स. ग्रं. सं. ठाणें.
निबंध
२७९

निबंधमाला

— विष्णु कृष्ण चिपळूणकर

REFBK-0001399

॥ श्री

निबंधमाळा.

लेखक

के० विष्णु कृष्ण चिपळूणकर.

नवी आवृत्ति.

REFBK-0001399

रा. रा. शंकर नरहर जोशी यांनीं ८१८ सदाशिव पेठ, शहर पुणें येथें आपल्या 'चित्रशाळा' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

सन १९१७.

किंमत ४ रुपये.

प्रस्तावनेदाखल दोन शब्द.



कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं **निबंधमाला** मासिक पुस्तक सन १८७४ च्या जानेवारीपासून सुरू केलें, व त्याचे एकंदर ८४ अंक काढून तें आपल्या हयातींतच बंद केलें. या अवधींत कै० विष्णुशास्त्री यांचेवर कोणकोणते प्रसंग आले व त्यांतून ते पार कसे पडले याचें वर्णन त्यांचे बंधु कै० लक्ष्मणराव चिपळूणकर यांनीं त्यांच्या चरित्रांत चांगलें लिहिलें आहे. तें वाचकांनीं अवश्य वाचून पहावें. निबंधमाला मासिक पुस्तक शास्त्रीबुवांनीं एकट्यानेंच चालविलें असून त्यांत प्रारंभीं निबंध, नंतर सुभाषितें, विनोदमहदाख्यायिका व निबंधांसंबंधींचा पत्रव्यवहार अशीं सदरें असत. यांपैकीं 'सुभाषितसंग्रह' आणि 'विनोदमहदाख्यायिका' हीं दोन वेगळीं पुस्तकरूपानें छापलेलीं आहेत. 'पत्रव्यवहार' मात्र आतां कोठें पहावयास मिळण्याचा संभव नाहीं.

मासिक रूपानें निबंधमाला छापल्यानंतर त्यांतील निबंधांच्या आणखी दोन आवृत्ति निघाल्या; एक आर्यभूषण छापखान्यानें छापलेली व दुसरी रा. कृ. बा. मांडे यांनीं छापलेली. याखेरीज निबंधमालेंतील कांहीं लेख व केसरी, शालापत्रक वगैरे इतर ठिकाणचे शास्त्रीबुवांचे कांहीं लेख रा. रा. खंडेराव भिकाजी बेलसरे यांनीं छापले होते, व 'आमच्या देशाची स्थिति' आणि 'इतिहास' हे दोन निबंध स्वतंत्रहि निघाले.

निबंधमालेची ही आवृत्ति छापण्याचें ठरलें तेव्हां चित्रशाळेच्या म्यानेजरांनीं या आवृत्तीचीं पक्कीं प्रुफें पहाण्याचें काम मजला सांगितलें व तें मीं पतकरलें. या कामाबद्दल चित्रशाळेचे मालकांकडून मला जो मोबदला मिळाला तोहि इतर ठिकाणीं असल्या कामाबद्दल मिळालेल्या मोबदल्याहून पुष्कळच चांगला मिळाला हें येथें आनंदानें नमूद केल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. असो. ही आवृत्ति छापण्याचें काम १९१५ च्या आगष्ट सप्टेंबरमध्यें जें सुरू झालें तें १९१७ च्या जूनमध्यें संपलें.

ही आवृत्ति छापण्याचे पूर्वी या आवृत्तीला कांहीं टीपा जोडाव्या असा चित्रशाळा छापखान्याचा मनोदय होता. परंतु दुर्दैवानें टीपा लिहिण्याचें काम एका अनधिकारी माणसानें आपण होऊनच आपल्या अंगावर घेऊन पहिलीं ६५ पानें आपल्या टीपांनीं खराब करून टाकलीं. *, †, ‡ इत्यादि खुणांपुढें लिहिलेला मजकूर हा या गृहस्थांचा होय. शेक्सपीयर इंग्रज नाटककार होता आणि जानसन इंग्रज कवि होता असली अगाध विद्वत्ता कोणाची, याबद्दल मीं पुष्कळ शोध चालविला आणि पुढील पानांकरित

काय टीपा लिहिल्या आहेत त्या वाचून पाहिल्या; त्या सर्व टीपा रद्द करून अखेरीस शास्त्रीबुवांनीं स्वतः लिहिलेल्या टीपांशिवाय दुसऱ्या कोणाच्याहि टीपा द्यावयाच्या नाहींत असें निक्षून सांगितल्यावर पुढें हा प्रकार बंद झाला. शास्त्रीबुवांच्या टीपांमागें १, २, ३ इत्यादि आंकडे आहेत. पहिल्या ६५ पानांत आलेल्या *, †, ‡ इत्यादि खुणांच्या टीपा वाचकांनीं खोडून टाकाव्या. वास्तविक एवढीं पानें पुन्हां छापावयास पाहिजे होतीं. पण ही गोष्ट आजच्या परिस्थितींत शक्य नाहीं हें कोण जाणीत नाहीं ?

निबंधमालेची ही कांहीं प्रस्तावना नव्हे. केवळ चित्रशाळेनें छापलेल्या या आवृत्तीच्या प्रस्तावनेदाखल हे दोन शब्द आहेत. ते अधिक किती असणार ?

पुणें, ता. १२ जून १९१७.

हरि रघुनाथ भागवत.

अनुक्रमणिका.

अंक.	विषय.	पृष्ठें
१	मराठी भाषेची सांप्रतची स्थिति.	१
२	प्रस्तुत मालेचा उद्देश.	१३
३,४	विद्वत्त्व आणि कवित्त्व.	२५
५	संपत्तीचा उपभोग.	४९
६–८	इतिहास.	६१
९	भाषादूषण.	१०८
१०	लेखनशुद्धि.	१२२
२६,२७	भाषापद्धति.	१३५
११	वाचन.	१७१
१२	भाषांतर.	१८३
१३,१४,१७	लोकभ्रम.	२११
१६	गर्व.	२५१
१८–२१,२३–२५	वक्तृत्व.	२७३
१५	ग्रंथांवर टीका.	३७९
२२	टेंपेस्ट नाटक.	४००
३१	वेदार्थयत्न.	४०६
३८	रसायनशास्त्र.	४२६
४२	संस्कृत ग्रंथ.	४३४
४४	मराठी पुस्तकें.	४५७
४९	काव्येतिहाससंग्रह.	४७७
५१	नवीन पुस्तकें.	४९२
६०	तारा नाटक.	५२७
२८–३०,३२	इंग्रेजी भाषा.	५७०
३३–३५,३७,३९–४१,४३	डाक्टर जानसन.	६५१
४५–४७,५२, ५४–५९,६२,६३	मोरोपंताची कविता.	७५८

६४–७१, ७३–७६	लोकहितवादी.	९५७
७७–८४	आमच्या देशाची स्थिति.	१०९५

निबंधमाला	वर्ष १लें.	२०३
”	२रें.	३७६
”	३रें.	६१७
”	४थें.	९०६
”	५वें.	
”	६वें.	९४५

॥ श्री ॥

नि बं ध मा ला.

मराठी भाषेची सांप्रतची* स्थिति.

तोयैरल्पैरपि करुणया भीमभानौ निदाघे
मालाकार ! व्यरचि भवता या तरोरस्य पुष्टिः ।
सा किं शक्या जनयितुमिह प्रावृषेण्येन वारां
धारासारानपि विकिरता विश्वतो वारिदेन ॥ जगन्नाथराय.

अंक १ ला.—(१) उपोद्घात, (२) प्रस्तुत विषयाचे दोन विभाग, (३) अलीकडील विद्वानांचें मराठी भाषेविषयीं मत, (४) तिची खरी योग्यता; सांप्रतचा ऱ्हास, व त्याचीं कारणें, (५) तिच्या अभिवृद्ध्यर्थ लोक उपाय सुचवितात ते—त्यांचें खंडन, (६) शंका—तिचें निवारण, (७ आपल्या भाषेची कठिण स्थिति, (८) तिच्या उत्कर्षाचे खरे उपाय, (९) संस्कृत भाषेचें उत्कृष्ट साहाय्य, (१०) उपसंहार, (११) भाषाभिवृद्धीची हल्लींची दशा, (१२) वर्तमानपत्रें, (१३) मासिक पुस्तकें, (१४) इतर ग्रंथ, (१५) ते चांगले न होण्याचीं कारणें.

१. हा विषय मोठा अगत्याचा आहे. सध्यांच्या वेळीं तर त्याविषयीं विचार करणें फारच जरूर आहे. कां कीं ही वेळ देशाच्या व भाषेच्या स्थित्यंतराची होय आजवर या दोहोंत जे फेरफार होत गेले ते सर्व मिळून त्यांची एकच अवस्था मानली असतां चिंता नाहीं. कारण दोहोंत जरी पुष्कळ उलथापालथी झाल्या, तरी यापुढें जें एकंदर अवस्थान्तर होण्याचा रंग दिसत आहे त्यापुढें ते कांहींच नाहींत ह्मटलें असतां चालेल. यास्तव या मोठ्या संधीस सुज्ञांनीं दोहोंच्या स्थितीकडे चांगलेंच लक्ष दिलें पाहिजे.

आतां एकंदर देशाचें अवस्थान्तर पुढील काळांत कोणत्या प्रकारचें होणार हा विषय प्रस्तुत निबंधाचा नव्हे. त्याविषयीं नुसत्या अटकळीहि बांधण्यास मोठमोठ्या इतिहासवेत्त्यांस सुद्धां पंचाईत पडेल यांत संशय नाहीं. तेव्हां सामान्य जनांनीं तेथपर्यंत न भरकटतां ईश्वराच्या दयालुत्वावर भरंवसा ठेवून स्वस्थ रहावें इतकीच गोष्ट. असो; पण भाषेची अभिवृद्धि ही देशाच्या उत्कर्षाचें एक मोठेंच साधन असून तें प्रयत्नाधीनहि बरेंच आहे. यास्तव त्यासंबंधेंच येथें विचार करूं.

---

* इ. स. १८७४.

२. मराठी भाषेचा इतिहास–म्हणजे ती कोणत्या भाषेपासून उत्पन्न झाली, केव्हां झाली, तींत पुढें कसकसे फेरफार होत गेले, वगैरे गहन गोष्टींचें निरूपण–येथें अप्रस्तुत होय. यास्तव त्याविषयीं येथें कांहीं न लिहितां सध्यां ती कोणत्या स्थितीस येऊन पोंचली आहे, व ती सुधारण्याची आशा आहे कीं नाहीं, याविषयीं मात्र जे विचार सुचतात ते वाचकांस कळवितों.

३. वरील दोन गोष्टींविषयीं आमच्या लोकांत प्रमुख म्हणविणारांचें बहुधा कायम मत केव्हांच ठरून गेलें आहेसें दिसतें. आह्मांस कित्येकांच्या तोंडून ऐकलेलें आठवतें कीं, मनांतील अभिप्राय खुबीदार रीतीनें स्पष्ट करण्यास मराठी अगदीं अप्रयोजक, तींत कांहीं जीव नाहीं. कित्येक शिक्षक इंग्रेजींतील अर्थ मराठींत समजून देतांना निरुपाय होऊन हात टेकतात; त्यांतून जे कोणी अंमळ चणचणीत असतात ते तर साफ सांगून जातात कीं, छे ! मराठी भाषेंत याचें भाषान्तरच होऊं शकत नाहीं, आपली भाषा फार भिकार पडली. अलीकडील विद्वानांनीं तर जुन्या शास्त्री लोकांवरहि चढ केली ! त्यांस देशभाषेचा विटाळहि सोसत नाहीं. दहा वीस वर्षांमागें शिकेलेल्या लोकांस मराठींत ग्रंथ लिहिण्याची बरीच हौस घाटत असे; पण आतां ती भाषा कोणास डोळ्यांसमोरहि नको ! आपले अमूल्य विचार प्रदर्शित करणें झालेंच तर इंग्लिश भाषेहून हलक्या द्वारानें ते लोकांच्या मनांत शिरकविणें त्यांस अगदीं आवडत नाहीं. पण सद्धर्मोपदेश करतांना अगर देशहिताबद्दल बोध करणें झाल्यास अस-ल्या अडाणी लोकांशीं जेव्हां गांठ पडतेच, तेव्हां त्यांस क्षणभर आपली योग्यता एकी-कडे ठेवावी लागते. तरी अशा प्रसंगीं सुद्धां आपली मानहानि त्यांस सर्वथा सहन होत नाहीं. प्रतिपादन करावयाचे गहन अर्थ कोत्या मराठी भाषेस झेपण्यास कठिण असें वाटून विलायती शिक्क्याचे नवे शब्द त्यांस पदोपदीं आपल्या भाषणांत आणावे लागतात. हे अमूल्य शब्द प्रचारांत कसे झपाट्यानें येत चालले आहेत, बहुतेकांचें त्याविषयीं मत कसें असतें, त्यांची उत्पत्ति कशापासून झाली आहे, वगैरे गोष्टींचें यथास्थित विवरण करणें या स्थलीं अशक्य आहे. पुढें प्रसंगानुसार एकाद्या निबंधांत त्याविषयीं विचार करूं.

४. पण आपल्या भाषेची वरच्याप्रमाणें विटंबना व अवहेलना करण्याचें आह्मांस अगदीं प्रयोजन दिसत नाहीं. जी भाषा बोलणाऱ्यांनीं दिल्लीअटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, जींत तुकारामरामदासांसारख्या भगवत्परायण साधूंनीं आपले श्रुतिवेद्य अर्थ ग्रथित केले, जींस मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादि कवींनीं आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीनें संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश, गांभीर्य व सरसता या गुणांकरितां कोणत्याहि अन्य भाषेच्या तोंडाकडे बघण्याची खास गरज नाहीं अशी आमची खात्री आहे ! हें मत कोणास उगीच फुशारकीचें वाटूं नये म्हणून

सर्वांस खात्रीनें कळवितों कीं, ज्या कोणास आपल्या भाषेची खरी योग्यता जाणण्याची इच्छा असेल त्यानें मोलस्वर्थ* व क्यांडी† यांच्या कोशांतिल प्रस्तावना वाचून पहाव्या. विशेषतः मोलस्वर्थकृत कोश तर शुद्ध मराठी भाषेचें मार्मिक ज्ञान आपणास होऊं इच्छिणारास फारच उपयोगाचा आहे. तो मोठ्या परिश्रमानें व मोठ्या आस्थेनें तयार केला असून आपल्या भाषेचें विचित्र शब्दभांडार त्यांत समग्र भरलें आहे.–साधारण मताहून इतकें भिन्न मत त्यांचें कां बरें झालें ? अर्थात् एवढ्याचकरितां कीं, कोश रचण्याच्या अचाट कामांत त्यांस सगळी भाषा धुंडाळणें अवश्य पडून तींतील सर्व गुण त्यांस स्पष्ट दिसून आले. पण मोलस्वर्थसारख्यांचें मत कसेंहि असलें तरी तें त्यांचें कोशांतल्या कोशांत. तें वाचून कोणीं पहावें ? किंवा आमच्या भाषेविषयीं आमचें मत असेल तेंच खरें, त्यांत साहेब कोण मत देणार ? असो; याप्रमाणें स्वभाषेच्या लज्जास्पद अज्ञानास्तव व दुरभिमानास्तव आजपर्यंत मराठी भाषेची फारच हयगय होत गेली. व ज्यांनीं तिच्या अभिवृद्धयर्थ निरंतर उत्साहानें झटावें, त्यांच्यांत सुस्ती, कृतकृत्यताबुद्धि, पंडितंमन्यता, वगैरे दोष अखंड वसल्यामुळें तिची मोठीच हानि होऊन ती क्षयाच्याच पंथास दिवसेंदिवस लागत चालली आहे.

५. या भावी अनर्थाच्या परिहारार्थ कित्येक जे उपाय सुचवितात ते मोठे मौजेचे आहेत. कोणी म्हणतात, युनिवर्सिटीच्या वरच्या परीक्षांत मराठी भाषा पुनः घालावी; मात्रिक्युलेशन परीक्षेस मराठी भाषा आवश्यक करावी. –युनिवर्सिटी स्थापन झाल्यापासून पहिलीं आठ दहा वर्षें वरील दोन्ही प्रकार चालू नव्हते काय ? बरें, मग तितक्या काळांत मराठी भाषेचें कोणतें मोठें हित झालें ? आपला ज्ञानौघ किती ग्रंथकारांनीं तींत ओतला ? पण इतकेंचसें काय ? आज वीस बावीस वर्षें दक्षिणाप्रैज ‡ कमिटी मराठी भाषेच्या हितकर्त्यांस माळ घालण्यास सतत तत्परतेनें उभी नाहीं काय ? मग तिच्या सत्कृतीचा आदर करण्यास असे कोण आले, कीं ज्यांच्या बुद्धीस तिच्या कृपाकटाक्षाशिवाय स्फूर्तिच न होती ? युनिवर्सिटीचे किताबवाले तिच्या भजकांत किती सांपडतील ?

---

* हे मिशनरी असून यांनीं स्वतः हौसेनें इंग्रजी–मराठी कोश तयार केला आहे.

† मेजर क्यांडी हे प्रथम मिलीटरी खात्यांत नोकर असून पुढें शाळाखात्यांत विश्रामबागचे पाठशाळेंत हेडमास्तर होते. यांनीं इंग्रजी–मराठी कोश तयार केला आहे.

‡ पूर्वी पेशवाईत ब्राह्मणांस दक्षिणा देत असत; पेशवाई बुडाल्यावर त्या दक्षिणेचा विनियोग सरकारानें डेक्कन कालेज स्थापण्यांत व मराठी भाषेंत उत्तम ग्रंथ लिहिणारांस बक्षीसें देण्याकडे केला. ग्रंथ तपासणाऱ्या कमिटीचें नांव दक्षिणाप्राइझ कमिटी असें होतें. कांहीं काळानें ग्रंथकारांना बक्षीस देण्याची ही रक्कम सरकारानें एम्. ए. चा अभ्यास करणाऱ्या पंचवीस विद्यार्थ्यांना प्रत्येकीं दरमहा ५० रुपये प्रमाणें देण्याचें ठरविलें, व ग्रंथांकीरतां डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी नांवाची नवीन संस्था काढवून तिला फक्त दरसाल एक हजार रुपये ग्रांट चालू केली.

२. मराठी भाषेचा इतिहास–ह्मणजे ती कोणत्या भाषेपासून उत्पन्न झाली, केव्हां झाली, तींत पुढें कसकसे फेरफार होत गेले, वगैरे गहन गोष्टींचें निरूपण–येथें अप्रस्तुत होय. यास्तव त्याविषयीं येथें कांहीं न लिहितां सध्यां ती कोणत्या स्थितीस येऊन पोंचली आहे, व ती सुधारण्याची आशा आहे कीं नाहीं, याविषयीं मात्र जे विचार सुचतात ते वाचकांस कळवितों.

३. वरील दोन गोष्टींविषयीं आमच्या लोकांत प्रमुख ह्मणविणारांचें बहुधा कायम मत केव्हांच ठरून गेलें आहेसें दिसतें. आह्मांस कित्येकांच्या तोंडून ऐकलेलें आठवतें कीं, मनांतील अभिप्राय खुबीदार रीतीनें स्पष्ट करण्यास मराठी अगदीं अप्रयोजक, तींत कांहीं जीव नाहीं. कित्येक शिक्षक इंग्रेजींतील अर्थ मराठींत समजून देतांना निरुपाय होऊन हात टेकतात; त्यांतून जे कोणी अंमळ चणचणीत असतात ते तर साफ सांगून जातात कीं, छे ! मराठी भाषेंत याचें भाषान्तरच होऊं शकत नाहीं, आपली भाषा फार भिकार पडली. अलीकडील विद्वानांनीं तर जुन्या शास्त्री लोकांवरहि चढ केली ! त्यांस देशभाषेचा विटाळहि सोसत नाहीं. दहा वीस वर्षांमागें शिकेलेल्या लोकांस मराठींत ग्रंथ लिहिण्याची बरीच हौस घाटत असे; पण आतां ती भाषा कोणास डोळ्यांसमोरहि नको ! आपले अमूल्य विचार प्रदर्शित करणें झालेंच तर इंग्लिश भाषेहून हलक्या द्वारानें ते लोकांच्या मनांत शिरकविणें त्यांस अगदीं आवडत नाहीं. पण सद्धर्मोपदेश करतांना अगर देशहिताबद्दल बोध करणें झाल्यास असल्या अडाणी लोकांशीं जेव्हां गांठ पडतेच, तेव्हां त्यांस क्षणभर आपली योग्यता एकीकडे ठेवावी लागते. तरी अशा प्रसंगीं सुद्धां आपली मानहानि त्यांस सर्वथा सहन होत नाहीं. प्रतिपादन करावयाचे गहन अर्थ कोत्या मराठी भाषेस झेपण्यास कठिण असें वाटून विलायती शिक्क्याचे नवे शब्द त्यांस पदोपदीं आपल्या भाषणांत आणावे लागतात. हे अमूल्य शब्द प्रचारांत कसे झपाट्यानें येत चालले आहेत, बहुतेकांचें त्याविषयीं मत कसें असतें, त्यांची उत्पत्ति कशापासून झाली आहे, वगैरे गोष्टींचें यथास्थित विवरण करणें या स्थलीं अशक्य आहे. पुढें प्रसंगानुसार एकाद्या निबंधांत त्याविषयीं विचार करूं.

४. पण आपल्या भाषेची वरच्याप्रमाणें विटंबना व अवहेलना करण्याचें आह्मांस अगदीं प्रयोजन दिसत नाहीं. जी भाषा बोलणाऱ्यांनीं दिल्लीअटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, जींत तुकारामरामदासांसारख्या भगवत्परायण साधूंनीं आपले श्रुतिवंद्य अर्थ ग्रथित केले, जींस मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादि कवींनीं आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीनें संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश, गांभीर्य व सरसता या गुणांकरितां कोणत्याहि अन्य भाषेच्या तोंडाकडे बघण्याची खास गरज नाहीं अशी आमची खात्री आहे ! हें मत कोणास उगीच फुशारकीचें वाटूं नये ह्मणून

सर्वांस खात्रीनें कळवितों कीं, ज्या कोणास आपल्या भाषेची खरी योग्यता जाणण्याची इच्छा असेल त्यानें मोलस्वर्थ* व क्यांडी† यांच्या कोशांतील प्रस्तावना वाचून पहाव्या. विशेषतः मोलस्वर्थकृत कोश तर शुद्ध मराठी भाषेचें मार्मिक ज्ञान आपणास होऊं इच्छिणारास फारच उपयोगाचा आहे. तो मोठ्या परिश्रमानें व मोठ्या आस्थेनें तयार केला असून आपल्या भाषेचें विचित्र शब्दभांडार त्यांत समग्र भरलें आहे.—साधारण मताहून इतकें भिन्न मत त्यांचें कां बरें झालें ? अर्थात् एवढ्याचकरितां कीं, कोश रचण्याच्या अचाट कामांत त्यांस सगळी भाषा धुंडाळणें अवश्य पडून तींतील सर्व गुण त्यांस स्पष्ट दिसून आले. पण मोलस्वर्थसारख्यांचें मत कसेंहि असलें तरी तें त्यांचें कोशांतल्या कोशांत. तें वाचून कोणीं पहावें ? किंवा आमच्या भाषेविषयीं आमचें मत असेल तेंच खरें, त्यांत साहेब कोण मत देणार ? असो; याप्रमाणें स्वभाषेच्या लज्जास्पद अज्ञानास्तव व दुरभिमानास्तव आजपर्यंत मराठी भाषेची फारच हयगय होत गेली. व ज्यांनीं तिच्या अभिवृद्धयर्थ निरंतर उत्साहानें झटावें, त्यांच्यांत सुस्ती, कृतकृत्यताबुद्धि, पंडितंमन्यता, वगैरे दोष अखंड वसल्यामुळें तिची मोठीच हानि होऊन ती क्षयाच्याच पंथास दिवसेंदिवस लागत चालली आहे.

५. या भावी अनर्थाच्या परिहारार्थ कित्येक जे उपाय सुचवितात ते मोठे मौजेचे आहेत. कोणी ह्मणतात, युनिवर्सिटीच्या वरच्या परीक्षांत मराठी भाषा पुनः घालावी; मात्रिक्युलेशन परीक्षेस मराठी भाषा आवश्यक करावी.—युनिवर्सिटी स्थापन झाल्यापासून पहिलीं आठ दहा वर्षें वरील दोन्ही प्रकार चालू नव्हते काय ? बरें, मग तितक्या काळांत मराठी भाषेचें कोणतें मोठें हित झालें ? आपला ज्ञानौघ किती ग्रंथकारांनीं तींत ओतला ? पण इतकेंचसें काय ? आज वीस बावीस वर्षें दक्षिणाप्रैज‡ कमिटी मराठी भाषेच्या हितकर्त्यांस माळ घालण्यास सतत तत्परतेनें उभी नाहीं काय ? मग तिच्या सत्कृतीचा आदर करण्यास असे कोण आले, कीं ज्यांच्या बुद्धीस तिच्या कृपाकटाक्षाशिवाय स्फूर्तीच न होती ? युनिवर्सिटीचे किताबवाले तिच्या भजकांत किती सांपडतील ?

---

* हे मिशनरी असून यांनीं स्वतः हौसेनें इंग्रजी—मराठी कोश तयार केला आहे.

† मेजर क्यांडी हे प्रथम मिलीटरी खात्यांत नोकर असून पुढें शाळाखात्यांत विश्रामबागचे पाठशाळेंत हेडमास्तर होते. यांनीं इंग्रजी—मराठी कोश तयार केला आहे.

‡ पूर्वी पेशवाईत ब्राह्मणांस दक्षिणा देत असत; पेशवाई बुडाल्यावर त्या दक्षिणेचा विनियोग सरकारानें डेक्कन कालेज स्थापण्यांत व मराठी भाषेंत उत्तम ग्रंथ लिहिणारांस बक्षीसें देण्याकडे केला. ग्रंथ तपासणाऱ्या कमिटीचें नांव दक्षिणाप्राइझ कमिटी असें होतें. कांहीं काळानें ग्रंथकारांना बक्षीस देण्याची ही रक्कम सरकारानें एम्. ए. चा अभ्यास करणाऱ्या पंचवीस विद्यार्थ्यांना प्रत्येकीं दरमहा ५० रुपये प्रमाणें देण्याचें ठरविलें, व ग्रंथांकरितां डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी नांवाची नवीन संस्था काढवून तिला फक्त दरसाल एक हजार रुपये ग्रांट चालू केली.

अशा जबरदस्तीच्या उपायांचे पुरस्कर्ते जर क्षणभर विचार करतील तर त्यांस खचित कळून येईल कीं, जगांतील कित्येक भाषांस जी अभियुक्तता आली ती अशा बळजबरीनें व लालचीनें आली नाहीं! कोणत्याही कामांत मनुष्य जो नांवालौकिकास चढतो तो वरच्यासारख्या कृत्रिम उपायांनीं कधींहि चढत नाहीं; तसें होण्यास मूळचा अंकुरच पाहिजे. दुसरे कोणी ह्मणतात कीं, कोडतांतूनहि मराठी भाषा काढण्याचा सरकार यत्न चालवीत आहे हें अगदीं गैर आहे. तीस तेथें थारा अवश्य असावा. –वकीलांच्या अर्ध्यावोबड्या वक्तृत्वानें,–त्यांच्या 'आक्टा'नें, 'च्यार्ज्या'नें, कैदीस 'संशयाचा फायदा' दिल्यानें–जर महाराष्ट्र भाषेची अभिवृद्धि होणार, तर तिचे खांब ह्मणून सुतारांनीं, शिंप्यांनींहि कां पुढें होऊं नये हें आह्मांस समजत नाहीं.! असो; वरील आक्षेप आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् फार असमंजस वाटून ते आह्मांस उलट विचारतील कीं, तर मग मराठी भाषा बुडूं न देण्यास तजवीज तरी कोणती? या प्रश्नावर आमचें उत्तर एवढेंच आहे कीं, हल्लींची स्वभाषेविषयीं उपेक्षाबुद्धि जोंपर्यंत लोकांच्या मनांत अशीच राहील तोंपर्यंत कोणत्याहि उपायास लवमात्रहि यश येणार नाहीं; पण जर कांहीं कारणानें ती कमी होत जाऊन नाहींशी झाली, तर वरील उपायांपैकीं एकाची सुद्धां बिलकूल गरज लागणार नाहीं. वरील दीर्घ प्रयत्न ह्मणजे क्षयरोगी माणसास बळेंच चालवून त्याच्या अंगीं शक्ति आणवूं पहाण्यासारखे आहेत. यास्तव ते केवळ व्यर्थ असून विशेष क्लेशकारक मात्र होत. पण जर ईश्वरी कृपेनें रोग्याच्या रोगाच्या मूळावर औषध पोंचलें, तर त्याच्या अवयवांस आलेली ग्लानि दूर करण्यास जसा यत्किंचित्हि प्रयत्न नको; तद्वतच परभाषादूषणरूप जें क्षयाचें बीज आपल्या भाषेस लागून दिवसेंदिवस तीस खिळूं पहात आहे, तें जर का एकदां दूर होईल, व विद्वानांची तिजकडे प्रवृत्ति होईल, तर तिच्या अभिवृद्धीस आरंभ झाला ह्मणून समजावें. पण हें जर होणार नाहीं, तर तिचा लय जितका लवकर होईल तितका बराच!

६. या ठिकाणीं आमच्या वाचणारांस एक मोठीच शंका येईल; तिचें निवारण केलें पाहिजे. ते विचारतील कीं, मराठींत मागेंहि दोन परभाषा–फारशी व आरबी–पुष्कळच मिसळल्या होत्या, मग आतां इंग्रेजीचेंच एवढें भय कसचें? ही शंका सकृद्दर्शनीं खरी वाटते; पण अंमळसा बारीक विचार केला तर ती अगदीं शुष्क दिसेल. त्या परकी भाषांचा संबंध मराठीशीं ज्या प्रकारचा होता त्याहून इंग्रेजीचा संबंध फारच निराळा आहे. त्यांपैकीं आरबीचा संबंध तर दक्षिणेकडे मुसलमानांचेंच जोंपर्यंत प्राबल्य होतें तोंपर्यंतच असून आतां मुळींच नाहींसा झाला आहे; सध्यां जे कांहीं आरबी शब्द आढळतात, ते फारशी भाषेच्या द्वारेंच आले असावे असें वाटतें. तसाच या दुसऱ्या भाषेचाहि संबंध पेशव्यांच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंतच असून तेव्हांपासून नाहींसा झाला आहे. यास्तव चालू मराठी भाषेंतून जुने परकी शब्द गेल्या पन्नास

वर्षांत शेंकडों निघून जाऊन कांहीं वर्षांनीं तर ते अंाणखीहि कमी होतील असें दिसतें. पेशव्यांच्या राज्यांत दप्तर फारशी भाषेंत ठेवीत असल्यानें व ब्राह्मण लोक पुष्कळ त्यांतच चाकरीस रहात यास्तव, त्या भाषेचे शब्द प्रचारांत पुष्कळ येऊं लागले. पण त्या वेळचे लोक फारशी ज्या रीतीनें शिकत तीपेक्षां आतांची इंग्रेजी शिकण्याची तऱ्हा फार वेगळी आहे. त्यांचा ती परभाषा शिकण्याचा उद्देश केवळ व्यावहारिक होता,—ह्मणजे सरकारी काम बजावतां येण्यापुरतीच ती शिकत. सध्यांच्या लोकांत इंग्रेजांतील अनेक ग्रंथांत निष्णात झालेले विद्वान् जसे शेंकडों सांपडतील तसे त्या वेळेस अगोदर कोणी असलेच तर फार असतीलसें वाटत नाहीं. बहुतेक तर आतां जशी हिंदुस्थानी भाषा लोक शिकतात त्याप्रमाणेंच सरासरी बोलण्याचालण्यापुरतीच केवळ शिकत असतील असें दिसतें[1]. तेव्हां अशा प्रकारें परभाषांचा संबंध कितीहि काळ जरी असला, तरी त्यापासून चालू देशभाषेस भीतीचें कांहींच कारण नाहीं हें उघड आहे.

पण इंग्लिश भाषेची गोष्ट तशी आहे काय ? या भाषेचें सामान्य ज्ञान तर आतांशा बहुधा प्रत्येक मनुष्यास जरूर झालें आहे. दिवसेंदिवस तर तींत निपुण होणें हा जीवनाचाच एक उपाय होऊं पहात आहे. चोहोंकडे प्रतिष्ठा मिरविण्याचें तर यासारखें सध्यां दुसरें साधनच नाहीं. तेव्हां तिचा जो हल्लीं फैलावा झाला आहे, व होत चालला आहे, त्यापुढें वर सांगितलेल्या भाषांची गोष्ट काय बोलावी ? इंग्लिश लोक आपल्या उत्कृष्ट भाषेचा साऱ्या भूमंडळावर प्रसार होत चालला आहे याचा अतिशयित गर्व बहातात, व तो त्यांचा गर्व यथार्थ आहे. आमच्या नुसत्या हिंदुस्थानांतच पाहिलें तर आमच्या तरुण विद्वानांस तिनें इतकें वेडावून टाकलें आहे कीं, त्यांस आपल्या आईबापांशीं बायकांशीं, बहिणींशीं, चाकरांशीं सुद्धां शुद्ध व सरळ बोलण्याची मारामार पडते ! मग ग्रंथांतील भाषेविषयीं तर काय सांगावें ! त्यांच्या मनाचा जो व्यापार चालतो तो सारा इंग्रेजी भाषेंत; तेव्हां देशभाषेंत बोलणें किंवा लिहिणें झाल्यास तें भाषान्तर होऊन निघायचें ! असो; तर या सर्व गोष्टींचा क्षणभर विचार केला असतां सहज ध्यानांत येईल कीं, मुसलमानांच्या सहवासानें आपल्या पेहेरावांत जितकी तफावत पडली तितकीच भाषेंतहि पडली. ह्मणजे मूळची साधी रीत जी दोनच वस्त्रें वापरण्याची ती जाऊन तीहून डौलाचा जो सध्यांचा आंगरखा, पागोटें, उपवस्त्र हा पोषाक जसा त्या लोकांपासून आपण उचलला, त्याप्रमाणेंच त्यांच्या भाषेंतून आपल्या भाषेंत कांहीं शब्द येऊन व तींस नवें वळण लागून तींत झोंकदारपणा व आवेश हे गुण मात्र जास्त आले. तेव्हां त्या भाषेच्या मिसळण्यानें आपल्या भाषेचें अहित न होतां हितच झालें, यांत संशय

१ हा तर्क आह्मी यावरून करितों कीं, मराठींत जे अजून शेंकडों फारशी व अरबी शब्द आहेत त्यांचे या भाषेंत कांहीं विलक्षण अर्थ होऊन गेले आहेत ! मोलस्वर्थकृत मराठी कोशांत अशा शब्दांचे मूळचे व अपभ्रंश अर्थ दिलेले आहेत, ते पहावे.

नाहीं. पण इंग्लिश भाषेचा प्रचार हाच आतां सार्वत्रिक होऊन मूळच्या भाषेचा लोप होऊं पहात आहे. कारण विचार, कल्पना यांची उत्पत्ति ज्या मनापासून तेंच इंग्रेजी बनल्यावर मूळच्या भाषेची प्रधानता कोठें राहिली ? अर्थात्च नाहीं; तीस सर्व प्रकारें गौणत्व येऊन इंग्रेजी जिकडे नेईल तिकडे जाणें तीस प्राप्त झालें.

७. वरील उपपादनावरून सर्वांच्या ध्यानांत सहज येईल कीं, सध्यां मराठी भाषा मोठ्या कचाटींत सांपडली आहे. इंग्रेजीसारख्या प्रबल परभाषेचा तिजवर अगदीं पगडा बसून तिचें स्वत्व ह्मणजे निराळेपणा नष्ट होण्याच्या बेतांत आहे. तेव्हां अजून जोंवर हें संकट अनिवार्य झालें नाहीं तोंवरच तिच्या कैवाऱ्यांस कंबर बांधण्याचा अवकाश आहे !

८. याप्रमाणें आपल्या भाषेच्या सध्यांच्या स्थितीविषयीं थोडेंबहुत निरूपण झालें. आतां तिचा उत्कर्ष होण्याची आशा आहे कीं नाहीं, याविषयीं आह्मांस जें वाटतें तें वाचकांस सादर करितों.

वरच्या आमच्या लिहिण्यावरून सुज्ञ वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं इंग्रेजी विद्येचा जो एवढा फैलावा आपल्या लोकांत हल्लीं झाला आहे, व होत चालला आहे, तो आह्मांस अनिष्टसा वाटतो असें नाहीं तर त्याच्या योगानें त्या परभाषेचें वर्चस्व जें आपल्या मराठीवर होत चाललें आहे त्यापासून होणारा अनर्थ आह्मीं वाचकांस दाखविला. पण इतकेंच नव्हे. हा अनर्थ होतां होतां एवढा भयंकर होणार आहे कीं, शेवटीं त्याचें अनर्थत्वच नाहींसें होऊन आपल्या भाषेस इंग्रेजी विद्येपासून व भाषेपासून लाभ झाला या शब्दांतच कांहीं अर्थ रहाणार नाहीं. कारण जर सध्यांप्रमाणें इंग्रेजी शब्दांची व रचनेची आपल्या भाषेंत सतत भेसळ होत गेली—आणि जर कांहीं प्रतिबंधक कारण न झालें तर असेंच होणार हें कोणीहि सांगेल—तर तिचें रूप पालटतां पालटतां असें होईल कीं, ती इंग्रेजीपासून निवडतां येणार नाहीं; व तिच्या मूळच्या रूपाचा मागमूसहि रहाणार नाहीं. मग असें झाल्यावर 'आपल्या भाषेस असे असे लाभ झाले' असें ह्मणतांना 'आपल्या' या शब्दांत कांहीं अर्थ राहिला काय ? तसेंच मराठीस वर सांगितलेली सरूपतामुक्तिच मिळाल्यावर तिचा आधींचा देह कोठें राहिला ? व ह्मणूनच मग अनर्थ तरी कसचा ? यास्तव मोक्षमुल्लरसाहेबांनीं आपल्या देशांतील लोकांस जो धर्माच्या बाबतींत उपदेश केला आहे, तोच आह्मी एतद्देशीय भाषांविषयीं त्यांस करतों. ह्मणजे जर आपण सर्व इंग्रेज व ख्रिस्ती बनलों, तर आपला आपलेपणा अर्थात्च समूळ विनष्ट झाला; मग आमच्या देशाचें आह्मीं पुनरुज्जीवन केलें हे शब्द सहजच विगतार्थ झाले ! त्याप्रमाणेंच जर मराठी भाषा होतां होतां इंग्रेजीच बनली तर आपल्या लोकांचा तींत ग्रंथ लिहिल्याचा आटाट सर्व केवळ व्यर्थ झालासें होईल ! यास्तव मराठींत इंग्रेजीची भेसळ होऊं देणें हें आपणांस लज्जास्पद आहे इतकेंच नव्हे, तर त्याच्या योगानें आपल्या सर्व प्रयत्नांचा शेवटीं विघातहि

होणार आहे.

इंग्लिश भाषेचा आह्मी द्वेष करीत नाहीं हें तर काय, पण आपल्या मराठीच्या उत्कर्षास ती मोठेंच साधन होईल अशी आमची खात्री आहे. सर्व जगांतील ज्ञानभांडार तींत सांठवलें असल्यामुळें तिचें साहाय्य मराठीसारख्या परिपक्व होऊं पहाणाऱ्या भाषेस जितकें होईल तितकें थोडें आहे! इतकेंच मात्र कीं, तें ज्ञानभांडार खुद्द आपलेंसें करून घेण्यास आपल्या भाषेचें स्वत्व ह्मणजे निराळेपण कायम राखलें पाहिजे. ज्याप्रमाणें तेच रस शरीरास हितावह होत, कीं जे शरीरप्रकृतीस मानवून जीवतत्वास ढका लावणार नाहींत; त्याचप्रमाणें जे भाषांतरादि ग्रंथ भाषेच्या सरणीस अगदीं बरोबर उतरून तिच्या रचनेस यत्किंचित्हि अपाय न करतील तेच मात्र तीस वर्धक होतील. एरवींच्यांनीं जी तिची वृद्धि होईल ती केवळ वातमूलक स्थौल्याप्रमाणें होय. तिच्या योगानें तीस दुरून दिसण्यापुरती बळकटी आलीशी वाटेल खरी, पण वस्तुतः पहाणारापुढें तिच्या अंगीं आलेली क्षीणता क्षणमात्रहि झांकली जाणार नाहीं. तर मराठी भाषेच्या हितकर्त्या विद्वानांनीं हें पक्कें लक्षांत बागवावें कीं, इंग्रेजींतील केवळ अर्थ मात्र घेऊन त्यास शुद्ध मराठीच्या सांच्यांत त्यांनीं ओतलें पाहिजे. अशा तऱ्हेचे ग्रंथ बनले असतां ते भाषेस फारच हितावह होऊन भूषणप्रद होतील.

९. आपल्या भाषेस दुसरी उत्कृष्ट सोय ही आहे कीं, तीस प्रसंगानुरोधानें प्रौढता देण्यास व शास्त्रपरिभाषेचे शब्द नवे बनवण्यास संस्कृत भाषेचें साहित्य तीस अनुकूल आहे. कित्येक शास्त्रें अगोदर संस्कृतांतच असल्यामुळें त्यांची परिभाषा तर ठरलीच आहे. पण दुसरीं जीं अनेक अलीकडे युरोपियन लोकांनीं काढलीं आहेत त्यांवरहि ग्रंथ लिहिण्यास मराठींत कांहींच अडचण पडणार नाहीं. हीं उत्तम सोय नसती तर 'मेडिटरेनियन', 'आट्मसफीयर', 'रिफ्रॅक्शन्', असे कर्णकटु अडाणी शब्द मराठींत घेणें भाग पडतें; व 'भूमध्यसमुद्र', 'वातावरण', 'वक्रीभवन', अशा मूळच्या इंग्रेजी शब्दांसहि प्रौढतेंत व वर्णसौंदर्यांत लाजविणाऱ्या शब्दांस आपण अंतरलों असतों. शिवाय संस्कृत भाषेंत काव्यादि ग्रंथांचा भरणाहि पुष्कळ असल्यामुळें तिचेंहि साहाय्य वरच्या इंग्रेजीप्रमाणें आपल्या भाषेस पुष्कळच होणार आहे. मराठींत प्रवीण होऊं पहाणारास निदान काव्यव्युत्पत्तीपुरतें तरी संस्कृत भाषेचें ज्ञान अवश्यमेव हवेंच; कारण दोहोंचा संबंध निकट असल्यामुळें मूळच्या भाषेशिवाय चालू भाषेचें ज्ञान पुरतेपणीं होणें कठिण आहे. आतां इंग्रेजींत व संस्कृतांत मराठी भाषेच्या उत्कर्षास कारणभूत होण्याच्या संबंधानें एक मात्र मोठा भेद आहे. तो अर्थात् हाच कीं, पहिली सर्व प्रकारें परभाषा पडल्यानें तिच्या धर्तीवर जाणें जसें तीस अत्यंत दूषणाई होणार आहे, तसें ती दुसरीच्या पद्धतीवर पडली असतां केवळ तितकें होणार नाहीं.

१०. याप्रमाणें आपल्या भाषेची अभिवृद्धि होण्यास एकीकडून संस्कृत व एकीकडून इंग्रेजी अशा दोहोंचा आधार तीस बळकट सांपडला पाहिजे. तशीच तिसरी गोष्ट ही आहे कीं, ती सांप्रत जितपत स्थितींस येऊन पोंचली आहे तीहि तिची वृद्धि होण्यास पुष्कळ अनुकूल आहे. सध्यां जर ती केवळ अडाणी अवस्थेंतच असती, तर इंग्लिश व संस्कृत अशा प्रौढ भाषांपासूनहि तीस कांहींएक नफा न होता. पण दैवयोगानें अनेक कारणांस्तव ती आधींच पुष्कळ नांवारूपास आली आहे. यास्तव अशा स्थितींतहि तिची हेळसांड केली असतां आपणांवर फारच दोष येईल यांत संशय नाहीं !

११. आतां आपल्या भाषेच्या वृद्धयर्थ अलीकडे कितपत उद्योग झाला व सध्यां कितपत चालू आहे याविषयीं कांहीं लिहून प्रस्तुत विषय पुरा करितों.

गेल्या पन्नास वर्षांत सरकारानें विद्यावृद्धयर्थ किती खटपट केली ती सर्वांस माहीत आहेच; तीविषयीं येथें सविस्तर लिहिणें नको. कोश व व्याकरण या दोहोंशिवाय भाषेस ठरीवपणा येत नाहीं, यास्तव सरकारानें पहिल्यानें तीं तयार करवून भाषेच्या उत्कर्षास प्रथम पाया घातला. पुढें हळू हळू गद्यग्रंथांची प्रवृत्ति पडून ते वाढविण्याकरितां सरकारानें कित्येक उत्तेजनाचे उपाय करून ठेविले. ते अजूनहि चालू आहेत. या सर्व स्तुत्य प्रयत्नांस बरेंच यशहि आलें; व लोकांत समजूत व उपयुक्त ज्ञान यांचा बराच प्रसार झाला. पण अलीकडे आठ दहा वर्षांत इंग्रेजीचा अभ्यास मनस्वी होत गेल्यानें एका मोठ्या अनिष्टास आरंभ झाला. तें अर्थातच भाषेचें दूषण होय. या दूषणाचा प्रसार निष्प्रतिबंध सतत चालल्यानें सध्यांच कितपत अनर्थ झाला आहे, व पुढें कोठपर्यंत पोंचणार, याविषयीं निबंधारंभीं आह्मीं लिहिलेंच आहे. असो; सध्यांच्या काळींहि मराठीच्या तर्फेनें बराच उद्योग चालला आहे. एक पत्र व पुस्तक–कर्त्यांचा; आणि दुसरा स्वतंत्र ग्रंथकारांचा. या दोहोंच्याहि संबंधें अनुक्रमें विचार करूं.

१२. पहिल्यानें वर्तमानपत्रें. हीं आतांशा चोहोंकडे निघूं लागून पुष्कळ झालीं आहेत. हेंच आपल्या लोकांत विद्या अतोनात झाल्याचें एक मोठें चिन्ह होय असा पुष्कळांचा समज आहे. पण आह्मांस तसें वाटत नाहीं. सध्यां जो उठला तो इंग्रेजी शिकूं लागतो हें जितपत विद्याभिरुचीचें चिन्ह होय, किंवा किरकोळ जिनसांच्या विक्रींचीं पुष्कळ दुकानें या शहरांत नवीं झालेलीं दृष्टीस पडतात हें जितपत त्यांतील संपत्ति वाढल्याचें दर्शक होय, तितपतच वरील फैलावा विद्यावृद्धीचा सूचक होय असें आह्मांस वाटतें. हीं इतकीं वाढल्याचें कारण साधारण ज्ञान लोकांत बरेंच वाढलें, हें एक आहे खरें; पण दुसरें मोठें कारण आह्मांस हें वाटतें कीं, एकानें केलें ह्मणजे दुसऱ्यानें करूं लागावें हा कच्चा समजुतीचा प्रकार. या अल्प समजुतीचीं दुसरींहि

उदाहरणें दृष्टीस पडतात. जिकडे तिकडे वक्तृत्वोत्तेजक सभा, पुस्तकालयें, वगैरेंची स्थापना; 'मुक्तमाले' च्या धाटणीवर केलेल्या शेंकडों पानचट गोष्टी, 'परशियन नैट्स,' 'नेटीव नैट्स,' 'सवाईमाधवरावावर नाटक,' इत्यादि सर्व उक्त अनुकरणेच्छेचीं उदाहरणें होत. असो; आतां हें खरें कीं, ही अनुकरणेच्छा मनुष्यमात्रास स्वाभाविक आहे; पण आपली योग्यता, शक्ति वगैरे न जाणून केवळ दुसऱ्याचें पाहूनच करण्याची जी बुद्धि ती मनाच्या पराधीनत्वाची व कोतेपणाचीच दर्शक होय यांत संशय नाहीं. असो; पण सांप्रतकाळीं वर्तमानपत्रांचा सुकाळ होण्याचीं कशींहि कारणें असलीं तरी त्यांपासून आपल्या भाषेला पुष्कळ उपयोग होण्यास तीं साधनें झालीं आहेत ही आमची खात्री आहे. सुमारें आठ दहा वर्षांपूर्वी उत्कृष्ट पत्रें जितपत चालत होतीं तितपत आतां अगदीं सामान्य प्रतीचीं आहेत तीं चालतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. कित्येक तर मोठ्याच योग्यतेस चढलीं आहेत, हेंहि येथें लिहिण्यास आह्मांस आनंद वाटतो. आतां त्यांतील मराठी भाषा नेहमीं शुद्धच असते असें नाहीं, पूर्वोक्त दूषितत्वाचा प्रकार त्यांत नजरेस येतो हें खरें आहे; पण यासंबंधेंहि त्यांत सुधारणा होत चालली आहे, व कांहीं काळानें पुष्कळ होईल असा आह्मांस अजमास दिसतो.

१३. दुसरीं मासिक पुस्तकें. यांपैकीं एकाविषयीं* तर आह्मांस लिहितांच येत नाहीं. दुसरीं तीन† आहेत. त्यांपैकीं दोन सुमारें दोन वर्षांमागें निघूं लागून बहुधा तिसऱ्याच्याच धाटणीवर चालू झालीं आहेत. हें तिसरेंच त्या तिहींत कालाच्या व योग्यतेच्या मानानें श्रेष्ठ आहे. त्याची भाषा शुद्ध व प्रौढ असून त्यांतील विषयहि महत्त्वाचे असतात. तारखेच्या तारखेस अंक काढून वर्गणीदारांच्या टपक्यांतून सुटावें एवढीच इच्छा न धरतां हातीं घेतलेल्या कामाचा बोज त्यास चांगला कळतोसें स्पष्ट दिसतें. त्यांतील लेखांवरून लिहिणारांचा देशाभिमान, निर्भीडपणा, निर्मत्सरता, गुणग्राहित्व, वगैरे उत्कृष्ट गुण सर्व व्यक्त होतात. दुसरीं जीं दोन सांगितलीं तीं एकंदरींत पहातां बरींच आहेत; तरी त्यांत सुधारणा करण्यास पुष्कळ जागा आहे असें आह्मांस वाटतें. एकाची भाषा शुद्ध असते; पण ज्याच्या त्याच्यावर हल्ला धरण्याचा जो त्यानें बाणा उचलला आहे तो विचारी मनुष्यास खास आवडणार नाहीं. त्याच्या योगानें त्याची योग्यता मात्र कमी होऊन दुसऱ्यास फजीत करण्याचा जो त्याचा उद्देश तो सिद्धीस न जातां उलटा फसून मात्र जातो. मोठमोठ्या इंग्रेजी ग्रंथकारांची कोणास खोंचा मारण्याची रीत किती संभावितपणाची व किती रामबाण असते हें त्यास ठाऊक असेलच, तर तिचेंच अनुकरण करण्यास

* शाळापत्रक.

† १ दंभहारक, २ विविधज्ञानविस्तार, ३ स्त्रीज्ञानप्रदीप.

आह्मी त्यास शिफारस करतों. शत्रूचा पाडाव करणें असल्यास हातांतील शस्त्राची धार जितकी उपयोगी पडेल तितका तीशिवाय नुसता मनगटाचा जोर कामास येणार नाहीं हें त्यानें पक्कें लक्षांत ठेवावें. आतां आपल्या धर्माच्या तर्फेनें भांडून त्याच्या प्रतिपक्ष्यांचें खंडण करणें हाच जर त्याचा उद्देश असेल तर तो आमच्या लोकांस कांहींसा मानवेल यांत संशय नाहीं; व पाद्री, बाटे वगैरे लोकांच्या जो तोंडीं लागेल त्यानें कांहीं अंशीं जशास तसें केल्यावांचूनहि उपाय नाहीं हें खरें आहे. तरी या कामींहि आमच्या देशबंधूनें आपली इतकी विटंबना करून घ्यावी हें आह्मांस सहन होत नाहीं. हा दोष राहिलेल्या दुसऱ्या पुस्तकांत मात्र अगदीं दिसत नाहीं. पण त्यांत भाषाशुद्धीकडे चांगली नजर दिलेली नसते. शिवाय विषयांचीहि निवड ह्मणण्यासारखी चांगली नसते. ज्या विषयांची माहिती वाचकांस मजेची वाटून उपयोगाची होईल, असेच विषय प्रायः मासिक पुस्तकांतून असावे. तादृश प्रसिद्ध नसणाऱ्या पुरुषांचीं चरित्रें, दूर देशांचें वर्णन, मराठींत नीरस वाटणारीं भाषांतरें हीं त्यांत कामाचीं नाहींत. असो; एकंदरींत सर्वांपासून भाषेस बराच फायदा होईलसा सुमार दिसतो.

१४. आतां एका प्रकरणाविषयीं मात्र विचार करावयाचा राहिला. तें इतर ग्रंथांचा भरणा आपल्या भाषेंत जो कांहीं झाला आहे व होत आहे त्याविषयीं होय. हा भरणा जरी अद्याप मोठासा झाला ह्मणतां येत नाहीं, तरी त्या सर्वांविषयीं यथायोग्य लिहिणें बऱ्याच वेळाचें व विचाराचें काम आहे. यास्तव त्याविषयीं येथें विशेषतः कांहीं न लिहितां सामान्यतः कांहीं निरूपण करतों.

इंग्लिश भाषेंत पहिल्यानेच गति होऊन तींतील सुरस ग्रंथांचीं आपल्या लोकांस जेव्हां गोडी लागली, तेव्हां त्यांसारखें आपल्याहि भाषेंत कांहीं करावें अशी त्यांस सहजच मोठी हौस वाटली. मग पुष्कळांनीं हा उद्देश भाषांतरद्वारा सिद्धीस नेला. यांच्या योगानें लोकांचें पुष्कळ हित झालें, व इंग्रेजी भाषेची योग्यता सर्वांस स्पष्टपणें कळून आली. पुढें कित्येकांनीं यावरहि तोड करण्याचें मनांत आणिलें. कोणीं इंग्रेजी ग्रंथांच्या नमुन्यावर कल्पित कथा, नाटकें, व इतर ग्रंथ केले; व कोणीं इंग्रेजींतीलच गोष्टींचें देशाचारानुरोधानें रूपांतर करून मराठी ग्रंथ बनवले. तशींच संस्कृतांतूनहि काव्यादि ग्रंथांचीं भाषांतरें होऊन भाषेची व रसिकत्वाची लोकांत वृद्धि होण्यास बरींच कारणें झालीं. असो; याप्रमाणें तऱ्हेतऱ्हेचे ग्रंथ होऊन मराठीस पुष्कळ शोभा येत चालली होती. पण पुढें हळू हळू विद्वानांची तिजवर अवकृपा होऊं लागून पहिलें मान फिरतां फिरतां आतां अगदीं फिरून गेलें. तिचीं सूत्रें ज्यांनीं हातांत बागवावीं त्यांनीं तीस सोडल्यापासून तिजवरची कळा उडत चालली. तिच्याविषयीं कळकळ बाळगणारे असे कोणी राहिलेच नाहींत. नाहीं ह्मणण्यास सध्य

दोघांचा मात्र आश्रय तीस उरला आहे. एक पाद्री लोकांचा; व दुसरा तिजवर उपजीवन करणाऱ्या ग्रंथादि कर्त्यांचा. पण या आश्रयाची योग्यता कितपत आहे हें सांगणें नको. मिशनरी लोकांच्या लेखांत तर मराठीचें रूप कित्येक ठिकाणीं असें चित्रविचित्र दृष्टीस पडतें कीं, 'ती बेबलच्या बुरूजावरील भाषेचीच बहीण' शोभेल! ती समजण्यास धोतर नेसलेला, शालजोडी पांघरलेला व डोक्यावर साहेबी टोपी घातलेला महाराष्ट्रसंस्कृतांग्लभौमभाषाभिज्ञ महापंडितच आणून पुढें उभा केला पाहिजे! दुसरा मोठा आधार अर्थलुब्ध लोकांचा. अशांचे ग्रंथ कित्येक असे मासलेदार आहेत कीं, त्यांत चोहोंकडे हिंडलें असतांहि अर्थाचा पत्ता लागत नाहीं. दुसऱ्यांचें इकडून तिकडून चोरून आणून सरासरी पानांची भरती करून दिलेली असते.

१५. पण यावरून सध्यां छापलीं जाणारीं सारीं पुस्तकें येथून तेथून अगदीं नादान असतात असा आमच्या लिहिण्याचा अभिप्राय कोणीं समजूं नये. तरी सत्परीक्षकांचा बहुधा अभावच असल्यामुळें चांगल्यांस व वाईटांस हल्लीं एकाच पंक्तींत बसणें येतें हें खरें. सध्यां लिहिण्याची हौस एकंदर लोकांत पुष्कळांच्या ठायीं दृष्टीस पडते; तेव्हां या सर्वांचे लेख सारख्याच योग्यतेचे असतील हें तर मुळींच संभवत नाहीं. न्यूनाधिकभाव वस्तुगत्याच असायचा. पण हा समजावा कोणास ? स्वतःच्या रूपाची आपल्याच डोळ्यास प्रतीति घडणें जसें केवळ अशक्य, तसेंच आपल्या ठायींचे गुण उत्कृष्ट असले तरी ते आपले आपणास पहिल्यानेंच कळणें स्वभावींच शक्य नव्हे. हें ज्ञान पहिल्याचें जसें आरशानें वगैरे होतें तसें दुसऱ्याचें यथार्थोक्तीनें होतें. येथवर दोहोंचें सादृश्य ठीक आहे; पण पुढें त्यांत एकासंबंधानें मोठाच भेद नजरेस येतो. तो हा कीं, पहिला प्रत्यय घडणें जसें अगदीं सुलभ आहे तसें दुसऱ्याचें नाहीं. अगोदर यथार्थ ज्ञान कठिण; मग त्याहून एके पक्षीं निर्मत्सरता, व दुसरे पक्षीं स्पष्टवक्तेपणा हा तर विरळच. सारांश, ग्रंथांची यथार्थ परीक्षा करणारे असले, ह्मणजे चांगल्यावाईटाची तेव्हांच निवड होते; व चांगल्यांस उत्तेजन मिळून भाषेचें उत्तरोत्तर हित होत जातें. पण सध्यांची स्थिति त्या प्रकारची नसून कांहीं विलक्षणच आहे. ग्रंथकर्त्यांस प्रसिद्ध होण्याचे तीन मार्ग आहेत. एक त्यानें स्वतःच्या जोखमीवर. आपलें पुस्तक छापावें,—ह्मणजे लोकांकडून आश्रय मिळाला तर नशीब, नाहीं तर सरासरी छापणावळ तरी काढण्यापुरते कोणा विद्याखात्यांतील अधिकाऱ्याचे आर्जव करावे. या मार्गाचें अवलंबन ज्यास पैशाची कमताई आहे त्याच्या हातून तर अर्थात् होतच नाहीं. तेव्हां नुसत्या प्रसिद्धीचा मार्गहि पैशाखेरीज कोणास अनुकूल नाहीं, व यामुळें कोणाचे ठायीं कसाहि गुण असला तरी ठिकाणच्या ठिकाणींच मुरून जाण्याखेरीज त्यास गत्यंतर नाहीं. दुसरा मार्ग दक्षिणाप्रैज कमिटी. हा मार्ग वरच्याहून सोईवार खरा; पण या सभेकडे आपला ग्रंथ पाठविण्याचा धीर येण्यास ग्रंथकर्त्यास आपली योग्यता बक्षी-

सापुरती आहे एवढा तरी भरंवसा पक्का असला पाहिजे. हा त्यास कसा यावा? कोणाच्या अंगीं योग्यता वास्तविक असतांहि ती त्यास परप्रत्ययाशिवाय भासत नाहीं, व कोणाच्या अंगीं ती थोडी असतां किंवा मुळींच नसतांहि स्वाभिमानास्तव मोठी वाटते. यास्तव प्रस्तुत उद्देश पुरता सिद्धीस जात नाहीं. तिसरा मार्ग विद्याखात्याचे मुख्य अधिकारी यांकडे अर्ज. येथें तरी वरचीच अडचण–ह्मणजे आपल्या योग्यतेचा पक्का भरंवसा आधीं असणें, ही आहेच; पण एवढीच असती तर पुरवती ! एखाद्या चांगल्या अभिज्ञाकडून आपला ग्रंथ मान्य होईल कीं नाहीं याविषयीं अभिप्राय घेतां येतो; पण इतकी तयारी करूनहि वरील अधिकारी तो पसंत करतातच असा काय नेम आहे? त्यांचा अनन्यभाव दोघां दुसऱ्या कामगारांवर. ते सांगतील तो अखेरचा निकाल. इंग्रेजी वैद्यकांत निष्णात ह्मणविलेल्या डाक्तरांचा अभिप्राय जसा वज्रलेप, त्यावर कोणाची कोटीच चालणें नाहीं; त्याचप्रमाणें वरील दोघांचें मत जें एकदां ठरेल तें कायम, त्यांत चुकीचा संभवच रहात नाहीं! आमचें सरकार त्यांस हुद्द्याचा किताब देतें त्याबरोबरच इटली देशाच्या पोपाप्रमाणें त्यांस प्रमादराहित्याचा महा अधिकारहि देत नसेल ना!! कोणीं सांगावें?—— पण सामान्यजनाच्या समजुतीस तर त्यांच्या प्रमादाभावाचा व सर्वज्ञतेचा त्यांच्या अभिप्रायांशीं मेळ घालतां घालवत नाहीं असें अनेक वेळां होतें! ग्रंथकर्त्यानें डोळ्यांत तेल घालून व कितीहि अचाट श्रम करून ग्रंथ तयार केला असो; त्याची योग्यता एका क्षणार्धांत ओळखून एका टाकासरसा त्याचा निकाल फाडकन् पाडण्याची त्यांची शर्थ खरी! एरवीं साधारणरीत्या पाहिलें तर कामाकाजास ठेवलेल्या चाकरमाणसांशीं त्यांच्या भाषाज्ञानाचा प्रकाश पडत नाहीं, सरासरी खुणाखाणांनींच व्यापार चालतो; सभासदाच्या नात्यानें एखाद्या पुस्तकावर मत देणें आल्यास दुसऱ्याच्या-व विशेषतः चिटणीसांच्याच–अभिप्रायावर निर्वाह करणें भाग पडून तें एका ओळविर कधींहि लांवत नाहीं; पण एखाद्या हतभाग्य ग्रंथकाराचें दुर्दैव उभें राहून त्याच्या श्रमांचा निकाल जेव्हां त्यांस स्वतंत्रतेनें करणें पडतें, तेव्हां त्यांस अकस्मात् कोठून स्फूर्ति होत असेल ती परमेश्वर जाणे! या धडधडीत अंधाराची जेव्हां जेव्हां आह्मांस आठवण होते, तेव्हां तेव्हां सरकारच्या असंभजसपणास किंवा जात्यभिमानास, अथवा या कामगारांच्या धृष्टतेस, यांतून कशास जास्त हसावें हें आह्मांस कळत नाहीं ! हा एक प्रकार तर शुद्ध अज्ञानाचा व घमेंडीचा झाला. आतां दुसरा प्रकार जो आह्मी सांगणार तो यासारखा केवळ हास्यास्पद नाहीं; तरी अनर्थमूलक होय यांत संशय नाहीं. या दुसऱ्या सरकारतर्फेच्या परीक्षकास देशभाषेचें ज्ञान उत्कृष्ट आहे खरें; पण लिहिण्यास खेद वाटतो कीं, ग्रंथाच्या व्याकरणशुद्धीपलीकडे त्याचें लक्षच पोंचत नाहीं. गद्य असो, पद्य असो, शास्त्रीय विषय असो; त्यांत ऱ्हस्व, दीर्घ, काना, मात्रा, अनुस्वार, शुद्ध प्रयोग,

इतकीं त्यानें बसवलेल्या नियमांस अनुसरून असलीं कीं ग्रंथ चांगला; नाहीं तर वाईट. असो; याप्रमाणें सरकारतर्फे ज्यांच्या हातून ग्रंथांची पारख होते ते त्या कामास यथायोग्य नसल्यामुळें भाषेचे फार हाल होतात. जे ग्रंथ छापखान्यांतून निघून लोकांचे हातीं पडल्यावर लवकरच वाण्यांच्या घरीं वास करावयास योग्य, अशांचें मोठ्या चमत्कारानें दैव उघडून त्याची शाळांतून गर्जना ऐकूं येते; व ज्यांची चोहोंकडे मानमान्यता व्हावी त्यांची फारशी पुस्तापास्तहि न होऊन ते कोनाकोपऱ्यांत कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडतात. असा उलटा न्याय झाल्याचीं उदाहरणें आमच्या अभिज्ञ वाचकांस ठाऊक असतीलच; यास्तव वरील उल्लेखांत केवळ अत्युक्ति केली नाहीं अशी त्यांची खचित खात्री होईल. असो. आतां या अनर्थाच्या परिहारार्थ आह्मांस एकच कांहीं अंशीं आपल्या हातचा असा उपाय सुचतो तो येथें सांगतों. पत्रकर्त्यांनीं व मासिकपुस्तककारांनीं सध्यांप्रमाणें नुसती उडवाउडव न करितां जे ग्रंथ त्यांकडे येतील त्यांवर निर्भीडपणानें व निष्पक्षपातबुद्धीनें आपले अभिप्राय प्रगट करावे. तसेंच चांगले असून मागें पडलेल्या ग्रंथांचीहि योग्यता लोकांस लक्षांत आणून देण्याचा यत्न करून फुकट मिरवणाऱ्या हल्लींच्या ग्रंथांची चांगली चर्चा करावी. हें कृत्य भाषेस किती हितावह होईल हें सांगणें नको.

प्रस्तुत मालेचा उद्देश.

पिबामः शास्त्रौघान् ! उत विविधकाव्यामृतरसान् !

भर्तृहरि.

अंक २ रा.—(१) सध्यांचीं चोहोंकडची गडबड. (२) भाषेच्या संबंधानें उद्योग; पत्रें पुढें सरसावून पुस्तकें मागें पडल्याचीं कारणें. (३) पत्रें व मासिक पुस्तकें यांचें विभक्त होणें. (४) मासिक पुस्तकांचा इतिहास—नव्या जुन्यांची तुलना. (५) अशा पुस्तकांची मूळ कल्पना; ती नीट न उचलल्यामुळें कित्येक पुस्तकांत आलेले मोठे दोष. (६) मासिक पुस्तकाच्या खऱ्या स्वरूपाविषयीं मत; त्यांपासून झालेलें लोकहित. (७) तसें इकडे होण्यास कोणती गोष्ट कमी आहे ?. (८) अशा पुस्तकांपासून आपणांस होणारे फायदे—(९) मराठीच्या द्वारें सामान्यलोकांस ज्ञान, (१०) ग्रंथाभिरुचीची वृद्धि. (११) भाषेचें पुनरुज्जीवन, विटंबनानिवारण, आणि अभिवृद्धीस आरंभ. (१२) आणखी एक उपयोग. (१३ पुनः सूचना.

मागील अंकांत मराठी भाषेचें एकंदर स्वरूप व ती सध्यांच्या काळीं कोणत्या स्थितीस येऊन पोंचली आहे याविषयीं थोडेंसें निपरूण केलें. आतां यांत सांप्रत पुस्तक सुरू करण्याचा हेतु काय याविषयीं पहिल्याहून जास्त विस्तारानें येथें लिहितों.

१. अलीकडे दोन तीन वर्षांत चोहोंकडे मोठी गडबड होऊन गेली आहे. पूर्वीप्रमाणें केवळ वाक्पांडित्य न चालतां देशहितार्थ पुष्कळ उद्योग जिकडे तिकडे ख-

रोखरी होऊं लागला आहे हें मोठें सुचिन्ह होय. लोकशिक्षण, वर्तमानपत्रें यांचा पुष्कळ फैलावा होऊन लोकांत ज्ञान व समजूत हीं दिवसेंदिवस वाढत चाललीं आहेत. आपलें शहाणें इंग्रेज सरकार आपल्या पाठीवर असतां आतां आपणास काय कमी? दिवसेंदिवस हिंदुस्थानची संपत्ति वाढून उत्तरोत्तर तीस इंद्रभुवनाचें साम्य येत चाललें आहे; आज आगगाडी झाली, उद्यां तारायंत्र झालें, परवां सूर्यकिरणांनीं क्षणार्धांत तजबीर काढण्याची अलौकिक कला या देशांत आली.– अहो काय आमचें भाग्य! पेशवाईत कोणाच्या स्वप्नीं तरी या गोष्टी होत्या काय? आज हजारों वर्षें जीं हिंदुस्थानचीं गेलीं ती एक महारात्रच गेली, आज परमेश्वरानें महाभाग्याचा सुदिन दाखविला;–असे प्रमादजनित उद्गार चुकते चुकते ऐकूं येत होते, त्यांचा घोष अजून आमचे कानांत घुमतो आहे! पण या समजुती आतां बऱ्याच पालटत चालल्या आहेत; विलायतेतील कांहीं थोड्या थोर लोकांचीं कशींहि मतें असलीं, तरी चार हजार कोसांवरून या उष्ण देशांत येऊन व गेलीं शंभर वर्षें सतत युद्धप्रसंग करून जे लोक आपले धनी होऊन बसले त्यांनीं एवढी यातायात केवळ परोपकारबुद्धीनें केली नाहीं, व हिंदुस्थानचें राज्य करण्यांत या देशाच्या हिताव्यतिरिक्त त्यांचे कांहीं तरी हेतु असावे, हें आतां सर्वांच्या मनांत वागूं लागलें आहे. असो; वरच्या लिहिण्यानें हल्लींच्या राज्याचा आह्मी द्वेष करतों, किंवा त्यानें आपल्या देशावर जे अपरिमित उपकार आजपर्यंत केले व अजूनहि करीत आहे ते आह्मी जाणीत नाहीं, असें नाहीं. आह्मांस तर असें वाटतें कीं, असे विचार करण्याची आमच्या अंगीं शक्ति आणून त्यांचा उल्लेख उघडपणें करण्याची जी मोकळीक आमचें सरकार आह्मांस देत आहे, यापरतें औदार्य कोणतेंहि नाहीं! तें मनांत येऊन वरच्या सारखे लेख लिहितांना कृतघ्नत्वशंकेनें लेखणी वरचेवर अडखळते. असो; वरील लेखांत आमच्या लोकांची कच्ची समजूत, व आपण सुस्त बसलों तरी देशाची भरभर आपोआप चालणार आहे हें वेडें मत, या दोहोंवर आमचा मुख्यतः रोख होता; पण हीं दोन्ही आतां कमी होऊन स्वतःच्या उद्योगाखेरीज राज्यकर्त्यांचें शहाणपण व उदारपण हीं आपल्या कामास येणार नाहींत असें लोकांस भासूं लागलें आहे.

२. सध्यां भाषेच्या संबंधानें जो उद्योग चालू आहे तो मुख्यतः वर्तमानपत्रांच्या रूपानें चालतो आहे. यांत गेल्या आठ दहा वर्षांत जितकी सुधारणा झाली व दिवसेंदिवस होत आहे, तशी मासिक पुस्तकांत व इतर ग्रंथांत ह्मणण्यासारखी झाली नाहीं व होतहि नाहीं. ही गोष्ट एका प्रकारें आश्चर्याची होय. कां कीं, इतक्या काळांत साधारणतः विद्येचा इतका फैलावा झाला असतां व तिचीं साधनें इतकीं वाढलीं असतां वर्तमानपत्रांची जशी भरभर झाली तशी पुस्तकांचीच कां होऊं नये? असें होण्यास दोन तीन गोष्टी कारणभूत झाल्या आहेत असें आह्मांस वाटतें. एक तर

मागील अंकांत सांगितलेली विद्वान् लोकांची मराठी भाषेविषयींची उपेक्षाबुद्धि. दुसरें वर्तमानपत्रेंच वाचण्याकडे जुन्या नव्या अशा एकंदर लोकांची प्रवृत्ति. ही प्रवृत्तिच वर्तमानपत्रांच्या एवढ्या उत्कार्षाचें कारण व कार्यहि होय;—ह्मणजे तिच्यामुळें त्यांचा एवढा फैलावा झाला व होत आहे; व हा फैलावा झाल्याकारणानें ती अधिक प्रबळहि झाली आहे. लोकांच्या सामान्यतः ज्या नव्या समजुती झालेल्या दृष्टीस पडतात त्या सर्वांस हीं पत्रें कारण होत, व एका प्रकारचें ज्ञानहि लोकांत प्रसृत करण्यास तीं उपयोगीं पडतात. यास्तव त्यांची वृद्धि एके रीतीनें अत्यंत अभिनंदनीय होय. तरी वर्तमानपत्रांची योग्यता लोक वास्तविकपणें जाणीत नाहींत हें येथें लिहिणें अवश्य वाटतें. त्यांची समजूत अशी झाली आहे कीं, ज्ञानप्राप्तीचें परमस्थान ह्मणजे हीं पत्रें होत; त्यांच्या पलीकडे ज्ञानाचा मार्गच नाहीं. या समजुतीचें उत्कृष्ट प्रमाण पुस्तकालयांची जी स्थिति दृष्टीस पडते ती होय. पुस्तकगृह हें सुधारणुकेचें एक मोठें कलम आहे असें जाणून त्यांची स्थापना लहानसान गांवांतून सुद्धां झाल्याचें वरचेवर वाचण्यांत येतें. पण स्थापनाचा समारंभ होऊन त्यावर एकदां अक्षता पडल्या कीं आटपलें; तेव्हांपासून त्यांची चालना, फार करून केर झाडणाऱ्या गड्याच्या हातूनच कधींमधीं होत असेल ती असेल. त्यांच्याहून मऊ हाताचा स्पर्श पुस्तकांस बहुधा होत असेलसा दिसत नाहीं. असो; याप्रमाणें मोठमोठे ग्रंथ नीट लक्षपूर्वक वाचून ज्ञानभांडार सांठविण्यापेक्षां वर्तमानपत्रांतीलच क्षणिक महत्त्वाच्या गोष्टी मनास सहजरीत्या कर्मणूक करून घटकाभर गप्पा मारण्यास उपयोगीं पडण्याकरितां लोक वाचतात व ही ढब पडून गेल्यामुळें अर्थातच पत्रें पुष्कळ वाढून पुस्तकें मागें पडलीं. तिसरें कारणां वर्तमानपत्रें चालविणें पुस्तकांहून पुष्कळ सोपें पडतें हेंहि असावें. बातम्या वगैरे तर सारीं पत्रें एकमेकांतून घेतातच; शिवाय नोटिशी, पत्रें, जाहिराती यांनींहि पुष्कळ भाग साजरा होऊन खेरीज मिळकतहि होते. येऊन जाऊन पत्रप्रकाशकास स्वतःचा असा मजकूर दर खेपेस पराकाष्ठा दोन तीन घरें घालणें येतें. तो लिहिण्यास नेहमीं कांहींना कांहीं तरी लौकिक विषय बहुधा उपस्थित झालेला असतोच; व इतरांनीं प्रकट केलेले विचारहि त्यासंबंधें त्यांस उपयोगीं पडण्यासारखे असतातच. पण या सर्वांहून मोठी गोष्ट ही कीं, वर्तमानपत्रांतील मजकूर कसाहि असला तरी तो लोकांपुढें फार वेळ रहात नाहीं. वाचणारे आधीं तो भराभर वाचून जातात; व पुढील अंक आला कीं, मागचा मागें पडून जातो. पण पुस्तकांची गोष्ट फार वेगळी. त्यांत दर वेळेस कांहीं तरी नवें असावें लागतें; व इतर पुस्तकांतील उतारे त्यांत राजरोस घेतां येत नाहींत. शिवाय त्यांत जो लेख एकदां पडला तो पडला, त्याची चर्चा होण्याचा पुष्कळ दिवस संबंध असतो; कां कीं, वर्तमानपत्रांप्रमाणें तो वर्षासहामाहिन्यांत वाण्याचें दुकान पाहून प्रायः निर्भय होत नाहीं. याप्रमाणें पुस्तकाचीं इतकीं सर्व पानें स्वतःच्या

मजकुरानें भरून शिवाय त्यांत दोष न रहाण्याविषयीं मोठी खबरदारी ठेवावी लागते.

पुस्तकें मागें पडल्याचीं आमच्या मतें हीं तीन कारणें होत. यांपैकीं पहिलीं दोन पुस्तकांच्या वृद्धीस फारच प्रतिबंधक आहेत; पण तीं नाहींशीं झालीं तर तिसरें मुळींच उरणार नाहीं. असो; आतां पुस्तकांची वृद्धि होणें देशसुधारणुकेस किती आवश्यक आहे, ती कशानें होते, वगैरे गोष्टींविषयीं विचार करूं.

३. कांहीं वर्षांमागें वर्तमानपत्रांतून सर्व प्रकारच्या गोष्टी असत;—ह्मणजे वर्तमानें, व्यापारासंबंधी माहिती, देशस्थितीवर विचार इत्यादि आतांप्रमाणें असून शिवाय भाषेसंबंधींहि मजकूर असे. निबंध, पुस्तकावर टीका वगैरे पत्रकर्ते लिहीत, व इतर लोकहि तसा मजकूर प्रसिद्ध करण्याकरितां त्यांकडे पाठवीत. पण आतांशा तसा प्रकार मुळींच नजरेस येत नाहीं. हें पत्राच्या नांवाखालीं जी प्रतिज्ञा असते तिशीं विसंगत दिसतें; व ज्या सदरास पुढारीपणाचा मान दिला असतो त्याची दाद वर्षानवर्ष लागत नाहीं हें मोठें हास्यास्पदहि होय. आतां हा विसंगतपणा वाचकांस जर भासत नाहीं, तर पत्रकर्त्यांनीं तरी त्याबद्दल कशाला उठाठेव करावी, हें खरें आहे. पण जर वाचकांचें त्यावांचून चालतें, व पत्रकर्त्यांसहि त्याबद्दल उठाठेव करण्याचें नको, तर वर सांगितलेलें सदर मुळींच कां काढून टाकूं नये?—किंवा तें उगीच ठेवावयाचें तर दुसऱ्या तिहींच्या शेवटीं घालावें, हें तरी कांहीं बरें; असो; याप्रमाणें भाषेसंबंधी विषयांत वर्तमानपत्रांतून अलीकडे अगदीं थारा नाहींसा झाला आहे. ही गोष्ट एके प्रकारें फार चांगली झाली. कारण, पत्रकर्त्यांनीं आपली हद्द नीट रेखून खुद्द भाषेचा विषय–जो वास्तविक त्यांचा नव्हे–– तो निराळा केला. तो अर्थातच आतां मासिक पुस्तकें व इतर ग्रंथ करणारांकडे आला. यास्तव आह्मीं अशी उमेद बाळगितों कीं, वर्तमानपत्रकर्त्यांनीं आपलें काम जसें खबरदारीनें सांभाळलें आहे तसेंच आमचे पुस्तककर्तेहि करून मागें पडल्याचा जो टपका त्यांवर आहे तो ते लवकरच काढून टाकतील.

४. या ठिकाणीं मासिक पुस्तकांचा इतिहास–ह्मणजे हा प्रघात इकडे केव्हां कोणीं पाडला, तीं पहिल्यानें कोणत्या प्रकारचीं होतीं व त्यांचें स्वरूप आतां कसें आहे, वगैरे गोष्टींविषयीं पूर्णपणें लिहिणें आमच्या मनांत होतें. पण तीं पुस्तकें आमच्यापाशीं सगळीं नसल्यामुळें व त्याविषयींची विशेष माहिती होण्याचाहि आह्मांस कधीं योग न आल्यामुळें तें आमच्यानें करवत नाहीं. तरी जवळ असणाऱ्या सामग्रीवरून आह्मांस जें कांहीं वाटतें तें येथें वाचकांस सादर करितों. हा प्रघात पहिल्यानें बाळ गंगाधर शास्त्री नामें करून जो प्रसिद्ध विद्वान्[1] आपणांमध्यें प्रथम होऊन गेला

१ या प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र 'कविचरित्र' नामक पुस्तकांत थोडेसें लिहिलें आहे तें वाचण्यास आमच्या वाचकांस आह्मी शिफारस करतों.

यानें घातला असें दिसतें. ते 'त्रैमासिक ज्ञानदर्शन' नांवाचें एक पुस्तक काढीत होते. तशींच त्या वेळेस 'दिग्दर्शन', 'चंद्रिका', 'ज्ञानप्रसारक' हींहि मासिक पुस्तकें निघत असत. या सर्वांवरून त्या वेळेस इंग्रेजी भाषेच्या द्वारें जें ज्ञान आपणांस नुकतें होऊं लागलें होतें तें आपल्या भाषेच्या द्वारें प्रगट करण्याची पुष्कळांस हौस होती असें दिसतें. वरील सर्व पुस्तकें त्या वेळेस लोकांस फार आवडत होतीं; कारण इंग्रेजी विद्येचा त्या वेळेस थोडथोडा नुकता प्रचार होऊं लागला असल्यामुळें वर्तमानपत्रेंहि थोडींच निघत, यामुळें एकंदर लोकांस ज्ञानाचा मार्ग हाच काय तो एक होता. तसेंच या पुस्तकांतून मनोरंजनाचे व अनेक प्रकारची माहिती होण्यासारखे विषयहि असत. अलीकडे जीं थोडीं पुस्तकें चालू आहेत तीं तरी त्यांच्याच धाटणीवर मुख्यतः निघालीं आहेतसें दिसतें. यांची व पूर्वीच्यांची तुलना करून कित्येकांनीं असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, पूर्वीच्यांची सर यांत कांहींच येणार नाहीं. हें मत आह्मांस बहुतेक अंशीं अत्युक्तीचें दिसतें. दोहोंची निष्पक्षपातबुद्धीनें जर परीक्षा केली तर वरील मतास कोणी फारकरून मिळणार नाहीं अशी आह्मांस खात्री वाटते. आतां हें खरें कीं, अशीं पुस्तकें अजून फारच थोडीं निघतात, व हल्लींच्या विद्याप्रसाराच्या मानानें तीं जशीं उत्कृष्ट चालावीं तशींहि चालत नाहींत. तरी गेल्या वीस वर्षांत आमच्या लोकांच्या बुद्धीची तीव्रता कमी होऊन तीस विशेष मांद्य आलें असेलसें आमचें मन अगदीं घेत नाहीं !

५. मासिक पुस्तकांची कल्पना फार अलीकडची आहे. खुद्द इंग्लंड देशांतच तीं निघाल्यास सुमारें दीडशें वर्षें झालीं. आडिसन् नामक कवि पहिल्यानें नामांकित निबंधकार झाला; त्याच्या पुढें जॉन्सन्, गोल्डस्मिथ्, वगैरे झाले. यांचे निबंध अगदीं लहान—ह्मणजे सामान्य पुस्तकाचीं दोन तीन पृष्ठें इतकेच-असत. पण पुढें या शतकाच्या आरंभीं तें मान फिरलें. तोंपर्यंत एकंदर लोकांत ज्ञानाची पुष्कळ वृद्धि होत गेल्यामुळें पहिले निबंध फारच लहान वाटून ते सरासरी लहानशा पुस्तकाएवढे मोठे निघूं लागले. या अलीकडील निबंधकारांत मेकाले हा फार प्रख्यात झाला. याच्यापुढेंहि अर्थात् तोच मोठमोठे निबंध लिहिण्याचा क्रम अजून चालू आहे. असो; हें इतकें येथें लिहिण्याचें कारण हेंच कीं, वरील निबंधकारांचें अनुकरण करतांना आमचे मासिकपुस्तककार देशस्थितीचा नीट विचार करीत नाहींत. पहा कीं, मागील पुस्तकांत अग्रगण्य असें जांभेकर यांचें 'त्रैमासिक ज्ञानदर्शन' हेंच असे. 'त्रैमासिक', या शब्दावरूनच तें विलायतेंतील 'एडिन्बरो', 'क्वार्टरली' अशा पुस्तकांच्या नमुन्यावर येथें सुरू केलें होतें हें स्पष्ट आहे. ज्याची बुद्धि एवढी विशाळ होती कीं, एकोणिसाव्या वर्षीं विद्यालयांत विद्यागुरु होऊन तें काम वजनदारीनें चालविण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य आलें, त्यास 'एडिन्बरो' त्रैमासिकासारख्या पुस्तकांतहि लिहिणें

मोठेंसें कठिण नव्हतें; पण त्यांची मोठी बुद्धि व विद्वत्ता ही त्यांच्या वाचकांस काय होय ? त्यांच्याकरितां ह्मणून जर पुस्तक चालवायाचें, तर त्यांतील विषयांचें ग्रहण करण्यास त्यांची बुद्धि समर्थ होईल कीं नाहीं हा विचार पहिल्यानें करायास नको काय ? भूगर्भशास्त्र, नीतिशास्त्र, युरोपखंडाचा इतिहास इत्यादि विषय समजण्यापुरती त्या काळीं कितीकांची बुद्धि पोक्त असेल ? एवढाले विषय अजूनहि आमच्या मासिक पुस्तकांतून खास शोभणार नाहींत. हीच चूक सध्यांच्याहि पुस्तकांतून दृष्टीस पडते. अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, असे या पुस्तकांतील विषय कोण वाचीत असतील ते असोत ! ज्यांनीं इंग्रेजींत ते विषय समजून घेतले आहेत त्यांस तर त्यांतून ते वाचण्याची गरज नाहींच; व ज्यांस इंग्रेजी कळत नाहीं त्यांस हे किती गोड लागत असतील कोण जाणे ? त्यांतून इंग्रेजी तर्कशास्त्रावरून मराठींत त्या विषयावर ग्रंथ लिहिणें हें तर आह्मांस फारच विलक्षण वाटतें ! एक तर या शास्त्राचा व्यवहारदृष्ट्या प्रायः मुळींच उपयोग नाहीं—ह्मणजे तर्कशास्त्र उत्तम पढिलें कीं सर्व खोटीं मतें नाहींशीं होऊन मन सत्यमय होतें असें नाहीं व हें शास्त्र न पढतांहि पुष्कळांची सत्यासत्यविवेचनशक्ति प्रखर असते असेंहि पण आढळतें. दुसरें असें कीं, या शास्त्रावर संस्कृतांत ग्रंथ असल्यामुळें याच द्वारें त्याचें ज्ञान वाचकांस करून दिलें तर त्यापासून मराठी वाचकांस अधिक उपयोग होणार आहे. असो; याप्रमाणें वरच्यासारख्या गहन शास्त्रांवर लिहिण्याचा जो उद्योग आमचे मासिक पुस्तककर्ते करतात तो आह्मांस अगदीं व्यर्थ वाटतो. तरी पण अशीं शास्त्रें सुद्धां त्यांतून अगदींच असूं नयेत असें आमचें मत नाहीं. तीं कोणत्या प्रकारें असावीं हें खालीं लिहिण्यांत येईल.

६. तर मग मासिक पुस्तक असावें तरी कसें ? त्याचा उद्देश कोणता ? वगैरे सहज विचारणें येतें. याविषयीं आह्मांस जें वाटतें तें येथें लिहितों. मासिक पुस्तकाचा उद्देश बहुश्रुतपणा होय—ह्मणजे तीं वाचलीं असतां थोड्या वेळांत सहज मौजेनें पुष्कळ ज्ञान नानाविध विषयांचें व्हावें. हें ज्ञान त्या त्या विषयावरील मोठमोठे ग्रंथ वाचूनहि होतेंच,—व पूर्ण ज्ञान होण्यास ते मोठेच ग्रंथ वाचले पाहिजेत—पण वाचकांस सामान्यतः हा मार्ग फार कठिण व कंटाळवाणा वाटून त्यांची उमेद खचते, व निराश होऊन तो उद्योगच बहुधा सोडून देतात. वास्तव मोठमोठ्या कठिण पहाडांतून घाट बांधले असतां वाटसरांची जी सोय होते तीच ज्ञानेच्छु लोकांस मासिक पुस्तकांनीं होते;—ह्मणजे मोठमोठे गहन विषयहि सामान्य बुद्धीच्या लोकांस सुद्धां गम्य होऊन, पुनः श्रम होत नाहींत. असा सहज रीतीनें एकदां प्रवेश झाला ह्मणजे पुढील मार्ग क्रमण्यास उमेद येऊन तितके आयास पडत नाहींत. हा प्रकार

१ तर्कशास्त्राच्या उपयुक्ततेविषयीं एवढें निक्षून मत आह्मीं आधाराशिवाय लिहिलें नाहीं. याविषयीं ज्यास संशय असेल त्यानें मेकालेचा 'लॉर्ड बेकन' निबंध पहावा.

प्राचीन काळीं किंवहुना पांचशें वर्षांपूर्वी युरोपखंडांतहि मुळींच अशक्य होता. कारण मुद्रणकलेचें ज्ञान त्या वेळेस नसल्यामुळें कोणी तसे दिग्दर्शनरूप ग्रंथ केले असते तरी त्यांचा लोकांत प्रसार होणें फारच कठिण होतें. पण हल्लींच्या काळीं वरील कला पूर्ण दशेस आल्यामुळें, व दुसऱ्याहि शेंकडो सोयी नव्या झाल्यामुळें, ज्ञानाचा प्रसार आतां फारच त्वरेनें होऊं लागला आहे. व्यापारास कोणताहि अटकाव न राहून पृथ्वीवरील सर्व देशांत सर्व देशांतील जिन्नस जसे सुलभ झाले आहेत, त्याप्रमाणेंच ज्ञानाचा लाभहि सध्यांच्या काळीं सर्वथा निष्प्रतिबंध झाला आहे. देशविशेष किंवा स्थितिविशेष आतां पूर्वीप्रमाणें ज्ञानप्राप्तीस अनुकूल किंवा प्रतिकूल असा राहिला नाहीं. मनुष्य राजधानीसारख्या टोलेजंग शहरांत असो, कीं भिकार खेडयांत असो; घरचा मोठा संपन्न असो, कीं विपत्तींत असो; ज्यास त्यास ज्ञान संपादन करण्याची सांप्रतच्या काळीं उत्कृष्ट सोय झाली आहे. या सत्कृत्याच्या संबंधानें मनुष्याच्या हातून जेवढें होण्यासारखें होतें तेवढें बहुधा आतां झालें आहे. नाहीं म्हणण्यास आतां दोन मात्र जबरदस्त अडथळे ज्ञानाच्या मार्गांत अजून राहिले आहेत;–एक आळस व दुसरा ढपणा. यांपुढें मात्र छापखाने, आगगाडया, आगबोटी, इत्यादि ज्ञानाप्रसाराचीं साधनें सारीं नाइलाज होऊन हात टेंकतात! पण इंग्लंडासारख्या देशांत हेंहि म्हणतां येणार नाहीं. आळशी लोकांची मिजास सांभाळूनहि त्यांस ज्ञानाच्या मार्गांत ओढण्यास कादंबऱ्या, नाटकें वगैरे पुस्तकांची रेलचेल होत असून शिवाय नाटकप्रयोग, भाषणसमारंभ इत्यादि त्याहूनहि कमी श्रमाचे प्रकार निरंतर चालू आहेत. मोठा ढ असला तरी तेथें वरचेवर डोळ्यांसमोरून व कानांवरून जाणाऱ्या गोष्टी त्याचे मनांत कांहींना कांहीं तरी बिंबतींलच. सारांश, प्राचीन काळीं महापंडित होणें जितकें कठिण तितकेंच आतां महाशंख होणें कठिण झालें आहे!

७. वरील गोष्ट मुख्यतः इंग्लंडासारख्या देशाची झाली. तिची प्रचीती या देशांताहे अलीकडे येत चालली आहे. गेल्या दहा वीस वर्षांत वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, इतर ग्रंथ पुष्कळ वाढल्यानें व मुख्यतः इंग्रेजी भाषेच्या अभ्यासाच्या योगानें साधारण गोष्टींचें ज्ञान पुष्कळ वाढून लोकांच्या समजुतींताहि पुष्कळ फेर पडत चालला आहे. पण इंग्रेज लोकांच्या सहवासामुळें ज्ञानप्रसार करण्याचीं जीं त्यांचीं उत्कृष्ट साधनें आपणास अनुकूल झालीं आहेत, त्यांच्या मानानें पहातां वर झालें तें कांहींच झालें नाहीं असें म्हटलें पाहिजे. वरील साधनांचा ते जितका उपयोग करून घेतात त्यांचा लक्षांश करून घेण्यापुरती जर आपल्या लोकांत हिंमत असती, तर आजपर्यंत आपल्या देशांतील चालू भाषा, व त्यांत विशेषतः मराठी भाषा आज फारच निराळ्या स्थितींत असती. इतकेंच पहा कीं, इंग्रेज लोकांस संस्कृत भाषेचा शोध लागून[1] नुकतीं पन्नास

१ 'संस्कृत भाषेचा शोध' हे शब्द आमच्या मराठी वाचकांस चमत्कारिक भास-

पाउणशें वर्षें झालीं; पण एवढ्याशा काळांत त्या भाषेच्या संबंधें त्यांनीं किती उद्योग केला ! व अजूनहि किती चालला आहे ! आमच्या देशांतील लक्ष्मी जशी तिकडे जाऊन भरली, तशीच तीहून अमूल्य अशी आमची विद्याहि तिकडेच लुटून नेऊन यापुढें तिचें महापीठ तिकडेच स्थापिलें जाणार असा अजमास दिसतो. पण आह्मी असे बहादर कीं, पहिल्या गोष्टीबद्दल कधीं स्वप्नींहि खेद न होऊन जसे नेहमीं चैनींत असतों, तसेच दुसरीविषयींहि बेफिकीर असून मांजरपाटी कापडाप्रमाणें आमच्याच मालाच्या रूपांतराचें पुनः रूपांतर करून तें चोहोंकडे मिरवितों. भट्टाचार्य हौग* साहेबांनीं आमच्या वेदांचीं ममें काढलीं--कीं धांवला आमचा 'देशहितेच्छु' पुढें ! साहेबमजकुरांस तीं व्याख्यानें लिहितांना इतका गर्व वाटला नसेल, पण त्यांचा महाप्रसाद झेलून तो आपल्या देशबांधवांस नजर केल्यानें त्यांवर अपार उपकार केल्याची वरील 'हितेच्छू' स केवढी धन्य वाटली असेल ! हें वेदांसारख्या विस्तीर्ण व दुर्बोध ग्रंथाविषयीं झालें. आतां दुसरी मौज पहा. आमच्या भाषेंत कांहीं वर्षांपूर्वी 'वेताळपंचविशी' चें भाषांतर झालें. पण झालें कसें ! संस्कृतांतून थेट मराठींत काय ? नाहीं ! भाषांतरकर्ते प्रस्तावनेंत ती परंपरा लिहितात--हा ग्रंथ मूळचा संस्कृत; त्या भाषेंतून याचा तर्जुमा फारशी भाषेंत झाला; तींतून इंग्रेजींत; आणि शेवटीं इंग्रेजींतून मराठींत ! ! केवढा द्राविडी प्राणायाम हा ! इंग्रेजी भाषा ह्मणजे महातीर्थ होय; तींतून आल्याखेरीज कोणत्याहि ग्रंथास पवित्रता येणें नाहीं ! असो; आपल्या मराठी भाषेविषयीं पाहिलें तरी देखाल तिच्या संबंधाचें मुख्य अचाट काम, ह्मणजे कोश, हे इंग्रेजांनींच आपणाकरितां करून ठेवले आहेत. या कोशांची योग्यता अज्ञानास्तव व दुरभिमानास्तव आमचे लोक फारशी मानीत नाहींत; पण आमची अशी खात्री आहे कीं, त्यांनीं महाराष्ट्र भाषेवर जे उपकार करून ठेवले आहेत त्यांस पार नाहीं ! ते तयार करतांना शास्त्री लोकांचें साहाय्य पुष्कळ घेतलें, व दोघां साहेबांसं त्या कामाबद्दल सरकारानें मोठें बक्षीसहि दिलें, हें खरें आहे; पण एवढ्यावरूनच नाक मुरडण्यास कारण तें कोणतें झालें ! तितकें किंवा त्याहून चौपट साहाय्य मिळालें असतें तरी एवढें काम अंगावर घेण्यास आमचे विद्वान् कितीक तयार होते ? एखादें मोठें कृत्य करण्याचा बेत करून तें आमच्या लोकांनीं तडीस नेलें असें कोणतें सांपडेल ? आमच्या

तील. त्यांस येथें सांगणें अवश्य आहे कीं, कलकत्त्यास सर विल्यम् जोन्स नामें जो विद्वान् न्यायाधीश मागें होता त्यानें सन १७८९ या वर्षीं 'शाकुंतल' नाटकाचें भाषांतर प्रसिद्ध करून युरोपांतील पंडितांचें मन आपल्या अन्वर्थ 'संस्कृत' भाषेकडे वेधविलें. तेव्हांपासून युरोपियन विद्वानांची प्रवृत्ति तिजकडे झाली.

---

* हे जर्मन पंडित होते.

† मोलस्वर्थ व क्यांडीसाहेब.

आरंभशूरत्वाचीं कृत्यें एक दोन आहेत काय ? सारांश, आपल्या अंगीं गुण नसणें हें एकेपरी वाईट; पण तो दुसऱ्याचे ठायीं दिसत असतांहि त्याचें गुणत्व न भासणें ह्मणजे अंधत्वाची व दुराग्रहाची पराकाष्ठा होय.

हें कांहींसें विषयान्तर झालें. तरी त्याच्या योगानें वर सांगितलेल्या गोष्टी जर आमच्या वाचकांच्या मनावर ठसतील तर त्याबद्दल आलेला दोषहि आह्मी खुशाल पतकरूं. एकंदरींत आमचें आमच्या लोकांस एवढेंच सांगणें आहे कीं, इंग्लिश लोकांच्या उत्कर्षाचाच नुसता ध्येवा करण्यापेक्षां त्यास कारणभूत जे त्यांचे अनेक गुण त्यांचा मत्सर करणें फार समंजस व अत्यंत हितावह होय. असो; तेव्हां आपल्या सुदैवानें ज्ञानप्रसाराचीं जीं अमोलिक साधनें आज आपणास अनुकूल आहेत त्यांचा उपयोग अद्याप व्हावा तसा झाला नाहीं हें मनांत वागवून तो करून घेण्यांत आमच्या देशबंधूंनीं अगदीं कसर करूं नये. असें केलें असतां त्यानीं आपला धर्म जागविला व आपणांस व आपल्या देशास मोठें भूषण आणलें असें होईल.

८. वर मासिक पुस्तकाच्या स्वरूपाविषयीं आह्मीं आपलें मत प्रदर्शित केलें आहे, त्याचप्रमाणें हें पुस्तक करण्याचा आमचा बेत आहे हें सांगायास नकोच. हें प्रस्तुत मालेच्या उद्देशाविषयीं मुख्यतः झालें. आतां अशा पुस्तकांपासून उपयोग कोणकोणते घडणारे आहेत याविषयीं लिहितों.

९. सध्यां असें झालें आहे कीं, मराठी लिहिण्याची इच्छा आहे एकांस, व शक्ति आहे दुसऱ्यांस. वर्तमानपत्रांत लिहिणारे, त्यांकडे पत्रें पाठविणारे, तसेच या भाषेंत चांगले वाईट ग्रंथ करणारे, हे सर्व लोक बहुधा अर्धेमुर्धे शिकलेले व मराठी वर्तमानपत्रें, पुस्तकें यांवरून ज्ञान संपादन करणारे असे आहेत. सध्यां मराठीस मोठा आधार झटला ह्मणजे अशांचाच आहे. हें पहिल्यांविषयीं झालें. आतां दुसरे जे आहेत त्यांस सर्व गोष्टी अनुकूल आहेत; पण इच्छा मुळींच नाहीं. सरकारानें त्यांस इंग्रेजींत वाकबगार केलें; संस्कृतादि अभियुक्त भाषांतहि पुष्कळ गति करून दिली. नानाविध विषयांचीहि थोडी बहुत बरीच माहिती करविली;—एकंदरींत उद्देश काय कीं, त्यांस कोणीकडे जरी फेंकलें, तरी त्यांनीं कचरूं नये. पण एवढा जामानिमा करून व शेवटीं चान्सेलरसाहेबांनीं पाठ थोपटून यांचें विसर्जन झाल्यावर हे करतात काय ? त्यांस वाटतें कीं, आज आपण विद्येच्या कडेस लागलों, देशास अक्षय भूषण आणलें, तेव्हां आतां दुसरें काय कर्तव्य उरलें? आपल्या कडकडीत व सतत जागृत असणाऱ्या तर्कशास्त्राच्या कोट्यांनीं जनाज्ञानांधकाराचा ध्वंस करण्याची परम दीक्षा धारण करून हे आपल्या देशबंधूंपुढें आपलें अगाध ज्ञान मिरवीत फिरतात. यथासुख आयुष्यक्रमण करावें हा त्यांचा एक मोठा सिद्धान्त आहेसा दिसतो. मराठींत ग्रंथ लिहून आपल्या इंग्रेजी विद्वत्तेस बट्टा आणणें हें तर त्यांस अगदीं आवडत नाहींच; तरी प्रसंग

आल्यास ते आपल्या सहासनावरून मराठींतील ग्रंथावर अभिप्राय देतात. पण तेहि अडाणी लोकांच्या भाषेंत त्यांस समजतीलसे नव्हेत! तर फर्डेशाई इंग्रेजींत! ग्रंथकार होऊन लोकांचा प्रसाद जोडणें हें त्यांस हलक्या मनुष्याचें काम वाटून तें त्यांस कधीं पत्करत नाहीं; हवें तर आपल्या किताबाच्या झोंकांत ते इंग्रेजींत कोणाला 'मूर्ख', कोणाला 'पोरकट', कोणाला 'अप्रयोजक' असें अभिप्राय देतील; फारच कृपा झाली तर 'हा ग्रंथ बरा आहे' अशी गुळमुळीत शिफारस करतील. सारांश, प्राचीन-काळीं रोम शहरांत प्याट्रीशियन् (महाजन) आणि प्लीबियन् (सामान्यजन) यांमध्यें जसा द्वंद्वभाव होता, तसाच सांप्रतकाळीं विद्यालयांतून पसार झालेल्या लोकांचा व इतरांचा आहे. हें लिहिणें पुष्कळांस उगीच फुगवून लिहिलेलें व अगदीं गैरवाजवी असें वाटेल हें आह्मी जाणतों; व असें वाटण्याचें कारणहि उघडच आहे कीं, नवीन विद्वानांविषयीं लोकांच्या मनांत सामान्यतः मोठी आदराची बुद्धि वागते, त्यांस नांव ठेवण्यास कोणी सहसा धजावत नाहीं. पण आजपर्यंत असा प्रकार घडला नाहीं एवढ्याच वरून आतांहि तो घडूं नये हा कोण न्याय? भारवीनें ह्मटलें आहे—

हितं मनोहारि च दुर्लभं वचः

'हितकर आणि मनोहरहि असें भाषण दुर्लभ.' हेंच वचन आह्मांस सध्यां मान्य आहे; व आमचे समंजस वाचकहि वरच्यासारखे आमचे लेख वाचतांना तेंच ध्यानांत सतत ठेवतील अशी आमची आशा आहे.

तेव्हां प्रस्तुत निबंधांनीं अशा दुसऱ्या लोकांस—कीं ज्यांस विद्यालयांतील शिक्षणाचा वगैरे लाभ न घडल्यानें ज्ञानाचा मार्ग खुला नाहीं त्यांस—अनेक गोष्टींचें ज्ञान व्हावें हा एक ते लिहिण्याचा उद्देश आहे. संस्कृत व विशेषतः इंग्रेजी भाषेंत जें अगाध ज्ञान भरलें आहे, त्याचा पाट फोडून जर आपल्या भाषेकडे वळवितां येईल तर केवढी मजा होईल! सध्यांच्या काळीं इंग्रजी विद्या पुरी शिकण्यापुरतें सामर्थ्य पैशाच्या अडचणीमुळें आपणांत फारच थोड्यांस असतें, व पुष्कळांस तेंहि अनुकूल असून दुसऱ्या कित्येक कारणांनीं विद्याभ्यास सोडून द्यावा लागतो. तेव्हां ज्ञानाचे खरे भोक्ते असे एकंदर लोकांच्या मानानें पहातां सध्यां अगदींच थोडे आहेत यांत संशय नाहीं. बाकीचे एकंदर लोक अज्ञान व तज्जन्य जे अनर्थ ह्मणजे दुर्मतें, आळस व दुराचरण—त्यांत बुडून राहिले आहेत. इंग्लंडांत ज्ञानसंपादनाच्या सोयी उत्कृष्ट असल्यामुळें तेथील मजुरांस जें ज्ञान असेल तें या लोकांपैकीं मोठे शहाणे ह्मणविणारांसहि नाहीं. ही केवढी दुःखाची गोष्ट आहे! त्यांतून विशेष वाईट वाटण्याचें कारण हें कीं, आमच्या लोकांत कितीहि दोष असले, तरी बुद्धीचा मंदपणा हा आमचा अत्यंत तिरस्कार करणारांच्यानींहि आमच्या माथीं मारवणार नाहीं! चलाखपणांत आह्मी कोणत्याहि लोकांस हार जाणार नाहीं अशी आमची खात्री आहे;—आमच्या बुद्धीचे प्रभाव

जगाच्या इतिहासावर अक्षय खोदलेले आहेत; व चंद्र सूर्य आहेत तोंवर त्यांचा झेंडा मिरवत राहील!

१०. अशा ग्रंथांपासून लोकांत सदभिरुचीचा प्रसार होऊन; ग्रंथ वाचण्याची त्यांस गोडी लागण्याचा जितका संभव आहे, तितका दुसऱ्या कोणत्याहि उपायापासून नाहीं. ही सदभिरुचि राष्ट्रास किती हितकर आहे हें इतिहास वाचणारांस माहीत असेलच. अडाणी व सुधारलेल्या राष्ट्रांत मोठा भेद हीच होय असें झटलें असतां चालेल. ही जेथें असेल तेथें विद्येचा व कलांचा उत्कर्ष, सभ्य चालचलणूक; वगैरे अर्थात् आलीच. ही आपणांतहि प्राचीनकाळीं होतीच, पण परराजांची सत्ता येथें अखंड झाल्यामुळें तिचा अस्त झाला. पण सध्यांच्या उदार व शहाण्या सरकारच्या अमलांत तिचें पुनरुज्जीवन होण्याचा पुष्कळ संभव आहे. असो; याप्रमाणें अशा ग्रंथांतून पुस्तक चांगलें कोणतें, व वाईट कोणतें, त्यांतील गुणदोष काय, वगैरे गोष्टींचें निरूपण वरचेवर होत गेलें, झणजे त्यापासून लोकांस, ग्रंथकारांस व भाषेस फार उपयोग होतो. लोकांत मार्मिकपणा वाढून त्यांस विचार करण्याची संवय लागते, पुस्तकांची परीक्षा अगोदर झालेली असली झणजे त्यांस तीं घेण्यास सोईवार पडतें; मग अर्थातच चांगल्या ग्रंथकारांस तेव्हांच आश्रय मिळून वाईट पुस्तकें निवडलीं जातात; आणि इतकें झालें झणजे भाषेंत सहजच चांगल्या ग्रंथांची समृद्धि होऊन उत्तरोत्तर तींत चांगले ग्रंथकार निपजतात. याप्रमाणें ज्ञानाची वृद्धि होत जाऊन चांगल्या ग्रंथकारांची दैना निघून जाते.

११. वरील दोन उपयोग अशा ग्रंथांपासून सामान्यतः होणारे सांगितले. पण मराठी भाषेच्या सध्यांच्या स्थितीकडे पहातां, असे ग्रंथ तर तीस अगदीं हवेतच; त्यांवांचून तिजवर मोठाले अनर्थ गुदरणारे आहेत;–फार तर काय, पण आतां जर तिनें जीव धरला नाहीं, तर थोड्याच काळांत तिची समाप्ति होईल! घरीं दारीं, उठल्या, बसल्या, इंग्रेजी तर हल्लीं सुद्धां बरीच झाली आहे. आफिसांतून जाणारे लोक, इंग्रेजीचा खरा खोटा बाणा बाळगणारे लोक अशांच्या जिव्हाग्रीं तर इंग्रेजीनें अक्षयीं वास केलेला असतोच. पण कित्येक बहादर तर असे आहेत कीं, घेडगुजरी मराठी तोंडांत बसण्याचें कारण जें इंग्रेजीचें ज्ञान त्याचाहि पण त्यांस गंध नसतो! असो; तेव्हां मराठी बुडण्याचीं हीं सर्व भयंकर चिन्हें नव्हेत काय? देशाभिमान, स्वदेशीय व्यापार, सुधारणा, इत्यादि प्रकरणीं सध्यां चोहोंकडे एवढी गडबड चालली असतां, बिचाऱ्या मराठी भाषेची कोठेंच दाद लागूं नये, हा केवढा चमत्कार आहे? तिजकडे अगदीं दुर्लक्ष करून तिची परभाषेच्या पायीं अनिवार विटंबना करण्यासहि कारण होणें हें आमच्या देशाभिमानी विद्वानांस केवढें भूषण होणार आहे! असो; या संबंधानें गेल्या अंकांत आह्मीं बराच विस्तार केला आहे. यास्तव येथें आणखी लिहीत नाहीं. तेव्हां एकंदर सांगण्याची गोष्ट इतकीच कीं, या आणीबाणीच्या वेळीं मराठीस

जें साहाय्य होईल तें तीस अनेक प्रकारांनीं उपयोगीं पडणारें आहे!–एक तर तिचें पुनरुज्जीवन झाल्यासारखें होईल; तसेंच विटंबना निवारण होईल; आणि शिवाय ग्रंथ-समृद्धि होऊन ती उत्कर्षाच्या मार्गास लागेल!

१२. शेवटीं स्वतःच्याहि संबंधें येथें लिहिणें इष्ट वाटतें. तें इतकें कीं, आमच्या या लेखांवरून मराठी भाषेची योग्यता किती आहे हें जर लोकांस कळून येईल तर आह्मीं एक मोठेंच काम बजावलें असें आह्मीं समजूं. आपल्या भाषेच्या अंगीं अर्थ-व्यंजकता, वर्णसौंदर्य फार कमी आहे,–किंबहुना नसल्यासारखेंच आहे–हा अलीकडील विद्वानांचा ग्रह कांहीं अंशीं तरी मोडून टाकण्यास जर आमचे निबंध कारण झाले, तर आमच्या हातून देशहिताचें एक मोठेंच कृत्य घडलेंसें आह्मी मानूं. तसेंच विद्यालयांतून शिकलेल्या लोकांवर इतके दिवस जो उगीच बसण्याचा आरोप लोक ठेवीत असत तो उडून आमचा प्रभाव लोकांस यापुढें जर दाखविण्यांत येऊं लागला, तर हेंहि आह्मांस मोठेंच भूषण झालेंसें होईल. असो, आतां शेवटीं पुनः एकवार पहिलीच सूचना येथें करून लिहिणें आटपतों.

१३. या व मागील निबंधांत पुस्तकांवर, ग्रंथकारांवर वगैरे जेथें जेथें आह्मांस कांहीं विरुद्ध लिहिणें अवश्य वाटलें, तेथें तेथें तें आह्मीं स्पष्ट व निर्भीडपणें लिहिलें आहे. याबद्दल कोणास वाईट वाटल्यास आमचा उपाय नाहीं. एखाद्या गोष्टीविषयीं जो स्वतंत्रपणें विचार करील, व ते लोकांस मोकळ्या मनानें जो प्रदर्शित करील, त्याचे अभिप्राय सर्वांच्या अभिप्रायांशीं नेहमीं जुळतीलच, किंवा ते सर्वांस सारखे आवडतील, असें कदापि घडणार नाहीं. तरी ते अभिप्राय आह्मी केवळ सत्यनिरूपणाच्याच उद्देशानें लिहूं अशी आमची खात्री आहे. व आह्मी दुसऱ्यास वाजवी रीतीनें नांवें ठेवण्यास ज्याप्रमाणें मागें पुढें पहाणार नाहीं, त्याचप्रमाणें दुसऱ्यांनीं आमच्या लेखांविरुद्ध मतें प्रदर्शित केल्यास त्यांत आह्मांसहि अगदीं वाईट वाटणार नाहीं. आपणांस जें खरें वाटतें तें स्पष्टपणें लिहिण्यास जो भितो, किंवा तसें आपणाविरुद्ध कोणीं लिहिलेलें ज्यास आवडत नाहीं, तो खरा सत्यनिष्ठ नव्हे, असें आह्मी समजतों! आतां अशा रीतीनें प्रदर्शित केलेलें मत कदाचित् अगदीं खोटें ठरेल; पण तसें ठरलें असतांहि तो मनुष्य प्रशस्तच होय; कां तर तो तसें न करता, तर सत्याचा निवाडा होताना. मिल्टन कवीनें ह्मटलें आहे कीं, 'चुकलेल्या मतांतूनच खरें मत पुढें निघेतें.'[1] तर हें उत्कृष्ट वचन आमच्या होतकरू विद्वानांनीं नेहमीं लक्षांत ठेवावें. दुसरें असें कीं, ज्यांवर पुष्कळ प्रकारांनीं मतभेद होण्याचा संभव असे जे भाषेच्या संबंधाचे वगैरे विषय त्यांवर कोणीं आपले विचार प्रगट केले असतां, त्यांवर इतरांची जर कांहींच चर्चा झाली नाहीं, तर त्यांत त्या लिहिणारास हर्ष मानण्याचें कारण मुळींच नाहीं!

[1] 'Error is but an opinion in the making.'—Milton.

उलटें त्याबद्दल त्यास वाईटच वाटणें योग्य आहे; कारण तशानें त्याचा लेख त्याच्याच पाशीं राहिला असें होतें. जानसन ह्मणतो, 'ग्रंथकारास उपेक्षेसारखें भयाचें कारण कोणतें नाहीं.'[1] यास्तव आह्मी सर्वांस आणखी एकदां शेवटीं असें सुचवितों कीं, आमच्या विरुद्ध जर कोणाचे अभिप्राय येतील तर ते आह्मी मोठ्या प्रेमानें वाचूं, व ते लिहिणाराचे आभार मानून आमच्या बुद्धीनें जें त्यांवर आह्मांस प्रत्युत्तर देणें सुचेल तें देऊन आमच्या दीन भाषेचा भाग्योदय झाला असें समजूं!

विद्वत्त्व आणि कवित्व.

सौवर्णानि सरोजानि निर्मातुं सन्ति शिल्पिनः ।
तत्र सौरभनिर्माणे चतुरश्चतुराननः ॥[2]

अंक ३ रा.—(१) काव्यविवेचनशास्त्र; त्याचा आपल्या लोकांत अभाव. (२) प्रकृत निबंधाचा विषय. (३) कवितेच्या स्वरूपाविषयीं निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळी मतें. (४) काव्याचें लक्षण; उदाहरणें. (५) कवित्व ईश्वरी देणें होय; प्रासादिक कवितेचीं उदाहरणें. (६) अशा कवितांतील चमत्कारिक खुबी. (७)—

१. काव्यविवेचनाविषयक ग्रंथ इंग्रेजी भाषेप्रमाणें संस्कृतांत नसल्यामुळें काव्याचें स्वरूप काय, कवीस कोणते गुण अवश्य पाहिजेत, कवित्व ही ईश्वरी देणगी होय किंवा ती प्रयत्नाधीन आहे, वगैरे गोष्टींचें निरूपण केलेलें ज्या भाषेंत कोठें सांपडत नाहीं. यावरून वरील विषयांवर संस्कृतांत कोठें कांहींच लिहिलेलें नाहीं असा ह्मणण्याचा अर्थ नाहीं. साहित्यग्रंथांतून तसेंच कोठें कोठें काव्यांतून नाटकांतून वगैरे यासंबंधें मोठे मार्मिक विचार प्रकट केलेले आढळतात. आणि ज्या आपल्या देशाचें भाषावैभव मुख्य कवितेच होय, व ज्यांत ती इतक्या परिपक्व दशेस येऊन पोंचलेली दृष्टीस पडते त्यांतील लोकांच्या मनांत वरील विचार येऊन त्यांचा उल्लेख जागजागीं दृष्टीस पडतो यांत कांहीं नवलहि नाहीं;–तसा तो नसता ह्मणजे मात्र मोठ्या आश्चर्याची गोष्ट होती! असो; तरी या विषयाचें विवेचन अलीकडे इंग्लंड वगैरे देशांत जितपत झालें तितपत या पूर्वी कोठें–ह्मणजे आपल्या देशांत, किंवा ग्रीस, इटाली देशांतहि–झालें नसेल असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आपल्या लोकांत तर या काव्यविवेचनशास्त्राचा अलीकडे मुळींच लय झाला आहे असें ह्मटल्यास हरकत नाहीं. आपल्या जुन्या पंडितांस काव्याभिरुचि कितपत असते हें त्यांच्या संस्कृत कवितेवरून, त्यांच्या टीकांवरून, व संभा-

---

१ To an author nothing is more dangerous than neglect.' —Johnson.

२ "सोन्याचीं कमलें कारागिरांच्या हातून होतील; पण त्यांत सुगंध निर्माण करणें ही करामत एका ब्रह्मदेवाचीच !"

घणप्रसंगीं मोठमोठ्या संस्कृत कवींच्या ग्रंथांतून ज्या प्रकारचीं सुभाषितें ते काढतात, त्यांवरून अगदीं स्पष्ट दिसून येतें. युरोपांतील सामान्य पंडितांस आमचे काव्यग्रंथ जसे समजतात तसे इकडील मोठमोठ्या शास्त्रज्ञांसहि अगदींच समजत नाहींत; व त्यांतील अप्रतिम रसाचा आस्वाद घेण्यास जर हे परस्थ लोक आह्मांस न शिकवते तर तो आह्मांस कधींहि समजताना यांतहि अगदीं संशय नाहीं ! सारांश या शास्त्राची चांगली माहिती ज्यास करून घेणें असेल त्यानें या विषयावरील इंग्रेजी ग्रंथ वाचून त्यांचें सतत मनन केलें पाहिजे. तें केलें असतां काव्यांचें मर्म जाणण्याची त्याच्या अंगीं उत्कृष्ट शक्ति येऊन आनंदाचें एक मोठें साधन त्यानें अक्षयीं आपलेंसें करून ठेवल्याप्रमाणें होईल.

२. या निबंधांत काव्याविषयीं सविस्तर विवरण करण्याचा उद्देश नाहीं. यांत एवढ्याच गोष्टीचा विचार करणें आहे कीं, कवित्व आणि विद्वत्त्व यांचा वस्तुतः कांहीं संबंध आहे कीं नाहीं;—ह्मणजे विद्वान् झाला कीं तो कवि झालाच, किंवा कवि असला कीं तो विद्वान् असावयाचाच असा कांहीं नित्य संबंध आहे किंवा काय ! याविषयीं समजूत होण्यास मराठी वाचकांकरतां अद्याप कोठें कांहींहि लिहिलेलें आढळत नाहीं; यास्तव हा विषय त्यांस अगदीं नवा व त्यामुळें विशेष मजेचा वाटेल असें जाणून त्याविषयीं या अंकांत लिहितों.

३. आतां पहिल्यानें कविता ह्मणजे काय याविषयीं विचार करूं. कवितेचें खरें स्वरूप आपल्या लोकांत अजूनहि फारच थोड्यांस समजतें. बाकीच्यांनीं त्याविषयीं कधींहि नीट विचार केला नसल्यामुळें, व हा विचार करण्याची योग्यताहि बहुतेकांस नसल्यामुळें, कवितेविषयीं त्यांच्या निरनिराळ्या समजुती असतात. जे अगदींच अप्रबुद्ध आहेत त्यांची समजूत तर अर्थात् हीच असते कीं, छंदोबद्ध पदरचना ह्मणजे पद्य हीच कविता. मग या पद्यांत कांहीं कां असेना ! अमरकोशाचे श्लोक, भर्तृहरीच्या कारिका, वाग्भट्टाचे वैद्यकावरील श्लोक, अलीकडे मुलांकरतां केलेले पद्यरूप लहान इतिहास, हीं सर्व त्यांच्या मतें कवितेखालींच मोडतात. उद्यां बाजारांतील सर्व जिनसांच्या भावांचें कोष्टक जर कोणीं कवीनें पद्यरूप केलें, तर त्या कोष्टकासहि रघुवंशाबरोबर व शेक्सपीयर कवीच्या नाटकांबरोबर ते काव्याच्या वर्गांत सामील करतील ! सारांश, कवितेचें स्वरूप ते तिच्या नेहमींच्या वेषावरून मात्र जाणतात. जर तिनें गद्याचा वेष घेतला, किंवा गद्यानें तिचा वेष घेतला, तर दोहों ठिकाणीं ते फसून जातात. असो; हा एक प्रकार झाला. याहून वरचा पायरी यमक, प्रास इत्यादिकांच्या भोक्त्यांची. यांच्या मतें ज्या पद्यांत यमकांची, प्रासांची वगैरे खूप रेलचेल असेल ती उत्कृष्ट कविता. ही परीक्षा ह्मणजे स्त्रियांचें रूप त्यांच्या अंगावरच्या दागदागिन्यांवर लेखण्यासारखी होय. या लोकांच्या मतें अर्थातच मोरोपंतासारखा कवि आजपर्यंत

झाला नाहीं व पुढें होणार नाहीं! पण त्यांस एवढें समजत नाहीं कीं, यमकांची, प्रासांची गर्दी ही जरी एका प्रकारच्या बुद्धीची दर्शक होय, तरी ही बुद्धि व कवित्व हीं एक नव्हेत. अष्टावधानी, अठरा अवधानी असा मनुष्य असला ह्मणजे जसा तो महाबुद्धिमान् असतोच असा नेम नाहीं; किंवा उत्कृष्ट कसरतवाला असला कीं, तो मोठा शूर असून सैनाधिपत्यास नेहमीं योग्य असेलच असाहि नेम सांगतां येणार नाहीं; त्याप्रमाणेंच मोठमोठीं यमकें, चमत्कारिक प्रास हीं साधतां येणें हें कवित्वाचें दर्शकच होय असें ह्मणणें व्यर्थ आहे. अशा यमकप्रासप्रचुर पद्यांपासून मनास मोठा चमत्कार वाटेल यांत संशय नाहीं; पण तो चमत्कार वरच्या दोघां मनुष्यांची कृति पाहून जसा वाटेल तसाच. त्यांपासून खरा उपयोग फार थोडा आहे, ह्मणजे मनास कांहीं वेळ मौज वाटेल इतकाच! याहूनहि वरची पायरी श्लेषप्रिय दुर्विदग्ध लोकांची. या तिसऱ्या वर्गांत सर्व जुन्या शास्त्रग्रंथांस घातलें असतां चालेल. यांस खऱ्या कवितेचें रमणीयत्व व तिचे मुग्धविलास अगदींच कळत नाहींत! न्यायमीमांसादि शास्त्रांतील कोट्यांत घटून पूर्वपक्ष उत्तरपक्ष यांची परस्परांत नेहमीं झटापट करणाऱ्या या प्रचंड मल्लांचें उग्र रूप पहातांच बिचाऱ्या कवितेचा थरकांप होतो! अशा दांडगाईची तीस कधीं संवय नसल्यामुळें ती त्यांच्या हातीं सांपडतांच बहुधा मृतप्राय होते! मग पुढची गोष्ट कशाला हवी? हे तिची परीक्षा ह्मणजे एखाद्या शास्त्रवादाप्रमाणें करणार; ह्मणजे कोट्यांवर कोट्या लढवून जसें त्यांचें पीठनपीठ करून सोडायाचें, तशीच कवितेचीहि दशा! तिची ताणाताण करून तींतील पदांवर नानातऱ्हेचे चित्रविचित्र अर्थ बसवायाचे. शृंगाराचा वैराग्यपर; वैराग्याचा शृंगारपर असा चमत्कारिक अर्थ करून बिचाऱ्या कवीच्या स्वप्नींहि आली नसेल अशी त्याच्या ग्रंथाची दुर्दशा करून सोडावयाची. शंकराचार्यांच्या नांवावर 'आनंदलहरी' व 'अमरुशतक' ह्मणून दोन उत्कृष्ट काव्यें संस्कृतांत प्रसिद्ध आहेत. या दोहोंत शृंगाराचा विषय आहे पण आमच्या पंडितांस शब्दाचें प्रसन्नार्थत्व व एकार्थत्व कधींहि सहन होत नसतात. त्यांच्यांतून एकानें आपली तीव्र बुद्धि खर्चून व एकाक्षरी कोशाचें बहुधा बळकट पाठबळ घेऊन वरील काव्यांतील शब्दांचा रंगेलपणा काढून टाकून खऱ्या रसिकाबरोबर त्यांस वैराग्यांत लोटून दिलें आहे! हाच प्रकार एका शहाण्या टीकाकारानें 'शाकुंतल' नाटकांतील आरंभींच्या श्लोकाशीं केला आहे असेंहि ऐकण्यांत येतें. पण इतक्यावरच गोष्ट गेली असेल तर कालिदासाचें मोठें भाग्यच समजलें पाहिजे! कां कीं न जाणों, त्याचें तें सगळें नाटकचें नाटक स्वतःस न कळतां वैराग्यपर अर्थाचेंहि बांधलें गेलें असून दोन हजार वर्षांनीं त्याचा गर्भितार्थ जर या विशालबुद्धि टीकाकारानें काढला असता, तर एवढें नाटक रचूनहि त्याचा अर्थ स्वतःसच नीट न कळल्याचें मोठें अज्ञान आपल्या महाकवीच्या पदरीं आलें असतें! असा बुद्धीचा व

काळाचा अपव्यय केल्याचें आणखीहि एक अलीकडचें उदाहरण येथें सांगितल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. तें पुष्कळांस सहज प्रत्यक्ष पहातां येईल. आमचे मराठीचे वैय्याकरण व प्रसिद्ध ग्रंथकार दादोबा पांडुरंग* यांनीं 'केकावली'वर सुमारें आठ दहा वर्षांपूर्वी एक भली लांब टीका करून ती प्रसिद्ध केली हें सर्वांस माहीत असेलच. त्यांत त्यांनीं बुद्धया आड रानांत शिरून केलेले विलक्षण अर्थ पुष्कळ आहेत. त्यांवर यापूर्वी पुष्कळ चर्चा मागेंच झाली; व तींत एवढ्या मोठ्या ग्रंथकाराची व लोकोपकारी सद्गृहस्थाची होऊं नये अशा चारगटपणाची विनाकारण पुष्कळ विटंबनाहि झाली हेंहि येथें लिहिणें आह्मांस वाजवी वाटतें. असो; त्या टीकेच्या संबंधानें प्रस्तुत प्रसंगीं लिहावयाचें तें हेंच कीं, तींत पहिल्या केकेवर व्याख्या देतांना दादोबांनीं वरील अप्रयोजक टीकाकारांचा बाणा उचलला आहे. पहिल्या मंगलाचरणरूप केकेचा अर्थ अगदीं उघड असतां तीवर पंचवीस तीस पानें व्याख्या देऊन तिचा अर्थ वेदान्तपर लावला आहे! असो; तेव्हां श्लेष ह्मणजे कवितेचा जीव प्राण, व पांडित्याचा परमोत्कर्ष ह्मणजे चार वर्षांच्या पोराच्या बोलण्यांतहि निरनिराळे अर्थ काढणें, असें मानणारांचा हा तिसरा वर्ग झाला. आतां याहूनहि वरचा वर्ग नादलुब्ध लोकांचा. यांच्या मतें कवितेचें सर्वस्व पदरचनेंतील माधुर्य होय. शब्द अंमळ थाटामाटाचे घातलेले असून ते कानास गोड लागतीलसे असले कीं झाली उत्कृष्ट कविता. ही परीक्षा ह्मणजे स्त्रियांच्या रूपाचें मान त्यांच्या गळ्यावर ह्मणजे मधुर स्वरावर बसविण्यासारखें असमंजस आहे. मधुर रचना हें उत्कृष्ट कवितेचें एक अंग खरें; पण तिचें सर्वस्व नव्हे. याप्रमाणें निरनिराळे लोकांचीं कवित्वाविषयींचीं भिन्न भिन्न मतें सांगितलीं. पण एवढ्यांतच सर्वांचा समावेश होत नाहीं. या चौघांशिवाय बाकीचे जे कोणी आहेत त्यांचा कशाविषयींच आग्रह नसतो. त्यांचा अभिप्राय नेहमीं चारचौघां विद्वानांसारखा पडायाचा,—ह्मणजे ते जें ह्मणतील त्यांचा अनुवाद करणें हेंच त्यांचें मत! ते स्वतः ह्मणून कधीं विचार करायाचे नाहींत. ढालीसारखीं पागोटीं जाऊन चंबूचा प्रघात पडला, गजरेदार आंगरखे जाऊन पोकळ आंगरख्यांची भास पडली, हें पाहून विद्वानांच्या अभिरुचीस ते जसे अनुसरत गेले, त्याचप्रमाणें त्यांचीं सर्व गोष्टींविषयीं मतें वरचेवर फिरत असतात. तीं अशीं बेचूक कीं, कोणी मनुष्य जर खेडेगांवांत जाऊन राहिला किंवा देशांतरास गेला असला तर पुनः शहरास परत आल्यावर अशा मनुष्यांशीं त्यानें चार घटका प्रसंग केला कीं पुरे, त्यास तोंपर्यंत झालेल्या फेरफारांची सगळी माहिती तेव्हांच व्हावयाची! असे लोक जर विद्वानांच्या समाजांत मेजवानीस बसले असले तर त्यांचें लक्ष नेहमीं विद्वानांच्या तोंडाकडे असेल, व त्यांच्या

* हे शाळाखात्यांत नोकर होते व यांनीं 'यशोदा पांडुरंगी' या नांवाची केकावलीवर टीका केली आहे.

तोंडावर जसे रुचिभेदेंकरून विकार झालेले दृष्टीस पडतील, तसे हुबेहुब आपल्याहि तोंडावर ते उठवितील,–ह्मणजे प्रसंगानुसार साखरेच्याहि पदार्थाला तोंड आंबट करतील, किंवा एखादा तुरट पदार्थ मोठा मिष्ट ह्मणून त्याचा स्वाद वाखाणतील! सारांश, अजून आपल्या लोकांत खरे परीक्षक फारच थोडे आहेत; व यामुळें काव्य ह्मणजे काय हें एकंदर लोकांस कांहींच कळत नाहीं.

४. काव्याचें बरोबर थोडक्यांत लक्षण देणें फार कठिण आहे तें इंग्रज ग्रंथकारांनीं पांच पंचवीस प्रकारांनीं दिलें आहे. तरी आपल्या संस्कृत ग्रंथांतील 'रसात्मकं काव्यम्' ह्मणजे रसयुक्त तें काव्य हें लक्षण सध्यांच्या पक्षीं आपणांस पुरे आहे. हें लक्षण ध्यानांत धरलें असतां वरील सर्व भ्रांति दूर होतील, ह्मणजे काव्यास पद्यरचना, यमक, प्रास, श्लेष किंवहुना वर्णमाधुर्य हीं अवश्य हवींच असा कांहीं नेम नाहीं हें तेव्हांच लक्षांत येईल. अशा प्रकारचीं काव्यें आपल्या मराठींतहि नाहींतशीं नाहींत. हीं उदाहरणें पहा—

"कोणी एक ओगलजी नांवाचा गृहस्थ काश्मीर देशीं रहात होता. तो वैशाखमासीं एके दिवशीं संध्याकाळीं आपला मुलगा आन्या यास संगातीं घेऊन एके लहान डोंगरीवर बसला आहे, आणि तेथून समोर दृष्टीस पडताहेत ते रमणीय पदार्थ त्यास दाखवितो आहे. ते वेळीं सूर्य अस्तास जात होता, तेव्हां त्यास अशी कल्पना झाली कीं, तो सर्व विश्वाला सोनेरी रंगाचें वस्त्र पांघरवून चालला आहे काय! किंवा हे डोंगर सोन्याचेच आहेत काय! अशा कल्पना करीत ते सुख घेत बसले असतां, तितक्यांत तिकडून एक धनगर आपला कळप चारणीवरून घराकडे वळवून चालला होता; त्यानें सुस्वर गायन केलें, तें त्या बापलेकांच्या कानीं पडून ते तिकडे पाहूं लागले."

बाळमित्र–कांटेझाड.

ऋतूंचें वर्णन.

"बाळा नुकताच शेकून आणि ओले गव्हांच्या ओंब्या खाऊन आलेला होता, आणि ह्मणतो 'अहाहा! असा सदा हिंवाळाच असता तर बरें होतें! यांचें सुख काय सांगूं! ह्यांत नद्यांचें पाणी किती स्वच्छ आणि किती मिष्ट! लोंकरी वस्त्रें काय सुख देतात! पोटांत भूक, अन्नास रुचि, आणि निद्रा तरी काय गाढ येते ती!' तें ऐकून गोविंदशेट, त्याचा बाप, त्यास ह्मणाला, 'बरें तर, ह्मणतोस असेंच स्मरणवहींत लिहून ठेव.' बाळानें तसें केलें. पुढें हिंवाळा निघून गेला, आणि उन्हाळा आला. तेव्हां संपूर्ण वृक्ष पालवी फुटून फलपुष्पयुक्त झाले आहेत; वायु मंद सुगंध शीतळ वहात आहे; लोक चंदनाच्या उट्या घेऊन गळ्यांत पुष्पांच्या माळा घालून फिरताहेत, व नानाप्रकारचे शीतळ उपचार करताहेत; बागांमध्यें कारंजीं उडाबिताहेत; त्यांचे तुषार अंगांस लागून अत्यंत सुख करताहेत, तसेंच पिकलेलीं फळें, आंबे, फणस, जांब,

अंजीर, द्राक्षें इत्यादि जिव्हेस अमृतासारखी रुचि देताहेत. तें सर्व सुख पाहून बाळा ह्मणतो, 'अहाहा! असाच सदां उन्हाळा असता तर बरें होतें.' गोविंदशेट ह्मणाला, मुला, ह्मणतोस असेंच स्मरणवहीवर लिहून ठेव.' बाळानें तसें केलें. नंतर पावसाळा आला. त्यासमयीं जिकडे तिकडे हिरवीं चार गवतें व नानाप्रकारचीं झाडें उगवलीं आहेत; नद्यांचे प्रवाह चालले आहेत; शाकभाज्या पुष्कळ झालेल्या आहेत; जिकडे तिकडे पाणी जमलें आहे; त्यांतून कागदांचीं तारवें करून मुलें पोंहविताहेत; डोईवर छत्र्या, सखलादीच्या टोप्या घेऊन पावसांतून लोक चालले आहेत; पुढें शेतें पिकलीं, त्यांत नानाप्रकारचीं धान्यें झालीं आहेत. तें पाहून बाळा ह्मणाला, बाबा, काय चमत्कार हा! हा पावसाळा सदां असाच असता तर बरें होतें! बाप ह्मणाला, 'मुला, हें त्या वहींत लिहून ठेव!' बाळानें तसें केलें.

कित्ता—तीन काळ.

अशीं काव्यें या ग्रंथांत पुष्कळच आहेत; फार तर काय, पण हें सगळें पुस्तक काव्यमयच आहे असें ह्मटलें असतां चालेल. हें मूळचें एका फ्रेंच बाईनें केलें असून या ग्रंथाची सर्व जगभर प्रसिद्धि झाली आहे. आपल्या मराठींत तर हें भाषांतर इतकें उत्कृष्ट उतरलें आहे कीं, तें परभाषेतलें असेलशी शंका सुद्धां येत नाहीं. हें पुस्तक वाचलें असतां मराठीची दुर्दशा वीस पंचवीस वर्षांत किती झाली हें पुरतेपणीं चित्तावर ठसून फार वाईट वाटतें, व पुढील पंचवीस वर्षांकडे नजर देण्यास भय वाटतें! असो; या प्रसंगीं आमच्या भाषेच्या हितचिंतकांस हा ग्रंथ वरचेवर वाचण्याची फार फार शिफारस केल्यावांचून आमच्यानें पुढें लिहवत नाहीं!

असेच उतारे 'इसापनीति,' 'आरबी भाषेंतील गोष्टी,' 'मुक्तमाला,' 'थोरले माधवराव आणि जयपाळ,' अशा ग्रंथांतूनहि आणखी हवे तितके घेतां येतील.

वरील दोन काव्यें वाचून आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् असमंजसपणानें हंसूं येईल; पण त्यांनीं पक्कें समजावें कीं, असें जोंपर्यंत होईल, व त्यांत त्यांस अंतःकरणास लागण्यासारखें कांहींच भासणार नाहीं, तोंपर्यंत कवितेचा स्वाद त्यांस मुळींच कळला नाहीं! तसेंच आमच्या वाचकांत जर कोणी शास्त्री असतील तर त्यांसहि वरील गोष्टीचा मोठाच चमत्कार वाटेल! आपण कांहीं भलतेंच भ्रांतींत वाचीत आहों, किंवा हें लिहिणारानें तरी कांहीं भलतेंच भ्रांतींत लिहिलें असावें, अशा कल्पना त्यांस बहुधा कराव्या लागतील! पण दोघांपैकीं भ्रांतींत कोणीच नाहीं हें दाखविण्याकरितां त्यांच्या परिचयांतलाच असा एक उतारा येथें घेतों—

तत्तु तीरं समासाद्य तमसाथा मुनिस्तदा।
शिष्यमाह स्थितं पार्श्वे दृष्ट्वा तीर्थमकर्दमम्॥
अकर्दममिदं तीर्थं भारद्वाज निशामय।

रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा ॥
इदं तीर्थं समं सौम्यं सुजलं सूक्ष्मवालुकम् ।
न्यस्यतां कलशस्तात दीयतां वल्कलं मम ॥

बालकांड—सर्ग २.

हें आद्यकवीचें काव्य कोणास 'रमणीय' वाटत नाहीं? व कोणाचें चित्त 'प्रसन्न' व 'सौम्य' करीत नाहीं? वास्तविक पहातां यांत एवढें काय आहे बरें? गांवढळ कुणब्यांसहि ज्या गोष्टी दररोज दृष्टीस पडतात त्याच येथें वर्णिल्या आहेत. पण ह्मणूनच हीं पद्यें एवढीं रमणीय झालीं आहेत! तीं समजण्यास यत्किंचितहि श्रम न पडून प्रत्येक मनुष्याच्या मनांत नदी पाहिली असतां ज्या कल्पना सहज भरतात त्याच येथें कवीनें अगदीं साध्या रीतीनें बोलून दाखविल्या आहेत. या वर्णनांत एक मात्र अलंकार घातला आहे,—किंवा घातला आहे ह्मणण्यापेक्षां आला आहे हेंच ह्मणणें बरोबर आहे. कां कीं, तो इतका सहज आला आहे,—व ह्मणूनच त्या ठिकाणीं इतका शोभतो कीं, तो आणण्यास कवीस यत्किंचितहि प्रयत्न पडला नसावा. असो; एकंदरींत या काव्याची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच आहे! ज्यानें आजपर्यंत कोट्यवधि मनुष्यांचें रंजन करून त्यांच्या प्रशंसेचें मोर्तब जसें काय काळास दाखवीत आहे त्या काव्यास येथच्या स्तुतीच्या दोन शब्दांनीं किती थोरवी येणार!

याचप्रमाणें पुढें क्रौंच पक्ष्याचा वृत्तान्त लिहिला आहे तोहि किती हृदयंगम आहे! तो वाचूनहि ज्याची वृत्ति पहिल्याप्रमाणेंच तटस्थ राहील त्यास देण्यास दुसऱ्या कोणाची उपमा साजणार नाहीं,—एक त्या निषादाचीच* (कोळ्याची) साजेल।

तेव्हां एकंदर सांगायाचें काय कीं, सत्काव्यास पद्यरचना, यमक, प्रास, श्लेष, किंबहुना वर्णमाधुर्यहि, यांपैकीं कोणाची सुद्धां बिलकूल गरज नाहीं! जें वाचल्यानें किंवा ऐकिल्यानें मनाच्या वृत्ति प्रसन्न होऊन तो तो रस अंतःकरणांत सहज बिंबून जातो त्यास काव्य ह्मणावें. पण हें जर होत नाहीं, तर छंद, यमक, श्लेष, मृदुत्व यांविषयींची सर्व खटपट व्यर्थ!

५. वरील सर्व गोष्टींचा यथास्थित विचार केला असतां लक्षांत येईल कीं, कवित्व हें अंगीं आणूं जातां येणारें नव्हे; तें ईश्वराचेंच देणें होय. यास्तव सौंदर्य, सुस्वर, इत्यादि मनुष्याच्या अस्वाधीन असणारे गुण बळेंच आपले ठायीं आणणारांच्या प्रयत्नांस जितपत यश येतें, तितपतच अशा दांडगाईनें कवि होऊं पहाणारांचा प्रयत्न सिद्धीस जातो; ह्मणजे नुसत्या छानछुकींत व सुरेखपणांत जितकें अंतर, तितकेंच कृत्रिम प्रकारांनीं आणलेल्या शोभेंत व खऱ्या कवित्वांत! आणि ज्याप्रमाणें छानछूक ही बहुधा हवें त्यास प्रयत्नांतीं साधण्यासारखी असते, त्याचप्रमाणें कवितेचा बाह्य वेष

* मा निषाद प्रतिष्ठां त्वं अगमः शाश्वतीः समाः । यत्क्रौञ्चमिथुनादेकं अवधीः काममोहितम् ॥

ह्मणजे छंद, मृदुरचना इत्यादिहि सामान्य बुद्धीच्या सर्व लोकांस बहुधा साधतां येईल. आतां हें सर्व कोणास अधिक, कोणास कमी, असें साधेल खरें; पण तें फार फार उत्कृष्ट साधलें तरी खऱ्या रसिकास त्यापासून तशी बहार वाटणार नाहीं; कीं जशी अगदीं साध्या पण अस्सल अशा कवितेच्या चुटक्यानें वाटेल! उदाहरण—

वर्षावावीण सागर जैसा जळें निर्भर ।
तैसाचि निरुपचार संतोषी जो ॥
व्यापक आणि उदास जैसें कां आकाश ।
तैसें जयाचें मानस सर्वत्र गा ॥
संसारव्यथे फिटला जो नैराश्यें निवटला ।
व्याधाहातोनि सुटला विहंग जैसा ॥
घरींचियां उजेड करावा परकियां अंधार पाडावा ।
हें नेणेंचि गा पांडवा दीप जैसा ॥
जो खांडावया घाव घाली कां लावणी जेणें केली ।
दोघां एकाचि सावली दे वृक्ष जैसा ॥
जो निंदेतें नेघे स्तुतीनें न श्लाघे ।
आकाशा न लागे लेप जैसा ॥

ज्ञानेश्वरी.

हें भगवद्भक्तांचें वर्णन केवढें उदात्त आहे! व यांत छंद, पदरचना, वगैरे अगदीं साधी असल्यामुळें तर हें फारच शोभतें. अशा ठिकाणीं संस्कृतांतले शिखरिणी, मंदाक्रांता वगैरे झोकदार मोठाले छंद, किंवा मराठींतली साकी, दिंडी इत्यादि मंजुळ वृत्तें अगदींच कामास पडतीं ना!

दुसरें—

कांरे नाठविसी कृपाळु देवासी । पोशीतो जगासी एकलाची ॥
फुटे तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयासीं कोण घाली ॥
बाळा दुग्ध कोणां केलेंसें उत्पत्ती । वाढवी श्रीपती सवें दोन्ही ॥
तुका ह्मणे त्याचें नांव विश्वभर । करा निरंतर ध्यान त्याचें ॥
ऐसें संत झाले कळीं । तोंडी तमाखूची नळी ॥
स्नान संध्या बुडवीली । पुढें भांग ओढवली ॥
भांगभुर्का हें साधन । पचनीं पडे मद्यपान ॥
तुका ह्मणे अवघे ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥
आली सिंहस्थ पर्वणी न्हाव्या भटां झाली धणी ॥
अंतरीं पापाच्या कोढी । वरी बोडी डोयी दाढी ॥
जें बोडिलें तें निघालें । सांग काय पालटलें ॥
पाप गेल्याची खूण । नाहीं पालटले अवगुण ॥
भक्तिभावेंवीण । तुका ह्मणे अवघा शीण ॥

अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो ॥
आत्माअनुभवीं चोखाळिल्या वाटा । त्याच्या माथां जटा असो नसो ॥
परस्त्रीचे ठायीं जो कां नपुंसक । त्याचे अंगा राख असो नसो ॥
परद्रव्या अंध निंदेसी जो मुका । तोचि संत देखा तुका ह्मणे ॥

आणखी एक—

(वनाचें वर्णन) देखे प्रचंड महागिरी विशाळ पर्वताचिया दरी ।
जळें तुंबलीं सरितासरीं समुद्रतुल्य अगाध ॥
नाना वृक्षांचीं अचाट डांगें लागलीं घनदाट ।
माजीं निर्झरोदकाचे पाट सैरावैरा धांवती ॥
माथां उचलूनी दिनकर छायें रक्षिला अंधकार ।
माजीं श्वापदगणांचे भार सुखावले सुखवस्ती ॥
(नदीचें वर्णन) नदी मालिनी पवित्रजीवनीं वाहे जैशी देवतटिनी ।
तरंगलिंगें सुफेनसुमनीं सुपूजितें शोभती ॥
(पुढील वृत्तांत) मग गर्जूनि नराधीशें ह्मणितलें आश्रमीं कोण असे ।
हें परिसोनि इंदिरावेशें लावण्यकलिका प्रगटली ॥
कनकलतिका सौदामिनी कीं चंद्रकलिका तनुधारिणी ।
सुवर्णकेतकीपत्रवर्णी सुवर्णखाणी हरिणाक्षी ॥

मुक्तेश्वर.

६. एवढे उतारे पुरेत. यांवरून खऱ्या कवित्वाचें स्वरूप वाचकांच्या लक्षांत येईल. तें हेंच कीं, इतर कोणत्याहि गोष्टींचें साहाय्य न घेतां अर्थाच्याच केवळ अंगभूत सौंदर्यानें व तद्व्यंजक शब्दांच्या अपूर्व सौष्ठवानें मनास चमत्कार भासविण्याची शक्ति. ही शक्ति कवीशिवाय इतरास समजणें अशक्य होय. फार तर काय, पण कवीची कवीसहि ती सांगतां येणार नाहीं ! व ह्मणूनच या शक्तीस कवि व इतर लोक ईश्वरी प्रेरणा ह्मणतात ! सामान्य मनुष्याची अक्कल व प्रयत्न कवितेच्या बाह्यांगांपर्यंत मात्र पोंचेल; व ह्मणूनच काव्यांत रस आणावयाचा असल्यास चांगलीं मोठालीं वृत्तें, अर्थालंकार, शब्दालंकार इत्यादिकांचें मजबूत साह्य घेतल्याखेरीज त्यांचें कधींहि चालणार नाहीं पण वरील उतारे पहा बरें ! त्यांस असें बाहेरचें साहित्य लवमात्रहि लागलें नाहीं. छंद, ओवी व अभंग– ज्यांत इतर छंदांप्रमाणें मोठेंसें माधुर्य आहे असें नाहीं; व ज्यांची रचना साऱ्या वृत्तांत अगदीं सोपी असल्यामुळें गद्यांत व जींत फारसा फेर नाहीं; शब्दालंकार पाहिला तर शेवटलें एकाक्षरी यमक एवढाच; आणि अर्थालंकारहि मोठ्या प्रयासानें उत्कृष्ट निवडून घातले आहेत असेंहि नाहीं. बरें, अशा कवितेचा विषय तरी कांहीं अपूर्व असतो काय? कांहीं नाहीं; ज्या गोष्टी चारचौघांस नेहमींच्या माहीत असतात त्याच प्रायः तींत असतात ! पण कवीच्या वाणीनें त्या निघाल्या कीं पुरे; जादूगीराच्या कांडीनें त्याच

पदार्थांस जशी अपूर्वता प्राप्त होते, त्याप्रमाणें अशा नेहमींच्या गोष्टींसहि कांहीं अपूर्व शोभा येते! एरवींचीं पद्यें कितीहि उत्कृष्ट असलीं, तरी त्यांचा एकदोनदां वाचतांच कंटाळा येऊन जातो; पण अशांचें साधें सौंदर्य शेंकडोंदां वाचल्यानेंहि कमी न भासतां वाचकांस

प्रतिक्षण नवीच दे रुचि———

७. असो; याप्रमाणें स्वतःसिद्ध अशा महाकवींच्या कवितेचें स्वरूप वर लिहिलें आहे त्यावरून आमच्या वाचकांच्या मनांत बरेंच आलें असेल असें आह्मांस वाटतें. येथवर हातीं घेतलेल्या विषयाचा अर्धा भाग–ह्मणजे कवित्व ह्मणजे काय याविषयीं बराच विचार झाला. पण बाकीचा सर्व विषय थोडक्यांत आटपण्यासारखा नव्हे, ह्मणून सध्यां येथेंच थांबून पुढील खेपेस तो पुरा करूं.

हठादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता
जनः स्पर्धालुश्चेदहह कविना वश्यवचसा।
भवेदद्य श्वो वा किमिह बहुना पापिनि कलौ
घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः॥ [1]

भवभूति.

अंक ४ था.—(१) अवतरण. (२) कवित्वास विद्वत्त्व अनुकूल होय हा लोकभ्रम. (३) तर्कशास्त्राचा कवित्वाशीं अत्यंत विरोध; कवीचें मन आणि तत्वज्ञाचें मन; उदाहरण—चंद्र. (४) कल्पनेच्या विकासानंतर बुद्धीचा विकास. (५) कवित्वास आवश्यक गुण. (६) 'कवि' शब्दाची व्याख्या. (७) कवीचा मुख्य गुण—सहृदयता—(८) स्वभाववर्णन. (९) प्राचीन कवींच्या उत्कर्षाचीं कारणें. (१०) इतर अप्रधान गुण. (११) दोहोंचा योग. (१२) विद्वत्तेची गति कोठपर्यंत? (१३) एकंदर सिद्धांत.

१. मागील अंकांत अस्सल कवित्वाचें कांहीं स्वरूप सांगितलें. आतां कृत्रिम कवितेचें–ह्मणजे मूळची कवित्वस्फूर्ति नसतां विद्वत्तेच्याच जोरावर रचलेल्या काव्यांचें–निरूपण करितों.

२. या विषयाच्या संबंधानें आपल्या लोकांत पुष्कळ दिवसांपासून एक मोठाच भ्रम माजला आहे. तो अर्थात् विद्वत्त्व आणि कवित्व यांचा परस्पर अभेद. फार तर काय, पण 'कवि' या शब्दाचा अर्थ 'शहाणा' असाहि पुढें होऊन गेला. आतां असें होण्याचें कारण काय असें जर कोणी विचारील तर तेंहि सांगणें कठिण आहेसें नाहीं.

---

१ "ओढून ताणून शब्दांची जुळवाजुळव करणारा मनुष्य सरस्वती ज्यांस प्रसन्न आहे अशा महाकवीशीं जर स्पर्धा करूं लागला; तर आज उद्यां मडकीं घडणाऱ्या कुंभाराचा व त्रिभुवनास ज्यानें निर्माण केलें त्या ब्रह्मदेवाचाहि कलह लागेल!! कोणीं सांगावें!"

विद्यासंपादनाचा मार्ग पूर्वीचा असा कांहीं चमत्कारिक होता कीं, मनुष्यानें एक अगदींच विद्येशिवाय रहावें किंवा तिच्या सर्व शाखांचें पूर्ण अध्ययन तरी करावें; मध्यंतरीं ह्मणून मुळींच मार्ग नव्हता. तेव्हां जे नामांकित कवि होत ते अर्थातच या दुसऱ्या वर्गातलेच असत. पण गुरूच्या घरीं बारा किंवा याहूनहि अधिक वर्षें राहून त्यांनीं नुसतीं काव्येंच पढून न रहातां व्याकरण, न्याय, मीमांसा इत्यादि शास्त्रांतकीं जीं कवीस कांहीं उपयोगाचीं नाहींत, किंबहुना कवित्वास अपायकारकहि होत, त्यांतहि त्यांस पारंगत व्हावें लागे. यास्तव जे कवि निपजत ते अर्थात् अशा विद्वानांतूनच. तेव्हां सहजच कवि असला कीं तो विद्वान् असायचाच असें लोकांच्या नेहमीं दृष्टीस पडे. पण याच शब्दांचा जर व्यत्यास केला—ह्मणजे विद्वान् कवि असतात असें ह्मटलें—तर नेहमीं चालेलच असें नाहीं; या गोष्टीचा त्यांनीं नीट विचार केला नाहीं! असो; पुढें पुढें तर ह्मणजे माघ, श्रीहर्ष* यांच्या वेळीं, कवित्वास शास्त्राध्ययन अवश्यच झालें. या कवींच्या ग्रंथांतून व्याकरण, न्याय, मीमांसा, किंबहुना वैद्यक, ज्योतिष इत्यादि शास्त्रांचाहि संबंध आणलेला असतो. असें होतां होतां आलीकडे तर 'रंडागीतानि काव्यानि' येथपर्यंत येऊन मजल टेकली! असो; हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार अलीकडे सुरू झालेल्या इंग्रेजी विद्येचा. ही विद्याहि मागील संस्कृत विद्येप्रमाणेंच कवित्वास अत्यंत अनुकूल आहे, किंबहुना तीशिवाय चांगली कविता करतां येणें अशक्य होय, असा एकंदर लोकांचा समज झाला आहेसा दिसतो. अथवा हेंचसें काय; एकंदर सर्व गुणांचें अधिष्ठान इंग्रेजी विद्वत्ता होय असा या अप्रबुद्ध लोकांनीं सिद्धांत केला आहेसा वाटतो! त्यांच्या मतें ही नवी विद्वत्ता ह्मणजे कांहीं मोठी अजब चीज होय! ही जवळ असली कीं, त्या मनुष्यानें सभाग्रभागीं उभें राहून बृहस्पतीप्रमाणें श्रोत्यांस आपल्या वक्तृत्वानें थक्क करून टाकावें, कालिदासाप्रमाणें जगास चिरकाळ मोहणारी कविता करावी, शाक्यमुनीप्रमाणें † मानसिक व्यापारांची उपपत्ति काढावी, इत्यादि अनेक परस्परविरुद्ध शक्ति अशांच्या ठायीं अवश्यमेव आल्याच असें हे समजतात. फार तर काय, पण चार पांच वर्षे विद्यालयांत घालविलीं कीं, पृथ्वीवरील व्यापाराची घडामोड, राज्यव्यवस्था इत्यादि गोष्टींत किंबहुना युद्धकलादिकांतहि निपुणता प्राप्त होते असा सुद्धां कित्येकांचा समज असेल. उद्यां जर गायन-

१ शास्त्रीय कोट्यांत घटून लाखेरीज दुसरें ज्यांस कांहीं रुचेनासेंच झालें असे आपल्या देशांतील जुने पंडित वरील वाक्यानें काव्याच्या अप्रतिम रसास तुच्छ करूं पहातात. यावरून त्यांची रसिकता स्पष्टच दिसते.

* माघ शिशुपालवध नामक महाकाव्याचा कर्ता; व श्रीहर्ष नैषध नामक महाकाव्याचा कर्ता.

† हा एक बौद्धधर्मातील श्रेष्ठ पुरुष होता.

विद्येचा अभ्यास करावयाचें कोणाच्या मनांत आलें, कीं उत्कृष्ट पाकासिद्धि करायाची असली, तर तो एखाद्या विद्वानाची गांठ घेईल! सारांश,

प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां
पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः ॥ *

"सर्व गुण एके ठिकाणीं ठेवण्याविषयीं विधात्याची इच्छा दिसत नाहीं,–तर याच्या उलट दिसते;" असें सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी जें कालिदासास वाटलें, व अगदीं अलीकडेपर्यंत लोकांस वाटत असे, तें सध्यांच्या काळीं एकाएकीं खोटें ठरत चाललें कीं काय कोण जाणें असें एखाद्यास वाटेल! मागील काळीं होमर,† थुसिडिडीस्, ‡ आरिस्टाटल्, § आलेक्झांडर, ‖ असे नामांकित पुरुष निपजायास फार दीर्घकाळ लागे, व शिवाय एकेकाच्या ठायीं एकेकच गुण मोठ्या प्रयासानें वास करी; पण इंग्रेजांची सत्ता येथें होऊन त्यांची विद्या इकडे नुकतीच संचार करूं लागली तों सगळेंच मान एकदम फिरलें! शिल्पशास्त्र मोठ्या उत्कृष्ट दशेस येऊन अलीकडे जसे अद्‌भुत चमत्कार चोहोंकडे दृष्टीस पडतात, त्याहिपेक्षां बुद्धीचे चमत्कार फारच मोठाले दिसूं लागले आहेत. मनुष्याच्या मनास फार थोड्या काळांत पूर्णत्व येऊन त्यांत हरएक गुणांचा सहज समावेश व्हावा असें झालें आहे. असो; ईश्वरकृपेकरून एवढा प्रकाशाचा लोट आमच्या देशास सहन होवो ह्मणजे झालें!

वरील लेखावर पुष्कळांचे पुष्कळ आक्षेप निघतील हें आह्मी जाणतों. तरी त्या सर्वांचें निराकरण करण्यास पुष्कळ जागा लागून तें या प्रसंगासहि उचित नाहीं असें समजून त्यासंबंधें येथें कांहीं लिहीत नाहीं. वरच्या लिहिण्यांतील मुख्य मुद्दा हा आहे कीं, कवित्वास विद्वत्तेची अगदीं गरज नाहीं. निरनिराळ्या शास्त्रांत पुरतेपणीं गति होणें हें कवित्वास अनुकूल होणार नाहीं हें तर काय, पण अगदीं साक्षात् प्रतिकूलच बहुधा होणार आहे. तर्कशास्त्रासारखें तर कवित्वास अपाय करणारें कांहींच नाहीं!

३. हें वाचून आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस मोठें आश्चर्य वाटेल; व कांहीं तरी विलक्षण मत स्थापण्याच्या बुद्धीनें आह्मी हें लिहिलें आहे असेंहि कित्येकांस

---

१ हा काळ अगदीं निश्चित ह्मणून आह्मीं येथें लिहिला नव्हे. पण ज्या अर्थी थोरल्या विक्रमादित्य राजाची व आपल्या कवीची तोडातोड अजून कोणीं पक्केपणीं केली नाहीं, त्या अर्थी तसें होईपर्यंत लोकवादास अनुसरणें आह्मांस प्रशस्त वाटतें.

---

* कुमारसंभव. सर्ग ३.

† हा यूरोपमधील आद्यकवि असून यानें इलियड नांवाचें काव्य केलें आहे.

‡ हा ग्रीक राजकारणी पुरुष व कायदेपंडित होता.

§ हा ग्रीक तत्त्ववेत्ता होता व आलेक्झांडरचा गुरु होता.

‖ हा ग्रीसचा बादशाहा होता.

वाटल्यावांचून रहाणार नाहीं. यास्तव एका अनुभविक ग्रंथकाराचें प्रमाण येथें त्यांस दाखविणें अवश्य वाटतें—

नटः—नन्वयं (कविः) प्रमाणप्रवीणोऽपि श्रूयते । तदिह चंद्रिकाचंडातपयोरिव कवितातार्किकत्वयोरेकाधिकरणतामालोक्य विस्मितोऽस्मि ।

सूत्रधारः—क इह विस्मयः ।

येषां कोमलकाव्यकौशलकलालीलावती भारती
तेषां कर्कशतर्कवक्रवचनोद्गारेऽपि किं हीयते ।
यैः कांताकुचमंडले करुहाः सानंदमारोपिता–
स्तैः किं मत्तकरींद्रकुंभशिखरे नारोपणीयाः शराः ॥

प्रसन्नराघव नाटक.

"नट–हा कवि तर्कशास्त्रांतहि मोठा प्रवीण आहे ह्मणून ऐकतों. तर चांदणें व कडक ऊन हीं जशीं एकत्र असावीं त्याप्रमाणें याचें कवित्व व तर्कशक्ति एके ठिकाणीं पाहून मला मोठा चमत्कार वाटतो !"

"सूत्रधार–यांत कसचा चमत्कार ! अरे, ज्यांची वाणी कोमल काव्यरचना प्रसवते, तींतूनच तर्कशास्त्राचीं तीक्ष्ण वचनेंहि निघालीं असतां कोणती हानि झाली ?— ज्यांनीं कांताकुचमंडलीं आनंदेंकरून नखें रोंविलीं, त्यांसच मदोन्मत्त झालेल्या हत्तीच्या गंडस्थळावरहि बाण हाणण्यास कांहीं कठिण आहे काय ?"

याप्रमाणें सुमारें सात आठशें वर्षांपूर्वीच जयदेवासहि * 'कवितेचा व तार्किकत्वाचा' विरोध भासला. तेव्हां हें मत आह्मीं बळेंच स्वकपोलकल्पित काढलें आहे असें नाहीं अशी आमच्या सुज्ञ वाचकांची खचीत खात्री होईल. आणि या विषयाचा जो अंमळ बारकाईनें विचार करील त्यास खचीत कळून येईल कीं, कवीचें मन व तत्त्वज्ञाचें मन स्वभावतःच परस्परविरुद्ध होय. कवीच्या मनांत पदार्थमात्राच्या दर्शनानें कल्पनेचे नानाविध तरंग उठत असतात. ते अर्थातच बहुधा भासमय असतात. तत्त्वज्ञाचें मन पदार्थमात्राच्या वास्तविक स्वरूपाच्या शोधाकडे लागलेलें असतें; यास्तव सर्व भासमय कल्पनांचा निरास करून तें निवळ सत्याकडेच जातें. कवीचें काम ब्रह्मदेवाप्रमाणें चित्रविचित्र कल्पनासृष्टि बनविण्याचें असतें. तत्त्वज्ञाचें रसायनवेत्त्याप्रमाणें पदार्थमात्राचें पृथक्करण करण्याचें असतें. सारांश, पहिल्याचा विषय कल्पना व दुसऱ्याचा विषय सत्यासत्यविवेचन. ही भिन्नता विशेष स्पष्ट करण्याकरितां एक थोडेंसें उदाहरण येथें घेतों. साऱ्या सृष्टींत चंद्राहून रमणीय पदार्थ नाहीं. आतां याकडे कवीची व तत्त्वज्ञाची मनःप्रवृत्ति कशी होते ती बघा ! ग्रीक व रोमन लोकांनीं चंद्राच्या सौंदर्यावरून व सौम्यत्वावरून त्यास स्त्री कल्पिलें. त्यांच्या कथासमूहांत ही स्त्री पार-

* हा महान् कवि असून, यानें अष्टपदी व गीतगोविंद या नांवाचें काव्य केलें आहे.

धीण असून धनुष्य व भाता घेऊन ही वनांत पशूंमागें धांवते आहे असें वर्णन आढळतें. आपल्या कथासमूहांत तर अशा कल्पनांची गर्दीच आहे. समुद्रांतून उगवलासा दिसतो ह्मणून त्यांतून निघालेलें एक रत्न; तो उगवतांच कुमुदिनी (जणो काय हर्षानें) विकसतात ह्मणून त्यांचा पति; रात्रींच त्याचे किरण प्रकाशमान होतात ह्मणून तिचा नवरा; त्याच्या बिंबावर हरणाची आकृति दिसते ह्मणून मृगांक; त्यास पहातांच समुद्रास (जसें काय आनंदाचें) भरतें येतें, ह्मणून (दुसऱ्या कल्पनेनें) त्याचा मित्र; याच प्रमाणें अंधकाराचा शत्रु, राहूचा द्वेष्य इत्यादि संबंधहि त्याजवर आले. त्याचे किरण नेत्रांस व शरीरास सुखद होत ह्मणून शीतकर, चंद्रकांतास द्रवविणारा, इत्यादि कल्पनाहि त्यावर बसल्या. आतां या मनोरम भ्रमांचें तत्वज्ञ कसें निरसन करून टाकतो पहा! चंद्र समुद्रापासून लाखों कोस दूर आहे हें जाणून तो समुद्रोत्थ रत्न नव्हे असा तो निश्चय करतो; समुद्राची भरती, कमलांचा विकास, हीं आकर्षणादि सृष्टिव्यापारांचीं फलें होत; हरण दिसतें ती चंद्रावरील पर्वतांची छाया; राहु ह्मणतात ती पृथ्वीची छाया; अशा उपपत्ति तो करीत जातो. शेवटीं, चंद्राचे किरण थंडगार आहेत हा लोकानुभवहि त्यास सहन न होऊन उष्णतामापक यंत्रानें तो चंद्रकिरणांची उष्णता काढतो!!—झालें! याप्रमाणें कविपरंपरेनें उभारलेल्या सुंदर मंदिराचा हा कवितभ्रिपक्षी आपल्या दुर्बिणीनें व उष्णतामापक यंत्रानें समूळ विध्वंस करून सर्व सृष्टि उजाड करून सोडतो. वरील उताऱ्यांत कवितेस चांदण्याची व विचारशक्तीस कडक उनाची जी उपमा जयदेवानें दिली आहे तीहि मोठी सरस व समर्पक होय. एक तर चांदणें शांत व रमणीय असतें; आणि ऊन उपयोगाचें खरें, पण त्याची झळई कोणास आवडत नाहीं. तसेंच कविता समजण्यास सोपी असते, मनाचें रंजन करते, आणि मनास शांति देते; पण शास्त्रावरील ग्रंथ अगोदर दुर्बोध, व समजल्यावरहि त्यापासून मनास प्रगल्भता येते, त्याचें रंजन होत नाहीं; आणि वादाचे ग्रंथ असले तर त्यांपासून चित्तवृत्ति शांत न होतां उलटी क्षुब्धच होते. हें एक सादृश्य. दुसरें हें कीं, चांदण्यांत पदार्थ स्पष्ट न दिसल्यामुळें कल्पनाशक्तीस अवकाश सांपडून अवास्तव भासांत रंगण्यास मनास सांपडतें; पण कडकडीत उनांत पदार्थ अगदींच स्पष्ट दिसल्यामुळें कल्पनेस सवडच न सांपडून त्यांचें वास्तविक स्वरूप सहज दृष्टिगोचर होण्यासारखें असतें. हीच गोष्ट कल्पनेच्या द्वारें झालेल्या ज्ञानास व बुद्धीच्या द्वारें झालेल्या ज्ञानास यथानुक्रम लागते.

४. वरील उपपादनावरून दुसरी अशीहि गोष्ट आमच्या सुज्ञ वाचकांच्या लक्षांत येईल कीं, बुद्धीची प्रगल्भता ही कल्पनाविकासाच्या पुढली मनाची दशा होय;—ह्मणजे आरंभीं कल्पनेचा विकास होऊं लागून त्यापुढें बुद्धि विकास पावूं लागते. या गोष्टीचा अनुभव फार थोड्क्यांत आहे. लहानपणीं मुलांस खुळखुळ्याची, दिव्याच्या

ज्योतीची, चांदोबाची जी मौज वाटत असते, तिचें बीज हेंच होय कीं, त्या वेळेस त्यांची कल्पनाशक्ति हळू हळू विकास पावूं लागत असते. त्यांस भूताखेताच्या, राक्षसांच्या गोष्टींची फार मजा वाटते, काळोखांत जाण्यास तीं भितात, यांचें तरी कारण हेंच,–कीं त्यांची कल्पना मोठी जागृत असून विचारशक्ति बहुधा निद्रिस्त असते. पण पुढें जसजसें त्यांस कळूं लागतें, तसातसा हा गोष्टवेल्हाळपणा कमी कमी होत जाऊन सारासारविचार ह्मणजे तथ्य कशांत आहे कशांत नाहीं वगैरे विवेचन तीं करूं लागतात. पुष्कळांस स्वतःच्या अनुभवावरून आठवत असेल कीं, लहानपणीं इसापनीतींतील गोष्टींची फारच मौज वाटून तात्पर्य वाचतांना डोकें उठे, पण तो कल्पनेचा काळ जाऊन त्यापुढील दशा मनावर येऊं लागल्यामुळें हल्लीं वरच्या विरुद्ध अनुभव येतो;–ह्मणजे गोष्टीपेक्षां तात्पर्यावर विशेष नजर असते! असो; आतां हा प्रकार प्रत्येक व्यक्तिभूत मनुष्यांत जसा आढळतो, तसाच पण एकंदर राष्ट्रांतहि आढळतो. पहा, सर्व लोकांत अगदीं पहिले ग्रंथ[1] ह्मटले ह्मणजे कवितेचे असतात; आणि हे केवळ अनुकमानेंच पहिले असतात असें नव्हे, तर योग्यतेनेंहि अग्रगण्य असतात. या दोन्ही गोष्टींचें कारण अर्थात् हेंच कीं, त्या अप्रबुद्धतेच्या काळीं कल्पनाशक्ति जशी उद्दाम आणि अनावर असते, तशी पुढें कधींहि असत नाहीं. विद्वत्ता ह्मणजे सर्व गुणांचें निधान मानणाऱ्या लोकांस होमर किंवा वाल्मीकि, व्यास यांसारखे पुढें कवि झाले नाहींत या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटत असेल! पण असें होण्याचें कारण वर जें सांगितलें आहे तें लक्षांत आणलें असतां विस्मयास मुळींच जागा रहाणार नाहीं. तें मन्वंतर निराळें होतें आणि आतांचें निराळें आहे. त्या काळीं कल्पनेचेंच बहुधा प्राबल्य असल्यामुळें तसले जगद्वंद्य काव्यग्रंथ त्या वेळीं निर्माण झाले. पण आतां कल्पना जाऊन तिच्या जागीं विवेचनशक्तीचा जोर दिवसेंदिवस होत चालल्यामुळें तें सामर्थ्य गेलें, आणि नानाविध शास्त्रांचा प्रादुर्भाव झाला. अंतरालांत काय काय चमत्कार आहेत, पृथ्वीच्या पोटांतील रचना कसकशी आहे, मनोवृत्तीचे व्यापार कोणकोणत्या नियमांनीं चालतात, वगैरे गोष्टींच्या शोधाकडे अलीकडे लोकांच्या मनाची प्रवृत्ति झाली. पहिला काळ वसंतमासांप्रमाणें पालवीचा, मोहोराचा व फुलाचा होय; आणि हा पुढील शरन्मासांप्रमाणें फलधान्यसमृद्धीचा होय. तेव्हां दोहोंचें एकाधिकरणत्व ह्मणजे एके ठिकाणीं असणें वस्तुगत्याच शक्य नव्हे!

५. या सर्व गोष्टींचा यथास्थित विचार केला असतां 'सुधारणा कवितेस प्रतिकूळ होय,' 'तिची वाढ सज्ञानतेच्या काळीं खुंटते' वगैरे सकृद्दर्शनीं विलक्षण दिसणाऱ्या

१ हा शब्द येथें 'पुस्तक' या अर्थीं योजला नाहीं; तर त्याचा मूळचा अर्थ–'जुळलेला मजकूर' हाच येथें ध्यावयाचा. वेदांच्या वेळेस किंवा होमरच्या वेळेस लेखनकला होती कीं नाहीं, या भानगडींत पडण्याची येथें जरूर नाहीं.

वाक्यांचा अर्थ आमच्या वाचकांच्या नीट लक्षांत येऊन त्यांची सत्यता त्यांच्या मनावर चांगली ठसेल. असो; आतां कवीचें लक्षण काय, त्याच्या अंगीं कोणते गुण प्राधान्येंकरून पाहिजेत, कोणते गौणत्वेंकरून हवेत, याविषयीं विचार करूं. तेणेंकरून प्रस्तुत विषयाची विशेष फोड होईल.

६. 'कवि' शब्दाचा धात्वर्थ पाहिला तर 'गाणारा' असा आहे. हा अलीकडच्या काळीं अर्थात्च नेहमीं लागू पडेल असें नाहीं; कारण गाणें हें निराळें कसबच होऊन बसलें आहे. पण प्राचीनकाळीं सर्व देशांत, व अजूनहि तशी स्थिति जेथें असेल तेथें, कवि हेच गाणारे व वाजवणारे असत. संस्कृत नाटकांतून हा पूर्वीचा प्रकार दाखविलेला असतो. राजापाशीं स्तुतिपाठक असत, त्यांस नाटकाच्या परिभाषेंत 'वैतालिक' ह्मणत, आणि एरवीं 'बंदिजन' हि ह्मणत. दैत्यगुरु शुक्राचार्यास याच कारणास्तव 'कवि' 'काव्य' हीं नांवें होतीं. ग्रीक लोकांत 'ऱ्हापसोडिस्ट्स्* (Rhapsodists) नांवाचे लोक असत, त्यांचा धंदा होमर वगैरे प्राचीन सर्वमान्य कवींचीं काव्यें गाऊन व वाद्यांवर वाजवून तोंडपाठ ह्मणावीं हा असे. हे काव्यपठक कोणी कोणी स्वतःहि काव्यें रचीत. असो; याप्रमाणें लेखनकला त्यावेळीं नसतांहि आपल्या वेदांप्रमाणें तीं काव्यें पठकपरंपरेनें त्या लोकांत राहिलीं. असो; हीं गोष्ट प्राचीन काळची झाली. पण इतकेंहि लांब जाण्याची गरज नाहीं. हा प्रकार सध्यांहि इकडच्या प्रांतीं नुकता दृष्टीस पडत असे. पेशव्यांच्या वेळेस लावण्या, पवाडे या छंदांवर शाईर कवनें रचून आपणच गात; व त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्या वेळीं त्यांची संभावना होत असे. ही कविता अजूनहि पठकपरंपरेनें आपणांत राहिली आहे. ही छापून ठार बुद्दं न देणें हें देशाभिमानी लोकांस मोठें भूषणास्पद होईल आणि असें केल्यानें भाषाभिज्ञांवर व रसिकांवरहि लहान उपकार होईलसें नाहीं. असो; तेव्हां या रीतीनें 'कवि' शब्दाची आपल्या देशांत रूढि झाली. इंग्रेजी भाषेंत एतदर्थवाचक जो शब्द आहे त्याचा अर्थ 'करणारा' असा होतो. यास्तव कवि ह्मणजे कल्पनासृष्टि बनवणारा असा त्या भाषेंतला मूळचा अर्थ होय असें सामान्यतः लोक समजतात. पण एवढा खोल अर्थ त्या अडाणी लोकांच्या मनांत प्रथमतः आला असेल असें आह्मांस वाटत नाहीं. तर आपल्या 'कवि' शब्दाप्रमाणेंच 'करणारा' ह्मणजे 'पद्यें जुळणारा' इतकाच अर्थ त्यावेळीं मूळचा असेल हें मानणें आमच्या मतें अधिक सयुक्तिक होय. असो; येथवर नुसत्या शब्दाची व्याख्या झाली. आतां कवीस अवश्य गुण कोणते पाहिजेत वगैरे गोष्टींविषयीं विचार करूं.

१ कु—'गायन करणें.'

२ Poet—poeo 'I make'

* हे ग्रीस देशांतील काव्यपठक होते.

७. कवीच्या अंगीं मुख्य गुण सहृदयता पाहिजे;—ह्मणजे हृदयाच्या शृंगार-वीर-करुणादि ज्या नानाविध वृत्ति त्या त्यास अत्यंत सूक्ष्मत्वानें व स्पष्टत्वानें भासल्या पाहिजेत. वरील निरनिराळ्या वृत्तींचा विषय इंद्रियगोचर होतांच कवीचें मन क्षुब्ध होऊन जातें, आणि त्या खळाळीसरसे जे उद्गार आपोआप निघून जातात तेच खरी व अस्सल कविता होते. याचें अत्युत्कृष्ट उदाहरण आपल्या आद्यकवीचा क्रौंचवधनिमित्तक करुणोद्गार होय हें आमच्या वाचकांस मागील अंकावरून आठवेलच! तसेंच मराठी कवितेंत पहातां असे उत्कृष्ट मासले विशेषेंकरून तुकारामाचेच अभंग होत हेंहि सर्वांच्या ध्यानांत येईल. हा कवि मनाचा मोठा प्रेमळ, साधा, मोकळा व थोर असल्यामुळें कोणत्याहि प्रसंगाचे त्याचे अभंग असोत, त्यांत तो रस जसा काय भरपूर भरलेला असतो; व ह्मणूनच ते आपल्या लोकांस आज दोन अडीचशें वर्षें एवढे प्रिय होऊन राहिले आहेत; आणि जोंपर्यंत त्यांचा आधार जी मराठी भाषा ती या जगांत राहील तोंपर्यंत आपल्या नांवाप्रमाणें ते खरोखरच 'अभंग' रहाणारे आहेत. असो; तेव्हां निरनिराळ्या वृत्ति पूर्णपणें ज्यांत प्रतिबिंबित होतील असें अंतःकरण कवीचें असायास पाहिजे; ह्मणजे सहृदयता हें कवित्वाचें मुख्य लक्षण होय. हें ज्याच्या ठायीं वसत नाहीं त्याची बुद्धि कितीहि प्रचंड असली तरी ती त्यास या ठिकाणीं अगदीं कामास पडायाची नाहीं. अशाविषयींचीं उदाहरणें आपल्या देशांतलीं देणें अशक्य होय; कां कीं, आपल्या प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारांची माहिती आपणांपाशीं मुळींच नाहीं ह्मटलें असतां चालेल. यास्तव दुसऱ्या देशांतीलच उदाहरणें सांगणें अवश्य आहे. प्राचीन रोमन लोकांत सिसरो ह्मणून एक महावक्ता होऊन गेला हें आमच्या मराठी वाचकांसहि बहुधा विदित असेलच. हा सिसरो सांस्थानिक कामांतहि मोठा हुशार असून शिवाय महाविद्वान्हि होता. यानें क्याटिलैन्च्या* बंडाचा मोड करून रोम शहर बचावलें, व एकंदर राज्यहि त्यानें त्या संकटसमयीं वांचविलें ह्मणण्यास हरकत नाहीं. तसेच यानें त्याटिन भाषेंत शेंकडो मोठमोठे ग्रंथ रचून ठेवले होते; पण त्यांचा एक विसांश मात्र आतां उरला आहे. असो, पण सांगायाचें काय कीं हा एवढा नामांकित विद्वान् व शिवाय वक्ता असतांहि, याची कविता इतकी भिकार आहे कीं तिला तें नांव सुद्धां शोभत नाहीं! त्याला मात्र स्वाभिमानास्तव तिची योग्यता मोठी वाटे, पण बाकी सर्वांस ती आजपर्यंत अगदीं नादान वाटत आली आहे! हें उदाहरण मोठें ह्मणून आह्मीं येथें एकच घेतलें. दुसरींहि अशीं पुष्कळ आहेत; पण तीं सर्व येथें लिहि-

१ वर्डस्वर्थ नामक इंग्रजी कवीनें असें कवित्वाचें लक्षण केलें आहे:- "Poetry is the spontaneous overflow of powerful feelings."

* हा राजकारणी पुरुष होता व सिसरोनें यास रोममधून हांकलून दिलें.

ण्याचें प्रयोजन नाहीं. आतां दुसऱ्या देशांतील कांहीं थोडीं सांगतों. जानसन्,* पोप,† ड्रायडन्‡ हे ग्रंथकार केवढे थोर होऊन गेले हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. यांपैकीं शेवटल्या दोघांनीं तर आपआपला सारा जन्म कविता लिहिण्यांतच घालविला; व तिघेहि आपआपल्या काळीं बाकीच्या कवींत अग्रगण्य होते. पण आतां यांस फारसा मान नाहीं; कोणी कोणी तर हे मुळींच कवि नव्हेत असें सुद्धां ह्मणावयास भीत नाहींत! बरें तर, हीं सर्व उदाहरणें महाविद्वान् असून मुळींच कवि नसणारांचीं–किंवा निदान महाकवि नसणारांचीं––झालीं. पण इतकेंच नव्हे. याहूनहि चमत्काराची एक गोष्ट वारंवार आढळण्यांत येते, ती ही कीं, समयविशेषेंकरून खऱ्या कवींचें सुद्धां कवित्व कमीजास्त होतें;—ह्मणजे एखादें काव्य एखाद्या वेळीं उत्कृष्ट साधून जातें, पण दुसऱ्या वेळीं कांहीं केल्या तसें उतरत नाहीं. मिलटन्§ कवीनें आपणाविषयीं असें लिहिलें आहे कीं माझी प्रतिभा वर्षाच्या कांहीं महिन्यांत विशेष उज्ज्वल असे, व या धोरणावर तो काव्यरचना करीत असे. पोपविषयीं जान्सन् यानें असें लिहिलें आहे कीं, यानें वीस वर्षांचा असतां जितकी उत्कृष्ट कविता केली त्याहून वरचढ अशी पुढें त्यास साधलीच नाहीं. त्याप्रमाणेंच बैरन¶ यानेंहि पंचवीस तीस वर्षांच्या वयांत जी कविता रचिली ती फारच उत्कृष्ट उतरली; तशी त्यास पुढें साधली नाहीं इतकेंच नव्हे, तर ती पहिलीच्या मानानें पुष्कळच हलकी ठरली. असो; तेव्हां या सर्व गोष्टींवरून काय बरें स्पष्ट दिसतें? अर्थात् हेंच कीं, कवित्वाचें तत्त्व सहृदयता होय. ही ग्रंथांत जशी कमीजास्त असते त्याप्रमाणें त्या ग्रंथास काव्यत्व येतें. आणि ही आपल्या अंगीं बळेंच आणूं जातां येणारी नव्हे हें तर काय, पण ती आपले ठायीं असतांहि नेहमीं आटोक्यांत रहाणारी नव्हे!

८. तेव्हां इतर मनुष्यांत व कवींत मुख्य विशेष ह्मणून हाच कीं, कवीच्या ठायीं सहृदयता अत्यंत असते. ही एवढी मुद्द्याची गोष्ट नीट ध्यानांत धरली असतां हा विषय सर्वांस अगदीं उघड होईल. पहा कीं, ही सहृदयता म्हणजे अंतःकरणाचा कोमळपणा तरुण वयांत मनुष्यास फार असतो, व तसाच अर्थात् अज्ञानावस्थेंत असणाऱ्या राष्ट्रांतहि फार असतो. ह्मणूनच लहान वयांत अंतःकरणवृत्ति सुक्षोभ असून नाटकें, कादंबऱ्या, काव्यें अशा ग्रंथांचा अतोनात नाद लागतो; आणि राष्ट्राच्याहि आद्यावस्थेंत उत्कृष्ट कविता उदयास पावते. पण या सौम्य वृत्ति मनुष्यांत व राष्ट्रांत प्रौढ व-

---

* इंग्रज कवि. यानें इंग्रजी शब्दकोश प्रथम तयार केला.

† हा इंग्रज कवि. यानें इलियडचें इंग्रजी भाषांतर केलें.

‡ हा इंग्रज कवि होता.

§ हा प्रसिद्ध इंग्रजकवि होता.

¶ प्रसिद्ध इंग्रजकवि होता.

याच्या सुमारास मावळूं लागून शेवटीं बहुधा अगदींच नाहींशा होतात; व त्या त्या प्रमाणें विचारशक्तीचें प्राबल्य होत जाऊन कवित्वाचा ऱ्हास होतो. त्या मूळच्या साध्या काळांत झालेल्या कवींस दुसरी सोयहि ही होती कीं, सृष्टीच्या व मानवी स्वभावाच्या केवळ मूळच्या स्वरूपाशीं त्यांचा नेहमीं परिचय असे; आतांप्रमाणें दोहोंवर त्या काळीं कृत्रिमता आली नव्हती. यास्तव दोहोंची प्रतिमा त्यांच्या विशद मनावर जशी काय सहज ठसून जाऊन ती वर्णनद्वारा त्यांच्या ग्रंथांत प्रगट झाली. पण पुढील कवींच्या मनावर ती अर्थातच पहिल्यांच्याप्रमाणें यथास्थित न उठल्यामुळें स्वभाववर्णन त्यांस पहिल्यांसारखें साधलें नाहीं. असें होतां होतां शेवटीं तर स्वभाववर्णन अगदींच सुटून कविता केवळ सामान्य व्यावहारिक कलेप्रमाणें गणमात्रा जुळण्याचेंच काम होऊन बसली. पहिले कवि स्वानुभूत गोष्टींचें व मनोवृत्तींचें वर्णन करीत; पण पुढील काळीं कीर्तीच्या किंवा पैशाच्या लोभास्तव जेव्हां काव्यें रचण्याचा प्रघात पडला, व कविता करणें हा एक धंदाच झाला, तेव्हां स्वानुभव हा कवींस नकोसाच झाला. कवितेस सहृदयत्वापेक्षां बुद्धीची व मेहनतीचीच विशेष गरज लागूं लागली. ह्मणजे आधींच्या कवितेचें जें साधें अर्थसौंदर्य तें जाऊन त्याच्या जागीं मोठमोठीं मजेदार वृत्तें, पदांचें लालित्य व माधुर्य, अर्थालंकार, शब्दालंकार, असा थाटमाट हळू हळू आला. जे पदार्थ, जे सृष्टिचमत्कार कधीं यावज्जन्म पाहिले नाहींत, ज्या मनाच्या वृत्ति किंवा जे अंतःकरणाचे विकार कधींहि साक्षात् अनुभवास आले नाहींत, किंबहुना येण्याची योग्यताहि नाहीं, त्यांवरहि या पुढील कवींनीं धाड घालून त्यांचें वर्णन आपल्या ग्रंथांतून आणलें आहे. हें एक असो. पण याहून उपहासास्पद गोष्ट काय कीं, जे सृष्टींतील पदार्थ सहज पहाण्यासारखे असतात त्यांचेंहि वर्णन यांनीं यथावत् केलेलें नसतें. होमरच्या 'इलियड' नामक जगन्मान्य काव्याचें पोप कवीनें इंग्रेजींत भाषांतर केलें. त्यांतील आठव्या सर्गाच्या शेवटीं चांदण्या रात्रीचें वर्णन आहे तें इंग्रेजींत इतकें चुकलेलें आहे कीं, मेकॉलेच्या मतें, 'त्यांत जितक्या चुका आहेत तितक्या साऱ्या 'इलियडां'त सांपडायाच्या नाहींत.' तसेंच ड्रायडन् यानें एका नाटकांत एके प्रसंगीं रा-

---

१ तें वर्णन येणेंप्रमाणें—

As when the moon, refulgent lamp of night,
O'er heaven's clear azure spreads her sacred light,
When not a breath disturbs the deep serene,
And not a cloud o'ercasts the solemn scene,
Around her throne the vivid planets roll,
And stars unnumbered gild the glowing pole,
O'er the dark trees a yellower verdure shed,

त्रीचें वर्णन केलें आहे; त्याची मागें मोठी वाहवा होती, व तसें वर्णन कोणत्याहि कवीस साधलें नाहीं असें जॉनसन् सारख्या महारसिकांचें मत होतें. पण तेंच आतां 'अप्रयोजक, व आंत शब्दगौरव मात्र मोठें असून अर्थशून्य' असें ठरलें आहे.[1] पुढील पुढील संस्कृत कवींचीं वर्णनेंहि जीं इतकीं नीरस उतरलीं आहेत त्याचें तरी कारण हेंच. एकदां अनादिसिद्ध ज्या उपमा ठरून गेल्या, जे कविसंकेत एकदांचे कायम बसून गेले, त्यांचीच पुनरुक्ति, किंवा स्वतःच्या वेड्यावांकड्या अत्युक्तिरूप विलक्षण कल्पना यांनीं त्यांच्या कृति भरलेल्या असतात. बाह्यसृष्टीचें किंवा अंतःसृष्टीचें अवलोकन ह्मणजे काय हें या विचाऱ्यांच्या कधीं स्वप्नींहि आलें नसेल! जुन्या कवींनीं केलेल्या वर्णनावरून सरासरी आपलीं वर्णनें बनवायाचीं, मग तीं कशीं चांगलीं उतरावीं? अगोदर मोठमोठ्या कवींनीं केलेलीं वर्णनेंहि हुबेहुब उतरत नाहींत,—ह्मणजे ते ते पदार्थ प्रत्यक्ष पाहून जी कल्पना मनांत भरते ती नुसत्या वर्णनावरून कधींहि भरत नाहीं. मग या वर्णनावरूनच जीं प्रतिवर्णनें उतरावयाचीं त्यांच्यांत तथ्य व रस कितपत राहील! अर्थात् छायेच्या प्रतिच्छायेंत व मूळच्या रूपांत जितपत अंतर तितपतच त्या दोहोंत[2]! अशा प्रतिकवींचीं वर्णनें ह्मणजे जन्मांधानें जसें वनश्रीचें वर्णन करावें,

---

And tip with silver every mountain's head;
Then shine the dales, the rocks in prospect rise,
A flood of glory bursts from all the skies;
The conscious swains, rejoicing in the sight,
Eye the blue vault, and bless the useful light.

१ तें हें—

All things are hushed as Nature's self lay dead,
The mountains seem to nod their drowsy head.
The little birds in dreams their songs repeat,
And sleeping flowers beneath the night-dew sweat,
Even Lust and Envy sleep; yet Love denies
Rest to my soul, and slumber to my eyes.

Indian Emperor

('These lines are vague, bombastic and senseless'—

Wordsworth.)

२ छायेच्या प्रतिछायेचें उदाहरण सृष्टींत दृष्टिगोचर होणारें एक मोठें आहे— तें चंद्राची कोर दिसत असतां अवशिष्ट बिंबावर जो अंधक प्रकाश दिसतो तो होय. सूर्याचा पृथ्वीवरील प्रकाश चंद्रबिंबावर परावर्तन पावून त्याचें पुनः पृथ्वीवर परावर्तन झाल्यानें वरील अंधक प्रकाश दिसतो.—हा दृष्टान्त मूळच्या अनुभवसिद्ध वर्णनांत व वर्णनाच्या प्रतिवर्णनांत किती भेद होतो हें दाखविण्यास उपयोगीं पडेल.

किंवा दुसऱ्या एका तऱ्हेच्या मनुष्यानें श्रृंगार वर्णावा, त्याप्रमाणेंच सर्वथा हास्यास्पद होत.

९. तेव्हां जुन्या कवींचीं काव्यें एवढीं उत्कृष्ट उतरण्याचीं हीं कारणें होत. एक तर त्या काळीं कल्पनेचें मोठें प्राबल्य असल्यामुळें तें त्यांच्या कवित्वास अत्यंत पोषक झालें; दुसरें, बाह्यसृष्टीचें व अंतःसृष्टीचें मूळचें शुद्ध स्वरूप त्यांच्या नेहमीं दृष्टीस पडल्यामुळें त्यांच्या कृत्रिमसंस्काररहित शुद्ध मनावर 'रंगः शुक्लपटे यथा' (जसा पांढऱ्या स्वच्छ कापडावर रंग) या न्यायानें त्यांचा ठसा सहजपणें पूर्ण उमटला; तसेंच तिसरेंहि कारण अर्थात् हें कीं, त्या कवींच्या मनोवृत्ति व हृदयवृत्ति केवळ स्वानुभूत असल्यामुळें त्यांचा आविर्भाव तसाच यथास्थित व स्पष्ट त्यांच्या ग्रंथांत झाला. पदार्थविज्ञानांत सांगितलेला पाण्याचा धर्म सर्वांस माहीत असेल कीं, तें जितक्या उंचावर मूळचें असतें तेथपर्यंतच तें चढतें. हाच नियम अंतःकरणवृत्तींसहि लागतो. ज्या वृत्ति हृदयासच अगोदर भासल्या नाहींत त्यांचें वाग्द्वारा वर्णनहि अगदीं रसशून्य उतरल्यास काय नवल? ज्यानें वियोगदुःख कधीं अनुभविलें नाहीं त्यानें पुत्रशोकादिकांचें वर्णन केल्यास, ज्याचा काळ नेहमीं ऐषआरामींत जाणार त्यानें युद्धादि प्रसंग वर्णिल्यास, वसंतांतील गार झुळूक घेणारानें समुद्रावरील तुफानाचें वर्णन करूं गेल्यास, तें किती उत्कृष्ट उतरेल हें कोणी सांगेल! ज्यानें पर्वतीहून मोठा डोंगर पाहिला नाहीं त्यानें हिमालयाचें वर्णन करूं जाणें, ज्यानें मुळामुठाच काय त्या मोठ्या नद्या पाहिल्या त्यानें गंगायमुनांसारख्या महानद्यांच्या वर्णनास हात घालणें, ह्मणजे भांवुरड्यावरून लंडन शहराची कल्पना बांधणें होय! असो; तेव्हां वर्णावयाच्या गोष्टीचा साक्षात् अनुभव कवीस अगदीं अवश्य पाहिजे.

१०. कवीस प्राधान्येंकरून ज्या गोष्टी पाहिजेत त्या वर सांगितल्या. याखेरीज बाकीच्या ज्या राहिल्या—ह्मणजे पदलालित्य, मृदुत्व, माधुर्य, सरळ अन्वय, व्याकरणशुद्धता, छंदांची निर्दोष व्यवस्था, इत्यादि—त्या एके रीतीनें गौणच होत. या नसल्यानें काव्याची शोभा कमी होते खरी, पण याच नुसत्या असल्यानें ती येते असेंहि नाहीं. दुसरें असें कीं, अगदीं सुमारवट बुद्धीच्या मनुष्यासहि हे गौण काव्यगुण साधण्यासारखे आहेत; पण वरील तसे नव्हेत. ते पुष्कळ अंशीं मूळचेच अंगीं वसले पाहिजेत, व कांहीं अंशीं स्थितिविशेष व प्रसंगविशेष यांच्या योगानें त्यांचा उत्कर्ष व्हावयास पाहिजे. आरंभींच्या मोठमोठ्या कवींचीं काव्यें पाहिलीं, तर त्यांत वरील पदलालित्यादि गुण फारसे सांपडणार नाहींत. रामायणाचा छंद येथून तेथून एक अनुष्टुप् आहे, व शब्दांच्या रचनेकडे वगैरे त्यांत विशेष लक्ष अगदींच दिलेलें आढळत नाहीं. 'महाभारतां'तहि तोच प्रकार. त्यांत मधून मधून मोठाले छंद कोठें कोठें आहेत, पण त्यांत छंदोभंगादि दोष हवे तितके आहेत. तिसरें प्रसिद्ध पुराण जें 'भाग-

वत' त्यांत मात्र मोठाले छंद, अलंकार वगैरे सांपडतात; व यास्तव-तें अर्वाचीन आहे असें पंडितांचें मत आहे. इंग्लिश लोकांच्या अभिमानाचें परम स्थान होऊन बसलेला जो शेक्सपीयर*–कीं जो इंग्लंडचा कवि नव्हे, तर साऱ्या मनुष्यजातीचा होय, असें युरोपांतील पंडित ह्मणतात–त्याचे ग्रंथहि याच सदराखालीं मोडतात. या बोवांनीं तर कोणत्या दोषास ह्मणजे आपल्या अजरामर कृतींत थारा दिला नाहीं असें प्रायः आढळणार नाहीं!–एकवचनी क्रियापद बहुवचनान्त कर्त्याशीं जोडलें तर आहे; बोहेमिया देशास बेट करून त्याच्या किनाऱ्यावर जहाज तर उतरविलें आहे; ट्रोजन† लोकांच्या हेक्टर‡ नामक वीराकडून शेंकडो वर्षें पुढें झालेल्या आरिस्टॉटलचें एके प्रसंगीं वचन तर ह्मणविलें आहे;–याप्रमाणें या वाग्देवतेच्या लालाचीहि थोडीशी लीला वर्णन केली[१]! बरें, माधुर्य, मार्दव, प्रसाद वगैरे इतर गुण जर कोणी पाहूं लागेल, तर या संबंधेंहि शेक्सपीयरच्या ग्रंथांत त्याचें समाधान होईलसें आह्मांस वाटत नाहीं. या कवीच्या पुढल्या काळीं—ह्मणजे ड्रायडन्, पोप, जॉनसन् यांच्या वेळीं—तर वरच्या उलट गुण, ह्मणजे कार्कश्य, क्लिष्टत्व, यास्तव यास कोणीच विचारीत नसे; व आतां जरी हा कवि एवढा लोकप्रिय होऊन गेला आहे तरी दुर्बोध अर्थाचीं याच्या नाटकांत पुष्कळ स्थळें आहेत हें हवें त्यास सहज दिसून येईल. पण एवढ्यानेंच झालें नाहीं; आणखीहि दोन मोठाले दोष या कविशिरोमणींच्या माथीं मारले पाहिजेत. एक श्लेषयोजनेची अतोनात हौस; आणि दुसरा दोष अश्लीलत्व. जॉनसन् यानें एके ठिकाणीं

---

१ या ह्मणण्याचा अर्थ असा कां असे पुरुष फार विरळा होतात. असे लाल केव्हां केव्हां प्रकट करून ईश्वर आपली विभूति दाखवितो. यास्तव अमुकच देशांत ते जन्मास आले ही केवळ साहजिकच गोष्ट असून तीवद्दल त्याच देशविशेषास गर्वाचें कारण नाहीं; कां तर ती कृपा एकंदर मानवजातीवर झाली असें समजायाचें.

२ व्याकरणदोषाचें फार प्रसिद्ध उदाहरण **'जुलियस् सीझर'** नाटकांत आहे—'There is tears for his love.'— प्रस्तुत कवीच्या भूगोलज्ञानाविषयीं **जॉनसन्** एकें ठिकाणीं टिपेंत ह्मणतो— 'Our author seldom escapes well when he is entangled in Geography! (आपले कवि भूगोलाच्या जाळ्यांत अडकले असतां बहुधा बरेपणीं निभावत नाहींत!').—**आरिस्टॉटल् शिकंदर** बादशहाचा गुरु होता ही गोष्ट आमच्या वाचकांस बहुधा विदित असेलच. यास्तव या तत्त्ववेत्त्याचें वाक्य हेक्टरानें आपल्या भाषणांत आणणें ह्मणजे भीमानें **कालिदासाचा** श्लोक ह्मणण्याप्रमाणें हास्यास्पद आहे!!

---

* हा प्रसिद्ध इंग्रज नाटककार होय.

† एकजातीचे लोक होते.

‡ ट्रोजन जातीचे लोकांचा वीर पुरुष.

ह्मटलें आहे कीं, 'श्लेषाची संधि सांपडली असतां ती आपल्या कवीस कधीं फुकट दवडवत नाहीं.' तसेंच अश्लीलत्व ह्मणजे चावटपणा. हा शेक्सपीयरच्या मोठमोठ्या नाटकांतूनहि खुशाल उघडपणें मोठमोठ्या पात्रांनीं सुद्धां केलेला असतो. याचा प्रत्यय आमच्या मराठी वाचकांस घेणें असेल तर त्यांनीं कैलासवासी महादेवशास्त्री कोल्हटकर* यांनीं केलेलें 'अथेल्लो'चें भाषांतर पहावें. तें पाहिलें असतां आमच्या कांहीं संस्कृत कवींच्या शृंगारवर्णनाच्या योगानें अंगावर शहारा आणणाऱ्या डॉक्टर हाल् प्रभृति सोंवळ्या साहेबांच्या ढोंगाचा आमच्या लोकांस चमत्कार वाटल्यावांचून रहाणार नाहीं! असो; या वादाच्या संबंधानें एका थोर निष्पक्षपात इंग्रेज ग्रंथकाराचा अभिप्राय येथें दाखवून हें प्रकरण संपवितों. शेक्सपीयर कवीनें कांहीं लहान काव्येंहि लिहिलीं आहेत; त्यांस उद्देशून हालम्साहेबांनीं ह्मटलें आहे कीं, हे ग्रंथ या कवीच्या विशाल कीर्तीस कलंकरूप होत, हे यानें लिहिले नसते तर बरें होतें. असो; पण या सर्वांपेक्षांहि अधिक सदोष कविता पाहणें असल्यास आमची मराठी होय; तींतील बहुतेक कवींस व्याकरणाची, छंदांची वगैरे ओळख सुद्धां नव्हती असें ह्मणण्यास हरकत नाहीं; मग पदलालित्य, अर्थगांभीर्य वगैरे काव्यगुणांची तर गोष्टच नको! प्रसाद हा गुणही त्यांच्या कवितेंत सर्वत्र आढळतोच असाहि नेम नाहीं. या सर्व कवींत वामनपंडित मोठा विद्वान् होता ह्मणून लौकिक आहे; पण या कवीचेंहि पांडित्य त्याच्या काव्यांत चांगलेसें दिसत नाहीं. अर्थ पुष्कळ ठिकाणीं क्लिष्ट असून शिवाय पदरचनेविषयींहि पंडितांनीं मोठीशी खटपट केलेली कोठेंहि नजरेस येत नाहीं. असो; तेव्हां एकंदर सिद्ध करायचें काय कीं, हे पदलालित्यादि गुण काव्यास शोभादायक खरे, पण ते काव्याचे सर्वस्व नव्हेत. त्यांचा बहुधा अभावच असतांहि जगास ज्यांचे ग्रंथ चिरकाळ मान्य होऊन राहिले आहेत अशा महाकवींचीं वर उदाहरणें सांगितलीं. त्यांवरून पूर्वोक्त गुण केवळ गौण होत हें आमच्या वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

११. पण ते गौण आहेत ह्मणून त्यांची गरज नाहीं असा अर्थ समजावयाचा नाहीं. केवळ त्यांच्याच योगानें ग्रंथास काव्यत्व येणार नाहीं हें खरें, पण सत्काव्या-

---

१ Our author can never resist the temptation of a pun.

२ हे साहेब दहापंधरा वर्षांमागें कलकत्त्याकडे विद्यागुरु होते. यांनीं सुबंधु कवीच्या 'वासवदत्ते'चें प्रकाशन केलें. या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत या साहेबांनीं संस्कृत कवींवर व एकंदर हिंदु लोकांवर मोठा कडाका उडविला आहे. यासंबंधें शालापत्रक, पुस्तक १३ अंक ८ वाचकांनीं पहावा.

---

* महादेवशास्त्री कोल्हटकर—हे गृहस्थ सरकारी नोकर असून लेखक व वक्ते होते व अथेल्लो नाटकाचें मराठी भाषांतर यांनीं केलें आहे.

शीं जर त्यांचा योग झाला तर ते त्याचें रमणीयत्व फारच वाढवितील यांत तिळमात्रहि संदेह नाहीं. याशिवायहि काव्याचें सौंदर्य भासणें, किंबहुना एतद्विरुद्ध दोषांनीं ग्रस्त झालेल्या ग्रंथांतहि कवित्वाची लकेर उमगणें, हें महारसिकांशिवाय दुसऱ्यांचें सामर्थ्य नव्हे; पण सामान्य जनास जर रमविणें असेल तर रत्न जसें कोंदणांत बसवायाचें, तसेंच काव्यास वर सांगितलेल्या साधनांचा अवश्य उपयोग करून घेतला पाहिजे. हाच प्रकार व्हर्जिल* वगैरे त्याटिन व कालिदासादि संस्कृत कवींच्या ग्रंथांतून आहे; व ह्मणूनच त्यांचीं काव्यें मोठ्या मार्मिक रसिकांस जशीं रिझवितात तशींच सामान्यजनांसहि आजपर्यंत आनंद देत आलीं आहेत.

१२. याप्रमाणें कवीस प्राधान्येंकरून कोणते व गौणत्वेंकरून कोणते गुण अवश्य हवेत याविषयीं बरेंच लांब विवरण झालें. हें यथास्थित ज्यांच्या मनांत भरलें असेल त्यांस प्रस्तुत विषयाचा तेव्हांच उलगडा पाडतां येईल. तो असा कीं, प्रधान जे गुण आहेत--ह्मणजे सहृदयता व तज्जन्य स्वभाववर्णन करण्याची शक्ति- हीं शेंकडों ग्रंथांचें अध्ययन करून त्यांचें ज्यानें पीठ करून सोडलें व मोठा वादंचंचू किंवा महान् ग्रंथकार झाला त्यास सुद्धां त्याच्या विद्वत्तेच्या योगानें लेशमात्रहि येणार नाहींत. मोठा मोठा विद्वान् झाला तरी जसा मनुष्य चित्रकलेंत किंवा गायन अथवा वादनकलेंत निपुण झालाच असें होत नाहीं, तशींच गोष्ट कवित्वाची होय. रत्नपारख्याची जशी एका प्रकारची नजर असते, ती शिकवून येणारी नव्हे; व तशीच चित्रकलेचें किंवा वादनकलेचें मर्म समजण्याची शक्ति जशी एखाद्याचेच ठायीं ईश्वरानें ठेविली असते; तशीच कवितेचीहि गोष्ट आहे. पण इतकेंच नव्हे. अशा प्रचंड पंडितांस जातीनें कविता करतां येणार नाहीं हें तर आहेच; पण शिवाय तिची परीक्षा किंवा आस्वादन हेंहि त्यास नियमानें शक्य असेलच असेंहि ह्मणवणार नाहीं. याचीं उदाहरणें, इंग्लंडांत मागल्या शतकांत होऊन गेलेला जॉनसन् हा कांहीं अंशीं होय; व इकडे अलीकडील आपले जुने शास्त्री प्रायः सर्वथा होत. बाह्यसृष्टीचें वर्णन कर्तव्य असतां तो प्रदेश घटकाभर प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिला असतां जी त्याविषयीं मनांत कल्पना भरेल ती जशी नकाशावरून किंवा वर्णनावरून पुष्कळ दिवस अभ्यास केल्यानेंहि येणारी नव्हे; त्याप्रमाणेंच अंतःसृष्टीचीहि गोष्ट होय. त्या त्या रसाच्या विषयाच्या साक्षात् अनुभवानें जें स्वरूप लक्षांत येईल तें नुसत्या कोरड्या वर्णनाच्या वारंवार वाचनानेंहि आलेंच तर अगदीं अस्पष्ट येईल. सारांश, कवित्वास किंबहुना रसिकतेसहि विद्वत्ता अगदीं कारण नाहीं. उलटी ती मागें सांगितल्याप्रमाणें दोहोंस स्वभावतः विरुद्धच होय असेंहि ह्मटलें पाहिजे. तिचा उपयोग झाला तर कवितेचे वर सांगितलेले बाह्य व अप्रधान गुण तिच्या योगानें कदाचित् मोठ्या श्रमानें साधतां येतील, इतका-

* हा त्याटिन भाषेंत काव्यें लिहिणारा मोठा कवि होता.

च; पण तिच्या तत्त्वापर्यंत तिची गति कदापिहि पोंचणार नाहीं !

१३. तेव्हां एकंदर सिद्धान्त हा. जो जात्या कवि आहे तो कदाचित् विद्वान्हि असेल–जसे कालिदास, जगन्नाथराय,* मिल्टन्, बायरन इत्यादि; किंवा नसेलहि–जसे शेक्सपीयर, बर्न्स, तुकाराम इत्यादि. पण जितकी जितकी विद्वत्ता अधिक तितकें तितकें कवित्व अधिक ही मात्र मोठी चूक. या पक्षाचीं कांहीं उदाहरणें मागें सांगितलीं आहेतच.–सिसरो, जॉनसन्, आपले जुने शास्त्री. पण हीं फार कां देतां येत नाहींत याचें कारण अंमळ विचार करील त्यास तेव्हांच उमगेल;–तें विद्वत्तस सर्वगुणाधिष्ठित मानणाऱ्या भोळ्या भाविकांस मोठें जाचेल यांत संशय नाहीं तें आह्मी येथें उघड लिहीत नाहीं; तें एवढ्यानेंच सुचवितों कीं, असें होणें त्या विद्वानांच्या गर्वास किंवा मूर्खपणास योग्य शासन झालें; व या योगानें त्यांनीं पुढील लोकांस चांगला शहाणपणाचा मार्ग दाखवून ठेवला !

संपत्तीचा उपभोग.

अर्थमनर्थं भावय नित्यं नास्ति ततः सुखलेशः सत्यम् ॥ [२]

शंकराचार्य.

अंक ५—(१) विषयनिरूपण. (२) प्रस्तुत विषयावर तीन प्रकारचा मतभेद. (३) पहिलें मत; त्याचें समर्थन. (४) त्याचें खंडन. (५) निर्णय. (६) दुसऱ्या मताचें विवेचन. (७) तिसऱ्याचें विवेचन. (८) मुख्य विषय. (९) संपत्तीच्या उपभोगाचे प्रकार. (१०) कृपण व विषयी. (११) मिजाशी लोक. (१२) रिकामपणाचें सुखावहत्व. (१३) रिकामपणाचे अनर्थ. (१४) संपत्तीच्या उपभोगाचा आणखी एक प्रकार—धर्म. (१५) युरोपियन लोकांचा कित्ता— एकंदर होणारें हित.

१. या विषयावर आपल्या लोकांत, विशेषेकरून जुन्या मंडळींत, मोठीं विलक्षण मतें त्यांच्या मनानें घेतलेलीं आढळतात. हा अर्थात्च पिढ्यानपिढ्या कायम चालून विचार करण्याची कधीं संवय नसल्यामुळें आपल्या लोकांच्या मनांतून कधीं ढळलीं नाहींत. पण सध्यांच्या काळीं त्यांचा खरेखोटेपणा विचारांनीं ठरविणें अवश्य

---

१ हा स्वशिक्षित कवि स्कॉटलंड देशांत गेल्या शतकांत होऊन गेला. हा अगदीं गरीब असून याचा सारा जन्म शेतकींत गेला.

२ याचा अर्थ पुढें आलाच आहे.

---

* हे दिल्लीचे बादशहाजवळ मोठे पंडित होते. यांनीं भामिनीविलास, गंगालहरी, या नांवाचे ग्रंथ केले आहेत.

आहे. यास्तव या विषयाच्या संबंधें आमच्या ज्या समजुती झाल्या आहेत त्या येथें प्रगट करितों.

२. अर्थशास्त्राची उत्पत्ति होऊन त्याचा युरोपखंडांत सर्वत्र प्रसार झाल्यापासून या विषयाच्या संबंधें लोकमत अगदीं फिरून गेलें आहे. प्राचीन काळीं महाज्ञानी ह्मणविणारांनीं संपत्तीस जसें नेहमीं तुच्छ करूं पहावें; व सुमारें गेल्या शतकापर्यंत ती अनर्थमूलक, व विशेषतः एकंदर राष्ट्रास अत्यंत अपायकारक असें मानण्याकडे जसा सुज्ञ लोकांचा कल होता; तसेंच हल्लींच्या काळीं संपत्तीविषयीं लोकांच्या मनानें वरच्याच्या अगदीं उलट अशा समजुती ग्रहण केल्या आहेत. संपत्ति ह्मणजे सर्व सुखाचें व समाधानाचें परम स्थान होय; तिचा लोभ धरण्यांत कांहीं वाईट नाहीं इतकेंच नव्हे, तर तिजविषयीचें प्रेम मोठें प्रतिष्ठादायक होय; असा सर्वांचा अलीकडे सिद्धान्त होऊन गेला आहेसा दिसतो! असो. तेव्हां आजपर्यंत संपत्तीच्या संबंधें लोकमतांत इतके प्रकार झाले. प्रस्तुत निबंधांत वरील सर्व मतें खरीं आहेत व खोटींहि आहेत हें दाखवायाचें आहे.

३. आतां पहिल्यानें प्राचीन मत. सर्व देशांतील महाज्ञानी लोकांचें प्राचीन काळीं असें मत होतें कीं, संपत्ति ही सर्व प्रकारें अनिष्टाचें मूळ होय. इहलोकीं तर तिजपासून तिच्या मालकास निरंतर श्रम, काळजी, दौर्बल्य हीं मात्र पैदा होऊन शिवाय याहूनहि अत्यंत भयंकर काय कीं, संपत्तीच्या करितां तिच्या जोरावर केलेलीं महापातकें त्यास परलोकीं अक्षय नरकवास घडण्यास कारण होतात. याप्रमाणें सुखाच्या आशेस गुंतून मनुष्य धनासाठीं जी सारखी यातायात करीत असतें त्याप्रमाणें त्यास कसचाच लाभ न होतां व्यर्थ श्रीण मात्र होऊन संतोषसुखास तें मुकतें; व शिवाय परमार्थास मोठाच धक्का बसतो! यास्तव सर्व प्राचीन तत्त्वज्ञांचा धनावर मोठा कटाक्ष होता; व यास्तव दारिद्र्यांत व संतोषांत किती सुख आहे तें ते मोठ्या उत्सुकतेनें सांगत. आपले आचार्य* 'मोहमुद्गरां'त आरंभींच हा उपदेश करतात--

मूढ जहीहि धनागमतृष्णां कुरु तनुबुद्धे मनसि वितृष्णाम्।
यल्लभसे निजकर्मोपात्तं वित्तं तेन विनोदय चित्तम्॥
अर्थमनर्थं भावय नित्यं नास्ति ततः सुखलेशः सत्यम्।
पुत्रादपि धनभाजां भीतिः सर्वत्रैषा कथिता नीतिः॥

"वारे मूढा! ही धनतृष्णा सोड. अरे वेड्या! मनांत संतोषरूप समाधानवृत्ति धारण कर. पूर्वकर्मानुरूप जेवढें तुला मिळेल तेवढ्यांतच आनंद मानून ऐस. अर्थ हा अनर्थावह आहे असें नेहमीं समजत जा. त्यापासून खरोखर सुखाचा लेशहि प्राप्त होणार नाहीं. पहा कीं धनवान् पुरुषास प्रत्यक्ष पुत्रापासूनहि भीति आहे;

* हे भरतभूमींतील तत्त्ववेत्ते. यांस आद्य शंकराचार्य असें अभिधान आहे.

दा. क्र. 9399

मग दुसरें तर काय? तस्मात् हा उपदेश चांगला चित्तांत ठसूं दे. हाच आजपर्यंत ज्ञाते पुरुष सर्वांस सांगत आले आहेत."

असाच उपदेश कित्येक संस्कृत काव्यांतून व साऱ्या मराठी कवितेंत आहे. ग्रीक व रोमन लोकांतहि धनास तुच्छ मानणारे पुष्कळ थोर लोक होऊन गले. त्या सर्वांत सॉक्रेटीस* हा अग्रगण्य होय. हा साऱ्या जन्मभर अकिंचन राहिला. एकेसमयीं एका श्रीमान् गृहस्थाचें ऐश्वर्य व थाटमाट पाहून हा ह्मणाला, "मला ज्यांची गरज नाहीं, ज्यांवाचून माझें खुशाल चालतें, असे येथें किती पदार्थ आहेत!" दुसऱ्या अशाच प्रसंगीं त्यानें ह्मटलें, "मी या श्रीमंतांपेक्षां किती सुखी आहे! यांस एवढे संभाळण्यास केवढे आयास पडतात! केवढी काळजी वहावी लागते!" असो; तेव्हां यावरून प्राचीन ज्ञात्या पुरुषांचा एकंदर रोंख तेव्हांच दिसून येतो.

आतां वरील मत खरें आहे व खोटेंहि आहे हें सहज दाखवितां येईल. खरें असें कीं, वर सांगितलेले धनाचे अनर्थ सर्वांनीं प्रत्यक्ष पाहिले आहेत;—ह्मणजे तें प्राप्त झाल्याच्या योगानें मनुष्य मदांध होतो, त्यास नानातऱ्हेचे ढंग सुचतात, व्यसनांस वश होऊन तो अनन्वित कृत्यें करूं लागतो, इत्यादि प्रकार झालेले ज्यानें पाहिले नाहींत असा मनुष्य सांपडणें नाहीं! श्रीमंतांच्या घरोघर दुराचार व गृहच्छिद्रें किती असतात हें जवळ जवळच्या लोकांस तरी पूर्णपणें विदित असतें. श्रीमंतीच्या जोरावर हवी तेथे सत्ता चालते, अनेक प्रकारचीं दुष्कर्में बिनधोक करतां येतात, प्रसंगीं न्यायाधीशांची, डाक्तर साहेबांची मूठ दाबायास सांपडते, हें कोणास सांगावयास पाहिजे? असो, तर हीं सर्व अनिष्टें धनजन्य नव्हेत काय? बरें, आपले छंद पुरविण्याकरितां इतकी दुसऱ्यांस पीडा देऊन तो संपत्तीचा उपभोक्ता तरी सुख पावतो काय? आपणापाशीं अपार संपत्ति आहे, हजारों चाकर माणसें आपल्या शब्दावर झुलताहेत, हवा तो सुखाचा पदार्थ ह्मटल्या वेळेस तयार आहे, इच्छेस कोठेंहि अटकाव नाहीं; इतकें असून असे किती लोक सांपडतील, कीं ज्यांस असें वाटत असेल, अहो, आह्मांसारखें सुख व समाधान कोणास आहे? आह्मांस यत्किंचित् तरी दुःख आहे काय? लेशमात्रहि काळजी आहे काय? अहाहा! काय संपत्तीचा प्रभाव! ती जसजशी मिळत गेली तसतसे आह्मी आनंदसागरांत बुडतच चाललों!—अरेरे! असें त्यांच्यानें ह्मणवतें तर मग काय हवें होतें! ज्यांस त्यांची खरी स्थिति माहीत नाहीं अशा अज्ञान लोकांस त्यांची स्थिति अशीच वाटते खरी; पण काय? दुरून डोंगर साजरे. अंतस्थ प्रकार कसा काय आहे तो जो अंमळ विचारपूर्वक पाहील त्याची खात्री होईल कीं, शेतांत रात्रंदिवस खपणाऱ्या कुणब्यानेंहि त्यांच्या श्रीमंतीचा हेवा करूं नये! सदास-

* हा प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता होता. जिनोफोन व प्लेटो हे दोघे याचे शिष्य होते.

वंदा दुखणीं, त्यामुळें शरीरास आलेला दुबळेपणा, व्यायाम नसल्यामुळें मनास नेहमीं कंटाळा. सुखोपभोगांचा नित्य सेवनानें आलेला वीट, कर्मणूक दुसरी कांहींच नसल्यामुळें दुर्व्यसनांत आसक्ति, व तिचे परिणाम शरीरास व मनास अस्वस्थता, तसेंच निरंतर कलह, सदोदित भय, इत्यादिक हे श्रीमंतीचे सोहळे होत! तेव्हां हें सर्व जाणत असतांहि 'धनागमाची तृष्णा मूढा'शिवाय कोण धरील?

४. पण वरील निरूपण केवळ एकदेशतः झालें. संपत्तीपासून वर सांगितलेले महान् अनर्थ घडतात खरे. पण त्याप्रमाणेंच तिजपासून महान् लाभहि होत नाहींत काय? केवळ स्वतःच्याच संबंधानें पाहिलें, तर दारिद्र्याच्या नानाविध विपत्तींपासून तें आपणास सोडवितें. हाच काय आधीं थोडा लाभ आहे? मनुष्य केवढाहि मोठा तत्त्वज्ञ झाला, तरी भुकेची तजवीज केल्यावांचून त्यास गत्यंतर नाहीं! तसेंच थंडी, वारा, पाऊस, ऊन यांस तरी वेदान्ताची भीड पडून तन्निष्ठ ची तीं क्षणभर तरी गय करतील असेंहि नाहीं! तेव्हां जीवितास केवळ आवश्यक जीं अन्न, वस्त्र, घर इत्यादि तीं ज्याच्या योगानें आपणास प्राप्त होतात, व ज्याच्यामुळें ते पदार्थ दिवसेंदिवस अधिक सोईवार बनताहेत, त्याचा संग्रह व्यर्थ कसा ह्मणावा? शिवाय, निर्धन पुरुषास कोठेंहि मान नसतो, त्यास सर्व तुच्छ करतात; त्याजवर धनवान् लोक अनेक वेळां बिनदाद जुलूम करूं शकतात; त्याच्या अंगीं उत्कृष्ट गुण असले तरी त्यांचा सर्वथा लोप होऊन जाण्याचाहि पुष्कळ संभव असतो; चोरी, चाहाडी वगैरे गोष्टीहि हलक्यांच्या संगतीनें व पैशाच्या लालचीनें त्यांच्या अंगीं जडतात; तेव्हां हीं तरी लहान अनिष्टें आहेत काय? तसेंच परोपकारादि जीं परमार्थसाधनें तींहि संपत्तीशिवाय तशीं प्रशस्तपणें घडत नाहींत. आतां दुर्बलता, दुराचारप्रवृत्ति, वगैरे जे अनर्थ सांगितले त्यांचा तरी संपत्तीशीं कार्यकारणरूप संबंध नित्यत्वानें रहातो काय? कांहीं नाहीं. मोठी राजसत्ता भोगीत असतांहि वरील विकारांपासून मुक्त असलेल्यांचीं उदाहरणें इतिहासांत थोडीं आहेत असें नाहीं; फार तर काय, पण आपला इतिहास जरी फारच थोडा माहीत आहे तरी त्यांत सुद्धां अशीं रत्नें आलीं आहेत! असो; तेव्हां पैशापासून जसे अनर्थ होतात ह्मणून वर लिहिलें, त्याप्रमाणेंच त्यापासून लाभहि पण होतात.

५. याप्रमाणें दोन्ही पक्षांचे साधक बाधक विचार वर प्रदर्शित केले. त्यांवरून सुज्ञ मनुष्याची खात्री होईल कीं, मनुष्यांच्या कृतीवद्दलचा दोष बिचाऱ्या संपत्तीवर ठेवणें गैर आहे. एखादें उत्तम शस्त्र आहे तर त्याचा योग्य ठिकाणीं उपयोग करणें किंवा भलतेंच करून चोहोंकडे हाहाकार उठविणें जसें सर्वथा त्याच्या मालकाच्या स्वाधीन आहे, तसेंच संपत्तीचेंहि होय. अथवा आणखी अग्नीचें उदाहरण घ्या. तो जर आपल्या अटकेंत ठेवून त्याची नीट योजना केली, तर त्यापासून पाकनिष्पत्ति, प्रकाश, इत्यादि अनेक कार्यें करून घेतां येतात; पण जर एक ठिणगी गवताच्या गंजीवर टा-

कून दिली, किंवा घरास कोलीत लावलें, तर केवढा अनर्थ होतो बरें! तर या दोहों उदाहरणांत शस्त्र व अग्नि हीं केवळ मध्यस्थ होत. लाभ व हानि हीं दोन्हीहि त्यांच्या हातीं नाहींत. तीं केवळ साधनें असून योजक जसा भेटेल त्याप्रमाणें तीं वर्तणारीं आहेत. यास्तव याच न्यायानें संपत्तीची स्तुति व निंदा हीं दोन्ही व्यर्थ होत! सारांश,

येन श्रियः संश्रयदोषरूढं
स्वभावलोलेत्ययशः प्रमृष्टम्[1]

य श्लोकांत कालिदासानें श्रीच्या ह्मणजे संपत्तीच्या चंचलतेविषयीं जें ह्मटलें आहे तेंच तिच्या अनर्थावहत्वाकडे लावलें असतां वरील वादाचा थोडक्यांत निर्णय होईल!

वर व्यक्तिभूत ह्मणजे एकेक मनुष्याच्या संबंधें संपत्तीचा विचार झाला. आतां एकंदर राष्ट्राच्या संबंधानें पाहूं. गेल्या शतकाच्या सुमार अखेरपर्यंत सर्वांचें याविषयीं असें मत होतें कीं, राष्ट्रांत संपत्ति फार झाली ह्मणजे त्याच्या ऱ्हासास आरंभ झाला ह्मणून समजावें. पैसा फार फार होत चालला ह्मणजे त्याच मानानें ऐषआराम, इष्कीबाजी ही वाढते. ही जसजशी वाढत जाते त्या त्या प्रमाणें लोक दुर्बळ, व्यसनसक्त, अभिमानहीन असे होऊं लागतात. अशी एकंदर राष्ट्राची स्थिति झाली ह्मणजे मग अर्थातच त्यावर परचक्रें येऊं लागून त्याचा टिकाव निघेनासा होतो, आणि लवकरच तें परराजांचें अंकित होतें. आजपर्यंत जेवढीं राष्ट्रें उदयास चढलीं त्या सर्वांची शेवटीं अशी दशा झाली, आणि सर्वांच्या मोडकळीस धनसमृद्धीनें पाया घातला. असो; याप्रमाणें त्यांचें ह्मणणें असे. आतां हेहि वरच्याप्रमाणेंच अंशतः खरें आहे; कारण संपत्ति फार झाली ह्मणजे वरील वाईट परिणाम व्हावे हें पुष्कळ अंशीं स्वाभाविकच आहे. संपत्ति हें एका तऱ्हेचें मद्यच आहे; तें आपला गुण केल्याखेरीज बहुधा सोडणार नाहीं. संस्कृतांत एक ह्मण आहे, 'ऋद्धिश्चित्तविकारिणी' ह्मणजे 'धनाची विपुलता ही चित्तास विकार करणारी आहे.' असो; पण जो शहाणा आहे तो जसा धनानें केवळ मदांध होऊन जात नाहीं, त्याप्रमाणेंच ज्या राष्ट्राची राज्यरीति उत्कृष्ट आहे त्यास धनाची समृद्धि कांहींहि अपाय न करतां उलटी अधिकच बलाढ्य करते. यास उदाहरण अलीकडचीं इंग्लंड, फ्रान्स, प्रशिया इत्यादि राज्यें होत. तशींच प्राचीन काळचीं रोम, कार्थेज हींहि होतीं. रोमच्या संस्थानाचा पाया इतका मजबूत होता कीं, तें दोन हजार वर्षांवर टिकले; आणि त्यांत संपत्तीचा शिरकाव होऊन तें

---

१ 'ज्यानें स्वभावतःच चंचल हा जो लक्ष्मीवरचा अपवाद तो तीस आपले ठायीं निरंतर स्थिर करून काढून टाकिला.' सारांश, लक्ष्मी स्थिर रहात नाहीं हा तिचा दोष नव्हे, तर ज्यापासून ती जाते त्याचा होय; तो जर मतिमंद किंवा दुर्बल असेल तर त्यास तिनें काय करावें?

तिचें आगर होऊन बसल्यावरहि कित्येक शतकेंपर्यंत त्यानें शत्रूंस दाद दिली नाहीं. कार्थेजचें उदाहरण तर रोमच्याहूनहि चांगलें आहे. ज्या संपत्तीविषयीं राज्यास हानिप्रद ह्मणून सध्यां बोलणें चाललें आहे त्या संपत्तीच्याच खुद्द जोरावर कार्थेजचें संस्थान बलाढ्य झालें होतें; आणि तिच्या योगानें तें हतवीर्य झाल नाहीं हें तर काय, पण त्यानें रोमसारख्या लढाईत कसलेल्या संस्थानाशीं गांठ घालून त्यास रसातळास मिळविण्याच्या लागास आणले होतें. बरें, शेवटीं शेवटीं तरी धनविपुलतेमुळें तें निर्बळ झालें असेल ह्मटलें, तर तसेंहि नाहीं! त्याची अंतस्थ रचना अशी उत्कृष्ट होती कीं, आरंभीं त्याच्यांत जी शक्ति व जी हिंमत होती ती शेवटपर्यंत हालली नाहीं. अगदीं अखेरची वेळ येऊन ठेपे तोंपर्यंत तें रोमन लोकांशीं कसें निकराने लढत होतें तें सर्व इतिहासवेत्त्यांस विदितच आहे. असो; या उदाहरणांवरून स्पष्ट दिसेल कीं, राज्य मोडकळीस आणण्याचा दोष संपत्तीवरच सर्वथा ठेवणें बरोबर नव्हे. आतां उलटपक्षीं पहा कीं, जेथें संपत्तीचें वारें नाहीं, किंवा लागूं दिलें नाहीं, तेथचा प्रकार कसा काय आहे. संपत्तीचें वारें सृष्टीच्या आरंभापासूनहि आजपर्यंत कसें तें मुळींच लागलें नाहीं, असे देश पृथ्वीवर पुष्कळ आहेत. आफ्रिकेंतील बहुतेक देश, तसेंच कांहीं अमेरिकेंतील देश, पासिफिक महासागरांतील बेटें, यांतील लोक अजूनहि आद्यावस्थेंतच आहेत. बरें, मग दारिद्र्याच्या जोरावर त्यांच्यांत मोठीं टोलेजंग अशीं राज्यें किंवा संस्थानें कितीक उठलीं! हें एक झालें. दुसरें उदाहरण स्पार्टन* लोकांचें. यांचा राज्यव्यवस्थापक जो नामांकित लायंकर्गस त्यानें यांस संपत्तीचें कधीं वारें लागूं नये ह्मणून मुद्दाम मोठे कडक कायदे करून ठेवले होते; व ते बहुधा शेवटपर्यंत चांगले अंमलांत होते. बरें मग परिणाम काय झाला? स्पार्टन लोकांनीं कांहीं दिवस ग्रीसदेशावर प्रभुत्व मिरविलें खरें; पण तसेच तितकी खटपट न करतां आथिनियन, थीबन, मसिडोनियन लोकांनींहि त्यांच्यापक्षां अधिक काळ गाजविलें! बरें, तितकें असूनहि पुढें जेव्हां रोमन लोकांनीं सगळा ग्रीस देश सहज आपल्या हातासाखालीं घातला, तेव्हांहि त्या लोकांचें संपत्तीनें कमजोर न झाललें वीर्य कोणीकड गेल? असो; तेव्हां एकंदर काय कीं, संपत्तीची विपुलता ही उत्कर्षास किंवा अपायास कारण होणें हें राज्याच्या अगर संस्थानाच्या अंगच्या मजबुतीवर आहे; व ह्मणूनच तीं बुडाल्याचें अपेश तिच्यावर घालणें बरोबर नव्हे.

७. याप्रमाणें पहिल्या दोन मतांचा विचार झाला. आतां तिसऱ्यांत किती तथ्य आहे तें पाहूं. हें मत अलीकडील नव्या लोकांचें आहे. या लोकांच्या मनाच्या स्थितीविषयीं जर नीट विचार केला तर तेव्हांच लक्षांत येईल कीं, सध्यां ती मोठी चम-

* ग्रीसमधील स्पार्टा प्रांताचे रहिवासी. हे अत्यंत शूर होत. यांनीं इराणच्या झर्क्सिस बादशहाच्या प्रचंड सैन्याला कांहीं काळ थोपवून धरलें होतें.

त्कारिक झाली आहे. जुने विचार, जुनीं मतें यांची भास आतां बुडाली, यास्तव त्यांस अनुसरणें त्यांस नीट वाटत नाहीं. बरें, नवींच सर्वथा ग्रहण करावीं, तर तसेंहि करणें अजून प्रशस्त झालें नाहीं. यास्तव दोहोंच्या मध्यें लोंबणें त्यांस प्राप्त झालें आहे. जुनें तेवढें बहुधा वेडगळ, कोत्या समजुतीचें; आणि युरोपियन लोकांच्या संबंधाचें जें जें असेल तें तें शहाणपणाचें, आदरास पात्र, अशा कांहीं सरासरी त्यांच्या कल्पना झालेल्या असतात. पण एक चांगलें कां व दुसरें वाईट कां, किंवा तीं खरोखरीच वाईट किंवा चांगलीं आहेत कीं नाहींत, हे जर त्यांस विचारलें, तर सोनेरी सांखळीचें घड्याळ गळ्यांत अडकविलें असतां चागलें कां दिसावें, किंवा मराठी जोडा टाकून विलायती-बूट घालण्यांत नफा कोणता, याचीं कारणें ते जितपत सांगतील तितपतच याचींहि सांगूं शकतील! असो; तेव्हां आजपर्यंत धनसंचयाच्या निषेधाविषयीं पूर्वीच्या लोकांचीं जीं मतें हतीं, तीं सर्वथैव खोटीं असा निश्चय करून पैसा जोडणें ह्मणजे एक मनुष्याचें कर्तव्यच आहे अशी यांची समजूत झाली आहेशी दिसते. आतां पैसा जवळ असल्याशिवाय निर्वाह होणें व सुखासमाधानानें असणें कठिण आहे हें मागें आह्मीं एकदां सांगितलेंच आहे; व ह्मणून तो बाळगून ठेवणें फार जरूर आहे हेंहि आह्मीं मागें दर्शविलेंच आहे. पण तो सुखाचें व समाधानाचें मोठें साधन होय अशा समजुतीनें त्याविषयीं मोठें प्रेम प्रकट करणें किंबहुना त्याचा हव्यास धरणें, ही बुद्धि कृपणासारख्या नीच प्राण्यासच योग्य! सारांश, संपत्ति ही जरी सुखाचें साधन आहे, तरी तिजविषयीं अनिवार तृष्णा उत्पन्न होईपर्यंत तिला जीवाशीं धरणें हें परम दुःखास कारण होईल यांत संशय नाहीं; व अशा पुरुषाच्या हातून तिचा स्वहितार्थ किंवा परहितार्थ कसाहि विनियोग होणार नाहीं हेंहि उघड आहे. संपत्ति ही केवळ साधन आहे, साध्य ह्मणजे साक्षात् उपभोग्य वस्तु नव्हे, हेंहि ज्यास कळेनासें झालें त्यापरता मूर्ख व हतभाग्य कोण?

८. येथवर मुलत्या संपत्तीच्या संबंधानें सामान्यतः विचार झाला. आतां प्रस्तुत निबंधाचा मुख्य विषय जो तिचा उपभोग त्याविषयीं लिहितों.

९. संपत्ति ही सर्वांस इष्ट आहे, व प्रायः सर्वांचा तत्प्राप्त्यर्थ उद्योग चालू आहे हें सांगायास नकोच. तसेंच तिजकरतां जे सतत श्रम करायाचे ते तरी तिच्यामुळें आपण सुखी व्हावें एवढ्याचकरितां होंहे उघड आहे. बरें, तर आतां या स्थलीं इतकाच विचार करायाचा कीं, संपत्ति मिळूनहि सुखलाभाचा जो हेतु तो कितीकांचा सफळ होता.

१०. या संपत्तिसुखाविषयीं मनुष्यामनुष्यांच्या निरानिराळ्याच समजुती असतात. पहिल्यानें कृपणबोवा. हे आपल्या नांवानुरूप संपत्तीविषयीं पराकाष्ठेचे 'कृपाळू' असतात. त्यांस तिचा वियोग लवभर सहन होत नसतो. पैशास पैसा, कवडीस क-

वडी जोडून ते आपल्या देवतेची अशी सेवा करतात, कीं त्यांच्या जोगवणीस कसचीहि उपमा साजत नाहीं. या निःसीम भक्तीच्या उपहासपर जेथें गोष्टी व ह्मणी नाहींत असा पृथ्वीवर एकहि देश नसेल. खरोखर, जर दुसऱ्या एखाद्या गोलावरील मनुष्य आपल्या पृथ्वीवर कांहीं दिवस येऊन राहिल असें कल्पिलें, तर कृपणाची कृति त्यास केवळ अतर्क्य वाटेल! निरंतर कष्ट करून जोडायाचें, नेहमीं जीवापलीकडे जतन तर करायाचें, पण त्यापासून लाभ करून घेण्याची कल्पनाहि सहन व्हावयाची नाहीं! या वेडेपणास तो काय बरें ह्मणेल! त्यास खरोखर वाटेल कीं यास कोणाचा तरी शाप आहे; एरवी एवढी भूल चांगल्या जाणत्या मनुष्यास कशी पडेल!! असो; तर या मूढ अनुकंपनीय जनास संपत्तीचा उपभोग केवळ दर्शनमात्रेकरून. हा उपभोगाचा एक प्रकार झाला. यांत सुखोत्पत्तीचा इष्ट हेतु खरोखर सिद्ध झालासें ह्मणतां येत नाहीं हें उघडच आहे. दुसरा प्रकार विषयवासनातृप्तीचा. मनुष्यमात्राची स्वभावतःच इकडे प्रवृत्ति असल्यामुळें संपत्तीचा विनियोग अशाच प्रकारचा पुष्कळ होतो. आतां हा जर समर्याद असेल तर त्यांत कांहीं वाईट नाहीं. धर्माच्या व नीतीच्या आड न येतां परमेश्वरानें जे हजारों सुखाचे पदार्थ या पृथ्वीवर निर्माण केले आहेत त्यांनें सुख घेणें हें अगदीं रास्त आहे; फार तर काय, आपल्या शास्त्राप्रमाणे असें करणें हें तिसऱ्या पुरुषार्थाचें साधन करणें होय. आणि विचार करून पहातां जगदीशाचें सूत्रहि असेंच दिसतें. कां तर, इंद्रियजन्य सुख जोंवर मर्यादाकलित असतें, तोंवरच त्याचें सुखत्व रहातें. ती मर्यादा उल्लंघिलीशी झाली, कीं लागलीच तेंच दुःखरूप होऊं लागतें. पण मनुष्याच्या मूर्खत्वानें ह्मणा, अगर वाईटाकडे त्याचा कलच विशेष ह्मणून ह्मणा, हें इंद्रियजन्य सुख त्याच्यानें बहुधा आटोक्यांत ठेवचत नाहीं. त्यांत अतिशय भडकून जाऊन जो बहुशः आपणास मोठ्या भयंकर विपत्तींत पाडून घेतो, आणि संपत्तीचा यथायोग्य उपभोग करून जितके सुखी होतात त्यांहून तिच्यापाशीं वर सांगितल्याप्रमाणें अनर्थांतच पडणारे फार—किंबहुना शंभरांत निदान नव्वद तरी झटलें असतां चालेल—यास्तव यावरच मुख्य रोंख ठेवून प्राचीन सुज्ञ लोक धनाचा पूर्वोक्तरीत्या निषेध करीत. असो; तेव्हां हा दुसरा प्रकारहि बहुध सुखावह होत नाहीं.

११. आतां या दोन्ही अपव्ययांखेरीज संपत्तीच्या उपभोगाचे दुसरे कोणते मार्ग आहेत ते पाहूं. या ठिकाणीं आपल्या जुन्या लोकांच्या कांहीं विलक्षण समजुतींचें स्वरूप उघड करणें अवश्य वाटतें. वरच्या दोन्ही वाईट मार्गांचें अवलंबन न करतांहि पुष्कळ आपल्या धनाचा असमंजसपणानें विनियोग करतात. तो काय? तर अतोनात मिजास वाढविणें. ही मिजास मुसलमानांची आह्मास लागली असावी असें वाटतें. हिचा एकंदर रोंख पाहिला तर हा दिसतो कीं, अगदीं इकडचें इकडे न हालतां निवळ रिकामपणांत वेळ घालविणें ह्मणजे सुखाचें शिखर! ताठावरचें पाठवर,

पाटावरचें ताटावर; बसावयाच्या ठिकाणीं जिकडे पडायाचा दील लागेल तिकडे तक्के, लोड आहेतच; अंमळ इकडे तिकडे हिंडणें झालें तर रथ, पालख्या इत्यादि वाहनांची तयारी; वस्त्रें नेसवायास, पांघरावयास, सांवरायास माणसें; स्नान घालण्यास, अंग चोळण्यास, हात धुण्यास, जेथें तेथें चाकर; बरें, इतकेंहि होऊन तन्हे तन्हेची चाकरी घेतल्यामुळें झालेला शीण घालविण्यासच कीं काय, कोण जाणे,–निद्रासमयीं पाय चेपणें, अंग रगडणें हें पुनः आहेच! हा श्रीमंतीच्या सोहळ्यांचा नित्यक्रम. सुखाची परमावधि त्यांच्या व लोकांच्या मतें काय ती हीच. आपल्या भाषेंत 'सुखी' व 'श्रीमंत' हे शब्द तर पर्यायच होऊन बसले आहेत; यावरून प्रस्तुत विषयावर लोकांचीं मतें कशीं आहेत हें दिसून येतें. मागील लोकांच्या श्रीमंतीचीं वर्णनें बहुधा सर्वांनीं ऐकिलीं असतीलच— "अहो काय तो दैवशाली! त्यास बाहेरचें ऊन कधीं माहीत नव्हतें, त्याच्या पायास कधीं खडा लागला नाहीं, कधीं पोटचें पाणी हललें नाहीं. श्रीमंती अशी त्यांनीं भोगली! चारी ठाव चमचमीत भोजन करावें, आणि खुशाल निजावें. शेंकडों माणसें सेवेस तत्पर असतच. त्यांस इकडचें तिकडे हालायासहि लागत नसे!" वाः! किती अपरंपार सुख हें हो! पण याचा परिणाम लवकरच कसा होत असे हेंहि येथें सांगितलें पाहिजे. गाड्या, घोडीं, पालख्या यांनींच वाहनाचें काम सर्वथा पत्करल्यावर, मग ईश्वरदत्त जें वाहन तें कशाला राहील? तेव्हां पायांनीं जावें. शरीरांतील कोठ्यास नेहमीं पक्वान्नें पचवायचीं, व व्यायाम झटला तर जेवतांना पानावरचा हात तोंडाशीं न्यायचा अशा प्रकारचा काय अवश्य घडेल तेवढाच काय तो; तेव्हां अर्थातच पक्वान्नांनीं आपल्या आश्रितवर्गास—निरनिराळ्या रोगांस—निमंत्रण करावें! याप्रमाणें लुले व रोगी बनल्यावर मग तर श्रीमंतीचे विलास अधिकच. यापूर्वी नुसते चाकरच सेवेस तत्पर असत; आतां आणखी त्यांत वैद्यहि सामील व्हावयाचे. आधींच राजश्रींचा आहार नाजूक; मग ही स्थिति प्राप्त झाल्यावर तर कांहीं पुसूंच नये. असो, याप्रमाणें निरंतर उपचार चालले असतां शेवटीं अशी अवस्था प्राप्त होते कीं, सर्व श्रीमंतीच्या सोहळ्यांचा त्या वेळेस कळस होतो कीं इतःपर हालायास चालायास कांहींच नको!—अरेरे केवढें मूर्खत्व हें! केवढा वेडेपणा! ईश्वरानें हस्तपादादि जे अवयव दिले ते आपल्या स्वाधीन ठेवून त्यांस दृढतर करायाचें टाकून मुद्दाम पराधीनपणा पतकरायाचा, हा एकेपरी मूर्खपणा; त्यांतून त्याचें आणखी भूषण मिरवावयाचें झणजे तर त्याची सीमाच! कांहीं न करतां स्वस्थ पडून असणें हेंच जर श्रीमंतीचें स्वरूप, तर मग मनुष्याची अंत्यावस्था झणजे खरोखरी स्वर्गस्थितिच झटली असतां चालेल!

१२. येथवर या समजूतीच्या मूर्खपणाबद्दलच लिहिलें. आतां हें क्रियाशून्यत्व वस्तुतः सुखदायक आहे किंवा होणें शक्य तरी आहे काय याविषयीं विचार करूं.

रिकामपणीं सुस्त बसल्यापासून किती वेळपर्यंत सुख होतें याचा अनुभव बहुधा प्रत्येकास असेल. याचें एक थोडेंसें उदाहरण घेतों. आठा पंधरा दिवसांची, किंवा महिन्या दोन महिन्यांची सुट्टी आली असतां विद्यार्थ्यांस पहिल्यानें केवढा आनंद होतो! त्यांस वाटतें कीं, इतके दिवस आतां खुशाल घरीं बसायास व मौज मारायास सांपडेल! असें वाटून पहिले चार पांच दिवस त्यांस फार बहारीचे वाटतात; पण पुढें लागलींच असा कंटाळा येऊं लागतो कीं, दिवस जातां जात नाहींत; आणि शेवटीं शेवटीं इतका त्रास आलेला असतो कीं, पुनः शाळेंत जाण्याच्या दिवशीं सर्वांस मोठी हुशारी वाटते. या पोरपणाच्या अनुभवांत सर्व सुखदुःखांची किल्ली आहे! नुसतेंच सुख असा कांहीं पदार्थ नाहीं. तें भासण्यास दुःखाचा अनुभव वागत असला पाहिजे. जोंवर पोटांत भूक आहे तोंवरच जेवण्याचें सुख, ताहान आहे तोंवरच पाणी पिण्याचें, थंडी आहे तोंवरच उष्णतेचें, उकाडा होत आहे तोंवरच शीतळ उपचारांचें. याप्रमाणेंच श्रम आणि विश्रांति हेंहि द्वंद्व परस्परसापेक्ष आहे. विश्रांतीचा अनुभव आहे तोंवर श्रम सुखदायक वाटतो, आणि श्रमाचा अनुभव आहे तोंवरच विश्रांतीचें सुख भासतें. हें सर्व जर खरें आहे, तर उद्योग केल्यावांचून रिकामपणाच्या सुखाची आशा करणें आणि श्रम केल्यावांचून विश्रांतिसुख मिळवूं पहाणें, ह्मणजे निरभ्र आकाशापासून वृष्टीची अपेक्षा करण्यासारखें असमंजस नव्हे काय? ताहानेल्यास पाणी सुखकर, उन्हांतून आलेल्यास सावली गोड वाटते, ह्मणून जर कोणी मनुष्य पाणी पिण्यांत सुख आहे एवढेंच घेऊन सारखा पाणी पीत बसला, किंवा सावली गोड वाटते एवढाच अर्थ उचलून सुखाच्या आशेनें निरंतर सावलींत बसला, तर आपण त्यास केवढा मूर्ख ह्मणूं! वर वर्णिलेला श्रीमंतीचा प्रकार थेट यासारखाच आहे हें स्पष्ट आहे. असो; तेव्हां एकंदर सिद्ध काय होतें कीं, उद्योगाखेरीज रिकामपण हें सुख नव्हे हें तर काय, पण महादुःखच आहे; कसें? तर रिकामपणाशिवाय सतत उद्योग जसा अत्यंत दुःखदायक होईल तसा! यास्तवच एका सुज्ञ व चतुर ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं, "सतत विश्रांति हें स्वर्गींचें मोठें सुख आहे असें लोक ह्मणोत; मी तर नरकांतल्या ज्या महा घोर यातना त्यांत तीस गणतों."

१३. याप्रमाणें रिकामपण सुखास कितपत कारण व्हावें याविषयीं विचार झाला पण इतकेंच नव्हे. रिकामपणापासून महान् अनर्थहि आहेत हेंहि पुढच्या-वरून दिसेल. इंग्रेजींत एक ह्मण आहे कीं, "रिकाम्या मनांत सैतान आपला कारखाना घालतो."[1] याचा अर्थ काय कीं, मनुष्यास अगदीं रिकामपण सांपडलें कीं त्यास नानाप्रकारचे कुमार्ग सुचतात. हें ठीकच आहे. कारण मनुष्याच्या शरीरांतले व्यापार जसे कधीं खळत नाहींत, त्याचप्रमाणें त्याच्या मनाचेहि सारखे चाललेले

1 'An idle brain is Satan's workshop.'

असतात. एरवींच्या मनुष्यांचे ईश्वराच्या योजनेनेंच शरीराचे व मनाचे व्यापार सदोदित चालू रहातात; कारण श्रमाशिवाय चरितार्थच न चालण्यानें त्यांच्या दोहोंचाहि चाळा नेहमीं चालू असावा लागतोच. पण श्रम न करितांहि कांहीं थोड्या (एकंदर लोकांच्या मतें 'भाग्यवान्' अशा) लोकांचें चालतें तेव्हां अर्थात्च त्यांचें शरीर व मन हीं दोन्ही इतरांच्या मानानें व्यापारशून्य रहातात. पण अगदीं व्यापार नाहीं अशी मनाची अवस्था कधीं असूं शकत नाहीं. यास्तव सहजच नानातऱ्हेचे ढंग, व व्यसनें त्यांस जडतात. तीं पैशाच्या जोरावर चालली जातात; आणि तशा प्रकारची मंडळी लवकरच त्यांभोवतीं जमते. अशी एकदां कुमार्गाकडे प्रवृत्ति होऊन निरंतर तोच ध्यास लागल्याबर मग काय विचारावें! कोणी कवि ह्मणतो,

यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवेकिता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ॥

"तारुण्य, धनाढ्यता, अधिकार आणि अविचार या चौकड्यापैकीं एक एक मनुष्याचा फडशा पाडण्यास पुरे आहे; मग चारी एकत्र मिळाल्यावर तर काय होईल!" यास्तवच ज्ञानसंपन्न असला तरी मनुष्य तसाच परिपक्व झाल्याखेरीज त्याच्या हातून वनवासांतहि तपश्चरण होणार नाहीं. हें 'रासेलसां'तल्या जोग्याच्या गोष्टींत जॉनसन् यानें सुचविलें आहे; आणि 'शांतिशतक'कारहि असेंच सांगतो,

वनेषु दोषाः प्रभवंति रागिणां । गृहेषु पंचेंद्रियनिग्रहस्तपः ।
अकुत्सिते कर्मणि यः प्रवर्तते । निवृत्तरागस्य गृहं तपोवनम् ॥

"ज्यांच्या मनांत पूर्ण वैराग्य बाणलें नाहीं अशांकडून वनांतहि मानसिक दोष घडतात; आणि जो घरींच असून इंद्रियनिग्रह करतो त्यास तप घडतें. सारांश, अनिंद्य कर्में जो आचरतो, आणि विषयलोभापासून दूर रहातो त्यास त्याचें घरहि तपोवनतुल्य होय!" सारांश एकांतवासांतहि मन शुद्ध ठेवणें कठिण आहे; त्यास अवकाश सांपडला कीं तें दुर्वासनांस वश होतें. आपल्या धर्मांत कर्ममार्गाचा जो एवढा खटाटोप विहित केला आहे त्याचें बीज हेंच होय.

१४. आतां आणखी एक मात्र संपत्तीचा उपभोग सांगणें राहिला. तो धर्म होय. यास उपभोग ह्मणणें हें सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण उपभोग ह्मणजे सुख हाच अर्थ जर आहे, तर धनाचा विनियोग धर्माकडे करणें हाहि त्याचा उपभोगच होय. कां कीं, धर्म करणारास त्यापासून फार समाधान वाटतें. वास्तविक पहातां संपत्तीचा अत्यंत थोर उपयोग ह्मणजे ती परोपकारीं लावणें हाच होय; यास्तव तशा महात्म्यांस अशा विनियोगानें जें चित्तास सुख होत असेल त्यास दुसऱ्या कशाची उपमा साजणार नाहीं! परोपरीच्या भूषणांनीं आपलें शरीर लेववून त्यांत संतोष मानणें ही प्राकृत जनांची कोती समजूत होय; तिचें सुख केवळ नेत्रांनींच घेणें हा अत्यंत

मूढ व नीच जो प्राणी कृपण त्याचा प्रकार; आणि धनाचा व्यय केवळ स्वार्थपरैक-बुद्धीनें विषयोपभोगांकडेच करणें, व त्याच्या जोरावर अनेक अनन्वित कृत्यें करणें हें तर मानवजातीस कलंक लावणाऱ्या पशूंचें व राक्षसांचें कर्म होय! सत्पुरुषांच्या हातून संपत्तीचा वेंच फार निराळ्या तऱ्हेनें होतो. भर्तृहरि ह्मणतो,

श्रोत्रं श्रुतेनैव न कुंडलेन । दानेन पाणिर्नतु कंकणेन ।
विभाति कायः करुणापराणां । परोपकारैर्नतु चंदनेन ॥

"कर्ण हे सच्छास्त्रश्रवणानेंच शोभतात, कुंडलांनीं नाहीं; हात दानानें शोभतो, कंकणानें नाहीं; आणि जे दयाशील आहेत त्यांचा देह परोपकारांनीं शोभतो, चंदनानें शोभत नाहीं!" असो; तेव्हां हाच उपभोगप्रकार सर्वांत श्रेष्ठ होय हें उघड आहे. पण धर्म करण्यांत एका गोष्टीकडे अवश्य लक्ष पोंचवावें लागतें; ती गोष्ट पात्रापात्रत्व-विचार होय. जर पात्रीं दान घडलें तरच तें उत्तम; नाहीं तर उलटा दाताच दोषांत पडतो. आतां अलीकडे पात्रापात्रत्वाविषयींचे विचार पहिल्यापेक्षां चांगले झाले आहेत हें सर्वांस माहीत आहेच. त्याविषयीं विशेष लिहिणें नको. यापूर्वी ब्राह्मणांची, विशेषतः भटांची, सर्वथा भर करण्यांत लोक पुण्य मानीत असत; पण आतां समदृष्टीनें पहातां सर्व विपन्न मनुष्यें धर्मास सारखींच सत्पात्र आहेत अशी उत्तम समजूत पहिलीच्या जागीं आली. पण या नव्या समजुतीनें धर्मबुद्धि वाढली, किंवा पहिल्या इतकीच राहून ती दुसऱ्या चांगल्या मार्गास लागली, असें मात्र दृष्टीस पडत नाहीं. दुष्काळादि कहरांत सांपडलेले हजारों लोक तर धर्मास अत्यंत पात्र ना! पण धर्मांविषयींचीं सर्वांचीं मतें एवढीं सुधारलीं असतांहि ह्मणण्यासारखें दातृत्वाचें श्रेय कितीक घेतात? तेव्हां एकंदरींत पहातां आमच्या नव्या लोकांची चाल ही दिसते कीं, पथ्यावर पडण्यापुरती मात्र ते सुधारणा उचलितात! असो; या धर्माच्या संबंधानें दुसरी अशीहि गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, मुळींच हातचा पैसा न सुटण्यापेक्षां कीर्तीच्याहि हेतूनें धर्म झालेला बरा; पण तो खरा धर्म नव्हे. कां तर, तितका परोपकार कीर्तीसाठीं विकल्यासारखें तें होतें. खरा धर्म तोच, कीं जो अंतःकरणाच्या कळवळ्यानें व निरपेक्ष बुद्धीनें केला असतो; व असाच त्या करणाऱ्यास अत्यंत सुख देतो यांत संशय नाहीं.

१५. याप्रमाणें संपत्तीच्या उपभोगाचे निरनिराळे प्रकार सांगून प्रत्येकापासून उपभोक्त्यास सुख किती होत असतें हेंहि लिहिलें. आतां शेवटीं इतकेंच सांगतों कीं, ऐश्वर्य काय तें आह्मींच भोगावें हा मूर्खपणाचा अभिमान सोडून देऊन जर आमचे राजेरजवाडे आणि इतर श्रीमान् गृहस्थ यासंबंधें युरोपियन लोकांचा कित्ता उचलतील तर तो त्यांस फार हितावह होईल. या ह्मणण्याचा अर्थ असा नाहीं, कीं ते सर्वत्र आपल्या पैशाचा चांगला व्यय करीत असतील, किंवा जो जो करतात तो

चांगलाच असतो. या देशांत जी त्यांची कृति दृष्टीस पडते, तीवरून सहज तर्क करतां येतो कीं, एथल्याप्रमाणेंच तेथेंहि मडम साहेब, बुटणेर साहेब यांचेंच साहेबावर प्राबल्य चालत असेल; खुर्च्या वगैरे हरएक सामान, कापडचोपड यांतच पुष्कळ पैसा नासत असेल; शिवाय मद्यादिकांचें सेवन; व्यभिचाराऐवजीं राजरोस बॉल नांवाचे नाच, वगैरे मूर्खपणाचे आणखीहि अनेक प्रकार चालू असतील! तसेंच येथच्या आचरणावरून पहातां दुष्काळ युद्धादि प्रसंगीं लोकांस मदत करण्याचेंहि मान तेथें बहुतेकांचें तितपतच असेलसें दिसतें. असो, या प्रकारांविषयीं आह्मी बोलत नाहीं. त्यांजपासून ग्रहण करावयाचे गुण हे कीं, तक्केलोडांशीं बसण्यांत व इकडची काडी इकडे न करण्यांत प्रतिष्ठा न मानतां त्यांसारखे यांनीं व्यायाम करावे, देशाटनें करावीं, तसेंच अक्षरशून्य व नेहमीं रिकामें रहाण्यांत भूषण न मानतां त्यांसारखें विद्यानिपुण होऊन जगांत नांव राखण्याची उमेद धरावी. दानशूरत्वांत त्यांस आमच्या पारशी देशबधूंचें--कीं, ज्यांचा धर्म आणि जीवित महासंकटसमयीं वांचविल्याबद्दलचें या देशाचें ऋण जे कृतज्ञताबुद्धीनें अनेक प्रकारांनीं फेडीत आहेत त्यांचें --आणि विशेषतः त्यांस व एकंदर मनुष्यजातीस भूषणरूप जो महात्मा त्यांच्यांत होऊन गेला त्याचें उत्कृष्ट उदाहरण आहेच. तर याप्रमाणें जर आमचे लोक आपलें वर्तन सुधारतील, तर संतत संपत यांचा विरोध जो आमच्या लोकांस दैवमत्सरकृत वाटतो तो तेव्हांच नाहींसा होऊन, पूर्वी भगवा झेंडा व जरी पटका रणांत नाचवून त्यांच्या पूर्वजांनीं जी कीर्ति मिळविली तीस अजूनहि ते उज्वल करतील!

इतिहास.

कोऽन्यः कालमतिक्रांतं नेतुं प्रत्यक्षतां क्षमः ।
कविप्रजापतींस्त्यक्त्वा रम्यनिर्माणशालिनः ॥ *

राजतरंगिणी.

अंक ६—(१) प्रकृत विषयाचें स्वरूप. (२) 'इतिहास' शब्दाची व्युत्पत्ति; मूळचा व आतांचा अर्थ. (३) इकडच्या प्राचीन इतिहासाचा अभाव; त्याचीं कारणें. (४) उपलब्ध असणारे कांहीं ग्रंथ; त्यांवरून अनुमान. (५) या देशाच्या प्राचीन इतिहासाची माहिती होण्याचीं दुसरीं साधनें. (६) इतिहासाची उत्पत्ति व प्रसार. (७) इतिहासाचा उपयोग; त्यावर आक्षेप घेणारे लोक. (८) पहिला उपयोग–जिज्ञासातृप्ति. (९) दुसरा उपयोग—सदुपदेश. (१०) तिसरा—मनास प्रसन्नत्व व उन्नति.

---

* रमणीयत्व निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवांवांचून आणि कवींवांचून, गत झालेल्या काळाला पुन्हां डोळ्यांपुढें आणून देण्यास दुसरा कोण समर्थ आहे?

१. हा विषय मोठा दांडगा आहे. यावर जितकें लिहावें तितकें थोडेंच. कारण खुद्द विषयच अगोदर मोठा असून त्याचीं अंगं उपांगंहि अनेक आहेत. तीं अशीं कीं, यावर लिहिणारानें जगाच्या इतिहासावर एकंदर नजर पोंचविली पाहिजे. असें केल्यानें त्यास जे मुख्य मोठमोठे सिद्धान्त सामान्यतः दिसतात त्यांचा उल्लेख केला पाहिजे; नंतर प्रत्येक मोठमोठ्या राष्ट्राच्या इतिहासाकडे विशेषतः दृष्टि देऊन त्याच्याविषयीं लिहिलें पाहिजे. तसेंच भूगोल व कालक्रम–कीं ज्यांस इतिहासाचीं नेत्रें ह्मणतात–त्यांविषयीं; देशांच्या स्थितिविशेषाचीं फलें–ह्मणजे अमुक अमुक देशाची रचना अशा अशा प्रकारची असल्यामुळें असं असे परिणाम उद्भवले,–याविषयीं; विद्या-कलादिकांचा उत्कर्ष कसकसा होत गेला, तो प्रकार; किंबहुना रीत रिवाज पेहराव, वगैरे लहानसान गोष्टी; यांविषयीं सुद्धां इतिहासांत माहिती आली पाहिजे. सारांश, इतिहास ह्मणजे इतिवृत्त. मूळारंभापासून आजपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडल्या त्या सर्वांचे टिपण ज्या ग्रंथांत केलें असतें त्याचें नांव इतिहास.

२. आतां पहिल्यानें या शब्दाची व्युत्पत्ति अंमळ चमत्कारिक आहे ह्मणून सांगतों. या शब्दाचे घटकावयव तीन शब्द आहेत—'इति–ह–आस' यांचा अर्थ 'याप्रमाणें झालें' असा आहे.[1] तेव्हां या शब्दाचा अर्थ 'मागें घडलेला वृत्तांत' असा आहे. पण मूळच्या व आतांच्या अर्थांत एक मोठा भेद झाला आहे. या शब्दाचा मूळचा अर्थ पुराणांतील उपकथा ह्मणजे अप्रधान गोष्ट असा होता—जशा धर्मराजास वगैरे निरनिराळ्या प्रसंगीं ऋषींनीं सांगितलेल्या प्राचीन राजांच्या गोष्टी. पण हल्लीं 'इतिहास' हा शब्द 'बखर' या अर्थी योजतात. तेव्हां दोहोंतला भेद उघडच आहे कीं, पहिल्यांस प्रमाण केवळ ऋषींचे पुराणांतील लेखच काय ते होत; पण दुसऱ्यांस त्यांहून सबळ असे अनेक आधार लागतात.

३. वर जो 'इतिहास' शब्दाचा जुना अर्थ सांगितला त्यावरून स्पष्ट दिसतें कीं, अर्वाचीन अर्थी तो शब्द ज्यांस लागेल असे ग्रंथ आपल्या देशांत प्राचीन काळीं नव्हते; ह्मणजे ग्रीक व रोमन लोकांत सप्रमाण व खरे इतिहास लिहिण्याची जशी पुढें प्रवृत्ति पडली, तशी इकडे कधींहि पडली असेलशी दिसत नाहीं. हा एके रीतीनें मोठा चमत्कार आहे. कारण जे प्राचीन हिंदु लोक त्या वेळेस सर्व राष्ट्रांत हरएक प्रकारें अग्रगण्य होते, ज्यांच्यांत विद्या तर प्रत्येक रूपानें पूर्ण अवतरली होती, त्यांच्या हातून एवढें हेंच एक अंग सुटावें ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? आहे खरी. तथापि तीबद्दल कांहीं कारणें सांगतां येतील असें आह्मांस वाटतें. इतिहासाचा उद्भव केव्हां होऊं लागतो याविषयीं जर आपण थोडा विचार केला, तर असें दिसून येईल कीं,

१ या शब्दांत 'ह' हें केवळ अव्यय आहे. याचा प्रयोग वेदादि जुन्या ग्रंथांतून आढळतो.

ज्या वेळेस राष्ट्रांत मोठ्या लढाया, मोठ्या राजक्रांति वगैरे कांहीं मोठमोठ्या गोष्टी घडतात तेव्हां. आथेन्स, रोम, इंग्लंड, येथील लोकांत; तसेंच मुसलमान, मोंगल, मराठे या लोकांतहि, घडलेल्या गोष्टींचें वृत्त लिहून ठेवण्याची प्रवृत्ति अशाच प्रसंगीं पडली. असो; तेव्हां हें जर खरें आहे, तर प्राचीन हिंदु लोकांत इतिहासग्रंथांचा अभाव कां राहिला यांचें कारण बरेंच स्पष्ट होईल, त्यांच्या देशाच्या चतुःसीमा बहुधा अलंघ्यच असल्यामुळें प्राचीन चिनी लोकांप्रमाणेंच आपले पूर्वजहि आपल्या ठिकाणींच स्वस्थ सुखरूप होते. ग्रीक, रोमन वगैरे लोकांचा शेजारच्या राष्ट्रांशीं जसा नेहमीं संबंध पडेच, तसें येथें मुळींच नसल्याच्या योगानें परराष्ट्रांशीं युद्धादि प्रसंग प्राचीन हिंदु लोकांचे कधींच घडले नाहींत. देशांतल्या देशांतच राजेरजवाड्यांच्या एकमेकांशीं लढाया होत असतील खऱ्या, तरी इतिहासरूपानें त्यांचें वर्णन करावें अशा तन्हेच्या त्या कधींहि झाल्या असतीलशा वाटत नाहींत. कारण त्या वेळचे जे कांहीं संस्कृत ग्रंथ अजून उपलब्ध आहेत त्यांत अनेक राजे स्वतंत्रपणें राज्य करीत असल्याचे उल्लेख आढळतात; पण एकानें सार्वभौमत्व पावून बाकीच्यांस पादाक्रांत करून टाकिलें आहे असें कोठें आढळत नाहीं. असो; तेव्हां मोठे युद्धप्रसंग, मोठ्या राज्यक्रांति, वगैरे जी इतिहासाची सामग्री ती नसल्यामुळें इतिहास लिहून ठेवण्याचा पाठ इकडे पडला नसेल असें वाटतें. दुसरें एक मोठें कारण असेंहि दिसतें कीं, आपल्या लोकांच्या मनाचा एकंदर कल निवृत्तिमार्गाकडे जेवढा दृष्टीस पडतो तेवढा प्रवृत्तिमार्गाकडे नाहीं. जग सर्व मिथ्या आहे, प्रपंचांतील सर्व व्यवहार लटके आहेत, अवघा ईश्वरी मायेचा गोंधळ आहे,

दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा कसें
धरील मन आधिनें बहु परिभ्रमे चाकसें ।

असे विचार ज्यांच्या मनांत नेहमीं घोळावयाचे, ज्यांचा परमार्थाकडेच विशेष ओढा, अशा लोकांस रक्तपात, राज्यांच्या घडामोडी वगैरे गोष्टींचीं वर्णनें करून नरस्तुति गात बसण्याचा कंटाळा असल्यास काय नवल ? असो; तर आपल्या देशांत इतिहासकार न झाल्याचीं हीं दोन मोठीं कारणें आह्मांस वाटतात.

४. वर प्राचीन हिंदु लोकांत इतिहास लिहिण्याचा परिपाठ नव्हता म्हणून म्हटलें, यावरून त्या विषयींची माहिती मिळण्यास मुळींच मार्ग उरला नाहीं असें समजावयाचें नाहीं. निबंधाच्या अग्रभागीं जें पद्य घातलें आहे त्यावरूनच मार्मिक वाचणारांच्या सहज लक्षांत येईल कीं, इतिहासाची योग्यता आपले लोक जाणीत नव्हते असें नाहीं. संस्कृतांत चांगले इतिहास नाहींत खरे, तरी पूर्वी घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याचा नाद आपणांस अगदीं नव्हता असें नाहीं. वर ज्यांतून उतारा घेतला आहे तो 'राजतरंगिणी' ग्रंथच याविषयीं मोठें प्रमाण आहे. यांत काश्मीरदेशाच्या

राजांचें वर्णन अगदीं मूळारंभापासुन तों तहत अकबर बादशहानें तो देश काबीज केला येथपर्यंत आहे. हा इतिहास निरनिराळ्या पंडितांनीं आपआपल्या वेळेपर्यंत आणून पोंचविला आहे. संस्कृत ग्रंथकारांचे शक बसविण्यास हा ग्रंथ फार उपयोगी पडतो. असाच दुसरा इतिहासरूप संस्कृत ग्रंथ आह्मांस कांहीं वर्षांपूर्वी पाहिलेला आठवतो; त्यांत बंगाल्याकडील मोंगलांच्या राजांचा वृत्तांत लिहिला होता. 'विविध-ज्ञानविस्तारां'त काशिराजनामक* पंडितानें लिहिलेला पानपतच्या लढाईविषयींचा मजकूरहि पुष्कळांनीं वाचला असेलच. तो जरी नबाबाच्या सांगण्यावरून त्या पंडितानें फारशी भाषेंत लिहिला, तरी या दोन्ही गोष्टींनीं आमच्या वरच्या ह्मणण्यास बाध येत नाहीं. उलट्या या दोन्ही आमच्या हिंदु लोकांस—व विशेषतः ब्राह्मणांस—भूषणास्पदच होत. एक तर पदरच्या मुनशास टाकून त्या नबाबानें वरच्या पंडितासच तो वृत्तांत लिहावयास सांगितला यावरून त्याचें त्या भाषेंत अत्यंत निपुणत्व दिसून येतें. आणि दुसरें, चांगला इतिहास लिहिण्यापुरती त्याच्या अंगीं शक्ति व हौसहि होती असें झटलें पाहिजे. हौस होती असें ह्मणण्याचें कारण उघडच आहे कीं, ती नसती तर स्वदेशीयांचा त्या घोर युद्धांत जो अगदीं मोड झाला—कीं जो या देशास अजून भोंवतों आहे, आणि यापुढें तर कोणत्या परिणामास नेऊन पोंचवील, ईश्वर जाणे!—त्याची हकीकत लिहिण्याचें काम कोणीहि हिंदु खचित पतकरताना! असो; तेव्हां इतिहास लिहिण्याचा आपल्या लोकांस अगदीं नाद नाहींसा नव्हता हें वरील उदाहरणांवरून दिसून येईल. व आह्मांस असेंहि वाटतें कीं, आपल्याकडे इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति कमी तर खरीच; परंतु वरच्यासारखे फुटकळ ग्रंथ पूर्वी पुष्कळ लिहिलेले असतील. त्यांचा कालगत्या लोप होऊन त्यांतले अजूनहि कदाचित् कोठें सांपडण्यासारखे असतील. हा आमचा तर्क खरा असला, तरी आमच्या लोकांस त्यापासून मोठासा उपयोग नाहीं हें उघड आहे. नानाप्रकारचे शोध करण्याच्या वगैरे सर्व कामांचा भक्ता आह्मीं आमच्या राज्यकर्त्यांस देऊन टाकला आहे. त्यांनीं ते शोध करून विलायतेस नेऊन तेथून, मोक्षमुल्लर† डॉक्टर हौग अशांच्या शिक्क्यामोर्तबासहित ते इकडे आले, ह्मणजे मग ते आमच्या अज्ञान व भोळ्या देशबंधूंपुढें मोठ्या पांडित्याचा आव घालून झोकानें मिरविण्याचें आमचें काम!

५. पण इतकेंच नव्हे. आपल्या देशाचा प्राचीन इतिहास वरच्यासारख्या ग्रंथावरून तर समजतोच; पण याखेरीज दुसरींहि कित्येक साधनें तो समजण्याचीं आहेत. प्राचीन ग्रीक व रोमन लोक मोठे शोधक असत; त्यांस आपल्या देशाची जरी चांगलीशी माहिती नव्हती; तरी उत्तरेकडील भागांविषयीं त्यांच्या कित्येक ग्रंथांतून लेख

* अयोध्येचे नबाबाजवळ पंडित होते. यांनीं पानपतची बखर लिहिली आहे.

† जर्मन पण्डित होते. यांनीं ऋग्वेदाचें इंग्लिश भाषांतर केलें आहे.

आढळतात. ते तेथील प्राचीन इतिहासाची माहिती होण्यास कांहींसें साधन आहेत. ईजिप्ट (मिश्र) देशांत टॉलेमी ह्मणून एक मोठा नामांकित भूगोलवेत्ता होऊन गेला. त्याचे ग्रंथ, तसेच चिनी लोकांचे[1] ग्रंथ, यांवरूनहि प्राचीन हिंदुस्थानाविषयीं बरीच माहिती मिळते. त्याप्रमाणें पूर्वीचे जयस्तंभ, ताम्रपत्रें, लेणीं वगैरेहि पूर्वीच्या काळचें ज्ञान होण्यास कांहींशीं साधन होतात. याशिवाय 'मुद्राराक्षस,' 'मृच्छकटिक' अशा ऐतिहासिक नाटकांवरून वगैरेहि प्रसंगविशेषीं प्राचीन इतिहासाच्या कांहीं गोष्टी कळतात. सारांश, आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासाची माहिती याप्रमाणें तुटक तुटक मात्र होण्याची सध्यां सोय आहे. पहिल्यापासून अनुक्रमानें लिहिलेले इतिहास जर असते, तर जसें पूर्ण ज्ञान होतें, तसें होण्याची आतां मुळींच आशा नको!

६. याप्रमाणें इतिहासाचा अभाव हें आपल्या प्राचीन विद्येचें मोठेंच व्यंग होय. आतां हें शास्त्र केव्हां व कोठें प्रथमतः उत्पन्न झालें, त्याचा प्रसार कसा झाला, याविषयीं लिहितों.

साऱ्या जगांत ज्ञानाचा प्रसार जो झाला आहे त्याचें उगम मुख्यतः दोन होत. एक हिंदुस्थान; आणि दुसरा ग्रीस देश. पहिला देश जसा एशियाखंडाचें नाक होतें, तसा दुसरा देश युरोपाचें होतें. अर्वाचीन काळीं युरोपांतील सर्व देशांत जी सुधारणा झाली आहे तिचें मूळ केवळ ग्रीस देश होय. विद्याकलादिकांची अलीकडे इंग्लंड वगैरे देशांत पुष्कळ वृद्धि झाली, व दिवसेंदिवस होत आहे हें खरें आहे, पण सर्वांचें आदिपीठ पाहिलें असतां वर सांगितलेला देशच होय. असो; तर युरोपांत जी इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति पडली आहे तिचेंहि कारण ग्रीस देशच होय. या देशांत हिरॉडटस्* हा पहिला इतिहासकार झाला. यास्तव होमर यास आद्यकवि हें पद जसें जोडतात, तसें यास आद्य इतिहासकार ह्मणतात. ग्रीक लोकांचें पारसीकांशीं[2] मोठें दारुण युद्ध ज्या काळीं चाललें होतें त्याच काळांत हा जन्मला. यानें दूरदूरच्या देशीं प्रवास करून आपल्या इतिहासास उपयोगी पडेलशी पुष्कळ माहिती मिळविली,

---

१. चिनी लोकांस हिंदुस्थानाविषयीं लिहिण्याची गरज कां पडली हें समजण्यास शालापत्रक पुस्तक १३, अंक २ पहावा

२. पारसीक ह्मणजे प्राचीन पारशी लोक. 'पारशी' 'इराणी' हे अगदींच अर्वाचीन शब्द असल्यामुळें **कालिदास, बाण,** इत्यादि आपल्या जुन्या कवींस ते लोक ज्या नांवानें माहीत होते तोच शब्द येथें योजणें प्रशस्त वाटतें.— 'पारसीकांस्ततो जेतुं प्रतस्थे स्थलवर्त्मना— **रघुवंश ४.**

---

* ग्रीस देशांतील पहिला इतिहासकार.

आणि ग्रीक भाषेंत पहिल्यानें इतिहास रचिला. तो त्यानें 'ऑलिंपिक गेम्स' नांवाचे पांच पांच वर्षांनीं जे सार्वजनिक उत्सव होत असत त्यांतील एका प्रसंगीं आपल्या देशबंधूंपुढें वाचला. त्यांतील विषयच अगोदर देशाभिमानाचा—म्हणजे ग्रीक लोकांच्या पराक्रमांचें वर्णन असल्यामुळें, व इतरहि चमत्कारिक माहिती मोठ्या चातुर्यानें आंत घातली असल्यामुळें, तो ग्रंथ सर्व लोकांस फारच प्रिय झाला. इतका कीं, त्यांच्यांत नऊ ज्या विद्याधिदेवता मानिल्या असत त्यांचीं नांवें त्या ग्रंथाच्या नऊ सर्गांस जमलेल्या समाजानें लागलीच ठेवलीं. याच प्रसंगीं दुसरीहि एक चमत्कारिक गोष्ट अशी सांगतात कीं, वर सांगितलेला इतिहास हिरॉडटस् वाचीत असनां त्या समाजांत एका नऊ वर्षांच्या मुलास इतका गहिंवर आला कीं, तो आंसवें ढाळूं लागला. तें त्या इतिहासकर्त्यानें पाहून त्या मुलाच्या बापापाशीं असें भाकित केलें कीं, हा तुमचा मुलगा पुढें मोठा नामांकित इतिहासकार निपजेल! आणि खरोखरीच तसें घडून आलें. तो लहान मुलगा पुढें ग्रीस देशांतला, किंबहुना साऱ्या जगांतला, अत्युत्कृष्ट इतिहासकार थुसिडिडीज् झाला! असो; याप्रमाणें आणखीहि कित्येक इतिहासकार ग्रीस देशांत होऊन गेले. त्या सर्वांत वरच्या दोहोंसारखा विख्यात झाला म्हणजे सॉक्रेटीस् याचा शिष्य जिनोफन् हा तिसरा होय. ग्रीक लोकांच्या वीर्याचा व वैभवाचा अस्त झाल्यावर पुढें रोमन लोकांची भरभर झाली. तेव्हां त्यांच्यांतहि कित्येक मोठमोठे इतिहासकार झाले. लिव्ही, सालस्ट, सीजर, प्लुटार्क, टासिटस इत्यादि. पुढें रोमन लोकांनींहि हजार दीड हजार वर्षें राज्यवैभव भोगल्यावर त्यांची सद्दी संपली; आणि आरब व तुर्क लोक यांचें दैव उदयास आलें. या आरबांचें त्यांच्या शौर्याखेरीज त्यांचें स्वतःचेंच असें थोडेंच निघेल! धर्म तर यहुदी व ख्रिस्ती यांच्या धर्माची भेसळ करून व कांहीं पदरचें घालून सरासरी बनवलेला; तसेंच विद्या व कला याहि ग्रीक व हिंदु लोकांच्याच घेऊन यांनीं आपल्या म्हणून म्हणविलेल्या आहेत. तेव्हां सदरहूप्रमाणेंच इतिहास लिहिण्याचा प्रघातहि त्यांचाच मूळचा असेलसें दिसत नाहीं; तो त्यांनीं ग्रीक लोकांपासून घेतला असावा. असो; याप्रमाणें इतिहासाची उत्पत्ति होऊन त्याचा प्रसार जगांत झाला. अलीकडील इंग्लिश वगैरे लोकांनीं तर थेट ग्रीक व रोमन लोकांपासूनच तो उचलला हें वर सांगण्यांत आलेंच आहे; व हल्लींच्या काळीं हेच लोक बाकी सर्वांहून ज्ञानसंपन्न विशेष असल्यामुळें तो लिहिण्याची उत्कृष्ट पद्धति यांच्यांतच आहे. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं हल्लीं सगळ्या भूगोलाची माहिती झाली असल्यामुळें इतर सर्व देशांचेहि इतिहास त्यांनीं लिहून ठेवले आहेत.

७. याप्रमाणें प्रस्तुत विषयास उपोद्घातरूपानें जी माहिती सांगणें अवश्य होतें ती सांगितली. आतां खुद्द विषयाविषयीं विचार करूं. पहिल्यानें इतिहासाचा उपयोग काय? हा प्रश्न दिसतांच असमंजस दिसून कोणी करीत नसतीलसें प्रथमतः वाटतें.

कां कीं, दुसरा कोणताहि उपयोग नाहीं झटला, तरी मनुष्याच्या मनास अत्यंत स्वाभाविक अशी जी जिज्ञासा ती तरी त्याच्या योगानें तृप्त होते हाच काय थोडा उपयोग आहे? हा अगदीं निदानपक्षींचा उपयोग सांगितला,—दुसरे जे इतिहास वाचल्यापासून मोठमोठे नफे आहेत ते पुढें सांगण्यांत येतीलच. असो; पण असें असतांहि इतिहासांत ज्यांस कांहीं एक अर्थ दिसत नाहीं, जे त्याचा तिरस्कार करतात, असे मनुष्य पुष्कळ आढळतात. ज्यांच्या मनांत ज्ञानानें कधीं प्रवेश केला नाहीं, किंवा तो व्हावा असा ज्यांविषयीं ईश्वरी संकेतच दिसत नाहीं, अशांनीं वरील मतें प्रगट केल्यास कांहीं नवल नाहीं. पण नवल हें कीं, ज्यांच्या ठायीं विचारशक्ति चांगली प्रखर दृष्टीस पडते, जे समंजसतेचा मोठा आव घालतात, अशांमध्येंहि इतिहासावरची अप्रीति पुष्कळ वेळां दृष्टीस पडते. इंग्रेज लोकांतला प्रसिद्ध ग्रंथकार जॉनसन् हा अशाविषयींचें एक मोठें उदाहरण आहे. एकंदर इतिहासाविषयीं, व विशेषतः प्राचीन इतिहासाविषयीं, हा आपला तिरस्कार वारंवार प्रकट करीत असे. या थोर ग्रंथकाराच्या कित्येक विलक्षण समजुती होत्या, व जे हेकटपणाचे कित्येक ग्रह त्याच्या मनास साऱ्या जन्मभर खिळून राहिले होते, त्यांपैकींच वरचा एक होय. असो; आपणांमध्येंहि असे पुष्कळ झणणारे सांपडतील कीं, "अहो! मागील काळाशीं आपणाला कय करायाचें आहे? ते लोक गेले, मेले, पार झाले; आतां त्यांची कर्मकटकट आपणास कशाला हावी? बाजीरावानें दिल्ली घेतली, नाना फडनविसानें अशी अशी युक्ति लढविली,—आपणाला त्यांत काय लभ्य आहे? सध्यां चाललें आहे तें खरें! ज्यांत आपला कांहीं नफाहि नाहीं व तोटाहि नाहीं, अशा मागच्या गोष्टी मिळवायाच्या, जुने लेख पाहायाचे, वगैरे जी विनाकारण यातायात करायाची तींत काय अर्थ? साहेब लोकांस कांहीं उद्योग नसतो, त्यांचीं हीं कामें! असा रिकामा उद्योग कोणीं करीत बसावें? त्यांत निष्पन्न काय?" खरेंच! जीवमान आहे तोंवर खाऊन घ्यावें, पिऊन घ्यावें; दुपारची वामकुक्षी चुकूं देऊं नये; संध्याकाळच्या खाशा वेळीं शानदारसा पोषाक करून बाहेर पडावें; मग गंध्याचें दुकान, किंवा (विद्येचा षोक अथवा सुधारणेंत पुढारीपणा दाखविणें असल्यास) लायब्ररी, अशा ठिकाणीं चार घटका साऱ्या जगाच्या उलाढाली करून नंतर रमत रमत घरीं यावें; अशा प्रकारचा स्तुत्य आयुष्यक्रम ज्यांनीं निरंतर अबाधित चालवावा, अशा थोर लोकांपुढें बाजीराव काय आणि मोठा शिकंदर बादशाहा झाला झणून तो तरी काय!! जन्मास आल्याचें चीज जर कोणास करून घेणें असेल, तर त्यांनीं अशाच सद्गुरूचे पाय धरावे; कां कीं, एकंदर तत्त्व असें यांनींच ओळखलें! मग काय उशीर? तुकारामबोवा झणतात, अशांची थोरवी काय वर्णावी!—

आपणासारिखे करिती तात्काळ

नाहीं काळ वेळ तयांलागीं ॥[1]

असो; तर याप्रमाणें इतिहासास नाक मुरडणारे वर सांगितलेले दोन प्रकारचे लोक असतात. एक वरचे वामकुक्षीवाले. यांच्या मतांत अर्थातच मुळींच अर्थ नाहीं; व त्यांचें मत कोणीं न मानलें तर त्यांतहि त्यांस मोठी मानहानि झालीशी वाटणार आहे असेंहि नाहीं ! त्यांचें चमचमीत भोजन, वामकुक्षी, तंबाखू, गप्पा, यांस जोंपर्यंत कांहीं हरकत होत नाहीं, तोंपर्यंत इतर कशासहि ते भीजीत नाहींत ! हा एक वर्ग, व हा फार मोठा आहे यांत संशय नाहीं. दुसरा वर्ग जॉनसन्सारख्या दुराग्रही व स्थूलबुद्धि लोकांचा. यांचीं मतें इतर विषयांवर केवढींहि मान्य असलीं, तरी ज्यांवर त्यांनीं कधीं व्यासंग केला नाहीं, व ज्याचा आस्वाद घेण्यास त्यांची स्थूलबुद्धि स्वभावतःच समर्थ नाहीं, अशा विषयांवरचीं त्यांचीं मतें असमंजस मानण्यास कांहीं हरकत नाहीं; कित्येक इंग्लिश कवींच्या ग्रंथांवर दिलेले अभिप्राय जानसन्चे जितपत खरे आहेत, किंवा गाण्याबजावण्यावर त्यानें आपलें मत दिलें असतें तर तें जितपत यथार्थ असण्याचा संभव होता, तितपतच त्याचें प्रस्तुत विषयावरचें मत ग्राह्य होय ! असो, तेव्हां या दोन्ही लोकांचे आक्षेप मनास आणण्यासारखे नाहींत. आतां इतिहासाचे उपयोग कोणकोणते आहेत याविषयीं लिहितों.

८. एक तर वर सांगण्यांत आलाच आहे. कोणता ? तर जिज्ञासातृप्ति. ईश्वरानें ही मनोवृत्ति मनुष्याच्या ठायीं मोठी प्रबळ ठेविली आहे. हिचा अंगचा जोर कितपत आहे हें सुधारणेच्या काळीं चांगलें दिसून येत नाहीं. कां कीं, अशा काळीं मनुष्याच्या मनाची मूळची कळा त्याच्या शरीराप्रमाणें लोकाचाराखालीं पुष्कळ दबली जाते; ह्मणजे मूळची जशी तिची स्वेच्छाप्रवृत्ति असते तशी पुढच्या काळीं रहात नाहीं. पहा बरें. मनुष्याचा अंतरालांतील गोलांशीं काय संबंध आहे ? पृथ्वी फिरत असली कीं सूर्य फिरत असला, चंद्र स्वयंप्रकाश असला कीं परप्रकाशित असला, ग्रहमालेचा मध्य पृथ्वी असली कीं सूर्य असला, तारे कितीहि असले, कांहींहि असलें, तरी त्यांत मनुष्याचें काय बरें हिताहित आहे ? मागें सूर्य फिरतो असें लोक मानीत होते, आतां पृथ्वी फिरते असें लोक मानतात, ह्मणून मनुष्यें काय रोग्याचीं निरोगीं झालीं, कीं दरिद्राचीं संपन्न होऊन बसलीं ? एवढी उठाठेव करून—दुर्बिणीची कल्पना काढून, नानाप्रकारचीं गणितें करून, निरनिराळीं प्रमाणें एकत्र करून—ज्योतिष्यांस किंवा जगास कोणता फायदा झाला ?—खरें आहे. एका कवडीचाहि झाला नाहीं ! हाच उपदेश सर्व मनुष्यांत शहाणा ह्मणून जो निवडला गेला त्या सॉक्रेटिसानें आपल्या शि-

१. वरचा अभंग कवीनें असा व्याजोक्तीनें लिहिला नाहा. त्याचा मूळचा अर्थ सरळच आहे. पण मूळांतल्या सारख्याच प्रसंगीं लोक तो भाषणांत आणतात, हें बहुधा सर्वांस माहीत असेलच.

ष्यांस व सर्व जगास केला. पण एवढ्या महापंडिताच्या सांगण्यानेंहि लोक राहिले आहेत काय ? सूर्यबिंबाचा चंद्रानें ग्रास केला, किंवा शुक्र सूर्याच्या आड आला, कीं लोक कोणी हिंदुस्थानांत, कोणी अमेरिकेंत, कोणी दक्षिण समुद्रांत, धांव घेतातच कीं नाहींत ? जिवावर उदार होऊन केवळ जिज्ञासाप्रेरित होत्साते तोफेच्या गोळ्यांत बसून चंद्रलोकावर स्वारी करतात कीं नाहींत ?[1] असो; तेव्हां मनुष्यमात्राचे ठायीं जिज्ञासा ही मोठी उच्छृंखल आहे. हिचा मुळींच अभाव असता तर जगाच्या मूळच्या स्थितींत आज फारसा फरक पडता ना हें उघड आहे. असो; तेव्हां सांगायाचें काय कीं अंतरालांतील दूरदूरच्या गोलांविषयींहि जर मनुष्याच्या मनांत जिज्ञासा उत्पन्न होते, तर ज्या गोलावर तो वास करतो त्यावर निरनिराळ्या ठिकाणीं काय काय वृत्तांत घडले ते समजून घेण्याची त्यास उत्कंठा होणार नाहीं काय ?

९. वर सांगितलेला इतिहासाचा उपयोग सर्वांत पहिला, साधा व लहान असा होय. तरी इतिहासाची प्रवृत्ति मूळारंभीं पडण्यास तोच कारण आहे असें दिसून येईल. त्याहून वरचढ दुसरा उपयोग ह्मटला ह्मणजे नीतिबोध. सज्जनांचा जय व दुर्जनांचा अपजय असेंच जरी नेहमीं इतिहासांत आढळत नाहीं, तरी एकंदरींत परिणाम असाच दृष्टीस पडतो. शिवाय दुसरें हेंहि लक्षांत येतें कीं, भलेपणानें वागूनहि जरी नेहमीं परिणाम लागतोच असें नाहीं, तरी पण दुष्टपणा केल्यानें तर तो नाहींच नाहीं लागत ! मनुष्याचें सर्व प्रकारें हित होणें तें केवळ याच मार्गानें व्हावयाचें; कुमार्गानें तें व्हावें हें वस्तुगत्याच शक्य नव्हे. याप्रमाणेंच मोठ्या प्रसंगांहि ज्यांचें धैर्यबळ ढळत नाहीं असे थोर पुरुष विपत्तींतहि जें सुख पावतात तें दुष्ट व कुत्सित मनाच्या लोकांस मोठ्या भाग्यशालीपणांतहि लाधत नाहीं. सारांश, या संसाररूप महानाटकांत आजपर्यंत कोणकोणतीं पात्रें आपआपली भूमिका आटपून निष्क्रमण करतीं झालीं हें चित्तावर चांगलें ठसलें असतां चांगला मार्ग कोणता, वाईट कोणता, हें सुज्ञ मनुष्यास सहज निवडतां येतें. खरें सुख, खरें समाधान, खरी प्रतिष्ठा कशांत आहे हेंहि कळूं लागतें. सहस्रावधि मनुष्यांचा अनुभव थोड्क्यांत त्यास आलासा होतो; त्याच्या योगानें त्याची दृष्टि फांकते; आणि तो जर तसा समजुतीचा व दृढ निश्चयाचा असेल, तर लवकरच तो कोणाचा तरी कित्ता उचलून खलाशी लोक ध्रुवाच्या ताऱ्यावरून जसें नौकेचें नियमन करतात, त्याप्रमाणें तो त्या त्या निवडलेल्या पुरुषाच्या चरित्रावर सारखी नजर ठेवून तदनुरूप आपलें आयुष्यक्रमण करतो. याप्रमाणें इतिहासापासून सदुपदेश प्राप्त होतो; व ह्मणूनच एका थोर ग्रंथकारानें 'इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय' असें यथार्थ ह्मटलें आहे.

१. हें वर्तमान हल्लीं कित्येक पत्रांतून समजतें. तें खरें असेलसें बहुधा वाटत नाहीं. तरी मनुष्याचें धाडस व जिज्ञासा हीं काय करतील याचा नेम सांगवत नाहीं !

१०. इतिहास हा मनास उन्नति व प्रसन्नत्वहि देणारा आहे. ह्मणजे त्याच्या निरंतर वाचनानें चित्त शांत व स्थिर रहातें, आणि थोर होतें. याचें कारण उघडच आहे. एका चतुर ग्रंथकाराचें असें वचन आहे कीं, 'इतिहास ह्मणजे या जगांत जे महापुरुष होऊन गेले त्यांचीं चरित्रें आहे. ह्मणजे अशा पुरुषांनीं जीं कृत्यें केलीं त्यांनींच इतिहास भरला आहे; तीं काढून निराळीं केलीं तर त्यांत काय उरेल? अर्थात् कांहीं नाहीं. तेव्हां आजपर्यंत या जगतीस भूषणभूत जीं रत्नें निरनिराळ्या देशांत निपजलीं त्यांचा सहवास जर अक्षयीं घडेल, तर त्यापरता लाभ कोणता? प्लूटार्क नामें करून एक नामांकित इतिहासकार ग्रीस देशांत होऊन गेला, त्याचा अत्यंत प्रसिद्ध व सर्व जगाचा प्रीतिपात्र झालेला असा ग्रंथ 'थोर लोकांचीं चरित्रें' या नांवाचा आहे. यांत त्यानें ग्रीस व इटाली देशांत जीं मोठमोठीं प्रकरणें होऊन गेलीं त्यांचा वृत्तांत लिहिला आहे. त्याच्या प्रस्तावनेंत त्यानें असें ह्मटलें आहे कीं, मला या लोकांच्या उज्वल चरित्रांचें मनन केल्यापासून जो लाभ झाला तो सांगतां पुरवणार नाहीं; जेव्हां जेव्हां कांहीं अनुचित कृत्यांकडे माझ्या मनाचा कल होई, किंवा सदाचरणाविषयींचा उत्साह कमी झालासा वाटे, तेव्हां तेव्हां मी यांचीं चरित्रें वाचीं; तेणेंकरून मला पुनः हुशारी वाटे. असो; सत्समागमाचा महिमा असाच आहे. आपल्या मराठी व संस्कृत कवींनीं या महिम्याविषयीं निरनिराळ्या कथानकांनीं व दृष्टांतांनीं पुष्कळ लिहिलें आहे. या दृष्टांतांपैकीं तुकारामादि मराठी कवींची फार आवडती जी लोहपरिसाची उपमा ती या ठिकाणीं फार सुंदर व समर्पक होय. लोखंड मूळचें किती हलकें असतें व दिसण्यांत किती भिकार दिसतें! पण परिसाशीं वरच्यावर संघट्न जसजसें घडेल तसतसें त्याचें सर्व धातूंत श्रेष्ठ व यथार्थनाम जें सुवर्ण तें बनत जातें! आणि वस्तुतः मनुष्य कसाहि चांगला वाईट निपजणें हें पुष्कळ अंशीं ज्या ज्या स्थिति त्यास प्राप्त होत जातात त्यांचेंच फल असतें. कोणी कोणी तर तें सर्वथाच त्यांचें फल होय असें सुद्धां ह्मणतात. इंग्लंडांत सुमारें दोनशें वर्षांपूर्वी लॉक नामेंकरून एक मोठा विख्यात तत्त्वज्ञ होऊन गेला त्यानें हें मत स्थापलें. या मताच्या लोकांचें ह्मणणें असें आहे कीं, मनुष्याचें मन हें आरंभीं एखाद्या स्वच्छ आरशाप्रमाणें किंवा कोऱ्या कागदासारखें शुद्ध असतें. त्यास प्राक्तन संस्कार ह्मणजे आधींचे बरे वाईट विकार कोणतेच घडलेले नसतात. ते पुढें ज्याच्या त्याच्या स्थितिविशेषानुरूप त्यास जडून त्याचा कल चांगल्याकडे किंवा वाईटाकडे फिरतो. असो; हें कांहींहि असो. पण इतकें खचित आहे कीं, या पुढच्या स्थितीप्रमाणें मन बहुधा चांगले वाईट विकार पावत असतें. संस्कृतांत एक वाक्य आहे—

अतृणे पतितो वह्निः स्वयमेवोपशाम्यति।

'गवताशिवाय एखाद्या जाग्यावर जर अग्नि पडला, तर तो आपोआपच विझला

जातो.' याप्रमाणेंच मनुष्याचे चांगले वाईट गुण पूर्णपणें विकास पावण्यास तशा प्रकारची स्थिति त्यास अनुकूल असावी लागते. पहा बरें, सध्यां आपल्या देशांत शिवाजीसारखा किंवा हैदरासारखा राज्यकर्ता कां निपजत नाहीं ? किंवा नाना फडनवीसासारखा राजकारणी पुरुष कां होत नाहीं ? कारण उघडच आहे कीं, तसे गुण असले तरी त्यांचा विकास होण्यास हल्लींच्या स्थितींत मुळींच अवकाश नाहीं. असो; तेव्हां एखाद्या अंगच्या गुणाचा उत्कर्ष व्हावयास तशीतशी स्थिति मनुष्यास अनुकूल असावी लागते. या स्थितिविशेषांतील एक मोठी गोष्ट तशा मनुष्याची संगत हा एक होय. जगांत जे मोठमोठे लोक होऊन गेले ते त्यांस तशी संगत नसती तर कधीं न होते. अगदीं अलीकडचेंच एक उदाहरण घ्या. इंग्लंडांतला अलीकडचा मोठा प्रसिद्ध ग्रंथकार जॉन् स्टुअर्ट् मिल्ल, जो गेल्या वर्षी मरण पावला, त्यास जर त्याच्या बापाची संगत नसती तर त्याची बुद्धि एवढी परिपक्व झाली असती काय ? खचित झाली नसती. तो बुद्धिमानच होता, त्यापक्षीं तो कसा तरी प्रसिद्धीस येता त्यांत संशय नाहीं; पण एवढ्या योग्यतेस तो एरवीं कधीं चढता ना. हें याच ग्रंथकारानें आपल्या लुकत्या प्रसिद्ध झालेल्या 'स्वरचित चरित्रां'त स्वतः कबूल केलें आहे. या ग्रंथांत तो ह्मणतो कीं, बापाच्या शिक्षेमुळें मी पंचवीस वर्षे अगोदर जन्मून जितकें ज्ञान मला झालें असतें तितकें झालें. असो; याचप्रमाणें प्राचीन काळचे शिकंदर, हानिबल, सिपिओ, इत्यादि व अलीकडचे आपल्या देशांतले थोरला बाजीराव, टिपू सुलतान यांचींहि उदाहरणें देतां येतील. तेव्हां संगतिविशेषाचें फल अचिंत्य होय यानें तरी कारण पाहूं जातां फार खोल आहे असें नाहीं. मनुष्य जन्मून त्यास जगांतील व्यवहार थोडेबहुत कळूं लागले ह्मणजे त्याच्या हातून कांहींना कांहीं तरी व्यापार अवश्य झालाच पाहिजे. त्यास सर्वथा निर्व्यापार असें कधींच रहातां येणार नाहीं. असें जर आहे तर मग त्यानें कोणतें आचरण करावें ? अर्थात् जवळच्या चारचौघांचें जें पाहील तेंच. हें अगदीं स्वभावास अनुसरून आहे. यास्तवच मुलांस आईबापांचे जितके गुण लागतात–त्यांतूनहि विशेषतः आईचे–तितके दुसऱ्या कोणाचे लागत नाहींत. असो; तर अनुकरणाकडे मनुष्याची प्रवृत्ति जर एवढी साहजिक व बलवत्तर आहे तर लहानपणापासून इतिहास, चरित्रें वगैरे वाचण्याची जर त्यास गोडी लागेल तर ती त्यास किती हितावह होईल बरें ! सज्जन व थोर मनुष्यांशीं निरंतर सहवास असणें हें हजारांमध्यें एखाद्याचें कदाचित् भाग्य असेल; बाकीच्यांस वरच्याविरुद्ध लोकांशींच नेहमीं प्रसंग ! तेव्हां अशांची संगति जो गुण अवश्य करील तो नाहींसा होऊन सदाचरणप्रीति व खरा थोरपणा मनांत बिंबण्यास वरच्याखेरीज दुसरें कोणतें साधन आहे ? दुसरें असें कीं, वरच्या सारखे थोर लोक कोणत्याहि देशांत ईश्वरकृपेनें एखादे वेळेसच उत्पन्न होतात. व तेव्हां त्यांचा वर्तनक्रम पाहून दुसरेहि कित्येक त्यांचा कित्ता उचलून योग्यतेस चढतात. पण तेवढा

काळ गेला कीं आटपलें! इतिहास, चरित्रें वगैरे लिहिण्याचा प्रघात नसला ह्मणजे पांचपन्नास वर्षांत त्यांची आठवणहि पार बुजून जाते! मग पुढील लोकांच्या ठायीं उत्साह कसा उत्पन्न व्हावा? व देशाची पहिली थोरवी तरी कशी रहावी?—वर इतिहासाची अवहेलना करणारे जे सांगितले त्यांस एवढें विचारावें कीं, इतिहासापासून दुसरा बिलकूल कांहीं एक फायदा नसला तरी हाच एक काय लहान आहे? होमर-कवीनें आकिलिसाचा पराक्रम वर्णिला नसता तर शिकंदर होता काय? व्यासानें पांडवांचें चरित्र गाइलें नसतें तर शिवाजी उत्पन्न होऊन त्यानें यवनांपासून राज्यश्री माघारी हरण केली असती काय? शिकंदराचा इतिहास नसता तर सीझर कशाला होता? सीझराचा नसता तर नेपोलिअन कशाला होता? शिवाजी महाराजांची कीर्ति जर मागें न रहाती, तर त्यांच्या पुत्राचा वध होऊन, राजकुल व राजधानी शत्रूच्या कबजांत सांपडून, सर्व शून्याकार झालें असतांहि मराठ्यांनीं दिल्लीच्या अवरंगजेबास पुरेपुरेसें करून मोठ्या कष्टानें व मोठ्या शर्थेनें अहमदनगरास कशाला पळवून लाविलें असतें? थोरल्या बाजीराव साहेबांनीं घरचें दाभाड्याचें बंड मोडून दिल्लीच्या मोंगलाची व हैद्राबादच्या नबाबाची[1] कशाला खोड मोडली असती? चिमाजी आप्पानें फिरंग्यांस कशाला जेरीस आणलें असतें? राघोबा भरारी[2] गिलच्यांस अटकेपार कशास पळवून लावता? थोरला माधवराव साऱ्या जगास भारी असणाऱ्या इंग्रजांसहि जो भारी झाला, त्या हैदरास वरचेवर कसा तुडवून टाकता? सरतेशेवटीं भेकड, मूर्ख, बायक्या असा धनी पेशव्यांच्या कुळास अक्षय कलंक लावून पळत सुटला असतां, शत्रूंवर एकटा चालत जाऊन समशेरबहादुर गोकलखा[3] अष्टयास कसा पडता? असो; तेव्हां अनुकरणाचें फल कांहीं विलक्षण आहे! पण ते पुरुष होऊन गेल्यावर त्यांचें स्मरण पुढें कोणासच होत नाहीं. यास्तव इतिहास असावे लागतात; कीं देशाची स्थिति जरी अगदीं बदलून गेली, तरी ते वाचून पुढेंमागें कोणास तरी त्यांपासून उत्साह व प्रेरणा

---

१. हल्लीं ज्यास निजाम ह्मणतात त्यास आपले आजे पणजे नबाब ह्मणत. ते आपणांस दिल्लीपतीचे अंकित ह्मणवीत ह्मणून त्यांचें तें नांव ठीक होतें. 'निजाम' हें नांव वास्तविक पहातां अप्रयोजक आहे. साऱ्या पेशव्यांस 'माधवराव' किंवा 'बाजीराव' ह्मणण्यासारखें हें होय!

२. इंग्लंडच्या कित्येक जुन्या राजांस जशीं त्यांच्या गुणांवरून उपपदें दिलीं असत, किंवा नेपोलियनच्या शिपायांनीं त्याचें नांव जसें 'लिट्ल कॉपोरल' (छोटा नाईक) असें आवडीनें ठेवलें होतें, तसें राघोबादादाच्या रणवेगावरून त्यास 'राघोबा भरारी' असें ह्मणत.— ही गोष्ट व पुढील टीपेंतील माहिती एका वृद्ध मनुष्यापासून आह्मांस मिळाली.

३. बापू गोखल्यापाशीं जे आरब होते ते त्यास 'गोकलखा' असें त्याच्या शौर्यावरून ह्मणत.

प्राप्त होते. ग्रीसचें, रोमचें, व अलीकडील इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांचीं राज्यें इतके दिवस टिकल्याचें हें एक कारण असावें यांत संशय नाहीं. पण कोणी ह्मणतील कीं, सर्वांसच लढाऊ व राजकारणी पुरुष होण्याचें कोठें अनुकूल असतें? नसतें खरें. पण ह्मणून काय झालें? इतिहासाचा उपयोग कमी झाला काय? पृथ्वीवर हजारों लाखों लोक गुरूचे उपग्रह व शनीचें कडें दुर्बिणींतून बरचेवर बघतात; मग त्यांस ते उपग्रह व कडें आपल्या ताब्यांत येतील असें वाटत असतें काय? नाहीं. ते उपग्रह व तें कडें पाहून विश्व रचणाऱ्या चतुर कारागिराचें जर वैभव त्यांच्या मनांत बिंबलें तर तो लाभ उपग्रह व कडें हीं ताब्यांत आल्य पेक्षांहि शतगुणित अधिक नव्हे काय? तद्वतच नेपोलियन बादशहाचे किंवा शिवाजीचे पराक्रम वाचून जर त्यास वाटलें कीं, अहाहा! मनुष्याच्या बुद्धीचा प्रभाव केवढा आहे!—कधा कधीं एकट्याच मनुष्याच्या हातीं किती लोकांचें कल्याण व नाश करण्याचे असतें!—पहा! एवढा युरोप हाताखालीं आला असतांहि त्या नेपोलियनास संतोष ह्मणून झालाच नाहीं, व शेवटीं एका दीडवर्षांत त्याची काय दशा झाली! मोठमोठे राजे ज्याचे अंकित होऊन ज्यास थरथरां कापत होते तोच दैवानें एक झोला देतांच अफाट समुद्रांत एका भयाण बेटांत जाऊन पडला, आणि जें शरीर जिवंतपणीं साऱ्या युरोपास दणाणवीत होतें तेंच एका दगडाखालचें खणून आणून त्याच्याच राजधानींत समारंभानें पुरण्यास त्याच्या शत्रूंची परवानगी मागावी लागली! अरेरे! लक्षावधि मनुष्यांच्या प्राणांचा नाश करून यानें कोणती जोड केली! एवढ्या अचाट बुद्धीबरोबर परोपकाराची इच्छा जर याचे ठायीं तिळभरहि असती, तर जगाचें केवढें हित होतें!—शिवाजीचें चरित्र पहा! बापानें नावडत्या आईबरोबर पुनवडीस ठेवला असतां दादोजी कोंडदेवानें लहानपणीं थोडें बहुत जें त्यास कांहीं शिकवलें तेवढ्याच ज्ञानानें पुढें केवढें अकांडतांडव केलें! जे लोक मागेंहि कधीं प्रसिद्धीस आले नव्हते व पुढेंहि लवकरच पुनः अप्रसिद्ध झाले, ज्यांच्या अंगीं बाहेरून शरीराचें किंवा बुद्धीचेंहि सामर्थ्य दृष्टीस पडत नाहीं, अशांच्या ठायीं आपणास अत्यंत उपयोगी पडतीलसे गुण ओळखून त्यांस त्यानें आपले जिवलग संवगडे केले. त्यांच्या बळावर जी हिंदूंची राजसत्ता सुमारें हजार वर्षें अस्तास गेली होती तिचा अरुणोदय मावळच्या डोंगरांवर पुनः झाला! थरमॉपिलीच्या लियोनिडसास त्यांच्या तानाजीनें व सूर्याजीनें लाजविलें! सर्व पृथ्वीभर ज्या शहराच्या मातब्बरीची प्रसिद्धि होती, जें मोंगलांच्या राज्यश्रीचें केवळ कुंकू होतें, तें शहर त्यांनीं दोनदां साबकाश लुटलें. विजापुरास तर हंहं ह्मणतां चिरडून टाकून गर्वानें माजलेल्या मोंगलांस त्यांनीं असा उच्छाद दिला कीं, शिवाजी एक आहे कीं दोन आहेत असें त्यांस भासविलें! केवढें सामर्थ्य हें! व याहीपेक्षां वाखाणण्यासारखे काय, कीं तिचा केवढा सद्व्यय झाला!-तेव्हां मोठी बुद्धि असण्यापेक्षां सदाचरणप्रीति असणें हेंच विशेष

हितकारक आहे. मनुष्याच्या मनाचा असा चमत्कार आहे कीं, 'लाभाल्लोभः प्रवर्तते'– 'जसा जसा लाभ होत जातो तसा तसा लोभहि वाढतो!' तेव्हां आहे त्यांत संतोष मानून रहाणारा मजूरहि मोठ्या बादशहापेक्षां सुखी असेल यांत संशय नाहीं! याप्रमाणें शहाणपणाच्या अनेक गोष्टी जर त्याच्या मनांत ठसून गेल्या, तर मोठा अधिकार मिळाल्यापेक्षांहि त्यास अधिक लाभ होणार नाहीं काय? असो; तर इतिहासापासून मनास शांति व उन्नतत्व प्राप्त होतें हा एक त्यापासून मोठा लाभ आहे.

लंकापतेः संकुचितं यशो यत् यत्कीर्तिपात्रं रघुराजपुत्रः।
स सर्व एवाद्यकवेः प्रभावो न कोपनीयाः कवयः क्षितींद्रैः॥ १
बिल्हण.

अंक ७ वा—(१) इतिहासाचा चवथा उपयोग—मनोरंजन. (२) पांचवा–नीतिज्ञान. (३) सहावा—मनाचें पोषण.

१. इतिहासापासून चवथा उपयोग मनाचें रंजन. निरनिराळ्या देशांत घडलेले वृत्तांत समजल्यानें व त्यांचें मनन केल्यानें मागें सांगितल्याप्रमाणें जिज्ञासावृत्तीचें समाधान तर होतेंच, पण जर ते इतिहास तशा शैलीनें लिहिले असतील तर त्यांच्या वाचनानें वाचकांस आल्हादहि होईल. असे इतिहासग्रंथ ग्रीक, ल्याटिन, फारशी या भाषेंत आहेत. तसेंच अलीकडे इंग्लिश भाषेंत झालेले ह्यूम्, गिबन्, मेकॉले यांचेहि ग्रंथ सर्वत्र प्रसिद्ध आहेतच. अशा इतिहासांची भाषासरणी, यथास्थित ग्रंथरचना, कथानकाची जुळणी, गहन विचार, तऱ्हेतऱ्हेची माहिती मध्यें घालून देण्याची खुबी, यांच्या योगानें सर्व प्रकारच्या वाचणारांस ते मान्य होतात. ज्यांस केवळ भाषाच शिकायाची असते त्यांस तिचें अत्यंत रमणीय रूप त्यांत पाहायास सांपडतें, ज्यांस विषयाची मांडणी कशी करावी याची समजूत करून घ्यायची असते त्यांस ती धाटणी त्यांतून उचलतां येते, केवळ गोष्टवेल्हाळच जे असतात त्यांस कादंबऱ्यांप्रमाणें त्यांत चमत्कृति भासते, जे तत्त्वजिज्ञासु असतात त्यांस पोक्तपणाचे व खोल असे विचार त्यांत सादर केले असतात, आणि ज्यांस चमत्कारिक व मौजेच्या गोष्टींचा संग्रह करावासा वाटतो त्यांस तो त्यांतून सहज करतां येतो. याप्रमाणें इतिहास अनेक प्रकारांनीं मनोवेधक होतो. कादंबऱ्या वाचतांना श्रम न होतां जशी कर्मणूक होते तशीच बहुधा अलीकडील कित्येक उत्कृष्ट इतिहासांनीं होते; व यास्तवच अलीकडे इतिहास वाचण्याची प्रवृत्ति

---

१ "लंकेचा राजा रावण याची कीर्ति थोडी, व रामराजाचें यश विशाल, हा प्रभाव अवघा आद्यकवीचा (वाल्मीकीचा) होय! यास्तव मोठे राजे जरी झाले तरी त्यांनीं कवींशीं नम्रच असावें!"

पडून तो सर्वांस सामान्यतः जितका माहीत असतो तितका पूर्वी कधींहि नसेल. ही गोष्ट दोहों तऱ्हेनें नफ्यांची झाली. एक तर इतिहासाचें ज्ञान सर्वांस उपयोगी आहे ह्मणून; आणि दुसरें असें कीं, त्यामुळें कादंबऱ्या, नाटकें इत्यादिकांकडेच जो लोकांचा पूर्वी ओढा होता तो कमी झाला. मनोरंजनाचा दुसरा कांहींच प्रकार अनुकूल नसल्यामुळें पूर्वी लोकांचा कादंबऱ्यांकडेच विशेषतः भर असे; व यामुळें मुख्यत्वेंकरून तरुण लोकांस त्या फार अनर्थावह होत. त्या वाचणारे बहुधा तरुण वयाचेच असायाचे, व लिहिणारेहि तसेच; मग काय विचारावें? त्या वयांत अंतःकरणवृत्ति अत्यंत सुक्षोभ असल्यामुळें अद्भुत असंभवी गोष्टींत मन रंगून शृंगारवीरादि रस, जे त्यांत अतिशयोक्तीनें वर्णिले असतात त्यांत तल्लीन होऊन मन भडकून जाई. डॉन् क्विक्सोट[1] किंवा रासेलसांतील ज्योतिषी यांची जशी अवस्था होऊन गेली तशाच प्रकारची बहुधा या वाचकांची होण्याचा संभव असे. ह्मणजे विलक्षण कल्पना व चमत्कारिक तरंग मनांत नेहमीं भरून लौकिक व्यवहारास हे मनुष्य अगदीं कामाचे नाहींत असे होत. शिवाय मन बिघडण्यास व त्यास अगदीं निःसत्व करून टाकण्यासहि कादंबऱ्या कारण होत. याचें उदाहरण आपल्या मराठींतीलच कित्येक कादंबऱ्या व नाटकें आहेत. व इंग्लंडांत सर वॉल्टर स्कॉट यांच्या पूर्वी जे कित्येक कादंबरीकार होऊन गेले त्यांपकीं मोठे नामांकित होते ते सुद्धां महाचावट होते. पण या चावटगिरीचा अगदीं कळस झालेला ज्यास पहाणें असेल त्यानें 'डिक्यामेरॉन्' व 'हेप्ट्यामेरॉन्' हे ग्रंथ पाहावे. पहिला बोकेशियो नामक इटालियन ग्रंथकारानें रचला व दुसरा त्याच्या नमुन्यावर एका फ्रेंच बाईनें रचिला. पहिला ग्रंथ रचण्याचा प्रसंग मोठा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. फ्लॉरेन्स (हें नांव विशेषतः इकडच्या लोकांच्या मनांशीं पुष्कळ दिवस खिळून राहील!) या नांवाच्या शहरीं एके समयीं मोठी पटकी उठली असतां तेथील सात तरुण स्त्रिया व तीन तरुण पुरुष अशीं दहाजणें गांवाबाहेर एका बागेंत जाऊन कांहीं दिवस राहिलीं. तेथें त्यांनीं परस्परांस कर्मणूक करण्याकरितां ज्या चमत्कारिक गोष्टी सांगितल्या त्या एकंदर मिळून हा ग्रंथ झाला आहे. दुसरा ग्रंथ तर वर सांगितल्याप्रमाणें एका स्त्रीनेंच लिहिला असून त्यांत सांगितलेल्या कित्येक गोष्टी तिनें स्वानुभवावरून लिहिल्या आहेत! असो; इतकी बारीक माहिती येथें सांगण्याचा हेतु इतकाच कीं, या दोन ग्रंथांवरून सर्व सुधारणेचें आगर जें युरोपखंड, सर्व सदाचरणाचें आगर

---

१. हा जगद्विख्यात ग्रंथ एका स्पानिश ग्रंथकारानें दिवाणी तुरुंगांत असतां आपल्या कर्मणुकीकरितां लिहिला. यांतील नायकाचेंच नांव ग्रंथास ठेवलें आहे. यानें 'नाईट' लोकांच्या गोष्टी इतक्या वाचल्या कीं त्यांनीं याला वेड लागून आपणहि त्यांसारखे अद्भुत पराक्रम करावे असें याच्या मनांत आलें; व तसें करण्यास तो बाहेर पडला असतां त्यावर जे प्रसंग गुदरले ते या ग्रंथांत वर्णिले आहेत. यांत हास्यरस चोहोंकडे भरपूर आहे.

जो ख्रिस्ती धर्म, सर्व सद्गुणांचें आगर ज्या तिकडील कुलीन स्त्रिया, त्या सर्वांचें किंचित् स्वरूप आमच्या वाचकांच्या लक्षांत यावें! पण ही गोष्ट इतालियन व फ्रेंच लोक, जे नखरेबाज व इष्की ह्मणून साऱ्या युरोपखंडांत निवडले आहेत, त्यांविषयीं झाली. आतां आपले धनी इंग्रेज लोक, ज्यांच्या मतें नीति व सदाचरण यांचें केवळ निधानच ते होत, त्यांच्यांत तरी वरील पुस्तकांचा कितपत तिटकारा आहे तो पाहूं. यास प्रमाण दोनच गोष्टींचेंच पुरें आहे. पहिलें हें कीं, त्यांचे आद्यकवि जे चॉसर त्यांनींच 'डिक्यामेरॉन' मधल्या कित्येक गोष्टींचें कवितारूपानें निबंधन केलें आह. यावरून त्या इटालियन ग्रंथाचा सदाचरणी इंग्लिश लोकांत किती लवकर व केवढा प्रसार झाला हें समजतें. दुसरी गोष्ट, अगदीं अलीकडे ड्रैडन व पोप यांनींहि तोच प्रकार कला आहे.[1] असो; येथें लेखणी नें बरीच धांव घेतली; पण वरील माहिती अमच्या कोणत्याहि वाचकांस नकोशी वाटल असें आह्मांस वाटत नाहीं! तेव्हां मन विघडण हा कादंबऱ्यांपासून होणारा एक अनर्थ आहे. दुसरा अनर्थ मनाचें दौर्बल्य. कादंबऱ्याच वाचण्याची ज्यास एकदां चटक लागते त्यास मग दुसरें कांहींच वाचावेंसें वाटत नाहीं. कादंबऱ्या भराभर वाचायाच्या, व त्यांत समजण्यासहि कांहीं कठिण नसतें; यास्तव विद्या काय ती हीच असें वाचणारास वाटूं लागून त्याहून वरचढ जे शास्त्रीय वगैरे ग्रंथ त्यांचा त्यास त्रासच येऊं लागतो. त्यांत शिकणारानें आपली मति शिरकवावी लागते, कारण ते कठिण व गहन विषय पडले; पण तें याच्यानें होत नाहीं. अशी एकदां सवय पडून गेली ह्मणजे मग ती कधींहि मोडतां येत नाहीं. याप्रमाणें वाजवीपेक्षां जास्त असा हा कादंबऱ्याचा नाद लागला असतां तो मनास अपाय करतो. तें अगदीं निःसत्त्व होऊन जाऊन कोणतेंहि श्रमांचें काम त्यास झेपेनासें होतें.

पण मनोरंजक इतिहासाच्या योगानें वरील तिन्ही अनर्थ टळून कादंबऱ्यांचें तर कार्य होतें. त्यांत निवळ सत्यच लिहावयाचें असतें, यास्तव भूताराक्षसांच्या, 'नाइट' लोकांच्या, अशा विलक्षण प्रकारच्या अद्भुत गोष्टी त्यांत येत नाहींत. तरी पण त्यांत अद्भुत रस नसतो असें नाहीं. नेपोलियनासारख्या वीरांच्या, वॉट्सारख्या कल्पकांच्या, बेकन्सारख्या तत्त्वज्ञांच्या चरित्रांत अद्भुत रसास काय उणीव आहे! पण दोहींत फरक किती आहे तो पहा! पहिल्या वाचून जसे पुष्कळ भ्रमिष्ट झाले तसे दुसऱ्यांच्या योगानें कधीं तरी होतील काय? दुसरी गोष्ट मन विघडणें. हेंहि इतिहासवाचनानें होण्याचा अगदीं संभव नाहीं हें उघडच आहे. तिसरें मनाचें क्षीणत्व. हें इतिहासवाचनानें होण्याचा संभव मुळींच नाहीं हें तर काय, पण जसजसा इतिहासाचा कोणास

---

१. चॉसरचे व ड्रायडनचे ग्रंथ सहज मिळण्यासारखे नाहींत; त्यांतून पहिल्याचे तर समजण्यासारखेहि नाहींत. यास्तव वरील गोष्टीचा ज्यास प्रत्यय घेणें असेल त्यानें पोपचें January and May. हें काव्य पहावें.

नाद लागत जाईल, तसतसें त्याचें मन विशाल व विचारक्षमच होत जाईल. फार तर काय, पण त्यास हा नाद लागला हेंच वरील दोहोंचें मोठें चिन्ह होय! तर याप्रमाणें इतिहास हा सर्व प्रकारें हितकर असून कादंबऱ्यांप्रमाणें त्यापासून कोणताहि अपाय होण्याचा संभव नाहीं. शिवाय सर्वांत मोठी गोष्ट ही कीं, इतिहास अक्षरशः खरा असल्यामुळें त्यांतील गोष्टी जशा मनावर पक्क्या ठसल्या जातात, तशा कादंबऱ्यांतील ठसत नाहींत.

२ इतिहासापासून पांचवा उपयोग राज्यकारणी पुरुषांस ह्मणजे मुत्सद्द्यांस होय. इतिहासाचा मुख्य उपयोग वास्तविक पहातां हाच असून याचकरितां इतिहासकार पूर्ववृत्त लिहून ठेवतात. व्यक्तिभूत मनुष्यास जितका चरित्रांचा उपयोग तितकाच मुत्सद्द्यांस इतिहासाचा: ह्मणजे 'पुढच्यास ठेंच मागला शहाणा' या मराठी ह्मणीप्रमाणें पूर्वी होऊन गेलेल्या मनुष्यांचा अनुभव जसा पुढच्यांस उपयोगीं पडतो, त्याचप्रमाणें या पृथ्वीवर आजपर्यंत जीं अनेक राज्यें होऊन गेलीं त्यांचा अनुभव हल्लींच्यांस कामास येतो. राज्यास हितकर गोष्टी कोणत्या, अपायकारक कोणत्या, त्यावर अनिष्टें आलीं असतां कोणत्या युक्तिप्रयुक्तीनें त्यांचें निवारण करावें, तंटे बखेडे कशामुळें उत्पन्न होतात, प्रजेस सुखी ठेवण्याचे मार्ग कोणते, कायदेकानू कशा प्रकारचे असावे, वगैरे शेकडों गोष्टी पूर्वीच्या इतिहासावरून सध्यांच्या राज्यकर्त्यांस समजल्या आहेत. एकादें जुनाट वडाचें झाड अवाढव्य विस्तार पावून शेवटीं वठलें असतां त्याचे नवे सोट जसे वाढत जाऊन मूळच्या झाडाच्या जागीं होतात, त्याप्रमाणेंच रोमच्या अफाट पसरलेल्या बादशाहींतून हळू हळू अलीकडचीं युरोपांतील अनेक राज्यें उद्भवलीं. भाषा, रीतरिवाज वगैरेंचें मूळ जसें तें राज्य होय, तसेंच राज्यव्यवस्थेचा पायाहि सध्यांच्या राष्ट्रांचा तेथपासूनच आहे. हा बळकट आधार नसता, तर युरोपाची स्थिति आज कोणत्या प्रकारची असती हें सांगणें कठिण आहे! पहा बरें, पंधराव्या शतकांत ग्रीक व रोमन विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तिचा प्रसार युरोपभर होतांच त्या खंडांतील सगळ्या राष्ट्रांस एकदम किती जोर आला! हरएक गोष्टींत तेथील लोकांचा पगडा साऱ्या पृथ्वीवर जो तेव्हांपासून बसला आहे त्यास मुख्य कारण पाहूं जातां वर सांगितलेल्या प्राचीन राष्ट्रांनीं ग्रंथांत सांठवून ठेवलेलें अमोलिक ज्ञानभांडार एकदम त्यांच्या हातास जें लागलें तेंच होय. राज्यरीति, सैन्यव्यवस्था, कायदेकानू वगैरे सर्व वरील जुन्या लोकांमध्येंच पूर्ण दशेस आलीं असल्यामुळें तीं अलीकडील राष्ट्रांस आयतींच उपयोगीं पडलीं. तेव्हां हा त्यांस केवढा लाभ झाला! पूर्वी नशिरवान नामें करून एका पारसदेशाच्या राजानें[1] मुद्दाम एक वकील हिंदुस्थानांत पाठ-

१. संस्कृत ग्रंथांचा कालक्रम बसण्यास कांहीं गोष्टी ठोकीव माहीत आहेत— जसें शिकंदराची स्वारी, काश्मीरच्या श्रीहर्षराजाचा शक सन १११३, चिनी प्रवाशांचे ग्रंथ.

वून आपल्या संस्कृत 'हितोपदेशा'चें फारशी भाषेंत भाषांतर करविलें, रोमच्या सेनेट सभेनें तसेच तीन वकील अथेन्स शहरास पाठवून तेथून सोलनचे कायदे आणविले; लैकर्गसहि स्पार्टन लोकांस राज्यव्यवस्थेचे नियम बांधून द्यावे या उद्देशानें एशिया मेनर, इजिप्त या दूरदूरच्या देशांस जाऊन हिंदुस्थानांतहि आला होता असें ह्मणतात;– असे दीर्घ प्रयत्न त्या वेळच्या लोकांस राज्यनीतिविषयक ज्ञान मिळावयास पडत असत ! आणि तेवढेहि त्या ज्ञानाची योग्यता जाणून लोक करीत ! मग अलीकडच्या हजारों नव्या सोईंच्या योगानें तेंच अमोलिक ज्ञान जर सर्वांस सुलभ झालें आहे, तर हा लाभ लहानसान काय ? मागें इतिहासाचे जे आक्षेपक सांगितले ते एवढाहि विचार करीत नाहींत, कीं मूळांशिवाय जशी झाडाची स्थिति संभवत नाहीं, किंवा पायावांचून जसें घर रहाणें अशक्य, त्याप्रमाणेंच प्राचीन स्थितीशिवाय कोणत्याहि राष्ट्राची त्या त्या वेळची नवी स्थिति आली नसते. नुसत्या वरवर पहाणाराची दृष्टि मूळापर्यंत न पोंचल्यामुळें त्यास वाटतें कीं, सध्यां जें रूप दिसतें आहे तें स्वयंभूच आहे यास आदिकारण किंवा आधारभूत असें कांहींच नाहीं. ही मूर्ख समजूत मनांत धरून असे लोक आपल्या अज्ञानास, अरसिकतेस, किंवा आळसास इतिहासाचा मुळीं तिरस्कारच करून लपवूं पहातात. असो; तेव्हां एखाद्या राष्ट्राविषयीं पूर्ण सार्यंत ज्ञान ज्यास संपादन करायाचें असेल, त्यास त्याची त्या वेळचीच स्थिति पाहिल्यानें तें कधीं होणार नाहीं. अगदीं मूळारंभापासून कसकसे फेरफार होत गेले ते पूर्णपणें जेव्हां तो लक्षांत आणील तेव्हांच त्या वेळच्या स्थितीविषयीं त्यास यथार्थ ज्ञान होईल. तसेंच त्याच्या भावी स्थितीविषयीं जर त्यास अटकळी बांधायाच्या असतील तर तेंहि वरील समग्र ज्ञान असल्याखेरीज त्याच्यानें होणार नाहीं.

३. इतिहासाचा शेवटला एकंदर उपयोग ह्मटला ह्मणजे मनाचें पोषण होय. ह्मणजे त्याच्या वाचनानें व मननानें मनाच्या निरनिराळ्या शक्ति प्रगल्भ दशेस पोंचतात. एक तर स्मरणशक्ति. शक, मिति, स्थलांचीं नांवें, मनुष्यांचीं नांवें, एकंदर मजकूर हीं अगदीं बरोबर ध्यानांत ठेवावीं लागल्यामुळें या शक्तीचें काम पडून ती उत्तरोत्तर अवश्य वाढत जाते. दुसरी कल्पनाशक्ति. इतिहास ह्मणजे अर्थात्च गत गोष्टींचा वृत्तांत असल्यामुळें तो मनांत यथास्थित आणण्यास कल्पनेचें काम पडतें. ज्या काळचा, ज्या देशाचा इतिहास वाचायाचा, त्याची विशेष स्थिति पूर्णपणें लक्षांत आणल्यावांचून तो कधीं समजत नसतो; यास्तव तसें होण्यास वाचणाराची कल्पनाशक्ति चांगली चलाख असावी लागते. ही चलाख कल्पना व मोठी पोक्त किंवा सूक्ष्म बुद्धि हीं एक नव्हेत. यास्तवच कविता, कादंबऱ्या, नाटकें इत्यादिकांचा तिरस्कार

यांपैकींच वरील राजाचा शक (सुमारें इ०स० ५६०) हा आहे. यावरून कालिदासादिकांसहि जे आठव्या शतकापर्यंत ओढतात त्यांनीं अंमळ जपून लिहावें.

करणारे जसे मोठे बुद्धिमान्हि आढळतात, तद्वतच मागें सांगितल्याप्रमाणें जॉनसन् सारखे इतिहासास तुच्छ करणारे पंडितहि आढळतात. पण या त्यांच्या अवहेलनेनें ते स्वतःस जितका अपाय करून घेतात तितका वरील कवितादिकांच्या अधिदेवतांस होत नाहीं! त्यांचें मनोहर सौंदर्य लेशमात्रहि कमी होत नाहीं, व त्यांच्या रसलुब्ध खऱ्या भजकांतूनहि एकाची सुद्धां भक्ति लवमात्रहि उडत नाहीं. हे अवहेलना करणारे मात्र कल्पनेचे जड ठरून वृद्धप्रमदान्यायानें उपहास्य होतात. पुरूरवा राजानें उर्वशीस प्रथमच पाहिलें असतां तिला निर्माण केल्याच्या संबंधानें तो ब्रह्मदेवास उद्देशून जें ह्मणतो तेंच अशा पंडितांस निराळ्या संबंधानें लागेल![1] असो; तेव्हां इतिहास–त्यांतूनहि विशेषतः दूरच्या देशांचा किंवा काळाचा–यथास्थित समजण्यास व त्याची पुरतेपणीं गोडी लागण्यास वाचकाची कल्पना जागृत असली पाहिजे. असें असल्याविना त्या त्या इतिहासपात्राशीं तादात्म्य पावून तो तो वृत्तांत केवळ प्रत्यक्षसा मनास भासणें हें घडत नाहीं. तेव्हां ही शक्ति इतिहास वाचणाराच्या अंगीं मूळची असली पाहिजे. ती असली ह्मणजे मग अर्थात्च याच वाचनानें ती पुढें वृद्धिंगतहि होत जाते. इतिहासांत नानाप्रकारचे देश, पुरुष, प्रसंग यांचें वर्णन असल्यामुळें कल्पनाशक्तीस रमण्यास हवा तेवढा अवकाश सांपडतो; व त्यामुळें तिचें अर्थात्च अधिकाधिक पोषण होत जातें. शिवाय दुसरी गोष्ट ही कीं, इतिहासांतील हकीकत सगळी अक्षरशः खरी असल्यामुळें–कारण तशी ती असेल तरच तो इतिहास–कादंबऱ्यांच्या असत्यत्वेमुळें जो एके रीतीनें त्यांपासून मनास खेद होतो तो यापासून होत नाहीं! पहा बरें, 'आरबी भाषेंतील गोष्टीं'तल्या सिंदबाद दर्यावर्दीच्या निरनिराळ्या सफरी वाचल्या असतां मनास मोठा चमत्कार वाटून कल्पनाशक्ति त्यांत अगदीं चूर होऊन जाते! पण काय? वाचणें संपतांच लागलेंच मनांत येतें कीं, या सर्व गोष्टी मोठ्या मौजेच्या खऱ्या, पण शेवटीं काय–येथून तेथून खोट्या! पण तेंच कोलंबसाच्या सफरी वाचा; ह्मणजे मनाची कशी स्थिति होते! पहिल्याच्या सफरी आजपर्यंत लक्षावधि लोकांनीं वाचल्या असतील, व तशाच दुसऱ्याच्याहि वाचल्या असतील; पण पहिल्या वाचल्यावरोबर कोणी मनुष्य गलबत तयार करून त्याच्या सारखे हिरे आणण्यास निघाला असें वाटत नाहीं; पण दुसऱ्यांचा परिणाम काय झाला तो कोणासहि–विशेषतः हिंदूंस तर–सांगायास

---

१ अस्याः सर्गविधौ प्रजापतिरभूच्चंद्रो नु कांतिप्रदः
शृंगारैकरसः स्वयं नु मदनो मासो नु पुष्पाकरः।
वेदाभ्यासजडः कथं नु विषयव्यावृत्तकौतूहलो
निर्मातुं प्रभवेन्मनोहरमिदं रूपं पुराणो मुनिः॥

विक्रमोर्वशीय. अंक १.

"हिला निर्माण करतेवेळीं चंद्र प्रजापति झाला असावा, किंवा वसंत झाला असावा,

नकोच ! त्याच जगत्प्रसिद्ध पुस्तकांत अल्लादिनाच्या वाड्याचें वर्णन आहे; आणि इतिहासांत ताजमहालाचें वर्णन आहे. पण दोहोंच्या वाचनानें वाचकांच्या मनांत किती भिन्न वृत्ति उद्भवतात ! याप्रमाणेंच यक्षांनीं, राक्षसांनीं केलेलीं अद्भुत कृत्येंहि त्यांत घातलीं आहेत; पण तीं वाचून मनास कांहीं वेळ कर्मणूक होते इतकेंच. इकडे वायुवेगानें चालणारे अश्विरथ, तेलाशिवाय वत्तीशिवाय जळणारे दिवे, एक ठोका भुंबईस तर दुसरा ठोका लंडनास अशी मनाच्या वेगानें धांवणारी वीज, हत्तीच्या अंगासारख्या धोंडी एकावर एक रचून उभारलेले मनुष्यकृतीचे पर्वत–कीं जे आतां जितके जुने भासतात तितकेच हिरॉडटसास भासले,–डोंगर कोस कोस पोंखरून कोरून काढलेलीं विशाल मंदिरें–ज्यांनीं आपल्या प्रचंडतेपुढें निष्ठुर, हेवेखोर व दुराग्रही अशा यवनांसहि हात टेकायास लावून त्यांकडून त्यांचा दुष्ट हट्ट सोडविला,–इत्यादि मानवी बुद्धीचे व प्रयत्नाचे अद्भुत प्रभाव जेव्हां मनुष्य पहातो तेव्हां त्यास वरील खोट्या गोष्टी पोरकट वाटूं लागतात ! असो; तेव्हां सांगायाचें तात्पर्य काय कीं, मनुष्याच्या मनास स्वभावतःच सत्य आवडत असतें, यास्तव खऱ्या इतिहासाकडे त्याची प्रवृत्ति जितकी सहज व जितक्या प्रेमानें होईल तितकी कल्पित कादंबऱ्यांकडे होणार नाहीं.व ह्मणूनच मनुष्याची कल्पना इतिहासवृत्तांतांत मोठ्या आवडीनें निःशंक रमते; कारण त्यांत असत्यतादोष मुळींच नसल्यामुळें तींत यथेच्छ विहार केल्याचा तीस अगदीं शीण वाटत नाहीं. तसेंच इतिहासांतील विषय पुष्कळ प्रत्यक्ष इंद्रियगोचर होण्यासारखे असल्यामुळें त्यांचा ठसा मनावर जितका ठळठळीत उठण्यासारखा असतो तितका कल्पित कथांतील विषयांचा अर्थात्च नसतो. असो; तर याप्रमाणें कल्पनाशक्तीस रंजविण्याच्या संबंधानें कादंबऱ्यांत व इतिहासांत इतकें अंतर आहे. तेव्हां इतिहासाच्या वाचनानें वाढली जाणारी दुसरी मानसिक शक्ति कल्पना होय. तिसरी विचारशक्ति. ही इतिहासाच्या ज्ञानानें वाढते हें अगदीं उघड आहे.—फार तर काय, पण हें नुसतें लिहिणें ह्मणजे सुद्धां 'सूर्य तेजाळ आहे,' 'पाण्याच्या अंगीं प्रवाहित्वधर्म आहे,' इत्यादि वाक्यांप्रमाणें अत्यंत प्रसिद्ध अर्थाचा अनुवाद केल्याप्रमाणें असमंजस दिसतें. तथापि ती कां वाढते व कशी वाढते यावर अंमळ विस्तार करणें जरूर आहे. एक तर इतिहासांत तऱ्हेतऱ्हेची माहिती असल्यामुळें मनाच्या कोठारांत पुष्कळ नव्या गोष्टींचा भरणा होतो. त्या तर्क चालविण्यास किंवा हातीं घेतलेल्या विषयास वैचित्र्य किंवा विशदत्व देण्यास उपयोगीं पडतात. दुसरें इतिहासांत निरनिराळ्या पात्रांचे निर-

---

अथवा एक्या शृंगारांतच जो नेहमीं रमतो असा साक्षात् मदनच प्रजापति होऊन त्यानें हिला घडली असावी ! कां कीं, सदासर्वकाळ वेद घोकून घोकून ज्याच्या बुद्धीस जाड्य आलें, व ज्यास विषयांची प्रीति भासेनाशी झाली, तो जुनाट ऋषि (ब्रह्मदेव) असें मनोहर रूप उत्पन्न करण्यास कसा समर्थ होईल ?

निराळे गुणदोष, निरनिराळे स्वभाव, निरनिराळ्या कृति स्पष्ट दाखविल्या असतात. यास्तव मानवी स्वभावाचीं अनेकविध अशीं चित्रविचित्र रूपें वाचकांच्या दृष्टीस पडून त्यांचें व्यवहारांत अत्यंत उपयोगी असें मार्मिक व पूर्ण ज्ञान त्यांस होतें. निरनिराळ्या देशांतील लोकस्थिति, राज्यव्यवस्था, रीतरिवाज, धर्मादि विषयांवर समजुती, वगैरे कळल्या असतां मनुष्याची नजर दूरवर फांकते. त्यामुळें बुद्धीची पोंच वाढून एकंदर वस्तुमात्राविषयीं त्यास पहिल्याहून विशेष यथार्थज्ञान होऊं लागतें. एकच स्थितिविशेष नेहमीं दृष्टीसमोर असल्याच्या योगानें बुद्धीवर जो संकुचितत्वाचा वाईट संस्कार घडलेला असतो तो मोडण्यास दोनच मार्ग आहेत; एक देशोदेशीं हिंडून परराष्ट्रांविषयीं प्रत्यक्ष माहिती करून घेणें; आणि याच्या खालोखालचा दुसरा मार्ग झटला ह्मणजे अर्थात्च तसें ज्यांनीं केलें आहे त्यांपासून भाषणद्वारा किंवा लेखनद्वारा तें ज्ञान मिळविणें. आतां पहिला मार्ग व दुसऱ्यांतील पहिली सोय हीं फारच थोड्यांस अनुकूळ असतात; यास्तव एकंदर लोकांच्या उपयोगाचा मार्ग झटला ह्मणजे इतिहास, देशांतरवर्णनें, प्रवासाच्या हकीकती वगैरेच होत. यांचा यथास्थित अभ्यास केला असतां कूपमंडूक किंवा उंबरांतले किडे यांसारखी सदोदित अवस्था असल्याच्या योगानें ज्या मूर्ख समजुती व जे दुराग्रह मनास स्वभावतःच जडून काळेंकरून त्यास अगदीं खिळून जातात ते दूर होतात. शहाणे काय ते आह्मी; रीतभात उत्तम ह्मणजे काय ती आमचीच; सर्व सुधारणेचें आगर ह्मणजे आमचाच देश; खरा व सदाचरणप्रवर्तक असा आमचाच धर्म–बाकीच्यांचें ह्मणजे निवळ थोतांड व लोक भ्रष्ट–; देवाचे एकुलते एक लाडके असे आह्मीच; त्यानें आमच्याच भूमींत अवतरून आपलें शुभवर्तमान इतर सर्व पापमग्न व मरणोत्तर अक्षय्य नरकाचे धनी होणाऱ्या लोकांस जाहीर करण्याचा आह्मांस अधिकार दिला; आमची भाषा उत्तम; आमची विद्या, आमच्या कला याच बाकीच्या साऱ्या जगास वंद्य; –फार तर काय, पण आमची पोषाकाची तऱ्हा, आमची जेवणाखाणाची तऱ्हा, आमची तोंड धुण्याची तऱ्हा, ही सुद्धां सर्वांत उत्कृष्ट; अशा प्रकारच्या ज्या निराधार कोत्या समजुती त्या नाहींशा होऊन इतिहासाच्या योगानें आपणांविषयीं व इतर राष्ट्रांविषयीं यथार्थ ज्ञान वाचकांस होतें.[1] आपली मोठी मानव-

१. इतिहासापासून मनास जें शिक्षण मिळायाचें त्याचा उत्कृष्ट भाग वरील होय. हें यथार्थ ज्ञान मोठी निष्पक्षपात व उदार बुद्धि धारण केली, किंवा प्रत्यक्ष तो देश पाहिला, किंबहुना तेथें राहून तेथील विद्येचेंहि अध्ययन केलें, तरीहि नियमानें येईलच असें नाहीं. याचें उत्कृष्ट प्रमाण ज्यास पहावयाचें असेल त्यानें हिंदुस्थानचा इतिहासकार **मिल्ल**, प्रसिद्ध ग्रंथकार **मेकॉले**, 'वासवदत्ते' चे प्रकाशक **डाक्टर हॉल** यांचे ग्रंथ पहावे! यांनीं आमच्या देशाच्या संबंधानें कित्येक ठिकाणीं इतका शहाणपणाचा मजकूर लिहिला आहे कीं, तसा जर कोणी हिंदु त्यांच्या देशाच्या संबंधें लिहिता, तर हेच ग्रंथकार त्यास पोरापेक्षां पोर ठरविते, व त्यास कोठें तोंड काढूं देतेना!

जाति, जी साऱ्या भूमंडळावर पसरली आहे, व एकेक राष्ट्र केवढेंहि ज्ञानसंपन्न किंवा थोर असलें तरी तें जिचा केवळ एक कोपरा असतें, तिचें सर्वांशीं जेव्हां पर्यालोचन करावें तेव्हांच तिचें एकंदर खरें स्वरूप लक्षांत येतें. मनुष्यस्वभावाच्या नित्य व शाश्वत स्वरूपापासून त्याचें आगंतुक ह्मणजे देशकालविशेषजन्य स्वरूप निवडतां येण्यास अर्थात् असेंच एकंदर सर्व राष्ट्रांचें मनानें आकलन झालें पाहिजे. असो; तेव्हां मनाचा दृक्प्रदेश वाढवून कोत्या समजुतींपासून व भ्रमांपासून इतिहास त्यास मुक्त करितो, व आपणांविषयीं व इतरांविषयीं यथार्थबुद्धि मनांत आणून देऊन इतरांशीं सलोखीनें वागण्यास तो आपणास शिकवितो हाहि त्याच्या अध्ययनानें होणारा एक मोठा लाभ आहे. इंग्रेजांचें राज्य या देशांत होऊन इतके दिवस टिकलें, व पुढेंहि बहुधा चिरकाळ असेंच अबाधित चालेल, यांचें एक मोठें कारण वरील गोष्टींच्या संबंधें त्यांच्यांत व मुसलमानांत जो मोठा भेद दृष्टीस पडतो तो होय यांत संशय नाहीं. इतिहासाच्या योगानें राजकारणाच्या संबंधें विचारशक्ति वाढते हेंहि वरील कलमांत सांगण्यांत आलेंच आहे. पण तें खुद्द राज्यकर्त्यांसच लागून होतें. प्रस्तुत प्रसंगीं हेंहि दाखवावयाचें आहे कीं, ज्याच्या हातीं राज्याधिकार लहान थोडा सुद्धां नाहीं अशा घरीं बसून असणाऱ्या सुखवस्तु मनुष्यासहि तशा प्रकारचें मार्मिक ज्ञान इतिहासापासून होईल. सध्यां इंग्लंडांत वगैरे अशा प्रकारचे विचार करणारे व अशा विषयांवर ग्रंथ लिहिणारे लोक सगळे मुत्सद्दीच असतात असें नाहीं; तर वर सांगितले तसे सुखवस्तु असणारे लोकहि अशा विचारांत मग्न असतात. तेव्हां हा विषय राज्यकारणी पुरुषांचाच केवळ आहे असें नव्हे; अगदीं सामान्य मनुष्यांसहि तो विचारार्ह आहे. राज्यप्रकारांपैकीं[1] उत्कृष्ट कोणता, किंवा अमुक अमुक देशास कोणकोणता विशेष हितकर; प्रजेस राजानें अगदीं अटकावांत ठेवावें कीं मोकळीक द्यावी, द्यावी तर कोठपर्यंत; राज्याचें हित होत असलें तर अनीति आचरावी कीं नाहीं, आचरली असतां तिचा परिणाम काय होईल; देशाच्या स्थितिविशेषाचे परिणाम एकंदर सर्व लोकांच्या मनावर व स्थितीवर काय होतात; राज्याचा आणि धर्मखात्याचा कितपत संबंध असावा; राजानें प्रजेवर धर्माच्या बाबतींत सक्ती करावी कीं करूं नये; अशा रीतीचे शेंकडों विषय एकंदर सर्व लोकांच्या संबंधाचे आहेत; यास्तव यांवर इंग्लंड वगैरे देशांतून सारखी वाटाघाट चालू आहे. गेल्या शतकाच्या शेवटीं फ्रान्स देशांत जी मोठी धामधूम झाली त्या वेळेस सर्व युरोप व अमेरिका अगदीं गलबलून गेलीं; व सर्वांच्या तोंडीं लोकस-

---

१. या शब्दाचा अर्थ आमच्या मराठी वाचकांस अंमळ फोडून सांगितला पाहिजे. हिंदुस्थानांत व साऱ्या एशियाखंडांत पूर्वीपासून तों तहत आजपर्यंत राजाच्या सत्तेखेरीज दुसरी सत्ता कोणास माहीत नाहीं. पण युरोपांत अल्पजनसत्ताक, प्रजासत्ताक, लोकसत्ताक असे अनेक संस्थानाचे प्रकार होते, व अजूनहि प्रसंगानुसार स्थापित होतात.

त्ताक संस्थान चांगलें कीं एकराजक चांगलें हा वाद झाला. त्या प्रसंगीं त्या मोठ्या विषयावर शेंकडों ग्रंथ झाले; पण ते आतां सर्व बुडून विख्यात वक्ता जो बर्क् त्याचा ग्रंथ 'फ्रान्सच्या राज्यक्रांतीवर विचार' एवढा मात्र अजून सर्वत्र प्रसिद्ध आहे. या ग्रंथावरून त्या थोर तत्त्वज्ञाची विशाल बुद्धि स्पष्ट दिसून येते. या ग्रंथाविषयीं दुसरी विशेषतः सांगायाची गोष्ट काय कीं, त्यांत ज्या कित्येक गोष्टींविषयीं मागील इतिहासाच्या अनुभवावरून त्या ग्रंथकारानें भाकीत केलें होतें तें पुढें बरोबर मिळून आलें. असो; वरील शेवटल्या गोष्टीवरून इतिहासाची थोरवी सर्वांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं; आणि सर्वांच्या, व विशेषतः राज्यकर्त्यांच्या, उपयोगीं इतिहासाचें ज्ञान किती पडण्यासारखें आहे हेंहि त्यावरून दिसून येईल. कोणी कोणी तर यावरून असेंहि ह्मणतात कीं, कांहीं काळानें इतिहासज्ञांस पूर्वीच्या अनुभवावर पुढें अमुक अमुक देशाची कसकशी स्थिति होईल याविषयीं अगोदर भाकीत करण्याची सुद्धां शक्ति येईल. असो; याशिवाय आणखीहि एका प्रकारें विचारशक्ति वाढते. तो हा कीं, सगळ्या जगाचा इतिहास पहिल्यापासून आजपर्यंत सगळा एकदम मनांत आणला असतां जगदीशाचें वैभव त्यांत दिसून येतें. अगदीं प्राचीन राष्ट्रांची मूळची स्थिति कशी होती, व ती पुढें क्रमाक्रमानें कालगत्या कशी पालटत गेली, आणि असें होतां होतां हल्लींच्या काळीं जग कोणत्या स्थितीस येऊन पोंचलें आहे, याचा जो यथास्थित विचार करील त्यास एकंदर जगाच्या रहाटीचा रोंख सुधारणुकेकडे आहे असें खास दिसून येईल. या ह्मणण्यास रानटी लोकांनीं रोमन बादशाहीची धूळधाण करून टाकली, ख्रिस्ताच्या जन्मभूमीनिमित्त कोट्यावधि युरोपियन लोक मरून शेवटीं त्यांसच मुसलमानांनीं माघारीं पिटून लावलें, फ्रान्स देशांत दंगा होऊन त्याची व त्याबरोबर सगळ्या युरोपखंडाची नासाडी झाली, वगैरे गोष्टी सकृद्दर्शनीं विरुद्धशा वाटतात; पण याच अनर्थांचे पुढें परिणाम कसे झाले याचा जो अंमळ विचार करील त्यास कळून येईल कीं, ते अनर्थ केवळ तात्कालिक असून त्यांपासून जगाचें चिरकाळ कल्याण झालें आहे. सध्यां जी पृथ्वीवरील सुधारलेल्या देशांची स्थिति आहे तिजमध्यें व चारपांचशें वर्षांमागें जी होती तींत जमीनअस्मानाचा फरक झाला आहे असें ह्मटलें असतां चालेल. हल्लीं अगदीं सामान्य मनुष्यास अशीं शेंकडों सुखें व सोई प्राप्त झाल्या आहेत, कीं ज्या त्या वेळीं मोठ्या बादशहास अनुकूल नव्हत्या. सध्यां पोरांसोरांस अशा कित्येक गोष्टी माहीत आहेत, कीं ज्या त्या वेळच्या मोठमोठ्या पंडितांच्या व तत्त्वज्ञांच्या स्वप्नींहि कधीं आल्या नसतील. प्राचीन काळीं पक्षवायुग्रस्त शरीराप्रमाणें जगाची अवस्था होती; ह्मणजे एका भागाचें सुखदुःखज्ञान दुसऱ्यास पोंचण्याचा बिलकूल मार्ग नसे. यास्तव जवळजवळचे देश सुद्धां परस्परांविषयीं उदासीन असत. ग्रीक लोकांचें व पारसीकांचें युद्ध अनेक वेळां मोठ्या निकराचें झालें; पण एकीकडे रोमन वगैरे लोक

व दुसरीकडे हिंदु वगैरे, अगदीं गार होते. तसेंच दुसऱ्या पक्षीं हानिबलानें रोमचें राज्य हालवून दिलें, किंवा इकडे बौद्धधर्मी लोकांस ब्राह्मणांनीं तिबेटांत, लंकेंत, चिनांत हद्दपार करून घालवलें, पण ग्रीक लोक आपल्या ठिकाणीं स्वस्थ. पण आतां कसा चमत्कार झाला आहे तो पहा! अमेरिकेंत लोक भांडतात—एक होतात; आणि त्यांच्या संबंधानें पातालवासी जे मुंबईचे शेटसावकार ते त्या भांडणाच्या योगानें एकदम कोट्याधीश होतात, आणि भांडण एकाएकीं मिटतांच घरोघर शेणाचे दिवे लागतात!— सारांश, तारायंत्राची तार जशी सध्यां पृथ्वीच्या एका टोकाशीं हालवली असतां दुसऱ्या टोकापर्यंत ती हालत जाते, त्याप्रमाणें एका भागाचें सुखदुःख तत्क्षणीं दुसऱ्या भागाच्या अनुभवास येतें; किंवा वरचें सादृश्य येथें घेतलें तर निरोगी मनुष्याच्या शरीराच्या कोणत्याहि भागास झालेलें ज्ञान जसें तत्क्षणीं सार्वत्रिक होतें तसा प्रकार होतो. असो; तेव्हां हा सर्व प्रकार जेव्हां लक्षांत येतो, व एकंदर जगाचा क्रम दिवसेंदिवस सज्ञान व सुखी होण्याचा आहे असें त्यावरून समजतें, तेव्हां धर्मशील पुरुषांस मोठी उमेद येऊन त्यांची परमेश्वराचे ठायीं भक्ति दृढ होते.

याप्रमाणें या अचाट विषयाचें आमच्या वाचकांस किंचित् दिग्दर्शन करविलें. या विषयास साजेलसें पूर्ण निरूपण करणें ह्मणजे सामान्य मनुष्याचें काम नव्हे. त्यास ग्रंथावलोकन पुष्कळ पाहिजे, जगाचा अनुभवहि पुष्कळ हवा, आणि शिवाय विषय प्रतिपादन करण्याची शैलीहि उत्कृष्ट साधलेली पाहिजे. हीं सर्व प्रस्तुत लिहिणाराच्या अंगीं आहेत असें त्यास अगदीं वाटत नाहीं. परंतु तीं सध्यांच्या वाचकांच्या मानानें पहातां त्यांसहि हवीं आहेत, किंवा त्यांपासून त्यांस हल्लींच्या स्थितींत उपयोग होणार आहे, असेंहि पण त्यास वाटत नाहीं. वाचकांचें ज्ञान व विचारक्षमता जसजशी वाढत जाते त्याच मानानें त्यांची सेवा करण्यास तसे ग्रंथकारहि अवश्य निपजत जातात; यास्तव आमचे इकडील वाचक इंग्लंडांतील वाचकांच्या तोडीचे होताहेत तोंपर्यंत आपणांत बर्क, मेकॉले, मिल यांसारखे लिहिणारेहि खास निपजतील यांत संशय नाहीं! या दोन्ही गोष्टी परस्परसापेक्ष होत हें उघडच आहे. असो; तेव्हां सध्यांच्या स्थितीप्रमाणें आमच्या मराठी वाचकांस प्रस्तुत निरूपण पुरें आहे असें आह्मांस वाटतें. या व मागील अंकांत सांगितलेले इतिहासांचे उपयोग नीट मनांत भरून त्याच्या अभ्यासाकडे जर त्यांतून कित्येकांची प्रवृत्ति होईल तर या लेखाचे श्रम फुकट गेले असें होणार नाहीं.

येथवर इतिहासाविषयीं सामान्यतः विचार झाला. पुढील अंकांत विशेषतः आपल्या देशाच्या इतिहासाविषयीं चार शब्द बोलूं.

न यत्र स्थेमानं दधुरतिभयभ्रांतनयना गलद्दानोद्रेकभ्रमदलिकदंबाः करटिनः ।
लुठन्मुक्ताभारे भवति परलोकं गतवतो हरेरद्य द्वारे शिव शिव शिवानां कलकलः ॥
भामिनीविलास.

अंक ८ वा— (१) आपल्या देशाविषयीं एकंदर जगाचें मत. (२) आपलें स्वतःचें मत. (३) 'घाशीराम कोतवाल;' 'पुण्याचें वर्णन.' (४) हिंदुस्थानच्या इतिहासाची इंग्रेजांस गोडी व माहिती. (५) आमची गोडी व माहिती. (६) उपसंहार. (७) लोकांस सूचना.

मागील अंकाच्या शेवटीं सुचविल्याप्रमाणें यांत आपल्या देशाच्या इतिहासाविषयीं–ह्मणजे या विषयावर इंग्रेजींत व मराठींत जे ग्रंथ आहेत ते कसे आहेत, सध्यां एकंदर लोकांस इतिहासाचें ज्ञान कितपत आहे, त्याची योग्यता त्यांस कितपत कळते वगैरे विषयीं—लिहावयाचें आहे. आतां या विषयासच खुद्द आरंभ करायाच्या पूर्वी एका मोठ्या गोष्टीविषयीं बरेंच लिहिलें पाहिजे. ही गोष्ट हिंदुस्थानाविषयीं एकंदर जगाचें मत. हें चांगलें लक्षांत आलें असतां पुढील विषय पुरतेपणीं ध्यानांत येण्यास अगदीं सोपें पडेल.

१. अलीकडे पन्नास पाऊणशें वर्षांत या देशाची स्थिति मोठी चमत्कारिक होऊन गेली आहे. त्यास फारां दिवसांनीं मोठ्या सुदैवानें जें स्वराज्याचें वारें लागलें होतें तें एकाएकीं नाहींसें होऊन तो हल्लीं एका टोंकापासून तों दुसऱ्या टोंकापर्यंत परराज्याच्या सत्तेखालीं आला आहे. असें पूर्ण पराधीनत्व त्यास यापूर्वी कधींहि आलें असेलसें दिसत नाहीं. आणि याहूनहि विशेष खेदास्पद काय कीं, हींतून मुक्त होऊन त्यास पुनः तर डोकें उचलण्याचा बहुधा प्रसंगहि इतःपर येईलसा वाटत नाहीं. सध्यांच्या अत्यंत कष्टावस्थेंत इंग्रेजांच्या तरवारींच्या तिखट धारांशीं दयार्द्रतेचा जो कांहीं थोडाबहुत अंश मिश्रित असेल तेवढेंच बहुतकरून आह्मांस त्राण उरलें आहे ! असो; पण हीहि दशा कदाचित् सह्य होती. कां कीं, 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण'[२] या न्यायानेंच एकंदर जगाची रहाटी चालली आहे. जो मनुष्य, जें कुळ, किंवा जें राष्ट्र आज भाग्याच्या परम शिखरास चढलेलें असतें तेंच उद्यां एकाएकीं डबघाईस येऊन परवां त्याचा मागमूसहि मागें रहात नाहीं. पहा बरें 'ग्रीक' या नुसत्या नांवाबरोबर किती कल्पना एकदम मनांत उभ्या रहातात ! ज्या देशैकनिष्ठ वीर्यापुढें झर्सीज राजाचें असंख्यात सैन्य भुसासारखें उडून गेलें, तें वीर्य; सारें जग अजूनहि

१. "ज्या गुहेपुढें आलें असतां मदोन्मत्त हत्तींनीं भय पावून क्षणभरहि तेथें न ठरतां दूर पळून जावें, जींत हत्तींच्या गंडस्थळांतील मोत्यांचा खच पडला आहे, त्याच सिंहाच्या गुहेंत आतां भालूची गर्जना ऐकूं येते ! शिवशिव ! "

२. 'चाकाच्या धांवेप्रमाणें मनुष्याची स्थिति वरचेवर पालटत असते,— ह्मणजे एकदां खालीं होते, पुनः वर होते.'

ज्यांच्या योगानें थक्क होतें असें वाक्चातुर्य व बुद्धि; मोठमोठ्या राजांस ज्याचा धाक पडावा असें उत्साहोद्दीपक वक्तृत्व; प्रत्यक्ष पाषाणास बोलता चालता करण्याची अपूर्व करामत; इत्यादि कल्पना वरील नांवाच्या केवळ उच्चाराबरोबर एकसमयावच्छेदेंकरून मनांत प्रवेश करतात ! व यामुळेंच हें नांव आजपर्यंत सर्वांच्या कानास अमृतासारखें मधुर लागत आलें आहे, फार तर काय, पण या चिमुकल्या देशाचा–कीं ज्याचा एकंदर विस्तार येथील एखाद्या जिल्ह्याइतका सुद्धां नसेल, त्याचा–इतिहास सर्व जगास एखाद्या महातीर्थाप्रमाणें पावन व तारकच जणों काय झाला आहे. यानेंच नुकतें सगळ्या युरोपास दीर्घकालिक महानिद्रेंतून एकदम जागविलें, व त्याचा प्रचार व प्रसाद जेथें जेथें होत जाईल तेथें तेथें त्याच्या मागोमाग विद्या व कला या आल्याच असें समजावें. आजवर जे युरोपांत व अमेरिकेंत थोर थोर लोक होऊन गेले त्यांपैकीं ज्याच्या बुद्धीनें येथून पेट घेतला नाहीं असा कदाचित् एकहि मनुष्य सांपडणार नाहीं. असो; पण याच ग्रीक लोकांची लवकरच काय दशा होऊन गेली ! ज्या मासिडोनियन लोकांस ते आपणांहून अत्यंत हीन समजून त्यांची अवगणना करीत तेच साऱ्या ग्रीस देशास शिरजोर झाले; त्यानंतर अक्षरशून्य जे रोमचे दांडगे शिपाई त्यांनीं सहज तो सगळा देश सर केला; आणि त्यांच्या मागून तर वाळवंटांतून भटकणारे जे आरब त्यांची एक टोळी इकडे येऊन त्यांनीं मूर्ति फोडण्यास व सगळ्या देशाची धूळधाण करण्यास आरंभ केला. लक्ष्मीच्या चंचलतेचें व दैवाच्या अस्थिरपणाचें आणखी उदाहरण हवें असल्यास रोमचेंहि आहे ! या शहरच्या इतिहासापेक्षां चमत्कारास्पद दुसरें काय आहे ! रॉम्युलसानें जी मर्यादा पहिल्यानें नांगरानें आंखून दिली तीच वाढतां वाढतां कोठपर्यंत वाढली ! त्या वेळेस माहीत असलेलें सारें जग तींत आलें ! पण एवढें होऊनहि शेवटीं काय राहिलें ? ज्या रोमन लोकांचा मागें पाय ह्मणून कोठें कधींहि आलाच नाहीं; ज्यांचें धैर्य असें अढळ कीं, केनीच्या मोठ्या लढाईत हानिबलानें त्यांचे बहुधा हातपायच मोडून टाकले असतांहि जे यत्किंचितहि न डगमगतां जो कोणी शत्रूस शरण जाण्याची मसलत काढील त्यास मारून टाकावें असा ज्यांनीं नियम केला, ज्या वीरांचा अद्भुत पराक्रम ऐकून ईजिप्ट, हिंदुस्थान[1] अशा दूरदूरच्या देशांतूनहि त्यांकडे वकील येत; त्यांसच शेवटीं रानटी जे गॉल, व्यांडल, गॉथ, हन्स, आरब, तुर्क अशा लोकांपुढें थरथरां कांपावें लागलें ! असो; तर याप्रमाणें हें कालचक्र सतत फिरत आहे ! याच्या सपाट्यांत कोणाचें काय होईल याचा नेम आहे ? तेव्हां आमचे पूर्वज केवढेहि थोर असले, व सध्यां आह्मी कितीहि नीच पदवीस आलों

१. हीं गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. मुसलमानांच्या संबंधानें 'रूमशाम' हा शब्दहि आमच्यांत आला आहे. तुर्कस्थानच्या सुलतानास ते हा शब्द लावतात. तसेंच एका हिंदु चालीच्या कृत्रिम भूगोलावर 'रोमकपत्तनम्' असें नांव पाहिलेलें आह्मांस आठवतें.

असलों, तरी त्यांत चमत्कार कसचा ? जी गत्ति ग्रीक व रोमन लोकांसहि चुकली नाहीं तीच हिंदूंसहि प्राप्त झाली असल्यास नवलं कसचें ? याप्रमाणें सभ्यांच्या पक्षीं मनाचें समाधान करून घेण्यास सवड झाली असती; आणि आमच्या पूर्वीच्या वैभवाकडे पाहून आमचा मान चोहोंकडे अद्याप असता ! पण हें तरी कोठें आहे ? आमच्या देशाविषयीं व आमच्या लोकांविषयीं एकंदर जगाच्या कशा समजुती आहेत त्या येथें विशेष सांगायाला पाहिजेत असें नाहीं. मोठमोठ्या नामांकित इंग्रेज ग्रंथकारांच्या ग्रंथांत, हिंदुस्थानासंबंधीं कांहीं प्रकरण निघालें असतां, पार्लमेंट सभेंत, येशू ख्रिस्तानें वरद हस्त डोईवर ठेवून सर्वज्ञ केलेल्या मिशनरी लोकांच्या मोलवान भाषणांत, त्यांच्या प्रसादानें सर्वज्ञतेची झुळूक ज्यांच्यावरून गेली अशा येशूच्या कळपांत जाऊन फसलेल्या विचाऱ्या बाब्यांच्या दांभिक बोलण्यांत, किंवा ख्रिस्ताच्या शरीराचें व रक्ताचें भोजन पुरतेंच अर्धे मुर्धे मेंढे बनून कळपांत शिरलेल्या लबाड लांडग्यांच्या कपटव्याख्यानांत, वगैरे जिकडे तिकडे एक घोष ऐकूं येतो ! त्याचा सारांश हा कीं, आह्मांसारखे मूर्ख, वेडगळ, भितरे, लबाड, दुराचारी असे आह्मीच ! इंग्लंडांत अगोदर हिंदुस्थानाचें नांव निघालें कीं, लोकांच्या कपाळास तिडीक उठते; पण त्यांतूनहि आमच्या देशास आपल्या वास्तव्यानें भूषित करण्यास व आह्मांवर उपकार करण्याच्या बुद्धीनें जे कोणी इकडे येतात, ते येतांना मेकॉले साहेबांचे 'लॉर्ड क्लाइव्' 'वॉरन हेस्टिंग्स्' हे निबंध रेल्वे स्टेशनांवर विकत घेऊन वाचीत असतील ! साहेबांची वृत्ति मूळची सौम्य व ज्ञानहि अगाध असतेंच; त्यांतून हे सुंदर निबंध वाचल्यावर तर हिंदुस्थानावर पाऊल ठेवतांच त्यांच्या मनांत अशा वृत्ति उद्भवत असतील:—'अहो ! क्लाइव् व हेस्टिंग्स् यांस इतके श्रम तरी पडले ! मीं असतों तर एका सपाट्यास साऱ्या हिंदूंस चीत करून दिलें असतें ! मी एक शब्द बोलेन तर त्यांचे सगळे ग्रंथ त्यांस कस्पटाप्रमाणें वाटवीन !' आह्मांस खचीत वाटतें कीं, मोठमोठ्या वरिष्ठ कामदारांपासून तों रेल्वेच्या यःकश्चित् गार्डापर्यंत जो अरेरावपणा सर्वांत दृष्टीस पडतो तो इंग्रेज लोकांच्या अंगच्या उद्दामपणामुळें व त्यांचें हिंदुस्थानावर प्रभुत्व झालें आहे यामुळेंच केवळ आलेला नव्हे. हिंदु ह्मणजे काय कस्पटापेक्षां कस्पट, अधमांहून अधम, मूर्खापेक्षां मूर्ख असे जे वेडगळ समज साऱ्या लोकांचे झाले आहेत, व जे अधिकाधिक दृढ करण्याविषयीं ज्याचा त्याचा यत्न चालू आहे, त्यांचें जर आमचे लोक खंडन करतील, आणि आपली योग्यता प्रकट करतील, तर वरील दांडगेपणा बराच कमी होईल यांत संशय नाहीं. याविषयीं दोन उदाहरणांवरून आमच्या वाचकांची खात्री होईल. सर्व इतिहासज्ञांस, किंबहुना इकडील सर्व लोकांस, सर जॉन मालकम् साहेबांचें नांव ठाऊक असेलच. अव्वल इंग्रेजींत ज्या साहेबांचीं नांवें या प्रांतांत आबालवृद्धांस माहीत होतीं, व ज्यांवर एकंदर लोकांचाहि लोभ जडला असे, त्यांत अल्फिन्स्टन्च्या खालो-

खाल सदर्हू मालकम् साहेबांचेंच नांव होतें. या भल्या साहेबानें आपणाविषयीं हा मजकूर लिहिला आहे—

"माझी स्वतःची एतद्देशीय लोकांविषयीं पहिल्यानें काय समजूत होती ती अजून मला आठवते;—व ती आठवली असतां माझी मला मोठी शरम वाटते! ती अशी होती कीं, माझ्या हाताखालीं जे नेटिव कामगार आहेत ते माझ्यापेक्षां सर्व प्रकारें किती हलके आहेत! असें मला बरेच दिवस वाटत असे; पण जसजसें येथील लोकांविषयीं व माझे स्वतःविषयीं मला अधिकाधिक कळूं लागलें तसतसा आमच्यामधील भेद कमी कमी होत गेला. आमचे इंग्रज लोक आपल्या श्रेष्ठपणाचा मोठा डौल मिरवितात हें मीं पुष्कळ ठिकाणीं पाहिलें आहे व ऐकलेंहि आहे; पण युरोपांतील व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रतींच्या लोकांची त्यांच्या त्यांच्या मानानें परस्पर तुलना केली, तर तिकडच्या लोकांस गर्व मिरविण्यास मोठेसें कारण दिसेल असें वाटत नाहीं! तसेंच सगळ्या हिंदूंविषयीं एकंदर सरसकट जें मत ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येतें, कीं ते सारे लोक येथून तेथून लुच्चे लबाड आहेत, त्यांची भल्यानें संगत करूं नये; आणि ते बुद्धीचे इतके मंद आहेत कीं विद्याभ्यासाच्या योगानें ज्यांचीं मनें विशाल व उदार झालीं अशा युरोपियन लोकांच्या संभाषणास व स्नेहास ते अगदीं लायक नाहींत, हेंहि मला बिलकूल मान्य नाहीं." [1]

दुसरें उदाहरण कोलब्रूक नामक प्रख्यात संस्कृतज्ञाचें. आपल्या प्राचीन विद्येवर व्यासंग करून तिची माहिती युरोपांत ज्यांनीं करून दिली, त्या पंडितांच्या मालिकेंत याची गणना मोठी आहे. असें असतां याच साहेबाचे आधींचे उद्गार येथें दाखल केले असतां सर्वांस मोठा चमत्कार वाटेल; व ते पुनः वाचून कोलब्रूक साहेबास स्वतःहि अनेक वेळां खचीत लाज वाटली असेल! ज्याची पुढें संस्कृतावर एवढी भक्ति जडली, व फारशी वगैरे भाषांशींहि ज्यानें चांगला परिचय केला, त्यानेंच विल्किन्स नामक संस्कृतज्ञास 'संस्कृताचें वेड डोक्यांत शिरलेला' असें ह्मणावें. 'एशियाटिक मिसलेनी' ह्मणून एक बंगाल्यांत पुस्तक काढीत असत त्यास 'वेडगळ मजकुराचें आगर', 'ऐन अकबरी' ग्रंथास 'हा नुसता उकिरडा आहे, यांत एकादें दुसरें मोतीं सांपडेल न सांपडेल' असें ह्मणावें ही केवढी चमत्काराची गोष्ट! या दोन उदाहरणांवरून आमच्या वाचकांस स्पष्ट दिसून येईल कीं एकंदर जगास आमच्या देशाविषयीं यथार्थ ज्ञान बिलकूल नाहीं. तसेंच यावरून आह्मांस असेंहि खचीत वाटतें कीं, जे जे युरोपियन लोक येथें येऊन पुनः माघारी गेले व जातात, त्यांच्या हिंदूविषयीं पहिल्या समजुतींत फारच तफावत पडत असेल! नाहीं अशी मेकॉलेसारख्या दुराग्रही व कोत्या मनाच्या लोकांची किंवा युरोपांतून शुभवर्तमान घेऊन येऊन तें

1. Briggs's Letters xxiii.

बहुधा जसेंचें तसेंच गुंडाळून माघारी न्यावें लागल्यामुळें निराश झालेल्या मिशनरी लोकांची मात्र समजूत पालटत नसेल! मग हे सद्गृहस्थ तिकडे गेल्यावर आपलें सर्व पांडित्य हिंदूंवर खुशाल बिनधोक ओतीत असतील. तिकडे अगोदर हिंदुस्थानाविषयीं माहिती इतकी जबर कीं, शिंदा हिंदु कीं मुसलमान याची भ्रांत, हैदर दिल्लीस राज्य करीत होता कीं त्रावणकोरास करीत होता कोण जाणे! मुंबईस एखाद्यास पत्र लिहिलें असतां मद्रासेस व कलकत्त्यास असणाऱ्या इष्टमित्रांचा समाचार त्यांस पुसायाचा! केवळ नकाशाकडे पाहून किंवा इतिहासाच्या चार ओळी वाचून जी माहिती मिळायची तिची इतकी भ्रांत; मग अशा लोकांस हिंदुधर्माची, हिंदूंच्या विद्येची, त्यांच्या भाषांची वगैरे माहिती कितपत असेल हें सांगावयास नकोच! फार कशाला, अजूनहि हा प्रकार चोहोंकडे दृष्टीस पडत नाहीं काय? संस्कृतामध्यें ओ का ठो करतां येत नसतांहि हिंदुधर्माविषयीं सव्वा सव्वा हात गप्पा झोंकणारे पाद्रीसाहेब कोणीं पाहिले नाहीं? 'पंचतंत्र' या महाग्रंथाचें अक्टोविकट अध्ययन करून खासे पी. एच. डी. बनून आलेले चारी वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें, यांत पारंगत झालेले श्वेतद्वीपीय व शर्मण्यदेशीय शास्त्री कोणास माहीत नाहींत? पण अः यांत काय आहे? संस्कृतचसें काय, एशिया खंडांतील झाडून साऱ्या भाषांत ज्यांचा कोणी हात धरणारा नाहीं असे 'पूर्वदेशीय भाषांचा बाणा बाळणारे'हि युरोपांत तयार होऊन इकडे येत नाहींत काय? त्यांस तुह्मी आरबी विचारा, फारशी विचारा, चिनी विचारा; सगळ्यांत तयारी! प्रश्न करण्याचा अवकाश! साहेबांची बुद्धि येथवर फांकली असल्यावर मग युनिव्हर्सिटींत मराठीचीं बुकें नेमतांना 'विद्येपासून लाभ आणि संतोष', 'ईश्वरी ज्ञान' वगैरे लाखे ग्रंथ त्यांनीं निवडल्यास, किंवा 'दक्षिणा प्राइज-कमिटी'कडे कसाहि गद्यपद्यात्मक ग्रंथ येवो, त्यावर फाडकन न्यायाच्या तराजूंत जोखलेलें मत साहेबांनीं दिल्यास आश्चर्य कोणतें? वाः! एकूण अक्कल हा जिन्नस हल्लींच्या काळीं युरोप खंडांत जितका रगड पिकतो तितका एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी कधीं कोठेंहि पिकला नसेल!! हा देवानें आपल्या आवडत्या लोकांवर एकदम महाप्रसाद केला असेल, किंवा त्यांच्या पुत्रानें आपलें शुभवर्तमान भूमंडळावर फैलावलेंसें पाहून खुष होऊन आकाशांतून हें अपूर्व पारितोषिक पाठवून दिलें असेल कोण जाणे! असो, तेव्हां सांगायचें काय कीं, असे अरण्यपंडित इंग्लंडांत गेल्यावर ' एरंडोऽपि द्रुमायते' या न्यायानें तेथें मोठी प्रतिष्ठा व विद्वत्तेबद्दल मान पावतात. मग काय, सांगतील ती पूर्वदिशा! कोणत्याहि लोकांस इतरांचा मोठेपणा व थोरवीचें वर्णन कधीं सहन होत नसतेंच; त्यांतून हिंदूंसारखे लोक, जे त्यांच्या सत्तेखालीं आलेले, त्यांचें वर्णन काय करावयाचें आहे? यास्तव लोकांस हंसवायासाठीं व आपण किती थोर आहों हें त्यांस समजाविण्यासाठीं हिंदूंचा जितका पाडाव करावा तितका इष्टच! त्यांतून दुसरें काय झालें आहे कीं,

हिंदूंचा फार प्राचीन काळापासून संपत्तीविषयीं, कलांविषयीं, विद्येविषयीं वगैरे मोठा लौकिक इतका कीं, युरोपांतील सर्व राष्ट्रें तिकडून आलेले अमोलिक जिन्नस पाहून हिंदुस्थानाविषयीं केवळ वेडीं होऊन गेलीं होतीं. कोलंबस अमेरिकेजवळील बेटांस जाऊन लागला, पण त्यास आपण हिंदुस्थानच शोधून काढला असें वाटून त्यानें त्यास तेंच नांव दिलें, तें अद्याप चालत आहे. तसेंच ग्रीक व रोमन लोकांतहि आमच्या पूर्वजांची मोठी ख्याति होती असें त्यांच्या ग्रंथांवरून वगैरे दिसतें.[1] तेव्हां एवढ्या नामांकित लोकांचें नाक खालीं करून ते अत्यंत नीच आहेत हें दाखविलें म्हणजे इंग्रज लोक मोठे थोर कसे नाहीं झाले? अर्थात्च झाले! ख्रिस्ती धर्माकरितां वेडे होऊन गेलेल्या मिशनरी लोकांनीं हिंदूंविषयीं एकंदरींत, व विशेषतः धर्माच्यासंबंधानें, हवी तितकी बडबड केली तरी ती त्यांच्या थोरपणास व त्यांच्या येशूच्या नांवास शोभते खरी; पण सत्याचा, न्यायाचा व विद्वत्तेचा बाणा बाळगणाऱ्या अशा मोठमोठ्या ग्रंथकारांनींहि आमच्या देशाविषयीं झोटिंगपाच्छाहीचा मजकूर लिहावा हा केवढा चमत्कार आहे? मेकॉलेसाहेब मोठ्या तीव्र बुद्धीचा, बहुश्रुतपणाचा, रसिकतेचा व निःपक्षपातपणाचा बाणा मारीत असतां हिंदुस्थानाच्यासंबंधानें जेथें जेथें त्यांनीं कांहीं म्हणून लिहिलें आहे, तेथें तेथें अत्यंत दुराग्रह–किंबहुना पोरकटपणाहि–त्यांनीं प्रकट केला आहे. त्यांची माहिती केवढी जबर होती हें त्यांस दहा बारा भाषा येत होत्या यावरून व त्यांच्या ग्रंथांवरून स्पष्ट दिसतेंच. दृष्टान्त देण्याविषयीं तर त्यांची हद्दच होती. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या ग्रंथांतून, अर्वाचीन युरोपांतील भाषांतल्या ग्रंथांतून, किंबहुना फारशी वगैरे इकडील ग्रंथांतूनहि ते त्यांनीं प्रसंगवशात् दिले आहेत, पण नाहीं असा संस्कृतांतून! त्यांच्या तडाक्यांतून आमच्या कालिदासाचें 'शाकुंतल' नाटक, कीं ज्याचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध होतांच श्लेजेल, हंबोल्ड, गेटी अशा महापंडितांस त्यानें गर्कच करून टाकलें तें चुकलें असेल असें मुळींच संभवत नाहीं. त्यांतून साहेबमजकूर आमच्या देशांत तीन चार वर्षें येऊन राहिलेहि होते. पण कांहीं नाहीं. फारशी ग्रंथांचा संबंध जसा त्यांनीं आपली माहिती दाखविण्याकरितां आपल्या ग्रंथांत कोठें कोठें आणला आहे, व फर्दोशी, सेक, सादी वगैरे कवींचीं नांवें मोठ्या

---

१ शिकंदर बादशहा हिंदुस्थानांत आला होता तेव्हां येथील लोकांचें ज्ञान व चातुर्य पाहून तो चकित झाला, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तसेंच अनेक ग्रीक व रोमन ग्रंथकारांनीं हिंदुस्थानाविषयीं लिहिलें असून येथील लोकांविषयीं त्यांच्या मनांत आदराची बुद्धि पुष्कळ वागत असावी असें दिसतें. पोप कवीनें 'टेंपल् ऑफ फेम' [कीर्तिमंदिर] या नांवाच्या काव्यांत पूर्वदेशीय विद्वत्समाजांत ब्राह्मणांस घातलें आहे—

'—The sage Chaldeans robed in white appeared,
And Brahmans, deep in desert woods revered.

प्रेमानें आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं आणलीं आहेत, तशीं हिंदुकवींचीं मात्र बिलकूल कोठें नाहींत. आह्मांस खचीत वाटतें कीं, त्यांनीं 'शाकुंतला'चें भाषांतर जें एखादे वेळेस कधीं वाचलें असेल, तें त्यांचे बंधु जेम्स मिल इतिहासकार त्यांच्यासारखें घूक-दृष्टीनेंच वाचलें असेल ! बरें, ते इतके दिवस बंगाल्यांत राहिले तेव्हां नंदकुमाराच्या देशबांधवांची वर्तणूक त्यांनीं 'वॉरन् हेस्टिंग्स' या निबंधांत लिहिली आहे तशीच त्यांच्या नजरेस आली असेल काय ? ह्मणजे लहानापासून थोरापर्यंत सर्वच लबाड, ठक, मूर्ख असे त्यांस आढळले असतील काय ? तसेंच जेवढा टापू त्यांनीं पाहिला असेल तेवढ्यांत कोणत्याहि संबधानें चांगलें ह्मणण्यासारखें त्यांत कांहींच दिसलें नसेल ? काय असेल तें असो. गरीब बिचारा हिंदुस्थान ! त्याच्या धर्माची तर सर्वांनीं पायमल्ली करावीच—'तुमी हिंदु लोक' करणाऱ्या पाद्रीसाहेबांपासून तों मोठ्या लाटसाहेबापर्यंत—त्याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथकारानेंहि एके ठिकाणीं आपल्या नेहमींच्या चालीप्रमाणें त्यावर वर्षाव केलाच आहे. त्याचा अंमळशानें उल्लेख करूं;—पण नवल पहा काय कीं, आमच्या देशाची संपत्ति ही साहेबमजकूरांस सहन झाली नाहीं ! ! त्यांनीं वर सांगितलेल्या सर्वप्रसिद्ध निबंधांत असा मजकूर लिहिला आहे— "मोठ्या शहाण्या व्यापाऱ्यांसहि हिंदुस्थानांतील संपत्तीचा मोठा भ्रम असे. त्यांच्या मनांत अशा वेड्या कल्पना घोळत कीं, हिंदुस्थानांत हिऱ्यांचीं जोतीं, रत्नांचे खांब, सोन्याचे वाडे असं आहेत; पण खरोखरी पहातां हा सगळा भ्रम होता. युरोपांत पोर्तुगाल देश, किंवा त्याहूनहि आयर्लंड देश भिकारी समजतात;पण हिंदुस्थान तर आयर्लंडाहूनहि भिकारी आहे ! !" लॉर्डसाहेबांचें हें महावचन ऐकून आमचे वाचक खरोखर भांबावून जातील !—काय ? हिंदुस्थान आणि भिकारी !—वाः ! दिवसा ढवळ्या साऱ्या जगाच्या डोळ्यांत माती टाकण्याचें हें साहेबांचें धाडस त्यांचें त्यांसच शोभो ! हिंदुस्थान जर दरिद्री झाला तर मेकॉले साहेबांचा देश कशानें श्रीमंत झाला कोण जाणे ? शिशाच्या व कोळशांच्या खाणींनीं तर नाहींना ! काणीं नाहीं ह्मणावें ? उद्यां मेकॉले-साहेबांचे एखादे बंधु साऱ्या जगास कदाचित् जाहीर करतील कीं, 'अहो ! हिमालयाविषयीं मोठ्या भूगोलवेत्त्यांसहि मोठी भ्रांति आहे. आमच्या इंग्लंडांतील एखादें लहानसें टेकाड त्यास उंचींत हटवून टाकील ! तसेंच गंगा, ब्रह्मपुत्रा यांची सारे लोक रिकामी बढाई सांगतात. आमच्या लंडनांतलें एखादें गटार पुढें होईल तर त्यांस मागें सारून देईल '—जुलमी राजांनीं प्रजा चरकांतून पिळून काढल्यामुळें येथील लोकांस अगदीं त्राण उरलें नसतें असें जर आमच्या साहेबांचें ह्मणणें असेल, तर वरील वाक्य क्लैव्, हेस्टिंग्स् अशांच्या देशबंधूस फारच नामी शोभतें ह्मणावयाचें ! असो; यावरील मतावर आणखी विस्तार येथें करीत नाहीं; तें आमच्या वाचकांवरच आह्मी सोंपवून देतों. आतां वरील महाविद्वान् साहेबांचे आमच्या बिचाऱ्या

धर्मावरील मत ऐकों. सरकारनें प्रजेवर धर्माच्या बाबतींत सक्ती करावी कीं नाहीं असा विषय चालला असतां तदनुरोधानें मेकॉले साहेब हिंदुस्थानाविषयीं लिहितात– "परधर्म जबरीनें लोकांवर बसविला असतां जेथें त्यांचें अपरिमित कल्याण होईल असा देश हिंदुस्थानाखेरीज कदाचित् दुसरा कोठेंहि सांपडणार नाहीं. तेथील धर्मासारखा नीचतेस पोंचलेला धर्म साऱ्या पृथ्वीवर कोठेंहि नाहीं. त्याचा समूळ उच्छेद करून ख्रिस्ती धर्माचें अत्यंत हीन काळीं अत्यंत हीन जें स्वरूप कधीं कोठें चालू असेल तें त्याच्या जागीं आणून बसविलें असतांहि त्या देशांतील लोकांचें अतोनात हित होणार आहे!"[1] वाः! येथें तर आमच्या साहेबांनीं आपल्या सर्वज्ञतेची पराकाष्ठाच दाखविली! आमच्या देशाकरितां राज्यसंबंधाचे कायदे करण्याच्या कामांत हे साहेब पुढारी होते, व सध्यां चोहोंकडे चालू असणारी शिक्षणपद्धतिहि त्यांनींच घालून दिली, या डौलावर जाऊन आमच्या धर्मावरहि ते घसरले नसतील ना! वरील त्यांच्या लेखावरून पहातां हे साहेब येशूचे पुरे भक्त असून आमच्या धर्मातला त्यांस खडान् खडा माहीत होता याविषयीं आह्मांस संशयच उरला नाहीं। साहेबांचें लिहिणें कोठेंहि पहा; तें अर्धबोड्या मनुष्यासारखें अर्धमुर्धें कधीं नसायचेंच. त्यांतून हिंदुस्थानासारख्या देशाविषयीं लिहितांना तर तें अगदीं निक्षूनच असावयाचें. त्यांची व त्यांच्या देशबंधूंची खात्रीच होऊन गेली आहे कीं, आमच्या देशाविषयीं कितीहि वाईट लिहिलें तरी तें पुरें नाहींच होत! मग कशाला कसर करा? मानवी भाषेनें जेथवर ह्मणून निंदा व्यक्त करतां येते तेथवर तिचें सत्त्व बघून बिचाऱ्या हिंदुस्थानावर वर्षाव! ही मजा ज्यास पुरतेपणीं पहावयाची असेल त्यांनीं जेम्स मिल्लसाहेबांचा 'हिंदुस्थानचा इतिहास' पहावा. यांनीं तर इतिहास लिहिण्याची नवीच तऱ्हा जगांत प्रगट केली. इतिहासकार इंग्लंडांत; ज्याचा इतिहास लिहावयाचा तो देश सात आठ हजार कोस दूर; तेथील लोक काळे का गोरे कधीं पाहिले नाहींत; तेथील भाषांच्या ज्ञानाच्या नांवानें तर आवळ्याएवढेंच ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं; अशा थाटानें हे साहेब इतिहास रचावयास बसले. वरें, इतकेंहि नाहीं ह्मटलें; येथील देशाची हकीकत ज्यांनीं लिहिली त्यांच्या लेखावरच निर्वाह करून इतिहासकारानें आपलें बुद्धिकौशल्य योजून निदान निःपक्षपातबुद्धीनें खरा मजकूर तरी लिहिला असेल ह्मणावें! पण तसें तर बिलकूल नाहीं. स्वतः हिंदुस्थानाविषयीं माहिती तर मेकॉले साहेबांच्याच तोडीची, तेव्हां दुसऱ्यांचे लेख तर पाहावयाला हवेच; पण खुबी काय करावयाची? जेवढें ह्मणून हिंदूंच्या विरुद्ध लिहिलेलें सांपडेल तितकें मात्र घ्यावयाचें; पण त्याच ग्रंथकारानें त्यांविषयीं जेवढा प्रशंसेचा मजकूर लिहिला असेल तेवढाच नेमका गाळावयाचा! एवढी सगळी सामुग्री असल्यावर मग हा इतिहास किती उत्कृष्ट उतरला अ-

1. *'Gladstone on Church and State.'*

सेल हें सांगावयास नकोच! या थोर इंग्रेज इतिहासकाराच्या मनांत आमच्या हिंदुस्थानाविषयीं केवढी वळकट अढी होती ती थोडक्या उदाहरणावरून वाचकांस कळवितों. सारें जग ज्यांस पाहून विस्मय पावतें अशा डाकाच्या मलमली, आग्र्याचा ताजमहाल, कालिदासाचें 'शाकुंतल नाटक,' वेरुळचीं लेणीं, हीं सुद्धां साहेबांच्या पसंतीस उतरलीं नाहींत!! लेण्यांविषयीं त्यांनीं एक तर्क सुचविला आहे तो मोठ्या मौजेचा आहे. साहेबांची कल्पना अशी धांवते कीं, हीं लेणीं कदाचित् भुईतूनच स्वयंभू वर निघालीं असतील किंवा आकाशांतील ढगांतून खालीं कोसळलीं असतील!!! विलायती कल्पना खरी! असो. तेव्हां असे दिव्य इतिहास वाचून एकंदर जग आमच्याविषयीं कल्पना बांधणार! मग त्यांत आमच्याविषयीं त्या आतांप्रमाणें अत्यंत मूर्खत्वाच्या असल्यास नवल काय?

२. पण वरच्याहूनहि विशेष मूर्खपणाचा व लज्जेचा प्रकार अजून सांगणें आहे. तो कोणता, तर खुद्द आपल्याच देशांतला. हिंदुस्थानाशीं एवढा निकट संबंध झाला असतांहि इंग्रेजांस, व तदद्वारेंच काय तें इतरांस ज्ञान होणार यास्तव बाकीच्या एकंदर जगास, त्याविषयीं यथार्थज्ञान बिलकूल नाहीं यांत वास्तविक पहातां मोठेंसें आश्चर्य नाहीं. कारण आह्मांत व इंग्रेजांत हरएक गोष्टींत मनस्वी अंतर आहे. इंग्रेज तरवारीच्या जोरानें अरेराव झालेले, आह्मी हतवीर्य होऊन त्यांचे बंदे बनलेलों; आह्मी मूर्तिपूजक, ते मूर्तिभंजक; आह्मी फार झालें तर बायकांस बरोबरीनें वागविणारे, त्यांच्यांत तर मडमसाहेब ह्मणजे प्रतिदैवत; आह्मांस तर कीडमुंगीच्या हत्येनेंहि अंगावर शहारा येणार, व प्राणांत ओढवला तरी मद्यास शिवणें नाहीं; त्यांच्यांत तर दोहींसहि मनाई नाहीं हें तर काय, पण दोनहि पदार्थ अनुक्रमेंकरून त्यांच्या पैगंबराचें शरीर व रक्त मानलें असून स्वर्गारोहणाची पहिली पायरीच होत; आमच्या स्त्रियांस परपुरुषाचें वारें सुद्धां पातिव्रत्यभंजक, त्यांच्यांत हें तर काय, पण मोठ्या शृंगारवेषानें परक्याबरोबर नृत्य करणें हें अत्यंत प्रतिष्ठादायक! याप्रमाणें हजारों गोष्टींत आह्मांत व इंग्रेजांत रात्रदिवसाचें अंतर असतां इंग्रेजांनीं आपल्या अत्युच्च पदापासून खालीं येऊन हिंदूंशीं स्नेह करावा व त्यांविषयीं यथार्थज्ञान संपादावें हें व्हावें कसें? हें ज्ञान त्यांस क्रमाक्रमानें होत जाईल खरें; पण मिल्ल, मेकॉले, हे पुरते लबाड ठरण्यास आणखी शंभर दीडशें वर्षे तरी हवींत असें आह्मांस वाटतें! तेव्हां मुसलमानांचा व आमचा जितपत हल्लीं स्नेहभाव झालेला दृष्टीस पडतो तितका कदाचित् आमचा व इंग्रेजांचा होईल. पण तेथपर्यंत वर लिहिल्यासारखीं मतें मोठे ज्ञाते ह्मणविणाऱ्या साहेबांच्याहि मनांतून निघायाचीं नाहींत. तर याप्रमाणें परदेशस्थ लोकांच्या समजुती आमच्याविषयीं कितीहि वाईट असल्या, व कशाहि हेकटपणाच्या असल्या तरी त्यास सवड आहे; पण तशाच, किंबहुना त्याहूनहि वेडगळ, अशा जर आपणच आपणाविषयीं वागवूं लागलों, तर मग

केवढ्या आश्चर्याची गोष्ट? आमची पुष्कळ दिवसांपासून पक्की खात्री होऊन गेली आहे कीं, इंग्रेज लोकांच्या अज्ञानानें व दुराग्रहानें, खिस्ती भटांच्या मतलबी व हेकटपणाच्या उपदेशानें, त्यांच्या पुढेंपुढें करणाऱ्या बाट्यांच्या व लबाड शिष्यांच्या मूर्ख व्याख्यानांनीं, सुशिक्षित ह्मणविणाऱ्या अर्धबोबड्या लोकांच्या पोकळ शब्दपांडित्यानें, एकंदर देशांत स्वतःविषयींच्या दुर्मतांचें जें महाजाल चोहोंकडे पसरलें आहे, तें पार नाहींसें करून लोकांचीं मनें साफ दुरुस्त करणें ह्मणजे ग्रीक लोकांच्या हर्क्युलीसानें ऑजियस राजाच्या तबेल्यांत फार दिवस बिऱ्हाड करून राहिलेलीं लीद व घाण दोन नद्या धरून आंत सोडून जशी पार धुवून टाकली, तसेंच एखाद्या अचाट महावीरानें उठून येथें केल्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं! ज्या गोष्टी धडधडीत डोळ्यांपुढें जणूं काय प्रत्यक्ष दिसणाऱ्या आहेत त्या सुद्धां नाहींशा ह्मणून वरील लबाड व मूर्ख लोकांनीं पंचतंत्रांतील तीन धूर्तांच्या गोष्टीप्रमाणें आमच्या डोळ्यांत माती फेंकली आहे! त्या धूर्तांनीं त्या भोळ्या ब्राह्मणास फसवून प्रत्यक्ष पशूवर जशी कुत्र्याची भ्रांति करविली, त्याप्रमाणें आमचे पूर्वज सर्व राष्ट्रांत अग्रगण्य असतां व साऱ्या जगाचे गुरु असतां त्यांच्या पदरीं या कुत्सित लोकांनीं वेडगळपणा व मूर्खपणा बांधला आहे. बरें, हेंहि असो; पण प्रत्यक्ष आमच्या पदरीं हल्लीं हि ते मंदता, क्रूरता, भीरुत्व इत्यादि दोष बांधूं पहात आहेत, तेव्हां त्यांच्या धाडसास काय ह्मणावें? युनिवर्सिटी स्थापन होऊन नुकतीं पंधरा सोळा वर्षें होताहेत तोंच ज्या लोकांत किताबी विद्वान् पैशापासरी या मोलानें विकूं लागले, ज्यांनीं खुद्द विलायतेंतहि बुद्धिमान् ह्मणून नाक मिरविणाऱ्या लोकांचा पहिल्याच सपाट्यास त्यांच्याच भाषेंत नक्षा उतरविला, ज्यांच्यांत न्यूटनसारख्या महापंडितांच्या ग्रंथावरहि कोटी चालविणारे आढळतात, तेच लोक 'बुद्धिमंद असून विद्वान् युरोपियनांच्या संभाषणास व स्नेहास लायक नाहींत!!' ज्यांच्यांत प्रत्यहीं लक्षावधि निरपराध प्राण्यांचा वध होत आहे, ज्यांच्यांत मद्याचा तर कधीं कोणींच निषेध केला नसून ज्यांची मगरूरी इतकी कीं, केवळ बोलतां बोलतां ज्यांनीं हातघाईस यावें, उन्मत्त पशूंप्रमाणें मोठे विद्वान् ह्मणविणारांनींहि द्वंद्वयुद्धें करावीं, ज्यांची सुधारलेली कर्मणूक ह्मटली तर 'पिज्यन शूटिंग' ह्मणजे खबुतरांच्या करंड्यांचें झांकण उघडें करून तीं बिचारीं पाखरें वर उडूं लागलीं असतां त्यांच्या नाजुक अंगांत छरे रोंवायाचे अशा प्रकारची, धर्माच्या कलहांत ज्यांनीं लक्षावधि लोकांचे प्राण घेतले, ज्यांच्या पवित्र शास्त्रानें अंगांत इतकी दया संचरते कीं, सगळें खंडचें खंड जी उजाड करण्यास प्रवृत्त करून मूर्तिपूजक काळ्या निग्रो लोकांवर धाड घालून जनावरांप्रमाणें त्यांचा राजरोस विक्रय केला असतांहि जीस बाध येत नाहीं, ताडावर चढणाऱ्या काळ्या माणसांचीं ज्यांच्या अपूर्व ज्ञानदृष्टीनें माकडें बनून जे त्यांवर छऱ्यांची सहज लीलेनें कृपा करतात, अशा अत्यंत सुशील, अत्यंत दयाळु,

अत्यंत धार्मिक, 'एका गालावर मारली तर दुसरा गाल पुढें करणाऱ्या' देवाच्या आवडत्या पवित्र लोकांपुढें आमच्या विचाऱ्या हतभाग्य हिंदूंचा काय पाड? तसेच आह्मी भेकड! खरेंच, वसईच्या किल्ल्यावर भगवा झेंडा रोंवतांना भेदारलेल्या एखाद्या पेद्रूला,[1] किंवा सुमारें शंभर वर्षांपूर्वी वडगांव मुक्कामीं दांतीं तृण धरावयास लावलेल्या एखाद्या टोपीवाल्यास विचारलें असतें तर तो आमच्या भेकडपणाचें फार छान वर्णन करता? फार लांब नको; 'नाना' ह्मणतांच + + वर कांटा उभा राहिलेले अजूनहि शूर साहेब शेंकडों सांपडतील! असो. तेव्हां अशा धडधडीत सर्वांदेखतां झालेल्या व होणाऱ्या गोष्टीहि ज्या दुरभिमानांध लोकांस दिसत नाहींत त्यांस काय ह्मणावें? ही तर दुराग्रहाची व मूर्खत्वाची पराकाष्ठाच; पण जे आमचे लोक अशा फू करतां उडून जाणाऱ्या पोकळ शब्दपांडित्यानेंहि फसतात त्यांची तर केवढी बहादुरी! आमच्या लोकांत सध्यां जर स्वतःविषयीं समजुती पाहिल्या तर अशा आहेत— 'अहो! आह्मी कसचे लोक हो! आह्मी का शूर आहों, का विद्वान् आहों, का सदाचारी आहों, कां सद्धर्मी आहों? आमचे पूर्वज तरी कसले? त्यांनीं ग्रीक व रोमन लोकांप्रमाणें राज्यें काबीज केलीं, का हल्लींच्या इंग्रेजांप्रमाणें आगगाड्या काढल्या, तारायंत्रें रोंवलीं, का कलाकौशल्य वाढविलें? काय केलें? आमचा धर्म काय, आमचीं शास्त्रें काय, आमचें ज्ञान काय? सगळें येथून तेथून वेडगळपणाचें! या सर्वांचा जेव्हां समूळ उच्छेद होईल तेव्हां कोठें हिंदुस्थानास कांहीं सुधारणुकेची कळा येऊं लागेल!' पाद्री भटांनीं, मेकॉलेसारख्या लहान तोंडीं मोठा घांस घेणाऱ्या अप्रयोजक ग्रंथकारांनीं, स्वभाषा धेडगुजरी बोलूं लागण्यापुरतें किंवा गिचमीड फर्डेशाई सही करण्यापुरतेंच इंग्रेजीचें चुटपुटतें ज्ञान मिळवून तेवढ्यावरच मोठ्या पांडित्याचा आव घालणाऱ्या आमच्या अलीकडच्या नव्या विद्वानांच्या कोल्या समजुतींनीं, वगैरे जीं वरच्यासारखीं कुत्सित मतें चोहोंकडे माजविलीं आहेत त्यांचें पूर्ण खंडन केल्यास एक स्वतंत्र ग्रंथच बनेल; पण तसें करणें प्रस्तुत स्थलीं इष्ट नसून तें कोणत्याहि सामान्य समजुतीच्या मनुष्यास मोठेंसें कठिण पडेल असेंहि वाटत नाहीं; यास्तव त्यासंबंधें येथें कांहीं विशेष लिहीत नाहीं. आमच्या लोकांस इतकेंच सुचवितों कीं, केवळ स्वार्थसाधू मिशनरी लोकांच्या किंवा अजाणत्या हटवादी इंग्रेज ग्रंथकारांच्या ह्मणण्यावरून आपली पारख करून घेणें हें अप्रयोजकपणाचें व आपणांस अत्यंत लज्जास्पद असें कृत्य आहे. वरील साहसी लोकांचें अज्ञान व दुराग्रह त्यांच्या पदरांत घालून त्यांस चीप न बसवितां जर त्यांच्या अद्वातद्वा बडबडीस आपण उलटी मानच डोलवीत गेलों, तर मग आपण जसे शरीरानें परकी लोकांचे गुलाम झालों आहों तसेच मना-

१. हा शब्द Pedro या फिरंगी शब्दापासून निघाला कीं काय कोण जाणे? असला तर वरच्या प्रसंगीं कदाचित् निघाला असेल.

नेंहि झालेले होऊं ! फार काय, पण आपले धनी इंग्रेज हे दुसरें मोठें स्वातंत्र्य जें आपणांस उदारपणानें देत आहेत त्यासहि आपण पात्र नाहीं असें होईल ! आपले दोष आपणांस जितके कळतील तितके चांगलेच, व ते जो कोणी आपणांस दाखवील तो मोठा दावेदारी असला तरी सुद्धां मनःपूर्वक आभार मानण्यासच तो योग्य होय, हें आह्मी पक्कें जाणतों; पण जो दुष्ट आमच्या सर्व गुणांसहि दोषांचें रूप देऊन व दोषांचें अत्युक्तीनें वर्णन करून आह्मी राक्षसतुल्य किंवा पशुतुल्य आहों असें जगास भासवूं पाहील त्याचे चांगले दांतच पाडणें आपणांस उचित आहे. पण तसें करण्याचें टाकून देऊन आपल्या स्वदेशाच्या निंदेतच जर आपणांस पुरुषार्थ वाटूं लागला व त्या मूर्खांचे आपण उलटे साह्यकारी झालों, तर मग आपल्या सत्यनिष्ठेची व शहाणपणाची पराकाष्ठाच झाली असें ह्मटलें पाहिजे ! आमच्या विद्येविषयीं, आमच्या धर्माविषयीं, आमच्या इतिहासाविषयीं जर यथार्थ ज्ञान कोणास हवें असेल, तर तें त्यानें मेकॉलेपासून, ज्यांचें इकडील भाषांचें ज्ञान एवढें अगाध होतें कीं, Ali-Nagor or Port of God असें आपल्या सर्वज्ञतेच्या घमेंडींत अप्रयोजक भाषांतर करून ज्यांनीं आपलें अज्ञान व घाडस साऱ्या जगास विदित मात्र केलें,—किंवा मुंबईच्या डॉक्टर विल्सनसारख्या हिंदुधर्माचें, मुसलमानी धर्माचें, पारशी धर्माचें एका सपाट्यासरसें एकदम खंडन करून देणाऱ्या अपूर्व विद्वान् मिशनरीपासून, किंवा मॉरिससारख्या छोटेखानी इतिहासकारापासून तें करून घेणें ह्मणजे आमच्या परसांत भाजी कोणती आहे किंवा तळघरांत भांडीं कोणतीं आहेत तीं समजून घेण्यास इंग्लंडांतल्या किंवा अमेरिकेंतल्या एखाद्या मोठ्या प्रसिद्ध भूगोलवेत्याकडे जाण्यासारखें हास्यास्पद होय ! ज्या इंग्लिश लोकांचा एवढा बाणा आहे कीं, त्यांच्या भाषेचा नुसता उच्चारहि एका इंग्रेजाशिवाय दुसऱ्या कोणास—प्रत्यक्ष स्कॉटलंडांतल्या त्यांच्यांत हरहमेश वागलेल्या मनुष्यासहि—साध्य नाहीं, त्यांसच एवढेंहि कळत नाहीं कीं हजारों कोसांवरून दूर आह्मी हिंदूंच्या भाषांविषयीं, विद्येविषयीं, धर्माविषयीं, किंवा अत्यंत हल्ली गोष्टींविषयींहि बेधडक हवा तसा मजकूर लिहितों हें काय ? हा केवढा चमत्कार आहे ! आणि अशा पोरकट बडबडीसहि जे आह्मी महाप्रसाद ह्मणून झेलतों त्या आमच्या शहाणपणाची तर किती तारीफ करावी !

३. गेलीं पंचवीस तीस वर्षें वरील लोकांनीं, विशेषतः मिशनरींनीं, बरेंच राज्य भोगलें. त्यांनीं ह्मणावी ती पूर्वदिशा होऊन त्यांच्या पोरकट गोष्टींनीं भरलेल्या पवित्र शुभवर्तमानाची बरीच चोहोंकडे भरभर झाली. येशूख्रिस्ताच्या कळपांत जरी महार, मांग वगैरे हीन जातींतले लोकच काय ते शारीर भुकेनेंच केवळ प्रेरित होत्साते शिरले, तरी एकंदर सुशिक्षित ह्मणविलेल्या लोकांच्या मनांत ख्रिस्ती धर्माविषयीं बराच अभाव होता. त्या धर्माविषयीं व तो आचरणाऱ्या सुधारलेल्या इंग्रेज लोकांविषयीं त्यांच्या

ठायीं एकंदरींत मोठी आदराची बुद्धि वागत असे. इंग्रेजी झटलें कीं त्यांत सर्व गुणांचा समावेश झाला. त्यांस इकडील सर्व गोष्टींची मोठी लाज वाटूं लागली. इंग्रेजीशिवाय तर पाणीहि प्यावयाचें नाहीं, तितकें अनुकूल नसलें तर निदान मधून तरी इंग्रेजी शब्द बोलण्यांत जितके आणवतील तितके आणावयाचे, निदानपक्षीं ग्यारी, घोरा, गारव अशी तरी इंग्रेजीची उगीच झांक दाखवायाची; मराठी विसरून गेल्यांत मोठी प्रतिष्ठा; गाडींत बसलें असतां कोचमिलास खतःच्या पदवीस चढवून जातीनें सारथ्य; पाटलून, बूट वगैरे मिरविण्यांत कांहीं विलक्षण थोरपण; किंबहुना याहूनहि निंदास्पद व लज्जास्पद दुसरे विलायतेकडून इकडे आलेले ढंग करण्यांत मोठें भूषण;–इत्यादि प्रकार त्या वेळेस विशेष चालू असत. ते अजूनहि अगदीं मोडले नाहींतच; पण ते आतां अंमळ जुने झाल्यामुळें व एकंदर लोकांत ज्ञान व समजूत हींहि अंमळ जास्त वाढल्यानें, त्यांचें प्राबल्य आतां पहिल्यासारखें नाहीं. सुमारें आठ दहा वर्षांमागेंच इंग्रेजी या नांवाला जितका मान होता तितका आतां नाहीं. त्या वेळच्या पत्रांतून, पुस्तकांतून त्या वेळची स्थिति स्पष्ट दिसते. माजी मोरोबा कानोबा, स्मॉलकाज कोर्टाचे जज्ज, यांनीं सुमारें दहा अकरा वर्षांपूर्वी 'घाशीराम कोतवाल' या नांवाची एक कादंबरी रचली होती; ती वर सांगितलेल्या पुस्तकाचाच एक मासला होती. हिचा सध्यां विशेष प्रचार नाहीं; तरी एवढ्या मोठ्या हुद्देदारानें ती केली असल्यावरून तिचें नांव अजून पुष्कळांस माहीत असेल. हींत हिंदूंस व विशेषतः महाराष्ट्राकडील लोकांस, रानटी, मूर्ख, वेडगळ असे दाखविण्याचा ग्रंथकाराचा उद्देश होता; व शहाणपणा काय तो इंग्रेजांत! फार तर काय, पण जे मुसलमान अजूनहि अक्षरशून्य, मंद असे सर्वत्र प्रसिद्ध आहेत त्यांचें सुद्धां ज्ञान आपल्या लोकांपेक्षां विशेष दाखविलें आहे. या कादंबरीवर (सदरील ग्रंथास एवढें नांव तरी केवळ मुरवतीस्तवच द्यावयाचें!) शालापत्रकांत[1] आमच्या एका कालेजकर मित्रानें फार नामी चरचरीत अशी एक टीका केली आहे; ती सर्व रसिक व देशाभिमानी अशा आमच्या वाचकांस लक्षपूर्वक वाचण्यास आम्ही शिफारस करतों. असो. अशाच प्रकारचें पण अंमळ निराळ्या तऱ्हेचें, असें दुसरेंहि एक पुस्तक सहा सात वर्षांमागें प्रसिद्ध झालें आहे. तें 'पुण्याचें वर्णन' होय. हें पुस्तक पुष्कळांनीं वाचलें असेल; पण लिहिण्यास फार खेद वाटतो कीं, या महा विद्वान् व अत्यंत थोर ग्रंथकारांची जशी शोभा करणें हावी होती तशी कोणीं केली नाहीं! यांची विशेष माहिती आह्मांस बिलकूल नाहीं; पण त्यांच्या प्रस्तुतच्या ग्रंथावरूनच हे मिशनरी लोकांच्या हाताखालीं शिकले असून त्यांचा उपदेश मनांत पूर्ण बिंबलेल्या शिष्यवर्गापैकीं आहेत हें स्पष्ट दिसतें. असें गुरुमुख असल्याखेरीज 'बेबलचा बुरूज;' सहा दिवस सतत खपून देवानें पृथ्वी घडली व सातव्या

१ फेब्रुवारी १८६६.

दिवशीं दमून विश्रांति घेतली; आमच्या आईबापांच्या तन्हेवाईक अपराधाबद्दल आम्हांस भलत्याच ठिकाणीं भयंकर दंड; नोहाच्या एका पोरानें आफ्रिकाखंड, दुसऱ्यानें युरोप, तिसऱ्यानें एशिया, अशीं तिन्ही खंडें तिघांनीं वसविलीं (अमेरिकेची व पासिफिक महासागरांतील बेटांची काय वाट झाली असेल ती असो !); पवित्र शास्त्रांतील देव सहाव्या दिवसाच्या शेवटीं खोरें कुदळ ठेवून निजला तो सार्वजनिक पुनरुत्थानाच्या दिवशीं पुनः उठणार, तोंवर सगळे पापपुण्याचे खटले तसेच तुंबवून ठेवून त्या एका दिवशीं फडाफड कोट्यानकोटी मनुष्यांचा निवाडा आपण व आपला प्रियपुत्र असे बापलेक मिळून करणार; तेव्हां देवाचे लाडके ख्रिस्ती लोक भराभर आपआपलीं थडगीं फोडून आयतेच बाहेर निघतील; (पण हिंदूंसारखे दहन पावलेले, पारशांसारखे गिधाड, घारी, यांच्या पोटांत राहिलेले, तसेच समुद्रांत बुडालेले, वाघांनीं वगैरे खाल्लेल्या लोकांची त्या वेळेस 'आकाशांतला बाप' काय तडजोड काढील ती काढो !) इत्यादि खऱ्या धर्माचीं रहस्यें पुरतेपणीं कळून आमच्या ग्रंथकर्त्यांच्या हृदयांत एरवीं एवढा प्रकाश कसा फांकता ? सद्धर्माची एवढी बळकट प्रतीति घडली असतां येशूच्या शरीराचें व रक्ताचें पवित्र भोजन करून मोठ्या सुदैवानें हातीं लागलेलें खरें मौल्यवान् मोतीं, ते कां स्वीकारीत नाहींत कोण जाणे ! तसें होऊन जर कोठें मेंढपाळ बनले असते, तर सांप्रत पुस्तकांत जो त्यांनीं चारगटपणा केला आहे तो त्यांस पुरतेपणीं शोभता, व ज्या हतभाग्य वाचकांकरितां त्यांनीं सद्धर्माचे विचार इतके भरपूर जिकडे तिकडे ओतून दिले आहेत त्यांच्या मनावरहि ते कांहीं अंशीं तरी ठसते. पण तसें न झाल्यामुळें वाचकांस सहजच असा अंदेशा येतो, कीं आपल्या उपदेशकांस फसविल्याबद्दल त्यांचें कांहीं तरी समाधान करण्याकरितां, किंवा वर सांगितलेल्या भोजनाची मोकळीक त्यांच्या प्रसादानें आपणास मिळाली अशा कृतज्ञत्व बुद्धीनें, अगर डॉक्टर उईलसन प्रभृति आपल्या सद्धर्मी आश्रयदात्यांस वरचेवर हंसवून त्यांनीं पुष्कळ प्रती घेतल्यासारखी त्यांची कांहीं तरी सेवा करावी, असे उद्देश मनांत धरून हे वर्णनकर्ते ग्रंथरचना करण्यास बसले असावे ! कसेंहि असो; पण हें अमोलिक पुस्तक वाचलें असतां एक मोठीच गोष्ट मनावर पक्की ठसते. ती ही कीं, ख्रिस्ती शास्त्राचें अध्ययन केलें असतां 'मोलवान मोतीं' हातीं लागून बाकीचे सर्व धर्म एकदम कस्पटासारखे भासूं लागतात. हा 'मोलवान' लाभ तर आहेच; पण बुद्धीची अतोनात तीव्रता प्राप्त होऊन सर्वज्ञतेचीहि थोडी बहुत छाया मनुष्यावर पडते ! राज्यव्यवस्थेचें, सैन्यव्यवस्थेचें, शहरच्या मांडणीचें वगैरे पूर्ण ज्ञान एकदम होऊन जिकडे पहावें तिकडे चुकाच चुका मनुष्याच्या नजरेस येऊं लागतात ! अरेरे, काय थोड्यानें गेलें ! पेशव्यांनीं एवढें सैन्य ठेवावयाची, एवढे गुणी लोक पदरीं बाळगायाची वगैरे व्यर्थ खटपट न करतां विलायतेहून एक दोन पाद्री जर आणवले असते, तर त्यांनीं असे दिव्य शिष्य तयार करून

दिले असते, कीं त्यांच्या हातून फत्ते ह्मणून झाल्याशिवाय राहिलीच नसती ! एका चार पांच वर्षांत त्यांनीं त्यास युद्धकलेंत, राजनीतीच्या कामांत, शहरांच्या बांधणीच्या कामांत वगैरे असे तरबेज केले असते कीं, त्यांनीं कोणाची मात्रा चालूं दिली नसती ! नाहीं तर आतां पहा. पर्वतीचें तळें काय बांधलें आहे, ते साडेतीन शहाणे काय, त्यांच्या मसलती काय, पेशवे किती अप्रयोजक, अंगास तीन चिमट्या राख लावून पळालेंच तर कोणत्या उद्देशानें पळावें ? उघडे बोडके होऊन पावसांत जाऊन वेड्यासारखें बसूं नये एवढेंहि त्यांस कळलें नाहीं ! ! असो; एकंदरींत आमच्या विचाऱ्या पेशव्यांच्या राजधानीचें वर्णन करण्यास एवढ्या खिस्तभक्ताखेरीज दुसरा कोणी मिळाला नाहीं याचें आह्मांस फार वाईट वाटतें. तसेंच चमत्कारहि असा वाटतो कीं, ज्यानें पांच सहा वर्षें या उद्योगामागें लागून एवढी जुनी माहिती मिळविली त्यानें पेशव्यांविषयीं, नानाफडनवीसाविषयीं वगैरे प्रस्तुत ग्रंथांत दाखल केलेल्या पोरकट, अप्रयोजक गोष्टींखेरीज दुसऱ्या कोणत्याच गोष्टी बिलकूल ऐकल्या नाहींत ! पण आमच्या शहाण्या वर्णनकर्त्यास बहुधा असें वाटलें असावें कीं, स्वतः मूर्तिपूजक असून त्या अत्यंत घोर पापमार्गाचे पुरस्कर्ते असल्यामुळें पवित्र शास्त्राच्या वचनाप्रमाणें जे अक्षय नरकाचे धनी झाले अशा महापातकी लोकांचें, तसेंच शेषाच्या मस्तकावर पृथ्वी, राहु केतु चंद्रसूर्याचे वैरी, पृथ्वी स्थिर, सूर्य फिरणारा असें मानणाऱ्या महामूर्ख लोकांचें, काय वर्णन करावयाचें आहे ! हल्लींच्या काळचें एखादें पोर त्यांस ज्ञान शिकविण्यास समर्थ झालें असतें ! असें वाटून जगाचे खरे कल्याणकर्ते, अकटो विकट ज्ञानसंपन्न असे मिचेल साहेब, गार्डनर साहेब, व जोतीबा फुले प्रभृति त्यांचे सच्छिष्यमणि अशांच्या नांवांनीं आपल्या पुस्तकास पवित्र करून मधून मधून पवित्र शास्त्रांतील अति सुंदर ओंव्या 'वेबलच्या बुरुजा' सारखे अत्यंत सरस दृष्टांत, आमच्या ग्रंथकारानें मोठ्या प्रेमानें मधेमधें गोंवून दिले असावे ! असो; एकंदरींत हा ग्रंथ वाचला असतां मिशनरी लोकांच्या शिक्षणानें बुद्धि केवढी फांकते, सत्यनिष्ठा केवढी वाढते, वगैरे गोष्टी स्पष्ट दिसून येतात. तसेंच वरील दोन्ही ग्रंथांवरून इंग्रेजी विद्येचा फैलाव होऊन एकंदर लोकांच्या मनाची पोंच किती वाढली, व त्यांचें ज्ञान किती खोल आहे, याचा चांगला अजमास होतो !

४. येथवर जें वर लिहिण्यांत आलें आहे त्याचा चांगला विचार केला असतां आमच्या देशाच्या इतिहासाची एकंदर सर्व लोकांस व आमची आह्मांसच किती गोडी लागण्याचा संभव आहे हें सहजच लक्षांत येईल. उघड आहे; उद्यां जर एखाद्यानें मोठे परिश्रम करून नीग्रो लोकांचा इतिहास जगांत प्रसिद्ध केला तर तो घेणारे व वाचणारे किती मिळतील बरें ! वस्तुतः पहातां वरचाहि दाखला अगदीं बरोबर आहे असें ह्मणतां येणार नाहीं. नीग्रो लोकांविषयीं सर्वांचा, व विशेषतः इंग्रेजांचा, जितका कळवळा

आहे तितका त्यांशीं समवर्ण व एकंदर जगाच्या मतें त्यांच्याच योग्यतेचे असे जे आह्मी त्यांविषयीं आहे कीं नाहीं हें कोणालाहि सांगायाला नको. ज्या पार्लमेंटानें नीग्रो लोकांच्या दास्यमुक्त्यर्थ कोट्यावधि रुपये खर्चले तींतच फॉसेट, ब्राइट या वक्त्यांच्या भाषणांचा किती जयजयकार होतो हें सर्वांस माहीत आहेच! नामांकित कवि लार्ड बायरन् यांनीं त्याच सभेंत एक विनोदाचें भाषण केलें तें प्रकृत स्थलीं फार समर्पक आहे. ऐरिश लोकांच्या वतीनें कोणी सभासद तेथें असतां हे एकीकडे वळून आपल्या जवळच्या लोकांस ह्मणाले, "या ऐरिश लोकांचा वर्ण गोरा आहे हें त्यांचें केवढें दुर्भाग्य आहे! हेच जर काळे असते तर त्यांच्या मुक्त्यर्थ याच सभेनें केवढा खटाटोप केला असता!" असो; तर याप्रमाणें साऱ्या जगांत अज्ञान, दुराचारी, वेडगळ ह्मणून जे निवडले गेले त्यांविषयीं माहिती कोण करून घेतो? कोणीं घेतलीच, तर मेकॉले, हॉल यांच्याप्रमाणें केवळ उपहास व तिरस्कार करण्याच्या बुद्धीनेंच घेतात! मेकॉले साहेबांनीं 'लॉर्ड क्लाइव'च्या आरंभीं वरच्याच गोष्टीविषयीं मोठें आश्चर्य दाखविलें आहे, व क्लाइव प्रभृति वीरांनीं येथें जे मोठमोठे पराक्रम केले ते कोणासहि वाचावेसे कां वाटूं नयेत याचें कारण आह्मांस बिलकूल समजत नाहीं असें ते ह्मणतात. पण कारण उघडच आहे. त्यांनींच स्वतः आपल्या निबंधांत जर हिंदूंस परम नीच, परम दुर्बळ असे सिद्ध करून दाखविले आहेत, तर अशा तृणप्राय लोकांवर मोठे अद्‌भुत जय मिळविले ह्मणून नवल कसचें असें अर्थातच त्यांचे शहाणे देशबांधव समजत असतील! आबिसिनियाची मोहीम, अशांटी लोकांची लढाई या जितक्या प्रेमानें लोक वाचतील तितक्याच प्रेमानें अर्थात् हिंदुस्थानचाहि इतिहास वाचतील. आणि हा लोकांचा तिरस्कार त्यांच्या दोन्ही निबंधांनींहि तिळमात्र तरी कमी झाला असेल असेंहि पण आह्मांस वाटत नाहीं. असो. तर याप्रमाणें आमच्या देशाचा इतिहास परकी लोकांस केवळ तिरस्कारास्पद आहे. आणि आमच्या देशाच्या संबंधें त्यांचे स्वतःचे पराक्रम वाचण्याचीहि जर त्यांस हौस वाटत नाहीं, तर खुद्द आमच्याच संबंधाचा इतिहास त्यांस किती रुचेल हें सांगायासहि नको! हा प्रकार सर्वत्र दृष्टीस पडतो. 'हिंदुस्थानचा इतिहास' असें ठळठळीत नांव वर घातलेल्या ग्रंथांतून बहुतेकांत खुद्द हिंदुस्थानाविषयीं किती माहिती असते हें सर्वांस ठाऊक असेलच! उदाहरणार्थ सध्यां चोहोंकडे चालू असणारा मारिस साहेबांचा इतिहास पहा. या साहेबांनीं अगदीं मूळापासून तों तहत इ० सन १७३९ पर्यंतचा इतिहास सरासरी तीस पसतीस पानांत ओढून टाकून बाकीचा सर्व इंग्रेजांच्या मजकुरानें भरला आहे. पेश्व्यांचें तर त्यांत बिलकूल नांव सुद्धां नाहीं, आणि ज्या मुसलमानी घराण्यांनीं हिंदुस्थानावर कित्येक वर्षें प्रभुत्व भोगलें त्यांची हकीकत कोणाची दोन ओळी, कोणाची चार ओळी देऊन मनुष्याचा आपल्या कीर्तिविषयींचा गर्व किती व्यर्थ आहे हें प्रकट

दा. क. 1399

केलें आहे! अकबराचा पन्नास वर्षांचा इतिहास एका पानांत भरला आहे. आमच्या शिवाजीची दशा तर कांहीं पुसूंच नये! तो चोर होता येथून आरंभ करून त्यानें केलेला प्रसिद्ध खून मात्र सविस्तर वर्णन केला आहे, आणि बाकीच्या गोष्टींची कल्पना करणें वाचकांवरच सोंपवून दिलें आहे. असा एकंदर मजकूर सुमारें दोन अडीच पानें आहे. पण तेवढ्यांत या विद्वान् इतिहासकारानें शंभर चुका केल्या आहेत! शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दहा वर्षें अगोदर ओढला आहे, अफझुलखानास तीन वर्षें उशीरानें मारविला आहे, संभाजीचा वध वगैरे गोष्टी शिवाजी जिवंत असतांच घडविल्या आहेत! बरें एवढी घाई व इतक्या चुका करून साहेब पुढें धांवले तरी कोठें? अर्थात्च मेजर लॉरेन्स, कर्नल मॉनसन, लेफ्टेनंट--अशा महावीर्यशाली शूरांचे पोंवाडे गाण्यास! खरेंच, 'स्वजातिर्दुरतिक्रमा'! तेथें कोणाचा उपाय आहे!! परवां सहज 'पेनी सैक्लोपीडिया' नांवाच्या सर्वसंग्रहरूप ग्रंथांत मराठ्यांचा इतिहास कसा काय दिला आहे म्हणून पाहिलें. तों कांहीं अपूर्वच माहिती मिळाली! बाळाजी विश्वनाथाचा पुत्र बाळाजी बाजीराव; धाकट्या माधवरावाचें खरें नांव शिवाजी माधवराव; त्याचा पुत्र दुसरा बाजीराव!!! कां, कशी खाशी माहिती आहे! पण इतकें कशाला, प्रत्यक्ष आमच्या युनिवर्सिटींतहि हा प्रकार दृष्टीस पडतो. बी. ए. सारख्या परीक्षेस मराठ्यांच्या इतिहासावर असे प्रश्न असतात--'पेशव्यांची वंशावळी लिहा,' 'पानपतची लढाई केव्हां, कोठें व कोणामध्यें झाली? तिचे परिणाम काय झाले?'-केवढे जाडे प्रश्न हे! आह्मांस खचीत वाटतें कीं, असे प्रश्न देणाऱ्या परीक्षकांपेक्षां आमच्या मराठी शाळेंतल्या 'महाराष्ट्रदेश' शिकणाऱ्या मुलांस मराठ्यांच्या इतिहासाची माहिती पुष्कळ जास्त असते. असो; तेव्हां एकंदरींत आमच्या देशाकडे इंग्रेजांचें फारच दुर्लक्ष व फारच तिरस्कार! मेकाले साहेबांनीं आपल्या दोन निबंधांत जसें केलें आहे त्याप्रमाणें जेव्हां त्यांस हरबऱ्याच्या झाडावर चढवावें, तेव्हां एतद्देशीय इतिहासाचा वगैरे ग्रंथ त्यांस पहावासा वाटतो. आमच्या एका कॉलेजबंधूनें पांच सहा वर्षांपूर्वी येथील 'यंग् मेन्स् असोशियेशन्' (ही सभा अजून आहे कीं नाहीं हें बाहेरचे लोकांस सांगायाला नकोच!) पुढें 'ग्रांट डफकृत मराठ्यांच्या इतिहासावर टीका' या नांवाचा एक उत्कृष्ट निबंध वाचला, त्यांत त्यानें एका इंग्रेजी पत्रांतून घेतलेली सदरहू साहेबांची हकीकत वाचली. ती तर आमच्या वरच्या लेखास फारच मजबुती आणते. तींत मराठ्यांच्या इतिहासकारास आपला ग्रंथ छापून बाहेर काढण्यास केवढा भगीरथ प्रयत्न पडला-किती छापखान्यांचें आर्जव करावें लागलें, किती मोठमोठ्या लोकांच्या भिडा खर्चीं घालाव्या लागल्या-हें सविस्तर लिहिलें आहे. या प्रसंगींचा मरे (छापखानेवाला) व डफ यांचा संवाद मोठा लक्षांत ठेवण्यासारखा झाला. तो डफ साहेबानें स्वतः असा लिहून ठेवला आहे—"त्यानें मला सांगितलें कीं,

जर तुह्मी ग्रंथाचें नांव बदलाल तर आह्मी तो छापूं. मीं झटलें कीं, हा ग्रंथ मराठ्यांची बखर आहे, यास्तव 'मराठ्यांचा इतिहास' हेंच नांव त्यास योग्य आहे. तो झणाला, तें खरें; परंतु मराठ्यांची यत्किंचित् तरी माहिती कोणास आहे ? त्यास मीं उत्तर दिलें, 'हें पुस्तक करण्याचें कारण काय तें तेंच, मराठ्यांची माहिती लोकांस फार थोडी आहे.' मरेनें उत्तर केलें, 'ठीक्, तुह्मी झणतां तें खरें आहे; पण माहिती असावी अशी तरी इच्छा कोणास आहे ? तुह्मी या ग्रंथाचें नांव 'मोगलांचा पाडाव किंवा इंग्रेज लोकांचा उत्कर्ष' असें ठेवल्यास तें ठीक होईल. परंतु 'मराठ्यांची बखर ?' छे, हें पुस्तक कोणी विकत घेणार नाहीं !' मरे साहेबांचें भाकीत अक्षरशः खरें झालें. हिंदुस्थान लुटून जे गब्बर झाले त्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सच्या सभासदांनींच मुळीं चाळीस प्रती घेतल्या. पण त्या पावल्याचें उत्तरहि पाठविलें नाहीं. मग इतर लोकांत या बखरीचा किती खप झाला असेल हें सांगावयासच नको. डफ साहेब शेवटीं लिहितात, "हा जो मी एवढा खटाटोप केला त्यांत मला कवडीचाहि फायदा न होतां उलटा ११७०० पेक्षां जास्ती रुपयांस मात्र मी बुडालों."

५. वरील गोष्टींवरून इंग्रेजांस आमच्या देशाचें ज्ञान कितपत आहे व तें मिळविण्याची इच्छा तरी कितपत आहे हें आमच्या वाचकांस पुरतेपणीं कळल्यावांचून रहाणार नाहीं. तरी त्याबद्दल त्यांस मोठेंसें नांव आह्मांस ठेवतां येत नाहीं. ज्या त्या प्रकरणीं मोठी घमेंडी मारण्याची जी त्यांस संवय लागून गेली आहे तिचा अप्रयोजकपणा वर दाखल केलेल्या गोष्टींवरून उघड दिसेल खरा; पण ज्या देशाशीं ते अगदीं अपरिचित, जेथील रीतभात, भाषा, लोकांच्या समजुती वगैरे त्यांच्याहून फारच वेगळ्या त्याचा इतिहास वाचण्याची त्यांस गोडी कशी लागावी ? 'अहिल्याबाई' 'माधवराव' हीं नांवें जशीं आह्मांस गोड लागतात, तशीं 'Aila Bye,' 'Madhoo Rao'—ज्यांचा उच्चारहि त्यांच्या भाषेनें होणें कठिण, व झाला तरी कानास कर्कश लागणारा,—तीं त्यांस तशीं न लागून त्यांचा त्यांस त्रास येत असल्यास नवल काय ? असो, तर न्यूहॉलंडचा किंवा अमेरिकेचा इतिहास जसा आह्मांस तसाच आमचा इतिहास त्यांना होय; व यास्तव त्यांची त्यावर अप्रीति असल्यास त्यांत कांहीं विलक्षण नाहीं. पण हीच अप्रीति खुद्द आमच्यांतच असल्यास मग तर काय झणावें ? आमच्या देशचे प्रख्यात वीर होऊन गेल्यास अजून शंभरहि वर्षें होऊन गेलीं नाहींत—खुद्द आमच्या आमच्या आठवणींतहि आमचें राजतेज शेवटच्या धूमावस्थेंतून एकाएकीं प्रज्वलित होऊन त्याच्या प्रचंड लोळानें सगळ्या हिंदुस्थानास धाक दाखविला, व सगळें जग त्याकडे आश्चर्यानें स्तब्ध होत्सातें पहात राहिलें ! तरी आमची देशप्रीति व बुद्धीची तीव्रता केवढी ! हवालदील होऊन एकमेकांस साशंक विचारतों, काय हो आह्मी कसचे लोक—किती भित्रे, केवढे भागूबाई, आह्मांस हवें त्यानें खुशाल तुडवावे ! आमच्यांत

वीर असे हाका मारायला झाले कधीं ! आमचे वीर झटले झणजे बाजीरावासारखें बंदुकीच्या बाराला भिणारे ! मेकॉले साहेबांनीं बकऱ्यांची उपमा आह्मांस दिली आहे ती ठीक ! ! वर शौर्याच्या संबंधानें आमच्या तर्कशास्त्राचे तारे तुटले ! तसेच प्रत्येक गोष्टीच्या संबंधानेंहि हरहमेश तुटत असतात ! मेकॉले, मिल्ल, पाद्री साहेब यांच्या सुविचारांचें अखंड सेवन केल्यानें बुद्धींत अतोनात प्रकाश कोंदून तो वरील रूपानें लोककल्याणार्थ बाहेर पडतांना पुष्कळांनीं पाहिला असेल; किंवा त्यांचें स्थिर रूप कोणास पहाणें असल्यास तो हेतु मागें सांगितलेले दोन अनुपम ग्रंथ सहज पूर्ण करतील. एकंदर हिंदु लोकांचा थोडक्यांत पराभव करून टाकून अल्पायासानें अरण्यपांडित्य ज्यास मिरविणें असेल त्यास वरील कोठारांत हवीं तितकीं अपूर्व शस्त्रास्त्रें सांपडतील ! असो; उपाय काय ? सांप्रतच्या स्थितींत जाळ्यांत अडकलेल्या वाघाप्रमाणें जो जो मानभंग होईल तो तो आमच्या देशास सोसणें भाग आहे. मेकॉलेच्या देशबांधवांची आमच्या काळ्या लोकांवर जशी सहज लीलेनें चाबकांची, छऱ्यांची वगैरे कृपा होते, तशीच त्यांच्यासारख्या महापंडितांची आमच्या विद्यादिकांवरहि होते हें अनुरूपच आहे ! अशांच्या फर्डेशाईपुढें आमच्या हिंदु लेखणीनें टिकाव धरावा हें मुळींच संभवत नाहीं; तरी तिच्या सपाट्यानें अगदीं गतप्राणच न होऊन ज्यांच्यांत अजून थोडी धुगधुगी तरी उरली असेल त्यांस जिववण्याचा यथाशक्ति यत्न करणें आह्मांस योग्य वाटतें. यास्तव आह्मी अशांस इतकेंच सांगणार कीं, बाबानों ! ज्यांच्यांत पाणिनि, वाल्मीकि, कालिदास, आर्यभट्ट, भास्कराचार्य, गदाधरभट्ट, वगैरे असंख्यात धेंडें निपजलीं, त्या लोकांची केवळ मूर्खांतच गणना करणें कठिण आहे; ज्यांच्यांत रामपांडवादिक नाहीं धरले तरी विक्रमादित्य, इतिहासप्रसिद्ध पोरस, शिवाजी, बाजीराव, यशवंतराव, रणजितसिंग, विजेच्या गतीनें सैन्यासहवर्तमान धांवणारा परवांचा शूर, असे तरवारबहाद्दर होऊन गेले ते केवळ 'मेंढ्या' च असतीलसें नाहीं; तसेंच ज्यांच्यांत तुकाराम, रामदास, किंवा रामशास्त्री, माधवराव असे निष्पाप महात्मे; व रमाबाई, अहल्याबाई, अशीं भूतलास भूषित व पवित्र करणारीं स्त्रीरत्नें निर्माण झालीं, त्याच लोकांस अघोर, पातकी, दुराचारी, निर्दय झणणें झणजे शुद्ध दांडगाई आहे; आणि जो धर्म सर्वांत प्राचीन असून शंकराचार्यांसारख्यांनीं ज्याच्या रक्षणार्थ आपली बुद्धि खर्चली तो मेकॉले, रेवरेंड विलसन किंवा जोतीबांसारखे त्यांचे कल्याण, अशांच्या बडबडीनें व शुष्क तर्कांनीं ऱ्हास पावेल हें मुळींच संभवत नाहीं ! वरील गोष्टी इतक्या धडधडीत स्पष्ट दिसत असतांहि आमच्या लोकांस त्या अलीकडे दिसेनाशा झाल्या आहेत; हें तर काय पण आपणांस अधिकाधिक कुत्सित झणून घेण्यांतच पुष्कळांस कांहीं विलक्षण प्रतिष्ठा वाटते. 'हिंदु' हा शब्द 'मूर्ख' शब्दाशीं केवळ समानार्थच होय असें ते समजतात, आणि त्यांतून जितकें

सुटून जातां येईल तितकें जाण्याचा बहुतेकांचा प्रयत्न दृष्टीस पडतो. हा हिंदुत्वाचा द्वेष कित्येकांच्या ठायीं इतका जागृत असतो कीं, पोषाक, रीतरिवाज, आचार वगैरे गोष्टींत सर्व प्रकारें इंग्रेजांचा नमुना उचलला असल्यामुळें त्यांच्या पूर्वस्थितीची एक मात्र काय ती मोठी खूण त्यांच्यांत राहिली असते— ती अर्थातच काळा रंग होय. हा जाण्याचा जर एखादा अपूर्व उपाय इंग्लिश लोक काढतील, तर आमच्या देशांत त्यांचे पुष्कळ नवे बंधु बनतील ! असो. तर याप्रमाणें दिवसेंदिवस आमची स्थिति मोठी विलक्षण होत चालली आहे. आमची मूळची स्थिति तर आह्मांला नकोच; पिसें लावून थोरांच्या मंडळींत शिरूं पहातों, पण ते तर आह्मांस नीग्रो, हॉटेंटॉट अशांच्याच पंक्तीस सरासरी बसवितात ! चोहोंकडे इंग्रेजी माजल्यानें आमची भाषा आह्मांस येईनाशी झाली, देशाभिमान सहजच विगलित झाला, कारण चांगलें ह्मणण्यासारखें आमच्यांत कांहींच नसून दोष ठेवण्यासारखेंच सारें पडलें, तेव्हां त्याचा अभिमान ह्मणजे दुरभिमानच होय ! धर्माची तर अशी लाज वाटूं लागली कीं, कांहीं बोलण्याची सोय नाहीं. तेव्हां एकंदरींत देश नाहीं, भाषा नाहीं, धर्म नाहीं, रीतरिवाज नाहीं, असें पोरकें राष्ट्र आह्मी सध्यांच्या स्थितींत झालों आहों ! असें झाल्यामुळें जो कोणी पूर्वीच्या संबंधाचें कांहीं चांगलें ह्मणेल तो एक वेडगळ तरी असेल किंवा मूर्ख तरी असावा असा एकंदर लोकांचा ग्रह होऊन गेला आहे. वर 'मराठ्यांच्या इतिहासावर टीका' ह्मणून एका निबंधाचा आह्मीं उल्लेख केला; त्याचा त्या माजी सभेनें व एकंदर लोकांनीं वर सांगितल्या प्रकारेंच आदर केला; ह्मणजे अशा निबंधांपासून तादृश कांहीं उपयोग नाहीं असा त्या ठिकाणींच लिहिणारास सभेचा अभिप्राय मिळून पुढें त्यानें तो छापला असतां आज सात वर्षें बहुधा जशाचा तसाच छापखान्यांत लोळत पडला आहे. पण इतक्यानेंच झालें नाहीं; ज्या रात्रीं तो वाचला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं 'ज्ञानप्रकाशां' त एकानें पत्र पाठवून सर्वांस कळविलें कीं, त्या निबंधांत कांहीं जीव नव्हता; आणि सभेंत अध्यक्षांनीं वगैरे जी त्याची कांहीं तारीफ केली तो सर्व प्रकार 'पंचतंत्रां' तील 'पूर्वं तावदहं मूर्खो..... सर्वं वै मूर्खमंडलम्' असा झाला ! असो; वरील गोष्टीवरून आपल्या इतिहासाची आमच्या लोकांस एकंदरींत किती गोडी आहे ती स्पष्ट दिसून येते. तसेंच आमच्यांत विद्वान् ह्मणविणारांसहि त्याची किती माहिती असते व माहिती करून घेण्याची इच्छा तरी कितपत असते, तीहि येथें विशेषतः सांगावयास पाहिजे असें नाहीं.

६. असो. प्रस्तुत निबंधांत ज्या विषयाचें विवेचन करावयाचें होतें त्याच्या नुसत्या प्रस्तावनेदाखलच सरासरी इतका मजकूर लिहावा लागला. आतां यापुढें मुख्य विषयावरच जर आणखी लिहूं लागलों, तर त्याचें जसें व्हावें तसें अध्ययन जरी अजून आमचें मुळींच झालें नाहीं, तरी सुद्धां पुष्कळ लिहिण्यास सांपडेल

आणि हा विषय हिंदूंसच स्वतः ह्मटला ह्मणजे मोठा मोहक पडला, यास्तव आरंभ केला असतां एकाएकीं तो सोडतां येणेंहि कठीण. पण आमच्या वाचकांस इतका लांब मजकूर वाचूनहि अगोदर कदाचित् कंटाळाच आला असेल अमें आह्मांस वाटतें; यास्तव इकडूनहि पहातां सांप्रत विषय, येथेंच तसा तहकूब ठेवणें आह्मांस बरें वाटतें. या खेपेस आमच्या देशाविषयीं ज्यांपासून माहिती आह्मांस मिळते,—कीं, जी बहुधा 'बाबावाक्यं प्रमाणम्' या न्यायानेंच आपण गृहीत धरून चालतों,—त्यांस ती खरी मिळण्याचा संभव किती, व यास्तव ती आपण किती जपून मान्य केली पाहिजे, ही एक मोठी मुद्द्याची गोष्ट जर या अंकावरून आमच्या वाचकांच्या मनावर पक्की ठसेल, तर एक मोठीच गोष्ट मिळविलीशी होईल. तसेंच मनोरंजनांत आपल्या देशाचा इतिहास कोणत्याहि दुसऱ्या देशाच्या इतिहासाहून उणा नाहीं हेंहि जर या एकंदर निबंधावरून वाचकांच्या लक्षांत येईल, तर तेवढ्यानेंहि तो लिहिल्याचा हेतु सफळ झालासें होईल. असो; तरी लिहावयाच्या एक दोन मोठ्याच गोष्टी राहिल्या; त्यांतील पहिली ही कीं, प्रस्तुतचे इंग्रेजी इतिहास फारच अपुरते असतात,—ह्मणजे संस्थानिक वृत्तांताखेरीज आमच्या विद्या, कला, स्थिति, रीति, वगैरेविषयीं त्यांत बिलकुल एक अक्षरहि असत नाहीं. दुसरी ही कीं, आमच्या मराठींत इतिहास चांगला वाचण्याजोगा ह्मटला तर मुळींच नाहीं, व एकंदर लोकांत त्याविषयीं एवढें अज्ञान असण्याचें एक मोठें कारण तेंच आहे. यासारख्या आणखी दुसऱ्या कांहीं न्यूनता मागें एकदोन वेळां सांगितलेल्या 'ग्रांट डफवर टीका' नांवाच्या निबंधांत चांगल्या रीतीनें दाखविल्या आहेत, त्या प्रस्तुत निबंधाच्या परिशेषार्थ वाचकांनीं पहाव्या. तसेंच मराठींतील विद्यमान इतिहासांवर शालापत्रकाच्याहि एका अंकांत[२] कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत तेहि वाचण्यास आह्मी त्यांस शिफारस करतों. आतां सरते शेवटीं एकंदर लोकांस या विषयाच्या संबंधानें कांहीं सूचना करण्याजोग्या आहेत त्या येथें लिहून हा अंक पुरा करतों.

७. वर जें इतके विवरण केलें त्यावरून आपल्या देशाचा इतिहास चांगला होऊन त्याची सर्वांस माहिती झाली असतां किती उपयोग होणार आहे हें सर्वांच्या ध्यानांत आलेंच असेल. यास्तव ज्यांस तशी माहिती मिळण्याचा संभव असेल त्यांनीं

१. हा निबंध व मागें सांगितलेली 'घाशीराम कोतवाला'वर टीका हीं आमचे कॉलेजबंधु रा० रा० नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं रचिलीं. हे 'माधवराव पेशवे व जयपाळ' या सर्वमान्य नाटकाचे कर्ते रा० रा० विनायक जनार्दन कीर्तने यांचे धाकटे बंधु. यांची लिहिण्याची पद्धति तारीफ करण्यासारखी असून विषयाचें निरूपण प्रौढ व मार्मिक रीतीनें करण्याची यांची शैली उत्कृष्ट आहे. प्रस्तुत निबंधाच्या संबंधानें वरील दोन्ही लेख वाचले असतां वाचकांस हितावह होतील.

२. पुस्तक १२ अंक ५.

ती बुडूं न देतां तिचा संग्रह ठेवावा. आमचीं जुनीं लहान मोठीं राज्यें अजून साऱ्या देशभर पुष्कळ आहेत; तर त्यांचा स्वाहा जोंवर झाला नाहीं तोंवर तरी लोकांनीं सावध होऊन आपल्या नुकत्या होऊन गेलेल्या पराक्रमी पूर्वजांची एवढी तरी सेवा करावी. असें केलें असतां आपला देशाभिमान जागविलासा होऊन आपल्या वाडवडीलांचे उपकार फेडलेसे होतील;—कारण त्यांची कीर्ति वाढविणें जर आपल्या हातून होत नाहीं, तर तिचें रक्षण करून ती बुडूं न देणें हें तरी आपण श्रेय घ्यावें; आणि हें पहिल्यापेक्षां पुष्कळ सोपेंहि आहे हें उघड आहे. आतां हें कृत्य आपले सध्यांचे धनी इंग्रेज लोक यांच्या विरुद्ध केलेंसें होईल, किंवा केलेंसें ते समजतील, याविषयीं बिलकुल संशय धरण्यास जागा नाहीं. ते इतर संबंधानें कसेहि असले, तरी एवढ्यांत तरी अत्यंत उदार आहेत. फार तर काय, पण त्यांनींच जर ही माहिती मिळवून ठेवली नसती, तर माधवराव काय, आणि बाळाजी विश्वनाथ काय, सर्व आतांपर्यंत आपणांस एकच होऊन गेलें असतें! शिवाय दुसरें असें कीं, अशी माहिती ग्रांट डफ, मालकम अशांच्या ग्रंथांत कांहीं आहे खरी; पण ती केवळ राजकीय संबंधाची. पूर्वीची किरकोळ माहिती जागोजागच्या लोकांस जशी अजूनहि असेल तशी सर्व अगोदर त्यांस कळली नसेल हें एक; आणि दुसरें, ती सर्व त्यांस आपापल्या ग्रंथांत घालतांहि आली नाहीं. अशा माहितीचा वास्तविक निराळाच ग्रंथ असला पाहिजे, व 'पिक्टोरियल् ह्यांडबुक् ऑफ लंडन्' अशा तऱ्हेचे निराळेच ग्रंथ इंग्लंडांत वगैरे करतात. तसें आमच्या 'पुण्याच्या वर्णनां'त असेलसें पाहिल्याबरोबर सर्वांस वाटतें; पण ग्रंथकर्ते ब्राह्मण धर्माचे, व तेव्हां अर्थात्च पेशव्यांचे वगैरेहि शत्रु असल्यामुळें त्यांचें जिच्या योगानें गौरव होईल अशी एक सुद्धां गोष्ट त्यांनीं आपल्या ग्रंथांत दाखल केली नाहीं. फुलांतून मधमाशा मध काढतात, पण त्यांतूनच दुसरे किडे विष काढतात, याप्रमाणेंच त्यांनीं कृति केली! असो; येथें शेवटीं इतकेंच सुचवितों कीं, आमच्या मराठी शहरांचीं जर यापुढें अशींच कोणीं वर्णनें रचलीं तर तें काम पुरें होईपर्यंत तो रचणारा मोठा भाविक खिस्ती असला तरी त्यानें आपलें पवित्र शास्त्र तोंपर्यंत एकीकडे गुंडाळूनच ठेवावें! असो; तेव्हां आमच्या लोकांस यासंबंधें हीच सूचना करावयाची कीं, अशी माहिती कितीहि क्षुल्लक वाटली, तरी तिचा त्यांनीं नीट संग्रह करून ठेवावा; कां कीं, कधीं कधीं एखाद्या अशा क्षुल्लक गोष्टींतहि असें तात्पर्य असेल कीं तिच्या योगानें कदाचित् इतिहासहि फिरूं शकेल! त्यांतूनहि नेटिव संस्थानांतून दप्तरी माहिती किंवा जुने लेख ज्यांपाशीं असतील त्यांनीं तर ती फारच जपून ठेवावी. अशा प्रकारचा उद्योग आमचे बंधु 'विविधज्ञानविस्तार' कर्ते यांनीं करण्याचें मनावर घेतलें होतें. पण लोकांच्या अज्ञानास्तव, हयगयीमुळें, किंवा वेड्या समजुतीमुळें त्यांस त्यांत फारसें कोणीं साहाय्य केलें नाहीं असें दिसतें. हा प्रकार अत्यंत शोचनीय होय. असो; याखेरीज

जुन्या माहितीचा आणखी एक मार्ग सध्यां तादृश प्रसिद्ध नसणारे इंग्रेजी ग्रंथ होत. गेल्या शंभर दीडशें वर्षांत इकडे आलेल्या इंग्रेज लोकांनीं लिहून ठेवलेले पुष्कळ ग्रंथ आहेत, ते कधींमधीं दृष्टीस पडतात. त्या काळीं आपली स्थिति फार निराळ्या तऱ्हेची असल्यामुळें कित्येक तर इतके तल्लीन होऊन गेले होते कीं, त्यांचीं मूळचीं मतें जाऊन बहुतेक आमच्यासारखींच झालीं होतीं. अशांस सर जेम्स म्याकिंटाश जे कांहीं दिवस मुंबईचे रेकॉर्डर (न्यायाधीश) होते त्यांनीं 'ब्राह्मण बनलेले युरोपियन'[1] असें एके ठिकाणीं झटलें आहे. वास्तविक पहातां यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कां कीं, त्या काळीं हल्लींप्रमाणें ब्राह्मण्य हें रेल्वेच्या गार्डाच्या पायांवारीं जात नव्हतें; तर गजमस्तकारूढ झालेलें, किंवा अश्वारूढ होऊन शत्रूंवर गर्जणारें अशापैकीं होतें! अजूनहि वृद्ध लोकांच्या तोंडून जें आपण ऐकितों, कीं पहिले साहेब फार दयाळू असत, इकडच्या लोकांचा ते फार बोज ठेवीत, तें खोटें नव्हे. आतांप्रमाणें चुटपुटती विलायतेस परीक्षा देऊन व येतांना मेकालेचे दोन निबंध वाचून अेरराव होऊन आलेले ते नसत. त्यांस लोकांच्या अनुरोधानें वागणें पडे. असो; तर अशांच्या ग्रंथांत आपणांस अनुकूल असा पुष्कळ मजकूर सांपडतो. मालकम साहेबाचा वर एक लेख लिहिला आहेच; व अहिल्याबाईचें त्यानें किती चरित्र मिळवून लिहून ठेवलें आहे तेंहि बहुतेकांस विदित असेलच. तसेंच 'विविधज्ञानविस्तारा' च्या एका अंकांत स्कॉट नामक एका ग्रंथकाराचा अफझुलखानाच्या वधाविषयींचा मजकूरहि पुष्कळांनीं वाचला असेल. अजूनहि हिंदूंचे पक्षपाती इंग्रेज लोक कित्येक सांपडतील. 'तारा,' 'सीता' 'ठगाची जबानी' या सर्वप्रसिद्ध ग्रंथांचे कर्ते क्यापटन मेडोज टेलर हे अशांत अग्रगण्य होत. यांनीं नुकताच एक हिंदुस्थानाचा इतिहास स्वभाषेंत लिहून प्रसिद्ध केला आहे; त्यांत सर्व भागाचें यथास्थित विवरण केलें असून मॉरिस, मेकॉले, मिल्ल यांच्यापेक्षां फार निराळ्या तऱ्हेचीं मतें त्यांत प्रदर्शित केलीं आहेत. अशाच तऱ्हेचे आणखी एक दोन लहान इतिहास अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत. असो; तर गेल्या काळाविषयीं चमत्कारिक व खरी माहिती मिळण्याचा हा तिसरा मार्ग आहे. तर याप्रमाणें असत्यरूप व भ्रांतिरूप धुकें जें या देशभर आजपर्यंत पसरून राहिलें आहे त्याचें निरसन करून सत्यरूप सूर्याचा व ज्ञानाचा खरा उदय अजूनहि व्हावा अशी आजची तर स्थिति आहे.

1. 'Brahmanised Europeans.'

भाषादूषण.

अहो कष्टं सापि प्रतिदिनमधोऽधः प्रविशति ।

भर्तृहरि.

अंक ९—(१) विषयोपक्षेप. (२) दूषणाचें स्वरूप. (३) त्याचीं कारणें. (४) त्याचा प्रचार. (५) इंग्रेजांचा व आमचा आपापल्या भाषांविषयीं अभिमान. (६) भाषादूषणाच्या कैवाऱ्यांस उत्तर. (७) इंग्रेजीच्या अनुकरणाची मर्यादा. (८) परभाषेचें साह्य. (९) भाषादूषणाचीं उदाहरणें. (१०) शुद्धतेचें निश्चित प्रमाण.

प्रस्तुत मालेच्या पहिल्या अंकांत आमच्या मराठी भाषेची विद्यमान स्थिति कशी आहे तीविषयीं सामान्यतः लिहून इंग्रेजी भाषेच्या संसर्गानें तीस केवढा अपाय घडत आहे याविषयींहि सामान्यतः लिहिलें होतें. व पुढील एखादे प्रसंगीं त्या विषयावर सविस्तर लिहिण्याचें तेथें आह्मीं सुचविलें होतें. त्याप्रमाणें या अंकांत लिहितों.

१. भाषेचें दूषण ह्मणजे तिचें खराब होणें. प्रस्तुत निबंधांत या दूषणाचें स्वरूप, त्याचें कारण, त्याचा प्रचार, इत्यादि सांगून शेवटीं त्याचीं ग्रंथांतून उदाहरणें दाखवूं. तसेंच त्याविषयीं लोकांचें मत एकंदर कसें आहे तेंहि लिहून त्यापासून होणारे अनर्थ कळवूं.

२. आतां पहिल्यानें हें दूषण ह्मणजे काय? तर अर्थातच आपल्या भाषेंत परभाषेंतील ह्मणजे प्रस्तुत प्रसंगीं इंग्रेजी भाषेंतील शब्दांचा अनिवार संकर होणें; व तिची मूळची रचना सुटून ती अगदीं परकी जी इंग्रेजी भाषा तिच्या धर्तीवर पडणें. वर इंग्रेजी भाषेंतील शब्द ह्मणून ह्मटलें त्याचा अर्थ केवळ अक्षरशः घ्यावयाचा नाहीं. तसा कांहीं अंशीं घ्यावयाचाच—कारण 'इष्टेट,' 'इस्कूर,' 'पाइंट,' 'रजिष्टर' वगैरे पुष्कळ मंजूळ शब्द इतक्यांतच घरोघर होऊन बायकांपर्यंत व पोरापर्यंत सुद्धां गेले आहेत! पण आमचा मुख्य रोख त्यांवर नव्हे. वरील शब्द कितीहि मराठींत आले तरी त्यांपासून तीस तादृश भय नाहीं. एक तर ते बोलून चालून परकी पडले, तेव्हां त्यांस खुद्द मराठीच असें कोणी ह्मणणार नाहीं, व त्यांचीहि तींत घुसण्याची इच्छा नाहीं. शिवाय दुसरें असें कीं, त्यांतून कित्येकांचें मराठींत असणाऱ्या शब्दांनींहि कामहि होणारें नव्हे; यास्तव लांबलचक नवे शब्द जे उगीच श्रम घेऊन ओतून काढावे, त्यापेक्षां हेच कां असेनात? इंग्रेजांस जर आमचे Khutput, bandobast, pacca, ghee, असे शब्द चालतात, तर आह्मांसहि 'बुक,' 'टेबल,' 'नाटपेड' वगैरे शब्द खुशाल चालवून घेतां येतील. पण या शब्दांविषयीं आह्मांस विशेषतः बोलणें नाहीं. तर जे धड इंग्रेजी नव्हेत धड मराठी नव्हेत; ज्यांचा अर्थ इंग्रेजी आणि उच्चार मराठी; असे अर्धे कच्चे मराठींत उतरलेले जे शेंकडों शब्द सध्यां मोठाल्या

१. "अहो! काय सांगावें! तीहि आतां दिवसानुदिवस लयास जात चालली!"

ग्रंथांतून, मासिक पुस्तकांतून, वर्तमानपत्रांतून, हजारों नवीन तरुण लोकांच्या भाषणांत हंमेश आढळतात अशा शब्दांवर आमचें मुख्यतः धोरण आहे. पण इतकेंच नव्हे. नुसते निरनिराळे शब्दच असे अर्धजातीय असतात असें नाहीं, तर एकंदर वाक्याची, किंबहुना एकंदर ग्रंथाची, रचनाहि शुद्ध इंग्रेजीच असते. ह्मणजे लिपि पाहिली तर मराठी, अक्षरांचा उच्चार मराठीसारखाच, पण अर्थ पाहूं जावें तो अर्धामुर्धा कळतो, किंवा कधीं कधीं मुळींच कळत नाहीं. कायद्याचीं जीं मराठींत कांहीं पुस्तकें झालीं आहेत त्यांची मौज पुष्कळांस अनुभवावरून किंवा निदान ऐकून तरी माहीत असेलच! त्यांतील भाषांतर इतकें सुरेख झालें असतें कीं, कोठें कोठें तें समजण्यास फार जड जातें इतकेंच नव्हे; तर जेथें अर्थ काढण्याची अतिशय मुष्कील पडते तेथें मूळचें इंग्रेजी जेव्हां कोणापासून समजून घ्यावें तेव्हां अर्थ उकलतो! आमच्यांत असे फर्डे बोलणारे शेंकडों सांपडतील कीं, त्यांच्या बोलण्याचा अर्थ पुनः नीट मराठींतच करण्यास दुभाष्या ठेवल्यावांचून सोय नाहीं. खरेंच, ज्यांनीं अष्टौप्रहर इंग्रेजीचा ध्यास घेऊन तीस केवळ आपलीशी करून टाकली, ज्यांच्या जिव्हाग्रीं त्या भाषेनें सतत वास करावा, तिच्या प्रसादें करून ज्यांचें मन सुप्रकाशित झाल्यामुळें एका द्वाड काळ्या रंगाखेरीज त्यांच्या ठायीं इकडचा ह्मणून दुसरा मागमूसहि उरला नाहीं, त्यांच्या हातीं मराठी पुस्तक किंवा वर्तमानपत्र दृष्टीस पडलें, किंवा एक शुद्ध मराठी वाक्य त्यांच्या तोंडून निघालें, तर मग राहिलें काय? त्यांच्या इंग्रेजी ज्ञानास कलंक लागला नाहीं काय? असो; वरील समजूत केवढी थोर आहे याविषयीं येथें वाद करण्याचें प्रयोजन नाहीं. इंग्रेजींत थोडीबहुत गति होतांच पाद्रींच्यासारखें किंवा बाट्यांसारखें धेडगुजरी बोलण्यांत ज्यांस प्रतिष्ठा वाटत असेल त्यांस वाटो; आह्मांस तर हा प्रकार मूर्खतेचा व अत्यंत लज्जास्पद असा वाटतो.

३. आतां हें भाषादूषण जें चोहोंकडे एवढें फैलावलें आहे कीं कांहीं थोड्या नामांकित ग्रंथकारांखेरीज जें बाकी सर्वांच्या ग्रंथांत थोडें बहुत तरी आढळतेंच, मराठी भाषेच्या अभिवृद्धीस साह्य व्हावें ह्मणून चालू केलेल्या मासिक पुस्तकांसहि जें सर्वथा सोडीत नाहीं, वर्तमानपत्रांस तर बहुधा ज्याची फारशी पर्वाहि वाटत नाहीं, नवीन इंग्रेजी विद्वानांच्या भाषणांत व व्याख्यानांत तर जें प्रत्यक्ष मूर्तिमंत जणूं काय उभेंच असतें, तें उत्पन्न तरी कशापासून झालें, व त्याचा एवढा प्रचार कसा होत गेला याविषयीं थोडासा विचार करूं. पहिल्या दोन अंकांत लिहिल्याप्रमाणें इंग्रेजी भाषेचा सार्वत्रिक अभ्यास त्यास कारण झाला हें एक उघडच आहे. पण हेंच काय तें एक कारण झालें असें ह्मणतां येत नाहीं. दुसऱ्या भाषेचा पुष्कळ प्रचार झाला कीं पहिली अगदीं बिघडूच जावीच असें जर असतें, तर ज्या भाषेनें आमच्या भाषेची दुर्दशा करून टाकली तिचीच आजपर्यंत कांहीं विलक्षण स्थिति झाली असती! गेल्या दोनतीनशें वर्षांत

ग्रीक व ल्याटिन भाषेचा प्रचार इंग्लंडांत अतोनात झाला आहे; फ्रेंच, इटालियन वगैरे अर्वाचीन भाषाहि नेहमींच्या दळणवळणाच्या योगानें तेथील लोकांस पुष्कळ परिचित आहेत; बाकीच्या युरोपियन भाषाहि व्यापाराच्या वगैरे संबंधानें पुष्कळांस माहीत असतात; फार तर काय पण वरील व्यापाराच्याच संबंधानें ज्यांतले शब्द इंग्रेजींत आले नाहींत अशा भाषा साऱ्या पृथ्वीवर थोड्याच असतील. बरें, मग एका इंग्रेजीनेंच जर आमच्या मराठीची एवढी हैराणगत करून सोडली, तर वरच्यासारख्या तडाक्यांत ती सांपडली असतां तिची काय अवस्था होऊन जाईल कोण जाणे! असो. तर परभाषेचा केवळ संसर्गच मराठी भाषेस बाधक झाला असें ह्मणतां येत नाहीं. तिच्या दुर्दशेचें खरें कारण वरच्या वाक्यांतच गर्भित होतें. तें काय? तर अर्थात्च आपल्या लोकांच्या मनांत तिजविषयीं मुळींच अभिमान नसणें हें होय. जे आमचे लोक विलायतेस गेले कीं तेथें डोळे चक्र होऊन आपल्या देशाची बहुतेक आठवणहि विसरून जातात, आणि निरुपायास्तव पुनः माघारी आले असतां येथील सर्व गोष्टींची त्यांस लाज वाटूं लागते, त्यांसच इंग्रेजी भाषेचें ज्ञान झालें असतां मराठीची सर्वांपरी लाज वाटूं लागते हें अनुरूपच आहे! त्यांस साहेबी तुमान, साहेबी बूट, साहेबी डगला, साहेबी दाढी यांचा वियोग जसा केवळ दुःसह होतो, त्याप्रमाणेंच यांसहि विलायती शब्द, विलायती वाक्यरचना यांचा सहसा त्याग करवत नाहीं. पण इंग्रेज पहा! त्यांचें भ्रमण साऱ्या जगभर आहे, हव्या तेवढ्या उलाढाली त्यांच्या जेथें तेथें चालल्या आहेत; पण आपल्या देशास माघारी आले कीं, पुनः इंग्रेजचे इंग्रेजच! त्याचप्रमाणें इतक्या भाषा इंग्रेजीशीं मिसळल्या असतांहि ती कायमची कायमच! असो; तर ज्या अभिमानहीनतेनें व इतर प्रकारांनीं एकंदर देशाची दुर्दशा होऊन गेली आहे, तीमुळेंच आमच्या भाषेचीहि अशी दशा झाली आहे. तिसरें कारण उपेक्षा किंबहुना तिरस्कारहि ह्मटला असतां चालेल. ज्या गोष्टीविषयीं आपणांस लवलेशहि अभिमान नसतो तिजविषयीं उपेक्षेची किंवा तिरस्काराचीहि बुद्धि मनांत वागत असल्यास कांहीं नवल नाहीं. असाच आमच्या लोकांचाहि प्रकार आहे. त्यांस मराठी भाषेविषयीं केवढी कळकळ आहे हें त्या भाषेंत ग्रंथ करून ज्यांनीं प्रसिद्ध केले असतील त्यांच्या अनुभवास बहुतकरून पक्केपणीं आलें असेल. तसेंच ग्रंथाची पारखहि त्यांस मोठी उत्तमच आहे असें ह्मटलें पाहिजे. हल्लीं पुस्तकांचा जो खप होतो तो तादृश त्यांच्या गुणांवरून होतो असें नाहीं, तर आर्जव व शिफारस यांनीं एरवीं जशीं कामें होतात तसेंच येथेंहि चालतें. सर्व लोकांच्या आश्रयास पात्र असून केरांत पडलेलीं पुस्तकें आह्मांस पुष्कळ दाखवितां येतील, व तसाच त्याच्या उलटहि प्रकार दाखविण्यास कांहीं कठिण पडणार नाहीं. मोठी उठाठेव करून लोकहितार्थ श्रम केले असतांहि त्याप्रमाणें प्राप्ति तर कांहीं झाली नाहीं, पण उलटा भुर्दंड भरावा लागला असे हतभाग्य ग्रंथकार आह्मांमध्यें थोडे थो-

डके असतीलसें नाहीं. एकच सर्वप्रसिद्ध उदाहरण घेतों. 'राणीचें पुस्तक' ह्मणून एक ग्रंथ सुमारें तीन चार वर्षांमागें प्रसिद्ध झाला तो सर्वांस माहीत असेलच. तें त्यांचें गोड नांव, सोनेरी पुठ्ठा, ग्रंथार्पणपत्र, मधून मधून नामी चित्रें; शेवटीं बड्या बड्या आश्रयदात्यांच्या नांवांची लांब मालिका, हीं सर्व पाहिलीं असतां डोळे दिपून जाऊन एखाद्या बड्या दरबाराची आठवण होते. पण आंत वाचूं लागावें तों मजकूर काय, ती भाषापद्धति काय, कविता काय, बडा दरबार पाहून डोळे चक्क झाल्यावर बड्या स्टार ऑफ इंडियांचीं, बड्या खानबहादुरांचीं भाषणें ऐकून अंतःकरण जितकें गार होऊन जातें, तितकेंच वरील मजकुरानें होतें. एवढा थाटमाट ज्या पुस्तकाचा त्याचा आदर केवढा झाला असेल तें वाचकांनींच मनांत आणावें. 'राणीचें पुस्तक'! मग काय, साऱ्या जगास व त्यांत हिंदुस्थानास तें सर्वोपरी वंद्य झालें! आतां याच्याच उलट दुसरा प्रकार पहा. 'सर्वसंग्रह' नांवाचें एक अत्यंत उपयुक्त मासिक पुस्तक सुमारें सहा सात वर्षें चालून तें बंद झाल्यास आज तितकींच वर्षें झालीं. तें आजपर्यंत चाललें असतें तर आपल्या मराठी कवींच्या सर्व ग्रंथांचा बहुधा जीर्णोद्धार झाला असता; आणि त्या पुस्तककाराचा एवढा खर्च, मेहनत व आस्था यांचें चीज झालें असतें. एवढा उद्योग पुनः उभा रहाणें परम दुर्घटच; पण त्यांतून जरी यथाकथंचित् यापुढें तो राहिलाच, तरी नुकत्या कांहीं दिवसांपर्यंत जें त्यास अत्युत्तम साहाय्य होण्यासारखें होतें तेंहि आतां समूळ नाहींसें झालें. वरील शब्द आमच्या साऱ्या वाचकांस लवकर समजतीलसें वाटत नाहीं, यास्तव त्यांच्या स्पष्टीकरणार्थ येथें सांगतों कीं, थोड्या दिवसांमागें कैलासवासी झालेले रा० रा० परशुरामपंततात्या गोडबोले, ज्यांच्या विद्वत्तेस्तव, सुस्वभावास्तव व मराठी भाषेवर आणि कवितेवर जे त्यांनीं मोठे उपकार करून ठेवले आहेत त्यांस्तव वरील गोष्ट ऐकून सर्व हळहळले असतील, ते वरील 'सर्वसंग्रहा'चें काम करीत असत. या कामास यांच्या इतका वाकबगार पुरुष दुसरा कोणी नव्हता हें सर्वांस माहीत आहेच; व याचें कारण मराठी कवितेचाच सर्व जन्मभर त्यांनीं मुख्यत्वें व्यासंग केला होता हें होय. यांनीं तिच्या प्रीत्यर्थ जे श्रम केले ते जर केले नसते तर मराठी कवितेचें ज्ञान आमच्या लोकांस आज कितपत असतें याचा मोठा संशयच वाटतो. असो; तर इतःपर या उद्योगाचे बहुतेक हातपायच मोडले असें ह्मणण्यास चिंता नाहीं. सेलर हौस, सोन्याच्या तोफा वगैरे कीर्तिदायक कृत्यांकडे जो पैसा खर्च झाला त्याच्या एका सहस्रांशानें वरील पुस्तकाचा इष्ट हेतु सिद्धीस गेला असता, व देशावर फार मोठे उपकार झाले असते. पण आतां बोलून उपयोग काय? गोष्ट गेली ती गेली! अशा उत्कृष्ट पुस्तकाचा सरकारानें आपला आश्रय तोडला हें त्यास कितीहि भूषणार्ह असो, पण एकंदर लोकांच्या समंजसतेस, रसिकतेस आणि उदारत्वास हें चिरकाळ लांछन लागून गेलें यांत संशय

नाहीं ! असो; तर याप्रमाणें वशील्याचा आणि आर्जवाचा या जगांत कांहीं विलक्षण जोर चालतो ! एरवीं अगदीं नादान असणारें पुस्तक सर्वांच्या आश्रयास पात्र होतें, आणि खरोखरी जें अत्यंत उपयोगाचें व सर्वांच्या आश्रयास पात्र त्यास कोणी वर डोकेंहि काढूं देत नाहीं. असो; तर चांगल्या ग्रंथांचीहि अत्यंत शोचनीय उपेक्षा आणि तिरस्कार हे आपल्या भाषेची एवढी खराबी होण्याचें तिसरें कारण होय.

४. आतां या भाषादूषणाचे निरनिराळे कसे प्रकार आहेत ते दाखवितों. हे मुख्यतः तीन आहेत. पहिला प्रकार झटला झणजे चांगले शुद्ध मराठी शब्द, पण त्यांस इंग्रेजीचें स्वरूप दिलेलें—जसें, 'ग्रंथकाराच्या विद्वत्तेची हा ग्रंथ साक्ष देत आहे,' 'मीं आपले विचार सभेपुढें ठेवतों अ० मांडतों,' 'त्याच्या भाषणाचा ठसा सर्वांवर उठला,' 'हा निराळा प्रश्न आहे,' 'परीक्षेचा परिणाम,' 'मुलांचें भक्ष्य' इत्यादि. दुसरा प्रकार संस्कृत शब्द, पण त्यांचा मूळचा अर्थ सोडून देऊन भलत्याच रीतीनें त्यांचा प्रयोग केलेला—जसें, 'स्वकपोलकल्पित ग्रंथ,' 'तूं त्याजवर कां नेहमीं अवलंबून राहतोस ?' 'निरुपद्रवी' इत्यादि. तिसरा प्रकार नवेच बनवलेले संस्कृत शब्द—जसें, 'साल्हादाश्चर्य,' 'महत्त्वाकांक्षा,' 'आईबापांशीं आज्ञाधारकपणानें वागावें हें मुलांचें मुख्य कर्तव्यकर्म आहे,' इत्यादि. हे तिसऱ्या प्रकारचे शब्द एकदां जे ठरून बसले आहेत ते आहेत. दुसरें तिसरें बुक शिकायाला लागल्यापासून डिक्शनरींतले शब्द जे एकदां पोरांच्या तोंडांत बसून जातात ते अगदीं शेवटपर्यंत. ते खरे शब्द आहेत, किंवा त्यांच्यापेक्षां शुद्ध मराठी असे शब्द सांपडतील कीं नाहीं, हा विचार कोणीहि करीत नाहीं, व करण्याची गरजहि कोणास पडत नाहीं. 'त्याचें भाषण ऐकून सर्वांस साल्हादाश्चर्य वाटलें'—या वेड्यावाकड्या वाक्यापेक्षां —'सर्वांनीं मोठी वाहवा केली,'—'सारे तोंडांत बोट घालून राहिले' वगैरे साहजिक वाक्यें किती शोभतात ! 'शिवाजीस महत्त्वाकांक्षा होती' यापेक्षां त्यांस 'राज्यलोभ होता' हें वाक्य; किंवा शेवटल्या वेड्यावांकड्या वाक्यापेक्षां 'आईबापांच्या आज्ञेंत चालावें हा मुलांचा धर्म होय' हें वाक्य किती चांगलें दिसतें ! पण इतका विचार कोणीं करावा ? एकदां अनादिसिद्ध परंपरेनें जी वरील शब्दांस वहिवाट मिळाली आहे ती आहे. मोठमोठ्या ग्रंथांतून, भर सभेंत, वर्तमानपत्रांत, एरवींच्या बोलण्यांत वरील शब्द व वाक्यें उच्चारण्यास कोणासहि तिळप्राय सुद्धां शंका वाटत नाहीं. वक्ते व्याख्यान देण्यास उठले कीं अगोदर सर्वांस विनंति करतात कीं, 'मी तुह्मांपुढें आपले विचार ठेवतों,' किंवा हेंहि तितकें पसंतीस न पडून याहूनहि छानी करण्याचें मनांत आल्यास '—विचार मांडतों' असें उत्कृष्ट मराठी बोलून आपल्या मोलवान वक्तृत्वास आरंभ करतात ! वरें पण, त्यांच्यापुढें मेज तरी उभें केलें असतें ! नाहीं तर विचारांस खालीं आधार न सांपडल्यामुळें बिचारे श्रोत्यांकडे घरंगळत जायचे ! पुढें वक्तेमहाराज या विषयाकडे वळतात, त्या विषयाकडे वळतात,

किंवा एकाच विषयाचें एकदां काळें अंग, दुसऱ्यानें गोरें अंग, असें आपल्या प्रिय श्रोत्यांस अनुक्रमें करून दाखवितात ! ग्रंथकर्त्यांची तरी झांक वक्त्यांहून कमी असते असें नाहीं. कोणी ह्मणतील न जाणो, कीं पुस्तकांतील मजकूर इकडून तिकडून उपटला असेल, यास्तव मुखपत्रावरच ठळठळीत अक्षरांनीं ते जगास जाहीर करतात, कीं पुढील ग्रंथ असा तसा नव्हे—हा आहे स्वकपोलकल्पित, 'खुद्द आमच्या गालांतून काढलेला !' भाषेचें तिसरें वसतिस्थान न्यायाधीशांच्या कचेऱ्या. या ठिकाणचा मराठी भाषेच्या कैवाऱ्यांस मोठा अभाव आहे. पण तेथें तर जी तिची विटंबना होते तीस पारच नाहीं ! शेंकडों इंग्रेजी शब्दांची भेसळ, त्यांहून दुःसह असा वर सांगितल्यासारखा धेडगुजरी मराठीचा प्रकार, न्यायासनीं बसलेल्या अधिकाऱ्यांकडून तर तिचा उच्चारहि नीट होऊं नये. फार तर काय पण मराठी भाषा जर मूर्तिमंत अवतरली, तर सगळ्या कोर्टांवर बेअब्रू केल्याची फिर्याद तीस पहिल्यानें करावी लागेल ! तिच्या शब्दांचे, वाक्यांचे, उच्चाराचे जे तेथें प्रत्यहीं खून पडतात, तितके एका वर्षांत साऱ्या पृथ्वीवर पडत नसतील ! प्रत्यक्ष न्यायदंड धारण करणाऱ्या कोर्टांकडूनच असा वाक्प्रवाह वहातो, 'अरे ! त्यानें तुला मारलें, तर तूं त्या वेळेस आवाज कां केला नाहीं ?' 'तूं त्या वेळेस सूर्यांत उभा होतास ?' ! ! बरें हें एक असो; पण परभाषेची सबब ज्यांस लागू पडत नाहीं अशा नेटिव वकीलांची तरी स्वभाषेवर केवढी आस्था असते ! मागें कायद्यांच्या भाषांतराचा प्रकार वर्णिला आहे तो याविषयीं एक प्रमाण आहेच; आणि दुसरें त्यांचें कोडतांतील वक्तृत्व. 'अमुक अमुक आक्टाअन्वयें' ('आक्टा'चा आणि 'अन्वया'चा मोठाच गोड अन्वय हा !) 'कैदींस संशयाचा फायदा दिला पाहिजे,' 'या साक्षीदाराच्या जबानीस पुष्कळ वजन दिलें पाहिजे,' अशा प्रकारच्या सुंदर रूपानें मराठी भाषा कोडतांतून प्रकट झालेली दृष्टीस पडते. असो; तर याप्रमाणें एवढ्या उंच उंच शिखरांहूनहि आमच्या भाषेचा प्रवाह जर असा अत्यंत दूषित होत्साताच खालीं येतो, तर नाटकवाल्यांसारख्या अशिक्षित लोकांतहि तो तसाच दिसत असल्यास कांहीं आश्चर्य नाहीं. 'नाटक्कार कंपनी' 'नारायणरावाच्या मृत्यूचा फासे' असे अशुद्ध, दूषित आणि परम उद्वेगकारक शब्द ज्या छापखान्यांत त्यांच्या जाहिराती छापतात त्यांस, किंवा ज्या पत्रांतून त्यांच्या नोटिशी घातलेल्या असतात त्यांस, कसेहि भूषणास्पद असोत; पण बहुधा अक्षरशून्य असणाऱ्या आमच्या 'नाटक्कार' मंडळ्यांस आह्मांस त्याबद्दल मोठासा दोष लावतां येत नाहीं. असो; तर याप्रमाणें मोठ्या विद्वान् ह्मणविणाऱ्या ग्रंथकारांपासून तों अगदीं नाटकवाल्या मंडळीपर्यंत, किंबहुना सुतारांपर्यंत, शिंप्यांपर्यंत आमच्या भाषेची अशी पायमल्ली व्हावी हा मोठा चमत्कार नव्हे काय ? चार पांच वर्षांपूर्वी युनिवर्सिटीच्या वरच्या परीक्षांतून मराठी भाषा काढली तेव्हां चोहोंकडे मोठा गवगवा होऊन त्याबद्दल कित्येक वर्तमानपत्रांतून, मासिक पुस्तकां-

कांतून, व आमच्या विद्वान् मंडळींत ज्याच्या त्याच्या तोंडीं तो वाद झाला व पुष्कळांनीं मराठी भाषेच्या संबंधें पक्षकारीपणा त्या प्रसंगीं प्रदर्शित केला. पण शेवटीं फल काय? कांहीं नाहीं. त्याच सुमारास दुसरा एक मोठा वाद उत्पन्न होऊन त्याच्या संबंधानें आतां जसें चोहोंकडे गार होऊन गेलें आहे तसेंच याविषयींहि झालें. नवे इंग्रेजी शब्द प्रचारांत आणण्याची, किंवा घेडगुजरी बोलण्याची त्या वेळेस जितकी कोणास शरम वाटत नव्हती तितकींच आतांहि वाटत नाहीं. ज्या पत्रांनीं त्या प्रसंगीं स्वभाषेच्या कैवारानें वादामध्यें पुढारीपणा पतकरला, त्यांची तरी लिहिण्याची पद्धति तेव्हांपासून किती शुद्ध झाली असेल हें सांगवत नाहीं. एकंदरींत, 'वचने का दरिद्रता' या न्यायास आमचे लोक हरएक प्रसंगीं फार अनुसरतात!

५. असो; वरच्या लिहिण्यावरून एकंदरींत पहातां मराठी भाषेच्या शुद्धीकडे कोणाचेंहि विशेष लक्ष नाहीं असें दिसून येईल. आपला व इंग्रेजांचा वर्णसंकर होऊन प्रभूच्या शरीराचें व रक्ताचें एका मेळ्यांत यथेच्छ भोजन करतां येईल त्या सुदिनाची आमच्या मधले पुष्कळ शहाणे लोक जशी वाट पहात आहेत तशीच दोहोंच्या भाषांच्या संकराचीहि आमचे विद्वान वाट पहात नसतील ना! पण त्यांनीं पक्कें समजून ठेवावें कीं, वरील गोष्ट होणें परम दुर्घट आहे. आमच्या लोकांची इंग्रेजांत मिसळण्याची जितकी इच्छा आहे, तितकाच तसें करण्याविषयीं इंग्रेजांचा तिरस्कार आहे. याप्रमाणेंच इंग्रेजीच्या संपर्कानें आमच्या मराठीचा मात्र नाश होण्याचा संभव आहे. इंग्रेजांस एकंदर सर्व गोष्टीप्रमाणें आपल्या भाषेविषयीं केवढा अभिमान आहे हें मागील अंकांत एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. आपणांत जशी म्हण आहे कीं, तीर्थी गेल्याखेरीज मुंडन होत नाहीं त्याप्रमाणें ज्यास पक्कें इंग्रेजी शिकायाचें असेल त्यानें लंडन शहरच्याच वास पतकरला पाहिजे; हें तर काय, पण असें करूनहि ती भाषा साध्य होईलच असें नाहीं; इंग्लिश उच्चार अगदीं बेचूक करणें व ती भाषा बेचूक लिहिणें हें जो इंग्लंडांत जन्मला त्यासच केवळ साध्य होय असें ते लोक म्हणतात. प्रसिद्ध सर वॉल्टर स्कॉट् व इतिहासकार रॉबर्टसन यांच्याहि ग्रंथांत अशा इंग्रेजीच्या चुका आहेत कीं, लंडनांतलें एखादें पोर त्या शुद्ध करील, असें एके ठिकाणीं मेकालेनें लिहिलें आहे असें असल्यावर मग या ठिकाणीं आह्मां नेटिवांचा काय पाड? असो; तर इंग्रेजांस आपल्या भाषेचा अभिमान एवढा जागृत आहे. पण आह्मी पहा! साहेबांच्या अशुद्ध लिहिण्याचा व उच्चारांचा आह्मांस राग व तिरस्कार न येतां उलटें त्यांचें अनुकरण करण्यांत आह्मांस प्रतिष्ठा वाटते. हें लोकांच्या देशाभिमानास व भाषाभिमानास मोठें लांछन होय. तसाच दुसरा हाहि मोठा चमत्कार आहे कीं, जे इंग्रेज लोक आपल्या भाषेविषयीं एवढा मत्सर मनांत बागवितात तेच इतर भाषांच्या ज्ञानाविषयीं घमंडी बाळगण्यांत यत्किंचितहि कसर करीत नाहींत.

नेटिवास इंग्रेजीचा प्रोफेसर करणें तर फारच दूर, पण प्रत्यक्ष संस्कृताचाहि करण्यास मोठीच वाटाघाट करावी लागते, पण युरोपियनास इकडील कोणत्याहि भाषेचें आधिपत्य देण्यास काडीमात्रहि विचार पडत नाहीं ! प्रोफेसर बेलैर्स साहेबांनीं 'Indian English Corrected' असें कुर्रेबाजपणाचें नांव देऊन त्यांत शाळेंतील पोरें वगैरे ज्या चुका करतात त्या खोडून शुद्ध केल्या आहेत. पण त्याच साहेबांनीं स्वतः एक मराठी वूक करून त्यांत जी शब्दरचना व वाक्यरचना केली आहे तीस तोड नाहीं ! त्यांतील एका धड्याचें नांव अजून आह्मांस आठवतें. तें 'पिवळा वामनमूर्ति' असें आहे. आमच्या वाचकांस या शब्दांचा अर्थ करण्यास बराच गोंधळ पडेल अशी आमची खात्री आहे; तसेंच आह्मांसहि क्षणभर झालें. पण वर पहातों तों इंग्रेजींत The Yellow dwarf असे शब्द होते. तेव्हां साहेबांच्या अगाध ज्ञानाची आह्मांस एकदम प्रतीति होऊन आह्मी क्षणभर चकित होऊन राहिलों. असो; पण अशीं शब्दरत्नें व वाक्यरत्नें ज्यास यथेच्छ हवीं असतील त्यानें पाश्चिमात्य लोकांचें भाषण किंवा लिहिणें यांकडे अंमळ लक्ष पुरवावें ह्मणजे झालें. येथील बंडावरील बागेंत आंत उतण्याच्या ठिकाणीं आमच्या लोकांकरितां एक पाटी लावली आहे तीवर लेख असा आहे–'येथील झाडांस व पुस्पांस कोणीं हात लावूं नये.' एवढा शब्द झेपत नव्हता तर साहेबांनीं साधा मराठी शब्द घालायाचा होता ! असो; तर चमत्कार काय कीं, मनुष्यस्वभावांत असा विरोध अनेक वेळां दृष्टीस पडतो.

६. याप्रमाणें हल्लीं अनेक प्रकारांनीं मराठी भाषा दूषित होत चालली आहे. याचीं कित्येक कारणें मागें एकदां सांगितलीं आहेतच; आतां या दूषणासहि भूषण मानणाऱ्या कित्येक लोकांचें काय ह्मणणें आहे तें सांगतों. कित्येकांस असें वाटतें कीं 'विचार मांडतों,' 'ग्रंथ साक्ष देत आहे' वगैरे प्रयोग अप्रशस्त कां मानावे ? इंग्रेजींतहि तोच अर्थ त्या शब्दांनीं व्यक्त होतो; मग इंग्रेजींत जर ते वाईट दिसत नाहींत व तशी रूढि पडून गेली आहे, तर मग मराठींतहि ते आणल्यास काय बिघडलें ? हें ह्मणणें सकृद्दर्शनीं समंजस वाटतें; पण अंमळ विचार केला असतां सहज लक्षांत येईल कीं, हें गोड तत्त्वज्ञान यथेच्छ चालविलें असतां साऱ्या भाषांचा एकदम लय होणार आहे; मराठींत आपण ह्मणतों 'थंडी वाजते,' 'मी वाट पहात आहें,' 'त्यानें मार खाल्ला;' मग इंग्रेजींत 'frost rings,' 1 am 'looking at your way,' 'He ate beating' असें ह्मणण्यास काय हरकत आहे ? मराठींत जर तोच अर्थ व्यक्त होतो, वाक्य वाईट दिसत नाहीं, व अगदीं रूढ होऊन गेलें आहे, तर लंडनांत भर पार्लमेंट सभेंत अशीं वाक्यें बोलण्यास काय हरकत आहे ? पण इतकेंच नव्हे; तर साऱ्या पृथ्वीवर जेवढ्या ह्मणून भाषा आहेत त्यांत वरील अर्थ ज्या शब्दांनीं व्यक्त करीत असतील त्यांचें हव्या त्या भाषेंत शब्दशः भाषांतर करून बोलल्यास काय बिघडलें ?

कांहीं नाहीं. आणि खरोखरच अर्थदृष्ट्या कांहीं बिघडलें नाहीं. पण भाषेंत जें शुद्धाशुद्ध ठरवितात तें केवळ अर्थावरच कधीं ठरत नसतें. प्रत्येक भाषेला 'इडियम' ह्मणजे शब्दांचा किंवा वाक्यांचा प्रयोगविशेष ह्मणून एक निराळेंच तंत्र असतें; तें भाषेचा बहुधा जीवप्राण होय. त्यांत लवमात्रहि इकडचें तिकडे होतां कामास नये. भाषेचा शुद्धाशुद्धपणा मुख्यतः त्यावर धरतात, व तिचें स्वारस्यहि सगळें त्यावरच असतें. यास्तव तत्त्वज्ञानांत शिरून त्याची हयगय लवमात्रहि करतां येत नाहीं. आणि वस्तुतः पहातां हें ठीकच आहे. प्रत्येक राष्ट्रास त्याचा स्वतःचा जसा निराळा पोषाक, निराळा धर्म, निराळा रीतरिवाज असतो, तसाच वरील प्रयोगविशेषहि असतो. उद्यां जर कोणीं आपणांस असा उपदेश केला कीं अहो, तुह्मी पागोटीं घालतां तीं कशाकरितां? डोक्यावर कांहीं असावें एवढ्याच करतांना? मग साहेबांसारख्या टोप्या कां घालाना? किंवा मुसलमानांत चुलत बहीणीशीं लग्न करतात, मिसर देशांत प्रत्यक्ष सख्या बहीणीशींहि करीत, एवढ्यावरूनच जर कोणी इतर देशांत तशा व्यभिचाराबद्दल कोर्टांत सबब सांगूं लागला, तर त्यास कोर्ट काय उत्तर देईल? आपण येथें हातानें जेवतों ह्मणून इंग्लंडांतल्या खाणावळींतहि तसेंच करून तेथील बुटणेराशीं जर मोठ्या निकरानें वाद करूं लागलों, तर तेथील लोक आपणांस काय ह्मणतील? असो; तर हीच गोष्ट भाषेसहि लागते. तिचे प्रयोग जे एकदां ठरून गेले ते शिरसा वंद्य मानूनच चाललें पाहिजे. तेथें तर्कशास्त्राची मात्रा चालणें नाहीं.

७. तरी एका मोठ्या गोष्टीचा आणखी विचार केला पाहिजे. ती ही कीं, जे शब्द व जी रचना आपल्या भाषेंत नाहीं ती आणायाची असल्यास काय तोड करावी? रसायन, दर्शनानुशासन, भूगोल, अर्थशास्त्र वगैरेंतील पारिभाषिक शब्दांची मराठींत काय तजवीज करावी? याविषयीं आमच्या पहिल्या अंकांत एके ठिकाणीं लिहिलेंच आहे; कीं संस्कृत भाषेचें साह्य आपल्या भाषेस असल्यामुळें या संबंधें बहुधा पंचाईत पडण्यासारखी नाहीं. ह्मणजे इंग्रेजींत ज्याप्रमाणें ग्रीक भाषेंतून नव्या शास्त्रांचीं नांवें बनवतात त्याप्रमाणें आपल्या मराठीस संस्कृताची अत्युत्कृष्ट सोय आहे. यास्तव कोणीं कोणीं ग्रंथकारांनीं अशा ग्रंथांत मूळचीं इंग्रेजीच जीं नांवें ठेवलीं आहेत तें बराबर नाहीं असें आह्मांस वाटतें. थोड्या यत्नानें त्यांसारखीं किंबहुना त्यांहूनहि उत्कृष्ट अशीं नांवें संस्कृतांतून साधतां आलीं असतीं. हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार ग्रंथरचनेचा. मराठींत मूळचे ह्मणजे कायते छंदोबद्धच ग्रंथ आहेत; गद्य ग्रंथ ह्मटले ह्मणजे पंचोपाख्यानासारखे तीन चार गोष्टींचे ग्रंथ आणि बखरी. यास्तव इंग्रेजींतल्या सारखे शास्त्रीय ग्रंथ, व्याख्यानें, निबंध वगैरे लिहितांना ग्रंथाची एकंदर रचना इंग्रेजी ग्रंथांच्याच धाटणीवर केली पाहिजे. ह्मणजे मजकूर कलमवार लिहून विरामचिन्हें हीं जशीं इंग्रेजीच्या नमुन्यावर मराठींत मांडतात, त्याप्रमाणेंच लिहि-

ण्याचा एकंदर झोंकहि बहुधा इंग्रेजीसारखाच आणल्याशिवाय गत्यंतर नाहीं. यास्तव एवढ्यापुरतें इंग्रेजीचें अनुकरण करण्यास चिंता नाहीं असें आह्मांस वाटतें,—कारण तसा मूळचा प्रकार आपल्या भाषेंत मुळींच नाहीं. याप्रमाणेंच ज्या कल्पना आपणांत पूर्वीच्या नव्हत्या त्यांचे द्योतक जे 'देशाभिमान,' 'लोककल्याण,' 'सुधारणा' वगैरे शब्द ते जरी अगदीं नवे बनवले आहेत तरी ते ग्रंथांत घालण्यास कांहीं हरकत नाहीं. 'अशी आमची आशा आहे,' 'लिहिण्यास आनंद वाटतो कीं,' अशा प्रकारचे जे नवे संप्रदाय अलीकडे प्रचारांत आले आहेत तेहि आपणांत पूर्वी नसल्यामुळें आहेत तसेच ठेवण्यास कांहीं चिंता नाहीं असें आह्मांस वाटतें.

८. याप्रमाणें आमच्या मतें जेथपर्यंत इंग्रेजीचें अनुकरण करण्यास हरकत नाहीं तितकी मर्यादा सांगितली, हिच्या पलीकडे जें विनाकारण तिचें अनुकरण तें अनर्थावह होय यांत संशय नाहीं. परभाषेचें साह्य कोणत्याहि भाषेनें कोठवर घ्यावें याविषयीं महाविख्यात इंग्रेजी ग्रंथकार जो ड्रायडन् त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आंह कीं, तें साह्य त्या भाषेवरच उलटून जबरदस्ती करूं लागेल येथवर घेऊं नये. भाषेची उणीव नाहींशी करून तें तिच्या खरोखर उपयोगीं पडेल इतकेंच तें असावें. नाहीं तर आपल्या देशाची जशी स्थिति झाली आहे तशीच होण्याचा संभव. मराठ्यांचा इतिहास ज्यांनीं समग्र वाचला असेल त्यांस नाना फडनवीसाची राज्यनीति माहीतच असेल. परराज्यांचा अपहार करण्याची हिकमत पहिल्यानें काढणारा पहिला गव्हरनर जनरल जो हेस्टिंग्स त्यानें इंग्लिशांचा पगडा सगळ्या मुलखांत करण्याकरतां 'सब्सिडियरी आलायन्स' ह्मणजे आपलें सैन्य दुसऱ्या राजांपाशीं चाकरीस ठेवण्याचा तह हा प्रकार काढला, असा तह करण्याविषयीं त्याचा व पुढील गवरनरांचा नानास आग्रह चालला होता. पण त्यास त्यांतला मतलब कळून एकंदर राज्याची जरी त्या वेळेस फारच तारांबळ झाली होती तरी तो कबूल झाला नाहीं. त्यानें अनेक निकडीच्या प्रसंगीं त्यांचें साहाय्य मात्र मागितलें; पण तें इंग्लिशांनीं कधीं दिलें नाहीं. पण पुढें नाना मरण पावून दोन वर्षेंहि पुरतीं लोटलीं नाहींत तोंच शेवटल्या पळपट्या पेशव्यानें इंग्रजांचा फार दिवस मनांत धरलेला हेतु वसई मुक्कामीं शेवटास नेला. तेथील तहावर जी त्यानें सही केली ती पुढें झालेल्या राज्याच्या राजीनाम्यावरच केली असें ह्मटलें असतां चालेल. असो; तर आमच्या भाषेचीहि जर तीच गति न होऊं देण्याचें आमच्या लोकांच्या मनांत असेल तर इंग्रेजीचा मराठीशीं जो दिवसेंदिवस अधिकाधिक निकट संबंध होऊं पहात आहे त्यास त्यांनीं फार जपलें पाहिजे. या संबंधास वर जी मर्यादा सांगितली तीसहि मराठ्यांच्या इतिहासांतलें वरच्यासारखेंच सादृश्य दाखवितां येईल. मराठ्यांच्या लष्करांत मुसलमान, युरोपियन वगैरे सुद्धां असत; महादजी शिंद्यानें तर इंग्रेजांच्या सारखीं पलटणें तयार करून त्यांस

त्यांच्या सारखी कवायत शिकविली होती, व तोफखानाही संग्रहास ठेवला होता. त्याचा त्यास फार उपयोग झाला, व तो आणखी बरींच वर्षें वांचता तर त्याच्या योगानें तो काय करता हें सांगवत नाहीं! तर याप्रमाणें कांहीं बेताचे इंग्रेजी शब्द मराठींत घेतले असतां, व तींतील ग्रंथरचनाहि तींत उतरली असतां तीस अपाय न होतां तिचें हितच होईल. इतकेंच मात्र कीं, यांस मूळच्या भाषेहून शिरजोर होऊं देतां कामास नाहीं.

९. याप्रमाणें प्रस्तुत विषयाविषयीं सामान्यतः विचार झाला. आतां भाषादूषणाचीं कांहीं उदाहरणें देतों. एक आपल्याच लोकांच्या ग्रंथांतलीं; आणि दुसरीं परकी लोकांच्या ग्रंथांतून. पहिल्या प्रकारच्या ग्रंथांच्या उदाहरणार्थ रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें प्रसिद्ध पुस्तक 'हिंदुस्थानचा इतिहास' हें घेऊं. हें भाषांतर आज सुमारें पंधरा वर्षें प्रसिद्ध असून युनिव्हर्सिटींत बी. ए. परीक्षेस मराठीकडे नेमलें असे. शिवाय हेंहि लक्षांत आणलें पाहिजे कीं, जेव्हां हें लिहिलें त्या वेळेस इंग्रेजीचा प्रसार आतांप्रमाणें झाला नसल्यामुळें मराठी भाषा हल्लींच्या इतकी तेव्हां दूषित झाली नव्हती—

"(भा.२ पृ.३५१) पुढें त्यानें आणखी एक तसाच प्रयत्न केला, तो विशेष मोठा होता. त्याचा प्रकार—शाहूचें दैव खुलल्यामुळें मराठ्यांच्या गादीचा दुसरा वारीस संभाजी हा झांकून गेला होता, तथापि त्यानें आपल्या राज्याची गादी कोल्हापूर येथें स्थापिली होती, आणि तो आपल्या वंशाचें दक्षिणेकडील राज्य हातांत राखून सगळ्या राज्याविषयीं वारसा सांगतच होता. असोफजानें, त्याचा पक्ष विधिपूर्वक उचलिला असें न दाखवितां, मराठ्यांस आपल्या देशासंबंधी जी खंडणी द्यावयाची होती ती कोणास द्यावी, अशा संशयांत पडल्यासारखें ढोंग केलें; आणि उभय पक्षांच्या लोकांस आपल्या हक्कांची शाबिदी दाखविण्याविषयीं सांगितलें. या त्याच्या मागण्यानें शाहूस फार क्रोध आला. तो राग काढण्यास बाजीराव हें त्यास तयारच साधन मिळालें. इ०

"(पृ.२३७) शिवाजी हा मोठ्या सरदाराचा मुलगा असून, त्यानें प्रथम धाडशी व कपटी अशा चोरांच्या सरदारांचा वेष धरून संसार आरंभिला; परंतु पुढें पक्क दशेस येऊन तो मोठा कुशल सरदार व शहाणा राज्यकर्ता होऊन गेला. तो जी आपली कीर्ति ठेवून गेला, तिची बरोबरी अथवा तिच्या जवळ जवळ चालहि त्याच्या देशबांधवांतून अद्यापि कोणीं एकानेंहि केली नाहीं. जवळच्या देशांची स्थिति गडबडलेली होती, त्यामुळें ज्या संधि मिळाल्या, त्या योगेंकरून यापेक्षां कमी बुद्धिमान् सरदारहि कदाचित् आपलें हित करून घेता; परंतु धर्माविषयीं श्रद्धा जागृत करून तिच्या द्वारानें मराठे लोकांत स्वदेशाभिमान उत्पन्न करणें, आणि त्या

योगानें औरंगजेबानें मुसलमानी धर्माविषयीं दुराग्रह धरून हिंदूंचे छळ करणें इत्यादि ज्या कांहीं चुक्या केल्या; त्यांची संधि साधून आपला फायदा करून घेणें, हें काम करण्यास शिवाजीसारखाच बुद्धिमान् पाहिजे होता. इ०.

"(कित्ता) शिवाजी प्रथम चकित झाला होता, तो सांवरून पुनः लढाई करूं लागला; तेव्हां आपली सामग्री शिवाजीनें मारून नेली असें पाहून नाइलाज होऊन दिल्लीकरानें विजापुरचा वेढा उठविला.

"(भा.२ पृ.२७५) या सर्व भारी मेहेनतीच्या कामांचा विचार करीत असतां, त्यांच्या उतार वयामध्यें ज्या संकटांचें व दुःखांचें त्यावर आच्छादन पडलें होतें त्यांतून त्यानें मोठ्या धैर्यानें आपलें डोकें कसें वर काढलें, याविषयीं त्याची स्तुति न करणें हें अशक्य आहे.

"(—पृ. २८७) हे बंदोबस्त होऊन फार वेळ झाला नाहीं, इतक्यांत आपला अंतकाळ जवळ येत आहे असें त्यास समजलें. त्या भयंकर प्रसंगीं त्याणें शाहजादा अझीम यास स्वतः पत्र लिहिलें किंवा सांगून दुसऱ्याच्या हातून लिहवविलें आहे; त्यांत ऐहिक उपदेश व निर्वाणचीं भाषणें असून मधून मधून कांहीं तुटक तुटक वाक्यें आहेत; त्यांत जे पश्चात्तापाचे उद्गार आणि परलोकची भीति यांहीं करून त्याचें अंतःकरण गलबललें होतें, तीं बाहेर पडलीं आहेत. इ० इ०

वरच्यासारख्या भाषेचा प्रकार प्रस्तुत भाषांतरांत येथून तेथून आहे. मधून मधून भाषांतर चांगलें आहे खरें, व कोठें कोठें शब्दहि चांगले निवडून घेण्यासारखे घातले आहेत; पण ज्यांकरितां हें भाषांतर ग्रंथकारानें केलें त्यांस याचा काडीइतकाहि उपयोग होण्यासारखा नाहीं असें ह्मटल्यास हरकत नाहीं. असे इतिहासग्रंथ असल्यावर एकंदर लोकांचे ठायीं इतिहासाचें एवढें अज्ञान असल्यास नवल काय ?

आतां दुसऱ्या प्रकारचे ह्मणजे परकी लोकांचे ग्रंथ पाहूं. यांच्या उदाहरणार्थ 'साधारण प्रार्थना' हें पुस्तक घेऊं. ख्रिस्ती 'दीक्षितां' च्या मंडळीनें तयार केलेलें हें पवित्र पुस्तक सैतानानें आमच्या डोळ्यांवर झांपड घातलें असल्यामुळें आह्मांस चांगलें वाटत नसेल तर नकळे; पण आमचा आह्मांस जो त्याचा अनुभव वाटतो तो मनोभावानें आह्मीं आमच्या वाचकांस कळवितों; आह्मीं हें पुस्तक सगळें वाचलें नाहीं हें मोकळे मनानें कबूल करतों; फार तर काय, पण एक पानहि आमच्यानें सबंध वाचून जाववलें नाहीं. असा यांत काय गुण असेल तो असो ! तरी इकडून तिकडून चाळून पहातां या पुस्तकापासून दोन चार फार चांगले उपयोग होतीलसे आह्मांस वाटलें. एक ज्यास झोंप येत नसेल त्यानें हें हातीं घ्यावें, ह्मणजे दोन चार वाक्यांत झोंप ठेवलेली; कोणास जर करमेनासें झालें तर चार घटका त्यास खों खों हसविण्यास यासारखें साधन नाहीं; कोणाला जर वर्षा सहा महिन्यांची

सक्त मजुरीची शिक्षा द्यावयाची असली, आणि तो तर प्रकृतीनें अशक्त आहे, तर हें पुस्तक सबंध वाचणें त्या शिक्षेच्या मोबदला दिल्यास चालेल; किंवा अशुद्ध वाक्यें शुद्ध करण्यास विद्यार्थ्यांस जर द्यावयाचीं असलीं, तर हें पुस्तक बाळगलें असतां दुसरीकडे बघण्याची बिलकूल गरज रहाणार नाहीं !

मागील पुस्तक अंमळ इकडे तिकडे वाचण्याचे तरी आह्मांस श्रम पडले; पण तेहि श्रम प्रस्तुत ग्रंथाचे दयाळू कर्ते आह्मांस देत नाहींत. खरोखरी पहातां 'साधारण प्रार्थने'चें मुखपत्रहि आमच्या उपयोगीं पडण्यासारखें आहे; पण तसें करणें फारच अप्रतिष्ठित जाणून प्रस्तावनेंतले थोडके चुटके वाचकांस सादर करतों--

"इंग्लंड देशच्या मंडळीनें पहिलें मंडळींतील भजनाचें पुस्तक रचिलें, त्या वेळापासून त्यांतील गोष्टींहून ज्या भिन्न आहेत त्या हट्टानें नाकारणें, अथवा सहज अंगीकारणें, ह्या दोन्ही गोष्टी न करतां मध्यम क्रम धरिला, यांत मोठा शहाणपणा दाखविला आहे. कारण आह्मास अनुभवावरून असें समजून आलें आहे कीं, ज्या गोष्टी विचारपूर्वक स्थापित आहेत, त्यांत फेरफार करण्याचें अगत्य नसून पालट केल्यावरून अनेक प्रकारच्या अडचणी लागल्या आहेत; आणि अशा फेरफारानें ज्या गोष्टी दूर करण्याच्या हेत्या त्यांपेक्षां अडचणी फार व अधिक मोठ्या लागल्या आहेत."इ.इ.

"सकाळची व संध्याकाळची प्रार्थना मंडळस्थानांत, भजनस्थानांत अथवा कठड्यांत ज्या ठिकाणीं ह्मणत आले आहेत, तेथेंच ह्या प्रदेशांतील धर्माधिकाऱ्यानें निराळा हुकूम दिल्हा नसल्यास ह्मणावी. आणखी कठडे मागल्या काळाप्रमाणें राहूं द्यावे."

"आणि लक्षांत ठेवावें कीं साहावा एडवर्ड राजा याच्या दुसऱ्या वर्षी पार्लिमेंताच्या अधिकारानें या इंग्लंडच्या मंडळींत जीं मंडळीचीं व आचार्यांचीं भूषणें चालत होतीं, तींच आचार्यत्व करण्यांत नेहमीं राखून उपयोगास लावायाचीं आहेत."

सकाळची प्रार्थना—

"माझ्या पातकापासून आपलें मुख आवरून घे; व माझें सर्व अन्याय पुसून टाक. गीत ५१.९.

"देवाचे यज्ञ ह्मणजे फुटलेला आत्मा, फुटलेलें व नम्र झालेलें हृदय, हे देवा, तूं तुच्छ मानणार नाहींस. गीत ५१.१७.

"आपलीं वस्त्रें नका, तर आपलें हृदय फाडा; आणि परमेश्वर जो तुमचा देव त्याकडे फिरा; कां कीं तो कृपाळू व दयाळू, मंदक्रोध व फार मायाळू आहे, आणि विपत्तीविषयीं अनुतापी आहे. योएल २.१३.

"पश्चात्ताप करा, कां कीं आकाशाचें राज्य जवळ आलें आहे. माथी ३.२.

आणखी एकच लहानसा उतारा घेतों—

"शुभ्रसप्तकांतील सोमवार--

देवा, त्वां या समयानुसार आपल्या पवित्र आत्म्याचा प्रकाश पाठवून आपल्या विश्वासू लोकांच्या अंतःकरणांस शिकविलें तसें आह्मास त्याच आत्म्याने हरएक गोष्टींत यथार्थ समज प्राप्त होऊन त्याच्या पवित्र सांत्वनावरून सर्वकाळ आनंद करावा असें कर; आमचा तारणारा ख्रिस्त येशू याच्या पुण्यास्तव, जो तुजबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यांत एकच देव निरंतर असून युगोयुगीं जगतो व राज्य करितो. आमेन."

वरील वाक्यें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस समजलीं असतील तीं असोत; आह्मांस तर या भाषांतरासारखाच त्याचा हेतुहि बिलकूल कळत नाहीं. मराठींत भाषांतर ह्मणजे काय ? ज्यास इंग्रेजी ग्रंथ कळत नाहीं त्यास त्यांतील अर्थ मराठी भाषेनें कळावा हाच त्याचा उद्देश कीं नाहीं ? हा उद्देश ख्रिस्ती लोकांनीं जीं शेकडों भाषांतरें आजपर्यंत केलीं व अजून करीत आहेत त्यांच्यापैकीं कितीएकांनीं सिद्धीस जातो बरें ? प्रस्तुतच्या इतकींच जर तीं सर्व उतरलीं असलीं, तर ते ग्रंथ मूळचे इंग्रेजीचे इंग्रेजींतच ठेवणें फार बरें होतें असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. भाषांतर उतरण्याचा व छापण्याचा तरी अटाट तशानें वांचला ! असो; पण एवढी उघड गोष्टहि आमच्या ख्रिस्तभक्तांस दिसत नाहीं; त्यांस वाटतें कीं आपल्या सद्धर्मांतील ग्रंथ देवनगरी लिपींत नुसते लोकांच्या दृष्टीस पडले तरी तेवढ्यानेंहि त्यांचें तारण होईल ! असें त्यांचें मत असल्यास आह्मी त्यांस एक सूचना करतों कीं, अलीकडे भराभर बेरीज, गुणाकार वगैरे करण्याचीं जशीं यंत्रें केलीं आहेत तसें एका बाजूला मराठी व्याकरण व दुसऱ्या बाजूस मराठी कोश अशीं आंत घालून भराभर भाषांतरें तयार होण्याचें त्यांनीं एक यंत्र तयार करावें. ह्मणजे तेणेंकरून त्यांच्या शुभवर्तमानाच्या क्रियाचा फार त्वरित जगावर प्रसार होईल !

१०. आतां सरतेशेवटीं बोलण्याच्या किंवा लिहिण्याच्या मराठी भाषेच्या शुद्धतेचें एक निश्चित प्रमाण तरी कोणतें धरावें तें सांगतों. एक मराठी कवि व दुसरें प्रमाण आपल्या स्त्रिया वगैरे. पहिल्यांच्या भाषेंत परभाषेच्या संस्काराची बिलकूल शंकाहि नाहीं हें उघडच आहे; यास्तव त्यांत जे शब्द व जे प्रयोग आढळतील ते अर्थातच अत्यंत शुद्ध होत. दुसरें प्रमाण तरी तसेंच मजबूत आहे. आपल्या बायकांच्या भाषेस अजून आपल्याप्रमाणें परभाषेचा विकार जडला नाहीं यास्तव त्यांचें बोलणें अगदीं शुद्ध मराठी धरण्यास चिंता नाहीं. असेंच वृद्ध मनुष्यांचें, व ज्यांस इंग्रेजीचा गंधहि लागला नाहीं अशा एकंदर सर्व लोकांचेंहि बोलणें शुद्धतेचें उत्कृष्ट प्रमाण होय. अशांस समजण्यासारखा जो ग्रंथ झाला त्याच्या शुद्धतेविषयीं मग जास्ती बोलणेंच उरलें नाहीं. यास्तव जो कोणी मराठी लिहील त्यानें जर नेहमीं हें मनांत ठेवलें कीं, हें वाक्य मीं जर इंग्रेजी न समजणाऱ्या एखाद्या मनुष्यापुढें

वाचून दाखविलें तर तें त्यास कितपत समजेल, तर सध्यांचा भाषादूषणाचा दोष हळू हळू अगदीं नाहींसा होऊन जाईल. ईश्वर करो, आणि आमच्या ग्रंथकारांच्या ठायीं स्वभाषेच्या शुद्धतेविषयीं असा अभिमान सतत जागृत राहो !

लेखनशुद्धि.

लिपेर्यथावद्ग्रहणेन वाङ्मयं नदीमुखेनेव समुद्रमाविशत्[1] ।
रघुवंश.

अंक १०— (१) उपोद्घात. (२) शास्त्र आणि रूढि. (३) व्याकरणाचें प्राधान्य. (४) भाषा आणि व्याकरण. (५) त्यांचा परस्पर संबंध. (६) मराठी भाषेची स्थिति. (७) लेखनपद्धति बसविण्याचें साधन. (८) विषयाचीं तीन सदरें. (९) वर्णशुद्धि. (१०) शब्दशुद्धि. (११) वाक्यशुद्धि. (१२) सारांश.

१. लेखनशुद्धि ह्मणजे शुद्ध लिहिण्याची पद्धति. ह्मीविषयीं सध्यां बरेच नियम ठरले आहेत; आणि शुद्ध कसें लिहावें, ह्मणजे ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार वगैरेविषयीं विद्यार्थ्यांकरितां लहान पुस्तकेंहि कांहीं झालीं आहेत. यांविषयीं आह्मांस कांहीं विशेष लिहिणें नाहीं. तरी य. विषयाच्या संबंधाच्या आणखी कांहीं गोष्टी आहेत त्यांविषयीं विचार करणें अवश्य आहे. त्यांविषयीं पूर्णपणें असें विवेचन आजपर्यंत कोणींच केलेलें नाहीं. असें समजून या अंकांत त्यांविषयीं कांहीं विचार प्रदर्शित करतों.

२. कोणत्याहि आचाराची शुद्धता ह्मणजे तो बरोबर आहे कीं नाहीं याचा निर्णय नेहमीं दोन गोष्टींवरून होतो. एक शास्त्र आणि दुसरी रूढि. शास्त्र ह्मणजे तत्त्ववेत्या पुरुषांनीं चांगला विचार करून घालून दिलेले नियम; आणि रूढि ह्मणजे कालगत्या पडलेला प्रचार. या दोहोंचा अगदीं प्रथमारंभीं अर्थातच पूर्ण मिलाफ असतो, किंवा निदान पुष्कळ असतो; पुढें हळू हळू रूढि ढिली पडत जाऊन कधीं कधीं ती शास्त्राच्या अगदीं उलटहि होते. हा प्रकार लोकव्यवहारांत, धर्मांत, वगैरे जेथें तेथें दृष्टीस पडतो. असो; तर याप्रमाणेंच प्रस्तुत विषयाचाहि विचार आहे. अमुक लिहिणें शुद्ध आणि अमुक अशुद्ध याचा निश्चय ह्मटला ह्मणजे एक शास्त्रावरून ह्मणजे व्याकरणावरून; आणि दुसरा रूढीवरून ह्मणजे बोलण्यांत किंवा लिहिण्यांत तसा प्रयोग होतो यावरून. जेथें दोन्ही प्रकार जमतात तेथें ठीकच आहे; पण जेथें दोहोंचा विरोध येतो, तेथें बरीक मोठी पंचाईत येते. अशा ठिकाणीं कोणता मार्ग काढावा ?

---

१. "लिपी ह्मणजे बाराखड्या चांगल्या शिकून हा [रघु] नदीच्या मुखानें जसें अफाट समुद्रांत शिरावें त्याप्रमाणें विद्येंत शिरला."

३. आतां खरोखरी ह्मटलें असतां असा वाद जेथें उत्पन्न होतो तेथें व्याकरणाप्रमाणें निर्णय करावा; ह्मणजे जो शब्दप्रयोग किंवा वाक्यप्रयोग व्याकरणाच्या नियमांस अनुसरून असेल तोच खरा ह्मणावा. असें केलें असतां भाषा निर्दोष होऊन तींत चोहोंकडे सारखा मेळ बसेल; आणि यामुळें शिकणारास व शिकविणारास दोघांसहि ती जास्त सुलभ होईल. याप्रमाणेंच तिचें बाह्य स्वरूप चांगलें नीटनेटकें होईल. पण वरील प्रकार जर सर्वथैव चालवला, त्यास कांहींच नियमित मर्यादा केली नाहीं, तर भाषेची मोठींच हानि होईल. तिचा स्वेच्छाप्रचार बंद होऊन ती व्याकरणाच्या सूत्रांनीं जशी कांहीं अगदीं बद्ध होऊन जाईल. आणि तिचें स्वरूप कांहीं तऱ्हेवाईक, बोजड अशा प्रकारचें होऊन कृत्रिमतेचा मोठा दोष तिजवर सर्वथा येईल. ह्मणजे चालत्या बोलत्या माणसांत आणि मनुष्याचा पुतळा करून त्याच्याकडून नेहमींचे व्यापार यांत्रिक शक्तीनें करविले असतां त्यांत, या दोहोंत जितका भेद दिसेल तितकाच स्वेच्छाप्रचार जिला आहे अशा भाषेंत आणि व्याकरणानें चोहोंकडून बांधून टाकलेल्या भाषेंत दृष्टीस पडेल. सारांश पावसाचें पाणी जसें अगदीं शुद्ध असतें खरें पण अगदीं बेचव लागतें, आणि निर्वाहास अगदीं उपयोगाचें नाहीं, त्याप्रमाणेंच वर कल्पिलेली शुद्ध भाषा होय; पण तेंच पाणी जमीनीवरून वाहून त्यांत तींतील अनेक द्रव्यें मिसळलीं असतां तें दूषित होतें खरें, पण मधुर होऊन सेवनीय होतें. त्याप्रमाणेंच स्वच्छंदानें चालणाऱ्या भाषेची गोष्ट होय. वैयाकरण्याच्या दृष्टीस जे तिचे दूषणप्रकार दिसतात तेच तिच्या अंगीं अर्थव्यंजकता, माधुर्य, चलखपणा वगैरे गुण आणणारे असतात.

४. पण इतकेंच नव्हे. वर व्याकरण प्रधान आहे ह्मणून सांगितलें त्यामुळें केवळ भाषेच्या प्रचारावरूनच शब्दांचा किंवा वाक्यांचा प्रयोग शुद्ध मानणें बरोबर नाहीं हें खरें: पण एके रीतीनें पहातां प्रचाराकडेच मोठी प्रधानता येते. ती अशी कीं, न्यायदृष्ट्या जरी व्याकरणावरूनच प्रयोगाची शुद्धता मानणें बरोबर आहे; तरी कालदृष्ट्या प्रचारासच अधिक मान दिला पाहिजे, कारण व्याकरणाची उत्पत्ति जर पाहिली तर ती भाषेच्या फारच मागून होते. आणि जेवढीं ह्मणून शास्त्रें आहेत त्यांस तरी हीच गोष्ट लागते; कीं प्रचार आधीं; आणि मग त्यावर विचार करून कांहीं नियम बसवून ते नियम हळू हळू पूर्ण झाले, ह्मणजे ते शास्त्र होतात. असें तर खचीत झालें नाहीं, कीं वैयाकरण अध्यक्षस्थानीं बसून सर्व राष्ट्र त्याच्यापुढें हात जोडून उभें राहून त्याचीं सूत्रें त्यांनीं उतरून घेतलीं, आणि घरोघर जाऊन त्या सूत्रांप्रमाणें बेचूक बोलण्यास आरंभ केला ! तसेंच जेथें जेथें एखादी पंचाईत पडूं लागेल तेथें तेथें बोलतांना तसेंच अर्धें थांबून वैयाकरणाकडे आले, आणि विचारूं लागले, कीं, महाराज अमुक अमुक शब्दाला विभक्तिप्रत्यक नीट लागत नाहीं, किंवा

अमुकापासून अमुक अर्थी तद्धित साधतां येत नाहीं, तर या ठिकाणीं तुम्ही काय निर्णय देतां तो द्या; ह्मणजे त्याप्रमाणें मी एका मनुष्याशीं बोलतांना अधेंच वाक्य टाकून आलों आहें तें जाऊन पुरतें करीन ! असा तर प्रकार खचीत झाला नाहींना ? ज्यास जसा त्या वेळेस प्रत्यय लावतां आला, किंवा प्रयोग करतां आला, तसाच त्यानें दामटला असेल यांत संशय नाहीं. लहान मुलें जेव्हां पहिल्यानें बोलूं लागतात तेव्हां 'करला,' 'मरला' असे भूतकाळ, किंवा 'बुवा'-'बुवे' अशा अशा प्रकारचीं अनेक वचनें वगैरे रूपें प्रयोगसादृश्यावरून साधतात हें पुष्कळांच्या लक्षांत असेलच; व याप्रमाणेंच पहिल्या पहिल्यानें भाषेचा उद्भव हळू हळू होत गेला यांत संशय नाहीं. त्या वेळेस अष्टाध्यायीच्या अमुक अमुक सूत्रावर अमुक अमुक वार्तिक आहे तस्मात् हा प्रयोग अशुद्ध आहे, असें ह्मणण्यास मुळींच जागा नव्हती हें उघड आहे. तेव्हां भाषेंत व व्याकरणांत इतकें अंतर आहे ! भाषा केव्हां उत्पन्न झाली, कशी झाली, व कोठें झाली याचा विचार ह्मणजे पर्वत केव्हां उत्पन्न झाले, समुद्र केव्हां पाण्यानें भरला या गोष्टींच्या शोधाइतकाच गहन आहे ! आणि व्याकरणांची उत्पत्ति तर सर्व भाषांची सांगतां येईल; कित्येकांची तर अगदीं अलीकडे झाली आहे, आणि अजून अशाहि शेंकडों भाषा असतील कीं ज्यांस व्याकरणाची ओळखहि नाहीं !

५. वरील उपपादनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, भाषा ही बहुधा अनादि आहे; तेव्हां कायद्याप्रमाणें वहिवाट जर पाहिली तर व्याकरणाच्या तर्फे फैसला न होतां प्रचाराच्या तर्फे होईल. जे प्रयोग शेंकडों वर्षे बसून गेले आहेत, कीं भाषेचा आणि त्यांचा जणों काय एकच जीव होऊन गेला आहे, त्यांस व्याकरणानें उपटून टाकण्याचा यत्न करणें ह्मणजे इंजनेरास सडक बांधायाची असतां त्यानें मधील डोंगर व पर्वत उपटून दूर फेंकून देण्यासारखेंच कृत्य आहे ! ज्यांचीं मूळें अगदीं भाषेच्या मूळांइतकींच बहुतेक पोंचलीं आहेत असे प्रयोग वैयाकरणांनीं कितीहि आपली शक्ति वेंचली तरी कसे निघतील ? फार झालें तर, आपल्या व्याकरणांत मोठमोठ्या डोळ्यांत भसकन जाणाऱ्या अक्षरांनीं तो अमुक अमुक प्रयोगांस निषिद्ध करून त्यांवर बहिष्कार टाकील; पण रोमच्या पोपमहाराजांच्या बहिष्कारास यत्किंचितहि न जुमानतां त्यांची आज्ञा एकीकडे झुगारून देऊन पृथ्वी जशी फिरतेच आहे, फार तर काय, पण त्या युरोपियन शंकराचार्यांचा व्याटिकन् नामक सुंदर मठ व प्रत्यक्ष धर्ममूर्ति स्वतः यांसहि तिजबरोबर फिरावें लागतेंच; त्याप्रमाणेंच अशा जुलमी व्याकरणकर्त्यांचीहि फजिती होते[1]! यास्तवच संस्कृत वैयाकरणांचा पहिला मोठा

१. वरील संबंध आमच्या साऱ्या वाचकांच्या लक्षांत येण्यासारखा नाहीं; यास्तव तो फोडून सांगितला पाहिजे. ग्यालिलिओनें पृथ्वीच्या गतीचें नवेंच मत काढल्याबद्दल

(पुढें चालू.)

सिद्धांत हा आहे कीं, 'प्रयोगशरणा वैयाकरणाः' वैयाकरण हे प्रयोगाचे बांधील आहेत, त्यांच्यापुढें यांचें शहाणपण खुंटतें. ते जसे असतील तसेच घेऊन यांस चाललें पाहिजे, त्यांशीं दांडगाई करून कांहीं उपयोग नाहीं. भाषा ही कोणी महानदीच होय. हिचा प्रवाह सतत वेगानें धांवणारा व अत्यंत उच्छृंखल असा असतो. यास्तव त्यास रोध करणारीं जीं धरणें, पूल वगैरे बांधणें तीं फार जपून बांधावीं लागतात. हीं जर तिच्या अनुरोधानें बांधलीं, अशीं कीं तिच्या स्वच्छंद गतीस तीं प्रतिबंधक न होत, तरच त्यांचा कांहीं टिकाव ! नाहीं तर वैयाकरणरूप इंजनेरांनीं आपली सगळी कर्तबगारी खर्चून जरी आपल्या मतें मोठें भक्कम काम केलें असलें, तरी एखादे दिवशीं इंजनेरसाहेब खुद्द पुलावर उभे राहून नदीवेगास हंसत असतांच वेळेनसार धडाड होऊन नदी आपलें सामर्थ्य प्रकट करायची ! असो; तर जसें शहर नदीच्या अनुरोधानें वसतें; शहराच्या अनुरोधानें नदी वहात नाहीं; त्याप्रमाणेंच भाषेच्या अनुरोधानेंच व्याकरणानें नेहमीं चाललें पाहिजे, त्याच्या अनुरोधानें ती कधीं चालायाची नाहीं !

६. जो व्याकरण नवें करूं जाईल किंवा भाषेचें शोधन करण्याच्या वगैरे खटपटीस पडेल त्यानें वरील गोष्टी चांगल्या पक्केपणीं ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. पण त्यांकडे आपल्या भाषेंत सर्वथा लक्ष दिलेलें दिसत नाहीं. भाषेंतील रूढ शब्द, रूढ प्रयोग यांस बळेंच फिरविण्याचा आज बरींच वर्षे उद्योग चालू आहे. याविषयीं पुढें विशेषतः लिहिण्यांत येईल. सध्यां इतकेंच सुचवितों कीं, मागील कलमांत भाषेच्या प्राबल्याविषयीं जें लिहिलें तें आपल्या मराठी भाषेस तर फारच लागू पडतें. संस्कृत, इंग्लिश वगैरे भाषा व्याकरणाच्या अटकावांत आज शेंकडों वर्षे तरी आहेत. पण आमच्या मराठीस तो संस्कार नुकता नुकता लागत चालला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तिचें नियमन करण्यास्तव आमच्या पाणिनीनें उद्योग केल्यासच नुकतीं कोठें चाळीस वर्षे होत आहेत. त्याच्या आधींचा सर्व काळ तर तीस कोणतेंच बंधन माहीत नव्हतें. अजून तरी वरील दोन भाषांप्रमाणें तींत कोणी मोठे नामांकित ग्रंथकार होऊन तिचे प्रयोग त्यांनीं बसवून टाकले आहेत असेंहि झालें नाहीं. तिचा प्रचार अजून बहुधा स्वच्छंद वृत्तीचाच आहे. यास्तव तिला जीं बंधनें करावयाचीं तीं फार जपून केलीं पाहिजेत. तरच तीं कांहीं निभावून भाषेचें हित होईल.

७. आपल्या भाषेच्या मूळ भाषा झटल्या ह्मणजे बालभाषा, संस्कृत, फारशी व आरबी या होत; यास्तव तिची लेखनपद्धति बसविण्यास या चारी भाषांचें चांगलें

त्याचा पोपमहाराजांनीं छळ केला हें सर्वांस माहीत असेलच. पण इतक्यानेंच झालें नाहीं. त्या खिस्ताच्या प्रतिनिधीनें लवकरच एक आज्ञापत्र काढलें, कीं पृथ्वीनें फिरूं नये ! ! ! या एकंदर वृत्तांतावरून खिस्ती धर्मानें अंगीं येणाऱ्या शांतीचें व ज्ञानाचें स्वरूप उत्कृष्ट दृष्टीस पडतें !

ज्ञान अगोदर अवश्य पाहिजे. हे अजूनपर्यंत कोणीं ह्मणण्यासारखें संपादन केलेलें आह्मांस माहीत नाहीं. अलीकडे युनिव्हर्सिटीच्या परीक्षांत संस्कृत घातल्यामुळें त्याचा प्रचार बराच होऊन हें एक अंग पुष्कळांस साध्य झालें आहे खरें. पण याखेरीज बाकीच्या तिहींचें ज्ञान फारच थोडक्यांस असेल. मोलस्वर्थच्या कोशांत मात्र शब्दव्युत्पत्ति देतांना वरील भाषांतील मूळचीं रूपें पुष्कळ ठिकाणीं दिलीं आहेत. पण त्यावर आज सुमारें पन्नास वर्षांत याविषयीं कोणीं यत्किंचित्हि विचार केला आहेसा दिसत नाहीं. आह्मीं सहाव्या अंकाच्या शेवटीं ज्या थोड्या चुका दाखविल्या आहेत त्यांवरून पहातां या कोशांत फेरफार करण्यास बरीच जागा अजून असेल यांत अगदीं संशय नाहीं, असें आह्मांस वाटतें. तर आमच्या भाषेच्या हितचिंतकांस आह्मी येथें इतकेंच सुचवितों कीं, ज्यांस वरील भाषांचें ज्ञान असेल त्यांनीं तें प्रस्तुत विषयास लावून तिची व्युत्पत्ति व लेखनपद्धति हीं जर सुधारलीं तर त्यांच्या ज्ञानाचें चांगलें चीज होणार आहे !

८. आतां प्रस्तुत विषयाचीं तीन सदरें करून त्याविषयीं विचार करूं. एक वर्णशुद्धि, दुसरी शब्दशुद्धि आणि तिसरी वाक्यशुद्धि. वर्णशुद्धि ह्मणजे मराठी भाषा सध्यां जशी लिहितात ती तश्शा बरोबर आहे कीं नाहीं; असाच शब्दांविषयीं व वाक्यांविषयींहि विचार करावयाचा.

९. वर्णशुद्धीविषयीं एकंदरींत पहातां सध्यांची पद्धत बहुतकरून बरोबर आहे असें आह्मांस वाटतें. वीस पंचवीस वर्षांपूर्वीं 'स्थ' च्या जागीं 'स्छ,' 'च'चा दंततालव्य उच्चार कर्तव्य असतां त्याच्या मागें टिंब द्यायचें, वगैरे जे विलक्षण प्रकार चालू होते ते आतां कोठेंहि दृष्टीस पडत नाहींत. इंग्रेजींतील 'ट' 'ड' याच्या जागीं 'त' 'द' असें लिहिण्याचा परिपाठहि अलीकडे अंगळ माजीच पडला असें दिसतें. 'स्कातलंद', 'त्रान्स्लेतर' 'वाशिंग्तन्' वगैरे रूपें सरकारी मराठी पुस्तकांतून व मिशनरींच्या ग्रंथांतून अगदीं नेहमीं आढळतात खरीं. पण बाकीच्या पुस्तकांतून वरील नियम तितका अबाधित चालत नाहीं. 'इंग्लंड,' 'अक्टोबर' अशींच रूपें बोलण्यांत व लिहिण्यांत अलीकडे चालू झालीं आहत.[1] हे वरील तिन्ही फेरफार फार समं-

१. हा विलक्षण प्रघात कशामुळें पडला असेल तो असो ! 'इंग्लंड' शब्दाचें 'इंग्लंद' असें जें रूपांतर करायाचें तें मराठींत 'ड' नाहीं ह्मणून, किंवा तसा उच्चार आह्मी नेहमीं करतों ह्मणून, काय असेल तें असो ! आमच्या लिपींत तर 'ड' आहेच, व इंग्रेजी शब्दांचाहि उच्चार 'बटाटा,' 'पोष्ट,' 'अड्रिपष्टन,' असाच आमचे लोक करीत आले आहेत. एक मात्र कारण दिसतें, कीं इंग्रेजींत 'त' नसल्यानें Caloutta असें इंग्रेज लोक त्या शब्दाचें रूपांतर करतात, तेव्हां असे शब्द पुनः मराठींत आणले असतां 'ट' चा पुनः 'त' करावा लागतो. पण या इंग्रेजी लिपीच्या उणीवेबद्दल मराठीला काय ह्मणून तिसऱ्या ठिकाणीं प्रायश्चित्त ! !

जस झाले. तरी अद्याप कित्येक शब्दांविषयीं लिहिण्यांत घरसोड दिसते. उदाहरणार्थ 'पाहणें,' 'पाणीं.' पहिला शब्द कोणी 'पहाणें' असाहि लिहितात; व दुसऱ्यावर बहुधा कोणी अनुस्वार देत नाहींत. पण हे शब्द मूळ कशापासून अपभ्रंश पावले आहेत हें जर पाहिलें, तर 'पाहणें,' 'पाणीं' हेंच बरोबर आहे असें सर्वांच्या लक्षांत येईल. पहिल्याचें मूळ रूप 'पश्य' असें आहे; तेव्हां 'साप,' 'आख' याप्रमाणें यांचा अपभ्रंश ' पाह ' असाच होईल; 'पहा' असा कदापि होणार नाहीं. तसेंच 'पानीयम्' याच्या शेवटीं नासिक्य वर्ण असल्यामुळें 'रामें,' 'गांव,' 'में' याप्रमाणेंच 'पाणीं' असें लिहून अनुस्वार ठेवणें बरोबर आहे. असो; तर याप्रमाणें मूळ व्युत्पत्तीचा जर विचार केला, तर पुष्कळ शब्दांचीं शुद्ध व ग्राह्य रूपें कोणतीं तीं चांगलीं समजतील. आतां वरच्याशिवाय आणखी एक वर्णशुद्धीविषयींचा प्रकार सांगणें राहिला आहे. तो हा कीं, एरवीं लोक सामान्यतः जसा उच्चार करतात त्यांस अनुसरून न लिहितां भलतेंच रूप लिहिणें. जसें, 'सोई' 'सवई' 'रुचिकर' 'तब्यत' इत्यादि. हेच शब्द जसे आपण ह्मणतों तसेच ह्मणजे अनुक्रमेंकरून 'सोय' 'सवय' 'रुचकर', 'तब्बेत' असेच लिहिणें विशेष प्रशस्त आहे असें आह्मांस वाटतें.

१०. दुसरें सदर शब्दशुद्धि. हीविषयींहि सध्यां बराच घोंटाळा आहे. मराठींत संस्कृतांतूनच जे शब्द आले आहेत त्यांचीं कोणी मूळाप्रमाणेंच शुद्ध रूपें लिहितात व कोणी मराठीप्रमाणेंच लिहितात. तरी ज्या ग्रंथकारांस मानमान्यता आहे ते बहुधा पहिलीच पद्धति उचलतात; दुसरीस अनुसरणारे थोडे, आणि ज्यांस विशेष मान नाहीं असे. उदाहरणार्थ 'जन्म' शब्द घ्या. हा संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे, आणि मराठींत पुल्लिंगी आहे, तरी 'त्याचा जन्म झाला' असें न ह्मणतां 'त्याचें जन्म झालें' असें लिहिण्याचा सध्यां बहुधा अगदीं परिपाठ पडून गेला आहे. 'जें वस्तु', 'ती वीणा', किंबहुना 'तो स्वप्न' असेंहि कोणी अगदीं संस्कृताच्या पद्धतीवर पडून लिहितात. पण हा प्रकार आमच्या बुद्धीनें सर्वथा प्रशस्त नव्हे. एक तर मराठी भाषा संस्कृताहून भिन्न आहे; यास्तव ही तिची भिन्नता जितकी कायम राहील तितकी अवश्य राखली पाहिजे. नाहीं तर फारशी भाषेविषयीं जसें सांगतात कीं ती अर्धीमुर्धी आरबीच आहे; त्याप्रमाणें आपल्या भाषेची दशा होऊन तिचें स्वातंत्र्य नष्ट व्हावयाचें. दुसरें, जर याप्रमाणें मूळ संस्कृत शुद्ध ह्मणून त्याचेंच अनुसरण करण्यास एकदां आरंभ केला, तर मग हा प्रकार चालवावा तरी कोठपर्यंत ? शेंकडों शब्दांचीं रूपें बदलून टाकून त्यांस नीटनेटकें करावें लागेल ! 'मी जेवणा अनंतर निजतों, 'हें घडणें दुरापास्त आहे,' 'ही तुला कोठून अवदशा आठवली ?' 'मला स्वप्न पडला' त्यानें वीणा वाजविली' 'इंग्लंडांत विदुषी स्त्रिया पुष्कळ आहेत' असे प्रयोग करणें भाग पडून सगळी भाषाची भाषा उसकटावी लागेल. शिवाय, संस्कृतापासून आलेल्या

शब्दांस याप्रमाणें पूर्वस्थिति दिली तर मग फारशी व आरबी शब्दांनीं तरी काय केलें आहे ? त्यांचींहि मूळचीं रूपें व मूळचे अर्थ पुनः आणावे लागून सगळा येथून तेथून गोंधळच गोंधळ होऊन जाईल. तेव्हां प्रशस्त मार्ग हाच दिसतो कीं, जशीं रूपें एकदां भाषेंत रूढ होऊन गेलीं आहेत तशींच कायम राखावीं. ज्यांस संस्कृत, फारशी किंवा आरबी भाषा पूर्ण अवगत आहेत त्यांस सध्यांचीं मराठींतील विलक्षण रूपें व विलक्षण अर्थ पाहून मनास नीट वाटणार नाहीं, व तीं पुनः पहिल्यासारखीं करावींशीं वाटतील; पण तशा शब्दांचें जर नुसतें सध्यांचेंच रूप मनांत आणलें तर कांहीं विलक्षण वाटणार नाहीं. पहा कीं, 'त्याला रूपवान् बायको मिळाली' हें वाक्य 'त्याला चांगला बायको मिळाली' यासारखेंच वस्तुतः अशुद्ध आहे, व ह्मणूनच दुसरें वाक्य मराठी जाणणाऱ्या मनुष्यास जसें कानास अतिशय वाईट लागेल, तसेंच पहिलें संस्कृतज्ञास लागेल यांत आश्चर्य नाहीं ! तरी तें केवळ प्रचारांत आलें असल्यामुळें त्यास अगदीं काढून टाकणें आह्मांस बरोबर वाटत नाहीं. ज्या संस्कृतज्ञास तें अगदीं दुःसह होत असेल त्यानें त्या वाक्याकडे केवळ मराठीच्या दृष्टीनें पहावें, ह्मणजे त्यास त्यांत कांहीं वावगें दिसणार नाहीं. तें असें कीं, 'त्यास सुंदर बायको मिळाली' यांत जसें कांहीं वाईट नाहीं, तसेंच 'सुंदर' या जागीं 'रूपवान्' हा शब्द केवळ विशेषणाप्रमाणें घातला आहे असें जर पाहिलें, तर त्यांत काय वांकडें आहे ? तर याप्रमाणें चालू असणारीं रूपें जशींचीं तशींच ठेवणें आह्मांस बरें वाटतें. फार तर काय, पण 'तिकीट,' 'नाटपेट' 'गटार' वगैरे अगदीं अलीकडे सुरू झालेल्या इंग्रेजी शब्दांचींहि रूपें बिघडविणें आह्मांस नीट वाटत नाहीं. असो; तर हें दुसरें कारण झालें. तिसरें असें कीं, वर सांगितलेला प्रकार सोपा असल्यामुळें तो सर्वांस साध्य आहे, व यामुळें भाषेंत जो एकदां चोहोंकडे जम बसून जाईल तो जाईल. लेखनशुद्धि ही एकदां रूढीवर ठरली, ह्मणजे अमुक शब्द कसा लिहावा याविषयीं कोणास यत्किंचत्हि पंचाईत पडणार नाहीं. ज्या त्या शब्दाचा जसजसा उच्चार होत असेल तसतसा तो खुशालपणें लिहावयास सांपडेल. त्यास संस्कृताचा किंवा आरबीचा अभ्यास करण्याची मुळींच गरज पडणार नाहीं.

याप्रमाणें शब्दशुद्धीविषयीं विचार कर्तव्य असतां रूढीवरच बहुधा अवलंबन करावें हें अनेक कारणांनीं प्रशस्त होय असें आह्मांस वाटतें. तरी प्रसंगविशेषीं वरील नियम मोडल्यास कांहीं हरकत नाहीं. 'मध्यान्हरात्र,' 'अहोरात्र अहोदिवस' 'परस्वाधीन' वगैरे जे मुळींच अर्थासंगतीचे शब्द आहेत ते काढून 'मध्यरात्र,' अहोरात्र' 'पराधीन' वगैरे शुद्ध रूपें त्यांच्या जागीं घालावीं यास आह्मी कबूल आहों. तसेंच 'अंधःकार,' 'हाहाःकार,' 'दीपोत्साह' वगैरे शब्दांचीं 'अंधकार,' 'हाहाकार' 'दीपोत्सव' अशीं व्याकरणरीत्या शुद्ध रूपें लिहावीं हेंहि आह्मांस ठीक वाटतें,

तसेंच अलीकडे अगदीं नवे शब्द जे साधले असतील किंवा यापुढें साधावे लागतील त्यांविषयींहि शुद्ध शुद्धतेबद्दलचा विचार करण्यास आपण मुकल्यार आहों. पण जे एकदां रूढ होऊन बसले त्यांशीं दांडगाई करण्यांत आह्मांस मोठासा शहाणपणा वाटत नाहीं. एवढे पाणिन्यादि समर्थ व्याकरणकार, पण त्यांसहि छांदस व आर्ष प्रयोगांपुढें हात जोडावे लागले, व 'पृषोदरादित्वात्साधुः'[1] अशा प्रकारच्या हिकमती कराव्या लागल्या. इंग्रेजींतहि असा घोटाळा नाहींसा नाहीं. पण हेंचसें काय, सर्व भाषांत तो वस्तुगत्याच असायाचा. वैयाकरणाच्या मनांत साऱ्या भाषेंत जिकडे तिकडे उत्कृष्ट व्यवस्था होऊन वेडें वांकडें कोठे कांहीं दिसूं नये असें असतें. पण तें होतें कसें ? नदी जशी उगमापासून निघाली कीं जिकडे तिला सखल प्रदेश सांपडेल तिकडेच वहात जाते, व तिचें पात्र पुढें मोठें होऊन जसें तुफान वाहूं लागतें, त्याप्रमाणेंच भाषेचीहि गोष्ट आहे. तिच्या उच्छृंखल वेगास जर बळेंच रोध करण्याचा प्रयत्न केला, तर तो सिद्धीस जाईलच असा बिलकूल नेम सांगवत न हीं. शंभर वाटेनें अशा बांधाऱ्यांची गति नर्मदा, कृष्णा वगैरेंचा बोभाट जसा वरचेवर ऐकूं येतो तशीच व्हावयाची !

११. तिसरें सदर वाक्यशुद्धि. मराठींत प्रयोगांचा घोंटाळा किती आहे तो पुष्कळांस माहीत असेलच. 'बाजीरावास पुणें द्यावें लागलें' इत्यादि प्रयोगांची वाटाघाट आज कित्येक वर्षें चालू आहे; तरी त्यांविषयीं अजून पक्का निश्चय कोणताच होत नाहीं. तसेंच 'त्यानें त्या पोरीस मारिली,' 'मी अंघोळ केलों' 'त्यानें तुला लहानाचा मोठा केला,' 'तुह्मी जेवलांत ?' वगैरे विलक्षण प्रयोगांविषयींहि मोठाच वाद आहे. मराठी भाषेचें नियमन करण्यांत अग्रभागीं गणण्यास योग्य अशा एका गृहस्थानें वरील प्रयोगांस केवळ अशुद्ध ठरवून त्यांस आपल्या नजरेखालून जाणाऱ्या ग्रंथांत बिलकूल थारा दिलेला नाहीं. हें त्याचें मत व्याकरणदृष्ट्या बरोबर आहे. कां कीं, वरील प्रयोग शुद्ध रीतीनें ह्मटले ह्मणजे, 'त्यानें त्या पोरीस मारिलें' अ० 'त्यानें ती पोर मारली,' 'मी अंघोळ केली,' 'त्यानें तुला लहानाचें मोठें केलें,' 'तुह्मी जेवलां ?' असेच असावे. तसेंच 'तो पुराण पठन करतो,' 'माझें वाक्य श्रवण कर,' 'त्यानें आज चार दिवस अन्न ग्रहण केलें नाहीं' या प्रयोगांसहि अशुद्धच ठरवून त्यानें त्यांचे जागीं 'तो पुराणाचें पठन करतो,' 'माझ्या वाक्याचें श्रवण कर,' 'त्यानें आज चार दिवस अन्नाचें ग्रहण केलें नाहीं' असे प्रयोग घातले आहेत. हा व्याकरणा-

१. ज्या शब्दांच्या व्युत्पत्तीचा कांहींच थांग लागत नाहीं त्यांस ढकलून देण्याकरितां वरील वर्ग संस्कृत वैयाकरणांनीं एक जबरदस्त करून ठेवला आहे. वरील सूत्राचा अर्थ असा कीं, 'पृषोदर' या अव्युत्पन्न शब्दाचेंच हें भावंड, मग यास व्युत्पत्ति कसची ? रॉम्युलसानें चोर, दरवडेखोर, खुनी अशा मनुष्यांकरतां केलेली गुहाच ही !

विषयींचा एवढा पक्षपात आमच्या मतें यथायोग्य नव्हे. व्याकरणाचा हक्क एके रीतीनें खरा आहे; पण दुसऱ्या रीतीनें पहातां भाषाप्रचारांचाहि तितकाच, किंबहुना अधिकहि, हक्क पोंचत नाहीं काय? या दोहोंच्या हक्कांविषयीं वर सविस्तर लिहिलेंच आहे, व व्याकरणासच सर्वथा अनुसरलें असतां केवळ्या अडचणी प्राप्त होणाऱ्या आहेत हेंहि आमच्या वाचकांस मागील लेखावरून पुरतेपणीं कळलेंच असेल. तेव्हां सदरहू गृहस्थानें वरील अपवादक प्रयोगांस अशुद्धच ह्मणून जें निखालस ठरवलें आहे तें आह्मांस मान्य नाहीं. व्याकरणदृष्ट्या ते अशुद्ध होत हें आह्मी अजून कबूल करतों, पण रूढिदृष्ट्या ते अत्यंत शुद्ध आहेत. ज्याची व्याकरणावर मोठी भक्ति असेल त्यानें वरील प्रयोग व्याकरणशुद्ध रीतीनें हवे तर लिहावे; पण रूढीस अनुसरून हजारों सुशिक्षित लोकांच्या बोलण्याप्रमाणें व अभियुक्त कवींच्या लेखांप्रमाणें जरी त्यानें वरील्च प्रयोग लिहिले, तरी त्यांस अशुद्ध ह्मणण्यास कोणासहि अधिकार नाहीं!

वर 'अभियुक्त कवींच्या लेखांप्रमाणें' असें ह्मटलें आहे त्यावर एक मोठा आक्षेप निघण्यासारखा आहे. त्यावें येथें समाधान केलें पाहिजे. मराठी कवींच्या मालिकेंत कवित्वाच्या संबंधानें ज्याची गणना मोठी आहे, व शुद्धतेविषयीं तर जो सर्वांत पहिलाच गणिला पाहिजे, त्या मोरोपंताच्या कवितेंत व्याकरणाविषयीं व संस्कृता-विषयीं मोठा पक्षपात आढळतो. वर ज्या प्रयोगांच्या कैवारानें आह्मीं लिहिलें ते वरील नामांकित कवीनेंहि आपल्या ग्रंथांतून काढले आहेतसें दिसतें—

पार्थ ह्मणे तूं मुनिनीं चित्तीं पडरिक्षयार्थ धरिलास!
उद्योगपर्व १.

वरिलासि मत्सखीनें म्यांही वरिलासि तूं मनें..।
आदिपर्व १०.

जाउनि तो सूत वदे कृष्णे द्यूतांत तूं स्वयें धर्मे!
हारविलीस सुयोधनसदनाप्रति ये करावया कर्मे॥
सभापर्व ४.

इत्यादि रूढीविरुद्ध व शुद्ध व्याकरणास अनुसरून केलेले प्रयोग सर्वांस माहीत असतीलच. याप्रमाणेंच एकंदरींत संस्कृत व्याकरणाच्या शुद्ध पद्धतीवर मराठी भाषा नेण्याचा प्रस्तुत कवीचा रोख जेथें तेथें दृष्टीस पडतो—

(१) ऐसा स्वप्न विलोकुनि तो श्रीमान् कर्ण जाहला जागा।
वनपर्व १४.

कृपभोजद्रौणि तिघे पाहुनि राजासि दीन आरडले।
ते राजदार जैसे तैसे तेही ह्मणोनि हा रडले॥
स्त्रीपर्व १.

पांडवगुणवर्णन तें विदुरमनोधारणार्थ हें साचें।
वरि सरस अंत नीरस मद्भाषण मित्र होय फेंसाचें॥
आदिपर्व ३५.

वास करुनि परमात्मा सकळा भूतांत एक पूर्ण वसे ।
जो तोचि आपणांत हि आकाश जसा घटांत तेंवि असे ॥

मंत्रभागवत ११.

तों ये तेथ पहावयासि उदरीं ज्याचें तिच्या जन्म ती ।

बृहद्दशम. ५५.

दुर्योधन पंचाक्षरिमंत्रें परमोग्रभूतसा खवळे ।

सभापर्व ३.

सावध होउनि करिसिल जरि लोकप्रत्ययार्थ हे शपथ ।

भारती रामायण.

(२) ते नंदयशोदोद्भव[1] रात्रीला नेणतीच सरलीला ।

भागवत १०.

(३) स्मरोनि कृतमंतुला[2] न कविता वधू-स्वीकृती
कराल तरि आयका प्रभु खराच मी दुष्कृती ।

केकावली.

घाली घृतांत सैंधव दुग्धीं जंबीर पायसीं कथिका ।
मथि कामशर जया त्या राम ह्मणे साधुमोक्षसत्पथिका ॥

बृहद्दशम. ८६.

(४) त्वां हे पांच पति कसे वश केले भजति सर्व एकीतें
थोडें याहुनि पाहुनि नटती[3] कादंबिनीस केकी तें ॥

वनपर्व ६.

वरील सर्व प्रयोगांवरून मोरोपंताचा एकंदर रोंख तेव्हांच दृष्टीस पडतो. तो अर्थात् हाच कीं, मराठी भाषेस जितकी व्याकरणशुद्धता आणतां येईल तितकी आणायाची. पण इतकेंच नव्हे; वरील उदाहरणांवरून हेंहि सहज लक्षांत येईल कीं, संस्कृतांतील व्याकरणप्रयोगहि मराठी कवितेंत आणण्याचा त्यानें यत्न केला आहे. हें पूर्वीच्या एकाहि मराठी कवीनें मुळींच केलें नसल्यामुळें या शेवटल्या कवीचा यांत मोठा धीटपणा उघड दिसतो. पण हेंचसें काय; प्रस्तुत मालेच्या चवथ्या अंकांत

---

१. 'नंदयशोदोद्भव' हा द्वंद्वसमास होय. याचा संस्कृतांत असा नियम आहे कीं, शेवटल्या पदाचें लिंग साऱ्या समासास लागतें. या नियमासच अनुसरून सगळा सामासिक शब्द येथें पुल्लिंगी करून 'ते' या पुल्लिंगी बहुवचनान्त सर्वनामाशीं कवीनें अन्वय केला आहे.

२. हा प्रयोगहि संस्कृताच्या पद्धतीवरच केला आहे. संस्कृतांत 'राजानें त्यास प्रधान केला.' 'मनुष्यानें सुज्ञ असावें' असे प्रयोग न होतां राजानें त्यास प्रधानास केला,' 'मनुष्यानें सुज्ञानें असावें' असे होत असतात. असाच प्रकार वरील दोन पद्यांत केला आहे.

३ 'नट्' नाचणें या संस्कृत धातूवरून वरील क्रियापदाचा अर्थ 'नाचतात' असा होतो. संस्कृताच्या पद्धतीवर केलेल्या अशा प्रयोगास Sanscritism असें इंग्रजींत ह्मणतां येईल.

सांगितल्याप्रमाणें आमचे बाकीचे महाराष्ट्र कवि बहुतेक सारे व्याकरणापासून केवळ अलिप्त होते असें ह्मणण्यासहि कांहीं हरकत नाहीं. त्यांत अगोदर विद्वान् ह्मणण्यासारखे तीन चारच निघतील; आणि व्याकरणास बुद्धिपुरःसर अनुसरलेला आह्मांस एक मोरोपंतच दिसतो. बाकीच्यांची कोणाचीहि व्याकरणाकडे तशी करडी नजर दिसत नाहीं.[1] असो; तर हा महाप्रसिद्ध कविहि आमच्या पक्षाचा आहे असा वाद करण्यास वरील लोकांस सवड राहून ते ह्मणतील कीं, ज्या अर्थीं या कवीनेहि

१, वामनपंडिताच्या ग्रंथांतून जागोजाग अशुद्धें आढळतात—

कैकेयीच्या ये गृहा सानुरागें ।
दे भूमी विप्रप्रवरोत्तमातें ।
करी बळी स्वात्मनिवेदनातें ।
असा भी त्या मातें पुनित करिशी तूं जननिये ।
बस तुं मौन्यपणें अथवा उगा ।

या शेवटच्या एका लहानशा चरणांत तर बहुधा शब्दांइतक्यांच चुका आहेत—(१) 'तुं' याबद्दल 'तूं' असाव. (२ 'मौन्य' हा शब्द अगदीं अशुद्ध आहे, खरा शब्द 'मौन' ('मुनि'पासून तद्धित) होय. (३) तो विशेषण नव्हे, यास्तव 'पण' हा प्रत्यय त्यास लागणें नाहीं. ४) 'अथवा उगा' याचा कांहींच अर्थ दिसत नाहीं—'मौन धर' आणि 'उगा बस' हीं दोन्ही केवळ समानार्थक होत !

रघुन थपंडितांताहि 'नाडीशान जयाचें,' 'करुनि मज रवाना' वगैरे भाषाशुद्धीकडे बरेंच दुर्लक्ष आढळतें.

असो; वर इतर कवींचे दोष दाखविले त्याप्रमाणेंच खुद्द मोरोपंताचेहि कांहीं दाखविले पाहिजेत. हें आमच्या वाचकापैकीं पुष्कळांस बहुधा अशक्य वाटेल. कां कीं, या शेवटच्या कवीचा वर सांगितल्याप्रमाणें व्याकरणशुद्धतेविषयीं ह्मटला ह्मणजे मोठाच बाणा आहे, व तसा त्याचा लौकिकाहि आहे. परंतु पुढ पहा—

ऐसें ह्मणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी ह्मणे अयि ते ।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमोदयिते ॥

आदिपर्व २९.

'अनुष्ठितुं' ही अर्थात्च मोठी चूक आहे. शुद्ध रूप 'अनुष्ठातुं' हें होय. पण 'अनुष्ठित' या भूतकालवाचक धातुसाधितावरून आपला कवि येथें चकला !—

तसेंच एके ठिकाणीं 'पुनीत' असें अशुद्ध रूप वाचल्याचें आह्मांस आठवतें. स्थल पक्कें माहीत नाहीं. तें अर्थातच 'पूत' असें असावें. 'पुनाति' या रूपावरून कवि फसला हें उघडच आहे. अथवा वरील वामनपंडिताच्या चरणावरूनहि ही चुकी झाली असल्याचें संभवतें.

मोरोपंताची व्युत्पत्ति केवळ पुराणिकाइतकीच असल्यामुळें व ति चुका त्याच्या हातून घडल्या यांत कांहीं आश्चर्य नाहीं ! आतांप्रमाणें लहान सुलभ व्याकरण ग्रंथ त्या वेळेस नव्हते हें लक्षांत आणलें पाहिजे. तसेंच 'वैयाकरणास्तृणवः' ही गम्मताहि आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस बहुधा माहीत असेलच ! !

असे शुद्ध प्रयोग मराठींच बळेंच घातले आहेत त्या अर्थी यापुढें आपणहि तोच क्रम चालवला असतां कांहीं काळानें रूढिहि फिरवून टाकतां येईल. हें ह्मणणें सकृद्दर्शनीं कोणास समंजस वाटेल; पण वास्तविक पाहिलें असतां कळून येईल कीं, ही केवळ भ्रांति आहे. गद्य भाषेंत व पद्य भाषेंत नेहमीं फार अंतर असतें. दोहोंचे नियम अगदीं निराळे; एकांत असा प्रयोग करतात ह्मणून दुसऱ्यांत तो केला असतां कधीं शोभणार नाहीं. मोरोपंतानें वरील प्रयोग जरी आपल्या काव्यांत निर्भयपणें केले आहेत, तरी बोलण्याचालण्याच्या भाषेंत 'मीं तूं मारिलास,' 'त्यानें मी धरलों,' 'मीं असा स्वप्न पाहिला,' 'तो माझें मित्र आहे,' 'त्यानें त्याला शहाण्यास केलें' असे प्रयोग तो करीत असेल काय ? इंग्रेजींत ऱ्हस्वाचें दीर्घ, दीर्घाचें ऱ्हस्व हवें तसें छंदोऽनुरोधानें करतात, ह्मणून बोलतातहि तसेंच काय ? कालिदासानें

तं पातयां प्रथममास पतात पश्चात् ।

असें काव्यांत घातलें ह्मणून तो नेहमींच्या बोलण्यांतहि आपला निरंकुशत्वाचा हक्क[1] चालवीत असेल काय ? अर्थात्च नाहीं. तेव्हां पद्यरचनेंतील प्रयोगांवरून गद्यांतील प्रयोगांस कांहीं आधार मिळत नाहीं. शिवाय, दुसरें असें कीं, कवींचा एकंदर परिपाठच आहे कीं, बोलण्याचालण्याच्या भाषेपासून जितकी करवेल तितकी कवितेची भाषा निराळी करायाची. प्राकृत व्यवहारांत जी नेहमीं भाषा चालू असते तिच्याच रूपानें कविता लिहिल्यास ती केवळ हास्यास्पद दिसते. यास्तव विभक्तिप्रत्ययांत, वाक्यरचनेंत वगैरे जेथें तेथें कवितेचें स्वरूप गद्याहून नेहमीं भिन्न करतात, व छंदोऽनुरोधानें वगैरे तें आपोआपहि होतेंच. मिलटन कवीच्या 'प्याराडैज लॉस्ट' काव्यावर आडिसन नामक ग्रंथकारानें जे सर्व प्रसिद्ध निबंध लिहिले आहेत त्यांतील एकांत त्यानें कवितेची भाषा प्रौढ करण्याचे दोन तीन उपाय सांगितले आहेत. त्यांतील एक हा आहे कीं, परभाषेंतील प्रयोग आपल्या भाषेंत घ्यावे; कीं तेणेंकरून काव्यरचना गद्याहून निराळी होऊन त्या भाषेचा प्रौढपणा आपल्या भाषेंत उतरतो. आपल्या मराठीस जशी संस्कृत तशी इंग्रेजिस ल्याटिन भाषा होय; यास्तव मोरोपंताप्रमाणें मिलटन कवीनें त्या प्रौढ भाषेंतील प्रयोग आपल्या काव्यांत कित्येक जागीं उतरले आहेत. आतां आपल्या कवीनें आडिसनचे निबंध न वाचतां वरील गोष्ट त्यास कशी सुचली, याचें आमच्या वाचकांस कदाचित् मोठें आश्चर्य वाटेल; त्यांतून विशेषतः काय झालें आहे कीं, तसा प्रयत्न पूर्वीच्या मराठी कवींतून कोणींहि —खुद्द वामनपंडितानेंहि—बिलकूल केला नाहीं. पण वर सांगितलेल्या दुसऱ्या कवीवरूनच या शंकेचें समाधान होईल. ह्मणजे आडिसन यानें निबंध लिहिण्यापूर्वीच जसा

१ 'निरंकुशाः कवयः' 'कवि जे जे प्रयोग करतील ते ते चालगारे आहेत' अशी संस्कृतांत एक ह्मण आहे. इंग्रेजींत याच अर्थी Poetical license ह्मणतात.

तो प्रकार तिकडे मिलटन यानें केला, तसाच इकडे इतक्या अंतरावर आपल्या कवीनेंहि केला; आडिसनचे निबंध मधल्यामधेंच राहिले ! वस्तुतः जर पाहिलें तर वरील गोष्टीचें कारण असें आहे कीं, नियम हे सामान्य मनुष्यांच्याच उपयोगार्थ होत; जे जात्याच महाबुद्धिमान् असतात त्यांस अन्यकृत नियमांची मुळींच गरज पडत नाहीं. त्यांचेंच स्वतउद्भूत ज्ञान त्यांस नियमांच्या जागीं होतें. 'लीलावतीनां सहजा विलासाः' 'स्त्रियांचे विलास त्यांस आपोआप प्राप्त होतात' असें भर्तृहरीनें झटलें आहे. तींच गोष्ट वरच्यासारख्या महाकवींस लागते. झणजे स्त्रियांस यौवनदशा आली असतां विलास जसे मागून आपोआप आलेच, त्याप्रमाणेंच कवींची बुद्धि एकदां प्रौढ दशेस आली कीं, तिचे जगास मोहनी घालणारे विलासहि सहजच प्रकट होतात ! तींस शिक्षणाची गरज पडत नाहीं.

असो; तर या दोन कारणांवरून मोरोपंतानें आपल्या कवितेंत कसेंहि व्याकरण आणलें असलें, तरी तें चालू गद्य भाषेस अगदीं उपयोगीं पड़णार नाहीं. काव्य रचणारांनीं हवी तर त्याची पद्धति पुढें चालवावी; पण गद्यरचना करणारानें तींस अनुसरतां कामा नये. जी वेडी वाकडी रचना कवितेस शोभा देते तींच गद्यास हास्यास्पद मात्र करील. ठीकच आहे; पहा कीं, कलावंतीण आपल्या गायनानें व नृत्यानें रसिक विलासी जनांस तल्लीन करून टाकते; झणून नेहमीं बोलतांनाहि जर ती गाऊनच बोलेल किंवा एरवीं चालतांना नाचतच जाईल, तर तें उपहासास्पद होणार नाहीं काय ? हीच गोष्ट भाषेस लागते. कवितारूपानें ती प्रकट झाली असतां जे जे विलास तीं करील ते ते तींस शोभतच जातील, व तितकी तितकी तिचे ठायीं रममाण होणाऱ्या रसिकांस ती अधिकच प्रिय होईल; पण एरवींच्या गद्य रूपास झटलें झणजे तिचें स्वरूप जितकें सरळ व साधें असेल तितकें चांगलें !

१२. याप्रमाणें मागें केलेल्या तिन्ही सदरांचा विचार झाला. या महत्वाच्या विषयावर आजपर्यंत ऊहापोहपूर्वक कोणींच विचार केलासा दिसत नाहीं; यास्तव प्रकृत निबंधांत त्यासंबंधानें जे कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत त्यांकडे आमच्या भाषेच्या मार्मिक ज्ञात्यांनीं चांगले लक्ष पुरवावें अशी त्यांस आह्मी सूचना करतों. हा अशा संबंधाचा पहिलाच लेख आहे, यास्तव आमच्या लक्षांत न आलेल्या गोष्टी यांत किंवेक घालायाच्या राहिल्या असतील; किंवा घातल्या आहेत त्यांत फेरफार करणेंहि कदाचित् जरूर पडेल. तरी सदरील निबंधानें या अगत्याच्या विषयाकडे जर आमच्या लोकांचें लक्ष लागेल तर तेवढेंहि आह्मांस बस्स आहे. असो; आतां या अंकांत एकंदर आपणाकडून आह्मीं काय सिद्ध केलें तें थोडक्यांत सांगतों. भाषेचें झणजे पडून गेलेल्या रूढीचें सामर्थ्य केवढें आहे व त्यापुढें व्याकरण किती पंगु, हें दाखवून तींस अटकाव करूं जाणें हें किती वेडेपणाचें काम आहे तें दर्शविलें. त्यावरून असें

समजावयाचें कीं, जेथें रूढीचा आणि व्याकरणाचा विरोध पडतो तेथें 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' 'शास्त्राहून रूढि प्रबळ आहे' याच वचनास प्रायः अनुसरणें उत्तम. तसेंच वर्ण, शब्द, किंवा वाक्य हीं कशीं लिहावीं असा जेथें ह्मणून संदेह पडेल तेथें फारकरून केवळ उच्चारावरच प्रमाण धरून चालावें. हा नियम अत्यंत सयुक्तिक, साधा, आणि सोपा असून यामुळें लेखी भाषेंत चोहोंकडे एकदम मेळ बसून जाईल हें उघड आहे.

भाषापद्धति.

अंतर्गूढानर्थानव्यंजयतः प्रसादरहितस्य।
संदर्भस्य नदस्य च न रसः प्रीत्यै रसज्ञानाम् ॥

आर्यासप्तशती.

अंक २६—(१) विषयोपक्रम. (२) मराठी भाषेची या पूर्वीची स्थिति. (३) सध्यांची स्थिति. (४) भाषापद्धति. (५) उत्तम पद्धतीचे गुण–शुद्धता. (६) साधेपणा. (७) सुबोधपणा. (८) इतर गुण–अवतरण.

१. भाषापद्धति ह्मणजे बोलण्यांत किंवा लिहिण्यांत जी शब्दयोजना होते तिचा प्रकार. या विषयावर मराठींत अद्याप कोणीं कांहींच विवेचन केलेलें नाहीं; फार तर काय, वरील विषयाचें स्वरूपहि पुष्कळांस अद्याप माहीत नसेल. यास्तव प्रस्तुत अंकांत या चित्तवेधक विषयाचें निरूपण करून उदाहरणद्वारा तो परिस्फुट करण्याचें योजिलें आहे.

२. भाषापद्धति ह्मणजे काय हें वर सांगितलेंच आहे. ही आमच्या साधारण लोकांस माहीत नसण्याचें कारण उघडच आहे कीं, अलीकडील वीस पंचवीस वर्षांपूर्वी आमच्या भाषेची स्थिति कांहीं विलक्षणच होती. तींत ग्रंथ ह्मटले ह्मणजे सगळे पद्यरूपच असून गद्याचा प्रकार काय तो बखरींत मात्र असे. या बखरींत इतिहासवृत्तान्त, पौराणिककथा, व सिंहासनबत्तिशी, शुकबहात्तरी वगैरे गोष्टी असा विषय असे. त्या साऱ्या मोडींत लिहिल्या असून त्या लिपीच्या रीतीप्रमाणें त्यांत ऱ्हस्वदीर्घांचा, अनुस्वारांचा वगैरे अर्थात्च बिलकुल विचार नसे. मग वाक्यरचना व शब्दांची आवडनिवड वगैरे गोष्टी तर दूरच राहिल्या. तर याप्रमाणें इंग्लिश वगैरे भाषांतून वाक्यरचना, विरामचिन्हपद्धति, लेखनशुद्धि, इत्यादिकांचे नियम ठरून जाऊन नंतर भाषापद्धतीचे निरनिराळे प्रकार जसे उदयास आले, त्याप्रमाणें आमच्या

१ "ज्याचा अंतस्थ अर्थ [विचार–पदार्थ] स्पष्ट दिसत नाहीं व ज्यांत प्रसाद [सुबोधत्व–स्वच्छपणा] नाहीं अशा प्रबंधाचा व नदाचा रस [सौंदर्य–उदक] खरे रसज्ञ जे असतात त्यांस आनंद देत नाहींत."

जुन्या मराठी भाषेंत कांहींच झालें नाहीं. संस्कृतांतील गद्य जसें पद्यरचनेच्याच धाटणीवर पुष्कळ अंशीं असून विरामादिकांचेंहि त्यास चांगलेंसें बंधन नाहीं, त्याप्रमाणेंच वरील बखरींतील मराठी भाषा कांहीं कवितेच्या धाटणीवर कांहीं लोकव्यवहारास अनुसरून अशी अर्धवट होती. महाराष्ट्रराज्यकर्त्यांनीं, एक, त्यांस मुळींच न फावल्यामुळें, व दुसरें त्यांच्या मूळ पुरुषाप्रमाणें देशाभिमानाचा आवेश त्यांचे ठायीं पुढें न राहिल्यामुळें, देशभाषेकडे ह्मणण्यासारखें कांहींच लक्ष दिलें नाहीं. स्वराज्यच होतें, त्यापक्षीं अवांतर पुष्कळ प्रकारांनीं मराठी भाषेची अभिवृद्धि झाली खरी; तरी तिची व्यवस्था होऊन तिचें नियमन होणें हें गेल्या तीस चाळीस वर्षांतच काय झालें तें झालें. या नियमनाविषयीं मागें एक दोन ठिकाणीं बरेंच लिहिलें आहे. असो; आतां मराठी भाषेची सध्यां जी स्थिति आहे तिच्या संबंधानें प्रस्तुत विषयाविषयीं विचार करूं.

३. गेल्या वीस पंचवीस वर्षांत इंग्रेजी विद्येचा इकडे पुष्कळ फैलावा झाल्यामुळें त्या भाषेच्या द्वारें अनेक विषयांचें आपल्या लोकांस ज्ञान झालें. त्या भाषेंत हरएक विषयावर मोठमोठ्या बुद्धिमान् पुरुषांनीं वर्षांचीं वर्षें खपून पुष्कळ उत्तम ग्रंथ लिहून ठेवले असल्यामुळें व त्यांतील अर्थनिरूपणाची तऱ्हाहि इकडच्यापेक्षां पुष्कळ निराळी असल्यामुळें आमच्या नव्या लोकांस विद्येचा एक मोठा नवाच मार्ग सांपडल्यासारखा झाला. या मार्गांत ज्ञानरूप उत्तम संपत्तीचा जो त्यांस लाभ झाला तो आपल्या देशबांधवांसहि करून देण्याची त्यांस सहजच इच्छा होऊन त्यांनीं देशभाषेंत ग्रंथरचना करण्यास आरंभ केला. हे जे त्यांनीं ग्रंथ केले ते तीन प्रकारचे होत. एक इंग्रेजी ग्रंथांचीं भाषांतरें; दुसरें इंग्रेजी ग्रंथांच्या आधारें तयार केलेले; आणि तिसरे इंग्रेजींतील नमुन्यावर एतद्देशीय भाषेंत नवे रचलेले असे कादंबरीनाटकादिक. याखेरीज इतर कांहीं विषयांवरहि आमच्या भाषेंत ग्रंथ झाले. या सर्वांच्या योगानें भाषेचें बरेंच नियमन होऊन ती सुधारण्याच्या मार्गास लागली. अद्यापहि या उत्कर्षस्थितीचा नुकता आरंभच आहे; कां कीं संस्कृत, इंग्रेजी वगैरे अभियुक्त भाषांतल्याप्रमाणें मराठींत अद्याप कोणा मोठ्या ग्रंथकारांचे ग्रंथ झाले आहेत असें नाहीं. असो; तरी प्रस्तुत विषय सुबोध करून देतां येण्याजोगे हल्लींच्या स्थितींतहि तींत बरेच प्रकार आहेत.

४. प्रस्तुत विषयाकडे आमच्या लोकांचें नुकतें लक्ष लागत चाललें आहे. अलीकडे मराठी लिहिण्याचा प्रघात दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें अमुक पद्धति चांगली व अमुक वाईट असें तारतम्य अर्थातच सर्वांस भासूं लागलें आहे. मागें जसें केवळ अर्थबोधनावरच नजर देऊन लोक लिहीत असत तसें आतां नाहीं. मनांतील अभिप्राय व्यक्त करून शिवाय तो चांगल्या शब्दांनीं व खुबीदार रीतीनें वाचणाराच्या

मनांत भरवावा अशी इच्छा बहुधा साऱ्या लिहिणारांच्या ठायीं अलीकडे वागूं लागली आहे. वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें हीं हल्लीं पुष्कळ वाढून निरनिराळ्या तऱ्हेचे ग्रंथहि दर वर्षीं पुष्कळ तयार होत आहेत. यावरून मराठी लिहिण्याचा प्रघात अलीकडे किती वाढला आहे व आपल्या भाषेची अभिवृद्धिहि कशी होत चालली आहे हें सहज दिसून येतें. शिवाय अलीकडे इंग्लिश व संस्कृत या भाषांचाहि चोहोंकडे पुष्कळ अभ्यास वाढल्यानें आपल्या भाषेस अनेक प्रकारांनीं पुष्कळच साहाय्य झालें आहे. तेव्हां एकंदरींत महाराष्ट्र भाषेची स्थिति सध्यां बरीच सुधरत चालल्यामुळें तींत ग्रंथरचना करणारांनीं प्रकृत विषयाकडे चांगलें लक्ष पोंचविणें अगदीं अवश्य आहे. यास्तव भाषापद्धति उत्तम कोणती, व तीन निरनिराळ्या तऱ्हा कोणत्या, याविषयीं पुढें विवेचन करून विद्यमान ग्रंथसंग्रहांतून उदाहरणें देऊं.

५. आतां पहिल्यानें उत्तम भाषपद्धतीचें स्वरूप काय याचें निरूपण करतों. ही भाषापद्धति ग्रंथरचनेच्या अनेक गुणांचें फल होय. हे गुण आतां क्रमवार सांगतों. यांत पहिला गुण ह्मटला ह्मणजे शुद्धता होय. शुद्धता ह्मणजे अगोदर वर्ण, शब्द, व वाक्य या तिन्ही प्रकारांनीं रचना निर्दोष असणें हें होय. या विषयावर प्रस्तुत मालेचा एक सबंध अंक मागें लिहिला असून त्यांत वरील तिन्ही सदरांचा बराच सविस्तर विचार केला आहे. त्यावरून वरील प्रकारची निर्दोषता ग्रंथरचनेंत आणण्यास काय करायास पाहिजे याविषयीं आमचे विचार वाचकांस कळलेच आहेत. आतां हें खरें आहे कीं, संस्कृत किंवा इंग्रेजी वगैरे परिपक्व झालेल्या भाषांस मोठमोठ्या कोशकारांनीं, वैयाकरणांनीं व महान् महान् अभियुक्त ग्रंथकर्त्यांनीं पुष्कळ परिश्रम करून जसा निश्चितपणा आणलेला आहे तसें आमच्या मराठीस अद्याप ह्मणण्यासारखें कांहींच झालें नाहीं; व त्यामुळें वरील भाषांप्रमाणें तिचे प्रयोगहि ठरून गेले नाहींत. यास्तव शुद्धाशुद्धतेविषयीं पुष्कळ ठिकाणीं निर्णय झाला नसल्यामुळें लिहिणारांचा अनेक स्थळीं प्रयोगभेद आढळण्यांत येतो. असो; तरी आपल्या भाषेचा प्रचार सध्यांसारखाच पुढें जर पुष्कळ वाढत जाईल तर हल्लींची गैरसोय हळू हळू मोडत जाऊन तिचे ठायीं विशेष शुद्धता न आली तरी निदान निश्चितपणा तरी अधिक येईल यांत संदेह नाहीं. असो; तर वर सांगितलेल्या शुद्धतेचें हें एक अंग झालें;—ह्मणजे व्याकरणदृष्ट्या भाषा शुद्ध असावी. दुसरें अंग ग्राम्यता ह्मणजे गांवढळपणा किंवा भाषासंकर ह्मणजे परभाषेंतील प्रयोग आपल्या भाषेंत आणणें, हे प्रकार नसून रचना सभ्य व भाषासरणीस पूर्ण अनुसरून असावी हें होय. या दुसऱ्या प्रकाराविषयींहि प्रस्तुत पुस्तकांतील एका अंकांत बरेंच विवरण केलें आहे. तेथें सध्यां चोहोंकडे चालू असणाऱ्या भाषासंकराचीं कारणें, त्याचें स्वरूप, वगैरेविषयीं लिहून या दोषांचें निरसन करण्यास उपाय काय तोहि सांगितला आहे. तर याप्रमाणें वरील

दोन्ही प्रकारचे दोष जींत बिलकुल नाहींत ती भाषापद्धति शुद्ध होय.

६. उत्तम भाषापद्धतीचा दुसरा गुण साधेपणा. हा गुण साऱ्या कलांत, किंबहुना हरएक गोष्टींत, मोठ्या शोभेस कारण होऊन यथार्थ परीक्षकांस अत्यंत मान्य होतो. तसें त्याच्या विरुद्ध गुण जें कृत्रिमत्व तें कधीं होत नसतें. जे अनभिज्ञ असतात त्यांस साधेपणापेक्षां थाटमाट जास्त आवडतो खरा; पण त्यांचीहि वरील प्रीति बहुतकरून फार दिवस टिकत नाहीं. गोड अन्नाचा जसा जिभेस लवकरच वीट येतो, पण साध्या पदार्थांचें तसें कधीं होत नाहीं; त्याचप्रमाणें कोणत्याहि गोष्टींत स्वभावजन्य शोभाच जशी फार वेळ टिकते तशी कृत्रिम असून जी प्रयासानें आणलेली असते ती टिकत नाहीं. हीच गोष्ट सांप्रत विषयासहि लागते. जी शब्दरचना अगदीं साधी असते, ह्मणजे विवक्षित अर्थ जींत केवळ सरळ रीतीनें व्यक्त केलेला असतो, तीच रसिक वाचकांस पसंत होऊन कितीहि काळ लोटला तरी तिच्या रमणीयत्वाची हानि होत नाहीं. आजपर्यंत सहस्रावधि वर्षे ज्यांची कीर्ति चालत आली आहे अशा सर्व देशांतील महाकवींच्या कृतींत वरील सरळ रचनेचा गुण स्पष्ट दृष्टीस पडतो. या गुणास संस्कृतांतील साहित्यग्रंथांत 'प्रसाद' असें पारिभाषिक नांव आहे. या लहानशा सुंदर शब्दावरून आमच्या पूर्वजांचें चातुर्य पूर्ण दिसून येतें. यांत विवक्षित अर्थाचें व्यंजकत्व किती उत्कृष्ट तऱ्हेचें आहे, व त्यावर कवित्वाची झांक तरी किती बहारीची आहे! 'प्रसाद' या शब्दाचा मूळ अर्थ 'स्वच्छपणा,' 'निवळपणा' असा आहे; व तो शरत्कालच्या वगैरे उदकास लावतात.[1] तेथून हा शब्द साहित्यकारांनीं घेऊन कवींच्या सरस्वतीस लावला आहे. असो; तर ज्याप्रमाणें पर्वतांवरील झऱ्यांचें किंवा कित्येक उत्तम नद्यांचें पाणी निवळ शंख असून पुनः खोलहि असतें, त्याचप्रमाणें अवघ्या जगास आल्हादप्रद झालेल्या ज्या होमर कालिदास प्रभृति कवीश्वरांच्या कृति, त्यांतहि प्रसन्नार्थत्व व गांभीर्य हे गुण साहजर्यानें सांपडतात. असो; गद्यग्रंथकारांचीहि अशीच गोष्ट आहे. उदाहरणार्थ इंग्लिश भाषेंत पहा. हींत जे ग्रंथकार आजपर्यंत झाले त्या सर्वांत आडिसन याची प्रमुखत्वानें गणना आहे. याचे 'स्पेक्टेटर' नामक पुस्तकांतील निबंध जेव्हां पहिल्यानें निघूं लागले तेव्हां त्यांतील सुरस, प्रौढ, व प्रसंगवशात् विनोदात्मक असणारा अर्थ, शुद्ध व सरळ भाषापद्धति, चमत्कारिक व गहन विषय, या सर्वांच्या योगानें ते सर्वांस एकदम प्रिय होऊन जाऊन तेव्हांपासून जी त्यांची ख्याति

---

१. जसें 'रघुवंश' चवथा सर्ग—

प्रससादोदयादद्रेभः कुंभयोर्नैर्महौजसः ।

तसेंच मागें अंक ३ पृष्ठ १०—

इदं तीर्थं समं सौम्यं सुजलं सूक्ष्मवालुकम् ।
रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा ॥

निबंधारंभींच्या पद्यांत तर प्रस्तुत शब्द दोन्ही अर्थी श्लेषपर योजिला आहे.

चालत आली ती आज दोन शतकें सारखी चालली आहे; व जोंवर या पृथ्वीवर इंग्लिश भाषा राहील तोंवर वरील ग्रंथकाराचे लेख बुडायाचे नाहींत असा खात्रीचा अभिप्राय मोठमोठ्यांनीं प्रदर्शित केला आहे. आडिसनच्या पुढें जॉनसन गोल्डस्मिथ वगैरे कित्येक मोठमोठे निबंधकार झाले, व त्यांचे निबंध आंतील मजकुराच्या संबंधानें पहातां 'स्पेक्टेटर'पेक्षां कमी योग्यतेचे आहेत असें नाहीं; तरी सदरील निबंधांची पद्धति पहिल्यानें काढून ज्यानें लोकप्रतीतीस पात्र केली त्याची सर पुढच्यांपैकीं कोणासहि आली नाहीं.[1] असें होण्याचें एक मोठें कारण प्रस्तुत भाषापद्धतिच होय. जॉन्सन्सारख्याच्या निबंधांत 'स्पेक्टेटर' ग्रंथापेक्षां अधिक गहन प्रतिपादन जरी असलें, तरी वरील ग्रंथांत शब्दरचनेची जी अपूर्व करामत आहे ती दुसऱ्या कोठेंहि नाहीं;[2] व त्यामुळेंच एकंदर सर्व वाचकांस वरील निबंध जितके प्रिय होतात तितके दुसऱ्या ग्रंथकारांचे होत नाहींत. सारांश, ज्याप्रमाणें स्वच्छ हंडींत किंवा लखलखीत कंदिलांत दिवा लावला ह्मणजे त्याचा प्रकाश बाहेर उजळ पडून त्यास अधिक शोभाहि येते, त्याचप्रमाणें आंतील अर्थ सुंदर असून ग्रंथाची शब्दरचनाहि जर प्रसादगुणेंकरून युक्त असेल तर तो अर्थ एरवींपेक्षां अधिक खुलेल हें उघडच आहे !

७. उत्कृष्ट भाषापद्धतीचा तिसरा गुण सुबोधत्व होय. हा वस्तुतः पहातां वरच्याहून फारसा निराळा नाहीं; त्याच्याच अनुषंगानें येणारा किंवा त्याचें कार्यच तो होय. कारण शब्दरचना सोपी असून जेथें वाक्यांची संगति घोटाळ्याची नसते तेथें अर्थबोध होण्यास अगदीं आयास पडत नसतात. जसजसें वाचीत जावें तसतसें सर्व भराभर समजत जातें. पण पुष्कळ विषय असे आहेत कीं, जे स्वरूपतःच सुबोध नसल्यामुळें सोप्या भाषेनें लिहितांच येत नाहींत. त्यांचें निरूपण करणें असल्यास

---

१. खुद्द जॉनसननेंच मत्सरभाव सोडून एके ठिकाणीं आडिसनविषयीं ह्मटलें आहे—"He is the Raphael of essay--writers" (हा निबंधकारांतला रेफीलच होय). या उपमेंत जॉन्सन् यानें 'स्पेक्टेटर' ग्रंथांतील शब्दलालित्य, अर्थसौरस्य, व मनुष्यस्वभावाचें हुबेहुब वर्णन, हे तिन्ही गुण एका शब्दांत सुचविले आहेत.

२. जॉन्सन् यानें वरील कवीच्या चरित्रांत वरील ग्रंथांतील भाषापद्धतीची जी तारीफ केली आहे ती अगदीं यथार्थ असल्यामुळें सर्वांच्या तोंडीं बसून गेल्यासारखी झाली आहे. ती ही होय—

"Whoever wishes to attain an English style, familiar but not coarse, and elegant but not ostentatious, must give his days and nights to the volumes of Addison."

("ज्या कोणास इंग्रेजी भाषा लिहिण्याची अशी तऱ्हा उचलायाची असेल,. की जी प्रचारांतील असून प्रौढहि पण असावी, आणि चटकदार असून पुनः डौलाची दिसूं नये, त्यानें रात्रंदिवस आडिसनच्या ग्रंथांचा ध्यास घेतला पाहिजे.")

व्यावहारिक साधी भाषा तादृश उपयोगीं पडत नाहीं. कारण एक तर जे शास्त्रादि विषय व्यवहारापासून अत्यंत भिन्न त्यांतील कल्पना बोलण्याचालण्याच्या साधारण भाषेनें व्यक्त करतां येणें अशक्यच होय; आणि दुसरें असें कीं, वरच्यासारख्या विषयांच्या प्रगल्भतेस झटलें ह्मणजे प्रौढ भाषेचीच योजना करणें अवश्य होय. तर याप्रमाणें कांहीं अंशीं निरुपायास्तव व कांहीं अंशीं विषयाच्या प्रौढतेमुळें भाषेंत कधीं कधीं दुर्बोधता आणल्यावांचून चालत नाहीं. संस्कृतासारख्या परिपक्व भाषांतून पारिभाषिक शब्द व कांहीं भाषापद्धति ही घ्यावी लागते. असो; पण हा प्रकार निराळा; याविषयीं अंमळ पुढें विशेष लिहिण्यांत येईलच. वरच्यासारख्या विषयांखेरीज इतर जे व्यावहारिक विषय असतील ते लिहितांना भाषा अगदीं सुबोधच असावी. ती अशी कीं, शब्द अगदीं प्रचारांतले घातले असून वाक्यांत दूरान्वय नसावा—ह्मणजे एक शब्द येथें तर त्याचा ज्याच्याशीं संबंध तो शब्द त्याहून फार दूर, असें नसावें. वाक्याच्या निरनिराळ्या अवयवांचा अन्वय वाचल्याबरोबर तेव्हांच लक्षांत यावा; व तें फार लांबलचक व गुंतागुंतीचेंहि नसावें. शिवाय विषयाचें जें विवरण करावयाचें तेंहि व्यवस्थेनें झालें पाहिजे. ह्मणजे त्याचे यथार्थ भाग विभाग करून त्यांचा क्रमवार यथास्थित रीतीनें विचार केलेला असावा. सारांश, सुबोध भाषापद्धति ह्मणजे अशी कीं, ग्रंथ वाचूं लागलें असतां वाचण्यासरसा आंतील मजकूर भराभर समजत जावा, व मजकूर समजल्याबरोबर विषयाचीहि सहज रीतीनें फोड होत जावी.[1]

या ठिकाणीं वर सांगितल्याप्रमाणें एका गोष्टीचा विशेषेंकरून विचार करणें अवश्य आहे. ती गोष्ट ही कीं, मराठी बोलण्यांत किंवा लिहिण्यांत संस्कृत शब्द आणावे कीं नाहीं. याविषयीं पुष्कळ लोकांचीं निरनिराळीं मतें आढळण्यांत येतात. कोणीं ह्मणतात, निवळ प्राकृत शब्द योजल्यानें भाषेंत प्रौढता किंवा सरसत्व हें बिलकूल येत नाहीं; यास्तव संस्कृत शब्दांची रेलचेल जितकी असेल तितकी चांगली. हें मत फारकरून जुन्या शास्त्री लोकांचें व अलीकडच्या लोकांत शास्त्रित्वाचा किंवा संस्कृतज्ञतेचा मान चोहोंकडे मिरविण्याची

१ इंग्रेजा भाषेंत शेंकडों महान महान् ग्रंथकारांनीं मोठमोठे नामांकित ग्रंथ लिहून ठेवले आहेत; तेव्हां वरील भाषापद्धतीचा गुण त्यांपैकीं पुष्कळांत उत्तम प्रकारचा सांपडतो हें सहजच आहे. पण या सर्वांत वरील गुणाचें सर्वोत्कृष्ट उदाहरण झटलें तर मेकॉलेच्या पेक्षां दुसरें कदाचित् कोणतेंच सांपडणार नाहीं. या ग्रंथकारानें ग्रंथरचनेचा कला केवळ शिखरास नेऊन पोंचविली असें झटलें असतां चालेल. इतिहासासारख्या रूक्ष व गहन विषयासहि त्यानें आपल्या रचनाचातुर्याच्या योगानें इतकी मनोवेधकता आणली आहे कीं, कादंबरीनाटकादि ग्रंथांप्रमाणें त्यांच्या वाचनाविषयीं वाचकांस उत्कंठा उत्पन्न होते. प्रस्तुत ग्रंथकाराच्या लेखांतील प्रकृत गुणाविषयीं कोणीं असें लिहिलें आहे कीं, त्याचें वाक्य समजण्यास दोनदां कधींहि वाचावें लागत नाहीं, त्यांतील अर्थग्रहण पूर्ण होण्यास मात्र तसें केव्हां केव्हां करावें लागतें!

ज्यांस विशेष हौस वाटत असते अशांचें होय. हें एक झालें. दुसरें मत काय आहे कीं, संस्कृत शब्द अगदीं कामाचे नाहींत. मराठी भाषा ह्मणावयाची, मग तींत संस्कृत शब्द कां ? मोठमोठाले संस्कृत शब्द घालून कोणास न समजेलशी डौलाची रचना करणें यापेक्षां साधे मराठी शब्द योजणें हेंच चांगलें. बोलणें किंवा लिहिणें तें असें असावें कीं जें हवें त्यास सहज कळेल. हें दुसरें मत अलीकडील बहुतेक लोकांचें झालें आहे. तें इतकें कीं, कोणताहि नवा ग्रंथ झाला कीं, पहिल्यानें अगोदर त्याच्या भाषापद्धतीचा विचार होतो. तींत संस्कृत शब्दांचा बराचसा भरणा दृष्टीस पडला कीं, लागलीच त्या पुस्तकावर बहुतेकांची इतराजी होते. पण इतकेंच नव्हे. वरील मत जसें गद्यग्रंथाविषयीं पुष्कळ लोक प्रदर्शित करितात, त्याचप्रमाणें पद्यग्रंथाविषयीं ह्मणजे कवितेविषयींहि तें आढळण्यांत येतें. अलीकडे दहा पंधरा वर्षांत झालेली मराठी कविता ज्यांनीं उगीच वरवर पाहिली असेल त्यांच्याहि ध्यानांत वरील गोष्ट तेव्हांच आल्यावांचून रहाणार नाहीं. या नव्या कवींचीं कवितेविषयींचीं मतें नव्या तऱ्हेचीं असल्यामुळें त्यांच्या कृतींत संस्कृताचा द्वेष पूर्णपणें नजरेस येतो. कोल्हटकरांच्या 'लहान मुंगी' वरील कवितेपासून तों तहत 'राजा शिवाजी' काव्यापर्यंत सारखाच प्रकार दृष्टीस पडतो; तो हा कीं, संस्कृत शब्दांस बिलकूल थारा न देतां निवळ मराठी शब्द योजायाचे. मग अशा रचनेमुळें काव्यास भिकारपणा किंबहुना पोरकटपणा आला तरी कांहीं हरकत नाहीं. नव्या विद्वन् मंडळीचा जुन्या मराठी कवींतून बहुतेकांविषयीं व त्यांतून मोरोपंताविषयीं जो बळकट ग्रह होऊन बसला आहे, कीं त्याची कविता अगदीं नादान, तींत बिलकूल जीव नाहीं, तो उत्पन्न होण्यास तरी वरीलच कारण झालें आहे. मोरोपंताचा संस्कृत भाषेकडे विशेष ओढा असून तींतील शब्द, प्रयोग, व रचना महाराष्ट्र भाषेंत पुष्कळ आणण्याचा त्यानें यत्न केला आहे, एवढ्यावरूनच त्याच्या काव्यरचनेस नाक मुरडणें हें अलीकडील रसिकवर्गाचें एक पहिलें मोठें कलम ठरून गेलें आहे.[1] असो; तर याप्रमाणें संस्कृत शब्दांचा मुळीं प्रयोग न करतां निवळ मराठी शब्दच घालीत जावे असें मानणारे हे दुसरे लोक झाले. आतां तिसऱ्यांचें जें मत आहे तें वरील दोहोंत तोडजोड करून बनलेलें आहे. तें असें आहे कीं दोन्ही शब्द घातले तरी कांहीं चिंता नाहीं; पण असा मात्र निर्बंध

---

१. आमच्या देशाविषयींच्या हजारों गोष्टींविषयीं आमच्या विद्वान् व शोधक ह्मणविणाऱ्या नव्या लोकांचे जे विलक्षण ग्रह आज दीर्घकाळ होऊन बसले आहेत त्यांचा एक उत्कृष्ट मासला प्रस्तुत कवीविषयीं जीं मतें पुष्कळांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत आढळतात तीं होत. त्याविषयीं सविस्तर विवरण करून त्यांच्या यथार्थत्वाची परीक्षा करणें झटलें ह्मणजे एका मोठ्या स्वतंत्र ग्रंथाचाच विषय होय. असो; प्रस्तुत मालेंत वरील उपयुक्त विषयांचें अवकाशानुसार निरूपण करण्याचें आमच्या मनांत आहे.

असावा कीं, जेथें मराठी शब्द अगोदर आहेच तेथें विनाकारण संस्कृत शब्द नवा आणूं नये. जेथें उपायच नाहीं तेथें मात्र तो घालण्यास हरकत नाहीं.

याप्रमाणें प्रस्तुत विषयाविषयीं निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळीं मतें आहेत. हीं अर्थात्च सर्वथा अयथार्थ आहेत असें नाहीं. कोणतें कसेंहि मत असलें तरी त्यांत बहुतकरून सत्याचा अंश जसा थोडाबहुत असतोच असतो, तसाच तो वरील तिहींतहि आहे. संस्कृत भाषेचा पक्ष उचलणारांचें जें ह्मणणें कीं तिच्या साह्यानें मराठीस प्रौढता व सरसत्व हे गुण येतात हें जसें खरें आहे, त्याचप्रमाणें महाराष्ट्र भाषेच्या पक्षकारांचें जें ह्मणणें कीं संस्कृताचें मिश्रण अतिशय होणें बरोबर नाहीं हेंहि खरें आहे. कारण तसें झालें ह्मणजे मूळच्या भाषेचें मातेरें होऊन जाईल हें उघडच आहे. तसेंच तिसऱ्या मताच्या पुरस्कर्त्यांचा जो मुद्दा कीं विनाकारण परभाषेचा प्रवेश न होऊं देतां तो जितका अवश्य असेल तितकाच मात्र होऊं द्यावा हेंहि वस्तुतः पहातां नीटच आहे. पण इतकेंच ह्मणून न रहातां वरील पक्षकार आपापल्या मतांचें निरपेक्षत्वानें विधान करूं पहातात यामुळें त्यांवर असमंजसतेचा दोष येतो. आपापलें ह्मणणें जेथवर सत्यत्वाला व समंजसतेला अनुसरून आहे तेथपर्यंतच जर ते त्याचा आग्रह धरतील तर तो चालणार आहे. तो अगदीं शेवटपर्यंत नेऊन पोंचविल्यानें वर सांगितल्याप्रमाणें अनर्थ होतो. असो; तर वरील वादाचा जो प्रांजल बुद्धीनें विचार करील, त्यास बहुधा असा निर्णय करावा लागेल कीं संस्कृत शब्दांवर व प्रयोगांवर अलीकडील लोकांचा जो विशेष कटाक्ष आढळण्यांत येतो तो सर्व प्रकारें बरोबर नाहीं. संस्कृत भाषा मराठीहून तर काय, पण जगांतील सर्व भाषांहूनहि सुरस व प्रौढ असल्यामुळें तिच्या साह्यानें देशभाषेस अतिशय शोभा येऊन तिला विशेष परिपक्वतेस पोंचविण्यासहि ती कारण होईल हें कोणाहि समंजस मनुष्यास कबूल करणें भाग आहे.

पण वरील तिन्ही मतांच्या प्रतिपादकांची एक मोठी चूक अद्याप सांगायाची आहे. ती ही कीं, साऱ्या ग्रंथांस सरसकट एकच भाषापद्धति चालण्यासारखी असते ही खोटी समजूत त्यांस स्पष्ट दिसते. कोणत्याहि भाषेंतील ग्रंथसंग्रह जो अमळ लक्षपूर्वक पाहील त्याच्या लक्षांत एक गोष्ट सहज येणारी आहे कीं, विषयभेदाच्या अनुरोधानें भाषापद्धतीहि बदलत असते. जी भाषा गद्यांत चालते ती पद्यांत चालत नाहीं; व गद्यांत चालते ती तरी साऱ्या विषयांस सारखीच चालते असेंहि नाहीं. कादंबरीची किंवा नाटकाची भाषा निराळी; इतिहासग्रंथांची निराळी; व शास्त्रीय ग्रंथांची निराळी. असे विषयभेदानें भाषेंत निरनिराळे प्रकार उत्पन्न होतात; व तसें होणें हें साहजिकच आहे. साऱ्या सुधारलेल्या राष्ट्रांत निरनिराळ्या प्रसंगांचे निरनिराळे पोषाक जसे असतात, व तसे असावे लागतात, त्याचप्रमाणें प्रौढ दशेस आलेल्या

साऱ्या भाषांसहि विषयानुरोधास्तव भिन्नभिन्न रूपें प्राप्त होतातच. मग असें जर आहे, तर साऱ्या ग्रंथांस वरच्यासारखा सरसकट एकच नियम घालून देणें हें किती असमंजस आहे ! बेबंद नगरीतील बादशाहाप्रमाणें एखाद्या राजाने जर असा सरसकट हुकूम फर्मावला कीं, बस् सर्वांनीं कापसाच्या वस्त्रांखेरीज इतर वस्त्रें कधींहि अंगावर घेऊं नयेत; लग्न असो, कार्य असो, राजाचा दरबार असो; सर्वांनीं वरील साध्या पोषाकांनींच नेहमीं वावरावें; तर त्या राजश्रीच्या शहाणपणाची लोक किती तारीफ करीत रहातील ! तर हीच गोष्ट वरील मतांपैकीं दुसरें स्थापित करूं पहाणारांसहि लागते. जी भाषा 'आरबी भाषेतील गोष्टीं'त किंवा 'मुक्तमालें'त दृष्टीस पडते त्याच भाषेंत 'अनेकविद्यामूलतत्वा'सारखा शास्त्रीय ग्रंथ लिहा किंवा तशाच भाषेत एखादें वीररसप्रधान काव्य रचा असें जर कोणी ह्मटलें, तर तें त्याचें ह्मणणें किती अप्रयोजक होईल ? शास्त्रीय ग्रंथांस जी परिभाषा लागते तिचे शब्द लहान पोरांच्या किंवा अडाणी कुणब्याच्या भाषेंतून कसे काढावे ? व वरच्या सारख्या ग्रंथांत जी शब्दरचना करायाची ती काऊचिऊच्या गोष्टीप्रमाणें किंवा आटपाट नगरच्या कहाणीप्रमाणें केल्यास उपहास्यता होणार नाहीं काय ? यासारखाच याच्या उलटचा प्रकार. संस्कृतांतील श्लोकदार व गोड शब्दांनीं भाषेस शोभा व गांभीर्य हें येतें खरें, पण यावरून वरील गुण जेथें तेथें साधण्याचा यत्न केल्यास चालेल काय ? असे कांहीं विषय आहेत कीं, ज्यांस अगदीं साधी भाषापद्धतिच शोभते. ते शास्त्रीय किंवा कवितेच्या भाषेनें लिहूं गेलें असतां वरच्या सारखाच हास्यास्पदतेचा प्रकार होतो. तर याप्रमाणें भाषापद्धति अमुकच तऱ्हेची असावी याविषयीं आग्रहानें निर्बंध करूं पहाणें हें सर्वथा असमंजसतेचें दर्शक होय. विषयाच्या अनुरोधानें जी भाषापद्धति जेथें शोभेल तेथें ती योजिली असतां अर्थात् दूषणास पात्र होत नाहीं.

८. वर सांगितलेले तीन गुण उत्कृष्ट भाषापद्धतीस अत्यंत आवश्यक असणारे होत. यांखेरीज इतर जे गुण उत्कृष्ट ग्रंथकारांत सांपडतात त्यांचा बहुधा वरच्यांतच अंतर्भाव होतो. उदाहरणार्थ अवतरण घ्या. अवतरण ह्मणजे अभियुक्त ग्रंथकारांच्या ग्रंथांतून आपल्या मतास पुष्टि आणण्याकरितां किंवा लेखास शोभा आणण्याकरितां घेतलेलें वचन. हें अवतरण पुष्कळदां घेण्याची पुष्कळांस हौस असते. त्याच्या योगानें आपल्या लेखास महत्व येऊन विशेष योग्यता येते असें त्यांस वाटतें. पण रसिक ग्रंथकारांच्या प्रचारास हें अनुसरून नाहीं; कारण दागिन्याचा किंवा उंची वस्त्रांचा अतिशय थाटमाट हें जसें खऱ्या मार्मिकतेचें लक्षण नव्हे; त्याचप्रमाणें वरील अवतरणें फार घेतल्यानें उत्तम पद्धतीच्या गुणांपैकीं दुसरा गुण जो साधेपणा ह्मणून वर सांगितला त्यास बाध येतो. तर याप्रमाणें या विषयाचा विचार वरील गुणाच्या सदराखालीं येतो. असो; आतां या अवतरणाच्या युक्तायुक्ततेविषयीं थोडा विचार करून प्रस्तुत विषयाचा

हा पहिला भाग आटपतों.

अवतरण ह्मणजे काय हें वर सांगितलेंच आहे. हा शब्द प्रचारांतील ह्मणी व संस्कृतांतील न्याय यांसहि लावतां येईल. या सर्वांचा प्रयोग ग्रंथांत करणें हें बरोबर आहे कीं नाहीं, व तो करणें तर कितपत करावा, याविषयीं पुष्कळांचा रुचिभिन्नत्वें-करून बराच मतभेद पडेल. ज्यांस थाटमाट न आवडून अगदीं साधेपणाच आवडतो त्यांचा अभिप्राय बहुधा असा पडेल, कीं असलीं सोंगें ग्रंथांत मुळींच आणूं नयेत. तसेंच त्यांच्या विरुद्ध पक्षाचा वरील प्रकरणीं उलट तऱ्हेचा आग्रह दृष्टीस पडेल, कीं ग्रंथरचनेस विशेष शोभा आणण्याकरितां वरील प्रकार जितके आणावे तितके चांग-लेच. जे नव्यानें ग्रंथरचना करूं लागतात त्यांचा तर वरील दुसऱ्या मताकडे विशेषच कल दृष्टीस पडतो. आपला लेख जितका छानदार व डौलाचा दिसेल तितका करण्या-विषयीं त्यांचा यत्न चालू असतो. पण पुढें जसजशीं ग्रंथकर्तृत्वाचीं मर्में त्यांस कळूं लागतात तसतशी वरील अल्लडपणाची त्यांची हौस कमी कमी होत जाऊन पोक्त व गंभीर अशी रचना त्यांस अधिक मान्य होत जाते.[1] असो; तर याप्रमाणें प्रस्तुत विषयावर दोन प्रकारचे अभिप्राय पडणारे आहेत. त्यांविषयीं अगदीं बरोबर निर्णय करणें कठिण आहे; व त्याची येथें जरुरीहि नाहीं. अभियुक्त व सर्वमान्य ग्रंथकारांची मात्र पद्धति येथें सांगितली असतां बस् आहे. ती प्रायः अशी आढळते कीं, अवतरण मुळींच घ्यावयाचें नाहीं असा त्याचा जरी नेम नसतो, तरी तें फार बेतानें व फार विरळा ते घेतात. ह्मणजे जेथें प्रकृत अर्थास घेतलेल्या वचनानें, ह्मणीनें, किंवा न्यायानें पुष्कळ दृढता येऊन दोघांचा जम अगदीं बरोबर बसत असेल, किंवा तो अर्थ वरील तिहींनीं उत्तम तऱ्हेचा खुलत असेल, तेथेंच त्यांस ते आपल्या लेखांत जागा देतात. एरवीं उगीच ग्रंथास सुशोभित करण्याकरितां तसें करीत नाहींत. हा दुसरा प्रकार अप्रबुद्ध ग्रंथकारांत फार आढळतो. यांची रीत कधीं कधीं तर अशीहि नजरेस येते

१. वरील गोष्टीचें इंग्रेज ग्रथकारांतील एक प्रसिद्ध उदाहरण मेकालेचें आहे. यानें 'एडिन्बर्ग रिव्हयू' नामक अद्यापि चाललेल्या जगत्प्रसिद्ध त्रैमासिकांत मिल्टन कवीवर एक शानदार निबंध पहिल्याप्रथम लिहिला. त्या वेळेस तो सारा पंचवीस वर्षांचा होता. या निबंधाची त्या वेळेस चोहोंकडे पुष्कळ तारीफ झाली, व निबंधकारांत पुढें लवकरच जें अग्रगण्यत्व वरील ग्रंथकारास मिळालें त्यास वरील लेखच कारण झाला. पण पुढील जाणत्या वयांत मेकालेसच वरील निबंधाचें अत्युज्वल स्वरूप आवडेनासें झालें. त्यांत अलंकारिक भाषेची रेलचेल फारच झाली आहे असें त्यानें आपल्या निबंधांच्या प्रस्तावनेंत एके ठिकाणीं लिहिलें आहे. असो. प्रस्तुत ग्रंथकारानें बेकन व बर्क यांच्याविषयीं चालू विषयाच्या संबंधानें एक चमत्कारिक गोष्ट लिहून ठेवली आहे कीं, पहिल्यानें ह्मणजे पूर्ववयांत दोघांसहि साधी भाषापद्धति रुचत नसून पुढें शेवटीं अलंकारिक भाषेची अतोनात आवड उत्पन्न झाली. हा नेहमींच्यापेक्षां विपरीत क्रम झाला!

कीं, एखादें उत्तम वचन वगैरे त्यांस माहीत असलें ह्मणजे त्यास स्थळ देण्याकरितां मुद्दाम ओढून ताणून तिकडे मूळ अर्थाचा संबंध न्यावयाचा. तसेंच भाषेंतील ह्मणी जितक्या आंत घालाव्या तितकी लेखास शोभा येते असेंहि ते समजतात. पण ही शेवटली तर मोठी चूक आहे. तसें केल्यानें एक तर डौलीपणा दिसतो, आणि शिवाय लिहिण्यास मनोवेधकता येण्याची एकीकडेच राहून उलटी ग्राम्यता मात्र येते. वरचेवर बोलण्यांत ह्मणी आणायाच्या हा प्रकार अडाणी लोकांत व विशेषतः बायकांत, चालू असल्यामुळें तो प्रकार प्रौढ व सभ्य लेखांत जितका थोडा येईल तितका चांगला. व ह्मणूनच मोठमोठ्या नामांकिततेस पावलेल्या ग्रंथकारांत तर तो प्रायः कधींहि दृष्टीस पडत नाहीं.

वर जें अवतरणाविषयीं लिहिलें तेंच दृष्टान्त, उपमा, वगैरे अलंकारांची योजना प्रसंग न पहातां व सुमार न ठेवतां करण्याचा जो प्रघात त्यांसहि लागू पडतें. हा प्रघात वरच्याप्रमाणेंच नूतन किंवा अप्रबुद्ध अशा ग्रंथकारांचे ठायीं आढळतो; व चांगल्या ग्रंथांत तो कां आढळत नाहीं याचें कारणहि वरच्यासारखेंच आहे. आमच्या मराठींत तर अलीकडे ग्रंथांत व भाषणांतहि शब्दालंकार घालण्याची एक अप्रयोजक तऱ्हा[1] निघाली आहे. ती किती निंद्य व हास्यास्पद होय हें आमच्या सुज्ञ वाचकांस सांगणें नकोच. असो; एकंदरींत वरील दोन्ही प्रकार फार समंजसतेनें व बेताबातानें जेव्हां योजावे तेव्हांच शोभतात; व सर्व भाषांतील मोठमोठ्या ग्रंथकारांचे ठायीं ते अशाच तऱ्हेनें आढळतात.

येथवर प्रस्तुत विषयाचा पहिला भाग ह्मणजे उत्तम भाषापद्धतींचीं लक्षणें कोणतीं याविषयीं झालें. पुढील अंकांत आरंभीं उपक्षेप केल्याप्रमाणें राहिलेल्या भागाचें निरूपण करूं.

शीलभारवती कांता पुष्पभारवती लता।
अर्थभारवती वाणी भजते कामपि श्रियम्[2] ॥

अंक २७–(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) भाषापद्धतींच्या भिन्नत्वाची उपपत्ति. (३) वरील भेदांत उत्तम कोणता या प्रश्नाचा विचार. (४) लोकमान्य ग्रंथांची भाषापद्धति. (५) सरळ व सोपी भाषा. (६) प्रौढ भाषासरणी. (७) इतर प्रकार. (८) इंग्रेजीच्या अनुकरणानें सुरू झालेल्या तऱ्हा. (९) गद्याची प्रवृत्ति. (१०) नवे प्रकार. (११) विनोदात्मक लेख. (१२) सृष्टिवर्णन. (१३) आणखी कांहीं उतारे.

---

१. ही अलीकडील कित्येक कादंबऱ्यांतून आढळते. पुण्यासारख्या ठिकाणच्या वक्तृत्वप्रसंगांहि वरील पोरकट हौस कित्येकांनीं केलेली कधीं कधीं दृष्टीस पडते व वर्तमानपत्रांतूनाहि ती क्वचित् दिसते.

२. "शालीनतेचा भार वागविणारी स्त्री, फुलांचा भार जीवर आला आहे अशी वेली, आणि जींत अर्थगौरव आहे अशी वाणी, या तिहींची कांहीं अपूर्व शोभा दिसले!"

१. मागील खेपेस भाषापद्धतीचा उत्तम प्रकार कोणता याविषयीं सांगितलें. आतां तिच्या निरनिराळ्या तऱ्हा सांगून मराठी भाषेंतल्या ग्रंथांत त्या कितपत आहेत त्या दाखवूं.

२. भाषा ही मनुष्याच्या मनोवृत्तींचा व हृदयवृत्तींचा उद्गार होय; ह्मणजे ह्याच्या मनांत जे विचार उत्पन्न होतात किंवा अंतःकरणास क्षोभ होऊन जे तरंग उठतात ते ज्या रूपानें प्रकट होतात तें रूप भाषा होय. असें आहे तेव्हां अर्थातच मूळ ठिकाणीं जितके निरनिराळे प्रकार आढळतात तितकेच वरील प्रगट होणाऱ्या रूपांत ह्मणजे भाषेंतहि सांपडतात. मनुष्य जसा स्वभावेंकरून किंवा प्रसंगविशेषानें गंभीर किंवा लाघवी, उदास किंवा रंगेल, मंद किंवा तापट, वगैरे असेल त्या त्याप्रमाणें त्याची बोलण्याची किंवा लिहिण्याची तऱ्हाहि दिसून येईल. त्याप्रमाणें हृदयाच्या नान विध वृत्तींचेंहि प्रसंगवशात् स्वरूप प्रकट होऊन तो तो रस त्या त्या ठिकाणीं आविर्भूत होईल. तर याप्रमाणें वर सांगितल्यासारखे भाषापद्धतीचे भेद होणें हें साहजिकच आहे; व ह्मणून ते साऱ्या परिपक्व दशेस येऊन पोहोंचलेल्या भाषांतून आढळतात.

३. आतां वरील भाषापद्धतींत उत्तम कोणती असें जर कोणीं विचारलें तर तें सांगणें फार कठिण आहे. फार तर काय, पण वरील प्रश्न पुष्कळ अंशीं असमंजसतेच्या दोषास पात्र होतो असें ह्मटलें असतांहि चालणार आहे. ज्याप्रमाणें तांबडा, हिरवा, निळा वगैरे रंगांत, किंवा गोड, आंबट, तिखट वगैरे रसांत अमुकच उत्कृष्ट हें सांगणें अशक्य असून तसें करूं पहाणें हें अरसिकत्वाचें दर्शक होय; त्याचप्रमाणें भाषासरणीच्या वरील निरनिराळ्या तऱ्हांपैकीं सर्वांत चांगली कोणती याचा निखालसपणें निर्णय करूं जाणें हें वेडेपणाचें काम आहे. वरील दोन्ही गोष्टींत निरनिराळ्या मनुष्यांचीं निरनिराळीं मतें पडणें हें जसें साहजिक असून तें रुचिवैचित्र्याचें फळ होय; व शिवाय जें एका ठिकाणीं चांगलें तें चोहोंकडे चांगलें नसून तो चांगलेपणा स्थानभेदानेंहि प्राप्त झालेला असतो; तसेंच प्रस्तुत विषयाचें आहे. जी भाषापद्धति एका विषयाला शोभते तीच दुसऱ्या ठिकाणीं योजिली असतां ती अगदीं अप्रयोजक होते; व तसेंच जी एका मनुष्याला पसंत पडते ती सर्वांस तशीच चांगली वाटते असाहि नेम नाहीं. सारांश, प्रस्तुत विषयावर कोणत्याहि प्रकारें व्यापक नियम देतां येणार नाहींत. यास्तव या ठिकाणीं लोकोपयोगी ग्रंथांची भाषा कशी असावी एवढ्याचविषयीं सामान्यतः कांहीं लिहून मागें सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत काळीं प्रसिद्ध असणाऱ्या ग्रंथांतील कांहीं वेंचे वाचकांस सादर करतों.

४. आमच्या महाराष्ट्र भाषेंत ग्रंथरचनेची तऱ्हा जशी चालू असावी तशी अद्याप झालेली नाहीं. हांतिल्ला वगैरे भाषांत मोठमोठ्या गहन विषयांवरहि सामान्य

मनुष्यांस सहज समजण्यासारखे जसे अनेक ग्रंथ आहेत तसे इकडे कोठेंच झालेले नाहींत. असें होणें हें सध्यांच्या स्थितीस अत्यंत आवश्यक आहे. लिहिण्या वाचण्याचा प्रघात अलीकडे सरकारानें सुरू केलेल्या लोकशिक्षणाच्या योगानें पुष्कळ फैलावल्यामुळें वरील उपायानें देशहिताच्या कामाला जशी मदत होणार आहे तशी अलीकडे बड्या बड्या लोकांनीं सुरू केलेल्या पुष्कळ अचाट उद्योगांनीं मुळींच होण्यासारखी दिसत नाहीं. इंग्लिश भाषेंत ज्याप्रमाणें हरएक उपयुक्त व मनोरंजक विषयावर शेकडो बालबोध ग्रंथ झालेले आहेत, व प्रतिवर्षी तयार होत आहेत, तसेंच इकडील देशभाषांतून जर होईल, तर सहस्रावधि लोकांस अल्पायासानें अल्प काळानें व अल्प अर्थानें पुष्कळ ज्ञान करून दिलेंसें होईल. पदार्थविज्ञानाच्या ज्योतिष, रसायन, दर्शनानुशासन, भूगर्भशास्त्र, यंत्रशास्त्र, इत्यादि निरनिराळ्या शाखांवर, तसेंच इतिहासादि विषयांवर, व अनेक लौकिक विषयांवर जर सुबोध ग्रंथ लोकांस वाचावयास मिळतील तर हल्लीं सामान्य गोष्टींचेंहि एकंदर लोकांत जें लज्जास्पद अज्ञान दृष्टीस पडतें तें दूर होईल; व विद्यानंदाचा खरा अनुभव सर्वांस घडून आपले सर्व प्रकारचे हक्कहि लोकांस कळूं लागतील. असो; आतां वरील इष्ट हेतूंची सिद्धि होण्यास एक मोठें साधन कोणतें कमी आहे कीं, लोकांच्या मनांत ज्ञानाचा जेणेकरून सुलभ रीतीनें प्रवेश होईल असा मार्ग अद्याप चांगलासा झाला नाहीं. तो होऊन निरंतर प्रचारानें चांगला सुरळीत चालू झाला पाहिजे. हा मार्ग म्हटला म्हणजे वरील लोकमान्य ग्रंथांस उचित असा भाषापद्धतीचा प्रकार होय. हा अलीकडील कित्येक सर्वमान्य झालेल्या इंग्रेजी ग्रंथकारांचें अनुकरण केलें असतां आपल्या भाषेस अनुकूल होणार आहे. त्यांतील मुख्य गुण हेच कीं, वाक्यरचना सरळ असावी, अर्थ चांगला खुलासेवार मजेदार रीतीनें लिहिला असावा,—असा कीं, तो सहज मनांत भरून वाचण्याची सारखी हौसच वाटत जावी—आणि एकंदर लिहिण्यांत आवेश किंवा झोंकदारपणा असावा. हे गुण आमच्या ग्रंथकर्त्यांच्या अंगीं बरेच आले म्हणजे अलीकडील नव्या शिक्षणानें आपल्या लोकांस जें अमूल्य ज्ञान प्राप्त झालें आहे व दिवसानुदिवस होत चाललें आहे त्याचा विनियोग देशकल्याणाकडे झाल्यानें त्याचें योग्य चीज झालेंसें होईल. आणि सिसरोनें साकेटिसाविषयीं जें म्हटलें आहे कीं, त्यानें देवलोकींचें नीतिज्ञान मनुष्यलोकीं आणून तें सामान्य जनांसहि सुलभ करून टाकलें; त्याचप्रमाणें यापूर्वी जे महासिद्धान्त मोठमोठ्या पंडितांस मात्र अवगत होते, व ज्या कल्पनातरंगांनीं विद्वानांचेंच तेवढें रंजन होत असे, त्या दोहोंपर्यंतहि प्राकृत जनांची सुद्धां गति झालीशी होऊन तज्जन्य महानंदाचे तेहि अधिकारी होतील.

५. आतां वरील कलमांत लोकमान्यतेस पात्र होऊं पहाणाऱ्या ग्रंथांस अवश्य जे गुण सांगितले त्यांपैकीं सध्यांच्या ग्रंथांतून ते कितीसे आढळतात हें उदाहरणद्वारा

दर्शवितों. पहिल्यानें भाषापद्धतीचें सरलत्व. हा गुण अलीकडील ग्रंथांपैकीं कित्येक उत्तम धरलेल्या ग्रंथांतून पूर्णपणें आढळतो; जसें 'बाळमित्र,' 'इसापनीति,' 'आरबी भाषेंतील गोष्टी,' 'अनेकविद्यामूतलत्व,' 'मधुमक्षिका,' 'मुक्तमाला,' इत्यादि. वरील पुस्तकांत शेवटल्या कादंबरीखेरीज बाकी सारीं इंग्रेजी ग्रंथांचीं भाषांतरें आहेत. अशांत वरील गुण पूर्णपणें राखणें हें मोठ्या चातुर्याचें काम होय, व कोठें कोठें तर तें फारच कठिण पडतें, याविषयीं मागें अनेक ठिकाणीं बरेंच लिहिलेलें आहे. असो; आतां प्रस्तुत गुणाच्या उदाहरणार्थ वरील ग्रंथांतून कांहीं निवडक उतारे येथें दाखल करतों.

'बाळमित्रां'तले दोन उतारे प्रस्तुत पुस्तकाच्या तिसऱ्या अंकांत घेतले आहेत ते या ठिकाणींहि लागू पडण्यासारखे आहेत. यास्तव आणखी एकच लहानसा उतारा येथें घेतों—

"चिमणी.

"गोदावरीबाई ह्मणून एक शहाणी भली आणि मायाळू बायको होती. तिची वडील मुलगी गंगा ह्मणून होती; तिनें एके दिवशीं कांहीं अन्याय केला, ह्मणून आईनें तीस ममतेनें धमकावलें. ते आईचे मायाळू शब्द ऐकून आणि आपला अन्याय स्मरून गंगा रडूं लागली. तें पाहून तिची लहान बहीण चिमणी तीन वर्षांची होती तिनें हळूच माघारून येऊन एका हातानें परकराचा पदर घेऊन आपल्या बहिणीचीं आसवें पुसलीं; आणि दुसरे हातानें आपले तोंडांतला खडेसाखरेचा खडा तिचे तोंडांत घातला.

"मला असें वाटतें कीं, कोणीं चांगल्या चिताऱ्यानें याविषयीं चित्र काढलें असतां काय बेधक होईल!"

'इसापनीतीं'तील—

"नकल्या आणि गांवढेकर.

"मागें एके वेळेस, रूमनामें राजधानींत एक मोठा धनवान् शेट होता; त्याच्या मनांत आलें कीं लोकांस तमाशा दाखवून, त्यांस रंजवून, कीर्ति मिळवावी; ह्मणून त्यानें शहरांत जाहीरनामा लावला कीं, नवा उत्कृष्ट तमाशा कोणी दाखवील, तर त्यास मोठें बक्षीस मिळेल अशी अवाई पडल्यावर बक्षीसाचे लालचीनें जिकडून तिकडून तमाशेवाले आले. त्यांमध्यें एक नकल्या आला होता; तो ह्मणाला कीं, लोकांनीं कधीं पाहिला नाहीं असा तमाशा मी करून दाखवीन. या गोष्टीचा पुकारा होऊन तो खेळ पहावयास सगळें शहर लोटलें. रंगभूमींत अशी दाटी झाली कीं, कितीकांस उभें रहावयासहि जागा मिळेना. मग तो नकल्या एकटा पुढें आला; त्याजबळ दुसरें कोणी नाहीं, व सरंजाम कांहीं नाहीं, असें पाहून, हा आतां काय करील ह्मणून त्याकडे डोळे लावून लोक कौतुकानें पाहूं लागले. तेव्हां त्या नकल्यानें आपलें

मस्तक उरावर टेंकून डुकराच्या पोराच्या केंकण्याची नक्कल केली. ती इतकी हुबेहुब झाली कीं, खरेंच डुकराचें पोर त्याच्या खाकेंत आहे असें लोकांस खास वाटून त्याचा झाडा घेतल्यावांचून त्यांस राहवेना. त्याचा झाडा घेतल्यावर जेव्हां त्याजपाशीं कांहीं सांपडलें नाहीं, तेव्हां लोकांनीं त्याची वाहवा करून वाखाणणीचा सुमार ठेवला नाहीं. तेथें कोणी गांवढेकर कुणबी बसला होता. तो हें पाहून ह्मणाला कीं, हा खेळ मला याहून चांगला करतां येतो. मग त्यानें सर्व लोकांपुढें प्रतिज्ञा केली कीं, जर तुह्मी उद्यां सारे याल, तर मी तुमच्या समक्ष याचे कान कापीन. दुसऱ्या दिवशीं तमाशा पहावयास पहिल्यापेक्षां लोकांचे लोटाचे लोट आले. लोकांचे मनांत कीं, पहिला नकल्या मोठा कसबी त्याची स्तुति करावी; आणि दुसरा गांवढेकर अडाणी, याला काय येतें, ह्मणून त्याची छी थू करावी; अशी सर्वांची तयारी होती. लोक जमल्यावर ते दोघे पुढें आले. त्यांतून पहिल्या नकल्यानें पूर्ववत् डुकराच्या पोराच्या ओरडण्याची नक्कल करून पराकाष्ठेची शाबासकी मिळविली. त्याचा खेळ संपल्यावर गांवढेकर पुढें सरला. त्यानें डुकराचें पोर खरेंच अगोदर आपल्या घोंगडींत लपविलें होतें, तें कोणास न समजावें ह्मणून बळेंच लपविण्याचा भाव करून दाखविला, आणि तें पोर केंकावूं लागेपर्यंत त्याचा कान चेपून धरला. तेव्हां सर्वांनीं एकच आरोळी केली कीं, पहिली नक्कल हुबेहुब झाली खरी; ही कांहीं चांगली उतरली नाहीं. असें ह्मणून ते गांवढेकरास छी थू करून हाकून लावणार, इतक्यांत त्यानें घोंगडींतून डुकराचें पोर बाहेर काढून सर्वांस दाखवून, ह्मटलें, गड्यांनों, तुह्मी भले गाजरपारखे दिसतां! तुह्मी मोठे चतुर साबाजीच आहां! वास्तविक डुकराचे पोराचा जो शब्द तो न ओळखतां खोटा मानून खोटा शब्द तो खरा, चांगला ह्मणतां! आहा! काय तुमची अक्कल!

तात्पर्य—"जें वास्तविक आहे तें लोकांच्या मनांत बहुतकरून भरतें असें नाहीं; तर आपापल्या मनाचा जसा कल असतो, तसतशी मनाची समजूत. एखादा मनुष्य चांगला गुणी आहे, आणि त्याजविषयीं जर आपल्या मनांत गांठ आहे तर त्याचा चांगुलपणा किंवा त्याचे गुण आपल्या मनांत येत नाहींत. तसेंच एखादा वाईट मनुष्य असून, हा चांगला ह्मणून मनानें घेतला आहे, तर त्याचा वाईटपणा कधीं मनांत यावयाचा नाहीं. सारांश, मनाच्या झोंकाप्रमाणें मनुष्यांची वेडी वांकडी समजूत होते."

'आरबी भाषेंतील गोष्टी'—

"मासे धरणाऱ्या कोळ्याची गोष्ट.

"शाहजादी पादशहास ह्मणते, महाराज, प्राचीन काळीं समुद्रतीरीं एके नग-

रांत एक कोळी रहात असे. तो फारच दरिद्री होता. त्यास आपला व बायकापोरांचा निर्वाह करण्यापुरतें सुद्धां द्रव्य मिळत नसे. त्याचा पाठ असा होता कीं, दररोज मोठ्या पहांटेस उठून मासे धरावयास समुद्रावर जावें. व चार वेळ जाळें टाकून, तितक्यांत जे मासे सांपडतील, तितक्यांवर चरितार्थ चालवावा, यापेक्षां अधिक वेळ जाळें त्यानें कधींहि टाकूं नये. तो कोळी एका दिवशीं मोठ्या पहांटेस उठून चांदण्यांत मासे धरण्याकरितां समुद्रावर जाऊन आंगावरचीं पांघरुणें काढून ठेवून, जाळें समुद्रांत टाकून तीरीं बसला. नंतर अमळशानें जाळें ओढून पहातो तों, तें फारज जड आल्यामुळें पुष्कळ मासे लागलेसें त्यास वाटून मनांत मोठा आनंद पावला. पण जाळीं तीरावर ओढून आंत मासा एक देखील नाहीं, गाढवाच्या हाडांचा एक सांगाडा मात्र लागला आहे; हें पाहून त्यास फारच वाईट वाटलें. नंतर त्यानें गाढव फेकून देऊन, व जाळें कितीएक ठिकाणीं तुटलें होतें, तें सांधून नीट करून पुनः समुद्रांत टाकलें, आणि ओढूं लागला, तेव्हां तें लौकर ओढत नाहींसें पाहून पुष्कळ मासे सांपडले असें त्यास वाटून पुनः मोठा संतोष झाला. आणि तीरावर जाळें ओढून आंत पहातो, तों चिखलानें व वाळूनें गच्च भरलेला मोठा हारा त्याच्या नजरेस पडल्यावरून तो फारच संतापला, आणि त्या खेदाच्या आवेशांत दैवास करुणास्वरानें ह्मणतो, अरे दैवा, मजवर इतका कोप करूं नको. अरे मला वांचव, ह्मणून तुजपाशीं नेहमीं दैन्य भाकीत असतां, तूं मज गरीबाच्या कां बरें इतकें हात धुवून पाठीस लागलें आहेस? अरे पोटाच्या पाठीस लागून कांहीं मिळेल ह्मणून मी येथें आलों; आणि तूं कांरे माझा जीव घेऊं पहातेंस? मला या धंद्याखेरीज दुसरा धंदा पोट भरावयास नाहीं. अरे, मरे तोंपर्यंत मी मेहनत करतों; तरी माझ्या कुटुंबास ओलीकोरडी भाकरी व अंगास फाटकीं तुटकीं धडुतें मिळण्याची सुद्धां पंचाईत! कोठेंच माझें तूं पुरें पडूं देत नाहींस, असें तुझें काय मीं केलें आहे? अथवा मी तुला नांव ठेवतों, हा माझाच अपराध आहे. भल्या मनुष्यास गांजण्यास तुला मोठा संतोष होतो. खऱ्या व थोर मनुष्यास तूं कधीं वर डोकें काढूं देत नाहींस; असा तुझा स्वभावच आहे. दुष्टावर तुझी कृपा फार. जे कुमार्गानें वागतात, त्यांस तूं नेहमीं बरकत देतेंस, हें सर्वांस माहीतच आहे."

'मधुमक्षिका'—

"निद्राभ्रम.

"एके रात्रीं एक तास पावेतों तो आपले बिछान्यावर स्वस्थ निजून, झोंपेंत एकाएकीं उभा राहिला, आणि कांहीं बोलणें ऐकिलेसें करून मोठ्यानीं गदगदां हंसला. नंतर हाताचीं बोटें बाहेर झाडल्यासारखीं करून, जें ऐकिलें त्यांत कांहीं

हांशील नाहीं, असें त्यानें दाखविलें. मग दुसऱ्या कोणा माणसाकडे वळल्यासारखें करून तपकिरीकरितां चिमूट पुढें केली, पण तेथें शेजारीं कोणी नव्हतें; तेव्हां तो अमळसा हिरमुसल्यासारखा होऊन मागें वळला. नंतर त्यानें आपली डबी काढिली तींत कांहीं नव्हतें; तरी तींत बोटें घालघालून चिमटी काढण्यास त्यानें पुष्कळ यत्न केला, तो सर्व व्यर्थ गेला; तेव्हां संशयमुद्रेनें चोहोंकडे पाहून, ती डबी चटकन आपले खिशांत टाकिली. पुढें कांहीं वेळ स्तब्ध बसून कांहीं उघड कारण नसतां एकाएकीं तो पराकाष्ठेचा संतापला, आणि शिव्या शाप देऊं लागला, व तडातड शपथा वाहूं लागला. इतकी कृति दुरून पाहून इतर मठवासी कंटाळून उठून गेले.

"तो पुनः एके रात्रीं निद्राभ्रमांतच उठून, मोठ्या लगबगीनें, त्या मठांतील पवित्र यज्ञशाळेंत गेला. तो, तेथें एक ताट ठेवीत असत, तें चोरून आणण्याच्या बेतानें गेला असावा असें वाटतें. परंतु आदले दिवशीं तें घांसण्याकरितां बाहेर टाकिलें होतें, ह्मणून तेथें त्याला कांहीं सांपडलें नाहीं. तेणेंकरून त्याला फार संताप आला; आणि रिक्तहस्तें आपल्या खोलींत परत जावयाचेंच नाहीं; असा पक्का निश्चय करून, तेथें जवळच कांहीं मठवाशांचे यज्ञकर्में करते वेळीं घालण्याचे उंची उंची रेशमी झगे होते, त्यांतले दोन तीन हळूच उचलून घेऊन, स्वारी भयभीत होत्साती पळत पळत आपल्या खोलींत आली, आणि ते कपडे आपल्या गादीखालीं लपवून ठेवून, वर स्वस्थ निजली. हें ज्यांनीं पाहिलें होतें, ते, हा सकाळच्या प्रहरीं काय करतो हें पहाण्यास फार उत्सुक झाले होते.

"तो सकाळीं जागा होऊन पहातो तों, त्याचे आंथरुणाला मध्येंच एक गोळा आलेला त्याचे दृष्टीस पडला. तेणेंकरून त्याला मोठें आश्चर्य वाटलें; आणि ते झगे आहेत, असें पाहून तर त्याची बुद्धिच गुंग होऊन गेली. तो बाहेर जाऊन लोकांस विचारूं लागला कीं, हें झालें तरी कसें? तेव्हां मठवाशांनीं त्याला कची हकीकत कळविली. ती ऐकून, तो लाजून, मान खालीं घालून एक अक्षरहि न बोलतां चालता झाला; आणि ते झगे त्यानें तात्काळ जिकडचे तिकडे पोहोंचविले."

वरील चारी उतार्‍यांत महाराष्ट्र भाषेचें स्वरूप अगदीं साधें दृष्टीस पडतें. चारीहि मूळ इंग्रेजी ग्रंथांचीं भाषांतरें होत; तरी तीं अशीं चोख उतरलीं गेलीं आहेत कीं तीं त्या त्या ग्रंथकारानें मराठी भाषेंत केवळ आपल्या कल्पनेनेंच लिहिलीं आहेत काय असें वाटतें. शब्द अगदीं सोपे व व्यवहारिक घातले असून वरील वाक्यांतील रचनाहि भाषांतरकारांनीं अगदीं सरळ केली आहे. गोष्टी ज्या भाषेंत लिहावयाच्या ती वरच्यासारखीच अगदीं सोपी व साधी असायास पाहिजे. तींत मोठमोठे शब्द घालून व वाक्यरचना प्रौढ करून गांभीर्य आणण्याचा यत्न केला असतां तो प्रकार

जॉनसनच्या 'रासेलस' वगैरे ग्रंथांत कित्येक स्थलीं जशी हास्यास्पदता आली आहे तसा उपहास्य होतो. | शब्दरचना व अर्थरचना यांची नेहमीं परस्पर अनुरूपता असावी लागते; ह्मणजे आंतील अर्थ जशा योग्यतेचा असेल तितक्याच प्रतीची तद्व्यंजक शब्दरचनाहि असावी.| अर्थ अगदीं सामान्य किंवा पोरकट आहे, आणि तो मोठमोठ्या शब्दांनीं व्यक्त करण्याचा घाट घातला, तर गाढवावर मखमाली झूल घातल्याप्रमाणें, किंवा चार वर्षांच्या पोरानें आपणास न झेपेसें मोठें पागोटें डोक्यास घातल्याप्रमाणें हास्यास्पदतेचा प्रकार होतो. तसेंच दुसऱ्या पक्षीं अर्थ मोठा प्रौढ व गंभीर आहे आणि तो रस्त्यावरील किंवा बाजारांतील भाषेनें सांगितला किंवा लिहिला, तर तिकडूनहि ऐकणारास व वाचणारास हसूं आल्याविना रहाणार नाहीं. आतां हें खरें कीं, हा दुसरा प्रकार पहिल्याहून बरा, कारण त्यांतील विसदृशतेवरून बोलणाराचा किंवा लिहिणाराचा असमंजसपणाच फार तर दिसून येईल. मोठ्या तेजस्वी हिऱ्याला कथिलाचें कोंदण केलें असतांहि त्याची लकाकी जशी कमी व्हावयाची नाहीं; त्याचप्रमाणें सुज्ञ पुरुष वरील सुंदर अर्थावरच नजर देऊन शब्दरचनेकडे दुर्लक्ष करतील. तरी एकंदरींत त्यांस अंतर्बाह्य विसंवादाची विलक्षणता भासल्यावांचून रहाणार नाहीं. असो; तर वरील ग्रंथांत विषयानुरूपच भाषापद्धति योजली असल्यामुळें ती पूर्वोक्त गुणामुळें विशेष शोभली आहे.

६. आतां वरच्यासारखी तऱ्हा नसून जेथें शास्त्रादिकांचा विषय असतो तेथील भाषापद्धतीचा प्रकार पाहूं. यांचीं उदाहरणें वरच्यासारखीं पुष्कळ देतां येणार नाहींत. कारण पदार्थविज्ञानांत अंतर्भूत होणारीं नाना अर्वाचीन शास्त्रें, किंवा इतिहास, अगर प्रतिपादन करण्याचे नानाप्रकारचे गहन विषय, यांपैकीं कशावरहि मराठींत ह्मणण्यासारखे अद्याप मुळींच ग्रंथ झालेले नाहींत. यास्तव प्रौढ भाषापद्धतीचें स्वरूप वाचकांस वरच्यासारखें चांगलेंसें दाखविण्याची सोय नाहीं. ह्मणून एक दोन ग्रंथांतीलच उदाहरणें देतों.—

'अनेकविद्यामूलतत्व'—

"सृष्टपदार्थांचे तीन वर्ग.

"हें जें वर सृष्टपदार्थांच्या तीन प्रधान वर्गांचें व त्यांतील मुख्य मुख्य अवांतर विभागांचें वर्णन केलें, तें लिनियस नामें कोणी स्वीदन देशांत सुमारें शंभर वर्षांपूर्वी महापंडित झाला होता, त्याच्या ग्रंथाच्या आधारानें केलें आहे. हे तीन प्रधान वर्ग स्वरूपतः भिन्न आहेत; तथापि त्यांचा परस्परांशीं संबंध आहे; व कितीएक पदार्थ असे आहेत, कीं ते कोणत्या वर्गांतले आहेत हें सांगावयास फारच कठिण पडतें. आतां हें खरें आहे कीं, खनिजवर्ग व इतर वर्ग यांची परस्परांवर भ्रांति कदापि व्हावयाची नाहीं; कारण निर्जीव पदार्थांस इतर दोन वर्गांतल्या पदार्थांप्रमाणें जीव व

शारीररचना हीं असत नाहींत, व ते बाहेरून नवें द्रव्य चिकटून वाढतात, सजीव पदार्थांसारखे शरीरांत पोषकरस जाऊन तद्द्वारा वाढत नाहींत, असा स्पष्ट भेद आहे; परंतु सजीव पदार्थांचे जे दोन वर्ग आहेत, ह्मणजे वनस्पतिवर्ग व प्राणिवर्ग, त्यांतील कितीएक पदार्थांचें एकमेकांशीं इतकें सारखेपण असतें, कीं ते पदार्थ वनस्पति आहेत, किंवा प्राणी आहेत, हें स्पष्टपणें सांगवत नाहीं. असे पदार्थ समुद्रांत कितीएक सांपडतात. आतां आपणांस असें जर कोणीं विचारलें, कीं शेवटच्या दोन वर्गांतल्या पदार्थांचे ठायीं त्यांचा पहिल्या वर्गांतल्या पदार्थांपासून भेद करणारें असें जीवनतत्त्व ह्मणून जें आहे, तें काय? तर ही गोष्ट आह्मांस अगदीं ठाऊक नाहीं, असें कबूल केलें पाहिजे. आपण ईश्वरास जसा त्याच्या कृतीनें जाणतों; स्वरूपतः जाणत नाहीं; तसेंच जीवतत्त्वाच्या स्वरूपाचें आपणांस ज्ञान नाहीं; तर त्याच्या कार्यांवरून मात्र तें समजावयाचें."

'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण'—

"मागल्या दहा पंधरा वर्षांपासून महाराष्ट्र भाषेंत गद्यात्मक ग्रंथ लिहिण्याचा प्रचार वाढूं लागला; तेव्हांपासून, मोठमोठालीं वाक्यें तर काय, परंतु त्यांतील प्रत्येक शब्द, व त्या शब्दांतील प्रत्येक वर्णरूप अवयवहि शुद्ध व नियमास अनुसरून असावा, आणि तेणेंकरून सर्वांची लिहिण्याची पद्धति एकसारखी पडून सांप्रत जी लिहिण्यांत अव्यवस्था आढळते, ती दूर व्हावी, अशी इच्छा माझ्या मनांत उद्भवली होती; कारण जशी भाषा, तशी तिची लेखनपद्धतिहि, तदंतर्गत गूढस्थित जे नियम त्यांचें उद्घाटन करून त्यांजवर बशिवणें, हाच व्याकरणशास्त्राचा मुख्य उद्देश होय. आणि याच उद्देशानें गालवशौनककात्यायनशाकटायनादि जे प्रतिशाख्यादिवेदव्याकरणभाष्यकार, व त्यानंतर पुढें यास्कपाणिन्यादि जे वैयाकरण झाले, व तदनंतर अर्वाचीन काळीं भट्टोजी दीक्षित, महीधरभट्ट, बोपदेव, आदिकरून जे व्याकरणग्रंथकार प्रसिद्ध झाले, त्या सर्वांनीं परिश्रम केले; ह्मणोनच संस्कृत भाषा इतक्या प्रगल्भ दशेस येऊन विद्वज्जनचित्तचकोरास चंद्रीभूत होऊन, वाल्मीकिव्यासशंकरश्रीहर्षकालिदासभवभूत्यादि जे प्राचीन आणि अर्वाचीन कवि त्यांच्या वाग्देवतेस इतकी रम्यस्थानार्ह झाली; नाहीं तर संस्कृत वाणीप्रमाणें जिचें काठिन्य, विस्तार, आणि जिच्या ठायीं, सहस्रशः सूक्ष्मनियमरूप तंतूंचें गुंतलेलें जाल, अशा भाषेसं मार्दवदशेस आणून, तिचें हें दुर्निवार जाल उकलून, त्या सूत्रांनीं विणून, सिद्ध केलेला जो पट तो कविजनचित्रकारांच्या अनेक सुरसरंगभरित कल्पनांस लेखनार्ह झाला नसता. ह्मणोन या यशाचे जे अंशभाक् त्यांची परिगणना केली असतां, पतंजलिकात्यायनपाणिन्यादि जे शब्दशास्त्रनियंते त्यांसच आद्यस्थानापन्न केलें पाहिजे."

या शेवटल्या उताऱ्यांत वरील ग्रंथकर्त्याची नेहमींची तऱ्हा पूर्णपणें लक्षांत येते. ती सर्वांस माहीतच आहे कीं, संस्कृतांतले मोठमोठाले शब्द व लांब लांब समास घालून देण्याची हौस होय. ही इंग्रेजी भाषेंतील जानसनच्या ग्रंथांवरून प्रस्तुत ग्रंथकारानें मराठींत सुरू केली कीं काय नकळे. असें जर असेल, तर त्यानें वरील पद्धतीविषयीं सध्यां सर्व रसिक वाचकांचें काय मत झालें आहे तें चांगलेंसें लक्षांत आणिलें नाहीं असें ह्मणणें भाग आहे. जानसनची पद्धति मनापासून चाहून तीस बुद्धिपुरःसर अनुसरणारा मनुष्य सध्यां तर कोणीहि मिळेल असें वाटत नाहीं; व त्या महापंडिताच्या ह्यातींत व पुढें कांहीं वेळ त्याची तऱ्हा जरी बरीच लोकमान्य होऊन गेली होती, तरी त्यापुढें ती कोणाहि नामांकित ग्रंथकारानें पुनः चालू करण्याचें मनांत आणिलें नाहीं. असो; तर असल्या तऱ्हेचें अनुकरण आमच्या भाषेंत जितकें वेताचें व जितकें थोडें होईल तितकें चांगलें. आतां हें खरें आहे कीं, वरील उताऱ्यांत प्रौढ विषयावरच लिहावयाचें असल्यामुळें वरील रचना केवळ विशोभितच दिसते असें नाहीं. तिजवर दोष एवढाच येतो कीं ती असावी त्यापेक्षां दुर्बोध झालेली असून ग्रंथकारानें आपलें पांडित्य मिरविण्याच्या उद्देशानें तिची योजना केली आहे असा वाचकांचा समज होतो.

आतां वरच्यासारखी डौलाची रचना ही येथें विषयानुरूपतेमुळें साजली जाऊन मनोवेधक होते असेंहि एक उदाहरण येथें देतों. तें वरील सर्वप्रसिद्ध ग्रंथकाराच्याच एका प्रसिद्ध ग्रंथांतील होय--

"आणखी अशी अटकळ होते कीं, जेव्हां प्रथम मोरोपंताच्या आर्या बारामतींतून बाहेर निघूं लागल्या, त्या काळींच बारामतीजवळ सोलापुरांत रामजोशी या नांवाचे व्युत्पन्न आणि परम रसिक कवि असून त्यांनीं हरिदासाच्या वृत्तीचें अवलंबन केलें होतें; आणि नुकतेच कीर्तांच्या अंगणांत जाण्यास उमऱ्यावरून बाहेर पाऊल टाकीत होते; तों इतक्यांत त्यांस पंताच्या कृतिकुमारिकेचा आल्हादजनक शकुन भेटला; तिच्या सौंदर्यानें आणि निमंत्रणरूप आनंदजनक अशा प्रेमकटाक्षानें आकर्षितांतःकरण होऊन ही उपवर कन्या आपण वरावी अशी मनांत आवड धरून त्यांणीं तिच्या पित्याचा शोध करण्याकरितां तिचेंच अनुसरण केलें. पित्यानींहि आपल्या कन्येच्या गुणास हा इतका लुब्ध पाहून तिणें याचें पाणिग्रहण केलें असतां ती लवकरच सुखी होईल ह्मणून तसें करण्यास आपलें पूर्ण अनुमोदन दिलें. हा प्रसंग कोणीं खालीं लिहिलेल्या आर्येंत असाच वर्णिला आहे--

जैशी जनकें दिधली सच्चिद्घन राम जो सिता त्याला।
तैशी मयुरें दिधली ती आर्या रामजोसि तात्याला॥

"किंबहुना असेहि ऐकण्यांत आहे कीं, मोरोपंताच्या आर्यांनींच रामजोशाची

वृत्ति हरिकीर्तनाकडे वळविली. त्या पूर्वी ते कलगीतुऱ्याच्या नादांत असून, लावण्यांच्या छंदावर कवनें करून, स्वच्छंदानें डफ तुणतुणें सारंगी आणि नाचेपोर हातीं घेऊन चरितार्थ चालवीत होते. ही वेळ बाजीराव रघुनाथ पेशवे यांच्या विलासाच्या आरंभाची असावी अशी अटकळ होते. त्या कालीं रावबाजींच्या उत्तेजनानें पुणें शहरांत व त्या शहराचा वारा लागून जेथें तेथें शिमग्याचें चांदणें वाढत चाललें होतें. दिवसास ब्रह्मभोजनाचा थाट आणि दिव्यांत वात पडली नाहीं तों मंदिरांत चवघडे, सणया यांचा मंजुळ घोष; श्रीमंतांच्या व सरदार लोकांच्या वाड्यांत सरकारी तायफांचे मुजरे, रात्रीस रस्त्यांत आणि बोळांत फिरणाऱ्या विलासी लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घेणारे नुकतेच चिमणी, साळू, मैना, यांच्या मंजुळ कंठांत होणाजी बाळानें घातलेले खडे सूर, आणि फौजेकडील शिलेदार, बारगीर, शिपाई, आणि शहरांतील सुखवस्तु शिंपी, माळी, सराफ, दुकानदार, यांस रिजविण्याकरितां बाहिरू मल्हारी, धोंडीबापु, सगनभाऊ आणि रामा गोंधळी, यांनीं सजविलेले डफ तुणतुण्याचे तमासे आणि कलगी तुऱ्याचीं भांडणें; हे सर्व थाट रावबाजीच्या उल्हासित मनोवृत्तींच्या प्रेरणेनें पुणें शहरांत जेथें तेथें गाजून राहिले होते. मग 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें त्या प्रेरणेचा अंमल सर्व पेशवाईंत पसरला नसेल असें संभवत नाहीं. त्या काळीं सर्व गुणिजनांचे आशेनें भरलेले डोळे पुणें शहराकडे लागले असून त्या शहरानें जो कित्ता घातला होता, त्याची नक्कल जेथें तेथें होऊन कित्येक ठिकाणीं त्या नकलेवर तान करणारे उमेदवारहि निपजूं लागले. रामजोशांसहि यद्यपि अशा उमेदवारांमध्यें गणिलें तथापि त्याच्या गुणांस न्यूनत्व न येतां उलटी ती त्यांची उमेद प्रशंसेस पात्र होईल; कारण त्यांच्या कवनावरून रामजोशी हे चांगले व्युत्पन्न आणि साहित्यशास्त्रज्ञ असावे असें अनुमान होतें. असें असतां त्यांनीं आपलें लक्ष त्या काळाच्या इतर पंडितांप्रमाणें सभेंत शुष्क वादविवाद करून शालजोड्यांची आणि दक्षणेची प्रतिष्ठा मिळविण्याकडे न लावितां, सर्व लोकांचें मनोरंजन करून त्यांमध्यें वाहवा मिळविण्याकडेस लाविलें हें आश्चर्य होय. त्यांत आणखी ब्राह्मणानें विद्वानाची पूज्य प्रतिष्ठा तुच्छ मानून केवळ लोकरंजनार्थ शूद्रवृत्ति धारण करून तमासगीरांच्या निर्भर्त्सनेचा अंगीकार केला, येणेंकरून रामजोशी हे मोठे उदार मनाचे पुरुष होते असें दिसतें; तसें असल्यावांचून त्या काळीं इतक्या धैर्याचें कर्म त्यांजकडून घडणें कठिण, ह्मणून माझ्या मतें ते मोठे प्रशंसेस योग्य होत."

'केकावलि'–प्रस्तावना.

७. याप्रमाणें भाषेंत असणारे दोन मोठमोठाले प्रकार वर सांगून त्यांचें उदाहरणहि केलें. आतां याशिवाय बाकीचे जे आढळणारे आहेत ते आपल्या भाषेंत अद्याप चांगलेसे रूढ न झाल्यामुळें त्यांविषयीं एकंदरीनें निराळ्या सदरांतच विचार

करूं. हें सदर इंग्रेजी भाषेचें अनुकरण होय.

८. इंग्रेजी भाषेचें अनुकरण ह्मणजे इंग्रेजींत ज्या पद्धति आढळतात त्या इकडे आणण्याचा गेल्या वीस पंचवीस वर्षांत आपल्या लोकांचा जो उद्योग चालू झाला आहे तो होय. हा उद्योग इंग्रेजी भाषेचा इकडे जो आजपर्यंत प्रसार झाला व उत्तरोत्तर होत आहे त्याचें फळ होय. तो आजला जितका व्हावा व जितका होणें इष्ट आहे तितका अद्याप झाला नाहीं खरा; तरी तो काळेंकरून पुष्कळ वाढत जाईल असा सुमार दिसतो. हे नवे प्रकार ह्मटले ह्मणजे वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व काव्यनाटकादि इतर ग्रंथ हे होत. यांपैकीं पहिल्या दोहोंविषयीं प्रस्तुत मालेच्या पहिल्या दोन अंकांत बराच मजकूर लिहिला आहे. त्यांच्या स्थितींत मध्यंतरीं गेलेल्या अल्पकाळांत ह्मणण्यासारखा कांहींच विशेष फेरफार न झाल्यामुळें तेथल्याहून येथें कांहीं जास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. यास्तव इतर ग्रंथांच्या संबंधानें मात्र येथें विचार करूं.

९. कोणत्याहि दोन भाषांचा जेव्हां परस्पर संगम होतो, तेव्हां दोहोंच्या मिश्रणाच्या योगानें दोघींचे गुण एकमेकींस लागतात. याविषयीं इतिहासांत पुष्कळ उदाहरणें आहेत; व एका राष्ट्राच्या ग्रंथसंग्रहास दुसऱ्या राष्ट्राच्या ग्रंथसमूहानें कसें साहाय्य झालें किंवा त्यांत कोणते फेरफार घडले हा विषय भाषाभिज्ञ लोकांस मोठा मनोरंजनावह झाला आहे. आतां जेथें मराठी व इंग्रेजीसारख्या परस्परांहून अत्यंत भिन्न असणाऱ्या व परिपक्वतेच्या मानानें ज्यांत अतिशयित अंतर आहे अशा दोन भाषांची गांठ पडते, तेथें तर वरच्याहून पुष्कळ निराळा प्रकार घडण्यांत येतो. तो असा कीं, हीन भाषेस अभियुक्त भाषेची पद्धत लागून तींतील ग्रंथसंग्रह त्या दुसऱ्या भाषेची अभिवृद्धि होण्यास कारणभूत होतो. हा प्रकार संस्कृताच्या योगानें आमच्या भाषेस यापूर्वी पुष्कळच झाला आहे; व इतउत्तर वरील संस्कार मराठीस आणखी जास्त होत जाण्याचाहि संभव आहे. तीच गोष्ट इंग्रेजी भाषेसहि लागते. हिचा परिचय गेल्या पंचवीस तीस वर्षांत आमच्या लोकांस पुष्कळ झाल्यामुळें महाराष्ट्र भाषेचें सगळें स्वरूप तिनें बदलून टाकलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां वरील फेरफार होतांना आमच्या भाषेची पुष्कळ हानि झाली, व कांहीं वेळ तर तीस अतिशय अपाय घडण्याचेंहि भय होतें, हें खरें आहे; पण सध्यां चोहें कडे जी गडबड दिसत आहे तिजवरून पहातां वरील भय नाहींसें होऊन तिचा उत्कर्ष होण्याचीं बरींच सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत असें ह्मणणें भाग आहे. असो; आतां इंग्रेजी भाषेच्या अनुकरणानें मराठींत नवे प्रकार कोणते सुरू झाले हें जर पाहिलें, तर अगोदर गद्याची तींत पद्धति पडली ही गोष्ट तेव्हांच लक्षांत येणारी आहे. ही पद्धति हिंदुस्थानांत यापूर्वी कधींच नव्हती ह्मटलें तरी चालेल; कारण संस्कृतांतहि सर्व ग्रंथ

प्रायः पद्यरूपच आहेत. ही नवी पद्धति पद्यरचनेपेक्षां सोपी व साहाजिक असल्यामुळें व नाना प्रकारच्या विषयांच्या विवेचनासहि ती सारखी उपयोगीं पडणारी आहे, यास्तव तिचा प्रचार अलीकडे चांगला पडून गेला हा महाराष्ट्र भाषेस मोठाच लाभ झाला असें झटलें पाहिजे. अलीकडे दहावीस वर्षांत पुष्कळ निरनिराळ्या विषयांवर जी मराठींत ग्रंथरचना झाली ती एरवीं होतीना. ही पद्धत वर्तमानपत्रांच्या व मासिक पुस्तकांच्या फैलाव्यानें दिवसेंदिवस विशेष निश्चित होत जाऊन कादंबऱ्या, नाटकें, वगैरे जे कित्येक नवे प्रकार अलीकडे सुरू झाले आहेत त्यांच्या योगानेंहि तीस साह्य झालें आहे. तीस अद्याप ह्मणण्यासारखी चांगली स्थिति आली नाहीं; तरी सध्यांचा क्रम असाच पुढें चालल्यास तींत पुष्कळ सुधारणा होण्याची आशा दिसत आहे.

१०. आतां सरतेशेवटीं वरील कादंबऱ्यादि नवे प्रकार आपल्या भाषेंत कसे सुरू झाले, त्यांची आजला कोणती स्थिति आहे, वगैरेविषयीं लिहून एकंदर विषयाची परिसमाप्ति करतों. इंग्रेज लोक इकडे आल्यानें सर्व गोष्टींत दोन प्रकारचा बदल झाला आहे,—कीं कांहीं नव्या उत्पन्न झाल्या आहेत, व कांहींचें पहिलें स्वरूप पालटून फेरफार झाला आहे,—तसेंच आमच्या ग्रंथांतहि झालें आहे. कवितेची व इतिहासाची जुनी तऱ्हा बदलून नवी होत चालली आहे; व कादंबरी आणि नाटक हे अपूर्व प्रकार प्रचारांत येत आहेत. आतां या चोहोंविषयीं अनुक्रमेंकरून विचार करूं.

पहिल्यानें कवितेविषयीं जर पाहिलें तर तिजविषयीं अलीकडे आपणांत प्रमुख ह्मणविणाऱ्या मंडळीच्या समजुती किती पालटल्या आहेत याविषयीं यापूर्वी अनेक ठिकाणीं प्रसंगोपात्त उल्लेख केलाच आहे. त्यांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, आमच्या देशासंबंधींच्या इतर बहुतेक गोष्टींविषयीं नव्या मंडळीचीं मतें प्रायः जशीं अज्ञानमूलक व भ्रांतिमय आहेत तशींच प्रस्तुत विषयावरीलहि होत. हें सविस्तर व प्रमाणपूर्वक दाखविण्यास एका स्वतंत्र लेखाचीच जरूर आहे.[1] तो

१. वरील विषयावर माजी शालापत्रकाच्या गेल्या वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या अंकांत बेराच मजकूर लिहिलेला आहे. सदरील पुस्तकांत मराठी कवितेविषयीं विवेचन करण्याचा पुस्तककर्त्याचा संकेत असून त्यास आरंभहि झाला होता. पण पुढें एकाएकीं तो विषय बंद पडून हजारों वेळां चर्वितचर्वण झालेला 'शिक्षणा'चा विषयच एकदम सुरू होऊन तोच शेवटपर्यंत चालू झाला, व वर्षांच्या अखेरीबरोबर पुस्तकाचीहि अखेर झाली ! हा सर्व प्रकार काय झाला असेल तो असो ! आमच्या ऐकण्यांत असें आहे कीं, वरील माहे एप्रिलच्या अंकांत आमच्या पाद्री बंधूंचें जें थोडेंसें खंडन केलें आहे तें सदरील पत्रकास अपायकारक झालें. असें असेल तर वरील परम धार्मिक लोकांची व विद्याखात्यांतील अधिकाऱ्यांची मोठी तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांत कदाचित् यथावकाश येईल. असो; प्रकृत स्थळीं एवढेंच सांगणें पुरें आहे कीं, मराठी कवितेचा ओघ आजपर्यंत ज्या दिशेनें वहात आला ती दिशा आतां बदलली. तो मुळींच बंद न होतां जर इतउत्तर पुढें चाललाच, तर त्याचा रोंख अगदीं निराळा होईल यांत संशय नाहीं. तो कांहीं इंग्रेजी कवितेच्या व कांहीं संस्कृत कवितेच्या मार्गाकडे वळेल, किंवा कवींच्या रुच्यनुरूप तो वरच्यांपैकीं एकेका पंथासच अनुसरेल. हा प्रकार सध्यांहि कांहीं दृष्टीस पडूं लागला आहे. पहिल्या प्रकारचें उदाहरण 'गंगावर्णना' हें दोन तीन वर्षांमागें प्रसिद्ध झालेलें एक लहानसें काव्य होय; व दुसऱ्या दोहोंचीं 'राजा शिवाजी' व 'देवसेनी,' आणि 'विद्याधनप्रशंसा' हीं उदाहरणें होत.[1] या चारी काव्यांची योग्यता अर्थात्च फार निरनिराळी आहे. ती बरोबर ठरविण्याचें सध्यां आमचें काम नाहीं. तरी वरील कृतींचें स्वरूप आमच्या वाचकांच्या कांहीं लक्षांत येण्याकरतां येथें इतकें सांगणें जरूर आहे कीं, 'गंगावर्णना' हें काव्य कांहीं इंग्रेजी कवींच्या व पुष्कळ अंशीं संस्कृत कवींच्या धाटणीवर आहे. पुढलीं दोन अनुकमेंकरून मिल्टनचें 'प्यारडैज् लॅस्ट्' आणि स्काट्चें 'लेडी आफ दि लेक' यांच्या हतोटीवर आहे; आणि शेवटलें केवळ जुन्या मराठी कवींच्या पद्धतीवर रचिलें आहे. असो, तर याप्रमाणें अलीकडे आमच्या कवितेचें रूपांतर होत आहे.

दुसरें रूपांतर इतिहासाचें. आमच्या जुन्या मराठी व ब्राह्मणी घराण्यांचे इतिहास कोणत्या रूपानें दृष्टीस पडतात हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित् माहीत असेल. तें रूप बखर हें होय. ही ऐतिहासिक वृत्तांत लिहून ठेवण्याची तऱ्हा आमच्या लोकांत चागली पूर्णतेस कधींहि आली नाहीं; तरी झालेल्या हकीकती साद्यंत लिहून ठेवण्याची जी वरील चाल त्या काळीं चोहोंकडे सुरू होती तीवरून आपल्या लोकांचा उद्योग व जिज्ञासा हीं दोन्ही स्पष्ट होतात. आपल्या देशाचा खरा इतिहास मिळविण्याचें वरील लेखच चांगलें साधन होत हें आह्मीं मागें सांगितलेंच आहे; व असें असण्याचीं कारणेंहि दर्शविलीं आहेत. तसेंच वरील उद्योग आतां जर केला नाहीं, तर तो पुढें होण्याची मुळीं शक्यताहि रहाणार नाहीं हेंहि मागें आठव्या अंकाच्या

१ 'राजा शिवाजी' व 'देवसेनी' हे ग्रंथ प्रसिद्धच आहेत. राहिलेले दोन मात्र सर्वांस माहीत नसतील असें वाटतें. त्यांपैकीं पहिला 'गंगावर्णना' हा ग्रंथ दक्षिणाप्रैज कमिटीच्या बक्षीसास लायक ठरून तो आमचे विद्यालयबंधु रा० सा० पांडुरंग व्यंकटेश चिंतामणी पेटकर यांनीं रचिला आहे. वरील कमिटीकडे असल्या मासल्याची कविता फारच क्वचित् आली असेल. हा अभिप्राय त्या कमिटीच्या चिटणिसांनीं वरील काव्याची जी तारीफ केलेली आढळते तीवरून स्पष्ट होतो. दुसरें काव्य 'विद्याधनप्रशंसा' यावर शालापत्रकाच्या एका अंकांत (पुस्तक १२ अंक ३) चांगला अभिप्राय दिलेला आढळतो. एकंदरींत वरील कवितेंत पुष्कळ श्लाघ्य गुण आहेत असें आह्मांसहि वाटतें.

शेवटीं सुचविलें आहे. असो; पण आतां वरील तऱ्हा बदलली. इंग्लिश भाषेंत जे शेंकडों मोठमोठे इतिहास ग्रंथ आहेत त्यांची सरणी आपल्या लोकांस माहीत झाल्यामुळें यापुढें पहिल्या अडाणी रीतीस आतां कोणी अनुसरणार नाहीं. गेल्या तीस चाळीस वर्षांत आपल्या भाषेची क्रमाक्रमानें स्थिति सुधारत जाऊन ती अद्यापहि पुढें तशीच चालू आहे, हेंहि वरील इतिहासरचनेस चांगलें अनुकूल होणार आहे. तेव्हां एकंदरींत या विषयाच्या संबंधानें इंग्लिश भाषेचा आमच्या भाषेशीं जो संसर्ग घडला आहे तो सर्वथा हितावहच होईल. मागील कवितेच्या संबंधानें त्याचें हितावहत्व जसें संशयात्मक होय तसें याविषयीं नाहीं. असो; पण हे सर्व मनाचे तरंग पुढील काळाच्या संबंधानें झाले. त्यांचा साक्षात् प्रत्यय केव्हां येईल तो येवो. सध्यां तर आजपर्यंत चालत आल्याप्रमाणेंच स्वदेशाच्या इतिहासाविषयीं बहुधा सर्वांची अनास्था दिसते. ज्या गोष्टींचें यथावत् स्वरूप आह्मांस मात्र समजणें शक्य, व यास्तव त्याविषयीं निर्णय देण्यास वस्तुतः पाहिलें असतां आह्मांस मात्र अधिकार, त्यांविषयीं मतें देण्याचा पतकर बडे बडे रेवरेंड, मोठमोठे हुद्देदार साहेब, व इकडचें अक्षरहि माहीत नसतां उंटावरून शेळ्या हाकणारे महान् महान् इंग्रेज ग्रंथकार हे बेधडक घेतात; आणि पेनाच्या सफाईत किंवा जिव्हाग्राच्या चापल्यांत (त्यांतून त्या चापल्याचा विलायती रसाच्या संस्कारानें परमोत्कर्ष झाला असल्यास मग तर आमचा पुराच भाग्योदय !) वक्तृत्वरूप ओघांत जे कांहीं वाहवतात ते अतोनात ! पण याहून चमत्कार काय कीं त्यांच्या पोकळ शब्दावडंबराचें आह्मांस हसूं न येतां किंवा तिरस्कार न वाटतां सत्याचें व ज्ञानाचें जणों काय मंथन करून दोहोंचें सारच त्यांनीं आह्मांस अर्पण केलें आहे अशा भावानें त्यांचीं वचनें आह्मी शिरसावंद्य करतों; आणि त्यांची पोपटपंची भरसभेंत करून आमच्या लोकांचा खुळेपणा व अधमपणा सर्वांस दाखवून दिला ह्मणजे आह्मांस जन्माचें भूषण झालें असें मानतों ! असो; आज आमच्या भाषेंत आमच्या देशाचे जे इतिहास आहेत त्यांत शब्दास शब्द भाषांतर नसतां स्वतंत्र आपल्याच बुद्धीनें लिहिलेले असे दोन मात्र आह्मांस माहीत आहेत– एक जांभेकर यांचा 'हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास,' आणि दुसरा रा० विनायक कोंडदेव ओक यांचा 'हिंदुस्थानकथारस.' या दोघां ग्रंथकारांनीं, व त्यांतून विशेषतः दुसऱ्यानें स्वतंत्र इतिहासरचना करण्याचा जो आपल्या देशबंधूंस कित्ता घालून दिला आहे त्याजबद्दल त्यांचे सर्वांनीं मोठे आभार मानणें अवश्य होय हें उघडच आहे. तथापि खरोखरी पहातां दोघांनींहि आपापल्या ग्रंथांत केवळ शब्दरचनेच्या पलीकडे कोणत्याहि प्रकारें स्वातंत्र्य दाखविलें आहे असें नाहीं. इंग्रेज ग्रंथकारांच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा प्रकार आहे तो आहेच.[1] हें जोंपर्यंत

१. मेकाले, मारिससारख्या महासमर्थ ग्रंथकारांनीं आमच्या इतिहाससिंधूचें आलाइन

नाहींसें झालें नाहीं तोंपर्यंत इतिहासाचें खरें वास्तव्य आपल्या भाषेंत झालेंसें मुळींच ह्मणतां येणार नाहीं.

आतां आपल्या भाषेंत पूर्वी मुळीं नसून नवेच सुरू झालेले दोन प्रकार जे कादंबरी व नाटक त्यांविषयीं लिहूं. हे दोन्ही प्रकार संस्कृतांत आहेत. नाटक तर मोठ्याच पूर्णतेस पावलेलें असून कादंबरीचा प्रकार इंग्रेजींतील 'नाव्हला'सारखा जरी सर्वांशीं नाहीं, तरी तो संविधानकादि अनेक गुणांनीं परिपूर्ण आहे. पण मराठींत जे वरील दोन्ही प्रकार उत्पन्न झाले आहेत ते संस्कृतावरून घेतलेले नव्हेत. त्यांस मूळ इंग्रेजी ग्रंथच होत. इंग्लंडांत गेल्या शंभर वर्षांत 'नाव्हल' ह्मणून एक कल्पित कथेची तऱ्हा निघून ती लवकरच मोठ्या उत्कर्षास जाऊन पोंचली. नाटकें तर त्या भाषेंत दोन तीनशें वर्षांपूर्वीच मोठीं उत्कृष्ट झालेलीं आहेत. तर या दोहोंच्या अनुकरणानें वरील दोन्ही तऱ्हा मराठींत सुरू झाल्या आहेत. त्या पूर्णत्वाच्या दशेस पोंचण्यास अर्थात् अद्याप पुष्कळ काळ गेला पाहिजे. तरी सध्यांहि त्यांच्यांत कांहीं मासले बऱ्याच चांगल्या प्रतीचे दाखवितां येतील. या नव्या कादंबऱ्यांत आह्मीं अद्याप जितक्या वाचल्या आहेत तितक्यांत 'मुक्तमाला,' 'बोधसुधा,' व 'हंबीरराव आणि पुतळाबाई' या आमच्या मतें उत्तम आहेत. त्याप्रमाणेंच इंग्रेजीच्या धाटणीवर जीं जीं नाटकें

करून आह्मी परम दुर्बल, परम नीच, परम मूर्ख अशीं सत्याचीं रहस्यें जीं आह्मांस नजर केलीं आहेत तीं अद्यापहि आह्मीं उराशींच बाळगिलीं आहेत, तीं तेथून केव्हां निघतील तीं निघोत. आमच्या साधारण संभाषणांत मोठमोठ्या सभांतून लोकमान्य ग्रंथांतूनहि वरच्यासारख्याच कल्पना व विचार आढळून येतात. वर सांगितलेल्या 'कथारसां'त ग्रंथकारानें कित्येक ठिकाणीं आपल्या समजुती सदर्हूप्रमाणेंच प्रगट केल्या आहेत. त्यांचा मासला ज्या कोणास पहाणें असेल त्यानें तो वरील ग्रंथाच्या शेवटीं सत्तावन सालच्या बंडाच्या संबंधानें दोन लेख लिहिले आहेत त्यांत पहावा. अथवा त्याच ग्रंथकर्त्यानें 'शिपायांच्या बंडाचा इतिहास ह्मणून एक नवें पुस्तक' प्रसिद्ध केलें आहे तें पहावें. या नव्या इतिहासांत रा० ओक यांनीं आपली राजनिष्ठा मोठ्या बहादरीनें दाखविली आहे यांत संशय नाहीं; पण त्याच मानानें त्यांत सत्यनिष्ठेचा प्रकार जर दिसता तर बरें होतें असें आह्मांस वाटतें. वरील दोन्ही लेख त्यांनीं लोकभ्रांतीचें निरसन करण्याच्या स्तुत्य उद्देशानें लिहिले आहेत; व याच कामगिरीबद्दल सरकारच्या उदार आश्रयाचा अनुभव त्यांस घडला असावा असें वाटतें. असें असेल तर आमची त्यांस अशी सूचना आहे कीं, गेल्या सालीं माजी गायकवाडांनीं विषप्रयोगाचें घोर कृत्य केल्याबद्दल आमच्या न्यायदंडधारी कृपाळू सरकारानें त्यांस जें यथायोग्य शासन दिलें त्यावरहि त्यांनीं इतिहासरचना करून लक्षावधि राजनिष्ठ लोकांच्या मनांत ब्रिटिश सरकारच्या न्यायित्वाबद्दल व्यर्थ जो किंतु आला आहे तोहि नाहींसा करावा. 'हिंदुस्थानकथारसा'चा हा शेवटचा घुटका त्यांनीं तयार केला असतां त्यांच्या श्रमाचें वैफल्य होईल असें नाहीं हें सांगणें नकोच!

झालीं आहेत त्यांत 'थोरले माधवराव,' 'जयपाळ,' व मनोरमा'[1] हीं आह्मांस उत्कृष्ट वाटतात. अशा प्रकारचे ग्रंथ कसे असावेत, त्यांतील गुण कोणते, व ते साधण्यास उपाय काय, वगैरे गोष्टींचा यथास्थित उहापोह करून तो आमच्या लोकांस समजाविणें हें मोठें अवश्य आहे. पण तें अद्याप कोणींच न केल्यामुळें कादंबऱ्या व नाटकें हीं सध्यां यदृच्छेनें जो तो हवीं तशीं लिहितो. त्यामुळें तीं सामान्यतः इतकीं भिकार व पचपचीत निपजतात. साधारणपणें बरें असें एखादेंहि त्यांत सांपडण्याची मारामार पडते. असो; तर इंग्रेजी भाषेच्या संसर्गानें हे दोन प्रकार आमच्या भाषेंत नवे सुरू होऊन त्यांची आज वर सांगितलेल्या प्रकारची स्थिति आहे.

११. आतां वरील कलमांत सांगितलेल्या स्थित्यंतराच्या योगानें आमच्या भाषेंत भाषापद्धतीचे नवे प्रकार कोणते निघाले तें सांगतों. एक विनोदाचा; विनोदात्मक लेखाची प्रवृत्ति मराठींत पूर्वी गद्यांत नव्हती व पद्यांतहि नव्हती हें उघडच आहे. तशीच ती संस्कृतांतहि विशेष ह्मणण्यासारखी नाहीं हें तद्भाषाभिज्ञांस माहीत असेलच. त्या भाषेंत इतकीं नाटकें आहेत; पण हास्यरसाचा विशेष प्रकार असा एका मृच्छकटिकांत मात्र आहे. प्रहसन नांवाचा एक नाट्यप्रकार प्रसिद्ध आहे खरा; पण त्यांतील विनोद विशेष वाखाणण्यासारखा नसतो. असो; तर ही वरील रीत इंग्रेजी भाषेवरून इकडे आली. वर्तमानपत्रें सुरू होऊन त्यांचा फैलावा जसा होत चालला, व जनमनोरंजन हें त्यांचें तत्त्व होऊन बसलें, तसतसा वरील प्रघात वाढत चालला. लोक-

१. वरील ग्रंथाची आह्मीं उत्तमांत गणना केली हें पुष्कळांस कदाचित् विलक्षण वाटेल; व वरील नाटकांत बीभत्स रसाचा वगैरे पुष्कळ निंद्य प्रकार जो आहे तो आह्मांस अमान्य नाहीं अशी त्यांची समजूत होईल. पण असें अगदीं नव्हे. 'विविधज्ञानविस्तारां'त (पुस्तक ३ अंक १०) सदरील पुस्तकावर जी चरचरीत टीका केली होती तीं बहुतेक अंशीं आह्मांस मान्य आहे; व पुस्तकें कीतीहि चांगलीं असलीं तरी तीं जर चावट आहेत तर तीं न झालेलीं पुरवलीं असें आमचें मत आहे. कारण असल्या ग्रंथांत जितके गुण अधिक तितका त्यांपासून अधिक अनर्थ होण्याचा संभव. तथापि ज्याप्रमाणें वेश्या दुराचारिणी खरी तरी तिचें रूप जर मनोहर आहे, तर नुसत्या रूपाचाच विचार कर्तव्य असतां तिचें दुष्कर्म मनांत आणण्यांत हंशील नाहीं; त्याप्रमाणें ग्रंथाच्या रचनेवरच जर नजर द्यावयाची असली तर त्याच्या बीभत्सत्वाचा वगैरे विचार निराळाच ठेविला पाहिजे. चिताऱ्याचें किंवा मूर्तिकाराचें कसब बीभत्सपणामुळें जसें कमी धरतां येत नाहीं तशीच ग्रंथकारांचीहि गोष्ट होय. पहा कीं, 'बोकेशियो' सारखा चावट व विचकट ग्रंथकर्ता आजपर्यंत या भूमंडळावर थोडासाच झाला असेल; पण त्याच्या भाषासौंदर्यास्तव त्याच्या गोष्टी आज सहाशें वर्षे युरोपांत सर्वमान्य होऊन त्या चिरकाळ या जगांत रहातील यांत तिळमात्रहि संशय नाहीं. त्याचप्रमाणें शेक्सपीयर, बायरन् वगैरे इंग्लिश कवींची, व कालिदास, जयदेव इत्यादि संस्कृत कवींचीहि गोष्ट होय. असो; तर वरील नाटकांत कांहीं संविधानकाचें चातुर्य व विशेषतः भाषणांचा चटकदारपणा हे गुण चांगले असल्यामुळें त्यास वरील पंक्तींत बसाविणें भाग आहे.

प्रसिद्ध गोष्टींविषयीं व लोकप्रसिद्ध मनुष्यांस अनुलक्षून लिहिलेला मजकूर लोकांस मनोवेधक होत गेल्यानें तो मार्मिक रीतीनें लिहिण्याची रीत पडली. त्याप्रमाणेंच ग्रंथ लिहिण्याचा प्रघातहि अलीकडे वाढत चालल्यानें टीका करण्याचा प्रचारहि अलीकडे वाढत चालला आहे. ग्रंथांचे गुणावगुण लोकांस दिवसेंदिवस बरेच चांगले कळूं लागले आहेत; व मासिक पुस्तकांचा प्रचार सध्यांहून जर पुष्कळ वाढत चालला तर ग्रंथपरीक्षणांत वाचकांची निपुणताहि अधिकाधिक होत जाईल हें उघड आहे. असो; आतां वरील दोन्ही ठिकाणीं विनोदाचा बराच उत्तम ह्मणण्यासारखा मासला आजपर्यंत कोणकोणता दिसण्यांत आला तो सांगतों. एक येथील ज्ञानप्रकाशांतील 'पिशाच' सहीचीं पत्रें, यांतील विषय जरी नेहमीं विशेष महत्वाचा नसे, तरी आंतील मजकूर हास्यपर असल्यामुळें तीं पुष्कळ वाचकांस अत्यंत प्रिय झालेलीं असत. त्यांतील रोंख कोणा व्यक्तीवर नसून लौकिक विषयांच्या संबंधानेंच तीं प्रायः लिहिलीं असत. दुसरा मासला वरच्याहून निराळा होता. तो वरील पत्रांत एकदां व एकदां माजी 'लोककल्याणेच्छें'त असा दोनदां चांगला दृष्टीस पडला. तो अद्यापहि येथील लोक तरी निदान विसरले नसतील. पुण्यांतील दोन प्रसिद्ध व्यक्तींस अनुलक्षून 'लोककल्याणेच्छें'त 'गोल्या घुबड' या सहीचीं दोन पत्रें व 'ज्ञानप्रकाशां'त 'पढत मूर्ख' या सहीचें एक पत्र अशीं सुमारें चार पांच वर्षांपूर्वी तीन पत्रें प्रसिद्ध झालीं होतीं. तीं अशीं खुबीदार लिहिलीं होतीं कीं, कांहीं दिवसपर्यंत लोकांच्या तोंडीं त्याशिवाय दुसरा विषयच नाहींसा झाला. जो तो त्या लोकप्रिय व्यक्तींचें चरित्र गाऊं लागला. तसेंच त्या पत्रांवरून वरील दोघां महापुरुषांस पुरतेपणीं कळून आलें कीं, पुण्याचें पाणी कांहीं निराळें आहे; वनजंबूकन्यायानें आपण पूर्वीच्या ठिकाणीं जी विचित्र लीला केली तीं या पुण्यपत्तनांत खपली जाणार नाहीं; येथें मोठमोठ्यांचीहि मति कुंठित होते ! असो; ग्रंथावरील टीकेंत यावयाचा जो विनोदाचा प्रकार तो अद्याप पुष्कळसा दृष्टीस पडूं लागला नाहीं. यापूर्वी वरील प्रकार ज्यांत दृष्टीस पडला अशीं पुस्तकें दोनच होत; एक माजी 'शालापत्रक' व दुसरें 'विविधज्ञानविस्तार.' या दोहोंपैकीं पहिल्यांतील 'घाशीराम कोतवाला'वरील टीका[1] ही आह्मांस वरील विनोदात्मक टीकेचें एक चांगलें उदाहरण वाटतें; व त्याच्या खालोखाल दुसऱ्या पुस्तकांतीलहि कांहीं टीका आहेत.

१२. इंग्रेजी ग्रंथांचें ज्ञान चोहोंकडे फैलावल्यानें नवा सुरू झालेला प्रकार आणखी एक सांगणें आहे. तो सृष्टिवर्णन होय. हा जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांत क्वचित् आढळतो; व संस्कृतांतहि त्याची एक निराळी तऱ्हाच आहे.[2] इंग्रेजी कवि-

१. पुस्तक ५ अंक १०.

२. या महत्त्वाच्या विषयावर थोडेसें विवेचन केलेलें शालापत्रक पुस्तक १२ अंक १ यांत सांपडेल.

तेंत व गद्यग्रंथांत मात्र तो अलीकडे मोठ्या पूर्ण दशेस येऊन पोंचला आहे. त्याचेंच अनुकरण अलीकडे आमचे ग्रंथकार करूं लागले आहेत. वस्तुतः पहातां आमच्या देशाचें सृष्टिवैभव एवढें अवाढव्य, चित्रविचित्र, व चित्तास आल्हाद व उन्नति देणारें असल्यामुळें वरील प्रकारचा उत्कर्ष होण्यास आमच्या देशवासी लोकांस जशीं साधनें आहेत तशीं पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याहि देशांतील लोकांस नाहींत असें झटलें असतां चालणार आहे. यास्तव इंग्रेजी ग्रंथांच्या परिचयानें सृष्टिवैभव पहाण्याची आह्मांस जसजशी गोडी लागत जाईल, व चोहोंकडे प्रवास करण्याचा प्रघात आमच्या लोकांत वाढत जाईल; तसतशी आमच्या ग्रंथांतून प्रस्तुत प्रकारची अभिवृद्धि होत जाईल असा सुमार दिसतो. असो; आतां सध्यांच्या स्थितीला वरील वर्णनाचा प्रघात कितपत सुरू झाला आहे तो दाखवितों.—

"पर्जन्यकाळ संपत येऊन हस्तनक्षत्रास आरंभ झाला असतां मोठमोठाले ढग आकाशांतून हिंकडून तिकडे फिरूं लागले. मोठ्या जोराचा वारा सुटून कोठें कोठें वादळेंहि होऊं लागलीं. विद्युल्लतेचे मोठे भयंकर कडकडाट चालू झाले. कोठें कोठें मोठ्या जोराचा पाऊसहि पडत आहे. चोहींकडील नदीनाले भरून चालले आहेत. कितीएक पांथस्थ लोक पावसाच्या सपाट्यानें भिजून नदीनाले इत्यादिकांस उतार नसल्यामुळें खुडखुडत उभे राहिले आहेत. कितीएकांस, विजेच्या व वादळाच्या सपाट्यांत आपण सांपडतों कीं काय असें होऊन गेलें आहे. जिकडून वादळ जात आहे तिकडे अतिशय धुरळा उसळून वृक्ष आपापलीं मस्तकें मोठ्या जोरानें हालवीत आहेत. आणि मेघांच्या भयंकर गर्जनेनें चारी दिशा व्यापून गेल्या आहेत.

"अशा भीतिदायक प्रसंगांत, उज्जनीपासून सुमारें दोन कोशांवर, आमचा सोमदत्त सांपडला. शुक्राक्षाच्या वगीनें भद्राक्षाची मोठ्या जाग्यावर नेमणूक होतांच सोमदत्तानें बंदिखान्यावरील अधिकाऱ्यास एक हजार रुपये लांच देऊन आपली सुटका करून घेतली. आणि पहाटेस उठून दोन कोस गेला नाहीं तों वादळाच्या सपाट्यांत सांपडला. वारा इतका जोराचा सुटला कीं, तो घोड्यासुद्धां कोठें भलतीकडे नेऊन टाकतो कीं काय असें त्यास वाटलें; धुरळा इतका होऊन गेला कीं, डोळे उघडण्याची सोय नाहीं. मध्यें थोडा अवकाश सापडतांच तो घोड्यावरून खालीं उतरला. आणि एक झाड होतें त्याचे आड जाऊन उभा राहिला. चाकरहि मोठ्या प्रयत्नानें घोडा तेथें घेऊन गेला. इतक्यांत पहिल्यापेक्षांहि अधिक जोराचा वारा सुटला. तेणेंकरून तो वृक्ष उमळून पडून त्या खालीं आपला चुराडा होतो कीं काय असें त्यास वाटलें. अशा अवस्थेंत तो आहे तों मोठ्या सपाट्याचा पाऊस व मोठमोठ्या गारा पडण्यास आरंभ झाला. वाऱ्याच्या जोरामुळें जसा दगडांचा मार व्हावा तसा गारांचा मार चालला. इतक्यांत अंतःकरणांत धडकी भरण्यासारखा विजेचा कडकडाट झाला.

यांतून आतां प्राण वाचणें कठिण असें सोमदत्तास वाटलें. सुमारें आठ महिने बंदिखान्यांत असल्यामुळें व रात्रंदिवस मुक्तमालेच्या काळजीमुळें तो आधींच अशक्त होऊन गेला होता. त्या बंदांतून सुटून बाहेर पडतो तों लागलाच या अनर्थांत सांपल्यामुळें त्यास असें वाटलें कीं आपणावर ईश्वर कोपला. मग यश कोठून येणार? तर आतां त्यासच शरण जावें ह्मणजे त्यास दया आली तर येईल. असा निश्चय करून त्यानें अनन्यभावानें त्याचें चिंतन चालविलें.

"मागें सांगितल्याप्रमाणें एक घटकाभर गारांचा पाऊस पडला. नंतर तो वळवाचा पाऊस जसा एकाएकीं आला तसाच एकदम उडाला. मेघांनीं आकाश व्यापून गेलें होतें तें तेव्हांच वितळून जाऊन स्वच्छ ऊन्ह पडलें. जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेलें होतें. सोमदत्ताचें सर्वांग गारांच्या मारानें बरेंच ठेंचून गेलें व कपाळावर एक दोन ठिकाणीं टेंगळेंहि आलीं. सर्व चिरगुटें भिजून चिंब झाल्यामुळें कोरडें वस्त्रहि नेसावयास राहिलें नाहीं. घोड्यावरीलहि सर्व सामान भिजून गेलें. हा आपला अपमृत्युच टळला असें वाटून सर्व भिजलें व गारांचा मार बसला तरी त्यास फारसें दुःख झालें नाहीं; आकाश स्वच्छ होऊन ऊन्ह पडल्यामुळें कांहींसा त्याचे जीवास धीर आला." 'मुक्तमाला' भाग ८.

"स्वप्न असें पाहिलें कीं, मी वाड्यांतून निघून गंगातीरीं गेलों; आणि तेथें पहातों तों अमर्याद पूर आला असल्यामुळें, ती गंगाबाई दुथड्यांचें उल्लंघन करून, महावेगानें "फूंफूं" असा शब्द करीत चालली होती. कोणी ह्मणेल ही बया गिरिराज जनकावर रुसून तट फुगून, गाऱ्हाणें गातच आपल्या प्रियपात्र रत्नाकराकडे जात आहे कीं काय कोण जाणे! इतक्यांत तिची ती शीघ्रगति मंद झाली, तिच्या प्रचंड लाटा कमी झाल्या; तिचें विस्तीर्ण पात्र आकुंचित झालें; तिचें गढूळ उदक स्वच्छ स्फटिकासारखें झालें; सारांश कोणी ह्मणेल सख्या रत्नाकरानें अंजारून गोंजारून, लडिवाळपणानें मांडीवर घेऊन इचें शांतवन केलें. इकडे आसमंतात् भागींच्या प्रदेशांत नाना तऱ्हेचीं धान्यें इतकीं विपुल उगवलेलीं दिसलीं, कीं आज पृथ्वीनें आपलें सर्वच वैभव बाहेर काढले कीं काय असा मला घटकाभर भास झाला. जयपाळा, सरासरी दोन अडीच घटकांच्या आंत हा सातदां चमत्कार पाहिला. मग परतावें ह्मणून निघालों तों एकएकीं गंगाबाईचें होतें तें उदक आटूं लागलें. आटतां आटतां, पांच सात पुरुष पाणी असावयाच्या ठिकाणीं, नेत्रस्पर्शास टिपूसभर देखील उरलें नाहीं. तिच्यामध्यें विहार करून सुखानें रहाणारे जे मत्स्यादि जीव, त्यांनीं तळमळ तळमळ करून पटापटा प्राण टाकले. चहूं बाजूंच्या घाऱ्यांची राख झाली. जिकडे दृष्टि द्यावी तिकडे वालुकामय दिसूं लागलें. हाहि चमत्कार सातदां पाहिला.

'जयपाळ,' अंक ३.

१३. येथवर आरंभीं संकल्प केल्याप्रमाणें सगळा विषय आटपला. आतां सरते शेवटीं उत्कृष्ट भाषांतराचे कांहीं मासले येथें दाखल करून प्रस्तुत लेख आटपतों. हे देण्याचा अभिप्राय एवढाच आहे कीं, जे प्रकार आपल्या भाषेंत अद्याप चांगलेसे दृष्टीस पडूं लागले नाहींत ते तींत येण्याची योग्यता तरी तिचे अंगीं आहे कीं नाहीं हें वाचकांस कळावें. ही योग्यता पुढील भाषांतरें जितकीं उत्कृष्ट उतरलीं असतील तितक्यावरून विशेष कळणार आहे. पहिलें उदाहरण अत्यंत आवेशयुक्त वक्तृत्वाचें–

"पण मद्देशबांधवहो, किती वेळ तुमच्या कानांशीं ओरडावें, तुह्मी उपेक्षा करितां पाहून, पहा, माझा जीव पराकाष्ठेचा चडफडतो. अरे, तुह्मी आलस्यनिद्रेंतून जागे होऊन युद्ध करण्याविषयीं कंबर कधीं बांधणार? काय, कांहीं मोठा एखादा अनर्थ घडल्यांवाचून तुमचे डोळे उघडत नाहींत! आतां घरीं बसवत नाहीं, शत्रु येऊन वेशीशीं पोंहचला; असें झालें पाहिजे काय? अरे, आजपर्यंत ज्या तुमच्या मानखंडना झाल्या त्याविषयीं तुह्मांस कांहींच वाटत नाहीं? आजपर्यंत जें झालें, तितक्यानें तुमचा आळस जात नाहीं? याहिपेक्षां मोठा कांहीं अनर्थ कोसळला पाहिजे? शहरच्या रस्त्यांनीं उगीच फिरत असावें; आणि एकमेकांस पोकळ बातम्या विचाराव्या; अशा व्यर्थ गमण्याखालीं, तुह्मीं बाबांनो, किती तरी वेळ घालविणार? अरे, मासिदनवाल्यानें आथेन्स संस्थान जिंकून सर्व ग्रीस देशावर आपला पगडा बसविला; असें घोर वर्तमान या शहरांत आजपर्यंत कधीं आलें होतें? आणखी तुह्मीं एकमेकांस विचारितां, "काय हो फिलिप मेला?" एक उत्तर देतो "अद्यापि मेला तर नाहीं; पण तो फार हैराण आहे." अरे, मद्देशबांधवहो, कोण तुमचा हा वेडेपणा? अरे फिलिप हैराण असला किंवा बरा असला, तर त्यापासून तुमचें कायरे, बरें किंवा वाईट आहे? समजा कीं, फिलिप मेला; पण तेणेंकरून तुह्मांस काय नफा? तो मेला; तर तुमचा आळस त्याच्या जागीं लौकरच आणखी नवा फिलिप उत्पन्न करील. अरे, फिलिप जो आज इतका प्रबळ झाला आहे, तो काय आपल्या आंगच्या पराक्रमानें झाला आहे? नाहीं तुमच्या आळसानें झाला आहे. हा तुमचा आळस अलीकडे इतका कांहीं वाढला आहे कीं, तुह्मांस स्वतः शत्रूपेक्षां प्रबल होतां येत नाहीं, व दुसऱ्या कोणीं तुह्मांस प्रबल केलें तर, तें प्राबल्य तुमच्यानें राखवत नाहीं."

'अनेकविद्यामूलतत्व.'

तोच प्रकार; पण वरच्याप्रमाणें वीरपर व निर्भर्त्सनपर नसून करुणापर व अभ्यर्थनापर––

"जिकडे जिकडे पहावें तिकडे तिकडे भय व घोर अनर्थ हींच माझ्या नज-

रेस येतात, निर्भय असें ठिकाण कोठेंहि नाहीं. आपल्या पूर्वजांच्या राजधानींकडे जाईन ह्मटलें, तर माझ्या भावाचा मारेकरी माझ्या बापाचें तक्त बळकाऊन बसला आहे; मी जातांच जे हात माझ्या भावाच्या रक्तानें लाल झाले आहेत तेच माझ्याहि रक्तानें भरविण्यास तो चुकेल काय? जर दुसऱ्या एखाद्या राजाचा आश्रय पहावा, किंवा त्यापाशीं साह्य मागावें, तर तेंहि व्यर्थ; कां कीं, रोमन प्रजासत्ताक राज्यानेंहि मला अंगाबाहेर टाकल्यावर मला आपलासा ह्मणणारा दुसरा कोण सांपडणार? माझीं ममतेचीं कुटुंबांतील माणसें किंवा इष्टमित्र यांची तर गोष्ट बोलावयासच नको. माझा बाप केव्हांच लोकांतरास गेला, तेथें त्यास शत्रूचा अपकार कधींहि पोंचणार नाहीं; व दुःखांनीं गांजलेल्या त्याच्या पुत्राचा आक्रोशहि त्याच्या कानीं कधींहि जाणार नाहीं. माझा भाऊ जरी जिवंत असता, तरी परस्परांच्या कळवळ्यानें दोघांचें दुःख हलकें झालें असतें; पण काय सांगावें? न्युमिडिया देशाच्या राजकुळांतील मनुष्यावर ज्याचा हात कदापि वाहूं नये त्यानेंच कृतघ्नतेचें ओझें एकीकडे झुगारून देऊन त्यास अल्पवयांतच संसारयात्रेंतून मुक्त केलें. शिवाय माझ्या पक्षाचे जे जे लोक त्यास वाटले त्यांचाहि जुगार्थानें एकदम सप्पा उडविला. कोणास सुळावर चढवून त्या घोर यातनांनीं त्यांचे प्राण घेतले. कित्येकांस सिंहादिक क्रूर पशूंकडून खावविलें त्यांहूनहि क्रूर अशा मनुष्यांस त्यांचा तमाशा दाखविला. अजूनहि त्या लोकांपैकीं जे कोणी जगले असतील त्यांस अंधारकोठड्यांत टाकून प्रत्यक्ष मरणाहूनहि दुःसह असे त्यांचे हाल तो करवीत असेल.

"आर्यजनहो! जे तुह्मी या रोम नगरींत अत्युच्चपदीं विराजमान असून संपूर्ण जगाचीं सूत्रें चालवीत आहां, त्या तुमच्या पायांशीं हा दीन राजपुत्र जुगार्थानें दिलेल्या दुर्धर संतापानें पीडित होत्साता शरण आला आहे, याचें रक्षण करा. तुह्मांस तुमच्या मुलाबाळांची, तुमच्या देशाची, तुमच्या धर्माची, तुमच्या राज्याची व ज्या ज्या वस्तु तुह्मांस पूज्य किंवा प्रिय आहेत, त्या सर्वांची शपथ घालून हात जोडून एवढेंच मागतों कीं, मीं कोणास यत्किंचित्हि दुखविलें नसून जो दुःखाचा कहर मजवर विनाकारण लोटला आहे, त्यापासून मला सोडवा, आणि न्युमिडियाच्या राज्याची मालकी तुह्मांकडे आहे यास्तव त्यांत जो दंगा उसळला आहे व जीं अघोर कृत्यें होताहेत त्यांचा बंदोबस्त करून तेथें निरंतर स्वस्थता नांदेल असें करा."

सेनेट सभेपुढें आधरबालचें भाषण.

सृष्टिवर्णन—

"मग कवि होण्याचा निश्चय केल्यावर या नवीन उद्देशानें जेव्हां मी सृष्टीचें अवलोकन करूं लागलों, तेव्हां पूर्वी पाहिलेलीच सृष्टि मला नवीन भासूं लागली. ज्या

गोष्टींकडे पूर्वी लक्ष पोंहचत नव्हतें त्या लक्षांत येऊं लागल्या; सर्व प्रकारच्या माहितीची मला आतां गरज वाटूं लागली. नाना प्रकारचे उपमादि अलंकार सुचावे व मनोरंजक वर्णन करतां यावें, ह्मणून मी पर्वतावर व अरण्यांत पुष्कळ फिरलों; अनेक प्रकारच्या वृक्षांच्या व पुष्पांच्या तसबिरी स्मृतिरूप पटावर उतरून घेतल्या; पर्वतांचे मोठमोठे कडे व राजमंदिरांचीं शिखरें यांचें एकसारखें लक्ष देऊन अवलोकन केलें. कधीं कधीं मी वनांत एखादा चांगला स्वच्छ ओढा वहातां दृष्टीस पडला असतां, त्याच्या वळणावळणांनीं त्याच्या तीरांवरची शोभा पहात पहात कोस कोस लांब जाईं; व कधीं कधीं संध्याकाळीं पश्चिमेस चित्रविचित्र रंगांचे मेघ दिसतात, व क्षणोक्षणीं त्यांचे आकार बदलत असतात, त्यांजकडे पहात उभा राहीं. कवीला अनुपयुक्त असा कोणताहि विषय नाहीं. या सृष्टींत जे जे अत्यंत रमणीय किंवा अत्यंत भयंकर विषय आहेत ते त्यास सर्वदा उपस्थित पाहिजेत; जें जें विशाळ असल्यामुळें प्रचंड, किंवा सूक्ष्म असल्यामुळें गोजिरवाणें असेल त्या सर्वांची त्यास माहिती पाहिजे. बागांतील झाडें, व अरण्यांतील जनावरें, जमिनींतील खनिज पदार्थ,आकाशांतील ग्रह तारे वगैरे, या सर्व विषयांचें ज्ञान त्यास पाहिजे. कवीचा मुख्य उद्देश ह्मटला ह्मणजे वाचणाऱ्यांची सदाचरणाकडे प्रवृत्ति व्हावी व दुराचरणापासून निवृत्ति व्हावी हा आहे, आणि या प्रकारचा त्याचा उपदेश गोड लागून मनांत ठसण्याविषयीं प्रसंगवशात् सर्व प्रकारच्या कल्पना त्याच्या उपयोगीं पडतात. यास्तव ज्यास माहिती फार, त्यास आपल्या वर्णनांत वैचित्र्य व गोडी आणण्याची व दूरदूरचे दाखले आणून व उपदेश करून वाचणाऱ्यांचें मनोरंजन करण्याची शक्तीहि फार येते हें सिद्धच आहे."

'रासेलस' भाग १०.

"हे सागरा ! तुझ्या अफाट विस्ताराकडे पाहून जों जों विचार करूं लागावें तों तों नव्या नव्याच कल्पना मनांत येऊं लागून बुद्धीस अधिकाधिक चमत्कार भासतात, आणि आश्चर्यभरांत चित्त अगदीं थक्क होऊन जातें ! ज्याप्रमाणें मनुष्यांच्या पिढ्यानपिढ्या एका मागून एक जन्मास येऊन कांहीं काळानें लागलीच विलयास जातात, त्याप्रमाणें तुजवर हजारों लाटा एकावर एक येऊन भराभर बुजून नाहींशा होतात, आणि त्यांच्या प्रमाणेंच यांच्या वास्तव्याची मागें खूण देखील रहात नाहीं ! तुझ्या लाटा साऱ्या पृथ्वीच्या किनाऱ्यांवर आदळत आहेत, आणि ज्यांचें निकट सान्निध्य त्यांच्या अक्षय वैरास मात्र कारणभूत होतें, अशा देशांची तोडातोड करून तूं त्यांचें कलाकौशल्य व संपत्ति हीं परस्परांस देववितोस, व येणेंकरून सर्व जगास तुझ्यामुळें सुखाचा व समृद्धीचा लाभ होत आहे.

"तुझे देखावे तरी निरनिराळ्या समयीं किती विचित्र अस्तात ? त्यांची

शोभा व भव्यपणा हीं कोठवर वर्णावीं !–कधीं वाऱ्याची हालचाल अगदीं बंद होऊन तुझा सर्व विस्तार अगदीं निश्चल दिसतो–कधीं नुकताच सूर्योदय झाला असल्यामुळें क्षितिजाची कड रुप्यानें जणों काय मढविलीच आहे अशी भासते–कधीं तोच सूर्य अस्तास जाऊं लागून संध्याकाळचें आकाश त्यांच्या सोनेरी किरणांनीं देदीप्यमान झालें असतें, व अशा वेळेस आरशाप्रमाणें स्थिर अशा तुझ्या पाण्यावर जेव्हां आकाशाची कमानची कमान शाबूद उठलेली असते तेव्हां ती तर काय शोभा सांगावी?-पण हीं सर्व सौम्य रूपें टाकून जेव्हां तूं आपलें उग्र स्वरूप धारण करतोस-जेव्हां काळ्या दाट ढगांनीं आकाशांत गाढ अंधार होऊन तुफानांच्या वाऱ्यांच्या सोसाट्यांनीं तूं अगदीं खवळून जातोस, व तुझ्या प्रचंड लाटा उसळून मेघमंडळाशीं एकवट होऊं पहातात–जेव्हां मृत्यु आपलें भयंकर आधिपत्य तुजवर चोहोंकडे गाजवीत असतो–जेव्हां अशा तडाक्यांत सांपडलेला बिचारा खलाशी भयानें गर्भगळित होऊन त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होतात, व त्याचे इष्टमित्र त्याजकरितां जागच्या जागीं हळहळत असतात. अशा भयंकर प्रसंगीं तुजकडे पहाण्याची कोणाची छाती आहे !

"याप्रमाणें विचार पुढें चालविले असतां बुद्धि अगदीं कुंठित होऊन जाते. पण जेव्हां तुझ्या भरती ओहोटीविषयीं विचार करावा–कीं ज्या जगाच्या आरंभापासून आजपर्यंत कधींहि टळल्या नाहींत,–तेव्हां ज्यानें आपल्या अपार सामर्थ्यानें तुला निर्माण केलें, व तुझ्या मर्यादा अशा रेखून टाकिल्या कीं, तूं एवढा उच्छृंखळ खरा, परंतु त्यांचें उल्लंघन तुझ्यानें होऊंच नये, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष लागून विचारशक्ति गुंग होऊन जाते, व तिची गतिच पुढें होत नाहीं !"

समुद्र—'शालापत्रकां'तून.

एका तत्त्वज्ञाची स्वोक्ति--

"अहो ! मनुष्याचें ज्ञान फार फार झालें तरी तें किती अत्यल्प ! मीं आपला सारा जन्म ज्ञानसंपादन करण्यांत घालविलाना ! पण इतकें करूनहि मला समजतें तें काय! सृष्टीच्या रहस्यांचा खुलासा लावण्याची उमेद धरून मी खोल खोल विचारांत जों जों शिरूं लागतों, तों तों माझी बुद्धि अगदींच गुंग होऊन मला कांहींच कळेनासें होतें. पहिल्या पहिल्यानें माझी मति कांहीशी चालते खरी, पण माझें निश्चित ज्ञान असें तेवढेंच; त्यापुढें नुसत्या कल्पनाच बांधाव्या लागतात. एकूण अज्ञानदशेपेक्षां सज्ञानदशेंत मोठा विशेष ह्मटला ह्मणजे एवढाच कीं, सृष्टिकर्त्याच्या अपार योजनेचें आकलन होण्यास मनुष्याची बुद्धि किती पंगू याचा तींत असल्यानें पूर्णपणें सिद्धान्त होतो !

"आतां सूर्याचें परिमाण व ग्रहांचीं अंतरें हीं मला काढतां येतात, तसेंच त्यांचे वेध घेऊन त्यांच्या गति वर्तविणें, व मनास थक्क करणाऱ्या अशा त्यांच्या प्रद-

क्षिणांचे नियम सिद्ध करणें, या गोष्टीहि मला अगदीं सहज आहेत, हें सर्व खरें; परंतु त्यांची रचना कशी काय आहे, त्यांवर प्राणी वास करितात कीं नाहीं, करीत असेल तर त्यांची जीवनस्थिति व रहाण्याच्या सोई कोणत्या प्रकारच्या आहेत, इत्यादिविषयीं माहिती माझी व अडाण्या कुणब्याची सारखीच.–पण हें फार दूरच्या अशा अंतरालांतील गोलांविषयीं झालें; ज्या पृथ्वीवर मी खुद्द रहातो तिच्या सृष्टि-व्यवस्थेविषयीं तरी मला कितपत माहिती आहे ! ज्या वायुजलादिकांस मूलद्रव्यें समजून 'पंचमहाभूतें' अशी संज्ञा पूर्वापारपासून लोक देत आले, त्यांचेहि पृथक्करण करून त्यांच्या घटकावयवांस मीं नांव दिलीं, हें खरें; पण अग्नीची दहनक्रिया कशी चालते किंवा जलास प्रवाहित्वधर्म कशामुळें आला आहे, इत्यादि गोष्टींचें उपपादन माझ्यानें करवेल काय ? अग्नि व उदक हीं वस्तुतः काय आहेत हा विचार सुद्धां कधीं मनांत न आणतां सर्व जग त्याचे सेवन करितें, त्यास वरील गोष्टींचा उलगडा पाडण्यास जशी मोठीच पंचाईत येऊन पडेल त्याचप्रमाणें मलाहि होतें; माझी कुशाग्रबुद्धि व तत्त्वज्ञता यांची येथें यत्किंचित्हि गति न होतां सारी माझी माझ्यापाशींच रहाते.–पदार्थ निराधार असला कीं, तो जमीनीवर पडायाचाच हा नियम सर्वत्र मी पहातों; व शास्त्रकारांच्या उपपत्तीवरून मला असें समजलें आहे कीं, हें गुरुत्वाकर्षणाचें फल होय. पण हें समजूनहि मला नवीन तें काय कळलें ? ज्यास पूर्वी मी 'पतन' ह्मणत होतों त्यासच आतां 'आकर्षण' ह्मणतों एवढाच काय तो फरक ! अवघ्या पदार्थमात्रांची ज्या अतर्क्य व अदृश्य सूत्राच्या योगानें एका केंद्राकडे गति होत आहे, त्यांच्या स्वरूपाचा बोध वरील शब्दानें मला यत्किंचित् तरी होतो काय ?–सृष्टिविषयक शास्त्रांत निष्णात झाल्यामुळें प्राणिवर्ग, उद्भिजवर्ग, व खनिजवर्ग असे तीन मुख्य विभाग, तशाच अवांतर जाति व उपजाति, या सर्वांची निवडानिवड मला करितां येते; पण इतके परिश्रम करूनहि हिरव्या गवताच्या एका पातेचा तरी पोषणप्रकार माझ्यानें सांगवेल काय ? मीं फार फार सूक्ष्म विचार केला तरी सृष्टिकर्त्या चतुर कारागिराचें जें मारू कलम वनपुष्पांस चित्रविचित्र रंगांनीं रंगवितें त्याचा मला शोध लागेल काय ? तसेंच माणिकावर व पाचेवर जे रंग झळकतात, व तन्हेतऱ्हेच्या शिंपावर ज्या लकेरी मारतात, त्यांचें कारण तरी आजपर्यंत विचार करून मला काय उमगलें आहे ?– इतर प्राण्यांचें चातुर्य जें माझ्या नजरेस येतें त्यास मी उपजतबुद्धि ह्मणतों, व मनुष्याच्या विचारशक्तीशीं ती कोणकोणत्या जनावरांचे ठायीं किती किती मिळूं पहाते याविषयीहि माझा तर्क चालतो; परंतु एकंदरींत पहातां, पशूंस माझे मनोधर्म जितपत कळतात तितपतच त्यांचेहि मला कळतात असें ह्मणणें भाग येतें. जेव्हां पक्ष्यांचा थवा आकाशांत घिरट्या घालतांना मी पहातों, किंवा एखाद्या दूरच्या प्रदेशाकडे त्यांचे कळप निघालेले असतात, तेव्हांचे

त्यांचे संकेत व शब्द, पंडितांच्या भाषा जशा एखाद्या अक्षरशून्य मजुराला, त्याप्रमाणेंच मलाहि ते अत्यंत गूढ होते. धर्मशास्त्रावरील ग्रंथांत जितकी त्यांची गति तितकीच माझीहि त्यांच्या वर्तननियमांत व व्यवस्थेंत होय.

"हर हर ! एकूण ज्ञानाचा हव्यास धरून त्याच्या प्राप्तीस्तव सर्व जन्मभर जो मीं शीण केला त्यासारखें त्याचें सार्थक तें मला काय झालें ! माझी बुद्धि किती पंगू, अज्ञान केवढें थोर, या गोष्टींचा पूर्ण प्रत्यय माझ्या मनास येऊन माझें क्षुद्रत्व मला स्पष्टपणें भासूं लागलें, इतकेंच कीं नव्हे ! शिव शिव ! मनुष्याच्या अंगीं पराकाष्ठेची विद्वत्ता आली, तरी आपला ज्ञानगर्व मिरवण्यास त्यास किती अल्पसे अवकाश असतो ! त्याची बुद्धि वस्तुतः इतकी कोती असून व संपादिलेलें ज्ञानहि तसेंच अपुरतें असून नुसत्या भूषणाचा त्यानें गर्व वाहावा व आपली योग्यता मोठी मानावी हा त्याचा केवढा मूर्खपणा !"

मनुष्याचें अटोकाट ज्ञान–'शालापत्रकां'तून.

आणखी एकच उतारा देतों. तो 'अथेल्लो' नाटकांतला आहे. प्रसंग मोठा व चित्तास थरारवणारा असून तो मूळ कवीनें व भाषांतरकारानेंहि मोठ्या सफाईनें मारून नेला आहे.--

"निजण्याची खोली

"देस्दिमोना बिछान्यावर झोंपी गेली आहे. बाजूस दिवा जळतो आहे; अशा समयीं अथेल्लो तिचा प्राण घ्यावा या हेतूनें आंत शिरतो; आणि आपल्याशींच ह्मणतो, हे मना, या अघोर कृत्याचें तेंच बीज बरें, तेंच बीज. अहो पवित्र तारांगणांनो तें मी आपणांजवळ या तोंडानें वदूं नये; पण बीज तेंच. तरी या सुंदरीचा रक्तस्राव करणें आपल्या हातून घडणें नाहीं. हिची काया तर पहा कशी बर्फासारखी शुभ्र आहे ती, आणि अंगावर तेज पहा कसें लखलखतें आहे तें, जशी काय घोटीव संगमरवरी पुतळीच ! अशा तुळतुळीत आणि तेजस्वी शरीरावर घाव करण्यास आपला कांहीं हात वाहयाचा नाहीं. (असें ह्मणून तरवार आटपतो). पण हिला जिवंतहि ठेवण्याची सोय नाहीं; कारण तसें केल्यास ही विश्वासानें पुष्कळांचे असे गळे कापील. याकरितां मारलीहि पाहिजेच; पण अगोदर दिवा मालवावा आणि मग-हे प्रकाशदायका दीपा जरी मीं तुला मालविलें तरी मला जर वाटेल तर पुनः तुला पूर्वीप्रमाणें प्रकाशित करतां येईल. (स्त्रीकडे दृष्टि जाऊन) अहाहा ! आपलें सर्व कौशल्य व अक्कल खर्चून परमेश्वरानें तुझी काय ही अप्रतिम सौंदर्याची मूर्ति निर्माण केली आहे ! या तुझ्या मूर्तीतील अंतर्दीप जर मीं समूळ मालविला तर त्यास पुनः प्रदीप्त करावयास संजीवनी विद्या मजपाशीं कोठें आहे ? हें गुलाबाचें फूल जर मीं

तोडलें तर याला पुनः जीव आणण्याची शक्ति माझ्या अंगांत नाहीं; तेव्हां अर्थात्च यास कोमेजून गेलें पाहिजे. असो; झाडावर आहे तोंपर्यंत याचा उपभोग तरी घेऊं या (असें ह्मणून तिचें मोठ्या प्रेमानें चुंबन करितो) आहाहा ! काय मधुर चुंबन हें. या माधुर्याच्या योगानें प्रत्यक्ष न्यायदेवतेला देखील आपला खड्ग मोडून टाकण्याची बुद्धि निपजूं लागत्ये. (चुंबनाची तृप्ति न होऊन) आणखी एकदां, आणखी एकदां. प्रिये तूं मरून अशीच राहा ह्मणजे मी तुजवर अत्यंत प्रीति करीन. पुनः आणखी एकदां आणि आतां हें शेवटचें. इतकें गोड असें प्राण घेणें कधीं नव्हतें. रडें तर कांहीं आपल्याला आवरत नाहीं; पण हे अश्रु महादुष्ट आहेत. हें दुःख मोठें अलौकिकच आहे ! अहो ज्या ठिकाणीं प्रीति करावयाची त्याच ठिकाणीं घाव घालावयाचा ! अँ ! ही जागी झाली.—"

अंक ५ प्रवेश २.

वाचन.

अथास्य तत्त्वेषु कृतेऽवभासे । समुन्मिमीलेव चिराय चक्षुः[1] ।

किरातार्जुनीय.

अंक ११–(१) विषयस्वरूप. (२) व्युत्पत्ति. (३) दोन लाभ. (४) मनोरंजन. (५) इतर प्रकारांशीं तुलना. (६) दुसरा लाभ—ज्ञान. (७) विशेषतः निरूपण. (८) मराठींतील ग्रंथसंग्रह. (९) हल्लींचा वाचनाचा प्रघात. (१०) त्याची खरी रीत.

१. प्रस्तुत अंकांत वाचन ह्मणजे वाचण्याची कला याविषयीं लिहावयाचें नाहीं. ह्मणजे उत्कृष्ट वाचनाचे जे कांहीं नियम आहेत ते दाखल करून त्यांचा उपयोग सांगणें हा याचा उद्देश नाहीं. तर ग्रंथ वाचण्याचा निरंतर नाद असणें हें किती हितावह आहे, तो प्रघात आपल्या लोकांत कितपत आहे, वाचायाचे ग्रंथ कसे असावे, ते वाचावे कसे, वगैरे गोष्टींविषयीं या निबंधांत विचार करूं.

२. येथें पहिल्यानें 'वाचन' या शब्दाची व्युत्पत्ति अंमळ चमत्कारिक आहे ती सांगतों. हा शब्द अर्थातच 'वच्' (बोलणें) या धातूपासून निघाला आहे; आणि हें रूप प्रयोजक रूपावरून साधलेलें क्रियावाचक नाम होय. तेव्हां 'वाचन' ह्मणजे 'बोलवणें' 'पुस्तक वाच्' ह्मणजे 'पुस्तकास बोलव' असा अर्थ ! यावरून कागदास–किंवा कागद तरी कसचा !–वृक्षत्वचांस वगैरे बोलतें करण्याची[2] लेखनकला जेव्हां

१ 'याप्रमाणें तत्त्वांचा बोध होऊन त्याच्या हृदयांत ज्ञानप्रदीप उजळला असतां, त्याचे फार दिवस मिटलेले डोळे जणों काय एकदम उघडले !

२ 'लेखन' हा शब्द तरी 'वाचन' शब्दाप्रमाणेंच ऐतिहासिक ह्मणजे पूर्वस्थितिसूचक होय. 'लिख' ह्मणजे 'ओरखडणें,' यावरून लिहिण्याचा प्रघात पहिल्यानें झाडांच्या साली वगैरे कठिण पदार्थांवर झाला हें उघड दिसतें.

पहिल्यानें निघाली, तेव्हां आपल्या पूर्वजांस जें आश्चर्य वाटलें तें वरील शब्दांत गर्भित होतें.

३. असो; आतां मुख्य विषयाविषयीं विचार करूं. वाचनापासून लाभ कोण-कोणते आहेत ते सर्वांस विदितच आहेत. ते मुख्यतः दोन–एक मनोरंजन आणि दुसरा ज्ञान. आतां यांविषयीं अनुक्रमें करून लिहूं.

४. पहिलें मनोरंजन. याचा अनुभव थोडाबहुत बहुधा सर्वांस असेल. लहान वयांत तर ही गोष्ट विशेषतः अनुभवास येते. लहान मुलांस प्रथमतः वाचतां येऊं लागलें ह्मणजे पुस्तकें वाचण्याची त्यांस केवढी हौस वाटत असते हें सर्वांनीं पाहिलेंच असेल. अक्षरओळख होऊन आपणास वाचतां येऊं लागलें हीच अगोदर मोठी गोष्ट मिळविलीशी वाटून तिजबद्दल त्यांस मोठाच हर्ष व अभिमान वाटूं लागतो. त्या भरांत त्यांस जी उमेद व हौस वाटत असते ती त्यांच्या विद्याभ्यासास फार उपयोगी पडते. त्या मौजेच्या काळीं मनोरंजन व ज्ञान हीं दोन्ही एकरूपच असतात. ह्मणजे पुढील वयांत ज्ञानसंपादनाची हौस कमी होऊन अभ्यास करण्याचा जसा त्रास येतो तसें त्या वेळेस मुळींच न होऊन नव्या गोष्टी शिकणें हें मनास केवळ रंजन करणारेंच होतें. शरीरानें तीं जशीं चपळ असतात,–सुस्त बसणें बिलकूल न आवडून कांहींना कांही तरी त्यांस करीत असल्यावांचून चैनच पडत नाहीं, त्याचप्रमाणें त्यांच्या मनाची स्थिति असते. ज्ञानग्रहण करण्यास त्यांचें कोवळें मन तेव्हां इतकें प्रवीण असतें कीं, व्याकरण, भूगोल, गणित वगैरे जे नीरस शुष्कप्राय विषय तेहि त्यांस मोठ्या मजेचे वाटून मनोरंजक गोष्टींप्रमाणेंच त्यांविषयींहि त्यांस जी हौस वाटत असते ती कांहीं पराकाष्ठेची ! वरील दोन्ही गोष्टी जगन्नियंत्या परमेश्वराचें, त्यानें निर्माण केलेला क्षुद्र प्राणी जो मनुष्य त्याच्या कल्याणाकडे केवढें लक्ष आहे याविषयीं प्रमाणभूत होत. मनुष्य जन्मास आल्यापासून तो स्वतःविषयीं खबरदार होईपर्यंत मध्यंतरीं पुष्कळ काल जातो. हा काळ लहानपणा होय. यांत ईश्वराचा असा संकेत उघड दिसतो कीं, मनुष्याच्या पुढील संसारास उपयोगी असें शारीर व मानसिक सामर्थ्य त्यानें या काळांत संपादन करून ठेवावें. असो; तर ज्याप्रमाणें मुलांस उडण्याबागडण्याची अतोनात हौस असते, त्याप्रमाणेंच त्यांच्या मनासहि त्या वेळेस स्वभावतःच मोठी प्रबळ जिज्ञासा वाटत असते. या दोहोंचा नीट उपयोग करून घेणें हें सुजाण मातापितरांचें व शिक्षकांचें काम आहे. असो; तर वाचनापासून मनोरंजन केवढें होतें हा लहानपणचा अनुभव सर्व सुशिक्षित लोकांस अर्थात् आहेच. पण इतकेंच नव्हे. ती लहानपणची संवय नीट वाढविली असतां अगदीं शेवटपर्यंत ती मनुष्यास सारखी खिळून रहाते. आजपर्यंत जे मोठमोठे ग्रंथकार होऊन गेले ते बहुतकरून सर्व मोठे जब्बर वाचणारे होते असें आढळेल.' यांत वस्तुतः पहातां कांहीं

आश्चर्य नाहीं. कारण कोणाची बुद्धि केवढीहि उज्वल असली तरी खाणींतल्या हिऱ्याप्रमाणें तीवर जर कांहींच संस्कार घडला नाहीं तर तिचें तेज कधींहि प्रगट होणार नाहीं. किंवा दुसरा दृष्टान्त घ्या. जमीन मोठी पिकाऊ आहे पण तिची नीट मशागत करून जर तींत कांहींच पेरलें नाहीं; तर अर्थातच नुसतीं रानझाडें किंवा कांटेकुटे हे मात्र तिजवर उगवतील! तर याप्रमाणेंच विशाल बुद्धीचे महान् ग्रंथकर्ते जे आजपर्यंत होऊन गेले त्यांस वरील गोष्टी पुरेतेपणीं अनुभवास येऊन आपल्या मनास ज्ञानाचा संस्कार अधिकाधिक करतांना ते कधीं थांबले नाहींत. ग्रंथवाचन हेंच त्यांस परम सुखकर वाटून त्याशिवाय त्यांस चैनच पडूं नये. इटाली देशांत सुमारें पांचशें वर्षांपूर्वी पेट्रार्क नामें करून एक मोठा नामांकित कवि होऊन गेला त्याविषयीं अशी एक गोष्ट लिहिली आहे कीं, तो एकदां आपल्या एका मित्राच्या येथें राहिला असतां त्याची प्रकृति अंमळ बिघडलीशी पाहून तो मित्र त्यास ह्मणाला, "तुह्मांला बरें वाटत नाहीं, यास्तव दहा दिवसपर्यंत तुमचीं बुकें, कागद, लेखणी, शाई हीं मला अडकवून ठेवूं द्या." पेट्रार्क बरें ह्मणाला. मग त्यानें तसें केलें असतां पहिला दिवस पेट्रार्कचा मोठा कंटाळवाणा गेला. दुसऱ्या दिवशीं भारी डोकें दुखूं लागलें; आणि तिसऱ्या दिवशीं तर बारीक ताप भरूं लागला. हीं अधिकाधिक चिन्हें पाहून त्या मित्रास मोठा धाक पडला आणि त्यानें मुकाट्यानें त्याच्या पुस्तकालयाची किल्ली त्याच्या पुनः स्वाधीन केली. दुसऱ्या दिवशीं तो कवि पुनः पहिल्यासारखा हुशार झाला. असो; तर याप्रमाणें विद्याप्रिय लोकांचा पुस्तकांविषयीं अतोनात हव्यास असतो.

५. आतां या मनोरंजनाच्या प्रकारांत व इतर जे लोकांत चालू आहेत त्यांत किती भेद आहे तो पाहूं. कालक्रमण करण्याचे प्रकार विद्वज्जनांचे कोणते व तदितरजनांचे कोणते याविषयीं एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे—

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्।
व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा॥

"बुद्धिमान् जे आहेत त्यांचा काळ काव्य किंवा शास्त्र यांचें अध्ययन, अथवा विनोद या तिहींत जातो; आणि मूर्खांचा ह्मटला ह्मणजे व्यसनांत, निद्रेंत किंवा कलहांत!" हें वचन अगदीं यथार्थ आहे यांत संशय नाहीं. अज्ञ किंवा अल्पज्ञ जे लोक असतात त्यांचें नेहमींचें वर्तन जर पाहिलें, तर वरील श्लोकांच्या उत्तरार्धांत त्यांचा बहुधा समावेश होईल. आणि एकंदर जगांत पाहिलें असतां, अशांचींच कोटी फार फार मोठी आहे. वरील श्लोकाचें पूर्वार्ध ज्यांस खरोखरी लागेल असे लोक किती थोडे! त्यांतून आमच्या हिंदुस्थानांत तर विचारूंच नये. युरोपखंडांत वगैरे अलीकडे विद्येचा पुष्कळच फैलाव झाला असल्यामुळें काळाचा वर सांगितल्याप्रमाणें सद्-

व्यय करणारे तिकडेच काय सांपडतील ते सांपडतील. बाकीच्या जगाच्या बहुतेक भागांत दुसऱ्या चरणाचेंच फार करून प्राबल्य आढळेल. आमच्या देशांत जुन्या पद्धतीचे जे लोक आहेत त्यांचा एकंदरींत पहातां वाईटच काळ जातो असें ह्मणतां येणार नाहीं; तरी त्यांचा विद्याभ्यास फारच तोकडा असल्यामुळें ज्ञानापासून होणारा जो परमानंद त्याचा अनुभव त्यांस कधींहि घडत नाहीं. विद्येचें स्वरूप कांहीं ज्यांस कळतें ह्मणावयाचें असे जे शास्त्री, पंडित वगैरे त्यांचीहि शिकण्याची पद्धति कांहीं विलक्षणच असल्यामुळें वरील आनंद त्यांच्याहि ह्मणण्यासारखा अनुभवास येत असेलसें वाटत नाहीं. ही साधारण एकंदर लोकांची स्थिति झाली. श्रीमंतांची व विशेषतः संस्थानिकांची जर आमच्या देशांतली स्थिति पाहिली, तर ती फारच शोकास्पद वाटेल. सगळ्या देशभर जी लहानमोठ्या राजेरजवाड्यांची रांग लागत गेली आहे त्यांत चांगले हुशार तर काय, पण सरासरी समजूत तरी ज्यास आहे असेहि फारच थोडे निघतील ! मागें त्यांस मोठ्या मोठ्या जोखमींचीं सरकारी कामें करायाचीं पडत, शत्रूचें निरंतर भय असे, त्यामुळें त्यांस सतत हुशारीनें राहावें लागे. पण सध्यांच्या काळीं वरील दोन्ही प्रकार बिलकूल नाहींसे झाल्यामुळें पोरासोरांची व अज्ञान लोकांची जी कल्पना कीं, राजाला ह्मणजे कांहीं करायाला नको, जेथें तेथें चाकर, निरंतर पक्कान्नें खावीं, ख्यालीखुशाली करावी, इतकेंच त्याचें काम, ती दिवसेंदिवस पूर्णपणें खरी होत चालली आहे ! 'तुह्मी काय राजे आहां' या वाक्यांत 'राजे' शब्दाचा जो अर्थ तो दिवसेंदिवस अधिकाधिक यथार्थ होत चालला आहे. असें झाल्यावर मग राज्यांतील व्यवस्था किती उत्तम असेल, व दरबारांतलीं मनुष्यें कशा प्रकारचीं असतील, याची कल्पना सहजच करतां येईल; व वर्तमानपत्रद्वारें ते बहुतेक प्रकार सर्वांस विदित होतातच. असो; तर मग अशा ठिकाणीं वरील श्लोकाचें कोणतें अर्ध लागतें तें आमच्या वाचकांस फोडून सांगावयास नकोच !

वरील लेखावरून हें ध्यानांत येईलच कीं, खरें जें विद्यासुख तें जुन्या पद्धतीच्या लोकांस बहुतकरून मुळींच माहीत नाहीं. यास्तव मनोरंजनाचें हें मोठें साधन त्यांस अगदीं अंतरतें. आमच्या मराठींत वाचण्याचे ग्रंथ मुळींच नव्हते असें नाहीं, पण ते अगोदर थोडे, आणि त्यांतून दुर्मिळ. गद्यग्रंथ ह्मटले ह्मणजे इतिहासाच्या किंवा पौराणिक विषयांच्या बखरी, आणि पंचोपाख्यान, विदुरनीति वगैरे तीन चार पुस्तकें इतकींच काय तीं. पद्यग्रंथ वरच्यांहून पुष्कळ होते खरे, पण त्यांचा संग्रह ह्मटला तर हरदास वगैरे लोकांपाशींच काय तो. छापखान्याचें उत्कृष्ट साधन अनुकूल नसल्यामुळें जें आपणास हवें असेल तें हातानें उतरून घेतल्याखेरीज सोय नसे. पण या सर्वांहून जबरदस्त अडचण ह्मटली ह्मणजे लोकशिक्षणाचा मुळींच प्रघात नसल्यामुळें लोकांत विद्याभिरुचीचा जो मुळींच अभाव होता तो होय.

सरासरी काव्यव्युत्पत्ति पुष्कळांस असल्यामुळें पुराणादि ग्रंथ, तसेच ज्ञानेश्वरी आदिकरून प्राकृत ग्रंथ, हजारों लोक वाचीत, व अजूनहि वाचतात; पण तें केवळ पारमार्थिक बुद्धीनें. ह्मणजे तसें करणें हें पुण्यकर्म आहे एवढेंच समजून तें करावयाचें. अर्थज्ञान किंवा रसानुभव घेऊन वाचणारे फारच थोडे. असो; तर या प्रमाणें ग्रंथवाचनरूप जो कर्मणुकीचा उत्तम मार्ग तो पूर्वीच्या लोकांस मुळींच अनुकूल नसल्यामुळें सोंगट्या बुदबळें वगैरे खेळ, कैफ, किंवा व्यभिचार अशींच पोरकळ, निंद्य व लज्जास्पद साधनें त्यांस जवळ करावीं लागत. फार तर काय, पण अजूनहि नेटिव संस्थानांतून बहुतेकांत वरील प्रकार भरपूर आढळून येतात. त्यांचें केवळ दिग्दर्शन करणें हें सुद्धां एतद्देशीय मनुष्यांस अत्यंत लज्जेचें व खेदाचें काम होईल.

तर याप्रमाणें वाचनाचा पहिला मोठा उपयोग ह्मटला ह्मणजे त्याच्या योगानें चित्ताचें उत्कृष्ट रंजन होऊन दुसरे जे अज्ञान व मूर्ख लोकांचे शेंकडों कर्मणुकीचे उपाय त्यांची बिलकूल गरज रहात नाहीं. भर्तृहरीनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे.—

सुकविता यद्यस्ति राज्येन किम् ।

'उत्कृष्ट कविता जर आहे तर तीपुढें राज्य काय ?' हेंच वचन बाकीच्याहि सर्व प्रकारच्या ग्रंथांस लागेल. खरा रसिक व विद्वान् हा आपल्या पुस्तकालयांत बसून ग्रंथवाचनांत निमग्न झाला असतां त्यास त्या वेळेस जें सुख होत असेल, तें मोठ्या सार्वभौम राजास भर दरबारांत राज्यासनावर बसल्यापासूनहि नसेल ! आणि खरोखरच नुसत्या सुखाच्या संबंधानेंहि पहातां तें विद्येपासून जितकें साध्य होतें तितकें राज्यापासून होणें नाहीं. रोमन लोकांचें लोकसत्तात्मक राज्य बुडून बादशाही अंमल सुरू झाल्यावर पुढें जे कित्येक बादशाहा झाले त्यांची हकीकत वाचली असतां वरील उल्लेखाची प्रचीति कळून येईल. त्यांची सत्ता त्या वेळच्या बहुधा साऱ्या जगावर असतांहि त्यांस रात्रंदिवस चैन पडूं नये. शेंकडो राजोपचार निरंतर चालले असतां त्यांचा त्यांस अगदीं वीट येऊन त्यांनीं नाना तऱ्हेचे फंद व चाळे करावे. झर्क्सीज नामेंकरून जो पारसीकांचा राजा होऊन गेला, त्यानें वीस लक्ष सैन्य जमा करून ग्रीस देशावर स्वारी केली, त्याविषयीं अशींच एक गोष्ट लिहिली आहे, कीं जो कोणी एखादा नवा कर्मणुकीचा खेळ काढील त्यास त्याच्याकडून मोठें बक्षीस मिळे. असो; तेव्हां एकंदरींत स्पष्ट काय दिसतें कीं, केवळ शारीरसुखें स्वभावतःच अल्पकालिक होत; त्यांचा तेव्हांच वीट येऊन मन लवकरच उदास होतें. मौजेच्या खेळाचीहि गोष्ट तीच. व्यसनें तर यांहूनहि भयंकर; त्यांच्या योगानें शरीरास बहुतकरून जन्माचा अपाय होऊन निरंतर जीवास खाण्याचें मात्र साधन पैदा होतें. तेव्हां वरील कोणताहि दोष नसून उलटें अत्यंत शुद्ध, अत्यंत प्रतिष्ठादायक, आणि अत्यंत मनोरंजनावह असें कर्मणुकीचें साधन एक वाचन मात्र होय.

६. दुसरा लाभ ज्ञान. हें संपादन करण्याचा ग्रंथवाचन एक मोठें साधन आहे हें उघडच आहे. सिसरोनें एके ठिकाणीं झटलें आहे कीं, लेखनकला जर नसती, तर मूळारंभीं जी जगाची स्थिति होती तिजपेक्षां पुढे पाऊल पडतेंच ना. उघडच आहे. सांप्रतकाळीं मानवजाति जी ऐवढ्या उत्कर्षास पोंचली आहे त्या सर्वांचा मूळ पाया पाहिला तर बावन्न मातृकाच होत! हल्लींच्या काळाच्या आश्चर्यकारक सुधारणेची जी एवढी भव्य इमारत उभी आहे ती असंख्य कारागीरांच्या श्रमाचे फळ होय! मागल्यानें रचलेले थर पुढच्याच्या उपयोगीं पडावे अशी आजपर्यंत अनादिसिद्ध परंपरा चालत आली आहे. व हीस एक कारण काय ती लिहिण्याची अमोलिक कलाच होय. ही नसती तर आज लक्षावधि महाबुद्धिमान् लोकांचे अत्यंत परिपक्व विचार आपणांस नाहींसे झाले असते! प्रख्यात ग्रंथकार लॉर्ड बेकन यानें एके ठिकाणीं या मूळाक्षरांस जहाजांशीं तुळिलें आहे, आणि ह्मणतो कीं, या जहाजांनीं कालरूप समुद्राच्या फार दूर दूरच्या बंदरांवरून आपणांकडे माल आणून यापुढेंहि तशाच अत्यंत दूरच्या बंदरांत तो तीं पोंचवितील! असो; तर याप्रमाणें सर्व काळच्या व सर्व देशाच्या महान् महान् लोकांची आपणास हवी तेव्हां, हवी तेथें, हवी तेवढी वेळ परमानंदकारक संगति होण्याची जी अद्भुत सोय सर्वांस झाली आहे तिचे मोल किती ह्मणून सांगावें! त्यांतून अलीकडे तर मुद्रणकला, अग्निरथ वगैरे अनेक साधनांनीं वरील सुख तर चोहोंकडे होऊन केवळ दारिद्र्यावस्थेंत असणाऱ्या मनुष्यासहि तें अनुकूल झालें आहे. तसेंच विद्येच्या सर्व शाखांवरहि अलीकडे ग्रंथ होऊन कांहीं अमुक शाखाच पढल्याच्या योगानें पूर्वीच्या काळीं बुद्धीवर जो संकुचितत्वाचा वाईट संस्कार घडत असे तोहि हल्लींच्या काळीं नाहींसा करण्याची सोय होऊन अलीकडील शिक्षणपद्धतीचा मुख्य रोख तोच आहे. आपल्याच देशांतील पूर्वीची स्थिति पाहिली तर विद्याभ्यासाची यत्ता निदान तरी बारा वर्षे होती. तितका काळपावेतों गुरूच्या घरीं राहून एकनिष्ठेनें जेव्हां अध्ययन करावें तेव्हां कांहीं ह्मणण्यासारखी विद्वत्ता शिष्याच्या ठायीं यावी. आणि इतकेंहि करून बहुधा कोणत्या तरी एकाच शास्त्रांत त्याची गति! न्याय आहे तर व्याकरण नाहीं, व्याकरण आहे तर मीमांसा नाहीं, असा प्रकार अर्थात्च होत असे. कारण जें शास्त्र हातीं धरावयाचें तें शेवटास पोंचविल्यावांचून थांबायाचेंच नाहीं. ही त्यांची शिक्षणपद्धति पुष्कळ तऱ्हेवाईकच होती यांत संशय नाहीं. तिचा एक मोठा गुण होता खरा, कीं जेवढें ह्मणून कोणी शिकेल तेवढें अगदीं ठाम; एकदां त्याचें पठण झालें ह्मणजे त्यांत लेचेपेचेपणा बिलकूल राहायाचा नाहीं. कोणतेंहि शास्त्र घेतलें कीं, त्यावरील मुख्य ग्रंथ, उपग्रंथ, टीका, प्रतिटीका, वगैरे जेवढे ह्मणून ग्रंथ असतील तेवढे पार मुखोद्गत केल्यावांचून प्रायः सोडायाचे नाहींत. मुळीं परंपरेनेंच तशी वहिवाट चालत आलेली! गुरु

आपल्या आसनावर बसून पांक्ति सांगायाला लागले ह्मणजे शिष्याच्या हातांत जेवढें पुस्तक असेल तेवढेंच काय तें; गुरूंनीं ह्मणून पाठ सांगतांना पोथी हातीं धरायाचीच नाहीं. तसें करावें लागलें तर तो गुरु कसचा? असो; तर असाच बाणा पूर्वीपासून चालत आलेला असल्यामुळें पुढें जे शिष्य गुरुस्थानापन्न होतात तेहि तो तसाच पुढें अबाधित चालवतात. याप्रमाणें अलीकडची जी पोपटपंची तीस पूर्वी मुळींच थारा न मिळून जे कोणी पंडित होत ते आपआपल्या शास्त्रांत केवळ निष्णात असेच होत. अलीकडील इंग्रेजी युनिवर्सिटीच्या पद्धतीनें झटलें ह्मणजे हवा तो विषय ज्यांस अवगत आहे असे विद्वान् तयार करावयाचे. हमालांचे जसे टप्पे असतात त्याप्रमाणें आधींच निःशक्त झालेल्या आमच्या गरीब विद्यार्थ्यांवर वर्षानुवर्ष अधिकच विषयांचें ओझें लादून त्यांनीं अमुक दिवसांत अमुक मजल मारली पाहिजे असा ठराव झालेला असतो. मग विद्यार्थीहि निरुपायास्तव जेमतेम करून तेवढी यातायात करतात; पण एकदां सुटले ह्मणजे बुकांना जी एकदां रजा मिळते ती मिळते. त्यांच्या कृपाळू आईनें एवढा खटाटोप करून जें नाना विषयांचें ज्ञान त्यांचे ठायीं सांठविलें असतें तें लवकरच घालवून ते बहुधा पहिल्यासारखेच पुन्हां लखलखीत होऊन बसतात! असो; तर या मानानें पहातां पहिली एकधोरणी रीतच कांहीं अंशीं बरी होती असें आह्मांस वाटतें. तरी अलीकडे जे सर्व विषयांवर उत्कृष्ट रीतीनें लिहिलेले ग्रंथ युरोपांतील भाषांत झालेले आहेत त्यांच्या योगानें फार काळ व श्रम न पडतां मनुष्याचें मन विशाल व बहुश्रुत होतें; व पूर्वीच्या पद्धतीनें मनास जडणारे जे वेडेपणाचे ग्रह व दुष्कल्पना त्या यामुळें बहुतेक नाहींशा होऊन जातात हा लाभ लहानसान ह्मणतां येत नाहीं.

७. याप्रमाणें प्रकृत विषयाविषयीं सामान्यतः कांहीं विचार प्रदर्शित केले. आतां खुद्द आपल्यां स्वतःच्या स्थितीविषयीं कांहीं लिहून हा विषय संपवितों.

८. आतां पहिल्यानें हें उघडच आहे कीं, वाचन झटलें ह्मणजे अगोदर भाषेंत ग्रंथसंग्रह पाहिजे. आमच्या मराठींत तो मूळचा कोणत्या प्रकारचा होता हें वर लिहिण्यांत आलेंच आहे. तसेंच अलीकडे तो कोणत्या प्रकारचा झाला आहे व होत आहे याविषयींहि प्रस्तुत मालेच्या पहिल्या दोन अंकांत कांहीं लिहिलें आहे. आतां हा ग्रंथसंग्रह सगळा एकंदरींत धरला तरी अर्वाचीन युरोपियन भाषांशीं किंवा संस्कृतादि प्राचीन भाषांशीं त्यासंबंधानें आमच्या गरीब मराठी भाषेस टक्कर मारतां येईल हें अगदीं संभवत नाहीं खरें; तरी सध्यांच्या स्थितींत सुद्धां तीस आपल्या दारिद्र्यास्तव केवळ खालींच पहावयास हावें असें आह्मांस अगदीं वाटत नाहीं. एतद्देशीय इतर भाषांत तर तिच्याहून कोणच्याहि संबंधें वरचढशी भाषा एकहि नाहीं असें आह्मांस वाटतें; तसेंच सुमारें तीनचारशें वर्षांपूर्वी इंग्लिश वगैरे युरोपियन

भाषांची जी स्थिति होती तीपेक्षांहि सध्यां देखील तिची स्थिति बरी आहे. सारांश, केवळ अज्ञानास्तव, दुराग्रहास्तव, व आळसामुळें मराठीचा जे तिरस्कार करूं पहातात व तिची ज्यांस मोठी लाज वाटते त्यांस तसें करण्यास वरच्याशिवाय दुसरें कोणतेंहि समर्पक कारण नाहीं हें त्यांनीं पक्कें समजावें. तसेंच जे फांकडे नवीच विद्वान् जुन्या शालजोडीवाल्या शास्त्र्यांप्रमाणें मराठी भाषेवर नाक मुरडतात त्यांवर दोन प्रकारचा दोष येतो. एक तर जिचें ज्ञान आपण पुरतेपणीं कधींहि संपादन केलें नाहीं तीस विनाकारण दूषण देणें हें; आणि दुसरें असें कीं जी न्यूनता त्यांनीं पूर्ण करायाची ती न केली हें तर एकीकडेच राहिलें, पण पुनः तीवरूल भाषेसच दोष ! भाषेच्या अंगीं रानांतील जमीनीप्रमाणें तर शक्ति नाहींना ! कीं तींत जसे गगनचुंबित वृक्ष आपोआप उत्पन्न होतात व वाढतात त्याप्रमाणें मोठमोठे ग्रंथ भाषेंत आपले आपोआप व्हावेत । काव्यें, नाटकें, कादंबऱ्या, शास्त्रीय ग्रंथ हे केवळ स्वतःच उत्पन्न व्हावे, मनुष्याच्या श्रमाची झणून त्यांस बिलकुल गरज लागूं नये, असा जर सृष्टीचा नियम असता, तर वरीक वरील मराठीवरचीं दूषणें ठीक होतीं ! पण अशी स्थिति मुळींच नाहीं हें स्पष्ट आहे. ग्रंथसंग्रह हें मुख्यतः उद्योगाचें फळ होय. मोठमोठे कवि, कादंबरीकार, किंवा शास्त्रकार वगैरे निपजणें ही गोष्ट केवळ एकेका देशाच्या भाग्याची होय; ती येथें धरायाची नाहीं. पण एकंदर लोकांच्या हितार्थ इतर भाषांतील ग्रंथांचीं भाषांतरें करणें किंवा त्यांच्या नमुन्यावर आपल्या भाषेंत तसे ग्रंथ उतरणें असल्या सामान्य कृत्याकरितां ईश्वराचे लालच निर्माण झाले पाहिजेत असें नाहीं ! सुताराचें, शिंप्याचें, वगैरे काम जसें त्यांत कांहीं दिवस पडलें झणजे बहुधा सर्वांस येण्यासारखें आहे तशाच मासल्याचीं वरील कामें होत. इंग्लिश भाषेंत जे आज लाखों ग्रंथ झाले आहेत व होत आहेत त्या सर्वांचेच कर्ते प्रतिमिलटन, प्रतिन्यूटन असे आहेत काय ? कांहीं नाहीं. पुष्कळ अंशीं त्या लोकांच्या अचाट उद्योगाचेंच केवळ तें फळ होय. पण आमच्यांत बहादर पहा कसे आहेत ! नांव लिहावयाचें झालें तर पुढें हात सव्वा हात किताब, देशाभिमानाविषयीं तर पहिल्या प्रतीचा बाणा, देशकल्याणाचें कोणतेंहि काम निघो, त्यांत प्रमुख मंडळींत नांव, पण देशभाषेंत जर चार शब्द बोलण्याचा किंवा लिहिण्याचा प्रसंग आला, तर बहुधा प्राणसंकटच ! असो; तर जेथें स्वभाषेचें एवढें ज्ञान व तीविषयीं एवढी आस्था दृष्टीस पडते तेथील स्थिति काय सांगावी ? ती सर्व प्रकारें अत्यंत शोचनीय असून तिच्यासंबंधें येथवर अनेक वेळां मागें आह्मीं लिहिलेंच आहे; यास्तव जास्त पुनः लिहिण्याची गरज दिसत नाहीं. असो; एकंदरींत मराठींतील ग्रंथसंग्रहाविषयीं आह्मांस असें वाटतें कीं, सध्यां तो जितपत आहे त्याची इतरांच्या मानानें पहातां फार मोठी योग्यता जरी नाहीं, तरी आह्मी सध्यां जितपत स्थितीस येऊन पोंचलों आहों तितक्या

स्थितीला तो चांगला उपयोगीं पडण्यासारखा आहे; व आमचें पाऊल जसजसें पुढें पडत जाईल त्या त्याप्रमाणें आमच्या भाषेची आंगची योग्यता व लोकांचें कर्तृत्व पहातां तो वाढत जाण्याचेंहि आह्मांस अगदीं कठिण वाटत नाहीं.

९. आतां वाचनाचा प्रघात आपल्या लोकांत सध्यां कितपत आहे तो पाहूं. पूर्वीच्या पद्धतीचे जे लोक आहेत त्यांच्या वाचनाचा वर एक प्रकार सांगितलाच आहे,—कीं ज्ञानेश्वरी, भगवद्गीता अशांसारखे ग्रंथ ते नियमानें वाचतात; पण तें केवळ भाविकपणानें, ह्मणजे आपण जें वाचतों त्याचा अर्थ आपणास कळावा इतकी सुद्धां थोड्यांचीच इच्छा असते! हें असलें वाचन विद्येच्या दृष्टीनें केवळ निरर्थक होय हें उघड आहे. आतां नव्या पद्धतीचे लोक पाहूं. यांपैकीं फार करून सगळ्यांचें मुख्य वाचन ह्मटलें ह्मणजे वर्तमानपत्रेंच होत. सांजसकाळ लायब्ररींत खेप घालून आलें ह्मणजे त्या दिवसाचें कर्तव्यकर्म आपण बजावलें असा पुष्कळांचा समज दिसतो. पण खरोखरीची जी लायब्ररी तिजकडे बहुधा कोणीं महिन्याचे महिने ढुंकूनहि पहात नाहीं. तेथें खरा अक्षय वास ह्मटला ह्मणजे अंधाराचा व केराचा, पुस्तकांचा खरा चालक ह्मटला ह्मणजे महिन्या दोन महिन्यांनीं त्यांवर सांचलेला मळ झाडणारा गडी, आणि त्यांचे खरे उपभोक्ते ह्मटले ह्मणजे कृमिकीटक! हा हास्यास्पद प्रकार बहुधा जेथें तेथें दृष्टीस पडत असेल यांत संशय नाहीं. पण याबद्दल कोणासहि कधीं कांहीं चमत्कार वाटला आहे, किंवा तो मोडायाचें मनांत आलें आहे, असें बिलकूल आढळत नाहीं! याचें कारण काय असावें बरें? एकंदर लोकांत एकाएकीं ज्ञानाची भरती येऊन आजपर्यंत मोठे मानलेले ग्रंथहि त्यांस आज एकदम नादान वाटूं लागले; किंवा देशांत विद्येची अगदीं रेलचेल होऊन गेल्यामुळें अधिक शिकण्यास आतां जागाच उरली नाहीं; अथवा सर्व लोक एकंदर लोककल्याणाच्या कामास लागून मार्ग तयार करण्याच्या किंवा कलाकौशल्य वाढवण्याच्या कामास तर गुंतले नाहींत ना! काय असेल तें असो. याचें कारण आह्मांस एक सुचतें. तें हें कीं, घरच्यासारखे प्रकार केवळ लोकाचाराचे होत. सुधारलेले शहर ह्मटलें ह्मणजे जशी त्यांत म्युनिसिपालिटी पाहिजे, सभागृह, नाटकगृह वगैरेहि अवश्य आलींच; त्याचप्रमाणें पुस्तकालय. त्याची एकदां स्थापना होऊन गेली पाहिजे; मग पुढें त्याची व्यवस्था कांहीं कां होईना? त्याचा मूळचा अर्थ असा खरा, कीं उपयुक्त व मनोरंजक पुस्तकें त्यांत ठेवून तीं लोकांनीं वाचावीं, व तेणेंकरून ज्ञानप्राप्ति करून घेऊन देशभाषेंत तसे ग्रंथ रचण्याची त्यांस उमेद यावी; व पहिल्या पहिल्यानें हा त्यांचा उद्देश बराच सिद्धीस गेला. पण त्याचें आतां काय? जें पहिल्याने खरोखर उपयोगाकरितां होतें तें आतां केवळ शोभेचें कलम झालें आहे. सारांश, आमच्या राजेरजवाड्यांस कमरेस रेशमी म्यानांत लटकणाऱ्या तरवारीचा जितका उपयोग, किंवा कित्येक शौकीन गृहस्थांच्या

बंड्यांच्या कप्प्यांत टिकटिक करणाऱ्या धाकट्या घड्याळांचा ह्यांस जितका उपयोग, तितकाच घरच्या दिवाणखान्यांत सुंदर सोनेरी पुठ्ठे करवून नीट बेताबातानें ठेवलेल्या लायब्ररींतील बुकांचा ! असो; एकंदरींत सांगावयाचें काय कीं, याप्रमाणें ग्रंथवाचनाचा प्रघात बहुतेक सोडून गुसतीं वर्तमानपत्रेंच वाचण्याकडे आमच्या लोकांचा दिवसेंदिवस कल होत चालला आहे. यावरून वर्तमानपत्रें वाचणें अगदीं निरर्थक, त्यांस लोकांनीं आश्रय देणें अगदीं गैर आहे, असें ह्मणण्याचा आमचा बिलकूल रोख नाहीं. तीं वाढविणें हें भाषेच्या संबंधानें व सरकारच्या संबंधानें लोकांस फार हितावह होय अशी आमची पक्की खात्री आहे. पण त्यांपलीकडे ज्ञानाचें साधनच नाहीं, ही जी लोकांची समजूत होत चालली आहे ती मात्र फार गैर आहे हें आह्मांस दाखविणें आहे. वर्तमानपत्रें वाचणें हें इंग्रेज लोक सकाळीं जसा चहा घेतात त्यासारखेंच पुष्कळ अंशीं होय. ह्मणजे अर्धें पोषण अर्धी कर्मणूक असाच दोहोंचा प्रकार आहे. शरीराचा निर्वाह होऊन त्याचें यथास्थित पोषण होण्यास जसें चांगलें जेवणच पाहिजे त्याप्रमाणेंच खरी उपयोगाची अशी विद्वत्ता ज्यास संपादन करणें असेल त्यानें मोठमोठ्या नानाविधविषयक ग्रंथांचा ऊहापोहपूर्वक यथास्थित व्यासंगच केला पाहिजे. हे परिश्रम केल्यानें आलेला शीण घटकाभर दूर करण्यास व जगांत काय उलाढाली चालल्या आहेत त्या समजण्यास वरील पत्रांचा आदर करणें बरोबर आहे; पण त्यांस विद्येच्या शिखरावर बसवून ठेवणें हें अगदीं शोभत नाहीं. फार तर काय, पण कित्येक मोठमोठ्या ग्रंथकारांचें असेंहि मत आहे कीं, वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, इत्यादिकांची समृद्धि लोकांस अपायकारक होय. कां कीं, हींच चाळून पाळून वरवर वाचण्याची सवय एकदां मनास लागून गेली ह्मणजे विचारपूर्वक व शोधक बुद्धीनें मोठमोठे ग्रंथ सावकाश वाचण्याचा मनास कंटाळा येऊं लागतो. व यामुळें वरवरचें शुष्क पांडित्य मात्र चोहोंकडे माजून खऱ्या विद्वत्तेचा लोप होतो.

१०. प्रस्तुत विषयावर निरनिराळ्या संबंधानें आणखी पुष्कळ लिहितां येईल. पण सरतेशेवटीं एका मात्र गोष्टीविषयीं कांहीं लिहून हा निबंध आटपतों. ज्यांस ग्रंथ वाचण्याचा नाद असतो, किंवा डौलाकरतां जे तसा आव घालतात, ते बहुधा आपली विद्वत्ता वाचलेल्या पानांच्या संख्येवर लेखतात, ह्मणजे जितकीं पानें आपण वाचलीं तितक्या मानानें आपले ठायीं अधिक ज्ञान आलें असें ते समजतात. पण हा केवढा भ्रम आहे हें हवें त्यास अंमळ विचार केला असतां कळण्यासारखें आहे. जितकें जितकें ज्यानें वाचलें तितका तितका तो विशेष ज्ञानसंपन्न व शहाणा असें जर असतें, तर सध्यांचा काळ जगाच्या मागील सर्व काळांपेक्षां ज्ञानांत व शहाणपणांत श्रेष्ठ असता; कारण हल्लीं जितके ग्रंथ झाले आहेत व होताहेत, व लोकांत वाचनाचा सध्यां जेवढा प्रचार आहे त्याचा लक्षांशहि प्राचीन काळीं नव्हता. पण चम-

त्कार पहा काय आहे, कीं अत्यंत प्राचीन काळचेच महान् महान् ग्रंथकार कीर्तिमंदिराच्या अत्युच्च पदांवर जे एकदां अढळ बसले आहेत ते आहेत ! हल्लींच्या काळीं ज्ञानाचा केवढाहि फैलावा झाला तरी त्यांची सर कोणासहि येत नाहीं ! तेव्हां यावरून स्पष्टच दिसतें कीं, वाचलेल्या ग्रंथांच्या संख्येचा आणि विद्वत्तेचा मेळ घालणें हें नेहमीं बरोबरच असतें असा नेम नाहीं. ज्यानें दहाच ग्रंथ वाचले पण मननपूर्वक शोधक बुद्धीनें वाचले त्याचें ज्ञान, आणि ज्यानें शेंकडों भराभर वाचून फेकून दिले त्याचें ज्ञान, या दोहोंत कांहींच साम्य धरतां येणार नाहीं. पारसीकांचें मोठ्या डामडौलाचें अफाट सैन्य आणि शिकंदराचें थोडकेंच पण कसलेलें सैन्य या दोहोंचा सामना झाला असतां जो परिणाम झाला तोच वरील दोन पंडितांचें वाग्युद्ध झालें असतां व्हावयाचा. पण इतकेंच नव्हे. असें 'भराभर केलेलें पाठांतर' सर्वथा 'व्यर्थ' होय इतकेंच नव्हे, तर तें अत्यंत अनर्थकारकहि होय. वरच्या सैन्याचाच दृष्टान्त घेऊन पहा. त्यांत कोणाचा जोडा कोणाच्याच पायांत नसल्यामुळें व जो तो आपल्याच थाटांत असल्यामुळें ऐन गर्दीच्या वेळेस सगळा घोंटाळाच घोंटाळा होऊन सैन्याची संख्याच त्याच्या नाशास जशी कारण होते, त्याप्रमाणेंच वरील ग्रंथसंख्या वाचणारास उपयोगी पडत तर नाहींच, पण उलटी गर्वोत्पत्तीस मात्र कारण होऊन त्यास प्रसंगीं गोत्यांत आणण्यास मात्र खाशी उपयोगीं पडते ! अथवा सर्वांच्या अतिशय परिचयांतला जो व्यापार भोजन त्याचा दाखला घ्या. अन्न जसें शरीरास तसें वाचन श्रवण वगैरे जीं ज्ञानाचीं साधनें तीं मनास होत. एकानें जसें शरीराचें पोषण होतें तसेंच दुसऱ्यानें मनाचें होतें. या दोन्ही व्यापारांत पुष्कळ प्रकारचें मोठें चमत्कारिक साम्य आहे. तें असें– जेवण जसें सावकाश नेमस्तपणाचें व नियमानें असेंच केलें असतां अंगीं लागून शरीरास हितावह होतें, त्याप्रमाणेंच वाचायाचे ग्रंथ जर पूर्ण लक्ष देऊन मननपूर्वक असे बेताबातानें वाचले तरच त्यापासून ज्ञानाचा लाभ होऊन निरनिराळ्या मानसिक शक्ति वृद्धिंगत होत जातील. नाहीं तर जसा अधाशी मनुष्य अन्नाशीं गांठ पडली असतां आकंठ तृप्ति करून घेऊन पुढें मग आमांशाच्या योगानें होणारी पीडा भोगीत बसतो त्याप्रमाणेंच वाचणाराचीहि स्थिति होते. ह्मणजे सगळेंच अधेंमुधें माहीत, पक्कें निश्चित असें कांहींच नाहीं, असें असल्यामुळें भलभलत्या कल्पना व विलक्षण वेडगळ मतें त्याच्या मनांत शिरून तीं अभिमानास्तव त्यास कधींहि टाकावींशीं वाटत नाहींत. तेव्हां अन्नाचा परिपाक होऊन तें रक्तरूपानें शरीरास मिळालें ह्मणजे जसें त्याचें सार्थक झालें त्याप्रमाणेंच आपण जें वाचलें त्याचें पुरतेपणीं विवेचन करून त्यांतलें ग्राह्य कोणतें त्याज्य कोणतें वगैरेची नीट व्यवस्था झाली ह्मणजे तो मजकूर ज्ञानरूपानें आपल्या मनाशीं मिळून तो आपला झाला असें समजावें. या ठिकाणीं मांसाहाराचा दृष्टान्त फार समर्पक होय. पशुपक्ष्यादिकांचें मांस खालें ह्मणजे तें जसें तत्क्षणींच

शरीराच्या मांसाशीं मिळत नाहीं, तर जठराग्नीने त्याचें पुनः पृथकरण होऊन व तेथील सर्व व्यापार त्यावर क्रमाक्रमानें होऊन शेवटीं जेव्हां त्याचें रक्त बनतें व रक्तांचें मांस होतें, तेव्हांच तें जसें खाणाराच्या मांसाशीं मिळतें, तशीच गोष्ट ग्रंथ-वाचनाची होय. शेंकडो जाडे मोठमोठाले ग्रंथ जरी घोकून टाकले, तरी जोंपर्यंत त्यांचें विवेचन करण्यास वाचणारानें आपल्या विचारशक्तीचा उपयोग केला नाहीं, तोंपर्यंत तितकी विद्या त्या जाडी पुस्तकांतल्या पुस्तकांतच राहिली. त्याचा लवलेशहि याच्या मनांत शिरला नाहीं. इसापनीतींतील उंटाप्रमाणें त्याच्या पाठीवर मात्र अन्न-सामग्री पुष्कळ झाली, पण पोटांत कांहीं नाहीं ! त्या खाशा ओझ्यानें यास वाह-ण्याचें मात्र श्रम होतील, व मूर्खत्वास्तव त्याच्या भाराचा यास मोठा गर्वहि वाटेल; पण उपयोग झटला तर जो कोणी शहाणा त्यांतील अन्न काढून करून घेईल त्यासच !

असो; वरील अर्ध्याकच्च्या विद्वत्तेचे अनर्थ फार प्राचीन काळापासून सर्व देशां-तल्या पंडितांनीं पाहून ठेवले आहेत. ते सर्व भाषांतील ह्मणींत व सुभाषितांत बहुधा सांपडतील. त्यांपैकीं आह्मांस अवगत असलेल्या तीन भाषांतले तीन चुटके येथें लिहून हा लेख पुरा करतों.

आपल्या मराठींतील ह्मण आमच्या सर्व वाचकांस माहीत असेलच—

'उथळ पाण्याला खळखळाट फार.'

पोप कवीनें आपल्या एका लहानशा काव्यांत (Essay on Criticism) ह्मटलें आहे—

A little learning is a dangerous thing;
Drink deep, or taste not the Pierian spring,
There shallow draughts intoxicate the brain,
But drinking largely sobers us again.

"चुटपुटती विद्या ही फार भयंकर आहे. विद्यारूप झऱ्याशीं तोंड लावून एक यथेच्छ प्राशन तरी कर, नाहीं तर एक बिंदुहि घेऊं नको. कारण त्याचा असा विचित्र गुण आहे कीं, थोडेच घोट घेतले असतां त्यांनीं माथें फिरून जातें; पण तेच पुष्कळ जसजसे घ्यावे तसतसा मद उतरत जातो !"

भर्तृहरि 'नीतिशतका'च्या आरंभीं ह्मणतो—

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।
ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि च तं नरं न रंजयति ॥

"जो केवळ अज्ञान आहे त्याची लवकर समजूत करून देतां येते; किंवा जो ज्ञाता आहे त्याची तर त्याहिपेक्षां लवकर करतां येते. पण ज्ञानाचा अर्धामुर्धाच संस्कार

ज्यास घडला आहे अशास नमस्कार असो ! साक्षात् ब्रह्मदेवाच्यानेंहि त्यानें समाधान करवणार नाहीं ![1]

भाषांतर.

—०—

सानुमती—अहो एषा राजर्षेर्निपुणता । जाने सखी अग्रतो मे वर्तत इति ।[2]
शाकुंतल–६.

अंक१२—(१) 'भाषांतर' शब्दाचा इतिहास व व्याख्या. (२) पूर्वीचा भाषांतराचा प्रघात. (३) अलीकडील भाषांतरें. (४)—(५) भाषांतरकर्त्यास लागणारीं साधनें. (६) भाषांतराचे प्रकार. (७) आणखी दोन विभाग. (८) गोष्टींचीं वगैरे भाषांतरें. (९) शास्त्रीय ग्रंथांचीं. (१०) कविताग्रंथांचीं. (११) भाषांतराच्या उत्कृष्टत्वाचें प्रमाण. (१२) एका आक्षेपाचें निवारण.

१. 'भाषांतर' हा शब्द अलीकडे इंग्रेजींत नवीन बनलेल्या शब्दांपैकीं दिसतो. प्राचीन संस्कृतांत तर हा शब्द आढळत नाहींच; कारण त्याच्या प्रयोगाचें कधीं कारणच पडलें नसावें. भोंवताल ीं राष्ट्रें ल्या काळीं आमच्या आर्य लोकांपेक्षां फार कमी ज्ञानसंपन्न असल्यामुळें त्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें संस्कृतांत व्हावीं असा कधींच योग आला नाहीं. उलटीं संस्कृताचीं मात्र त्या वेळीं व पुढें जवळच्या लोकांनीं भाषांतरें केलीं ही गोष्ट कांहीं अनुमानावरून व कांहीं प्रत्यक्ष प्रमाणांवरून सिद्ध आहे. असो; पुढें संस्कृत माजी पडून प्राकृत किंवा बालभाषा यांचा जेव्हां प्रचार झाला, तेव्हां त्यांचें संस्कृतांत व संस्कृताचें त्यांत भाषांतर करण्यांचा प्रसंग आला. पण यास 'भाषांतर' ही संज्ञा नसून 'छाया' हें नांव ाजपर्यंत चालत आलें आहे. 'छाया' ह्मणजे 'प्रतिबिंब.' आपल्या मराठींतहि जुने लोक वरील शब्द ह्मणत नाहींत. तर त्याच्या जागीं 'प्राकृतांत अर्थ करणें' असें ह्मणतात. अथवा 'टीका' 'व्याख्या' हे शब्द घालतात. तेव्हां प्रस्तुत शब्द शुद्ध इंग्रेजींतला आहे असें वाटतें.

---

१ वामनानें वरील आर्येचें असें भाषांतर केलें आहे–
करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें, धरूं ये सुखें चित्त पें जाणत्याचें ।
न जाणे न नेणे अशा पामराला, बुझावूं शकेना विधाता तयाला ॥

२ "सानुमती (नामें अप्सरा गु ल्पें दुष्यंतामागें आकाशांत उभी असतां शकुंतलेची तजबीर पाहून) ह्मणते—"अहा या राजर्षीची (दुष्यंताचा) चित्रकर्मांत सुद्धां काय निपुणता ही ! माझी सखी (शकुंतला) माझ्यापुढें जणूं उभीच आहे काय असें मला वाटतें !)'

या शब्दाचा मूळ अर्थ 'दुसरी भाषा 'असा होय.[1] हा कर्मधारय समास असून संस्कृत रीतीनें 'अन्या भाषेति भाषांतरम्' (दुसरी भाषा ह्मणजे भाषांतर) असा याचा विग्रह करतात. तेव्हां भाषांतर करणें ह्मणजे जो अर्थ एखाद्या विवक्षित भाषेंत असेल तो दुसऱ्या भाषेंत उतरणें.

२. आतां हा प्रघात मराठी भाषेंत कसकसा पडत गेला तो पाहूं. पूर्वी गद्य ग्रंथच मागें सांगितल्याप्रमाणें अगोदर थोडे होते, व आतांप्रमाणें परभाषेचा अभ्यासहि लोकांत होत नव्हता. तेव्हां हल्लीं जशीं इंग्रेजींतून अनेक भाषांतरें मराठींत झालीं आहेत तशीं त्या वेळेस फारशींतून किंवा आरबींतून होत नव्हतीं; एका संस्कृतांतून मात्र होत होतीं खरीं, पण तीं काव्यांतील किंवा शास्त्रीय ग्रंथांतील मुळींच नसून केवळ पुराणांतून प्राकृत कवींनीं देशभाषेंत छंदोबद्ध रचलेलीं होतीं. या ह्मणण्याचा अर्थ असा अर्थातच नाहीं कीं, मराठी कविता जेवढी ह्मणून आहे तेवढी सर्व संस्कृताचें शुद्ध भाषांतर आहे. हें मत बहुतेकांचें, किंबहुना मोठे ज्ञाते ह्मणविणारांचेंहि आहे. यांच्या मतें मराठी भाषा तर एकंदरींत निर्जीवच; आणि त्यांतून मराठी कविता तर कांहीं पुसूंच नये. तींत भाकड कथा, वेदान्ताचीं वेडगळ मतें, वेडगळ धर्म हींच काय तीं भरलीं आहेत. पदलालित्य, अर्थगांभीर्य, सुंदर अलंकार वगैरे प्रकार तींत बिलकूल नाहींत. एकंदरींत तीस 'कविता' हें नांव तरी कितपत शोभेल याची शंकाच आहे ! असो; या सर्व मतांचा विचार येथें करायाचा नाहीं. तो सविस्तर केल्यास एक बराच मोठा स्वतंत्र ग्रंथ होईल. प्रस्तुत स्थलीं इतकेंच सांगायाचें कीं, मराठी कविता संस्कृताचें केवळ भाषांतरच आहे किंवा निराळी स्वतंत्र आहे याचा पुरतेपणीं क्षणभरहि कधीं विचार न करतां तिच्या प्रतिकूल जे खुशालपणें आपलें निक्षून मत देतात त्यांची सत्यावर निष्ठा केवढी असेल किंवा आपले अभिप्राय किती तारतम्यत्वविचार करून ते देत असतील हें स्पष्ट दिसतें ! तुकारामाचे हजारों निरनिराळ्या प्रसंगीं यदृच्छेनें निघालेले उद्गार; वामनानें, आनंदतनयानें वगैरे रचलेलीं स्फुट प्रकरणें; महीपतीनें रचलेला 'संतविजय,' 'भक्तविजय' इत्यादि; मोरोपंताचे 'केकावली,' 'सन्मणिमाला,' 'संशयरत्नमाला,' 'अष्टोत्तरशत रामायणें' इत्यादि ग्रंथ; रामजोशाच्या लावण्या; अमृतरायाचे कटाव— हीं सर्व जर संस्कृताचीं शुद्ध भाषांतरेंच होत, तर शेकसादीचें 'गुलिस्तान' किंवा मिल्टनचें 'पाराडैज लास्ट' हींहि तशींच कां नव्हत ? बरें हेंहि सोडून दिलें; मुक्तेश्वराचें किंवा मोरोपंताचें 'भारत' घ्या. हे ग्रंथ तरी व्यासकृत 'महाभारता'चीं भाषांतरें आहेत काय ? 'महाभारत'

---

१. या अर्थी

'तथापि भाषांतरलोलुपोऽहं'

हा चरण आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस आठवेलच. (अंक २. पृष्ठ २१, श्लोक २).

हा केवढा प्रचंड ग्रंथ आहे, यावरूनच नुसतें पहातां कळून येईल कीं, त्याचें शुद्ध भाषांतर झटलें झणजे त्याहूनहि प्रचंड होणार ! पण वरील ग्रंथ पाहिले तर तीं त्याचीं लहान पिलींशींच शोभतील. बरें, दोन्ही भाषांतरें संक्षेपानें केलीं असतील झणावें, तरी मोरोपंतानें एवढालीं लांब लांब यमकें, मधून मधून चमत्कारिक प्रास वगैरे जे साधले आहेत ते सर्व असूनहि त्याच्या ग्रंथाचें भाषांतरत्व रहाणें झणजे लहानसान आश्चर्य नव्हे ! तेव्हां वरच्यासारखीं आपल्या विद्वत्तेच्या भरांत जे निःशंकपणें मतें देतात त्यांनीं यावरून अंमळ सुविचार शिकावा कीं, अभिप्रायाला खेरेपण जें येतें तें तो सप्रमाण असल्यानेंच येतें; तो मोठ्या डौलदार शब्दांनीं एकदम झोंकून दिला असतां अज्ञान व भोळे असे श्रोते किंवा वाचक मोठ्या पूज्यभावानें त्यास झेलतील खरें, पण तसें करणें ठीक नव्हे. एक तर तें पंडितत्वास कलंकभूत होय; शिवाय त्याच्या योगानें असत्याचा प्रसार होऊन जो कोणी अंमळ शोधक बुद्धीनें त्यांच्या मतांचा विचार करूं जातो, त्यास तेव्हांच त्यांचा पोकळपणा कळून येऊन त्यांची पत मात्र नाहींशी होते!

वरील गोष्टीच्या प्रत्ययार्थ आमच्या वाचकांपैकीं जे कोणी संस्कृतज्ञ असतील त्यांनीं आदिपर्वातील शकुंतलोपाख्यानाशीं मुक्तेश्वराच्या ओंव्या व मोरोपंताच्या आर्या ताडून पहाव्या. तसें केलें असतां मराठी कवितेचें भाषांतरत्व कितपत उरतें तें त्यास तेव्हांच कळून येईल. तितकें करूनहि जे वरील ओंव्यांस व आर्यांस भाषांतरच झणतील, त्यांनीं मग कालिदासाच्या जगाद्विख्यात 'शाकुंतल' नाटकास, तसेंच भवभूतीच्या 'उत्तररामचरिता'स वगैरेंहि तोच दोष ठेवल्यास तितकेंच साजणार आहे !

३. हें मागील काळाविषयीं झालें. आतां गेल्या पांचपन्नास वर्षांत झणजे इकडे इंग्रेजी झाल्यापासून जो प्रघात पडला तो पाहूं. आमची भाषा अव्वल इंग्रेजींत कशी होती, तिजकडे लक्ष देऊन तिच्या नियमनार्थ व अभिवृद्धयर्थ आमच्या प्रस्तुतच्या सरकारानें केवढा उद्योग केला, वगैरे गोष्टींचें संक्षेपतः निरूपण आह्मीं पहिल्या दोन अंकांत केलें आहे; तें आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. ही भाषेची अभिवृद्धि मुख्यत्वेंकरून भाषांतरांनीं झाली. हीं भाषांतरें मुख्यतः इंग्रेजींतून आणि त्याच्या खालोखाल संस्कृतांतून झालीं. इंग्रेजींतील भाषांतरें नानाप्रकारच्या विषयांवर झालीं. भूगोलविद्या, ज्योतिषशास्त्र, पदार्थविज्ञान, गणिताच्या शाखा वगैरे शास्त्रीय विषयांवर; व चरित्रें, देशवर्णनें, गोष्टींचीं पुस्तकें, इत्यादिकांवरहि तीं झालीं. या पुस्तकांपैकीं अजून दृष्टीस पडणारीं अशीं थोडींच उरलीं आहेत. असो; दुसरा प्रकार संस्कृताचीं भाषांतरें. हीं बहुतेक सर्व दक्षिणा प्रैज कमिटीच्या विद्यमानें झालीं. कालिदास, भवभूति, श्रीहर्ष इत्यादि संस्कृत कवींचीं नाटकें बहुतेक मराठींत होऊन कित्येक छापून प्रसिद्धहि झालीं आहेत. हे भाषांतरकार सर्व जुने पंडित असून

सगळ्या देशाची भिस्त ज्यांवर असे आमचे नवीन विद्वान् मात्र त्यांत कोणीच नाहींत ! ही गोष्ट चांगली ध्यानांत ठेवण्यासारखी असून तींत अर्थहि थोडा आहे असें नाहीं ! असो; वरील भाषांतरकार कैलासवासी परशुरामपंततात्या गोडबोले; वे० शा० सं० कृष्णशास्त्री राजवाडे, व गणेशशास्त्री लेले हे होत. त्यांत रा० लेले यांचीं भाषांतरें तर मूळार्थास धरून असून पुनः अत्यंत सरस व शुद्ध असल्याबद्दल त्या वेळच्या चिटणीसांनीं त्यांची रिपोर्टांत विशेष तारीफ केलेली आढळते. असो; पण वर सांगितल्याप्रमाणें संस्कृत नाटकांचीं जशीं भाषांतरें झालीं, तशीं त्या भाषेंतील 'रघुवंशा'दि अत्यंत प्रसिद्ध काव्यांचींहि कांहींच झालीं नाहींत ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे ! याचें कारण काय झालें असेल तें असो !

४. याप्रमाणें आजवर भाषांतररूपानें जो ग्रंथसंग्रह आमच्या भाषेंत झाला त्याविषयीं लिहिलें. आतां भाषांतर कसें असावें, त्याच्या उत्कृष्टतेचें प्रमाण कोणतें, वगैरे गोष्टींविषयीं विचार करूं.

५. उत्कृष्ट भाषांतरकार झटला ह्मणजे त्यास इतके गुण अवश्य पाहिजेत. एक तर ज्या भाषेंतून तो भाषांतर करणार ती त्यास पूर्ण अवगत व्हावी. ह्मणजे व्याकरणरचना, अर्थस्वारस्य वगैरे त्यांचें त्यास यथास्थित कळलें पाहिजे,–दुसऱ्याच्या भाषांतरावर, सांगण्यावर वगैरे त्यानें जातां कामा नये. याप्रमाणें मूळ ग्रंथांचा अर्थ सर्व यथास्थित त्यानें आपल्या मनांत भरून घेऊन मग तो भाषांतरद्वारा दुसऱ्या भाषेंत त्यानें ओतूं लागावें. दुसरें ज्या भाषेंत भाषांतर उतरावयाचें तिचेंहि पहिल्यासारखेंच त्यास पूर्ण ज्ञान पाहिजे. तरच पहिल्या भाषेंतील अर्थ दुसरींत त्यास नीट ठाकठिकीनें बसवतां येईल. हें काम पहिल्यापेक्षां किती कठिण आहे हें सांगायास नकोच ! पुष्कळांस स्वतःच्या अनुभवावरून त्याची प्रचीती आली असेलच. मूळ भाषेचा अर्थ चांगला पक्का समजणेंहि तादृश कठिण नाहीं. पण तोच दुसऱ्या भाषेनें यथास्थित व्यक्त करणें ह्मणजे पुष्कळ वेळां मोठी मारामार पडते. ज्याच्या त्याच भाषेंत तो अर्थ व्हावा तर अनेक प्रकारांनीं व्यक्त करतांहि येईल, पण त्याची कल्पना बरोबर परभाषेंत ठेवून देणें ह्मणजे परम दुर्घट ! उघडच आहे. भाषाभाषांत अनेक प्रकारची तफावत असते. कित्येकांत शब्दसंग्रह अगदीं थोडा, कित्येकांत पुष्कळ, कित्येकांत संस्कृताप्रमाणें शब्दसाधनिकेची पुष्कळ सोय असते,–ह्मणजे एका शब्दावरून निरनिराळ्या अर्थांचे वाचक असे शब्द लगेहात हावे तितके करतां येतात; कित्येकांत ही सोय फारच थोडी असते; कित्येकांत अशा कांहीं कल्पना असतात कीं, दुसऱ्या भाषेनें त्या व्यक्त करतांच येत नाहींत; किंवा आल्याच तर केवळ सरासरी मात्र करतां येतात; याखेरीज शब्दांचें मृदुत्व, सौंदर्य, लालित्य इत्यादि प्रकार; वाक्यरचनेची रीत, भाषापद्धतीची शैली, वगैरेहि आणखी अनेक भेद असतात. तेव्हां या

सर्व अडचणींतून बरेपणीं निभावून जाणें लहानसान काम नव्हे. त्यास मनुष्याच्या अंगीं समंजसता व चातुर्य असून भाषांतराच्या कामांत तो चांगला घटावलेलाहि असला पाहिजे. असो; तिसरी गोष्ट ज्याचें भाषांतर करायाचें तें. तें भाषांतर होण्यासारखें पाहिजे. याचा आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् मोठा अचंबा वाटेल! ते ह्मणतील कीं, याचा काय अर्थ! हवें त्याचें भाषांतर होण्यासारखें आहे. नाहीं असें काय आहे? पण यावें विवरण अंमळ पुढें सविस्तर करण्यांत येईल. असो; तर याप्रमाणें दोहों भाषांची पुरी माहिती भाषांतर करणारास असून ज्याचें भाषांतर करावयाचें त्याची तशी योग्यता हवी, हीं उत्कृष्ट भाषांतरांस तीन साधनें मुख्यतः अनुकूल असलीं पाहिजेत. याखेरीज चवथीहि एक गोष्ट येथें सांगितलेली पाहिजे. ती ही कीं, भाषांतरकर्ता मूळ ग्रंथकाराशीं समवृत्ति असला पाहिजे. ह्मणजे मूळच्या ग्रंथकाराची वृत्ति जशी रंगेल, थट्टेखोर, किंवा गंभीर, कडक वगैरे असेल तशीच भाषांतर करणाराची असायास पाहिजे; किंबहुना एकाच ग्रंथांत अशा वृत्ति जसजशा त्यानें जागोजाग प्रगट केल्या असतील तसतशा अनुक्रमानें भाषांतरांत उतरल्या पाहिजेत. पण हें काम हवें त्यास साधणार आहे असें नाहीं. कोणी स्वभावतः केवळ थट्टेखोरच असतात; कोणास थट्टा कशी ती मुळींच भासतहि नाहीं! यास्तव जो तशा ग्रंथाचें भाषांतर करूं जाईल तो केवढाहि बुद्धिमान् असला तरी तें काम त्याच्यानें निभणार नाहीं. धर्माच्या किंवा वेदान्ताच्या विषयास भाषांतरकार तसाच पाहिजे; व 'डॉन्किक्सोट्'[1] सारख्या ग्रंथास तसाच निराळा पाहिजे. असो; याचप्रमाणें मूळ ग्रंथाच्या भाषापद्धतीकडे वगैरेहि भाषांतर करणारानें लक्ष दिलें पाहिजे.

६. याप्रमाणें उत्कृष्ट भाषांतर होण्यास कोणकोणतें साहित्य पाहिजे तें सांगितलें. आतां भाषांतराचे निरनिराळे प्रकार पाहूं. ग्रंथाचे एकंदर मोठे दोन विभाग आहेत; एक गद्यग्रंथ आणि दुसरे पद्यग्रंथ, ह्मणजे कविता. आतां दोहोंविषयीं अनुक्रमानें लिहूं.

७. गद्यग्रंथांतहि दोन प्रकार; एक शास्त्रीय, आणि दुसरे बाकीचे,—ह्मणजे गोष्टी, कादंबऱ्या, चरित्रें इतिहास वगैरे. आतां या दुसऱ्यांविषयीं प्रथमतः लिहून मग पहिल्यांविषयीं विचार करूं.

८. गोष्टींचीं भाषांतरें करणें हें एकंदरींत जरी फार कठिण नाहीं; तरी तें उत्कृष्ट साधणेंहि एखाद्याचीच हातोटी! मनुष्य जसा जन्मतःच कवि निपजावा लागतो तसाच गोष्टी सांगणाराहि निपजायासच पाहिजे असें एका ग्रंथकाराचें वचन आहे. हें कोणास केवळ अत्युक्तिरूप वाटेल; पण तसें नव्हे. चित्तवेधक रीतीनें गोष्टीची रचना करायाची किंवा ती सांगायाची ही लहान कला आहे असें नाहीं. हें काम

१. मागें पृष्ठ ७५ पहा.

किती कठिण आहे याचा अनुभव ज्यास घेणें असेल त्यानें बुकांत वाचलेली एखादी मजेदार गोष्ट किंवा हरदासानें सांगितलेली नक्कल आपण होऊन दुसऱ्यास सांगूं लागावें, ह्मणजे त्या ग्रंथकारांत किंवा हरदासांत आणि आपणांत केवढी तफावत पडते ती त्यास तेव्हांच दिसून येईल. एकेका मनुष्यास बोलण्याची छाप अशी साधून गेलेली असते कीं, तशी त्याशीं निरंतर सहवास केल्यानेंहि दुसऱ्यास साधूंच नये. गोष्ट जुळण्याची खुबी; ज्या शब्दांनीं ती सांगायाची ते जसे काय अगदीं टाकलेले–त्यांत लेचापेचा शब्द पडायाचाच नाहीं; गोष्टीस ओघाओघानें एकदम आरंभ करावयाचा; तिचा शेवटहि तसाच झोंकानें करायाचा; निरनिराळ्या पात्रांचें ज्याचें त्यास शोभेसें बोलणें; इत्यादि गोष्टी जो ह्मणेल त्यास साधण्यासारख्या आहेत असें नाहीं! असो; तर ज्याप्रमाणें वरील बोलणारांस किंवा लिहिणारांस रसवंती अनुकूल असावी लागते त्याचप्रमाणें ती खुबी व ती मजा परभाषेंत उतरण्यास भाषांतरकर्त्याच्याहि अंगीं तो गुण असला पाहिजे. यास्तव अशीं भाषांतरें हवा तो करूं गेल्यास त्यास अगदीं साधणारीं नव्हेत. आह्मीं असें ऐकिलें आहे कीं, कौपरचा प्रसिद्ध चुटका 'जॉन गिल्पिन' याचें कोणीं मराठींत छंदोबद्ध भाषांतर केलें आहे. हें आह्मीं अजून पाहिलें नाहीं; पण न पहातांहि वरील भाषांतराविषयीं अभिप्राय देण्यास आह्मांस काडीइतकेंहि भय वाटत नाहीं. तें भाषांतर निवळ फसलें असेल असें आह्मी खात्रीनें सांगतों. आणि याचें कारणहि उघड आहे कीं, त्यांत जो नाजुक तऱ्हेचा विनोद आहे तो केवळ इंग्रेजी पद्धतीचाच आहे. तो मराठींत उतरणें केवळ अशक्य होय! दुसरें उदाहरण 'अथेल्लो'. शेक्सपियरकृत त्या अत्यंत प्रसिद्ध नाटकाचें भाषांतर कैलासवासी महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं सुमारें दहा बारा वर्षांपूर्वी केलें तें एकंदरींत फार उत्कृष्ट साधलें आहे,–व तें इतकें मराठींत उतरेलसें आह्मांला वाटलेंहि नव्हतें! पण याचें कारण अर्थातच भाषांतरकर्त्याचा रंगेल स्वभाव हें एक; आणि दुसरें त्या नाटकाची निवड. असो; पण याविषयीं पुढें आणखी विशेषतः लिहिण्यांत येईल. तेव्हां गोष्टींचीं, कादंबऱ्यांचीं, नाटकांचीं वगैरे भाषांतरें करतांना त्यांची मराठींत उतरतां येण्याची योग्यता व त्या कामास आपली स्वतःची योग्यता हीं नीट पाहून मग त्या उद्योगास घालणारानें हात घालावा. इतिहास व चरित्रें यांच्या भाषांतराची गोष्ट मात्र तशीच केवळ ह्मणतां येत नाहीं. दोहों भाषांचें पूर्ण ज्ञान व वाकबगारी मनुष्यास असली ह्मणजे तें होण्यास, विशेष अडचण पडणार नाहीं.

९. दुसरें कलम शास्त्रीय ग्रंथ. यांचें भाषांतर एरवीं पहातां सगळ्यांत सोपें आहे; कारण त्या त्या शास्त्रांतील सिद्धांत वगैरे जसे असतील तसे या दुसऱ्या भाषेंत ठेवून दिले ह्मणजे झालें. मूळच्या ग्रंथांतील रस भाषांतरांत उतरला पाहिजे वगैरे

संबंध यांत बिलकूल नसल्यामुळें केवळ व्याकरणशुद्ध व रूढिशुद्ध असा साध्या सोप्या रीतींचा तर्जुमा इकडे उतरला ह्मणजे पुरे होतें. पण एक मात्र मोठी जबरदस्त अडचण वरचेवर येऊन पडते. ती अर्थात्च पारिभाषिक शब्दांची. प्रत्येक शास्त्राला त्याचे त्याचे असे ठरलेले कांहीं शब्द असतात; त्यांस संस्कृतांत परिभाषा ह्मणतात. या परिभाषेला प्रतिपरिभाषा दुसऱ्या भाषेंत बनवणें हें मोठ्या चातुर्याचें व श्रमाचें काम असतें. असे जे नवे शब्द बनवायाचे त्यांत इतके गुण असावे लागतांत. एक तर या शब्दांचें वरचेवर काम लागणार, तेव्हां ते लांबलचक अवजड असे नसावे; तर जेवढे थोडक्यांत येतील तेवढे चांगले; जसें 'भूगर्भशास्त्र,' 'पदार्थविज्ञान,' 'वक्रीभवन,' इत्यादि. दुसरें, ते ओबडधोबड अथवा कर्कश नसून कानास चांगले मृदु व मधुर लागावे. तिसरें, ते व्यवहारीक भाषेपेक्षां जितके निराळे असतील तितकें चांगलें; कारण जे शब्द नेहमीं बोलण्याचालण्यांत वगैरे आलेले ते शास्त्रीय ग्रंथांत शोभत नाहींत. असो; आतां या सर्व सोयी संस्कृतामुळें मराठीस फार उत्कृष्ट साध्य झाल्या आहेत हें मागें एक दोन वेळां आह्मीं लिहिलेंच आहे. एक तर तींत समासांची व संधींची अत्युत्कृष्ट रचना असल्यामुळें नवा शब्द थोडक्यांत व बेमालूम असा बनवतां येतो. दुसरें, त्या भाषेंत शब्दसंग्रह फार मोठा असल्यामुळें व भाषाच एकंदर मोठी डौलदार व सुंदर असल्यामुळें वर सांगितलेले दोन गुण मार्दव आणि माधुर्य–हेहि सहज साधतां येतात; तिसरा गुण–अपरिचितत्व–हा तर ती भाषा निराळी पडल्यामुळें अर्थात् आहेच आहे. शिवाय त्या भाषेच्या रीतीप्रमाणें एक शब्द साधला असतां त्यापासून जवळ जवळच्या अर्थाचे शब्दहि तेव्हांच साधता येतात; जसें 'इतिहास' शब्दापासून 'ऐतिहासिक,' 'इतिहासज्ञ' इत्यादि. सारांश, सोन्यारुप्याच्चा उंच नाण्यास जसे गुण असतात तसेच परिभाषेंत असावे. ह्मणजे रुपयाची किंवा मोहरेची जशी किंमत फार असून वजन मात्र थोडकें असतें, कीं त्यांस बरोबर नेण्याची अगदीं अडचण पडूं नये, त्याप्रमाणेंच परिभाषेच्या शब्दांत अर्थ पुष्कळ असून ते टुमदारसे, लहान असावे, कीं उच्चारण्यास व वारंवार त्यांचा प्रयोग करण्यास श्रम पडूं नयेत. दुसरें वरील नाणें ठाकठिकीनें पाडलें असून जसें दिसण्यांतहि सुंदर दिसतें, तसेच वरील शब्दांत झोंकदारपणा व सुरेखपणा हे गुण असावे. तिसरें अपरिचितत्व. रुपये, मोहरा या सामान्य लोकांस ह्मणजे गरीबगुरीबांस कशानें दृष्टीस पडाबयाच्या आहेत ? हल्लीं आमच्या देशांत तर असे हजारों लोक आहेत कीं ज्यांनीं सोन्याचें नाणें तर काय पण सबंध रुपयाहि यावज्जन्म पाहिला नाहीं ! तर याप्रमाणेंच पारिभाषिक शब्दहि अगदीं व्यवहारबाह्य असावे. चवथें सादृश्य वरील नाण्याची मोड ह्मणजे मोहोरांच्या पुतळ्या, किंवा रुपयांच्या अधेल्या पावल्या वगैरे जशा करतां येतात, तसेंच हें विभाजत्व परिभाषेंतील शब्दांत असावें. ह्मणजे 'तें जाणणारा,' 'तत्संबंधी,' इत्यादि-

वाची शब्दांची साधनिका मूळ शब्दापासून सुलभतेनें होण्यासारखी असावी. सरते-शेवटीं, देशाचें राज्य चालवणाऱ्या राजाचा शिक्का एकदां ठोकला, ह्मणजे तें नाणें बनून सर्वांस जसें ग्राह्य होतें, त्याप्रमाणेंच इकडे मोठमोठ्या ग्रंथकारांनीं आपली बुद्धि व चातुर्य खर्चून एकदां परिभाषा ठरवून टाकली, कीं ती मग चालली! असो; तर वर सांगितल्याप्रमाणें आमच्या देशाच्या व भाषांच्या भाग्यानें जेव्हां चोहोंकडे टांकसाळ सुरू होतील तेव्हां वरील गोष्टींकडे आमच्या पंडितांस अवश्य लक्ष पुरवावें लागेल.

१०. आतां एक मात्र सदर राहिलें,--पद्यग्रंथ ह्मणजे कविता. याविषयींचा विचार वरच्याहूनहि विशेष महत्वाचा आहे; कारण कवितेचें भाषांतर ह्मणजे फारच कठिण! हें ह्मणणें आमच्या बहुतेक वाचकांस फार विलक्षण वाटेल; कारण इतर ग्रंथांचीं जशीं भाषांतरें झालीं आहेत, तशींच आमच्या मराठी कविताग्रंथांचींहि बरींच झालीं आहेत, व तीं विशेष जड गेलीं असेंहि पण कोणास वाटत नाहीं. याचें कारण पाहूं जातां कवितेच्या स्वरूपाचें एकंदर लोकांस थोडेंच ज्ञान आहे हे होय. कविता ह्मणजे नुसत्या पद्यरचनेच्या पलीकडे कांहीं पदार्थ आहे ही कल्पनाहि बहुतेकांच्या मनांत अजून आली नाहीं, व ज्यास ती ऐकून माहीत आहे त्यांच्यापैकीं कितीकांस तिचा पूर्ण प्रत्यय मनास भासत असेल तो असो! आमच्या जुन्या मराठी कवितेविषयीं जर पाहिलें, तर ती ज्यांनीं वाचली आहे व यास्तव तीविषयीं मत दिलें असतां ज्यांस कांहीं तरी शोभेल अशा लोकांपेक्षां वाचण्याच्या किंवा वाचून समजण्याच्या नांवानें तर पूज्य पण तिजविषयीं रामबाण मत देणारांत मात्र अग्रगण्य अशांचीच संख्या फार आहे. मराठी कवि एकंदर येथून तेथून अप्रयोजक,[1] त्यांतून मोरोपंतासारखा नादान कवि (अथवा 'कवि' तरी कसचा? 'यमकें जुळणारा') तर आजपर्यंत कधींच झाला नसेल, अशीं मतें लेखनद्वारा व भाषणद्वारा ज्यांनीं अनेकशः प्रणीत केलीं आहेत अशा गृहस्थांपैकीं आह्मांस कित्येक असे माहीत आहेत कीं, ज्यास 'केकावली'सारख्या अंमळ कठिण काव्यांची तर काय, पण आर्येची, श्लोकाची सुद्धां भ्रांत! हे श्लोक किंवा या आर्या त्यांस ह्मणजे समजणार नाहींत असें आमचें बिलकूल ह्मणणें नाहीं; पण त्या समजण्याच्या अगोदर त्याविषयीं मत देण्याचा पतकर जो ते खुशाल बिनधोक आपणावर घेतात; तो पाहून मात्र हंसूं येतें. पण अंमळ जास्ती नजर फांकविली असतां यांतहि मोठेंसें आश्चर्य वाटणार नाहीं! अलीकडील इंग्रेजी विद्वत्तेचा बहुतेक ठिकाणीं असाच कांहीं अद्भुत प्रभाव दिसण्यांत

१. हो! पण चुकलों! वर सरसकट मराठी कवींस ओढलें तें बरोबर नाहीं. अलीकडे पांच सहा वर्षांत माजी डेरेक्टर ग्रांट साहेब यांच्या प्रसादानें तुकाराम मात्र एकटा चांगल्या कवींत मोडूं लागला आहे. यास्तव त्यास वरील पंक्तीस बसवतां येत नाहीं!

येतो कीं, आपणास जें माहीत असेल त्याविषयीं कोणीहि मत देईल, पण ज्याची आपली बापजन्मींहि ओळख नाहीं, जें समजण्याविषयीं आपण कधीं यत्किंचितहि प्रयत्न केला नाहीं, किंबहुना योग्यता नाहीं, त्याविषयीं फाडकन भर सभेंत मत झोंकून दिलें, तर ती विद्वत्ता! ही शक्कल इंग्रेज लोकांनीं प्रथम काढली असून त्यांचे पुरे शिष्य बनलेल्या आमच्या कित्येक विद्वानांनीं ती त्यांच्यापासून भरपूर उचलिली आहेशी दिसते! असो. तर याप्रमाणें आमच्यांत आमच्या जुन्या कवितेविषयीं ज्ञान आहे. आतां तीपेक्षां इंग्रेजी कवितेशीं पुष्कळांचा अधिक परिचय झाला असतो खरा,—कारण कीं, बिचाऱ्या मराठी कवितेप्रमाणें तिजकडे तसें दुर्लक्ष करतां येत नाहीं—तरी कवितेची अभिरुचि प्राप्त होण्यास केवळ शाळांतील व विद्यालयांतील शिक्षण मोठेंसें उपयोगी पडण्यासारखें असतें असें आह्मांस बिलकूल वाटत नाहीं. कारण शेंकडों विषयांचें सारखेंच अध्ययन करायाचें, तेव्हां त्यांत कवितेचीच काय मातब्बरी! वरील अभिरुचि प्राप्त करून घेण्यास विद्यार्थ्यांचा स्वतःचा निराळा व्यासंगच कारण होय यांत संशय नाहीं. असो; तर याप्रमाणें सध्यांच्या स्थितींत कवितेची खरी अभिरुचि फारच थोड्यांस प्राप्त होते. त्यांतून मराठी कवितेची तर वर सांगितल्या प्रकारची दशा! तेव्हां ती वाचणारे अगोदर थोडे, समजणारे तर त्यांहून थोडे, आणि खरे उपभोक्ते तर विरळाच! यास्तव वर जीं मराठींत कवितागंथांचीं भाषांतरें झालीं ह्मणून सांगितलीं त्यांविषयीं यथार्थज्ञान आमच्या लोकांस तितपतच आहे. अमुक अमुक भाषांतरें झालीं आहेत एवढें कित्येकांस माहीत आहे; पण तीं कशीं आहेत, त्यांत मूळच्या ग्रंथाचे गुण कितपत उतरले आहेत, हें समजणें पुष्कळांस अर्थात्च अशक्य होय. कारण तसें होण्यास दोन्ही भाषांचें पूर्ण ज्ञान परीक्षकास असलें पाहिजे. ही स्थिति सध्यां फारच थोड्यांची आहे; ती पुष्कळ लोकांची होण्यास अजून पुष्कळच अवधि पाहिजे. असो; तर यास्तव कवितेचें भाषांतर करणें फारच कठिण ह्मणून आह्मीं वर जें ह्मटलें त्याचा अर्थ पुष्कळांच्या लक्षांत मुळींच येणार नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

कवितेचें भाषांतर ह्मणजे काय याची कल्पना अद्याप तर एकंदर लोकांची अशीच आहे कीं, मूळच्यांतील अर्थ पद्यरूपानें परभाषेंत उतरला ह्मणजे झालें. ही कल्पना किती पोरकळ आहे याविषयीं प्रस्तुत मालेच्या तिसऱ्या अंकात आरंभीं आह्मीं बराच विस्तार केला आहे. केवळ छंदोबंध हा कवितेचा किती लहान भाग आहे याविषयीं आमच्या वाचकांस बहुधा संशय नसेलच. मूळच्या कवितागंथांचें भाषांतर केवळ वरच्या प्रकारानेंच जर होत असेल तर भाषांतराभाषांतरांत बिलकूल फरक रहाणार नाहीं; व साऱ्या उत्कृष्ट कवितांचीं भराभर भाषांतरें होऊं शकतील. कारण सुताराच्या लोहाराच्या वगैरे व्यावहारिक कामासारखेंच हें काम झालें!

एकदां पद्यें जुळण्याचें कसब साधलें ह्मणजे झालें ! पण असें नव्हे. उत्तम कविता ह्मटली ह्मणजे तिचीं अनेक अंगें असतात. एक तर पद्यरचना. ही पद्यरचना ह्मणजे 'ट' ला 'ट' व 'प' ला 'प' जुळवीत बसविण्याचें कसब नव्हे. हें तर हवें त्यास साधणारें आहे; व अशा कविता कितीहि श्रम करून केल्या तरी त्यांचा निर्जीवपणा मार्मिक वाचकांस तेव्हांच मासतो. कविता दोन प्रकारची आहे. एक हठकविता ह्मणजे बळेंच ओढून ताणून ठाकठिकीनें जुळविलेली; आणि दुसरी प्रासादिक ह्मणजे सरस्वतीच्या कृपेचें फळ. आतां पहिल्या हठकवीची कविता ह्मटली ह्मणजे 'कुंभारानें घडलेल्या मडक्यांसारखी' किंवा फार बुद्धि खर्चून केली असली तर 'सोन्याच्या कमळासारखी'च[1] काय ती होईल ! याच्या पलीकडे तिची मजल कधीं पोंचणार नाहीं. प्राण्यांच्या शरीरांत जीवतत्त्व घालणें किंवा वनस्पतिवर्गास टवटवी, स्वाद, सुगंध वगैरे देणें हें जसें एका ब्रह्मदेवाच्याच हातीं; त्याचप्रमाणें कवितेच्या पदरचनेंत कवित्व ओतून देणें हें एक वरील प्रासादिक कवींनीं त्यांचें त्यांनींच करावें ! अथवा याहि ह्मणण्यांत अंमळ चूकच आहे. वरील कवित्व ते ओतून देतात असें नव्हें, तर तें स्वतःसिद्धच बाहेर पडतें असें ह्मणायाला हवें ! अशा खऱ्या खऱ्या कवींस काव्यरचनेचें कठिण पडत नाहीं हें तर काय, पण त्यांचे जे जे उद्गार निघतील ते कवित्वमय निघावे हा त्याचा स्वभावधर्मच केवळ होय. भवभूतीनें 'उत्तररामचरितां'त ह्मटलें आहे–

लौकिकानां हि साधूनामर्थं वागनुवर्तते ।
ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ॥

"लोकांत वागणारे जे साधु असतात त्यांची वाणी अर्थास अनुसरते, ह्मणजे अर्थास अनुलक्षून ते बोलतात; पण वाल्मीकिप्रभृति जे पुरातन ऋषि त्यांच्या पाठीमागें अर्थ धांवतो !–ह्मणजे त्यांवें बोलणें वरच्यांच्यासारखें अर्थावर धोरण ठेवून झालेलें नसतें, तर आधींच होऊन मग अर्थ हा आपोआप त्यास येऊन मिळतो !" ही उक्ति रामाची असून तेथें आशीर्वादाच्या संबंधानें केली आहे. पण तीच प्रकृत प्रसंगीं कवित्वाच्याकडे लावली असतां शोभणार आहे !

असो; तर याप्रमाणें पद्यरचनेची गोष्ट आहे. तींतील मृदुत्व, माधुर्य, लालित्य हे गुण फार श्रमानें कोणाकोणास कदाचित् साध्य होतील; पण कवित्वाच्या भरांत जी शब्दांची ठेवण प्रासादिक कवींस वरचेवर साधते ती इतरांस कितीहि श्रम केले तरी साधणारी नव्हे. फार तर काय, पण प्रत्यक्ष त्या कवीसहि तशी पुनः साधेल असा नेम नाहीं ! अशा अमृतयोगावर निर्माण झालेली आपली कृति पाहून कवीस स्वतःच जो विलक्षण विस्मय वाटत असेल तो पुढील श्लोकांत वर्णिल्यासारखाच ह्मणाव्याचा–

दृशः पृथुतरीकृता जितनिजाब्जपत्रत्विष-

१. अंक ३ व ४ यांवरील पद्यांत हा अर्थ आहे.

श्रुतिभिरपि साधुसाध्विति मुखैः समं व्याहृतम् ।
शिरांसि चलितानि विस्मयवशात् ध्रुवं वेधसो
विधाय ललनां जगज्जनललामभूतामिमाम् ॥

"साऱ्या जगाचें केवळ नाक अशी ही स्त्री निर्माण झाली असतां, ब्रह्मदेव खरोखर अगदीं चकित होऊन राहिला असेल !–आपल्या आसनाच्या कमलाच्या पत्रांहून आपले डोळे मोठे करून तो हिजकडे टकमकां पाहूं लागला असेल;[1] चारी मुखांनीं एकदम 'वाः' 'वाः' असें केलें असेल; आणि आश्चर्यांत बुडून जाऊन त्यानें आपलीं मस्तकें डोलविलीं असतील !"[2] अशीं स्थलें मोठमोठ्या कवींच्या ग्रंथांतून रसिक वाचकांस हवीं तितकीं सांपडतील व अशी जेथें मूळ ग्रंथकर्त्याची तल्लीनता झाली असते तेथेंच वाचकांचीहि होते हें उघडच आहे ! 'पॅराडैज लॉस्ट' नांवाच्या मिल्टनकृत काव्याविषयीं लिहितांना मेकॉलेनें आपल्या पहिल्या प्रथमच्या निबंधांत काय लिहिलें आहे तें आमच्या इंग्रेजी जाणणाऱ्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच. तो ह्मणतो, 'मिल्टन्चा प्रत्येक शब्द कवित्वानें भारलेला आहे; त्यांतला एक अंमळ इकडचा इकडे करा, कीं सगळें बिघडलें !'[3] शेक्सपीयर, ग्रे इत्यादि कवींच्या कित्येक पद्यांविषयींहि कितीक पंडितांनीं असें लिहिलें आहे कीं, त्यांतील शब्दांत काय चेटुक करून ठेवलें असेल तें असो, त्यांनीं वाचकाला मोहनीच पडते ! आपल्याकडचें कालिदासाचें उदाहरण घ्या. 'शाकुंतल' नाटक निर्माण झालें असेल तेव्हां वरील ब्रह्मदेवाप्रमाणेंच आमच्या महाकवीस आपल्या कृतीचा विस्मय वाटून त्यानें खरोखर मस्तक डोलविला असेल ! या आमच्या स्वारीनेंहि त्यांतील चवथ्या अंकावर व विशेषतः त्यांतील श्लोकचतुष्टयावर[4] काय फुक मारून ठेविली असेल ती

---

१. विलसन् साहेबानें वरील श्लोकाच्या पहिल्या चरणाचें भाषांतर निराळेंच केलें आहे. तें असें कीं, 'आपल्या आसनाच्या कमलाच्या पत्रांसारखे सुंदर असे तिचे डोळे पाहून–ब्रह्मदेव चकित झाला.' त्याप्रमाणेंच वरील चरणाचा पाठ–निजात–पत्रत्विषः' असाचं दोन तीन पुस्तकांत आढळतो. पण हां दोन्ही आमच्या मतें बरोबर नाहींत.

२. 'रत्नावली' नाटक अंक २. नायिकेची तजबीर पाहिली असतां राजास आश्चर्य वाटून त्यानें केलेली ही उक्ति होय.

3. Essay on Milton.

४. जुन्या पंडितांत एक चुटका प्रसिद्ध आहे—

काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्यं शकुंतला ।
तत्रापि च चतुर्थोऽङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम् ॥

"काव्यांत नाटक रम्य, नाटकांत 'शकुंतला' रम्य, 'शकुंतले'त चवथा अंक, आणि चवथ्या अंकांत 'श्लोकचतुष्टय'. हें 'श्लोकचतुष्टय' ह्मणजे शकुंतला सासरीं जाण्यास निघाली असतां कण्वाचे निरनिराळ्या प्रसंगीं जे उद्गार निघाले ते होत."

असो ! सगळ्या जगाची त्यावर मुरकुंडी वळते ![1] आमच्या महाराष्ट्रकवींविषयीं बोलण्यास भय वाटतें; कारण आमच्या अलीकडील महाराष्ट्रपंडितांनीं त्यांस केव्हांच नादान ठरवून ठेविले आहेत ! तरी एवढ्या पंडितांच्या मतविरोधास भीतच आम्ही येथें असा अभिप्राय देतों कीं, आमच्या पंतासहि केकावली लिहितांना खूपच भट्टी साधली, त्यांतहि शेवटल्या शेवठल्या पंधरा सोळा केका लिहितांना ! असो; तर अशा प्रकारचीं स्थलें हींच कवितेचे जीवप्राण होत. मनुष्याच्या जीवतत्वाचा जसा आजपर्यंत कोणासहि थांग लागला नाहीं, व बहुधा पुढेंहि कधींच लागणार नाहीं, त्याप्रमाणेंच वरील कवितांचें होय. इकडे जसें बाहेरचें जड शरीर मात्र इंद्रियगोचर होतें, पण त्याचा चालक जो जीवात्मा तो केवळ अवाङ्मनसगोचर होय, म ह्मणजे वाणीच्या व मनाच्या टप्याबाहेर आहे, तसेंच तिकडे बाहेरचे शब्द मात्र कानावर पडतात व त्यांचा आल्हादजनक अर्थ मनास भासतो, पण एवढा अपूर्व गुण त्यांत कशामुळें आला आहे हें मात्र कधीं समजायाचें नाहीं ! एके पक्षीं मोठ्या उत्कृष्ट व कुशल शस्त्रवैद्याचीं शस्त्रें जशीं व्यर्थ होत, त्याप्रमाणेंच दुसऱ्या पक्षीं शब्दविवेचकाचें पांडित्य अगदीं खुंटून जातें. पण इतकेंच नव्हे. वरील शस्त्रवैद्याच्या दृष्टांतांतच आणखी हेंहि स्पष्ट होतें कीं, जीवतत्वाचा शोध लावण्याच्या हेतूनें त्यानें एखाद्या प्राण्याच्या शरीरावर जर शस्त्रप्रयोग केला तर तें जसें नाहींसें मात्र होऊन तो प्राणी त्यास पुनः शाबूद करतां यावयाचा नाहीं, त्याप्रमाणेंच वरील कवितांचें मर्म काढून तें परभाषेंत जो ठेवूं पाहील त्याचा प्रयत्नहि तितकाच सफळ होईल ! अथवा झाडाचें उदाहरण घेतलें तरी चालणार आहे. झाड जसें उपटतांच अंमळशानें त्याबरचीं टवटवी नाहींशी होतें, पानें सगळीं गळून जातात, त्याचप्रमाणें मूळच्या भाषेंत जी शब्दांची ठेवण वगैरे असते ती दुसऱ्या भाषेंत आणणें हें परम दुर्घट, किंबहुना अशक्यच झालें असतां चालेल. सर विल्यम जोन्स यानें 'शाकुंतल' नाटकाचें जें इंग्रेजींत भाषांतर केलें आहे त्याच्या प्रस्तावनेंत त्यानें असाच अभिप्राय दर्शविला आहे. तेथें तो ह्मणतो, कीं एका भाषेंतील कवित्व दुसऱ्या भाषेंत नेण्याचा जो प्रयत्न

१. खुद्द मिल साहेबांसहि एकंदर कवितेशीं व विशेषतः हिंदूंविषयीं जो त्यांचा वळकट विरोध होता तो क्षणभर विसरून असें लिहावें लागलें—

"The poem (!) has, indeed, some beautiful passages..... The scene which takes place when Sacontala is about to leave the peaceful hermitage where she had happily spent her youth, her expressions of tenderness to her friends, her affectionate parting with the domestic animals she had tended, and even with the flowers and trees in which she had delighted, breathe more than pastoral sweetness."

करतो, त्याचा उद्योग एका कुपींतील अत्तर दुसऱ्या कुपींत जो घालतो त्याच्या सारखाच होय. ह्मणजे या अत्तरवाल्याची जशी फजीती होते तशीच भाषांतरकर्त्याची ! बूच उघडल्याबरोबर जो वास जायला लागतो तो दुसऱ्या कुपीला बूच पडे तोंपर्यंत बहुधा सगळा निघून जातो; आणि याप्रमाणें दुसऱ्या कुपींत निवळ पाणी मात्र रहातें!

वरील गोष्टीच्या प्रत्ययार्थ एक सर्वप्रसिद्ध उदाहरण घेऊं. आपल्या देशचा आद्यकवि जसा वाल्मीकि तसा युरोपांतील कवींत होमर होय हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. या कवीच्या 'इलियड' नामक काव्याचीं निदान इंग्रेजींतच दहा बारा भाषांतरें झालीं आहेत. पण मूळच्याच्या बरोबरीला कांहीं तरी उतरलीं अशीं एक दोनच आहेत. एक चापमनचें, आणि दुसरें त्याहून विशेष प्रख्यात असें पोपचें. अजून सर्वत्र प्रसिद्ध व सर्वांस प्रिय असें पोपचेंच भाषांतर होय. पण या पोपचीच हें भाषांतर उतरतांना काय त्रेधा उडाली ती त्यानेंच स्वतः वर्णिली आहे. या भाषांतरास हात घालण्यापूर्वीच या कवीची फार कीर्ति झाली होती, व तिच्या भरावरच एवढा बोजा त्यानें आपल्या शिरावर घेतला असावा यांत संशय नाहीं. यानें आपला बेत वर्तमानपत्रद्वारा चोहोंकडे सर्वांस जाहीर करून शेंकडो बडे लोकांच्या वर्गण्या घेऊन ठेवल्या; व असा संकल्प केला कीं, दररोज पन्नास ओळींप्रमाणें सुमारें वर्षा सव्वा वर्षांत सगळे चोवीस सर्ग संपवून टाकायाचे. हे सर्व बेत होई तोंपर्यंत ठीक होतें; पण जेव्हां का भाषांतराला त्यानें प्रत्यक्ष आरंभ केला, तेव्हां त्याला कळून आलें ! त्यास चैन पडेनासें झालें, रात्रीं झोंप येऊं नये,-येऊन जाऊन भाषांतराचा धौशा ! पुढें पुढें तर त्यास इतका त्रास आला कीं, मला कोणी फाशीं देईल तर बरें असें त्यास होऊन गेलें ! शेवटीं अशा विपत्तींत रखडतां रखडतां जें काम तो वर्षा सव्वा वर्षांत आटपून टाकणार होता तें पांच वर्षांत त्यास आटपतां आटपेना; त्र जर तो वर्गणीदारांचा पैसा घेऊन बसल्यामुळें अडकून न रहाता तर हें ओझें तो केव्हांच झुगारूनहि देता यांत संशय नाहीं ! बरें इतकें करूनहि भाषांतर तरी कितपत उतरलें आहे ? ज्यास मूळ काव्याची ओळख नाहीं त्यास तें फार मजेचें वाटतें खरें, पण बाकीच्यांच्या मतें त्याची योग्यता सुमाराचीच आहे. पोपच्या वेळेस च बेंटली नामेंकरून ग्रीक व ल्याटिन भाषेंत अत्यंत निपुण असा एक महाविख्यात पंडित होता, त्यानें पोपच्या तोंडावरच त्यास सांगितलें कीं, तुमचें भाषांतर ह्मणजे मजेदारशी तुमदार कविता आहे खरी, पण तींत होमरचे गुण बिलकूल उतरले नाहींत ![1] आणि अलीकडे तर मेकॉलेनें एके ठिकाणीं या भाषांतराची खुशाल निवळ

१. वरील अभिप्राय बेंटलीनें ज्या प्रसंगीं दिला तो अंमळ विशेषतः सांगण्यासारखा आहे. हा ग्रीक व ल्याटिन पंडित पोपचा वर्गणीदार असून 'इलियडा'च्या भाषांतराचे जस-

(पुढें चालू.)

थट्टाच केली आहे." असो; तर कवितेचें भाषांतर करणें ह्मणजे एवढी जोखीम अंगावर घेणें आहे. स्वतंत्र निराळी कविता करणें हें एके परी बरें; कारण आपल्या कवित्वाचा आपणास अजमास असून ती आपणास साधेल त्या विषयावर हव्या तेवढ्या विस्तारानें करतां येते. पण परभाषेतील कविता आपल्या भाषेंत आणायाची ह्मणजे बरीक मोठी पंचाईत! मूळ ग्रंथाचें संधान राखून मग आपलें राखायाचें, व शिवाय आपणांत नसणाऱ्या त्यांतील कल्पना वगैरे आपल्या भाषेनें व्यक्त करायाच्या, शब्दसौष्ठवादि गुण साधावयाचे, ह्मणजे केवळ अचाटच काम! असो; तेव्हां असें अंगावर घ्यावयाचें तें मोठ्या विचारानेंच घेणारानें घेतलें पाहिजे.

येथवर कवितेचें भाषांतर यथास्थित रीतीनें उतरणें हें किती कठिण आहे हें सांगितलें. तरी अशा कठिण कामांतहि कित्येकांस यश आलें तें सांगितलें पाहिजे. इटालियन भाषेंत डांटी नामक कवीचें जें प्रख्यात काव्य आहे त्याचें इंग्रेजी भाषांतर केरी नामंकरून एका पंडितानें केलें आहे तें अशाचें एक नामांकित उदाहरण आहे. वर सांगितलेलें पोपचें 'इलियड' तरी सर्वांसच केवळ अमान्य आहे असें नाहीं. जॉनसनच्या मतें तर तसें भाषांतर आजपर्यंत झालेंच नाहीं; व बाकीच्या सर्वांहून त्याचीच जी आजपर्यंत प्रसिद्धि चालत आली आहे तीहि तसेच गुण कांहीं असल्याखेरीज आली नाहीं हें खास आहे. असो; जानसननेंहि जुवेनल नामक ल्याटिन कवीच्या धाटणीवर कांहीं उत्कृष्ट लहान काव्यें रचलीं आहेत. तसेंच पोपचें 'मेसाया' नांवाचें एक इंग्रेजी काव्य आहे, त्याचें जॉनसन यानें ल्याटिन भाषेंत असें शानदार भाषांतर केलें कीं, तें वाचून पोप यास फार विस्मय वाटून तो ह्मणाला कीं, हा नवा कवि सर्वांस लवकरच संदेहांत पाडील कीं, मूळचें काव्य कोणतें, व भाषांतर कोणतें, कोण जाणे! आमच्या भाषेंत अशीं उदाहरणें देणें कठिण आहे. तरी 'पद्यरत्नावली'त जगन्नाथरायाच्या 'भामिनीविलासां'तील एका चुटक्याचें जें मराठी भाषांतर केलें आहे तें प्रस्तुत प्रसंगीं घेतलें असतां चालेल.

पण असें होणें विरळा. त्यांतून हीहि दुसरी गोष्ट येथें ध्यानांत आणली पाहिजे, कीं इटालियन अगर ल्याटिन आणि इंग्लिश, किंवा संस्कृत आणि मराठी या भाषा परस्पर पुष्कळ जवळ जवळ आहेत, यास्तव भाषांतराचें कठिणत्व यांत तितकें

जसे भाग तयार होत गेले तसतसे इतर वर्गणीदारांप्रमाणें यासहि पोंचत गेले. एके समयीं असें झालें कीं, हे भाग नुकतेच चोहोंकडे वाटले असतां पोपची व बेंटलीची गांठ पडली. तेव्हां पोपनें सहजच विचारलें, 'कांहो तुमचीं बुकें तुह्मांस पोंचलीं ना?' बेंटलीनें बळेंच न कळल्याचें सोंग करून परत पुसलें, 'अं, बुकें—कसलीं बुकें?' पोपनें सांगितलें, 'माझ्या होमरचीं'—तेव्हां आठवलेंसें करून त्या गर्विष्ठ पंडितानें कुरेंबाजपणानें उत्तर दिलें, 'पोप, तीस तुह्मी दुमदार मोजेची कविता हवी तर ह्मणा, तीस तुह्मांस मी होमर ह्मणूं देणार नाहीं!

2, *Addison and his writings.*

दिसून येणारें नव्हे. शिवाय वरील उदाहरणांत मूळ ग्रंथकाराचा आणि भाषांतर करणाराचा काळ, समजुती वगैरे गोष्टींतहि ह्मणण्यासारखा भेद नाहीं. पण संस्कृत अगर चिनी ग्रंथांचें इंग्रेजींत भाषांतर, किंवा इंग्रेजी कवितेचें अगर नाटकांचें मराठींत भाषांतर ह्मणजे बिलक्षणच काम आहे. ग्यावर कोणी असा आक्षेप काढतील कीं, असें आहे तर मग इतकीं भाषांतरें झालीं आहेत व होत आहेत तीं ? पण या ह्मण-ण्यांत कांहीं अर्थ नाहीं. भाषांतरें झालीं आहेत खरीं; पण ज्यांच्याकरितां तीं तयार केलीं त्यांपैकीं कितीकांस तीं गोड लागतात ! माजी डायरेक्टर हवार्डसाहेब यांच्या दुसऱ्या बुकाच्या दुसऱ्या भागांत त्यांनीं ह्मटलें आहे कीं, ज्यांस संस्कृत समजतें त्यांसच मात्र कालिदासाचे ग्रंथ समजतात. हें त्यांचें ह्मणणें आह्मांस अगदीं यथार्थ वाटतें. फार तर काय, पण दोन तीन लोकोत्तर रसिकांखेरीज 'शाकुंतल' नाटकांत ज्यास गोडी लागली असा संस्कृत न जाणणारा युरोपियन ग्रंथकार थोडाच सांपडेल ! मिल्ल साहेबांचा एकंदर झोंक मागें एकदां दर्शविला आहेच; व मेकॉले साहेबांनींहि एखाद्या ठिकाणीं तरी कालिदासावर वगैरे यथास्थित झोड उडविली असतीच ही आमची पक्की खात्री आहे; पण श्लेजेल, ह्मबोल्ड, गेटी, जोन्स, विलसन, अशांच्या पुढें त्यांचा दम निघाला नसावा असें वाटतें ! अशींच आणखीहि एक दोन विरुद्ध मतें आमच्या वाचण्यांत आलीं आहेत. एक क्यांपबेल नामक प्रख्यात इंग्लिश कवीचें, आणि दुसरें फॉरेस्टर नामक एका नामांकित पाद्री ग्रंथकाराचें. पहिल्यानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, हिंदु लोकांची कविता फार विलक्षण आहे. तींत मदनाचें धनुष्य हें फुलांचें, धनुष्याची दोरी भ्रमराची, बाण स्त्रियांचे कटाक्ष, साह्यकारी चंद्र वगैरे वर्णन असतें, त्याचा काय अर्थ असेल तो असो ! दुसऱ्या ग्रंथकारानें 'रामायणा'वर हत्यार धरलें आहे, आणि ह्मणतात—'यांत शुद्ध येथून तेथून सारखी बडबड आहे दुसरें बिलकूल कांहीं सांपडावयाचें नाहीं' ! हा एवढ्या संस्कृतज्ञाचा अभिप्राय आमच्या ख्रिस्ती मित्रांस खूप मानवेल यांत संशय नाहीं; व कित्येकांनीं तो आपल्या हृत्पट्टिकेवर खोदूनही ठेवला असेल ! असो; तर जोन्स, विल्सन असे भाषांतर करणारे असतांहि संस्कृत भाषांतरांची ही दशा; तर यावरून काय स्पष्ट होतें ? दुसरें, मागें एक दोन वेळां आलेलें कैलासवासी कोल्हटकर यांचें 'अथेल्लो'चें भाषांतर घ्या. हें फार चांगलें साधलें आहे ह्मणून आह्मीं वर ह्मटलें आहे. पण हें चांगलें कोणाला ? जोन्सचें, विल्सनचें भाषांतर जसें संस्कृतज्ञांस चांगलें, तसें वरील भाषांतर ज्यांना इंग्रेजी समजतें आहे त्यांनाच चांगलें ! ज्यास नुसतें मराठी कळतें तो मोठा रसिक असला तरी तें त्याला किती गोड लागेल ? आह्मांस खचीत वाटतें कीं, मुळींच लागणार नाहीं. याच्या स्पष्टीकरणार्थ दोन तीन उदाहरणें घेतों—

"अथेल्लो—सखे प्राणवल्लभे, तूं माझ्या अगोदर येथें येऊन पोंहचलीस हें पाहून मला पराकाष्ठेचें आश्चर्य वाटून अतिशय आनंद झाला आहे. आजच्या वादळाचा शेवट जसा गोड झाला तसाच जर प्रत्येक वादळाचा होऊं लागला तर साक्षात् मृत्यु जागा होई एवढ्या सपाट्यानें कां वापडा वारा वाहीना, आणि ओलेंपस पर्वताएवढ्या समुद्रांतील लाटांच्या शिखरावर कां तारूं जाऊन बसेना, आणि तें पुनः असमानापासून जितकी जमीन खोल तितकें कां तळीं जाईना ! आतां मरण जरी आलें तरी तें देखील मोठें सुखाचें; कारण, सांप्रत जीवात्म्यास जसें सुख झालें आहे तसें ह्मणजे पुढें कधीं होईल असा मला भरंवसा वाटत नाहीं !"

अंक २.

"यागो—महाराज, आपली बायको व्यभिचारिणी आहे अशी कल्पना एकदां मनुष्याच्या मनांत आली, कीं मग त्याला चैन ह्मणून कधीं पडायाचें नाहीं, याकरतां या गोष्टीविषयीं मात्र आपण फार जपा. कल्पनेसारखें द्वाड कोणी नाहीं. ती शुद्ध घाऱ्या डोळ्यांची राक्षसीण आहे. नाहीं ते संशय घेऊनच घोळीत बसते. मग त्यांतले कांहीं टाकून देते, पुनः आणखी घेते. हा खेळ चाललेला असतो..."

अंक ३ प्रवेश ३.

"अथेल्लो—अरे त्या गुलामाला चाळीस हजार देह पाहिजे होते, कारण मला सूड घेण्याकरितां एक देह काय अगदीं बापुडवाणा पासंगास देखील पुरावयाचा नाहीं. आतां मला पक्कें दिसूं लागलें कीं, हें सर्व खरें आहे—इकडे बघ, यागो, ही पहा मी आपली चट सारी प्रीति आकाशांत फुंकून दिली. आतां प्रीतीचें ह्मणून नांव देखील नको ध्यायला. साधेल तितका द्वेष उगविला पाहिजे. हे कृष्णवर्णी वैराग्या, आपल्या नरकदरींतून निघून तूं असा बाहेर ये. हे प्रेमा, तूं आपला मुगुट व माझ्या हृदयांत जें तुझें सिंहासन आहे तेंहि त्या जुलमी द्वेषाच्या स्वाधीन कर. अंतःकरणा, आतां तुझे विषतुल्य तरंग चालून तूं उलून जा. कारण द्वेष हा काळसर्प आहे."

कित्ता.

वरील स्थळें ह्मटलीं ह्मणजे प्रस्तुत नाटकांतील अत्युत्कृष्टांपैकीं होत. पण हीं वाचून ज्यांस आनंद होईल असे मराठी वाचक किती सांपडतील ! हें नाटक असें जर रंगभूमीवर करून दाखविलें, तर लोकांना एक दोन अंकपर्यंत तरी दम निघेल कीं नाहीं कोण जाणे ! उघडच आहे. अगोदर ही तऱ्हाच मुळीं अगदीं निराळी;—विचार निराळे, कल्पना निराळ्या, वाक्यरचना निराळी; सगळेंच अपरिचित ! 'ओलेंपस पर्वत' ह्मणजे काय, 'घाऱ्या डोळ्याची राक्षसीण' काय, आणि 'कृष्णवर्ण वैराग्य' तरी काय ? मूळ ग्रंथांत या शब्दांचा अर्थ जसा तेव्हांच समजला जातो व गोड दिसतो, तसें मराठींत काय होणार ? अशा ठिकाणीं भाषांतरकर्त्यास निरुपायास्तव

तच टेकणें येतें.

दुसरें उदाहरण पहा—

"हाय हाय ? काय हा अनर्थ ! कोण अंदाधुंदी ? शिव शिव ! हे स्वतंत्रते, कोणीकडे गेलीस ? पूर्वी स्वतंत्रता हा शब्द हरएक रोमन गृहस्थाच्या कानास कसा अमृतासारखा गोड लागत होता ! 'रोमन गृहस्थ' या पदवीचा मान मागें केवढा होता ! पण हाय हाय ! आतां मातीपेक्षांहि कमी मोलाची ती पदवी झाली ! अहो, सभासदहो, पण पुढें काय ? काय हा असा काळ आला काय ? अरे, काय रोमन लोकांनीं नेमलेल्या क्षुल्लक सुभेदारानें रोमन प्रांतांत इटालीच्या शेजारीं, रोमन गृहस्थास विनाकारण बांधावें, कोरड्यांनीं मारावें, तापलेल्या लोखंडाच्या पट्यांनीं भाजून हाल करावे, आणि शेवटीं अपमान करून गुलामासारखें कुसानें खिळून जिवें मारावें ? आणि काय, त्या निरपराध मनुष्यानें दुःखानें कळवळून केलेला आक्रोश, पहाणाऱ्या लोकांच्या डोळ्यांस आलेले अश्रु, रोमन लोकांचा प्रभाव, न्याय होऊन शिक्षा होण्याचें भय, यांपैकीं एकाहि गोष्टीनें किंवा एकंदर या सर्व गोष्टींनीं त्या राक्षसाच्या क्रूरतेचा व दुष्टपणाचा प्रतिबंध होऊं नये ? तो आपल्या संपत्तीच्या मदानें व बलानें सर्वांस तुच्छ मानून स्वातंत्र्याच्या मूळावर निर्भयपणें कुऱ्हाड घालीत असतां आह्मीं सर्वांनीं उगीच बसावें असा समय आला काय ?"

अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह.

वरील उतारा सिसरोनें वेरिसच्या विरुद्ध जें भाषण केलें त्याच्या भाषांतरांतील होय हें आमच्या वाचकांस बहुधा माहीत असेलच. हें भाषण त्याच्या सर्व भाषणांत उत्तम गणिलें आहे, आणि यांतच सिसरोचा नामांकित सारालंकार[1] आहे. वरील भाषांतर कसें उतरलें आहे हेंहि येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. असो; पण हा उतारा येथें देण्याचें कारण उघडच आहे कीं, त्यांत 'स्वतंत्रते'विषयीं जो उल्लेख आहे तो इंग्रेजी न कळणाऱ्या वाचकांस बिलकूल कळणार नाहीं; तसेंच 'रोमन गृहस्थ' या शब्दांवर जो त्यांत रोख आहे तोहि त्यांस मुळींच भासणार नाहीं. हे शब्द 'रोमन सिटिझन' याचें भाषांतर होत; पण 'भाषांतर' या शब्दाचा अर्थ जर असा घेतला कीं, मूळ शब्दांनीं जितका व जसा अर्थ मनांत बिंबतो तितका व तसा त्या दुसऱ्या शब्दांनीं बिंबावा तर वरील भाषांतर अगदीं व्यर्थ आहे यांत कांहीं संशय नाहीं. असो; तर याप्रमाणें देशादेशाचे आचार, रीतभात, विचार, समजुती वगैरे अगदीं भिन्न असल्यामुळें तसला संबंध जेथें असतो तेथें भाषांतर होणें केवळ अशक्य होय. आणि असले संबंध काव्यांतून, नाटकांतून, कादंबऱ्यांतून वगैरे भरभूर असा-

१. या अलंकाराचें इंग्रेजी नांव climax आहे. एकाहून एक वरचढ अशी मालिका रचिली असतां वरील अलंकार होतो.

याचे; तेव्हां त्यांचीं भाषांतरें अन्यभाषांत–त्यांतून विशेषतः फार दूर देशच्या भाषांत–होणें केवळ अशक्य होय.

वरील प्रतिपादनावरून सर्वांच्या ध्यानांत येईलच कीं, मिल्टन, शेक्सपीयर, स्कॉट यांचे ग्रंथ इंग्रेजींत फार रमणीय आहेत ह्मणून मराठींत ते तसे होणार नाहींत. उलटे कंटाळवाणे होऊन हास्यास्पद मात्र होतील. ते वाचून व त्यांतील खुब्या नीट ध्यानांत ठेवून त्यांतील इकडे उतरण्यासारख्या ज्या असतील त्या मात्र आपल्या भाषेंत आणल्या असतां साजणार आहे.

११. असो; याप्रमाणें तिन्ही सदरांचा विचार झाला. आतां भाषांतराच्या उत्कृष्टत्वाविषयीं अगदीं बरोबर असें एक प्रमाण सांगतों. तें हें कीं, ज्या ग्रंथाचें दुसऱ्या भाषेंत भाषांतर करायाचें त्याचा कर्ता, तो ग्रंथ या दुसऱ्या भाषेंत आपण स्वतः कसा लिहिता हें मनांत आणावें; व त्यासारखें जेव्हां भाषांतर उतरेल तेव्हां तें अत्युत्तम झालें. हें प्रमाण बरोबर सांपडणें अर्थातच अशक्य आहे; तरी मूळ ग्रंथकाराची स्थितिरीति, स्वभाव, समजुती, विचारांचा झोंक, भाषापद्धति या सर्वांशीं दृढ परिचय झाला असतां भाषांतरांत त्याची घाटणी बरीच उतरतां येईल यांत संदेह नाहीं.

१२. आतां सरते शेवटीं एका गोष्टीविषयीं लिहून हा लांबलचक निबंध पुरा करतों. प्रस्तुत मालेच्या पहिल्या अंकांत आरंभीं आह्मीं ह्मटलें होतें कीं, इंग्रेजीचें मराठींत भाषांतर करतांना कित्येकांस मोठी मुसकील पडून ते मराठी भाषेसच दोष लावतात कीं, तींत प्रौढ व खोल अर्थ व्यक्त करण्यास शब्दच नाहींत. आतां हें ह्मणणें कितपत खरें आहे याविषयीं विचार करूं. यांत पहिल्यानें हें एक लक्षांत आणलें पाहिजेच कीं, वरील मत जे देतात त्यांपैकीं यासंबंधानें मत देण्यास खरोखर लायक असे किती. ही शंका मूळारंभींच येण्याचें कारण उघडच आहे कीं, हल्लीं मराठीचा अभ्यास ह्मणजे मोठ्या आस्थेनें होत असतो असें नाहीं. मुलांस लिहितां वाचतां येऊन व्याकरण, भूगोल वगैरे समजूं लागतांच इंग्रेजीचा अभ्यास जो सुरू होतो तो शेवटपर्यंत; मराठीकडे तादृश लक्ष देण्यास त्यांस फावतच नाहीं. व तसें करण्याचें मोठेंसें अगत्यहि कधीं त्यांस पडत नाहीं. तर अशी स्थिति असल्यावर मराठी भाषेची पोंच कोठपर्यंत आहे; प्रौढ, सरस, किंवा खोल अर्थ तिच्यानें कोठपर्यंत झेपला जाईल याची त्यांस वास्तविक कल्पना होणें अंमळ दुरापास्तच खरें ! पण जेथें प्रत्युक्तीचें भय नाहीं तेथें हवी तशी वल्गना चालली जाते; व हेंच समजून वरील अभिप्राय चोहोंकडे हवा तो देतो. हें मत शिक्षकांस व भाषांतरकारांस तर खासें पथ्यावरच पडतें. कारण इंग्रेजींतील अर्थ वर्गात समजून देतांना किंवा एखाद्या अबघड ग्रंथाचें पैशाच्या अगर लौकिकाच्या लोभानें भाषांतर करण्याचें पतकरलें असतां, जेथें जड जाऊं लागेल, तेथें आपली आयती सबब तयार आहेच;—काय

करावें हो ! आपली भाषा पडली फार भिकार, यापुढें इलाज नाहीं; नाहीं तर भाषांतर करण्यास काय कठिण आहे ! असो; तर याप्रमाणें वरील मत कांहीं अज्ञानास्तव व कांहीं अपमतलबीपणामुळें चोहोंकडे पसरलें आहे. आमची भाषा इतक्यांतच इंग्रेजीसारख्या भाषांशीं टक्कर मारील असें आह्मी ह्मणत नाहीं,—व तितक्या उजगारीस ती कधीं तरी पोंचेल कीं नाहीं याचा संशय आहे,—पण अर्थव्यंजकता वगैरे गुण तिच्यांत फारच नेमस्तपणाचे आहेत, किंवा मुळींच नाहींत, असें जे पुष्कळ मानतात त्यांची समजूत अगदीं गैर आहे. खरोखरी जर पाहिलें, तर मराठीस सोयी काय थोड्या आहेत ? व्यवहारिक बोलण्याच्या चालण्याच्या वगैरे भाषेस आमची साधारण भाषा पुरे आहेच; शास्त्रीय भाषेस तर संस्कृताचें अत्युत्कृष्ट साहाय्य; दरबारी, लष्करी वगैरे भाषेस फारशी व अरबी यांची मदत आहेच. इंग्लिश लोकांचा इकडे संचार होण्यापूर्वीच आमचें राष्ट्र सर्व प्रकारें पूर्णावस्थेस येऊन पोंचलें असल्यामुळें कवितेची भाषा, नेहमींच्या व्यवहाराची भाषा, दरबारी भाषा, लष्करी भाषा, व्यापारी भाषा, न्यायमनसुब्याची भाषा, धर्मोपदेशाची भाषा, कलाकौशल्यांची भाषा, इत्यादि सर्व येथें केव्हांच ठरून गेल्या होत्या. कोणत्याहि ठिकाणीं ह्मणजे आतां नवे शब्द शोधून काढले पाहिजेत असें नव्हतें. एक मात्र मोठी उणीव होती खरी. ती ही कीं, गद्यग्रंथांचा मुळींच प्रघात नसल्यामुळें तो भाषेचा प्रकार इकडे बिलकूल नव्हता; व भाषेकडेहि शास्त्रदृष्ट्या कोणीं लक्ष दिलें नव्हतें. ह्मणजे व्याकरण कोश वगैरेंची रचना संस्कृतांत जशी आहे तसें इकडे मुळींच कधीं झालें नाहीं.[1] ही उणीव प्रस्तुत सरकारानें आपल्या उदार आश्रयानें भरून टाकली ही मोठी गोष्ट केली खरी; कारण तिच्याशिवाय आमच्या भाषेच्या पूर्वीच्या अभिवृद्धीचा कांहींच उपयोग होताना. पण गद्यग्रंथांची पद्धति आतां चांगली बसून गेल्यामुळें लोकशिक्षणाचा उत्कृष्ट मार्ग तींतून निष्पन्न झाला, व भाषेच्या अभिवृद्धीसहि ती पुष्कळ कारणीभूत झाली. असो; तर एवढ्या स्थितीस जी भाषा अगोदरच येऊन पोंचली होती ती केवळ रानटी अवस्थेंत होती असें ह्मणतां येणार नाहीं. पण आमचे लोक स्वतःस अज्ञान व रानटी ह्मणून घेण्यास जसे अगदीं खूष आहेत, तद्वतच भाषेचीहि मानहानि केल्याचें ते बिलकूल दुःख मानीत नाहींत. मराठी भाषेंत अद्याप ग्रंथसंख्या फार झाली नाहीं. तरी गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें, इतिहास, शास्त्रीय ग्रंथ असे प्रकार बरेच झाले आहेत; व कोण्या ग्रंथकाराची लेखणी अमुक विषयावर लिहितांना भाषेच्या कोतेपणामुळें ह्मणजे थांबली अशी हाकाक अजून कोणाच्या कानीं

१. आह्मांस एका मित्राच्या सांगण्यावरून कळलें आहे कीं, कानडी भाषेंत संस्कृतासारखीं व्याकरणें व कोश रचलेले आहेत. हिंदुस्थानांतील विद्यमान भाषांत असा प्रकार दुसरीकडे कोठेंहि असेलसा वाटत नाहीं.

आली नाहीं ! असो; तेव्हां वरील आक्षेप केवळ व्यर्थ होय असें आह्मांस वाटतें.

तरी आमची भाषा इतक्यांतच पूर्णतेच्या शिखरास पोंचली आहे, किंवा कोत्याहि भाषेंतील कोणताहि अर्थ मराठी भाषेंत चांगला हवा तसा नियमानें व्यक्त करतां येईलच, असा व्यर्थ अभिमान तिजबद्दल आह्मी बाळगात नाहीं. आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, ती सध्यांहि बऱ्याच पक्व दशेस आली असून इंग्लिश वगैरे भाषा जशा क्रमाक्रमानें वाढत गेल्या तशी वाढत जाण्यास तीस पुष्कळ हवी तशी सोय आहे. हीमुळें कालगत्या हवा तो अर्थ त्या भाषेनें लिहितां व बोलतां येईल. आतां एवढें खरें आहे कीं, जे प्रकार इकडे कधींच नव्हते त्यांच्यासंबंधाचे शब्द आमच्या भाषेंत मिळणार नाहींत. उदाहरणार्थ अलीकडील यंत्रांचे वाचक शब्द, किंवा रसायनादि ज्या शास्त्रांचा अलीकडे प्रादुर्भाव झाला त्यांची परिभाषा, हीं नवींच बनवावीं लागतात. तसेच 'लोकसत्ताक राज्य' 'सार्वजनिक सभा', 'विद्यालय', 'पुस्तकालय', 'देखावा', 'देशाभिमानी', 'मुद्रणकला', 'बेअब्रूची फिर्याद' वगैरेहि सर्व नव्याच अर्थांचे वाचक शब्द मराठींत आणावे लागले. यांत आमच्या भाषेची कमताई आहे खरी; पण हीबद्दल मराठी भाषेस दोष कोण लावील ? ज्या कल्पना लोकांच्या कधीं मनांतच आल्या नाहींत त्यांचे वाचक शब्द किंवा वाक्यें त्या भाषेंत असावीं कशीं ? कांहीं दिवसांपूर्वी आमच्या एका मित्रानें आह्मांस एक इंग्रेजी वाक्य देऊन त्याचें भाषांतर करण्यास सांगितलें. तें वाक्य हें—'He sympathises with me fully in this movement' याचें भाषांतर आह्मी कांहीं तरी सरासरी केलें; पण तें आमच्यापैकी अनास आलें नाहीं, व त्याच्याहि आलें नाहीं. पण यांत दोष कोणाचा ? अर्थात्च कोणाचाच नाहीं. 'Hearth', 'Oak', 'Skating', 'Aurora Borealis', 'Swallow', वगैरे शब्दांस मराठींत प्रतिशब्द जसे सांपडणें नाहींत, तसेच 'Parliament', 'limited monarchy', 'Whig', 'Tory', 'representation', 'popular movement' वगैरेंस तरी कसे सांपडतील ? बरें, अशानें मराठीवर दरिद्रतेचें दूषण येईल काय ? तिकडे कांहीं जिन्नस होतात ते इकडे होत नाहींत ह्मणून आमचा देश जसा भिकारी होत नाहीं त्याप्रमाणेंच तिकडील कांहीं कल्पना व विचार इकड्या भाषांस मुळींच माहीत नसले ह्मणून या भिकारच ठरल्या असेंहि पण होत नाहीं. असो; तर अशा आक्षेपांत कांहीं जीव नाहीं; व ज्यांस आपल्या भाषेचा अजून अभिमान वाटत असेल व तिचें हित करण्याची बुद्धि असेल त्यांनीं असल्या पोकळ पांडित्यास अगदीं जुमानूं नये. शिवाय आमच्या वरील मित्रांनींहि ही मोठी गोष्ट ध्यानांत बाळगिली पाहिजे कीं, भाषा जी प्रगल्भ दशेस चढते ती केवळ सृष्टिनियमानुसारानेंच चढते असें नाहीं; ह्मणजे प्राणी किंवा वनस्पति यांची वाढ

जशी नेमानें व्हावयाचीच, तशी कांहीं भाषेची गोष्ट नाहीं. तिची अभिवृद्धि मुख्यतः मनुष्यप्रयत्नांनींच आहे. तर ग्रंथकारांनीं भाषेच्या भिकारपणाचें रडगाणें गाणें ह्मणजे त्यांसच पुष्कळ अंशीं लज्जास्पद आहे याखेरीज दुसरी उत्साह येण्यासारखीहि ही गोष्ट आहे की, भाषा भिकार असतां तींत चांगली ग्रंथरचना करण्यांत जितकें भूषण आहे, तितकें ती अगादरच चांगली असतां करण्यांत मुळींच नाहीं. यास्तव आमच्या भाषेच्या सध्यांच्या वाईट मानलेल्या स्थितींतहि जे ग्रंथकार परिश्रम करून मनोरम ग्रंथ रचतील त्यांची वाहवा अलीकडील मोठे नामांकित ह्मणून मोडले जाणारे जे इंग्रेज ग्रंथकार त्यांच्याहूनहि अधिक होईल हें उघडच आहे !

निबंधमाला,—वर्ष १ लें.

या पुस्तकाचें आज पहिलें वर्ष संपलें. यास्तव या प्रसंगीं कांहीं विचार प्रदर्शित केल्यावांचून राहवत नाहीं. पहिल्यानें संपूर्ण विश्वाचें सूत्र चालवणारा जो परमेश्वर, ज्याच्या कृपेशिवाय सर्व मनुष्यप्रयत्न व्यर्थ होत, त्यास आह्मी मनोभावानें कृतज्ञतापूर्वक नमन करतों; आणि आमच्या कृत्यास यश येण्याकरतां त्याचा प्रसाद मागतों. संपत आलेल्या वर्षाच्या आरंभीं जेव्हां सदर्हू मासिक पुस्तक काढण्याचें आह्मीं मनांत आणलें, तेव्हां एवढें काम कसें निभेल, त्यास लोकांचा आश्रय कसा मिळेल, वगैरे गोष्टी वरचेवर मनांत येऊन आह्मांस मोठा धाक वाटत होता. पण जगदीशाच्या सत्तेनें त्याचा बराच निभाव लागला हें पाहून आह्मांस जो संतोष वाटतो आहे त्याचा येथें उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. असो; या ठिकाणीं प्रस्तुत पुस्तकास ज्यांनीं आपण होऊन आपला आश्रय दिला त्यांचेहि आभार आह्मीं मनःपूर्वक मानतों.

पुस्तककर्त्यास, किंबहुना कोणत्याहि मनुष्यास, आपल्या स्वतःविषयीं बोलणें ह्मणजे मोठी पंचाईत असते. कारण तसें करण्याचें बीज अहंकारच होय असें सामान्यतः लोक समजतात. तरी तसें केल्यावांचून परिणाम नाहीं असे पुष्कळ वेळां मनुष्यास प्रसंग येतात. तसें तो न करील तर त्याच्याविषयीं लोकांचे कधीं कधीं जे भलतेच ग्रह झालेले असतात ते तसेच राहून ते दिवसेंदिवस अधिकाधिकच दृढ होत जातील. यास्तव प्रस्तुत मालेच्या पांचव्या अंकाच्या शेवटीं आह्मीं स्वतःविषयीं कांहीं मजकूर लिहिला होता, तसाच आतां वर्षाच्या अखेरच्या या संधीस कांहीं लिहिणें अवश्य वाटून तो लिहितों.

जगाची रीत ज्यानें यत्किंचित्हि पाहिली असेल त्यास अर्थात्च कळून येणारें आहे कीं, मनुष्यामनुष्यांत, रूप, स्वर, बोलण्याचालण्याची ढब वगैरे गोष्टींत जसा

फरक नेहमीं दृष्टीस पडतोच त्याचप्रमाणें स्वभाव, रुचि, समजूत यांतहि नेहमीं तो असायाचाच. यास्तव एका मनुष्यास जी गोष्ट चांगली वाटते तीच दुसऱ्यास त्याच्या विपरीत वाटल्यास कांहीं नवल नाहीं. याप्रमाणेंच सगळ्यांचें ज्ञानहि वस्तुगत्याच सारखें नसल्यामुळें लोकांच्या समजुतींतहि परस्पर फेर पडल्यास मोठी विलक्षण गोष्ट झाली असें ह्मणतां येत नाहीं. हा प्रकार जोंपर्यंत मनुष्याचें मन सध्यां आहे असेंच राहील तोंपर्यंत अर्थात्च चालणारा आहे. यास्तव सुज्ञ जे असतात त्यांस दुसऱ्यांच्या मतविरोधाचें कधीं आश्चर्य वाटत नाहीं व रागहि येत नाहीं; कां कीं, मानवी स्वभावाचा हा धर्मच होय. असें समजून ते आपला ज्या विषयावर मतभेद पडत असेल त्याची वाटाघाट करण्याकरतां एकत्र जमतात, आणि सत्यैकनिष्ठ बुद्धीनें व शान्त मनानें खरें खोटें निवडतात. जेथें असा साफ निर्णय झाला तेथें जो हटतो तो आपल्या पराभवाचें किमपि दुःख न मानतां सत्याचा लाभ झाला यावरच नजर देऊन आपणास जिंकणाराचीहि प्रशंसाच करतो; असो तर शहाण्या व सालस लोकांची चाल अशी आहे. पण ही जगांत कितपतशी दृष्टीस पडते याचा शोध जो करूं जाईल त्याची खात्री होऊन जाईल कीं, तिची अपेक्षा व अभाव हीं परस्परांशीं सम आहेत. ह्मणजे जगाचें कल्याण होण्यास तिची अवश्यकता जेवढी मोठी आहे तितकाच मोठा तिचा जगांत अभावहि पण आहे. ही मनाची शांत वृत्ति व सत्यप्रीति यांचें मान विद्वत्तेवर नाहीं हें तर काय, पण पुष्कळ ठिकाणीं जितकी जितकी विद्वत्ता अधिक तितका तितका वरच्या उलट गुणांचा मात्र पगडा मनुष्यावर झालेला दृष्टीस पडतो. अशाविषयींचीं उदाहरणें मागील काळचीं व हल्लींच्या काळचींहि पुष्कळ देतां येतील. असो; पण त्यांशीं आह्मांला गरज नाहीं. त्याच्या विरुद्ध मात्र एक उत्कृष्ट उदाहरण आमच्या वाचकांच्या प्रत्ययार्थ आह्मी येथें सांगतों. मेकॉले व मिल्ल साहेब यांची ओळख आमचे वाचक विसरले नसतीलच. या दोघां साहेबांचा सुमारें चाळीस वर्षांमागें मोठा वाद लागला होता; आणि खरोखर पहातां हिंदुस्थानाचा द्वेष किंवा तिरस्कार असे कांहीं थोडे विषय खेरीज करून या दोघांचा ज्यांवर मिलाफ व्हावा असे थोडेच विषय होते! असो; हा वाद मिल्लच्या एका राज्यप्रकरणीं निबंधावरून उत्पन्न झाला. यांत मेकॉले साहेबांनीं आपल्या प्रतिपक्षाची आपल्या नेहमींच्या चालीप्रमाणें[1] वाजवीपेक्षां फाजील शोभा अगोदर खूपच केली; पण पुढें त्यांचें त्यांसच

१ मेकाले साहेबांवर जी आह्मीं टीका केली तिला एक्या अक्षरानेंहि उत्तर देण्याची पंचाईत न करतां आमच्या खिस्ती बंधूंनीं आह्मांवर नुसती शिव्यांची मात्र फेर झाडली! पण ते एखाद्या साधारण प्रतीच्या विद्वान् साहेबांस—कारण हिंदूचें तसें वजन पडायाचें नाहीं—जर पुसतील तर त्यांस कळून येईल कीं, मेकॉले साहेबांचें जें त्यांस परब्रह्म एवढें

पुढें चालू.

वाईट वाटून एवढ्या थोर ग्रंथकारांशीं आपण फार गैर रीतीनें वागलों असें त्यांनीं कबूल केलें. त्यांतून प्रकृत प्रसंगीं विशेष सांगण्यासारखें काय कीं, पुढें लवकरच दोघांचा जो परस्पर स्नेह जमला तो आमरणान्त राहिला ! तर याचें नांव खरा थोरपणा व सौजन्य ! हें सामान्यतः सर्व मनुष्यांस, व विशेषतः जे साधारण लोकांपेक्षां आपण विशेष ज्ञानसंपन्न ह्मणून मिरवितात अशा वर्तमानपत्रकर्त्यांस, पुस्तककर्त्यांस व ग्रंथकारांस तर फारच उचित होय !

वरील लेखाचा रोंख आमच्या मर्मज्ञ वाचकांच्या ध्यानांत आला असेलच. तो आह्मीहि येथें विशेष स्पष्टतेनें सांगतों. आज एक वर्षभर आमच्या पुस्तकांतून जे विचार प्रदर्शित होत गेले ते सर्व लोकांस सारखे मान्य झाले नाहींत. कित्येकांस तर ते अत्यंत दुःसह होऊन त्यांचें आह्मीं शत्रुत्व मात्र संपादन केलें हें आह्मी पक्कें जाणतों. तरी ज्याअर्थीं हें पुस्तक सुरू करण्याचा उद्देश अर्थप्राप्ति किंवा कोणाचें आर्जव करणें हा बिलकूल नव्हता, त्याअर्थीं वरील दोन्ही गोष्टींची आह्मी काडीइतकीहि पर्वा करीत नाहीं. आजपर्यंत आमच्या देशाच्या हरएक गोष्टींविषयीं— आमच्या विद्येविषयीं, स्वभावाविषयीं, आचारांविषयीं, धर्माविषयीं, भाषांविषयीं, कवितेविषयीं, वगैरे, ज्या लोकांच्या समजुती ठरून गेल्या होत्या त्यांपैकीं कित्येक आह्मीं निःशंकपणें खोडून टाकून खोट्या ठरविल्या आहेत. तरी असें करतांना आह्मीं कोणास विनाकारण दुखविलें आहे, किंवा कोणाची खरी योग्यता न ओळखतां मानहानि केली आहे असें आह्मांस वाटत नाहीं. तसेंच लोकांच्या समजुतींच्या विरुद्ध उगीच डौलानें केवळ लिहावयाचें असेंहि आमच्या हातून घडल्याचें आह्मांस माहीत नाहीं. तर आमच्या बुद्धीनें जें जें आह्मांस खरें भासलें व ज्याच्या सत्यत्वाविषयी आह्मांस स्वतः संशय उरला नाहीं, तें तें कितीहि लोकमतविरुद्ध असलें तरी आमच्या सुज्ञ व निःपक्षपात वाचकांस आह्मीं प्रमाणासहित सादर केलें. तसेंच पहिल्या दोन अंकांच्या शेवटीं ज्या आह्मीं कांहीं सूचना केल्या होत्या त्याप्रमाणें आमच्या आक्षेपकांस आह्मीं उत्तरें देऊन योग्य वाटला तेवढा त्यांचा मजकूर ग्रहण केला.

सदरहू पुस्तकाविषयीं कितीकांच्या ज्या कल्पना झाल्या आहेत त्याचें आह्मांस मोठें नवल वाटतें. या पुस्तकाचा उद्देश ज्यास त्यास शिव्या द्याव्या, ज्याची त्याची फजीति करावी, एवढाच पुष्कळांच्या मतें आहे. इंग्लिश लोक, नवीन विद्वान्, मोठमोठे ग्रंथकार वगैरेंची मानहानि करून आपली प्रतिष्ठा मिरवावी इतकाच या लिहि-

---

वाटतें तसें कोणीहि सध्यां मानीत नाहीं ! कित्येकांनीं त्यांची योग्यता तर फारच थोडी धरली आहे. असो, एकंदरींत आमच्या वरील साहेबांची फगवून लिहिण्याची खोड फार खरी. त्यांच्या प्रासिद्ध निबंधांतच कित्येक ठिकाणीं त्यांनीं स्वतःच मूळचा मजकूर फिरवून घातलेला आढळतो.

णाराचा उद्देश आहे असें कित्येकांचें मत आह्मांस समजलें आहे. आमचे खिस्ती बंधु 'ज्ञानोदय' महाराज यांनीं तर आह्मांवर मोठाच कडाका उठवून राजद्रोहहि ते आह्मांवर शाबीत करूं पहात आहेत.[1] या सर्व गोष्टींवरून वरील लोकांस मराठी फार उत्कृष्ट समजतें, ग्रंथ वाचणें तो ते फार लक्ष लावून वाचतात, व त्यांची विचारशक्तिहि मोठीच जाज्वल असावी. याविषयीं आह्मांस बिलकूल संशय उरला नाहीं ! इंग्रेज लोक ह्मणजे केवळ देवमाणसें, हिंदु ह्मणजे कृमिकीटकांहून नीच; जेवढें जेवढें ह्मणून उत्कृष्ट मनानें कल्पितां येईल किंवा भाषेनें व्यक्त करितां येईल तेवढ्याचें आगर युरोपखंड, व त्यांतून इंग्लंड देश, वरच्याच्या अगदीं जें जें उलट त्याची भरपूर भरती बरीक बिचाऱ्या एशियाखंडांत, व विशेषतः आमच्या हतभाग्य हिंदुस्थानांत; खरा

१. 'ज्ञानोदय' महाराजांस आमच्या 'पुस्तकरूप पिल्ला'नें काय शिकवावें ह्मणा; पण पोरपणाचा अनिवारपणा कांहीं अधिक आहे ! आमचें मूळचें वाक्य 'सैन्यासहवर्तमान धांवणारा परवांचा शूर' हें बरोबर न वाटून आमच्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध बंधूनें त्याच्या जागीं 'खरें पाहिलें असतां चुकांड्या (?) देत पळणारा' असा शोध घातला. याप्रमाणें मूळ वाक्याचें राजद्रोहार्थकत्व मोडून त्याच्या अंगीं खरी राजनिष्ठा आमच्या बंधूनें आणली. ही त्याची आपल्या धाकट्या भावंडाविषयीं ममता पाहून आह्मांस खरोखर मोठा संतोष वाटतो. तरी पुढील वाक्यांकडे आमच्या प्रिय बंधूंनीं आपली ज्ञानदृष्टि अंमळ फेंकावी अशी त्यांस विनंति आहे—

"Tantia Topee fought to the last ... ... This able general, *whose movements Russell's graphic pen compared to forked lightening*, and who led our troops so many weary marches—crossing the Nerbudda to and fro, passing between our columns, behind them, and before them, traversing mountains, ravines, valleys, swamps, and marching for weeks together thirty and forty miles a day—was a comely well-made Brahmin fifty years of age, with a large finely-shaped head, piercing black eyes, sharply arched grey eyebrows, and an abundant head of grey hair with whiskers, beard, and moustache of the same colour. When apprehended and heavily ironed, he was quite calm-said he wanted no trial, and expected nothing but death. Only he wished that it might be speedy, and that his captive family might not be made to suffer on his account. He was tried by court-martial and hanged."—Martin's British India—pp. 80-1.

वरील मजकूर वाचून आमच्या राजनिष्ठ बंधूची खात्री होईल कीं, निबंधमालाकर्त्यापूर्वी पुष्कळांनीं 'महादुष्ट बंडवाल्याची प्रशंसा' केली आहे.

धर्म झटला ह्मणजे सीनिया पर्वताच्या शिखरावर विजा चमकताहेत, मेघ गडगडताहेत, अशा थाटांत जो प्रगट झाला तो, निवळ थोतांड झटला ह्मणजे ब्रह्मदेवाच्या चारी मुखांतून जो निघाला तो; विद्वत्त्व, शूरत्व, सुशीलत्व वगैरे सर्व गोऱ्या कातड्याकडे, काळ्याच्या बिचाऱ्याच्या माथीं मात्र मूर्खत्व, भीरुत्व, क्रूरत्व हें ब्रह्मदेवानेंच जन्मकाळीं बांधलेलें;—फार तर काय, पण 'ज्ञानोदय' महाराज 'बुद्धिमांद्यता,' 'सौजन्यता' असे, पाणिनीस एकीकडे गुंडाळून ठेवणारे प्रयोग करूनहि अत्यंत 'परिपक्व पंडित,' आणि 'निबंधमाले'चा कर्ता बिचारा 'अपक्व,' 'अर्धाकच्चा', ! असो; भाग्य आमच्या देशाचें !—तर अशीं उत्कृष्ट मतें ज्यांचीं आज वीस पंचवीस वर्षें कायम बनून गेलीं त्यांस त्यांचें अकस्मात् झालेले खंडन कसें पाहवेल ! मेकाले, मिल्ल, अशा जगद्विख्यात ग्रंथकारावरहि जो 'आपली क्षुद्र लेखणी उचलतो' तो महा मूर्ख कसा नव्हे ! इंग्रेज लोकांनीं त्यांच्या देशावर जन्मोजन्मींहि न फिटणारे जे असंख्य उपकार करून ठेवले आहेत ते न जाणतां जो प्रत्येक इंग्रजास प्रतिख्रिस्त मानीत नाहीं; ख्रिस्ती धर्म खरा, हिंदु धर्म खोटा अशी ज्याची अजून खात्री झाली नाहीं; पाठीवर घाव घेऊन तकट पळालेला इंग्रजी सोजरहि आमच्या बाजीरावापेक्षां, रणजितसिंगापेक्षां शतपट अधिक शूर असें ज्यास भासत नाहीं; ज्याची पूर्वजप्रीति इंग्रेजी ज्ञानानें नष्ट होत नाहीं; महाराणीचे ठायींच्या राजनिष्ठेचा आणि आपल्या देशच्या शूरांच्या वर्णनाचा केवढा जबरदस्त विरोध आहे तो ज्यास दिसत नाहीं;—तो केवढा नष्ट, केवढा कृतघ्न तरी ! ! असो; एकंदरींत 'ज्ञानोदय' प्रभृति आमच्या प्रतिपक्ष्यांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, जेव्हां 'सेरीज् ऑफ् लेसन्स' 'मरेज इंडिया' हीं पुस्तकें ह्मणजे इंग्रेजी विद्येचें शिखर होतीं; म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरली ह्मणजे त्या उतरणारास आज मी काय ब्रह्मदेवच झालों असें वाटावें; रस्त्यानें जाणाऱ्या एखाद्या सोजरासहि बडासाहेब समजून लोक कौतुकानें त्यास पहाण्यास धांवत; दयाळू इंग्रेज सरकार ह्मणजे रयतेचे केवळ मायबाप,—नागपूरवाल्यास, लखनौवाल्यास लॉर्ड डालहौसी साहेबांनीं जें नागविलें तें केवळ आमच्या हितार्थ करितां,—परवां मेजवान्यांवर जो कोणाच्या कधीं स्वप्नींहि न आलेला कर आमच्या सरकारानें बसाविला होता तो आह्मांस मितभोजी, मितव्ययी करण्याकरितां,—आह्मांस शहाणे करून व आमच्या देशाचें आधिपत्य देऊन इंग्रेज लोक आह्मांस सरते शेवटीं रामराम करून परत निजधामास जाणार; अशी बोडल्यानें दूध पिण्याची स्थिति मागेंच निघून गेली ! त्या काळांत व सध्यांच्यांत विद्येच्या, धर्माच्या, सरकाराच्या वगैरेसंबंधानें पुष्कळच फेरफार झाला आहे. तेव्हां जेथें म्याट्रिक्युलेशन होती तेथें सध्यां बी. ए. ची परीक्षा झाली आहे; त्या वेळेस जीं अत्युत्कृष्ट ह्मणून पत्रें चालत असत तितपत आतां अगदीं सामान्य प्रतीचीं चालतात; त्या वेळेस जे ज्ञानकिरण शिखराशिखरांवर असत ते

आतां अगदीं पायथ्यापर्यंत पोंचले आहेत. धर्माच्या संबंधानें तरी तसेंच. त्या वेळेसहि इंग्रेजी ज्ञानानें हिंदुधर्मास हळु हळु धक्का पोंचूं लागला होता खरा; पण मिशनरी लोकांच्या इच्छेप्रमाणें ख्रिस्ती धर्मास त्या धक्क्याच्या योगानें बळकटी आली असें मात्र घडलें नाहीं. जी बुद्धीची प्रखरता हिंदु धर्मास अपायकारक झाली तीच ख्रिस्ती धर्मासहि तितकीच झाली. उघडच आहे. तुकाराम देहासकट वैकुंठास गेला ही गोष्ट खोटी ठरवून जर तोच मिशनरी ख्रिस्ताविषयीं तीच गोष्ट सांगूं लागला, तर कोण ऐकेल ! शेषाच्या मस्तकावर पृथ्वी आहे हें धडधडीत खोटें आहे ह्मणून ज्यानें टाकून दिलें तो किड्यांनीं खाऊन टाकलेलें शरीर पुनरुत्थानाच्या दिवशीं पुनः उठेल हें कसें खरें मानील ! असो; सरकारच्या संबंधानेंहि लोकांच्या समजुतींत किती फेर पडला आहे तो सर्वांस माहीत आहेच. तर याप्रमाणें गेल्या वीस पंचवीस वर्षांत जें स्थित्यंतर झालें आहे तें आमच्या आक्षेपकांनीं पूर्णपणें लक्षांत आणावें. मेकॉले, मिल्ल वगैरेच्या तोंडून जें जें निघेल तें ब्रह्मवाक्य, बैबल ह्मणजे सर्व जगास शिरसावंद्य, इंग्रेज लोक ह्मणजे सारे देवाचे अवतार, मिशनरी ह्मणजे केवळ ज्ञानसागर व सत्यमूर्ति, इत्यादि भावना जर आमच्या लोकांच्या मनांत पूर्ण बिंबवायाच्या होत्या तर त्यास एक मात्र खासा उपाय होता. तो अर्थात्च लोकशिक्षणाची बंदी. लोकांस जर पूर्वीप्रमाणें अज्ञान ठेवले असते, किंवा 'सेरीज् ऑफ लेसन्स' येथवरच त्यांची गति असें जर केलें असतें, तर ख्रिस्ती धर्मावर ज्यांचा पूर्ण निर्धार, महाराणी साहेबांचे ठायीं ज्यांची अपार राजनिष्ठा, आणि सगळ्या इंग्रेजी ग्रंथकारांचे पुरे निःसीम भक्त, अशा आमच्या 'ज्ञानोदय' महाराजांचा क्रोधाग्नि एवढा भडकला नसता ! पण आतां काय ? मसलत पहिल्यानेंच चुकली ती चुकली ![1]

असो; हा मजकूर आमच्या पूर्वसंकल्पापेक्षां पुष्कळ वाढला. पण आमच्या पुस्तकाचे खरे उद्देश आमच्या वाचकांस पुनः एकवार कळवावे, व त्यांविषयीं भलभलते ग्रह जे कित्येकांचे झाले आहेत ते काढण्याचा यत्न करावा, या हेतूनें एवढा विस्तार करावा लागला. आतां सरते शेवटीं पुनः थोडक्यांत एकंदर सारांश सांगतों

१. हा अनर्थ चाळीस वर्षांपूर्वीच मेकॉलेसारख्यांच्या मनांत येऊन चुकला. वरील थोर साहेबानें 'हिंदुस्थानची राज्यरीति' या विषयावर जें पार्लमेंटांत भाषण केलें त्यांत ह्मटलें—

"Are we to keep the people of India ignorant in order that we may keep them submissive ? Or do we thnk that we can give them knowledge without awakening ambition? Or do we mean to awake ambition and to provide it with no legitimate vent ? Who will answer any of these questions in the affirmative?—

कीं, इंग्रेज सरकारानें आमचें हित किती केलें आहे; त्या लोकांची विद्वत्ता, नीति, थोरपणा, सौजन्य हें केवढें आहे; मेकालेसारख्या महाविख्यात ग्रंथकारांचे एकंदर जगावर व विशेषतः आमच्या देशावर केवढें उपकार आहेत; वगैरे सर्व आह्मी पूर्णपणें जाणीत आहों. फार तर काय, पण ख्रिस्ती धर्मांत, तद्धर्मी लोकांत, व त्यांच्या पुस्तकांत ज्या कित्येक चांगल्या गोष्टी आहेत त्यांसहि आह्मी मनापासून मान देतों. व अशाविषयींचे उल्लेख आमच्या पुस्तकांत जागोजाग सांपडतील. पण इंग्रेज सरकार शहाणें ह्मणून पूर्वीचें सर्व प्रकारें बेडगळ; इंग्रेज लोक विद्वान्, शूर, सुशील ह्मणून आमचे लोक मूर्ख, भित्रे, व दुःशील; इंग्रेजांची कविता, शास्त्रें, कला वगैरे उत्कृष्ट, ह्मणून आमचीं सर्व अर्थात्च त्याच्या उलट; ख्रिस्ती धर्मांत कांहीं चांगल्या गोष्टी आहेत ह्मणून आमचा अत्यंत नीच; हल्लींच्या सरकारानें पुष्कळ चांगल्या गोष्टी केल्या आहेत ह्मणून तें जें जें करील तें वंद्यच; मेकाले वगैरे ग्रंथकारांची विद्वत्ता मोठी, ह्मणून त्यांचे ग्रंथ सर्वथा निर्दोष; असें मात्र आह्मी कधी कबूल करणार नाहीं. आणि ज्याला लेशमात्र ह्मणून ज्ञान आहे तोहि कधीं करणार नाहीं. या जगांत पूर्णावस्थेस पावलेलें कांहींच नाहीं, सर्वांत कांहींना कांहीं तरी दोष आहेतच यास्तव केवळ स्तुति किंवा केवळ निंदा हीं कशासच शोभत नाहींत. इंग्रेज जसे देव नव्हेत, तसेच आह्मीहि पशु किंवा राक्षस नाहीं. दोघांतहि गुणदोष आहेतच आहेत; आणि त्यांविषयीं वाटाघाट करण्याचा अधिकार इंग्रेज ग्रंथकारांस जसा आहे तसाच तो आह्मांसहि पण आहे. तो चालवणें ही आमच्या 'ज्ञानोदय' कर्त्यांच्या मतें कृतघ्नता व राजद्रोहबुद्धि होय; पण आह्मांस तसें वाटत नाहीं. आह्मांस तर असें वाटतें कीं, आमचे खेरे गुण व इंग्रेजांचे खरे दोष प्रकट केले असतां ते आमच्या रेवरेंड बंधूंस व इतर हेकटखोर लोकांस न आवडोत, पण ज्यांस सत्यप्रीति आहे अशा कित्येक थोर इंग्रेजांस ते फार पसंत पडतील; व द्रोणाचार्यानें अर्जुनाचे प्रणामबाण (येथें आमच्या पाद्री बंधूंची क्षमाच मागितली पाहिजे !) जसे प्रेमानें ग्रहण केले, तसेच आमचे बाग्बाणहि त्यांस फार प्रेमळ लागतील अशी आमची खात्री आहे ! तसेंच प्रस्तुत सरकारच्या राज्यरीतींतील दोष आह्मी दाखवून दिले असतां तें रागावेल याची शंकाच नको; तें इतकें मूर्ख आहेसें आमच्या ख्रिस्ती बंधूंच्या महावचनप्रामाण्यावरूनहि आमचें मन घेत नाहीं. एवढ्या तेवढ्या लेखांवरून तें रागावत नाहीं हें तर काय, पण रयतेचीं गाऱ्हाणीं व शिव्या आपणास ऐकण्याबकरतांच खुद्द एका स्वतंत्र कामगाराची नेमणूक आहे. हें नीट न समजून आमच्या बंधूनें आह्मांस बागुलबोवा दाखविण्याची जी नवीनच शक्कल काढली आहे तिचें आह्मांस फार हसूं येतें. असो; तर एकंदरींत निःपक्षपातपणानें खरा जो मजकूर आह्मांस वाटेल तो आह्मी अवश्य लिहिणार; मग तो कोणास आवडो; कोणास न आवडो ! 'खऱ्यास मरण नाहीं' हीं

आमच्या भाषेंतील उत्कृष्ट ह्मण आह्मांस सर्वथैव मान्य होय !

लोकभ्रम.

—०—

सांगों जाणती शकुन भूत भविष्य वर्तमान ।
त्यांचा आह्मांसि कंटाळा पाहों नावडती डोळां ॥

तुकाराम.

अंक १३.—(१) विषयोपक्षेप. (२) भुतेंखेतें. (३) त्यांविषयीं लोकांच्या कल्पना. (४) त्यांचें अस्तित्व. (५) अंधार व ओसाड जागा यांची आवड. (६) दुसरे प्रत्यय.

१. या निबंधांत आपल्या लोकांत आज फार दिवसांपासून जीं कित्येक खुळें माजलीं आहेत त्यांविषयीं लिहावयाचें आहे. हीं खुळें ह्मणजे भुतेंखेतें, शकुन, मंत्र ग्रहांचे शुभाशुभ योग, दैव, नवस, किमया, रमल इत्यादि होत. यांवर बहुतेक लोकांचा विश्वास असल्यामुळें लबाडांस फावून लोकांचें फार नुकसान होतें. एक तर हे सर्व निवळ भ्रांतीचे प्रकार असल्यामुळें हे मनास जडले असतां त्यास क्षीणत्व येतें. शिवाय काळाचा, श्रमाचा व पैशाचा विनाकारण खर्च होतो. असो, तर या विषयीं आतां क्रमाक्रमानें विचार करूं.

२. पहिल्यानें भुतेंखेतें. अगदीं प्राचीन काळापासून मनुष्यमात्राचा असा एक समज होऊन गेला आहे कीं, मनुष्याचे मरणसमयीं त्याचे दोन भाग जे चित् आणि जड, ह्मणजे आत्मा आणि शरीर, यांचा जो वियोग होतो तो झाल्यानंतरहि ज्या ठिकाणीं मेलेल्या माणसाची आशा गुंतून राहिली असते तेथें त्याचा आत्मा पिशाच-रूपानें भ्रमण करतो. हा समज मनुष्यमात्राच्या मनास बहुधा खिळून गेला आहे; इतका कीं, ज्यानें अशा प्रकारच्या कांहीं तरी गोष्टी ऐकल्या नाहींत असा सांच्या पृथ्वीवर एकहि मनुष्य सांपडायाचा नाहीं. आडिसननें[1] एके ठिकाणीं मौजेनें झटलें आहे, कीं 'ज्यांत भूत नाहीं असें इंग्लंडांत एकहि गांव किंवा खेडें नाहीं;' हेंच त्याचें ह्मणणें पृथ्वीवरील एकंदर शहरांस, गांवांस, व खेड्यांसहि लागेल. आमच्याच दे-शांत भुतें, समंध, ब्रह्मसमंध, हाडळी, डाकिणी, मुंजे, पैशाच्या डबोल्यांवर बसलेले रक्षक नाग, यांविषयीं लोकांनीं सांगितलेल्या गोष्टी कोणीं ऐकल्या नाहींत ? तसेंच अमुक अमुक वाड्यांत समंध आहे, तो कोणास आंत नांदूं देत नाहीं, अशा प्रका-रच्या लोकवार्तांवरून ओसाड पडलेलीं ठिकाणेंहि कोणास माहीत नाहींत ? पण पिशा-चादिकांचा मुख्य आखाडा ह्मणजे ह्मणजे मसणवटींत तेथें त्यांच्या क्रीडा, चेष्टा,

१. आडिसनच्या 'स्पेक्टेटर'मध्यें प्रकृत विषयावर एक शानदार निबंध आहे तो आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच.

वेताळाची स्वारी[1] वगैरे सर्व यथास्थित दृष्टीस पडायाचें! भवभूतीच्या 'मालतीमाधव' नाटकाच्या पांचव्या अंकाच्या आरंभीं हा सर्व प्रकार फार उत्कृष्ट रीतीनें वर्णिलेला आहे. तो आमच्या असंस्कृतज्ञ वाचकांसहि त्या नाटकाच्या मराठी भाषांतरांत वाचतां येईल. असो; तर स्मशान हें पिशाचादिकांचें मुख्य वसतिस्थान. याचें कारणहि उघडच आहे, कीं सारीं प्रेतकर्में तेथेंच होत असल्यामुळें त्या स्थळाच्या दर्शनानें किंवा स्मरणानें दुसरी कल्पना मनांत येतच नाहीं. यास्तवच कोणास भुतें दाखवावयाचीं असतां देवरुखे, बीरमंत्री वगैरे लुच्चे लोक भोळ्या लोकांस तेथेंच नेऊन फसवतात. भुतें दिवसां दिसावयाचीं नाहींत, तीं रात्रीं मात्र दिसायाचीं; त्यांतून काळोख्या रात्रीं, विशेषतः अवसेस; हे समज लोकांचे आयतेच ठरले असल्यामुळें त्यांच्या पथ्यावर फार पडतात. कां कीं, काळोख्या रात्रीं, अंधारांत भुतें दाखविण्याची तयारी त्यांस सर्व अगोदर कोणास न कळतां करतां येते. ती तयारी झटली झणजे अर्थात्च जिवंत आशाळभूत भूतें तेथें अगोदर नेऊन ठेवून त्यांच्याकडून खऱ्या भुतांच्या सर्व चेष्टा करून दाखवायाच्या. त्यांतून तो भूतवाला पहाणारास दूर उभें करून ताकीद देत असतो कीं, पहा, जर जवळ जाल तर भूत गचांडी धरील! याप्रमाणें त्यांचे सर्व कावे अगोदरपासून बनवलेले असतात. पण त्यांतूनहि जर तसाच कोणी वस्ताद भेटला, तर वेळेनसार त्यांची फजीतीहि होते. असो; याप्रमाणेंच कोणास मंत्रसाधन करून घेणें असतां तेंहि स्मशानावांचून होत नाहीं.[2] कोणी नादिष्ट लोक गारुड्याच्या मागें लागले असतां तो त्यांस मध्यानरात्रीं मसणवटींत फिरवतो, आणि पुरलेल्या व जाळलेल्या माणसांच्या कंवट्या हाडें वगैरे जमा करण्याचा नादीं लावून त्यांस वरचेवर भूलथापा देत असतो. शेवटीं यांपासून आतां जास्त कांहीं

---

१. हा प्रकाश मसणवटींत, रानांतील दलदलींत वगैरे दिसतो. याचें कारण अजून बरोबर समजलें नाहीं. प्राण्यांचीं शरीरें व वनस्पति हीं कुजत पडलीं असतां त्यांतून निघणारा एखादा ज्वालाग्राही वायु (ग्यास) हा असावा असें झणतात. याची मौज अशी सांगतात कीं, यांत पुष्कळ ज्योति हवेंत तरंगताहेतशा दिसून त्यांच्या जवळ जसजसें जावें तसतशा त्या दूर दूर जातात. हा प्रकार मनुष्य चालूं लागला असतां मध्यरात्रीच्या निश्चळ हवेंत त्याच्या चालण्यानें ज्या लाटा होतात त्यांच्या योगानें होतो. याचें ल्याटिन नांव 'इग्निस फ्याटयूइ' (फसवणारा प्रकाश) असें आहे. इंग्रेजींतील तर मराठींतल्यासारखींच आहेत—'विल आफ् दि विस्प्,' 'जाक् विथ् दि लांटर्न्' (कोलित किंवा कंदील घेतलेला बोवा)!

२. भर्तृहरीनें लिहिलें आहे—

'मंत्राराधनतत्परेण मनसा नीताः इमशाने निशाः'

(मंत्राराधन करण्याच्या हेतूनें रात्रीं मसणवटींत हिंडलों)

यावरून स्पष्ट दिसतें कीं, जगांतील सर्व प्रकारचे अनुभव घेऊन हा कवि चुकला होता!

लभ्य नाहीं असें पाहून एकादे दिवशीं निसटून जातो ह्मणजे झालें. असो; तर या-सारख्या अनेक प्रकारांनीं 'दुनिया झुकती है' या ह्मणीप्रमाणें भोळ्या लोकांवर लबाडांचा चरितार्थ चालत आहे.

३. आतां भूतांविषयीं वगैरे लोकांच्या ज्या अनेक कल्पना आहेत त्यांतील तथ्य पाहूं. पहिल्यानें त्यांचें अस्तित्व, ह्मणजे तीं आहेत कीं नाहींत याविषयीं.

४. कोणत्याहि गोष्टीच्या खरेपणाविषयीं खात्री होण्यास तीन प्रकार लागतात. एक तिची स्वतःची संभाव्यता; दुसरें प्रत्यक्ष प्रमाण, तिसरें विश्वासपात्र मनुष्याचें भाषण किंवा लेख. आतां भुतेखेतें दृष्टीस पडणें हें संभवतें कीं नाहीं याचा अगोदर विचार करूं. भूत ह्मणजे काय याची जर कल्पना मनांत आणली तर ती अर्थात् हीच कीं, शरीरास सोडून गेलेला आत्मा. तेव्हां भूत ह्मणजे तो आत्मा होय; इंद्रियगोचर जें जड शरीर तें नव्हे हें अर्थातच झालें. मरणसमयीं जें नष्ट झालें तें तो आत्मा होय; जड शरीर हें पहिल्यासारखें कायमचें कायमच असतें; त्याची मरणोत्तर काय व्यवस्था होते ती तर सर्वांस दिसतेच. तर मग या दहन पावलेल्या किंवा पुरून टाकलेल्या शरीरासहवर्तमान तो नष्ट झालेला आत्मा पुनः दिसावा हे कसें घडेल ! जो मनुष्य ह्मणतो कीं मीं आपल्या मित्रास किंवा कोणा मनुष्यास भूत झालेला पाहिला वगैरे, त्यानें जर यत्किंचित् विचार केला तर त्यास कळून येईल कीं, जें शरीर त्यानें प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं जाळलेलें किंवा पुरलेलें वगैरे पाहिलें तेंच पुनः दृष्टिगोचर कसें होईल ? पण कोणी कदाचित् ह्मणतील कीं, तेंच शरीर जरी दृष्टीस न पडलें, तरी त्यासारखें शरीर धारण करण्याचें पिशाचांचे अंगीं सामर्थ्य असेल. अशा शंकेवर उत्तर देणें कठिण आहे खरें; कारण या पंचेंद्रियविषयक सृष्टीखेरीज दुसऱ्या सृष्टीचें आपणास बिलकूल ज्ञान नाहीं; तसेंच यमपुरींतील, प्लूटोच्या नगरांतील, किंवा पर्गेटरींतील व्यवस्थाहि इहलोकीं कळण्याचा बिलकूल मार्ग नाहीं ! असो; तर भूतांच्या अस्तित्वाच्या संभाव्यतेविषयीं हा विचार झाला. आतां दुसरें प्रत्यक्ष प्रमाण प्रस्तुत वादास किती उपयोगी पडतें तें पाहूं. हें प्रमाणहि येथें कोतेंच पडतें. आमचा स्वतःचा अनुभव जर कोणी विचारील, तरी आह्मी असें स्पष्ट सांगूं कीं, सृष्टींतील अद्भुत चमत्कार पहाण्याची जशी मनुष्यमात्रास जाल्याच हौस असते व असावी, त्याप्रमाणेंच आह्मांसहि या गोष्टीची अतोनात हौस आहे; व जर कोणी या गोष्टीविषयीं आमची पक्की खात्री करून देईल तर ती करून घेण्याची आमची फार खुषी आहे.[1] फार तर काय, पण जगांतील सर्व विद्वान्

१. वरील मजकूर केवळ ऐकिवावरून आह्मी लिहित नाहीं हें आमच्या वाचकांस कळविण्याकरतां स्वतःस घडलेला एक वृत्तांत येथें सांगतों. पुण्यांतील एका प्रसिद्ध गृहस्थाकडे

(पुढें चालू.)

शोधक लोकांची आह्मी बिनधोक हमी भरतों कीं, कितीहि अक्राळ विक्राळ भूतांची, ब्रह्मसमंधांची, मुंजेबुवांची, किंवा वेताळ महाराजांची स्वारी प्रत्यक्ष दाखविण्याची जर कोणामध्यें शक्ति असेल, तर सूर्यग्रहणाला, गेल्या शुक्रयुतीला, गर्दी झाली नाहीं अशी देशोदेशच्या लक्षावधि लोकांची वरील चमत्कार पहाण्यास हवी तेथें जमेल ! शिवाय बीरमंत्राची एवढी भट्टी ज्यास साधली त्यास पिशाचादिकांचा राजा कुबेर यापासूनहि प्रत्यक्ष मिळणारी नव्हे अशी संपत्ति त्यास देशोदेशचे लोक देतील. हवा तर खुद्द महाराणीच्या शिक्याचा भूतांबद्दल, समंधाबद्दल त्या महाभाग्यवान् मनुष्यास पेटंटचा चांदहि मिळेल ! असो; पण भुतें नाहींत याचें हेंच एक मोठें साक्षात् प्रमाण आहे कीं, अशी गोष्ट आजपर्यंत कधीं झालीं नाहीं ! समजा कीं एखाद्यास पिशाच अनुकूल असून हवे ते चमत्कार त्यास करतां येत आहेत, तर तो त्या मौजेवर लोकांपासून हवा तितका पैसा काढणार नाहीं काय ? जो आपल्या जवळच्या पिशाचास आज्ञा करून हलवायाच्या घरची पेढेबरफी आणवतो, त्यासच आपली पोतडी बगलेस मारून आपल्या भिकार खोपटांत गेल्यावर ओल्याकोरड्या भाकरीचीहि कां बरें पंचाईत पडावी ? तसेंच ज्याच्या लहान कांडीचा असा पराक्रम कीं ती हातावरून फिरविली असतां मुठींतील पैशाचा खाडदिशीं रुपया होतो तीच कांडी त्याच्या बिऱ्हाडीं कां स्वस्थ पडून रहाते ! एखाद्या मनुष्यास जर परीस सांपडला तर त्याचें सामर्थ्य दारोदार दाखवून त्यावर पैसा दोन पैसे मिळवण्यास त्यास हिंडावें लागेल काय ? असो; तर पिशाच कोणाच्या स्वाधीन असणें हें मुळींच संभवत नाहीं. व म्हणूनच तीं दृष्टीस पाडविण्याचें कोणामध्यें सामर्थ्य आहे हीहि गोष्ट संभवदुक्तिक ह्मणतां येत नाहीं. आतां तिसरें प्रमाण भाषण किंवा लेख. यांत पहिल्या भाषणाविषयीं जर पाहिलें तर त्यांत पहिल्यानें हा चमत्कार आढळेल कीं, जो अशा गोष्टी सांगतो त्यास जर विचारलें कीं तुह्मीं ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिली काय ? तर

एक भूतवाला येऊन त्यानें मी भुतें दाखवतों अशी प्रतिज्ञा भोगली. कोठें ह्मणून विचारतां त्यानें खंडोबाचा माळ सांगितला. तेव्हां दोन तीन गाड्या करून आमची एकंदर दहा पंधरा मंडळी भूतांच्या दर्शनार्थ तेथें डेक्कन कालेजापाशीं दाखल झाली. ती रात्र गतवर्षांच्या मार्गशीर्ष महिन्याची पौर्णिमा होती. आकाश निरभ्र असून चांदणें (त्या भूतवाल्याची चांगली फजितीच करण्याकरितां कीं काय, कोण जाणे !) फार नामी पडलें होतें. पण तेथें जाऊन पहातों तों काय आहे ? भुतें तर नाहींतच; पण भुतांचीच खोड काढण्यासारखे आमच्या कालेजांतील विद्यार्थी ती बातमी समजून बाहेर इकडे तिकडे फिरत होते. ते मात्र रात्रीं वाट चुकलेल्या एखाद्या मनुष्यास त्या ओसाड ठिकाणीं पिशाचवत् भासते खरे ! असो; मग त्या मंत्रीबोवांनीं जेव्हां पाहिलें, कीं आतां तर दहा बाराची पन्नाससाठ मंडळी झाली- तेव्हां मग कांहीं वेड्यावांकड्या सबबी सांगून त्यांनीं आपल्या लपविलल्या सोंगाड्यासहवर्तमान निसटता पाय घेतला !

'पाहिली' असें उत्तर न येतां नेहमीं 'ऐकिलें' असेंच येईल ! तसेंच जो मनुष्य खोटें बोलणारा नव्हे त्याच्याहि तोंडून मीं अमुक अमुक वेळीं अमुक अमुक ठिकाणून जात असतां पिंपळावर मुंजा, चिंचेवर जखीण[1] किंवा वडावर वेताळ पाहिला असेंहि कधीं येणार नाहीं. पण जे वरच्या प्रकारचे मनुष्य नव्हेत, तर निवळ खोट्या गोष्टीहि जे केवळ मौजेखातर बनवून सांगत असतात किंवा अशा भीति उत्पन्न करणाऱ्या गोष्टी सांगून ज्यांस कांहीं स्वार्थ साधायाचा असतो, अशा लोकांच्याच तोंडून वरील गोष्टी बहुधा ऐकूं येतात; व त्यांस सत्याची पर्वा बिलकूल नसल्यामुळें शपथा आणा घेऊनहि वरील खोटा बनावट मजकूर सांगतांना ते तिळमात्रहि कांकूं करीत नाहींत. तर या तिन्ही गोष्टींचा नीट विचार करतांहि भूतांच्या अस्तित्वाचा मोठाच संशय येतो. आतां शेवटीं एक मात्र मुद्दा राहिला–लेख. याचाहि निकाल पाडण्यास फार पंचाईत नको. कां कीं कोणी प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारानें मीं प्रत्यक्ष असा असा भूतांचा चमत्कार पाहिला असें लिहून ठेवलेलें आढळत नाहीं. निदान अलीकडे तरी असा चमत्कार दृष्टीस पडण्यासारखा असता तर तो कधींहि गुप्त रहाताना ! सोसायटी-(मंडळी)-चीं पुस्तकें, मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें यांतून कोठें कोनाकोपऱ्यांत जरी अशी गोष्ट घडली तरी ती सर्वांस जाहीर झाल्याखेरीज कधीं राहायाची नाहीं. पण भूतें जशीं दिवसास भितात त्याप्रमाणेंच वरील प्रसिद्धीच्या साधनांसहि भिऊन, इसापनीतींतील उंदरांनीं जसा बेत केला होता कीं कोणीहि फळीखालीं उतरूं नये त्याप्रमाणेंच इतःपर कोणी कोठेंहि डूंकांचूं सुद्धां करूं नये असें जर सर्वांनीं कौन्सल भरून ठरविलें असेल तर मात्र न कळे ! असो; तर याप्रमाणें वरील तिन्ही प्रमाणांवरून पहातां भूतांच्या विरुद्धच निकाल होईल.

५. याप्रमाणें पिशाच्यांच्या अस्तित्वाविषयीं वस्तुदृष्ट्या विचार झाला. आतां त्याविषयीं लोकांच्या मनांत जे कित्येक समज आहेत, कीं ज्यांवरून भूतसृष्टीच्या अस्तित्वाचें ते प्रमाण धरतात-त्यांत कितपत समंजसपणा आहे तो पाहूं. पहिला मोठा समज हा कीं, भूतें अंधारांत मात्र दृष्टीस पडायाचीं. शेक्सपीयरच्या 'ह्याम्लेट' नामक प्रसिद्ध नाटकांत आरंभीं जे भूत दिसल्याचे एक दोन उत्कृष्ट प्रवेश आहेत त्यांत त्या कवीनें हीच सर्व लोकांची कल्पना तेथें दर्शविली आहे. त्या राजपुत्राचा भूत झालेला बाप मध्यरात्र उलटून गेल्यानंतर पहारा करणाऱ्या संत्र्यास व त्यास दिसे, व कोंबड्याचा शब्द कानीं पडतांच उचकून 'हवेंतल्या

१ हा शब्द 'यक्षिणी' शब्दाचा अपभ्रंश आहे. वरील मराठी शब्दांत अक्षरावरोबर अर्थाचाहि अपभ्रंशच झालासें दिसतें. 'मेघदुतां' तील नायिकेस 'जखीण' कोण म्हणेल !– 'तो जखम झातारा झाला आहे' या वाक्यांत 'यक्ष' शब्दाचा तसाच दुहेरी अपभ्रंश दृष्टीस पडतो.

हवेंत दिसेनासा होई !' असो; आतां या कल्पनेचें जर तथ्य पाहिलें तर काय निघेल ? भूत जर मनुष्यास अदृश्य आहे व हवें तेवढें रूप त्यास घेतां येतें, तर मग उजेडांतहि येण्यास त्यास कां शंका वाटावी ? जें मुळींच अदृश्य त्यास अंधार काय आणि उजेड काय! तसेंच सात ताड ज्यास उंच होतां येतें त्यास यःकश्चित् मनुष्याच्या बळाची काय पर्वा ! शिवाय लोकांची भूतांविषयीं अशी कल्पना आहे कीं, ज्याची आशा मागें राहिली, किंवा ज्यास दावेदाराचा सूड जिवंतपणीं उगवतां आला नाहीं, तो भूत होऊन आपल्या वैऱ्यास छळतो. आतां ही दुसरी कल्पना जर खरी आहे, तर त्या भूताला आपल्या दावेदाराचा सूड घेण्यास किती उत्कृष्ट सोय झाली बरें ! स्वतः अदृश्य, हवें तितकें बळ, हवें तेथें हव्या तेवढ्या त्वरेनें जाण्याची मोकळीक, हवें तें करण्याचें सामर्थ्य; इतकी सामग्री असल्याबर मग त्या वैऱ्याच्या घरादाराचें वाटोळें करून त्याचें निसंतान सुद्धां त्यास क्षणार्धांत करतां येईल. मग असें आजपर्यंत कोठेंहि झाल्याचें बिलकुल ऐकूं येत नाहीं असें कां बरें असावें ? भूतांस समंधांसहि हायकोर्टाचा तर धाक वाटत नसेलना ! काय असेल तें असो ! दुसरी कल्पना अशी कीं, तीं नेहमीं ओसाड जाग्यांतच दिसायाचीं. अशा जाग्यांत मात्र तीं आपला नेहमींचा क्रम मोडून एकट्या दुकट्या मनुष्यास कधीं मधीं दिवसासहि दिसतात. पण हें त्यांचें करणेंहि वरच्यासारखेंच विचित्र होय. मनुष्यास एवढें बुजण्याची त्यांस काय गरज आहे ? बरें, शिवाय ओसाड एकान्त प्रदेश व अंधार हीं जर त्यांस अत्यंत आवडतात, व अशा ठिकाणीं त्यांचा नेहमींचा वास असायाचाच असें जर असतें, तर आमच्या शिवाजीसारखे सेनापति, ज्यांचा सारा जन्म निर्जन अरण्यांतून व डोंगरांतून वगैरे रात्रींच्या रात्रीं फिरतां गेला, त्यांस कोठेंच भतांनीं भेवडावलें नाहीं, किंवा त्यांस अटकाव केला नाहीं, हें कसें झालें ? तेव्हां भूतांविषयींच्या वरील कल्पना केवळ व्यर्थ होत.

६. वरील गोष्टी सर्व विचारी मनुष्यांच्या सहज ध्यानांत येणार आहेत; व त्यांवरून एकंदरींत पहातां भूतांविषयींच्या चोहोंकडे ऐकूं येणाऱ्या गोष्टी सगळ्या निवळ गप्पा आहेत असाच सिद्धांत होतो. या म्हणण्यावर कोणी कदाचित् अशी शंका काढतील कीं, असेंच निखालस कसें एकदम म्हणावें ? जिकेड तिकेडे साऱ्या जगभर ज्या भूतांच्या गोष्टी ऐकूं येतात त्यांपैकीं पुष्कळ जरी लुचे किंवा भोळसर लोकांनीं सांगितलेल्या असल्या, तरी त्यांपैकीं कांहीं तरी खऱ्या झालेल्या असाव्या. उगाच आगीशिवाय कसा धूर निघेल ? हें म्हणणें सकृद्दर्शनीं बरेंच समंजस वाटतें, व कित्येक नामांकित ग्रंथकारांनीं असाच गुळमुळीत अभिप्राय देऊन ठेवला आहे.[1]

१ वर जो आडिसनचा भूतांविषयींचा निबंध सांगितला त्याचा एकंदर झोंक निरा-

(पुढें चालू.)

पण अंमळ विचार केला असतां कळून येईल कीं, अशा ठिकाणीं सगळ्या जगाचा अभिप्राय कांहीं उपयोगीं पडायाचा नाहीं. 'पांचा मुखीं परमेश्वर' वगैरे ह्मणी अशा ठिकाणीं बिलकूल लागू पडत नाहींत. एखाद्या रत्नाची परीक्षा करणें असतां तीं जशीं लोकांचा मोठा जमाव जमवून त्यांच्या बहुमतानें ठरवणें केवळ अप्रयोजक होईल, त्याचप्रमाणें जेथें बुद्धीच्या सूक्ष्मत्वाचें काम लागतें तेथें सगळ्या जगाचें मत घेण्यांत कांहीं जीव नाहीं. पहिल्या उदाहरणांत रत्नपारख्याचें एकाचें मत जसें लक्षावधि मनुष्याच्या मतांहून ज्यास्त योग्यतेचें धरायाचें, त्याप्रमाणेंच दुसऱ्या उदाहरणांत तत्त्वविवेचकाचें मत साऱ्या जगाहून भारी असें समजावें. पृथ्वी फिरते कीं अचल आहे, अटलांटिक महासागराच्या पलीकडे भूमि आहे कीं नाहीं, या दोन्ही वादांत जसें सगळ्या दुनियेचें मत खोटें ठरून, व पोप महाराजांचेंहि आज्ञापत्र मधल्या मधेंच राहून, ग्यालिलियो व कोलंबस हेच शहाणे ठरले, त्याचप्रमाणें आजपर्यंत हर-एक गोष्टींत होत आहे. उघडच आहे; ज्याची दृष्टि शाबूत आहे अशा एकट्या मनुष्याचें पहाणें खरें, कीं शंभर आंधळे आहेत आणि पांच पन्नास डोळ्यांवर सारा आलेले लोक आहेत त्यांचें बहुमत खरें ! आतां हीच गोष्ट प्रस्तुतच्या वादास लावून पहा. लाखों लोक भूतांविषयीं अंधपरंपरेनें चालत आलेल्या गोष्टी सांगतात; कांहीं थोडे मात्र आह्मीं पाहिलीं ह्मणून सांगतात; पण हे लुच्चे भोळसर, किंवा वेडगळलेले अशा प्रकाराचे; पण वरील दोन्ही प्रकार ज्याचे नाहींत, ज्याचें मन नव्या आरशा-सारखें स्वच्छ, त्यास मात्र कोणताच अनुभव प्रत्यक्ष घडत नाहीं. तेव्हां अर्थात् नकाराकडेच त्याचा कल होतो. असो; तेव्हां पिशाचादिकांच्या गोष्टी साऱ्या जगभर जरी आहेत तरी यावरून कांहीं निष्पन्न होत नाहीं. कां कीं, मनुष्याच्या मनाचा हा धर्मच आहे कीं, डोळ्यास जसे नानाप्रकारचे आभास होतात त्याचप्रमाणें त्यासहि व्हावे. ह्मणजे डोळ्यास जसे सूर्यबिंबांचें संध्यासमयीं प्रसरण व आरक्तता, अरण्यां-तील मृगजल, वगैरे अनेक आभास होतात, त्याचप्रमाणें मनासहि होत असतें हे भ्रम विचारांच्या योगानें मनुष्यास जसजसें यथार्थ ज्ञान प्राप्त होतें तसतसे नाहींसे

लाच असून शेवटचा अभिप्राय मात्र अंमळ विचित्रच आहे. पण तो शेवटचा मजकूर त्या ग्रंथकारानें व्याजोक्तीनें लिहिला असावासें आह्मांस वाटतें. जॉन्सनच्या 'रासेलसां'त तर त्या ग्रंथकाराची नेहमींची समजूतच स्पष्ट लिहिली आहे. जॉनसन् आपणावरोबर कांहीं मंडळी घेऊन एका घरीं मध्यानरात्रीं भुताशीं बोलण्याकरितां गेला होता, व तो सर्व खेळ एका नऊ दहा वर्षांच्या लबाड पोरीचा होता हें पुढें उमगलें. ही गोष्ट त्याच्या चरित्रांत प्रसिद्ध आहे. या सर्वप्रसिद्ध वृत्तांताचें नांव 'कॉक् लेन घोस्ट' (कॉक् नांवाच्या गल्लींतील भूत') हें असून यावद्दल चर्चिल नामक विनोदी कवीनें जान्सनची खूप फजिती उड-विली होती.

होत जातात. पण हें जेव्हां नसतें तेव्हां वरील आभासांचा मनुष्याच्या मनावर पूर्ण अंमल चालू असतो; जसें लहानपणीं, मादक पदार्थांचें सेवन केलें असतां, ज्वर-सृष्टींत वगैरे वरील तिन्ही अवस्थांत मनुष्याला जे जे भास होत असतात ते सर्व खरेच वाटत असतात, ह्मणून त्यांतून सुटल्यावरहि पाहिलेल्या सर्व गोष्टी खऱ्याच असें कोणी तरी ह्मणेल काय ? तर याचप्रमाणें अज्ञानाच्या काळीं लोकांची एकंदर स्थिति असते. खरें खोटें निवडण्यापुरता त्या वेळेस लोकांच्या बुद्धीस पोक्तपणा आलेला नसतो, यास्तव निबंधारंभीं जे कित्येक भ्रम सांगितले आहेत ते सर्व त्याच्या ठायीं माजलेले आढळतात. व ते सर्वजनसाधारण असल्यामुळें मोठमोठ्या पंडितांच्या मनालाहि अंशतः लागून राहिलेले आढळतात. असो; तर ज्या अर्थीं भूतांविषयीं प्रमाण ह्मणजे अशाच भ्रांतींत बुचकळत राहिलेल्या लोकांचें धरायाचें, त्या अर्थीं अंशांची संख्या केवढीहि असली, किंवा कधीं कधीं मोठ्या नामांकित ग्रंथकारांचेहि तसेच समज झालेले असले, तरी तेवढ्यानेंच त्यांचीं मतें खरीं होतात असा अर्थ नाहीं.

७. असो; तर याप्रमाणें भूताखेतांविषयीं जो बारीक रीतीनें विचार करील त्याचा एकंदर कल आमच्यासारखाच होईल. तो असा कीं, प्रत्यक्ष प्रमाण ह्मणून त्यास बिलकुल मिळणार नाहीं; तसेंच ज्याच्या खरेपणावर त्याचा पूर्ण विश्वास आहे असाहि मनुष्य मीं भूत पाहिलें असें प्रतिज्ञेवर सांगणारा त्यास अगदीं सांपडणार नाहीं. शिवाय इतकेंहि न करतां प्रकृत विषयाविषयीं जो आपणाशींच वस्तुतः शोध करूं लागेल त्यासहि त्याचा शुष्कपणा पूर्ण कळून येईल, कीं या सर्व अज्ञान लोकांच्या भ्रांति असून पाहूं गेलें असतां त्यांत तथ्य हें मुळींच संभवत नाहीं. या असंभव्यतेचीं वर कित्येक प्रमाणें सांगितलींच, पण आतां सरतेशेवटीं आणखीहि कांहीं अधिक सांगतों. एक हें कीं, भूतें जर दिसतात, तर जीं आपणांस माहीत आहेत तेवढींच कां दिसावीं ? शंभर दोनशें वर्षांमागील एखादें भूत आतां कां दृष्टीस पडूं नये ? तसेंच मनुष्यांचींच तेवढीं भूतें कां व्हावीं ? देह सोडून गेलेला आत्मा ह्मणजे जर भूत तर पशुपक्ष्यादिकांचाहि[1] तसा प्रकार दृष्टीस पडावा; कां नये पडूं ? मग आ-

१. हें अर्थातच आमच्या धर्माच्या लोकांचेंच मत होय. ख्रिस्ती वगैरे लोकांस हें अर्थातच मान्य होणार नाहीं. आत्मा असा फक्त मनुष्यास मात्र आहे, व बाकीच्या कोणत्याहि प्राण्यास नाहीं हें त्यांच्या धर्मांतील एक मुख्य मत आहे. यावरच पुनर्जन्माचा अभाव व हिंसेची निर्दोषता तद्धर्मी लोक ठरवतात. असो; या मताच्या तथ्यत्वाचा येथें आह्मांस विचार करणें नाहीं. तरी वरील मतामारखेंच दुसरेंहि एक मत येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. महमदी धर्माप्रमाणें स्त्रियाहि आत्मशून्य होत ! आह्मांस तर असें वाटतें कीं, या मताचे प्रतिपादक मात्र तसे खरे !

मचा मेलेला घोडा किंवा कुतरा भूत होऊन खिंकाळतो किंवा भोंकतो असें कोणाच्या सांगण्यांत येत नाहीं हें कसें ! असो; तेव्हां यावरून उघडच दिसतें कीं, या सर्व ज्याच्या त्याच्या मनास भासणाऱ्या शुष्क भ्रांति आहेत. जें ज्या वेळेस मनांत फार भरलें असतें तें जसें स्वप्नांत क्षणभर प्रत्यक्ष दिसतें, किंवा अंमलाच्या गुंगींत जसा प्रकार होतो, तसाच कल्पनाशक्ति अनावर होऊन उच्छृंखल झाली असतां होतो. हा प्रकार मुलांत व अज्ञान लोकांतच काय तो दृष्टीस पडतो यांचेंहि कारण तेच. ज्याची विचारशक्ति कल्पनेहून प्रबळ झाली त्याच्या भूत बधीहि वाटे जाणार नाहीं ! आमच्या इकडच्या प्रांतांत भूतांविषयीं कोंकण फार प्रसिद्ध आहे, व यावरून 'कोंकणचीं भुतें' अशी म्हणहि पडली आहे. पण हींच भुतें शहरांत वगैरे कधीं दृष्टीस पडत नाहींत यांचें कारण काय ! शेंकडो साहेब लोक लोकवस्तीपासून दूर अशा बंगल्यांत किंवा तंबूंत निराळेच राहिलेले असतात, पण त्यांस कधींहि पिशाचानें पछाडलेलें ऐकण्यांत नाहीं. ते रानें तोडतात, डोंगर पोखरतात, पण कोणीहि त्यांच्या वाटे जात नाहीं. त्यांच्या उग्रस्वरूपापुढे भूतांचाहि थरकांपच होतो कीं काय कोण जाणे ! असो; तेव्हां एकंदरींत सर्व प्रकार निवळ भीतीचे आहेत. 'भितऱ्यापाठीं ब्रह्मराक्षस' या म्हणींत तरी हाच अर्थ सुचविला आहे; कीं भूतें, ब्रह्मराक्षस हे सर्व कल्पनेचे खेळ आहेत. सुविचाराचे योगानें ज्यानें तत्त्वशोध केला त्यास भूतपिशाचादिकांची शंकाहि मनांत यावयाची नाहीं, मग भीति तर कोठली ?[1]

१. भूतांविषयीं सुविचाराचे योगानें निर्भीत न होतां जो केवळ धट्टाइनें भुताशीं सामना करील त्याचीं खालीं लिहिल्याप्रमाणें फजीती होण्याचा संभव आहे. पुढील गोष्ट येथेंच घडलेली आह्मीं ऐकिली आहे. एका मित्रमंडळीचा अशा विषयावर वाद चालला असतां पैज पडली कीं, जो अवसेच्या दिवशीं मसणवटींत जाऊन तेथें खुंटी ठोकून येईल तो खरा धीट. त्याला सर्वांनीं अमुक अमुक रुपये द्यावे. असें बोलणें होतांच एकजण मी हें काम करतों असें म्हणून छातीस हात लावून तयार झाला. मग अवसेच्या दिवशीं मध्यानीच्या सुमारास सारी मंडळी येथील ओंकारेश्वराच्या देवळाशीं जाऊन बसली, व तो पैज मारणारा गडी एका हातांत लांकडाची मेख व दुसऱ्यांत ठोकावयास एक चांगला भक्कम धोंडा अशा सरंजामानें मसणवटीकडे निघाला. जात्या स्वारी धीटच होती, तेव्हां काळोखांतून बेधडक अर्ध्या वाळवंटापर्यंत गेली. नंतर तेथून आपल्या सोबत्यांस हाक मारून ओरडला, 'पहारे, येथें मेख ठोकतों !' ही फुशारकीची आरोळी त्याच्या मंडळीनें ऐकली; पण फार वेळ गेला नाहीं तोंच दुसरी निराळ्याच प्रकारची किंकाळी त्यांच्या कानीं आली—'मेलों रे मे—!' ती ऐकून त्याच्या सोबत्यांच्या उरांत धडाड झालें. मग कांहीं वेळानें ते सारे व दुसरी आणखी मंडळी असे कंदील घेऊन स्मशानांत उतरले. भीत भीत जाऊन जवळ जाऊन पहातात तों राजश्री निर्भीचित पडले आहेत ! मग त्यांस उठवूं लागले तेव्हां बोबडी वळल्याचें कारण उमगलें. काय ? तर मेख ठोकतांना आंगरखा सांवरून न बसल्यामुळें ती आंगरख्यावरोबरच

(पुढें चालू.)

असो; या खेपेस निबंधाच्या आरंभीं लोकभ्रमाचे जे अनेक प्रकार सांगितले त्यांपैकीं एकाचें विवेचन झालें. पुढल्यांचें क्रमाक्रमानें पुढील निबंधांत होत जाईल. अशा विषयांवर लोकांचीं मनें निर्भ्रांत करणें अगदीं अवश्य आहे. आतां यांवरून जुन्या पद्धतीच्या कित्येक लोकांच्या मनांत अशा कल्पना येण्याचा संभव आहे, कीं अशा विषयांवर उघडपणें आपले विचार प्रदर्शित केले असतां लोकांची धर्मावरील श्रद्धा कमी होऊन नास्तिकपणा वाढविलासा होईल. पण ही केवळ भ्रांति होय. वर जे लोकभ्रमाचे आह्मीं विषय काढले आहेत त्यांचा आणि धर्माचा बिलकूल संबंध नाहीं. उलटा त्यांचा धर्माशीं कांहीं अंशीं विरोधच आहे असें ह्मटलें पाहिजे. आजपर्यंत सर्व देशांत दोहोंचें ऐक्यच सर्व मानीत आले आहेत; पण आतां तसें कोणी मानीत नाहींत, फार तर काय, आमच्या महाराष्ट्रांतहि जे मोठे विख्यात साधु होऊन गेले त्यांनींहि तें सर्व निवळ थोतांड ह्मणून खुशाल ह्मटलें आहे. हेंच दाखविण्याकरतां निबंधारंभींचा चुटका तुकारामाच्या ग्रंथांतला घेतला असून आतां सरतेशेवटीं रामदासाचे प्रस्तुत विषयास उद्देशून लिहिलेले सर्वप्रसिद्ध अभंग येथें दाखल करतों–

वाजे पाऊल आपलें ह्मणे मागें कोण आलें ।
कोण धांवतसे आड पाहों जातां झालें झाड ।
भावीतसे अभ्यंतरीं कोण चाले बरोबरी ।
शब्दपडसाद ऊठला ह्मणे कोण रे बोलिला ।
रामीं रामदास ह्मणे संशयाचीं हीं लक्षणें ॥
कांहीं दिसे अकस्मात तेथें वाटे आलें भूत ।
वायां पडावे संदेहीं मुळीं तेथें कांहीं नाहीं ।
झाडझुडुप देखिलें जिवीं वाटे कोणी आलें ।
रामदास सांगे खुण भितो आपणा आपण ॥
छाया देखुनी आपली शंका अंतरीं वाटली ।
ऐसें भ्रमाचें लक्षण भुले आपणा आपण ।
मुखें बोलतां उत्तर तेथें झालें प्रत्युत्तर ।
डोळां घालितां आंगोळी एकाचीं तीं दोन झालीं ।

वाकूंत ठांकली गेली तेव्हां अर्थातच उठूं लागलेंच भूतानें पछाडल्याचा बोवांस भास झाला असो, पुढील वृत्तांत उघडच आहे. सर्वांनीं त्या भूतांच्या प्रतिमल्लास प्रेतभूमींतून प्रेतसंप्रदायाविरुद्ध माघारी उचलून आणून देवळांत ठेवलें. नंतर तोंडावर पाणीबिणी शिंपडल्यावर चार सहा घटकांनीं खबरी सावध झाली. याप्रमाणें पैजेपरी पैज बुडाली आणि मंडळींचें हसें मात्र झालें,—पण बरें तितक्यावरच गेलें, जिवावरच येऊन बेतली होती तो प्रसंग दैवयोगानें टळला !—तर वेडपणाची धट्टाई अशी एखाद्या वेळीं भोवते !

पोटीं आपण कल्पिलें तेंचि आलेंसें वाटलें ।
दास ह्मणे हे उपाधी शंका धरितां अधिक बाधी ।

ग्रहाणां चरितं स्वप्नोऽनिमित्तोत्पादकं तथा ।
फलंति काकतालीयं तेभ्यः प्राज्ञो न बिभ्यति ॥[1]
वेणीसंहार २.

अंक १४—(१) शकुन. (२) या भ्रमाचा प्रचार. (३) निरनिराळे प्रकार.—परदेशांतले. (४) आपल्या देशांतले. (५) शकुनांचा खरेपणा. (६) शंकेवर उत्तर. (७) या भ्रमापासून हानि. (८) परधर्मी लोकांचे अपशकुन. (९) आपल्यांतील प्रकार. (१०) शकुनांवर विद्वानांचा विश्वास. (११) शंकानिवारण; सारांश.

१. मागील अंकांत चालू विषयांपैकीं एक कलम झालें. आतां यांत दुसऱ्या एकाचा विचार करूं. हें कलम शकुन होय.

२. हा भ्रमाचा प्रकारहि मागल्याप्रमाणेंच सार्वत्रिक आहे. कोणत्याहि देशांत शकुनाचे निरनिराळे प्रकार नव्हतेसे नाहींत. युरोपांतील प्राचीन ज्ञानसंपन्न राष्ट्रें ग्रीक व रोमन लोक यांच्याहि इतिहासांत हें खूळ पुष्कळच दृष्टीस पडतें; व अद्यापहि त्या खंडांत अडाणी लोकांमध्यें भुतेंखेतें, ग्रहफलें, जादू वगैरेवर जसा विश्वास आहे तसाच शकुनांवरहि बहुधा असेलच. आमच्या देशांत तर हा प्रकार आजपर्यंत भरपूर चालत आला आहेच. असो; आतां हे सर्व प्रकार अनुक्रमानें सांगून नंतर त्यांत तथ्य असण्याचा संभव किती याविषयीं विवेचन करूं.

३. शकुन ह्मणजे पुढें घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टीचें सूचक. यावरून शकुन अर्थात् दोन प्रकारचे झाले; एक शुभ आणि दुसरा अशुभ. या दोहोंविषयीं निश्चित प्रमाण ह्मणून कांहींच नसल्यामुळें असें अर्थात्च होत असेल, कीं जें एका देशांत शुभ त्यासच दुसऱ्यांत अशुभ मानीत असतील, व अशुभास शुभ. शकुन पुष्कळ गोष्टींवरून मानतात. पक्ष्यांच्या शब्दांवरून व गतींवरून, कोणत्याहि आवाजावरून, पोरांच्या साहजिक बोलण्यावरून, नेत्रादि स्फुरण पावल्यावरून, वगैरे; तसेंच मांजर, चासपक्षी, कावळा, घुबड,[2] पिंगळे, कवडा,[3] इत्यादि प्राणीहि शुभाशुभसूचक मानले आहेत.

१. "ग्रहांचे योग, स्वप्न, आणि अपशकुन यांचें फळ कवळ काकतालीयन्यायानें दृष्टोत्पत्तीस येतें ! यात्तव जाणते पुरुष त्यांचा धाक मानीत नाहींत."

२. या पक्ष्याचें संस्कृत नांव 'कौशिक' असें मोठें पवित्र आहे. पण हल्लीं त्याचें मराठींतील नांव उच्चारण्यासंह लोक भितात. तसें करणें पाप मानून त्याबद्दल बोलणेंच झाल्यास 'दिवाभीत' हा त्या शब्दाचा पर्याय योजतात. या पक्ष्याचा शब्द अपशकुनी मानून लोक याविषयीं सेंहि सांगतात कीं, यास दगड मारिला असतां तो तें झेलतें, आणि उगाळीत बसतें; आणि त्या उगाळण्यानें तो दगड जसजसा झिजत जातो, तसतसें तें माणूसहि झिजत

(पुढें चालू).

ग्रहांचे योग तर चोहोंकडे शुभावह व अशुभावह मानलेले असून आमच्या देशांत तर त्यांवांचून कांहींहि चालत नाहीं. सैंपाकघरांत चुली घालण्यापासून तों मोठ्या मोहीमेस बाहेर पडण्यापर्यंत ग्रहांचें आनुकूल्य अगोदर करून घ्यावें लागतें. हा प्रकार ग्रीक व रोमन लोकांतहि पुष्कळ होता हें वर लिहिलेंच आहे. त्यांच्या इतिहासांत अशीं उदाहरणें सांपडतात. एकदां कोणत्या एका देवतेस रोम शहरीं यज्ञ चालला असतां पशूच्या शरीरांतलें काळीजच नाहींसें झालें. तें देवताक्षोभाचें दर्शन व अत्यंत अशुभ जाणून लोक फार भ्याले. दुसरे एके प्रसंगीं असें झालें कीं, देवाचीं कोंबड्याचीं पिलीं चारा खाईनात, तेव्हां त्यांचा रक्षक भयाभीत होऊन त्यानें सेनापतीस वरदी दिली कीं, हें मोठें अशुभ झालें आहे, तर या वेळेस शत्रूशीं लढाई करूं नये. तो सेनापति आपला असाच होता; त्यानें त्या अपशकुनाची मुळींच पर्वा न करतां त्या रक्षकाचीच उलटी निर्भर्त्सना केली, आणि त्या कोंबड्याच्या पोरांस उचलून समुद्रांत झुगारून दिलें, आणि ह्मणाला, "बरें चारा नको तर नको, पाणी कां पिईनात!"[1] या धर्म-**-पणाचें त्यास लवकरच प्रायःश्चित्त भोगावें लागलें. कार्थेजिनियन लोकांनीं त्याचा समुद्रावर अगदीं पराभव करून टाकला, व त्यामुळें व वरच्या दांडगाईबद्दल त्याला रोमन लोकांनीं कामावरून दूर केला. आथीनियन व स्पार्टन लोकांतहि हें खूळ होतें. पारसीकांनीं पहिल्यानें जी ग्रीस देशावर स्वारी केली त्या वेळेस आथे-

---

जातें, आणि शेवटीं मरतें! –या पक्ष्यास एके ठिकाणीं मात्र मोठा मान असे; तो अशा तशा ठिकाणीं नव्हे, तर आथेन्स शहरांत! त्या लोकांची मुख्य विद्याधिदेवता जी मिनर्वा तिला हा पक्षी प्रिय असून तिच्या निशाणावर याची प्रतिमा असे. असा जगद्विलक्षण मान त्या चतुर लोकांनीं या पक्ष्यास देण्याचा आशय असा दिसतो कीं, विद्येच्या उपासकांचें आणि मिनर्वा देवीच्या आवडत्या अशा या पक्ष्याचें पुष्कळ साम्य दिसतें, तें असें–दोहोंची निशाचरवृत्ति, जगापासून अलिप्तपणा, मुद्रा गंभीर, आणि एकंदर व्यवहार शांतपणाचे!

३. हा शब्द 'कपोत' शब्दाचा अपभ्रंश दिसतो. हा पक्षी अशुभसूचक होय. हें मोरोपंताच्या पुढील आर्येवरून निसून येईल. विदुर शकुनीस उद्देशून ह्मणतो—

'हा न भला बुडवाया शिरला या राजमंदिरीं कवडा'
सभापर्व.

१. यासारखाच धट्टपणा दुर्योधनानें 'वेणीसंहार' नाटकांत केला आहे. मोठें वारें सुटून रथाचा ध्वज मोडून पडला असतां त्याचा कंचुकी 'भग्नं' 'भग्नं' करीत एकाएकीं ओरडत आला, आणि भावी घोर अनर्थाचें सूचक जें ध्वजपतन तें त्यानें मोठ्या भयाच्या मुद्रेनें आंत येऊन त्यास निवेदन केलें. पण दुर्योधनास त्या अपशकुनाचें कांहींच न वाटून तो त्या घाबरलेल्या कंचुकीस रागें मात्र भरला. आणि शेवटा ह्मणाला कीं, 'अंः, यांतरे काय आहे! जा, वाड्यांत जाऊन पुरोहितास सांग, ह्मणजे तो याची शांतीबिंती कांहीं करील!'— निबंधारंभींचें वचन याच बड्या राजश्रींचें आहे!

न्सच्या साहाय्यास स्पार्टन लोक आले नाहींत. कां तर पौर्णिमेच्या अगोदर लढाईस निघूं नये असा त्यांचा नियम होता! तसेंच पुढें स्पार्टन व आथीनियन लोकांचें जें सत्तावीस वर्षें अत्यंत घोर युद्ध चाललें होतें त्यांत सिसिली बेटावर जी आथीनियन लोकांनीं स्वारी केली तींतहि वरीलच प्रकार घडला. तेथून गुप्तपणें निसटून माघारी येण्याचा त्यांनीं बेत केला होता, पण इतक्यांत चंद्रग्रहण लागल्यामुळें शकुनज्ञ लोकांनीं त्यांस कळविलें कीं, या ग्रहणावरून देवाची अशी सूचना दिसते कीं, पुढील पौर्णिमेपर्यंत आपण येथून निघूं नये. त्याप्रमाणें निघून जाण्याचा बेत रहित झाला. मग तितक्या अवकाशांत शत्रूंनीं तयारी करून त्यांचा अगदीं मोड केला. असो; तसेंच वरील दोन्ही लोकांत शकुनज्ञ ह्मणून निराळे शिकवलेलेच लोक असत. यांस पाठशाळांत पढवून शकुन कसे पहावे व त्यांचा अर्थ कसा करावा हें शिकवीत. हें शकुनशास्त्र[1] त्यांनीं कसें रचलें असेल व त्यांत नियम वगैरे काय करून ठेवले असतील तें पाहावयास सांपडलें असतें तर मोठी मौज होती!

४. असो; आतां आपल्या लोकांत निरनिराळे प्रकार आहेत ते पाहूं. पहिला सर्वांत मोठा शकुन झटला ह्मणजे मांजराचा होय. कोणी कांहीं कार्यानिमित्त बाहेर पडला, आणि वाटेनें मांजर आडवें गेलें, कीं गली मसलत! ही मांजराची गम्मत पुष्कळांनीं पाहिली असेल. एखादे वेळेस दोघे चौघे कोठें निघाले असतां मधेंच एखाद्या घरांतून मांजर निघतें व माणसांच्या भयानें तें रस्ता ओलांडून समोरच्या घराकडे पळत जाऊं लागतें. त्या बिचाऱ्याच्या ध्यानीं मनींहि नसतें, कीं आपल्या साहजिक जाण्यानें या गृहस्थांस आपण अपशकुन करीत आहों; व आपल्या केवळ यदृच्छेच्या गतीचा जाणाऱ्या गृहस्थांच्या कार्यावर एवढा जबरदस्त परिणाम घडणार आहे! यास्तव तें खुशाल बिनधोक जात असतें. पण इतक्यांत हे गृहस्थ हाकाटी करून दोघे इकडे होतात—दोघे तिकडे होतात; आणि त्यास हुसकूं लागतात. मांजरास आपणावर एकाएकीं एवढा गहजब गुजरण्याचा अर्थ कांहींच न कळून बिचारें अगदीं गांगरून जातें, आणि इकडे पळ तिकडे पळ अशी त्याची त्रेधा उडते! मग त्या धांदलींत बहुधा या गृहस्थांच्या इच्छेविरुद्ध त्याचें गमन होतें! याप्रमाणें घडणाऱ्या शकुनास बळेंच माघारी फिरविण्याचा त्यांचा यत्न निष्फळ झाला असतां हे हिरमुसले होऊन माघारी फिरतात; किंवा त्या अपशकुनावरहि कांहीं तडजोड चालवून पुनः मार्गस्थ होतात! या प्रमाणेंच विधवेचें दर्शन, प्रेत समोरून येणें, वगैरेहि अशुभसूचक होत. हिंदुस्थानांत ह्मणजे शिंद्याच्या होळकराच्या वगैरे मुलखांकडे

१. शकुनविद्येस इंग्रेजी नांव augury असें आहे. संस्कृतांत पक्ष्याम 'शकुनि' असा एक पर्याय आहे. आणि वरील इंग्रेजी शब्दाची व्युत्पत्तिहि तशीच आहे—'*avis*' 'a bird' (पक्षी)!—यावरून शकुन पहाण्याचें मुख्य ठिकाण पक्षी होते असें असेलसें दिसतें.

शिंकणें हेंहि अपशकुन मानतात. वाटेनें निघालें असतां वगैरे कोणी शिंकतां कामा नये. गाईकवाडाच्या मुलखांत विधवेप्रमाणेंच विधुराचेंहि मुखावलोकन अशुभ धरतात. जो विधुर ह्मणजे गतस्त्रीक झाला त्याला राजवाडा वर्ज्य! अन्याय व अंदाधुंदी यांविषयीं प्रसिद्ध असणाऱ्या आमच्या वरील मराठी संस्थानांत हा मोठाच न्याय घडतो असें सर्व स्त्रीपक्षपाती लोक कबूल करतील. असो; तर असे अपशकुनाचे अनेक प्रकार आहेत.

आतां कांहीं शुभ शकुन सांगतों. सकाळचे प्रहरीं कोल्ह्याचें तोंड दृष्टीस पडणें; डावा डोळा लवणें; उजवा बाहु स्फुरण पावणें वगैरे. तसेंच घराल्या बाहेर पडतांच सवाष्ण बायका कडेवर पाण्यानें भरलेल्या घागरी घेऊन सामोऱ्या येणें. हा शेवटला शकुन फार उत्कृष्ट समजतात; व मागील पद्धतीच्या श्रीमंत लोकांची अशी चालहि सांगतात कीं, ते कांहीं एखाद्या मोठ्या कार्यास बाहेर पडले असतां दहा पांच बायका वर सांगितल्याप्रमाणें मुद्दाम तयारी करून स्वारी घराबाहेर पडते आहे तोंच त्यांस सामोऱ्या याव्या अशी आधींच तजवीज करून ठेवायाची! तसेंच ज्या वाटेनें बडी स्वारी जायची त्या वाटेंत कोणी अपशकुनी माणूस येऊं नये ह्मणून अगोदर शिपायांनीं पुढें धावून बंदोबस्त करून ठेवायाचा! हें वाचून सर्व सुविचारी मनुष्यांस हसूं आल्याखेरीज रहाणार नाहीं. एक तर शकुन अपशकुन ह्मणजे सारी निवळ भ्रांति. त्यांतून त्यांस यदृच्छेनें घडूं न देतां अपशकुनांस पिटून लावून चांगल्या शुभ अशा शकुनास मुद्दाम कैद करून आणून पुढें उभें करणें व तसल्या मारून मुटकून आणलेल्या शकुनाचें शुभत्व मानणें ह्मणजे मूर्खत्वाची कांहीं सीमा झाली! अशा जुलमाच्या शकुनांचा हर्ष मानणें ह्मणजे सोंगट्या खेळत असतां दर वेळेस फांसे हवे तसे जुळून जसेचे तसेच खालीं ठेवून दुसऱ्यावर डाव करणें, व त्यांत फुशारकी मिरविणें; किंवा रंगभूमीवर रामाचें किंवा भीमाचें सोंग घेऊन रावणाचा पराभव केल्याबद्दल किंवा जीमूतमल्लास चीत केल्याबद्दल शौर्याची व बळाची प्रौढी झोंकणें यासारखेंच हास्यास्पद होय! असो; तर याप्रमाणें मूर्खत्वाच्या एका प्रकारास थारा मिळाला असतां त्याचे भाऊबंद दुसरे अनेक प्रकार त्याच्या भोंवतीं जमतात!

५. वर शकुनाचे कांहीं निरनिराळे प्रकार सांगितले. आतां यावर विश्वास ठेवणें यांत समंजसपणा कितपत आहे याविषयीं विचार करूं. कोणतीहि गोष्ट खरी मानण्यास अनुभवसिद्ध प्रमाण पाहिजे; तें इतर लोकभ्रमांप्रमाणेंच यासहि बिलकूल मिळणार नाहीं. वर सांगितलेलें मांजराचेंच नेहमींचें उदाहरण घ्या. कांहीं कामास निघालें असतां मांजर आडवें गेलें, आणि तें काम हटकून झालें नाहीं असें कोणाच्या तरी अनुभवास आजपर्यंत आलें असेल काय? कार्याचें स्वरूप, कर्त्याचें शहाणपण व हिंमत, साधनांचा योग्यायोग्यपणा, इत्यादिकांवर हातीं घेतलेल्या कामांत यश अगर

अपयश येणें हें सदासर्वदा असतें. त्यांत बिचाऱ्या मांजराच्या जाण्याचा कांहींच संबंध नसतो. दुसरे जसे लक्षावधि व्यापार त्या वेळेस सृष्टींत चाललेले असतात त्याप्रमाणेंच मांजरानें रस्ता ओलांडून जाणें हा एक होय. मग होणाऱ्या कार्याची असिद्धि ही त्या बिचाऱ्या एकट्यावरच कां लोटावी ? दिसण्यांत परस्पर असंबद्ध असणाऱ्या लक्षावधि कार्यांचा जर कांहीं अपूर्व संबंध असेलच, तर वाटेनें निघालेल्या मनुष्याचें काम न होणें याचा संबंध केवळ खुर्षखातर इकडून तिकडे जाणाऱ्या मांजरावर जितका येईल तितकाच कोट्यावधि दुसऱ्या गोष्टींवरहि येईल. समजा कीं, पुणें मुक्कामीं कोणी गोमाजी तिमाजीस भेटण्याकरितां गेले, आणि तिमाजी भेटले नाहींत, तर तें अपेश सोम्या नांवाच्या मांजरावरच कां ? गोमाजींनीं त्या वेळेस पांढरें पागोटें घातलें होतें, किंवा आदल्या रात्रीं ते जेवले नव्हते, हेंच भेट न होण्याचें कारण कशावरून नसेल ? अथवा हेंचसें काय, त्याच क्षणीं लंडन शहरांत अमुक अमुक ठिकाणीं अमुक अमुक मनुष्यास अमुक अमुक झालें तें आमच्या शकुनभोळ्या गृहस्थास कशावरून बद्धक झालें नसेल ? बिचारें मांजर तेवढें पुढें दिसलें त्यानेंच काय पाप केलें ? बुद्धीच्या मार्गानें लक्षांत न येणारा असा कांहीं विलक्षणच कार्यकारणसंबंध हजारों गोष्टींत असतो असें जर एकदां झटलें, तर मग अमुकापासूनच अमुक कार्य झालें असें झणण्यास जागा कोणती राहिली ? निश्चित असें कांहीं नाहीं, सारेंच अनिश्चित, असें जेथें झालें, तेथें एकाच व्यक्तीवर निमित्त ठेवण्यास आधार काय ? ईश्वराच्या घरचें तंत्र सगळेंच जर असें तऱ्हेवाईक असलें, तर मग त्यांत मनुष्यानें अमुकच नियम करून ठेवणें हा केवढा मूर्खपणा ! असो; तर असे विचित्र संबंध जोडीत बसणें हा निवळ वेडेपणा आहे. आणि त्यांचा खोटेपणा जर पावलोपावलीं प्रत्ययास येतो, तर त्यांवर विश्वास ठेवणें अगदीं अप्रयोजक होय.

६. पण यावर कोणी अशी शंका घेतील कीं, आजपर्यंत हा विश्वास साऱ्या देशांतील लोकांचा पूर्ण होता, आणि अजूनहि लक्षावधि लोकांचा आहे, तर हे सर्व लोक कांहींच प्रमाण पाहिल्याशिवाय विश्वास धरीत असतील काय ? अशा झणण्याचा गेल्या अंकांत बराच विचार केला आहे. तरी त्यावर आणखीहि लिहिण्यास पुष्कळ आहे. अज्ञान जे असतात त्यांच्या तोंडून हें वाक्य नेहमीं ऐकूं येतें. त्यांना एखादी नवी व सकृद्दर्शनीं विलक्षण वाटण्यासारखी गोष्ट सांगा, कीं हा वाद पुढें ठेवलेला ! काय हो, हजारों लाखों लोकांचें असें मत आहे, आणि हाच काय तो शहाणा, इतक्या सगळ्या लोकांना ज्ञान शिकविणारा ! आजपर्यंत साक्रेटीस, कोलंबस, ग्यालिलियो, न्यूटन, बेकन, वॉट, वगैरे जे मोठमोठे शोधक होऊन गेले त्या सर्वांशीं बाकीच्या अज्ञानग्रस्त जगाचें हें भांडण;—आज हाच निघाला दीड शहाणा आह्मांस सांगायाला; आजपर्यंत लोक झाले ते सगळे मूर्खच ! तर याप्रमाणें मनानें

एकदां घेतलेले ग्रह सोडण्याची जगास नेहमीं मारामार पडते.-एकंदर लोकांची दुसरीहि एक मोठी चूक अशी दृष्टीस पडते, कीं एखाद्या गोष्टीचा खरेपणा किंवा खोटेपणा तिच्या स्वरूपावरूनच न पहातां ते नेहमीं बहुमताकडे धांवत असतात ! ह्मणजे शरीराच्या संबंधानें जसें जिकडे पुष्कळ मंडळी असेल तिकडे जाणें सुरक्षित, तसेंच मनाच्याहि संबंधानें असेलसें त्यांस वाटतें. पण ही अर्थात्च मोठी चूक आहे. हजारों लोक जर एकीकडे आहेत, आणि दुसरीकडे एकटाच मनुष्य त्यांच्यासीं भांडणारा असला, तर हा दुसरा तेव्हांच चिरडून जाईल यांत संशय नाहीं; पण मनाच्या संबंधानें हीच गोष्ट अगदीं उलटी पडते. ह्मणजे ज्याच्यापाशीं मजबूत प्रमाण आहे तो मनुष्य उलट पक्षाच्या कोट्यानुकोटी मनुष्यांसहि भारीच होतो ! ठीकच आहे; पहा कीं, ज्यापाशीं दिवा आहे तो त्या दिव्यावर अंधाराचे डोंगरचे डोंगर आणून लोटले तरी डगमगेल काय ? असो; पण अशा सत्यरूप ज्योतीचे किरण एकंदर जगाच्या ज्ञाननेत्रांत सुखेंकरून कधींहि प्रवेश करीत नाहींत; त्यास अनेक प्रकारचे दोष जडले असल्यामुळें अगोदर त्यांचा त्यांत रिघाव होणें हें सुद्धां बहुतेक ठिकाणीं केवळ दुरापास्तच असतें ! तेव्हां अर्थात्च सर्वांस बहुधा एक धोपट मार्ग माहीत असतो, कीं पुष्कळांचें जें मत असेल तेंच आपलें मत ह्मणावें; सगळ्यांची वाट ती आपली वाट ! हाच एकंदर जगाचा कल लक्षांत आणून कोणी तत्त्वज्ञानें ह्मटलें आहे—

गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः

"एकानें केलें ह्मणून दुसऱ्यानें करावें हाच प्रकार या जनाचा आहे; परमार्थ ह्मणजे तत्त्व जाणणारा थोडा" तसेंच कालिदासाचें वचन आहे—

सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ।

"जे ज्ञाते आहेत ते दोन्ही पक्ष पाहून चांगलें आढळेल तें पसंत करतात; पण मूर्खांचा प्रकार वेगळा. त्यांचा अभिप्राय नेहमीं दुसऱ्यांवर टेकलेला असतो !"

असो; तर याप्रमाणें या जगाची रहाटी आहे. जें एकदां मत पडून गेलें त्यासच सारे अनुसरतात; मग तें खरें असो कीं खोटें असो ! त्याच्या स्वरूपाविषयीं बारीक विचार करण्याचें कोणाच्या मनांतहि येत नाहीं, आणि तसें करण्याची योग्यताहि थोड्यांचींच असते. याचकरतां लोकशिक्षणाचा जेवढा फैलाव होईल तेवढा देशास हितावहच होतो. त्याच्या योगानें लोकांचे भ्रमजाल तुटून सत्यासत्याची निवड करण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य येऊं लागतें. पण याचा प्रसार जेथें झालेला नसतो तेथें अर्थात्च वरचा गतानुगतिकत्वाचाच न्याय; तेथें प्रमाणें कसलीं आणि अनुभव कसला !

बरें; पण शकुनादिकांवर ज्याचा पूर्ण भरंवसा आहे त्याला जर कोणीं विचारलें कीं, तूं हें सर्व खरें मानतोस, तर याचा दाखला तूं कोणता पाहिला आहेस ?

तर तो मनुष्य उगीच बसायाचा नाहीं; तसा ठोका आल्याचीं तो पांच सात उदाहरणें सांगेल, आणि त्यांवरून सिद्धांत करील कीं, हें सर्व खरें आहे. हीच अशा लोकांची मोठी चूक असते. जेवढीं आपल्या तर्फेचीं ह्मणजे शकुन पटल्याचीं उदाहरणें असतात तेवढींच ते घेतात पण त्याच्या उलटचीं मात्र बिलकूल घेत नाहींत. याविषयीं बेकननें एके ठिकाणीं एक मजेदार गोष्ट लिहिली आहे. प्राचीन काळीं ग्रीस देशांत इतर सर्व राष्ट्रांतल्याप्रमाणेंच मूर्तिपूजेचा प्रचार असे, आणि पुष्कळ देवता उपदेवता वगैरे ते लोक मानीत. एकदां असें झालें कीं, नवसाच्या पुष्कळ प्रचीतीबद्दल वाद चालला असतां तो वाद करणाऱ्यानें आपल्या प्रतिपक्ष्यास त्याची खात्री करण्याकरतां नेपच्युनच्या देवळांत नेलें. नेपच्युन हा हिंदु लोकांच्या वरुणाप्रमाणें समुद्राचें दैवत होतें. तेथें त्यानें त्या नास्तिकास देवास नवस करून वाहिलेला पुष्कळ सरंजाम दाखविला, आणि शेवटीं ह्मणाला. 'पहा, किती लोकांस हा देव पावला तो !' त्याच्या प्रतिपक्ष्यानें उत्तर केलें, 'ह्मणतोस तें खरें; पण असें न होऊन ज्यांचीं जहाजें बुडालीं असतील त्यांची खूण येथें कोठें आहे ? त्या जर असत्या, तर त्याहि मीं तुला दाखविल्या असत्या !' असो; तर शकुनांच्या खेरेपणाविषयींचीं प्रमाणें लोक जीं सांगतात तीं सारीं अशा प्रकारचीं असतात. कोणी बहादर कांहीं कामाला निघाले, आणि तोंडांत मारल्यासारखे माघारी आले, कीं तें सारें अपेश सामोरें आलेल्या मांजराचर ! आणि असें एकदां दोनदां झालें, कीं झाला तो ठोका ! पण ज्या कामाला हात घातला तेंच जर होण्यासारखें नसलें, किंवा या राजश्रींच्या अंगचें कर्तृत्वच तितपत असलें, तर त्या बिचाऱ्या मांजराकडे काय बोल ? पण तें कांहीं नाहीं. अपेशास मूळ कारण तें मांजरच ! एरवीं यांच्या हातून फत्ते झाल्याखेरीज राहायाचींच नाहीं!

७. असो; तर याप्रमाणें हा शुद्ध भ्रांतीचा प्रकार आहे; त्यांत तथ्य पाहूं जातां बिलकूल सांपडणार नाहीं. आतां यापासून अनर्थ कोणते कोणते आहेत ते पहा. एक तर हा निवळ भ्रम असल्यामुळें तो मनास चिकटल्यानें त्यास दुर्बलता प्राप्त होते, ह्मणजे सदसद्विवेचनरूप जी उत्कृष्ट शक्ति परमेश्वरानें मनुष्याचे ठायीं ठेविली आहे तिचा व्यापार या अज्ञानजन्य भ्रमानें कांहींसा कुंठित होतो. शिवाय, व्यवहारांत याचे योगानें अनेक हानि झाल्या आहेत व होत आहेत. स्पार्टन व आथीनीयन लोकांचा वृत्तांत वर एक लिहिलाच आहे. व या शकुनांच्या पायीं लोकांस वरचेवर किती अद्दल घडते, किती घोटाळा होतो, वगैरे गोष्टी विशेषेंकरून आमच्या लोकांस सांगण्याची तर मुळींच गरज नाहीं. शकुनांनीं आमची जशी पाठ पुरविली आहे तशी थोड्यांचीच असेल ! आह्मांस त्याशिवाय इकडच्या इकडे बहुधा हालतांहि येत नाहीं. कोणतेंहि काम हातीं घेण्यापूर्वी तिथि, वार, नक्षत्रें वगैरे काय ह्मणतात तें अवश्य समजून घ्यावें लागतें, आणि त्यांचा रुकार पडला तर सगळ्या गोष्टी. करा-

वयाचें काम कितीहि निकडीचें असलें तरी वरील सल्ला अगोदर घ्यावा तेव्हां तें करायास लागावें. कधीं नवानवसानें सद्बुद्धि सुचून एकदां बेत आरंभण्याचें आह्मीं मनांत आणणार, तों चमत्कार पहा,–त्या दिवशीं आपला शुक्रवार ठेवलेला ! आमच्या देशांत जागोजाग ज्या सभा, मंडळ्या, समाज वगैरे खंडोगणती उत्पन्न होतात, आणि लवकरच चोहोंकडे सामसूम होते, त्यांस वरील वाराची तर बाधा होत नसेलना !–तसेंच आमच्यांतील कोणी बहादर एखाद्या बड्या कामास बाहेर पडले, आणि पुढें जातात तों सुळकन् या घरांतलें मांजर निघून त्या घरांत गेलें, कीं फिरला मोर्चा मागें ! कार्य जेमतेम करून होण्यासारखें असलें तरी त्या अपशकुनाचा धाक सारखा मनांत राहून हातच कामाला नीट वाहायाचा नाहीं; कां कीं, मनास पक्की गांठ मारून गेलेली, कीं निघतांच बेटें मांजर आडवें निघून गेलेलें आहे, तें कसचें काम होऊं देतें ! याप्रमाणेंच कोठें निघालें तर तिघांनीं जाऊं नये; आपल्या ठिकाणीं नवव्या दिवशीं परत येऊं नये; एका घरांतून निघून दुसऱ्यांत जावयाचें, परगांवीं जायचें वगैरे हरएक लहान मोठ्या प्रसंगीं शुभाशुभ योग अवश्य साधले पाहिजेत; अशा प्रकारच्या नानाविध निरर्थक निर्बंधांनीं वेळ, पैसा यांचा व्यर्थ व्यय होऊन कार्यास पुष्कळ वेळां मोठाच व्यत्यय घडतो, आणि वेडेपणाचीं शुष्क भयें मनांत माजतात.

८. पण वरील प्रकार नुसता मूर्खपणाचाच झाला. याहूनहि उद्वेगकारक जे शकुनांचे आणखी परिणाम घडून येतात ते सांगावयाचेच आहेत. ते असे. जोंपर्यंत शकुन हे पशुपक्ष्यादिकांवरच असतात तोंवर मोठीशी वाईट गोष्ट झाली असें ह्मणतां येत नाहीं. घुबड, पिंगळे वगैरे पक्षी; किंवा मांजर, गाढव वगैरे जनावरें यांचा मनुष्यानें कितीहि त्रास मानला, तरी त्यांत त्यांचें कांहीं वाईट नसतें; ह्मणजे त्या योगानें त्यांस मनुष्यापासून उपद्रव पोंचतो किंवा त्यांची मानहानि होते असा कांहींच प्रकार घडत नाहीं. पण प्रत्यक्ष मनुष्याकडेच जेव्हां हें शुभाशुभत्व येतें तेव्हां बरीक मनुष्याच्या अंगभूत मूर्खत्वाचा व उद्धटपणाचा कळस होतो. ह्मणजे मनुष्यजातींतच एकानें दुसऱ्यास विनाकारण भ्रष्ट, अपशकुनी, अमंगळ असें मानावें हें अत्यंत लज्जास्पद होय. धर्माधर्मांत व राष्ट्राराष्ट्रांत हा वेडगळ व निंद्य प्रकार किती आहे हें सर्वांस माहीत असेलच. तसाच हा अगदीं प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. ग्रीक लोक एकंदर साऱ्या राष्ट्रांस 'बार्बेरियन्स' ह्मणजे रानटी समजत, आमचे पूर्वज सर्वांस म्लेंछ ह्मणत, तसेंच सांप्रतकाळीं इंग्रेज लोक व त्यांचे धर्मपुत्र जे आमच्या देशांत कित्येक आहेत त्यांच्या मतें सारी सुधारणा काय ती इंग्लंडांत नेऊन सांठविली आहे ! पण याहिपेक्षां धर्माच्या हेकटपणानें जें पिसें अंगांत शिरतें त्याची तर कांहीं सीमा आहे ! प्रत्येकाच्या मतें बाकीचे लोक सर्वथा

अपवित्र व पापरूपी होत. मुसलमान इतर धर्माच्या कोणत्याहि लोकांशीं गांठ पडली असतां 'बिसमिल्ला रहिमान' वगैरे एखादें कुराणांतील सूक्त ह्मणून आपणास त्या पापापासून धुवून काढील; हिंदूस तर तसें प्रत्यक्षच करावें लागेल; आणि मनुष्यमात्राचें बंधुत्व मानणारा व केवळ दयेचा सागर जो ख्रिस्तीधर्म तो पाळणारास परधर्मी लोकांचा विटाळ उडविण्यास अंगावर पवित्र क्रूस काढावा लागेल![1] आमचे शेवटले बाजीराव पेशवे दहा घटका दिवस येईपर्यंत मुसलमानाचें तोंड पहात नसत; आणि त्यांचेच बंधु माजी गायकवाड खंडेराव महाराज हे ब्राह्मणाच्या दर्शनाचा अपशकून मानीत! या दिग्विजयी समशेर बहादुरांनीं शेवटीं शेवटीं आपल्या[2] वंशाचा धर्म सोडून ते अगदीं इमाम

१. वरच्या गोष्टीची येथें अंमळ स्पष्टता केली पाहिजे. आमच्या देशांत जेवढे ख्रिस्ती दृष्टीस पडतात त्यांपैकीं कोणीहि वर सांगितलेला क्रूस काढीत नाहींत हें खरें आहे. पण ख्रिस्ती धर्माचें मूळचें खरें स्वरूप यांचेठायीं जें दृष्टीस पडतें तें नव्हे. ब्रह्मपंथांतील किंवा प्रार्थनासमाजांतील लोक जसे खरे ब्राह्मण नव्हेत, तसेच प्रॉटेस्टंट पंथांतलेहि खरे ख्रिस्ती नाहींत. खरा ख्रिस्ती झटला ह्मणजे स्पेन देशांतला किंवा रोम शहरांतला भाविक क्याथलिक. त्यांचे आचार वर सांगितल्याप्रकारचेच आहेत. सर वॉल्टर स्कॉटच्या 'ऐव्हेनो' नांवाच्या कादंबरींत वरील क्रुसाचा प्रकार आढळतो. यहुदी लोकांच्या केवळ दर्शनानेंहि विटाळ होऊन त्यांतील कित्येक पात्रांनीं वरील 'विष्णवे नमः'चा प्रकार केला आहे!

२. वरील शब्द वाचून आमच्या ख्रिस्ती बंधूंस आमची केवळ पोरबुद्धि वाटून हंसूं येईल हें आह्मी जाणतों! पण गेल्या महिन्याच्या अंकांत त्यांच्या एका बंधूनें निबंधमालेच्या आठव्या अंकावर जी एक ताण झाडली आहे ती पाहिली असतां त्यांस हंसण्यास फारशी जागा रहाणार नाहीं. सदरील अंकांत त्या पुस्तककारानें आमच्यावर कृतघ्नत्वाचे वगैरे जे आरोप ठेवले आहेत ते कांहीं अपूर्व आहेत! आणि त्या सर्वांत एक तर फारच भयंकर आहे; कोणता? तर 'जो धर्म आपली महाराणी अंतःकरणपूर्वक पाळीत आहे त्याची मनास वाटेल तशी निंदा' आह्मीं केली आहे!! आमच्या मलिकामाअझमा महाराणीचें राज्यवैभव ख्रिस्ती धर्मास बळकटी आणण्यास कसें उपयोगीं पडलें व आमच्या दयाळू राज्यकर्तीनें आपला १८५८ सालचा जाहीरनामा रद्द करून मिशनरींस व बाट्यांस मात्र तोंड सोडण्यास कोणत्या आनंदानें मुभा दिली, हें आह्मांस माहीत नाहीं. एकंदरींत आह्मांस याचें फारच आश्चर्य वाटतें कीं, जे दोहों धर्मांची परस्पर तुलना करून आपखुषीनें ख्रिस्ती झाले, ज्यांनीं गेलीं वीस वर्षें त्या धर्माच्या सत्यतेचा जातीनें अनुभव घेतला व त्याविषयीं सतत विचार केला, ज्यांनीं आमचे बिचारे शास्त्री पुराणिक यांस केव्हांच वादांत हटवून त्यांच्या धर्माची असत्यता त्यांच्या पदरांत घातली, व तेव्हांपासून आह्मां पापी लोकांच्या हृदयांत सत्याचा व ज्ञानाचा उजेड पाडणाऱ्या मंडळींत जे प्रमुख आहेत, त्यांनीं खऱ्या धर्माविषयीं चांगलीं सबळ प्रमाणें आह्मांस मुळींच न दाखवितां 'बाबावाक्यं प्रमाणम्' या महावाक्यावरच सरतेशेवटीं आणून काय तें थडकविलें! एकूण जसा प्रभु बदलेल तसा त्यावरोबर धर्मांचा खरेपणाहि बदलतो असें आमच्या 'सत्यदीपिका'कारांचें ह्मणणें झालें! ह्मणजे मोंगलांचें राज्य होतें तोंवर महंमदी धर्म खरा, पेशव्यांचें होतें तोंवर ब्राह्मणधर्म खरा, आणि आतां महाराणीचें झालें ह्मणून ख्रिस्ती धर्म खरा! वाहवारे सत्य आणि वाहवारे दीपिका!!

बनले होते व साठ लक्षांची एक रत्नखचित चादर मक्केस पाठविण्याकरितां त्यांनीं तयार केली होती हीहि गोष्ट सर्वांस महशूर असेलच. त्यांच्या ब्राह्मणद्वेषाची व एकंदर स्वभावाची एक चमत्कारिक गोष्ट येथें लिहिल्यावांचून राहवत नाहीं. एके दिवशीं सकाळीं खासा स्वारी शिकारीस निघाली होती. बरोबर त्यांचे मंत्री, मयत भाऊ शिंदे, हे होते. स्वारी शहराबाहेर पडत असतांच रस्त्यांत एक गरीब ब्राह्मण एका बाजूस उभा राहिलेला दृष्टीस पडला. खंडेराव महाराजांची सहज त्याजकडे नजर गेली मात्र, तों लागलींच मागें वळून मागल्या हत्तीवर भाऊ शिंदे होते त्यांस महाराज ह्मणाले, "हा दोड बाह्मन आमच्या ह्योरँ कां आला ? आज चांगली शिकार सांपडली तर बरें, नाहीं तर याला मारून टाकायाचा !" मग उशीर काय ? लागलींच त्या भटजीस पकडून भाऊंनीं आपल्या कांहीं लोकांबरोबर त्यास वाड्यांत पाठवून दिलें. पण त्याबरोबर त्या लोकांस हळूच असेंहि सांगितलें कीं, आपल्या शिकारखान्यांतला एक वाघ काढून त्याला लवकर आमच्या अगोदर शिकारीच्या वाटेवर एका जाळींत दडवून ठेवा. त्याप्रमाणें त्या लोकांनीं केलें. अंमळशानें महाराजांची स्वारी तेथून जाऊं लागली तों भाऊंनीं तो वाघ दाखविला. मग काय ? ताबडतोब मर्जी सुप्रसन्न होऊन उद्गार निघाला, "कां भाऊ ! बाह्मन लई पायगुणाचा, शिकार तर अक्षीं पहिल्या झपाट्यांत घावली !" नंतर भाऊंनीं सुचविलें कीं, आतां परत गेल्यावर त्या ब्राह्मणाला कडीं, कंठी घातलीं पाहिजेत. त्यास महाराजांचाहि रुकार पडून स्वारी माघारी आल्यावर जो ब्राह्मण अगदीं घाबरून जाऊन मरणाची वाट पहात होता त्याची एकदम वरील संकल्पाप्रमाणें मोठी संभावना झाली ! ! असो; तर धर्माच्या हेकटपणानें असे विचित्र प्रकार घडून येतात.

९. आतां विशेषतः आपल्याच लोकांत चालू असणारे कांहीं प्रकार येथें सांगतों. पहिला मोठा अपशकुन विधवा स्त्रियांचा. या करुणास्पद विषयाविषयीं क्षणभरहि विचार करतांना ज्याचें हृदय अत्यंत खेदानें व संतापानें व्याप्त होऊन जात नाहीं त्यास केवळ पाषाणहृदय व अधमाधम ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. स्त्रियांचें जिणें मुळींच पराधीन असल्यानें व संसारदुःखाचें मोठें ओझें त्यांच्यावरच नेहमीं असल्यानें त्यांची स्थिति एकंदरीत कठिणच; पण त्यांतूनहि वैधव्याच्या योगानें त्यांचा सगळाच आधार जेव्हां एकदम तुटतो तेव्हां त्यांच्या विपत्तीची तर सीमाच होते. त्यांतहि आमच्या देशांत जी त्यांची स्थिति दृष्टीस पडते तीहून दुःखास्पद अशी स्थिति थोडीच ! इतरांस दुःखाची स्थिति प्राप्त झाली असतां ते लागलेच सर्वांच्या दयेस व मैत्रीस पात्र होतात; पण तेंच सगळें वरील अनाथ प्राण्यांच्या ठायीं विपरीत होतें. ज्या वैधव्यदुःखाची वेदना सहन न होऊन बिचाऱ्या स्त्रियांनीं सुष्ट दुष्ट कसाहि नवरा असला तरी आपल्या पातिव्रत्यधर्मास जागून अंगावर शहारा येणाऱ्या

रीतीनें त्याच्या चितेवर आपल्या देहाची आहुति द्यावी, किंवा तसें न झालें तर आमरणान्त त्याच्या करतां केवळ तपस्व्याच्या वृत्तीनें राहावें, त्याच महादुःखाबद्दल त्यांचा कळवळा कोणास येत नाहीं इतकेंच नव्हे, तर त्यांच्याच प्रारब्धदशेचें तें फळ असें ह्मणून त्यांचा उलटा छळच होण्यास आरंभ होतो, हा प्रकार आमच्या देशास अत्यंत लांछनरूप होय यांत संशय नाहीं. असो; यासंबंधीं जितकें लिहावें तितकें थोडेंच. प्रस्तुत स्थलीं इतकेंच सांगतों कीं, ज्या अपशकुनाच्या प्रकारासंबंधें सध्यां आह्मी लिहीत आहों तो सर्वथा व्यर्थ आहे हें तर आहेच; पण शिवाय तो मानणें हें विपद्ग्रस्त मानवी प्राण्याचा उपमर्द करणेंहि होय. केवळ दैवयोगानें किंवा यदृच्छेनें प्राप्त होणाऱ्या स्थितिविशेषावरून मनुष्यास मंगळ किंवा अमंगळ मानावें हा केवढा अन्याय आहे ! स्त्रियांचें वैधव्य हें जर त्यांच्या अशुभत्वास कारण, तर बाप भाऊ बहीण वगैरे कोणी मेल्यानें त्यांच्या नातेवाईकांचें तरी कां तोंड बघावें ? पण मुळींच हा केवढा मूर्खत्वाचा प्रकार आहे ? जी अत्यंत सदाचरणानें आपलें आयुष्य क्रमून आपल्या कुलास तर काय पण सगळ्या मनुष्यजातीस भूषण आणीत आहे,—कारण मनुष्याचें अंतःकरण स्वभावतःच किती अस्थिर व दुष्ट असतें हें सर्वप्रसिद्धच आहे !—त्याच साध्वीचें दर्शन, पुरते तेरा दिवसहि जाऊं न देतां जो निर्लज्ज व विषयांध पुनः नवरा मुलगा होऊन उभाच, अशा पुरुषानें अशुभ मानावें हा केवढा उलटा न्याय ! ! आणि अशा निष्पाप स्त्रीचें दर्शन जर शुभ नव्हे, तर सगळ्या कपाळभर जिनें कुंकवाचा पट्टा ओढला आहे अशा एखाद्या नगरभवानीचें अथवा उभयकुलांस आणि अवघ्या मनुष्यजातीस जिनें स्त्रियांचें सहज भूषण जी लज्जा ती समूळ टाकून देऊन काळोखी आणली अशा बाजारबसवीचें तिच्या केवळ बाह्य वेषावरून अत्यंत शुद्ध दर्शन झालें काय ? असो; तर याप्रमाणें सुविचारानें दिसणारा मार्ग आणि जगाचा धोपट मार्ग या दोहोंत अनेक वेळां इतकें अंतर असतें. यासारखेच दुसरेहि वेडगळ अपशकुन. कोणी दाराबाहेर पडतो आहे इतक्यांत पुढें जर बोडका ब्राह्मण आला तर खुंटलेंच त्याचें जाणें ! मग हा ब्राह्मण चांगला सत्पात्र, सुशील सज्जन असाहि कां असेना ! पण तोच जर एखादा महाशंख मोठी शालजोडी पांघरून व मोठ्या लफ्याचा पदर लावून पुढें आला कीं शकुन उत्तम ! तसेंच कोणी क्लीबांचेंहि दर्शन तसेंच अशुभावह मानतात. हें करणें ह्मणजे जें मनुष्याच्या स्वाधीनचें नाहीं त्याबद्दल उगीच विनाकारण त्यास हिणावणें आहे.

याप्रमाणें मुळावर आल्याचेंहि एक मोठें बंड आहे. एखादें मुलगें जन्मतांच आई किंवा बाप यांतून कोणी मेलें, किंवा दुसरें कोणी कुटुंबांतील मनुष्य गचावलें, कीं आलें तें अपेश त्या बिचाऱ्या पोराच्या माथीं ! मग त्या पोराला कोणी चैन पडूं द्यायचें नाहीं. एखाद्या वैऱ्याशीं जसें वागावें त्याप्रमाणें त्या पोराचे सारखे

हाल चालायाचे. याहूनहि भयंकर प्रकार सुनेचा. ती घरांत आली, आणि सासू सासरा नवरा व इतर आप्तसंबंधी हीं सारीं जरं पुढें बरींच वर्षें निभावलीं तर ठीक गोष्ट; नाहीं तर मधेंच जर कांहीं विपरीत झालें कीं त्या बिचाऱ्या पोरीचें नशीब उसकटलें ! नवऱ्यांची स्वारी दुर्व्यसनी निघून त्यांत जरी पुढें मागें त्यांचा शेवट झाला, तसेंच सासूस सासऱ्यास वगैरे अशाच स्वतःच्या मूर्खपणानें किंवा आकस्मिक रोगानें मृत्युपंथास लावलें, कीं सारें सूनबाईच्या प्रारब्धाचें फळ ! अशा प्रकारचीं उदाहरणें आमच्या सर्व वाचकांस कांहींना कांहीं तरी माहीत असतीलच. यास्तव याविषयीं आणखी विस्तार करण्याची बिलकूल गरज नाहीं व हा केवढा घोर अन्याय आहे हेंहि एखाद्या शुद्ध टोणप्याखेरीज हवें त्यास सहज समजणारें आहे.

१०. असो; येथपर्यंत प्रस्तुत विषयावर बराच विस्तार झाला. आतां हें शकुनाचें वेड केवळ आमच्यांतच आहेसें नाहीं, तर युरोपांतील अगदीं अगदीं अलीकडच्याहि कित्येक मोठमोठ्या नामांकित पुरुषांमध्यें हेतें याचा थोडासा मासला दाखवितों. लॉर्ड बायरन ह्मणून इंग्लंडांत सुमारें पन्नास वर्षांपूर्वी एक मोठा नामांकित कवि होऊन गेला. त्यास एके समयीं इंग्लंडाहून पत्र आलें असतां तें फोडल्याच्या अगोदर तो ह्मणाला, "या पत्रांत कांहीं तरी वाईट बातमी मला खास समजायाची आहे." असें ह्मणून त्यानें पत्र फोडून वाचून पाहिलें तों खरेंच ! त्या प्रसंगीं त्यानें असा लेख लिहिला आहे–"काल रात्रींपासूनच मला कांहीं चमत्कारिक वाटत होतें, कीं माझ्या परिचयांतला कोणी मरण पावला, आणि पहातों तों तसें खरेंच– असा ठोका आल्यावर शकुनांवर विश्वास कसा ठेवूं नये ? सर वॉल्टर स्कॉट् याचा दिव्य दृष्टीवर[1] विश्वास असे; रॉसी (फ्रेंच कवी) झाडाच्या बुंधाशीं नेम धरून त्यावरून पाही, कीं मरणोत्तर आपण अक्षय नरकांत पडणार कीं नाहीं; गेटी (जर्मन कवी) चाकूवर तोंडाचा वाफारा टाकून पाही कीं आपण हातीं घेतलेलें काम तडीस जाईल कीं नाहीं !" याच कवीनें दुसरे एके ठिकाणीं लिहिलें आहे–"माझ्या जन्म दिवशीं पुष्कळ विलक्षण गोष्टी आजपर्यंत घडून आल्या. तसेंच नेपोलियनालाहि झालें. आणि मेरी आंटोईनेट (फ्रान्सची राणी) हिला तर एक फारच चमत्कारिक प्रसंग घडून आला. माझ्या लग्नाच्या वेळेस[2] माझ्या असें अकस्मात् मनांत आलें कीं, मी आपल्या मरणचिठ्ठीवर सही करीत आहें. त्या वेळेस जर मला पळून जातां

---

१. दिव्यदृष्टि ह्मणजे पुढें होणाऱ्या गोष्टींचें अगोदर ज्ञान होणें. ही शक्ति कोणाकोणामध्यें असते असें स्कॉटलंडांतील कित्येक लोक मानतात.

२. बायरन् कवि आपल्या बायकोशीं भांडून व तिजशीं घटस्फोट करून देशांतरास चालता झाला या गोष्टीवर वर लक्ष आहे. या वेळेस तो जो बाहेर पडला तो पुनः स्वदेशास मायदारी आलाच नाहीं.

येतें तर मी तसें करणार होतों. मनःप्रेरणेच्या शकुनावर माझा दृढ विश्वास आहे. सॉक्रेटीसाचा गुप्त यक्ष होता ह्मणून जें ह्मणतात तें खोटें नव्हे; मंक् ल्युईस यालाहि तशीच कोणी देवता अनुकूल होती; आणि नेपोलियनाला पुष्कळ दैवी सूचना वारंवार होत!" आपल्या लोकांत जसे घातवार मानतात तसाच वरील कवीचा प्रकार होता. तो शुक्रवारीं कोणास भेटावयास जात नसे; याप्रमाणेंच आणखीहि पुष्कळ चमत्कारिक गोष्टी सांगतां येतील. हाच बायरन ज्या वेळेस ग्रीस देशांत मृत्यु पावला त्या वेळेस एक मोठी भयंकर वावटळ सुटली होती; व हाच प्रकार नेपोलियन व कॉमवेल यांच्या मरणसमयीं झाला. जुलियस सीजर ज्या दिवशीं मारला गेला त्याच्या आदल्या रात्रीं विलक्षणच उत्पात चोहोंकडे झालेले प्लुटार्क यानें त्याच्या चरित्रांत लिहून ठेवले आहेत. त्यांचें कवितारूप शानदार वर्णन शेक्सपीयरच्या प्रसिद्ध नाटकांत आहे. त्यांत सीजरच्या बायकोला कसलें स्वप्न पडलें, तिला त्याचें किती भय वाटलें,[1] व त्याला मारण्यास टपलेल्या लोकांपैकीं एकानें त्याचा लाक्षणिक अर्थ सीजरला कशा चातुर्यानें बनवून सांगितला, हें सर्व या नाटकांत आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांनीं वाचलें असेलच. असो; अशीं उदाहरणें आमच्या इकडे इतिहासांतील मुळींच देतां येत नाहींत; कारण तो लिहिलेलाच नाहीं. तरी टिप्पू सुलतानाचें एक उदाहरण आहे. श्रीरंगपट्टण घेतल्यावर टिप्पूचे कागदपत्र जे सांपडले त्यांत त्याचीं स्वप्नें व त्यांचा अर्थ केलेला असा एक लेख सांपडला. त्यांतील एक स्वप्न मोठें चमत्कारिक आहे. मराठ्यांचें लष्कर आपणावर चालून येत आहे हें त्यास माहीत असतां त्यास एकदां असें स्वप्न पडलें कीं, एक तरणा मनुष्य आपणाकडे येऊन आपणापाशीं बोलतो आहे. पण बोलतां बोलतां तो मनुष्य बदलून आपणाकडे येऊन आपणापुढें स्त्री उभी आहे असें त्यानें पाहिलें. या स्वप्नाचा सुलतान साहेबांनीं असा अर्थ केला कीं, मराठे हे पहिल्यानें मोठे शूरसे दिसतील पण लढाईत केवळ बायकांप्रमाणें नामर्द ठरतील! असो; तर याप्रमाणें मागील निबंधांत भूतांवर विश्वास ठेवणारे जसे सांगितले तसेच शकुनांवरहि ज्यांचा विश्वास होता असे कित्येक नामांकित पुरुष वर सांगण्यांत आले.

११. वरील उदाहरणांवरून कित्येकांस कदाचित् असें वाटेल कीं निबंधांत जें आह्मीं प्रतिपादन केलें त्याचें वरील मोठमोठ्या उदाहरणांनींच खंडन होतें. पण असें बिलकूल नाहीं. प्रस्तुत निबंधाच्या अग्रभागीं दुर्योधन महाराज जसें ह्मणताहेत तसेंच आह्मांस वाटतें कीं शकुनादिकांचा कसाहि ठोका मिळाला तरी ज्या अर्थी तो नियमानें मिळत नाहीं त्या अर्थी तसें केवळ काकतालीय न्यायानें घडतें असेंच ह्मटलें

१. असाच प्रसंग 'वेणीसंहार' नाटकांत आहे. भानुमतीस एक अत्यंत अशुभ स्वप्न पडून तें तिनें आपल्या नवऱ्यास सांगितलें आहे. निबंधारंभींचें पद्य दुर्योधनाचीच वरील प्रसंगींची उक्ति होय.

पाहिजे. त्यांवर पूर्ण भरंवसा ठेवून भिणें हें शहाण्याचें काम नव्हे. तर मग वरील शहाण्यांनीं तरी त्यावर कसा भरंवसा ठेवला? असें कोणीं विचारल्यास त्यांवर आमचें उत्तर इतकेंच आहे कीं, त्यांचा तरी त्यांवर अगदीं पक्का विश्वासच होता असें नाहीं. एखाद्या भलत्याच नादास लागून मोठे शहाणेहि जसे फसतात तसाच हा त्यांचा केवळ नाद असेल; यापेक्षां कांहीं नाहीं. त्यांची जर त्याविषयीं पक्की खात्रीच झाली असती तर तसें त्यांनीं खचित लिहून ठेवलें असतें, व सबळ प्रमाणें दाखविलीं असतीं. पण वरील गोष्टी तशा बिलकूल नसून त्यांच्या मनानें घेतलेल्या समजुती मात्र त्यांत दाखविल्या आहेत. असो; तर एकंदरींत शकुन वगैरे सर्व निवळ भ्रम आहेत. त्यांवर विश्वास ठेवून कोणीहि हर्षविषाद पावूं नये, व त्याचें भयहि बिलकूल बाळगूं नये. तुकोबा सांगतात—

अवघा तो शकुन हृदयीं देवाचे चरण ।
येथें नसतां वियोग लाभा उणें काय मग ।
संग हरीच्या नामाचा शुचिर्भूत सदा वाचा ।
तुका ह्मणे हरिच्या दासा शुभ काळ दाही दिशा ॥

चतुरंगबलो राजा जगतीं वशमानयेत् । अहं पंचांगबलवानाकाशं वशमानये ॥[1]

अंक १७—(१) ज्योतिष. (२) विषयस्वरूप. (३) प्रस्तुत शास्त्राच्या उदयाचीं कारणें. (४) त्याचा प्रचार–या प्रचाराचीं कारणें. (५) मुख्य विषय–आक्षेपावर उत्तर. (६) ग्रहगति आणि संसारकृत्यें यांचा परस्पर संबंध असण्याचा संभव. (७) प्रत्यक्ष अनुभव. (८) दुसरे कांहीं विचार. (९) कुतर्कीचें विवरण. (१०) खऱ्या ज्योतिषाची योग्यता व उपयोग.

१. मागील दोन निबंधांत भुतें व शकुन यांविषयीं आह्मीं आपले विचार प्रदर्शित केले. आतां या खेपेस ज्योतिषाविषयीं ह्मणजे ग्रहदशेवर वगैरे जो लोकांचा दृढ विश्वास आढळतो त्याविषयीं लिहूं.

२. प्रस्तुत निबंधांत खऱ्या ज्योतिषाविषयीं–ह्मणजे ज्या आश्चर्यमय शास्त्रांत आपल्या पृथ्वीविषयीं व सूर्यचंद्रादि खस्थ पदार्थांविषयीं यथार्थ निरूपण केलेलें आढळतें, व ज्यासारखें कवीच्या, तत्त्वज्ञाच्या आणि भाविकाच्या मनास आल्हाद देणारें दुसरें कांहीं नाहीं, त्याविषयीं विवेचन कर्तव्य नाहीं. तर त्याचा उदय होण्यास जें भ्रांतिमूलक शास्त्र कारण झालें त्याविषयींच फक्त यांत विचार करावयाचा आहे. ह्मणजे त्याचा उदय कसा झाला, केव्हां झाला, त्याचा सध्यां कितपत प्रसार आहे, त्यांत तथ्य कितीसें आहे, वगैरे गोष्टीच काय त्या सांप्रतच्या निबंधांत येतील.

१. "चतुरंगबलेंकरून ह्मणजे हत्ती, घोडे, पायदळ इत्यादि चारी अंगें ज्याचीं परिपूर्ण आहेत अशा सैन्याच्या योगानें राजा पृथ्वीस वश करूं शकतो; तसाच मी पंचांगबलेंकरून ह्मणजे पंचांगाच्या जोरावर आकाशास आपल्या सत्तेंत आणतों!"

३. आतां प्रथमतः या शास्त्राचा उदय कसा झाला असावा हें पाहूं. ज्योतिषाची माहिती थोडीबहुत बहुतेक राष्ट्रांत सांपडते; त्यांतून खाल्डियन, मिसरी, हिंदु, चीन वगैरे अत्यंत प्राचीन राष्ट्रांत तर हें शास्त्र पुष्कळच पूर्णावस्थेस येऊन पोंचलें होतें, असें समजतें. तेव्हां यावरून आकाशांतील चमत्कारांविषयीं जिज्ञासा व शोधक बुद्धि हीं मनुष्यस्वभावास केवळ साहजिक होत हें स्पष्ट दिसतें. पण बाल्यावस्थेंत असणाऱ्या राष्ट्रांस स्वाभाविक असणाऱ्या ज्या वरच्या दोन मनोवृत्ति त्यांबरोबर त्याच स्थितीच्या अप्रबुद्धत्वास साहजिक जी मनाची भ्रांतिमयता तीहि पुष्कळ आढळते. ह्मणजे हल्लींच्या काळीं जो कोणी ज्योतिष शिकतो तो तें जसें केवळ त्यांतील प्रमेयांचा बोध व्हावा एवढ्याच हेतूनें शिकतो, तसें प्राचीन काळीं नसून शिकणाराचा उद्देश वरच्या खेरीज आणखी एक निराळाच असे. तो अर्थात् हा कीं, ज्योतिषांत पारंगत होऊन ग्रहफलें वर्तवितां येऊं लागलीं ह्मणजे भावी कालाचें आपणास ज्ञान व्हावें. हा हेतु वरील शास्त्राच्या अध्ययनानें कितपत सिद्ध होतो व कितपत व्हावा याविषयीं पुढें विवेचन करण्यांत येईलच. प्रस्तुत स्थलीं त्याच्या संबंधानें इतकेंच सांगावयाचें कीं, मागील काळीं वरील हेतु केवळ भ्रांतिमूलक होय हें सामान्यजनास तर काय, पण मोठमोठ्या विद्वानांसहि पक्कें ठाऊक नसे. मागें विवेचन केलेल्या दोन भ्रमांस अनुसरणारे जसे पुष्कळ असत तसेच यावर पूर्ण भरंवसा ठेवणारेहि होते. असो; तर याप्रमाणें वरील समज सर्वांचा होऊन गेला असल्यामुळें प्राचीन काळीं ज्योतिषाचें ज्ञान करून घेण्याची उत्कंठा व त्यांत नवे नवे शोध लावण्याची हौसहि पुष्कळ लोकांस असावी यांत संशय नाहीं. आणि याच दोन्ही गोष्टी प्रस्तुत शास्त्राच्या उदयास कारणीभूत झाल्या असाव्या. असें नसतें तर तादृश ज्ञानसंपन्न नसणाऱ्या राष्ट्रांतहि या शास्त्राची बरीच माहिती असल्याचें आढळतें ना. पण यावर कोणी कदाचित् अशी शंका घेतील कीं, हें शास्त्र जर केवळ भ्रांतिमयच होय, तर याचा अभ्यास एवढे परिश्रम घेऊन लोक करीत असत हें कसें? ग्रहांचीं फलें वगैरे गोष्टी सर्व खोट्याच जर असत्या तर तीं समजण्याविषयीं सर्वांनीं एवढा अटाट कशाला केला असता? या शंकेचें समाधान असें आहे कीं, ज्या वेळेस या शास्त्राचें वर सांगितल्याप्रमाणें मोठ्या हौसेनें लोक आपणास ज्ञान करून घेत त्या वेळेस त्याचें खोटेंपण प्रगट झालें नव्हतें. नवग्रह, राशिचक्र, नक्षत्रें वगैरेंची व्यवस्था करून लोक जेव्हां पहिल्यानें गणितें करूं लागले व कुंडल्या मांडूं लागले, तेव्हां तें सर्व खरें आहे अशा समजुतीवरच लोकांत तो प्रघात पडला. अंतरिक्षांतील ग्रहांच्या गत्यादिकांवर इहलोकच्या संसारादि कृत्यांचा ठोकताळा मिळतो या समजुतीवर ज्योतिष्यांनीं पहिल्यानें नियम बांधले,—कीं अमुक अमुक योग आला असतां त्याचें अमुक अमुक फल प्राप्त व्हावयाचेंच. हेच नियम पुढें दृष्ट दृष्ट विस्तार पाडून होतां होतां प्रस्तुत काळीं

निरनिराळ्या देशांत या विषयावर जे सर्वमान्य ग्रंथ होऊन बसले आहेत ते निर्माण झाले. आणि त्यांवर विश्वास ठेवण्याचाहि प्रघात पितृपुत्रपरंपरेनें फारां दिवसांपासून चालत आल्यानें तोच अजूनपर्यंतहि सामान्यतः अविच्छिन्नपणें चालू असलेला आढळतो. तरी प्रस्तुत विषयाविषयीं ज्यांनीं यथार्थपणें विचार केला त्यांस या शास्त्रांतील नियमांचा असंबद्धपणा लक्षांत येऊन ग्रहणनक्षत्रादिकांवरचा त्यांचा विश्वास उडाला असें मागील काळाच्या इतिहासावरून सुद्धां पुष्कळ दिसून येतें. अशीं उदाहरणें कांहीं पुढें देण्यांत येतीलच. त्यांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच कीं, ज्योतिषावर पूर्वीपासूनहि सर्वांचाच सारखा विश्वास होता असें नाहीं. हा विश्वास होतां होतां हल्लींच्या काळीं तर सर्व सुधारलेल्या देशांतून बहुतेक नाहींसाच झालेला आहे. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत शास्त्राच्या असत्यत्वाचें अज्ञान हेंच त्याच्या वृद्धीस कारण झालें; आणि शेवटीं त्यांतला असत्याचा जेवढा भाग होता तेवढा निराळा होऊन खरें जें ज्योतिष तें मात्र आयतें जगांत प्रगट झालें.

वर जो ज्योतिषाचा प्रकार सांगितला तसाच प्रकार रसायनशास्त्र व खनिजपदार्थविषयक शास्त्र यांचाहि झाला. तो असा कीं, या शास्त्रांतले शोध करण्याविषयीं लोकांची पहिल्यानें प्रवृत्ति जी झाली ती केवळ भ्रमामुळें झाली, आणि होतां होतां सरते शेवटीं त्यांतून वरील उपयुक्त शास्त्रांचा प्रादुर्भाव झाली. तांब्याचें सोनें करण्याचा रस, लोखंडास घासल्याबरोबर त्याचें सोनें बनवणारा परीस, काया अमर करणाऱ्या वनस्पति, द्रव्यांजन, वगैरे केवळ मनःकल्पित पदार्थ शोधून काढण्याकडे लक्षावधि भ्रांतिष्ट लोकांची प्रवृत्ति झाल्यानें एकंदर जगाचें फार कल्याण झालें. ह्मणजे वरील वस्तु सांपडल्या असें तर नाहीं, पण वरील नादास इतके लोक गुंतल्यामुळें लोकांच्या ध्यानीं मनींहि नव्हत्या अशा अनेक गोष्टी उदयास आल्या. उदाहरणार्थ लोहचुंबक घ्या. या खनिज द्रव्याच्या अंगीं केवढे अद्भुत गुण आहेत, व त्यांच्या योगानें जगाचें केवढें अपरिमित कल्याण झालें आहे, या गोष्टी कोणास सांगावयाला पाहिजेत ! या एकट्या पदार्थानें जगांत जेवढे चमत्कार झाले आहेत त्याचा शतांशहि परीस खरोखरच सांपडल्यानें झाला असता काय ? समजा कीं इतक्या लोकांच्या वेडेपणाच्या श्रमाची कींव येऊन देवानें त्यांस परीस सांपडूं दिले असते तर जगांत सध्यां आहे त्याहून कितीशी बदल झाली असती ! जो क्षणभर विचार करील त्यास सहज कळून येईल कीं, अपूर्णांकांतील भाजकांस आणि भाज्यास सारख्याच केवढ्याहि मोठ्या संख्येनें गुणिलें असतां जसा मुळींच फरक पडत नाहीं, त्याचप्रमाणें सध्यां आहे त्याच्या कोट्यावधिपट सोनें जरी पृथ्वीवर झालेंसें कल्पिलें, तरी तिळमात्रहि मनुष्याच्या स्थितींत फेर पडणार नाहीं. वरील अपूर्णांकांत दोन्ही आंकडे बरीक जसे भले मोठे भव्य दिसतील, त्याप्रमाणें घरीं दारीं जिकडे तिकड सोनेंच

सोनें होऊन शिलंगणाच्या दिसचा मात्र थाट उडेल; पण त्या खऱ्याखुऱ्या सोन्याची किंमत त्या नामधारी सोन्याहून फार जास्त होणार नाहीं.[1] असो; तर याप्रमाणें वरील भ्रमांच्या मागें लागतां लागतां मनुष्यास खऱ्याखुऱ्याच मोठमोठ्या वस्तूंचा लाभ झाला; तसा त्या भ्रमात्मक पदार्थांच्या प्राप्तीनेंहि होताना. हा सगळा प्रकार मृगजळाचा पाठलाग करतां करतां खरीखुरीच एखादी चांगली नदी लागण्याप्रमाणें होय. किंवा इसापनीतींतील शेतकऱ्यांच्या लेकांच्या सारखा होय. त्यांनीं ज्याप्रमाणें शेतांत ठेवा मुळींच नसतां तें शेत चोहोंकडून चांगलें पोखरलें, आणि सरतेशेवटीं बापाचें डबोलें जरी सांपडलें नाहीं, तरी शेताचें पीक फार आल्यानें त्यांची भरपाई झाली; त्याप्रमाणेंच वरील भ्रमांनीं वेडे होऊन लोक हिंडतां हिंडतां त्यांस वरील शास्त्रांतील कित्येक गूढ रहस्यें कळून येऊन त्यांचा क्रमाक्रमानें जगांत प्रसार झाला.

४. वर प्रस्तुत शास्त्राची उत्पत्ति व प्रसार कसा झाला याविषयीं लिहिलें. आतां त्याचा पूर्वापारपासून प्रचार कसा चालत आला आहे तो पाहूं. मागें सांगितलें आहेच कीं, या शास्त्राची माहिती फार प्राचीन काळच्या राष्ट्रांसहि होती; तेव्हां यावरून स्पष्ट आहे कीं ग्रहनक्षत्रादिकांचें माहात्म्य तेव्हांपासून चालत आलें आहे. आणि अलीकडच्या कालापेक्षां तो मागला काळच कोणत्याहि प्रकारचा विश्वास विशेष दृढ बसण्यास पुष्कळ कारणभूत होता हें उघड आहे. कारण एक तर दिवसेंदिवस जगांत ज्ञानाचा अधिकाधिक प्रसार होत चालला आहे, तेव्हां समंजसतेच्या संबंधानें पूर्वीच्या काळाला व आतांला पुष्कळच फेर आहे. दुसरें असें कीं, दिवसेंदिवस मनुष्य अधिक शहाणें व लबाड होत चालल्यामुळें पूर्वीच्या सारखा भोळेपणा व भाविकपणा आतां कोठेंहि राहिला नाहीं. तिसरी गोष्ट अशी कीं, प्राचीन काळीं अर्वाचीन काळाइतकें सृष्टिज्ञान चोहोंकडे फैलावलें नसल्यामुळें सृष्टींत कांहीं उत्पात

---

१. अमेरिकेचा शोध लागून तेथील सोन्याच्या खाणी जेव्हां स्पेन देशाच्या ताब्यांत आल्या, तेव्हां कित्येक वर्षेपर्यंत सोन्याचा भाव पुष्कळ उतरला होता ही गोष्ट अर्थशास्त्रप्रसिद्ध आहे. तशीच लंकेंत गेलेल्या न्हाव्याचीहि गोष्ट आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित् माहीत असेलच. ती अशी कीं, कोणी एक न्हावी लंकेंतील सोन्यांच्या विटांची कीर्ति ऐकून तेथें आपलें कसब चालवण्याकरितां गेला. मग पहिल्याच हजामतीस एकदम पांच विटा मिळालेल्या पाहून त्यानें मनांत आणलें कीं, आतां बरें झालें; जन्माची दगदग चुकली! याप्रमाणें मनाचे मांडे यथेच्छ खातो आहे इतक्यांत बायकोनें येऊन सांगितलें कीं, घरांत दाणे नाहींत. यानें उत्तर केलें कीं आतां कोणत्याहि गोष्टीची दहात नाहीं, आजच्या पांच विटा आपल्याच जन्माला तर काय, पण आपल्या पाठीमागेंहि पिढ्यानपिढ्या पुरण्यासारख्या आहेत! अशा घमेंडींत स्वारी बाजारांत जों गेली तों शेरभर दाण्यास चार विटा एकदम खाडदिशीं गेल्या! सारांश, सोन्याची आणि संपत्तीची वस्तुतः एकात्मता नाहीं; आहे ती केवळ त्यांच्या वैरल्यावरूनच होय.

किंवा अपूर्व चमत्कार एकाएकीं घडून आले असतां मागल्याप्रमाणें आतां लोक भयाभीत होऊन जात नाहींत. ज्या गोष्टींचें आतां कोणास कांहींहि वाटत नाहीं त्यांचाच पूर्वीच्या लोकांस केवढा धाक वाटत असे हें पाहून मोठी मौज वाटते ! ग्रीस देशाच्या इतिहासांत अशी एक गोष्ट लिहिलेली आढळते कीं, एशिया मैनर प्रांतांत पूर्वी लिडिया आणि मीडिया नांवाचीं दोन राज्यें होतीं. यांचीं निकट संबंधामुळें वरचेवर परस्पर युद्धें होत. एकदां असें झालें कीं, दोन्ही पक्षांचीं दलें समरांगणांत समोरासमोर उभीं राहून आतां चकमक उडावी इतक्यांत सूर्यास ग्रहण लागून खग्रास पडत चालला. होतां होतां पूर्ण ग्रास होऊन सगळ्या रणभूमीवर ठिक्कर काळोख पडला. नक्षत्रें पुनः दिसूं लागलीं. पशुपक्ष्यादि प्राणिजात व वनस्पतिवर्ग हीं एकाएकीं भयचकित झाल्यासारखीं होऊन क्षणभर व्यापारशून्य व स्तब्ध झालीं. संपूर्ण सृष्टि अतिशयित उदास व भयाण वाटूं लागली. सारांश, तो अपूर्व देखावा पाहून दोहों पक्षांचे वीर भयानें अगदीं गडबडून गेले, आणि आपणांवर ईश्वराचा अत्यंत क्षोभ झाला असें मानून दोन्ही सैन्यांनीं युद्धाचा संकल्प तात्काळ सोडून दिला आणि तीं परत आपआपल्या स्थलास गेलीं.[1] कोलंबसाविषयींहि अशी एक गोष्ट वाचण्यांत आली आहे कीं, तो अमेरिकेजवळील एका बेटांत असतां लवकरच चंद्रग्रहण येणारें आहे असें जाणून तेथील लोकांस आपले अगदीं आज्ञांकित करून टाकण्याचा त्यानें त्या ग्रहणावरून बेत योजला. तो असा कीं, ते लोक आपणास पूर्वीप्रमाणें न भजतां आपली अंमळ अवज्ञा करूं लागले असें पाहून त्यानें त्यांच्या मनांत दहशत बसण्याकरतां त्यांस असें कळविलें कीं, तुमची वर्तणूक अलीकडे अगदीं गैर होत चालली आहे तर मी याबद्दल देवाच्या कानावर घालून तुह्मांस शासन करवीन. अशी त्यांस धमकी देऊन ग्रहणाच्या दिवशीं त्यानें त्यांस सांगितलें कीं, तुह्मीं अजून माझें ऐकत नाहीं, तर पहा आज रात्रीं मी आपलें सामर्थ्य तुमच्या चांगलें टळटळीत प्रत्ययास आणून देतों. मग पौर्णिमेचा चंद्र नेहमींप्रमाणें अत्यंत देदीप्यमान उगवला असतां कांहीं वेळानें तो काळा होत जातांना जेव्हां त्या बेटांतील लोकांनीं पाहिला, तेव्हां त्यांस मोठी धास्ती पडून ते कोलंबसापाशीं मोठ्या नम्रपणानें आले, आणि त्याच्या पायां पडून आपल्याबद्दल देवापाशीं रदबदली करण्याविषयीं ते त्याची विनवणी करूं लागले. कोलंबसानें त्यांचें बोलणें मान्य करून सांगितलें कीं, जर तुह्मांस खरोखरच पश्चात्ताप झाला अ-

१. सूर्याचें खग्रास ग्रहण इतिहासप्रसिद्ध असणारें असें हे पहिलें होय. हे इ० स०च्या पूर्वी ५८४ व्या वर्षी घडलें. हेंच ग्रहण थेल्सनामक ग्रीक पंडितानें आधीं वर्तवून ठेविलें होतें, यावरून वरील दोन प्रांतांतील लोकांपेक्षां त्या वेळींहि ग्रीक लोक अधिक ज्ञानसंपन्न होते हें स्पष्ट दिसतें.

सेल तर तुमचें संकट दूर करण्याविषयीं मी पुनः देवाची प्रार्थना करतों. असें ह्मणून तो प्रार्थना करण्याचे निमित्तानें आपले खोलींत एकांतीं गेला. मग कांहीं वेळानें सृष्टि-नियमाप्रमाणें ग्रहण सुटलेंच; पण तें कोलंबसाच्या योगानें झालें अशी त्या अडाणी लोकांची खात्री होऊन तेव्हांपासून ते कोलंबसास पुष्कळच मान देऊं लागले. असो; तर याप्रमाणें सूर्याच्या व चंद्राच्या ग्रहणांची वास्तविक उपपत्ति माहीत नसल्यामुळें प्राचीन काळीं त्यांचें लोकांस इतकें भय वाटत असे. असाच प्रकार धूमकेतूंचा. हे तर वरील ग्रहणांहूनहि क्वचित् येणारे असल्यामुळें व यांचा आकारहि मोठा विचित्र असल्यामुळें यांचा वरच्याहूनहि धाक लोकांस पडे. हीं शेंडीं नक्षत्रें आकाशांत दिसूं लागलीं कीं, देशांत दुष्काळ, सांथी, लढाया, धरणीकंप वगैरे प्रलय कांहीं तरी व्हावयाचेच अशी साऱ्या जगाची समजूत होऊन बसली आहे. असो; तर याप्रमाणें सृष्टीतील चमत्कारांचें यथावत् स्वरूप मागील काळच्या लोकांस समजत नसल्यामुळें ज्योतिषावर वगैरे त्यांचा सर्वथैव निर्धार असे. शिवाय दुसरें असें कीं, ज्योतिषांतील कांहीं भागाची ह्मणजे ग्रहणांची वगैरे लोकांस नेहमीं बरोबर प्रचीती येत असे; तेव्हां इतर भागांसहि त्याप्रमाणेंच खरें मानणें त्यांस भाग पडे. आतां जसा त्या शास्त्रांतील खऱ्या खोट्या भागांचा साफ निकाल झालेला आहे तसें पूर्वीं नसल्यामुळें संदेहात्मक भागांवरहि लोकमतें निश्चयात्मकताच येत असे. तर याप्रमाणें प्राचीनकाळीं ग्रहनक्षत्रादिकांच्या शुभाशुभत्वावर लोकांचा पक्का विश्वास बसून राहिला होता. आणि पुढें हळू हळू धर्मांत व लोकव्यवहारांत ज्योतिष शिरून मुहूर्ताचा वगैरे जेव्हां विचार होऊं लागला, तेव्हां वरील विश्वासास तर अधिकच बळकटी आली. ती अशी कीं, वरील विश्वास हें धर्माचें व लोकाचाराचें एक कलमच बनून जाऊन त्याचा अभाव हें नास्तिकपणाचें व तऱ्हेवाईकपणाचें चिन्ह झालें. असो; तर ज्योतिषाचें प्राबल्य सर्व जुन्या राष्ट्रांत जें इतकें माजलें त्याचीं कारणें वर सांगितल्याप्रमाणें होत. हें प्राबल्य अजूनहि सर्वथैव मोडलेंसें ह्मणतां येत नाहीं. सुधारलेले ह्मणविणाऱ्या देशांतूनहि वरील प्रकार आढळतातच आणि त्यांतून आमच्या देशांत तर कांहीं विचारूंच नये! विद्वान् अविद्वान् वगैरे सर्व लोकांचा प्रस्तुत विषयावर केवढा विश्वास आढळतो, व त्याचा प्रचार किती बारीक गोष्टींपर्यंत गेलेला आहे याची माहिती आमच्या वाचकांपैकीं कोणासहि नवी द्यावयास पाहिजे असें नाहीं.

५. येथपर्यंत प्रस्तुत विषयाचें उपोद्घातरूपानें कांहीं विवेचन झालें. आतां मुख्य विषयाविषयींच विचार करूं;—ह्मणजे ज्योतिषाची लोकभ्रमांत कां गणना केली याचीं कारणें लिहितों. हें करण्याच्या अगोदर पुढील प्रतिपादनावर येणाऱ्या एका आक्षेपाचें निवारण केलें पाहिजे. तो हा कीं, यापुढें ज्योतिषांच्या विरुद्ध जें आह्मीं मत देणार तें त्या विषयावरील ग्रंथ वाचल्याशिवाय अगोदरच देण्यास आह्मांस अधिकार

काय ? 'मुहूर्तमार्तंड', 'वृहज्जातक' वगैरे ग्रंथांचें यथास्थित अध्ययन करून त्याप्रमाणें गणितें करून त्यांचा ठोका जेव्हां पहावा तेव्हां मग त्यांच्या खेरखोटेपणाविषयीं बोलावें. आधीं बोलण्यांत काय जीव ? असा वाद जर कोणी प्रस्तुत विषयाचे कैवारी घेतील तर त्यांस आमचें उत्तर असें आहे कीं मागील दोन खेपेस जसे आह्मी भूतविद्या किंवा शकुनविद्या न शिकतां केवळ चार चौघांच्या समजुतीवरूनच अभिप्राय दिले त्याचप्रमाणें प्रस्तुत विद्येविषयींहि होण्यासारखें आहे, ह्मणजे आकाशांतील गोलांच्या गतींवर मनुष्यास होणाऱ्या इष्टानिष्ट गोष्टींचें बरस्तान असण्याचा संभव किती, व ज्योतिष्यांनीं केलेल्या गणितांचा ठोकताळा किती वेळां बरोबर उतरतो, या दोन गोष्टींचा शोधक बुद्धीनें जो अंमळ विचार करील त्यास प्रस्तुत विषयावर निर्णय देण्यास फार आयास पडणार नाहींत. आणि हा निर्णय कोणी मनुष्यानें वरील ज्योतिषग्रंथ मुळींच न पहातां जरी दिला, तरी तसें असल्यानें त्याच्या निर्णयास यत्किंचित्हि दुर्बलत्व येणारें आहे असें नाहीं.

६. तर आतां वरील दोन गोष्टींविषयीं यथानुक्रम विचार करूं. पहिली गोष्ट ही कीं, अंतरालांतील गोल आणि या आपल्या गोलावर जीं आपण मनुष्यें आहों यांचीं संसारकृत्यें यांचा परस्पर कांहीं संबंध आहे कीं नाहीं. अशा प्रश्नांवर निश्चयात्मक उत्तर देणें फार कठिण आहे; कां कीं, सगळ्या सृष्टींचा परस्पर किती संबंध आहे किंवा मुळींच नाहीं वगैरे गोष्टींविषयीं अल्पज्ञ जो मनुष्य त्यास कसें ज्ञान व्हावें? या सर्व गोष्टी एका सृष्टिकर्त्यास मात्र माहीत ! असो; पण एवढें खरें आहे कीं, असा जर कांहीं विचित्र संबंध असलाच, तर तो मनुष्यास कळण्याचा बिलकूल मार्ग नाहीं. आणि हल्लीं जे संबंध ज्योतिषग्रंथांत लिहून ठेवले आहेत ते केवळ काल्पनिक होत. ह्मणजे ग्रहनक्षत्रादिकांचा अमुक अमुक योग आला असतां अमुक अमुक व्हावें असें, तशी गोष्ट केवळ यदृच्छेनें एक दोन वेळां घडली असतां ज्योतिषकारांनीं लिहून ठेविलें असावें इतकेंच दिसतें. याच्या पलीकडे तसल्या नियमांत कांहीं तथ्य नाहीं. याखेरीज दुसऱ्याहि आणखी कित्येक गोष्टी मनांत येतात, कीं ज्यांवरून अमुक अमुक ग्रह आला असतां अमक्या अमक्या मनुष्यास वाईट वगैरे सर्व निवळ भ्रांति आहे अशी खात्री होते. पहा कीं, आपल्या भाषेंतील ह्मणीप्रमाणें दररोज सव्वा लक्षाची घडामोड आहे, ह्मणजे प्रतिदिवशीं लाखों मनुष्यें जन्मास येत आहेत आणि लाखों मरण पावताहेत. आतां या लाखांमध्यें अगदीं त्याच पळास किंवहुना विपळास जन्मलेलीं मनुष्यें किती सांपडतील बरें ? समजा कीं, आपण एक विविक्षित काळ धरला, आणि त्याच काळीं अगदीं बराबर जन्मास आलेलीं एक दहा हजार मनुष्यें घेतलीं. आतां ज्योतिषविद्येच्या सिद्धांताप्रमाणें झालें ह्मणजे या दहा हजार मनुष्यांचे जन्मकाळचे योग अगदीं सारखे असल्यामुळें त्यांस

पुढील संसारांत सारख्याच बऱ्या वाईट गोष्टी घडून त्या सर्वांची आयुष्यमर्यादाहि अगदीं सारखी असायास पाहिजे. पण अशी प्रचीती कधीं तरी येते काय? अमुक अमुक दोन मनुष्यांस सारख्याच विपत्ति आल्या व सारखींच सुखें प्राप्त झालीं असें कधीं कोणाच्या ऐकण्यांत आलें आहे? ज्यास त्यास बहुतकरून ज्याच्या त्याच्या बऱ्या वाईट कृतीप्रमाणें बरे वाईट परिणाम आजपर्यंत घडत आले आहेतच. जी रास व जें नक्षत्र एकास रंकाचा राजा करतें तीच रास व तेंच नक्षत्र दुसऱ्यास राज्यपदावरून खालीं ढकलून देतें. तेव्हां यावरून हें स्पष्ट दिसत नाहीं काय, कीं, ज्या अर्थीं वरील नक्षत्रांपासून व नक्षत्रराशींपासून एकेच प्रसंगीं अशीं परस्परविरुद्ध कार्यें घडतात त्या अर्थीं त्या प्रसंगीं त्यांवर कारणत्वाचा आरोप करणें हें केवळ असमंजस होय!

इंग्रेजी ज्योतिषाची—ह्मणजे प्राचीन काळच्या ज्योतिषावर इंग्रेज वगैरे लोकांनीं अलीकडे जे पुष्कळ नवे नवे चमत्कारिक शोध केले आहेत त्यांची—ज्यांस माहिती असेल त्यांस प्रस्तुत विषयावर आणखीहि कांहीं चमत्कारिक आक्षेप काढतां येतील. ते असे, आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस बहुधा माहीत असेलच कीं, गेल्या शंभर वर्षांत पुष्कळच नव्या ग्रहांचा शोध लागला आहे. इ० स० १७८१ सालापर्यंत साऱ्या जगास माहीत असलेले ग्रह झटले ह्मणजे बुध, शुक्र, मंगळ, गुरु आणि शनि असे पांचच काय ते होते. पण तेव्हांपासून आजपर्यंत एकामागून एक असे नवे ग्रह सांपडतां सांपडतां सध्यां त्यांची संख्या शंभरावर गेली आहे; आणि यापुढें आणखी कितीकांचा शोध लागेल हेंहि सांगवत नाहीं. मग या गोष्टीवरून ही एक मोठी शंका प्राप्त होत नाहीं काय, कीं जर वर सांगितल्या पांचांचींच फळें सगळ्या जगाला बाधतात तर या बाकीच्या मंडळीचींहि कां बाधूं नयेत? पूर्वीच्या ज्योतिष्यांस न दिसले ह्मणून हे सर्व नवे ग्रह सगळ्यांच्या राशीस लागायास चुकले असतील काय? बाकीच्यांच्या प्रमाणेंच यांनींहि शक्त्यनुसार जगास पीडा व सुख हीं दिलीं असतीलच. पण चमत्कार पहा कीं, गेल्या शंभर वर्षांपर्यंत पांचांची मात्र गणना होऊन बाकीची एवढी मंडळी धड जमेंत ना खर्चांत!! आणि याखेरीज सूर्यमालेच्या आणखी दूर दूर कोंपऱ्यांत आजपर्यंत दृष्टि चुकवून जे कोणी बसले असतील ते निराळेच! दुसरा आक्षेप असा कीं, आपली पृथ्वी ही ग्रहगणांतच मोडते; ह्मणजे सूर्यमालेंत पहिला ग्रह बुध, दुसरा शुक्र आणि तिसरी पृथ्वी होय. तेव्हां यावरून सहज ध्यानांत येईल कीं, या गोलावरील लोकांस जसा बुधाचा, शुक्राचा, मंगळाचा धाक वाटतो, त्याप्रमाणेंच वरील ग्रहांवर रहाणाऱ्या लोकांसहि (लोक असले तर!) आमच्या पृथ्वीचा धाक वाटत असेल. तेव्हां ज्योतिषांनीं गणित करतांना आपल्या पायाखालच्या ग्रहांचेंहि फळ वर्तविलें पाहिजे!! तें वगळतां कामा नये!

आणखी असें पहा कीं, ग्रहांच्या गतीवर मनुष्यमात्राच्या सुखदुःखाचें जर अवश्य अवलंबन आहे, तर जो प्रकार एके देशांत आढळावा तोच सर्वत्रहि आढळण्यांत यावा हें न्यायाच्या दृष्टीनें युक्त आहे कीं नाहीं ? जर आहे, तर तसा प्रकार दृष्टीस पडतो काय ? आमच्या देशांत जर बारावा बृहस्पति वाईट, अमुक स्थानीं असलेला मंगळ चांगला, तर तसेंच चोहोंकडेहि लागू पडावें. पण निरनिराळ्या राष्ट्रांतील ज्योतिषविद्येचे प्रकार पाहिले तर ते सारखेच जमतील असें वाटत नाहीं. एका देशांत ज्या स्थानाचा जो ग्रह इष्ट किंवा अनिष्टकारक मानला असेल त्याच स्थानाचा तोच ग्रह दुसऱ्या देशीं विपरीत असेल. शिवाय वरील ग्रहांची सर्वांवर सारखीच दृष्टि असावी. एका मनुष्यास जर त्यापासून पीडा झाली तर दुसऱ्यासहि ती अवश्य व्हावयासच पाहिजे. पण असें कोठें आढळतें ? येथें कोणाच्या राशीवर शनि महाराजांची स्वारी वळली कीं, त्यांच्या प्रीत्यर्थ लोहदान, तिलदान वगैरे हजारों धर्मकृत्यें केलीं तरी त्यांचा रोष कमी होत नाहीं; पण तीच स्वारी इंग्लंडांतल्या वगैरे मनुष्यांच्या बिलकूल वाटेस न जातां खुशाल आल्या वाटेनें चालती होते. तेव्हां या त्यांच्या पंक्तिप्रपंचाचें काय वरें बीज असावें ! ज्या अत्युग्र ग्रहानें प्रत्यक्ष शंकरावरहि दोन तीन घटका आपला प्रभाव गाजविला, ज्याची दृष्टि लंकापतीच्या सिंहासनावर सारखी लागली असतां लवकरच चौदाचौकड्यांचें राज्य फडशा होऊन गेलें, त्याचेंच सामर्थ्य यःकश्चित् परद्वीपस्थ मनुष्यांवर चालूं नये हें केवढें आश्चर्य ! तेव्हां एकंदरींत 'भितऱ्यापाठीं ब्रह्मराक्षस' ही म्हण मागील दोन लोकभ्रमांच्या संबंधानें जशी लागू पडते तशीच ती प्रस्तुतच्या संबंधानेंहि पडते असें सहजच म्हणणें येतें.

७. आतां प्रस्तुत विषयाच्या तर्फेचें दुसरें प्रमाण जो प्रत्यक्ष अनुभव त्याविषयीं विचार करूं. हें प्रमाणहि वरच्यासारखेंच प्रकृत विषयाचें खरेंपण सिद्ध करण्यास बांगलेंसें उपयोगी पडणार नाहीं, हें सर्वांस स्वतःच्या प्रचीतीवरून बहुधा माहीत असेलच. पहा कीं, जन्मपत्रिका, वर्षफल, मुहूर्त, प्रश्न वगैरे जे ज्योतिष्यांचे भविष्यवादाचे अनेक प्रकार असतात त्यांतून सर्वांशीं बरोबर प्रत्ययास उतरलेला एक तरी सांपडतो काय ? अमुक अमुक गोष्ट अमुक अमुक वेळीं घडेल असें सांगितलें, आणि तिचा नेमका ठोका आला, असें दोन चारदां तरी झालेलें कोणाच्या ध्यानीं असेल ? अशा गोष्टी कदाचित् एखाद्या दुसऱ्या वेळीं झालेल्या फार तर कोणीं पाहिल्या असतील; पण ज्या अर्थी त्या नेहमीं न होतां एखाद्या दुसऱ्या वेळेसच काय त्या घडतात, त्या अर्थी त्यांवर नियम बांधतां न येऊन त्या केवळ यदृच्छेनेंच घडल्या असें मानायला नको काय ? अर्थात् असेंच मानलें पाहिजे; त्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण असें नसून, समजा कीं पुढें होणाऱ्या गोष्टीचें ज्ञान होण्याचा

मार्ग मनुष्यास सांपडला, तर त्यापासून केवढा उपयोग होईल बरें ! सर्व मनुष्यांस व विशेषतः राजकारणी पुरुषांस, तर अशा ज्ञानापासून आपलें, केवढें हित करून घेतां येईल ? सध्यांच्या अज्ञान स्थितींत जसें करायाला जावें एक आणि होतें एक, दुसऱ्यास आपण मोठ्या युक्तीनें डावपेंच घालायला जावें, आणि मधेंच कांहीं अकल्पित गोष्टी घडून आपल्याच तंगड्या आपल्या गळ्यांत याव्या असे प्रकार भावी गोष्टींचें ज्ञान आपणास झालें असतां अगदीं टाळतां येतील हें उघड आहे. असो; तर याप्रमाणें भविष्यकाळाचें ज्ञान मनुष्यास अत्यंत हितावह होणारें आहे; आणि हें प्राप्त करून घेण्याचा एखादा खरा मार्ग जर आजपर्यंत कोणास उमगला असता, तर त्याच्या शोधार्थ लक्षावधि लोकांचे प्रयत्न सुरू झाले असते यांत अगदीं संशय नाहीं. पण प्रस्तुतच्या ज्योतिष विद्येसारखे जे कांहीं मार्ग चोहोंकडे प्रसिद्ध आहेत ते केवळ अनिश्चित होत, यास्तव यांच्यावर भोळे व भाविक अशा लोकांखेरीज कोणाचाहि पक्का विश्वास जडत नाहीं. असो; एकंदरींत हें भविष्यज्ञान ईश्वरानें केवळ आपणाकडेच ठेवून तें मनुष्यास होण्याचा बिलकूल मार्ग ठेवला नाहीं हें फार चांगलें झालें असेंहि आह्मी समजतों. कारण मनुष्याचा स्वभाव एकंदरींत पहातां मोठासा सुधा आहे असें नाहीं; आणि त्यांतून वरील ज्ञान त्यास अनुकूल झालें तर जगांत आणखी किती अनर्थ होतील हें सांगायाला नको ! सारांश, भविष्यकाळीं होणाऱ्या गोष्टींचें ज्ञान मनुष्यास होण्याचा अद्याप एकहि मार्ग कोणास सांपडलेला नाहीं; आणि तो आजपर्यंत न सांपडला व पुढेंहि कधीं सांपडूं नये यांतच एकंदर जगाचा निभाव आहे !

दुसरें प्रत्यंतर असें पहा कीं, ज्योतिषविद्येवरून पुढें होणाऱ्या गोष्टी जर सगळ्या बिनचूक कळतात, तर मग इतर सामान्य मनुष्याप्रमाणेंच ज्योतिष्यांवरहि संसारांतील संकटें कां गुदरतात ? जर त्यांस ग्रहाच्या गतीवरून भावी संकटें अगोदर समजतात, व त्यांचा प्रतिकार कसा करावा हेंहि जर त्यांस माहीत असतें, तर मग सर्व उपद्रवांपासून सर्व विपत्तींपासून वगैरे ते अगदीं मुक्त असावे कीं नाहींत ? पण असा प्रकार कोठें तरी आढळतो काय ? असो; तेव्हां या सर्व गोष्टींवरून एकंदरींत स्पष्ट दिसतें कीं, जोशांचा ठोका वगैरे सर्व लोकांचीं बोलणीं केवळ भ्रांतिमूलक होत. मागें शकुनांच्या निबंधांत सांगितलेल्या नेपचूनच्या गोष्टीप्रमाणें अज्ञान लोक फसले जातात इतकेंच काय तें. ह्मणजे जेवढ्या गोष्टी पटतात तेवढ्या मात्र घेऊन लोक त्यांवरून एकंदर सिद्धांत ठरवतात हींच त्यांची मोठी चूक असते. बाकी, जो मनुष्य प्रांजल बुद्धीनें पटलेलीं व न पटलेलीं अशीं दोन्हीहि उदाहरणें घेऊन त्या दोहींवरून सत्यासत्यत्वाचा निवाडा करूं पाहील त्याच्या ध्यानांत खरें तथ्य तेव्हांच आल्यावांचून कधींहि रहाणार नाहीं.

याप्रमाणें प्रस्तुत विषयावर दोन प्रकारचीं प्रमाणें दाखविलीं. त्यांवरून आमच्या समंजस वाचकांची खात्री झाल्याविना रहाणार नाहीं कीं, लहान मोठ्या सर्व कृत्यांत तिथि, वार, नक्षत्रें वगैरेंचीं फलें पहाण्याचा जो प्रघात आपल्या देशांत आज हजारों वर्षें चालत आलेला आहे तो केवळ भ्रमात्मक होय. अंतरालांत जे लक्षावधि गोल फिरताहेत त्यांच्या अनादिसिद्ध गतीचा आणि आपल्या या यःकश्चित् क्षुद्र गोलावर कीटवत् इतस्ततः संचार करणारे जे आपण मानवी प्राणी यांच्या संसारकृत्यांचा परस्पर संबंध असावा हें मुळींच संभवत नाहीं. जगन्नियंत्याच्या इच्छामात्रेंकरून प्रेरित होत्सतीं वरील तेजें आपापलीं नियतकालिक परिभ्रमणें अंतरिक्षांत परिपूर्ण करीत आहेत;—त्यांस या आमच्या लहानशा जगांत आमच्या मतें मोठमोठ्या उलाढाली झाल्या तरी त्यांशीं काय कर्तव्य आहे? तीं कोणीकडे आणि आह्मी कोणीकडे! आमचे मल्हारराव महाराज पदच्युत होऊन जन्मकैदेंत गेले, किंवा उद्यां रशियन लोकांनीं सगळा अफगाणिस्थान सर केला, तर या गोष्टीचा पुकारा सगळ्या जगभर करण्यास शनीनें अमुक स्थानीं यावें, गुरूनें अमुक अमुक जागा पतकरावी, सूर्यानें आपल्या भोंवतीं खळें उत्पन्न करावें, किंवा एखाद्या धूमकेतूनें उद्यास यावें एवढी खटपट वरील खस्थ पदार्थांस करण्याची काय गरज आह? बडोद्याचे गायकवाड, सेंटफिटसेंबर्गचे झार, यांची कीर्ति सूर्यमालेंतील दूरदूरच्या ग्रहांपर्यंतहि गेली आहे काय? आणि एकाचा अपकर्ष व दुसऱ्याचा उत्कर्ष या गोष्टी एकंदर सृष्टीच्या मानानें पहातां एवढ्या महत्त्वाच्या आहेत काय, कीं खरेंखोटें दुःखप्रदर्शन किंवा आनंदप्रदर्शन करण्यास येथें जसे जागोजाग लोक जमतात त्याचप्रमाणें आकाशांतहि चोहोंकडे एकदम मोठा हाहाकार व्हावा! आह्मांस तर वाटतें कीं, एकंदर विश्वाच्या मानानें पहातां आमच्या पृथ्वीवरील मोठमोठे बादशहा व सार्वभौम राजे यांची योग्यता आणि मधाच्या पोळ्यावर स्वामित्व गाजविणारी राणी माशी किंवा वारुळाची नायकीण राणी मुंगी यांची योग्यता या परस्पर सारख्याच होत!! ज्या काळीं पृथ्वी ही अवघ्या विश्वाचा मध्य असून सर्व ग्रहगण व ज्योतिर्गण तिच्याभोवतीं सतत भ्रमण करताहेत अशी एकंदर जगाची समजूत होती, व सूर्यचंद्रादि खस्थ पदार्थांचें वास्तविक परिमाण माहीत नसून सूर्यमालेची यथावत् स्थिति लोकांत प्रगट झालेली नव्हती, तेव्हां वरील कल्पना होत्या हें ठीकच होतें. त्या वेळेस जग काय तें आपली पृथ्वी मात्र मानली असून बाकीचे सर्व खस्थ पदार्थ हे केवळ तींवर रहाणाऱ्या प्राणिमात्राकरतां व विशेषतः मनुष्याकरतांच निर्माण केले आहेत असें सर्व समजत असत.[1] जसें एखादें मोठें मंदिर असावें आणि त्यांत हजारों पदार्थ कोंहीं

१. ज्योतिषशास्त्रासंबंधीं पुष्कळ चमत्कारिक नवे शोध करून तें पूर्णत्वास आणल्याचा (पुढें चालू).

उपयोगाकरतां व कांहीं केवळ शोभेकरतां ठेवले असावे, त्याचप्रमाणें आपली पृथ्वी ही देवानें मनुष्याकरतां बांधलेला एक मोठा महाल असून सूर्यचंद्र हे त्यास प्रकाश देण्याकरतां व नक्षत्रें, ग्रह वगैरे हे केवळ शोभेकरतां उत्पन्न केले आहेत अशी पुरातन काळच्या लोकांची समजूत होती. अशा वेळीं पृथ्वीवरील मोठमोठे राजे यांचें एकंदर विश्वाच्या मानानें—(त्या वेळेस एकंदर विश्व ह्मणजे पृथ्वीच काय ती !) मोठेंच महत्त्व असून त्यांस घडलेल्या इष्टानिष्ट गोष्टींचीं चिन्हें सगळ्या सृष्टींत दिसावीं हें साहाजिकच होतें; ह्मणचे प्राचीन महाकाव्यांतून जीं वरील प्रसंगीं उत्पातादिकांचीं वर्णनें असतात तीं त्या वेळच्या लोकांस तशीं वाटावीं हें सहजच आहे. पण हल्लींच्या काळीं वरील मान सगळें अगदीच फिरून गेलें आहे. ह्मणजे सूर्य व त्याच्या भोंवतालचें आपली पृथ्वी आदिकरून ग्रहांचें लटांबर यांचीहि एकंदर विश्वांत कोणीकडच्या कोणीकडे मुळींच दाद लागत नाहीं. समुद्रावरील वाळवंटांतला एखादा खडा नाहींसा झाला असतां जसा तो कोणास कधींहि उमगला जाणार नाहीं, त्याचप्रमाणें अवघ्या विश्वाच्या एकंदर अवाढव्य विस्तारांतून आमची सूर्यमालाची माला अजीबात गडप जरी झाली तरी सुद्धां कांहीं समजण्यांत येणार नाहीं असें ज्योतिषवेत्ते ह्मणतात! मग एवढ्या प्रचंड सूर्याची व शनि गुरु सारख्या शंभर ग्रहांची ज्या विश्वांत इतकी योग्यता तेथें आमच्या एवढ्याशा एका गोलाला कोण विचारतो ! आणि सरतेशेवटीं या यःकश्चित् गोळ्यावर तीन साडेतीन हाताची आपली भव्य मूर्ति मिरविणारे, 'स्टार ऑफ इंडिया' नांवाचे दहा पांच चांद अंगावर चमकणारे आणि 'नजर रख्खो' ह्मणून मोठ्या थाटांत ललकारत जाणारे, अशा आमच्या सेनाखासखेलांची किंवा तशींच झार महाराजांची स्वारी मनांत आणावी;—ह्मणजे ज्यांचें शुभाशुभ दाखविण्याकरितां नक्षत्रांनीं, ग्रहांनीं, धूमकेतूंनीं वगैरे नेहमीं जपत असलें पाहिजे, त्याचा खरोखरी पहातां एकंदर सृष्टींत केवढा बडिवार आहे याची कल्पना वाचकांच्या मनावर चांगली ठसल्याविना रहाणार नाहीं ! !

वरील प्रतिपादनावरून आमच्या सर्व सुज्ञ वाचकांच्या मनांत येईल कीं, या भूतलावर क्षणमात्र इतस्ततः संचार करणारा जो कीटकप्राय मनुष्य त्याच्या भातुकलीं.

मान जरी खिस्ती लोकांकडे आहे, तरी त्यांच्या 'पवित्र शास्त्रां'त या शास्त्राचें अज्ञान भरपूर दिसून येतें. यास वरील 'ईश्वरप्रणीत शुभवर्तमाना'ची पहिली ओंवीच मोठें प्रमाण आहे. ही ओंवी पुष्कळांस माहीत असेलच:—"ईश्वरानें आदौ आकाशें व पृथ्वी यांस उत्पन्न केलें."

वरील शब्द भाषांतरकाराच्या महाराष्ट्रभाषाभिज्ञतेचें जसें उत्कृष्ट प्रमाण होत; त्याप्रमाणेंच 'पवित्र शास्त्रा'चा खरा कर्ता कोण हेंहि ते साऱ्या जगास विदित करीत आहेत ! या दिल्लीदरवाज्यावरून आंतील इमारतीची बळकटी सर्वांस दिसून येईलच ! !

तल्यासारख्या चुटपुटत्या गृहकृत्यांचा आणि आकाशांत फिरणाऱ्या ग्रहनक्षत्रादिकांचा बिलकूल संबंध नाहीं. यास्तव त्यांच्या योगायोगांचा त्यानें हर्षहि मानूं नये व विषादहि मनांत बाळगूं नये. गिरणींत काम करणाऱ्या मनुष्याचें बरें वाईट होणें हें जसें भोंतालीं फिरणाऱ्या शेंकडों चाकांच्या गतीवर नाहीं, किंवा घड्याळाच्या तबकडीवरून जाणाऱ्या मुंगीचें शुभाशुभ लंबकाच्या हेलकाव्यावर किंवा आंतील चक्रांच्या फिरण्यावर नाहीं, त्याचप्रमाणें मनुष्याचीं या भूगोलावर स्थिति आहे. आकाशांत फिरणारीं तेजें हीं त्याच्या कल्याणाविषयीं अगर अकल्याणाविषयीं केवळ उदासीन होत. येथिल लोकांस शनीचा एवढा निरंतर धाक वाटतो, पण गेल्या वर्षीं कांहीं लोक तोफेच्या गोळ्यांत बसून जसें चंद्रावर गेले होते तसेच पुढें एखादे वेळेस जर कोणी शनीवर जातील, तर तेथिल लोकांस आमच्या विलक्षण व निरर्थक भयाचें मोठें आश्चर्य वाटेल; व आह्मी जसे त्यांच्या गोलास भितों तसेच तेहि कदाचित् आमच्या ग्रहाच्या वक्रदृष्टीस थरथरां कांपत असतील!! असो; तर या सर्व गोष्टी मनांत आणल्या असतां आमच्या वाचकांची खात्री होईल कीं, ज्योतिषविद्येवर आजपर्यंत जो सर्व लोकांचा विश्वास पक्का जडला असे त्यास त्यांचें अज्ञान व बुद्धीचा अपक्वपणा हींच केवळ कारणें होतीं. हीं आतां पुष्कळांच्या ठायीं दूर झालीं असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं मागील काळचा अज्ञानजन्य विश्वास अजून रहावा हें मुळींच संभवत नाहीं.

९. येथवर मुख्य विषयाचा बहुतेक विचार झाला. आतां आणखी एक दोन गोष्टींविषयीं लिहून हा निबंध आटपतों. एकही कीं, वर प्रस्तुत विद्येचें आह्मीं खंडन केलें यावरून तिचें प्रणयन करणारे व तिची पुढें वृद्धि करणारे जे होऊन गेले ते केवळ मूर्ख होते किंवा लोकांस फसवण्याच्याच हेतूनें त्यांनीं वरील ग्रंथ लिहिले असें ह्मणण्याचा आमचा बिलकूल रोंख नाहीं. उलटें आह्मीं मागें एकदां सांगितलेंच आहे कीं, प्रस्तुत शास्त्राच्या उदयास ज्ञानप्राप्तीची मनुष्याची स्वाभाविक उत्कंठा हीच मुख्यतः कारण झाली; आणि तिचे योगानें पहिल्या पहिल्यानें जरी भ्रमाचा मात्र प्रसार झाला तरी पुढें त्या भ्रमांतूनच खऱ्या शास्त्राचा प्रादुर्भाव झाला. यास्तव हल्लींच्या ज्ञानसंपन्नतेच्या काळीं जरी वरील शास्त्राचें विलक्षणत्व व असंमजसत्व पाहून आपणास हसूं आलें, तरी त्यापासून पुढें परिणाम कोणते झाले या गोष्टीवरच मुख्यत्वेंकरून लक्ष देऊन त्या व्यर्थ श्रम पावलेल्या शोधकांस आपण विशेष मानच दिला पाहिजे. दुसरें असेंहि आपण लक्षांत आणावें कीं, ते ज्या वेळीं जन्मास आले त्या वेळेस जग मूळच्या बाल्यावस्थेंतून नुकतेंच वर येऊं लागलें होतें, यास्तव हल्लींच्या इतका ज्ञानाचा प्रसार त्यावेळेस झाला नसल्याकारणानें वर वर्णिलेला भ्रम मनास जडणें हें केवळ साहजिकच होतें. पहा कीं, सूर्याच्या व चंद्राच्या ग्रहणांची उपपत्ति ज्यास माहीत नाहीं त्यास त्या दोहोंची बिंबें एकाएकीं काळीं ठिक्कर पडतांना पाहून मोठें

आश्चर्य व भय वाटणारं नाहीं काय ? त्यास वाटेल कीं, सृष्टीचा नेहमींचा क्रम बदलून हा एवढा उत्पात एकाएकीं कशामुळें झाला असावा बरें ? सगळ्या राष्ट्रावर ईश्वराचा क्षोभ होऊन त्यावें दर्शक तर हें नसेल ना ! कोलंबसानें अटलांटिक महासागरावर पहिल्यानें धाड घातली असतां होकयंत्राचा कांटा एकाएकीं उत्तरेकडचा दक्षिणेकडे वळतांना पाहून त्याच्या खलाशांस भय वाटलें तें जसें साहजिक होतें तसाच वरील प्रकार होय. या चमत्कारावें अजूनहि कांहींच कारण उगमलें नाहीं; पण पुढें कांहीं काळानें जर तें उगमलें तर कोलंबसास व त्याच्या खलाशांस विनाकारण भय वाटल्याबद्दल हसणें हें त्या वेळेस जसें असमंजस होईल, किंवा सध्यां तें कारण उमगलें नसतांहि तसें करणें हा जसा मूर्खपणा होय, तसाच वरचा प्रकार आहे. वरील ग्रहणांचें किंवा होकायंत्राचा कांटा ढळल्याचें आपणास सध्यां जें भय वाटत नाहीं त्याचें कारण वरील प्रकार हळू हळू आंगवळणीं पडल्यासारखे झाले आहेत हें होय; व सर्वांस समजून आलें आहे कीं, यापासून कांहीं होत नाहीं. पण असे चमत्कार ज्या लोकांस पहिल्यानेंच दृष्टीस पडतात ते अत्यंत भयचकित होऊन जात असतील त्यांत कांहीं नवल नाहीं. दुसरें उदाहरण धूमकेतूचें पहा. यांचें भ्रमण सरासरी अनिश्चितच आहे; व त्यामुळें यांच्या कक्षा सुमारानेंहि काढण्यास मोठ्या पटाईत ज्योतिष्यांसहि मोठीच मारामार पडते. तेव्हां यांचें दर्शन आकाशांत जें कधीं कधीं घडतें तें अर्थात्च अकल्पित घडून त्यांचें वास्तव्यहि अनिश्चितच असतें. शिवाय यांचा आकारहि बाकीच्या खस्थ पदार्थांहून अगदीं निराळा व तऱ्हेवाईक असल्यामुळें हे दिसूं लागले न लागले कीं सर्वांचें लक्ष यांच्याकडे लागतें. मग काकतालीयन्यायानें त्या देशांत किंवा आसपासच्या देशांत एखादा भयंकर उत्पात त्याच वेळेस सुरू असला किंवा पुढें लागलींच झाला, कीं लागलींच सर्वांची सहजच कल्पना बसते कीं, हें शेंडें नक्षत्र या उत्पाताचें सूचक होय. परस्पर केवळ असंबद्ध असणाऱ्या गोष्टांचाहि असा जम बसवणें हा मनुष्याच्या मनाचा एक धर्मच होय; यास इंग्रेजींत 'आसोसिएशन ऑफ ऐडियाज' [कल्पनांची संगति] असें ह्मणतात. ही संगति एकदां झाली ह्मणजे विरुद्ध प्रमाणें चांगलीं बलवत्तर दृष्टीस पडल्याखेरीज ती कधींहि मोडली जात नाहीं; ह्मणजे मनानें घेतलेल्या कारणांचा व कार्यांचा असंबंध पुष्कळदां दृष्टीस पडल्याखेरीज वरील ग्रह नाहींसा होत नाहीं. असो; तर याप्रमाणें सूर्यचंद्रांचीं ग्रहणें व शेंडीं नक्षत्रें हीं कधींमधीं एखादे वेळेसच काय तीं दृष्टीस पडणारीं असल्यामुळें वरच्यासारखी खोटी कल्पनासंगति लोक जी करीत ती स्वाभाविक करीत. समजा कीं, दररोज रात्रीं एक दोन शेंडीं नक्षत्रें उगवावीं असें जर असतें; किंवा गुरूवर, शनीवर वगैरे[1] जसा

१. गुरुला चार चंद्र [उपग्रह] आहेत. वास्तव त्यांच्या व सूर्याच्या मधामध एका

(पुढें चालू).

प्रकार आहे त्याप्रमाणेंच या आपल्या पृथ्वीवरहि दर रात्रीं चंद्रग्रहण असून सूर्यग्रहणेंहि महिन्यांतून दहा पांचदां व्हावीं असें जर असतें; तर बिचाऱ्या शेंडें नक्षत्रावरचा व राहूकेतूंवरचा आरोप केव्हांच उडून जाता, किंबहुना आरंभींच जडताना! आपला चंद्र कधीं अर्धा असतो, कधीं सगळा होतो, कधीं मुळींच नाहींसा होतो, याचा जसा विलक्षणपणा कोणास कधींहि वाटला नाहीं;-कां कीं, तो सृष्टिक्रमच होय अशी तेव्हांच एकदम मनुष्याची समजूत होऊन बसली-त्याचप्रमाणें वरील नक्षत्रांच्या लांब शेपटांचा व चंद्रसूर्यांवर अकस्मात् येणाऱ्या काळिमेचा कोणासहि मुळींच आचंबा वाटताना! 'अतिपरिचयावज्ञा' 'अति परिचय झाल्याच्या पोटीं अवज्ञा उत्पन्न होते' ही म्हण लौकिकांत जशी खरी आहे तशीच चोहोंकडेहि आहे. धूमकेतूची स्वारी कधीं मधीं एखादे वेळेस वीस पंचवीस वर्षांनीं दृष्टीस पडते, व पुनः प्रस्थानहि लवकरच करते, त्यामुळें त्यांची साऱ्या दुनियेभर जी मानभरातब रहाते ती पुनः पुनः आगमन केलें तर अगदीं रहाणार नाहीं. 'इसाबनीतीं'तील बेडकांच्या गोष्टीप्रमाणें त्यांचीहि गत होईल. म्हणजे जुपिटरानें आकाशांतून लांकडाचा ओंडा खालीं टाकला असतां तो पाण्यावर मोठ्यानें आदळल्यामुळें सगळे बेडूक जसे पहिल्यानें अगदीं चपापले व कोणी हूं का चूं सुद्धां न करतां कांहीं वेळ आपआपल्या जागीं स्तब्ध होऊन राहिले; पण त्यांचा राजा कांहींच हालचाल करीनासें पाहून सर्व जसे जसे हळू हळू त्याच्या जवळ आले-त्याच्या अंगावर चढूं लागले-त्याशीं खेळूं लागले -आणि लवकरच सर्वांस त्याच्या अतिशय मठ्ठपणाचा अगदीं त्रास येऊन त्यास कांणीच विचारीतनासे झाले, त्याचप्रमाणें धूमकेतूंचीहि दुर्दशा झाली असती. असो; तर याप्रमाणें वरील अंतरिक्षांतील चमत्कार क्वचित् होणारे असल्यामुळें त्याकडे लोकांचें लक्ष फार लागे. आणि या पृथ्वीवर घडणाऱ्या घडामोडींचें सूत्र सगळें आकाशांत आहे अशी कल्पनाहि मनुष्यास सहज होण्यासारखी असल्यामुळें ती सर्वांनीं उचलून प्रस्तुत शास्त्राचा जो सार्वत्रिक प्रचार आढळतो तो चोहोंकडे सुरू झाला असावा असें अनुमान होतें. तर याप्रमाणें ज्योतिषविद्या ज्यांनीं पहिल्यानें प्रवर्तविली त्यांनीं तसें करण्यांत आपला मूर्खपणा प्रगट केला किंवा जगास फसवण्याचा मार्ग काढला असें म्हणणें अगदींच शोभत नाहीं.

१०. आतां सरते शेवटीं प्रस्तुत भ्रमरूप शास्त्रांतून उद्भवलेलें जें खरें ज्योतिष

केंद्रांत आलेला असा त्यांपैकीं कोणी ना कोणी तरी असतोच. यामुळें दररात्रीं म्हणजे नेहमीं [कारण रात्रिहि कोठें ना कोठें तरी असायाचीच!] गुरूवर चंद्रग्रहणाचा योग असतो. हीं ग्रहणें खलाशांस फार उपयोगीं आहेत, व तीं त्यांच्या पंचांगांत नेहमीं दाखल केलेलीं असतात. याच गुरूच्या चंद्रग्रहणावरून दर्शनानुशासनांतील एक मोठी गोष्ट सिद्ध झाली. ती गोष्ट प्रकाशाचा प्रसरणधर्म व गति ही होय. शनीला तर आठ उपग्रह आहते!

त्याची योग्यता व उपयोग यांविषयीं थोडेंसें लिहून हा विषय आटपतों. प्रस्तुत निबंधाच्या आरंभीं लिहिलेंच आहे कीं, या शास्त्रापासून कवि, तत्त्वज्ञ, व ईश्वरपरायण अशा तिघां प्रकारच्या मनुष्यांस अत्यंत आनंद होण्यासारखा आहे. तो असा. पहिल्यानें कवि. कवीचा विषय झटला झणजे कल्पनाशक्ति होय. झणजे चित्तास जेणेंकरून चमत्कृति भासेल त्यांत ते रममाण होतात. ही चमत्कृति ज्योतिषशास्त्रांत जी आहे ती त्या शास्त्राचा विषय जें विश्व त्यासारखीच केवळ अपार आहे ! प्रत्येक राष्ट्राच्या कवींनीं सूर्यचंद्रादि खस्थ पदार्थांचीं वर्णनें किती निरनिराळ्या प्रकारांनीं केलीं आहेत, त्यांपासून उपमारूपकादि भांडार त्यांस किती घ्यावयास सांपडतें; व हिंदु, ग्रीक वगैरे राष्ट्रांच्या पुराणग्रंथांतून वरील तेजांस दैवतें कल्पून त्यांविषयीं किती चमत्कारिक कथा लिहिलेल्या आहेत, हें सर्व जो मनांत आणील त्यास प्रस्तुत शास्त्राचा कवितेशीं किती निकट संबंध आहे तो चांगला लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. त्यांतून अलीकडे तर या शास्त्रांत जे शेंकडों नवे नवे शोध झाले आहेत व होत आहेत त्यांच्या योगानें तर कवींच्या कल्पनाशक्तीस रंजवण्याचें साधन याजमध्यें किती जास्त आलें आहे ! गुरूचे चंद्र, शनीचे उपग्रह व कडें, सूर्यावरचे डाग, धूमकेतूंचा लक्षावधि कोस लांबवर पसरलेला प्रकाशाचा झोत, इत्यादिकांचें दृग्यंत्रद्वारा प्रत्यक्ष झालें असतां कोणास मौज वाटणार नाहीं ! त्याप्रमाणेंच सूर्यमालेची एकंदर अवाढव्य रचना–तींतील ग्रहांचें आकारमान, मनास थक्क करून टाकणारा त्यांचा वेग, त्यांचीं अमर्याद अंतरें, कधीं न चुकणारी अशी सुयंत्र गति; हें सर्व मनांत आणलें असतां केवढा चमत्कार वाटतो ! सारांश, आडिसन यानें आपल्या सर्वप्रसिद्ध निबंधांत 'चित्तचमत्कृती'चे जे तीन हेतु प्रतिपादन केले आहेत–एक महत्त्व, दुसरें सौंदर्य, आणि तिसरी विचित्रता–त्या सर्वांचा प्रस्तुत विषयांत पूर्ण समावेश होत असून तिन्हीहि यांत अनंतत्वानें रहाताहेत ! असो; आतां दुसरें तत्त्वज्ञ झणजे वस्तुमात्राचा तत्त्वतः शोध करणारें अशांसहि प्रकृत शास्त्रांतील सिद्धांत अत्यंत विस्मयास्पद वाटतील हें उघडच आहे. लोकांस स्वतःसिद्ध वाटणाऱ्या गोष्टी, किंबहुना प्रत्यक्ष इंद्रियजन्य अनुभव, यांसहि खोटीं करणारीं जीं सूर्याची स्थिरता, पृथ्वीचें भ्रमण, तिची अंतरालांत निराधार स्थिति, पदार्थमात्राचें आकर्षण करण्याची तिच्या अंगाची शक्ति,–इत्यादि ज्योतिषांतील प्रमेयें त्यांचें सोपपत्तिक ज्ञान होऊन संपूर्ण सृष्टीचें नव्या ज्ञाननेत्रानें जेव्हां मनुष्य अवलोकन करूं लागतो तेव्हांचा त्याचा अधिकार काय सांगावा ! मोठ्या उंच पर्वताच्या शिखरावर उभा राहिलेल्या मनुष्याची नजर जशी खूप लांबवर पोंचून त्याचा दृक्प्रदेश वाढतो त्यासारखीच मनाच्या संबंधानें पहातां वरील मनुष्याची स्थिति होय. झणजे त्याच्या ज्ञाननेत्राचा ठप्पा सृष्टीच्या सीमेपर्यंत जाऊन पोंचतो असें झणावयास चिंता नाहीं ! तसेंच सृष्टीचे अनेक गुप्त

व्यापारहि त्यास करून सामान्य जनास अज्ञानास्तव ज्या गोष्टीचें खरें स्वरूप कांहींच कळत नाहीं, किंवा ज्याविषयीं विचार करूं गेलें असतां त्यांची बुद्धि अगदीं गोंधळून जाते, किंवा ज्यांचें त्यांस अत्यंत भय वाटतें,[1] त्या सर्वांचें यास सोपपत्तिक ज्ञान झालें असतां मुलाचें एखाद्या गोष्टीविषयीं चोज किंवा बागुलबोवाचा धाक पाहून वयस्क मनुष्यास जसें हसूं येतें त्याप्रमाणेंच यासहि होतें. असो, पण हें सर्व तरी वरील शास्त्र शिकणारांविषयींच झालें. त्या शास्त्रांत नवे नवे शोध करून त्याचें गुरुत्व ज्यांनीं आपणाकडे घेतलें त्या महाबुद्धिमान् पुरुषांचें भाग्य तर काय सांगावें ! थेल्स नामें मागें सांगितलेल्या ग्रीक पंडितानें इ० स० च्या पूर्वी ५८४ व्या वर्षींचें[2] खग्रास सूर्यग्रहण वर्तवून तें जेव्हां लोकांच्या बरोबर प्रत्ययास उतरलें असेल तेव्हां त्याच्या बुद्धिसामर्थ्याचा लोकांस केवढा आचंबा वाटला असेल, व त्यास स्वतः केवढा हर्ष झाला असेल ! ग्यालिलियोनें नवी दुर्बीण स्वतः तयार करून आकाशाचें जेव्हां पहिल्यानें सीमोल्लंघन केलें, व पहिल्याच तडाक्यास गुरूचे उपग्रह, शनीचें कडें, सूर्यबिंबावरचे डाग, चंद्रावरील पर्वत,[3] ही लूट भूलोकास आणली, तेव्हां त्याच्या

---

१. सूर्य आकाशांतून एकाएकीं नाहींसा झाला असतां अजाणत्या लोकांस केवढें भय वाटण्यासारखें आहे याचें उदाहरण मागें [पृ०२३७] एक सांगितलेंच आहे. आतां वरच्याविरुद्ध एक उदाहरण ग्रीसच्या इतिहासांतील येथें सांगतों. आथेन्स आणि स्पार्टा या संस्थानांची लढाई चालली असतां एकदां असें झालें कीं, पहिल्या संस्थानानें दुसऱ्यावर चालून जाण्याकरितां एक मोठें आरमार तयार केलें. पण तें आतां निघणार इतक्यांत सूर्यास ग्रहण लागलें. त्याच्या योगानें अत्यंत भयाभीत होऊन मुख्य गलबतावरील नाखुदा हातांत सुकाणू धरीना. तेव्हां मागील जहाजावर पेरिक्लीज होता, त्यानें त्याच्याकडे जाऊन त्याच्या डोळ्यांवर आपला झगा घातला, आणि म्हटलें, "यांत तुला कांहीं भयंकर दिसतें काय ?" नाखुदा म्हणाला, 'नाहीं.' "मग पेरिक्लीज म्हणाला, अरे, मग यांत आणि या ग्रहणांत रे काय भेद आहे ?—इतकेंच ना, कीं माझ्या झग्याहून फार मोठा पदार्थ तुझ्या दृष्टीआड आला आहे !"

२. या ग्रहणाचें उलट गणित करतां हें वरील वर्षाच्या मे महिन्याच्या २८ वे तारखेस झालें असें समजतें !

३. या पर्वतांस उद्देशून मिल्टन कवीनें आपल्या महाकाव्याच्या पहिल्या सर्गांत म्हटलें आहे—

——His ponderous shield,
Ethereal temper, massy, large and round,
Behind him cast ; the broad circumference
Hung on his shoulders like the Moon, whose orb
Through optic glass the Tuscan artist views

(पुढें चालू).

चित्तास केवढा उल्हास झाला असेल ! अशीच केप्लरची गोष्ट. ग्रहांच्या गतींविषयीं सिद्ध करून दाखविलेले तीन नियम याच्या नांवावर ज्योतिषशास्त्रांत प्रसिद्ध आहेत. यांतील प्रत्येकाची सिद्धता करण्यास यास वर्षांचीं वर्षें सतत खपावें लागलें. यांच्या योगानें ज्योतिषास किती पूर्णत्व आलें हें त्या शास्त्राच्या अभिज्ञांस चांगलें माहीत आहे. असो; या ज्योतिष्यानेहि वरील सिद्धांत पक्के ठरले असतां जो आनंद प्रदर्शित केला त्याचे उद्गार त्याच्या चरित्रांत सांपडतात. या आनंदभरांत त्यानें आपणास 'आकाशाचा नियंता' असें झटलें, व हा किताब आजपर्यंत तसाच त्याच्या नांवाबरोबर चालत आला आहे. पण या सर्वांहून मोठी गोष्ट झटली झणजे सर ऐझाक न्यूटन याची. हा एके दिवशीं बागेंत बसला असतां एक फळ झाडावरून खालीं पडतांना पाहून तेवढ्याशा गोष्टीवर त्यानें केवढा विभु रचला हें सर्वांस विदित आहेच. ज्या गुरुत्वाकर्षणाच्या नियमावर विशेषेंकरून त्याची कीर्ति आजपर्यंत चालत आली आहे व पुढेंहि जगाचा अंत होईपर्यंत चालत राहील, त्याची सिद्धता पुष्कळ वर्षें गणित करून जेव्हां त्यास सांपडली, व त्यास हवे होते तसे आंकडे त्या गणितांत क्रमाक्रमानें येऊं लागले,—तेव्हां असें सांगतात कीं, त्यास इतका आनंद झाला व कंपस्वेदादि अष्टभाव प्रगट होऊन इतके प्रबळ झाले, कीं त्याच्यानें पुढें गणित करवेना ! तेव्हा तें टाकून देऊन आपल्या एका मित्राकडून त्यानें तें पुरें करविलें ! आतां सरतेशेवटीं एक मात्र भाग राहिला. तो हा कीं, प्रस्तुत शास्त्रांच्या अध्ययनानें व मननानें मनुष्याच्या ठायीं आस्तिक्य उत्पन्न होऊन जगत्कर्त्या परमेश्वराच्या ठायीं भक्ति वृद्धिंगत होते. पहिल्यानें आस्तिक्य जें उत्पन्न होतें तें असें कीं, तो एवढी अपार सृष्टि आपणाभोंवतालीं पसरलेली जेव्हां पहातो, व तिचा व्यापार आज युगानुयुगें अस्खलित व सुयंत्र चाललेला जेव्हां मनांत आणतो, तेव्हां एवढें अवडंबर कोणी कर्त्याशिवाय खास उत्पन्न झालें नाहीं, व एवढी रहाटी जी आज अनंत वर्षें चालली आहे ती कोणी नियंत्याखेरीज खचीत चालली नाहीं, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री होऊन जाते ! एखादी टोलेजंग व सुशोभित इमारत एखाद्या वालुकामय व निर्जन प्रदेशांत एखाद्यानें पाहिली असतां जी त्यास कल्पना होईल तीच वरील मनुष्यास होते; आणि ज्यानें एवढी भव्य व अवाढव्य रचना केली त्याचें सामर्थ्य व चातुर्य किती असावें असें त्याच्या सहजच मनांत येऊन तो थक्क होऊन जातो ! ही एक पहिली गोष्ट झाली. झणजे सर्व धार्मिकपणाचें मूळ जी वरील आस्तिक्यबुद्धि ती वर सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत शास्त्रानें मनुष्याच्या मनांत दृढ होते. नंतर दुसरी गोष्ट परमे-

---

At evening from the top of Fesole,
Or in Valdarno, to descry new lands,
Rivers or mountains in her spotty globe.

श्वराचे ठायीं प्रीति व भक्ति. या दोन्ही वृत्तिहि सृष्टीचें लेशमात्रहि अवलोकन लक्षपूर्वक केलें असतां सर्व सुज्ञ मनुष्यांच्या हृदयांत उत्पन्न होणाऱ्या आहेत. जसें मूल मोठें होऊन त्यास जाणतेपणा येऊं लागला असतां आपल्या मातापितरांनीं आपलें लालनपालन कसें केलें, आपणावर आलेले किंवा येऊं पहाणारे दुःखप्रसंग कसे टाळले, वगैरे गोष्टी त्यास कळूं लागतात, व त्या मनांत येऊन त्याची जन्मसिद्ध व सहवासरूढ प्रीति व भक्ति या वृद्धिंगत होतात; त्याचप्रमाणें जगत्कुटुंबी जो परमेश्वर त्यानें संपूर्ण सृष्टीच्या रक्षणार्थ व सुखार्थ ज्या हजारों लाखों तजविजी व युक्ति करून ठेवल्या आहेत,—ज्या सृष्टिविषयक प्रत्येक शास्त्राच्या वृद्धीबरोबर अधिकाधिक उदयास येत चालल्या आहेत व अशाच पुढें अनंतकालावधि अवश्य येत जातीलच—त्या सर्व मनांत आणल्या असतां दुराग्रही व मूर्ख अशा लोकांखेरीज बाकी सर्वांच्या मनांत वरील दोन वृत्ति अवश्य उत्पन्न होतीलच होतील; आणि जोंपर्यंत हें चराचर विश्व त्यांस दृष्टिगोचर होत आहे तोंपर्यंत त्या कशानेंहि ढळणार नाहींत हें उघड आहे !

गर्व.

अभिमानधनस्य गत्वरैरसुभिः स्थास्नु यशश्चिचीषतः ।
अचिरांशुविलासचंचला ननु लक्ष्मीः फलमानुषंगिकम् ॥[1]
किरातार्जुनीय.

अंक १६—(१ मानसशास्त्र. (२) प्रस्तुत विषयाचें स्वरूप. (३) त्याविषयीं वाचकांस होणाऱ्या कल्पना. (४) प्रकृत विवेचनाचा उद्देश—षड्रिपु. (५) गर्वाचीं दोन स्थानें. (६) दोषरूप गर्व. (७) अदोषरूप गर्व—(८) योग्य रीतीचा गर्व. (९) दुसरे प्रकार—स्वाभिमान इ०. (१०) प्रस्तुत मनोवृत्तीचें प्रयोजन.

१. प्रस्तुत विषय मानसशास्त्राचा होय. मानसशास्त्र ह्मणजे मनुष्याच्या मनाच्या व हृदयाच्या ज्या नानाविध वृत्ति आहेत त्यांचें विवरण ज्यांत केलें असतें तें होय. जसें शारीरकांत मानवी शरीराचे घटकावयव जे, रक्त, मांस, हाडें इत्यादि यांविषयीं विवेचन असतें, त्याप्रमाणेंच वरील शास्त्रांत मानसिक व्यापारांविषयीं विचार केला असतो. या शास्त्राचें ग्रंथरूपानें प्रणयन यापूर्वी आमच्या देशांत कधींहि झालेलें माहीत नाहीं. इंग्रजी भाषेंत मात्र अर्थात्व याहि शास्त्रावर इतरांप्रमाणें पुष्कळ सर्वमान्य ग्रंथ झाले आहेत. असो, तर प्रस्तुत शास्त्राचें ज्यास अध्ययन करायाचें असेल त्यास इंग्रजी भाषेशिवाय सध्यां दुसरें द्वार नाहीं.

२. प्रस्तुत निबंधांत वरील मनोवृत्तीचें जें विवरण करायाचें आहे तें शास्त्र-

---

१. "क्षणभंगुर जे प्राण ते खर्चून चिरकाल रहाणार यश मिळवूं इच्छणारा जो मानी पुरुष तो संपत्तीची ह्मणजे पर्वा करीत असतो असें नाहीं, कां तर ती विद्युल्लतेप्रमाणें चंचल असून त्याच्या शौर्याचें केवळ अनुषंगिक फलच होय !"

रीत्या करायाचें नाहीं. ह्मणजे त्याच्या स्वरूपाविषयीं सूक्ष्म विचार, त्याच्या उत्पत्तीचें कारण, त्याच्या प्रतिकाराविषयीं उपाय, वगैरेविषयीं यांत लिहावयाचें नाहीं. तर फक्त व्यवहाररीत्याच त्याविषयीं विचार करूं. ह्मणजे तो मनुष्यांत असणें हें योग्य कीं अयोग्य, त्यापासून हिताहित कोणतें, वगैरेविषयीं लोकांत जशी वाटाघाट चालते त्याप्रमाणेंच येथें प्रस्तुत विषयावर कांहीं विचार प्रदर्शित करायाचे आहेत.

३. आतां मूळारंभीं प्रकृत विषयावर सामान्यतः लोकांच्या काय समजुती आहेत त्याविषयीं थोडेसें लिहिलें पाहिजे. आह्मांस खचीत वाटतें कीं, या निबंधांतील विषयाचें वरील नांव पहातांच आमच्या बहुतेक वाचकांस असें वाटेल कीं, या विषयावर नवें तें लिहिण्यासारखें काय आहे ? गर्व ही मनोवृत्ति दुष्ट असून ती सर्वथा त्याज्य होय हें उघडच आहे; मग तीविषयीं मोठें विवेचन केलें तरी अधिक काय सिद्ध होणार ? जो मनुष्य गर्विष्ठ ह्मणून लोकांस माहीत झाला त्याची सर्व हेळणा करितात, व त्या दुर्गुणाखाली त्याचे असते नसतेहि गुण बहुधा लोपून जातात, हा प्रकार जनांत पुष्कळ दृष्टीस पडतोच; व यास्तवच जगांत बागलेले लोक नव्या उमेदवार पूर्ववयी लोकांस सर्वांशीं लीनतेनेंच वागण्याविषयीं उपदेश करतात हें सर्वांस माहीत आहेच. तसेंच जुन्या तत्त्वज्ञानी लोकांनीं मनुष्याचे ठायीं संचार करणारे षड्रिपु ह्मणून जे वर्णिले आहेत त्यांपैकींच वरील गर्वहि होय. तेव्हां यावरून पहातां या मनोविकाराच्या युक्तायुक्ततेविषयीं आणखी विचार तो कसचा करायाचा ? 'विकार' या शब्दांतच त्याचें अयुक्तत्व आलें. व यास्तवच त्यापासून मनुष्याचें सर्वथा अहितच होणार हेंहि उघड झालें. मग यापुढें हिताहितत्वाचा विचार तो आणखी काय राहिला ? तेव्हां हें दुसरें प्रतिपादनहि वरच्या प्रमाणेंच निरर्थक झालें. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत विषयावर सर्वांचा निर्णय अगोदरच ठरला असून त्यावर जास्त विचार करण्यासारखें कांहीं नाहींच असें बहुधा सर्वांस वाटेल.

४. पण वरील निर्णय सर्वांशीं अगदीं खराच आहे असें नाहीं, व प्रस्तुत विषयावर सविस्तर उपपादन करण्यास जागाहि पुष्कळ आहे, हें पुढील मजकुरावरून आमच्या वाचकांस दाखविण्याचा आमचा उद्देश आहे. या पुढील मजकुरांत आजपर्यंत परंपरेनें चालत आलेलीं कांहीं जुनीं मतें व एकंदर लोकांचे साधारण समज यांस पुष्कळ ठिकाणीं विरोध पडलेला दिसेल. असो; आतां पहिल्यानें याचाच विचार करूं कीं, गर्वाची 'मद' या पर्यायानें षड्रिपूंत जी गणना केली आहे ती कितपत खरी आहे. कामादि षड्वर्गास आजपर्यंत मनुष्याचे रिपु ह्मणजे त्याच्या हिताच्या आड येऊन त्यास अनर्थांत घालणारे मनोविकार असेंच सर्व ह्मणत आले आहेत. पण हें ह्मणणें केवळ एकदेशीय होय असें अंमळ विचार केला असतां स-

वांस कढून येईल. कामक्रोधादि मनोविकृति केवळ अनावर होऊन त्यांचा मनुष्यावर पगडा झाला असतां मोठमोठे अनर्थ होतात हें खरें आहे; पण ते या जगांतून मुळींच नाहींसे झालें असें समजा, तर जगाची काय अवस्था होईल बरें? सर्वांत अग्रगण्य जो काम त्याच्या अभावीं तर जगाचा अवश्यमेव लयच होईल हें उघडच आहे. त्याच्यापुढें क्रोध. याचाहि समूळ नाश होऊन सर्वांनीं धर्मराजाची वृत्ति धरली, किंवा खऱ्या ख्रिस्त्याप्रमाणें एका गालावर मारली असतां दुसरा गाल पुढें करण्याचा निर्धार केला, तर जगांत काय अनर्थ होतील! असो, याप्रमाणेंच बाकीच्या मनोविकारांविषयींहि समजावें. तेव्हां यावरून स्पष्ट दिसेल कीं, वरील सहा जण हे जगाचे केवळ शत्रुच आहेत असें नाहीं. उलटें असेंहि म्हणतां येईल कीं ते जगाचे हितकर्ते मित्रहि पण होत. आणि आमचा असा पक्का भरंवसा आहे कीं मनुष्याच्या शरीराचा जसा कोणताहि अवयव वावगा नाहीं, व कोणताहि व्यापार निरर्थक नाहीं, त्याप्रमाणेंच मनाचीहि गोष्ट होय. परमेश्वरानें मनाच्या ज्या निराळ्या शक्ति निर्माण केल्या आहेत व त्यास निरनिराळ्या वृत्ति जडविल्या आहेत त्यांस अहेतुक किंवा अनर्थावह म्हणणें हें धर्माच्या दृष्टीनें पाप व न्यायाच्या दृष्टीनें मूर्खत्व होय! आतां यावर जर कोणी अशी शंका काढील कीं असें आहे तर सर्व देशांतील ज्ञाते पुरुष व आपले शास्त्रकार यांनीं वरील मनोवृत्तींचा एवढा निखालस निषेध कां केला? तर तिचें समाधान करणें अवघड आहे असें नाहीं. एक तर असें कीं वर जो निषेध सांगितला तो त्या त्या विकाराच्या अतिरिक्ततेचा समजायाचा; साक्षात् त्या वृत्तीचाच नव्हे. कारण तसें असतें तर विवाह करणें हें पातककर्म मानलें असतें;[1] 'काम' हा तिसरा पुरुषार्थ धरला नसता; आणि कामदेवाची हिंदु, ग्रीक वगैरे जुन्या राष्ट्रांत पूजा झाली नसती. त्याप्रमाणेंच थोर पुरुषांच्या कथांतून त्यांच्या क्रोधावेशांचें वगैरे जें प्रशंसापूर्वक वर्णन केलेलें असतें तेंहि आढळतेंना. दुसरें असें कीं, जगाच्या व्यवहारांत सामान्यतः पहातां वरील कामक्रोधादि वृत्तींचें योग्य आकलन फारच थोड्या ठिकाणीं झालेलें सांपडतें; त्या दुर्धर होऊन मनुष्य अरिष्टांच्या कचाट्यांत सांपडलेलाच फार आढळतो. यास्तव या सामान्यतः दृष्टीस पडणाऱ्या प्रकारावरच मुख्यतः कटाक्ष ठेवून वरील अंमळ एकदेशीय वर्णन वरील लोकांनीं केलें आहे हें उघड आहे. वस्तुतः पहातां वरील वृत्तिच अनर्थकारक आहेत असें नव्हे. परमेश्वरानें त्या मनुष्याच्या ठायीं ज्या ठेवल्या आहेत त्या उगीच नव्हेत. त्यांपासून त्यांस फार उपयोग आहे. इतकेंच मात्र कीं, त्यांस मनुष्यानें आपल्या नेहमीं स्वाधीन ठेवून त्यांस आपण सर्वथा वश कधींहि होतां कामा नये. जसें, घोड्यावर बसणें. घोडा हा आपलें सामर्थ्य

१. हा प्रकार रामन क्याथालक पंथांत अद्याप चालू आहे. त्यांच्यातल्या धर्माधिकाऱ्यास लग्न करतां कामा नये!

आणि वेग मनुष्याच्या अगदीं स्वाधीन करून देतो, आणि त्याच्या योगानें बसणारा चांगला चतुर असेल तर त्यास हवा तसा उपयोग करून घेतां येतो हें सर्वप्रसिद्ध आहे. पण बसणारा जर कच्चा असेल किंवा मूर्ख असेल, तर घोड्याच्या अंगचे वरील दोन गुणच त्याच्या नाशास कारण होऊन तो बसणारास एखाद्या खड्ड्यांत नेऊन टाकणार नाहीं काय ?

५. वर काम आदिकरून सहा मनोविकारांविषयीं साधारणपणें जें प्रतिपादन केलें आहे तेंच प्रस्तुतच्या निबंधाचा विषय जो गर्व त्यासहि लागतें. ह्मणजे तो वस्तुतः वाईट नसून त्याचा बरेवाईटपणा मनुष्याच्या बरेवाईटपणावरच सर्वथा असतो. तेव्हां यावरून वरील मनोवृत्ति अर्थात्च दोन प्रकारचीं झाली. एक शहाण्या समंजस अशा लोकांच्या ठायीं जी आढळते ती; आणि दुसरी मूर्ख लोकांच्या ठायीं जी दृष्टीस पडते ती. आतां दोहोंविषयींहि अनुक्रमानें विवेचन करूं.

६. पहिल्यान मूर्ख लोकांतला प्रकार. यांसच पहिल्यानें पुढें आणण्याचें कारण 'दुर्जनं प्रथमं वंदे' हें सर्वप्रसिद्ध सूत्र एक आहेच; आणि दुसरें असें कीं, यांचीच कोटि जगदीशाच्या इच्छेनें जनांत फार मोठी आहे. तेव्हां बहुपक्षाचा अगोदर मान करणें हेंच आह्मांस उचित दिसतें. असो; आतां एवढ्या समुदायास गर्व जो बाधा करतो तो एका प्रकारानें नव्हे हें उघडच आहे. निरनिराळ्या द्वारांनीं आंत प्रवेश करून वरील 'रिपु' अंतःकरणरूप गडास सर करून घेतो. कोणास आपल्या बळाचा गर्व असतो. बलिष्ठ काय तो मी, माझ्याशीं सर्वांनीं बेतानें असलें पाहिजे, मला कोणाचें दुरुत्तर खपायाचें नाहीं, मी मात्र हवें त्यास हवें तें बोलणार; असें कित्येकांस वाटत असतें. हा दोष विशेषेंकरून आमच्या तालिमबाज लोकांत फार आढळतो. कोणी उगीच महिना दोन महिने कां तालमींत जाईना—आणि जाऊनहि कांहीं येण्याच्या नांवाने शून्य कां असेना—लागलीच ती चालण्याची बोलण्याची वगैरे अक्कड त्यानें उचललीच ! पण इतकेंहि करून कोणी मोठा मोठा बलवान् झाला समजा,—इतका कीं, मोठाल्या पहारी त्यानें सहज वांकवाव्या, किंवा पाण्यानें भरलेले हांडे दांतानीं सहज वर उचलावे; तरी असलें अचाट बलहि नुसतेंच प्रशंसेस पात्र होणार नाहीं हें उघड आहे. कारण टोणग्याचा, हत्तीचा वगैरे दृष्टान्त सर्वांच्या जवळ आहेच. असो; वरील लिहिण्यानें तालमींत मेहनत करून शरीरसामर्थ्य संपादन करणें वाईट असें ह्मणण्याचा आमचा अर्थात मुळींच रोख नाहीं,—सांप्रतकाळीं तर तें अनेक कारणांनीं फारच इष्ट झालें आहे—; आह्मांस सांगावयाचें इतकेंच आहे कीं, जें संपादन केलें त्याविषयीं सदासर्वदा गर्व वहाणें हें मूर्खत्वाचें चिन्ह आहे. दुसरा प्रकार संपत्तीचा. हें तर गर्वाचें वरच्याहूनहि मोठें कारण होय. मनुष्य बळकट असूनहि जर त्यापाशीं कांहीं ऐपत नसली किंवा त्याचें वजन नसलें, तर नुसत्या

बळाला कोणी वचकत नाहीं. पण संपत्ति असली की, साऱ्या मनुष्यांस त्याचा दरारा बाळगावा लागतो. थोडी बहुत सत्ता हातीं असल्यामुळें व पैशाचें मोठें पाठबळ असल्याच्या योगानें गरीब गुरीबांचा मनांत आल्यास नाश करण्याचें त्यांच्या हातांत बरेंच असतें. यामुळें जो तो त्याच्यांशीं नमून असतो, व पुष्कळ आशाबद्ध लोक त्यांजपाशीं नेहमीं हांजी हांजी करण्यास तयार असतात. आपण थोर, आपण मोठे गुणवान्, आपल्या आश्रयावर इतक्या लोकांचा चरितार्थ चालला आहे, वगैरे प्रकारच्या खऱ्या खोट्या प्रशंसा याच काय त्या त्यांच्या नेहमीं कानीं पडल्यामुळें, व आपल्या पाठीमागें आपणास लोक काय ह्मणत असतील हें कधीं त्यांस स्वप्नींहि ठाऊक नसल्यामुळें, श्रीमंत लोक गर्वाचीं आगरें झालेलीं असतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं. त्यांतूनहि जे स्वतःच्याच पराक्रमानें वैभवास चढलेले असतात त्यांस वरील गर्व कांहीं तरी शोभतो. पण वाडवडिलांनीं संपादन करून ठेवलेल्या संपत्तीवरच जे डौल मिरवितात त्यांस तर तो मुळींच शोभत नाहीं. कारण एखाद्या कुळांत जन्मास येणें ही जी केवळ दैवायत्त गोष्ट तीवरच फुकाची फुशारकी मारणें हें काय ? अशा कुलीन पुरुषांचा आपल्या कुलवंतपणाबद्दलचा पोकळ गर्व इसापनीतींतील खेचराच्या सारखा केवळ हास्यास्पद होय. किंबहुना त्याच्या पूर्वजांची उज्वल कीर्ति हीच त्यांच्या दुष्कीर्तीस विशेष कारणभूत होते असेंहि ह्मटलें असतां चालेल; कारण पांढऱ्या स्वच्छ कापडावर वगैरे जसा अगदीं लहान डागहि तेव्हांच उमगतो, त्याप्रमाणेंच गर्वाचा विषय जें कुलीनत्व तेच या वंशजांचा दुर्लौकिक विशेष स्पष्ट दिसण्यास मात्र कारण होतें. तसाच या लोकांचा आपल्या दागदागिन्यांचा आणि उंची पोषाकाचा गर्व. या गर्वाची व्यर्थता सोलन नामक विख्यात ग्रीक तत्त्वज्ञानें एके प्रसंगीं जशी स्पष्ट दाखविली तशी फारच थोड्यांनीं दाखविली असेल. त्यास कोणी राजानें आपलें वरील वैभव मोठ्या दिमाखानें दाखविलें असतां त्यानें थोड्याच शब्दांत त्याच्या गर्वाचें पूर्ण खंडन केलें. तो ह्मणाला, "हे राजा ! तुजपेक्षां मोर मला जास्त श्रीमंत दिसतो, व त्याचा गर्वहि अधिक यथार्थ वाटतो !" असो; तिसरा प्रकार रूपाचा. याबद्दचा अभिमान पुरुषांस मुळींच शोभत नाहीं; तो बायकांचाच सर्वथा विषय होय. नवऱ्याची प्रीति आपणांवर स्थिर करण्याचें तें स्त्रियांस एक मोठें साधन असतें, यास्तव तें राखण्याविषयींची व वाढविण्याविषयींची त्यांची तर्तूद त्यांस शोभते; व पुरुषास आपल्या अंगच्या हिंमतीचा, हुषारीचा वगैरे गर्व जसा शोभतो तसाच स्त्रियांस आपल्या रूपाचाहि शोभतो; कारण तें त्यांच्या जातींत एक मोठें भूषण धरलें असतें. पण त्यांचें मृदुत्व, भीरुत्व वगैरे गुण जसे पुरुषाचे ठायीं दोषरूप होतात, त्याप्रमाणेंच रूपवत्त्वाचा गर्व व नटण्यामुरडण्याची हौसहि पुरुषजातींत केवळ निंद्य मात्र होते. असो. आतां शेवटला मोठा प्रकार, विद्येचा, या सदराचा

प्रस्तुत काळीं वरच्याहून पुष्कळ विस्तारानें विचार केला पाहिजे. कारण हल्लीं आमचा देश सगळा एकदम महानिद्रेतून एकाएकीं जागा केल्यासारखा होऊन बहुतकरून घरोघर विद्वत्ता झालेली सध्यां दृष्टीस पडत आहे. आमच्या प्रस्तुतच्या दयाळू सरकारानें आह्मांस ज्ञानामृत पाजण्याचा जो चोहोंकडे उद्योग सुरू केला आहे, त्याचें आतांपासूनच जीं फळें दृष्टीस पडूं लागलीं आहेत त्यांवरून पहातां सरकारचा उद्योग सरकारासच लवकर फळूं लागेल असा सुमार दिसूं लागला आहे. ज्ञानामृताचा पेल तोंडाशीं नेऊन त्याचा एक झुरकाच नुकता आह्मीं कोठें घेतला न घेतला तों इतक्यांतच चोहोंकडे एकदम केवढाले चमत्कार झाले आहेत पहा! खुद्द होमरच्या, मिलटनच्या सुद्धां तोंडांत मारणारे महाकवि; येशू ख्रिस्त, महंमद अशांस एकीकडे झुगारून देणारे धर्मसंस्थापक; डिमास्थेनीस, सिसरो अशांनीं सुद्धां ज्यांचीं सुरस भाषणें ऐकून तटस्थ व्हावें असे महावक्ते; तसेच मोठमोठे पंडित, मोठमोठे शिल्पज्ञ, वगैरे महाजनांचा समुदाय जिकडे तिकडे उत्पन्न होऊन त्यांनीं सगळा देश गजबजून टाकला आहे! एवढ्याशा अल्पकाळांत एवढी गर्दी झालेली पाहून पुढें तर काय होईल कोण जाणे असा मोठाच विस्मय प्राप्त होतो! हजारों महाकवींचे विणे सजून त्या सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून नाद घुमूं लागला असतां, व हजारों महावक्त्यांची एकदम गर्जना सुरू झाली असतां आकाशमंडप लवकरच खालीं येईल कीं काय कोण जाणे! असो; एकंदरींत वरील चमत्कार पाहून मनास अशी कल्पना होते कीं, ख्रिस्त प्रभु साक्षात् अवतरून जगाच्या शेवटीं एक हजार वर्षें राज्य करणार आहे ह्मणून जें पवित्र शास्त्रांत सांगितलें आहे त्या परम सुखाच्या काळाजवळ जवळ तर आह्मी येऊं लागलों नाहीं ना? त्या प्रभूनें आपला पहिला अवतार आमच्या एशिया खंडांतच घेतला; त्याचप्रमाणें शेवटलाहि इकडेच घेण्याचा त्याचा विचार झाला आहे कीं काय न कळे! सारांश, आमच्या देशांत दोहोंकडे इतक्यांतच विद्वत्तेचा वगैरे जो फैलावा झाला आहे तो कांहीं अपूर्व आहे. पण या फैलाव्याप्रमाणें लोकांत खरोखर ज्ञान व समजूत हीं किती वाढलीं आहेत हें जो पाहील त्याची खात्री कांहीं निराळ्या तऱ्हेचीच होईल. आमच्या लोकांच्या बुद्धिविलासाचे अचाट प्रकार जे वर सांगितले त्यांचें वास्तविक स्वरूप पाहिलें तर ज्ञानाचा संस्कार आमच्या लोकांस जो नुकता नुकता होऊं लागला आहे त्याचे योगानें झालेले दुर्विकार ते बाहेर पडले आहेत असें सर्व समंजस लोकांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. मनुष्याच्या मनांत ज्ञानाचा प्रवेश होऊं लागला असतां प्रथमतः गर्वादि दुर्विकार त्यास कसे जडतात हें मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे;[1] त्यावरच येथें अंमळ विस्तार करतों. भर्तृहरीनें नीतिशतकांत ह्मटलें आहे—

१. अंक ११ पृष्ठ १६९.

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदांधः समभवं
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ।
यदा किंचित् किंचित् बुधजनसकाशादवगतं
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

"जेव्हां मला उगीच थोडें समजत होतें तेव्हां हत्तीप्रमाणें मी मदोन्मत्त ('मद' शब्द द्वयर्थी आहे) असें, आणि मी सर्वज्ञ आहें असा गर्व वाहीं; पण पुढें जसजसें शहाण्या लोकांपासून मला थोडथोडें ज्ञान प्राप्त होऊं लागलें तसतशी माझी खात्री होत चालली कीं, मी मूर्ख आहें. याप्रमाणें जसा अंगांतून हळू हळू ज्वर नाहींसा होत जावा तसा माझा मद उतरत गेला !"[1]

वरील पद्य कवीनें स्वानुभवावरून लिहिलें आहे हें उघड आहे. आणि खऱ्या ज्ञानापर्यंत जे पोंचले असतील त्या सर्वांस वरील गोष्टीचा प्रत्यय आला असेलच. आणि जो कोणी शिकण्याचे विषय किती आहेत, मनुष्याची बुद्धि किती अल्प आहे, इत्यादि गोष्टींचा यथास्थित विचार करील त्यास मनुष्याचा आपल्या ज्ञानाविषयींचा गर्व किती मूर्खत्वाचा असतो हें तेव्हांच लक्षांत येईल. कोणीहि मनुष्य पहिल्यानें शिकूं लागला ह्मणजे त्यास असें वाटतें कीं, मी जेवढें शिकणार आहें तेवढें आटपलें ह्मणजे यापुढें मग काय उरलें आहे ! पण तोच मनुष्य जसजसा अधिकाधिक ज्ञान संपादन करूं लागतो तसतसा ज्ञानाचा प्रदेश अधिकाधिक विस्तृत होत जाईसा त्यास दिसूं लागतो. याप्रमाणें होतां होतां ज्ञानाची सीमा आकाशाच्या सीमेप्रमाणें सरते-शेवटीं अगदीं अनंत होय अशी त्याची खात्री होते.[2]

---

१. वरील श्लोकावर वामनी टीका—

जधीं कांहीं कांहीं 'हरि' 'कवि' असे शब्द शिकलों
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें याच भरलों ।
जधीं कांहीं नेणे ह्मणुनि वदले पंडित मला
तदा माझा गर्वज्वर सकलही हा उतरला ॥

२. हें निरूपण पोपनें एके ठिकाणीं फार सरस दृष्टान्तानें केलें आहे—

Fired at first sight with what the Muse imparts,
In fearless youth we tempt the heights of arts,
While from the bounded level of our mind,
Short views we take, nor see the lengths behind;
But more advanced, behold with strange surprise
New distant scenes of endless science rise!
So pleased at first the towering Alps we try,
Mount o'er the vales, and seem to tread the sky,

(पुढें चालू).

वरील गोष्ट ज्यांच्या पूर्णपणें मनांत बिंबली असेल त्यांस कळून येईल कीं, मनुष्याचें ज्ञान हें केवळ सापेक्ष आहे; ह्मणजे अमुक अमुक मनुष्य शहाणा किंवा विद्वान् आहे असें जेव्हां आपण ह्मणतों तेव्हां तो दुसऱ्या कोणाच्या मानानें पहातां तसा आहे इतकाच अर्थ समजायाचा. असें कांहीं मान न घेतां त्यास ज्ञानविशिष्ट ह्मणणें हें पृथ्वीवरील एखाद्या पदार्थाच्याविषयीं निरपेक्षत्वानें उच्चतेचें विधान करण्यासारखें अप्रयोजक होईल. ह्मणजे पृथ्वीवरील एखादा फार उंच वृक्ष, मनोरा, किंवा डोंगर घ्या, त्याची उंची जशी भोंवतालच्या पदार्थांच्या ठेंगणेपणामुळेंच त्यास आली—वस्तुतः एकंदर पृथ्वीच्या मानानें पहातां तो अति उंच पदार्थ आणि भुईवरून चालणारी मुंगी हीं दोन्ही सारखींच; त्याचप्रमाणें इतर मनुष्यांचा संबंध जर मनांत न आणला तर फार फार मोठा विद्वान् आणि केवळ निरक्षर मनुष्य हे दोन्ही सारखेच ! पहा कीं, पृथ्वीवर सर्वांत उंच पदार्थ ह्मटला ह्मणजे हिमालयाचें एवरेस्ट नामक शिखर होय, व खोल ह्मटला ह्मणजे हिंदु महासागरांतलि कांहीं भागांचा तळ होय, पण एवढी पांच मैलाची उंची व पांच मैलांची खोली जमेस धरूनहि पृथ्वीचा एकंदर पृष्ठभाग खासा गुळगुळीत वर्तुळाकारच आहे ! ! याचा प्रत्यक्ष प्रत्यय चंद्राचें बिंब होय. ह्मणजे चंद्रावर पृथ्वीप्रमाणेंच डोंगर वगैरे असतांहि येथून त्याची कड सारखी वाटोळीच दिसते. किंवा पृथ्वीचाच एकंदर पृष्ठभाग खुद्द पहाणें असल्यास तो चंद्रग्रहणसमयीं सर्वास छायारूपानें चंद्रबिंबावर प्रत्यक्ष दृष्टिगोचर होतो. हिमालयादि पर्वतांनीं आपआपलीं उंच उंच शिखरें आकाशांत जरी हजारों उभारलीं आहेत, तरी वरील ग्रहणाच्या समयीं भूपृष्ठाची छाया चंद्रबिंबावर खाशी नामी वाटोळीच पडते ! एवढ्या प्रचंड पर्वतांच्या योगानेंहि त्या कंसाकृतींत कोठेंहि इतका सुद्धां फांटा फुटलेला बिलकूल दिसत नाहीं. असो; तर वरील दृष्टांतावरून आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, पदार्थांचा उंचपणा हा जसा नेहमीं सापेक्षच असतो त्याचप्रमाणें मनुष्याच्या ज्ञानाचीहि गोष्ट होय.

वरील उपपादनावरूनच ही मोठी गोष्ट अर्थातच सिद्ध होते कीं, ज्ञान हें अनंत आहे; व यास्तव आपल्या मोठ्या ज्ञानाचा गर्व वहाणें हें मनुष्यासारख्या अल्पज्ञ क्षुद्र प्राण्यास मुळींच शोभत नाहीं. आपणाहून ज्यांस कमी ज्ञान आहे त्यांजवर हवा

The eternal snows appear already past,
And the first clouds and mountains seem the last;
But those attained, we tremble to survey
The growing labours of the lengthened way,
The increasing prospect tires our wandering eyes,
Hills peep o'er hills, and Alps on Alps arise!

Essay on Criticism.

तर त्यानें मोठा डौल मिरवावा; पण तो डौल खरोखरी झटला झणजे डोंगळयानें आपण मुंगीहून मोठे आहों झणून डौल मारण्यासारखा क्षुल्लक प्रकारचा होय. हीच गोष्ट मनांत आणून खेरे झाते आहेत ते आपल्या ज्ञानानें फुगून जाऊन दुसऱ्याची अवहेलना कधींहि करीत नसतात. त्यांस आपल्या ज्ञानाची इयत्ता केवढी थोडी आहे, व आपलें अज्ञान केवढें अपरंपार आहे, या दोन गोष्टींचा मनास पूर्ण प्रत्यय येऊन चुकलेला असतो. हा प्रत्यय होणें हीच तत्त्वज्ञतेची खरी निशाणी आहे; आणि त्याच्या विरुद्ध प्रकार ही अत्यंत मूर्खत्वाची होय. यास्तव कोणी चतुर ग्रंथकाराचें असें एक वचन आहे कीं, तत्त्वज्ञाच्या मतें आपण ज्ञानशून्य आहों असें असतें व मूर्खाच्या मतें मी सर्वज्ञ आहें असें असतें ! या दोहों प्रकारांचीं उदाहरणें थोडीं आहेत असें नाहीं. साक्रेटीसाची गोष्ट आमच्या बहुतेक वाचकांस माहीत असेलच. डेलफायच्या देवानें साक्रेटीस साऱ्या ग्रीस देशांतील लोकांहून शहाणा आहे असा कौल दिला असतां तो अगदीं गोंधळून गेला. तो असा बुचकळ्यांत पडला कीं, माझ्या मतें तर माझें ज्ञान फारच अल्प आहे आणि देवाचें वचन तर मी सर्वांत मोठा ज्ञानसंपन्न आहें झणून आलें, तेव्हां या दोन्ही परस्परविरुद्ध गोष्टी एकदम संभवतात तरी कशा ! पण पुढें शोध करतां करतां त्याची खात्री झाली कीं, मोठे शहाणे झणून जे लोक मिरवतात त्यांचें ज्ञान वस्तुतः फार अल्प आहे; आणि त्यांच्यांत व आपणांत मोठा विशेष झणून हाच कीं, आपलें अज्ञान आपणास समजतें, आणि त्यांस समजत नाहीं ! दुसरें असेंच मोठें उदाहरण म्यूटनचें होय. या महापंडितानें एवढे अपूर्व शोध करून जगांत प्रगट केले असतां मरणापूर्वी कांहीं वर्षें त्यानें आपणाविषयीं असा चमत्कारिक लेख लिहून ठेवला आहे–'माझ्याविषयीं लोकांस केवढेंहि आश्चर्य वाटो; पण माझें मला कसें वाटतें झणाल तर जसें एखादें पोर समुद्रकिनाऱ्यावर खेळत असतां ही चमत्कारिक गारगोटी वाटली, ती चमत्कारिक वाटली, असें झणून त्या गोळा करीत असतें त्याप्रमाणें माझी अवस्था आहे;–मला ठाऊक नसणाऱ्या कोट्यावधि प्रमेयांचा सागर तर मजपासून फारच दूर आहे !' असो; तर सर्व देशांत मोठमोठे तत्त्वज्ञ झणून जे होऊन गेले त्या सर्वांच्या मनाचा पूर्ण सिद्धांत होऊन ठरलेला तो हा. आतां बरऱ्याच्या उलट प्रकार पहा. हा जगांत पुष्कळ ठिकाणीं भरपूर भरलेला आढळेल. या लोकांस आपलें अज्ञान किती आहे हें कधींहि कळत नाहीं, व कळण्याची इच्छाहि नसते. त्यांच्या मतें आपणास सर्व लोकांनीं सर्वज्ञतेचा मान द्यावा असें असतें; व या हेतूस्तव ते सर्व विषयांत सारखाच बाणा मारीत असतात. पण हा साधतो कसा ? तेव्हां अर्थातच 'एक ना धड भाराभर चिंध्या' या झणीप्रमाणें पुष्कळ विषयांची त्यांनीं उगीच चावाचाव मात्र करून ठेवलेली असते. हें सर्वतोमुख ज्ञान भोळ्या

मूर्ख अशा लोकांस कांहीं वेळ फसविण्यास मात्र उपयोगीं पडतें खरें; पण जगांतील लोक सगळेच वरच्यासारखे नसल्यामुळें त्यांचा कावा लवकरच बाहेर पडतो, आणि फजिती मात्र उडते. असो; तर याप्रमाणें सुज्ञ व मूर्ख लोकांचे निरनिराळे समज असतात.

७. येथवर प्रस्तुत विषयाच्या एका अंगाचा विचार झाला. ह्मणजे कोत्या समजुतीच्या लोकांत गर्वाचे जे प्रकार दृष्टीस पडतात, ते सांगितले. आतां वरील मनोवृत्तींचें दोषरूपत्व ज्यां प्रसंगीं नाहींसें होऊन ती मनुष्यास उलटी शोभादायकहि होते त्यांचा निर्देश करतों.

गर्वाच्या ज्या प्रकारांविषयीं वर विचार झाला ते प्रकार आपल्या भाषेंत 'उन्मत्तपणा,' 'ताठा,' 'अहंपणा,' 'मीपणा,' वगैरे निंदाव्यंजक शब्दांनीं जे दर्शविले जातात ते होत. हे अर्थात्च सर्वथा दूषणास्पद असून सर्व सुज्ञ लोकांहि समूळ त्याज्य होत. पण यांच्यासारखें दुष्ट स्वरूप ज्यांचें नाहीं, असे कांहीं गर्वाचेच प्रकार सज्जन व थोर मनुष्यांचे ठायीं आढळतात. त्यांचें निरूपण यापुढें करतों.

८. एक प्रकार तर योग्य रीतीचा गर्व. आपल्या ठायीं जे वास्तविक गुण आहेत त्याविषयीं नेहमीं वल्गना करीत बसणें जरी मनुष्यास शोभत नाहीं, व त्यामुळें ऐकणारासहि त्रास येतो; तरी त्याविषयीं यथायोग्य गर्व वहाण्यानें मनुष्य केवळ दोषासच पात्र होतो असें नाहीं. जे अशा मनुष्याचे द्वेषी असतील, किंवा स्वभावतःच दुसऱ्याचा उत्कर्ष ज्यांस देखूं शकत नाहीं, असे मत्सरी मनुष्य, यांस त्याचा यथार्थ गर्वहि दुःसह होईल खरा, व ते त्याबद्दल त्याची निंदा करण्यास कधीं चुकणार नाहींत हें खरें; पण जे न्यायी व सत्यपक्षपाती लोक असतील त्यांस त्याच्या वर्तनांत कांहीं गैर दिसणार नाहीं. यास व्यावहारिक दाखला पहा. जो तो मनुष्य आपापल्या ऐपतीप्रमाणें वागून आपणांस शोभे अशाच पोषाकानें बहुधा लोकांत मिरवतो, व असें करण्याबद्दल कोणास कोणीहि नांव ठेवीत नाहीं. ही मर्यादा मोडून जो नुसता डौल आपले ठायीं आणतो त्यास मात्र लोक हंसतात, व तें ठीकच आहे. आणि याचप्रमाणें आपल्या खऱ्या योग्यतेहून उगीच जास्त विद्वत्तेची जो घमंडी मारतो त्याचीहि दशा होते. पण आपल्या पायरीप्रमाणें जो जगांत वागतो त्यास जसें नांव ठेवतां येत नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या वास्तविक योग्यतेनुरूप जो आपल्या गुणांचा खरा अभिमान मनांत बाळगतो तोहि दोषास बिलकूल पात्र होत नाहीं. पण हें तरी साऱ्या लोकांविषयीं एकंदर सरसकट रीतीनें झालें. गुणिजनांत अग्रगण्य असून जगाच्या पूज्यत्वबुद्धीस व प्रशंसेस जे पात्र झाले, त्यांची गोष्ट तर वरच्याहूनहि अधिक. सामान्य प्रतीच्या नामांकित लोकांस त्यांचा यथायोग्य गर्व दोषास पात्र करीत नाहीं इतकेंच काय तें; पण वरच्या सारख्या बड्या मंडळीस तर तो

दोषावह मुळींच न होतां उलटा विशेष शोभादायकच होतो !–कीं ज्याप्रमाणें सार्वभौम राजांस आपलें वैभव जेवढें बाहेर काढावें तेवढें शोभतेंच ! वरील दृष्टांत ज्यांस अगदीं यथार्थ वाटेल त्यांस निरानिराळ्या देशांत होऊन गेलेल्या महान् महान् ग्रंथकारांचे वगैरे आत्मश्लाघेचे उद्गार वाचून अगदीं आश्चर्य वाटणार नाहीं, आणि ते वाचतांना हृदयवृत्ति कोणत्या प्रकारची झाली पाहिजे हेंहि त्यांस कळेल. असो; आतां या प्रकारचीं कांहीं उदाहरणें येथें घेतों.

इंग्लंडांत सुमारें दोनशें वर्षांपूर्वी मिल्टन ह्मणून एक मोठा नामांकित कवि होऊन गेला, हें सर्वांस विश्रुत असेलच. या कवीच्या लेखांत वर सांगितल्यासारखे आत्मश्लाघापर उद्गार जागोजाग सांपडतात. आपल्या काळच्या अरसिक लेकांत आपल्या अर्वाचीनत्वामुळें आपल्या अद्भुत कवित्वाचें तेज पडत नाहीं हें जाणून वरील कवीनें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, 'मी या काळीं न जन्मतां जर मागेंच जन्मलों असतों, तर बरें होतें !'[1] तसेंच या कवीचा उत्तर काळ त्याच्या पक्षाचा समूळ नाश होऊन विरुद्ध पक्षाचा जय झाल्याकारणानें मोठ्या विपत्तींत गेला, या गोष्टीस उद्देशूनहि त्यानें आपल्या काव्यांत कोठें कोठें लिहिलें आहे. तसेंच पूर्ववयीं अतिशय अभ्यास केल्याच्या योगानें शेवटीं त्याचे डोळे गेले, व त्या परम दुःखकारक स्थितींत त्यानें ह्मातारपणीं अनेक तऱ्हेचे हाल काढले, याचाहि संबंध दोन मोठ्या ठिकाणीं त्यानें आणलेला आहे. एक त्याच्या महाकाव्याच्या तिसऱ्या सर्गाच्या आरंभीं, आणि दुसरा 'स्यामसन एगोनिस्टिस' नामक नाटकांतहि पहिल्या पहिल्यानेंच. या दोहों स्थलींचे त्याचे उद्गार वाचून ज्यांचें हृदय करुण व उदात्त रसांनीं व्याप्त होऊन जात नाहीं त्यांस धन्य पुरुष ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं ! असो; हें एक उदाहरण झालें. दुसरें वर्ड्स्वर्थ नामक सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी निवर्तलेल्या कवीचें. हा कवि जरी वरच्याच योग्यतेचा नव्हता, तरी चालू शतकांत इंग्लंडांत जे कित्येक मोठमोठे कवि होऊन गेले त्यांच्यांत सर्वानुमतें याची प्रमुखत्वानें गणना आहे. पण हा मान यास अलीकडेच प्राप्त झालेला आहे. तेथपर्यंत लहान थोर रसिक अरसिक विद्वान् अविद्वान् सर्वच याच्या कवितेचा अतिशयित उपहासच करीत असत. पण इतक्यांच्याहि बडबडीस न जुमानतां हा थोर मनाचा कवि पुढील काळावर सारखी नजर देऊन धैर्यानें कालक्रमण करीत होता; आणि शेवटीं

---

१. असाच अभिप्राय वरील कवीचा प्रतिपक्षी जो जानसन त्यानें अमळ निराळ्या रीतीनें लिहिला आहे—

"His work is not the greatest of heroic poems, only because it is not the first."

Life of Milton.

त्याचेंच खरें झालें. असो; तर याच्याहि लेखांत आत्मस्तुतीचे जागोजाग उल्लेख आहेत. आमच्या संस्कृत कवींतहि वरील प्रकार नाहींसा नाहीं. वर सांगितलेल्या वर्ड्स्वर्थ कवीप्रमाणेंच आमच्या प्रसिद्ध भवभूतीचीहि दशा झाली असावी असें अनुमान होतें. सामान्यतः पंडितजनांची जरी अशी समजूत आहे कीं, भोजराजापाशीं जीं कविरत्नें होतीं त्यांच्यांतच कालिदासादिकांच्या मंडळींत वरील कवि होता, तरी शोधकांच्या मतें वरील गोष्ट खरी नव्हे असें ठरलें आहे. भवभूतीच्या ग्रंथांत कांहीं ठिकाणीं जे उल्लेख आहेत त्यांवरून गुणज्ञांची प्रशंसा व राजसत्कार हीं दोन्हीहि त्यास प्राप्त झालीं नाहींत हें स्पष्ट दिसतें.[1] उलटी त्याची अरसिकांच्या पायीं विटंबना मात्र पुष्कळ झाली असावी असें दिसतें. यास प्रत्यक्ष प्रमाण—

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां
जानंतु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

मालतीमाधव.

"जे कोणी आमची अवहेलना चोहींकडे पसरवितात त्यांनीं पक्कें समजून ठेवावें कीं, त्यांच्या करतां हा माझा मुळींच यत्न नव्हे. मला पूर्ण भरंवसा आहे कीं, ज्याचे मनाचे धर्म माझ्या सारखे आहेत असा पुढें मागें कोणीना कोणी तरी निपजेलच निपजेल; कां तर काळ हा अनंत आहे आणि पृथ्वी विस्तीर्ण आहे !"

वरील श्लोकाचें भाषांतर इंग्रजींत पद्यरूपानें जर केलें तर तें वर्ड्स्वर्थनेंच लिहिलें आहे असें म्हणण्यास कोणीहि चुकणार नाहीं; इतकें दोहींत अत्यंत साम्य आहे. असो; तर आपल्या काळच्या लोकांची गुणानभिज्ञता पाहून महाशय कवींचे असे लोकभर्त्सनपर उद्गार वारंवार प्रगट केलेले आढळण्यांत येतात; व ते सहृदय वाचकांस अत्यंत तल्लीन करून टाकतात. असाच, किंवा याहूनहि विशेष उद्दामत्वाचा प्रकार अगदीं अर्वाचीन संस्कृत कवि जगन्नाथपंडित याच्याहि लेखांत आढळतो. याचे कांहीं मासले पुढें देतों.

'भामिनी विलासा'च्या पहिल्या भागांत प्रायः सगळ्या अन्योक्ति आहेत; त्यांत आरंभींच पंडितराय गर्जतात—

दिगंते श्रूयन्ते मदमलिनगंडाः करटिनः
करिण्यः कारुण्यास्पदमसमशीलाः खलु मृगाः ।
इदानीं लोकेऽस्मिन्ननुपमशिखानां पुनरयं

१. या विषयावर सविस्तर विवेचन केलेलें पहाणें असल्यास शालापत्रक पुस्तक १२ अंक ६ आणि ११ हे पहावे.

नखानां पांडित्यं प्रकटयतु कस्मिन्मृगपतिः ॥

"मदस्रावानें ज्यांचीं गंडस्थळें मलिन झालीं आहेत असे मदोन्मत्त हत्ती दिगंतरीं आहेत असा जनवाद कानीं येतो; आणि सभोंवतीं पहावें तों केवळ कारुण्यास पात्र अशा हत्तिणी व क्षुद्र पशु हेच दृष्टीस पडतात; तर अशा समयास मृगराज जो सिंह त्यानें आपल्या अत्यंत तीव्र नखांचें पांडित्य कोठें प्रगट करावें !"[1]

तसेंच वरील ग्रंथाच्या शेवटीं शेवटीं—

आमूलाद्रत्नसानोर्मलयवलयिताद्रा च कूलात्पयोधेः
यावंतः संति काव्यप्रणयनपटवस्ते विशंकं वदंतु ।
मद्वीकामध्यनिर्यन्मसृणमदधुरीमाधुरीभाग्यभाजां
वाचामाचार्यतायाः पदमनुभवितुं कोऽस्ति धन्यो मदन्यः ॥

"सुमेरु पर्वताच्या पायथ्यापासून तों मलयवेष्टित सागराच्या तीरापर्यंत—(ह्मणजे सगळ्या भारतवर्षांत)—जे जे काव्यरचनानिपुण असतील त्या सर्वांनीं निःशंकपणें सांगावें कीं, द्राक्षांपासून निघणाऱ्या रसाप्रमाणें अत्यंत मधुर अशा वाणींचें स्वामित्व मजवांचून दुसऱ्या कोणास आहे !—(ह्मणजे माझ्या इतकी रसभरित काव्यरचना करणारा दुसरा कोण आहे !)"

याप्रमाणेंच अगदीं सरतेशेवटचा श्लोक—

शास्त्राण्याकलितानि नित्यविधयः सर्वेऽपि संभाविताः
दिल्लीवल्लभपाणिपल्लवतले नीतं नवीनं वयः ।
संप्रत्युज्झितमासनं मधुपुरीमध्ये हरिः सेव्यते
सर्वं पंडितराजराजितिलकेनाकारि लोकाधिकम् ॥

"संपूर्ण शास्त्रांचें आकलन केलें, सारे नित्यविधि आचरिले, दिल्लीपतीच्या करतलावर नवीन वय घालविलें (ह्म० तरुणपणीं दिल्लीच्या बादशहाच्या अत्यंत आदरास पात्र शालों,) हल्लीं सर्वपरित्याग करून मथुरेंत हरिसेवेंत रत आहें;—तर याप्रमाणें पंडितराजमालिकेंत जो अग्रगण्य त्यानें लोकोत्तर असें काय केलें नाहीं !"

वरील श्लोकांत प्रस्तुत कवीविषयीं चोहोंकडे असणाऱ्या प्रसिद्धीचें प्रत्यक्ष प्रमाण आहे हें आमच्या साऱ्या वाचकांच्या ध्यानांत येईलच.[2]

---

१. वरील आरंभींची अन्योक्ति कवीनें आत्मपर लिहिली आहे. त्याचा अभिप्राय असा आहे कीं, पुरातनकाळीं कालिदासप्रभृति जे महाकवि होऊन गेले त्यासारखे आतां कोणीच नाहींत,—जे जे कोणी आहेत ते केवळ 'कारुण्यास्पद' व क्षुद्र असेच आहेत. तेव्हां आतां टक्कर मारायाची ती कोणाशीं मारावी !

२. अकबर पादशहास उद्देशून लिहिलेला एक संस्कृत श्लोक आह्मांस आढळला आहे. तो असा—

(पुढें चालू).

असो; आतां सरतेशेवटीं आमच्या महाराष्ट्रभाषेंतील कवींकडे पाहूं. यांची तऱ्हा एकंदरींत बाकीच्या सर्व भाषांतील कवींहून अगदीं निराळीच असल्यामुळें, ह्मणजे जेवढे काव्यरचना करणारे झाले तेवढे बहुधा साधुच असल्यामुळें, वरील आत्मश्लाघेचा प्रकार यांत आढळणें कठिण हें सर्वांच्या सहज ध्यानांत येईलच. आणि खरोखरीच तसें आहे. साधूचा आणि अहंकाराचा परस्पर अत्यंत विरोध असल्यामुळें पूर्वोक्त गर्वोक्तीसारखें त्यांच्या ग्रंथांत कांहीं आढळणार नाहीं. तथापि जरी कवित्वाचा गर्व न आढळला, तरी तुकारामासारख्यांनीं आपले स्वतःविषयींचेहि अभिप्राय जागोजाग स्पष्ट बोलून दाखवितांना अगदीं कमी केलें नाहीं. जसें—

मऊ मेणाहुनी आह्मी विष्णुदास कठिण वज्रास भेदूं ऐसे ।
मेले जीत असों निजोनिया जागें जो जो जें जें मागें तें तें देऊं ।
भले तरी देऊं गांडीची लंगोटी नाठाळाचे काठी देऊं माथां ।
मायबापाहुनी बहु मायवंत करूं घातपात शत्रुहूनी ।
अमृत तें काय गोड आह्मांपुढें विष तें बापुडें कडू किती ।
तुका ह्मणे आह्मी अवघेची गोड ज्याचें पुरवूं कोड त्याचे परी ।

तसेंच—

तोंवरी तो करी जंबुक गर्जना जंव पंचानना देखिलें नाहीं ।
तोंवरीच सिंधु करी तो गर्जना जंव त्या ब्राह्मणा देखिलें नाहीं ।
जोंवरी तोंवरी वैराग्याच्या गोष्टी सुंदर वनिता दृष्टी पडली नाहीं ।
तोंवरी तोंवरी शूरत्वाच्या गोष्टी जव परवीर दृष्टी पडला नाहीं ।
तोंवरी तोंवरी माळामुद्राभूषण जंव तुक्याचें दर्शन झालें नाहीं ।

एके ठिकाणीं प्रस्तुत कवीनें सर्व संतांत आपलें श्रेष्ठत्व वर्णिलें आहे—

संतकृपा झाली इमारत फळा आली ।
ज्ञानदेवें रचिला पाया बांधियेलें देवालया ।
नामा तयाचा किंकर तेणें केला हा विस्तार ।
जनार्दन एकनाथें ध्वज केला भागवतें ।
भजन करा सावकाश तुका झालासे कळस ।

याप्रमाणेंच ईश्वरापाशीं केवळ सरूपता पावल्याचा मनांत भाव धरून तुकारा-

---

जगद्दलन भूपते वदति यद्यपि त्वां नृपं ।
मतं तु हरिशर्मणो हरिरसि त्वमेव ध्रुवम् ।
अकब्बरमहीश्वर ज्वलदघासुरग्रासतः
प्रजाः सह निजात्मना कथमथान्यथा रक्षिताः ॥

वरील हरिशर्मा कोण असेल तो असो !

मानें कोठें कोठें ह्मटलें आहे--

अणु रेणु या थोकडा तुका आकाशा एवढा ।
गिळुनि सांडिलें कलेवर भवभ्रमाचा आकार।
सांडिलें त्रिपुटी दीप उजळीला घटीं ।
तुका ह्मणे आतां उरलों उपकारा पुरता ।

तसाच पुढील सर्वप्रसिद्ध अभंग--

आधीं होता संतसंग तुका झाला पांडुरंग ।
त्याचें भजन राहिना मूळस्वभाव जाईना ।

असो; पण हा प्रकार निराळा. वर दाखल केलेल्या उदाहरणांप्रमाणें जर आमच्या मराठी कवितेंतील स्थलें पाहायाचीं असतील तर तीं दोन तीन कवींच्या ग्रंथांतच काय तीं सांपडतील. हे कवि मोरोपंत, रघुनाथपंडित, रामजोशी हेच मुख्यतः होत. आतां यांपैकीं पहिल्याचे कांहीं उद्गार येथें सादर करितों.

'मंत्ररामायणा'च्या शेवटीं 'विद्वत्प्रार्थने'त वरील कवि ह्मणतो—

जसे होती देव प्रमुदित शचीनायकवनीं
तसे सारज्ञाते बुधजन मयूरेशकवनीं ।
महाराष्ट्रग्रंथीं रसिक कवि जे तेचि रमती
परंतु ज्ञात्यांवी पळहि न असावी चैर मती ॥

'आर्यामुक्तामाले'च्या शेवटीं ह्मटलें आहे--

आर्यामुक्तामाला दाविन परि जरि तुह्मी न मागाल ।
लागाल प्रभुकंठीं घालूं फुगवील कीं रमा गाल ॥[1]

तसेंच 'भारता'च्या सरते शेवटीं जो उपसंहार केला आहे त्यांत आपल्या मातापित्यांस नामनिर्देशपूर्वक अभिवंदन करून आमच्या कवीनें 'भारत'प्रणेता जो व्यास त्याशीं आपली समता व्यंग्योक्तीनें सुचवून दिली आहे.

धन्य श्रीराम पिता धन्या लक्ष्मी प्रसू जगीं झाली ।
आली सैत्यवतीची कीं भारतकीर्ति सुतमुखीं आली ॥

याप्रमाणेंच आपल्या काव्याचे दूषक जे खल त्यांस उद्देशून वरील 'विद्वत्प्रार्थने'च्या शेवटीं मोरोपंत ह्मणतो--

---

१. इंद्राच्या नंदनवनांत. २ चंचल. ३ माता. ४ सखी. ५ व्यासाची आई.

१. कवीचा अभिप्राय असा कीं, जर या 'मोत्यांच्या माळा' मीं तुह्मांस दाखविल्या आणि त्या मजपासून घेऊन तुह्मीं ईश्वरास अर्पण करू लागलां, तर लक्ष्मी रुसेल; कां कीं भगवंतास कंठालिंगन करण्याचा तिचाच अधिकार, तो माळा घेऊं पहातील तर तिला कसा सहन होईल ?

माझी सत्कृति दूषिली जरी खलें उच्छृंखलें आग्रहें
सेवावीच परंतु नित्य रसिकें हे सद्गुणांच्या गृहें।
चांडाल त्रिदशापगेंत[7] बमला कीं धेनुला स्पर्शला
त्यांचें श्रोत्रियदेवसेव्य[8] पयही त्याही सदा निर्मला ॥

ज्या आमच्या कवीस अलीकडील महापंडितांनीं कवित्वाच्या पदावरून केव्हांच झुगारून दिलें आहे व ज्याचे ग्रंथ छापून काढण्यापुरती त्याची योग्यता अलीकडे कोणासहि भासत नाहीं, त्यानेंच आपल्या 'सत्कृती'विषयीं जेथें तेथें एवढी प्रौढी झोंकावी हें आमच्या सर्व वाचकांस बहुधा मोठें विलक्षण वाटेल यांत संशय नाहीं ! पण आमची तर अशी खात्री आहे कीं, 'केकावली'सारख्या अप्रतिम काव्याच्या रचणारास जर वरील गर्वोक्ति शोभत नाहींत, तर त्या कोणत्याहि कवीस शोभणार नाहींत. असो; एकंदरींत सरतेशेवटीं असेंहि येथें लिहिल्याबांचून आमच्यानें राहवत नाहीं कीं, आमच्या कवीच्या प्राकृत काव्यास नाक मुरडणारे मोठमोठे 'शास्त्री,' 'पंडित,' 'आचार्य,' 'उपाध्याय' आदिकरून सर्व बडी मंडळी जशी हळू हळू विस्मृतीच्या पंथास लागून आजला पार नाहींशी झाली, त्याचप्रमाणें त्याचे आधुनिक प्रतिपक्षी जरी मोठेमोठे 'उपपदधारी' असले तरी कालाच्या तडाक्यांत या लांब लांब किताबांचाहि चुराडा होऊन जाऊन आमच्या साध्या कवीची कीर्ति आजवर जशी अबाधित चालत आली तशीच पुढें चालून निरंतर उज्वलच राहील !

असो; मोरोपंताशिवाय दुसरे जे दोन कवि वर सांगितले त्यांच्या ग्रंथांत वरच्यासारखे आत्मश्लाघात्मक निराळे उल्लेख सांपडत नाहींत. प्रसंगोपात्त व काव्याच्या आरंभीं शेवटीं वगैरे आपलें नांव घालण्याची जशी कवींची चाल आहे त्याप्रमाणें मात्र त्यांनीं आपापल्या कृतींस केलेलें आढळतें; व विशेष म्हटलें म्हणजे 'कविराय,' 'कवींद्र' वगैरे उपपदें कोठें कोठें जोडलेलीं आढळतात, इतकेंच.

याप्रमाणें इंग्रजी, संस्कृत व मराठी कवींनीं आपापल्या ग्रंथांतून जे स्तुतिपर उद्गार जागोजाग उघडपणें प्रगट केले आहेत त्यांपैकीं कांहीं वर सांगितले. आतां यावर आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस बहुधा असें विचारणें येईल कीं, आपल्याच तोंडानें आपली स्तुति कधीं करूं नये, तसें करणें हें मूर्खत्वाचें चिन्ह होय, वगैरे जें सारे शहाणे लोक सांगत असतात तें आणि या वरील वल्गना हीं परस्पर जुळतात कशीं ? वरील कवि एवढे ज्ञानी असून त्यांच्या हातून असें अनुचित कर्म कसें घडलें, व तें करणें त्यांस बरें कसें वाटलें ? यावर आमचें असें उत्तर आहे कीं, वरील नियम जरी सामान्यतः पहातां खरा आहे, तरी तो पुष्कळ ठिकाणीं अपवादक होतो. पहा कीं आपल्या स्वतःविषयीं बोलणें हें जरी प्रशस्त नाहीं, तरी ह्यूम, गिबन, मिल्ल

६. उत्कृष्ट काव्य. ७ गंगेत. ८ ब्राह्मणश्रेष्ठ आणि देव यांस सेव्य. ९ पाणी–दूध.

वगैरे ग्रंथकारांनीं आपलीं चरित्रें आपल्याच हातांनीं लिहून ठेविलीं आहेत, व त्याबद्दल कोणी त्यांस नांव ठेवीत नाहींत इतकेंच नव्हे, पण तीं स्वरचित चरित्रें लोक उलटीं अधिक आवडीनेंच वाचतात. त्याप्रमाणेंच सीजर व बाबर यांनीं आपापल्या ग्रंथांत आपल्याच पराक्रमांचें जरी स्वतः वर्णन केलें आहे, तरी तें दोषरूप न होतां त्यांचीं जगास प्रियच झालें आहे. तेव्हां यावरून काय स्पष्ट होतें बरें ? अर्थात त्याचप्रमाणें स्वतःविषयींचें जरी वर्णन असलें, तरी जर तें यथार्थ आहे, तर दूषणास पात्र होण्यापर उद्धारहि नाहीं. दुसरें असें कीं गुणिजनांचे चहाते असून त्यांपासूनच जेव्हां त्यांस मान्यता त्यांस तृप्ति मानमान्यता प्राप्त होते, तेव्हां आत्मश्लाघेचा प्रसंगच येत नाहीं. केलेल्या प्रशंसेनें संतुष्ट होऊन गुणवान मनुष्य आपल्या श्रमांचें सार्थक झालेंस अभिमान आणि स्वस्थ रहातो. पण वरच्याच्या विपरीत जेव्हां प्रकार घडतो,—ह्मणे सद्गुणाची चहा न होतां उलटी थट्टा व हेळणा मात्र होते, जेव्हां

नैसर्गिकी सुरभिणः कुसुमस्य सिद्धा
मूर्ध्नि स्थितिर्न चरणैरवताडनानि ॥

"सुवासिक पुष्पाची स्वभावसिद्ध योग्यता ह्मटली ह्मणजे डोक्यावर असणें ही होय, पायाखालीं तुडवून जाणें ही नव्हे !" हें विसरून जाऊन लोक एखाद्या महान ग्रंथकाराची अवज्ञा करूं पहातात, तेव्हां स्वतःची योग्यता प्रकट करण्यास आत्मप्रशंसेखेरीज मार्गच रहात नाहीं. तसें तो ग्रंथकार न करील तर, मोठा तेजस्वी हिराहि जसा अजाणत्या अडाणी लोकांच्या हेळसांडीनें कोणीकडे लोपून जाऊन हरवेल, त्याप्रमाणेंच त्याचे गुणहि अप्रसिद्धच रहातील. वर ज्या कवींच्या ग्रंथांतून उतारे दिले आहेत त्या सर्वांनीं ही अवहेलना स्वतः अनुभविली असून तिच्या संबंधानेंच वरील उपोक्ति प्रकट केल्या आहेत. तेव्हां या रीतीनें पहातांहि त्यांवर गर्वाचा दोषारोप करतां येत नाहीं. याखेरीज वर एकदां सांगण्यांत आलेंच आहे कीं, आपआपल्या योग्यतेप्रमाणें उंची पोषाक केलेला जसा सर्वांस चालतो, त्यांत जनदृष्ट्या कांहीं बावगें दिसत नाहीं, तसाच ग्रंथकारांसहि यथायोग्य अभिमान असल्यास तो निंद्य होत नाहीं. तर इकडून पाहिलें असतांहि जे ग्रंथकार साऱ्या जगास वंद्य होऊन राहिले आहेत त्यांचा स्वतःविषयींचा गर्व राजाधिराजांच्या महावैभवाप्रमाणें दूषणास मुळींच पात्र न होतां त्यांस उलटा भूषणास्पदच होतो.

पण इतकेंच नव्हे. वर जीं कित्येक कारणें दर्शविलीं तीं पूर्वोक्त आत्मश्लाघेचा प्रकार दोषरूप समजून त्याचें दोषरूपत्व उडविण्याकरतां कल्पिण्यांत आलीं. आतां तो प्रकार वस्तुतः किंवा निदान रसिकजनाच्या दृष्टीनें तसा मुळींच नव्हे हें दाखवितों. पहा कीं, कोणाचेंहि यथावत् गुणदोषवर्णन करणें हें चितारयाच्या किंवा मूर्तिकाराच्या कसबाप्रमाणें आहे; ह्मणजे वरील दोन कारागीर जशी हुबेहुब प्रतिमा उतर-

तात तसेंच करणें हें गुणदोषविवेचकांचें काम आहे. आतां अशी कल्पना करा कीं, कोणा एकाला आपली तजवीर उत्कृष्ट काढावयाची आहे किंवा उत्कृष्ट पुतळा बनवायाचा आहे; तर तो मनुष्य कोणाकडे जाईल बरें ? अर्थातच एखाद्या नामांकित चित्र[illegible]याकडे किंवा मूर्तिकाराकडे हें उघड आहे. पण पुनः असें समजा कीं त्या सर्वोत्कृष्ट चित्र्याला किंवा मूर्तिकारासच अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, आपणामागें आपली कीर्ति कायम रहावी यास्तव आपली एक तजवीर किंवा मूर्ति तयार करावी; तर [illegible]ग त्यानें कोणाकडे जावें ? त्याच्यासारख्या कारागिराच्या कीर्तीस साजेसें काम [illegible] करण्यास धजावणारा त्यास कोण सांपडेल ? व तें काम अत्युत्तम जसें व्हावें [illegible] तसें इतर कोणाच्या हातून होणार आहे ? ग्रीस देशाच्या इतिहासांत तद्देशीय एका अत्युत्कृष्ट मूर्तिकाराची[1] जशी एक गोष्ट लिहिली आहे कीं, आथेन्स शहरीं एक मोठें देवालय बांधलें असतां त्याच्या बाहेरच्या मेहेरपीवर तेथील देवाचीं चित्रें खोदून बसविलीं असतां त्या कारागिरानें त्या गर्दीतच एक आपलें आणि एक आपल्या यजमानाचें असें चित्र कोणास कळूं न देतां बसवून दिलें. पण तें घुडें जेव्हां कळून आलें तेव्हां त्याच्या शत्रूंनीं त्याबद्दल त्याजवर सरकारांत फिर्याद लावून त्यास मोठी शिक्षा देवविली. असो; तर याप्रमाणें महाविख्यात जे पुरुष होऊन जातात त्यांचे ठायीं स्वाभिमान असा अनेक वेळां दृष्टीस पडतो. पण जे खरे रसिक आहेत ते त्याबद्दल वरील मत्सरी लोकांप्रमाणें त्यांच्यावर कधींहि न उलटतां त्यांचा अधिक सत्कारच करतील अशी आमची खात्री आहे. असो; तर हेंच सादृश्य वरील कवीकडे घेऊन असें म्हणायाचें कीं, ज्याप्रमाणें फिडियस याचा पुतळा बनवण्यास किंवा रेफीलेची[2] तजवीर काढणें असल्यास तें काम फिडियस किंवा रेफील यांच्यासारखें दुसऱ्या कोणाच्याहि हातून होणें नाहीं, त्याप्रमाणेंच मिल्टन किंवा जगन्नाथराय अशा महाकवींच्या वाणीचें मधुरत्व अत्यंत उत्कृष्टतेनें वर्णायाचें असल्यास तें काम तीच स्वतः जितक्या सरसत्वानें करील तितकें इतराकडून कदापि व्हावयाचें नाहीं. यास्तव स्वसुखानें केलेलें गुणवर्णन जरी सामान्यतः दुसऱ्यास कंटाळाच आणतें, तरी वरच्यासारख्या प्रसंगीं त्या वर्णनाच्या माधुर्यानें व यथार्थत्वानें चित्तवृत्ति इतकी

१. हा मूर्तिकार फिडियस होय. याच्या जोडीचा कारागीर आजपर्यंत कोणा झालाच नाहीं. ज्यूपिटर (इंद्र) वगैरे देवाच्या याच्या मूर्ति अजून जपून ठेवल्या आहेत. त्यांजकडे वघून आजपर्यंत हजारों कारागिरांनीं हात टेकले. हा कारागीर पेरेक्लीज याचा जिवलग मित्र होता. याचीच एक मूर्ति फिडियसानें आपल्या मूर्तीवरोवर खालीं लिहिल्याप्रमाणें खोदून तयार केली होती. पुढील वृत्तांत खालीं आला आहेच.

१. रेफील हा वरच्या फिडियसासारखाच आपल्या कलवांत अगदीं वस्ताद होऊन गेला. याचीं चित्रें अद्याप रोम शहरीं आहेत. तीं कितीहि पैसा दिला तरी तेथील लोक कोणास देत नाहींत. या चित्र्याच्याहि वरोवरीचा आजपर्यंत कोणीहि झाला नाहीं.

तन्मय होऊन जाते कीं, त्या आनंदभरांत वरील दोषाकडे वाचकाचें लक्षच जात नाहीं. सारांश, ज्याप्रमाणें समरांगणांत महावीरांच्या वीरोक्ति आत्मश्लाघापर असतांहि ऐकणारास त्रास न देतां उलट्या अत्यंत आल्हादच देतात, किंवा मानिनी स्त्रियांचा आपल्या रूपत्वाचा अभिमान त्यांच्या सौंदर्यास विशेष रमणीय करून त्यांचीं निर्मत्सनपर भाषणेंहि त्यांच्या वल्लभांस उलटीं अधिक हृद्यच वाटवितो, त्याचप्रमाणें संपूर्ण जगाच्या प्रेमाचें स्थान होऊन बसलेल्या कवीश्वरांचे लोकाविक्षेपपर उद्गारहि रसिकजनमनास कांहीं विलक्षण रीतीनें मोहून टाकतात ! ते वाचतांना त्यांस तृप्ति न होतां दर खेपेस ते त्यांत अधिकाधिक तन्मयच होऊन जातात !

९. असो; येथवर आपल्या अंगीं वास्तविकपणें असणाऱ्या गुणांचा अभिमान मनुष्यास असल्यास तो दोषरूप होत नाहीं याविषयीं निरूपण झालें. हा वरील सदराचा एक भाग झाला. याखेरीज अदोषरूप गर्वाचे आणखीहि कित्येक प्रकार आहेत. ते स्वाभिमान, कुलाभिमान, जात्याभिमान, देशाभिमान इत्यादि होत. यांविषयीं हवें तसें विवेचन करण्यास पुष्कळ जागा पाहिजे; ती प्रस्तुतच्या अंकांत घेतां येत नाहीं. यास्तव पुढें एखादे वेळेस निराळ्याच निबंधांत त्या सर्वांविषयीं पृथक् विचार करूं. असो; आतां सरते शेवटीं प्रस्तुत विषयावर आणखी कांहीं थोडे विचार प्रदर्शित करून हा लेख आटपतों.

१०. प्रस्तुत निबंधाच्या आरंभीं आह्मीं दाखविलें आहे कीं, मनुष्याचे ठायीं परमेश्वरानें ज्या निरनिराळ्या वृत्ति ठेवल्या आहेत त्या व्यर्थ किंवा अपायकारक मुळींच नाहीत; तर त्या शरीरावयवाप्रमाणें मनुष्याच्या कल्याणार्थच सूचल्या दिल्या असून केवळ त्याच्याच असमंजसपणानें त्या प्रसंगानुसार त्यास बंधक होतात. हीच गोष्ट सांप्रत विवेचनाचा विषय जो गर्व त्यासहि लागू पडते कशी ती पहा. जसा क्रोध हा मनुष्यास योग्य प्रसंगीं अवश्य आलाच पाहिजे,—ह्मणजे ज्या वेळेस कोणी कोणाच्या विनाकारण वाटेस जाईल व त्यास कोणत्याहि प्रकारची नाहक इजा करील तेव्हां त्याचें पारिपत्य त्यानें अवश्य केलेंच पाहिजे.—त्याचप्रमाणें आपली खरी योग्यता लोकांत कर्मी करण्याचा जो यत्न करील त्याशीं गर्वाची वागणूकहि समजदार मनुष्यास अवश्य करावी लागते. तसें तो न करील तर वरील प्रसंगीं सर्वस्वाची किंबहुना शरीराचीहि हानि होण्याचा जसा संभव, त्याचप्रमाणें या दुसऱ्या प्रसंगीं आपल्या अंगच्या योग्यतेचाहि नाश अवश्य व्हावयाचा. याचा उत्कृष्ट प्रत्यय सध्यां आमच्या देशांतच आहे. आमचें वैभव होतां होतां अगदीं नष्ट झाल्यापासून आज पांच पन्नास वर्षें इंग्रेज ग्रंथकार, इंग्रेजी शिक्षक, इंग्रेजी मिशनरी वगैरे सर्व लोकांनीं एकवट होऊन आमच्या लोकांस जें कांहीं घाबरे करून सोडले आहे तें कांहीं पुसूं नये. एखाद्या बिचाऱ्या हरणावर कुत्र्यांची झुंड सुटून त्यांनीं त्याजवर लगट करून

त्यास पाडाव करावें, आणि मग जशी त्याशी दुर्दशा, त्याचप्रमाणें वरील ज्ञानसंपन्न लोकांपैकीं ज्यानें उठावें त्यानें आह्मांस अज्ञानांधकारांतून वर काढण्याचा जसा काय पतकरच घेऊन सर्वांनीं आह्मांस एका मोठ्या तत्त्वाचें पक्कें ज्ञान करून दिलें आहे कीं, आह्मांस ज्ञान ह्मणून कसें तें मुळींच नाहीं ! आह्मी सर्व केवळ मतिमंद, कर्तृत्व-शून्य व अत्यंत नीच असे कोणी क्षुद्र प्राणी असून इसापनीतींतील ओझ्यानें लाद-लेल्या गाढवाप्रमाणें आज यांचें उद्यां त्यांचें असें सतत पिढ्यानपिढ्या ओझें वागवि-ण्यासच केवळ निर्माण झालों आहों. आह्मांस योग्य कामें झटलीं ह्मणजे नांगर धरणें, पोरें हाकणें, कागद घासणें, छोटेखानी शिपाई बनून हडेल हप करणें इतकींच काय तीं ? अंमळ मोठ्याशा वरील कामांवरहि आह्मांस नेमतां कामा नये,–कारण न जाणो आमच्या अजागळपणानें सरकारच्या गळ्यांत एखादें जबरदस्त घोंगडें येऊन पडलें तर मग कोणी उगीच पंचाईत करीत बसावी ! तेव्हां पहिल्यापासूनच सावधगिरी ठेवलेली बरी नव्हे ? असो; एकंदरींत सध्यांच्या काळीं अमुक अमुक गुण ह्मणजे आमच्या ठिकाणीं आहे असें ह्मणण्यास मुळींच जागा राहिलेली नाहीं. जगांत जेवढे ह्मणून गुण आहेत त्यांपैकीं झाडून एकूण एक आमच्या राजकर्त्यांनीं आपणांकडे ओढून घेऊन सगळे अवगुण तेवढे दरोबस्त आह्मांकडे सोंपवून दिले आहेत. फार तर काय पण ज्या गोष्टी केवळ निर्विवादशा आजपर्यंत आह्मांस वाटत होत्या त्याहि अलीकडे निवळ खोट्या ठरत चालल्या आहेत ! आमचा देश साऱ्या पृथ्वींत कंगाल असून आमच्या निमित्त आमच्या दयाळू राजकर्त्यांस दर वर्षीं विलायतेंतून अगणित द्रव्य उलटें इकडेच आणावें लागतें ही गोष्ट आजपर्यंत कोणास कळली होती ! आभाळांत दगडफोडीचा कारखाना असून आयतीं तयार झालेलीं देवळेंचीं देवळें एखादे वेळेस मजेखातर खालीं कोसळतात हें शुभवर्तमान आजपर्यंत कोणीं जगांत जाहीर केलें होतें ! 'रामायण' हें होमरच्या काव्यांवरून उतरलें आहे, 'भगवद्गीता' 'पवित्र शास्त्रां'तील मजकूर चोरून बनविली आहे, वगैरे ग्रंथकर्तृत्वाचीं परम गूढ रहस्यें प्रणीत करण्याची युरोपीय महापंडितांशिवाय कोणा इतराची छाती झाली असती ! तेव्हां एकंदरींत आमच्या देशास उगीच वर मान करण्यास जेथें जेथें ह्मणून सांपडल तेथें तेथें देवाच्या आवडत्या सत्यनिष्ठ लोकांनीं वरच्याप्रमाणें टोला हाणलाच ! एकूण धन्य त्यांची यांत संशय नाहीं. इतःपर एतद्देशीय लोकांस, आणि त्यांतून विशेषतः हिंदूंस, कोणत्याहि संबंधें उगीच प्रौढी मिरविण्याचें बिलकूल कारण उरलें नाहीं. हें तर काय पण मनुष्यमात्रास जे कांहीं स्वाभाविक हक्क असतात तेहि त्यांस जागवितां कामा नयेत. वरील हक्कांपैकीं दोन मुख्य झाटले ह्मणजे एक शरी-राचें स्वातंत्र्य ह्मणजे हवें तें करण्याची मोकळीक, आणि दुसरा मनाचें स्वातंत्र्य ह्मणजे हवा तसा विचार करण्याची मोकळीक हे होत. हे दोन्ही अधिकार मनुष्यास

जन्मसिद्ध आहेत. पण हेहि हल्लींच्या काळीं निष्प्रतिबंध चालतात असें नाहीं. वाटेनें जातांना जर सोजर साहेबांची गांठ पडली,—त्यांतूनहि त्यांच्या हातांत अग्नियंत्र असलें,—तर मग विचाऱ्या नेटिवानें ती वाट आपली सोडून द्यावी हें बरें; कां कीं साहेब मजकूर स्वभावतःच किती सालस व दयाळू असतात, व पुढें कोडतांतून अशा खटल्याचे निवाडे कसे होतात हें कोणासहि माहीत नाहींसें नाहीं. दुसरें स्वातंत्र्य मनाचें. हें आमच्यापासून हिसकूनच घेतलें आहे असें नाहीं; तरी बरच्याप्रमाणेंच तें चालण्यास पुष्कळच अटकाव आहेत हें उघड आहे. जी गोष्ट आमच्या गौरवर्ण बांधवांनीं केली असतां खुशाल चालते, किंबहुना तींबद्दल त्यांची वाहवाहि होते, तींच गोष्ट केली असतां नेटिवास चोहोंकडून सर्व खायाला उठतात. तेव्हां न्याय अन्याय तोलण्याचा कांटा युरोपियन लोकांना एक आणि आह्मांला एक अशी सांप्रतची व्यवस्था आहे. विद्येकडे वगैरेहि हाच वैषम्यभाव आढळतो. एखादी जागा युरोपियनास मिळावयाची असतां जितकी विद्वत्ता लागते तिच्या दसपट किंवा शंभरपट विद्वत्ता अंगीं असतांहि ती नेटिवास मिळण्यास मारामार पडते. तेव्हां दहा किंवा शंभर नेटिवांबरोबर एक युरोपियन असें प्रमाण पडलें. आह्मां एतद्देशीय लोकांस कित्येक वर्षें उरस्फोड करूनहि इंग्लिश भाषेचे प्रयोग नीट करतां येतच नाहींत. यास्तव कित्येक दयाळू इंग्रेज ग्रंथकारांनीं आह्मांकरतां लहान लहान ग्रंथ करून ठेवले आहेत; त्यांतूनहि इंग्रेजीचे उच्चार[1] ह्मटले तर ते आह्मांस कधींच साध्य व्हावयाचे नाहींत, तसें होण्यास जन्मोजन्मीं तपश्चर्या करून जेव्हां खुद्द लंडन शहरांतच जन्मास यावें तेव्हांच तो महालाभ व्हावयाचा, याप्रमाणें मोठमोठे विद्वान् व अनुभवशीर असे तद्देशीय पंडित सर्वांस सांगतात. पण तींच आमच्या इकडच्या भाषांची गोष्ट पहा. यांचे प्रयोग युरोपियन लोकांस नीट करतां येत नाहींत हें तर नाहींच,—छे छे! असें ह्मणेल त्याची जिव्हा झडो!—पण खुद्द आमच्याच लोकांनीं केलेले ग्रंथ आमच्या भाषांच्या सरणीस यथास्थित उतरले आहेत कीं नाहींत याविषयींची साक्ष वरील परस्थ पंडित देतात! कोणीं कसाहि नवीन ग्रंथ तयार केला कीं त्याच्या शुद्धाशुद्धतेविषयीं मत देणारे कोण!—अर्थातच मिचेलसाहेब, विलसनसाहेब, हौगसाहेब वगैरे! आमच्या बिचाऱ्या एतद्देशीय पंडितांस दोन तीन भाषांचाच पुरेसा

१. इंग्रेजांच्या उच्चाराविषयींची बरची जी घमंडी तिकडील लोकांच्या तोंडून हमेष ऐकूं येते ती अगदीं खोटी असेल असें आह्मी ह्मणत नाहीं. तरी इतकें खरें आहे कीं, इकडील लोकांस तिकडच्या भाषांचे उच्चार जितके साधतात तितके तिकडच्यांस इकडचे साधत नाहींत. आमच्या देशांतून प्रख्यात बाबू केशवचंद्र-सेन यासारखे जे कित्येक विद्वान तिकडे गेले होते त्यांचें बोलणें ऐकून त्यांच्या उच्चाराची व सफाईची तिकडील पुष्कळ लोकांनीं खुप तारीफ केली असें ऐकण्यांत येतें.

अभ्यास करतांना मोठी पंचाईत पडते, पण आमच्या युरोपीय पंडितांस आपली जन्म-भाषा शिकून शिवाय इंग्लिश, फ्रेंच वगैरे अर्वाचीन व ल्याटिन, ग्रीक वगैरे प्राचीन भाषांत पारंगत होऊन खेरीज आमच्या इकडच्याहि दहा पांच सहज बगलेंत मारतां येतात ही मोठ्या अचंब्याची गोष्ट नव्हे काय! काय असेल तें असो! एशिया खंडाकडील लोक चटसारे नामर्द व बेबंदशाई हा युरोपियन इतिहासकारांचा एक मोठा सिद्धान्त होऊन गेलेला आहे, तसाच कांहीं प्रकार इकडच्या भाषांचाहि नसेल ना! असो; असाच किंवा याहूनहि विचित्र प्रकार उच्चारांचा. इंग्लिश भाषेतील शब्दांचा स्वरहि अंमळ इकडे तिकडे झालेला कोणास खपत नाहीं,—तेवढ्यावरूनहि त्या बोलणाराची भाषाज्ञानाची परीक्षा करूं जातात; पण आमच्या एतद्देशीय भाषांस कोण विचारतो? जेथें खुद्द व्याकरणावर व भाषाप्रयोगांवरहि धाड पडते तेथें एवढ्याशा तेवढ्याशा उच्चाराची कोण पर्वा करतो? मेकालेसाहेबांनीं आपल्या देश-बांधवांची आमच्याशीं तुलना करून कोठेसें झटलें आहे कीं, इंग्लंडांत एक मनुष्याचें डोकें फुटलें असतां जितका लोकांत गवगवा होतो तितका हिंदुस्थानांत तीन कचकचीत लढाया झाल्या तरी होत नाहीं; तर हीच गोष्ट इंग्लिश व एतद्देशीय भाषांस अनुक्रमेंकरून लागते. असो; तर याप्रमाणें युरोपियन व नेटिव यांत इतकी तफावत हरएक बाबतींत पडलेली आढळते.

वरील पाल्हाळवार मजकुराचें एकंदर धोरण आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. तें इतकेंच आहे कीं, आमच्या देशाची सांप्रत काळीं अत्यंत निकृष्ट अवस्था आली असल्यामुळें तो सगळ्या जगाच्या व विशेषेंकरून बहुतेक इंग्लिश लोकांच्या दृष्टीनें केवळ अवहेलनेसच पात्र झाला आहे. तर जे खरे देशाभिमानी असतील व सत्यनिष्ठ असतील त्यांस प्रस्तुत निबंधाच्या या शेवटल्या भागांत आम्ही इतकेंच सुचविणार कीं, त्यांनीं वरील निंदेनें बिलकूल खचून जाऊं नये; आणि मेकाले सारख्यांच्या मोठ्या नांवास भिऊन न जातां व मिशनरी, पाद्री, बाटे वगैरे लोकांच्या शिव्यांस व रागास अगदी न जुमानतां आपल्या देशावर वरील लोकांनीं जीं अज्ञानमूलक व दुराग्रहजन्य परोपरीचीं दूषणें बळेंच जाणून बुजून दिलीं आहेत त्यांचें यथास्थित खंडन करावें. असें केलें असतां त्यांचे याच देशावर तर काय, पण एकंदर सगळ्या जगावरहि मोठे उपकार होतील!

असो; तर याप्रमाणें प्रस्तुत मनोवृत्तीचा मनुष्यास अत्यंत उपयोग आहे. ही त्याचे ठायीं वास करीत नसेल तर मत्सरी व द्वेषी मनुष्यांच्या निर्भर्त्सनेखालीं तो तेव्हांच खचून जाऊन त्याच्या अंगचे खरे गुणहि कदाचित् लोपून जातील. यास्तव भर्तृहरीनें 'नीतिशतकांत' झटलें आहे—

कदर्थितस्यापि च धैर्यवृत्तेर्न शक्यते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम्।

अधःकृतस्यापि तनूनपातो नाधः शिखा याति कदाचिदेव ॥

"गंभीर मनाचे जे पुरुष असतात ते सर्वांनीं अवमानना केली असतांहि अंगचा धैर्यगुण कदापि सोडीत नाहींत. कसें ? तर जसा अग्नि उलटा केला असतांहि त्याची शिखा खालीं न रहातां वरच जाते !"

वक्तृत्व.

तद्वक्ता सदसि ब्रवीतु वचनं यच्छृण्वतां चेतसः
प्रोल्लासं रसपूरणं श्रवणयोरक्ष्णोर्विकासश्रियम् ।
क्षुन्निद्राश्रमदुःखकालगतिहृत् कार्यांतरप्रस्मृतिं
प्रोत्कंठामनिशं श्रुतौ वितनुते शोकं विरामादपि ॥[1]

अंक १८—(१) विषयोपक्षेप. (२) 'वक्तृत्व' शब्दाची व्याख्या. (३) प्रस्तुत विषयाचे विभाग. (४) वक्तृत्वगुणाची उत्पत्ति. (५) तिचा लोकसत्तात्मक राज्याशीं संबंध. (६) उदाहरणें.—(७) ग्रीस देश, (८) डिमास्थेनीस. (९) रोम. (१०) सिसरो. (११) इंग्लंड. (१२) बर्क.

१. हा विषय फार महत्त्वाचा आहे. त्यांतून आलीकडे पांच सहा वर्षें तर याकडे लोकांचें चोहोंकडे विशेष लक्ष लागलें असल्यामुळें याविषयीं थोडा बहुत कांहींच विचार न केलेले फार थोडे लोक सांपडतील. यास्तव या खेपेस सदरील विषयावर कांहीं विचार प्रगट करण्याचें मनांत आणलें आहे. पुस्तककर्त्याचें मुख्य काम झटलें झणजे निरनिराळ्या विषयावर लोकांची जीं मतें ठरून गेलीं असतील त्यांचा खरेखोटेपणा पाहून तीं नीट करण्याचा यत्न करणें हें होय. यास्तव प्रस्तुत विषयावर लोकांत सामान्यतः जीं मतें आढळतात त्यांविषयीं विचार करून या विषयाचें स्वरूपहि आमच्या वाचकांच्या लक्षांत विशेष यथार्थत्वानें आणावें या हेतूनें पुढील निरूपण करतों.

२. आतां प्रथमतः 'वक्तृत्व' शब्दाचा मूळ अर्थ पाहिला तर 'बोलण्यारेपणा' झणजे 'बोलण्याची शक्ति' असा होय. पण हा केवळ यौगिक अर्थ झाला. रूढीवरून पाहिलें असतां नुसत्या वाचाशक्तीस वरील शब्द लागत नाहीं; त्याच्या पोटीं वरच्याहून पुष्कळ जास्त अर्थ गर्भित होतो. तो पुढें वक्त्यांच्या अंगीं कोणकोणते गुण

---

१. सभेंत उभें राहून वक्त्यानें बोलणें तर असें बोलावें कीं, तें ऐकतांना श्रोत्यांचा अंतःकरणें प्रसन्न व्हावीं, कर्ण वाग्रसानें भरून जावे, आणि डोळे आश्चर्यानें विकास पावावे; तसेंच क्षुधा, निद्रा, श्रम, दुःख आणि कालगति यांचें त्यांस भान राहूं नये; इतर सर्व कार्यांचें विस्मरण पडून भाषण ऐकण्याकडेच त्यांस अतिशय उत्कंठा वाढावी; आणि तें संपलें असतां फार वाईट वाटावें !"

अवश्य असले पाहिजेत त्यांचें वर्णन करतांना स्पष्ट होईलच. सध्यां प्रसंगानुसार थोड्क्यांत एवढेंच सांगतों कीं, 'वक्तृत्वा'चें मुख्य लक्षण मोहकपणा होय. ह्मणजे जें भाषण एकतांच श्रोत्यांची चित्तवृत्ति तटस्थ होऊन ती बोलणाराकडे अगदीं वेधून जावी त्याचें नांव वक्तृत्व.

३. आतां प्रस्तुत विषयाचे चार भाग करून त्यांचा क्रमवार विचार करूं. ते चार भाग असे– एक वक्तृत्वाचें आदिपीठ जो ग्रीस देश तेथें त्याची उत्पत्ति होऊन प्रसार कसा झाला व तेथें तें कोणत्या दशेस येऊन पोंचलें याविषयीं लिहून नंतर तेथून इतर देशांत त्याचा फैलावा कसा व कितपत झाला वगैरे वृत्तान्त लिहूं. याप्रमाणें पहिल्या भागांत देशांतराचें कथन करून दुसऱ्यांत या आपल्या देशांत प्रस्तुत प्रकार कितपत होता याविषयीं निरूपण करूं. तिसऱ्यांत हल्लीं वक्तृत्वोत्तेजनाचा जो प्रकार चालू आहे त्याविषयीं कांहीं लिहूं. आणि चवथ्यांत सदरील विषयाविषयीं एकंदरीनें विवेचन करून वक्त्याचे अंगीं गुण कोणकोणते असायास पाहिजेत, वक्तृत्वापासून उपयोग काय, इत्यादि गोष्टींविषयीं विवेचन करूं.

४. तेव्हां प्रथमतः प्रस्तुत वक्तृत्वगुणाची उत्पत्ति कशी होते व त्याचा फैलावा होण्यास कोणत्या गोष्टी कारणभूत होतात याविषयीं विचार करावयाचा. आतां एकंदर इतिहासावरून जर पाहिलें तर एक मोठी गोष्ट कळून येते कीं, जेथें जेथें लोकसत्तात्मक राज्यें होतीं तेथें तेथें वरील गुणाचें वास्तव्य होतें. पहा कीं, सगळ्या ग्रीस देशांत आथेन्स येथेंच काय तो वरील राज्यप्रकार चालू असल्यामुळें मोठमोठे नामांकित वक्ते तेथेंच मात्र निपजले. बाकी, त्या शहराच्या जोडीचीं दुसरीं जीं स्पार्टा, थीब्स, मासिडन वगैरे संस्थानें होतीं त्यांच्या सगळ्या इतिहासांत कोणी मोठा वक्ता होऊन गेल्याचें एक सुद्धां उदाहरण सांपडतं नाहीं. तोच प्रकार पुढें इटाली देशांतहि नजरेस येतो. त्या देशांतहि ग्रीसप्रमाणेंच अनेक संस्थानें होतीं; पण मोठें वक्ते झालेले असे रोम शहरीं मात्र इतिहासांत प्रसिद्ध आहेत. तोच प्रकार अर्वाचीन काळीं अलीकडे सुमारें शंभर दोनशें वर्षें इंग्लंडांतहि दृष्टीस पडतो. तो तरी केव्हांपासून ह्मणाल तर राजाचें आणि प्रजेचें मोठें युद्ध होऊन दुसऱ्या पक्षास अधिकाधिक स्वातंत्र्य ज्या वेळेपासून मिळूं लागलें तेव्हांपासूनच. तसेंच सुमारें शंभर वर्षांपूर्वी फ्रान्स देशांत मोठी धामधूम होऊन तद्देशीय लोकांस जें क्षणिक स्वातंत्र्य प्राप्त झालें होतें त्या प्रसंगीहि एवढ्याशा थोड्या वेळांत सुद्धां वक्तृत्वशक्तीचा क्षणमात्र उदय झाला होता. तसाच अलीकडे अमेरिकेंतील नव्या प्रजासत्तात्मक राज्यांतहि झाला आहे. आतां तोच प्रकार उलट पहा. इकडे एशियाखंडांत आजपर्यंत शेंकडों मोठमोठीं राज्यें होऊन गेलीं; पण एकांतहि वक्त्यांच्या भाषणानें सगळे लोक एकदम चेतून गेले आहेत, वक्त्यांच्या पाठशाळा घातल्या असून त्यांतून

मोठ्या नामांकित गुरूंचें शिष्यांस व्याख्यान चाललें आहे, अथवा संस्थानिक कारभाराच्या मोठाल्या सभांतून दोन वक्त्यांच्या परस्परावर कोट्या प्रतिकोट्या चालल्या आहेत, असा प्रकार बिलकूलहि आढळत नाहीं. फार तर काय, पण 'वक्ता' व 'वक्तृत्व' हे शब्दहि अलीकडील नव्या अर्थाचे दर्शक असे एशिया खंडांतील कोणत्याहि भाषेंत सांपडतीलसें वाटत नाहींत. कारण कोणत्याहि शब्दानें वाच्य जो अर्थ तोच जर लोकांच्या मनांत कधींच आला नसेल तर त्याचा व्यंजक शब्द भाषेंत कधीं असणार नाहीं हें उघडच आहे. असो; तसेंच दुसरें प्रत्यंतर हें पहा कीं, आमच्या प्राचीन हिंदु लोकांत अनेक शास्त्रें व विद्या उदयास आल्या होत्या, व यास्तव ग्रीक, रोमन वगैरे जुन्या राष्ट्रांतून जे जे प्रकार आढळतात ते सर्व आमच्या देशांत होते, पण नव्हते असे दोन मात्र. एक इतिहास आणि दुसरें वक्तृत्व. यांपैकीं पहिल्याचा अभाव असण्याचीं कारणें गेल्या सालच्या जून महिन्याच्या अंकांत दाखल केलीं आहेतच. आणि दुसऱ्याच्या अभावाची उपपत्ति प्रस्तुत प्रतिपादनावरून सहजच होईल. ती अर्थात् अशी कीं, आमच्या देशांत राज्यांचा प्रकार काय तो साम्राज्याचाच होता; ह्मणजे सगळी सत्ता एका राजाच्या हातीं असून सर्व प्रजा त्याची केवळ अंकित अशीच राज्यरीति अगदीं प्राचीन काळापासून तों आजपर्यंत सारखी चालत आली आहे. यास्तव वक्तृत्वाची उत्पत्ति येथें कधीं झाली नाहीं ती ठीकच. मुसलमानांचा इतिहास जर पाहिला तर त्यावरून तर प्रकृत सिद्धांतास फारच मोठी दृढता येते. पहा कीं, महमंदाच्या अनुयायांनीं आरबस्थान, इराण, हिंदुस्थान, चीन असे पूर्वेकडील देश व पश्चिमेकडे मिसर देश, आफ्रिकेचा उत्तर किनारा, स्पेन, फ्रान्स, व हल्लीं ज्यास तुर्कस्थान ह्मणतात ते दोन देश, एवढा पृथ्वीचा अफाट विस्तार व्यापून इतकीं निरानिराळीं राज्यें स्थापलीं असतां,—व त्यांतून विशेष काय कीं, ग्रीक व रोमन लोकांच्या सगळ्या विद्या त्यांनीं आपल्याशा करून टाकल्या असतां, लोकसत्तात्मक राज्याची कल्पनाहि कधीं त्यांच्या मनांत आली नाहीं. आणि ग्रीस लोकांचे वैद्यकावरील, ज्योतिषावरील, अध्यात्मविद्येवरील वगैरे सर्व ग्रंथ जरी त्यांनीं आपल्या भाषेंत उतरवून त्यांचा मोठ्या हौसेनें अभ्यास केला, तरी त्या भाषेंतील वक्तृत्वाचे जे अत्युत्तम ग्रंथ ते मात्र त्यांच्या राज्यरीतीस अगदीं विरुद्ध असल्यामुळें त्यांस विशेष प्रिय झाले नाहींत असें दिसतें. कारण ते प्रिय होऊन त्यांतील मतें जर त्यांच्या मनांवर ठसतीं, तर ग्रीक व रोमन लोकांच्या सारखें एखादें तरी लोकसत्तात्मक राज्य त्यांच्या एवढ्या अफाट मुलखांत कोठें तरी स्थापित झालें असतें. असो; पण वरील लोकसत्तात्मक राज्याची कल्पना इकडील पूर्वदेशीय लोकांच्या मनास किती अत्यंत अपरिचित आहे याची उत्कृष्ट प्रचीती आह्मांस आमच्या घरचीच आहे. हल्लीं आमच्या देशांत इतक्या हजारों सभा दर वर्षीं उपस्थित होतात व लवकरच लयासहि

पावतात. याचें मुख्य कारण पाहूं गेलें असतां ही सभांची पद्धत केवळ अन्यदेशीय असल्यामुळें तिचें बीं इकडील लोकप्रचारांत रुजण्यास अजून पुष्कळ काळ पाहिजे हें होय असें आह्मांस वाटतें. आज हजारों वर्षें लोकप्रवृत्तीचा जो ओघ चालत आला आहे त्यास एकाएकींच नवें वळण देऊं लागलें असतां कसें चालेल ? असो; तेव्हां वरील उल्लेखावरून एकंदर सिद्ध काय होतें कीं, लोकसत्तात्मक राज्याची कल्पना एशियाकडील लोकांस बिलकूल माहीत नव्हती. ह्मणून संस्कृत, फारशी, आरबी वगैरे भाषांतून ग्रीक व ल्याटिन भाषांप्रमाणें वक्तृत्वाचे ग्रंथ मुळींच नाहींत यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

५. वरील प्रतिपादनाचा रोंख आमच्या वाचकाच्या सहज लक्षांत आलाच असेल कीं, वक्तृत्वशक्तीचा उदय होण्यास देशांतील राज्यरीति एका विशेष प्रकारची असायास लागते. हा विशेष प्रकार लोकसत्तात्मक राज्य हा होय. आतां हाच प्रकार मात्र वक्तृत्वाच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस कां कारण व्हावा, व इतरांत वरील दोन गोष्टी कां होऊं नयेत, याचें कारण जर कोणी विचारील, तर तें सांगण्यास फार कठिण आहे असें नाहीं. पहा कीं, मनुष्याचा काय अगर राष्ट्राचा काय, कोणाचाहि अंगभूत गुण प्रगट होण्यास कांहीं विशेष प्रसंगच यावा लागतो; तो जर आला नाहीं तर तो कधींहि दृष्टोत्पत्तीस यावयाचा नाहीं. तर याचप्रमाणें कोणा मनुष्याच्या ठायीं वक्तृत्वशक्ति कितीहि उत्कृष्ट असली, तरी जोंपर्यंत तिचा विकास होण्यास हवा तसा अवकाश मिळाला नाहीं, तोंपर्यंत ती त्याची त्याजपाशींच त्यास स्वतः सहि न कळतां राहील हें उघड आहे. तर यावरून सहजच दिसून येईल कीं, लोकसत्तात्मक राज्य असून समाजाच्या किंवा सभेच्या बहुमतानें जेव्हां राज्यकारभार नेहमीं चालत असतो, तेव्हां बुद्धिमान् पुरुषांस अशा समाजांचें किंवा सभांचें एकचित्त करून आपल्यासारखा एखादा सल्ला करून घेणें असतां त्यांस वक्तृत्वासारखें जबरदस्त हत्यार कोणतेंहि सांपडणार नाहीं. तें ज्याजपाशीं पुरें असेल त्याच्या मग सर्व लोक मुठींत आले असें समजायाचें. तो ह्मणेल ती पूर्व दिशा होऊन सगळ्या संस्थानावर त्याचाच अंमल चालू आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असो; तर याप्रमाणें सर्व राज्यप्रकारांत लोकसत्तात्मक राज्य हेंच वक्तृत्वशक्तीच्या उदयास अनुकूल होय; कारण बाकी कोणत्याहि प्रकारांत बहुजनांच्या मतावर राज्यकारभार चालत नसल्यामुळें बहुजनांचें मन आपल्या मताकडे वळविण्याची कला जें वक्तृत्व त्याची गरजच पडत नाहीं; आणि याप्रमाणें वरील कलेचें मूळच खुंटल्यामुळें तिचा विस्तार होण्याचा संभवच नाहीं हें उघड आहे.

६. वरील दोन कलमांत वक्तृत्वशक्तीचा उदय होण्यास कोणच्या प्रकारची स्थिति असावी लागते याविषयीं सामान्यतः लिहिलें. आतां वरील नियमाचीं कांहीं

इतिहासप्रसिद्ध उदाहरणें दाखल करतों. त्यांवरून वरच्या नियमाचा खरेपणा आमच्या वाचकांच्या चांगला लक्षांत येईल.

७. पहिलें मोठें उदाहरण ग्रीस देश. या देशाचा इतिहास[1] ज्यानें वाचला नाहीं त्यानें मानवी बुद्धीचे अद्भुत अद्भुत चमत्कार मुळींच पाहिले नाहींत असें झटलें पाहिजे. हा देश पृथ्वीच्या साऱ्या खंडांत अगदीं लहान जें युरोपखंड त्याच्या नकाशांतहि पाहिला असतां पुरता टीचभरहि भरणार नाहीं. पण एवढासा चिमकुला देश असतांहि 'मूर्त लहान पण कीर्त मोठी' या आपल्या भाषेंतील म्हणीप्रमाणें याच्या कीर्तीचा दुंदुभि आजपर्यंत साऱ्या जगभर वाजत आहे, व तसाच तो जगत्प्रलयावधि वाजत राहील! याच्याहून शंभरपट हजारपट मोठमोठाले असे दुसरे कित्येक देश आहेत, व कित्येकांत देवाच्या पैगंबरांनीं आकाशांतून उतरून त्याच्या प्रियत्वाबद्दल लोकांस आश्वासन दिलें आहे; पण वरील देश आकारमानानें एवढा लहान असतां व देवाचा लाडका नसतांहि त्यानें केवळ स्वतःच्या बुद्धिबळावर जें आपलें नांव गाजविलें आहे त्याची सर आजपर्यंत कोणत्याहि अन्य देशास आली नाहीं, व पुढेंहि येईलशी वाटत नाहीं! असो; या देशाविषयीं प्रस्तुत विषयाच्या संबंधानें हेंच सांगावयाचें आहे कीं, वक्तृत्वाचा यांतच पहिल्यानें उदय होऊन तें लवकरच अगदीं कळसास जाऊन पोंचलें; आणि येथूनच अन्य देशांत तें पसरून अद्यापहि त्याचें वास्तव्य जें देशोदेशीं आहे त्याचें मुख्य कारण हाच देश होय. शिवाय दुसरें असें आहे कीं, प्रस्तुत कला याच देशांत जें पूर्णत्व पावली त्यावर वरचढ आज दोन हजार वर्षांत कोठेंहि झाली नाहीं. असो; आतां या वक्तृत्वरूप महौघाचा उगम जर पाहूं गेलें तर तो आथेन्स शहरचें लोकसत्तात्मक राज्य होय हें तेव्हांच ध्यानांत येईल. या शहरीं प्रस्तुत राज्यप्रकाराचें स्वरूप जेथपर्यंत जाऊन पोंचलें होतें तेथपर्यंत दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं तें प्राचीन काळीं पोंचलेलें नव्हतें व अद्यापहि कोणत्याहि देशांत पोंचलें नाहीं. संस्थानांतील अगदीं गरीबगुरीबांपर्यंत सर्वांचीं मतें घेऊन मग जें ठरेल तो निकाल समजून त्याप्रमाणें जें काय होणें तें होत असे. तेव्हां अशा समयीं साऱ्या लोकसमाजापुढें उभें राहून जो भाषण करील व आपल्या अभिप्रायास सर्वांचीं मतें अनुकूल करून घेईल तोच संस्थानांत मुख्य होत असे, व सगळें राज्यसूत्र त्याच्याच तंत्रानें चाले. आथेन्स शहरीं मोठमोठे मुत्सद्दी जितके म्हणून होऊन गेले ते सर्व वरील वक्तृत्वगुणानें विशिष्ट होते, व तो गुण त्यांच्या ठायीं अप्रतिम असल्याच्या योगानेंच त्यांची सत्ता दीर्घकाळ अबाधित चालली. या मुत्सद्द्यांत शेवटला जो डि-

१. आमच्या मराठी भाषेंत बहुधा सर्व विषयांवर कांहींना कांहीं तरी लहान मोठे असे ग्रंथ आहेतच. पण ग्रीस व रोम यांचे इतिहास करण्याचें अद्याप कोणाच्याच मनांत आलें नाहीं हा चमत्कार आहे.

मॉस्थेनीस याची वक्तृत्वशक्ति तर अद्याप जगभर गाजते आहे. मासिडन देशचा राजा फिलिप यानें सगळा ग्रीस देश पादाक्रांत करण्याचा बेत मांडला असतां वरील वक्त्या-सारखे जे कित्येक देशाभिमानी पुरुष होते त्यांच्या जीवास सारखी चटपट लागून गेली होती. त्यांनीं आपली वक्तृत्वशक्ति सर्व वेंचून व जेवढा ह्मणून हातून प्रयत्न होण्यासारखा होता तेवढा सर्व करून फिलिप राजाशीं एकदां समरांगणांत गांठ घातली. या प्रसंगीं सगळीं बाकीचीं संस्थानें मासिडनाच्या विरुद्ध होतीं; पण फि-लिपाच्या कवाइतीपुढें व हिंमतीपुढें इतक्यांचाहि टिकाव न निघून त्या एका लढा-ईंत सगळा देश एका सपाट्यास जो चीत होऊन गेला तो गेला; त्यानें पुनः वर डोकें काढलेंच नाहीं![1] असो; याप्रमाणें डिमॉसथेनीस वगैरे देशाभिमानी लोकांच्या पक्षाचा जरी अगदीं मोड होऊन गेला तरी त्यांचे श्रम सर्वथा व्यर्थ गेले असें नाहीं. कां कीं, जोंवर देशैकनिष्ठेची व वक्तृत्वाची या जगांत प्रशंसा होईल तोंवर त्यांचीं नांवें निघतीलच निघतील. फार तर काय, पण त्यांचा शत्रु जो फिलिप त्यासहि मोठमोठ्या सैन्याचा धाक वाटत नसे, पण यांचा वाटत असे. इतका कीं, आथेन्स शहरीं जे नामांकित बारा वक्ते होते त्यांस मोठे मोठे लांच देऊन वश करून घेण्याचा त्यानें उद्योग चालविला होता; व तो काळ ग्रीसच्या उतरत्या पायाचाच असल्यामुळें त्या बारा जणांतहि कांहीं त्यास आंतून अनुकूल झाले. असो; तर याप्रमाणें लोक-सत्तात्मक राज्याच्या संबंधानें ग्रीस देशांत वक्तृत्वाचा उद्भव होऊन तें वर सांगितल्या इतक्या पूर्ण स्थितीस येऊन पोंचलें होतें.

८. या ठिकाणीं विषयनिरूपणाच्या ओघानें सगळ्या ग्रीस देशांत, किंबहुना साऱ्या जगांत, जो अप्रतिम ठरला त्या डिमॉसथेनीसाचें थोडेंसें वृत्त दिलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. यास्तव त्याचें संक्षेपतः कथन करतों. हा महाविख्यात वक्ता आथेन्स शहरीं जन्मला. हा पुढें जरी तेवढ्या योग्यतेस चढला तरी याचें अंगचें साहित्य प्रथमतः कच्चेंच होतें. तें असें कीं, आवाज कोता, उच्चार साफ नाहीं, आणि अंगविक्षेप श्रोत्यांचें चित्त वेधून टाकणारा असा नव्हता. यास्तव हा जेव्हां एके प्रसंगीं सभेंत पहिल्यानेंच बोलायास उभा राहिला, तेव्हां सर्वांनीं वरील दोषांस्तव त्याची हुर्रेवडी करून दिली. पण तेमुळें हा खचून न जातां त्यानें आपल्या अंगचे वरील दोष काढून टाकण्याविषयीं व वक्त्यास अवश्य ज्या दुसऱ्या कित्येक गोष्टी त्या संपादन करण्याविषयीं सतत उद्योग चालवला. तो असा.

---

१. वरील युद्धप्रसंग इ० स० पूर्वी ३३८ व्या वर्षीं झाला. तेव्हांपासून ग्रीस देशास जी परतंत्रता आली ती त्यास सारखी दोन हजार वर्षें भोगावी लागली. हें नष्टचर्य त्याचें सन १८२७ या वर्षीं सरून तेव्हांपासून आज सुमारें पन्नास वर्षें त्यास पुनः स्वातंत्र्याचें वारें लागलें आहे. तरी पहिलें वारें जें एकदां गेलें तें गेलेंच !

त्याचा आवाज कोता होता, यास्तव तो मोठा व गंभीर करण्याकरितां त्यानें समुद्रतीरीं एकांतीं जावें, आणि समुद्राच्या प्रचंड लाटा उसळूं लागून त्यांची मोठी गर्जना होत असतां तेथें खूप मोठ्यानें आपलीं भाषणें ह्मणावीं. तसेंच डोंगरांच्या दरडीवरून खालीं वर पळत जाण्याची संवय करून त्यास दम छाटत नसे तो त्यानें छाटेसा केला. आणि उच्चार तोंडांतून साफ होत नसे यास्तव तोंडांत बारीक गारगोट्या धरून त्यानें आपला शब्द बाहेर चांगला उमटेसा केला. याप्रमाणें वाणीचे जेवढे दोष होते तेवढे काढून टाकिल्यानंतर डिमॉसथेनीसानें तिचें मोहकत्व वाढविणारे जे दुसरे कित्येक गुण ते आपल्या ठायीं आणण्याचा यत्न चालवला. आथेन्स येथें रंगभूमीवर नाटकप्रयोग होत असत; यास्तव त्या कलेंत अत्यंत प्रवीण असणाऱ्या कांहीं नटांपाशीं तो अंगविक्षेपादिक शिकला. तसेंच आपल्या भाषणाची रचना प्रौढ, रसभरित व मनोवेधक अशी आपणास करतां यावी या उद्देशानें नामांकित इतिहासकार जो थुसिडिडीज त्याचा ग्रंथ त्यानें आठदां आपल्या हातानें लिहून काढला. असो; तर याप्रमाणें एवढे अचाट श्रम कित्येक वर्षेपर्यंत जेव्हां डिमॉसथेनीस यानें केले तेव्हां त्याच्या देशबांधवांत त्याचें तेज पडून सर्वांवर त्याचा पगडा बसला; आणि देशहिताचीं मोठमोठीं कामें जीं त्यानें केलीं तीं त्याच्या हातून घडलीं !

मनुष्याच्या अंगचा कोणताहि गुण पूर्णपणें प्रगट होण्यास तसाच कांहीं विशेष प्रसंग घडून यावा लागत असतो. असा प्रसंग डिमॉसथेनीस यास कोणता घडून आला व त्यानें आपल्या देशाची सेवा केली ती कोणत्या संकटसमयीं केलीं हें सर्व इतिहासज्ञांस विश्रुत आहे. हा प्रसंग नुकता वर सांगण्यांत आलाच आहे; कीं, मासिडन प्रांताचा राजा फिलिप यानें आपली सत्ता वाढवून सगळा ग्रीस देश काबीज करण्याचा बेत मांडला होता. असो; या प्रसंगीं डिमॉसथेनीसचे आवेशादि वक्तृत्वगुण सर्व प्रगट झाले. या समयींचीं यानीं भाषणें इतकीं उत्कृष्ट आहेत कीं, तीं साऱ्या जगास मान्य होऊन तेव्हांपासून तशा प्रकारच्या सर्व भाषणांस त्याचेंच नांव प्राप्त झालें आहे. ह्मणजे एखाद्या मनुष्यावर ज्या भाषणांत खूप भडिमार करून सोडिला असतो त्यास इंग्रेजी भाषेंत 'फिलिपिक' असें ह्मणतात! या भाषणांचा मासिडनच्या राजास इतका धाक वाटे कीं, त्यानीं डिमॉसथेनीसास आपले स्वाधीन करण्याविषयीं आथेन्सच्या लोकांपाशीं अनेक वेळां बोलणीं केलीं; आणि सरतेशेवटीं वरील प्रांताच्या राजाच्या भयास्तवच या वक्त्यास विषप्रयोगानें आत्महत्या करणें भाग पडलें. असो; तर एवढा ज्यांचा प्रभाव तीं भाषणें किती अत्युत्तम असतील यांचें सर्वांस सहज अनुमान करतां येईलच. त्यांचा मासला 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रहां'त आमच्या मराठी वाचकांस पहाण्यास सांपडेल; त्यावरून त्यांनीं मूळच्या

ग्रीक ग्रंथाची कल्पना करावी![1]

९. दुसरें उदाहरण रोम. या शहरींहि लोकसत्तात्मकच राज्यप्रकार चालत असल्यामुळें अगदीं पूर्वीपासून येथें वक्तृत्वगुणाची गरज पडून त्याची चहा असे. महाजन आणि सामान्यजन असे रोमन लोकांत दोन तट असून त्यांच्या भांडण्याच्या एका समयीं पहिल्या पक्षांकडील एका चतुर वक्त्याने इसाबनीतींतील 'पोट आणि अवयव' हीं गोष्ट दुसऱ्यास सांगून तंटा मिटवला आणि दोघांची एकी केली, ही गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध आहे. हीवरून त्या वेळीं रोमन लोक किती साधे भोळे होते व वक्तृत्वकला त्यांच्यांत किती आधींपासून होती हें स्पष्ट दिसतें. त्याप्रमाणेंच पुढें पिन्हस राजाचा मंत्री सिनियस–ज्याची ख्याति इतिहासांत अशी लिहिली आहे कीं, त्याच्या चित्तवेधक बोलण्यानें जितकीं शहरें वश झालीं तितकीं त्याच्या धन्याच्या तरवारीनें झालीं नाहींत– तो रोम शहरीं येऊन त्यानें आपल्या अपूर्व वक्तृत्वानें रोमन लोकांसहि क्षणभर तन्मय करून टाकलें असतां सरतेशेवटीं एका वयोवृद्ध व अंध सभासदानें मुद्दाम सेनेट सभेंत येऊन सभेचें मोहजाल जेव्हां दूर केलें व पिन्हस राजाचें कपट सर्वांच्या नजरेस आणून दिलें, तेव्हां त्यांचे डोळे उघडून त्यांनीं त्या वकीलास तावडतोब रोम शहर सोडून जाण्याविषयीं हुकूम दिला हीहि गोष्ट इतिहासवेत्त्यांस माहीत आहे. तसेंच पुढें सिपीयो, केटो वगैरे कित्येक नामांकित राजकारणी पुरुष प्रस्तुत कलेंत चांगले निपुण असून जो जो संस्थानिक कामांत पुढारी झाला त्यास त्यास वक्तृत्वगुणहि अवश्यच झाला. मेरियस व सीजर हे दोघे मोठे प्रख्यात सरदार होऊन गेले व कांहीं वेळ हे दोघे सगळ्या राज्याचे आधारस्तंभच होऊन राहिले होते; तरी त्यांसहि वरील कलेंत निपुणत्व संपादणें भाग पडलें. पहिल्याच्या वक्तृत्वाचा मासला वरील 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह' पुस्तकांत एक आहे. दुसऱ्याची तर प्रस्तुत गुणांत इतकी परिपूर्णता होती कीं, खुद्द सिसरोनेंहि त्याबद्दल त्याची प्रशंसा केली; आणि त्याच्या खालोखाल पायरी सीजराचीच अशी त्या वेळेस त्याची ख्याति होती! सीजराच्या मागें इतिहासप्रसिद्ध ब्रूटस व आंटनी यांचाहि वक्तृत्वगुणाविषयीं लौकिक होता. या दोघांचीं भाषणें शेक्सपीयर कवीनें आपल्या सर्वप्रसिद्ध नाटकांत मोठीं खुबीदार घातलीं आहेत. तीं वाचलीं असतां रोम शहरांत घडलेला तो महाप्रसंग जसा काय टळटळीत डोळ्यांपुढें उभा रहातो. तसेंच त्यांवरून वक्तृत्वाचें सामर्थ्य केवढें आहे हेंहि स्पष्ट दिसून येतें. पहा कीं, ज्याप्रमाणें वाऱ्याच्या सोसाट्यानें समुद्राचा समुद्र सगळा हव्या त्या दिशेला

१. डिमॉसथेनीसच्या भाषणांविषयीं मेकालेनें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, त्यांपैकीं कित्येक इतकीं उत्कृष्ट आहेत कीं, त्यांतला एक शब्दहि इकडचा इकडे करतां येणार नाहीं!

उचंबळला जातो, त्याप्रमाणें पहिल्या वक्त्याने ह्मणजे ब्रूटसानें आपलें वेताबातांचें संक्षिप्त भाषण करतांच सगळ्या लोकांची खात्री झाली कीं, सीजराला मारला तो ठीक मारला; सगळ्या लोकांच्या स्वातंत्र्यावर जो उठला होता त्या दुष्टास यथायोग्य शासन झालें! पण तेंच आंटनीनें आपल्या करुणरसभरित भाषणास आरंभ करतांच सगळें मान एकदम फिरून गेलें. जे लोक नुकतेच सीजराला शिव्या देत होते त्यांसच त्याचें यथार्थ गुणवर्णन ऐकून मोठा गर्हिवर आला; आणि ज्या ब्रूटस वगैरे मारेकरी लोकांची त्यांनीं नुकतीच प्रसंसा केली होती तेच त्यांचीं घरेंदारें जाळून पोळून फस्त करण्याकरितां मोठ्या आवेशानें दांत ओंठ चावीतच त्यांच्या पाठोपाठ निघाले! तेव्हां वक्तृत्वाच्या अद्भुत सामर्थ्याचें आणखी दुसरें कोणतें उदाहरण पाहिजे? असो; तर याप्रमाणें रोम शहरीं जोंवर लोकसत्ता होती तोंवर वर सांगितल्याप्रमाणें ती वक्तृत्वाच्या अभिवृद्धीस कारणभूत होऊन तें इतक्या परिपक्व दशेस येऊन पोंचलें होतें. आतां मागील अनुक्रमाप्रमाणें साऱ्या रोमन लोकांत जो अप्रतिम वक्ता ठरला; व ज्याच्याहून डिमॉस्थेनीसखेरीज दुसरा कोणीहि वरचढ नाहीं, त्या सिसरोची थोडीशी हकीकत येथें देतों.

१०. सिसरो हा मूळचा हीन कुळांतला होता. हा व वर सांगितलेला मेरियस हे दोघे एकाच गांवीं जन्मले असून दोघेहि केवळ अंगच्या हिंमतीनेंच पुढें मोठ्या पदवीस चढले. मेरियस हा लष्करी खात्यांत शिरला, आणि सिसरोनें कायद्याचा अभ्यास करून लवकरच नांव काढलें. सिसरोच्या बरोबरीचे आणखी दोन तीन हुशार वकील होते; पण त्यांची व याची झकमक उडून त्यांस लवकरच सिसरोशीं स्पर्धा करणें सोडून द्यावें लागलें. याप्रमाणें न्यायसभेंत सिसरोचें पक्कें वजन बसलें असतां तो हळू हळू लोकमान्यतेस चढला. त्यास संस्थानांतील हुद्दे एकापुढें एक मिळून सरते शेवटीं तो कॉनसलची पदवी पावला. हा मोठा अधिकार सिसरोस ज्या वर्षी मिळाला त्याच वर्षी रोम शहरावर व सगळ्या राज्यावर एक मोठा कहर गुजरणार होता. हा रोमच्या इतिहासांत 'क्याटिलैनचा कट' या नांवानें प्रसिद्ध आहे. पण सिसरोनें मोठी हुशारी ठेवून वरील कट मोडला, आणि त्या संकटसमयीं राजधानीचा व एकंदर राज्याचा बचाव केला. असो; याप्रमाणें जो सिसरो पहिल्यानें केवळ यःकश्चित् वकील होता तो पुढें रोमच्या संस्थानांतील एक बडें प्रकरण होऊन बसला; आणि पांपे, सीजर अशा रणधुरंधरांबरोबर त्याची लोकांत मानमान्यता झाली. पण थोरपणामागें सदोदित भयें लागलीं असतात. आणि या जगांत भल्या मनुष्यांचा दुर्जनांकडून सदैव छळ होतच असतो; याप्रमाणेंच सिसरोची अवस्था झाली. त्यानें रोमन लोकांवर एवढे थोर उपकार करून ठेवले असतां, व आपल्या उज्वल कीर्तीनें त्यांस अक्षय भूषण आणलें असतां त्यांनींच त्यास दोनदां हद्दपार करून दिलें. आणि सरतेशेवटीं रोम

शहरीं दुष्टांचें आधिपत्य होऊन साऱ्या लोकांवर मोठी संक्रांत येऊन गुजरली असतां या विख्यात वक्त्याचा त्याच धामधुमींत शेवट झाला. त्याच्या शत्रूंनीं त्यावर मारेकरी घालून त्याचें शिर कापून आणविलें, आणि सेनेट सभेंत ज्या उच्चस्थानीं आरूढ होऊन तो लोकांचीं मनें खवळून टाकीत असे, त्याच ठिकाणीं त्याचें शिर खिळून टाकिलें! केवढा हा अधमपणा ! !

वर सिसरोचें ऐतिहासिक चरित्र सांगितले. आतां ज्या गुणानें तो साऱ्या जगास विश्रुत आहे, त्याच्या संबंधानें कांहीं वृत्तांत येथें लिहितों.

वर सांगितलें आहेच कीं, सिसरोनें पहिल्यानें कायद्याचा अभ्यास करून तो वकीलीचा धंदा करीत असे. या धंद्याचा वक्तृत्वशक्तीशीं निकट संबंध आहे. तेव्हां प्रस्तुत वक्त्याची ती शक्ति या ठिकाणीं पहिल्यानें उदयास आली. त्या काळीं आथेन्स, व्होड्स हीं दोन वक्तृत्वाच्या पाठशाळांचीं दोन मोठीं प्रसिद्ध स्थळें होतीं. यास्तव या दोहों ठिकाणीं मोठ्या नामांकित गुरूंपाशीं कित्येक वर्षें सिसरोनें वक्तृत्वाचा अभ्यास केला. त्याच्या योगानें त्याचें न्यायसभेंत विशेषच तेज पडून मागें सांगितल्याप्रमाणें तें तेज त्याच्या प्रसिद्धीस व लोकप्रियत्वास कारण झालें. पुढें त्यास सरकारी हुद्देहि मोठमोठे मिळून ते त्यानें मोठ्या दक्षतेनें व सचोटीनें वहिवाटल्यावरून त्याचा लौकिक दिवसेंदिवस अधिकाधिकच होत गेला. त्या काळीं रोमन लोकांची नीति व सदाचरण हें पुष्कळच सुटत चाललें होतें, यास्तव सिसरोचा प्रामाणिकपणा व निस्पृहपणा त्या वेळच्या लोकांत विशेषच ठळठळीत दिसूं लागला. आणि वक्तृत्वाचें हत्यार त्याजपाशीं चांगलें मजबूत असल्यानें त्यास लोक इतके वचकायाला लागले कीं, मोठमोठ्या अरेरावांसहि त्याचा धाक वाटे. एके समयीं सला नांवाच्या प्रसिद्ध सरदाराचा त्याच्या विरुद्ध पक्षास जबर आसरा असतां सिसरोनें भांडून दावा आपल्यासारखा केला. व्हेरीस नांवाच्या जुलमी सुभेदाराची तर त्यानें कशी खोड मोडून टाकली ती सर्वांस विदित आहेच.[1] पुढें क्याटिलेन नांवाच्या मानवरूपी राक्षसानें मोठा पुंडावा मांडला असतां त्याचें सिसरोनें पारिपत्य केलें हेंहि वर सांगण्यांत आलेंच आहे. या आणीबाणीच्या प्रसंगीं सिसरोची फारच चहा झाली; आणि त्याच्या भाग्याचा व वैभवाचा कळस झाला. या वेळेस त्यानें सेनेट सभेंत केलेलीं भाषणें मागील व्हेरीसच्या संबंधाच्या भाषणांप्रमाणेंच फार प्रसिद्ध आहेत. पण इतक्यानेंच झालें नाहीं. वरील दोन समयांहूनहि घोरतर प्रसंग रोम शहरावर गुजरून त्यांत सिसरोच्या वक्तृत्वाचा विकास अद्याप पूर्णपणें व्हावयाचा होता ! हा महाप्रसंग अर्थात्च सीजराचा वध होय. सीजर यास छपन्नजणांनीं एकवट होऊन सभास्थानीं मारला असतां त्यानें अचाट श्रम करून रचलेला राज्यव्यूह सगळा जेव्हां एकदम उकलला तेव्हां सगळ्या

१. या प्रसंगीचें एक भाषण 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रहांत' आहे.

राज्यभर कित्येक वर्षें बेबंदाईच चालली होती. या समयीं मागें सांगितलेला आंटनी हा सीजरच्या कृपेंतला असल्यामुळें त्यानें लोकांचीं मनें आपणाकडे वळवून घेऊन आपणच सगळी सत्ता बळकाविण्याचा बेत मांडला होता. हें सिसरोच्या व त्याजसारखे इतर जे लोकसत्तात्मक राज्याचे अभिमानी होते त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं त्यास विरोध करण्यास आरंभ केला. तरी आंटनी हा आपल्या पक्षाच्या लोकांच्या बळावर कांहीं दिवसपर्यंत त्यांस डोकें देऊन राहिला होता. शेवटीं सिसरोच्या तडाक्यासमोर आपला निभाव लागणार नाहींसें पाहून त्यानें पळ काढला. मग तर सिसरोनें त्याचा सारखा पिच्छाच पुरवून त्याजवर रोम शहराहून फौज रवाना केली. असो; तर या प्रसंगीं प्रस्तुत वक्त्यास आपलें शक्तिसर्वस्व प्रकट करावें लागलें. हीं या समयींचीं भाषणें आंटनीच्या विरुद्ध बोललेलीं असून त्यांत त्यांवर इतका भडिमार करून सोडला आहे कीं, मागें सांगितलेला 'फिलिपिक' हा शब्द त्यांस लावतात. हीं भाषणें एकंदर वीस पंचवीस आहेत. हीं सर्व ऐकण्यास आंटनी रोम शहरीं राहिला नाहीं. पहिल्या दुसऱ्या तडाक्यासच त्यास दे माय धरणी ठाय होऊन येथून मी धडपणीं निघून जातों कसा असें त्यास होऊन गेलें; आणि रोम शहराच्या आणि आपल्यामध्यें आल्पसचे पहाड जेव्हां त्यानें केले तेव्हां त्याच्या जीवांत जीव आला. मग तेथें त्यानें अनेक कारस्थानें रचून आपणांवर चालून आलेले दोघे सरदार आपलेसे करून घेतले; आणि पुनः रोम शहरीं आपला अंमल बसवून मागें सांगितल्याप्रमाणें सिसरोचा सूड घेतला. असो; तर असा सरस्वतीचा महिमा आहे!

११. याप्रमाणें वक्तृत्वाच्या दोन आदिपीठांचा वृत्तांत झाला, आतां आपल्या देशाशीं ज्याचा दैवयोगेंकरून संबंध जडला आहे त्या इंग्लंड देशाची सदरहूप्रमाणें थोडीशी हकीकत देतों. वर एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, इंग्लंडांत राजाचें व लोकांचें जें सुमारें दोनशें वर्षांपूर्वी भयंकर युद्ध झालें तेव्हांपासून त्या देशांत प्रस्तुत गुणाची प्रवृत्ति झाली; व ती त्या वेळेसच कां झाली याचेंहि कारण वर सांगितलें आहेच. असो; आतां वरील देशांत जे मोठमोठे वक्ते होऊन गेले त्यांचीं नांवें येथें सांगतों.

वर सांगितलेल्या भयंकर लढाईच्या वेळींच पार्लमेंत सभेंत कित्येक सभासदांचा वक्तृत्वाविषयीं मोठा लौकिक होता. त्यांचीं नावें इतिहासांत प्रसिद्ध आहेत; पण तीं वक्तृत्वाच्या संबंधानें तितकीं विख्यात नसल्यामुळें देत नाहीं. तसेंच पुढेंहि कित्येक वर्षेंपर्यंत इंग्लंडांत चांगले नामांकित वक्ते कित्येक निपजले. पण त्यांच्याहि नांवांचा निर्देश वरील कारणास्तवच करीत नाहीं. आतां वरील लोकांचीं नांवें त्यांच्याच मात्र काव्यांत प्रसिद्ध असतां तीं पुढें कां मागें पडलीं याचीं कारणें पाहूं गेलें असतां दोन दिसतात. एक तर हें कीं, सध्यां इंग्लंडांत जी एक उपयुक्त कला

कित्येक वर्षें चालू आहे ती त्या वेळेस नव्हती. ही कला शीघ्रलिपि ह्मणजे वक्ता बोलत असतांच त्याचे शब्द झटपट उतरून घेण्याची युक्ति ही होय. ही आतां चांगल्या पूर्ण दशेस आली असल्यामुळें व चोहोंकडे प्रसिद्ध असल्यामुळें अगदीं साधारण वक्त्यांचीं भाषणें सुद्धां शब्दानशब्द उतरतां येऊन त्यांचा तेव्हांच चोहोंकडे हवा तेवढा फैलावा करून देतां येतो. पार्लमेंट सभेंत तर सभासद उजाडतां उठून परत घरीं येताहेत तोंच त्यांचीं भाषणें छापून चोहोंकडे वांटून पार केव्हांच निकाल होऊन गेलेला असतो; व लवकरच कांहीं दिवसांत त्यांची प्रसिद्धि साऱ्या जगभर होते! अशी हल्लींच्या काळीं वक्त्यांस उत्कृष्ट सोय होऊन गेलेली आहे, पण पूर्वी यापैकीं कांहींच नसे. सभांतल्या सभांत आंत काय होई तें होई; आणि वक्त्यांची बाहेर लोकांत प्रसिद्धि झटली ह्मणजे ऐकणारांच्या सांगोपांगीवरून जी काय होईल ती होईल असें असे. फार काय, पण गेल्या शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटीं शेवटीं सुद्धां पार्लमेंटांतील भाषणें एकंदर लोकांस समजण्याचा बिलकूल मार्ग नसून त्या वेळेस चालणाऱ्या पत्रांतून त्यांचा गोषवारा दिलेला असे. एका पत्रांत मात्र तीं भाषणें सगळींचीं सगळीं दिलीं असत; पण तीं शब्दशः बरोबर नसून सरासरी तो मतलब मात्र त्यांत आणलेला असे.[1] असो; तर याप्रमाणें वरील शीघ्रलिपि निघण्यापूर्वी वक्त्यांच्या प्रसिद्धीस मोठा अडथळा होता; व यामुळेंच त्या काळांत होऊन गेलेल्या कित्येकांची नुसती वक्तृत्वाविषयीं कीर्ति मात्र उरली आहे. फार तर काय, पण ज्यास मरून अद्याप पुरतीं शंभरहि वर्षें लोटलीं नाहींत त्या पिट्ट नामक विख्यात वक्त्याचीं सुद्धां भाषणें सध्यां केवळ अंशतः मात्र उपलब्ध आहेत; बाकीच्यांचा वरील कलेच्या अभावास्तव केव्हांच लोप होऊन गेला.

दुसरें कारण असें कीं, चिताऱ्यास किंवा मूर्तिकारास ज्याप्रमाणें मूळचें रूप जसें उत्कृष्ट असेल तसें आपल्या कृतींत उतरतां येतें, किंवा उत्कृष्ट विषय असला ह्मणजे कवीच्या स्फूर्तीस तेज चढून काव्यास जसें विशेष रमणीयत्व येतें, त्याचप्रमाणें वक्त्यासहि प्रसंगविशेषाची अनुकूलता लागत असते. या सिद्धांताचा प्रत्यय मागील दोन महावक्त्यांच्या वृत्तांतावरून आमच्या वाचकांस आलाच असेल. तर हेंहि वर सांगितलेल्या वक्त्यांची कीर्ति पुढें न उरल्याचें एक मोठें कारण असावें. ज्या विषयावर त्यांनीं आपली वक्तृत्वशक्ति खर्चली ते विषय एकंदर जगास महत्वाचे वाटण्यासारखे नसल्यामुळें त्यांवर आधेयभूत जी त्यांची वक्तृत्वकीर्ति तीहि अर्थातच लवकर विनष्ट झाली. आणि शिवाय ते विषय तसे सामान्य प्रतीचेच असल्यामुळें त्यांच्या वक्तृत्वाचा ओघहि त्यांवर सुमाराचाच वाहिला असेल. पदार्थविज्ञानांत

१. हें पत्र 'जटलमेन्स मागझीन' नांवाचें मासें इंग्लंडात निघत असे. यांत वरील भाषणें जॉनसन हा लिहीत असे. तो लोकांनीं आणलेल्या टिपणावरून हीं रचीत असे.

पाण्याच्या दाबाचा जसा नियम आहे कीं, तें मूळचें जितकें उंच असेल तितकेंच नळांत वगैरे दुसऱ्या बाजूस उंच चढतें, तोच नियम सर्व कलांस लागतो. विषयाची जशी योग्यता असेल त्याप्रमाणें कारागिरीचें कसब दिसून येतें. तर याप्रमाणें वरील दोन कारणांस्तव अलीकडील कित्येक नामांकित वक्त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या अनेक वक्त्यांची कीर्ति फार वेळ टिकली नाहीं असा सुमार दिसतो.

असो; आतां इंग्लंड देशांत ज्यांची कीर्ति विशेष स्थिर होऊन ती चिरकाळ रहाण्याचा संभव आहे अशा कांहीं अत्यंत प्रसिद्ध वक्त्यांचा येथें निर्देश करतों. या सर्वांत कालानें, व कांहीं अंशीं योग्यतेनेंहि, पहिला असा विल्यम पिट्ट ऊर्फ लॉर्ड च्याथम हा होय. हा 'हौस आफ कामन्स'मध्यें शिरून त्या सभेंत यानें मोठा नांवलौकिक मिळविला. आपल्या आवेशयुक्त वक्तृत्वानें यानें ती सभा केवळ आपलीशी करून कांहीं काळपर्यंत सगळें राज्यसूत्र आपल्याच हातांत वागविलें. तसाच त्या वेळेस फॉक्स नामेंकरून याच्या जोडीचा एक प्रसिद्ध वक्ता होता. तोहि याच्या प्रमाणेंच लोकपक्षास मिळाला असून शेवटपर्यंत त्याच पक्षास बळकट धरून राहिला. असो; वरील च्याथम मरण पावल्यावर त्याचा दुसरा मुलगा विल्यम पिट्ट जो याच साध्या नांवानें शेवटपर्यंत प्रसिद्ध होता, तो आपल्या बापाच्या जागेवर आला. यांचेंहि थोरल्या पिट्टसारखेंच वक्तृत्व असून प्रामाणिकपणा, राजनिष्ठा इत्यादि गुणांतहि तो त्यासारखाच होता. पण एक मात्र झालें कीं, त्याच्या बापाला जसें राज्यकारणांत यश आलें तसें यास आलें नाहीं,--अथवा तें पहाणें याच्या नशीबीं नव्हतें असेंच ह्मटलें पाहिजे. थोरल्या पिट्टचें राज्यांत चांगलें वजन बसलें असतां युरोपांत, अमेरिकेंत, हिंदुस्थानांत वगैरे सर्व ठिकाणीं इंग्लिशाचा उत्कर्ष होत गेला; पण दुसऱ्याच्या वेळेस तर खुद्द इंग्लंडच वांचतें कीं नाहीं याचीच शंका होती ! आतां हें खरें कीं, या दुसऱ्याच्याहि कारकीर्दीत इंग्लिशांस पुष्कळ जय मिळाले; व जे अपजय झाले ते याच्यामुळें मुळींच झाले नसून शिवाय पुढे कांहीं वर्षांनीं लवकरच त्यांचा वचपाहि निघाला; पण इतकें खरें कीं, यास जिवंतपणीं आपल्या देशाची दुर्दशाच पहावी लागली. हा प्रसंग या शतकाच्या आरंभीं नेपोलियन बादशहानें सगळ्या दुनियेभर केलेला दंगा होय. नेपोलियनानें बहुधा सगळें युरोप पालथें घालून एशिया खंडावरहि त्याचा डोळा होता; व इंग्लिशांचें कांहीं वर्षें सगळ्या युरोपभर त्यानें मातेरें करून टाकलें होतें; व एके सालीं तर खुद्द इंग्लंडावर चढ करण्याचा त्यानें मोठाच घाट घातला होता; या गोष्टी सर्व इतिहासज्ञांस माहीत आहेत. असो; तर याच शेवटल्या भयंकर संकटाच्या सुमारास वरील पिट्ट हा मृत्यु पावला.[1] पुढें

१. पिट्टच्या मरणाचा शक इ० स० १८०५ हा होय. या वर्षीत ट्राफलगार येथें (पुढें चालू).

वेलिंगटन, व्लूचर, कुटुसॉफ[1] वगैरे सरदारांनीं फ्रेंच लोकांचा मोड करून फ्रान्स देशावरच चोहोंकडून गर्दी केली ती पहाण्यास तो वांचला नाहीं. असो; याच वेळेस दुसरेहि आणखी बरेच वक्ते होऊन गेले. पण त्या सर्वांत मुख्य झटले झणजे बर्क व शेरिड्यान हे होत. यांपैकीं पहिल्याचा यापुढें सविस्तर वृत्तांत द्यावयाचा आहे; व त्यांतच दुसऱ्याविषयींहि मजकूर लिहिण्यांत येईलचः यास्तव दोघांविषयींहि येथें कांहीं विशेष लिहिणें नको. यानंतर आजपर्यंतहि प्रस्तुत गुण इंग्लंडांत बराच वास करीत आहे. यापूर्वी मेकॉलेसारखे कांहीं नामांकित ग्रंथकार व सध्यांचे ग्ल्याड-स्टन, डिजरेली, ब्राइट वगैरे मुत्सद्दी यांची वक्तृत्वांत बऱ्याच प्रतीची गणना आहे, आणि अलीकडे विलायतेंत विद्येचा फैलावा दिवसेंदिवस अधिकाधिक होत गेल्यानें वक्तृत्वाचा अभ्यास व त्याच्या ख्यातीविषयीं हौसहि मोठमोठ्या सभांपासून तों लहान लहान शाळांतील वर्गांपर्यंतहि पोंचली आहे. तेव्हां या गुणाचा सदरील देशांत अगदींच लोप बहुधा कधींहि होणार नाहीं.

१२. आतां वर सांगितल्याप्रमाणें वरील क्रमास अनुसरून बर्क याची येथें थोडीशी हकीकत देतों. याचें कारण वरील विख्यात पुरुषाची वक्तृत्वाच्या संबंधानें फार मोठी गणना आहे हें मुख्य आहेच; व शिवाय विद्वत्तेच्या व बुद्धिमत्त्वाच्या मानानेंहि त्याच्या सारखे मनुष्य इंग्लंडांत थोडेच निपजले हीहि गोष्ट त्याच्याविषयीं विशेष सांगण्यासारखी आहे. पण आमच्या वाचकांस या विख्यात वक्त्याचा विशेष परिचय करून देण्याचें एक तिसरेंहि मोठें कारण आहे. तें कारण हें कीं, सध्यांच्या फॉसेट साहेबांप्रमाणें सुमारें शंभर वर्षांपूर्वी बर्क हा आपल्या देशाच्या तर्फे पार्लमेंटांत सारखा सात वर्षें भांडत होता. तो सर्व वृत्तांत पुढें यथास्थलीं येईलच.

इंग्लिशांचा मोठा जय झाला, आणि पुढें दोन महिन्यांतच ऑस्टरलिझ येथें नेपोलियनास मोठा विजय प्राप्त होऊन सगळें युरोप त्याच्या हातीं आलें. या लढाईचें वर्तमान ऐकतांच पिट्ट्या काळजास मोठा धक्का बसला. त्यापासून तो पुढें सांवरलाच नाहीं. सोनपत पानपतची खबर ऐकून नानासाहेबाची जी अवस्था झाली तीच त्याची होऊन लवकरच त्याचा अंत झाला. वरील प्रसंगीं युरोपाच्या भावी स्थितीविषयीं त्याची इतकी निराशा होऊन गेली कीं, वरील बातमी खरीशी समजतांच तो झणाला, "तो समोरचा युरोपचा नकाशा आतां गुंडाळून ठेवा; त्याची आतां पुढील पांच पन्नास वर्षें अगदीं गरज पडणार नाहीं." तसेंच मरतेसमयीं "हाय हाय! आतां माझ्या देशाची काय गति होईल!" असे शब्द त्यानें उच्चारले असें झणतात!

२. वेलिंगटन कोण हें आमच्या वाचकांस माहीत असेलच. ज्यानें बाजीरावास गादीवर बसविलें; टिपूचा आणि शिंद्याचा मोड केला; आणि ज्याचें नांव वेलस्ली पूल या नांवावरून तिगस्तसालपर्यंत सर्वांच्या तोंडीं होतें तो तो होय.—वरील दुसरे दोघे सरदार अनुक्रमेंकरून प्रशियन आणि रशियन लोकांचे मुख्य होत.

असो बर्क हा जॉनसनच्या वेळेस होता. दोघांचें मोठें सख्य अमून दोघांचेहि मनांत एकमेकांविषयीं सेाठी सन्मानबुद्धि वागत होती.[1] तसेच दोघेहि पहिल्यानें दारिद्र्यावस्थेंत असून पुढेंहि मोठ्या भाग्यास चढले असें झालें नाहीं. तरी आपआपल्या गुणांत ते सर्वांहून श्रेष्ठत्व पावले. जॉनसन हा सर्व ग्रंथकारांत अग्रगण्य होऊन बसला; आणि तसाच तिकडे वक्तृत्वगुणांत व राजकारणांत बर्कहून वरचढ कोणीहि राहिला नाहीं. बरोबर शंभर वर्षांपूर्वी अमेरिकन लोकांचें इंग्लंडाशीं मोठें कडाक्याचें भांडण चाललें असतां कित्येक दूरदर्शी व थोर मनाचे मनुष्य तिकडील लोकाच्या पक्षानें नेहमीं बोलत असत; अशांतच प्रस्तुत वक्त्याची गणना होती. या प्रसंगींचीं यांचीं भाषणें ऐकून खुद्द लॉर्ड च्याथम यानेंहि मस्तक डोलविलें. हा बर्कच्या वक्तृत्वाचा पहिला प्रसंग; व एव्हांपासून त्याची चोहोंकडे हळू हळू प्रसिद्धि होऊं लागली. ती होत होतां त्याच्या आयुष्याच्या शेवटीं शेवटीं अगदीं शिखरास जाऊन पोंचली. त्या वेळेस पार्लमेंटांतील सभासदांत याची पायरी सर्वांवर होती. इ० स० १७८९ या सालीं फ्रान्स देशांत जो रयतेचा मोठा दंगा झाला,—कीं ज्याच्या योगानें फ्रान्स देशांत दोन तीन वर्षांतच आकाश आणि पाताळ एकच होऊन गेलें, आणि ज्या अपूर्व उत्पाताचा सगळ्या युरोपास धाक पडून त्याप्रमाणें वीस पंचवीस वर्षें सगळ्या देशांतून सारखी धुमश्चक्री चालली होती,—त्याच्याच संबंधानें प्रस्तुत वक्त्याची वक्तृत्वशक्ति पूर्ण उदयास आली. तरी त्यासमयीं यास पुत्रशोक होऊन त्याच्या योगानें याचें चित्त अत्यंत उद्विग्न झालें असल्यामुळें, व सगळ्या फ्रान्स देशभर हाहाकार उठून पारिस राजधानी त्या वेळेस तर केवळ यमपुरीच बनून राहिली असल्यामुळें तेथील लोकांविषयीं याच्या मनांत जो संताप व जी चिळस येऊन गेली होती, त्याच्या योगानें, व इतर कांहीं कारणांमुळें नुकत्या उगवलेल्या चंद्राचा प्रकाश जसा प्रसन्न व आल्हादकारक नसतो, त्याप्रमाणेंच वरील प्रसंगींचें याचें वक्तृत्व त्याच्या पूर्वीच्या वाग्विलासांसारखें रमणीय नाहीं. त्याच्या उज्वल बुद्धीवर वरील दुष्ट विकारांचें पटल आल्यामुळें तिचें शुद्ध स्वरूप त्यांत दृष्टीस पडत नाहीं.

असो; तर याप्रमाणें बर्कचीं हीं शेवटलीं भाषणें सर्वांत उत्तम धरण्यासारखीं नाहींत. यास्तव वरील प्रसंगाच्या आधीं जो त्याच्या वक्तृत्वाचा विकास झाला तो

---

१. बर्क याची इतर सर्व तत्कालीन लोकांप्रमाणें जॉनसनविषयीं मोठी पूज्यबुद्धि होती यांत कांहीं विशेष नाहीं. पण जॉनसन हा स्वभावानें कांहींसा गर्विष्ठ व कोणास न मोजणारा असतां त्याचें बर्कविषयीं अत्यंत प्रेम व सन्मानबुद्धि होती ही गोष्ट सांगण्यासारखी आहे. तो बर्कविषयीं असें म्हणे कीं, जर एखाद्या मनुष्यास मध्यें पावसानें गांठून तो व बर्क एखाद्या आडोशास एके ठिकाणीं उभे राहिले, तर तितक्या थोड्या वेळांतहि बर्क हा कोणी लोकोत्तर पुरुष असावा असें त्यास वाटल्यावांचून रहाणार नाहीं!

अत्यंत उज्वल समजला पाहिजे. हा विकास झटला झणजे मागें सांगितल्याप्रमाणें यानें आपल्या देशाचा जो कैवार घेतला त्या प्रसंगींचा होय. हिंदुस्थानचा पहिला गवर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स यानें येथील राजेरजवाड्यांवर अतोनात जुलूम केला असतां, व इंग्रेजी शिपाई भाड्यावारी लावून कंपनीची तिजोरी भरण्याचा उद्योग आरंभला असतां, इंग्लंडांतील लोकांस, सगळ्या देशाचा नांवलौकिक यानें दवडला झणून हेस्टिंग्स याचा फार संताप येऊन गेला होता. त्यांतून बर्कसारखे जे कोणी महात्मे होते त्यांस तर हिंदुस्थानांत चाललेले कहर कानांनीं ऐकवेनातसे होऊन क्लेश, हेस्टिंग्स वगैरे मुख्य मुख्य लोकांवर ते सारखे दांत ओंठ खात होते.[1] असो, तर असा प्रकार कित्येक वर्षे चालला असतां सरतेशेवटीं वॉरन हेस्टिंग्स हा आपला अधिकार सोडून परत स्वदेशास जेव्हां गेला, तेव्हां बर्क प्रभृति त्याच्या प्रतिपक्ष्यांनीं त्याजविरुद्ध पार्लमेंटांत फिर्याद केली. हा सगळा प्रसंग एकंदरींत मोठाच भव्य झाला. याचें मेकाले साहेबांनीं आपल्या निबंधांत फार शानदार वर्णन केलें आहे. ही चौकशी सन १७८८ पासून तों १७९५ पर्यंत अशी सात वर्षे चालली होती. फिर्यादींत प्रमुख असे तिघे चौघे मोठे नामांकित मनुष्य होते. एक तर वर सांगितलेला बर्क आणि दुसरे फॉक्स, शेरिड्यान, फ्रान्सिस हे होते. फिर्यादींचीं कलमें एकंदर बावीस होतीं. त्यांत बर्क यानें सर्वांत मोठें व धडधडीत अन्यायाचें कलम जी रोहिले लोकांवर विनाकारण घातलेली धाड तें उचललें. पण या प्रसंगीं आपलें सर्व कौशल्य खर्चून बर्क यानें जरी मोठें मनोवेधक भाषण केलें, तरी त्यापासून जितकें कार्य व्हावेंसें त्यास वाटलें होतें तितकें झालें नाहीं. त्यानंतर फॉक्स पुढें झाला; आणि काशीचा राजा चेतसिंग याचें राज्य बला-

---

१. वरील घोर अनर्थ इकडे चालले असतां तिकडील लोकांच्या मनाची स्थिति कशी होत होती हें त्या वेळच्या कांहीं लेखांवरून स्पष्ट होतें—

"Is India free? and does she wear her plumed
And jewell'd turban with a smile of peace,
Or do we grind her still?"

The Task

"——That she is rigid in denouncing death
On petty robbers, and indulges life
And liberty, and ofttimes honour too,
To peculators of the public gold:
That thieves at home must hang; but he that puts
Into his overgorged and bloated purse
The wealth of Indian provinces, escapes."

Ibid.

त्कारानें घेतल्यावद्दलचें दुसरें कलम त्यानें हातीं घेऊन त्यावरहि मोठें उत्कृष्ट भाषण केलें. पण या दोघांवरहि तिसऱ्या वक्त्यानें कडी केली. शेरिड्यान यानें अयोध्येच्या बेगमांच्या संबंधानें जें तिसरें कलम त्यावर आपली वाक्शक्ति अशी कांहीं लढविली कीं, सर्व श्रोते जागच्या जागीं केवळ चित्रांसारखे तटस्थ झाले. असें भाषण आजपर्यंत जगांत कधींच झालें नाहीं असें सर्वांस वाटून तेथल्या तेथें त्याच्या श्रोत्यांपैकीं कित्येक-जणांनीं त्यास विनंति केली कीं, जर हें छापण्याची आपण आह्मांस परवानगी द्याल तर आपणास दहा हजार रुपये देण्यास आह्मी कबूल आहों. तसेंच वरील भाषणांत त्या गरीब बिचाऱ्या राजस्त्रियांचा इंग्लिशांनीं जो पराकाष्ठेचा छळ केला त्याचें वर्णन इतकें हृदयभेदक केलें होतें, व त्या संबंधानें आरोपावर असा विलक्षण भडिमार करून सोडला होता कीं, त्या बेळेस ऐकणारांचीं मनें अत्यंत क्षुब्ध होऊन गेल्यामुळें सभेचें काम पुढें चालेनासें झालें, आणि त्या दिवशीं तें तसेंच तहकूब ठेवावें लागलें. असो तर याप्रमाणें या प्रसंगीं वॉरन हेस्टिंग्स याजवर असलाले जबरदस्त वक्ते उठले होते;- कीं ज्यांनीं या समयींच्या आपल्या वाक्पांडित्यानें आपलालीं नांवें आणि आपल्या प्रतिपक्ष्याचें नांव हीं जगांत चिरकाल चालतीलसें करून टाकलें आहे ! मागें जे आथेन्स व रोम शहरीं झालेले वक्तृत्वाचे मोठमोठे प्रसंग सांगितले त्यांच्याशीं तुळण्यासारखा इंग्लंडांत घडलेला प्रसंग हाच होय. असो; तर आह्मां भारतवर्षीय जनांस बर्क याचें नांव विशेष प्रिय होण्यासारखें आहे ह्मणून जें मागें सांगितलें तो हा वर वर्णिलेला प्रसंग होय. व या महाप्रसंगाच्या संबंधानेंच प्रस्तुत वक्त्याचें नांव सर्व रसिक व थोर हृदयाच्या लोकांत चिरकाल राहील हें उघड आहे !

दाता वक्ता योद्धा तेजस्वी मानधन असामान्य ।
अतुले पितृप्रसादे पंडित देवव्रता असा मान्य ॥
कर्णपर्व.

अंक १९.—(१) अवतरण. (२) प्रस्तुत अंकाचा विषय. (३) प्रस्तुत गुणाचा प्रचार. (४) त्याच्या अभिवृद्धीचें एक मोठें कारण. (५) त्याचें संस्कृत व असंस्कृत रूप. (६) प्रस्तुत विषयाचे तीन विभाग-प्राचीन काळ. (७) मध्यम काळ. (८) महाराष्ट्र देश. (९) वक्तृत्वविशिष्ट राजकारणी पुरुष.—

१. मागील अंकांत प्रस्तुत विषयाच्या एका भागाविषयीं निरूपण केलें. आतां यांत प्रस्तुत वक्तृत्वाचा प्रकार आपल्या देशांत कितपत होता याविषयीं विचार करावयाचा आहे.

२. गेल्या अंकांत प्रकृत गुणाच्या उत्पत्तीविषयीं सांगतांना आपल्या देशाविषयीं लिहिण्यांत आलेंच आहे कीं, येथील राज्यस्थिति त्याच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस अनुकूल नव्हती. ह्मणजे आथेन्स व रोम येथें लोकसत्तात्मक राज्यप्रकार चालू

असल्यामुळें वक्तृत्व गुण तेथें जसा सहज उदयास येऊन तो तेथील लोकांत उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेला, तसें येथें कधींहि झालें नाहीं. तेव्हां यावरून एखाद्यास सकृद्दर्शनीं असें वाटणार आहे कीं, आपल्या देशाच्या संबंधानें प्रस्तुत गुणाविषयीं काय लिहावयास सांपडणार आहे? या देशांत त्याचा अभावच पहिल्यापासून नांदत असल्यामुळें त्याविषयीं सगळें बोलणेंच खुंटलें. असो; ही समजूत कितपत खरी आहे याचा निकाल पुढील लेखावरून होईल.

३. वक्तृत्व हा गुण असा आहे कीं, त्याचें वास्तव्य या जगांत अगदीं मूळारंभापासून असलें पाहिजे. ह्मणजे सरस्वतीच्या उदयापासून प्रस्तुत गुणाचा उदय या जगांत झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मानवी भाषेचा जेव्हांपासून प्रचार झाला तेव्हांपासून ती कांहीं थोड्या मनुष्यांची सर्वथा अंकित होऊन इतरांस मोहून टाकण्याचें त्यांच्यामध्यें सामर्थ्य दृष्टीस पडूं लागलें असावें. साधारणतः जगांत पाहिलें असतां असा प्रकार दृष्टीस पडेल कीं, अगदीं अडाणी लोकांत सुद्धां कोणा एखाद्या मनुष्यास आपल्या बोलण्यानें दुसऱ्यांचें चित्त वेधून टाकण्याची कांहीं चमत्कारिक हातोटी साधलेली असते! त्याच्या वाणीचा असा कांहीं गुण असतो कीं सर्वांनीं त्याचें बोलणें ऐकतच रहावें! हाच प्रकार सर्व राष्ट्रांच्या आद्यावस्थेंतहि दृष्टीस पडतो. पहा कीं युरोपखंडांतील साऱ्या देशांत ग्रीसइतका जुना देश नाहीं; आणि त्या देशाच्या भाषेंत होमरकृत 'इलियड' नामक काव्याइतका जुना दुसरा ग्रंथ नाहीं; पण त्यांतहि वक्तृत्वाचा प्रकार स्पष्ट आढळतो. ट्रॉय नामक शहरावर ग्रीस देशांतील जे राजे गेले होते त्यांत भिन्न भिन्न गुणांनीं विशिष्ट असे कित्येकजण होते. त्यांत युलिसिस नामें करून राजाची वक्तृत्वगुणाविषयीं ख्याति होती. तसेंच भारती युद्धांत प्रसिद्ध जो पितामह भीष्म त्याच्या जोडीचा एक वृद्ध राजा नेस्टर नामेंकरून वरील काव्यांत प्रसिद्ध आहे; त्याची तर प्रकृत गुणाविषयीं वरच्या युलिसिसपेक्षांहि ज्यास्त प्रसिद्धि होती. वरील राजांत वैमनस्य उत्पन्न होऊन ते आपसाआपसांत भांडूं लागले असतां आपल्या पोक्त भाषणानें त्यानें त्यांची समजूत करावी. असो; हीं वरील भाषणें होमर कवीनें आपल्या अजरामर काव्यांत फार उत्कृष्ट तऱ्हेचीं घातलीं आहेत. त्यांवरून ज्या ग्रीस देशानें पुढें वक्तृत्वगुणांत केवळ कळस करून टाकला त्याची आद्यस्थिति लक्षांत येऊन प्रस्तुत कलेचा उगम त्यांत स्पष्ट दिसतो. तर याप्रमाणें युरोपांतील अत्यंत प्राचीन काळची स्थिति होय. आतां इकडे एशिया खंडांत पहा. यांतील अत्यंत प्राचीन देश झटले ह्मणजे हिंदुस्थान व चीन हे दोन होत. यांपैकीं दुसऱ्याविषयीं विशेष ह्मणण्यासारखी माहिती जगास अद्याप कोणत्याच प्रकारची नाहीं. यास्तव त्याच्या संबंधानें कांहींच लिहवत नाहीं. आपल्या हिंदुस्थानाविषयीं वरच्यापेक्षां बरीच पुष्कळ माहिती आपणांस आहे. तीवरून पहातां प्रस्तुत गुणाचें वास्तव्य ग्रीस देशा-

प्रमाणें इकडेहि होतें असें जरी दिसत नाहीं, तरी पूर्वोक्त युरोपीय काव्याच्या जोडीचीं इकडचीं काव्यें जीं 'रामायण' व 'महाभारत' त्यांत, व विशेषतः 'महाभारतां'त, प्रस्तुत प्रकार बराच दृष्टीस पडतो. असो; तर याप्रमाणें 'वक्तृत्व' शब्दाच्या अलीकडील अर्थास अनुसरून जरी प्रस्तुत गुणाचा प्रचार प्राचीन काळीं किंवा अजून नहि सर्वत्र दृष्टीस पडत नाहीं; तरी त्या गुणाचें वास्तव्य अगदीं पहिल्यापासून या जगांत आहे यांत संशय नाहीं.

४. प्रस्तुत गुणाच्या अभिवृद्धीचें दुसरें एक मोठें कारण असें आहे कीं, तो सदोदित उजळ रहाण्याची सोय असते. तशी दुसऱ्या कोणत्याहि कलेस असत नाहीं. पहा कीं, काव्यरचना, चित्रकर्म, वादनकला, नानाप्रकारच्या शिल्पविद्या, नाट्य, मल्लविद्या, युद्धकौशल्य इत्यादि कोणतीहि कला घेतली, तरी तिचा सतत अभ्यास ठेवणें ह्मणजे केवढा खटाटोप करायास पाहिजे व केवढे श्रम आहेत! कवितेचा अभ्यास ठेवणें ह्मणजे कागद, लेखणी, शाई नेहमीं जवळ बाळगून गणमात्रा जुळण्याचे श्रम करीत बसलें पाहिजे. त्याप्रमाणेंच चित्रें काढणें, वाद्यें वाजविणें, कुस्ती किंवा कसरत करणें वगैरे कोणतेंहि काम घटावयाचें ह्मटलें ह्मणजे त्याकरतां मुद्दाम सगळी सामग्री जेव्हां जमवावी तेव्हां तें साध्य होणार; व त्यावरच सारखे परिश्रम करण्यानें लवकरच कंटाळा येण्याचा संभव. त्यांतून मूर्ति घडवणें, इमारती बांधणें वगैरे कामें तर फारच अटाटाचीं असून युद्धादि प्रसंग तर स्वाधीनचेहि नाहींत. असो; तर याप्रमाणें इतर कलांचा सतत परिचय ठेवण्यास सामग्रीची सिद्धि, श्रम, वगैरे अनेक गैरसोयी असतात. पण वक्तृत्वकलेची गोष्ट अगदीं निराळी. तिची सामग्री मिळवण्यास तर अगदींच आयास नाहींत व क्षणाचाहि विलंब नको हें उघडच आहे. परमेश्वरानें आपलें अगाध चातुर्य खर्चून मानवजातीस अद्भुत देणगी दिली आहे ती सदैव सिद्धच आहे. जिव्हा दंतपंक्ति; व वर्णोच्चाराचीं कंठतालवादि स्थानें इत्यादि साहित्य जन्मसिद्ध व अंगभूतच असल्यामुळें वक्त्याच्या इच्छेचीच केवळ तीं वाट पहात असतात. इतर कलांच्या उपकरणांप्रमाणें यांस सज्ज करण्यास यत्किंचितहि काल न लागूनं व आयास न पडून स्थलकालादिकांची अनुकूलताहि यांस लागत नाहीं. शिवाय त्यांवर कालाचा तडाखाहि वरच्यांच्या सारखा न चालून वक्त्याच्या जीवमानापर्यंत बहुधा तींहि टिकाव धरून असतात. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत कलेचें साहित्य असें उत्कृष्ट सोयीचें आहे. हें एक झालें. दुसरें असें कीं, मागें सांगितल्याप्रमाणें इतर कलांचा अभ्यास फार श्रमदायक असतो. तसा हा मुळींच नाहीं ह्मटला असतां चालेल; कारण वक्तृत्व ह्मणजे नुसतें बोलायाचें काम. पण तिसरी सोय तर वरच्या दोहोंहूनहि मोठी मौजेची आहे. ती ही कीं साधारण नित्याच्या व्यवहारांतच प्रस्तुत गुणाचें अनायासानें सहज उज्वलन होत असतें तें

असें कीं, नेहमींच्या बोलण्याचालण्यांत किंवा इष्टमित्रांच्या मेळ्यांत वगैरे सहजच वाक्शक्तीचा उपयोग करणें पडून तिचे निरनिराळे गुण उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जातात. इतर कलांत निपुणत्व संपादणें असतां त्याकरितां जशी निराळी यातायात करायाला हवी तसें येथें न पडून व्यवहाराचा व्यवहार आणि अभ्यासचा अभ्यास अशीं दोन कामें एकेच वेळीं सहजगत्या साधून जातात. आणि पुनः श्रम ह्मणून बिलकूल नसून उलटें मनोरंजनहि त्यांत होतें.

५. असो; तर याप्रमाणें प्रकृत गुण हा इतर सर्व गुणांप्रमाणें केवळ स्वभावसिद्ध असल्यामुळें अत्यंत प्राचीन काळापासून सर्व देशांत असेल यांत संशय नाहीं आणि मागील कलमांत सांगितल्याप्रमाणें त्याचा व्यवहारांत नेहमीं उपयोग असल्यामुळें तो सर्व देशीं व सर्व काळीं बऱ्याच प्रौढदशेस येऊन पोंचण्याचा पुष्कळ संभव आहे हेंहि उघड आहे. आतां हें खरें आहे कीं, ज्ञानसंपन्न राष्ट्रांत वरील गुण ज्या रूपानें दृष्टीस पडेल त्या रूपानें तो अज्ञान लोकांत दृष्टीस पडायाचा नाही. ह्मणजे मागें होऊन गेलेल्या मोठमोठ्या वक्त्यांच्या भाषणांत किंवा अलीकडच्यांच्या व्याख्यानांत जसे शब्दलालित्य, अलंकार, विषयरचना इत्यादि गुण सांपडतील तसे त्यांच्यांत कदाचित् मुळींच दृष्टीस पडणार नाहींत. उलटा अपशब्दांचाहि पुष्कळ भरणा असून विषयाची मांडणी तर कधीं कधीं मुळींच नसेल. लोकसमाजांत उठून जें त्या अवसरास सुचेल तेंच वरील वक्ता बोलेल. सारांश, पहिल्या वक्त्याच्या भाषणांत रसिकता, कोमलता इत्यादि गुणांचा जसा समावेश असेल तसा दुसऱ्यांत नसून उद्दामपणाचेच सर्व गुण त्यांत असतील; इतके कीं, स्थलविशेषीं कोमल मनाच्या मनुष्यास त्यांच्यामुळें तें भाषण अत्यंत दुःश्राव्यहि वाटेल. पण याप्रमाणें वरील दोहों भाषणांत बाह्यरूपदृष्ट्या जरी बराच फरक दृष्टीस पडेल, तरी वक्तृत्वाचें बीज जो मोहकपणा तो दोहोंतहि आढळेल; आणि त्यामुळें वस्तुतः पहातां पहिल्यास जशी वक्तृत्व ही संज्ञा लागेल, तशीच ती दुसऱ्यासहि पण लागेल. दोहोंत भेद ह्मटला ह्मणजे पुरस्त्रीच्या आणि वनस्त्रीच्या रमणीयत्वांत जितका दृष्टीस पडेल, तितकाच. ह्मणजे दोहींचेंहि सौंदर्य वस्तुतः सारखें असतां पहिलीस जशी जडावाच्या व सोन्यारुप्याच्या दागिन्यांनीं व उंची उंची वस्त्रांनीं विशेष शोभा येईल व बोलण्याचालण्याची ढब वगैरे तीस उत्तम लागली असल्यामुळें पुरवासी रसिकजनांस तिची रमणीयता अधिक वाटेल, तशीच गोष्ट पहिल्या वक्तृत्वाची होय. पण जो खरा मार्मिक आहे, जो अंतर्गत गुणाचा वस्तुतः शोध करणारा, त्यास दुसरें वक्तृत्वहि वरच्यासारखेंच मोहून टाकील; किंबहुना स्वाभाविकत्वास्तव तेंच त्यास जास्त पसंत पडेल. कसें ? तर ज्याप्रमाणें दुष्यंत राजास कण्वाच्या तपोवनांत शकुंतलेचें वल्कलाच्छादित मुग्ध लावण्य व अप्रगल्भत्व हींच अंतःपुरांतील स्त्रियांच्या उज्वल वेषांहून व नाट्याचा-

यांनीं शिकवलेल्या विभ्रमांहून विशेष आल्हादप्रद झालीं.

६. आतां आपल्या भरतखंडांत वक्तृत्वाचे प्रकार कोणकोणते होते, व अलीकडे कोणते असून हल्लीं कोणते नवे चालू झाले आहेत याचा विचार करूं. त्यांत पहिल्यानें आपल्या देशांतील प्राचीन काळाविषयीं जर पाहिलें तर त्याविषयीं जरी आपणांस ह्मणण्यासारखी कांहींच विशेष माहिती नाहीं, तरी वक्तृत्वगुणाची त्या वेळेस चहा होती एवढें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. पुराणादि जुन्या ग्रंथांतून प्रस्तुत गुणाची अधिदेवता ह्मणून सरस्वतीचें वर्णन केलेलें आढळतें, व देवांचा गुरु बृहस्पति यानेंहि प्रकृत गुणाच्या संबंधानेंच प्रधानत्वानें वर्णन असून अद्याप आपल्या मराठी भाषेंतहि मोठ्या वक्त्यास वरीलच शब्द लावतात, इत्यादि प्रमाणांवरून वरील गोष्ट सिद्ध होते. त्याप्रमाणेंच 'वाग्मी' 'वाग्विद्' इत्यादि शब्दांचा 'रामायणा'च्या वेळेपासून प्रचार आहे यावरूनहि वरीलच अनुमान निघतें. शिवाय पृथ्वीवरील बाकीचीं राष्ट्रें गाढ अज्ञाननिद्रेंत स्वस्थ घोरत असतां आमच्या देशांत धर्माच्या लोकव्यवस्थेच्या वगैरेसंबंधानें शेंकडों उलटापालटी होऊन नवीं मतें, नवीं दर्शनें, नवे पंथ वगैरेंची जेव्हां सारखी गडबड चालली असे तेव्हां प्रस्तुत गुणाची आमच्या देशांत मोठी जागृत वस्ती असेल यांत संशय नाहीं. ब्राह्मण, बौद्ध, जैन, चार्वाकमति, इत्यादिकांचे धर्मविषयक वाद व नैयायिक, मीमांसक, सांख्यवादी इत्यादिकांचे पदार्थमात्राविषयीं सूक्ष्म विचार, यांची ज्या वेळेस चोहोंकडे गर्दी असेल त्या वेळेस अनेक नामांकित वक्ते निपजले असतील असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां यावर जर कोणी अशी शंका घेईल कीं, वरील गोष्टीस कोठें ग्रंथांतरीं आधार नसतां किंवा दुसरेंहि निश्चित प्रमाण नसतां ती खरी कशी मानावी, तर तीवर आमचें उत्तर असें आहे कीं वरील उल्लेखास अनुमान हें प्रमाण जबरदस्त आहे; मिसर देशांतील पर्वतप्राय विशाळ मनोरे पाहून किंवा इकडील भव्यत्व विस्तीर्ण लेणीं पाहून प्राचीन मिसरी लोकांचें व आर्यलोकांचें बुद्धिसामर्थ्य जसें सहज अनुमानासिद्ध होतें, त्याप्रमाणेंच वरील वक्तृत्वाविषयीं जरी कोठेंहि बिलकूल आधार न सांपडला, तरी तें गृहीत धरण्यास अगदीं अडचण नाहीं. कारण ज्या वेळेस हल्लींप्रमाणें ग्रंथ छापण्याची कला माहीत नसल्यामुळें वादविवाद व्हावयाचा तो केवळ तोंडींच व्हावयाचा असें असे, त्या वेळेस लिहिण्याच्या चातुर्यापेक्षां बोलण्याच्याच चातुर्यास अतिशय उत्तेजन मिळालें असेल यांत संशय नाहीं. आणि ज्या वादांस आज निदान दोन हजार तरी वर्षें होऊन गेलीं असतांहि 'शंकराचार्य', 'मंडनमिश्र', 'कुमारिलभट्ट' अशीं नांवें लोकवार्तेच्या केवळ वाऱ्यावर उडत हल्लींपर्यंत येऊन पोंचलीं आहेत, आणि ज्यांचा परिणाम एवढा झाला कीं, अर्ध्या एशिया खंडास त्याच्यामुळें नवा धर्म मिळाला,[1] ते वाद केवढे कडाक्याचे

१. ब्राह्मणधर्माची व बौद्धधर्माची प्रॉटेस्टंट व क्याथलिक पंथाप्रमाणें पुष्कळ दिवस मोठी

(पुढें चालू).

झाले असतील याची सहज कल्पना होते ! असो; तर याप्रमाणें प्राचीन भरतखंडांत प्रकृत गुणाचें वास्तव्य होतें याविषयीं केवळ प्रत्यक्ष प्रमाण जरी न मिळालें, तरी तें अनुमानानें सिद्ध होतें. हें अनुमान वरच्या कलेप्रमाणें इतरहि कांहीं कलांस तसेंच लागतें. उदाहरणार्थ नाट्यकला आणि चित्रविद्या घ्या. या दोहोंहिविषयीं इतर देशांप्रमाणें आमच्या देशाची मुळींच प्रसिद्धि नाहीं. ग्रीस देशांत रॉशस नामें करून एक मोठा विख्यात नट होऊन गेला; व सुमारें शंभर वर्षांपूर्वी त्याच्या बरोबरीचा गॅरिक[1] ह्मणून एक नट इंग्लंडांत झाला. पण इकडे सॉफोक्लीज व शेक्सपीयर यांच्या बरोबरीचे नाटककार निपजले असतां वरील नटांसारखीं मात्र इकडे कोणाचींहि नांवें आढळत नाहींत. त्याप्रमाणेंच ग्रीस देशांत आपिलीज, इटालींत रेफील, व इंग्लंदांत जॉनसनचा परम मित्र रेनॉल्डस् हे चित्रकर्मांत मोठे निपुण होऊन गेले. पण प्राचीन काळीं आपल्या देशांत असुक असुक मोठे चित्रकार झाले असें कोठेंहि आढळत नाहीं. तर या दोन अभावांचें काय वरें कारण असावें ! ज्या आमच्या देशांत 'शाकुंतल', 'उत्तररामचरित,' 'मृच्छकटिक' अशीं नाटकें रचणारे कवि निपजले त्याच देशांत त्यांचा उत्कृष्ट अभिनय करणारा नट कोणीच झाला नाहीं काय ? तसेंच अशोक, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, शालिवाहन असे मोठमोठे पृथ्वीपति येथें नांदत असतां व बहुतकरून दरएक संस्कृत नाटकांत चित्रपट, आलेख्य, तूलिका, इत्यादिकांचें नेहमीं वर्णन येत असतां कोणाहि चित्रकाराची सार्वत्रिक प्रसिद्धि झाली नाहीं काय ? वरील दोन्हीहि गोष्टी केवळ असंभाव्य होत हें आमच्या सर्व समंजस वाचकांच्या लक्षांत येईल; आणि ज्या अर्थी इतर कलांत व विद्यांत आपल्या पूर्वजांनीं एवढी कीर्ति मिळविली, त्या अर्थी वरील दोन कलांतहि त्यांनीं निदान पक्षीं बरेंच निपुणत्व संपादिलें असेल असा तर्क सहज होतो. बरें, पण मग वरील कला आपल्या देशांत असून त्यांचा पुढें मागमूसहि कसा उरला नाहीं हें जर कोणी विचारील, तर त्याचें उत्तर अर्थात् हेंच कीं, वरील दोन कला व प्रस्तुत वक्तृत्वकला या अशा प्रकारच्या आहेत कीं, या स्वभावतःच अचिरस्थायी ह्मणजे फार वेळ न टिकणाऱ्या आहेत. पहा कीं, एखाद्या उत्कृष्ट नटानें फार उत्तम अभिनय केला तर तो चिरकालिक करण्यास कांहीं तरी उपाय आहे काय ! तो जोंवर रंगभूमीवर आहे तोंवरच त्याचें

झटापट लागून सरते शेवटीं बौद्धांचा मोड झाला, व त्यास सिंहलद्वीप, तिबेट, चीन, वगैरे देशांत जावें लागलें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. बौद्धांची संख्या एकंदर ६ कोट आहे व एकंदर मनुष्यवस्तीचा सरासरी अर्धा भाग या धर्माचा आहे.—सुमात्रा, जावा वगैरे बेटांतूनहि हिंदुधर्माच्या खुणा कित्येक अद्याप स्पष्ट आहेत.

१. या विख्यात नटाविषयीं 'महदाख्यायिका' या सदराखालीं मागें मजकूर लिहिला आहे तो आमच्या वाचकांस आठवत असेलच.

कसब. शिल्पकारानें तयार केलेल्या वस्तु जशा पुष्कळ दिवस राहूं शकतील किंव एखाद्या उत्तम कवीचें काव्य एकदां रचलें ह्मणजे तें जगत्प्रलयापर्यंत जसेंचे तसेंच ठेवितां येईल तशी गोष्ट वरील मनुष्याच्या कृतीविषयीं आहे काय ? फार फार झालें तर त्या नटाच्या हयातीपर्यंत तो लोकांस रंजवील. पण त्याचा अवतार एकदां आटपला कीं पुढें त्याची करामत कशी होती आणि काय होती तीं सांगतां येणेंहि मुसकील आहे. जी मूर्ति एकदां लोपली ती लोपली ! या सारखींच सरासरी चित्र्याचीहि गोष्ट आहे. चित्राचा आधार जो कागद, भिंत, किंवा कापड हीं जोंवर आहेत तोंवरच त्याचें अस्तित्व; शिवाय रंगाची तकाकी वगैरे तर वरच्याहूनहि लवकरच नाहींशी होणारी. कालगत्या सगळ्या सृष्टींत जी बदल होत जायची ती मोठ्या चित्र्याच्या कसबाकडे पाहून होण्याची ह्मणजे क्षणभरहि राहील असें नाहीं ! मागें आपिलीज ह्मणून जो ग्रीस देशांत होऊन गेलेला चितारी सांगितला त्याच्याहि तजबिरी[1] वरील कारणास्तवच आतां कोठेंहि राहिल्या नाहींत आणि वरील देशाची मूर्तिकारांबद्दल जशी प्रसिद्धि अद्याप आहे तशी चित्रकारांबद्दल नाहीं यांचेंहि कारण वरीलच असावें. असो; तर याप्रमाणें ज्या लोकांचीं कामें लागलींच किंवा लवकरच नाहींशीं होणारीं असतात तीं पुढें दृष्टीस न पडलीं इतक्यावरून त्यांचें वास्तव्य अमुक अमुक देशांत मुळींच नव्हतें असें ह्मणणें रास्त नाहीं. यास्तव वक्तृत्वाची तरी वरच्यासारखीच गोष्ट आहे. एक तर अगदीं अलीकडेपर्यंतहि शीघ्र लिपि ही कला युरोपांत सुद्धां माहीत नव्हती; त्यामुळें कोणीं एखादें उत्कृष्ट भाषण केलें तर तें टिपून घेण्याची मुळींच सोय नव्हती. शिवाय दुसरी मोठी गोष्ट आणखी अशी आहे कीं,

---

१. वरील चित्रकार शिकंदर बादशहाच्या पदरीं होता; व तो विद्यासंपन्न असल्यामुळें त्याचा शिकंदराशीं स्नेहसंबंध होता. याच्याविषयीं इतिहासांत कांहीं आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं दोन येथें सांगतों. एकदां असें झालें कीं, वरील राजपुत्र हा आपल्या स्नेह्याच्या चित्रशाळेंत गेला. तेथें कित्येक तसबिरा तयार झाल्या असून कित्येक तयार होत होत्या. शिकंदरास चित्रकलेंत विशेष गम्य नसतांहि तो आपल्या राजवैभवाच्या घमंडींत तेथील चित्रांत कांहीं चुका काढूं लागला. तें ऐकून आपिलीजानें त्याची पुढील उत्तरानें खुबीनें फजिती केली;—ह्मणाला, "मित्रा अंमळ हळू तरी बोल, तीं पलीकडे पोरें रंग उगाळीत बसलीं आहेत तीं तुला हंसतील !" दुसरी गोष्ट अशी आहे कीं, शिकंदराचा प्रख्यात घोडा बुसेफेलस याचें वरील चित्र्याचेंप्रमाणें एक त्याच्याचप्रमाणें चित्र काढलें. तें इतकें हुबेहुब उठलें होतें कीं, तें पाहिलें असतां चित्र ह्मणून भासत नसे. शिकंदरानें वरच्याप्रमाणेंच या चित्रावरहि कांहीं टीका केली. आपिलीसानें कांहींएक उत्तर न करितां त्या घोड्यासच तेथें आणविलें. तो जवळ येतांच तेथें दुसरा आपल्यासारखाच घोडा बांधला आहे असें त्यास वाटून तो खिंकाळूं लागला. तेव्हां आपिलीस शिकंदरास ह्मणाला, "खरोखर, तुझ्यापेक्षां तुझ्या घोड्यास चित्रकलेचें ममज्ञान विशेष आहे !"

पुष्कळ भाषणांचा रस त्या प्रसंगामुळेंच वृद्धिंगत झालेला असतो; तो इतका कीं, पुढें कांहीं काळ लोटल्यावर जर तींच वाचलीं किंवा ऐकिलीं तर तीं अगदीं नीरस वाटतील. फार कशाला, मागील अंकांत सांगितलेल्या शेरिड्यान नामक वक्त्याच्या भाषणानें त्या वेळेस सगळ्या लोकांस जरी एवढा चटका लावून सोडला, व प्रत्यक्ष फॉक्स यानेंहि एके प्रसंगीं त्यास सर्वोत्कृष्ट ह्मणून ह्मटलें,[1] तरी हल्लीं तें वाचलें असतां त्यांत एवढा अद्भुत गुण कांहीं दिसत नाहीं. खुद्द डिमॉस्थेनीसच्याहि कांहीं थोड्या सर्वप्रसिद्ध भाषणांस खेरीज करून बाकीचीं वरच्याप्रमाणेंच सध्यां नीरस झालीं आहेत. याचें कारण उघडच आहे. अन्न निवाल्यावर जशी त्याची गोडी रहात नाहीं, त्याप्रमाणेंच एखाद्या प्रसंगविशेषानेंच जें लोकांस रुचलेलें असतें तें मग तो प्रसंग निघून गेल्यावर पहिल्यासारखें कसें रुचेल ? खेरीज वक्त्यानें भाषण केलेलें खुद्द ऐकणें आणि तें कागदावरून वाचणें यांत पुष्कळदां फारच तफावत असते. मोठमोठ्या वक्त्यांच्या भाषणांत तर वरील भेद फारच असेल यांत संशय नाहीं. कारण वक्तृत्व ह्मणजे नुसतें बोलणेंच नव्हे; तर उंच व मनोवेधक स्वर, अंगविक्षेपांचा नोकझोक, चेहऱ्यावर निरनिराळ्या मनोवृत्तींचा आविर्भाव, व आणखीहि कित्येक बारीक सारीक गोष्टी या सर्वांचें संमेलन होय.[2] शिवाय वक्तृत्वस्थानाची शोभा, एकंदर लोकांचा थाट, वगैरे गोष्टींनीं आधींच सुप्रसन्न होऊन गेलेल्या मनावर वक्त्याच्या भाषणाचा जसा रंग उठेल तसा पांढऱ्यावर काळें केलेलें नुसतें वाचून कांहींच उठावयाचा नाहीं हें उघड आहे. फार तर काय, पण नुसतें ऐकणें व वाचणें या दोन व्यापारांतहि सुखाच्या संबंधानें थोडा भेद आहे असें नाहीं. वाचण्याचा जसा तेव्हांच त्रास येतो तसें ऐकण्याचें नाहीं. असो; तर याप्रमाणें वक्तृत्वसभेचा थाट पाहून तेथें झालेलें भाषण खुद्द ऐकणें आणि तें दुसऱ्या दिवशीं किंवा पुढें वर्तमानपत्रांत किंवा पुस्तकांत वाचणें या दोहोंत फारच फेर आहे. त्यांतून एखाद्या लौकिक प्रसंगविशेषानें लोकांचीं मनें क्षुब्ध

१. फॉक्स कोण होता हें मागील अंकावरून आमच्या सर्व वाचकांस माहीत झालें असलच. या वक्त्यास एकदां कोणीं असा प्रश्न केला कीं, आपण इतके दिवस पार्लमेंटांत अनेक भाषणें ऐकलीं, त्या सर्वांत तुह्मांस अत्युत्तम कोणतें वाटतें ? फॉक्सनें उत्तर केलें "बेगमांच्या संबंधानें शेरिड्यान यानें जें केलें तें."

२. वरील सर्व अंगें वक्त्यास किती आवश्यक आहेत हें मागें डिमॉस्थेनीसच्या संबंधानें जें सांगितलें, कीं तीं त्यानें मोठमोठ्या नटांपासून शिकून घेतलीं यावरून एक स्पष्ट दिसतेंच. शिवाय वरील वक्त्याचें एक सर्वप्रसिद्ध वचन असें आह. एके समयीं कोणा एकानें त्यास विचारलें कीं, वक्त्यास अगदीं आवश्यक अशा कोणकोणत्या गोष्टी आहेत ? डिमॉस्थेनीसनें उत्तर केलें, "नाट्य"—दुसरीं कोणकोणतीं ?—"नाट्यें !"—बरें तिसरी ?—"नाट्य !" पहिले विल्यम पिट ऊर्फ लार्डचाथम यांस वरील 'नाट्य' किती अंगवळणीं पडून गेलें होतें हें मेकॉलेच्या त्याविषयींच्या निबंधावरून चांगलें ध्यानांत येईल.

होऊन गेलीं असतां त्या संधीस तर भाषणाचा जो रंग पडेल तो ती वेळ निघून गेल्यावर अगदीं नाहींसा होऊन त्याची कल्पनाहि पुनः करतां येणार नाहीं. सारांश, ज्याप्रमाणें कमलपत्रांवर जलबिंदूंस मोत्यांची शोभा येते, किंवा संध्यासमयीं सूर्याचीं कोमल व सोनेरी किरणें पश्चिमेकडील ढगांवर पडलीं असतां त्यांस रंग चढून त्यांचा देखावा कांहीं मोठा अपूर्व दिसत असतो, त्याप्रमाणें प्रसंगविशेषीं झालेलें वक्तृत्व कांहीं चमत्कारिक रीतीचें खुलतें! ती खुमारी तो प्रसंग आटपला कीं अगदीं नाहींशी होऊन जाते. कशी? तर जसे वरील ढग क्षणभर आपलें विचित्र वैभव मिरवून सूर्य अंमळसा खालीं जातांच राखेसारखे दिसूं लागून अधिकच निस्तेज दिसतात!

असो; तर याप्रमाणें वक्त्यानें केलेलें भाषण उतरल्यानें तें अधिक नीरस मात्र लागणारें असल्यामुळें वरील निष्फळ प्रयत्न कोणीं केला नसेल हेंहि संभवतें. शिवाय हातानें लिहिण्याचा श्रम वांचविण्याचें जें मुद्रणरूप साधन तें प्राचीन काळीं नव्हतें हेंहि लक्षांत आणलें पाहिजे. तर याप्रमाणें अनेक कारणांस्तव आपल्या देशांतील प्राचीन वक्तृत्वाचा आजला बिलकूल मागमूस उरला नाहीं हें ठीकच आहे. त्यांतून ग्रीक व रोमन लोकांप्रमाणें इतिहास लिहून ठेवण्याची जर आपणांत प्रवृत्ति असती तर निदान अमुक अमुक काळीं अमुक अमुक प्रसंगानें अमुक अमुक पंडितांची वक्तृत्वाविषयीं मोठी ख्याति झाली असा नुसता उल्लेख तरी सांपडता. पण इतिहासाच्या अभावामुळें तोहि आधार आपणांस अनुकूल नाहीं. तेव्हां एकंदरींत प्रस्तुत कलेचें वास्तव्य केवळ अनुमानावरून सिद्ध करायाचें. त्यास प्रत्यक्ष प्रमाण मुळींच नाहीं. तरी ज्याप्रमाणें एखाद्या अरण्यांत राखेचा व कोळशांचा चोहोंकडे ढीग पडलेला पाहिला असतां वणव्याच्या ज्वाळाच प्रत्यक्ष पाहायाला नकोत, किंवा भुईंत खचलेले वाडे व वर आलेल्या विहीरी पाहिल्या असतां भूमीचा कंप प्रत्यक्षच दृष्टिगोचर होण्याची गरज लागत नाहीं, त्याचप्रमाणें अर्ध्या एशिया खंडावर पसरलेला हिंदुस्थानांतील धर्म व खुद्द हिंदुस्थानांतच मागें चालू असलेले व अद्याप चालत असणारे हजारों पंथ व निरनिराळीं मतें, हीं मोठमोठे वक्तृत्व ग्रंथ प्रत्यक्ष पाहिल्यापेक्षांहि प्रस्तुत विषयाविषयीं विशेष निर्णायक होत!

७. वर प्राचीन काळाविषयीं प्रस्तुत गुणाच्या संबंधें विचार झाला. आतां मध्यंतरीं ह्मणजे त्या काळाच्या व हल्लींच्या मध्यें जो पुष्कळ काळ लोटला त्याविषयीं विचार करूं. या काळाविषयीं मागील काळाप्रमाणेंच ह्मणण्यासारखी कांहींच आपणांस माहिती नाहीं, तरी आमच्या देशाच्या एका भागाविषयीं निदान एक दोन शतकांपर्यंत बरीच माहिती लिहिण्यासारखी आहे. हा भाग आमचा महाराष्ट्र देश असून वरील शतकें ह्मणजे यापूर्वीच गेलेला काळ होय.

८. आमच्या सर्व वाचकांस माहीत आहेच कीं, या देशाचें प्राचीन वैभव नष्ट होऊन कित्येक शतकें लोटल्यानंतर एका कोपऱ्यांतल्या लोकांनीं एकाएकीं वर डोकें उचलून थोडक्याच काळांत सगळा देश व्यापून टाकला. या त्यांच्या उदयामुळें प्राचीन आर्य लोकांचा धर्म, विद्या, आचार, इत्यादिकांचा जो सर्वथा लोपच होऊन जाण्याचा रंग आला होता तो समय दैवयोगानें टळला. या पराक्रमी लोकांनीं साऱ्या देशभर जीं जागोजाग ठाणीं घातलीं व मोठमोठीं राज्यें स्थापन केलीं, त्यांच्या योगानें यवनांनीं व म्लेंछांनीं उच्छेद करून टाकल्यामुळें आर्यांच्या धर्मादिकांवर जी ग्लानि येत चालली होती ती मागें हटून हिंदुत्वाचें जणों काय पुनरुज्जीवनच झालें. आमच्या जुन्या विद्या, कला इत्यादिकांस उत्तेजन मिळून आमच्या गतवैभवाची कळा आह्मांवर पुनः बऱ्याच प्रमाणानें आली. हींबरोबर मोठमोठ्या राष्ट्रांत आढळणारे जे निरनिराळे उज्वल गुण त्यांचाहि पुनः उदय झाला. हे गुण धैर्य, साहस, शौर्य, प्रामाणिकपणा, बुद्धिप्रागल्भ्य इत्यादि होत. यांचीं उदाहरणें महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत जीं सांपडतील त्यांहून मोठीं इतर कोणत्याहि प्राचीन किंवा अर्वाचीन देशाच्या इतिहासांत सांपडणें नाहींत. असो; प्रस्तुत गुण वक्तृत्व हाहि वरच्यांच्या मालिकेंतीलच एक होय. मराठ्यांचा इतिहास ज्या थोड्यांनीं सविस्तर वाचला असेल, व आपल्या देशाची गेल्या शंभर वर्षांतली स्थिति जे पुरतेपणीं ध्यानांत आणतील, त्यांची वरील गुणाच्या वास्तव्याविषयीं खात्री झाल्याखेरीज रहाणार नाहीं. आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं वक्तृत्व याचा अर्थ प्राचीन ग्रीस व रोमच्या इतिहासावरून जो एकंदर जगाच्या मनांत बसून गेला आहे, व जो अलीकडे आपल्या देशांतहि सामान्यतः सर्व समजूं लागले आहेत, तो त्याचा केवळ एकदेश होय. वक्तृत्वसभेंत उभें राहून सभोंवतीं थाटलेल्या समाजास 'अहो, वीर हो', 'हे मद्देशबांधव हो' वगैरे खरीं किंवा खोटीं संबोधनें करून मोठ्या गंभीर स्वरानें व मोठा आविर्भाव आणून उद्देशून बोलणें हें जसें वक्तृत्व; त्यापेक्षां सेनापतीनें रणांगणावर आपल्या सैन्यास बोललेले वीर्योत्साहप्रेरक शब्द, किंवा धर्मोपदेशकानें देवळांत केलेलें धर्मव्याख्यान, किंवा सुज्ञ बापानें आपल्या पुत्रास घरगुती केलेला बुद्धिवाद, हे प्रकार वरच्याहून वस्तुतः पहातां कमी आहेत असें नाहीं. जो गुण पंडितसभेंत झळकणारा तोच वरील प्रसंगीं ह्मणजे उणा पडेल असें नाहीं. सोनें किंवा रुपें यांच्या अंगीं जशी स्वतःसिद्ध योग्यता असून त्यांवर छाप असो किंवा नसो; त्यांची योग्यता खरा परीक्षक तेव्हांच जाणतो त्याप्रमाणें जगांतील सामान्य व्यवहारांतहि प्रस्तुत गुण खऱ्या मर्मज्ञाच्या लागलींच लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. असो; तर याप्रमाणें पेशव्यांच्या या जुन्या राजधानींत व इतर ठिकाणीं जरी वक्तृत्वाच्या समारंभाकरतां आथेन्स व रोम येथल्याप्रमाणें मोठाल्या टोलेजंग इमारती

बांधल्या नव्हत्या, व ऱ्होडस् बेटांतल्याप्रमाणें येथें त्या कलेचा अभ्यास करण्याकरितां पाठशाळा घातल्या नव्हत्या, तरी प्रकृत गुण वरील राज्यांत अनेक रूपांनीं प्रगट झालेला होता यांत संशय नाहीं. हें ह्मणण्यास आधार काय हें पुढील लिहिण्यावरून स्पष्ट होईल.

९. मनुष्याच्या करणीवरून त्याच्या अंगीं असणाऱ्या निरनिराळ्या गुणांचें अनुमान करतां येतें हें जर खरें असेल. तर ज्या महापराक्रमी पुरुषानें हिंदूंस दास्य-मुक्त करून सुमारें शंभर दीडशें वर्षें त्यांस स्वातंत्र्यसुखाचा व राज्यवैभवाचा अनुभव करविला त्याचे ठायीं प्रकृत गुणाचें वास्तव्य बरेंच कल्पिलें पाहिजे असें आह्मांस वाटतें. यापूर्वी शिकंदरप्रभृति जे अनेक रणधुरंधर महाविख्यात राज्यकर्ते होऊन गेले त्यांपैकीं बहुतेकांची राज्यसाधनसामग्री त्यांच्या पूर्वजांनींच अगोदर करून ठेवलेली होती. यास्तव एखाद्या कारागीरास उत्तम प्रकारचीं हत्यारें आयतीं तयार करून दिलीं असतां मग जशी त्यांवर त्यानें आपली करामत दाखवावी, तसाच प्रकार शिकंदर, सीजर, नेपोलियन इत्यादि राज्यकर्त्यांचा झाला. पण मराठी बादशाहीचा ज्यानें पाया घातला त्यास सगळें राज्य विश्वकर्म्याप्रमाणें केवळ नवेंच बनवावें लागलें. त्याची मूळची सामग्री ह्मटली ह्मणजे लोखंडासारखें भक्कम शरीर आणि मोठी विशाळ बुद्धि एवढीच काय ती होती. जे मावळे लोक आतांप्रमाणेंच शेतभात, मोलमजुरी किंवा काबाडकष्ट करूनच पिढ्यानपिढ्या राहिलेले, व अगदीं भावडे व भित्रे असल्यामुळें हूं कां चूं न करतां पर राज्याचा जुलूम सोसण्यास अगदीं घटावून गेलेले, त्यांचाच स्वभाव अगदीं बदलून टाकून मोठे कडवे व अभिमानी जे मुसलमान व रजपूत त्यांशीं छाती भिडावून लढण्याचें सामर्थ्य शिवाजीनें त्यांच्यांत आणलें. फार तर काय, पण ज्यांस आपला धर्म काय, आपला देश काय, याची साधारण चांगलीशी कल्पनाहि कधीं झाली नसेल, त्यांचा मुसलमानांशीं पुरा दुजेभाव करून देऊन त्यांचा रणोत्साह व आपल्या ठायीं अनन्यभाव त्यानें इतका वाढविला कीं, हर-एक प्रसंगीं आपापलीं शिरें हातावर घेऊन व प्रत्यक्ष प्राणहि अर्पण करून त्याची कामगिरी त्यांनीं बजाविली. सिंहगडावर कल्याण दरवाजाशीं जो घोरतर प्रसंग झाला—कीं ज्या वेळेस काळोख तर ऐन मध्यान्हीचा, जवळ दिवा ना बत्ती, चढा-याचा कडा सारखा पंचवीस तीस हात उंच, खालच्या लोकांची चाहूल ऐकून वरील रजपूत हत्यारबंद होऊन तयार झालेले, त्यांतून सर्वांत धैर्य खचण्यासारखी गोष्ट काय कीं, ऐन गर्दीच्या वेळेस त्यांचा मोहरा पडून सर्वांचें काळीज उडून गेलेलें. कां कीं, पुढें जावें तर रजपूतांच्या तरवारीशीं गांठ, मागें हटावें तर कडेलोट होऊन अंगाच्या ठिकऱ्यान् ठिकऱ्या उडायाच्या. असो; पण अशा भयंकर प्रसंगींहि—कीं जो नुसता मनांत आणला असतांहि अंगाचा थरकांप सुटतो—तानाजीचा धाकटा भाऊ सूर्याजी

तिळमात्रहि धैर्यभंग न होतां आपल्या सोबत्यांस सांगतो, "गड्यांनों, मागच्या शिड्यांच्या आशेवर तुह्मीं मागें परतूं पहात असाल, तर दोर मी मघांच कापून टाकले, तर आतां वांचायाचा मार्ग झटला झणजे येथील शिपायांवर तुटून पडल्याखेरीज दुसरा कोणता नाहीं;" असें झणून स्वतः त्यांचा झोरप्या होऊन त्यानें रजपुतांस कापून काढलें, आणि पंधरा कोस दुरून गडाकडे डोळे लावलेल्या आपल्या धन्यास तेथील एका खोपट्यास आग लावून फत्ते झाल्याची वर्दी दिली!–तर असे प्रसंग लक्षांत आणले असतां आपल्या जवळच्या लोकांस अगदीं आपलेसे करून टाकण्याचें सामर्थ्य शिवाजीच्या अंगीं किती अद्भुत असेल हें काय सांगावें! वस्तुतः पहातां तो कोण व मावळे लोक कोण? बरें, पैशाच्या लालुचीनें त्यांनीं त्याचा आश्रय धरला असेल झणावें तर वरील प्रसंगीं खुद्द थॅर्मापिलीवरहि कडी झाली असतां शिवाजीनें आपल्या सवंगड्यास एवढीं बक्षीसें तरी काय दिलीं झणाल तर पांच सात रुपयांचें एक एक रुप्याचें कडें किंवा एखादें मुंडासें! तेव्हां वरील अद्भुत सामर्थ्य आमच्या महावीराच्या वाक्पटुत्वाचें होय यांत संशय नाहीं. वरील गुण त्यानें अडाणी व साधेभोळे जे मावळे लोक त्यांस वश करून घेण्यांत जसा दाखविला, तसाच विजापूरच्या दरबारीं वागलेल्या वकीलाशीं बोलणें लावून त्यावर आपली पूर्ण छाप ठेवण्यांत व तसेंच पुढें मोगल सरदारांस वगैरे आंतून आपल्या पक्षास अनुकूल करून घेण्यांतहि प्रगट केला. असो; तर याप्रमाणें महाराष्ट्र देशाच्या इतिहासांतील वक्तृत्वाचें पहिलें उदाहरण त्या इतिहासाचा मुख्य आधारस्तंभ जो वरील पुरुष तो होय. दुसरें उदाहरण मराठी राज्य विसकळित झालें असतां त्यास आपल्या अंगच्या व बुद्धीच्या पराक्रमानें ज्यानें जोरदार केलें, व मोगल, पठाण, मराठे आणि फिरंगी यांस ब्राह्मणांच्या शौर्यापुढें कांपायास लावलें, त्या बाजीरावाचें होय. हा पेशवा शिपाईगिरींत, राजकारणांत, वगैरे बहुतेक गोष्टींत शिवाजी राजाशीं समत्व पावतो; व महाराष्ट्र देशाच्या सगळ्या इतिहासांत पाहिलें असतां त्याहून वरची पायरी अशी एका शिवाजीचीच आहे. असो; याच्या वक्तृत्वगुणाचा उल्लेख मराठ्यांच्या इतिहासकारानें आपल्या ग्रंथांत केला आहे. त्यांवरून व शाहू राजास त्यानें व बाळाजी विश्वनाथानें असा बापलेकांनीं मिळून अगदीं आपल्या मुठींत ठेवला होता यावरूनहि प्रस्तुत गुणाची अनुकूलता दोघांस किती होती हें स्पष्ट दिसून येतें. पहिल्यानें पेशव्यानें तर पेशवाईचा अधिकार आपल्या वाक्चातुर्यावरच मिळविला ही गोष्ट आमच्या साऱ्या वाचकांस बहुधा विश्रुत असेलच. आंग्रयानें मोठा पुंडावा करून खुद्द साताऱ्यावरहि येण्याचा संकेत केला असतां बाळाजीनें त्याशीं मोठें युक्तीनें तहाचें बोलणें लावून शेवटीं त्यास अगदीं आपलासा करून उलटी शाहूसच खंडणी देण्याचें त्याकडून कबूल करविलें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तसेंच हरएक प्रसंगीं शाहूस

शहाणपणाची मसलत देणारा व संकटसमयीं पुढें तोंड देणारा वरील पंतप्रधानच होता. हा पेशवा किती उत्तम प्रकारच्या चढाईत होता हें सर्वांस माहीतच असेल, कीं स्वारी घोड्यावर बसली असतां दोहोंकडून दोघांनीं त्यास धरावें लागत असे! तरी दिल्लीपर्यंत मोहीमा करून यानें आपल्या शेवटल्या मोहीमेंत स्वराज्य चौथाई व सरदेशमुखी या हक्कांच्या बादशाहि सनदा आपल्या धन्यास आणून दिल्या. तेव्हां हीं सर्व कार्यें करतांना त्यास तरवारीच्या पाण्यापेक्षां वाणीचा सरळपणाच मुख्यत्वेंकरून उपयोगीं पडला असेल यांत संशय नाहीं. या गुणास्तव मागील अंकांत सांगितलेला जो सिंहस राजाचा मंत्री सिनियस त्याची उपमा यास साजेल. असो; आतां दुसरा पेशवा बाजीराव बल्लाळ याचा वक्तृत्वप्रसंग सांगतों. शाहूच्या दरबारीं सान्या प्रधानमंडळांत वरील पेशवा शिरजोरपणानें वागे, व साऱ्या मुलखांत मराठ्यांचा डंका जो फिरत होता तो याच्याच जोरावर. हें त्याचें महत्त्व सहन न होऊन श्रीपतराव नामें करून त्या वेळेस प्रतिनिधि होता तो याचा फार द्वेष करी. एके समयीं असें झालें कीं, बाजीरावानें हिंदुस्थानावर जातीनिशीं स्वारी करण्याची आपली मसलत राजास कळविली असतां वरील प्रतिनिधि त्या बेतास आडवा येऊन असें करणें फार अविचाराचें आहे असें शाहूस समजावून देऊं लागला. त्यानें आपला विचार अशा सांगितला कीं, करनाटकांतील वगैरे आपल्या हातचे जे मुलूख गेले आहेत, ते अगोदर माघारीं घेऊन मग मोगलांवर चालून जावें. बाजीरावानें उत्तर केलें कीं, जर शिवाजी महाराजांची बुद्धि प्रतिनिधीसारखी असती, तर विजापूर व गोवळकोंडें आधीं घ्यावें, आणि मग हळूच युक्तीनें करनाटकांत प्रवेश करावा असें त्यांच्या मनांत येतें. पण ते अभिमानी, साहसी,—त्यांची बुद्धि थोर; त्यांनीं एकदांच करनाटक सर केलें! तर याचप्रमाणें या विस्तीर्ण व जुनाट वृक्षाच्या बूडाशींच आपण कुऱ्हाड घालूं, ह्मणजे फांद्या आपोआप खालीं आल्याच!—याप्रमाणें प्रतिनिधीनें जो विचार काढला होता त्याचें खंडन करून बाजीरावानें शेवटीं विनंति केली कीं, "जर मला आज्ञा होईल, तर कृष्णेपासून कटकनदीपर्यंत मी महाराजांचा झेंडा लावीन!" हें पेशव्याचें वीर्योत्साहयुक्त भाषण ऐकून शाहूराजा तन्मय होऊन गेला; आणि त्याच्या आजाचा आवेश क्षणमात्र त्याच्या शरीरांत संचरून सद्गदित होत्साता ह्मणाला, "शाबास! तुमचे वडील मोठे थोर होते, त्यांचे तुम्ही पुत्रहि योग्यच आहां. मराठ्यांचा झेंडा तुम्ही हिमालयाच्या मस्तकावर नेऊन रोंवाल अशी माझी खात्री आहे!

बाजीराव बल्लाळ यापुढें जे चार पेशवे गादीवर आले त्यांपैकीं वरील दोघांप्रमाणें वाक्पटुत्वाविषयीं कोणाचीहि कोठें विशेष वर्णना केलेली आढळत नाहीं. ती शेवटल्याविषयीं मात्र आढळते. हे शेवटले राजमाणे अद्याप सर्वांस पूर्ण माहीत आहेत, व यांच्या दुष्कीर्तीचा कलंक केवळ त्यांच्याच नांवास लागून न रहातां त्यांच्या पूर्व-

जांच्या शुभ्र यशासहि तो बाधक झाला आहे. 'पेशवाई' हें नांव काढतां ज्यानें पुणें वसविलें, ज्याच्या भयानें नादिरशाहास येथें धडगत न दिसून माघारा पाय घ्यावा लागला,[1] जो संपूर्ण चंद्राप्रमाणें पूर्ण आधिपत्य पावून यवनम्लेंच्छादिकांनीं दीर्घकाळ संताप दिलेल्या जगतीस मुहूर्तमात्र शीतळविता झाला, जो दुष्टांस काळासारखा व सन्मार्गवर्ती मनुष्यांस केवळ पितृतुल्य असा प्रत्यक्ष धर्मच अवतरला होता, ज्या राजेंद्रास उदयकाळानंतर लवकरच दुर्दैवराहूनें ग्रासलें, ज्या राजबिंड्यास खर्ड्याचा मोठा जयहि अपजयापेक्षां अधिक खेदास्पद झाला,—या सगळ्या राजपरंपरेची मुळींच आठवण न होतां ज्या गोजिरवाण्या दिसणाऱ्या दुष्ट सर्पानें काळियाप्रमाणें सर्वांचा जीवनहेतु, जो राज्यरूप-डोह त्यास आपल्या विषारानें लवकरच विषमय करून टाकिलें, दुर्जनरूप नक्रांस आंत बिन्हाड दिलें, आणि आपल्या आईचे डाव जे तिच्या जिवंतपणीं तीस घेतां आले नाहींत ते निर्धास्तपणें घेतले—ज्या अधमानें नसते दुराचार आपल्या नगरींत माजवून केवळ विषयांधतेनें पुण्यक्षेत्राचे ठिकाणीं हिंदुधर्मांत अत्यंत घोर मानलेलें जें ब्रह्मवधाचें पातक तेंहि जोडण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं, आपल्या पदरच्या सरदारास अत्यंत नीच अपराध्यास योग्य जें शासन तें देऊन आपल्या डोळ्यांचें पारणें फेडलें, आणि त्यांचा समशेरबहादर भाऊ जेव्हां छातीवर चढून आला तेव्हां भागूबाईप्रमाणें पळ काढला, आणि सरतेशेवटीं ज्यांच्या जीवावर उड्या मारून पंधरा वीस वर्षें राज्यसुख भोगलें त्यांवरच उलटून दीपशलभन्यायानें आपल्याच हातीं आपला व आपल्या प्रजेचा नाश करून घेतला,—त्या राजश्रींचीच मूर्ति मनांत उभी रहाते! असो; वरील पेशव्याचा दुर्लौकिक विशेष

---

१. वरील उल्लेखाचें आमच्या वाचकांस बहुधा आश्चर्य वाटेल, व ही उगीच निराधार प्रौढी झोकली आहे असा आरोप घेण्यासहि आमचे प्रतिपक्षी चुकणार नाहींत. यास्तव प्रमाण दाखल केलें पाहिजे. तें हें पहा—

"The ravages of the Persians were confined to Hindustan, and their departure was hastened by fear of the Mahrattas, then ably ruled by Bajee Rao, the second Peishwa."——*Martin's British India.* p. 6.

दुसरें—

"If Bajee Rao had been near Delhi when Nadir Shah arrived, it is not improbable that he would have joined the emperor in the defence of the empire; and could he have done so, or the Mahratta troops have been employed as auxiliaries, Nadir Shah's invasion would probably have had a very different conclusion.——*Taylor's Manual*, p. 381.

स्पष्टतेनें दिसण्यास दुसरें आणखी असें कारण झालें आहे कीं, त्याची सत्ता त्याच्या मागें ज्या राज्यकर्त्यांच्या हातीं आली, त्यांचें शहाणपण, नीति, शौर्य, व्यवस्थितपणा वगैरे गुण सर्वांच्या प्रत्ययास येऊन दोहों राज्यरीतींतील जमीन अस्मानची तफावत सर्वांच्या नजरेस आली. तर या दोन कारणांवरून बाजीराव ह्मणजे मूर्खांतला मूर्ख, त्याच्या अंगीं बिलकूल कर्तृत्व नव्हतें, असा एकंदर लोकांचा समज होऊन गेला आहे. पण ही मोठी चूक आहे. सदरील पेशव्याच्या अंगीं त्याच्या पूर्वजांचे शौर्यादि गुण तर नव्हतेच; पण दोहोंची त्याच्या अंगीं मोठी परिपूर्णता होती. एक आंतल्या आंत लावालावी करून कपटोपक्रम रचण्याचा आणि दुसरा आपल्या बोलण्यानें दुसऱ्यास अगदीं मोहून टाकण्याचा. या दोन्ही गुणांचा क्रम जें दहा वीस वर्षें त्यानें राज्य केलें त्या सर्व काळभर सतत चालला होता. त्यास गादी मिळाली व ती त्यानें घालविली हें तरी वरील दोहोंचेंच फळ. नानाफडनवीसानें धाकट्या माधवरावाशीं प्रतिस्पर्धा करणारा कोणी नसावा या हेतूनें बाजीराव व त्याचा धाकटा भाऊ यांस राज्योपयोगी शिक्षण मुळींच न देतां केवळ वैदिक कर्मांतच त्यांस निपुण करून ठेवलें होतें; व त्यांची आई निवर्तल्यापासून त्यांवर मोठा सक्त पहारा ठेवला होता. पण तशा अडचणींतहि वरील दोन्ही गुणांच्या योगानें बाजीरावानें पेशव्याशीं संधान बांधलें. पुढें तें सर्व बेंड बाहेर पडून पेशव्याच्या, नानाच्या, व एकंदर राज्याच्या नाशास कसें कारण झालें तें सर्वांस माहीत आहेच; पण वरील गुप्त पत्रव्यवहारापासून बाजीरावास एक मोठी गोष्ट साध्य झाली ती ही कीं, त्याच्या पुतण्यानें आपला अधिकार आपल्या पश्चात् त्यास असावा असें लिहून ठेवलें. तें छपवण्याचा नानानें पुष्कळ उद्योग केला; पण तो सिद्धीस न जातां व्हावयाचें तें झालेंच. बाजीरावानें शिंद्यास अनुकूल करून घेऊन आपणास गादीचा मालक करून घेतलें. असो; तर याप्रमाणें शेवटल्या पेशव्यानें पेशवाई मिळविली तीच मूळारंभीं प्रस्तुत गुणाच्या बळावर. हा गुण आणखीहि दोन तीन प्रसंगीं त्यानें दाखविला. पण त्याचें वर्णन करण्यास कोणत्याहि महाराष्ट्रवासी जनास उत्साह वाटणार नाहीं. कारण त्या गुणाचा उपयोग मागें सांगितल्यासारखा कीर्तिदायक प्रसंगीं न होतां केवळ नीच कृत्यांच्या संबंधानेंच तो झाला. तरी कसेंहि असलें तरी तो गुण वर्णनीय होता यांत संशय नाहीं. असो; आतां ते प्रसंग सांगतों. एक तर, नाना फडणवीस एवढा चाणाक्ष व धूर्त असतां व साडेतीन शहाण्यांत मोडत असतां, सदरहू पेशव्यानें त्यास दोनदां फसविलें. तें असें कीं, त्यास पकडून कैद करण्याची आंतून मसलत चालली असतां आपली त्यावर अत्यंत भक्ति आहे असें त्यास आपल्या गोड बोलण्यानें व मोठ्या नाटकी अविर्भावानें भासवून दिलें. तें सर्व त्यास खरें वाटून बाजीरावाचें अंतःकरण आपणाविषयीं शुद्ध आहे अशा भ्रमांत तो दोनदां पडला. त्याप्रमाणेंच

अगदीं शेवटीं इंग्रजांशीं लढण्याची तयारी सपाट्यानें चालली असतां माहुली येथें सर जान मालकम साहेबाशीं जें बाजीरावाचें बोलणें झालें त्यांतहि त्यानें वरील साहेबावर अशी छाप ठेवून दिली कीं, कंपनी सरकाराविषयीं याच्या मनांत मोठा स्नेहभाव वागत आहे अशी त्याची पक्की खात्री झाली; आणि त्यानें कलकत्त्यास लिहून धाडलें कीं, पेंढाऱ्यांच्या लढाईत आपणास पेशव्यापासून उत्कृष्ट तऱ्हेची मदत मिळेल. या मदतीचा प्रकार मालकम साहेबास लवकरच पुढें कळून आला असेल! असो; तिसरा प्रसंग गंगाधर शास्त्र्याचा. त्या भोळसर ब्राह्मणास पेशव्यापासून व त्रिंबकजी डेंगळ्यापासून दूर रहाण्याविषयीं पुष्कळ सांगत होते; तरी दोघांच्या मानभावी बोलण्यास भुलून तो कालपाशाकृष्ट होत्साता त्यांबरोबर पंढरपुरास निघाला. तेथे पोंचल्यावर तर त्यांच्या आदरसत्कारानें तो जो कांहीं चढून गेला तो कांहीं विचारूं नये. कंपनी सरकारचें अभयवचन त्यास सुदर्शनासारखें वाटून मारेकऱ्यांच्या तरवारीहि आपल्या अंगास लागणारच नाहींत असें त्यास वाटलें कीं काय न कळे! असो; तर याप्रमाणें ज्या सरस्वतीप्रसादानें ब्राह्मण बादशाहीचा पाया घालून पहिल्या पेशव्यांच्या कीर्तीस अधिक उज्वल केलें तोच शेवटल्याच्या अपकीर्तीस मलिनतर करून वरील राज्यरूप इमारतीस धुळीस मिळवून टाकण्यास सरतेशेवटीं कारण झाला!

कीर्तनसुखार्थ झाला अवताराचि अमृतराय जीवाचा।
भलत्या मुखांतुनि अशी सुरसखनि निघेल काय जी वाचा॥

सन्मणिमाला.

अंक २०–(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) हिंदु धर्माचें उज्जीवन. (३) धर्मव्याख्यान. (४) आमच्या देशाचा अध्यात्म विचारांकडे कल. (५) इकडे सुरू झालेला एक नवा प्रकार. (६) त्याची प्रवृत्ति व मराठ्यांच्या उदयाशीं त्याचा संबंध. (७) 'कीर्तन' शब्दाचा अर्थ, व मूळ प्रकार. (८) तो सध्यांच्या स्थितीस येऊन पोंचण्याचा क्रम. (९) या गुणांत नामांकितपणा पावलेले लोक. (१०) राष्ट्राचें व भाषेचें झालेलें हित.

१. मागील खेपेस महाराष्ट्र देशांत राजकारणाच्या संबंधानें वक्तृत्व उदयास आल्याचा प्रकार सांगितला. आतां त्याच गुणांचा वरच्याहून फार भिन्न रीतीनें जो आविर्भाव झाला—कीं जो अद्यापहि दृष्टीस पडतो—त्याजविषयीं लिहूं.

२. मागें सांगितलेंच आहे कीं, मराठ्यांची सत्ता या देशांत चोहोंकडे पसरल्यामुळें एक मोठी गोष्ट ही झाली कीं, परराष्ट्रांच्या तडाक्यापुढें हिंदूंचा टिकाव न निघून ते अगदीं क्षुद्रत्वास जाऊन पोंचण्याचा किंवा त्यांचें भिन्नत्व नष्ट होण्याचा जो समय येऊं लागला होता तो अगदीं टळला, परमुलखांतून येऊन ज्या ज्या लोकांनीं हिंदुस्थानांत ठाणीं घातलीं होतीं व हिंदूंस तृणवत् मानून त्यांवर निर्घास्तपणें जुलूम

चालवला होता त्या सर्वांचा वरील लोकांनीं चांगला समाचार घेतला. त्यामुळें हिंदूंची स्वतःविषयींची क्षुद्रत्वबुद्धि व त्यांविषयीं परक्यांचा तिरस्कार हीं दोन्ही तेव्हांच नाहींशीं झालीं. 'हिंदु' या नांवास हल्लींप्रमाणें तेव्हां जो अगदीं हलकेपणा आला होता तो जाऊन त्यास राज्यवैभवामुळें मोठें गौरव प्राप्त झालें. असें झालें असतां आमच्या धर्मासहि पहिल्याहून विशेष मान प्राप्त झाला हें उघडच आहे. ज्या मुसलमानी धर्मानें हल्लींच्या त्याच्या वडील भावाप्रमाणें येथील धर्माचा समूळ उच्छेद करण्याकरितां कंबर बांधली होती तोच पुढें हळू हळू त्याशीं मित्रत्वानें रहाण्यास खुषी झाला; व कोठें कोठें तर स्वतःचा पराभवहि त्यास मुकाट्यानें सहन करावा लागला. असो; तर याप्रमाणें परधर्माचा पाय मागें हटून हिंदुधर्माचें पुनः सर्वत्र संजीवन झालें. हें होण्यास वरील कारणाखेरीज दुसरी एक मोठीच गोष्ट कारणभूत झाली. ती प्रस्तुत अंकाचा विषय होय.

३. वक्त्यांच्या व्याख्यानास आधारभूत जे अनेक मोठमोठे विषय आहेत त्यांपैकींच धर्म हा एक होय. किंबहुना यांचेंच प्राधान्य सर्वांवर आहे असें झटलें असतां चालेल. कां कीं, ज्या देशांत वकील किंवा बारिस्टर हे शब्द कोणास माहीत नाहींत; व राजकारणाच्या संबंधानें किंवा देशाभिमानाच्या स्फूर्तीनें कोणीं आपलें वक्तृत्व प्रगट केलेलें कधीं ऐकूं येत नाहीं, अशा देशांतून धर्मव्याख्यान मात्र निरनिराळ्या रूपांनीं सतत चालू असलेलें दृष्टीस पडतें. त्यांतून सर्व राष्ट्रांच्या पूर्वस्थितींत तर वरील प्रकार विशेषच आढळून येतो. याचें कारण उघडच आहे. राष्ट्रांची आद्यस्थिति ह्मणजे मनुष्याच्या आद्यस्थितीसारखी होय. ह्मणजे लहानपणीं, किंबहुना पूर्ववयांतहि, कुतूहल जसें सतत जागृत असतें, ह्मणजे जी जी वस्तु पहावी तिची मौजच वाटून नव्या नव्या गोष्टींचा शोध करण्याकडे मनाची साहाजिक प्रवृत्ति असते; त्याप्रमाणें जें राष्ट्र बाल्यावस्थेंत असतें, किंवा ती दशा संपून वरच्या स्थितीस नुकतें येऊं लागलें असतें, त्यास सृष्टीची जी आश्चर्यमय राहाटी आज अनंतकाल चालली आहे, व समुद्र, पर्वत, नद्या, सूर्य, चंद्र, पर्जन्य, विद्युत् इत्यादि सहस्रावधि महाभूतांचे जे खेळ तींत चालले आहेत, ते पाहून मोठा चमत्कार वाटतो. एखाद्या गांवढळ मनुष्यास मोठ्या पदार्थसंग्रहालयांत सोडून देऊन त्याची मुक्तपणें मौज पहायास बसलें असतां त्याचें ज्या त्या पदार्थाविषयीं जसें चोज व कौतुक दृष्टीस पडेल त्यासारखीच अज्ञान राष्ट्रांतील लोकांची स्थिति होय. सज्ञान राष्ट्रांस पदार्थविज्ञानादि अनेक शास्त्रांची माहिती होऊन सृष्ट पदार्थांविषयीं बरेंच यथार्थ ज्ञान झालें असल्यामुळें त्यांची जिज्ञासा जशी तृप्त झाली असते तशी वरील लोकांची झाली नसल्यामुळें जो जो सृष्टींतील पदार्थ पहावा त्याच्या विचारांत त्यांची अप्रौढ बुद्धि अगदीं गुंग

होऊन जाते. त्यांस कसलाच कांहीं थांग लागत नाहीं.[1] पण वरील गोष्ट केवळ बाह्य सृष्टीचीच झाली. अंतःसृष्टि जी आहे—ह्मणजे पिंडास आणि ब्रह्मांडास चालवणारीं तत्वें आणि त्यांचे व्यापार, यांविषयीं तर कांहीं बोलूंच नये! बाह्यसृष्टीविषयीं पुष्कळ सतत विचार करून मोठमोठ्या पंडितांनीं अनेक गहन शोध आजपर्यंत कांहीं तरी लावले आहेत; पण या दुसऱ्या सृष्टींतली एकहि निश्चित गोष्ट आपणांस आजपर्यंत कळली आहे असें ह्मणण्यास कठिण पडेल. शरीरचालक जो आत्मा व विश्वचालक परमात्मा यांच्या स्वरूपाविषयीं फार प्राचीन काळापासून मोठमोठे ज्ञाते विचार करीत आले, पण त्यांचा निश्चय ह्मणून कोणत्याच गोष्टींविषयीं बिलकुल झाला नाहीं. मनुष्याची मरणोत्तर काय स्थिति होते, त्याचें जनन होतें तें तरी कसें होतें—ह्मणजे चित् आणि जड यांचे धर्म परस्पर एवढे भिन्न असतां त्यांचा संयोग कसा होतो,—मनुष्याची पूर्वावस्था काय असते, त्यास निर्माण करण्याचा हेतु काय, त्यास इहलोकीं जें सुखदुःख प्राप्त होतें तें कशामुळें, वगैरे शतशः गोष्टींविषयीं मनुष्य अद्याप संशयजालांत जशाचा तसाच गुंतून राहिलेला आहे. असो; तर याप्रमाणें राष्ट्रांच्या आद्यावस्थेंत वरील दोन्ही सृष्टींविषयीं मनुष्य केवळ अजाण असून त्या मानानेंच त्याची जिज्ञासाहि अतिशयित जागृत असते. त्यांतून दुसऱ्या सृष्टीविषयीं ज्ञान करून घेण्याची व तिजविषयीं विचार करण्याची तर त्यास विशेषच उत्कंठा असते. कारण एक तर ती अत्यंत अगोचर आहे; आणि जिज्ञासावृत्तीचा असा नियम आहे कीं तिचा विषय जितका गूढ, व तिच्या तृप्तीस जितके विशेष आयास, तितका तिचा जोर अधिक! दुसरें कारण असें कीं, या दुसऱ्या सृष्टीशीं मनुष्याच्या हिताहिताचा जितका निकट संबंध आहे तितका पहिलीशीं नाहीं; कां कीं, पहिलीशीं जो त्याचा संबंध आहे तो केवळ नियतकालिक असून दुसरा संबंध वरच्याहून अगदीं भिन्न आहे. ह्मणजे या दृश्य जगाशीं मनुष्याचा जो संबंध आहे तो केवळ त्याच्या

---

१. मनुष्याच्या मूळ अज्ञानावस्थेंत बाह्य सृष्टीचा व्यापार त्याच्या ज्ञानसंस्कारविरहित मनावर कसा होतो, व जगाच्या नियंत्याची कल्पना त्याच्या हृदयावर कशी ठसते, हें पोप कवीच्या पुढील पद्यावरून लक्षांत येईल—

Lo the poor Indian, whose untutored mind
Sees God in clouds, or hears him in the wind!

प्राचीन आर्य व ग्रीक लोकांनीं सृष्टींतील महाभूतांवर देवतत्वाची कल्पना करून 'मेघां'चा राजा जो इंद्र त्यास मुख्य देव कल्पिला, व त्याविषयींच्या व इतर देवांविषयींच्या त्यांच्या व हिंदु लोकांच्या पुष्कळ कल्पनांचा मेळ बसतो, या गोष्टींची उपपत्ति वरील उक्तीवरून होते. अलीकडे कोणी महापंडितांनीं 'इंद्र' ह्मणजे 'ईश्वर,' 'सूर्य' ह्मणजे 'ईश्वर,' 'वरुण' ह्मणजे 'ईश्वर'च असा जो पांडित्याचा कळस करून दिला आहे त्यांत तथ्य कितपत आहे हें वरील टीपेवरून वाचकांस कळून येईल!

जीविताच्या मर्यादेपर्यंतच शरीरांतील जीवतत्व नष्ट होऊन त्याच्या परमाणूंचा सृष्टीतील तत्त्वांशीं पुनः संयोग होऊं लागला, कीं परस्परांचा संबंध तुटला. त्यापुढें ह्मणजे मरणोत्तर जी त्यास स्थिति प्राप्त होणार ती वरच्यासारखी क्षणिक नसल्यानें तिजविषयींचा विचार त्यास वरच्यापेक्षां अतिशयित महत्वाचा आहे. असो; तर याप्रमाणें परलोकांविषयींचे विचार मनुष्याच्या मनांत येणें अगदीं स्वाभाविक आहे. आणि त्यांतून ज्या राष्ट्रांस असल्या विचारांच्या गहनत्वाचा पूर्ण अनुभव येऊन चुकला नसतो, ह्मणजे असले विचार करण्यास मानवी बुद्धि किती पंगु आहे हें ज्यांस कळलें नसतें, अशांस तर त्यांचा अतिशयच हव्यास असतो. हा हव्यास पुढें अनुभवांतीं जरी पुष्कळ कमी होत जातो, तरी तो अगदीं नाहींसा असा मनुष्याच्या मनांतून कधींच होत नाहीं.

४. वर धर्माच्या संबंधानें जें सांगितलें, कीं त्या विषयावर विचारांची प्रवृत्ति होणें हें मनुष्यास अगदीं स्वाभाविक आहे, तें आमच्या देशास तर विशेष लागू पडतें. अध्यात्म विषयावर या देशांत पूर्वीपासून जितका विचार झाला, व एकंदर लोकांच्या मनाचा तिकडे जितका पूर्ण कल आढळण्यांत येतो, तितका बहुधा पृथ्वीवरील इतर थोड्याच देशांत सांपडेल. याचें कारण काय असेल तें असो; पण कोणी ग्रंथकार वरील वृत्तीची उपपत्ति करतांना या देशांतील उष्ण हवा, जमीनीचा पिकाऊपणा, नदीपर्वतादिकांचें विशालत्व इत्यादि बाह्य सृष्टीवरच सर्वथा निर्वाह करतात, तें आमच्या अल्प बुद्धीस केवळ प्रशस्त वाटत नाहीं. असो; पण वरील वृत्तीचा उद्भव कशांपासूनहि झाला असला, तरी एवढें खरें आहे कीं, तिचा प्रबलपणा या देशांत कांहीं विलक्षण आहे. प्राचीन काळाची गोष्ट तर राहूं द्याच; पण अलीकडे अजूनपर्यंतहि एतद्देशीय लोकांचा कल वरील विषयाकडे मोठाच दृष्टीस पडतो. पहा कीं, कवितेचे विषय इतके नानाविध असतां, व तितक्या निरनिराळ्या प्रकारांनीं ती जगांतील इतर भाषांत आढळत असतां, एतद्देशीय सर्व भाषांत तिचा धर्माच्या व परमार्थाच्या विषयांकडेच विशेष रोंख दृष्टीस पडतो. याप्रमाणेंच वक्तृत्व या शक्तीचा ओघ प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या प्रमाणें येथें ऐहिक विषयांकडे न वळतां केवळ पारलौकिक हिताच्या साधनाकडेच वळला.

५. धर्मविषयक व्याख्यान प्राचीन काळीं कसें होत असे याविषयीं हल्लीं आपणांस कांहीं माहीत नाहीं. तसेंच बंगाल, कर्नाटक वगैरे इतर प्रांतीं वरील प्रकार कसा चालू आहे हेंहि आमच्यानें सांगवत नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं इकडे महाराष्ट्र देशांत गेल्या शेंदोनशें वर्षांत जो एक नवा प्रकार सुरू झाला, किंवा त्यास विशेष स्वरूप प्राप्त होऊन तो मोठ्या प्रगल्भ दशेस येऊन पोंचला, त्याविषयीं मात्र येथें लिहितों.

६. वर कोणत्या प्रकारास अनुलक्षून लिहिलें आहे हें आमच्या सुज्ञ वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलें असलच. हा प्रकार अर्थात् कथा किंवा कीर्तन या नांवानें जो अद्याप प्रसिद्ध आहे तो होय. याची प्रवृत्ति प्रसिद्ध साधु व शिवाजी महाराजांचे गुरु रामदास यांनीं पाडली असें ह्मणतात. ही गोष्ट कितपत खरी आहे हें सांगवत नाहीं; पण एवढें खचीत कीं, वरील स्वामींच्या दिग्विजयी चेल्यानें सगळा हिंदुस्थान दणाणून दिल्यापासून प्रस्तुत प्रकार जरी पूर्वीपासून चालत आलेला असला तरी तेव्हांपासून त्यास विशेष तेज आलें. हिंदु धर्माचा यवनादिकांकडून कित्येक शतकें छळ चालला होता तो मराठ्यांच्या उदयानें बंद झाला हींच गोष्ट अगोदर लहानसान आहे असें नाहीं. त्यांतून तद्धर्मी लोकांचा चोहोंकडे पगडा झाल्यानें वरील ववतृत्व प्रकारास पुष्कळ उत्तेजन आलें असेल हेंहि उघडच आहे. पण मराठ्यांच्या शौर्यानें प्रस्तुत कीर्तनांस जें साह्य झालें तें असें एकपक्षींच केवळ नव्हतें; तर तें उभयपक्षीं सारखेंच झालें. ह्मणजे त्या लोकांच्या वीर्यावर हिंदुधर्माचा बचाव होऊन वरच्यासारख्या अनेक प्रकारांनीं त्याचा पुनः उत्कर्ष जसा झाला; त्याचप्रमाणें कीर्तनादिकेंकरून त्यांच्या शिपाईगिरीसहि पण साह्य झालें. खुद्द शिवाजीसच त्याच्या बापानें ठेवलेला कारभारी दादोजी कोंडदेव याच्या शिक्षणानें व आईच्या[1] घरगुती शिकवण्यानें स्वधर्माच्या रक्षणीं केवढा अभिमान पडला, व आपण शककर्ता होऊन पुरातन काळीं होऊन गेलेल्या राजांप्रमाणें पुनः धर्मसंस्थापनाच करावी या कृतसंकल्पावर त्यानें साऱ्या जन्मभर केवढा प्रचंड उद्योग केला, हें सर्वांस विदित आहेच. तसेंच इकडे होऊन गेलेल्या संतमंडळींत प्रमुख जे रामदास व तुकाराम त्या दोघांविषयीं त्याचे ठायीं किती पूज्यत्वभाव वागत होता हेंहि सर्वप्रसिद्धच आहे.[2] ग्रांट डफ

---

१. शिवाजीच्या आईचें नांव जिजाबाई. हिजवर शिवाजीची अतिशय भक्ति होती. एखाद्या अवघड कामास हात घालायाच्या अगोदर तो मातोश्रीच्या चरणांवर मस्तक ठेवून तिचा आशीर्वाद घेत असे.—येथील कसब्याच्या गणपतीचें देऊळ हिनेंच बांधलें असें सांगतात.

२. रामदासास तर शिवाजीनें आपले गुरु करून त्यांस सगळें राज्य वाहिलें होतें, व हें सुचण्यास आपल्या पदरीं 'भगवा झेंडा' बाळगला होता, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. पण तकारामाचा आणि त्याचा घडलेला प्रसंग सर्वांस माहीत नसेल. तो हा कीं, तुकारामाची योग्यता ऐकून शिवाजीनें त्यास आपल्या भेटीस आणण्याकरितां कारकून, घोडे, अबदागिरी वगैरे मोठा लवाजमा पाठवून दिला. पण तुकारामानें तो तसाच माघारी लावन देऊन सांगितलें कीं, 'आपण रामदासाकडे जावें, मी शूद्र असल्यामुळें उपदेश देण्याचा मला अधिकार नाहीं.' पुढे शिवाजी स्वतः होऊन भेटण्यास आला, आणि पुष्कळ जवाहीर नजराणा ह्मणून त्यानें तुकारामाच्या पुढें ठेवलें. पण तितक्या रत्नांच्या प्रकाशानेहि त्या जन्मविरक्त योग्याचें

(पुढें चालू).

यानें एके ठिकाणीं असेंहि लिहिलें आहे कीं, शिवाजीस कथा ऐकण्याची अतोनात गोडी असल्यामुळें त्यानें केलेले बेत त्यास पुष्कळ वेळां तहकूब ठेवावे लागत; व एके प्रसंगीं तर तुकाराम बावांच्या कीर्तनांत हा आसक्त होऊन राहिला असतां शत्रूंची एक टोळी त्यावर छापा घालण्यास आली. पण तें त्यास अगदीं आयत्या वेळेस कळून येऊन तो तेथून युक्तीनें निसटून गेला. असो; तर याप्रमाणें शिवाजीच्या हृदयांत जन्मतःच जें राजतेज स्फुरत होतें त्याचें धर्माभिमानानें विशेष उद्दीपन झालें. ही वृत्ति त्यानें आपल्या अनुयायांच्या ठायीं, किंबहुना एकंदर राष्ट्रांतहि मोठी बळकट उत्पन्न केली. तिच्यामुळेंच त्यानें रचलेला राज्यव्यूह जरी पुढें मोडून लोकदृष्ट्या अगदीं नाहींसा झाला होता, तरी जसें एखादें जोरदार झाड खची करून टाकलें असतां अधिक जोरानें मात्र फोफावतें, त्याप्रमाणें मराठे हे पहिल्यापेक्षांहि प्रबळ होऊन त्यांनीं अवरंगजेबाची व मस्त झालेल्या मोगलांची लवकरच चांगली खबर घेतली. तर याप्रमाणें हिंदूंचा धर्म आणि त्यांची राजसत्ता यांचा परस्परामुळें उभयतांचाहि उत्कर्ष होत गेला. मराठ्यांचा इतिहास वाचणारांनीं वरील गोष्ट चांगली लक्षांत ठेविली पाहिजे. महंमदी लोकांचा इतिहास जसा वरील गोष्टीशिवाय बिलकूल समजणार नाहीं, त्याप्रमाणेंच इकडील लोकांचा अंमल एवढ्या थोड्या काळांत चोहोंकडे कसा पसरला व यवनांचीं मोठमोठीं राज्यें लयास कशीं गेलीं हेंहि वरील धोरण ठेवल्याखेरीज चांगलें लक्षांत येणार नाहीं.

७. असो; आतां हा कीर्तनाचा प्रकार कसा सुरू झाला, व तो अधिकाधिक पूर्णत्वास कसा पावत गेला; त्यांत वस्ताद कोण कोण होऊन गेले, व त्यापासून देशास उपयोग काय झाला, याविषयीं अनुक्रमानें लिहूं. पहिल्यानें कीर्तनांची प्रवृत्ति. 'कीर्तन' शब्दाचा धात्वर्थ 'यशाची वर्णना करणें' हा होय. यावरून ध्यानांत येईलच कीं, रामकृष्णादि अवतारी पुरुषांच्या पुराणांतून ज्या कथा आहेत त्या निवेदन करून तद्द्वारा ईश्वराचे गुणानुवाद गाणें, यांचें नांव कथा किंवा कीर्तन. पण या अर्थीं वरील शब्द योजलेला संस्कृतांत कोठेंहि सांपडत नाहीं; त्याप्रमाणेंच 'कथा' या शब्दाचाहि मराठींतल्याप्रमाणें मूळ संस्कृतांत अर्थ नाहीं.[१] या शब्दांचा अर्थ अनुक्रमेंकरून 'यशो-

---

चित्त विरघळलें नाहीं. त्यानें त्यांचा उलटा अत्यंत तिरस्कार दाखविला. असो; याच काळीं वामन पंडिताचीहि कवित्वाविषयीं व साधुत्वाविषयीं ख्याति झाली होती; पण शिवाजीचा आणि त्यांचा प्रसंग घडलेला कांहीं ऐकण्यांत नाहीं.

१. वरील शब्द नव्या अर्थानें योजलेले पुढील दोन श्लोकांत आढळतात—

(१) येषां श्रीमद्यशोदासुतपदकमले नास्ति भक्तिर्नराणां
येषामाभीरकन्याप्रियगुणकथनेनानुरक्ता रसज्ञा ।

(पुढें चालू).

वर्णन' आणि 'सांगणें' किंवा 'गोष्ट' इतकाच मूळचा आहे. असो; तेव्हां यावरून प्रस्तुत प्रकार अगदीं अलीकडे सुरू झालेला आहे हें स्पष्ट दिसतें. पण एरवीं पाहिलें असतांहि ही प्रवृत्ति नवीन पडली असावी हें सहज समजेल. कथेचें अगदीं मूळचें रूप, ह्मणजे पौराणिक कथांचें देवळांत वगैरे जमलेल्या श्रोतेमंडळीस नुसतें निरूपण करणें, हें ज्या वेळीं चालू असेल तोहि काळ अर्वाचीनच असला पाहिजे. कारण ज्या वेळेस मूळची संस्कृत भाषा सर्वांस समजत असेल, तेव्हां 'रामायणा'दि ग्रंथ सर्वांस सुबोध असल्यामुळें कथेकऱ्यांची, पुराणिकांची वगैरे गरजच नव्हती हें उघड आहे. तेव्हां संस्कृत भाषा मोडकळीस येऊन तिचे प्राकृत रूपानें जेव्हां अनेक भेद झाले तेव्हांपासून कथापुराणादिकांची रीत पडली असावी. असो; आतां या व्याख्यानविशेषाचें मूळचें रूप कसें असेल व तें हळू हळू बदलत जाऊन सध्यांच्या स्थितीपर्यंत कसें पोंचलें असेल याविषयीं लिहूं.

८. प्रस्तुत धर्मव्याख्यानाचें मूळचें रूप वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, ज्या वेळीं संस्कृत भाषा बुडून प्राकृत व तिच्या देशभेदेंकरून झालेल्या शाखा यांचाच पूर्ण प्रचार झाला तेव्हां पुराणांतील कथांचें लोकसमाजापुढें निरूपण करणें इतकाच अगदीं आरंभींचा प्रकार असावा. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांच्या वेळीं वरील साध्या रूपानेंच कीर्तनाची प्रवृत्ति असे. त्या वेळेस मराठी भाषा तादृश परिपक्वतेस आली नव्हती, चोहोंकडे यवनी अंमल चालू असून एतद्देशीय धर्माचा लोप होत चालला होता, आणि पुढें महाराष्ट्रांतील लोकांस प्रभुत्व प्राप्त झाल्यामुळें जसे अनेक कवि उदयास आले, धर्माचें उज्जीवन झालें, गायनादि कलांचा प्रसार झाला, तसें पूर्वी कांहीं नसल्यामुळें प्रकृत धर्मव्याख्यानास पुढें जसा रंग आला तसा त्या वेळेस बिलकूल नव्हता. तुकारामाविषयीं तर असें सांगतात कीं, त्याची गायनसामग्री झटली ह्मणजे एक काय तो टाळ; त्याखेरीज तो दुसरें कांहीं जवळ बाळगीत नसे. तसेंच कथेंत तो प्रायः आपलेच आधीं केलेले किंवा प्रसंगवशात् तेथल्या तेथेंच केलेले अभंग

येषां श्रीकृष्णलीलाललितगुणकथा सादरौ नैव कर्णौ
धिक् तान् धिक् तान् धिगेतान् कथयति नितरां कीर्तनस्थो मृदंगः ॥
(२) निद्राप्रियो यः खलु कुंभकर्णो
हतः समीके स रघूत्तमेन ।
वैधव्यमापद्यत तस्य कांता
श्रोतुं समायाति कथां पुराणम् ॥

पण हे दोन्ही अगदीं अर्वाचीन आहेत. पहिला श्रीधरस्वामिकृत 'व्रजविहारा'तील होय. हा कवि कोण हें कांहीं माहीत नाहीं; पण अगदीं अलीकडचा असेल यांत संदेह नाहीं. दुसऱ्याचा कर्ता माहीत नाहीं; पण त्याच्या रचनेवरून त्याचें नवनित्व व्यक्त होत आहे.

ह्मणे, आणि त्यांवर व्याख्यान करी. त्याला कीर्तनांचा पहिल्यापासून नाद असल्यामुळें व त्याच्या आधींचे महाराष्ट्रकवि जे मुकुंदराज, ज्ञानेश्वर एकनाथ, नामदेव; आणि कबीर, सुरदास, तुळसीदास, वगैरे हिंदुस्थानी कवि यांची कविता त्याने पुष्कळ वाचली व ऐकली असल्यामुळें तो जातीचा शूद्र होता तरी त्यास पुष्कळ ज्ञान प्राप्त होऊन वक्तृत्वकला त्यास साध्य झाली होती. शिवाय गीता, भागवत, योगवासिष्ठ इत्यादि अध्यात्मविषयक ग्रंथ त्यानें अनधिकारास्तव स्वतः जरी कदाचित् वाचले नसतील, तरी हरदासांच्या वगैरे तोंडून त्यांचें त्यास श्रवण झालें असेलच. हें त्याच्या ग्रंथांवरून दिसतें.[1] असो; तर याप्रमाणें मराठी राज्याचा चोहोंकडे डंका वाजून सध्यां चालू असणारा कथेचा प्रकार सुरू होण्यापूर्वी तो वरील स्थितीस येऊन पोंचला होता. ह्मणजे पुराणांतील एखाद्या कथेचें आख्यान, त्यावर एखाद्या कवीच्या ओंव्या किंवा अभंग असतील तर ते, वेदान्ताचा विषय निघाला असतां ज्ञानेश्वरी विवेकासिंधु वगैरे ग्रंथांतील वचनें, इतक्याच काय त्या तऱ्हा त्या वेळेस असत. पण पुढें लवकरच वामनपंडितानें संस्कृतांतील मोठमोठालीं गणवृत्तें—ज्यांस एकंदर लोक श्लोक ह्मणतात—तीं प्रचारांत आणून त्यांत निरनिराळ्या पौराणिक विषयांवर सुरस काव्यरचना केली. अमृतरायानें कटाव, चूर्णिका वगैरे नवेच छंद निर्माण करून त्यांत कविता केली. शेवटीं सवाई, साकी, दिंडी, पद, हेहि संस्कृतांत नसणारे नवेच प्रकार मराठींत सुरू झाले. मोरोपंतानें आर्यावृत्तांत मोठी प्रौढ, सरस, व शब्दार्थचमत्कारयुक्त कविता करून, व रघुनाथकवीनें संस्कृतांतील महाकाव्यांचा थाट मराठींत उतरून देऊन जनमनोरंजनाचें व कीर्तनास रंग आणण्याचें मोठें साहित्य करून ठेवलें. आणि सरतेशेवटीं रामजोशी यांनीं सर्वजनांस अत्यंत प्रिय जो लावणी छंद त्यास तमासगीरांच्या डफावरून काढून हरदासांच्या मृदंगावर आणून बीभत्स शृंगारास जो उद्दीपक व्हावयाचा त्यासच आपल्या वाक्प्रभावानें श्रोतृजनांच्या हृदयांत वैराग्यवृत्ति बळकट बाणविण्यास साधनीभूत केला. असो; तर याप्रमाणें नामदेव, तुकाराम यांच्या वेळेस ओंव्या आणि अभंग या दोन अगदीं साध्या छंदांतच जी मराठी कविता होती ती

१. तुकारामाचे भगवद्गीतेवर भाषांतररूप अभंग प्रसद्ध आहेत. ते 'गीतार्थबोधिनी' नांवाच्या कांहीं वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या एका ग्रंथांत आहेत. सदरील पुस्तकांत वामनाची समश्लोकी, मोरोपंताची आर्या, कबीराचे दोहोरे, ज्ञानेश्वराच्या ओंव्या, आणि तुकारामाचे अभंग हे प्रत्येक श्लोकाच्या खालीं दाखल केले आहेत. शिवाय प्रस्तुत कवीच्या ग्रंथांतून मूळांत सांगितलेल्या भागवतादि ग्रंथांतील वचनें पुष्कळ भाषांतररूपानें आढळतात. जसें—

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ
मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ॥

तुकारामाचा अभंग—

माझे भक्त गाती जेथें ॥ नारदा मी उभा तेथें ॥

पुढें हळू हळू संस्कृतांतील जुन्या वृत्तांनीं व मराठी कवींनीं जीं कित्येक नवींच काढलीं त्यांनीं अत्यंत सुशोभित झाली. त्यांच्या योगानें कीर्तनास पहिल्यापेक्षां अतिशयित रमणीयत्व व वैचित्र्य आलें हें उघडच आहे. दुसरें असें कीं एतद्देशीय जुन्या विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तींस बहुधा सगळ्या देशभर पुष्कळ उत्तेजन मिळत गेल्यामुळें संस्कृताचा अभ्यास पुष्कळ वाढला, साधारण गृहस्थांसहि थोडी बहुत काव्यव्युत्पत्ति संपादन करणें अवश्य होऊन तसा प्रघातच पडून गेला. असें झालें असतां हरदासांस अर्थात्च संस्कृताचें अंग चांगलें वळकट ठेवणें जरूर पडलें. यास्तव प्राकृत कवितेचा भरणा जवळ बाळगून शिवाय पुराणें, काव्यें, चंपू, सुभाषित, वगैरेचें साहित्यहि त्यांस आवश्यक झालें. यांच्याहि योगानें वरील दोन गुण जे वैचित्र्य व रमणीयत्व ते कीर्तनाच्या ठायीं वरच्याहून हि अधिक वाढले. असो; तर या दोन गोष्टींनीं पहिल्या साध्या कीर्तनांत आणि गेल्या शंभर वर्षांत जी नवी पद्धति पडली तींत इतका फेर पडला. पण वरील दोहोंशिवाय तिसऱ्याहि एका गोष्टीचा येथें उल्लेख केला पाहिजे. ही गोष्ट कथांत तात्कालिक लौकिक वृत्तांतांस उद्देशून बोलणें व नकला करणें हें होय. हें अंग वरील दोहोंप्रमाणेंच अर्वाचीन कीर्तनास नवेंच जडलें; व यामुळें पूर्वोक्त दोन गुणांत आणखीहि अधिक भर पडली. वेदांताचा वगैरे गहन विषय सारखाच चालल्यानें श्रोत्यांस जो कंटाळा यावयाचा तो वरील गोष्टींनीं नाहींसा करण्यास वरील साहित्य चांगलें यांत संशय नाहीं; व मधून मधून असा गंमतीचा विषय निघाल्यानें एकंदर व्याख्यानास वैचित्र्यहि येतें. गेल्या शंभर दीडशें वर्षांत या देशांत चोहोंकडे जी धामधूम चालली होती, व त्यांत महाराष्ट्रांच्या लोकांचा चोहोंकडे जयजयकार होत होता, यामुळें येथील शेंकडों विख्यात वीरांच्या व प्रसिद्ध राजकारणी पुरुषांच्या चमत्कारिक आख्यायिका सर्वांच्या तोंडीं होत्या. त्या अद्यापहि वृद्ध लोकांच्या तोंडून कांहीं कांहीं कानीं पडतात. तर प्रस्तुत व्याख्यानास अलीकडे जें जनमनोरंजकत्व विशेषेंकरून आलें त्यास तिसरें कारण वरील आख्यायिका व लोकव्यवहारांतील विनोदात्मक गोष्टी या होत. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत व्याख्यानप्रकार जो केवळ धर्मशील व विरक्त अशा पुरुषासच रुचण्यासारखा मूळचा होता, तो होतां होतां लहान थोर, विरक्त रक्त, सुज्ञ अज्ञ, अशा सर्व लोकांस मनोरंजनावह झाला.

९. आतां प्रकृत गुणाच्या संबंधानें महाराष्ट्र देशांत कोण कोण मोठ्या लौकिकास चढले तें लिहूं. हा लेख अर्थातच अगदीं संक्षिप्त व अपुरता होईल. कारण एक तर आपल्यांत गत वृत्तांत लिहून ठेवण्याची चाल जशी असावी तशी नाहीं.[1]

१. पेशवाईत व मुसलमानी राज्यांतून दररोजचा वृत्तांत लिहून ठेवणारे अकबरनवीस (पुढें चालू).

आणि दुसरें असें कीं, या प्रांताचा इतिहास ज्या ग्रंथकारानें लिहिला त्यानें मागें आठव्या अंकांत सांगितल्याप्रमाणें अशी अवांतर प्रकारची माहिती ग्रंथविस्तारभयास्तव ह्मणा, अगर न मिळाल्यामुळें ह्मणा, ह्मणण्यासारखी कोणतीच दिली नाहीं. जेवढा संबंध आला तेवढ्यापुरती मात्र कोठें कोठें कांहीं थोडीशी दिली आहे. असो; तर आतां पुढें जें आम्ही लिहितों तें कांहीं ऐकिवावरून व कांहीं कोठें कोठें जें लिहिलेलें आहे त्यावरूनच होय असें वाचकांनीं समजावें.

कीर्तनकारांत पहिला अत्यंत विख्यात ह्मटला ह्मणजे तुकाराम होय. या कवीच्या कथांविषयीं वर लिहिण्यांत आलेंच आहे कीं, शिवाजी राजाची त्यांवर मोठी भक्ति असे. असा वक्ता आणि असा श्रोता असल्यावर कीर्तनाचा रंग काय पुसायाचा आहे! जे प्रस्तुत कवीचे अभंग सध्यां दोन शतकें उलटून गेलीं असतांहि त्याच्या देशबांधवांत लहान थोरांच्या सर्वांच्या तोंडीं आहेत, ज्यांची योग्यता परधर्मी लोकांसहि वाखाणणें भाग पडतें,[1] ते आदि उगमापासून कानीं पडले असतां स्वधर्माभिमानी व रामदासाचा शिष्य जो वरील राज्यकर्ता तो किती तल्लीन होऊन जात असेल व त्याच्या शौर्याचें किती उद्दीपन होत असेल हें सहजच ध्यानांत येणारें आहे! एके प्रसंगीं तर बोवांचा संसाराच्या मिथ्यत्वाविषयींचा उपदेश शिवाजीच्या

ह्मणून सरकारी कामगार असत हें पुष्कळांस माहीत असेल; व तशींच मोठमोठ्या गोष्टींचीं टिपणें करून ठेवण्याची चालहि मागें पुष्कळांच्या घरोघर होती, हेंहि खरें आह. तरी वरील लेखांकडे आपल्या लोकांचें तादृश लक्ष होतें असें दिसत नाहीं. सध्यां तर अशी स्थिति आली आहे कीं, वाण्याच्या दुकानांतन जिनसांचीं जीं पुडकीं आणावीं तीं सोडून पहातां कधीं कधीं जुने महत्वाचे लेख किंवा शास्त्रीय वगैरे ग्रंथांचीं पृष्ठें हीं केव्हां केव्हां आढळतात! आमच्या देशास आलेल्या भिकारपणाचें व मतिमंदत्वाचें दुसरें कोणतें प्रमाण पाहिजे?

१. माजी डायरेक्टर सर अलेक्झांडर ग्रांटसाहेब यांनीं मुंबईच्या 'एज्युकेशनल रेकर्ड' पत्रांत तुकारामावर एक निबंध लिहिलेला आहे तो आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. सदरील निबंधाचा प्रभाव केवढा झाला याविषयीं मागें एके ठिकाणीं आह्मीं लिहिलेंच आहे. वरील विद्वान् व रसिक साहेबांनें प्रस्तुत कवीचे अभंग छापण्यास २४००० रुपये दिले, व ते अभंग दोन भाग मिळून छापून प्रसिद्ध झाले आहेत, हेंहि पुष्कळांस महशूर असेलच. वरील निबंधांत तुकारामाच्या व एकंदर हिंदुधर्माच्या संबंधानें लिहिलेल्या कांहीं वाक्यांचा आणि गतवर्षी या महिन्याच्या अंकांत दाखल केलेल्या मेकॉलेच्या व मिशनरीच्या महावचनांचा मेळ घातला असतां मोठीच मौज दिसणार आहे! देहूच्या वारकऱ्यांस उपदेश करणाऱ्या खिस्तभक्तांनीं व मेकॉलेसारख्या लेखणबहादरांनीं पुढील वाक्याकडे नजर पुरविली असतां त्यांचें चापल्य बरेंच कमी होईल.

"It must be hard to convince a people who have Tukaram in their mouths of the *intrinsic moral superiority* of the Christian doctrine."

हृदयांत इतका ठसला कीं, त्यानें राज्य सोडून देऊन तो अगदीं विरक्त झाला; तेव्हां त्याची आई जिजाबाई तुकारामाकडे जाऊन तिनें विनविल्यावरून त्यानें शिवाजीस क्षत्रियांच्या धर्मावर व्याख्यान देऊन पुनः ताळ्यावर आणला; अशी गोष्ट 'संतविजय' ग्रंथांत महिपतीनें लिहिली आहे. असो; तुकारामाच्या पुढें दुसरें नांव अमृतरायाचें. हाहि तुकारामासारखाच स्वतः कवि असून वैराग्यशील व तात्कालिक काव्यरचना करणारा होता. मराठी वृत्तांत 'कटाव' ह्मणून जो छंदोभेद आहे त्यांत यानेंच पहिल्यानें कविता केली. सदरील वृत्त वर्णनाच्या प्रसंगास किती उत्कृष्ट आहे व त्यांत प्रस्तुत कवीनें किती बहार करून दिली आहे, हें सर्वांस माहीत असेलच. हा अवरंगाबादचा रहाणारा असून मूळचा मोठा संपन्न असतां यानें पुढें विरक्तता धारण केली. याचा मरणकाल 'नवनीतां'त इ० स० १७५३ असा दिला आहे. त्यावरून पेशवाईची अगदीं भरभराट असतां वरील कवि हयातींत होता असें दिसतें. नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दीत अमृतराय पुण्यास आला होता, व सरकारवाड्यांत त्याची एक कथा झाली, असें ह्मणतात.[1] या कवीचें कीर्तन किती रसाळ होत असेल हें त्याचीं कवनें जीं अद्याप आहेत त्यांवरून व निबंधारंभींच्या पद्यांत मोरोपंतानें त्यास बृहस्पतीचा अवतार असें ह्मटलें आहे यावरून स्पष्ट दिसतें. वरील आर्येंत प्रस्तुत कीर्तनकाराच्या वाणीच्या रसाचें जें वर्णन केलें आहे तें कवीनें स्वतःच्या अनुभवावरून लिहिल्यासारखें दिसत आहे. असो; अमृतरायानें हिंदुस्थानी भाषेंतहि पुष्कळ कविता केली आहे असें ह्मणतात. तिच्या योगानें व गायनाच्या साहित्यानें याच्या वाणीचा रस व कीर्तनाचा रंग हीं विशेषच खुलत असतील. अमृतरायाच्या पुढली असामी सोलापूरकर रामजोशीबोवा. यांच्याविषयींच्या लोक ज्या गोष्टी सांगतात त्यांवरून ही स्वारी मोठी विलक्षण असावी असें दिसतें. हे पहिल्यानें मोठे फकड, रंगेल व फंदी होते; आणि हीं वृत्ति यांच्या शृंगारपर लावण्यांवरून स्पष्ट दिसते. पण पुढें मोरोपंताच्या आर्यांनीं यांची मनोवृत्ति तन्मय करून टाकून परमार्थाकडे ओढली. ती इतकी कीं, जो वाग्विलासाचा भर प्रस्तुत कवीनें असभ्य काव्यरचना करून रंगेल लोकांस अधिकच व्यसननिमग्न करण्याच्या अनुचित कार्याकडे योजिला होता, तोच पुढें जनांचें मन विषयपराङ्मुख करून आपल्या खऱ्या हिताकडे वळविण्यास त्यानें योजला. ज्यानें विषयासक्त होऊन स्त्रियांच्या लावण्याचें व विलासांचें मनोवेधक वर्णन करावें, त्याचेच ठायीं परमार्थाची वृत्ति इतकी दृढ व्हावी कीं, त्यानें विषयसुखाची अनर्थावहता व असारत्व हीं वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या हृदयांवर ठाम उठवून द्यावीं हें सकृद्दर्शनीं विरोधात्मक दिसतें. आणि सामान्य प्राकृत जनांचे ठायीं वरील दोन्ही गोष्टींचा मेळ कधींहि दृष्टीस पडत नाहीं हेंहि खरें. जे एकदां

१. 'नवनीता'स जोडलेलें 'कवीचें वर्णन.'

विषयलंपट होऊन बसले, व ज्यांची चित्तवृत्ति केवळ तदाकार बनून राहिली, त्यांस वैराग्याच्या स्थितीची कधीं कल्पनाहि होत नसते. पण विशाल मनाचे जे असतात त्यांचा प्रकार निराळा. तो वर सांगितलेल्या कवीच्या सारखा असतो. अशीं उदाहरणें आणखीहि कांहीं कवींचीं देतां येतील. भर्तृहरीचीं तीन शतकें आमच्या वाचकांपैकीं बहुधा सर्वांस ऐकून तरी माहीत असतीलच. त्यांतील चमत्कारहि असाच आहे. जो भर्तृहरि 'शृंगारशतकां'त स्त्रियांची एवढी वाखाणणी करतो, तोच पुढें 'वैराग्यशतकां'त त्यांस केवळ तुच्छ मानतो व त्यांचा तिरस्कार करतो. जगन्नाथपंडिताच्या 'भामिनीविलासा'चीहि अशीच गोष्ट आहे. पहिला भाग शृंगारात्मक असतां शेवटल्यांत त्याच्या विरुद्ध विषय आहे. फार तर काय, पण ज्या विलासी पुरुषानें यवनीच्या पायाशीं आपलें सर्वस्व वाहिलें, त्यानेंच आपल्या नातवास 'अश्वघाटी' नामक प्रसिद्ध काव्यांत विरक्तीचा उपदेश करून भक्तिमार्ग सांगितला आहे. पण नवल काय कीं, शृंगार जसा साधला तसाच शांतरसहि वरील काव्यांत उत्कृष्ट उतरला आहे. तेव्हां या सर्व उदाहरणांवरून काय दिसतें कीं, कवीच्या मनांत मानवी प्रकृतीच्या सर्व वृत्तींचा समावेश होऊन साऱ्याच अतिशयित प्रबळ असतात; आणि जिचा ज्या वेळेस पगडा असेल ती त्या समयीं त्यांच्या कृतींत पुरतेपणीं उठते.[1] यास दृष्टांत, कीं ज्याप्रमाणें स्वच्छ तेजस्वी हिऱ्यासमोर जो जो रंग असेल तो तो त्यांत अगदीं पूर्णपणें प्रतिबिंबित होतो!

असो; तर वर सांगितल्याप्रमाणें रामजोशाच्या लावण्यांत शृंगारवर्णन जसें उत्तम आहे, त्याप्रमाणेंच वैराग्यहि हृदयावर ठळठळीत ठसण्यासारखें आहे. या कवीनें कीर्तनांत स्वकृत लावण्यांचा प्रवेश करून दिला हें मागें सांगितलेंच आहे. या गोष्टीवरून[2] व वरील लावण्यांत त्यानें याज्ञिकांवर धर्माचें दंभ माजविणारांवर, वगैरे जो खूप भडिमार करून दिला आहे त्यावरून कवीच्या अंगचा धीटपणा, उद्दामपणा, व आवेश हे सर्व गुण व्यक्त होतात. प्रस्तुत स्वरचित कवनें तो जेव्हां कथेंत ह्मणत असेल तेव्हां सामाजिकांच्या मनावर त्यांचा प्रभाव कांहीं

१. असाच प्रकार मिल्टन कवीचीं दोन लहान काव्यें 'एल आलेग्रो' आणि 'इल पेन सरेसो' नांवाचीं आहेत त्यांमध्यें आहे. एक वाचलें असतां रंगेलपणा आणि दुसरें वाचलें असतां उदासपणा अशा दोन वृत्ति अनुक्रमेंकरून मनांत उभ्या रहातात!

२. कीर्तनांत लावण्या ह्मणण्याबद्दल अद्यापहि लोकांचा ग्रह अगदीं कमी झाला नाहीं. मागें सुमारें दहा वर्षांपूर्वी पन्हळकर ह्मणून एक नामांकित हरदास येथें आले होते. त्यांचें कीर्तन वरील कारणास्तव पुष्कळ असमंजस व अरसिक लोकांस अप्रशस्त वाटे. वरील गोसाव्याजवळ इतर मराठी कवींच्यासारखा रामजोशाच्या लावण्यांचा पुष्कळ भरणा होता. आणि त्या ह्मणण्याची त्याची रीत फारच बहारदार असे. मराठी कवितेची माहिती करून घेऊन तिचा आस्वाद ज्यांस घेणें असेल त्यांनीं वरच्यासारखे प्रसंग कधीं दवडूं नयेत.

विलक्षण होत असेल यांत संदेह नाहीं ! शिवाय तो चतुर वक्ता असल्यामुळें त्याची त्या वेळच्या कीर्तनकारांत मोठीच कीर्ति असेल असें अनुमान होतें. या कीर्तनाच्या संबंधें प्रस्तुत कवीविषयीं अशी एक गोष्ट सांगतात कीं, एका सावकाराचें त्याजकडे पांच सहा हजारांचें येणें असतां तें त्यानें एका कीर्तनाची कबुलायत करून घेऊन सोडून दिलें. याप्रमाणेंच त्याजवर ब्राह्मणांनीं बहिष्कार घातला असतां शंकराचार्यांनीं खुद्द आपण होऊन त्यास पंक्तिपावन करून घेतलें, वगैरे पुष्कळ चमत्कारिक आख्यायिका याविषयीं लोकांच्या सांगण्यांत आहेत.

रामजोशाच्या पुढें लोकप्रसिद्ध हरदास विशेषेंकरून नांव घेण्यासारखे असे एक दोनच आहेत. एक संगमनेरास रहाणारा अनंतफंदी, आणि दुसरे, बाजीरावाचे पुढें जे दिवाण झाले ते माणकेश्वर. यांपैकीं दुसऱ्याविषयींच्या लोकप्रसिद्ध दोन आख्यायिका मागें एका अंकांत सांगितल्याच आहेत. ग्रांट डफ साहेबांनीं आपल्या इतिहासांत वरील ऐतिहासिक पुरुषाविषयीं लिहितांना त्याचें थोडेंसें वृत्त टीपेंत लिहिलें आहे. तीवरून असें समजतें कीं, माणकेश्वर हे मोठे गवय्ये असून शिवाय यांनीं पुष्कळ कवनेंहि केलीं आहेत. त्यांची वरील इतिहासकारानें बरीच प्रशंसा करून तीं जमविण्याविषयीं आपल्या स्वदेशीयांस शिफारस केली आहे. या शिफारशाप्रमाणें आजपर्यंत कांहीं झाल्याचें कोठें समजण्यांत नाहीं; आणि मूळ इतिहासाचीच कोण दुर्दशा झाली हें मनांत आणलें असतां त्यांतील टीपेकडे कोणीं विशेष लक्ष न दिलें याचें मोठेंसें आश्चर्यहि वाटावयास नको ! असो; वरील शिफारस आह्मी आमच्या वाचकांसहि वरील दोघां कीर्तनकारांच्या संबंधानें करतों. ती वरच्यासारखी फुकट न जावो ह्मणजे झालें.[1]

१०. येथवर कीर्तनाच्या स्वरूपाचें वगैरे कथन करून त्या गुणांत प्रख्यातीस आलेल्या मनुष्यांचें कांहीं वर्णन केलें. आतां सरतेशेवटीं या व्याख्यानविशेषापासून एकंदर राष्ट्राच्या व भाषेच्या संबंधानें कोणतीं कार्यें उद्भवलीं याविषयीं विचार करूं. मराठ्यांच्या शौर्याचें उद्दीपन करण्यास व हिंदुधर्माचें उज्जीवन करून त्याचा प्रसार

---

१. दोघांचींहि कवनें प्रयत्न केला असतां मिळण्यासारखीं आहेत. तीं छापून प्रसिद्ध केली असतां तीं संग्रहास ठेवूं इच्छिणारे पुष्कळ लोक सांपडतील असें वाटतें. मौल्स्वर्थच्या कोशांत 'मुरकुंडी' या शब्दाची व्याख्या करतांना "अनंतफंदीच्या कथेवर हजारों माणसांच्या मुरकुंड्या पडतात" असें उदाहरण दिलें आहे. यावरून त्या कालीं [सुमारें १८३०] फंदीच्या कथेची केवढी कीर्ति असेल हें दिसून येतें ! हा कविहि रामजोशासारखाच मोठा फटिंग होता असें ह्मणतात. यानें बाजीरावाच्या शेवटच्या गर्दीचें मोठें मौजेचें वर्णन केलें आहे; आणि बाजीरावाविषयीं भर कथेंत वगैरे बोलावयास तो अगदीं वचकत नसे असें सांगतात.

करण्यास प्रस्तुत कथांचा किती उपयोग झाला हें एक वर सांगण्यांत आलेंच आहे. शिवाय ज्या काळीं सध्यांप्रमाणें चोहोंकडे शाळाशिक्षणाचा क्रम चालू नव्हता, व ग्रंथ-वाचनाच्या आतांप्रमाणें सोयी नसल्यामुळें व्यवहारचातुर्य, रसिकता, बहुश्रुतपणा वगैरे संपादन करण्यास कोणताच मार्ग नव्हता, अशा वेळेस कीर्तनाचा उपयोग वरील संबंधानें मोठाच समजला पाहिजे. हें एक झालें. आतां मराठी भाषेस कथेच्या प्रवृत्तीपासून कोणकोणते फायदे झाले ते पहा. एक तर महाराष्ट्र भाषेंतील कविता कीर्तनामुळें वांचली गेली; ही प्रवृत्ति नसती तर ती सफाई बुडण्याचाच रंग होता. कारण हल्लींप्रमाणें त्या वेळेस छापण्याची सोय नसल्यामुळें पैसा खर्च करून किंवा कोणा मोठ्या मनुष्याचा आश्रय मिळवूनहि ग्रंथाचा अगोदर नुसता प्रसार होण्याची सुद्धां सोय नसे. जें काव्य किंवा जो ग्रंथ खरोखरीच योग्यतेचा असून लोकप्रिय होईल तोच उतरून घेऊन पदरीं बाळगण्याची लोक आस्था धरीत. अशी त्या वेळची स्थिति होती. तेव्हां अशा रीतीनें मराठी कवींचीं काव्यें किती वेळ तगलीं असतीं ? पण कीर्तनकारांस त्यांचें अगत्यच पडल्यामुळें, व जितका मोठा भरणा असेल तितका त्यांस उपयोगी असल्यामुळें, त्यांस वरील कवितेचा संग्रह करावाच लागला. मग त्यांच्या तोंडून प्रस्तुत कवींचीं उत्कृष्ट उत्कृष्ट पद्यें सर्वांच्या कानीं पडल्यामुळें लोकांत त्यांचा प्रसार होऊन श्रीमान् व रसिक गृहस्थांस लेखकांकडून सगळे ग्रंथचे ग्रंथ उतरवून जवळ संग्रहास ठेवण्याची इच्छा झाली. असो; तर याप्रमाणें कवींच्या वित्ताचे संरक्षक हरदास हे झाले, पण इतकेंच नव्हे. या लोकांनीं जुन्या कवींच्या यशोरूप देहाचें जसें रक्षण केलें तसेंच पण पुढच्यांचें पोषण करणारेहि हेच झाले. गेल्या शंभर दोनशें वर्षांत जे वामन, अमृतराय, मोरोपंत, रघुनाथपंडित इत्यादि कवि होऊन गेले त्यांच्या कृतींचा चोहोंकडे आदर होण्यास व प्रसार होण्यास वरील पुरस्कर्त्यांशिवाय दुसरें कोणतेंहि साधन नव्हतें. यांच्या व्याख्यानाच्या द्वारानेंच ते लोकांच्या हृदयांत शिरून तेथें अढळपद पावते झाले. मोरोपंताच्या आर्यांस लोकप्रीतिपात्र करण्यास[1] रामजोशीच कारणभूत झाला ही गोष्ट तर सर्वांस माहीत आहेच. असेच इतर सर्व कवीचेहि कोणी कोणी विशेष चहाते होऊन त्यांच्या परिश्रमानें त्या कवींच्या कीर्तीचा प्रसार झाला असेल

---

१. या कवीच्या वृत्तीचा पालट मोरोपंतांच्या कवितेनें कला. याविषयी मागें लिहिलेंच आहे. कवीचा आणि रसिकाचा परस्पर संबंध सासन्याच्या आणि जांवयाच्या सारखाच बहुतांशीं आहे. याच अर्थास अनुलक्षून वरील दोघांविषयीं कोणीं आर्या केली आहे—

जैशी जनकें दिधली सच्चिद्घन राम जो सिता त्याला ।
तैशी दिधलि मयूरें स्वार्या ती रामजोसितात्याला ॥

यांत संशय नाहीं. असो; तर महाराष्ट्रांत जी आजपर्यंत कविता झाली तिचें रक्षण व प्रसार केल्यामुळें कीर्तनकर्त्यांचा मराठी भाषेवर मोठाच उपकार झाला. दुसरें असें कीं, हरदासास मागें सांगितल्याप्रमाणें संस्कृताचें अध्ययन करणें भाग पडल्यामुळें व कथेंत मोठे प्रौढ शब्द योजावे लागल्यामुळें एतद्देशीय भाषेंत संस्कृत शब्दांची पुष्कळ भर पडून तीस प्रगल्भता व वैचित्र्य हीं प्राप्त झालीं. तसेंच हिंदुस्थानी, फारशी वगैरे शब्दहि मराठी[1] व हिंदुस्थानी कवींनीं केलेली त्या भाषेंतली कविता कथेंत निघाल्यामुळें देशभाषेंत सामील झाले. तर याप्रमाणें प्रस्तुत व्याख्यानाचे योगानें महाराष्ट्र भाषेच्या अभिवृद्धीस साह्य झालें. हा त्यापासून झालेला दुसरा नफा. याखेरीज ऐतिहासिक वृत्तांत प्रकृत प्रसंगीं निघाल्यानें व नकला, विनोद यांचाहि कथेंत समावेश असल्यानें इतिहासाची माहिती एकंदर लोकांस सहज रीतीनें झाल्यासारखी होऊन विनोदात्मक भाषेचीहि सरणी आमच्या भाषेंत क्रमाक्रमानें पडत गेली, अशा आणखीहि कांहीं गोष्टी सांगतां येतील. तर याप्रमाणें एकंदरींत या संप्रदायापासून एकंदर राष्ट्रास व देशभाषेस पुष्कळ उपयोग घडला यांत संदेह नाहीं.

अल्पाक्षररमणीयं यः कथयति निश्चितं स खलु वाग्मी ।
बहुवचनमल्पसारं यः कथयति विप्रलापी सः ॥[2]

अंक २१—(१) प्रकृत विषयाचा तिसरा विभाग. (२) विषयोपक्षेप. (३) वक्तृत्वाची विद्यमान स्थिति. (४) बाल्यावस्था. (५) मागल्या स्थितींत व सध्यांच्यांत अंतर. (६) वक्तृत्वोत्तेजक सभा. (७) त्यांपासून अपेक्षित कार्य. (८) वक्तृत्वादि गुणांचें उत्तेज्यत्व.

१. गेल्या तीन अंकांत प्रस्तुत विषयाचे दोन विभाग आटपले. आतां यांत आमच्या देशांत अलीकडे जो वक्तृत्वाचा नवा प्रकार दृष्टीस पडूं लागला आहे त्याविषयीं लिहूं.

२. हा प्रकार अर्थातच पाश्चात्यजनांच्या संपर्काचें फल होय. या लोकांचें प्रभुत्व आज सुमारें पांचपन्नास वर्षें या साऱ्या देशभर निष्कंटक व सुयंत्र चालल्यामुळें त्यांच्या विद्या, कला वगैरेचा प्रसार चोहोंकडे क्रमाक्रमानें होत गेला, व तसा अद्यापहि चालला आहे. आणि यापुढेंहि वरील प्रसार जर असाच दीर्घकाल होत गेला,

---

१. अमृतरायानें हिंदुस्थानी भाषेंत कविता केली आहे हें मागें सांगितलेंच आहे. तशीच तुकारामानेंहि कांहीं केली आहे. ती मुंबईस नुकत्या छापलेल्या आवृत्तींत घातली आहे.

२. "थोड्याच शब्दांत जो मधुर व निश्चित असें भाषण करतो तो वक्ता ज्यांत अर्थ तर थोडा, पण शब्दविस्तार फार, असें भाषण करणारास विप्रलापी ह्मणजे बडबड करणारा हेंच नांव योग्य !"

तर देशाचें स्वातंत्र्य हरण केल्यानें जी विपत्ति वरील लोकांनीं त्यास आणली आहे तिचें बरेंच विस्मरण पाडण्यासारखे आमच्या लोकांस पुष्कळ लाभ होतील असा सुमार दिसतो. असो; तर लोकसमाजांत उभें राहून तात्कालिक स्फूर्तीनें वादास्पद विषयावर भाषण करणें किंवा अगोदर घरून योजून येऊन एखाद्या नेमलेल्या विषयावर वक्तृत्व करणें, हा अलीकडील प्रकार इंग्रेजी विद्येचा जो सगळ्या हिंदुस्थानभर हल्लीं फैलाव होत चालला आहे त्याच्यामुळें सुरू झालेला आहे. आतां ही नव्या तऱ्हेची वक्तृत्वकला आजला आमच्या देशांत कोणत्या स्थितीस येऊन पोंचली आहे, तिचा उत्कर्ष यापुढें होण्यासारखा आहे कीं नाहीं, हा उत्कर्ष होण्यास साधनें कोणतीं, वगैरे गोष्टींची प्रस्तुत निबंधांत चर्चा करूं.

३. आतां प्रस्तुत कलेच्या विद्यमान स्थितीविषयीं जर विचार केला, तर ती हल्लीं अगदीं बाल्यावस्थेतच आहे असें झटलें पाहिजे. हें झणणें आमच्या वाचकांस बहुधा मोठें चमत्कारास्पद वाटेल. कां तर, आमच्या देशांत हल्लीं वक्तृत्वाविषयीं नामांकित असणारे बरेच पुरुष चोहोंकडे गाजताहेत, जिकडे तिकडे वक्तृत्वाच्या सभांतून वक्त्यांचीं भाषणें दर वर्षी होत आहेत, कोणी रावसाहेब किंवा रावबहादूर यांची अत्तर गुलाबानें संभावना झाली असतां त्यांचें भाषण नेहमीं 'सुरस' 'मनोवेधक' वगैरे झाल्याचा गांवोगांवच्या वर्तमानपत्रांतून नेहमीं पुकार होतच असतो;—मग इतकें असूनहि वक्तृत्वाची बाल्यावस्थाच! असा आमच्या वाचकांस फार करून अचंबा वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. पण वक्तृत्वाचें वास्तविक स्वरूप काय, व तें वर सांगितलेल्या लोकांच्या ठायीं कितपत आढळेल, याविषयीं जो मार्मिकपणें विचार करील त्यास प्रकृत विषयाविषयीं बिलकूल संशय उरणार नाहीं. हल्लीं वक्तृत्वाच्या संबंधानें ज्यांची चोहोंकडे थोडीबहुत प्रसिद्धि आहे, त्यांचे अंगीं प्रस्तुत गुण वस्तुतः पहातां किती वसत आहे याविषयीं प्रस्तुत अंकांत जें आह्मीं कांहीं विवरण करूं त्यावरून, व पुढील अंकांत वक्त्यांस आवश्यक गुण कोणकोणते ते जे सांगण्यांत येतील, त्यांवरून सांप्रत काळच्या वक्तृत्वाची यथार्थ परीक्षा करण्यास आमच्या वाचकांस विशेष अडचण पडणार नाहीं, असें वाटतें. प्रस्तुत स्थलीं वरील उल्लेखाचीं इतर जीं कांहीं उघड दिसण्यासारखीं कारणें आहेत तीं दाखल करतों.

४. प्रस्तुत गुण हल्लींच्या काळीं आमच्या देशांत कितीसा असण्याचा संभव आहे याचाच नुसता जो अगोदर विचार करील त्यास कळून येणारें आहे कीं, सांप्रतची स्थिति त्याच्या उत्पत्तीस व वास्तव्यास अत्यंत प्रतिकूल आहे. मागील दोन निबंधांत दाखविल्याप्रमाणें राजदरबार किंवा देवालय हींच वक्तृत्वाचा प्रकाश होण्याचीं दोन मुख्य स्थानें होत. मग असें जर आहे तर हल्लींच्या देशस्थितींत

वक्तृत्वाचा उदय कसा व्हावा ? आमच्या देशचा राज्यकारभार आमच्या हातीं किती आहे हें कोणालाहि सांगायाला नकोच;—आमच्या हातांत एक मात्र मोठें साधन सरकारानें ठेविलें आहे, तें आरडाओरड करणें इतकेंच काय तें होय ! हें एक झालें. दुसरा विषय धर्माचा. यासंबंधानेंहि मागील काळांत व आजच्या स्थितींत किती फरक आहे तो सर्वांस दिसतोच आहे. इंग्रेजी विद्येचा फैलाव होऊन नव्या ज्ञानाचा व कल्पनांचा चोहोंकडे प्रसार होत गेल्यानें, व ख्रिस्ती धर्माच्या निरनिराळ्या शाखा, शिवाय ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्याला सोधणारी मंडळी, देवाचा शोध लावणारी मंडळी, अशा शेंकडों नव्या नव्या पंथांनीं लोकांच्या मनाचें शतशः विदारण होऊन इसापनीतींतील शंभर युक्तीवाल्या कोल्ह्याप्रमाणें त्याची अवस्था होऊन गेली आहे. त्याच गोष्टींतील एकच युक्ति माहीत असणाऱ्या मांजराप्रमाणें यापूर्वी जी या देशाची व पृथ्वीवरील इतर देशांचीहि स्थिति होती तीच पुष्कळ अंशीं बरी असून प्रस्तुत गुणाच्या अभिवृद्धीस चांगली अनुकूल होती. असो; तर याप्रमाणें वरील दोन्ही मोठमोठ्या विषयांस आपण अगदीं मुकलों आहों. आतां वरच्या खेरीज दुसरे जे विद्येसंबंधीं विषय किंवा देशस्थितीच्या वगैरे संबंधें बोलणें, लोकांचा देशाभिमान जागृत करणें, हें आपणास अनुकूल आहे खरें; पण हे विषय अगदीं नवे निघाले असल्यामुळें लोकांस अद्याप पुरते समजूंहि लागले नाहींत. तसें होऊन वक्त्याच्या व श्रोत्यांच्या हृदयांत ते पूर्णपणें बिंबण्यास अद्याप बराच काळ लोटला पाहिजे. तर हल्लींच्या काळीं विषयांचा अभाव हें एक प्रस्तुत गुणास प्रतिबंधक आहे. हें एक झालें. दुसरें असें आहे कीं, वक्तृत्व हा गुण कांहीं सामान्य नव्हे. इतर सर्व मोठमोठ्या गुणांप्रमाणें हाहि फार विरळ मनुष्यांत सांपडतो. शिवाय तो मूळचा अंगांत असून त्यास इतर जीं कित्येक साधनें लागतात त्या सर्वांच्या योगानें त्याचा कोणा मनुष्याचे ठायीं पूर्ण विकास होणें हें मोठेंच दुरापास्त आहे यांत संशय नाहीं. डिमॉस्थेनीसास प्रस्तुत गुणाची अत्यंत परिपूर्णता आपले ठायीं करून घेण्यास केवढा खटाटोप करावा लागला तें मागें अठराव्या अंकांत लिहिलेंच आहे; आणि आजपर्यंत ज्यांची प्रकृत गुणाच्या संबंधानें मोठी ख्याति झाली त्या सर्वांस वरच्यासारखेच अतिशयित श्रम करावे लागले. असो; मग असें जर आहे, तर ज्या आमच्या लोकांस वक्तृत्व ह्मणजे काय हें नुकतें कोठेंसें कढूं मात्र लागलें आहे त्यांच्यांत तो गुण हल्लीं कोणत्या पायरीला येऊन पोंचला असेल, व त्याची परीक्षा करणारे जे एकंदर लोक त्यांचे ठायीं त्याविषयींची अभिज्ञता कितपत आली असेल हें सहजच दिसण्यासारखें आहे. पण हल्लींच्या आमच्या लोकांची ही एक मोठी मौज आहे कीं, 'बाळमित्रां'तील महत्वाकांक्षी मुलांप्रमाणें त्यांस मोठेपणाचा आव घालण्याची मोठी हौस वाटते; कशास कांहीं ठिकाण नसतांहि आपल्या अंगचीं

योग्यता जी त्यांस कांहीं वाटत असते ती अतोनात! अलीकडे तीन चार वर्षांत तर जिकडे तिकडे अशी विलक्षण गडबड होऊन गेली आहे कीं, ज्याला त्याला असें वाटूं लागलें आहे कीं, हा आमचा देश एकदांचा परमोत्कर्षाच्या स्थितीस येऊन पोंचतो कसा! मग काय, कोणीं कलाकौशल्य हातीं घेतलें, कोणीं धर्माची सुधारणा करण्याचें पतकरलें, कोणीं नवे माग तयार करून म्यांचेस्टरबरोबर टक्कर मारण्याकरितां कंबर बांधली, कोणीं पाहिलें कीं, इंग्लंडची जी एवढी सुधारणा झाली आहे ती केवळ वक्तृत्वामुळें झाली आहे, तेव्हां 'वक्त्यांचे वर्ग' सुरू करूं या![1] याप्रमाणें देशसुधारणुकेच्या एकेक खांबानें एकेक काम तेव्हांच पतकरलें; पण तें होणें शक्य तरी आहे कीं नाहीं, किंवा निदान आपलें सामर्थ्य तरी कितपत आहे, याचा विचार एकानेंहि क्षणमात्र सुद्धां केला नाहीं. असें असल्यावर वरील सर्व कामाची जी स्थिति आज दृष्टीस पडत आहे तशी असल्यास नवल काय! दरवाज्याच्या फळीवर नांव काय--'कौशल्यशिक्षक मंडळी'! आणि आंत जाऊन पहावें तों वरील नांवाच्या अक्षरांच्या निम्यानेंहि आंत शिकणारी मंडळी नाहीं; आणि एवढें कौशल्य तरी कोणतें म्हणाल तर ज्यास तें नांव देणें वरील मंडळीशिवाय कोणासहि समंजस वाटणार नाहीं. वरील मंडळीच्या शेजारींच दुसरी एक मंडळी आहे. पहिलीचा उद्देश जसा लोकांचें ऐहिक हित करण्याचा आहे तसा दुसरीचा लोकांस स्वर्गाचें दार मोकळें करून देण्याचा आहे. या मंडळीच्या शाखा आमच्या देशांत बऱ्याच ठिकाणीं पसरलेल्या आहेत; आणि या भक्तमंडळीची अशी उमेद आहे कीं, यापुढें साऱ्या पृथ्वीवर जर एखादा धर्म पसरणें असेल तर तो आमचाच पसरेल यांत संशय नाहीं. हें यांचें भाकीत पुढें कितपतसें प्रचीतीस येईल तें येवो; पण वरील मंडळीची सध्यांची जर स्थिति पाहिली, तर इतर लोकांत व यांच्यांत कोणत्याहि संबंधें लवमात्रहि फरक नजरेस येईल असें आह्मांस वाटत नाहीं. मनुष्यमात्रांत संचार करणाऱ्या सहा रिपूंचें प्राबल्य इतरांत जसें आढळतें त्याहून वरच्या सद्धर्मपालक मंडळींत कमी

---

१. ही अत्यंत सयुक्तिक कल्पना देशकल्याणाच्या कामांत, वक्तृत्वांत, व शहाणपणांत आपणास पुढारी मानणाऱ्या अशा येथील एका गृहस्थाची आहे. वरील 'वर्ग' स्थापन करून देशकल्याण केल्याचें श्रेय घेण्याविषयीं त्यानें कित्येकांस सांगून पाहिलें; पण त्याचा उपदेश त्यांपैकीं कोणाच्याहि हृदयांत यथास्थित न उतरल्यामुळें त्याची मनीषा अद्याप पूर्ण झाली नाहा. ती परमेश्वरकृपेनें कधीं सिद्धीस जाईल ती जावो! एका नकल्या गृहस्थानें तर वरील पंडितांच्या तोंडून वक्तृत्वाचें माहात्म्य वरचेवर ऐकण्यास कंटाळून येथील 'ज्ञानप्रकाशां'त हालोवेच्या गोळ्यांच्या धाटणीवर एक पत्र लिहून त्यांचा स्पष्टपणें उपहासच केला. तो आमचे येथील वाचक तरी निदान विसरून गेले नसतील असें वाटतें. असो; एकंदरींत वरील गोष्टी सदर्हू गृहस्थाच्या वक्तृत्वाविकारावर बरीच शामक झाली!

आढळतें असें नाहीं; किंवा वरील मंडळींत कोणी मूळचा दुष्ट असतां डोळे मिटल्यानें, गायन केल्यानें, किंवा जगाची पापमग्नता पाहून मोठ्या सद्गदित अंतःकरणानें प्रसंगविशेषीं अश्रु ढाळल्यानें मोठा सज्जन झाला असेंहि पण थोडेंच आढळेल. याप्रमाणेंच इतरहि सर्व लौकिक कृत्यांची स्थिति आहे. कोणतेंहि काम ह्मणजे आह्मीं हातीं घेतलें, आणि त्यांत आमची फजिती झाली नाहीं, असें एकहि आढळणार नाहीं. पण आमची धांव केवढी! लूथरानें युरोपांत धर्मक्रांति केली, त्याप्रमाणें इकडे नवा धर्म उत्पन्न करावयाचा; तिकडे मोठमोठ्या व्यापाराच्या मंडळ्या आहेत तोच मासला इकडे उचलून देशाची नष्ट झालेली संपत्ति पुनः माघारी आणायाची; युरोपांत तीन मोठमोठ्या कवींनीं आपआपल्या भाषेंत जगप्रसिद्ध अशीं वीररसप्रधान काव्यें रचून अक्षय भूषण आणलें, तसाच प्रकार इकडे मराठींत उतरून द्यावयाचा; फार तर काय, पण ज्या आह्मांस मोठमोठ्या प्रचंड विद्वानांपासून तो अगदीं शाळेंतील मुलांपर्यंत महिन्यापंधरा दिवसांनीं भरणारी सभा किंवा मासिक त्रैमासिक वगैरे पुस्तक हेंहि सतत चालविण्याचें सामर्थ्य नाहीं, खाजगी शाळा घातल्या तर त्यांत पहिल्या प्रतीची अंदाधुंदी, ज्या आह्मांस धर्मविषयक वादानें दुफळी पडली असतां, सरकारच्या घरापर्यंत तें भांडण गेल्याखेरीज तंटा मिटतच नाहीं, वक्तृत्वोत्तेजक सभेसारखा छोटासा समारंभ,—पण तोहि चार वर्षें सुरळीत चालून सर्वांस अचंबा जों वाटूं लागतो आहे तोंच त्यास दृष्ट पडून पांचव्या वर्षीं असा जबरदस्त कहर उसळावा कीं, सभेच्या पुनर्जन्माचीच वेळ आलीशी सर्वांस वाटावी, आणि चार दिवसांत चार बेत होऊन बखेडा कोणासहि मोडतां येऊं नये—तेच आह्मी लोक खुद्द ऐरिश व स्कॉच यांसहि मोठ्या मिनतवारीनें जो प्राप्त झाला, व अमेरिकन लोकांनीं युद्ध करण्यास कंबरा बांधल्या असतांहि जो त्यांस प्राप्त झाला नाहीं, तो पार्लमेंट सभेंत बसण्याचा हक्क मागतों; तेव्हां आमची केवढी बरें बहादुरी! असो; एकंदरींत आपलें बळाबळ न जाणतां हव्या त्या अचाट उद्योगास हात घालण्याची जी विलक्षण हौस आपल्या अलीकडच्या लोकांत दृष्टीस पडते तिजपासून देशाचें फार नुकसान होत आहे. तें असें कीं, एक तर देशाची अपकीर्ति होऊन आरंभशूरपणा, कोती बुद्धि, कमनिश्चयीपणा, वगैरे आपले गुण मात्र चोहोंकडे प्रसिद्ध होताहेत; व त्यामुळें आमचें स्वतःचेंच धैर्य खचून पुढें कोणतेंहि कार्य हातीं घेण्याविषयीं मनास तादृश उत्साह वाटत नाहीं. दुसरें असें कीं, वरच्यासारख्या दुर्घट कार्याकडेच लोकांची बुद्धि खर्चली गेल्यामुळें होण्यासारखे जे दुसरे उद्योग आहेत तेहि घडत नाहींत. तर याप्रमाणें मोठाली कामें आमच्या दुर्बळपणानें आह्मांस झेंपत नाहींत, आणि जीं वरच्याहून लहान पण होण्यासारखीं आहेत तीं आमच्या अहंपणामुळें आह्मांस तुच्छ वाटून आह्मी तिरस्कारानें लोटून देतों!

आमच्या देशाचें सर्व प्रकारें हित करून त्यास सुधारणुकेच्या मार्गास लावण्याचें काम ज्यांनीं पतकरलें आहे, किंवा निदान लौकिकांत तसा आव तरी जे घालतात, त्यांची इतर गोष्टीच्या संबंधानें जी वर स्थिति सांगितली आहे तीच प्रस्तुत विषयाविषयींहि लागू पडते. ह्मणजे येथील वक्त्यांच्या डौलांत किंवा त्यांच्या अनभिज्ञ श्रोत्यांच्या वाखाणणींत जरी कांहीं कमी नाहीं, तरी दुसऱ्या प्रत्येक गोष्टीच्या संबंधें आमची सध्यांची स्थिति जशी निकृष्टतेची आहे तशीच या संबंधेंहि ती वस्तुतः पहातां आहे. ह्मणजे युरोपांतील देशाभिमानी पुरुषांत आणि येथच्यांत[1] जितकें अंतर, तिकडील कलाकौशल्याच्या सभांत आणि इकडील वर सांगितलेल्या सारख्या कौशल्यशिक्षण मंडळींत जी तफावत, तिकडील लूथर आणि इकडचे नुकते पुण्यांत गाजलेले श्रीमद्दयानंद यांत जो भेद, तोच तिकडील वक्त्यांत आणि इकडच्या वक्त्यांत आढळेल. आतां या वरील लिहिण्यानें आह्मी आमच्या लोकांस नुसतें दूषण बळेंच लावतों, किंवा प्रस्तुत गुणाचा इकडे जो प्रचार होऊं लागला आहे त्याची वास्तविक जितकी योग्यता आज दृष्टीस पडत आहे तितकीहि आह्मी ओळखीत नाहीं असें नाहीं. वरील आमच्या लिहिण्याचा आशय इतकाच आहे कीं, वक्तृत्वाची अलीकडील नवी तऱ्हा इकडे नुकतीच सुरू झाली असल्यामुळें ती अद्याप बाल्यावस्थेंतच आहे; आणि तिची आज इतकीच मजल येऊन पोंचली आहे यांत कांहीं आश्चर्यहि नाहीं. पण हें न समजतां वक्तृत्वाच्या शिखराला आजच आमचा हात लागला असें जे समजतात त्यांच्या असमंजसपणाचा उपहास केल्यावांचून कोणीहि खरा ज्ञाता रहाणार नाहीं!

५. तर एकंदरींत पहातां हल्लीं वक्तृत्वकलेची आपल्या देशांत केवळ बाल्यावस्था आहे. पण सुमारें दहा वीस वर्षांपूर्वीं जी स्थिति होती तिशीं ताडून पाहिलें असतां आजचें पाऊलहि बरेंच पुढें आहे असें ह्मणावें लागेल. यास कारण इतक्या कालांत जी विद्याबुद्धि झाली ही एक मुख्यतः आहेच; आणि याशिवाय

१. 'स्वदेशाभिमान' 'लोककल्याण' वगैरे शब्द आपल्या एतद्देशीय भाषांत जसे अद्याप रुजले नाहींत, त्याप्रमाणेंच तद्व्यंज्य जो अर्थ तोहि लोक अजून चांगलासा समजूं लागले नाहींत असें जें प्रस्तुत अंकांत वर झटलें आहे त्याचें एक उत्कृष्ट उदाहरण नुकतें घडून आलें आहे. तें अत्यंत समर्पक असतांहि येथें स्पष्ट दाखल करण्यास आमचें मन घेत नाहीं. यास्तव इतकेंच दिग्दर्शन करतों कीं, जे बडे वक्ते गेल्या सालीं येथें जागोजाग मोठी मानमान्यता पावले; 'आर्यजननी' 'स्वदेशमाता', 'देशबांधवहो' वगैरे यथेष्ट पोपटपंची करून जे चार चार हात उंच उडत असत; ते नुकतेच बहिरीससाण्याची भगरी पुण्यावर घालण्यास आले होते! पण इतकें बरें झालें कीं, त्यांच्या गवींत एखादें भोळसर भक्ष्य सांपडण्याच्या पूर्वीच त्यांची झांप ओळखली जाऊन चंचुघाताखेरीज त्यांस दुसरा कांहीं लाभ झाला नाहीं!

वक्तृत्वोत्तेजक वगैरे सभा चोहोंकडे सुरू झालेल्या आहेत हें दुसरें होय. या सभांचा हल्लीं बराच चोहोंकडे फैलाव होत चालला आहे; यास्तव त्यांच्यासंबंधें थोडें बहुत लिहिणें येथें इष्ट होय.

६. ही सभा प्रथमतः मुंबईस सुमारें आठ नऊ वर्षांपूर्वी सुरू झाली. मग तेथून पुणें, सातारा, नगर वगैरे ठिकाणींहि तिची स्थापना होत गेली. पुण्यास गेल्या समारंभासकट तिचे पांच समारंभ एकंदर झाले; आणि एकंदरीनें पहातां या सभेचें तेज पुण्यास जसें पडलें, तसें इतर कोणत्याहि ठिकाणीं पडलें नाहीं, व अद्यापहि पडत नाहीं. जेथें तिची मूळ स्थापना झाली तेथें तर ती आज बरेच दिवस क्षयाच्या पंथास लागत जाऊन गेल्या वर्षी तर मजल येथवर येऊन टेंकली होती कीं, सभेनें वक्तृत्वाचा विषयच 'आपल्या लोकांचा आरंभशूरपणा आणि तो नाहींसा होण्यास उपाय' असा कांहीं एक नेमला होता. असो; पुण्याच्या समारंभास तरी दृष्ट लागण्याचा समय नुकता येत आहे तोंच गेल्या खेपेस त्यावर केवढें अरिष्ट आलें होतें, व तें कितपतसें टळलें आहे, हें येथील सर्व लोकांस माहीत आहेच; व त्याच्या संबंधानें थोडासा उल्लेख आह्मीं वर केलाच आहे. असो; ही सदरील सभांची थोडीशी हकीकत झाली. आतां त्यांचे मूळचे उद्देश काय आहेत, व ते गेल्या काळांत कितपतसे सिद्धीस गेले, वगैरेविषयीं थोडेंसें लिहूं.

या सभांचा उद्देश त्यांच्या नांवावरून स्पष्टच आहे कीं, आपल्या देशांतील लोकांत वक्तृत्व हा गुण अगदीं नाहीं, तर तो उत्पन्न करायाचा;—ह्मणजे ज्या कोणांच्या अंगीं तो वसत असेल त्यांस अशा सभांमुळें तो प्रगट करण्याचा प्रसंग आणून तो त्यांच्या ठायीं वृद्धिंगत करायाचा. हा उद्देश अर्थातच अत्यंत स्तुत्य व अत्यंत इष्ट होय. पण उद्देशाची तारीफ केल्यानें उद्योगाची तारीफ नेहमीं होतेच असें नाहीं. उद्देश चांगला असणें हें एक निराळें; आणि तो शक्य असणें ह्मणजे आपल्या किंवा कोणाच्याहि हातून तो सिद्धीस जाण्यासारखा असणें, हें एक निराळें. आतां वरील उद्योगाच्या विषयीं वरील संबंधानें जर विचार केला,—ह्मणजे देशांत वक्ते उत्पन्न होणें हें कितीहि इष्ट असलें तरी प्रस्तुत सभांनीं तो उद्देश कितीसा सिद्धीस जाणारा आहे हें जर पाहिलें, तर आमच्या कित्येक वर्षांच्या अनुभवावरून सर्वांच्या सहज लक्षांत येईल कीं तो मूळ संकल्पाप्रमाणें सिद्धीस जाण्याचा रंग अद्याप तर ह्मणण्यासारखा कांहींच दिसत नाहीं. एवढें खरें कीं, कांहीं काळापूर्वी मोठ्या सभेंत उभें राहून वेडेवांकडे कांहीं चार शब्द जरी बोलले तरी तेवढ्यावरूनहि त्या बोलणाराच्या सभाधीटपणाची व वक्तृत्वाची जशी तारीफ होत असे तशी आतां होत नाहीं. तसेंच[1] प्रसंगविशेषीं

१. सालमजकुरीं येथें जो वक्तृत्वाचा समारंभ झाला त्यांत दोन दिवस नुसती

(पुढें चालू).

केवळ तात्कालिक स्फूर्तीनेंहि थोडें बहुत भाषण करण्याची शक्तिहि लोकांत कांहींशी आली आहे. आणि एकंदरींत बऱ्याच लोकांस अमुक भाषण बरें झालें आणि अमुक वाईट झालें इतकें साहाजिक रीतीनें आपोआप समजण्याचेंहि तारतम्य आलें आहे. हें इतकें फळ वरील सभांचे प्रसंग जागोजाग व वेळोवेळ झाल्याचें होय. पण याच्या पलीकडे अजून कोणतीच सिद्धि झाली नाहीं. प्रस्तुत वार्षिक समारंभाच्या वेळीं जीं भाषणें होतात तीं बहुधा सारीं महिना महिना अगोदर घोकंपट्टी करून पाठ करून टाकिलेलीं असतात;[1] आणि त्यांतलींहि बरींच वक्त्यांचीं स्वतःचीं नसून दुसऱ्यांनीं तयार करून दिलेलीं असतात. आतां हें खरें कीं, वरील भाषणें घोकीव असोत, किंबहुना दुसऱ्यानें रचून दिलेलींहि असोत; सभेपुढें तीं बोलणारानें आपलें काम जर चांगल्या रीतीनें बजावलें, तर सभेस तेवढेंहि बस आहे. पण तसाहि प्रकार आजच्या स्थितीस दृष्टीस पडत नाहीं. वक्ता सभास्थानीं येऊन उभा राहिल्याबरोबर आपल्या संथेस जो आरंभ करतो तो ती संपल्याखेरीज मधें ह्मणून बिलकूल थांबत नाहीं. कोणत्याहि प्रसंगीं कोणी मनुष्य दुसऱ्याशीं जो बोलतो तो नाटकांतील पात्राप्रमाणें तोंडपाठ केलेलें बोलणें कधींहि बोलत नसतो हें वरील लोकांच्या लक्षांत येत नाहीं. त्याप्रमाणेंच कोणत्या प्रसंगाला कोणतें भाषण उचित, कोणतें अप्रयोजक, याचाहि सुमार न राहून समयविशेषीं भरकटणारेहि पुष्कळ. तेव्हां एकंदरींत घरून तयार करून आणलेलें जरी भाषण असलें तरी तें सावकाश व साहजिक रीतीनें बोलून दाखवून पाठ केल्याचें चिन्ह अगदीं न दाखविणें हें फारकरून कोणासहि साधत नाहीं. आणि त्या त्या विवक्षित भाषणांत जी जी मनोवृत्ति श्रोत्यांच्या हृदयांत पूर्ण उत्पन्न व्हावयाची असते तिचा आविर्भाव वक्त्याच्या भाषणांतच अगोदर चांगला आला नसल्यामुळें व अंगविक्षेपादिकांवरूनहि त्यास तो बाहेर पुरतेपणीं उमटवितां न आल्यामुळें श्रोत्यांच्या हृदयास तर तो विकार फारच थोडा होतो, किंबहुना मुळींच होत

बंडाळी चालली असतां वरील गोष्ट चांगली प्रत्ययास आली. वरील प्रसंगीं दोहों पक्षांकडील लोकांचीं व तिऱ्हाइतांचीं जीं कांहीं भाषणें झालीं त्यांतील कित्येकांत प्रस्तुत सभेच्या उद्योगाची जितकी कृतार्थता दृष्टीस पडली तितकी गेल्या पांच वर्षांत झालेल्या नकली भाषणांपैकीं एकानेंहि झाली नाहीं असें आह्मांस वाटतें! उघडच आहे कीं, चिंधी पेटवून आणून आणि फांकूं करून मोठ्या केलेल्या जाळापेक्षां चकमक उडून निघालेल्या लहान ठिणगीचीहि जास्त योग्यता आहे!

१. वरील प्रकार बहुतेक भाषणांचा जो अस्खलित ओघ चालत असतो त्यावरून तर दिसतोच; पण कित्येकांची जी भरधांव डाक चालत असते तींवरून तर तो अगदींच स्पष्ट होतो. या दुसऱ्या तऱ्हेची एखादे वेळेस अशी गंमत होते कीं, एकाएकीं मधेंच गाडी थांबून ती कांहीं केल्या पुढें चालेनाशीच होते. मग पुनः पहिल्यापासून पाठ ह्मणावा लागतो; किंवा टाळ्यांच्या गजरांत पडद्यांत निष्क्रमण करावें लागतें!

नाहीं, हें उघड आहे. असो; तर प्रस्तुत सभेपुढें वक्ते जीं भाषणें करतात त्यांत वरील दोष बरेच आढळतात.

७. वरील लिहिण्यावरून वक्तृत्वोत्तेजक सभांची सध्यांची स्थिति कांहीं लक्षांत येईल. आतां त्यांपासून त्यांचे स्थापक व एकंदर दुसरे लोक ज्या कार्याची अपेक्षा करतात त्याविषयीं कांहीं थोडेसें लिहिणें येथें अवश्य वाटतें. या सभांची अलीकडे उत्पत्ति जी झाली ती कशी झाली हें पुष्कळांस अवगत असेलच. सुमारें आठ दहा वर्षांपासून आमच्या लोकांचें देशस्थितीकडे विशेष लक्ष लागत चाललें आहे. हिंदुस्थानास हल्लीं जी अवस्था प्राप्त झाली आहे तिचीं कारणें काय, ती चांगली होण्यास उपाय कोणते, वगैरे अत्यंत गहन विषयांविषयीं बड्या बड्या विद्वानांपासून तों लहानसान पोरांसोरांपर्यंत सर्वांचे विचार चालू आहेत. कित्येकांस तर वरील विचारांवांचून रात्रंदिवस चैन पडत नाहीं. 'लोककल्याण,' 'हिंदुस्थानची स्थिति' वगैरे शब्दांची त्यांनीं जणों काय जपमाळच घेतलेली आहे! असो; तर याप्रमाणें या 'आर्यजननी'च्या उद्धारार्थ हजारों जणांच्या हजारों ज्या युक्तिप्रयुक्ति निघाल्या त्यांत कित्येकांची मनोदेवता अशी वाहिली कीं, वक्तृत्वगुणाखेरीज सर्व व्यर्थ होय. आज युरोपांतील देशांची एवढी भरभर जी चालली आहे ती सगळी वाक्चातुर्याच्या जोरावर. तेव्हां कसेंहि करून ही अमोलिक चीज आपल्या हातांत आली पाहिजे. ती एकदां आली कीं, मग सगळे लोक आपल्या मुठींत, सगळा हिंदुस्थान आपला! कोणतेंहि देशहिताचें काम असो, तें एका वक्त्याकडे सोंपवून देऊन त्याच्या मनोवेधक भाषणानें लोकांचीं मनें वळविलीं कीं, झालें काम फत्ते! सारांश, ज्याप्रमाणें प्राचीन इतिहासांत डिमॉस्थेनीस किंवा सिसरो यांच्या भाषणांचा अद्भुत प्रभाव दृष्टीस पडतो तशीच मजा इकडेहि उठवून देण्याचा पुष्कळांनीं संकल्प केला. या संकल्पास अनुसरून मुंबई, पुणें, वगैरे ठिकाणीं वक्तृत्वाचे समाज अगोदर स्थापले जाऊन मग त्यांचा इतर जागीं फैलावा झाला. असो; येथवर ठीक झालें. पण एवढ्या केलेल्या उद्योगाचीं फळें जों पुढें पाहिलीं तों तीं भलतींच दृष्टीं पडूं लागलीं. वक्तृत्वसभांच्या स्थापकांचा मूळचा उद्देश काय कीं, आह्मी जे वक्ते तयार करूं, त्यांनीं मग पुढें आमच्या उपयोगीं पडावें. ठीकच; जर पन्नास साठ रुपयांचें एक दोन वेळां बक्षीस देऊन कोणाची वक्तृत्वशक्ति त्यांनीं उदयास आणली, तर तो उपकार स्मरून त्या वक्त्यांनीं स्वशक्त्यनुसार आपल्या धन्यांची थोडीशी तरी सेवा करावी हें अगदीं रास्त आहे. पण एवढी कृतज्ञत्वबुद्धि हल्लींच्या काळीं मनुष्यांत राहिली आहे कोठें? वरील वक्ते सभेपासून तेवढें बक्षीस उपटून जे नाहींसे होतात ते मग लोकांपुढें कधींहि येत नाहींत. संपादन करून दिलेल्या वाक्पटुत्वाच्या गुणानें लोकांत जो त्यांनीं ज्ञानप्रसार करावयाचा तो करण्याचें त्यांच्या कधीं स्वप्नींहि येत नाहीं. हा त्यांच्या लबाडीचा

प्रकार पाहून कित्येक सभास्थापकांनीं अशी हिकमत काढली होती कीं, जे जे वक्ते सभेपुढें पसंत होतील, त्यांकडून बक्षीस देण्यापूर्वी असा करार करून घ्यावा कीं, आह्मी दर वर्षास निदान एक दोन तरी व्याख्यानें देऊन प्रस्तुत सभेची कामगिरी बजावीत जाऊं; पण ही सक्ती कशी चालवावी याची पंचाईत पडून सरते शेवटीं तो बेत रहित झाला. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत सभेचा मुख्य जो उद्देश कीं, वक्तृत्वाचें पीक येऊन एकंदर देशास उपयोग व्हावा, तो सरासरी अगदीं फसलाच !

८. वरील कलमांत प्रस्तुत सभाविषयीं उपहासरीत्या जो आह्मीं मजकूर लिहिला आहे तो आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् आवडणार नाहीं; व वक्तृत्वाचें वेड डोक्यांत शिरून उठतां बसतां त्यावांचून ज्यांस दुसरें कांहीं सुचतच नाहीं त्यांस तर आपला उपमर्द केलासाहि कदाचित् वाटेल. पण आपल्या बुद्धीस जें वाटतें तें मोकळ्या मनानें जो बोलूं जाईल त्यास अशा प्रसंगास भिऊन उपयोग नाहीं. जें त्यास वाटेल तें त्यानें स्पष्टपणें खुशाल बोलून दाखविलें पाहिजे. तर याच आमच्या कृतसंकल्पास अनुसरून प्रस्तुत सभाविषयीं आह्मी आपलें असें मत प्रदर्शित करतों कीं, त्या न चालाव्या असें जरी आमचें ह्मणणें नाहीं,–किंबहुना त्यांपासून झालेला व पुढें होणारा फायदाहि आह्मीं वर दाखविला आहे,–तरी त्यांपासून मोठमोठ्या कार्यांची जे अपेक्षा करतात त्यांच्या असमंजसपणाचें हसूं आल्यावांचून रहात नाहीं. सध्यां आमच्यांत देशकल्याणाच्या कामांत पुढारीपणानें वागणाऱ्या लोकांत पुष्कळ जण असे आहेत कीं, ज्यांस आपण काय करतें आहों, आपल्या उद्योगाचा परिणाम काय होईल, याविषयीं बिलकूल पोंच नसतो. प्रायः लोकांत इकडे तिकडे मिरविण्याच्या इच्छेनें, व क्वचित् खरोखरीच लोकहितबुद्धीनें, प्रेरित होत्साते शेंकडों स्वदेशाभिमानी पुरुष हल्लीं चोहोंकडे वावरतांना दृष्टीस पडताहेत. पण यांतील बहुतेकांची स्थिति 'सॉक्रेटीसाच्या चरित्रां'तील ग्लाको नामक फांकड्या सरदारासारखीच होय. त्या बाणेदार गृहस्थाच्या मी यंव करीन मी त्यंव करीन अशा वल्गना ऐकून सॉक्रेटीसानें एके समयीं त्यास रस्त्यांत हटकून जसें फजीत केलें,[1] त्याप्रमाणेंच सध्यांच्या काळीं लोककल्याणाचें वारें अंगांत भरून यथेष्ट कल्पना करणाऱ्या कित्येकांस चांगलें बळकट औषध पोंचण्याची तजवीज होणें फारच जरूरीचें आहे. असो; प्रस्तुत विषयाच्या संबंधानें वरील लोकांच्या समजुतीविषयीं आह्मांस इतकेंच लिहावयाचें आहे कीं त्यांनीं आपल्या उद्योगापासून होणाऱ्या कार्यांचा जो आपल्या मनांत विभु रचलेला आहे तो 'आरबी गोष्टीं'तील अलनासकराच्या मनोराज्याचेंच भावंड होय. किंबहुना 'वक्त्यांचे वर्ग' स्थापणाऱ्या व एका वक्तृत्वाच्या खांबावर सगळ्या देशाची वैभवरूप इमारत रचूं पहाणाऱ्या आमच्या शहाण्या देशबंधूंहून वरील मिया-

१. 'सॉक्रेटीसाच चरित्र' अध्याय ४.

साहेबहि बरे असें आह्मांस वाटतें. कारण त्यांनीं चुटक्याचे मांडव यथास्थित रचून खुद्द वजीराच्या लेकीवरहि आपल्या नाजूक पायाचा प्रयोग जरी योजिला होता, तरी तो सोहळाहि त्यांस केवळ अशक्यच होता असें ह्मणतां येणार नाहीं. पण 'वक्त्यांच्या वर्गा'ची जी कांहीं कल्पना आहे तीस तोड नाहीं! आमच्या देशांत हल्लीं हें एक वेड भारी माजलें आहे कीं, कोणत्याहि प्रकारची कोणास उणीव भासो, लागलीच फंड उभा करून त्याच्या 'उत्तेजना'स किंवा 'वर्धना'स आरंभ करायाचा. हिंदुस्थानांतील प्रजा हल्लीं अशक्त होत चालली आहे काय? काढा 'बलवर्धक' सभा! देशास एवढी बुडवणूक जी आली आहे ती एकी नसल्यामुळेंच आली आहे;—असें आहे काय? कांहीं चिंता नाहीं; 'ऐक्यवर्धनी सभा,' 'जेवणाच्या मंडळ्या,' 'चहा बुंध पिण्याच्या मंडळ्या,' वगैरे स्थापा ह्मणजे झालें; एकी एकी ह्मणजे काय, चार दिवसांत सगळ्या हिंदुस्थानांत एकी करून देऊं! आमच्या फाकडद्या नव्या विद्वानांस शोभेसा व त्यांस चांगला सोईवार पडे असा एखादा धर्म पाहिजे आहे काय? कुच फिकीर नाहीं;—'पाहिजे आहे' अशा मोठ्या अक्षरांनीं नोटीस देऊन बक्षीस नेमा ह्मणजे झालें; अथवा नेटिवांकडून हें काम नीट न होईसें वाटल्यास 'ट्रेचर आणि को' किंवा 'बाळकृष्ण आणि मार्गन' यांजकडे ऑर्डर पाठवून द्या ह्मणजे काम झालें. कीं ईश्वरास पसंत पडेशा धर्माचें साहित्य ते तावडतोब रवाना करून देतील! आमच्या देशांत गदाधर, भट्टोजी दीक्षित, नागोजीभट्ट वगैरे मंडळीची सध्यां उणीव आहे काय? 'वेदशास्त्रोत्तेजना'र्थ एक सभा काढा ह्मणजे झालें. मग काय कमी? पेशव्यांच्या दक्षणेला आले नाहींत असे मूर्तिमान् व्यास, गौतम व पाणिनि येथें चोहोंकडून उड्या टाकीत येतील. असो; एकंदरींत लक्ष्मीचा प्रभाव अलीकडे जसा आमच्या देशहितचिंतकांस कळून येऊं लागला आहे तसा पूर्वी कोणासहि आला नसेल. पैसा उभा करून 'मंडळी' किंवा 'सभा' उत्पन्न केली कीं, हवें तें कार्य होतें आहे! पण वरील समजुतीचा मूर्खपणा किती आहे हें क्षणमात्र विचार केला असतां हवें त्यास सहज समजणारें आहे. पहा बरें! सुया गुंड्यांसारख्या व्यापाराच्या जिनसांचे जसे कारखाने देशोदेशीं आहेत व ते हवे तेथें घालतां येतील, त्याप्रमाणेंच वक्तृत्व, विद्वत्त्व, कवित्व, शिल्पकौशल्य इत्यादिकांची गोष्ट आहे काय? कालिदासासारख्यांची मधुर वाणी, शिवाजीच्या सारख्या राज्यकर्त्यांचें युद्धकौशल्य व राजकारण, फिडियस व रेफील अशांच्या सारखें शिल्प हीं किती पैसा खर्च केला असतां पैदा होतील बरें? किती वक्तृत्वोत्तेजक सभा मिळून डिमॉस्थेनीस तर दूरच, पण अगदीं सामान्य प्रतीचा वक्ता तरी निर्माण करण्याचा पतकर घेतील? जॉनसन किंवा मेकॉलेच्या सारखे ग्रंथ मराठींत करून देण्यास किती 'दक्षिणाप्रैजकमिटी'स मक्ता दिला असतां काम होईल? असो; तर केवळ सभा स्थापून बक्षीसांची लालूच दाखविल्यानें

आपल्या देशांत वक्तेच वक्ते होतील ही जी सदरील मंडळीची किंवा निदान त्यांतील कित्येक चाणाक्ष गृहस्थांची आशा आहे ती केवळ वेडगळपणाची आहे; आणि 'वक्त्यांचे वर्ग' हे शब्द 'हिऱ्यांचा कारखाना' या शब्दांसारखे सर्वथा अप्रयोजक होत![1]

९. वरील कलमांत वक्तृत्वाविषयीं जें लिहिलें आहे तें सर्व गुणांस सारखेंच लागणारें आहे. तरी हें नीट न समजल्यामुळें वरील भ्रम बहुधा सर्वांच्या मनास जडलेला आढळतो. याचीं उदाहरणें वर दिलीं आहेतच. तीं सांगतांना लोकांच्या असमंजसतेचा जो आह्मीं उपहास केला आहे तो ज्यांस यथार्थ वाटणार नाहीं त्यांस मेकालेचा एतद्विषयक एक प्रसिद्ध लेख वाचण्याविषयीं आह्मी शिफारस करतों.[2] तो वाचला असतां कोणतीहि कला किंवा गुण यांची अभिवृद्धि कर्तव्य असतां पैशाचें साधन किती अप्रयोजक होय याविषयीं वाचकांची खात्री होईल. उघडच आहे कीं, पैशाचा लोभ ही जी मनुष्याच्या अंगची एक प्रबळ वासना आहे ती ह्मणजे मोठीशी थोर आहे असें नाहीं. तेव्हां तिच्या योगानें प्रवृत्ति होऊन मनुष्याच्या हातून कोणतेंहि श्लाघ्य कृत्य घडावें हें मुळींच संभवत नाहीं. शिवाय नुसत्या द्रव्यलोभापासून एका परिश्रमाखेरीज दुसरें कोणतें कार्य होणार? पुढें लालूच असली ह्मणजे तेवढ्यापुरती मेहनत मनुष्य करील इतकेंच काय तें. कोणत्याहि कलेंत पूर्णत्व पावण्यास उत्साहपूर्वक व्यासंग किंवा हौस जी एक लागत असते ती अर्थलाभाच्या केवळ आशेनें मनुष्यांत कशी उत्पन्न होईल? आणि त्याहिपेक्षां मूळची बुद्धि किंवा स्वाभाविक पटुत्व जें गुणी मनुष्यांत असावें लागतें तें पैशाच्या राशीच्या राशी पुढें मांडल्यानें तरी लवमात्रहि उत्पन्न होईल काय? तेव्हां एकंदरींत पैशाच्या योगानें हवें

---

१. कोणी कदाचित् असा आक्षेप घेतील कीं, वर जें लिहिलें आहे तसा प्रस्तुत सभांचा बिलकूल उद्देश नाहीं. पण दोन तीन गोष्टींवरून पाहिलें असतां त्यांचा रोख वरच्यासारखाच दिसतो असें ह्मणणें भाग येतें. एक ही कीं, कोणा उमेदवारास दोनदां बक्षीस मिळालें कीं, प्रस्तुत गुण त्यास पुरतेपणीं साध्य झाला असें समजून त्यास पुनः बोलूं देत नाहींत. दुसरी गोष्ट मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलीच आहे कीं, वरील पसार झालेल्या वक्त्यांनीं आपल्या वक्तृत्वाचा प्रकाश जनहितार्थ पाडावा अशी वरील मंडळीची मोठी अपेक्षा होती व अद्याप आहे. शिवाय तिसरें असें कीं, सदरील समारंभांत बक्षीस मिळालें कीं, सरस्वतीचा वरद हस्त त्या मनुष्याच्या मस्तकीं चढलाच असें समजून त्यास तेथल्या तेथें भाषण करायास सांगणें. मुंबईच्या इ० स० १८७० सालच्या समारंभांत अशी एकदां मौज झाली कीं, वरच्याप्रमाणें केवळ तात्कालिक स्फूर्तीनें भाषण करायास नुकत्या तयार झालेल्या एका प्रसिद्ध वक्त्यास सांगितलें असतां तो समेंत भलतेंच बोलून गेला! तेणेंकरून साऱ्या सभासदांस खालीं पहावें लागून वरील प्रकार कोठून केला असें त्यांस झालें!

२. 'Royal Society of Literature'—*Miscellaneous Writings.*

तें करतां येईल. आणि आमच्या देशांत हल्लीं पैसा नाहींसा झाल्यामुळें लोककल्याणाचीं कामें होण्यास अडचण पडते, या दोन्ही समजुती निवळ खोट्या आहेत. मनुष्यास खुपसुरत करण्याचें साधन किंवा रत्नें निपजविण्याची कृति हीं जशीं मुळींच संभवत नाहींत, त्याचप्रमाणें कोणा कोणा मनुष्यामध्यें ईश्वरदत्त जे गुण कधीं कधीं विरल सांपडणारे ते उत्पन्न करण्याची आशा धरणें यासारखा वेडेपणा दुसरा नाहीं. असो; आतां वरील महत्त्वाच्या गोष्टींचें प्रत्यक्ष प्रमाण आमच्या वाचकांस दाखवून प्रस्तुत विषयाचा हा विभाग आटपतों. एक प्रमाण दक्षिणाप्रैजकमिटी. ही सभा आमच्या साऱ्या वाचकांस माहीत असेलच. हिचें वास्तव्य आज सुमारें पंचवीस वर्षें आहे. इतक्या काळांत हिजकडे शेंकडों पुस्तकें नजर होऊन आजपर्यंत पुष्कळ ग्रंथकारांस हिजकडून बक्षीसें पोंचलीं. आतां या कमिटीच्या द्वारें आजपर्यंत जो सरकारी पैशाचा विनियोग झाला त्याविषयीं जर विचार केला, तर इतकी रक्कम केवळ पाण्यांत गेली असें जरी ह्मणतां येणार नाहीं, तरी निदान मूळच्या उद्देशाप्रमाणें तिचें मोठेंसें चीज झालें असें कोणासहि वाटणार नाहीं. तोच पैसा पूर्वी जसा गोरगरीब ब्राह्मणांस फुकट वाटला जात असे, त्याचप्रमाणें तो गेलीं पंचवीस वर्षें गद्यपद्यांच्या रचनेच्या श्रमाबद्दल विपन्न ग्रंथकारांस दिला जाऊन तितक्या गरीब लोकांस अन्नास लावण्यांत गेला इतकेंच सरासरी त्याविषयीं ह्मणतां येईल. बाकी सभेचा जो खरा हेतु, कीं मराठी भाषेंत नवे नवे ग्रंथ होऊन ती सुधारणेच्या मार्गाला लागावी तो एकंदरींत तितपतच सिद्धीस गेला! आतां हें खरें कीं, सदरहू कमिटीस नजर आलेल्या ग्रंथांत कांहीं सर्वमान्यतेच्या पदवीस पावले आहेत; पण त्यांबद्दल कमिटीनें आपणाकडे मान बळेंच ओढून घ्यावा हें अगदीं रास्त नाहीं. कांहीं महिन्यांपूर्वी येथील एका प्रसिद्ध पहिलवानानें साताऱ्यास कुस्ती मारली. याबद्दल येथील 'बलवर्धक सभे'नें कृतार्थता मानणें किंवा प्रौढी झोकणें जसें बरोबर होणार नाहीं, त्याचप्रमाणें वरील कमिटीनें प्रसंत केल्यापैकीं कांहीं पुस्तकें उत्कृष्ट ठरून लोकमान्य झालीं याचाहि मान तीस आपणाकडे बिलकूल घेतां येणार नाहीं. कां कीं, प्रस्तुत सभा मुळींच नसती, तर तीं पुस्तकें होण्यास किंवा लोकांस आवडण्यास रहातीं असें मुळींच संभवत नाहीं. असो; हें एक उदाहरण झालें. दुसरें अलीकडील इंग्रेजी शिक्षणक्रम होय. इंग्रेज सरकारचा या देशावर सर्वांत मोठा झालेला उपकार हाच होय, कीं, ज्ञानाची अमोलिक देणगी त्यानें एतद्देशीयांस दिली व अद्याप देत आहे. गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत या देशांत चोहोंकडे ही नवी विद्या हळू हळू प्रसार पावून हल्लीं तिचा पुष्कळच फैलावा झाला आहे. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी मेकालेनें जी नवी पद्धति सुरू केली तिच्यामुळें तर वरील प्रसारास फारच साह्य होऊन त्यामुळें देशाची एकंदर स्थिति आजला अगदीं बदलून गेली आहे असें ह्मटलें असतां चालेल. पण

इतकें होऊनहि एतद्देशीय शाळांविषयीं व विद्यालयांविषयीं सरकारचा, इंग्रेज लोकांचा व आपला जो बोभाट वरचेवर ऐकूं येतो तो सर्वांस माहीत असेलच. तो हा कीं, लोकशिक्षणाकडे देशाचें उत्पन्न इतकें खर्च होत असतां त्याचें ह्मणण्यासारखें चिज कांहींच होत नाहीं. शिक्षणाच्या सर्व सोयी करून ठेवून ज्यांकडून सरकारानें दहा दहा बारा बारा वर्षें विद्याभ्यास करविला, त्यांतून कित्येकांस तर पदरच्या दमडीच्या कवडयाहि खर्चायास न लागतां नेमणुका, पगारी जागा वगैरे करून देऊन खुशाल विद्या संपादन करण्याची सवड करून दिली, आणि शेवटीं सगळा विद्याभ्यास आटपून संपूर्ण शस्त्रास्त्रांनीं सज्ज होत्साते जे सरकारच्या दरबारीं मानाचा विडा पावून देशहिताची दीक्षा पावले, ते एकदां सुखवस्तु होऊन संसारसुखाचा अनुभव घेऊं लागले कीं लागलींच पूर्वीच्या गोष्टी सर्व विसरून जातात. आपल्या शिरीं स्वदेशाचें ऋण असून तें आपणास फेडलें पाहिजे, व चान्सेलर साहेबांनीं केलेला मंत्रोपदेश त्या वेळेस दिलेल्या चर्मपत्रांतच केवळ गुंडाळून ठेवायाचा नाहीं, या दोन्ही गोष्टींची त्यांस पुढें कधींहि आठवण सुद्धां होत नाहीं. वर्षानुवर्षें खपून मिळविलेल्या ज्ञानाचें व किताबांचें सार्थक स्टाकिंग बूट चोहोंकडे मिरविण्यापलीकडे किंवा हंसून खेळून मौजेंत काळ घालविण्यापलीकडे वरील लोकांपैकीं कोणासहि बिलकूल दिसत नाहीं. बाकी प्रस्तुत शिक्षणक्रम इकडे सुरू करण्याच्या वेळेस मेकालेसाहेबांच्या मनांत केवढाले तरंग येऊन चुकले असतील! कीं लवकरच या देशांतील अज्ञानाचा संपूर्ण विध्वंस होऊन विद्वत्तेंत, रसिकतेंत, देशाभिमानादि गुणांत वगैरे आमचे लोक इंग्लंडांतील लोकांशीं हळू हळू समत्व पावत जातील; व त्यांजसारखे मोठमोठे ग्रंथकार येथें निपजून स्वदेशीय लोकांस देशभाषेच्या द्वारें ज्ञानाचा मार्ग खुला करून देतील. या शेवटल्या गोष्टीचा तर साहेब मजकुरांस मोठाच भरंवसा होता; आणि तिच्या संबंधें तर आमच्या नवीन विद्वानांनीं त्यांस जसा दगा दिला तसा कोणताच दिला नाहीं. मेकाले साहेबांस मोठी आशा होती कीं, आपल्या नव्या तऱ्हेनें या लोकांत ज्ञानाचा जो थोडथोडा प्रसार होत जाईल तो सगळया देशभर फैलावण्याच्या कामीं हे नवे लोक आपल्या फार उपयोगीं पडतील. ते असे कीं, ज्यांस इंग्रेजी शिक्षकांकडून व इंग्रेजी ग्रंथांच्या द्वारें साक्षात् ज्ञान मिळणार नाहीं अशा आपल्या इतर लक्षावधि देशबांधवांस हे लोक त्यांच्याच भाषेनें नव्या कल्पना व नवे विचार मोठ्या प्रीतीनें व हौसेनें कळवीत जातील. हा विचार मनांत आणून या लोकांस वरील साहेबानें 'इंटरप्रेटर' ह्मणजे 'दुभाष्ये' असें नांव प्रकृतविषयक लेखांत दिलें आहे. आतां हा 'दुभाष्य'पणा या लोकांनीं कितपत केलासा आढळेल बरें! मेकॉले साहेब आज चाळीस वर्षांनीं पुनः हिंदुस्थानांत येऊन आपण लावलेला वृक्ष कितीसा लागवडीस आला हें जर पहाते, तर मूळच्या संकल्पांत आणि प्रत्यक्ष सिद्धीत पडलेली एवढी

तफावत पाहून ते अगदीं थक्क होऊन जाते! ज्यांनीं इंग्रेजी विद्येच्या समुद्रांत सतत अवगाहन करून मनाच्या सर्व वृत्ति वृद्धिंगत करायाच्या, अंतःकरणास उत्कृष्ट संस्कार द्यावयाचा, आणि तेंच उत्तम फळ आपल्या इतर ज्ञानरहित देशबंधूंस मिळवून देण्याचा मार्ग–ह्मणजे देशभाषेंत ग्रंथ करणें–याविषयीं उद्योग करायाचा, त्याची स्थिति सर्वांपरी वरच्याच्या अगदीं उलटच असून वरील 'दुभाष्ये'पणा करण्याविषयीं तर त्यांच्या मनांत अतिशयित तिरस्कार वागतो आहे, हें पाहून साहेब मजकुरांस वर सांगितलेल्या आपल्या निबंधाचीच पुरतेपणीं आठवण झाली असती! असो; तर या दोन उदाहरणांवरून पूर्वोक्त सिद्धांताचा उत्कृष्ट प्रत्यय आमच्या वाचकांस आल्याशिवाय रहाणार नाहीं. तेव्हां एकंदरींत सरते शेवटीं वरील गोष्ट पुनः दृष्टांतरूपानें येथें सांगतों कीं, पैशाचें साधन हें केवळ उदकासारखें आहे. जेथें अपेक्षित गुण बीजरूपानें गुप्त असेल तेथें जर वरील साधन त्यास जाऊन पोंचलें तर त्याचें चीज होईल यांत संशय नाहीं. पण वनस्पतीचें पोषक उदक आहे एवढेंच समजून केवळ उदकाचा संग्रह केल्यानें अपेक्षित वृक्षाची उत्पत्ति, वृद्धि, व फलद्रूपता या गोष्टी आपल्या स्वाधीनच्या झाल्या असें समजून केवळ यदृच्छेनें त्याचा विनियोग करणें, व त्यापासून फलप्राप्तीची आशा करून रहाणें, यासारखें असमंजस व उपहासास्पद दुसरें कांहीं नाहीं!!

यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाघ्यस्तत्राल्पधीरपि।
निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते॥[1]

अंक २३—(१) अवतरण. (२) वक्तृत्वगुणाच्या उत्कर्षांचा संभव. (३) सभ्यांची स्थिति. (४) उत्कर्षाचीं साधनें. (५) अलीकडील वक्ते.

१. शेवटच्या अंकांत प्रस्तुत विषयाचें आधुनिक स्वरूप सांगितलें. आतां त्यांत उपोद्घात केल्याप्रमाणें प्रस्तुत कलेचा यापुढें उत्कर्ष होण्यासारखा आहे कीं नाहीं, व तो होण्यास साधनें कोणतीं याविषयीं लिहूं.

२. मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, प्रकृत गुणाची आपल्या लोकांस अलीकडे जी ओळख झाली आहे ती परस्थ लोकांच्या परिचयानें. तेव्हां त्यांच्या सहवासानें आमच्या देशांत त्यांचे इतर गुण जसे क्रमाक्रमानें प्रसार पावत जातील त्याचप्रमाणें हाहि जाईल हें उघड आहे. लोकशिक्षणाच्या व इतर द्वारांनीं चोहोंकडे विद्येचा व ज्ञानाचा जसजसा फैलाव होत जाईल तसतशी ग्रीस, रोम, इंग्लंड, यांत झालेल्या वक्त्यांची आमच्या लोकांस माहिती विशेष होत जाऊन, व

---

१. 'जेथें विद्वज्जन नसतात तेथें अल्पबुद्धि मनुष्यहि प्रशंसेस पात्र होतो; ज्याप्रमाणें ज्या माळावर कांहींच झाडझूड नाहीं तेथें एरंड ह्मणजे मोठा वृक्ष!"

इंग्लिश लोकांच्या साक्षात् परिचयानें प्रस्तुत गुण जो त्यांत सांप्रत विद्यमान आहे त्याचें अनुकरण होऊन तो उत्तरोत्तर वृद्धि पावत जाईल यांत संशय नाहीं. हल्लींहि बाबू केशवचंद्र सेनासारख्या कित्येक एतद्देशीय विद्वानांस प्रकृत कला बरीच साध्य झाली आहे; आणि ज्या ज्या ठिकाणीं इंग्रेजी विद्येचा बराच फैलाव झाला आहे तेथें सभांचा वगैरे कसलाहि समारंभ झाला तरी थोडेंबहुत बऱ्याच प्रकारें भाषण करणारे लोक कोणी ना कोणी तरी असतातच. असो; तर याप्रमाणें हल्लींहि वक्तृत्वाचा अंकुर जो फुटलेला दृष्टीस पडतो तो यापुढें असाच जर सतत पोषण पावत गेला, तर येथील जमीनीच्या उत्कृष्ट पिकाऊपणामुळें तो पुढें चांगला सरसावत जाईल यांत आम्हांस बिलकूल संदेह वाटत नाहीं.

३. पण वक्तृत्वाची वृद्धि होऊन त्याचा एकंदर लोकांस उपयोग होणें जर असेल, तर प्रस्तुतचा क्रम पुष्कळ बदलायास पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणें वक्तृत्वाचें बीज अंकुररूपानें देशांत जागोजाग आविर्भूत झालें आहे खरें; पण हल्लींच्या स्थितीस सामान्य लोकांस त्यापासून कांहींएक फायदा घडण्यासारखा नाहीं. मोठमोठीं व्याख्यानें देऊन एतद्देशीय पंडितांनीं विलायतेंतील लोकांसहि तोंडांत बोट घालायास लावलें, किंवा आपल्या देशबांधवांस क्षणभर चकित करून सोडलें, तरी ज्यांस नवें शिक्षण प्राप्त न झाल्यामुळें इंग्रेजी भाषा व इंग्रेजी विचार कळत नाहींत, अशा लाखोंगणती लोकांस तें काय होय! त्यांनीं त्यांचा लौकिक ऐकून स्वस्थ बसावें इतकीच गोष्ट. तसेंच वरील लोकांच्या वक्तृत्वशक्तीचें चीजहि शेंदोनशें लोकांनीं टाळ्या पिटल्याच्या पलीकडे कांहीं नाहीं. पण तेवढ्यानेंच त्यांस कृतार्थता वाटून आपल्या कलेचा खरा उपयोग करण्याचें त्यांच्या कधीं मनांतहि येत नाहीं. हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार अशिक्षित लोकांचा. यांच्या मंडळींत कोणा कोणास बरेंच वाक्पटुत्व असतें; पण वक्त्यांस अवश्य जीं अनेक साधनें तीं यांस मुळींच अनुकूल नसल्यामुळें, फार तर काय, पण व्याकरणाची सुद्धां कित्येकांस भ्रांत असल्यामुळें, त्यांच्या अंगीं प्रस्तुत गुण थोडा बहुत असतांहि तो प्रगट होण्याची सोय नसते.

४. तर आतां प्रस्तुत गुण आपल्या भाषेच्या द्वारानें उदयास येऊन सर्व लोकांस तो हितावह होण्यास काय काय सामग्री पाहिजे ती सांगतों. पहिलें कलम अर्थातच उत्तम भाषा. चित्रें करणारास जशी उत्तम माती, आचाऱ्यास जसें उत्तम प्रकारचें साहित्य, तशीच वक्त्यास उत्तम भाषा अगदीं अवश्य होय. ती त्यास अनुकूल नसेल तर त्याच्या अंगीं मोठी करामत असली तरी ती त्याची त्याच्यापाशींच राहील, रस्त्यांतील मातीचा ढीग पुढें आणून टाकून एखाद्या उत्कृष्ट जिनगरास त्याची उत्तम पुतळी बनविण्यास सांगितलें, किंवा भाजीभाकरीचें साहित्य

देऊन पंचपक्वान्नांचा थाट उडविण्यास एखाद्या उत्तम आचाऱ्यास सांगितलें, तर तसें करणें जसें अत्यंत हास्यास्पद होईल; त्याचप्रमाणें भाषा सुधारण्याचा बिलकूल प्रयत्न न करतां उत्तम वक्तृत्व निपजाविण्याचा जो आमच्या लोकांचा चोहोंकडे जारी उद्योग चालला आहे तोहि उपहासास्पद होय. भाषा सर्वथा अंकित असणें हें वक्त्यांस किती जरूरीचें आहे हें डिमॉस्थेनीसची मागें जी हकीकत दिली आहे तिवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच; आणि आजपर्यंत प्रसिद्धीस आलेल्या कोणत्याहि वक्त्याचें चरित्र पाहिलें तरी तोच प्रकार आढळेल. तर उत्तम भाषा हें वक्तृत्वाचें पहिलें मोठें साधन होय. यास्तव आपल्या देशांत वक्ते उत्पन्न होऊन जनभाषेनेंच सर्वांचीं मनें एखाद्या विवक्षित कार्याकडे वळविण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य यावें असा जर हेतु असेल, तर एतद्देशीय भाषा ह्मणजे काय अप्रयोजक, ती चांगल्या तऱ्हेनें शिकण्याची कोणीं उगीच रिकामी उठाठेव करावी, ती सुधरून काय करावयाचें आहे; दिवसेंदिवस सर्वसाधारण होऊं पहाणारी जी इंग्रेजी भाषा ती आली ह्मणजे बस आहे, वगैरे कोल्या समजुती ज्या आज चोहोंकडे पसरल्या आहेत त्या अगोदर नाहींशा झाल्या पाहिजेत. या समजुतींचें खंडन आह्मीं यापूर्वी अनेक वेळां केलें आहे; फार तर काय, पण आमचें पुस्तकच एके रीतीनें त्याचें खंडन होय! असो; तर याप्रमाणें आपल्या देशांत प्रस्तुत कलेचा उत्कर्ष होण्याचें पहिलें मोठें साधन झटलें ह्मणजे देशभाषा सुधारणें–ह्मणजे तिच्या अंगचे सर्व गुण तिच्या ठायीं प्रगट करणें, आणि संस्कृतादि अन्य भाषांच्या साहाय्यानें तिला विशेष परिपक्वतेस आणणें–हें होय, हें एक झालें. दुसरें साधन विद्वत्त्व व बहुश्रुतपणा. हीहि गोष्ट आमचे लोक बिलकूल लक्षांत आणीत नाहींत. वक्तृत्वगुणाविषयीं अनेकांचे जे अनेक तरंग आहेत त्यांतील एक मोठा हा होय, कीं ज्या अर्थीं प्रकृत गुण हा केवळ ईश्वरदत्त होय त्या अर्थी वक्ता ह्मणजे असा असला पाहिजे कीं, त्यास एकदम झोंपेंतून उठवून सभास्थानीं आणून उभा केला तरी विषय सांगतांच त्याच्या सरस्वतीचा ओघ तात्काळ उच्छृंखलपणें व अस्खलिततेनें चालला पाहिजे! असा वक्ता वस्तुतः पहातां त्रिभुवनांतहि सांपडायाचा नाहीं. डिमॉस्थेनीस सिसरो यांच्या सारख्यांसहि भाषणाच्या अगोदर चांगली मजबूत तयारी करून यावें लागत असे. एवढें खरें कीं एखाद्या मोठ्या निकराच्या प्रसंगीं मोठमोठ्या वक्त्यांनीं केवळ तात्कालिक स्फूर्तीनें समयविशेषीं भाषणें केलीं आहेत; पण तींहि अगदींच अकल्पित विषयावर केलीं आहेत असें नाहीं. तयारी केलेल्या विषयास सोडून अंमळ इकडे तिकडे त्यांनीं थोडीशी भरारी मारली इतकेंच. असो; तर वरील समजूत केवळ पोरकटपणाची आहे. मनुष्याच्या अंगीं कसाहि गुण असला, तरी परिश्रमाखेरीज व अभ्यासाखेरीज त्याचें तेज कधींहि पडायाचें नाहीं. खाणींतून नुकता खणून काढलेला हिरा जसा तादृश

तेजस्वी नसून शिल्पकारांच्या संस्कारप्रयोगाची त्यास अपेक्षा असते त्याचप्रमाणें गुणिजनांच्या अंगीं वसणारी कलाहि शिक्षणाखेरीज पूर्णत्वानें कधीं प्रगट होत नसते. असो; तर याचप्रमाणें वक्तृत्व हें जरी मनुष्याच्या अंगीं जन्मसिद्धच असलें पाहिजे, तरी तें तसें कोणाचे ठायीं असतांहि विद्वत्तेखेरीज तें पूर्ण शोभा कधींहि पावायाचें नाहीं. विद्वान् व रसिक लोकांस तुष्ट करून त्यांचीं मनें आपल्या भाषणानें ज्यास वळविणें असेल त्यानें भाषाशुद्धता, अर्थसंगति, सुंदर व प्रौढ विचार, हीं सर्व साध्य केलीं पाहिजेत. ह्मणजे अर्थात्च व्याकरण, तर्क, अलंकार या शास्त्रांचा अभ्यास करून शिवाय मोठमोठ्या नामांकित काव्यांचें, नाटकांचें, इतिहासांचें वगैरेहि ज्ञान संपादन करून त्यांशीं त्यानें सतत परिचय केला पाहिजे. याखेरीज इतरहि अनेक विषयांची माहिती त्यास असली तर चांगलीच; कारण दृष्टांत वगैरे देण्यास व भाषणास वैचित्र्य व मनोरंजकता आणण्यास ती फार उपयोगीं पडते. तर प्रस्तुत कला आपल्या देशांत वाढण्यास वरील गोष्टींकडे आपल्या लोकांनीं लक्ष दिलें पाहिजे. सध्यां जसें जो उठला तो वक्तृत्व करूं लागतो, तसा प्रकार उपयोगी नाहीं. तिसरें साधन अनुकरण. कोणताहि गुण साध्य करून घेण्यास अनुकरणासारखा उत्तम मार्ग दुसरा नाहीं. यास्तव वक्तृत्वाची आपल्या लोकांस चांगली ओळख करून देण्यास प्राचीन व अर्वाचीन काळीं उदयास आलेल्या नामांकित वक्त्यांचीं भाषणें जर सर्वांस सुलभ होतील तर मोठा उपयोग होईल. आमच्या मराठी भाषेंत वरील सोय अद्याप ह्मणण्यासारखी झाली नाहीं. 'अनेकविद्यामूलतत्वां'त, 'शालापत्रकां'त व 'गद्यरत्नावलीं'त मात्र कांहीं भाषणांचीं भाषांतरें आहेत. त्यांखेरीज दुसरीं कोठें नाहींत. तर वक्तृत्ववृद्धीच्छु लोकांनीं 'वक्त्यांचे वर्ग' वगैरे स्थापण्याच्या व्यर्थ भरीस न पडतां वरील लाभ जर सर्व लोकांस विशेषतः इंग्रेजींत तादृश निपुण न झालेल्यांस करून दिला तर त्यापासून इष्ट हेतु सिद्धीस जाण्याचा पुष्कळ संभव आहे.

याप्रमाणें वक्तृत्वाचा उत्कर्ष होण्यास मुख्य साधनें कोणतीं हवीं तीं सांगितलीं. याखेरीज अंगविक्षेप, स्वर वगैरे जीं दुसरीं वक्तृत्वाचीं अंगें आहेत तीं गौण होत; यास्तव त्याविषयीं कांहीं लिहीत नाहीं. सोन्यारुप्याच्या डागांस झिलई दिल्यानें जशी त्यांची प्रभा अधिक फांकते, त्याप्रमाणें वक्तृत्वास विशेष शोभा आणण्याचीं वरील उपकरणें होत. त्यांस स्वतःसिद्ध योग्यता विशेष नाहीं. यास्तव हल्लींच्या स्थितींत त्यांकडे विशेष लक्ष दिलें नाहीं तरी चालणार आहे.

५. येथवर प्रस्तुत विषयाच्या तिसऱ्या भागाविषयीं निरूपण झालें. आतां सरते शेवटचा भाग हातीं घेण्यापूर्वी सदरील अंकांत अलीकडे प्रसिद्ध झालेल्या व सध्यां प्रसिद्ध असणाऱ्या वक्त्यांविषयीं कांहीं लिहितों.

खालील लेख लिहिण्याचीं दोन तीन कारणें आहेत. एक तर जे प्रसिद्ध

होऊन गेले त्यांचा कांहीं तरी निर्देश करणें हें अत्यंत उचित होय ह्मणून. दुसरें त्यांविषयीं लोकांची यथार्थ बुद्धि करणें; आणि तिसरें निबंधाची पूर्णता, ह्मणजे मागें जे कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत ते अप्रमाण नाहींत असें दाखविणें. असो; इकडे ह्मणजे महाराष्ट्र देशांत इंग्रेजीचा आरंभ बंगाल्यापेक्षां व मद्रासेपेक्षां फार उशीरानें झाला, यास्तव त्या विद्येचीं वक्तृत्वादि जीं फळें तीं त्याच मानानें इकडे पुष्कळ वेळानें ह्मणजे अगदीं अलीकडे दृष्टीस पडूं लागलीं आहेत. हें सर्वांसमाहीत आहेच. तथापि या प्रांताचे लोक हिंदुस्थानाच्या कोणत्याहि भागांतील लोकांहून बुद्धीनें कमी तर मुळींच नसल्यामुळें वरील नवीन विद्येचा फैलावा गेल्या वीस पंचवीस वर्षांतहि पुष्कळ झाला. या नवीन विद्वन्मंडळांत प्रस्तुत गुणाच्या संबंधानें प्रख्यातीस आलेले दोन गृहस्थ होते. ते दोघेहि पूर्ववयांतच कांहीं वर्षांपूर्वी परलोकवासी झाले. एक रावसाहेब महादेवशास्त्री कोल्हटकर, आणि दुसरे रावबहादूर विष्णु परशुराम रानडे. कोल्हटकर यांच्या 'अथेल्लो' नाटकाविषयीं प्रस्तुत मालेंत आह्मीं अनेक वेळां लिहिलेंच आहे. त्याखेरीज 'कोलंबसाचा वृत्तांत,' 'पदार्थ आणि चलन' वगैरे आणखीहि कांहीं थोडीं पुस्तकें त्यांच्या नांवावर प्रसिद्ध आहेत. रानडे यांचें नांव ग्रंथकारांच्या मालिकेंत मुळींच नाहीं ह्मटलें असतां चालेल. त्यांचा लौकिक त्यांच्या निबंधांवर व वर्तमानपत्रांत ते मजकूर लिहीत असत त्यावरच काय तो आहे. या गृहस्थानें इंग्लिश भाषेचा फार चांगला अभ्यास केला होता; तो इतका कीं, त्याचे त्या भाषेंतील लेख वाचून खुद्द इंग्रेजांसहि भ्रांति पडावी! हे सर्व लेख एकत्र करून छापण्याचा व ते लिहिणाराचा जीवनवृत्तांतहि त्यांबरोबर सविस्तर देण्याचा बेत होऊन तें काम एका प्रसिद्ध विद्वानानें हातीं घेतलें होतें; पण त्याचें पुढें काय झालें तें समजण्यांत कांहींच आलें नाहीं. आमच्या नव्या लोकांचे दर वर्षीं हजारों बेत होऊन ते ज्या पंथाला बहुधा जातात तीच त्याची गति झाली असावी! असो; तर वरील दोघां गृहस्थांचा सामान्यतः विद्वत्तेविषयीं व हुशारीविषयीं जसा लौकिक होता तसाच वक्तृत्वाविषयींहि होता. कोल्हटकर हे डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर असून आपल्या वक्तृत्वाच्या योगानें फार लोकप्रिय होऊन गेले होते. त्यांची भव्य मुखश्री व गंभीर स्वर यांच्या योगानें त्यांच्या भाषणास विशेष मनोवेधकता येऊन तें ऐकण्याविषयीं श्रोत्यांचीं मनें अगोदरच उत्कंठित होत. रानडे हेहि चेहऱ्यावरून मोठे पाणीदार दिसत; आणि त्यांचा स्वरहि खणखणीत असल्यामुळें त्यांचें भाषण ऐकणारांच्या हृदयावर चांगलें ठसे. हे शेवटीं शेवटीं डेप्युटी कलेक्टरच्या जागेपर्यंत चढले असून त्या कामांतहि त्यांचें तेज चांगलें पडलें.[1] असो; या दोघांचेंहि वक्तृत्व

१. वरील हुद्द्यावर असतां रावबहादुरांनीं आपल्या अंगच्या हिम्मतीचें व लोकहितपर

(पुढें चालू).

आमच्या कानीं चांगलेंसें कधींहि न पडल्यामुळें त्याविषयीं खात्रीचा असा कोणत्याहि तऱ्हेचा आमच्यानें अभिप्राय देववत नाहीं. वर सांगितलेल्या गोष्टी दहा पंधरा वर्षांमागच्या असल्यामुळें त्यांची वक्तृत्वाची ख्याति मूळची खरोखर किती, हुद्द्यानें आलेली किती, व श्रोत्यांच्या अज्ञानानें व अनभिज्ञतेनें किती, हें आह्मांस सांगवत नाहीं. पण इतकें खरें दिसतें कीं, ज्या अर्थीं वर सांगितलेला वरील गृहस्थांचा लौकिक विद्वानांच्या व अविद्वानांच्याहि तोंडीं असे, त्या अर्थीं प्रस्तुत गुणाचें वास्तव्य त्यांच्या अंगीं बरेंच असावें. हे निवर्तल्यापासून यांच्या मागें विशेष नांवाजलेले कोणी फार करून नाहींत. एका गृहस्थास मात्र त्यांच्या बरोबरीनें कदाचित् बसवतां येईल असें वाटतें. या नव्या वक्त्याची विद्वत्ता वरील दोघांच्या पेक्षां निराळी आहे; व स्वभावाच्या, चालचलणुकीच्या वगैरे इतर संबंधांनींहि त्याच्यांत व वरील दोघांत पुष्कळच तफावत आहे. वक्तृत्वाच्या संबंधानें पाहिलें तर तें प्रसंगविशेषीं चांगलें चित्तवेधक व समर्पक असतें यांत संशय नाहीं. पण वळवाच्या पावसासारखा त्याचा नेम ह्मणून कधीं धरवत नाहीं. मनाच्या अस्थैर्यास्तव, कधीं विद्वत्तेच्या, कधीं हुद्द्याच्या डौलांत, कधीं मत्सरास्तव, कधीं कांहीं एक विशेष कारण नसतां केवळ हुक्की-खातर, वरील वक्त्यास स्वतःचेंच भान न राहून तो कोणीकडच्या कोणीकडेच भरकटत जातो! मग एखादे वेळेस असे होतें कीं, तें त्याचें वक्तृत्व त्याचें त्यासच सांवरतां सांवरतां पुरे वाट होते! असो; एकंदरींत तात्कालिक स्फूर्तीनें श्रोत्यांच्या चित्तास लागण्यासारखें भाषण करण्याची या गृहस्थाच्या अंगीं बरीच शक्ति आहे; पण वरच्याप्रमाणें तें बहुधा अनियमित असल्यामुळें व स्वतःविषयींचा मजकूर यांत नेहमीं कांहींना कांहीं तरी घुसवून दिल्यामुळें, त्यापासून श्रोत्यांस पुष्कळ वेळां ह्मणण्यासारखें ज्ञान कांहींच न होऊन हंसण्यास मात्र विषय होतो!

या ठिकाणीं हिंदुस्थानाच्या इतर भागांतील प्रसिद्ध वक्त्यांचाहि कांहीं निर्देश

बुद्धीचें एक उत्कृष्ट उदाहरण दाखविलें तें येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हें अर्थातच पंढरपूरच्या देवळाचीं दारें फोडून मोठमोठीं करून बडव्यांच्या व उत्पातांच्या दांडगाईस, अनाचारास, व द्रव्यहरणास जो त्यांनीं चिरकाल रहाण्याजोगा प्रतिबंध केला तो होय. एकंदरींत वरील गृहस्थाच्या अंगीं देशकल्याणाची खरी इच्छा, व त्यांतून विशेष दुर्लभ जो आस्थापूर्वक उत्साह, तो पुष्कळ होता यांत संशय नाहीं. केवळ पुढें पुढें मिरवणाऱ्या हल्लींच्या कित्येक लोककल्याणेच्छूंप्रमाणें शुष्क पांडित्य करण्याची त्यांस आवड नसे. लोकाचाराच्या संबंधानें त्यांच्या वागणुकीत कित्येक मोठमोठे दोष होते खरे; व धर्मसंबंधीहि त्यांचीं मतें ठीक नव्हतीं. तरी शेवटीं अतकाळपर्यंत त्यांची वृत्ति जी अगदीं स्वस्थ व नेहमींप्रमाणें आनंदित राहिली, तिजबद्दल तारीफ केल्यावांचून व आश्चर्य वाटल्यावांचून कोणासहि राहवणार नाहीं. इंग्लंडांतील प्रसिद्ध ग्रंथकार ह्यूम याची उपमा वरील संबंधानें त्यांस सर्व प्रकारें पूर्ण साजेल.

करणें अवश्य होय. कां कीं, दिवसानुदिवस एकराज्याच्या संबंधानें, व राजकीय, लौकिक, धर्मसंबंधीं वगैरे प्रकरणांनींहि दूर दूरच्या प्रांतांत परस्परांविषयीं यापूर्वी जें औदासीन्य किंबहुना दुजेभाव असे तो मोडत जाऊन स्नेह जमत चालल्यामुळें देशाच्या एके भागाच्या जी हिताहिताची गोष्ट तीच बाकीच्या सर्वांस लागेशी झाली आहे. शिवाय ज्यांविषयीं पुढें उल्लेख करावयाचा आहे, त्यांची प्रसिद्धि साऱ्या देशभर असून ते चोहोंकडे फिरलेलेहि आहेत. तेव्हां त्यांची वक्तृत्वशक्ति अनुभविलेले इकडे पुष्कळ लोक असल्यामुळें त्यांचा उल्लेख इकडील वक्त्यांप्रमाणेंच केला असतां चालणार आहे. असो; आधुनिक वक्तृवर्गांत मुख्यत्वेंकरून पहिलें नांव ह्मटलें ह्मणजे बाबू केशवचंद्र सेन यांचें होय. हे ब्रह्मसमाजाच्या मंडळींत अग्रगण्य असून त्या मार्गाच्या प्रीत्यर्थ यांनीं युरोपांत व अमेरिकेंतहि आपली वक्तृत्वशक्ति गाजविली हें सर्वांस माहीत आहेच. हे विलायतेस गेले होते तेव्हां यांच्या विद्वत्तेची व वक्तृत्वाची चोहोंकडे प्रशंसा होऊन कित्येक पुरुष व बायका लागल्याच आपला ख्रिस्ती धर्म सोडून यांच्या पंथास अनुसरल्या. तसाच प्रकार अमेरिकेंतहि घडून आल्याचें समजतें. असो; एकंदरींत या सर्व गोष्टींवरून प्रस्तुत गुण बाबू मजकुरांच्या अंगीं अप्रतिम असावा असें दिसतें. यांच्या खालोखाल प्रसिद्धि पाहिली तर बाबू प्रतापचंद्र यांची होय. यांचाहि विद्वत्व व वक्तृत्व या गुणांविषयीं चोहोंकडे मोठा लौकिक आहे. केशवचंद्र सेनांप्रमाणेंच हेहि कांहीं महिन्यांपूर्वी विलायत गाजवून आले. तीन चार वर्षांपूर्वी हे येथेंहि आले होते; व चालीप्रमाणें चोहोंकडे व्याख्यानें, उपदेश वगैरे प्रकार झाले. ब्रह्मसमाजाची येथें शाखा स्थापण्याकरतां बाबूंनीं पुष्कळ खटपट केली, पण श्रोत्यांस स्वतःचें हित त्यांच्यापेक्षां बरें कळून कोणीं ह्मणण्यासारखा त्यांस हुकार दिला नाहीं. इतर समारंभांप्रमाणेंच वरील समारंभ मंडळीनें साजरा करून वक्त्याचे आभार मानणें वगैरे सर्व यथाविधि केलें; पण आपल्या वक्तृत्ववृक्षास गारोड्याच्या आंब्याप्रमाणें तत्क्षणींच फलद्रूपता व्हावी हा जो हेतु वरील धर्मोपदेशकानें मनांत धारण केला होता तो मात्र बिलकूल सिद्धीस गेला नाहीं. असा आशाभंग झाला तेव्हां बाबूंनीं दुसरीकडे संधान करण्याचा यत्न केला. येथील रडत कडत चाललेल्या प्रार्थनासमाजानें व मयत 'थीइस्टिक आसोशियेशन' (देवशोधक मंडळी) हिनें ब्रह्मसमाजाशीं एकात्मक होऊन आपल्या पंथाचें नांव धारण करावें, असा त्यांनीं विचार काढला; पण काय झालें असेल तें असो, तोहि वरील भक्तमंडळीस मान्य झाला नाहीं. असो; एकंदरींत वरील वक्त्याचें देशाटन पुष्कळ होऊन त्याची प्रस्तुत गुणाबद्दल जिकडे तिकडे ख्याति आहे. पण वरील बाबूंचीं एक दोन भाषणें ऐकून आमची जी समजूत झाली ती येथें स्पष्ट लिहिली पाहिजे. ती ही कीं, त्यांनें उभें राहून साधारण चार चौघे बोलतात त्याप्रमाणें इंग्रेजींत भाषण कर-

ण्याची शक्ति त्यांच्या अंगीं आहे खरी; पण त्यांच्या सार्वत्रिक प्रसिद्धीसारखा त्यांच्या भाषणांत मोठा अद्भुतसा गुण आह्मांस कोणताहि दिसला नाहीं. तोंपर्यंत इकडील लोकांनीं बंगाल्यांतील बाबू कसा तो मुळींच पहिला नव्हता यास्तव, व त्यांची ख्यातिहि सर्वांनीं अगोदरच ऐकिली होती यामुळें, त्यांची प्रशंसा लहानथोरांच्या सर्वांच्या तोंडीं तेव्हांच झाली असें आह्मांस वाटतें. त्यांच्या भाषणांत ह्मणजे कांहीं अपूर्व रस होता, व तो समजण्याजोगती मंडळीच्या ठिकाणीं अभिज्ञता होती, हें ह्मणणें ह्मणजे अंमळ पंचाइतीचेंच ! या आमच्या मतास प्रस्तुत भाषणांचें फळ कितीसें दृष्टोत्पत्तीस आलें याविषयीं जें वर नुकतेंच वाचकांस कळविलें आहे त्यावरून चांगलीच बळकटी येते. ज्या लोकांनीं त्या प्रसंगीं यथेच्छ माना डोलवल्या व टाळ्यांचा गजर केला, व कोणीं विद्वत्तेची, कोणीं धर्मपरायण बुद्धीची, कोणीं इंग्रेजांच्या ज्ञानाची, कोणीं वक्तृत्वशक्तीची, अशी आपआपल्या प्रकारें भाषणकर्त्याची खूप तारीफ केली, त्यांनीं ब्रह्मसमाजास मिळण्याची खुषी असल्याबद्दल हात वर करण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां कोणीं सगळा तर कोणीं अर्धाच, आणि तोहि तिघां चौघांनीं, असाच हात वर केला ! शिवाय वरील वक्त्याच्या भाषणाचा असाहि प्रकार नजरेस येतो कीं, जें भाषण मुंबईस होऊन श्रोतृमंडळीच्या आग्रहास्तव छापलें गेलें, तेंच येथें व तेंच लंडनमध्यें ! त्याच सुमारास एक अमेरिकन प्रोफेसर सीलि नामेंकरून येथें आले होते; त्यांची जशी छापील भाषण करण्याची तऱ्हा होती,[1] तसाच प्रकार प्रतापचंद्र यांचा आहेसा दिसतो. तसेंच धर्मोपदेशकाच्या अंगीं जी गंभीरता व औत्सुक्य दृष्टीस पडावें तेंहि प्रस्तुत वक्त्याच्या अंगीं विशेष दिसत नाहीं. पुण्यांतून नुकते यशस्वी होऊन गेलेले जे दयानंदस्वामी यांच्याप्रमाणेंच वरील बांबूंस कुचेष्टा करण्यांत मोठी प्रतिष्ठा वाटते. नवा धर्म जो स्थापायाचा तो जुन्याची विटंबना केल्यानें व पोरासोरांस व मूर्ख लोकांस हंसविण्यानें, एवढ्यानेंच केवळ स्थापिला जाईल अशी त्यांची समजूत आहेशी दिसते. असो; एकंदरींत सर्व गुणांनीं या दुसऱ्या वक्त्याची योग्यता पहिल्याहून पुष्कळ कमी येईल असें आह्मांस खास वाटतें.

आतां सरते शेवटीं वरील दोघांहूनहि जाडी प्रकरण जे वरील महाविख्यात स्वामी त्यांच्याविषयीं कांहीं लिहून हा अंक व हा भाग आटपतों. यांस वरील दोघां बाबूंच्याहूनहि वरच्या पदवीस चढविण्याचें कारण उघडच आहे कीं, ते त्यांच्यासारखे केवळ प्रेषित होऊं पहात नाहींत; तर बुद्ध, ख्रिस्त, महंमद, राममोहनराय, यांच्याप्र-

---

१. वरील साहेबांनीं ख्रिस्ती धर्माच्या गौरवाचें असें एक व्याख्यान येथें दिलें. तें पहिल्या प्रसंगास बरेंच चित्तवेधक होतें. पण पुढें एके दिवशीं पहातां तें जसेंचें तसें शब्दानशब्द एका लहानशा पुस्तकांत वरील प्रोफेसरांचे नांवानें छापलेलें सांपडलें ! हा प्रकार आपलेंच द्रव्य आपण चोरल्यासारखा होय !

मार्ग नव्या पंथाचा प्रवर्तकच होण्याची त्यांनीं उमेद धरली आहे. स्वामी महाराजांनीं आमच्या पुण्यपत्तनास आपल्या पवित्र मूर्तीनें पावन करून कांहीं महिन्यांपूर्वी देशोन्नत्यर्थ जीं अनेक व्याख्यानें दिलीं त्यांतील एकांत आपल्या भाविक शिष्यवृंदास आपला त्यांनीं चरित्रमहिमा ऐकाविला. त्यावरून असें कळतें कीं, आर्यसमाजवाल्यांची पुण्यभूमि व महातीर्थ गुजराथेंतील अजमीर नामक गांव होणार! कबीर, तुळसीदास, तुकाराम, वगैरे आजपर्यंत थोर व पुण्यशील मानलेल्या महामूर्ख व महादुष्ट लोकांची तेजोहानि करून महार मांगप्रभृति शूद्रजातींचा अभ्युदय करणारें तेज तथें उदय पावलें. हें या आर्यभूमीवर तिच्या मोठ्या सुदैवानें आज चाळीस वर्षें झळकत असून अलीकडे दोन तीन वर्षांपर्यंत तें जागच्या जागींच दडून कसें राहिलें याचा आह्मांस मोठा चमत्कार वाटतो व चित्तास अत्यंत विषाद होतो! प्रस्तुत भद्रपुरुष हे आपल्या देशबंधूंच्या पारलौकिक हिताची एवढी कळकळ बाळगीत असतां आज निदान वीस वर्षें तरी मूर्तिपूजेच्या घोर पापमार्गास अनुसरल्यानें कोट्यावधि लोकांच्या आत्म्याचें जें आज अक्षय नुकसान झालें तें त्यांच्यानें खुशालपणीं कसें पहावलें कोण जाणे! त्यांचे कित्येक महाविद्वान् शिष्य तर त्यांस लूथरची उपमा देतात; व सकृद्दर्शनीं निदान बहिरंगदृष्ट्या तरी तिजवर कोणीहि आक्षेप घेईलसें वाटत नाहीं. मग स्वामींचें अंतरंगच एवढें कठोर कां बरें? त्यांनीं स्वचरित्रांत सांगितलें आहे कीं त्यांचा मामा वारला असतां ते वयानें लहान असतांहि त्यांच्या डोळ्यास टिपूसहि आलें नाहीं; तेंच निर्वाण निर्ममत्व तर वयःपरत्वें उत्तरोत्तर परिपक्व दशेस आलें नसेल ना!

दयानंदजींनीं धर्मविषयावर जीं अलीकडे कित्येक नवीं मतें प्रगट केलीं आहेत,—कीं जीं त्यांच्या सच्छिष्यांनीं मोठ्या प्रेमळ भक्तीनें टिपून घेऊन त्यांचा चोहोंकडे मोठ्या आस्थेनें प्रसार मांडला आहे; व ज्यांच्या योगानें संस्कृतशून्यासहि अकस्मात् विद्वत्त्वाची स्फूर्ति होऊन बड्या बड्या पंडितांशींहि टक्कर मारण्याचें अंगीं सामर्थ्य येतें,[1]—त्याविषयीं येथें विचार करावयाचा नाहीं. त्याविषयीं पुढें प्रसंगोपात्त एखादे निबंधांत स्वतंत्रपणें लिहितां येईल. तसेंच स्वामींची विद्वत्ता कशी काय आहे याविषयींहि आह्मांस लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. त्यांच्या प्रसादानें

---

१. वरील प्रसाद केवळ एतद्देशीयांसच झाला असता तर इतकें नवल नव्हतें; पण चमत्कार काय कीं, जेथें वेदविद्येचा किंबहुना नुसत्या संस्कृताच्या ज्ञानाचाहि प्रवेश होण्याचा फारसा संभव नाहीं, अशा माजिस्ट्रेटी कोर्टांसहि तो लाभ झाला. स्वामींच्या मिरवणुकीपासून उत्पन्न झालेल्या गाढवाच्या खटल्यावर आमच्या सिटी माजिस्ट्रेट साहेबांनीं जें फाइंडिंग (अभिप्राय) लिहिलें आहे तें मोक्षमुलर साहेबांनीं किंवा हौग साहेबांनीं लिहिलें आहे कीं काय असा भास होतो!

ज्यांस चार दिवसांत चार वेद पालथे घालतां आले, व यजुर्वेद तर पांढऱ्याचा काळा व काळ्याचा पांढरा होऊन गेला, त्यांजवरच स्वामींचे पोवाडे गाण्याचें, किंवा कवित्वशक्ति शेष राहिली असल्यास एखादें वीररसप्रधान काव्य रचण्याचें आह्मी सोंपवून देतों. या ठिकाणीं फक्त वक्तृत्वाच्या संबंधानें प्रस्तुत परमहंसांची योग्यता कितीशी आहे ती पाहूं.

वरील वक्तृत्वाचें स्वरूप या शहरच्या लोकांत जसें पूर्णपणें दृष्टीस पडलें तसें इतर कोणत्याहि ठिकाणीं पडलें नसेल. बाकी पुष्कळ ठिकाणीं ह्मणजे मुंबई, अमदाबाद, नाशिक, सातारा वगैरे शहरीं सद्धर्मविवेचनेच्छु लोकांनीं स्वामींस पाचारण करून त्यांचें अमूल्य ज्ञान मोठ्या भक्तीनें श्रवण केलें; पण पुण्यास जसा थाट उडाला तसा कोठेंहि नाहीं. गेल्या जुलई व आगस्ट महिन्याभर स्वामींच्या नांवावर सगळें शहर जसें काय झुलत होतें! दर रोज रात्रीं दिवसां स्वामींच्या भोंवतीं ज्ञानेच्छु मंडळीची सारखी झिमड! फार तर काय, पण सगळ्या लोकांत ज्ञानाच्या संबंधानें केवळ श्रेष्ठ ह्मणून मिरविणाऱ्या अशा पुण्याच्या पुढारी लोकांसहि स्वामींनीं असे आपले अंकित करून सोडले होते कीं, त्यांच्या सेवेव्यतिरिक्त त्यांस कांहीं दुसरें सुचेनासेंच झालें! तेहेतीस कोटी देव सोडून देऊन एका देवास भजा, मूर्तिपूजनाचा घोर पापमार्ग सोडून द्या, तो देवास खचीत अगदीं आवडत नाहीं, व त्यामुळेंच तर आपल्या देशाचें व प्राचीन ग्रीक, रोमन, मिसरी, पारसीक इत्यादि लोकांचें देवानें रागानें वाटोळें करून टाकलें, दोन तीन वर्षांमागें पंढरपूरच्या देवास जशी भिक्षा मिळाली तसा प्रकार जेव्हां घरोघर सुरू कराल तेव्हांच देशाच्या उन्नतीस आरंभ होईल, ब्राह्मणांचें व भटांचें माहात्म्य वाढवून त्यांनीं उपदेशिलेल्या मार्गास अनुसरून रे तुमचें काय कल्याण होणार!—मराठीशाहि बुडून चोहोंकडे इंग्रजी झाली आहे हेंहि तुह्मी कसें लक्षांत आणीत नाहीं! तीं तुमचीं जुनीं देवळें, जुनीं व्यासपीठें, जुनीं धर्मपुस्तकें वगैरे सर्व आतां विसरा; हल्लीं इंग्रेजी राज्यांत नवीं नव्या पद्धतीचीं मंदिरें जेव्हां बांधाल, खुर्च्या, टेबलें आंत ठेवाल, 'प्रार्थनासंगीता'-सारखीं अगदीं गाळीव धर्मतत्त्वांचीं अत्यंत शुद्ध अशीं जेव्हां पुस्तकें बाळगाल, व युनिव्हर्सिटींत प्रसार होऊन मोठाले किताब मिळविलेल्या एखाद्या विद्वानास धरून त्याच्या धोरणानें जेव्हां चालाल तेव्हां स्वर्गाचा मार्ग तुह्मांस दिसेल; पूर्वीचे मार्ग आतां सारे बंद झाले आहेत—अशा प्रकारचा उपदेश मिशनरी लोक व त्यांच्याच मतांचें थोडेंसें रूपांतर करून देशास नवा धर्म देऊं पहाणारे आमचे नवीन पंडित हे आज वर्षानुवर्षे करीत आले. पण त्यांच्या इतक्या दिवसांच्या उपदेशानें, इतक्या व्याख्यानांनीं, इतक्या मासिक पुस्तकांनीं व इतक्या ग्रंथांनीं तेहतीस कोटींतला एकहि देव कमी झाला नाहीं, किंवा एकहि मूर्ति भंगली नाहीं! तेव्हां अशा संधीस

प्रस्तुत परमहंसाचा जो उदय झाला तो त्यांस किती अभिनंदनीय होय हें सर्वांस सहज समजेल! वरील मंडळीचें फसे काय, कीं ज्यांच्या उद्धारार्थ ते स्वर्गास शिड्या लावण्याची तजवीज करीत त्या सामान्य लोकांचा त्यांजवर बिलकूल विश्वास च मुळीं बसत नसे. ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या लोकांस तर ते बाटेच ह्मणत, व इतरांस धर्मभ्रष्ट किंवा नास्तिक ह्मणत. तेव्हां उपदेशाचा मार्ग येथेंच अगोदर खुंटला. पण दयानंदजीची कशी मौज आहे! ते परिव्राजकाचार्य असल्यामुळें विरक्त धर्मशील वगैरे तर झालेच; शिवाय विद्वत्तेची मोठी ख्याति असून वेदग्रंथांचा तर त्यांस अतोनात अभिमान;--तो हरएक प्रसंगीं ते बोलून दाखवितातच! तेव्हां वरील गुणांनीं लोकांचा विश्वास जडण्याचें त्यांजपाशीं उत्कृष्ट साधन असून शिवाय वरील धर्मस्थापकांचा मुख्य जो मुद्दा कीं कसा तरी मूर्तीचा एकदां सत्यानास होवो, तो कटाक्ष वरील बोवांचा तर त्यांच्याहूनहि चौपट! तर याप्रमाणें वरील सर्वोत्कृष्ट सोयी असल्यामुळें स्वामीमजकुराचा जेथें तेथें मोठा आदरसत्कार झाला. शिष्यपरिवारासह यथेच्छ चमचमीत पाहुणचार, धर्मजिज्ञासु व मुमुक्षु जनांची दर्शनार्थ नेहमीं दाटी, विद्वत्तादि गुणांचा सर्वतोमुख जयजयकार अशा सोहळ्यांत त्यांचें जेथें तेथें कालक्रमण झालें. पुण्यांत तर मागें सांगितल्याप्रमाणें स्वामींचा जो सत्कार झाला तो कांहीं विचारूंच नये! त्यांतून 'हिंदुक्लब'[1]मध्यें व्याख्यानसमयीं जो थाट नजरेस पडे तो तर कांहीं अवर्णनीय! श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य उंच व्यासपीठावर खुर्चीवर बसलेले, त्यांच्या सरस्वतीच्या ओघाचा थेंब ना थेंब टिपून घेण्यास लेखक मंडळी जवळ बसलेली, भोंवताली स्वामींचे मुख्य पुरस्कर्ते असे कोणी बडे विद्वान् कोणी छोटे विद्वान् वक्तृत्वाचें सेवन करून मान डोलवण्यास व हंसून विनोदास रंग आणण्यास सदा तत्पर असलेले, आणि सगळ्या दिवाणखान्यांत कोणी केवळ मौज पहाण्याकरतां, कोणी मूर्तिपूजेस कंटाळून तींतून सप्रमाण मुक्त होण्याकरितां, कोणी वक्तृत्वाचा लाभ करून घेण्याकरतां, कोणी ब्राह्मणांची व भटांची फजिती ऐकण्याकरितां, अशा निरनिराळ्या उद्देशांनीं जमलेल्या मंडळीचा थाट! असा अपूर्व श्रोतृवृंद पाहून कोणत्या वक्त्यास आपली धन्य वाटणार नाहीं! मग अगोदरच पंडितंमन्य

---

१. इंग्लंडांत शंभर वर्षांपूर्वी 'जॉनसनचा क्लब' ह्मणून एक मोठमोठ्या नामांकित पंडितांची मंडळी दर आठवड्यास एके ठिकाणीं जमत असे. त्या धाटणीवर वरील 'क्लब' येथें एका प्रसिद्ध ठिकाणीं कांहीं दिवस जमत असे. पण इंग्लंड तो इंग्लंड आणि हिंदुस्थान तो हिंदुस्थान! 'जॉनसनचा क्लब' सुमारें पन्नास साठ वर्षें सारखा चालला होता; आणि आमचा तितके दिवसहि चालला कीं नाहीं कोण जाणें! कांहीं दिवसांपूर्वी त्याचा मिलाफ येथील 'गायनसमाजा'शीं होणार ह्मणून ऐकिलें होतें. हा अपूर्व संयोग कोणत्या रसायनव्यापारानें होणार होता कोण जाणे!

व अहंकाराचें केवळ वसतिस्थान असे आमचे परमहंस तर केवळ अकांड तांडव करूं लागले यांत काय आश्चर्य ? प्रार्थनासमाजाच्या धुरंधरांनीं पुढें पुढें करून आपली जी एवढी मिजास चालविली आहे, व मंडळीचा थाट समजून ते आपणांस हातावर झेलीत आहेत, याचें गुप्त बीज काय याचा विचार स्वामी महाराज आपली विशाल बुद्धि अंमळ खर्च करून जर करते; तर त्यांची खात्री झाली असती कीं, ज्यांचा जन्म वेदशास्त्रादिकांचा निवळ अज्ञानानें व दुराग्रहानें उपहास करण्यांत गेला, ज्यांस या देशांत नुसतें बरें ह्मणण्याजोगतेंहि आजपर्यंत कांहींच दिसलें नाहीं, वैदिक मार्गाचा उत्कर्ष करण्याची ज्यांची इच्छा तर अशी प्रबळ आहे कीं, तो सगळा एकीकडे गुंडाळून ठेवून किंवहुना त्याचा उच्छेद करून डोळे मिटण्याचा व गाणें बजावणें करण्याचा धर्म चोहोंकडे फैलावण्याचा ज्यांचा यत्न सतत चालू आहे, ते आपल्या चरणीं एवढे लीन जे झाले आहेत ते आपलें अज्ञान नाहींसें करून घेऊन आपला मूर्खपणा पदरीं घेण्याकरतां झाले असतील असें नाहीं ! मनुष्यस्वभावाची ज्यास लेशमात्र ह्मणून ओळख आहे, त्यासहि वरील विरोध तेव्हांच भासला असता, व यांत कांहीं तरी गोम आहे असा संशय आला असता. पण स्वामींस तसें बिलकूल झालें नाहीं. आपल्या दररोजच्या चंदींस भुलून गेल्यामुळें त्यांची युक्ती, प्रमाण, अनुमान वगैरे सर्व लटपटून गेलें ! ज्यास खरोखरच धर्माची सुधारणा करण्याचें मनांत असून नवा पंथ स्थापायाचा असेल, तो आपल्या प्रतिपक्ष्यांच्या मतलबी मानसन्मानास कधीं भुलायाचा नाहीं. त्यांतून भारती युद्धांत शिखंडीनें जें पांडवांचें कार्य करून दिलें, किंवा एखाद्या किल्ल्याचा दरवाजा फोडणें असतां उंटास पुढें करून जें काम करून घेतात, तसा उपयोग आपली अंजारणी गोंजारणी करून कोणीं करून घेण्याचें मनांत आणल्यास कोणत्याहि सामान्य मनुष्यास अतिशय राग येईल. पण प्रार्थनासमाजाच्या अध्वर्यूनीं आपल्या पंथाच्या पुष्टयर्थ बळी देण्याकरतां आर्यसमाजाची स्वामींच्या द्वारें उत्पत्ति करून त्याचें वरील दुष्ट हेतूनें पोषण करण्याचा घाट घातला असतां त्याच्या जनकाच्या बिचाऱ्याच्या तें मुळींच ध्यानीं मनींहि नाहीं !

स्वामींच्या वक्तृत्वाच्या परीक्षेस एवढी प्रस्तावना पुरे आहे. ही इतकी लांब लिहिली हेंहि कित्येकांस कदाचित् नीट वाटणार नाहीं. पण या शहरांत महिना दोन महिने सारखे गाजून केवळ अजेयत्वानें जे चोहोंकडे मिरवत होते, ज्यांचीं व्याख्यानें (एवढा शब्द तरी स्वामींच्या मतलबी पुरस्कर्त्यांनींच त्यांच्या भाषणांस दिलेला, एरवीं त्यांस तो पुरतेपणीं शोभण्याची मारामारच !) बडे बडे विद्वान्हि शिंगें मोडून बासरींत शिरून पोरांसोरांबरोबर मोठीं भक्तिपुरस्सर ऐकत होते, ज्यांनीं आज हजारों वर्षें पडलेल्या प्रवाहास सहस्रबाहु अर्जुनाप्रमाणें सहसा रोध करून या आर्य-

भूमीच्या हितकर्त्यांत पहिली पायरी पटकाबण्याची हांव बांधली आहे, व वरील महान् उपकाराबद्दल पदरजीं लीन होत्साता ज्यांच्या सच्छिष्यांनीं त्यांस गजेंद्रमस्तकारूढ करून मोठ्या जयघोषानें व समारंभानें एखाद्या समरविजयी वीराप्रमाणें त्यांकडून पुरप्रवेश करविला,[1] अशा श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यत्वाद्यनेकगुणविराज-

१. श्रीमत्परमहंसांनीं आपल्या चुटपुटत्या शास्त्रज्ञानानें पुण्याच्याचशा काय, पण एकंदर सगळ्या भारतवर्षीय पंडितांचाहि पराभव करून टाकला, व त्यांच्याशीं वादास उभें रहाण्यास कोणाचीहि छाती होईना, एवढा प्रताप आमच्या मतें कोणत्याहि समंजस व सुज्ञ मनुष्यास पुरेसा झाला असता. पण रिपुषट्काचा स्वामींनीं जय केला असतांहि त्यांतील पांचवा एकाएकीं उच्छृंखळ होऊन त्यानें शिष्यमंडळीस जें प्रेमाचें व भक्तीचें भरतें आलें त्यास साहाय्य केलें. स्वामींची एखाद्या नव्या नवऱ्या मुलाप्रमाणें मोठ्या थाटाची वरात निघणार ही वातमी पुष्कळांस अगोदर खरीशीहि वाटेना; गटारयंत्रावरील भटांनीं उगींच द्वेषबुद्धीनें ती पिकविली असेल असें वाटलें. पण अंमळशानें पहातात तों सर्वांची भ्रांति फिटली. महारापोरांनीं व कामाठ्यांनीं मशाली व दिवट्या धरल्या आहेत, परमहंस गजेंद्रावर आरूढ झाले आहेत, पुढें बाजांचे ताफे चालले आहेत, व लवाड आणि दुष्ट ब्राह्मणांच्या चिरकालिक दास्यांतून विमुक्त झालेले असे त्यांचे शिष्य मोठी कृतकृत्यता मानून आपल्या सद्गुरूंचा पार्श्वभाग सुशोभित करताहेत, अशा थाटानें पालखींत मिरविलेल्या शास्त्र्याच्या सवाईनें स्वारी ब्राह्मणांचें नाक ठेंचीतच शहरांत प्रवेश करती झाली. शेवटीं बुधवारांत दाखल होऊन ज्या ठिकाणाहून दयेचें व आनंदाचें शुभवर्तमान चोहींकडे फैलावलें त्या पवित्र जागीं सगळे वऱ्हाडी येऊन दाखल झाले. श्रीमंत सिंहासनावर चढले; मग सद्धर्माच्या प्रीत्यर्थ एवढा खटाटोप करून थकलेली भागलेली अशी शिष्यमंडळी मोठी कृतकृत्य होत्साती जागजागीं बसली. नंतर एका दोघां सच्छिष्यांनीं सुरस भाषणें करून एका पंडिताकडून जगद्गुरूंचा स्तुतिपाठ करविला. याप्रमाणें महिना दीड महिना चालेल्या खटपटीचा सर्व बऱ्या प्रकारें शेवट होऊन एका समाजस्थापनाखेरीज कोणतीहि कर्तव्यता उरली नाहींशी दिसली. पण देवाची लीला अगाध! त्याचें मूर्तत्व नाहींसें करून टाकून वास्तव स्वरूपाची प्रतीति लोकांच्या हृदयांत ठसविण्यास दयानंदजींनीं व त्यांच्या चेल्यांनीं एवढा विभु रचला असतांहि तो अकस्मात ढासळून सर्वांवर दे माय धरणी ठाय असा प्रसग एकाएकीं येऊन गुजरला. छबिन्याची मंडळी जी बाहेर उभी राहिली होती तिचा व त्यांच्याहून आत्म्याची कळकळ ज्यांस विशेष अशी खाशी मंडळी जी वर माडीवर बसली होती तिची एका अर्ध्या घटकेंत जी तारंबळ व जी त्रेधा उडून गेली ती सांगतां पुरवत नाहीं! ज्या गजेंद्रानें स्वामींची वरात सुशोभित करून आपलें जीवित धन्य करून घेतलें त्याची कोणी शेपूट ओढून कोणी सोंड ओढून व महातांस तिसऱ्या ठिकाणीं फुकटाफाकट प्रायश्चित्त भिऊन पुण्याच्या दुष्ट व दांडग्या ब्राह्मणांनीं गाढवासारखा माघारीं पार पळवून लावला; ज्या दीपिका या शहरांतील शंभर दीडशें वर्षें सांचलेल्या मूर्तिजन्य अंधकारासच जणों काय दूर करीत होत्या त्याहि एकदम मालवन दिवट्यांस पलायन करण्यांतच निभावणूक दिसली; बाजेवाल्यांनीं व तासेवाल्यांनीं तोच मुक्तीचा मार्ग पसंत केला;

(पुढें चालू).

मान दयानंदजींचा गुणानुवाद पृष्ठ अर्धपृष्ठांत कसा आटपेल ? शिवाय स्वामीमहाराजांचा यशोदुंदुभि पत्रोपत्रीं अनेकदां वाजून त्यांच्या उपासकांनीं तर तो दूरदूरच्या प्रदेशापर्यंत पोंचून दीर्घ काळ रहाण्याचीहि मागें सांगितल्याप्रमाणें तजवीज केली आहे. तेव्हां त्यांस अनुरूप झटलें झणजे वर जो विस्तार झाला तो कांहींच नाहीं असें झटलें पाहिजे. मूर्तिपूजेवर व तदनुषंगेंकरून तत्प्रतिपादक ग्रंथांवर व लोकांवर स्वामींनीं आपल्या व्याख्यानांत जो पांडित्याचा भयंकर कहर उसळवून दिला आहे, त्यांत तथ्य कितपत आहे; प्रस्तुत मार्गास वेदांत आधार आहे कीं नाहीं; स्वामींच्या व्याख्यानांत यज्ञाविषयीं, हवा शुद्ध होण्याविषयीं, विमानांविषयीं, तारायंत्राविषयीं, वगैरे जो मजकूर आहे तो 'प्रमाणसे, जुक्तीसे, अनुमानसे' कितपतसा खरा ठरेल, कीं सारा 'गोलंकार'च होय; तसेंच निरनिराळ्या शास्त्रांतील वगैरे जे आधार दाखविले आहेत ते अगदीं यथार्थ असून पंडितजींची अखिलशास्त्रपारंगतता सत्य आहे, कीं त्यांच्या भाविक शिष्यवर्गाची ती केवळ प्रेमाची उकळी आहे; वगैरे गोष्टींविषयीं जर यथास्थित निरूपण करूं झटलें तर बराच ग्रंथ माजेल. यास्तव स्वामींच्या निमित्त येथें जो मोठा समारंभ झाला त्याची, आर्यसमाजाची, व खुद्द स्वामींची, वर जी थोडी हकीकत दिली ती विषयाचें महत्त्व पहातां वाचकांस अप्रासंगिक वाटणार नाहीं असें आह्मांस वाटतें.

आतां स्वामींचें वक्तृत्व. या फारा दिवसांनीं सांपडलेल्या सद्गुरूंचे ठायीं त्यांचे चेले ज्या ज्या गुणांचा मोठ्या प्रेमळ व भाविक बुद्धीनें आरोप करतात त्यांपैकीं वरील गुण हा एक मोठा आहे. स्वामींची विद्वत्ता कांहींहि असो; त्यांच्या व्याख्यानांत व कोट्यांत 'जुक्ति' कितीहि असो; निदानपक्षीं प्रस्तुत वक्तृत्वाचा गुण तरी त्यांच्यांत मोठा वर्णनीय आहे यांत कांहीं संशय नाहीं, असा वरील शिष्यांचा व

इतक्यांत पोलीसचे शिपाई धांवत आले. त्यांचाहि चार पांच हजार लोकाच्या गर्दीत मोठ्या मारामारीनें रिवाब होऊन मग त्यांनीं जो दांडक्यांचा व बाह्यांचा मार सुरू केला तो मोठा कठिण ! शेंकडों लोकांस स्वामींचें वक्तृत्व व त्यांच्या सच्छिष्यांची प्रेमळ भक्ति हीं फळास आलीं;—कोणाच्या वांट्यास दांडकीं, कोणाच्या चाबूक, कोणाच्या घोंडे, निदान चिखलाचे लपके तरी, असा प्रसाद सर्वांस पंक्तिभेद न होतां भरपूर वांटला गेला. माडीवरील मंडळी खिडक्या लावून बसली होती; कोणीं मधें मधें उगीच एखादी अंमळ लिकलिकी करून खालची मौज पाहूं लागलें तों आलाच चिखलाचा लपका ! याप्रमाणें सप्टेंबर महिन्याची पांचवी तारीख माडोरमच्या दहावीप्रमाणें या वर्षी पुण्यास गाजली ! असो; या छोट्याशा नाट्काची परिसमाप्ति शेवटीं अशी झाली कीं, स्वामींच्या जवळ निदानींच्या समयीं एकहि सच्छिष्य न राहून ज्यानें त्यानें आपली वाट काढली. शेवटीं पंधरा वीस एके बाजूस व पंधरा वीस दुसरे बाजूस अशी पोलीसांची रांग दुतर्फा चालून मागून जवळोष होत्साती स्वामींची स्वारी निजधामास चालती झाली !

इतर पुष्कळ लोकांचाहि अभिप्राय पडेल. पण याच्या पूर्वीच्या अंकांत वक्तृत्वाची दशा हल्लीं आपल्या देशांत कोणती आहे व त्याची अभिज्ञता तरी कितपत आहे यांविषयीं जें लिहिलें आहे त्यावरून पहातां वरील अभिप्रायाचें कोणत्याहि समंजस मनुष्यास फारसें आश्चर्य वाटणार नाहीं. वक्तृत्वाचें तेज हुद्द्याच्या व लौकिकाच्या जोरावर किती पडत असतें याविषयीं आह्मीं मागें लिहिलेंच आहे. गवरनर साहेब, कलेक्टर साहेब वगैरेंची गोष्ट तर राहोच; पण एखाद्या मामलेदारानें किंवा शाळांवरील इन्स्पेक्टरानें कोठें कसेंहि भाषण केलें, तरी तें 'सुरस' 'मनोवेधक' वगैरे असायाचेंच. तसेंच स्वदेशाच्या हलाकीबद्दल, धर्माच्या नीचावस्थेबद्दल वगैरे कोणीं व्याख्यान दिलें किंवा कीर्तन केलें, कीं विद्वान् व सुज्ञ मंडळी अवश्य गोळा होऊन त्या वक्त्याच्या भाषणास किंवा कीर्तनकाराच्या शोकपर आख्यानास अवश्य मान मिळायाचाच. पूर्वीच्या धर्मभोळ्या लोकांचा कीर्तनावर जसा भाव असे, व कीर्तनास जातांना दर एक पावलास शंभर अश्वमेध केल्याचें पुण्य लागतें वगैरे समजुती असत, त्याचप्रमाणें हल्लीं नव्या तऱ्हेचे भक्तिभाव जडले आहेत. पुस्तकालय, पदार्थसंग्रहालय वगैरेंची स्थापना होत असल्यास कधीं आडकाठी घालूं नये, मग त्यांकडे उभ्या वर्षांत कोणी ढुंकूनहि पाहिलें नाहीं तरी चिंता नाहीं; भटाभिक्षुकांच्या हातीं कधीं एक छदामहि लागूं देऊं नये. पण दयानंदजीच्यासारखे एखादे अगदीं निःस्पृह देशहितचिंतक कोठेंहि गेले असतां शिष्यपरिवारासह त्यांची बरदास्त जितकी भरपूर ठेवावी तितकी आर्यजननींच्या घरीं रुजू होते; एखादा उत्कृष्ट कीर्तनकार गांवांत आला तर त्यास कोणींहि विचारायाचें नाहीं, पण स्वदेशाचा विषय पुढें करून कोणी रडगाणें गाण्यास उभा राहिला कीं विद्वान् मंडळीची ऐकायाला दाटी; कैलासवासी परशुरामपंत गोडबोल्यांसारखा सज्जन व खरा परोपकारी गृहस्थ मरण पावला तर त्याबद्दल फारशी विचारपूसहि व्हावयाची नाहीं, पण एखादे बडे साहेब शेंकडों लोकांना बुडवून स्वर्गवासी झाले, कीं लागलीच त्यांच्या पराक्रमांचें स्मारक कृत्य! तर याच नव्या भक्तिभावास अनुसरून प्रस्तुत वक्त्याचा जो चोहोंकडे महिमा गाजतो आहे तो होय. मागील अंकांच्या एका टीपेंत एका वसईकर वक्त्याचा लौकिक लिहिला होता तो जसा त्यास केवळ नुसत्या बोलकेपणावरून मिळाला, व येथेंहि एका वक्तृत्वनिष्ठ गृहस्थास प्रस्तुत गुणांबद्दल जसा गेल्या सालापर्यंत बराच मान मिळत असे, तशीच स्वामींचीहि गोष्ट आहे. हे बोवा येथें इतके दिवस गाजले हा जर त्यांच्या रसवंतीचाच केवळ प्रताप झणावा, तर मग मुंबई वगैरे ठिकाणींहि तसें कां झालें नाहीं? येथील 'ज्ञानप्रकाश' वगैरे पत्रांत स्वामींचा महिमा जसा सारखा गाजत होता तसें कांहीं महिन्यांपूर्वी 'इंदुप्रकाशा'दि

पत्रांतहि कां दृष्टीस पडलें नाहीं ? उघडच आहे कीं,[1] भावी आर्यसमाजाच्या दोघां खंबीर खांबांनीं येथें स्वामींस जसें झेलून धरलें होतें, तसा पुरस्कार स्वामींस दुसऱ्या कोणतेहि ठिकाणीं मिळाला नाहीं, आणि त्यामुळेंच परमहंसांच्या जिव्हाग्रावर वाग्देवीनें येथें जसें निर्भर तांडव केलें तसें इतर ठिकाणीं कोठेंहि झालें नाहीं. तर याप्रमाणें पंडितजींच्या वक्तृत्वकीर्तीचें पहिलें कारण स्थानमाहात्म्य होय. 'इसापनीतीं'तील खोपटावर चढलेल्या करडाप्रमाणें त्यांस महदाश्रयानें उन्नति जर प्राप्त न होती तर भटांवर, ज्यौतिष्यांवर, देवांवर, मूर्तींवर, पुराणांवर फार तर काय, पण तुकाराम, तुळशीदास यांवर, व विद्याऱ्या कालिदासावरहि, हे बडे वक्ते जसे यथास्थित घसरले तसें त्यांस घसरायास न सांपडतें ! त्यांचा 'मतलबासिंधु,' 'गडबडाध्याय', 'गोलंकार' वगैरे चटसारें त्यांचें त्यांच्यापाशींच रहातें ! दुसरें कारण विषयमाहात्म्य होय. आमच्या देशांत चोहोंकडे इंग्रेजी अंमल बसून राणीसाहेबांच्या रत्नजडित मुगुटानें, कमांडर इन् चीफ्च्या तुऱ्यानें, व मडमांच्या गळ्चूर्णानें, तसेंच आगगाडी, तारायंत्र, फोटोग्राफ वगैरे आश्चर्यमय कलांनीं ख्रिस्ती धर्मास अपूर्व शोभा येऊन तो इकडे जेव्हां चमकूं लागला तेव्हां आमच्या नव्या शिकलेल्या लोकांचे डोळे तेव्हांच दिपून गेले. त्यांस वाटूं लागलें कीं, ज्या धर्मांत इतक्या मौजा आहेत तोच खरा असला पाहिजे. आमचे बुधवारीं पंचे नेसणारे भट, शालजोडी उडाविणारे शास्त्री, यांच्यापाशीं कोठून खरा धर्म असणार ! त्यांतून पाद्री साहेबांचीं कपटी आर्जवें व निरनिराळ्या लालुची दाखविणें. तेव्हां अर्थात्च या सर्व कारणांनीं ख्रिस्ती धर्माचें मोठें गौरव होऊन त्याच मानाने जुन्या धर्माची विटंबना. ही विटंबना आज चांगली वीस पंचवीस वर्षें मोठी जारी चालली आहे. नव्या विद्वन्मंडळांत वरील उपहासाचें सुख ज्यानें घेतलें नाहीं असा कदाचित् एकहि पंडित सांपडणार नाहीं. असो; तेव्हां असा मौजेचा विषय असल्यावर व आमच्या स्वामीसारखे रंगेल नकले असल्यावर मग ती बहार काय विचारावी ! चांगल्या प्रतिष्ठित ठिकाणीं व बड्या बड्या विद्वानांच्या मेळांत तमाशांतली मौज जर ऐकायास सांपडते आहे, व त्यांतून पातक न होतां उलटा फुकटाफाकट पुण्यसंग्रहहि जर होतो आहे; तर मग असली लाख रुपयांची वेळ कां दवडा ! तर स्वामींचें वक्तृत्व कान भरून ऐकण्यास व हंशा पिकविण्यास जी शेंकडों मंडळी 'हिंदु क्लब'मध्यें नेहमीं भरे त्यांचें बीज वरील होय. आपल्या वक्तृत्वाचें सामर्थ्य किती आहे हें पाहायाचें असल्यास

१. बर ज्यास 'भावी' झटलें तो आर्यसमाज स्वामींनीं येथून प्रयाण केल्यापासून दोनदां स्थापला गेला. हा असा वरचेवर कां ढासळतो कोण जाणे. प्राणप्रतिष्ठेचा एखादा खरा मंत्र करून स्वामी आपल्या शिष्यांस देतील तर त्यांत दोघांचाहि उपहास न होण्याची तजवीज होईल.

स्वामींनीं मूर्तिपूजेचें मंडन किंवा दुसरा एखादा विषय घेऊन पाहाण्याचा होता, म्हणजे त्याच ठिकाणीं रेवरेंड नीळकंठशास्त्री यांच्या व्याख्यानाची जी मजा उडे तीच खास उडाली असती![1] असो; तर ज्या वक्तृत्वव्यातीवर स्वामींचे भक्त एवढ्या उड्या मारतात त्याचीं दोन मुख्य कारणें वरील होत. याखेरीज परमहंसांचा स्निग्ध व गंभीर आवाज, ती भव्य फुगीर मुद्रा, भगवी कफनी, मुकटा डोक्यास गुंडाळून ते झोकदार सोडलेले कल्ले, डौलाचे नाटकी हावभाव, उंच आसन, वगैरे सर्व सामग्री ध्यानांत आणली असतां वक्तृत्वाचा परिपाक इतका उत्कृष्ट उतरला यांचें कोणासहि आश्चर्य वाटणार नाहीं!

असो; येथवर प्रस्तुत विषयाचा तिसरा भाग आटपला. आतां यापुढें शेवटल्या म्हणजे चौथ्याविषयीं लिहून प्रस्तुत विषय समाप्त करूं.

केयूरा न विभूषयंति पुरुषं हारा न चंद्रोज्वलाः
न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालंकृता मूर्धजाः।
वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते
क्षीयंते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम्॥[2]

नीतिशतक.

अंक २५—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) वक्त्याचे गुण. (३) मनाचा शुद्धपणा. (४) विद्वत्त्व. (५) इतर गुण. (६) वक्तृत्वापासून उपयोग.

१. येथपर्यंत प्रस्तुत विषयाचे तीन विभाग झाले. आतां शेवटल्याविषयीं विचार करूं. यांतील विषय, वक्त्यास अत्यंत आवश्यक गुण कोणते, व प्रस्तुत कलेपासून उपयोग काय, वगैरे होय.

२. आतां पहिल्यानें वक्त्याचे गुण. हे गुण म्हणजे मागें एके ठिकाणीं (अंक २३ कलम ४) वक्त्यास अवश्यक असणारीं जीं साधनें सांगितलीं तीं नव्हेत. वरील साधनें सर्वथा बाह्य व प्रयत्नसाध्य होत. हे गुण म्हटले म्हणजे मागें तिसऱ्या व चवथ्या अंकांत कवीचे कित्येक अंगभूत गुण जसे सांगितले तशांसारखे वक्त्याच्या

---

१. 'हिंदु कुल'मध्यें गेल्या जुलै महिन्यांत मोठी झटापट चालली होती. एक दिवस स्वामींचें व्याख्यान आणि दुसरे दिवशीं वरील रेवरेंड बोवांचें. त्यात मौज काय होई की स्वामींच्या बेळेस दिवा गखान्यांत जाण्याला रीघ नसे; आणि रेवरेंड शास्त्रीबोवांच्या बेळेस एकेका श्रोत्यानें बरोबर हातरुणे आणून प्रभू येशूचें ध्यान करण्याचें मनांत आणलें असतें तरी हवी तितकी जागा होती! आणि हातरुणाची गरजहि खरीच!

२. "पुरुषास शोभा जी येते ती बाहुभूषणांनीं, चंद्रासारख्या तेजस्वी हारांनीं, स्नानानें, गंधादिविलेपनानें, फुलांनीं, किंवा केशसंस्कारानें येत नाहीं; तर एका संस्कारयुक्त वाणीनेंच मनुष्य शोभा पावतो! कां कीं, वरील सर्व भूषण अल्पकालिक असून वाणीचें भूषण मात्र सतत रहाणारें होय."

अंगीं जे जन्मसिद्धच असले पाहिजेत ते होत. हे एकदां चांगले समजले असतां कोणाहि मनुष्यास कितपतसें वक्तृत्व करतां येईल याचा तेव्हांच अजमास काढतां येत जाईल.

३. वरील गुणांत पहिला झटला असतां मनाचा शुद्धपणा झणजे जें बोलणें तें केवळ मनापासून व मनाची पूर्ण खात्री होऊन बोलणें हें होय. प्रस्तुत मालेच्या चवथ्या अंकांत वरील गुण कवीस किती अवश्यक होय, व स्वानुभवावांचून केलेलीं वर्णनें किती नीरस व अप्रयोजक उतरतात हें बरेंच सविस्तर सांगितलें आहे. तेंच प्रस्तुत कलेसहि लागू पडतें. कारण कवि व वक्ता या दोघांचाहि उद्देश हृदयवृत्तींस क्षोभ उत्पन्न करायाचा असल्यामुळें त्यांचे गुण पुष्कळ अंशीं एकमेकाशीं मिळतात. दोघांत मोठा भेद इतकाच आहे कीं, वक्त्यास तर्कशास्त्राचाहि जसा अवश्य प्रयोग करावा लागतो तसा कवीस लागत नाहीं. चित्ताचें रंजन होऊन अंतःकरणांत रसाविर्भाव झाला झणजे झालें कवीचें काम; मग त्यानें वर्णिलेल्या गोष्टी निवळ खोट्या असल्या, व केलेलें प्रतिपादन अगदीं चुकलेलें असलें तरी कांहीं हरकत नाहीं. पण वक्त्यास दोन्हीहि सांभाळावीं लागतात. नुसतें मनोरंजन झालें, व हृदयास मोठा द्रव येऊन डोळ्यांवाटे अश्रुधारा चालल्या, तर तेवढ्यानेंच वक्त्याचें कार्य झालें असें नाहीं. जे बुद्धीचे कोते असतील व युक्तिशून्य असतील त्यांस वरच्यासारखीं भाषणें यथार्थ वाटतील खरीं; पण सदसद्विवेचनानें ज्यांच्या बुद्धीस रुक्षता व प्रखरत्व हीं आलीं असतील त्यांस वरील प्रकार मुळींच मान्य न होऊन त्यांस तो उलटा तिरस्कारास्पद व उपहास्यहि वाटेल. असो; तर कवींत व वक्त्यांत हा विशेष आहे. तरी ज्या पक्षीं वक्तृत्वाचा मुख्य भाग श्रोत्यांचीं अंतःकरणें वश करून घेणें हाच होय, त्या पक्षीं वरील स्वानुभव कवीस जसा अवश्य होय तसाच तो वक्त्यासहि होय. पण तो पूर्णपणें होणें हें वरील शुद्धतेखेरीज संभवत नाहीं. कालिदासानें झटलें आहे,

छाया न मूर्च्छति मलोपहतप्रसादे
शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा ॥

"मळानें ज्याचा स्वच्छपणा नाहींसा झाला आहे अशा आरशाच्या भिंगावर छाया नीट उठत नाहीं, पण तेंच शुद्ध झणजे निर्मळ असेल तर तिचा प्रवेश आंत सहज होतो." तर हीच गोष्ट मनुष्याच्या मनासहि लागते. ज्याच्या मनावर दंभ, स्वार्थबुद्धि, वगैरे दुर्विकारांचें पटल सांचलें नसेल त्याच्याच ठायीं कोणतीहि थोर मनोवृत्ति यथास्थित प्रतिबिंबित होईल. आणि तसें झालें असतां प्रकाशकिरणांच्या धर्मा-प्रमाणें तिचें परावर्तनहि तसेंच निर्मळ पडेल!

वर सांगितलेल्या गोष्टीचा प्रत्यय आजपर्यंत मोठ्या प्रख्यातीस चढलेल्या सर्व वक्त्यांच्या चरित्रावरून येईल. पहिल्यानें डिमास्थेनीस घ्या. या वक्त्याची स्वदेश-

प्रीति केवढी बलवत्तर होती हें त्याच्या मागें सांगितलेल्या वृत्तांतावरून व त्याचा अंत कसा झाला यावरून स्पष्ट दिसून येतें. ज्या फिलिप राजावर तो एवढा भडिमार करून सगळ्या ग्रीस देशाचें सतत प्रोत्साहन करीत होता त्याजपासून इतर कांहीं वक्त्यांप्रमाणें जर तो लांच घेता व त्याचा लाचार होऊन बसता, तर त्याच्या वक्तृत्वास कोणी विचारताना, व तें अशा कडाक्याचेंहि होतें ना. तसेंच त्या वक्तृत्वापासून जें मोठें कार्य निष्पन्न झालें कीं, त्याचे सगळे देशबांधव एकवट होऊन त्यांनीं मासिडनच्या राजाशीं शेवटला समरप्रसंग केला, त्याची तर एरवीं वार्ताहि नको होती. दुसरें उदाहरण सिसरोचें. याच्याहि वेळीं रोम शहराची स्थिति डिमास्थेनीसच्या वेळेच्या सारखीच झाली होती. ग्रीक लोकांचें पूर्वीचें शौर्य व देशप्रीति हीं नष्ट होत जाऊन फिलिप राजास सगळा देश जसा सहज पादाक्रांत करून टाकतां आला, त्याचप्रमाणें रोमन लोकांचेंहि पिन्हस, हानिबल यांच्या वेळचें मान, सिसरोच्या वेळेस अगदीं पालटून गेलें होतें. बुद्धीच्या व तरवारीच्या जोरानें जो सर्वांस डेईजड होईल त्यास सगळें राज्य आपल्या कबजांत आणण्यास फारसा प्रयत्न नको होता. ही गोष्ट सीजर यानें बहुतेक साध्य केलीच होती हें सर्वांस माहीत असेलच. असो; तर याप्रमाणें वरील वक्त्याच्या काळीं रोमन लोकांचें पूर्वीचें सत्त्व अगदीं निघून गेलें होतें. अपार संपत्तीपासून होणारे वाईट परिणाम जे बलहीनत्व व दुराचारप्रीति यांचा त्या काळीं जिकडे तिकडे पुष्कळ प्रादुर्भाव झाला होता. अशा, वेळीहि 'भांगेंत तुळस' या म्हणीप्रमाणें कोणी कोणी सज्जन व थोर मनुष्य विरलतेनें आढळतातच. अशांपैकींच त्या वेळेस सिसरो हा होता. चोहोंकडे व विशेषतः श्रीमंत लोकांच्या घरोघर नाना तऱ्हेचे दुराचार माजले असतां, व पूर्वीच्या रोमन लोकांचे सर्व सद्गुण नष्ट होत चालले असतां, सिसरोचे ठायीं मात्र पूर्वीच्या लोकांप्रमाणें स्वदेशप्रीति, सदाचरण, धर्मनिष्ठा हे गुण वसत होते. तर तात्पर्य काय कीं, वरील गुणांनीं प्रस्तुत वक्त्याचें मन अत्यंत शुद्ध राहिलें असल्यामुळेंच त्यानें वेरिस, क्याटिलैन, आंटनी, यांवर जो तडाका उडविला तो उडाला. आपला मतलब साधण्याकरतां किंवा प्रतिष्ठा मिळविण्याकरतां जर तो सभाग्रस्थानीं उभा राहून पांडित्य करता, तर सला, सीजर अशांसहि जो त्याचा धाक वाटे व क्याटिलैन, आंटनी अशा सारख्यांस त्यानें जें पळवून लाविलें, तें कधींहि झालें नसतें. तिसरें उदाहरण इंग्लंडांतील वक्त्यांचें. या वक्तृवर्गांत प्रमुख जो बर्क त्याविषयीं मागें अठराव्या अंकांत बराच मजकूर लिहिला आहे. त्यावरून आपल्या देशाशीं त्याचा बिलकूल संबंध नसतां केवळ भूतदयेनें व अंतःकरणाच्या कळवळ्यानें त्यानें इकडची अतोनात माहिती मिळविली, सात वर्षे हेस्टिंग्स याचा पार्लमेंट सभेंत सारखा पिच्छा पुरविला, व सात हजार कोस दूर असणाऱ्या हिंदुस्थानांतील लोकांचा स्वतःच वकील बनून

त्यांच्या तर्फेनें पहिल्या गवरनर जनरलास आरोपी ठरवून पार्लमेंटांतील पिंजऱ्यांत उभा केला, या सर्व गोष्टींवरून त्याच्या मनाचा थोरपणा व शुद्धपणा स्पष्ट दिसून येतो. हेस्टिंग्स याजवर त्यानें सात वर्षे सारखा जो गहजब उडवून दिला याचें कारण त्यांची पूर्वीची कांहीं चुरस होती ती होय, असें जें कित्येक ह्मणत असत त्याचें मेकालेनें आपल्या निबंधांत खंडन करून टाकलें आहे, व असें दर्शविलें आहे कीं, प्रस्तुत वक्त्यानें बंगाल लुटलेल्या प्रतिष्ठित दरवडेखोरावर जो एवढा विभु रचला तो केवळ त्याच्या राक्षसी कृत्यांचा त्यास अतोनात संताप येऊन गेल्यामुळेंच होय.[1] असो; तर वर जो वक्तृत्वास अत्यंत आवश्यक ह्मणून गुण सांगितला तो या तिसऱ्या महावक्त्याच्या ठायींहि अगदीं परिपूर्ण होता. त्याच्या योगानेंच त्या सगळ्या प्रकरणास अतिशयित शोभा येऊन तो प्रसंग एकंदर जगाच्या चिरकाळ ध्यानांत रहाण्यासारखा झाला आहे. वरील गुणानें बर्कच्या वक्तृत्वाचें तेज किती वाढलें व त्याच्या प्रतिपक्ष्यांस तें केवढें दुःसह झालें याचा दाखला आह्मांपाशीं एक फार पसंत आहे. तो दुसऱ्या तिसऱ्याचा नव्हे; तर खुद्द खाशा स्वारींचाच आहे. हिंदुस्थानाचे पहिले अधिपति एक गुडघा टेंकून पार्लमेंटाच्या पिंजऱ्यांत जेव्हां उभे राहिले, व पहिल्यानें बर्क यानें फिर्यादीचीं कलमें वाचून व एकंदर मोकदम्याचें स्वरूप सर्वांच्या लक्षांत आणून देऊन मुख्य आरोपीवर जेव्हां भडिमार चालविला, तेव्हां त्याच्या मनाची जी स्थिति झाली ती त्यानें येणेंप्रमाणें लिहून ठेविली आहे. तो ह्मणतो, "त्या वेळेस एक अर्धा तासभर मी केवळ आश्चर्यस्तब्ध होत्साता वक्त्याकडे पहात होतों; आणि त्याचे शब्द माझ्या हृदयास इतके टोंचले कीं, कांहीं वेळपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर माझ्यासारखा दुष्ट कोणी मनुष्य नसेल असें मला वाटत होतें!"

असो; बर्कच्या खालोखालचे मोठे नामांकित वक्ते जे दोघे पिट व फॉक्स वगैरे दुसरे कित्येक वक्ते, त्यांचीहि अशीच गोष्ट होय. पहिला पिट ऊर्फ लार्ड च्याथम याचें उदाहरण तर वरील सिद्धांताचा प्रत्यय दाखविणारें व त्याचें दृढीकरण करणारें मोठेंच उत्कृष्ट आहे. हा जेव्हां 'हौस आफ कामन्स' (मध्यम प्रतीच्या लोकांची सभा) हींत पहिल्यानें बोलूं लागला, त्या वेळेस राजाचे दिवाण सर राबर्ट

१ प्रस्तुत विषयाच्या संबंधाचा मेकॉलेचा लेख फार उत्कृष्ट आहे ह्मणून मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. तो वरील वक्त्याची योग्यता चांगली ध्यानांत येण्याकरतां समग्र वाचण्याविषयीं आह्मी येथें आमच्या वाचकांस पुनः शिफारस करतों. वॉरन हेस्टिंग्स याच्या एकंदर वर्तणुकीविषयीं व प्रस्तुत ग्रंथकाराचे गोड गोड व लडिवाळपणाचे लेख कोणत्याहि सत्यपक्षपाती व न्याय्याभिमानी मनुष्यास, व त्यांतून एतद्देशीय वाचकांस तर, बिलकूल पसंत पडणार नाहींत हें खरें; तरी वरील निबंध मोठ्या सफाईनें लिहिला असल्यामुळें व वरच्या सारखीं उत्कृष्ट स्थळें त्यांत असल्यामुळें इकडील लोकांनीं तो विशेषेंकरून वाचण्यासारखा आहे.

स्वामींनीं मूर्तिपूजेचें मंडन किंवा दुसरा एखादा विषय घेऊन पाहाण्याचा होता, म्हणजे त्याच ठिकाणीं रेवरेंड नीळकंठशास्त्री यांच्या व्याख्यानाची जी मजा उडे तीच खास उडाली असती![1] असो; तर ज्या वक्तृत्वख्यातीवर स्वामींचे भक्त एवढ्या उड्या मारतात त्याचीं दोन मुख्य कारणें वरील होत. याखेरीज परमहंसांचा स्निग्ध व गंभीर आवाज, ती भव्य फुगीर मुद्रा, भगवी कफनी, मुकटा डोक्यास गुंडाळून ते झोकदार सोडलेले कल्ले, डौलाचे नाटकी हावभाव, उंच आसन, वगैरे सर्व सामग्री ध्यानांत आणली असतां वक्तृत्वाचा परिपाक इतका उत्कृष्ट उतरला यांचें कोणासहि आश्चर्य वाटणार नाहीं!

असो; येथवर प्रस्तुत विषयाचा तिसरा भाग आटपला. आतां यापुढें शेवटल्या म्हणजे चौथ्याविषयीं लिहून प्रस्तुत विषय समाप्त करूं.

केयूरा न विभूषयंति पुरुषं हारा न चंद्रोज्वलाः
न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालंकृता मूर्धजाः।
वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते
क्षीयंते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम्॥[2]
नीतिशतक.

अंक २५—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) वक्त्याचे गुण. (३) मनाचा शुद्धपणा. (४) विद्वत्त्व. (५) इतर गुण. (६) वक्तृत्वापासून उपयोग.

१. येथपर्यंत प्रस्तुत विषयाचे तीन विभाग झाले. आतां शेवटल्याविषयीं विचार करूं. यांतील विषय, वक्त्यास अत्यंत आवश्यक गुण कोणते, व प्रस्तुत कलेपासून उपयोग काय, वगैरे होय.

२. आतां पहिल्यानें वक्त्याचे गुण. हे गुण म्हणजे मागें एके ठिकाणीं (अंक २३ कलम ४) वक्त्यास अवश्यक असणारीं जीं साधनें सांगितलीं तीं नव्हेत. वरील साधनें सर्वथा बाह्य व प्रयत्नसाध्य होत. हे गुण म्हटले म्हणजे मागें तिसऱ्या व चवथ्या अंकांत कवीचे कित्येक अंगभूत गुण जसे सांगितले तशांसारखे वक्त्याच्या

---

१. 'हिंदु क्लब'मध्यें गेल्या जुलै महिन्यांत मोठी झटापट चालली होती. एक दिवस स्वामींचें व्याख्यान आणि दुसरे दिवशीं वरील रेवरेंड बोवांचें. त्यात मौज काय होई कीं स्वामींच्या वेळेस दिवा गखान्यांत जाण्याला रीघ नसे; आणि रेवरेंड शास्त्रीबोवांच्या वेळेस एकेका श्रोत्यानें बरोबर हातरुणे आणून प्रभू येशूचें ध्यान करण्याचें मनांत आणलें असतें तरी हवी तितकी जागा होती! आणि हातरुणाची गरजहि खरीच!

२. "पुरुषास शोभा जी येते ती बाह्यभूषणांनीं, चंद्रासारख्या तेजस्वी हारांनीं, स्नानानें, गंधादिविलेपनानें, फुलांनीं, किंवा केशसंस्कारानें येत नाहीं; तर एका संस्कारयुक्त वाणीनेंच मनुष्य शोभा पावतो! कां कीं, वरील सर्व भूषण अल्पकालिक असून वाणीचें भूषण मात्र सतत रहाणारें होय."

अंगीं जे जन्मसिद्धच असले पाहिजेत ते होत. हे एकदां चांगले समजले असतां कोणाहि मनुष्यास कितपतसें वक्तृत्व करतां येईल याचा तेव्हांच अजमास काढतां येत जाईल.

३. वरील गुणांत पहिला झटला असतां मनाचा शुद्धपणा झणजे जें बोलणें तें केवळ मनापासून व मनाची पूर्ण खात्री होऊन बोलणें हें होय. प्रस्तुत मालेच्या चवथ्या अंकांत वरील गुण कवीस किती अवश्यक होय, व स्वानुभवावांचून केलेलीं वर्णनें किती नीरस व अप्रयोजक उतरतात हें बरेंच सविस्तर सांगितलें आहे. तेंच प्रस्तुत कलेसहि लागू पडतें. कारण कवि व वक्ता या दोघांचाहि उद्देश हृदयवृत्तींस क्षोभ उत्पन्न करायाचा असल्यामुळें त्यांचे गुण पुष्कळ अंशीं एकमेकाशीं मिळतात. दोघांत मोठा भेद इतकाच आहे कीं, वक्त्यास तर्कशास्त्राचाहि जसा अवश्य प्रयोग करावा लागतो तसा कवीस लागत नाहीं. चित्ताचें रंजन होऊन अंतःकरणांत रसाविर्भाव झाला झणजे झालें कवीचें काम; मग त्यानें वर्णिलेल्या गोष्टी निवळ खोट्या असल्या, व केलेलें प्रतिपादन अगदीं चुकलेलें असलें तरी कांहीं हरकत नाहीं. पण वक्त्यास दोन्हीहि सांभाळावीं लागतात. नुसतें मनोरंजन झालें, व हृदयास मोठा द्रव येऊन डोळ्यांवाटे अश्रुधारा चालल्या, तर तेवढ्यानेंच वक्त्याचें कार्य झालें असें नाहीं. जे बुद्धीचे कोते असतील व युक्तिशून्य असतील त्यांस वरच्यासारखीं भाषणें यथार्थ वाटतील खरीं; पण सदसद्विवेचनानें ज्यांच्या बुद्धीस रुक्षता व प्रखरत्व हीं आलीं असतील त्यांस वरील प्रकार मुळींच मान्य न होऊन त्यांस तो उलटा तिरस्कारास्पद व उपहास्यहि वाटेल. असो; तर कवींत व वक्त्यांत हा विशेष आहे. तरी ज्या पक्षीं वक्तृत्वाचा मुख्य भाग श्रोत्यांचीं अंतःकरणें वश करून घेणें हाच होय, त्या पक्षीं वरील स्वानुभव कवीस जसा अवश्य होय तसाच तो वक्त्यासहि होय. पण तो पूर्णपणें होणें हें वरील शुद्धतेखेरीज संभवत नाहीं. कालिदासानें झटलें आहे,

छाया न मूर्च्छति मलोपहतप्रसादे
शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा ॥

"मळानें ज्याचा स्वच्छपणा नाहींसा झाला आहे अशा आरशाच्या भिंगावर छाया नीट उठत नाहीं, पण तेंच शुद्ध झणजे निर्मळ असेल तर तिचा प्रवेश आंत सहज होतो." तर हीच गोष्ट मनुष्याच्या मनासहि लागते. ज्याच्या मनावर दंभ, स्वार्थबुद्धि, वगैरे दुर्विकारांचें पटल सांचलें नसेल त्याच्याच ठायीं कोणतीहि थोर मनोवृत्ति यथास्थित प्रतिबिंबित होईल. आणि तसें झालें असतां प्रकाशकिरणांच्या धर्माप्रमाणें तिचें परावर्तनहि तसेंच निर्मळ पडेल!

वर सांगितलेल्या गोष्टीचा प्रत्यय आजपर्यंत मोठ्या प्रख्यातीस चढलेल्या सर्व वक्त्यांच्या चरित्रावरून येईल. पहिल्यानें डिमास्थेनीस घ्या. या वक्त्याची स्वदेश-

प्रीति केवढी बलवत्तर होती हें त्याच्या मागें सांगितलेल्या वृत्तांतावरून व त्याचा अंत कसा झाला यावरून स्पष्ट दिसून येतें. ज्या फिलिप राजावर तो एवढा भडिमार करून सगळ्या ग्रीस देशाचें सतत प्रोत्साहन करीत होता त्याजपासून इतर कांहीं वक्त्यांप्रमाणें जर तो लांच घेता व त्याचा लाचार होऊन बसता, तर त्याच्या वक्तृत्वास कोणी विचारताना, व तें अशा कडाक्यावेंहि होतें ना. तसेंच त्या वक्तृत्वापासून जें मोठें कार्य निष्पन्न झालें कीं, त्याचे सगळे देशबांधव एकवट होऊन त्यांनीं मासिडनच्या राजाशीं शेवटला समरप्रसंग केला, त्याची तर एरवीं वार्ताहि नको होती. दुसरें उदाहरण सिसरोचें. याच्याहि वेळीं रोम शहराची स्थिति डिमास्थेनीसच्या वेळेच्या सारखीच झाली होती. ग्रीक लोकांचें पूर्वीचें शौर्य व देशप्रीति हीं नष्ट होत जाऊन फिलिप राजास सगळा देश जसा सहज पादाक्रांत करून टाकतां आला, त्याचप्रमाणें रोमन लोकांचेंहि पिन्हस, हानिबल यांच्या वेळचें स्मान, सिसरोच्या वेळेस अगदीं पालटून गेलें होतें. बुद्धीच्या व तरवारीच्या जोरानें जो सर्वांस डेईजड होईल त्यास सगळें राज्य आपल्या कबजांत आणण्यास फारसा प्रयत्न नको होता. ही गोष्ट सीजर यानें बहुतेक साध्य केलीच होती हें सर्वांस माहीत असेलच. असो; तर याप्रमाणें वरील वक्त्याच्या काळीं रोमन लोकांचें पूर्वीचें सत्त्व अगदीं निघून गेलें होतें. अपार संपत्तीपासून होणारे वाईट परिणाम जे बलहीनत्व व दुराचारप्रीति यांचा त्या काळीं जिकडे तिकडे पुष्कळ प्रादुर्भाव झाला होता. अशा, वेळीहि 'भांगेंत तुळस' या म्हणीप्रमाणें कोणी कोणी सज्जन व थोर मनुष्य विरलतेनें आढळतातच. अशांपैकींच त्या वेळेस सिसरो हा होता. चोहोंकडे व विशेषतः श्रीमंत लोकांच्या घरोघर नाना तऱ्हेचे दुराचार माजले असतां, व पूर्वीच्या रोमन लोकांचे सर्व सद्गुण नष्ट होत चालले असतां, सिसरोचे ठायीं मात्र पूर्वीच्या लोकांप्रमाणें स्वदेशप्रीति, सदाचरण, धर्मनिष्ठा हे गुण वसत होते. तर तात्पर्य काय कीं, वरील गुणांनीं प्रस्तुत वक्त्याचें मन अत्यंत शुद्ध राहिलें असल्यामुळेंच त्यानें वेरिस, क्याटिलैन, आंटनी, यांवर जो तडाका उडविला तो उडाला. आपला मतलब साधण्याकरतां किंवा प्रतिष्ठा मिळविण्याकरतां जर तो सभाग्रस्थानीं उभा राहून पांडित्य करता, तर सला, सीजर अशांसहि जो त्याचा धाक वाटे व क्याटिलैन, आंटनी अशा सारख्यांस त्यानें जें पळवून लाविलें, तें कधींहि झालें नसतें. तिसरें उदाहरण इंग्लंडांतील वक्त्यांचें. या वक्तृवर्गांत प्रमुख जो बर्क त्याविषयीं मागें अठराव्या अंकांत बराच मजकूर लिहिला आहे. त्यावरून आपल्या देशाशीं त्याचा बिलकूल संबंध नसतां केवळ भूतदयेनें व अंतःकरणाच्या कळवळ्यानें त्यानें इकडची अतोनात माहिती मिळविली, सात वर्षें हेस्टिंग्स याचा पार्लमेंट सभेंत सारखा पिच्छा पुरविला, व सात हजार कोस दूर असणाऱ्या हिंदुस्थानांतील लोकांचा स्वतःच वकील बनून

त्यांच्या तर्फेनें पहिल्या गवरनर जनरलास आरोपी ठरवून पार्लमेंटांतील पिंजऱ्यांत उभा केला, या सर्व गोष्टींवरून त्याच्या मनाचा थोरपणा व शुद्धपणा स्पष्ट दिसून येतो. हेस्टिंग्स याजवर त्यानें सात वर्षे सारखा जो गहजब उडवून दिला याचें कारण त्यांची पूर्वीची कांहीं चुरस होती ती होय, असें जें कित्येक ह्मणत असत त्याचें मेकालेनें आपल्या निबंधांत खंडन करून टाकलें आहे, व असें दर्शविलें आहे कीं, प्रस्तुत वक्त्यानें बंगाल लुटलेल्या प्रतिष्ठित दरवडेखोराबर जो एवढा विभु रचला तो केवळ त्याच्या राक्षसी कृत्यांचा त्यास अतोनात संताप येऊन गेल्यामुळेंच होय.[1] असो; तर वर जो वक्तृत्वास अत्यंत आवश्यक ह्मणून गुण सांगितला तो या तिसऱ्या महावक्त्याच्या ठायींहि अगदीं परिपूर्ण होता. त्याच्या योगानेंच त्या सगळ्या प्रकरणास अतिशयित शोभा येऊन तो प्रसंग एकंदर जगाच्या चिरकाळ ध्यानांत रहाण्यासारखा झाला आहे. वरील गुणानें बर्कच्या वक्तृत्वाचें तेज किती वाढलें व त्याच्या प्रतिपक्ष्यांस तें केवढें दुःसह झालें याचा दाखला आह्मांपाशीं एक फार पसंत आहे. तो दुसऱ्या तिसऱ्याचा नव्हे; तर खुद्द खाशा स्वारींचाच आहे. हिंदुस्थानाचे पहिले अधिपति एक गुडघा टेंकून पार्लमेंटाच्या पिंजऱ्यांत जेव्हां उभे राहिले, व पहिल्यानें बर्क यानें फिर्यादीचीं कलमें वाचून व एकंदर मोकदम्याचें स्वरूप सर्वांच्या लक्षांत आणून देऊन मुख्य आरोपीवर जेव्हां भडिमार चालविला, तेव्हां त्याच्या मनाची जी स्थिति झाली ती त्यानें येणेंप्रमाणें लिहून ठेविली आहे. तो ह्मणतो, "त्या वेळेस एक अर्धा तासभर मी केवळ आश्चर्यस्तब्ध होत्साता वक्त्याकडे पहात होतों; आणि त्याचे शब्द माझ्या हृदयास इतके टोंचले कीं, कांहीं वेळपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर माझ्यासारखा दुष्ट कोणी मनुष्य नसेल असें मला वाटत होतें!"

असो; बर्कच्या खालोखालचे मोठे नामांकित वक्ते जे दोघे पिट व फॉक्स वगैरे दुसरे कित्येक वक्ते, त्यांचीहि अशीच गोष्ट होय. पहिला पिट ऊर्फ लार्ड च्याथम याचें उदाहरण तर वरील सिद्धांताचा प्रत्यय दाखविणारें व त्याचें दृढीकरण करणारें मोठेंच उत्कृष्ट आहे. हा जेव्हां 'हौस आफ कामन्स' (मध्यम प्रतीच्या लोकांची सभा) हींत पहिल्यानें बोलूं लागला, त्या वेळेस राजाचे दिवाण सर राबर्ट

१ प्रस्तुत विषयाच्या संबंधाचा मेकॉलेचा लेख फार उत्कृष्ट आहे ह्मणून मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. तो वरील वक्त्याची योग्यता चांगली ध्यानांत येण्याकरतां समग्र वाचण्याविषयीं आह्मी येथें आमच्या वाचकांस पुनः शिफारस करतों. वॉरन हेस्टिंग्स याच्या एकंदर वर्तणुकीविषयीं व प्रस्तुत ग्रंथकाराचे गोड गोड व लडिवाळपणाचे लेख कोणत्याहि सत्यपक्षपाती व न्यायाभिमानी मनुष्यास, व त्यांतून एतद्देशीय वाचकांस तर, बिलकूल पसंत पडणार नाहींत हें खरें; तरी वरील निबंध मोठ्या सफाईनें लिहिला असल्यामुळें व वरच्या सारखीं उत्कृष्ट स्थळें त्यांत असल्यामुळें इकडील लोकांनीं तो विशेषेंकरून वाचण्यासारखा आहे.

वॉलपोल हे सगळा राज्यकारभार आपण हाकीत होते. वरील सभा केवळ नांवाला मात्र असून वॉलपोल जी करील ती पूर्वदिशा असा प्रकार होता. राजाचा खजिना स्वाधीन असल्यामुळें लोकांच्या तर्फेनें जो भांडायाला उठेल त्याची मूठ गच्च भरून दिवाण साहेबांनीं त्यास खालीं बसवून टाकावें. या श्लाघ्य कृत्यांत त्यांस इतकें यश आलें कीं, 'प्रत्येक मनुष्याची ज्याची त्याला किंमत आहे'[1] अशी त्यांनीं एक म्हणच करून टाकिली. ती यांच्या नांवावर अद्याप चालत आहे. असो; पण सरतेशेवटीं वरील प्रख्यात वक्ता मात्र त्यांस मोठा वस्ताद भेटला. त्यावर त्यांचे कुटिल प्रयोग सर्व व्यर्थ होऊन त्यांस आपली आवडती म्हण माघारी घ्यावी लागली. पिट हा त्या वेळेस वयानें लहान होता, पण वरील अमूल्य गुणस्तव त्याचें वजन चोहोंकडे एकदम असें बसून गेलें, व त्याच्या सरस्वतीच्या ओघास त्याच्या योगानें अशी उद्दामता प्राप्त झाली कीं, वरील दिवाणाचें तेज या नव्या वक्त्यापुढें लोपत चाललें. सरतेशेवटीं त्यास आपल्या हुद्द्याचा राजीनामा देणें भाग पडून सगळें राजतंत्र पिट याच्या हातीं आलें. तें त्यानें कांहीं वर्षें मोठ्या दक्षतेनें सांभाळून आपल्या नांवाचा सगळ्या जगभर जयजयकार करून सोडला. आणि त्याच वेळेपासून कामन्स लोकांच्या सभेचें जें राज्यांत वजन आहे तें बसलें.

असो; तर याचप्रमाणें मनाचें शुद्धत्व हा वक्त्यास अवश्य असणाऱ्या गुणांपैकीं पहिला होय. जें श्रोत्यांस सांगावयाचें तें वक्त्यास पूर्णपणें भासून त्यानें अंतःकरणाच्या केवळ कळवळ्यानें जर प्रगट केलें नसेल, तर तें ऐकणारांच्या हृदयास विशेष म्हणण्यासारखा विकार करील हें मुळींच संभवत नाहीं. त्यानें ओढून ताणून आणलेल्या आवेशास कांहीं अतज्ज्ञ लोक कदाचित् भुलून जाऊन फसतील; पण खऱ्या मार्मिक श्रोत्यांस केवळ लटपटपंची केल्यानें लेशमात्राहि द्रव येणार नाहीं. यास्तव 'पुराणांतील वांगीं पुराणांत' असा कपटभाव मनांत धरून जो वक्तृत्व करील त्यानें तें न केलेलें बरें; कारण तशानें त्याचे श्रम तरी वांचतील. आपल्या भाषेंत एक उत्कृष्ट म्हण आहे, कीं 'जाळावांचून कड नाहीं; आणि मायेवांचून रड नाहीं.' तर या लहानशा वाक्यांत येथवर सांगितलेल्या सर्व गोष्टींचा थोडक्यांत समावेश होतो.

४. वक्त्याच्या अंगीं अवश्य पाहिजे असा दुसरा गुण विद्वत्व होय, म्हणजे

---

१. 'Every man has his own price.' या म्हणीवरून खरा प्रामाणिकपणा म्हणून जगांत मुळींच नाहीं, अशी वरील प्रधानाची समजूत होती हें स्पष्ट दिसतें. हें अर्थात्च सर्वांशीं खरें नाहीं. असें म्हणणें म्हणजे एकंदर मनुष्यजातीची अब्रू घेणें होय. असो, 'हितोपदेशा'त अशाच अर्थाची पण निराळ्या अभिप्रायानें केलेली एक उक्ति आहे—

पंचभिर्यांति दासत्वं पुराणैः कोऽपि मानवः ।
कोऽपि लक्षैः कृती कोऽपि लक्षैरपि न लभ्यते ॥

ज्याविषयीं बोलावयाचें त्याविषयींची पूर्ण माहिती असून साधक बाधक प्रमाणें त्यास सारीं अवगत पाहिजेत. शिवाय अनेक ग्रंथांच्या अवलोकनानें जें बहुश्रुतत्व अंगीं येतें तेंहि त्यास अनुकूल पाहिजे. अशी सर्व सामग्री असली ह्मणजे ज्या विषयावर बोलावयाचें त्याचें त्यास परिपूर्णतेनें उद्घाटन करतां येऊन श्रोत्यांचें मन संशयमुक्त होतें, व केलेलें भाषण त्यांच्या हृदयावर पूर्णपणें ठसतें. वर सांगितलेले तिन्ही वक्ते याप्रमाणेंच मोठे विद्वान् होते, व त्यांच्या कोटिक्रमापुढें कोणाचाहि टिकाव निघत नसे. वरील गुण मुख्यत्वेंकरून वकीलांच्या अंगीं अवश्य पाहिजेत. सिसरो तर मूळचा वकीलच होता; व बर्कनेंहि पार्लमेंटांत आमच्या देशाची एक पैहि फी न घेतां वकीलीच केली; आणि काळ्या गोऱ्या लोकांचा मोकदमा चालला असतां जसे अद्याप फैसले झालेले दृष्टीस पडतात तसाच वरील महाप्रसंगींहि एवढें अवडंबर रचलें असतांहि झाला. असो; या ठिकाणीं विख्यात तत्त्वज्ञ जो सर फ्रंचान्सिस बेकन त्याच्या वकीलीविषयीं प्रसिद्ध कवि बेन जॉनसन यानें लिहिलेला एक उत्कृष्ट चुटका सरते-शेवटीं देतों. हा कवि महाविख्यात जो शेक्सपीयर त्याचा जिवलग मित्र होता, व त्याच्याप्रमाणें याचीहि कीर्ति त्याच्या नाटकांवरच आजपर्यंत चालत आली आहे. हा बेकन याच्याहून पुष्कळ वडील होता; तरी त्याच्या कीर्तीचा व वैभवाचा त्यास तिळमात्रहि मत्सर न वाटतां त्यानें बेकनच्या स्तुतिपर पुष्कळ मजकूर लिहून ठेवला; तो अद्याप प्रसिद्ध आहे. बेकनच्या वक्तृत्वाविषयीं तो येणेंप्रमाणें लिहितो— "माझ्या वेळीं एक उत्कृष्ट वक्ता चोहोंकडे गाजत होता. त्याचें भाषण मोठें प्रौढ असे. ज्या वेळेस तो विनोद करी त्याखेरीज करून त्याचें भाषण नेहमीं अतिशयेंत गंभीरतेचें असे. त्याच्या सारखा बेताबातानें, युक्तीस धरून, व अर्थगांभीर्यानें बोलणारा माझ्या पहाण्यांत दुसरा कोणी आला नाहीं; त्याच्या बोलण्यांत वायफळ असा एक शब्द किंवा एक अक्षरहि नसे. ज्या त्या शब्दास त्याचीच अशी कांहींना कांहीं तरी खुबी असायाचीच. त्याच्या श्रोत्यांतून एखाद्यानें जर क्षणभर एकीकडे पाहिलें किंवा कोणाला खोकला आला, तर तितक्यांतहि कांहीं गहन अर्थाचे शब्द निघून जाऊन त्यांची त्यास हळहळ वाटावी. तो बोलायाला उठला कीं सर्वांनीं स्तब्ध होऊन त्याच्या बोलण्याकडे एकाग्र चित्त द्यावें; आणि न्यायाधीशांचे रागद्वेष केवळ त्याच्या स्वाधीन असत. त्यांच्या साऱ्या मनोवृत्ति या वक्त्याच्या जशा काय मुठींत होत्या. साऱ्या श्रोत्यांस असा नेहमीं धाक वाटे कीं, हा इतक्यांतच आटपतो कीं काय!" असो; तर ही गहनार्थता व युक्तिमत्त्व पुरतेपणीं साधण्यास वक्त्याची बुद्धि कुशाग्र व विशाल असून तिच्या योगानें त्यानें मोठी विद्वत्ता संगादन करून ठेवलेली असली पाहिजे.

१. प्रस्तुत विषयाच्या आरंभीं जें संस्कृत पद्य घातलें आहे त्यातील पुष्कळ अर्थ वरच्या वर्णनाहीं मोठ्या चमत्कारिक रीतीनें जमतो!

५. वरच्या खेरीज सहृदयत्व, तार्किकता, विषय-जुळण्याची शैली, अर्थविशदत्व, वगैरे जे कित्येक गुण उत्तम वक्त्याचे ठायीं अवश्य असले पाहिजेत त्यांविषयीं येथें आणखी सविस्तर लिहीत नाहीं; कां कीं, वर सांगितलेल्या दोन्ही गुणांत त्यांचा बराच समावेश होतो; व त्यांचें स्वरूप उत्तम भाषणांकडे नीट लक्ष पुरविलें असतां सर्वांच्या तेव्हांच ध्यानांत येणारें आहे. शिवाय समग्र विषयाचें श्रोत्यांस सुखानें ग्रहण करतां येई अशी त्याची रचना कशी करावी, व त्यावर केलेलें प्रतिपादन सर्वांस सुबोध होण्यास काय करावें याविषयीं नियम सांगणें कठिण आहे. अशा पुष्कळ गोष्टी असतात कीं, त्या चांगल्या करतां येणें हें केवळ अनुकरणसाध्य मात्र असतें; त्यांविषयीं नियम झटले झणजे करतांहि येत नाहींत, व केले तर ते सर्वव्यापक होत नसल्यामुळें त्यांपासून तादृश उपयोगहि होत नाहीं. तर अशा प्रकारच्याच वरील दोन गोष्टी होत. यास्तव ज्या कोणास त्या शिकणें असतील त्यांनीं प्राचीन व अर्वाचीन काळच्या महावक्त्यांचीं भाषणें लक्षपूर्वक वाचावीं व त्यांवर मनन करावें एवढाच काय तो चांगलासा उपाय आहे.

६. याप्रमाणें वक्त्याच्या अंगीं स्वभावतःच जे गुण असले पाहिजेत त्यांचें निरूपण झालें. आतां सरते शेवटीं या कलेपासून उपयोग काय याविषयीं लिहून प्रस्तुत विषय आटपतों. हा उपयोग दोन तऱ्हेचा आहे. एक व्यक्तिदृष्ट्या व दुसरा लोकदृष्ट्या. व्यक्तिदृष्ट्या प्रस्तुत कलेचा उपयोग उघडच आहे कीं, ती ज्याजपाशीं वसत असते तो सर्वांस प्रिय व सन्मानार्ह होतो. अशा मनुष्याचा सहवास करण्याविषयीं लोक नेहमीं उत्सुक असतात, व आपल्या भाषणाच्या मोहनीनें तो सर्वांचीं चित्तें आपणास वश करून घेतो. शिवाय हा गुण प्रस्तुत अंकाच्या आरंभीं घातलेल्या पद्यांत सांगितल्याप्रमाणें त्यास मोठा अलंकारहि होतो. हा सहज अलंकार त्यास श्रमाशिवाय व निर्भयपणें धारण करतां येऊन यावज्जन्म त्यास शोभादायक होतो. पण इतकेंच नव्हे. एखाद्या शूर सरदारास त्याच्या कमरेस लटकलेली तरवार जशी केवळ शोभाच देते असें नाहीं, तर त्याच्या सामर्थ्याची ती निशाणी असून तिची लकाकी शत्रूंच्या काळजास थरारवीत असते, त्याचप्रमाणें वाक्शस्त्राचें तीव्रत्वहि प्रतिपक्षिजनास अत्यंत भयावह असतें. मिलिटसानें सॉक्रेटीसावर द्वेषबुद्धीनें कारस्थान रचून न्यायसभेंत त्यावरचे सगळे बनावट व शुष्क आरोप जेव्हां बोलून दाखविले, तेव्हां सरते शेवटीं आपल्या पक्षाची दुर्बलता व आपल्या प्रतिपक्ष्याचें बुद्धिसामर्थ्य मनांत आणून न्यायाधीशांस त्यानें विनंति केली कीं, "महाराज, सॉक्रेटीस शब्दपांडित्यानें आपणांस मोहित करील, तर आपण फार सावध असावें; व तो आपणांस फसविण्यासाठीं गोड गोड काव्याचीं भाषणें करील, तर आपण त्याचें बोलणें बहुतकरून खरें मानूं नये." असो; तर याप्रमाणें प्रस्तुत गुणानें मनुष्य भूषित होऊन त्याचें सर्वांवर वजन

बसण्यास तो कारण होतो. आतां राष्ट्राच्या संबंधानें पहा. या संबंधाचीं उदाहरणें मागील अंकांतून ग्रीस, रोम, इंग्लंड, व हिंदुस्थान या देशांतील दिलींच आहेत. त्यांवरून एका मनुष्याच्या वक्तृत्वशक्तीचा प्रभाव प्रसंगविशेषीं किती दृष्टीस पडतो याचा प्रत्यय आमच्या वाचकांस चांगला आलाच असेल. तसलीं उदाहरणें आणखी बहुत्या प्रत्येक देशाच्या इतिहासांतूनहि देतां येतील. असो; आतां प्रस्तुतच्या देश-स्थितीला सांप्रत कलेचा कितीसा उपयोग होईल याविषयीं कांहीं लिहून एकंदर विषयाची परिसमाप्ति करतों.

यापूर्वीं अलीकडे चालू झालेल्या वक्तृत्वोत्तेजनाच्या प्रकाराविषयीं जें आह्मीं लिहिलें आहे त्यावरून त्या उद्योगाविषयीं आमचें काय मत आहे, व प्रस्तुत कला सुधारणें असल्यास काय केलें पाहिजे, हें आमच्या वाचकांस कळलेंच आहे. त्याविषयीं येथें जास्त सांगण्यासारखें एवढेंच आहे कीं, युरोपांतील कोणताहि प्रकार पाहून त्यासारखें येथें करण्याचा प्रयत्न करणें हें फार असमंजस होय. एकाच्या शरीर-प्रकृतीला जें मानवलें तें दुसऱ्यास मानवेलच हा जसा नेम धरवत नाहीं, त्याप्रमाणें युरोपच्या स्थितिविशेषाला लागू ज्या गोष्टी त्या इकडे लागतीलच हें कदापि होणार नाहीं. रोम, आथेन्स वगैरे ठिकाणीं लोकसत्तात्मक राज्यप्रकार होता, तेव्हां आंटनी, डिमास्थेनीस वगैरे पुरुषांचे जे प्रभाव इतिहासांत दाखल केले आहेत ते तेथें घडण्यांत आले हें सहजच आहे. पण तो नमुना घरून येथें जर तशा गोष्टी बळेंच घडवून आणण्याचा घाट घातला, तर येथें तसली सामग्री काय आहे? एशियाखंडांतील कोणत्याहि राष्ट्रास राजसत्तेखेरीज दुसरा कोणताहि प्रकार आजपर्यंत कधींच माहीत झाला नाहीं; व लोकस्वातंत्र्याची कल्पना त्यांच्या कधीं स्वप्नींहि आली नाहीं. रोमन लोकांस 'राजा' हा शब्दहि सहन होत नसून सीजरासारख्यांस त्यांनीं कट करून ठार मारून टाकलें ही गोष्ट येथील लोकांस अतिशय विलक्षण वाटणारी आहे; कीं, ज्याप्रमाणें एवढ्याशा काडतुसाच्या चिरडीवरून बंगाल्यांत झालेला दंगा युरोपियन लोकांस विचित्र वाटला! असो; तर एकंदरींत एका राष्ट्राची प्रकृति दुसऱ्या राष्ट्राच्या प्रकृतीशीं सर्वांशीं कधीं मिळायाची नाहीं. त्यांतून इंग्लंड व हिंदुस्थान अशा हरएक प्रकारें भिन्न असणाऱ्या देशांविषयीं तर कांहीं बोलायालाच नको. यास्तव वक्ते तयार होऊन त्यांनीं लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घ्यावीं, व हवा तो फेरफार एकंदर राष्ट्रांत सुरू करावा, वगैरे बेत जे आमच्या लोकांच्या मनांत घोळताहेत ते सगळे पुष्कळ अंशीं व्यर्थच होत. वक्तृत्वाचा एवढा प्रभाव येथें दृष्टीस पडूं लागण्यास अद्याप पुष्कळच काळ लोटला पाहिजे; व तितका लोटल्यावरहि तो निश्चयानें पडेलच असेंहि सांगवत नाहीं. तर याप्रमाणें प्रस्तुत देशस्थितीला वक्तृत्वाची अतिशय आवश्यकता आहे, व तो गुण नसल्यामुळें

देशाचें मोठें नुकसान होत आहे, हें मत आमच्या मतें पुष्कळ अंशीं अत्युक्तीचें व असमंजस असें होय.

तेव्हां प्रस्तुत कलेचा उपयोग हल्लीं आमच्या देशास झटला ह्मणजे कविता, चित्रविद्या, इत्यादि इतर कलांप्रमाणेंच होय. ह्मणजे ती आपल्या देशांत वाढली असतां लोकरंजनाचें एक उत्तम साधन होऊन देशास भूषण होणार आहे. तसेंच हल्लीं जे लोककल्याणाचे कित्येक उद्योग चोहोंकडे सुरू झाले आहेत त्यांची वृद्धि करण्यासहि तिचा बराच उपयोग होईल खरा; पण तसें होण्यास हल्लींपेक्षां तिचें स्वरूप फार निराळ्या प्रकारानें प्रगट झालें पाहिजे. हल्लीं ज्याप्रमाणें एक वाक्शक्ति व एके रीतीचा धीटपणा एवढीच सामग्री वक्तृत्वास पुरते, तसा प्रकार कामाचा नाहीं. कोणत्याहि विषयाविषयीं जो लोकांस आपल्या मताला मिळवूं पहाणार त्यानें अगोदर तो विषय चांगला समजून घेऊन नंतर मनोवेधक रीतीनें त्याचें प्रतिपादन केलें पाहिजे. असें करतां येण्यास त्यानें कोणतीं साधनें आपणास अनुकूल करून घेतलीं पाहिजेत तीं मागें सांगण्यांत आलींच आहेत. असें जर न केलें, तर हल्लीं जसें वक्तृत्व बहुधा निष्फळ होतें; किंवा त्यापासून कांहीं निष्पन्न झालेंच तर भलतीं मतें लोकांच्या मनांत अर्धीमुर्धी शिरून जातात; तसा मात्र प्रकार होईल. असो; तर प्रकृत कलेपासून विद्यमान स्थितींत आपल्या देशास जो उपयोग होणार तो वरच्या इतका मात्र होईल असें आह्मांस वाटतें.

नहि प्रियं
प्रवक्तुमिच्छन्ति मृषा हितैषिणः ॥[1]

किरातार्जुनीय.

अंक २४—पत्र-त्यास उत्तर.

रा. रा. निबंधमालाकर्ते यांस—

वि. वि. तुह्मी अलीकडे तीन चार अंकांत वक्तृत्वाविषयीं विवरण करून त्या विषयाची वास्तविक योग्यता लोकांच्या ध्यानीं आणून देण्याविषयीं जो यत्न करीत आहां त्यापासून वक्तृत्वाच्या प्रवृद्धीस योग्य उपयोग व्हावा असें मी मनापासून इच्छितों. यास्तव त्या विषयाचे संबंधानें तुमच निबंधाविषयीं, व विशेषेंकरून अंक २१ माहे सप्तंबर याविषयीं, जे थोडे विचार सुचतात ते तुह्मांस लिहून कळवावे या हेतूनें हें पत्र लिहिलें आहे. सवड झाल्यास कृपा करून यास आपल्या पुढील अंकांत जागा द्याल अशी आशा करतों.

विषयास आरंभ करण्याचे पूर्वी वक्तृत्वाचें जें लक्षण संस्कृत पद्यरूपानें तुह्मीं दिलें आहे तें अगदीं योग्य आहे, व या देशांतील वक्तृत्वाचे प्राचीन काळचे स्थितिविषयीं जे विचार

१. "जे आपले खरे हितचिंतक असतात ते आपणास प्रिय वाटण्याकरितां खोटी गोष्ट कधीं सांगत नसतात !"

तुम्हीं प्रदर्शित केले आहेत ते प्रायः सर्वसंमत आहेत. या देशांतील प्राचीन काळच्या वक्तृत्वाविषयीं ज्ञान केवळ काव्यें, पुराणें, इत्यादिक ग्रंथांवरून अनुमानानें होतें. तथापि शिष्टाईच्या वगैरे संबंधानें अंगद, कृष्ण, विदुर इत्यादिकांचीं जीं भाषणें रामायणमहाभारतादि ग्रंथांत आहेत, त्यांवरून वक्तृत्वशक्ति आपल्या पूर्वजांतील पुढारी लोकांत बरीच होती असें दिसतें. परंतु ग्रीस किंवा रोम, इंग्लंड किंवा फ्रान्स, या देशांतील प्राचीन व अर्वाचीन वक्त्यांचीं भाषणें जशीं विषयाच्या संबंधानें पराकाष्ठेचीं व्यापक असतात, तशीं भाषणें करण्याजोगें व्यापक ज्ञान प्राचीन काळीं आपल्या लोकांत असे असें प्रतीतीस येण्यास कांहीं साधन नाहीं. वक्तृत्वाची विशेष आवश्यकता व प्रवृत्ति लोकसमाजास आकर्षण करण्याच्या संबंधानें असल्यामुळें, प्रायः प्रजासत्तात्मक राज्यांतच या कलेचा विशेष उदय झाला आहे यांत आश्चर्य नाहीं.

अलीकडील काळांत वक्तृत्वाच्या संबंधानें हरदास किंवा कीर्तन करणारे यांजविषयीं तुम्हीं जें लिहिलें आहे तें सर्वांशीं बरोबर आहे असें मला वाटत नाहीं. कांहीं काळापूर्वीच्या दोन तीन कीर्तन करणारांचीं नांवें सांगून त्यांच्या संबंधानें तुम्हीं कांहीं लिहिलें आहे. ते स्वतः कवि असून कीर्तनांत आपण नवीन केलेलीं पदें वगैरे ह्मणून त्यांचा अर्थ लोकांस सांगून गायन, शब्दालंकार, व भाषणाची मधुरता या गुणांनीं आपल्या श्रोत्यांचें मनोरंजन त्यांनीं केलें असेल यांत संशय नाहीं. परंतु एखाद्या प्रतिपाद्य विषयाच्या संबंधानें व्यापक बुद्धीनें सर्व साधक बाधक प्रमाणें योजून विषयप्रतिपादन करून श्रोत्यांच्या चित्ताची खात्री आणि तदनुरूप प्रवृत्ति करण्याची शक्ति त्यांचे अंगीं होती, असें त्यांच्या वेळेपासून चालत आलेला जो कीर्तनाचा पाठ त्यावरून दिसत नाहीं. कीर्तनांत दोन भाग मात्र जसे असावे तसे करण्याचा हेतु दिसतो; ह्मणजे प्रथम एखाद्या धर्म किंवा नीतीच्या विषयाचें प्रतिपादन, व नंतर त्यास समर्पक असा इतिहासांतील किंवा पुराणांतील दृष्टांत. परंतु हा हेतु एकीकडेच राहून कीर्तनांत आधीं ब्रह्मज्ञान (किंवा ब्रह्मघोळ ह्मटलें तरी चालेल) सांगण्याचा प्रघात आहे. यांत वक्त्यास आपला प्रतिपाद्य विषय कोणचा, त्यास साधक बाधक प्रमाणें कोणचीं, याचें भान न रहातां सर्व घोंटाळा होऊन जातो. यामुळें कीर्तनसंबंधीं वक्तृत्वांत हा मुख्य भाग असून तो ऐकण्याचें श्रोते टाळावयास सांपडेल तितकें टाळण्याचा यत्न करितात. यावरून कीर्तन करणारांचे वक्तृत्वाचें अनुमान सहज करितां येतें. तसेंच कीर्तनांत जे रस येऊं नयेत ते कीर्तन करणारे निःशंकपणें आणितात; व बेडक्या वांकड्या चावट गोष्टीहि केवळ बालिश लोकांत हसविण्याकरितां सांगतात. आणि पुष्कळ प्रसंगीं तर असें होतें कीं, कीर्तनाच्या पहिल्या भागांतील प्रतिपाद्य विषय धर्म किंवा नीति, भक्ति किंवा शांति, किंवा वैराग्य असून पुढें दृष्टान्त रूपानें एखादें उत्कृष्ट शृंगाररसयुक्त, किंवा रौद्र किंवा बीभत्सरसयुक्त आख्यान लागून पूर्व भागानें यथाकथंचित उत्पन्न झालेला शांत भाव मुळींच नाहींसा होऊन, मनावर शृंगारादिकांचा मात्र ठसा रहातो. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां आपल्या कीर्तन करणारांस प्रायः वक्ते हें नांव मुळींच शोभत नाहीं असें कबूल करावें लागेल. कीर्तन करणारांनीं आपलें भाषेचें व प्रतिपाद्य विषयाचें ज्ञान पुष्कळ वाढविण्याविषयीं यत्न करून वर सांगितलेले दोष त्यांतून काढून टाकिले, तर धर्मसंबंधी वक्तृत्वाचा कीर्तन हा एक अति उत्तम प्रकार होईल यांत संशय नाहीं. इकडे आपले वाचक व कीर्तन करणारे लक्ष देतील अशी मी आशा करितों.

या विषयाचे संबंधानें आणखी एक गोष्ट येथें सांगितली पाहिजे ती ही कीं, धर्मसंबंधीं बोधास अनुकूल जे शांत, करुण, इत्यादि रस त्यांचा जेणेंकरून आविर्भाव होईल असे इतिहासांतील निवडक भाग काढून पुराणिकांनीं श्रोत्यांस त्यांचें प्राकृत भाषेंत (पदरचें कांहीं न घालतां) मधुर वाणीनें विवरण करण्याची चाल घातली, तर पुराण सांगण्याची पद्धति आहे तीहि धर्मसंबंधी वक्तृत्वाचा चांगला प्रकार होईल असें वाटतें.

आतां अंक २१ यांत प्रस्तुतच्या वक्तृत्वाच्या स्थितीविषयीं जें तुह्मीं लिहिलें आहे तें लिहितांना त्या अंकाचे मुखपृष्ठावर जें पद्य तुह्मीं घातलें आहे त्याच्या, व "सत्याय मितभाषिणां" या महाकविवचनाच्या, तात्पर्यावर दृष्टि देऊन जें लिहिणें तें लिहिलें असतें, तर फार बरें झालें असतें. तसें केलें असतां कदाचित् तुमचा निबंध इतका लांबला नसता. परंतु तुमचा लेख यथार्थ होऊन राहिलेली जागा दुसऱ्या एखाद्या चांगल्या विषयास उपयोगीं पडली असती.

अलीकडील सुधारणुकेच्या ज्या कितीएक पद्धति निघाल्या आहेत त्यांचीं कारणें, त्यांतील वास्तविक गुणाचा अंश, व पुढें होणारा परिणाम, या सर्व गोष्टींकडे "मार्मिक" लक्ष न पुरवितां त्याची केवळ खटपटनाच करण्यांत तुह्मांस मोठें भूषण किंवा मौज वाटते यांचें मला मोठें आश्चर्य वाटतें! तुमची 'निबंधमाला' हि अशाच पद्धतींतली एक पद्धत आहे अशी प्रायः सर्वांची समजूत आहे. व तुमचा एकंदर विषयप्रतिपादन करण्याचा प्रकार पाहिला तर वृथा डौल घालण्याविषयीं जो दोष तुह्मी इतर सुधारणा करूं इच्छिणारांस लावतां तोच तुमच्यावरहि येऊं पहातो. निबंधाचा मुख्य विषय मात्र खरा असून, त्याचें प्रतिपादन करतांना ज्या अनेक गोष्टी येतात त्यांच्या सत्यासत्याचा विचार न करतां हवें तसें लांबलचक लिहिलें, तर तेवढ्यानेंच निबंध चांगला होत नाहीं. निबंधाचा मुख्य विषय व त्यासंबंधानें लिहावयाच्या बारीकसारीक सर्व गोष्टी सत्य असून, त्यांच्या संबंधानें जें कित्येक व्यक्तींविषयीं लिहिणें येईल तें विचारपूर्वक लिहिलें पाहिजे. हल्लींच्या अंकांत ही गोष्ट तुह्मीं ध्यानांत ठेवली आहे असें मला वाटत नाहीं. तुमच्या या अंकांतील मुख्य विषय वक्तृत्वाची कला प्रस्तुत कालीं अगदीं बाल्यावस्थेंत आहे हा दिसतो. या गोष्टीची सत्यता सर्व विचारी मनुष्य कबूल करतील याविषयीं मला संशय नाहीं; व सुधारणेचे कामांत पुढें झाल्यामुळें ज्या ज्या कोणास प्रसंगविशेषीं भाषण करण्याचा प्रसंग येतो तेहि ही गोष्ट पक्केपणीं समजत असतील असें मला वाटतें. याचें कारण हेंच कीं, वक्तृत्वकलेच्या प्राप्तीविषयीं बुद्धया यत्न करणारे सुशिक्षित लोक निदान आपल्या या महाराष्ट्र देशांत तर मुळींच नाहींत झालें तरी चालेल. ही कला चांगली येण्याकरतां सुभाषित, इतिहास, काव्यनाटकादि प्रबंध, अलंकारशास्त्र, प्राचीन व अर्वाचीन वक्त्यांचीं रसिक भाषणें, यांचा उत्तम अभ्यास केला पाहिजे; तसेंच इतर अनेक विषयांचेंहि बरेंच व्यापक ज्ञान संपादिलें पाहिजे; व प्रत्येक भाषण करणें तें, प्रतिपाद्य विषयाचें परिपूर्ण आलोचन करून विवक्षित साधक बाधक प्रमाणांची उत्तम व्यवस्था करून, भाषणाचा प्रसंग, श्रोत्यांची योग्यता, व मनाची स्थिति या सर्व गोष्टींकडे लक्ष देऊन करण्याचा अभ्यास ठेविला पाहिजे. वक्तृत्वगुणाचे प्राप्तीस हीं सर्व साधनें अत्यंत अवश्यक आहेत. यास्तव आपल्या वक्तृत्वशक्तीनें स्वदेशकल्याण करूं इच्छिणारे व वक्तृत्वोत्तेजक मंडळ्या या अवश्य गोष्टींकडे लक्ष पुरवितील अशी मी आशा करितों.

परंतु अलीकडील राज्यरीति व धर्मसंबंधी स्थिति वक्तृत्वकलेच्या वृद्धीस अगदीं प्रतिबं-

धक्क आहेत, व पूर्वीची स्थिति होती तीच बरी, असें जें तुह्मीं लिहिलें आहे तें यथार्थ नाहीं. हल्लींची राज्यरीति व धर्मस्थिति इंग्रेज लोकांच्या हकडे येण्यानें व इंग्रजी विद्येच्या अभ्यासानें झाली आहे, हें तुह्मीं उपक्रमीं सांगितलें आहे. या गोष्टी तुह्मांस इष्ट आहेत कीं अनिष्ट आहेत याचा विचार केला तर एकंदरीनें त्या तुह्मांस इष्ट आहेत असें निबंधाचा उपक्रम व उपसंहार पहातां दिसतें. हें ठीकच आहे. कारण या गोष्टी घडल्या नसत्या तर आज मित्तीस आपली 'निबंधमाला' व निस्पृहपणानें (पुष्कळ वेळां अविचारानें) विद्यमान व्यक्ति व स्थिति यांजविषयीं लिहिण्याचा मार्ग कोणीकडे असता? तेव्हां एकंदरीनें या गोष्टी हिताच्या आहेत असें परिणामाकडे दृष्टि देऊन सर्व विचारी मनुष्यांस कबूल केलें पाहिजे. तर आपली 'निबंधमाला' खेरीज करून ज्या सर्व सुधारणेच्या पद्धतींची तुह्मीं यथेच्छ विटंबना केली आहे त्याहि तुमच्या 'निबंधमाले'प्रमाणेंच त्याच गोष्टींचा तात्कालिक परिणाम होय असें कां ह्मणूं नये? व हा तात्कालिक परिणाम सर्वांशीं वाईट असें ह्मणणें अगदीं अविचाराचें आहे. तुह्मी याच निबंधांत एके ठिकाणीं कबूल करतां कीं "सुमारें दहा वीस वर्षांपूर्वी जी स्थिति होती तिशीं ताडून पाहिलें असतां आजचें पाऊलहि बरेंच पुढें आहे असें ह्मणावें लागेल" याचें कारण विद्यावृद्धि व वक्तृत्वोत्तेजक सभा असेंहि तुह्मीच कबूल करतां. आणि त्याच विद्यावृद्धीपासून साहजिक मनांत उठणारे अनेक रंग कार्यरूपानें प्रकट होऊं पहात आहेत त्याची तुह्मी विटंबना करतां. व ज्या वक्तृत्वोत्तेजक सभाच्या योगानें (तुमच्या मतें) अलीकडील वक्तृत्वाची स्थिति बरी आहे, त्याच सभांची प्रवृत्ति करणाऱ्या सर्व पुढारी लोकांचा तुह्मी अमर्याद उपहास करितां. या वक्तृत्वोत्तेजक सभांच्या व इतर सुधारणुकेच्या संबंधानें आजपर्यंत कित्येक पुरुष घरांत बसून गोष्टी सांगण्याचें सोडून देऊन आपलें विचार यथामति लोकांस कळविण्यास पुढें सरसावले नसते, तर आज मित्तीस जें कित्येकांस समेंत एखाद्या विषयाचें पूर्वापेक्षां बरेंच प्रतिपादन करितां येऊं लागलें आहे तें तरी कसें झालें असतें? या गोष्टीचा विचार न करतां फक्त कोणी बोलतांना एकेक हात उडतो, कोणी अशीच मान करतो, कोणी असेंच तोंड करितो, कोणी असाच आव घालतो, कोणी असा डौल करितो, इत्यादि क्षुद्र गोष्टी पुढें करीत बसण्यांत तुह्मांस काय आनंद वाटत असेल तो वाटो! मला तर त्यापासून कांहीं हांशील दिसत नाहीं! साधारणपणें एक पद्धति एके ठिकाणीं झाली ह्मणूनच तिचा कित्ता इतर ठिकाणीं घ्यावा हें योग्य नाहीं. परंतु सर्वच सुधारणेच्या पद्धति व्यर्थ व पोकळ व आरंभशूरपणाच्या, व त्यांचा उपक्रम करणारे सर्व लब्धप्रतिष्ठ, डौल मिरविणारे, दांभिक, भलताच आव घालणारे, अविचारी, व आरंभशूर असें ह्मणणें एकांशीं देखील खरें नाहीं. मला तर असें वाटतें कीं, एखाद्या नष्ट दशेस आलेल्या देशाची उत्तम सुधारलेल्या देशाशीं एकदम गांठ पडली असतां अशा तऱ्हेचा फरफार होणें हें अगदीं साहजिक आहे. हा सर्वच फेरफार सर्वांशीं चांगला असें तर कधींच होत नाहीं. व सुधारणेच्याहि अनेक पद्धति प्रचारांत येऊन नष्ट होतां होतां कांहीं काळानें निकृष्ट प्रतीच्या देशास वऱ्या प्रकारची स्थिरावस्था येते. आणि ईश्वरकृपेनें या देशांतहि तसेंच होईल अशी आशा आहे.

हल्लीं जी या देशांत अनेक प्रकारची खळबळ सुरू झाली आहे ही काय सर्वांशीं अकल्याणाची आहे? माझ्या मतें अशी गोष्ट खचीत नाहीं. तुह्मीं आपल्या 'निबंधमाले'त "लोकक्रमा"विषयीं वगैरे जें विवरण केलें आहे तेंहि याच खळबळीची लहर तुमच्या

अंतःकरणांत उत्पन्न होऊन केलें आहे यांत संशय नाहीं. त्याचप्रमाणें ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, वक्तृत्वोत्तेजक, व्यापारोत्तेजक, कौशल्यवर्धक इत्यादि मंडळ्या व त्यांचे उद्योग त्याच खबळीमुळें उपस्थित झाले आहेत. आपल्या देशांत धर्माचें अलीकडे जें अज्ञान व जी वजबज झाली आहे, व त्याचे योगानें अनेक वेडसर व कित्येक अंशीं अनीतीच्या व अकल्याणकारक चाली व त्यांस अनुकूल प्रतिपादक ग्रंथ प्रचारांत आले आहेत, त्यांपासून लोकांचीं मनें निवृत्त होऊन धर्म व नीति यांच्या तत्त्वांविषयीं ज्ञान व आस्था उत्पन्न होण्यास कित्येक वास्तविक परोपकारी गृहस्थांनीं ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, बालविवाहनिषेधक मंडळी, विधवाविवाहोत्तेजक मंडळी, इत्यादि प्रकारचे प्रयत्न चालू केले आहेत, ते केवळ डौल मिरविण्याकरितां व देशाच्या अकल्याणाकरितां मतलबीपणानें केले आहेत काय? व त्यापासून वाईट परिणाम तरी आजपर्यंत कोणते झाले आहेत? डोळे उघडे ठेवून ईश्वरोपासना करण्यापेक्षां डोळे मिटून उपासना करण्यानें मनुष्य विशेष चांगलें होत नाहीं हें क्षणभर कबूल केलें, तरी तोंडानें कांहीं तरी अर्थावांचून बडबड व हातांनीं हावभाव करणें, किंवा धर्मविचाराकडे अत्यंत दुर्लक्ष करून तो निरर्थक असें मानणें, यापेक्षां आपल्यास व इतरांस समजतील अशा शब्दांनीं जगन्नियंत्याची उपासना करणें, त्याचे मंगल गुण आठवून तदाकारवृत्ति व तदनुरूप आचरण करण्याचा यत्न करणें, हा मार्ग विशेष श्रेयस्कर होणार नाहीं असें साहसावांचून कोणाच्यानें म्हणवेल? हल्लीं ब्रह्मसमाज किंवा प्रार्थनासमाज यांतील लोक व इतर लोक यांजमध्यें षड्रिपुजयाचे संबंधानें फरक दिसत नाहीं म्हणून पुढेंहि कधीं होणार नाहीं असें कोणाच्यानें म्हणवेल? धर्मोन्नति इतर सर्व साध्य गोष्टींपेक्षां अत्यंत महत्त्वाची जशी आहे, तशीच अत्यन्त यत्नसाध्यहि आहे. ती अति अल्पकालांत व्हावी अशी अपेक्षा करणें हें अविचाराचें काम होय. तुम्हीं ज्या गोष्टींचा मुळींच अनुभव घेतला नाहीं, व जो विषय तुम्हांस अगदीं उपेक्षणीय वाटतो, त्याजविषयीं इतरांच्या नुक्त्याच आरंभलेल्या उद्योगाविषयीं बरा वाईट अभिप्राय देणें हें मला अगदीं साहसाचें काम वाटतें. व हीच गोष्ट इतर सुधारणेच्या यत्नांविषयीं आहे. त्यांत कोणी कांहीं मोठी चूक किंवा अन्याय करीत आहे, किंवा निःसंशय केवळ प्रतिष्ठेसाठीं ढोंग करीत आहे, याविषयीं चांगल्या अनुभवांनीं खाली होईल, तेव्हां तेवढा दुर्गुण निस्पृहपणें (मर्मभेदकपणानें नव्हे) स्पष्ट करून दाखविणें आणि योग्य मार्ग सांगणें हें तुम्हांसारख्या निबंधकर्त्यांचें काम होय. हें न करतां सर्व सुधारणेच्या उद्योगांत जो सद्धेतु व गुणलेश असेल तिकडे दुर्लक्ष करून[1] दयानंद सरस्वती सारख्या वास्तविक परोपकारबुद्धीच्या व्यक्तींचा, व ब्रह्मसमाजासारख्या राममोहनराय, बाबू देवेंद्रनाथ टागोर (ठाकूर), बाबू केशवचंद्र सेन, इत्यादि केवळ सद्बुद्धिप्रेरित, परोपकारी, खऱ्या स्वदेशाभिमानी लोकांनीं आरंभिलेल्या उद्योगांचा, अनुभवावांचून यथेच्छ उपहास करणें, यापासून तुम्हां स्वतःस किंवा तुमच्या वाचणारांस, किंवा ज्या या सर्व देशाच्या कल्यार्थ तुम्हीं आपल्या पद्धतीनें यत्न चालविला आहे त्यास, कांहीं फळ होईल असें मला वाटत नाहीं. कळावें हे विनंति.

मु. रत्नागिरी ता० २० डिसेंबर १८७५.

निबंधमालाहितेच्छु.

---

१. पंडित दयानंद सरस्वती यांचें वेदांविषयीं मत सुयुक्तिक आहे असें मला वाटत नाहीं.

(पुढें चालू).

वरील पत्राच्या उत्तरास आरंभ करण्यापूर्वी तें लिहिणाराविषयीं दोन शब्द बोलले पाहिजेत. एक तर वरील लिहिणाराचीं मतें आमच्याहून इतकीं भिन्न असतां आमच्या लहान पुस्तकाविषयीं त्याच्या मनांत यत्किंचित्हि द्वेषभाव नसून त्याचा तो उलटा हितचिंतक आहे याबद्दल आह्मी त्याचे उपकार मानून त्याच्या औदार्याची तारीफ करतों. शिवाय आमच्या लेखावर आपले विचार त्यानें इतके उघड बोलून दाखविल्याबद्दलहि आह्मी त्याचे आभारी आहों. असले अभिप्राय कितीहि कडक रीतीनें लिहिले असले तरी गुळमुळीत शिफारशीपेक्षां व व्यर्थ स्तुतीपेक्षां त्यांची योग्यता आह्मी फार जास्त समजतों.

सदरील पत्र वाचून आमच्या वाचकांस कळून आलें असेलच कीं तें लिहिण्यास प्रस्तुत पुस्तकाचा २१ वा अंक कारण झाला. त्या अंकांत वक्तृत्वोत्तेजक सभांविषयीं व त्या संबंधानें आपल्या देशांत अलीकडे चालू झालेल्या दुसऱ्या कित्येक उलाढालींविषयीं जें लिहिलें आहे तें 'हितेच्छूं'स यथार्थ न वाटून त्यांनीं आपले स्वतःचे त्याविषयींचे अभिप्राय आह्मांस कळविले आहेत. मुख्य विषयाविषयीं त्यांचा आमचा मुळींच मतभेद नसून त्यास अंमळ सोडून प्रस्तुत देशस्थितीविषयीं जे आह्मीं कित्येक विचार प्रदर्शित केले आहेत ते व त्यांचा एकंदर रोंख हे त्यांस अगदीं मान्य नाहींत.

आतां 'हितेच्छूंनीं' आमच्या लेखांवर जीं दूषणें काढलीं आहेत तीं प्रथम सांगून नंतर त्यांवर अनुक्रमानें आह्मी आपले विचार प्रगट करूं. हीं दूषणें मुख्यत्वेंकरून तीन आहेत. एक हें कीं, अलीकडे या देशांत सर्व विषयांच्या संबंधानें जी खळबळ सुरू झाली आहे;—ह्मणजे धर्म, नीति, विद्या, लोकाचार वगैरेविषयीं जुनीं जीं मतें होतीं तीं बदलत चाललीं आहेत किंवा नाहींशीं होत चाललीं आहेत,—तिजविषयीं आमच्या समजुती बरोबर नाहींत. दुसरें असें कीं, वरील खळबळींत प्रमुख असणारी जी मंडळी तिचे गुण मुळींच न घेतां केवळ दोषच बाहेर काढण्याची आह्मांस हौस वाटते. आणि तिसरें दूषण हें कीं, वरील दोष जे दाखवायाचे ते केवळ प्रांजळ बुद्धीनें न दाखवितां त्यांचा अमर्याद उपहास करण्यांतच आह्मांस विलक्षण कांहीं भूषण वाटतें!

आतां पहिल्यानें वरील खळबळ ह्मणजे नवे विचार व नव्या समजुती. या खळबळीविषयीं प्रस्तुत पुस्तकांत आज दोन वर्षें आमचीं मतें अनेक ठिकाणीं प्रगट

तथापि त्यांची निस्पृहता, स्वदेशाविषयीं योग्य अभिमान, व खरा कळवळा, व त्याचे भावी स्थितीविषयीं सद्धेतु, आणि ते सिद्धीस नेण्याविषयीं (त्यांच्या समजुतीप्रमाणें) बहुत दिवस निर्भयपणें व निर्भीडपणें सतत प्रयत्न, हे गुण आपल्या लोकांत फारच थोड्यांचे अंगीं असल्यामुळें त्यांजविषयीं आपली कृतज्ञताबुद्धि असली पाहिजे असें मला वाटतें.

झालीं आहेत. त्यांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, गेल्या दहा वीस वर्षांत तीविषयीं लोकांच्या ज्या समजुती होऊन बसल्या होत्या, व पुष्कळ अंशीं अजूनहि आहेत, त्यांपेक्षां आमच्या फार निराळ्या आहेत. इंग्रेजांच्या ऐश्वर्यास व विद्योत्कर्षास भुलून जाऊन, आणि इंग्रेज ग्रंथकारांच्या अज्ञानमूलक गर्वोक्ति व पाद्रीसाहेबांचे हेकटपणाचे व मतलबाचे लेख व भाषणें हीं सर्व खरीं मानून, आमच्या नवीन विद्वानांनीं सर्वमतें असा एक जबरदस्त सिद्धांत करून टाकला होता कीं, जुनें तेवढें सर्व अतिनिंद्य व नवें इंग्रेजी तेवढें सर्वथा स्तुतीस पात्र. हा समज कांहीं अंशीं स्वाभाविकच होता. कोणा एका चतुर ग्रंथकारानें असें झटलें आहे कीं, आपण मनुष्यें हीं सरड्यासारखीं आहों; त्याचा रंग जसा वरचेवर बदलतो त्याप्रमाणेंच संगतिविशेषानें आपलेहि गुण, रुचि, व मतें हीं नेहमीं पालटत असतात. तर या सर्वसाधारण नियमावरून पहातां दहा वीस वर्षांमागच्या लोकांच्या मनावर वर सांगितलेला संस्कार झाला यांत कांहीं मोठेंसें विचित्र नाहीं. कोणत्याहि गोष्टीचें खरें स्वरूप व खरी योग्यता हीं समजण्यास नेहमीं कांहीं तरी काळ जावा लागतोच. असो; तर याप्रमाणें ही नवी खळबळ वरील लोकांस सर्वांशीं श्रेयस्करच वाटून पहिलें सर्व अगदीं मोडून टाकण्याचा किंवा तें पालटून टाकून त्यास नवें स्वरूप देण्याचा वरील लोकांचा सारखा प्रयत्न चालला होता, व अद्यापहि बराच चालला आहे. प्रस्तुत लिहिणाराचीं मतें आमच्या देशाच्या संबंधानें सारीं कशीं काय आहेत हें आह्मांस चांगलेंसें माहीत नाहीं; तरी वरील पत्रांत (पृष्ठ ३५९) त्यास त्यांनीं 'नष्ट दशेस आलेला', व 'निकृष्ट प्रतीचा' अशीं विशेषणें दिलीं आहेत यावरून व पत्राच्या एकंदर मजकूरावरूनहि त्यांचा झोक बराच दृष्टीस पडतो. आह्मांस खचीत वाटतें, व हा समज यापूर्वी आह्मीं अनेक वेळां बोलून दाखविला आहे, कीं आमच्यांत प्रमुख ह्मणविणाऱ्या लोकांस स्वतःची योग्यता, ज्ञान, व कर्तृत्व हीं जरी केवळ अकटोविकट वाटतात, व जगांत आजपर्यंत महान् महान् पुरुषांनीं जीं कृत्यें केलीं तीं करण्याचा पतकरहि जरी ते खुशाल घेतात, तरी वस्तुतः पाहिलें तर वरील तिन्ही गुणांत त्यांचा कमतरपणा पुष्कळच आहे असें सर्व यथार्थ पहाणारांस वाटेल. हल्लीं थोरापासून तों लहानापर्यंत ज्यानें उठावें त्यानें सगळ्या हिंदुस्थानावर धाड घालून त्यास सांप्रत जी अवस्था प्राप्त झाली आहे ती अशा अशामुळेंच झाली आहे व ती अमुक अमुक उपाय केले असतां खास दूर होईल, वगैरे यथेष्ट जल्पना निःशंकपणें करावी यासारखें दुसरें काय बरें हास्यास्पद आहे? एवढा अवाढव्य देश—ज्यांत आज लक्षावधि फेरफार होऊन गेले, ज्यांत हजारों तऱ्हेचे कोट्यावधि लोक आहेत, ज्याच्या प्राचीन इतिहासाची ह्मणण्यासारखी माहिती कोणास कांहींच नाहीं—त्याच्या एकंदर स्थितीविषयींचे खात्रीचे विचार देऊन अमुक अमुक मात्रा या ह्मणजे त्याचा

रोग हटून त्यास खचीत आराम पडेल असे अभिप्राय देणें ह्मणजे केवढें साहसाचें काम आहे? इंग्रेज लोकांचें आज निदान शंभर वर्षे तरी या देशांत राज्य चालू असून व एतद्देशीयांचा स्वभाव, रीतभात वगैरे माहिती त्यांनीं आजपर्यंत सतत उद्योग करून इतकी मिळविली असतांहि, वरच्यासारखे विचार प्रगट करण्यास त्यांस मोठी भीति वाटते. एतद्देशीय लोकांचें मन हें एक मोठें कोडेंच आहे असें समजून कोणताहि फेरफार वगैरे करणें तो ते फार जपून करीत असतात. तरी दहा वीस वर्षांनीं सत्तावन सालासारखी किंवा नुकत्या झालेल्या बडोदें प्रकरणासारखी भयंकर चूक होतेच होते! मग अशी जर आमच्या चतुर, ज्ञानी, व अनुभवी राजकर्त्यांच्या घरची व्यवस्था आहे; तर ज्या आह्मांत शोधक बुद्धीनें प्रवास करण्याचा ज्याला शोक असा एकहि मनुष्य सांपडायाचा नाहीं, ज्याची सर्व माहिती काय ती वर्तमानपत्रांवरून वगैरे मिळविलेली, ज्यांचा जातीचा अनुभव झटला ह्मणजे शून्यच, असे आह्मी जर सगळ्या देशाच्या उलाढाली करण्यास हात घातला तर आमच्या शहाणपणाची किती तारीफ करावी? एखाद्या प्रचंड राक्षसास रोग होऊन तो बेजार होऊन पडला असतां छोट्या छोट्या माणसांनीं त्याच्या शरीरव्यापारांची माहिती करून घेण्याची बिलकूल खटपट न करतां पट्या बांध, पलिस्तरें मार, दवा दे, असा जर धूम सपाटा चालवला, किंवा होडगें वल्हवायाला शिकलेल्या नावाड्यांनीं आपलें नाविकज्ञान समुद्रांत अडून राहिलेल्या किंवा तुफानांत सांपडलेल्या मोठ्या जहाजावर चालवण्याविषयीं जर कंबर बांधली, तर वरील दोन्ही शूरत्वाच्या कृति पाहून कोणास हसूं आल्यावांचून राहील? असो; तर वरील पत्र लिहिणारानें व्यापारोत्तेजनादि ज्या अनेक उलाढालींच्या कैवारानें आह्मांस दोष दिला आहे त्या सर्व आह्मांस वरच्यासारख्या वाटतात; आणि वरील सादृश्य त्यांस पुरतेपणीं लागतें कीं नाहीं याचा प्रत्यय वरील सर्व मंडळ्यांची स्थिति क्षणभर ध्यानांत आणली असतां कोणासहि पुरतेपणीं आल्यावांचून रहाणार नाहीं.

आतां एवढें खरें कीं, वरील उलाढाली कितीहि हास्यास्पद असल्या तरी त्यांपासून मुळींच उपयोग नाहीं असें नाहीं. असा उल्लेख या पूर्वी आह्मीं कोठेंहि केला असेलसें आह्मांस वाटत नाहीं. कोणतेंहि कृत्य केलें आणि तें पुढें सारखें चालेनासें होऊन बंदहि जरी पडलें, तरी त्यापासून कांहीं थोडी तरी कार्यनिष्पत्ति होतेच होते. निदानपक्षीं असा असा उद्योग आरंभिला असतां त्यांत यश येईल कीं नाहीं, व आलें तर कितपतसें येईल, याचा सुमार तरी लागतो. शिवाय कोणतेंहि मोठें कृत्य चांगलें सिद्धीस जाण्यास पहिल्यानें पुष्कळ प्रयत्न करावे लागतात व ते अनेक वेळां फसतातहि. हें सर्व आह्मी कबूल करतों. गेल्या एकविसाव्या अंकांत वरील मंडळ्यांवर वगैरे जे आह्मीं दोष दिले ते फक्त एवढ्याचकरितां कीं, कोणतीहि

झालीं आहेत. त्यांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, गेल्या दहा वीस वर्षांत तीविषयीं लोकांच्या ज्या समजुती होऊन बसल्या होत्या, व पुष्कळ अंशीं अजूनहि आहेत, त्यांपेक्षां आमच्या फार निराळ्या आहेत. इंग्रेजांच्या ऐश्वर्यास व विद्योत्कर्षास भुलून जाऊन, आणि इंग्रेज ग्रंथकारांच्या अज्ञानमूलक गर्वोक्ति व पाद्रीसाहेबांचे हेकटपणाचे व मतलबाचे लेख व भाषणें हीं सर्व खरीं मानून, आमच्या नवीन विद्वानांनीं सर्वमतें असा एक जबरदस्त सिद्धांत करून टाकला होता कीं, जुनें तेवढें सर्व अतिनिंद्य व नवें इंग्रेजी तेवढें सर्वथा स्तुतीस पात्र. हा समज कांहीं अंशीं स्वाभाविकच होता. कोणा एका चतुर ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, आपण मनुष्यें हीं सरड्यासारखीं आहों; त्याचा रंग जसा वरचेवर बदलतो त्याप्रमाणेंच संगतिविशेषानें आपलेहि गुण, रुचि, व मतें हीं नेहमीं पालटत असतात. तर या सर्वसाधारण नियमावरून पहातां दहा वीस वर्षांमागच्या लोकांच्या मनावर वर सांगितलेला संस्कार झाला यांत कांहीं मोठेंसें विचित्र नाहीं. कोणत्याहि गोष्टीचें खरें स्वरूप व खरी योग्यता हीं समजण्यास नेहमीं कांहीं तरी काळ जावा लागतोच. असो; तर याप्रमाणें ही नवी खळबळ वरील लोकांस सर्वांशीं श्रेयस्करच वाटून पहिलें सर्व अगदीं मोडून टाकण्याचा किंवा तें पालटून टाकून त्यास नवें स्वरूप देण्याचा वरील लोकांचा सारखा प्रयत्न चालला होता, व अद्यापहि बराच चालला आहे. प्रस्तुत लिहिणाराचीं मतें आमच्या देशाच्या संबंधानें सारीं कशीं काय आहेत हें आह्मांस चांगलेंसें माहीत नाहीं; तरी वरील पत्रांत (पृष्ठ ३५९) त्यास त्यांनीं 'नष्ट दशेस आलेला', व 'निकृष्ट प्रतीचा' अशीं विशेषणें दिलीं आहेत यावरून व पत्राच्या एकंदर मजकूरावरूनहि त्यांचा झोक बराच दृष्टीस पडतो. आह्मांस खचीत वाटतें, व हा समज यापूर्वी आह्मीं अनेक वेळां बोलून दाखविला आहे, कीं आमच्यांत प्रमुख ह्मणविणाऱ्या लोकांस स्वतःची योग्यता, ज्ञान, व कर्तृत्व हीं जरी केवळ अकटोविकट वाटतात, व जगांत आजपर्यंत महान् महान् पुरुषांनीं जीं कृत्यें केलीं तीं करण्याचा पतकरहि जरी ते खुशाल घेतात, तरी वस्तुतः पाहिलें तर वरील तिन्ही गुणांत त्यांचा कमतरपणा पुष्कळच आहे असें सर्व यथार्थ पहाणारांस वाटेल. हल्लीं थोरापासून तों लहानापर्यंत ज्यानें उठावें त्यानें सगळ्या हिंदुस्थानावर धाड घालून त्यास सांप्रत जी अवस्था प्राप्त झाली आहे ती अशा अशामुळेंच झाली आहे व ती अमुक अमुक उपाय केले असतां खास दूर होईल, वगैरे यथेष्ट जल्पना निःशंकपणें करावी यासारखें दुसरें काय बरें हास्यास्पद आहे? एवढा अवाढव्य देश—ज्यांत आज लक्षावधि फेरफार होऊन गेले, ज्यांत हजारों तऱ्हेचे कोट्यावधि लोक आहेत, ज्याच्या प्राचीन इतिहासाची ह्मणण्यासारखी माहिती कोणास कांहींच नाहीं—त्याच्या एकंदर स्थितीविषयींचे खात्रीचे विचार देऊन अमुक अमुक मात्रा या ह्मणजे त्याचा

रोग हटून त्यास खचीत आराम पडेल असे अभिप्राय देणें ह्मणजे केवढें साहसाचें काम आहे? इंग्रेज लोकांचें आज निदान शंभर वर्षे तरी या देशांत राज्य चालू असून व एतद्देशीयांचा स्वभाव, रीतभात वगैरे माहिती त्यांनीं आजपर्यंत सतत उद्योग करून इतकी मिळविली असतांहि, वरच्यासारखे विचार प्रगट करण्यास त्यांस मोठी भीति वाटते. एतद्देशीय लोकांचें मन हें एक मोठें कोडेंच आहे असें समजून कोणताहि फेरफार वगैरे करणें तो ते फार जपून करीत असतात. तरी दहा वीस वर्षांनीं सत्तावन सालासारखी किंवा नुकत्या झालेल्या बडोदें प्रकरणासारखी भयंकर चूक होतेच होते! मग अशी जर आमच्या चतुर, ज्ञानी, व अनुभवी राजकर्त्यांच्या घरची व्यवस्था आहे; तर ज्या आह्मांत शोधक बुद्धीनें प्रवास करण्याचा ज्याला शोक असा एकहि मनुष्य सांपडायाचा नाहीं, ज्याची सर्व माहिती काय ती वर्तमानपत्रांवरून वगैरे मिळविलेली, ज्यांचा जातीचा अनुभव झटला ह्मणजे शून्यच, असे आह्मी जर सगळ्या देशाच्या उलाढाली करण्यास हात घातला तर आमच्या शहाणपणाची किती तारीफ करावी? एखाद्या प्रचंड राक्षसास रोग होऊन तो बेजार होऊन पडला असतां छोट्या छोट्या माणसांनीं त्याच्या शरीरव्यापारांची माहिती करून घेण्याची बिलकूल खटपट न करतां पट्या बांध, पलिस्तरें मार, दवा दे, असा जर धूम सपाटा चालवला, किंवा होडगें वल्हवायाला शिकलेल्या नावाड्यांनीं आपलें नाविकज्ञान समुद्रांत अडून राहिलेल्या किंवा तुफानांत सांपडलेल्या मोठ्या जहाजावर चालवण्याविषयीं जर कंबर बांधली, तर वरील दोन्ही शूरत्वाच्या कृति पाहून कोणास हसूं आल्यावांचून राहील? असो; तर वरील पत्र लिहिणारानें व्यापारोत्तेजनादि ज्या अनेक उलाढालीच्या कैवारानें आह्मांस दोष दिला आहे त्या सर्व आह्मांस वरच्यासारख्या वाटतात; आणि वरील सादृश्य त्यांस पुरतेपणीं लागतें कीं नाहीं याचा प्रत्यय वरील सर्व मंडळ्यांची स्थिति क्षणभर ध्यानांत आणली असतां कोणासहि पुरतेपणीं आल्यावांचून राहाणार नाहीं.

आतां एवढें खरें कीं, वरील उलाढाली कितीहि हास्यास्पद असल्या तरी त्यांपासून मुळींच उपयोग नाहीं असें नाहीं. असा उल्लेख या पूर्वी आह्मीं कोठेंहि केला असेलसें आह्मांस वाटत नाहीं. कोणतेंहि कृत्य केलें आणि तें पुढें सारखें चालेनासें होऊन बंदहि जरी पडलें, तरी त्यापासून कांहीं थोडी तरी कार्यनिष्पत्ति होतेच होते. निदानपक्षीं असा असा उद्योग आरंभिला असतां त्यांत यश येईल कीं नाहीं, व आलें तर कितपतसें येईल, याचा सुमार तरी लागतो. शिवाय कोणतेंहि मोठें कृत्य चांगलें सिद्धीस जाण्यास पहिल्यानें पुष्कळ प्रयत्न करावे लागतात व ते अनेक वेळां फसतातहि. हें सर्व आह्मी कबूल करतों. गेल्या एकविसाव्या अंकांत वरील मंडळ्यांवर वगैरे जे आह्मी दोष दिले ते फक्त एवढ्याचकरितां कीं, कोणतीहि

मंडळी किंवा सभा स्थापन करण्यापूर्वी तिच्यापासून कितीसा उपयोग होईल, ती चालण्याचा संभव आहे कीं नाहीं, वगैरे गोष्टींचा चांगलासा विचार बिलकूल न करतां केवळ अनुकरणेच्छेनें किंवा प्रतिष्ठेच्या आशेनेंच त्यांस लोक हात घालतात. असें केल्यापासून देशाचें कोणतें अहित होतें तें मागें सांगितलेंच आहे.

हें एक कलम झालें. आतां 'हितेच्छूं'चा आह्मांवर दुसरा दोष हा आहे कीं, वरील सभादिकांचे गुण मुळींच न घेतां त्यांचे दोष मात्र बाहेर काढण्याची आह्मांस हौस वाटते. हा आह्मांवर केवळ वृथा आरोप आहे अशी आमची खात्री आहे. प्रस्तुत पत्र लिहिणारास कदाचित् एवढें ह्मणतां येईल खरें, कीं ज्या लोकांचे मंडळ्यांचे दोष बाहेर काढण्याचा सर्वांस आजपर्यंत संकोच किंवा भीति वाटत असे त्यांवरहि प्रसंगानुसार टीका करण्यास आह्मी अगदीं कमी करीत नाहीं. प्रत्येक विषयावर आमचीं जीं मतें आह्मांस यथार्थ वाटतात तीं उघडपणें व निर्भीडपणानें आह्मी बोलून दाखवितों. पण वरील अभिप्राय केवळ एकपक्षीय असतात, ह्मणजे गुण तेवढे छपवून ठेवून कोणाचेहि दोष तेवढे आह्मी उघडकीस आणतों, असें झाल्याचें निदान आह्मांस तर माहीत नाहीं. तसा प्रकार होत असल्यास आमची चूक आह्मांस दाखविण्याविषयीं अगदीं पहिल्या अंकापासून आह्मीं सर्वांसःविनंति केली आहे. प्रस्तुत लिहिणाराचें पत्र तरी बरेंच रागानें लिहिलें असतां सदरील अंकांत जसेंचें तसें घालून त्यावर हें उत्तर आह्मी लिहीत आहों हेंहि मूळच्या संकल्पासच अनुसरून होय हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

तेव्हां प्रस्तुत दूषण जें आह्मांस लावलें आहे तें केवळ विनाकारण लावलें आहे. वक्तृत्वोत्तेजक आदिकरून ज्या अनेक सभांविषयीं व मंडळ्यांविषयीं हा वाद आहे त्यांपैकीं जिचा 'वास्तविक गुणाचा अंश' आह्मीं घेतला नाहीं अशी कोणती आहे ? आतां एवढें खरें कीं, जेथें गुणाचा अंश आह्मांस विशेष मुळींच दिसला नाहीं तेथें आह्मीं त्याचा आरोप केला नाहीं. यास जर 'हितेच्छु' वृथा दोषाविष्करण ह्मणत असतील तर ह्मणोत. आमच्या पुण्यास ज्या अनेक मंडळ्या व सभा आहेत त्यांत सार्वजनिक सभा, वक्तृत्वोत्तेजक मंडळी, तसेंच चालू सालीं झालेलें प्रदर्शन, वगैरे कांहीं प्रकार बऱ्याच रीतीनें चालल्यामुळें त्यांत दोष व न्यूनता जरी आहेत तरी त्यांस सर्वथा नांव ठेवणारा मनुष्य कोणीहि आढळणार नाहीं. त्याप्रमाणेंच ब्रह्मसमाज, विधवाविवाहोत्तेजक, बालविवाहोत्तेजक वगैरे मंडळ्या व केशवचंद्र सेन, बाबू सत्येंद्रनाथ, राममोहन राय इत्यादि खरोखर 'केवळ सद्बुद्धिप्रेरित, परोपकारी, व खऱ्या स्वदेशाभिमानी' पुरुषांचीहि आमच्या पुस्तकांत कोठेंहि बिलकूल विटंबना केलेली नाहीं. त्यांविषयीं मजकूर आढळलाच तर उलट्या तऱ्हेचा मात्र आमच्या वाचकांस आढळला असेल. पण वरील कांहीं मंडळ्या व कांहीं व्यक्ति स्तुतीस पात्र असल्या

ह्मणून ज्यानें ज्यानें स्वदेशाचा झेंडा मिरवून नाचूं लागावें तो तो अवघा प्रशंसेस पात्र झालाच काय? उद्देश चांगला असला ह्मणजे त्याच्या संबंधानें केलेलें कृत्य नेहमीं चांगलेंच असतें काय? मनांत धरलेला उद्देश मुळींच सिद्धीस जाण्यासारखा आहे कीं नाहीं, किंवा निदान आरंभलेल्या उद्योगानें तो कितपतसा सिद्धीस जाईल याविषयीं विचार करावयास नकोच काय? टिट्टिभ ह्मणून एक पक्षी आहे तो रात्रीं निजला ह्मणजे आपले पाय वर करून निजतो, व त्यास वाटतें कीं, असें केल्यानें मी साऱ्या आकाशमंडळास सांवरून धरतों; मी असें न करीन तर आकाश कडकडून खालीं पडेल व साऱ्या प्राणिमात्राचा नाश होईल! तर अशा प्रतीचे जे कित्येक बहादर आमच्या देशांत आहेत त्यांस असें सांगावयास नको काय, कीं टिट्टिभ महाराज! तुमचा हेतु मोठा स्तुत्य आहे खरा, पण आकाश कोणीकडे आणि तुमचे भुवनाधारभूत पाय कोणीकडे! ते एक रात्रभर आपल्या पोटाशीं आंखडून घेऊन जर आपण खुशाल निद्रासुख घ्याल, तर दुसऱ्या दिवशीं आपणास कळेल कीं, अवघ्या जीवसृष्टीच्या हितार्थ आपण जे एवढे श्रमी होत होतां ते उगीच फुकटाफाकट! जगाची एवढी कामगिरी न पतकरतां आपल्या योग्यतेनुरूप जर एखादें स्वल्प काम आपण सांभाळाल, तर त्यांत तुमचेंहि बरें होऊन जनहिताविषयीं जी आपली अनिवार मनीषा तीहि बरीच पूर्ण झाल्यासारखी होईल! तर लोककल्याणाची जरी खरी इच्छा हृदयांत वागत असली, तरी असमंजसपणामुळें ती ज्यांच्या ठायीं केवळ उपहासास मात्र पात्र होते अशांचा हा एक प्रकार झाला. पण हाहि पुष्कळ अंशीं बरा. 'कौशल्यशिक्षक मंडळी', 'धर्मसभा' अशांचे स्थापक व पुरस्कर्ते फार तर असमंजसपणाच्याच दोषास पात्र होतील. पण दांभिकत्वाचा व लब्धप्रतिष्ठत्वाचा दोष तर वरच्याहून फारच भयंकर! सदरील पत्र लिहिणारास वरील दोषांचा आरोप जो आह्मीं कित्येक सभांवर व लोकांवर केला तो अगदीं खपला नाहीं. 'तो एकाहि अंशीं खरा नसून उलटा आमच्यावरच तो बराच येऊं पहातो' असें त्यानें ह्मटलें आहे. येथें आमच्यासंबंधानें आह्मीं कांहीं लिहीत नाहीं. आमचें पुस्तक आज दोन वर्षें लोकांसमोर आहे, तेव्हां प्रस्तुत दूषणाविषयीं आमचे वाचक स्वतंत्रपणें विचार करतीलच. वरील सभांविषयीं व व्यक्तींविषयीं वरील पत्रांत जें लिहिलें आहे त्याविषयीं मात्र येथें विचार करूं.

पत्रकर्ते ह्मणतात, वरील आरोप 'एकाहि अंशीं खरा नाहीं.' तर मग 'हितेच्छूंच्या मतें सुधारणेच्या पद्धति आजपर्यंत जेवढ्या निघाल्या तेवढ्या सर्व समंजसपणानें व केवळ निस्पृहपणानें काढल्या असून आजपर्यंत चांगल्या सुरळीत चालल्या आहेत असें आहे काय? असें त्यांच्यानें खास ह्मणवणार नाहीं असें आह्मांस वाटतें. आपल्या नव्या लोकांच्या अंगीं कोणतेंहि काम सारखें नेटानें चालवण्याचा बिलकूल

दम नाहीं, त्यांचीं कृत्यें आजपर्यंत जेवढीं झालीं तेवढ्यांत त्यांचा आरंभशूरपणा मात्र दिसून आला, व "निस्पृहपणा, स्वदेशाविषयीं योग्य अभिमान, खरा कळवळा, व कोणत्याहि कार्याच्या सिद्धयर्थ निर्भयपणें व निर्भीडपणें सतत प्रयत्न करणें हे गुण आपल्या लोकांत फारच थोड्यांच्या अंगीं आहेत" हें कोणास माहीत नाहीं, व याविषयीं आजपर्यंत कोणीं खेदोद्गार प्रगट केले नाहींत? वरील अवतरणचिन्हांतर्गत शब्द 'हितेच्छूं'चेच स्वतःचे आहेत हें आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच; व पंडित दयानंदजींचा स्तुतिपाठ करतांना त्यांच्या तोंडून देशाच्या खऱ्या स्थितीचे वाचक शब्द नकळत निघून गेले यांत संशय नाहीं! आतां खरोखरी पहातां वरील शब्द जे सदरील पत्राच्या शेवटीं टींपेंत दिले आहेत ते जर प्रस्तुत लिहिणारानें मिथ्या स्तुतीच्या भरांत लिहिले नसून मनापासून लिहिले असतील, तर परस्परांमधील वादाचें तोंडच मिटलें! गेल्या एकविसाव्या अंकांत सांप्रत देशांत चालू असणाऱ्या मंडळ्यांवर, सभांवर वगैरे जी आह्मीं चर्चा केली तिचा सारांश सारा वरील शब्दांत आला आहे. वास्तव 'हितेच्छूं'नीं व त्यांच्यासारखीं ज्यांचीं मतें असतील त्यांनीं वरील शब्द पतकरावे ह्मणजे झालें; यापेक्षां आमचें कांहीं जास्त ह्मणणें नाहीं.

पण आमच्या इष्टार्थाचें प्रतिपादन करण्यास असा वादच्छल नको. तो सिद्ध करणें असल्यास त्याविषयींचीं प्रमाणें इतकीं मजबूत आहेत, व इतकीं सर्वप्रसिद्ध आहेत, कीं त्यांचा उल्लेख करण्याचा मात्र अवकाश; तीं सांगितलीं असतां त्यांवर वाद घेण्यास मुळीं जागाच नाहीं. फार तर काय, पण तीं येथें दाखल करणें हेंहि पुष्कळ अंशीं अयोग्य होईल; कां कीं एक तर तीं कोणास माहीत नाहींत असें नाहीं; आणि शिवाय त्यांचा यथास्थित उल्लेख करून त्यांवर जशी हवी तशी चर्चा करणें हें जो आमच्या देशाचा शत्रु असेल त्याच्या खेरीज कोणाच्याहि हातून सहसा होणार नाहीं! असो; पण ज्या अर्थीं प्रस्तुत उत्तराचा मुख्य भाग तो आहे, व त्याविषयीं कांहींच लिहिलें नाहीं तर वरील पत्रांतील मुख्य दोषारोप आह्मीं अंगीकारलासें होईल, त्या अर्थीं वरील प्रमाणांपैकीं कांहीं येथें अवश्य लिहिलीं पाहिजेत. आमच्या नव्या मंडळीनें देशस्थिति सुधारण्यास ज्या अनेक तऱ्हा केल्या त्यांपैकीं विधवाविवाहोत्तेजन, स्वदेशीयव्यापारोत्तेजन आणि प्रार्थनासमाज व आर्यसमाज हे दोन धर्मपंथ, हे चार प्रकार मुख्य धरले असतां चालणार आहेत. आतां असें समजा कीं, गेल्या दहा पंधरा वर्षांचा इतिहास एखाद्यानें लिहिण्यास आरंभ केला, तर वरील प्रकारांविषयीं निःपक्षपातपणानें त्यास काय मजकूर लिहावा लागेल बरें? त्यास असें लिहावयास नको काय कीं 'नवविधव्याच्या असह्य वेदनां'पासून बिचाऱ्या हतभाग्य बालविधवांस सोडविण्याकरितां आमच्या देशांतील नव्या नव्या उमेदवार विद्वानांनीं व पंडितांनीं पहिल्या

पहिल्यानें खूप कंबर बांधली; पण हळूहळू त्यांचा आवेश व उत्साह कमी कमी होत जाऊन लवकरच चोहोंकडे अगदीं सामसूम होऊन गेलें. लोककल्याणाची उष्णता जी कांहीं थोडा वेळ २१२ अंशांवर अगदीं टवटवीत येऊन पोंचलीशी दिसत होती ती लवकरच खालीं जायाला लागून जातां जातां ३२ च्याहि कांहीं अंश खालीं गेली! विधवांच्या मनोरथास नुकता अंकुर जो कुठें फूट्ं लागतो न लागतो, तोंच चोहोंकडे गारठा पसरायाला लागून तो जागच्या जागींच कोमेजून गेला. जोंपर्यंत सभेंत पांडित्य करणें, वादविषयक ग्रंथ लिहून विद्वत्ता प्रगट करणें, व परस्पर वन्हाडीपणा मिरविणें हें होतें तोंवर ठीक होतें; पण परमेश्वरानें लवकरच गाऱ्हाणें ऐकून विधवांच्या मुक्त्यर्थ त्यांच्या कैवाऱ्यांस जेव्हां मोठे नवस करूनहि न यावी अशी सोन्यासारखी संधि आणली, तेव्हां स्वदेशाभिमान, आर्तजनाविषयीं दया, आणि दीर्घकाळ केलेल्या पांडित्याचें व नव्या विद्वत्तेचें चीज, हीं दाखविण्याचें धैर्य एकाचें तरी झालें काय? लूथराविषयीं आणि वॉशिंगटनाविषयीं नेहमीं गप्पा झोंकणारांनीं, व वरील गप्पा झोंकल्यानेंच त्यांची वीरश्री आपल्या ठायीं आलीशी मानून आह्मी असें करूं, आह्मी तसें करूं अशा यथेच्छ वल्गना करणारांनीं, देशकार्याच्या धुरेला आपला खांदा जातीनें असा एकानें तरी लावला काय? नाहीं; तर कोनाकोपऱ्यांतून शोधून काढून कोणाला तरी मारून मुटकून नवरा मुलगा सजवून उभा करावा, आणि "शुभमंगल" करून टाळ्या पिटण्याचें मात्र काम आपलें! बरें, हेंहि एकीकडे ठेवूं. धैर्य हा पुष्कळ अंशीं स्वभावजन्यच गुण होय; तो मोठी विद्वत्ता संपादन केल्यानें किंवा पुष्कळ पुस्तकें वाचल्यानें अंगीं येतो असें नाहीं. पण निदान एवढें तरी खरें कीं नाहीं, कीं समरांगणांत सरसावून पुढें जाण्याचें ज्यांचें धैर्य झालें नाहीं त्यांनीं निदान तळ तरी राखावा! का तेथूनहि तटक पळ काढून भराभर स्नानें करून मोकळें व्हावें, व ज्यांस लाथा मारल्या त्यांच्यापुढेंच नाक घासण्याला तयार व्हावें? असो; एकंदरींत या उलाढालींत आमच्या नव्या लोकांची जी फटफजिती झाली ती कांहीं पुसूं नये. तिच्या योगानें त्यांसच काय, पण सगळ्या देशासहि निरंतर खालीं पहाण्याचा प्रसंग आला आहे! असो; आतां दुसरी व्यापारोत्तेजनाची मौज पहा. हें काम तर वरच्याहून पुष्कळ सोपें होतें ना! यांत यश येण्यास इतक्याच गोष्टी हव्या होत्या कीं, सर्वांनीं एकमतानें व सचोटीनें एकमेकांशीं वागून यथाशक्ति आरंभलेल्या कार्यास साहाय्य करावें. पण इतकें तरी आमच्या हातून व्हावें कसें? स्थापना होतांना अगदीं ईस्ट इंडिया कंपनीप्रमाणें शेअर्स(भाग), कोर्ट आफ प्रोप्रायटर्स (भागीदारांची मंडळी), कोर्ट आफ डैरेक्टर्स (व्यवस्थापक मंडळी), खजिनदार, चिटणीस, शिपाई, वगैरे सर्व यथासांग झालें; पण पुढें काम सुरळीत चालेल तेव्हां कीं नाहीं! अनुकरणाच्या इच्छेनें शरीरास प्रतिशरीर कसें तरी बनवून दिलें; पण त्याचा चालक

जो जीव तो कसा घालतां येईल? हा जीव झटला झणजे साऱ्या सभासदांची स्वदेशकल्याणाविषयीं कळकळ होय. पण ही सर्वांच्या ठायीं किती नांदत होती हें पुढील प्रकारांवरून स्पष्ट दिसतेंच. कोणी डैरेक्टर आह्मांस बोलावणें पाठविलें नाहीं किंवा आपला इतमाम बरोबर राहिला नाहीं झणून रुसणार; कोणी इतर निमित्तांनीं आपआपसांत भांडणार; प्रेसिडेंट (अध्यक्ष) साहेबांस कोणाहि सभासदाचें दुरुत्तर किंवा नकार खपायाचा नाहीं,—ते झणणार, "बस बस, आह्मी सांगूं तें सर्वांनीं निमूटपणें ऐकिलें पाहिजे, आह्मी प्रेसिडेंट आहों!"[1] मग अशी सामग्री असल्यावर आमच्या सभांपुढें म्यांचेस्टरानें आणि लिवरपूलनें कां कांपूं नये! असो; तर एकंदरींत आमच्या लोकांची पहिल्यानें उडी मोठी, आणि पुढें हातून मात्र कांहीं होणें नाहीं, ही तऱ्हा वरील दोन्ही उदाहरणांवरून स्पष्ट दिसते.

वरील दोन्ही प्रकार केवळ लोकव्यवहाराचे झाले. आतां आमच्या मंडळीनें देशाच्या अवघ्या विपत्तीच्या मूळास घात घालून जुन्या वेडगळ धर्माचा ऱ्हास करून त्याच्या जागीं अत्यंत सोज्वल अशा नव्याचें रोपण करण्याचा जो प्रचंड उद्योग आरंभला आहे त्याविषयीं लिहूं. 'हितेच्छूं'स आमच्या पुस्तकाचा जो राग आला तो मुख्यतः याच विषयावरून आला असावासा वाटतो; यास्तव याविषयींचीं आमचीं मतें अंमळ विशेष विस्तारानें लिहिणें अवश्य आहे.

प्रस्तुत विषयावर आमच्या काय समजुती आहेत त्या आह्मीं अद्याप कोठेंहि केवळ निश्चितपणें लिहून प्रगट केल्या नाहींत; तरी आज दोन वर्षांच्या झोंकावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं, प्रभु येशू, महंमद, राममोहन राय, पाळंदे,[2] किंवा दयानंदस्वामी यांपैकीं आह्मी कोणाचेहि चेले नसून त्यांच्या पंथांकडे

---

१. वरील नक्कल आमच्या येथील सभेंत झाली. मागें जें आह्मीं दोन तीनदां लिहिलें आहे कीं, हे नवे प्रकार आपल्या देशांत जरी चोहोंकडे बळेंच चालू केले आहेत तरी ते अपूर्व असल्यामुळें त्यांचें स्वरूप एकंदर लोकांस अद्याप मुळींच समजूं लागलें नाहीं. त्याचेंच वरील एक चांगलें उदाहरण आहे. वरील मजेदार भाषणावरून अध्यक्षस्थान पतकरण्यांत वरील गृहस्थाचा हेतु काय होता तो स्पष्ट दिसतोच आहे. त्याचप्रमाणें कसलीहि सभा असली—तीं अंमळ वजनदार मात्र पाहिजे—तरी अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजीनदार किंवा चिटणीस यांपैकीं कोणता तरी हुद्दा पटकावून कसेंहि करून एकदां आपलें नांव वर्तमानपत्रांतून वगैरे कोठें तरी झळको याविषयीं पुष्कळ लोकांची किती झटापट चालत असते हेंहि सर्वांस माहीत आहेच. कित्येकांनीं तर 'येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत' हें महावाक्य आपल्या पदरीं बांधून निरंतर उराशींच बाळगलें आहे काय असें वाटतें!

२. कैलासवासी भास्कर दामोदर पाळंदे यांनीं केलेलें 'रत्नमाला' नामक पुस्तक हें 'प्रार्थनासमाजा'चा धर्मग्रंथ होय, यास्तव त्यांचेंच नांव वरील मालिकेंत घातलें आहे. असें

(पुढें चालू).

आमचा विशेष ओढा आहे असें नाहीं. तसेंच वरील साऱ्या मार्गाच्या अनुयायांस सांप्रत चालू असणारा हिंदुधर्म जसा केवळ उपहास्य व उच्छेद्य वाटतो, त्यांत गुणाचा लेशहि नसून दोषांनीं मात्र तो ओतप्रोत भरला आहे, व या भरतखंडाच्या उन्नतीस तोच मुख्यतः मोठा जबरदस्त अडथळा असें वाटतें; तसेंहि पण आह्मांस बिलकूल वाटत नाहीं. प्रस्तुत एकंदर विषयावर, व विशेषतः आमच्या अत्यंत निंद्य मानलेल्या हिंदुधर्माविषयीं, आह्मी अवकाशानुसार आपलीं मतें आमच्या वाचकांस सादर करूं; तेव्हां वरील दोन नव्या निघालेल्या पंथांविषयीं आमचे विचार यथास्थित प्रकट करण्यांत येतील. सांप्रत स्थळीं वरील पत्राच्या संबंधानेंच जें लिहिण्यासारखें आहे तेवढें लिहितों.

'हितेच्छु' यांच्या सदरील पत्रावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, त्यांचीं मतें अलीकडे नव्यां निघालेल्या धर्ममार्गास अनुसरून आहेत. यास्तव त्या मार्गाच्या संबंधानें एकविसाव्या अंकांत वगैरे आह्मीं जो टोंचून मजकूर लिहिला आहे तो त्यांस अगदीं अमान्य होऊन, प्रस्तुत विषयाचा आह्मांस मुळींच अनुभव नाहीं, तो आह्मांस अगदीं उपेक्षणीय वाटतो, व यास्तव त्यासंबंधानें आमचें लिहिणें केवळ साहसाचें आहे, असे दोष त्यांनीं आह्मांस दिले आहेत. आतां यावर आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, कोणाचीं धर्मसंबंधीं कशींहि मतें असलीं तरी त्याविषयीं आमचें कांहीं बोलणें नाहीं. जो ज्यास धर्म खरा वाटतो त्याचें जर तो निस्पृह व शुद्ध मनानें यथासांग अनुवर्तन करील तर त्यास कोणीहि दोष लावणार नाहीं, किंबहुना बहुधा सर्व लोक त्यास मानहि देतील. हें तर काय, पण कोणास, विद्यमान धर्म अत्यंत दुष्ट असून त्यास अनुसरल्यानें आपल्या देशबांधवांचें फार अकल्याण होत आहे, असें मनापासून वाटून तो सुधारण्याचें किंवा तो नष्ट करून टाकून नवा प्रवृत्त करण्याचें जर तो मनांत आणील व त्याकरतां बुद्धिपुरःसर निर्मळ अंतःकरणानें झटेल, तर त्याचा अत्यंत द्वेष करणाऱ्या त्याच्या प्रत्यक्ष शत्रूंसहि त्याची योग्यता वाखाणावी लागेल. अशा प्रकारचें आमच्या देशांतील अलीकडचें उदाहरण राजा राममोहन राय याचें होय; व एकंदर जगाच्या इतिहासांत असलीं उदाहरणें

करण्याचें कारण उघडच आहे कीं, प्रस्तुत समाजाला इतर ग्रंथांप्रमाणें कोणा एकाच प्रवर्तकाचें असें नांव लागलेलें नाहीं. ही त्यास मोठी गैरसोय आहे. शिवाय दुसरी ही मोठी मौज आहे कीं, ज्यांनीं वरील भक्तमंडळीस आपली 'माला' गुंफून दिली ते समाजांत मुळींच नसून उलटे मूर्तीचे उपासक होते! प्रस्तुत समाजांत एवढी बडी मंडळी असतां स्वतः पद्यरचना करण्याचें काम तिजपैकीं कोणी एखाद्यानें कां पतकरलें नाहीं कोण जाणे! त्यांतून महाराष्ट्र कवीचें शिरोरत्न त्यांजपाशीं असतां 'रत्नमाले'चीच त्यांस काय एवढी थोरवी वाटली!

आणखी पुष्कळ आहेत. पण वरच्यासारखें कांहींच नसून असा जर प्रकार कोणाच्या पहाण्यांत आला,—कीं, आज प्रार्थनासमाजाची स्थापना केली तर उद्यां त्याच हातांनीं आर्यसमाजाचें प्रतिष्ठापन करावयाचें; सकाळीं वेदमूर्ति बनून बषट्कार केला, तर दुपारीं येशूचें पवित्र भोजन करून त्याची सांगता, कीं लगेच संध्याकाळीं 'अह्ना-बिसमिल्ला'दि कुराणसूक्ताचा पाठ करून परिसमाप्ति; दिवसा परमेश्वराचें निर्गुण निराकार स्वरूप डोळे मिटून मोठ्या भक्तीनें मनांत आणलें, तर रात्रीं साकार सगुण रुपाचें चंद्रचकोर न्यायानें डोळे भरून ध्यान करावयाचें; आज सद्धर्माचा आवेश अंगांत भरून मूर्तीस लाथेनें झुगारून दिलें तर उद्यां अत्यंत उपरति होऊन त्यांस पुनः देव्हाऱ्यांत चढवून त्यांवर रुद्राचें आवर्तन;—इत्यादि 'अनेक बुद्धितरंग कोणाचे दृष्टीस पडून ते जर क्षणक्षणा पालटूं' लागले, तर त्यांच्या धार्मिकत्वाची मीमांसा काय करावी बरें? आमची बुद्धि तर येथें अगदीं गुंग होऊन जाते! मग 'हितेच्छूं'च्या म्हणण्याप्रमाणें आह्मांस प्रत्यक्ष अनुभव नसल्यामुळें असें होतें कीं काय न कळे! असें असेल तर आमची सर्वांस एवढीच प्रार्थना आहे कीं, प्रस्तुत धर्मप्रवाहांत गाढ अवगाहन केल्यामुळें ज्यांचें अंतःकरण शुद्ध होऊन बुद्धीस अत्यंत तीव्रता आली असेल, व अगदीं उगमाच्या स्वच्छ झऱ्याशीं तत्त्वप्राशन करून जे परमपावन झाले असतील त्यांनीं वरील संशयजालाचें एकदां पूर्ण निरसन करून टाकावें म्हणजे सहस्रावधि अज्ञजनांच्या हृदयांत सद्धर्मप्रकाश फांकून लक्षावधि लोकांस स्वर्गाचा दरवाजा खुला करून दिलासा होईल!

आतां 'हितेच्छूं'चें असें म्हणणें आहे कीं, 'प्रार्थनासमाज' व 'आर्यसमाज' हे अद्याप बाल्यावस्थेंत आहेत, यास्तव सध्यां त्यांच्यापासून विशेष कार्यनिष्पत्ति झालेली जरी दृष्टीस न पडली, तरी कालेंकरून त्यांचा प्रभाव अवश्य फैलावत जाणार. 'आर्यसमाजाची' नुकती जी पुनः स्थापना झाली म्हणून मागील अंकांत एके ठिकाणीं सांगितलें त्या प्रसंगीं अध्यक्षांनीं जें सुरस भाषण केलें, त्यांत त्यांनीं असा कोटिक्रम बसविला कीं, या भूपृष्ठावर आजपर्यंत जेवढे म्हणून धर्म स्थापले गेले त्यांचे आरंभ आमच्या प्रस्तुत समाजाप्रमाणेंच लहान होते; तर एवढ्यावरूनच या नव्या सुरू झालेल्या पंथाच्या भावी स्थितीविषयीं कोणीं मनांत संशय आणूं नये; याहि पंथाचा त्याच्या अग्रजांप्रमाणें भविष्यत्कालीं प्रताप गाजेलच! या दर्पोक्तीवरून आह्मांस एका करवीरस्थ महाकवीची[1] आठवण होते. त्याच्या वीररसप्रधान काव्यावर जे कोणी मूर्ख समजुतीमुळें व अरसिकत्वास्तव टीका करितात त्यांस तो असें उत्तर देतो कीं, "थांबा असे हातघाईवर येऊं नका; मीं जो आपल्या बुद्धीचा एवढा विलास प्रकट केला आहे

१. या कवीविषयीं एक आख्यायिका १६ व्या अंकाच्या 'विनोद' या सदराखालीं दिली आहे ती आमच्या वाचकांस आठवत असेलच.

तो केवळ तुह्मांकरितांच नव्हे. अरे खुळ्यांनो, केवळ 'ट' ला 'ट' आणि 'प' ला 'प' जुळवून तात्कालिक लोकांसच रंजवूं पहाणारा हा सरस्वतीचा लाल नव्हे! आह्मांसारख्या महाकवींनीं तुह्मांला एकट्यांनाच घेऊन रे काय करावें? आमची नजर किती दूरवर असते! जेव्हां तुह्मांपैकीं मोठे मोठे नामांकित ह्मणून गाजणारेहि केव्हांच धुळीस मिळून जाऊन त्यांच्या कीर्तीचा मागमूसहि रहाणार नाहीं, व तुमच्या खापरपंतूंचे खापरपंतू जातिभेद, मूर्तिपूजा वगैरे सब गोलंकार मोडून टाकून पायांत विजारी व डोक्याला टोप्या घातलेले दयानंदजींच्या वैदिक विमानांत बसून उलूपी राजकन्येचा देश (अमेरिका), श्वेतद्वीप (ब्रिटन) वगैरे खुशाल मौजेनें हिंडूं लागतील, व आमचे दयाळू राज्यकर्ते या सुवर्णभूमीची विभूति रघुराजाप्रमाणें मृत्पात्रशेष करून आपल्या काळ्या बंधूंस प्रेमालिंगन देऊन व त्यांचा मोठ्या गौरवानें निरोप घेऊन परत निजधामास जाण्याच्या तयारीनें आगबोटीवर पाय ठेवतील, तेव्हांहि राजा शिवाजीचा पोवाडा हल्लींपेक्षां लोकांस अतोनात आवडून त्याचा कडाका सगळ्या देशभर गर्जत राहील!" याप्रमाणें हे दोन्ही भविष्यवाद एकासारखे एक आहेत; व ते तसे असण्याचें कारणहि उघडच आहे. आतां ते कितपत खरे होतील याची प्रचीती तर आधुनिक लोकांपैकीं कोणासहि सांपडायाची नाहीं हें उघडच आहे; तरी दयानंदस्वामींनीं आह्मांला जी 'युक्ति, प्रमाण, अनुमान,' वगैरेंची सामग्री देऊन ठेविली आहे तीवरून पहातां त्यांच्या आर्यसमाजाची व त्याच्या भावंडाची धडशी गत दिसत नाहीं. कारण जो 'आर्यसमाज' आज चार दिवसांत चारदां ढासळला, व स्थापनाच्या वेळेस ज्यास पांच सात ठरीव भक्तमंडळीखेरीज जास्ती कोणी मिळेचना; तसेंच ज्या 'प्रार्थनासमाजाच्या' पहिल्याच महोत्सवाच्या दिवशीं त्याच्या मंदिराचे स्तंभ एकमेकांवर कोसळूं लागून प्रथम मंगल दिवशींच अत्यंत अमंगल झालें, त्यांचा टिकाव किती काळ निघेल याचें अनुमान कोणासहि सहज होणारें आहे! युक्तीपेक्षां भावाचें प्राबल्य ज्याच्या ठायीं जास्त झालें असेल किंवा समंजसतेवर दुराग्रहाचा पगडा बसला असेल त्यास मात्र वरील गोष्ट कदाचित् दिसणार नाहीं. आतां वरील आचार्यांचें असें ह्मणणें आहे कीं, आज हजारों वर्षें चालू असणारे इतर धर्महि आरंभीं असेच लहान होते;—होते खरे, पण एवढ्यावरूनच त्यांचें नूतन बालक त्या इतरांसारखें प्रचंड विस्तार पावेल असें झालें का? वटवृक्षाचा आरंभ लहान अंकुर असतो, व तेरड्याचाहि तोच असतो; ह्मणून या दुसऱ्या महावृक्षाची प्रशंसा करून जर एखादे महापंडित सांगूं लागले, कीं हा सध्यां तुह्मांला छोटासा अंकुर दिसत आहे यावर जाऊं नका, या अंकुराचाच कांहीं वर्षांनीं मोठा सपाटा बुंधा बनणार आहे, असा कीं दहा दहा मनुष्यांच्या वेंगेंतहि तो मावणार नाहीं; यांचें शिखर मेघमंडळास भेदून जाऊन फांद्यांचा मोठा प्रचंड विस्तार

होईल; आणि असें होऊन लक्षावधि प्राण्यांस हा आधारभूत होऊन त्यांचा विश्रांतिहेतु व जीवनहेतु होणार आहे;—अशा बाता जर कोणी झोंकूं लागला, व प्रमाण काय ह्मणून विचारलें असतां जर शेजारच्या वडाकडे बोट दाखवूं लागला, तर ऐकणारास अतिशय हसूं आल्यावांचून राहील काय? बौद्ध धर्माचा, ख्रिस्ती धर्माचा, व मुसलमानी धर्माचा आरंभ 'आर्यसमाजा'प्रमाणेंच आधीं क्षुद्र होता खरा, पण पहिल्यानें अर्धें एशियाखंड व्यापलें, दुसऱ्यानें युरोप व्यापून नवें जगहि पाहिलें आहे, आणि 'सत्यदीपिका'कारांसारख्यांचे उल्लेख जर खरोखरीच 'सत्य' असतील तर त्या धर्मांचा पाय (निदान संख्येच्या संबंधानें तरी) प्रतिवर्षी पुढेंच आहे असें ह्मणणें भाग आहे; महंमदाचा धर्म तर त्याच्या हयातींतच सगळ्या आरबस्थानावर पसरून सुमारें शंभर वर्षांतच तो एकीकडे अटलांटिक महासागरापर्यंत व दुसरीकडे पासिफिक महासागरापर्यंत पसरला! मग दयानंदी धर्माचाहि असाच प्रकार होणार आहे काय? कोण जाणे बोवा, वेदांतून व शतपथ ब्राह्मणांतून स्वामींच्या सांगण्याप्रमाणें आगगाड्या तारायंत्रें, व विमानें निघून तसें झालें तर कोणीं सांगावें!! असो; एकंदरींत समाजमजकुराच्या महाविद्वान् स्थापकांस आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, असल्याचा उच्छेद करून सत्याचा उदय करण्याची व देशसुधारणा करण्याची जर त्यांची खरोखरच इच्छा असेल, व आपली चोहोंकडे जी प्रतिष्ठा आहे ती कायम राहून लोकांचा विश्वास आपणावरचा समूळ उडून जाऊं नये असें जर वाटत असेल, तर स्वामींच्या प्रीत्यर्थ व त्यांनीं काढलेल्या सोंगाच्या प्रीत्यर्थ त्यांनीं अलीकडे जो कित्येक महिने लपंडाव सुरू केला आहे, तो त्यांनीं अगदीं सोडून द्यावा; त्याच्या योगानें सध्यांहि थोडा अनर्थ झाला आहे असें नाहीं! तसेंच त्यांनीं गेल्या दहा वर्षांत झालेल्या कालांतराकडेहि भरपूर नजर पुरवावी. दयानंदजींस पुढें करून शास्त्री लोकांचीं तोंडें बंद करून टाकतां आलीं, व वेदचतुष्टयाचें मूर्तत्व आपल्या ठायीं स्थापून घेऊन त्या बिचाऱ्या लोकांचा भरसभेंत आपणांस यथेच्छ उपमर्द करतां आला, एवढ्यानेंच कृतार्थता मानून आपला दिग्विजय झाला असें मानूं नये. 'आर्यसमाजा'चे प्रतिपक्षी केवळ वरील लोकच आहेत असें नाहीं. श्रीमत्परमहंसांच्या उद्दामपणानें, पोरकट कोट्यांनीं, असंबद्ध प्रलापांनीं, व दोन महिने घोशक्करेच्या जोरावर यथेच्छ केलेल्या चारगटपणानें, तसेंच त्यांच्या पुरस्कर्त्यांच्या कौटिल्यानें, ज्यांचीं मनें पुरतेपणीं विटून जाऊन संतप्त होऊन गेलीं आहेत असे लोक थोडे आहेत असें नाहीं. त्यांस सभेंत उभें राहून अद्वातद्वा चर्पटपंजरी करण्याचें जरी सामर्थ्य नसलें, व अनेक कारणांस्तव त्यांचा राग त्यांस आंतल्या आंतच जरी गिळावा लागला, तरी तसें ते नेहमीं व सर्वच करतील असें नाहीं. एकंदरींत ज्ञानाचें निधान काय ते आह्मी, व जुक्तीचा वास काय तो आमच्याच पाशीं, अशा भ्रमांत गढून जाऊन 'निर्वीरमुर्वी-

तलम्' असा आव वरील लोक जितका थोडा घालतील तितका बरा!

'हितेच्छूं'चा आह्मांवर तिसरा दोषारोप हा आहे कीं, सभांचा व व्यक्तींचा व्यर्थ उपहास करण्यांत आह्मांस कांहीं विलक्षण भूषण वाटतें. हा आरोप वरील दुसऱ्या आरोपावरच सर्वथा अवलंबून रहाणारा आहे. वरील सभांस वगैरे जे आह्मी दोष देतों ते अयथार्थ नव्हेत अशी ज्यांची खात्री असेल त्यांस तिसऱ्या दूषणाची विशेष मातब्बरी वाटणार नाहीं. कारण जें सर्वथा किंवा बहुतेक अंशीं एखाद्यास अप्रयोजक वाटतें, व ज्या गोष्टी विषयीं त्याची विशेष पूज्यबुद्धि नसून इतरांची तरी ती कां असावी हें त्यास कळत नाहीं, त्यावर नुसतीं कोरडीं दूषणें देण्यापेक्षां आपल्या श्रोत्यांस किंवा वाचकांस हसविण्याचीहि जर त्यास संधी सांपडली, तर ती तो व्यर्थ घालवील असें नाहीं. हा प्रकार अगदीं प्राचीन काळापासून चालत आला आहे; व त्यांत आमच्या बुद्धीस कांहीं गैरहि दिसत नाहीं. त्यांतून जो कित्ता आमच्यापुढें इतका ठळठळीत दिसत आहे तो आह्मीं कां गिरवूं नये? मेकाले, मिल्ल सारख्या महापंडितांनीं विचाऱ्यांनीं क्षणमात्रहि विचार न करतां आमच्या देशभर आपली चटोरपणाची व कडकपणाची लेखणी जर खुशाल फिरविली आहे, व तिच्या शाईनें आपल्या कीर्तीच्या मुखास कालिमा लावून आमच्या हृदयांत चिरकाल भिनून राहीसें विष तिच्या मुखांतून जर ओकविलें आहे; तेंच व्रत पुढें जगत्तारकाच्या प्रेषितांनीं व त्यांच्या भुलथापीस भुलून आकाशाच्या राज्याचा तुकडा ज्यांनीं आपापलासा करून घेतला अशा बाटे मंडळीनें जर आज तीस चाळीस वर्षें कायावाचामनेंकरून निर्बाध चालविलें आहे; फार तर काय, पण आमचे देशबंधु व आमच्या हिताची अतोनात कळकळ बाळगणारे असे जे महाविद्वान् व महावक्ते बाबू प्रतापचंद्र व साक्षात् जगद्गुरु दयानंदजी यांसहि हास्यरस यथास्थित पिकविल्याखेरीज आपलें व्याख्यान रंगलेंसें वाटतच नाहीं, तर तोच श्लाघ्य क्रम पुढें चालवण्यास आमच्या 'निबंधमाले'सच कां आडकाठी असावी? आमच्या जुन्या लोकांत व त्यांच्या आचारांत हास्यरसाला पुष्कळ विषय आहे हें जसें आमच्या नव्या मंडळीनें जगजाहीर करून टाकिलें आहे; त्याचप्रमाणें न्यायानें ह्मटलें ह्मणजे नव्या मंडळीचेहि गुणदोष जगापुढें विशेष उघडपणें आणले असतां त्यांत कोणास वाईट वाटूं नये. बालविधवांचा दुःखाक्रोश कानांनीं ऐकवत नाहीं ह्मणून शास्त्रकर्त्यांच्या व भटांच्या नांवानें नेहमीं खडे फोडून ते दुष्ट, पक्षपाती, कोत्या समजुतीचे, व आपमतलबी ह्मणून हाका मारायाच्या, व देशकार्यरूप नौकेचें सुकाणूं आपण स्वतः हातीं धरायाचें; पण पुढें लवकरच आपला कपटकोप, लोककल्याणाविषयीं कळकळ, बालविधवांस दिलेलें आश्वासन, आपला, आपल्या मंडळीचा, व एकंदर देशाचा लौकिक, वगैरे चट सारें एका क्षणांत एकीकडे गुंडाळून ठेवून केवळ विषयलंपटतेस वश होऊन आपल्या एकट्याच्याच नियतकालिक सुखा-

करतां सगळें जहाजचें जहाज समुद्राच्या तळीं नेऊन बसवितांना तिलप्रायहि मनांत शंका आणायाची नाहीं ! मूर्तिपूजा, जातिभेद, वगैरे आह्मी बिलकूल मानीत नाहीं ह्मणून शेंकडों वेळां ईश्वरोपासनेच्या वेळीं मंदिरांत सांगून बाहेर आले कीं, पुन्हां लागले जगाच्या रूढीला ! दुसऱ्यांच्या पुनर्विवाहोत्सवाला वऱ्हाडी; पण घरचें कार्य निघालें कीं कपाळ दुखायाला लागून हवा पालटल्याखेरीज चालायाचेंच नाहीं ! इंग्रेजी विद्येच्या अध्ययनानें जुन्या धर्माची लाज वाटायाला लागून मोठा समाज जमवून त्यांत मोठ्या समारंभानें ईश्वराविषयीं प्रेम, मनुष्यमात्राविषयीं बंधुप्रीति, वगैरे भाव पूर्ण दाखवून खळखळां रडावयाचें; पण तेथून निघाले कीं लागलेंच याच्यावर तोंड टाक, त्याच्या नाशाचा उद्योग कर, वगैरे अंगांत बिंबलेलें दुष्टत्व व नीचत्व प्रगट झालेंच; सकाळीं संध्याकाळीं ईश्वराचे गुणानुवाद मोठ्या प्रेमानें गाऊन आत्म्यास अक्षय सुखांत ठेवण्याविषयीं त्याजपाशीं प्रार्थना करायाची; आणि रात्रींच्या समयीं ईश्वराच्या दृष्टीस न पडतां त्याचें जगद्व्यापकत्व गुंडाळून ठेवून शरीरसुखसाधनाच्या ठिकाणीं गुप्त प्रवेश करायाचा ! याप्रमाणें शेंकडों कुलंगडीं जीं आमच्या नव्या मंडळींत सर्वांस ढळढळीत दिसत आहेत तींच तेवढीं छपवून ठेवण्याचें कोणीहि सत्यपक्षपाती व न्यायी मनुष्य पतकारावयाचा नाहीं. शिवाय वरील उपहासापासून कांहीं उपयोग नाहीं असें जें आमच्या ग्रंथकाराचें ह्मणणें आहे तेंहि आह्मांस बरोबर वाटत नाहीं. त्याचा उपयोग उघडच आहे कीं, त्यामुळें जे लोक इतःपर देशहिताच्या उलाढालींत पुढारीपणा घेऊं पहातील ते पूर्वीप्रमाणें खुशाल मौजेखातर तें काम कधीं हातीं घेणार नाहींत. आपण या कामांत शिरणार तर अगोदर पूर्ण विचार करून शिरलें पाहिजे, व यांत आपण दक्षता दाखविली नाहीं किंवा लबाडी केली तर साऱ्या लोकांचा आपणावर गहजब होईल हेंहि ते पक्केपणीं समजून रहातील.

असो; याप्रमाणें 'हितेच्छूं'च्या तीन दोषारोपांवर आह्मीं आपले विचार त्यांस व आमच्या एकंदर सर्व वाचकांस कळविले आहेत. ते निबंधारंभींच्या कविवचनास अनुसरून वरील पत्राच्या रीतीप्रमाणेंच केवळ उघडपणें आह्मीं प्रदर्शित केले आहेत. ते सर्वांस रुचतील असें अर्थातच होणार नाहीं; कारण कोणताहि विषय घेतला तरी त्यावर लोकांचा परस्पर मतभेद नेहमीं असतोच; आणि शिवाय कितीहि विद्वत्ता अंगीं असली किंवा लोकांत मान्यता असली तरी अप्रिय जें सत्य तें साहणारे लोक फार थोडे. ह्मटलें आहे, "अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः" "जें भाषण पथ्य ह्मणजे हितकर आहे पण अप्रिय आहे असें बोलणाराहि दुर्लभ व ऐकणाराहि विरळा." तेव्हां वरील उत्तरांत आमच्या देशांतील अलीकडील लोकांविषयीं सामान्यतः विशेषतः जे इतके उल्लेख स्पष्टरीत्या केले आहेत ते पुष्कळांस न आवडून कांहीं बड्या मंडळींचा आह्मांवर अत्यंत क्षोभहि होईल हें आह्मी समजून

आहों. पण यापूर्वी आह्मीं अनेक वेळां आमच्या वाचकांस कळविलेंच आहे कीं, आमच्या बुद्धीनें आह्मांस जें खरें भासतें तें जाहीर करण्यास आह्मी कोणाचेंहि भय किंवा धाक तिळमात्रहि मनांत बागविणार नाहीं. ईश्वरकृपेनें सरकारचें मिंधें झाल्यावांचून व बड्या मंडळीची ओशाळगत बागविल्यावांचून आमचें पुस्तक आज दोन वर्षें खासें सुरळीत चाललें आहे. महाराष्ट्र भाषेविषयीं कळकळ, स्वदेशाचा अभिमान, किंवा ज्ञानाविषयीं उत्कंठा, यांहीं प्रेरित होत्साल्या शेंकडों लोकांचा आह्मांस बळकट आश्रय आहे, व तो दिवसेंदिवस वाढत आहे. आमच्या पुरस्कर्त्यांच्या मालिकेंत आमच्या देशाच्या गतवैभवाचें स्मारक व त्याचें अवशिष्टांशभूत असें जें जुनें राजमंडळ त्यांचींहि नांवें मधून मधून झळकतात. या शेवटल्या गोष्टीचा आह्मांस मोठा संतोष व मोठा अभिमान वाटतो; व तो प्रदर्शित करण्यांत आह्मांस कांहीं एक दोष दिसत नाहीं. असो; तर याप्रमाणें जर आमच्या पुस्तकाची स्थिति आहे तर त्यावर कोणाची इतराजी होईल या भयास्तव किंवा व्यर्थ मुरवतीस्तव सत्याचें तेज मुळींच झांकणें किंवा मलिन करणें आह्मांस अगदीं उचित वाटत नाहीं !

हा मजकूर येथवर बराच लांब झाला आहे. तरी प्रस्तुत लेख आटपण्यापूर्वी गेल्या एकविसाव्या अंकांतील मजकुराच्या संबंधानें कांहीं लिहिणें अवश्य वाटतें. त्या अंकांत अलीकडे स्थापन झालेल्या बहुतेक सभांविषयीं वगैरे जो मजकूर लिहिला आहे तो वरील पत्र लिहिणारास जसा वृथा डौल मिरविण्याकरतां लिहिला आहेसा वाटला तसाच पुष्कळांस वाटण्यासारखा आहे. कारण त्यांविषयीं आजपर्यंत कोणींहि विरुद्ध अभिप्राय विशेष उघड रीतीनें प्रसिद्ध केलेला नाहीं. तेव्हां त्यांवर एकदम गदीं केलेली पाहिली असतां वरील कल्पना होणें कांहीं अंशीं साहजिकच आहे. तरी वरील अंक चांगला लक्षपूर्वक व शांत मनानें वाचला असतां कोणासहि कळून येईल कीं, त्यांत जी टीका केली आहे ती वरील सभांवर ह्मणजे त्यांच्या उद्देशांवर तादृश नसून, त्यांचें स्वरूप जें हल्लीं दृष्टीस पडत आहे त्यावर, त्यांपासून अपेक्षा केलेल्या कार्यावर, व त्यांतील सभासदांवरच मुख्यत्वेंकरून होय. मूळचा संकल्प कितीहि चांगला असला तरी तो सिद्धीस नेण्याचा मार्ग जर कोणीं भलताच धरला, व त्यापासून विलक्षण कार्याची सिद्धि होईल असा भ्रम लोकांत माजविला किंवा स्वार्थसाधनाच्या आशेनें तें कार्य हातीं घेतलें, तर या तिन्ही गोष्टींच्यामुळें त्यावर टीका करण्यास जागा होते हें उघडच आहे. तर वरील अंकांतील टीका पुष्कळ अंशीं अशाच प्रकारची आहे. तिजवरून अलीकडे आमच्या लोकांचे जे निरनिराळ्या प्रकारचे उद्योग सुरू झाले आहेत ते सर्व अगदीं व्यर्थ आहेत व त्यांचे पुरस्कर्ते सर्वच दांभिक, लब्धप्रतिष्ठ वगैरे आहेत असें ह्मणण्याचा आमचा बिलकूल इरादा नाहीं. ज्या व्यक्तींवर[1] विशेषेंकरून वरील दोष येऊं पहातो

१. कित्येक व्यक्तींविषयीं आह्मीं केवळ 'अविचारानें' मजकूर लिहिला आहे असा दोष

(पुढें चालू).

त्यांविषयीं व वरील उद्योगांचा जेवढा भाग आमच्या मतें दूषणीय वाटतो तेवढ्या-विषयीं आमचीं मतें प्रगट झालींच आहेत. तेव्हां व्यक्तिविशेषाविषयीं व एकदेशा-विषयीं जें झटलें तें एकंदर सर्वांस व साऱ्या उद्योगांस लागू पडतें असें समजूं नये.

निबंधमाला,—वर्ष दुसरें.

या अंकाच्या अखेरीस आमच्या पुस्तकाच्या दुसऱ्या वर्षाचा क्रम संपला. यास्तव सालगुदस्तप्रमाणें एकंदर वर्षाच्या संबंधानें कांहीं थोडा मजकूर येथें लिहितों.

पहिल्यानें सर्वधर्मसंमत जो सुज्ञसंप्रदाय त्यास अनुसरून जगन्नियंत्यास येथें सद्भावपूर्वक प्रणाम करतों. अवघ्या जीवसृष्टीची कृति केवळ त्याच्याच सत्तेनें चालली असल्यामुळें ज्ञानवान् प्राणी जो मनुष्य त्यानें आपल्या महाधिकाराप्रमाणें आपल्या वक्तृत्वाचें मूळ ओळखून त्याशीं अनन्यभावेंकरून नम्र असावें. हें त्यास उचित होय. यास्तव प्रस्तुत देशकार्याचें दुसरें वर्ष ज्याच्या कृपेनें निर्विघ्नपणें तडीस लागलें त्याचे कृतज्ञताबुद्धीनें व आनंदभरानें येथें उपकार आठवतों.

गेलेलें वर्ष एकंदरींत पुष्कळ गोष्टींनीं दीर्घकाळ ध्यानांत रहाण्यासारखें झालें. युरोपांत तर रूमशामच्या आज चारशें वर्षें चाललेल्या राज्यावर एकदम मोठाच प्रसंग गुदरला असून त्यामुळें सगळ्या खंडाच्या खंडास मोठी धास्ती येऊन पडली आहे. आमच्या देशांत दोन मेठे भयंकर प्रलय होऊन एक मोठीच राज्यक्रांति झाली, व दुसरी होण्याचेंहि चिन्ह थोडेंसें भासूं लागलें होतें. जिकडे तिकडे रडारडी व पळापळी सुरू होऊन मनुष्यमात्राचा मोठाच संहार झाला. लक्षावधि लोकांस इष्टजनवियोगाच्या दुःसह वेदनांचा अनुभव होऊन दुःखसागरांत बुडून रहावें लागलें. आमच्या बडोदें सरकारचा आमच्या राज्यकर्त्यांशीं आज इतके वर्षें अखंड चाललेला स्नेह एकाएकीं भंग पावून दोघांमध्यें जें वितुष्ट पडलें त्याचा डंका साऱ्या जगभर वाजून त्यापासून अनेक अनर्थ झाले. हैदराबादच्या दिवाणाची व बडे साहेबांची बोला-

---

'हितेच्छूं'नीं आह्मांस एके ठिकाणीं दिला आहे. एवढ्या सन्मानार्ह व्यक्ति कोणत्या त्या आह्मांस बरोबर माहीत नाहींत. पण निदान एका व्यक्तीचा तरी क्वेार आमच्या 'हितेच्छु' ह्मणविणारांनीं ध्यावयाचा नव्हता. ज्या अधमाधमानें शें दोनशें रुपयांच्या लालचीस भुलून दगेखोरपणाचें काम पतकरलें, व आपल्या 'आर्यजननी'स अक्षय काळोख लावून 'देशबांध-वां'स गळफांस लावण्याचा प्रयत्न केला, त्याची लीला ज्यांस लडिवाळपणाचीच वाटते त्यांची धन्य ह्मणावी; दुसरें काय! आह्मी तर आमचा कृतसंकल्प येथें स्पष्ट लिहून कळवितों कीं, आमच्या महाराष्ट्र भाषेंत जेवढे ह्मणून कठोर शब्द आहेत व तिच्या अंगीं निंदाव्यंजकत्व जेवढें ह्मणून आहे तेवढ्या सर्वांचा असल्या महापातकी मनुष्यांवर वर्षाव के ल्याखेरीज आह्मी कधीं रहाणार नाहीं!

चाली होऊन पुढें काय होतें कोण जाणे असें सर्वांस वाटूं लागलें. असो; एकंदरींत या वर्षीं आमच्या देशांत अनेक मोठमोठे उत्पातच झाले असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शेवटीं मात्र एक मोठा उत्सव चोहोंकडे गाजला; तो अर्थात्च युवराजनिमित्त जिकडे तिकडे चालू झालेला समारंभ होय. हा अद्याप चालू आहेच.

वर जे उत्पात झाले ह्मणून सांगितले त्यांचीच एक लहर आमच्या शहरावरहि येऊन आदळली कीं काय कोण जाणे! येथेंहि गेल्या सालीं दोन अपूर्व प्रसंग घडले. एक मे महिन्यांत वक्तृत्वोत्तेजक सभेंत झालेला दंगा. याविषयीं गेल्या एक-विसाव्या अंकांत थोडासा उल्लेख केलाच आहे. त्याहून अधिक येथें इतकेंच सांगावयाचें कीं, तो सगळा प्रकार पुनः मनांत आणला असतां मोठा चमत्कार वाटतो! वरील समारंभ अगोदर चार वर्षें चांगला चालला असतां पहिल्यानें यःकश्चित् कारण तें काय झालें, पुढें जातां जातां गोष्ट गेली कोणत्या थरावर, सभेंत चोहोंकडे एकदम बजबजपुरी माजून तीस कोणी ध्वनी ना गोसावी अशी एकदम तिची तारंबळ काय झाली, कोणास काय पाहिजे तें तो बोलायास लागून बड्या बड्या मंडळींचा बोज वार तो काय झाला, हें सर्व मनांत आलें ह्मणजे बुद्धि अगदी गुंग होऊन जाते! एवढा कहर एकदम कशानें उसळला असेल याची कांहीं कल्पनाच करवत नाहीं. असो; परमेश्वराच्या दयेनें तशी वेळ पुनः न येवो ह्मणजे झालें! दुसरा प्रसंग दयानंद सरस्वतीचा. यांच्या समारंभाचा वृत्तांत गेल्या अंकांत बराच दिला आहे. त्यावरून बाहेरील लोकांस स्वामींच्या निमित्त येथें जो महोत्सव झाला त्याची बहुधा बरीच कल्पना करतां येईल. येथील लोकांस तर निदान दहा वीस वर्षें तरी परमहंसांची वरात व वे० रा० रा० श्रीगर्दभाचार्य यांचा छबिना यांचा विसर पडणार नाहीं. ज्या कोणा भाग्यवान् पुरुषांच्या वांट्यांस लुला हात, दगडाची खोंच किंवा चाबकाचे वळ वगैरे महाप्रसाद आला असेल ते तर जन्मपर्यंत स्वामींचा गुणनुवाद गात बसतील. असो; पण अशांस स्वामींच्या तर्फे आह्मी असें आश्वासन देतों कीं, झाल्या गोष्टीचा त्यांनीं व्यर्थ विषाद करूं नये. नुकत्या वर सांगितलेल्या वेदमूर्तींस परमहंसांनीं आपल्या शिष्यांकरवीं तत्त्वमसीचा बोध करून ताबडतोब लोकांतरास रवाना केलें आहे. तेथें त्यांनीं आपल्या कर्णदैर्घ्याचा संन्यास करून सुंदर परिव्रज्या धारण केली आहे, व महामीमांसक बनून व्याख्यानांचा भारी सपाटा चालवला आहे. आर्यसमाजाची स्थापना होऊन स्वामीमहाराजांस त्या लोकांचें आधिपत्य घेण्याविषयीं लवकरच सूचना येईल असा रंग दिसतो. तर वरील लोकीं वरील लोकांची त्यांस मिळालेल्या प्रसादाच्या मानानें अवश्य संभावना केली जाईल! असो, एकंदरींत आह्मांस एवढा मोठा संतोष वाटतो, व साऱ्या पुणेकरांसहि तो तसाच वाटेल, कीं येथील जुनें वैभव गेल्यापासून आज सुमारें साठ वर्षें हत्तीची मोठ्या थाटाची स्वारी जी कोणाच्या

कधीं दृष्टीस पडली नव्हती, व पुढेंहि कधीं पडण्याचा योग नव्हता, ती सत्यशोधकांच्या व आर्यसमाजवाल्यांच्या हौसेमुळें सर्वांस अनायासें पहावयास सांपडली.

असो; याप्रमाणें गेल्या सालची एरवींची हकीकत झाली. आतां आमच्या पुस्तकाच्या संबंधाची जर पाहिली तर ती फारशी विशेष नाहीं. या सालांत आमच्या आश्रयदात्यांची संख्या सुमारें दुप्पट झाली. याबद्दल आमच्या देशबंधूंचे आह्मी भारी आभारी आहों हें उघडच आहे. व यासंबंधानें यापूर्वी अंमळ वर लिहिण्यांत आलेंच आहे. गेल्या वर्षांत आमच्याकडे पत्रेंहि पुष्कळ आलीं. हीहि गोष्ट आमच्या हितचिंतकांस अभिनंदनीयच वाटेल. या पत्रांपैकीं कांहींस आह्मांकडून उत्तरें मिळून कांहीं नुसतींच छापलीं गेलीं. असें करण्याचें कारण कांहींस उत्तर नकोच होतें, आणि कांहींस विशेष देण्यासारखें नव्हतें हें होय. गेल्या वर्षभर आमच्या पुस्तकावर मागील वर्षाप्रमाणें कोठें टीकाहि केलेली आमच्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत आली नाहीं.[1] आमचे मुख्य प्रतिपक्षी व परंपरागत चालत आलेले वैरी जे ख्रिस्तोपासक त्यांनींहि यंदां बिलकूल कांहीं खटपट किंवा गडबड केलेली कोठें ऐकण्यांत नाहीं. त्यांच्या पवित्र शास्त्रावर व पवित्र लोकांवर सत्याच्या पक्षास अनुसरून गेल्या बारा अंकांत नेहमींप्रमाणें बरीच चर्चा झाली असतां, ती सर्व त्यांनीं येशूनें शिकविलेल्या क्षमेस व शांतीस अनुसरून सर्व निमूटपणीं ऐकून घेतलीसें वाटतें. अशी साधुत्वाची वृत्ति भांडणानंतर पतकरण्यापेक्षां त्याच्या अगोदरच ते पतकरीत जातील, तर त्यांत त्यांचा व त्यांच्या शुभवर्तमानाचा बराच आब रहात जाईल. असो; या वर्षीं आमच्या एका मित्रानें दिलेला मोरोपंताचा 'मुक्तामाला' ग्रंथ सुमारें अर्धी टीकेसहित छापला गेला हेंहि येथें लिहिलें पाहिजे. अशी मेहेरबानी आमच्या महाराष्ट्रकवींचे कोणी भक्त करीत जातील तर आह्मांवर व एकंदर लोकांवर मोठेच उपकार होतील हें उघड आहे.

---

१ वर मुळींच टीका झाली नाहीं असें ह्मटलें यांत अंमळ चुकी झाली. येथील 'शिवाजी' पत्रांत कांहीं माहन्यापूर्वी आमच्या पुस्तकाच्या सातव्या अंकांतील कांहीं वाक्यांवर कोणी एकानें कांहीं वेडावांकडा मजकुर लिहिला होता. पण जी टीका सातवा अंक निघून एक वर्ष होईपर्यंत आमच्या प्रतिपक्ष्यास प्रसिद्ध करण्याचें धैर्य झालें नाहीं किंवा मनांत आलें नाहीं, आणि ज्यास 'शिवाजी'हून अधिक योग्यतेच्या ठिकाणीं जागा मिळाली नाहीं, तिचें आह्मांस विस्मरण झालें व तिजकडे आह्मीं सर्वथा दुर्लक्ष केलें याचें कोणाहि समंजस मनुष्यास मोठेंसे आश्चर्य वाटणार नाहीं!

ग्रंथांवर टीका.



नीरक्षीरविवेके हंसाऽऽलस्यं त्वमेव तनुषे चेत् ।
विश्वस्मिन्नधुनाऽन्यः कुलव्रतं पालयिष्यति कः ॥[1]
भामिनीविलास.

अंक १५.—(१) ग्रंथसमृद्धि. (२) ग्रंथकाराची स्थिति. (३) तीं सुधारण्यास उपाय. (४) ग्रंथपरीक्षेचा हल्लींचा प्रकार. (५) त्यांचे परिणाम. (६) प्रस्तुत विषयावर सामान्यतः विचार. (७) त्याची हकीकत. (८) टीका करणारांस आवश्यक गुण–मूळग्रंथांचे ज्ञान. (९) सत्यप्रीति. (१०) शांत स्वभाव. (११) सहृदयता. (१२) टीकेचे सामान्य प्रकार. (१३) खरा टीकाकर्ता. (१४) प्रस्तुत विषयाविषयी लोकांच्या गैरसमजुती. (१५) चांगले टीकाकार निपजल्यापासून उपयोग.

१. गेल्या पांचपंचवीस वर्षांत आमच्या भाषेंत बरीच ग्रंथसमृद्धि होऊन दिवसेंदिवस ती बरीच वाढतहि चालली आहे. निदान पांचपंचवीस तरी लहान मोठीं, बाईट चांगलीं अशीं नवीं पुस्तकें निघाल्यावांचून वर्ष बहुधा सुनें जात नसेल. ही गोष्ट आह्मांस सर्व प्रकारें अभिनंदनीय वाटते. कारण या प्रतिवर्षी तयार होणाऱ्या पुस्तकांत जरी नांव घेण्यासारखीं सगळींच नसलीं, किंबहुना मुळींच नसलीं, तरी निदान पक्षीं इतक्या ग्रंथकारांनीं आपल्या श्रमाचा व काळाचा केवळ अपव्यय्य केला नाहीं, व इतक्या छापखान्यांस काम मिळालें, एवढें तरी निदान ह्मणतां येईल! पण ही कल्पना ह्मणजे अगदीं कडेलोटची इतक्या थरास ग्रंथ पोंचणें हें बहुधा मुळींच संभवत नाहीं. कारण एक तर ग्रंथ छापणें हें कोणी उगींच मौजेखातर करीत नाहीं, तो घेणारे कोणी तरी सांपडतील अशा समजुतीवरच कोणी ग्रंथकार आपलें पुस्तक छापतो; आणि दुसरें असें कीं, जो आपला ग्रंथ छापण्यास निघाला तो बहुधा त्यांत छापण्यासारखें कांहीं तरी असल्याशिवाय तसें करण्यास सहसा प्रवृत्त होणार नाहीं; फजितीचें भय ज्याला त्याला आहेच.

२. पण ही ग्रंथांची संख्या जशी दिवसेंदिवस वाढत चालली आहे, त्या मानानें त्यांस अत्यंत हितावह अशी गुणदोषविवेचकांची संख्याहि वाढत जावी हें अत्यंत इष्ट होय. पण हें मात्र बहुधा मुळींच आढळत नाहीं. सध्यांची स्थिति पाहिली तर अशी आहे; ग्रंथ छापखान्यांतून बाहेर पडतात, आणि पुढें त्यांची कांहीं तरी यदृच्छेनें व्यवस्था होते. कांहींस लोकांचा आश्रय मिळतो; कांहीं शिफारशींनीं, वशिल्यांनीं वगैरे खपतात; आणि पुष्कळ तर ग्रंथकाराच्याच अंगावर पडून 'मला ही

१. "हे हंसा! पाणी आणि दूध हें वेगळें वेगळें करण्याचा जर तूंहि आळस केलास, तर या जगीं हें तुझें कुलव्रत दुसरा कोण चालवील?"

कोठून बुद्धि सुचली' असें त्यास करून टाकतात! याप्रमाणें लोकांचा आश्रय हा केवळ अनिश्चित असल्यामुळें कोणीहि ग्रंथ छापण्यास सहसा धजावत नाहीं. आमच्या देशांत इंग्लंडांत वगैरे जसे बडे लोकहि ग्रंथकारांच्या पंक्तींत सांपडतात तसें अजून मुळींच झालें नाहीं, व केव्हां होईल याचा सुमारहि करवत नाहीं; तसेंच जे ग्रंथकार झाले असतां सारे लोक त्यांस अवश्य आश्रय देतील, किंबहुना त्यांपासून अपेक्षित जी ज्ञानवृष्टि तिची सर्व चातकवत् प्रतीक्षा करीत आहेत, अशा आमच्या नवीन विद्वानांच्याहि कधीं स्वप्नीं सुद्धां तो विचार येत नाहीं. तेव्हां ग्रंथरचना करणारे झटले ह्मणजे अर्थात्च वरील दोहों प्रकारचें ज्यांच्या पदरीं बहुधा अठरा विश्वे दारिद्र्य तेच काय ते. अशांनीं भीत भीत एखादा ग्रंथ लोकांपुढें आणला आणि त्यास कोणींच विचारलें नाहीं, ह्मणजे आटपलें!. आधींच तुटपुंजीचा व्यापार; त्यांतून एकदां जबर ठोकर लागून चांगले डोळे उघडले, ह्मणजे मग तो कशाला पुनः या भानगडींत पडतो आहे! याप्रमाणें त्याची स्वतःची हिंमत पार खचून जाऊन दुसऱ्यांचेहि त्याची ती दशा पाहून हात पाय मोडतात. असो; तर याप्रमाणें ग्रंथकारांची सध्यां स्थिति आहे. पुस्तक छापून त्याची छापणावळ सरासरी बाहेर पडली ह्मणजे अगोदर निमे मिळविली. मग पुढला विचार पुढें. त्यांतूनहि यथाकथंचित् सगळ्या प्रती खपून जाऊन सगळ्या कृत्यांत एकंदरींत नफा झालाच, तरी दुसऱ्या आवृत्तीची गोष्टहि नको! आजपर्यंत जे शेंकडों ग्रंथ आमच्या भाषेंत होऊन गेले, त्यांत सरकारी पुस्तकांखेरीज दुसरी आवृत्ति पाहिलेले फारच थोडे निघतील. पराकाष्ठा चार पांचावर निघणार नाहींत असें आह्मांस खास वाटतें. तर ही केवढी विलक्षण स्थिति! ज्या आमच्या देशांत विद्याभिरुचि चोहोंकडे एवढी फैलावली आहे; ज्यांत प्रतिवर्षी गांवोगांवीं छापखानें, पत्रें, पुस्तकें, पुस्तकालयें, सभा वगैरे नवे नवे प्रकार होत चालले आहेत; ज्यांत देशाभिमान, विद्वत्त्व, कवित्व, वक्तृत्व वगैरेंची चोहोंकडे एवढी गर्दी दृष्टीस पडते; ज्यांत नवा धर्म स्थापणें, देशाचें गेलेलें कलाकौशल्य पुनः माघारीं आणणें, कवितेच्या नव्या शाखा स्थापणें, नवीं यंत्रें तयार करून विलायतेशीं व्यापारांत टक्कर मारणें, फार तर काय, पण ज्या गोष्टी येथें व साऱ्या एशिया खंडांत कधीं कोणीं कानीं ऐकल्याहि नाहींत अशा—ह्मणजे प्रति डिमॉस्थेनीस, प्रति सिसरो, व प्रति पार्लमेंट येथें बनवणें,—इत्यादि अचाट कामें हातीं घेण्यासहि लोक मागेंपुढें पहात नाहींत;—त्यांतच इंग्लंडांतील केवळ सामान्य प्रतीच्या ग्रंथकारांच्या योग्यतेचेहि ग्रंथकार सांपडूं नयेत, व शेंपांचशाच्या पहिल्या आवृत्तीनंतर मोठ्या नामांकित ग्रंथकर्त्यांसहि दुसरी काढण्याची छाती होऊंच नये, हा केवढा चमत्कार आहे? आमच्या सार्वजनिक सभांतून गेलेले हिंदुस्थानतर्फेचे मुखत्यार हौस आफ कामन्समध्यें तेथील सभासदांशीं जेव्हां खुचाशीं खुर्ची लावून

बसतील, तेव्हां इकडील विद्येची वरील स्थिति ऐकून तेथील सभासदांस केवढें आश्चर्य वाटेल! त्यांची समजूत जी कीं, देशास थोरपणा येण्यास तेथील भाषा चांगल्या ऊर्जित दशेस आली पाहिजे, तींत सर्व प्रकारच्या विषयांवर मोठे मोठे ग्रंथ असले पाहिजेत, लोकांच्या अंगांत विलक्षण हिंमत असून जेथें त्यांनीं एकदां पुढें पाऊल ठेवलें तेथें ते मागें सरतच नाहींत असा त्यांचा लौकिक व्हायास हवा, हा नियम जो सर्व मोठ्या राष्ट्रांस लागतो त्यास आमचाच देश मात्र अपवादक पाहून त्यांस मोठा अचंबा होईल! आणि खरोखरीच, जे लोक आपल्या देशभाषेची योग्यता केवळ हलकट, अविद्वान् अशा लोकांस मात्र ती उपयोगी इतकीच समजतात, तींस व्याकरण किंवा कोश तयार करण्याचें ज्यांच्या कधीं फारसें मनांतहि आलें नाहीं, ती जगो का मरो या-विषयीं जे सोळा आणे बेफिकीर आहेत, ज्यांच्यांत पांच पंचवीस वर्षें तरी वांचावी इतक्या प्रतीचीहि कविता निपजत नाहीं, ज्यांच्यांतील मोठ्या प्रसिद्ध वक्त्यांचें भाषण एकदां ऐकतांनाहि कंटाळा येतो, ज्यांच्या भाषेनें सामान्य प्रतीच्या लोकांस ज्ञानप्राप्ति होण्याचा बिलकूल संभव नाहीं, ज्यांचे इतिहास, पदार्थविज्ञान, वैद्यक वगैरे विषयां-वरील ग्रंथ ह्मटले ह्मणजे पोरींच्या भातुकलींतील पदार्थांसारखे होत, ज्यांच्यांतील व्यापाराच्या मंडळ्या, कौशल्यशिक्षक गृहें, भजनसमाज, पुस्तकालयें वगैरेंचा थाट पाहिला तर युरोपांतून आलेल्या एखाद्या गृहस्थास पोट भरून हसूं मात्र येईल,-- त्याच लोकांचा पार्लमेंटांत जागा मिळवण्याचा उद्योग चाललेला पाहून कोण तोंडांत बोट घालून रहाणार नाहीं? असो; एकंदरींत आमच्या भाषांची विद्यमान स्थिति व ग्रंथकारांचा लोकांकडून आदर या दोन्ही गोष्टी एकंदर देशाच्या स्थितीविषयीं उत्कृष्ट सूचक आहेत असें आह्मांस वाटतें; आणि हीं चिन्हें अशींच जोंपर्यंत दृष्टीस पडतील तोंपर्यंत देशाच्या मोठेपणाविषयीं लोक कितीहि भकले तरी तें सर्व व्यर्थ होय यांत अगदीं संशय नाहीं.

३. देशभाषेची सुधारणा व तींत उत्कृष्ट ग्रंथांची समृद्धि होणें याचा देशाच्या हिताशीं केवढा निकट संबंध असतो याविषयीं जे निःसंशय असतील त्यांस वरचें लिहिणें केवळ यथार्थ वाटेल अशी आमची खात्री आहे. आतां वरील दोन्ही गोष्टी घडण्यास काय झालें पाहिजे याचा विचार करूं. प्रस्तुत मालेच्या पहिल्या दोन अंकां-त आह्मीं वाचकांस कळविलें आहेच कीं, ग्रंथाचे यथार्थ परीक्षक असणें हें फार अवश्य आहे; व असे असले ह्मणजे भाषेस अनेक प्रकारांनीं उपयोग होतो. हे प्रकार या निबंधांत पुढें सांगण्यांत येतील. आतां हें ग्रंथांचें गुणदोषविवेचन सध्यां कितपत होतें तें पाहूं.

४. हा प्रकार बहुधा सर्वांच्या लक्षांत असेलच. आमच्या मराठी वर्तमानपत्रां-तील कित्येकांच्या अग्रभागीं इंग्रेजी पत्रांवरून उचललेली एक लांबलचक प्रतिज्ञा असते

कीं, अमुक अमुक विषय आमच्या पत्रांत येत जातील. आतां या विषयांत पहिल्यानें कोणता मांडलेला असतो ह्मणाल, तर Literature ह्म० भाषेंतील ग्रंथ! आणि पत्र जर उलटून सारें वाचून पाहिलें, तर वरील सदर केवळ नामधारी होय असें तेव्हांच लक्षांत येतें. हा प्रकार केवळ एकाच अंकांत नव्हे, तर महिन्यांचे महिने, किंबहुना वर्षांचीं वर्षें चाललेला दृष्टीस पडेल. आतां वरील सदराचा अर्थ पत्राच्या दोहों बाजूंस नवीन पुस्तकांच्या ज्या जाहिराती दिल्या असतात त्या, किंवा 'तुला—होतें काय? रक्त शुद्ध कर' अशा प्रकारचे जे मजेदार चुटके दिले असतात ते असल्यास न कळे! एरवीं त्यांपासून त्यांच्या वाचकांस भाषेची किंवा तींतील ग्रंथांची माहिती किती होत असेल ती त्या पत्रकर्त्यांस किंवा त्यांच्या वाचकांसच माहीत. बरें हें एक असो; वर्तमानपत्रांचा तो मुख्यतः विषय नसल्यामुळें, व दर खेपेस वरील सदराचा मजकूर लिहिण्यास सांपडणें अशक्य ह्मणून तो वरचेवर येत नाहीं असें ह्मटलें, पण महिन्या दोन महिन्यांनीं कोणी नवीन ग्रंथकार आपलें पुस्तक त्यांच्या परीक्षेकरितां जेव्हां त्यांजकडे नजर करतो तेव्हां तर वरील सदर जागवण्यास चांगली संधि ना! पण अशा प्रसंगीं आमचे वर्तमानपत्रकर्ते कशी हिकमत लढवतात ती पुष्कळांस माहीत असेलच. कोणी 'पोंच' या सदराखालीं त्या ग्रंथकाराच्या नांवाचा यथास्थित निर्देश करून पुस्तक पाठविल्याबद्दल त्याचे फार फार आभार मानतात, एवढीच त्याच्या ग्रंथावर टीका! दुसरे कित्येक वरील छापील आभार प्रदर्शित करून नंतर ग्रंथाची छापणी फार सुरेख आहे, बांधणी मोठी मनोवेधक आहे, कागद तर कांहीं पुसूंच नये, अशा प्रकारच्या गोड गोड शिफारशी करतात. एवढें नामी गुणदोषविवेचन करण्यास त्या विद्वान् पत्रकर्त्यांस केवढे श्रम पडत असतील बरें! व बिचाऱ्या ग्रंथकर्त्यांस आपली शिफारस सगळी कागदांच्या कारखानदाराकडे, छापणाराकडे व बुकें बांधणाराकडेच खपली जाऊन स्वतःच्या वांट्याला एक शब्दहि उरला नाहींसें पाहून केवढा संतोष वाटत असेल! असो; तर अशा दोन तऱ्हांनीं प्रायः नवीन पुस्तकावर मत प्रदर्शित केलें जातें. पण याहूनहि खुबीची एक तिसरी तऱ्हा सांगायाची राहिली आहे. ती ही—'अमुक अमुक बूक आह्मांस पावलें; आह्मी ग्रंथकर्त्याचे याबद्दल फार आभारी आहों. आमचें मत पुढील खेपेस देण्यांत येईल'. किंवा इतकेंहि आपणांस बांधून घ्यावयाचें मनांत नसल्यास 'मत सवडीप्रमाणें प्रकट करूं'. असें लिहावें ह्मणजे आटपलें. पुढील खेप किंवा सवड यायला नको, आणि मत द्यायला नको. ही पुढील खेप येणें ह्मणजे नारदमुनीची उलट फेरीच ह्मणायाची! त्या भोळ्या स्वारीनें सह्याद्रीकडून दंडवत घालवून त्यास जशी थाप दिली, कीं बारे! असाच अंमळ राहा, मी आतां रामेश्वराहून परत आलों पहा! आणि मग परत कसचें आणि काय कसचें—याप्रमाणेंच वरील पत्रकारांचा

वेळ मारून नेण्याचाच केवळ मतलब असतो! असो; तर नवीन ग्रंथ करून तो अभिप्रायाकरतां जो कोणी वर्तमानपत्रांकडे वगैरे पाठवतो, त्याची वासलात वरील तिन्ही प्रकारांतूनच बहुधा एकानें होते.

वरील विचित्र स्थिति पाहून काय बरें मनांत येतें? अर्थात् हेंच कीं, असें होण्याचें कारण ग्रंथ वाचण्याचा एक आळस तरी असेल; किंवा गुणदोषपरीक्षेचें काम लोकांस अंमळ जडच जातें. कांहींहि असो, निदान एवढें खरें कीं, ग्रंथकारांची अशी हेळसांड होणें हें आमच्या विद्वत्तेस व देशाभिमानास मोठें लांछन असून त्यापासून भाषेची व तद्द्वारा एकंदर लोकांची मोठीच हानि होते. ग्रंथाची शिफारस करतेसमयीं बहुतेक शिफारस पुस्तकाच्या पुठ्ठ्यावरून व छापणीवरूनच करणें हें किती अप्रयोजक आहे! कसाई लोक जशी गुरांची परीक्षा त्यांच्या अंगाच्या चांचपणीवरून करतात तशीच गोष्ट ग्रंथांची असते काय? 'साधारण प्रार्थने'सारखें धर्मपुस्तक किंवा 'मंजुघोषे'सारखी कादंबरी मोठ्या शानदार पुठ्ठ्यांनीं बांधवून त्यावर मोठें नामी असें मिन्याचें किंबहुना जडावाचें काम केलें ह्मणजे तीं पुस्तकें खरोखरी वाचनीय झालीं काय? आणि 'बाळमित्र' किंवा 'पद्यरत्नावली' हीं अगदीं भिकार कागदावर भिकार ठशांनीं छापून अगदीं भिकार रीतीनें बांधलीं ह्मणजे त्यांची योग्यता कमी झाली काय? रद्दी घेणाऱ्या वाण्यानें किंवा आतान्यानें पुस्तकांचीं त्यांच्या बाह्य स्वरूपावरून जर पारख केली तर ती त्यास शोभणार आहे; पण स्वतः अर्थज्ञ व अत्यंत मार्मिक ह्मणून जे लोकांस एखाद्या ग्रंथाची शिफारस करणार त्यांनीं ग्रंथांची पारख वाण्यासारखी किंवा अत्तरवाल्यासारखी करावी हें किती हास्यास्पद होय! अशी शिफारस झाली ह्मणजे ग्रंथकारांस आपली केवळ मानहानि केलीशीच वाटावी, व ती करणारासहि त्याबद्दल मोठा संकोचच वाटावा. पण ही वृत्ति उभयपक्षींहि बहुधा दिसत नाहीं; दोघांसहि बाह्यरूपाची प्रशंसाच पुरेशी होते. असो; एकंदरींत वरील प्रकारच्या ग्रंथपरीक्षेनें भाषेचें फार अहित होतें. कारण खरा परीक्षक कोणीच नसल्यामुळें कसाहि ग्रंथ असला तरी 'टक्का शेर भाजी टक्का शेर खाज्या' या न्यायानेंच त्याची प्रायः योग्यता ठरते. ह्मणजे 'मुक्तमाला' सुरस आणि 'मंजुघोषा'हि सुरस; 'अथेल्लो' उत्कृष्ट भाषांतर, तसेंच वर्षा दोन वर्षांमागें तयार होऊन लोळत पडलेलें 'जुलियस सीजर'चें एक भिकार भाषांतरहि उत्कृष्टच; 'पुण्याच्या वर्णना'सारखा ग्रंथ पुस्तकालयीं संग्रहास असण्यास जितक्या योग्यतेचा, तितकाच 'राणीच्या पुस्तका'सारखा केवळ राजमान्य ग्रंथहि योग्यच! सगळे ग्रंथ अर्थातच सारख्या योग्यतेचे कधीहि असणार नाहींत; पण अवर्षेच्या दाट काळोखांत जसे सगळे पदार्थ सारख्याच आकारमानाचे, सारख्याच रंगाचे, आणि सारखेच सुरेख; त्याप्रमाणेंच सत्परीक्षकांच्या अभावीं सगळे ग्रंथ येथून तेथून सारखेच. हा ब्रह्मघोटाळा होण्याचीं कारणें

प्रस्तुत मालेच्या पहिल्या अंकांत कांहीं सांगण्यांत आलीं आहेतच. या सर्वांत आमच्या नवीन विद्वानांची स्वभाषेविषयींची उपेक्षाबुद्धि हीच मुख्य ह्मटली असतां चालेल. कारण ग्रंथपरीक्षा करण्याचें सामर्थ्य यांच्या अंगीं येण्याचा जितका संभव आहे तितका अर्थात्च इतरांच्या नाहीं. यांचें तरी कारण मुख्यतः हेंच आहे कीं, इंग्रेजी भाषेंत जॉनसन, मेकाले वगैरे नांमाकित ग्रंथकारांचे ग्रंथ प्रस्तुत विषयावर मोठे उत्कृष्ट असून त्यांचा परिचय कालेजांतील विद्यार्थ्यांस हरहमेश घडतो. शिवाय इतरहि पुष्कळ माहिती त्यांस झाली असते. यामुळें एखाद्या ग्रंथावर ते जसा मार्मिक अभिप्राय देतील तसा केवळ मराठींतच हुशार असा मनुष्य किंवा मोठा व्युत्पन्न शास्त्री याच्या हातूनहि देणें होणार नाहीं. असो; पण ही केवळ शक्यत्वाची उक्ति झाली. ह्मणजे इतकें करण्याचे त्यांच्या अंगीं सामर्थ्य आहे, किंवा निदान योग्यता तरी आहे, इतकेंच. हें सर्व ते करतातच असा अर्थ नाहीं. शेक्सपीयर साहेबांची नायिका ह्मणते--

If to do were as easy as to know what where good to do, chapels had been churches and poor men's cottages princes' palaces ![1]

हाच न्याय प्रस्तुत प्रसंगीं किंचित् फिरवून लावतां येईल. असो; पण या हयगयीमुळें देशाचा तोटा किती होतो हें उघडच आहे. ग्रंथांचा खरा चाहता कोणी नसल्यामुळें चांगल्या ग्रंथकारांस वाईटांतच सामील होऊन बसावें हें तरी एक त्यांच्या कपाळीं येतें किंवा आपली योग्यता जर प्रगट करणें असली तर आत्मश्लाघेचें अश्लाघ्य कृत्य करण्याखेरीज त्यांस दुसरा मार्ग रहात नाहीं. पण हा मार्ग आचरणें हें नेहमींच फलदायक होतें असें नाहीं. पुष्कळदां त्याचे योगानें लोकांच्या मनावर वाईट ग्रह मात्र होऊन जातो. असो; तर याप्रमाणें तिऱ्हाईतपणें निष्पक्षपातपणानें ग्रंथांची योग्य प्रशंसा करणारे असले, ह्मणजे चांगल्या ग्रंथकारांस उमेद येते व लोकांपासून त्यांस आश्रय मिळाल्याच्या योगानें भाषेंत चांगल्या ग्रंथांची संख्या उत्तरोत्तर वाढते. आणि त्याप्रमाणेंच वाईट तेवढें निवडलें जाऊन त्यांचा क्रमाक्रमानें ऱ्हास होतो. पण असें जेव्हां असत नाहीं तेव्हां अर्थात्च हल्लींप्रमाणें चांगलें काय आणि वाईट काय दोन्ही एकच होऊन जाऊन भाषेची मोठीच हानि होते; आणि लोकांचे हातीं चांगलेच ग्रंथ पडून त्यांच्या मानसिक शक्ति वृद्धिंगत होत जाव्या असें जें व्हावें तें मुळींच न होऊन त्यांस उलटा अपाय मात्र घडतो.

१ "अमुक अमुक करणें चांगलें हें समजणें जसें सोपें आहे त्याप्रमाणेंच तें करणेंहि जर सोपें असतें, तर लहान देवळें हीं मोठीं देवालयें बनलीं असतीं आणि गरीबगुरीबांच्या खोपटांचे पोलेजंग राजवाडे झाले असते!"

६. येथवर आमच्या भाषेंतील ग्रंथकारांच्या सांप्रतच्या स्थितीविषयीं विशेषतः निरूपण झालें. आतां प्रस्तुत विषयावर सामान्यतः विचार करूं. ह्मणजे ग्रंथांवर टीका करण्याचें काम जो हातीं घेतो त्याच्या अंगीं कोणते गुण असले पाहिजेत, त्यास साधनें कोणतीं हवींत, हा टीका करण्याचा प्रकार केव्हां उद्भवला, त्यापासून हिताहित कोणतें वगैरे.

७. पहिल्यानें या प्रकाराची हकीकत. हा प्रकार आपल्या देशांत प्राचीन काळीं ह्मणण्यासारखा नव्हता, व अर्वाचीन काळीं तर अगदींच बुडून अलीकडे दहा पंधरा वर्षांतच इंग्रजी ग्रंथकारांच्या परिचयानें नुकता कोठें सुरू होत चालला आहे. या विषयाच्या संबंधानें प्रस्तुत मालेच्या तिसऱ्या व चवथ्या अंकांत आह्मीं कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत, त्यावरून या काळाच्या पूर्वीची स्थिति कांहीं लक्षांत येईलच; यास्तव तिजविषयीं आणखी येथें लिहिणें जरूर नाहीं. प्रस्तुत स्थलीं अलीकडच्या स्थितीस उद्देशून मात्र लिहितों. नुकतें वर लिहिण्यांत आलेंच आहे कीं, इंग्रजी विद्येचा इकडे फैलाव होऊं लागल्यापासून ग्रंथांच्या गुणदोषांचें विवेचन करण्याचा इकडे प्रघात पडला. प्रतिवर्षीं नवीं जीं पुस्तकें निघतात त्यांवरं वर्तमानपत्रांतून थोडीबहुत चर्चा होऊं लागली व त्याच उद्देशानें मासिक पुस्तकेंहि सुरू झालीं. या पुस्तकांचा विषय भाषा व विद्या हींच केवळ होत, वर्तमानपत्रांप्रमाणें आणखी दुसरीं व्यवधानें त्यांस बिलकूल नाहींत, यास्तव वरील गुणदोषविवेचनाचें काम वस्तुतः पहातां त्यांचेंच विशेषेकरून होय. देशांत चालणाऱ्या राज्यकारभाराविषयीं, व्यापाराविषयीं व इतर अनेक लौकिक गोष्टींविषयीं लोकांचीं मनें बरोबर करणें हें जसें वर्तमानपत्रांचें काम, तसेंच मासिक पुस्तकांचें विद्येच्या संबंधानें होय. ह्मणजे नानाविध विषयांविषयीं थोडक्यांत चांगल्या रीतीनें वाचकांस माहिती जेणेंकरून होईल तें करणें हेंच त्यांचें मुख्य काम होय; व याबरोबर विद्यावृद्धयर्थ सरकारचे किंवा लोकांचे जे प्रयत्न चालले असतील त्यांची चर्चा करणें हेंहि त्यांजकडेच येतें. यास्तवच नवीं पुस्तकें जेवढीं होतील त्यांपैकीं खरोखरी उपयोगाचीं कोणतीं व नादान किंवा अपायकारक कोणतीं तींहि लोकांस कळविणें त्यांचेंच कर्तव्य होय. हा प्रकार विलायतेंतील मासिक व त्रैमासिक पुस्तकें जीं आपल्या दृष्टीस पडतात त्या सर्वांत आढळतो. कोणत्याहि विषयावर नवें बुक झालें न झालें कीं लागलींच चोहोंकडे मासिक पुस्तकांतून त्याची वाटाघाट सुरू होते. हें तर काय, पण पुस्तकालयांतून, वादविवादाच्या सभांतून, चहा बुंद वगैरे पिण्याच्या ठिकाणीं, किंबहुना मेजवान्यांच्या प्रसंगीं सुद्धां वरील चर्चा जिकडे तिकडे चालू असते. असो; तर नवीन पुस्तकांविषयीं मतें प्रदर्शित करून त्यांपैकीं लोकांच्या आश्रयास पात्र कोणतीं व नाहींत कोणतीं हें ठरविणें हा अधिकार मुख्यतः मासिक पुस्तकांचा होय. पण आमच्या भाषेंत जीं आहेत

व मागें होतीं त्यांपैकीं वरील काम बरेंच बजाविलेलें व बजावणारें आह्मांस एक मात्र दिसतें. तें 'विविधज्ञानविस्तार' होय हें सर्वांच्या सहज ध्यानांत येईलच. असो; तर याप्रमाणें ग्रंथांवर टीका करण्याचा प्रकार आमच्या भाषेंत अगदीं नवा सुरू झाला आहे. व अद्याप त्याचा प्रचारहि फारच थोडा आहे. तो वाढणें हें भाषेच्या अभिवृद्धीस व लोकांच्या हितास फार आवश्यक आहे.

८. वर प्रस्तुत प्रकाराचा कांहीं इतिहास झाला. आतां ग्रंथांवर टीका करणाराचे अंगीं अवश्य गुण कोणकोणते हवेत तें सांगतों. प्रथमतः अर्थातच मूळ ग्रंथाचें ज्ञान. हें असल्याशिवाय टीकाकार एरवीं केवढाहि विद्वान् असला तरी तें व्यर्थ होय; हें उघड आहे. ही गोष्ट वास्तविक पहातां अगदीं स्पष्ट होय; कारण ज्या मनुष्यास एखाद्या वस्तूचें पूर्ण ज्ञान नाहीं, किंबहुना मुळींच नाहीं, त्यानें त्याविषयीं आपलें मत सांगणें हें मुळींच शोभत नाहीं हें अगदीं उघड आहे. पण मनुष्याच्या मनाचा असा कांहीं चमत्कार आहे कीं, स्वतःच्या अज्ञानाची केवळ कल्पनाहि त्यास सहन होत नसते. आपणास अमुक अमुक विषय अगदीं कळत नाहीं व यास्तव त्यावर मत देण्यास आपण सर्वथा अयोग्य, अशी मनाची पक्की खात्री फारच थोड्या सुज्ञ लोकांची झाली असते. बाकी कोणास कोणत्याहि विषयाविषयीं पुसा; बहुतकरून उत्तर नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं. ज्या त्यास बहुधा असें वाटत असतें कीं, मला जितकें ज्ञान आहे त्यापेक्षां अधिक दुसऱ्यास काय असावयाचें आहे? व माझीं जीं मतें आहेत त्यांत चुकीचा संभव असेल तरी कसा? तर असा मूर्खपणाचा दुराभिमान बहुतेक लोकांच्या मनास जडला असल्यामुळें हव्या त्या गोष्टीवर हवें तसें मत झोंकून न देणारे फार थोडे. फार तर काय, पण जो विषय त्यांस अगोदर असलाच तर फारच थोडा अवगत असण्याचा संभव, त्यावरहि बरें वाईट ह्मणण्यास मागें पुढे बिलकूल न पहाणारे शेकडों गृहस्थ सांपडतात. बेकननें कोठेंसें एक मोठं मार्मिक वचन लिहिलें आहे कीं, असे कित्येकजण आढळतात कीं ज्यांस आपणास माहीत काय नाहीं तेंच माहीत नसतें! असो; तर ग्रंथांवर टीका करण्यास निघालेले गृहस्थ अशा प्रतीचे कामाचे नाहींत. आपण ज्याचे गुणदोष लोकांस दाखविणार तो ग्रंथ खरोखर आपणास पुरतेपणीं समजला आहे असा निश्चय झाल्यावरच टीका करणारानें त्या कामास हात घालावा. नाहीं तर तो अर्धमुर्धा समजून तितक्यावरूनच जर गुणदोषविवेचनास आरंभ केला तर तें त्या कर्त्याच्या उपहासास मात्र कारण होईल; व लोकांत सत्याचा प्रसार होणें एकीकडेच राहून मूर्खपणाचीं मतें मात्र चोहोंकडे माजतील.

९. दुसरा गुण सत्यप्रीति. हाहि गुण वरच्यासारखाच टीकाकर्त्याच्या अंगीं अवश्य असला पाहिजे. याची योग्यता तर वरच्याहूनहि अधिक आहे; पण त्याच

मानानें तो जगांत फारच विरळा आढळतो. दुसऱ्याच्या ग्रंथावर जी टीका करावयाची ती केवळ सत्यास अनुसरूनच करायाची, व ती करण्यांत सत्याचा उदय व असत्याचा ऱ्हास करणें एवढाच काय तो हेतु, हा प्रकार फारच थोडा सांपडेल. एरवीं टीका करणारांचे सामान्यतः उद्देश पाहिले तर द्वेषबुद्धीनें, मत्सरानें किंवा उगीच गमतीखातर दुसऱ्याची निंदा करावी, त्याची फजिती उडवावी, त्याची कीर्ति दूषित करावी, इतकाच असतो. किंवा इतकेंहि नसलें तरी निदान आपलें नांव लोकांपुढें यावें, आपली विद्वत्ता प्रदर्शित व्हावी, इतका तरी असतो. आतां हें खरें कीं, वरील दुष्ट मनोवृत्तींच्या प्रेरणेनेंच कोणीं एखाद्या ग्रंथावर चर्चा केली असूनहि जर तींत असत्याचा लेशहि नसला, तर ती केवळ दोषास पात्र होत नाहीं; तरी वरील वृत्तींचें अवलंबन सर्वथा अश्लाघ्यच होय. सुविचाराचे योगानें ज्यांचें मन थोर झालें असतें ते त्यांस आपल्या निर्मळ अंतःकरणांत कधीं थारा देत नसतात. असो; तर जो कोणी एखाद्या ग्रंथकाराचे गुणदोष जगास प्रगट करण्याकरितां हातीं लेखणी धरील त्यानें अगोदर सत्यास स्मरावें आणि त्यास धरूनच मी पुढील सगळा मजकूर लिहीन असा अगोदर निश्चय करावा. असें करणें केवळ परमार्थबुद्धीस्तवच त्यास योग्य आहे असें नव्हे, तर त्यानें निवळ स्वार्थ पाहिला तरी सुद्धां वरीलच मार्ग श्रेयस्कर होय हें त्याच्या लक्षांत येईल; कारण जरी त्यानें आपल्या विद्वत्तेच्या व कीर्तीच्या भरावर चढून जाऊन खोटींच मतें लोकांच्या मनात भरवून देऊन त्यांस कांहीं वेळ फसविलें व त्याबद्दल तात्कालिक कृतार्थता मानली; तरी कधी ना कधीं तरी त्याची लबाडी बाहेर पडेलच पडेल हें त्यानें खूप समजून ठेवावें. याविषयीं ह्यूम, जॉनसन, मेकाले हीं सर्व प्रसिद्ध उदाहरणें आहेत. पहिल्यानें आपल्या इंग्लंडच्या इतिहासांत पुष्कळच खोटा मजकूर लिहिला असल्यामुळें त्याची पत आतां बहुतेक अगदीं बुडाल्यासारखीच आहे; व दुसरे दोघेहि आपल्या हेकटपणाच्या लहरींत अनेक प्रसंगीं पुष्कळच भरकटले असल्यामुळें त्यांचीं मतें ग्रहण करणें तीं लोक फार जपून करतात! असो; तर सत्यरूप दैवत असें कडक व जाज्वल्य आहे. त्याच्या क्षोभापुढें मोठमोठ्या प्रचंड ग्रंथकारांचाहि चुराडा होऊन जातो! मग छोटेखानी लुटपुट्या ग्रंथकारांचा खुर्दा तर कोणीकडच्या कोणीकडे उसळून जात असेल कोण जाणे! असो; तर याप्रमाणें वर जी सत्यानुसरणाविषयीं आम्हीं सूचना केली ती केवळ स्वार्थदृष्ट्याहि यथार्थ होय. ग्रंथाविषयीं जो यथार्थ विवरण करील, ह्मणजे गुण असतील तेवढे गुण व दोष असतील तेवढे दोष जो यथास्थित दाखवून देईल, त्याचीच टीका चिरकाल जगास मान्य होऊन राहील.

१०. तिसरा गुण शांत स्वभाव. ह्याहि टीका करणारांच्या अंगीं अवश्य पाहिजे असून वरच्यासारखाच क्वचित् आढळतो. याचें कारण वरील कलमांतच आलें

आहे. तें अर्थातच हें कीं, टीकाकर्त्यांची प्रवृत्ति मुळींच वर सांगितलेल्या द्वेषमत्सरादिकांनींच प्रायः होत असल्यामुळें वरील गुणास जागाच रहात नाहीं. क्रोधास वश होऊन जेथें चित्ताचा क्षोभ झाला तेथें शांतता कशी रहावी ? असो; पण या क्षोभाचाहि उद्गार बाहेर पडण्यास मनास कांहीशी तरी शांति असावी लागते. ती मुळींच नसून चित्तास अतिशयित क्षोभच जर केवळ झाला असला, तर मनाचे व्यापारहि नीट चालण्यास कठिण पडेल. ह्मणजे जसा मनुष्य अतिशयच रागावला असला तर त्याचा कंठ दाटून येऊन शब्दहि पुरता तोंडावाटे निघेनासा होतो; त्याप्रमाणेंच मनुष्य रागानें अगदीं देहभान विसरून गेला ह्मणजे त्याची बुद्धिहि गोंधळून जाते. काय बोलायाचें किंवा लिहायाचें तें त्यास एरवीं जेवढें सुचेल तेवढेंहि त्या हातघाईच्या वेळीं न सुचून तो अगदीं बेफाम होऊन जातो, व वेड्यासारखें भलभलतेंच बरळूं सुद्धां लागतो. असें कीं, तोच मनुष्य पुढें कांहीं दिवसांनीं आपला वेडेपणा पाहून विस्मय पावेल. असो; तर मनाच्या शांततेची इतकी आवश्यकता आहे, कीं रागाचें बोलणें किंवा लिहिणें संगतवार होण्यास सुद्धां तीवांचून चालत नाहीं. मग हजारों वाचकांस मान्य होईशी ग्रंथरचना करायाची असल्यास तर तिचें अगत्य केवढें आहे हें काय सांगावें? कां कीं, ग्रंथ रचायाचा ह्मणजे सगळा विषय अगोदर सादंत मनांत आणून त्याची यथास्थित मांडणी करायाची असते; व वाक्यरचना वगैरे जितकी उत्कृष्ट होईल तितकी साधावी लागते. तेव्हां हें सर्व क्षोभ पावलेल्या मनुष्यापेक्षां शांत स्थिर मनाच्या मनुष्यास जास्त साधेल हें उघड आहे. हें एक झालें. दुसरें असें कीं, एखाद्या ग्रंथावर वगैरे जो अभिप्राय देणें तो शांत, गंभीर व सभ्य अशा रीतीनें दिला असतां त्याचें कांहीं निराळेंच वजन पडतें, आणि त्यानें जें काम होतें तें रागाच्या सपाट्यांत उगीच पुष्कळ गोंगाट केला, वेड्या वांकड्या शिव्या आंसडल्या, अशानें अगदींच होत नाहीं. या दुसऱ्या प्रकारानें टीका करणारावरून मात्र लोकांचें मन उडतें. व त्याचा हलकटपणा व पोरकटपणा जगांत प्रगट होतो. शिवाय वरील शिव्यांनीं त्याच्या पक्षास बळकटी यायची ती तर एकीकडेच राहून त्याची दुर्बलता मात्र लोकांस भासूं लागते. कारण लोक पक्के समजतात कीं, ज्या अर्थी यानें शिव्यांचा एवढा भडिमार केला आहे त्या अर्थी याजपाशीं प्रमाणें तितपतच असतील. खेरीज ग्रंथकाराच्या थोरपणाला झाटलें ह्मणजे शिमग्याचा झगडा जागविणें हें अगदींच अप्रशस्त. रस्त्यांतील भांडणारांत तोंडाच्या जोरावर जसा कज्जाचा निकाल होतो, ह्मणजे जो मोठ्यानें ओरडत असेल त्याचाच पक्ष खरा असें भोंवतालच्या तमासगीरांस वाटतें, तसा प्रकार ग्रंथांत करूं पहाणें यासारखें निंद्य व हास्यास्पद कांहीं नाहीं. असें जो करतो त्यास आपला बोज कळत नाहीं हें एक दिसतें, आणि शिवाय हातीं घेतलेलें टीका करण्याचें कामहि त्यास बिलकुल कळत

नाहीं हें दुसरें स्पष्ट होतें. कारण ज्याजवळ सबळ प्रमाणें आहेत तो शब्दपांडित्याच्या किंवा शिव्यांचा भडिमार करण्याच्या भरीस कधीं पडणार नाहीं. जीं ठोक प्रमाणें त्यास माहीत असतील तीं दाखवून तो खुशाल बिनधोक बसेल. आपल्या प्रतिपक्ष्यांच्या शिव्यांचीहि तो काडीइतकीहि परवा करणार नाहीं, कारण त्यांचा पोकळपणा त्यास धडधडीत दिसून येईल, व जे सुज्ञ आहेत ते यानें कधीं फसले जाणार नाहींत हेंहि तो पक्कें समजेल. असो; तर याप्रमाणें मनाची शांतता ही टीकाकर्त्यास अत्यंत आवश्यक असून तिच्या योगानें त्याच्या लेखास कांहीं विलक्षण थोरवी व भव्यपणा हीं येतात, कीं ज्याप्रमाणें दोहों पक्षांच्या वकीलांच्या कोट्या व एकतर्फी उत्तरें प्रत्युत्तरें सगळीं ऐकून घेतल्यावर न्यायाधीश आपल्या उंच आसनावरून निःपक्षपातपणाचा चोख निवाडा अगदीं स्वस्थ अंतःकरणानें बोलून जातो त्याप्रमाणें. सारांश, टीकाकर्त्याचा अभिप्राय वकीलाप्रमाणें एकतर्फी कधीं नसावा, तर न्यायाधीशाच्या निर्णयाप्रमाणें केवळ सत्याच्या तर्फेचाच असावा.

११. चवथा गुण सहृदयता. सहृदयता ह्मणजे ज्यावर टीका करायाची त्यांत हृदयाचा पूर्ण अभिनिवेश होण्याची योग्यता. ही योग्यता अर्थात्च सर्व मनुष्यांच्या ठायीं असत नाहीं, अथवा असली तरी सारख्या प्रमाणानें असत नाहीं. जगांत जें एवढें मतवैचित्र्य दृष्टीस पडतें यास मुख्य कारण वरील होय. प्रत्येक मनुष्याची जन्मसिद्ध प्रकृतिच निराळी पडल्यामुळें व पुढें ज्या ज्या अवस्था त्यास प्राप्त होतात त्याहि सर्वांच्या सारख्या नसल्यामुळें, मनुष्या मनुष्यामध्यें रुचिभिन्नत्व उत्पन्न होतें हें साहजिकच आहे. पण त्यांतूनहि कित्येक मनुष्यांच्या ठायीं वरील सहृदयतागुण इतरांच्याहून जास्त आढळतो. ह्मणजे दुसऱ्याच्या मनोवृत्तीशीं आपली मनोवृत्ति मिळविणें हें त्यास सहज करतां येतें. हा गुण असणें हें मनाच्या किंवा हृदयाच्या विशालत्वाचें चिन्ह होय, आणि त्याचा अभाव हा अर्थात्च त्याच्या उलट गुणाचें ह्मणजे वरील दोहोंच्या संकुचितत्वाचें दर्शक होय. तर जो एखाद्या ग्रंथावर टीका करण्याचें मनांत आणील त्यानें अगोदर आपल्याशीं हें पहावें कीं, याशीं सहृदयत्व पावण्याची माझी योग्यता आहे, कीं नाहीं. नाहीं तर काय प्रकार होईल तो उघडच आहे. समजा कीं, जयदेवाच्या 'गीतगोविंद' काव्यावर किंवा मराठीशाहींत रामजोशासारखे सुरस लावण्या करणारे जे कित्येक कवि ह्मणले त्यांच्या कवनांवर टीका करण्यास शुकाचार्यासारख्या परमहंसांनीं हातांत लेखणी घेतली, किंवा वृद्धत्वानें अगर सृष्टीच्या चुकीनें मदनव्यापरशून्य असणाऱ्या मनुष्यानें तें काम पत्करलें, तर टीका किती उत्तम तऱ्हेची होईल याचें अनुमान सहज करतां येईल! तसेंच धर्मप्रतिपादक किंवा वेदान्तविषयक ग्रंथावर एखाद्या रंगेल विनोदी मनुष्यानें जर टीका करण्यास आरंभिलें तर तें त्यास किती साधेल? बिशप बटलर नांवाच्या एका धर्माध्यक्षानें इंग्रेजी भाषेंत एक मोठा वि-

ख्यात ग्रंथ वरील विषयावर रचलेला आहे, त्याविषयीं कित्येकांनीं असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, तो ग्रंथ पाहिल्याबरोबर आमचें डोकें दुखूं लागे. याप्रमाणेंच मिल्ल साहेबांचें शेक्सपीयरविषयीं मत, आमच्या कालिदासाविषयीं मत, जॉनसनचें कित्येक इंग्रेजी कवींविषयीं व इतिहासाविषयीं; मेकॅलेचें हिंदूंच्या विद्यादिकांविषयीं; या सर्वांची योग्यता किती धरायाची हें आमच्या वाचकांस तेव्हांच कळेल. एलिझाबेथ राणीचे खजीनदार लॉर्ड बर्ले ह्मणून कोणी होते, त्यांस, स्पेन्सरच्या सर्वप्रसिद्ध काव्याबद्दल राणीनें त्यास कांहीं इनाम करून दिलें या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटलें; त्या प्रसंगीं त्यांचा असा उद्गार निघाला, 'अहो, हें काय वेड आहे, तुमतें एक यःकश्चित् गाणें केल्याबद्दल एवढें इनाम?' दुसऱ्या एका प्रसंगीं असें झालें कीं, कोणा काव्याची कोणीं फार फार प्रशंसा केली असतां एका तत्त्वज्ञाचा उद्गार निघाला, 'अंः—यांत काय आहे? या काव्याच्या योगनें बाजारांत दाणे स्वस्त झाले कीं काय हें मला सांगा!' असो; तर याप्रमाणें ज्यांत आपणाला गम्य नाहीं त्यांत वेडेपणानें शिरलें ह्मणजे अशीं विचित्र मतें उत्पन्न होतात. यास्तव एखाद्या ग्रंथावर लेखणी उचलण्यापूर्वी टीकाकारानें याचा अगोदर नीट सुमार पहावा कीं, मी हें काम हातीं घेणार खरें, पण याशीं सहृदयता पावण्याची माझी योग्यता आहे काय? नसली तर अंधळ्यानें तजबीरीची परीक्षा करूं गेल्यासारखें त्याचें मत वेडगळ ठरेल. या ठिकाणीं कोणास असा भ्रम उत्पन्न होईल कीं, मनुष्याची विद्वत्ता मोठी असल्यावर त्यास हवें त्यावर मत देण्यास काय हरकत आहे? पण या भ्रमाचें वरील जॉनसन, मिल्ल वगैरेंच्या उदाहरणांवरूनच पूर्ण निरसन होतें; आणि त्याविषयीं अधिक उपपादन केलेलें पहाणें असल्यास प्रस्तुत मालेचा तिसरा व चवथा अंक पहावा. असो; तर एकंदरीत या सहृदयतागुणाची नुसत्या विद्वत्तेहून फारच अधिक योग्यता आहे. व ह्मणूनच एखाद्या ग्रंथावरील अभिप्राय जरी मोठी विद्वत्ता खर्चून लिहिला असला तरी वरील गुणाच्या अभावीं वरील मत केवळ कवडीचा माल होय.

१२. याप्रमाणें उत्तम प्रकारची टीका करतां येण्यास ती करूं जाणाराच्या अंगीं जे गुण लागतात ते वर सांगितले. यांत बाकीच्यांचा समावेश होईल असें आह्मांस वाटतें. आतां जगांत सामान्यतः जी ग्रंथादिकांवर लोकांची टीका चालते ती कितपत योग्यतेची असते व कोणकोणत्या प्रकारची दृष्टीस पडते याविषयीं थोडेसें निरूपण करणें अवश्य आहे. प्रथमतः लोकव्यवहारांत हा प्रकार सर्वांच्या सहज ध्यानांत येणारा आहे कीं, एकंदर लोकांची स्तुतीपेक्षां निंदेकडे फारच विशेष प्रवृत्ति असते. कोणीं अंमळ वर डोकें काढलें न काढलें, कोणाची अंमळ कोठें प्रशंसा झाली न झाली, कीं लोकांस तें सहेनासें होऊन लागलींच चोहोंकडे त्याचे निंदक उभे रहातात. ह्मणूनच पुष्कळ मोठमोठ्या ग्रंथकारांनीं व विशेषतः बहुतक सर्व कवींनीं

आपआपल्या ग्रंथांच्या प्रस्तावनांतून खलांचें माहात्म्य वर्णिलेलें आढळतें. असो; तर यावरून स्पष्टच आहे कीं, टीकेचें सामान्य स्वरूप म्हटलें म्हणजे मूळ ग्रंथाचें दूषण किंवा खंडन हेंच होय. दुसऱ्याची स्तुति करण्याकरितां कोणी एखाद्या ग्रंथावर विवेचन केलें आहे असें बहुधा कांहीं आंत मतलब असल्याविना झालेलें सांपडणार नाहीं. आतां एकंदर सगळ्या लोकांचा दुसऱ्यास नांवें ठेवण्याकडेच एवढा रोंख कां दिसून येतो याविषयीं जर अंमळ विचार केला तर त्याचें कारण स्वाभिमान होय हें तेव्हांच लक्षांत येईल. ज्याच्या त्याच्या मतें शहाणा काय तो मी, माझेंच सर्वांनीं गुणवर्णन करावें, असेंच बहुधा असतें; यास्तव दुसऱ्याची जेवढी प्रशंसा झाली तेवढी आपल्यांतून वजाच झ ली असें मनाच्या कोतेपणामुळें त्यास वाटतें. यामुळें दुसऱ्याच्या निंदेस जो तो बहुधा सतत जपलेला असतो. कित्येक जे खरोखरच बुद्धिमान व शहाणे म्हणून निवडले असतात त्यांची अशी समजूत असते कीं, दुसऱ्याच्या करण्यास आपण सर्वथैव चांगलें म्हणून त्यांत कांहींच दोष काढला नाहीं, तर आपला थोरपणा तो काय राहिला ? यास्तव अलीकडील नव्या सुरू झालेल्या युनिव्हर्सिटीच्या वगैरे परीक्षांतून परीक्षकांचा जसा प्रकार आढळतो, कीं, त्यांच्या हातून भरपूर गुण म्हणून पडायाचेच नाहींत,—दहा पांच तरी स्वतःच्या गौरवास्तव त्यांतले एकीकडे शाबूत काढून ठेवायाचेच—तसेच हे टीकाकार करतात. स्वतः सुद्धां जी ग्रंथरचना हातून घडायाची नाहीं तिची परीक्षा करतांनाहि कांहीं गुणांचा उल्लेख करून शेवटीं कांहींना कांहीं तरी खरीं किंवा खोटीं कुलंगडीं काढून स्तुति आणि निंदा शेवटीं सरासरी समानच करून टाकतात ! हा प्रकार वरच्याहून पुष्कळ बरा, पण टीकाकारांच्या सत्यनिष्ठेस याचे योगानें कलंक लागतो हें उघड आहे. दुसरे कोणी असे असतात कीं त्यांस गुण व दोष दोन्ही दाखवावे लागतातच; पण दोषांवर पांडित्य करणें त्यांस जितकें आवडतें तितकें गुणांवर विवरण करणें अगदीं आवडत नाहीं. यास्तव गुणांचा उल्लेख सरासरी कांहीं थोडासा करून मग दोषांवर ते यथास्थित घसरतात. हा प्रकार अर्थात्च द्वेषबुद्धीशिवाय किंवा मत्सरी स्वभावाशिवाय घडत नाहीं. पण कसाहि असला तरी सरळ स्वभावाच्या मनुष्यास तो खचीत पसंत पडणार नाहीं. कोणाच्या स्वभावांत पक्षपातीपणाचें इतकें प्राबल्य असतें, व प्रकृति इतकी हेकटपणाची असते कीं, त्यांस एक गुण तर गुणच, नाहीं तर दोष तर दोषच, याखेरीज कांहीं बिलकूल दिसत नसतें. त्यांच्या आवडीचे किंवा त्यांच्या मतासारखे जे ग्रंथ असतील त्यांत त्यांस सर्वच गुणमय दिसून दोषाचा लवलेशहि सांपडायाचा नाहीं; आणि वरच्या उलट ठिकाणीं सर्वच दोषरूप भासून गुणाचा लेशहि सहन व्हावयाचा नाहीं. अशा टीकाकारांच्या ठायीं अर्थात्च दुराग्रह म्हणजे अगदीं जागरूक असतो; कारण कोणतीहि वस्तु केवळ गुणमय किंवा केवळ दोषमय

असावी हें सृष्टिनियमासच मुळीं विरुद्ध होय. तेव्हां अशा टीकाकर्त्यास सहजच सत्याचा उपमर्द करून गुणांस दोषांचें व दोषांस गुणांचें रूप देण्याची खटपट करावी लागते. असो; तर याप्रमाणें बहुधा ग्रंथांवरील टीकांचे प्रकार अनेक दृष्टीस पडतात.

१३. वर जे प्रकार सांगितले ते अहंकारादि दुष्ट मनोवृत्तींचीं फलें असल्यामुळें अर्थात्च थोडेबहुत सर्व दूषणार्हच होत. आतां खऱ्या टीकाकर्त्याचें स्वरूप येथें थोडक्यांत सांगतों. ज्या ग्रंथावर टीका करावयाची त्याचें पूर्णज्ञान व त्याशीं सहृदयता हे गुण त्याच्या अंगीं अगोदर हवेत हें वर सांगण्यांत आलेंच आहे. पण यांहून दुसरे जे गुण सांगितले ते तर टीकाकर्त्यास अधिकच अवश्य होत. त्याच्या योगानें टीकेस खरी शोभा व खरी योग्यता येते; व ती सर्वांस मान्य होते. फार तर काय पण ग्रंथकर्ता जर समंजस असला तर तोहि तीस मान डोलवल्यावांचून रहाणार नाहीं. ही टीका म्हणजे अशी कीं, ती केवळ तिऱ्हाईतपणें व निःपक्षपातपणानें केली असून केवळ सत्यनिरूपणाखेरीज तींत टीकाकाराचा दुसरा बिलकूल कांहींएक उद्देश नाहीं असें स्पष्ट दिसलें पाहिजे. टीकाकारानें काम गुण व दोष दोन्हीहि दाखविण्याचें आहे; यास्तव ते दोन्ही प्रगट करून त्यांचा उल्लेख कशाचीहि लेशमात्रहि अत्युक्ति न करतां त्यानें केवळ प्रांजलपणें केलेला असावा. दोष दाखवितांना मूळ ग्रंथकर्त्यावर शेखी मिरवण्याची आपली हौस आहे असें टीकाकर्त्याकडून जितकें न दाखवेल तितकें बरें; तसेंच गुण दाखवितांना तो त्याचा मित्र असल्यास त्याची फाजील प्रशंसा करणें हेंहि अगदीं वाजवी नाहीं. तर जे दोष असतील ते उघड निर्भीडपणानें स्पष्ट बोलून जाऊन जे गुण असतील त्यांबद्दल ग्रंथकर्त्याची त्यानें वाजवी रीतीची तारीफ करावी. असो; एकंदरींत ज्याप्रमाणें खरा न्यायाधीश शत्रुमित्रभाव अगदीं विसरून जाऊन केवळ उदासीनपणें कैदीचा इनसाफ करतो; किंवा खरा व्यापारी खऱ्या वजनांनीं गिऱ्हाइकाच्या पदरांत चोख माप घालतो; किंवा खरा उत्कृष्ट चितारी जसा मूळचा चेहरा असेल तसाच हुबेहुब तसबीरींत उतरून देतो; त्याप्रमाणेंच ग्रंथावर टीका करणारा असावा !

१४. येथवर प्रस्तुत विषयाचें बहुतेक विवेचन झालें. आतां या ठिकाणीं हल्लीं एकंदर लोकांत प्रकृत विषयाच्या संबंधें ज्या कित्येक विलक्षण समजुती नजरेस येतात त्याविषयीं थोडेसें लिहिणें इष्ट वाटतें. हें लिहिणें कांहीं अंशीं याच पुस्तकाच्या संबंधानें येईल. यास्तव या गोष्टीबद्दल आमच्या समंजस वाचकांची अगोदर क्षमा मागणें अवश्य आहे. या समजुतींपैकीं पहिली ही मोठी समजूत दृष्टीस पडते कीं, जो दुसऱ्याचे दोष काढतो तो तसें अहंपणानें फुगून जाऊन किंवा द्वेषबुद्धीनेंच केवळ करतो; यास्तव तो मोठा गर्विष्ठ व दुष्ट मनुष्य असावा. ही समजूत होण्यास कारणें कोणतीं झालीं आहेत हें मागील लेखावरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत आलें

असेलच, पण ही समजूत नेहमीं खरी असायचीच असा कांहीं नियम नाहीं. अगदीं निकट संबंधाच्या व सारख्या स्वभावाच्या लोकांतहि मतभेद हरहंमेश दृष्टीस पडतोच, व तो पडला असतां कांहीं विलक्षण आश्चर्याची गोष्ट झाली असें होत नाहीं, याविषयीं गेल्या सालच्या शेवटच्या अंकाच्या शेवटीं कांहीं विवेचन केलें आहे, त्यावरून आमच्या वाचकांची यासंबंधें खात्री झाली असेलच. यास्तव त्यावर येथें आणखी विस्तार करण्याची गरज नाहीं. इतकेंच सांगतों कीं, वरील दोषविवेचन हें वरील दोन हेतूंवरून होण्याचा जसा संभव आहे तसेंच पण तें केवळ सत्यनिष्ठेपासूनहि संभवतें. यास्तव तसा लेख लिहिणारावर वरील दोन मनोवृत्तींचा आरोप निखालसपणें करणें ही कांहींशी दांडगाईच होय. हें एक झालें; दुसरें असें कीं, ज्यानें गर्वानें किंवा दुष्टबुद्धीनें दुसऱ्याची विनाकारण निंदा केली, त्यावर तोच कडाका उठविण्यास त्या निंदिलेल्या मनुष्यास किंवा त्याच्या कैवाऱ्यास कोणीं मनाई केली आहे? त्याच्या निंदेस आपण पात्र नाहीं असें ज्यास वाटत असेल त्यानें तो दोषारोप आपणावरून न उडवितां कां स्वस्थ बसावें? तसें न केलें तर आपण त्या सर्व दूषणांस कबूल आहों असें लोक समजतील हें त्यास कळत नाहीं काय? तर याप्रमाणें द्वेषमूलक निंदेपासूनहि यत्किंचित् सुद्धां अनर्थ होण्याचा बिलकूल संभव नाहीं हें उघड आहे. असो; दुसरी समजूत अशी कीं, आपणांहून जे थोर आहेत त्यांचे दोष काढण्यास आपणांस अधिकार नाहीं; ही समजूत आमच्या जुन्या भोळ्या भाविक लोकांची जर असती तर तिचा आह्मांस मोठासा चमत्कार वाटला नसता. कारण वाडवडीलांविषयीं वगैरे आमच्या लोकांची पूज्यबुद्धि किती दृष्टीस पडते हें सर्वांस विदित आहेच. पण जुन्या वेड्या कल्पनांच्या दास्यांतून नवीन विद्वत्तेनें आपणास मुक्त केलें ह्मणून जे आपणांस परम धन्य मानतात, आजपर्यंत हिंदुस्थानांत इतके राज्यकर्ते होऊन गेले पण सांप्रतच्या दयाळू सरकाराप्रमाणें मनाचें स्वातंत्र्य कोणीहि प्रजेस दिलें नाहीं ह्मणून जे त्यांचे पोवाडे गातात, आपल्या थोर पूर्वजांची चारगटपणानें हवी तशी निंदा करण्यास ज्यांनीं कधींच मागें पुढें पाहिलें नाहीं, आमच्या प्रभूचा धर्म शांतीचा सागर असून तो जबरदस्तीनें नव्हे तर लोकांचीं मनें वळवूनच वाढविण्याची आह्मांस आज्ञा आहे ह्मणून जे चोहोंकडे डांगोरा पिटीत आहेत, त्यांनींच मेकाले, मिल्ल सारख्या ग्रंथकारांची निंदा वाचतांच अंगावर शहारा आणून कानांत बोटें घालावीं, डाक्टर विलसन सारख्यांस कोणत्याहि संबंधानें नांव ठेवणें हें केवळ सहावें महापातकच मानावें, आपल्या महाराणी साहेबांचे पायीं तिच्या सर्व प्रजेनें आपली धर्मनिष्ठा, सत्यप्रीति, व ईश्वरदत्त सदसद्विवेचनशक्ति वगैरे सर्व वाहून टाकावें असा प्रसिद्धपणें उपदेश करावा ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे! पण वरील अधिकार मनुष्यमात्रास आहे कीं नाहीं याचा निर्णय जो क्षणभर विचार करील त्यासहि

सहज समजण्यासारखा आहे. केवळ पोरबुद्धि टाकून मनुष्यांच्या गुणागुणांविषयीं यत्किंचित्हि विचार करण्याचें ज्याच्या बुद्धीस सामर्थ्य आलें, त्यास जगाचें अवलोकन उगीच थोडेंसें केल्यावरहि लक्षांत येणारें आहे कीं, सर्व गुणांनीं संपन्न असा मनुष्य एकहि सांपडणार नाहीं; तसेंच ज्यांत लेशमात्रहि दोष आढळणार नाहीं असाहि सांपडणें केवळ अशक्य होय. दोषांचा सर्वथा अभाव हा एक परमेश्वराचे ठायीं मात्र संभवतो. त्याची मनुष्यानें स्पृहा करणें, किंवा त्याचें वास्तव्य आपले अंगीं मानणें, यासारखें भयंकर मूर्खत्व कोणतें नाहीं ! मग असें जर स्पष्ट आहे तर कोणी केवढाहि थोर असला तरी त्याचे ठायीं कांहीं ना कांहीं तरी दोष दिसल्यास व ते कोणी काढल्यास नवल कसचें ? पण कोणी कदाचित् ह्मणतील कीं, मोठ्यांच्या अंगीं जरी दोष असले तरी ते लहानानें काढूं नयेत. हें ह्मणणें ह्मणजे चंद्रास कलंकी ह्मणूं नये, सूर्यच्या बिंबावरचे काळे डाग पाहूं नयेत, असें ह्मणण्यासारखेंच असमंजस झालें. वरील दोन ज्योतींचा प्रकाश त्यांच्या डागांनीं कमी होतो काय ? किंवा त्या डागांचा नकाशा जे ज्योतिषी काढतात ते तसें करण्यानें त्यांच्या तेजाची निंदा करूं पहातात काय ? कांहीं नाहीं. त्यांचा उद्देश त्यांचें यथावत् स्वरूप प्रगट करावें इतकाच काय तो असतो. पण इतकेंच नव्हे. हें महद्दोषविवरण वर सांगितल्याप्रमाणें केवळ निदोष तर आहेच; पण शिवाय तें अत्यंत उपयोगाचेंहि होय. एक उपयोग तर सत्याचा लाभ हा उघड आहेच. दुसरा असा कीं, त्याच्या योगानें मनुष्याच्या वृथा गर्वाचें उत्कृष्ट खंडन होऊन परमेश्वराच्या पूर्णत्वाकडे चांगलें लक्ष लागतें. तें असें कीं, आपण ज्यांस फार फार थोर ह्मणतों त्यांच्या ठिकाणींहि जेव्हां अपूर्णत्व दृष्टीस पडतें, तेव्हां बाकीच्या यःकश्चित् क्षुद्र मनुष्यांस आपला वेडेपणाचा गर्व सहजच समूळ टाकून द्यावा लागतो, आणि सर्व गुण व ऐश्वर्य हीं सृष्टिकर्त्या देवाच्या ठिकाणीं मात्र आहेत अशी मनाची खात्री होऊन जाते. आणखी तिसरा उपयोग असा आहे कीं, थोरांच्या दोषांपासून जो एक मोठा अनर्थ होतो तो बंद होतो. कोणी चतुर इंग्रेज ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं, 'मोठ्यांच्या ठायीं असणाऱ्या दोषांसारखें भयंकर कांहीं नाहीं'. उघडच आहे कीं, मनुष्याचा स्वभाव दुसऱ्याचें अनुकरण करण्याचा असल्यामुळें मोठ्यांच्या दुर्गुणांचा कित्ता घेणारे हजारों निघतात, आणि त्या दुर्गुणांतहि कांहीं विलक्षण प्रतिष्ठा आहे असें पुष्कळांस वाटूं लागतें. तेव्हां त्या दुर्गुणांचेंच एकदां यथास्थित खंडन झालें असलें ह्मणजे ते पुढें लोकांस तादृश बाधक होत नाहींत. असो; तर याप्रमाणें कोणी केवढाहि मोठा असला तरी त्याचे दोष काढण्यांत कांहीं गैर नसून तसें करणें अत्यंत उपयोगाचें आहे असेंहि पण आह्मीं वर दाखविलें. तिसरी समजूत अशी कीं, वरील दोषाविष्करणानें त्यांचा उपमर्द होतो. हीहि समजूत अगदीं खोटी आहे. वर जें सांगितलें आहे कीं मनुष्यानें आपण सर्वगुणसंपन्न आहों

असा अभिमान बाळगणें हें अत्यंत मूर्खत्व होय, हें जर खरें आहे, तर आपल्या दोषांचें वर्णन सहन न होणें हा तरी वरचाच प्रकार झाला. जो मनुष्य आपल्या गुणांची लोकांनीं प्रशंसा करावी असें इच्छितो, त्यानेंच आपल्या दोषांची निंदा ऐकण्यासहि कां सिद्ध नसावें ? आपले गुण तेवढे काढून दोष तेवढे लोकांनीं झांकून ठेवावे असें त्यास वाटतें काय ? व जनाची प्रवृत्ति ज्यानें यत्किंचित्हि अवलोकन केली असेल तो अशी वेडी आशा तरी बाळगील काय ? शिवाय आपण जसे दुसऱ्याचे दोष काढण्यास काडीइतकाहि अनमान करीत नाहीं, तसेंच दुसऱ्यांनींहि आपणाविषयीं कां करूं नये ? सर्वांस सर्वांच्या गुणदोषांची चर्चा करण्यास अर्थात् पूर्ण अधिकार आहे; इतकेंच मात्र कीं, कांहीं गोष्टी उघडपणें बोलून दाखविल्या असतां चालतात, आणि कांहीं चालत नाहींत. बरें; पण ही बऱ्यावाईटाची निवडानिवड तरी खरोखरी पहातां जगाच्या सद्वर्तनास अत्यंत इष्टच नव्हे काय ? अर्थात् इष्टच आहे; आणि तिच्या हितावहत्वाविषयीं एक स्वतंत्र निबंध लिहितां येईल. यास्तवच या जनचर्चेचा ज्ञाते पुरुष कधीं त्रास मानीत नाहींत; आणि नसत्या गुणांबद्दल आपली उगीच प्रशंसा झाल्यापेक्षां नसत्या दोषांबद्दल झालेली निंदाहि त्यांस एकवार पतकरेल, इतका त्यांस वावग्या स्तुतीचा कंटाळा असतो. मग स्वतःच्या यथार्थ दूषणाबद्दल त्यांस राग तर कोठचा ? असो; तर वरील कारणांवरून सहज ध्यानांत येईल कीं, खरोखर जे आपल्या ठायीं दोष आहेत ते दाखविल्याचा सुज्ञ मनुष्यास कधीं राग येणार नाहीं; आणि ते दाखविले असतां कोणाचा उपमर्द होतो हींहि अगदीं खोटी समजूत आहे.

पण ग्रंथकर्त्यास तर वरील गोष्ट विशेषच लागू पडते. एरवीं व्यवहारांत नातीं, स्नेहसंबंध, भीडमुरवत वगैरे प्रकारांमुळें आपणांस कोणाविषयीं जें वाटेल तें अगदीं यथार्थ असतांहि स्पष्ट बोलून दाखवितां येत नाहीं. तसाच सरकारी नात्यानेंहि मनुष्य बांधला जातो. कोणाचें कोणाविषयीं मत कितीहि वाईट असलें; रागानें, मत्सरानें, तिरस्कारानें वगैरे मनुष्य कितीहि आंतल्या आंत जळफळत असला, तरी सरकारी संबंधास्तव वरकरणी तरी उभयपक्षीं गोडीगुलाबी ठेवावी लागते. तसेंच कायद्याचेंहि बंधन. प्रत्यक्ष हाडवैरी जरी असले, एकीकडे गांठ पडली असतां एकमेकांच्या उरावर बसण्यासहि जरी चुकले नाहींत, तरी त्याच मनुष्यांस चारचौघांत आपआपलीं मतें स्पष्टपणें बोलून दाखवितां येणार नाहींत. कां तर लायबेलच्या फिर्यादीचा धाक ! पण कोणी मनुष्य ग्रंथकाराच्या नात्यानें जगापुढें आला कीं वरील मान सर्व अगदीं फिरून जातें. तेथें लपण्यास मग कांहीं सांपडत नाहीं. तो घरचा मोठा संपन्न असो; मोठा हुद्देदार असो; मोठा विद्वान् असो; मोठ्या अब्रूचा मनुष्य असो; जो त्यावर हत्यार उचलील, त्यास त्याच्या कशाचेंहि तिळमात्र सुद्धां भय बाळगण्याची गरज नाहीं. त्याचे दोष जे त्याच्या बुद्धीनें वाटतील ते खुशाल निर्भीडपणें सर्वांस जाहीर

करून त्याची हवी तशी फजिती उडविण्यास त्यास पूर्ण अखत्यार असतो. आतां हें खरें कीं असें आहे ह्मणून एखाद्याचा विनाकारण बभ्रा करणें, व भलभलतीं बळेंच दूषणें लावून त्याची योग्यता लोकांत कमी होईलसें करूं पहाणें हें केवळ नीचपणाचें व अत्यंत अश्लाघ्य असें कृत्य होय. हें करण्यास प्रवृत्त होणारे लोक पुष्कळ आढळतात खरे; पण यावरून वरील अधिकार सर्वांस असणें हें वाईट आहे असें कदापि सिद्ध व्हावयाचें नाहीं. सर्व गोष्टींचा चांगलेवाईटपणा ज्याच्या त्याच्या बऱ्यावाईट कृतीवर असतो; त्याचप्रमाणें वरील अधिकाराचीहि गोष्ट होय. सत्यप्रिय व समंजस जे असतील त्यांच्या हातून त्याचा चांगला उपयोग होईल; आणि हेकटखोर अथवा दुष्ट असतील त्यांच्या हातून वाईट होईल. असो; आतां हा अधिकार सर्वांस कशावरून आला असें जर कोणी पुसेल, तर त्याचें उत्तर थोडें आहे. तें इतकेंच कीं, बाजारांतील जिन्नस चांगला वाईट ठरवणें हा हक्क जसा हवा त्यास आहे, तसाच ग्रंथाचें गुणदोषविवेचन करण्याचाहि साऱ्या वाचकांस आहे. वरील साम्य आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् उपहासास्पद वाटेल; पण वस्तुतः पहातां ग्रंथकाराची आणि दुकानदाराची गोष्ट अगदीं सारखी आहे. अलीकडे तर छापखाने निघाल्यापासून वरील सादृश्य अधिकच दृढ झालें आहे. पण पूर्वीपासून जरी पाहिलें तरी सगळी दुनिया हाच कोणी बाजार, यांत आपला ग्रंथरूप माल घेऊन कीर्तिरूप द्रव्याच्या आशेनेंच सर्व ग्रंथकार येतात असें ह्मटल्यास कांहीं हरकत नाहीं. मग असें जर आहे तर बाजारांत दुकानदारांची जी दशा होते तीच ग्रंथकारांच्या कपाळीं आल्यास त्यांनीं कां खेद मानावा ? ह्मणजे हजारों गिऱ्हाईक आणि त्यांचीं हजारों बोलणीं, तीं सर्व वरील दुकानवाल्यास निमूटपणें सोसणें जसें भाग पडतें, त्याप्रमाणेंच लोकांचे आपल्या ग्रंथांवर नानाप्रकारचे अभिप्राय ग्रंथकारानें निमूटपणें ऐकून कां घेऊं नये ? अथवा दुसरा दृष्टांत. रंगभूमीवर नाटकपात्र आलें असतां त्याच्या अभिनयाची, किंवा एखाद्या सभेंत कोणी वक्ते उठून त्यांनीं भाषणास आरंभ केला असतां त्यांच्या वक्तृत्वाची, परीक्षा करण्याचा अधिकार सर्व श्रोत्यांस नाहीं काय ? आणि समजा कीं, वरील दोघेजण आपआपल्या कलेंत अत्यंत निपुण असतांहि सगळ्यांनीं टाळ्या पिटल्या व हुर्रेवडी करून दिली, तरी त्याबद्दल आपली मानहानि झालीशी वाटून त्या दोघांनीं सर्व लोकांवर बेअब्रू केल्याची जर फिर्याद केली तर तें त्यांस किती शोभेल व कोर्ट तरी त्यांस काय जबाब देईल ? तर या वरील तीन दृष्टांतांवरून आमच्या वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल कीं, कोणाच्याहि ग्रंथांवर कोणास हवें त्यास हवा तसा अभिप्राय प्रगट करण्याची पूर्ण मोकळीक आहे.

वरील गोष्ट इतकी स्पष्ट असतांहि पुष्कळ लोकांस व त्यांतून विद्वान् व ज्ञाते ह्मणविणाऱ्यांपैकींहि कित्येकांस, चांगलीशी कळत नाहींशी दिसते. कांहीं वर्षांपूर्वी

'विविधज्ञानविस्तारा'च्या एक अंकांत मोरोपंताविषयीं कांहीं मजकूर लिहिला होता. त्यांत लिहिणारानें त्या कवीवर कांहीं खरीं व कांहीं केवळ शुष्क अशीं दूषणें दिलीं होतीं. तीं त्या कवीच्या भजकांस न आवडून त्यांपैकीं एकानें एके पत्रांत असा मजकूर प्रसिद्ध केला होता कीं, पंतांचे कोणी पुरस्कर्ते जर या वेळेस असते तर त्यांनीं वरील लिहिणारावर बेअब्रूबद्दल फिर्याद ठोकली असती. पण तसे नसल्यामुळें हवें त्यानें त्यांवर हवे तसे दोषारोप करावे अशी स्थिति झाली आहे. ही बेडी समजूत त्या लिहिणारास वरील गुन्ह्याचें स्वरूप पुरतें माहीत नसल्याच्या योगानें जडली हें उघडच आहे. असो; वरच्याप्रमाणेंच आमच्या पुस्तकाच्या दहाव्या अंकांत जीं कांहीं मराठी कवींस आह्मीं दूषणें दिलीं आहेत तीं पाहूनहि कित्येक नाखुष झाले असें आमच्या कानीं आलें आहे. पण गुणदोषविवेचनाच्या अधिकाराविषयीं वगैरे जो मजकूर वर लिहिला तो सगळा लक्षांत आणला असतां आह्मीं केलें तें गैर केलें अशी समजूत थोड्यांचीच होईल, असा आह्मांस भरंवसा आहे. पण वरील अज्ञान आमच्या आठव्या अंकाच्या खेपेस तर आमच्या नजरेस पुष्कळच आलें. कित्येकांनीं मोठ्या गंभीर मुद्रेनें आह्मांस लायबेलचा आक्ट वाचण्यास सांगितलें; कित्येकांनीं असा धाक घातला कीं, हें जर सरकारच्या कानीं गेलें तर मोठें कठिण जाईल; कित्येकांस असें भय पडलें कीं, त्यांतील मजकूर लिहिण्यास आह्मांस कोठून बुद्धि सुचली कोण जाणे; कित्येकांनीं पुस्तक बंद केलें जाईल असाहि भविष्यवाद केला! आमच्या दयाळू व सत्याभिमानी ख्रिस्ती बंधूंनीं तर आह्मांवर जी तरवार उपसली ती तर अतिच भयंकर! एखाद्या लुच्च्याची ठकविद्या जाणून त्याची पुंगी कोणीं बंद केली असतां त्याचा जसा माथा फिरून जावा त्याचप्रमाणें लोकांत ज्ञानाचा उदय करणारे व सत्याचा दीप पाजळणारे आमचे बंधु अगदीं खवळून गेले, आणि त्यांच्या शुभवर्तमानावर जे आह्मीं कांहीं आक्षेप काढले ते नाहींसे करून ख्रिस्ती धर्माचें सत्यत्व प्रतिपादन करण्यास जो त्यांनीं खटाटोप केला त्यास भगीरथ प्रयत्न ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं:—इतकेंच मात्र कीं, वरील शब्दांत कार्याच्या सिद्धीचा जो अर्थ गर्भित होतो तो बरीक वरील ठिकाणीं लागू पडत नाहीं! असो; एकंदरीत वरील प्रसंगावरून आमचे लोकांस आपले हक्क कितपत समजतात, व एकदां कायम होऊन बसलेलीं जीं मतें तीं सोडण्यास केवढा आयास पडतो, हें स्पष्ट कळून येतें.

आह्मीं अद्याप लायबेलचा आक्ट वाचला नाहीं, व पुढेंहि वाचूं कीं नाहीं याचा संशयच आहे; पण आह्मांस एवढें स्पष्ट कळतें आहे कीं, जर मेकाले, जॉनसन वगैरे हजारों मोठ्या थोर मानलेल्या ग्रंथकारांनीं आपआपल्या ग्रंथांतून मोठमोठे कवि, इतिहासकार, तत्त्वज्ञ इत्यादिकांविषयीं हवा तेवढा कडक मजकूर लिहिला आहे व तो सर्वांस मान्य आहे; जर पोप कवीनें खुद्द बेकनला उद्देशून,

"The greatest, brightest, meanest of mankind."

"सर्व मनुष्याहून अति बुद्धिमान्, अति चतुर, आणि अति नीच!" असें झटलें असताहि जर पोपवर बेअब्रू केल्याचा गुन्हा येत नाहीं, व त्या जगद्विख्यात अद्वितीय पंडिताची विद्वान् लोकांतील कीर्तिहि लवमात्र सुद्धां कमी होत नाहीं; तर मेकाले, मिल्ल यांसारखे ग्रंथकार केवढेहि मोठे असले, व त्यांस आह्मीं कितीहि शिव्या दिल्या असल्या, तरीहि पण वरच्याप्रमाणेंच कोणतीहि गोष्ट ठरत नाहीं. तसेंच पाद्री लोकांनीं आज पांचपन्नास वर्षें हिंदु व इतर धर्मांविरुद्ध सहस्रावधि अप्रयोजक ग्रंथ जर आजपर्यंत प्रसिद्ध केले आहेत, व अजूनहि 'ज्ञानोदया'सारख्या कपींची बडबड सतत सुरूच आहे, तर आमच्याच लोकांची लेखणी कोणी धरीलसें वाटत नाहीं. पण हेंचसें काय? आमच्या 'सन्मान्य' पाद्री बंधूंस खुद्द इंग्लंडांतच ख्रिस्ती धर्मावर लोकांचा केवढा विश्वास आहे हें माहीत नाहीं काय? टॉमस पेन, हासलम वगैरे ग्रंथकारांनीं 'पवित्रशास्त्रा'ची केवढी धूळधाण करून दिली आहे हेंहि त्यांस ठाऊक नसेल काय? ह्यूम, गिबन, दोघे मिल्ल हे विलायती धर्माचे केवढे शत्रु होते हें कोणास माहीत नाहीं? नुकतें कांहीं महिन्यांपूर्वीच माजी जॉन स्टुअर्ट मिल्ल यांचे 'धर्मावर तीन निबंध' छापून ते लक्षावधि लोकांच्या पुस्तकालयांत जाऊन पडले हें कोण जाणत नाहीं? आमच्या 'ज्ञानोदय' महाराजांनीं मेकाले व मिल्ल या दोघांस हात देऊन सांवरलें, पण दोघांचेहि ग्रंथ जर त्यांनीं उगीच वरवर तरी वाचले असते, तर त्यांस कळून आलें असतें कीं, यांची जगाच्या तारणाऱ्या प्रभूवर मोठीशी भक्ति होती असें नाहीं. असो; तिसरा मोठा आरोप बंडवाल्यांच्या नांवांचा उल्लेख. गेल्या वर्षाच्या बाराव्या अंकांत एका इंग्लिश इतिहासकाराचा तात्या टोप्याविषयीं जो उतारा दिला आहे, व त्या शूर पुरुषाची खुद्द रसेल साहेबांनीं[1] केलेली मोठी तारीफ त्यांत जी मोडी अक्षरांनीं लिहिली आहे, ती वाचून आमच्या पाद्री बंधूंशिवाय बाकी सर्वांची खात्री होईल कीं, 'महादुष्ट बंडवाल्यां'च्याहि योग्य स्तुतीनें इंग्रेजांची लेखणी ही केवळ विटाळतेच असें नाहीं; मग एतद्देशीय लिहिणाराची तर नाहींच नाहीं! असो; तेव्हां एकंदरींत सारांश हाच कीं, कोणी केवढयाहि योग्यतेचा ग्रंथ-

---

१. हा नामांकित ग्रंथकार जगद्विख्यात 'लंडन टैम्स' पत्राचा बातमीदार होता. आदल्या वर्षीं क्रिमियाच्या लढाईचा वृत्तांत त्या पत्रास पोंचवून बंडाच्या सालीं हा हिंदुस्थानांत आला होता. येथील वृत्तांताहि या साहेबानें अगदीं चोख रीतीनें आपल्या देशीं कळविला. असो; एकंदरींत आमच्यावर राज्य करणाऱ्या लोकांच्या अनेक सद्गुणांपैकीं प्रत्यक्ष शत्रूचीहि वाहवा करण्याची जी औदार्यान्वित सत्यप्रीति त्यांच्यांत दिसून येते ती परम आश्चर्यकारक खरी! आणि आमच्या मेकॉले साहेबांप्रमाणें किंवा पाद्री बंधूंप्रमाणें सगळेच सत्यनिष्ठ नाहींत हेंहि मोठयाच आनंदाची गोष्ट होय!

कार असला तरी त्यावर हवी तशी चर्चा करण्यास हवा त्यास अधिकार आहे; आणि जोंपर्यंत आपण कोणाच्या घरगुती वगैरे गोष्टी न काढतां केवळ लौकिक संबंधानें कोणाविषयीं बोलत आहों, तोंवर त्याची हवी तशी शोभा केल्यास कांहीं गुन्हा होत नाहीं. इतकें मात्र खरें कीं, एवढें जो धाडस करील त्यानें त्याविषयीं अगोदर आपणापाशीं तशीच कडेकोट तयारी करून ठेविली पाहिजे; आणि लोकांचा द्वेष जो त्याजवर येईल त्यानेंहि आपण कचरणार नाहीं असा मनाचा पक्का धडा करून ठेवला पाहिजे.

१५. असो; आतां सरते शेवटीं वर सांगितलेल्या गुणांनीं विशिष्ट असे टीकाकार निपजले असतां भाषेचें व तद्द्वारा लोकांचें हित कोणतें होतें तें सांगतों. चांगलें वाईट अशी कांहींच निवडानिवड न करतां हवें तें अन्न खाल्लें असतां जसें शरीराचें पोषण होणें एकीकडेच राहून उलट्या त्यास व्याधि मात्र जडतात त्याचप्रमाणें ग्रंथवाचनाचीहि गोष्ट होय. जे ग्रंथ खरोखर वाचण्यालायक असतील,—ह्मणजे ज्यांची भाषासरणी उत्तम, विषयप्रतिपादन प्रौढ व सरस, ज्यांपासून मनोरंजन किंवा उपदेश अथवा दोन्हींहि एकदम प्राप्त होतात; असेच वाचणारांनीं वाचावे. पण हें होण्यास वरच्यासारखे ग्रंथ कोणते हें अगोदर अवश्य समजलें पाहिजे. हें ज्ञान वाचणारास प्रथमतः मुळींच नसतें; तें अनेक ग्रंथांचें बहुतकाल जेव्हां सतत परिशीलन करावें तेव्हांच प्राप्त व्हावयाचें. तेव्हां अमुक ग्रंथ वाचण्यासारखा आहे आणि अमुक नाहीं हें ज्ञान वाचकांस करून देण्यास अर्थातच निराळेच लोक पाहिजेत. हे लोक टीकाकार होत. मागील काळच्या श्रीमंतांच्या घरीं जसे चोखे वाळगलेले असत, कीं त्यांनीं पदार्थ वाढायाला आला असतां अगोदर आपण चोखून तो नीट उतरला असला तरच आपल्या यजमानांकडे जाऊं द्यावा, त्यांच्यासारखेंच कांहीं अंशीं टीकाकर्त्यांचें काम होय. ग्रंथकार हे मुदपाकांतील पाकाध्यक्षांसारखे होत, आपली सर्व करामत खर्च करून पदार्थ तयार करण्याचें त्यांचें काम; एकंदर वाचणारे लोक हे पाटावर बसलेल्या यजमानासारखे, त्यांस जातीनें पदार्थांचा बरेवाईटपणा फार करून कळायाचा नाहींच; आणि ग्रंथांचे गुणदोषपरीक्षक हे अर्थातच वर सांगितलेल्या चोखेमंडळीसारखे; यांच्या सर्वानुमतें किंवा बहुमतें जो पदार्थ पसार होईल तो मग पुढें खाशांकडे जायचा. असो; तर याप्रमाणें चांगले गुणदोषविवेचक असले ह्मणजे एकंदर लोकांचें त्यापासून एवढें हित होतें. हें एक झालें ह्मणजे याच्या पोटीं दुसऱ्याहि अनेक गोष्टी आल्या. चांगले ग्रंथकार निवडले गेले ह्मणजे तशांसच उत्तेजन मिळून त्यांच्या हातून उत्तरोत्तर भाषेची सुधारणा होत जाते. ते तिचें व्याकरण नीट बसवून तिजमधील अव्यवस्था मोडून टाकतात, आणि शेंकडों नवे शब्द व नवे प्रयोग वगैरे प्रचारांत आणून तिची अभिवृद्धि करतात. याप्रमाणें तिच्या अर्जित दोष ए-

कदां आरंभ झाला झणजे कविजनपरंपरेच्या प्रसादानें तिजवर अधिकाधिक कळा येऊं लागून कांहीं काळानें अभियुक्त भाषांच्या वर्गांत मोडूं लागण्याची तिचे ठायीं योग्यता येते. ही योग्यता आली असतां ती भाषा लोकांत ज्ञानाचा प्रसार होण्यास केवढी साधनीभूत होते, व हा प्रसार देशाच्या वैभवाचें केवढें कारण आहे वगैरे गोष्टी सर्व विचारी मनुष्यांस पूर्णपणें माहीत आहेतच. असो; सरते शेवटीं हाहि एक मोठा नफा सांगितला पाहिजे कीं, निःपक्षपात व सहृदय असे ग्रंथांचे परीक्षक असले झणजे बुद्धिमान् मनुष्यांस एरवींच्या साधारण लोकांप्रमाणें मूर्ख व दुष्ट अशा धनिकांचें आर्जव करण्याची किंवा वरिष्ठ अधिकारांच्या पुढें पुढें करून पदरीं लघुत्व घेण्याची बिलकूल गरज रहात नाहीं. तर त्यांच्या बुद्धिमत्वास अत्यंत अनुकूल, उचित आणि शोभादायक जी निःस्पृहता व स्वतंत्रता ती खुशाल मिरवायास सांपडते.[1]

'टेंपेस्ट' नाटक.

करवदरसदृशमाखिलं भुवनतलं यत्प्रसादतः कवयः ।
पश्यंति सूक्ष्ममतयः सा जयति सरस्वती देवी ॥[2]

वासवदत्ता.

अंक २२--'टेंपेस्ट' नाटकावर अभिप्राय.

हें पुस्तक रा. रा. नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं नुकतेंच छापवून कांहीं दिवसांपूर्वी आमच्याकडे त्याची एक प्रत मेहेरबानीनें पाठवून दिली. तिचा आभारपूर्वक स्वीकार करून सदरहू ग्रंथाबद्दल चार शब्द लिहिण्यासारखे आहेत ते येथें लिहितों.

प्रस्तुत नाटकाचे कर्ते आमच्या वाचकांच्या माहितींतले नाहींतसें नाहीं. आ-

---

१. ही उत्कृष्ट सोय छापखाने निघाल्यापासून ग्रंथकारांस अनुकूल झाली आहे. इंग्लंडांत हिच्या योगानें संपत्तिमान् होऊन पुनः स्वतंत्र राहिलेला पहिला कवि पोप होय. यास होमरच्या महाकाव्याच्या भाषांतरानें पन्नास हजारांवर रुपये मिळून वतनवाडी बागबगीचा अशा थाटांत रहातां आलें. त्यानें झटलें आहे—

And thanks to Homer, since I live and thrive,
Indebted to no prince or peer alive !

याप्रमाणें सर वॉल्टर स्कॉट यास पंधरा लाख रुपयांची व्यापारांत ठोकर लागली असतां आपल्या कादंबऱ्यांनीं वगैरे ती त्यानें पैसानपैसा फेडून टाकली ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहेच. आपल्या महाराणीजवळचे राजकवि टेनिसन यांचीहि प्राप्ति अशीच आहे. वर्षा दोन वर्षांनीं एखादें काव्य रचावें कीं तीन चार लाखांची बेगमी !

२. "जिच्या प्रसादें करून सूक्ष्ममति होत्साते कवि अवघ्या भुवनतलास हातावरील बोराप्रमाणें पहातात ती सरस्वती देवी सर्वांस वंद्य होय !"

मच्या मालेच्या आठव्या अंकांत हिंदुस्थानाच्या व विशेषतः महाराष्ट्रदेशाच्या, इतिहासाविषयीं लिहितांना वरील ग्रंथकाराच्या एक दोन लेखांचा निर्देश करून त्यांतील एकाचा तर त्यांत पुष्कळच उपयोग झाला आहे. तसेंच वरील निबंधांतील एके टीपेंत रा. कीर्तने यांच्या मराठी लिहिण्याची तारीफ केली आहे तीहि आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच. असो; आतां प्रस्तुतच्या प्रसंगीं वरील प्रशंसेचें यथार्थत्व विशेष पूर्णपणें आमच्या वाचकांच्या लक्षांत आणून देण्याचा योग फार चांगला आहे हें पाहून आह्मांस मोठा संतोष वाटतो.

'टेंपेस्ट' ह्मणजे 'वादळ' हें नाटक शेक्सपियर कवीच्या नाटकांत उत्तम ह्मणून जीं निवडलीं आहेत त्यांपैकीं एक होय. याचा शेवट 'आथेल्लो' वगैरे नाटकांसारखा दुःखाचा न होतां संस्कृत नाटकांप्रमाणें गोड झालेला आहे. यांतील मुख्य पात्र प्रोस्पेरो, हा मांत्रिक आहे; आणि याच्या आज्ञेंत वागणारीं भूतें व पिशाचें यांच्या खेळांनीं हें भरलें आहे. यांतील स्थळ एक निर्जन बेट असून वरच्या भूतपिशाचादिकांखेरीज यांतील दुसरीं पात्रें ह्मटलीं ह्मणजे पूर्वोक्त मांत्रिक आणि त्याची एकुलती एक आवडती कन्या, मिरांदा, हीं होत. यावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, प्रस्तुत नाटकांतील विषय सामान्य नाटकांप्रमाणें लौकिक वृत्तांचा नाहीं. तो याच कवीच्या 'मिडसमर नैट्स ड्रीम' ('ऐन उन्हाळ्याच्या रात्रीं पडलेलें स्वप्न') या नांवाच्या नाटकाप्रमाणें, किंवा आमच्या कालिदासाच्या 'शाकुंतल' व 'विक्रमोर्वशी' या जगत्प्रसिद्ध नाटकांसारखा केवळ कल्पनामय आहे. असो; शिवाय या नाटकांत मिल्टन कवीच्या 'प्याराडैज लॉस्ट' नामक महाकाव्याप्रमाणें, व वरील 'शाकुंतल' नाटकाप्रमाणें, शृंगाराचा एक मोठा मौजेचा प्रकार आहे. तो असा कीं, 'प्याराडैज लॉस्ट' यांत पृथ्वीवर प्रथम निर्माण केलेल्या जोड्याचें परस्परविषयक अकृत्रिम प्रेम जसें वर्णिलें आहे, व विशेषतः आडम यास ईवच्या प्रथम दर्शनानें झालेल्या हृदयविकारांचें जसें वर्णन केलें आहे; तसेंच 'शाकुंतलां'त वनांतील लतेप्रमाणें कण्वाच्या आश्रमांत वाढलेली जी नायिका तिची दुष्यंत राजाशीं अकस्मात गांठ पडली असतां पूर्वी कधींहि न अनुभविलेल्या अशा चमत्कारिक वृत्तीचा जो तिचे ठायीं एकदम उद्भव झाला त्याची जशी काय हुबेहुब तजबीर उठवून देऊन कालिदासानें मनुष्यस्वभावाची पुरी माहीतगारी व अप्रतिम कवित्वशक्ति जशी प्रकट केली आहे; तसाच प्रकार प्रकृत नाटकांत आहे. यांतील नायिका मिरांदा ही शकुंतलेप्रमाणेंच अगदीं लहानपणापासून वरील बेटांत वाढली असून तिच्याशीं पुढें लग्न झालेला जो राजपुत्र फर्दिनांद त्याच्या पूर्वी आपल्या बापाखेरीज तिनें कोणीहि पुरुष पाहिला नव्हता. यास्तव आपल्याशीं समवयस्क व सुस्वरूप अशा वरील राजपुत्रास पहातांच आश्चर्य, प्रेमभाव, व त्याहून विशेष खोल अशी दुसरीच एक अननुभूतपूर्व अशी नाजूक मनोवृत्ति, या

सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून तिच्या हृदयांत प्रादुर्भाव झाला. असो; तर 'टेंपेस्ट' नाटकांतील मुख्य बहार ही आहे. याशिवाय राजेरजवाडे, राजदरबारी लोक, नाविक, भुतेंखेतें, या साऱ्या भिन्न भिन्न पात्रांची ज्यास त्यास शोभतशीं जीं भाषणें घातलीं आहेत त्यांवरूनहि प्रस्तुत कवीची अपूर्व बुद्धि लक्षांत येते.

येथवर खुद्द मूळ नाटकाविषयींच झालें. आतां सदर्हू ग्रंथाचें सौरस्य आपल्या महाराष्ट्र भाषेनें एतद्देशीय वाचकांस सुलभ करून देण्याचा जो रा. कीर्तने यांनीं प्रयत्न केला आहे त्यांत त्यांस कितपत यश आलें आहे याविषयीं विचार करूं.

प्रस्तुत नाटक मूळ इंग्रेजींतून आह्मीं अद्याप समग्र वाचलें नाहीं. अलीकडील प्रसिद्ध ग्रंथकार चार्लस ल्यांब यानें शेक्सपियरच्या ऐतिहासिक खेरीज करून बाकीच्या बहुतेक नाटकांचीं संविधानकें कथारूपानें जीं रचिलीं आहेत त्यांवरून वरील नाटकांतील कथासूत्र मात्र आह्मांस माहीत होतें. तेव्हां टीकाविषयक ग्रंथ आह्मीं प्रथमतः जो वाचला तो केवळ वरील कथासूत्राच्या अनुसंधानानें. पण असें असतांहि प्रकृत भाषांतर आह्मांस मुळींच दुर्बोध वाटलें नाहीं इतकेंच नव्हे; तर बहुतेक भागीं अत्यंत रमणीयहि वाटलें. यावरून प्रस्तुत भाषांतर कसें उतरलें आहे याविषयीं निराळी तारीफ करणें नको. इंग्रेजी व मराठी या भाषा परस्परांहून इतक्या भिन्न असतां, व त्यांतून पाश्चात्य कवींच्या कल्पना, विचार वगैरे तर इकडच्याहून फारच निराळे असतां, दुर्बोध व नीरस न होतां सरासरी बरेंच चित्तरंजन होई इतपत जरी कोणत्याहि भाषेंत कोणत्याहि ग्रंथाचें, व विशेषतः काव्यनाटकादिकांचें, भाषांतर उतरलें, तरी त्याच्या कर्त्याचें कौशल्य थोडें ह्मणतां येत नाहीं ! हा प्रकार प्रस्तुत नाटकांत पुष्कळ दृष्टीस पडतो. युरोपांतील रीतभात, भाषा, मनोव्यापार, हीं येथल्यापेक्षां फारच निराळीं पडलीं; तेव्हां तिकडील काव्यनाटकादिकांचें यथास्थित रूपांतर इकडच्या भाषांतून होणें हें वस्तुगत्याच अशक्य होय; तें पुरतेपणीं तर साधायाचेंच नाहीं. पण जेथपर्यंत वरील प्रकार शक्य होय तेथपर्यंत मूळच्यांतील रस मराठींत उतरतांना भाषांतरकर्त्यानें यत्किंचित्हि कसर केली नाहीं असें आह्मांस वाटतें. प्रोस्पेरोच्या प्रौढ व रसाळ भाषणापासून व मिरांदेच्या लडिवाळपणाच्या आणि कोमलतेच्या बोलण्यापासून तों क्यालिबनचें अभद्र व कुत्सित भाषण आणि जहाजावरील मोकद्दमांचें आडदांड व उद्धटपणाचें बोलणें, यांपर्यंत सर्व अगदीं यथास्थित साधलें आहे. तसेंच ज्या ज्या मनोवृत्तीचा व्यंजक जो जो भाषणप्रकार तोहि भाषांतरकर्त्यानें यथापात्र शुद्ध मराठी रीतीचा योजला आहे. सारांश, शेक्सपियरच्या मूळ नाटकाची प्रस्तुत भाषांतरावरून रसिक व अभिज्ञ अशा मराठी वाचकांस सुद्धां बरीच कल्पना होईल असें आह्मांस वाटतें.

पण वरील वाचकांपेक्षां इंग्रेजी कवितेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस व शुद्ध

आणि सरस भाषांतर करण्याची कला शिकणारांस तर सांप्रत पुस्तक फारच उपयोगाचें आहे. आमच्या मराठींत भाषेच्या स्वरणीस अगदीं यथास्थित उतरलेलीं भाषांतरें अगोदर थोडीं; त्यांतून कॉलेजाचें वारें लागून गर्वानें ताठलेल्या व इंग्रेजीचा तोरा मिरविणाऱ्या आमच्या नव्या मंडळींत तर वरील उदाहरण शपथेसहि सांपडायाचें नाहीं. मराठी पुस्तकांचें अवलोकन ज्यांस उभ्या वर्षांतहि घडत नसेल, तसेंच सगळ्या अहोरात्रांत साधारण व्यवहाराखेरीज मराठी बोलण्याचाहि ज्यांस थोडाच प्रसंग, पत्रव्यवहार, सभेंत बोलणें वगैरेहि सर्व ज्यांचें हरहमेश इंग्रेजींतच चालायाचें, अशा आमच्या नवीन विद्वानांस चार शब्दहि बोलणें किंवा लिहिणें झाल्यास गेल्या फेब्रुवारीच्या अंकांतील भरे आणि लानमन यांच्या 'साखरावगुंठित गोळी'सारखा प्रकार होत असेल यांत नवल कसचें? असो; पण लिहिण्यास आनंद वाटतो कीं आमचे मित्र प्रस्तुत भाषांतरकर्ते हे इंग्रेजींत पुरे वाकबगार असतां यांच्या लेखांत वरील लज्जास्पद दूषणाचा प्रकार आढळलाच तर फार क्वचित् आढळेल. यांची लिहिण्याची एकंदर पद्धति अत्यंत शुद्ध व मराठी चालीची असून शिवाय मार्मिकहि व चित्तवेधक असते. प्रस्तुत भाषांतरांतच पहा बरें, प्रत्येक पात्राचें ज्याचें त्यास शोभेसें भाषण कसें खुबीनें उतरून दिलें आहे तें! पहिले दोन प्रवेशच घ्या. पहिल्यांत जहाजावर झालेली तारंबळ व आकांत, आणि नावाड्यांची आणि मोकद्दमाची एकच होऊन राहिलेली गर्दी, हीं किती हुबेहुब मराठींत साधलीं आहेत! वरील प्रवेश वाचणाऱ्या वाचकांस भूमध्यसमुद्राची व युरोपियन खलाशांची बिलकूल आठवण न होतां वरील प्रसंग एतद्देशीय लोकांवरच कोठें तरी गुदरला आहे असें वाटेल. तसेंच पुढील प्रवेशांत बापाचें व लेकीचें जें संभाषण दाखल केलें आहे तें तरी इकडच्या सारखेंच दिसण्यासारखें किती उत्तम साधलें आहे! 'बाळमित्रां'तील मैनेची धनीण मनी हिचा मूळचा इंग्रेजी झगा काढून त्या चतुर भाषांतरकर्त्यानें तीस इकडचा वेष जसा अगदीं पूर्णपणें देऊन तिची मूळची ओळखहि वाचकांस पटूं नये असें केलें आहे, त्याचप्रमाणें सांप्रत रसिक भाषांतरकारानें मिरांदेस अगदीं नवी करून टाकली आहे. आह्मांस खास वाटतें कीं, प्रवेशारंभींचें वादळाचें थोडेसें वर्णन व पुढें आपल्या आजीबाईविषयीं मिरांदेनें झोकून दिलेला उद्गार,[1] या दोहोंखेरीज करून बाकीचें तिचें सर्व बोलणें येथील

१. पृष्ठ १४. अस्लीं चावटगिरीचीं बोलणीं शेक्सपियरच्या नाटकांत व काव्यांत भरपूर आहेत. प्रस्तुत नाटकांतच तीं फार थोडीं आहेत असें ह्मटलें पाहिजे. वरच्यासारखें दुसरें उदाहरण चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत मात्र आहे. 'आथेल्लो' नाटकांत तर कांहीं विचारूंच नये. असो; मिरांदेचें वरील बोलणें नाथिकेच्या शालीनतेस अत्यंत विघातक असून शिवाय स्वभाववर्णनासहि अगदीं विरुद्ध होय. कां कीं, जी केवळ निर्जन बेटांत जन्मली

(पुढें चालू.)

एखाद्या कुलीन सरदाराच्या मुलीस पुरतेपणीं शोभण्यासारखें आहे! असो; तेव्हां एकंदरींत इंग्रेजीचें मराठींत रूपांतर कसें करावें हें ज्यास शिकणें असेल त्यास सांप्रत 'टेंपेस्ट' नाटक चांगला नमुना होय.

असो; याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथाचें सामान्यतः निरूपण केलें, व यापासून वाचकांस काय उपयोग होईल तोहि सांगितला. आतां सरते शेवटीं एका गोष्टीविषयीं मात्र थोडेसें लिहिणें अवश्य वाटतें. ती ही कीं, वर जी आह्मीं या नाटकाची तारीफ केली आहे, तीवरून हें मराठींतील एखाद्या नाटकाप्रमाणें किंवा कादंबरीसारखें सर्वांस सारखेंच मनोरंजक होईल असें कोणीं समजूं नये. आमच्या मराठी वाचकांस अद्याप ह्मणण्यासारखी कांहींच रसिकता आलेली नाहीं,[1] तेव्हां एखाद्या ग्रंथाच्या बरेवाईटपणाबद्दल सहसा अभिप्राय देण्याचें किंवा तो आपल्या मनाशीं ठरवून ठेवण्याचें त्यांनीं पतकरूं नये. शिवाय प्रस्तुत नाटक परभाषेतलें व परराष्ट्राचें असल्यामुळें त्याचें यथास्थित भाषांतर आपल्या भाषेंत होणें फार कठिण असून मूळच्यांतला रस सर्वथैव उतरणें तर केवळ अशक्यच होय हेंहि त्यांनीं लक्षांत ठेवावें. मागें बाराव्या अंकांत याविषयीं बरेंच विवरण केलें असून 'आथेल्लो' नाटकांतील जे दोन तीन प्रसिद्ध उतारे तेथें घेतले आहेत त्यांवरून प्रकृत सिद्धांताचा वाचकांस प्रत्यय येऊन चुकला असेलच. तर तोच दुर्बोधत्वाचा व रसापकर्षाचा प्रकार प्रस्तुत नाटकांतहि कोठें कोठें सांपडेल. पण त्याबद्दल अभिज्ञ वाचक भाषांतर करणारावर टपका ठेवणार नाहींत. मूळांतील रस भाषांतरांत न उतरल्याबद्दल दोष न देतां जितका उतरला आहे तितक्याबद्दलच भाषांतरकर्त्याची तारीफ करणें अशा प्रसंगीं उचित होय; कां कीं, जी निरुपायाची गोष्ट ती न करतां आल्याबद्दल कोणी दोषास पात्र होत नाहीं. दुसरें असें कीं, अशा भाषांतराचा प्रकार आपल्या भाषेंत अगदीं नवाच झालेला आहे. दहा वर्षांमागें 'आथेल्लो'चें भाषांतर झालें; त्यावर दुसरें

असून नायकाचें प्रथम दर्शन होतां त्यास सुंदर पिशाच समजली, तिला स्त्रीपुरुषसमागमाची आणि त्यांतून व्यभिचाराची, कल्पना व्हावी हें अगदींच संभवत नाहीं! तशांत असली अप्रयोजक कल्पना आपल्या आजीच्या संबंधानें करून ती खुशाल मोजेनें झोकून द्यावी हें इंग्लिश लोकांच्या आचारास व सभ्यतेस मात्र शोभेसें आहे!!

१. वरील स्पष्टपणाची उक्ति प्रस्तुत पुस्तकांत कदाचित् कृतघ्नत्वदोषास पात्र होईल. पण वास्तविक जी स्थिति दृष्टीस पडत आहे ती सांगितल्यावांचून रहावत नाहीं. नवव्या अंकांत वगैरे कोठें कोठें प्रस्तुत विषयावर कांहीं उल्लेख आहेतच; पण येथें आणखी एक ध्यानांत ठेवण्यासारखें उदाहरण सांगण्याजोगें आहे. 'माधवराव', 'जयपाळ', 'पद्मरत्नावलि' इत्यादि ग्रंथांची ह्मणण्यासारखी कांहींच चहा नसून 'मंजुघोषे'च्या तीन तीन चार चार आवृत्ति निघून मोठ्या झपाट्यानें त्यांचा खप चालू आहे.

घटलें म्हणजे हेंच. तेव्हां हा मार्ग आपल्या ग्रंथकारांस अद्याप अगदीं अपरिचित असल्यामुळें प्रस्तुतसारख्या ग्रंथांकडे विशेष करडी नजर करणें बरोबर नाहीं. हा प्रघात असाच पुढें चालला असतां असले ग्रंथ पुढें किती चांगले होतील, किंवा प्रस्तुत भाषांतरकारासारख्यांसच या कामांत आणखी घटावल्यानें कितपत जास्त यश येईल, याची आज कांहीं कल्पना करतां येत नाहीं. यास्तव प्रस्तुत ग्रंथाची कल्पना जी करावयाची ती त्याची त्याजवरूनच केली पाहिजे. ती तशी केली असतां आमच्या वरील अभिप्रायाप्रमाणेंच बहुधा सर्वांचा पडेल असें आह्मांस वाटतें. असो; शिवाय प्रकृत नाटकाच्या संबंधानें तिसरी हीहि गोष्ट लक्षांत आणायास पाहिजे, कीं हें भाषांतर मुख्यतः विद्यार्थ्यांकरितां तयार केलेलें आहे. एरवींच्या वाचकांच्या मनोरंजनार्थ जर पुस्तककर्त्याचा हा प्रयत्न असता, तर सध्यांपेक्षां जास्त खबरदारी घेणें त्यास कदाचित् जरूर वाटलें असतें.

आतां वरील ग्रंथांत जे कित्येक दोष किंवा न्यूनता आहेत त्या सांगून हा लेख आटपतों. इंग्रेजी तऱ्हेचें लिहिणें न येण्याबद्दल जरी ग्रंथकर्त्यानें आपणाकडून पुष्कळ खबरदारी ठेविली आहे, तरी कित्येक ठिकाणीं तसा प्रकार अद्याप राहिला आहे. याचीं उदाहरणें येथें देण्याची गरज नाहीं. मार्मिक वाचणाराच्या तीं स्थलें सहज लक्षांत येणारीं आहेत. आतां त्यांपैकीं कांहीं निरुपायास्तव राहून कोणाच्यानेंहि तीं न निघण्यासारखीं कदाचित् असतील व त्यांबद्दल भाषांतर करणाराच्या भाषाशुद्धतेवरहि विशेष टपका ठेववणार नाहीं हें खरें. कारण भाषांतर करतांना एरवींप्रमाणें ग्रंथकारास स्वातंत्र्य नसतें. असो; दुसरा दोष असा कीं, कांहीं ठिकाणीं वाक्यें लांब, लांब होऊन त्यांची गुंतागुंत झाली असल्यामुळें प्रथमतः सर्वांस, व विशेषतः इंग्रेजी न समजणारांस, तर तीं विशेषच दुर्बोध होतील. हा दोष विद्यार्थ्यांकरितां प्रस्तुत पुस्तक रचण्याचा जो हेतु ग्रंथकर्त्यानें मनांत धारण केला त्यामुळें बराच उत्पन्न झाला असावा असें वाटतें. तसेंच कांहीं ठिकाणीं टीपांची जरूर असून त्या नसल्यामुळें, व इकडील लोकांस अत्यंत अपरिचित अशा गोष्टींच्या व कल्पनांच्या संबंधानेंहि प्रस्तुत दोष कांहींसा आला आहे. शिवाय संस्कृताच्या अपरिचयास्तव भाषांतरकर्त्याच्या हातून कोठें कोठें अशुद्ध प्रयोगहि पडले आहेत ते मराठी वाचकांच्या लक्षांत येण्यासारखे जरी नाहींत, तरी ग्रंथास दूषणरूप होत.

असो; याप्रमाणें प्रस्तुत नाटकाचें गुणदोषविवेचन झालें. एकंदरींत हा ग्रंथ महाराष्ट्रभाषेंत आजपर्यंत झालेल्या उत्कृष्ट ग्रंथांत गणण्यासारखा होय. भाषांतरकर्त्यानें सदरील पुस्तकाच्या प्रस्तावनेंत जरी आपली संशयवृत्ति प्रगट केली आहे तरी यापूर्वी झालेल्या 'आथेल्लो' नाटकाच्या जोडीला यास बसविण्यास आह्मांस कांहीं हरकत दिसत नाहीं. दोहोंचीहि योग्यता भाषांतर व एरवीं वाचण्याचा ग्रंथ या दोन्हीं

संबंधानें मोठी आहे. अशा ग्रंथांचा देशास अनेक प्रकारांनीं मोठा उपयोग होणारा आहे. एक तर इंग्रेजींतील अतिविख्यात ग्रंथकारांच्या गुणांचें साधारण लोकांस येणेंकरून ज्ञान होईल; आणि दुसरें असें कीं, इंग्रेजी व मराठी या अत्यंत विप्रकृष्ट भाषांमधील मार्ग प्रस्तुतसारख्या भाषांतरांनीं उत्तरोत्तर अधिकाधिक सुगम होत गेला असतां आपल्या भाषेच्या अभिवृद्धीची मोठी सोय होणार आहे. इंग्लिश वगैरे उत्तम अवस्थेस पोंचलेल्या भाषांतल्याप्रमाणें आमच्या मराठींत मूळचे स्वतंत्र ग्रंथ होण्यापेक्षां वरील भाषांत असणाऱ्या ग्रंथांचें आमच्या भाषेंत रूपांतर होण्याची शक्यता अधिक आहे. तेव्हां एतद्देशीय भाषांतून ग्रंथसमृद्धि करतां येण्याचा हा जो दुसरा सुगमतर मार्ग तो जितका सोपा होईल तितकें देशभाषेचें व तदद्वारा लोकांचें अधिक हित आहे.

सरते शेवटीं सांप्रत ग्रंथाच्या बाह्य स्वरूपाविषयींहि थोडेंसें लिहिणें इष्ट वाटतें. 'छापणी सुरेख', 'बांधणी मनोवेधक', 'कागद जाड' हीं स्वतः जरी केवळ क्षुल्लक होत; व प्रिंटर साहेबांची, बैंडर बुवांची तारीफ करणें हा ग्रंथावरील टीकेचा अवश्य भाग होय असें जरी आह्मी बिलकूल समजत नाहीं; तरी जेथें अंतर्बाह्य अशा दोहों प्रकारच्या रमणीयत्वाचा संयोग होतो तेथें दुसऱ्यासहि योग्यता येऊन त्याविषयीं केवळ उदासीन असणें हें संभवत नाहीं. उघडच आहे कीं नुसत्या पात्रास जरी स्वतःसिद्ध फारशी योग्यता नाहीं, तरी उत्तम अन्नाचा व उत्तम पात्राचा योग झाला असतां तो परस्परांस शोभावह होतो! तर याच न्यायानें सदरील पुस्तकाच्या सुरेख व स्वच्छ छापणीची आणि लहान दुमदार अशा बांधणीचीहि येथें तारीफ केल्यावांचून रहावत नाहीं.

वेदार्थयत्न.

—०—

यस्य निश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत्।
निर्ममे तमहं वंदे विद्यातीर्थमहेश्वरम्॥[1]

अंक ३१—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) प्राचीन विद्येचें उज्जीवन. (३) वेदग्रंथांच्या अभ्यासाचें महत्त्व व उपयोग. (४) अन्यदेशीय लोकांच्या संबंधानें. (५) आपल्या संबंधानें. (६) वेदांतील विषय. (७) वेदांचा काळ. (८) प्रस्तुत भाषांतर. (९) त्यांतील विषयसंग्रह. (१०) न्यूनता व दोष. (११) भाषेच्या संबंधाचे. (१२) अर्थाच्या संबंधाचे. (१३) उपसंहार.

---

१. "सकल विद्यांचें आदिस्थानभूत जो परमेश्वर, कीं ज्याच्या निश्वासमात्रेंकरून वेद निर्माण झाले, आणि ज्यानें वेदांपासून सर्व जग उत्पन्न केलें, त्यास मी नमन करतों."

१. सदरील पुस्तकाचा तिसरा अंक त्याच्या प्रकाशकांनीं आमच्याकडे पाठविल्यास आज बरेच दिवस झाले. या खेपेस चालीप्रमाणें वरील अंकाचा आभारपूर्वक स्वीकार करून एकंदर पुस्तकाविषयीं आमचा अभिप्राय प्रगट करतों.

२. अलीकडे या भरतखंडांतील प्राचीन विद्यांचें पुनरुज्जीवन करण्याविषयीं लोकांचा उद्योग दिवसेंदिवस वाढत चालला आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. युनिवर्सिटी स्थापन होऊन तिनें संस्कृताच्या अभ्यासास उत्तेजन दिल्यापासून आज दहा पंधरा वर्षें ह्या भाषेचें ज्ञान आपल्या लोकांत बरेंच प्रसार पावत चाललें आहे, व ह्याच्या योगानें देशभाषेचीहि बरीच सुधारणा होऊं लागली आहे. या सालींच पाहिलें तर वरील उद्योग तीन चार भिन्न भिन्न रूपांनीं प्रगट झाला हें आमच्या वाचकांस बहुधा माहीत असेलच. एक तर प्रस्तुत 'वेदार्थयत्न'; दुसरा उद्योग इंग्रेजी पद्धतीप्रमाणें प्राचीन संस्कृत कवींचा वृत्तांत व त्यांच्या कवित्वाचें विवरण या रूपानें त्याविषयीं केलेलें विवेचन होय. हे दोन्ही उद्योग सध्यां चालू असून त्यांचें फळहि लोकांस दृष्टीस पडूं लागलें आहे. दुसऱ्या दोहोंची अद्याप तशी स्थिति न आल्यामुळें ते सुरू आहेत किंवा नाहीं याविषयीं संशय वाटतो. हे उद्योग एक आपल्या पुरातन वैद्यकाच्या संबंधानें व दुसरा जुन्या शास्त्रविद्येच्या संबंधानें असे होत. पहिला मुंबईच्या कांहीं प्रसिद्ध नेटिव डाक्तरांनीं हातीं घेतलेला आहे; व दुसऱ्याच्या प्रीत्यर्थ येथील कांहीं वड्या व कांहीं किरकोळ विद्वानांनीं कंबर बांधली आहे. असो; हे शेवटले उद्योग पहिल्या दोहोंसारखे यशालाभास येऊन वर जो त्यांविषयीं वर्तमानकालानें उल्लेख केला आहे तो भूतकालीं करण्याची पाळी न येवो ह्मणजे झालें.

३. आतां प्रस्तुत पुस्तकाविषयीं साक्षात् विवेचन करण्यापूर्वी त्यांतील विषयावर कित्येक विचार सामान्यतः सुचण्यासारखे आहेत ते येथें दाखल करतों. ते येणेंप्रमाणें. पहिल्यानें प्रस्तुत विषयाचें महत्त्व व उपयोग हीं दोन प्रकारचीं आहेत; एक साऱ्या पृथ्वीच्या संबंधानें व दुसरें आपल्या एकट्या देशाच्याच संबंधानें. आतां दोहोंविषयीं अनुक्रमेंकरून लिहूं.

४. वेदग्रंथांचें साऱ्या जगास कोणतें महत्त्व आहे व त्यांच्या अध्ययनापासून कोणता उपयोग आहे हें अलीकडे सर्वांस माहीत होत चाललें आहे. याचें प्रमाण प्रत्येक सुधारलेल्या देशांत संस्कृतास व त्यांतून वरील ग्रंथास जो आदरपूर्वक मान प्राप्त झाला आहे तो होय. सर्व देशांतील संस्कृतज्ञांची दिवसेंदिवस खात्री होत चालली आहे कीं, वेदांच्या बरोबरीचा जुना लेख पृथ्वीवर कोठेंहि नाहीं. युरोपांत अत्यंत प्राचीन मानलेलीं जीं ग्रीक व रोमन हीं राष्ट्रें त्यांहून, किंबहुना त्यांसहि पूज्य होऊन गेलेलें असें मिसर देशचें जुनें राष्ट्र, त्याहूनहि येथील लोक पुरा-

तन होत.[1] तेव्हां इतक्या प्राचीन राष्ट्राचा जो अत्यंत प्राचीन ग्रंथ, कीं ज्यास ते 'अनादि' ही संज्ञा देतात, तो प्रत्येक जिज्ञासु मनुष्याच्या अत्यंत आदरास पात्र होईल यांत नवल कसचें ? उगाच शंभर दोनशें वर्षांची जुनी एखादी अपूर्व वस्तु पाहिली असतां केवढी मौज वाटते व जिज्ञासा जागृत होऊन तिच्या तृप्तीविषयीं केवढी प्रबळ इच्छा उत्पन्न होते ! मग मानवी जातीच्या आद्य स्थितीचें स्वरूप ज्यांत दृष्टीस पडतें, ज्यांत चार हजार वर्षांपूर्वीचीं मनुष्यें कशीं बोलत होतीं, कशीं चालत होतीं, त्यांचे मनोव्यापार कसे होते, निरनिराळ्या विषयांवर मतें कशीं होतीं, वगैरे गोष्टींची माहिती ज्यावरून व्हावी असा अत्यंत विश्वसनीय लेख जर सांपडला, तर शोधक व जिज्ञासु जनांस केवढा मनोवेधक विषय होईल ! इतिहास खरा झटला झणजे मनुष्यजातीच्या मनोव्यापारांचें शाश्वत स्वरूप कोणतें व प्रसंगानुरोधानें त्यावर कसकशीं कार्यें घडतात यांचें ज्यांत उद्घाटन केलें आहे असा लेख होय. मग वरील ज्ञान होण्यास वेदासारखा ग्रंथ तर किती साधनीभूत होय ! कां कीं तो अत्यंत प्राचीन असल्यामुळें मनुष्यस्वभावाचें अगदीं साधें व मूळचें रूप त्यांत जसें सांपडेल तसें पुढील काळच्या ग्रंथांत सांपडणार नाहीं. असो; तर एतद्देशीयांखेरीज बाकीच्या

१. "Ere yet the Pyramids looked down upon the valley of the Nile—when Greece and Italy, those cradles of modern civilization, housed only the tenants of the wilderness, India was the seat of wealth and grandeur. A busy population had covered the land with marks of its industry; rich crops of the most coveted productions of Nature annually rewarded the toil of the husbandman; skilful artizans converted the rude produce of the soil into fabrics of unrivalled delicacy and beauty, and architects and sculptors joined in contributing works, the solidity of which has not in some instances been overcome by the revolution of thousands of years. The princes and nobles of India, unlike the wandering chieftains of the neighbouring countries, already dwelt in splendid palaces, and clothed in the gorgeous products of its looms, and glittering with gold and gems, indulged a corresponding luxury in every act and habit of their lives. Poets were not wanting to celebrate the exploits of their ancestors, nor philosophers to tread the mazes of metaphysical inquiry, and weave the net of ingenious speculation, with as much subtlety, and perhaps with not less success than has attended the researches of subsequent inquirers."

Thornton's History of India.

सर्व लोकांस वेदग्रंथांच्या ज्ञानापासून वरील एक मोठा उपयोग आहे. तसाच दुसरा उपयोग भाषाज्ञानाच्या संबंधानें आहे हेंहि सर्वत्र प्रसिद्धच आहे.[1]

५. आतां आपणांसच खुद्द वरील ग्रंथाच्या अध्ययनापासून कोणकोणते लाभ आहेत हें पाहिलें तर ते वरच्याहूनहि अधिक आहेत हें सहज लक्षांत येईल. याविषयीं प्रस्तुत भाषांतरकारांनीं प्रस्तावनेंत उगीच थोडा निर्देश प्रथमारंभीं केला आहे. वास्तविक झटलें असतां एवढ्या थोरल्या व महत्त्वाच्या ग्रंथास त्याच्या योग्यतेप्रमाणें चांगली एक मोठी प्रस्तावना हवी होती. 'वेदां'चें भाषांतर झणजे 'पंचोपाख्याना'चें किंवा एखाद्या गणित ग्रंथाचें भाषांतर नव्हे. जो ग्रंथ आज शेंकडों पिढ्या पितृपुत्रपरंपरेनें पठन करून येथील लोकांनीं जीवापलीकडे रक्षण करून ठेविला, ज्यास साक्षात् ईश्वरप्रणीत मानून मुक्तीचें द्वार झणून लोक समजतात, ज्याचा अर्थ मोठमोठ्या पंडितांसहि दुर्गम झणून प्रसिद्धि आहे, ज्यांत एतद्देशीय लोकांच्या सर्व विद्येचें व सर्व आचाराचें मूळ आहे, आणि सामान्य जनांच्या मतें तर ज्यांत हरएक प्रकारचें ज्ञान भरलेलें आहे, अशा ग्रंथाचा अर्थ लोकभाषेंत उतरतांना असल्या अपूर्व उद्योगाच्या संबंधानें वाचकांस पुष्कळ गोष्टी अगोदर कळविणें अवश्य होतें. पण तशाविषयीं 'वेदार्थयत्न'कारांनीं विशेष खटपट मुळींच केली नाहीं. सरासरी विषयाचें स्वरूप व भाषांतराच्या अडचणी वगैरे यांविषयीं कांहीं लिहून पांच सात पानांत सगळी प्रस्तावना आटपली आहे; व तीहि विशेष काळजीनें लिहिली आहेशी दिसत नाहीं. असो; आतां वरील लाभ सांगतों. एक तर लाभ स्पष्टच आहे कीं, सर्व

१. 'शाकुंतल' नाटकाचें भाषांतर युरोपांत प्रसिद्ध होतांच तिकडील पंडितांस संस्कृत भाषेच्या अध्ययनापासून होणारे कोणकोणते लाभ तेव्हांच लक्षांत आले हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल—

——"At the same time the attention of the historian, the philologist, and the philosopher was roused to the fact that a complete literature had been preserved in India, which promised to open a new leaf in the ancient history of mankind, and deserved to become the object of serious study."

"No one who wishes to acquire a thorough knowledge of these or any other of the Indo-European languages, no one who desires to study the history of that branch of mankind to which we ourselves belong, and to discover in it the first germs of the language and mythology of our forefathers,-can for the future dispense with some knowledge of the language and ancient literature of India."

—*Muller's Sanscrit Literature.*

आर्यजनांच्या पूज्यताबुद्धीस व प्रीतीस पात्र झालेला जो प्रस्तुत ग्रंथ त्याचा अर्थ समजल्यानें त्यांत आहे काय याची अगोदर फोड होईल. दुसरा असा कीं, आपले अत्यंत प्राचीन पूर्वज, ज्यांचा अभिमान आह्मांस वाटतो हें तर सहजच आहे, पण ज्यांचें अपूर्व बुद्धिवैभव पाहून युरोपांतील पुरातन राष्ट्रें जशीं विस्मित होत होतीं तसेच त्यांचे आधुनिक वंशजहि होतात,—त्यांची त्या वेळची स्थितिरीति आह्मांस कळेल. ही कळल्यापासून त्यांचे कोणी नव्हेत अशा दूरच्या युरोपियन् लोकांसहि जर कौतुक वाटतें तर आह्मांस तर तें किती वाटेल! याचें विशेष कारण असें कीं, ती स्थितिरीति आमच्या पाश्चात्य बंधूंहून आह्मांस निकट संबंधास्तव विशेष चांगल्या रीतीनें कळेल. या ज्ञानापासून दुसऱ्याहि पुष्कळ गोष्टी समजून येतील. त्या अशा कीं, आमच्याच राष्ट्राची अगदीं पूर्वीं स्थिति कशी होती, ती आज हजारों वर्षांच्या कालांतरानें कशी बदलली आहे, ती बदलण्याचीं कारणें काय काय झालीं; धर्म, नीति, आचार, विद्याभ्यास वगैरेचा प्रकार पूर्वी कसा होता व सध्यां कसा आहे, अशा अनेक गोष्टी आपल्या लक्षांत येतील. याशिवाय भाषेच्या संबंधानें प्रस्तुत ग्रंथांवरून पुष्कळ ज्ञान होईल हें उघडच आहे.

६. येथवर प्रस्तुत विषयाच्या महत्त्वाविषयीं व उपयोगाविषयीं लिहिलें. आतां त्याच्या स्वरूपाचें थोडेसें विवरण करून मुख्य विषयास लागूं. वेद चार आहेत. हे येथें कोणास सांगावयास नकोच; ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, व अथर्ववेद. या चोहोंत मुख्य झटला ह्मणजे पहिलाच होय; याच्याच ऋचा प्रायः बाकीच्या तिघांत आहेत. चवथा तर तिहींहून अर्वाचीन आहे, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे.[1] चारी वेदांस समुदायरूपानें 'श्रुति' असें ह्मणतात. या शब्दाचा अर्थ 'जें ऐकलें तें' असा होतो; यावरून वेद ज्या वेळेस उत्पन्न झाले किंवा मंत्रद्रष्ट्या ऋषींनीं पाहिले त्या वेळेस लेखनकला चालू नव्हती असें अनुमान करण्यास जागा आहे. श्रुतीमध्यें तीन भाग आहेत. संहिता, ब्राह्मण आणि आरण्यक. संहिता ह्मणजे मूळ वेदमंत्र; ब्राह्मण ह्मणजे त्यांवर टीकारूप व्याख्यान; आणि आरण्यक ह्मणजे उपनिषदादि भाग. प्रत्येक वेदाची संहिता निरनिराळी आहे; व तिचे पुनः पदें, क्रम इत्यादि आणखी भेद आहेत.[2] ब्राह्मणें (हा शब्द नपुंसकलिंगी आहे) हीं प्रत्येक वेदाचीं निरनिराळीं आहेत. जसें

---

१. वेदांस 'त्रयी' अशी संज्ञा प्रसिद्धच आहे. शिवाय पाणिनीच्या अष्टाध्यायीवरून पहातां त्यास अथर्ववेद माहीत नव्हता हें स्पष्ट दिसतें. वरील मुनीच्या व्याकरणांत तसाच ब्राह्मणांविषयीं व आरण्यकांविषयींहि उल्लेख सांपडत नाहीं.

२. 'संहिता' ह्मणजे मूळ संहित स्थितींत असलेला वेदमंत्र; पदें ह्मणजे त्याचा पदविभाग; आणि क्रम ह्मणजे ऋचांचा अनुक्रम. हा क्रम प्रत्येक संहितेचा निरनिराळा आहे. याशिवाय जटा, घन, रेखा, शिखा वगैरे आणखी प्रकार युद्धें सुरू झालेले सर्वप्रसिद्ध आहेतच.

ऋग्वेदावर ऐतरेय व कौषीतकी ब्राह्मण; यजुर्वेदाच्या दोन शाखा कृष्णयजुर्वेद व शुक्लयजुर्वेद; त्यांवर अनुक्रमेकरून तैत्तिरीय व शतपथ ब्राह्मण; सामवेदावर प्रौढ व अद्भुत ब्राह्मण; आणि अथर्वावर गोपथ ब्राह्मण. आरण्यकें हीं ब्राह्मणांच्या परिशिष्टासारखीं होत. यांत सारीं उपनिषदें अंतर्भूत होतात. यांचें पठन अरण्यांत करावें लागतें ह्मणून वरील संज्ञा त्यांस प्राप्त झाली आहे. वेद प्रायः सर्व छंदोबद्ध आहे, यजुर्वेदाचा कांहीं भाग मात्र गद्यरूप आहे. ऋग्वेदसंहितेचे दहा भाग केले आहेत; त्या प्रत्येकास मंडल ह्मणतात. मंडलाचे पुनः आणखी उपभाग आहेत त्यांस सूक्तें ह्मणतात. हीं सूक्तें वरील संहितेंत हजारांवर आहेत. प्रत्येक सूक्तांत सुमारें दहा ऋचा येतात. या मानानें पहातां नुसता ऋग्वेदच सुमारें दहा हजार ग्रंथ आहे. आतां या निरनिराळ्या संहितांत व ब्राह्मणादि ग्रंथांत काय काय विषय आहे हें पाहिलें तर ऋग्वेदांत इंद्रादि देवतांची स्तुति आहे; यजुर्वेदांत यज्ञप्रकरण आहे; सामांत ऋग्वेदांतीलच ऋचा, पण त्या गायनाच्या रीतीनें ह्मणायाच्या आणि चवथ्या आथर्वणांत जारणमारणादि क्रियांचे मंत्र आहेत. वर सांगितलेल्या निरनिराळ्या ब्राह्मणांत प्रायः यज्ञक्रियेविषयीं मजकूर आहे. आरण्यकांत व उपनिषदांत अध्यात्मज्ञान आहे.

७. वेदांच्या संबंधानें एका मोठ्या गोष्टीविषयींची माहिती देणें अवश्य आहे. ही गोष्ट वेदग्रंथांचा काळ होय. या कालाचा निर्णय अगदीं बरोबर होणें तर बहुधा अशक्यच दिसतें, तरी त्याविषयींची कांहीं अटकळ करण्याची युक्ति पाश्चात्य पंडितांनीं एक चांगली योजली आहे. ती संपातबिंदूंचें चलन होय. ज्योतिष ह्मणून एक वेदांग आहे, त्यांत आपल्या ऋषींच्या वेळीं सूर्य कोणत्या अयनांशावर होता हें सांपडतें. त्यावरून गणित करतां असें निघतें कीं, तो ग्रंथ ज्या वेळेस रचला तो काळ इ. स. पूर्वीचें ११८१ वें वर्ष होय.[1] यावरून स्पष्ट कळतें कीं, वरील वेदांगाचा जर इतका काळ तर मूळ वेदाचा याच्याहि मागला असला पाहिजे. तो एका विख्यात संस्कृतज्ञाच्या मतें इ. स. पूर्वी २००० वर्षें होय.[2] हें खुद्द वेदाविषयीं ह्मणजे संहि-

१. वरील ग्रंथ लगध नांवाच्या ऋषीनें केलेला आहे. यांत त्यानें आपल्या वेळचीं अयनवृत्तांचीं संपातस्थळें सांगितलीं आहेत त्यांवरून कळतें कीं, त्या वेळच्या संपातबिंदूंत आणि सांप्रतच्यांत २३ अंशांचें अंतर पडलें आहे. संपातबिंदु ह्मणजे विषुवद्वृत्त व क्रांतिवृत्त यांचा ज्यांत परस्पर छेद होतो ते दोन बिंदु होत. हे दर वर्षास मागें सरताहेत. यांस ३० अंश क्रमण्यास सुमारें दोन हजार वर्षें लागतात.

२. वरील विख्यात पंडित नुकते निवर्तलेले मार्टिन हौग साहेब होत. हे येथील विद्यालयांत संस्कृताचे गुरु होते, व ऐतरेय ब्राह्मणावर त्यांचा जो एक प्रसिद्ध ग्रंथ आहे तो लिहिण्यापूर्वी त्यांनीं आपल्या बंगल्यांत एक यज्ञ करविला होता हेंहि येथें तरी सर्वांस माहीत असे.

(पुढें चालू).

तेविषयीं झालें. ब्राह्मणें व आरण्यकें हीं पुढें झालेलीं आहेत याविषयीं मागें सांगितलेंच आहे.

८. येथवर प्रस्तुत पुस्तक ज्याचें भाषांतर होय असा मूळ ग्रंथ जो सर्वमान्य वेद त्याविषयीं उपोद्घातरूपानें आमच्या वाचकांस कांहीं थोडीशी माहिती दिली. आतां सदरील पुस्तकाविषयीं लिहितों.

९. या पुस्तकांत एकंदर सहा भाग आहेत. ते असे-संहिता, पदें, मराठी भाषांतर, इंग्रेजी भाषांतर, अन्वय, आणि टीपा. यांपैकीं पहिलीं दोन एका पृष्ठावर व त्याच्या समोरील पृष्ठावर दुसरीं दोन दिलीं असून खालीं एका बाजूस अन्वय व व दुसरीस टीपा घातल्या आहेत. येणेंकरून कोणतीहि ऋचा काढली तरी लागलीच पुढें तिचे दोन तऱ्हेचे अर्थ पहाण्यास सांपडून अन्वय व टीपहि खालीं लगेच वाचतां येते. याप्रमाणें हें पुस्तक शिकणारास चांगलें उपयोगीं पडण्यासारखें असून समयानुसार चाळणारासहि सोयीवार आहे. आतां वरील सहा भागांचा विचार केला असतां संहिता व पदें याविषयीं तर कांहीं बोलावयासच नको. तीं जशीं आज पिढ्यानपिढ्या वैदिकांच्या जिव्हाग्रावर आरूढ होऊन आलीं आहेत त्याप्रमाणें, किंवा श्वेतद्वीपीय महावैदिकाच्या मुकत्या संपूर्ण झालेल्या ग्रंथावरून, उतरलीं असतील.[1] यास्तव त्याविषयीं कांहीं विशेष लिहिणें नकोच. मराठी भाषांतर, इंग्रेजी भाषांतर, व 'भाषायाम्' या सदराखालीं दिलेला अन्वय, हींहि प्रसिद्ध वेदभाष्यकर्ता सायणाचार्य याचा

लच. वरील साहेबास पंधरा बीस भाषा येत असून इतिहासाचें ज्ञान उत्तम होतें; व तो विद्याभ्यासांत इतका गढून गेलेला असे कीं, त्याचें बोलणें, चालणें वेड्या खुळ्या मनुष्यासारखें असे. यानें येथील माजी 'यंग मेन्स असोसियेशन'पुढें १८६३ सालीं वेदांवर कांहीं व्याख्यानें दिलीं, त्यांतील प्रमाण वर दाखल केलें आहे. या व्याख्यानांचें मराठी भाषांतर इंदुप्रकाशांत छापलेलें आहे.

१. वरील अपूर्व संज्ञा आह्मीं कोणास उद्देशून केली आहे हें आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस तरी माहीत असेलच. डॉ० मॉक्स म्यूलर यानें आज तीस वर्षे सतत खपून संपूर्ण ऋग्वेदाचें भाष्यासहित प्रकाशन केलें. या ग्रंथाचे एकंदर सहा भाग होऊन शेवटला नुकताच प्रसिद्ध झाला. या उद्योगामुळें आमच्या अत्यंत पुरातन ग्रंथाचा साऱ्या पृथ्वीभर प्रसार होऊन त्यावरील टीकाग्रंथाचें कांहीं अंशीं पुनरुज्जीवन झाल्यासारखेंच झालें. या आवृत्तींतील अत्यंत उपयुक्त भाग ह्मटला ह्मणजे तिच्या शेवटीं जें मोठें सूचीपत्र दिलें आहे तें होय. यांत ऋग्वेदांतील सर्व शब्दांचें वर्णानुक्रमानें परिगणन केलें असल्यामुळें अमुक अमुक शब्द वरील ग्रंथांत अमुक अमुक ठिकाणीं आला आहे असें तेव्हांच काढतां येतें. याचे योगानें शब्दविशेषाचा अर्थनिश्चय करण्यास साधन झालें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या अवलोकनानें शोधक मनुष्यास याहि गोष्टीचा चमत्कार वाटल्यावांचून रहाणार नाहीं, कीं शेंपन्नास वर्षांमागला एखादा ग्रंथ काढला तर त्यांत पाठभेद आढळतात; पण साऱ्या पृथ्वींतला अगदीं जुना जो हा ग्रंथ यांत पाठांतराची वार्ताहि नाहीं. येथून तेथून एक पाठ!!

मुख्य आधार घेऊन व कोठें कोठें युरोपीय पंडितांच्या नव्या अर्थांस अनुसरून रचिलीं आहेत. अन्वयांत दुर्बोध व अपरिचित अशा वैदिक शब्दांस अर्वाचीन संस्कृत भाषेंतले प्रतिशब्द कंसांत दिले आहेत, व प्रसंगविशेषीं शेषपूरणहि केलें आहे. हा दुसरा प्रकार मराठी व इंग्रेजी भाषांतरांतहि बराच करावा लागला आहे. हीं भाषांतरें मुख्यतः शब्दास शब्द धरूनच केलीं आहेत. आतां हीं मूळांतील अर्थांस अगदीं बरोबर उतरलीं आहेत कीं नाहीं हें सांगण्याचा पतकर आह्मी आपणांवर घेत नाहीं; कां कीं, या विषयाचें विशेष अध्ययन आमचें अद्याप झालेलें नाहीं. तरी आमच्या वाचकांस एवढें आह्मांस खात्रीनें सांगतां येईल कीं, ज्या मंडळीनें हें काम हातांत घेतलें आहे त्यांपैकीं एकाशिवाय बाकी सर्वांस प्रस्तुत विषय चांगला अवगत असून त्यांचा त्यावर बहुत परिश्रमहि झालेला आहे. यास्तव सदरील भाषांतरें त्यांनीं आपणांकडून तरी अगदीं बरोबर उतरलीं असतील याविषयीं आह्मांस विलकूल संशय नाहीं. एकंदरींत ज्या कोणास वेदांत काय आहे हें समजण्याची इच्छा असेल त्यास या भाषांतरावरून त्याची बहुतकरून बरोबर कल्पना करतां येईल असें आह्मांस वाटतें.

आतां शेवटल्या टीपांविषयीं मात्र बोलणें राहिलें. हा सदरील पुस्तकाच्या सर्व भागांत विशेष महत्त्वाचा भाग आहे; व याच्या वाचकांपैकीं बहुतेकांस हा व वरील मराठी भाषांतर हींच काय तीं उपयोगीं पडणारीं आहेत. कां कीं, इंग्रेजी भाषांतर सर्वांस समजेल असें नाहीं; व संस्कृताचा मुख्य भाग तर फारच थोड्क्यांस कळेल. यास्तव एकंदर मराठी वाचकांस वेदांचें स्वरूप ध्यानांत जें येणार तें वरील टीपांवरून. हें जाणून प्रस्तुत भाषांतरकर्त्यांनीं या भागावरच विशेष परिश्रम केला आहेसें दिसतें. या टीपांत मूळ अर्थाच्या संबंधानें जें जें विशेष लिहिण्यासारखें वाटलें तें तें लिहिलें आहे. तें असें कीं कोठें देवतांविषयींची माहिती, कोठें शब्दविशेषांचें विशेष स्पष्टीकरण, कोठें प्राचीनिकाळच्या संबंधानें माहिती, कोठें अर्वाचीन काळांत झालेल्या अनेक फेरफारांच्या संबंधाचा उल्लेख, इत्यादि. या टीपा समयविशेषीं पुष्कळ विस्तारानें लिहिल्या आहेत; व त्या पुष्कळ उपयोगाच्या व माहितीच्याहि आहेत.[1] तसेंच प्रसंगानुरोधानें मूळ ग्रंथांतील भाषासौंदर्य व अर्थसौष्ठव यांचाहि त्यांत निर्देश केला आहे.

१०. आतां सदरील पुस्तकांत ज्या कित्येक न्यूनता व दोष आहेत त्याविषयींहि येथें उल्लेख करणें अवश्य होय. प्रस्तुत 'यत्न' ह्मटला ह्मणजे लहानसान उद्योगाच्या संबंधानें केलेला नव्हे; तर या देशाच्या संबंधानें पहातां ज्यासारखें महत्त्व दुसऱ्या

---

१. उदाहरणार्थ अंक ४ पृष्ठ २०४ यांतील 'शुनःशेपा'वरची पांच संहा पानांची टीप पहा. तसेंच त्या अंकांतील 'ऋक्ष' व 'अधिक मास' या शब्दांवरील व्याख्याहि पहाव्या. शिवाय 'क्रतु' 'बृहस्पति,' 'असुर' वगैरे अनेक शब्दांच्या संबंधानें ठिकठिकाणीं पुष्कळ चमत्कारिक माहिती दिलेली आहे.

कशासहि नाहीं अशा तऱ्हेचा तो आहे. यास्तव अशांत कोणत्याहि संबंधानें उणेपणा जितका थोडा असेल व नांव ठेवण्यास जितकी थोडी जागा राहील तितका प्रयत्न करणें अवश्य होय. असें असतां व हे 'यत्न'कार इकडील विद्वन्मंडळांत प्रमुखत्वानें मोडणारे असतां त्यांनीं आपलें कर्तव्य बजावण्यांत पुष्कळच कसर केली आहे हें वाचकांस कळविण्यास आह्मांस अत्यंत खेद वाटतो. तसेंच आश्चर्यहि वाटतें कीं, एवढाले ढोबळ दिसणारे दोष इतक्यांच्या नजरेखालून खुशाल गेले कसे ! असो; आतां त्यांचें क्रमवार निरूपण करतों.

११. वरील दोष दोन प्रकारचे आहेत. एक भाषेच्या संबंधाचे व दुसरे आंतील विषयाच्या संबंधाचे. भाषेच्या संबंधाचे दोष तर असे आहेत कीं, ते हवे त्यास पुस्तक सहज चाळलें असतां जिकडे तिकडे दृष्टीस पडणारे आहेत. आजपर्यंत या पुस्तकांत आह्मीं अनेक वेळां आमच्या देशांतील नव्या विद्वानांची स्वभाषेविषयीं जी अत्यंत उपेक्षा व तिरस्कारबुद्धि आढळते तिच्या संबंधानें आरोळ्या मारल्या आहेत; व कित्येक असमंजस लोकांस त्या निरर्थकशाहि वाटल्या आहेत. पण सदरहु पुस्तकाच्या आजपर्यंत झालेल्या पांच अंकांपैकीं एखाद्याचेंहि उगीच वरवर अवलोकन केलें असतां कोणासहि आमच्या दूषणांचा प्रत्यय चांगला आल्याविना रहाणार नाहीं. महाराष्ट्र भाषेंत सुरस ग्रंथरचना करणें हें तर काय, पण नुसतें शुद्ध लिहितां येणें हेंहि कांहीं सामान्य नव्हे, तर तें साधण्यास इतर भाषांप्रमाणेंच मराठीचाहि चांगला अभ्यासच करणें जरूर आहे; व तसें न करतां केवळ परभाषेचेंच उठतां बसतां नेहमीं डौलानें सेवन केलें असतां जन्मभाषेचेंहि किती मातेरें होऊन जातें, व शुभवर्तमानाच्या जवळ जवळ तिचे झोकांडे कसे जाऊं लागतात, हें ज्यास पहाणें असेल त्यास तें प्रस्तुत 'यत्ना'वरून चांगलें नजरेस येईल. भाषेच्या संबंधानें पहातां निर्दोष असा यांतील भाग झटला ह्मणजे इंग्रेजी भाषांतर मात्र होय. तें वाचण्यास जसें गोड लागतें व मूळ ऋचेचें स्वरूप त्यावरून जसें लक्षांत येतें तसें मराठी भाषांतरावरून फारसें येत नाहीं. उलटें त्यांत मूळचें स्वारस्य नष्ट होऊन वाचकांस त्रास मात्र येतो. नुसतें मराठीच ज्यांस येतें त्यांस तर हें हिंदुशास्त्र पवित्र ख्रिस्ती शास्त्रासारखेंच बहुधा मधुर लागत असेल. असो; हाच प्रकार दर एक पानाखालीं ज्या भरपूर टीपा दिल्या आहेत, त्यांतला व आरंभींच्या प्रस्तावनेंतलाहि होय. फार तर काय, पण प्रस्तुत ग्रंथाचें नांव हेंहि इंग्रेजी धर्तीचें असून अंमळ विलक्षणच आहे. टीकाग्रंथांचीं नांवें संस्कृतांत अशा तऱ्हेचीं कधींहि नसतात; तीं 'प्रकाश', 'दीप', 'बोध' अशा प्रकारच्या उपपदांशीं प्रायः समस्त केलेलीं असतात. शिवाय प्रस्तुत शब्दापासून बोध झटला ह्मणजे 'वेदांकरतां यत्न' असा होतो; अभिप्रेत अर्थ व्यक्त करणें अशक्त्यास 'वेदार्थ-विवरण-यत्न' असें कांहीं लांबलचक नांव हवें होतें.

वर जें प्रकृत पुस्तकाच्या भाषापद्धतीवर पहिलें मोठें दूषण दिलें आहे तें कोणत्या आधारावर हें आतां वाचकांस दाखवितों. तेणेंकरून आह्मांवर वृथा आरोप किंवा अत्युक्ति केल्याचा दोष कोणी समंजस व निःपक्षपात मनुष्य तरी निदान ठेवणार नाहीं;—

"वेदाचा मूळ अर्थ हजारों वर्षांपासून आजपर्यंत करणाऱ्यांनीं जे श्रम ज्या उद्देशानें केले आहेत त्याच ज्ञानेच्छेच्या उद्देशानें त्याप्रमाणें थोडा श्रम केला पाहिजे तरच भाषांतर समजेल असें कितीएक सूक्तांविषयीं कबूल करणें अवश्य आहे. आणि तसें झाल्यावरहि जर दुर्दैवेंकरून वाचकांची निराशा होईल तर त्याचा दोष वाचक कृपा करून भाषांतरकर्त्यालाच सगळा न लावितील अशी आशा आमच्यानें केल्याविना रहावत नाहीं. कारण कीं, आह्मी केवळ अर्थवाहक आहों, अर्थकारक नाहीं. भांडारांत जें असेल तें आणून आह्मी आमच्या प्रिय वाचकांपुढें ठेवूं. बाहेरचें आणून भांडारांतील हें आहे अशी अथवा भांडारांत अर्थ असून तो नाहीं अशी प्रतारणा करणार नाहीं. आणि या आमच्या कारभारांत आह्मांस देवाचे प्यारे सकल आर्यजन आपल्या "मित्रतेचा, अर्थांचा आणि सच्छास्त्ररूपी संततींत जें बळ नित्य असतें त्याचा अनुग्रह करून साहाय्य करितील" यांत संशय नाहीं.

(सूचना—पृष्ठ ७.)

कोण विलक्षण मराठी भाषा ही! प्रस्तुत पुस्तकास आश्रय देणाऱ्या मंडळींत कित्येक रेवरेंड, कित्येक शेट, कित्येक मिस्तर, वगैरे मंडळी आहे. त्यांस अशा भेसळीची नेहमीं संवय असल्यामुळें त्यांस वरील वाक्यांपासून कांहीं बोध झाला असल्यास नकळे. यांपैकीं कित्येकांनीं तर शेवटल्या वाक्याच्या शेवटीं पवित्र शास्त्रांतील ओंवीचा भ्रम होऊन बहुधा 'आमेन' या पवित्र पदाचा उच्चारहि केला असेल! असो; हाच आरंभींचा प्रकार पुढें चोहोंकडे आढळतो. त्याचीं कांहीं उदाहरणें देतों ह्मणजे बस आहे;—

'इंद्र चपल घोड्यावरून जातो,' 'शब्द वापरणें,' 'नवऱ्याचें काम वजाविण्याच्या स्थितींत असणें', 'भरभराटीची देवता', 'ही समजूत जिकडे तिकडे वेदमंत्रांत व्यापून आहे', 'सायणाचार्य जो याचा अर्थ करतात त्यावरून तरी विशेष तृप्ति होते असें नाहीं'.—'अन्नवंताच्या मैत्रींत रहाणाऱ्यापेक्षां शक्तिमंताच्या मैत्रींत रहाणारा विशेष निर्भय राहील हें सांगावयास नको'.—'वैदिक युगांत रथ होते व त्यांत कौशल्य खर्चून सुख होई अशी युक्ति करीत असत. ह्मणजे कितीएक सुखकारक व कितीएक हालण्यानें क्लेशकारक होते असें दिसून येतें.'

हा इंग्रेजी धर्तीवर मराठी भाषा गेल्याचा एक प्रकार झाला. याशिवाय प्रस्तुत भाषांतरावर दुसरींहि दोन मोठालीं दूषणें देणें अवश्य आहे. तीं यवनी

शब्दांचा प्रचार व अश्लील पदांचा प्रयोग हे होत. ज्या आमच्या देशबंधूंस एकीकडे यहुदी तर दुसरीकडे मुसलमान अशा मुमुक्षूंवरोबर डोळे मिटून ईश्वरास एखाद्या नादलुब्ध हरिणाप्रमाणें आळविण्याची संवय होऊन गेली असेल, व ज्या कित्येक भाग्यवंतांनीं आपल्या गौरकाय आर्यबंधूंबरोबर व आर्यभगिनींसहवर्तमान एका ताटांत किंवा निदान एका मेजावर क्षुधाशमन केलें असेल, त्यांच्या मनाचा कल काय असेल तो असो; पण आमच्या साध्या व अल्प समजुतीस असें वाटतें कीं, ज्याप्रमाणें वषट्काराचा घोष चालून इंद्रादि देवता सोमपानाविषयीं तरंगल्या असतां तेथें एका मेजावर मुसलमान बसून अग्नींत आहुति टाकतो आहे, दुसरीकडे कोणी ख्रिस्ती भट खुर्ची पुढें सरसावून उद्गातेपणाचें काम बजावीत आहे, असा प्रकार पाहिला असतां तो आह्मांस जसा मोठासा गोड वाटणार नाहीं; त्याप्रमाणेंच आमच्या प्राचीन ऋषींकडून 'हे अग्ने, तूं आह्मांस दौलत दे', 'हे इंद्रा, तूं आह्मांस मदत कर', 'हे अश्वया, तूं पिंवळ्या घोड्यांची जोडी वापरतोस,' असले प्रयोग वदवलेलेहि आह्मांस 'एखाद्या ठुंबरीप्रमाणें मधुर' मुळींच लागत नाहींत हें आह्मी प्रांजलपणानें कबूल करतों! तसेंच इंद्रास 'जवान पोळ' ह्मटल्यानें, दुसऱ्या एका देवतागणास 'जासूद' ही संज्ञा दिल्यानें, मरुतांस तर विचाऱ्या एके ठिकाणीं श्वापदांप्रमाणें 'कळप' हा शब्द लावल्यानें, तसेंच 'हे गड्यांनों, हा सूर्य--', 'इंद्रालाच फडानें गाणारे लोक स्तवीत असतात', 'वरुणाचे कपडे असे असतात', अशा वाक्यांनीं मूळ वेदवाणीचें महाराष्ट्र भाषेंत मोठें गौरव होतें असेंहि पण आह्मांस वाटत नाहीं.

१२. येथवर भाषासंबंधी दूषणांचें एक सदर झालें. आतां आंतील विषयाच्या संबंधानें आमच्या बुद्धीस यांत जे कित्येक दूषणीय प्रकार वाटतात ते सांगतों. एक तर विचित्र तर्क. हे तर्क दोन प्रकारचे असतात; एक शब्दांच्या संबंधाचे व दुसरे या देशाच्या नाना प्रकारच्या गोष्टींच्या संबंधाचे. या दोहों ठिकाणीं आपली कल्पनाशक्ति खर्च करून कांहींना कांहीं तरी अजब चीज वर्षा सहा महिन्यानें काढल्याखेरीज आमच्या पाश्चात्य बंधूंस बहुतकरून चैन पडत नसतें. त्यांचें इकडील भाषांचें व देशांचें ज्ञान अगोदर मासलेवाईकच असतें; त्यांतून वरील अक्कल लढवण्याचा प्रकार जेव्हां ते दाखवूं लागतात, तेव्हां तर कांहीं विलक्षण तारे तुटूं लागतात. एक ह्मणतो, 'अहो! पूर्वी सर्व भाषा एकच होत्या. याचें प्रमाण पहाण्यास फार लांब जायाला नको; पहा, बैबलांतला पहिला उत्पन्न झालेला पुरुष 'आदम' आणि संस्कृत शब्द 'आदिमः'!-दुसरी मौज पहा! 'यशोदेचा कृष्ण' आणि 'येशू ख्रिस्त;' किती जवळ मेळ आहे तो!-तिसऱ्या एका विद्वान् पंडितानें 'रामायणा'विषयीं व 'भगवद्गीते'विषयीं काय नव्या कोट्या काढल्या आहेत त्याहि सर्वांस माहीत आहेतच. याप्रमाणेंच आपल्या शिपायाच्या तोंडून 'जी साब' हे शब्द वरचे-

वर ऐकले असतां येथील एका शामण्य संस्कृतज्ञाचा तर्क धांवला कीं, हा बेटा 'जीव' असा आपणांस मूळ संस्कृत भाषेतला आशीर्वाद करतो आहे, हींहि मजा आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. फार काय, पण आमच्या सत्यशोधक पंडितांनींहि आज कित्येक वर्षें एक कोटी जगास जाहीर केली आहे; ती ही कीं, 'महाराष्ट्र' ह्मणजे 'मोठें राष्ट्र' नव्हे तर 'महार राष्ट्र'! आणि यास प्रमाण काय तर मराठींतली ह्मण 'जेथें गांव आहे तेथें महारवडा आहेच.' या शूद्रश्रुतीवरून निर्णय स्पष्ट होतो कीं, या प्रांतांतील रहाणारे मूळचे ब्राह्मणादि महादुष्ट व महामूर्ख लोक नव्हेत, तर त्यांचे 'महा–अरि' ह्मणजे 'महार' हे होत.[1] असो; आतां सदरील पुस्तकांत वरच्यासारख्या अप्रयोजक कोट्या मुळींच नाहींत हें खरें; तरी यांत युरोपीय पंडितांनीं केलेले अर्थ जेथें तेथें अगदीं पूर्ण भक्तीनें ग्रहण केलेले जे दिसत आहेत त्यांच्या संबंधानें प्रस्तुत पुस्तकाच्या कर्त्यास व त्याच्या वाचकांस पुढील सूचना केल्याखेरीज आमच्यानें रहावत नाहीं. ती इतकीच कीं, वरील द्वीपांतरस्थ पंडितांची शोधकबुद्धि जरी प्रशस्त होय, व त्यांनीं पुष्कळ चमत्कारिक शोध जरी केले आहेत, तरी त्यांच्या अपुरत्या ज्ञानामुळें इकडील गोष्टीविषयींचे त्यांचे पुष्कळ तर्क अगदीं भरकटलेले असतात, यास्तव एतद्देशीयांनीं त्यांचा स्वीकार करण्यापूर्वी त्यांचा अगोदर यथास्थित विचार करावा, आणि त्यानंतर युक्तायुक्ततेच्या मानानें त्यांचें ग्रहण किंवा त्याग करावा.

आतां 'वेदार्थयत्नां'त वरील कर्त्याचा दुसरा प्रकार जो नजरेस येतो त्याचीं कांहीं उदाहरणें सांगतों. या पुस्तकांतील टीपा साऱ्या जर वाचल्या तर त्यांपासून वाचकांच्या मनावर हा ग्रह दृढतर होणार आहे,–व तसा व्हावा याविषयीं 'यत्न'कारांचीहि पूर्ण मनीषा दिसते–कीं, ज्यांस आज हजारों वर्षें आह्मी परम पूज्य मानीत आलों आहों, व ज्यांच्या ठिकाणी सकल ज्ञानाचें अधिष्ठान कल्पून त्यांस आह्मी सरासरी देवांसारखे आजपर्यंत मानीत होतों, त्या लोकांची स्थिति सध्यांच्या एखाद्या रानटी राष्ट्रहून फारशी बरचढ होती असें नाहीं. त्यांची संपत्ति काय ती गुरें ढोरें, खाण्याचा मोठा मेवा ह्मणजे तूपलाह्या, प्यायचें उत्तम मद्य ह्मणजे सोमवल्लीचा पिळून

१. वरील सर्व कोट्या इतक्या पोरकट आहेत कीं, त्या वर दाखल केल्या यावद्दलहि कित्येक वाचक आह्मांस कदाचित् नांव ठेवतील. पण त्या मोठमोठ्या विद्वान् ह्मणविणारांनीं काढल्या असून तशाच प्रतीच्या लोकांच्या मनांत ठसाप वागत आहेत हें पुष्कळांस माहीत असेलच. पहिली कोटी आह्मीं दयानंदस्वामीच्या व्याख्यानांत ऐकिली; दुसऱ्याविषयीं प्रख्यात जर्मन प्रोफेसर वेबर साहेब यांचा वाद चालूच आहे: तिसरी 'जी'ची कोटी येथील एका प्रोफेसराची असून तिचें खंडन 'विविधज्ञानविस्तारा'नें केलेलें पुष्कळांस आठवत असेलच; आणि चवथी कोटी माजी डाक्टर विलसन यांनीं मराठी कोशाच्या प्रस्तावनेंत दाखल केली आहे. तेव्हां या सर्वांचें खंडन करणें अवश्य होय हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

काढलेला रस, बसायाचें मोठें उत्तम गालिचे ह्मणजे दर्भाचीं विणलेलीं आसनें. ही ऐहिक स्थिति झाली. आतां पारमार्थिक स्थितीचा जर विचार केला, तर तीहि भिल्ल, गोंड लोकांपेक्षां किंवा येथील वेदूंपेक्षां विशेष भिन्न दिसत नाहीं. पहा इंद्रासारख्या देवाला, वरुणासारख्या महाराजाला, अग्नीची मध्यस्थी घालून बोलावून आणायाचें, आणि मागायाचें काय? तर कोठें गाई दे, कोठें घोडे दे, कोठें शूर संतति दे; कोठें युद्धांत आमचें रक्षण कर, इतकेंच! आमच्या एखाद्या आधुनिक ब्रह्मोच्या पुढें जर देव येऊन उभा राहिला, तर तो कशा सुधारलेल्या जिनसा मागेल! कोठें ह्मणेल माझ्या हातून लोककल्याण करीव, मला एकदम वेदमूर्तित्व दे, मोठमोठे शोध करण्याचें बुद्धिसामर्थ्य दे, मुक्ति दे; खाण्यापिण्याच्या का जिनसा पोरासारख्या मागत बसेल! शरीर ह्मणजे काय पदार्थ; त्याच्या पोषणाबद्दल, रक्षणाबद्दल, वगैरे देवाला विनवणी करावी हें काय? असो; आतां वरील मजकुराच्या संबंधानें आह्मांस एवढेंच कळविणें आहे कीं, आमच्या प्राचीन पूर्वजांच्या ऐहिक व पारमार्थिक स्थितीविषयीं जरी आह्मांस अद्याप पूर्ण माहिती नाहीं, तरी वरील तर्क सर्वथा युक्त आहेत असें नाहीं एवढें आह्मांस समजतें. पहा बरें, ज्या आमच्या ऋषींस सोनें माहीत होतें, जहाजें माहीत होतीं, ज्योतिःशास्त्रांतहि ज्यांचा पुष्कळ प्रवेश झाला होता, ते केवळ रानटी व अज्ञानी कसे असतील! 'यत्न'कर्ते 'दर्भ' शब्दावर व्याख्या करतांना ह्मणतात, "दर्भाचें आसन घालणें यांत फार आश्चर्य नाहीं. कारण अजून तरी गालिचा आंथरणारे लोक थोडेच. पण लवाळ्याची अथवा शेंदीच्या पातीची हातरी बसायास घालणारे पुष्कळ." हा तर्क किती समंजस आहे बरें! दर्भाचीं आसनें घातल्यावरून प्राचीन आर्यांच्या दारिद्र्याची जर कल्पना करावयाची, तर आमच्या देशांतले मोठमोठे श्रीमंतहि केळीच्या पानावर जेवतात व कढीला द्रोण घेतात यावरून त्यांस कंगाल कां ह्मणूं नये? किंवा महादजी शिंद्याच्या हातीं तुळशीच्या मण्यांची स्मरणी असे, यावरून त्यास सोनें किंवा रत्नें मिळत नव्हतीं असें ह्मटल्यास काय चिंता आहे? दर्भ, लाह्या, सोमवल्ली यांस यज्ञीय द्रव्यें मानलीं असल्यामुळें त्यांचा विनियोग यज्ञांत करीत हें 'वेदार्थयत्न'कारांस आह्मीं सांगितलें पाहिजे काय?

तसेंच दोन तीन ठिकाणीं हे भाषांतरकार वाचकांस कळवितात कीं, आमच्या प्राचीन ऋषींची चाल सध्यांच्या ख्रिस्ती लोकांप्रमाणें पुरुष, बायका व मुलें अशी सर्वांनीं मिळून प्रार्थनेस बसावें अशी होती. पण यास आधारभूत ह्मणून जीं स्थलें दाखविलीं आहेत त्यांवरून वरील तर्क चांगलासा निघतो असें आह्मांस वाटत नाहीं.[1] तसेंच चवथ्या सूक्ताच्या आरंभीं 'सोम' शब्दाचा अर्थ 'पिळून काढलेला रस

१. अंक २ पृष्ठ १००, व अंक ३ पृष्ठ १७०. पहिल्या ठिकाणा एवढेंच वाक्य आहे कीं,

(पुढें चालू).

ह्मणजे मद्य' असा केला आहे हेंहि अंमळ चमत्कारिकच आहे. आतां वरील व्याख्येत 'मद्य' ह्मणजे 'दारू' असाच अर्थ स्पष्ट न लिहितां 'मादक' रस अशा संदिग्ध अर्थी त्या शब्दाची योजना केलेली जरी दिसते, तरी दुसऱ्या अनेक स्थलांवरून पहातां वरील निंद्य अर्थच त्यांस इष्ट आहेसा दिसतो. एके ठिकाणीं मूळ ऋचेंत देवांस अर्पण करायाच्या सोमाचें वर्णन असतां खालीं टीपेंत 'यत्न'कर्ते लिहितात, "आधुनिक मद्यपी आधुनिक मद्याची प्रशंसा यापेक्षां चांगली करूं शकेल?" यावरून वरील ऋचेंत मंत्रवक्त्या ऋषीनें प्राचीन ग्रीक किंवा अर्वाचीन फारसी भाषेंतील एखाद्या रंगेल कवीप्रमाणें बाटलाबाईचें मनोहर चरित्र गाइलें असा या आधुनिक भाष्यकारांचा अभिप्राय दिसतो. कसेंहि असलें तरी यज्ञशालेस खाटकाचें दुकान ह्मणणें जसें शोभणार नाहीं, त्याप्रमाणेंच सोम केवढाहि 'मधुर, स्वादिष्ट, तुरट, रसवान् आणि मादकारक' असला तरी त्यास 'मद्य' ह्मटल्यानें कोणत्याहि रसिक वाचकांच्या मनास उद्वेग झाल्यावांचून रहाणार नाहीं. आतां एवढें खरें कीं, प्रस्तुत 'यत्ना'स साह्य करणाऱ्या मंडळींत वर एके ठिकाणीं सांगितलेली रेवरेंड अधिकरून मोठी रसिक मंडळी आहे, व एतद्देशीय वाचकांपैकींहि कित्येकांनीं आधुनिक सोमाचें आधुनिक रीतीनें पान केलेलें असेल; तरी असल्या वाचकांस रिझविण्याकरितां मूळ वेदवाणीस भ्रष्ट करणें आह्मांस अगदीं प्रशस्त वाटत नाहीं.

याप्रमाणेंच 'चांगला गाडी हाकणारा' (हे शब्द वेदाच्या भाषांतरांत मोठेसे शोभतात असें नाहीं!) एवढ्या शब्दांवरून आमच्या प्राचीन आर्यांच्या वेळीं भरतखंडांत सध्यांप्रमाणें चांगले रस्ते नव्हते असा तर्क करणें, तसेंच 'शूर संतति दे,' एवढ्या शब्दांवरून आमच्या पूर्वजांच्या व येथील भिल्लप्रभृति लोकांच्या नेहमीं लढाया चालत असत ही कल्पना बसविणें, हेंहि सर्वांस किती मान्य होईल हें सांगवत नाहीं.

असो, येथवर वर सांगितलेल्या दूषणीय प्रकारांतला एक झाला. आतां दुसऱ्याचें निरूपण करतों. हा दोष तर प्रस्तुत सारख्या पुस्तकाच्या योग्यतेस फारच अपायकारक होय असें आह्मांस वाटतें. हल्लींच्या काळीं जिकडे तिकडे लोकांची धर्मावरील श्रद्धा उडून तसल्या विषयांवरहि चावटपणा करण्याचा जो प्रकार चोहोंकडे सुरू झाला आहे, तो बंद होण्याचें एखादें ठिकाण जर असेल, तर तें प्रस्तुत सारखीं अत्यंत पूज्य मानलेलीं जीं कांहीं धर्मपुस्तकें पृथ्वीच्या पाठीवर आहेत तीं होत यांत

'हे अग्नी, कण्वांनीं तुला हाक मारली आहे'; व दुसऱ्या ठिकाणीं असें आहे कीं, 'हे मित्रांनो, या बसा, आतां आह्मांस (आपणांस) सविल्याची स्तुति गावयाची आहे.' आतां वरील दोन संबोधनांवरून कुटुंबप्रार्थनेचा तर्क कितपतसा बनतो याचा वाचकांनींच स्वतंत्रपणें विचार करावा. हा विचार करतांना नुकतीं वर येऊन गेलीं दोन स्थलें,—'हे गड्यांनो', व 'फडानें गाणारे लोक' यांकडेहि वाचकांनीं लक्ष पुरवावें.

संशय नाहीं. यास्तव अशांतील प्रमेय जो लोकांस समजून देण्याचा 'यत्न' करील त्यानें अतिशयित गंभीर वृत्ति धारण केली पाहिजे. त्यानें आपल्या वाचकांस किंवा श्रोत्यांस हसविण्याकरतां विदूषकांच्या वृत्तीचें अवलंबन करणें हें अत्यंत अश्लाघ्य होय. तसें केल्यानें तो आपल्या स्थानाची प्रतिष्ठा घालवितो, व त्यामुळें अत्यंत दोषास पात्र होतो. आतां प्रस्तुत ग्रंथ जर एखाद्या मिशनरी साहेबांनीं हातीं घेतला असता तर त्यावर हवा तितका हास्यरस पिकविण्यास ते मुकत्यार होते. किंवा जर्मन पंडितांनीं त्यांचें भाषांतर चालविलें आहे त्यांत त्यांनीं इंद्रादि देवतांशीं हवा तसा विनोद केला तर तेंहि सर्वथा दूषणीय होणार नाहीं. पण 'अनादि काळापासून ज्यांत सर्व गोष्टींचें प्रमाण आणि पूज्यता व पवित्रता हीं राहिलीं आहेत, आणि ज्याच्या ज्ञानांत मोक्षप्राप्ति निःसंशय राहिलेली आहे' असें ज्यांनीं आरंभीं ह्मणावें व ज्याचा मोठा बाऊ करून वेदवाणीचा अर्थ मोठा दुर्गम यास्तव त्याविषयीं आह्मी हा नुसता 'यत्न' करीत आहों अशी इंग्रेजी नमुन्याची संकोचवृत्ति ज्यांनीं प्रगट करावी, त्यांनींच अगदीं पहिल्या पानापासून त्याच वेदवाणीशीं हास्यविनोदादि प्रकार आरंभावे हें आह्मांस अत्यंत अनुचित दिसतें. युरोपांतील देशभाषेतून बायबलाचें जेव्हां पहिल्यानें भाषांतर आरंभलें, तेव्हां पुढील काळीं व्हाल्टेर, गिबन, पेन यांनीं जी ख्रिस्ती शास्त्राची विटंबना केली, ती त्या भाषांतरांत टीपांच्या रूपानें जर सामील केली असती, तर त्या भाषांतरकारांची लोकांनीं काय अवस्था करून टाकली असती? फार कशाला, अजूनहि जर तसा प्रकार करून कोणीं बायबलाची नवीन आवृत्ति काढली, तर त्यास विलायत सरकारांतून व विशेषतः हिंदुस्थान सरकारांतून केवढें बक्षीस मिळेल बरें? हेंहि असो; पण ज्या लक्षावधि लोकांस बायबल हें केवळ गाबाळ ग्रंथ वाटतें त्यांच्या तरी वरील आवृत्ति आदरास पात्र होईल काय? उघडच आहे; कधींहि होणार नाहीं. कारण मनुष्यास किंवा ग्रंथास प्रमाणभूत न मानणें ही एक निराळी गोष्ट; व दुष्टपणानें त्याची विटंबना करण्यांत हर्ष मानणें हें एक निराळें.

आतां हेंच दूषण 'वेदार्थयत्न'कर्त्या मंडळांवर बऱ्याच अंशीं कसें येतें तें पहा. या मंडळीचीं धर्मसंबंधी मतें प्रस्तुत पुस्तकाच्या वाचकांस बहुधा माहीत असतीलच; कीं ते प्रार्थनासमाज पंथाचे आहेत, किंवा निदान त्यांचीं मतें तरी त्यासारखीं आहेत. तेव्हां अर्थातूच देशांत सध्यां चालू असणारा धर्ममार्ग पापपरिणामी असून तो देशास बुडवणूक आणणारा आहे असें यांचें कायमचें मत असून ज्या ग्रंथाचें ज्ञान आपल्या देशबांधवांस करून देण्याचा यांचा 'यत्न' सुरू आहे तोहि त्यांस विशेषतः मान्य आहे असें नाहीं. कां कीं, ईश्वरप्रणीत ग्रंथ मनुष्यास कोणताहि मिळालेला नाहीं हें त्यांच्या पंथाचें एक मुख्य तत्त्व आहे. आतां खरोखरी पाहिलें असतां वरच्यासारखीं प्रस्तुत भाषांतरकर्त्यांचीं कांहींहि मतें असलीं, तरी तीं प्रकृत

पुस्तकांत प्रगट करण्याचें कांहीं विशेष प्रयोजन नव्हतें; कां कीं, त्यांचें काम झटलें ह्मणजे फक्त अर्थ समजून देण्याचें. त्यांनींच प्रस्तावनेंत झटलें आहे कीं, "ह्यामत्रा हेतु इतकाच कीं, परम पुरातन, परम पूज्य आणि परम प्रमाणीभूत जो वेद त्याचा अभ्यास लोकांनीं करावा, आणि अर्थ सकल आर्यजनांनीं जाणून घ्यावा." मग ही स्वकृत मर्यादा उल्लंघून पुढील मताभिमान प्रगट करण्यांत प्रस्तुत 'यत्न'कारांचा काय हेतु असावा बरें ?——

"या मंत्रांत इंद्राजवळ ऋषि काय मागतो याचा विचार आपण केला ह्मणजे ऋषिजन देवांपेक्षांहि मोठे आणि ते विष्णूच्या वक्षःस्थळीं लाथ मारतील तर त्यापासून देवांचा देव विष्णु भूषण मानून घेईल या पौराणिक कथेची योग्यता समजून येईल. वेदांत ब्राह्मणांनीं देवावर वर्चस्व बजावलेलें दृष्टीस पडत नाहीं. ऋषि हे देवांच आपण उपासक आणि देव करतील तर आपलें कल्याण होईल अशीच सुबुद्धि बाळगीत होते."

(अंक १, पृष्ठ ३४–५).

तसेंच,

"या ऋचेंतील प्रार्थना किती नम्र आणि किती भाविक आहेत पहा. रक्षण करणारे देव 'महाराज' होत, ह्मणजे मोठ्या शक्तीचे व अधिकाराचे राजे होत; आणि ज्यांचें रक्षण करावयाचें तो दीन दास, दीनवाण्या स्थितींत आहे असें उपासक मंत्रवक्ता ह्मणतो. हा जो देवभजकभाव त्याला, आणि देवाधिदेव विष्णूच्या छातीवर ब्राह्मणानें लाथ मारली आणि तेणेंकरून जें क्षत पडलें तो एक अलंकारच आहे असें समजून विष्णूनें तें क्षत विरुद करून बाळगिलें आणि तो आपल्यावर ब्राह्मणाचा प्रसाद झाला असें मानिलेया अघोर पातकरूपी कथेला किती अंतर आहे पहा ?"

(अंक ३, पृष्ठ १२९).

आणखी पुनः,

"ऋग्वेदांत विष्णूविषयीं जें सांगितलें आहे त्यास आणि पुराणांत वगैरे त्याविषयीं सांगितलेल्या कथांस पुष्कळ अंतर आहे. विष्णूस अजून बायकोची व मुलांची आणि संसार करण्याची जरूर लागली नव्हती. तो ब्राह्मणाकडून लाथा मारून घेऊन त्यांतच आपला मान आहे असें मानून घेण्यास शिकला नव्हता."

(वित्ता–पृष्ठ १८०).

ब्राह्मणांवर कडाका–

"हा मंत्र फार सुंदर आहे. यांत वरुणाचा मोठेपणा किती नम्रभावानें मंत्रवक्ता वर्णीत आहे तें ध्यानांत ठेवावें. ज्या वरुणाच्या प्रसादाची इच्छा मंत्रवक्ता करितो तो साधारण एखाद्या जेजुरीसारख्या लहानशा गांवांतील देव आहे असें

नाहीं, तर तो सकळ भूलोकांचा आणि सकल पृथ्वीचा राजा आणि सकल भुवनांचा राजा होय. आणि उपासक उद्धट आणि गर्विष्ठ कर्मठ ब्राह्मण नाहीं, तर लीन आणि अनन्यभावें आपल्या देवाला शरण जाऊन आपली हाक ऐक अशी नम्रतापूर्ण साधी प्रार्थना करणारा एक सेवक होय. ब्राह्मणाचा शब्द असला तर पुरे, देवांचे दगड होतील आणि दगडांचे देव होतील अशी शक्ति भूदेवांस वैदिक युगांत आली नव्हती. त्या वेळचे उपासक बिचारे आह्मांसारखेच गरीब आणि निर्बळ मानव, पण अधिक प्रामाणिक आणि अधिक भजनोत्सुक होते."[1]

(अंक ४, पृष्ठ २४६–७).

वरील वचनें 'ज्ञानेदया'दि कर्पींचें पांडित्य आज सुमारें चाळीस वर्षें ऐकून स्वभाषेचें व स्वधर्माचें जे मातेरें करून बसले असतील, अथवा माजी आर्यसमाजाचे स्थापक जे यशःशुभ्र परमहंस त्यांनीं सगळ्या आर्यभूमीवर उड्डाण करून जें मधुर कूजित केलें तें ज्यांनीं ऐकून माना डोलविल्या असतील, अशा सर्व तत्त्वज्ञ वाचकांस भारी पसंत होतील यांत बिलकूल संशय नाहीं. पण ज्या अर्थी प्रस्तुत 'यत्न' वरील लोकांकरितांच केलेला नाहीं; व वेदाचा अर्थ समजून घेण्याविषयीं जे सर्वांत अत्यंत उत्सुक असणारे त्यांस वरील वाक्यें विशेष गोड लागतील असाहि संभव कर्मीच, त्या अर्थी प्रस्तुत 'यत्न'कार 'सुबुद्धी'च्या व सद्धर्मनिष्ठेच्या योगानें वरच्यासारखे अनेक ठिकाणीं जे वहावले अहेत ते मोठा विचार करून वहावले आहेत असें आह्मांस वटत नाहीं. वेदांतील मंत्रांचा अर्थ करतांना विष्णु, विठोबा, खंडोबा, वागजाई, यांच्याकडे व 'उद्धट आणि गर्विष्ठ' ब्राह्मणाकडे नजर वरचेवर गेल्याखेरीज जर रहातच नाहीं; तर ख्रिस्तमहाराजांकडे, त्यांच्या रोमनगरस्थ प्रतिनिधींकडे, बैबलांतील सुंदर कथाकडे, वगैरे तिचा लेशहि पोंचत नाहीं हें नवल नव्हे काय? प्रस्तुत पुस्तकाला हिंदु लोकांचा जसा आश्रय आहे तसाच ख्रिस्ती जनांचाहि आहे; तेव्हां त्यांच्या वर्गणीच्या मोबदला त्यांसहि उपहासाचा वांटा थोडा तरी मिळणें रास्त होतें हें कोण कबूल करणार नाहीं?

पण हेंहि सध्यां एकीकडे ठेवूं. पुराणें तितकीं तेथून तेथून अप्रयोजक व दुष्ट

---

१. वरील उताऱ्यांत ब्राह्मणांविषयीं जो भाव दृष्टीस पडतो तो आपल्या प्रिय वाचकांच्या अंतःकरणावर पक्केपणीं ठसविण्याविषयीं 'वेदार्थयत्न'कारांनीं जेथें तेथें मोठा आस्थापूर्वक 'यत्न' केला आहे. नुकत्या आलेल्या पांचव्या अंकाच्या शेवटीं शेवटीं तर 'ब्रह्मप्रतापा'वर सारखा भडिमार केलेला आढळतो (पृष्ठ २८२–८८–९८–३०२). प्रस्तुतसारख्या विद्वन्मान्य पुस्तकानें 'ज्ञानोदया'शीं किंवहुना 'ब्राह्मणांची गुलामगिरी' असल्या अप्रयोजक व हलकट ग्रंथाशीं समत्व पावण्याची वेडी हौस बाळगावी, व कांहीं प्रयोजन नसतां आपल्या आश्रयदात्यांपैकीं पुष्कळांचीं मन दुखवावीं, हें आमच्या मतें अत्यंत शोचनीय होय.

असून त्यांनींच मूळचा हिंदुधर्म जो कांहीं बरासा होता तो अगदीं भ्रष्ट करून टाकला, व हिंदुस्थानाची सांप्रतची अवस्था त्यास प्राप्त होण्यास ब्राह्मण व त्यांतून भट हे कारण झाले, हे आधुनिक विद्वानांचे दोन जबरदस्त सिद्धांत आहेत; तेव्हां त्यांस अनुसरून 'वेदार्थयत्नां'त वरील टीपा आल्या आहेत असें कदाचित् एके रीतीनें ह्मणता येईल. पण पौराणिक 'दवांचा देव' विष्णु यावर व त्याच्या छातीवर लाथ मारणाऱ्या 'उद्धट' ब्राह्मणावर प्रस्तुत भाषांतरकार मंडळीची लेखणी जशी सफाईनें वाहिली, तशीच ती वैदिक 'देवाच्या देवा'वर व त्याच्या 'प्रामाणिक' उपासकावर तरी निदान वाहावयाची नव्हती! आमच्या जुन्या यमाची व त्याच्या 'चित्रगुप्तादि दिवाणा'ची प्रार्थनासमाजाच्या सभासदास भीति बाळगण्याचें बिलकूल कारण नसून त्यांची त्यानीं खुशाल थट्टा केली यांत फारसें आश्चर्य नाहीं; पण ऋग्वेदांत ज्याच्या पराक्रमांचें वर्णन केलें आहे असा जो देवाधिदेव 'वज्रबाहु' इंद्र त्याशीहि 'यत्न'कार इतकी सलगी करतील हें कोणासहि वाटलें नव्हतें; पहा--

"या मंत्राच्या कर्त्याच्या समजुतीप्रमाणें इंद्र जन्मला, त्याचें सार्थक्य इतकेंच कीं, त्यानें देवांचें आधिपत्य करून सर्वांच्या वांट्यापेक्षां मोठा सोमाचा वांटा प्यावा."

त्याच्या उपासकांची आणखी फजिती—

"वरील सूक्तांत एवढ्या मोठ्या देवाजवळ जितकें मागावयाचें तितकें मागितलें नाहीं असें झटलें पाहिजे. अलीकडचे खंडोबा आणि म्हसोबा यांचे भगत सुद्धां त्या आपल्या देवांकडेस मोक्षादि मोठमोठे वर मागतात. असो; आमचे आर्य पूर्वज वरुणाच्या सार्वभौमत्वाच्या वेळीं कोणत्या स्थितींत होते तें लक्षांत ठेविलें पाहिजे."

असो; याप्रमाणें प्रस्तुत भाषांतरांत भाषेच्या व विषयाच्या संबंधाचे जे अनेक दोष आहेत त्यांचें निरूपण केलें. याशिवाय आमच्या एका बंधूनें जे दाखविले आहेत तेहि येथें दाखल करणें अवश्य होतें; पण अगोदरच एवढा मोठा विस्तार झाला आहे, यास्तव त्यांचा निर्देश मात्र येथें करतों. एक 'भाषायाम्' या सदराखालीं दिलेली वृत्ति. पहिल्या एक दोन अंकांत तर फारच थोडी दिलेली आहे; एखादा दुसरा शब्द क्वचित् बदलून मुसता वाक्यान्वय मात्र दिलेला आढळतो. तर ती पूर्ण असावी; ह्मणजे तेणेकरून मूळ ग्रंथाचें अध्ययन करणारास फार उपयोग होईल. दुसरी गोष्ट सुसंगतता. हिच्या संबंधानें पुढील अंकांत आह्मांस नांव ठेवण्यासारखें कांहीं दिसलें नाहीं; पहिल्या अंकांत 'दंभहारका'नें[1] 'सरस्वती' व 'ब्राह्मण' या

१. वरील पुस्तकाचा कांहीं महिने अस्त होऊन पुनः उदय झाला आहे हें सर्वांस बहुधा माहीत असेलच. आमच्या देशांत लोकांच्या उपेक्षेमुळें चांगल्या कृत्यासहि यश येणें

(पुढें चालू).

शब्दांवरील निरनिराळ्या टीपांचा जो विरोध दाखविला आहे आहे तो आह्मांस बरोबर वाटतो, व तो प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्याच अंकांत इतक्या थोड्या पृष्ठांत कसा घडला याचेहि आश्चर्य वाटतें. तसेंच या 'यत्ना'स पूर्वीचे अनेक ग्रंथ साहाय्यभूत असतां व त्यांचा यांत पुष्कळ उपयोगहि केला असतां, त्याबद्दल ह्मणण्यासारखें अवाक्षरहि 'यत्न'कारांनीं काढलें नाहीं, याचाहि आह्मांस चमत्कार वाटतो. यास्कपाणिन्यादि पुरातन ग्रंथकार तर राहोतच; पण चार पांचशें वर्षांमागें झालेला प्रसिद्ध वेदभाष्यकर्ता सायणाचार्य, व नुकती गेल्या वर्षीं संपलेली प्रसिद्ध मेक्ष मुल्लर साहेबांची ऋग्वेदाची आवृत्ति यांचा तरी प्रस्तुत मंडळीनें यत्किंचित् तरी उल्लेख करावयाचा होता. ज्याला वेदांचा अर्थ समजून घेण्याविषयीं उत्कंठा होईल त्यास सायणाचार्यासारख्या महापंडिताची व वर्तमानकालीं 'उक्षतरण' नगरीं वास करणाऱ्या महावैदिकाची माहिती आपणांस कांहीं तरी असावी हें बिलकूल वाटणारच नाहीं काय? जेथें जेथें वेदभाष्याचा व आपला विरोध झाला आहे तेथें तेथें मात्र सायणाचार्यांच्या नांवाचा उल्लेख करून त्यांची चूक त्यांच्या पदरीं घालण्याचा 'यत्न' केला आहे, व त्यासंबंधानें आरंभीं प्रस्तावनेंत वाचकांस सूचना देऊन ठेविली आहे. पण एकंदरीनें वरील भाष्यकाराविषयीं मजकूर,—कीं, तो कोठें होता, कोण होता, त्याची आमचे पाश्चात्य महापंडितजी निर्भर्त्सना करतात ती कितपत खरी आहे, वगैरेविषयीं कांहीं एक चकार शब्द सद्धां काढलेला नाहीं.[1] तसेंच पुनः

मोठें दुरापास्त होतें ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे. सुदरहू मासक पुस्तकानें 'राम ह्मटला' ही संतोषदायक व तमी 'ज्ञानोदय'कर्त्यास शोधाअंतीं जेव्हां पक्की समजली, तेव्हां त्यानें आपल्या पहिली मोठा नाटकी बळवळा दाखवून आपल्या 'पुणेवर बंधू'स त्याच्या भावी पुनरुत्थानाचें शुभ वर्तमान कळाविलें होतें. ही आमच्या खिस्ती बंधूची भविष्योक्ति लवकरच सफल झाली, व धर्मविचारावर चर्चा करण्यास व त्याची वादश्रद्धा पुरविण्यास एकाच्या जागीं पुनः दोन प्रतिपक्षी तयार झाले याचा आह्मांस अत्यंत संतोष वाटतो. असो; 'दंभहारका'च्या या नव्या अंकांत 'वेदार्थयत्ना'वर टीका असून तींत वर सांगितलेला दोषनिर्देश केला आहे. एकंदरींत वरील पुस्तकाच्या संबंधानें वरील अंकहि वाचण्याविषयीं आमच्या जिज्ञासु व अभिज्ञ वाचकांस सूचना केल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं.

१. सायणाचार्याविषयीं अद्याप विशेष कांहीं माहिती मिळालेली नाहीं. इतकें मात्र ह्मणतात कीं तो सुमारें ४७५ वर्षांपूर्वी होऊन गेला, व बुक्क नामक कोणा राजाच्या पदरीं होता. वेदांचें अध्ययन या देशांत इतक्या प्राचीन कालापासून सर्वतोमुख चालत असतां त्यांवर पाचशें वर्षांपूर्वी मुळींच भाष्य नसावें ही मोठ्या चमत्काराची गोष्ट आहे; व इतकें अलीकडे तें झालें असतां प्रमाणग्रंथस्थेंकरून चोहोंकडे मान्य होऊन जावें हाहि दुसरा चमत्कारच होय. असो; या भाष्यकाराविषयीं युरोपीय विद्वानांमध्यें मोठा वाद आहे. अर्ध्या हळकुंडानें पिवळे होणारे, व मूर्खपणाचा कां असेना पण नवा करकरीत शोध कांहीं तरी काढून

(पुढें चालू).

त्याच्या चुका ज्या काढल्या आहेत त्या 'यत्न'कारांनीं आपल्या बुद्धीनें काढिलेल्या आहेत किंवा त्या युरोपीय पंडितांच्या कोट्या आहेत हेंहि समजूं देण्याचा बिलकूल मार्ग ठेवला नाहीं. एकंदरीत वरील कृतीवरून मनुष्याच्या मनाची स्थिति 'वरुणाच्या सार्वभौमत्वाच्या वेळीं' बरी होती, कीं विष्णूच्या हातीं सत्ता असतांना होती, कीं आतां एकेश्वराच्या अमलांत बरी आहे, याची आमच्या सर्व वाचकांस बरीच कल्पना झाल्यावांचून रहाणार नाहीं!

१३. असो; येथवर आरंभीं प्रस्ताव केल्याप्रमाणें प्रस्तुत विषयाच्या संबंधानें पहिल्यानें एकंदर कांहीं माहिती, पुढें प्रकृत पुस्तकाचें स्वरूपकथन, आणि शेवटीं त्याचें गुणदोषविवेचन, याप्रमाणें सारे भाग आटपले. आतां सरतेशेवटीं कांहीं गोष्टी-विषयीं अवश्य लिहिलें पाहिजे तेवढें लिहून हा लेख आटपतों. वरील सर्व मजकूर जे जे वाचतील त्या सर्वांस तो सारखाच पसंत पडेल असें फार करून होणार नाहीं. स्थलविशेषीं तो उगाच जास्त कडक रीतीनें लिहिला असून टीका करणारांची सामान्यतः जी वृत्ति दृष्टीस पडते कीं, त्यांच्या मनास झणून फारसें कांहीं यावयाचें नाहीं तीच आह्मीं प्रगट केली आहे असेंहि कित्येकांस कदाचित् वाटेल. पण असे जर कोणीं आक्षेप काढले तर त्यांनीं असा विचार करावा कीं, आह्मीं वरील ग्रंथांवर जीं दूषणें दिलीं आहेत तीं उगीच मनःकल्पित दिलेलीं नाहींत; तर प्रत्येकाचे आधार

जगभर टिमकी वाजविण्याची भारी हौस बाळगणारे, जे कित्येक महापंडित युरोपांत आहेत त्यांच्या मतें 'सायण' हा केवळ मूर्ख व अप्रयोजक टीकाकार आहे; त्याच्या भाष्यावरून मूळचा अर्थ कळेनासा मात्र होतो. पण ज्यांचा वरील टीकाकाराशीं खरोखर चांगला परिचय झाला आहे त्यांचे मत वेगळें दृष्टीस पडतें. भट्ट मोक्षमूलर लिहितो—

"I do not wonder that others who have more recently entered on the study of the Vedas are inclined to speak disparagingly of the scholastic interpretations of Sáyana. They hardly know how much we all owe to his guidance in effecting our first entrance into this fortress of Vedic language and Vedic religion, and how much even they, without being aware of it, are indebted to that Indian Eustathius..... If we can now walk without Sáyana, we ought to bear in mind that five and twenty years ago we could not have made even our first steps, we could never, at least, have gained a firm footing, without his leading strings. If therefore we can now see further than he could, let us not forget that we are standing on his shoulders."

Rig-Veda--Samhita Vol. I.

जेथल्या तेथें दाखल केलेले आहेत. ते नीट लक्षांत आणले असतां व मूळ ग्रंथांत त्यांचें प्रत्यंतर पाहिलें असतां अत्युक्ति केल्याचा किंवा अन्यथा निरूपण केल्याचा दोष कोणाच्यानेंहि सहसा आह्मांवर ठेववणार नाहीं अशी आह्मांस खात्री वाटते. आतां कोणी असें जर ह्मणतील, कीं हें लोकोपयोगाचें काम आहे; तेव्हां अशावर टीका करून त्याचें खंडन करूं पहाणें हें दुष्टपणाचें कृत्य आहे; तर याचेंहि उत्तर सोपें आहे. एक तर हें कीं, जी लोककल्याणाची इमारत इतकी लुटपुटीत कीं चार शब्द विरुद्ध बोलले कीं लागलीच ती खचून जाते, असली उभारली काय आणि न उभारली काय सारखीच ! 'वेदार्थयत्ना'ची अशी गोष्ट नाहीं याबद्दल सर्वांची खात्री असेलच. पण दुसरी मोठी गोष्ट अशी कीं, ज्यापासून सर्व लोकांस मोठा उपयोग घडायाचा त्यांत कोणास कांहीं न्यूनता किंवा दोष दृष्टीस पडले तर ते त्यानें जाहीर करावे कीं दडवून ठेवावे ? या दडवण्यास जर सज्जनपणा हें नांव असेल, तर एवढी शाबासकी कोणताहि सुज्ञ मनुष्य खास पतकरणार नाहीं. वरील भाषांतर ह्मणजे एखादा यःकश्चित निबंध किंवा कादंबरी नव्हे; तर तें मोठें महत्त्वाचें कार्य असून देशभाषेचें चिरकालिक भूषण होणार, व एकंदर देशावर अनेक रीतींनीं त्यापासून कार्यें घडणार. यास्तव आमचा लेख ज्यांस आवडणार नाहीं त्यांनीं असें समजावें कीं, वर जे प्रतिकूल अभिप्राय आले आहेत ते प्रस्तुत भाषांतर करणाऱ्या विद्वान् मंडळीविषयीं आमच्या मनांत सन्मानबुद्धि कमी वागत असल्यामुळें आले आहेत असें नव्हे; तर प्रस्तुत विषयावर जी सर्व खऱ्या आर्यजनांप्रमाणें आमची अतिशयित भक्ति व पूज्यताबुद्धि आहे तिजमुळें प्रादुर्भूत झालेले होत. सारांश, ज्या प्रांजल बुद्धीनें प्रस्तुत पुस्तक भाषांतरकर्त्या मंडळीनें आह्मांकडे पाठविलें व त्यावर अभिप्राय मागितला, तोच भाव मनांत धरून आह्मीं आपले विचार 'लोकांस आवडणार नाहींत किंवा त्यांच्या प्रचारास व समजुतींस विरुद्ध आहेत' ह्मणून बिलकूल भय न बाळगतां ते स्पष्टपणें बोलून दाखविले आहेत. तर याप्रमाणें आह्मांवर सोंपवलेलें कार्य उरकलें असतां आतां लेखणी खालीं ठेवतों.

रसायनशास्त्र.



अनंतपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः ।
सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु हंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥[1]

१. "शास्त्रविस्तार हा फार अवाढव्य आहे, आणि आयुष्य तर अल्पमात्र असून पुनः विघ्नें शेकडों आहेत. यास्तव सारी विद्या संपादन करण्याच्या भरीस न पडतां सारभूत

(पुढें चालू).

अंक ३८—(१) रसायनशास्त्र, (२) प्रस्तुत विषयाचा विस्तार. (३) पूर्वीचे ग्रंथ. (४) प्रस्तुत ग्रंथाचें साहित्य. (५) मुख्य विषय. (६) भाषापद्धति. (७) स्वतंत्र रचना. (८)प्रयोग व प्रयोगांचें साहित्य. (९) व्यावहारिक उदाहरणें व शिल्पक्रियांची माहिती. (१०) स्थलनिर्देश. (११) उपसंहार.

१. वरील ग्रंथाची जाहिरात आमच्या पुस्तकांत गेल्या वर्षी दिली असून तें कांहीं महिन्यांपूर्वी छापून प्रसिद्ध झालें हें आमच्या वाचकांस विदित असेलच. त्याबद्दलची पोंचहि नुकती आह्मीं प्रसिद्ध केलीच आहे. या खेपेस सदरहू ग्रंथावर आह्मी आपला अभिप्राय प्रगट करतों.

२. आतां सदरील ग्रंथाविषयींच खुद्द विचार करण्यापूर्वी असल्या पुस्तकाच्या संबंधानें सामान्यतः पुष्कळ गोष्टी लिहिण्यासारख्या आहेत. त्या या कीं, युरोपांत अर्वाचीन काळीं सृष्टिविषयक अनेक शास्त्रांचा अपूर्व प्रादुर्भाव होऊन तीं प्रगल्भ दशेस जीं येऊन पोंचलीं आहेत तीं कशामुळें, त्यांपासून पाश्चात्य राष्ट्रांच्या आधुनिक उत्कर्षास कसें साधन झालें, इकडील राष्ट्रांनीं पदार्थविज्ञानसंबंधीं आजपर्यंत किती शोध केले, किंवा ते त्यांच्या हातून मुळींच झाले नाहींत, आमच्या देशाच्या प्रस्तुत स्थितीवर वरील शास्त्रांच्या ज्ञानानें कोणकोणतीं कार्यें होण्याचा संभव आहे, इत्यादि. टीकाविषयक ग्रंथाच्या प्रस्तावनेंत वरील संबंधाचे कांहीं विचार प्रदर्शित केलेले आहेत. त्यांवर विशेष विस्तार करण्यास व त्यांच्या यथार्थत्वाचें परीक्षण करून इतर संबंधानेंहि विवरण करण्यास पुष्कळ जागा आहे. पण विस्तारभयास्तव व विषयांतराच्या दोषास्तव तसें प्रस्तुत अंकांत करीत नाहीं. यापुढें प्रसंगानुसार त्याविषयींचे आमचे विचार वाचकांस सादर करण्याचा आमचा संकल्प आहे. यास्तव या ठिकाणीं फक्त सदरील ग्रंथाच्या संबंधानेंच जें लिहावयाचें तें लिहितों.

३. महाराष्ट्र भाषेंत पदार्थविज्ञानाच्या निरनिराळ्या शास्त्रांवर अद्याप चांगलेसे ग्रंथ झाले नाहींत हें सर्वांस माहीत असेलच. वरील विषयांवर ज्ञान होण्यास आमच्या लोकांस इंग्रेजी पुस्तकांखेरीज इतर साधनें ह्मटलीं ह्मणजे ज्योतिषादि कांहीं शास्त्रांवर झालेले ग्रंथ, मासिक पुस्तकांतील प्रसंगोपात्त लेख, व सामान्यतः व्याख्यानें वगैरे क्वचित् होणारे प्रसंग, इतकींच काय तीं होत. या सर्वांच्या योगानें पदार्थविज्ञानाचें सामान्य स्वरूप एतद्देशीय लोकांत जे कोणी विशेष बहुश्रुत आहेत त्यांस झालें आहे इतकेंच कायतें ह्मणतां येईल. प्रस्तुत रसायनशास्त्राविषयीं जर पाहिलें, तर आजपर्यंत त्यावर प्रसिद्ध ग्रंथ ह्मटले ह्मणजे काय ते दोनच होते. एक इकडील प्रसिद्ध गणिती व अलीकडील नव्या मंडळीपैकीं बहुतेकांस गुरुस्थानीं असलेले रा० रा०

जेवढा अंश दिसेल तेवढा ग्रहण करून बाकीचें टाकून दे; कीं ज्याप्रमाणें हंस हा क्षीरनीर विभाग करून दुधाचा तेवढा अंश काढून घेतो."

केरो लक्ष्मण छत्रे यांचें 'पदार्थविज्ञान;' व दुसरे कैलासवासी डा० नारायण दाजी यांचें 'रसायनशास्त्र'. पहिल्या ग्रंथांत प्रस्तुत विषय केवळ अंशतः आला असल्यामुळें त्याचें विवेचन संक्षेपानेच केलेलें आहे हें उघड आहे. दुसऱ्याचा कोठें विशेष प्रचार आढळत नाहीं. मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत मात्र मराठी विद्यार्थी त्यावरून रसायनशास्त्राची माहिती करून घेतात असें आह्मांस समजलें आहे. याखेरीज इतर वाचकांच्या हातीं तें पुस्तक जात असलसें वाटत नाहीं.

४. तेव्हां असल्या विषयावर आमचे मित्र रा० बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं ग्रंथरचना करून आपल्या देशबंधूंस पाश्चात्य शास्त्रविद्येंत प्रविष्ट करून देण्याचा जो हा यत्न त्यांनीं केला आहे तो परम स्तुत्य होय हें सांगायास नकोच. प्रस्तुत ग्रंथकारानें सदरील विषयाचा गेलीं चार पांच वर्षें सतत अभ्यास केला आहे. अनेक ग्रंथांचें साग्र अध्ययन करून, ज्यांस हें पुस्तक नजर केलें आहे अशा विद्वान् युरोपियनांकडून त्यांस सप्रयोग शिक्षणहि मिळालेलें आहे. शिवाय ते ज्या कामावर आहेत त्यामुळें तर सदरील विषयाचें निरंतर घोटन करण्याचा त्यांस प्रसंग पडतो. या कारणास्तव नवीन शिकणारांस हा विषय कसा सुबोध करून द्यावा, त्यांस त्यांतील कोणते भाग विशेष मनोरम वाटतील, व व्यवहारदृष्ट्या कोणते विशेष उपयुक्त आहेत, हें सर्व त्यांस अनुभवसिद्ध कळून प्रस्तुत ग्रंथ रचतांना हा अनुभव त्यांस पुष्कळ उपयोगीं पडला असेल यांत संशय नाहीं. याखेरीज हेंहि वाचकांस कळविण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं कीं, रा० मोडक यांचा पदार्थविज्ञान हा अत्यंत प्रिय विषय असून त्यांनीं त्यावर कोल्हापुरास सार्वजनिक व्याख्यानें दिलीं आहेत. अशा प्रसंगीं पुष्कळ प्रयोग त्यांनीं स्वतः करून साऱ्या लोकांस पाश्चात्य राष्ट्रांच्या विद्याप्रभावाविषयीं विस्मित करून टाकलें. सारांश, प्रस्तुत ग्रंथकारानें प्रकृत विषय आपल्या देशबंधूंस शिकविण्याचा पतकर जो आपणावर घेतला आहे तो केवळ अल्पस्वल्प ज्ञानाच्या जोरावर नसून तो घेण्याची योग्यता त्यांनीं आपले ठायीं चांगली आणली आहे हें वरील माहितीवरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत चागलें येईल.

५. आतां खुद्द ग्रंथाच्या गुणदोषांविषयीं विचार करावयाचा. प्रथमतः विषयाच्या संबंधानें. या सदरावर प्रस्तुतसारख्या पुस्तकांत फारसें विवेचन करण्यास जागा नसते हें थोडा विचार केला असतां वाचकांस तेव्हांच कळून येणार आहे. प्रत्यक्ष अनुभवावरून सिद्ध केलेल्या प्रमेयांचे जें शास्त्र झालेलें असतें त्याची विवरणरीति प्रायः एकच असते. तींत वादास मुळींच स्थळ न राहून रसाचा प्रादुर्भाव होण्यासहि बिलकूल अवकाश नसतो. गणिताच्या कोणत्याहि शाखेवर रचलेल्या ग्रंथांत जसे कांहीं नियमित सिद्धांत असायाचे, कीं ज्यांवर शंका घेण्यास अवकाशच रहात नसतो, व जे केवळ बुद्धीनें आकलन करायाचे असतात; त्याप्रमाणेंच रसायनादि

सृष्टिविषयक शास्त्रांतील सिद्धताहि अगदीं ठरलेल्या असून त्यांचें विवरण करण्याचा प्रकार एकच असतो. कविता, कादंबरी, इतिहास वगैरे विषयांवरील ग्रंथांवर रस-दृष्ट्या, युक्तिदृष्ट्या वगैरे जसें विवेचन करण्यास जागा असते, तशी भूमितीच्या किंवा भूगोलाच्या पुस्तकावर असत नाहीं हें उघड आहे. तर या कारणास्तव गुण-दोषविवेचनाचें मुख्य स्थान जे ग्रंथविषय तें सोडून देऊन इतर संबंधांनी सदरील पुस्तकाविषयीं विचार करूं.

६. या बाह्य विचारांपैकीं पहिला अगोदर भाषापद्धतीचा. या संबंधानें सांप्रत पुस्तकास नांव ठेवण्यास बिलकूल जागा नाहीं असें आह्मांस वाटतें. याची भाषाशैली अगदीं सुबोध आहे. विषय जरी इंग्रेजी आहे, व तो प्रौढ असल्यामुळें मोठमोठे संस्कृत शब्द घातले असतां जरी शोभणारे आहे, तरी धेडगुजरीचा किंवा आळ्यतेचा प्रकार यांत बिलकूल आणला नाहीं. कोणाहि सामान्य वाचकांस सहज अर्थग्रहण व्हावें अशा तऱ्हेची त्याची रचना केली आहे. आतां एक मात्र आहे कीं, मराठींत प्रस्तुत शास्त्रांतील नांवें अद्याप कोणींहि ठराविलीं नसल्यामुळें, साऱ्या पुस्तकभर इंग्रेजी शब्दांची गर्दी दृष्टीस पडते. केवळ मराठी भाषाच समजणारांस वरील परकी शब्द तर अत्यंत दुःश्राव्य होऊन ते त्यांच्या तोंडीं बसण्यासहि पुष्कळ श्रम पडतील. त्याप्रमाणेंच 'गुरु कार्ब्यूरेटेड हैड्रोजन,' 'निर्जल नैत्रिक आसिड' वगैरे व्यभिचारी प्रयोग पाहून वाचकांस हसूं आल्यावांचूनहि रहाणार नाहीं. पण समंजस वाचक याबद्दलचा दोष ग्रंथकारावर ठेवणार नाहींत हें उघडच आहे. नव्याच विद्याप्रदेशांत प्रथमतः जो वाट काढील त्यास ती सुगम व सुखावह करतां न आली ह्मणून दूषण देणें बरोबर नाहीं. जो रस्ता सध्यां बिकट व अडचणीचा वाटतो तोच पुढें पायमळणीनें बराच सुधरेल; किंवा तिकडे रहदारी विशेष वाढली असतां तोच दुरुस्त केला जाऊन तेथें कदाचित् चांगली सडकहि होईल.

७. दुसरा विचार प्रकृत ग्रंथाच्या स्वतंत्र रचनेचा. वर लिहिण्यांत आलेंच आहे कीं रा. मोडक यांनीं या विषयावरील अनेक ग्रंथांचें सतत पर्यालोचन करून सदरील पुस्तक तयार केलें आहे. यापूर्वी शास्त्रीय विषयांवर जे जे ग्रंथ झाले आहत ते प्रायः भाषांतररूप असत. ही भाषांतराची पद्धत अलीकडे कांहीं कांहीं मोडत चालली आहे; तीं अगदीं मोडून स्वातंत्र्यानें ग्रंथरचना करण्याचा प्रचार जेव्हां चोहोंकडे सुरू होईल तेव्हां एतद्देशीय भाषांस जोर येऊन खरी ज्ञानवृद्धि लोकांत होऊं लागेल. नेहमीं आईच्या कडेवर वागणारें पोर जसें किचकट व किरकिरें होत जातें, पण तेंच जर आपल्या पायांनीं चालूं लागेल तर त्याची त्यासच हुशारी वाटायाला लागून तें बळकट होत जाईल; तशीच गोष्ट भाषेची व लोकस्थितीची आहे. तेव्हां प्रस्तुत सारख्या गहन शास्त्रीय विषयावर सदरील ग्रंथकारानें अगदीं स्वतंत्र रचना

केली ही गोष्ट अत्यंत अभिनंदनीय होय. पण हा स्वतंत्रतेचा प्रकार केवळ ग्रंथकर्त्यास भूषणरूप व भाषाभिवृद्धीस अनुकूल ह्मणूनच चांगला ह्मणायाचा असा अर्थ नाहीं; तर विषयरचनेच्या संबंधानें पहातांहि त्याचें महत्त्व फार आहे. तें असें कीं, स्वतंत्र ग्रंथ करायाचा ह्मटलें ह्मणजे विवक्षित विषय ग्रंथकारास पक्केपणीं समजावाच लागतो; तो न समजेल तर त्याची लेखणीच चालायाची नाहीं. पण तेंच भाषांतर असलें ह्मणजे गोष्ट निराळी पडते. ग्रंथकर्त्याची जबाबदारी मजकुरावरची तेव्हांच उडून फक्त भाषेच्या संबंधानेंच काय ती त्याची मालकी रहाते. शिवाय देशभाषेंत एखाद्या विषयावर नवाच ग्रंथ करावयाचा असला ह्मणजे तो लोकस्थितीच्या अनुरोधानें लिहावा लागतो; ह्मणजे वाचकांचा त्यांत कोणत्या रीतीनें अत्यंत सुलभ प्रवेश होईल, व कोणत्या प्रकारानीं त्यांच्या मनावर तो उत्तम ठसेल, हें पहावें लागतें. अशा दृष्टीनें भाषांतररूप ग्रंथ तर फारच थोड्या योग्यतेचा ठरेल.

८. सदरील पुस्तकांत दोनशांवर प्रयोग दिलेले आहेत, व त्यांची कृति नीट लक्षांत येण्याकरितां सुमारें शंभर सवाशें आकृति ग्रंथाच्या शेवटीं जोडल्या आहेत. या प्रयोगांस कोणकोणतें सामान लागेल त्याचीहि याद किंमतीसकट सरते शेवटीं दाखल केली आहे. ग्रंथकाराचे हातून वरील साऱ्या प्रयोगांच्या कृति अनेक वेळां साक्षात् होऊन गेलेल्या आहेत, यास्तव वरील सर्व सोयी त्यास अनायासानें करून ठेवतां आल्या. असें करण्यांत दोन तीन हेतु आहेत. एक तर प्रस्तावनेंत सांगितलाच आहे कीं, एतद्देशीय शाळांतून प्रस्तुत विषय जसा चालावा तसा चालत नाहीं, यास्तव प्रस्तुत पुस्तकाच्या साहाय्यानें तो चांगल्या तऱ्हेनें शिकवितां यावा. दुसरा असा आहे कीं, कोणा हौसदार विद्यार्थ्यास या शास्त्राची चट लागून स्वतः प्रयोग करण्याची जर इच्छा झाली, तर तीहि शंभर सवाशें रुपयांत त्यास पुरवतां येऊन मौजेची मौज व माहितीची माहिती अशी दोन्ही त्यास करून घेतां येतील. तिसरा उपयोगहि लौकिक संबंधाचा एक फार मोठा करून घेतां येणार आहे. तो असा कीं, मोठमोठ्या शहरांतून वरील सामग्री जर आणून ठेवली, व पदार्थसंग्रहालयांतून पंचवीस प्रकारच्या शिंपा व पन्नास प्रकारचें शंख वगैरे जें सामान ठेवलें असतें त्याच्या जागीं वरील प्रयोगाची सिद्धता करून ठेवलेली जर असली तर लोकशिक्षणाचा एक उत्तम मार्ग स्थापित केलासा होईल. असल्या कृत्यास जो खर्च लागेल तो वसूल होण्याची पंचाईत पडेल असेंहि वाटत नाहीं. लोकांस अद्भुत चमत्कार पहाण्याची जात्या हौस असतेच, यास्तव ती पुरविण्यास सहज लोकाश्रय मिळण्याचा संभव आहे.

९. आतां प्रस्तुत ग्रंथाच्या एका गुणाविषयीं मात्र उल्लेख करायाचा राहिला आहे. तो हा कीं, त्यांस जेथें जेथें अवकाश सांपडला तेथें तेथें व्यावहारिक उदाहरणें देऊन पुष्कळ यांत्रिक व्यापारांची माहितीहि प्रसंगवशात् दिलेली आहे.

असें केल्याच्या योगानें दोन गोष्टी झाल्या आहेत. एक तर प्रकृत विषय वाचकांस सामान्यतः अपरिचित वाटण्यासारखा असल्यामुळें, व तो स्वरूपतःच कांहीं अंशीं रुक्ष असल्यामुळें, व्यावहारिक गोष्टींचा संबंध मधें मधें आल्यानें त्यास सुबोधता येऊन तो विशेष चित्तवेधकहि झाला आहे. वस्तुतः पहातां असला विषय साक्षात् प्रयोगदर्शनानेंच विद्यार्थ्यांच्या मनावर ठसावयाचा व त्यांस गोड लागावयाचा; पण तशी अनुकूलता किती थोड्यांस असणार? सामान्य वाचक जे असला ग्रंथ वाचणार ते अर्थात्च इतर पुस्तकांप्रमाणें केवळ मौजेखातर व विषयाची साधारण माहिती होण्याकरितां वाचणार. त्यांजपाशीं रसायनसामग्री कोठली? व आहे असें जरी कल्पिलें तरी एवढी खटपट कोण करीत बसतो? यास्तव मुख्य विषयाच्या अनुरोधानें व्यावहारिक गोष्टींचा संबंध सदरील पुस्तकांत वरचेवर आणला आहे ही चांगली योजना होय. दुसरें असें कीं, अलीकडे आमच्या लोकांचें देशी माल उत्पन्न करण्याकडे बरेंच लक्ष लागत चाललें आहे. आजपर्यंत ज्या त्या गोष्टींत सरकारावर टेंकण्याची जी त्यांस संवय लागली होती ती सोडून देण्याचें त्यांस भाग पडत चाललें आहे. व उत्तरोत्तर तर 'आपल्या बळें बांधावी कास, आणि कोणाची करूं नये आस' या झणीसच सर्वथा धरून चालण्याचें त्यांस अगत्य पडणार असा सुमार दिसतो. तर अशा स्थितींत प्रस्तुतसारख्या पुस्तकांत नुसतें शास्त्रीय विवेचन नसून व्यवहारोपयोगी अशा भिन्न भिन्न कलांच्या कृति व त्यांचे व्यापार यांविषयीं सविस्तर माहिती दिलेली आहे हें वाचकांस पसंत होईल यांत संशय नाहीं.

१०. आतां वरील उल्लेखाच्या उदाहरणार्थ सदरहू ग्रंथांतील कित्येक स्थलें दाखवितों. हीं अवतरणरूपानें संपूर्ण दिलीं असतां अतिशयितच विस्तार होईल, यास्तव त्यांचा निर्देश मात्र येथें करतों. त्यांवरून सदरील पुस्तकाच्या रचनेविषयीं वाचकांस बरीच कल्पना झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

रसायनाचा सृष्टिविषयक बहुतेक शास्त्रांशीं थोडा बहुत संबंध आहेच आहे. यास्तव प्रसंगवशात् त्यांविषयीं प्रस्तुत ग्रंथांत बरेच लेख आढळतात. उदाहरणार्थ--

पृष्ठ १२३. यांत बाष्पोद्भवनादि व्यापारांचें निरूपण केलें आहे. नंतर 'पाणी' या सदराखालीं 'पर्जन्योदक', 'झऱ्याचें उदक', 'पाण्यांतील क्षारांचें प्रमाण काढण्याची रीति,' 'नदीचें उदक,' 'खनिजोदक', 'समुद्राचें पाणी', अशा निरानिराळ्या विभागांचें विवरण केलें आहे.

पृष्ठ १२९. यांत हिऱ्याचें स्वरूप व धर्म हे सांगून त्यापुढें पृथ्वींतील अत्यंत नामांकित जे 'कोहिनूर' वगैरे हिरे त्यांविषयीं माहिती दिली आहे. नंतर लकडी पेन्सिलीचा दगड, व दगडी, लांकडी, लोखंडी वगैरे कोळशांच्या जाती, यांविषयीं पुष्कळ तऱ्हेची सविस्तर माहिती दाखल केली आहे.

पृष्ठ १४९. यांत कार्बानिक आसिड वायूविषयीं विवेचन चाललें असतां वारा मोकळा खेळेल अशा तजविजीनें घरें बांधणें हें आरोग्यास किती अनुकूल होय, वनस्पति व प्राणी यांचें श्वासोच्छ्वसन परस्परांस कसें हितावह आहे, तुळशीच्या झाडांत कोणता अपूर्व गुण असतो वगैरे आगंतुक विषयांवर पुष्कळ विवरण केलें आहे, व कित्येक अत्यंत महत्त्वाच्या सूचना करून ठेवल्या आहेत.

पृष्ठ १६५–१७०. यांत वातावरणाचा विषय असून हवेचे घटक जे निरनिराळे वायु त्यांच्या संबंधानें पुष्कळ अवांतर माहिती दिलेली आहे.

आतां व्यवहारोपयोगी ज्ञान या पुस्तकापासून जें होणारें आहे त्याचे मासले दाखवितों—

प्रयोग ५३, ५४. यांत गुळाची पांढरी साखर करण्याच्या दोन तीन रीति सांगितल्या आहेत.

पृष्ठ १३८. यांत फिल्टर ह्मणजे पाणी स्वच्छ व शुद्ध करण्याचें यंत्र कसें तयार करावें तें सांगितलें आहे.

पृष्ठ २११–२१४. यांत कापड पांढरें शुभ्र कसें करावें, व निरनिराळ्या रंगांचें बुट्टीदार कापड विलायतेत जें तयार करतात तें कसें करतात हें सर्व सांगितलें आहे.

प्रयोग १३३,१३४. यांत कांचेवर नक्षीचें काम करण्याचा प्रकार दिलेला आहे.

पृष्ठ १३९. यांत रेशमी, लोंकरी, वगैरे वस्त्रांस रंगहीन ह्मणजे शुभ्र करण्याची रीत सांगितली आहे.

पृष्ठ २४९–५० टीप. हींत फोटोग्राफीविषयीं माहिती आहे; ह्मणजे सूर्यकिरणांच्या योगानें हुबेहुब तजवीर कशी उठते तो प्रकार समजून सांगितला आहे.

प्रयोग १६३,१६४. यांत आगकाड्या करण्याची कृति सांगितली आहे. पहिल्या प्रयोगानें आवाज न होणाऱ्या काड्या तयार होतात, दुसऱ्यानें आवाज होऊन पेटणाऱ्या तयार करतां येतात.

पृष्ठ २७०–२७४. यांत कांचेविषयीं निरूपण केलें आहे. प्रथम सामान्यतः तिचें वर्णन असून नंतर 'खिडक्यांची कांच,' 'शिशाची काच,' 'बोहिमियन ग्लास,' 'गारेची कांच,' व 'रंगित कांच' इतक्या तऱ्हांविषयीं मजकूर आहे.

आतां प्रस्तुत पुस्तकांतले कांहीं चमत्कारिक प्रयोग दाखवितों. त्यांचें वर्णन वाचतांनाहि वाचकांस चमत्कार वाटल्यावांचून रहाणार नाहीं; मग ते प्रत्यक्ष पाहिले असतां किती मौज वाटेल याची कल्पना वाचकांनींच करावी!—

पाण्यावर जाळ——————प्रयोग——८.

पाण्यांत जाळ———————प्रयोग———१९
लोखंडावर तांबें चढविणें———————प्रयोग———२५
लोखंड जाळणें———————प्रयोग———३१
साबणाचे बुडबुडे———प्रयोग———३७
विमान———————प्रयोग———३८
दारू बत्तीशिवाय बंदुकीसारखा बार———————प्रयोग———४०
रसायन संगीत———————प्रयोग———४३
पाण्याचें विद्युत्प्रवाहाच्या योगानें पृथक्करण——— प्रयोग———११४
वायुसंयोगजन्य पाणी———प्रयोग—११२
पाण्याच्या गोठण्यानें लोखंडाचें भांडें फुटणें———प्रयोग—५०
उत्कृष्ट कारंजें———प्रयोग———९९
आग्या वेताळ———प्रयोग———१५९
पाण्यावर आगीच्या लाटा———प्रयोग———१६०

११. इतका निर्देश पुरे आहे. एवढ्यावरून टीकाविषयक पुस्तक कोणत्या तऱ्हेचें रचलें आहे याचा कोणासहि बराच अजमास करतां येईल. तसेंच वर त्याची जी तारीफ केली आहे ती केवळ 'मित्रनिष्ठे'च्या भरांत केली नाहीं याविषयींहि बहुधा खात्री होईल. आमच्या देशांत विद्या वाढण्यास व एतद्देशीय भाषांचा उत्कर्ष होण्यास काय झालें पाहिजे याविषयीं सदरील पुस्तकावरून आह्मांस एक कल्पना सुचते, तीहि येथें प्रसंगवशात् लिहिल्यावांचून रहावत नाहीं. ती ही कीं, सध्यांच्या शिक्षणपद्धतीनें 'वेश्यानामिव विद्यानां मुखं कैः कैर्न चुंबितम्' हा प्रकार होऊन विद्याभ्यास झणजे नेमक्या टप्यावर ओझें नेऊन पोंचविणाऱ्या हमालाचें काम अशी जी स्थिति झालेली आहे, त्यापेक्षां ज्यास ज्या विद्येची हौस वाटेल व जिकडे त्याचा जात्याच कल असेल तिकडे व्यासंग करायास जर प्रत्येक जण मोकळा होईल तर आमच्या सरकारचा एतद्देशीयांस विद्यादान करण्यांत जो वास्तविक हेतु आहे तो विशेष सफल होणार आहे. असो; पण हा सरकारचा विचार आहे; व त्याविषयीं विवेचन करण्याची ही जागाहि नव्हे. यास्तव सरते शेवटीं आमच्या नव्या मंडळीस एवढीच सूचना करून आटपितों कीं, रा० मोडक यांचा या कामीं कित्ता उच लून एकेक जण आपापला काळ एकेका विषयाकडे किंवा कांहीं विवक्षित विषयांकडेच घालविण्याचा जर संकल्प करील व आपापल्या व्यासंगाचें फळ कालांतरानें आपल्या देशबंधूंस सादर करण्याचें जर मनांत आणील, तर आजपर्यंतच्या अभिश्रापापासून ते मुक्त होतील, व देशभाषेचें कल्याण होऊन आजपर्यंत पाश्चात्य विद्या केवळ पांडित्य करण्यांतच जी प्रगट होत होती ती क्रियाद्वारा फलद्रूप होत्साती

ह्याच्या देशभर प्रगट होईल[1]!

संस्कृत ग्रंथ.

येन धौता गिरः पुंसां विमलैः शब्दवारिभिः।
तमश्चाज्ञानजं भिन्नं तस्मै पाणिनये नमः॥[2]

अंक ४२—(१) कौमुदीमहोत्साह. (२) गद्यपद्यावलि. (३) भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश.

१. 'कौमुदीमहोत्साह,' 'गद्यपद्यावली' व 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' हे तीन ग्रंथ त्यांच्या कर्त्यांनीं आमच्याकडे पाठविल्यास आज बरेच दिवस झाले. सदरील अंकांत त्यांवर यथानुक्रम आह्मी आपला अभिप्राय वाचकांस सादर करतों.

कौमुदीमहोत्साह—हें त्रैमासिक पुस्तक मुंबई येथें रा० रामचंद्र भिकाजी गुंजीकर व रा० काशीनाथ पांडुरंग परब यांनीं प्रसिद्ध करण्यास आरंभ केला आहे. सदरील अंक हा त्याचा पहिला खंड होय. असे पंधरा सोळा खंड होऊन हें पुस्तक समाप्त व्हावें असा त्याच्या प्रकाशकाचा अजमास आहे. प्रत्येक अंकाचीं पृष्ठें शंभर व्हावयाचीं असून किंमत एक रुपया ठेवलेली आहे. या मानानें पहातां चार वर्षांच्या शेवटीं 'महोत्साहा'ची समाप्ति होऊन १६ रुपयांस १६०० पृष्ठांचा ग्रंथ वाचकांच्या हातीं येईल.

आतां प्रस्तुत पुस्तकाविषयीं विशेषतः निरूपण करण्यापूर्वी त्याविषयीं सामान्यतः कांहीं लिहिणें अवश्य होय. या ग्रंथाचा विषय कोणता आहे हें बहुधा कोणासहि सांगायाला लागेल असें वाटत नाहीं. पाणिनिमुनीच्या सर्वप्रसिद्ध 'अष्टाध्यायी' नामक सूत्रात्मक ग्रंथावर अर्वाचीन प्रख्यात पंडित भट्टोजी दीक्षित[3] यांचा 'कौमुदी'

---

१. प्रस्तुत ग्रंथकाराचा पदार्थविज्ञानावरहि एक ग्रंथ तयार झालेला आहे. तो लवकरच छापून प्रसिद्ध करण्याची त्याची उमेद आहे. याशिवाय दक्षिणेंतील प्रांतांच्या प्राचीन इतिहासासंबंधीं माहिती पुष्कळ जमा करून महाराष्ट्र देशाचा प्राचीन इतिहास त्यांनीं अलीकडे लिहावयास घेतला आहे. हाहि कांहीं दिवसांनीं कदाचित् प्रसिद्ध होईल.

२. "ज्यानें निर्मल शब्दजलांनीं मनुष्यांची वाणी धुऊन शुद्ध केली, व अज्ञानजन्य मतिभ्रमाचें निरसन केलें, त्या पाणिनीस नमस्कार असो!"

३. दीक्षितांचें रहाणें काशीस होतें. त्यांचे वंशीय जे कोणी तेथें आहेत त्यांस [illegible] पूजेचा मान अद्याप चालत आहे. शिवाय असाहि लोकप्रवाद ऐकण्यांत आहे कीं, त्यांचा संचार त्यांच्या खाजगी वाड्यांत अद्याप असून पाणिनीयावरील शंकांचें समाधान त्यांजकडून अजूनहि विद्यार्थ्यांस होत असतें!

या नांवाची सर्वमान्य वृत्ति आहे हें संस्कृतज्ञांस माहीत आहेच. ही वृत्ति सुमारें दोन अडीचशें वर्षांतली आहे. तरी इतकी अर्वाचीन असतां हिचें प्रामाण्य एवढें आहे कीं, सायणाचार्याच्या वेदभाष्याप्रमाणें व मल्लिनाथी टीकेप्रमाणें तिची पंडितमान्यता तेव्हांच स्थापित होऊन तिच्यामुळें पूर्वीचे सर्व ग्रंथ लुप्त व्हावयाला लागून आजला तर बहुतेक बुडालेच आहेत. पूर्वीच्या 'काशिका'दि ज्या वृत्ति होत्या त्यांत मूळ 'अष्टाध्यायी'चाच क्रम धरून प्रतिसूत्रावर विवरण केलेलें असे. या विवरणाच्या पलीकडे कोणत्याहि प्राचीन पंडिताची मजल गेली नाहीं. पण भट्टोजींनीं आपल्या पूर्वीच्या सर्व वैयाकरणांवर ताण करून मूळ पाणीनीयावर नवीन रचना केली. गीर्वाण भाषेचें तीन मुनींनीं ज्या सूत्रजालानें निबंधन करून तीस सर्वथा नियंत्रित करून टाकिली होती, त्याचें उद्घाटन करून वरील अर्वाचीन पंडितानें त्याचा मनोरम पट विणला, आणि सकल भुवनास वंद्य व समग्र भाषांस शिरोभाग व मूलभूत असणारी जी या देशाची पुरातन आर्यभाषा तीस त्याचें पवित्र प्रावरण घातलें. हा प्रकार या पंडितानें असा केला कीं, मूळ पाणिनीयावर प्राचीन दोन मुनींचे व पुढील अनेक पंडितांचे[1] जे अभिप्राय होते ते सर्व एकत्र करून ते आपल्या वृत्तीशीं ऊहापोहपूर्वक सामील केले, व विषयक्रमास अनुसरून सूत्रव्यवस्था केली. तेणेंकरून काय झालें कीं, पाणिनीचा मूळ ग्रंथ जो अत्यंत दुर्बोध व विषयाच्या संबंधानें संकीर्ण होता, तो या वृत्तीच्या योगानें सुगम होऊन विद्यार्थ्यांस व्यवस्थेवार शिकण्यास सुलभ झाला आहे.

वर 'सिद्धांतकौमुदी'स सुगम व सुलभ झटलें आहे यावरून कित्येक वाचकांस असें वाटण्याचा संभव आहे कीं, 'कौमुदी' हातीं धरली झणजे मूळ 'अष्टाध्यायी' अत्यंत व्यक्त होणार आहे. पण असें केवळ झणतां येत नाहीं. संस्कृतांतील शास्त्रग्रंथांची सामान्यतः अशीच पद्धति आहे कीं, गुरुमुखावांचून त्यांत प्रायः प्रवेश होऊंच नये. व्याकरणास तर ही गोष्ट विशेषतः लागू पडणारी आहे. कां कीं, संस्कृतासारखी विस्तीर्ण व परिपक्व भाषा,–जींतील शब्दसंग्रह अपार व रूपांची साधनिकाहि तशीच विचित्र–तींतील साऱ्या नियमांचा संग्रह ज्या ३९८३ सूत्रांत केलेला आहे, व ज्यांतहि पुनः लाघवाविषयीं झणजे जितक्या थोड्या अक्षरांत नियम

---

१. पाणिनीच्या पुढील दोन मोठे वैयाकरणी झटले झणजे कात्यायन व पतंजलि हे होत. पहिल्या मुनीनें 'अष्टाध्यायी'स परिशिष्टादाखल अनेक 'वार्तिकें' रचिलीं; व दुसऱ्यानें सूत्रें व वार्तिकें यांची नीट व्यवस्था लावून 'महाभाष्य' नामेंकरून एक विस्तीर्ण ग्रंथ रचिला. या तिघां वैयाकरणांच्या प्रमाणत्वाविषयीं 'यथोत्तरं मुनीनां प्रामाण्यम्' असें पंडितप्रसिद्ध वचन आहे. 'हरदत्त', 'चंद्र', 'भीमसेन' इत्यादि आणखीहि कित्येक वैयाकरणांचीं नांवें 'कौमुदी'त मधून मधून आढळतात.

सांगतां येईल तितक्यांत तो आणण्याविषयीं अतिशयित यत्न केला आहे,[1] त्यांचे ठिकाणीं दुर्बोधता किती आली असेल, याची सहज कल्पना होईल! 'अष्टाध्यायीची' रचना किती बिकट आहे व तींत लाघवावर केवढा कटाक्ष ठेवलेला आहे, याविषयींचा प्रत्यय आरंभींच्या चौदा सूत्रांवरून तेव्हांच येण्यासारखा आहे. या सूत्रांस 'माहेश्वरसूत्रें' अशी संज्ञा प्रसिद्ध आहे. याशिवाय एखाद्या वैयाकरणास एखादें अवघडसें सुबंतांतलें किंवा तिङंतांतलें रूप विचारलें असतां तें सिद्ध करण्यास केवढी खटपट करावी लागते,–किती सूत्रांची अनुवृत्ति करावी लागते, कितींची निवृत्ति करावी लागते, विभाषादिकांवर किती लक्ष ठेवावें लागतें–हें सर्व ज्याच्या ध्यानांत असेल त्यास ही 'अष्टाध्यायी'रूप सूत्रजालाची रचना कशी असेल हें सहज समजेल. असो; तर असल्या सूत्रव्यूहाचा भेद करणें हें नुसत्या 'कौमुदी'वरूनहि साध्य होणारें नव्हे. हें जाणून दीक्षितांनीं वरील ग्रंथावर 'मनोरमा' ह्मणून एक निराळीच टीका लिहिलेली आहे.

वर जें सांगितलें त्यावरून वाचकांच्या ध्यानांत येईलच कीं 'कौमुदी'वर प्रस्तुत पुस्तकांत जी मराठी टीका दिली आहे तिची सांप्रत काळांत अत्यंत अवश्यकता आहे. हें भाषांतर या वेळेस जर न होईल तर 'अष्टाध्यायी', व 'सिद्धांतकौमुदी' हे दोन्ही ग्रंथ कापडांत गुंडाळून पुस्तकालयशोभनार्थ 'जेंदावेस्ता'दि प्राचीन ग्रंथांच्या सोबतीला ठेवून द्यावे लागतील. प्रस्तुतचा काळ असा कांहीं चमत्कारिक तऱ्हेचा आहे कीं, एखादा मनुष्य कडेपठारावरून चालत असतां तो कड्याच्या कांठावर जसा येऊन ठेपावा, तशी आमच्या देशाची हरएक गोष्टीच्या संबंधानें आज स्थिति आहे. आमच्या विद्या, आमच्या कला, आमचे आचार वगैरे सर्व परराज्याच्या अमलाखालीं मलिन व्हावयाला लागून लवकरच त्यांचा समूळ नाश होईलसा दिसत आहे. हरएक विद्येंत निपुण असणारे विद्वान्, हरएक कलेंत वाकबगार असणारे कारागीर, यांस सांप्रत काळांत सरकारांतून तर नाहींच, पण लोकसमुदायाकडूनहि आश्रय न मिळाल्यामुळें 'विनाश्रयं न शोभंते पंडिता वनिता लताः' या वचनाप्रमाणें त्यांचें दिवसेंदिवस मातेरें होत चाललें आहे. त्या त्या विद्येंत व कलेंत पूर्वीच्या सारखे नवे कोणी होत नाहींत हें तर काय, पण कोणी मुळीं होतच नाहींत. त्यामुळें सध्यां जे जे तसे मनुष्य आहेत ते एकदां खपून गेले ह्मणजे 'नवी विटी नवें राज्य' या ह्मणीप्रमाणें कांहीं वर्षांनीं सगळा हिंदुस्थान लखलखीत होऊन पूर्ण सुधारणा त्यांत प्रतिबिंबित होऊं लागेल! उदाहरणार्थ प्रकृत शास्त्रच घ्या. पांचपंचवीस वर्षांत या

१. 'अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सवं मन्यंते वैयाकरणाः' ('सूत्ररचनत कोठें अर्धमात्रा जर कमी करतां आली तर वैयाकरणांस पुत्रलाभापासून व्हावा तसा आनंद होतो') अशी एक वैयाकरणांची परिभाषा आहे.

शास्त्राच्या संबंधानें केवढें स्थित्यंतर झालें असेल! 'भाष्यां'त अध्ययन केलेले, 'कौमुदी' मुखोद्गत असणारे किती पंडित इतक्या काळांत लयास गेले असतील! व्याकरणाच्या किती पोथ्या वाण्यांच्या घरीं जाऊन हिंगजिऱ्याच्या कामीं लागल्या असतील! आतां यापुढें तर 'कौमुदी', 'शेखर' हीं नांवें सुद्धां ऐकूं येण्याचा संभव दिसत नाहीं. सध्यांच पाहिलें तर रस्तोरस्तीं भट्टोजी दीक्षित, नागोजी भट्ट या नांवांच्या जागीं भट्ट मोक्षमूलर, बोधलिंगाचार्य या शार्मण्य नामांचा आदेश कर्णप्रदेशावर आदळूं लागला आहे.[1]

येथवर सांप्रत पुस्तकाच्या स्वरूपाविषयीं व उपयुक्ततेविषयीं वाचकांस कळविलें. आतां यांत विषयसंग्रह कोणता आहे याविषयीं लिहितों. प्रथमतः 'कौमुदी'च्या क्रमाप्रमाणें 'अष्टाध्यायीं'तलीं सूत्रें लिहिलीं आहेत; त्याखालीं भट्टोजींची संस्कृत व्याख्या दिली आहे; तिच्या खालीं सदरील व्याख्येचा मराठी अर्थ केला आहे; आणि सरते शेवटीं वरील अर्थ विशेष परिस्फुट करण्याकरितां टीपा दिल्या आहेत. कात्यायनाचीं 'वार्तिकें' जीं मधें मधें आलीं आहेत त्यांचा निर्देश दोन फुल्यांनीं करून व्याख्यानाची व्यवस्था मूळ सूत्रांप्रमाणेंच केलेली आहे. वरील चार चार सदरें स्पष्ट उमगण्याकरितां लहान मोठ्या ठशांची योजना केली आहे;—ह्मणजे मूळ सूत्र फार मोठ्या अक्षरानें, संस्कृत वृत्ति त्याहून लहान, मराठी भाषांतर तिजहूनहि बारीक, व टीपा सर्वांहून बारीक. इतर सूत्रांचा संबंध जेथें जेथें प्रसंगवशात् आलेला आहे त्याचाहि निर्देश सांकेतिक अंकांनीं केला आहे. हें इतकें मुख्य ग्रंथाविषयीं झालें. याखेरीज कित्येक उपग्रंथ परिशिष्टरूपानें जे जोडले आहेत ते येणेंप्रमाणें—

पाणिनीकृत——सूत्रपाठ, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन.
(कित्ता)——शिक्षा.
शाकटायनकृत——उणादिसूत्रें.
शांतनवाचार्यकृत——फिट्सूत्रें.
कात्यायनकृत——वार्तिकपाठ.

---

१. व्याकरणाचीच काय पण एकंदर शास्त्रविद्येची स्थिति पाहिली असतां दिवसेंदिवस 'विश्वगुणादर्शा'त कृशानूनें महाराष्ट्राविषयीं जें ह्मटलें आहे तेंच पूर्ण प्रत्ययास येत चाललें आहे—

वेदव्यासः स नवदश यो वेद वेदाक्षराणि
श्लोकं त्वेकं परिपठति यः स स्वयं जीव एव।
आपस्तंबः स इह कलयेत्सम्यगापासनं सः
कष्टं शिष्टक्षतिकृति कलौ कार्श्यमृच्छंति विद्याः॥

या सर्व जुन्या ग्रंथांचा प्रस्तुत पुस्तकांत संग्रह करून शिवाय 'महोत्साह'कर्त्यांनीं 'अनुवृत्तिदर्पण', व 'सूत्रसूच्या'दि वर्णानुक्रमपर परिशिष्टेंहि जोडण्याचा विचार केला आहे. या उपग्रंथांपैकीं पहिला व दुसरा खंड[1] मिळून संपूर्ण 'सूत्रपाठ' व 'गणपाठ' आणि 'अनुवृत्तिदर्पण' यांचे कांहीं भाग इतका विषय आज छापून निघाला आहे. या तिहीं परिशिष्टांत विद्यार्थ्यांच्या सोयीकरतां विशेष सौलभ्य आणखी कांहीं करून ठेवलेलें आहे तें त्यांचें पर्यालोचन केलें असतां ध्यानांत येणारें आहे. खेरीज पहिल्या खंडांत दोन कोष्टकें घातलीं आहेत; एक प्रत्याहारांचें व एक स्थानप्रयत्नांचें. हींहि अध्ययन करणारांस पुष्कळ उपयोगीं पडणारीं आहेत.

प्रस्तुत पुस्तकाच्या विषयव्यवस्थेंचें वर जें निरूपण केलें आहे त्यावरून वाचकांच्या ध्यानांत येईलच कीं, संस्कृत व्याकरणाचें अध्ययन करणारास तो अतिशयित उपयोगी आहे. जुन्या पद्धतीप्रमाणें या शास्त्राचें साग्र परिज्ञान करून घेण्याची सोय दिवसेंदिवस नाहींशी होत चालली आहे, यास्तव सदरील पुस्तकावरून तें यथावकाश सहज रीतीनें प्राप्त करून घेण्यास मार्ग झाला आहे. शिवाय या एका पुस्तकाचा संग्रह केल्यानें विद्यार्थ्यापाशीं पाणिनीची 'अष्टाध्यायी', भट्टोजींची 'कौमुदी', कात्यायनाचा 'वार्तिकपाठ', व याखेरीज वर सांगितलेले 'गणपाठा'दि ग्रंथहि संगृहीत होणार आहेत. तसेंच प्रसंगानुसार व्याकरणनियम पाहूं जाणारास सूत्रादिकांचें सूचीपत्र जें येणार आहे तेंहि फार उपयोगीं पडेल. हा केवळ विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें उपयोग झाला. याखेरीज नुसता जो बहुश्रुत वाचक आहे त्यास प्रस्तुत विषयांत खुद्द जरी प्रवेश होणार नाहीं, तरी सदरहू पुस्तकांत टीपांच्या रूपानें जी अवांतर माहिती मधें मधें दिलेली आहे तिजपासून बरेंच ज्ञान होण्यासारखें आहे. संस्कृत भाषेच्या रचनेची त्यास थोडी बहुत कल्पना होऊन प्राचीन वैय्याकरणांच्या बुद्धिवैभवाची कीर्ति जी द्वीपांतरींहि ऐकूं येते तिचें यथार्थत्व त्यास भासल्यावांचून रहाणार नाहीं.

आतां सांप्रत त्रैमासिक पुस्तकाच्या प्रकाशकांनीं आपलें काम कोणत्या रीतीनें बजावलें आहे, त्यांच्या प्राकृत विवरणांत वगैरे न्यूनाधिक्य कांहीं आहे कीं नाहीं, याविषयीं येथें कांहीं निर्देश करणें अवश्य होतें. पण तें येथें होण्यास सवड नाहीं. कां कीं, मूळ 'कौमुदी'चा ज्यानें उत्कृष्ट अभ्यास केला असेल त्यासच वरील तारतम्य कळणार आहे. तितकी परिपक्वता प्रस्तुत पुस्तककारास अद्याप अनुकूल नसल्यामुळें वरील विवेचन करवत नाहीं. तरी इतकें कळविण्यास संतोष वाटतो कीं पूर्वोक्त द्वितीय खंडाच्या शेवटीं कित्येक तदभिज्ञ पंडितांचे अभिप्राय जे लोकांस जाहीर केले आहेत त्यांवरून पहातां हें काम उत्तम तऱ्हेनें चाललें आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. शिवाय ज्या वैयाकरणाच्या साह्यावर हा उद्योग उपस्थित केला आहे त्यासहि

१. 'कौमुदीमहोत्साहा'चा दुसरा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

कोठून विद्याप्राप्ति झाली आहे हें लक्षांत आणलें असतां प्रकृत विवरण कसें उतरलें असेल याचा कोणासहि सहज अजमास करतां येईल. यास्तव या संबंधानें येथें आणखी कांहीं लिहिण्याची गरज नाहीं. भाषापद्धतीच्या संबंधानें पाहिलें असतांहि प्रस्तुत पुस्तकाची प्रशंसाच केली पाहिजे. विषयानुरूप भाषा प्रौढ योजली असून ती अनभिज्ञ वाचकांस जरी प्रथमतः कांहींशी दुर्बोध वाटेल तरी परिचयाच्या योगानें ती सुगम वाटावयास लागेल, व तिची मार्मिकता व अर्थव्यंजकता त्यांच्या मनांत क्रमेंकरून भरेल यांत संशय नाहीं.

आतां सरते शेवटीं 'प्राचीन वैयाकरणाशीं आपल्या देशबांधवांचा स्नेह करून देऊं इच्छिणाऱ्या' आमच्या मुंबईकर दोघां बंधूंच्या स्तुत्य परिश्रमाबद्दल त्यांची तारीफ करून व त्यांचा सदुद्योग निर्विघ्नपणें शेवटास जावा याविषयीं आशा प्रदर्शित करून हा लेख आटपतों. हा आटपतांना देशस्थितीच्या संबंधानें एक उत्साहदायक विचार मनांत उद्भवतो तो येथें प्रगट केल्यावांचून रहावत नाहीं. तो हाच कीं, महाराष्ट्र भाषेकडे आमच्या देशांतील विद्वानांचें अलीकडे बरेंच लक्ष लागून आमच्या जुन्या विद्येचें पुनरुज्जीवन होण्याचाहि सुमार दिसूं लागला आहे. वेदशास्त्रांकडेहि लोकांच्या मनाची प्रवृत्ति व्हावयाला लागून शोधक बुद्धीनें सर्व विषयांचा विचार करण्याची संवय त्यांस लागत चालली आहे. असाच क्रम दिवसेंदिवस चालू झाला असतां कालेंकरून लोकस्थितींत पुष्कळ फेर पडत जाईल यांत संशय नाहीं. आजपर्यंत केवळ पाश्चात्य विद्येचेंच सेवन केल्यामुळें,—व तेंहि पुनः अल्पमात्र—जे विलक्षण ग्रह लोकांच्या मनांत जडून जात, व उत्तरोत्तर स्वाभिमानामुळें बळावत जात, ते आतां हळू हळू झडत जाण्याचा समय येऊं लागला आहे. हीं स्थिति एका तऱ्हेच्या लोकांस विशेष इष्ट वाटणार नाहीं खरी, व लोकशिक्षणाचा मूळचा जो उद्देश होता तो एकीकडेच राहून हें काय विलक्षण होत चाललें आहे म्हणून ते हाकाटी करतील, व करूंहि लागले आहेत हें खरें; पण या देशाचें खरें कल्याण झालेलें पहाण्यांत ज्यांस संतोष वाटत असेल त्यांस वरील स्थित्यंतर अत्यंत अभिनंदनीय वाटल्याविना रहाणार नाहीं. एकाच पारड्यांत सगळें वजन पडलें असतां तराजूची दांडी जशी तिरपी होऊन कल खाते त्याप्रमाणें आजपर्यंत एतद्देशीय विद्वज्जनांची व तद्द्वारा सामान्यतः पुष्कळ लोकांच्या मनाची स्थिति असे. पण अलीकडे दुसऱ्या पारड्यांत जसजशी भर पडूं लागली आहे तसतशी वरील दांडी खालीं यावयाला लागून तिची वास्तविक अवस्था जी समांतरता ती स्थापित होण्याचा संभव उत्तरोत्तर दिसत आहे. तर या भारतवर्षाच्या साऱ्या हितचिंतकांनीं ही समतेची अवस्था जेणेंकरून दृढतर स्थापिली जाईल तें करण्याविषयीं अवश्य झटलें पाहिजे. जुन्या विद्येतून जे जे पारंगत होतील त्यांनीं ती किंवा निदान तिचें मर्म

देशभाषांतून प्रसिद्ध करण्याचा उद्योग करावा, व एकंदर लोकांनीं त्यांस यथाशक्ति आश्रय देण्याचें मनावर घ्यावें. असें झालें असतां एकसमयावच्छेदेंकरून किती कार्यें उठणारीं आहेत पहा!–एक तर देशभाषांची उत्कृष्ट सुधारणा होईल; दुसरें, लोकांस विद्येचे नवे मार्ग खुले करून दिलेसे होतील; तिसरें लोकांच्या मनावर जे विजातीय ग्रह चिरकाल स्थिर होऊन राहिलेले आहेत ते अनायासानें दूर होतील,–कां तर दिवा लावला असतां अंधारास घालविण्याची निराळी खटपट करावयास नको, व दुसऱ्या बाजूस वजन घातल्यावर दांडीला खालीं ओढण्याची गरज नाहीं; आणि चवथें असें कीं, आमच्या जगद्वंदनीय पूर्वजांनीं आपल्या बुद्धीचे अपार विलास जे नाना तऱ्हांनीं प्रगट केले आहेत,–कीं, जे आह्मी परम भाग्यवान् ह्मणून आजपर्यंत अभंग राहिले व आह्मी देवाचे लाडके ह्मणून ते पहाण्यास अद्याप जिवंत राहिलों आहों, नाहीं तर मिसरी, पारसीक, ग्रीक, रोमन, वगैरे लोकांप्रमाणें आमचें पर्यवसान केव्हांच होऊन जावयाचें,–त्यांचेंहि लोकप्रसिद्धीनें चीज होणार आहे, व आपल्या कुलपरंपरेस आपण कालिमा लावलासा न होऊन प्राचीन ऋषिगणांच्या ऋणांतून चिरकाल मुक्त झालेसे होऊं![1]

गद्यपद्यावली–या पुस्तकाचा सध्यां प्रसिद्ध झालेला पहिला भाग आमचे स्नेही रा० सखाराम रामचंद्र किर्लोसकर यांनीं रचिला आहे. दुसरा जो तयार होणें आहे त्यांत वेदांतील ह्मणजे उपनिषदांतील, ब्राह्मणांतील वगैरे कांहीं उतारे यावयाचे आहेत, व एकंदर दोहों भागांवर टीपा यावयाच्या आहेत. हा दुसरा भाग आजला प्रसिद्ध झाला असता, तर पहिल्याची पूर्णता होऊन एकंदर ग्रंथाच्या संबंधानें विवेचन करतां आलें असतें. पण तसा तूर्त योग दिसत नाहीं, यास्तव पहिल्या भागाविषयींच लिहिणें जरूर आहे.

या पुस्तकाविषयीं दोन दृष्टींनीं विचार करण्यासारखा आहे. एक शाळांतून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संबंधानें, व दुसरा सामान्य वाचकांच्या संबंधानें. पहिला विचार असा कीं, ग्रंथकर्त्यानें ज्यांच्या उपयोगीं पडण्याकरितां तो केला आहे

---

१. वरील ऋणाचा उल्लेख केवळ अलंकारार्थ केला आहे असें नाहीं. प्रत्येक भारतवर्षीयावर तीन ऋणांचें ओझें आहे अशी पूर्वापासूनच समजूत आहे. हीं ऋणें प्राचीन ऋषि, देवगण, व पितृवर्ग अशा तिघांचीं होत. पहिल्यापासून मुक्त होण्याचा मार्ग ऋषिप्रणीत शास्त्रांचें अध्ययन, दुसऱ्याचा मार्ग यजन, व तिसऱ्याचा संतान हे यथानुक्रम होत. कालिदासानें अजराजाविषयीं ह्मटलें आहे —

ऋषिदेवगणस्वधाभुजां श्रुतयागप्रसवैः स पार्थिवः ।
अनृणत्वमुपेयिवान् बभौ परिधेर्मुक्त इवोष्णदीधितिः ॥

रघुवंश ८.

त्यांस तो किती उपयुक्त होण्यासारखा आहे; व त्याप्रमाणेंच संस्कृताचें ज्याचें थोडें बहुत अध्ययन झालें आहे अशा वाचकानें तो स्वतः हातीं घेतला असतां त्यास किती पसंत पडण्यासारखा आहे.

आतां प्रथमतः शाळांतून शिकविण्याविषयीं प्रस्तुत ग्रंथाची योग्यता या संबंधानें येथें जरी बरेंच लिहितां येणार आहे, तरी तसें करणें इष्ट दिसत नाहीं. कां कीं, एक तर तें आमच्या वाचकांस सामान्यतः कंटाळवाणें वाटणार आहे; व दुसरें असें कीं, सरकारी शाळांसंबंधी चर्चा करण्याचें हें पुस्तक नव्हे. यांत फक्त सामान्यतः लोकांच्या संबंधाचें जें तेवढ्याविषयींच उल्लेख आजपर्यंत करण्यांत आले आहेत, व असलेच उल्लेख एकंदर लोकासहि समजण्यासारखे होत. सरकारी शाळांची कशी काय व्यवस्था असते व तेथील विद्याभ्यासाच्या मानानें कोणत्या तऱ्हेचीं पुस्तकें तेथें चालणें जरूर आहे याविषयीं या पुस्तकांत उठाठेव करणें ह्मणजे एक तर 'अव्यापारेषु व्यापार' होणार; व शिवाय ज्याच्या उपयोगार्थ हें पुस्तक चाललें आहे त्यांचाहि वरच्यासारखाच टपका पुस्तककर्त्यावर येणार. यास्तव या सदराच्या संबंधानें येथें इतकेंच लिहिणें बस आहे कीं, संस्कृत पहिल्या व दुसऱ्या बुकाच्या पुढें काठिन्याच्या मानानें व मजकुराच्या योग्यतेच्या मानानें पहातां अशासारख्याच पुस्तकाची योजना ठीक होणारी आहे. जो पहिल्या व दुसऱ्या पुस्तकांतून पारंगत झाला आहे त्याच्या अंगीं हें वाचण्याची योग्यता क्रमानेंच येणार आहे. यातील पाठ अनुक्रमानें एकाहून एक अवघड असे घातले आहेत. हे सकृद्दर्शनीं जरी वाचकांस कदाचित् बरेच कठिण लागतील, तरी प्रत्येक पाठाचा संदर्भ समजला असतां, व दुर्बोध शब्दांवर व अपरिचित् व्याकरणरूपांवर भरपूर टीपा असतां ते बरेच सुबोध होतील असें आह्मांस वाटतें. यास्तव ग्रंथकारास आमची अशी सूचना आहे कीं, प्रस्तावनेंत सुचविल्याप्रमाणें दुसरा भाग तयार करण्यास त्यांनीं अनमान करूं नये. तो प्रसिद्ध न झाल्यास मात्र सध्यांच्या भागाचा अर्धा अधिक उपयोग नाहींसा होणार आहे.

दुसरा विचार केवळ सामान्य वाचकांच्या संबंधानें. असले लोक अद्याप आमच्या देशांत फार थोडे आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जुन्या पद्धतीनें शिकलेले जे शास्त्री लोक ते तर अलीकडे सर्वथा मागेंच पडत चालल्यामुळें, व असल्या पुस्तकांविषयीं त्यांस अभिरुचिहि विशेष नसल्यामुळें, त्यांच्यांत संस्कृत ग्रंथ वाचीत बसण्याचा नाद कितपत आढळण्याचा संभव आहे हें उघडच आहे. नव्या पद्धतीनें ह्मणजे अलीकडे शाळांतून व विद्यालयांतून तयार होणारी जी नवीन उमेदवार मंडळी त्यांच्यांत पाहिलें तरी वरीलच अभाव निराळ्या तऱ्हेनें दृष्टीस पडतो. तो असा कीं, त्यांच्या अंगीं नूतन शिक्षणपद्धतीच्या योगानें रसिकता विशेष येण्याचा जरी संभव असतो, तरी विद्यालयांतून सुटल्यावर आलस्यदेवतेची सामान्यतः त्यांच्यावर

अशी भरपूर कृपा होते कीं, विद्यापर्वतावरील नऊ देवतांपैकीं कोणतीच त्यांच्या माजींस उतरत नाहीं; नाहीं ह्मणण्यास बेकस् व व्हीनस् यांजवर मात्र त्यांची भक्ति जडते.[1] असो; पण हीहि स्थिति पालटण्याचा अलीकडे रंग दिसूं लागला आहे ही संतोषाची गोष्ट होय; व ती जसजशी पालटत जाईल तसतशी प्रस्तुतसारख्या ग्रंथांची चहाहि विशेष होणार आहे हें उघड आहे. असल्या वाचकांस सदरील ग्रंथ हा मराठी 'नवनीता'प्रमाणें उपयोगी पडेल. त्यांत जसे पहिल्यापासून शेवटपर्यंत साऱ्या महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांतील वेंचे दिलेले आहेत व ते वाचल्यानें साऱ्या कवींच्या वाणीचा अनुभव घडून एकंदर कवितेविषयीं कल्पना करतां येते; त्याप्रमाणेंच प्रस्तुत पुस्तकावरूनहि संस्कृतांतील निरनिराळ्या कवींच्या गुणांचें ज्ञान होऊन एकंदर कवितेचें स्वरूपहि समजून येणारें आहे. अगदीं आदिकवीपासून, किंबहुना त्याच्याहूनहि प्राचीन जे वैदिक कवि त्यांच्यापासून, तों थेट **जगन्नाथराया**पर्यंत बहुतेक मोठमोठ्या कवींच्या ग्रंथांतले उतारे 'गद्यपद्यावली'त आले आहेत. 'रघुकिराता'दि मोठालीं सर्व मान्य काव्यें; 'शाकुंतल', 'उत्तररामचरित' इत्यादि रसिकप्रिय नाटकें; 'कादंबरी', 'दशकुमारचरित' वगैरे गद्यप्रबंध; 'सर्वदर्शनसंग्रह', 'ब्रह्मसूत्रभाष्य' यांसारखे वेदांतविषयक ग्रंथ, अशा मोठमोठ्या प्रकरणांपासून तों 'हितोपदेश', 'पंचतंत्र', 'चाणक्यशतक', अशा अत्यंत सुबोध ग्रंथांपर्यंत सर्वांचें पर्यालोचन करून, त्यांतील यांत वेंचे काढलेले आहेत. शिवाय 'घटकर्परांतले यमकबद्ध श्लोक,' 'भट्टिकाव्या'तलीं व्याकरणोदाहरक पद्यें, 'गीतगोविंदा'तलीं तालसुरांवर ह्मणायाचीं गीतें, अन्योक्त्यादि सुभाषितें, जुन्या संस्कृत चालीचीं पत्रें, हे प्रकार सुद्धां त्यांत आणले आहेत. सारांश, प्रस्तुत ग्रंथाचें समग्र अध्ययन झालें असतां अपरिचित असा संस्कृत कवितेचा भाग फार करून थोडाच राहील!

असो; तेव्हां एकंदरींत रा० किर्लोसकर यांनीं संस्कृत विद्यार्थ्यांची एक मोठी उणीव दूर केली, व गीर्वाणकवितारूप महोद्यानाची रम्य शोभा संपूर्ण दृष्टिगोचर होई अशा प्रकारची नवी वीथिका त्यांत निर्माण केली, याबद्दल वरील भाषेच्या पुरस्कर्त्यांनीं व सकल विद्यावृद्धीच्छु जनांनीं त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. वरील वीथिकेस सर्वगम्य करण्याकरितां काय केलें पाहिजे हें वर सुचविलेंच आहे. आतां सरते शेवटी एवढेंच कळवितों कीं, प्रो० भांडारकर यांच्या पहिल्या व दुसऱ्या पुस्तकांच्या साह्य अध्ययनानें संस्कृत भाषेची व्युत्पत्ति प्राप्त होते असें ह्मणण्यास जशी हरकत नाहीं,

---

१. 'पार्नेसस' ह्मणून एक ग्रीस देशांत पर्वत आहे. त्यावर नऊ विद्यादेवतांचा वास ग्रीक लोक कल्पीत. या देवता कविता, इतिहास, हास्यप्रधान नाटक, शोकप्रधान नाटक, चित्रविद्या, संगीत, व इतर शिल्पकला यांवर अधिकृत असत. वर सांगितलेल्या शेवटल्या दोन देवतांचा अधिकार मद्य व शृंगार यांवर असे.

त्याप्रमाणेंच प्रस्तुत गद्यपद्यात्मक ग्रंथाचें पारायण केलें असतां त्या भाषेंतील काव्यग्रंथांचीहि विद्यार्थ्यांस चांगली माहिती होईल असें ह्मणण्यास फारसा बाध दिसत नाहीं.

भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश—हा ग्रंथ रा० रघुनाथ भास्कर गोडबोले, 'मराठी भाषेचा नवीन कोश' व 'हंसकोश' यांचे कर्ते, यांनीं रचिला आहे. वरील दोन्ही कोश हल्लीं प्रसिद्ध नाहींत. पहिला तर डिपॉतल्या डिपॉतच आहे; व दुसरा दहा बारा वर्षांपूर्वी कांहीं प्रसिद्ध होता, तो आतां नाहींसा झाल्यासारखाच आहे पहिला कोश अव्वल इंग्रेजींत कांहीं शास्त्री मंडळीनें जो एक मोठा मराठी कोश तयार केला होता त्याचा संक्षेप हेाय; व दुसऱ्यांत 'ज्ञानेश्वरी' वगैरे जुन्या ग्रंथांतून आढळणाऱ्या शब्दांचा मुख्यतः संग्रह आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा ज्यास इंग्रेजींत 'क्लासिकल डिक्शनरी' ह्मणतात अशा तऱ्हेचा होय. असे कोश इंग्रेजी भाषेंत ग्रीक व ल्याटिन भाषांच्या संबंधाचे अनेक आहेत, ह्मणजे प्राचीन ग्रीक व रोमन ग्रंथांतून अनेक देवतांविषयीं, उपदेवतांविषयीं, ऐतिहासिक पुरुषांविषयीं वगैरे जे जागोजाग उल्लेख आढळतात ते व्यक्त हेाण्याकरतां वरील भाषांच्या अभिज्ञांनीं वर सांगितलेले कोश रचले आहेत. त्याप्रमाणेंच अलीकडे इंग्रेजी भाषेंतील ग्रंथांची परिस्फुटता हेाण्याकरितां इंग्रेजी काव्यांतील व कादंबऱ्यांतील वगैरे नांवांचा निर्देश केलेले काशहि तयार झालेले आहेत.[1] हें तर काय, पण 'पवित्र शास्त्र' प्रत्यहीं किंवा निदान शाबाथाच्या दिवशीं तरी वाचण्याचा जरी ख्रिस्ती लोकांचा संप्रदाय आहे तरी त्याचें अनुसरण वस्तुतः कितपत होत असेल यांचें प्रमाण 'डिक्शनरी ऑफ बायबल नॉलेज' ('पवित्र शास्त्र संबंधी माहितीचा कोश') अशासारख्या ग्रंथांवरून बरेंच धरतां येणार आहे. असो; रा० गोडबोले यांनीं गेलीं सात वर्षे परिश्रम करून प्रस्तुत कोशरचनेचा जो उद्योग केला आहे तो अशाच तऱ्हेचा होय. 'रामायण', 'महाभारत', 'भागवत' व 'मत्स्य ब्रह्मांडादि' पुराणें यांत जे जे वृत्तांत आहेत ते वाचकांस सदरील ग्रंथांवरून उपलब्ध हाणार आहेत. अशा तऱ्हेचा कोश अद्याप कोठेंहि झालेला नाहीं;[2] आणि त्यांतून मराठीस तर तो केवळ अपवादरूपच आहे.

---

१. वेबस्टरच्या इंग्रेजी कोशास जोडलेल्या ज्या अनेक पुरवण्या आहेत त्यांपैकीं एक पुढील आहे—Vocabulary of Noted Names of Fiction &c. : त्याप्रमाणेंच अलीकडे Dictionary of phrase and fable ह्मणून एक कोश प्रसिद्ध झालेला आहे हें पुष्कळांस माहीत असेलच.

२. अलीकडे मद्रासेस प्रसिद्ध झालेला एक इंग्रेजी कोश मात्र अशा तऱ्हेचा आहे. याचें नांव 'Garret's Classical Dictionary of India असें आहे. याची रचना टीकाविषयक कोशाहून पुष्कळ प्रकारें निराळी आहे.

शिवाय हीहि गोष्ट सामान्य आहे असें नाहीं, कीं जी लोकसेवा खरोखरी पहातां कोणी नव्या उमेदवार विद्वानांच्या हातून व्हावयाची, ती प्रस्तुत ग्रंथकारासारख्या जुन्या चालीच्या एकट्या विद्वानाने मनांत आणून उतार वयांत वर्षानुवर्ष खपून लोकाश्रयाची किंवा राजाश्रयाची चिंता बिलकूल न करितां मुकाट्यानें तडीस नेऊन पोंचवावी ! या गोष्टीवरून केवळ उदासीनपणें सतत पडून रहाणाऱ्या आमच्या जुन्या पंडितांनां कांहीं उपदेश घेण्यासारखा आहेच; पण विशेषेंकरून आमच्या तरुण विद्वानांस—कीं, ज्यांच्या देशहितविषयक प्रलापांत शरन्मेघांच्या गर्जनेप्रमाणें गांभीर्य मात्र असून त्यांच्या विद्वत्तेचें चीज काय तें एखाद्या सभेची चिटणिशी किंवा पोतनिशी पतकरण्यांतच बहुधा झालेलें दृष्टीस पडतें,—त्यांस तर वरील गोष्टीचा चटकाच लागून जावा !

आतां प्रथमतः प्रकृत कोशाची रचना कशी केली आहे ती सांगून नंतर त्यांतील गुणदोषांविषयीं विवेचन करूं. यांतील सारीं नावें विल्हेवारीनें ह्मणजे अकारापासून ह्मकारापर्यंत वर्णानुक्रमानें दिलीं आहेत, हें 'कोश' या नांवावरून तर सिद्धच आहे. यास्तव जो शब्द पहावयाचा असेल तो वरील क्रमानें सांपडेल. कधीं कधीं एकच नांव अनेकांचें वाचक असल्यामुळें एकाच शब्दाखालीं त्याचे अनेकार्थ दिले आहेत. या अर्थांत जेथें जेथें विशेष कारण दिसलें तेथें तेथें त्या त्या ग्रंथाचा, पर्व, कांड, अध्याय इत्यादिपूर्वक निर्देश केला आहे. कोठें कोठें तर कार्यपरत्वें कांहीं कांहीं श्लोकांचे उतारेहि घेतले आहेत. या ग्रंथाचें संज्ञापत्र पहिलें असतां सहज कळून येईल कीं, यांत मुख्यतः तीन ग्रंथांतील नांवें भरपूर आलीं आहेत—एक रामायण, दुसरें भारत, व तिसरें भागवत. त्यांतून भारतावर तर कोशकाराचा विशेषच कटाक्ष आढळतो. त्यांत असणाऱ्या साऱ्या कथांचा त्या त्या नांवापुढें सविस्तर उल्लेख करून, देशमर्यादा, नदी पर्वतादिकांचीं स्थानें हींहि वरील ग्रंथाचाच मुख्यतः आधार धरून त्यानें निश्चित केलीं आहेत. पुराणांपैकींहि मत्स्य, लिंग, ब्रह्मांड, व स्कंद यांतून; व जैमिनी अश्वमेध, ब्रह्मोत्तरखंड इत्यादि कांहीं इतर ग्रंथांतूनहि सदरील कोशास मजकूर घेतला आहे. यांच्याखेरीज आणखी दुसरीं जीं पुष्कळ पुराणें आहेत त्यांतूनहि सदरील कोशास आणखी भर पडली पाहिजे होती; पण एक तर हीं सर्व हल्लीं दुर्लभ झालीं आहेत; दुसरें तीं सर्व वाचून कोशरचनेचा श्रम करणेंहि कांहीं सामान्य दगदग नव्हे; व तिसरें असें कीं, तीहि कोणीं केली तरी तिजपासून तादृश उपयोगहि नाहीं; यास्तव वरील न्यूनता कोणास विशेष भासणार नाहीं. असले कोश ज्या हेतूस्तव रचले असतात तो, सदरील ग्रंथ हल्लीं जेवढा आहे तेवढ्यावरूनहि पूर्णपणें सिद्ध होणार आहे.

वरील स्वरूपवर्णनावरून प्रस्तुत कोशाचा उपयोग काय काय होणार आहे तें

सहज लक्षांत येईलच. एक मोठा उपयोग तर हा उघडच आहे कीं, जुने संस्कृत किंवा मराठी ग्रंथ वाचतांना पौराणिक कथांच्या संबंधानें जेथें वाचकांस अडचण पडेल तेथें या ग्रंथापासून उत्कृष्ट साहाय्य होईल. अमुक अमुक पुरुष कोण होता, अमुक देश, पर्वत किंवा नदी ही कोठेंशी होती किंवा अद्याप आहे, वगैरे प्रकारची माहिती हें पुस्तक चाळलें असतां अल्पायासानें थोडक्यांत मिळणार आहे. तीच माहिती पुरतेपणीं पाहिजे असल्यास तीहि सोय आहे; कारण वर सांगितल्याप्रमाणें बहुतेक शब्दांच्या व्याख्यानाच्या शेवटीं मूळ ग्रंथ अध्यायादिकांच्या सकट संक्षिप्त रीतीनें सांगितलेला असतोच. यास्तव तो पाहिला असतां सर्व वृत्तांत सविस्तर सांपडणार आहे. हें एक झालें. दुसरें असें कीं, कोणा बहुश्रुत वाचकास आपल्या 'रामायणा'दि प्राचीन ग्रंथांत काय काय मजकूर आहे हें पहावेसें वाटल्यास तीहि मनीषा प्रस्तुत कोशावरून पूर्ण होणार आहे. उदाहरणार्थ 'राम' शब्द पहा. या शब्दाखालीं रामायणांतील सर्व इतिहास बालकांडापासून तों उत्तरकांडापर्यंत सगळा क्रमानें इत्थंभूत दिला आहे. याला या ग्रंथाचीं १७।१८ पानें लागलीं आहेत. याप्रमाणेंच 'रावण', 'दुर्योधन', 'कर्ण', 'भीष्म', 'धृतराष्ट्र' इत्यादि शब्द पाहिले असतांहि 'रामायण' व 'भारत' यांतील बहुतेक भाग वाचल्याप्रमाणें होणार आहे. तर रामायण भारतादि जे प्रचंड ग्रंथ,—कीं जे वाचणें हेंच अगोदर आयासाचें व पुष्कळ वेळाचें काम, आणि त्यांतून ज्याला संस्कृत येत असेल त्यासच साध्य—तें सांप्रत पुस्तकावरून कोणाहि टफ करणारास सहज वाचल्याचें श्रेय येणार आहे. तिसरा उपयोग भाविक वाचकांस यांनीं 'रामकथामहोदया'सारखीं लांबच लांब पुस्तकें वर्षानवर्ष जें वाचीत बसवें त्यापेक्षां सदरील ग्रंथांत सहस्रावधि पुण्यपुरुषांचीं चरित्रें थोडक्यांत त्यांस वाचावयास सांपडतील; व शिवाय विषयवैचित्र्यामुळें यांत मनोरंजन अधिक होऊन बहुश्रुतपणाहि प्राप्त होईल. चवथा उपयोग आमच्या नवीन विद्वन्मंडळासहि असल्या प्रकारच्या ग्रंथापासून एक मोठा होण्यासारखा असतो. तो स्वभाषेच्या संबंधानें होय. निरंतर इंग्रेजींत पडल्यानें त्यांच्या देशभाषेवर जें पाणी पडत जात असतें व घेडगुजरीची तऱ्हा त्यांस चिकटूं लागते, तिजवर प्रकृत कोशासारखे ग्रंथ मारक होत. यांचें कारण उघडच आहे कीं, ज्यांस म्लेच्छ भाषांचा कधींच संस्कार न घडून जे भाषादूषणाच्या संबंधानें जसे काय अगदीं सोंवळे राहिले त्यांच्या लेखांत 'बेबल'च्या बुरुजावरील भाषा शिरण्याचा बिलकूल संभव नाहीं!

या 'ऐतिहासिक कोशा'पासून बहुश्रुत व शोधक वाचकास निरनिराळ्या तऱ्हेचीं माहिती बरींच मिळण्यासारखी आहे. हिचे कांहीं नमुने दाखवितों. 'राधा' शब्द उलटून पाहिला असतां पुढील चमत्कारिक मजकूर सांपडतो—

"गोकुळांत कृष्णसखी राधा असल्याचें हरिदास इत्यादि वर्णितात; परंतु स-

गळ्या भागवतांत तिचें नांव कोठेंहि नाहीं."

तसेंच कुचैलाविषयीं—

"यास सुदामा अथवा श्रीदामा असें पुराणिक इत्यादि ह्मणतात; परंतु हें नांव भागवतांत नाहीं."

'नौबंधन'—या शब्दाखालीं जो वृत्तांत सांगितला आहे तो वाचला असतां 'पवित्रशास्त्रां'तील एका गोष्टीची आठवण होते.

हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार संज्ञाशब्दांचा. यांची व्युत्पत्ति या ग्रंथांत कित्येक ठिकाणीं प्रमाणपूर्वक दिलेली आढळते. उदाहरणार्थ पुढील शब्द पहा—

'उमा', 'करंधम', 'कान्यकुब्ज', 'चर्मण्वती', 'दण्डकारण्य', 'नक्षत्र', 'पांचजन्य', 'मांधाता', 'यक्ष', 'लोमहर्षण', 'वाराणसी', 'विपाशा', 'शतद्रु', 'सुपर्ण'.

तिसरा प्रकार प्राचीन काळची माहिती. ही सदरील पुस्तकावरून आपल्या भारतवर्षीय बंधुजनांस व्हावी हा ग्रंथकर्त्याचा एक मुख्य हेतु असल्यामुळें ती त्यानें जागोजाग अगत्यपूर्वक दिलेली आहे. प्रत्येक देशाच्या, नगराच्या वगैरे नांव पुढे तें कोठें होतें याविषयीं 'भारता'दि ग्रंथांत जें त्यास आढळलें तें त्यानें तेथल्या तेथें दाखल करून ठेवलें आहे यामुळें पूर्वीच्या स्थितीची कांहीं कांहीं बरीच माहिती मिळते. उदाहरणार्थ, 'मद्रदेश' व 'मत्स्यपुर' हे शब्द पाहिले असतां तेव्हांच कळून येतें कीं, पहिला देश ह्मणजे अलीकडील 'मद्रास' व विराट राजाचें नगर ह्मणजे हल्लींची 'वांई' या दोन्ही कल्पना केवळ अन्यथा होत. वरील दोन्ही ठिकाणें उत्तरेकडीलच असल्यामुळें वरील लौकिक कल्पना केवळ भासमय होत हें तेव्हांच लक्षांत येतें. चंद्रगुप्त राजाची राजधानी 'पाटलिपुत्र', विक्रमार्काचें नगर 'उज्जयिनी,' व पुढील काळीं अनेक संस्कृत ग्रंथांतून ज्यांचा उल्लेख आढळतो असे 'पारसीक' लोक, यांचा सदरील ग्रंथांत कांहीं वृत्तांत सांपडत नाहीं; यावरून भारती युद्धाच्या वेळीं वरील दोन्ही नगरें व वरील राष्ट्र हीं नव्हतीं असें सहज अनुमान होतें. 'महाराष्ट्र' व 'कोंकण' या शब्दांविषयींहि असेंच. पहिला देश 'दंडका' या नांवाखालींच त्या वेळेस बहुधा मोडत असावा, व दुसऱ्यास 'शूर्पारक' असें दुसरेंच नांव त्या वेळेस असावेसें दिसतें. आतां दुसऱ्या पक्षीं पहा. 'गांधार' ह्मणून जो प्राचीन देश होता (तेथील राजाची कन्या गांधारी) तोच बहुधा सांप्रतचा कंदाहार असावा. कारण त्याची पुरातन राजधानी जी तक्षशिला ती ग्रीक लोकांच्या ग्रंथांतून Taxila (तक्षिला) या नांवानें प्रसिद्ध आहे, व[1]

१. शिकंदर बादशहानें मिसर देश काबीज केल्यानंतर त्याच्या इतर मुलखांप्रमाणेंच हाहि त्याच्या तेहेतीस सरदारांपैकीं एकानें बळकावला. या सरदारानें टॉलेमीचें घराणें स्थापलें. हे राजे सारे विद्येचे मोठे शोकी होते. आलेक्झांड्रिया येथील जगत्प्रसिद्ध पुस्तकालय यांनीं

(पुढें चालू).

टॉलेमीच्या भूगोलवर्णनावरून पहातां वरील दोन्ही स्थलें परस्पर मिळतात. 'चीन' शब्द काढून पहातां तो 'भीष्मपर्वा'त आहे असें आढळलें;- व ही गोष्ट त्या देशाची सुप्रसिद्ध जी प्राचीनता तिशीं चांगली जुळते. याप्रमाणेंच 'कर्नाटक' हें नांव 'भारता'त सांपडत असल्यामुळें आजवर चालत आलेली त्या देशाची संज्ञा किती प्राचीन होय याचा निश्चय होतो.

असो; तर प्रकृत कोश लक्षपूर्वक वाचला असतां वरच्यासारख्या चमत्कारिक गोष्टी शोधक मनुष्यास अनेक कळण्यासारख्या आहेत. तसेंच लोकाचारांत वगैरे प्राचीन काळाहून अलीकडे काय काय फेरफार होत गेले आहेत हें समजण्यासहि या ग्रंथांत पुष्कळ साधन आहे हें उघड आहे.

येथवर प्रस्तुत पुस्तकाचा एतद्देशीयांस काय काय उपयोग होण्यासारखा आहे या संबंधानें त्याचें गुणवर्णन झालें. आतां त्यांत जे कित्येक दोष आढळतात त्यांचाहि निर्देश केला पाहिजे. हे दोष म्हणजे प्रकृत कोशास विशेष लागू आहेत व त्यांच्या योगानें त्याच्या उपयुक्ततेस बाध येण्यासारखा आहे असें नाहीं. ते केवळ कोशकर्त्याच्या धर्मविषयक समजुतीमुळें उत्पन्न झाले असून मुख्य ग्रंथापासून पृथग्भूत आहेत. तरी ते त्यांत अनेक ठिकाणीं प्रगट झालेले असल्यामुळें, व त्यांचा संसर्ग पुष्कळांच्या मनास जडण्यासारखा असल्यामुळें त्यांचें सविस्तर निरसन करणें अवश्य होय. शिवाय आपणास अपरिचित अशा विषयांवर अभिप्राय प्रगट केले असतां ते किती असमंजस होतात यांचेंहि उदाहरण पुढील विवरणावरून वाचकांस पहावयास सांपडेल.

'भारतवर्षीय कोशा'चे कर्ते जुन्या पद्धतीचे गृहस्थ असून वेदशास्त्रांवर त्यांचा पूर्ण भरंवसा आहे. अलीकडे पाश्चात्य विद्येच्या संसर्गानें आमच्या देशांत जी चोहींकडे बजबजपुरी माजली आहे, व वरील ग्रंथांस धाब्यावर टेवून 'मन राजा मन प्रजा' या न्यायाप्रमाणें यथेच्छ वर्तण्याचा जो प्रघात सुरू झाला आहे, तो त्यांस अत्यंत अनन्वित वाटतो हें उघड आहे. प्रस्तुत कोशाचें काम सात वर्षेपर्यंत सतत परिश्रम करून जें त्यांनीं तडीस नेलें त्याचा तरी मुख्य हेतु त्यांनीं प्रस्तावनेंत दाखल केल्याप्रमाणें आपल्या भारतवर्षीय बंधूंस ताळ्यावर आणण्याचाच होय. आतां असल्या उद्देशानें हे त्यांच्या हातून स्वदेशाची ही सेवा घडली ही गोष्ट संतोष मानण्यासारखी होय यांत संशय नाहीं; व एकंदरींत पहातां अलीकडील सुधारणेवर त्यांचा जो कटाक्ष

च मोठ्या श्रमानें व खर्चानें जमविलें होतें. वर ज्याचा उल्लेख केला आहे तो मोठा नामांकित भूगोलवेत्ता व ज्योतिषी होता. कोपर्निकस, ग्यालिलियो, यांचीं मतें प्रगट होत तोंपर्यंत त्यांचेंच मत साऱ्या युरोपभर चालू असे. संस्कृतांत 'यवनाचार्य'कृत म्हणून कांहीं ज्योतिषग्रंथ आहेत; हे आचार्य बहुधा वरीलच असावे असा पाश्चात्य संस्कृतज्ञांचा समज आहे!

आढळतो तोहि फार चुकीचा आहे असें आह्मांस वाटत नाहीं. तरी स्वदेशप्रीति व पूर्वजांविषयीं पूज्यबुद्धि या दोन्ही वृत्ति प्रस्तुत ग्रंथांत ज्या प्रकारें प्रादुर्भूत झाल्या आहेत तो प्रकार समंजसतेस विशेष अनुसरून आहे असें ह्मणवत नाहीं. याविषयीं पुढील उदाहरणांवरून वाचकांनीं स्वतंत्रपणें निर्णय करावा.

कोशकर्त्यानें प्रस्तावनेंत आरंभींच आपला एक पूर्वसंकल्प येणेंप्रमाणें लिहून ठेवला आहे--

"या ग्रंथांत श्रुतिस्मृतींस विरुद्ध किंवा पूर्वापर ग्रंथसंगतीस विरुद्ध अतएव कृतक अथवा हस्तदोषादिकांनीं अन्यथा लिहिला गेलेला तितका भाग सूक्ष्म दृष्टीनें गाळून टाकून, व त्याची जुळणी करतांना आरबी व फारशी भाषेचे शब्द त्यांत अगदीं न येऊं देऊन, लिहिण्याविषयीं अतिशय सावधपणा ठेवला आहे."

आतां प्रथमतः आरबी व फारशी शब्दांविषयीं कोशकारानें एवढी बंदोबस्ती जी करून ठेवली आहे तिजविषयीं विचार करूं. प्रस्तुत ग्रंथांतला विषय सगळा ऐतिहासिक व पौराणिक आहे यास्तव भारतवर्षीय प्राचीन पुरुषांच्या कथांतून यवनी शब्दांचा प्रयोग होणें हें मोठें विलक्षण दिसेल हें खरें आहे, व हें जाणूनच महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांतूनहि वरील शब्दांचा पूर्ण अभाव आढळतो. 'कृष्णानें पांडवांची वकीली पतकरली', 'रामसुग्रीवांनीं एकमेकांस मदत केली', हीं वाक्यें प्रस्तुत ग्रंथांत 'भीष्म हा कौरवांचा पहिला कमांडर इन् चीफ् झाला', 'दारुक हा कृष्णाचा कोचमिल होता' यांसारखींच अप्रयोजक व हास्यास्पद दिसणार आहेत! तेव्हां मूळ ग्रंथांत वरील परकी शब्दांचा रिघाव बिलकूल होऊं दिला नाहीं यांत कांहीं गैर ह्मणतां येत नाहीं. पण हाच निर्बंध ग्रंथबाह्य जी प्रस्तावना तींतहि कां दृष्टीस पडावा हें कळत नाहीं. 'कोंकणी समुद्र', 'जलयान', 'पादत्राण', 'परिलेख' वगैरे अपरिचित शब्द प्रथमतः योजून मग ते कोणास समजतील न समजतील यास्तव त्यांचे प्रसिद्ध पर्याय 'आरबी समुद्र', 'जहाज', 'पायपोस' 'नकाशा', इत्यादि पुढें कंसांत घालण्याचा द्राविडी प्राणायाम जो करावा, त्यापेक्षां तेच मुळीं घातले तर काय वाईट? स्वाहास्वधाकार चालला असतां तेथें यवनांचा, म्लेंछांचा वगैरे प्रवेश होऊं देणें बरोबर नाहीं, ह्मणून एरवींच्या व्यवहारांतहि तेथलें सोंवळें काय कामाचें! शिवाय जेथें ग्रंथाच्या परिस्फुटतेकरितां विलायती विरामचिन्हांची योजना खपली जाते, तेथें बिचाऱ्या 'जहाजा'वर व 'नकाशा'वरच एवढी कदर कां असावी?

दुसरी गोष्ट श्रुतिस्मृतिविरुद्ध लेख आणि कृतक किंवा लेखकप्रमादजन्य अशीं पुराणांतील वचनें यांविषयीं. हे तिन्ही प्रकार प्रस्तुत ग्रंथकर्त्यास जेथें जेथें भासले तेथें तेथें त्यानें त्यांचें खंडन केलें आहे. पहिली प्रस्तावना पाहिली असतां या खंडनाचें स्वरूप वाचकांस काहीं कळेलच; शिवाय कोश चाळतां चाळतांहि कित्येक

ठिकाणीं असलीं स्थळें सहज दृष्टीस पडतील. यांचा मासला ज्यांस पहाणें असेल त्यांनीं 'सूर्य', 'राहु', 'ग्रह', 'हिमालय', 'भरतखंड', 'खंड', 'सप्तद्वीपें', सप्तसमुद्र', 'रोहिणी', 'सहदेव', 'बृहस्पति', 'म्लेंछ', हे शब्द पहावे.

आतां वरील शब्दांवर रा० गोडबोले यांनीं जे जे आपले अभिप्राय प्रगट केले आहेत त्यांपैकीं दोन जातींच्या अभिप्रायांविषयीं आह्मांस कांहीं विशेष लिहिणें नाहीं. एक कृतक ह्मणजे बौद्धादि द्वेष्ट्यांनीं जीं वचनें किंवा जे श्लोक वर्ज्यच घुसडून दिले असावे असें त्यांस वाटतें तीं स्थलें; व दुसरीं लेखकांच्या प्रमादानें पडल्याविषयीं ज्यांच्या संबंधानें त्यांनीं स्वमत प्रगट केलें आहे तीं. अशांच्या संबंधानें आह्मांस एवढेंच कळवावयाचें आहे कीं, जोंपर्यंत पुराणांच्या अतिप्राचीन प्रती सांपडत नाहींत व कोणीं कोठें कोणता फेरफार केला हें निश्चितपणें समजण्याचा मार्ग नाहीं, तोंपर्यंत अमुकच भाग कृतक आहे हें ह्मणणें साहसाचें होय; व वस्तुतः पहातां कोशकाराचें काम एवढेंच आहे कीं, त्यास जें आढळेल तें त्यानें वाचकांस सादर करावें. भाषेचा जो कोश करील त्यास अमुक शब्द वाईट किंवा अमुक प्रयोग अशुद्ध ह्मणून ते गाळणें हें जसें बरोबर नाहीं; त्याप्रमाणेंच प्रकृत ग्रंथासारखी जो रचना करील त्यानेंहि अमुक अमुक वृत्तांत श्रुतिविरुद्ध होय किंवा बनावट आहे असें ठरवून तो गाळतां कामा नये. त्यानें आपलें मत अमुक अमुक ह्मणून पाहिजे तर प्रसिद्ध करावें, पण सर्वप्रसिद्ध ग्रंथांत आवड निवड करीत बसण्याचा त्यास अधिकार नाहीं. हीच गोष्ट लेखनप्रसादांसहि लागू. कांहीं निश्चित आधार असल्याखेरीज अमुक गोष्ट लेखकाच्या मूर्खपणानें चुकून पडली आहे हें ह्मणणें केवढें विलक्षण होय? लेखकमहाराजांस लिहितां लिहितां डुलकी आली, किंवा त्यांचें मन स्वभावसिद्ध चांचल्यास अनुसरून क्षणमात्र कोणींकडे विहार करण्यास गेलें तर पराकाष्ठा 'ट'च्या ठिकाणीं 'प' पडेल, किंवा त्यानें फारच दूर भरारी मारली तर कदाचित् पंक्तीची पंक्ति चुकेल, ह्मणून काय पूर्वसंगतीस अनुसरून असणारा अधिक वृत्तांत त्याच्या हातून कागदावर नकळत लिहिला जाईल? बुद्ध्या स्वकपोलकल्पित मजकूर त्यांजकडून लिहिण्यांत येईल ह्मणावें, तर सरस्वती देवीची कृपा त्यांवर प्रायः कितपत असते हें सर्वप्रसिद्धच आहे. 'माशीला माशी' ही ह्मण पुष्कळांस माहीत असेलच!

तर या दोन मुद्द्यांवर जास्त लिहिण्याचें आह्मांस कारण नाहीं. याखेरीज तिसरा एक मोठा मुद्दा जो या ग्रंथांत आढळतो, व ज्याविषयीं प्रस्तावनेंत एक दोन जागीं स्पष्ट लिहिलें आहे, त्यावर मात्र अंमळ विस्तारानें लिहिणें जरूर वाटतें. हा मुद्दा कोणता हें पुढील उताऱ्यावरून वाचकांच्या लक्षांत येईलच—

(प्रस्तावना)—"या ग्रंथांत व युरोपियन लोकांच्या ग्रंथांत इतकाच फेर आहे कीं, ते लोक अनुमानानें पृथ्वी लहान व सूर्याभोंवतीं फिरते असें मानतात; आणि

आह्मी शास्त्राधारानें पृथ्वी अतिशय मोठी व स्थिर समजतों.''

(कित्ता)--''मीं, या ग्रंथांत पृथ्वी लहान व गोलाकार नसून मोठी व सपाट आहे, तशीच सूर्याभोंवतीं फिरत नसून स्थिर आहे, असें प्राचीन इतिहासावरून लिहिलें आहे तें सत्य आहे. चंद्रग्रहणावरून पृथ्वी गोल व लहान आहे असें गणिती लोक जरी ह्मणतात तरी तें बरोबर नाहीं, कारण चंद्रग्रहणास पृथ्वी मुळींच कारण नाहीं. (राहु शब्द पहा.)''

(सूर्य)—''सारांश, असा वैदिक सिद्धांत भारतांत वर्णन केला आहे. ह्मणून पृथ्वी फिरणारी व सूर्य स्थिर असें कधींहि ह्मणूं नये; कारण (अचिंत्याः खलु ये भावा न तांस्तर्केण साधयेत्) असें (भार० भीष्म० अ० ५ श्लोक १२) यांत आहे. ह्मणून ऋषिव्यतिरिक्त इतरांस चिंतन करण्यास अशक्य ज्या गोष्टी त्या त्यांनीं तर्कें करून कधींहि साधायास जाऊं नयेत. गेल्यास तसें करणें दोषयुक्त आहे.''

(हिमालय)—''प्रस्तुतच्या भूगोलवेत्त्यांस अस्मदितिहासोक्त भूमीचा पूर्ण शोध लागला नाहीं; कारण ज्या प्रमाणांनीं एवढीच काय ती पृथ्वी असें त्यांनीं निश्चित केलें आहे, तीं प्रमाणें पंच दोषांनीं व्याप्त आहेत, त्यांचीं नांवें. मदमोहादिक मानस दोष, पित्तकामलादिक शारीर दोष, काणत्वादिक नेत्रदोष, दूरत्वादिक अर्थदोष, आणि काचादिक यंत्रदोष.''

(ग्रह)--''आतां राहु आणि केतु हे जे दोन ग्रह ह्मणजे तीं मंडलें, त्यांची व्यवस्था अशी आहे कीं, राहु मंडल चंद्र व सूर्य यांच्यामध्यें आहे व त्यामुळेंच तीं मंडलें अनुक्रमानें सूर्यचंद्रमंडलाच्या ग्रहणास कारण होत आहेत. (छादयत्यर्कमिंदुर्विधु भूभिर्वा) ह्मणजे सूर्यग्रहण होण्यास कारण चंद्र आणि चंद्रग्रहणास कारण पृथ्वी, सूर्यसिद्धांतांतील वाक्य, काल्पनिक अतएव असत् होय.''

(भरतखंड)—''पृथ्वी अल्प परिमाणाची, गोलाकार व सूर्याभोंवतीं फिरते, इत्यादिक कल्पना आमच्या प्राचीन इतिहासकर ऋषींस संमत नसल्यामुळें, त्यास अनुसरून लिहिणाऱ्या मला तर संमत नाहींतच; परंतु माझ्या वैदिकधर्मी सर्व बांधवांसहि नसाव्यात; कारण, तिजभोंवतीं पूर्वपश्चिम प्रदक्षिणा करून आलेल्यांस अजून दक्षिणोत्तर प्रदक्षिणा झाली नाहीं व कल्पसमाप्तीपर्यंत किंवा पुढें होईल, असेंहि कधीं होणार नाहीं.''

(सप्तमहासागर)—''आह्मीं संपूर्ण पृथ्वीचा शोध लावून तिला प्रदक्षिणाहि करून आलों असें जें ह्मणतात, त्यांस अद्यापपर्यंत क्षारसमुद्राचें उल्लंघन झाल्याचें व अन्यद्वीपांत गेल्याचें त्यांच्या इतिहासांत कोठें आढळत नाहीं; तथापि आह्मीं गेलों असेंच त्यांचें ह्मणणें असेल, तर तशी प्रतीति कां होऊं नये ? प्रतीति हीच कीं सुरासमुद्रांतून मद्य शिसे भरून सर्वत्र यावें तें अजून येत नाहीं. त्याप्रमाणेंच दहीं, दूध, तूप,

ऐसाचा रसहि येत नाहीं. तेव्हां सर्व पृथ्वीचा शोध लागला हें ह्मणणें संभवत नाहीं."

इतके उतारे पुरे आहेत. यांवरून प्रस्तुत कोशकारांचा अर्वाचीन पदार्थविज्ञानावर केवढा कटाक्ष आहे तो वाचकांस सहज कळून येईल. आतां वरील साती उतान्यांत पृथ्वीच्या आकाराविषयीं व विस्ताराविषयीं, चंद्र सूर्याच्या ग्रहणांच्या वास्तविक उपपत्तींविषयीं, पृथ्वीच्या दैनंदिन परिभ्रमणाविषयीं, साता समुद्रांविषयीं वगैरे जे अभिप्राय प्रगट झाले आहेत, त्यांविषयीं सविस्तर विवरण करायाचें ह्मटलें ह्मणजे एक स्वतंत्र ग्रंथ होण्यासारखा आहे. स्वतंत्र ग्रंथ ह्मटलें ही कोणास अतिशयोक्ति केलीशी वाटेल; पण वरील विवरणाच्या पोटीं किती अवांतर विषय येणार आहेत याचा विचार केला असतां वरील शब्दांची यथार्थता ध्यानात आल्यावांचून रहाणार नाहीं. भूगोल व खगोल या शास्त्रांविषयीं प्राचीन राष्ट्रांस कितपत माहिती होती; त्यांतून प्राचीन आर्यांचें एतद्विषयींचें ज्ञान कितपत स्थितीस येऊन पोंचलें होतें; वेदांत, पुराणांत, व आर्यभट्ट, भास्कराचार्य इत्यादि ज्योतिष्यांच्या ग्रंथांत परस्पर कितपत मेळ आढळतो; अलीकडे पृथ्वीचें गोलत्व, तिची दैनंदिन व वार्षिक प्रदक्षिणा, तिच्या अंगीं असणारी आकर्षणशक्ति, इत्यादि प्रमेयें इंग्रेजी पुस्तकांतून जीं आढळतात तीं आमच्या कोशकारांच्या ह्मणण्याप्रमाणें केवळ अनुमानानें सिद्ध केलीं आहेत किंवा प्रत्यक्षादि इतर प्रमाणांनींहि त्यांस निश्चितता आली आहे; 'अचिंत्याः खलु ये भावा न तांस्तर्केण साधयेत्' हें भारतोक्त वचन प्रस्तुत स्थलीं कितपत लागू पडणारें आहे, व या 'अचिंत्य' गोष्टींविषयीं 'तर्क' करूं गेलें असतां त्यांत पातकसंग्रह होणार आहे कीं काय; 'सूर्यसिद्धांता'च्या वचनास 'काल्पनिक अतएव असत्–' असा शेरा मारून वर जें बेलाशक झुगारून दिलें आहे तें बरोबर केलें किंवा कसें; 'मदमोहादिक मानसदोष,' अर्वाचीन भूगोलज्ञांवर जे ठेवून दिले आहेत ते कितपत यथार्थ आहेत; पृथ्वीची अद्याप कोणीं दक्षिणोत्तर प्रदक्षिणा जी केली नाहीं तिचें बीज काय व ही प्रदक्षिणा न झाल्यानें तिचा सपाटपणा व विस्तीर्णपणा सिद्ध होतो किंवा कसें; तसेंच या एकंदर विषयाचा व धर्माचा परस्पर संबंध आहे किंवा नाहीं,–ह्मणजे पदार्थविज्ञानसंबंधीं माहिती बिनचूक असल्यानें किंवा नसल्यानें धर्मविषयक ग्रंथांची योग्यता कितपत कमजास्त होते,–या सर्व सदरांवर यथास्थित निरूपण करूं गेल्यास केवढा ग्रंथ माजेल! तर प्रस्तुत स्थलीं यांच्यापैकीं दोन तीन मुख्य गोष्टींविषयीं मात्र कांहीं उल्लेख करतों ह्मणजे बस आहे.

पहिली गोष्ट पृथ्वीचा गोलाकार. खगोलविद्येस मुख्य आधारभूत जें हें प्रमेय,––कीं ज्याचें आकलन होण्यास युरोपियन लोकांस कित्येक शतकें लागलीं,––तें आह्मांस तर केव्हांपासून माहीत झालेलें आहे कोण जाणे! 'पृथ्वी' व गोल या दोन पदांचा निकटभाव आमच्या प्राचीन भाषेंत इतका दृढपणें स्थापित

होऊन गेलेला आहे कीं, 'भू' व 'भूगोल' या दोन शब्दांत अर्थाच्या संबंधाचें न्यूनाधिकभाव सुद्धां विशेष भासत नाहीं. एक कल्पना आली कीं दुसरी जणों काय तिला लगडून मनांत आलीच! अगदीं प्राचीन ग्रंथांपासून तों अर्वाचीनांपर्यंत 'भूगोल', 'क्षितिचक्र', 'कुवलय' इत्यादि शब्द जेथें तेथें प्रयुक्त केलेले आढळतात. त्याचप्रमाणें 'पृथ्वीप्रदक्षिणे'च्या कथा 'रामायणा'पासून प्रसिद्ध आहेत. सकलसृष्टा व सकल व्यापी जो परमेश्वर त्याच्या पोटांत अनंत 'ब्रह्मांडें' नांदताहेत हें त्याचें स्तवनहि आमच्या देशांत आज अनादिसिद्ध चालत आलेलें आहे. पण या सर्वांहून केवळ दृग्गोचर प्रमाण कोणास पाहिजे असल्यास त्यानें आमच्या ज्योतिर्ध्यानीं आपल्या जुन्या मताप्रमाणें तयार केलेले पृथ्वीचे गोल पहावे. ते पाहूनहि कोणास संशय उरल्यास त्याची खात्री याच्या पलीकडे आमच्यानें करवणार नाहीं!

दुसरी गोष्ट पृथ्वीचें परिमाण. याविषयीं निरानिराळ्या पुराणांतून काय काय लिहिलें आहे तें आह्मांस माहीत नाहीं; पण एतद्देशीय ज्योतिष्यांस हें परिमाण सांपडलें आहे कीं नाहीं याविषयीं निश्चय होण्यास पुढीलच उतारा बस आहे;—

"भास्कराचार्यप्रभृति, अर्वाचीन ब्राह्मण ज्योतिषी व न्यूटनप्रभृति युरोपियन ज्योतिषी यांस जी भूमि दृग्गोलावरून गणितानें गोचर झाली, तिचा व्यास त्यांनीं आठ सहस्र मैल व परिधि पंचवीस सहस्र मैल निश्चित करून ती गोलाकार आहे अशा कल्पनेनें तिचें पृष्ठफळ पंधरा कोटी मैल वर्तविलें आहे."[1]

(भरतखंड.)

तिसरी गोष्ट ग्रहणांची उपपत्ति. द्विजविषयीं 'सूर्यसिद्धांता'चें वाक्य,—कीं 'चंद्र सूर्यास आच्छादन करतो, व चंद्रास भूमीची छाया आच्छादिते'—हें सदरील कोशकारानें दाखल केलेंच आहे, परंतु तें काल्पनिक अतएव असत् होय असें झटलें आहे. वरील विशेषणांचा व्यत्यास करून हें वाक्य असत् अतएव काल्पनिक असें जर ग्रंथकारानें दाखविलें असतें तर बरें झालें असतें. पण तसें कांहीं केलें नाहीं. तेव्हां वरील काल्पनिकता केवळ प्राचीन इतिहासकारांस अनुसरण्याचा जो त्याचा संकल्प आहे त्यावरून त्यानें स्थापित केली आहे असें झटलें पाहिजे. आतां पुराणकर्त्यांचें तरी अनुसरण कोशकर्त्यानें कितपत केलें आहे हें पाहिलें असतां असें आढळेल कीं,

---

१. एतद्देशीय ज्योतिष्यांत अग्रगण्य जो वरील गणिती त्याच्या ग्रंथांतील गोष्टी अर्वाचीन युरोपियन पंडितांच्या शोधांशीं किती मिळतात याचें दिग्दर्शन गेल्या सालच्या नोवेंबरच्या अंकांतील एका रत्नागिरीच्या पत्रांत केलेलें आहे तें पुष्कळांस माहीत असेलच. वरील पत्र लिहिणारानेंच भास्कराचार्यांच्या ज्योतिषाविषयीं एक नवा ग्रंथ तयार केला आहे हेंहि गेल्या अंकाच्या मूलपृष्ठावरून सर्वांस जाहीर झालेंच आहे. या ग्रंथावरून आमच्या प्राचीन ज्योतिषाविषयींचें ज्ञान बरेंच होईलसा सुमार दिसतो.

जेथें तें त्यास सोयीवार पडलें तेथेंच केलें आहे. 'राहु' व 'रोहिणी' हे शब्द काढून पाहिले असतां वरील गोष्टीचा प्रत्यय येणार आहे. राहुकेतु चंद्रसूर्यांचा ग्रास कां करतात याविषयीं आदिपर्वांतील प्रसिद्ध जी समुद्रमंथनाची कथा तिचा उल्लेख वरील शब्दाच्या व्याख्येंत बिलकूल न करतां ज्योतिषांतील माहिती त्याच्यापुढें दाखल केली आहे ती ही कीं, राहूचें तामस (अंधकाररूपी) मंडल फिरत फिरत चंद्रकक्षेच्या समीप जेव्हां येतें तेव्हां चंद्रग्रहण होतें. याप्रमाणेंच दक्षाच्या सत्तावीस कन्या या चंद्रास दिल्या असून तो त्यांतील एकीविषयींच (रोहिणीविषयीं) जेव्हां प्रेमाविशेष दाखवूं लागला तेव्हां बाकीच्यांनीं पित्याकडे गाऱ्हाणें करून त्यास क्षयाचा शाप देवविला ही जनप्रसिद्ध कथा[1] सांगून शेवटीं कोशकार येणेंप्रमाणें लिहितात—"ही क्षयकल्पना लोक सोममंडलावर कल्पितात, परंतु ही अगदीं चूक असून कलांच्या ऱ्हासवृद्धींनीं व्याप्त सोममंडल अनादिसिद्धच ईश्वरानें ब्रह्मदेवरूपेंकरून निर्मिलेलें आहे." एकूण तात्पर्य असें कीं, पुराणांतील सोम व सृष्टींतील चंद्रमंडल यांचा कांहीं संबंध नाहीं. आकाशांत जो चंद्र दिसतो त्यास वृद्धिक्षयादि जे नियम ब्रह्मदेवानें लावून दिले आहेत ते अनादिसिद्ध आपोआप चाललेले आहेत. मग असें जर आहे, तर वरच्याच ब्रह्मदेवानें चंद्र सूर्यास जे नियम लावून दिले आहेत त्यांस अनुसरूनच ग्रहणकालीं स्पर्श व मोक्ष हे त्यांच्या बिंबांत घडतात असें तरी ह्मणण्यास अडचण कोणती? कलांच्या क्षयवृद्धींची उपपत्ति जर पुराणांप्रमाणें ध्यावयाची नाहीं, व ती तशी घेणें ही 'अगदीं चूक' आहे; तर भूछाया व चंद्रमंडळ हीं अनुक्रमेंकरून चंद्राच्या व सूर्याच्या ग्रहणास कारण होत हें तरी 'काल्पनिक अतएव असत्' असें कां ह्मणावें?[2]

---

१. ही कथा पुराणांतील अनेक कथांप्रमाणें अलंकारिक होय हें थोडासा विचार केला असतां सहज लक्षांत येईल. दक्षाच्या सत्तावीस कन्या हीं आकाशांतील नक्षत्रें होत. यांतून चंद्राची मासिक प्रदक्षिणा नेहमीं होत असल्यामुळें, चंद्राच्या अश्विनी, भरणी इत्यादि स्त्रिया होत व एकीकीपाशीं त्याचा एक एक दिवस वास होतो, या कल्पना सहज होणाऱ्या आहेत. याप्रमाणेंच राहूनें चंद्रसूर्याच्या मर्मे बसून सुधेचें प्राशन केलें, व हें तो करीत असतां त्याचा शिरच्छेद होऊन अद्याप शिरोरूपानेंच तो आकाशांत भ्रमण करीत आहे, हें सर्व चंद्रग्रहणसमयींची स्थिति लक्षांत आणली असतां वरच्याप्रमाणेंच अलंकारिक वर्णन ह्मणून तेव्हांच लक्षांत येईल. राहूचें अंधकाररूप मंडल आहे असें जें वर सांगितलें आहे त्यावरून सहज कळणारें आहे कीं, पृथ्वीच्या मंडलाकृति भासणाऱ्या छायेसच 'राहु' ही संज्ञा आहे. या छायेचा एकंदर आकार शंकूसारखा आहे, तेव्हां सहजच शिराची कल्पना राहूवर बसली. चंद्राच्या प्रकाशास सुखकरत्वास्तव 'सुधा', 'अमृत' ह्मणण्याचा परिपाठ सर्वप्रसिद्धच आहे, मग राहु हा चंद्रसूर्याच्या मर्मे बसून मुहूर्तमात्र सुधा प्राशन करीत नाहीं काय?

२. चंद्रग्रहणाविषयीं व सूर्यग्रहणाविषयीं आमच्या ज्योतिषग्रंथांतून यथार्थ उपपत्ति

(पुढें चालू).

आतां वरील सर्व उपपत्ति श्रुतीस विरुद्ध होत असें जर आमच्या प्रस्तुत कोशकाराचें मत असेल तर तेंहि चुकलेलें आहे. वेदांतील एका ऋचेंत चंद्रग्रहणाच्या खऱ्या उपपत्तीविषयीं स्पष्ट उल्लेख आहे. त्यावरून वरील तिन्ही गोष्टी वेदविरुद्ध आहेत किंवा वेदसंमत आहेत याविषयीं कोणासहि संदेह उरणार नाहीं.[1]

असो; आतां सरते शेवटीं एक निराळ्या तऱ्हेचा उतारा मात्र येथें देतों. त्याविषयीं वाचकांस कांहीं विशेष सांगावयाची जरूर दिसत नाहीं. 'म्लेंछ' शब्दाखालीं या कोशांत पुढील मजकूर आढळतो--

"कौरवपांडवांचें युद्ध झालें त्यांत हे लोक बरेच होते असें भारतावरून दिसतें, आणि त्यावरून कृष्णद्वैपायन व्यासास हे चांगल्या रीतीनें ऐकून जाणीत होते इतकेंच नव्हे. तर ते, आमच्यांतील अडाणी लोक द्वैपायन हीं अक्षरें गाळून, व्यास, कृष्ण एवढ्याच शब्दांतील, व्याकरण हा शब्द ह्मणतांना जसें यियाकर्न ह्मणतात, त्याप्रमाणें व्यास या स्थळीं यियास ह्मणत आणि कृष्ण या स्थळीं क्रष्ण बोलत; तो शब्द ऐकून ऐकून जीजास क्रष्ण ह्मणतां ह्मणतां जीजस क्राईस्ट शब्दोच्चार करीत परस्परांत त्याच्या वार्ता नेहमीं बोलत; आणि व्यासाची माता कुमारी, तसेंच त्यास शिष्य चार, हेंहि वृत्त त्यांस चांगल्या प्रकारानें ठाऊक होतें, मात्र त्यांचीं नांवें तादृश त्यांच्या ध्यानांत राहिलीं नसावींत. तरी जैमिनि हा शिष्य व्यासासहि अंमळ भारी होता, त्यामुळें त्याच्या नांवाचा त्यांस विसर न पडल्यामुळें, त्याच्या गोष्टी वारंवार जॉन अशा नांवानें काढीत. आतां यावरून मला असें वाटतें कीं, पुढें त्यांच्यांत कोणी एखादा पुरुष उत्पन्न झाला असावा, आणि त्याच्यावर वर लिहिलेले व्यासाचे संबंध त्यांनीं बसांवले असावेत. या माझ्या ह्मणण्याचा मार्मिक लोक विचार करोत.

याप्रमाणें 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' या ग्रंथाचें गुणदोषनिरूपण झालें. यांत गुणापेक्षां दोषांच्या विवरणास जरी जास्त जागा लागली आहे तरी

आहेत हें तीं प्रतिवर्षीं वर्तविलीं जातात यावरून तर उघडच आहे; पण तुलत्या लोकभाषेवरूनहि वरील यथार्थ ज्ञानविषयीं प्रमाण मिळतें. 'अमरकोशा'त 'राहु' व 'अमावास्या' यांचे पर्याय येणेंप्रमाणें आहेत--

तमस्तु राहुः स्वर्भानुः सैंहिकेयो विधुंतुदः ।
अमावास्या त्वमावास्या दर्शः सूर्येंदुसंगमः॥

यापैकीं 'तमस्' व 'सूर्येंदुसंगमः' या शब्दांकडे लक्ष पोंचविलें असतां निकाल होणार आहे. 'अमावास्या' शब्दाची व्युत्पत्तिहि मागें एके प्रसंगीं सांगण्यांत आलीच आहे.

१. वेदांत ग्रहणाविषयीं, पृथ्वीच्या आकर्षणाविषयीं वगैरे जे चमत्कारिक उल्लेख आहेत ते व्यास पहाणें असतील त्यांनें मुंबईचे कैलासवासी विष्णुबोवा ब्रह्मचारी यांच्या 'वेदोक्त धर्मप्रकाशां'तील 'वेदांतील सृष्टीचे नियम' हें प्रकरण पहावें. 'विविधज्ञानविस्तारा'चा सन १८७१ चा जानेवारीचा अंकहि प्रस्तुत विषयाच्या संबंधानें उपयोगी आहे.

आरंभीं आह्मीं वाचकांस कळवून ठेविलेंच आहे कीं, या दोषांचा मुख्य ग्रंथाशीं तादृश संबंध नाहीं. ज्या मतांवर आह्मीं चर्चा केली आहे तीं केवळ परिशिष्टादाखल कांहीं कांहीं ठिकाणीं प्रगट झालीं आहेत; व ग्रंथकाराची स्थिति मनांत आणली असतां त्यांबद्दल कोणास आश्चर्यहि वाटणार नाहीं. ज्याला अर्वाचीन इतिहासाची, भूगोलाची वगैरे माहिती नाहीं, आणि त्यांतून स्वधर्माचा अभिमान ज्यास पूर्ण आहे, त्यास जॉन् कोणीकडे व जैमिनी कोणीकडे, ऋषिक देश कोठला व रशिया कोठला, पृथ्वीचें अंतराळीं अधांत्री रहाणें व नित्य परिभ्रमण करीत असणें हें चंद्राविषयीं जें आपण नित्य आपल्या डोळ्यांनीं पहातों त्याहून लवमात्रहि जास्त आश्चर्य करण्यासारखें नाहीं, या गोष्टी लक्षांत येणें कठिण आहे यांत संशय नाहीं. यास्तव धर्मवेड्या मिशनरींच्या, दुराग्रही इंग्रेज ग्रंथकारांच्या, व अर्वाचीन पाश्चात्य पंडितांच्या ग्रंथांतून वेळेनुसार विलक्षण तर्काचे तारे तुटलेले पाहिले असतां त्यांची एरवींची योग्यता कमी झालीशी जशी आपण मानीत नाहीं; त्याप्रमाणेंच इकडच्या पंडितांचेहि वरच्यासारखे अभिमानमूलक विलक्षण लेख पाहून त्यांबद्दल त्यांजवर विशेष दूषण ठेवणें योग्य नाहीं. तरी ज्या अर्थी कोणत्याहि तऱ्हेचीं भ्रमात्मक मतें अज्ञानास व दुराग्रहास वर्धक होतात, त्या अर्थी त्यांचें निरसन करून सत्य प्रगट करणें हें सर्व देशहितेच्छूंचें कर्तव्य होय. हें जाणूनच प्रस्तुत कोशकारांच्या आग्रहमूलक अभिप्रायांचें वर खंडन केलें आहे. त्यावरून आमच्या वाचकांनीं हा बोध घ्यावा कीं, ज्या गोष्टींची आपणास पक्की माहिती नाहीं किंवा मुळींच नाहीं त्याविषयीं निश्चयात्मक मतें देणें हें अतिशय वेडेपणाचें काम होय. विद्या ही आकाशाप्रमाणे अनंतपार आहे, व मानवी बुद्धि ही पक्ष्यांच्या पंखांप्रमाणें थोड्या आटोक्याची आहे; यास्तव तिच्या अवसानावर मनुष्यानें कितीहि भरारी मारली, तरी विद्याप्रदेशाचें आक्रमण तें कितीसे होणार? कोणी केवढाहि विद्यासंपन्न असला तरी हजारों विषय त्यास मुळींच अज्ञात रहातील, व जितके अवगत असतील तितकेहि सर्व इत्थंभूत त्यास माहीत असतील असें नाहीं, हें उघडच आहे. तेव्हां यावरून हें सिद्धच आहे कीं, कोणास निखालस खात्रीचा जो अभिप्राय देणें असेल तो त्यानें आपल्या पूर्ण माहितीच्या विषयांतच द्यावा हें बरें; आपली मर्यादा उल्लंघून दुसऱ्याच्या विषयावर धाड घालण्याचें साहस सहसा पतकरूं नये. तें आपल्या सामर्थ्याच्या वृथाभिमानामुळें केलें असतां शत्रूच्या मुलखांत चाल केली असतां जशी मोठमोठ्या सैन्यांचीहि धूळधाण झाली आहे, किंवा गरुडपक्षी मोठा उंच उड्डाण करणारा ह्मणून तो जर पाण्यांत पोहूं लागेल किंवा देवमासा शेपटाच्या तडाक्यासारसा होड्यांस उंच झुगारून देणारा ह्मणून भुईवर येऊन श्वापदांशीं सामना करायाला जर जाईल, तर जशी त्यांची अवस्था होईल, त्याप्रमाणेंच वरील साहसाचा

परिणाम होईल हें उघड आहे.[1] तर या सिद्धांताचें उदाहरण वरील विवरणांत वाचकांस सांपडेल. शिवाय विषयाच्या संबंधानें पहातांहि तें महत्त्वाचें होय हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

असो; आतां सरते शेवटीं एक दोन गोष्टींविषयीं कांहीं सूचना करून प्रस्तुत लेख आटपतों. एक गोष्ट ही कीं, प्रस्तुत कोशासारखा मोठा व उपयुक्त ग्रंथ ज्या 'गुर्जर जातीय श्रीमान् गृहस्थानें साह्य दिल्यामुळें' प्रसिद्ध होऊन ग्रंथकर्त्याच्या दीर्घकालिक श्रमाचें चीज झालें, व लोकांस लाभ झाला, त्याचें नुसतें नांवहि या ग्रंथांत कोठें आढळत नाहीं हें बरोबर नाहीं. ज्या काळांत विद्येकडे पैशाचा विनियोग झालाच तर देशाच्या सुदैवानें क्वचित् कोठें होणारा, त्या काळांत असल्या औदार्याचा विशेषतः उल्लेख होणें अत्यंत अवश्य होय. शिवाय दोन ग्रंथ नुसते पहायाला दिल्याबद्दल त्या देणारांचीं नांवें जर ठळठळीत दाखल झालीं, तर प्रस्तुत कोश वरील उदार साह्यकर्त्यास नजर तरी झाला पाहिजे होता. तर सदरील ग्रंथाची सुदैवेंकरून द्वितीय आवृत्ति छापण्याचा प्रसंग कधीं पुढें आल्यास वरील सूचनेकडे लक्ष दिलें जाईल अशी आह्मी आशा करितों. या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळेस या ग्रंथास दुसरा भाग ह्मणूनहि एक जोडण्यासारखा आहे. तो हा. अलीकडील काळांत आमच्या देशांत चोहोंकडे बरेच नवे धर्मविषयक ग्रंथ झाले; ह्मणजे पूर्वीच्या पुराणांत जशा पुण्यशील राजांच्या वगैरे कथा लिहिल्या गेल्या, त्याप्रमाणेंच अलीकडे मोठमोठे नामांकित साधु चोहों-

---

१. वर जी गोष्ट उघड आहे ह्मणून ह्मटलें ती मोठमोठ्या अकटेविकट पंडितांसहि अभिमानांधतेनें बिलकूल दिसत नाहीं हें कोणास सांगितलें तर खरें तरी वाटेल काय? पण मौज पहा!—माजी डॉक्टर बिल्सन मोठ्या नामांकित विद्वानांत मोडत होते; पण त्यांचा एखादा ग्रंथ पाहिला तर त्याच्या पाठीवर पुष्कळ चमत्कार आढळेल. कोणता तर 'हिंदुधर्माचें खंडन', 'मुसलमानी धर्माचें खंडन', 'पारशी धर्माचें खंडन', 'चिनी धर्माचें खंडन'!! असेंच सव्यसाचित्व जुन्या शास्त्रविषेस ज्याच्या योगानें मिनिट बसलें त्या 'मिनिटां'त मेकाले साहेबांनींहि प्रगट केलें आहे. पुढील वाक्यरत्नें पहा—

"I have never found one among the Orientalists themselves who could deny that a single shelf of a good Eurorean library was worth the whole native literature of India and Arabia!"

"I certainly never met with any Orientalist who ventured to maintain that the Arabic and Sanskrit Poetry could be compared to that of the great European nations!!"

"I doubt whether the Sanskrit literature be as valuable as that of our Saxon and Norman progenitors!!!"

हे आंग्लभौम पंडिताचे महासिद्धांत ऐकून कालिदास, पाणिनि, भास्कराचार्य, फर्दोशी, शेक्सपीअर वगैरे मंडळीनें स्वर्गात टाळ्यांचा गजर करून टाकला असेल नाहीं बरें!!!

कडे प्रसिद्धीस येऊन त्यांच्या कथा लिहिल्या गेल्या. तर हे अर्वाचीन वृत्तांतहि या 'भारतवर्षीय कोशा'स जोडायासारखे आहेत. हे जोडले असतां प्रस्तुत ग्रंथ अगदीं अर्वाचीन काळापर्यंत आणून पोंचविल्याप्रमाणें होईल. हें दुसरें कामहि पहिल्याप्रमाणेंच रा० गोडबोले यांच्या हातून सहज रीतीनें चांगलें होण्यासारखें आहे हें उघडच आहे; कां कीं, ज्याचा ज्या विषयावर विशेष व्यासंग असतो व ज्याविषयीं त्यास आवड असते, तें त्याच्या हातून जसें उत्कृष्ट होईल तसें नवी तयारी जो पहिल्यापासून करूं जाणारा त्याच्या हातून होणार नाहीं. अशा प्रकारची लोकसेवा करण्याची आपली मनीषाहि कोशकारानें प्रस्तावनेंत प्रदर्शित केली आहे. तर आह्मी अशी उमेद बाळगतों कीं, सर्व विद्यावृद्धीच्छु व देशाभिमानी लोक हे प्रस्तुत उपयुक्त कोशाचा उत्कंठापूर्वक आदर करून वर जो त्याचा परिशेष सांगितला तो रचून आपल्या देशबंधूंस सादर करण्याचाहि कालेंकरून प्रसंग आणतील!

मराठी पुस्तकें.



ब्राह्मणांचें येथें नाहीं प्रयोजन ।
द्यावें हाकलून जोती ह्मणे ॥
ब्राह्मणांचें कसब.

अंक ४४.—(१) सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट. (२) विद्यार्थिबुद्धिवर्धिनी. (३) जमाखर्चाची पद्धति.

सदरील पुस्तकांतील पोंचीवरून वाचकांच्या लक्षांत असेलच कीं, 'सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट' 'विद्यार्थिबुद्धिवर्धिनी' व 'जमाखर्चाची पद्धति' अशीं तीन पुस्तकें यांच्या कर्त्यांकडून आमच्याकडे पाठविण्यांत आलीं. त्यांवर या खेपेस आह्मी आपलें मत प्रगट करतों.

१. सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट—या पुस्तकाविषयींच खुद्द लिहिण्यापूर्वी 'सत्यशोधक समाज' ह्मणजे काय प्रकरण आहे हें आमच्या वाचकांस कळविणें जरूर आहे. ही माहिती त्यांस अशाकरतां दिली पाहिजे कीं, हल्ली आमच्या देशांत जिकडे पहावें तिकडे खेड्यापाड्यांतून सुद्धां समाज व सभा स्थापन होत असल्याचें वरचेवर ऐकूं येतें; तेव्हां आमच्या देशांच्या दूर दूर ठिकाणीं येथील सत्यशोधक मंडळीचें बहुधा नांवहि माहीत असण्याचा संभव नाहीं. पुण्यासारख्या शहरांत जोतिबा प्रभृति विद्वन्मणींनीं एवढ्या परम स्तुत्य उद्देशानें काढलेला व आज थोडथोडकी नाहीं तर चार वर्षें सतत चाललेला वरील समाज कोणास माहीत नसून त्याच्या स्वरूपाचें प्रकाशन करण्याचें आमच्यासारख्या गरीब पुस्तककर्त्यास तें अगत्य पडावें, या

गोष्टीचें आह्मांस अत्यंत सखेदाश्चर्य वाटतें ! पण उपाय काय, पडलें तें केलें पाहिजे.

दोन वर्षांपूर्वी या शहरांत एका जगद्गुरूंची स्वारी प्राप्त झाली होती; तिच आरंभींच्या धूळभेटीपासून तों अखेरच्या चिखलवृष्टीपर्यंत एकंदर काय वृत्तांत झाला तो आह्मीं आपल्या वाचकांस बराच सविस्तर कळविला होता. त्या वेळीं स्वामींचें जिवलग अपत्य जो आर्यसमाज त्याविषयीं आह्मीं जें भाकीत केलें होतें तें लवकरच प्रत्ययास येऊन त्याच्या पुरस्कर्त्यांचे आशीर्वाद सर्व निष्फळ झाले. हीच गति कदाचित् प्रस्तुत सत्यशोधक समाजाचीहि लवकरच होईल; व आर्यसमाजाचे जनक जसे आतां धर्मोन्नति करतां करतां थकून काशीवास पतकरून राहिले आहेत, त्याचप्रमाणें बहुधा आमचे जोतीरावहि सत्य शोधतां शोधतां दमून शेवटीं कदाचित् येरुशलेमास तीर्थयात्रा करून आकाशांतील बापाच्या पुत्राच्या ज्योतीस जाऊन मिळतील ! असें झाल्यास पुढील लोकांस सत्यसमाजाचे अधिपति एवढे कोण होते याविषयीं मोठा भ्रम पडेल व प्रबळ उत्कंठा प्राप्त होईल. हें मनांत आणून माजी आर्यसमाजाच्या अध्यक्षांप्रमाणें माजी होऊं पहाणाऱ्या सत्यशोधक समाजाच्या कुलगुरूंचाहि महिमा लोकांस कळविणें जरूर वाटतें.

अजम जोतीराव गोविंदराव फुले हे वर सांगितलेल्या समाजाचे मुख्य पुरस्कर्ते व आधारस्तंभ होत. या गृहस्थांच्या अंगीं अनेक अलौकिक गुण वास करताहेत. ते कोणते ह्मणाल तर हे कवि आहेत, इतिहासज्ञ आहेत, मोठे गहन भाषापंडित आहेत, वक्ते आहेत; आणि सर्वांत विशेषतः सांगण्यासारखें हें कीं, आमच्या देशांत अलीकडे लोककल्याणाला वाहिलेली जी मंडळी चोहोंकडे आढळते त्यांत तर याच्यासारखे केवळ तद्रूप बनलेले थोडेच सांपडतील ! हें काम आज पुष्कळ वर्षांपासून ते करीत आहेत असें 'पुण्याच्या वर्णना'वरून व खुद्द त्यांच्याच 'गुलामगिरी'वरून समजतें. मुलींच्या शाळा स्थापण्याच्या कामीं यांनीं मदत केल्यावरून या 'तात्यासाहेबांस सरकारानें एक शालजोडी आनंदानें बक्षीस दिली.' पण मध्यंतरीं 'भटपांड्यांचें बंड उपस्थित झाल्यामुळें सर्व युरोपियन कामगार यांस पाहिल्याबरोबर कपाळास आंठ्या घालूं लागले.' ज्या कामगारांविषयीं आमच्या राजनिष्ठ जोतीरावांची इतकी कृतज्ञताबुद्धि होती कीं, 'त्यांचे उपकार त्यांच्या जातभाईंच्या आंगांत खिळून त्याजबद्दल त्यांनीं आपल्या शरीराचे चर्मी जोडे करून त्यांच्या पायांत घातले तथापि ते उतराई होणार नाहींत,' तेहि जेव्हां त्यांचा तिटकारा करूं लागले व त्यांस हिडीस फिडीस करूं लागले, तेव्हां मग काय पुसावें ! तात्यासाहेबांस परम वैराग्य प्राप्त होऊन त्यांनीं लोककल्याणाची व आपली फारकत करून टाकली. हा जोतीबांचा पहिला अवतार समाप्त झाला ! पण दहा वीस वर्षांनीं त्यांस स्वस्थ बसण्याचा कंटाळा येऊन ते ग्रंथकर्ते या नात्यानें पुनः अवतीर्ण झाले. तारीख १ आगष्ट १८७२ रोजीं

त्यांनीं त्यांचा कुलांतक जो विष्णूचा साहावा अवतार परशुराम त्यास एक नोटीस दिली. तींतील मतलब हा कीं, 'चिरंजीवा परशुरामा, तूं जर खरोखरच चिरंजीव असशील, तर सहा महिन्यांच्या आंत या नोटीशीदाखल तूं आह्मांपुढें येऊन हजर हो; तसें न करशील तर तुझ्या 'विविधज्ञानी' ह्मणविणाऱ्या ब्राह्मणबच्चांस ओढून आणून त्यांची फटफजिती करण्यास आह्मी कधीं कमी करणार नाहीं.' फुले महाराज वाट पहातां पहातां थकले. ७२ साल आटपत आलें, तरी परशुराम कोठें हूं का चूं करीना. तेव्हां जोतीसाहेबांस 'निर्वीरमुर्वीतलम्' होऊन त्यांनीं ब्राह्मणबच्चांवर आपलें हत्यार काढलें. तारीख ५ दिसेंबर रोजीं 'क्षुद्रांनीं ब्रह्मराक्षसांच्या दास्यत्वापासून असें मुक्त व्हावें' या सदराचें एक पत्र त्यांनीं तयार केलें. नंतर आपल्या एका लेख्यास आज्ञा केली कीं, 'या पत्रांतील नहस्वदीर्घादि सर्व चुक्या नीट करून त्याची एक एक प्रत करून एकंदर सर्व भट व ख्रिस्ती वर्तमानपत्रकर्त्यांच्या अभिप्रायाकरितां पाठव.' राजेसाहेबांच्या हुकमाप्रमाणें प्रधानजींनीं वरील पत्राची व्यवस्था तर केलीच असेल; पण त्यास बहुधा कोठेंहि थारा मिळाला नसावा. माजी 'लोककल्याणेच्छू'कडून फुलेबोवांस जें उत्तर मिळालें,[1] त्यावरून इतर 'भट' पत्रकर्त्यांनीं त्यांचा कितपत आदर केला असावा याचें अनुमान होतें. पण 'भटां'नीं आपल्या पत्रास मान दिला नाहीं ह्मणून जोतीबा कशाला फिकीर करताहेत? काळ्या भटांनीं आपलें अजिक्यपत्र छापलें नाहीं तर त्यांचे गोरे भट तर कोठें गेले नाहींत ना? ख्रिस्त माउलीच्या घरीं 'भटा'च्या धर्माप्रमाणें कांहीं भिन्न भाव आहे काय? छे छे! तिच्या येथें मि० जोती सारखा व मि० जोतीचा जोडा बांधणारा चांभारहि सारखाच! त्यांतून ज्या अप्रयोजक व परम निंद्य पत्राचा जिकडे तिकडे अव्हेर झाला त्याचा 'शुभवर्तमानदर्शक व चर्चसंबंधीं नानाविध संग्रहा'नें जर अंगीकार करूं नये तर मग करावा तरी कोणीं? दुबळें, खुळें, बापडें, ज्यास साऱ्या दुनियेंत कोणी पतकरीना, त्याला प्रभू येशूच्या मेंढवाड्यांत जर आसरा मिळूं नये, तर मग त्याच्या दयाळुत्वाचा महिमा तो काय? असो; तर मि० जोती याचें पत्र वरील करवीरस्थ वर्तमानपत्रांत सरतेशेवटीं छापलें जाऊन पत्रकर्त्यांनें जोतीची पाठहि बरीच थोपटली.[2] याहि

१. सदरील उत्तर असें होतें—

"आमचे प्रसिद्ध महाज्ञानी, महाविचारी व महाशोधक तत्ववेत्ते अजम जोतीराव गोविंदराव फुले यांनीं एका मोठ्या गृहस्थाच्या शिफारशीनें एक अप्रयोजक अशा प्रकारचें आत्मश्लाघेचें व ब्राह्मणांच्या निंदेचें पत्र आह्मांकडे पाठविलें आहे, त्यास आमच्या पत्रांत जागा मिळण्याचा संभव नाहीं. याबद्दल सदर्हू अजम फुले आह्मांस माफी करोत."

२. कांहीं वर्षांपूर्वी जे नुसते 'जोतीबा' होते ते पुढें आपणच होऊन 'जोतीराव' बनले असतां त्यांस अगदीं मूळपद जें 'जोती' त्यावर कोणीं आणून ठेविलें ही कोणास शंका प्राप्त

(पुढें चालू).

गोष्टीस कांहीं दिवस लोटून गेले. शेवटीं जोतीबांनीं विचार केला कीं, जीवित हें क्षणभंगुर आहे, आपली ज्ञानज्योत जर कदाचित् एकाएकीं मालवून गेली, तर 'भट-पांड्यां'ची बडबड पुनः सुरू होईल तर या 'ब्रह्मराक्षसां'नीं पुनः डोकेंच वर करूं नये अशी कांहीं तजवीज करून ठेविली पाहिजे. असें मनांत आणून त्यांनीं धोंडीबा या नांवाचा एक मानसपुत्र उत्पन्न केला; आणि कृष्णानें जशी अठरा अध्यायांत अर्जुनास गीता उपदेशिली, त्याप्रमाणें षोडशभागात्मक गाथेंत जोतीबांनीं या प्रतिजैमिनीस ब्राह्मणद्वेषाच्या तत्त्वाचें विवरण करून सांगितलें. जोतीबांसारखा महासमर्थ पुराण-वक्ता व धोंडीबांसारखा महान् अधिकारी परम भाविक प्रष्टा व श्रोता, मग काय विचारावयाचें आहे ! आमच्या ज्ञानोबा नांवाच्या एका साळ्या भोळ्या भ्रष्टकवीनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, चंद्राच्या चंद्रिकेशीं योग झाल्यावांचून चंद्रकांतास पाझर फुटत नाहींत. तर हाच न्याय प्रकृत स्थलीं लागू पडून जोतीबांच्या ज्ञानसागरास जें भरतें आलें आहे तें कांहीं अपरंपार ! पवित्र शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अहोदिवस अहोरात्र सहा महिने सारखी मुसळासारखी धार चालून सगळी पृथ्वी जशी जळबंब होऊन गेली, व पुरुष स्त्रिया, पशु पक्षी, कृमि कीटक, वृक्ष पर्वत, वगैरे चट साऱ्यांस सरसकट जळसमाधीचा योग घडून आकाशांतून मौज पहाणाऱ्या देववापाचा क्रोध अंमळ शांत झाला, त्याप्रमाणें प्रस्तुत महापंडितानेंहि आपल्या 'गुलामगिरी' नामक महाग्रंथांत स्वर्गपाताल जणूं काय एकच करून टाकिलें आहे ! जिकडे जिकडे दृष्टि द्यावी तिकडे तिकडे या महाज्योतीच्या प्रकाशानें डोळे अगदीं दिपूनच जातात. 'महा–अरि'–राष्ट्र भाषेकडे पहावें तों तिचा तर या गुरुशिष्यांच्या धांगडधिंग्याखालीं जो धुडगुस उडून गेला आहे तो पाहून बिचारीची दया येते. जोतीबांचे महान् पूर्वज जे शंखासुर, हिरण्याक्ष वगैरे त्यांच्या प्रचंड तांडवानें सगळी भूमि जशी दणाणून जात असेल, त्याप्रमाणेंच आमच्या देशभाषेचा टांकान् टांका या एका ग्रंथकाराच्या अकांड-तांडवानें खिळखिळा होऊन गेला आहे ! व्युत्पत्तिज्ञानाकडे पहावें तर असें ह्मणावें लागतें कीं, आजपर्यंत पाणिनि, भट्टोजी वगैरे वैयाकरण आमच्या देशांत झाले, व

होईल तर त्यानें पुढील 'शुभवर्तमान—संग्रह' या पत्रांतील उतारा पहावा—

"पुण्यांतील नेटिव वर्तमानपत्रकर्ते खालच्या मजकुरास आपल्या पत्रांत जागा दत नाहींत ह्मणून हा आह्मांकडे पाठविला आहे. हा मजकूर चहूंकडे प्रसिद्ध करावा अशी मि० जोती गोविंदराव फुले याची इच्छा असल्यामुळें आह्मी त्यास या अंकांत जागा देतों. जरी आमच्या हिंदु मित्रांस हा मजकूर कांहीं अंशीं निंदापर वाटेल तरी ह्यामध्यें जो अभिप्राय दाखविला आहे तो स्तुत्य असें आह्मांस वाटतें. कारण वास्तविक पाहिल्यास ब्राह्मणांनीं मानिल्याप्रमाणें जातीभेद नाहीं असें मि० जोतीच्या लक्षांत पक्कें आल्यावरून मी, बुट-पाहिजे त्यांशीं अन्नव्यवहार करीन असें त्यानें धैर्यानें सांगितलें. असे छातीचे पुरुष कान धरला पुष्कळ लवकर होवोत."

युरोपांत मोक्षमुल्लरादिकांनींहि आह्मांकरितां व्याकरणें रचून इकडे पाठवून दिलीं, पण त्या सर्वांनीं निवळ झक मारली!! जोतीबांच्या 'गुलामगिरी'त 'द्विज', 'ब्राह्मण', 'विप्र', 'संस्कृत', 'मार्तंड', इत्यादि शब्दांची मूळपीठिका जी आढळते ती पाणिनीच्या प्रपितामहाच्याहि स्वप्नीं कधीं आली नसेल.[1] पण हेंहि एक वेळ असो. ज्या

---

१. सत्यशोधक समाजाच्या भट्टाचार्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें **पाणिनि** प्रभृति 'भट मंडळी कशी चट सारी गुंडाळून टाकली आहे हें स्पष्ट करण्याकरितां पुढील उतारे वरील समाजाच्या शुभवर्तमानांतून घेतों—

"धों०—बरें, ते कच्छानें क्षेत्रांतून पिटाळून लाविलेले क्षत्रिय कोणीकडे गेले?

जो०—समुद्रावरून दुजी इराणी अथवा आर्य लोकांची टोळी आली असें ह्मणण्यावद्दल घाबरल्यामुळें द्विज आले द्विज आले, असा शब्द करीत करीत त्या पर्वताचे पलीकडे जाऊन कश्यप या नांवाच्या क्षेत्रपतीची पाठ निघाले यावरून कच्छ आपल्याबरोबर कांहीं फौज घेऊन त्या पर्वताचे पलकिडील बाजूनें खालीं उतरला."

गुलामगिरी—पृष्ठ११.

"नंतर वामनाचे मागून आर्य लोकांचा ब्रह्मा या नांवाचा मुख्य अधिकारी झाला. त्याचा स्वभाव फार हट्टी होता. त्यानें आपल्या कारकीर्दीत येथील आपल्या मूळ पूर्वजांस रणांगणीं जिंकून आपले दास केले; व त्यानें आपले लोक आणि दास या उभयतांमध्यें हमेशा भेद रहावा ह्मणून अनेक तऱ्हेचे नेम बांधिले. ह्या सर्व कृत्यांवरून ब्रह्मा मेल्या नंतर आर्य लोकांच्या मूळच्या नांवाचा आपोआप लोप होऊन त्यांचें नांव ब्राह्मण पडलें."

कित्ता—पृष्ठ ६.

"इकडे नृसिंहानें प्रल्हादास फसवून असें अघोर कर्म केलेलें उघडकीस आल्यावरून क्षत्रियांनीं आर्य लोकांस मुळींच द्विज ह्मणण्याचें सोडून त्यांस विप्रिय ह्मणूं लागले. व पुढें त्या विप्रिय शब्दापासून त्यांचें नांव विप्र पडलें असावें. पुढें क्षत्रियांनीं नृसिंहास नारसिंह ह्मणजे सिंहाची बायको असें निंद्य नांव दिलें."

कित्ता—पृष्ठ १७.

"जो०—ब्रह्मयानें प्रथम ताडपत्रावर खिळ्यानें उकरून लिहिण्याची युक्ति काढून व त्यास जे कांहीं इराणी जादुमंत्र व ज्या कांहीं भाकड दंतकथा पाठ होत्या, त्यांपैकीं कित्येक गोष्टी त्यांत सामील करून त्या सर्वांचें त्यानें त्या वेळच्या सर्वकृत (ज्याचा अपभ्रंश संस्कृत) चालू भाषेंत, आतांच्या फारशी बयती सारखीं लहान लहान कवनें करून त्या सर्वांचा सार ताडपत्रांवर टिपून ठेविला."

कित्ता—पृष्ठ ३६.

"तो धर्मन्यायानें लढण्यामध्यें इतका अहंकार बाळगीत असे कीं, त्यानें कधीं आपल्यास पाठ दाखविलेले शत्रूवर वार केला नाहीं. ह्मणून त्याचें नांव मारतोंड पडलें होतें. ज्याचा अपभ्रंश मार्तंड हा आहे."

कित्ता—पृष्ठ २२.

सहस्रावधी जोतीबांच्या अगाध ज्ञानसमुद्रांत वर ज्या बुचकळ्या मारल्या त्यांखालींच आमचे कोणी भारेचे रानें पहा! असा (पुढें चालू).

बहादरानें भटांच्या सर्व जुन्या ग्रंथांस लाथ मारली व मनूसहि सपाट्यासरसा झुगारून दिला, तो पाणिनीची मोठी पर्वा करील असें नाहीं. पण ज्यांच्यापुढें कुलंगी कुत्र्याप्रमाणें नेहमीं शेपूट हलवायाची, व ज्यांच्या आड दडून साऱ्या जगावर भोंकायाचें, त्यांच्यापर्यंत तरी जोतीरावांनीं आपलें तर्कट न्यावयाचें नव्हतें. पण तो तरी सुमार कोणाला रहावा? इंग्रेजींतील Hurrah Hurrah (हुरा हुरा) या उद्गारवाचक अव्ययाची दुर्दशा वर सांगितलेल्या शब्दांप्रमाणेंच त्यांनीं केली आहे.[1] तिसरी अजब

वाचक अगोदर अर्धेमेले झाले असतील! पण आणखीहि दोन तीन मारीपर्यंत त्यांनीं आपलें अवसान जाऊं देऊं नये. अशी सत्यशोधनाची पर्वणी पुनः कधीं येणार आहे? तर हें जाणून आमच्या आग्रहास त्यांनीं मान द्यावा—

"वामनानें बळीच्या शहरांतील एकंदर सर्व अंगणांचें सोनें लुटलें, त्याचा अपभ्रंश "शिलंगणाचें सोनें लुटलें" हा होय."

कित्ता—पृष्ठ २८.

"बळी अतिशय बळवान होता म्हणून त्याविषयीं एक जुनाट म्हण सुद्धां सांपडते. ती अशी कीं, "बळी तो कान पिळी!"

कित्ता—पृष्ठ २४.

" सारांश ब्रम्ह्यानें येथील मूळच्या क्षेत्रवासी लोकांस दास केल्यानंतर तो गर्वानें इतका फुगला होता कीं, महा अरींनीं त्याचें नांव थट्टेनें "प्रजापती" पाडिलें होतें असा तर्क निघतो."

कित्ता—पृष्ठ ४३

मि० जोतीच्या अरण्यपांडित्याचा एकदेश वरील उतान्यांत वाचकांस सांपडेल. अस-ल्या महान वैयाकरणास सत्यशोधकवाल्यांनीं मराठी शाळेंत पहिली यत्ता शिकण्यास पाठ-वायाचें सोडून उलटा त्यास आपल्या डोक्यावर बसवून ठेवला हें कसें झालें असेल तें असो! सत्याचा शोध लावण्यास निघालेल्या मंडळीस हें नाकासमोरचें महासत्य कसें दिसलें नाहीं कोण जाणे!!

१." हरहर या शब्दाचा अपभ्रंश हुरा हुरा होय, असा तर्क निघतो. कारण इंग्लिश लोकांत एक अति जुनाट वहिवाट सांपडते; ती अशी कीं, ते हुरा हुरा झटल्याशिवाय आनं-दाची टाळी पिटीतच नाहींत. व त्यांचे सेनापती आपल्या फौजेस हुरा हुरा झटल्याशिवाय शत्रूंवर तुटून पडण्याचा हुकूम देत नाहींत; असें कोठें कोठें त्यांच्या इतिहासांत सांपडतें. उदाहरण.–"Hurrah Boys! lose the Saddle or win the horse!"

जोतीरावांनीं सत्यशोधक समाजाकरतां नवें शुभवर्तमान तयार करून देतांना ब्राह्म-णांचा कृत्रिमरूपी कोट फोडणारे जे 'अमेरिकन व स्काच उपदेशक' त्यांचा बिलकूल सल्ला घेत-लाच नसेल काय? किंवा निदान पुण्याच्या वर्णनाला बाप्तिस्मा देऊन त्याचे जे पार-लौकिक जामनि होऊन बसले त्यांच्या पवित्र अवलोकनाखालीं तरी आपलें नवीन अपत्य जोतीबांनीं कांहीं वेळ असूं दिलें नसेल काय? आह्मांस तर खास वाटतें कीं, बरील इंग्रेजी शब्दांची कुळकथा या जोतीपुराणांत जी दाखल केली आहे ती एखाद्या 'महा—अ[illegible]त्रीय ब्राह्मणांनीं लेरास जर दाखविली असती, तर त्यानें सुद्धां सत्यशोधक मंडळींच्या अधिपतींचा [illegible]रून मी, बुट-असता!! [illegible]ाचे पुरु[illegible] कान धरला

चीज प्रस्तुत ग्रंथांतील इतिहासज्ञान. हें तर जोतीमहाराजांनीं कोठून पैदा करून आणलें असेल तें असो. सारें त्रिभुवन धुंडलें तरी तें बहुधा कोठेंहि सांपडेलसें दिसत नाहीं. आतां एक मात्र आह्मांला तर्क होतो, तो खरा असला तर कोणास माहीत! तो हा कीं, 'गुलामगिरी'च्या कर्त्याच्या कुलपतींतला प्रथम जो शंखासुर त्याची कीर्ति आज हजारों वर्षें लबाड ब्राह्मण ग्रंथकारांनीं जी दडपून टाकिली होती ती आज एकोणिसाव्या शतकांतील बहादरानें उदयास आणल्यावरून तो जर प्रसन्न झाला असेल, व मि० जोतीच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून समुद्रांत आजपर्यंत गुप्त ठेविलेलें एखादें बाडचें बाड जर त्यानें आपल्या कुलदीपकाच्या गुपचूप हातांत आणून दिलें असेल तर न जाणो! असें असेल तर शंखासुर महाराजांनीं आपल्या कृपेचें निधान करण्यास मोठें उत्कृष्ट पात्र पाहिलें यांत संशय नाहीं; कारण सदरील पुस्तकांत ग्रंथकर्त्याच्या बुद्धिमत्तेचें व सौजन्याचें जें मान प्रगट झालें आहे त्यावरून पहातां वरील योग अत्यंत अनुरूप होय असें कोणासहि वाटल्यावांचून रहाणार नाहीं. कसेंहि असो; पण आमच्या महान् इतिहासज्ञानें अगदीं पहिल्यापासून—ह्मणजे खुद्द ब्रह्मदेवापासून—तों मच्छ, कच्छ, वराह, नारसिंह, वामन, परशुराम हे सर्व अवतार घेऊन थेट इंग्रज बहादरापर्यंत व म्युनिसिपाल कमिटीपर्यंत एकंदर वृत्तांत जो आणून पोंचविला आहे तो वाचून मन अगदीं थक्क होऊन जातें! आजपर्यंत कोणत्याहि इतिहासकाराच्या लेखणीनें एवढी भरारी मारली नसेल! जोतीबांची 'गुलामगिरी' वाचीपर्यंत आह्मांस गिबनच्या इतिहासाचा चमत्कार वाटत असे. आह्मांस वाटे, कीं दीड हजार वर्षांची हकीकत हजारों पुस्तकांचे आधार घेऊन एकट्या मनुष्यानें वीस बावीस वर्षें सारखी लेखणी चालवून तयार करायाची ह्मणजे केवढें अचाट काम आहे! पण मि० फुले यांनीं आमचा वरील भ्रम पूर्णपणें दवडला. पहा कीं, गिबननें वेड्यानें आपलें निम्मे शिम्मे आयुष्य घालवून चार शेरांच्या ओझ्याचा ग्रंथ जेव्हां रचला, तेव्हां कोठें दहा पंधरा शतकांचा वृत्तांत त्यास लिहितां आला. पण फुल्यांनीं तर अवघ्या शंभर पानांच्या चोपडींत प्रथमारंभीं मच्छ, कच्छ, वराह वगैरे ब्राह्मण मंडळी इराणांतून या देशांत जलमार्गें कशी येऊन दाखल झाली, शूद्राचा मोठा बलाढ्य राजा जो बळी त्याच्या डोईवर त्या बंड्या ब्राह्मणानें [वामनानें] कसा पाय दिला, वगैरे हजारों वर्षांचा वृत्तांत इत्थंभूत जगास प्रगट केला आहे; आणि हें सर्व करण्यास त्यांस यत्किंचित्हि श्रम न पडतां सहज शिष्याशीं संवाद करतांना त्यांची इतिहासवाणी प्रगट झाली आहे. त्यांतून आणखी असें पहा कीं, गिबननें सहस्रावधि ग्रंथांचा आधार घेऊन आपलें भारूड रचलें; दुसऱ्यांचा उष्टा मजकूर घेऊन कोणी भारेचे भारे ग्रंथ नाहीं का तयार करायाचा! पण आमच्या शूद्र इतिहासकारानें पहा! असा मासलेवाईक इतिहास लिहून ठेवला आहे कीं, त्यास आधार ह्मणून

कोठेंहि सांपडायाचा नाहीं; मग तुझी ब्राह्मणांचा अधिपति जो ब्रह्मा त्याच्या लोकीं जा! किंवा शूद्रांचा सरनाईक जो बळी त्याच्या राज्यांत जा! स्वतःसिद्ध ऐतिहासिक स्फूर्ति असल्यावर व धोंडीबासारखा विचारा परम भाविक श्रोता मोठ्या सुदैवानें[1] गवसल्यावर मग कशाला पंचाईत करींत बसा! कवित्वाची स्फूर्ति होतांच धोंडीबास तुणतुणें आणायाला सांगून जोतीबांनीं 'ब्राह्मणाचें कसब,' जसें केवळ लीलेनें गाइलें असेल; त्याप्रमाणेंच कविरायांचा इतिहासाचा सूर लागला असतां 'ब्राह्मणांची गुलामगिरी'हि तेव्हांच निर्माण झाली असेल यांत संशय नाहीं. पण सदरील ग्रंथाचा सर्वांत मोठा गुण अद्याप सांगायाचा राहिलाच आहे. तो कोणता ह्मणाल तर विषयवैचित्र्य. हें वैचित्र्य पाहून तर जोतीबा केवळ ज्ञानमूर्ति आहेत असें ह्मणावें लागतें. 'ब्राह्मणाच्या गुलामगिरीं'त केवळ भगवद्गीतेंतलें विश्वरूप दृष्टीस पडल्यासारखें वाटतें! या गुलामगिरींत 'पद्मा डुकरीण' आहे, 'टामस पेन्स (!)' आहे, 'विश्वामित्र' आहे, 'वसिष्ठ' आहे, 'होमर' आहे, 'बदमास नाना' आहे, 'टर्किन् साहेब' आहे, 'मनू' आहे, 'भागवत' आहे, 'अमेरिकेंतील बळीचा मतानुयायी जार्ज वाशींगटन्' आहे, 'फ्रान्सांतील बळीचा अनुयायी लफेट्' आहे, 'बळीराजाचे मतानुयायी अमेरिकन व स्काच उपदेशक आहेत, 'शिवाजीसारखा अज्ञानी धर्मभोळा शूद्रराजा' आहे, 'मुकुंदराज, ज्ञानेश्वर वगैरे रामदासासारखे अनेक पायलीचे पंधरा व आधोलीचे सोळा ग्रंथकार' आहेत, 'भट प्रोफेसर' आहे, 'भट सभासद' आहे, 'भट शिरोमणि' आहे, 'लंगोट्या बहादर' आहे, 'दिगंबर विद्याखातें' आहे, 'मनगटाचा प्र***' आहे,—सर्व कांहीं आहे!! गारुड्याच्या पोतडीचा जसा ठावठिकाण लागत नाहीं, त्याप्रमाणें सदरील 'गुलाम गिरी'त काय काय चीजा आहेत हें प्रत्यक्ष पाहिल्यावांचून कोणालाहि कळणार नाहीं.

ज्या महाग्रंथावरून जोतीराव फुले यांचें नांव या देशांत चिरकाल राहून

---

१. 'कलिविडंबन' ग्रंथांत शिष्याचीं लक्षणें दिलीं आहेत—

अगतित्वमतिश्रद्धा ज्ञानाभासेन तृप्तता ।
त्रयः शिष्यगुणा ह्येते मूर्खाचार्यस्य भाग्यजाः ॥

"अध्ययनाच्या विषयाचें पूर्ण अज्ञान, जें कोणी सांगेल त्यावर पूर्ण विश्वास, व ज्ञानाचा भास झाल्यानेंहि तृप्ति,-या तिन्ही गुणांनीं युक्त असा शिष्य मूर्ख आचार्यास परम भाग्यानें प्राप्त होतो!"

वरील श्लोक प्रस्तुत गुरुशिष्यांवर कसा बरोबर लागू पडतो हें 'गुलामगिरी'चें पारायण केलें असतां तेव्हांच लक्षांत येईल. जोतीबांचीहि आपल्या कल्याण चेल्यावर मर्जी किती सुप्रसन्न आहे हें पुढील पद्यावरून लक्षांत येईल-

खरा विद्यार्थी जोतीबांचा धोंडीराम जिव्हाळा ।
घालि भटांच्या गळ्यांत गुंफुनि सर्व ऋषींच्या माळा ॥

(मलपृष्ठावरील पद.)

त्यांच्या शूद्र बांधवांचें कोटकल्याण होणार व 'ब्रह्मराक्षसां'वें निर्दाळण होणार, जो येथील सत्यशोधक मंडळीचें जणों काय पवित्रशास्त्रच बनून राहिला आहे, जो लिहिण्यास जोतीबांच्या कित्येक विद्वान् मित्रांनीं त्यांस उत्तेजन दिलें. ज्याची अकटोविकट योग्यता वाटून जो ग्रंथकर्त्यानें 'युनेटेड स्टेट्स मधील सदाचारी लोकांस' अर्पण केला आहे, व ज्या शूद्र अर्भकाचा खिस्ती पत्रकर्त्यांनीं आपआपल्या घरोघर महोत्साह करून त्याच्या जनकास परोपरीनें शाबासकी दिली, त्याच्या स्वरूपाचा कांहीं बोध वरील दिग्दर्शनावरून आमच्या वाचकांस होईल. मि० फुले यांजविषयीं केवळ लोकप्रवादावरून सामान्यतः आमची अशी कल्पना आजपर्यंत असे कीं, हे जात्या शूद्र असल्यामुळें इंग्रेजी ज्ञानाच्या योगानें त्यांच्या ठायीं ब्राह्मणाविषयीं स्पर्धा उत्पन्न झालेली असावी, व त्यांतून 'ज्ञानोदय', 'सत्यदीपिका', 'नानाविध चर्चे संग्रह' यांच्या निरंतर पवित्र परिशीलनानें ब्राह्मणद्वषाचें मोलवान तत्त्व त्यांनीं पटकावलें असावें. पण वरील 'रिपोर्टा'विषयीं अभिप्राय देण्याचें मनांत आणून जोतीबांचें 'कसब' व 'गुलामगिरी' हे दोन ग्रंथ पैदा करून ते वाचण्यास जेव्हां आरंभ केला, तेव्हां आमची तत्क्षणीं खात्री होऊन चुकली कीं, राव जोतीचे माहात्म्य आह्मांस पूर्वी जें माहीत होतें तें कांहींच नव्हतें! ऐकण्यांत व पहाण्यांत किती अंतर आहे याविषयींची आह्मांस गुलामगिरी'वरून जी प्रचीती आली ती आह्मी कधीं विसरणार नाहीं. केवढी प्रचंड विद्वत्ता! केवढी अतर्क्य तर्कशक्ति! सत्याविषयीं केवढा अभिमान व तें हुडकून काढण्याविषयीं केवढा हव्यास! इंग्रेज सरकाराविषयीं केवढी अपार राजभक्ति! वा! एकूण एवढा पटाईत शिष्य ज्या गुरूनें तयार केला असल त्यानें आमच्या देशास केवढी जोड करून दिली बरें! हा गुरू कोणी भट जातीचा असेलसें वाटत नाहीं; त्यांतूनहि कोणी प्रथमतः असलाच तर त्याची दुष्ट विद्या जोतीबांनीं लवकरच ओकून टाकून कोणी महासमर्थ मिशनरींच्यापासून चांगला अनुग्रह घेतला असेल. या पूर्वसंस्कारत्यागाच्या बरोबरच त्यांनीं ह्रस्वदीर्घांची ओळख टाकून दिली कीं काय कोण जाणे! एरवीं एवढ्या महापंडिताला ह्रस्व, दीर्घ, अनुस्वार यांविषयीं वानवा असून त्यांबद्दल दुसऱ्याच्या तोंडाकडे बघण्याची जरूर पडावी हें संभवत नाहीं! असो; एकंदरींत जोतीरावांचा ग्रंथ अत्यंत मोलवान आहे. याची किंमत आमच्या ज्ञातिबंधूंस जरी दुप्पट पडणार आहे,[1] तरी तीहि भरून तो संग्रहास बाळगण्याची आह्मी

१. 'गुलामगिरी'च्या मुखपत्रावरच ग्रंथकर्त्यानें किंमतीचा तपशील लिहिला आहे कीं, शूद्र अतिशूद्रांस ६ आणे, व इतरांस १२ आणे. हा मूल्यभेद करण्याचा जे तीरावांचा उद्देश उघडच आहे कीं, ज्यांचेकरतां त्यांचे रात्रंदिवस परिश्रम चालले आहेत त्यांनीं त्यांच्या महाग्रंथाच्या द्वारें शहाणें व्हावें व ते स्वतः आधीं 'क्षुद्र' असतां पुढें ज्ञानबळानें 'ब्रह्मराक्षसांच्या

(पुढें चालू.)

त्यांस शिफारस करतों. निदान प्रत्येक पुस्तकालयांत व विशेषतः पदार्थसंग्रहालयांत तरी त्याची प्रत असणें जरूर आहे. पूर्वी एका अंकांत आर्यसमाजवाल्यांच्या जगद्गुरूच्या मतें 'उलूपी राजकन्येच्या देशांत' व सत्यशोधकवाल्यांच्या जगद्गुरूच्या मतें 'बळी राजाचे अनुयायी जे अमेरिकन त्यांच्या देशांत' छापलेलें एक मासलेवाईक पुस्तक आह्मीं आपल्या वाचकांस प्रसिद्ध करून त्याची उपयुक्तता दाखविली होती ती केवळ विलक्षण भाषेच्या संबंधानेंच होती, पण सदरहू पुस्तकांत तर सर्व प्रकारची बहार सांपडणार आहे. बळी राजाचे अनुयायी मिशनरी त्यांचे अनुयायी जे आमचे जोतीबोवा त्यांनीं तर मिशनरींवर व बळीवरहि ताण करून दिली आहे! आमच्या भवभूतीनें 'वाचमर्थोऽनुधावति' [अर्थ वाणीच्या मागून धांवतो] असें जें झटलें आहे त्याचा प्रत्यय ज्यास उत्कृष्ट घ्यावयाचा असेल, बलवत्तर स्फूर्तीच्या लोंढ्यासरशी व्याकरणाची अर्थसंगतीची वगैरे काय त्रेधा उडून जाते हा चमत्कार ज्यास पहावयाचा असेल, 'ज्ञानोदया'तील ४० वर्षांच्या तत्त्वज्ञानाचा ज्यास अर्क काढून घ्यावयाचा असेल, श्रावणमासीं जोतीबांच्या भगिनींचा गालिप्रदानविधि जो मोठ्या थाटानें रस्तोरस्तीं चालतो त्याचा रस ज्यास चार घटका अनुभवावयाचा असेल, त्यास 'गुलामगिरी'सारखें दुसरें साधन नाहीं!

सत्यशोधक मंडळीच्या अग्रेसरांविषयीं वर जो मजकूर लिहिला आहे त्यावरून सदरील समाजाविषयीं वाचकांस बरीच कल्पना करतां येईल. आतां या समाजाच्या वरील पुस्तकाविषयीं लिहूं. हा तीन वर्षांचा रिपोर्ट आहे; ह्मणजे माहे सप्तंबर सन १८७३ पासून तों माहे मजकूर सन १८७६ पर्यंतची एकंदर झालेली हकीगत यांत सर्वांस जाहीर केली आहे. प्रथमतः समाज स्थापण्याचा उद्देश येणेंप्रमाणें प्रगट केला आहे—

"ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादिक लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरितां व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारें आज हजारों वर्षें ते

दास्यत्वापासून जसे मुक्त' झाले त्याप्रमाणेंच त्यांनींहि मुक्तस्थितीचें सुख अनुभवावें. पण इतकें करूनहि रावजोतींच्या 'गुलामगिरी'–ला फारसें गिऱ्हाईक आलें असेलसें वाटत नाहीं. कारण आज चार वर्षें लोटून गेलीं असतांहि वरील महाग्रंथाच्या पुष्कळ प्रती अद्याप शिल्लक आहेत असें 'रिपोर्टा'वरून कळतें, व शिवाय आळंदीच्या भटसंताच्या वारीला जाणारा कोणी शूद्र आपली पताका माघारी फिरवून सत्य शोधणाऱ्या मंडळीकडे वळला असेंहि कोणाच्या सांगण्यांत नाहीं! असो. पण एवढ्यानें काय झालें आहे! 'गुलामगिरी'त भविष्यवाद केल्याप्रमाणें बळीचें राज्य जेव्हां या महा–अरि–राष्ट्रावर होईल, व त्याच सुमारास ख्रिस्त महाराजहि आपला प्रेषितपरिवार बरोबर घेऊन सहस्रवार्षिक राज्य करण्यास जेव्हां भूमंडळावर मात्स्यान अवतीर्ण होतील, तेव्हां तरी सत्यशोधकांच्या पवित्रशास्त्राची खूप चलती चालेल

शूद्र लोकांस नीच मानून गफलतीनें लुटीत आले आहेत. यास्तव सदुपदेश व विद्या-द्वारें त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरितां ह्मणजे धर्म व व्यवहार-संबंधीं ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यांस मुक्त करण्याकरितां कांहीं सुज्ञ शूद्र मंडळींनीं हा समाज ता० २४ माहे सप्टेंबर सन १८७३ इसवी रोजीं स्थापन केला. या समाजांत राजकीय विषयांवर बोलणें अजी वर्ज आहे."

आतां हा जो सामाजिकांनीं आपला कृतसंकल्प येथें प्रदर्शित केला आहे त्यावर सकृद्दर्शनींहि अनेक आक्षेप येणार आहेत. ते हे कीं, शूद्रांचा आणि भटांचा व जोशांचा जो संबंध आढळतो त्यास एका पक्षीं दास्य व दुसऱ्या पक्षीं जुलूम हे शब्द अंमळ दांडगाईनेंच लाविले पाहिजेत. शूद्र अतिशूद्र यांच्या घरीं यजमानकृत्य चालविण्यास कोणत्या तऱ्हेचे भट जात असतात व त्यांतून जे जातात त्यांच्यापैकीं आपल्या दासावर जुलूम करून कितीजण धनत्तर होऊन पडले आहेत याविषयीं विचार केला असतां, व त्यांतहि वरील प्रकारचें 'दास्य' केवळ हिंदुस्थानांतच आहे किंवा सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेल्या देशांतहि त्याचें प्राबल्य आहे याविषयींहि थोडा विचार केला असतां, ब्राह्मणाच्या जुलुमाचा सत्यशोधकांनीं एवढा जो बाऊ करून ठेवला आहे तो बराच नाहींसा होईल. शिवाय दुसरी गोष्ट अशी कीं, 'ब्राह्मणांच्या बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून' आपल्या देशबांधवांस मुक्त करण्यास जी 'सुज्ञ शूद्र मंडळी' पुढें सरसावली तिच्यापैकीं कितीकांच्या ठायीं बरें वरील पाश छेदण्याचें सामर्थ्य असेल? इकडे इंग्रजी झाल्यास जें सबंध संवत्सरचक्र आज उलटून गेलें आहे त्यांत इंग्रेजी विद्येचा सर्वांस सारखा लाभ घडत असतां शूद्रवर्गापैकीं थोडेच विद्यासंपन्न झालेले आढळतील, त्यांतून ब्राह्मणांच्या बनावट व कार्यसाधक ग्रंथांचें ज्ञान ज्यास आहे असा धर्मशास्त्री शूद्र तर अद्याप कोणीहि ऐकला नाहीं. मग ज्या 'बनावट' ग्रंथांचा शेंडा का बुडखा आपणांस स्वतः माहीत नाहीं त्यांची अप्रमाणता समाजांतील पंडितजन जे तुकोबा, सदोबा, माणकोबा वगैरे त्यांस आमची 'सुज्ञ शूद्र मंडळी' कोणत्या तऱ्हेनें समजून देणार असेल ती असो! त्यांच्या बृहस्पतींनीं आपल्या बृहत्संहितेंत ब्रह्मदेवाविषयीं, भागवताविषयीं, मनुसंहितेविषयीं वगैरे जी बडबड केली आहे तसलेंच पांडित्य करण्याचें सामाजिकांनीं मनांत आणलें असल्यास कोण जाणे![1]

---

१. जो०—त्याचप्रमाणें मनुसंहिताहि भागवताचे मागून केली असावी ह्मणून शाबीत करितां येतें.

धों०—काय? मनुसंहिता भागवताचे मागन केली असावी! असें कसें होईल?

जो०—कारण, भागवतांतील वसिष्ठानें मी खून केला नाहीं ह्मणून सुदामन राजासमोर

(पुढें चालू).

वरील आक्षेपांप्रमाणेंच प्रस्तुत समाजाच्या संबंधानें आणखी अनेक प्रकारचे आक्षेप कोणाहि विचारी मनुष्याच्या सहज लक्षांत येणारे आहेत. त्यांवर सविस्तर निरूपण करूं गेल्यास आर्यलोक हे प्रथमतः कांकजस पर्वतापाशीं होते, पुढें त्यांनीं हिंदुस्थानांत येऊन मूळच्या भिल्ल, गोंड वगैरे लोकांस जिंकून आपले दास केलें, वगैरे जे पाश्चात्य पंडितांच तर्क आहेत, ते कितपत सप्रमाण आहेत; अथवा तेहि सप्रमाण धरले तरी ईश्वरप्रणीत धर्माचे आपणांस ह्मणविणारे व साऱ्या जगाचें बंधुत्व तोंडानें कबूल करणारे जे देवाचे लाडके लोक त्यांच्याकडून अमेरिकेंत व आफ्रिकेंत काय काय प्रकार घडण्यांत आले, व सध्यांहि साऱ्या जगभर काय काय चालू आहेत; अलीकडील स्थिति पाहिली तर ब्राह्मणांचा व अवांतर जातींचा परस्पर जो संबंध आहे तो जोतीबा-प्रभृति विद्वन्मणींस व त्यांस चिथावणारे जे शुभवर्तमानी त्यांचे बंधु त्यांस जसा वाटतो किंवा बळेंच आंगावर वेड घेऊन तो वाटल्यासारखं जसें ते दाखवतात तसाच आहे किंवा कसा आहे; शूद्रांतील अत्यंत नीच जातींत निर्माण झालेल्या साधुसंतांचाहि महिमा ब्राह्मणांनीं निरंतर गाइलेला पाहून व त्याच जातींतल्यांस खुद्द ब्राह्मणांनींच केवळ गुणावर लक्ष देऊन महाप्रभुत्वाच्या पदास चढवून आपल्या बरोबरचे करून सोडले हेंहि क्षणभर मनांत आणलें असतां कोणाहि मनुष्यास काय वाटणार आहे; हल्लींच्या काळीं आमच्या जोतीबासारख्या पट्ट्यांनीं निर्धास्तपणें ब्राह्मणांवर भुंकलें असता त्यांत त्यांची कितपत बहादुरी आहे व बळेनसार तोंड वर तुकडा टाकणाऱ्या धन्यांच्या पुढें लाळ घोटण्यांत कितपत राजनिष्ठा व सत्यनिष्ठा आहे; तसेंच हल्लींच्या देशस्थितींत एकमेकाला शिव्या देण्याकरितां समाज स्थापणें यांत कितीसे शहाणपण आहे,—इत्यादि सर्व गोष्टींविषयीं विचार करावा लागेल.[1] पण ज्या

शपथ घेतल्याची उपमा मनूनें आपल्या ग्रंथाच्या ८ व्या अध्यायाच्या ११० श्लोकांत कशी घेतली? त्याचप्रमाणें, विश्वामित्रानें विपत्तिकाळीं कुत्र्याचें फरें खाल्ल्याविषयीं त्याच ग्रंथाच्या १० व्या अध्यायामध्यें १०८ श्लोकांत कशी उपमा घेतली? याखेरीज त्याच पुस्तकांत अनेक विरुद्ध गोष्टी पंडतात.

गुलामगिरी—पृष्ठ ५५.

१. वरील विषयावर आमच्या ज्ञातींतील एक प्रमुख विद्वानानें गेल्या मे माहन्यांतील सप्ताहांत एक व्याख्यान दिलें ते यथील बहुश्रुत लोकांस तरी अजून आठवत असलच. हे गृहस्थ ब्राह्मणांचे पक्षपाती कितपत आहेत हें सर्वांस माहीत आहेच. असें असतांहि त्यांनीं केवळ समान दृष्टीनें सदरील विषयावर जे विचार प्रगट केले ते विशेषतः 'सत्यशोधक' मंडळीनें ऐकण्यासारखे होते. तरी या मंडळीपैकीं त्या रात्रीं श्रोतेजन किती होते हें ब्राह्मांस माहीत नाहीं. समाजाचे अध्यक्ष येथील लोकप्रिय डॉ० विश्राम रामजी घोले यांच्याखेरीज कोणी प्रमुख मंडळी त्यासमयीं बहुधा आली नसावी. "गुलामगिरी"चे विद्वान् कर्त्यांनी जर त्या दिवशीं व्या-

(पुढें चालू).

अर्थी जोतीबांचा समाज अद्याप बाल्यावस्थेंतच आहे. एकीकडे हडपसर व दुसरीकडे भांवुरडें याच त्याच्या प्रचंड सीमा होत, त्या अर्थी असल्या क्षुद्र सभेवर हत्यार धरण्यास आह्मी उत्साह पावत नाहीं. स्वामीन्या आर्यसमाजाप्रमाणे त्याचा जेव्हां अवाढव्य विस्तार होईल, व सत्यसमाज मंदिराच्या अग्रभागीं जोतीरावांचा संगमरवरी पुतळा त्यांच्या शुभ्र यशाचा स्मारक ह्मणून स्थापला जाईल, तेव्हां त्याच्या मतांच्या यथार्थत्वाविषयीं विचार करतां येईल!

सदरील 'रिपोर्टांत' वरील उद्देश प्रथमतः प्रगट करून नंतर जागजागीं समाजाच्या शाखा कसकशा स्थापन होत गेल्या, त्यांच्या हातून कोणकोणतीं कृत्यें घडण्यांत आलीं, हीं होत असतांना दुष्ट लोकांकडून त्यांच्या सत्कृत्यांस कोणकोणते अडथळे आले, त्या अडथळ्यांचें कोणीं कसें निवारण केलें, आपल्या शूद्रबंधूंस सुधारणेच्या मार्गास लावण्यासाठी हरतालका, गणेशचतुर्थी, ऋषिपंचमी वगैरे धर्मभोळ्या चाली बंद करून त्यांच्या जागीं बलीराजानें पवित्र 'पाळिलेला' व आकाशांतील बापानें लावून दिलेला जो आदितवार तो छानछूक पोषाक करून देवाच्या नांवानें डोळे मिटण्यांत घालविण्याची सुधारलेली रीत समाजानें सुरू केली; ब्राह्मणांचें बंड मोडून टाकून त्यांच्या मदतीशिवाय कोणीं लग्नें लावलीं, कोणीं वास्तुशांत केली, कोणीं पिंडप्रदान केलें, वगैरे प्रकार चालू झाले; त्याप्रमाणेच समाजाचा उत्कर्ष चिंतून कोणीं कोणीं काय काय मदत केली, ह्मणजे कोणीं पैशाच्या रकमा दिल्या, कोणीं शूद्र विद्यार्थ्यांस स्कॉलरशिपा सुरू केल्या, कोणीं त्यांस उत्तेजन येण्याकरितां मेणकापडी डगली वाटलीं, कोणीं माट्रिक्युलेशन परीक्षेंत जो उतरेल त्यास देण्याकरितां सोन्याचें पदक देण्याचें कबूल केलें, कोणीं शेतकीवर जो चांगला निबंध लिहील त्यास बक्षीस देण्याचें कबूल केलें, कोणीं तर सत्याच्या प्रकाशाचा फैलावा व्हावा ह्मणून १२०० रुपयांचा छापखाना समाजाच्या हवालीं केला;—इत्यादि गोष्टींची हकीकत लिहिलेली आहे. आतां वरील सर्व गोष्टी आमच्या 'सुज्ञ शूद्र मंडळी'नें शहाणपणाच्या ह्मणून केल्या आहेत, व अलीकडे इंग्रजी विद्येच्या योगानें जी लोकस्थिति बदलली आहे तीसहि त्या प्रायः अनुसरूनच आहेत हें खरें; पण सदरील 'रिपोर्टी'तील

ख्यानाची जागा सुशोभित केली असती तर 'सत्यदीपिका' दि पत्रांच्या द्वारें त्यांच्या डोक्यांत सांठवलेला गाढ अंधकार बराच दूर होऊन त्यांस खरें 'सत्य' कांहीं तरी उमजायाला लागलें असतें! पण हें व्हावें कोठून? जेथें 'भट प्रोफेसरा'ची, 'भट सभासदा'चीहि डाळ शिजेना तेथें भट्ट प्रिन्सपालाची तरी कोठून शिजावी? असो; पण वर सांगितलेल्या अध्यक्षाच्या मनाबर मान त्या दिवशीं खऱ्या सत्याचा प्रकाश बराच पडला असावा असें दिसतें. कां कीं, त्यांनीं यंदांच्या सत्यशोधक वक्तृत्वसमारंभांत शेवटीं जें भाषण केलें (हें 'ज्ञानप्रकाशां'तून आमच्या वाचकांपैकीं कित्येकांनीं वाचलेंच असेल) त्यांत जोतीबांची जागती जोत मालवल्यासारखीच दिसली!!

वरील स्थळें वाचून कांहीं शंका मनांत सहजीं उद्भवतात त्या येथें यत्किंचित् प्रदर्शित केल्यावांचून राहवत नाहीं. एक ही कीं, आपल्या शूद्र बंधूंची व भगिनींची पारलौकिक स्थित सुधारण्यास ह्मणून जी सामाजिकांनीं वर सांगितल्याप्रमाणें तजवीज केली आहे तिजपासून त्यांचें कितपत हित होईल हें आमच्यानें सांगवत नाहीं. गौरीच्या मुखवट्यांची स्त्रियांनीं पूजा करणें हें जोतीबा प्रभृति तत्त्वज्ञान्यांस अतिशय वेडगळ वाटेल हें उघडच आहे; पण तें न करतां पुरुषमंडळींत परक्याच्या दंडाला दंड लावून बसल्यानें व डोळे मिटण्याचें आठा दिवसानीं एकदां सोंग केल्यानें त्याच शूद्र स्त्रियांस ईश्वरज्ञान कितपत अधिक होईल किंवा त्यांची नीति कितपत सुधारेल याची आह्मांस कल्पना करवत नाहीं ! 'भट शिरोमणीनें केलेलीं गीतें एकंदर मिळून नवीन समाजांत गाण्याचा' जो परिपाठ आढळतो त्यापासून पारमार्थिक कार्य कितपत होतें व कितपत झालें आहे हें सर्वप्रसिद्धच आहे; व शूद्रशिरोमणीच्या समाजांत तरी बळीराजाचा आदितवार पवित्र पाळल्यानें अंतःकरणाची शुद्धता कितपत होण्याचा संभव आहे याची प्रचीति, आमच्या मतें, शूद्रशिरोमणीच्याच पवित्र 'गुलामगिरी'वरून भरपूर घेतां येणार आहे. मि० जोती वयानें चांगले पोक्त आहेत ह्मणून ऐकतों, व लोककल्याणाच्या कामांत तर त्यांची गडबड वीस पंचवीस वर्षें तरी आहे; मग आकाशांतील बापाची ओळख झाल्यास इतका काळ लोटला असतां, व इतकीं वर्षें त्यांनीं त्याचें दर आदितवारीं ध्यान केलें असतां, त्यांचा स्वभाव जर प्रसिद्ध शूद्रकवीच्या अभंगांत सांगितल्याप्रमाणें जसाचा तसाच अद्याप राहिला आहे, तर त्यांच्या बंधूंवर व भगिनींवर तरी नेत्रमीलनविधीचें अधिक कार्य दृष्टीस पडेल हें कोणीं ह्मणावें ? कोणत्याहि धर्मसमाजाचा उद्देश अर्थात हा असतो कीं, त्याचें अनुसरण केलें असतां धार्मिकतेच्या वृत्ति, ह्मणजे शांति, निरहंकारता, समदृष्टि, सभ्यता इत्यादि हृदयांत उत्पन्न व्हाव्या, व मनास उन्नति व प्रसन्नता प्राप्त व्हावी; पण हीं सर्व लक्षणें सत्यशोधकांच्या जगद्गुरूंच्या ठायीं कितपत आढळतील बरें ? जो 'गुलामगिरी'चें एखादें पृष्ठ वाचील त्याची खुद्दा वरच्या संबंधानें तेव्हांच खात्री होईल ! हें एक झालें. दुसरी एक मोठी शंका वरील वास्तुशांतीवरून व पिंडप्रदानावरून अशी मनांत येते कीं, वरील विधि 'समाजाचे मताप्रमाणें' केले ह्मणजे काय ? वास्तुशांतीचे व उत्तरकार्याचे मंत्र कोणीं शूद्र आचार्यांनें नवे तर बनवले नसतीलना ? किंवा त्यांच्या जागीं शुभवर्तमान अध्याय अमुक ओंवी अमुक, किंवा 'ब्राह्मणांची गुलामगिरी' भाग अमुक पृष्ठ अमुक अशी बदल करण्याविषयीं जोतीराव फुल्यांनीं एखादें अज्ञापत्र काढिलें आहे काय ? किंवा जेथें भाताचे पिंड करावयाचे त्या जागीं यंत्रसिद्ध विलायती पिंडांची योजना करायाची ! काय असेल तें असो; या बाबतींत एखादा जोतीबांचा चेला किंवा त्यांचे साह्यकारी जे 'चर्चसंग्रह'वाले ते आमच्या अज्ञानांधकाराच्या निर-

सनार्थ एखादा ज्ञानकिरण पाठविण्याची मेहेरबानी करतील तर बरें होईल! तिसरी गोष्ट सोन्याचें पदक व शेतकीचा निबंध. सोन्याच्या पदकाविषयीं सदर्हू रिपोर्टांतच असा मजकूर आढळतो कीं, तें देणाऱ्यानें 'दरसाल २५ रुपये देण्याच कबूल करून एकसालचे रुपये भरले असतांहि पदक अद्याप देण्यांत आलें नाहीं! दुसऱ्या निबंधाची काय व्यवस्था झाली तीं अद्याप समजण्यांत आली नाहीं. आतां या दोन्ही प्रकारांविषयीं आह्मांस लिहावयाचें ह्मणून इतकेंच आहे कीं, केवळ इच्छामात्रेंकरून कोणत्याहि कार्याची सिद्धि होत असते असें नाहीं. ज्या जमीनीची कधीं लागवड झाली नाहीं तिजवर उत्कृष्ट पीक यावें अशी जर कोणाची मनदेवता धांवली तर त्यानें नांगराची, बैलाची वगैरे तजवीज पहावी, का मोठें बक्षीस लावून क्षेत्रदेवतेस लालचावयास पहावें? जेथें बारा जन्मांत कधीं नांगर फिरला नाहीं तेथें मोठीं सोन्याचीं फुलें उघळलीं ह्मणून काय होणार? तर या उघड न्यायाकडे लक्ष देऊन आमची शूद्रकल्याणेच्छु मंडळी सोन्याचें पदक व बक्षीसांच्या थैल्या यांस तूर्त मोहोरबंद करून ठेवून आपल्या बांधवांच्या शिक्षणाच्या तजविजीला जर अगोदर लागतील तर त्यांत त्यांचें शहाणपण दिसून येणार आहे, व ज्यांच्या हितार्थ ते झटताहेत त्यांचेंहि त्यांत कल्याण होणार आहे!

असो; आतां सरते शेवटीं सदरील रिपोर्टांतल्या चार ठिकाणचा उतारा पुढें देऊन जोतीबांची व त्यांच्या सभासदांची रजा घेतों—

"मुंबईकर सभासदांनीं रा० रा० जोतीराव फुले यांस गतवर्षी मुंबईस बोलावून नेलें आणि तेथें त्यांच्याकडून कांहीं व्याख्यानें सत्याविषयीं देवविलीं."

"रा० रा० जोतीराव गोविंदराव फुले यांनीं केलेल्या गुलामगिरी आणि ब्राह्मणांचें कसब या पुस्तकांच्या प्रत्येक ५० पन्नास ५० प्रति समाजास बक्षीस दिल्या. हीं पुस्तकें आणि समाजाचे नियम हीं श्रीमंत आणि राजेलोक यांजकडे पाठवावीं असें ठरलें."

"या समाजाचे खरे हेतु जाणून सत्यदीपिका ह्मणजे केवळ सत्याचा दीपकच या पत्रानें समाज सुरू झाल्या दिवसापासून आजतागाईत जी जी मदत अवश्य आणि सत्यास अनुसरून द्यावयाची ती दिली, व ज्या ज्या सभासदानीं सत्यास स्मरून जीं जीं स्तुत्य कृत्यें केलीं तीं छापून प्रसिद्ध केलीं याजकरितां समाज त्या पत्रकर्त्याचे फारच आभार मानून सर्वशक्तिमान जगाचा उत्पन्नकर्ता यास अशी प्रार्थना करतो कीं, हें पत्र चिरकाल चालून असाच सत्याचा प्रकाश जगभर होवो!

"श्री० रा० रा० हरी गणेश पटवर्धन ऊर्फ अण्णासाहेब सांगलीकर हे सभ्य गृहस्थ ब्राह्मण लोकांपैकीं बडे लोक असून समाजाचे सभासद नसतां, समाजाचे मुख्य सभानायकाकडून समाजाचा स्तुत्य हेतु त्यांस समजतांच त्यांनां शूद्र लोकांचा खरा

कळवळा आल्यामुळें त्यांनीं चालू सालाकरितां पस्तीस रुपये वर्गणी दिली, यास्तव समाज त्यांचा फार आभारी आहे. यांचेंच नांव सत्याभिमान आणि यांचेंच नांव मनुष्यमात्राचा कळवळा !"

वरील चार कलमांवर निराळी टीका करणें नको. जोतीराव केवढे महाज्ञानी आहेत, त्यांचें सत्य झगजे काय, व त्यांच्या दोन महाग्रंथांचें स्वरूप काय आहे; हें वर सविस्तर वाचकांस कळविलेंच आहे; तशीच 'सत्याची जी केवळ दीपिकाच' तिजविषयीं हि विशेषतः गेल्या ३६ व्या अंकावरून आमच्या वाचकांस माहिती झालेलीच आहे; तेव्हां मुंबईकरांनीं वरील सत्यमूर्तीस पाचारण केलें असतां त्यांच्या वक्तृत्वानें त्यांचे कान कितपत पावन होऊन गेले असतील, 'गुलामगिरी' व तिचें 'क्षुद्र' भावंड हीं पुस्तकें कोणत्या वसुलाचीं आहेत व राजाश्रयास तीं कितपत पात्र आहेत, तशीच 'सत्याच्या जोती'ची जी सत्यशोधकांनीं व जोतीभक्तांनीं तारीफ केली आहे व तिच्या तर्फेनें आकाशांतील प्रभूपाशीं भीड घातली आहे ती कितपत यथार्थ आहे व कितपत सफळ होण्यासारखी आहे, या सर्व गोष्टी वाचकांच्या लक्षांत येऊन चुकतीलच. त्याविषयीं आणखी कांहीं लिहिण्याची गरज नाहीं. पण शेवटल्या कलमांत ज्या पुण्यपुरुषाचा महिमा गाईला आहे त्याची माहिती मात्र आमच्या दूरदूरच्या वाचकास कदाचित् नसेल. कां कीं संभाजी महाराजांच्या अमलांत कलुषाची कारकीर्द जशी गाजली, किंवा शेवटल्या रावबाजीच्या आश्रयानें त्रिंबकजीचे गुण जसे पूर्ण विकास पावले, तशी वरील गृहस्थाची सार्वत्रिक विख्याति होण्याचा योग आमच्या सरकारानें येऊं दिला नाहीं. त्यांचा 'सत्याभिमान व मनुष्यमात्राचा कळवळा' नुकता कोठें दृष्टीस पडूं लागला न लागला तोंच त्यांस सरकारनें त्यांच्या जिवलग दोस्तापासून दूर केलें. व सांगली संस्थानाचा बचाव केला. पुढें या कळवळ्याच्या गृहस्थांनीं आमच्या पुण्यपत्तनांतहि आपली कीर्ति उधळून वर्तमानपत्रद्वारें लोकांचें रंजन कांहीं दिवस बरेंच केले हेंहि सर्वांस महशूर आहेच. असो; एकंदरींत सत्यशोधनाचा जिनें आपला बाव्हटा उभारला आहे, व सत्यदीपिकेच्या साह्यानें जिची दृष्टि एवढी परम सूक्ष्म झालेली आहे कीं, मनूपर्यंत ब्रह्मदेवापर्यंतहि ती पोंचून टर्किन साहेबांच्या अंगावरील रोमांचांहि तिच्या दृष्टीला विषय झाले, त्या सभेस पटवर्धन ऊर्फ सांगलीकर यांचेंच चरित्र कसें अश्रुत राहिलें याचा आह्मांस आचंबा वाटतो ! पण कोण जाणे, पस्तीस टिकल्यांच्या उजेडानें झक्क होऊन सभेचे डोळे तर दिपले नसतील ना ! असें असेल तर सामाजिकांस आह्मी अशी सूचना करतों कीं, वरील सत्याभिमानी व कनवाळू गृहस्थास त्यांनीं आपल्या मंडळीचें अधिपतित्व द्यावें. तें दिलें असतां समसमानांचा जोडा मोठा उत्कृष्ट घडेल व बलीचें राज्य आकाशाच्या राज्याबरोबर लवकरच खालीं येईल !

अभिप्राय देण्यास हातीं घेतल्यापेक्षां पहिल्या पुस्तकावर एवढी टीका बस झाली. वस्तुतः पाहिलें असतां जोतीबांच्या व त्यांच्या अनुयायांच्या मतांवर विवरण करणें, व ब्राह्मणांचे गुणावगुण, हल्लींची शिक्षणपद्धति वगैरे विषयांवर सविस्तर निरूपण करणें, हें हल्लींच्या काळीं अत्यंत अवश्य होय. पण तसें करण्याचें हें स्थल नव्हे हें उघड आहे. तरी वर जे अनेक विचार प्रगट करण्यांत आले आहेत त्यांवरून प्रस्तुत समाजाविषयीं व त्याच्या मतांविषयीं वाचकांच्या मनांत बरीच यथार्थ कल्पना येईल असें आह्मांस वाटतें. सत्यशोधकांस वरील विवरण आवडणार नाहीं हें उघडच आहे; पण ज्या अर्थी आमचें मत प्रांजलपणें उघड करण्याविषयीं त्यांनीं आपलें पुस्तक पाठविण्यानें आह्मांस सूचना केली त्या अर्थी पुस्तककारांच्या संप्रदायास अनुसरून आह्मांस आपलें मनोगत कळविणें प्राप्त पडलें. तें आमच्या बुद्धीनें तरी आह्मीं निःपक्षपातपणानें दिलेलें आहे; तर सत्याच्या शोधार्थ यत्न करणारी मंडळी आपलें नामाभिधान सार्थ करून त्याविषयीं मनन करो एवढीच आमची त्यांस प्रार्थना आहे.

विद्यार्थिबुद्धिवर्धिनी—हें पुस्तक रा० शंकर बाळकृष्ण दीक्षित स्कूलमास्तर रेवदंडा यांनीं रचिलें आहे. हें मराठी शाळांतील चवथी, पांचवी व सहावी यत्ता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां केलें असून यांत क्रमिक चवथें, पांचवें व सहावें पुस्तक यांतील कवितांत असणाऱ्या कठिण शब्दांचा संग्रह केला आहे. आरंभीं एक बराच मोठा निबंध जोडला आहे, त्यांत मराठी कवितेंतील व्याकरणविशेषांचें निरूपण केलें आहे, व शब्दसिद्धीविषयीं वगैरे कांहीं सूचना दिल्या आहेत.

सदरील ग्रंथाचे वरील सर्व भाग यथास्थित व व्यवस्थेवार लिहिलेले आहेत. पहिला व्याकरणाचा निबंध 'पद्यरत्नावली'स जोडलेल्या लेखांच्या आधारानें लिहिलेला असावा. तरी यांतील विषय वरील लेखाहून अधिक विस्तारानें लिहिला असून उदाहरणें वगैरे पुष्कळ दिलेलीं आहेत. शिवाय संधीचे वगैरे नियमहि अधिक जोडलेले आहेत. दुसऱ्या भागांत पुस्तकाचा मुख्य विषय, ह्मणजे चौथ्या पांचव्या व सहाव्या पुस्तकांतील कवितांतील कठिण शब्द यांचा संग्रह, हा आहे. या भागाची रचना येणेंप्रमाणें आहे—प्रथमतः प्रत्येक कवितेचा विषय वगैरे सांगून ह्मणजे तींतील कथानकाचा पूर्वापार संबंध, एकंदर कथा, कवीचें नांव वगैरे ही सर्व माहिती देऊन नंतर दुर्बोध शब्दांचे समजण्यासारखे संस्कृत किंवा मराठी पर्याय दिले आहेत. हे पर्याय देतांना कोठें मूळ शब्दाची व्युत्पत्ति, कोठें विशेष नाम असल्यास त्याविषयींची विशेष माहिती, कोठें लिंगनिर्वचन, कोठें समासविग्रह, असा प्रकार केला आहे; व स्थलविशेषीं त्या त्या शब्दाच्या खालीं टीपेंत पूर्वीच्या व्याकरणनियमांचा निर्देश केला आहे. तसेंच कोठें पुराणप्रसिद्ध प्राचीन कथांचा संदर्भ, कोठें 'पुण्यश्लोक', 'चतु-

रंग', 'पंचबाण', 'अर्जुन' इत्यादि शब्दांच्या संबंधानें 'पुण्यश्लोक' ही संज्ञा कोणा कोणास आहे, सेनेचीं चार अंगें कोणतीं, मदनाचे पांच बाण कोणते, अर्जुनास कोणतीं दहा नांवें होतीं, ही माहिती मूळ संस्कृत श्लोकांचा उल्लेख करून दिलेली आहे. एकंदरींत सदर्हू पुस्तक लिहिण्याचा ग्रंथकाराचा मूळचा जो उद्देश, कीं त्याच्या साह्यानें विद्यार्थ्यास स्वतःच्या परिश्रमानें अर्थ लावण्याची संवय लागावी व त्यांची कल्पना वाढावी, तो आमच्या मतें यापासून चांगला सिद्धीस जाईल.

सदरील पुस्तक मराठी शाळांतील शिक्षक व विद्यार्थी या दोघांसहि उपयोगीं पडावें ह्मणून केलें आहे. शिक्षकांस यांत कांहीं माहिती जास्त दिलेली आढळेल व शिवाय शिकवितांनाहि प्रश्न विचारण्यास याचा त्यांस उपयोग होईल. विद्यार्थ्यांच्या संबंधानें याची उपयुक्तता काय आहे हें वर सांगितलेंच आहे. कवितार्थाचीं आयतीं तयार केलेलीं जीं पुस्तकें आहेत त्यांवरून अर्थ तोंडपाठ करण्यापेक्षां सदरील पुस्तकावरून तो लावण्याचा जर त्यांनीं परिपाठ ठेवला, तर तो त्यांस किती अधिक श्रेयस्कर होईल हें सांगावयास नको. असो; तर मराठी शाळांतील मास्तरांस वरील पुस्तकाविषयीं शिफारस करून ग्रंथकाराची रजा घेतों.

जमाखर्चाची पद्धति—हें पुस्तक रा० वासुदेव बाळकृष्ण लोटलीकर यांनीं आमचेकडे पाठविल्यास बरेच दिवस झाले. त्यांतील गुणावगुणाविषयीं या वेळीं आह्मी आपला अभिप्राय देतों. या पुस्तकासंबंधीं गुणदोष कळविण्यापूर्वी प्रथमतः जे विचार सुचतात त्यांचें कांहीं दिग्दर्शन येथें करतों.

आमच्या देशांतील मोगल बादशहापासून तों आजपर्यंत जमाखर्च लिहिण्याची पद्धति या देशांत उत्कृष्ट प्रकारची चालत आली आहे. पेशवाईंत जमाखर्ची लिहिणें हें मोठें कसबच मानीत असत. त्या काळीं या विद्येचा फारच फैलावा झाला होता. लहानपणीं मुलांस शिक्षण ह्मटलें तर मोडी लिपीचें अक्षर चांगलें असणें व पत्र लिहितां येऊन हिशेब ठेवतां येणें इतकेंच असे. खुद्द पेशव्यांच्या दरबारांतील जे फडनवीस यांजकडे त्या वेळच्या सर्व राज्यप्रकरणी जमाखर्चाचा हिशेब असे, हें सर्वांस माहीत आहेच. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांजपासून तर शेवटचे बाजीराव पेशव्यापर्यंत या घराण्यांतील सर्व पुरुषांस ही विद्या संपादन करावी लागत असे. त्याप्रमाणें बहुतेक सर्व गादीचे मालक या कलेंत निपुण असत. शेवटले बाजीराव यांस तर या जमाखर्ची लिहिण्याचा फारच नाद असे. आपल्या खजिन्यांतून ज्या रकमा खर्ची पडत व जमा होत असत त्यांचा हिशेब गुप्तचिप तऱ्हेनें सर्व दिवसाचा ते रात्रीं मांडून ठेवीत असत. हा कच्चा खर्डा स्वतः करून ठेवण्याचें कारण काय तें बरोबर समजत नाहीं. बाजीराव साहेब पुण्यांतून गेल्यावर इंग्रेजांनीं पेशव्यांचा वाडा ताब्यांत

घेऊन तपासण्यास आरंभ जेव्हां केला, त्या वेळीं त्यांच्या पलंगाखालीं चोवीस वर्षांचा हिशेब उत्तम तऱ्हेनें लिहून ठेवलेला सांपडला. बाजीराव साहेबांचें अक्षर उत्कृष्ट होतें असाहि लौकिक आहे.

सन १८१८ इसवींत पेशवाई बुडाल्यावर इकडे इंग्रेजी अंमल सुरू झाला. ही नवीन राज्यपद्धति जरी पुष्कळ प्रकारानें पूर्वीपेक्षां भिन्न होती तरी जमाखर्चाची पद्धति पूर्वीच्याच धाटणीवर ठेवणें प्राप्त झालें. पुढें या पद्धतींत कांहीं तरी सुधारणूक व्हावी असें राज्यकर्त्यांस वाटलें. परंतु या बिकट विषयाची सुधारणा करतो कोण! शेवटीं दक्षिणभाग आणि उत्तरभाग रेविन्यु कमिशनर या उभयतांची कमिटी बसून या विषयाची सुरुवात करण्याविषयीं विचार ठरला.

त्या वेळीं दक्षिणभाग रेविन्यु कमिशनरचे दप्तरदार रा० रामराव नरसिंह ताडपत्रे हे होते. यांनीं सरकारच्या आज्ञेवरून गांवचे नमुन्यांची चोपडी तयार केली. हींत कीर्द, खतावणी, व दुसऱ्या प्रकारच्या सर्व हिशेबी कागदांची उत्तम तऱ्हेनें माहिती दिली होती. जमाखर्चाचा मुख्य कागद जी कीर्दवही तिची परिस्फुटता चांगल्या तऱ्हेनें करून सर्व गांवचा हिशेब चोख रीतीनें रहावा ह्मणून नगदी व मुलकी मिळून एकंदर बेवीस नमुने तयार केले होते. सन १८२७ चा कायदा जसा फार जुना व नामी ह्मणून ह्मणतात व तोच बहुत दिवसपर्यंत चालू राहिला, त्याचप्रमाणें वरील नमुन्यांची गोष्ट झाली. सर्व आबालवृद्धांस ते पसंत होऊन ती पद्धति सर्वांनीं स्वीकारली होती. व्यापारी लोकांनीं देखील तिचें अनुकरण केलें होतें. पेशवाईत लहानपणीं मुलांस ज्याप्रमाणें अक्षर तयार झाल्यावर जमाखर्च लिहिण्यास शिकवीत असत, त्याप्रमाणें रामरावजींचे नमुने इंग्रेजींत मुलांकडून पाठ करवीत असत. असो; पुढें हे नमुने बदलून दुसरे करावे असें सरकारानें ठरविलें. या ठरावाचा उल्लेख व नंबर होपसाहेबांनीं आपल्या नमुन्याचे पुस्तकाचे आरंभीं सादर केला आहे.

सन १८६९ सालीं पुणें येथें बुधवारच्या वाड्यांत वरील विचाराकारितां कमेटी बसली. त्या कमेटींत हुषार व जुने अनुभवशीर अशा गृहस्थांचीच योजना केली होती. बहुतेक मामलेदार त्या वेळीं येथें जमले होते. त्या कमेटींतील मामलेदार यांनीं आपल्या पंचवीस तीस वर्षांचे अनुभवावरून असें सांगितलें कीं, चालत आलेल्या वहिवाटींत फेरबदल करणें हें घोटाळ्याचें होईल. हें त्यांचें सांगणें दुराग्रहामुळें सरकारानें मान्य केलें नाहीं. शेवटीं सन १८७० सालीं सुरतेचे कलेक्टर टी. सी. होप यांनीं 'मुल्की हिशेबाची पद्धति' ह्मणून नमुन्याचें पुस्तक तयार केलें. होप साहेबांनीं कायद्याचीं एक दोन बिलें करण्याचें जसें यश घेतलें त्याप्रमाणें हेंहि यश घेतलें. या होपच्या नमुन्यापूर्वी गार्डन साहेबाचे नमुने एक वर्षभरच चालले होते, परंतु तें धुळीवरील

सारखण केव्हां नाहींसें झालें हें कळलें देखील नाहीं. होप साहेब आपल्या या पुस्तकांत प्रथम असें ह्मणतात कीं, 'तालुक्यांत खतावण्या रहात होत्या व हुजुरांत किरकोळ हिशेब रहात होते त्यांऐवजीं कितीएक नमुने करण्याचा आमचा अभिप्राय पुणें येथें सन १८६९ सालीं सप्टेंबर महिन्यांत ठरलेल्या कमिटीनें मंजूर केला.' 'ही पद्धति' करण्यांत होप साहेबांचें बरेंच चातुर्य दिसून येतें. पहिल्यानदां नवीन चालू होण्यास इचा थोडासा घोटाळा वाटला, परंतु आतां त्याचाहि फारसा बोभाटा राहिला नाहीं. हें जरी खरें आहे, तरी पुष्कळ दिवस ज्या वृद्ध लोकांनीं पेशवाई राज्याचा अनुभव घेतला त्यांस इंग्रेजी राज्यापासून जें बरें वाईट मनाला वाटण्याचा त्यांस संभव आहे तसाच कांहीं प्रकार होपच्या नमुन्यांचाहि आहे. असो. येथपर्यंत या पद्धतीला मूळपासून कसकसें वळण मिळत गेलें तें कथन केलें. आतां आमच्या टीकाविषयक पुस्तकाविषयीं मात्र दोन शब्द लिहिणें राहिलें आहे तें आतां लिहूं.

हें पुस्तक कर्त्यांच्या हेतूप्रमाणें 'सहावी इयत्तेची परीक्षा देऊं इच्छिणारांस' खरोखरीच उपयोगाचें असें झालें आहे. त्याचप्रमाणें 'या विषयावर अनेक पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, परंतु त्यांत एकहि स्वल्प रीतीनें माहिती करून देण्याजोगें नाहीं' असें जें लोटलीकर यांचें मत आहे त्याचप्रमाणें आमचेंहि आहे. यांत 'कोणास न्यूनाधिकें आढळल्यास अवश्य कळवावीं ह्मणजे त्यांचा पुढील आवृत्तीचे वेळीं विचार केला जाईल' असें लिहिलें आहे त्यावरून कांहीं सूचना येथें करून हें मत आटपतों.

या पुस्तकास वाढविण्यास अजून पुष्कळ जागा राहिली आहे. या पुस्तकाचा उपयोग 'इतर हिशेबी लोकांस' व 'व्यापारी लोकांस'हि आहे असें जें ह्मणणें आहे तें व्यर्थ आहे. तसें होण्यास हें पुस्तक पुष्कळ वाढवून यास यापेक्षां वेगळेंच रूप दिलें पाहिजे. या 'जमाखर्चाचे पद्धती'चें अध्ययन करून कोणीं ह्मटलें कीं, मी पेढीवरील किंवा दुकानावरील मुनीमाचें काम चालवीन तर हें असंभवनीय आहे. त्याचा विलक्षण घोटाळा होऊन जाऊन त्यास वाटेल कीं, मीं अध्ययन केलेल्या पुस्तकांत इकडील माहितीचा एक शतांश देखील आला नाहीं व आपणांस 'जमाखर्चाचे पद्धती'पेक्षां अजून पुष्कळ शिकणें राहिलें आहे. शाळेंत असतां जें वाटत होतें कीं, ही 'जमाखर्चाची पद्धति' शिकल्यावर आपल्यास पाहिजे तेथील हिशेबी काम चोख रीतीनें समजेल, परंतु ती व्यर्थ भ्रांति होती. अशी त्या अध्ययन करणाराची स्थिति होऊन जाईल. तर हें पुस्तक पुनरपि वाढवितेवेळीं माटे यांचा अभिप्राय असेल त्या पद्धतीनें वाढवून आमचे इकडील जुन्या हिशेबाचें पुनरुज्जीवन केल्याचें कर्त्यांनीं यश घ्यावें. या आवृत्तीचे वेळीं पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावना गाळून टाकण्याचें कारण नव्हतें.

सुबोधपत्रिकाकर्त्यांच्या यांतील अभिप्रायाप्रमाणेंच आमचा या पुस्तकावर अभिप्राय आहे. 'सहावी इयत्तेची परीक्षा देऊं इच्छिणारांस' या लहानशा चोपडीचा बराच फायदा झाला आहे असें दिसतें, आणि ह्मणूनच 'इतक्या थोड्या वेळांत या लहानशा पुस्तकाची पहिली व दुसरी आवृत्ति सर्व संपल्यामुळें ही तिसरी आवृत्ति छापण्याचा प्रसंग रा० लेटलीकर यांस आला. तसेंच 'डायरेक्टर साहेब बहादुर' यांचा उदार आश्रयहि वरील उक्तीस कांहींसा कारण झाला आहे. यावरून रा० लेटलीकर यांनीं असें समजूं नये कीं, परीक्षेचे तयारीस या पुस्तकाची माहिती पुरून उरण्याजोगी असेल. मागें रामरावाच्या नमुन्यांवरून मुल्कीकडील परीक्षा देऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठीं माटे यांनीं 'सवाल जवाबाचें' पुस्तक कसें केलें होतें तें पाहिलें तर आमच्या ह्मणण्याविषयीं खात्री होईल.

असो; एकंदरीनें या पुस्तकांत नवीन मंडळीस समजूत होण्याजोगा कांहीं भाग सुबोध असल्यामुळें लेटलीकर यांचा मूळ हेतु तडीस गेला. यांत अशुद्धें पुष्कळ राहिलीं आहेत, त्यांतून चवथ्या पृष्ठांत व त्या पृष्ठांतील खालच्या भागांत तर चुका फारच आहेत, त्या पुढें दुरुस्त व्हाव्या. किंमतहि जी तिसऱ्या आवृत्तीस फार ठेविली आहे ती पुढें कमी करावी, व पुढील प्रयत्नाचे वेळीं यांतील जुन्या माहितगार मनुष्यांचें साह्य घ्यावें, ह्मणजे त्यांचें कर्तृत्व सफल होईल.

काव्येतिहास—संग्रह.

कष्टं शिष्टक्षतिकृति कलौ काश्यमृच्छंति विद्याः ।[1]

विश्वगुणादर्श.

अंक ४९(१) मासिक पुस्तकाचा फैलाव. (२) काव्येतिहासमंग्रह. (३) याच्या उद्देशावर येणारे आक्षेप. (४) पहिला—इतिहासावर.(५) दुसरा मराठी कवितेवर.(६) तिसरा—संस्कृत कवितेवर.(७) वरील तिन्ही विभागांविषयीं पृथक् विचार.(८) पुस्तकाविषयीं अभिप्राय. (९) उपसंहार.

१. अलीकडे दोन चार वर्षांत आमच्या भाषेंत पुष्कळ नवीं नवीं मासिक पुस्तकें निघूं लागलीं आहेत. प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या अंकांत आह्मीं जें लिहिलें होतें कीं, वर्तमानपत्रांची स्थिति अलीकडे सुधारून मासिक पुस्तकें मागसल्यासारखीं झालीं आहेत, ती स्थिति दिवसांदिवस जात चालली आहे. पूर्वी एखादें दुसरें मासिक पुस्तक असे, व त्यांतच पाहिजेत ते विषय येत असत. पण हल्लीं लोकांत ज्ञानाचा

१. "हर हर! शिष्टांचा ऱ्हास करणारा जो कलि त्यांत विद्याचा उत्तरोत्तर अपकर्ष होते चालला आहे!"

प्रसार पुष्कळ झाल्यानें हरएक प्रकरणाचें निरानिराळेंच पुस्तक होऊं लागलें आहे. 'वेदार्थयत्न', 'षड्दर्शनचिंतनिका', 'वैद्यकसंग्रह', 'सिद्धपदार्थशास्त्र,' 'शिल्पकला-संग्रह', एंजनियरिंग विषयाचें पुस्तक', 'उपयुक्त ज्ञानसार', 'अबलामित्र', 'सर्वसंग्रह', इत्यादि नांवांवरून वरील गोष्टींची प्रचीति येईल. अभिप्राय देण्यास घेतलेलें वरील पुस्तकहि वरच्यांप्रमाणेंच देशहिताचें एक काम उचलून त्या संबंधाची न्यूनता घूणें करण्यास निर्माण झालेलें आहे.

२. वरील मासिक पुस्तकाचें प्रसिद्धिपत्रक गेल्या डिसेंबर महिन्यांत आमच्या-पुस्तकाच्या तिहिरी अंकाबरोबर जोडलेलें होतें हें आमच्या वाचकांस माहीत असेलच. या पत्रकांत प्रकृत 'संग्रहा'चा उद्देश, त्याची व्यवस्था, वगैरे सर्व गोष्टींचा यथास्थित उल्लेख केलेला होता. त्याबरहुकूम सदरील पुस्तकाचे आजवर आठ अंक छापून प्रसिद्ध झाले आहेत. ते पुस्तकप्रकाशकांनीं आमच्याकडे पाठविल्यावरून त्यांवर व या एकंदर उद्योगावर आमचें मत प्रगट करतों.

३. आतां प्रथमतः या उद्योगाविषयीं सामान्यतः विचार करून नंतर प्रस्तुत पुस्तकांतील तीन सदरें जीं महाराष्ट्र देशाचा इतिहास, मराठी कविता, व संस्कृत कविता त्यांविषयीं बेगळें बेगळें लिहूं. प्रस्तुत उद्योग हा पुनरुज्जीवनासारखा किंवा जीर्णोद्धार करण्यासारखा आहे हें उघडच आहे. जे जुने ग्रंथ सध्यां कांहीं खटपट न केली तर ठार बुडून जाणार आहेत त्यांस वांचविण्याचा प्रस्तुत यत्न होय. आतां हा यत्न करण्याचें एवढें काय खोळंबलें आहे,—जुन्या काळच्या हकीकती व जुनीं काव्यें हीं राखून ठेवून काय करायाचें आहे,—असा प्रश्न कित्येक समंजस लोक कदाचित् करतील. जें गेलें मेलें त्याची आठवण करण्यांत काय फायदा आहे, जें चाललें आहे तें खरें, तसेंच इंग्रेजीसारखी कविता आयती वाचायाला असतां व तिच्या स्फूर्तीनें अलीकडील नवीन विद्वान् उत्कृष्ट उत्कृष्ट काव्यें रसिकजनरंजनार्थ स्व-भाषेंत रचीत असतां, हजारों वर्षांमागलीं जुनीं संस्कृत काव्यें हुडकून काढा, तीं समजण्याकरितां संस्कृत भाषेचा पृथक व्यासंग करा, व शेंकडों वर्षांमागली अज्ञान व अरसिक महाराष्ट्र कवींनीं केलेली कविता पुनः उदयास आणा,—यांत काय हांशील आहे? हे प्रश्न केवळ काल्पनिक आहेत असें कोणीं समजूं नये. पुष्कळांच्या वरच्या सारख्याच समजुती आहेत व तसे उद्गारहि पुष्कळांनीं स्वतः ऐकले असतील. तर प्रस्तुतसारख्या पुस्तकाचा उपयोग ध्यानांत येण्याकरितां वरील शंकांचें अगोदर निरसन केलें पाहिजे.

४. प्रस्तुत मालेच्या सहाव्या अंकांत वरच्यांपैकीं पहिला जो इतिहासाविषयींचा आक्षेप त्याविषयीं बराच विचार केला आहे. त्यावरच येथें आणखी थोडा विस्तार करतों. इतिहास म्हणजे मेलेल्यांची किंवा गत गोष्टींची कथा होय हें उघडच

आहे; पण यावरून त्याचा अभ्यास निरर्थक हें मात्र ठरत नाहीं. पहा कीं, सॉक्रेटीस मरून आज दोन हजारांवर वर्षें होऊन गेलीं; सध्यां सारें भूमंडळ जरी शोधलें, तरी त्याचा गोत्रज. वंशज किंवा कोणी कसलाहि संबंधी एकहि सांपडणार नाहीं. खुद्द आथेन्स येथें गेलें तरी त्यांचें रहाण्याचें ठिकाणहि सांपडेल किंवा नाहीं याचा वानवाच दिसतो.[1] त्याचें शरीर तर केव्हांच मातीबरोबर मिळून पार झालें असेल! दुसरें उदाहरण रोम व कार्थेज यांच्या लढाईचें घ्या. याहि लढाईस आज दोन हजारांवर वर्षें लोटलीं; व दोन्ही शहरांचें वैभव नष्ट झाल्यासाहि किती काळ लोटून गेला! कार्थेज तर वरील लढाई आटपल्यावर पन्नास वर्षांनींच धुळीस मिळून गेलें; व पुढें कितीक राष्ट्रें तो सारा प्रदेश एकामागून एक तुडवीत गेलीं. रोमची तरी कालांतरानें तशीच धूळधाण झाली; व सध्यां जरी तें शहर कायम आहे तरी हा त्याचा दुसरा जन्म झटला पाहिजे. पूर्वीची भाषा, पूर्वीचा धर्म, पूर्वीचा रीतिरिवाज, पूर्वीची लोकव्यवस्था, वगैरे सर्व कांहीं नाहींसें झालें आहे. तेव्हां असल्या दोन शहरांच्या त्रेतायुगांतल्या लढाईचा वृत्तांत हा सध्यां इसापनीतींतल्या पशुपक्ष्यांच्या युद्धासारखाच होय! म्हणजे वस्तुतः पहातां इसापानें वर्णिलेल्या युद्धाचा प्रस्तुत काळीं चाललेल्या राहाटीशीं जितका संबंध आहे तितपतच वरील महायुद्धाचाहि होय. तुसता वरवर जो विचार करणारा आहे त्यास वरील दोन्ही सिद्धांत अत्यंत मान्य होऊन सॉक्रेटीसचें चरित्र व कार्थेजची लढाई हीं लिहिणारे व वाचणारे दोघेहि मूर्ख असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. पण अंमळ खोल जर विचार केला तर कोणाच्याहि ध्यानांत येईल कीं वरील महापंडित हा लोक सोडून गेल्यास जरी आज दोन हजार वर्षें होऊन गेलीं, व कार्थेजचें युद्धहि जरी केवळ कर्मकथाच होऊन बसलें आहे, तरी दोहोंच्या वृत्तांतापासून होणारा जो वास्तविक उपयोग तो इतक्या काळानेंहि लवमात्र

---

१. "एवढा विख्यात जो ग्रीस देश त्याच्या परम विख्यात शहरांचीहि आज काय स्थिति आहे ती पुढील उतान्यावरून लक्षांत येईल. हा जुन्या 'कोर्स आफ रीडिंग'च्या ७० व्या पृष्ठांत समग्र सांपडेल. एक फ्रेंच मुशाफर एका माहीतगारास बरोबर घेऊन स्पार्टा शहर धुंडीत असतां तें शेवटीं अशा प्रकारें दृष्टीस पडलें—

"Yonder, at Magoula," said the Cicerone pointing to a white cottage with some trees about it, at a considerable distance in the valley. Tears came into my eyes when I fixed them on this miserable hut, erected on the forsaken site of one of the most renowned cities of the universe, now the only object that marks the spot where Sparta flourished, the solitary habitation of a goat herd, whose whole wealth consists in the grass that grows upon the graves of Agis Leonidas!

सुद्धां कमी झाला नाहीं. कोट्यावधि योजनें दूर असणारे जे तारागण त्यांचा स्वयंभू प्रकाश जसा इतक्या अगणित अंतरावरूनहि आपणाकडे सतत पोंचून जगाच्या आरंभापासून मार्गदर्शक होत आला आहे त्याप्रमाणेंच आजपर्यंत साऱ्या देशांत ज्या ज्या ईश्वराच्या विभूति वेळोवेळां प्रगट होऊन पुनः निजधामास गेल्या त्यांचें चरित्रहि लोकांस उन्नत्तिप्रदच होत गेलें आहे. वरील चरित्र व वरील इतिहास वाचून धीरोदात्त पुरुषांचा महिमा कोणाच्या हृदयावर ठसत नाहीं ? व कोणाच्या मनास सदाचरणाविषयीं, स्वदेशप्रीतीविषयीं स्फुरण होत नाहीं ? तर याप्रमाणें जे गतवृत्तांत अतज्ञ जनांस बाह्यतः केवळ नीरस वाटतात त्यांच्या आंत नारिकेलपाकन्यायानें अत्यंत आल्हादकारक व उत्साहप्रद असा रससंचय असतो ![1]

पण हें केवळ सामान्यतः झालें. कोणत्याहि देशाच्या इतिहासाच्य वाचनापासून कोणता लाभ आहे हें वर सांगितलें. मग यावरून आपला जिशीं अत्यंत निकट संबंध, जिचें वैभव तें आपलें वैभव, जिचें दूषण तें आपलें दूषण, जिची आपणांस सर्वांत अधिक माहिती, जी आपलें जन्मस्थान, त्या भूमीचा वृत्तांत समजल्यापासून तर किती फायदा आहे हें काय सांगावें ! इतर देशांचा इतिहास व आपल्या

---

१. थोर पुरुषांच्या चरित्रानें उज्वल झालेल्या स्थलांचें दर्शन घडलें असतां सहृदय प्रेक्षकांची चित्तवृत्ति कशी होते हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. जॉनसन बॉसवेल यांनीं मिळून स्कॉटलंड देशाच्या पश्चिम भागांवर सफर केली हें मागें (अंक ३७ कलम ४) सांगण्यांत आलेंच आहे. याच प्रवासांत ऐओना नांवाच्या एका बेटावर गुरुशिष्य उतरले असतां त्या स्थलाचें वर्णन जॉनसननें पुढें येणेंप्रमाणें लिहून ठेवलें—

"We were now treading that illustrious island which was once the luminary of the Caledonian regions, whence savage clans and roving barbarians derived the benefits of knowledge and the blessings of religion. To abstract the mind from all local emotion would be impossible if it were endeavoured, and would be foolish it it were possible. Whatever withdraws us from the power of our senses, whatever makes the past, the distant, or the future predominate over the present, advances us in the dignity of thinking beings. Far from me and my friends be such frigid philosophy as may conduct us indifferent and unmoved over any ground which has been dignified by wisdom, bravery, or virtue. That man is little to be envied whose patriotism would not gain force on the plains of Marathon, or whose piety would not grow warmer among the ruins of Iona !"

Journey to the Hebrides.

देशाचा इतिहास या दोहोंमधील भेद झटला झणजे अंतरालांतील अवघ्या इतर तारागणांत व आपापल्या ग्रहमालेचा जो अधिपति त्यांत जितका आहे तितका होय. समजा कीं, आपण वसंत ऋतूंतल्या एखाद्या निरभ्र रात्रीं गच्चीवर हवा खात बसलों असतां एकाएकीं आपल्या असें नजरेस आलें कीं, दहा पांच तारे आपण पहातां पहातां अकस्मात् जागच्या जागीं गडप झाले, तर त्याबद्दल आपणांस काय वाटणार आहे? त्यांचें व आपलें अंतर कोट्यानकोटी कोस असल्यामुळें त्यांचा आपला कांहींच संबंध नाहीं. तेव्हां वरील प्रलयापासून फार झालें तर एवढेंच होईल, कीं त्या तेजोमय गोलांवर व त्यांच्या आकर्षणांत असलेल्या इतरांवर जर प्राण्यांची वस्ती असेल तर त्यांचा निःपात झाल्याबद्दल आपणांस क्षणमात्र विषाद वाटेल. तसेंच वरील नष्ट झालेल्या तान्यांत व्याध, अगस्त्य यांच्यासारखे कांहीं असले तर आकाशाची शोभा कमी झाल्याबद्दल आकाशप्रेक्षकांस वाईट वाटेल, व ज्योतिष्यांस आपले नकाशे नीट करावे लागतील. पण याच्या पलीकडे या गोलावरील लोकांस वरील प्रलयापासून दुसरी कोणतीहि बाधा पोंचणार नाहीं. पण तोच प्रसंग आमच्या सूर्यावर येऊं द्या; झणजे एका सूर्याबरोबर प्रकाश गेला, उष्णता गेली, पर्जन्य गेला, धान्यें गेलीं, सर्व कांहीं नाहींसें झालें! तर देशांतराच्या इतिहासांत व स्वदेशाच्या इतिहासांत इतका फेर आहे. पहा कीं, रोम व कार्थेज यांच्या युद्धांत सोफानिसबा नांवाच्या सरदारकन्येची गोष्ट आहे, आणि इकडे भीमसिंगाची बेटी कृष्णाकुमारी हिचा वृत्तांत आहे; तिकडे सीजराचा वध आहे, इकडेहि नारायणराव पेशव्यास मारेकऱ्यांनीं मारला आहे; तिकडे नेपोलियन बादशहाची जंगी स्वारी रशियाची खोड मोडून सगळें युरोपचें राज्य एकछत्री करण्याकरितां निघाली आहे; इकडे शिवाजीनें शंभर वर्षांपूर्वी सुरू केलेल्या मंदिरावर कळस बसविण्याकरितां भाऊसाहेबांचा जरीपटका असंख्य महाराष्ट्र वीरांनीं वेढलेला होत्साता दिल्लीपदावर निघाला आहे; तिकडे ऑगस्टस् बादशहा रोमक पत्तनच्या सिंहासनावर बसून व्हर्जिल होरेस यांच्या वाग्विसरांत आनंदभरानें वाहवत आहे, इकडे शकांचा आपल्या प्रतापकिरणांनीं विध्वंस करून विराजमान झालेला जो विक्रमादित्य तो कालिदासप्रभृति कविवरांचा प्रत्यक्ष वाग्देवीच्या वीणावादनपर हस्तास व नेत्रकमलांसहि स्तिमित करणारा जो वीणारव त्यास लुब्ध होऊन डोलत आहे! वस्तुतः पहातां वरील दोन्ही वृत्तांत हे समसमान आहेत. पण दोहोंचें एतद्देशीयांच्या मनावर कार्य किती भिन्न होतें? दोन्ही गतवृत्तांत असतां दुसरे स्वदेशांत घडले असल्यामुळें त्यांची जणों काय प्रत्यक्षता आपणास भासते. सारांश, अगस्त्याच्या किंवा व्याधाच्या प्रकाशांत आणि उन्हांत किंवा चांदण्यांत जितपत अंतर तितपतच द्वीपांतरींच्या इतिहासांत व स्वदेशाच्या इतिहासांत होय!

मग असला इतिहास जर नष्ट झाला, तर त्यापरती देशाची हानि कोणती ? आमच्या पूर्वजांनीं गेल्या शेंदोनशें वर्षांत एवढाले दिग्विजय गाजवून भारत वर्षाच्या पूर्वापार चालत आलेल्या कीर्तींत एवढी जी भर घातली, व शेकडों स्थलांचा महिमा चिरकाल राहीसा करून टाकिला, तें सर्व आमच्या मूर्खपणानें व हयगयीनें जर होऊन न झाल्यासारखेंच झालें तर केवढी शोचनीय गोष्ट होय ? युरोपांतल्या देशांत एकंदर देशाच्या इतिहासाविषयीं तर राहोच, पण प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें, शहरांचीं वर्णनें, धर्म, कलाकौशल्य, ग्रंथसंग्रह इत्यादिकांचा इतिहास यांविषयींहि लोकांस जिज्ञासा असून ती तृप्त करणारांस हवा तितका लोकाश्रय मिळतो. पण इकडे कशी बहार आहे पहा ! 'विद्यामृता'चा, 'देशसुधारणे'चा 'आर्यजननी'चा आज कित्येक वर्षें चोहोंकडे घोष चालून त्यानें दाही दिशा घुमूं लागल्या असतां 'आर्यजननी'चा स्वतंत्र इतिहास तर लांबच, पण त्याचा नुसता पाया जुन्या बखरी त्यांसहि आश्रय मिळतांना जेमतेम पडते; कवींचीं चरित्रें व त्यांच्या गुणदोषांचें विवरण हें तर दूरच, पण अगोदर त्यांचीं काव्येंहि आमच्या देशबंधूंस आश्रयाहें वाटत नाहींत ! एकंदरींत सध्यांची आमची स्थिति किती विलक्षण तऱ्हेची आहे पहा ! नूतन विद्येनें आमची नजर सगळ्या भूमंडळावर फांकली असून काभश्चाटका कोठें आहे, टिंबक्टू शहराची वस्ती किती आहे, माजिलनची सामुद्रधुनी कोणीं शोधून काढली; वगैरे खडान् खडा आह्मांस पुसून घ्या; पण वस्तीच्या ठिकाणाहून दहा वीस कोसांवर नेऊन सोडलेंत तर परत आपल्या जागीं येण्याची आह्मांस मारामार पडेल ! आपल्या आजापणजांचें नांव वेळेनसार आठवायाचें नाहीं, रामायणांतील महाभारतांतील अति प्रसिद्ध कथा किंवा मराठ्यांच्या इतिहासांतील ठळक ठळक गोष्टीहि माहीत नसतील; पण ग्रीस व रोमच्या इतिहासांतील शक विचारा, किंवा इंग्लंडाची वंशावळ ह्मणायाला सांगा, ह्मणजे विल्यम राजापासून तों तहत केसर ई हिंद्पर्यंत तडक आगगाडी. मोरोपंताची सामान्य आर्या लागायाची नाहीं. तुकारामाचें साधारण अवतरण लक्षांत यावयाचें नाहीं; पण इंग्रेजी कवितेंतली काय ती सर्व माहिती ! याप्रमाणेंच धर्माचीहि गोष्ट. आतां कोणतेंहि ज्ञान संपादन केलें तरी तें प्रशस्यच होय हें खरें; पण आपल्या घरच्या गोष्टींची गैरमाहिती असून माहिती काय ती हजारों कोसांवरच्या मुलखांची हें हास्यास्पद होय यांत संशय नाहीं. शिवाय जे आपल्या घराची दुरुस्ती करणार व त्यास सुधारणेची कळा आणणार त्यांस वरच्यासारखा दिव्याखालीं अंधेर अगदींच उपयोगी नाहीं. तर मॉरिस साहेब सांगतील तो आमचा इतिहास, मेकॉले बोवा सांगतील ती आमची नीति, डा० विल्सन सांगतील तो धर्म, ही लज्जास्पद स्थिति आजपर्यंत जी चालत आली तीच पुढें चालू नसावी असें ज्यांच्या मनांत असेल त्यांनीं हल्लीं प्राचीन विद्येच्या उज्जीवनार्थ जे प्रकृत पुस्तकासारखे उद्योग आमच्या कांहीं देशबंधूंनीं हातीं

धरले आहेत त्यांचा चांगला पुरस्कार करणें अत्यंत आवश्यक होय.

५. दुसरें सदर महाराष्ट्र कविता. यावरहि पुष्कळांचे, व विशेषतः विद्वान् ह्मणविणारांचे कित्येक आक्षेप आहेत. यांपैकीं कांहींविषयीं यापूर्वी प्रसंगोपात्त विवेचन केलेलें आहे.[1] यास्तव येथें त्यांविषयीं सामान्यतः निरूपण करतों ह्मणजे बस आहे. सर्वांस ही गोष्ट महशूरच आहे कीं, इंग्रेजी विद्येचा प्रसार आमच्या लोकांत प्रथमतः होऊं लागला तेव्हां लवकरच तिचा एक मोठा परिणाम असा दृष्टीस पडूं लागला कीं, एतद्देशीय धर्मावरून लोकांची श्रद्धा उडत चालली; आणि धर्मच काय, पण जें जें स्वदेशीय तें सर्व अप्रयोजक मूर्ख वेडगळ असें असलेंच पाहिजे ही एक जबरदस्त कल्पना लोकांच्या मनास खिळून राहिली. अद्यापहि ती निघाली आहे असें नाहीं; पण तिचे वेढे अलीकडे बरेच सईल पडत चालले आहेत. तर हीच कल्पना वरील कवितेस अर्थातच बाधक झाली. त्यांतून दुसरें असें कीं; मराठी कवितेचा बहुतेक सर्व विषय धर्माचाच. तेव्हां ज्या लोकांचें मन मुळींच धर्मावरून उडालें त्यांस तदनकूल किंवा तत्प्रतिपादक जी कविता ती कशी पसंत व्हावी! आतां खरोखरी पहातां अर्वाचीन पाश्चात्य विद्येनें ज्यांची दृष्टि परम सूक्ष्म व परम विमल झाली त्यांच्या हें लक्षांत यावयाला पाहिजे होतें कीं, कवितेची योग्यता जी ठरते ती तींतील विषयाच्या खरेखोटेपणावरून ठरत असते असें नाहीं. प्रतिपादित अर्थ अत्यंत समंजस व केवळ सत्य असला ह्मणजे कविता उत्तम झाली आणि असमंजस व असत्य असला ह्मणजे नादान झाली असें मुळींच नाहीं. कारण तसें असतें तर युक्लिड हा कविसार्वभौम व होमर हा कुकवींतला अत्यंत अधम असा ठरला असता. कां कीं, युक्लिडनें जी सिद्धांतांची इमारत बांधली ती आज दोन हजारांवर पृथ्वीच्या सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा झाल्या तरी जशीच्या तशी अजून कोरी करकरीत आहे. एवढालीं रोमच्या सारखीं राज्यें उभारलीं जाऊन उलथून गेलीं पण वरील इमारतीस एवढीशी चीर ह्मणाल कां टवका उडालेला ह्मणाल तर कोठेंहि सांपडायाचा नाहीं. तर वरील भूमितिप्रवर्तकाची कृति इतकी सत्यानें ओतप्रोत भरलेली आहे! आतां तसेच युरोपीय कवींच्या आजोबांनीं रचलेल्या आद्यकाव्याकडे उलटा,—ह्मणजे काय गोंधळ आहे पहा! कोठला आकिलीस आणि कोठला हेक्टर—या नांवांचे मनुष्य तरी या पृथ्वीच्या पाठीवर कधीं जन्मास आले होते कीं नव्हते कोण जाणे! तर असल्यांच्या भाकड कथा आपल्या आजापणजांपासून चालत आलेल्या या खुळ्यानें खऱ्या मानून भलें थोरलें चोवीस सर्गांचें बाड रचून ठेवलें! त्यांतूनहि 'बाबावाक्यं प्रमाणम्' या अडाणी न्यायानें

१. सदरील पुस्तकाचा १२ वा व ४६ वा अंक पहा. माजी 'शालापत्रका'चा शेवटल्या वर्षाचा एप्रिलचा अंक पाहिला असतांहि कांहीं आक्षेपांचें निरसन सांपडेल. या निरसनाचा लवकरच काय परिणाम झाला तो मागें (अंक २७ पृष्ठ १५ टीप) सांगण्यांत आलाच आहे.

त्यानें वरील सर्व हकीकतहि खरी मानली समजा, पण हें हो काय !—आकाशांतला सूर्य उठला, ग्रीक लोकांच्या कंपूवर बाणांची वृष्टि करायाला लागला; शुक्राची चांदणी निघाली, लागली सोन्या राजपुत्राची व त्याच्या प्रियकरणीची गांठ घालून द्यायाला; मंगळ खालीं उतरला, लागला ग्रीक लोकांशीं लढायाला; बुध स्वर्गाहून निघाले, आले प्रायम राजाच्या शिबिरीं आपल्या यजमानाचा निरोप घेऊन; आकिलीस उठला तो दोन नद्यांशीं लढायाला लागला ! वरील सर्व प्रकार ज्यानें वर्णिले त्यास जर खुळा ह्मणूं नये तर मग खुळा तरी कोण ? पण चमत्कार पहा काय आहे तो, कीं या कवींतल्या वृद्ध कपीस वेड्यांच्या इस्पितळांत पाठविण्याची कोणी तजवीज न करतां कवित्वमंदिरांत त्यास उलटें अग्रासन दिलेलें आढळतें ! त्याप्रमाणेंच, 'उंदरांची सभा', 'पशुपक्ष्यांचें युद्ध' 'खटला उभा करणारीं मांजरें' या गोष्टी ज्यानें लिहिल्या; किंवा भांड्यांतून पहिल्यानें धुराचा भपकारा निघाला आणि मग सगळ्या धुराच्या सोटाचा एक राक्षस बनला; एकजण भुयारांतल्या बागेंत शिरला तों जिकडे पहातो तिकडे सारीं झाडें आपलीं हिऱ्या माणकांनीं लादलीं आहेत असें त्यानें पाहिलें, असल्या बातांचें ज्यानें एक जबरदस्त भारूड रचून ठेवलें; त्याचे ग्रंथहि वेडगळ ह्मणून जे उकिरड्यावर झुगारून द्यावयाचे ते उलटे मोठमोठ्या शहाण्यांनीं आजपर्यंत उराशीं बाळगले ! असो; वरच्या सारखे विचार आमच्या अर्वाचीन पंडितांनीं जर कांहीं मनांत आणले असते तर महाराष्ट्र कवितेची आजपर्यंत जी उपेक्षा झाली, व 'सर्वसंग्रहा'सारखी सात वर्षांची इमारत एकाएकीं जी खचली, तसला प्रकार झाला नसता. सारांश, ज्याप्रमाणें बुदबळांच्या डावांत लांकडाच्या तुकड्यांस हत्ती, घोडा, उंट हीं नांवें दिल्यानें वेडगळपणाचा आरोप माथीं बसण्याची शंका नको, किंवा रंगभूमीवर स्त्रीचा अभिनय पहात असतां त्या पात्राच्या स्त्रीपुंस्त्वाची मीमांसा करायाला पाहिजे असें नाहीं, त्याप्रमाणेंच कवि, नाटककार, कादंबरीकार, वक्ते इत्यादिकांची करामत पाहून तल्लीन होतांना आपणासमोर दिसतें आहे हें सर्व खरें आहे कीं सर्व भास आहे हेंहि मनांत आणण्याची बिलकूल गरज नाहीं. 'भारत', 'इलियड' किंवा 'प्यारडैज लॉस्ट' हीं वाचतांना आपल्या आनंदास वरील संशयवृत्तीनें व्याघात करणारा मार्मिक हा, 'शाकुंतल' नाटकांतील नायक स्वनिर्मित चित्रांतल्या भ्रमराशीं बोलावयास लागून आपल्या हृदयवल्लभेच्या समागमाचें सुख अनुभवीत असतां त्यास जागें करणाऱ्या विदूषकाप्रमाणेंच महामूर्ख होय !

६. तिसरें सदर संस्कृत कविता. यावर सांगण्यासारखे आक्षेप वाचण्यांत किंवा ऐकण्यांतहि येत नाहींत. याचें कारण उघडच आहे, कीं जोन्स, विल्सन, कोलब्रूक सारख्यांनीं आमच्या गीर्वाण कवींचा महिमा मागेंच गाऊन त्यांची कीर्ति साऱ्या जगभर पसरविली, व त्यांचीं नांवें होमर प्रभृतींच्या पंक्तीत सामील करून

टाकलीं. त्यामुळें एतद्देशीय दूषकांचीं तोंडें तर मुळींच बंद होऊन स्वदेशनिंदेचें जें त्यांचें व्रत तें या ठिकाणीं तरी त्यांस तसेंच ठेवून द्यावें लागलें. तिकडील जी रसज्ञ मंडळी तिजपैकीं मेकाले व मिल्ल या दोघां बहादरांनींच आमच्या कवींस कीर्तिमंदिरांतील अत्युच्च स्थलांवरून ढकलून देण्याचा काय तो यत्न केला; पण डोंगरांशीं टक्कर घेणाऱ्या मदोन्मत्त हत्तींप्रमाणें वरील महारसिकांनीं दंतभंग मात्र करून घेतला! बाकी त्यांच्या शुष्क आक्षेपांनीं आमचे कविवर आपल्या अढळ पदापासून कितपत ढळले म्हणाल तर त्यांच्या कृतीचे भोक्ते युरोपांत दिवसेंदिवस वाढतच आहेत, व त्यांस मोठमोठ्या लायब्ररींतून त्यांच्या योग्यतेनुरूप उच्चस्थानहि मिळत आहे! तेव्हां या सदरावर विशेष लिहावयास नकोच.

७. याप्रमाणें प्रस्तुत पुस्तकावर कित्येक अनभिज्ञ व अरसिक लोकांचे जे आक्षेप निघणारे आहेत त्यांचें निराकरण केलें. आतां त्याविषयीं विशेषतः प्रत्येक विभागाच्या संबंधानें लिहूं. या तिन्ही सदरांवर पूर्वोक्त प्रसिद्धिपत्रकांत बरेंच दिग्दर्शन केलें आहे. त्यावरच येथें अंमळ विस्तार करतों.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशकांनीं इतिहासाच्या उपोद्घातांत म्हटलें आहे कीं, ग्रांट डफ यास जी सामग्री मिळाली होती तींतील कित्येक लेख त्यानें रचलेल्या एकंदर इतिहासाएवढाले होते. या गोष्टीचा कोणाला चमत्कार वाटायाला नको. असें पहा कीं, एकट्या जानसनचें व एकट्या स्काटचें चरित्र जर ग्रांट डफच्या इतिहासाच्या चौपट पांचपट झालें आहे, मेकालेनें रचलेल्या पांच मोठमोठ्या भागांत जर नुसता पंधरा वर्षांचा काय तो इतिहास आला आहे, व सामान्यतः कोणी मनुष्य कोठें पांच पन्नास कोस जाऊन आला तर तेवढ्यांतहि आपल्या स्नेही मंडळीस चार घटका सांगत बसण्यासारख्या जर गोष्टी घडून येतात, तर केवळ क्षुद्र स्थितीपासून साऱ्या हिंदुस्थानाच्या सार्वभौमत्वापर्यंत चढलेल्या अवघ्या राष्ट्राचा इतिहास सामान्य प्रतीच्या पांचसातशें पानांत यावयाचा म्हटला म्हणजे कोळ्याच्या गोष्टींतल्या प्रचंड राक्षसास लहानशा भांड्यांत कोंडून भरला होता त्यासारखीच अवस्था म्हणायाची! शिवाय कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास म्हटला म्हणजे केवळ राजांचे वृत्तांत व लढायांच्या हकीगती दिल्यानें होत नाहीं. वरील शब्दाचा अर्थ किती व्यापक आहे हें मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे.[1] तेव्हां या व्याप्तीप्रमाणें म्हटलें म्हणजे महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत पुढील सर्व गोष्टी आल्या पाहिजेत. प्रथमारंभीं मराठे

१. अंक ६. व्हॉलटेर नामें करून फ्रान्स देशांत जो महाविख्यात पंडित गेल्या शतकांत होऊन गेला त्यानें इतिहासाच्या व्याप्तीचें यथार्थ निरूपण करून त्याप्रमाणें स्वतः इतिहास रचले. याविषयीं माहिती पाहिजे असल्यास ती बकलच्या दुसऱ्या भागाच्या ६ व्या खंडांत सांपडेल.

लोकांची स्थिति शिवाजीमहाराजांच्या पूर्वी कशी होती, त्यांस पुढें जें एवढें वैभव प्राप्त झालें त्यास कारणभूत असे त्यांच्या अंगीं मूळचे गुण कोणते व कितपत होते व वरील राज्यस्थापकानें त्यांचा विकास कोणते प्रकारानें केला, हिंदुधर्माची स्थिति त्या वेळेस कशी होती व तिनें यवनांच्या अपकर्षास कितपत साह्य केलें, इत्यादि गोष्टी मूळ उपोद्घातांत आल्या पाहिजेत. नंतर मावळे लोकांचें वर्णन, शिवाजीचे संवगडे तानाजी, बाजी, येसजी यांचे वृत्तांत, शिवाजीचें शिक्षण, सैन्यव्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार, आरमारी फौजेची तयारी, अवरंगजेबाचा दरबार, मोगली लष्कर, भगवा झेंडा, रामदासाचा राजनीतिपर व धर्मपर उपदेश, तुकारामबोवांचें कीर्तन, वामनाचें पांडित्य व कवित्व, परभू लोकांचें शौर्य, इत्यादि गोष्टी शिवराजाच्या वृत्तांतांत दाखल झाल्या पाहिजेत. नंतर संभाजीपासून शाहूपर्यंतच्या इतिहासांत सैन्यव्यवस्थेंत व राज्यव्यवस्थेंत झालेले फेर, कलुष्याचें वर्चस्व, फिरंग्यांची सत्ता, बेगम साहेबांची हकीगत व शाहूचें आपल्या शत्रूच्या घरीं वाढणें, चित्पावनांची पूर्वस्थिति व उत्कर्ष, ब्राह्मणांच्या व मराठ्यांच्या झटापटी, बाळाजीचें चातुर्य व वक्तृत्व, त्याचे दोघे बचे याज्ञिकीच्या किंवा कारकुनीच्या कामांत फार झाले तर वाकबगार व्हावयाचे ते हानिबल व हासडुबल यांसारखे महावीर बनून शत्रूंचे काळ कसे होऊन राहिले तो प्रकार, दोघां भावांची परस्पर प्रीति, मस्तानी व समशेरबहादर, शूद्र अधिपतींचा अभ्युदय, महाराष्ट्रांतील जातिभेदजन्य वैमनस्य मोडून सर्वांचा कट करण्याविषयीं पेशव्यांचा कटाक्ष, शाहूच्या गळ्यांतील केवळ ताईत बनून गेल्यामुळें त्यानें अंतकाळीं सर्व राज्याधिकारावें त्यांस केलेलें समर्पण, इत्यादि गोष्टींचा या दुसऱ्या भागांत अंतर्भाव झाला पाहिजे. यापुढें तर मराठ्यांचा इतिहास ह्मणजे साऱ्या हिंदुस्थानचाच इतिहास; कां कीं चारी मुलखांत त्यांचे सत्ताधारी कायम होऊन राहिले. तेव्हां नदीचें पात्र रुंदावत जातां जातां समुद्रसंगमाच्या स्थानीं जसें अफाट होऊन सागराशीं एकात्मक होऊन जातें, त्याप्रमाणें वरील काळाच्या इतिहासांत अवघ्या भारतवर्षाच्या इतिहासाचा अंतर्भाव होतो! यापुढें छत्रपतींचें किंवा पेशव्यांचें घराणें हें मागील सूत्र सुटून शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, पवार, बुंदेले, पटवर्धन इत्यादि शाखांच्या पृथक विस्तारांत शिरावें लागतें. तेव्हां या सर्वांचें यथातथ्य वर्णन झटलें ह्मणजे पुनः वरच्यासारखा प्रत्येकाचा अवांतर परिवार आला. सारांश, मराठ्यांचा इतिहास ह्मणजे शिवाजीचे, बाजीरावाचे, किंवा यशवंतरावाचे पराक्रम वर्णिले किंवा नाना फडनवीसाच्या राजकारणाचें वर्णन केलें ह्मणजे झालें नाहीं; तर वरील वीरांच्या मोहिमींबरोबर व मुत्सद्द्यांच्या मसलतीबरोबरच रामशास्त्रीबोवांचा न्यायमनसुबा, रामचंद्र बाबाची जमाबंदी, बखतरामाची कारागिरी, दयारामाची सावकारी, गंगाविष्णूची वैद्यक्रिया, काशीनाथोपाध्यायांचा 'धर्मसिंधु', भवदेवमिश्राचें पांडित्य, अमृतरायाचें

कीर्तन, मोरोपंताची आर्यावाणी, जोशीबोवांचा तमाशा, व्यंकटनरसींचें गाणें, बाळंभटदादाची कुस्तेगिरी, वगैरे सर्व प्रकार त्यांत इत्थंभूत आले पाहिजेत. त्याप्रमाणेंच त्या वेळचीं लोकस्थिति कशी होती,—ह्मणजे बापलेक, नवराबायको, बहीणभावंडें, धनीचाकर, गुरुशिष्य इत्यादिकांचे परस्पर संबंध कसकसे होते; धर्मावर लोकांची कितपत श्रद्धा होती, त्यांचें आचरण कसें होतें; मेकालेप्रभृति तत्त्ववाद्यांच्या मताप्रमाणें सर्व येथून तेथून लबाड व मूर्ख होते किंवा कसें; त्याप्रमाणेंच शुभवर्तमानाची बातमी किंवा एकेश्वराचें वर्तमानहि त्या वेळेस कानीं येण्याचा संभव नसून उलटा मूर्तिपूजेचा व पुराणांचा अंमल मात्र जारीनें सुरू होता, मग घरोघर व्यभिचार, लांडीलबाडी, मारामाऱ्या हे प्रकार सुरू असत किंवा काय; लोकांत कोणत्या विद्यांचा कितपत अभ्यास सुरू असे, व अभ्यासाची रीति कशी होती; मुसलमानी विद्येचा, भाषेचा, व रिवाजाचा कितपत प्रचार होता; मुल्ला साहेबांच्या पवित्र शास्त्रानें हिंदुधर्माच्या अंधकारांत सत्याचा प्रकाश कितपत पाडला होता, व 'न काशी मक्का वा शिवशिव न हिंदुर्न यवनः' ही स्थिति कितपत दृष्टीस पडत असे; याप्रमाणेंच लोकांतील उत्सव, रीतरिवाज, पेहेरावाच्या तऱ्हा, वगैरे सर्व कांहीं वरील इतिवृत्तांत समाविष्ट झालें पाहिजे. मराठे लोकांविषयीं अमुक प्रकारची एक माहिती यांत मिळत नाहीं असें जोंपर्यंत राहील तोंपर्यंत 'महाराष्ट्र देशाचा इतिहास' अपूर्णच समजावयाचा!

आतां हें खरें कीं, वरील मानानें पाहिलें असतां संपूर्ण इतिहास असा कधींहि मनुष्याच्या हातून तयार व्हावयाचा नाहीं; कां कीं सर्व प्रकारची माहिती कोणाला असणार आहे? व ती सर्व मिळावी तरी कशी? पण असें आहे ह्मणून इतिहासाचें यथार्थ स्वरूप सांगणें बरोबर नाहीं असें मात्र होत नाहीं. आकाश अनंत आहे ह्मणून आपल्या आड्याला आभाळ लागलें आहे असें ह्मणून कसें चालेल? वामनाचा श्लोक सर्वविश्रुतच आहे—

आकाशअंत न कळेनिहि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी।

हाच न्याय धरून अर्वाचीन पाश्चात्य इतिहासकारांनीं कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास लिहितांना केवळ राजकारणाच्या उलाढालींविषयींच न लिहितां लौकिक स्थितींचें यथावत् स्वरूप उतरण्याविषयींहि नेहमीं प्रयत्न केलेला आढळतो.[1] आतां डफ

१. अलीकडील साऱ्या लहान मोठ्या इतिहासांत वरील नवी पद्धति दृष्टीस पडते. त्यांतून गिबन व मेकाले यांच्या इतिहासांत तर ती भरपूर आढळते. मेकालेच्या अवांतर निबंधांचा, कवितांचा वगैरे जो एक तिसरा भाग छापलेला आहे त्यांत 'इतिहास' या विषयावर एक सविस्तर निबंध लिहिलेला आहे; त्यांत वरील पद्धतीच्या यथार्थ स्वरूपाचें प्रतिपादन केलें आहे. हा निबंध वरील ग्रंथकर्त्यानें पूर्ववयांत लिहिलेला आहे तेव्हां यावरून स्पष्ट कळून येतें कीं, स्वदेशाचा इतिहास लिहिण्याविषयींची स्फूर्ति त्यास तेव्हांपासून होत होती!

साहेबांच्या ग्रंथांत वरील प्रकार कितपत आढळतो हें आमच्या वाचकांस सांगायास नकोच. आज पन्नास वर्षांत आमच्या महाराष्ट्राविषयींच्या माहितीचा ग्रंथ झटला ह्मणजे काय तो त्यांचाच एक तयार झालेला आहे. त्यांत जो एकदां मजकूर आला आहे, व जीं मतें प्रगट झालीं आहेत, तीं कायम. तीं ताडून पहाण्यास दुसरा कोणताहि ग्रंथ नाहीं. आतां एवढें एक बरें आहे कीं, आमचे इतिहासकार मेकॉलेच्या तालमीपैकीं नसल्यामुळें त्यांनीं आपल्या ग्रंथांत आपली फुशारकी व रिकामें अद्वातद्वा कांहीं तरी तर्कट जें भरून टाकायाचें तें न करतां आमच्या पूर्वजांचे बरेच गुण ओळखले आहेत,[1] व मिळवलेल्या विपुल सामग्रीचा यथार्थ उपयोग करून ती यथास्थित दिली आहे. पण वर जी अवांतर प्रकारची माहिती सांगितली तींतलें त्यांच्या बखरींत कोठें अक्षरीहि सांपडायाचें नाहीं, तर ती प्राप्त होण्याविषयीं जे उत्सुक असतील त्यांची इच्छा प्रस्तुत पुस्तकावरून पूर्ण होणार आहे. यांत पूर्वीचे जे जे लेख मिळतील ते सर्व छापण्याचा संकल्प असल्यामुळें वरील जिज्ञासा तृप्त होण्याचा हाच एक मार्ग आहे हें उघड आहे. याशिवाय वरील इंग्रेजी इतिहासांतील जागोजागच्या खांचाखोंचा भरून काढण्यास व तो तपासण्यास वरील जुने लेख उपयोगीं पडणारे आहेत व भाषाज्ञानाच्या दृष्टीनेंहि ते इष्ट आहेत हें उघडच आहे. सदरील पुस्तकांत पहिलें प्रकरण जो इतिहास त्याच्या उपोद्घातांत वरील उपयुक्ततेच्या संबंधानें बराच मजकूर लिहिलेला आहे.

बाकीचे दोन भाग जे मराठी व संस्कृत कविता त्यांविषयीं विशेष कांहीं सांगायास पाहिजे असें नाहीं. पहिलीचा बराच अंश रा० माधव चंद्रोबा यांच्या हातून प्रसिद्ध झालेला आहे, व कित्येक 'ज्ञानेश्वरी'सारखे ग्रंथ भाविकजनांच्या आश्रयानेंहि अनेक वेळां छापून निघाले आहेत. त्याप्रमाणेंच अलीकडे बाबू जीवानंद विद्यासागर यांनीं आपल्या छापखान्यांतून अनेक संस्कृत ग्रंथ छापून काढून सर्व संस्कृतज्ञांस सुलभ करून टाकले आहेत. तरी वरील कवितांचें कोठार अजून किती खल्लास व्हावयाचें आहे हें पूर्वोक्त प्रसिद्धिपत्रकांत सांगितलेंच आहे. प्रकृत मासिक पुस्तकांत अलीकडे त्यांस सांपडलेल्या तिन्ही ग्रंथांच्या यादी दिलेल्या असतात त्यांवरून, हरदासांच्या ह्मणण्यांत प्रसंगवशात् जीं अश्रुतपूर्व प्रकरणें येतात त्यांवरून, व आमच्या पुस्तकाच्या २८ व्या अंकांत छापलेल्या यादीवरून, महाराष्ट्रकविता अद्याप किती प्रसिद्ध व्हावयाची आहे याची कल्पना वाचकांस बरीच करतां येईल. त्याप्रमाणेंच सुमारें पंधरा वीस वर्षांपूर्वी छापलेलें जें 'कविचरित्र' त्यांत प्रत्येक ग्रंथकाराच्या कृतींचा उल्लेख करून शेवटीं जी

१. डफ साहेबांनीं आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंतच वरील अभिप्राय प्रगट केला आहे. त्याचा उतारा एके ठिकाणीं (अंक ३२) आलाच आहेः यास्तव तो पुनः येथें घेत नाहीं। प्राच्य राष्ट्रांचा इतिहास लिहिणारांनीं डफ साहेबांचेंच व्रत चालविलें असतें तर किती बरें होतें

एकंदर विल्हेवार याद दिली आहे तिजवरून व इतर अनेक संस्कृत ग्रंथांच्या यादीहि छापलेल्या आढळतात[1] त्यांवरून या दुसऱ्या भागाचा विस्तारहि कळून येईल. तर हे दोन्ही रसातळास मिळून नाहींसे न व्हावे, व इतक्या मोठमोठ्या ग्रंथकारांच्या परिश्रमाचें अमूल्य फळ होऊन न झाल्यासारखें न व्हावें असें जर आमच्या देशबंधूंस वाटत असेल तर तीहि तजवीज सदरील मासिक पुस्तकांत होत असून रसिकांची विविध काव्यास्वादनाविषयींची उत्कंठ हि यांत पूर्ण होणार आहे.

८. येथवर प्रस्तुत पुस्तकाच्या स्वरूपाविषयीं विवरण झालें. आतां त्याच्या विषयींच खुद्द जें लिहावयाचें तें अर्थातच फार लिहिण्यासारखें नाहीं; एखादा स्वतंत्र ग्रंथ असला ह्मणजे त्याच्या भाषासरणीविषयीं, त्यांतील मजकुराच्या खरेखोटेपणाविषयीं, वगैरे लिहिणें अवश्य येतें; पण येथें तें अर्थात् कांहींच नाहीं. प्रस्तुत प्रकाशकांचा उद्योग केवळ प्रकाशनाचाच होय; जे जुने ग्रंथ आजपर्यंत अप्रसिद्ध राहिले ते सर्वांस सुलभ करून द्यावयाचे एवढेंच त्यांचें काम. त्यांचा असा या पुस्तकांतील मजकूर झटला ह्मणजे ग्रंथारंभीं प्रसंगवशात् प्रस्तावना दिली तर ती व पृष्ठांखालच्या टीपा. यास्तव इतर पुस्तकांत बाह्य व्यवस्थेच्या संबंधाचा विचार जो केवळ अप्रधान असतो तोच येथें प्रधान होय. पूर्वोक्त प्रसिद्धिपत्रकांत वरील माहिती दिलीच आहे. यास्तव ती व्यवस्था आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अंकांत दृष्टीस पडते कीं नाहीं एवढें सांगितलें ह्मणजे बस झालें.

पूर्वसंकल्पाप्रमाणें या पुस्तकांतील प्रत्येक प्रकरणाच्या पृष्ठांवर निरानिराळे अंक घातले आहेत; तेव्हां एक एक प्रकरण जसजसें पुरें होईल तसतसें तें निराळें बांधून संग्रहास ठेवितां येईल. तसेंच तिन्ही भागांतील मजकुरावर जागोजाग टीपा दिल्या आहेत. जुन्या बखरींची भाषा हल्लींच्या भाषेहून पुष्कळ प्रकारें निराळी असल्यामुळें मूळ रचना कायम ठेवून क्वचित् स्थलीं फेरफार केल्यास तो कौसानें दाखविला आहे. अप्रसिद्ध शब्दांचे प्रसिद्ध पर्याय देऊन ठिकठिकाणीं ग्रंथांतरींची वगैरे अवांतर माहिती भरीस घातली आहे. जागोजाग ग्रांट डफ साहेबांच्या बखरीचा व मूळ लेखाचा विरोध किंवा दोहोंतील न्यूनाधिक्य हें दाखविलें आहे. याप्रमाणें मराठी व संस्कृत कवितेंतहि दुर्बोध शब्दांची व्याख्या करून दोघां मराठी कवींचें यथोपलब्ध वृत्त दिलें आहे. अली-

---

१. जागोजागच्या पुस्तकसंग्रहांच्या यादी छापलेल्या आमच्या वाचकांपैकीं कित्येकांनीं पाहिल्या असतीलच. एक याद काशीस निघणाऱ्या 'पंडित' नामक पत्रास जोडली असून ती आज कित्येक अंक सारखी चालली आहे. मुंबईस तर जुन्या संस्कृत ग्रंथांचें एक मोठें दुकानच आहे. त्यांचीहि याद छापलेली आहे. हींत ६५१ संस्कृत ग्रंथ आहेत त्यांपैकीं कित्येकांपुढें (दुष्प्राप्यम्) असा शेरा आहे. यावरून ते ग्रंथ किती टेकीवर आले आहेत हें सांगायाला नकोच !

कडे दोन तीन अंकांत नवीन उपलब्ध झालेल्या ग्रंथांच्या यादीहि मलपृष्ठावर दिलेल्या आहेत. असा क्रम ठेवल्यानें शोधक लोकांस शोध करण्यास सवड होणार आहे, व सदरील पुस्तक घेणारांसहि प्रकाशकांपाशीं किती संग्रह होत चालला आहे हें कळल्यानें त्याच्या योग्यतेविषयीं व शाश्वतीविषयीं आश्वासन दिल्यासारखेंहि होणार आहे.

सदरील पुस्तकास घेणारांच्या सोयीकरितां जरी मासिक पुस्तकाचें स्वरूप दिलें आहे, तरी वस्तुतः पहातां त्यांत एक एक ग्रंथ संग्रहास ठेवतां येईल अशा रीतीनें प्रसिद्ध करण्याचाच उद्देश असल्यामुळें त्याचा कागद व छापणी हीं दोन्ही तशींच ठेविलीं आहेत. कागद बराच जाड असून छापणीहि सुरेख आहे. पहिल्या पहिल्या अंकांचा सांचा मात्र एकसारखा नसल्यामुळें व ते अगोदरच कापून ठेवल्यामुळें पुढें एकंदर ग्रंथ बांधतांना पंचाईत पडणार आहे; पण पुढील अंकापासून एक सांचा राखण्याची व पानें जशींच्या तशींच बांधण्याची तजवीज ठेविली आहे, असें दिसतें. सातवा व आठवा हे अंक तर फारच सुरेख निघाले आहेत. तर हाच क्रम पुढें सुरू ठेवण्याविषयीं व वरील अंकांत अशुद्धेंहि कोठें नजरेस येत नाहींत तर त्याविषयींहि तशीच खबरदारी पुढें ठेवण्याविषयीं पुस्तकप्रकाशकांस आह्मी सूचना करितों.

९. सदरील पुस्तक हें दोघां उपपदधाऱ्यांच्या परिश्रमाचें फळ होय, हीं हल्लींच्या काळाला एक मोठी लक्षांत ठेवण्यासारखीच गोष्ट होय. कांहीं कालापूर्वी सुधारणा ऐन शिखरास जाऊन पोंचल्याचें जें मान दिसत होतें त्यास आतां कल पडून लोकांच्या मनानें उलट खालच्याचीं जीं चिन्हें अलीकडे चोहींकडे दृष्टीस पडूं लागलीं आहेत त्यांपैकींच हेंहि एक होय. इंग्रेजी ग्रंथांचीं पुरश्चरणें करतां करतां ज्यांचे एकदांचे गंगेंत घोडे न्हाले, व या न्हाण्याबरोबर आपली अडाणी जन्मभाषा, वेडगळ आचार, अप्रयोजक व कुत्सित धर्म, या सर्वांचें पार क्षालन करून टाकून सुधारणेचीं शुद्ध तत्त्वें ज्यांनीं अंगीकारलीं, त्यांनीं मराठी बखरी छापणें व वामनमोरोपंतांचे ग्रंथ प्रसिद्ध करणें हें दहा पंधरा वर्षांपूर्वी केवढें विलक्षण वाटलें असतें! हल्लीं ज्याप्रमाणें एखादा बी. ए. चड्डीकाच्या भिडवून आखाड्यांत खम ठोकून उभा राहिला असतां लोकांस अचंबा वाटेल, किंवा एखादा एम. ए. पुरा याज्ञिक बनून स्वाहाकाराला बसला असतां पहाणारे तोंडांत बोट घालून रहातील, त्याप्रमाणेंच महाराष्ट्रदेशीय वीरांवर व कवींवर कीर्तिचामरें उडवून आपल्या युनिवर्सिटीच्या झग्यास कलंक लावणाऱ्या किताबवाल्याचाहि सर्वांस कांहीं कालापूर्वी अतिशय चमत्कार वाटला असता! झगेवाल्यांचीं कामें ह्मटलीं ह्मणजे त्यांनीं सांजसकाळ लायब्ररीचें दर्शन चुकूं देऊं नये; कधीं काळीं कोठें सभा झाली तर अध्यक्षस्थान पतकरून तेथून आपलें बिनचूक मत सर्वांच्या पुढें ओकून यावें,—तेंहि बहुधा इंग्रेजींतच, पण अज्ञ श्रोत्या मंडळीची दया आलीच तर धेडगुजऱ्या भाषेंत; मराठी लेखणीला तर कधीं शिवायाचें

नाहींच, फार मेहेरबानी झाली तर एखाद्या ग्रंथावर इंग्रेजींत अभिप्राय द्यावयाचा. त्यांतून चान्सलर साहेबांनीं बोळवणी करतांना दिलेल्या गुरुमंत्राची कोणास कधीं आठवण होऊन स्वदेशसेवा करण्याचें मनांत आलेंच, तर ती सेवा अशी छोटेखानी व्हावयाची नाहीं, तर नवे धर्म, कवितेच्या नव्या शाखा, पार्लमेंटास अर्ज, समग्र शास्त्रोदधीचें मंथन,—असल्या कांहीं तरी दांडग्या प्रकरणावर उद्योग सुरू व्हावयाचा. खरेंच, ज्या मंदराचलानें अवघ्या महोदधीस गरगर फिरावयास लावून लक्ष्मी, पारिजात, चंद्र यांसारखीं रत्नें ढवळून बाहेर काढावीं त्यानें क्षुद्र नवनीताकरतां दह्याच्या माथणींत कसें शिरावें ? ज्या गजेंद्रानें सार्वभौम राजा जींत बसला आहे अशी अंबारी पाठीवर घ्यावी, त्यानें क्षुद्र पशूंप्रमाणें सामान्य व्यवहाराचीं कामें कशीं करावीं ? मोठ्या अफाट दर्यांवरून भर तुफानांत चालून ज्या महानौकांनीं एका देशची संपत्ति दुसऱ्या देशांत नेऊन भरावी, त्यांच्याकडून भिकार लहान नांवांची कामगिरी कशी घडावी ? तेव्हां आजपर्यंत युनिवर्सिटींत निपजलेल्या प्रचंड मंडळींकडून बारीकसारीक देशहिताचीं कामें झालीं नाहींत हें नांटच आहे. पण आह्मांस लिहिण्यास संतोष व अभिमान वाटतो कीं, प्रस्तुत पुस्तक चालविणाऱ्या आमच्या विद्यालयबंधूंनीं वरच्यासारख्या अस्मान भराऱ्या मारण्याचें मनांत न आणतां आपल्या शक्तीप्रमाणें ही अल्प देशसेवा करण्याचें योजून ती बिलकूल कसर न करतां ते दर महिन्यास बजावीत आहेत. तर आतां आमच्या देशबंधूंस शेवटीं एवढीच प्रार्थना आहे कीं, त्यांच्या ठायीं या आर्यभूमीविषयीं जर खरी प्रीति व पूज्यबुद्धि वसत असेल, आपल्या पूर्वजांविषयीं खरें ज्ञान करून घेण्याची जर त्यांची इच्छा असेल, स्वभाषेच्या अभ्युदयाविषयीं जर ते कळकळ बाळगीत असतील, अनेक कवींचीं वाग्रत्नें जीं साऱ्या देशभर केरांत लोळत आहेत व कोंदणाविना ज्यांची प्रभा व्यर्थ होऊं पहात आहे त्यांचा संग्रह करून काव्यरसाच्या अनुपम आस्वादास आपणास व आपल्या संततीस जर अक्षयीं अंतरावयाचें नसेल, तर या नव्या उभारलेल्या इमारतीस अर्थद्वारा व शोधद्वारा मदत करण्यास त्यांनीं बिलकूल अनमान करूं नये. प्रस्तुत उद्योग हा मोठा अवाढव्य असल्यामुळें त्यास जसजसें लोकांचें आनुकूल्य दृष्टीस पडेल तसतसें पुस्तक वाढविण्याचाहि प्रकाशकांचा पूर्ण मनोदय आहे हें सांगून लेखणी ठेवतों.[१]

---

१. प्रस्तुत पुस्तकाच्या मलपृष्ठांवर उपलब्ध झालेले म्हणून जे ग्रंथ अलीकडे दिलेले आढळतात त्यांवरूनच पहातां ४८ पृष्ठांच्या मानानें सध्यां जमलेला सांठाहि केवढा आहे त्याची कल्पना थोडी बहुत वाचकांस होईलच. दोनच उदाहरणें वरील उल्लेखाच्या प्रत्ययार्थ देतों. मुक्तेश्वराचें 'वनपर्व' सध्यां चालू आहे व मोरोपंताच्या 'मैत्ररामायणा'चाहि कांहीं भाग निघाला आहे; पण हे दोन्ही ग्रंथच समग्र निघण्यास हल्लींच्या मानानेंहि दोन अडीच वर्षे तरी लागतील.

नवीन पुस्तकें.



वैयाकरणकिरातादपशब्दमृगाः क्व यांतु संत्रस्ताः ।
यदि नटगणकांचिकित्सकवैतालिकवदनकंदरा न स्युः ॥

अंक ५१--नवीन पुस्तकें-(अभिप्राय)—

आमच्याकडे कांहीं दिवसांपूर्वी 'अपभ्रष्टशब्दचंद्रिका' व 'ज्ञानेश्वरीपरिभाषा' हे दोन ग्रंथ त्यांच्या कर्त्यांनीं पाठविले. याबद्दल वरील ग्रंथकारांचे आभार मानून सदरील पुस्तकांविषयीं आह्मी आपलें मत वाचकांस कळवितों.

अपभ्रष्टशब्दचंद्रिका—हा ग्रंथ रा० प्रभाकर रामचंद्र पंडित यांनीं केला आहे. हे बडोदें येथील 'व्हरन्याक्यूलर कॉलेज आफ सायन्स' नामक पाठशाळेंतील गुरु आहेत. या ग्रंथाचा उद्देश त्याच्या नांवावरून व्यक्त होतच आहे, कीं संस्कृत, फारशी वगैरे भाषांतून अपभ्रंशरूपानें जे शब्द मराठींत आले आहेत त्यांचा यांत संग्रह केला आहे. या ग्रंथांत आरंभीं अपभ्रंशाचे ५२ नियम दिले आहेत. पुढें कोशांत येणेंप्रमाणें व्यवस्था आहे. आरंभीं अपभ्रष्ट शब्द, नंतर मूळ शब्द, पुढें अपभ्रंशाच्या नियमांचा आंकडा, आणि शेवटीं कोठें कोठें मूळ संस्कृत शब्दाचा धातु व अर्थ, व कोठें अपभ्रष्ट शब्दांवर विशेष व्याख्या. येणेंप्रमाणें सदरील ग्रंथांत सुमारें ३००० शब्दांची व्युत्पत्ति केलेली आहे.

प्रस्तुतसारख्या ग्रंथाची सांप्रत काळीं फार आवश्यकता आहे हें उघडच आहे. हल्लीं महाराष्ट्रभाषेकडे सर्वांचें लक्ष लागून तिच्या अभिवृद्ध्यर्थ अनेक प्रकारें उद्योग चालू आहे. यास्तव तिचे घटकावयव ज्या संस्कृत, प्राकृत, फारशी, आरबी भाषा त्यांतून तिचा शब्दसंग्रह कसकसा निष्पन्न झाला हें समजणें या काळीं अत्यंत आवश्यक होय. मूळ धातूंचें किंवा मूळ शब्दांचें ज्ञान झालें असतां साधित शब्दांचें व अपभ्रशांचें ज्ञान किती सुलभतेनें होतें हें सर्व भाषाभिज्ञांस माहीत आहेच. शिवाय ज्याप्रमाणें मूळ खोडावर नजर ठेविली असतां फांद्यांचा विस्तार तेव्हांच ध्यानांत येतो एवढेंच नाहीं, तर त्यांचा परस्परांशीं व मूळाशीं कसा संबंध आहे हेंहि लक्षांत येतें, त्याप्रमाणेंच धातु व मूळ शब्द यांचीहि गोष्ट होय. एक धातु समजल्यानें त्यापासून निघालेल्या अनेक शब्दांचें ज्ञान होतें व या शब्दांतील प्रत्येकास त्याचा त्याचा अर्थविशेष कसा प्राप्त झाला हेंहि समजण्यास मार्ग होतो. अपभ्रंशांचीहि अशीच गोष्ट आहे. अपभ्रंशांचे सामान्य नियम एकदां कळले ह्मणजे शेकडों शब्द जे अगदीं पारखेसे वाटत होते ते एकदम परिचितसे भासूं लागतात. चिरवियुक्त आप्तजनांची भेट होऊन

१. "वैयाकरणरूप किरातापासून भय पावलेले जे अपशब्दरूप मृग त्यांनीं एरवीं कोठें जावें ? जर नट, ज्योतिषी, वैद्य व बंदिजन यांचीं मुखें या गुहा त्यांस लपण्यास नसत्या तर."

संबंधाची पूर्वपीठिका एकदां समजली असतां ती जशी आजन्मांत विसरण्याचा संभव रहात नाहीं, त्याप्रमाणें चालू भाषेंत वहिवाटणाऱ्या शब्दांची परंपरा एकदां समजण्यांत आली ह्मणजे तीहि स्मरणांतून सहसा न जाई अशी मनांत दृढ होऊन जाते. शिवाय या अपभ्रंशांत राष्ट्राचे मनोव्यापारहि कधीं कधीं प्रतिबिंबित झालेले दृष्टीस पडतात. यास्तव मन्वंतरांच्या प्राण्यांचे अस्थिपंजर जसे भूगर्भशास्त्रज्ञास उपयोगी, तसेच वरील शब्दहि भाषाविवेचकास होत. त्यांत कधीं प्राचीन इतिहास, कधीं प्राचीन प्रचार, कधीं प्राचीन समजुती, यांचा ठसा उमटून राहिलेला त्याच्या नजरेस येतो !

तेव्हां हें अपभ्रंशशास्त्र जरी व्याकरणाचीच शाखा होय तरी तें त्यासारखें नीरस व रुक्ष नाहीं हें सहज ध्यानांत येईल. ही शाखा पल्लवांनीं सुशोभित होऊन फळांनीं लादण्यासारखी आहे. हल्लींचे प्रख्यात पदार्थविज्ञानवेत्ते प्रोफेसर हक्सले यांनीं इंग्लंडांतील एका मजूर लोकांच्या सभेपुढें जसें 'खडू'वर व्याख्यान दिलें, आणि नुसत्या खडूवरून हजारों वर्षांमागील पृथ्वीची स्थिति, तींत कालगत्या झालेले फेरफार, वगैरे विषयांवर पुष्कळ निरूपण केलें,[1] त्याप्रमाणेंच प्राचीन शब्द कालप्रवाहाच्या बरोबर लोटत लोटत येतां हल्लीं त्यांस प्राप्त झालेल्या रूपांतरावरून पुष्कळ व्याख्यान करतां येणार आहे. या भाषाशास्त्राकडे अलीकडे युरोपीय संस्कृतज्ञांचें किती लक्ष लागत चाललें आहे, हें मोक्षमुल्लर साहेबांच्या Lectures on the Science of Language (भाषाशास्त्रावर व्याख्यानें), यासारख्या ग्रंथांवरून स्पष्ट होत आहे. त्याप्रमाणेंच इंग्रेजी भाषेंतील शब्दांवर ट्रेंच साहेबांचे Study of words (शब्दांची व्याख्या), Select glossary (निवडक शब्दांवर व्याख्यान), वगैरे ग्रंथ जे अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरूनहि प्रस्तुतसारख्या विषयावरील ग्रंथ किती व्यापक व चित्तवेधक करतां येणार आहे याचें सहज अनुमान होतें. असा ग्रंथ करूं जाणाराच्या अंगीं पुढील गुण जितपत असतील त्या मानानें वरील गुण ह्मणजे व्यापकत्व व चित्तवेधकता हे त्यांत येणार आहेत. हे गुण चालू भाषेचें ज्ञान, संस्कृत, फारशी व आरबी यांची माहिती, इतिहासादि विषयांशीं परिचय, आणि विशेषतः लौकिक भाषाप्रकार व लोकव्यवहार यांकडे निरंतर लक्ष पुरविण्याची संवय शिवाय सामान्य बहुश्रुतपणा आणि सुबोध व मनोवेधक अशी ग्रंथरचना करण्याची

१. 'Lay Sermons. Essays and Reviews' या नांवाचें पुस्तक वरील ग्रंथकारानें निराळें छापलें आहे त्यांत वरील व्याख्यान सांपडेल. यांत वरील शास्त्रज्ञानें आपल्या श्रोत्यांस असें सिद्ध करून दिलें कीं, खडूची उत्पत्ति समुद्राच्या तळाशीं होते, व तेथें तो बनून रहाण्यास पुष्कळ काळ लागतो. आतां सध्यांची स्थिति पाहिली तर खडू हा पर्वतावरील प्रदेशांत सांपडतो, तेव्हां फार काळापूर्वी मोठमोठे पर्वतहि समुद्रांत बुडालेले होते असें अनुमान होतें. हें अनुमान पवित्रशास्त्रास किती विरुद्ध आहे हेंहि वरील व्याख्यात्यानें शेवटीं सांगितलें आहे. तेव्हां एका खडूच्या खड्यावर केवढा विभु रचला गेला पहा !

हातोटी, हे होत. आमच्या पुस्तकांतच कधींमधीं 'भाषापरिज्ञान' या सदराखालीं जो मजकूर येत गेला आहे, त्यावरून ट्रेंच साहेबांनीं केलेल्या ग्रंथांच्या नमुन्यावर महाराष्ट्र भाषेंत ग्रंथ होण्यास किती साधन आहे, हें भाषामर्मज्ञांच्या लक्षांत आलेंच असेल.

सदरील पुस्तकाची जाहिरात जेव्हां आमच्या दृष्टीस पडली, तेव्हां पुढें होणारा ग्रंथ वरील कलमांत दाखविलेल्या नमुन्याचा होईल असें आह्मांस वाटत होतें. रा० पंडित यांस फारशी व आरबी भाषांची माहिती कितपत आहे हें ठाऊक नाहीं, पण त्यांस संस्कृताचें ज्ञान चांगलें आहे असें दिसतें. तेव्हां या ज्ञानाचा उपयोग करून महाराष्ट्र भाषेंतील शब्दांविषयीं व प्रयोगांविषयीं पुष्कळ शोध करून चांगला व्यापक, उपयुक्त, व चित्तवेधक असा संग्रह ते विद्यार्थ्यांस व सामान्यतः सर्व विद्याप्रिय जनांस अर्पण करतील अशी आमची अपेक्षा होती. पण प्रकृत ग्रंथावरून पहातां वरील अपेक्षा व्यर्थ होती असें ह्मणणें भाग येतें. 'चंद्रिका'कर्त्यांचा उद्देश फक्त मोलस्वर्थ, मॉनियर विल्यम्स, विल्सन, क्यांदी इत्यादि कोशकर्त्यांच्या परिश्रमाचें एकीकरण करून व प्राकृत भाषांचा प्रख्यात जैन वैयाकरण हेमचंद्र याचें साहाय्य घेऊन रा० तळेकर यांच्या इंग्रेजी कोशाप्रमाणें किंवा रे० बाबा पदमनजी यांच्या मराठी कोशाप्रमाणें एक लहानशी इमारत उठवून द्यावयाची एवढाच असावा असें दिसतें. मग असल्या कार्याला प्रस्तुत ग्रंथकारासारख्यानें श्रम करायाला पाहिजे होते, किंवा ते सिद्ध झाले असतां त्याची शिफारस करण्यास जुन्या पंडितांस तसदी देण्याची गरज होती, असें आह्मांस वाटत नाहीं. मोलस्वर्थ वगैरेंच्या कोशांचें चालन करून अपभ्रष्ट शब्दांची याद करण्याचें काम कोणीहि सहज करूं शकता. एखादा ख्रिस्ती 'दीक्षित', किंवा 'सह्याद्रिखंड'कार एखादा फिरंगी डॉक्टर, अगर 'गुलामगिरी'कार एखादा बहादरहि दररोज चार घटका खपता तर दोन तीन महिन्यांत असली हवेली रचून देता! असो; आतां हा ग्रंथ जसा तयार झाला आहे तसाच घेऊन त्यांतील गुणदोषांचें विवरण करूं.

हें पुस्तक जर वर सांगितलेल्या कोशाप्रमाणें विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितांच केलें असेल तर त्यावर अपूर्णतेचा आरोप सकृद्दर्शनींहि येणार आहे हें उघड आहे. मोलस्वर्थचा कोश एवढा मोठा असतां त्याचा एवढासा संक्षिप्त ग्रंथ कसा संभवेल? वरील दोन कोशांच्या खालोखाल तरी तो असला पाहिजे. कोणास अमुक शब्द कशाचा अपभ्रंश आहे हें समजून घेण्याची इच्छा झाली, आणि तो यांत सांपडला नाहीं, तर याचा काय उपयोग? त्याप्रमाणेंच अपभ्रष्ट शब्दांचें ज्ञान व्हावें हाच जर याचा उद्देश आहे तर अठरा कारखाने, अठरा धान्यें, अठरा पुराणें, नऊ रत्नें, चौदा विद्या, चौसष्ट कला, वगैरेच्या यादी ज्या यांत दिल्या आहेत, व 'कार्ति-

कस्बामीच्या भिडेचा,' 'कफल्लक' इत्यादि शब्दांची यांत जी व्याख्या केली आहे तीहि सर्व केवळ अप्रस्तुत होय. अपभ्रंशशास्त्राशीं वरील माहितीचा बिलकूल संबंध नसल्यामुळें इतकी जागा या पुस्तकांत व्यर्थ अडली आहे असें म्हटलें पाहिजे.

आतां दुसऱ्या पक्षीं असें जर म्हटलें, कीं अपभ्रंशाचे नियम भाषाज्ञानेच्छु विद्यार्थ्यांच्या मनांत चांगले भरावे म्हणून हा ग्रंथ केला आहे, तर इकडूनहि त्यावर अनेक दूषणें येतात. पहिलें मोठें दूषण तर हें, कीं यांतील निंमेशिंमे शब्द अत्यंत मूढ विद्यार्थ्यांच्याहि लक्षांत येण्यासारखे आहेत. 'ओठ', 'औक्ष', 'कठिण', 'कर्दळी', 'कल्होळ', 'कोकिळा', 'खार', 'कापूर', 'दुकाळ', 'दीपमाळ', 'निळा', 'पद्धत', 'मीठ', 'मध', 'मरणें', 'मोर', 'रात्र', 'लक्षुमी', 'हरण', 'विख', 'शिंग', 'साप' इत्यादि शब्द कशाचे अपभ्रंश होत यांविषयीं कोणी कधींहि बुचकळ्यांत पडणार आहेत काय? ज्यानें महाराष्ट्र भाषेचा यत्किंचित्हि व्यासंग केला असेल, किंवा सामान्य संस्कृत शब्द ज्यांच्या कधींमधीं कानावरून गेले असतील त्यांसहि वरील अपभ्रंशांची व्युत्पत्ति तेव्हांच करतां येईल. याप्रमाणेंच 'चार' (चत्वार), 'आठ' (अष्ट) इत्यादि संख्यावाचक विशेषणांची एकदां व्युत्पत्ति समजली म्हणजे सगळ्या पाढ्याची पृथक् पृथक् व्युत्पत्ति देण्याचीहि गरज दिसत नाहीं. तसेंच 'आईतवार', 'ऐतवार', 'अखातीच', 'कलयुग', 'उहू', 'धजा', 'शिणगार, 'चिकइया', 'वर्णशंकर', हे शब्दहि केवळ अडाणी लोकांच्या बोलण्यांतच येणारे असल्यामुळें त्यांचा समावेश प्रस्तुत पुस्तकांत शोभत नाहीं; आणि त्यांतून वरील शब्दांची मूळपीठिका तर इतकी सहज उमगण्यासारखी आहे कीं, तिचें ज्ञान होण्यास 'चंद्रिके'चें साहाय्य कोणासहि लागेलसें दिसत नाहीं. याखेरीज वर सांगितलेल्या यादी–म्हणजे आठ प्रधान, आठ सिद्धी, आठी अधिकार, पांच हत्यारें, पांच गौड, नऊ रस, दहा ग्रंथ, चौदा रत्नें, बत्तीस गुण, चौसष्ट कला, इत्यादि. या यादींचा 'चंद्रिके'शीं अगोदर मुळींच संबंध नाहीं; आणि त्यांतून त्या कोठेंहि सांपडण्यासारख्या नसून प्रस्तुत ग्रंथकारानें जर प्रथमतःच लोकांस जाहीर केल्या असत्या तर एकपरी त्या चालवून घेतां आल्या असत्या; पण मोलखर्च साहेबांनीं पन्नास वर्षांपूर्वी खटपट करून त्या मिळविल्या असतां त्या आयत्या उतरून घेण्यांत मातब्बरी ती कोणती?

आतां प्रस्तुत पुस्तकाचा मुख्य भाग जे अपभ्रंश ते कितपत खरे आहेत व ते कोणत्या तऱ्हेनें दिले आहेत याविषयीं विचार करूं. एक तर कोठें कोठें परस्पर विरोध आढळतो. जसें 'हौद' हा शब्द शेवटल्या (९९) पृष्ठांत 'ऱ्हद' शब्दापासून निघाला आहे म्हणून सांगितलें आहे; पण पृष्ठ ४५ यांत पहातां वरील संस्कृत शब्दाचा अपभ्रंश 'डोह' म्हणून सांपडतो. पृष्ठ ९३ यांत 'सांज' शब्द 'संध्या' शब्दाचा अपभ्रंश होय असें सांपडेतं; तोच शब्द ९५ व्या पृष्ठांत 'सायम्' याचा अपभ्रंश म्हणून आढ-

ळतो. आतां खरोखर पहातां 'हौद' हा यवनी शब्द आहे; व 'डोह' हाच 'ह्रद' शब्दाचा अपभ्रंश होय. तसेंच 'संध्या' शब्दाचा अपभ्रंश, 'मध्यगृह' (माजघर), 'वंध्या' (वांझ) यांप्रमाणें 'सांज' हा होय; 'सायम्' हें अव्यय होय. 'फाटणें' हें धातुसाधित 'स्फटनं' यापासून निघालें आहे; पण 'फाडणें' हें 'पाटन' यावरून निघालें आहे; असें ६६ व्या पृष्ठांत सांपडतें; पण ज्यापक्षीं 'फाडणें' हें 'फाटणें' याचेंच प्रयोजक रूप होय, त्यापक्षीं दोहोंची व्युत्पत्ति कोणत्या तरी एका धातूपासून झाली पाहिजे हें उघड आहे; मूळस्वरूप एका धातूपासून व प्रयोजक रूप दुसऱ्यापासून मानणें असमंजस होय. 'जो' हा 'यः' याचा अपभ्रंश दिला असून 'याचा' व 'यानें' हीं रूपें 'यस्य' व 'येन' यांचीं अनुक्रमेंकरून दिलीं आहेत. 'य'चा 'ज' अपभ्रंश होतो हें जर खरें आहे, तर 'यस्य' व 'येन' यांचीं रूपें 'ज्याचा,' व 'ज्यानें' हीं होत हें उघड आहे. 'याचा' व 'यानें' हीं रूपें 'अस्य' व 'अनेन' या दर्शक सर्वनामांचीं होत. 'पांथस्त' हा शब्द 'पांथस्थ' याचा अपभ्रंश ह्मणून सांगितला आहे; पण संस्कृत शब्द 'पांथ' असा आहे, 'पांथस्थ' नव्हे; 'खटाटोप', 'शेंपूट' व 'थवा' हे शब्द, 'घटाटोप', 'शेप' व 'जात' यांचे अपभ्रंश होत असें सांगितलें आहे. पण 'घटाटोपो भयंकरः' याचा अर्थहि कांहीं होत नसून 'फटाटोपो भयंकरः' असा मात्र पाठ आढळण्यांत आहे. 'शेप' या शब्दाचा 'शेपूट' असा दिढीनें अपभ्रंश कसा झाला हें समजत नाहीं; शिवाय 'शेप' हा प्राकृत शब्द तर ध्यावयाचाच नाहीं, कारण प्राकृत शब्दाचा प्राकृत अपभ्रंश होणें संभवत नाहीं; तेव्हां तो संस्कृतच घेतला पाहिजे; पण संस्कृत अर्थ काय आहे हें कोशांत पाहिलें असतां कोणासहि कळणार आहे! 'जात' याचें 'थवा' हें रूप कसें बनलें हें 'चंद्रिकें'तील २१ व्या नियमावरूनहि कळत नाहीं. हा शब्द 'स्तव (–क)' शब्दाचा अपभ्रंश असावा असें आह्मांस वाटतें. 'खरवड', 'सचोटी' व 'बदक' यांचे मूळ शब्द 'खरवृत', 'सत्योक्ति' व 'कादंब' असे दिले आहेत. यांत पहिला शब्द तर निवळ मराठीच आहे असें आह्मांस वाटतें. 'खोटसाळ' मनुष्यास 'खरवड' असें जें ह्मणतात तें संस्कृतांतील 'खरवृत्त' शब्दाचा अपभ्रंश करून त्याची योजना वरील प्रयोगांत करतात असें नव्हे, तर तो केवळ लाक्षणिक प्रयोग होय. 'सत्योक्ति' शब्दाचा अर्थ 'खरें बोलणें' असा आहे, मग यावरून 'सचोटी' हें भाववाचक नाम कसें सिद्ध होईल? 'बदक' शब्द मोलस्वर्थकृत कोशांत अरबी ह्मणून सांपडतो; यास्तव 'हंसा'पासून बदक निपजण्याचा जितपत संभव तितपतच 'कादंबक' शब्दापासून 'बदक' शब्द निघण्याचाहि होय! 'अदबशीर' शब्दाची व्युत्पत्ति आरबी शब्द 'अरब' व संस्कृत 'शील' अशी केली आहे; व 'कामगार' हें संस्कृत 'कर्मकार' यावरून निघालें आहे असें सांगितलें आहे. पण 'शीर' व 'गार' हे दोन्ही आरबी किंवा फारसी भाषेंतील प्रत्यय होत असें आह्मांस

वाटतें; व तसें मानलें ह्मणजे पहिला धेडगुजरी समास करण्याचें व दुसऱ्याची संस्कृत व्युत्पत्ति मानण्याचें प्रयोजन उरत नाहीं. याप्रमाणेंच 'गदळ'(कदर्य), 'बिघा' (विग्रह), 'बारदान' (बहिर्धान), 'डोला' (दोला), 'सोंग' (सु+अंग), 'भंडारी' (भंड+हारी), 'भगरा' (भंगुरा), 'विस्तू' (वीतिहोत्र) इत्यादि अनेक व्युत्पत्ति ज्या 'चंद्रिका'कारांनीं दिल्या आहेत; व 'बडोदें' (बटोदर), 'वेळगांव' (वेणुग्राम), 'भडोच' (भृगुकच्छ), 'जाधव' (यादव), 'जोहार' (योद्धारः) अशा ज्या कित्येक मूळपीठिका दिल्या आहेत त्या तरी कितपत यथार्थ होत हेंहि सांगणें कठिणच आहे! 'जातो' (याति), 'तरतो' (तरति) ही व्युत्पत्तिहि अशुद्धच आहे. शालापत्रकांत प्रसिद्ध झालेल्या निबंधांत मराठी क्रियापदांची उपपत्ति कशी केली आहे हें आमच्या पुष्कळ वाचकांस माहीत असेलच.

प्रस्तुत पुस्तकांत दुसरा हा दोष दृष्टीस पडतो कीं, जेथें विशेषेंकरून विस्तार करायाला पाहिजे होता तेथें तो मुळींच केला नाहीं. 'खटाटोप', 'किंतू', 'यःपलाय', 'मनःपूतं समाचरेत्', 'अजागळ', इत्यादि शब्दांवरील व्याख्यान अगदीं कोतें आहे. "'खटाटोपो भयंकरः–घटाटोपो भयंकरः", "'किंतू–किंतु–परंतु", "'यःपलाय स जीवति–यः पलायते स जीवति=जो पळेल तो जगेल", "'अजागळ–अजागलस्तन (बोकडाच्या गळ्याला असणाऱ्या स्तनासारखा निरुपयोगी मनुष्य)" "'मनःपूतं समाचरेत्–मनास पवित्र वाटेल तें करणें; यथेच्छ वर्तन करणें असा अर्थ नव्हे", एवढ्याच व्याख्यानावरून वरील शब्दांचें ज्ञान विद्यार्थ्यांस काय होणार? 'खटाटोपाचें' मूळ 'घटाटोप' सांगितल्यानें जास्त काय समजलें? वरील शब्द प्रचारांत कसा आला हें समजण्यास संपूर्ण श्लोक दिला पाहिजे होता. 'किंतू'चा मराठींत कोणत्या अर्थीं प्रयोग होतो तो कोशकारानें मुळींच सांगितला नाहीं; वरील मालिकेवरून प्रकृत शब्द उभयान्वयी अव्यय होय असें अपरिचितास वाटेल. 'यःपलाय' हे तुटके शब्द मराठींत कसे आले हें वाचकांस कळण्यास 'पंचोपाख्यानां'तील धूर्त कोल्ह्याची गोष्ट सांगणें जरूर होतें. 'अजागळ' याचा अर्थ 'निरुपयोगी' असा मूळचा खरा, पण हल्लींचा अर्थ निराळा आहे; यास्तव तो देऊन त्याची उपपत्ति करायास पाहिजे होती. याप्रमाणेंच 'मनःपूतं समाचरेत्' या शब्दांचा अर्थ निश्चित करून त्यावर आमच्या कोशकारानें आपला शिक्का ठोकून दिला आहे खरा; पण याचा कितपत उपयोग होईल हें सांगणें नको. मराठीच काय, पण एकंदर भाषांची प्रवृत्ति 'मनःपूतं समाचरेत्' या प्रकारची आहे. त्यांस वैयाकरणांनीं किंवा कोशकारांनीं आपला स्वैरक्रम सोडून मर्यादेनें वागण्यास सांगणें ह्मणजे नदीच्या ओघांवर व पर्वतांच्या रांगांवर रूळ व कंपास चालविणें होय. ज्या आमच्या देशभाषेनें एवढे धुरंधर क्यार्डा साहेब तिचें चाळीस वर्षें नियमन करीत असतां त्यांसहि दाद दिली नाहीं, व जी त्यांच्या मेज-

रीच्या तरवारीस लवमात्रहि वचकली नाहीं, ती 'वटोदर'निवासी एतद्देशीय अध्यापकाची कदर कोठून जुमानणार ?[1]

याप्रमाणें सदरहू पुस्तक जसें व्हावयास पाहिजे होतें तसें मुळींच झालें नाहीं. विद्यार्थ्यांस व जिज्ञासु जनांस कोणत्या प्रकारचा ग्रंथ विशेष उपयुक्त होईल, हें नीट मनांत आणून किंवा अर्वाचीन पद्धत जाणणाऱ्या कोणा विद्वानाचा सल्ला घेऊन प्रस्तुत ग्रंथकारानें जर उद्योग आरंभला असता, तर बरें झालें असतें. एक तर यांतला फाजील भाग निघाला असता; आणि त्याच्या जागीं उपयोगाची व मौजेची माहिती आली असती. आतां हल्लीं आहे, अशा प्रकारचेंहि पुस्तक निरुपयोगी आहे असें नाहीं, त्यापासून सर्वांस व विशेषतः नवीन विद्यार्थ्यांस बराच उपयोग होणारा आहे. अपभ्रंशाचे सामान्यतः सर्वव्यापक नियम यावरून त्यांच्या मनावर बरेच ठसतील; व पुष्कळ शब्दांची व्युत्पत्तिहि त्यांस कळेल. याप्रमाणें कांहीं ठिकाणीं माहितीहि बरीच मिळेल. उदाहरणार्थ 'कनोज', 'कफळक', 'कोटस्य कीटायते', 'खडाष्टक',[2] 'बसवण्णा', 'परोक्ष' हे शब्द पहा.

---

१. वरील पंडिताची महाराष्ट्र भाषेवर केवढी जरब होती हें त्यांचे रिपोर्ट पाहिले असतां कळून येणार आहे. हे एज्युकेशनल रेकर्ड पत्रांत कोठें कोठें आढळतात. सुमारें पंधरा वीस वर्षांपूर्वी Hints to Composition (ग्रंथकर्त्यांस सूचना) या नांवाचें एक लहानसें पुस्तक त्यांनीं प्रसिद्ध केलें होतें. त्यांत 'इसापनीती'तील वगैरे कांहीं प्रयोग शुद्ध केले होते. याच सुमारास त्यांचा व 'ज्ञानप्रसारक' मंडळीचा एक मोठा वाद झाला तोहि पहाण्यासारखा आहे. त्या वेळचे विद्याभिमानी डायरेक्टर मे० हावर्ड साहेब यांनीं उभयपक्षींचा वाद प्रतिवाद (Correspondence on the subject of the Dnyan prasarak) 'ज्ञानप्रसारका'वरून झालेला पत्रव्यवहार या नांवानें पुढें लवकरच महाराष्ट्रभाषाविवेचकांच्या प्रीत्यर्थ प्रसिद्ध केला.

२. वरील शब्दाची प्रस्तुत पुस्तकांतील व्याख्या बरोबर आहे, तरी तींत मुद्द्याची गोष्ट मुळींच गाळली आहे. ती ही कीं, वरील योग लग्नाच्या वेळेस मुलाचा व मुलीचा पहात असतात; केवळ अचा व वचा कोणी पहात नाहीं. मोलस्वर्थ साहेबांस वरील शब्दाची व्युत्पत्ति समजली नाहीं. त्यांच्या कोशांत पुढील शब्दापुढें 'खडा'–'अष्टक' असे त्याचे अवयव देऊन A free formation असा शेरा दिला आहे. पण हा 'दांडगाईचा समास' नव्हे हें 'चंद्रिके'तील व्याख्यानावरून ध्यानांत येईल. वरील कोश प्रस्तुत पुस्तकाबरोबर ताडून पहातां इतर कित्येक प्रमादहि आमच्या लक्षांत आले ते येथें प्रसंगवशात् देतों. 'कस' शब्दाची व्युत्पत्ति 'कषाय' ह्मणून दिली आहे; पण खरी व्युत्पत्ति 'निकष' असावी. 'घरदार' हें 'घर' आणि 'दार' यांपासून झालें, ह्मणजे हा समाहार द्वंद्व होय, असा कोशकाराचा अभिप्राय दिसतो. आमचें मत 'भाषापरिज्ञान' या सदराखालीं पूर्वी (अंक १८) दिलेंच आहे. 'अणीक' हा शब्द 'अनेक' याचा अपभ्रंश ह्मणून दिला आहे. पण दोहोंतील अर्थभेदावरून पहातां

(पुढें चालू).

हल्लींच्या स्थितींत वरील पुस्तकाची वरच्यापेक्षां जास्त तारीफ करवत नाहीं. तर सरते शेवटीं प्रस्तुत ग्रंथकारास आह्मी अशी सूचना करतों कीं, सदरील ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आल्यास त्यांनीं पूर्वोक्त आक्षेपांकडे लक्ष पुरवावें. तसें करून या पुस्तकांत हवी तशी सुधारणा केली असतां त्यांचे एतद्देशीय विद्यार्थ्यांवर व सामान्यतः सर्व वाचकांवरहि मोठे उपकार होतील यांत संशय नाहीं.

ज्ञानेश्वरीपरिभाषा-हें पुस्तक रा० रघुनाथ भास्कर गोडबोले यांनीं केलें आहे. या ग्रंथकर्त्याचें नांव आमच्या वाचकांच्या माहितींतलेंच आहे. अंक ४२ यांतील ग्रंथपरीक्षेंत आलेला 'प्राचीन भारतवर्षीय ऐतिहासिक कोश' या पुस्तकाचे हे कर्ते होत. प्रस्तुत विषयावरच विशेष व्यापक असा 'हंसकोश' नांवाचा ग्रंथ याच ग्रंथकारानें सुमारें वीस वर्षांपूर्वी रचून प्रसिद्ध केला होता. तो हल्लीं अनुपलब्ध आहे.

वरील 'परिभाषा' हा नव्याच मासल्याचा ग्रंथ आहे. इंग्रेजींत ज्यांस Companion volume (जवळ ठेवायाचा किंवा जोडीचा ग्रंथ) ह्मणतात त्यासारखा हा आहे. 'ज्ञानेश्वरी'चें जो अध्ययन करील त्यास उपयोगीं पडण्याकरतां हा तयार केला आहे. रा० रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं कांहीं महिन्यांपूर्वी 'ज्ञानेश्वरी'ची नवीन आवृत्ति आपल्या छापखान्यांत काढली. तेव्हां तिजबरोबर ही 'परिभाषा'हि तयार करवून छापली. ही नवीन योजना मनांत आणून ती वरील वाकबगार गृहस्थाकरवीं पूर्ण केली, याबद्दक रा० गोंधळेकर यांची तारीफ करणें रास्त आहे.

ही 'परिभाषा' सरासरी मूळ ग्रंथाच्या एवढीच झाली आहे. हिचा सांचाहि तेवढाच धरून ती पोथीप्रमाणेंच आडवी छापली आहे. प्रत्येक पृष्ठांत 'ओवी', 'कठिण शब्द' आणि 'अर्थ' अशीं तीन तीन सदरें पाडलीं असून अनुक्रमानें बहुतकरून प्रत्येक ओवींतील शब्द दिलेले आहेत. तेव्हां ही 'परिभाषा' सर्व प्रकारें 'ज्ञानेश्वरी'ची सहचारिणी किंवा परिचारिका झाली आहे असें ह्मटलें असतां चालेल.

प्रस्तुत पुस्तकाची उपयुक्तता स्पष्टच आहे. 'ज्ञानेश्वरी' हा कालआजचा ग्रंथ

वरील अभिप्राय खरा असेलसें दिसत नाहीं. अपभ्रंशांच्या नियमावरून व अर्थसादृश्यावरून 'अन्यक' ही व्युत्पत्ति यथार्थ दिसते. 'कळी'चें संस्कृतांत 'कली' असें दीर्घ रूप कोठेंहि आढळत नाहीं, नेहमींचें रूप 'कलिका' हें होय. 'कष्टाळू' याचें मूळ संस्कृत रूप 'कष्टालु' असें दिलें आहे; पण 'कष्ट' शब्दाचा संस्कृतांत 'श्रम' या अर्थीं कधींहि प्रयोग होत असलेला आह्मांस वाटत नाहीं. तेव्हां 'कष्टालु' तर दुरापास्तच. 'आई'चें मूळ रूप 'अंबा' ह्मणून दिलें आहे. आमच्या मतें 'मातृ'—'माई' 'आई' अशी व्युत्पत्ति होय. 'चंद्रिकें'त 'आर्या' असें मूळ रूप दिलें आहे; पण याचा अपभ्रंश 'आजी' हा असावा. 'जोहारा'चें मूळ 'योद्धारः' दिलें आहे. पण ही व्युत्पत्ति प्रस्तुत शब्द उच्चारणारे जे 'महाअरि' त्यांच्या व्युत्पत्तीचेंच भावंड दिसतें! टीकाविषयक ग्रंथांत वरील सर्व व्युत्पत्ति प्रस्तुत महाकोशाच्या आधारावरूनच दिल्या आहेत हें उघडच आहे.

नाहीं. इंग्रेजी भाषेचा आद्यकवि चासर त्याच्याहि कांहीं मागले आमचे ज्ञानोबा होत. यवनी अमलाची रात्र ज्या वेळेस पुरती अर्धीहि लोटून गेली नव्हती, व शेजारच्या पुण्यग्रामाचे अधिपति तर काय, पण त्यांच्या यजमानांचे कुलपति उदयास येण्यासहि कित्येक शतकांचा ज्या वेळेस अवधि होता, त्यावेळेस महाराष्ट्र कवींचे व सन्मणिमंडलाचे कुलगुरु जन्मले. यांचा इतिहास सध्यां अर्थात्च केवळ दंतकथाशेष राहिला आहे. यांची कीर्ति मात्र आजपर्यंत सारखी चालत आली आहे; ती भाविक लोकांत कितपत आहे ती आळंदीच्या वार्षिक यात्रेवरून दिसतच आहे, व रसिकजनांत कितपत आहे याचें प्रमाण प्रौढ हरदासांचीं कीर्तनें होत. यांचे ग्रंथ 'ज्ञानेश्वरी' व 'अमृतानुभव' हे दोन आहेत; यांपैकीं पहिलाच अत्यंत प्रसिद्ध आहे. याचें अध्ययन करण्याची सोय सदरील पुस्तकाच्या द्वारें झाली आहे ही फार चांगली गोष्ट झाली. कां कीं, दिवसेंदिवस वरील जुन्या ग्रंथांचें सतत परिशीलन केलेला तर काय, पण नुसते ते वाचलेलाहि गृहस्थ मिळणें दुरापास्त होणार. तेव्हां ही अनकूलता आहे तोंपर्यंत अशीं कामें जितकीं उठतील तितकीं चांगलीं !

'ज्ञानेश्वरी'च्या अध्ययनापासून अनेक लाभ होण्याजोगे आहेत. एक तर 'महाभारता'चें सार जी 'भगवद्गीता', जिचें माहात्म्य या देशांत तर प्राचीन काळापासून अतिशयित आहे, व जिच्या योग्यतेचें प्रमाण दुसरें नको,—बिचाऱ्या व्यासावर युरोपीय पंडितांनीं अलीकडे जो चोरीचा चार्ज आणला आहे तोच बस आहे,—त्या

---

१. ज्ञानेश्वराचे व तुकारामाचे जे सांप्रदायी आहेत त्यांच्या कीर्तनांत वरील ग्रंथाचें प्राबल्य विशेष दिसून येतें. तुकते निवर्तलेले भाऊ काटकर वगैरे मंडळी वरच्यापैकीं होत. यांच्या कीर्तनाच्या संबंधानें येथें पुढील गोष्ट लिहिणें अवश्य वाटतें कीं, ती कानीं पडली असतां जी चित्तवृत्ति होते ती आमच्या अलीकडील सुधारलेल्या धर्मव्याख्यानांनीं फारकरून थोडीच होते ! आह्मीं ब्रह्मो बाबूंनीं मोठ्या सद्गदित स्वरानें केलेल्या प्रार्थना ऐकल्या आहेत, व त्यांची उपासना पाहिली आहे; प्रार्थनासमाजाचे वार्षिक उत्साह व त्या वेळचे पवित्र उपदेश देहि पाहिले व ऐकले आहेत; पण वरच्यांतला रंग येथें कांहींच चढत नाहीं असें आमच्या अनुभवास आलें. मग याची मीमांसा काय असेल ती असो !

२. आमच्या आद्यकवींनीं ज्याप्रमाणें 'मूळ स्वभाव जाईना' या न्यायानें होमरवर दरवडा घालून त्यास लुटलें, त्याप्रमाणेंच 'भारत'वाल्यानेंहि 'नव्या करारां'तून सगळा मजकूर उपट्टून 'भगवद्गीता' रचून दिली, हीं दोन अत्यंत समंजस मतें अलीकडे निघालीं आहेत. एकंदरींत आमच्या पाश्चात्य बंधूंचा हा महासिद्धांत ठरून गेला आहे कीं, इकडे जें कांहीं ह्मणून बरेंसें सांपडेल तें तिकडूनच उपटलेलें असायाचें; इकडच्या लोकांच्या बांटग्याला अक्कल ती आली कधीं ! मेकॉले साहेबांस आमच्या इकडील ग्रंथांचें केवढें अगाध ज्ञान होतें हें पूर्वी अनेक वेळां सांगण्यांत आलेंच आहे; तरी पुढील वाक्यांतील त्यांचा कटाक्ष पहा !—

Voltaire seems, at this time, to have meditated a history of

(पुढें चालू)

'भगवद्गीते'वर प्रस्तुत ग्रंथांत मनोरम व्याख्यान आहे. तेव्हां तिचें स्वरूप मनांत यथास्थित बिंबेल हा एक लाभ. दुसरा भाषेच्या दृष्टीनें. अलीकडील पंडितांस भाषाशास्त्राची फार आवड वाटूं लागली आहे; व नदीचा प्रवाह पहात पहात मूळापर्यंत जाणें यांत जशी मौज तशीच भाषेचा ओघ समग्र पहाण्यांतहि आहेच; तर प्रस्तुत ग्रंथ हा वरील शास्त्राच्या अध्ययनासहि उपयोगी आहे. सहाशें वर्षांपूर्वी आमची भाषा कशी होती, ह्मणजे संस्कृत व प्राकृत या दोन मागल्या पिढ्या तुटून तिच्या स्वैर गतीस आरंभ झाला असतां तिचें स्वरूप कसें होतें तें या ग्रंथावरून पहाण्यास सांपडणार आहे. तिसरा लाभ प्रस्तुत ग्रंथाचेंच मनोरमत्व. ज्ञानोबांनीं शेवटल्या महाराष्ट्र कवीप्रमाणें मूळ ग्रंथाशीं भीत भीत दुरून न वागतां[1] आपल्या अधिकाराप्रमाणें त्याशीं पुष्कळ सलगी केली आहे. किंबहुना बहुधा मूळ हें आधार मात्र करून वरील सर्व रचना आपली स्वतःचीच केली आहे. बाराव्या अध्यायांतील मूळच्या एका श्लोकावर १४७ ओव्या झाल्या आहेत, हें पहिल्या 'नवनीता'वरून[2] पुष्कळांस माहीत

---

the conquest of Bengal. Had the plan been carried into execution, we have no doubt that Voltaire would have produced a book containing much lively and picturesque narrative, many just and humane sentiments poignantly expressed, many grotesque blunders, many sneers at the Mosaic Chronology, much scandal about the catholic missionaries and much sublime theo—philanthrophy, *stolen from the New Testament, and put into the mouths of virtuous and theosophical Brahmins.*"

—Lord Clive.

खरेंच, यहुदी लोकांसारख्या परम ज्ञानसंपन्न व ईश्वरकृपाविशिष्ट लोकांस जें ज्ञान वरून आयतें प्राप्त झालें, तें ब्राह्मणांसारख्या अधम व मूर्ख लोकांस कसें मिळावें ? आमच्या गोवळकोंड्याच्या वगैरे खाणींतून जरी हिरे निघालेले आपण प्रत्यक्ष पाहिले, तरी त्यांची मूळ उत्पत्ति कार्नवाल प्रांतांताल कोळशांच्या खाणीच होत असें पक्कें समजावें !!

वरील दोन्ही मतांचें यथास्थित खंडन एका प्रसिद्ध नवीन पंडिताकडून इंग्रजी भाषेंत झालें आहे हें आमच्या बहुश्रुत वाचकांस माहीत असेलच.

१. अंक ४६ प्यारा ४ टिप पहा. (पुढें, मोरोपंताची कविता).

२. 'नवनीता'ची नुकती दुसरी आवृत्ति निघाली हें कोणाकोणास माहीत असेलच. या आवृत्तींत वरील अध्याय पाहूं गेल्यास पहाणाराची निराशा होईल. या आवृत्तींत पुष्कळ चांगल्या सुधारणा केल्या आहेत, पण बिचाऱ्या मुकुंदराजास व ज्ञानेश्वरास मुळींच फाटा दिला आहे ही मोठी सुधारणा झाली आहे असें आह्मांस वाटत नाहीं. वेदांताचा भाग जर महाराष्ट्र कवितेंत एवढा पुष्कळ आहे तर 'मराठी कवितांच्या वेंच्यां'त त्याचा मागमूसहि उमगूं नये हें अमळ विचित्रच खरें ! बाराव्या अध्यायांत बिचाऱ्या ज्ञानोबानें साधूचीं लक्षणें दिलीं

(पुढें चालू).

असेलच; शिवाय मूळ ग्रंथ सगळा ७०० असून 'ज्ञानेश्वरी' ९००० आहे यावरूनहि वरील विस्तार स्पष्टच आहे. पण या विस्ताराची मौज अशी आहे कीं, त्याचा बिलकूल कंटाळा न येतां उलटें त्याकडे चित्त वेधूनच जातें. आह्मांस पूर्वी 'नवनीता'-च्या पहिल्या व दुसऱ्या भागांवरूनच काय ती प्रस्तुत कवीची माहिती होती; पण सदरील 'परिभाषे'च्या परीक्षार्थ मूळ ग्रंथाची कोठें कोठें जी आह्मीं उगीच चांचणी पाहिली तिजवरूनहि त्याच्या वाणीच्या लावण्याच्या छटा आमच्या डोळ्यांत भरल्या व समग्र ग्रंथाच्या वाचनाविषयीं उत्कृष्ट इच्छा उद्भवली. आमच्या येथील एका मित्रा-नेंहि तोच आपला अनुभव आह्मांस सांगितला. तर आह्मीं आमच्या वाचकांसहि आनंदानें कळवितों कीं, कवित्वाच्या तरंगांत मौजेनें लोटत जाऊन उपमादृष्टांतादि कमलें ज्यांस लीलेनें खुडायाचीं असतील त्यांनीं प्रस्तुत 'परिभाषा'रूप तुंबीफलांचा आश्रय करून महाराष्ट्र भाषेच्या आद्यकवीच्या वाक्तरंगिणींत उडी घालावी. हिचें आजपर्यंत अपरिचितत्वास्तव जें दुरवगाहत्व वाटत होतें तेंहि प्रत्यक्ष अनुभवावरून पुष्कळ अंशीं मिथ्याच अशीहि आमची खात्री झाली. ज्यास संस्कृत व्युत्पत्तीचें अंग आहे त्यासहि असाच अनुभव येईल असें आह्मांस वाटतें.

सदरील 'परिभाषे'विषयींच खुद्द आणखी जास्त लिहिण्यासारखें अर्थात् कांहीं नाहीं. मूळ ग्रंथांत जेवढे शब्द अडण्यासारखे आहेत तेवढे प्रायः सर्व यांत आहेत. जे शुद्ध संस्कृत शब्द, कीं ज्यांच्या अर्थाची संस्कृतज्ञ वाचकांस गरज नाहीं, ते सुद्धां सामान्य वाचकांच्या सोयीकरतां यांत सामील केले आहेत. तेव्हां प्रस्तुत ग्रंथाच्या साह्यानें बहुधा कोणाचाहि 'ज्ञानेश्वरीं'त प्रवेश होईल असें वाटतें. एवढें मात्र आहे कीं, प्रस्तुत ग्रंथप्रकाशकानें जी 'ज्ञानेश्वरी'ची आवृत्ति काढली आहे तीच जवळ असली पाहिजे. आह्मी एका जुन्या हस्तलिखित पोथीवरून 'परिभाषें'तील शब्द पाहूं लागलों तों कशास कांहीं मेळ बसेना. जो शब्द 'परिभाषें'त एका ओवींत आढळावा तोच आमच्या प्रतींत पांच पन्नास ओंव्या पुढें आढळावा. उदाहरणार्थ १४ व्या अध्या-यांत 'हरिखाचा' (आनंदाचा) हा शब्द छापील प्रतींत ४१४ व्या ओवींत; हस्तलि-खित प्रतींत ४३१ व्या ओवींत आहे; १५ व्या अध्यायांतील ५३२ व्या ओंवींतला 'अनारिसा' (वेगळा) हा शब्द आमच्या प्रतींत ५१६ व्या ओवींत सांपडतो; 'निष्कर्ष' (शेवट) व 'वाक्यपूजा' (वाक्यरूप पूजा) हे शब्द वरील दोन प्रतींत अनुक्रमेंकरून ५२९ व ५५१ आणि ५९९ व ६२९ अशा ओंव्यांतून सांपडतात; सतराव्या अध्या-यांत 'खेंव' (आलिंगन) हा शब्द एका प्रतींत ४१७ व्या व दुसरींत ४४१ व्या

होतीं. त्यांत एवढें दुर्बोध काय होतें तें कळत नाहीं. शिवाय एवढ्या चारशें पानांच्या ग्रंथांत कोठें कोनाकोपऱ्यांत थोडासा वेदांत आला असता तर 'नवनीता'च्या स्वादास कांहीं हीनत्व आलें असतें किंवा त्याचे पौष्टिक धर्म कांहीं कमी झाले असते असेंहि आमचें मन घेत नाहीं.

ओंवींत सांपडतो. त्याप्रमाणेंच शेवटली प्रसिद्ध आवी—

शके बाराशें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंद बाबा आदरें । लेखकु जाहला ॥

ही 'परिभाषें'त १८११ वी व हस्तालिखित प्रतींत १९५५ वी सांपडते. तर याप्रमाणें रा० गोंधळेकरांच्या आवृत्तींत व इतर प्रतींत पुष्कळ फरक पडण्याचा संभव दिसतो. आमच्या प्रतींत एकंदर ग्रंथ ९४८७ इतका आहे; तो वरील आवृत्तीहून ४६० ओंव्यांनीं जास्त आहे. शिवाय 'परिभाषें'तील कांहीं शब्द आमच्या पोथींत न सांपडल्यावरून व कोठें निराळीं रूपें आढळल्यावरून असेंहि वाटतें कीं, प्रस्तुत ग्रंथांत पाठभेदाचा प्रकारहि पुष्कळ असावा. तर रा० गोंधळेकर यांस आमची अशी सूचना आहे कीं, 'ज्ञानेश्वरी'ची आवृत्ति पुनः काढणें झाल्यास तींत वरील अधिक ग्रंथाचा व पाठांतरांचा त्यांनीं समावेश करावा. ठिकठिकाणच्या पांच सहा प्रती एकत्र केल्या असतां वरील दोहोंचा उलगडा होणार आहे. एका प्रतीहून दुसऱ्या प्रतींत ४६० ओव्यांची जर भर दृष्टीस पडते आहे तर एवढा ग्रंथ बुडूं देणें हें कवीची व कवितेच्या भोक्त्यांची मोठीच हानि करणें आहे !

सरते शेवटीं सदरील पुस्तकाच्या छापणीबद्दलहि दोन शब्द लिहिल्यावांचून रहावत नाहीं. ठशांच्या छापाविषयीं मुंबईच्या गणपतकृष्णाजींची जशी पहिल्यापासून प्रसिद्धि आहे, त्याप्रमाणेंच अलीकडे रा. गोंधळेकर यांचीहि शिळाछापाविषयीं झाली आहे. यांच्या छापखान्यांत शिळेवरील काम जसें सुबक निघतें तसें दुसऱ्या कोठेंहि निघत नाहीं. प्रस्तुत 'परिभाषा' जाड कागदावर चांगली स्वच्छ छापली असल्यामुळें तिजकडे वाचकांची प्रवृत्ति सहजावृत्त्या होणार आहे. मूळ ग्रंथाचीहि अंगभूत वेधकता अशीच वाढली असेल यांत संशय नाहीं. तर भाविक जनांस व रसिक भाषाविवेचकांस वरील दोन्ही ग्रंथांविषयीं शिफारस करून हें परीक्षण आटपतों.

पत्राचें उत्तर.

न पादपोन्मूलनशक्तिरंहः शिलोच्चये मूर्छति मारुतस्य ।[1]

रघुवंश.

अंक ६१—(१) सदरील अंकाचा विषय. (२) सदरहू पत्र न छापण्याचीं कारणें. (३) 'अपभ्रष्टशब्दचंद्रिके'वर पहिला आक्षेप—अव्याप्ति. (४) दुसरा आक्षेप—अतिव्याप्ति. (५) तिसरा आक्षेप—पुनरुक्तता. (६) चवथा आक्षेप–अस्थानगत विस्तार. (७) उपसंहार.

१. या अंकांत पूर्वसंकेताप्रमाणें 'विविधज्ञानविस्तारा'च्या एप्रिल–मे–जून

१. "वाऱ्याचे अंगीं झाडें उपलून टाकण्याचें जरी सामर्थ्य असलें तरी पर्वतावर त्याची शक्ति चालत नाहीं !"

महिन्यांच्या त्रैमासिक अंकांत आलेल्या पत्राचें उत्तर द्यावयाचें आहे. सदरील पत्र 'अपभ्रष्टशब्दचंद्रिके'च्या कर्त्यानें प्रथमतः आमच्याकडे पाठविलें होतें; पण तें छापण्याचें आह्मीं नाकारल्यावरून तें वरील मासिक पुस्तकाकडे पाठविण्यांत आलें.

२. आमच्या पुस्तकांत जे अभिप्राय प्रगट होत असतात त्यांस अनुकूल किंवा प्रतिकूल असे कोणत्याहि तऱ्हेचे लेख आमच्याकडे कोणीं पाठविल्यास ते छापून प्रसिद्ध करण्याची व अवश्य वाटल्यास आमचा त्यांवर पुनः अभिप्राय देण्याचीहि आमची मूळपासून वहिवाट आहे हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. मग असें असतां 'चंद्रिके'च्या तर्फेनें आलेल्या वरील पत्रासच आह्मीं नकार कां लावला हें वाचकांच्या सहजच मनांत येईल. यास्तव वरील निषेधाचीं कारणें येथें अगोदर लिहिलीं पाहिजेत.

सदरील पत्र न छापण्याचें पहिलें मोठें कारण हें होय कीं, तें अतिशयित लांब असून शास्त्रीय भाषेनें लिहिलेलें आहे; व शिवाय त्यांतील विषयहि वाचकांस चित्तवेधक होण्यासारखा नाहीं. आमचे वाचक अगोदरच 'नवीन पुस्तकें' हें सदर पाहिलें ह्मणजे कंटाळतात. ही गोष्ट आह्मांस प्रथमतः माहीत नव्हती; पण कित्येकांच्या पत्रांवरून ती समजण्यांत आली. एके रीतीनें पहातां हा कंटाळा येणें हें स्वाभाविकहि आहे; कां कीं अनोळखी मनुष्याची तजबीर पहाण्यापासून जसा विशेष आनंद होत नाहीं, त्याप्रमाणेंच ज्या पुस्तकाची आपणांस मुळींच माहिती नाहीं त्याच्या अत्यंत यथार्थ परीक्षणापासूनहि काय चित्तरंजन होणार? मग मूळ ग्रंथपरीक्षणाची जर ही गोष्ट, तर त्या परीक्षणाचें परीक्षण कितीसें वाचकांस पसंत पडेल हें सांगावयासच नको! त्यांतून सदरील पत्राचा विषय ह्मटला ह्मणजे परम रुक्ष जें व्याकरण त्याच्या संबंधाचा होय; आणि त्यांतहि 'चंद्रिका'कारांची[1] लिहिण्याची पद्धति जुन्या शास्त्रीय तऱ्हेची! तेव्हां अशा प्रकारचें पत्र साऱ्या अंकभर पाहून आमच्या वाचकांस कितपत संतोष झाला असता हें सांगण्याची जरूर नाहीं. तर आमचा नेहमींचा शिरस्ता मोडून पत्र माघारीं पाठविण्याचें हें पहिलें मोठें कारण होय.

दुसरें कारण असें कीं, सदरील पत्रांत मुद्द्याचा मजकूर थोडा असून पाल्हाळ व वितंडवाद भारी आहे. मूळ उपक्रम जो केला आहे तोच अगोदर मोठा मौजेचा

१. वादविषयक पत्राच्या खालीं जरी 'अच्युत अनंत चिपळोणकर' अशी सही आहे तरी हें पत्र कोणीं लिहिलें असावें याविषयीं बहुधा कोणीहि भ्रमांत पडणार नाहीं. 'चंद्रिकाकारांचा हेतु असा आहे कीं,—'चंद्रिकाकारांचा मनोरथ असा आहे, 'चंद्रिकाकर्त्याचें हार्द मर्म आहे तें असें' इत्यादि उल्लेखांवरून स्पष्ट दिसत आहे कीं, सदरील पत्राचे लिहिणारे ग्रंथकारच होत. यास्तव आह्मीं आपलें उत्तर नामधारी पत्राकारास न लिहितां मुख्य ग्रंथकारासच उद्देशून लिहिलें आहे.

आहे. झालें काय, कीं प्रस्तुत पत्रकार हे 'अपभ्रष्टशब्दचंद्रिके'चा प्रकाश व 'निबंधमाले'च्या ५१ व्या 'अंकरत्ना'चा प्रकाश यांचें तारतम्य पहात असतां त्यांचा एकाएकीं डोळा लागला; डोळा लागतांच स्वप्नसृष्टीस आरंभ झाला ! या स्वप्नांत त्यांनीं काय पाहिलें व काय ऐकलें म्हणाल, तर 'एक अतिप्राचीन तरुण शास्त्रपंडित व एक अति अर्वाचीन प्रौढवक्ता या दोघांचा लीलाविवाद उद्भवला आहे' व हा लीलाविवाद आपण 'उदासीन व तटस्थ' होत्साते ऐकत आहों, असें त्यांस दिसलें. बरें, या गमतीच्या विवादाचा विषय काय होता म्हणाल तर 'चंद्रिका' व 'अंकरत्न' ! पुढें काय झालें कीं, आमचे पत्रकार वरील दोघां महापंडितांची भवतिनभवति ऐकण्यांत जों अगदीं चूर होऊन गेले आहेत तों एकाएकीं ते 'नित्यव्यवसायाच्या चटक्यानें' जागे झाले. जागे होतांच त्यांची दृष्टि कलमदानाकडे जाऊन त्यांच्या मनांत कल्पना आली कीं आपले उपनामधारी निबंधमालाकर्ते यांजकडे हें आपलें स्वप्न उकलण्याकरितां पाठवावें. मग या स्वप्नसृष्टींत झालेल्या वादाचें दिक्प्रदर्शन करून एक लांबलचक पत्र त्यांनीं आमच्याकडे रवाना केलें. पुढें कोणती व्यवस्था झाली हें वर सांगितलेंच आहे.

आतां आमच्या पुस्तकाच्या ५१व्या अंकांत 'चंद्रिके'वर जी आह्मीं टीका केली होती तिचें निराकरण करण्याची जर प्रस्तुत ग्रंथकारास इच्छा होती तर वरील एवढ्या द्राविडी प्राणायामाची काय जरूर होती हें आह्मांस कळत नाहीं. आपले काय प्रत्याक्षेप असतील ते आपल्या सहीनिशीं जर त्यानें आमच्याकडे पाठविले असते तर ते प्रस्तुत स्वप्नवादापेक्षां आह्मांस कमी ग्राह्य झाले असते असें नाहीं. 'चंद्रिका' हें पुस्तक जर स्वप्नसृष्टींत लिहिलेलें नाहीं, व त्यावर आह्मीं जो अभिप्राय प्रगट केला तोहि जर जागृतावस्थेतच लिहिला, तर मग आमच्या आडनांवाचा एक परम मित्र उभा करून त्याला स्वप्न पाडून त्यांत आपण शिरून व आह्मांला शिरवून वादप्रसंग उपस्थित करावयाचा, आणि मग त्याचा सारांश आह्मांस पत्ररूपानें कळवायाचा, एवढा खटाटोप कशाकरतां बरें केला ? जागृतींतल्या लेखाचें विवेचन जागृतींतच होण्यास कोणती आडकाठी होती ? पण प्रस्तुत ग्रंथकर्त्याचा कदाचित् असा मतलब असावा कीं, आपण साक्षातच जर वादाची गांठ घातली, तर केवळ स्वाभिमानानें आपला पक्ष सिद्ध केल्याचा आपणावर आरोप येईल, तर आपण केवळ 'उदासीन व तटस्थ' रहावें, आणि 'या अति अर्वाचीन प्रौढवक्त्या'शीं भांडण्यास आपला मित्र पुढें करावा ! ही 'चंद्रिका'कारांची युक्ति मोठी चातुर्याची आहे खरी; पण तींत एवढेंच वाईट आहे कीं, सदरील पत्रांत मधें मधें अनेक ठिकाणीं 'खंडाळ्याचा घाट', 'काजळाची तिटली' वगैरे जे अप्रस्तुत व अप्रयोजक उल्लेख आले आहेत त्यांवरून आमच्या 'अतिप्राचीन तरुण शास्त्रपंडिता'च्या 'औदासीन्या'ची तादृश प्रतीति होत नाहीं !

असो; तिसरें कारण प्रस्तुत पत्रांत जो असभ्यतेचा प्रकार आढळतो तो होय. 'चंद्रिका'कारांस अर्वाचीन विद्येचा जर संस्कार असता, व वादविवादाची खरी पद्धत माहीत असती, तर प्रतिपक्ष्याचें खंडन कसें करावें, व उदासीनपणाचें घेतलेलें पांघरूण शेवटपर्यंत कसें राखावें हें त्यांस समजलें असतें. त्यांस आह्मीं 'सत्ययुगांत झुगारून दिलें' आहे तें पसंत नाहीं; पण त्यांच्या वादरीतीवरून पहातां त्यांजवर वरील युगाचींच झांक बहुधा दृष्टीस पडते. आह्मी आपल्या प्रतिपक्ष्यांचेहि अभिप्राय पुस्तकांत घेत असतों एवढें समजल्यावरून कोणत्याहि तऱ्हेचा मजकूर आमच्याकडे खपला जाईल अशी प्रस्तुत ग्रंथकाराची समजूत झाली. आपलें लिहिणें युक्तीस कितपत अनुसरून आहे, व दुसऱ्याच्या घरीं आपण जाऊन वाद करणार तर तेथेंहि शिष्टाचारांची उपेक्षा आपणास करतां कामा नये, या गोष्टी आमच्या 'अतिप्राचीन पंडिता'च्या मुळींच लक्षांत आल्या नाहींत. आपण जर एखादें पुस्तक प्रसिद्ध केलें तर त्यावर हवा तसा अभिप्राय प्रगट केल्यानें कोणी गुन्हेगार होत नाहीं. आणि त्यांतून टीकाकारानें जर प्रांजलपणें आपले गुणदोष दाखविले आहेत तर त्याबद्दल क्रोधास चढून त्या क्रोधावेशांत आपण आहों कोठें व बोलतों आहों काय याचें भान विसरून जाऊन दुसऱ्याच्या घरांत अविनीतत्व प्रगट करणें ही शिष्टजनरीति नव्हे एवढेंहि पंडितमजकुरांस कळलें नाहीं. असो; तर येथें त्यांस व इतःपर ज्या कोणांस असा प्रसंग येईल त्यांस कळण्याकरितां अशी सूचना करून ठेवतों कीं, आपले अभिप्राय आह्मांस कळविण्याची आह्मीं सर्वांस मोकळीक दिलेली आहे, व कोणाचे कसेहि अभिप्राय असले तरी ते प्रसिद्ध करण्यांत व वाटल्यास आमचा अभिप्राय पुनः प्रगट करण्यांत आमच्याकडून कधीं अनमान होणार नाहीं; पण या मोकळिकीमध्यें दोन अटी आहेत हें पक्कें समजलें पाहिजे. एक अट ही कीं, मजकूर छापण्यालायक असला पाहिजे, ह्मणजे त्यांत चार चौघांस पसंत पडेल असें सयुक्तिक प्रतिपादन असलें पाहिजे—मग पक्ष कोणताहि असला तरी फिकीर नाहीं. आणि दुसरें असें कीं, ज्या अर्थीं आमच्या परवान्यानें शत्रूकडचा वकील आमच्या गोटांत येणार त्या अर्थीं आपला व आमचा बोज ठेवण्याकडेहि त्यानें लक्ष पुरविलें पाहिजे. अविनीतत्व हें दुसऱ्याच्या उपमर्दास जसें कारण होतें तसेंच आपल्या प्रतिष्ठेसहि उणेपणा आणतें हें वरील वावदूकानें विसरतां कामा नये!

तर वादविषयक पत्र आमच्याकडे आलें असतां त्याचा आह्मांकडून अव्हेर कां झाला याचीं वर दाखविल्याप्रमाणें कारणें होत. आतां या पत्रांतील कोटिक्रमाविषयीं विचार करूं.

३. 'अपभ्रष्टचंद्रिके'वर आमचा पहिला मोठा आक्षेप हा होता कीं, प्रस्तुत पुस्तकास जर कोश हें नांव दिलें आहे तर कोशाचा पहिला गुण जो व्यापकता तो

यांत पाहिजे होता. या आक्षेपावर 'चंद्रिका'काराचें ह्मणणें काय आहे, कीं आमचा कोश जर तुह्मी अपूर्ण ह्मणतां तर मग भट्टोजी दीक्षितांची 'सिद्धांतकौमुदी', अमरसिंहाचा 'अमरकोश', हेहि ग्रंथ अपूर्ण असें तुह्मांस ह्मणावें लागेल. शिवाय कोश ह्मटला ह्मणजे त्यांत ज्या वस्तूंचा समावेश असेल त्यांची 'त्वरित उपस्थिति' व्हावी इतक्या प्रकारची त्यांत 'व्यवस्था मात्र अपेक्षित असते.' 'संकलित वस्तूंचा आधार' एवढाच 'कोश' शब्दाचा शास्त्रोक्त अर्थ; तेव्हां या पाणिनीय अर्थाप्रमाणें पहातां आमच्या पुस्तकास 'कोश' हें नांव यथार्थच आहे. आणि त्यांतून 'अपभ्रष्ट शब्दांचा व्यापक असा ग्रंथ तर होणेंच नाहीं.' कारण प्रत्येक संस्कृत शब्दाचे अनेक अपभ्रंश आहेत; 'इंद्रादयोऽपि यस्यांतं न ययुः शब्दवारिधेः (शब्दसमुद्राचा इंद्रादिकांसहि पार लागला नाहीं !); खेरीज 'आकाशाचा वामनाप्रमाणें अंत सांपडेल तरच पक्ष्यानें उडावें, अथवा समुद्राचें गांभीर्य मंदराचलाप्रमाणें समजेल तरच मनुष्यानें पाण्यांत पोहावें' असाहि कांहीं अर्थ नाहीं ! 'चंद्रिका'कर्त्यांनीं आपल्या पुस्तकाच्या तर्फेनें हा जो आह्मांवर कोट्यांचा भडिमार केला आहे तो पाहून आह्मांस परम विस्मय होतो ! या कोट्या स्वप्नांतर्गत 'लीलाविवादां'तील आहेत ह्मणून ठीक आहे; नाहीं तर त्यांची उपपत्ति करणेंहि आह्मांस दुर्घट झालें असतें. मनुष्याच्या मनांत एकीकडून कोपानें प्रवेश केला कीं दुसरीकडून विवेचनशक्तीची निष्क्रांति होते, शब्दशास्त्राचा आणि तर्कशास्त्राचा नैसर्गिक विरोध असावा, सत्ययुगांत 'जुक्ती'चें तेज फार मंद होतें, किंवा शब्दांच्या अपभ्रंशांत सतत व्यापृत झालेल्या बुद्धीवरहि भ्रंशनाचा कांहीं संस्कार घडत असेल,—अशी कांहीं नवी उपपत्ति करणें आह्मांस एरवीं भाग पडलें असतें ! 'कौमुदी'कार भट्टोजी कोणीकडे आणि विजयी ब्राह्मणांच्या तडाक्यांतून परमोत्कृष्टत्वास्तव वांचलेला अन्वर्थनामा 'अमरकोश'हि कोणीकडे ! या दोन बड्या प्रकरणांस 'चंद्रिका'कारांनीं आपल्या तर्फे साक्षी देण्याची विनाकारण तसदी दिली या गोष्टीचा आह्मांस फार खेद वाटतो. वरील दोन ग्रंथांची आह्मांस थोडी बहुत माहिती आहे, तिजवरून पहातां त्यांचें सादृश्य प्रस्तुत अपभ्रंशकोशास विशेष उपयोगी पडेल असें आह्मांस वाटत नाहीं. 'कौमुदी'त विद्यार्थ्यांच्या निर्वाहापुरतें व्याकरण आहे; व 'अमरां'तहि तोच प्रकार आहे, ह्मणजे सामान्य काव्यादि ग्रंथांत येणाऱ्या शब्दांचें त्यांत संकलन आहे. प्रस्तुत ग्रंथकारानेंहि प्रस्तावनेंत ह्मटलें आहे कीं, 'मुलांस शिकवितांना शिक्षक लोकांस अपभ्रष्ट शब्दांची व्युत्पत्ति सांगण्यास अडचण पडूं नये ह्मणून हें अल्प किंमतीचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे.' आतां वरील दोन चिरप्रसिद्ध संस्कृत ग्रंथांचें सादृश्य शोभण्यास व प्रस्तावनागत प्रतिज्ञेची परिपूर्ति होण्यास सदरील अपभ्रंशकोश कशा तऱ्हेचा पाहिजे होता याचा अंमळ विचार केला असतां आमच्या आक्षेपाची यथार्थता कोणाच्याहि लक्षांत येईल. भट्टोजींनीं 'मनोरमा', 'कौस्तुभ' वगैरे ग्रंथांत व्याकरण विषयावर अधिक उप-

पादन केलें आहें खरें; पण तें नसल्यानें 'कौमुदी'स अपूर्णत्व येतें असें नाहीं. वरील उपपादन केवळ पंडितगम्य असल्यामुळें विद्यार्थ्यांकरितां रचलेली जी 'कौमुदी' तींत त्याचा त्यांनीं समावेश न करतां स्वतंत्र ग्रंथांच्या रूपानेंच तें प्रगट केलें हें ठीक आहे. जोंपर्यंत मूळ संकल्पाप्रमाणें दीक्षितांच्या कृतीनें विद्यार्थ्यांच्या व्याकरणसंबंधी अडचणी सर्व दूर होताहेत, व तिजवरून ज्याची उपपत्ति होत नाहीं असें संस्कृत भाषेतील एकहि रूप रहात नाहीं तोंपर्यंत 'कौमुदी'चें पूर्णत्व पौर्णिमेच्या गरगरीत चंद्राप्रमाणें अर्थात् सिद्धच आहे. आणि असें आहे ह्मणूनच दीक्षितांच्या पांडित्ययशाची मूर्तिच होऊन बसलेली जी 'कौमुदी' तिच्या देदीप्यमान तेजापुढें पूर्वीचीं अल्पतेजें प्रत्याख्यात होत्सातीं निष्प्रभ होऊन गेलीं. आज दोन तीनशें वर्षें सहस्रावधि चकोर तिचें पान करून तृप्त झाले, आणि गीर्वाण भाषेचा दुर्गम व गहन प्रदेश तिजमुळें प्रकाशित होत्साता सर्वांस सुगम झाला! मग असल्या जड पारख्याबरोबरहि आमचा वटपत्रनिवासी कोशकार टक्कर मारणार काय? कोण जाणे बोवा! बाणभट्टाचें श्लेषचातुर्य लढवून आमच्या अंकाची व आपल्या चंद्रिकेची जशी त्यांनीं 'दोषाकरप्रकाश'त्वधर्मेकरून सांगड घालून दिली,[1] त्याप्रमाणेंच 'कौमुदी' व 'चंद्रिका', 'दीक्षित' व 'पंडित' या नामचतुष्टयाच्या लटपटीत पायावर वरील टोलेजंग इमारतहि त्यांनीं कशावरून उठवून दिली नसेल? असो; तर प्रस्तुत पत्रकाराचा पहिला जो मुद्दा, कीं 'कौमुदी' अपूर्ण आहे तशीच 'चंद्रिका'हि अपूर्ण आहे, हा बरोबर नाही; कां कीं, पहिल्या ग्रंथानें संस्कृत विद्यार्थ्यास व्यवहारापुरतें व्याकरणाचें पूर्ण ज्ञान होतें यास्तव त्यास अपूर्ण ह्मणतां येत नाहीं; आणि 'चंद्रिके'च्या पक्षीं पहातां तिच्या प्रस्तावनेंत केलेला संकल्पहि तिच्या योगानें सिद्ध होत नाहीं यास्तव ती अपूर्णच होय. 'मुलांस शिकवतांना शिक्षक लोकांस अपभ्रष्ट शब्दांची व्युत्पत्ति सांगण्यास अडचण पडूं नये' ही जर ग्रंथकाराची प्रतिज्ञा होय, तर अर्थात् मराठी ग्रंथांतून सामान्यतः आढळणाऱ्या सर्व संस्कृत, फारशी, व आरबी अपभ्रंशांचा यांत समावेश होणें अवश्य होतें; पण तसें यांत आढळत नाहीं. ग्रंथकारास जे शब्द वाटले व जेवढे त्यास एकदां आढळले तेवढ्यांचाच संग्रह करून त्यानें तो लोकांस अर्पण केला आहे. व्यापकतेचा विचार फारकरून त्यांच्या मनांतहि आला नसावा. आतां हें खरें आहे कीं, वरील प्रति-

---

१. 'दोषाकरप्रकाश' या शब्दाचे दोन अर्थ ध्यावयाचे; एक 'दोषाकर' ह्मणजे 'चंद्र' त्याचा प्रकाश; आणि दुसरा अर्थ, 'दोषाच्या आकाराचा प्रकाश ह्मणजे दोषराशींचें प्रकटीकरण.' हे अर्थ अनुक्रमेंकरून 'चंद्रिका' व 'निबंधमाला अंक ५१ यांस लाग करायाचे. आमच्या प्रतिपक्ष्यानें 'चंद्रिके'चें व अंकाचें साहचर्य घालून देण्यास एवढा श्लेष जुळविण्याची कशाकरितां खटपट केली हें समजत नाहीं. त्यांची 'निरंतर संगति' तर विधात्यानें निर्मिलेली आहे!

ह्येच्या शेवटीं 'अल्प किंमतीचें हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे' असे शब्द आहेत; व या शब्दांवरून 'चंद्रिके'च्या कर्त्यास अव्यापकतेच्या दोषांतून मुक्त होण्यास पुष्कळ जागा आहे. पण सदरील पत्रांत त्यांनीं "संश्लेषार्थक 'कुश्' धातूपासून अधिकरणशक्ति-प्रधान 'घञ्' प्रत्ययानें 'कोश' शब्द निष्पन्न झाला आहे" वगैरे जें पांडित्य केलें आहे तें त्यांस बद्धक होऊं पहातें. त्याप्रमाणेंच 'इंद्रादयोऽपि यस्यांतं न ययुः शब्दवारिधेः', 'अनंतपारं किल शब्दशास्त्रम्', 'आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं' इत्यादि वचनांचा आश्रय करून त्याखालीं दडण्याचा जो त्यांनीं असमंजसपणाचा यत्न केला आहे त्याच्या योगानेंहि वरील सबबीस थारा रहात नाहीं !

४. तर याप्रमाणें प्रस्तुत अपभ्रंशकोशावर अव्याप्तीचा जो आह्मीं पहिला आक्षेप केला होता त्याच्या संबंधानें विचार झाला. आतां दुसरा आक्षेप अतिव्याप्तीचा;—ह्मणजे अशा तऱ्हेच्या पुस्तकांत जितका मजकूर असायास पाहिजे तितक्याहून यांत अधिक घुसडून दिला आहे, हा यावर दुसरा दोष होय. 'अपभ्रष्टशब्दचंद्रिकें'त अठरा कारखाने, अठरा धान्यें, अठरा पुराणें, नऊ रत्नें, चौदा विद्या, चौसष्ट कला, इत्यादिकांच्या यादी आह्मीं जेव्हां पाहिल्या तेव्हां आह्मांस आश्चर्य वाटलें, व मोलस्वर्थचा कोश चाळतांना त्या ग्रंथकारास आढळल्यावरून त्यानें आपल्या कोशांत त्या उतरून घेतल्या असाव्या असा आमचा सहजच तर्क झाला. पण हा तर्क खोटा असें आतां आह्मांस कळतें. एकूण या यादींची खरी हकीकत अशी, कीं 'स्फुट श्लोक, दोहरे, संस्कृत कोश, वात्स्यायनसूत्र,' इत्यादि ग्रंथांतून त्या आमच्या कोशकारांनीं घेऊन आपल्या अल्पवयस्क वाचकांस सादर केल्या. असें असेल तर तरुण विद्यार्थ्यांनीं प्रस्तुत ग्रंथकारांचे फारच आभार मानिले पाहिजेत. कां कीं, मोलस्वर्थच्या कोशांतून अपभ्रंशांची याद मिळवीत असतां वरील यादी जर त्यांनीं आयत्या घेतल्या असत्या तर त्यांत इतकें विशेष नव्हतें; पण ज्यापेक्षां त्यांनीं हातचें काम अर्धेंच टाकून वरील वात्स्यायनसूत्रादि ग्रंथ चाळण्याची तसदी घेतली, त्या अर्थीं या श्रमांबद्दल तर त्यांची विशेषच प्रशंसा केली पाहिजे. रा० पंडित यांच्या इतकें आमचें संस्कृत ग्रंथांत अवलोकन नसल्यामुळें वरील यादी आह्मांस माहीत नव्हत्या, व त्या मिळवण्यास मोलस्वर्थ यास बरीच खटपट पडली असावी असें आह्मांस वाटलें, हें आह्मी कबूल करतों; पण या भ्रमास कारण वरील कोशांतील उल्लेख होय.[1] असो; पण सदरील यादींच्या

---

१. 'चौसष्ट कला' या शब्दाच्या शेवटीं वरील कोशांत पुढील उल्लेख आढळतो —

"Other, and in some articles, very diverse enumerations are made of the sixty-four Arts; and of the articles given above there are different arrangements, and of some widely different

(पुढें चालू).

संबंधानें जो आह्मीं आक्षेप काढला होता तो तसाच राहिला आहे. तो अर्थात् हाच कीं, त्या प्रस्तुत ग्रंथांत शोभत नाहींत. आमच्या पत्रकारानें या यादींच्या तर्फेनें असा पुरावा आणला आहे कीं, 'वस्त्र' शब्दाचा मुख्यार्थ जरी 'आच्छादनाचें साधन' इतकाच आहे तरी 'त्यास चांगले रेशमी किंवा जरीचे कांठ लावूं नये' असें नाहीं ! हें समाधान आह्मांस अंमळसें विलक्षण वाटतें. यावरून आमच्या पत्रकाराची 'चंद्रिका'-कारांचे ठायीं किती निष्ठा आहे, किंवा 'चंद्रिकाकारां'स आपल्या कृतीच्या निर्दोषत्वाविषयीं किती पूर्ण विश्वास आहे, एवढें मात्र स्पष्ट दिसून येतें; कां कीं एरवीं असली जाडी कोटी कोणी पुढें आणील असें आह्मांस वाटत नाहीं ! या कोटीवरून आह्मांस येथील भिक्षागृहाची आठवण होते. हें जो पहावयास जातो त्यास नदीकांठची हवा, बगीचा, फुलझाडांचीं चक्रें, फिरण्याकरतां बांधलेल्या शानदार दगडी वाटा, वगैरे प्रकार पाहून मोठें समाधान वाटतें व ज्या उदार यहुदी गृहस्थानें आंधळ्यापांगळ्यांच्या सोयीकरतां एवढा खर्च केला त्याची मोठी धन्य वाटते; पण या नंदनवनाच्या भोक्त्यांकडे जों जावें तों कोणी आपल्या कोठडींत कुडकुडत पडले आहेत, कोणाचीं अन्नाविणें खपाटें वळलीं आहेत, कोणी औषध मिळत नाहीं ह्मणून हाका मारताहेत, असा प्रकार नजरेस येतो. त्यावरून कोणाहि समंजस मनुष्यास सहजच वाटणार आहे कीं, आंधळ्याला बगीचा काय होय ? लंगड्याला मोठे संगमरवरी रस्ते बागेंतून केले असले ह्मणून काय करायाचे आहेत ? वस्तुतः पाहिलें तर वरील प्रकार ह्मणजे त्या विपन्न लोकांची थट्टाच केल्यासारखी नव्हे काय ? तर हेंच सादृश्य इकडे प्रस्तुत कोशाकडे घेऊन विचार केला असतां कोणासहि सहज कळेल कीं, 'चंद्रिका'कार रेशमाच्या व जरीच्या कांठांच्या भानगडींत जे पडले तें नीट नव्हे. पोरांस थंडीवाऱ्याच्या निवाऱ्याकरतां जर आंगडें टोपडें करायाचें, तर तें लांडें झालें तरी फिकीर नाहीं, पण त्यास कलाबतूचे कसे व गोंडे लावा असें कोणीं ह्मटल्यास तें शोभेल काय ? आमच्या पत्रकारानें दुसरे ठिकाणीं सदरील यादींविषयीं आणखी असें लिहिलें आहे कीं, "ज्या मुलांस इंग्रजी भाषा समजत नाहीं किंवा मोलस्वर्थांचा कोश घेण्यास सामर्थ्य नाहीं त्यांस त्या कळाव्या" ह्मणून त्या टीकाविषयक पुस्तकांत घातल्या. हें समाधानहि वरच्याच्या तोडीचेंच आहे. मुलांच्या कर्मणुकीकरितां किंवा माहितीकरितां वरील भर जर सदरील पुस्तकांत घातली, तर यासारख्याच किंवा याहूनहि चांगल्या अशा दुसऱ्या शेंकडों गोष्टीहि घालतां आल्या नसत्या काय ? मग त्याहि यांत सामील करायाच्या होत्या. ग्रंथकाराची इच्छा हेंच जर ग्रंथविस्ताराचें

explanations. The Hindus are fast forgetting their ancestral classifications and settlements, and will be well content to accept the carefully compiled catalogue now presented."

प्रमाण, तर मग मर्यादा तरी कोणती मानावी ?

५. प्रकृत पुस्तकावर आमचा तिसरा आक्षेप असा होता कीं, त्यांतील पुष्कळ शब्द अत्यंत मूढ विद्यार्थ्यांच्याहि लक्षांत येण्यासारखे आहेत. यावर प्रस्तुत पत्रांत येणेंप्रमाणें पांडित्य केलेलें आढळतें–"मूढ ह्मणजे विवेकशून्य, त्यास आणखी अत्यंत असें विशेषण दिलें ह्मणजे व्युत्पत्तिमर्यादेनें ज्ञानाविषयीं अगदीं अंधळा असा अर्थ होतो. असा जो मनुष्य आहे तो विद्यार्थी ह्मणवत नाहीं. कदाचित् मालाकारांनीं ह्मटला तरी ज्ञानाविषयीं अगदीं अंधळ्यास डोंगराएवढ्या ढोबळ शब्दाचेंहि ज्ञान कोठून असणार ? इ० इ०." 'चंद्रिका'कारांची वाद करण्याची जी जुनी पद्धत आहे तिचें स्वरूप वरील पांडित्यप्रकारावरून वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. 'अत्यंत मूढ विद्यार्थी' या तीन शब्दांची किती चोख मीमांसा वर केली आहे पहा ! सुमारें दहा वर्षांपूर्वी या शहरीं जो मोठा पंडितसमाज मिळाला होता त्यांत जसा एका सर्वप्रसिद्ध स्मृतिवचनांतल्या 'पति' शब्दाचा कीस निघत होता व एका स्वकपोलकल्पित अवग्रहावर शब्दविग्रह चालत होता, त्यासारखीच आमच्या वटपद्रनिवासी प्रतिपक्ष्याची वरील शब्दत्रयावर उडविलेली छान होय ! साखरेची साल काढण्याचा हा प्रकार पाहून कदाचित् जुन्या पंडितमंडळीस संतोष होण्याचा संभव आहे, पण ज्या अर्थीं सदरील पत्र 'चंद्रिका'कर्त्यांनीं आमच्या पुस्तकाच्या वाचकांकरितां लिहिलें त्या अर्थीं त्यांचा वरील खटाटोप या अर्वाचीन मंडळीच्या संबंधानें पहातां व्यर्थच होय असें ह्मटलें पाहिजे. सदरील ग्रंथकारानें वरील शब्दत्रयाच्या विवेचनाच्या अंतीं आह्मांस एक सर्टिफिकिटहि दिलें आहे कीं, 'निबंधमालेमध्यें विशेषणें मात्र योजलेलीं असतात, परंतु त्यांचें सर्वांशीं अर्थस्वारस्य पाहिलेलें नसतें !'. खरें आहे, 'अत्यंत मूढ विद्यार्थी' हे शब्द कागदावर नमूद करतांना त्या बिचाऱ्यांवर बडोदें मुक्कामीं एवढा 'अवच्छेदकावच्छिन्ना'चा प्रयोग होईल हें आमच्या स्वप्नींहि आलें नव्हतें. आमचे प्रतिपक्षी जसे शब्दशास्त्रांत परम प्रावीण्य पावून "संश्लेषार्थक 'कृञ्' धातूपासून अधिकरणशक्तिप्रधान 'घञ्' प्रत्ययानें 'कोश' शब्द निष्पन्न झाला आहे" इत्यादि प्रकारें प्रत्येक शब्द पाणिनिनिर्मित तुलेंत तोलून मग त्यांचा शास्त्रोक्त रीतीनें प्रयोग करतात, तसें करण्याची आह्मांस सोयहि नाहीं, व अवश्यकताहि वाटत नाहीं. आमची लिहिण्याची पद्धति इतक्या तऱ्हेची असली ह्मणजे बस्स आहे, कीं तिच्या योगानें आमचा अर्थ आमच्या वाचकांच्या ध्यानांत चांगल्या रीतीनें उतरेल. मग आमचे प्रयोग क्यांडीसाहेबांच्या शिस्तीबरहुकूम नसले किंवा बडोदें कालेजांतील सूक्ष्मदर्शक यंत्रांत ते ओबडधोबड दिसले तरी आह्मी विशेष पर्वा करीत नाहीं.[1]

१. 'खिस्ती दीक्षित' हे शब्द 'वंध्यापुत्र', 'पंढवीर' यांसारखे केवळ अनर्थक होत असें

(पुढें चालू).

'अत्यंत मूढ विद्यार्थी' या तीन शब्दांनीं आह्मांस जो अर्थ वाच्य होता त्याचा आमच्या वाचकांस चांगला बोध झाला असेल याविषयीं आह्मांस बिलकूल संशय वाटत नाहीं. 'अत्यंत मूढ विद्यार्थी' ह्मणजे 'बुद्धीनें अगदीं जड असणारा मुलगा' अशासहि 'साप' 'विख' 'दुकाळ', 'मोर', 'औक्ष', 'ऐतवार' इत्यादि शब्दांची व्युत्पत्ति समजण्यास 'चंद्रिके'कडे जावें लागेल असें आह्मांस वाटत नाहीं. 'सर्प', 'विष' इत्यादि संस्कृत शब्द सर्वांच्या कानावरून जाणारे असल्यामुळें ज्यास अपभ्रंश ह्मणजे काय हें माहीत असेल त्यास त्यांची व्युत्पत्ति करण्याची कधींहि पंचाईत पडणार नाहीं.

वरील आक्षेपासारखेंच हेंहि दूषण आह्मीं प्रस्तुत पुस्तकावर दिलें होतें कीं, 'चार' (चत्वार), 'आठ' (अष्ट) इत्यादि संख्यावाचक विशेषणांची एकदां व्युत्पत्ति दिली ह्मणजे मग सगळ्या पाढ्याची पृथक् पृथक् व्युत्पत्ति देण्याची गरज नाहीं. यावर प्रस्तुत पत्रांत समाधान आलें आहे तें इतकेंच आहे कीं, नियम सांगून त्यांचीं उदाहरणें सांगणें तीं अध्यापकानें हवीं तितकीं सांगावीं, त्यांची मर्यादा 'विवक्षु-सापेक्ष होय.' हें समाधान प्रस्तुत पुस्तक जर कोशरूप नसून व्याकरणरूप असतें तर ठीक झालें असतें; ह्मणजे व्याकरणांत जशीं नियमापुढें अनेक उदाहरणें दिलीं असतात तशीं यांत असून तीं विद्यार्थ्यांस शिकण्यास उपयोगीं पडतीं. पण प्रस्तुत पुस्तक कोशासारखें वरचेवर पहाण्याकरतां केलेलें आहे; व यांत सगळे अपभ्रंश दिले आहेत अशीहि कोशकाराची प्रतिज्ञा नाहीं, यास्तव 'चोवीस', 'चवतीस'; 'अठावीस' 'अडतीस' वगैरे साऱ्या संख्यावाचकांचीं मूळ रूपें दिल्यानें विशेष उपयोग घडला नसून इतर अपभ्रंशांस मिळण्यासारखी जागा मात्र त्यांनीं अडविली असें ह्मणणें भाग आहे.

६. आमचा चवथा आक्षेप असा होता कीं, प्रस्तुत पुस्तकांत जेथें विस्तार करायाला पाहिजे होता तेथें तर तो मुळींच केला नाहीं. 'चंद्रिकें'त कांहीं शब्दांचें व्याख्यान येणेंप्रमाणें आढळतें–"घटाटोपो भयंकरः–घटाटोपो भयंकरः" "यः पलाय स जीवति–यः पलायते स जीवति (जो पळेल तो जगेल)" इ० इ० हीं व्याख्यानें कोतीं आहेत हें आमच्या ग्रंथकारास स्वाभिमानास्तव किंवा त्याच्या पक्षकारास मित्रनिष्ठेस्तव न वाटेल तर न वाटो, पण एरवीं कोणाहि तिऱ्हाईत मनुष्यास सहज दिसण्यासारखें आहे कीं, "खटाटोपो भयंकरः" याचें व्याख्यान "घटाटोपो भयंकरः" असें केल्यानें शिक्षकांस किंवा विद्यार्थ्यांस काय बोध होईल न कळे! निदान पक्षीं प्रस्तुत पत्रांत वरील

आमच्या आक्षेपकांचें ह्मणणें आहे. सदर्हू 'पंडितां'स जर अर्वाचीन पद्धति माहीत असती किंवा क्रोधवन्हीच्या धूमपटलानें त्यांची दृष्टि जर व्याप्त न होती, तर त्यांस कळलें असतें कीं वरील शब्द अवतरणचिन्हांतर्गत होत, यास्तव ते निबंधकर्त्याचे नसून दुसऱ्या कोणाचे घेतलेले आहेत. ख्रिस्ती धर्मांतील बाप्तिस्मा विधीस ते लोक 'दीक्षा' ह्मणत असतात. व वरील विधि ज्याचा झाला त्यास 'दीक्षित' ह्मणतात!

शब्दांवर जेवढें व्याख्यान केलें आहे तेवढें तरी मूळ ग्रंथांत असायाला पाहिजे होतें. पण तें कांहीं नाहीं. सदरील पत्राच्या झोंकावरून 'चंद्रिकाकारां'चा असा मानस दिसतो कीं, आह्मीं आपल्या कोशांत जें जें केलें आहे तें तें सर्व पूर्ण विचार करूनच केलें आहे, त्यांत उणें अधिक करण्याचा किंवा सुचविण्याचा कोणासहि अधिकार नाहीं. पाणिनीय कृतीस जसें अर्धमात्रेचें लाघवहि दुःसह, त्याप्रमाणेंच आमच्या अर्वाचीन भट्टोजीस व अमरसिंहासहि कोणत्याहि तऱ्हेचें दूषण बिलकूल खपणार नाहीं. त्यांतून आमचें 'पहाणें' तर मुळीं 'गोष्पद–प्रमाणांतच.' यास्तव प्रस्तुत महापंडितानें सुचविल्याप्रमाणें जांवई-शोधाची गोष्ट पक्की ध्यानांत ठेवणें व 'मौनमपंडितानाम्' या वचनावर दृष्टि देऊन लेखणी चालविणें हेंच आह्मांस उचित होय !

प्रस्तुत पत्रांतील मुख्य मुख्य मुद्द्यांविषयीं वर विचार झाला. आतां याखेरीज अनेक शब्दांच्या व्युत्पत्तीविषयीं जी आमच्या प्रतिपक्ष्यानें चर्चा केली आहे तिजविषयीं येथें विशेष विचार करणें नलगे. आह्मीं जितक्या शब्दांविषयीं आक्षेप काढले होते त्यांपैकीं कांहींविषयीं प्रस्तुत पत्रकारानें मुळींच नांव काढलें नाहीं; कांहीं चुका ह्मणून कबूल केल्या आहेत, पण त्या चुका ह्मणून आह्मांस न कळल्याबद्दल आमच्या पदरांत चूक घातली आहे; कांहीं व्युत्पत्तींचें अशा चमत्कारिक रीतीनें समर्थन केलें आहे कीं ज्या-पासून लिहिणाराखेरीज इतरा कोणाचेंहि समाधान होईलसें वाटत नाहीं; आणि कांहीं व्युत्पत्तींचे आधार सप्रमाण दाखविले आहेत. याशिवाय पत्राचा बाकींचा भाग 'चंद्रिके'-सारख्या महाग्रंथावर लेखणी उचलल्याचें धाष्टर्य आमच्या हातून झाल्याबद्दल आह्मांवर प्रहार करण्यांत, व 'हो ! हो !! हो !!! झालें समाधान' वगैरे सत्ययुगी महापंडि-तांस ताटश न शोभणारा विनोदप्रकार करण्यांत गेला आहे.

७. 'अपभ्रष्टशब्दचंद्रिके'वर जी आह्मीं टीका केली होती तिजवरील प्रतिटीके-वर आमचे विचार वर प्रगट झाले तेवढे बस झाले. आतां प्रस्तुत विषयाच्या संबंधानें पुनः थोडेंसें लिहून हें प्रकरण आटपतों. मराठींत इतर अनेक ग्रंथांची जशी उणीव आहे तशीच अपभ्रंशकोशाचीहि आहे. मोलस्वर्थच्या कोशांत महाराष्ट्र भाषेंतील शब्दां-चा बहुतेक समावेश झालाच असेल यांत संशय नाहीं. तर याच कोशाचा आधार धरून प्रत्येक मराठी शब्दाची व्युत्पत्ति जर दिली तर मोठें काम होईल. मोलस्वर्थचा आधार धरायाचा ह्मणजे त्याचें प्रामाण्य स्वीकारायाचें असें नव्हे; तर फक्त त्यांतील शब्दांचा अनुक्रम धरायाचा. सदरील कोशकारानें शब्दव्युत्पत्तीचा भाग बराच आटपला आहे, पण त्यांत दोन सुधारणा होणें अवश्य आहेत. एक तर साऱ्या शब्दांच्या व्युत्प-त्तीविषयीं प्रयत्न करायाला पाहिजे; दुसरें आरबी व फारशी शब्दांची व्युत्पत्ति त्या भाषांच्या लिपीनें न देतां महाराष्ट्र लिपीनें द्यावयास पाहिजे; आणि तिसरें असें कीं कांहीं कांहीं ठिकाणीं व्युत्पत्ति चुकलेली आहे ती नीट करायाला पाहिजे. तर अशा

तऱ्हेचा एक व्यापक कोश झाला असतां फार उपयोग होणार आहे. अथवा हें न होईल तर ट्रेंच साहेबांच्या ग्रंथाच्या नमुन्यावर तरी एखादा ग्रंथ व्हावा. अशा ग्रंथाच्या योगानें अपभ्रंशांच्या नियमांचें ज्ञान होऊन खेरीज अनेक प्रकारची चमत्कारिक व उपयोगाची माहितीहि विद्यार्थ्यांस करून देतां येईल. सदरील पुस्तकांत येणारें 'भाषापरिज्ञान' यांत अशाच प्रकारचा विषय असतो हें आमच्या वाचकांस माहीत आहेच.

नवीं पुस्तकें.



जयाची वदे पूर्ण वेदान्त वाणी । कसें हो म्हणावें तयालागिं वाणी ॥
वामन.

अंक५३—(१) नवीन पुस्तकें. (२) 'तुकारामबोवाचे अभंगांतील निवडक वेंचे.' (३) 'अमोलिक वैद्यकचातुर्य.' (४) 'शकावली.' (५) अशा तऱ्हेच्या पुस्तकांची आवश्यकता.

१. 'तुकारामबोवाचे अभंगांतील निवडक वेंचे,' 'अमोलिक वैद्यकचातुर्य' आणि 'शकावली' या तीन पुस्तकांविषयीं या खेपेस अभिप्राय देतों. पहिलीं दोन पुष्कळ दिवसांपूर्वी आह्मांस पोंचलेलीं आहेत; तिसरें मात्र नुकतेंच पोंचलें.

२. **तुकारामबोवाचे अभंगांतील निवडक वेंचे**–हें अठ्ठावीस पानांचें लहानसें पुस्तक आहे. तुकारामाच्या साडेचार हजार अभंगांचा गाथा फार मोठा, त्याची किंमतहि फार, ह्मणून एक आणा किमतीचें हें पुस्तक कोणीं रचून कवितेच्या भोक्त्यांस व भक्तिपर जनांस अर्पण केलें आहे. इंग्रेजी भाषेंत Beauties (सुंदर स्थलें) या नांवांचीं पुष्कळ मोठमोठ्या ग्रंथकारांचीं व विशेषतः कवींचीं पुस्तकें आढळतात. नुसता शेक्सपीयर घेतला, तर त्याच्या काव्यकमलवनाचा मकरंद आजपर्यंत किती मधुकरांनीं काढून मधाच्या शिशा तयार करून दिल्या असतील! असा मकरंदसंचय इकडेहि पुष्कळ होण्यासारखा आहे. आमच्या संस्कृत कवितेच्या अपार भांडारांत, व महाराष्ट्र कवितेचाहि आजपर्यंत जितका संग्रह झाला व पुढें होत आहे त्यांत, रसिक मधुव्रतानें भरारी मारली असतां दलांच्या सौदर्यानें, रजांच्या सौरभानें व मरंदाच्या माधुर्यानें तो किती गोंधळून जाणार आहे! तर अशा प्रकारचीं पुस्तकें एतद्देशीय रसिकांकडून रसज्ञ जनांस या काळीं अर्पण होणें फार योग्य होय. कांकीं, हल्लीं संस्कृताचा चोहोंकडे बराच प्रसार झाला आहे व होत आहे; व महाराष्ट्र भाषेकडेहि लोकांचें लक्ष बरेंच लागत चाललें आहे. अशा प्रकारच्या ग्रंथांनीं लोकाभिरुचि वृद्धिंगत होण्यास मोठें साहाय्य होतें. एक तर थोड्या किंमतींत कवीच्या कवित्वाचें सार प्राप्त होतें; दुसरें, समग्र ग्रंथ वाचण्याचे श्रम वांचतात; आणि तिसरें असें कीं, असे निवडलेले भाग पाहिले असतां रसज्ञसंमत स्थलें कोणतीं तीं समजल्यानें वाचकांस काव्यांतील सारासारभाव कळूं लागतो. शिवाय बहुश्रुत वाचकांस व लिहिणारांस असला संग्रह भाषणसमयीं किती उपयोगी पडण्यासारखा असतो, व ग्रंथरचनेस तो किती शोभावह होय; तसेंच वाचलेल्या ग्रंथांची उपस्थिति चांगली रहाण्यास त्याचा किती उपयोग आहे, हेंहि सर्वांच्या सहज लक्षांत येणार आहे. तर याप्रमाणें अशा संक्षेपरूप ग्रंथांचा अनेक प्रकारचा उपयोग आहे.

आतां सदरील पुस्तकाविषयीं पाहिलें तर त्याच्या अत्यल्प किंमतीच्या मानानें

त्यांत बराच संग्रह आहे व वेंचेहि एकंदरींत बरे असून कांहीं चांगले चित्तवेधकहि आहेत; तरी वर सांगितलेल्या इंग्रजी नमुन्याच्या धाटणीवर ह्मटलें ह्मणजे हा ग्रंथ फार निराळ्या तऱ्हेचा झाला पाहिजे. एक तर तुकारामबोवांच्या कवित्वाचें समग्र स्वरूप ह्मटलें ह्मणजे तें कितीहि थोड्यांत आणलें तरी असल्या लहानशा पुस्तकांत त्याचा समावेश होण्याचा संभव नाहीं. शेंकडों प्रकारचे उद्गार ज्याच्या प्रासादिक वाणीच्या द्वारें प्रगट झाले त्याच्या कवितेचा सारभूत अंश छोट्याशा पंचवीस पानांत येणें ह्मणजे सागरानें अत्यंत संकुचित होऊन मूषकांजलींत समाविष्ट होऊं पहाण्यासारखेंच होय! तर एक विस्ताराच्या संबंधानें प्रस्तुत पुस्तकावर आक्षेप येणारा आहे. दुसरा आक्षेप विषयवैचित्र्याच्या संबंधानें. हें वैचित्र्य प्रस्तुत कवींत पुढील प्रकारचें आढळणारें आहे. त्याच्या अभंगांचे विभाग भक्तिपर अभंग, बोधपर अभंग, मनोरंजनपर अभंग, इतिहासपर अभंग असे करतां येतील. आणि या सर्व सदरांत जर निवडक वेंच्यांचा संग्रह केला तर असें पुस्तक सर्वांस प्रिय होण्याजोगतें होईल. जे जुन्या पद्धतीचे निवळ भक्तिमार्गी आहेत त्यांस पहिलें सदर पसंत पडेल, अलीकडील समाजवाल्यांस व बुभुत्सु जनांस दुसरें मान्य होईल, रसिकांस व बहुश्रुत लोकांस तिसरें आवडेल आणि इतिहासाच्या भोक्त्यांस व चरित्रपरांस चवथें प्रिय होईल. तुकारामाची वाणी विद्वान् अविद्वान्, भक्त अभक्त, लहान थोर, वगैरे सर्वांस मान्य असल्यामुळें वरील संग्रह जर मिळतो आहे तर चार आठ आण्यांकडे कोणीं बघेल असें आह्मांस वाटत नाहीं.

अशा संग्रहांत विवक्षित स्थलीं टीपाहि दिल्या असाव्या. जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांतून हल्लीं प्रचारांतून गेलेले बरेच शब्द आढळतात; यास्तव त्यांवर व समयविशेषीं इतर संबंधाच्याहि टीपा असणें जरूर आहे. त्याप्रमाणेंच आरंभीं कवीविषयीं कांहीं माहिती असल्यासहि चांगली. आमच्या देशाच्या दुर्दैवेंकरून हा भाग असल्या पुस्तकाच्या आरंभीं जोडण्यास प्रायः थोडेंच साधन सांपडेल; तरी जी माहिती असेल ती व ग्रंथांविषयीं कांहीं विवेचन हें असल्यास विद्यार्थ्यांस व बहुश्रुत जनांस पुढील वेंच्यांची अधिक गोडी लागेल हें उघड आहे.

तर अशा प्रकारची स्वदेशसेवा करण्याचें जे कोणी रसिक व विद्वान् मनांत आणतील त्यांनीं वरील सूचनांकडे लक्ष पुरवावें अशी विनंति करून हा लेख पुरा करतों.

३. **अमोलिक वैद्यकचातुर्य**—हें पुस्तक रा० रा० बाळकृष्ण दिनकर वैद्य यांनीं रचलें आहे. हें कांहीं वर्षांपूर्वी दक्षिणा प्रैज कमिटिकडे पाठविलें असून कमिटीकडून ग्रंथकारास बक्षीस मिळालें. पुढें रा० रा० पांडुरंग गोपाळ डाक्तर यांनीं तें छापवून प्रसिद्ध केलें. सदरील पुस्तक 'आयुर्वेदशोधक मंडळी'स अर्पण केलें असून मुंबईच्या दोन तीन प्रसिद्ध नेटिव डाक्तरांचे अभिप्राय यास जोडले आहेत.

सदरील ग्रंथकाराची जी आह्मांस कांहीं माहिती आहे तिजवरून वाचकांस कळवितों कीं, रा० वैद्य हे एतद्देशीय वैद्यकाशीं बरेच परिचित असून औषधक्रिया चालवीत असतात. नेटिव डाक्तरांच्या सहवासानें त्यांस इंग्रेजी वैद्यकाचीहि कांहीं माहिती झाली आहे. शिवाय ग्रंथरचनेचाहि त्यांस अभ्यास असून सदरील ग्रंथाखेरीज आणखी एक दोन ग्रंथांबद्दल त्यांस वर सांगितलेल्या कमिटीकडून बक्षिसें मिळालीं आहेत. शिवाय सामान्यतः बहुश्रुतपणाहि यांच्या अंगीं बरा आहे. सदरील ग्रंथावरूनहि वरील गोष्टी वाचकांच्या ध्यानांत येणारच आहेत. याचा उद्देश त्याच्या नांवावरून स्पष्टच आहे, कीं प्रसंगविशेषीं वैद्यानें चमत्कारिक उपाय योजून रोग्यास रोगमुक्त कसकसें केलें आहे तें यांत सांगितलें आहे. असें असतां प्रस्तुत पुस्तक केवळ वैद्य लोकांच्याच उपयोगीं पडावें ह्मणून केलें आहे असें नाहीं. ग्रंथकार प्रस्तावनेंत लिहितो—

"आतां जर या पुस्तकाचा विषय असा आहे तर हें वैद्य लोकांच्याच उपयोगी आहे असें होईल. पण तसें नाहीं. ज्या ज्या वेळेस वैद्यानें हे दुर्घट प्रसंग युक्तीनें निभावले आहेत, त्या त्या वेळची ती ती युक्ति ज्यानें वैद्यशास्त्र मुळींच पाहिलें नाहीं पण केवळ चतुर, काल्पनिक व धूर्त असा मनुष्यहि योजूं शकेल, अशी आहे. या पुस्तकाची रचना कल्पित, मनोरंजक गोष्टींच्या रूपानें केली आहे. यांत प्रसंगीं वैद्यकाचे शास्त्रार्थ दर्शविले आहेत आणि ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्यांतील आलेले बहुतेक मोठमोठे भयंकर प्रसंग, औषधाच्या जोरानें नाहीं तर केवळ युक्तीच्याच बळानें निभावले आहेत. क्वचित् एखादे प्रसंगीं मात्र थोडीशी औषधाची मदत घेतली आहे."

तेव्हां प्रस्तुत ग्रंथ हा वैद्यकाच्या विषयावर जरी आहे तरी एकंदरींत पहातां गोष्टींचें पुस्तक हेंच त्याचें वस्तुतः स्वरूप होय. वैद्यकाच्या दृष्टीनें पहातां यांतील मुख्य कल्पना जी, कीं मनोव्यापारांचें शरीरावर कार्य घडतें व तो व्यापार बंद झाल्याशिवाय रोग्यास बिलकूल गुण पडायाचा नाहीं, ती सर्वथा खरी आहे. हर्ष, शोक, भय, विस्मय इत्यादि मनोविकारांचें प्राबल्य किती आहे व त्यांचा व्यापार शरीरावर किती दृष्टीस पडतो, ह्मणजे रोग उत्पन्न होण्यास व तो झाला असतां वाढण्यास किंवा हटण्यास वरील चित्तक्षोभाचे प्रकार किती कारणीभूत होतात, हें बहुधा कोणासहि सांगावयास नकोच. पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या उदाहरणांवरून किंवा थोड्या कल्पनेनें वरील गोष्टींचा प्रत्यय कोणासहि येईल. प्रस्तुत पुस्तकांतील बहुतेक गोष्टींचें संविधानक याच तात्पर्यावर रचलें आहे. आतां केवळ मनोरंजक पुस्तक एवढ्याच संबंधानें जर प्रकृत ग्रंथाचा विचार केला, तर यांतील सर्व गोष्टींत चातुर्याचा विशेष प्रकार दिसून येत आहे असें नाहीं. कांहीं गोष्टी सर्वांच्या ऐकण्यांतल्याच आहेत व कांहीं सामान्य प्रतीच्याच आहेत. बाकी सात आठ मात्र खरोखर चांगल्या कल्पनेच्या

असून वाचकांस थक्क करून टाकण्यासारख्या आहेत. भाषेच्या संबंधानें पाहिलें तर ग्रंथरचनेची शैली यांत चांगल्या प्रकारची दिसून येते; ह्मणजे प्रत्येक कथेचा उपक्रम, उपसंहार व एकंदर मांडणी सुबोध व चित्तवेधक केली असून शब्दरचनाहि ज्या ज्या ठिकाणीं जसजशी असावी तसतशी त्या त्या ठिकाणीं आहे. प्रसंग पाहून वैद्याच्या भाषणांत संस्कृत श्लोक व हकीमाच्या बोलण्यांत मुसलमानी भाषा व एक दोन ठिकाणीं मुसलमानी षेअरहि घातले आहेत. तेव्हां एकंदरींत हें पुस्तक बहुश्रुतपणा व मनोरंजन इच्छिणाऱ्या वाचकांच्या संग्रहास पात्र होय.

या पुस्तकांतील दोन गोष्टींत शृंगाराचा विषय आहे यावरून कोणाच्या मतें ग्रंथकारावर दोष येईल; पण हा दोष दोन प्रकारांनीं उडणारा आहे. एक तर वैद्यकाच्या विषयास शृंगारवर्णन माफ आहे. वैद्य व न्यायाधीश या दोघांस या संबंधानें किती मुभा असते हें सर्वांस माहीत आहेच. दोघांच्या विषयांचा स्त्रीपुरुषव्यवहाराशीं संबंध येत असल्यामुळें वैद्यकग्रंथांत व कायद्याच्या पुस्तकांत स्पष्टोक्तीच्या आवश्यकतेमुळें बभित्सतेचा प्रकार सहजच येतो. तेव्हां तद्विषयक ग्रंथांतहि तो प्रकार क्वचित् आल्यास नवल नाहीं. मनोविकारांचें सामर्थ्य जो वर्णन करूं लागेल त्यानें षड्रिपूंतल्या थोरल्या दादांच्या त्रिजगद्विश्रुत प्रभावाचें सर्वथा विस्मरण केल्यास कसें चालेल ? तेव्हां प्रस्तुत ग्रंथकारानें पंचविसांपैकीं दोन गोष्टींत वरील प्रकार आणला आहे याजबद्दल त्याजवर दोष मुळींच येत नाहीं असें आह्मांस वाटतें. त्यांतून वरील दोन गोष्टींतील वर्णनहि मर्यादेस सोडून नसल्यामुळें, व कामाच्या झपाट्यांत सांपडलेल्या स्त्रियेस व पुरुषास अमार्गीवरून नीट वाटेवर आणल्याचाच प्रकार त्यांत वर्णिला असल्यामुळें प्रस्तुत दोषाची छटाहि या ग्रंथावर रहात नाहीं असें ह्मटलें पाहिजे. असो; तर वैद्यकाची कांहीं माहिती, चित्तवेधक कथा, व चांगल्यापैकीं भाषासरणी, हीं ज्यांस पाहिजे असतील त्यांस या पुस्तकाच्या संबंधानें आह्मी शिफारस करतों.

४. **शकावली**—हें पुस्तक नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वी रा० रा० जगन्नाथ प्रभाकर सरंजामे यांनीं प्रसिद्ध केलें. हीं शकावली 'मुसलमानी आणि मराठी राज्यांच्या घडामोडींची'च फक्त आहे असें मुखपत्रावरून व प्रस्तावनेवरून कळतें. त्याप्रमाणें हींत सुलतान महंमदापासून तों मोगलाईच्या अखेरपर्यंत व शिवाजी महाराजांपासून तों परवांचे गाईकवाड मल्हारराव यांजपर्यंत घडून आलेल्या इतिहासप्रसिद्ध गोष्टींचें शकवार टिपण दिलेलें आहे. इंग्रेजाच्या कारकीर्दीचा भाग निराळाच करणें आहे यास्तव त्यांच्या संबंधाच्या गोष्टी या पुस्तकांत सर्व घातल्या नाहींत असें ग्रंथकारानें प्रस्तावनेंत सुचविलें आहे. ज्यांचा संबंध मराठ्यांच्या संबंधानें आलाच तेवढ्या गोष्टी

१. पद्य किंवा सुभाषित. याच शब्दापासून 'शाहिर' (कवि) हा शब्द निघाला असावा असें वाटतें.

मात्र सदरील पुस्तकांत घेतल्या आहेत.

'शकावली' ही पुस्तकाची तऱ्हा आमच्या भाषेंत नवीच आहे. यासारखें एक पुस्तक मात्र यापूर्वी पाहिलेलें आह्मांस आठवतें. तें 'ऐतिहासिक कालक्रम' हें होय. इंग्रेजी भाषेंत अशीं पुस्तकें आहेत हें सांगावयास नकोच. तीं सदरील ग्रंथापेक्षां फारच मोठीं असून त्यांत इंग्लंड देशांतल्याच काय, पण सगळ्या देशांतील गतगोष्टींचें टिपण असतें; शिवाय केवळ राज्यप्रकरणी हकीकतीच त्यांत नसून हरएक प्रकरणाविषयींची शकवार माहितीहि असते. याखेरीज प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेंत सांगितलेल्या शिवापूरकर देशपांड्याच्या रोजनिशीप्रमाणें[1] इंग्रेजांत पेपीज व एविलिन या दोघांनीं लिहून ठेवलेल्या रोजनिशा सर्वप्रसिद्ध आहेत. हे दोघे ग्रंथकार सुमारें दोनशें वर्षांपूर्वी इंग्लंडांत होऊन गेले. यांच्या रोजनिशांत दुसरा चालेस व दुसरा जेम्स यांच्या कारकीर्दीत घडलेल्या गोष्टींचें वर्णन आहे. यांचें महत्त्व किती आहे याविषयीं एक प्रमाण बस आहे कीं, मेकॉलेनें आपल्या सर्वमान्य इतिहासास वरील टिपणाचें पुष्कळ साह्य घेतलें आहे.

रोजनिशी असणें हें व्यक्तिमात्राच्या संबंधानें पहातां जसें कर्मणुकीचें साधन असून फायदेशीर आहे, त्याप्रमाणेंच राष्ट्राच्या संबंधानेंहि शकावली ही मनोरंजनावह व लाभदायक होईल हें उघडच आहे. अशा शकावली जर प्राचीन काळापासून अखंडित असत्या तर केवढी मौजेची गोष्ट होती ! पण हा प्रघात आमच्याकडे पहिल्यापासून नव्हताच यामुळें ह्मणा, अथवा कालगतीनें व राष्ट्रविप्लवांमुळें असले लेख उच्छिन्न झाल्यानें ह्मणा, जुन्या माहितीचें साधन हल्लींच्या काळाला फारकरून उरलेंच नाहीं. ही महाहानि लक्षांत आणून इतःपर आपण सावध असलें पाहिजे. यापुढील काळाची व पूर्वीचा जेवढा अजून आटोक्यांत येईल तेवढ्याची खबरदारी ठेवून तो मागल्याप्रमाणें नष्ट होऊं देतां कामा नये. तर याप्रमाणें वरील पद्धतीच्या पुस्तकांची हल्लीं अवश्यकता आहे हें उघड आहे.

आतां प्रस्तुत 'शकावली'पासून वर सांगितलेलें कार्य कितपत होणार आहे याचा जर विचार केला, तर तींत अनेक न्यूनता असल्यामुळें तें हवें तसें होणार नाहीं हें उघडच आहे. एक तर सदरील पुस्तक लहान असल्यामुळें त्यांत विषय फार थोडा आला आहे. सुमारें ८०० वर्षांची हकीकत शिळाछापाच्या अघळपघळ अक्षरांच्या

---

१. या रोजनिशींत पेशवाईंत झालेल्या गोष्टींची चांगली तपशीलवार माहिती होती असें समजतें. वरील दोन्ही इंग्रेजी रोजनिशा तर इतिहासग्रंथच बनून राहिल्या आहेत. एविलिनच्या ग्रंथाविषयीं असें लिहिलें आहे कीं, तो कांहीं सांकेतिक चिन्हांनीं लिहून ठेवला होता; व त्यामुळें तो शंभर दीडशें वर्षें तसाच ओळत पडला असून शेवटीं कोणीं मोठ्या मेहेनतीनें तो उकलला आणि प्रसिद्ध केला.

पन्नास पृष्टांत कशी येईल ? गेल्या पंचवीस सत्तावीस वर्षांत इतक्या गोष्टी घडल्या असतां त्यांची सारी माहिती काय ती वर सांगितल्यासारख्या अवघ्या दोन पानांत आली आहे. आतां ग्रंथकारास आपल्या तर्फेनें दोन सबबी सांगतां येतील हें खरें आहे. एक तर ही कीं, आठ आणे किंमतीच्या पुस्तकांत इतका मजकूर कसा आणायाला सांपडेल ? ही सबब खरी आहे; कां कीं, आमच्या देशांत पुस्तकांचा फार खप नसल्यामुळें व कोणत्या पुस्तकाचा किती खप होईल याचाहि सुमार करवत नसल्यामुळें, शिवाय ज्यांस पुस्तकें तयार करण्याचें सामर्थ्य व इच्छा त्यांस द्रव्याची अनुकूलताहि बहुधा तितपतच असल्यामुळें, वरच्यासारखी अडचण उत्पन्न होते. पण ही अडचण उत्पन्न होते ह्मणून पुस्तक कसें असायाला पाहिजे हें सांगण्यास बाध नाहीं, व तें सांगितलेंहि पाहिजे. दुसरी सबब ही कीं, ही 'शकावली' 'मुसलमानी आणि मराठी राज्यांच्या घडामोडींची' असें मुखपृष्ठावरच वाचकांस कळविलें आहे; तेव्हां या दोन सदरांखेरीज माहिती सदरील पुस्तकांत अर्थात् यावयाचीच नाहीं. या सबबींत आह्मांस फारसें हांशील दिसत नाहीं. कांकीं, वरील 'घडामोडींत' जर महाराष्ट्र कवींचें जन्ममरण, जंगबहादुराचा मृत्यु, कृष्णाबाईचा पूर, उमाजीनाईकाचें बंड, कोंकणांतील वादळ, मृगनक्षत्राचा पाऊस, वगैरे अनेक गोष्टी खपल्या जातात, तर इतर लोकप्रसिद्ध गोष्टींचाहि त्यांत समावेश कां होऊं नये ? मुसलमान व पारशी यांचा दंगा, पुनर्विवाहाच्या शास्त्रार्थाबद्दल झालेला वाद, दयानंदजींचीं व्याख्यानें व गर्दभाचार्याचा छबिना, साबरमतीचा विलक्षण पूर, गुडघेमोडीचा नवा आजार, व्यांकेचा खटला, बायजाबाईचें लक्षभोजन व चोहोंकडे उदक सुटल्याच्या एकदम ग्वाल्हेरीस तारा, वगैरे गोष्टींचा उल्लेखहि वरच्यांच्यासारखाच येथें असता तर शोभला नसता असें नाहीं. पण या सर्वांपेक्षां आचंब्याची गोष्ट ही कीं, सन १८५७ साल आमच्या देशांतच काय पण साऱ्या जगभरहि एवढें दणाणलें असतां, व त्या सालच्या हकीकतींवर शतावधि ग्रंथ इंग्रेजी भाषेंत झाले असतां, 'शकावली'त पुढील दोन ओळी मात्र त्या सालाच्या वांट्यास आल्या आहेत—

"१८५७ १७७९ (शके) —कोल्हापूरचे चिमासाहेब महाराज यांस बंडाचे संशयावरून कंपनी सरकारानें कराचीस नेऊन ठेविलें."

'मुसलमानी आणि मराठी राज्यांच्या घडामोडी' अशी मर्यादा जरी 'शकावली'कारानें आपणाकरितां रेखून घेतली असली तरी पहिल्या सदरांत दिल्लीस झालेली गडबड व दुसऱ्यांत ब्रह्मावर्त, झांशी, ग्वाल्हेर, नरगुंद या ठिकाणचे बंडावे हे येत नाहींत काय ? साऱ्या हिंदुस्थानांत एवढी धामधूम झाली असतां व अनेक राज्यांची उलथापालथ झाली असतां एका करवीराकडेच आमच्या ग्रंथाकाराची नजर पोंचून ती तेथेंच कशी ठरून राहिली याचा आह्मांस चमत्कार वाटतो ! या चमत्काराची उपपत्ति पुढील

उताऱ्यांवरून होणारी आहे असें आह्मांस वाटतें—

"१८५० - १७७२——पौष शुद्ध १२ रोजीं [ता० २८ जानेवारी सन १८५१] बाजीराव रघुनाथ पेशवे ब्रह्मावर्तांत मरण पावले. त्यांचें वय सुमारें ७५ वर्षांचें होतें. त्यांचें पेनशिन ह्यांचे 'दत्तक चिरंजीवां'कडे कंपनी सरकारनें चालविलें नाहीं....."

"१८७६ १७९८——मुंबई व मद्रास इलाख्यांत दुष्काळ पडला. इंग्रेज सरकारानें जमिनीचा धारा रयतेस माफ केला नाहीं. लोकांचे हाल फार झाले. 'कांहीं' लोक मेले."

"१६२९ १५५१——या सालांत दक्षिणेंत दुष्काळ पडला. माणसें 'फार' मेलीं... ... ... —"

"१७९२ १७१४—... ... ... महादाजी शिंदे दिल्लीची ज्ञालकी घेऊन पुण्यांत आले. या सालांत पुणें प्रांतांत दुष्काळ पडला. पायलीची धारण झाली. माणसें 'फार' मेलीं."

या उताऱ्यांवरून 'शकावली'च्या कर्त्यांची लेखणी केवळ सर्वप्रसिद्ध वृत्तांतांचा उल्लेख कर्तव्य असतांहि अडखळते हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच !

रा० सरंजामे यांनीं इंग्रेजी पुस्तकांचा नमुना पाहून मग जर या पुस्तकाच्या रचनेस ते लागते, तर वरील गोष्टी त्यांच्या सहज लक्षांत येऊन चुकल्या असत्या. राज्यांच्या घडामोडींची हकीकत जितकी महत्त्वाची तितकीच इतर लौकिक गोष्टींचीहि होय. गेल्या जानेवारीच्या अंकांत महाराष्ट्राच्या इतिहासाच्या वास्तविक स्वरूपाविषयीं जें आह्मीं निरूपण केलें आहे त्यावरून अर्वाचीन इतिहासकारांचा हा महासिद्धांत वाचकांच्या बराच लक्षांत येईल. त्यास अनुसरून ह्मटलें ह्मणजे वरच्यासारख्या अनेक लौकिक वृत्तांतांचें टिपण सदरहू पुस्तकांत असणें जरूर होतें. प्रस्तुत पुस्तक पहातां प्रथमतः आह्मांस असें वाटलें कीं, त्याच्या कर्त्यास जुनी माहिती मिळवण्याची पुष्कळ दिवसांपासून हौस असल्यामुळें व ती त्यानें पुष्कळ मिळवून ठेविली असल्यामुळें या 'शकावलींत' सुद्धां ती बरीच घातली असेल. पण पुस्तक सबंध वाचून पहातां तसें फारच थोडें आढळलें. ग्रांटडफचा इतिहास, किंबहुना 'महाराष्ट्र देशाचें वर्णन,' यावरूनहि कोणी सहज आपल्या स्मरणार्थ जसें टिपण करून ठेवावें त्यासारखेंच सरासरी हें पुस्तक आहे. या भागांत पुस्तककारानें निराळी माहिती दिलेली ह्मटली ह्मणजे कायती एवढीच आहे कीं, पेशव्यांच्या बायकांचीं नांवें बहुतेक सगळ्यांचीं दिलीं आहेत, सगळ्या सालांचे शक दिलेले आहेत, कोठें प्रसंगविशेषीं महिना, तिथि व क्वचित् वारहि दाखल केलेला आहे, आणि टीपांत वगैरे कोठें कोठें कांहीं नवा मजकूर सांपडेल. मराठ्यांच्या कारकीर्दीच्या पूर्वीच्या भागांत बरीच नवीन माहिती दिलेली आहे; पण हाहि

भाग पुष्कळ मागल्या काळचा असल्यामुळें त्याविषयीं कोणास विशेष जिज्ञासा होईल असें वाटत नाहीं.

एकंदरींत पहातां ज्यास हिंदुस्थानच्या इतिहासाची विशेष माहिती नसेल त्यास प्रस्तुत पुस्तकापासून थोडक्यांत बरीच माहिती होईल, व ज्यास तो अगोदर अवगत असेल त्यास यांत कांहीं नवी माहिती मिळेल. तरी ग्रंथकाराच्या बहुश्रुतत्वाप्रमाणें व शोधाप्रमाणें हें काम उठलें नाहीं असें आह्मांस वाटतें. सदरील पुस्तकास 'शकावली'चें रूप दिल्यानें हा घोटाळा झाला आहे. तो असा कीं, ग्रंथकारापाशीं जी नवी माहिती होती ती 'शकावलींत' खुद्द सामील करतां न आल्यामुळें टीपांच्या दाखल व परिशिष्टांच्या दाखल ती पुस्तकास जोडावी लागली. शिवाय 'शकावली' या रूपानें पहातांहि हा ग्रंथ पूर्ण झाला नाहीं. एक तर इंग्रेज लोकांची शंभर सवाशें वर्षें या देशांत एवढी उलाढाल चालली असतां व शेवटीं त्यांस सार्वभौम अधिकार प्राप्त झाला असतां त्यांचा एवढा महत्त्वाचा भाग या 'शकावलींतून' अजीच वेगळा झाला आहे; शिवाय 'राज्यांच्या घडामोडीं'शीं ज्यांचा मुळींच संबंध नाहीं अशा गोष्टी तींत येऊन त्याहि सगळ्या आल्या नाहींत. 'हें पुस्तक गतगोष्टींचें पंचांग आहे असें ह्मटल्यास चालेल' असें ग्रंथकर्त्यानेंच प्रस्तावनेंत ह्मटलें आहे; पण हें पंचांग असें चमत्कारिक आहे कीं, 'तिथिवारं च नक्षत्रं योगं करणमेव च' हें लक्षण यावर पूर्ण लागू पडत नाहीं. कोठें नक्षत्र आहे तर योग नाहीं, योग आहे तर वार नाहीं, अशी याची त्रुटित अवस्था आहे. 'मुसलमानी व मराठी राज्यांच्या घडामोडीं'त जंगबहादुराचा मृत्यु येतो तर लॉर्ड मेयो साहेबांचा कां येऊं नये? कृष्णानदीचा पूर येतो, तर पर्वतीचें तळें एका रात्रींत भरून वाहिलें व पाण्याचा दुष्काळ पडणार होता तो ऐन अखेरीस सुकाळ झाला ही गोष्ट कां येऊं नये? उमाजी नायकाचें बंड येतें तर तिमिंगिलाचार्यांनीं सोनारांस द्विजत्व देऊं केल्यानें त्यांचीच चांदी होण्याचा समय आला होता व त्यांस 'ब्रह्मपुरी'तून पलायन करावें लागलें, ही गोष्ट किंवा नुकताच सुलतान महमदाचें अल्लोपनिषत् उपदेशण्यास जो महापंडित पुण्यास आला होता त्यावर हजारों मूर्तिपूजकांनीं कर्दमास्त्राचा प्रयोग करून 'आठ महिन्यांचा उन्हाळा व चार महिन्यांचा पावसाळा' या न्यायानें दोन महिन्यांची सद्धर्मोन्नति एका चार घटकेंत पार चेपून टाकली हीहि गोष्ट कां येऊं नये? असो; तर 'शकावली' हें रूप पुस्तकास दिल्यानें ही दुहेरी अडचण आलेली आहे. यास्तव आमची प्रस्तुत ग्रंथकर्त्यास अशी सूचना आहे कीं, त्यानें 'शकावली'चा नाद मुळींच सोडून द्यावा. एक शक सांपडतो आणि एक सांपडत नाहीं अशी शकावली काय कामाची? चार शब्द सांपडतात आणि चार सांपडत नाहींत असा कोश जसा निरुपयोगी, किंवा हिंग मिळतो आणि जिरें मिळत नाहीं असें वाण्याचें दुकान जसें कुचकामाचें, त्याप्रमाणेंच वरच्यासारखें पुस्तकहि होय.

तर रा० सरंजामे हे जर 'लोकहितवादी'चें अनुकरण करून 'ऐतिहासिक गोष्टी' किंवा 'जुनी माहिती' असें कांहीं नांव देऊन ग्रंथरचना करतील, व इंग्रेजी इतिहासांतून न आढळणाऱ्या गोष्टींचें ज्ञान आपल्या देशबंधूंस करून देण्याची तजवीज करतील, तर त्यांच्या श्रमांचें खरें चीज होणार आहे. इंग्रेजी भाषेंत अशा माहितीचीं स्वतंत्र पुस्तकें रचलेलीं असतात. हल्लींचे प्रख्यात प्रधान डिझ्राएली यांचा बाप मोठा शोधक असून त्यानें Curiosities of literature (ग्रंथकारांविषयींच्या ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी) अशा प्रकारचे दोन तीन मोठे सर्वमान्य ग्रंथ केले आहेत हें आमच्या कांहीं वाचकांस माहीत असेलच. यांत जुन्या इतिहासाच्या संबंधाचीं जी माहिती मोठा शोध करून वरील ग्रंथकर्त्यानें जमा केली आहे ती केवढ्या योग्यतेची आहे, याची प्रचीती एका गोष्टीवरून येणार आहे कीं, सर वॉल्टर स्कॉटच्या कित्येक मनोरम कादंबऱ्या वरील आधारावर रचल्या गेल्या आहेत ! तर प्रस्तुत ग्रंथकारानें अशा तऱ्हेचा जर उद्योग केला, तर 'शकावली'चा बहुतेक भाग सर्वांस माहीत असणाऱ्या किंवा सहज सांपडणाऱ्या गोष्टींनींच जो भरला आहे, तें नाहींसें होऊन सर्वांनीं संग्रह करून ठेवण्यासारखें पुस्तक तयार होईल अशी आह्मांस उमेद आहे.

५. याप्रमाणें वरील तिन्ही ग्रंथांचें परीक्षण झालें. 'तुकारामबोवाच्या अभंगांतील वेंचे,' 'अमोलिक वैद्यकचातुर्य' व 'शकावली' अशीं परस्परांहून अत्यंत विसदृश पुस्तकें अभिप्रायास एकदम घेतलीं हें कोणास सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण हे तिन्ही ग्रंथ एके रीतीनें पहातां एकाच स्वरूपाचे आहेत. तें स्वरूप हें कीं, हे बहुश्रुतत्वाचे वर्धक होत. असले ग्रंथ कोणत्याहि देशांत पुष्कळ असणें हें इष्ट होय; यांतून जेथें विद्येचा प्रसार नुकताच होऊं लागला आहे, तेथें तर ते अल्प मूल्यानें प्रसिद्ध होणें हें अत्यंत आवश्यकच होय. इंग्लंड देश हल्लीं सुधारणेंत अग्रगण्य आहे व मोठमोठे विद्वान् तेथें सहस्रावधि असून सामान्य लोकांतहि विद्येचा प्रचार पुष्कळ झालेला आहे, तथापि तेथेंहि सर्व शास्त्रांतील प्रमेयांचीं लहान लहान पुस्तकें, मोठमोठ्या इतिहासांचे संक्षेप, कवींच्या व गद्यकारांच्या ग्रंथांतील निवडक वेंचे, मनोरंजक चुटके, नकला, चमत्कारिक माहिती, शहरांचीं वर्णनें, ह्मणी, नानाविषयांवर कोश, वगैरे शेंकडों तऱ्हेचीं पुस्तकें हरहंमेश छापलीं जातात व खपतात. उघडच आहे कीं कोणत्याहि देशांत पाहिलें तरी विद्येच्या परम पदवीला पोंचलेले लोक एकंदरींत फारच थोडे असतात; कां कीं, तितका व्यासंग, तितकी बुद्धि, तितक्या सोयी या थोड्यांसच असणें संभवतें. बाकी एकंदर जनसमूह पाहिला तर, एक तर बुद्धीच्या मानानें कमी व शिवाय संसारकृत्यांत सदोदित राबलेला; तेव्हां अशा एकंदर लोकांच्या शिक्षणार्थ व रंजनार्थ ह्मटलें ह्मणजे वरच्यासारखींच पुस्तकें पाहिजेत. या पुस्तकांत पुढील गुण असले पाहिजेत. एक, थोडी किंमत; दुसरें, थोडा विस्तार;

तिसरें, सुबोधपणा–ह्मणजे ज्यास त्या विषयाची पूर्वीची माहिती थोडी किंवा हुना मुळींच नाहीं त्याच्याहि लक्षांत त्यांतील निरूपण भरावें अशा तऱ्हेची त्यांची रचना असावी. आमच्या भाषेंत आजपर्यंत पहातां वरील प्रकारचे ग्रंथ कांहीं झाले आहेत; तरी ते एकंदरींत पहातां व्हावे तसे चांगले झाले नाहींत हें एक, आणि शिवाय त्यांची विशेष योग्यता कोणीं न मानल्यामुळें त्यांचा प्रचारहि ह्मणण्यासारखा झाला नाहीं. ज्यांस इंग्रेजीच्या नमुन्यावरून ग्रंथरचनेची माहिती होण्याचा संभव, व ज्यांच्यावर एकंदर देशाची फारा दिवसांपासून भिस्त, त्यांच्या हातून आपल्या देशबांधवांच्या हितार्थ वरील उद्योग व्हावयाला पाहिजे होता. पण तो न होण्यास अनेक कारणें झालीं. एक देशभाषेविषयीं अप्रीति, व तिजमुळें अर्थात् तिच्या व्यासंगाचा अभाव; आणि दुसरें हें कीं, कोणास कधीं काळीं तसली प्रेरणा झालीच तर ग्रंथ जो रचावयाचा तो वाचकांकडे नजर पुरवून करावयाचा नाहीं, तर आपल्याकडे पाहून आपणासाठीं करावयाचा. ह्मणजे आपले अल्पज्ञ जे देशबंधु त्यांस तो कितपत समजेल किंवा रुचेल याविषयीं तादृश विचार नाहीं तर आपल्या विद्वत्तेला साजण्यासारख्या बड्या विषयावर बड्या तऱ्हेनें तो झाला पाहिजे! असो; गेली गोष्ट ती गेलीच; पण इतःपर पुढें तरी आमच्या नवीन मंडळीनें आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावण्याविषयीं जपावें. मिल्टननें व्याकरणाचा पूर्वभाग जो शब्दविचार त्यावर ग्रंथ लिहिला, कालिदासानें उत्तर भागांतील विषयावर 'श्रुतबोध' रचिला, शंकराचार्यांनीं 'चर्पटपंजरी'सारखे चुटपुटते लहानसान ग्रंथ केले, मोरोपंतानें जात्यावर ह्मणण्याकरितां 'ओंवीरामायण' रचलें, परवांचे बाळ गंगाधर शास्त्री यांनीं 'बालव्याकरण' मुलांकरतां तयार केलें, इत्यादि उदाहरणांवरून पहातां बराच बोध घेण्यासारखा आहे. थीबन लोकांचा प्रख्यात सेनापति इपामिनॉंडस याची त्याच्या देशबंधूंनीं जेव्हां रस्ते झाडणाऱ्या लोकांवर एके प्रसंगीं नेमणूक केली, तेव्हां ती त्यानें संतोषानें पतकरून झटलें कीं, 'या कामानें जर मला थोरवी येण्यासारखी नाहीं तर माझ्या योगानें याला प्रतिष्ठा आणण्याकरितां मी झटेन.' अशाच दुसऱ्या एका प्रसंगीं त्यानें झटलें कीं, 'मोठें काम हातीं घेऊन तें वाईट रीतीनें बजावण्यापेक्षां हलकेंच घेऊन तें चांगल्या रीतीनें बजावणें यांत भूषण आहे.' तर आमच्या देशांतील विद्वज्जनांनीं याचप्रमाणें देशहिताचा उद्योग केला असतां फार उपयोग होणार आहे. प्रस्तुतच्या काळांत वर सांगितल्यासारखे ग्रंथ हलके मानले जाणार नाहींत इतकेंच नव्हे, तर त्यांचीच अतिशयित आवश्यकता आहे. लहान मुलांस जशीं पंचपक्वान्नें कांहीं कामाचीं नाहींत तर बोंडल्यांतलें दूधच त्यांस पाहिजे, त्याप्रमाणें नुकती अक्षरओळख होऊन विद्यांगणाचा नुकता उंबरठा उतरून जे पलीकडे गेले त्यांच्याकरतां अर्थानें सुलभ ह्मणजे समजण्यास सोपीं व थोड्या पैशानें मिळणारीं अशींच पुस्तकें झालीं पाहिजेत. तर असलें खाद्य तयार करण्याकडे ग्रंथका-

रांनीं व देशहितेच्छूंनीं चांगलें लक्ष पुरवावें हें त्यांस उचित होय.

तारा नाटक.

एकेन स्मितपाटलाधररुचो जल्पंत्यनल्पाक्षरं
वीक्षंतेऽन्यमितः स्फुटत्कुमुदिनीफुल्लोल्लसल्लोचनाः ।
दूरोदारचरित्रचित्रविभवं ध्यायंति चान्यं धिया
केनेत्थं परमार्थतोऽर्थवादिव प्रेमास्ति वामभ्रुवाम् ॥[1]

अंक ६०—(१) प्रस्तुत अंकास स्वतंत्र विषय घेण्याचीं कारणें. (२) 'तारा नाटक.' (३) त्याचें संविधानक. (४) संविधानकांतील दोष. (५) मूळ नाटकांत केलेले फेरफार. (६) इकडील रीतरिवाजास न जमणारे भाग. (७)प्रस्तुत ग्रंथापासून एतद्देशीयांस उपयोग. (८) मराठी पुस्तक या दृष्टीनें पहातां प्रकृत नाटकांतील दोष. (९) मासल्याकरतां उतारे.

१. प्रस्तुत अंकाचा वरील विषय पाहून आमच्या वाचकांस बराच आचंबा वाटेल असें वाटतें. कां कीं, पूर्वीच्या क्रमास अनुसरून ह्मटलें ह्मणजे हा अंक उपसंहाररूप असायाचा. यांत एकंदर वर्षाचा आढावा दाखवून आमची आमच्या प्रतिपक्ष्यांकडे किती बाकी फिरते व त्यांची आमच्याकडे किती निघते हें वाचकांस समजावून द्यावयाचें. पण यंदां तसें करण्यास फारशी सवड नाहीं. गेल्या सालची जबरदस्त वेसण साऱ्यांच्या नाकांतून सारखीच ओंवली गेल्यामुळें ह्मणा, अगर गेल्या अकरा अंकांतील विषय अंमळ निराळ्याच पद्धतीचे पडल्यामुळें ह्मणा, आमच्या लेखांवर दूषणें मुळींच कोठेंहि आलीं नाहींत.[2] गतवर्षींच्या आक्टाचा प्रभाव चोहोंकडे दृष्टीस पडूं लागल्यापासून आमच्या देशास पुराणांतरीं वर्णिलेल्या ऋषींच्या आश्रमांची किंवा पवित्र शास्त्रांत वर्णिलेल्या भावी सहस्रवार्षिक युगाची[3] बरोबरी येत चालली आहे.

---

१. "स्मिताच्या योगानें अधरोष्ठाची लाली मोडून त्यावर आरक्तता आली आहे अशा होत्साऱ्या एका पुरुषाशीं पुष्कळपणीं बोलतात,—पूर्ण विकास पावलेल्या कमलांसारख्या सुप्रसन्न नेत्रांनीं दुसऱ्याकडे पहातात,—आणि अत्यंत कीर्तिमान् व भाग्यवान् असणाऱ्या तिसऱ्यावर मन ठेवतात,—तेव्हां स्त्रियांचें वास्तविक प्रेम असतें तरी कोणावर ह्मणावें ?"

२. गेल्या बारा अंकांतील मुख्य विषय जो **मोरोपंता**चें काव्य त्याच्या संबंधानें वरील उल्लेख केला आहे. बाकी आमच्या पुस्तकाविरुद्ध लेख ह्मटला तर 'विविधज्ञानविस्तारां'त नुकतें आलेलें 'अपभ्रष्टशब्दचंद्रिका' पुस्तकाचें मंडन हें होय. याविषयीं पुढील अंकांत विवेचन करण्याचा आमचा संकल्प आहे.

३. यास इंग्रेजींत **Millenium** असें नांव आहे. ख्रिस्ती लोकांच्या पैगंबराचा शेवटचा इतिहास सर्वांस माहीतच आहे, कीं त्यास रोमी सरकारानें यहुदी लोकांच्या फिर्यादीवरून सुळावर चढविलें. हें कृत्य झाल्यानंतर तिसऱ्या दिवशीं येशूचें पुनरुत्थान झालें. नंतर तीन आठवडेपर्यंत आपल्या शिष्यवर्गासमवेत काळक्रमणा करून त्यानें स्वर्गारोहण केलें. तेव्हां-

(पुढें चालू).

ह्मणजे वाघ आणि गाय यांनीं एकाच ओहोळावर पाणी प्यावें, लांडग्यानें कोंकराच्या गळ्याला मिठी मारावी, कोंकरानें लांडग्याच्या मारावीं, इत्यादि प्रकार जसे वसिष्ठादिकांच्या आश्रमाभोंवतीं दृष्टीस पडत, व पुढें कधीं कधीं ख्रिस्त राज्यांत पडणार आहेत, त्याप्रमाणेंच हल्लीं या देशांतहि साऱ्या तंट्याबखेड्याचें मूळ एकदम मोडून चोहोंकडे मध्यरात्रीप्रमाणें अगदीं सामसूम होऊन गेलें आहे. काळोखांत ज्याप्रमाणें उंच सखल, सुरेख विद्रूप, रंगी बेरंगी हे सर्व भेद अस्तास जातात, त्याप्रमाणेंच मेकॉलेप्रभृति उदार बुद्धीच्या पुरुषांनीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वी जें स्वातंत्र्य या आर्यभूमींस अर्पण केलें होतें त्यास गेल्या सालीं एकाएकीं अकाल राहूनें ग्रासून टाकल्यामुळें सद्धर्म अधर्म, राजनिष्ठा राजद्रोह, सत्य असत्य, इत्यादि भेद चट सारे एका क्षणांत लोपून गेले. परवां या पुण्यजननगरीवर लंकेसारखा आकांत गुदरून अग्निनारायणानें कृपा केली असतां ज्याप्रमाणें हजारों लवाद कोर्टांचे हातून होतेंना असें काम प्रहरा दीड प्रहरांत चोख होऊन गेलें, व सावकार, कूळ आणि वकील या त्रिपुटीचा एकदम लय झाला, त्याप्रमाणेंच बादशाही दरबारांतून सुटलेल्या वरील वटहुकुमाअन्वयें आमची आमच्या प्रतिपक्ष्यांच्या खात्यावरील बाकी व आमच्या खात्यावरील त्यांची बाकी या दोन्ही एकदम पूज्य होऊन गेल्या आहेत. हा प्रकार कोठपर्यंत कायम राहील किंवा एकदां झाला तो झालाच, याविषयीं कांहीं सांगवत नाहीं; पण हा जोंपर्यंत राहील तोंपर्यंत बहुधा या खेपप्रमाणेंच आह्मांस शेवटच्या अंकाला कांहीं निराळा विषय शोधावा लागेल, व यापूर्वी आमच्या फाल्गुन महिन्याप्रमाणें किंवा ख्रिस्ती नाताळाप्रमाणें जसा एकंदर वर्षाचा हूडपणा पुरवून घेण्यास सरते शेवटीं अवकाश सांपडेल तसा फारकरून सांपडणार नाहीं असा सुमार दिसतो!

तरी एके तऱ्हेनें पहातां आमच्या प्रतिपक्षीवर्गानें या वर्षीं जो अत्यंत मूकभाव धारण केला तो कांहीं अंशीं आश्चर्यास्पदच होय. कां कीं, या सालचा मुख्य विषय

पासून तो भूलोकावर अद्याप प्रगट झाला नाहीं. तथापि 'नव्या करारां'तील शेवटच्या भागांत सांगितल्याप्रमाणें येशू ख्रिस्ताचा पुनः एकवार अवतार होणार आहे. त्या वेळेस तो सैतानास बांधून नरकाग्नींत टाकून देईल व साऱ्या पृथ्वीवर हजार वर्षें त्याचें राज्य चालेल. या भविष्यत्कालीन महोत्सवाचें पोपनें येणेंप्रमाणें वर्णन केलें आहे--

"The lambs with wolves shall graze the verdant mead,
And boys in flowery bands the tiger lead;
The steer and lion at one crib shall meet,
And harmless serpents lick the pilgrim's feet.
The smiling infant in his hand shall take,
The crested basilisk and speckled snake,
Pleased the green lustre of the scales survey,
And with their forky tongue shall innocently play!"

MeSsiah.

झटला झणजे 'जॉनसनपुराण' नव्हतें किंवा 'इंग्रेजी भाषा' नव्हती; तर एका पत्रकारानें सुचविल्याप्रमाणें सर्वांस समजणारा, सर्वांच्या माहितींतला व सर्वांनीं ज्यावर अनुकूल किंवा प्रतिकूल अभिप्राय अनेक वेळां प्रगट केलेले अशा प्रकारचा तो होता. तेव्हां असा विषय निघाला असतां ग्रीक भाषेंतील आदिकाव्यांत उपनायकभूत जो आकिली-सचा जिवलग मित्र प्याट्रॉक्लस तो रणांत पडला असतां त्याच्या प्रेताभोंवतीं जसें रणमंडळ माजलें, किंवा येशूची येरूशलेम शहरीं जी कबर आहे तिच्या प्रीत्यर्थ जसें दोनशें वर्षें ख्रिस्तभक्तांचें व महंमदभक्तांचें युद्ध चालू होतें, तसा प्रकार खरोखरी पहातां गेल्या सालीं नजरेस यावयाचा होता. त्यांतून प्रस्तुत महाराष्ट्र कवीच्या व त्याच्या टीकाकर्त्यांच्या तर्फेनें विरुद्ध पक्षांतील रथी महारथी मंडळींवरहि आह्मी बिलकूल कसर न करतां यथास्थित प्रहार केले होते. पण इतकें असून अद्याप दुसऱ्या बाजूस अगदीं सामसूम आहे. याचें काय कारण असेल तें असो. आमच्या ख्रिस्ती बंधूंसहि या वर्षीं गुपचुप रहाण्यास बिलकूल सवड नव्हती. 'पाद्री खात्याकडील अशुद्ध पत्र आपल्या सोवळ्या घरांत येऊं देणें त्यांस बरें वाटत असलें तर त्यांनीं मोबदला करण्यास आरंभ करावा' या आमच्या वडील बंधूंच्या वचनास मान देऊन या सालच्या आरंभापासून आमची सद्धर्मप्रेरोही माला 'ज्ञानोदय' कचेरीच्या टेबलावर जाऊन पडत आहे, व आमचे शुभवर्तमानी बंधुहि दर आठवड्यास नियमानें आमची भेट घेत असतात. पण मौज काय झाली आहे पहा! जोंपर्यंत आमची व आमच्या पवित्रधर्मी बंधूंची गांठ घालून देण्यास मध्यस्थ मित्राची गरज लागत असे, तोंपर्यंत आह्मांस कडकडून भेटण्याची आमच्या बंधूंस भारी हौस असे व असा भेटीचा योग थोडा बहुत तरी आल्याखेरीज फार करून उभें वर्ष सुनें जात नसे. पण आतां मध्यस्थाची गरज न रहातां परस्पर दळणवळण चांगलें पडलें असतां पूर्वीचा आदर शिथिल झाला. याचें कारण आह्मांस कांहींच उमगत नाहीं. गेल्या सालच्या भयंकर आक्टाच्या तडाक्यानें आमच्या बंधूंची 'चपळ लेखणी बोथटून गेली' असेल झणावें तर तें मुळींच शोभणार नाहीं. कां कीं, एक तर त्यांच्या अंगीं सद्धर्माचे योगानें संचरलेलें अढळ धैर्य वास करीत आहे, व शिवाय आकाशांतील प्रभूचें त्यांस बळकट पाठबळ आहे कीं, 'जगाच्या समाप्तीपर्यंत मी तुह्मांबरोबर सर्वकाळ आहें.' मग 'खऱ्या व जिवंत देवा'-ची एवढी जबरदस्त सनद त्यांजपाशीं असतां नवव्या आक्टांसारखे छप्पन्न आक्ट ते बगलेंत मारणार नाहींत काय? बरोबर आहे! शिवाय हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जरी यदाकदाचित् असें झालेंच,—कीं पवित्रशास्त्रीय शांति व सभ्यता विसरून आमच्या बंधूंनीं हिंदूंस टोंचण्यासारखा मजकूर आपल्या पत्रांत प्रसिद्ध केलाच, व सुप्रीम कौंसलांत त्याविषयीं विचार झालाच, तरी आक्टाचें अतिक्रमण केल्याबद्दल आमच्या बंधूंस जी अद्दल घडेल तिचा प्रकार एका महाराष्ट्र कवीनें वर्णिल्याप्रमाणें——

पैं मोहाचिये सांगडें लासी पिली धरी तोंडें।
तेथ दांताचे आगरडें लागती जैसे॥

अशासारखाच बहुधा होणार! तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार करतां आमच्या बंधूंच्या मौनाची वरील उपपत्ति मुळींच संभवत नाहीं. बरें, असें जर ह्मणावें कीं गेल्या अकरा अंकांत आमच्या बंधूंनीं मधें पडावें असा मुळीं प्रसंगच आला नाहीं, तर तसेंहि नाहीं. कां कीं, ५२ व्या व ५६ व्या अंकांत त्यांचे सन्मान्य गुरु रे० डॉवटर विल्सन साहेब यांच्या लेखांवर आमच्या अल्पबुद्धीस जे विचार सुचले ते दाखल केले होते. ते डाक्टर मजकुरांच्या शिष्यवर्गास मोठेसे आवडण्यासारखे नव्हते हें आमच्या वाचकांस सांगावयास नकोच. तरी असें असतां आमचे वृद्ध बंधु उगाच राहिले. साहेबांचा बचाव करण्याची त्यांस जरूर दिसली नाहीं किंवा त्यांजविषयींची गुरुभक्ति त्यांची इतक्यांतच कमी झाली, हें कांहीं कळत नाहीं!

असो; तर या खेपेची अशी हालहवाल आहे. यास्तव आतां वरील ग्रंथाच्या परीक्षणास लागूं.

२. 'तारा नाटक' हें शेक्सपीयरच्या 'सिंबलैन' नामक नाटकाचें भाषांतर आहे. या इंग्रेजी कवीचीं एकंदर सदतीस नाटकें प्रसिद्ध आहेत; त्यांपैकीं यापूर्वी 'आथल्लो,' 'टेंपेस्ट,' 'जुलियस सीजर' (विजयसिंग), 'कॉमेडी ऑफ एरर्स' (भ्रांतिकृत चमत्कार-भुरळ), 'मर्चंट आफ व्हेनिस' (व्हेनिस् शहरचा व्यापारी), आणि 'रोमिओ ॲन्ड जुलियेट' (रामकेतुविजया) इतकीं मराठींत झालीं आहेत. प्रस्तुत नाटक कांहीं अंशीं वरील सर्वांपेक्षां निराळ्या तऱ्हेचें आहे. हें रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनि, एम. ए., उमरावती हायस्कूलचे हेडमास्तर, यांनीं तयार केलें असून मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीच्या विद्यमानें प्रसिद्ध झालें आहे.[1]

३. आतां प्रथमतः सदरील नाटकाचें संविधानक येथें देतों. त्यावरून मूळ

---

१. वरील उल्लेख केवळ प्रकृत पुस्तकाच्या मुखपत्रावरूनच केला आहे. खरोखरी पहातां तें ग्रंथोत्तेजक मंडळीनें छापलें नाहीं व प्रसिद्धहि केलें नाहीं. ग्रंथकार आमचे परिचित असल्यामुळें आह्मांस खाजगी रीतीनें असें कळलें आहे कीं, सदरील पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचा हक्क त्यांनीं 'नेटिव ओपिनियन'च्या मालकांस देऊन टाकून त्यांजकडून तें छापविलें छापल्यानंतर कांहीं प्रती सदरील मंडळीनें आपल्या वर्गणीदारांस देण्याकरितां घेतल्या असें समजतें. मंडळीच्या नांवावर प्रसिद्ध झालेलें पहिलें शेतकीवरील पुस्तक याचीहि अशीच हकीकत आहे ह्मणून ऐकतों. एकंदरींत विचाऱ्या महाराष्ट्रीय लोकांच्या हितार्थ हा जो दोघां रावबहादुरांनीं नवा उद्योग आरंभिला तोहि जुन्यांच्यास भेटीला जाऊं पहात आहे यांचें आह्मांस फार वाईट वाटतें. पुढें समयानुसार प्रकृत मंडळीची जी हकीकत आह्मांस माहीत आहे व तिच्या उद्योगाविषयीं आमच्या व पुष्कळ मंडळींच्या मनांत जे विचार आले आहेत ते वाचकांस सादर करण्याचा आमचा मानस आहे.

ग्रंथाची व भाषांतराचीहि वाचकांस बरीच कल्पना होऊन पुढील गुणदोषविवेचन लक्षांत येण्यास मार्ग होईल.

सुवर्णपुर नामक नगराचा संभाजी नामें करून एक वृद्ध राजा होता. याची पहिली बायको मरण पावली असून त्यानें द्वितीय संबंध केला होता. पहिल्या बायकोपासून त्यास तीन अपत्यें झालीं होतीं; दोन मुलगे व एक मुलगी. हे दोन मुलगे लहानपणींच कोणीं चोरून नेले होते, व त्यांचा मुळीं पत्ताच नव्हता. राहिलेली मुलगी तारा; ही प्रस्तुत नाटकांतील नायिका होय.

तारेला तिची सावत्र आई नित्य पाण्यांत पहात असे. संभाजी राजा हा स्वभावानें भोळसर असल्यामुळें त्याजवर तिनें असा पगडा बसवून टाकिला होता कीं राजकीय प्रकरणांतहि तिच्या सत्तेवांचून कांहीं चालत नसे. मुरारराव ह्मणून तिच्या बहिणीचा मुलगा होता, त्याजवर तिचा अतिशय लोभ होता. याचें तारेशीं लग्न व्हावें व संभाजीच्या पश्चात् दोघांनीं राज्य करावें असा तिचा मानस होता.

मुरारराव हा मूर्खशिरोमणि होता. त्याच्या अंगीं कर्तृत्व मुळींच नसून तो केवळ मावशीच्या जोरावर अरेराव होऊन बसला होता. त्यानें तारेचें मन आपणाकडे लागावें एतदर्थ पुष्कळ खटपट केली. व त्याच्या मावशीनेंहि आपला स्वार्थ साधावा एवढ्यास्तव त्यास अनेक प्रकारें साह्य केलें. पण दोहोंचाहि कांहींएक उपयोग झाला नाहीं. हंबीरराव ह्मणून एक सरदाराचा मुलगा होता, त्याचीं आईबापें लहानपणींच वारलीं असल्यामुळें संभाजी महाराजांनीं त्याचें पुत्राप्रमाणें पालन केलें होतें. हा तारेचा बालमित्र होता. यास्तव लहानपणापासूनच दोघांचा स्नेह अत्यंत दृढ झाला असल्यामुळें तारुण्यदशेंत त्याच स्नेहास त्या दशेस अनुरूप असें अंमळ निराळें स्वरूप प्राप्त झालें. तरी हें परस्परविषयक प्रेम त्यांनीं कोणास कळूं न देतां गुप्त प्रीतिविवाह केला.[1] ही गोष्ट पुढें जेव्हां प्रगट झाली तेव्हां राजास पराकाष्ठेचा राग आला. त्यानें हंबीररावास आपल्या मुलुखांतून घालवून दिलें व तारेस तिच्या महालांत कोंडून ठेविलें. इतकें झालें तरी ज्याप्रमाणें जलप्रवाहास रोध केला असतां फार झालें तर त्याची गति कुंठित होईल, पण ती उलटी कधींहि व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणें तारेची आणि हंबीररावाची तुटातूट मात्र झाली; राणीचा एवढें कंवटाळ रचण्यांतला जो उद्देश—कीं हंबीररावावरून तिचें मन निघून आपल्या भाच्याकडे लागावें तें मात्र

---

१. विलायतेंतील लग्नाची चाल आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच कीं वधूवरांचा संबंध देवळांत पाद्रीच्या विद्यमानें होतो. दोघांचे हस्त एकत्र करून पाद्री त्यांस आशीर्वचन देतो; आणि त्यांचीं नांवें पटावर दाखल करतो. जेव्हां स्त्रीपुरुषांचा चोरून विवाह कर्तव्य असतो, ह्मणजे आईबापांच्या वगैरे हरकतीमुळें उघडपणें देवळांत जाऊन लग्न करतां येत नाहीं, तेव्हां पाद्रीस घरीं बोलावून आणून वरील विधि गुप्तपणें करतात.

बिलकूल झालें नाहीं. एवढें मात्र उलटें झालें कीं, हंबीररावाची विशेष प्रसिद्धि होऊन लोक त्याच्या गुणांची विशेष तारीफ करूं लागले, व तारा आपल्या बापासहि जुमानीनाशी होऊन मुरारराव्याचा उघडपणें तिटकारा करूं लागली.

हंबीरराव आपल्या प्रियेची गुप्तपणें गांठ घेऊन देशोधडीस गेला. ही गांठ राणीनेंच पाडून दिली होती; तिचा मतलब काय कीं, आपल्या मनांत दोघांविषयीं कांहीं विषम नाहीं असें त्यांस व सर्वांस कळावें. हा कृत्रिम स्नेह ती सर्वांस दाखवी; पण सर्व तिला पक्केपणीं ओळखून होते. हंबीरराव सुवर्णपुराहून निघाला तो विजयपुरास जाऊन राहिला. तेथें बापाच्या वेळचा एक सरदार होता; त्यानें आपल्या जुन्या स्नेहास स्मरून हंबीररावास आपल्या घरीं राहून घेतलें. एके दिवशीं चार मंडळी बसली असतां स्त्रियांविषयीं बोलणें निघून हंबीररावाचा व खंडूजी नांवाचा एक विजयपूरचा गृहस्थ होता त्याचा वाद पडला. हंबीररावास आपली प्रीतिविवाहानें वरिलेली स्त्री तारा हिच्या अढळ सत्त्वाविषयीं पक्का विश्वास होता, आणि खंडूजी हा मूळपासून लफंगा असल्यामुळें 'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः' या मतास अनुसरणारा होता. दोघे बोलण्याच्या भरांत आवेशांत आले आणि शेवटीं दोघांनीं असें ठरविलें कीं, हंबीररावाच्या हातचें पत्र घेऊन खंडूजीनें सुवर्णपुरास जावें आणि तारेशीं ओळख करून घ्यावी. नंतर जेवढी आपली लफंगबाजी असेल तेवढी लढवून तीस वश करण्याचा प्रयत्न करावा. या कार्यांत जर त्याची सिद्धि झाली तर हंबीररावानें आपल्या हातांतील आंगठी त्यास द्यावी व त्याउपर तारेचें नांव घेऊं नये; पण जर करतां मसलत अंगावर आली तर खंडूजीनें दहा हजार रुपये हरावे व प्रतिष्ठित स्त्रीची अब्रू घेतल्याबद्दल समरांगणांत हंबीररावास जबाब देण्यास तयार व्हावें. हा विलक्षण व भयंकर पण ठरल्यावर खंडूजी हंबीररावाच्या हातचें पत्र घेऊन सुवर्णपुरास यावयास निघाला.

येऊन पोंचल्यावर त्यानें तारेस तिच्या नवऱ्याचें पत्र दाखविलें. तें पहातांच तिला मोठा आनंद होऊन हा आपल्या नवऱ्याचा परम मित्र आहे असें ती समजली व तिनें त्याचा मोठा सत्कार केला. मग हंबीररावाविषयीं ती हालहवाल विचारणार तों खंडूजी भलतेंच कांहीं असंबद्ध भाषण आपणाशींच बोलूं लागला. तारेस त्याचा कांहींच उमज पडेना. मग जें काय बोलत आहां तें मला कळेंसें स्पष्ट बोला असें तारेनें सांगितलें असतां त्यानें तीस कळविलें कीं, तुमचा नवरा मोठा बदफैली निघाला आहे व सुवर्णपुरची तर त्यास कधींच आठवणहि होत नसून तो तिकडेच नीच वेश्यांशीं रममाण होऊन बसला आहे. याप्रमाणें हंबीररावाविषयीं भलताच मजकूर तारेच्या कानावर घालून खंडूजीनें तिच्या चित्तास भ्रंश पाडण्याचा उद्योग केला, आणि नंतर तीस तो सांगूं लागला कीं, "आपण तरी असल्या बेइमा

नाशीं कशाला इमान ठेवतां ? मी आपला दास आहें, माझ्या जीवांत जीव आहे तोंवर मी आपणांवर प्रेम ठेवीन." हें त्याचें पाजीपणाचें व धट्टाईचें बोलणें ऐकून तारा संतापली, व तिनें त्याची खूप निर्भर्त्सना केली. ती ऐकतांच या विजयपुरी फक्कडाची धुंदी उतरून त्यानें तारेची क्षमा मागितली व आपलें प्रेम हंबीररावावर कितपत दृढ आहे हें पहाण्याच्या उद्देशानें मीं हा उपक्रम केला होता असें त्यानें प्रांजळपणें कबूल केलें. इतकें झाल्यावर खंडूजी निघून गेला. पण जाण्यापूर्वी त्यानें तारेपाशीं एका गोष्टी-विषयीं विनंति केली कीं, "विजयपुरच्या महाराजांकरितां कांहीं जडावाचे दागिने व नकशीचीं चांदींचीं भांडीं मीं तयार करविलीं आहेत, एवढ्या किंमतीचा माल बिन्हाडीं सुरक्षित रहावयाचा नाहीं, तर तो पेटींत घालून मीं आपणाकडे पाठवून देईन. पेटी रातोरात आपल्यापाशीं असूं द्यावी. उद्यां मी जाईन तेव्हां घेऊन जाईन."

त्या रात्रीं तारा नित्याच्या क्रमाप्रमाणें पोथीचा पाठ आटपून व ईश्वरस्मरण करून निजली. तिला पहांटेस उठावयाचें होतें यास्तव दासीस दिवा तसाच जळत ठेवण्यास तिनें सांगितलें. मध्यरात्रींच्या सुमारास जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर तिच्या महालांत आणून ठेवलेल्या पेटीचें दार आपलें हळूच उघडलें—आणि खंडूजींची स्वारी आंतून मुकाट्यानें बाहेर पडली ! त्याचा बेत उघडपणें जेव्हां साधेना तेव्हां त्यानें ही पेटीची युक्ति लढाविली. मग खोलींतील सामानाच्या, पलंगाच्या वगैरे झटापट सर्व खाणाखुणा टिपून घेऊन या कपटपटूनें तारेच्या हातांतील एक कंकण हळूच काढून घेतलें; व इतका कारभार आटपून पुनः स्वारी पेटींत जाऊन बसली. हंबीररावाच्या स्त्रीचें सत्त्व हरण करण्याची प्रतिज्ञा जरी शेवटास गेली नाहीं, तरी आपला पण जिंकण्यास आतां कांहीं हरकत नाहीं असें समजून खंडूजी आपल्या ठिकाणीं मोठा कृतार्थ झाला. त्यांतून वरील कृतार्थताबुद्धीचें पूर्णत्व होण्यास दुसरी एक मोठी गोष्ट दैवयोगानें अशी घडली कीं, तारेच्या हातांतील कंकणाचा फांसा काढीत असतां तिचें दिव्य स्वरूप जेव्हां त्यानें समग्र न्याहाळलें तेव्हां तिचा पदर झोपेंत अस्ताव्यस्त पडला असतां तिच्या स्तनमध्यभागीं असणारा तीळ त्याच्या दृष्टीस पडला !, या मुद्द्याचा उपयोग किती झाला हें पुढें कळेलच.

वर सांगितल्याप्रमाणें खंडूजी आपला हेतु कपटानें साधून विजयपुरास परत आला. हंबीरराव व ज्यांच्या समक्ष वरील पण ठरला होता ते सर्व जण त्याची वाट पहातच होते. तो इतक्या लवकर आलासा पाहून हंबीररावास वाटलें कीं याची पहिल्या सपाट्यास फटफजिती उडाली असेल तेव्हां निराश होत्साता हा चटदिशीं माघारा आला. याप्रमाणें त्यानें त्यास विनोदपूर्वक बोलूनहि दाखविलें. पण क्रमाक्रमानें ही त्याची वृत्ति पालटत गेली. खंडूजी महालाच्या, पलंगाच्या वगैरे एकएक खुणा जसजशा सांगत गेला तसतसा संशयाचा विचार त्याच्या शुद्ध व ऋजु अंतःकरणांत भिना-

याला लागला. त्यानें तारेच्या हातांतील कंकण पुढें टाकलें तेव्हां तर हंबीरराव मनांत फारच चरकला; कां कीं, तें त्यानें प्रस्थानसमयींच आपल्या प्रियेच्या हातांत स्वतः घातलें होतें, व तिनें त्या समयींच वर सांगितलेली पणास लावलेली आंगठीहि त्यास दिली होती. पण सरतेशेवटीं तीळाची खूण जेव्हां खंडूजीनें दिली तेव्हां तर बिचाऱ्या हंबीररावाची जी दशा झाली ती कांहीं पुसूं नये! तो रागानें वेडा होऊन गेला, व अवघ्या स्त्रीजातीवर त्यानें जो शिव्यांचा भडिमार केला तो कांहीं विलक्षण! मग त्यानें सदोबा या नांवाचा एक आपला विश्वासू चाकर तारेपाशीं ठेविला होता त्याजकडे पत्र पाठवून त्यास कळविलें कीं, तुझ्या धनिणीच्या जारकर्माची माझी खात्री होऊन चुकली आहे, तर या सोबतचें माझें पत्र तिला दाखवून तीस तूं जामगांवीं घेऊन ये, आणि तेथें आल्यावर खरा मजकूर सांगून तिचा वध कर; आणि याबद्दलची निशाणीहि मजकडे पाठवून दे.

सदोबास वरील पत्र पाहून मोठें आश्चर्य वाटलें व खेदहि झाला. पण करतो काय? धन्याची आज्ञा प्रमाण! तेव्हां तिजप्रमाणें त्यानें तारेपाशीं बहाणा करून व तीस हंबीररावाचें पत्र दाखवून तीस जामगांवीं नेलें, व तेथें पोंचल्यावर तिला हंबीररावाचें पत्र दाखविलें. तें पाहिल्यावर तिची काय अवस्था झाली असेल हें सांगावयास नकोच! ज्याची मूर्ति तो गेला तेव्हांपासून तिच्या डोळ्यांपासून कधीं ढळलीच नाहीं, व ज्याच्या समागमाविषयीं तिची इतकी आतुरता कीं ऊन्ह न ह्मणतां तान्ह न ह्मणतां ती त्या पावलींच रानावनांतून जावळी महालाकडे जावयास निघाली, त्यानेंच ऐन भेटीच्या सोहळ्याच्या वेळीं तिजवर जारकर्माचा आरोप करून तिची पत्रद्वारें अत्यंत निर्भर्त्सना करावी, हा प्रसंग केवढा दुर्धर होय! तारा वरील मजकूर वाचतांच मूर्छित होऊन पडली. मग सावध झाल्यावर व सदोबाच्या सांत्वनानें अंमळ शांत झाल्यावर तिनें असा निश्चय केला कीं, आतां परत सुवर्णपुराकडे ह्मणून जावयाचेंच नाहीं. तर पुरुषवेषानें वियजपुरास जाऊन तेथेंच हंबीररावाची गांठ घेऊन त्याच्या मनावरील संशयपटल दूर करावें असा तिचा बेत ठरला. हा सल्ला तीस सदोबानेंच दिला, व तिचा निरोप घेते समयीं त्यानें तिच्या हवालीं एक डबी केली. या डबींत औषधाच्या गोळ्या होत्या. वाटेच्या शेणभागानें प्रकृति बिघडली असतां या तुह्मांस उपयोगीं पडतील असें सदोबानें जातांना तीस सांगून ठेविलें.

आतां इकडे संभाजी महाराजांच्या दरबारीं काय हालहवाल चालली आहे ती पाहूं. संभाजी हा विजयपूरच्या बादशहाचा मांडलिक होता त्याजकडून दरसाल

१. विजयपुर व सुवर्णपुर हीं नांवें यथानुक्रम रोम व लंडन या शहरांचीं भाषांतरकारानें ठेविलीं आहेत. नाटकांतील काल ख्रिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमाराचा आहे.

(पुढें चालू).

दोन कोट रुपये खंडणी विजयपुरास जात असे. ही वहिवाट संभाजीच्या बापापासून चालत असतां ती अलीकडे त्यानें राणीच्या मसलतीवरून बंद केली होती. या गैर-शिस्त वागणुकीबद्दल कानउघाडी करण्याकरितां विजयसिंग नांवाचा वकील विजयपुरच्या बादशाहाकडून संभाजीकडे या वेळेस आला होता. त्यानें आपल्या धन्याचा निरोप कळवून संभाजीस पुष्कळ सांगून पाहिलें, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. निकरावर गोष्ट येऊन लढाईचा बेत ठरला. सैन्याचें आधिपत्य राणीच्या शिफारशीवरून मुरारराव यास द्यावयाचें होतें. पण इतक्यांत काय झालें कीं, तारा वाड्यांतून निघून गेल्याचा बोभाटा झाला. तो ऐकून व ती कोठें गेली याचा तळास सदोबाकडून काढून मुरारारावांची स्वारी तारेच्या शोधार्थ व हंबीररावाच्या शासनार्थ बाहेर पडली. सदोबा हिकमती होता; त्याचें अंतःकरण जरी हंबीरराव व ताराबाई यांच्याकडेच सर्वथा होतें, तरी बाहेरून राजा, राणी व मुरारराव यांशींहि त्यास सलोखा ठेवावा लागत असे. तेव्हां या प्रसंगींहि त्यानें वरील कावा योजून हंबीररावाकडून आलेलें पत्र मुरारारावास दाखविलें व त्यावरून त्यास भासवून दिलें कीं, आतां आपण जर जामगांवीं गेलों तर हंबीरराव व ताराबाई या दोघांचाहि समाचार घ्यावयास सांपडेल. मुरारराव दुष्टशिरोमणिच ! त्यानें सदोबाकडून हंबीररावाचे कपडे मागून घेतले, आणि असा बेत केला कीं, हंबीररावास मारून नंतर त्याचे कपडे वापरून ताराबाईकडे जावयाचें व त्या कपड्यांनीं तिला फसवून तिजशीं संभोग करायाचा. हा त्याचा संकल्प कितपत सिद्धीस गेला हें पुढें कळेलच.

तारा मागें सांगितल्याप्रमाणें आपल्या नवऱ्याकडे जावयास जी निघाली ती सदोबानें दुरून दाखवून दिलेला मार्ग विसरली आणि भलतीकिडेच आडरानांत शिरली. जातां जातां ती एका गुहेपाशीं आली. या गुहेंत तिचे दोघे भाऊ रहात होते. कोणते ह्मणाल तर जे लहानपणीं कोणीं चोरून नेले होते ते. चोरून नेणार संभाजीच्या पदरचा सरदार होता. यानें त्याची चाकरी इमानें इतबारें केली असतां त्यावर फितुरीचा आरोप ठेवून संभाजीनें त्यास हद्दपार केलें होतें. या अन्यायाचा सूड वरील सरदारानें असा घेतला कीं, जातांना राजाचे दोन मुलेंच चोरून नेले ! असो; तर या प्रसंगीं निर्जन अरण्यांत ज्या तिघां माणसांची तारेची गांठ पडली तीं तिघें जणें वरील दोन राजपुत्र व त्यांचें पालन पोषण ज्यानें केलें तो वरील हद्दपार केलेला सरदार अशीं होत. तारेनें वेषांतर केलेलें असल्यामुळें व विश्वासराव हें नांव धारण केल्यामुळें अर्थात्च तिचें स्त्रीत्व वरील तिघांस कळून आलें नाहीं. मग तीं तिघें

सीजर नामक प्रख्यात रोमन सरदारानें ब्रिटन देश जिंकून रोमच्या अमलाखालीं आणला होता ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. पुढें ऑगस्टसच्या बादशाही अमलांत ब्रिटनचा राजा अर्थातच रोमचा मांडलिक होता.

भावंडांप्रमाणें त्या गुहेंत रहात असतां एकदां असें झालें कीं, तारा आजारामुळें तेथेंच पडून राहिली व तिचे दोघे भाऊ शिकारीस गेले. तारेच्या आजाराचें कारण अर्थात्च शरीराला झालेली दगदग व चित्ताची अस्वस्थता हीं होत. मागें सांगितलेंच आहे कीं, सदोबानें जातांना एक औषधाची डबी तिच्या हवालीं केली होती. या डबींतलीच एक गोळी या वेळेस तारेनें घेतली. या गोळ्यांची हकीकत अशी होती कीं, त्या राणीकरितां राजवैद्यानें विषारी म्हणून तयार करून दिल्या होत्या. खरोखरी त्या विषारी नव्हत्या; वैद्यानें राणीचा मतलब जाणून त्यांत एवढी मात्र खुबी करून ठेवली होती कीं, त्या पोटांत गेल्या असतां कांहीं वेळ मनुष्यानें मृतवत् पडावें; पण प्रहरा-भरानें पुनः चांगलें सावध व्हावें. राणीस ही वैद्याची हिकमत कळून आली नाहीं. तिनें वरील गोळ्या विषारीच समजून एके प्रसंगीं गोडींत आल्यासारखें दाखवून डबीची डबी सदोबास बहाल दिली, व त्यास सांगितलें कीं, या गोळ्या मोठ्या गुणकारी आहेत, कसलेंहि दुखणें असलें तरी तें यांनीं हटतें. तर वरच्यांपैकींच एक गोळी तारेनें या वेळेस जेव्हां घेतली तेव्हां तिचा परिणाम काय झाला तें सांगायाला नकोच. तिचे भाऊ शिकार खेळून घरीं जों येतात तों ही मरून पडली आहे! अगोदरच शिकारींत एक भयंकर गोष्ट घडून आली होती. ती ही कीं, वरील राजपुत्रांपैकीं एकाची व हंबीररावाचा पोषाक करून आलेल्या मुरारराव‌ाची रानांत गांठ पडून दोघांची बोलाचाली झाली, व हातघाईवर गोष्ट येऊन राजपुत्रानें मुरारराव‌ाचें डोकें उडविलें. तें घेऊन तो घराकडे येत असतां त्याच्या भावानें व त्यांच्या बरोबरच्या वृद्ध सरदा-रानें तें कृत्य जेव्हां पाहिलें तेव्हां या सरदारास मुरारराव‌ाची ओळख पडून मोठी धास्ती पडली. त्यास वाटलें कीं आपली गुप्त जागा संभाजी राजास बहुधा कळली असावी, व या कृत्याचा शोध लागला असतां आपली धडगत रहाणार नाहीं. तेव्हां वरील प्रसंग डोळ्यांपुढें असतां तारेचें निश्चेष्ट शरीर पाहून तर त्याच्या हृदयास केवढा धक्का बसला असेल हें सांगावयासच नको! दोघे तरुण राजपुत्र हे लोकव्यवहारानभिज्ञ, पण त्यांसहि या पुरुषवेषधारी त्यांच्या भगिनीनें थोडक्याशा काळांत इतके आपलेसे करून टाकले होते कीं, तिच्या भासमान प्रेतावर ते दुःखाच्या लहरींत मूर्च्छागत होऊन पडले. असो; शेवटीं शोक आंवरून त्यांनीं तारेस प्रेतसंस्कार करून झाडींत नेऊन ठेवली.

गोळीचा अंमल उतरल्यावर तारा जागी होऊन पहाते तों आपण कोठें आड-रानांत आहों असें तीस आढळलें. येथें आपणास कोणीं आणून टाकलें, व दिसतें आहे हें सारें खरें आहे कीं स्वप्न आहे, अशा प्रकारचे अनेक विचार तिच्या मनांत येऊं लागले, व ती अगदीं गोंधळून गेली. अंमळ पुढें जाऊन इकडे तिकडे पाहूं लागली तों तिच्या दृष्टीस हंबीररावाचें पागोटें पडलें. तें पाहून तर तिला अतिशयित दुःख झालें.

तिला असें वाटलें कीं सदोबानें मुरारराव शीं मथून हा माझा घात केला ! पण अंमळशानें तिनें आपल्या जीवाला असा धीर दिला कीं नुसतें पागोटें पाहिल्यावरून भलभलत्या कल्पना मनांत आणणें हें बरोबर नाहीं; या गोष्टीचा पक्का शोध लावला पाहिजे. असा निश्चय करून ती मार्गक्रमण करूं लागली. तों पुढें लवकरच विजयपुरचा वकील विजयसिंग याच्या लवाजम्याची व तिची गांठ पडून ती त्याच्यापाशीं चाकरीस राहिली. ही चाकरी पतकरण्यांत तिचा मतलब असा होता कीं, विजयपुरच्या लष्करांत आपला नवरा इकडे येईलच, तर या योगानें त्याची व आपली गांठ पडेल.

पुढें सुवर्णपुर व विजयपुर या दोन्ही संस्थानांचीं दळें समरांगणांत उभीं ठाकून मोठें निकराचें युद्ध झालें. संभाजीकडे कोणी मोठा सरदार नसल्यामुळें त्याचा मोड होण्याचा रंग आला होता; पण त्याच्या तर्फेनें त्याचे दोन पुत्र व त्यांजबरोबर असणारा सुवर्णपुरचा जुना सरदार हे लढल्यामुळें, व या तिघांनीं त्या दिवशीं खूप तरवार गाजाविल्यामुळें, विजयपुरच्या सैन्याचा केवळ पराभव झाला. विजयपुरचा सरदार विजयसिंग, त्याचा हुजऱ्या विश्वासराव (ह्मणजे वेषांतर केलेली तारा), आणि हंबीरराव या तिघांस पकडून राजदरबारीं नेलें. हंबीरराव हा रणभूमीवर वेषांतर केलेला होत्साता संभाजीच्या तर्फेनें लढला, तारेच्या वधाचा वृत्तांत सदोबानें त्यास खोटाच कळविला. तेव्हांपासून त्यास आपल्या कौर्याचा परम अनुताप होऊन तो जीवास सुद्धां कंटाळला होता. यास्तव वरील समरप्रसंगीं कसा तरी मृत्यु येवो अशी तो वाट पहात होता. पण रणभूमीवर जेव्हां त्याचा हेतु साध्य झाला नाहीं, तेव्हां तो बळेंच शत्रूच्या पक्षांतला ह्मणून सुवर्णपुरच्या शिलेदारांच्या स्वाधीन झाला. त्यांनीं त्यास कैद करून सुवर्णपुरास नेल्यावर तेथें कांहीं वेळ त्यास कारागृहांत ठेवून नंतर चौकशीकरितां दरबारीं नेलें. तेथें सुवर्णपुरचा जुना सरदार व त्याजबरोबरचे दोघे राजपुत्र यांसहि राजानें मोठ्या आदरानें सत्कारार्थ बोलाविलें होतें. तसाच हंबीररावाचा प्रतिपक्षी खंडूजी व इमानी चाकर सदोबा हे दोघेहि त्या प्रसंगाला दरबारीं हजर होते.

याप्रमाणें सर्व मंडळी एके ठिकाणीं जुळल्यावर पुढल्या प्रकारें सर्वांची आपआपसांत ओळख पडली. संभाजीनें विजयसिंगास निक्षून सांगितलें कीं, तुह्मी आतां आमचे हातांत सांपडलां आहां, तर तुह्मांस व विजयपुरवाल्या सर्व बंदिवानांस आह्मी देहान्त शासन देणार. विजयसिंगानें उत्तर केलें कीं, ज्याअर्थीं आह्मी आपल्या कबजांतच आहों, त्या अर्थीं आमचें आपणास जें वाटेल तें करण्यास आपण मुकत्यारच आहां, पण एक मात्र गोष्ट मी मागून घेतों कीं, हा जो मजबरोबर हुजऱ्या आहे हा आपल्याच मुलखांतला आहे व अत्यंत सुशील आहे, तर याला मात्र जीवदान द्यावें. हें भाषण ऐकून संभाजीनें ती गोष्ट मान्य केली, व हुजऱ्यास आपणाजवळ बोलाविलें. त्यास

पहातांच राजाच्या हृदयांत स्वाभाविक उमाळा आला, आणि तो त्यास ह्मणाला, "मुला, तुजवर माझें प्रेम ओढवतें, आजपासून तूं माझाच झालास; तुला जीवदान तर दिलेंच आहे, याखेरीज आणखी तुला कांहीं मागायाचें असेल तर बोल." मुलगा आपल्या नेणत्या बापाजवळ जाऊन त्यानें ही गोष्ट मागून घेतली कीं, त्या खंडूजीच्या हातांत आंगठी आहे ती तुला कोठून मिळाली एवढें आपण त्यास विचारावें ह्मणजे झालें. नंतर संभाजीनें वरील प्रश्न केला असतां एकंदर गोष्टींचा उलगडा झाला. खंडूजीनें आंगठीची व कंकणाची सारी हकीकत सर्वांसमक्ष बोलून दाखविली; ती ऐकून हंबीररावाचा हृदयक्षोभ अनावर होऊन तो तारेच्या नांवानें शोक करूं लागला व आपली निर्भर्त्सना करून घेऊं लागला. पुरुषवेषी तारा त्यास आंवरण्याचा यत्न करूं लागली, तों त्यानें रागावून फाडकन तिच्या तोंडांत भडकावली. त्यासरशी ती खालींच पडली. तो अनर्थ पाहून सदोबा पुढें झाला, आणि त्यानें तो मुलगा कोण याचा पुकारा केला. याप्रमाणेंच क्रमाक्रमानें संभाजीच्या पक्षानें लढलेले तिघे योद्धे कोण याचाहि निकाल लागला. शेवटीं राजवैद्य येऊन त्यानें राणींची अखेरची बातमी येऊन दरबारांत सांगितली. या वेळेस त्यानें जो वृत्तांत सांगितला त्यावरून राजास आपल्या बायकोच्या दुष्टपणाचें स्वरूप पुरतेपणीं समजून आलें. मुरारराव्याचा कसा अंत झाला ती हकीकतहि राजपुत्राच्या तोंडून राजास अगोदरच कळलींच होती. तेव्हां याप्रमाणें दुष्टांस विपत्ति प्राप्त होऊन चिरवियुक्त सज्जनांचा सरतेशेवटीं समागम झाला, व सर्व तेव्हांपासून आनंदानें काळक्रमणा करूं लागलीं.

याप्रमाणें प्रस्तुत नाटकाचें कथासूत्र आहे. हें मूळ इंग्रजी नाटकाच्या अगदीं बरहुकूम जरी नाहीं तरी बहुतेक अंशीं मूळच्यासारखेंच आहे. देशकालानुरोधास्तव कांहीं थोड्या ठिकाणीं मात्र भाषांतरकारास फेरफार करावा लागला आहे. हा प्रकार कोणकोणत्या ठिकाणीं केला आहे हें पुढें सांगण्यांत येईलच. तूर्त वरील संविधानकाच्याच गुणदोषांचें विवेचन करूं.

संविधानकचातुर्य हा नाटककाराच्या करामतीचा एक मोठाच भाग आहे. इमारतीस जसा नकाशा, तसें नाटकास किंवा कादंबरीस संविधानक होय. ज्याप्रमाणें उत्कृष्ट कारागीर ह्मटला ह्मणजे त्यास इमारतीचा प्रत्येक भाग जितका संदर व भव्य करतां येईल तितका करूनच बसतां उपयोगी नाहीं, तर एकंदर घाट डौलदार साधण्याविषयींहि त्यानें पहिल्यापासून धोरण ठेविलें पाहिजे, त्याप्रमाणेंच नाटककारानें व कादंबरीकारानेंहि आपल्या कृतीचें केवळ अवयवशः मनोरमत्व साधणें पुरें नव्हे, तर सामग्रचेंकरून पहातांहि तींत उणेपणा कोठें दिसूं नये, याविषयीं सुद्धां त्यानें खबरदारी ठेवणें जरूर आहे. शेक्सपियरच्या नाटकांत पहातां प्रस्तुत गुण प्रायः पूर्णपणें आढळत नाहीं. कथासूत्रांत ठिकठिकाणीं गुंतागुंत झालेली दृष्टीस पडते, व कोठें कोठें असंबद्धत्वहि

नजरेस येतें.[1] प्रकृत नाटकांतील संविधानक बरेंच मौजेचें आहे, तरी त्यांत पुष्कळ ठिकाणीं अनेक प्रकारचे दोष आहेत. ते कोणते ते अनुक्रमानें पुढें सांगतों.

प्रथमतः उपोद्घातच पहिल्या प्रवेशाचें स्थल राजवाड्याच्या पिछाडीचा बाग योजला आहे. या बागेंत दोघां गृहस्थांचें परस्पर जें भाषण झालें आहे त्यांत पुढील नाटकांतील मुख्य पात्रांविषयींची माहिती श्रोत्यांस किंवा वाचकांस होण्याची कवीनें तजवीज केली आहे. या तजविजीच्या संबंधानें पहातां वरील संवाद ठीक आहे. पण त्याच्या संबंधानें पहिल्यानें ही शंका येते कीं, वरील दोघे संवादक राजाच्या बागेंत कसे शिरले? त्यांच्या भाषणावरून तर ते राजपुरुष असावेत असें दिसत नाहीं; कां कीं, त्यांतील एक तर जसा काय नुकताच सुवर्णपुरांत येऊन ठेपलासा दिसतो, त्यास राजाच्या अपत्याविषयीं देखील माहिती नाहीं. बरें, हे दोघे राजसेवक नव्हेत ह्मणावें तर राजवाड्याच्या पिछाडीच्या बागेंत यांचा रिघाव झाला कसा? याप्रमाणें वरील प्रवेशावर दोहोंकडून अडचण येते. पहिल्या व दुसऱ्या अंकांत खंडूजीची व हंबीररावाची पैज, तारेचें विलोभन, खंडूजीचा कपटोपक्रम, आणि त्याची पूर्ण सिद्धि, इतक्या गोष्टी मुख्य आहेत. आतां सर्वांत मुख्य गोष्ट जी पैजेची,—कीं जी साऱ्या नाटकाचें जणों काय कळसूत्रच आहे—तिजविषयीं येथें कांहीं लिहीत नाहीं; तिच्या संबंधानें पुढें विचार करावयाचा आहे. बाकी खंडूजीचा व तारेचा जो प्रसंग झाला तो नीट मनांत आणला असतां त्यावर कित्येक आक्षेप निघण्यासारखे आहेत. एक तर खंडूजी आपणास अढल सोदा ह्मणवीत असतां त्यानें प्रथम दर्शनींच तारेशीं लघळपणा आरंभिला, व आपली शोभा करून घेतली; तसेंच एक प्रयत्न निर्फळ होतांच त्यानें एवढी

१. **जॉनसन**चा अभिप्राय असाच आहे—

"The plots are often so loosely formed, that a very slight consideration may improve them, and so carelessly pursued, that he seems not always fully to comprehend his own design. He omits opportunities of instructing or delighting, which the train of his story seems to force upon him, and apparently rejects those exhibitions which would be more affecting for the sake of those which are more easy.

It may be observed, that in many of his plays the latter part is evidently neglected. When he found himself near the end of his work, and in view of his reward, he shortened the labour to snatch the profit. He therefore remits his efforts where he should most vigorously exert them, and his catastrophe is improbably produced or imperfectly represented."

Preface to Shakspere.

जीवावरील पैज मारली असतां तिचा नाद तेव्हांच अगदीं सोडून दिला, या दोन्ही गोष्टी नीटशा जमत नाहींत. शिवाय साऱ्या जन्मभर ज्यानें लफंगबाजी केली त्याची वृत्ति केवळ एका निर्भर्त्सनेनें अगदीं पालटून जावी, व पतिव्रतेचें तेज त्यास केवळ दुःसह व्हावें, हेंहि प्रायः असंभाव्यच ! त्यांतून खंडूजीनें तारेच्या महालांत येण्यास पेटीची जी योजना केली ती तर फारच विलक्षण दिसते. जडावाचे दागिने व नकशीचीं रुप्याचीं भांडीं ठेवावयाची पेटी कितीशी मोठी असणार ? मग खंडूजीसारख्या बाप्यास ज्यांत आंत गुपचुप बसतां येई असा सपाटा जड पेटारा जेव्हां तारेच्या महालांत आणून चाकरांनीं ठेविला असेल तेव्हां तीस मुळींच संशय कसा बरें आला नाहीं ? शिवाय तारेनें पेटी आपल्या हवालीं घेतांना आंत काय आहे हें पाहिलें नाहीं काय ? निदान यजमानांनीं राजाकेडे पाठविण्यास एवढ्या जिनसा तरी कोणत्या तन्हेच्या करविल्या आहेत हींहि स्वाभाविक उत्कंठा तीस कशी झाली नाहीं कोण जाणे ! पेटीस मोहोर केलेली असेल ह्मणावें तर तीस नुसता कोइंडाहि नव्हता; कां कीं, झांकण वर करून खंडूजीची स्वारी बाहेर पडली आहे व पुनः तें लावून घेऊन आंत जाऊन बसली आहे असें आढळतें. एकंदरींत हें सर्व प्रकरण गोंधळाचेंच आहे. बरें, आतां एकंदर राजवाड्यांतील व्यवस्था पहा. एक तर खुद्द राजाचेच मुलगे चोरून नेले असतां त्यांचा बिलकूल पत्ता नाहीं. ही ढिलाई जरी संभाजी महाराजांच्या माथीं मारतां आली, तरी पुढें राणी बायजाबाई हिच्या हातीं सारें राज्यसूत्र आलें असतां व ती एवढी दक्ष असतांहि राजवाड्यांतील अव्यवस्था मोडली असें आढळत नाहीं. तारेला कोंडून ठेविली असतां खंडूजी खुशाल तिच्याकडे येतो जातो, त्याची कोणी फारशी विचारपूसहि करीत नाहीं. तारेस हंबीररावाचें कपटाचें पत्र आल्यावरून ती सदोबाबरोबर निघून जाते, आणि हें वर्तमान पुढें कांहीं दिवसांनीं राजास कळतें ! तेव्हां हाहि या नाटकांत घोंटाळ्याचाच प्रकार आहे. याप्रमाणेंच सदोबा एवढा वस्ताद असतां,—कीं इकडे आपल्या धनिणीची व धन्याची एकनिष्ठपणें सेवा करावयाची व त्यांस संकटांतून सोडवायाचें व इकडे राणी व मुरारराव यांचीहि मर्जी जाऊं द्यावयाची नाहीं—असें असतां राणीच्या गोळ्या त्यानें मुकाट्यानें घेऊन त्या बिनदिकत तारेच्या हवालीं वाटेच्या आजाराला उपयोगी ह्मणून कराव्या, त्या गोळ्यांची अगोदर परीक्षा करण्याचें त्यास मुळींच सुचूं नये, हें मोठें आश्चर्य नव्हे काय ? त्यास राणीच्या स्वभावाची माहिती असून एवढा गाफलिपणा त्याचें हातून कसा झाला ? शेवटल्या अंकांत तारा आपल्या बापासमोर उभी राहिली असतां तिची त्यास ओळख पटत नाहीं आणि मुरारराव्याची सोळा वर्षांमागची ओळख जुना सरदार मल्हारराव यास बरीक तत्क्षणींच पटते ! याप्रमाणें एकंदरींत बऱ्याच ठिकाणीं प्रस्तुत नाटकांत विरोध व असंभाव्यता हीं दृष्टीस पडतात.

वरच्याप्रमाणेंच इतर कांहीं ठिकाणींहि बरेच आक्षेप निघण्यासारखे आहेत. प्रकृत नाटकांतील मुरारराव हें पात्र बहुतेक अंशीं 'मृच्छकटिकां'तील प्रतिनायक शकार याच्या सारखें आहे. दोघेहि मूर्खशिरोमणि, दोघेहि दुष्ट, दोघांचेंहि नाटकांतील नायिकेविषयीं प्रेम व त्या प्रेमाचें दोघांसहि बक्षीस ह्मटलें ह्मणजे तिरस्कार. एक राणीचा भाऊ व एक राणीचा पूर्वसंबंधाचा पुत्र, दोघांचेंहि वरील संबंधाच्या जोरावर उद्धताचरण व क्रूर वर्तन, याप्रमाणें अनेक गोष्टींमध्यें दोघांचें इतकें साम्य आहे कीं एक मूर्ति डोळ्यापुढें उभी राहिल्याबरोबर दुसरी रहाते! पण एका ठिकाणीं मात्र या इंग्रेजी शकारानें अप्रयोजकपणाची अगदीं कमाल करून सोडली आहे. दुसऱ्या अंकांत तारेच्या वशीकरणार्थ त्यानें एक मोठा गमतीचा उपाय योजला आहे. गवयांस बोलावून आणून त्यांजकडून प्रभातगीत ह्मणविलें आहे, कीं त्या गाण्यास भूलून तारेनें मुरारावाच्या गळींच येऊन पडावें! ही लाखी मसलत 'राव मुरारींस' कोणीं दिली असेल ती असो! एकंदरींत तारा खोलींत कडी लावून बसली आहे, व मुरारराव, गवई, राजा, राणी सर्व मंडळी बाहेर दारांशीं अर्जदाराप्रमाणें किंवा रिणकऱ्यांसारखी उभी आहेत. हा प्रवेश फारच मजेचा दिसत असेल! त्यांतून शेवटीं मुरारजींनीं जी अक्कल खर्चली आहे तीस तर तोडच नाहीं;—तेथल्या तेथेंच आपल्या हृदयंगमेच्या दासीशीं संधान करून आपलें वकीलपत्र पतकरण्याविषयीं ते तिला गळ घालताहेत! जी तारा आंतून प्रभातगीत ऐकून दारांशीं उभ्या राहिलेल्या नंदीवर सुप्रसन्न होणार तीच आपला व दासीचा संवादहि ऐकेल ऐवढें सुद्धां त्यास कळून येऊं नये काय? असो; पांचव्या अंकांत हंबरिरावास झालेला परम अनुताप व त्या वैतागांत जीवितत्यागाविषयीं केलेला पूर्ण निश्चय या त्याच्या वृत्ति दाखविल्या आहेत. पण या दोन्ही त्या ठिकाणीं विशेष शोभण्यासारख्या नाहींत असें आह्मांस वाटतें. सदरील अंकाच्या शेवटीं खंडूजीनें आपल्या अधमपणाचा उच्चार केला त्या समयीं त्यास परमोद्वेग झाला आहे व शोकवृत्ति उच्छृंखल झाली आहे तें ठीक आहे. पण जोंपर्यंत तारेच्या जारकर्माविषयीं त्याची पूर्ण खात्री होऊन चुकलेली होती तोंपर्यंत त्यानें आपला धिक्कार करून घ्यावा व जीवास कंटाळून जावें हें स्वाभाविक दिसत नाहीं. 'उत्तररामचरितां'त रामास उद्वेग व शोक झाला आहे तो यथार्थ आहे, कां कीं सीतेचा परित्याग त्यानें केवळ अपवादनिरसनार्थ व लोकाराधनास्तव केला होता, तिच्या शुद्धतेविषयीं तो स्वतः निःसंदेह होता. त्याप्रमाणेंच आथेल्लोनें शेवटीं आपणास मारून घेतलें व खोट्या दोषारोपावरून ज्या आपल्या आवडत्या पत्नीचा त्यानें नुकताच अविचारानें वध केला तिच्या प्रेतावर पडून त्यानें प्राण सोडला, हेंहि मनुष्यस्वभावास अनुसरूनच आहे. पण प्रस्तुत नाटकांतील नायकाच्या हृदयांत उद्वेगादि वृत्ति एवढ्या प्रबळ होण्यास तसें कांहीं कारण दिसत नाहीं. सदरील पांचव्या अंकांत दोघां तरुण राजपुत्रांचा अलौकिक

पराक्रम वर्णन केला आहे तोहि केवळ अत्युक्तिरूप असल्यामुळें असंभाव्य होय. सुवर्णपुरच्या लोकांचा बहुतेक मोड होऊन ते पळूं लागेल असतां एका ह्यातान्यानें व दोघां कुमारांनीं शत्रुसैन्याचा लोटचा लोट मागें फिरवावा हें कृत्य केवळ अमानुष दिसतें. 'उत्तररामचरितां'त एकटा लव साऱ्या रामसैन्याशीं लढला आहे, 'इलियड'मध्यें ट्रोजन लोक ग्रीक लोकांच्या जहाजांपर्यंत येऊन ठेपून त्यांस आग लावण्याच्या बेतांत आलेले असतां आकिलिसनें त्यांस माघारें पिटून लावलें व त्यांच्या सेनानायकास मारून त्यांचा अगदीं मोड केला आहे, 'जुन्या करारां'तला सामसन यानें मेलेल्या गाढवाच्या दाढेनें हजारों अविंधांस झोडपून काढलें आहे, हें सर्व खरें; पण वरच्यासारखीं वर्णनें प्रस्तुतसारख्या नाटकांत शोभत नाहींत. जसा विषय असेल तशी त्याच्यावर रचना करायास पाहिजे. महाभारतांतील विषय घेऊन त्यावर रचलेल्या नाटकांत जशीं काडतुसें, बेगनटें, हडेल हप वगैरे प्रकार शोभणार नाहींत, त्याप्रमाणेंच सत्तावन्न सालच्या बंडावरील नाटकांतहि नानासाहेबानें पर्वतास्त्र सोडलें असतां त्यावर हवलाक साहेबानें वज्रास्त्र सोडलें, तात्या टोप्याचें व सर ह्यू रोजचें गदायुद्ध झालें, इत्यादि वर्णनहि अप्रयोजक होईल. तर या रीतीनें पहातां प्रस्तुत नाटकाचा काळ ऑगस्टस सीजरचा कारकीर्द असतां तीन वीरांनीं साऱ्या सैन्याचा पराभव केल्याचा प्रकार कवीनें यांत जो घालून दिला आहे तो असमंजस होय. याप्रमाणेंच तारेस पातिव्रत्यापासून भ्रष्ट करण्याचा जो खंडूजीनें प्रयत्न केला आहे तोहि नीट साधला नाहीं. 'अथेल्लो' नाटकांत यागोनें अथेल्लोस जसा मोठ्या शितापीनें व युक्तिप्रयुक्तीनें गोत्यांत आणला आहे त्याप्रमाणेंच कांहीं खंडूजीनें करावयास पाहिजे होतें. पण तसें कांहींच नाहीं. खंडूजी प्रतिज्ञा करून निघतो कोणत्या आवेशानें, आणि पुढें त्याच्या अजागळपणानें सारा विभु एका क्षणांत ढांसळून काय जातो! एकंदरींत 'फटाटापो भयंकरः' या वचनाची प्रतीति येते![1]

५. याप्रमाणें मूळ इंग्रेजी नाटकांतील संविधानकांत जे दोष आढळले ते दाखविले. यांबद्दल अर्थात्च भाषांतरकाराकडे कांहीं जबाबदारी नाहीं. भाषांतरकर्त्याचें काम मूळ ग्रंथांत चांगला किंवा वाईट कोणत्याहि तऱ्हेचा फेरफार करण्याचें नाहीं. जसें मूळांत असेल

१. **जॉनसनचा** 'सिंबलेन' नाटकाविषयीं येणेंप्रमाणें अभिप्राय आहे–

"The play has many just sentiments, some natural dialogues, and some pleasing scenes, but they are obtained at the expense of much incongruity. To remark the folly of the fiction, the absurdity of the conduct, the confusion of the names, and manners of different times, and the impossibility of the events in any system of life, were to waste criticism upon unresisting imbecility, upon faults too evident for detection, and too gross for aggravation."

त्यासारखें त्यानें अन्य भाषेंत उतरून दिलें ह्मणजे झालें. आतां प्रस्तुत भाषांतरकारानें सदरील ग्रंथ मराठींत उतरतांना पुष्कळ ठिकाणीं बदल केला आहे हें खरें; पण हा बदल फार करून मूळचा इंग्रेजी पेहेराव काढून त्याच्या जागीं मराठी घालण्यापुरताच आहे. हें वेषांतर कोणत्या तऱ्हेनें केलें आहे व तें कितपत साधलें आहे याविषयीं आतां विचार करूं.

मूळ नाटकांत राणी पुनरूढा आहे; ह्मणजे बायजाबाई ही संभाजी राजाची दुसरी बायको, व संभाजी हा तिचा दुसरा नवरा. राणीस पहिल्या नवऱ्यापासून झालेला मुलगा मुरारराव होय. मराठ्यांत पाटाचा प्रकार जरी सुरू आहे तरी तो प्रतिष्ठित धरलेला नाहीं, व उंच प्रतीच्या लोकांत तो चालूहि नाहीं; यास्तव वरील ठिकाणीं दोन फेरफार केले आहेत. ते हे कीं, राणीचा प्रथम संबंधच ठेवून मुरारराव तिचा भाचा केला आहे. पात्रांच्या परस्पर संबंधांत केलेला बदल काय तो एवढाच आहे. इकडील देशांत स्त्रियांचा व्यवहार तिकडच्या पेक्षां फार मर्यादेचा व आड पडद्यांतला असतो; यास्तव मूळ नाटकांत राणी जशी भर दरबारांत विजयपुरच्या वकीलाशीं बोलते आहे तसें येथें दाखविलें नाहीं. तिचें आणि राजाचें भाषण होण्याकरितां निराळ्या प्रवेशाची योजना केली आहे. शेवटल्या अंकांतील शेवटल्या प्रवेशांत तारेचें व तिच्या नवऱ्याचें जें पुनरभिज्ञानानंतर भाषण झालें आहे त्यांतहि वरील देशाचारास अनुसरूनच फेरफार केला आहे. जावळी महालांतील रानांत मुरारराव्यानें घातलेलें हंबीररावाचें पागोटेंच तेवढें तारेस दाखविलेलें आहे; मूळ नाटकांत मुरारराव्याचें धड पडलेलें जसें तिच्या दृष्टीस पाडलें आहे तसा प्रकार भाषांतरांत केलेला नाहीं. याचें कारण उघडच आहे कीं इकडील देशाचाराप्रमाणें नवऱ्याच्या प्रेताबरोबर तीस सहगमन करणें प्राप्त होतें. तारेच्या भासमान मरणाच्या प्रसंगींहि भाषांतरकारास मूळापेक्षां निराळा मजकूर घालून द्यावा लागला आहे. नाटकांतील काळ रोमन लोकांच्या वेळचा असल्यामुळें त्या वेळेस ब्रिटन बेटांत मूर्तिपूजेचा धर्म चालू होता; यास्तव त्या धर्माप्रमाणें प्रेतसंस्काराच्या वेळचा गायनाचा वगैरे प्रकार मूळ ग्रंथांत आढळतो. तारेस मेलेली पाहून एका राजपुत्रानें प्रेतवाद्य वाजविण्यास आरंभ केला आहे, व तो स्वर ऐकून त्याचा भाऊ व त्यांनीं मानलेला बाप असे दोघे गुहेकडे आले आहेत. पुढें प्रेत जमीनविर ठेवल्यावरहि दोघांनीं त्या वेळच्या रिवाजाप्रमाणें गाणें ह्मटलें आहे, व प्रेतावर पुष्पें टाकलीं आहेत. हें सर्व भाषांतरकारास बदलावें लागलें आहे, व इकडील आचारास जुळेसा कांहीं नवा मजकूरहि घालावा लागला आहे. याप्रमाणेंच हंबीररावास तुरुंगांत पडलेलें स्वप्न, मूळ नाटकांत हंबीररावाच्या स्वप्नसृष्टींत त्याची आई, बाप, व बंधु इतके आले आहेत, व यांशिवाय जुपिटरानें (विष्णूनें) दर्शन दिलें आहे. भाषांतरांत केवळ विष्णुदर्शनाचा प्रसंग मात्र घातला आहे. हे येथवर प्रकृत भाषांतरांत

केलेले मोठमोठे फेरफार झाले. यांखेरीज बारीक सारीक अदलाबदल जी मध्यें मध्यें अनेक ठिकाणीं करावी लागली आहे ती तारेच्या महालाचें वर्णन, भूपाळी वगैरे, स्थलांकडे अंमळ लक्ष पुरविलें असतां सहज लक्षांत येणारी आहे. शेक्सपीयरच्या वेळच्या लोकांची अभिरुचि दांडग्या तऱ्हेची असल्यामुळें येथील फाल्गुन मासास शोभतेशीं भाषणें त्याच्या नाटकांतून व काव्यांतून रगड आहेत,[1] तसाच प्रकार कांहीं थोड्या ठिकाणीं प्रस्तुत नाटकांतहि आहे.[2] हा प्रकार अर्थात्च भाषांतरांत मुळींच गाळून टाकला आहे. त्याप्रमाणेंच मिलफर्ड बंदर, रोमन लोकांचीं जहाजें, वगैरे समुद्राच्या खाणाखुणाहि भाषांतरांत अगदीं बुजवून टाकल्या आहेत. तिसऱ्या अंकांतील शेवटला प्रवेश बहुतेक नवा करून घातल्यासारखाच आहे.

याप्रमाणें प्रस्तुत भाषांतरांत ग्रंथकारानें इकडील रीतरिवाजाशीं जम बसण्याकरितां मूळ नाटकांत कोणकोणते फेरफार केले आहेत ते सांगितले. आतां या रूपांतराच्या योगानें इष्ट हेतूची सिद्धि कितपत झाली आहे ती पाहूं.

६. रा० महाजनी यांनीं प्रस्तावनेंत आरंभीं असें लिहिलें आहे कीं, "जे परदेशीय आचार विचार आपल्या रीतींस जुळत नाहींत त्यांचा या पुस्तकांत अव्हेर केला आहे. मूळ ग्रंथांत जेवढा भाग आपल्या देशस्थितीस अनुसरून आहे तेवढा मात्र ठेविला आहे. बाकीचा भाग बदलला आहे." ही प्रतिज्ञा जर सामान्यतः घेतली तर ती प्रस्तुत पुस्तकांत बऱ्याच रीतीनें शेवटास गेली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं; ह्मणजे हें आपण इंग्रेजी नाटक वाचीत आहों एवढी गोष्ट ध्यानांत धरून चाललें असतां वाचणारास प्रस्तुत ग्रंथ वाचीत असतां विशेष अडखळायाला नको. कां कीं, हंबीररावास आपल्या प्रियेच्या हातांत कांकण घालतांना पाहून व तिची आंगठी आपल्या बोटांत घालतांना पाहून वरील तत्त्व लक्षांत ठेवणाऱ्या वाचकास किंवा प्रेक्षकास मुळींच आचंबा वाटणार नाहीं. इंग्रेज लोकांचा वरील रिवाज आहे, हें तो वरील प्रसंगीं तेव्हांच ध्यानांत आणील; व आंगठीचा आणि कांकणाचा एकंदर संविधानकाशीं अत्यंत निकट संबंध जडून राहिला असल्यामुळें हा इंग्रेजी रिवाज भाषांतरकारास बदलतां येईना ही सबबहि तो लक्षांत आणून तिचा फायदा प्रस्तुत पुस्तककारास देईल. पण वरील प्रतिज्ञेचा अक्षरशः अर्थ करून हें मराठीच नाटक आहे, अशा बुद्धीनें जर कोणी 'तारा' वाचण्यास आरंभ करील तर तो जागोजाग भांबावून जाईल. 'साठे,' 'गोखले' वगैरे आडनांवें ऐकून जर कोणीं नवल्यानें गोमांतकस्थ ब्राह्मणांस आपल्या घरीं बोलाविलें, तर त्यांच्या

१. याचा मासला पहाणें असल्यास 'आथेल्लो' नाटकाचा पहिला प्रवेश पहावा. तशीच प्रस्तुत कवीचीं दोन तीन लहान काव्यें आहेत तींहि पहावीं.

२. मूळ 'सिंबेलैन' नाटकाच्या दुसऱ्या अंकांतील हंबीरराव व खंडूजी यांचें भाषण, व शेवटची हंबीररावाची स्पष्टोक्ति हीं दोन स्थलें पहा.

विजारी व केंस पाहून तो जसा वेडावून जाईल, त्याप्रमाणेंच तारेचा व हंबीररावाचा गुप्त विवाह, तिचें आपल्या गूढ वल्लभाच्या तर्फेनें बापाशीं भांडण व तोंडास तोंड देणें, वगैरे विलक्षण प्रकार पाहूनहि वरील भावड्या वाचकास असें होऊन जाईल कीं हे इंग्रेज मराठे कोण्या मुलखाचे कोण जाणे!! त्यांतून साऱ्या संविधानकाचें मुख्य बीज जी पहिल्या अंकांतील पैज तिजाविषयीं तर तो जितका आचंबा करीत राहील तितका थोडा![1] ज्या देशांतील राजस्त्रियांस जुनीं संस्कृत नांवें झटलीं ह्मणजे 'अवरोध' 'असूर्यंपश्याः' अशा तऱ्हेचीं, व अलीकडील काळ घेतला तरी जेथील स्त्रियांस पराकाष्ठेची अटक, आणि त्यांतून मराठमोळ्याचा गोशा झटला ह्मणजे तर पुसूंच नये–तेथेंच परक्या पुरुषानें नवऱ्याची चिट्ठी आणून बायकोवर लावावी व नवऱ्यानें आपल्या स्त्रीच्या पातिव्रत्याचा पण आपणच लावावा, या गोष्टी केवढ्या विलक्षण तऱ्हेच्या भासणाऱ्या आहेत!! संभाजी महाराजांच्या दरबारीं 'बॉल' होऊन खंडूजीच्या बायकोच्या कंबरेला हात घालून हंबीरराव नाचतो आहे, व तारेच्या तोंडचें मद्यपात्र खंडूजी झोकतो आहे, इत्यादि प्रकार प्रस्तुत नाटकांत आले असते तर ते जितके इकडील रिवाजाला गोड दिसले असते तितकाच वरील पैजेचा प्रसंगहि दिसत आहे.

७. असो; येथवर प्रस्तुत नाटकाचा अवांतर गोष्टींच्या संबंधानें विचार झाला, ह्मणजे मूळ नाटक कोणत्या तऱ्हेचें आहे, त्यांत भाषांतरकारानें कोणकोणते फेरफार केले आहेत वगैरेविषयीं विवेचन झालें. आतां सांप्रत पुस्तकापासून लोकांस कोणत्या तऱ्हेचा व कितपत उपयोग होण्यासारखा आहे तो पाहूं.

प्रथमतः विद्यार्थ्यांस व जिज्ञासु जनांस.—विद्यार्थी ह्मणजे जे लोक प्रकृत ग्रंथ 'सिंबलैन'चें भाषांतर ह्मणून टकिदाखल हातीं घेतील ते, व जिज्ञासु ह्मणजे ज्या लोकांचा इंग्रजींत प्रवेश नसल्यामुळें या भाषांतरावरून शेक्सपीयरच्या कवित्वगुणांची जे परीक्षा करूं जातील ते. या दोघांस प्रकृत पुस्तकापासून चांगलासा उपयोग होणार नाहीं. याचें कारण उघड आहे कीं, एक तर हें शब्दशः भाषांतर केलेलें नाहीं, व शिवाय पुष्कळ ठिकाणीं मूळांत व भाषांतरांत अतिशयित अंतर आहे. यास्तव 'अथेल्लो' व 'टेंपेस्ट' यांचा वरील दोन संबंधांनीं जितपत उपयोग होण्यासारखा आहे तितका प्रस्तुत नाटकाचा नाहीं हें सिद्धच आहे. दुसरा उपयोग सामान्य वाचकांस,—ह्मणजे जे केवळ कर्मणुकीखातर इतर नाटकांप्रमाणें व कादंबऱ्यांप्रमाणें प्रस्तुत ग्रंथ वाचावयास

१ हा पैज एतद्देशीयांच्या दृष्टीनें जरी केवळ असंभाव्य व अत्यंत अप्रतिष्ठित वाटेल तरी यूरोपांतील आचारास ती ह्मणण्यासारखी विलक्षण वाटणारी नव्हे. एक तर बोकेशीयो नामक विख्यात इटालियन ग्रंथकाराच्या एका कथानकावरूनच शेक्सपीयरनें ती आपल्या नाटकांत घेतली आहे; व शिवाय 'डॉन क्विझोट' नामक जगद्विख्यात स्पानिश कादंबरींतहि एक अशाच प्रकारचें उपकथानक आहे. याचें 'The curious impertinent' असें नांव इंग्रेजी भाषांतरांत आहे.

घेतील त्यांस. या वाचकांकरितां प्रस्तुत ग्रंथकारानें मुख्यतः परिश्रम केलेले आहेत. त्यानें प्रस्तावनेच्या आरंभीं सांगितलेंच आहे कीं, आजपर्यंत जेवढीं शेक्सपीयरचीं नाटकें मराठींत झालीं आहेत तेवढीं सर्व निव्वळ भाषांतरादाखलच असल्यामुळें एतद्देशीय वाचकांस प्रायः दुर्बोध झालीं आहेत. यास्तव त्यांस समजेल व गोड लागेल अशा पद्धतीचें भाषांतर महाराष्ट्र भाषेंत करण्याचा हा प्रथमच यत्न होय. इंग्रेजींत ज्यास adaptation (आडाप्टेशन) ह्मणतात,—ह्मणजे मूळ ग्रंथाच्या आधारावर दुसऱ्या भाषेंत स्वतंत्र रचना करायाची,—तशा तऱ्हेचा हा ग्रंथ होय. हें रूपांतर सिद्ध होण्यास किती खटपट करावी लागली आहे व ती कितपत सिद्धीस गेली आहे हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. तेथें दर्शविल्याप्रमाणें 'प्रस्तुत' नाटकाच्या कथानकांत कित्येक मोठमोठाले दोष राहिले आहेत व त्यामुळें एतद्देशीय वाचकांचा मनोभंग होणारा आहे हें खरें; पण या गोष्टीस उपाय नाहीं. व्हीनस देवीच्या कृपेनें तत्क्षणीं तरुणी बनलेली 'इसापनीतीं'तील भाटी जशी 'स्वजातिर्दुरतिक्रमा' किंवा 'मूळ स्वभाव जाईना' या न्यायास अनुसरून मूषकशब्द ऐकतांच गडबडून गेली, व प्रथमसमागमाच्या सोहळ्याचा भंग करून व तिरस्करिणीचा तिरस्कार करून तिनें जशी उंदरावर झांप घातली; त्याप्रमाणेंच आमच्या विदर्भदेशीय नाट्याचार्यानें आपल्याकडून जरी पुष्कळ मेहेनत घेऊन तारेस अगदीं मराठी 'लेडी' बनवून दिली आहे, तरी तिच्या भाषणांत व आचरणांत मूळ इंग्रेजी झांक थोडी बहुत तरी मारायाचीच! मूळच्या महानाट्याचार्याच्या शिक्षेचा संस्कार नाक कान टोंचल्यानें व झग्याच्या जागीं साडी नेसवल्यानें कोठून समूळ नाहींसा होणार? असो; तर निवळ मराठी तऱ्हेचें नाटक या दृष्टीनें पहातां भाषांतरकाराचा मुख्य जो उद्देश, कीं एतद्देशीय वाचकांचें मनोरंजन व्हावें, तो सदरील ग्रंथावरून चांगल्या प्रकारें सिद्धीस जाईल असें आह्मांस वाटतें. एक तर एकंदर संविधानक बरेंच मौजेचें आहे, व शेवटला उपसंहार तर फारच बहारीचा आहे; शिवाय शेक्सपीयरची मुख्य खुबी जी स्वभाववैचित्र्य व यथार्थ वर्णन तेंहि प्रकृत नाटकांत उत्कृष्ट तऱ्हेचें आढळतें. नायकाचें व नायिकेचें गभीरोदात्तत्व; प्रतिनायकाचें शकारसदृश मूर्खत्व, क्रूरत्व, नीचत्व; सदोबाचीं स्वाभिभक्ति; राजाचें स्त्रीजितत्व; राणीचें आनंदीबाईच्या सवाई निष्ठुराचरण व कौटिल्य; खंडूजीचा मत्सरी स्वभाव; तरुण राजाबिंड्यांचें कुशलवांसारखें स्वाभाविक उन्नतत्व व वीर्यस्फुरण;—हीं सर्व प्रस्तुत नाटकाच्या मनोरमत्वास साधनीभूत असून या महाराष्ट्रीय प्रतिकृतींतहि वरील सर्व भाग यथास्थित उतरले आहेत. कांहीं ठिकाणीं वर्णनेंहि शानदार आलीं आहेत; शिवाय प्रस्तुत ग्रंथकाराचा संस्कृत नाटकांशीं व काव्यांशीं चांगला परिचय असल्यामुळें जेथें जेथें शेक्सपीयरच्या वाणीचा व भवभूत्यादिकांच्या सरस्वतीचा परम हृद्य संगम झाला आहे तेथें तेथें इकडचा आयताच ओघ भाषांतरकारानें आपल्या कृतींत ओतून दिल्यामुळेंहि 'तारा नाटका'स

मध्यें मध्यें फार रमणीयत्व आलें आहे.

प्रस्तुत नाटकाचा तिसरा उपयोग नाटककार मंडळीस.—यांची सुधारणा करण्याकडे आपल्या नवीन मंडळीनें अद्याप ह्मणण्यासारखें कांहींच लक्ष पुरविलें नसल्यामुळें त्यांच्याच अकलेनें जेथपर्यंत मजल पोंचवेल तेथपर्यंत त्यांनीं पोंचविली आहे. या मंडळ्यांस मुख्य उणीव ह्मटली ह्मणजे नाटकांचीच होय. आजपर्यंत एकंदर लोकांचें सज्ञानदशेंत विशेष पुढें पाऊल नसल्यामुळें, व इंग्रजी सुधारणुकेचीं जीं नाट्यप्रभृति अंगें त्यांशीं परिचयहि चांगलासा झाला नसल्यामुळें, 'रावणराज्य महाराज' 'अल—ल—ल' वगैरे प्रकार शोभून गेले. पण यापुढें वरील धांगडधिंगा खपला जाणार नाहीं. अलीकडील अभिरुचीस वरच्यापेक्षां कांहीं खुबीचा प्रकार पाहिजे. तेव्हां अशा संधींस प्रस्तुतसारखीं परभाषेंतील नाटकें किंवा देशभाषेंतच नवीं नाटकें झालीं असतां फार उपयोग होणारा आहे. जुन्या संस्कृत नाटकांचीं भाषांतरेंहि या कामीं चांगलीं पडणार आहेत.[1] असो; प्रस्तुत नाटक तरी एका नाटककार मंडळीच्या सांगण्यावरूनच केलें असें भाषांतरकर्त्यानें प्रस्तावनेंत सांगितलें आहे; व सदरील नाटकाचा रंगभूमीवर प्रयोग होऊन तो लोकप्रिय झाला असेंहि वरील ठिकाणींच लिहिलें आहे.[2] तर प्रयोगद्वारा

---

१ दक्षिणा प्रैज कमिटीच्या विद्यमानें बहुतेक संस्कृत नाटकांचीं महाराष्ट्र भाषेंत भाषांतरें आज वरींच वर्षें झालीं असतां तीं होऊन न झाल्यासारखींच झालीं आहेत हें पाहून अत्यंत खेद होतो. या नाटकांपैकीं फारच थोडीं हल्लीं कोणापाशीं शिलक असतील; बाकी त्यांचा बहुतेक अस्त झाल्यासारखाच आहे. विद्याखात्याकडे दरवर्षीं एवढी रक्कम खर्च होत असतां व Native literature encouragement fund (एतद्देशीय भाषांतून ग्रंथसमृद्धि व्हावी एतदर्थ झालेला खर्च) असें निराळें सदर विद्याखात्याच्या वार्षिक रपोटांत घातलें असतां, वरील कमिटीच्या द्वारें आयता तयार होऊन पडलेला मालहि आमच्या बिचाऱ्या बुभुक्षित ज्ञानेच्छु जनांस मिळत नाहीं ही गोष्ट मोठ्या चमत्काराची होय! कमिटीरूप यंत्रांतून सिद्ध झालेलें अन्न जसेंचें तसेंच वर्षानवर्षें पडूं द्यावयाचें, तर मग एवढा भटारखाना आज पंचवीस तीस वर्षें सतत चालू ठेवण्यापासून तरी उपयोग काय? गरीब बिचाऱ्या भटांच्याच प्रीत्यर्थ जर सदरील पैशाचा पूर्वीप्रमाणें विनियोग होता तर काय वाईट होतें? तसेंच हल्लीं भूगर्भशास्त्र, प्राणिरचनाशास्त्र, वनस्पतिशास्त्र, वगैरे गहन विषयांवर पुस्तकें बनवून तीं लोकांस समर्पण करण्याचा जो उद्योग चालू आहे, त्यापेक्षां वरच्या नाटकांसारखीं मनोरंजक पुस्तकें जर थोड्या किंमतीनें सर्वांस घेतां येण्याची सोय झाली तर तीं हल्लींच्या स्थितीस विशेष श्रेयस्कर होण्यासारखी आहे असें आमच्या बुद्धीस वाटतें.

२ वरील नाटककार इचलकरंजीकर मंडळी होय. हिनें वऱ्हाडांतील कांहीं मंडळीकडून 'सिंबलेन' व 'कॉमेडी ऑफ एरर्स' या दोन इंग्रेजी नाटकांचीं भाषांतरें करून घेतलीं असून त्यांचा प्रयोग ती रंगभूमीवर दाखवीत असते. वरील नाटकें रंगभूमीवर फार चांगलीं वठतात. 'तारा' नाटकाचा प्रयोग आमच्या एका मित्रानें नुकताच मुंबईस पाहिला; तो

(पुढें चालू).

लोकरंजन करण्यास प्रकृत ग्रंथ साधनीभूत आहे हाहि त्यापासून होणारा एक मोठा उपयोग आहे.

८. याप्रमाणें प्रस्तुत नाटकाच्या संबंधानें जे विचार वाचकांस कळविण्यासारखे होते ते कळविले. आतां केवळ मराठी ग्रंथ या रीतीनें पहातां 'तारा नाटका'वर कांहीं आक्षेप येण्यासारखे आहेत खरे; पण त्यांच्या योगानें 'किरणेष्विवांकः' (जसा चंद्राच्या प्रकाशांत कलंक लोपून जातो) या न्यायानें त्याच्या सौंदर्यास विशेष बाध येतो असें नाहीं. सामान्यतः पहातां परभाषेंतील विचार आपल्या भाषेंत उतरून देणें हें काम कठिणच; त्यांतून, कवितेचें भाषांतर तर विशेषतः दुर्घट; आणि त्यांतहि शेक्सपीयर बोवांशीं गांठ झटलें झणजे तर भाषांतरकारानें ठिकठिकाणीं हातच टेकायाला पाहिजेत. या गोष्टीचा अनुभव ज्यांनीं प्रस्तुत कवीचा एखादा ग्रंथ परीक्षेकरितां वगैरे चांगला लक्षपूर्वक वाचला असेल त्यांस विचारावा ! तर अशा ग्रंथकाराच्या कृतीचें

लोकांस चांगला पसंत पडतो हें त्याच्या सांगण्यावरून व सदरील प्रयोगाच्या वरील शहरीं झालेल्या पुनरावृत्तींवरून दिसून येतें. 'कॉमेडी आफ एरर्स' (भ्रांतिकृत चमत्कार) याचा प्रयोग रत्नागिरीस असतांना या वर्षाच्या आरंभीं आह्मीं पाहिला होता. तो आह्मांस फार मनोरम वाटून **शेक्सपीयरच्या** नाटकांचा एतद्देशीय वाचकांस व प्रेक्षकांसहि किती उपयोग करून देतां येईल ही गोष्ट आमच्या मनावर वरील अभिनयावरून चांगल्या प्रकारें ठसली.

१. **जॉनसननें शेक्सपीयर**च्या नाटकांची एक आवृत्ति तयार केली हें आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच. ही आवृत्ति निघण्यापूर्वी वरील पंडितानें एक प्रसिद्धिपत्रक काढलें होतें. त्यांत पुढील मजकूर आढळतो–

"But of the works of Shakespeare the condition has been far different: he sold them, not to be printed, but to be played. They were immediately copied for the actors, and multiplied by transcript; vitiated by the blunders of the penman, or changed by the affectation of the player; perhaps enlarged to introduce a jest, or mutilated to shorten the representation; and printed at last without the concurrence of the author, without the consent of the proprietor, from compilations made by chance or by stealth out of the separate parts written for the theatre; and thus thrust into the world surreptitiously and hastily, they suffered another deprivation from the ignorance and negligence of the printers, as every man who knows the state of the press in that age will readily conceive.

It is not easy for invention to bring together so many causes

(पुढें चालू).

मराठीसारख्या अत्यंत विसदृश भाषेंत प्रतिबिंब उठवून द्यावयाचें ह्मणजे मोठ्या प्रयासाचें काम आहे यांत संशय नाहीं. तें प्रस्तुत ग्रंथकारानें इतपत उठवून दिलें आहे यावरून त्याचे परिश्रम व त्याचें चातुर्य हीं व्यक्त होतात. छापण्यास पाठविण्यापूर्वी कित्येक मित्रांकडे सदरील पुस्तक पाठविलें होतें असें प्रस्तावनेच्या शेवटीं लिहिलें आहे; या गोष्टीचें मर्महि तज्ज्ञ वाचकांच्या लक्षांत येईलच. असो; पण या कृतीवर मूळ भाषांतरकर्त्याचे व इतरांचे इतके परिश्रम झाले असतां कांहीं ठिकाणीं तींत इंग्रेजीची झांक अद्याप राहिली आहे, व कोठें कोठें वाक्यरचनेचाहि घोंटाळा राहिला आहे. तसेंच कांहीं ठिकाणां प्रवेशादि निर्देशांतहि नजरचूक झालेली आढळते.

---

concurring to vitiate the text. No other author ever gave up his works to fortune and time with so little care; no books could be left in hands so likely to injure them, as plays frequently acted, yet continued in manuscript: no other transcribers were likely to be so little qualified for their task as those who copied for the stage, at a time when the lower ranks of the people were universally illiterate: no other editions were made from fragments so minutely broken, and so fortuitously re-united; and in no other age was the art of printing in such unskilful hands."

१. वरील दोषांचीं उदाहरणें येणेंप्रमाणें—

(पृष्ठ ९)—"हें (कंकण) मजकरतां तूं हातांत घाल."

(पृष्ठ ३५)—"ते जेव्हां त्या रामपूरकराची थट्टा करतात, तेव्हां ती ऐकणें ह्मणजे एक मोठी गंमत आहे."

(पृष्ठ ३८)—"मी ही हकीकत बाबांच्या कानावर घालतें, आणि त्यांना परक्या पुरुषानें येऊन असें अभद्र भाषण आपल्या मुलीशीं करावें हें आवडतें का बघतें!"

(पृष्ठ १०५)—"तो हंबीरराव, बेवकूब, कीं ज्यापाशीं चांगुलपणाचा एक लेशहि सांपडावयाचा नाहीं."

(पृष्ठ ८)—"नको गे प्रिये! डोळ्याला पुनः पाणी आणूं! नाहीं तर तुला वाटेल हें हृदय बायकापेक्षांहि कोंवळें आहे."

(पृष्ठ १७)—"अहो बाळासाहेब! मी हंबीररावास सुवर्णपुरास पाहिलें नाहीं असें नाहीं. त्या वेळीं तो होतकरू दिसत असे; आणि जसा त्याजविषयीं लोकांचा आज समज आहे, तशा प्रकारचा तो निघेल असें त्या वेळींहि लोक ह्मणत; परंतु मला मात्र कांहीं तसें वाटलें नाहीं. मला त्याचे गुण कळले नव्हते असें नाहीं. त्या वेळींच मला वाटे कीं, लोकांचा तर्क खोटा ठरेल."

(पृष्ठ २४)—"असें बोलण्याची ही तुमची चाल असेल, परंतु मागें घेणार नाहीं असें वाटतें."

(पृष्ठ ४५)—यांत 'गजाऊ जवळच उभी आहे' असें प्रवेशारंभीं असून तारा तिला दर

(पुढें चालू).

९. याप्रमाणें अभिप्राय देण्यास हातीं घेतलेल्या पुस्तकाचें सर्व प्रकारें गुणदोषविवेचन झालें. आतां सरते शेवटीं प्रकृत नाटकांतील कांहीं स्थलांचें येथें अवतरण करून हा लेख आटपतों. या अवतरणांचें प्रयोजन एवढेंच आहे कीं, त्यांवरून सदरील भाषांतर कोणत्या शैलीनें केलें आहे, व मराठींत तें कसें उतरलें आहे, याची आमच्या सर्व वाचकांस परीक्षा करतां यावी.

" (अंक २ प्रवेश २.)

(खंडूजी पेटीच्या बाहेर येतो.)

खंडूजी—काय शांत वेळ ही! जिकडे तिकडे आतां सामसूम झालें आहे! दिवसाचा कामधंदा करून थकले भागले लोकांना गाढ झोंप लागली आहे! रात्रीचा किर्र शब्द ऐकूं येत आहे.–अशा मध्य रात्रीच्या सुमारास माझ्या मनांत दुष्ट विचार कसे घोळत आहेत!—ही पहा चंद्रानना पलंगावर निजली आहे. त्या पलंगाला तिजमुळें किती शोभा आली आहे! वाः किती सुंदर ही कमलिनी! या कनकलतिकेला पाहून दिव्याची ज्योतीहि मान डोलवीत आहे! तिचे नेत्र या वेळीं लागले आहेत, आणि ह्मणूनच या दिव्याचा प्रकाश पडला आहे! तिच्या या गौरवर्ण शरीरावर ही हिरवी वेलबुट्टी कशी शोभत आहे! पण माझा उद्देश काय, आणि मी हें काय बघत बसलों. मला महालांतील खाणाखुणा टिपून घ्यायाच्या आहेत. या या अमुक अमुक तसविरी अमक्या ठिकाणीं टांगल्या आहेत. ही खिडकी या इकडच्या भिंतीला आहे. तिचा पलंग हा असा आहे. या भिंतीवर हीं चित्रें काढिलीं आहेत; पण या असल्या दहा हजार गोष्टी लिहून घेण्यापेक्षां तिच्या शरीरावरची एखादी खूण लिहून घेतली तर माझ्या बोलण्यावर विश्वास पटेल. अहा निद्रे! या वेळीं तूं माझें किती साहाय्य करीत आहेस! असेंच आणखी थोडा वेळ कर! चल नघि कसें [तिच्या हातांतील कंकण काढून घेतो.] वाः! किती लवकर याचा फांसा निघाला तरी! या कंकणावरून हंबीररावाची खातरीच होईल. तिचा हा पदर अस्ताव्यस्त झाला आहे, ह्मणून हा पहा तिच्या दोन स्तनांमध्यें असणारा तीळ चोळीच्या गांठीच्या वर दिसत आहे. माझ्या बोलण्याला याहून जास्त प्रमाण कशाला पाहिजे! या तिळावरून त्याची खातरी होईल कीं, मीं कुलूप तोडून तिच्या पातिव्रत्याचें भांडार

असल्याप्रमाणें हाक मारते आहे.

(पृष्ठ ५३)—यांत तारेच्या प्रवेशाच्या अगोदरच 'या पहा बाईसाहेब आल्या,' असें दासी बोलते आहे.

(पृष्ठ ८८)—यांत प्रवेशस्थल जामगांव असून तारा सदोवाला पुसते, 'अजूनहि जामगांव किती दूर आहे?'

(पृष्ठ ९०)—यांत तारेच्या भाषणाच्या अगोदर 'सावध होऊन' असे शब्द असणें जरूर होतें.

लुटलें! बस पुरें आहे. आतां अधिक टिपून घेण्याची काय जरूर? तळि लिहून घेण्याची तर मुळींच जरूर नाहीं. तो का मी आतां विसरेन! ती पांडवप्रताप वाचीत होती असें दिसतें. ही पहा येथें खूण घालून ठेवली आहे. दुर्योधनदुःशासनादि कौरवांनीं तिचा छळ आरंभिला आहे आणि सती द्रौपदी द्वारकाधीश कृष्णाचा धांवा करीत आहे, येथपर्यंत हिनें वाचलें आहे!—हे सति तारे! तुझाहि मी असाच छळ करणार ना! मी मोठा पातकी! पण काय करूं? असो. माझें काम झालें. चला, आपण पेटींत जाऊन बसावें आणि झांकण लावून घ्यावें."

" (अंक २, प्रवेश ४.)

खंडूजी—तिचा महाल! वाः! काय त्याची शोभा! मी तेथें निजलों नाहीं, कबूल! पण असला सुंदर महाल पाहिल्यावर झोंप येते कसची? सर्व रात्रभर मी त्याची शोभा पहात बसलों होतों. भिंतीवरून चित्रें काढिलीं होतीं, आणि त्यावर मळ पडूं नये ह्मणून किनखापाचे पडदे सोडले होते. एका भिंतीवर दधिसमुद्रांत शेषशायी नारायणाची मूर्ति काढली आहे. त्याच्या नाभिस्थळापासून कमलाचा देंठ निघून त्यावर चतुर्मुख ब्रह्मदेव चारी वेद हातांत घेऊन बसला आहे. पायथ्याशीं कमलालया लक्ष्मी नारायणाचे पाय चुरीत आहे. उजव्या अंगाला गरुड हस्त जोडून उभा आहे, त्याला पाहून नागांची तारांबळ उडाली आहे. पलीकडे सनकसनंदन नारायणाची लीला गात आहेत. कोण त्या चित्रकाराचें कसब! मूर्ति प्रत्यक्ष डोळ्यासमोर उभी आहे असें वाटतें!"

"(कित्ता) **खंडूजी**—महालाला दक्षिणेकडे दोन खिडक्या आहेत, त्यांच्या वरच्या अंगाला तसविरी लटकाविल्या आहेत. रावणानें अशोक वनांत सीतेला नेऊन ठेविलें आहे, आणि ती रामचंद्राच्या विरहानें एका अशोक वृक्षाखालीं सचिंत बसली आहे, आणि जवळच्या एका वृक्षावर हनुमान बसला आहे, आणि रामनामांकित मुद्रा तिजजवळ टाकीत आहे, असें एका तसविरींत दाखविलें आहे. या तरी चित्राऱ्याची खुबी मोठीच! तसबीर पाहिली कीं त्या मूर्ति आपल्या समोर उभ्या आहेत, असा भास होतो!"

"(अंक २, प्रवेश ५.)

(हंबीरराव आपणाशीं बोलतो.)

हरहर!—पुरुष आणि स्त्री मिळून माझा देह झाला, तेव्हां यांतील कोणचा भाग वरें स्त्रीच्या अंशानें झाला आहे! तो समजता तर मीं या वेळेस छेदून टाकला असता! कोणताहि जरी दुर्गुण पुरुषांत आढळला तरी तो स्त्रीच्या अंशापासूनच आहे यांत संशय नाहीं! अनृत, अविनय, साहस, माया, मूर्खत्व, अतिलोभ, कपट, चांचल्य, परनिंदाप्रीति, हे सर्व दोष जात्याच स्त्रियांत असतात, आणि त्यांच्यापासूनच

पुरुषांस प्राप्त होतात. स्त्रिया जगांतून नाहींशा होत्या तर बरें झालें असतें! काय स्त्रियांचें धाडस! समुद्राच्या लहरींप्रमाणें यांचा स्वभाव चंचल! यांची प्रीति तर संध्याकाळच्या ढगांवरील तांबड्या छट्ट्यांप्रमाणें क्षणिक! आज हा, उद्यां तो, परवां तिसरा, असा यांचा क्रम! एकावर कधीं यांचें प्रेम असणार आहे काय? बघतील एकाकडे, बोलतील एकाशीं, आणि प्रेम असेल कदाचित् तिसऱ्यावरच!–धिक्कार असो यांच्या जातीला! ब्रह्मदेवानें स्त्रीजाति निर्माण केली नसती तर खचितच नरकपुरी ओस पडली असती!–हे षडानना कार्तिकेया! तूं मोठा शहाणा! तुला मात्र यांचें कपट कळलें. बाकीचे सर्व देव स्त्रीपाशांत गुंतले! बरें आहे. स्त्रियांचें तोंड पहावयाचें नाहीं हा कृतनिश्चय! सांपडतील तेथें त्यांचा वध करावा! आं—पण नाहीं करूं! आपआपल्या हातांनींच त्या करून घेत आहेत, तेव्हां आपण तरी उगी कशास दोषी व्हावें?

[जातो.]"

इंग्रेजी भाषा.



गीर्वाणवाणीषु विशिष्टबुद्धिस्तथापि भाषांतरलोलुपोऽहम्।
यथा सुराणां सुधयां च सत्यां स्वर्गांगनानामधरासवे रुचिः॥[1]

अंक २८—(१) विषयोपक्षेप. (२) प्रस्तुत विषयाचा उपयोग. (३) इंग्रेजी भाषेची उत्पत्ति. (४) तिचे घटकावयव. (५) इंग्रेजी भाषेंतील ग्रंथसंग्रह. (६) गद्यात्मक ग्रंथांची प्रवृत्ति. (७) तिची सुधारणा. (८) गद्याचे प्रकार. (९) निबंध. (१०) त्रैमासिकें. (११) **मेकॉले.**

१. वरील विषयाचें नांव वाचून आमच्या वाचकांस बहुधा मोठा संदेह उत्पन्न होणारा आहे. 'इंग्रेजी भाषा' झणजे काय?—यांत ती भाषा उत्पन्न कशी झाली, तिची उत्तरोत्तर अभिवृद्धि होत जाऊन ती सांप्रतच्या स्थितीला कशी पोंचली, तींत गुणदोष कोणते आहेत, याविषयीं विवेचन करायाचें; कीं तींत ग्रंथसंग्रह कसा आहे, त्याची सांप्रतची स्थिति त्यास प्राप्त होण्यास काय कारणें झालीं, याविषयीं लिहावयाचें; कीं आपल्या देशांत वरील भाषेचा पुष्कळ फैलावा झाल्यानें कोणते फेरफार झाले, व पुढें कोणतें स्थित्यंतर होण्याचा संभव आहे, याविषयीं विचार करावयाचा? याप्रमाणें वरील शब्द वाचतांच निरनिराळ्या कल्पना वाचकांच्या मनांत उभ्या राहि-

---

१ गीर्वाण भाषेला जरी मी विशेष मान देतों; तरी इतर भाषांविषयीं मला उत्कंठा वाटते. कशी? तर ज्याप्रमाणें देवांस प्राशन करण्यास अमृत असतांहि स्वर्गांगनांच्या अधरमधूविषयीं ते लालस असतात!

ल्यावांचून रहाणार नाहींत. आणि खरोखरी पहातां प्रस्तुत विषय विस्तीर्ण असल्यामुळें त्याचें विवेचन अनेक प्रकारांनीं व्हावें असाच तो आहे. प्रस्तुत निबंधांत वरील सर्व गोष्टींचा विस्तारेंकरून विचार करावयाचा नाहीं. इंग्रेजी भाषेची उत्पत्ति व रचना यांविषयीं प्रथमतः सांगून मुख्यत्वेंकरून तिच्या ग्रंथसंग्रहाविषयीं वाचकांस थोडी बहुत माहिती करून देण्याचा आमचा विचार आहे. सवड राहिल्यास शेवटल्या गोष्टीच्या संबंधानें ह्मणजे इंग्रेजी भाषा इकडे फैलावल्यापासून कोणते फेरफार झाले आहेत याविषयींहि कांहीं विचार प्रकट करूं.

२. इंग्रेजी भाषा उत्तरोत्तर कशी उत्कर्ष पावत गेली, तींत ग्रंथसंग्रह कोणत्या प्रकारचा आहे, व तो कसकसा वाढत गेला, वगैरे गोष्टींचें ज्ञान एतद्देशीय लोकांस चांगलें होणें अवश्य आहे. तें असें कीं, त्याच्या योगानें देशभाषा सुधारण्याचा हल्लीं जो थोडा बहुत यत्न चोहोंकडे सुरू आहे तो सफल होण्यास काय केलें पाहिजे, भाषा सुधारत जाते ती कोणत्या क्रमानें जाते, वगैरे गोष्टींचें ज्ञान वरील निरूपणानें त्यांस होईल. शिवाय हा माहितीचा व मनोरंजनाचाहि विषय असल्यामुळें सामान्यतः सर्वांस इष्ट वाटण्यासारखा आहे.

३. आतां प्रथमतः इंग्रेजी भाषेची उत्पत्ति. अर्वाचीन भाषाभिज्ञांनीं साऱ्या भाषांच्या दोन शाखा कल्पिल्या आहेत. त्यांतील पहिली जी आर्यशाखा तिजपासून इंग्रेजी भाषेची परंपरया उत्पत्ति झाली आहे.[1] ती अशी कीं, वरील शाखेंत येणारी जी जर्मन भाषा तिचा पोटभेद साक्सन भाषा; आणि तिचा भेद जी आंग्लोसाक्सन ह्मणजे इंग्लंडांतील साक्सन भाषा ती इंग्रेजीची मूळ भाषा होय. इंग्लिश भाषेंतील अगदीं मूळचे साधे शब्द व तिची रचना हीं सारीं वरील भाषेंतील होय. मराठीस मूळ जशी संस्कृतापासून उत्पन्न झालेली बालभाषा तशींच प्रस्तुत भाषेस वरील भाषा होय. इंग्लंडाचे मूळचे रहाणारे जे ब्रिटन लोक त्यांची भाषा सेल्टिक ही होती. तिचा आतां त्या देशांत

१ वरील दोन शाखा एरियन ह्मणजे आर्य, व सेमेटिक या होत. पहिल्या शाखेचे आठ मोठमोठे भेद आहेत. ते संस्कृत, इराणी, ग्रीक, इटालियन, जर्मन इत्यादि होत. या शेवटल्या उपशाखेपासून इंग्लिश भाषेची उत्पत्ति आहे हें वर सांगितलेंच आहे. दुसऱ्या शाखेंत आरबी, चिनी, जपानी, या भाषांचा अंतर्भाव होतो. हें भाषाशास्त्र या शतकांत पुष्कळ पूर्ण दशेस आलें आहे. असें होण्यास संस्कृत भाषेचा शोध लागला हेंच मुख्य कारण होय. असो; या शास्त्राच्या योगानें मनुष्य जातीच्या अत्यंत प्राचीन इतिहासाची एक मोठी गोष्ट अगदीं निर्विवाद सिद्ध होते. ती ही कीं, युरोपांतील बहुतेक राष्ट्रें व इकडचे हिंदु, इराणी वगैरे लोक हे पूर्वी एकत्र असून एकच भाषा बोलत होते. पण पुढें सर्वांची फूट केव्हां व कशी झाली असेल याचा आज कांहींच पत्ता लागत नाहीं! 'पवित्र शास्त्र' जर खरें असेल, तर बेबलच्या बुरुजाची जी चमत्कारिक हकीकत झाली ती वरील गोष्टींचें कारण मानणें भाग पडेल.

फारसा मागमूसहि राहिला नाहीं. रोमन लोक निघून गेल्यावर सहाव्या शतकांत साक्सन लोक इंग्लंडांत येऊन त्यांनीं हळू हळू सगळा देश काबीज केला; आणि आपली भाषा व कायदेकानू हीं चोहोंकडे चालू केलीं. या दोहोंची स्थापना त्या देशांत इतकी दृढ होऊन गेली कीं, त्याच्या मूळच्या स्थितीचा पुढें मागमूसहि उरला नाहीं. साक्सन लोकांच्या पुढें नार्मन लोक आले. हे फ्रान्स देशांतील उत्तर प्रांत नार्मंडी ह्मणून होता तेथें वसाहत करून राहिले होते. यांचा राजा विलियम, जो 'विजयी' या उपपदानें प्रसिद्ध आहे, त्यानें सन १०६६ त इंग्लंडावर स्वारी केली; आणि साक्सन लोकांचा मोड करून चोहोंकडे आपला अंमल वसविला. पुढें सुमारें दोनशें वर्षेपर्यंत राज्यकर्ते जे नार्मन लोक त्यांचा आणि प्रजा झालेले साक्सन लोक यांचा परस्पर दुजाभावच वागत असल्यामुळें दोन्ही राष्ट्रांच्या भाषा भिन्न भिन्नच होत्या.[1] पण तिसऱ्या हेनरी राजाच्या कारकीर्दीच्या अखेरीपासून सुमारें वरील दोन्ही भाषा एकवट होऊन हल्लीं जीस इंग्रेजी ह्मणतात ती बनत चालली. तर याप्रमाणें प्रस्तुत भाषा ही वरील दोहोंची भेसळ होऊन उत्पन्न झालेली आहे.

४. गेल्या सहाशें वर्षांत इंग्रेजींत आणखी पुष्कळच फेरफार झाले. त्यांत मोठा ह्मटला ह्मणजे ग्रीक व ल्याटिन या भाषांनीं तिजवर झालेला संस्कार होय. इंग्लंडांत नवव्या शतकांत ख्रिस्ती धर्म प्रवृत्त होऊन रोमच्या पाद्री लोकांचें माहात्म्य चोहोंकडे जसजसें वाढत चाललें, तसतसे वरील अभियुक्त भाषांतले शब्द लोकभाषेंत थोडथोडे मिसळत चालले होतेच; पण त्यांच्या योगानें भाषेंत ह्मणण्यासारखा फेरफार कांहींच झाला नाहीं. तो सोळाव्या शतकांत पूर्णपणें झाला. रूमशामचें राज्य तुर्क लोकांच्या हातीं लागल्यामुळें ल्याटिन व ग्रीक विद्येच्या गुरूंनीं देशत्याग करून युरोपांत ठिकठिकाणीं जेव्हां वसाहात केली, व त्या विद्येचा स्वोपजीवनार्थ प्रसार मांडला, तेव्हां चोहोंकडे वरील दोन भाषांचें पुनरुज्जीवन झाल्यासारखें झालें. त्याच्या योगानें साऱ्या युरोपियन भाषा सुधारणेच्या पंथास लागून लोकस्थितींतहि अनेक फेरफार झाले.[2]

१. नार्मन लोकांच्या मनांत साक्सन लोकांविषयीं अत्यंत तिरस्कार वागत असे, व साक्सन लोकहि जरी हतवीर्य झाले होते तरी आपल्या पूर्वीच्या वैभवाच्या स्मरणामुळें त्यांशीं बांकूनच रहात असत हें वरील भिन्नभावाचें मुख्य कारण होतें. या वेळची स्थिति स्काटच्या 'ऐव्हेनो' नांवक कादंबरींत अगदीं हुबेहुब दाखविली आहे. हा ग्रंथ वाचीत असतां हिंदुस्थानच्या सध्यांच्या स्थितीचें सादृश्य जेथें तेथें पूर्णपणें मनांत येतें.

२. या फेरफारांपैकीं सर्वांत मोठा महत्त्वाचा ह्मटला ह्मणजे जर्मनी देशांत उत्पन्न होऊन साऱ्या खंडभर पसरलेली धर्मक्रांति होय. वरील विद्याप्रसारानें धर्मांतराचा प्रकार कसा उद्भवला हें अंमळ विचार केला असतां सहज समजणार आहे. विद्येच्या योगानें मनुष्यास खऱ्या खोट्याचें ज्ञान होऊं लागतें; तें झालें असतां खोट्या धर्मांचें बेंड बाहेर फुटून लोकांची श्रद्धा उडते हें सहजच आहे.

तोच प्रकार इंग्लंडांत घडून आला. सर्व लोक ल्याटिन व ग्रीक या भाषांचा मोठ्या आस्थेनें अभ्यास करायास लागून कित्येकांनीं तर त्यांत अत्यंत निपुणता संपादन केली. वरील भाषांचा अभ्यास अद्यापहि साऱ्या युरोपाप्रमाणें इंग्लंडांत चालू आहेच; तरी तो आतां पहिल्यासारखा नाहीं. असो; तर वरील भाषांची जेव्हां इंग्लंडांत प्रवृत्ति पडली, तेव्हां त्या भाषांतील हजारों शब्द इंग्रेजी भाषेंत आले, व त्यांची ढबहि पुष्कळ अंशीं या भाषेस लागली. अलीकडे दहा वीस वर्षांत संस्कृताचा अभ्यास वाढल्यानें महाराष्ट्र भाषेंत जसा फेरफार होत चालला आहे, व त्या भाषेचा या दुसऱ्या भाषेस जसा उपयोग होत आहे; तसेंच इंग्रेजी भाषेसहि झालें. तीस प्रौढता व सरसता आणण्यास वरील दोन प्राचीन भाषा कारण झाल्या; आणि शिवाय शास्त्रीय परिभाषा पूर्वीची आयती घेण्यास व नवी बनवतां येण्यास त्यांचा फारच उपयोग झाला.

वरील दोहोंशिवाय अलीकडे आणखी दोन भाषांचाहि इंग्रेजीशीं संयोग झाला आहे. तो फ्रेंच व जर्मन भाषांचा होय. या भाषा इंग्रेजीच्या बरोबरच प्राचीन भाषांच्या संसर्गानें वाढत जाऊन कालेंकरून त्यांत मोठमोठे ग्रंथ होत गेले यास्तव इंग्रेजी विद्येचा जसा युरोपभर प्रसार झाला तसा युरोपांतील विद्येचाहि इंग्लंडांत प्रवेश होऊन वरील भाषांचा संसर्ग इंग्रेजीस घडला. तो दिवसांदिवस अधिकाधिक दृढहि होत चालला आहे.

याखेरीज नुसत्या शब्दांच्याच संबंधानें पाहिलें तर व्यापाराच्या वगैरे संबंधानें ज्या भाषेचे शब्द इंग्रजींत आले नाहींत अशी भाषा साऱ्या पृथ्वीवर थोडीच असेल.

५. याप्रमाणें प्रस्तुत भाषेच्या उत्पत्तीविषयीं व तिच्या घटकावयवांविषयीं निरूपण झालें. आतां तींत जो ग्रंथसंग्रह आहे त्याविषयीं लिहूं.

कोणत्याहि राष्ट्राची अज्ञानावस्था संपत येऊन त्याच्या सज्ञान दशेस जेव्हां आरंभ होतो, तेव्हां त्याच्या बुद्धीचा प्रथम विकास पाहिला असतां नेहमीं कवितारूप दृष्टीस पडतो. या सामान्य नियमाप्रमाणें इंग्लंडांतहि सर्वसाधारण भाषा चालू होऊन तीस स्थैर्य येतांच कवितेचा प्रादुर्भाव झाला. हा पहिला कवि चॉसर होय. हा तिसऱ्या एडवर्ड राजाच्या वेळेस ह्मणजे चवदाव्या शतकाच्या उत्तरार्धांत झाला. याच्या काव्यांत जी भाषा आढळते ती आपल्या 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाच्या सारखी अगदीं जुनाट व अप्रसिद्ध आहे; व यामुळेंच या कवीची प्रसिद्धि जरी आजपर्यंत अबाधित चालत आली आहे, तरी त्याच्या ग्रंथांचा प्रचार ह्मणण्यासारखा नाहीं. हीच गोष्ट त्याच्या पुढें झालेला जो स्पेन्सर त्यासहि प्रायः लागते. या दोघां कवींचें अध्ययन भाषाभिज्ञ लोक जितकें करतात तितकें रसिक करीत नाहींत. असो; या दोघांपुढला अत्यंत विख्यात कवि झटला ह्मणजे शेक्सपीयर होय. हा स्पेन्सरच्या वेळींच, ह्मणजे

एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीतच, उदयास आला. पण याची भाषा वरील दोघां कवींच्या सारखी जुनाट नसल्यामुळें त्याच्या ग्रंथांचा प्रचार अद्याप सार्वलौकिक आहे. शिवाय वरील ग्रंथांचा विषय मनोरंजनावह असून त्यांच्या रचनेंत वरील कवीनें आपली आश्चर्यकारक बुद्धि खर्चिली आहे हेंहि वरील गोष्टींचें एक मोठें कारण आहे हें सर्वांस माहीत आहेच. असो; तर इंग्रेजी कवींत सर्वमान्यतेस चढलेले जे कित्येक कवि आहेत त्या सर्वांत योग्यतेनें व कालानें पहिला असा शेक्सपीयर होय. याच्या वेळेपासून आज सुमारें तीनशें वर्षें इंग्लंडांत कवितेचा सारखा उत्कर्षच चालला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या शतकांतच जे मोठमोठे कवि निपजले त्यांपैकीं कित्येक नुकते नुकतेच निवर्तले असून अद्यापहि कवित्वाच्या ओघास अगदीं खळच पडला आहे असें नाहीं. आतां हा सारा विस्तीर्ण विषय प्रस्तुत विवेचनांतच येण्यासारखा आहे; तथापि तूर्त त्याचा वरच्याइतकाच येथें निर्देश करून ठेवतों. तो अत्यंत महत्त्वाचा आहे, यास्तव पुढें एखादे खेपेस त्याचें पृथक्त्वेंकरून विवरण करूं. याच अंकांत त्याचें व प्रस्तुत विषयाच्या इतर भागांचें यथास्थित निरूपण होणें अशक्य आहे. यास्तव कवितेचा ह्मणजे पद्यात्मक ग्रंथसंग्रहाचा भाग सध्यां निराळा ठेवून गद्यात्मक ग्रंथांविषयींच विवरण करतों.

६. भाषेंत गद्य ग्रंथांचा प्रचार सुरू होणें हें लोकसुधारणुकेचें एक मोठें चिन्ह आहे. कारण पद्यरचना सोडून देऊन गद्याकडे जेव्हां लोकांचा कल होतो, तेव्हां केवळ मनोरंजन करणाऱ्या विषयांहून अधिक योग्यतेच्या विषयांकडे त्यांचीं मनें प्रवृत्त झालीं असें दिसून येतें. गद्यांत जो विषय लिहावयाचा तो अर्थातच शास्त्रीय वगैरे असावयाचा. तो छंदांत रचणें केवळ अप्रयोजक असून सर्वांस सरळ रीतीनें समजण्याकरतां अर्थातच व्यावहारिक भाषेनें लिहावा लागतो. तेव्हां ही दुसरी रीत पडणें हें राष्ट्राच्या सज्ञान अवस्थेचें विशेष सूचक होय हें उघड आहे. इंग्रेजी भाषेंत हा गद्याचा प्रघात विशेष ह्मणण्यासारखा ह्मटला ह्मणजे सुमारें एलिझाबेथच्या कारकीर्दीपासून सुरू झाला आहे. मागें सांगितलें आहे कीं, पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या ग्रंथांचें अध्ययन सार्वत्रिक झाल्यामुळें सगळें युरोपखंड अज्ञाननिद्रेंतून जागें होऊं लागलें. तर तोच प्रकार इंग्लंडांतहि घडून येऊन बेकन, हूकर अशांसारखे मोठमोठे ग्रंथकार निपजले, व त्यांनीं गद्याची प्रवृत्ति पाडून स्वभाषेच्या अभिवृद्धीस आरंभ केला. हाच क्रम वरील राणीच्या राज्यानंतरहि चालून अनेक नामांकित ग्रंथकारांनीं इंग्रेजींत गद्यरचना केली; व नाना प्रकारच्या विषयांवर मोठमोठे ग्रंथ लिहिले. तरी सांप्रत प्रकारास खरी शोभा आणून तो सर्वजनांस मान्य होईसा करणें व भाषेस व्यवस्थितपणा व नियमितपणा आणणें हें काम पुढील काळींच झालें. तें कसें तें पुढें सांगतों.

७. इंग्रेजी भाषेचें सध्यां जें प्रौढ व मनोवेधक रूप दृष्टीस पडत आहे त्यास

आरंभ पाहिला असतां गेल्या शतकापासून झाला असें दिसून येईल. ड्रायडन, टेंपल, आडिसन यांच्या पूर्वी इंग्रेजींत गद्य लिहिणारे मोठमोठे नामांकित ग्रंथकार होऊन गेले नाहींत असें नाहीं; पण वरील ग्रंथकारांनीं व त्यांच्या पुढें जे झाले त्यांनीं तींत मोठी सुधारणा केली हें निर्विवाद आहे. सोळाव्या शतकांत मोठमोठे कवि व महान् महान् ग्रंथकार होऊन गेले हें खरें; पण त्यांच्या भाषेंत मार्दवादि गुण तादृश नसून व्याकरणाची वगैरेहि चांगलीशी व्यवस्था नसे. उदाहरणार्थ कवितेंत शेक्सपीयर व मिल्टन हे घ्या; व गद्यांत बेकनचे ग्रंथ पहा. वरील दोघां कवींच्या कृति इंग्लंडांत, किंबहुना साऱ्या जगांत, सर्वमान्यतेस पात्र झाल्या आहेत; पण कोणी सामान्य मनुष्य घेतला तर पोपची किंवा गोल्डस्मिथची कविता त्यास जितकी पसंत पडेल, तितकें 'म्याकबेथ' नाटक किंवा 'प्याराडैज लॉस्ट' हें पडणार नाहीं. त्याप्रमाणेंच बेकनच्या ग्रंथांची गोष्ट. त्यांची प्रशंसा ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येईल; पण त्यांचें प्रेमपूर्वक अध्ययन करणारा थोडाच मनुष्य सांपडेल.[1] तर यांचें कारण काय बरें? अर्थातच

१. शेक्सपीयर कवीच्या अद्भुत कवित्वाविषयीं जरी कोणी संशय घेणार नाहीं, तरी त्यांचें माहात्म्य त्याच्या देशबांधवांनीं अतिशय वाढविलें आहे असें वाटल्यावांचून राहवत नाहीं. नुकत्या निवर्तलेल्या मिछच्या 'स्वरचित चरित्रां'त त्यानें आपल्या बापाविषयीं लिहिलेला हा मजकूर आढळतो—

"My father never was a great admirer of Shakespeare, the English idolatry of whom he used to attack with some severity."

याप्रमाणेंच **जॉनसन, बायरन** वगैरे कित्येक ग्रंथकारांचेंहि मत होतें. खुद्द ड्रायडन यास सुद्धां असें कबूल करावें लागलें—

"I cannot say he is everywhere alike. Were he so, I should do him injury to compare him to the greatest of mankind. He is many times flat and insipid, his comic wit degenerating into clinches, his serious swelling into bombast."

मेकॉले साहेबांनीं एके प्रसंगीं इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज याचा प्रस्तुत कवीविषयीं एक उद्गार दाखल केला आहे—

"But was there ever," he cried, "such stuff as great part of Shakespeare? *Only one must not say so.* But what think you? What? Is there not sad stuff? What? What?"

Madame D'Arlay.

वरील राजोक्ति निबंधकारानें केवळ उपहासार्थ दाखल केली आहे. आतां तिसरा जार्ज राजा ह्मणजे मोठा पंडित होता असा अर्थ नाहीं; तरी त्याचें वरील मत सर्वथा अयथार्थच आहे असें ह्मणवत नाहीं.

मिल्टनच्या काव्याविषयींहि कोणा ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, त्यांच्या आवृत्तीवर आवृत्ति मोठ्या झपाट्यानें निघत आहेत, व त्या पुस्तकालयें भूषित करताहेत हें खरें; पण

हें कीं, वाचकांस ज्या गुणांच्या योगानें चटका लागतो ते गुण वरील ग्रंथकारांत कमी. त्यांनीं आपल्या ग्रंथांतून आपल्या विशाल बुद्धीचा परिपाक ओतून दिला आहे यास्तव त्यांस आजपर्यंत जसा मान मिळाला, किंबहुना ते सर्वांस पूज्य होऊन बसले, तसाच क्रम पुढें सारखा चालेल यांत संशय नाहीं; पण वरील पूज्यतेच्या मानानेंच लोकप्रीतीचें मान त्यांचें कमी समजलें पाहिजे. या दोन्ही गुणांचें सामानाधिकरण्य होण्याची योग्यता इंग्रेजी भाषेंत जी आली ती वर सांगितल्याप्रमाणें अठराव्या शतकांत आली. या शतकाच्या आरंभींच आडिसनचें 'स्पेक्टेटर' पत्र आठवड्यांतून तीनदां निघूं लागून सामान्य लोकांस विद्यानंदाचा अनुभव घडण्याचें उत्कृष्ट साधन तयार झालें; व त्याबरोबरच इंग्लिश भाषेच्या पूर्वीचा जो कर्कशपणा व अनियमितपणा होता तो हळू हळू मोडूं लागून तिचे ठायीं जनमनोवेधकत्व हा गुण अधिकाधिक येऊं लागला. वरील पत्र दोन तीन वर्षें चालून पुढें बंद झालें; तरी तितक्या काळांत त्याच्या योगानें भाषेस व लोकांस पुष्कळ उपयोग झाला. त्याचा प्रचार तिन्ही देशांत होऊन लोकांस विद्येची अभिरुचि लागली.[1] 'स्पेक्टेटर'च्या पुढें त्याच्या सारखीं पत्रें दुसरीं पुष्कळ चालू झालीं, व त्यांच्या योगेंकरून लोकांचें व भाषेचें हित थोडें बहुत झालेंच. पण त्यांत विशेष गुण नसल्यामुळें त्यांची प्रसिद्धि लवकरच नाहींशी होऊन आतां त्यांचीं नांवेंहि कोणास माहीत नाहींशीं झालीं आहेत. आडिसनच्या पुढें त्यासारखा नामांकित निबंधकार झटला झणजे जानसन हा झाला. या महापंडिताचे इंग्रेजी भाषेवर पुष्कळच उपकार आहेत. त्यांत सर्वांत मोठा झटला झणजे हा कीं, त्यानें कोशरचना करून तीस आळ्यांत आणण्याचा प्रचंड उद्योग आरंभून तो एकट्यानें शेवटास नेला. याच्या पूर्वी इंग्रेजींत किती प्रकारचा गोंधळ होता, याचें त्यानेंच आपल्या कोशाच्या प्रस्तावनेंत सुरस वर्णन केलें आहे. ही अव्यवस्था जानसननें दोन प्रकारांनीं मोडली. अशी कीं, आपल्या कोशांत त्यानें होण्यासारखी होती तेवढी व्यवस्था करून ते नियम आपल्या स्वतःच्या ग्रंथांच्या द्वारें पुनः चांगले स्थापित केले. असो; जॉनसनच्या निबंधांचें नांव

त्यांच्या वाचण्याचा प्रघात तितपतच आढळतो.

बेकनविषयीं तसेंच मेकॉलेनें लिहिलें आहे—

"It is by the *Essays* that Bacon is best known to the multitude. The *Novum Organum* and *De Augmentis* are much talked of, but little read ... ."

Lord Bacon.

१. वरील पत्र घरोघर सकाळच्या न्याहारीच्या वेळेस सर्वांस वाचायास मिळत असे. त्याचा खप लवकरच दोन तीन हजारांवर गेला. या वेळची एकंदर लोकांची स्थिति पुष्कळ अंशीं येथल्यासारखीच होती. 'स्पेक्टेटर पत्रानें इंग्लिश लोकांस वाचावयास शिकविलें' असें सुद्धां कित्येकांनीं झटलें आहे.

'रांबलर' व 'ऐडलर'. या निबंधांची पद्धति वरच्या 'स्पेक्टेटरा'हून सर्व प्रकारें निराळी होती. 'स्पेक्टेटरां'त नाटकें, तमाशे,[1] बायकांचे पेहराव, नवराबायकांचीं भांडणें, भावी वधूवरांचा गांधर्व प्रकार, लंडन शहरांतल्या मेवामिठाई विकणाऱ्या फिरस्त्या लोकांचे निरनिराळे शब्द, अशा प्रकारच्या विषयांवरच बहुतकरून मजकूर असे; व त्या वेळच्या चैनी व रिकाम्या लोकांस आवडण्यासारखा तोच होता. मधून मधून काव्यनाटकादिकांविषयीं विवेचन किंवा शास्त्रीय विषयांवर गहन विवरण, हे प्रकार वरील पत्रांत असत; व दर शनिवारीं पुढील दिवशीं वाचण्याकरितां धर्माच्या किंवा अध्यात्मविद्येच्या विषयांवर एक उत्कृष्ट निबंध असे. पण एरवींचा सामान्य प्रकार ह्मटला ह्मणजे वरीलच होय. तशीच 'स्पेक्टेटरां'तली भाषापद्धतिहि वरील विषयांस अनुसरूनच असे. ह्मणजे नेहमींची व्यावहारिक भाषाच योजिली असून प्रौढ व कठिण शब्द फारकरून मुळींच नसत. पण जॉनसनच्या वरील निबंधांत हे दोन्ही प्रकार अगदीं भिन्न आहेत. 'स्पेक्टेटरां'त जे विषय कधींमधीं यावयाचे तेच त्यांत नेहमीं असून बायकांविषयीं व नटण्या मुरडण्याविषयीं तर त्यांत अक्षरहि नाहीं. एक तर मध्यंतरीं गेलेलीं जीं चाळीस वर्षे त्यांत लोकांचें ज्ञान बरेंच वाढल्यामुळें पूर्वीप्रमाणें केवळ ख्यालीखुशालीच्या व मौजेच्या गोष्टी आतां नको होत्या; आणि शिवाय जॉनसन हा लहानपणापासून हलक्या प्रतीच्या लोकांत वागलेला, जात्या उदासीन व गंभीर, यामु-

---

१. वरील नांव इंग्लंडांत 'ऑपरा' नांवाचे जे खेळ होतात त्यांस आह्मीं दिलें आहे. वरील 'ऑपरा' हा सभ्य रीतीचा तमाशाच ह्मटला असतां चालणार आहे. यांतील गुणदोषांचें विवेचन 'स्पेक्टेटरां'त जागोजाग आढळतें. विलायतेंत हीं जीं अनेक प्रकारचीं सुधारलेलीं ढंगें आहेत तीं पहिल्या प्रथम पाहिलीं असतां अर्ध्या मुर्ध्या रानटी लोकांच्या मनावर काय व्यापार घडतो तो पुढील उताऱ्यांवरून कांहीं लक्षांत येईल--

एक मुनशी विलायतेस गेला होता तो 'ऑपरा'विषयीं लिहितो—

"At half-past eight the curtain was pulled up, and two very handsome ladies, very *indecently* dressed, and an old man, representing their father, appeared on the stage. They sang, I fancy, some historical ballad in conjunction with instrumental music, and danced very expertly. Whilst the females whirled round in their dancing, their short gowns flew up to the forbidden height! Tantalizing the assembly, it appears, was their principal aim, by such a violation of decorum. We enjoyed the music well, but could not understand a word of what was said."

कर्सनदास मुळजींच्या 'इंग्लंडांतील प्रवासा'तहि वरील प्रकाराचें व 'बॉल' नाचाचें वगैरे वर्णन आहे तेंहि वाचण्याविषयीं वाचकांस शिफारस करतों.

ळेंहि त्यानें आपल्या 'रांबलरां'त 'स्पेक्टेटरा'प्रमाणें रंगेलपणा बिलकूल न आणतां आपल्या वृत्तीचे जे लोक असतील त्यांच्याच उपयोगार्थ आपला सदुद्योग चालविला होता. भाषापद्धतींतहि तसाच फेर. ती 'स्पेक्टेटरां'तल्याप्रमाणें साधी व सोपी नसून प्रौढ व कांहींशीं दुर्बोधहि आहे. ती त्या वेळेस नवीनच सुरू झाल्यामुळें सध्यांप्रमाणें दूषणार्ह न वाटतां लोकांस वरीच प्रियहि झाली होती; व तिचें अनुकरण करणारेहि पुष्कळ झाले. असो; तर याप्रमाणें इंग्रेजींतील गद्यरचनेची सुधारणा करून तीस लोकरंजनाचें साधन करण्याचा यत्न अठराव्या शतकांतील ग्रंथकारांनीं केला; यास्तव या वेळेपासूनच त्याची हकीकत देणें योग्य आहे.

८. इंग्रेजी भाषेंत वर सांगितल्याप्रमाणें गद्याचा प्रचार जसजसा वाढत गेला, तसतसा उत्तरोत्तर तो सर्वमान्य होत जाऊन नानाप्रकारच्या विषयांच्या रूपानें प्रगट होऊं लागला. हे विषय निबंध, इतिहास, शास्त्रीय ग्रंथ, कादंबऱ्या, वगैरे होत. आतां या निरनिराळ्या प्रकारांविषयीं अनुक्रमेंकरून लिहितों.

९. पहिल्यानें निबंध. या प्रकाराचें पहिलें व सध्यांचें रूप यांत मनस्वी अंतर आहे. पहिलें रूप बेकनच्या निबंधांत दृष्टीस पडतें. हे 'निबंध'अगदीं लहान असून त्यांत त्या त्या विषयाचें समग्र निरूपण केलेलें नाहीं. तर प्रत्येक विषयावर त्या ग्रंथकारास जे जे विचार सुचले ते ते त्यानें थोड्या शब्दांत खुबीदार रीतीनें वेगळे वेगळे लिहिलेले आहेत. यास्तव सामान्य वाचणारास त्यांपासून फारसा बोध होणार नाहीं हें तर काय, पण ते चांगलेसे अगोदर समजणारहि नाहींत. बेकनच्या वरील निबंधांतलें एकेक वाक्य असें आहे कीं, त्यांतील प्रत्येकाचें पूर्ण उद्घाटन करूं गेल्यास एकेक स्वतंत्र निबंधच होईल.[1] तर प्रस्तुत प्रकाराचें पहिलें रूप हें होय. असला मासला इंग्रेजींत दुसरा नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें अठराव्या शतकाच्या आरंभीं जी तऱ्हा सुरू झाली ती निराळीच. ती फ्रेंच लोकांच्या ग्रंथकारांची मूळची असून इंग्रेजी ग्रंथकारांनीं उचलली. हिचे दोन प्रकार वर सांगण्यांत आलेच आहेत; व त्यांच्या योगानें इंग्रेजी भाषेवर व त्या लोकांवर काय कार्यें झालीं याचाहि उल्लेख केला आहे. त्याहून जास्त या ठिकाणीं कांहीं लिहिणें नको. यास्तव इतकेंच सांगतों कीं, 'स्पेक्टेटर'व 'रांबलर'यांचा कित्ता आणखी कित्येक नामांकित ग्रंथकारांनीं उचलून गेल्या शतकाच्या शेवटपर्यंत तो प्रकार चालूच होता. शेवटीं या शतकाच्या आरंभीं बदलून निबंधाचें स्वरूप पुनः पालटलें. हा नवा फेरफार मोठ्या महत्त्वाचा आहे. यास्तव त्याचा अंमळ सविस्तर वृत्तांत देणें अवश्य आहे.

---

१. वरील 'निबंधां'ची आर्च बिशप व्हेटली यानें काढलेली एक आवृत्ति प्रसिद्ध आहे. तींत बेकनच्या लहान लहान वाक्यांवर लांब लांब निबंध मूळ अर्थाच्या स्पष्टीकरणार्थ लिहिलेले आहेत.

१०. मागें जीं 'स्पेक्टेटर' वगैरे पत्रें सांगितलीं त्यांचा लोकांस अतिशयित हव्यास लागून वाचण्याची व ज्ञानसंपादनाची गोडी जशी त्यांस अधिकाधिक लागत चालली, तसतसा इंग्लंडांत विद्येचा उत्कर्ष होऊं लागून राजकीय प्रकरणांचाहि सामान्य लोकांत सुद्धां विचार होऊं लागला. शिवाय नाना प्रकारच्या विषयांवर हजारों ग्रंथ होऊन ते सर्वांस समजूं लागल्यानेंहि एकंदर राष्ट्राचे ठायीं अभिज्ञता व ज्ञानाविषयीं उत्कंठाहि अधिकच प्रबळ झाली. यास्तव अठराव्या शतकाच्या आरंभीं एकंदर लोकांची ज्ञानाच्या संबंधानें जी बाल्यावस्था होती ती आतां नाहींशी झाल्यानें त्यांच्या प्रौढ दशेस अनुरूप अशी नवीच पद्धत या शतकाच्या आरंभीं विलायतेंत सुरू झाली. हा नवा प्रकार त्रैमासिकें होत. त्रैमासिक ह्मणजे तीन महिन्यांनीं एकदां निघणारें पुस्तक. या पुस्तकांत विषयसंग्रह पहिल्यापेक्षां फारच मोठा असून शिवाय त्यांत विविधत्वहि अधिक. मागील पत्रांतील विषय ह्मटले ह्मणजे नीतिज्ञान, काव्यविवेचन, सुरस व चमत्कारिक कल्पित कथा, रूपकें, वगैरे असे; व राजकीय प्रकरणांच्या संबंधानें जीं कांहीं चालू असत त्यांत 'परराज्याची स्थिति, पार्लमेंटांतील उलाढाली, वगैरेविषयीं लिहिलेलें असे. पण वर सांगितलेलीं नवीं जीं पुढें सुरू झालीं त्यांत बहुधा साऱ्या गोष्टींचा समावेश होऊं लागला. नव्या ग्रंथांवर टीका, राज्यप्रकरणीं वाद, नवे शोध, शास्त्रीय विषयांचें सविस्तर विवेचन, इत्यादिकांवर यांत एवढे मोठाले लेख येऊं लागले कीं, प्रत्येक निबंध ह्मणजे एक लहानसा ग्रंथच होऊं लागला. तसाच प्रत्येक अंकहि चांगल्या मोठ्या पुस्तकाएवढा असून तो लक्षपूर्वक वाचणें ह्मणजे खरोखरच महिना दोन महिन्यांचें काम. असो; हा नवा प्रकार पहिल्यानें स्कॉटलंडची राजधानी एडिनबरो येथें सुरू झाला. सन १८०२ सालीं त्या शहरांतल्या आठ नऊ उमेदवार तरुण विद्वानांनीं मनांत आणलें कीं, ग्रंथपरीक्षणाचें काम सध्यां अगदीं मंदाईनें चालत असल्यामुळें भाषेचें अहित होऊन एकंदर वाचकांस मनोरंजन व ज्ञान प्राप्त होण्याचें कोणतेंच चांगलेंसें साधन नाहीं. तर आपण सर्वांनीं मिळून एक त्रैमासिक पुस्तक काढावें. असा बेत होतांच त्या वर्षाच्या नोवेंबर महिन्यापासून 'एडिनबरो रिव्ह्यू' नांवाचें सध्यां जें जगत्प्रसिद्ध त्रैमासिक आहे तें सुरू झालें. पहिल्या पहिल्यानें त्याची चोहोंकडे थट्टाच झाली; कां कीं, वरील मंडळीचीं वयें, कोणाचें पंचवीस, कोणाचें तीस, इतक्याच बेताचीं असल्यामुळें एवढें काम या पोरांच्या हातून कसचें निभतें आहे असें सर्व ह्मणूं लागले. शिवाय तो प्रकारहि त्यांनीं नवाच काढल्यामुळें त्यांच्या धाडसाचें लोक नवल करून हसूं लागले. पण देशहितार्थ कंबर बांधलेल्या वरील उमेदवार गड्यांनीं वरील उपहासक मंडळीच्या प्रत्ययास लवकरच आणून दिलें कीं,

गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः ।

"गुणिजन लोकमान्यतेस जे चढतात ते केवळ आपल्या गुणांनीं चढतात; त्यांचे

ठायीं जातिविशेषाची किंवा वयाची चाड नसते." असो; वरील त्रैमासिकाचा फैलावा लवकरच चोहोंकडे झाला. पहिला अंक काढला त्याच्या प्रती भीत भीतच ७५० काढल्या होत्या, पण लागलीच दुसऱ्या तितक्याच काढणें जरूर पडलें. पुढील अंकाच्याहि त्याप्रमाणेंच कित्येक आवृत्ति पुनः काढाव्या लागल्या. असें होतां होतां तीन चार वर्षांत वरील 'रिव्ह्यू'चा खप ९००० प्रती व्हावयाला लागला; आणि त्याच्याहि पुढें तितक्याच वर्षांनीं १२०००,१३००० इतक्यावर येऊन मान बसलें. विलायतेच्या तीन भागांत तर काय, पण युरोपांतील दूरदूरच्या देशींहि सदरील त्रैमासिकास मान मिळून त्यांतील विद्याविषयक व राज्यतंत्रविषयक मतांचे अनुयायी चोहोंकडे झाले. याप्रमाणें निबंधांची ही नवी तऱ्हा निघून ती लवकरच इतक्या स्वरूपास येऊन पोंचली.[1] तें पाहून वरच्या सारख्या दुसऱ्या मंडळ्याहि जमल्या, व त्यांनीं आपआपल्या मतांच्या पुष्ट्यर्थ दुसरीं त्रैमासिकें सुरू केलीं. हींहि अद्याप चालत आहेत. यांचीं नांवें 'क्वार्टर्ली' व 'वेस्ट मिनस्टर रिव्ह्यू' अशीं आहेत. पहिलें सन १८०९ त सुरू झालें. हें आरंभण्याचें कारण मुख्य असें झालें कीं, मागील 'एडिनबरो रिव्ह्यू'त सरकारच्या विरुद्ध मजकूर येऊं लागून त्या पुस्तकाचें वजन जसजसें वाढत चाललें, तसतसा लोकांचा पक्ष अधिकाधिक बळावत जाईल असें राजकीय पक्षाच्या लोकांस भय पडलें. वास्तव त्यांनीं आपली बाजू संभाळण्याकरतां व विरुद्ध पक्षाचें खंडन करण्याकरितां स्वतंत्रच पुस्तक काढलें. या पुस्तकालाहि वाल्टर स्कॉटसारख्या बड्या बड्या मंडळीचा हात होता; व तें सरकारच्या तर्फेनें भांडत असल्यामुळें प्रधानमंडळीचा वगैरे त्यास बळकट आश्रयहि होता. तरी त्याचें वजन मागील त्रैमासिकाप्रमाणें पडलें नाहीं, व अद्यापहि नाहीं. याचें कारण अर्थात् हेंच आहे कीं, दिवसेंदिवस इंग्लंडच्या लोकांचा रोंख राजसत्तेवर अधिकाधिक होत जाऊन लोकपक्षाकडे विशेष ओढा होत चालला आहे. असो; तिसरें जें 'वेस्टमिनस्टर' तें १८२४ त निघालें. त्याचे प्रवर्तक मिल, च्याथाम, ग्रोट वगैरे लोक होते. यांचा वरील त्रैमासिक उपस्थित करण्याचा उद्देश निराळाच होता. तो तादृश राज्यप्रकरणासंबंधीं नसून धर्म, लोकव्यवहार, इत्यादि विषयांवर त्यांनीं जीं नवीं मतें प्रसिद्ध केलीं होतीं त्यांचें प्रकाशन करण्याचा होता. हीं मतें बहुतेक लोकांस आवडत नसून पाद्री मंडळीचा तर त्यांचें नांव काढतांच तिळपापड होऊन जातो. जेम्स मिल व जॉन स्टुअर्ट मिल यांच्या धर्मविषयक मतांचा उल्लेख पंधराव्या अंकांत एके

१. इंग्लंडांत राज्यप्रकरणीं लोकांचे दोन मोठे तट आहेत. ते येथें आमच्या मराठी वाचकांस सांगितले पाहिजत. एक लोकपक्षी लोक, ज्यांस 'व्हिग' ह्मणतात; आणि दुसरे राजपक्षीय, ज्यांस 'टोरी' ह्मणतात. वरील त्रैमासिक 'व्हिग' पक्षाचें होतें; यास्तव पुढें त्यांच्या प्रतिपक्ष्यांनीं 'टोरी' मतांचें दुसरें त्रैमासिक 'क्वार्टर्ली' हें काढलें. याप्रमाणें हे दोन तट जरी अद्याप चालू आहेत; तरी एकंदर राष्ट्राचा कल राजसत्ता कमी करण्याकडे व लोकांचें प्रभुत्व वाढविण्याकडे आहे हें आमच्या लोकांसहि अलीकडे माहीत होत चाललेंच आहे.

ठिकाणीं केला आहे त्यावरून वरील पुस्तकाचें स्वरूप आमच्या वाचकांच्या लक्षांत थोडेसें येईलच. त्याहून जास्त येथें इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, वरील पक्षाचा एकंदर रोंख जुन्या मतांविरुद्ध आहे. यांच्या मतें मानवी बुद्धीस जें यथार्थ दिसेल ह्मणजे जें प्रमाणसिद्ध असेल तेवढें मात्र खरें मानायाचें, व तेवढ्यासच धरून चालायाचें. देवानें आपणास दहा आज्ञा दिल्या आहेत, 'पवित्र शास्त्र' अमुक गोष्ट विहित व अमुक निषिद्ध ह्मणून सांगतें, रोम शहरचे पोपमहाराज जे ख्रिस्ताचे प्रतिनिधि त्यांनीं अमुक आज्ञापत्र काढलें आहे, हें सर्व एकीकडे गुंडाळून ठेवून वरील लोक मनुष्यमात्राचे ठायीं जी सदसद्विवेचनशक्ति आहे तिचेंच केवळ प्राधान्य मानतात. तसेंच जें मनुष्यमात्रास सुखावह तें कर्म चांगलें, व दुःखावह किंवा अनर्थकारक तें वाईट, एवढीच ते नीति व धर्म समजतात. या तिसऱ्या त्रैमासिकाचाहि वरच्या दोहोंप्रमाणें पुष्कळ प्रचार आहे, व एकंदर लोकांचा कल त्याच्यासारखा दिवसेंदिवस पुष्कळ होत चालला आहे. विलायतेंत बहुतेक लोकांचीं मनें ख्रिस्ती धर्मापासून निवृत्त होत चाललीं आहेत, व पाद्री लोकांचें माहात्म्य उत्तरोत्तर कमी कमी होत जाऊन त्यांची मुदत बहुतेक भरत चालली आहे, हें वरील मतांच्या प्रसाराचेंच फळ होय.[1] असो; तर याप्रमाणें या शतकाच्या आरंभीं ही नवी तऱ्हा निघून तिचा दिवसेंदिवस फैलावा होत चालला आहे.

११. आतां प्रस्तुत विषयाचा वरील भाग संपवून हा अंक आटपण्यापूर्वी वरील त्रैमासिकांत कालाच्या व योग्यतेच्या मानानें जें अग्रगण्य आहे त्यांतील अत्युत्कृष्ट निबंधकाराचा थोडासा वृत्तांत येथें देतों. तो अशाकरितां कीं, त्याच्या योगानें वरील पुस्तकांचें स्वरूप वाचकांस विशेष स्पष्ट रीतीनें कळेल. वरील त्रैमासिक अर्थात् 'एडिनबरो रिव्ह्यू' होय व वरील निबंधकार मेकाले होय. या ग्रंथकाराविषयीं सांप्रत पुस्त-

१. वरील उल्लेख ख्रिस्ती धर्माच्या द्वेषबुद्धीनें आह्मीं केला असून तो केवळ अत्युक्तिरूप आहे असें आमच्या कित्येक वाचकांस व आमच्या पाद्री बंधूंस कदाचित वाटेल. पण विलायत पाहून आलेल्या एखाद्या गृहस्थास, किंवा ग्रंथादिकांवरून तिकडची माहिती ज्यानें थोडी बहुत मिळविली आहे अशा कोणाहि मनुष्यास जर विचारलें, तर वरील लेखांत सत्यता कितपत आहे ती दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं. फार काय, पण आमच्या मिशनरींनीं व एतद्देशीय विद्वान् ख्रिस्त्यांनीं आपल्या मनाची खरी गोष्ट सांगणें जर पत्करलें, तर वरील अप्रिय सत्यच त्यांस मोठ्या खेदानें प्रगट करणें येईल यांत संशय नाहीं. खालच्या पार्लमेंटांतून तर पाद्रींस अजीबात काढून टाकून वरच्यांतूनहि तसेंच करण्याचा पुष्कळांचा मनोदय आहे, व प्रधान मंडळीची धर्मखात्यावर केवढी करडी नजर आहे, हें सर्व इतिहासज्ञांस विश्रुत आहेच. असो; एकंदरींत पहातां रोमी सरकारानें इंग्लंडांतल्या वगैरे फौजा जशा पांचव्या शतकांत राजधानीच्या संरक्षणार्थ माघाऱ्या आणल्या त्याप्रमाणेंच ख्रिस्तशत्रूनें विलायतेंत जो दंगा मांडला आहे तो मोडण्यास्तव देशोदेशच्या मिशनरींनीं आपापलें गवाळें गुंडाळून आपल्या चेल्यांसहवर्तमान आपल्या जळत्या घराची सत्वर वाट धरावी हें बरें नव्हे काय?

कांत पुष्कळ ठिकाणीं निंदास्तुतिपर मजकूर आला आहे; यास्तव प्रस्तुत प्रसंगीं त्या-विषयीं विशेष विस्तारानें लिहून त्याच्या ग्रंथकर्तृत्वाचें एकंदर स्वरूप वाचकांस कळविलें असतां बरें पडेल असें वाटतें. मेकाले हा चालू शतकाच्या आरंभीं जन्मला. तो जन्मल्यावर लवकरच त्याच्या नांवाशीं खिळलेलें जें वरील पहिलें त्रैमासिक त्याचा प्रादुर्भाव झाला. मेकालेनें पहिल्या पहिल्यानें लहान लहान मासिक पुस्तकांतून निबंध लिहिण्याचा उपक्रम आरंभिला; आणि त्यांत बरेंचसें यश आलें तशी जास्त उमेद येऊन आपल्या वयाच्या पंचविसावे वर्षीं त्यानें 'एडिनबरो रिव्ह्यू' चालवणाऱ्या मंड-ळींत प्रवेश केला. हा त्याचा पहिला लेख मिल्टन कवीवर लिहिलेला निबंध होय. यांत त्याच्या पुढें विस्तार पावलेल्या गुणांचा व दोषांचा अंकुर स्पष्ट दिसत आहे. ते कोणते ते पुढें सांगण्यांत येतील. असो; वर सांगितल्याप्रमाणें वरील त्रैमासिकांत एकदां प्रवेश झाल्यावर मेकालेनें शेवटपर्यंत आपले निबंध त्यांतच लिहिले. हे एकंदर बावीस आहेत. यांतील विषय मुख्यत्वेंकरून ऐतिहासिक वृत्तांत व निरनिराळ्या ग्रंथकारांचें गुणदोषविवेचन हें होत. मेकाले मोठा जबरा वाचणारा होता; त्यास युरोपांतील मोठमोठ्या भाषा स्वतः अवगत असून इतर भाषांतील ग्रंथांविषयींची माहितीहि भाषांत-रादि द्वारें चांगली झाली होती.[1] शिवाय बहुतेक सर्व विषयांचें त्यानें थोडें बहुत तरी ज्ञान संपादन केलें होतें. यास्तव वरील निबंधांत, शिवाय त्याच्या इतिहासांत, कवितेंत, पार्लमेंटांत केलेल्या भाषणांत, वगैरे जेथें तेथें मोठे समर्पक दृष्टांत, उपमा, इत्यादि देऊन आपली विलक्षण माहिती त्यानें दाखविली आहे. इंग्लिश कवींपैकीं मिल्टन व बायरन या दोघांवरच त्यानें निराळे निबंध लिहिले आहेत; तरी बर्डस्वर्थ, शेक्सपीयर, ड्रायडन, पोप, वगैरेंच्या विषयीं पुष्कळ मजकूर जागोजाग त्याच्या निबंधांत आला आहे. त्याप्रमाणेंच जॉनसन, बेकन, आडिसन, आणि दुसरे दोन चार ग्रंथकार यांवरच स्वतंत्र निबंध लिहिले असून इंग्रेजी भाषेंतील बहुतेक मोठमोठ्या ग्रंथकारांविषयीं पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आहेत. सारांश, वरील निबंध इंग्रेजी विद्येचें केवळ भांडार असून त्यांत तींतील ग्रंथसंग्रहाविषयीं वगैरे थोडक्यांत पुष्कळ जशी माहिती मिळ-णारी आहे तशी इतर थोड्याच ठिकाणीं सांपडेल.

आतां वर सांगितल्याप्रमाणें वरील निबंधांत व मेकालेच्या एकंदर ग्रंथांत आढ-ळणारे गुणदोष सांगतों. या ग्रंथकाराच्या विद्वत्तेविषयीं, व एकंदर माहितीविषयीं, वर सांगितलेंच आहे. हा गुण पुष्कळ ग्रंथकर्त्यांत आढळतो; पण तो मेकालेनें ज्या

१. वरील विविध ज्ञानाविषयीं मेकालेची विद्वत्तायांत असतांनाहि प्रसिद्धि असे. त्याचें नांव 'सर्वज्ञ' असें पडलें होतें. इकडील ग्रंथांविषयींहि त्यास थोडीबहुत माहिती असे याविषयीं मागें आठव्या अंकांत थोडेंसें लिहिलेंच आहे. तसेंच एका निबंधाच्या आरंभीं 'हितोपदेशां'तील 'तीन धूर्त'ची गोष्ट त्यानें दृष्टांताकरतां घातली आहे हें पुष्कळांस माहीत असेलच.

रीतीनें प्रगट केला आहे ती तऱ्हा थोड्यांसच साधेल. या माहितमुळें नवे नवे व चमत्कारिक दृष्टांत वगैरे देऊन त्यानें आपल्या ग्रंथरचनेस इतकी शोभा आणलेली आहे कीं, तीमुळें वाचण्याचे श्रमहि वाचणारांस न भासतां तो तो विषय त्यांचे मनावर ठसून जातो; व सहजरीत्या अनेक चमत्कारिक गोष्टींची माहिती होऊन जाते. मेकालेची भाषापद्धतिहि मोठी प्रशंसनीय आहे. कित्येकांच्या मतें तर त्याच्यासारखा सफाईदार लिहिणारा आजपर्यंत इंग्लिश भाषेंत झालाच नाहीं. वाक्यें लहान व खुबीदार, शब्द सोपे आणि निवडक, विषयनिरूपणाची शैली अत्यंत सुबोध व सरळ,—हाच प्रकार जेथें तेथें आढळतो. ही शेवटली गोष्ट तर फारच मोठी आहे. ती उत्तम शिक्षकास जशी अवश्य आहे तशीच ग्रंथकारासहि होय. सामान्य वाचकांसहि मोठमोठ्या विषयांची माहिती करून देणें ह्मणजे मोठ्या चतुराईचें काम आहे; व ही रीत ज्यास चांगली शिकायाची असेल त्यास ती प्रस्तुत ग्रंथकारापासून जशी मिळेल तशी बहुधा कोठेंहि मिळायाची नाहीं. वरील भाषापद्धतीचा दुसरा एक विशेष गुण तिची विनोदात्मकता होय. हा गुण अलीकडील इंग्रेजी ग्रंथकारांत सामान्यतः नेहमीं आढळतो; व वाचनाचे श्रम हलके करण्यास याचा उपयोग किती आहे हें ती तऱ्हा आपल्या भाषेंतहि थोडथोडी सुरू होत चालली आहे यावरून सर्वांच्या ध्यानांत येईलच.

सरते शेवटीं वरील ग्रंथकाराचे दोष दाखल करून प्रस्तुत लेख पुरा करतों.[1]

---

१. 'निबंधमाले'सारख्या छोट्याशा पुस्तकाच्या कर्त्यानें मेकॉलेच्या दोषांचें विवरण करूं जाणें हें आमच्या प्रतिपक्ष्यांस यापूर्वी विलक्षण धाडसाचें कृत्य वाटलेंच आहे; तसेंच तें या वेळेसहि वाटल्यावांचून रहाणार नाहीं. यास्तव वरील ग्रंथकाराची योग्यता किती मानलेली आहे याविषयीं एक दोन दाखले येथें देतों. ते नीट ध्यानांत बाळगले असतां वरील ग्रंथकाराचा व खिस्तभक्तादि मंडळीचा पूज्यपूजकभाव बराच कमी होईल असें वाटतें.—

"Macaulay's sense of beauty is keen, but not deep; his enthusiasm has no central fire; his convictions want depth, and as a consequence, his eloquence, with all its apparent earnestness, wants force. The surface of his mind is large and active; but its regions below remain untroubled. The consequence is, that he has no influence on his age. He has delighted thousands. This is no slight thing, and we should be the last to undervalue it. But he has materially bettered no one. He has deepened no man's convictions, he has given fresh strength to no human soul. His influence on his generation has been null. It is impossible, we think, to say that any human being would have been otherwise, had Macaulay never written. Some few might have written less picturesquely and less elegantly, but no human soul

हे दोष वरील गुणांचेच कांहीं अंशीं अनुषंगी होत. जो ग्रंथकार वाचकांस नेहमीं रंजवूं पाहील व त्यांस नेहमीं थक्क करून टाकण्याचा यत्न करील त्यास निवळ सत्यासच अनुसरून चालणें उपयोगी पडणार नाहीं. मीठमीरचीचा सांठा त्यास आपणांपाशीं नेहमीं भरपूर ठेवावा लागेल. हा प्रकार मेकॉलेनें आपल्या पक्षाच्या लोकांच्या संबंधानें व आपल्या आवडत्या ग्रंथकारांविषयीं जितकें गोड गोड लिहावयास सांपडेल तितकें लिहिण्यानें व आपल्या विरुद्ध पक्षाच्या लोकांचे दोष तिखटमीट लावून सांगण्यानें उघड दाखविला आहे. त्याच्या निबंधांतच पाहिलें तर जॉनसनचें चरित्र लिहिणारा बॉसवेल, प्रख्यात कवि पोप, इंग्लंडचा राजा पहिला चार्लस इत्यादिकांविषयीं; व दुसऱ्या पक्षीं क्रॉमवेल, हेस्टिंग्स, क्लैव, वगैरेंच्याविषयीं जें जें लिहिलें आहे त्यावरून वरील पक्षपाताचा व अत्युक्तीचा प्रकार सर्वांच्या नजरेस सहज येणारा आहे. मेकॉलेच्या ग्रंथांत असणाऱ्या या महादोषास्तव त्याचें वजन आजलाहि पुष्कळ कमी झालें आहे. केवळ त्याच्याच लिहिण्यावरून कोणास चांगलें किंवा वाईट ह्मणण्याचें कोणी पतकरीत नाहीं. असो; हें एक झालें. दुसरा मोठा दोष असा आहे कीं, त्याच्या छानछुकीचाहि अलीकडे लोकांस कंटाळा येत चालला आहे. सगळ्या आंगभर दागिने घातले असतां व नेहमीं तशाच थाटांत मिरविलें असतां त्या मनुष्याचा पहाणारास जसा कांहीं वेळानें त्रास येऊं लागतो; त्याप्रमाणेंच अलंकारांचा सदोदित थाटमाट राखिला असतां ग्रंथाचीहि शोभा नष्ट होते. तर याप्रमाणेंच मेकॉलेचे निबंध वगैरे पहिल्या प्रथम जरी

---

would have been poorer."

British Quarterly.

"His imagination often snatches the reins from his reason; his ardour dims his equanimity; his learning overpowers his taste. He was so enamoured of strong expressions and extreme views, that even when he tried to be impartial, it was only by setting off one exaggeration against another that he attempted to effect his object. His views, always ingenious, generally eloquently supported, are not uniformly just; his powers as a rhetorician sometimes make him forget his duties as a judge; he is too often splendid rather than impartial, one-sided than just. The reader will never fail to be interested by his narrative; but he is not equally certain to be instructed; the impression left, however brilliant, is often fallacious; and the facinating volume is often closed with regret that the first pleader at the bar of posterity has not yet been raised to the bench."

Alison's History of Europe.

वाचकास थक्क करून सोडतात, तरी ग्रंथरचनेची खरी सरसता त्यास जशी अधिकाधिक कळूं लागते, व न्यायान्यायबुद्धि त्याचे ठायीं वाढते, तसतसें वरील ग्रंथकाराचें तेज त्यास फिकें वाटायाला लागतें.

याप्रमाणें इंग्रेजी भाषेंतील गद्यरचनेची एक तऱ्हा जो निबंध त्याविषयीं लिहिणें झालें. पुढील भागांचें यापुढें क्रमवार विवेचन करूं.

अहह महतां निःसीमानश्चरित्रविभूतयः ॥[1]

नीतिशतक.

अंक २९—(१) अवतरण. (२) इंग्रेजी भाषेंतील इतिहाससंग्रह. (३) त्याचे विभाग. (४) इंग्लंडचा इतिहास. (५) नामांकित इतिहासकार. (६) अर्वाचीन युरोपियन राष्ट्रांचा इतिहास. (७) ग्रीक व रोमन लोकांचा इतिहास. (८) विख्यात इतिहासकार.

१. गेल्या अंकांत इंग्लिश भाषेची उत्पत्ति वगैरे सांगून गद्यग्रंथांपैकीं एका भागाचें निरूपण केलें. आतां पुढील भाग जे इतिहास, शास्त्रीय ग्रंथ इत्यादि त्यांविषयीं निरूपण करूं.

२. इंग्लिश भाषेंत इतर सगळे विषय जसे परिपूर्णतेस पावलेले आहेत त्याप्रमाणेंच इतिहासहि पावला आहे. प्राचीन ग्रीक व रोमन विद्येचें युरोपांत पुनरुज्जीवन होऊन इतिहासरचनेची सर्व राष्ट्रांत जशी माहिती झाली, तशीच ती इंग्लंडांतील विद्वानांसहि होऊन जुन्या इतिहासकारांचें ते लवकरच अनुकरण करूं लागले. पुढें जसजशी इंग्रेजी भाषा सुधारत चालली, व इंग्लिश लोकांचें ज्ञान वाढत चाललें; तसेंच त्यांच्या देशांत मोठमोठ्या गोष्टी घडूं लागून पृथ्वीच्या दूरदूरच्या देशांत त्यांचा संचार होऊं लागला, तसतशी इतिहासाची प्रवृत्ति विशेषच पडत चालली. वरील प्रकार अद्यापहि चालूच आहे. यामुळें प्रस्तुत विषयावर इंग्रेजी भाषेंत जितके व जितक्या प्रकारचे ग्रंथ आहेत तितके व तसे ग्रंथ युरोपांतील इतर भाषांतहि थोडेच असतील असें वाटतें. आमच्या राज्यकर्त्यांची जिज्ञासा व शोधकबुद्धि या दोन्ही विलक्षण असल्यामुळें व ते साहसप्रिय असल्यामुळें भूमंडळाच्या प्रत्येक भागावर त्यांची गडबड सतत चालू आहे. व यास्तवच त्यांच्या भाषेंत इतिहासाचें भांडार भरपूर असून त्यांत अतिशयित विचित्रता आहे.

३. वर इंग्रेजी भाषेंतील इतिहासाविषयीं सामान्यतः सांगितलें. आतां त्याच्या निरनिराळ्या शाखांविषयीं विशेषतः निरूपण करतों. या शाखा चार पांच निरनिराळ्या घेतल्या असतां चालणार आहे. एक खुद्द इंग्लंडचा इतिहास, दुसरा अर्वाचीन युरोपियन राष्ट्रांचा, तिसरा जुन्या ग्रीक व रोमन राष्ट्रांचा, चवथा हिंदु, चीन, पारसीक इत्यादि पूर्वेकडील राष्ट्रांचा आणि पांचवा सरसकट पृथ्वीवरील सर्व देशांचा. आतां प्रत्येकाविषयीं क्रमशः निरूपण करूं.

---

१. "अहाहा, थोर जे असतात त्यांचा चरित्रमहिमा केवळ अगाध असतो!"

४. पहिल्यानें खुद्द इंग्लंडचा इतिहास. या देशाच्या इतिहासाची माहिती सुमारें दोन हजार वर्षांपर्यंत मात्र लागते. युरोपच्या पलीकडे आटलांटिक महासागरांत दोन मोठालीं बेटें आहेत इतकी वार्ता मात्र फिनिशियन लोकांच्या जलपर्यटनांवरून वगैरे लोकांत प्रसिद्ध होती. तिचा साक्षात् प्रत्यय पहिल्यानें जुलियस सीजर यास आला. यानें इसवी सनाच्या पूर्वी ५६ व्या वर्षी ब्रिटन देशावर स्वारी करून तेथें रोमन लोकांचें ठाणें घातलें. या महाविख्यात सेनापतीनें व ग्रंथकारानें आपल्या इतिहासांत वरील बेटाविषयीं जें लिहिलें आहे त्याच्या अगोदरची माहिती कोणास कांहीं नाहीं. असो; सीजराच्या पुढेंहि कित्येक शतकेंपर्यंत इंग्लंड देशाची माहिती फारच थोडी सांपडते. याचें कारण हेंच कीं तेथील लोक त्या वेळेस केवळ रानटीच असून विद्येचा लोकांचे ठायीं केवळ अभाव होता. ही स्थिति नार्मन लोकांच्या वेळेपासून बरीच बदलत चालली. इंग्लंडाचा तद्देशीयांनीं लिहिलेला इतिहास या वेळेपासून कांहीं मिळतो. त्या काळीं विद्येचें वास्तव्य झटलें ह्मणजे पाद्री लोकांच्या ठायींच काय तें होतें.[1] यास्तव वरील विषयावर त्यांनींच लिहिलेले लेख आजपर्यंत कांहीं चालत आले आहेत. यांस इंग्रेजी 'क्रानिकल्स' ह्मणजे बखरी ह्मणतात. या बखरी आंग्लो-साक्सन भाषेंत लिहिलेल्या असल्यामुळें ती भाषा जाणणारांस मात्र त्या समजतात. याप्रमाणेंच पुढील काळचे इतिहासहि कांहीं पाद्री लोकांनीं लिहिलेले व कांहीं सरदार लोकांनीं पदरीं ठेवलेल्या लेखकांनीं लिहिलेले असे आहेत. असो; पण ही केवळ इतिहासरचनेची बाल्यावस्था झाली. हा प्रकार चांगला झटला ह्मणजे सोळाव्या शतकापासून आढळतो. या वेळेपासून विद्येचा फैलावा होऊं लागून प्राचीन ग्रीक व रोमन ग्रंथकारांचे इतिहास सर्वांस माहीत झाल्यामुळें त्यांचें सहजच अनुकरण होऊं लागलें. बेकन यानें ट्यूडर घराण्यांचा पहिला राजा सातवा हेनरी याचा इतिहास लिहिला. तसाच मिल्टन यानेंहि एक इतिहास लिहिला आहे. हा कवि तरुण वयांत युरोपावर मुशाफरी करावयास गेला होता, तेव्हां परत येतांना वाटेनें त्यानें दोन मोठाले संकल्प मनांत करून ठेवले होते. ते हे कीं, आपल्या देशाचा एक इतिहास लिहावयाचा, आणि आपल्या भाषेंत एक वीररसप्रधान महाकाव्य रचायाचें. यांपैकीं दुसरा बेत त्यानें शेवटीं उतार वयांत व आंधळेपणांत शेवटास नेला हें सर्वांस माहीत आहेच.[2] पहिला बेत जो इतिहासाचा तो मात्र चांगलासा सिद्धीस

१. हा प्रकार सर्व देशांतून आरंभीं आढळतो. धर्माचे अधिकार जे चालवितात त्यांसच थोडें बहुत अगत्य पडल्यामुळें ती त्यांचेच ठायीं कांहीं आढळते. इंग्रेजींत 'क्लार्क' शब्दाचे अर्थ 'पाद्री', 'विद्वान्', 'लिहिणारा' असे जे क्रमाक्रमानें झाले त्यांत वरील स्थिति सूचित होते.

२. मिल्टननें 'प्यारॅडिज लॉस्ट' रचलें तो प्रकार मोठा चित्तास लागण्यासारखा आहे. त्यास त्याच्या मुली सकाळीं आणून खुर्चीवर बसवीत आणि नंतर केवळ स्फूर्तीनें पद्यरचना करून ती त्यांस तो सांगत असे. असें असे तरी आपली कविता पुनः पुनः वाचवून तींत सुधा-

(पुढें चालू).

गेला नाहीं. विषयाचें विवेचन फार सविस्तर झाल्यामुळें नार्मन लोकांच्या स्वारी-पर्यंतच वरील इतिहासाचे सहा भाग झाले; आणि पुढील भाग राहिले ते शेवटीं तसेच राहिले.

५. वर सांगितल्याप्रमाणें सोळाव्या व सतराव्या शतकांत इंग्लंडचा इतिहास तद्देशीय विद्वान् लिहूं लागले. तरी अद्याप त्या देशाचा संपूर्ण इतिहास लिहिण्याचें कोणाच्या हातून झालें नाहीं. हा उद्योग पुढील ह्मणजे अठराव्या शतकांत सिद्धीस गेला. असा संपूर्ण इतिहास पहिल्यानें एका फ्रेंच ग्रंथकारानें लिहिला. हा विलक्षण प्रकार घडण्याचें कारण असें झालें कीं, चवदाव्या लुई राजाच्या जुलुमामुळें पुष्कळ फ्रेंच प्रॉटेस्टंट इंग्लंडांत येऊन राहिले होते. अशांपैकीं वरील इतिहासकार रेपिन हा होता. हा आपल्या धर्माच्या रक्षणार्थ इंग्लंडास आला असून तिसरा विल्यम राजा यानें त्यास थोडीशी नेमणूक करून दिली होती. यानें सन १७२५ त आपला इतिहास संपविला. पुढें लवकरच त्याचें इंग्रेजींत भाषांतर झालें. रेपिनच्या पुढें त्याच विषयावर आणखी कित्येक ग्रंथ झाले; पण त्या सर्वांत विशेष नामांकित असा एकच ठरला. हा इतिहास ह्यूम नामक प्रख्यात ग्रंथकाराचा होय. या विख्यात तत्त्वज्ञाचा उल्लेख यापूर्वी कित्येक वेळां आह्मीं केला आहे; त्यावरून त्याचें नांव आमच्या वाचकांस बहुधा अपरिचितासारखें वाटणार नाहीं. यानें १७५४ त स्टुअर्ट घराण्यांतले पहिले दोन राजे जेम्स व चार्लस यांच्या कारकीर्दीचा इतिहास प्रसिद्ध केला. या कृत्याबद्दल ह्यूम यास काय बक्षीशी मिळाली ती त्यानें आपल्या चरित्रांत स्पष्ट लिहून ठेविली आहे. त्याचीं धर्मसंबंधीं मतें अगोदरच चोहोंकडे पसरून हजारों लोक, त्यांतून विशेषतः पाद्री, त्याचा अतिशय द्वेष करीतच होते; आणि त्यांत वरील ग्रंथांत आपलीं राज्यप्रकरणीं मतें जेव्हां त्यानें प्रसिद्ध केलीं, तेव्हां तर त्याच्यावर जो गहजब झाला तो कांहीं पुसूं नये. जो तो त्याला शिव्या देऊन त्याची निर्भर्त्सना करूं लागला. हा लोकद्वेष लवकरच येथपर्यंत जाऊन पोंचला कीं, वरील ग्रंथकारास स्वदेश नकोसा होऊन कोठें परागंदा व्हावें असें वाटूं लागलें.[1] पण पुढें कांहीं काळानें वरील स्थितींत फेर पडला. त्याच्या गुणांकडे वाचकांचें विशेष लक्ष लागून वरील इतिहास अधिक खपूं

रणा करण्याचा यत्न त्याचा नेहमीं चालूच असे. याप्रमाणें होतां होतां सात वर्षांनीं वरील महाकाव्य संपूर्ण झालें.

१. त्याचा स्वचरित्रांतील लेख येणेंप्रमाणें आहे--

"I was, I confess, discouraged; and had not the war at that time been breaking out between France and England, I had certainly retired to some provincial town of the former kingdom, have changed my name, and never more have returned to my native country.

लागला. तेव्हां ह्यूमनें ट्यूडर घराण्याची कारकीर्द लिहिली; आणि सरते शेवटीं जुलियस सीझरच्या स्वारीपासून तों वरील घराण्याचा पहिला राजा सातवा हेनरी याच्या पर्यंतचा आधींचा इतिहास लिहून ग्रंथ पूर्ण केला. तर याप्रमाणें इंग्लंडच्या समग्र इतिहासांत पहिल्यानें जो लोकमान्य झाला त्याची अशी हकीकत झाली.

ह्यूमच्या पुढें जे इंग्लंडचे इतिहासकार झाले त्यांत अग्रगण्य झटले ह्मणजे हालम व मेकॉले हे होत. हालम यानें इंग्लंडच्या राज्यरीतीचा इतिहास लिहिला आहे; ह्मणजे सगळें जग जिच्या योगानें विस्मय पावत आहे अशी जी अधिकारत्रयात्मक अपूर्व राज्यसत्ता इंग्लंडास प्राप्त झाली आहे ती उत्पन्न कशी झाली, तींत कोणकोणते फेरफार कसकसे होत गेले, व सांप्रतचें स्वरूप तिला कसें आलें, हा सर्व वृत्तांत वरील इतिहासांत सांगितला आहे. मेकॉलेचा इतिहास वरच्या दोहोंहूनहि व्यापक आहे. त्यांत राज्यप्रकरणाची हकीकत, राज्यरीतींत झालेले फेरफार, या गोष्टी तर मुख्य असून शिवाय विद्या, लोकसुधारणा, वगैरे हरएक विषयाची माहिती पूर्ण दिलेली आहे. इतिहास कसा असावा याविषयीं त्यानें पुष्कळ विचार केला होता, व आपल्या देशाच्या संबंधाची हरएक प्रकारची माहिती पहिल्यापासून मोठ्या आस्थेनें पुष्कळ मिळवून ठेविली होती. या सर्वांचें फळ सरते शेवटीं वरील इतिहासाच्या रूपानें प्रगट झालें. मेकॉले, हौस ऑफ कॉमन्स सभेमध्यें एडिनबरो शहराच्या तर्फेनें मुकत्यार झाला होता; पण पुढें कांहीं कारणास्तव त्याच्या लोकांचें व त्याचें न पटून त्यानें वरील जागा सोडून दिली. यामुळें सरतेशेवटचीं दहा बारा वर्षें त्याचा बाकीचा सर्व व्याप सुटून तीं इतिहासरचनेंत त्यास निर्वेध घालवितां आलीं. आपल्या इतिहासाचे त्यानें एकंदर पांच भाग काढले. त्यांपैकीं शेवटला त्याच्या मरणानंतर प्रसिद्ध झाला. हे पांच भाग मिळून सगळी पंधरा वर्षांची हकीकत आहे. ग्रंथकर्त्याचा मूळ संकल्प झटला ह्मणजे सन १६८५ ह्मणजे दुसऱ्या जेम्सच्या कारकीर्दीचा आरंभ येथपासून तों त्या वेळच्या लोकांच्या आठवणीपर्यंत ह्मणजे सुमारें १८५० सालापर्यंत घडलेला सर्व वृत्तांत लिहावयाचा असा होता. पण तो सिद्धीस जाणें अशक्यच होतें हें उघड आहे.[1] असो; वरील इतिहासास आरंभ होण्याच्या पूर्वीच मेकॉलेची कीर्ति चोहोंकडे पसरली होती व इंग्लंडचा इतिहास त्यानें लिहिला असतां तो किती चित्तवेधक होईल याविषयींहि सर्वांची खात्री अगो-

---

१ मेकॉलेच्या इतिहासाच्या आरंभींचें वाक्य हें आहे—

"I purpose to write the history of England from the accession of King James II down to a time which is within the memory of living men."

या मूळ संकल्पाप्रमाणें झटलें ह्मणजे वरील इतिहास आटपण्यास निदान शंभर सवाशें वर्षे व शंभर दांडशें भाग हावे होते!

दरच होऊन गेली होती. यास्तव तो प्रसिद्ध झाला असतां किती लोकप्रिय होऊन गेला असेल याचें सहज अनुमान करतां येईल. पहिला भाग बाहेर निघाल्यापासूनच साऱ्या वाचकांच्या वरील इतिहासावर उड्या पडल्या; त्या अशा कीं, दुसरा भाग छापायाला जाण्याच्या अगोदरच पहिल्याच्या अकरा मोठमोठाल्या आवृत्ति निघून पार खपून गेल्या. यावरून पुढील भागांच्या खपाचेंहि अनुमान करतां येईल. एकंदरींत वरील ग्रंथाचें उत्पन्न इतिहासकारास व छापणारांस जितकें झालें तितकें त्यापूर्वी कधींहि कोणास झालें नसेल. लाँगमन्स आणि कंपनी यांनीं एके प्रसंगीं प्रस्तुत ग्रंथकारास एक चेक (हुंडी) दिला तो दोन लाख रुपयांचा ! असो; तर याप्रमाणें मेकॉलेची इतिहासकार या संबंधानें सरते शेवटीं मोठी कीर्ति होऊन अद्यापहि ती कमी झाली आहे असें नाहीं.

आतां वरील तिघां इतिहासकर्त्यांची योग्यता व लोकमान्यता किती आहे याविषयीं जर विचार केला, तर तिघांचे तीन प्रकार आहेत असें आढळून येईल. ह्यूमचा जो इतिहास आहे त्यास आतां फारसें वजन नाहीं. त्यांत पुढील इतिहासवेत्त्यांनीं शेंकडों चुका काढल्या आहेत, व आपल्या इष्ट मतांच्या पुष्ट्यर्थ वरील इतिहासकारानें प्रमाणग्रंथांचे आधार देतांना कसा लबाडीचा प्रकार केला आहे तोहि सर्वांस विदित झालेला आहे; यास्तव इतिहासदृष्ट्या ह्यूमच्या ग्रंथाची आतां विशेष मातब्बरी राहिली नाहीं. तो मोठा बुद्धिमान् व चतुर होता, यास्तव त्यानें जागोजाग जे गहन विचार प्रदर्शित केले आहेत व कथानकाची मोठी मनोरम रचना केली आहे, त्याकडेच विशेषतः लक्ष देऊन त्याचा इतिहास सध्यां लोक वाचतात, तरी वरील गुणांत व विशेषतः भाषापद्धतींत वरील इतिहास इतका उत्कृष्ट आहे कीं, त्याची सर थोड्याच ग्रंथांस येईल. ह्यूम हा स्कॉटलंडांत जन्मला असून त्यास इंग्लिश भाषा इतकी उत्तम साधली हें त्याच्या बुद्धिविशेषाचें दर्शक आहे. एवढा इतिहासकार गिबन, व त्यांतून खुद्द इंग्लंडांत जन्मलेला, तरी त्यानेंहि वरील रचनागुणांत ह्यूमच्या पुढें हात ठेकले ! असो; हालमची जी कीर्ति आहे ती त्याच्या इतिहासाच्या बाह्य स्वरूपावर मुळींच नाहीं. त्याची भाषापद्धति प्रौढ, सभ्य, गंभीर अशा तऱ्हेची आहे. तींत इतर दोघां इतिहासकारांच्या सारखा चटकदारपणा ह्मणण्यासारखा मुळींच नाहीं. पण सर्व ग्रंथकारांस, व त्यांतून इतिहासकारांस, अत्यंत आवश्यक जो निःपक्षपाततारूप गुण तो हालमच्या ग्रंथांत पूर्ण आढळतो.[1] या विरल व अमोलिक गुणास्तव, आणि

---

१ **हालमचा** इंग्लंडचा इतिहास वर सांगितलाच आहे. त्याविषयीं वरील गुणाच्या संबंधानें **मेकॉलेनें** पुढील तारीफ केलेली आहे—

"His work is eminently judicial. Its whole spirit is that of the bench, not that of the bar. He sums up with a calm, steady

(पुढें चालू).

त्याच्या प्रचंड विद्वत्तेस्तव, वरील ग्रंथकाराची मान्यता मोठी आहे. त्यानें तीनच ग्रंथ केले आहेत; पण ते सर्वानुमतें त्या त्या विषयांत प्रमाणभूत होऊन राहिले आहेत. आतां राहिलेला इतिहास जो मेकॉलेचा त्याविषयीं येथें कांहीं विशेष लिहिण्याची गरज नाहीं. गेल्या अंकाच्या शेवटीं वरील ग्रंथकाराचे जे सामान्यतः गुणदोष सांगितले आहेत तेच वरील इतिहासासहि लागतात. मेकॉलेची कल्पनाशक्ति त्याच्या विवेचन-शक्तीहून प्रबळ होती; व त्याच्या ज्ञानाचा विस्तार जेवढा होता त्याच्या मानानें त्याची गहनता नव्हती. यास्तव वरील इतिहासांत भाषालालित्याचे वगैरे गुण जरी त्यानें सर्वोत्कृष्ट प्रगट केले आहेत, व आपली तन्हेतऱ्हेची सर्व माहिती जरी भरपूर ओतून दिली आहे, तरी उत्कृष्ट इतिहासाचीं जीं प्रधान लक्षणें आहेत त्यांपैकीं कांहीं मुख्य मुख्य त्यांत सांपडत नाहींत. एक तर मागें सांगितलेली निःपक्षपातता. या गुणाचा अभाव प्रस्तुत इतिहास अगदीं लहान आहे तरी तेवढ्यांतहि अगदीं स्पष्ट दिसत आहे. दुसरा गुण गहनार्थता. हाहि वरील इतिहासांत ह्मणण्यासारखा आढळत नाहीं. प्रस्तुत विषय मेकॉलेच्या प्रीतीचें व अभिमानाचें एवढें स्थान असतां, व त्यावर त्यानें साऱ्या जन्मभर शोधपूर्वक अतिशय विचार केला असतां, पूर्वीच्या इतिहासांतून न आढळणारे असे नवे व गहन विचार त्यानें कोठेंहि प्रगट केलेले दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. फार तर

---

impartiality, turning neither to the right nor to the left, glossing over nothing, exaggerating nothing, while the advocates on both sides are alternately biting their lips to hear their conflicting misstatements and sophisms exposed. On a general survey we do not scruple to pronounce the 'Constitutional History' the most *impartial* book that we ever read ..... For cold rigid justice, the one weight and the one measure, we know not where else we can look.

Essays Vol. I.

असलें रागद्वेषशन्यत्वाचें कडकडीत व्रत धारण करण्याची शक्ति किती थोड्यांत असते, आणि इच्छा तर त्याहूनहि किती थोड्या मनुष्यांस असते !

१. यांपैकीं एकाविषयीं तर वर लिहिलेंच. बाकीचे दोन 'मध्यम कालाचा इतिहास' ह्मणजे प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या वेळची सुधारणा बुडून ती अर्वाचीन काळीं पुनः उदयास येण्याच्या मध्यंतरीं जो काळ गेला त्याचा इतिहास; आणि 'युरोपीय भाषांतील ग्रंथसंग्रहाचें निरूपण' हे होत. हे दोन्ही विषय, आणि त्यांतून दुसरा, यांचें विवेचन करणें ह्मणजे केवढ्या श्रमाचें व केवढ्या बुद्धीचें काम आहे याचा सर्वांस सहज अजमास होईल. तरी असल्या विषयांवरहि हालम यानें अशी ग्रंथरचना केली आहे कीं, ती सर्वांस तत्क्षणींच मान्य होऊन अद्यापहि तसले ग्रंथ झाले नाहींत. वरील प्रत्येक तयार होण्यास सुमारें दहा दहा वर्षें लागलीं !

काय, पण सांप्रत इतिहासाचें एकंदर धोरण पाहिलें तर हालमचेच विचार व मतें मेकॉलेनें उचललीं आहेत असें दिसून येईल. असो; तरी एकंदरींत पहातां या शेवटल्या ग्रंथांत जे कित्येक उत्कृष्ट गुण आहेत त्यांत तो केवळ अप्रतिम आहे यांत संशय नाहीं.

६. याप्रमाणें प्रस्तुत विषयाचें एक सदर झालें. दुसरें सदर अर्वाचीन युरोपियन राष्ट्रांचा इतिहास. अलीकडे दोन तीन शतकें युरोपांतील साऱ्या राष्ट्रांचें व्यापाराच्या योगानें व राजकारणामुळें परस्पर दळवळण अधिकाधिक वाढत जाऊन यापुढें तर इकडील देशहि त्या भ्रमणांत जाणार असा सुमार दिसत आहे. असें झाल्यामुळें दूरदूरच्या राष्ट्रांसहि परस्परांचें ज्ञान विशेष होत चाललें आहे; व तें होण्याविषयीं उत्कंठा वाढत चालली आहे, हें उघड आहे. यास्तव युरोपांतील सर्व भाषांत इतर देशांचे इतिहास जसे रचलेले आहेत त्याप्रमाणेंच इंग्रेजी भाषेंतहि ते आहेत. या ग्रंथांपैकीं कित्येक मोठ्या मान्यतेस चढलेले आहेत; पण मराठी वाचकांस त्यांचा निर्देश विशेष उपयोगाचा नसल्यामुळें तो येथें करीत नाहीं. तसेंच हें सदरहि एकंदरींत एतद्देशीयांस विशेष महत्त्वाचें नसल्यामुळें त्याविषयीं आणखी कांहीं लिहीत नाहीं.

७. यापुढील भाग प्राचीन ग्रीक व रोमन लोकांचा इतिहास. इकडे एशिया खंडांत ज्याप्रमाणें आर्य शाखेच्या लोकांनीं सुधारणा पसरली त्याप्रमाणें तिकडे युरोपांतहि त्याच शाखेचीं वरील दोन राष्ट्रें ज्ञानोत्कर्षाच्या स्थितीस पावून इतरांस अज्ञानदशेंतून वर काढण्यास कारण झालीं. त्यांत विशेष मान ह्मटला ह्मणजे पहिल्या राष्ट्रासच देणें योग्य आहे. कारण रोमन लोकांची विद्या मूळची ह्मणण्यासारखी विशेष नसून सारी ग्रीक लोकांपासूनच ग्रहण केलेली होती. इतकें मात्र त्यांनीं केलें कीं, त्यांनीं तिचें रक्षण करून ती थोडी बहुत वाढविली. आणि त्यांचें राज्य चोहोंकडे अवाढव्य पसरून तें फार दीर्घकाळ टिकल्यामुळें वरील विद्येचा फैलावा होऊन दूरदूरच्या देशांतहि तिचा उत्कर्ष झाला. पुढें कांहीं काळानें रानटी लोकांनीं वरील बादशाही मोडून टाकून जिकडे तिकडे अज्ञानाचें व दुराचाराचें प्राबल्य पुनः करून दिलें. पण सोळाव्या शतकांत प्राचीन विद्येचें जें पुनः सर्वत्र संजीवन झालें त्याच्या योगानें सर्व युरोपभर वरील दोन राष्ट्रांस पुनः मान मिळूं लागला. सध्यां युरोपखंडांत सुधारणेचा अतिशय फैलावा होऊन तिचें पाऊल दिवसेंदिवस पुढेंच जें पडत चाललें आहे त्यास आरंभ ह्मटला ह्मणजे वरील काळापासूनच आहे.[1] त्याच्यापूर्वी चोहोंकडचा प्रकार ह्मटला ह्मणजे मारामारी

---

१. ही गोष्ट इतकी स्पष्ट असतांहि पाश्चात्य पंडितांस विशेष मान्य नाहींशी दिसते. कित्येकांच्या ठायीं तर इतका दुराग्रह किंवा असमंजसपणा दृष्टीस पडतो कीं, ख्रिस्ती धर्मामुळेंच सगळें युरोप सुधारलें असें सुद्धां मत ते प्रदर्शित करतात, आणि प्राचीन ग्रीक व रोमन लोकांचें गुरुत्व झुगारून देऊन त्यांहून आपलें वर्चस्व मिरवितात. पण ख्रिस्ती धर्माचें

(पुढें चालू).

व बेबंद पाच्छाही हाच होता. असो; तर याप्रमाणें ग्रीक व रोमन लोक हे अर्वाचीन युरोपियन राष्ट्रांस सर्व प्रकारें सन्मानार्ह होत; व यास्तवच त्यांचे इतिहास सर्वत्र प्रसिद्ध असून सर्वांच्या पूज्यतेस व प्रीतीस पात्र झाले आहेत. इंग्लंडांतहि तसाच प्रकार आहे. तेथील विद्यालयांतून ग्रीक व रोमन ग्रंथकारांचें अध्ययन अद्यापहि प्राधान्येंकरून चालत आहे; व इंग्लिश भाषेंत मोठमोठ्या नामांकित ग्रंथकारांनीं प्रस्तुत विषयावर सर्वमान्य रचना केलेली आहे. आतां या ग्रंथांपैकीं जे अत्यंत प्रसिद्ध आहेत त्यांचें कांहीं निरूपण करतों.

८. रोमन लोकांच्या इतिहासावर अत्यंत विख्यात ग्रंथकार झटले झणजे आर्नोल्ड व गिबन हे होत. आर्नोल्ड यानें प्रस्तुत इतिहासाच्या पूर्वभागावर ग्रंथरचना केली आहे. त्याचा मूळ संकल्प इ० स० ४७५ झणजे रोमच्या[1] बादशाहीचा शेवट, येथपर्यंत इतिहास लिहिण्याचा होता; पण तो अकस्मात् मृत्यूच्या तडाक्यांत सांपडल्यामुळें त्याचा तो ग्रंथ अर्धामुर्धाच राहिला. तीन भागांत कार्थेजची दुसरी लढाई काय ती सरासरी संपली. पुढील पांच सहा शतकांचा इतिहास तसाच राहिला. तो दुसऱ्या एका इतिहासकारानें बराच पुढें नेला आहे. असो; आर्नोल्डचा इतिहास मोठा मनोवेधक लिहिला आहे. भाषापद्धति प्रौढ व झोंकदार असून आंतील अर्थहि तसाच चित्तास लागण्यासारखा आहे; शिवाय ग्रंथकाराची वृत्ति मोठी गंभीर व धर्मपरायण होती; यास्तव तिची छाया जी प्रस्तुत इतिहासांत प्रगट झाली आहे तीहि सर्व वाचकांस, ष विशेषतः तरुण असतील त्यांस, मोठी हितावह होय. या सर्व गुणांनीं, व इतिहासकाराचें इतर कित्येक गोष्टींच्या संबंधानें जें चोहोंकडे अतिशय वजन होतें[2]

सर्व प्रकारें गौरव करणारांनीं व अर्वाचीन युरोपियन राष्ट्रांचें वैभव गाणारांनीं त्या खंडाची पंधराव्या शतकापर्यंतची स्थिति जर मनांत आणली, तर खरी गोष्ट तेव्हांच लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. युरोपाच्या जड संपत्तींतून आशियाखंडानें व अमेरिकेनें आपापला भाग जर माघारा काढून घेतला, व बुद्धिरूप संपत्तींतला ग्रीक, रोम, हिंदुस्थान, अरबस्थान यांनीं आपापला अंश हरण केला, तर बिचाऱ्या युरोपाचें अर्थभांडार व ज्ञानभांडार एकदम किती उघडें दिसूं लागेल!!

१. रोमच्या अवाढव्य राज्याचे चवथ्या शतकांत दोन भाग झाले; एक पूर्वेकडील बादशाही, व एक पश्चिमेकडील. पहिलीची राजधानी कॉन्स्टांटिनोपल, ज्यास पुढें मुसलमान लोक कुस्तुंतुनिया झणूं लागले; आणि दुसरीचें मुख्य शहर रोम. हीं दोन्ही राज्यें इ० स० ४७५ आणि १४५३ या सालीं लयास गेलीं. याप्रमाणें रोमची सत्ता एकंदर चांगली २००० वर्षें टिकली!!

२. आर्नोल्ड याचें विद्वत्तेच्या संबंधानें जें वजन होतें तें त्याच्या वर्तनानें तर फारच वाढलें होतें. हा एका शाळेचा शिक्षक असून तो त्यानें मोठ्या उत्कृष्ट दशेला आणून सोडली.

(पुढें चालू).

त्यामुळें, वरील ग्रंथ तेव्हांच लोकांस प्रिय झाला; व त्या विषयावर तसा ग्रंथ अद्याप न झाल्यामुळें पुढेंहि दीर्घ काळ त्याची ख्याति चालत राहील असा सुमार दिसतो. असो; पण वरील इतिहासकाराहून पुढें सांगावयाचा जो गिबन त्याची योग्यता तर फारच मोठी आहे. त्याच्या तोडीचे इतिहासकर्ते आजपर्यंत या जगांत एकंदरींत पहातां थोडेच झाले आहेत; व इंग्लंडांत तर कोणीच झाला नाहीं झटलें असतां चालेल. यानें मागें सांगितलेल्या ह्यूमप्रमाणें आपल्याच हातानें आपलें चरित्र लिहून ठेविलें आहे; व त्यावरून त्याच्या अभ्यासाचा प्रकार, त्याचीं धर्मसंबंधीं वगैरे मतें, त्याच्या सर्वप्रसिद्ध इतिहासाची कल्पना त्याच्या मनांत पहिल्यानें कोठें व कशी उद्भवली, तो शेवटास कोठें गेला, वगैरे अनेक चमत्कारिक गोष्टींविषयीं त्यानें मजकूर लिहून ठेविला आहे. गिबन हा, 'जॉनसनचा क्लब' ह्मणून एक मंडळी जी मागें एके अंकांत सांगितली आहे तिचा सभासद होता. यावरून त्याची इतिहास लिहिण्यापूर्वीहि विद्वन्मंडळांत केवढी गणना होती ती स्पष्ट दिसते. गिबन पहिल्यानें प्राटेस्टंट धर्मांतला होता; पण पुढें त्याच्या वाचण्यांत क्याथलिक मताचे कित्येक नामांकित ग्रंथ आल्यामुळें त्याची वृत्ति बदलून तो क्याथलिक झाला. पुढें कांहीं काळानें त्याच्या बापानें प्राटेस्टंट धर्माच्या अध्यक्षांच्या स्वाधीन त्यास केल्यानें त्याची बुद्धि पुनः फिरून तो आपल्या मूळच्या पंथास अनुसरला.[१] याप्रमाणें पूर्ववयांतच प्रस्तुत ग्रंथकाराची धर्मविषयक मतांत चलबिचल झाली होती. पण पुढें लवकरच व्हाल्टेरप्रभृति पाखंडवादी ग्रंथकारांची त्यास आवड लागून 'सब झुट है' ह्मणून दोन्ही पंथ त्यानें झुगारून दिले; आणि वरील फ्रेंच पंडिताची धर्मविडंबनरूप दीक्षा ग्रहण केली. ही त्याच्या इतिहासांत त्यानें चोहोंकडे पूर्णपणें चालविली आहे. असो; वरील नामांकित इतिहासाचा पहिला भाग १७७६ त प्रसिद्ध झाला. या ग्रंथाचा संकल्प गिबन यानें बारा वर्षें अगोदर करून ठेविला होता. तो प्रसंग त्यानें आपल्या चरित्रांत येणेंप्रमाणें सांगितला आहे. "सन १७६४ च्या आक्टोबर महिन्याच्या १५ तारखेस रोम येथें क्यापिटॉलच्या जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीपाशीं मी संध्याकाळचा हवा घेत मजेनें बसलों होतों. त्या वेळेस जुपिटरच्या देवालयांत मठवासी लोक सायंकाळचीं गीतें ह्मणत होते.

त्याच्या शिष्यांची त्यावर अतिशयित भक्ति होती; व तेहि पुढें त्याच्यासारखे सदाचरणी व भक्तिमान होऊन मोठ्या योग्यतेस चढले. प्रस्तुत इतिहासकाराचे शालानियमनाविषयीं कित्येक उत्कृष्ट लेख आहेत.

१. वरील धर्मांतराचे प्रकार युरोपांत पुष्कळ मोठमोठ्या विख्यात मनुष्यांचे घडले आहेत. त्यांत एक मोठा मौजेचा आहे ह्मणून सांगतों. रेनोल्डस या नांवाचे दोघे भाऊ इंग्लंडांत होते. त्यांपैकीं एक पक्का क्याथलिक व दुसरा पक्का प्राटेस्टंट होता. यांचा एके प्रसंगीं मोठा कडाकडीचा वाद होऊन मौज काय झाली, कीं क्याथलिक होता तो प्राटेस्टंट झाला, व प्राटेस्टंट होता तो क्याथलिक झाला.

अशा समयीं त्या शहराच्या सत्तेचा ऱ्हास व्हावयाला लागून तिचा लय कसा झाला याविषयींचा इतिहास लिहिण्याची कल्पना माझे मनांत उद्भवली." या कल्पनेचें वर सांगितल्याप्रमाणें कालांतरानें फळ दृष्टीस पडलें. हा पहिला भाग गिबन इंग्लंडांत असतां छापला गेला. तो निघतांच सर्व वाचकांची उत्कंठा इतकी प्रबळ झाली कीं पहिल्या आवृत्तीचा तेव्हांच फडशा पडून दुसरी व तिसरी काढली तरी ती पुरेशी होईना. ऐर्लंडांत तर दोन आवृत्ति चोरून छापून विकल्या. याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथ तेव्हांच लोकांस अत्यंत मान्य होऊन मोठमोठ्यांनींहि त्याविषयीं अनुकूल अभिप्राय प्रकट केला. एके ठिकाणीं मात्र तो अतिशयित अप्रिय होऊन द्वेषास व मत्सरास कारण झाला. हें स्थान पाद्रीमंडळ होय. या मंडळाची कृति जेथें तेथें एक दृष्टीस पडते. ती ही कीं, तोंडानें मात्र सत्याच्या प्रीतीविषयीं व अभिमानाविषयीं मोठाल्या वल्गना कराय्याच्या, आणि हातून होईल तितका त्यास अवरोध करायाचा; तसेंच बाहेरून ख्रिस्त प्रभूच्या शांतीचें व दयाशीलतेचें पांघरूण दाखवून आंतून अत्यंत दुष्ट मनुष्यांच्या हातून व्हावयाचीं नाहींत असलीं कृत्यें करायाचीं. असो; तर वरील धार्मिक वाचकांस मात्र रील ग्रंथ अगदीं ऊ:सह होऊन गेला. त्यांतून त्यांतील पंधरावा व सोळावा भाग तर त्यांस भारी वाईट लागला. या भागांत इतिहासकारानें ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराचीं कारणें लिहिलीं आहेत. हीं कारणें पाद्री साहेबांच्या मतें अशीं असायाचीं होतीं कीं, सदरील धर्म देवाच्या पुत्रानें मुद्दाम अवतार धारण करून स्थापला, मोठमोठे चमत्कार प्रत्यक्ष करून दाखविले, व 'आकाशांतील बापा'ची इच्छा फार दिवस तशी असून तसें त्यास करणें होतें, ह्मणूनच ख्रिस्ती धर्माचा उत्कर्ष झाला. पण वरील वेड्या इतिहासकारास हीं रहस्यें न कळून त्यानें केवळ ऐहिक व व्यावहारिक कारणांनींच वरील गोष्टींची उपपत्ति करण्याचा यत्न केला. यास्तव वरील धार्मिक लोकांपैकीं कित्येकांनीं त्याचा भ्रम दवडण्याकरतां हातांत लेखणी धरली. पण मानवी जातीच्या दुर्दैवामुळें वरील सर्व मोलवान ग्रंथ काळानें त्यांच्या कर्त्यांबरोबरच गिळून टाकले. नांव घेण्यास त्यांपैकीं, एक मात्र अंमळसा तगून राहिला आहे; तो बिशप वाटसन यानें केलेला होय. असो; तर याप्रमाणें सदरील इतिहासास प्रथमारंभींच लोकमान्यता प्राप्त होऊन दूषकांनींहि आपल्याकडून त्यावर पुष्कळ भडिमार केला; पण सूर्याचें तेज अंमळ प्रखर होत चाल-ल्याबरोबर ज्याप्रमाणें धुकें विरून जातें, त्याप्रमाणें वरील प्रतिपक्षिसमूह लवकरच हतवीर्य होऊन त्याच्यानें गिबनच्या कीर्तीच्या वेगास प्रतिबंध करवेनासा झाला. पुढें तीन तीन चार चार वर्षांच्या अंतरानें त्याच्या इतिहासाचा दुसरा, तिसरा व चवथा असे भाग छापून प्रसिद्ध झाले. यांचा प्रसार तर पहिल्याहूनहि अधिक व त्वरित झाला; व गिबनची साऱ्या युरोपभर अप्रतिम इतिहासकार ह्मणून ख्याति झाली. याप्रमाणें ज्या प्रचंड उद्योगाची उगीच कल्पना सन १७६४ त उद्भवली होती तो त्यानंतर तेवीस वर्षांनीं समग्र

सिद्धीस गेला ! या समाप्तीच्या समयींचाहि लेख मूळ आरंभाप्रमाणेंच मोठा चमत्कारिक आहे. गिबन हा शेवटीं शेवटीं इंग्लंड सोडून स्विट्सर्लंड देशांत लॉसेन या गांवीं जाऊन सुखवस्तु राहिला होता. तेथील बंगल्यांत त्याचा ग्रंथ संपूर्ण झाला. तो येणें-प्रमाणें—"या ग्रंथाच्या सरते शेवटच्या पृष्ठांतील सरते शेवटल्या ओळी ज्या मीं लिहिल्या त्या १७८७ सालच्या जून महिन्याच्या २७ वे तारखेस मध्यरात्रीं अकरा वाराच्या दरम्यान आपल्या बागेंतील बंगल्यांत लिहिल्या. त्यानंतर पेन खालीं ठेवून मी बागेंतील मंडपांत अंमळ इतके तिकडे फिरलों. त्या वेळेस हवा मजेदार होती, आकाश निरभ्र होतें, चंद्र चांगला प्रकाशला असून त्याचें प्रतिबिंब पाण्यांत पडलें होतें, आणि भोंवतालचा सर्व प्रदेश, पर्वत आणि सरोवर हीं अगदीं स्तब्धशीं दिसत असून चोहोंकडे शांत होतें ! या वेळेस इतक्या दिवसांचें ओझें उतरून मी मोकळा झालों याबद्दल व माझी कीर्तिहि कदाचित् चिरकाळ स्थापित झाली हें मनांत येऊन मला पहिल्यानें कांहीं वेळ मोठा आनंद वाटला खरा; पण लवकरच ती आनंदाची व उत्साहाची वृत्ति जाऊन माझें मन किंचित् उदास झालें. मला असें वाटलें कीं, आज वीस वर्षें ज्या मित्राच्या संगतीनें मीं मोठ्या मौजेनें काळ काढला तो मला आतां चिरकाळ अंतरला; आणि माझ्या इतिहासाची पुढें कितीहि मर्यादा असली, तरी माझी स्वतःची मुदत यापुढें थोडीच उरलेली असावी."—गिबन पुढें सात वर्षांनीं मरण पावला.

प्रस्तुत इतिहासाची गणना केवढी मोठी आहे याविषयीं वर सांगितलेंच आहे. आतां प्रसंगवशात् त्याच्या स्वरूपाचें येथें अंमळ विशेष कथन करतों; तेणेंकरून त्याची एवढी प्रसिद्धि असण्याचें कारण काय तें आमच्या वाचकांच्या विशेष लक्षांत येईल. प्रस्तुत ग्रंथांत सुमारें दीड हजार वर्षांची हकीकत आहे; व एवढ्या प्रचंड काळांत ज्या जबरदस्त उलाढाली झाल्या त्या सर्वांचें यांत यथासांग रेखल्यासारखें वर्णन आहे. पहिल्यानें एक तर रोमच्या राज्याचा इतिहास. रोमन लोकांच्या मोठमोठ्या सरदारांनीं व मुत्सद्द्यांनीं सगळ्या पृथ्वीवर जी राज्यरूप अवाढव्य इमारत कित्येक शतकें सतत प्रयत्न करून उभारली होती ती सरते शेवटीं मोडकळीस येऊन गॉथ, हून, गॉल वगैरे राष्ट्रांनीं व नवे उत्पन्न झालेले जे आरब, तुर्क, मोगल यांनीं होतां होतां अगदीं जमिनीस मिळवून टाकली,—या सर्व प्रकारांचें वर्णन हें प्रकृत इतिहासाचें मुख्य संविधानक होय. नंतर याच्या पोटांत पृथ्वीवर नवे उत्पन्न झालेले जे दोन मोठे धर्म—एक ख्रिस्ताचा व दुसरा महंमदाचा–त्यांच्या उत्पत्तीचा व प्रसाराचा वगैरे वृत्तांत; वर सांगितलेल्या अज्ञान व रानटी राष्ट्रांचें भ्रमण, युद्धप्रसंग इत्यादिकांचें कथन; 'धर्मयुद्धें' ह्मणून जें एक वेड युरोपांत कित्येक शतकें इतकें पिकलें होतें त्याची हकीकत; शिवाय निरनिराळ्या देशांचें वर्णन, तेथील लोक, रीतभात,

विद्याकला वगैरेविषयीं माहिती—या सर्व गोष्टी वरील मुख्य इतिहासास अंगभूत होत. या सर्वांचें निरूपणहि मुख्य कथानकाप्रमाणेंच इतिहासकारानें शेंकडों ग्रंथांतील माहिती एकत्र करून यथास्थितपणें केलें आहे; व यांतहि असा रस आणला आहे कीं, मुख्य इतिहासाप्रमाणेंच यांच्या वाचनाचाहि वाचकांस बिलकूल कंटाळा येत नाहीं. सारांश, प्रस्तुत इतिहासकारानें आपल्या महानाटकाचें लांबच लांब कथासूत्र एवढें दीर्घकाळ सतत हातांत वागवून त्यांत यत्किंचित्हि गुंतागुंत होऊं न देतां तें क्रमाक्रमानें सगळें साफ उलगडलें, आणि आपल्या असंख्य पात्रांचे असंख्य खेळ भूमंडलरूप महारंगाच्या अनेकविध स्थलीं—ह्मणजे आतां रोम शहरांत, तर अंमळशानें मक्केंत, आणि तिसऱ्यांदा इंग्लंडांत—याप्रमाणें दाखविले आहेत, यावरून त्याचें आटोकाट ज्ञान व अपूर्व रचनाचातुर्य हीं लक्षांत येऊन मन अगदीं थक्क होऊन जातें![1]

आतां ग्रीसच्या इतिहासाविषयींहि थोडेंसें लिहून सदरील अंक आटपतों. इतिहास लिहिण्याची खरी तऱ्हा या देशांत पहिल्यानें पूर्णत्वास पावून येथून ती युरोपभर पसरली या-विषयीं, व या देशांत झालेल्या नामांकित इतिहासकारांविषयीं, मागें सहाव्या अंकांत कांहीं माहिती दिलीच आहे. तीवरून वाचकांस कळेल कीं, बाकी सर्व देशांच्या इतिहासां-पेक्षां वरील देशाचा इतिहास लिहिण्यास मोठ्या उत्कृष्ट सोयी आहेत. त्या अर्थात्च या कीं, एरवीं जशी इतिहासाची सामग्री मिळवावी लागते, आणि मग त्यांतून तथ्य काढावें लागतें तसें तेथें मुळींच करणें न पडून सगळें आयतें तयार आहे; व शिवाय कित्येक इतिहास त्या त्या वेळचे लिहिलेले असल्यामुळें व लिहिणारे मोठे बुद्धिमान् व प्रामाणिक असल्यामुळें तर त्यांस विशेषच योग्यता आली आहे. असो; तर प्रस्तुत इति-हासावर ग्रंथ करणें हें वरील कारणामुळें सोपें होऊन युरोपांतील सर्व भाषांत तो झाला आहे. इंग्लंडांतहि चालू शतकांत या विषयाकडे लोकांचें विशेष लक्ष लागून त्यावर कांहीं मोठाले ग्रंथ होऊन ते लोकमान्य झाले आहेत. त्या सर्वांच्या शेवटला जो ग्रोटचा सर्वप्रसिद्ध इतिहास तो उत्कृष्ट मानतात. हा ग्रंथकार नुकता कांहीं वर्षांपूर्वी मृत्यु पावला. हा घरचा मोठा संपन्न होता; त्याचा बाप नामांकित सावकार असून तें काम यानेंहि कांहीं दिवस स्वतः केलें.[2] पुढें कांहीं वर्षें ग्रोट हा लंडन शहरच्या तर्फेचा

---

१. गिबनच्या इतिहासांताहि अलीकडील कित्येक फ्रेंच व जर्मन पंडितांनीं कांहींकांहीं चुका काढल्या आहेत. पण त्या अगदीं थोड्या असून त्यांच्या योगानें इतिहासाची योग्यता मुळींच कमी होत नाहीं. रोमच्या इतिहासाच्या उत्तरार्धावर अशा प्रकारचा ग्रंथ पूर्वी युरोपांत कोणताच नसून गिबनच्या ग्रंथास पहिल्यापासून जें अढळ स्थान मिळालें आहे तें अद्याप असून पुढेंहि चिरकाळ तसेंच राहील यांत कोणासहि संशय वाटत नाहीं!

२. तो आपल्या बापाच्या पेढीवर पहिल्यानें कारकून होता असें लिहिलें आहे. ही

(पुढें चालू).

मुकत्यार ह्मणून पार्लमेंटांत सभासद होता. पण पुढें तीहि जागा सोडून देऊन वर सांगितलेल्या इतिहासाचेंच काम त्यानें हातांत घेतलें. तें तडीस नेण्यास त्यास गिबनप्रमाणेंच चांगलीं वीस वर्षें लागलीं. हा इतिहास अगदीं पहिल्यापासून तों शिकंदर बादशहाच्या मृत्यूपर्यंत आहे. याचे एकंदर बारा भाग आहेत. ग्रोट हा मिल्ल वगैरेंच्या मंडळींत होता, व 'वेस्टमिनस्टर रिव्ह्यू'मध्यें त्याचे निबंध असत याविषयीं मागील अंकांत लिहिलेंच आहे. त्यावरून त्याच्या मतांचा एकंदर झोंक लक्षांत येईलच. तो प्रस्तुत इतिहासांतहि आढळतो. तरी एकंदरींत सर्वानुमतें हा इतिहास सप्रमाण व निःपक्षपातपणानें लिहिलेला असा धरला आहे. मागील कांहीं इतिहासांप्रमाणें सत्याचा अपलाप, अत्युक्तिरूप वर्णन, किंवा अप्रमाण उल्लेख इत्यादि केल्याचा आरोप त्यावर अद्याप बिलकूल आलेला नाहीं. तशीच त्याची रचना मनोवेधक असल्यामुळें व ग्रीक लोकांची त्या त्या वेळचीं स्थिति यांत मोठी उत्कृष्ट दाखविल्यामुळेंहि तो पंडितमान्य व सर्वजनप्रिय असा झाला आहे. ही त्याची प्रसिद्धि अशीच पुढेंहि दीर्घकाळ राहील यांत संशय नाहीं.

श्लाघ्यः स एव गुणवान् रागद्वेषबहिष्कृतः।
भूतार्थकथने यस्य स्थेयस्येव सरस्वती ॥[1]

राजतरंगिणी.

अंक ३०—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) इकडील राष्ट्रांचा इतिहास. (३) तो यथार्थ लिहितां येण्यास अवश्य पाहिजे असणारे गुण. (४) इकडील लोकांविषयीं माहिती. (५) यथार्थ बुद्धि. (६) या गुणांच्या अभावाचीं फलें.

१. मागील अंकांत इतिहास या सदराच्या पहिल्या तीन भागांचें निरूपण केलें. आतां यांत त्या सदरापैकीं राहिलेल्या भागांचा विचार करूं.

२. यापुढें एशियाखंडांत जीं हिंदु, चीन, पारसीक इत्यादि जुनीं राष्ट्रें होतीं व सध्यां जीं आहेत त्यांचा इतिहास इंग्लिश भाषेंत कसा आहे तो पहावयाचा. आतां वरील राष्ट्रांच्या इतिहासांविषयीं पहिल्यानें पृथक्त्वानें न लिहितां एकंदरींत सामान्यतः प्रस्तुत

गोष्ट आपल्या इकडच्या स्थितीस मोठी विलक्षण वाटणार आहे. पण इंग्लंडांतला व साऱ्या युरोपांतला प्रकार असाच आढळण्यांत येतो. मोठ्या श्रीमंतांच्या मुलांची शिक्षणाची रीत व गरीबांची रीत बहुधा सारखीच असते; व दोघांस काम करायाला सारखेंच शिकवितात. जर्मनीच्या बादशाहाचा ज्येष्ठ पुत्र व आपल्या महाराणी साहेबांचा जांवई, हा ठसे जुळायाला शिकत आहे असें वर्तमान कांहीं दिवसांपूर्वी चोहोंकडे वर्तमानपत्रांतून जाहीर झालेलें आमच्या वाचकांस बहुधा माहीत असेलच !

१. "तोच गुणवान पुरुष श्लाघ्य होय, कीं जो रागद्वेषांस वश न होत्साता केवळ उदासीनपणें न्यायाधीशाप्रमाणें वास्तविक गोष्ट असेल ती सांगून देतो."

विषयाकडे पाश्चात्यांचा कल कोणत्या प्रकारचा आहे तो वाचकांस कळविणें जरूर आहे. तो लक्षांत आला असतां वरील सर्व इतिहासांचें मुख्य स्वरूप त्यांच्या तेव्हांच ध्यानांत येईल; व तेणेंकरून त्यांच्या योग्यतेविषयींहि त्यांस एकंदरींत बरीच कल्पना होईल.

३. प्राच्यांचा ह्मणजे पूर्वभागच्या राष्ट्रांचा इतिहास पाश्चात्यांनीं ह्मणजे युरोपखंडच्या रहिवाशांनीं लिहावयाचा हें मनांत आणल्यावरोबर अगोदर कोणाहि समंजस व सुज्ञ मनुष्याच्या मनांत एक मोठी कल्पना आल्यावांचून रहायाची नाहीं. ती ही कीं, सर्व प्रकारें दूर व अपरीचित असणाऱ्या अशा या राष्ट्रांचें ज्ञान युरोपियन लोकांस अगोदर पुरतेपणीं व्हावें कसें, व तसेंहि झालें तरी तें यथार्थ झालें ह्मणून कशावरून? इकडील सर्व देशांचे रीतरिवाज, स्थितिरीति, धर्म, आचारविचार वगैरे दरोबस्त वरच्या लोकांच्याहून अगदीं निराळे आहेत, व कित्येक तर अगदीं विपरीतहि आहेत. या मोठ्या भेदामुळें व विरोधामुळें समजुतींत, विचारांत, व मतांत दोहों खंडांचा परस्पर अतिशयित भिन्नभाव आहे. या भिन्नत्वामुळें परक्या लोकांस इकडील गोष्टींचें ज्ञान होण्यास दोन मोठाले अंतराय येतात. पहिला मोठा अगोदर हा कीं, अज्ञानास्तव इकडील सर्व गोष्टींविषयीं अन्यथा ग्रह जे त्यांच्या मनास जडलेले असतात ते दूर झाले पाहिजेत. हे जर न होतील, तर इकडचें ज्ञान त्यांस कितीहि झालें तरी त्यापासून त्यांस सत्याचा लाभ मुळींच न होतां त्यांचे पूर्वीचे ग्रह बळकट मात्र होतील, व आधींचें अज्ञान दृढतर होईल. तर इकडील लोकांविषयीं खरें ज्ञान पाश्चात्यांस होण्यास पहिली अवश्य गोष्ट ही, कीं अज्ञानास्तव, गर्वास्तव किंवा दुराग्रहास्तव त्यांच्या मनानें ज्या वेड्या निराधार समजुती घेतल्या असतात त्या काढून टाकून त्यांनीं आपला चित्तरूप पट पहिल्यानें स्वच्छ धुऊन काढला पाहिजे. असें केलें तरच 'रंगः शुक्लपटे यथा' या न्यायानें इकडच्या कल्पना त्यांच्या मनावर यथार्थपणें ठसतील. तर याप्रमाणें पहिल्यानें तयारी झाली पाहिजे. मग यापुढें इकडच्या लोकांविषयीं ज्ञान संपादन करण्याचा उद्योग. हा तरी परराष्ट्रीय लोकांस मोठा जड जातो, व त्यासुळें एकंदरींत पहातां थोड्यांसच साध्य होतो.

४. आतां इकडील देशांचे इतिहास लिहिण्याचें काम युरोपांतील लोक जें बिनधोक आपणावर घेतात त्यांचे ठायीं तें जसें पाहिजे तशा रीतीनें तडीस नेण्यास वरील गुणांचें साहित्य कितपत असतें याविषयीं जर उगीच क्षणमात्र विचार केला, तर सर्वांच्या सहज ध्यानांत येईल कीं, वरील दोन्ही गुणांत यांतील बहुतेकांचा कमतरपणाच असतो. कोणत्याहि देशाचें ज्ञान होण्यास दोन मोठालीं साधनें असतात; एक भाषाज्ञान किंवा त्याहूनहि उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे लोकपरिचय. आतां पहिल्या भाषाज्ञानाविषयीं जर पाहिलें तर सगळ्या युरोपभर व अमेरिकेंतहि पूर्वेकडील भाषांचे विद्यागुरु जरी चोहोंकडे आहेत, तशाच 'एशियाटिक सोसायटी' नांवाच्या मंडळ्याहि जागोजाग आहेत, व आमच्या देशांत युनिव्हर्सिटींतले परीक्षक, 'दक्षिणाप्रैज कामिटी'चे सभासद,

वगैरे मंडळी पाश्चात्यांपैकीं असल्याशिवाय जरी कधीं चालतच नाहीं, तरी वरील साऱ्या पंडितांस इकडील भाषांची माहिती वस्तुतः कितपत असते ही गोष्ट अलीकडे लहान पोरांपर्यंत सुद्धां ठाऊक होत चालली आहे. तीविषयीं येथें कांहीं विशेष लिहिण्याची जरूर नाहीं. दुसरी गोष्ट लोकपरिचय. या साधनाचाहि युरोपियन लोक किती उपयोग करून घेतात हें फार विस्तारानें सांगायाला नको. पहा, आमचा देश सगळा आज त्यांच्या पादाक्रांत झालेला आहे; आतां पूर्वीप्रमाणें हात बांधून बूट काढून त्यांस कोणत्याहि एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या पदीं लीन व्हावें लागत नाहीं. किंवा एखाद्या देवळांत पाद्रीसाहेब शिरले तर त्यांस मार मिळण्याचीहि आतां विशेष भीति राहिली नाहीं;—फार तर काय, पण अर्वाचीन विद्येनें सुप्रकाशितांतःकरण झालेले आमचे कित्येक लोक तर आपल्या गौरवर्ण बंधूंस सैपाकघरच्या चुलीपर्यंत, देव्हाऱ्याच्या चौरंगापर्यंत किंवा शय्यास्थानापर्यंत मोठ्या हौसेनें नेण्यासहि तयार आहेत. पण काय मौज झाली पहा! जोंपर्यंत आह्मी आपली जुनी विद्या अगदीं लपवून ठेवून त्यांस थांग लागूं देत नव्हतों, आमचे रीतरिवाज, धर्माचार वगैरे अगदीं गुप्त रीतीनें होत होते, तोंवर ते सर्व समजण्याविषयीं आमच्या राज्यकर्त्यांची अतोनात उत्कंठा होती. पण आतां आह्मी आपल्या अत्यंत हृद्गत गोष्टी त्यांस खुशाल सांगण्यास तयार झालों, शास्त्राध्ययन तर काय पण यजनादि कर्मेंहि त्यांकडून करविण्यास सध्यां प्रत्यवाय उरला नाहीं, तों बेटी त्यांचीच हौस कोणीकडे नाहींशी झाली! असें होण्याचीं कारणें उघड आहेत; पण त्यांचें या स्थलीं विवरण अप्रस्तुत होय. बरें, पण हेंहि एक असो; आमच्या लोकांविषयींची माहिती आपण होऊन करून घेण्याचा उद्योग इंग्रेजांनीं जरी न केला, तरी निदान नेहमींच्या परस्परांच्या समागमानें तरी वरील ज्ञान त्यांस कांहीं अंशीं होण्यासारखें होतें. पण तसेंहि नाहीं. एतद्देशीय लोकांचा व त्यांच्या वरिष्ठांचा जो संबंध असतो तो नेहमीं कामापुरता मात्र असतो. परस्परांचा स्नेहसबंध तर कशाला, पण नुसतें आपआपल्या पायरीनें असणें हेंहि दोघांकडून घडत नाहीं. साहेब चार हजार कोसांवरून इकडे येऊन एकदम उच्चपदारूढ झालेले असतात, व इंग्रेज ग्रंथकारांनीं आणि पवित्रशास्त्रवाल्या मिशनरींनीं त्यांच्या डोक्यांत एतद्देशीय लोकांविषयीं मोठ्या मोलवान व पवित्र कल्पना घालून दिलेल्या असतात, यास्तव त्यांचें वर्तन सदा सर्वकाळ घोड्यावर असल्यासारखें असतें. 'ओ यू गद्धा' या गोऱ्या शिवीचा प्रयोग पट्टेवाल्यापासून तों शिरस्तेदार, मामलेदार अशासारख्या कामदारांपर्यंतहि होतो हें सर्वांस विदित आहेच. तसाच साहेबांचा कोरा करकरीत बूटहि शुभ वर्तमानाच्या दयेनें नेहमीं फुरफुरत असतो हेंहि सर्वप्रसिद्धच आहे. हें एका पक्षाचें वर्तन झालें; दुसऱ्याचें याच्या सर्वतोपरी विरुद्ध असतें. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अशा उद्दाम आचरणांचा त्यांच्या हाताखालचे एतद्देशीय लोक कांहीं प्रतिकार तर बिलकूल करीत नाहींतच; पण

कांहीं अंशीं निरुपायास्तव, व पुष्कळ अंशीं अंगांत पाणी नसल्यामुळें सदासर्वदा क्षमा-वृत्तीचेंच अवलंबन करून राहिलेले असतात. एकूण खरें ख्रिस्तभक्तत्व बाणिस्मा न घेतांना आमच्या लोकांत येत चाललें आहे,—कोणतें ? तर एका गालांत मारिली असतां दुसरा मोठ्या संतोषानें पुढें करावयाचा ! तर याप्रमाणें राजा व प्रजा या दोहोंचा संबंध सध्यां आमच्या देशांत वर सांगितल्याप्रमाणें झाल्यामुळें व तो दिवसेंदिवस दृढतर होत चालल्यानें पाश्चात्यांची आमच्याविषयीं अतिशयित तिरस्कारबुद्धि झाली आहे. युरोपांतील लोक नुकते नुकतेच इकडील राष्ट्रांच्या कित्येक आचारांस हांसत होते, व चिनी लोकांचा परराष्ट्रांविषयीं तिरस्कार व मत्सरबुद्धि, हिंदु लोकांचें सोंवळें, मुसलमानांचा गोषा, या सर्वांचा त्यांस भारी चमत्कार वाटे; पण तिकडील राष्ट्रांसच आज चार दिवसांचें वैभव येतांच स्वर्ग दोन बोटें उरलासा जो वाटत आहे त्याचा क्षणभर विचार केला असतां वरील राष्ट्रांचें मोठेंसें नवल कोणासहि वाटणार नाहीं. गेल्या सालीं हिंदुस्थानांतील एका मोठ्या अधिपतीची एखाद्या उचल्याप्रमाणें जी आटोकाट तयारीनें चौकशी झाली व त्याच्या पदोपदीं मानखंडना झाल्या, त्याप्रमाणेंच युवराजांच्या सन्मानरूप अर्मांत आमच्या शेंकडों सरदारमंडळींच्या मानाची जी पूर्णाहुति पडली, तसेंच आज काय कोणा डेप्युटी कलेक्टरास रेल्वेवरील गार्डानें हात धरून गार्डांतून बाहेर ओढून काढलें, उद्यां काय कोणा ख्रिस्तपुत्रानें आकाशांतील बापाची भेट घेण्यापूर्वी त्याकडे आपल्या घोडेवाल्यास मुष्टिमोदकांची चांगली भरपूर पथारी बरोबर देऊन तावडतोब रवाना केलें,—अशा प्रकारचे वृत्तांत जे वरचेवर घडत आहेत त्यांवरून आमच्या राज्यकर्त्यांच्या ठायीं आमच्याविषयीं किती गौरवाची बुद्धि वागत आहे व मनुष्यमात्राचे हक्क ते किती ओळखतात तें अगदीं स्पष्ट दिसत आहे. तसेंच ज्या त्या राष्ट्रांच्या धर्मकृत्यांत डोकावण्याची मोठी इच्छा, व निवळ मूर्खपणानें त्यांची टवाळी करण्याचीहि मोठी मनापासून आवड; पण ख्रिस्त्यांच्या देवालयांत कोणा परक्यास जाणें झालें तर त्यानें मुकाटयानें एकीकडे चोरट्यासारखें बसलें पाहिजे, व देवाच्या लाडक्या मंडळीबरोबर त्यास डोळेझांकहि करावी लागते;—डोळेझांक तर खरीच, कारण डोळे उघडून ज्यानें पवित्र शास्त्र वाचलें आहे त्यास त्यांतील पोरकटपणा, अप्रयोजकपणा, अज्ञान व दुष्टत्व हें ढळढळीत दिसल्यावांचून कधींहि रहायाचें नाहीं ! तसेंच रस्तोरस्तीं निर्लज्ज व कोडग्या बाटे मंडळीनें एतद्देशीय धर्माविषयीं हवा तसा व हवा तितका चारगटपणा केला तरी कांहीं हरकत नाहीं, त्यांस पाठराखी पोलीस लोकहि मिळतात; पण त्यांच्याच समोर एखाद्यानें त्यांचें खंडन चालवलें तर भाविक ख्रिस्त्यांचा शुभ वर्तमानावरील भाव डळमळविल्याबद्दल त्या मनुष्यास सरकारांतून शिक्षा होते ! फार तर काय पण वरील धर्मास एकंदरींत लवमात्रहि विरोध केलेला आमच्या राज्यकर्त्यांस खपत

नाहीं; तसें करणाऱ्या दुष्ट मनुष्यास तावडतोब शासन होतें.[1] असो; याप्रमाणेंच इंग्रेजी बुटाचें सुद्धां माहात्म्य जें आमचे राज्यकर्ते आपल्या मुलखांत चोहोंकडे वाढवीत आहेत, आमच्या जुन्या वेडगळ जोडयास सरकारी कचेरींत बिलकूल प्रवेश होऊं न देतां खुद्द कायदेकौन्सलांत असणाऱ्या एतद्देशीय सरदारांसहि त्याबद्दल सक्त ताकीद मिळते; व तसेंच मडम साहेबांच्या तोंडाकडे नेटिवानें डोळे उचलूनहि वर पहातां उपयोगी पडत नाहीं. त्यांच्या एखाद्या शृंगारचेष्टिताबद्दल चौकशी व्हावयाची असल्यास दरोबस्त काळ्या लोकांस बाहेर जावें लागतें, व त्यांच्या सन्मानाप्रीत्यर्थ बडया नेटिव कामगारांसहि गचांडी मिळते;—इत्यादि सर्व गोष्टींचा यथार्थ विचार केला असतां कोणाहि समंजस व निःपक्षपात मनुष्यास कबूल करावें लागेल कीं, मनुष्यमात्रांत जे दोष सांपडतात त्यांपासून युरोपियन लोक झाले ह्मणून ते तरी तिळमात्रहि मुक्त झाले आहेत असें नाहीं. उलटी त्यांत त्यांची साऱ्या राष्ट्रांवर कडीच आहे असें सुद्धां ह्मणणें भाग आहे.

वर सांगितलेल्या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या असतां पाश्चात्य लोकांचे ठायीं इकडील राष्ट्रांविषयीं कोणत्या वृत्ति मनांत वागत आहेत त्या बऱ्याच ध्यानांत येतील; व त्यावरून इकडील देशाचें ज्ञान त्यांस होण्यास त्या केवढया प्रतिबंधक आहेत हेंहि सहज समजेल.[2]

---

१. दोन तीन वर्षांपूर्वी मेलविल नांवाच्या साहेबानें मुसलमानी धर्म स्वीकारल्याबद्दल त्याजवर केवढा गहजब गुदरला होता हें आमच्या वाचकांस स्मरत असेलच. या उदाहरणावरून मनाच्या स्वातंत्र्याबद्दल आमचे राज्यकर्ते जो एवढा दिमाख मिरवितात त्यांत तथ्य कितपत आहे हें सहज लक्षांत येतें. त्याप्रमाणेंच येथेंहि धर्माच्या बाबतींत प्रजेवर बिलकूल सक्ति नाहीं असें जरी वरकांती पहातां खरें वाटण्यासारखें आहे, तरी वास्तविक स्थिति फार निराळ्या तऱ्हेची आहे असें कोणाहि विचारी मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. आमच्या मालेच्याच द्वेषबुद्धीनें खिस्तमाउलीच्या औरसें व दत्तक लेंकरांनीं धाग्यास धागा लावून कोळ्यासारखें लांबवर जें जाळें रचिलें होतें त्याची हकीकत आमच्या वाचकांस कळविली असतां त्यांस मौज व आचंबा वाटल्यावांचून रहाणार नाहीं. आमच्या शुभवर्तमानवाल्या प्रिय बंधूंच्या हातीं प्रस्तुत माला सुकवून टाकण्याचें किंवा तीस करपविण्याचें जर साधन असतें तर हरएक प्रयत्न करून त्यांनीं आपली अब्रू रक्षण होण्याचा उपाय अवश्य केला असता; पण बिचारे करतात काय, त्यांचा कोठेंच कांहीं लाग लागेना! आमच्या मालेस जेथपासून ओलावा मिळतो व तिची टवटवी रहाते तो जीवनरूप झरा तर त्यांस सर्वथा अगम्य पडला, यास्तव त्यांस निमूटपणें खालीं मान करून मार सोशीत रहाणें भाग पडलें.

२. पाश्चात्यांच्या मनांत इकडील लोकांविषयीं ज्या वृत्ति वागत असतात त्यांचें दूषण तिकडीलच एका नामांकित ग्रंथकारानें किती तीव्रतेनें केलें आहे पहा!—

"If Providence hath removed us to a greater distance from

(पुढें चालू).

५. आतां दुसरा गुण जी यथार्थबुद्धि ती वरील लोकांचे ठायीं कितपत आढळते याविषयीं जर विचार केला, तर हिची अनुकूलता तर त्यांस वरील गुणांहूनहि कमी

---

the influence of those genial rays which ripen the wits of the eastern nations, it hath made us abundant amends, by indulging us in this conceit, that we are wiser than all the rest of the world besides.

There are some sorts of pleasing madness of which it would be cruelty to cure a man. By bringing him to his senses you make him miserable.

You will ask me, perhaps, what is the meaning of all this? Why, in good truth, the meaning of it is, a just indignation against the impertinence of those who imagine that they know everything, when in reality they know nothing.

And, to be more particular, the folly of the westerns in despising the wisdom of the eastern nations and looking upon them as brutes and barbarians; whilst we arrogate to curselves everything that is wise and polite; and if we chance to light upon a just thought we applaud ourselves upon the discovery, though it was better understood three thousand years ago!

This happens to us through want of good reading and a true way of thinking; for the case is this, that little smattering of knowledge which we have is entirely derived from the east. They first communicated it to the Greeks (a vain, conceited people, who never penetrated the depths of oriental wisdom); from whom the Romans had theirs. And after barbarity had spread itself over the western world, the Arabians, by their conquests, restored it again in Europe. And it is the wildest conceit that can be imagined, for us to suppose that we have greater geniuses, or greater application, than is to be found in those countries."

Ockley's History of the Saracens.

वरील विचार, ज्ञानाच्या व बळाच्या गर्वानें उन्मादस्थितीस पावून साऱ्या एतद्देशीयांस किंबहुना झाडून साऱ्या प्राच्य राष्ट्रांस, कस्पटाप्रमाणें मानणारे आमचे श्वेतवर्ण बंधु, तसेच त्यांच्या जीवावर उडया मारून इमापनीतींतील करडाप्रमाणें जिव्हाचापल्य दाखविणारे असे येथूच्या कळपांत शिरलेले आमचे लोक, आणि सध्यां आमच्या देशांत चोहोंकडे सहस्रशः दृष्टीस पडणारे धड हिंदु ना खिस्ती असे फांकडे पंडित, या सर्वांनीं नीट ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत. तसें केलें असतां त्यांच्या सहस्रशः दुर्मतांचें मूळच खुंटल्याप्रमाणें होईल.

असते हें सहज दिसून येणारें आहे. यथार्थबुद्धि ह्मणजे निःपक्षपातता अथवा मनाची समवृत्तिता होय; ह्मणजे दुसऱ्याचे दोष काढायाला जसे आपण उत्कंठेनें धांवतों त्याप्रमाणेंच आपले दोषहि प्रांजलपणें कबूल करणें, व देशांतरांचे आचार आपल्याहून भिन्न होत एवढ्यास्तवच केवळ त्यांस दोषरूप न ठरविणें. या गुणांत सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलेले व खऱ्या धर्माचीं तत्त्वें स्वीकारल्यानें परम पावन झालेले आमचे पाश्चात्य बंधु इकडील कोणत्याहि लोकांपेक्षां सामान्यतः पहातां लवमात्राहि वरचढ आहेत असें नाहीं. आमच्या देशांत सुमारें शंभर वर्षांपूर्वी भर पेशवाईत टोपीवाल्या इंग्रेजाविषयीं जीं मतें होतीं, किंवा एखाद्या अत्यंत भाविक मुसलमानाच्या मनांत सुवर खाणाऱ्या फिरंगी काफराविषयीं जो द्वेष मक्केंत किंवा कुस्तुंतुनिया शहरांत आज वागत असेल तितकाच द्वेष किंवा तिटकारा आमच्या अत्यंत परिपक्व बुद्धीच्या युरोपियनांतहि आढळतो. फार तर काय, पण ताडावर चढणाऱ्या मनुष्यावर मौजेनें गोळी घालणें व तो वानर होता एवढेंच ह्मटल्यावरून खून माफ होणें, किंवा घोडेवाल्याच्या झिंज्या धरून त्यास बुकलून ठार मारणें व शेवटीं त्याच्या प्राणाची बिचाऱ्याची अवघी तीस रुपये किंमत होणें, असले प्रकार अंमळ ध्यानांत आणले असतां आमचे महासोवळे भट किंवा मोठे करडे इमामहि बरे असें वाटूं लागतें! असो; प्रस्तुत विषयांवर या पुस्तकाच्या आठव्या अंकांत बरेंच विवेचन केलें आहे, त्यावरून व सामान्यतः इकडील विषयांवर लिहिलेला कोणताहि इंग्रेजी ग्रंथ पाहिला असतां त्यावरूनहि वरील गुण पाश्चात्यांस अद्याप किती शिकायाचा आहे याविषयीं कोणाचीहि खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं.[१]

१. एशिया व युरोप या दोन्ही खंडांचा परस्पर संबंध वाढत चालला आहे; वास्तव कालेंकरून सध्यां असणारे ग्रह व मूर्ख समजुती या नष्ट होत जातीलच हें उघड आहे. या भावी स्थितीचें सध्यांहि क्वचित् चिन्ह दृष्टीस पडतें. हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. बॉसेट नांवाच्या फ्रेंच ग्रंथकारानें 'जगाचा इतिहास' कसा लिहिला आहे याविषयीं एक नामांकित इंग्लिश इतिहासकार लिहितो—

"In the same way, because Bossuet had been taught that the Jews are the chosen people of God, he, under the title of Universal History, almost confines his attention to them, and treats this obstinate and ignorant race as if they formed the pivot upon which the affairs of the universe had been made to turn! His idea of an universal history excludes those nations who were the first to reach civilization, and to some of whom the Hebrews owed the scanty knowledge which they subsequently acquired. He says little of the Persians, and less of the Egyptians; nor

(पुढें चालू).

६. वरील दोन कलमांत युरोपियन इतिहासकारांच्या अंगीं कोणत्या दोन गुणांचा अभाव सामान्यतः दृष्टीस पडतो तो सांगितला. आतां त्या अभावाचीं फळें

---

does he even mention that far greater people between the Indus and the Ganges, whose philosophy formed one of the elements of the school of Alexandria, whose subtle speculations anticipated all the efforts of European Metaphysics, and whose sublime enquiries, conducted in their own exquisite language, date from a period when the Jews, stained with every variety of crime, were a plundering and vagabond tribe, wandering on the face of the earth, raising their hand against every man and every man raising his hand against them."

पुढें अर्वाचीन इतिहासकार येऊन मुसलमानांविषयीं वरील भाविक इतिहासकारानें कसा काय मजकूर लिहिला आहे याविषयीं प्रस्तुत ग्रंथकार ह्मणतो—

—"To descend a little later: everyone acquainted with the progress of civilization will allow, that no small share of it is due to those gleams of light, which, in the midst of surrounding darkness, shot from the great centres of Cordova and Bagdad. These, however, were the work of Mahommedanism; and as Bossuet had been taught that Mahommedanism is a pestilential heresy, he could not bring himself to believe that Christian nations had derived anything from so corrupt a source. The consequence is, that he says nothing of that great religion, the noise of which has filled the world; and having occasion to mention its founder, he treats him with scorn, as an impudent impostor, whose pretensions it is hardly fitting to notice. The great apostle, who diffused among millions of idolators the sublime verity of one God, is spoken of by Bossuet with supreme contempt; because Bossuet, with the true spirit of his profession, could see nothing to admire in those whose opinions differed from his own. But when he has occasion to mention some obscure member of that class to which he himself belonged, then it is that he scatters his praises with boundless profusion. In his scheme of universal history, Mohammed is not worthy to play a part. He is passed by; but the truly great man, the man to whom the human race is really indebted, is—Martin, bishop

(पुढें चालू).

आज काय दृष्टीस पडताहेत तीं सांगतों. त्यावरून वरील दोन्ही गुणांचें, व त्यांतून दुसऱ्याचें, महत्त्व किती आहे तें चांगलें नजरेस आल्याविना रहाणार नाहीं.

७. हीं फळें ह्मटलीं ह्मणजे खोटे समज व अधींकचीं मतें हीं होत; ह्मणजे कांहीं समजुती तर केवळ निराधार व कांहीं अंशतः मात्र खऱ्या अशा वरील गुणांच्या अभावीं उत्पन्न होतात. आतां यांपैकीं कित्येक ज्या फारच ढळढळीत दिसणाऱ्या आहेत त्या सांगतों. युरोपियन इतिहासकारांचे कित्येक जे महासिद्धांत सर्वसंमत होऊन बसले आहेत त्यांत एक मोठें प्रमेय असें आहे कीं, एशियाकडील राष्ट्रें ऐष-आरामांत मग्न, भपकेदार, व नामर्द अशीं आहेत. हें महावाक्य बहुधा प्रत्येक युरोपियन इतिहासकाराच्या ग्रंथांत सांपडेल; याच्या सत्यतेविषयीं कोणासहि तिळ-मात्र सुद्धां संदेह नाहींसा दिसतो. फार तर काय, पणं हें खोडण्यास आह्मी सरसा-वतों याचें आमच्या वाचकांसहि बहुधा आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. पण आतां याच वाक्याची स्थिति काय होते ती पहा!

पहिला आरोप ऐषआरामाचा व भपकीचा. या आरोपाचा क्षणमात्र विचार केला असतां कोणासहि कळून येईल कीं, यांत कांहींच अर्थ नाहीं. एखाद्या कंगाल मनुष्यानें एखाद्या लक्षाधीशावर जर असे आरोप केले कीं, तूं उत्तम पक्वान्नें खातोस, उंची सरबतें पितोस, टोलेजंग वाड्यांत रहातोस, अंगावर दागदागिने मिरवतोस, तुझ्यासारखा अधम कोण आहे?—तर त्या श्रीमान मनुष्यास काय वाटेल बरें? हीं मोठीं जबरदस्त दूषणें समजून तीं उडविण्याचा तो यत्किंचित् तरी यत्न करील काय?

---

of Tours. He it is, says Bossuet, whose unrivalled actions filled the universe with his fame, both during his life-time and after death. It is true that not one educated man in fifty has ever heard the name of Martin, bishop of Tours. But Martin performed miracles, and the church had made him as saint; his claims, therefore, to the attention of historians must be far superior to the claims of one who, like Mohammed, was without these advantages. Thus it is that, in the opinion of the only eminent writer on history during the power of Louis XIV., the greatest man Asia has ever produced, and one of the greatest the world has ever seen, is considerd in every way inferior to a mean and ignorant monk, whose most important achievement was the erection of a monastery, and who spent the best part of his life in useless solitude, trembling before the superstitious fancies of his weak and ignoble nature."

Buckle, Vol. II.—pp. 285–8.

एशिया खंडांत देवाच्या कृपेनें सृष्टीचें अपार वैभव प्रगट झालें असून मनुष्यमात्रास सुखावह होणाऱ्या लक्षावधि पदार्थांची अत्यंत विपुलता आहे; मग तिचा उपभोग केल्यानें किंवा ती मिरविल्यानें मनुष्य दोषास पात्र होतो काय? ज्या खंडांतील लोकांस एशियाची माहिती होई तोंपर्यंत अगदीं सामान्य उपभोगाचे पदार्थहि दुर्लभ होते, जेथील भुतांस उसाचे मळे पहिल्यानें दृष्टीस पडतांच अत्यंत हर्ष होऊन वनचरांप्रमाणें ज्यांनीं त्यांत चंगळ मांडली,[1] हत्ती कसा तो मुळींच माहीत नसून जे त्यास भिऊन पहिल्यानें पळूं लागले,[2] जिकडील अत्यंत सुपीक देश सरासरी इकडच्या उखीर जमीनीबरोबर, जेथें बारा महिने अठरा काळ पाऊस, धुकें, बर्फ यांनीं पिच्छा पुरवून सूर्यदर्शनहि कधीं चांगलेंसें होऊं देऊं नये, अशा लोकांस इकडच्या समृद्ध व सुखकर देशांचें वैभव सहन न होऊन त्यांकडे नाक मुरडण्याचा त्यांनीं आव घालावा ही केवढी मौज आहे! आणि त्यांतून ज्या वीतभर लांब व वीतभर रुंद देशांत सृष्टीची रचना इतकी ठेंगणी व तोकडी आहे कीं, तिकडचे मोठे गगनचुंबित पर्वत ह्मणजे इकडचीं टेपाडें, व टेम्ससारख्या महाप्रचंड नद्या ह्मणजे इकडच्या एखाद्या ओहोळाबरोबर, जेथील खाणींतली मोठी अमूल्य संपत्ति झटली ह्मणजे शिसें व कथील, मोठीं स्वादिष्ट फळें ह्मणजे इकडील रानफळांसारखीं, व दारिद्र्याधिदेवतेची ज्या देशावर इतकी पूर्ण कृपा कीं, इकडील संपत्तीचा एवढा पूर आज शेंकडों वर्षें तिकडे चालत असतां लक्षावधि लोकांस नुसते बटाटे फांकावे लागतात, त्याच देशच्या लोकांनीं खुद्द हिंदुस्थानाशीं संपत्तींत टक्कर मारूं पहावी ह्मणजे केवढें अचाट साहस आहे?[3] बरें, पण आमच्या

---

१. युरोपच्या निरनिराळ्या देशांतून क्रूसवाले योद्धे जेव्हां जमून तुर्कस्थानावर येऊन धडकले, तेव्हां त्या देशांत त्यांस पहिल्याने ऊस दृष्टीस पडला. तोंपर्यंत त्यांस साखर मात्र माहीत असून ती कशी होते तें कांहीं माहीत नव्हतें. यास्तव हा गोड बेत पहातांच त्यांस भारी आनंद झाला. 'Sugar-cane' हें नांव वरील अज्ञानमूलक हर्षाचेंच दर्शक होय.

२. हीं गोष्ट रोमच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. ग्रीसचा राजा पिन्हस याची रोमन लोकांशीं जी लढाई झाली तींत पहिल्यानें वरील अद्भुत पशु त्यांस माहीत झाला. त्याचें तें विचित्र रूप व अचाट शक्ति पाहून रोमच्या शूर शिपायांचीहि दाणादाण होई; व त्या योगेंकरून वरील राजास पहिल्यानें कांहीं जय मिळाले.

३. मागें आठव्या अंकांत मेकॉलेचा हिंदुस्थानच्या संपत्तीवर जो उल्लेख आहे तो सांगितला होता. तो येथें मूलांतून उतरून घेतों—

"The most absurd notions were then entertained in England respecting the wealth of India. Palaces of porphyry hung with the richest brocade, heaps of pearls and diamonds, vaults from which pagodas and gold mohurs were measured out by the

(पुढें चालू).

पाश्चात्य बंधूंनीं हा संपत्तीचा तिरस्कार व हें कडकडीत वैराग्य आपल्या कृतींत तरी दाखवावयाचें होतें! 'रानटी सोन्या मोत्यां'ची एवढी कींव येऊं न देतां तों रानटी लोकांचीं रानटी लोकांपाशींच असूं द्यावयाचीं होतीं![1] देशोदेशीं फिरून शेवटीं मोडकीं तोडकीं जहाजें मोठ्या आर्जवानें मिळवून कोठें पश्चिमेकडे हजारों कोस वेड्यासारखें

---

bushel, filled the imagination even of men of business. Nobody seemed aware of what was nevertheless most undoubtedly the truth, that India was a poorer country than countries which in Europe are reckoned poor, than Ireland for example or than Portugal."

—*Warren Hastings.*

पुढें क्षणभरानें हीच वृत्ति पालटून प्रस्तुत इतिहासकार प्रसंगांतरावर दृष्टि देऊन पुनः आपणच लिहितात--

"The people of India, when we subdued them, were ten times as numerous as the Americans whom the Spaniards vanquished, and were at the same time quite as highly civilized as the victorious Spaniards. They had cities larger and fairer than Saragossa or Toledo, and buildings more beautiful and costly than the Cathedral of Seville. They could show bankers richer than the richest firms of Barcelona or Cadiz, viceroys whose splendour far surpassed that of Ferdinand the Catholic, myriads of cavalry and trains of artillery which could have astonished the Great Captain."

—*Lord Clive.*

मेकॉलेसारख्या विद्वान् व चाणाक्ष ह्मणविणाऱ्या ग्रंथकारानें साऱ्या जगादेखत या बोटावरची थुंकी या बोटावर असा पोरखेळ करावा हा केवढा चमत्कार आहे!-अथवा चमत्कार तरी कसचा? क्लैव साहेबांस खोटी सही करतांना केव्हां शरम वाटली? अथवा हेस्टिंग्स यास तरी सत्यभ्रष्ट व नीतिभ्रष्ट होतांना कधीं मनोदेवता आड येत होती? मग तोच प्रकार त्यांच्या अनन्यभजकांतहि कां आढळूं नये!

१. **मिल्टनें** आपल्या महाकाव्याच्या दुसऱ्या सर्गाच्या आरंभीं ह्मटलें आहे—

"High on a throne of royal state, which far
Outshone the wealth of Ormuz or of Ind,
Or where the gorgeous East with richest hand,
Showers on her kings barbaric pearl and gold,
Satan exalted sat."

प्राच्यदेशीय संपत्तीचा वर जो इंग्रजी कवीनें अधिक्षेप केला आहे तो वाचून 'इसापनीतीं'तील आंबट द्राक्षांची कोणास आठवण होणार नाहीं?

समुद्रावर फीर, नाहीं तर आफ्रिकेला वळसा घालून अनमानधबक्यानें कोठें तरी लाग, एवढी जबरदस्त यातायात आकाशाच्या राज्याच्या वांटेदारास कोणीं करायाला सांगितली होती कोण जाणे? तसेंच शेंकडों वर्षे ध्यानीं मनीं स्वप्नीं घोळलेला हिंदुस्थान एकदांचा गावला असतां त्यावर ख्रिस्तदासांच्या एवढ्या झुंडीच्या झुंडी कशा धांवल्या हा तरी चमत्कार आहे! त्याप्रमाणेंच पुढें खोट्या सह्या कर, राजद्रोहाच्या मसलतींत शिर, याची मुंडी मुरगाळ, त्याला चिथावून दे, एवढ्या उलाढाली तरी गेलीं शंभर वर्षें आमच्या परम विरक्त व प्राच्य देशांस तुच्छ करणाऱ्या यूरोपस्थ बांधवांनीं कशाकरतां केल्या बरें? पण हेंहि असो; येशूच्या प्रेषितांच्या सांगण्याप्रमाणें एवढाहि अचाट उद्योग आमच्या दयाळू भ्रात्यांनीं आह्मांस शहाणें करण्याकरितां किंवा आकाशचें राज्य मिळवून देण्याकरतां कदाचित् केला असेल; पण हें कसें बरें, कीं जो ऐषआराम दूर असतां केवळ निंदेस पात्र होता तोच आमच्या बंधूंस सुलभ होण्याबरोबर त्याचें निंद्यत्व कोठें तें पार निघून गेलें? जीं रत्नें येथील राजेरजवाड्यांच्या अंगावर असतां 'रानटी' झालीं होतीं त्यांस युरोपचें वारें लागतांच बेटीं एकदम कशीं सुधारलीं हो!!

यापुढचा दुसरा विचार नामर्दपणाचा. हें दूषणहि वरच्यासारखेंच केवळ शुष्क असून अंमळ सूक्ष्मदृष्ट्या त्याचा विचार केला असतां त्याचा पोकळपणा आरपार दिसल्यावांचून रहाणार नाहीं. एक तर हें अलीकडे अर्थशास्त्रावरून सर्वसंमत झालेंच आहे कीं, संपत्तीनें राष्ट्र दुर्बल होतें ही समजूत खोटी आहे; तिच्या योगानें त्यास उलटी बळकटी येते असेंहि पण पुष्कळांचें मत आहे. तेव्हां यावरून पहातां प्राच्य राष्ट्रें समृद्ध असल्यामुळें निःशक्त होऊन गेलेलीं आहेत हा मुद्दा तर अगोदर मुळींच उडाला. पण एशिया खंडांतील जमीनीचा व हवापाण्याचाच असा कांहीं गुण असला तर, कीं तेथील लोक आपले भागुबाईच निपजावे! असें असेल तर त्याचा प्रत्यय पहाणें सोपें आहे. इकडील देशांत युरोपांतल्यासारखे जरी मोठमोठे इतिहासकार निपजले नाहींत, तरी इकडील राष्ट्रांनीं आपापलें वृत्त बरेंच लिहून ठेवलेलें आहे. शिवाय त्यांचा इतिहास चिरकाल रहाण्यासारखा ठिकठिकाणीं स्थापित झाला असून त्यांच्या शत्रूंच्या ग्रंथांतहि त्यास स्थान मिळालें आहे. या सर्वांवरून पहातां असें स्पष्ट दिसून येईल कीं, जाफेटच्या पोरांपेक्षां शेमचीं पोरें कमी बळकट आहेत असें नाहीं. पहा बरें रोमन लोक साऱ्या जगास एवढे दुर्जय झाले असतां अरब लोकांनीं त्यांस किती लवकर जेर करून टाकले, व सारें युरोपखंड त्यांच्यापुढें कित्येक शतकें कसें थरथरां कांपत होतें! जितका मुलूख काबीज करण्यास रोमन लोकांस आठशें वर्षें लागलीं तितका आमच्या प्राच्य वीरांनीं ऐशीं वर्षांत काबीज केला![1] सिरिया, इराण, मिसरदेश, स्पेन,

१. "With the Koran in one hand, and the scimitar in the

(पुढें चालू).

फ्रान्स एवढाले देश त्यांनीं एकेका मोहीमेंत सर करून टाकिले.[1] पुढें कांहीं काळानें त्यांचे अनुयायी जे तुर्क लोक त्यांनीं तर एशियामैनर जिंकून सन १४५३ सालीं कुस्तुंतुनिया शहरांतील ख्रिस्ती देवळांवरचे क्रूस उपटून काढून त्या जागीं आपले अर्धचंद्र रोंवले! हे अर्धचंद्र आज चारशें वर्षें सारखे लकाकताहेत. युरोपांत हजारों धामधुमी होऊन राज्यें चीं राज्यें पालथीं झालीं व नवीं उदयास आलीं; पण हे कायमचे कायम! अकराव्या, बाराव्या व तेराव्या शतकांत तर ख्रिस्ती प्रभूच्या जन्मभूमीच्या उद्धारार्थ लक्षावधि, कोट्यावधि, युरोपियन वीर आपल्या पैगंबराची निशाणी दंडाला बांधून तुर्कस्थानांत येऊन थडकले; पण इतक्यांचाहि समाचार खोट्या पैगंबरास भजणारे जे तुर्क लोक त्यांनीं एकट्यांनीं घेतला. असो; या तर मागल्या गोष्टी झाल्याः कीं ज्या वेळीं युरोपांतील राष्ट्रें अज्ञानांत मग्न असून रानटी अवस्थेंत होतीं. पण हल्लीं त्यांवर सुधारणुकेची पूर्ण कळा येऊन बाकी सगळ्या जगास तीं तुच्छ करीत असतां एशियाकडील राष्ट्रें त्यांस सहज चिरडून टाकतां येण्याजोगीं आहेत कीं काय हें पाहूं. याचांहि क्षणभर विचार केला असतां कोणाहि निःपक्षपात व समंजस मनुष्यास सहज कळून येईल कीं आज एकोणिसाव्या शतकांतहि जगाची स्थिति अकराव्या शतकापेक्षां फारशी बदलली आहे असें नाहीं. पहा बरें, आमच्या पाश्चात्य राज्यकर्त्यांनीं टिपू सुलतान, बाजीराव, दौलतराव, यशवंतराव या सर्वांस एकामागून एक जिंकून आपलें निशाण उत्तरेस हिमालयापर्यंत, पूर्वेस ब्रह्मदेशापर्यंत, व पश्चिमेस अटक नदीपर्यंत जय-

---

other, the impetuous and indomitable Arab achieved a series of splendid victories unparalleled in the history of nations: for in the short space of eighty years that mighty range of Saracenic conquest embraced a wider extent of territory than Rome had mastered in the course of eight hundred!"

Ockley's History.

१. अरबस्थानांतून एकाएकीं निघालेली ही वावटळ वर सांगितल्याप्रमाणें दूरदूरच्या देशांपर्यंत जाऊन थडकून सर्वथा दुर्धर झाली असतां हिंदुस्थानावर मात्र तिचें कांहीं चाललें नाहीं. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. एक इंग्लिश इतिहासकार ह्मणतो—

"It cannot but appear a very notable circumstance, that while the followers of the Prophet completely subjugated Persia and Spain in two or three compaigns, the resistance which they met in their early encounters with the Hindus was so compact and resolute, that nearly three centuries elapsed after the first invasion, before they could make any permanent impression on India.

—*Marshman, Vol. I.*

घोषानें नाचवीत नेलें, व साऱ्या भरतखंडाचें प्रभुत्व फारा दिवसांनीं एका छत्राखालीं आणलें. पण इतकें असतांहि आपल्या सामर्थ्याच्या जोरावर एकेचाळीस सालीं त्यांनीं अफगाणस्थानावर जेव्हां चाल केली, तेव्हां तद्देशीय इतिहासकारांनीं मोठ्या प्रेमानें गाईलेलें जें पाश्चात्यांचें शरीरबल व बुद्धिबल त्याची प्रतीति कशी खाशी आली! इंग्रेजी कवाईत व इंग्रेजी शहाणपण हीं दोन्ही त्या कडवे लोकांच्या तडाक्यापुढें चुराडा होऊन गेलीं; आणि इंग्रेजांच्या 'सवाई तुऱ्या'स पुरतेपणीं धुळींत लोळवून त्यांनीं साऱ्या जगास जाहीर करून दिलें कीं, मराठ्यांचाहि ज्या राष्ट्रानें मोड केला तें कांहीं सामान्य नव्हे.[१]

---

१. अफगाणस्थानांतील मोहिमेचा जो शेवट झाला तशासारखें अपेश इंग्लिशांस कधींच आलें नसेल. ज्या सैन्यानें मोठ्या थाटानें सिंधुनद उल्लंघून शत्रूच्या मुलखांत चाल केली त्यापैकीं सरतेशेवटीं एकजण मात्र परत आला, मग तो गोरा होता कीं काळा नकळे! या भयंकर निःपाताचें वर्तमान ऐकून घींट जे पाश्चात्य लोक त्यांचीहि कशी अवस्था झाली हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल—

"There was not in that great palaced city (Calcutta), or in any one of the smaller stations or cantonments in India, an Englishman whose heart did not beat, and whose hand did not tremble, for the fate of the Cabul force, when he opened the letters and papers which brought him intelligence from beyond the frontier. No one who dwelt in any part of India during the early months of 1842 will ever forget the anxious faces and thick voices with which tidings were sought, questions and opinions asked and interchanged, hopes and fears expressed, rumours sifted, probabilities weighed, and how, as the tragedy deepened in solemn interest, even the most timid and despondent felt that the ascertained reality far exceeded in misery and horror all that their excited imaginations had darkly foretold. There was a weight in the social atmosphere as of dense *superincumbent* thunder-clouds. The festivites of the cold season were arrested—gaiety, and hospitality were not. There were few families in this country which did not look on with apprehension for the fate of some beloved relation or friend; while unconnected men, in whom the national overlaid the personal feeling in this conjuncture, sighed over the *tarnished* reputation of their country, and burned to avenge the insults that had been heaped upon it."

Kaye's War in Afghanistan.

हें सर्व एशिया खंडांतील एका राष्ट्राविषयीं झालें. पण एवढ्याचवरून आमच्या वाचकांपैकीं कित्येक कदाचित् ह्मणतील कीं, बरें, मुसलमानांच्या अंगीं शौर्य आहे हें आह्मी पाहिजे तर करूं कबूल; पण आह्मी हिंदु तर इंग्रेजी इतिहासकारांच्या ह्मणण्याप्रमाणें भित्रे व नामर्द खरे कीं नाहीं? या प्रश्नाचेंहि वरच्या एकंदर दूषणाप्रमाणेंच निराकरण करून आमच्या लोकांचें स्वतःविषयीं अद्याप किती अज्ञान आहे तें पुरतेपणीं दाखविणें मोठेंसें कठिण आहे असें नाहीं. पण प्रस्तुतसारख्या विषयावर जसें हवें तसें लिहिण्याची मोठी पंचाईत असते. इंग्रेजी ग्रंथकारांनीं व मनानें इंग्रेज बनलेल्या अशा एतद्देशीयांनीं आमच्या देशाविषयीं हवा तितका चारगटपणाचा व निवळ अज्ञानाचा मजकूर लिहिला तरी त्यांस पूर्ण मुभा असते; पण आमच्यांपैकीं कोणी अंमळ त्यांस वेडावांकडा शब्द लिहिला किंवा बोलला, कीं त्याच्यावर मात्र चोहोंकडून गहजब होतो. मिशनरी व बाटे लोक तर त्यास खाऊं का गिळूं याप्रमाणें पाण्यांत पाहूं लागतात: सरकारी अधिकाऱ्यांचीहि मर्जी खप्पा होऊन त्यास चाकरीच्या संबंधानें नडी येऊं लागतात, शिवाय त्याच्या देशबंधूंतहि पुष्कळ असे असतात कीं त्यांस आपणांवर केलेल्या व्यर्थ आरोपांचेंहि खंडन केलेलें पहावत नाहीं, त्यांस 'तुह्मी पशु आहां, मूर्ख आहां, नीच आहां' हींच पुष्पवृष्टि अधिकाधिक तोषप्रद होते. तेव्हां या पंचायतीमुळें असल्या विषयावर आपले विचार पूर्णपणें प्रगट करण्यास आपल्या लोकांस सवड नाहीं. तथापि आज दोन अडीच वर्षें प्रकृत विषयाच्या संबंधानें या पुस्तकांत जागोजाग बरेच उल्लेख केले आहेत; त्यांहून येथें आणखी कांहीं सविस्तर लिहिण्याची गरज राहिली नाहीं. यास्तव विषयानुरोधास्तव एक मात्र मोठें प्रमाण येथें दाखल करितों ह्मणजे पुरे. हें प्रमाण इतकें ढळढळीत असतां आमच्या स्वीय व परकीय प्रतिपक्ष्यांस दिसत नाहीं हें त्यांच्या मदांधत्वाचें किंवा अज्ञानांधत्वाचें दर्शक ह्मटलें पाहिजे. हिंदुस्थानच्या इतिहासाची ज्यांस ज्यांस थोडी बहुत तरी माहिती आहे त्या सर्वांस ही गोष्ट महशूर आहे कीं, फ्रेंचांचा प्रख्यात मुत्सद्दी डुप्ली यानें हा देश काबीज करण्याची एक मोठी उत्कृष्ट कल्पना काढिली. ती ही कीं, एतद्देशीय लोकांस चाकरीस ठेवून त्यांच्या युरोपच्या कवाइतीबरहुकूम पलटणी तयार कराव्याच्या. ही कल्पना पुढें इंग्रेजांसहि पसंत पडून त्यांनीं आपलें सैन्य हळू हळू याच रीतीनें वाढविलें. या काळ्या लोकांस इंग्रेज लोक 'शिपाई' ह्मणतात. या शिपायांनीं अवघ्या शंभर वर्षांत इंग्रेजांचें राज्य साऱ्या हिंदुस्थानभर कोणत्या प्रकारें करून दिलें, आणि प्राच्यदेशीय असतां व मूर्तिपूजक असतां किती शौर्यानें व किती इमानानें आपल्या परस्थ धन्यांची त्यांनीं चाकरी बजाविली हें साऱ्या जगास विश्रुत आहे.[1] इंग्रेजी

१. येथील काळ्या पलटणींनीं गोऱ्या लोकांच्या बरोबरीनें लढून केवळ हिंदुस्थानांतच

(पुढें चालू).

राज्याची टोलेजंग इमारत केवळ त्यांनींच सांवरिली असून तिचें आधारस्तंभत्व त्यांकडे किती पूर्ण आहे याचा प्रत्यय सुमारें वीस वर्षांपूर्वी उत्कृष्ट आलेला आहे, तो कोणासहि सांगायाला पाहिजे असें नाहीं. असो; तर यावरून आमच्या निंदकांस आह्मी असें विचारणार कीं, हे हिंदुस्थानच्या इतिहासांत गाजलेले शिपाई कोण ? येथीलच हिंदु किंवा विलायतेहून आलेले कोणी आहेत ?

याप्रमाणें प्राच्य राष्ट्रांवर केलेल्या पहिल्या दूषणाचा विचार झाला. यावरून आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, वृथाभिमानाचा व अंधपरंपरेचा या जगांत किती प्रचार आहे. जो उल्लेख पूर्वीच्या ग्रंथकारांनीं एकदां करून ठेवला तो आपल्या पोकळ गर्वास अनुकूळ पडल्यामुळें पुढील मोठमोठ्या इतिहासकर्त्यांनींहि अधिक शोध बिलकूल न करतां खुशाल करायाचा; मग तो केवळ एकदेशीय किंबहुना अगदीं अप्रयोजकपणाचा असला तरी कांहीं चिंता नाहीं. तसेंच वरील विवेचनावरून सर्वांच्या हेंहि लक्षांत येऊन चुकेल कीं, सामान्यतः वरवर पहातां जी गोष्ट खरी व प्रमाणसिद्ध अशी वाटते तिचा पूर्ण व सूक्ष्म विचार केला असतां तिचें स्वरूप एकदम किती पालटतें !

वरच्याप्रमाणेंच इतर दोषारोप जे युरोपियन ग्रंथकारांनीं इकडील लोकांवर केले आहेत, त्यांचाहि अंमळ बारकाईनें विचार केला असतां कोणाहि समंजस व निःपक्षपात मनुष्यास स्पष्ट दिसल्यावांचून रहाणार नाहीं, कीं तेहि मोठ्या शोधक बुद्धीनें व प्रांजलपणानें केले आहेत असें नाहीं. सर्वांचें मूळ पाहिलें असतां अज्ञान व तज्जन्य वृथागर्व हेंच आहे. या दोषारोपाचें थोडें बहुत खंडन या पुस्तकांत येथवर जागोजाग केलेंच आहे. तें सविस्तर व यथास्थित होण्यास झटलें झणजे ग्रंथांचे ग्रंथ लागतील. वरील एकाचें निराकरण करण्यासच वर इतकी जागा लागली. यास्तव बाकीच्यांचा

लढाया मारल्या आहेत असें नाहीं; तर परमुलखांतहि दूरदूर युद्धप्रसंग केले आहेत. अफगाणस्थान, सयाम, चीन, हबशांचा मुलूख, हे तर राहोतच; पण एकदां मिसर देशांत नेपोलियनच्या सैन्याशीं व दुसऱ्या प्रसंगीं रूमशामच्या राज्यांत रशियन लोकांशींहि त्यांचा सामना झालेला आहे. कित्येक प्रसंगीं तर गोऱ्या पलटणी मागें हटल्या असतां यांनीं पुढें सरसावून फत्ते केली आहे. असो; या ठिकाणीं मागें नवव्या अंकांत दिलेला एक चुटका मूळ इंग्रेजींतून उतरून घेतों—

"Their conduct during the war with Hyder excited the admiration of all who knew it. Frederick the Great of Prussia was known to have said, after reading 'Orme's Account of the War in India,' that had he the command of troops who acted like the sepoys on that occasion, he could conquer all Europe."

Briggs's Letters, VIII.

सामान्यतः निर्देश मात्र करून प्रस्तुत अंक आटपतों.

युरोपांतील सर्व राष्ट्रें आज सुमारें हजार दीड हजार वर्षें ख्रिस्ती धर्मास अनुसरून तो धर्म त्यांचे ठायीं आज कित्येक शतकें पूर्ण बिंबून गेला आहे. सध्यांहि त्या खंडांत कोट्यावधि लोक मोठे भाविक ख्रिस्ती असून बैबल हेंच ईश्वरप्रणीत शास्त्र व प्रभु येशू हाच एक जगाचा तारक असें मानणारे आहेत. ज्यांच्या ठायीं अर्वाचीन विद्येच्या योगानें जिज्ञासा व सत्यप्रीति वाढून ती शुभवर्तमानाच्या महत्त्वास बाधक झाली आहे असेहि लोक जरी त्या खंडांत लक्षावधि आहेत, तरी यांतील बहुतेकांचा व वरील भाविक लोकांचा एका गोष्टींत उत्कृष्ट मेळ पडतो. ही गोष्ट परधर्मांविषयीं तिरस्कार व द्वेष ही होय. त्यांची अशी बळकट समजूत दिसते कीं, जर पृथ्वीवर एखादा खरा धर्म असेल, तर तो कदाचित् आमचाच असेल; निदान सदाचरणाच्या प्रवृत्तीस तरी ख्रिस्ती धर्म जसा अत्यंत अनुकूल आहे तसा दुसरा नाहीं. हें एकदां ब्रह्मवाक्य ह्मणून गृहीत धरून चाललें, कीं बाकीचीं राष्ट्रें दुराचारी, पापमग्न वगैरे समजुती झाल्याच. मुसलमानी धर्माविषयीं, बौद्ध धर्माविषयीं, व विशेषतः हिंदु धर्माविषयीं इंग्रेज ग्रंथकारांपैकीं सामान्यतः कोणाचेहि लेख पाहिले, तरी वरील प्रकार त्यांत पूर्णपणें आढळल्यावांचून रहाणार नाहीं. मुसलमानांचा पैगंबर महंमद याविषयींचा उल्लेख 'ढोंगी' 'भोंदू' या उपपदांशिवाय कधीं व्हावयाचाच नाहीं; तसेंच बौद्ध धर्माविषयींहि आमच्या बहादर पाश्चात्य लोकांचा असा समज आहे कीं, तो धर्म कसचा, त्याचा पायाच मुळीं नास्तिकपणाचा आहे! आमच्या धर्माविषयीं तर कांहीं बोलावयासच नको. तेहतीस कोटि देव ज्यांनीं कल्पिले व दगडाच्या, लांकडाच्या, किंवा धातूच्या मूर्तींच्या जे पायां पडतात, असल्या महामूर्ख लोकांचे धर्मसंबंधी विचार किती अप्रयोजक असले पाहिजेत बरें! असो; तर याप्रमाणें आपला धर्म काय तो परमपवित्र असें मानल्यामुळें इतरांविषयीं पाश्चात्यांचे वरच्यासारखे कोते समज सहजच होतात. हीच गोष्ट लेकनीति व लोकाचार यांसहि लागू. प्राच्य राष्ट्रांच्या नीतीची कीर्ति युरोपांत पहिल्यापासून आहे. ती ही कीं, इकडच्यासारखे लबाड लोक कोठेंच नाहींत; ते खऱ्या खोट्याचा कधींच विधिनिषेध बाळगीत नसतात; इमानानें वागणें ह्मणजे त्यांस स्वप्नींहि ठाऊक नाहीं. नंदकुमारासारखीं रत्नें निपजविणें हा अधिकार इकडील भूमीचाच. वरील महारत्नाची प्रभा वर्णीत असतां मेकॉले साहेबांनीं दोन्ही हात अगदीं भुईवर टेकले आहेत. ते आपल्या विलायतवासी बंधूंस सांगतात कीं, "बांधव हो! मीं एवढा कलमबहादर खरा; पहा एवढा क्लैव साहेबांचा चरित्रमहिमा, पण तोहि मीं गाईला; पण या बेड्याचें बुद्धिलाघव व हातचलाखी कांहीं अघटित! येथें माझें वर्णनसामर्थ्य अगदीं कुंठित होतें. तरी पुढील कोष्टकावरून वरील अद्भुत सोद्याची तुह्मांस कांहीं कल्पना झाली तर बघा,—ऐका नीट लक्ष द्या! तुम-

च्या आमच्याहून इटालियन लोक जितके नीतींत कमी, इटालियन लोकांहून जितके हिंदु लोक, हिंदु लोकांहून जितके बंगाली बाबू, तितका आपल्या देशबंधूंहून वरील निम्मकहरामी नंदकुमार ! !"[१] वा ! लॉर्ड साहेबांनीं काय अगदीं बिवलकरी कांड्यानें नीतीचें माप जोखलें बोवा ! एवढें हें अष्टराशिक प्रमाण तंतोतंत जुळविण्यास त्यांस केवढें सूक्ष्म गणित करावें लागलें असेल बरें !

आतां सरते शेवटचा मासला विद्येविषयींचा पहा. मागें दोघां नामांकित इतिहासकारांचे जे उतारे दिले आहेत त्यांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत कांहींसें आलें असेल कीं, युरोपियन लोक हल्लीं ज्या ज्ञानाचीं एवढी बढाई मारतात त्याचा उगम मूळचा अन्य देशांतून आहे. तरी ज्याप्रमाणें पोरें अंमळ जाणतीं होऊं लागून त्यांस आपल्या सामर्थ्याचा अनुभव जरा येऊं लागला, कीं लागलींच आपलें मूळ विसरून जाऊन तीं आईबापांस गोष्टी सांगूं लागतात, किंवहुना तारुण्याच्या ताठ्यांत तीं त्यांस आपणांस शोभेनाशींहि वाटूं लागतात, त्याप्रमाणेंच पाश्चात्यांची आज अवस्था आहे. त्यांस असें वाटूं लागलें आहे कीं, आपण आकाशांतून पडलों आणि भुईवर सांवरलों ! आजपर्यंत सगळें जग अज्ञानांत व पापांत बुडून राहिलें होतें त्यावर ज्ञानाचा व सत्याचा प्रकाश ओतण्यास आपणास आकाशांतल्या बापानें बरोबर दिवटी देऊन खालीं पाठविलें आहे ! या उन्मादस्थितीच्या प्रत्ययार्थ वरील नामांकित ग्रंथकाराचेच लेख बघा. जेथें जेथें हिंदूंच्या प्राचीन विद्येचा उल्लेख करण्याचा यत्किंचितहि

---

१. "Of his moral character it is difficult to give a notion to those who are acquainted with human nature only as it appears in our own island. What the Italian is to the Englishman, what the Hindu is to the Italian, what the Bengalee is to the Hindu, that was Nuncomar to the other Bengalees."

—*Warren Hastings.*

वरील वाक्यांत **मेकॉले** साहेबांनीं आपल्या देशबंधूंस नीतियुक्त आचरणाच्या संबंधानें केवळ शिखरावर नेऊन खुशाल बिनदिक्कत बसविलें आहे; पण इंग्लंडचा इतिहास ज्यास ह्मणून माहीत असेल, अथवा हिंदुस्थानाचें प्रभुत्व वरील लोकांस कसें प्राप्त झालें याचा जो क्षणमात्र विचार करील, तो वरील महासिद्धांतास केवळ मानच डोलवील असें वाटत नाहीं. फार कशाला, प्रस्तुत ग्रंथकाराचे दोन निबंधच वरील महावाक्य पुरतेपणीं खोडून टाकण्यास बस आहेत. दुसऱ्याची बायको फितविणें, दुसऱ्याचें द्रव्य तें आपलेंच मानून खुशाल दिवसा ढवळ्या दरवडे घालणें, निरपराध मनुष्यास फांशीवर चढविणें, कार्य पडल्यास बिनदिक्कत दुसऱ्याची सही ठोकून देणें,—ही जर इंग्रेजी नीति असेल, तर असला अपूर्व मेवा **मेकाले** साहेबांचा व त्यांच्या देशबांधवांचा त्यांना त्यांजपाशींच राहो ! त्याजबद्दल इकडील प्राच्य राष्ट्रें त्यांचा कधींहि हेवा करणार नाहींत !

संबंध आलेला आहे तेथें तेथें त्यानें वरील वृत्ति प्रगट केली आहे. एके प्रसंगीं तर तिचें स्वरूप अगदीं पूर्ण दृष्टीस पडलें. मेकॉले साहेब १८३४ सालीं हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं या देशाच्या दोन मोठ्या कामगिऱ्या बजावल्या. एक ही कीं, आमच्या देशाकरितां कायद्यांचें एक नवें कोड तयार केलें; आणि दुसरी ही कीं, सध्यां चोहोंकडे चालू असणारी शिक्षणपद्धति सुरू करण्याविषयीं त्यांनीं शिफारस केली. ती अशी कीं, त्या वेळेस एतद्देशीय लोकांच्या शिक्षणाच्या संबंधानें एक मोठी वाटाघाट बंगाल्यांत सुरू होती. कित्येकांचा अभिप्राय असा होता कीं, इकडील प्राचीन भाषांचें अध्ययन आजपर्यंत जसें चाललें आहे तसेंच चालवावें,[1] इंग्रेजी सुरू करण्याचें विशेष कारण नाहीं. दुसऱ्यांचें ह्मणणें असें होतें कीं, हें जुनें भारुड आतां शिकून काय फायदा आहे? नुसतें इंग्रेजीच जिकडे तिकडे चालू करावें. दोन्ही पक्षांकडे मोठमोठे नामांकित विद्वान् होते व दोघांचाहि आपापल्या मताविषयीं मोठा आग्रह होता. शेवटीं या वादावर एकंदरींत तिऱ्हाईतपणें अभिप्राय देण्याला सरकारानें मेकॉले यास सांगितलें. तो त्यानें एका सविस्तर लेखांत दाखल करून सर्वांस जाहीर केला. तेव्हांपासून सर्वांच्या मतें वरील वादांतील दुसराच पक्ष खरा ठरून आज चाळीस वर्षें सगळ्या देशभर तोच क्रम चालू आहे. तर या प्रसंगीं प्रस्तुत ग्रंथकाराचें प्राच्यदेशीय राष्ट्रांविषयीं मनोगत पूर्ण प्रगट झालें आहे वरील लेखाचें एकंदर स्वरूप त्याच्या उपसंहारावरून स्पष्ट दिसतें. तो असा आहे—"आपण ज्ञानप्रसार करणारी मंडळी असा मोठा किताब धारण केला आहे; पण वस्तुतः पहातां तो घेण्यास आपणांस बिलकूल अधिकार नाहीं. कारण आपली कृति पाहिली तर खऱ्या ज्ञानाचा प्रसार आपण मुळींच करीत नसून खोटें नाहींसें होत चाललें आहे त्यास मात्र आडवें येत आहों. ज्या पुस्तकांतील मजकुराची किंमत त्यांतील कागदांच्या इतकीहि व्हावयाची नाहीं, असलीं अप्रयोजक इतिहास, अप्रयोजक पदार्थविज्ञान, अप्रयोजक अध्यात्मज्ञान, अप्रयोजक ईश्वरज्ञान, वगैरे विषयांवरील पुस्तकें आपण छापून प्रासद्ध करीत आहों!"[2]

---

१. वरील वाद सुरू होण्यापूर्वी पुष्कळ वर्षें बंगाल्यांत फारशी, आरबी, व संस्कृत या भाषा शिकण्याच्या व त्यांतील विद्यांचें अध्ययन करण्याच्या पाठशाळा होत्या. तोच प्रकार पेशव्यांचें राज्य घेतांच दोन तीन वर्षांनीं या शहरांताहे सुरू केला होता हें सर्वांस माहीत आहेच.

२. "I believe that the present system tends, not to accelerate the progress of truth, but to delay the natural death of expiring errors. I conceive that at present we have no right to the respectable name of a Board of Public Instrucion. We are a board for wasting public money; for printing books which are

(पुढें चालू).

त्यावेळच्या पंडितांत अग्रगण्य ह्मणून ज्यांकडे वाद तोडण्याचें सरकारानें सोंपवून दिलें त्यांचें निःपक्षपातपणाचें व समंजसतेचें मत सरते शेवटीं वरच्यासारखें पडलें. एकूण वरील साहेबांच्या मतें आरबी, फारसी, संस्कृत वगैरे भाषांतील ग्रंथांची योग्यता इतकी झाली, कीं त्यांच्या कागदांचीहि किंमत आंतील मजकुरास नाहीं. केवढी झोटिंग पाच्छाही ही ! वरील महाविद्वान् पंडितानें जर यत्किंचित् विचार केला असता तर आह्मांस खास वाटतें कीं, त्याची अशी खात्री होऊन जाती कीं, इकडील भाषांत शेंकडों असे ग्रंथ आहेत कीं, त्यांस पुष्टा घालण्यास त्याच्या अत्यंत मोलवान ग्रंथाच्या अत्यंत मोलवान आवृत्तीचीं पानें फाडलीं तर तीहि योग्यता त्यांस पुरतेपणीं साजणार नाहीं; आणि ज्या वेळीं मेकॉले हें नांव केव्हांच लोपून गेलें असेल, हिंदुस्थानाचें अधिपतित्व अमेरिकेंतील लोकांकडे किंवा आफ्रिकेंतील एखाद्या राष्ट्राकडे कदाचित् गेलेलें असेल, आणि "कोणी न्यूझीलंडचा मुशाफर 'लंडन ब्रिज्य'च्या एखाद्या मोडक्या कमानीवर उभा राहून भोंवतालच्या ओसाड प्रदेशाकडे नजर देईल, आणि 'सेंटपालच्या' मोडकळीस येऊन पडलेल्या देवळाचा नकाशा काढील" त्या कालींहि त्यांची कीर्ति आकाशांतील सूर्यचंद्राप्रमाणेंच कालगतीनें अबाधित होत्साती आजच्या सारखीच उज्ज्वल राहील !

येथवर जो बऱ्याच विस्ताराचा मजकूर लिहिला त्यावरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, पाश्चात्य राष्ट्रांस इकडील लोकांचें यथार्थ ज्ञान अद्याप कांहींच झालें नाहीं. अज्ञानापासून उद्भवणारा व दृढतर होणारा जो दुराग्रह त्यांचें प्राबल्य आजहि त्यांचे ठायीं अगदीं पूर्वीप्रमाणेंच आढळतें. हें समूळ नाहींसें होण्याचे मार्ग कोणते तेहि वर सांगितलेच आहेत. त्यांचें अनुसरण आमचे परस्थ बंधु केव्हां करतील हें सांगवत नाहीं; पण तें जेव्हां होईल तेव्हां त्यांस पूर्णपणें कळून येईल कीं, शारीरगुण किंवा मानसिकगुण कोणत्या एकाच राष्ट्राचे ठायीं परमेश्वरानें ठेवले आहेत असें नाहीं. जगाचा खरा नियंता जो आहे त्याच्या अंगीं पवित्र शास्त्रांत सांगितलेल्या आकाशांतील बापाप्रमाणें पक्षपातबुद्धि मुळींच वास करीत नाहीं. त्याची सर्वांवर समदृष्टि असून साऱ्या राष्ट्रांस त्यानें प्रायः सारख्याच गुणांनीं संपन्न करून ठेविलें आहे; इतकेंच मात्र कीं, ते ते गुण प्रगट होण्यास कांहीं विशेष काल व प्रसंग यावा लागतो. ही अनुकूल संधी कांहीं राष्ट्रांची यापूर्वी येऊन गेली, कांहींची सध्यां आलेली आहे, व कांहींची नुकती यावयास लागली आहे. तेव्हां या-

---

of less value than the paper on which they are printed was while it was blank; for giving artificial encouragement to absurd history, absurd metaphysics, absurd physics, absurd theology.—"

Minute on Education.

वरून पहातां अमुक अमुक राष्ट्रासच आपली शेखी मिरविण्यास फारसें कारण आहे असें नाहीं. कालचक्र हें सतत फिरत आहे; जो देश आतां वैभवाच्या शिखरास चढलासा दिसतो तोच घटकाभरानें अगदीं रसातळास जाऊन मिळतो. गेल्या शंभर वर्षांतच सगळ्या जगभर किती फेरफार होऊन गेले आहेत व आणखी शंभर वर्षांनीं काय काय उलथापालथी होतील त्या कोणाच्यानें सांगवणार आहेत! तर यावर नजर देऊन, व आपली स्थिति पांच सहाशें वर्षांमागें काय होती हें लक्षांत आणून, तसेंच इकडील देशांचें हरएक तऱ्हेचें ऋण त्यांच्या डोक्यावर आहे त्याचीहि मेहेरबानीनें समयविशेषीं आठवण करून, पाश्चात्य ग्रंथकार प्राच्यांविषयीं काय लिहिणें तें जर लिहीत जातील, तर फार बरें होईल. एक तर इकडील देशांविषयीं अत्यंत अप्रयोजक व कुत्सित मतें प्रसिद्ध केल्यानें इकडील लोकांच्या मनांत पाश्चात्यांविषयीं विनाकारण जो द्वेषभाव माजतो तो बंद होईल; व पाश्चात्यांसहि इकडील राष्ट्रांविषयीं यथार्थ ज्ञान होऊन त्यांच्या अज्ञानाचें व गर्वाचें खंडन खंडाळ्याच्या घाटांत किंवा काबूलकंदाहारच्या पहाडांत वेळोवेळीं होण्याचा जो अनिष्ट प्रसंग येतो तोहि बहुधा टळेल. पण सर्वांहून मोठा फायदा ह्मणजे हा कीं, इतिहासापासून होणारा मुख्य लाभ जो मानव जातीच्या मनोधर्मांचें ज्ञान तें सर्वांस यथावत होऊन सध्यां चोहोंकडे चालू असणारे जे वेडगळ भ्रम, कीं युरल पर्वताच्या एका पायथ्यापर्यंत व युरल नदीच्या एका तीरापर्यंत ज्ञान, शौर्य, व नीति यांचें राज्य; व दुसऱ्या पायथ्यापासून व दुसऱ्या तीरापासून लागलाच अज्ञानाचा, भेकडपणाचा, व दुष्टपणाचा अंमल लागला, हे सर्व दूर होतील.

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ॥[1]

अंक ३२—(१) विषयोपन्यास. (२) प्राच्य इतिहासाचे दोन भाग. (३) पुढील लेखाचा विषय. (४) आरब लोकांचा इतिहास. (५) इराण देशाचा इतिहास. (६) हिंदुस्थानचा इतिहास.

१. गेल्याच्या मागील अंकांत प्राच्य राष्ट्रांविषयीं यथार्थ इतिहासरचना करण्याची योग्यता पाश्चात्य ग्रंथकारांचे ठायीं कितपत आढळते याविषयीं बरेंच सविस्तर विवरण केलें. आतां हे इतिहास त्यांनीं कोणकोणते रचले आहेत तें सांगून त्यांचें एकंदर स्वरूप आमच्या वाचकांच्या लक्षांत कांहीं येईलसें करतों.

२. प्राच्य राष्ट्रांच्या इतिहासाचे दोन भाग करणें अवश्य आहे; एक प्राचीन व दुसरा अर्वाचीन. हें अर्वाचीनत्व व प्राचीनत्व पुनः दोन प्रकारचें आहे. तें असें

१. "हा माझा, हा परका, ही कुत्सित बुद्धि संकुचित मनाच्या मनुष्यांची; परंतु जे उदार मनाचे आहेत त्यांचे आप्तजन ह्मणजे अवघ्या भूमंडळावरील लोक होत!"

कीं, हिंदु, चीन, इत्यादि कांहीं राष्ट्रें अत्यंत प्राचीन काळीं प्रसिद्ध असून पुनः अर्वाचीन काळींहि विद्यमान आहेत; यास्तव त्यांचा प्राचीन इतिहास आहे व अर्वाचीनहि आहे. कांहीं राष्ट्रें—फिनिशियन, खाल्डियन, मिसरी वगैरे—हीं प्राचीन काळीं मात्र विख्यात असून ग्रीक, रोमन, कार्थेजिनियन यांच्याप्रमाणें आतां त्यांचा मागमूसहि उरला नाहीं. त्यांच्या वास्तव्याच्या ज्या खुणा मागें राहिल्या आहेत त्यांवरूनच काय तें त्यांच्या अस्तित्वाचें अनुमान करावयाचें. दुसरीं अरब, इराणी, मोगल, तुर्क, शीक वगैरे अर्वाचीन काळींच उदयास आलेलीं आहेत; यांचें प्राचीन इतिहासांत नांवहि नाहीं. असो; तर वरील विषयावर लिहावयाचें ह्मणजे हे सर्व भाग त्यांत आले पाहिजेत.

३. आतां वरील सर्व राष्ट्रांच्या इतिहासांवर इंग्रेजी भाषेंत लहान मोठे ग्रंथ जरी लिहिलेले आहेतच, तरी ते सर्व सारख्या महत्त्वाचे नसल्यामुळें, व एकंदर लोकांसहि त्यांविषयीं विशेष जिज्ञासा वाटत नसल्यामुळें, येथें सर्वांविषयीं उल्लेख करीत नाहीं. प्राच्य राष्ट्रांत विद्यमान कालापर्यंत विशेष प्रसिद्ध असणारीं चार राष्ट्रें जीं आरब, इराणी, हिंदु व चीन त्यांविषयीं मात्र लिहितों.

४. पहिल्यानें आरब लोक. या राष्ट्रांविषयीं प्राचीन काळची माहिती ह्मणण्यासारखी विशेष नाहीं. यांचा देश बहुतेक वालुकामय असल्यामुळें त्यांत फार थोड्या जिनसांचें उत्पन्न होतें. यामुळें तेथील लोक अद्याप लमाणाप्रमाणें भटकणारे आहेत. आपले कळप बरोबर घेऊन ते त्या देशांत ठिकठिकाणीं फिरत असतात. यामुळेंच अरबस्थानाचा भोंवतालच्या देशांशीं फार दिवस संबंध घडला नाहीं. कारण परदेशांशीं व्यापार करण्याचें त्यांजपाशीं साधन नव्हतें. व देशाच्या कंगालपणामुळें व वालुकामय मैदानांमुळें कोणी शत्रुहि आंत चालून येण्यास धजत नसे. याप्रमाणें हे लोक दीर्घकाळपर्यंत साऱ्या जगाहून विलग राहिलेले होते. त्यांविषयींची माहिती ग्रीक व रोमन लोकांच्या ग्रंथांत मात्र कांहीं असून टॉलेमीसारख्या प्राचीन भूगोलवेत्त्यांनींहि वरील देशाचें कांहीं वर्णन केलें होतें. हा सर्व प्रकार इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंत चालू होता. पण या शतकाच्या शेवटापासून प्रस्तुत राष्ट्राचा जो अभ्युदय होऊं लागला तो अद्यापहि चालूच आहे असें ह्मटलें पाहिजे. इ. स. ५७० या वर्षीं मुसलमानांच्या राज्याचें व धर्माचें स्थापन करणारा जो त्यांचा पैगंबर महंमद त्याचा जन्म झाला; व पुढील शतकाच्या आरंभापासून वरील दोहोंचा क्रम सुरू झाला. त्या देशच्या लोकांचें स्वाभाविक जें शौर्य त्याचें धर्माच्या आवेशानें अतिशयित उत्तेजन होऊन ते जिकडे जिकडे गेले तिकडे तिकडे थोडक्याच काळांत त्यांची सत्ता पूर्णपणें स्थापित झाली; आणि ईब्रो नदीपासून तों सिंधुनदीपर्यंत महंमदी धर्माचा प्रसार एक शतकाच्या आंत होऊन गेला. पण राज्याचा विस्तार अतिशयित अवाढव्य जसजसा होत जातो तसतसें त्याच्या नाशाचें बीज त्यांत उत्पन्न होत जातें असा सामान्य नियम

आहे. त्याप्रमाणेंच महंमदाचे वंशज जे कालिफ त्यांच्याहि राज्याची अवस्था झाली. ती अशी कीं, त्यांचे सरदार दूरदूरचे मुलुख कार्बाज करून तेथल्या तेथें जसे स्थाईक होत चालले, तसतसे मूळच्या गादीस ते ओळखीतनासे होऊन हळू हळू आपला अधिकार स्वतंत्र चालविण्याची इच्छा करूं लागले; व या त्यांच्या इच्छेस त्यांचा दूरपणा अनुकूल पडला हें उघडच आहे. याशिवाय दुसरा पुढें असाहि प्रकार झाला कीं, मोगल, तुर्क वगैरे लोक जे महंमदी धर्मास अनुसरून कालिफांच्या सैन्यांत सामील झाले होते त्यांस कालेंकरून आपल्या सामर्थ्याचा अनुभव जसजसा येऊं लागला तसतसे ते आपल्या धन्यांसच डोईजड होऊं लागले; आणि त्यांनीं लवकरच कालिफाच्या फौजांस हटवून बगदाद वगैरे शहरें आपल्या हस्तगत करून घेतलीं. पुढें त्यांपैकीं एका राष्ट्रानें एशिया खंडांत मोठ्या सार्वभौमत्वास चढून दुसऱ्यानें युरोपाचें नाकें धरलें, व अद्यापहि त्याचें ऐश्वर्य तेथें अखंड चाललें आहे हें साऱ्या जगास विदित आहेच.[1]

असो; आतां वरील लोकांचा इतिहास इंग्रेजी भाषेंत कोणीं रचला आहे तो सांगतों. गेल्या अंकांत ज्याच्या ग्रंथांतून एक दोन उतारे दिले आहेत तो ऑक्ले नामक इतिहासकार वरच्यांपैकीं एक होय हें आमच्या वाचकांस कळलेंच असेल. वरील इतिहास त्यानें इ० स० १७०८ या वर्षी रचिला. आधुनिक प्राच्य राष्ट्रांच्या इतिहासावर युरोपांत झालेला हा बहुधा पहिलाच ग्रंथ असेल. हा छापून प्रसिद्ध झाला असतां त्याचा लोकांकडून कितपत आदर झाला असावा याचें अनुमान वरील इतिहासकाराची जी सदोदित विपन्न स्थिति होती त्यावरून चांगलें करतां येईल. ऑक्ले हा एवढा विद्वान् असतां व त्यांतून त्या वेळेस ज्या भाषेची एकंदर लोकांस मुळींच माहिती नव्हती त्या आरबी भाषेचा व्यासंग करून तींत तो निष्णात झाला असतां त्याच्या पदरीं इतकी गरीबी होती कीं, सावकारी देण्याबद्दल त्यास कित्येक वेळां बिनभाड्याच्या घरांत जाण्याचा प्रसंग आला. त्याच्या सर्वप्रसिद्ध इतिहासाचा कांहीं भाग वरील ठिकाणींच लिहिलेला आहे. मागें एके अंकांत मराठ्यांच्या इतिहासकाराची

---

१. नुकती दोन तीन महिन्यांपूर्वी तुर्कस्थानची, सर्विया, बलगेरिया वगैरे प्रांतांशीं निकराची लढाई होऊन तिचा काय परिणाम झाला तो आमच्या वाचकांस विदित आहेच. या लढाईच्या आरंभीं सर्वांस असें वाटून गेलें होतें कीं, रूमशामच्या राज्याचीं शंभर वर्षें खास येऊन ठेपलीं ! वरील बंडखोर प्रांतांस साऱ्या युरोपाची अनुकूलता असून रशियन लोकांचें तर त्यांस आंतून पुष्कळ साहाय्यहि होतें. तरी काय चमत्कार झाला कीं, वरील चारी प्रांतांत तुर्क लोकांच्याच सैन्यांस यश येऊन ख्रिस्ती बंडवाल्यांचा अगदीं मोड झाला. तशींच याहूनहि दुसरी अतिशय विस्मय करण्याजोगी गोष्ट नुकतीच काय घडून आली कीं, एशिया खंडांत कधीं कोणी स्वप्नींहि न ऐकिलेली जी गोष्ट कीं राजास प्रधानादि लोकांनीं पदच्युत करावें, ती बिलकूल दंगाधोपा न होतां सुलतानच्या अमीर उमरावांनीं एका चार घटकेंत कुस्तुंतुनिया शहरांत करून टाकली ! !

इंग्रेजी वाचकांकडून जी संभावना झालेली वाचकांस कळविली आहे ती ध्यानांत आणली असतां, व आजच्या घटकेस इंग्लंडांतील मोठमोठ्या विद्वान् पुरुषांस खुद्द हिंदुस्थानाविषयींहि किती चोख माहिती आहे तिचा अंमळ विचार केला असतां, आरब लोकांचा इतिहास सुमारें दोनशें वर्षांपूर्वी कितीसा खपण्याचा संभव आहे हें सहज लक्षांत येईल. असो; तरी या अडचणी न जुमानतां वरील इतिहासकारानें आपला उद्योग शेवटास नेला. आरब लोकांचा उदय कसा झाला व त्यांनीं कोणकोणते अद्भुत पराक्रम केले हें समजण्याची त्याच्या देशबांधवांस बिलकुल इच्छा नव्हती, तरी पुढील काळावर नजर देऊन महंमदाचें चारित्र व कालिफाची कारकीर्द हीं त्यानें वर्णिलीं. प्रस्तुत इतिहासाची भाषासरणीहि मनोवेधक आहे; तिजमुळें मागें सांगितलेल्या कित्येक नामांकित ग्रंथांप्रमाणें याच्या वचनाचे श्रमहि वाचकांस विशेष भासत नाहींत. तरी पाश्चात्यांच्या उपेक्षाबुद्धिस्तव गिबनच्या वेळेपर्यंत प्रस्तुत इतिहासाकडे कोणाचें फारसें लक्ष लागलें नव्हतें. गेल्या शतकाच्या शेवटीं शेवटीं वरील महाविख्यात इतिहासकारानें रोमच्या बादशाहीच्या वर्णनांत तिचा विध्वंस करणारे जे मुसलमान लोक त्यांचा वृत्तांत जेव्हां लिहिला, तेव्हां सहजच त्या राष्ट्रांचा आद्य इतिहास लिहिणारा जो ऑक्ले त्याच्या ग्रंथासहि लोकमान्यता येऊं लागली. ती तेव्हांपासून वाढून यापुढेंहि कालगत्या अधिक होत जाईल यांत संशय नाहीं; कां कीं दिवसेंदिवस पाश्चात्यांचा व प्राच्यांचा संबंध दृढतर होत चालल्यानें दोघांसहि परस्परांविषयीं जिज्ञासा होणें हें सहजच आहे. असो; तर आरब लोकांचा इतिहास इंग्रेजी भाषेंत प्रथम जो लिहिला गेला त्याचा प्रकार वरच्यासारखा झाला. त्यापुढील ग्रंथ वर सांगितलेला गिबनचा प्रचंड इतिहास होय. याविषयींची माहिती मागें प्रसंगानुरोधानें जी दिली आहे तिजवरून वाचकांस कळलेंच आहे कीं, त्यांत प्रस्तुत राष्ट्राचा व तद्धर्मी इतर लोकांचाहि इतिहास अंतर्भूत झाला आहे. आरबस्थानांत नवीन धर्माची व नवीन राज्याची स्थापना होऊन दोहोंचा प्रसार भराभर होत जाऊन त्यापुढें रोमची बादशाही व तिनें नवा अंगीकारलेला ख्रिस्ती धर्म हीं दोन्ही कशीं निस्तेज पडत चाललीं, 'धर्म-

१. निजाम सरकारचे प्रख्यात दिवाण सर सालरजंग नुकतेच विलायतेस गेले होते त्या वेळेस वरील गोष्टींचें एक थक्क होऊन रहाण्यासारखें उदाहरण घडून आलें. वरील नबाबसाहेबांचा इंग्लंडांत जेथें तेथें केवढा मानमरातब झाला, व एके प्रसंगीं तर तेथील अधिराज्ञीनें त्यांचा केवढा सत्कार केला हें सर्वांस विदित आहेच. हा प्रकार चालला असतां मार्किस आफ हार्टिंगटन, जे हौस आफ कामन्सचे ग्लाडस्टनच्या मागें मुख्य सभासद झाले आहेत, त्यांनीं कोणास असा प्रश्न केला कीं, "हा सालरजंग, सालरजंग ह्मणतात, हा आहे तरी कोण?"—कोणीं उत्तर केलें "निजामाचा दिवाण."—"बरें, पण हा निजाम तरी कोण आहे?" इंग्रेजी पत्रकर्त्यांनीं जर ही बातमी लिहिली नसती तर कोणास क्षणभर तरी खरी वाटती काय!!

युद्धें' ह्मणून दोन शतकें जी मारामारी व तोडातोडी चाललली होती तिचा एकंदर वृत्तांत काय झाला, व शेवटीं सन १४५३ सालीं रूमशामचें तख्त तुर्क लोकांच्या हातीं लागून सगळें युरोपखंड कसें थरारून गेलें, ही सर्व हकीकत वरील इतिहासकर्त्यानें सविस्तर वर्णिली आहे. असो; वरील दोघां इतिहासकर्त्यांखेरीज तिसराहि अलीकडे प्रसिद्ध झाला आहे;–तो वाशिंगटन इरविंग हा होय. या अमेरिकन ग्रंथकारानें मोठ्या सुरस भाषेंत महंमदाचें चरित्र, त्याच्या पुढें जे राज्यकर्ते झाले त्यांचा वृत्तांत, स्पेन देशांतील मुसलमानी राज्याचा इतिहास, वगैरे कित्येक ग्रंथ केले आहेत. सामान्य वाचकांच्या अभिरुचीस ह्मटलें ह्मणजे मागील दोहोंच्या पेक्षां वरील चित्तवेधक व संक्षिप्त वृत्तांतच अधिक अनुरूप होत हें उघड आहे.

५. दुसरें राष्ट्र इराण देशांतील लोक. या राष्ट्राचा इतिहास मोठा चमत्कारिक आहे. इराणचे मूळचे रहिवाशी प्राचीन पारसीक होत.[1] यांचें वास्तव्य हल्लीं आमच्या देशांत मात्र अंशतः आहे. येथें ते आल्यास बाराशेंहून अधिक वर्षे होऊन गेलीं. यांच्या प्राचीन इतिहासाची माहिती अतःपर फारशी मिळण्याचा बिलकूल संभव दिसत नाहीं. तरी जी थोडीशी आज मिळालेली आहे तिजवरून व एरवीं अनेक प्रमाणांवरून एक मोठी गोष्ट अगदीं स्पष्ट होते कीं, हे लोक प्राचीन आर्यशाखेचे होत. भाषासाम्यावरून व पुष्कळ आचारांच्या सादृश्यावरून प्राचीन हिंदु व प्राचीन पारसीक यांचा पूर्वी फार निकट संबंध असावा हें उघड दिसतें.[2] असो; या राष्ट्राची आज जगास

---

१. वरील शब्द प्रस्तुत पुस्तकांत आह्मीं जागोजाग जो घातला आहे त्याचें कारण मागें एके ठिकाणीं सुचविलेंच आहे. 'इराणी' या शब्दानें सांप्रतचे रहिवाशी मुसलमान, व 'पारशी' या शब्दानें येथें येऊन राहिलेले लोक बोधित होतात; वास्तव आमच्या जुन्या संस्कृत ग्रंथांतून वरील लोक ज्या नांवानें प्रसिद्ध आहेत तेंच योजणें प्रस्तुतसारख्या प्रसंगीं प्रशस्त दिसतें. वरील स्थळें हीं होत—

पारसीकांस्ततो जेतुं प्रतस्थे स्थलवर्त्मना ।

रघुवंश ४.

कौलूतश्चित्रवर्मा मलयनरपतिः सिंहनादो नृसिंहः
काश्मीरः पुष्कराक्षः क्षतरिपुमहिमा सैंधवः सिंधुषेणः ।
मेघाख्यः पंचमोऽस्मिन् पृथुतुरगबलः पारसीकाधिराजो
नामान्येषां लिखामि ध्रुवमहमधुना चित्रगुप्तः प्रमार्ष्टु ॥

मुद्राराक्षस १.

याप्रमाणेंच 'कादंबरी'तील नायक जो चंद्रापीड त्याचा इंद्रायुध नांवाचा घोडा त्याच्या बापास पारसीकांच्या राजाकडून नजर आला होता असें त्या ग्रंथांत लिहिलेलें सांपडतें.

२. संस्कृत भाषेचें व इराणांतील प्राचीन झेंड भाषेचें साम्य तर किती निकट आहे हें

(पुढें चालू).

जी कांहीं थोडी बहुत माहिती आहे ती केवळ त्यांचे चिरकालीन शत्रु जे ग्रीक लोक त्यांच्या ग्रंथांवरूनच होय; यास्तव ती सर्वथा खरी असण्याचा संभव नाहीं हें सांगणें नकोच. तरी ज्या अर्थी वरील ग्रंथांखेरीज दुसरी गतिच नाहीं, त्या अर्थी तीच कार्य आहे ती मान्य करणें अवश्य होय. यास्तव तिजवरूनच ती पुढें संक्षेपतः देतों.

कोणतेंहि राष्ट्र उदयास येण्यास त्यांत कोणी मोठा बुद्धिमान् पुरुष उत्पन्न व्हावा लागतो, कीं ज्याचें वजन साऱ्या लोकांवर बसून त्यांच्या वर्तनास त्यास नवेंच वळण लावून देतां येतें. असा पुरुष इराण देशांत सायरस नामेंकरून एक विख्यात राज्यकर्ता झाला. यानें त्याचे देशवासी जे पूर्वी रानटी व भटकणारे होते त्यांस आपलेसे करून घेऊन त्यांचें एक मोठें बलाढ्य राष्ट्र बनवलें. पुढें लवकरच या लोकांनीं आपल्या देशाचें पूर्ण आधिपत्य पावून शेजारचीं कित्येक राज्येंहि काबीज केलीं.[1] याप्रमाणें वाढतां वाढतां पारसीकांचा अंमल हल्लीं ज्यास एशिया मैनर ह्मणतात तो देश, सिरिया, पालेस्टाइन, मिसर देश, भूमध्य समुद्राच्या पूर्वभागाचीं बेटें, ग्रीस देशाच्या उत्तरचा मुलूख, व येथील पंजाबाजवळचा कांहीं प्रांत येथपर्यंत वाढला. पण राज्यतृष्णा मोठी दुर्धर आहे; तीस जों जों तृप्त करूं जावें तों तों ती उलटी अनावरच होत जाते. याप्रमाणेंच पार्सदेशीय राजांसहि वरील अवाढव्य राज्यानें संतोष न होतां त्यांचा युरोपांत प्रवेश होतांच तेथीलहि देश पादाक्रांत करण्याचा त्यांनीं उद्योग आरंभिला. डेरायस राजानें मोठें सैन्य मिळवून ग्रीस देशावर चाल केली; पण मारेथन येथें त्याचा मोठा पराभव होऊन त्यास माघारें जावें लागलें. डेरायसच्या पुढें झर्सीज हा गादीवर बसला. याच्या अंगीं बापाचें शौर्य मुळींच नसून नुसती भपकी मिरवावी एवढीच त्यास मोठी आवड होती. या हौशीप्रमाणें त्यानें एक मोठी अफाट फौज तयार करून आपल्या बापाचा मनोरथ सिद्धीस नेण्याचा आव घातला. वीस लक्ष लोक व बाराशें जहाजांचें आरमार, शिवाय लक्षावधि सेवक

भाषाभिज्ञांस विदितच आहे, उदाहरणार्थ असुर (अहुर), मिश्र (मित्र). पारशी धर्माचा गुरु जो झोरास्टर त्याचें मूळचें नांव 'जरदुष्ट्र' अशासारखें कांहीं आहे; व त्याचा अर्थ 'सोन्याचा उंट' असा आहे असें समजतें. पारशांच्या धर्मग्रंथाचें नांव 'जेंदावेस्ता' असें आहे. याची दशा आमच्या वेदाहूनहि वाईट आहे. ती अशी कीं, तो समजण्यास कोशाचें साधन नाहीं व व्याकरणाचेंहि नाहीं. तेव्हां नुसत्या अटकळीनें काय अर्थ बसेल तो त्यांतून काढायाचा ! पारशी हे प्राचीन आर्यांसारखे अग्नीचे उपासक असून ब्राह्मणांच्या यज्ञोपवीताप्रमाणें बहात्तर पदरांचें एक उर्णासूत्र त्यांच्या अंगावर असतें हेंहि सर्वत्र प्रसिद्धच आहे.

१. सायरस यानें मीडिया व लिडिया हीं दोन राज्यें पहिल्या प्रथम घेतलीं. लिडियाचा राजा अपार संपत्तीविषयीं प्रख्यात जो क्रीसस तो होता. याची इतिहासांत प्रस्तुत प्रसंगाच्या संबंधाची एक मोठी चमत्कारिक गोष्ट प्रसिद्ध आहे. ती पुढें 'विनोद, महदाख्यायिका' या सदरांत सांगण्यांत येईल.

व बाजारबुणगे, अशा थाटानें त्यानें हेलेस्पांटचा समुद्र ओलांडून ग्रीस देशावर धाड घातली. ही वार्ता ऐकून सगळे ग्रीक लोक अगदीं भयभीत होऊन गेले. दोन संस्थानांनीं मात्र धैर्य धरून शत्रूशीं सामना घालण्याची तयारी केली: हीं संस्थानें आथेन्स व स्पार्टा हीं होत. या दोहोंचेंहि शौर्य सारखेंच होतें; तरी पहिल्याचें प्राबल्य विशेषतः समुद्रावर व दुसऱ्याचें जमीनीवर असें होतें. त्याप्रमाणें स्पार्टन लोकांनीं थर्मापिलीचें नाकें रोखिलें, व आथीनियन लोक आर्टीमिसियम येथें शत्रूच्या जहाजांचा रस्ता आडवून बसले. या दोहों ठिकाणीं ग्रीक लोकांनीं पारसीकांस आपल्या शौर्याचा चांगला मासला दाखविला; पण शेवटीं त्यांच्या अफाट सैन्यापुढें व आरमारापुढें त्यांचा टिकाव न निघून त्यांस माघारीं हटावें लागलें. या थोड्याशा जयानेंहि मोठा उत्साह पावून झर्सीज राजानें पुढें चाल केली, व आथेन्स शहर जाळून टाकिलें. याप्रमाणें एका शत्रूचा पाडाव होऊन लवकरच सगळ्या ग्रीस देशास पारसीकाधिराजाच्या पायाशीं शरण जावें लागतें असा सुमार दिसूं लागला. पण इतक्यांत ग्रीक लोकांच्या देवतांस दया येऊन त्या आपल्या भक्तांच्या रक्षणार्थ पारसीकांवर अत्यंत कोपायमान झाल्या. समुद्रावर मोठें भयंकर तुफान तीन दिवस सारखें सुटून त्यांचीं जहाजें एकमेकांवर हापटून व तुटून फुटून पार झालीं. येणेंकरून त्यांच्या आरमाराची भारी नासाडी झाली असतां व आरमारावरील राहिलेले लोक अगदीं हवालदील होऊन गेले असतां ग्रीक लोक त्यांच्यावर चालून गेले. ही मोठी लढाई सालामिस नांवाच्या खाडींत झाली. ती खाडी अगोदर अरुंद, त्यांतून ते खलाशी लोक नाउमेद होऊन गेलेले; तेव्हां अर्थातच ग्रीक लोकांस लढण्याची चांगली सोय सांपडून त्यांनीं झर्सीज राजाच्या आरमाराचा अगदीं मोड करून टाकला. हें झाल्यानंतर लागलीच जमीनीवरहि ग्रीक लोकांनीं शत्रूवर हल्ला केला. प्लेटिया येथें मोठी लढाई होऊन तीनंतर त्यांच्या हातीं पुष्कळच मोठमोठी उंची लूट सांपडली. याप्रमाणें ज्या अगणित सैन्यासहवर्तमान झर्सीज राजा ग्रीस देशावर मोठ्या समारंभानें चालून आला होता त्याची वर सांगितल्याप्रमाणें कांहीं मनुष्यप्रयत्नानें व कांहीं अमानुष प्रभावानें अशी दोहोंच्या योगानें अगदीं वाताहत होऊन गेली; व बाराशें जहाजें सजवून ज्यानें पहिल्यानें प्रयाण केलें त्यास सरते शेवटीं एका कोळ्याच्या होडींत बसून आपल्या देशास परत जावें लागलें! असो; तर याप्रमाणें पार्स देशच्या राजांनीं आपल्या ऐश्वर्याच्या घमेंडीवर जाऊन त्यांच्या पुढें क्षुद्र दिसणारा जो ग्रीस देश त्याच्या शासनार्थ वर सांगितल्याप्रमाणें दोन मोठे अवडंबराचे प्रयत्न केले. पण दोन्ही अगदीं निष्फळ होऊन सरते शेवटीं त्यांचेंच दुर्बलत्व मात्र साऱ्या जगास विदित झालें.[1] यापुढेंहि पुष्कळ

१. एशियाखंडांतील राष्टें दुर्बळ, इकडील हजार लोक असले तर युरोपांतले दहा पट्टे (पुढें चालू).

काळपर्यंत वरील राष्ट्रांचा परस्पर बराच संबंध होता. पारसीकांचा देश मोठा समृद्ध असल्यामुळें त्यांजपाशीं द्रव्याचें मोठें जबर्दस्त साधन असे. त्याच्या योगानें साक्षात् युद्ध करून जें कार्य झालें नाहीं तें त्यांस सहज साध्य होत गेलें. तें असें कीं, ग्रीसच्या संस्थानांची वरील साधनानें परस्पर कलागत लावून देऊन त्यांस आपलें वर्चस्व राखतां आलें, व त्यांजपासून एरवीं जो त्यांच्या राज्याला धोका येता तो त्यांस टाळतां आला. पण हीहि थावराथावर फार वेळ करतां येईना. पहिल्यानें स्पार्टाच्या राजांनीं व पुढें मासिडन संस्थानचें आधिपत्य सगळ्या ग्रीस देशावर झालें असतां फिलिपचा पुत्र शिकंदर यानें पारसीकांच्या मुलुखावर स्वाऱ्या केल्या. शिकंदर बादशाहाचें चरित्र साऱ्या जगभर गाजलेंच आहे. त्यानें थोडक्या फौजेनिशीं हेलेस्पांट उतरून शत्रूचा जो पिच्छा पुरविला तो शेवटीं त्यांचें राज्य उलथून टाकून त्याखालीं असणारे दूरदूरचे मुलुख जे मिसर देश, पंजाब वगैरे तेथपर्यंतहि आपले झेंडे मिरवीत नेले. असो; तर याप्रमाणें जें संस्थान ग्रीसच्या स्वातंत्र्यास बाधक झालें त्यानेंच सरते शेवटीं पारसीकांचें राज्य धुळीस मिळविलें. यानंतरचा प्रस्तुत राष्ट्राचा इतिहास वरच्या इतका प्रसिद्ध नाहीं. तरी शिकंदराच्या नंतर जीं अनेक संस्थानें स्थापित झालीं तीं रोमन लोकांनीं कालेंकरून उध्वस्त करून टाकिलीं असतां त्यांची कस्तुंतुनिया येथें जी एक बादशाही स्थापिली गेली तिच्या पार्स देशच्या राजांशीं पुष्कळ लढाया झालेल्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत. या लढाया अगदीं शेवटपर्यंत ह्मणजे दोन्ही राज्यांच्या पाळ्यामुळ्या खणून काढणारें एक शेजारचें तिसरेंच राज्य एकाएकीं उपस्थित होईतोंपर्यंत चालल्या होत्या. यावरून असें दिसतें कीं, शिकंदरानें प्रस्तुत राष्ट्रास राजपदभ्रष्ट करून टाकल्यावरहि कांहीं काळानें त्याची स्थिति त्यास पुनः प्राप्त झाली होती. याच सुमारास खुसरू ह्मणून एक विख्यात राज्यकर्ता जो या लोकांत होऊन गेला तो झाला. याचें दुसरें नांव नशिरवान असेंहि प्रसिद्ध आहे.[1] यानेंच राज्य चाललें असतां मक्केत

त्यांचा समाचार घेण्यास बस आहेत, या पोकळ समजुती वरील दोन युद्धांपासून बहुधा पडत गेल्या असाव्या. पण या ठिकाणीं आमच्या पाश्चात्यांनीं अंमळ विचार केला असतां कळणार आहे कीं, युरोपांतल्या युरोपांतहि वरच्यासारखे प्रकार घडले नाहींत असें नाहीं. नेपोलियनाची १८१२ सालीं काय दुर्दशा झाली! इंग्लंडावर 'आर्जिक्य' ह्मणून विडा उचलून जें प्रचंड आरमार आलें होतें त्याची काय वाताहत झाली? व खुद्द इंग्लिश लोकांचीच फ्रान्स देशांतल्या एक गांवढळ मुलीनें दोन तीन वर्षांत काय मौज करून दिली!! मग या सर्व गोष्टींवरहि वरच्यासारखे तर्क कां बसवूं नयेत?

१. 'खुसरूचें चरित्र' ह्मणून एक ग्रंथ दहा वीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध होता तो आतां बहुधा कोणाच्या ऐकण्यांतहि नसेल. आमच्या भाषेंत अगोदर ग्रंथ थोडे; आणि त्यांतून जे मोठ्या पंचाइतीनें प्रसिद्ध होतात त्यांचें रक्षणहि होण्याची ह्मणण्यासारखी अद्याप सोय

(पुढें चालू).

महंमदाचा जन्म झालां. असो; यापुढील वृत्तांत वर सांगण्यांत आलाच आहे; कीं, आरब लोक आपल्या देशांतून निघून सिरिया, पालेस्टैन वगैरे प्रांत त्यांनीं सपाट्यासरसे जिंकून इराणहि एका मोहिमेंत सर करून टाकला. ही गोष्ट इ०स०६३५ या वर्षीं घडली.[1]

यानंतरचा इराण देशाचा इतिहास वस्तुतः आरबस्थानच्या इतिहासाचाच एक भाग होय. कां कीं, महंमदाचे अनुयायी हे मूर्तिपूजेचे द्वेष्टे असल्यामुळें त्यांनीं तेथील धर्म बुडवून पारसीकांच्या शेंकडों वर्षे जळत राहिलेल्या अगेऱ्या पार विझवून टाकल्या; व आपला अंमल तेथें असा पक्का बसवून टाकला कीं, सगळ्या राष्ट्राचें स्वरूपच कालें-करून पालटून गेलें. ह्मणजे अमेरिकेची युरोपियन लोकांनीं जी दशा करून टाकली आहे, व येथें गोंव्याची जी आज कित्येक शतकें स्थिति झाली आहे, तीच प्रस्तुत देशाची आज सुमारें बाराशें वर्षें होऊन राहिली आहे. मूळचे धर्मभ्रष्ट झालेले रहि-वाशी व नवे असलेले मुसलमान लोक यांत मुळींच तफावत नसून सगळ्या एकंदर लोकांचे आचारविचार वगैरे केवळ महंमदी होऊन गेले आहेत. तेथील धर्म शिया हा आहे. या पंथाचें व सुन्नी ह्मणून त्याच्या विरुद्ध जो दुसरा मोठा पंथ आहे त्याचें परस्पर अतिशयित वांकडें असल्यामुळें हिंदुस्थानचा बादशाहा व तुर्कस्थानचा सुलतान हे दोघेहि इराणच्या शहाचे वैरी असत, व सध्यां त्यांपैकीं एक आहे. यामुळें इराणचे वरील दोहोंशीं अनेक वेळां युद्धप्रसंग झाले आहेत.[2] असो; इराणच्या इतिहासाच्या या

नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. पुष्कळ चांगले चांगले ग्रंथ आजहि अप्रसिद्ध झाल्या-सारखे असून कांहीं काळानें बहुधा नाहींसेहि होतील. असो; वरील पारसिक राजानें 'हितो-पदेशा'चें भाषांतर आपल्या देशभाषेंत करून घेण्यासाठीं केवढी खटपट केली, व या लहा-नशा गोष्टीवरून संस्कृत कवींचा काळ बसविण्याचें चांगलें साधन कसें मिळतें याविषयीं दुसरे ठिकाणीं लिहिलेंच आहे. वरील वृत्तांताचें प्रमाण पाहिजे असल्यास **गिबन**चा इतिहास भाग ४२ पहावा. त्यावरून वरील लहान ग्रंथाचा प्रसार कोठपर्यंत होत गेला हें कळून येईल.

१. या वर्षींच हिंदुस्थानांतील पारशांचे पूर्वज जहाजांत बसून गुजराथेच्या कडेस येऊन लागले. तेथील हिंदु राजानें त्यांकडून कांहीं धर्मसंबंधीं अटी कबूल करून घेऊन त्यांस आश्रय दिला. तेव्हांपासून या लोकांचा पूर्वीचा क्रम सर्व पालटून त्यांनीं गुजराथी भाषा व त्या लोकांचें वाणिज्यकर्म हीं दोन्ही पतकरलीं; तीं अद्याप तशींच निर्बाध चाललीं आहेत. अनाथ होऊन शरण आलेल्या राष्ट्रास आश्रय देणें, व त्या लोकांनीं शेंकडों वर्षेंचीं वर्षें बिल-कुल दंगाधोपा न करतां आपल्या द्वितीय जन्मभूमींत सुजनतेनें कालक्रमण करणें, या दोन्ही गोष्टींचें इतिहासांत दुसरें उदाहरण बहुधा नाहींच !

२. ख्रिस्ती धर्मांत क्याथलिक व प्रॉटेस्टंट हे जसे दोन मोठाले तट आहेत त्याप्रमाणें मुसलमानांत वर सांगितलेले दोन-ह्मणजे सुन्नी व शिया—हे आहेत. ही दुफळी चवथा कालिफ अल्ली याच्या वेळेपासून झाली. सुन्नी पंथाच्या लोकांचें मत असें आहे कीं, महंमदा-च्या पुढें अबू बेकर, ओमर, ओथमान व अल्ली हे चार जे कालिफ झाले त्यांचा तक्तावर हक्क

(पुढें चालू).

उत्तर भागांत पहिल्याप्रमाणें विशेष सांगण्यासारख्या मोठमोठ्या गोष्टी कोणत्याहि घडलेल्या नाहींत, यास्तव त्यांविषयीं कांहीं लिहिणें नको.

आतां प्रस्तुत राष्ट्राचा इतिहास इंग्रेजी भाषेंत कोणत्या प्रकारचा आहे हें मागील मजकुरावरून कोणाच्याहि लक्षांत तेव्हांच येईल. इंग्रेजी भाषेंत जुन्या ग्रीक व रोमन ग्रंथकारांचीं भाषांतरें अनेक वेळां झालीं आहेत; तेव्हां त्यांत हिराडटस, जिनोफन यांनीं पारसीकांशीं झालेल्या लढायांचा वृत्तांत जो दिला आहे तो आलाच आहे. शिवाय मागें सांगितलेल्या ग्रोट वगैरे इंग्रेजी इतिहासकारांनीं वरील इतिहासांचा आधार घेऊन स्वतंत्र ग्रंथ केले आहेत, त्यांतहि प्रस्तुत राष्ट्राची हकीकत आहेच. तसाच पुढील काळाचा ह्मणजे शिकंदर बादशाहानें पारसीकांच्या राज्याची समाप्ति केल्यानंतरचा इतिहास पहाणें असल्यास तो गिबनच्या ग्रंथांत आहे; व अगदीं अलीकडील बादशाहांची कारकीर्द सर जॉन मालकम यानें 'इराणचा इतिहास' या ग्रंथांत वर्णिली आहे. हा ग्रंथ वरील साहेबानें फारशी ग्रंथांवरून रचला आहे.

येथवर आरबस्थान व इराण यांच्या इतिहासांविषयीं निरूपण केलें. आतां तिसरें राष्ट्र जे एतद्देशीय हिंदु लोक त्यांच्या इतिहासाविषयीं लिहावयाचें.

६. या राष्ट्राची उत्पत्ति मनुष्यजातीच्या साऱ्या शाखांत मुख्यत्वेंकरून गणलेली जी आर्यशाखा तिजपासून होय; किंबहुना त्या शाखेची उपशाखा मुख्य हीच असावी असाहि पुष्कळ संभव आहे. या आर्य लोकांचें मूळ ठिकाण युरोप व एशिया यांच्या मध्यंतरीं कोठें तरी असावें असा अर्वाचीन भाषाशास्त्रज्ञांचा सुमार आहे, व तेथून दोहोंकडे या लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या दूरदूरपर्यंत वसाहत करण्यास गेल्या असाव्या असें अलीकडे सर्वांचें मत झालें आहे. यांपैकीं एक टोळी पूर्वेकडे येऊन इराण देशांत स्थाईक झाली; व दुसरी पुढें पंचनद देशांत जाऊन तो सुपीक देश तिनें वसाविला असावा. ही प्राचीन हिंदु लोकांची मूळ जागा होय.[1] तेथून ते क्रमाक्रमानें सगळ्या देशभर

होता व त्यांस राज्य मिळालें तें बरोबर मिळालें. शियांच्या मतें हे चवघे जण जबरदस्तीनें कालिफ झाले, त्यांचा हक्क मुळींच नव्हता. याशिवाय वरील पंथाचे धर्मकर्मांतहि अल्पस्वल्प भेद आहेत. असो; हिंदुस्थानचा बादशाहा हुमायून हा पदभ्रष्ट होऊन इराणच्या राजापाशीं आश्रय धरून राहिला असतां त्यानें आपल्या मतांतरेंकरून त्यास अनुकूल करून घेतलें ही गोष्ट आमच्या वाचकांस माहीत असेलच. त्याप्रमाणेंच पुढें नादिरशाहानें दिल्लीवर स्वारी केली तीहि इतिहासप्रसिद्ध आहे.

१. प्राचीन आर्यांचें मूळ पीठ पंजाबाकडचा प्रदेश असावा यास पुष्कळ प्रमाणें आहेत. पहा कीं, सूर्यवंशी व चंद्रवंशी राजांच्या राजधान्या ज्या अयोध्या व हस्तिनापुर त्या हिंदुस्थानच्या उत्तर भागासच आहेत. त्याप्रमाणेंच मोठमोठीं क्षेत्रें व तीर्थें सारीं तिकडेच आहेत. शिवाय पाणिन्यादि प्राचीन मुनि पंजाबाकडीलच रहाणारे होते. पाणिनीस 'शालातूरीय' ह्मणजे 'शालातूर (लाहोर ?)चा रहाणार' अशी संज्ञा दिलेली महाभाष्यादि ग्रंथांतून आढळते.

पसरले. आतां या वेळची आमच्या पूर्वजांविषयींची माहिती सध्यां लोकांत कितपत आहे व ती कशावरून आहे याविषयीं कांहीं लिहितों.

प्राचीन आर्यांच्या आचारांविचारांविषयीं ज्ञान होण्याचा मुख्यग्रंथ कोणता तो साऱ्या जगास विदित आहे. हा ग्रंथ ऋग्वेद होय. याच्याविषयीं गेल्या अंकांत आमच्या वाचकांस बरीच माहिती दिली आहे; यास्तव त्या संबंधानें येथें कांहीं अधिक लिहीत नाहीं. वेदांच्या खालोखाल स्मृति, व स्मृतींच्या पुढें पुराणें. या तिहींवरून एतद्देशीय लोकांच्या प्राचीन स्थितिरीतींविषयीं जी काय माहिती होणें तीं व्हावयाची. आतां वरील तिन्ही ग्रंथसमुदायांचीं नांवें तेव्हांच घेतां आलीं, पण त्यांतील विषय केवढा विस्तीर्ण आहे व त्याचें नुसतें पर्यालोचन होणेंहि केवढें श्रमाचें काम आहे, याची कोणाहि समंजस मनुष्यास कल्पना झाल्याशिवाय रहावयाची नाहीं. मग त्यांचें समग्र अध्ययन तर केवढें दुर्घट किंबहुना अशक्य होय हें उघडच आहे. तें अनेक पंडितांनीं जेव्हां आपआपणावर वांटून घ्यावें तेव्हां मात्र दीर्घ काळाअंतीं साध्य होणार. या उद्योगाकडे आज कित्येक वर्षें पाश्चात्य पंडितांचें लक्ष लागून तो सिद्धीस नेण्याविषयीं त्यांचे प्रयत्न सतत चालू आहेत. यांत त्यांच्या परिश्रमाप्रमाणें बरेंच यशहि येत चाललें आहे; पण तें पूर्ण येण्यास एका मोठ्या गोष्टीची अद्याप उणीव आहे. ही उणीव एतद्देशीय लोकांचा उद्योग होय. आमच्याच देशांतील लोक आपल्या पूर्वजांविषयीं जेव्हां उत्साहानें ज्ञान संपादन करूं लागतील व प्राचीन ग्रंथांचें शोधपूर्वक समग्र अध्ययन करतील तेव्हां मात्र वरील उद्योगास विशेष निश्चितता येऊन तो अधिक झपाट्यानेंहि चालेल. आजपर्यंत चालत आलेली स्थिति अशी आहे कीं, आमच्या प्राचीन इतिहासाविषयीं वगैरे जे अनेक शोध करावयाचे ते ज्यांनीं हा देश नकाशावरून मात्र पाहिलेला, येथील लोकाचार वगैरे ज्यांनीं पुस्तकांत मात्र वाचलेले, व संस्कृत भाषा इंग्रजी लिपीनें वाचून ती बोललेली ज्यांनीं स्वप्नींहि ऐकिलेली नाहीं,[1] — अशा लोकांनीं करावयाचे.

---

१. सुमारें एका वर्षापूर्वी इंग्लंडांतील प्रसिद्ध प्रोफेसर मॉनियर विलियम्स येथें आले असतां त्यांच्या निमित्त येथें जी सभा झाली होती तींत वरील गोष्ट प्रोफेसर मजकुरांनीं स्पष्ट सांगितली. त्यांचें पहिल्यानें इंग्रजींत भाषण होऊन त्यावर येथील एका पंडितानें त्यांस उद्देशून संस्कृतांत भाषण केलें; पण त्यास त्याच भाषेंत उत्तर देण्याची साहेबांस मोठी पंचाईत पडली. तेव्हां इंग्रजींतच प्रत्युत्तर देऊन विलियम्स साहेब म्हणाले कीं, "मी आज वीस वर्षें ऑक्सफर्ड येथें संस्कृताचा प्रोफेसर आहें व व्याकरण, कोश व इतर कित्येक ग्रंथ मीं रचले आहेत, असें असतांहि मला संस्कृतांत बोलतां येऊं नये याचें तुह्मां सर्वांस मोठें नवल वाटेल; पण आमची शिकण्याची तऱ्हा तुह्मांस माहीत नाहीं. आमचें संस्कृताचें ज्ञान केवळ पुस्तकावरून असतें; तीं भाषा बोलण्याचा आह्मांस कधींच प्रसंग येत नाहीं. संस्कृत शब्द बोललेले ऐकण्याचा हाच माझा पहिला प्रसंग आहे."

अशांस आमचे पुरातन ऋषि मिसर देशांतील मसाल्यांत जतन करून ठेवलेल्या प्रेतांप्रमाणें किंवा भूगर्भशास्त्रसंबंधीं संग्रहालयांत ठेवलेल्या अस्थिमय प्रचंड प्राण्यांप्रमाणेंच केवळ असून त्यांविषयीं त्यांस यथार्थ समजुती होणें व त्यांच्याविषयीं हुबेहूब कल्पना मनांत उठणें हें दुरापास्तच होय. याच कारणामुळें संस्कृताच्या अभ्यासास तिकडे असावें तसें उत्तेजन नाहीं व एकंदर लोक तर त्याविषयीं केवळ उदासीन आहेत. पण तेंच आह्मीं स्वतः जर वरील उद्योग करण्याचें आरंभिलें तर आह्मांस किती गोष्टींची अनुकूलता आहे? आमचा नित्यक्रम व साहजिक विचार हे आमच्या पूर्वजांच्या ग्रंथांवर सदोदित जवळ असणाऱ्या जणूं काय टीकाच होत; कोणताहि शोध करायाचा असला किंवा एखादा ग्रंथ मिळवायाचा असला, तर तें आह्मांस किती अल्प आयासानें साध्य होणार आहे; तशीच गुरुशिष्यपरंपरेनें पूर्वीपासून चालत आलेली जी व्याख्यानाची रीति व ग्रंथांतरीं न आढळणारी अशी अनेक प्रकारची माहिती ती आह्मांशिवाय दुसऱ्या कोणास प्राप्त होणार आहे? याशिवाय एतद्देशीय लोकांस संस्कृताचें अध्ययन इतरांपेक्षां अत्यंत सुलभ असून जुन्या ग्रंथांचें मर्मज्ञान व त्यांतील रसाचें ग्रहणहि अनायासें करून होणार आहे हेंहि उघड आहे. आतां हें खरें कीं, या सर्व सोयी असूनहि सध्यां आढळणाराच प्रकार जर पुढें चालत गेला, तर त्या आह्मांस असून नसून सारख्याच. सध्यांचा प्रकार सर्वांस माहीत आहेच, कीं आमच्या जुन्या विद्येविषयीं कोणासहि ह्मणण्यासारखा अभिमान वाटत नसून तिच्या प्रीत्यर्थ परिश्रम करण्याची तर बहुधा कोणासहि उत्सुकता नाहीं. विद्यालयांतून जे संस्कृतज्ञ बाहेर पडतात त्यांचें ज्ञान केवळ परीक्षेकरतांच संपादन केलेलें असल्यामुळें बहुधा लवकरच ऱ्हास पावायाला लागतें; तें पुढें वाढविण्याची इच्छा तर फारकरून कोठेंच दृष्टीस पडत नाहीं. त्यांखेरीज इतर जे कोणी बाह्यात्कारी प्राचीन आर्यविद्येचें मोठें गौरव करतात व तिच्या संपादनार्थ मोठा परिश्रम करिताहेतसे दिसतात त्यांची भक्ति तरी निरपेक्षतेची किंवा विशेष प्रेमाची असते असें नाहीं. त्यांचे गुप्त हेतु पाहिले तर बढतीची इच्छा किंवा निदान डौल मारण्याची हौस याच्यापेक्षां फारसे निराळे नसतात. कोणत्याहि शास्त्रांत चंचुमात्र प्रवेश होऊन उगाच टफ करण्याचें सामर्थ्य आलें न आलें पुरे, कीं लगेच त्या शास्त्रावर भरसभेंत व्याख्यानें, मासिक पुस्तकांतून निबंध वगैरे सुरू झालेच; एखाद्या सामान्य ग्रंथाच्या दोन पंक्ति लावण्याची सुद्धां मारामार कां असेना, वेदशास्त्रोत्तेजक सभेंत परीक्षकाचें स्थान आपलें पटकावयाचें; तसेंच कोणताहि प्रसंग असो,—दुष्काळानिमित्त सभा असो, कोणावद्दल दुःखप्रदर्शन असो, सार्वजनिक कामाची वाटाघाट असो—कणाद, पाणिनि वगैरे मंडळी सभाजनांपुढें आपली आणून उभी करायाचीच! असो; तर हा प्रकार जोंवर चालेल तोंवर प्रस्तुत विषयाचें ज्ञान प्राप्त होण्याचीं आमच्यापाशीं कशींहि साधनें असलीं तरी त्यांपासून फलनिष्पत्ति विशेष

होण्याचा मुळींच संभव नाहीं. हीं वरील साधनें व युरोपियन लोकांचा उत्साह, उद्योग व तात्त्विक जिज्ञासा हीं दोन्ही जेव्हां एकत्र होतील तेव्हांच आमच्या प्राचीन विद्येचें पुनरुज्जीवन होऊन आमच्या प्राचीन स्थितीविषयीं विशेष ह्मणण्यासारखी माहिती सर्वांस होईल. नाहीं तर आजवर चालत आलेला जो संदिग्धत्वाचा व अपूर्णतेचा प्रकार तोच पुढेंहि असाच चालत राहील यांत संशय नाहीं.

हें आमच्या देशाच्या इतिहासाच्या एका भागाविषयीं झालें. यापुढला भाग परराष्ट्रांचें वर्चस्व हिंदुस्थानावर जेव्हांपासून गाजूं लागलें व हिंदु राज्यांचा ऱ्हास होऊं लागला तेव्हांपासून तों वरच्याविरुद्ध प्रकार होऊं लागेपर्यंत; ह्मणजे सुमारें अकराव्या शतकाच्या आरंभापासून तों सतराव्याच्या मध्यापर्यंत. या काळांत हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या प्रांतांवर मुसलमानांचा अंमल बसूं लागून तो कांहीं काळपर्यंत सार्वभौमत्वाच्याहि शिखरास जाऊन पोंचला होता. या काळाचा इतिहास मुख्यत्वेंकरून मुसलमान इतिहासकारांनीं फारशी भाषेंत लिहून ठेवला आहे. गिझनीच्या महंमदाच्या स्वाऱ्यांपासून तों मोंगलांच्या घराण्याचें ऐश्वर्य नष्ट होईपर्यंतचा मजकूर फेरिस्ता, फेजल वगैरेंच्या बखरींतून आहे, व फारसी कवितेंतहि इतर भाषांतल्याप्रमाणें ऐतिहासिक वृत्तांत सांपडतो. इंग्रेजी इतिहासांत या काळच्या वृत्तांताचा जो उल्लेख सांपडतो तो वरील ग्रंथांच्या आधारानें होय हें उघडच आहे.

तिसरा भाग अगदीं अलीकडचा इतिहास. या भागांत मागील दोहोंहूनहि पुष्कळ विलक्षण उलाढाली झाल्या आहेत. आणि अर्वाचीनत्वास्तव व दुसऱ्या कित्येक कारणांस्तव याची माहिती सर्वांस पहिल्या दोहोंपेक्षां अधिक आहे. यांत गेल्या दोन अडीचशें वर्षांची हकीकत, ह्मणजे हिंदूंच्या राज्याचा पुनरुदय व यवनांच्या सार्वभौमत्वाचा ऱ्हास व अस्त, आणि साता समुद्रांपलीकडच्या अत्यंत दूर राष्ट्रांस या भूमीचा शोध लागून त्यांचा या मुलुखांत संचार व उलाढाली; व त्यांपैकीं एकाचें कांहीं अंगच्या अलौकिक गुणांनीं व कांहीं सद्दीच्या जोरावर साऱ्या देशभर झालेलें वर्चस्व;— या सर्व गोष्टी अंतर्भूत होतात. या शेवटल्या भागाची सर्वांस थोडी बहुत माहिती आहेच आहे; यास्तव ती येथें मुळींच न देतां इंग्रेजी भाषेंतल्या इतिहासांतून ती कशी दिलेली आहे एवढ्याचविषयीं येथें लिहिलें ह्मणजे बस आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या आठव्या अंकांत प्रकृत विषयावर कांहीं मजकूर लिहिलेला आहे. व तुकत्या (निघालेल्या ?) तिसाव्यांतहि एकंदर विषयाच्या संबंधानें त्यांतील एक देश जो प्रस्तुत विषय त्याविषयीं मधून मधून कांहीं उल्लेख केले आहेत. पण तें सर्व निरूपण एकंदर विषयावर व्यापकपणें केलें होतें. प्रस्तुत स्थलीं तेंच विशेषतः करावयाचें आहे; ह्मणजे इंग्रेजींत या देशाच्या इतिहासावर जे मोठमोठे प्रसिद्ध ग्रंथ आहेत त्यांविषयीं वाचकांस कांहीं माहिती द्यावयाची आहे.

वरील इतिहासग्रंथ दोन तीन प्रकारचे आहेत. कांहीं एका राष्ट्रविशेषाचे किंवा देशविभागाचे आहेत; जसे डफचा 'मराठ्यांचा इतिहास', टॉडची 'राजस्थानची बखर,' एलियटचा 'मुसलमानांचा इतिहास', मालकमचा 'मध्य हिंदुस्थानचा इतिहास', ऑर्मचा 'इंग्लिशांचा इतिहास' इत्यादि. कांहीं एकंदर देशाचे आहेत; जसे मिल्ल, एलफिनस्टन, मरे, टेलर वगैरेंचे. कांहींत एखाद्या लढाईची किंवा एखाद्या इतिहासप्रसिद्ध पुरुषाचीच हकीकत आहे, जशी केची 'आफगाणस्थानांतील मोहीम', 'शिपायांच्या लढाईची हकीकत', मेकॉलेचे 'लॉर्ड क्लैव' व 'वॉरन हेस्टिंग्स' हे सर्वप्रसिद्ध निबंध, इत्यादि. याशिवाय इतरहि नानाप्रकारचे लहान मोठे ग्रंथ व निबंध आहेतच. आतां या सर्वांविषयीं यथास्थित विवेचन करणें ह्मणजे वरील सर्व ग्रंथ अगोदर शोधपूर्वक समग्र वाचलेले पाहिजेत, व वाचकांसहि तें सर्व विवेचन चित्तवेधक होण्यास वरील सर्व ग्रंथांचें बरेंच ज्ञान असलें पाहिजे. शिवाय तें विवरण प्रस्तुत सारख्या लहान पुस्तकांस मुळींच शोभणार नाहीं; तें समग्र होण्यास मोठमोठे ग्रंथ लागतील. यास्तव येथें वरील ग्रंथांचें आमच्या वाचकांकरतां अनुक्रमेंकरून केवळ दिग्दर्शन मात्र करतों—

ग्रांट डफ हा सातार्‍यास पोलिटिकल रेसिडंट होता. यानें मुंबईचे पहिले गवर्नर एलफिनस्टन साहेब व जनरल सर टॉमस मनरो यांच्या प्रोत्साहनावरून मराठे लोकांचा इतिहास लिहिला. या इतिहासकर्त्यास कितीका ठिकाणांहून इतिहासाची सामग्री मिळाली ती त्यानें आपल्या इतिहासाच्या प्रस्तावनेंत सांगितली आहे; व ती एकत्र करून तींतून ग्रंथरचना करतांना व विशेषेंकरून ग्रंथ पूर्ण झाल्यावर तो छापून काढतांना त्यास केवढा अटाट पडला व किती पंचाइती कराव्या लागल्या त्यांची हकीकत नुकत्या छापून प्रसिद्ध झालेल्या नव्या आवृत्तीच्या आरंभीं दिली आहे.[1] हा इतिहास एकंदरींत पहातां अत्यंत प्रशंसनीय होय. जो जो मजकूर इतिहासकर्त्यास खरा वाटला तो तो त्यानें दाखल करून इंग्लिशांविषयीं पक्षपात किंवा मराठ्यांविषयीं द्वेषभाव किंवा मत्सर अशा वृत्ति कोठेंहि प्रगट केल्या नाहींत. त्याप्रमाणेंच पुष्कळ इंग्रेजी ग्रंथकारांस एतद्देशीय लोकांच्या संबंधानें लिहितांना पोकळ पांडित्य करण्याची जी हौस असते, आणि ज्ञान व नीति यांत आपल्या राष्ट्राचें वर्चस्व वरचेवर दाखविल्याखेरीज कधीं चैन पडत नसतें, तोहि प्रकार यांत नाहीं.[2] सारांश, प्रस्तुत इतिहास आमच्या लोकांस

---

१. ही नवी आवृत्ति 'टैम्स आफ इंडिया'च्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध झाली आहे. मूळच्या तिन्ही भागांचें एक पुस्तक करून या आवृत्तीची किंमतहि पहिलीच्या मानानें थोडी ठेविली आहे.

२. डफनें प्रस्तावनेंतच लिहिलें आहे—
"There being differences of opinion as to whether the writer

(पुढें चालू).

सुद्धां निःपक्षपातपणें लिहिलेला असा वाटण्यासारखा आहे; व धर्म, नीति वगैरेच्या संबंधानेंहि एतद्देशीयांस राग येण्यासारखा यांत बिलकूल मजकूर नसल्यामुळें तो त्यांस सर्वथा प्रिय व्हावा असा आहे.[1]

कर्नल टॉड हा राजपुतान्यांत पोलिटिकल एजंट होता. हा त्या प्रांतांत असतां तेथील लोकांस इकडील अल्फिष्टन, राबिसन, केनेडी, मनरो यांच्या सारखा अत्यंत प्रिय होऊन गेला होता.[2] त्यामुळें रजपूत, जाट वगैरे लोकांचा व त्याचा अतिशय परिचय होऊन त्यास त्यांची अतिशय माहिती होऊन गेली होती. ती सर्व त्यानें आपल्या बखरींत दाखल केली आहे. ही बखर अगदीं आरंभापासून, ह्मणजे सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रियांपासून, तों अगदीं प्रस्तुतच्या काळापर्यंत आणून वरील ग्रंथकारानें पोंचविली आहे. हींतील विषय सर्वांस माहीत आहेच,—कीं ज्यास हिंदुस्थानांतील स्पार्टन लोक ह्मटलें असतां चालेल असे जे रामसिंग, बखतसिंग, राणा संग, वगैरेंचे देशबंधु त्यांचे मनास थक्क करून टाकणारे पराक्रम तींत वर्णिले आहेत. प्रस्तुत इतिहास फारसा प्रसिद्ध नाहीं. पहिली जी एक आवृत्ति निघाली आहे तिच्यावर अद्याप दुसरी निघालेली माहीत नाहीं.

एलियटच्या इतिहासाचे पांच सहा मोठाले भाग आहेत. हा ग्रंथ त्यानें मुसलमानांनीं रचलेल्या इतिहासांवरून तयार केला आहे. अगदीं आरंभापासून ह्मणजे महंमदाच्या स्वाऱ्यांपासून तों मोगलाईच्या अखेरपर्यंत यांत हकीकत आहे.

सर जॉन मालकम कोण हें कोणासहि सांगावयास नको. एलफिनस्टनच्या

---

of history should always draw his own conclusions or leave the reader to reflect for himself, I may expect censure or approbation according to the taste of parties. I have never spared my sentiments when it became my duty to offer them; but I have certainly rather endeavoured to supply facts than to obtrude my own commentaries; and though I am well aware that, to gain confidence with the one-half of the world, one has only to assume it, I trust that I shall not have the less credit with the other for frankly acknowledging a distrust in myself."

१. वरील इतिहासावर आमच्या एका मित्राची व विद्यालयबंधूची चांगली वाचण्यासारखी टीका आहे हें मागें एक दोन वेळां सांगितलेंच आहे. या टीकेंत प्रस्तुत इतिहासाच्या गुणदोषविवेचनाखेरीज आणखीहि पुष्कळ चमत्कारिक माहिती आहे.

२. वरील साहेबाविषयीं अशी एक गोष्ट लिहिली आहे कीं, राजपुतान्यांतील एक शहर लढाईत उध्वस्त होऊन गेलें असतां तें त्यानें पुनः बांधिलें. त्या वेळेस एकजण ह्मणाला, "या शहरास टॉडगंज असें नांव द्यावें; पण हें तरी कशाला पाहिजे? टॉड साहेबाचें नांव या मुलखांतील लोक कधींहि विसरणार नाहींत!"

खालोखाल यांचेंच नांव प्रसिद्ध आहे. यास शेवटला पेशवा शरण गेला, व आठ लाखांची मोठ्या पंचाइतीनें नेमणूक करून देऊन यानेंच बाजीरावास ब्रह्मावर्तास पाठविलें. हा मुंबईचा दुसरा गवरनर झाला. याचा मुख्य ग्रंथ 'मध्य हिंदुस्थानचा इतिहास' हा होय. यांतच यानें इंदूरच्या राजवंशाची हकीकत व विशेषेंकरून अहल्याबाईचें वर्णन लिहिलें आहे. हाहि ग्रंथ अप्रसिद्ध झाल्यासारखाच आहे. याचें नुकतें एक मराठी भाषांतर होळकर सरकारच्या आज्ञेवरून प्रसिद्ध झालें आहे.[1]

रॉबर्ट ऑर्म हा पहिल्यानें ईस्ट इंडिया कंपनीच्या पदरीं कारकुनीची एक लहानशी असामी पतकरून क्लैव व हेस्टिंग्स यांच्याप्रमाणें हिंदुस्थानांत आला. पुढें वाढतां वाढतां तो मद्रास येथें कौंसलदार झाला. याच्या इतिहासाचा पहिला भाग सन १७६३ सालीं प्रसिद्ध झाला, व पुढील दोन पुढें कांहीं वर्षांनीं तयार झाले. या इतिहासांत ऑर्म यानें प्रथमतः एकंदर देशाची वगैरे थोडीशी माहिती देऊन इंग्लिश व फ्रेंच यांची सन १७४४ सालीं जी लढाई सुरू झाली तेथपासून आरंभ केला आहे. वरील लढाईत प्रसिद्धीस आलेला जो रॉबर्ट क्लैव त्याचा व या इतिहासकाराचा चांगला स्नेह होता. या कारणामुळें व शिवाय ती लढाई त्याच्या वेळेसच झाली यामुळें ती त्यास अगदीं हुबेहूब वर्णितां आली. हींत अगदीं बारीक बारीक गोष्टी सुद्धां वगळल्या नाहींत. या तपशीलवारपणामुळें सामान्य वाचकास प्रस्तुत इतिहास कंटाळवाणा वाटण्यासारखा आहे खरा; परंतु जो खरा जिज्ञासु आहे त्यास तो वरील गुणास्तवच विशेष प्रिय होणार आहे. सन १७७५ सालीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनीं आर्म यास ३००० रुपये सालीना नेमणूक करून देऊन कंपनीचा अकबरनवीस नेमिलें. हा हुद्दा त्याच्या हयातीपर्यंत ह्मणजे सन १८०० पर्यंत त्याजकडे होता. या इतिहासकर्त्याच्या अंगीं त्या कामास अवश्य जितके गुण तितके सर्व परिपूर्ण होते. एक तर मनोवेधक ग्रंथरचनाः हें कसब त्याच्या अंगीं कितपत होतें याबद्दल खुद्द मेकॉलेनें काय ह्मटलें आहे तें आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच. मेकॉलेच्या मतें ऑर्म हा इंग्लंडांत झालेल्या कोणत्याहि इतिहासकर्त्याहून वरील गुणांत कमी नाहीं.[2] एवढी प्रशंसा, आणि त्यांतून इतिहास-

१. हें भाषांतर रा० विनायक जनार्दन कीर्तने यांच्या नांवावर प्रसिद्ध झालें आहे. 'थोरले माधवराव' व 'जयपाळ' हे ग्रंथ ज्यानें वाचले असतील त्याची वरील इतिहासाविषयीं बहुधा अशी कल्पना होईल कीं, तें मोठें उत्कृष्ट भाषांतर झालें असेल. पण काय असेल तें असो; त्यांतील भाषासरणी थेट रा० रा० मंडलीक यांच्या इतिहासासारखी आहे. 'माळव्याचा प्राचीन इतिहास अंधःकारांत बुडाला आहे,' 'मल्हारराव होळकर पानपतच्या लढाईत हजर होता' असला प्रकार साऱ्या ग्रंथभर आहे. एलफिनस्टन व मालकम या दोघां इतिहासकर्त्यांची सारखीच दुर्दशा झाली हा काय चमत्कारिक योग!

२. "Orme, inferior to no English historian in style and

(पुढें चालू).

रचनेच्या कामांत, वरील ग्रंथकाराकडून प्रस्तुत इतिहासकारास मिळाली, यावरून त्याच्या योग्यतेचें अनुमान वाचकांस सहज होईल. दुसरा गुण वृत्तांताचें पूर्णत्व. याविषयीं वर नुकतें लिहिलेंच आहे. पण तिसरा गुण तर वरील दोहोंहूनहि मोठा आहे, तो प्रामाणिकत्व होय. हा गुण सामान्यतः सर्व मनुष्यांत व त्या मानानें बहुतेक इतिहासकारांतहि किती थोडा आढळतो, किंवा निदान अपुरता तरी असतो, याविषयीं मागील अंकांवरून वाचकांची बरीच खात्री झाली असेल. त्यांतून सुधारणुकेचें आगर जें युरोपखंड तिकडील मनुष्यानें सुधारणेच्या दुसऱ्या टोंकास असणारें जें एशियाखंड इकडील राष्ट्रांविषयीं यथार्थ लिहिणें ह्मणजे तर केवढी पंचाईत ती सांगायाला नकोच ! पण असें असतांहि आर्म यानें वरील इतिहासांत अगदीं निःपक्षपातपणा व समवृत्ति हीं प्रगट केलीं आहेत. क्लैवप्रभृति आपल्या देशबंधूंच्या शौर्याचें जसें वर्णन केलें आहे, त्याप्रमाणेंच इकडील लोकांचेंहि अगदीं निर्मत्सरतेनें केलें आहे. प्रस्तुत इतिहासांतील शिपायांचें वर्तन वाचून प्रशियाचा राजा फ्रेडरिक काय ह्मणाला तें यापूर्वी वाचकांस कळविलेंच आहे. याशिवाय फ्रेंचांचा सेनापति बुसी, त्या वेळचा पेशवा बाळाजी बाजीराव, व प्रख्यात मराठा सरदार मुरारराव घोरपडा, यांच्याविषयीं सुद्धां असें वर्णन केलें आहे कीं तें वाचून प्रस्तुत इतिहासकाराच्या उदारतेची अतिशय तारीफ केल्यावांचून रहावत नाहीं. एकंदरींत वरील तिन्ही गुणांपैकीं कोणत्याहि गुणाच्या संबंधानें पाहिलें, तरी या इतिहासाहून वरचढ असा अद्याप कोणताहि झाला नाहीं असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. तरी आमच्या पाश्चात्य बंधूंची आमच्या देशाविषयीं

---

power of painting, is minute *even to tediousness*. In one volume he allots, on an average, a closely-printed quarto page to the events of every forty-eight hours. The consequence is, that his narrative, though one of the most authentic and one of the most finely written in our language, has never been very popular, and is now scarcely ever read.

Lord Clive.

१. **क्लैव** आरकाटच्या किल्ल्यांत असतां त्याच्या मदतीस जो मुरारराव आला तोच वरील होय. या घराण्याचें उपनांव त्यास कशावरून पडलें असावें हें उघडच आहे. या कुळांतील एका सरदारानें शहाजीस दग्यानें धरून बिजापूरच्या बादशाहाच्या स्वाधीन केलें होतें; व या कृत्याचा सूड पुढें शिवाजीनें कसा उगवला हें इतिहासप्रसिद्ध आहे. पुढें राजारामाच्या वेळेस याच कुळाच्या राहिलेल्या अंकुरापासून उत्पन्न झालेला जो संताजी घोरपडा तो मोठा प्रख्यात झाला. (अंक ६ मध्यें पहा.) असो; तर मुरारराव‌ाचा कुलवृत्तांत हा होय. याच्या राज्यरीतीचें व शिपाईगिरीचें वर्णन वरील इतिहासाच्या पाहिल्या भागांत उत्कृष्ट केलें आहे.

पहिल्यापासून केवढी आदराची बुद्धि आहे पहा कीं असल्या इतिहासाचें सुद्धां दुसरी आवृत्ति निघण्यापुरतें नशीब अद्याप उघडलें नाहीं !

याप्रमाणें हिंदुस्थानच्या इतिहासकारांचा एक वर्ग आटपला. आतां एकंदर सगळ्या देशाचा पहिल्यापासून तों आतांपर्यंत ज्यांनीं वृत्तांत लिहिला आहे त्यांच्या ग्रंथांचें थोडेसें निरूपण करतों.

या कोटींत जेम्स मिल्ल हा अग्रगण्य होय. हा प्रस्तुत काळचा मोठा तत्त्वज्ञ जो नुकता निवर्तलेला जॉन स्टुअर्ट मिल्ल त्याचा बाप हें यापूर्वी दोन तीन वेळां सांगण्यांत आलेंच आहे. हा अगदीं गरीब व अप्रसिद्ध कुळांत जन्मला असून त्याचा विद्याभ्यासहि विपत्तींतच झाला. तरी त्याच्या अंगच्या हिंमतीनें व बुद्धीच्या जोरानें तो लवकरच प्रसिद्धीस आला. पुष्कळ वर्षेपर्यंत त्याचा चरितार्थ शिकवणीवर व वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें यांत मजकूर लिहिण्यावर चाललेला होता. शेवटीं सन १८०८ सालीं त्याच्या जन्मांतला मोठा उद्योग जो हिंदुस्थानचा इतिहास तो त्यानें हातीं धरला. हा ग्रंथ संपूर्ण तयार होण्यास दहा वर्षें लागलीं. या प्रचंड उद्योगाचें चीज कितपतसें झालें हें माहीत नाहीं; पण त्यापासून त्यास मोठी किफायत झाली. ती ही कीं, वरील इतिहास प्रसिद्ध झाल्यावर लवकरच कोर्ट आफ डायरेक्टर्स यांनीं त्यास इंडिया हौस येथें एक हुद्दा दिला. हा हुद्दा 'कॉरेस्पॉडन्स एक्झामिनर' ह्मणजे कंपनी सरकारचा एतद्देशीय राजेरजवाड्यांशीं जो पत्रव्यवहार चालत असे त्याची तपासणी करावयाची, हा होता. हा पुढें त्याचा मुलगा जो दुसरा मिल्ल त्याच्याकडेहि कांहीं वर्षें चालत होता. असो; आतां वरील इतिहासाविषयीं जर विचार केला तर तो या शतकाच्या आरंभीं—कीं ज्या वेळेस इकडची माहिती युरोपियन लोकांस अगदींच थोडी होती—त्या वेळेस सरकारची वगैरे बिलकुल मदत नसतां केवळ स्वतःच्या श्रमानें एकट्या मनुष्यानें तयार केला ही लहानसान गोष्ट नाहीं खरी; तसेंच जें काम इकडे येऊन पुष्कळ वर्षें राहिलेल्या इंग्रेजांसहि जड जातें तें इतक्या दूर असलेल्या मनुष्यानें,—भाषेचें ज्ञान नाहीं, लोकपरिचय नाहीं, पूर्वीच्या ग्रंथांचा आधार नाहीं, सरकारची मदत नाहीं, अशा पंचाइतींत व दुसऱ्या अनेक व्यवधानांत दहा वर्षांच्या आंत तडीस नेलें ही खरोखर आश्चर्याची गोष्ट होय! सदरील ग्रंथावर जो टीका करूं जाईल त्यानें वरील गोष्टींकडे अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे. तर तसेंच करून वरील इतिहासांत जे शतशः प्रमाद अपरिहार्यतेनें आले आहेत त्यांविषयीं केवळ न्यायबुद्धीनें येथें उल्लेख करतों. हे प्रमाद पहिल्या तीन भागांत, कीं ज्यांत प्राचीन हिंदु लोकांची विद्या, कला, रीतभात वगैरे-विषयीं लिहिलें आहे, त्यांत अतिशयित आहेत. पुढील भाग, व विशेषतः युरोपियन लोकांचा इकडे संचार होऊं लागला तेव्हांपासूनची हकीकत, यांत फारशा चुका नाहींत; कारण त्याविषयींचे लेख मिल्ल यास स्वतः वाचायाला सांपडून शिवाय ती माहिती

चांगली मिळण्याचाहि पुष्कळ संभव होता. पण पहिल्या भागाविषयींचीं साधनें त्या वेळेस फारच अपुरतीं होतीं. अलीकडे विलसन, मुल्लर, हौग, यांच्या सारख्यांनीं या देशाची प्राचीन काळाविषयीं माहिती होण्याचा जसा मार्ग करून ठेवला व तो जसा अजून पुढेंहि चालला आहे, तसें पूर्वी कांहीं नव्हतें. या कारणास्तव व शिवाय प्रस्तुत इतिहासकाराच्या मनांत या देशाविषयीं पहिल्यानेंच वाईट ग्रह होऊन बसल्यामुळें व कांहीं त्याच्या साहजिक हट्टी स्वभावास्तव, एतद्देशीयांच्या पूर्वजांविषयीं पुष्कळच हेकटपणाचा व तर्कटपणाचा मजकूर सांप्रत इतिहासांत आला आहे. यापासून पुष्कळ अनर्थ होण्याचा संभव होता; पण आमच्या सुदैवानें एक मोठी चांगली गोष्ट झाली. ती ही कीं, वर सांगितलेले हॉरेस हेमन विल्सन यांनीं मिळ्ळच्या इतिहासाची दुसरी आवृत्ति काढतांना वरील सर्व चुका व अप्रयोजक तर्क खोडून टाकले. वरील साहेब मूळ सर्जन ह्मणून हिंदुस्थानांत आला होता, पण लवकरच संस्कृत विद्येकडे त्याच्या मनानें ओढ घेऊन तो सर्व संस्कृतज्ञांत प्रमुख होऊन गेला. तो येथें सुमारें वीस वर्षें एका कॉलेजाचा मुख्य गुरु होता. असो; तर अशा मनुष्यानें वरील विलायतवासी इतिहासकाराचे गैरसमज खोडून टाकले हें फार योग्य काम झालें. ही खोडाखोड विल्सननें मूळ ग्रंथाच्या खालीं टीपा देऊन केली आहे. शिवाय हा इतिहास मूळचा जो १८०८ पर्यंत होता तो १८३५ पर्यंत ह्मणजे लॉर्ड विल्यम बेंटिक यांच्या कारकीर्दीच्या अखेरीपावेतों नेऊन पोंचविला आहे.

ऑनरेबल मौंट स्टुअर्ट एलफिनस्टन यांच्याविषयीं निदान इकडच्या लोकांस तरी विशेष माहिती देण्याची अगदीं जरूर नाहीं. ते येथें रेसिडेंट होते व पेशवाई बुडाल्यावर इकडची व्यवस्था पहिल्यानें त्यांनींच मोठ्या शहाणपणानें केली, व मुंबई इलाख्याचे पहिले गवरनर हेच झाले, हें सर्वांस माहीत आहेच. ज्या चतुर व सुज्ञ पुरुषानें इकडील लोकांचा लोभ व पूज्यबुद्धि हीं इतकीं संपादन केलीं होतीं व या देशाचें ज्ञान ज्यास उत्कृष्ट होण्याची एवढी संधी होती त्यानें कर्नल टॉडप्रमाणें महाराष्ट्र देशाचा इतिहास स्वतः लिहिण्याचें मनावर घेतलें नाहीं ही मोठी खेद करण्यासारखी गोष्ट होय. असो; याच्या इतिहासांत फक्त दोन काळांविषयींच निरूपण केलें आहे; एक प्राचीन हिंदु लोकांचा व दुसरा मुसलमानांचा. याप्रमाणें हा इतिहास आरंभापासून दिल्लीच्या बादशाहीच्या अखेरपर्यंत आहे. हा एलफिनस्टननें विलायतेस गेल्यावर तेथें लिहिला. याविषयीं विशेष लिहिण्यासारखें कांहीं नाहीं. इतिहासकर्त्याच्या स्वभावावरून प्रस्तुत ग्रंथाचें स्वरूप कसें असेल याची सहज कल्पना होईल.

आतां शेवटीं दोहोंविषयीं बोलायाचें राहिलें: एक मरेचा इतिहास व दुसरा क्याप्टन मेडोज टेलर यांचा. पहिल्याविषयीं कांहीं विशेष माहिती मिळत नाहीं; दुसरा ग्रंथकार तर चोहोंकडे प्रसिद्धच आहे. हा नुकता कांहीं महिन्यांपूर्वी वारला. हा

निजामच्या दरबारीं रेसिडेंट असून कांहीं दिवस ठगींवर नेमलेला होता. यांनीं केलेल्या 'तारा', 'सीता' व 'राल्फ डार्नल' या कादंबऱ्या व ठग लोकांविषयीं एक ग्रंथ, हे सर्व प्रसिद्धच आहेत. काळ्या लोकांचा धिःकार व द्वेष न करतां त्यांशीं मोठ्या सलोखीनें वागणारे जे साहेब कांहीं दिवसांपूर्वी असत त्या वर्गातले हे कदाचित् शेवटलेच असतील. यांचें येथें तीस वर्षें वास्तव्य असून एतद्देशीयांचा व यांचा इतका परिचय जडला असे कीं, हिंदु मुसलमान वगैरे सर्व जातीचे अगदीं घरगुती रीतारिवाज सुद्धां त्यांस माहीत झाले होते. हें ज्ञान वरील कादंबऱ्यांत व प्रस्तुत इतिहासांतहि टेलर साहेबांनीं दाखविलें आहे. असो; या दोन्ही इतिहासांत, आणि त्यांतून विशेषेंकरून दुसऱ्यांत, प्रस्तुत विषयाचा संपूर्ण संग्रह केला आहे. त्याचें दिग्दर्शन ज्यांस करून घेणें असेल त्यांस ते वाचण्यास फार उपयोगी आहेत. टेलर साहेबांचा वर जो वृत्तांत सांगितला आहे त्यावरून त्यांचा इतिहास एतद्देशीय वाचकांस विशेष प्रिय होण्यासारखा आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईलच.

येथवर पहिले दोन प्रकार झाले. आतां शेवटीं राहिलेले दोन ग्रंथ ह्मणजे 'अफगाणिस्थानांतील मोहीम' व 'शिपायांची लढाई' यांविषयीं, व मेकॉलेचे दोन प्रसिद्ध निबंध 'लॉर्ड क्लैव' व 'वॉरन हेस्टिंग्स' यांविषयीं कांहीं विशेष लिहिण्याची गरज नाहीं. पहिले दोन्ही ग्रंथ फार मोठाले असून त्यांतला दुसरा तर अद्याप पुरताहि झाला नाहीं. सर विल्यम के हे नुकते दोन तीन महिन्यांपूर्वी मरण पावल्यामुळें वरील इतिहास कदाचित् अपुरताच राहील. मेकॉलेच्या निबंधांविषयीं यापूर्वी कित्येक वेळां लिहिलें आहे, व त्याच्या एकंदर लेखांविषयीं त्याच्या देशबंधूंचाहि काय अभिप्राय आहे तो मागें (२८ व्या अंकांत) आमच्या वाचकांस कळविलाच आहे. तेव्हां वरील दोन चरित्रांविषयीं विशेषतः येथें कांहीं जास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. इतकेंच सुचविणें बस आहे कीं, ज्या अर्थीं मेकॉले साहेब या देशास खुद्द येऊन गेले होते, व आमच्या वेड्यावागड्या लोकांची चालचलणूक दोन तीन वर्षें त्यांनीं मेहेरबानीनें नजेरखालीं घातली होती, त्या अर्थीं मिल्ल साहेबांच्या अज्ञानास व गैरसमजास जीं सबब लागू होतीं तींहि पण तीस वर्षांनीं पुढें त्यांस उपयोगी पडण्याजोगीं नव्हतीं. यास्तव देशप्रीतीच्या अनिवार्य भरांत किंवा लेखणीच्या सफाईच्या तडाक्यांत त्यांनीं सत्याचा जो निःशंक उपमर्द केला आहे, आणि आपल्या दोघां कथानायकांचा महिमा वाढविण्याकरितां इतिहास फिरविण्यास, व राष्ट्रांचें किंवा व्यक्तिभूत मनुष्यांचें अन्यथा वर्णन करण्यासहि मागें पुढें पाहिलें नाहीं; या दोन्ही गोष्टींबद्दल त्यांच्याविषयीं कितीहि कडकपणाचा मजकूर लिहिला असतां निदान एतद्देशीय तरी खचीत दोषास पात्र होणार नाहीं.

येथवर प्राच्य राष्ट्रांपैकीं तिहींच्या इतिहासांविषयीं लिहिलें. आतां चवथें राष्ट्र

जे चीन देशचे लोक यांविषयीं कांहीं मजकूर लिहितां येईल; पण ज्या पक्षीं त्या राष्ट्राविषयीं अद्याप ह्मणण्यासारखी माहिती प्रसिद्ध झालेली नाहीं, आणि शोधक व साहसी जे युरोपियन लोक त्यांचाहि त्या अवाढव्य देशांत नुकता कोठें प्रवेश होऊं लागला आहे त्या पक्षीं प्रकृत विषय येथेंच थांबविणें इष्ट दिसतें.

निबंधमाला—वर्ष ३ रें.

—०—

प्रहर नमतु चापं प्राक्प्रहारप्रियोऽहं
मयि तु कृतनिघाते किं विदध्याः परेण ॥[1]
महावीरचरित.

अंक ३६—प्रतिखंडन-निबंधमाला.

हा अंक चालू वर्षाचा शेवटला होय. यांत आजवर चालत आलेल्या क्रमाप्रमाणें निबंधरचना असायाची; पण आमच्या प्रतिपक्ष्यांनीं या वर्षीं आह्मांवर बरीच मेहेरबानी केली असल्यामुळें तसें करतां येत नाहीं. त्यांच्या शिव्यांचा, आक्षेपांचा, व दूषणांचा आदर करणें अवश्य आहे. हें करणें आमच्या मित्रांपैकीं कित्येकांस कदाचित् पसंत वाटणार नाहीं; ते ह्मणतील कीं, वृथा निंदकान्च्या तोंडीं लागण्यांत काय फळ आहे? जो दुराग्रहाच्या स्वाधीन झाला त्याशीं कितीहि वाद केला, व कशीहि उत्कृष्ट प्रमाणें त्याच्यापुढें उभीं केलीं, तरी तो आपला हेका सोडणार नाहीं; व ज्यास यथार्थ ज्ञान आहे व समबुद्धि आहे त्याची पुनः खात्री करूं जाणें ह्मणजे सोन्यावर परीस घासण्याप्रमाणें व्यर्थ श्रम मात्र होत. हें ह्मणणें वस्तुतः खरें आहे. मण त्याप्रमाणें चालण्याजोगी सांप्रत पुस्तकाची व विशेषतः आमच्या देशाची अद्याप स्थिति आली नाहीं. आमच्या पाद्री बंधूंच्या धड हिंदु ना ख्रिस्ती अशा भाषेनें व विचारांनीं आमच्या मालेस यत्किंचित्हि अपाय होण्याचा जरी संभव नाहीं; तरी इतर दूषकांचे आक्षेप तितके अप्रयोजक नसल्यामुळें पुष्कळांस ते स्थलविशेषीं संदेहांत पाडण्यासारखे असतात. यास्तव असली संशयात्मकता दूर करण्याकरितां वर्षाच्या अखेरीस एकदां सगळी झडती करावी हें बरें दिसतें. तसें केलें असतां निंदकांस आपली कृतार्थता वाटत असेल तर ती मानण्याचें फारसें कारण उरणार नाहीं; व कोणाचा जर खरा आक्षेप असेल तर तोहि प्रांजलपणें कबूल करण्यास सांपडेल.

याप्रमाणें प्रस्तावना करून आतां अनुक्रमानें आमच्या प्रतिपक्षिवर्गाच्या कोटिक्रमाचा विचार करतों. हा कोटिक्रम सर्वांच्या पहाण्यांत आला नसेल, यास्तव तोहि

---

१. "धनुष्य ओढ व शरप्रहार कर. शत्रूनेंच प्रथम प्रहार केलेला मला प्रिय आहे. मीं घाव मारल्यावर मग तुह्यानें काय होणार!"

स्थलविशेषीं वाचकांच्या सोयीकरतां सादर करण्यांत येईल.

दयानंद सरस्वती—या महाविख्यात जगद्गुरूंचें नांव प्रथमतः घालण्याचें कारण आमच्या वाचकांच्या सहज ध्यानांत येईलच. गेल्या वर्षींच्या शेवटल्या दोन अंकांत स्वामींचा जो आह्मीं गुणानुवाद केला होता तो त्यांच्या परम धार्मिक शिष्यवर्गास अर्थातच बिलकुल रुचला नाहीं. तेव्हां बहुतेकांनीं नुसता तोंडानें व एका दोघांनीं वर्तमानपत्रांतून आपल्या गुरूच्या कैवारानें आह्मांवर भडिमार केला. यांत ह्मणण्यासारखे मुद्दे काय ते दोन तीन होते. एक हा कीं, स्वामींची विद्वत्ता आटोकाट, षड्दर्शनांच्या चिंतनिकेंत त्यांनीं अपरिमित दिवस घालविलेले, तेव्हां नुसत्या काव्यसुभाषितांच्या जोरावर परमहंसांबरोबर उड्डाण करूं जाणें आह्मांसारख्यास शोभत नाहीं. दुसरा हा कीं, स्वामी हे पुरे लोककल्याणेच्छु असून ते मूर्तिपूजेचें बंड मोडून स्वर्गास जाण्याचा सोपा मार्ग सर्वांस सांगत होते, तेव्हां अशा सत्कार्यास आडकाठी घालणें हा सज्जनपणा नव्हे: व स्वामींचा पंथ सध्यां जरी निर्बळ दिसला तरी कालांतरानें त्याची भरभर होऊन तो पुढें प्रबळ होत जावयाचा. तिसरा हा कीं, दयानंदजींच्या 'जुक्ती'शीं टक्कर मारण्याच्या भरीस न पडतां आह्मीं नुसत्या वाग्डंबरानेंच त्यांस जिंकण्यास पुढें सरसावलों.

आतां पहिल्यानें स्वामींच्या प्रचंड पांडित्याविषयीं जर पाहिलें तर त्याविषयीं निश्चयानें सांगण्यापुरतें शास्त्रज्ञान आह्मांस नाहीं हें खरें; तरी आह्मांस एवढें पक्कें माहीत आहे कीं, ज्यांनीं त्यांस पंडिततेच्या शिखरावर व गजेंद्रमस्तकावर आपमतलबास्तव बसविलें त्यांसहि त्याविषयीं यथार्थज्ञान होण्याचें साधन आमच्याहून जास्ती होतें असें नाहीं. शिवाय क्वचित् प्रसंगीं परमहंस जी तुटक तुटक गीर्वाण भाषा बोलत तीवरून आह्मांस तर त्यांच्या शास्त्रपारंगततेची फारशी कल्पना झाली नाहीं, व काशिस्थ पंडितांच्या संबंधानें स्वमुखानें भर सभेंत ज्या वल्गना चालल्या होत्या त्यांचा खरेपणाहि आह्मांस विशेष भासला नाहीं. तसेंच एकंदरींत त्यांच्या आंगलोटावरून पहातां व 'सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम्' या अनुभविक वचनाकडे किंचित् लक्ष दिलें असतां, स्वामींचे दिवस शास्त्राध्ययनांत कितीसे गेले असतील याची कोणासहि सहज कल्पना होणार आहे!

दुसरी गोष्ट दयानंदजींची देशहिताविषयीं कळकळ, निस्पृह लोकोपकार बुद्धि, व सद्धर्मप्रसारणार्थ निर्भयपणानें व निर्भीडपणानें सतत चालविलेले परिश्रम. ज्यांस आमच्या परमहंसांच्या दर्शनाचा व त्यांच्या वक्तृत्वाच्या श्रवणाचा साक्षात लाभ घडला नाहीं, व त्यांची कीर्ति त्यांच्या सद्धर्मी शिष्यांच्या सांगोपांगीवरून वगैरे ज्यांनीं दूराहून मात्र ऐकली आहे, त्यांस 'दूरतः पर्वता रम्याः' या न्यायानें वरील सर्व गोष्टी खऱ्या वाटल्यास फारसें आश्चर्य नाहीं. कां कीं, युनिवर्सिटीचा उत्कृष्ट संस्कार घडलेले व

चोहोंकडे सर्वमान्य ह्मणून गाजलेले लोक सुद्धां आपमतलब साधण्याकरतां निःशंकपणें कशा हिकमती करीत असतात, व वर्तमानपत्रांतील मजकुरावर पूर्ण भरंवसा ठेवला असतां वाचणारा पुष्कळ प्रसंगीं कसा निखालस फसून जातो, तसेंच लोककल्याणाकरतां झटणारे ह्मणून जितके लोक पुढें पुढें करीत असतात त्यांपैकीं निवळ सोंग आणलेले किती असतात, व प्रसंग पडला असतां आपला मुखवटा खालीं टाकून देण्यास किती तयार असतात, वगैरे गोष्टी नुकत्या कोठें एकंदर लोकांस समजत चालल्या आहेत. तेव्हां लांबलांबच्या लोकांचे ठायीं वरील भ्रम आढळता तर फारसें नवल नव्हतें. पण विद्वत्तेचा व मार्मिकपणाचा बाणा मिरविणारे लोक सुद्धां वरील अडाण्यांसारखे फसून जावे हें केवढें आश्चर्य आहे! स्वामींच्या निमित्त येथील लोकांवर पट्टी बसली असून त्यांची पुडी चार पांच महिने कशी भरपूर चालली होती, व येथील गजेंद्रोत्सव व कर्दमोत्सव अनुभवून श्रीमंतांची स्वारी स्थानांतरास गेली असतां तेथूनहि आपल्या चेल्यांनीं भक्तीच्या भरांत कबूल केलेल्या खंडणीचा तगादा त्यांनीं कसा लावला होता, हें ज्यास माहीत असेल त्यास त्यांच्या निस्पृहत्वकीर्तीचें हंसूं आल्याशिवाय रहाणार नाहीं. त्याप्रमाणेंच ज्यांच्या रखवालीस सरकारचे मोठमोठे हुद्देदार व त्यांचा परिवार, त्यांनीं भटाभिक्षुकांची वगैरे निर्भर्त्सना आरंभली असतां व शास्त्री लोकांचीं तोंडें आपल्या पांडित्यानें बंद करून टाकलीं असतां त्यांचा निर्भयपणा व निर्भिडपणा जर स्तुत्य होय; तर धन्याच्या जोरावर परक्यावर भुंकणाऱ्या ग्रामसिंहासहि शूर व वावदूक कां ह्मणूं नये? श्रीमत्परमहंस जर खरेच धर्मसुधारणेच्छु असते, व वरील दोन गुण जर खरोखरच त्यांच्या अंगीं वसत असते तर ते आपल्या वचनाप्रमाणें मूर्तिपूजाधर्माचें मुख्य ठिकाण जें पुण्यपत्तन त्यास वर्षा सहा महिन्यांनीं तरी आपलें दर्शन देतेच; व येशूच्या कळपांत सामील झालेल्या मंडळीप्रमाणें मारहाण सुद्धां सोसून सद्धर्माचा उपदेश करते. पण तें कसचें? स्वामींची नजर आपल्या खाद्यसमृद्धीवर; त्यांच्या पुरस्कर्त्यांची लोकस्फीतीवर; व इतर जनांची केवळ मौजेवर. मग इतकी अनुकूलता असल्यावर लूथरानें जशी ख्रिस्ती धर्मात सुधारणा केली त्याप्रमाणें इकडे करण्याचा प्रार्थनासमाजाच्या धुरंधरांनीं जो घाट घातला होता तो आज एक वर्ष लोटतें आहे तोंच सगळ्या देशभर इतक्या यशालाभास येऊन ठेपला आहे यांत नवल काय? स्वामींचा 'आर्यसमाज' तर केव्हां लोपून गेला तो कोणाच्या कळण्यांतहि आला नाहीं; व त्याचे स्थापकहि पुनः पहिल्यासारखे कोणीकडे गुप्त होऊन बसले आहेत कोण जाणे! पण सर्वांत स्वामींच्या परम शिष्यांच्या आचरणाची तर जितकी तारीफ करावी तितकी थोडी. स्वामींवर गुजरलेल्या महाप्रसंगाच्या समयीं त्यांनीं आपली धर्मनिष्ठा कशी दाखविली याविषयीं गेल्या वर्षीच्या अंकांत लिहिलेंच आहे, त्याप्रमाणें पुढचाहि त्यांचा क्रम दृष्टीस पडला. स्वामींच्या निमित्त त्यांच्यावर तेव्हांपासून जीं किटाळावर किटाळें येऊं लागलीं

त्यांतून पार पडतां पडतां ते बेजार झाले, व या पंचाइतींत पडण्याची आह्मांस कोठून बुद्धि आठवली असें त्यांस होऊन गेलें. मग अशा वैतागांत स्वामींचा तनख्याविषयीं जेव्हां तगादा आला तेव्हां त्यांची काय वाट झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी ! शेवटीं मूर्तीचा छळ केल्याबद्दल झालेल्या पापाचें क्षालन करण्याकरितांच जणूं काय, वरील आर्यसमाजाच्या पुरस्कर्त्यांनीं दुसऱ्या एका परमहंसांचा आश्रय धरला. हे अद्याप येथें असणारे सत्यपराक्रमस्वामी श्रीमध्वाचार्य हे होत. यांच्याहि भजनीं आमच्या शहरांतील लोककल्याणकर्ती मंडळी कांहीं दिवस लागली होती. हा शेवटचा प्रकार मूर्तिपूजेचे हाडवैरी जे आमचे वरील जगद्गुरु ते जर पहाते तर त्यांस केवढा सवतीमत्सर वाटता, व आपल्या वक्तृत्वमय व्याख्यानांचें त्यांस केवढें चीज झालेसें वाटलें असतें ! !

असो; आतां तिसरा मुद्दा कीं, आह्मीं स्वामींच्या प्रमाणांचें प्रमाणांनीं खंडन न करतां त्यांचा व त्यांच्या शिष्यवर्गाचा केवळ उपहासच कां केला, यांचेंहि उत्तर दिलें पाहिजे. वरील गोष्टींचीं कारणें तीन चार आहेत. एक तर हें कीं, उपहासाचें खंडन प्रत्युपहासानें केल्यास त्यांत कांहीं गैर नाहीं; दुसरें असें कीं, दयानंदजींची विद्वत्ता जरी आटोकाट होती, तरी त्यांचीं प्रमाणें इतकीं लुटपुटीत असत, व एकंदर व्याख्यानांत रिकामी बडबड व चावटपणा हीं इतकीं असत, कीं, प्रत्येक गोष्टीचें खंडन करण्यांत कांहीं हांशील नाहीं. या आमच्या ह्मणण्याचा प्रत्यय पंडित मजकुरांचीं छापील व्याख्यानें जीं त्यांच्या सच्छिष्यांनीं काळाचा अपव्यय करून ऐकिलीं व अर्थाचा अपव्यय करून छापलीं त्यावरून कोणाहि निःपक्षपात वाचकास खासा येणार आहे. तिसरें कारण असें आहे कीं, शत्रूचा पराभव धुराच्या नुसत्या भपकाऱ्यानें जेथें होणारा, तेथें गोळाहि नासण्यांत कोणतें शहाणपण ? पण या सर्वांहून चवथें मोठें कारण प्रकृत निबंधाचें नुसतें नांव पाहिलें असतांहि ध्यानांत येणारें आहे. तें हें कीं, त्यांतील विषय 'वक्तृत्व' हा होता. तो जर 'मूर्तिपूजा', 'धर्म' अशा प्रकारचा कांहीं असता तर आमच्या प्रतिपक्ष्यांचा आक्षेप लागू पडता.

याप्रमाणें दयानंद सरस्वतींच्या संबंधानें आमच्या पुस्तकावर जीं दूषणें आमच्या पहाण्यांत व ऐकण्यांत आलीं त्यांचें निराकरण केलें. आतां विषयांतरास जाण्यापूर्वी या अपूर्व पंडिताविषयीं सरते शेवटचे कांहीं शब्द लिहितों. यांस सरते शेवटचे ह्मणण्याचें तात्पर्य असें कीं, पंडितजींविषयीं इतःपर लिहिण्याचा प्रसंग कधींहि येईलसें वाटत नाहीं. यांचे भाषणसमारंभ व शेवटचा महोत्सव झाल्यास नुकतें कोठें वर्ष लोटून गेलें आहे तोंच सर्वांस यांचें विस्मरण पडत जाऊन त्यांची आतां कोणी पुस्तापास्तहि करीत नाहीं. त्यांच्या 'आर्यसमाजा'चें ते येथून चालते होतांच त्यांच्या शिष्यांनीं रूपांतर करून टाकलें;[1]

१. 'आर्यसमाजा'च्या रूपांतराचा प्रकार वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध झालाच होता.

(पुढें चालू).

पण तेंहि लवकरच गळाठून लयास पावलें. त्यांच्या 'व्याख्यानां'चा सरासरी छपाईचा खर्च निघाला असेल, पण यापूर्वी केव्हांच त्यांपैकीं कित्येक वाण्यांच्या दुकानीं साखरेच्या पुड्यांस उपयोगीं पडलीं असतील! या भावी स्थितीचें गेल्या वर्षींच आह्मीं भविष्य केलें होतें; व स्वामींच्या विशाल कीर्तीचीं कारणें सांगितलीं होतीं. आतां सरते शेवटीं त्यांच्या एकंदर गुणांचें थोडक्यांत परिगणन करून हें सदर आटपतों.

दयानंदजींच्या अंगीं सांगण्यासारखा कोणताहि गुण नाहीं. विद्वत्तेच्या संबंधानें पाहिलें, तर जुन्या विद्येंत त्यांची गति सरासरी त्यांच्या शिष्यांच्या इतकीच आहे; ह्मणजे ऐवज थोडा पण आडंबर फार, अशी स्थिति आहे. नव्या विद्वत्तेच्या संबंधानें पाहिलें, तर बंगाल्यांतील सुधारलेल्या ब्राह्मांच्या वगैरे परिचयानें त्यांनीं कांहीं सटरफटर गोळा केलें आहे, पण तें बाहेर काढलें असतां त्यांची फजिती होण्यास मात्र तें खासें उपयोगीं पडतें.[1] वक्तृत्वाच्यासंबंधानें पाहिलें तर विदूषकाच्या सारख्या घोटीव कोट्या, अप्रयोजकपणाची बडबड, व 'सहस्रभगदर्शनान्मुक्तिः'[2] असला मोठ्या गंभीर घोषानें

स्वामींचें येथून प्रयाण होतांच त्यांच्या परस्त्रीयांनीं विचार केला कीं, त्यांनीं उपदेशलेलीं मतें सर्वांस मान्य होणार नाहींत, व त्यामुळें आपला मुख्य हेतु, कीं त्यांच्या पंथाचा प्रसार व्हावा, तो फसेल. शिवाय वेदादि ग्रंथांस आपण एकदां झुगारून दिलें असून त्याची पूज्यता पुनः कशी स्वीकारावी! यास्तव त्यांनीं अशी युक्ति काढली कीं, आपल्या गुरूनें स्थापलेला 'समाज' पुनः उसकटावा, व त्याची पुनः एकवार स्थापना करून त्यास निराळेंच रूप द्यावें. हें रूप आर्यधर्मविवेचनाची ही सभा आहे असें ठरवून त्यास दिलें.

१. प्रस्तुत महापंडित अर्वाचीन पदार्थविज्ञानाचें, इतिहासाचें वगैरे ज्ञान आपल्या व्याख्यानांत जें प्रगट करीत तें कांहीं अप्रतिम असे. त्याचा मासला छापलेल्या व्याख्यानांवरून वाचकांस दिसून येईल. उदाहरणार्थ एकच गोष्ट येथें सांगतों. स्वामींचा हवेच्या शुद्धीकरणावर मोठा कटाक्ष असे; सकाळीं उठल्यावरोबर होम कशाला करावा? तर प्राभातिक विधींच्या योगानें हवा जी खराब होते ती साफ करण्याकरितां!—देवानें पुष्पें कशाकरितां निर्माण केलीं? हवेच्या शुद्धीकरतां! यावरून मूर्तिपूजेपासून किती तोटा आहे तो पहा!—यज्ञयाग कशाकरितां सांगितले? वातावरणाच्या स्वच्छीकरणार्थ! आतां यावर कोणी कदाचित् आक्षेप घेतील कीं एका हिंदुस्थानांतल्या धुराच्या लोटानें सगळ्या पृथ्वीच्या हवेवर कसें कार्य घडेल? तर यावर स्वामींचें समाधान—पृथ्वी फिरते आहे कीं नाहीं; तर त्या फिरण्यानें तो शोधन करणारा धूर इंग्लंडापर्यंत व अमेरिकेपर्यंत पसरला जातो!! या शहरावर चारपांचशें रुपयांचा खंड बसवून आमच्यांतले प्रमुख विद्वान् जीं मतें भक्तिपूर्वक श्रवण करीत होते व इतर लोकांच्या हितार्थ जीं त्यांनीं मुद्दाम छापवून काढिलीं, त्यांची योग्यता या मासल्यावरून सहज ध्यानांत येईल.

२. वरील अश्लील वाक्यावद्दल आमचे वाचक आह्मांस नांव ठेवतील; पण तें आमच्या सोंवळ्या परिव्राजकाचार्यांच्या वाणीनें पवित्र झालेल्या अनेक वाक्यसमुदायांतलें एक आहे, हें

(पुढें चालू).

केलेला चावटपणा, यापेक्षां श्रोतृरंजन करण्याचें साधन त्यांच्या अंगीं आह्मांस दुसरें कोणतेंहि दृष्टीस पडलें नाहीं. धार्मिकतेच्यासंबंधानें पाहिलें, तर एवढे थोर थोर विद्वान व बडे बडे मुमुक्षु ज्यांच्या पदरजीं लोळत होते, त्यांच्याविषयीं संशय घेणें हा दांडगेपणा दिसेल; पण खरी स्थिति जगास जाहीर करणें हें जर पुस्तककर्त्यांचें काम असेल, तर प्रस्तुत जगद्गुरूंच्या ठायीं वरील गुणांचें फारसें आस्तित्व दृष्टीस पडलें नाहीं असें स्पष्टपणें सांगणें जरूर आहे. ब्राह्मणधर्माचे लूथर होऊं पहाणारांनीं आजपर्यंत अध्यात्मविचारांत व जुन्या धर्मग्रंथांच्या अवलोकनांत व मननांत किती वेळ घालविला असेल कोण जाणे! त्याप्रमाणेंच जगद्गुरु एवढी जबरदस्त पदवी पटकावणारांनीं षड्रिपुदमनार्थ तरी किती प्रयत्न केला असेल तोहि सांगतां येणें कठिणच आहे! त्यांच्या भाषणांत व आचरणांत तर वरील दोहोंची प्रचीति मुळींच दिसून आली नाहीं. जो खरा मुमुक्षु व खरा धर्मोपदेशक आहे त्याचे ठायीं पराकाष्ठेची सौम्यवृत्ति असावी, कोणीं कसेहि प्रश्न केले तरी त्यानें निदान शांतपणानें तरी त्यांचीं उत्तरें द्यावीं, व सर्व ऐहिक गोष्टी त्यास तुच्छ वाटत असून जगाचें पारमार्थिक हित साधण्याविषयीं त्याचे ठायीं औत्सुक्यपूर्वक खरा कळवळा दिसत असावा, अशी आजपर्यंत साऱ्या जगाची समजूत होती.[1] पण येथील प्रार्थनासमाजाच्या विद्वान व धर्मशील अग्रेसरांनीं साऱ्या आर्यभूमीस जे नवे धर्मगुरु ह्मणून पसंत करून दिले त्यांच्या ठायीं तर वरील लक्षणांचा लेशहि वसत नव्हता. उलटा त्या सर्वांचा विरोध मात्र सर्वांस त्यांचे ठिकाणीं स्पष्ट दिसून येत असे. त्यांचा वादविवाद ह्मणजे निवळ दांडगाई, धर्मव्याख्यान ह्मणजे फाल्गुन मासचें वक्तृत्व, शंकासमाधान ह्मणजे 'शेषं कोपेन पूरयेत्', आणि धर्माचें परम तत्त्व ह्मणजे निरंतर आकंठ अपूपसेवन व आर्यधर्मतत्त्वाप्रमाणें परम स्वच्छ व मधुर अशा गोरसाचें सांजसकाळ यथेष्टमनेंकरून प्राशन![2]

त्यांनीं ध्यानांत आणावें. शिवाय असल्या रूपानें स्वामींची वाग्देवता प्रगट झाली असतां त्यांचे बडे बडे शिष्य हास्यरसांत एकमेकावर प्रेमानें अगदीं कोसळून जात हेंहि पुष्कळांस आठवत असेल!

१. खऱ्या धर्मोपदेशकाचे ठायीं कोणकोणते गुण अपेक्षित असतात त्याचें शानदार वर्णन गोल्डस्मिथच्या 'डेझर्टेड व्हिलेज' काव्यांत व त्याहिपेक्षां कौपरच्या 'टाइमपीस'मध्यें आहे. हीं दोन्ही वाचलीं असतां दयानंदजींचें पुण्यास कांहीं महिने जें आडंबर माजलें होतें त्याचा चमत्कार थोड्यांसच वाटल्याविना राहील!

२. वर जें पंडित दयानंद सरस्वतीचें वर्णन केलें आहे व त्यांच्या गुणांचें मान काढलें आहे, तें पाहून कित्येकांस कदाचित् संशय येईल कीं, त्यांनीं धर्मसंबंधी मतें आह्मांस ग्राह्य नसल्यामुळें आह्मीं केवळ द्वेषबुद्धीनें त्यांचा गुण बिलकुल न घेतां त्यांवर वृथादूषणांचा वर्षाव केला आहे. असें कोणास वाटल्यास त्यानें येथील इतर लोकांचा अभिप्राय घ्यावा, किंवा

(पुढें चालू).

इंदुप्रकाश—या पत्राच्या २६ जूनच्या अंकांत आमच्या पुस्तकाच्या २७ व्या अंकावर टीका आली आहे. ही सदरील पत्रकर्त्याची नसून रा० विनायक कोंडदेव ओक यांच्या लेखांपैकीं कोणीं लिहिलेली आहे. ही गोष्ट जरी सदर्हू पत्रांत प्रगट केलेली नाहीं, व आपल्या मुख्य मुद्द्यावरच विशेष भर न दाखवितां आमच्या पुस्तकावर एकंदरीनें चर्चा करण्याचा जरी लिहिणारानें आव घातला आहे, तरी प्रस्तुत लेखाची प्रवृत्ति कशामुळें झाली हें कोणाच्याहि सहज लक्षांत येणारें आहे. वरील २७ व्या अंकांत इंग्रेजी भाषेच्या संसर्गानें मराठींत नवे सुरू झालेले प्रकार जे कादंबरी, इतिहास वगैरे त्यांविषयीं विवेचन करीत असतां माजी बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर व रा० विनायक कोंडदेव ओक यांनीं मराठींत रचलेल्या इतिहासांवर कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत. या प्रसंगीं रा० ओक यांच्या 'हिंदुस्थानकथारसा'वर व 'शिपायांच्या बंडाचा इतिहास' या नुकत्या प्रसिद्ध झालेल्या पुस्तकावर जी आह्मीं विषयानुसार टीपेंत थोडीशी टीका केली आहे ती सदर्हू लिहिणारास न' आवडून त्यानें आपल्या मतें आमच्या पुस्तकावर यथेच्छ सूड उगवून घेतला आहे. आपल्या मित्राचा बचाव करण्याचा मूळ उद्देश असतां तेवढ्यांतच हात आटपून न घेऊन, आमचे शत्रु ते आपले मित्र व आमचे मित्र ते आपले शत्रु अशी दृढ भावना करून त्यानें पहिल्यांवर आवरण घालण्याचा व दुसऱ्यांवर रगडून प्रहार करण्याचा यत्न केला आहे. ज्याची मित्रनिष्ठा एवढी अनावर व क्रोधावेश एवढा उच्छृंखल त्यास वरील वृत्तींबद्दल दुसऱ्यास नांव ठेवण्यास मोठासा अधिकार आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

प्रस्तुत लिहिणारानें सदरील पत्रांत आपल्या ठायीं जरी अतोनात विद्वत्ता कल्पिली

मुंबईच्या प्रार्थनासमाजीय वगैरे लोकांचें सदर्हू पंडितांविषयीं काय मत आहे तें पहावें. फार तर काय, पण स्वामींच्या मुख्य पुरस्कर्त्यांचेंहि हृद्गत कोणी काढल्यास, किंवा तें ज्यांस नेहमींच्या सहवासानें माहीत आहे त्यांस विचारल्यास, आमच्या वर्णनाची यथार्थता त्यास भासल्यावांचून रहाणार नाहीं. सारांश, आमच्या वाचकांनीं हें पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, जसें नाटकाच्या पडद्याच्या आंत पात्रांचें एक रूप असतें व बाहेरच्या प्रेक्षकांस दिसायाचें एक असतें, तसा च प्रकार सामान्यतः जगांत आढळतो. यास्तव रंगभूमिवरील सौन्दर्यावरून व बोलण्याचालण्याच्या थाटावरून कोणाच्या वास्तव स्वरूपाची परीक्षा करूं जाऊं नये. दोहोंत कधीं कधीं अतिशयित अंतर दृष्टीस पडतें! तसेंच कोणास वरील जगद्गुरूंविषयींचा मजकूर जर निरर्थक वाटेल तर त्यानें असें समजावें कीं लोकभ्रमाचें निरसन करणें हें लहान उपयोगाचें काम नव्हे. फार तर काय, पण सत्यासत्यतेची परीक्षा न करितां लोकांनीं केवळ अंधपरंपराऱ्यायानें आपला विश्वास कोणावर टाकला असतां केवढा अनर्थ होण्याचा संभव असतो, याची प्रचीति नुकतीच एका प्रसिद्ध लोककल्याणेच्छूच्या व वक्त्याच्या आचरणावरून आमच्या लोकांस आलीच आहे. तेव्हां मेंढ्यांच्या कळपांतून वेषधारी लांडग्यास निवडून काढून अनर्थांचें मूळ बंद करणें ही क्षुल्लक गोष्ट समजतां उपयोगीं नाहीं!

आहे व मोठ्या मार्मिकपणाचा आव घातला आहे, तसेंच त्यास हल्लीं चालू असणारीं मासिक पुस्तकें सरसकट भिकार वाटून त्यांतील 'अग्रेसर'हि केवळ भाषेच्या संबंधानेंच त्यास बरें वाटतें, बाकी त्यांतील मजकूर त्यास अप्रयोजक वाटतो,— तरी सदरील लेखावरून पहातां त्यास ग्रंथपरीक्षणाचें स्वरूप अद्याप चांगलें कळत नाहीं, व जें लिहिणें तें विचारपूर्वक लिहिण्यास तो अद्याप शिकला नाहीं, असें ह्मणणें प्राप्त आहे. हें आमचें प्रतिदूषण आमच्या महाविद्वान आक्षेकास बहुधा 'पोकळ व कोतें वाटून त्यास पोट दुखेपर्यंत हसूं मात्र येईल.' पण तसें करण्यापूर्वी त्यानें पुढील मजकूर वाचावा अशी त्यास आमची विनंति आहे. तो वाचल्याच्या उपरांतहि त्याची वरील रंगेल वृत्ति जर तशीच कायम राहिली, तर या गोष्टीबद्दल त्याची मोठी तारीफ करणें रास्त होईल.

आमच्या प्रतिपक्ष्याचा आह्मांवर पहिला मोठा आरोप हा आहे कीं, निःपक्षपातपणाचा जरी आह्मीं पहिल्यापासून मोठा बाणा बाळगीत आहों, तरी तो गुण आमच्या पुस्तकांत बिलकूल दृष्टीस पडत नसून त्याच्या विरुद्ध प्रकार मात्र चोहोंकडे दिसण्यांत येतो. तो असा कीं, आमचे मित्र असतील त्यांच्याविषयीं मात्र चांगला अनुकूल अभिप्राय देऊन इतर कोणीहि असला तरी त्यावर आमची हटकून करडी नजर असायाची. या सामान्य सिद्धांताच्या समर्थनार्थ त्यानें दोन उदाहरणें वाचकांस सादर केलीं आहेत. पहिला प्रकार 'टेंपेस्ट' नाटकाचा व 'गंगावर्णना' काव्याचा; व दुसरा त्यांचे मित्र मशारनिल्हे ओक यांनीं रचलेल्या पूर्वोक्त दोन ग्रंथांचा. पहिल्या दोहोंवर 'गुळमुळीत टीका' येण्याचें कारण 'आमचे मित्र प्रस्तुत भाषांतरकर्ते' व 'आमचे विद्यालय बंधु' हें होय; व दुसऱ्या दोहोंवर लेखणीचा कडाका झडण्याचें कारण रा० ओक यांचें आमच्याशीं अपरिचितत्व हें होय. आतां मासिक पुस्तकाच्या मुख्य गुणास व उपयुक्ततेस विघातक असें जें हें पहिलें मोठें दूषण तें आह्मांवर कितपत लागू होतें याचा विचार करूं.

रा० ओक यांचे पक्षकार आरंभींच्या व्याख्यानाच्या शेवटीं आह्मांस पुढील उपदेश करतात—

"कोणत्याहि गोष्टीचें खरें स्वरूप काय आहे हें समजण्यास पूर्वगतविकारविरहित मनाची स्थिति असली पाहिजे. नाहीं तर न्यायाधीशाचे हातून प्रमाद होण्याचा संभव आहे. हे 'आमचे विद्यालयबंधु', ते 'आमचे मित्र प्रस्तुत भाषांतरकर्ते' इत्यादि भ्रांतिकारक विकारांचा संसर्ग ज्याचे मनांत झाला त्याचे हातून प्रांजल बुद्धीनें न्यायाधीशाचें काम चोख होण्याची मुष्कील आहे.

या एका उताऱ्यावरून प्रस्तुत लिहिणाराचीं मतें किती यथार्थ आहेत हें सहज दिसणार आहे; व ज्यांस आमच्या पुस्तकाच्या सत्तावीस अंकांत भाषाशैलीखेरीज

विशेष ह्मणण्यासारखें कांहीं दिसलें नाहीं, एवढ्या थोर विद्वानाचे विचार किती खोल आहेत तेंहि व्यक्त होणार आहे. एकूण आमच्या पत्रकर्त्यांच्या मताप्रमाणें टीका करणारानें आपल्या मित्रत्वाचें वगैरे नातें प्रगट करणें हें अत्यंत दोषरूप होय; व तें करतांक्षणींच त्याच्या मनापासून सत्यता व निःपक्षपातबुद्धि या एकदम भ्रंश पावल्याच असें त्यानें समजावें ! 'मित्र' व 'बंधु' या अक्षरद्वयांच्या अंगीं एवढा भ्रांतिकारक धर्म आहे काय ? हें जाणूनच बहुधा आमच्या चतुर आक्षेपकानें प्रस्तुत लेखाचें बीज जी मित्रभक्ति तिचा कोठें मागमूसहि दृष्टीस पडूं दिला नाहीं. पण ती वृत्ति तोंडावाटे प्रगट न केली तरी कृतींत अगदीं पूर्णपणें प्रगट झाली आहे हें त्यास कसें कळून आलें नाहीं कोण जाणे ! आमची तर याविषयीं अशी समजूत आहे कीं, जो न्यायाधीश आपला मित्रत्वादि संबंध तोंडानें स्पष्टपणें बोलून दाखवितो, पण न्यायाचें तराजू उचलतांना जो समबुद्धिरूप कांट्यांस आपल्याकडून लवमात्रहि इकडचा इकडे ढळवीत नाहीं तो खरा; पण जो न्यायासनावर चढला कीं दुष्यंतराजाप्रमाणें जसा कांहीं त्या गांवचाच नाहीं असें वळानें कोंग मात्र करतो, आणि एकंदर खटला चालविण्यांत व शेवटला फैसल्हा देण्यांत आपली मित्रता गुप्तरूपें प्रगट करीत असतो, तो प्रामाणिक नव्हे व प्रांजळ बुद्धीचाहि नव्हे !

आतां आमच्या 'मित्रां'चें ''टेंपेस्ट' नाटक व 'विद्यालयबंधू'चें 'गंगावर्णना' काव्य यांविषयीं जर पाहिलें तर त्यांची तारीफ करतांना आह्मीं पक्षपात केला आहे असें आह्मांस अद्याप वाटत नाहीं. वरील दोन्ही ग्रंथ कोणींहि तिऱ्हाइतपणानें वाचले तरी त्यांची योग्यता त्यास भासल्यावांचून खास रहायाची नाहीं असें आह्मांस वाटतें; व याविषयीं प्रमाण पाहिजे असल्यास आमचे बंधु 'विविधज्ञानविस्तार' व 'दंभहारक' यांत चांगलें आढळणार आहे. पहिल्याचा गेल्या मे महिन्याचा अंक पाहिला असतां आमची ''टेंपेस्ट' नाटकावरील टीका किती यथार्थ आहे हें कळून येईल; त्याप्रमाणें सदरहू पुस्तकाचा गेल्या जुलै महिन्याचा अंक व 'दंभहारका'चा सप्तंबर महिन्याचा अंक हे दोन्ही पाहिले असतां 'गंगावर्णने'वरचा आमचा अभिप्राय चांगला असण्याचें कारणहि सहज समजेल. आतां क्वचित् स्थलीं वरील पुस्तककर्त्यांचें व आमचें मत भिन्न भिन्न आढळेल, व विवेचनाचा विस्तारहि कमी जास्त असेल; पण निदानपक्षीं एवढी खात्री कोणाचीहि झाल्यावांचून रहाणार नाहीं, कीं वरील नाटकाच्या व काव्याच्या उत्कृष्टत्वाचें कारण 'आमचे मित्र प्रस्तुत भाषांतरकर्ते' व 'आमचे विद्यालयबंधु' यांहून पुष्कळ 'सबळ' रास्त व सयुक्तिक आहे !

आतां दुसऱ्या पक्षीं रा० ओक यांचे वरील दोन इतिहासग्रंथ घ्या. त्यांच्या संबंधानें आह्मीं जें लिहिलें आहे तें आमच्या प्रतिपक्ष्यासहि 'अगदीं अमान्य आहे असें नाहीं.' तरी तोच पुढें वरील आपली संमति विसरल्यासारखें करून पुनः आपण लिहितो कीं, 'वरील आरोप जो आणला आहे तो सिद्ध करण्यास त्यांस (आह्मांस)

जड जाईल.' या दोन अभिप्रायांचा मेळ सदरहू पक्षकार कसा घालील तो घालो! आतां आमच्या वरील मतावर त्यानें दोन दोष आणले आहेत ते असे आहेत कीं, 'मनोरमा' नाटकाविषयीं टीप देतांना त्याच्या भाषापद्धतीविषयींच केवळ आह्मीं विचार केला आहे, व वरील इतिहासाविषयीं मात्र तसें न करतां त्यांतील विचारांकडे लक्ष दिलें आहे. तसेंच ज्या प्रकारच्या उल्लेखाबद्दल रा० ओक यांस आह्मीं टोंचून लिहिलें आहे तसाच रा० चिंतामणि पेठकर यांच्या 'गंगावर्णनें'त आढळतो. पण असें असूनहि त्यांस मात्र आह्मीं बिलकूल दोष दिला नाहीं. आतां हा जो आमच्या प्रतिपक्ष्यास एवढा पक्षपाताचा प्रकार दिसत आहे त्याची खरी स्थिति अशी आहे कीं, वरील 'मनोरमा' नाटकाच्या भाषापद्धतीविषयीं आह्मीं कांहींच लिहिलें नाहीं. त्याच्या ग्रंथरचनेच्या संबंधानें ह्मणजे संविधानक, पात्रांचीं भाषणें वगैरेविषयींच काय तें लिहिलें आहे. आणि या रचनेवरहि जो ठळठळीत दोष सर्वांच्या नजरेस येणारा आहे, कीं जो 'विविधज्ञानविस्तारां'तील सदरहू टीपेंत सांगितलेल्या अंकांत मुख्यत्वेंकरून निर्दिष्ट केला आहे, तोहि आह्मीं स्पष्टपणें दाखविलाच आहे. तेव्हां एका ठिकाणीं एक केलें आहे व दुसऱ्या ठिकाणीं दुसरें केलें आहे हा दोष निर्मूल होय. दुसरा आक्षेप 'गंगावर्णनें'तील उताऱ्यावरून जो केला आहे तोहि वरील पक्षपात–दोषास फारशी बळकटी आणीत नाहीं. कारण एक तर सदरील काव्यावर 'टेंपेस्ट' नाटकाच्या प्रमाणें आह्मीं आपला अभिप्राय पूर्णपणें दिला आहे असें नाहीं; सदरहू टीपेंत इतर तीन आधुनिक काव्यांप्रमाणें आमच्या वाचकांच्या माहितीकरितां मुख्यतः त्याचा निर्देश केला आहे; व एकंदरीनें तीं कशीं आहेत हें थोडक्यांत सुचविलें आहे. शिवाय इतिहासाचा उत्तमपणा त्यांतील मजकुराच्या खरेपणावर जितका असतो तितका काव्याचा असत नाहीं व कवित्वाची पारख वरील कारागिरींवरूनच मुख्यतः करायाची असून मूळ द्रव्याची मातब्बरी रसज्ञ तादृश धरीत नसतात, हेंहि 'विस्तीर्ण विद्याधना'नें संपन्न असणाऱ्या अशा वरील पत्रकारांनीं ध्यानांत कसें आणलें नाहीं कोण जाणे!

याप्रमाणें सदरहू पत्रांतील मुख्य दूषणावर आह्मीं आपले विचार वाचकांस कळविले. आतां याशिवाय दुसरीं जीं कांहीं आहेत त्यांच्या यथार्थत्वाचें परीक्षण करूं.

रा० ओक यांच्या 'कथारसा'वर व 'बंडाच्या इतिहासा'वर जी टीका आह्मीं केली आहे, तिजवर आमच्या आक्षेपकाचे दोन दोष असे आहेत कीं, "मोघम रीतीनें न लिहितां अमुक अमुक स्थलीं सत्याचा अपलाप करून ग्रंथकारानें आपली राजनिष्ठा दर्शविली आहे" असे आह्मीं दाखवावयाचें होतें; व "शिवाय दुसऱ्यास टोंचण्यासारखे व निंदाव्यंजक असें लेख लिहिणें हें एकंदरीनें अश्लाघ्यच होय." आतां मोघम रीतीची टीका केल्याचा पहिला जो दोष आमच्या पत्रकारास वाटतो, त्याचें कारण कोणासहि क्षणमात्र विचार करतांच कळणारें आहे कीं प्रत्येक गोष्टीचें विधान केल्याबरोबर लगेच

त्याबद्दलचीं कारणें देणें केवळ अशक्य होय. तसें करण्याचें कोणीं मनांत आणल्यास एक वाक्यहि त्यास पुरतें लिहितां येणार नाहीं. यास्तव लिहिणारांची व बोलणारांचीहि चाल पुष्कळ गोष्टी वाचकांस व श्रोत्यांस माहीत आहेत असें घेऊन चालायाची असते. तसेंच केव्हां केव्हां सांगितलेल्या गोष्टींचें प्रमाण अल्पायासानें सांपडणार आहे असें समजूनहि तें ते देत नसतात. फार लांब कशाला, आमच्या सुज्ञ पत्रकर्त्यासहि आमच्या पुस्तकावर आणलेल्या प्रत्येक दूषणाचें समर्थन जर कोणीं विचारलें, तर तो काय उत्तर देईल? त्यास आमच्या पुस्तकावरच पुनः हवाला द्यावा लागेल कीं नाहीं? तर याप्रमाणें सदरहू टीपेंतल्या दूषणांचा खरेखोटेपणा पहाण्याची ज्यास इच्छा होईल त्यानें तींत निर्दिष्ट केलेला 'हिंदुस्थानकथारसां'तील भाग व तेथें सांगितलेला 'बंडाचा इतिहास' पाहिला असतां तेव्हांच खात्री होणार आहे.

दुसरा दोष असा कीं, सदरील पत्रकर्त्याच्या मित्रास टोंचण्यासारखा मजकूर आह्मीं लिहिला. असें करणें हें त्याच्या मतें हलकटपणाचें काम होय. या ह्मणण्याचा अर्थ जर एवढाच असेल कीं ग्रंथकाराच्या चित्तास विषाद वाटेल असा मजकूर मासिकपुस्तकांत येऊं नये, कारण कोणासहि दुःख देणें हें सज्जनपणाचें काम नव्हे; तर आमच्या प्रतिपक्ष्यास मासिक पुस्तकांचा उपयोग मुळींच समजत नाहीं व ग्रंथपरीक्षणाचें तत्त्वहि त्यास कळत नाहीं असें ह्मणणें प्राप्त आहे. टीकाकर्त्याचें काम मागें पंधराव्या अंकांत सांगितल्याप्रमाणें न्यायाधीशाच्या सारखें होय. यास्तव न्यायाधीशाच्या आसनामागें फटके देण्याचा चाबूक, खोडा, लोहशृंखला, किंबहुना वधस्तंभ, हें सर्व साहित्य जसें सदैव सिद्ध असतें; त्याप्रमाणेंच टीकाकारास दुर्मतांच्या निरसनार्थ कोठें उपहास, कोठें युक्तिपूर्वक खंडन वगैरे प्रकार योजावे लागतात. आतां टीकाकर्त्याच्या व न्यायाधीशाच्या कामांत एके रीतीनें मात्र मोठें अंतर आहे खरें; तें असें कीं, न्यायाधीशाचें कर्तव्य ह्मटलें ह्मणजे दुष्टांचें शासन एवढेंच होय. सज्जनांची व थोरांची संभावना करण्याचें व त्यांची योग्यता वाढविण्याचें श्रेय त्यास घेतां येत नाहीं. पण तेंहि सिंहासनस्थ राजाप्रमाणें टीकाकारास घेतां येतें. सारांश, एका संस्कृत श्लोकांत राजास बागवानाची जी उपमा दिली आहे तीच भाषेचें हित करूं इच्छिणाऱ्या पुस्तककर्त्यासहि लावली असतां चालणार आहे.[1] ह्मणजे चांगल्या झाडांच्या रक्षणाची नीट तजवीज करून कांटेरी वगैरे झाडें किंवा रानगवत हीं दूर करणें, किंबहुना प्रसंगविशेषीं चांगल्या

१. वरील श्लोक हा होय—

उत्खातान् प्रतिरोपयन् कुसुमितांश्चिन्वन् शिशून् वर्धयन्
प्रोत्तुंगान् नमयन् नतान् समुदयन् विश्लेषयन् संहतान् ।
तीव्रान् कंटकिनो बहिर्नियमयन् ग्लानान्मुहुः सेचयन् ॥
मालाकार इव प्रयोगनिपुणो राजा चिरं नंदतु ॥

झाडांसहि खच्ची करणें, हें जसें उद्याननियुक्त पुरुषाचें कर्तव्य होय; त्याप्रमाणेंच लोकाश्रयाच्या बळावर भाषोत्कर्षास साहाय्य करण्याचें काम ज्यांनीं पत्करलें त्यांसहि ग्रंथांच्या गुणावगुणांविषयीं विवेचन करणें अगदीं जरूर आहे.

पण रा. ओक यांच्या पक्षकाराचा आक्षेप वरच्याप्रमाणें केवळ सामान्यतः नसून त्यास असें जर वाटत असेल, कीं वरील ग्रंथकाराची ख्याति आह्मांस सहन न होऊन त्यास बळेंच कांहीं तरी दूषण लावावें अशा बुद्धीनें आह्मीं सदरील दोन इतिहासग्रंथांवर टीका केली, तर या आरोपाचा शुष्कपणा वादविषयक अंकावरूनच कोणासहि सहज दिसणार आहे. ज्या ग्रंथकाराची उत्तम भाषापद्धतीच्या संबंधानें आरंभीं प्रधानत्वेंकरून गणना केली आहे, व इतर अनेक ठिकाणींहि ज्याच्या ग्रंथांविषयीं उल्लेख करून सदरील टीपेच्या पृष्ठांतहि ज्याची प्रशंसा केलेली आढळते, त्याच्याविषयीं एके ठिकाणींच मात्र द्वेषबुद्धि किंवा मत्सर ही वृत्ति प्रगट झाली आहे असें ह्मणण्यांत काय जीव आहे? जो मजकूर ग्रंथकर्त्याच्या मित्रासहि 'अगदीं अमान्य आहे असें नाहीं' असें त्यास उघडपणें कबूल करणें भाग पडतें, त्याविषयीं तिन्हाइतानें मोठासा अनुकूल अभिप्राय प्रगट न केल्यास नवल कसचें! आह्मांस खचीत वाटतें कीं, सदरील दोन लेख कोणापुढेंहि जरी ठेविले, तरी ते वाचून त्यांविषयीं आमची जी बुद्धि झाली ती हल्लींच्या काळीं बहुतेकांची होईल. त्याप्रमाणेंच के, रसेल यांसारख्या सर्वमान्य इतिहासकारांचे विचार जर आमच्या मराठी इतिहासकर्त्यानें आपल्या देशबंधूंस प्रांजलपणें सादर केले असते, आणि ज्यांस 'इतिहासाची गोडी लावण्याकरितां व ज्यांचें भ्रांतिमूलक मत घालवून बंडाचा खरा खरा वृत्तांत' कळविण्याकरितां त्यानें हातांत लेखणी धरली त्यांच्या आश्रयावरच आपल्या श्रमांची कृतार्थता मानण्याचा जर तो संकल्प करता तर प्रस्तुत पुस्तक आहे त्यापेक्षां फार निराळ्या तऱ्हेचें निपजलें असतें याविषयीं आह्मांस अगदीं संदेह वाटत नाहीं!

याप्रमाणें 'इंदुप्रकाशां'तील पत्रकारानें आमच्या लेखावर जीं जीं दूषणें दिलीं त्यांचा निरास झाला. आतां वरच्याखेरीज इतर जें पांडित्य त्यानें केलें आहे त्याविषयीं विशेष चर्चा करण्याची तादृश आवश्यकता नाहीं. आमची लेखणी वेळोवेळीं घसरतांना पाहून व विचारसरणींत विसंगतता पाहून त्यास जर वाईट वाटत असेल, तर त्यास आमचा काय उपाय आहे? आमच्या अल्पबुद्धीनें आह्मांस जें सयुक्तिक व संगतवार दिसतें तें आह्मीं लिहितों; तें आमच्या प्रतिपक्ष्यासारख्या जाडी विद्वानांस व केसभरहि इकडे तिकडे न होतां ज्याची लेखणी विचारसरणीवरून आगगाडीप्रमाणें नीट धांव घेण्यास शिकली असेल अशांस अन्यथा वाटत असेल हें उघडच आहे. आमच्या प्रस्तुतच्या पत्रकर्त्याप्रमाणें जे अगोदरच विद्याधनमंडित होऊन बसले असतील त्यांच्याकरतां आमचें पुस्तक चाललें आहे असें नाहीं; तर त्यांच्याहून ज्ञानसंप-

त्रतेंत ज्यांची पायरी फारच कमी अशा अज्ञान व साध्याभोळ्या लोकांस कांहीं उपयोग व्हावा एवढाच त्याचा हेतु आहे. तो कांहीं अंशीं सफळ झाला असतां तेवढेंहि आह्मांस बस आहे. अशा लोकांस आमच्या लेखणीचें भरकटणें केवळ अनिष्ट वाटत असेल असें आह्मी समजत नाहीं. तर मुख्य विषयाच्या अनुरोधानें अवांतर माहिती टीपांतून देण्याचा जो आमचा पूर्वागत पाठ आहे तो त्यांस बराच पसंत असेल असें समजतों. याप्रमाणेंच आमच्या आक्षेपकांनीं आह्मांस जें मेहेरबानीनें कळविलें आहे, कीं "विशेषतः वर्तमानकाळाच्या प्रसिद्ध व्यक्तींस, ग्रंथकारांस आणि सभादिकांस अनुलक्षून लिहिलेले (आमचे) लेख अविचार, साहस, चटोरपणा, दर्पोक्ति आणि अहंमन्यता या दोषांस पात्र असतात"—त्यावरहि आमचें उत्तर वरीलच होय. विधवांच्या दुःखपरिहारार्थ जो आमच्या देशहितेच्छूंचा उद्योग सुरू झाला होता तो अजूनहि जारी चालला असून हजारों गतभर्तृका पुनः संसारसुखाचा अनुभव घेऊं लागल्या आहेत, आमच्या देशी मागांतून खंडोगणती कापड दरवर्षी तयार होऊं लागून आमचीं स्वदेशी दुकानें विलायतच्या व्यापाऱ्यांस केवळ हृदयशल्यें होऊन बसलीं आहेत, आमच्या प्रार्थनासमाजाचा अत्यंत उत्कर्ष होऊन त्यांतील प्रत्येक जण केवळ धर्ममूर्ति बनून राहिला आहे, व आर्यसमाजाचा तर जिकडे तिकडे प्रसार होऊं लागून परमहंसांच्या शुभ्र यशानें शुद्ध ख्रिस्तादि मंडळीहि लोपून गेली, इत्यादि प्रकार आज चोहोंकडे कोणाच्या दिव्य दृष्टीस दिसत असल्यास न जाणो; आमच्या कोत्या नजरेच्या आटोक्यांत तर वरच्यापैकीं कांहींहि येत नाहीं. याचें कारण काय असेल तें असो! तरी निदान आह्मीं एवढें केलें आहे कीं, आमच्या बुद्धीस जें जें वाटलें तें तें आह्मीं आमच्या वाचकांस स्पष्टपणें कळविलें आहे. दिसतें एक आणि सांगितलें एक असा द्विधा भाव केल्याचा तरी दोष आह्मीं आपल्या माथीं घेतला नाहीं. आतां अशा स्पष्टोक्तीमुळें आमच्यांतल्या कित्येक महाजनांस आपला बुद्धचा मानभंग केलासा वाटेल, व त्यांच्या भाविक भक्तवर्गास आमचें वर्तन अविचाराचें, साहसाचें वगैरे वाटेल यांत संशय नाहीं. पण ज्याप्रमाणें आपले अंतस्थ रोग झांकून ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं इतकेंच नाहीं, तर तसें करणें हें उलटें अत्यंत अनर्थावह होय; त्याप्रमाणेंच आमच्या लोकांत जे कित्येक महादोष आहेत त्यांवर पांघरूण न घालतां त्यांचें ज्ञान कोणीं सर्वांस करून दिलें असतां तो पिशुनत्वाच्या दोषास पात्र होतो असें आह्मांस मुळींच वाटत नाहीं. बाह्य स्वरूपास भुलून जाणें टाकून देऊन लोक जसजसे मार्मिक व तत्त्वशोधक होतील, व त्यांच्या ठायीं सत्यप्रीति जसजशी बलवत्तर होत जाईल, तसतशी वरील दोषाविष्करणाची योग्यता व उपयोग हीं त्यांस विशेष कळूं लागतील असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

एलिफास—या सहीचें पत्र 'बॉंबे ग्याझिट' नामक इंग्रेजी वर्तमानपत्राच्या ३ आक्टोबरच्या अंकांत आलें होतें. या पत्राच्या मोहोऱ्यावरच 'एतद्देशीय वर्तमान-

पत्रें व कारस्थानी ब्राह्मण लोक' अशीं अमोलिक अक्षरें झळकत होतीं. यावरून आंतील मजकुराची आमच्या मराठी वाचकांस सहज कल्पना होईल. मराठी भाषेंतील पुस्तकावर 'ग्याझिट'सारख्या पत्रांत चर्चा हें मोठें अपूर्व असल्यामुळें सदरील लेखाचा गवगवा कांहीं वेळ चोहोंकडे फार झाला. दोन वर्षांपूर्वी आमचे खिस्ती बंधु वृद्ध 'ज्ञानोदय' यांनीं आमच्या पुस्तकावर आपलें जंगलेलें हत्यार उचलून जशी चोहोंकडे गडबड करून दिली होती, त्याहिपेक्षां वरील 'एलिफास' साहेबांची गंभीर गर्जना सर्वांस विशेष भयप्रद झाली. पहिल्या खेपेस आमच्या मित्रांस धाक पडून खिस्तभक्तांस जसा आनंद झाला होता, कीं आठव्या अंकाशींच आमच्या पुस्तकाची अखेर होते; त्याप्रमाणेंच पुनः तिसावा हाच त्याचा शेवटचा अंक असें वाटूं लागल्याचा समय आला. पण दैवयोगेंकरून तें सर्व काहूर निघून जाऊन आमच्या मालेस त्यापासून यत्किंचित्हि अपाय झाला नाहीं. एतद्देशीय वर्तमानपत्रांपैकीं कित्येकांनीं आमचा पक्ष उचलून साऱ्या इंग्रेजी पत्रांतहि अग्रगण्य जें 'टाइम्स आफ इंडिया' त्याचीहि आह्मांस अनुकूलता दृष्टीस पडली. 'ब्राह्मण' या सहीच्या एका पत्रांत तर 'एलिफास'नें एतद्देशीयांवर व विशेषतः ब्राह्मणांवर जीं अज्ञानमूलक व दुराग्रहपूर्वक दूषणें दिलीं होतीं त्यांचें सर्वथा निरसन केलेलें होतें. तसेंच येथील 'ज्ञानप्रकाशां'त वरील पत्रकाराच्या मुद्द्यांचा शुष्कपणा दाखवून प्रस्तुत पुस्तकावर केलेल्या टीकेचें खंडन आह्मीं स्वतः केलें होतें तेंहि पुष्कळांस बहुधा माहीत असेलच.

आतां ज्या पत्रावरून एवढा ग्रंथ माजला व सर्वांस एवढी धास्ती पडली त्यांत एवढें लिहिलें तरी काय होतें हें समजण्याची आमच्या वाचकांस उत्सुकता उत्पन्न होईल; यास्तव त्यांतील सारांश येथें देतों. प्रथमतः आमचें पुस्तक दोन तीन महिने मागें पडलें आहे हें लिहून नंतर तिसाव्या अंकांतील विषय काय आहे, हें 'एलिफास' साहेबांनीं आपल्या वाचकांस कळविलें आहे. याप्रमाणें उपोद्घात करून नंतर सदरील अंकांतील पांच सहा ठिकाणचे वेंचे भाषांतररूपानें आपल्या गौरवर्ण व ज्ञानसंपन्न देशबंधूंस सादर केले आहेत. यांपैकीं चार 'रत्नें' तर खुद्द नेक नामदार गवर्नर साहेब यांसच आमच्या प्रिय पाश्चात्य बंधूनें नजर केलीं आहेत. नंतर आह्मी पुण्याच्या एका कोपऱ्यांत लपून जे आहों तें नीट न वाटून, एतद्देशीयांस परम दुर्लभ जो पाश्चात्य परिचय तो सदरहू साहेबांनीं आमची जात हुद्दा वगैरेविषयीं टिमकी वाजवून आह्मांस अनायासें घडवून दिला आहे. आणि सरते शेवटीं ब्राह्मण हे जन्मतःच मोठे लावालावी करणारे व लुच्चे असून एकंदर देशांत सरकाराविषयीं कुरकुर व द्रोहबुद्धि जी आढळते ती सारी या दुष्ट लोकांच्या चिथावणीनें उत्पन्न झालेली आहे हें परम तत्त्व प्रस्तुत पत्रकारानें स्थापित केलें आहे; व सरकार अजून किती दिवस निजून रहाणार ह्मणून त्यास टोला दिला आहे!

याप्रमाणें सदरहू इंग्रेजी पत्राचा एकंदर मतलब आहे. आतां वस्तुतः पहातां त्यांत आमच्या लेखाचें खंडन एका अक्षरानेंहि केलें नसून 'ज्ञानोदय' 'सत्यदीपिका' अशा प्रतीच्या पुस्तकांत शोभण्यासारखाच मजकूर सगळा भरला आहे, यास्तव त्यास उत्तर न देतां त्याकडे मुळीं दुर्लक्ष करणें हेंच वाजवी होतें. पण लिहिणारे साहेब आहेत, व इंग्रेजी पत्रांत मोठ्यांपैकीं मोडणाऱ्या 'ग्याझिटां'त त्यांनीं प्रवेश करून तेथून आह्मांवर प्रहार केला आहे. यास्तव या दोहों संबंधानीं होणारा भ्रम दवडण्याकरितां त्यांच्या लेखणीस कांहीं मान देणें अवश्य आहे.

'एलिफास' साहेबांच्या पत्रांतील मुद्द्यांविषयीं विचार करण्याच्या अगोदर त्यांनीं आमच्या मालेस आपल्या शुंडाग्रेंकरून परम उन्नति देऊन आपल्या बंधुवर्गाच्या ज्ञानदृष्टीस तिला विषय केली, व तींतील शेलकीं शेलकीं चार फुलें या इलाख्याच्या अधिपतींच्या सिंहासनावर वाहिलीं, याबद्दल त्यांचे आभार मानल्यावांचून रहावत नाहीं. त्याप्रमाणेंच आपल्या विशाल मस्तकावर आह्मांस आरूढ करून आपल्या गंभीर गर्जनेनें आमचें इतिवृत्त त्यांनीं सर्वांस विश्रुत केलें या उपकाराचेंहि ओझें त्यांचें आमच्या डोक्यावर आहे. तर या दोहोंबद्दल आमची कृतज्ञता येथें प्रदर्शित करून आतां त्यांच्या पांडित्यप्रकारांतील तथ्यांश पाहूं.

आमच्या आक्षेपकांनीं वादविषय अंकांत जीं पाश्चात्यांवर आह्मीं दूषणें दिलीं आहेत तीं उडविण्याचा जरी आव घातला आहे तरी त्यांच्या पत्रानें तीं विशेष दृढ मात्र होतात हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. एक भाषाज्ञानाचें दूषण मात्र विशेष लागू पडत नाहीं. आपल्या स्वतःच्या ज्ञानानें ह्मणा, अगर खाजगी पंडितांच्या किंवा एतद्देशीय स्नेह्यांच्या साहाय्यानें, त्यांनीं आमच्या पुस्तकांतील उताऱ्यांचें भाषांतर एक दोन शब्दांशिवाय बेचूक केलें आहे. पण याशिवाय बाकी सर्व गोष्टींत 'हत्ती' महाराज स्वतःच्या आवेशानेंच निवळ खड्ड्यांत जाऊन कोसळले आहेत ! ही मौज कसकशी झाली आहे ती पुढील मजकुरावरून वाचकांस कळेल.

आह्मीं तिसाव्या अंकांत इंग्रेज लोकांविषयीं जें लिहिलें होतें कीं, त्यांस इकडील लोकांविषयीं फार थोडी माहिती असते, व अशी स्थिति असण्याचीं जीं कांहीं कारणें दाखविलीं होतीं, तें सर्व आमच्या प्रतिपक्ष्यास बिलकूल कबूल नसून त्यानें बिचाऱ्या ब्राह्मणांच्या माथींच सारा दोषारोप केला आहे. तो ह्मणतो युरोपियन लोक हिंदूंपासून विलग रहातात हें खोटें आहे; कां तर ब्राह्मण जर युरोपियनाबरोबर जेवला तर तो भ्रष्ट होतो हें जातिधर्माचें वेड अगोदर ब्राह्मणांतून कोठें निघतें आहे ? तेच जर आमच्या लोकांस इतके नीच मानतात तर दोघांचा समागम व्हावा कसा ? या त्याच्या ह्मणण्यावर वर सांगितलेल्या 'ब्राह्मण' नामक पत्रांत नामी उत्तर दिलें आहे. आमच्या 'एलिफास' बोवांस समागम व स्नेह होण्याचा मार्ग एका मेजावर बसून खाना खाल्लया-

खेरीज दिसतच नाहीं. तसेंच साऱ्या मनुष्यजातींतील खट जे ब्राह्मण त्यांशिवाय हिंदुस्थानांत दुसरे कोणी लोक आहेत कीं नाहीं याचाहि त्यानें क्षणभर सुद्धां विचार केला नाहीं. सहभोजनाचा थाट घडून येण्यास ब्राह्मणांस जरी धर्माची आडकाठी असली, तरी मुसलमान, पारशी या बाह्य लोकांस तर ती नाहींना; मग आमच्या पाश्चात्य बंधूंनीं त्यांशीं तरी निरर्गल स्नेह जोडण्याची कधीं इच्छा प्रदर्शित केली आहे? हिंदु-हिंदूंमध्येंहि सहभोजन फारच नियमित होतें; मग या प्रतिबंधामुळें निरनिराळ्या जातींच्या लोकांचा परस्परांशीं समागम किंबहुना अत्यंत मैत्रीहि घडत नाहीं काय? पण इतकें लांब कशाला? ज्या लोकांस येशूचे प्रेषित हिंदुधर्मरूपपातकमार्गातून काढून ख्रिस्ताच्या चरणीं लीन करवितात, व त्यांच्या गोड शब्दांस भुलून जे बिचारे आपल्या इष्टमित्रांस व गणगोतासहि जन्माचे अंतरतात त्यांचा तरी आदर प्रभुत्व भोगणाऱ्या लोकांपासून कितपत होतो? 'एलिफास' साहेबांचे कितीक बंधु नव्या बनलेल्या ख्रिस्ती लोकांबरोबर आजपर्यंत जेवले असतील, व त्यांच्यांत विद्वत्तादि गुणांनीं युक्त असणाऱ्यांशींहि दृढ परिचय करण्याविषयीं कितीकांची मनोदेवता वहात असेल? पण या सर्व गोष्टींनींहि जर खात्री होत नसेल, तर पुढील जगजाहीर वर्तमानावरून तरी आमच्या राजनिष्ठ बंधूंस आपल्या पांडित्याचा पोकळपणा आरपार दिसून येईल असें वाटतें. हें वर्तमान खुद्द आमच्या परम दयावंत चक्रवर्तिनीकडून आमच्या हल्लींच्या व्हैसराय साहेबांस आलेलें पत्र होय. याचें कारणहि तसेंच जगजाहीर आहे कीं, गेल्या वर्षीं हिंदुस्थानाच्या असंख्य प्रजेपासून राजनिष्ठापूर्वक राजसत्कार अनुभवून युवराजांची स्वारी आपल्या देशास जेव्हां परत गेली, तेव्हां त्यांनीं स्वदृष्टीनें पाहिलेले चमत्कार आपल्या मातोश्रीस जे निवेदन केले, त्यांत 'एलिफास' च्या परम ज्ञानसंपन्न व सुशील बांधवांविषयींचें गाऱ्हाणेंहि प्रमुखत्वेंकरून सांगितलें.

दुसरी गोष्ट जी इकडील लोकांविषयींची साहेब लोकांस माहिती तिच्या दृढीकरणार्थ पाहिजे असल्यास शेंकडों प्रमाणें दाखविण्यास आह्मी तयार आहों. शिवाय वरील कलमांत सांगितलेली स्थिति लक्षांत आणली असतां तिजपासून काय निष्पन्न व्हावें हेंहि कोणासहि सहज अनुमानानें कळणार आहे. यास्तव आमच्या वर सांगितलेल्या कैवाऱ्यानें दिलेलें एक सर्वप्रसिद्ध उदाहरण मात्र येथें दाखल करतों. तें नुकते निवर्तलेले प्रसिद्ध कादंबरीकार व इतिहासकार मेडोज टेलर यांचें होय. हे साहेब गेलीं चाळीस वर्षे या देशांत होते, व पूर्वीच्या कंपनीच्या नोकरांप्रमाणें हे एतद्देशीयांस कस्पटासमान मानण्यास शिकलेले नसल्यामुळें त्यांच्यांत नेहमीं बसणें उठणें हें त्यांस लज्जास्पद वाटत नसे. तरी अशा रीतीचा परिचय त्यांचा इतका दीर्घकाळ असतांहि त्यांच्या 'तारा' नामक कादंबरींत पुष्कळ विलक्षण गोष्टी आढळतात. त्यांची नायिका ही व्यासशास्त्री (हें नांवहि चमत्कारिकच आहे!) याची मुलगी असतां तिला मुरळी

केली आहे; मुरळी करून जेजुरीच्या खंडोबास न वहातां तुळजापुराच्या देवीस वाहिली आहे (तुळजापुरास मुरळ्या मुळींच नाहींत), आणि पुनः दिलेलें दान परत घेतल्यासारखें करून तारेस मुरळीची पुनः गरत केली आहे ! बरें, ती गरत होण्यास तिचें पाणिग्रहण तरी कोणीं केलें आहे, तर विजापुरच्या एका उमरावानें !!

याप्रमाणें वादविषयक निबंधांतील दोन मुद्द्याच्या गोष्टींविषयीं विचार झाला. आतां यापुढें पांच सहा उतारे जे दिले आहेत त्यांविषयीं पहावयाचें. हे उतारे तिसाव्या अंकांत आहेत. पहिला युरोपिअन लोकांस इकडील भाषांची माहिती कितपत असते याविषयींचा आहे; दुसरा रावबहादुर शंकर पांडुरंग पंडित व जगत्प्रसिद्ध फुलर साहेबांचा खटला याविषयींचा आहे; तिसरा मेलविल साहेबांच्या संबंधाचा; चवथा बूट स्टाकिंग यांच्या आधुनिक माहात्म्याचा; पांचवा युरोपच्या व इंग्लंडच्या समृद्धतेविषयींचा; आणि सहावा मुसलमान लोकांच्या व एतद्देशीय शिपाई लोकांच्या लष्कराच्या पराक्रमाविषयींचा होय. आतां या सर्व स्थलांचे उल्लेख 'एलिफास' साहेबांसारख्या परम विद्वान् व सत्यनिष्ठ लोकांस फारसे रुचले नसतील हें आह्मी कबूल करतों; पण एवढ्यानेंच ते असत्य व राजद्रोहासारख्या भयंकर आरोपास पात्र झाले काय ? ज्या गोष्टी सर्वांस सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें ढळढळीत स्पष्ट दिसताहेत व ज्या सर्वजनविश्रुत व ग्रंथप्रमाणसिद्ध आहेत, शिवाय ज्यांचा चालू राजकीय प्रकरणांशीं बिलकूल संबंध नाहीं, त्या तोंडावाटे काढल्या असतां जर आमच्या प्रस्तुत सुधारलेल्या इंग्रजी अमलांत राजनिष्ठाभंग घडतो, तर मागल्या मोगलाई व मराठेशाई कारकीर्दीस कां हसावें ? आमचा जुना मराठी जोडा इंग्रेजी बुटाच्या इतका निर्मळ असतो असें ह्मणतांक्षणींच राजनिष्ठेचा चुराडा होऊन तिची हत्या जर शिरावर चढते व ह्मणणारा भयंकर राजदंडास पात्र होतो, तर आरबी गोष्टींत शमसुद्दिनानें आपल्या पुतण्यास पुऱ्यांत मसाला कमी घातल्याबद्दल सुळावर देण्याचें योजिलें तें काय वाईट ? वरील उताऱ्यांपैकीं पहिल्या चोहोंस 'रत्नें' ही संज्ञा देऊन गवरनर साहेबांच्या हुजुरास तीं 'एलिफास' साहेबांनीं प्रविष्ट केलीं आहेत हें वर सांगितलेंच आहे. आतां या 'रत्नां'ची सरकारी जवाहीरखान्यांत काय व्यवस्था झाली असेल हें आह्मांस माहीत नाहीं; पण आह्मांस खचीत वाटतें कीं, त्यांवरून 'एलिफास' साहेबांच्या समंजसतेची जितकी पारख करतां येईल तितकी आमच्या पुस्तकाच्या राजनिष्ठेविषयीं करतां येणार नाहीं ?

येथवर 'बांबे ग्याझिट'मधल्या पत्रांत आमच्या पुस्तकाविरुद्ध जें एवढें भयंकर अवडंबर आलें होतें त्यांत तथ्यांश किती आहे तो वाचकांस कळविला. आतां याखेरीज इतर ज्या कित्येक गोष्टी त्यांत प्रसंगवशात् आणल्या आहेत त्यांच्या खरेखोटेपणाचा निवाडा येथें करण्याची गरज नाहीं. शाळांतून व विद्यालयांतून शिकलेल्या लोकांस सरसकट 'चतकोर विद्येचे धनी' अशी संज्ञा आमच्या महाविद्वान् गौरवर्ण

बंधूनें दिली आहे. हें तर काय पण येथील हायस्कूलचे हेडमास्तर व सरकारचे रिपोर्टर हेहि 'एलिफास' साहेबांच्या खिसगणतींत नाहींत. यांच्या जागीं एखादे 'महा-अरि' किंवा ख्रिस्ती दीक्षेनें पावन झालेले एकादे गृहस्थ जर सरकारानें नेमले असते, तर त्यांत आमच्या चाणाक्ष साहेबांच्या मतें सरकारचा कांहीं शहाणपणा दिसून येता. याप्रमाणेंच सार्वजनिक सभेसहि कोरडा लगवून सरते शेवटीं विचाऱ्या शंकराचार्यासहि एक निसटता फटका पोंचविण्याची आमच्या 'गजेंद्र' पंडितांनीं तजवीज ठेविली आहे. आतां या सर्व आक्षेपांवर आमचें उत्तर एवढेंच आहे कीं, विद्येच्या संपूर्ण कळा उघडल्याचा प्रकाश 'ग्याझिट' पत्रांत पडला आहे एवढाच जर असेल तर तिजपासून आमच्या 'एलिफास'सारख्या प्रचंड विद्वानांसच लखलाभ होवो, आह्मांस त्या कळांतला चतुर्थांश तर काय, पण एक अंशहि नको! तसेंच या शहरांतल्या वरील दोघां कामगारांच्या संबंधानें आमच्या पत्रकारास एवढेंच कळविणें बस आहे कीं, ते सांप्रत ज्या हुद्द्यांवर आहेत ते त्यांस देवाचे लाडके किंवा सरकाराचे प्यारे ह्मणून प्राप्त झाले आहेत असें नाहीं; तर त्यांच्यापेक्षां विद्वत्ता व गुणांची चढा हे गुण ज्यांचे ठायीं शतपट अधिक होते अशा वजनदार अधिकाऱ्यांच्या हातून त्यांच्या नेमणुका झाल्या आहेत. शिवाय त्यांच्यावर त्यानें जे पोरकट आरोप आणले आहेत, ते वर्तमानपत्रद्वारें सर्वांस जाहीर करण्यापूर्वी त्यांच्या कामाविषयींची बरोबर माहिती अगोदर कोणापासून तो करून घेता तर त्यासच बरें पडलें असतें. सरते शेवटीं येथील सार्वजनिक सभेस जें आमच्या प्रतिपक्ष्याकडून बक्षीस मिळालें आहे, त्याविषयीं लिहिण्याची तर सोयच नाहीं; कां कीं, एतद्देशीय जोड्याचाहि कैवार घेतलेला आमच्या पाश्चात्य बंधूस खपत नाहीं, मग लोकांच्या हक्कांविषयीं वगैरे लिहिलें तर केवढा राजद्रोह होईल हें सांगणें नकोच! तरी हें कलम संपविण्यापूर्वी आह्मीं तिसाव्या अंकांत केलेलें मुसलमानांचें वर्णन व सार्वजनिक सभेनें प्रोत्साहन करून विलायतेस पाठविलेला अर्ज, या दोहोंची आमच्या पत्रकारानें जी मौजेनें सांगड घालून दिली आहे तिचा आह्मांस जो चमत्कार वाटला तो येथें प्रदर्शित केल्यावांचून रहावत नाहीं. मुसलमानांनीं राणी साहेबांकडे पाठविलेला अर्ज[1] कोणीकडे आणि 'निबंधमाला' कोणीकडे! शेकमिऱ्याचा डोला आणि पर्वतीच्या पायऱ्या इतक्या तऱ्हेचाच दोहोंचा परस्पर संबंध आहे!!

याप्रमाणें 'एलिफास' साहेबांनीं आमच्या लहानशा पुस्तकावर मेहेरबानी करून आपल्या सोंडेनें त्यास उडवून देण्याचा किंवा भारदस्त पायाखालीं चेंगरून टाकण्याचा

१. हा जे निराधार मजकूर 'ग्याझिट' पत्रांत होता तो येथील सार्वजनिक सभेच्या चिटणीसांनीं खरी गोष्ट कळवून खोडून टाकविला, हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित् माहीत असेलच.

जो प्रयत्न केला आहे त्याचा आमच्या अल्पमात्र शक्तीप्रमाणें आह्मीं प्रतीकार केला. हा त्यास व तद्वर्गीयांस तुच्छ वाटेल यांत संशय नाहीं. पण याच्या योगानें आमच्या वाचकांस जर एवढें कळून येईल, कीं हजारों युरोपियनांच्या हातीं जाणाऱ्या पत्रांतहि किती छोटिंग बाच्छाईचा मजकूर खपला जातो, व दुराग्रहास वश झालें असतां आमचे विद्यासंपन्न ह्मणविणारे पाश्चात्य बंधुहि कोठवर भरकटत जातात, तर एवढ्यानेंच या प्रत्युत्तराचें आह्मी साफल्य मानूं.

सत्यदीपिका—या नांवाचें एक मासिक पुस्तक येथें निघत असतें. हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित् ऐकूनहि माहीत नसेल; कां कीं, हें ख्रिस्ती मताचें प्रतिपादक असल्यामुळें व त्या धर्माचें गौरव आणि हिंदुधर्माची निंदा याखेरीज यांत फारसा मजकूर कधींहि येत नसल्यामुळें मराठी मासिक पुस्तकांत हें विशेष मोडत नाहीं. याचे वर्गणीदार पाहिले तर ते अर्थातच भाविक युरोपियन, धर्मांतर झालेले लोक, हिंदुधर्माच्या अज्ञानास्तव त्याची टवाळी केलेली ज्यांस आवडते असे परभू, शेणवी वगैरे व यांच्याहूनहि हीन जातीचे लोक हेच आढळतात. हें पुस्तक अलीकडे चार वर्षें जें चाललें आहे हा त्याचा दुसरा जन्म होय. पहिल्या जन्माचीं त्यानें बारा वर्षें कंठलीं; पण त्याचा सांचा अतिशयित लहान असतां व वर्षाची किंमत अवघी दोन आणे असतांहि येथील 'चुटक्या'प्रमाणें[1] त्यास निजधामास जावें लागलें. 'ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी' हिनें ही छोटी 'दीपिका' असत्यरूप अंधकाराच्या ध्वंसनार्थ हातीं धरली होती; पण महिन्याच्या महिन्यास एक दिवलीभरहि तेल पुरविण्याची तीस ऐपत नाहींशी झाल्यानें ह्मणा, अगर तिजपासून आपलें कार्य कांहींच होत नाहीं असें वाटल्यावरून ह्मणा, तिनें तीस आपल्या हातची एकाएकीं सोडून दिली. हा आश्रय सुटतांच बिचारी 'दीपिका' भंग पावून तिची दिव्य ज्योत मातींच्या धुराळ्यांत मालवून गेली! सत्याची ज्योत मालवल्यावर मग तो अनर्थ काय पुसावा! 'ज्ञानोदया'चीं कोवळीं किरणेंहि न पोंचून जिकडे जिकडे अज्ञानांधकार जमत चालला तिकडे तिकडे सैतान महाराजांची स्वारी पुनः आपल्या संवगड्यासहवर्तमान यथेच्छ विहार करूं लागली. पण ही त्यांची दंगल फार दिवस चालली नाहीं तोंच ख्रिस्तभक्तांनीं मशालीची व बुधलीची तजवीज करून पहिलीच्या सवाईनें उजेड पडे अशी दुसरी 'दीपिका' उभी केली! हीहि आज चार वर्षें आपलें पवित्र काम बजाविते आहे; तरी आमच्या

---

१. सुमारें तीन चार वर्षांपूर्वी वरील नांवाचें एक टुमदार पत्र येथें दर पंधरवड्यास निघत असे. हें कोण काढीत असे हें शेवटपर्यंत कोणाच्याहि समजण्यांत आलें नाहीं. हें इंग्रजींत निघत असे. यांतील भाषापद्धति अंमळ विशेष डौलाची असे; पण विषयाचें प्रतिपादन फार पोक्त व वजनदारीचें असे. अशीं पत्रें क्वचित् निघायाला लागून तीं फार दिवस टिकत नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे.

देशाच्या दुर्दैवानें हिची देखील प्रभा अलीकडे मंदावत चालली आहे. देशहिताचें एवढें काम तिनें उचललें असतां तिच्या दीनवाण्या काकुलतीकडे कोणी लक्ष देत नाहीं. असें करतां करतां एखादे दिवशीं तीस 'ख्रिस्त' ह्मणण्याची पाळी येऊन ती आपल्या मयत भंगिनीच्या भेटीस जाईल कीं काय कोण जाणे !

या पुस्तकाचें एकंदर स्वरूप वर जें सांगितलें आहे त्यावरून त्याचें त्याच्या हिंदु बंधूंशीं कितपत सूत असेल हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. या सर्वांत जुनें जें 'विविधज्ञानविस्तार' हें आजपर्यंत धर्मविषयक वादांत जरी कधींहि पडलें नाहीं, व आमच्या ख्रिस्ती बंधूंशीं द्वेषभावहि त्यानें जरी कधींहि बुद्धिपुरःसर प्रगट केला नाहीं, तरी त्याच्या मुखपत्रावर 'श्री' हें परम अमंगल व मूर्तिपूजाभिमानसूचक जें अक्षर घातलेलें असतें तेवढेंच अत्यंत नाजूक प्रकृतीची जी 'सत्यदीपिका' तिच्या कपाळांत माथेशूळ उठविण्यास बस झालें ! मग एवढें जिचें मूर्तिपूजानिषेधाचें कडकडीत व्रत तिचा दुसऱ्या दोन मासिक पुस्तकांशीं तर केवढा स्नेह असेल हें उघडच आहे. 'दंभहारका'शीं तर तिचें व तिच्या बंधूचें निरंतर खडाष्टक चालत असतें हें पुष्कळांस माहीत असेलच. त्याचा जो मध्यें कांहीं काळपर्यंत अस्त झाला होता त्या वेळेस दोघांहि ख्रिस्ती भावंडांनीं आपलें जगद्बंधुत्व स्पष्ट दाखवून आनंद प्रदर्शित केला होता. आह्मांवरहि त्यांची कृपादृष्टि कधीं मधीं होत असतेच. 'ज्ञानोदय' बोवांनीं आमच्या आठव्या अंकाच्या वेळेस खूप मनावर घेऊन तीन चार अंकांत आमच्यावर जो वाग्बाणांचा वर्षाव चालवला होता त्याचा झणत्कार तरी पुष्कळांच्या कानावर आला असेलच. वरील वृद्ध पितामहांनीं बहुधा भारती युद्धांतील प्रथम सेनानीप्रमाणें 'लघु लेकराच्या गर्वखंडनार्थ हातांत धनुष्य धरिलें' असावें; पण त्याच्यासारखा पराक्रम मात्र न घडून लवकरच आमच्या अल्प दृष्टीनें ते शरपंजरीं जे खिळून गेले ते अद्याप उठत नाहींत. आमच्या 'मयत जननी'स ज्यांनीं खपवून टाकली त्यांस तिचें 'पुस्तकरूप पिलूं' भारी व्हावें ही मोठ्या आचंब्याची गोष्ट होय ! असो; वरील प्रसंगीं प्रस्तुत 'दीपिके'च्या कर्त्यांनींहि आमची खबर घेतली होतीच. वरील 'एलिफास' साहेबांप्रमाणें आमच्या वंशपरंपरेची व गुरुपरंपरेची हकीकत आपल्या शुभवर्तमानवाल्या बंधूंस आरंभीं जाहीर करवून नंतर आपली राजनिष्ठा व पवित्रशास्त्रनिष्ठा त्यांनीं भरपूर प्रदर्शित केली होती. शिवाय नुसत्या मराठी शिव्यांनींच आह्मी ऐकणार नाहीं असें जाणून आपल्या 'एका पुणेंकर हिंदु मित्रा'स भाड्यानें आणून त्याकडून इंग्रेजी पुष्पवृष्टि त्यांनीं आह्मांवर करविली. ही वृष्टि प्रकृत पुस्तकाच्या त्याच अंकांत (जानेवारी १८७५) असून तिच्या शेवटीं 'पुढें चालू' ह्मणून आपल्या दुखावलेल्या बंधुवर्गास त्यांनीं आश्वासन दिलें होतें; पण हें वचन पुरें झालेलें कोठें दिसण्यांत आलें नाहीं. मग या 'हिंदु मित्रा'ची लोककल्याणाची इच्छा तितक्यांतच गोठली; किंवा आह्मांस भय दाखविण्याकरितांच ती हिकमत केली होती; किंवा

सत्यदीपिकेच्या आफीसांत या विद्वान 'पुणेकरा'स येशूच्या शरीराची व रक्ताची बिदागी बरोबर पोंचली नाहीं यावरून त्यानें रागानें आपली लेखणी आधींच थांबवून धरली कीं काय कोण जाणे ! त्यावर आतां पुनः दोन वर्षांनीं 'दीपिके'ची व 'माले'ची गांठ. इतक्या काळांत परस्परांचा संबंध पुष्कळच बदलला आहे. त्या वेळेस प्रस्तुत 'दीपिके'ची बरींच भरभर असून आमच्या पुस्तकाचें डोकें कोठें उगीच वर होऊं लागलें होतें. सध्यां 'दीपिके'च्या पात्रांत ठणठणाट होण्याचा सुमार दिसूं लागून इतके स्नेही असतां व "जगाच्या समाप्तीपर्यंत मी तुह्मांबरोबर सर्वकाळ आहें" असें आकाशांतील प्रभूचें साक्षात अभिवचन असतां तिचींच शाश्वती तीस सांगवेनाशी झा ली आहे. इकडे आमच्या 'माले'ची स्थिति आज दोन वर्षांत कशी होत आली आहे हें आमच्या वाचकांस म'हीत आहेच. पूर्वी तीस 'दीपिके'चें शत्रुत्व जसें थोडें बहुत तरी बाधक होण्याचा संभव होता तसा आतां तर मुळींच नाहीं. उलटें तिचें मात्र मंदहि आंदोलन 'दीपिके'च्या सूक्ष्म होत चाललेल्या ज्योतीस निर्वाण पदवीस पोंचविण्यास कदाचित् कारण होईल!

एवढी प्रस्तावना करून आतां सदरहू पुस्तकाच्या गेल्या नोवेंबरच्या अंकांत आमच्यावर जी टीका आली आहे तिच्यांत सत्याचा व समंजसतेचा अंश कितपत आहे तो आमच्या वाचकांस सादर करतों. याच प्रसंगीं वर सांगितलेला जो जानेवारीचा अंक त्यांतीलहि कांहीं आक्षेपांचा विचार करूं.

'सत्यदीपिका'कर्ते हे पूर्वी हिंदु धर्मातले असून पुढें ख्रिस्ती झाले, व आज वीस पंचवीस वर्षें ते आपल्या देशबंधूंच्या मेळ्यांत नसून ज्यांचे आचार विचार वगैरे सगळे भिन्न अशांचा समागम त्यांस इतका काळ सतत घडला, यास्तव त्यांच्या समजुती त्यांच्या पूर्वीच्या धर्मबंधूंहून पुष्कळ निराळ्या झाल्या असल्यास त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. पण त्यांचीं मतें त्यांच्या देशबंधूंच्याहून जेथें तेथें अगदीं निराळींच पडावीं हें मोठें चमत्कारिक नाहीं काय ? ज्यांस आमच्या देशची पुरती भाषाहि येत नसते व जे एतद्देशीयांपासून नेहमीं दूर फटकून रहातात त्यांच्या ठायीं आह्मांविषयीं भलभलत्या कल्पना असल्यास तें सहजच आहे; पण लहानपणापासून जे इकडील रीतरिवाजांत वाढले व अजूनहि ज्यांचा संबंध अगदीं तुटला नाहीं, त्यांच्या ठिकाणींहि तेंच अज्ञान व तोच दुराग्रह आढळावा हें नवल आहे. खोटे तेहतीस कोटी देव सोडून एका खऱ्या देवास भजल्याचें व नित्य सांजसकाळ पवित्र शास्त्राचा पाठ केल्याचें फळ हेंच काय ? निवळ सत्याचें सेवन करणारे व विद्यासमुद्रांत सतत पोहणारे जे मिशनरी व इंग्रेज लोक त्यांच्या अत्यंत परिचयानेंहि सांप्रत पुस्तकांत दृष्टीस पडते इतकीच समंजसता व तर्कशक्ति जर येत असेल तर वरील समागमाचा लाभ घडला नाहीं ह्मणून कोणासहि खेद करण्यास फारसें कारण रहाणार नाहीं. तसेंच आज वीस वर्षें या पुस्तककर्त्यांचा मराठीकडे इतका सारखा व्यासंग चालला असतां आणि मराठी व इंग्रजी या भाषांचे

कोशहि त्याच्या हाताखालून गेले असतां, वाक्यार्थ करण्याची व लिहिणाराचा एकंदर मतलब जाणण्याची जी शैली त्याचे ठायीं दिसून येते तीहि कांहीं अपूर्व आहे !

या सर्व दूषणांचा प्रत्यय वाचकांस येण्याकरतां आतां पूर्वोक्त दोन लेखांतले आह्मांवर केलेले आक्षेप क्रमाक्रमानें पुढें आणतों. त्यांचें निरसनहि त्याच्या त्याच्या पुढें केलेलें वाचकांस आढळेलच.

'दीपिका'कर्ते वगैरे मंडळीचा आमच्यावरच काय पण एकंदर सर्व नव्या शिकलेल्या लोकांवर एक मोठा आक्षेप हा आहे कीं, आह्मी ख्रिस्ती धर्माची निंदा करतों. हा आक्षेप किती समंजसपणाचा आहे बरें ! आमच्या ख्रिस्ती बांधवांस एवढेंहि कळूं नये काय, कीं जी गोष्ट आपण निःशंकपणें कायावाचामनेंकरून नित्य करीत आहों तीच दुसऱ्यानें केल्यास आपणास बोलायास तोंड रहात नसतें ? आपण जर कोणावर शस्त्र उगारलें, तर त्यानें आत्मरक्षणार्थहि शस्त्र धारण करूं नये काय ? आतां हें खरें कीं, त्यांच्या पैगंबरानें त्यांस आज्ञा दिली आहे कीं, एका गालावर मारिली असतां दुसरा गाल पुढें करावा. पण या आज्ञेचा असा अर्थ काय, कीं तुह्मी दुसऱ्यांचा हवा तितका छळ करीत जा, आणि ते कांहीं गडबड करूं लागले, कीं हें माझें वचन त्यांच्या तोंडावर फेकून देत चला. शिवाय आह्मी पुस्तकास आरंभ करते वेळीं अशी प्रतिज्ञा भोगलेलीहि कोठें आह्मांस आठवत नाहीं, कीं बैबलास व त्याच्या भक्तांस आह्मी बिलकूल धक्का लावणार नाहीं. असें आह्मीं करावेंसें जर त्यांस वाटत असेल, तर त्यांचा साऱ्या जगभर चाललेला क्रम त्यांस सोडून द्यावा लागेल. हें एक झालें. दुसरें असें आहे कीं, पवित्र शास्त्र जर ईश्वरप्रणीत आहे तर मानवी निंदेचें त्यास एवढें भय कसचें ? सूर्याचें तेज मनुष्याच्या तोंडच्या वाफेनें कधीं मलिन झालें आहे काय ? न्यूटनच्या किंवा युक्लिडच्या सिद्धांतांवर आजपर्यंत कोणीं कधीं आक्षेप काढले आहेत ? आणि ते जर काढले तर त्यांचें समाधान किती लवकर करतां येतें ? असें आमच्या 'सत्यदीपिकें'त कधीं तरी असतें काय ? आठव्या अंकांत साऱ्या पृथ्वींतील लोक बैबलावर ज्या शंका काढतात त्या दाखल केल्या असतां त्यांवर 'सत्या'च्या ज्योतीचा उजेड इतकाच पडतो कीं,—"ख्रिस्ती शास्त्राचें यांचें ज्ञान तर अनुपम आहे !"-"ख्रिस्ती शास्त्राचें व त्यासंबंधी एखाद्या अर्थप्रकाशक ग्रंथाचें सहा महिने तरी शुद्ध हेतुपूर्वक अध्ययन केलें असतें तर अशा पोरकट गोष्टी त्यांच्या लेखांत आल्या नसत्या !" या दुसऱ्या वाक्यांतील 'शुद्ध हेतू'चेंहि बीज आह्मांस नीटसें कळत नाहीं. हिऱ्याची परीक्षा करायाच्या वेळीं अगोदर नेत्रस्पर्श करून प्राणायाम करावा लागतो काय ? तसेंच युरोपांतील सहस्रावधि मोठमोठे ग्रंथकार शुभवर्तमानास जे मानीतनासे झाले आहेत ते लबाड व दुष्ट ह्मणून काय ?

दुसरें जबरदस्त दूषण असें कीं, आमचें सरकार आह्मांस हवें तें लिहिण्याची व

बोलण्याची जी मोकळीक देत आहे तिचा आह्मी दुरुपयोग करून सरकारास नेहमीं शिव्या देत असतों. हें दूषण तर अगदींच पोकळ आहे. या लिहिण्यावरून स्वतः योजलेल्या शब्दांचा अर्थहि आमच्या 'दीपिका'कारांस बरोबर कळत नाहीं असें ह्मणणें भाग येतें. 'सरकार' ह्मणजे काय व 'दुरुपयोग' ह्मणजे काय याचा आमच्या खिस्ती बंधूंनीं आपल्याशीं कधीं क्षणभरहि विचार केला आहे काय? आह्मीं हातांत घेतलेलें काम त्यांच्यासारखेंच केवळ मासिक पुस्तक चालविण्याचें आहे, वर्तमानपत्र लिहिण्याचें नाहीं हें त्यांस माहीत आहेच; मग या मासिक पुस्तकांत सरकारच्या ठरावांचें, सार्वजनिक विषयांचें वगैरे विवेचन केलेलें त्यांस कधीं आढळलें आहे काय? पण आमच्या भाविक व राजानिष्ठ बंधूस जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं तर सरकार दिसत नसेलना! ह्मणजे पाद्रीसाहेब सरकार, पवित्र शुभवार्ता सरकार, मेकॉलेप्रभृति ग्रंथकार सरकार, टेम्स नदी सरकार, साहेबी बूटहि सरकार,—फार तर काय, दूरच्या परंपरासंबंधानें 'ज्ञानोदय', 'सत्यदीपिका' हींहि जबरदस्त सरकारेंच! सरकारत्वधर्माची एवढी जबर व्याप्ति असल्यास मग आह्मी मोठे राजद्रोही खेर. पण असें ह्मटलें तर बोलण्यालिहिण्याची मोकळीक जी आमच्या सरकारनें आह्मांस दिली आहे, तिचा अर्थ काय, व तिचा दुरुपयोग ह्मणजे तरी काय, हें आह्मांस कळत नाहीं. विलायती बूटासहि शिरसावंद्य मानीत जा, एरवीं तुह्मांला हवें तें बोलण्याची मुभा आहे, असें ह्मणणें ह्मणजे मनुष्याचे पाय बांधून टाकून त्यास त्रिभुवनांत संचार करण्याची सदर परवानगी दिल्याप्रमाणेंच आहे.

पण हेंहि क्षणभर एकीकडे ठेवूं. आमच्या राजनिष्ठ बंधूच्या मनोगतास अनुसरून 'सरकार' शब्दाचा अर्थ वरच्याइतका किंवा त्याहिपेक्षां पाहिजे तितका व्यापक जरी घेतला, तरी आमचें लिहिणें सर्व याच रोखाचें असतें असें 'सत्यदीपिका'कारांस शुभवर्तमानावर हात ठेवून ह्मणवेल काय? आमच्या राज्यकर्त्यांच्या अंगीं मनुष्यस्वभावास अनुसरून असणारे कित्येक दोष जसे आह्मीं स्पष्टपणें आमच्या वाचकांस कळविले आहेत, त्याप्रमाणें त्यांच्या गुणांचा कोठेंच उल्लेख केला नाहीं काय? हरएक प्रकारच्या विद्येंत त्यांचें नांव जें साऱ्या जगभर गाजलें आहे, त्यासंबंधानें एतद्देशीयांच्या मनांत पूज्यताबुद्धीची प्रेरणा करून देण्याचा यत्न गेल्या तीन वर्षांच्या लेखांत त्यांच्या नजरेस कोठेंच आला नसल्यास त्यांच्या डोळसपणाची मोठी तारीफ केली पाहिजे! त्याप्रमाणेंच आमच्या देशबांधवांचे जे पुष्कळ दोष व न्यूनता सर्वांस दिसताहेत त्यावाहि निर्देश आह्मीं केला नाहीं काय? नाहीं ह्मणण्यास एक मात्र केलें नाहीं खेरें, कीं पिसें पांढरीं करून खबुतरांच्या मंडळींत शिरल्याबरोबर खबुतरांचे सर्व प्रकारें गुणानुवाद व कावळ्यांचें जेवढें सांपडेल तेवढें पैशून्य काढून जगास जाहीर करणें. एवढें न केल्याबद्दल जो कांहीं दोष येईल तो पतकरण्यास आह्मी राजी आहों.

प्रस्तुत पुस्तककर्त्याच्या वर्गातले जे लोक आहेत त्यांचे आमच्या देशांतील नव्या मंडळीवर जे आक्षेप वरचेवर येत असतात त्यांचा शुष्कपणा येथवर दाखविला. आतां आमच्या 'इंग्रेजी भाषा' या निबंधावर या ख्रिस्ती पंडितांनीं जें एक मोठें दूषण दिलें आहे त्यावर चर्चा करून हें चवथें सदर आटपतों.

आमच्या अंगीं पक्षपातित्व किती पूर्णपणें विंबून गेलेलें आहे हें आपल्या वाचकांस दाखविण्याकरतां 'सत्यदीपिका'कर्ते गेल्या नोवेंबरच्या अंकांत दोन मोठीं जबरदस्त प्रमाणें दाखल करतात. त्यांतील एक हें—

"इंग्रेजी भाषेंत जो ग्रंथसंग्रह आहे त्याविषयीं सांगतांना ज्यांच्या योगानें ती भाषा इतक्या उत्तम दशेप्रत येऊन पोंचली आहे असे जे धर्मसंबंधी गद्यपद्यात्मक ग्रंथ त्यांचा तर मुळींच कोठें उल्लेख दिसत नाहीं. ह्यूम, गिबन, जान स्टुअर्ट मिल्ल इ० चीं नांवें दृष्टीस पडतात, परंतु कोपर, बन्यान, पेली, व्हेटली, वाटस, जान, न्यूटन, चामर्स, राबर्ट हाल, बटलर इ. जे नामांकित ग्रंथकार व वक्ते झाले व ज्यांच्या ग्रंथांकडून इंग्लिश भाषेला मातबरी व माधुर्य आलें त्यांची ह्या नि० क० स कशी माहिती नाहीं ? तसेंच ख्रिस्ती मताच्या मंडनार्थ व नास्तिक मताच्या खंडनार्थ जीं शेंकडों पुस्तकें इंग्रेजी भाषेंत आहेत त्यांतून कांहीं तरी सांगायाचीं होतीं."

दुसरें प्रमाण—

"चासर, मिल्टन वगैरे दोन चार धर्मसंबंधी ग्रंथकारांचीं नांवें लिहिलीं आहेत, परंतु त्यांचे ग्रंथांचे विषय काय होते, व धर्माच्या योगानें इंग्लिश कवितेला केवढें साह्य झालें आहे हें कांहींच सांगितलें नाहीं."

'दीपिके'च्या कर्त्यांनीं आठव्या अंकावर टीका करतांना आरंभीं आह्मांस कळविलें होतें कीं, आह्मी युनिवर्सिटीच्या परीक्षेच्या वेळीं उंटाच्या ओझ्याचीं पुस्तकें जरी वाचलीं असलीं तरी त्याच्या योगानें ख्रिस्ती मंडळीच्या १८०० वर्षांच्या इतिहासाचेंहि ज्ञान आह्मांस प्राप्त झालें असेल असें नाहीं. हें त्यांचें ह्मणणें वाजवी होतें; कां कीं सरकारी विद्यालयांतून वरील विषय अगदीं शिकवीत नाहींत. पण हाच आपला उपदेश त्यांनीं वरील वाक्यें लिहितांना कसा ध्यानांत आणला नाहीं कोण जाणे ! कदाचित् त्यांस वाटलें असेल कीं, ज्या विद्वान् पाद्रीसाहेबांपासून आपण धर्मदीक्षा घेतली त्यांपासूनच त्यांचें इतर सर्व ज्ञानहि आपणांस अर्थातच प्राप्त झालें पाहिजे; एकदां दत्तविधान झालें ह्मणजे झाडून साऱ्या जिनगाणांवर आपला कबजा बसलाच. अशी आमच्या ख्रिस्ती बंधूची समजूत झाली असल्यास तिनें त्यास या ठिकाणीं मोठ्या गोत्यांत आणलें असें ह्मटलें पाहिजे. इंग्रेजी भाषेस आज जी एवढी उत्कर्षाची स्थिति प्राप्त झाली आहे ती वरील धर्मोपदेशकांच्या ग्रंथांनीं झाली असून इंग्रेजी कवींसहि पवित्र शास्त्रानेंच स्फुरण आलें, या दोन गोष्टी आज आह्मांस नव्याच कळल्या. हीं

दोन तत्त्वें कॉलेजांतील प्रोफेसरांनीं आह्मांस कधींहि सांगितलीं नाहींत, व ग्रंथांतरींहि असे उल्लेख आह्मांस अद्याप आढळले नाहींत. इंग्लंडांत व युरोपांत जेवढें जेवढें ह्मणून चांगलें आहे तेवढें सर्व ख्रिस्ती धर्माचें फळ अशीं भाविक मतें मिशनरींच्या ग्रंथांतून जशीं आढळतात, तशींच वरील दोन आमच्या धर्मपरायण बंधूनें बहुधा आपल्या 'दीपिकें'त ठेवून दिलीं असावीं. पण शुभवर्तमानावरील भाव आपला अंमळ एकीकडे ठेवून व आपल्या विचारशक्तीस किंचित् प्रखर करून जर तो पाहील तर त्यास खचीत कळून येईल कीं, वरील मतें सत्यास फार अनुसरून आहेत असें नाहीं. वरील सर्व ग्रंथकार नामांकित आहेत खरे, व पाद्रींच्या मंडळांत तर त्यांस पुष्कळच मान आहे हें उघड आहे; पण इंग्रेजी भाषेस उत्कृष्ट दशेस आणून पोंचविण्यास कोणकोणते ग्रंथकर्ते कारणभूत झाले असें कोणीं विचारिलें असतां वरील धर्मोपदेशकांचीं प्रधानत्वेंकरून कोणी नांवें घेईल असें आह्मांस वाटत नाहीं; त्यांतून धर्मविषयक ग्रंथांनां भाषेस 'माधुर्य'हा गुण प्राप्त होणें हेंहि विचित्रच आहे ! तसें जान न्यूटन सारख्यांच्या ग्रंथांनीं इंग्लंडच्या भाषेस मातबरी कितपत आली असेल याचा प्रत्यय पहाणें फार सोपें आहे. सध्यां सामान्यतः इंग्रेज लोकांचीं खाजगी पुस्तकालयें किंवा सार्वजनिक ग्रंथालयें जर पाहिलीं, तर 'सत्यदीपिके'चे आवडते असे वरील महान महान ग्रंथ त्यांतून सांपडण्याचा जितका संभव आहे त्याहून आह्मीं निर्दिष्ट केलेलेच पहाणाराच्या दृष्टीस पडण्याचा अधिक संभव आहे. फार तर काय, पण पवित्र शास्त्राशीं दांडगाई करणारी जी वरील ह्यूमप्रभृति मंडळी तीस तर सर्वांच्या ग्रंथसंग्रहांतून मुख्य स्थान दिलेलेंहि आमच्या भाविक पुस्तककर्त्यांस पुष्कळ ठिकाणीं आढळलें असेल. असें होण्याचें कारण आह्मीं वादविषयक निबंधांत स्पष्टपणें दाखल केलें आहे; पण तें आमच्या बंधूस अर्थात अत्यंत दुःसह होऊन त्याचें खंडन करण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. पण त्यानेंच आरंभीं मोठ्या दुःखानें कबूल केलें आहे कीं, "वास्तविक पहातां या देशांत येणारे फारच थोडे इंग्लिश लोक ख्रिस्ती असतात" ! ! हा दिलगिरीचा अनुभव सांप्रत पुस्तककारास आपल्या वर्गणीदारांवरूनच बहुधा आला असावा.

दुसरा मुद्दा इंग्रेजी कवींचा. यांस बैबलाच्या योगानें वाग्देवता कितपत प्रसन्न झाली असेल याची प्रचीती थोडी आहे. साऱ्या कविमंडळांत धार्मिक ह्मटले तर मिल्टन व कौपर या दोहोंखेरीज कोणी आढळतील असें वाटत नाहीं. बाकीचे पाहिले तर बहुधा सारे बेताबाताचेच ख्रिस्ती असून कांहीं तर उघड नास्तिक होते. बायरन व शेली यांची ख्याति एतद्देशीय ख्रिस्ती मंडळांतहि नसेलसें नाहीं; व ड्रायडन, पोप, चॉसर[1] यांच्या कृतींत तर जो ख्रिस्तीपणा आहे त्या संबंधानें शेवटल्या न्यायाच्या

१. 'सत्यदीपिका'कारांनीं वरील कवींची धार्मिक ह्मणून जी वर गणना केली आहे ती पाहून हसूं आल्याशिवाय रहात नाहीं; आमचे बंधु वरील कवींच्या पुरातनत्वावर फसून गेले (पुढें चालू).

दिवशीं देवपुत्रांस आपल्या बापाशीं रदबदली करतांना बहुधा मोठीच पंचाईत पडणार आहे ! तसेंच स्पेन्सर, शेक्सपीयर यांच्या कवितेंतहि शुभवर्तमानाचा संबंध पाहूं गेलें असतां आमच्या पुराणाचा जितका सांपडेल तितकाच बहुधा वरील ईश्वरप्रणीत पुस्तकाचा सांपडेल[1] आणि त्यांतहि वरील जोडींतले दुसरे जे वाग्देवतेचे प्यार ह्मटलेले महाकवि यांच्या नाटकांत व विशेषतः दोन लहानशा काव्यांत तर जे चमत्कार आढळतात त्यांविषयीं यापूर्वी अनेकशः उल्लेख केलेच आहेत. असो; तेव्हां हें ख्रिस्ती धर्माचें गौरवहि आमच्या 'दीपिका'कारांच्या भाविकपणाचाच केवळ उद्गार होय; तींत 'सत्या'चा अंश ह्मणण्यासारखा नाहीं.

पण हें सर्व खंडन करण्याचीहि वस्तुतः पहातां मुळींच गरज नाहीं. आमच्या आक्षेपकांनीं प्रस्तुत टीकेस हात घालण्यापूर्वी आमच्या चार अंकांचा नुसता विषयक्रम जरी वाचून पाहिला असता, तरी त्यांस कळलें असतें कीं, त्यांचे दोष केवळ निराधार होत. कां तर, वरील चार अंकांत आह्मीं फक्त निबंध व इतिहास या दोन सदरांचाच काय तो विचार केला आहे. या सदरांपैकीं कोणत्यांतहि त्यांचीं बन्यानप्रभृति दोनशें मंडळी व पवित्रशास्त्राचा बचाव करणारे धर्मवीर यांस येण्यास अवकाश नव्हता हें उघड आहे. तरी गिबनच्या व ह्यूमच्यासंबंधानें बिशप वाटसन यांनीं केलेल्या ग्रंथांचा निर्देश आह्मीं केला आहे.[2] पण हें आमच्या सत्याभिमानी 'दीपिका'कारांच्या कोठून लक्षांत

असावे; पण असें असेल तर बोकेशियो महाराजांसहि सन्मणिमालेंत प्रथम वंदन कां करूं नये? नित्याच्या पवित्रशास्त्रपाठाबरोबर चॉसरच्या 'क्यांटर्बरी टेल्स' या काव्याचाहि पाठ तर ते करीत नसतीलना ! !

१. शेक्सपीयर कवीस पवित्र शास्त्राकडून कितपत प्रेरणा झाली असेल हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल, हा उतारा आमच्या बंधूस विशेषेंकरून मान्य होण्याजोगा आहे हें सांगण्यास नकोच—

"His genius is unrivalled; but it is the earthly and natural he paints. Of the heavenly and supernatural—the spiritual, in the highest sense, he says nothing. His characters are all *human*. For the divine, we must turn to another book and to other Teachers."

Angus's *Handbook of English Literature.*

२. गिबनचें एवढें माहात्म्य वर्णून त्याच्या प्रतिपक्ष्यांविषयीं आह्मीं विशेष कां लिहिलें नाहीं याचें कारण पुढील उताऱ्यावरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत येईल—

"Gibbon's *Decline and Fall* has now been jeaously scrutinized by two generations of eager and unscrupulous opponents, and I am only expressing the general opinion of competent jud-

(पुढें चालू).

यावें ? त्यांचा मुख्य उद्देश जो, कीं कोणत्याहि तऱ्हेनें आपले पवित्र धर्मबंधु या द्वाड पुस्तकावर जितके अधिक दांत ओठ खातील व लाग साधल्यास सरकारच्या कानावर त्याची कागाळी वरचेवर जितकी जाईल तितकें आपलें शुभवर्तमान स्मरून आपणाला करायाचें. मग मूळचा मजकूर नीट लक्षपूर्वक वाचा काय ह्मणून ? शिवाय ज्यांवर त्यांनीं आपली पवित्र लेखणी फिरविली ते अंक त्यांनीं आपल्या एका 'विद्वान् व सन्मान्य' मित्राकडून आणविले, तेव्हां त्याची परत करण्याबद्दल निकड लागल्यावरून कदाचित् त्यांस ते नीटसे वाचायलाहि सांपडले नसतील. असें असल्यास आमच्या ख्रिस्ती बंधूस आह्मी येथें असें कळवितों कीं, (पण हें कळविणेंहि त्यांस कोणीं कळविलेंच पाहिजे !) वरच्यासारखा पुनः कधीं काळीं योग आल्यास त्यांनीं आह्मांकडे मागणें केल्यास आमचें पुस्तक त्यांजकडे रवाना करण्यांत येईल. मग त्यांचें काम झाल्यावर तें त्यांनीं परत पाठविलें तरी चालेल किंवा आपल्यापाशींच ठेविलें तरी चालेल.

येथपर्यंत या चवथ्या आक्षेपकांच्या दूषणांपैकीं जीं विशेष विचार करण्यासारखीं होतीं त्यांच्या यथार्थत्वाविषयीं आह्मीं आपलीं मतें वाचकांस कळविलीं. त्यांवरून सदर्हू पुस्तकाचें एकंदर स्वरूप सर्वांच्या वरेंच लक्षांत येईल. आतां सरते शेवटीं आह्मांस एवढेंच सांगायाचें आहे कीं, आह्मीं आपल्या पुस्तकावर 'सत्या'चा ठळठळीत छाप जरी मारला नाहीं; व पवित्रशास्त्राच्या योगानें पवित्र आत्म्याचा समागम नित्य घडून आमच्या ख्रिस्ती बंधूंस जो लाभ होत असेल तो जरी आह्मांस मुळींच होण्याचा मार्ग नाहीं, तरी परमेश्वरानें अवघ्या मनुष्यजातींबरोबर आह्मांस जी थोडी बहुत ज्ञानशक्ति दिली आहे, तिच्या साह्यानें आह्मांस जें कांहीं खरें खोटें, बरें वाईट वगैरे दिसतें तें आह्मी मनोभावेंकरून आमच्या एतद्देशीय वाचकांस कळवितों. आमच्या सद्धर्मी बंधूंस हातीं धरलेल्या 'दीपिके'च्या प्रकाशानें जो पक्षपातरूप महादोष आमच्या अंतःकरणांत दिसला त्याच्या वास्तव्याचें निदान आह्मांस तरी ज्ञान नाहीं. आह्मांस ह्यूमसारखा नास्तिक सारखाच व डॉक्टर चामर्ससारखा आस्तिक्य बुद्धीचा वक्ता व ग्रंथकारहि सारखाच, दोघांतहि जो ग्राह्य अंश आमच्या बुद्धीनें दिसेल तो आह्मांस तिऱ्हाइतपणानें अवश्य घेणें आहे; पहिल्याचा बुद्धिप्रभाव पाहून जसे आह्मी थक्क होतों

ges when I say that by each successive scrutiny it has gained fresh reputation. Against his celebrated fifteenth and sixteenth chapters all the devices of controversy have been exhausted; but the only result has been, that while the fame of the historian is untarnished, the attacks of his enemies are falling into complete oblivion. The work of Gibbon remains; but who is there who feels any interest in what was written against him ?"

Buckle's *History of Civilization*.

त्याप्रमाणेंच दुसऱ्याचें अद्भुत वक्तृत्वहि आह्मांस मोहून टाकतें. आमच्या प्रतिपक्ष्यास ज्याप्रमाणें हिंदुधर्म हा केवळ तुच्छ असून सारे वेद व सारीं शास्त्रें हीं केवळ केरकचरा होत, त्यासारखी पवित्र बुद्धि आमची इतर धर्मांविषयीं मुळींच नाहीं. सारें सत्य काय तें एका बुकांत सांठवलें आहे, व सारे मनुष्यजातीचे गुण जगन्नियंत्यानें एका राष्ट्रांत कोंडून भरले आहेत, हें मत आह्मांस बिलकूल पसंत नसून त्यासारखें मूर्खपणाचें व अधमपणाचें मत कोणतेंहि नाहीं अशी आमची पक्की समजूत आहे. व ती आह्मीं 'यथाशक्ति' व यथावकाश गेल्या तीन वर्षांच्या अंकांत प्रगट केली आहे. हें आमच्या सत्यवादी व राजनिष्ठ बंधूसारख्यांस मुळींच न आवडून ते आह्मांस 'जुन्या शाळेचे' 'धर्म भोळे' 'इंग्रजी राज्याचे अहितचिंतक' वगैरे[2] अमोलिक विशेषणें देतील हें उघड

---

१. 'सत्यदीपिके'च्या कर्त्यांनीं गेल्या वर्षाच्या पहिल्या अंकांत आपल्या तीर्थरूपांचा जो जीवनवृत्तांत दिला आहे त्यांत ते आपल्या स्वतःविषयीं लिहितात—

"पुढें जसजसें त्या मुलाचें ('दीपिका'कारांचें) नवीन धर्मसंबंधी ज्ञान वळावत चाललें, तसतसा रा० पदमनजी यांची हिंदु व ख्रिस्ती धर्माची परीक्षा करण्याची इच्छाहि वाढत चालली. त्यांनीं कित्येक विद्वान्, शास्त्री व वैदिक यांस आपल्या घरीं बोलावून आणून त्यांस आपल्या मुलाशीं वाद करायास लावावें, व ते कुंठित झाले ह्मणजे त्यांस दक्षिणा देऊन वाटेस लावावें."

या दुसऱ्या वाक्यावरून आमच्या बंधूचा अगदीं आरंभींचा पराक्रम व त्याच्या वडिलांचें औदार्य हीं दोन्ही अगदीं व्यक्त होतात, व प्रभु येशूच्या धर्माचें तेज किती प्रखर आहे हेंहि दिसून येतें. खरेंच, जर येशूनें बाराव्या वर्षीं प्लेटोच्या व अरिस्टॉटलच्या शिष्यांस खुद्द अथेन्स शहरांतील पाठशालांत वादांत हटवलें, तर त्याच्या भजकानेंहि एका सपाट्यास वैदिकांस व शास्त्र्यांस पार धुडकावून दिलें यांत काय आश्चर्य ! तरी एवढ्या अकाटोविकट विद्वानांचें पुढील पांडित्य पहा—

"जनानां पिडा हर्तुम परमेश्वर समर्थोस्ती"

असलें लंगडें संस्कृत वरील बालपंडिताच्या पुस्तकांत आज वीस पंचवीस वर्षें लोटून गेल्यावरहि आढळतें हा काय चमत्कार आहे बरें ! !

२. 'सत्यदीपिके'च्या पुढील प्रकाशाकडे वाचकांनीं लक्ष पुरवावें—

"ज्यांच्या विद्येनें व प्रयत्नानें भूगोलज्ञानाची वृद्धि झाली, देशोदेशच्या व्यापाराचा मार्ग मोकळा झाला, सुधारणुकीचा व कलाकौशल्याचा प्रसार झाला, त्यांस (कोलंबस वगैरे पुरुषांस) हें फारच योग्य सर्टिफिकीट ह्या १९ व्या शतकांत पुण्यग्रामवासी इंग्लिश शिकलेल्या नि० क० कडून मिळालें ! असो. आतां या सर्टिफिकीट देणारांस जर कोणी असें पुसलें कीं, अहो महाराज, आपण गोमुखींत हात घालून एखाद्या तीर्थाच्या जागीं गायत्री मंत्र जपत बसण्याचें, अथवा एखाद्या देवळांत बाया बापड्यांस जमवून वटसावित्रीची अथवा ऋषिपंचमीची कथा सांगण्याचें सोडून एवढी जबरदस्त यातायात करून इंग्रजी कशाला शिकलां व असले अप्रयोजक निबंध लिहिण्याच्या खटपटींत कां पडलां तर ते काय उत्तर देतील ?"

(पुढें चालू).

आहे; पण अशांच्या दांत ओंठ खाण्याची व अंतस्थ खटपटींची आह्मी बिलकूल पर्वा करीत नाहीं, आह्मांस जो सत्याचा व देशहिताचा मार्ग दिसत आहे त्यास अनुसरणें हेंच आह्मांस प्राप्त झालेल्या विद्येचें चीज होय, व त्यास सध्यां कितीहि अडथळे आले व लोकांच्या मनांत त्याविषयीं कितीहि कुत्सित कल्पना आल्या तरी त्याची योग्यता उत्तरोत्तर यथार्थपणें प्रगट होत जाईल हा आमचा कृतनिश्चय आहे.

निबंधमाला—हें या पुस्तकाचें तिसरें वर्ष समाप्त झालें. यास्तव प्रथमतः जगच्चालकाचें भक्तिपुरःसर चिंतन करून व नंतर आमच्या आश्रयदात्यांचे आभार मानून सालाबादप्रमाणें एकंदर वर्षाची थोडीशी हकीकत देतों.

हें वर्षहि गेल्या सालाप्रमाणेंच एकंदर जगाच्या व हिंदुस्थानच्या इतिहासांत नोंदून ठेवण्यासारखें गेलें. युरोपांत तर तुर्कस्थानच्या लढाईची गडबड साऱ्या वर्षभर चालून तिजपासून कोणकोणते परिणाम उद्भवणार याचें अद्याप कोणासहि धोरण बांधवत नाहीं. रशियन लोकांच्या उत्तेजनानें जे चार प्रांत बंड करून उठले होते त्यांचें तुर्क लोकांनीं यथास्थित पारिपत्य करून आपलें प्रभुत्व दृढतरपणें स्थापित केलें हें मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. शिवाय आज कित्येक शतकें चाललेली जी रूमशामची गादी जी इकडील मोगल बादशाहीच्या बरोबरीची असून तिच्याहि अगोदर स्थापिली गेली,—तिच्या संबंधानें गेल्या वर्षांत जे अपूर्व फेरफार झाले व अद्याप अधिकाधिक होत चालले आहेत तेहि जगजाहीर झाले आहेत. या सर्व गोष्टींवरून आह्मां प्राच्य लोकांविषयीं ज्या पाश्चात्यांच्या अनेक कुकल्पना आहेत त्यांचें बरेंच खंडन झालें. असो; आमच्या देशांत तर गेल्या सालभर काय हालहवाल चालत होती ती सर्वांस माहीत आहेच. गेल्या सालीं महामारी व जलप्रलय या अनर्थांपासून सारा देश जसा गलबलून गेला, तसा या वर्षीं तिसराच अनर्थ कोसळून लोकक्षय झाला, व अद्याप ती ग्रहदशा चालूच आहे. या शतकाच्या दुसऱ्या व बाविसाव्या सालीं महाराष्ट्र देशावर जो कहर गुजरला होता त्याच्या सवाईनें या सालीं इकडील लोकांवर अवर्षणामुळें दुष्काळाची धाड येऊन पडली. शेंकडों गांवें ओसाड पडून लक्षावधि लोकांची अन्नान्नगत झाली. गुरांची तर राखरांगोळी होऊन शेतकरी लोक भिकेस लागले आहेत. हजारों बुभुक्षित व दीन लोक जागोजाग सुरू केलेल्या कामांवर मेटाकुटीनें

तसेंच पुढें—

"ह्या निबंधाचा दर्शनीं विषय जरी इंग्रजी भाषा ही आहे, तरी याचा सर्व रोंख इतकेंच दाखविण्याकडे आहे कीं, इंग्रज लोकांसारखी साडेसाती या देशाला कधींच लागली नव्हती, आणि तिच्या अनिष्ट-दशाशमनार्थ निबंधकारासारखे अनुष्ठानी दुसरे कोणी मिळाले नसतें."

काम करून सरासरी प्राण रक्षण करून राहिले आहेत. ही दक्षिणेकडची स्थिति. उत्तर हिंदुस्थानांत यंदां बरीच सुबत्ता असून लोक जों संतोष मानीत आहेत तों वरुण महाराजांचा क्षोभ होऊन समुद्ररूप भयंकर जलकुंडांत साठ सत्तर हजार मनुष्यांची एकदम आहुती झाली. हें भयंकर वर्तमान कर्णोपकर्णीं सर्वांनीं ऐकिलेंच आहे. असो; तेव्हां आतां हें आमच्या देशाचें नष्टचर्य अद्याप किती उरलें आहे व लोकस्थिति उत्तरोत्तर काय होत जाणार याची कांहींच कल्पना करवत नाहीं !

गेल्या सालीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी दुसरी एक गोष्ट घडून आली तीहि येथें लिहिली पाहिजे. ही प्रसिद्ध फुलर साहेबांचा खटला व त्यापासून साऱ्या हिंदुस्थानांत किंबहुना साऱ्या जगभर झालेला गवगवा होय. या खटल्यावर आमचे नवे लोकप्रिय गवर्नर जनरल यांचा अभिप्राय प्रगट झाला असतां इंग्रेजी पत्रांनीं काय गोंगाट करून सोडला, व आमच्या परम दयावंत महाराणी साहेबांकडून वरील वैसराय साहेबांस काय लिहून आलें, वगैरे सर्व गोष्टी वर्तमानपत्रद्वारें सर्वत्र प्रसिद्ध झालेल्याच आहेत. तसेंच वरील गडबडींत 'युरोपियन' नांवाचें एक अमोलिक वर्तमानपत्र निपजूं पहात होतें, व एलफिनस्टन कालेजचे प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ साहेब यांच्या पत्रावरून मिशनरी साहेबांचा व त्यांचा ख्रिस्ती धर्म प्रकरणीं एक तिसराच बाद मधें उत्पन्न झाला होता हेंहि आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस निदान ऐकून तरी माहीत असेलच. असो; तेव्हां एका यःकश्चित् घोडेवाल्याच्या मृत्युपासून इतक्या इतक्या गोष्टी निष्पन्न झाल्या !

आतां या आमच्या शहराच्या संबंधानें पहातां गेल्या वर्षाप्रमाणें यंदां कांहीं विशेष लिहिण्यासारखें घडलें नाहीं. तरी येथें सत्यपराक्रम स्वामी श्रीमध्वाचार्य यांची स्वारी बरेच महिने असून बालविवाहाच्या संबंधानें एक दोन सभा झाल्या, ही एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट झाली. श्रीस्वामी हे गेल्या सालीं गाजलेल्या परमहंसांहून फार निराळ्या तऱ्हेचे आहेत. त्यांचा काळ वृथापुष्टत्व संपादण्यांत व पाखंडवाद करण्यांत गेला नसून त्यांच्या मोठ्या अधिकारास शोभा आणणारे व संन्यासिधर्मास आवश्यक जे अनेक गुण ते सर्व त्यांचे ठायीं आहेत. सध्यांच्या काळीं फार विरळ आढळणारी जी शास्त्रविद्या तींत ते स्वतः चांगले निष्णात असून तिचें अध्यापन आपल्या शिष्यवर्गास करविण्यांत व सर्व यतिधर्म आचरण्यांत त्यांचें कालक्रमण होत असतें. असो; तर अशा योग्य पुरुषास अध्यक्षस्थान देऊन येथील पुढारी लोकांनीं मोठ्या महत्त्वाचा जो बालविवाह विषय त्यावर साऱ्या लोकसमाजापुढें प्रसिद्धपणें भवति न भवति करण्याचा जो उद्योग केला तो परम स्तुत्य होता यांत संशय नाहीं. पण एकंदर वादाचा जो प्रकार सर्वांच्या दृष्टीस पडला तो पाहून थोड्याच समंजस व सभ्य जनांस खेद झाल्याशिवाय राहिला असेल. प्रथमतः तर दोहों पक्षांकडील पंडितसमुदाय पाहिला

असतां पुण्यासारख्या शहरांतहि शास्त्रविद्येचा ऱ्हास होतां होतां किती निकृष्टतेची अवस्था तीस प्राप्त झाली आहे हें मनांत पूर्णपणें बिंबण्यासारखें होतें. ज्या ठिकाणीं पूर्वी मोठमोठ्या नामांकित पंडितांचे अनेक वेळां वादप्रसंग झाले असतील त्याच ठिकाणीं वरील वीरसमुदाय पाहून आखाड्यांत भारी भारी कुस्त्या साऱ्या आटपल्यावर बाल-मल्लांची झटापट लागलेली पाहून जशी मौज वाटते तशीच वरील प्रसंगीं वाटण्यासारखी होती. बरें हा जो छोटा वाद झाला तो निदान शांतपणानें व सभ्यपणानें तरी चालायाचा होता! अध्यक्षस्थानीं स्वामींस बसविलें होतें, व एकंदर सभेंतहि चांगली संभावित व विद्वान मंडळी होती; तेव्हां अशा प्रसंगीं अप्रयोजक कोट्या, अद्वातद्वा भाषण, विदूषकी प्रकार अगदीं अयोग्य होते हें कोणीहि कबूल करील; पण यांची तर दोन्ही वेळीं जी चंगळ चालली होती ती पाहून मंडळीस फाल्गुन मासाचीच आठवण झाली.[1] याखेरीज दुसरा एक मोठा अश्लाघ्य प्रकार वरील प्रसंगीं सर्वांस स्पष्ट दिसून आला. तो आमच्यांत प्रमुखपणानें भिरविणारी जी विद्वान मंडळी तिचें दंभयुक्त व कुटिल आचरण होय. याचा नवा मासला वरील परमहंसांच्या संबंधानें सर्वांस असा दृष्टीस पडला कीं, माजी परमहंसांच्या प्रमाणेंच यांसहि आपल्या मधुर वाग्जालानें बद्ध करण्याचा वरील देशहितेच्छूंनीं प्रथमतः आपल्याकडून पुष्कळ घाट घातला. एका वर्षापूर्वी मूर्तीस गटारांत झुगारून देऊन त्यांच्या परम द्वेष्ट्यास जसें त्यांनीं हत्तीवर बसवून त्यांचा जयजयकार केला, व स्वस्थानीं प्राप्त झाल्यावर त्यांची आरती केली; त्याप्रमाणेंच त्या गोष्टीस कांहीं महिने लोटत नाहीं तोंच मूर्तिपूजेचा तापलेला छाप हातीं धारण करणाऱ्या स्वामींच्या ते भजनीं लागले. त्यांच्या पायांवर डोचकी ठेवतांना व त्यांचा प्रसाद मोठ्या भाविकपणानें ग्रहण करतांना दयानंदजींचे शिष्य आपली स्वामिभक्ति अगदीं विसरून गेले. तसाच सरते शेवटीं माजी जगद्गुरूंच्या प्रमाणें या मूर्तिपूजकांच्या गुरूंचेंहि आमच्या मंडळीनें भक्तिपूर्वक गीर्वाण वाणीनें स्तवन केलें. पण इतक्या मानसन्मानास व शेवटल्या वाग्भोक्तिकांसहि हे नवे परमहंस जेव्हां मुळींच

१. वरील आमचा उल्लेख बाहेरच्या लोकांस बहुधा अत्युक्तीचा वाटेल; व तो खरोखर तसा वाटण्यासारखाहि आहे. कारण पुण्यासारख्या शहरांत व त्यांतून मोठमोठ्या विद्वानांच्या सभेंत अडाणीपणाची वर्तणूक कोणी करील हें संभवत नाहीं. पण प्रस्तुत प्रसंगीं एका पंडितांच्या तेंडून निघालेलीं दोन वाक्यें येथें मासल्याकरितां देतों. त्यांवरून आमच्या लेखाचें तथ्य वाचकांस बरेंच कळून येईल. बालविवाह हा रूढिमार्ग ह्मणून कोणी शास्त्री प्रतिपादन करीत असतां वरील पंडित वक्तृत्वाच्या व लोककल्याणेच्छेच्या आवेशांत त्यांस बोलले—"काय राव बोलतां!" "असें बोलाल तर येथल्या येथें हापटून टाकीन!" असें उद्दाम वाणीचें स्फुरण वरील दोन्ही प्रसंगीं प्रगट होत होतें. त्यांवरून आह्मांस तर तुकारामाच्या सर्वप्रसिद्ध अभंगाची व 'हितोपदेशां'तील पुढील श्लोकाची आठवण झाली—

अतीत्य हि गुणान् सर्वान् स्वभावो मूर्ध्नि वर्तते ।

भुलले नाहींत, व इतक्या युक्तीनें जाळें पसरल्याचे श्रम जेव्हां अगदीं व्यर्थ गेले; तेव्हां सदर्हू देशहितेच्छूंस स्वामींचा भारी राग आला. मग काय ? पूर्वी जी त्यांवर पुष्पवृष्टि होत होती तीच पुढें निराळ्या तऱ्हेची होऊं लागली. ज्यांच्या तोंडून स्वामींच्या विद्वत्तेची व समंजसपणाची निरंतर स्तुति ऐकूं येत असे, व ज्यांनीं आपल्या प्रचंड विद्वत्तेचा व सरकारी हुद्द्याचा अभिमान क्षणभर एकीकडे ठेवून स्वामींच्या पदाब्जीं आपलें अत्युच्च मस्तक लवविलें, त्यांच्याच तोंडून पुढें लवकरच त्यांच्या मूर्खत्वाचा महिमा कानावर येऊं लागला. लोककल्याणाच्या कामाला स्वामी जर मदत करणार नाहींत तर पुण्याच्या लोकांची त्यांच्यावर गैरमर्जी होईल अशा प्रकारच्या अप्रयोजक सूचना वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊं लागल्या. पण पहिल्या गौरवानें व हांजी हांजीनें सत्यपराक्रम स्वामींस जसा विशेष आनंद झाला नाहीं, तसा पुण्यजनांच्या या रोषापासूनहि त्यांस विषाद न वाटून त्यांनीं त्यांच्या धमकीकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. असें होतां होतां बालविवाहाची गडबड पुढें लवकरच नाहींशी झाली.[१]

आतां सरते शेवटीं या पुस्तकाविषयींहि नेहमींप्रमाणें कांहीं मजकूर लिहून एकंदर वर्षाचा कारभार आटपतों. या सालींहि आमचे वर्गणीदार बरेच वाढून आमच्या एका मित्राच्या साह्यानें एका संस्थानाकडून आह्मांस बराच आश्रय मिळाला आहे हेंहि आमच्या हितचिंतकांस कळविणें इष्ट दिसतें. तशींच ठिकठिकाणाहून निरनिराळ्या विषयांवर आह्मांकडे पत्रें येऊन त्यांचीं उत्तरेंहि प्रसंगविशेषीं आह्मीं दिलीं. श्री० बापूसाहेब कुरुंदवाडकर यांचें गेल्या आगस्ट महिन्याच्या अंकांतील पत्र हें वरील सर्वांत विशेष

१. बालविवाहनिषेध वगैरे जीं लोककल्याणाचीं कामें आहेत तीं साध्य करण्याविषयीं आमच्यांतील प्रमुख मंडळीचे उपाय मोठे चमत्कारिक दिसण्यांत येतात. आपल्या लोकांस लहानपणीं लग्न करण्याची जी बाईट चाल आहे ती मोठमोठ्या सभा केल्यानें व निरनिराळ्या ऋषींचीं नांवें काढून भवति न भवति केल्यानें बंद होणार आहे काय ? अशा सभांनीं फार तर अमुक अमुक पंडित मोठे शास्त्रप्रवीण आहेत व मोठे वक्ते आहेत अशा प्रकारची प्रसिद्धि अज्ञान लोकांत कोणा कोणांस मिरवावयास सांपडेल इतकेंच. यापलीकडे कांहीं कार्य होणें नाहीं. पण इतकेंहि करून समजा कीं, धर्मशास्त्राचा मथितार्थ कोणीं पंडितांनीं काढलाच, व स्वामींनीं आपला सत्यपराक्रम गाजवून त्यावर आपली अधिकारमुद्राहि ठोकली तरी त्या नुसत्या शिक्क्याच्या अक्षरांचा प्रभाव तो काय प्रगट होणार ? स्वतःवर बालविवाहाचा प्रसंग आला असतां आईच्या किंवा बायकोच्या तोंडास वरील मुद्रा जाऊन बसेल काय? किंवा स्वतःच्याच हौसेनें आपल्या लाडक्या मुलाचीं हाडें भाजून आमचे लोक कल्याणेच्छुच सर्वांस जेव्हां सांगूं लागतील कीं, आह्मी या कार्यात प्रमुख असलों ह्मणून काय झालें ? आह्मीं स्वतः याप्रमाणें वागूं ह्मणून तुह्मांस कोणीं सांगितलें ? तेव्हां तरी वरील श्रींची आज्ञा तोंडांत मारल्यासारखीच गपचीप बसणार कीं नाहीं ? तेव्हां या सर्व कृत्यांत स्वामींनीं मोठा शहाणपणा केला असें आह्मी समजतों कीं आमच्या पंडितमंडळीच्या वाङ्माधुर्यास भुलून माजी परमहंसांप्रमाणें आपली फटफजिती निष्कारण करून घेतली नाहीं !

महत्त्वाचें होय; व तें त्यांच्यासारख्या थोर पदवीच्या गृहस्थाकडून आल्यामुळें तर त्याची योग्यता विशेषच वाढली हें उघड आहे. त्यास जें गेल्या अंकांत आह्मांकडून उत्तर गेलें त्याच्या योगानें एतद्देशीय प्राचीन कवींविषयीं आमच्या वाचकांच्या मनांत जर कांहीं जिज्ञासा उत्पन्न होईल, तर तिजबद्दल त्यांनीं वरील कुलीन पत्रकारांचे आभार मानणें उचित होय. असो; गेल्या बारा अंकांत मागला अवशिष्ट राहिलेला 'मुक्तामाले'चा भाग आटपून भर्तृहरीच्या तिन्हीं शतकांचें वामनकृत प्राकृत भाषांतरहि संपूर्ण झालें.[१] तसेंच वर्षारंभींच्या जाहिरातींत कळविल्याप्रमाणें संस्कृत कवींचीं शिरोरत्नें जीं कालिदास व भवभूति त्यांवरचे आमचे निबंध छापून प्रसिद्ध झाले. पुढील तिन्हीहि क्रमाक्रमानें लवकरच प्रसिद्ध होतील.

या पुस्तकाविषयीं उशीराच्या संबंधानें बोभाटा या वर्षीं विशेष झाला; यास्तव यासंबंधानेंहि कांहीं लिहिलें पाहिजे. हा बोभाटा मोडून टाकण्याविषयीं यापूर्वी अनेक वेळां आह्मीं वाचकांस अभिवचन दिलें आहे; पण त्याप्रमाणें कालाची गति आटोपण्याचा अद्याप योग आला नाहीं. हें केवळ आमच्या अपेक्षेमुळें होत आहे असा पुष्कळांचा समज आहेसा दिसतो; व त्याप्रमाणें गेल्या वर्षांत मधून मधून आमच्या प्रतिपक्ष्यांच्या व मित्रांच्या आह्मांस सूचनाहि आल्या. आतां यांपैकीं पहिल्या आक्षेपास तर मुळींच उत्तर देण्याची गरज नाहीं. उलटें आह्मी असें मात्र समजतों कीं, वरील आक्षेप आमच्या पुस्तकास कांहीं अंशीं भूषणरूप होय; कां कीं, दुसरे दोष काढायाला न सांपडल्यामुळें वरच्यासारखीं कांहीं तरी पोकळ दूषणें त्यांस हुडकणें प्राप्त पडतें. आतां या वृथा दूषकांखेरीज इतर जे कोणी प्रांजळपणानें सदरील पुस्तकास नांव ठेवीत असतील,

---

१. भर्तृहरीचें जें भाषांतर आह्मीं गेल्या अंकांत समाप्त केलें त्याहून निराळेंच एक आह्मांपाशीं सध्यां आहे. हें पूर्वीच मिळालें असतें तर वरच्याबरोबर कदाचित् छापलें असतें. याचा कर्ता कोण हें बरोबर कळत नाहीं. शेवटल्या पृष्ठांत १७१२ हा शक घालून खालीं हा श्लोक आढळतो—

महायोगी भर्तृहरी कृतीं वैराग्यशंभरीं ।
ब्रह्मानंदें समश्लोकी केली टीका तुका ह्मणे ॥

वरील ग्रंथ आह्मांस मिळाल्याचा वृत्तांत तर त्याच्याहूनहि चमत्कारिक आहे. तो आमच्या एका विद्यालयीन मित्रास वाण्याच्या दुकानीं सांपडून त्यानें जास्त किंमत देऊन त्याच्या हातून सोडवून आणला. दुसऱ्या एका ग्रंथाची अशीच थोडक्यानें दुर्गति टळली. तो संस्कृत भाषेंतील मोठ्या ग्रंथांपैकीं असून परम दुर्मिळ जो 'कथासरित्सागर' तो होय. वाग्देवीच्या अपत्यांची आमच्या देशांत अशी दुर्दशा होत असावी हें केवढें दुःखास्पद व लज्जास्पद आहे ! असो; येथें शेवटीं आमच्या वाचकांस ही सूचना केल्याखेरीज रहावत नाहीं, कीं आमच्या वरील मित्रासारखा कोणास लाभ झाल्यास त्यानें पैशाचा लोभ न धरतां त्याच्यासारखें श्रेय जोडण्याची संधी दवडूं नये !

कीं, हें महिन्याचे महिन्यास न निघाल्यामुळें वाचकांचा आशाभंग होतो व त्यांस विनाकारण पुष्कळ दिवस तिष्ठत बसावें लागतें, त्यांस सुद्धां आमचें असें ह्मणणें आहे कीं, ते फक्त आपल्या स्वतःपुरताच विचार करून दुसऱ्याचे श्रम विशेष लक्षांत आणीत नाहींत. जो लेख तास दोन तासांत ते वाचून पार करतात तो प्रथमतः मनांत पूर्णपणें आणण्यास, देशभाषेंत हवा तसा यथास्थित उतरण्यास, त्याच्या समर्थनार्थ किंवा मंडनार्थ ग्रंथांतरींचे आधार काढून ते दाखल करण्यास, व अवांतर माहितीच्या टीपा बहुधा दर एक पृष्ठास जोडण्यास, किती काळ लागत असेल हें मनांत आणलें असतां, तसेंच त्यापुढें वरील कच्चा खर्डा ठशांवर पडून त्याचें पुनः पुनः शोधन करून तो स्वच्छ कागदावर पडे तोंपर्यंत व त्यापुढले अनेक संस्कार होऊन पुस्तकें अखेर टपालाच्या पेटींत पडत तोंपर्यंत किती विलंब होत असेल याचाहि अंमळ विचार केला असतां, आमच्या पुस्तकाकडे वाचकांची विशेष कडक नजर होणार नाहीं असें आह्मांस खचीत वाटतें. शिवाय आमच्या देशाची युरोपांतील देशांप्रमाणें अशी अद्याप स्थिति आली नाहीं, कीं केवळ लोकाश्रयावर ग्रंथकारांचा चरितार्थ चालून इतर व्यवधानें त्यांस मुळींच धरण्याची गरज नाहीं. हें ज्या दिवशीं होईल त्या दिवशीं वरील अडचण तेव्हांच दूर होऊन सांप्रत राज्यांत लिहिण्याचें स्वातंत्र्य जें आपणांस अनुकूल आहे त्याचेंहि अधिक चीज करतां येईल. तेव्हां वरील गोष्ट, व त्यांतून हें पुस्तक कोणाच्या मदतीशिवाय चाललें आहे, हेंहि आमच्या हितचिंतकांनीं मनांत आणलें पाहिजे. आतां आमचा एक विदर्भदेशीय मित्र आह्मांस कळवितो कीं, "पुणें मुक्कामींच 'सत्यदीपिका' या नांवाचें मासिक पुस्तक निघत असतें, त्याचा नियमितपणा आपल्या नियमितपणाशीं नि० मा० कर्ते जर ताडून पहातील तर फार चांगलें होईल." तसेंच तो आणखी असेंहि ह्मणतो कीं, आह्मी वर्गणीदारांच्या हाकाटीकडे बिलकूल लक्ष न देतां 'वाटेल तेव्हां पुस्तकाचे राहिलेल्या अंकांपैकीं एखादा अंक तयार करतों.' या दोहों ह्मणण्यांवर आमचें उत्तर एवढेंच आहे कीं, आमच्या खिस्ती बंधूचा नियमितपणा आमच्या पुस्तकाचे ठायीं आणण्याविषयीं आह्मी वरील मित्रास वाटलों तसे केवळ बेफिकीर आहों असें नाहीं. त्याचा स्तुत्य क्रम अनुसरण्याची आमची पूर्ण इच्छा आहे व तीप्रमाणें आमचा उद्योगहि चालू आहे; ज्या महिन्याचा त्या महिन्याला आमचा अंक जरी वाचकांच्या हातीं न पडला तरी वर्षाचे सरासरीनें बारा अंक त्यांच्याकडे जातात. एखादा अंक निघण्यास जसा महिना उलटून जातो तसा एखादा पंधरा दिवसांनींहि वाचकांस मिळतो. शिवाय वरील सूचना करणाऱ्या आमच्या मित्रानें हेंहि लक्षांत ठेवावयाचें होतें कीं 'दीपिका' पेटविण्यापेक्षां 'माला' गुंफण्याचें काम पुष्कळ निराळ्या तऱ्हेचें आहे. तीं सर्वांशीं सारखीं असून दोहों पुस्तकांचें सर्व प्रकारें जर साम्य असतें तर वाचणारांस हाकाटी करण्याचा व त्याच्या सारख्यास सूचना लिहिण्याचाहि प्रसंग

फार करून आला नसताच !

सारांश, या गोष्टीच्या संबंधानें आमच्या वाचकांस पुनः आमचें विनयपूर्वक कळविणें आहे कीं, सदर्हू पुस्तकाच्या अनियमितपणाचीं वर सांगितलीं त्याव्यतिरिक्त दुसरीं कोणतींहि कारणें नाहींत. तें जितकें उपयुक्त व वाचकांस पसंत होईल तितकें करण्याचा आमचा मुख्य उद्देश असल्यामुळें प्रसंगानुसार कमजास्त वेळ लागल्याबद्दल आह्मी फारशी फिकीर करीत नाहीं; तसेंच वाचकांनींहि केलें पाहिजे. त्यांनीं असें मनांत आणलें पाहिजे कीं, घटकाभर बसलें कीं, पांच सहा पानें लिहून टाकिलीं असें जॉनसनसारखें सामर्थ्य आमच्या अंगीं नाहीं; व इकडील छापखान्यांचीहि स्थिति इतकी अद्याप सुधारली नाहीं. कीं अंगावर मूळ प्रत टाकून दिली कीं, लागलींच थोड्या दिवसांत आयतीं बुकें घ्यावीं. शिवाय दर खेपेस नव्या नव्या विषयांवर रचना करण्याचें काम सुट्टी न घेतां व रजा न मागतां वर्षानवर्ष एकट्यानें नियमित वेळांत सतत करीत असणें हें वरेंच श्रमाचें आहे हें आह्मीं स्वतः सांगितलें पाहिजे असें नाहीं. यास्तव तें स्वसंतोषानें व उत्साहपूर्वक कोणीं हातीं घेतलें असतां त्यांत जें जें उणें पडेल तें तें आमच्या सुज्ञ व उदार देशबंधूंनीं संभाळून घेतलें पाहिजे हें उघड आहे !

डॉक्टर जॉनसन.

सुरतसे किरत बडी बिन पंख उड जाय ।
सुरत तो जाती रही किरत कबू न जाय ॥

तुलशीदास.

अंक ३३.—(१) प्रस्तुत विषयाचें अपूर्वत्व. (२) त्यावर लिहिण्याचा उद्देश. (३) **जॉनसन**चा जन्म व बाल्यावस्था. (४) त्याचें अध्ययन. (५) अभ्यासाचा प्रकार. (६) बापाच्या मरणानंतर उपजीवनार्थ उद्योग. (७) विवाह-विद्यालयस्थापन—लंडन शहरास प्रस्थान. (८) **ग्यारिक.**

१. प्रस्तुतसारख्या विषयाचें विवेचन आमच्या भाषेस अनेक प्रकारांनीं केवळ अपूर्व होय. एक तर असें कीं, या भाषेंत, किंबहुना हिंदुस्थानांतील जुन्या नव्या कोणत्याहि भाषेंत, चरित्रलेखनाचा प्रकार मुळींच आढळत नाहीं. इतिहासाच्या अभावामुळें एकंदर राष्ट्राविषयींची जुनी माहिती जशी अगदीं बुडाली, त्याप्रमाणेंच चरित्रांच्या अभावीं प्राचीन काळीं होऊन गेलेल्या महान् महान् पुरुषांचें वृत्तहि केव्हांच समूळ नष्ट होऊन गेलें आहे. आतां 'शंकरविजय,' 'ललितविस्तार', 'भोजप्रबंध' वगैरे कांहीं ग्रंथ संस्कृतांत व मराठींत 'भक्तिविजय', 'संतलीलामृत' अशांसारखे देशांत कांहीं आहेत खरे;[1] पण पुराणांत व इतिहासांत जितकें अंतर तितकेंच वरील ग्रंथांत

१. 'शंकरविजयां'त बौद्धांचें खंडन करून ब्राह्मणधर्माची ह्मणजे वैदिक मार्गाची ज्यांनीं

(पुढें चालू).

व खऱ्या चरित्रांत. ग्रीक व रोमन लोकांत प्लूटार्क, कॉर्नेलियस, नीपॉस वगैरे चरित्रकार जसे होऊन गेले तसा प्रकार इकडे बहुधा कधींहि झाला असेलसें वाटत नाहीं. तर वरील विषय एतद्देशीयांस अत्यंत अपरिचित वाटण्याचें हें एक कारण आहे.

आतां इंग्रेज सरकारचा या देशावर अंमल सुरू झाल्यापासून पाश्चात्य विद्येचा इकडे जसा प्रसार होत चालला तसा त्याबरोबर वरच्यासारख्या ग्रंथरचनाविशेषाचाहि प्रचार वस्तुतः पहातां वाढायाचा होता. पण वरील विद्येचा उपक्रम येथील लोकांत नुकताच झाला असल्यामुळें व वरील रचनाविशेष अगदीं नवाच पडल्यामुळें अद्याप त्याविषयीं लोकांत विशेष अभिरुचि उत्पन्न झालेली नाहीं. कांहीं वर्षांमागें इंग्रेजी भाषेंत प्रथम प्रवेश होऊन आमच्या विद्वान् मंडळीस मराठी भाषेंत ग्रंथरचना करण्याची जोंपर्यंत बरीच हौस वाटत असे, तोंपर्यंत इतर विषयांप्रमाणें या विषयावरहि बरेच ग्रंथ झाले; पण हल्लीं त्यांपैकीं एक मात्र सर्वप्रसिद्ध आहे. बाकीचे बहुतेक बुडाल्यासारखेच आहेत. आजपर्यंत लोकाश्रयास पात्र झालेल्या मासिक पुस्तकांतून तरी 'प्रसिद्धपुरुषचरित्रें' ह्मणून मूळ संकल्पांत घातलेलें एक सदर जरी नेहमीं असे व अद्यापहि आहे, तरी फार करून हें सदर कोरडेंच रहात गेलें आहे. कधीं मधीं एखाद्या विख्यात पुरुषाचा वृत्तांत आलाच तर तो चार पांच पृष्ठांहून बहुधा अधिक नसतो. याचें कारण उघडच आहे. इकडील देशांत चरित्रलेखनाचा प्रचार पूर्वीपासून मुळींच नसल्यामुळें इकड्च्या विख्यात पुरुषांचा जीवनवृत्तांत लिहिण्याचें मूळच खुंटलें; तेव्हां युरोपांत होऊन गेलेल्या नामांकित पुरुषांच्या संबंधानेंच काय तो तो लिहावयास सांपडणार. पण तिकडची नुसती भूगोलसंबंधी सुद्धां माहिती इकडील लोकांस चांगलीशी असण्याची पंचाईत; मग तिकडील लोकाचारांविषयीं व ज्यांचें नांवहि पूर्वी ऐकिलें नाहीं अशा प्रसिद्ध पुरुषांच्या चरित्राविषयीं त्यांस जिज्ञासा उत्पन्न

पुनः संस्थापना केली त्या प्रख्यात जगद्गुरूंचें चरित्र वर्णिलें आहे; 'ललितविस्तरां'त अर्ध्या मानव जातीभर जो धर्म आज हजारों वर्षें पसरला आहे त्याचा आद्यगुरु जो शाक्यसिंह, गौतम किंवा बुद्ध त्याचा वृत्तांत दिला आहे; 'भोजप्रबंधां'त भोज राजा व त्याच्या पदरचे जे कालिदासादि विख्यात कवि त्यांजविषयींच्या दंतकथा आहेत. शेवटले दोन महीपतिकृत ग्रंथ तर प्रसिद्धच आहेत.

१. गेल्या बीस पंचवीस वर्षांत साक्रेटीस, कोलंबस, खुसरू, नाना फडनवीस, क्यापटन् कुक व क्याथरीन इतक्यांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं. शिवाय दोन तीन वर्षांपूर्वी दक्षिणाप्रेज कमिटीकडून पसंत झालेलीं वॉशिंगटन, फ्रांकलिन, लॉर्ड क्लैव हींहि चरित्रें इंदुप्रकाशांत छापलीं गेलीं, याखेरीज अलीकडे रा० विनायक कोंडदेव ओक यांनीं केलेलीं 'शिकंदर बादशाहा,' 'पिटर धि ग्रेट' व 'ड्यूक ऑफ वेलिंगटन' हींहि सरकारानें विकत घेऊन प्रसिद्ध केलीं आहेत. पण इतक्या सर्व चरित्रांत सॉक्रेटीसाचें मात्र चोहोंकडे प्रसिद्ध असून तिसऱ्या आवृत्तीपर्यंत त्याची मजल पोंचली आहे.

होण्याचा कितीसा संभव आहे ?

तर याप्रमाणें हें पुढील चरित्र, एक तर ही नवीन ग्रंथपद्धति ह्मणून व शिवाय ती कांहींशी सुरू केली असतां पुनः मागें पडली, या दोहों कारणांनीं आमच्या वाचकांस अपूर्व वाटणारें आहे. पण इतकेंच नव्हे. पुढील लेखांत आणखी दोन नवे प्रकार वाचकांस आढळतील. पहिला हा कीं, आजपर्यंत महाराष्ट्र भाषेंत जीं जीं चरित्रें रचलीं गेलीं तीं कोणी विख्यात राज्यकर्ता, कोणी विख्यात शोधक, कोणी विख्यात तत्त्वज्ञ, अशांविषयींचीं होतीं. प्रस्तुत लेखाच्या विषयाप्रमाणें केवळ ग्रंथकारांचें चरित्र कोणीं लिहिलें नाहीं. दुसरा विशेष असा कीं, पुढील वृत्तांत कोणत्या एका ग्रंथाच्या आधारानें रचला आहे किंवा कशाचें भाषांतर आहे असा नाहीं. तर अनेक ठिकाणची माहिती गोळा करून ती वाचकांस चरित्ररूपानें सादर केली आहे.

२. आतां सदरील लेखास वरील विषय निवडण्याचा हेतु काय व यापासून वाचकांस लाभ तो काय होणार याविषयीं अगोदर थोडेंसें लिहिलें पाहिजे. चरित्रवाचनापासून सामान्यतः कोणते लाभ आहेत ते तर आज कोणालाहि सांगायाला नकोत; तेव्हां ते प्रस्तुत लेखापासूनहि होणारे आहेत हें उघडच आहे. पण कोणी कदाचित् ह्मणतील कीं, जॉनसन सारख्याच्या आयुष्यांत एवढ्या मोठ्या वर्णन करायाजोग्या गोष्टी कोणत्या घडलेल्या असणार ? तो अमुक वर्षीं जन्मला, अमुक वर्षीं मेला, त्यानें अमुक अमुक ग्रंथ केले; त्यावरून त्याचा असा असा लौकिक झाला, इतकेंच त्यांत असावयाचें कां नाहीं ! मोठमोठ्या राजांच्या वगैरे कथांत जसें मन रमून जातें तसें प्रस्तुत विषयांत काय होणार ? असा जे आक्षेप करतील त्यांस आमचें असें उत्तर आहे कीं, वरील समजूत जर खरोखरच त्यांच्या मनांत बिंबून गेली असेल, तर चरित्रांच्या वाचनापासून होणारा वास्तविक फायदा त्यांस बिलकूल कळलाच नाहीं असें झटलें पाहिजे. मनोरंजन किंवा चित्तास चमत्कार भासणें याच लाभाची चरित्रवाचनापासून जर कोणी अपेक्षा करीत असेल, तर वरील हेतु कादंबरीपासून किंवा नाटकापासून जसा साध्य होईल तसा प्रस्तुत प्रबंधविशेषापासून होणार नाहीं. शिवाय चरित्रांचा उपयोग जर हा आहे, कीं त्यांपासून संसारास व लोकव्यवहारास उपयोगी असा सदुपदेश प्राप्त होतो, तर हा उपदेश मोठमोठ्या सार्वभौम राजांच्या लढाया वाचल्यापासून जास्त होईल, कीं सामान्य लोकांस ज्या अडचणी व जे प्रसंग येतात ते त्यांच्यासारख्याच मनुष्यांनीं कसे टाळले किंवा ते कसे उदयास आले हें समजल्यानें जास्त होईल बरें ? तर हें सर्व मनांत आणील त्यास खचीत असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं कीं, ज्या विख्यात पुरुषाचें चरित्र आह्मी लिहावयास सरसावलों आहों तो जरी शिकंदराप्रमाणें सगळें भुवन जिंकून आणखी भुवनें जिंकावयास नाहींत. ह्मणून एकीकडे तोंड करून रडला नाहीं, त्यानें जरी कोलंबसाप्रमाणें

नवें जग शोधून काढलें नाहीं, किंवा वाशिंगटनाप्रमाणें नव्या जगांत नवें राज्य स्थापन केलें नाहीं, तसेंच सॉक्रेटीसाप्रमाणें त्यानें जरी स्वर्गलोकींचें तत्त्वज्ञान भूलोकास आणलें नाहीं, किंवा हिंदुस्थानच्या म्याकिवेलाप्रमाणें 'खूप शर्तीनें राज्य राखिलें' नाहीं, तरी चरित्राचा विषय होण्यास त्याची योग्यता वरील महाजनांपेक्षां कोणत्याहि प्रकारें कमी नसून पुष्कळ अंशीं उलटी जास्तहि आहे.

पण इतकेंच नव्हे. प्रस्तुत चरित्राचें वर जें सामान्यतः महत्त्व सांगितलें त्याशिवाय त्यापासून विशेषतः आणखी कित्येक लाभ आहेत. कोणा एका इंग्रेज ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, जॉनसन यास त्याच्या राष्ट्राचा प्रतिनिधिभूत मानला असतां चालेल, ह्मणजे साऱ्या इंग्लिश लोकांत सामान्यत्वेंकरून जे गुण आढळतात त्यांचा समुच्चय वरील व्यक्तींत आढळतो. हें कसें हें पुढें क्रमाक्रमानें व्यक्त होत जाईल. तर प्रस्तुत लेखावरून एतद्देशीय लोकांस इंग्रेजांच्या स्वभावाविषयीं व त्यांच्या आचारांविचारांविषयीं वगैरे बरेंच ज्ञान होईल, हा एक त्यापासून उपयोग होणार आहे. दुसरा असा कीं, जॉनसनच्या वेळची इंग्लंडची स्थिति व सध्यांची आपल्या देशची स्थिति यांत अनेक प्रकारचें साम्य आहे; यास्तव इकडूनहि वरील स्थितीचें ज्ञान होणें हें इष्ट आहे. तशींच तिसरी गोष्ट ही कीं, वरील नामांकित ग्रंथकाराच्या वेळीं कित्येक मोठमोठ्या गोष्टी घडून येऊन मोठमोठे बुद्धिमान पुरुष प्रख्यातीस चढले होते. तेव्हां त्यांचाहि मुख्य कथानकाच्या अनुषंगानें निर्देश होऊन वाचकांस सहजरीत्या तितकी जास्त माहिती होऊन मनास कर्मणूकहि होईल.

३. याप्रमाणें प्रकृत लेखाच्या अपूर्वत्वास्तव त्याच्यासंबंधानें सामान्यतः एवढा प्रस्ताव अगोदर केला. आतां मुख्य विषयास आरंभ करूं.

डॉक्टर[1] साम्युएल जॉनसन याचा जन्म इंग्लंड देशांत स्टाफर्डशायरमध्यें लिचफील्ड नांवाच्या गांवीं इ० स० १७०९ या वर्षीं झाला. याचीं आईबापें गरीब अवस्थेंतच होतीं; तरी तीं सालस व संभावित असल्यामुळें त्यांस त्यांच्या गांवीं बराच मान असे. एकदां तर जॉनसनच्या बापास लिचफील्डचा माजिस्ट्रेटहि नेमला होता; पण त्याचा नेहमींचा धंदा ह्मटला ह्मणजे पुस्तक विकण्याचा होता.[2] त्याचें दुकान

१. आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच कीं वरील उपपद 'भट्ट,' 'आचार्य,' 'पंडित' यांच्यासारखें केवळ सन्मानार्थक होय. 'डॉक्टर' हा शब्द एतद्देशीय भाषांतून 'इंग्रेजी वैद्य' या अर्थीं जरी रूढ होऊन गेला आहे, तरी त्याचा मूळचा अर्थ 'विद्वान्' 'निष्णात' इतकाच आहे. **जॉनसन** यास आक्सफर्ड युनिवर्सिटीनें 'एल्. एल्. डी' हा किताब त्याच्या विद्वत्तेस्तव व तत्कालीन ग्रंथकर्त्यांत तो अग्रगण्य होता यास्तव आपण होऊन पाठवून दिला.

२. हा धंदा इकडील देशांत अद्याप चांगलासा सुरू झाला नाहीं. विलायतेंतील पुस्तक

(पुढें चालू).

मोठें असून, त्यास जवळचे ग्रंथ स्वतः चांगले समजत असत; यामुळें त्याचा लौकिक इतर पुस्तकविक्यांपेक्षां फार असे. जॉनसन यास लहानपणींच 'स्कार्फ्युला' या नांवाचा एक रोग झाला होता; तो त्याच्या कुळींतलाच होता असें कोणी ह्मणतात, व कोणाच्या मतीं तो त्याच्या दाईच्या संसर्गानें त्यास लागला. तो जाण्याविषयीं जॉनसनच्या आईबापांनीं पुष्कळ औषधोपचार करून पाहिले, पण कांहीं गुण आला नाहीं. शेवटीं त्यांनीं आपल्या तीन वर्षांच्या मुलास त्या वेळची राज्यकर्त्री जी आन राणी तिजकडे नेलें. पण तिच्याहि हस्तस्पर्शानें कांहीं कार्य झालें नाहीं.[1]

४. जॉनसनच्या विद्याभ्यासाचा आरंभ लिचफील्ड येथील शाळेंतच झाला. त्या शाळेंत सगळीं मुलें नादार घेत असत; त्यामुळें जॉनसनच्या गरीब आईबापांवर त्याच्या शिक्षणाबद्दल कांहीं खर्च पडला नाहीं. या शाळेंत ल्याटिन व ग्रीक या दोन्ही भाषांचें व त्यांतून पहिलीचें त्यानें चांगलें ज्ञान संपादन केलें. पुढें कांहीं वर्षें तो घरींच राहून आपल्या बापाच्या दुकानचें काम कांहीं पाहूं लागला. त्याचा स्वभाव अगदीं लहानपणापासून पराकाष्ठेचा स्वच्छंदी असे; सारखें बसून कोणतेंहि काम पुष्कळ वेळ करीत असणें हें त्यास कधींहि आवडलें नाहीं. तेव्हां शाळेंत व घरीं मिळून जो त्यानें अभ्यास केला तो सगळा अशाच प्रकारचा. त्याची बुद्धि अतिशयित चलाख असल्यामुळें हवा तो विषय त्यास तेव्हांच समजे; व स्मरणशक्तिहि विलक्षण असल्यामुळें जें त्यानें एकदां वाचलें किंवा ऐकिलें तें त्याच्या मनांतून कधींहि जात नसे. पण सारखा नेट लावून असा अभ्यास त्यानें कधींच केला नाहीं. शरीरानें चांगला धष्टपुष्ट व भला भक्कम असल्यामुळें शाळेंतील उनाड पोरांत त्याचा पहिला नंबर असून कांहीं दांडगाई किंवा दंगा करणें असल्यास सर्वांचा मोरप्या हाच होई. या गुणांमुळें व नित्याचे धडे कधीं लक्ष लावून तयार न केल्यामुळें त्यावर चवदाव्या रत्नाचा प्रयोग वारंवार होई. या प्रयोगाचें माहात्म्य तो शेवटपर्यंत वर्णीत असे; व ह्मणे कीं, माझ्या पंतोजीनें जर मला मरे मरे तों खूप मारिलें नसतें तर माझ्या हातून कांहीं शिकणें

विकणारे लोक येथील मेमणांसारखा नुसता व्यापार करतात असें नाहीं; तर त्यांचे मोठमोठे छापखाने असून ते स्वतः पुस्तकें छापतात. दर वर्षास लाखों पुस्तकें तयार होऊन त्यांचा खपहि तसाच जंगी चाललेला असतो. मागें स्कॉट, मेकॉले वगैरे ग्रंथकारांस मिळालेला जो पैसा सांगितला आहे त्यावरून त्यांचे ग्रंथ छापणाऱ्या पुस्तकवाल्यांस तर काय किफायत झाली असेल याची वाचकांनीं कल्पना करावी!

१. जॉनसनच्या शरीरास राणीसाहेबांचा हात लावविण्याचें कारण हें कीं, त्यास जो रोग झाला होता त्यावर राजस्पर्श हें मोठें रामबाण औषध आहे असा त्या वेळेस लोकांचा समज होता. असला प्रकार युरल नदीच्या दुसऱ्या तीरीं घडत असता तर लागलीच तो 'वेडगळ' व 'रानटी' झाला असता हें उघडच आहे!

झालें नसतें.[1] असो; पुढें एकोणिसाव्या वर्षीं तो आक्सफर्ड युनिव्हर्सिटींत मोडणारें जें पेंब्रोक कॉलेज तेथें एका श्रीमंत मुलाचा सहाध्यायी[2] ह्मणून गेला. पण पुढें कांहीं दिवसांनीं त्या मुलानें कॉलेज सोडलें; तेव्हां याचा मुख्य आधार सुटला. तरी मोठ्या पंचाईतीनें त्यानें आणखी कांहीं दिवस येथें काढले. याप्रमाणें एकंदर तीन वर्षें येथें राहून शेवटीं युनिव्हर्सिटीची डिग्री (किताब) न घेतांच त्यास आपल्या घरीं परत यावें लागलें.

५. जॉनसनचें विद्याध्ययन ह्मणजे गुरुमुखानें विद्याग्रहण करणें हें येथेंच आटपलें; यापुढें तसा योग त्यास आलाच नाहीं. यापुढें जें त्यानें ज्ञान संपादन केलें तें केवळ स्वतःच्याच श्रमानें, ह्मणजे शेंकडों पुस्तकें वाचून व जगाचे व्यवहार पाहून केलें इतकेंच. यापूर्वी तरी त्याची जेवढी विद्या झाली होती तेवढ्यांत गुरुंच्या शिकवणीपेक्षां स्वतःच्या जिज्ञासेनें व परिश्रमानेंच त्यास अधिक ज्ञान प्राप्त झालें होतें. त्याच्या बापाच्या दुकानीं पुष्कळ निरनिराळ्या विषयांवर रचलेले ग्रंथ होते. ते यानें तब्बेत लागेल तेव्हां वरचेवर उलथे पालथे करीत असावे. जेवढें मौजेचें वाटेल तेवढें वाचून कंटाळा आला कीं, तितकेंच टाकून द्यावें. याप्रमाणें ल्याटिन, ग्रीक, इटालियन वगैरे भाषांतील ग्रंथांशीं खेळतां खेळतां या लहानग्या पोरानें इतकें ज्ञान मिळविलें कीं, तितकें मोठमोठ्या विद्यानिष्णात ह्मणविणाऱ्या पंडितांसहि नव्हतें. ऑक्सफर्डमध्यें प्रवेश झाला त्या पहिल्या दिवशींच जॉनसननें एका ल्याटिन ग्रंथकाराचें वचन बोलण्याच्या ओघांत मधेंच झोंकून दिलें; तें ऐकून त्याचे गुरु जागच्या जागीं आचंबा करीत राहिले! तसेंच तेथें असतां पोप कवीचा 'मेसाया' ह्मणून एक काव्याचा चुटका नुकता प्रसिद्ध झाला होता त्याचें ल्याटिन भाषांतर विद्यार्थ्यांस दिलें असतां तें जॉनसननें कसें उडवून दिलें

---

१. 'छडी वाजे चम् चम्, विद्या येई घम् घम्' या वचनाचा पुरस्कार वरील पंडित नेहमीं करीत असे. तो ह्मणे कीं, पोरांकडून शाळेतील धडे तयार करून घेण्यास वादी-सारखें दुसरें साधन नाहीं. त्यांस लाजवून व परस्परांत ईर्ष्या उत्पन्न करून वरील हेतु सिद्धीस नेण्याचा यत्न करणें हें बरोबर नाहीं. कां कीं, त्याच्या योगानें मत्सरादि दुष्ट भाव लहानपणींच मुलांत वाढूं लागतात. अलीकडे मोठमोठ्या शाळांतूनहि जो दांडगाईचा व टारगेपणाचा प्रकार दृष्टीस पडतो, व बेलेनसार शाळागुरूंची शोभा रहात नाहीं, याकडे लक्ष दिलें असतां चौदाव्या रत्नाचा अंमल दिवसेंदिवस ढिला पडत चालला आहे हें कोणासहि इष्ट वाटणार नाहीं.

२. इंग्लंडांत अशी चाल आहे कीं, श्रीमंतांचीं मुलें विद्याभ्यासाकरतां कॉलेजांत पाठविलीं ह्मणजे त्यांच्या बरोबर अभ्यास करण्याकरतां सोबती ह्मणून दुसरीं गरीब मुलें त्यांजपाशीं ठेवतात. यांचा खर्च अर्थातच त्या आईबापांवर किंवा पालकांवर असतो. वरील अर्थी 'सहाध्यायी' हा शब्द योजला आहे. याचा नेहमींचा अर्थ पाहिला असतां 'बरोबर अभ्यास करणारा,' 'गुरुबंधु' इतकाच होतो.

याविषयीं मागें एके ठिकाणीं [अंक १२ मध्यें] सांगितलेंच आहे. याशिवाय त्याच्या एका विद्यालयस्थ गुरूनें बॉसवेलपाशीं काय ह्मटलें तेंहि प्रसिद्धच आहे. तो ह्मणाला, "मी जॉनसनचा उगीच नांवाचा मात्र गुरु होतों; खरोखर पहातां तो माझ्याहूनहि वरचढ होता."[1]

प्रस्तुत विख्यात ग्रंथकाराच्या शिक्षणाचा वर जो वृत्तांत सांगितला आहे त्यावरून आमच्या मार्मिक वाचकांच्या लक्षांत एक मोठी महत्त्वाची गोष्ट आल्यावांचून रहाणार नाहीं. ती ही कीं, मनुष्यानें विद्येंत किंवा कोणत्याहि गुणांत निपुणत्व पावणें हें त्याच्या स्वप्रयत्नाधीन जितकें आहे तितकें त्याच्या शिक्षकांच्या ज्ञानावर किंवा श्रमावर नाहीं. आजपर्यंत मोठमोठे विद्वान् ग्रंथकर्ते जे या पृथ्वीच्या पाठींवर होऊन गेले आहेत त्यांचा गुरूंपासून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा अंश व पुढें त्यांच्या परिश्रमानें तें जितकें वाढलें तो अंश यांची जर परस्पर तुलना केली तर पहिला दुसऱ्यापुढें कांहींच नाहीं असें नेहमीं दिसून येईल. यास्तव ज्यास ज्ञानप्राप्तीची इच्छा असेल त्यानें त्याविषयीं स्वतः उद्योग केला पाहिजे; शिक्षकांचें काम मुख्यतः दिग्दर्शनापेक्षां दुसरें नाहीं. हल्लीं युरोपांत व अमेरिकेंत मुद्रणकलेचा अतिशयित प्रसार होऊन पुस्तकें अगदीं स्वल्प किंमतीस मिळूं लागल्यामुळें, व तीं सर्व विषयांवर व सर्वांस सहज समजतील अशा प्रकारचीं झाल्यामुळें, शिक्षकाचीहि गरज बहुतेक अंशीं नाहींशी झाली आहे. यामुळें शेंकडों मोठमोठे ग्रंथकार असे निपजले आहेत कीं, त्यांस शिकविण्यास कोणाचीच गरज लागली नाहीं; त्यांचें सर्व ज्ञान त्यांस स्वतःसिद्धच प्राप्त झालें. अशासारखी स्थिति इकडे जर कांहीं सुरू झाली, तर विद्याखात्याचा किती अटाट वांचेल, व लोकांचें किती हित होईल!

६. असो; जॉनसन कॉलेज सोडून घरीं आल्यावर कांहीं दिवसांनीं त्याचा बाप मरण पावला. यास त्याच्या धंद्यांत कधींहि बरकत आली नाहीं. व शेवटीं शेवटीं तर एका व्यापारांत त्यास मोठी ठोकर लागून तो अगदीं डबघईस आला. त्यास प्रपंच भागविण्याचीहि पंचाईत पडूं लागली. अशा स्थितींत त्याच्या मरणानें जॉनसन, त्याचा एक भाऊ, व त्याची आई, यांची केवढी तारंबळ झाली असेल, याची कोणासहि सहज कल्पना होईल. तरी असल्या संकटांतहि प्रस्तुत चरित्राचा विषयभूत जो विख्यात पुरुष त्यानें अगदीं धैर्य सोडलें नाहीं. बापानें मरते वेळीं ठेविलेला पैसा

१. "Dr. Adams paid Johnson this high compliment. He said to me at Oxford, in 1776, "I was his nominal tutor; but he was above my mark." When I repeated this to Johnson, his eyes flashed with grateful satisfaction, and he exclaimed, "That was liberal and noble!"—Boswell's *Life of Johnson*.

सगळा वीस पौंड [दोनशें रुपये] होता तो आपल्या आईपाशीं ठेवून व आपल्या भावास बापाच्या दुकानावर लावून स्वतः केवळ आपल्या विद्येवर चरितार्थ चालविण्यास व आपलें नशीब काढण्यास तो निघाला. पहिल्यानें त्यानें एका शाळेंत चाकरी धरली. ही शाळा खाजगी होती; व हींत जॉनसन हा दुय्यम ह्मणून राहिला. व शाळेच्या अध्यक्षाचें व याचें कधींहि नीट न पटल्यामुळें त्यानें ती जागा लवकरच त्रासानें सोडून दिली. शाळेचे सरमास्तर स्वभावानें मोठे गर्विष्ठ व तिस्मारखान होते; त्यांचा हिशेब असा होता कीं, या दुय्यमाला आह्मीं मोठी मेहेरबानी करून अन्नाला लावला आहे, तेव्हां आमचा मोगलाई अंमल यानें निमूटपणें मान खालीं करून सोसला पाहिजे. आह्मी सांगूं तें यानें शिरसावंद्य करून बंद्या गुलामाप्रमाणें प्रत्येक शब्दास 'हां नी, जी हां' अशी मान डोलविली पाहिजे. पण जॉनसन कसचा? जो पुढें ऑसबोर्न याच्या डोकींत त्याचेंच एक भलें मोठें बूक पाहून घालायाला चुकला नाहीं, व ज्यानें चेस्टरफील्ड सारख्याचीहि पर्वा ठेविली नाहीं; तो यःकश्चित शाळामास्तराला विचारतो काय? त्यानें खाडदिशीं चाकरीला लाथ मारिली, व बर्मिंगहाम नामक शहरांत निघाला. तेथें एक त्याचा परम मित्र होता त्याच्या घरीं तो कांहीं दिवस राहिला. तेथें असतां एका पुस्तकवाल्याच्या सांगण्यावरून त्यानें एका फ्रेंच ग्रंथाचें भाषांतर आरंभिलें. हा ग्रंथ लोबो नामक एका जेसुइट[1] ग्रंथकारानें 'आबिसिनिया देशाची सफर'

---

१. 'जेसुइट' हे कोण लोक आहेत ते आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असतीलच. कांहीं वर्षांपूर्वी मुंबई युनिव्हर्सिटींत त्यांच्या संबंधानें बोभाटा झाला होता हेंहि पुष्कळांस आठवत असेल. या पंथाचें नांव 'जोजप' येशू यावरून पडलें आहे. व त्याचें स्थापन इ० सन १५३४ या सालीं झालें. या 'ख्रिस्तशिष्यां'चा उद्देश रोमन क्याथलिक मताचें मंडन करून त्याचा साऱ्या जगभर प्रसार करायाचा हा होय; व तो साधण्यासाठीं हवें तें करावें. असा त्यांचा मूलभूत सिद्धांत आहे. चोरी करावी, खोटें बोलावें, फार तर काय, प्रत्यक्ष खूनहि पाडावे पण आपला पवित्र हेतु सिद्धीस न्यावा. हें मत येशूचे अनुयायी बोलून दाखवितात व आजपर्यंत अगणित वेळां त्याप्रमाणें त्यांनीं आचरणहि केलें आहे. सारांश, या मंडळास ख्रिस्ती ठग ह्मटलें असतां फारसा बाध येणार नाहीं. वरील मतांस्तव या मंडळीस युरोपांतील बहुतेक देशांतून वेळोवेळां घालवून दिलें आहे, व एकदां तर खुद्द पोपमहाराजांसहि हा पंथच मुळीं बंद करून टाकावा लागला. पण पुढें तो त्यांनीं सुरू केला, तो अद्याप आहेच. या लोकांच्या अंगीं दोन मोठे जबरदस्त गुण आहेत, एक विद्यार्थ्यांच्या पोटांत शिरून त्यांकडून विद्या करविणें व दुसरा गुण धारिष्ट. पहिल्या कलेंत यांची किती निपुणता आहे याचा प्रत्यय या देशांतहि घेण्यासारखा आहे; व दुसऱ्याचें स्वरूप वरील मिशनरीच्या प्रवासावरून ध्यानांत येईलच. मेकॉलेनें एके ठिकाणीं या दुसऱ्या गुणाविषयीं लिहिलें आहे—

"The Old World was not wide enough for this strange acti-

(पुढें चालू).

ह्मणून केला होता तो होय. लोबो हा कोणी पोर्च्युगीज मिशनरी होता; व हबशांच्या मुलखांत जाऊन तेथील सर्व सृष्टिचमत्कारांचें व लोकांच्या रीतीभातींचें वगैरे त्यानें अनुभवसिद्ध वर्णन केलें आहे. याच्या मुशाफरीचा मुख्य हेतु त्याच्या धर्मबंधूंप्रमाणें शुभवर्तमानाचा प्रसार करण्याचा होता; व निघतांना त्याच्या बरोबर आणखी दोघे पाद्री होते. पण या दोघांस हबशांनीं मधल्यामध्येंच ठोकून टाकल्यामुळें पुढें यास एकट्यासच एवढ्या अफाट रानटी देशांत व अपरिचित राष्ट्रांत मार्गक्रमण करावें लागलें. तरी गेल्या शतकांतील मंगोपार्क व नुकता निवर्तलेला लिविंगस्टन यांच्याप्रमाणें यानें मोठ्या धैर्यानें व हिकमतीनें साऱ्या देशभर भ्रमण केलें. नील नदाचा उगम शोधून काढण्याविषयीं आज हजारों वर्षे यत्न चाललेला आहे तो त्यानें कांहींसा तडीस नेला. असो; तर असल्या ग्रंथाचें इंग्रेजी भाषांतर जॉनसननें तयार केलें. या कामाबद्दल त्यास वर सांगितलेल्या पुस्तकवाल्यानें पांच पौंड दिले. यानंतर त्यानें एका ल्याटिन कवीचे ग्रंथ छापण्याबद्दलची जाहिरात दिली. तींत त्यानें असें कळविलें होतें कीं, वरील कवीचीं काव्यें थोड्या किंमतींत सर्वांस मिळून शिवाय त्या कवीचें चरित्र व एकंदर ल्याटिन कवितेचा इतिहास हाहि सदरहू आवृत्तीस जोडावयाचा आहे. पण या ग्रंथास कोणीं फारसा आश्रय दिला नाहीं; वर्गण्या फार थोड्या आल्यामुळें व कोणी पुरस्कर्ताहि न मिळाल्यामुळें वरील संकल्प तसाच असिद्ध राहिला.

---

vity. The Jesuits invaded all the countries which the maritime discoveries of the preceding age had laid open to European enterprize. They were to be found in the depths of the Peruvian mines, at the marts of the African caravans, on the shores of the Slice Islands, in the observatories of China. They made converts in regions which neither avarice nor curiosity had tempted any of their countrymen to enter; and preached and disputed in tongues of which no other native of the West understood a word."

Ranke's History of the Popes.

१. मिसर देशांतील जी नील नदी तिला दरवर्षी अपरंपार पूर येऊन सारा भोंवतालचा देश त्या पुरावर पिकतो, व पाऊस कसा तो तिकडे कोणास माहीत नाहीं, ही गोष्ट जगविख्यात आहे. ही नदी आबिसिनिया, न्युबिया, आणि ईजिप्ट या तीन विस्तीर्ण देशांतून वहात जाऊन आलेकजांड्रिया शहराशीं समुद्रास सातां मुखांनीं मिळते. हिचा ओघ एकंदर ३००० मैल आहे. या नदीचे उगम कोठें आहेत याविषयीं पहिल्यापासून साऱ्या जगास मोठी प्रबल जिज्ञासा वाढत आहे; तरी अद्याप त्यांचा पक्का शोध लागला नाहीं. ते विषुववृत्तापाशीं असावेत असा भूगोलवेत्त्यांचा अजमास आहे. सन १८५४ सालीं ब्रूस नांवाच्या एका मुशाफरानें वरील वृत्ताच्या चार अंशापर्यंत वरील नदीचा मार्ग काढला होता.

७. यापुढें बहुधा सर्व मनुष्यांच्या आयुष्यांतली एक मोठी ठोकळ गोष्ट जो विवाह तो जानसनचा झाला. तो बर्मिंगहॅम येथें असतां तेथील एका व्यापाऱ्याची व याची ओळख पडली होती. त्याच वेळेस त्याच्या बायकोचा व याचाहि बराच परिचय जडला होता; याच्या विद्वत्तेस्तव व भाषणचातुर्यास्तव हा तिला आवडूं लागला होता; व यासहि तिच्या रसिकतेमुळें व इतर गुणांमुळें ती पसंत झाली होती. पुढें ती गतभर्तृका झाल्यावर परस्परांच्या स्नेहाचा व प्रेमाचा परिपाक वर सांगितल्याप्रमाणें झाला. जानसननें आपल्या आईची आज्ञा विचारून गृहस्थधर्माचा स्वीकार केला, व आजपर्यंत जो मुशाफरासारखा ऐकेकटा राहिलेला होता तो आतां घरदार, चाकर माणसें, बायको, अशा थाटानें राहूं लागला. बायकोनें लग्नसमयीं आठशें पौंड जॉनसनच्या स्वाधीन केले व ते चांगल्या व्यवस्थेनें लावले असते तर त्यांस पुष्कळ दिवस, किंबहुना जन्मभर चांगल्या रीतीनें पुरले असते. पण तें होतें कसें ? त्यास अद्याप पुष्कळ काळ दारिद्र्यांत व विपत्तींत काढावयाचा होता ! तेव्हां त्यास अशी बुद्धि आठवली कीं, आपला संसार थाटलाच आहे, तेव्हां सध्यांप्रमाणेंच पुढेंहि चालण्यास आपण स्वतः एक निराळें विद्यालय स्थापावें. हें विद्यालय त्याच्याच घरीं असून विद्यार्थ्यांचा जेवणाखाण्याचा वगैरे बंदोबस्त तेथेंच ठेवण्याचें त्यानें योजलें. मग सर्व तयारी झाल्यावर एका वर्तमानपत्रांत जाहिरात आली कीं, 'साम्युअल जॉनसन याच्या घरीं विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय केली असून ल्याटिन, ग्रीक या भाषांचें अध्ययन चालायाचें आहे, तर श्रीमान व संभावित लोकांनीं आपलीं मुलें येथें पाठवावीं.' या जाहिरातीचें फारसें फळ दृष्टीस पडलें नाहीं. अठरा महिने लोटून गेले. तरी दोन तीन मुलांवर जास्त त्यास मिळेचनात याचें कारण असें होतें कीं जॉनसनची पुढें जी विलक्षण ख्याति होऊन बसली, कीं त्याच्या सहज बोलण्यावरहि मोठमोठे लोक सुद्धां झुलूं लागले, व तो केवळ अप्रतिम पंडित ठरला, तसें यां वेळेस कांहीं नव्हतें. त्याची प्रसिद्धि काय ती विद्यालयांतच असून एकंदर लोकांस तो विशेष माहीतहि नव्हता. शिवाय शिक्षकाच्या अंगीं जे गुण अवश्य लागतात त्यांपैकीं कांहींची त्याच्या अंगीं उणीव होती. एक तर शारीर व्यंगें. त्याचा चेहरा मूळचा जरी वाईट नसून उलटा भव्यहि होता तरी मागें सांगितलेल्या रोगाच्या योगानें त्यावर मोठमोठाले वण पडले होते, व त्याची दृष्टि अधू झाली होती. शिवाय त्याची बोलण्याचालण्याचीहि ढब श्रोत्यांच्या व त्यांतून पोरांच्या मनांत भरण्यासारखी नसून त्यांस उपहासास्पद वाटण्यासारखीहि होती. वायुग्रस्त मनुष्याप्रमाणें हात पाय वरचेवर वेंगायाची त्यास लहानपणापासून संवय लागून गेली होती; व त्याच्या मेंदूंत कांहीं विकार असल्यामुळें त्याची कृति पुष्कळ अंशीं वेड लागलेल्या मनुष्यासारखी दृष्टीस पडे. हा सर्व प्रकार घरींच विद्याभ्यासास राहिलेल्या पोरांच्या प्रत्यहीं नजेरस पडायाचा. मग अशांची गुरूविषयीं

पूज्यबुद्धि न जडतां त्याची त्यांस चेष्टाच वाटत असेल यांत नवल काय ? याखेरीज वरील विद्यालयांतली दुसरी मोठी नक्कल झटली झणजे गुरुपत्नी होय. तिचें वय जॉनसनच्या दुप्पट होतें; झणजे तिचें अठ्ठेचाळीस व नवऱ्याचें सव्वीस ! मग अशा जोड्याचें जें परस्पर प्रेम चालत असेल तें पाहून त्या तरुण विद्यार्थ्यांस केवढी मौज वाटत असेल व ते त्याविषयीं किती मस्करी करीत असतील ! या विद्यार्थ्यांत शेक्सपीयरच्या पात्रांचा सर्वोत्कृष्ट अभिनय करणारा जो प्रख्यात ग्यारिक तो होता. तो अगोदरच नकल्या, व पुढें नाटकाचें क्रसब पुरतेपणीं शोधून त्यांत पाहिल्या पदवीस चढलेला. आणि वरील सर्व मजा त्यानें स्वतः लहान वयांत पाहिलेली, तेव्हां पुढें लंडन शहरांतल्या बड्या बड्या मंडळींत तो जेव्हां आपल्या गुरूची नक्कल करी तेव्हां ती किती हुबेहूब व मजेदार उतरत असेल हें सांगायाला नको. ऐकणाऱ्या मंडळीचें हंसतां हंसतां पोट दुखूं येई. असो; तर जॉनसनचें विद्यालय चांगलेसें न चालण्याचीं वर सांगितलेलीं कारणें होतीं. शिवाय त्याचा स्वभावहि सौम्य व मनमिळाऊ नसून पराकाष्ठेचा कडक असे; व विद्यार्थ्यांस अगदीं मूलभूत सिद्धांतापासून क्रमाक्रमानें शिकवीत जाण्याची जी दगदग असते तीहि त्यास अगदीं आवडत नसे. तेव्हां या सर्व गोष्टींमुळें वर सांगितलेल्या विद्यालयाची कधींहि ऊर्जित दशा आली नाहीं. शेवटीं वायकोनें जो ऐवज आणला होता तो अशा प्रकारें सगळा व्यर्थ खर्चून जाऊन पुनः ददात ती ददात राहिलीच. हें पाहून जॉनसननें आपल्या लेखणीवर आपला चरितार्थ चालवायाचा हा पूर्वीचा संकल्प पुनः मनांत आणून लंडन शहरची चाट धरली. बरोबर आपला विद्यार्थी वर सांगितलेला ग्यारिक यास घेतलें.

ही गुरुशिष्यांची जोडी वरील राजधानीस सन १७३७ वर्षाच्या आरंभीं येऊन दाखल झाली. दोघेहि पहिल्यानें केवळ उपजीवनार्थ तेथें आले असून पुढें पुढें आपापल्या गुणाच्या योगानें अत्यंत विख्यात व सर्वांत प्रमुख होऊन बसले. हें अत्युच्च स्थान जॉनसन यास कसें प्राप्त झालें, तें यापुढें क्रमाक्रमानें सांगायाचेंच आहे. सध्यां ग्यारिकची हकीकत लिहून हा अंक आटपतों. हा महाविख्यात नट जॉनसनचा परम मित्र होता, व याचा प्रस्तुत चरित्रांत अनेक वेळां संबंधहि येणार आहे, यास्तव व शिवाय सामान्यतः माहितीचा विषय, झणून पुढील वृत्तांत अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें.

८. ग्यारिक हा जॉनसनहून आठ दहा वर्षांनीं लहान होता. याच्या शिक्षणाचा वगैरे प्रकार वर सांगितलाच आहे. याचा कल लहानपणापासून नाट्यविद्येकडे असे. लंडनास आल्यावर पहिल्यानें तो कांहीं दिवस व्यापाराच्या नादांत गुंतला होता; पण त्या कामाचा त्यास कंटाळा येऊन तो लवकरच नाटकांत शिरला. शिरल्याबरोबर लागलीच कांहीं दिवसांनीं त्यानें आपल्या सोबत्यांस व त्या शहरांतील सर्व नटांस मागें

टाकलें. इतर सर्व नाटकगृहें हळू हळू शुष्क होत जाऊन सारी गर्दी इकडेच जमूं लागली, ख्यालीखुशाली करणारी शौकीन मंडळी व मोठमोठे अमीर उमराव यांचा आश्रय ग्यारिक ज्या मंडळींत होता तींसच मिळूं लागला. फार तर काय, पण पोपसार-ख्यांनीं व मोठमोठ्या नामांकित ग्रंथकारांनीं व उत्कृष्ट रसिकांनीं सुद्धां हा अपूर्व नाट्य-प्रकार पाहून तोंडांत बोटें घातलीं.[१] याप्रमाणें थोड्याच काळांत ग्यारिकची चोहोंकडे मोठी कीर्ति झाली असतां त्यानें स्वतः एक नाटकगृह आपल्या ताब्यांत घेतलें, व त्या मंडळींत आपण मुख्य झाला. हें आधिपत्य त्यानें पसतीस वर्षें चालविलें. सरते शेवटीं

१. पोपनें ग्यारिकचा अभिनय जेव्हां पहिल्यानें पाहिला तेव्हांच त्याच्यासारखा नट आजपर्यंत झाला नाहीं व पुढेंहि होईलसा दिसत नाहीं असा अभिप्राय दिला. तो म्हणाला, "याशीं स्पर्धा करण्यासारखा कोणीच नट नाहीं ही मोठी वाईट गोष्ट आहे. याच्या योगानें हा लवकरच बिघडून जाईल." दुसऱ्या दोन प्रेक्षकांचे उल्लेख येणेप्रमाणें आहेत—

"If manly sense; if nature linked with art;
If thorough knowledge of the human heart;
If powers of acting vast and unconfined;
If fewest faults with greatest beauties joined;
If strong expression, and strange powers which lie
Within the magic circle of the eye;
If feelings which few hearts, like his, can know,
And which no face so well as his can show,
Deserve the preference; Garrick! take the chair,
Not quit it till thou place an equal there."

Churchill's Rosciad.

"And how did Garrick speak the soliloquy last night?" "O, against all rule, my lord, most ungrammatically; betwixt the substantive and the adjective, which should agree together in number, case and gender, he made a breach thus—stopping as if the point wanted settling;—and betwixt the nominative case, which your lordship knows should govern the verb, he suspended his voice in the epilogue a dozen times, three seconds and three fifths by a stop—watch, my lord, each time." "Admirable grammarian! But in suspending his voice, was the sense suspended likewise? Did no expression of attitude or countenance fill up the chasm? Was the eye silent? Did you narrowly look?" "I looked only at the stop-watch, my lord."—"Excellent observer!"

Sterne's *Tristram Shandy.*

आपल्या सभाजनांची बहुमानपुरःसर व प्रेमपूर्वक आज्ञा घेऊन ज्या कामांत त्यानें एवढी कीर्ति मिळविली तें सोडून दिलें. नाटकगृहाची मालकी त्यानें विकली, तिजबद्दल त्यास ३७००० पौंड मिळाले. या रकमेवर व पूर्वीच्या मिळालेल्या संपत्तीवर आपले शेवटले दिवस आनंदानें काढण्याचा त्याचा संकल्प होता. पण पुढें लवकरच तो मरण पावला. ग्यारिकच्या मागें त्याच्यासारखा नट अद्याप झाला नाहीं.

आमच्या देशांत अलीकडे नाट्यविद्या अगदीं नाहींशी होऊन तिचा उदय नुकता कोठें उगीच झाल्यासारखा असल्यामुळें 'नाटक,' 'नाटकवाला' हे शब्द केवळ निंदास्पद होऊन बसले आहेत. तेव्हां इकडील स्थितीवरून पाहिलें असतां जॉनसनसारख्याचा शिष्य व परम मित्र नाटकांत शिरला व त्या कसबांत मानमान्यता पावला ही गोष्ट मोठी विलक्षण वाटण्यासारखी आहे. पण आमच्या साऱ्या वाचकांस माहीत असेलच कीं, नाटकाचा धंदा हा सामान्यतः पहातां जरी मोठा प्रतिष्ठित धरलेला नाहीं, व सदाचरणप्रवर्तक असाहि विशेष मानितां येत नाहीं,[1] तरी प्राचीन काळच्या व अर्वाचीन काळच्या मोठमोठ्या प्रमुख राष्ट्रांत नाट्यकलेस गायन, वादन, नृत्य, चित्रविद्या इत्यादींच्या प्रमाणें मोठा मान असे व अद्याप आहे. तेव्हां हल्लीं व विशेषतः गेल्या शतकांत साऱ्या युरोपांत प्रमुख असणारें जें इंग्लंड त्यांत ग्यारिक हा वर सांगितल्याप्रमाणें मोठी कीर्ति पावला यांत कांहीं नवल नाहीं. त्याच्या अंगीं सामान्य नटांप्रमाणें यथोचित अंगविक्षेप करण्याचा व नाटकी स्वरानें बोलण्याचा एवढाच गुण होता असें नाहीं. तर खरा अभिनय त्यानेंच प्रथमतः प्रवृत्त करून लोकांस दाखविला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्या त्या नाटकपात्राशीं केवळ तादात्म्य पावून बोलणें चालणें, स्वर वगैरे हुबेहूब उठवून देऊन मूळचें मनुष्यच प्रेक्षकांच्या पुढें आणून जसें काय उभें करणें, व मनाच्या निरनिराळ्या वृत्ति चेहेऱ्यावर दाखविणें, ही अपूर्व कला त्याच्याच ठायीं

---

१. जॉनसन हा जरी मोठा धर्मशील व सदाचरणी होता, तरी त्याच्या मनावरहि नाटकी मंडळीच्या अल्पकालिक समागमानेंहि कोणते विकार उत्पन्न झाले हें पुढील लेखावरून दिसून येईल. त्याच्या नाटकाचा प्रयोग व्हावयाचा असतां तो अगोदर कांहीं वेळ पडद्याच्या आंत बसे, त्या वेळच्या त्याच्या स्थितीविषयीं त्याचा चरित्रकार लिहितो——

"He, for a considerable time, used to frequent the Green-Room, and seemed to take delight in dissipating his gloom, by mixing in the sprightly chit-chat of the motley circle then to be found there. M. David Hume related to me from M. Garrick that Johnson at last denied himself this amusement, from considerations of rigid virtue; saying, "I'll come no more behind your scenes, David; for the silk stockings and white bosoms of your actresses excite my amorous propensities."

पहिल्यानें पूर्ण रीतीनें दृष्टीस पडली. शरीरानें व मनानें सारखाच वांकडा असणारा इंग्लंडाचा राजा जो तिसरा रिचर्ड, तसाच डेनमार्क राजाचा वेडाचें सोंग केलेला मुलगा हामलेट, इत्यादि पात्रांचीं सोंगें त्यानें अशीं हुबेहूब आणावीं कीं सभाजनांनीं केवळ तटस्थ होऊन जावें. वर टीपेंत पोप कवीचें ग्यारिकविषयीं जें मत दिलें आहे तें त्यानें वरील रिचर्डाचे सोंग पहातांच दिलेलें आहे; व स्टर्नच्या ग्रंथांतील उतारा दिला आहे त्यांतील विषय वरील राजकुमाराची सर्वप्रसिद्ध जी आत्मगत उक्ति ती होय. तर यावरून रंगभूमीवर नाचणाऱ्या सोंगाड्याची एवढी विलक्षण ख्याति कशामुळें झाली हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईल. पण जॉनसनचा शिष्य नुसता सोंगाड्याच नव्हता. त्याच्या अंगीं जातीनेंहि बरीच कवित्वशक्ति असून तो त्या वेळच्या विद्वन्मंडळांत मोडत असे. 'जॉनसनचा क्लब' ह्मणून जी बर्क, गिबन अशा सभासदांची मंडळी आठवड्यांतून एकदां एके ठिकाणीं जमत असे तींत तो होता; आणि भाषणचातुर्यांत व विनोदकलेंत त्याची सर्वांवर ताण होती.[1] पण आपल्या राष्ट्रावर किंबहुना साऱ्या जगावर त्यानें केलेला मोठा उपकार अद्याप सांगावयाचाच आहे. तो इंग्लंडांतल्या किंबहुना तद्देशीयांच्या मतें साऱ्या जगांतल्या, कवींत अग्रगण्य जो शेक्सपीयर त्याच्या-संबंधानें होय. या महाकवीचे ग्रंथ पहिल्यापासून जरी सर्वांस प्रिय होऊन राहिलेले आहेत, तरी ग्यारिकच्या पूर्वी त्यांची असावी तशी चहा नसे. कांहीं काळपर्यंत तर ते अगदींच अप्रसिद्ध झाल्यासारखे होऊन जॉनसनच्या वेळीं त्यांच्याहून ड्रायडन, पोप यांच्याकडेच लोकांचा विशेष भर असे. पण वर वर्णिलेला अपूर्व नाट्यप्रकार जेव्हांपासून सुरू झाला तेव्हांपासून तें मान फिरत चाललें. शेक्सपीयरच्या कीर्तीचें पुनरुज्वलन होऊन ज्या कवितेच्या अंतर्गत गुणांकडे लोकांची दृष्टि तोंपर्यंत पोंचली नव्हती ती तिजकडे तेव्हांपासून पोंचूं लागली. ग्यारिकची तर वरील कवीविषयीं जी पूज्यबुद्धि होती ती कांहीं अतोनात! सन १७६९ सालीं त्यानें शेक्सपीयरची जन्मभूमि जें स्ट्राटफर्ड तेथें त्याच्या निमित्त एक मोठा महोत्सव केला. तो सारखा तीन दिवस चालून हजारों लोकांनीं तेथील तुतीचें झाड, तेथली खुर्ची, व एकंदर सर्व देखावे डोळे भरून पाहून घेतले. व तेथील खुणा देवाच्या प्रसादाप्रमाणें पदरीं बांधून नेल्या.[2] असो;

---

१. प्रख्यात कवि **गोल्डस्मिथ** हा वरील क्लबचा सभासद होता; त्यानें ग्यारिकविषयीं लिहिलें आहे—

"As an actor confessed without rival to shine
As a wit, if not first, in the very first line."

The Retaliation.

२. वरील समारंभाविषयीं **कौपर** कवीनें लिहिलें आहे—

"The mulb'ry tree was hung with blooming wreaths.

(पुढें चालू).

तर या नटानें केलेल्या नाटकप्रयोगांनीं त्या वेळच्या लोकांचें तात्कालिक रंजन झालें इतकेंच नव्हे तर त्या राष्ट्राच्या महाकवीविषयीं सर्वांचे ठायीं पुनः अतिशय प्रेम उत्पन्न होऊन लोकाभिरुचीस नवेंच वळण दिल्यासारखें झालें. तशीच हीहि दुसरी मोठी गोष्ट झटली पाहिजे कीं, ग्यारिकसारख्या संभावित व सर्वमान्य मनुष्यानें नाट्यकर्माचा अंगीकार केल्यानें त्यास प्रतिष्ठा येऊन नाटक करणारी मंडळी झणजे दुराचरणांचें माहेरघर होऊन जी राहिली होती तोहि प्रकार बराच मोडला.

अकृत्वा परसंतापमकृत्वा खलनम्रताम् ।
अनुसृत्य सतां वर्त्म यत्स्वल्पमपि तद्बहु ॥[1]

अंक ३४—(१) अवतरण. (२) जॉनसनच्या विपत्तीचा आरंभ. (३) तिचीं कारणें (४) त्या वेळची विद्योपजीवि-जनांची स्थिति. (५) जॉनसनचा उपजीवनार्थ उद्योग. (६) त्याचीं काव्यें व नाटक. (७) इंग्रेजी भाषेचा कोश.

१. मागील अंकांत वरील विख्यात पुरुषाचें पूर्ववृत्त सांगून गुणिजनांच्या गुणांस निकषभूत व अत्यंत समृद्ध जी लंडन राजधानी तिजपर्यंत त्यास आणून सोडलें. आतां येथें त्याचा जो शेवटपर्यंत काळ गेला तो कसा गेला, व क्रमाक्रमानें त्याची विद्वत्कीर्ति अप्रतिम होऊन त्यास स्वास्थ्य कसें प्राप्त झालें तें सर्व सविस्तर कथन करतों.

२. जॉनसन इ० स० १७३१ सालीं लंडनास येऊन दाखल झाला हें पूर्वी सांगितलें आहे. येथपासून त्याच्या विपत्तीस जो आरंभ झाला तो बरोबर पंचवीस वर्षें त्याची तशीच स्थिति होती. त्यानें अनेक मोठमोठे ग्रंथ केले, निबंध लिहिले, काव्यें रचिलीं, व त्याची कीर्तिहि चोहींकडे अधिकाधिक पसरत होती; पण त्याची ददात झणून सुटली नाहीं. लक्ष्मीचा व सरस्वतीचा विरोध जो आपल्या लोकांत प्रसिद्ध आहे त्याचें उत्कृष्ट उदाहरण त्याचे ठायीं दृष्टीस पडत होतें. त्याचीं शेवटलीं वीस बावीस वर्षें मात्र बरींच सुखांत व स्वस्थतेंत गेलीं; तरी शेवटपर्यंत त्याजपाशीं धनाची विपु-

---

The mulb'ry-tree stood centre of the dance,
The mulb'ry-tree was hymned with dulcet airs,
And from his touch-wood trunk the mulb'ry-tree
Supplied such relics, as devotion holds
Still sacred, and preserves with pious care.
So't was a hallowed time; decorum reigned,
And mirth without offence. No few returned
Doubtless much edified, and all refreshed."

The Task.

२. "दुसऱ्यास ताप न देतां, दुष्टापुढें नम्रभाव प्रगट न करतां, आणि सज्जनांचा मार्ग न सोडतां, जें प्राप्त होईल तें थोडकें असलें तरी पुष्कळच आहे.

लता अशी कधींच नव्हती. वरील स्वास्थ्याचा प्रकार कशामुळें घडून आला याविषयीं क्रमेंकरून सांगावयाचेंच आहे. सध्यां वरील दरिद्रता जॉनसन यास दीर्घकाळ कशामुळें भोगावी लागली तें लिहितों.

३. पहिलें मोठें कारण त्या वेळची लोकस्थिति होय. मागेंच २८ व्या अंकांत एके ठिकाणीं वाचकांस कळविलें आहे कीं, आडिसनच्या 'स्पेक्टेटर' नांवाच्या निबंधांनीं एकंदर लोकांस वाचायास शिकविलें. वरील निबंधावली सन १७११—१२ या दोन वर्षभर प्रति दिवशीं (आदितवार खेरीज करून) निघत असे. त्या काळास व वरील काळास नुकतीं पंचवीस वर्षें काय तीं निघून गेलीं होतीं. तेव्हां जे लोक आडिसनच्या वेळेस ट फ करायाला लागले त्यांची गति एक पिढी लोटून गेल्यानें किती जास्त झाली असेल याची सहज कल्पना करतां येईल. हल्लीं वरील काळास दीडशें अधिक वर्षें होऊन गेल्यामुळें जें विलक्षण स्थित्यंतर होऊन गेलें आहे त्यावरून पहातां हल्लींच्या इंग्रेज लोकांच्या पांचव्या सहाव्या पिढीचे लोक इतके अज्ञान होते ही कल्पना करणें सुद्धां कठिण पडतें. पण मिल्टनसारखा कवि कीं, ज्याचें नांव घेतल्याबरोबर सध्यां इंग्लंडांतील लहान पोरांच्या मनांत सुद्धां पूज्यभाव व प्रेम हीं उत्पन्न होतात, त्याची कविता त्याच्या वेळेस तर केवळ उपेक्षेसच पात्र होऊन पुढेंहि तीस चाळीस वर्षेपर्यंत बहुधा तशीच लोळत पडली होती.[1] तिची अभिरुचि आडिसननेंच पहिल्यानें आपल्या देशबांधवांस लावली या एका गोष्टीवरून त्या वेळच्या स्थितीचें अनुमान सहज होण्यासारखें आहे. असो; तर जॉनसन ज्या वेळेस लंडनास येऊन आपल्या लेखणीवर उपजीविका चालविण्याचा उद्योग करूं लागला त्या काळीं लोकांस विद्येची अभिरुचि उगीच कोठें लागत चालली होती हें एक त्याच्या दरिद्रतेचें कारण होय. सध्यांसारख्या स्थितींत त्याच्या एखाद्या ग्रंथाचें उत्पन्न त्यास जन्मभर पुरलें असतें. दुसरें कारण असें कीं, पुस्तकवाल्यांचा धंदा त्या वेळेस आतांप्रमाणें चांगला पिकला नसल्यामुळें ते स्वतः बहुधा अगदीं अडाणी असत. एखादा नवा ग्रंथ त्यांच्याकडे छापण्यास व विकण्यास आणला असतां त्याच्या खपाचा अदमास त्यांस स्वतः करतां येत नसे. कोणा प्रसिद्ध ग्रंथकाराची संमति जेव्हां ते घेत तेव्हां तो हातीं घेण्यास ते धजत. यामुळें जॉनसनचें नांव चांगलें प्रसिद्ध होईपर्यंत त्याच्याहि ग्रंथाबद्दल पुस्तकवाले त्यास फार पैसा देत नसत; व तोहि स्वतः पैशाच्या कामांत सढळच असल्यामुळें इतर ग्रंथकारांइतकीहि आपल्या ग्रंथास किंमत मागत नसे. जें एकदां पहिल्या बोलीला ठरेल तेंच संतोषानें घेत असे. हें दुसरें कारण झालें. पण तिसरें कारण तर दोहोंहूनहि मोठें होतें. तें या विख्यात मनुष्याची निस्पृही

१. मिल्टनचें जगत्प्रसिद्ध काव्य 'प्याराडैज लॉस्ट' याबद्दल त्यास सगळे पंधरा पौंड एका पुस्तकवाल्यानें दिले! आमच्या महाराष्ट्र भाषेतील वीररसप्रधान काव्यास सुद्धां आमच्या 'दक्षिणा प्रैज कमिटी'कडून अधिक वक्षीस मिळालें!

व मानी अशी मनाची स्वाभाविक वृत्ति होय. तो शरीरानें जसा धट्टाकट्टा व बळकट होता, तसाच मनानेंहि आडदांड व उच्छृंखळ होता. कोणी मनुष्य केवढाहि मोठा असला तरी त्याच्या वैभवास्तव त्याशीं लवून वागणें किंवा त्याचें मनोधारण करूं पहाणें हें त्यास अगदीं आवडत नसे. जसा अगदीं गरीब मनुष्याशीं तसाच थेट त्याच्याशींहि तो वागत असे, व बोलण्याचालण्यांत कांहीं कमीजास्त झालें असतां तो त्यांस खडखडीत उत्तर देण्यांत, किंवा हे डचूक आहेत, अर्ल आहेत आणि आपण काय गरीब मनुष्य, आपणास वेळेनसार दोन प्रहरचीहि भ्रांत, हें मनांत आणून त्यांचें अज्ञान किंवा उर्मटपणा त्यांस भासवून देण्यांत तो कधींहि कमी करीत नसे. मग अशा स्वारीचें व बड्या बड्या लॉर्ड साहेबांचें, कीं जे छानछूक करून आलेल्या लेडीसाहेबांची खुषामत करतां करतां मरून जाणार, व मोठ्या आदबीनें बोलणें चालणें, नटणें मुरडणें या नाटकी कलेंत आपण मोठे बाके ह्मणून आपली धन्यता मिरवणार, अशांचें कसें जमावें! तेव्हां अर्थातच या बड्या मंडळींत त्यास पुरस्कर्ता कोणीहि न मिळाल्यामुळें त्यास स्वतःच्या श्रमानेंच व जें मिळेल त्यावर बहुधा शेवटपर्यंत गुजारा करावा लागला.

४. जॉनसन लंडन शहरास निघाला तेव्हां त्याजवळ सामग्री ह्मटली ह्मणजे दोन तीन गिनी,[1] दोन तीन शिफारसीचीं पत्रें, व एक अर्धेमुधें तयार झालेलें नाटक, एवढीच काय ती होती. वरील शिफारसपत्रांपैकीं एक एका प्रसिद्ध पुस्तकवाल्यास लिहिलेलें असून जॉनसनची विद्वत्ता, कवित्वशक्ति वगैरे गुणांविषयीं त्यांत त्याची प्रशंसा केली होती; व शेवटीं सांगितलें होतें कीं, यास तुह्मीं भाषांतराचें वगैरे काम दिलें असतां हा तुमच्या चांगला उपयोगी पडेल. हें पत्र त्या पुस्तकवाल्यानें वाचून असेंच जॉनसनकडे अंमळ रेखून पाहिलें, आणि तो विनोदानें ह्मणाला, "गड्या, तूं जर बाजारांत हमालाचें पोतें विकत घेऊन ओझीं वहात जाशील तर तुझा निर्वाह याहूनहि बरा चालेल." या त्याच्या भाषणांत नसती थट्टाच होती असें नाहीं. त्याच्या व इतर पुस्तकवाल्यांच्या आश्रयानें जे ग्रंथकार आपली उपजीविका करीत असत त्यांची अवस्था कशी असे ती त्याच्या नेहमींच्या पहाण्यांतली होती. त्यांचें रहाणें चवथ्या पांचव्या मजल्यावरच्या खोलींत, जेवण खाण एखाद्या भट्ट्याच्या दुकानांत, अंगावर कपडालत्ताहि वेळच्या वेळेस घालायाला मिळायाचा नाहीं, कधीं कधीं तोहि सावकारानें शिपाई आणून पुढें उभा केला असतां जप्त व्हावयाचा, अशा प्रकारें ते काळ काढीत असत. जॉनसननेंच आपली या वेळची स्थिति अनेक प्रसंगीं वर्णिली आहे कीं, त्यास नित्य चिंता ह्मणून कधीं सुटली नाहीं. आज जर आळसामुळें कांहीं काम केलें नाहीं

१. विलायतेंत सोन्याचेंहि नाणें चालतें. गिनी ह्मणजे साडे दहा रुपये, व पौंड ह्मणजे दहा रुपये होत. शिलिंग ह्मणजे अधेली व सहा पेन्स ह्मणजे चार आणे हें बहुतेकांस माहीत असेलच.

तर उद्यां खडखडीत उपास पडायाचा अशी स्थिति त्याची वीस पंचवीस वर्षें होती. कधीं कधीं तर दोन दोन दिवस त्यानें अन्नावांचून काढावे.[1] दोनदां तर नाझरच्या शिपायानें त्यास पकडलें असतां त्याचा मित्र प्रख्यात कादंबरीकार रिचर्डसन यानें त्यास पांच पौंड उसने देऊन सोडविलें. असो; तर असल्या विपन्न स्थितींत प्रस्तुत ग्रंथकारानें आपले ऐन उमेदीचे व भर तारुण्याचे दिवस काढले. तरी त्याची नीति व सदाचरण हीं लवमात्रहि सुटलीं नाहींत. एक दोनदां मात्र त्याचा प्रसिद्ध मित्र साव्हेज याच्या संगतीनें त्याचें जरा वांकडें पाऊल पडलें; पण त्यानें तत्क्षणींच वाटेवर येऊन त्याबद्दल त्यास जन्मभर अनुताप होत असे. साव्हेज हा मोठा विलक्षण पुरुष होता. त्याचा जन्म मोठ्या कुळांत झाला असून त्याजवर मोठमोठे चमत्कारिक प्रसंग येऊन गुजरले होते; व जगाच्या सर्व स्थितींचा अनुभव त्यास घडला होता. शेवटीं जॉनसन वरील विपत्तींत रखडत असतां हा त्यास जोडीदार मिळाला; व 'समानशीलव्यसनेषु सख्यम्' या न्यायानें दोघांचा लवकरच परिचय होऊन अत्यंत स्नेह जडला. साव्हेजच्या अंगीं बरीच कवित्वशक्ति असून तो विद्वान् व बहुश्रुतहि होता; व जगाच्या व्यवहारांत पुष्कळ घोळून गेलेला असल्यामुळें त्याची संगति जॉनसन यास विशेषच प्रियकर झाली. दोघेहि फटिंग, व दोघेहि सारखेच कफल्लक; तेव्हां दोघांनीं सारी रात्रची रात्र शहरभर हिंडावें, व साऱ्या जगाच्या उलाढाली कराव्या.[2] या वेळेस वरील स्नेह्याच्या संगतीनें जॉनसन यास ज्या कित्येक संवयी लागून गेल्या त्या शेवटपर्यंत त्यास लागून राहिल्या. त्या रात्रभर जागणें व दिवसा दोन दोन वाजेतों निजून रहाणें, कोणाचीहि फारशी मुरवत न ठेवतां त्यास चापून उत्तर करणें, रागाच्या सपाट्यांत हातघाईवर येणें, अशा तऱ्हेच्या कांहीं होत. असो; पण हा समागम फार वेळ टिकला नाहीं. साव्हेज यास लंडन शहरचा त्रास येऊन तो वेल्स प्रांतांत निघून गेला, आणि पुढें लवकरच तिकडे दिवाणी तुरुंगांत मरण पावला.

५. इकडे जॉनसनचा क्रम 'शनैःपंथाः' या न्यायानें सारखा चाललाच होता.

---

१. **जॉनसन**चीं पत्रे जीं छापलीं आहेत त्यांतील एकावर Impransus अशी सही आहे. हिचा अर्थ ल्याटिन भाषेंत 'बुभुक्षित' 'भुकेला' असा होतो.

२. "Johnson has often been heard to relate, that he and Savage walked round Grosvenor-Square till four in the morning; in the course of their conversation reforming the world, dethroning princes, establishing new forms of government, and giving law to the several states of Europe; till, fatigued at length with their legislative office, they began to feel the want of refreshment, but could not muster up more than fourpence—half-penny."

Murphy's Life of Johnson.

फ्रेंच, इटालियन, त्याटिन वगैरे भाषांतल्या ग्रंथांचीं भाषांतरें; नव्या ग्रंथांवर टीका; प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें; निरानिराळ्या विषयांवर निबंध, कविता वगैरे; नाटकारंभींच्या सामाजिक विज्ञापना; ग्रंथार्पणपत्रें; पुस्तकालयांतील ग्रंथांची विषयवार याद; याप्रमाणें जो जो उद्योग सांपडेल व जो जो कोणी सांगेल तो जॉनसन करीत असे. तो स्वभावतः मोठा आळशी व मनस्वी होता, व शिवाय त्यास जी चमत्कारिक मनोविकृति जडली होती तिच्यामुळें तर त्यास जागचें उठूं नये असेंहि वाटे; पण क्षुधेपुढें उपाय नाहीं. तिचें शमन करण्याचें साधन त्यास दुसरें अनुकूळ नसल्यामुळें त्यास आंग मोडून दररोज कांहीं तरी उद्योग करावा लागे. या त्याच्या विपन्न स्थितीमुळें त्याच्या बुद्धिरूप भांडारांतील इतकी संपत्ति बाहेर पडली; व त्याच्या देशाचें कल्याण होऊन तिजपासून एकंदर जगासहि इतका उपयोग घडला. नाहीं तर खाणींतल्या खाणींत राहिलेल्या सोन्यारुप्याप्रमाणें वरील संपत्ति बहुधा तशीच गुप्त रहाती; किंवा निदान फारच थोडी प्रगट झाली असती. या गोष्टीची प्रचीती या ग्रंथकाराचीं शेवटलीं वीस वर्षें जीं अमदानींत गेलीं तिजवरून पुढें येईलच. असो; आतां वरील ग्रंथसमूहांत व निरानिराळ्या कृतींत विशेष प्रसिद्ध ह्मणून जेवढ्या आहेत तेवढ्यांविषयीं वाचकांस माहिती देतों.

६. जॉनसनच्या नांवावर दोन प्रसिद्ध काव्यें जीं आहेत तीं त्यानें याच वेळेस लिहिलीं. हीं 'लंडन' व 'मानवी आशेचें वैफल्य' अशीं दोन होत. पहिलें त्यानें आपल्या मित्राच्या प्रयाणसमयीं लिहिलें. त्यांतील पहिलीं पद्यें त्यासच उद्देशून लिहिलीं असून बाकीच्यांत इंग्लंडच्या राजधानींत जो दुराचाराचा, अनीतीचा वगैरे प्रकार आहे त्याचें वर्णन केलें आहे. दुसऱ्या काव्यांत मोठमोठे राजे, मोठमोठे सरदार, मोठमोठे मुत्सद्दी यांचीं उदाहरणें देऊन मनुष्याच्या मनाची धांव कशी निष्फळ होते, ह्मणजे मोठें अवडंबर रचलें असतां त्याचा शेवटीं एका क्षणांत कसा विध्वंस होऊन जातो हें दर्शविलें आहे. हीं दोन्ही काव्यें त्याटिन कवि जुवेनल याच्या धाटणीवर लिहिलीं आहेत. जुवेनलनें रोम शहरावर कडाका उडवून रोमच्या इतिहासांतील उदाहरणें जशीं घेतलीं होतीं, त्याचप्रमाणें जॉनसननें आपलें वसतिस्थान व आपल्या देशचा इतिहास यांच्या आधारानें वर्णन केलें. हीं दोन्ही काव्यें मूळ त्याटिन काव्यांच्या तोडीचीं आहेत; कोठें कोठें तर मूळच्यावरहि तान झालेली आहे. पहिलें 'लंडन' प्रसिद्ध झालें त्यावेळेस पोप होता, त्यानें मागील 'मेसाया'प्रमाणें याचीहि फार तारीफ केली, आणि त्याचा कर्ता कोण असावा याविषयीं आपल्या मित्रांकडून शोध करविला.[1] शोधाअंतीं जेव्हां असें समजलें कीं, हा कोणी गरीब व अप्रसिद्ध मनुष्य

१. जॉनसननें आपलें नांव, चोहोंकडे प्रख्यात होईपर्यंत आपल्या कोणत्याहि ग्रंथावर घातलें नाहीं. तरी त्यांतील मजकुरावरून व भाषापद्धतीवरून तें तेव्हांच समजण्यांत येई हें उघड आहे.

आहे, तेव्हां त्यानें भाकीत केलें कीं, 'हा मनुष्य फार दिवस अप्रसिद्ध रहाणार नाहीं.' याप्रमाणें या काव्याची प्रथमारंभींच चोहोंकडे मोठी प्रशंसा झाली; कित्येक तर असेंहि ह्मणूं लागले कीं, आतां पोपचेंहि वर्चस्व फार दिवस टिकणार नाहीं. याचा खपहि तसाच असा जलद झाला कीं दुसऱ्या आठदाड्याला दुसरी आवृत्ति काढावी लागली. तरी जॉनसन यास पुस्तकवाल्याकडून या काव्याबद्दल दहा गिनीच काय ते मिळाले. याप्रमाणेंच दुसऱ्या काव्याचीहि जरी चोहोंकडे वाखाणणी झाली, तरी त्यापासून त्यास मिळकत पंधरा पौंडच झाली.

जॉनसननें लंडनास येतांना बरोबर एक अपुरतें राहिलेलें नाटक आणलें होतें असें वर वाचकांस कळविलें आहे. तें त्यानें येथें आल्यावर संपूर्ण केलें; तें 'ऐरीन' हें होय. इंग्लिश भाषेंत, किंबहुना युरोपांतल्या साऱ्या भाषांतून, नाटकाचे दोन प्रकार मानलेले आहेत; एक ट्रॉजेडी (शोकरसप्रधान) आणि दुसरा प्रकार कॉमेडी (हास्यरसप्रधान). यांपैकीं पहिल्या वर्गांतलें वरील नाटक होय. याचें संविधानक तुर्क लोकांच्या इतिहासांतील एक चमत्कारिक वृत्तांत घेऊन त्यावर बांधलेलें आहे. याचा प्रयोग जॉनसनचा शिष्य ग्यारिक यानें मूळच्यांत पुष्कळ फेरफार करून रंगभूमीवर तेरा वेळ करविला. या प्रसंगीं ग्यारिकनें आपल्या गुरूकरतां आपलें कसब होतें तितकें प्रगट केलें, व एकंदर नाटकाची तयारी जितकी उत्कृष्ट ठेवतां आली तितकी ठेवली; पण मूळ कृतींत अंतःकरणास द्रवविण्यासारखें विशेष कांहीं नसल्यामुळें सभाजनांस तें फारसें पसंत झालें नाहीं. त्यांतील भाषा व विचार हीं दोन्ही प्रौढ होतीं यास्तव तें श्रोत्यांनीं शेवटपर्यंत गंभीरपणानें व स्वस्थपणानें ऐकून घेतलें; पण एकंदर प्रकार थंडाईचाच झाला. तेव्हांपासून पुढें तर त्याचा प्रयोग कधींच झाला नाहीं; व जॉनसनच्या इतर ग्रंथांच्या मानानें पहातां आडिसनच्या 'केटो'प्रमाणें तें आतां विशेष प्रसिद्धहि नाहीं. हीं दोन्ही नाटकें आतां सर्वांच्या मतें वाचण्यास मात्र चांगलीं असून रंगभूमी-

---

१. वरील दोन काव्यांवर निरनिराळ्या ग्रंथकारांचे असे अभिप्राय आहेत—

"*London* has all the ease and all the spirit of an original."

Gray.

"*The Vanity of Human Wishes* is a satire, the deep and pathetic morality of which has often extracted tears from those whose eyes wander dry over pages professedly sentimental."

Sir Walter Scott.

"*The Vanity of Human Wishes* is an excellent imitation of the tenth satire of Juvenal. It is in truth not easy to say whether the palm belongs to the ancient or the modern poet."

Macaulay.

वर प्रयोग करण्याच्या उपयोगीं नाहींत असें ठरलें आहे. असो; या नाटकाच्या प्रयोगांवरून व छापण्याचा हक्क विकल्यावरून जॉनसन यास एकंदर तीनशें पौंड मिळाले. हेच त्या वेळेस त्यास हजाराच्या जागीं होते.

७. जॉनसननें पद्यरूप जी ग्रंथरचना केली ती वर सांगितली तेवढीच. यापुढचे त्याचे सर्व ग्रंथ गद्यरूपच आहेत. त्याची पुढें पुढें जी एवढी विलक्षण ख्याति झाली व अद्यापहि चालत आहे ती या गद्यग्रंथांवरूनच होय. कांहीं अंशीं या पद्धतीस त्यानें नवें स्वरूप देऊन तिचा प्रचार वाढविला असें सुद्धां ह्मणण्यास हरकत नाहीं. या वेळीं इंग्लंडांत 'जेंटलमेन्स मागेझैन' ह्मणून एक पत्र निघत असे, त्यांत त्याचे लेख पहिल्यानें येऊं लागले. या पत्रांत निबंध वगैरे व सामान्य लौकिक विषय जसे असत, त्याप्रमाणेंच पार्लमेंटांत होणाऱ्या वाटाघाटीचीहि हकीकत लोकांस कळविली असे. हें दुसरें काम कांहीं दिवसांनीं जॉनसन स्वतः करूं लागला. वरील पत्राचा मालक आपल्या वतीचे कांहीं लोक पार्लमेंटांतील वादविवाद ऐकण्यास पाठवीत असे, व त्यांस तेथील चोपदारांनीं कांहीं हरकत करूं नये अशी त्यानें आंतून गुप्त तजवीजहि केली होती. या बातमीदारांनीं भाषणांचा सारांश टिपून आणावा, व कोणकोणत्या वक्त्यानें कोणत्या पक्षाकडचें भाषण केलें हेंहि लिहून आणावें; आणि मग एवढ्यावर काय ती सगळी इमारत रचायाची ! तरी जॉनसनची विद्वत्ता व चातुर्य असें होतें कीं, वरील तुटक तुटक माहितीवरून त्यानें दोहों पक्षांकडील वक्त्यांचीं भाषणें स्वकपोलकल्पित नवींच तयार करावीं. मग तीं तयार झाल्यावर वरील पत्रांत गोष्टीच्या रूपानें छापलीं जात; ह्मणजे अमुक अमुक नगरीं तेथील राजाच्या प्रधानांनीं अशीं अशीं भाषणें केलीं असा आरंभीं उपोद्घात करावा लागे.[1] असो; या भाषणांचेंहि कर्तृत्व पुष्कळ दिवसपर्यंत गुप्तच होतें; तें हळू हळू प्रसिद्ध होत जाऊन सरते शेवटीं जॉनसननेंच स्वतः एके प्रसंगीं कबूल केलें. या भाषणांत प्रस्तुत ग्रंथकर्त्याची प्रौढ रचना व चातुर्य हीं दोन्ही अर्थात आहेतच; तरी त्यांची आतां फारशी प्रसिद्धि नाहीं.

जॉनसनचा यापुढचा ग्रंथ त्याचा परम मित्र वर सांगितलेला जो साव्हेज त्याचें चरित्र होय. याचा मागें सांगितल्याप्रमाणें वेल्स प्रांतीं एका तुरुंगांत शेवट झाला असतां त्याच्या एकंदर चरित्राविषयीं लोकांस मोठी उत्कंठा व कौतुक हीं उत्पन्न झालीं होतीं. अशा संधीस वरील ग्रंथ लिहून जॉनसननें तीं दोन्ही पुरविलीं व सर्वांस अगदीं थक्क करून सोडलें. याहि ग्रंथावर जॉनसनचें नांव नव्हतेंच; तरी पुष्कळांस तोच त्याचा

---

१. वरील गोष्टीवरून इंग्लंडांतील लोकांस तेव्हां किती स्वातंत्र्य होतें याचा अजमास होतो. हल्लीं पार्लमेंटांतील कारभार इतका गुप्त रीतीनें न चालून तेथील भाषणें साऱ्या जगभर जशींचीं तशीं प्रसिद्ध होतात हें सर्वप्रसिद्धच आहे. यावरून सुमारें शंभर वर्षांतच इंग्लंडांत लोकस्वातंत्र्याच्या संबंधानें केवढा फेरफार झाला आहे हें सहज मनांत येईल!

कर्ता ह्मणून तेव्हांच माहीत झालें. या वेळेपर्यंत इंग्लंडांत चरित्रें लिहिण्याचा प्रकार विशेष चालू नव्हता; व जो होता तोहि मोठ्याशा पूर्ण दशेस आला नव्हता. कोणी मोठा प्रख्यात मनुष्य मरण पावला असतां जॉनसनच्या सारखे जे विपन्न ग्रंथकार आपल्या लेखणीवर उदरनिर्वाह करीत असत त्यांनीं त्यांचीं चरित्रें तयार करावीं; मग त्यांत जीं बरींशीं व खपतीलशीं वाटतील तीं पुस्तकवाल्यांनीं विकत घेऊन छापून प्रसिद्ध करावीं. अशा बुभुक्षाप्रेरित ग्रंथांची योग्यता कितीशी असणार! कांहींच नसे, त्यापेक्षां तसल्यांतहि जीं चरित्रें अंमळ बरींशीं असत तीं लोकांच्या आश्रयास कांहीं वेळ पात्र होत, व पुढें नाहींशीं होऊन जात. पण प्रस्तुत चरित्र फार निराळ्या तऱ्हेचें होतें. त्यांत साव्हेजच्या आयुष्यांत घडलेल्या ज्या चमत्कारिक चमत्कारिक गोष्टी त्या सर्वांचें यथास्थित व चित्तवेधक कथन अशा कांहीं खुबीनें केलें आहे कीं, वाचकांची वृत्ति तन्मय होऊन जाऊन त्यास पुस्तक खालीं ठेववतच नाहीं. तसेच जागोजागीं जे विचार प्रगट केले आहेत तेहि मोठे मार्मिकपणाचे व प्रौढतेचे असल्यामुळें सामान्यतः सर्वांस व विशेषतः तरुणजनांस तर ते अत्यंत हितावह होण्यासारखे आहेत.

८. जॉनसनचे येथवर जे जे ग्रंथ सांगितले ते ते त्याच्या पूर्व वयांत व तो तादृश प्रसिद्ध नसतां रचलेले होत. आतां यापुढचा जो त्याचा प्रचंड उद्योग सांगावयाचा आहे त्याच्यापासून मात्र त्याची कीर्ति अगदीं स्थायिक होऊन तो त्या कालच्या विद्वन्मंडळांत सर्वानुमतें अग्रगण्य ठरला. हा उद्योग इंग्रजी भाषेचा कोश होय. जॉनसनची मागील ग्रंथांवरून चोहोंकडे ख्याति होऊन वरच्यासारख्या कामास तो किती योग्य होता हें चोहोंकडे माहीत झालें होतें. यास्तव सन १७४७ सालीं लंडन शहरांतले कित्येक मोठमोठे पुस्तकवाले एकत्र जमून त्यांनीं विचार केला कीं जॉनसनकडे हा उद्योग सोंपवून दिला असतां तो चांगल्या तऱ्हेनें शेवटास जाऊन आपणांस चांगला नफा होईल. मग त्यांनीं तो बेत त्यास कळवून त्याबद्दल त्यास १५७५ गिनी देण्याचें कबूल केलें. जॉनसन यासहि दररोज नवा उद्योग शोधीत बसण्याचा त्रास आला होता, यास्तव दोन तीन वर्षांचें हें आपणास एकदमच काम

१. जॉनसनच्या मित्रमंडळींत सर जॉशुआ रेनॉल्डस ह्मणून एक मोठा विख्यात चित्रकार होता. त्याच्याविषयीं वरील ग्रंथाच्या संबंधानें एक चमत्कारिक गोष्ट लिहिली आहे. त्याचा वरील ग्रंथकाराशीं जो स्नेह जमला तो वरील ग्रंथावरून. रेनॉल्डस यानें एक दिवस सहज वरील चरित्र वाचायास घेतलें व रस्त्याच्या बाजूस एका धुराड्यावर हात टेंकून तें वाचायास आरंभ केला. पण त्या ग्रंथानें त्याचें मन इतकें वेधून टाकलें कीं, तें सगळें तेव्हांचे तेव्हांच त्यानें वाचून टाकलें. मग शेवटीं धुराड्यावरून हात काढायाला जों जातो तों तो बधिर होऊन गेलेला! पुढें दोघांची परस्पर ओळख होऊन जो स्नेह जमला तो आमरणांत राहिला. जॉनसनचें चित्र जें त्याच्या पुष्कळ ग्रंथांवरून काढलेलें असतें तें त्याच्या हातच्या तसबिरींवरून काढलेलें होय.

मिळालें असें समजून त्यासहि वरील बेत पसंत झाला. मग हाताखालीं तीन चार मदतनीस घेऊन व एक निराळें घर भाड्यानें घेऊन त्यानें इंग्रेजी भाषेचा कोश रचण्यास आरंभ केला. हा संस्कार त्या भाषेस तोंपर्यंत मुळींच घडला नव्हता. नुसते शब्द वर्णानुक्रमानें लावलेले व त्यांचा अर्थ थोड्क्यांत दिलेला असे लहानसान कांहीं कोश होते, पण तोंपर्यंत त्या भाषेंत जो गोंधळ माजलेला होता तो मोडून टाकून नीट व्यवस्था लावण्याचा उद्योग त्यापूर्वी कोणींच केला नव्हता. जॉनसननें या कोशाच्या आरंभीं जी प्रस्तावना लिहिली आहे तींत त्या वेळीं प्रस्तुत भाषेची जी स्थिति होती, तिचें स्वरूप चांगलें वर्णन केलें आहे. ह्मणजे वर्णोच्चाराविषयीं भेद, शब्दाक्षरांच्या लेखनाविषयीं अनियम, वाक्यांची रचना व्याकरणभ्रष्ट, भाषापद्धति ग्राह्य कोणती अग्राह्य कोणती याचा बिलकूल विचार नाहीं. पाहिजे त्या ग्रंथकारानें मनास वाटतील ते परकी शब्द भाषेंत घुसडून द्यावे, अशी अव्यवस्था एकंदर भाषेंत माजली होती. तेव्हां हा सर्व गोंधळ मोडून एकट्या मनुष्यानें तीस चाळीस हजार शब्दांची वर्णव्यवस्था, उच्चार, अर्थ वगैरे सर्व नीट बसवून देऊन चोहोंकडे व्यवस्था करून देण्याचा यत्न करणें ह्मणजे केवढें अचाट साहस आहे व केवढी जबरदस्त यातायात आहे! पण ही सर्व या महापंडितानें आपल्या अंगावर घेऊन तो उद्योग कालेंकरून तडीस नेला. त्याच्या पूर्वसंकल्पाप्रमाणें हें काम दोन तीन वर्षांत अर्थात् संपलें नाहींच; त्यास पुरीं सात आठ वर्षें लागलीं. इतक्या कालांत त्यास दिलेली रक्कम पार खल्लास होऊन गेली, त्यास दोनदां दिवाणी तुरुंगांत कर्जदारांनीं नेऊन बसविलें, दोनदां त्याच्या मित्रानें त्यास नाझरच्या शिपायाच्या हातून सोडविलें, व सर्वांत मोठी दुःखाची गोष्ट ह्मटली ह्मणजे ही कीं, जीवर तो जीव कीं प्राण करीत असे, जिच्या सुखार्थ स्वतःला कितीहि कष्ट पडले तरी त्यानें आनंदानें सोसावे, व प्रस्तुत अवाढव्य ग्रंथ संपला असतां त्यापासून उत्पन्न होणारी संपत्ति व कीर्ति यांचा उपभोग जिच्याबरोबर चिरकाळ घेण्याचें त्याच्या मनांत होतें, ती त्याची आवडती बायको मरण पावून तो पुनः सडाचा सडाच राहिला![1]

---

१. जॉनसनच्या या स्थितीचें मेकालेनें मोठें हृदयास लागण्यासारखें वर्णन केलें आहे–

"The last *Rambler* was written in a sad and gloomy hour. Dr. Johnson had been given over by the physicians. Three days later she died. She left her husband almost broken-hearted. All his affection had been concentrated on her. He had neither brother nor sister, neither son nor daughter. To him she was beautiful as the Gunnings, and witty as Lady Mary. Her opinion of his writings was more important to him than the voice

(पुढें चालू).

वरील कोशाच्या संबंधानें एक मोठें प्रकरण झालें तेंहि येथें सांगितलें पाहिजे. तें मागें सांगितलेला जो लार्ड चेस्टरफील्ड त्याच्या संबंधाचें होय. चेस्टरफील्ड हा त्या वेळेस सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या हुद्द्यावर होता. त्याची विद्वत्तेविषयींहि बरीच ख्याति असून त्या वेळच्या वक्त्यांत तर तो प्रमुखच होता. या बड्या सरदाराची वरील कोशास अनुकूलता दिसल्यावरून जॉनसननें पाहिलें संकल्पपत्र त्यास उद्देशून लिहिलें. यावरून सदरहू लार्ड साहेबांकडून जॉनसन यास बोलावणें आलें. तेव्हां तो त्यांजकडे जाऊं लागून कांहीं दिवस दोघांची बरीच गोडीगुलाबी चालली. जॉनसन यास वाटलें कीं, आपल्या कृत्यास एवढा पुरस्कर्ता मिळाला हें फार चांगलें झालें; व चेस्टरफील्ड यासहि वाटलें कीं, एवढा मोठा ग्रंथ आपल्या आश्रयानें होणार हें आपल्या नांवास चिरकाळ भूषणच झालें. पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. दोघांचा लवकरच जो बेबनाव झाला तो शेवटपर्यंत तसाच राहिला; व वरील अर्ल[1] साहेबांच्या मनांत आपल्या नांवाचा इंग्रेजी भाषेच्या कोशाशीं ज्या प्रकारचा संबंध असावा असें होतें त्यापेक्षां तो आतां फार निराळ्या तऱ्हेचा आहे. याचें कारण असें झालें कीं, अर्ल साहेब हे जन्मापासून सरदार मंडळींत व मोठमोठ्या लेडीसाहेबांच्या मेळ्यांत वागलेले असून रीतरिवाजाच्या टापटीपींत बारीक लक्ष पुरविणारे होते; व जॉनसन काय? त्याचा काळ सगळा अगदीं नीच पदवीच्या लोकांच्या संगतींत गेला असल्यामुळें वरील नोकझोकांत तो पुरा अडाणी होता, व स्वभावानें आडदांड असल्यामुळें थोर लोकांपुढें जाणें तर मोठें भीत भीत जावें, त्यांच्याशीं बोलायाचें तें मोठ्या अदबीनें व लवून बोलावें, वगैरे प्रकार तो बिलकूल जाणीत नसे. मग अशा रानवट मनुष्याशीं गांठ पडली असतां वरील नाजूक साहेबांच्या अंगांत हींव भरत असेल यांत नवल

---

of the pit of Drury Lane Theatre or the judgment of the Monthly Review. The chief support which had sustained him through the most arduous labour of his life was the hope that she would enjoy the fame and the profit which he anticipated from his Dictionary. She was gone; and in that vast labyrinth of streets, peopled by eight hun red thousand human beings, he was alone. Yet it was necessary for him to set himself, as he expressed it, doggedly to work. After three more laborious years, the Dictionary was at length complete."

१. इंग्लंडांतील अमीर उमरावांच्या पदव्या ड्यूक, अर्ल, मार्किस, बारोनेट वगैरे असून लॉर्ड, सर वगैरे त्या त्या पदवीचे किताब होत हें आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच.

काय ?[1] त्यांनीं दोनतीनदां जॉनसन यास मुलाखत देऊन पुढें देवडीवाल्यास ताकीद देऊन ठेविली कीं, या मनुष्यानें विचारलें असतां स्वारी बाहेर गेली आहे ह्मणून सांगत जा. हा मज्जावीचा प्रकार जॉनसननें दोनतीनदां पाहून मनांत गांठ घातली कीं, पुनः ह्मणून याच्या दाराशीं पाऊल घालायाचें नाहीं. पुढें याहि गोष्टीस सात आठ वर्षें लोटून गेलीं; व जॉनसननें वर सांगितलेल्या अडचणींत, विपत्तींत व दुःखांत आरंभलेलें महत्कार्य तडीस नेऊन पोंचविलें. तें पाहून वरील लॉर्ड साहेबांस आशा सुटली कीं, हा तयार झालेला कोश आपणास नजर होऊन आपलें नांव यावर यावें. या हेतूस्तव त्या वेळेस चालू असणाऱ्या 'वर्ल्ड' नामक पत्रांत त्यांनीं दोन निबंध लिहिले; व त्यांत जॉनसनच्या एकंदर विद्वत्तेची अतिशय तारीफ करून नुकत्या प्रसिद्ध होणाऱ्या कोशाविषयीं तर भारीच गोड गोड मजकूर लिहिला होता. चेस्टरफील्डचा

---

१. वरील हींचा प्रकार अर्लसाहेबांनींच स्वतः वर्णिला आहे. आपल्या चिरंजीवास ते जीं पत्रें लिहीत असत त्यांपैकीं एकांत त्यांनीं जॉनसनविषयीं पुढील मजकूर लिहिला—

"There is a man whose moral character, deep learning, and superior parts I acknowledge, admire, and respect; but whom it is so impossible for me to love, that I am almost in a fever whenever I am in his company. His figure (without being deformed) seems made to disgrace or ridicule the common structure of the human body. His legs and arms are never in the position which, according to the situation of his body they ought to be in, but constantly employed in committing acts of hostility upon the Graces. He throws anywhere but down his throat, whatever he means to drink; and mangles what he means to carve. Inattentive to all the regards of social life, he mistimes and misplaces everything. He disputes with heat indiscriminately, mindless of the rank, character and situation of those with whom he disputes. Absolutely ignorant of the several gradations of familiarity and respect, he is exactly the same to his superiors, his equals and his inferiors; and therefore by a necessary consequence, is absurd to two of the three. Is it possible to love such a man ? No. The utmost that I can do for him is, to consider him a respectable Hottentot!"

वरील पत्रें छापून प्रसिद्ध झालीं असतां त्यांवर जॉनसननें काय अभिप्राय दिला तोहि सत्प्रसिद्ध आहे—

"These Letters teach the morals of a harlot and the manners of a dancing-master".

हें सर्व करण्याचा मतलब उघडच होता कीं, जॉनसनच्या मनांत आपल्याविषयीं जर अद्याप राग असेल तर तो वरील मधुर शब्दांनीं घालवावा, व पूर्वीच्या संकल्पाप्रमाणेंच सर्व घडून यावें. पण तें कसचें होतें? जॉनसन यास वरील मजकूर जेव्हां समजला तेव्हां त्याचा राग शांत न होतां उलटा अधिक प्रदीप्त मात्र झाला. पोराच्या हातावर खाऊ ठेवून जशी समजूत करावी तसा वरील खुषामतीचा प्रकार पाहून आपली मानहानि केलीशी मात्र त्यास वाटली; व तत्क्षणींच त्यानें त्यास असें खडखडीत पत्र लिहिलें कीं, त्यांतील प्रत्येक अक्षर वरील नाजूक लार्ड साहेबांच्या मर्मींच पोंचलें असेल.[१] या एका पत्रावरून जॉनसनचा एकंदर स्वभाव व त्याची लिहिण्याची शैली हीं जशीं व्यक्त होतात तशीं मोठाल्या ग्रंथांवरूनहि होणार नाहींत!

याप्रमाणें प्रस्तुत कोशाच्या अर्पणाच्या संबंधानें एवढें प्रकरण माजलें व सरते शेवटीं त्याचा वरच्यासारखा शेवट झाला. जॉनसननें कोणाचेंहि साहाय्य न मागतां व कोणाचाहि आश्रय न घेतां, फार तर काय, पण घरीं चालत आलेला आश्रयहि वरच्यासारखा धुडकावून लावून, आपला कोश संपविला, व वर कोणाहि बड्या मनुष्याचें नांव न घालतां तसाच तो केवळ आपल्या नांवावर प्रसिद्ध केला. या वेळेस त्याच्या मित्रांनीं त्याजकरितां खटपट करून ऑक्सफर्ड युनिवर्सिटिकिडून त्यास एम० ए० हा किताब देवविला. त्यासकट सदरील ग्रंथावर त्याचें नांव प्रगट झालें. यापुढचा किताब एल. एल. डी. हा त्याच युनिवर्सिटीनें त्यास पुढें आपण होऊन पाठवून दिला, हें मागें सांगितलेंच आहे.

येथवर या कोशाचा वृत्तांत काय झाला तो सांगितला. आतां खुद्द त्याविषयींच कांहीं माहिती वाचकांस देतों. हा कोश आतां प्रसिद्ध नाहीं हें बहुधा सर्वांस माहीत असेलच. त्याची संक्षिप्त आवृत्ति जी जॉनसननें लवकरच पुढें काढली ती मात्र अद्याप क्वचित् दृष्टीस पडते. त्या वेळेपासून आतांपर्यंत इंग्रेजी भाषेचा विस्तार व फैलावा अतिशयित झाल्यामुळें, व त्या वेळेस माहीतहि नसणाऱ्या अनेक विषयांवर सहस्रावधि

---

१. वरील अर्लसाहेबांनीं आपणाकडून जॉनसनसारख्या कंगाल मनुष्यावर जी मोठी मेहेरनजर केली तिचा उलटा प्रकार कसा झाला तें पुढील वाक्यांवरून दिसून येईल. वरील बातमी समजली असतां जॉनसन आपल्या मित्रमंडळांत ह्मणाला—

"I have sailed a long and painful voyage round the world of the English language: and does he now send out two cock-boats to tow me into harbour?"

वर सांगितलेल्या पत्रांत तर पुढील कोरडा प्रत्यक्षच दिला—

"Is not a patron, my lord, one who looks with unconcern on a man struggling for life in the water, and when he has reached ground, encumbers him with help?"

उत्तमोत्तम ग्रंथांची तेव्हांपासून भाषेंत भर पडत चालल्यानें, मागचे कोश उत्तरोत्तर निरुपयोगी होत चालले आहेत. सध्यां साऱ्या जगभर ज्याचा प्रचार आहे असा कोश वेबस्टरचा होय.[1] आतां या पुढील सर्व इमारतींचा पाया ह्मटला ह्मणजे वरील प्रचंड ग्रंथच होय हें खरें आहे. मूळचा ह्मणण्यासारखा कांहीं आधार नसतां एकट्यानें एवढ्या श्रमाचा व एवढ्या जोखमीचा उद्योग पतकरून कोणाहि विद्वानाचें किंवा श्रीमान मनुष्याचें काडीइतकेंहि साह्य न घेतां, दोन प्रहरची भ्रांत, संकटें व दुःखें, हीं सर्व संभाळून सात आठ वर्षांत तो सर्व तडीस नेला ही खरोखर मोठी आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे![2] आमच्या मराठी भाषेचे दोन कोश सुमारें चाळीस वर्षांपूर्वी जे तयार झाले त्यांस सरकारचा केवढा आश्रय होता व किती पंडितांचें साहाय्य घ्यावें लागलें याचा विचार केला असतां, व फ्रेंच भाषेचा तद्देशीय विद्वानांनीं जो कोश तयार केला त्यावर पारिस येथील सर्व विद्वन्मंडळ पन्नास वर्षें सारखें खपत होतें हेंहि मनांत आणलें असतां वरील पंडिताच्या साहसाचा व बुद्धिवैभवाचा कोणास चमत्कार वाटणार नाहीं ?[3] तेव्हां कोशासारखें प्रचंड कामं जॉनसननें एकट्यानें हातीं घेऊन पार

---

१. वरील कोशकार इंग्रेज नसून अमेरिकन आहे हें सर्वांस माहीत असेलच. वरील कोशाचे ठसे आतां कायमचे करून ठेवले आहेत. दर वर्षी लाखों प्रती उडत असल्यामुळें ते झिजून जातात, यास्तव मात्र ते बदलावे लागतात. वरील कोशानें इंग्लंडांतल्या कोशांस मागें सारलें यामुळें पुष्कळ त्यास कांहींना कांहीं तरी नांव ठेवून हीनत्व आणूं पहातात. माजी डायरेक्टर हावर्डसाहेब यांनीं आपल्या व्याकरणांत पुढील सूचना दिली आहे--

"N. B.—The student should be warned against the American Dictionary of Webster, wherein are many proposed novelties (among others this of omitting the u of honour, &c.) which have not been accepted by standard English writers. He also pronounces many words obsolete which are not so in fact,"

२. जॉनसननें स्वतःच सदरील ग्रंथाच्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे--

"It may gratify curiosity to inform the world, that the "English Dictionary" was written with little assistance of the learned and without any patronage of the great; not in the soft obscurities of retirement, or under the shelter of academic bowers, but amidst inconvenience and distraction, in sickness and in sorrow."

३. जॉनसनचा शिष्य व मित्र जो ग्यारिक त्यानें वरील कोश प्रसिद्ध झाला असतां त्यावर पुढील चुटका रचिला--

"Talk of war with a Briton, he'll boldly advance,

(पुढें चालू).

पाडलें हींच अगोदर एक मोठी गोष्ट आहे. पण प्रस्तुत ग्रंथाचा मोठेपणा केवळ एवढ्यावरूनच नाहीं. भाषेचा कोश झटला झणजे त्यांत पुढील गोष्टी सर्व आल्या पाहिजेत. पहिल्यानें सर्व शब्दांचा समावेश, पुढें त्यांचा उच्चार व लेखनपद्धति, नंतर त्यांची व्युत्पत्ति. हें एक प्रकरण झालें. पुढें प्रत्येक शब्दाचा सर्वांस समजेल अशा तऱ्हेचा बरोबर अर्थ; आणि त्यानंतर मोठमोठ्या प्रसिद्ध ग्रंथांतून काढलेलीं उदाहरणें. आतां हे सर्व प्रकार प्रस्तुत कोशांत कितपतसे आहेत हें जर पाहिलें तर असें आढळून येईल कीं, एका व्युत्पत्तीखेरीज बाकीचीं सर्व सदरें यांत जशीं असावीं तशीं आहेत. इंग्रेजी सारखी भाषा,—जी मुळीं अनेक भाषांच्या भेसळीनें झाली आहे, व जींत जगांतील बहुतेक भाषांतले शब्द आले आहेत,—तिच्या सर्व शब्दांची व्युत्पत्ति द्यायची झटली झणजे तो व्युत्पत्तिकार मोठाच भाषाभिज्ञ पाहिजे. हें अंग जॉनसनचें कमीच होतें. त्यास परकी भाषांपैकीं उत्कृष्ट अशी ल्याटिन हींच काय ती येत होती; व इंग्रेजीची मूळ-भाषा जी आंग्लो साक्सन तिचेंहि त्यास विशेष ज्ञान नव्हतें. यास्तव सांप्रत ग्रंथांत ही

That one English soldier can beat ten of France.
Would we alter the boast from the sword to the pen,
Our odds are still greater, still greater our men.
In the deep mines of science, though Frenchmen may toil
Can their strength be compared to Locke, Newton and Boyle ?
Let them rally their heroes, send forth all their powers
Their versemen and prosemen, then match them with ours.
First Shakspeare and Milton, like gods in the fight,
Have put their whole drama and epic to flight.
In satires, epistles, and odes would they cope ?
Their numbers retreat before Dryden and Pope,
And Johnson well-armed, like a hero of yore
Has beat forty French, and will beat forty more."

१. वरच्याहूनहि आणखी कांहीं नवे प्रकार अलीकडील सर्वप्रसिद्ध जो वेबस्टरचा कोश त्यांत आढळतात. एक तर भाषासाम्य, झणजे आरंभीं प्रत्येक शब्दाचीं रूपें निरनिराळ्या भाषांतून कशीं होत गेलीं आहेत तीं दाखविलेलीं असतात. दुसरा प्रकार समानार्थक शब्द; झणजे सारख्या अर्थांचे वाचक असे सर्व शब्द एकत्र करून त्यांतले बारीक भेद सांगितलेले असतात. याशिवाय भिन्न भिन्न विषयांवरच्या पुरवण्या, पदार्थमात्रांचीं चित्रें, वगैरेहि प्रकार दिवसांदिवस येत चालले आहेतच. अशासारखा एक प्रचंड उद्योग आमच्या देशांत चालला आहे तोहि येथें सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. सर्व संस्कृतज्ञांस माहीत असेलच कीं, कलकत्त्याकडील प्रसिद्ध पंडित तारानाथ तर्कवाचस्पति हे आज कित्येक वर्षें 'बृहदभिधान' नांवाचा एक संस्कृत भाषेचा मोठा कोश तयार करीत आहेत. हा चालू सालच्या अखेरीस पुरा होणार होता. याचे कांहीं भाग प्रसिद्ध झाले आहेत.

मात्र मोठी उणीव राहिली. पण याशिवाय बाकी सर्व भाग यथास्थित उतरले. शेवटले दोन ह्मणजे शब्दांची व्याख्या व त्यांस प्रमाणभूत असे ग्रंथांतरींचे आधार, यांत तर या कोशाची पहिल्यापासून मोठी ख्याति आहे. जॉनसनची बुद्धि मोठी सूक्ष्म असल्यामुळें त्यानें मोठमोठ्या कठिण शब्दांच्याहि व्याख्या अगदीं समर्पक दिल्या आहेत; तशींच त्यास स्वभाषेंतील ग्रंथांची माहिती उत्कृष्ट असल्यामुळें वरील व्याख्यांच्या खालीं जीं अवतरणें दिलीं आहेत तींहि मोठीं उत्कृष्ट निवडून काढलेलीं आहेत. तीं अशीं कीं, उगीच कोणी गमतीखातर जरी वरील ग्रंथ चाळीत बसलें, तरी सुभाषितापासून जसें मनोरंजन होतें तसें ठिकठिकाणचे नुसते उतारे वाचल्यानेंहि तें व्हावें.[1] असो, तर इंग्रेजी भाषेचें नियमन ज्या कोशानें प्रथमतः केलें तो वर सांगितल्या प्रकारें सिद्धीस जाऊन प्रस्तुत ग्रंथकाराच्या कीर्तिमंदिराचा तो जणूं काय मजबूत पायाच होऊन राहिला !

तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना
दावी धन्यास जठरार्थ कसें पहाना ।
दे आळवूनि जरी हस्तिप बाप भाई
घेतोच घांस गजराज कशी बढाई ॥

—नीतिशतक.

अंक ३५.—(१) जॉनसनचे निबंध— 'रांबलर' व 'ऐडलर'. (२) 'रासेलस'. (३) बर्षांसनाची नेमणूक.

१. मागील अंकांत सांगितलेला जॉनसनचा प्रचंड ग्रंथ जो इंग्रेजी भाषेचा कोश त्याबरोबर दुसरेहि त्याच्या मानानें लहान असे दोन ग्रंथ त्यानें रचले. ते मागें भाषापद्धतीच्या निबंधांत सांगितलेले 'रांबलर' व 'ऐडलर' हे होत. हे 'स्पेक्टेटर'प्रमाणें निरनिराळ्या विषयांवर लिहिलेले निबंध आहेत. 'स्पेक्टेटर' आटपल्यानंतर तीस चाळीस वर्षें त्याच्या धाटणीवर कांहीं पत्रें चाललीं होतीं, पण त्यांची प्रसिद्धि ताव-

---

१. मकालेनें वरील गुणांबद्दल प्रस्तुत कोशाविषयीं झटलें आहे—

"The public, on this occasion, did Johnson full justice, and something more than justice. The best lexicographer may well be content if his productions are received by the world with cold esteem. But Johnson's Dictionary was hailed with an enthusiasm such as no similar work has ever excited. It was indeed the first dictionary which could be read with pleasure. The definitions show so much acuteness of thought and command of language, and the passages quoted from poets, divines and philosophers are so skilfully selected, that a leisure hour may always be very agreeably spent in turning over the pages."

न्मात्रच असून पुढें लवकरच त्यांचा मागमूसहि नाहींसा झाला. जॉनसनच्या वेळेपासून तरी त्याचें अनुकरण पुष्कळ ग्रंथकारांनीं केलें; पण त्यांच्या निबंधावलि वरच्याप्रमाणेंच आतां तादृश प्रसिद्ध नाहींत. तेव्हां सर्वांत अत्यंत प्रसिद्ध अशा वरील तिन्ही मात्र होत.[1]

'रॉबलर' व 'ऐडलर' यांतील निबंधसमुदाय 'स्पेक्टेटर'च्या सरासरी अर्ध्यानें आहे; तरी त्यांतील मजकूर पाहिला तर तो वरील ग्रंथाच्या इतका सहज भरेल. आडिसननें पत्र एकंदर लोकांस रिझविण्याकरितां व त्यांचा प्रवेश विद्येंत सहज मौजेनें करून देण्याकरितां सुरू झालें होतें; यास्तव चालू लौकिक विषय व नाटकादि लोकरंजनाचे प्रकार असल्या सामान्य गोष्टींवरच मुख्यतः त्याचा भर असे, व त्याचे पत्रकारहि असल्यांवरच त्याच्या पत्रास मजकर पाठवीत. पण जॉनसनची वरील दोन पुस्तकांत अगदीं निराळी तऱ्हा दृष्टीस पडते. त्यानें आपलें पत्र ख्यालीखुशालीवाल्या पुरुषांनीं व स्त्रियांनीं चहा पिण्याच्या वेळीं सहज वाचण्याकरितां काढलें नसल्यामुळें त्यांतील विषय नेहमीं विद्येच्यासंबंधानें किंबहुना धर्मसंबंधाचे सुद्धां असत. शिवाय राजघराण्यांतील पुत्रजन्म-विवाहादि उत्सव, परराष्ट्रांशीं झालेल्या लढाया, तह वगैरे, असले प्रकारहि तो आपल्या विवेचनांत कधीं आणीत नसे. यामुळें वरील दोन्ही पत्रें तादृश लोकप्रिय नव्हतीं. त्यांच्या सरासरी पांच सहाशें प्रती काय त्या खपत. प्रत्येक निबंधाबद्दल त्यास पुस्तकवाल्याकडून चार गिनी मिळत ह्मणजे महिन्याच्या आठाबद्दल सुमारें तीन साडेतीनशें रुपये दरमहा पडत. पुढें हे तिन्ही निबंध एकत्र करून जेव्हां छापले, तेव्हां मात्र त्यांचा खप पुष्कळ चालून जॉनसनच्या हयातीपर्यंत त्यांच्या एकंदर दहा आवृत्ति निघाल्या.

आडिसनच्या व जॉनसनच्या निबंधांची परस्पर तुलना केली असतां दोहोंत पुष्कळ तफावत दिसणारी आहे. एक तर विषयाच्या संबंधानें जी आहे ती वर सांगितलीच आहे. ऑडिसननें 'स्पेक्टेटरा'स जी सुरुवात केली ती त्याची विद्वत्त्वकीर्ति व त्याचा लौकिक हीं दोन्ही चांगलीं स्थाईक झाल्यावर केली होती; यामुळें पुष्कळांच्या आश्रयानें व मदतीनें तें पत्र पुष्कळ दिवसपर्यंत चांगल्या रीतीनें चाललें. जॉनसन हा स्वभावानें पराकाष्ठेचा निस्पृही व कोणाचीं गरज न बाळगणारा असा असल्यामुळें सारा निबंधसमूह त्यानें स्वतःच लिहिला. पहिल्या भागांत दुसऱ्यांनीं पाठविले असून छापलेले असे दहा अंक आहेत, व दुसऱ्यांत बारा आहेत. बाकीचे सर्व मागील अंकांत सांगितलेले कोशाचें काम चालत असतां, दुसऱ्या अनेक उपाधि मागें असतां, त्यानें स्वतः लिहिले.[2]

---

१. आजपर्यंत एकंदर जे निबंधकार बिलायतेंत होऊन गेले त्या सर्वांच्या ग्रंथांचा संग्रह 'ब्रिटिश एसेइस्ट्स' (ब्रिटन देशांतील निबंधकार) नांवाच्या पुस्तकांत केला आहे. याचे एकंदर ५० भाग आहेत!

२. असले निबंध रचण्यास जॉनसन यास किती आयास पडत हें पुढील गोष्टीवरून

(पुढें चालू).

या कारणामुळें त्यांत 'स्पेक्टेटर'प्रमाणें वैचित्र्य फारसें नाहीं. दुसरी मोठी तफावत भाषेच्यासंबंधानें जी आहे ती सर्वांस माहीतच आहे. आडिसनची शब्दरचना अगदीं साधी व सुबोध असून पुनः डौलदार व गहन आहे; आणि जॉनसनची पुढील दोन गुणांनीं युक्त असून पहिल्या दोहोंचा तिचे ठायीं बहुधा अभावच आहे. वर सांगितलेला कोश त्याच वेळेस चालत असल्यामुळें शास्त्रीय परिभाषेचे वगैरे मोठमोठाले शब्द त्यानें त्यांत घालून दिले, व कालांतरानें ते भाषेंत स्थाईकहि झाले. आडिसनच्या 'स्पेक्टेटरा'नें इंग्लंडांतील एकंदर लोकांस जसें वाचायास शिकविलें, त्याप्रमाणें या पुढील दोन निबंधांनीं त्यांस विचार करायाला शिकविलें अशी प्रसिद्धि आहे.

२. जॉनसनचा या पुढचा ग्रंथ त्याची प्रसिद्ध कादंबरी 'रासेलस' हा होय. याविषयीं मराठी वाचकांस विशेष माहिती सांगण्याची गरज नाहीं; कां कीं, माजी 'शालापत्रका'वरून व कांहीं वर्षांपूर्वी त्यांतील सर्व भाग एकत्र करून सबंध भाषांतर जें छापलें आहे त्यावरून सदरील पुस्तकाचें स्वरूप पुष्कळांस थोडें बहुत माहीत असेलच. तथापि प्रस्तुत चरित्राच्या पूर्णतेस्तव व इतर वाचकांच्या माहितीकरितां या जगद्विख्यात ग्रंथाविषयींहि पूर्वक्रमास अनुसरून कांहीं लिहितों. या गोष्टीची मूळ कल्पना मागें सांगितलेल्या 'अबिसिनिया देशाच्या सफरी'पासून जॉनसन यास सुचली हें उघडच आहे. वरील ग्रंथांत त्या देशाच्या सृष्टिवैभवाविषयीं त्यानें वृत्तांत वाचला होता, व तो सर्व भाषांतर करतांना त्याच्या हाताखालून गेला होता, यास्तव आपल्या कादंबरीचें स्थल त्यानें तेथेंच योजलें. याशिवाय बाकीची सर्व योजना त्यानें आपल्या देशाच्या रीतरिवाजावरून केली. आतां या कादंबरीची एवढी योग्यता कशावरून धरली आहे हें जर पाहिलें, तर ती संविधानकावरून किंवा रसपरिपाकावरून आहे असें नाहीं. संविधानक तर अगदींच लहान व साधें असून प्रस्तुत कादंबरींत कोणता रस ह्मणजे पूर्णपणें किंवा अंशतःहि साधला आहे असें नाहीं. तींतील बहार काय ती आंतील मजकुरावरच आहे. एक तर बाह्यतः भाषेची रमणीयता; ह्मणजे ती प्रस्तुत ग्रंथकाराच्या प्रद्धतीप्रमाणें अंमळ अवजड तर आहेच, पण गजाच्या गतीप्रमाणें तींत भारदस्तपणा व डौल हेहि गुण पण आहेत. परंतु याहून प्रस्तुत ग्रंथाचा

लक्षांत येतें. तो एकदां ऑक्सफर्ड येथें गेला असतां त्यानें आपल्या एका मित्रास पुसलें कीं, टपालाची गाडी निघण्यास किती अवकाश आहे ? त्यानें सांगितलें, अर्धा तास. मग तावडतोब स्वारी कागद, शाई व पेन घेऊन बसली, आणि तेवढ्या वेळांत पुढील दिवसाचा अंक तयार केला. शेवटले शब्द संपतांच कागदाची घडी करून त्यानें वर पत्ता लिहिला. हें पाहून जवळ बसलेला वरचा स्नेही ह्मणाला, "थांबा थांबा, मला एकदां वाचूं द्या." जॉनसननें उत्तर केलें, "अरे, मीं तरी कोठें पुनः वाचून पाहिला आहे!" असें ह्मणून त्यानें लखोटा गाडींत नेऊन टाकला.

मुख्य मोहक गुण झटला ह्मणजे वर्णन करण्याची शैली व आयुष्यांतील निरनिराळ्या स्थितींचें तींत जें यथार्थ व चित्तवेधक विवेचन केलें आहे तें होय. या एका गुणावरून 'रासेलसा'ची प्रख्याति तें प्रसिद्ध होतांच चोहोंकडे इतकी झाली कीं, ज्या पुस्तकवाल्यानें तें विकत घेतलें त्यास त्याच्या विक्रीपासून पुष्कळ नफा झाला, व जॉनसनच्या हयातींतच त्याचें भाषांतर युरोपांतल्या साऱ्या भाषांतून झालें !

वरील कादंबरी लिहिल्याचा प्रसंग मोठा चमत्कारिक आहे. तो प्रस्तुत ग्रंथकाराची आई मरण पावली व तन्निमित्त खर्च भागविण्यास त्यानें हें साधन काढलें हा होय. मागें सांगितल्याप्रमाणें जॉनसन घरदार सोडून लंडनास आपलें नशीब काढण्याकरितां जो आला तो पुनः आपल्या आईला भेटण्यास फारकरून गेलाच नाहीं. येथेंच त्यास आपला चरितार्थ चालविण्यास मोठी पंचाईत पडत असे, तेव्हां जाण्यास मुळींच सवड नव्हती हें उघडच आहे. तरी वरचेवर आपलीहि अडचण करून तो तिजकडे पैसा अडका पाठवीत असे. सरते शेवटीं एकुणनव्वदाव्या वर्षीं तिचा अंत झाला. तेव्हां आपला पुत्रधर्म जागविण्याकरितां वरील ग्रंथाचें मोल जें शंभर पौंड मिळालें तेवढें घेऊन तो परत आपल्या गांवीं गेला; व तिचें उत्तरकार्य करण्यांत व कर्ज वारण्यांत वगैरे वरील रक्कम त्यानें खर्चली. 'रासेलस'सारखा ग्रंथ योजण्यास व लिहिण्यास जॉनसन यास एका आठवड्याचा संध्याकाळचा वेळ ह्मणजे सरासरी वीस पंचवीस तास पुरले ! !

३. येथवर या विख्यात ग्रंथकर्त्यास स्वोपजीवनार्थ जे सतत परिश्रम पडत व निरंतर विपत्तींत रहावें लागे, ती स्थिति संपण्याचा आतां समय आला. सन १७६० त दुसरा जार्ज राजा निवर्तून तिसरा गादीवर आला. हा इंग्लंडांत जन्मला असल्यामुळें व इंग्रेजी रीतरिवाजांत वाढल्यामुळें त्याच्या घराण्याविषयीं पुष्कळ लोकांच्या मनांत जे ग्रह वागत होते ते बरेच नाहींसे झाले, व तो जातीनें बराच बुद्धिमान् असल्यामुळें पहिल्या पहिल्यानें तर साऱ्या प्रजेस तो अत्यंत प्रिय झाला. जॉनसनच्या मनाची वरच्याप्रमाणेंच स्थिति झाली. तो मागील राजांस सर्वांदेखतां सपाटून शिव्या देत असे; पण वरील राजाच्या हातीं राज्यसूत्र आल्यापासून त्याची वृत्ति एकंदर राष्ट्राप्रमाणें पालटली. अशा संधीस राजाच्या प्रधानानें त्यास पेनशन (वर्षासन) करून देण्याचें योजलें. राजानेंहि त्याचा लौकिक पुष्कळ दिवस ऐकिला होता, यास्तव वरील संकल्पास त्यानें अनुमोदन दिलें. पण पेनशनाची गोष्ट काढली असतां त्यास आवडेल कीं नाहीं हाच पहिल्यानें मोठा विचार होता. जॉनसनची वृत्ति आरंभीं सांगितलीच आहे कीं, तो अतिशयित निस्पृह असे, व त्यामुळें कोणी केवढाहि मोठा असला तरी त्याची पर्वा तो बिलकुल बाळगीत नसे. शिवाय चेस्टरफील्डचा मागें सांगितलेला वृत्तांत झाल्यापासून तर त्याचा स्वभाव सर्वांस जाहीर झाला होता, व त्यासहि बडे लोकां-

च्या आश्रयाचा पुरा त्रास येऊन गेला होता.[1] यामुळें वरील हेतु सिद्धीस कसा न्यावा याची वरील प्रधानास पंचाईत पडली. शेवटीं त्याच्या मित्रांकडून संधान बांधून वरील मनोगत त्यास बेताबातानें कळविलें. जॉनसनला या गोष्टीचा पहिल्यानें मोठा विचार पडला; कारण ताबेदारीचा त्यास अतिशय त्रास असे, व शिवाय त्यानें आपल्या कोशांत 'पेनशन' व 'पेनशनर' या शब्दांच्या व्याख्या ज्या दिल्या होत्या त्यांस अनुसरून झटलें ह्मणजे वरील इनाम त्यानें घ्यावें कीं नाहीं याचा सहज निवाडा होतो.[2] पण राजाकडून आलेल्या मनुष्यांनीं त्यास निक्षून सांगितलें कीं, हें वर्षासन तुह्मांस राजानें जें दिलें आहे, तें इतःपर सरकारची तुह्मीं काहीं कामगिरी बजवावी या उद्देशानें दिलें आहे असें नाहीं; तर फक्त यापूर्वी तुह्मीं मोठमोठे ग्रंथ रचून लोकहित जें केलें त्याबद्दल तुह्मांस हें बक्षीस आहे. हें समजल्यावर जॉनसननें त्या बेतास आपला रुकार दिला; आणि हयातीपर्यंत सालीना तीनशें पौंडांची रक्कम त्याच्या घरीं चालत येत होती.

सृजति तावदशेषगुणाकरं पुरुषरत्नमलंकरणं भुवः ।
तदपि तत्क्षणभंगि करोत्यहो अहह कष्टमपंडितता विधेः ॥
नीतिशतक.

अंक ३७—(१) **जॉनसनचा** उत्तरकाल. (२) 'क्लब'ची स्थापना. (३) **बॉसवेल.** (४) स्कॉटलंड देशावर मुशाफरी. (५) **शेक्सपियर**ची आवृत्ति. (६) राज्यप्रकरणीं लेख. (७) 'कविचरित्र'. (८) अखेरची हकीकत.

१. गेल्या अंकांत प्रस्तुत विख्यात ग्रंथकारास राजाश्रय कसा मिळाला तो प्रकार सांगितला. ही गोष्ट घडल्यापासून जॉनसनचा येथवरचा क्रम अगदीं पालटून गेला.

---

१. 'रांबलर' चालत असतां राजाचा ज्येष्ठ पुत्र फ्रेडरिक, जो पुढें लवकरच मरण पावला, त्याच्याकडून सात प्रती घेण्याबद्दल ठराव होऊन तो बेत जॉनसन यास कळविला होता. पण तो या वेळेस इतका बेफीकीर झाला होता कीं, एवढ्या आश्रयाचाहि त्यानें आदर केला नाहीं. यामुळें तो येथेंच खुंटला हें उघडच आहे.

२. Pension—*pay given to a state hireling for treason to his country.*

(पेनशन–फितूर राहून देश बुडविण्याकरितां सरकारच्या बंद्या गुलामास जो पगार देतात तो).

Pensioner—*a slave of state hired by a stipend to obey his master.*

(पेनशनर–तोंडावर तुकडा टाकून सरकारानें वश करून घेतलेला बंदा नोकर).

३. "संपूर्ण गुणांनीं मंडित व पृथ्वीस भूषणभूत अशा पुरुषरत्नास निर्माण करून त्याचें जीवित केवळ क्षणभंगुर करून ठेवतो, हा ब्रह्मदेवाचा केवढा वेडेपणा आहे."

सकाळीं निजून उठल्याबरोबर आज भोजनाची तजवीज काय ही काळजी जी त्याच्या समोर नित्य उभी रहात असे, ती आतां नाहींशी झाली. त्याच्या मनास मानेल त्याप्रमाणें केवळ स्वतंत्रतेनें वागण्यास तो आतां मुक्त्यार झाला. यापूर्वी त्याची बायको व आई यांचा खर्च त्यास चालवायाचा असे; पण आतां तो अगदीं एकेकटा राहिल्यामुळें त्यास कोणत्याहि प्रकारचें बंधन उरलें नाहीं. या वेळेस त्याची विद्वत्त्वकीर्तिहि स्थाईक झाल्यासारखी होऊन तत्कालीन पंडितमंडळांत तो सर्वानुमतें अग्रगण्य ठरला, व येथपासून पुढील वीस वर्षे मोठमोठे विद्वान् व नामांकित ग्रंथकारहि त्याच्याशीं स्पर्धा करण्याचें टाकून देऊन त्याचें वक्तृत्व शिष्यवर्गाप्रमाणें भक्तिपुरःसर ऐकूं लागले. हीं वीस वर्षें जॉनसनच्या एकट्याच्या संबंधानेंच काय, पण एकंदर इंग्लंड देशच्या संबंधानेंहि चांगलीं ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. त्यांत राजकीय प्रकरणीं मोठमोठाल्या उलाढाली होऊन एक जबरदस्त राज्यक्रांति झाली; व प्रस्तुत ग्रंथकाराची ख्याति शिखरास जाऊन पोंचून त्याचे कित्येक अत्यंत लोकमान्य ग्रंथ प्रसिद्ध झाले.

२. जॉनसनच्या येथवर सांगितलेल्या क्रमांत व यापुढें जो सांगायाचा त्यांत दुसरा एक मोठा विशेष असा आहे कीं, यापुढचा त्याचा काळ प्रायः वाक्पांडित्य करण्यांत गेला. येथपर्यंत जसें त्यास ग्रंथरचनेचें काम केवळ अगत्यायेंच होतें,—कां कीं, त्याशिवाय उपाशीं मरायाचीच पाळी यावयाची—तसें इतःपर नसल्यामुळें, व वादप्रतिवादाची त्यास स्वभावतःच पराकाष्ठेची हौस असल्यामुळें, ती त्यानें यापुढील वीस वर्षांत यथेच्छ पुरवून घेतली. त्याच्या नांवावर सुमारें साठ सत्तर वर्षें पुढें चालेला जो 'क्लब' तो त्यानें याच वेळेस स्थापला. यांत त्या वेळचे मोठमोठे नामांकित पुरुष होते; ते बर्क, गिबन, ग्यारिक, गोल्डस्मिथ, रेनॉल्डस, प्रख्यात वक्ता फॉक्स, प्रसिद्ध भाषाभिज्ञ सर विल्यम जोन्स इत्यादि होत. ही मंडळी दर आठवड्यास एकदां एके ठिकाणीं जमत असे. त्या वेळेस जेवायाची तयारी केली असून तें काम व संभाषण हीं दोन्ही बरोबर सुरू होत. वरच्यासारखी मंडळी एकत्र झाली असतां जें भाषण होत असेल त्याची वाचकांस सहज कल्पना करतां येईल. या पंडितमंडळांत निरानिराळे विषय निघत; पण ते प्रायः इंग्रेजी भाषेंतील नव्या जुन्या ग्रंथकारांविषयींचे असत. एकदां नवा ग्रंथ प्रसिद्ध झाला असतां त्यावर वरील सभेंत अवश्य चर्चा होत असे; व तींत त्याच्या गुणावगुणांचाहि निर्णय तेव्हांच होऊन तो साऱ्या लंडनभर लवकरच होई. तेणेंकरून नव्या ग्रंथांच्या साऱ्या प्रति भराभर खपून जाणें किंवा त्या वाण्यांच्या दुकानीं जाऊन पडणें हा सोक्षमोक्ष होण्यास उशीर लागत नसे. असो; तर जॉनसन ज्या मंडळीचा अध्यक्ष होता ती अशा तऱ्हेची होती.[१] हींतील मुख्य

१. वरील अतिविख्यात मंडळीविषयीं मेकॉलेनें लिहिलें आहे—
(पुढें चालू).

मुख्य सभासदांचीं बरीच माहिती यापूर्वी प्रसंगवशात दिलेलीच आहे. यास्तव प्रस्तुत स्थलीं त्यांपैकीं एकाचा मात्र वृत्तांत येथें विशेषतः देतों. हा सभासद जॉनसनचा प्रसिद्ध चरित्रकार बॉसवेल हा होय. ज्याची गणना चरित्रकारांत अग्रेसरत्वेंकरून करतात, व ज्यानें भाषणांचीं भाषणें समर्पक व मनोवेधक रीतीनें उतरण्याची अपूर्व कला प्रगट केली, त्याची हकीकत आमच्या वाचकांस समजणें अवश्य होय.

३. बॉसवेल हा स्कॉटलंडांतील एका जहागीरदाराचा मुलगा होता. याच्या बापाकडे तेथील सेशन जज्जाचें काम असून बॉसवेल यासहि त्यानें कायदे शिकण्याकडेच पहिल्यापासून घातलें होतें. तरी त्याचा स्वभाव कांहींसा हूड व हौशी असल्यामुळें वरचाच अभ्यास त्यानें सारखा चालविला नाहीं. कांहीं वेळ लष्करी खात्यांत शिरून कांहीं वर्षें फ्रान्स, इटाली, स्विट्सर्लंड, कॉर्सिका वगैरे देशांतून त्यानें मुशाफरी केल्या. त्यास लहानपणापासून विद्येचा भारी शोक असे. निरनिराळ्या विषयांवर पुस्तकें वाचावीं व मोठमोठ्या विद्वानांचा स्नेह संपादन करावा, याचा त्यास अतिशयित नाद असे. त्या वेळच्या इंग्लंडांतल्याच काय, पण दूरदूरच्या देशांतल्या महान् महान् पंडि-

---

"In 1764 was formed a club, which gradually became a formidable power in the Commonwealth of letters. The verdicts pronounced by this conclave on new books were speedily known all over London, and were sufficient to sell off a whole edition in a day, or to condemn the sheets to the service of the trunk-maker and the pastry-cook. Nor shall we think this strange when we consider what great and various talents and acquirements met in the little fraternity. Goldsmith was the representative of poetry and light literature, Reynolds of the arts, Burke of political eloquence and political philosophy. There too were Gibbon, the greatest historian, and Jones, the greatest linguist, of the age. Garrick brought to the meetings his inexhaustible pleasantry, his incomparable mimicry and his consummate knowledge of stage effect. To predominate over such a society was not easy; yet even over a such society Johnson predominated. Burke might indeed have disputed the supremacy to which others were under the necessity of submitting. But Burke, though not generally a very patient listener, was content to take the second part when Johnson was present; and the club itself, consisting of so many eminent men, is this day (1856) popularly designated as Johnson's club."

तांचाहि परिचय त्यानें जोडला होता. याचा अभ्यास पुरा झाल्यावर त्यानें बापाच्या इच्छेप्रमाणेंच वकीलीचा धंदा पतकरला. एडिनबर्गच्या पार्लमेंटांत हा मोकद्दमे चालवीत असे; व त्याची ह्या वेळेस ख्यातिहि पुष्कळ होती. पुढें बापाच्या मरणानंतर त्याची जहागीर याजकडे आली. हिचा उपभोग दहा पंधरा वर्षें घेऊन शेवटचा काळ त्यानें संतति, संपत्ति व कीर्ति या ऐश्वर्यानें युक्त होत्साता घालविला.

बॉसवेलची जॉनसन याशीं प्रथमतः जी ओळख झाली, ती १७६३ सालीं झाली. या वेळेस त्याचें वय सारें बावीस वर्षांचें होतें. तरी इतक्या वयांतहि त्यानें इतकें ज्ञान संपादन केलें होतें व त्यास विद्येची इतकी अभिरुचि होती कीं, जॉनसन हा बराच वयातीत झाला असतां व त्याचा स्वभाव तुसडा असतां, दोघांचा लवकरच अतिशयित परिचय जडून पक्का स्नेह जमला.[1] जॉनसनसारख्या वृद्ध व सर्वमान्य होऊन बसलेल्या महापंडितानें ज्यास बरोबरीनें बोलायाला चालायाला योग्य असा मित्र निवडला, व इतर सर्वांहून जो त्यास लवकरच अतिशयित प्रिय झाला तो केवळ महामूर्ख व महानीच असेल हें मुळींच संभवत नाहीं. तरी मेकॉलेसाहेबांनीं या बिचाऱ्या चरित्रकारावर जो कडाका उडवून दिला आहे व त्याची जी फटफजिती करून दिली आहे, ती पुष्कळांस माहीत असेलच. असो; यासंबंधानें यापुढें लिहावयाचेंच आहे. या दोघां मित्रांचा वर सांगितल्याप्रमाणें जो एकदां संबंध जडला तो थेट जॉनसनच्या हयातीच्या अखेरपर्यंत ह्मणजे सुमारें बावीस वर्षें राहिला. इतक्या काळांत त्यांचे अनेक भाषणादि प्रसंग झाले. एकदां तर दोघांनीं एक दूरचा प्रवास केला; व शिवाय दर वर्षी बॉसवेल हा आपल्या देशांतून इंग्लंडास जेव्हां येई तेव्हां वर सांगितलेल्या 'क्लब'च्या वगैरे ठिकाणीं जॉनसन व त्याचें मित्रमंडळ यांचा त्यास समागम होई. याखेरीज जॉनसनचा व त्याचा अगदीं घरोबा जमला असल्यामुळें दोघांचें खाजगी रीतीनें जें संभाषण होई तें निराळेंच. बॉसवेल हा अगदीं मोकळ्या मनाचा व मोठा लाघवी असल्यामुळें, व जॉनसन हा एकेकटा असून शिवाय पूर्वी सांगितलेला जो मेंदूचा विकार त्याच्यापासून त्यास वारंवार पीडा होत असल्यामुळें, ते परस्परांस अत्यंत इष्ट असत. बॉसवेल यास या महापंडिताचें वक्तृत्व सेवन करण्याची व प्रत्येक विषयावर त्याचीं काय काय मतें आहेत तीं समजून घेण्याची अतोनात इच्छा होती; व इकडे जॉनसन यासहि कोणी भाविक श्रोता मिळाला असतां चंद्रसमुद्रन्यायानें त्याच्या वाणीस मोठें भरतें येई. त्यानें पन्नास वर्षें जगाचा अनुभव घेतला होता, व हजारों ग्रंथांचें त्यास अवलोकन झालें होतें. शिवाय त्याची बुद्धि स्वभावतःच परम

१. जॉनसनची व त्याच्या भावी चरित्रकाराची जी पहिली भेट झाली तिची हकीकत मोठी चमत्कारिक आहे. ती बॉसवेलच्या ग्रंथांतून वाचण्यास आमच्या इंग्रेजी जाणणाऱ्या वाचकांस शिफारस केल्यावांचून रहावत नाहीं.

सूक्ष्म व शोधक होती, यास्तव कोणीं कसलाहि वाद काढला तरी त्यावर तो इतक्या उत्तम तऱ्हेची चर्चा करी, कीं एक शब्दहि इकडचा इकडे न करतां त्याचें भाषण खुशाल छापायाला पाठवावें. असो; तर याप्रमाणें वीस वर्षें पावेतों बॉसवेलनें जॉनसनच्या व त्याच्या मित्रमंडळीच्या भाषणरत्नांचा जो मोठ्या श्रमानें व आस्थेनें आपणापाशीं संग्रह करून ठेवला होता तो त्यानें सरते शेवटीं चरित्ररूपानें मोठ्या चातुर्यानें ग्रथित करून साऱ्या जगास प्रगट केला.

येथें प्रसंगवशात् बॉसवेलच्या स्वभावाविषयीं व योग्यतेविषयीं कांहीं लिहिलें पाहिजे. याचें कारण वर सांगितलेंच आहे कीं, मेकॉलेसाहेबांनीं जॉनसनविषयींच्या दोन लेखांत व इतर ठिकाणींहि प्रस्तुत चरित्रकार हा मूर्खांतला मूर्ख, पाजींतला पाजी असें जगजाहीर करून टाकलें आहे; व त्यांच्या लेखांत समयविशेषीं सत्याचा किती अत्यल्प अंश असतो हें अद्याप चोहोंकडे पुरतेपणीं माहीत झालें नसल्यामुळें वरील समजूतच पुष्कळांच्या मनांत खिळून राहिली असेल यांत संशय नाहीं. या महान् टीकाकारानें बॉसवेल यास त्याच्या परिश्रमांबद्दल जें बक्षीस दिलें आहे त्याचा सारांश येणेंप्रमाणें आहे.–"बॉसवेल हा पहिल्या प्रतीचा ढ होता; त्याला अक्कल कशी ती आल्या जन्मांत कधींच आली नाहीं; चातुर्य, तर्कशक्ति, रसिकता, इत्यादि गुणांचा त्यास गंधहि नव्हता. शिवाय कोणी मोठा पाहिला कीं, त्याचीं थुंकी झेलायाला

---

१. जानसनच्या वावदूकत्वाविषयीं मेकॉलेचा अभिप्राय येणेंप्रमाणें आहे—

"The influence exercised by Johnson's conversation, directly upon those with whom he lived, and indirectly upon the whole civilized world, was altogether without a parallel. His coloquial talents were indeed of the highest order. He had strong sense, quick discernment, wit, humour, immense knowledge of literature and life and an infinite store of curious anecdotes. Every sentence which dropped from his lips was as correct in structure as the most nicely balanced period of the Rambler. He uttered his short, weighty, and pointed sentences with a power of voice, and a justness and energy of emphasis, of which the effect was rather increased than diminished by the rollings of his huge form, and by the asthmatic gaspings and puffings in which the peals of his eloquence generally ended. To discuss questions of taste, of learning, of casuistry, in language so exact and so forcible that it might have been printed without the alteration of a word, and to him no exertion, but a pleasure. He loved, as he said, to fold his legs and have his talk out."

लागावें, रिकाम्या उलाढाल्या करीत असून चोंबडेपणा करावा, इकडची चुगली तिकडे व तिकडची इकडे सांगावी, अशा प्रकारचा हा अगदीं बेशरम, हलकट, पोरकट असा मनुष्य होता." याप्रमाणें आरंभीं ज्याच्या ग्रंथाचें एवढें माहात्म्य वर्णिलें आहे, त्याच्या सर्व गुणांचा एका सपाट्यास धुळधाण करून देऊन पुढें तर वरील टीकाकर्त्यानें जी एक मौज सांगितली आहे ती वाचून तोंडांत बोट घातल्याशिवाय रहावत नाहीं ! ती आश्चर्यकारक गोष्ट ही कीं, 'बॉसवेल हा वर सांगितल्याप्रमाणें बडा शंख होता ह्मणून त्याच्या हातून एवढा ग्रंथ तयार झाला' ! ! ![1] ही आमच्या साहेबांची कोटी मागें कित्येक जे विलायती तर्क आह्मीं आपल्या वाचकांस सादर केले आहेत त्यांच्या वर्गात ठेवण्यासारखीच आहे. महामूर्खत्व हें उत्तम ग्रंथरचनेचें कारण कसें होऊं शकेल हें आह्मांस कळत नाहीं. आमचा तर अद्याप असा समज आहे कीं,

न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात् ।

"विचित्रप्रभा मिरविणारें तेज पृथ्वीच्या पृष्ठभागापासून कधींहि निर्माण व्हावयाचें नाहीं." उघडच आहे कीं, अभावरूप कारणापासून भावरूप कार्य कसें निष्पन्न होईल ? मूर्खत्वापासून ज्ञानवत्त्वाचा प्रादुर्भाव होणें हें अंधकारापासून प्रकाशाचा उदय होण्यासारखें वस्तुगत्याच अशक्य होय !

प्रस्तुत चरित्रकाराविषयींच्या वरील उल्लेखांवरून मेकॉलेसाहेबांच्या मनावर दुष्ट ग्रहांचा अंमल किती चालत असे, व त्या अंमलांत ते कोठपर्यंत भरकटत जात हें आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल. जॉनसन हा राजपक्षाचा असून लोकपक्षीय लोकांचा तो अत्यंत द्वेष करीत असे, व शिवाय मेकॉलेच्या घरचीं प्रतिदैवतें जीं शेक्सपीयर व मिल्टन त्यांशीं वरील पंडितानें जागोजाग विरोधभक्ति प्रगट केली आहे, इत्यादि अनेक कारणांवरून जॉनसनविषयीं वरील ग्रंथकाराच्या मनांत मोठेसें प्रेम नव्हतेंच; यास्तव बॉसवेलच्या ग्रंथाविषयीं लिहिण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां 'शिष्या-

१. "If Boswell had not been a great fool, he would never have been a greater writer. Without all those qualities which made him the jest and torment of those among whom he lived, without the officiousness, the inquisitiveness, the effrontery, the toad-ending, the insensibility to all reproof, he never could have produced so excellent a book..... He had, indeed, a quick observation and a retentive memory. These qualities, if he had been a man of sense and virtue, would scarcely of themselves have sufficed to make him conspicuous; but because he was a dunce, a parasite and a coxcomb, they have made him immortal !"

पराधे गुरोर्दंडः' या न्यायाचा विपर्यय करून विद्याऱ्या शिष्यावर वरील टीकाकारानें आपली लेखणी खूप मनमुक्त झाडून घेतली. पण हा धडाका उडवून देण्यापूर्वी त्यानें हें लक्षांत कसें आणलें नाहीं कोण जाणे, कीं बॉसवेल हा केवढाहि महामूर्ख असला तरी मोठमोठ्या शहाण्यांचे ग्रंथ जेव्हां पार धुळीस मिळून गेले असतील तेव्हांहि त्याचा आजच्याप्रमाणेंच कोरा करकरीत राहिला! त्याप्रमाणेंच जॉनसनविषयीं सदरील चरित्रकाराच्या ज्या वृत्ति होत्या, व ज्या त्यानें पदोपदीं प्रकृत ग्रंथांत मोकळ्या मनानें प्रगट केल्या आहेत, त्या केवळ त्याच्याच ठायीं वास करीत होत्या असें नाहीं. बर्कसारख्यांनींहि ज्याच्याशीं नम्रत्वेंकरून शिष्यभाव प्रगट करावा, तसाच एवढा वक्ता फॉक्स व एवढा प्रचंड इतिहासकार गिबन पण त्यासहि ज्याच्याशीं बोलण्याचा धाक वाटत असे,[1] त्याच्या पुढें बॉसवेलसारख्यानें आपला कितीहि नीचभाव प्रगट केला व त्याविषयींची पूज्यता कितीहि नम्रभावानें प्रदर्शित केली, तरी त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. सारें जग ज्यांच्या बुद्धिवैभवानें चकित होतें व ज्यांची कीर्ति गातें, त्यांच्याविषयीं पूज्यता मनांत धरणें व ती व्यक्त करणें हें जर नीचपणाचें व मूर्खपणाचें दर्शक होय; तर मेकालेसाहेब स्वतः वरील दोषांपासून सुटतील असें नाहीं. त्यांनींहि स्वतःची प्रेमाची व भक्तीची उकळी बॉसवेलहून जास्त आंवरून धरलेली कोठेंहि दृष्टीस पडत नाहीं. पुष्कळ ठिकाणीं असें मात्र नजरेस येतें कीं, त्यांची दृष्टि प्रेमाश्रूंनीं अत्यंत व्याप्त होऊन त्यांस गुणदोषांचें भान यथास्थित होत नाहीं. हें प्रेमांधत्व प्रस्तुत महामूर्ख चरित्रकाराच्या ग्रंथांत फारच क्वचित् आढळेल.[2]

---

१. गिबन जॉनसनच्या मंडळींत नेहमीं असतां दोघांचें भाषण झालेलें फारसें आढळत नाहीं. फॉक्सविषयीं तर बॉसवेलनें असें लिहिलें आहे--

"It has been observed and wondered at, that Mr. Charles Fox never talked with any freedom in the presence of Dr. Johnson; though it is well known, and I myself can witness, that his conversation is various, fluent and exceedingly agreeable."

२. बॉसवेलच्या ज्या वृत्तींस मेकॉलेसाहेबांनीं वरील कुत्सित नांवें दिलीं आहेत त्याच पुढील उताऱ्यांत स्पष्ट दिसतात--

"We must conclude. And yet we can scarcely tear ourselves away from the subject. The days immediately following the publication of this relic of Milton appear to be peculiarly set apart, and consecrated to his memory. And we can scarcely be censured if, on this his festival, we be found lingering near his shrine, how worthless soever may be the offering which we bring to it. While this book lies on our table, we seem to be con-

(पुढें चालू).

असो; तर बॉसवेलच्या गुणांचें व योग्यतेचें यथास्थित ज्ञान वरील टीकाकर्त्यास मुळींच झालें नाहीं, किंवा तें त्यानें प्रगट तरी केलें नाहीं, असें ह्मणणें भाग आहे. तें सदरील चरित्र वाचलें असतां कोणास सहज होणारें आहे. सदरील चरित्रकाराचा पहिला मोठा गुण ह्मटला ह्मणजे गुणाची पारख व चहा होय. मोठमोठ्या विद्वानांचा व नामांकित पुरुषांचा समागम करण्याविषयीं त्याची उत्कंठा एवढी प्रबळ असे कीं, तो स्वतः थोर कुळांत निपजला असतां व त्याचा त्याला अभिमान वाटत असतां जानसनसारख्या कंगाल मनुष्याशीं सुद्धां आपण होऊन तो स्नेह करी. ईश्वरदत्त गुणांनीं जे श्रेष्ठ त्यांच्यापुढें केवळ कुलपरंपरेनें आलेल्या वैभवाचा श्रेष्ठपणा केवळ तुच्छ होय ही थोर समजूत अगदीं तरुण वयापासून त्याची दृढ झालेली होती. तें तर काय, पण त्याची गुणग्राहकता अशी असे व गुणिजनांविषयीं इतकी पूज्यता त्याचे ठायीं वागत असे, कीं कोणाशीं त्याचा केवढाहि मतविरोध असला तरी केवळ गुणावर नजर देऊन तो त्यास चाहत असे, व त्यांच्या स्नेहाची इच्छा करी. प्रत्यक्ष जॉनसनचेंच जरी उदाहरण घेतलें, तरी त्याचें व त्याच्या चरित्रकाराचें सर्वांशीं ऐकमत्य होतें असें नाहीं. राज्यप्रकरणाविषयीं व निरनिराळ्या ग्रंथकारांच्या योग्यतेविषयीं वगैरे त्यांचा बेबनावच असे. हा मतभेद जॉनसनविषयीं बॉसवेलची एवढी सप्रेम भक्ति असतां त्यानें जेथें तेथें स्पष्ट बोलून दाखविला आहे, किंबहुना 'दोषा वाच्या गुरोरपि' या न्यायास अनुसरून त्यास स्थलविशेषीं दूषणेंहि दिलीं आहेत. असो; तर स्नेहास विघात करणारीं

---

temporaries of the writer. We are transported a hundred and fifty years back. We can almost fancy that we are visiting him in his small lodging; that we see him sitting at the old organ beneath the faded green hangings; that we can catch the quick twinkle of his eyes, rolling in vain to find the day; that we are reading in the lines of his noble countenance the proud and mournful history of his glory and his affliction. We imagine to ourselves the breathless silence in which we should listen to his slightest word, the passionate veneration with which we should kneel to kiss his hand and weep upon it, the earnestness with which we should endeavour to console him, if indeed such a spirit could need consolation, for the neglect of an age unworthy of his genius and his virtues, the eagerness with which we should contest with his daughters, or with his Quaker friend Elwood, the privilege of reading Homer to him, or of taking down the immortal accents which flowed from his lips."

—*Essay on Milton.*

जीं कारणें सामान्यतः जगांत दृष्टीस पडतात त्यांचा प्रस्तुत चरित्रकारावर बिलकुल अंमल न चालून 'हंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात्' याप्रमाणें ग्राह्य जेवढा अंश तेवढा ज्याच्या त्याच्यापासून काढून घेण्याची हातोटी त्यास फार चांगली साधली होती. दुसरा गुण विलक्षण स्मरणशक्ति. ही प्रस्तुत ग्रंथकर्त्याच्या कृतीवरून कोणासहि स्पष्ट दिसणार आहे. दोन तीन मनुष्यांचें एक अर्धी घटका परस्पर संभाषण झालें असतां तें शब्दशः दुसऱ्यास सांगावयाचें असल्यास त्या सांगणारास केवढी पंचाईत पडेल याची कोणासहि स्वतःच्या अनुभवावरून सहज कल्पना करतां येईल. मग जॉनसनसारख्याचें त्याच्या विद्वान मित्रमंडळीशीं मोठमोठ्या प्रौढ व गहन विषयांवर सविस्तर होणारें भाषण ज्यानें ध्यानांत धरून नंतर घरीं गेल्यावर लिहून ठेवावें, त्याच्या स्मरणशक्तीचा कोणास चमत्कार वाटणार नाहीं? बॉसवेल यासहि पहिल्या पहिल्यानें हें काम भारी जड जाऊन त्यानें जॉनसनच्या भाषणांचा नुसता सारांश दिलेला आहे; पण पुढें क्रमाक्रमानें प्रस्तुत महापंडिताची भाषणपद्धति जशी त्यास अत्यंत परिचित होऊन गेली व भाषणें उतरून ठेवण्याच्या कलेंत तो घटावत गेला, तसतसें तें त्यास स्वल्प वाटून तो मोठ-मोठालीं भाषणें सुद्धां क्रमवार यथास्थित लिहून ठेवूं लागला. हा त्याचा अचाट उद्योग, कीं जो त्यानें वीस वर्षें सारखा चालविला होता त्यावरून जॉनसनचें वक्तृत्व सर्व लोकांस प्रसिद्ध करण्याची त्याची केवढी उत्कंठा असावी ती स्पष्ट होते. तशीच वरील भाषणांविषयींहि पहिल्यापासून प्रसिद्धि आहे, कीं त्यांत चरित्रकारानें आपण होऊन पदरचा एक शब्दहि घातला नाहीं. आपल्या गुरुप्रमाणेंच बॉसवेल हा सत्याचा एवढा निःसीम भक्त होता कीं, एका शब्दाचाहि पडताळा पहाणें असतां तो साऱ्या लंडनभर फिरे.[1] पण याहूनहि मोठा गुण एक अद्याप सांगायाचाच आहे; कीं ज्याच्या योगानें

---

१. सर जॉशुआ रेनाल्ड्स हा जॉनसनचा परम स्नेही असून बॉसवेलचाहि त्याच्याशीं वरील संबंधास्तव अत्यंत परिचय असे. प्रस्तुत चरित्र प्रथमतः त्यालाच नजर केलें होतें. त्यानें वरील ग्रंथाच्या संबंधानें मत पुढील उताऱ्यांत दाखल केलेलें आहे--

"Sir Joshua Reynolds told me at his table, immediately after the publication of this book, that every word of it might be depended upon as if given on oath. Boswell was in the habit of bringing the proof-sheets to his house, previously to their being struck off; and if any of the company happened to have been present at the conversation recorded, he requested him or them to correct any error; and not satisfied with this, he would run over all London for the sake of verifying any single word which might be disputed."—

—Wordsworth.

प्रस्तुत चरित्रास विलक्षण शोभा आली असून तो तसा दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथकाराचे ठायीं आढळत नाहीं. हा गुण मनुष्यस्वभावाचें ज्ञान होय. जॉनसन व त्याचें मित्र-मंडळ यांच्या स्वभावांची व गुणांची बॉसवेल यास इतकी उत्तम पारख होती कीं, प्रत्येकाचें चित्र रेनॉल्डच्या तजविरींत जसें अगदीं रेखलेलें उतरलें आहे त्याप्रमाणेंच त्यांच्या मनाची तजवीर वरील चरित्रकारानें जणों काय अगदीं हुबेहूब काढून दिली आहे. आजपर्यंत पुष्कळ अतिविख्यात मनुष्यांचीं चरित्रें मोठमोठ्या नामांकित ग्रंथ-कर्त्यांनीं लिहिलीं आहेत; ह्मणजे सॉक्रेटीस, जिनोफन यांच्या वेळेपासून तों थेट या काळपर्यंत.[1] पण हीं सर्व 'जॉनसनच्या चरित्रा'पुढें केवळ रद्द होत ! त्यांत मुख्य नायकाचें व त्याच्या मंडळाचेंच काय; पण त्या अवघ्या काळाचें प्रतिबिंब इतकें उत्तम उठलें आहे कीं, तसा प्रकार इतरत्र कोठेंहि नाहीं. ही कला प्रस्तुत चरित्रकारास पूर्ण साधल्याबद्दल पुष्कळांनीं त्याची अतिशयित तारीफ केली आहे, व त्याच्या ग्रंथाची लोकमान्यता अद्याप पहिल्यासारखी असल्याचें बीज तेंच होय. खुद्द जॉनसननेंहि वरील गुणाबद्दल आश्चर्य प्रदर्शित केलेलें व आपल्या वक्तृत्वाचा मासला इतक्या उत्तम तऱ्हेनें जगास प्रसिद्ध होणार हें पाहून त्यास अत्यंत आनंद झालेला प्रस्तुत चरित्रांतच दाखल झाला आहे.

तर याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथकाराचा विख्यात चरित्रकार बॉसवेल याची व त्याच्या ग्रंथाची हकीकत आहे. ही इतकी सविस्तर देण्याचें कारण एक तर असें आहे कीं, प्रस्तुत चरित्र ज्याच्या योगानें साऱ्या जगास उपलब्ध झालें त्याचा वृत्तांत अशा स्थळीं देणें उचित होय; आणि त्यांतून त्याची निर्भर्त्सना मेकॉलेसारख्यानें केली असल्यामुळें त्याची वास्तविक योग्यता प्रगट करणें तर अवश्य होय. याखेरीज आमच्या देशाचे दूषक जे वरील साहेब त्यांची स्वदेशीयाच्या संबंधानेंहि किती सत्यनिष्ठा व यथार्थबुद्धि आढळते याचाहि थोडासा चमत्कार वरील लेखावरून दिसून येणार आहे.[2] असो;

१. अगदीं नुकता अशा तऱ्हेचा झालेला ग्रंथ 'मेकॉलेचें चरित्र' हा होय. हा पांच सहा महिन्यांपूर्वी वरील ग्रंथकाराच्या पुतण्यानें प्रसिद्ध केला आहे.

२. वर जो आहीं बॉसवेलच्या कैवारानें मजकूर लिहिला आहे तो केवळ स्वतःच्या बुद्धीनें लिहिला नसून प्रस्तुत महामूर्ख चरित्रकाराची पुष्कळ मोठमोठ्या विद्वानांनीं स्तुति केली आहे हें दाखविणें फार कठिण आहे असें नाहीं. पण वरील सर्व अभिप्राय विस्तार-भयास्तव येथें दाखल करतां येत नाहींत. यास्तव वरील खंडनाच्या समर्थनार्थ दोनच उतारे पुढें देतों—

"We owe the great riches of the English Author's remains to the curiosity excited by his lively and pointed conversation, and the happy accident of his living for the latter part of his life in the

(पुढें चालू).

आतां यापुढें जॉनसनच्या आयुष्यांत विशेष ह्मणण्यासारख्या कोणत्या गोष्टी घडल्या त्या क्रमानें सांगतों.

---

society of a person eminently qualified, both by his tastes and his habits, to afford that curiosity an unlimited gratification. In the grateful remembrance of all who relish the pleasures of refined social intercourse, with the name of Johnson is associated that of Boswell, as indissolubly as are those of Plato and Xenophon with the more remarkable name of Socrates in the minds of all who love philosophy; and there is perhaps added a zest to the collections of the English writer which the Athenian records possess not. We see the amiable and lively historians figuring always in the group with the more stern idol; affording relief, by contrast, to the picture of the sage, and amusing by his own harmless foibles which he takes a pleasure in revealing, as if he shared the gratification he was preparing for his unknown reader. His cleverness, his tact, his skill in drawing forth those he was studying, his admirable good humour, his strict love of truth, his high and generous principle, his kindness towards his friend, his unvarying but generally rational piety, have scarcely been sufficiently praised by those who nevertheless have been ready, as needs they must be, to acknowledge the debt of gratitude due for perhaps the book, of all that were ever written, the most difficult to lay down once it has been taken up."

Lord Brougham.

बॉसवेलचें महामूर्खत्व हें त्याच्या उत्कृष्ट ग्रंथरचनेचें कारण होय हें जें मेकॉलेचें ह्मणणें त्यावर एका नामांकित ग्रंथकारानें येणेंप्रमाणें चर्चा केली आहे—

"*Bad* is by its nature negative, and can do *nothing*; whatsoever enables us to *do* anything is by its very nature *good*. Boswell wrote a *good* book because he had a heart and an eye to discern wisdom, and an utterance to render it forth; because of his free insight, his lively talent, above all of his love and childlike open-mindedness. Towards Johnson, his feeling was not sycophancy, which is the lowest, but reverence, which is the highest, of human feelings. None, but a *reverent* man—which so unspeakably few are—could have found his way from Boswell's

(पुढें चालू).

४. यापुढें प्रस्तुत चरित्रांतील विशेष सांगण्यासारख्या गोष्टी ह्मटल्या ह्मणजे जॉनसनची एक मोठी मुशाफरी व त्यानें प्रसिद्ध केलेले चार पांच ग्रंथ हे होत. ही मुशाफरी तो व बॉसवेल या दोघांनीं मिळून केली. बॉसवेलच्या मनांत फार दिवसांपासून होतें, कीं जॉनसननें आपल्या देशास यावें; व जॉनसननेंहि लहानपणीं हिब्रैडीज बेटांविषयीं वर्णन वाचलें असल्यामुळें तेथील लोकस्थिति पहाण्याविषयीं त्यास फार इच्छा होती. पण त्याची प्रकृति मूळची सुस्त असल्यामुळें व फारा दिवसांनीं त्यास स्वास्थ्य प्राप्त होऊन तो सुखावल्यामुळें, शिवाय साठी उलटून जाऊन तो बराच वयातीत झाला असल्याकारणानें वरील त्याचा संकल्प इतःपर कधींहि सिद्धीस जाईलसें दिसत नव्हतें. पण बॉसवेलचा फार आग्रह पडल्यावरून सरते शेवटीं वरील कठिण प्रवास करण्यास तो सिद्ध झाला. वर सांगितलेलीं बेटें स्कॉटलंडच्या पश्चिम किनाऱ्यावर आहेत. तीं अगदीं एकीकडे असून मूळचींच उजाड व नापीक असल्यामुळें तेथील लोक अद्याप अगदीं अडाणी स्थितींत आहेत. गेल्या शतकांत तर त्यांची अवस्था याहिपेक्षां वाईट होती; व प्रवासाच्या सोयी तर इतपत होत्या कीं, खाड्या वलांडायास चांगल्याशा होड्याहि मिळूं नयेत व तेथील रुक्ष व रखरखीत मैदानांवरून जाण्यास भक्कमशीं तटूंहि पैसा खर्चून बसायाला सांपडूं नयेत. याशिवाय ज्या वेळेस वरील गुरुशिष्यांनीं प्रस्थान केलें, ती वेळ हिंवाळ्याच्या आरंभींची असल्यामुळें तसल्या अडाणी मुलखांत तर समुद्रावरची सफर बरीच धोक्याची होती. पण

---

environment to Johnson's : if such worship for real God-made superiors shewed itself also as worship for apparent tailor-made superiors, even as hollow interested mouth-worship for such,—the case in this composite human nature of ours, was not miraculous, the more the pity ! But for ourselves, let every one of us cling to this last article of faith, and know it as the beginning of all knowledge worth the name,—that neither James Boswell's good book, nor any other good thing, in any time or in any place, was, is, or can be performed by any man in virtue of his *badness*, but always and solely in spite thereof."

—*Carlyle's Miscellanies.*

१. या प्रवासांत वेळोवेळीं **जॉनसन** किती त्रासून जाई व त्यास किती कष्ट पडले ती सर्व हकीकत **बॉसवेलनें** इत्थंभूत दिलेली आहे. हा प्रवासवृत्तांत **बॉसवेलनें** जॉनसनच्या मरणानंतर जरी छापला तरी त्याचा पुष्कळ भाग त्यानें खुद्द स्वतः प्रवासांतच पाहिला होता; व अशाच प्रसंगीं आपल्या भावी चरित्रकाराच्या वर्णनकलेची त्यानें अनेक वेळां तारीफ केलेली आढळते. असो; वर जीं तटूं सांगितलीं त्याविषयीं सदरील हकीकतींत असा

(पुढें चालू).

इतकीं सर्व अनिष्टें असतांहि जॉनसननें तीं न जुमानतां वरील बेटांतील लोकस्थिति पहाण्याची जी त्यास उत्सुकता होती ती त्यानें तृप्त करून घेतली. दोन अडीच महिने रानोमाळ फिरण्यांत व ठिकठिकाणचे देखावे आणि स्थितिरीति हीं पहाण्यांत त्यानें कालक्रमण केलें. सरते शेवटीं एडिनबरो येथें बॉसवेलच्या घरचा पाहुणचार घेऊन व तद्देशीय अनेक पंडितांचा समागम अनुभवून जॉनसन आपल्या देशास परत आला.

पुढें लवकरच त्यानें आपल्या प्रवासाची हकीकत लिहून प्रसिद्ध केली. हींत त्यानें त्या देशासंबंधीं कांहीं नवे शोध प्रसिद्ध केले आहेत असें नाहीं; तर जागोजाग जें जें त्याच्या दृष्टीस पडलें, व जें जें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें त्यास वाटलें, तें तें त्यानें समर्पक व चित्तवेधक रीतीनें वाचकांस कळविलें आहे. या ग्रंथाची अद्यापहि बरीच ख्याति आहे, व त्या वेळेस तर कांहीं दिवस विद्वान् लोकांच्या संभाषणास तोच विषय होऊन राहिला होता. स्कोटलंडांतल्या कित्येक दुराग्रही व असमंजस लोकांस मात्र तो अगदीं नापसंत होऊन त्यांनीं कांहीं काळपर्यंत जॉनसनवर शिव्यांचा वर्षाव चालविला होता. याचें एक मोठें कारण असें झालें कीं, सदरहू ग्रंथांत वर्णनकर्त्यानें स्काटलंड देशाच्या वनश्रीचें वर्णन न करतां त्याच्या दृष्टीस सदरील देशाचा रखरखीतपणा जो आला तो त्यानें साऱ्या लोकांस उघडपणें जाहीर करून टाकला. आपल्या भूमातेची वरील निर्भर्त्सना केलेली 'ब्रिटिश भूमिके'च्या अभिमानी लेकरांस कशी सहन होईल ?

५. यापुढची प्रस्तुत ग्रंथकाराची कृति शेक्सपियरची नवीन आवृत्ति होय. या कवीचा वृत्तांत मिळविण्याविषयीं व त्याच्या नाटकांत जीं सहस्रावधि दुर्बोध स्थलें आहेत तीं सुगम करण्याविषयीं आजपर्यंत मोठमोठ्या पंडितांनीं पराकाष्ठेचा उद्योग केला आहे; पण त्यांस सांगण्यासारखें अद्याप कांहीं यश आलें नाहीं. जॉनसनचे परिश्रम या सर्वांतील शेवटले होत. त्यानें प्रस्तुत काळाच्या पूर्वी सुमारें दहा वर्षें सदरील कवीच्या प्रीत्यर्थ उद्योग करण्याचें सर्वांस जाहीर केलें होतें, व त्याप्रमाणें पुष्कळ लोकांच्या वर्गण्याहि त्याच्याकडे येऊन कित्येक वर्षें पडल्या होत्या. पण मध्यंतरीं मागें सांगितलेल्या वर्षासनाचा प्रकार घडून आल्यामुळें जॉनसननें वरील काम जें लांबणीवर टाकलें तें वर्षानुवर्ष लांबतच चाललें. त्याच्या मित्रांनीं त्यास वारंवार सूचना कराव्या, व त्यानेंहि आपला आळस झाडून टाकण्याविषयीं वरचेवर मनोनिग्रह करावा; पण कांहीं नाहीं. सरते शेवटीं तत्कालीन एका कवीनें त्यास खरमरीत मात्रेचा चटका जेव्हां दिला, तेव्हां जॉनसन खाडदिशीं चांगला जागा होऊन त्याची आलस्यनिद्रा पार

लेख आढळतो कीं, **जॉनसन**च्या ओझ्यानें मोठी भक्कम घोडींहि बेजार होऊन अगदीं मेटाकुटीस येत. त्याप्रमाणेंच वरील दोघां मुशाफरांवर समुद्रावर असतां एक दोनदां असे प्रसंग गुदरले कीं, ते वादळांत सांपडून ठार झाले अशी बातां वर्तमानपत्रांतून चौहोंकडे प्रसिद्ध झाली होती !

निघून गेली. हा कवि मागें तेराव्या अंकांत एके प्रसंगीं सांगितलेला चर्चिल होय.[1] याच्या तडाक्यानें इतकें कार्य झालें कीं, नऊ वर्षें जें काम तसेंच पडलें होतें तें लागलीच एका वर्षांत समाप्त झालें. असो; या ग्रंथाविषयीं विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं. पूर्वीच्या टीकांहून हींत कांहीं कांहीं ठिकाणीं अधिक टीपा आहेत; व ह्मणण्यासारखी एक बरीच मोठी आरंभीं प्रस्तावना आहे. तींत वरील कवीवर कित्येक पंडित जे आक्षेप आणतात त्यांचें युक्तिपूर्वक निरसन असून त्याच्या गुणांचें यथार्थ व समर्पक वर्णन केलें आहे.

६. मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, या वेळेस इंग्लंडांत राजकीय प्रकरणीं पुष्कळ गडबड चालली असून एक मोठी राज्यक्रांतिहि झाली. ही राज्यक्रांति तर जगत्प्रसिद्धच आहे. हिचा शतसांवत्सरिक महोत्सव गेल्या सालीं अमेरिकेंत गाजला. ही पूर्ण होऊन इंग्लंडास दुसऱ्या महाद्वीपांतील आपल्या वसाहतींवरचा कबजा आपशाच सोडून देणें जेव्हां भाग पडलें, व प्रथमतः केवळ अन्यायानें उपस्थित केलेली जी लढाई तिचा शेवट जेव्हां अत्यंत अपयशाचा झाला, तेव्हां एकंदर लोकांचीं मनें अत्यंत क्षुब्ध होऊन गेलीं. अशा संधीस कित्येक देशहितेच्छु ह्मणविणारे पुरुष लोकांस उत्तेजन देण्यास पुढें सरसावले; व त्यांनीं तर अशी दंगल करून दिली कीं, राज्यरूप तारूं एवढ्या तुफानांत कोणत्या खडकावर जाऊन आदळतें किंवा त्याचें काय होतें याचा कोणास कांहींच सुमार लागेना! अशा प्रसंगीं राजाच्या प्रधानांनीं जॉनसनचें साहाय्य घेऊन लोकपक्षाशीं टक्कर मारण्याचा विचार केला. जॉनसनचीं मतें लहानपणापासून राजपक्षाकडीलच होतीं, व त्यांतून अलीकडे कित्येक वर्षें राजवेतनावर तो स्वस्थ झाला होता; यास्तव वरील कामगिरी त्यानें मोठ्या आनंदानें पतकरली. अमेरिकेंतील बंडखोरांनीं आपली राजनिष्ठा झुगारून देऊन स्वतःच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा जेव्हां जगासमोर वाचून दाखविला; व राजाचें प्रजेशीं कोणतें कर्तव्यकर्म आहे तें त्यांत स्पष्टपणें बोलून दाखविलें; तेव्हां जॉनसननें आपल्या राष्ट्राचा पक्ष उचलून वरील जाहीरनाम्यास उत्तर ह्मणून एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्याप्रमाणेंच त्या वेळीं 'जुनियस' या सहीचीं पत्रें लिहिणारा कोणी नवाच उपस्थित झाला होता;

१. वरील कवीचा दूषणापर काव्यरचना करण्यांत मोठा हातखंडा असे. प्रस्तुत प्रसंगींचा त्याचा कडाका येणेंप्रमाणें होता—

"He for subscribers baits his hook,
And takes your cash; but where's the book ?
Nor matter where; wise fear, you know,
Forbids the robbing of foes;
But what, to serve our private ends,
Forbids the cheating of our friends ?"

त्याच्या खंडनार्थहि जॉनसननें कांहीं वेळ हातांत लेखणी धरली होती. याखेरीज आणखीहि कांहीं लेख प्रस्तुतसारख्या प्रकरणीं त्यानें प्रसंगानुसार लिहिलेले आहेत. पण या विख्यात पंडिताचा राज्यविषयक विचाराकडे कधींहि कल नसल्यामुळें व तशा संबंधाचा ऊहापोहहि त्यानें कधीं केला नसल्यामुळें वरील सर्व लेख अगदींच सरासरी आहेत. त्यांत युक्तीपेक्षां भाषासौंदर्य व आवेश हेच गुण विशेषतः आढळतात.

७. आतां एक मात्र ग्रंथ सांगावयाचा राहिला. हा जॉनसनच्या ग्रंथांतील शेवटलें व अत्युत्तम जें 'कविचरित्र' तें होय. सन १७७७ सालीं लंडन शहरांतील चाळीस मोठमोठे पुस्तकवाले एके ठिकाणीं जमून त्यांनीं विचार काढला कीं आजपर्यंत नामांकित ह्मणून जेवढे इंग्रजी कवि झाले त्यांच्या काव्यांची एक नवी आवृत्ति काढावी. हा आपला विचार त्यांनीं जॉनसन यास कळविला व त्याच्याशीं असा ठराव केला कीं, प्रत्येक कवीस प्रस्तावनेदाखल असें लहानसें चरित्र त्यानें लिहून द्यावें. हा संकल्प मूळचा इतकाच होता कीं, प्रत्येक कवीचा वृत्तांत अगोदर संक्षेपतः देऊन नंतर त्याच्या प्रसिद्ध प्रसिद्ध ग्रंथांवर थोडी बहुत टीका दिलेली असावी. या कामगिरीबद्दल जॉनसन यास दोनशें पौंड देण्याची त्यांनीं कबुलायत केली. याप्रमाणें दोहों पक्षांचें संमत झाल्यावर प्रस्तुत ग्रंथकारानें आपल्या कामास हात घातला. या वेळेस त्याचें वय सुमारें सत्तर वर्षांचें होतें; तरी इतक्या वृद्धावस्थेंत असतांहि त्याची शरीरप्रकृति इतकी सदृढ होती व मनाच्या सर्व शक्ति इतक्या तरतरीत होत्या कीं, ऐन पूर्ववयांत रचलेल्या ग्रंथांत व या शेवटल्यांत कोणत्याहि प्रकारें बिलकुल अंतर दृष्टीस पडत नाहीं. वृद्धत्वदर्शेत पुष्कळांस कोणत्याहि प्रकारचीं दगदग होईनाशी होते; स्मरणशक्तीचा तर लोप व्हावयाला लागून बुद्धिहि बराबर चालत नाहीं; आणि जीव दुःखानें व काळजींनें थकून गेला असल्यामुळें चित्त उल्हासयुक्त न राहून उदासपणानें व्याप्त झालेलें असतें. पण जॉनसनचे ठायीं वरील विकार एकहि उद्भवला नव्हता. ग्रंथरचनेची त्याची जी पूर्वीची त्वरा असे तशाच रीतीनें त्यानें प्रस्तुत ग्रंथ लिहिला, व त्याची स्मृति तर अशी धड होती कीं, जागोजागचीं अवतरणें त्यानें पुस्तकावलोकन न करितां तशींच केवळ आठवणीवरून लिहिलीं. एरवीं असल्या उद्योगाला झटलें ह्मणजे अगोदर पुष्कळ दिवस तयारी केली असून शिवाय पुस्तकसंग्रह चाळण्याकरितां सतत जवळ असणें अवश्य होय. पण सदरहू चरित्रकारास कसलीहि गरज पडली नाहीं. कोशरचनेसारखा प्रचंड उद्योग जसा त्यानें एकट्यानें पार पाडला, त्याप्रमाणेंच, किंबहुना त्याहूनहि सहज रीतीनें, इंग्रजी कवींचे जीवनवृत्तांत व त्यांच्या काव्यांचें विवेचन हीं त्यानें उडवून दिलीं. प्रस्तुत विषय त्याच्या नेहमींच्या परिपाठांतला व अत्यंत आवडता असल्यामुळें फक्त शब्दरचनेसच त्यास काय वेळ लागला असेल तो असेल; बाकी विवेचनाची पद्धति त्याजपाशीं अगोदर सिद्ध असल्यासारखीच होती. असो; तर

अशा तऱ्हेनें प्रस्तुत चरित्रावलि सुमारें तीन चार वर्षांत समाप्त झाली. हींतील मजकूर मूळ संकल्पाहून पुष्कळ वाढल्यामुळें जॉनसन यास मूळच्या रकमेच्या इतका पैसा वरील पुस्तकवाल्यांनीं आणखी आपण होऊन पाठवून दिला.

सदरील ग्रंथ हा जॉनसनच्या साऱ्या ग्रंथांत शिरोभाग ह्मणून धरला आहे हें वर सांगण्यांत आलेंच आहे. याची भाषापद्धति त्याच्या इतर सर्व ग्रंथांहून साधी व सरळ आहे. याचें कारण यापूर्वीचीं वीस वर्षें त्याच्या हातची लेखणी सुटून तीं प्रायः संभाषण करण्यांतच गेलीं हें होय. या वीस वर्षेंभर इंग्लंडांत साऱ्या विद्वन्मंडळींत त्याचें प्रमुखत्व गाजलें होतें; व त्यांतून काव्यादि ग्रंथांवर तर त्याचीं जीं मतें होतीं तींच बहुतकरून पुष्कळांनीं उचललीं होतीं. तो स्वतः कवि होता, व गेल्या पन्नास साठ वर्षांची त्यास जातीनें उत्कृष्ट तऱ्हेची माहिती होती; यास्तव कविता विषयावर यथास्थित विवरण करण्यास त्याच्या इतकी योग्यता त्याकाळीं कोणाचेहि ठायीं नव्हती. पोप, स्विफ्ट वगैरे कवींशीं तो स्वतः समकालीन असल्यामुळें, व त्यांच्या मागल्या कवींविषयींचे लोकप्रवाद त्यास ऐकायाला सांपडले असल्यामुळें, गत काळाची स्थिति त्यास पुरतेपणीं ठाऊक होती. शिवाय काव्य व चरित्ररचना हे दोन त्याचे आवडते विषय असून त्यांवर त्यानें पुष्कळ विचार केला होता. या सर्व गोष्टींमुळें प्रस्तुत ग्रंथ फार उत्कृष्ट तऱ्हेचा उतरला; व तेव्हांपासून अद्याप त्याची प्रसिद्धि निर्बाध चालत आली आहे. ड्रायडन, पोप वगैरे कवींच्या गुणदोषांचें विवेचन व त्यांचें वृत्तांतकथन वगैरे प्रकार यांत जसे आहेत तसे दुसऱ्या ठिकाणीं क्वचित्च सांपडतील. कोठें कोठें मात्र राज्यप्रकरणी मतभेदास्तव प्रस्तुत टीकाकाराची लेखणी बरीच कडक झाली आहे, व स्थलविशेषीं त्याच्या बुद्धिस्थैर्यास्तव त्यास रसानुभव यथास्थित न होऊन त्याचे अभिप्राय मार्मिक रसज्ञांस अत्यंत असंमत होण्यासारखे पडले आहेत. पण हा प्रकार थोडा असून एकंदर ग्रंथ सामान्य वाचकास व रसिकास अत्यंत प्रिय व मान्य होण्यासारखा आहे.[1]

८. वरील ग्रंथ सन १७८१ त संपूर्ण झाला. यापुढचा जॉनसनचा वृत्तांत

---

१. वरील ग्रंथाची योग्यता पुढील वाक्यांवरून नजरेस येणार आहे--

"The Lives of the Poets are, on the whole, the best of Johnson's works. The narratives are as entertaining as any novel. The remarks on life and human nature are eminently shrewd and profound. The criticisms are often excellent, and, even when grossly and provokingly unjust, well deserve to be studied.

—Macaulay.

प्रायः दुःखमयच आहे. त्याच्या आयुष्याचीं यापुढें जीं तीन चार वर्षें उरलीं तीं इष्टमित्रांचें वियोगदुःख व वार्धक्यक्लेश हीं सहन करण्यांतच बहुधा गेलीं. त्याच्या मित्रमंडळापैकीं गोल्डस्मिथ, ग्यारिक व आणखी कांहीं जण याच सुमारास मरण पावले व आपल्या घरांत, त्यानें कांहीं निराश्रित अशा स्त्रेही मंडळीस कित्येक वर्षें जागा देऊन त्यांचें संगोपन केलें होतें त्यांपैकींहि बहुतेक खपून त्याचें घर शुक्र होऊन गेलें. थ्रेल नांवाच्या एका श्रीमान व संभावित गृहस्थानें जॉनसन यास पंधरा वर्षें आपल्या घरीं ठेविलें होतें; व त्याची आणि त्याच्या बायकोची आपले ठायीं अतिशयित भक्ति पाहून प्रस्तुत ग्रंथकारहि पहिल्या प्रतीचा निःस्पृह व फटिंग असतां त्यांच्या घरचा निरंतरचा पाहुणा होऊन इतके दिवस राहिला होता, पण तोंहि सालमजकुरीं मरण पावल्यामुळें जॉनसननें आपल्या ह्यातारपणचीं इतकीं वर्षें ज्या स्थळीं सुखासमाधानांत काढलीं तें त्यास यापुढें लवकरच अंतरलें. तें असें कीं, घरधन्याचा दाब नाहींसा होऊन त्याची यजमानीण जेव्हां स्वतंत्र झाली, तेव्हां तिचें जॉनसनवरचें वरकरणी प्रेम तेव्हांच लयास गेलें; व तिची वृत्ति लवकरच चंचल झाल्यामुळें तो तीस दुस्मानासारखा भासूं लागला. असा प्रकार दृष्टीस पडूं लागतांच जॉनसननें आपलें बिऱ्हाड उचललें, व आपल्या उदासवाण्या घरांत आपले शेवटचे दिवस घालविण्यास तो तिकडे निघून गेला. तो जातांच थ्रेलबाई अगदीं निर्धास्त होऊन आपले मनोरथ तिनें पुरवून घेतले. एका इटाली देशांतल्या सारंग्यावर तिचें मन बसून लवकरच दोघांचा विवाह झाला. या कृत्यानें तिची लंडन शहरांत अतिशयित छी थू होऊन तीस देशत्याग करावा लागला; मग ती आपल्या नव्या नवऱ्याच्या देशास जाऊन तेथें सुखरूप राहिली. हा सर्व वृत्तांत कळण्यास जॉनसन वांचला नाहीं. तिचा लाजिरवाणा द्वितीय संबध ऐकल्यापासून त्याचें मन तिजविषयीं अगदीं विटून गेलें होतें, व त्यानें तिचें नांवहि सोडून दिलें होतें. असो, तर अशा स्थितींत प्रस्तुत पंडिताचे सरते शेवटचे दिवस गेले. तो शेवटीं शेवटीं शरीरानें पुष्कळ स्थूल झाला होता; यास्तव स्थूलत्वाचें अनुषंगिक जें जलोदर त्यानें त्याचा शेवट केला. लंडनांतले त्या वेळेचे अत्यंत नामांकित असे चार वैद्य एक पैसा न घेतां त्यास उपचार करीत होते; व त्यांच्या अनुमतानें त्यानें आपल्या शरीरावर मोठे कठिण असे शस्त्रप्रयोगहि मोठ्या धैर्यानें करून घेतले. पण त्यांपासून विशेष गुण आला नाहीं. सरते शेवटीं सन १७८४ च्या अखेरीस जॉनसनचें देहावसान झालें. त्याच्या मागें त्याच्या संबंधाची ह्यटली ह्मणजे एक साधत्र मुलगी मात्र होती. ही त्याच्या बायकोच्या पहिल्या संबंधाची होय. त्यानें आपली सर्व जिनगी व सुमारें पंधरा हजारांचा ऐवज आपल्या शिद्दी चाकराच्या नांवें करून दिला. हा त्याच्या एका प्रिय मित्रानें त्यास नजर केला असल्यामुळें जॉनसनचा त्यावर पुष्कळ लोभ असे, व त्यानेंहि आपल्या धन्याची पुष्कळ वर्षें एकनिष्ठपणानें चाकरी केली होती.

जॉनसनचा अंत्यविधि वेस्टमिनिस्टर नांवाच्या विख्यात स्मशानभूमींत झाला. हें इंग्लंडांतील मोठमोठ्या नामांकित होऊन गेलेल्या पुरुषांचें कबरस्थान होय. या प्रसंगीं जॉनसनचें अवशिष्ट मित्रमंडळ व इतर कित्येक बडी बडी मंडळी जमा झाली होती. अलीकडे सेंट पॉल नाटक विख्यात देवळाच्या समंताद्भागीं मोठ्या कीर्तिमान पुरुषांचे पुतळे जे उभे केले आहेत त्यांत प्रस्तुत चरित्रनायकाची प्रतिमा अग्रस्थानीं स्थापिली आहे. ज्यानें आपल्या देशभाषेची दैना फेडून तीस व्यवस्थित व सुसंबद्ध केली, व आपल्या चिरस्थायी ग्रंथांनीं तीस शोभा आणिली; आणि आपल्या अनेक गुणांनीं व विशेषतः निर्मल आचरणानें जो स्वभूमीचें अभिमानस्थान होऊन साऱ्या जगास उदाहरणभूत झाला, त्या महापंडितास वरील मान अगदीं यथायोग्य मिळाला असें कोण सुज्ञ मनुष्य कबूल करणार नाहीं ?

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।
लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति ॥[1]

अंक ३९—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) जॉनसनचें शरीर. (३) पोषाखाचा वगैरे वेतवात. (४) विक्षिप्तपणाचे प्रकार व जडलेल्या खोड्री. (५) स्वभाव. (६) दयालुत्व. (७) मानित्व. (८) सत्यप्रीति. (९) बुद्धिगुण. (१०) कल्पनाशक्ति. (११) तर्कशक्ति. (१२) उपसंहार.

१. मागील चार अंकांत जॉनसनच्या हयातीच्या अखेरपर्यंत झालेला वृत्तांत सगळा सांगितला. आतां यांत त्याच्या स्वभावाचें एकंदर वर्णन करूं; ह्मणजे तो कोणत्या तऱ्हेचा मनुष्य होता, त्याची चालचर्या कशी असे, त्याचे मनोधर्म कसकसे होते, वगैरेविषयीं सामान्यतः निरूपण करतों.

२. प्रथमतः शरीरवर्णन. यापूर्वी अनेक ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, जॉनसन हा शरीरानें भला दांडगा होता. त्याचा बांधा ठेंगणाच पण चांगला खंबीर होता. ही शरीरसंपत्ति त्यानें आपल्या कमाईनें मिळविलेली ह्मणजे तालीम, कसरत वगैरे करून संपादिलेली होती असें नाहीं; तर कुलपरंपरेनेंच ती चालत आलेली होती. त्याचा बाप त्याच्यासारखाच बळकट होता, व चुलता तर एका आखाड्याचा वस्ताद होता. शरीराची ठेवण पाहिली तर ती जॉनसनची मोठी ढबदार होती असें नाहीं. पोट मोठें असून पुढील वयांत तर तें पुष्कळच सुटलें होतें; व पाय बांकदार असून ते एकंदर शरीराच्या अवजडपणामुळें चालतांना डळमळत. त्याचा चेहरा लहानपणीं बराच सुरेख होता, पण पुढें शस्त्रक्रियेचा त्यावर प्रयोग झाल्याकारणानें व एका डोळ्याची दृष्टि अधू झाल्यामुळें तो पुढील वयांत विरूप दिसत असे. तरी त्याची मुखश्री जात्या भव्य असल्यामुळें विद्येच्या तेजानें व अंगच्या इभ्रतीमुळें तीस विशेष शोभा येई.

१. "वज्राहूनहि कठोर व फुलाहूनहि कोमळ अशीं जीं लोकोत्तर पुरुषांचीं अंतःकरणें त्यांचा ठाव कोणास लागला आहे ?"

३. पोषाखाच्या टापटीपीकडे वगैरे जॉनसनचें बिलकूल लक्ष नसे. त्यास डामडौलाचा व नोकझोकाचा नेहमीं तिरस्कार वाटत असल्यामुळें लत्ताकपडा वगैरे जसा असेल तसा त्यास खपत असे. घरचा एरवींचा बेतबातहि त्याचा वरील तऱ्हेचाच होता. हल्लीं इंग्रेज लोकांत सामानसुमानाचा वगैरे साऱ्या घरभर जसा थाट दृष्टीस पडतो तसें त्याचें नसून केवळ निर्वाहाच्या वस्तूंचेंच तो अगत्य बाळगीत असे. त्यास सरकारांतून जें नियमित वेतन मिळत असे तें त्याच्यासारख्या एकट्या एक मनुष्यास जरी अगदीं रगाडीचें होतें, तरी रिकाम्या छानछुकींत किंवा ऐषआरामांत त्यानें कधींहि त्याचा व्यय केला नाहीं. हा व्यय कशांत होत असे याविषयीं यापूर्वी थोडासा उल्लेख केलाच आहे, व तो पुढें विशेषतः करायाचांच आहे. तर याप्रमाणें जॉनसनचें वर्तन एकंदरींत पहातां पुरातन काळच्या तत्त्वज्ञाप्रमाणें असे. ह्मणजे ते स्वभावतःच निरिच्छ असून जें यदृच्छेनें मिळेल त्यावर काळक्रमणा करून जसे नित्यसंतुष्ट असत तसाच प्रस्तुत महापंडित असे.

४. जॉनसन हा स्वभावतःच स्वच्छंदी होता, व तो वयांत आल्यापासून तर एकटा स्वतंत्रतेनें राहून त्याच्या डोईवर कोणीहि नव्हतें, यामुळें त्याचा स्वभाव तऱ्हेवाईक होऊन त्यास कित्येक विलक्षण संवयी व खोडी लागून राहिल्या होत्या. त्या सर्वांचा येथें उल्लेख करणें हें कित्येकांस कदाचित् बरोबर वाटणार नाहीं; कां कीं मोठ्या मनुष्यांच्या बारीकसारीक गोष्टी प्रगट करणें बरोबर नाहीं व त्यापासून कांहीं उपयोगहि नाहीं असें कोणास वाटण्याचा संभव आहे. तसेंच थोरांच्या चरित्रश्रवणापासून जो लाभ व्हावयाचा तो क्षुल्लक गोष्टींनीं नष्ट होऊन त्यांजवरची पूज्यबुद्धि उडून जाते असेंहि सकृद्दर्शनीं वाटण्यासारखें आहे. पण या सर्व समजुती खोट्या आहेत. एक तर चरित्र ह्मटलें ह्मणजे त्यांत तद्विषयभूत मनुष्याच्या संबंधाची साऱ्या प्रकारची माहिती आली पाहिजे. ज्या गोष्टींनीं त्याचा गौरव होतो त्यांचा उल्लेख जसा अवश्य होय, तसेंच जेणेंकरून त्यास हीनत्व येईल तेंहि निःपक्षपातपणानें सांगणें जरूर आहे. शिवाय ज्या अर्थीं कोणीहि मनुष्य सर्वगुणसंपन्न व सर्वदोषविवर्जित असा नाहीं, त्या अर्थीं कोणी केवढाहि मोठा विख्यात असला तरी त्याच्या दोषनिरूपणानें त्याची वास्तविक कीर्ति यथार्थज्ञांच्या दृष्टीनें तरी कमी खास होणार नाहीं. तर हें ध्यानांत ठेवून प्रस्तुत ग्रंथकाराच्या संबंधाच्या ज्या गोष्टी यापुढें येणार त्या वाचकांनीं वाचाव्या.

मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, जॉनसन यास एक चमत्कारिक मेंदूचा रोग जडला होता. हा त्याच्या कुळांत परंपरेनें चालत आलेला होता. याच्या योगानें त्याची वृत्ति नेहमीं उदासीन होत असे; कोणत्याहि गोष्टीविषयीं उल्हास न वाटून त्याचें चित्त इतकें उद्विग्न होत असे कीं, त्यास जीवाचा देखील कंटाळा येई. या मज्जारोगाच्या योगानेंच त्याचा स्वभाव पराकाष्ठेचा त्रासिक झाला होता, व त्यास

भ्रमिष्टपणा जडला होता. या भ्रमिष्टपणाचे अनेक प्रकार बॉसवेलनें लिहून ठेवले आहेत. त्यांपैकीं कांहीं सांगतों. अर्धांगवायूनें पीडलेल्या मनुष्याचे शरीरावयव जसे आपोआप हालत असतात, त्याप्रमाणें जॉनसनचें डोकें लटलटां कांपत असे; व हातपायांचे चाळे चालू असत. ही हालचाल त्याच्यानें बंद करवत नसे. भर मंडळींत त्यानें कधीं कधीं देहभान न राहून कवितेचे चुटके मोठ्यानें ह्मणावे; व एकटा असला ह्मणजे तर घटका घटका आपणाशींच मोठ्यानें बोलत उभें रहावें. रस्त्यानें चालत असतां बाजूच्या खांबांस हात लावीत गेल्याखेरीज त्यास चैन पडूं नये; व एखादा खांब चुकलासा जर त्यास वाटला, तर त्यानें पुनः माघारी येऊन पुनः एकवार तो विधि यथासांग करावा. साहेबलोकांच्या जेवणांत टेबलावर फळफळावळहि ठेवलीं असत; हिच्यापैकीं नारिंगांवर जेव्हां बारी येई, तेव्हां जॉनसननें त्यांचीं सोललेलीं सालपटें फेंकून न देतां मोठ्या तजविजीनें आपल्या आंगरख्याच्या खिशांत तीं सांठवून ठेवावीं. यांचा विनियोग पुढें काय होत असे तो समजण्यांत आला नाहीं !

वरील उदाहरणांवरून जॉनसनच्या भ्रमिष्टपणाची वाचकांस वरीच कल्पना होईल. जॉनसन यासहि आपल्या व्यथेचा होतां होतां काय परिणाम होईल याचा नेहमीं धाक असे. हा त्याचा रोग कधीं कधीं अतिशय बळावे, व कधीं कधीं बहुतेक नाहींसा झाल्यासारखाहि होई. जेव्हां तो प्रबळ होई तेव्हांची त्याची विपत्ति कांहीं पुसूं नये ! इंद्रियज्ञानासहि अशा वेळीं विकार पोंचे. त्याची आई घरीं कित्येक कोस दूर असतां ती आपणास हाक मारीत आहे असें त्यास स्पष्ट ऐकूं यावें. रस्त्यांतील घड्याळापुढें घटका घटका उभें राहिलें असतांहि किती वाजले याचा त्यास निश्चय करतां येऊं नये, पण या सर्वांहूनहि दुःखाची गोष्ट ही कीं, ही भ्रमावस्था स्थाईक होऊन मुळींच बुद्धि-भ्रंश आपला होईल कीं काय याची त्यास अतिशयित भीति वाटे. पण त्याच्या व एकंदर लोकांच्या भाग्यास्तव या कडेलोटावर केव्हांहि गोष्ट येऊन ठेपली नाहीं.[1]

वरील व्याधीपासूनच तिरसटपणा व आळस हे गुणहि प्रस्तुत ग्रंथकाराच्या ठायीं बलवत्तर झाले. ते असे कीं, तो मूळचा निस्पृह व अभिमानी होताच; व वेळ आल्यास कोणाचीहि पर्वा ठेवीत नसे. त्यांतून वरील पीडा ज्या अर्थीं त्यास बहुधा नेहमीं जडली असेच, त्या अर्थीं व्यथित मनुष्याचें जसें होतें त्याप्रमाणें त्याचा मूळचा

---

१. हा जो वर मज्जारोग सांगितला आहे हा प्राच्य राष्ट्रांत कितपत आहे किंवा मुळींच नाहीं याविषयीं कांहीं माहिती नाहीं. इंग्लंडच्या सर्द व तुंद हवेनें जर तो उत्पन्न होत असल तर इकडे तो मुळींच नसण्याचाहि संभव आहे. इंग्रेजी कवींपैकीं पुष्कळांस वरील विकाराची बाधा होती. असो, जॉनसननें एकदां तर असें सुद्धां कोणापाशीं ह्मटलें कीं, मी साऱ्या जन्मभर वेडाच होतों. या विकाराचें वर्णन प्रस्तुत ग्रंथकारानें आपल्या 'रासेलसां'-तील ज्योतिष्याच्या द्वारें सविस्तर केलें आहे हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस आठवलेच.

स्वभाव तिच्या योगानें दुणावला हें उघडच आहे. याशिवाय जॉनसनचें पूर्व वय हलक्या प्रतीच्या लोकांत गेलें असल्यामुळें बड्या मंडळींत जे सभ्यपणाचे प्रकार असतात,–म्हणजे राग आला तरी तो कढूं न देणें, कोणी अपमान केला असतां त्याचा प्रतीकार उघडपणें एकदम न करतां समय पाहून हांसत हांसत आपल्या प्रतिपक्ष्याचे दांत पाडणें,–वगैरेहि तो बिलकूल जाणीत नसे. त्याचा जबाब नेहमीं ज्या वेळचा त्या वेळेस रोकडा दिलेला असे. कधीं कधीं तर अत्यंत परिचित मित्रांवरहि तो संतापे, व त्यांस टाकून बोले. बॉसवेलच्या 'चरित्र'भर जॉनसनच्या कडक तब्बेतीचीं उदाहरणें आहेत, व खुद्द दोघांचींहि रुसणीं फुगणीं अनेक वेळां झालीं आहेत. असो; वरील मनोविकृतीचा दुसरा परिणाम जॉनसनचा सुस्तपणा होय. हा गुणहि त्याच्या अंगीं जात्या असून तो वरच्याप्रमाणेंच वरील विकाराच्या योगानें दृढतर झाला. दुखणाईत मनुष्यास जसा कामाचा कंटाळा येतो व स्वस्थ पडून रहावेंसें वाटतें, त्याप्रमाणेंच त्यास निरंतर होई. पण जवळ पैसा ना आडका, व उपासमार पडण्याची पाळी; तेव्हां झक मारीत त्यास जागचें उठून नित्यनिर्वाहाची कांहीं तरी तजवीज पहावी लागे. असें होतां होतां राजाकडून प्रस्तुत विख्यात ग्रंथकारास जेव्हां एकदाचें पेनशन झालें, तेव्हां त्याचा नित्याचा घोर नाहींसा होऊन त्याची स्वभाववृत्ति अत्यंत प्रबळ झाली. मग काय ! बोवांनीं सकाळीं लवकर लवकर म्हणजे केव्हां निजून उठायाचें ?–बारावर दोन वाजतां[1] !! मग दोहोंच्या पुढें मुखमार्जनादि विधि व भोजन. रात्रीचा प्रकार

१. इंग्रेज लोकांत निजुन उठण्याची मर्यादा कोठपर्यंत आहे याची कल्पना वरील उल्लेखावरून होणारी आहे. जॉनसनचाच समकालीन प्रख्यात कवि टॉमसन यानें आपल्या 'ऋतुवर्णनांत'त एके ठिकाणीं लिहिलें आहे—

"Falsely luxurious, will not man awake,
And springing from the bed of sloth enjoy
The cool, the fragrant and the silent hour,
To meditation due and sacred song ?
For is there aught in sleep can charm the wise ?
To lie in dead oblivion, losing half
The fleeting moments of too short a life ;
Total extinction of the enlightened soul ?
Or else to feverish vanity alive,
"wildered, and tossing through distempered dreams!
Who would in such a gloomy state remain
Longer than Nature craves ; when every Muse
And every blooming pleasure wait without,

(पुढें चालू).

याच मासल्याचा. एकदां जें बाहेर पडावें, तें फीर फीर सगळ्या रात्रभर रस्त्यांतून फिरत असावें; एखादा मित्र घरीं आला असला, तर ज्या गप्पा चालाव्या, त्या रात्र उजाडेपर्यंत; किंवा वाचण्याची अथवा लिहिण्याची लहर लागली तरी रात्रची रात्र उलटून जावी !

५. जॉनसनच्या स्वभावास त्याच्या स्थितिविशेषाच्या योगानें जो तऱ्हेवाईकपणा जडला होता, त्याचे कांहीं प्रकार वर सांगितले. त्यांवरूनच केवळ पहातां कोणासहि सकृद्दर्शनीं असें वाटणार आहे कीं तो कोणी वेडगळ, छांदिष्ट व तुसडा असा मनुष्य होता. हीच समजूत जॉनसनच्या हयातींत पुष्कळ जणांची होती. त्याची अचाट बुद्धि सर्वांस कबूल करावी लागेच, पण वरील समजूत बहुधा सर्वांची दृढ होऊन गेली असल्यामुळें त्याच्या नेहमींच्या मित्रमंडळीखेरीज फारच थोडे त्यास चाहत असत. बॉसवेलनें जें एवढें सविस्तर चरित्र लिहिलें त्याचा मुख्य हेतु हाच होता कीं, आपल्या मित्राच्या व गुरूच्या स्वभावाविषयीं लोकांत ज्या विलक्षण समजुती पहिल्यापासून पडून गेल्या आहेत त्या नाहींशा व्हाव्या. हा हेतु त्यानें कितपत सिद्धीस नेला आहे याविषयीं त्याचा ग्रंथ वाचला असतां तेव्हांच खात्री होणार आहे. असो; आतां या स्वभावाविषयीं कांहीं निरूपण करून नंतर जॉनसनच्या बुद्धिगुणांविषयीं वगैरे लिहूं.

६. मनुष्यस्वभावाचें अवलोकन ज्यानें उगीच वरवर केलें असेल त्याच्याहि लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय रहाणार नाहीं कीं, मनुष्याचें बाह्य व अंतर्गत स्वरूप हीं पुष्कळदां अगदीं भिन्नभिन्न असतात. कांहीं मनुष्यें दिसायास उग्र असून आंत फारच कोमल असतात; व कांहीं बोलणारे मोठे मिष्टे असून त्यांची कृति अगदीं निराळी किंबहुना विपरीतहि असते. जॉनसनचा प्रकार यांपैकीं पहिला होता. त्याची मुद्रा व आचरण हीं इतकीं विलक्षण असत कीं, त्याच्या अत्यंत जिवलग मित्रांसहि त्याशीं कमीजास्त बोलण्याचें भय वाटत असे. त्याची वृत्ति किती तापट असे व तो केवढा निस्पृह वक्ता होता, याविषयीं पूर्वी जे अनेक उल्लेख केले आहेत त्यांवरून वरील गोष्टींची प्रचीती सहज येईल; पण असें असून त्याचें अंतःकरण किती कोवळें होतें याचे दाखले त्याच्या चरित्रांतून शेंकडों आहेत. त्याची आपल्या आईबापांवर भक्ति, बायकोविषयीं प्रेम, मित्रांचे ठिकाणीं स्नेहपूर्वक निष्ठा, आश्रित व सेवक यांविषयीं आदर, प्राणिमात्राविषयीं भूतदया, वगैरेचीं उदाहरणें दाखल केलीं असतां

To bless the wildly—levious morning walk ? "

Summer.

पण प्रभातदेवतेची एवढी खुषामत करणारे कविमहाराज स्वतः विछान्यावरून केव्हां हालत एवढी मात्र कोणीं विचारपूस करूं नये ! यांची पहाट टळटळीत दोन प्रहर झाल झणजे होई ! 'निरंकुशः कवयः'–दुसरें काय झणावयाचें आहे !

निराळा ग्रंथच होईल. यास्तव वरील निरानिराळ्या वृत्तींचें केवळ संक्षेपतः येथें निरूपण करतों. जॉनसनचा बाप त्याच्या पूर्ववयांतच वारला, पण त्याची आई पुष्कळ वयातीत होऊन तो प्रौढ वयाचा झाल्यावर मरण पावली हें मागें कळविलेंच आहे. हिजविषयीं जॉनसनची भक्ति किती होती हें मागील चरित्रावरून व विशेषतः 'रासेलस' या ग्रंथाच्या रचनाप्रसंगावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. शिवाय त्याच्या ग्रंथांतहि कोठें कोठें हींच वृत्ति प्रगट झालेली आढळते.[१] आपल्या स्त्रीविषयीं तर जॉनसनचें इतकें प्रेम होतें कीं, तिच्या मरणानें त्यास अतोनात दुःख होऊन तें शेवटपर्यंत बुजून गेलें नाहीं. त्याला विवाहित स्थितीचा संस्कार काय तो सात आठ वर्षें घडला, व पुढें तीस बत्तीस वर्षें त्यानें विधुरावस्थेंत घालविलीं, तरी त्याच्या अंतःकरणांत त्याच्या प्रियकर स्त्रीची मूर्ति इतकी दृढ बसून गेली होती कीं, शेवटपर्यंत तिच्या स्मरणानें तो सद्गदित होत असे. तिचा मरणदिवस व्रताप्रमाणें पाळून तो त्या दिवशीं उपोषण करी; व वारंवार तिच्या नांवानें तो प्रार्थना करीत असे. मित्रांचीहि गोष्ट अशीच. ज्याचा त्याच्याशीं एकदां स्नेह जडला त्याजवरचें त्याचें प्रेम कधींहि उतरलें नाहीं. हरएक तऱ्हेनें तो त्याच्या उपयोगीं पडत असे. संकटसमयीं त्यांच्या साह्यार्थ धांवणें, त्यांस सदुपदेश करणें, त्यांच्या तर्फेनें शिफारशी लावणें, त्यांस कोणी नांव ठेवलें असतां त्यांचा कैवार घेणें, हा क्रम त्याचा सतत चालेलला असे. प्रसंगवशात् त्याचें याशीं भांडणहि होई, पण लवकरच पुनः दोघांचें समेट बनून येई. हा जॉनसनचा स्नेह परंपरासंबंधानें पुढेंहि चालत असे. ह्मणजे त्याच्या स्नेह्यांचा आप्तवर्ग, चाकर माणसें यांजवरहि त्याचा लोभ जडे. मागील अंकाच्या शेवटीं सांगितलेला शिद्दी चाकर, ज्याच्या नांवानें जॉनसननें शेवटीं मृत्युपत्र करून ठेवलें व आपला

---

१. पोप कवीची आई **जॉनसन**च्या आईसारखींच फार उतार वयाची होऊन मरण पावली; व पोपचाहि **जॉनसन**प्रमाणेंच तिजवर अतिशय लोभ असे. हिजविषयीं वरील कवीच्या चरित्रांत ग्रंथकार लिहितो—

"In the next year he lost his mother, not by an unexpected death, for she lasted to the age of ninety-three ; but she did not die unlamented. The filial piety of Pope was in the highest degree amiable and exemplary; his parents had the happiness of living till he was at the summit of poetical reputation, till he was at ease in his fortune, and without a rival in his fame, and found no diminution of his respect or tenderness. Whatever was his pride, to them he was obedient; and whatever was his irritability, to them he was gentle. Life has, among its soothing and quiet comforts, few things better to give than such a son."

सर्व ऐवज त्याच्या नांवें त्यानें करून दिला, तो अशा परंपरासंबंधाचाच होता. जॉनसनचा एक मित्र अमेरिकेंत पुष्कळ दिवस जाऊन राहिला होता व तेथें असतां वरील शिद्दी चाकरास त्यानें आपणापाशीं बाळगिलें होतें. पुढें स्वदेशास परत आल्यावर आपल्या मित्रास त्यानें तो चाकर नजर केला. त्यास या नव्या धन्यानें ख्रिस्ती धर्माची दीक्षा देऊन त्याच्या विद्याभ्यासाकडेहि तो लक्ष पुरवीत असे. याप्रमाणेंच आणखीहि कित्येक मनुष्यांस जॉनसननें आपल्या घरांत आश्रय दिला होता; व सामान्यतः कोणीहि दुःखित व दीन असा त्याच्या दृष्टीस पडला असतां त्याच्यावर तो दया करीत असे. सारांश, थोर पुरुषांस अत्यंत शोभादायक जें दयाशीलत्व, जें ख्रिस्ती धर्माचें अनुषंगी ह्मणून त्याचा महिमा जिकडे तिकडे ऐकूं येतो, तें प्रस्तुत पंडिताचे ठायीं पूर्ण नांदत असे.

७. वर जो गुण सांगितला त्याचें व मानित्वाचें साहचर्य हें कित्येकांस सकृद्दर्शनीं विचित्र वाटेल; पण पहिल्याप्रमाणेंच हा दुसराहि गुण ह्मणजे मानीपणा जॉनसनचे ठायीं पूर्ण होता. मानी पुरुषाचें लक्षण हें आहे कीं, त्यास दुसऱ्यानें केलेली अवज्ञा व दुसऱ्यापुढें भाकायाचें दैन्य, हीं दोन्ही लवमात्रहि सहन होत नसतात. पहिल्याचा प्रतिकार केल्याखेरीज तो कधींहि रहात नाहीं; व दुसरा प्रसंग येण्यापेक्षां मरण बरें असें त्यास वाटत असतें. जॉनसनच्या वर्तनांत वरील दोन्ही गोष्टी कितपत दृष्टीस पडत याचें चांगलें उदाहरण गेल्या अंकांत 'महदाख्यायिका' या सदराखालीं दिलेलें आहे, तें वाचकांस स्मरत असेलच. त्यावरून सहज ध्यानांत येईल कीं, कोणीं आपण होऊन त्यास व कोणासहि नकळत देणगी दिलेली जर त्यास खपली नाहीं, व तिचा त्यानें इतका धिक्कार केला, तर स्वतः याचना करण्याचें तर त्याच्या केवढें जीवावर येत असेल! बापाच्या मरणानंतर याच्या अंगावर जेव्हां संसार पडला, व स्वतःची व आपल्या कुटुंबांतील माणसांची तजवीज करणें हें जेव्हां याच्याकडे आलें, तेव्हां त्यानें जे निश्चय केले ते त्याच्या रोजनिशीवरून कढून येतात. ते हे होते कीं, कोणापाशींहि दैन्य न दाखवतां स्वतःच्या हिमतीवर पैसा कमवायाचा; दारिद्र्याच्या योगानें मन निरुत्साह व दुर्बळ होऊं द्यावयाचें नाहीं; व उदरनिर्वाहार्थ कोणतेंहि दुराचरण करावयाचें नाहीं. अगदीं पूर्ववयांत जॉनसननें वरील संकल्प दृढ करून ठेवले हेंच त्याच्या हिंमतीचें व सात्त्विकपणाचें अगोदर थोडें प्रमाण आहे असें नाहीं; व वरील स्वकृत मर्यादा त्यानें शेवटपर्यंत लवमात्रहि उल्लंघिल्या नाहींत, यावरून त्याच्या अंगीं धैर्य कितपत वसत होतें व प्रस्तुत गुण जो अभिमान तो कसा जागृत होता हें सहज ध्यानांत येणारें आहे. वस्तुतः पहातां प्रस्तुत ग्रंथकारास शेवटपर्यंत लोकाधिकार तर कधींच नव्हता, व पैशाच्या संबंधानें पाहिलें तर त्याचें निमें अधिक वय ददातींतच गेलें; तरी इतर सामान्य मनुष्य

लोकावज्ञेनें जसे खचून जातात तसा हा कधींहि गेला नाहीं. त्याचा व लॉर्ड चेस्टरफील्ड याचा जो प्रसंग झाला तो पूर्वी सविस्तर सांगण्यांत आलाच आहे; व तसेंच थ्रेलबाईची वृत्ति बावरून तिच्या घरीं इतःपर आपला बोज रहाणार नाहीं हें समजतांच त्यानें तेथून आपलें बिऱ्हाड उचललें व अंतसमय जवळ येऊन ठेपला असतांहि आपल्या ओसाडवाण्या घराची वाट धरली, हेंहि मागें सांगण्यांत आलेंच आहे. याच वृत्तीचीं उदाहरणें त्याच्या 'चरित्रां'त व ग्रंथांतहि पुष्कळ आहेत.[1]

८. जॉनसनचा दुसरा एक मोठा गुण म्हटला ह्मणजे सत्यप्रीति हा होय. त्यास सत्य हें स्वभावतःच आवडत असे; व खोटें बोलणें, लफंगेपणा करणें याचा त्यास तसाच अतिशयित तिरस्कार वाटे. 'चित्ते वाचि क्रियायां च महतामेकरूपता' हें महाजनांचें लक्षण त्यावर पूर्ण लागू पडतें. त्याच्या अगदीं बारीक सारीक भाषणापर्यंतहि त्याच्या अनेक चरित्रकारांनीं वृत्तांत लिहून ठेवला आहे, पण वरील वाक्यास जेणेंकरून विरोध येईल असें त्या सर्वांत एक अक्षरहि सांपडायाचें नाहीं. जसें त्यास वाटे त्याप्रमाणेंच तो बोलून दाखवी; व जें बोलून दाखवी त्याप्रमाणेंच त्याचें आचरण असे. हा तिहीं प्रकारचा मेळ इतका पूर्ण असे कीं, त्याच्या योगानें जॉनसनचें आचरण व्यवहारदृष्ट्या दोषरूप सुद्धां होई. ह्मणजे 'हितं मनोहारि च दुर्लभं वचः' या वचनाप्रमाणें लोकांस कडू लागेल अशा प्रकारचें भाषण करण्याचीहि त्यास पाळी येई. त्यास सभ्य लोकांची रीत मुळींच माहीत नसून त्याचें वर्तन उद्धट व दांडगेपणाचें असल्याविषयीं जो पहिल्या पहिल्यानें बोभाटा होता त्याचें कारण वरीलच होय. त्याप्रमाणेंच त्याचे ग्रंथहि पुष्कळांस अमान्य होऊन अद्यापहि ते सर्वप्रिय झाले आहेत असें नाहीं. असो; सामान्यतः बोलण्याचालण्यांतहि जॉनसनचें वरील गुणाकडे इतकें लक्ष असे कीं, तो जसा काय कोर्टातील प्रतिज्ञा भोगून शपथेवर जबानी देत आहे असें वाटे, असा त्याच्या एका मित्राचा लेख आहे.

९. आतां प्रस्तुत ग्रंथकाराच्या बुद्धिगुणांविषयीं कांहीं लिहितों; ह्मणजे तो एवढ्या विख्यातीस जो चढला तो कशामुळें, कोणत्या मानसिक शक्ति त्याचे ठायीं अत्यंत प्रबळ होत्या, याविषयीं निरूपण करावयाचें. मानसिक शक्तींत दोन प्रधानभूत

---

१. वरच्यापैकीं एक उदाहरण 'रांबलर'च्या शेवटीं आहे. शेवटल्या ह्मणजे २०८ व्या निबंधांत निबंधकारानें पुस्तक समाप्त करून एकंदर लोकांवर कडाका उडवून दिला आहे. प्रथमतः अवतरणच पुढील बाण्याचें आहे—

"Begone, ye blockheads! Horaclitus cries,
And leave my labours to the learned and wise;
By wit, by knowledge, studious to be read
I scorn the multitude, alive and dead!"

आहेत. एक तर्क ह्मणजे विवेचनशक्ति; व दुसरी कल्पनाशक्ति. पहिलीच्या योगानें मनुष्यास सत्यासत्याचें विवेचन करतां येतें, व वाद करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. दुसरीच्या योगानें अदृष्ट किंवहुना अवास्तव पदार्थांचीहि यथास्थित भावना मनोमय करतां येते, व त्यामुळें यथावत् वर्णन करण्याची शक्ति प्राप्त होते. पहिल्या शक्तीचा उत्कर्ष तत्त्वज्ञाचे ठायीं आढळतो; व दुसरीचा कवींचे ठायीं दिसून येतो. असो; आतां जॉनसनच्या ठायीं त्या कितपत वसत होत्या याविषयीं निरूपण करूं.

१०. प्रथमतः कल्पनाशक्ति. हिचें वास्तव्य प्रस्तुत पंडिताचे ठायीं होतें हें त्याच्या काव्यांवरून व त्यानें एक कादंबरी व एक नाटक रचलें यावरून सर्वांच्या लक्षांत येईलच. शिवाय त्याच्या 'चरित्रां'त बॉसवेलनें त्याच्या सुरस भाषणांचा जो संग्रह सर्वांस सादर केला आहे, त्यावरूनहि वरील कल्पकतागुण व्यक्त होतो. जॉनसनच्या ठायीं समयोचित भाषण करण्याची शक्ति कांहीं विलक्षण तऱ्हेची होती. त्यानें एकदां कोटिक्रम सुरू केला ह्मणजे त्यावर कोणाचीहि मात्रा चालत नसे; व यामुळेंच मोठमोठे पटाईत बोलणारे सुद्धां त्याच्याशीं सामना घालायाला भीत. कोणी कसाहि पूर्वपक्ष करून त्याशीं डौलानें वाद करायाला लागला, कीं त्यानें आपलें विनोदरूप शस्त्र उचलून त्याचें ह्मणणें असें हास्यास्पद करून टाकावें कीं, त्यास आपण कोठून बोललों असें होऊन जावें. या भाषणचातुर्याचें बीज वरील कल्पकतागुणच होय. ज्यानें अनेक तऱ्हेचें ज्ञान प्राप्त करून घेऊन बहुश्रुतपणा चांगला संपादन केला आहे, त्याच्यापाशींच कल्पकपणाचेंहि साहित्य उत्कृष्ट असलें तर, आपल्या प्रतिपक्ष्यावर कोटीवर कोटी लढवून त्यास वादांत जिंकण्याचें साधन त्यास उत्तम रीतीनें सांपडेल हें उघडच आहे. तर जॉनसनच्या कल्पकतेचीं हीं सर्व प्रमाणें होत. आतां हें खरें कीं, प्रस्तुत मानसिक शक्ति त्याच्या ठायीं जी होती ती विशेष सूक्ष्म व चलाख अशा तऱ्हेची नसून बोजड, अवजड अशा तऱ्हेचीच होती व यामुळेंच वरील काव्यादि ग्रंथांची आतां तादृश प्रसिद्धि नसून त्याचा विनोदप्रकारहि कांहींसा कृत्रिमतेचा दिसतो.[1] गोल्डस्मिथ

१. **जॉनसन** यास स्वतः वरील संबंधाचा उणेपणा भासून तो केव्हां केव्हां ह्मणे—

"Topham Beauclerk has wit, and everything comes from him with ease; but when I say a good thing I seem to labour."

बोक्लार्क हा **जॉनसन**च्या 'क्लब'पैकीं होता. याच्या अकालिक मरणानें सारी मित्रमंडळी हळहळत असतां **जॉनसन**नें त्याची येणेप्रमाणें प्रशंसा केली–

"Our club has had a great loss since we met last,—a loss that perhaps the whole nation could not repair! No man ever was so free, when he was going to say a good thing, from *a look* that expressed that it was coming; or when he had said it, from

(पुढें चालू).

वगैरे ग्रंथकारांचे ठायीं तो जशा तऱ्हेचा आढळतो तसा जॉनसनच्या ग्रंथांत किंवा भाषणांत आढळत नाहीं. त्याप्रमाणेंच संगीत, नाट्य, चित्रविद्या, कविता, यांचेंहि मर्मज्ञान त्यास जें नसे त्याचें तरी कारण वरीलच होय.

११. दुसरी तर्कशक्ति. ही वरच्याहून जॉनसनचे ठायीं अधिक प्रखर होती. त्याची बुद्धि जात्याच परम सूक्ष्म असून तिची पहिल्यापासून तत्त्वशोधाकडे सतत प्रवृत्ति झाली असल्यामुळें सत्यासत्यविवेचनाविषयीं तीस अत्यंत पटुत्व प्राप्त झालें होतें. तें इतकें कीं, त्याशीं कोणी वाद करूं लागला असतां त्यांत यत्किंचितहि लटपट केलेली तो तेव्हांच हुडकून काढी. अप्रमाण भाषण किंवा पोकळ कोंटी हीं त्याच्यापुढें पळभरहि टिकत नसत. सराफ ज्याप्रमाणें रुपये पारखतांना खोटा रुपया चटदिशीं फेंकून देतात, त्याप्रमाणें कोणी कितीहि हिकमतीनें खोटें प्रमाण लेखांत किंवा भाषणांत घुसडून दिलें असतां तें तो तेव्हांच बाहेर काढी. बॉसवेलचा ग्रंथ ज्यांनीं कोणीं समग्र वाचला असेल त्यांची वरील गोष्टीविषयीं खात्री होऊन गेली असेल. त्यांत किती शेंकडों तऱ्हेचे वाद प्रसंगानुसार निघालेले आहेत; पण तितक्यांवर जॉनसननें पांडित्य करून आपली कल्पनाशक्ति व तर्कशक्ति या लढवून दिल्या आहेत! बॉसवेलसारखा पृच्छक आणि जॉनसनसारखा वक्ता, मग विषयवैचित्र्यास काय कमी! बॉसवेल वर्षांतून एकदोनदां आपल्या देशाहून लंडनास जो येई त्याचा मुख्य उद्देश जॉनसनचें भाषण ऐकावें हा असे. अशा प्रसंगीं जेवढा वेळ त्यास जॉनसनच्या समागमांत घालवायास सांपडे तेवढा तो घालवी; व तितक्या वेळांत जितक्या विषयांवर भाषणाचा ओघ आणवेल तितका आणण्याचा त्याचा प्रयत्न चाललेला असे. यामुळें असें झालें कीं, नानाप्रकारचे विषय– ह्मणजे काव्य, शास्त्र, तत्त्वज्ञान, धर्म, लोकव्यवहार, राज्यतंत्र, किंबहुना सामान्य संसारांतील गोष्टी यांविषयींहि जॉनसनसारख्या पंडिताचे अत्यंत हृद्गत विचार प्रकट झालेले आहेत; आणि त्यामुळें प्रकृत ग्रंथ हा नुसता चरित्ररूप आहे असें नाहीं तर नानाविध ज्ञानाचें व मनोरंजनाचें जणों काय भांडारच बनला आहे. जॉनसननें वर्षांचीं वर्षें

---

a look that expressed it had come. Beauclerk's talents are those which I have felt myself more disposed to envy than those of any whom I have known."

१. **जॉनसनच्या** मित्रमंडळींत त्या काळचा उत्तम गायक, उत्तम नट, उत्तम चित्रकार व उत्तम कवि असे होते. ते अनुक्रमेंकरून बर्नी, ग्यारिक, व रेनॉल्डस गोल्डस्मिथ हे होत. या चवघांपैकीं पहिल्याचें कसब तर आमच्या महापंडितास बिलकूल कळतच नसे, दुसऱ्या व तिसऱ्याच्या कर्तबगारीची त्यांस कांहीं चहा असे, आणि चवथ्याच्या गुणाची मात्र त्यास पूर्ण पारख असून, त्याबद्दलची प्रशंसा त्यांच्या तोंडून वरचेवर ऐकूं येई. तरी त्याच्याहून तेजस्वी जीं इंग्रेजी भाषेंतील कविरत्नें त्यांचें यथार्थज्ञान जॉनसन यास नव्हतें हें सर्वप्रसिद्धच आहे.

खपून अनेक मोठमोठे ग्रंथ रचले; पण यांत त्याच्या बुद्धीचें ऐश्वर्य जसें प्रकट झालें आहे तसें त्या सर्वांत मिळूनहि झालें नाहीं. हा ग्रंथ महामूर्ख जो बॉसवेल त्याच्या हातून निर्माण जर न होता, तर जॉनसनच्या स्वभावाचें यथार्थज्ञान नष्ट होऊन त्याच्या-विषयीं अनेक कुकल्पना सर्वांच्या मनांत भरून रहात्या हें तर एक झालेंच असतें; पण याहून मोठी गोष्ट ही कीं, शेक्सपियरप्रभृति ग्रंथकारांचें वाक्चातुर्य जसें कीर्तिशेष मात्र राहिलें आहे त्याप्रमाणेंच जॉनसनचीहि अवस्था झाली असती. पन्नास वर्षांच्या सांठवणीचें ज्ञान आपल्या आयुष्याच्या शेवटच्या पंचविंशांत तो जें सतत ओतीत असे तें प्रस्तुत चरित्रकारासारख्या सत्पात्राशिवाय केव्हांच जिरून मुरून जाऊन पार झालें असतें! असें[1]; तर बॉसवेलच्या ग्रंथांत प्रस्तुत पंडिताची प्रखर तर्कशक्ति उत्तम रीतीनें प्रगट झालेली आहे. आतां हें खरें, कीं जॉनसन जसा मोठा वावदूक होता तसाच कांहींसा आग्रही व गर्विष्ठहि होता. याचमुळें त्याचीं भाषणें वरील ग्रंथांत जीं आलीं आहेत तीं सर्वच युक्तीस सर्वथा अनुसरून आहेत असें नाहीं. कधीं कधीं तो वादविवादाच्या भरांत अप्रमाण गोष्टीहि बोलून जाई व आपला पक्ष खोटा आहे असें आंतून पक्कें जाणीत असतांहि तो खरासा भासवून देण्याचा यत्न करी. त्याप्रमाणेंच आपली बाजू घसरते आहे असें त्यास एखादे वेळेस वाटूं लागलें असतां उगाच वितंड-वादांत शिरून प्रतिपक्ष्यावर प्रखर भाषणांचा प्रयोग करणें, किंबहुना 'शेषं कोपेन पूरयेत्' ही दयानंदी युक्ति लढविणें, यांतहि तो वेळेनुसार मागें घेत नसे.[2] या-खेरीज राष्ट्रविशेषांविषयीं, व्यक्तिविशेषांविषयीं वगैरे त्याचे कित्येक ग्रह पूर्ववयापासून किंबहुना अगदीं बाळपणापासून दृढ होऊन गेलेले होते, त्यांचें पटलहि प्रसंगविशेषीं त्याच्या बुद्धिचक्षूवर येऊन तें प्रकृत विषयाचें यथावत् भान त्यास होऊं देत नसे.

१२. येथवर प्रस्तुत चरित्रांतील नायकाचें सामान्यतः अनेक प्रकारांनीं वर्णन

---

१. बर्क असें ह्मणत असे--

"Johnson appears greater in Boswell's book than in his own."

त्याप्रमाणेंच--

"His conversation, which was one of the most powerful instruments of his extensive influence, was artificial, dogmatical, sententious, and poignant; adapted with the most admirable versatality to every subject as it arose, and distinguished by an almost unparallelled power of serious repartee."

—Sir James Mackintosh.

१. गोल्डस्मिथनें ह्मटलें आहे--

"There is no arguing with Johnson; when his pistol misses fire, he knocks you down with the butt-end of it."

केलें. त्यावरून त्याच्याविषयीं एकंदरीनें आमच्या वाचकांस बरींच कल्पना करतां येईल असें वाटतें. आतां सरते शेवटीं दोन गोष्टींच्या संबंधानें मात्र येथें उल्लेख करून हा अंक आटपतों. या दोन गोष्टी जॉनसनचीं धर्मसंबंधीं व राज्यप्रकरणीं मतें होत. हीं येथें शेवटीं देण्याचें कारण असें आहे कीं, हें सदर सर्व देशांतील विख्यात पुरुषांच्या चरित्रांत आढळणारें नव्हे. उदाहरणार्थ, आपल्या देशांतील एखाद्या प्राचीन किंवा अर्वाचीन पुरुषाचें चरित्र जर कोणीं लिहिलें, तर त्यांत वरील दोन संबंधांचा उल्लेख करण्याचा बिलकुल प्रसंग येणार नाहीं. उघडच आहे कीं, कालिदास व्हिग (लोकपक्षीय) होता कीं टोरी (राजपक्षीय) होता असें कोणी तरी विचारील काय? अथवा न.ना फडनवीसांचीं धर्मसंबंधीं काय मतें होतीं असें जर कोणीं विचारलें तर त्याचें काय उत्तर देतां येईल? अर्थात वरील दोन्ही प्रश्न केवळ निरर्थक होत. पण युरोपांत व विशेषतः इंग्लंडांत तसें नाहीं. अलीकडे दोन तीन शतकें तिकडे धर्म व राज्यव्यवस्था या विषयांवर बहुधा सर्व लोकांची सतत चर्चा चालू आहे; त्यामुळें सर्व विख्यात पुरुषांच्या चरित्रांत वरील दोहों संबंधांचा उल्लेख अवश्य असतो. अलीकडे तर सर्व मनुष्यांस आपलीं हरएक विषयावरील मतें मोकळेपणानें प्रसिद्ध करण्यास बिलकुल अटकाव राहिला नसल्यामुळें 'मूर्ति तितक्या प्रकृति' या न्यायप्रमाणें मनुष्य तितकीं मतें असेंच झाल्यासारखें आहे. युरोपांत बाह्यतः जरी ख्रिस्ती धर्माचा सर्वत्र प्रचार आहे, तरी वस्तुतः पहातां प्रत्येकाचा धर्म निरनिराळा म्हणजे ज्यास जसें वाटेल तसें तो धर्माचरण करतो अशी आंतली स्थिति आहे. कोणी जे भाविक शुद्ध मार्गाचे आहेत ते पवित्र शास्त्रास शिरसावंद्य मानून पाखंड्यांच्या वाऱ्यास सुद्धां उभे राहायाचे नाहींत अशा प्रकारचे पक्के ख्रिस्ती आहेत. कोणी केवळ ख्रिस्ती तर नाहींत, कारण त्यांस त्यांच्या शास्त्रांतील बिंगें सर्व ढळढळीत दिसतात; पण आपल्या पूर्वजांच्या धर्मावर उघडपणें आक्षेप घेणें त्यांस आवडत नाहीं. कोणी रंगेल जे आहेत ते सब झूट है म्हणून सर्वच धुडकावून देतात, त्यांच्या मतें सारे धर्म खरे व सारेहि खोटे! कित्येकांस अलीकडच्यांस तर धर्म कसा तो यावज्जन्म मुळीं माहीतच झाला नाहीं, जन्मास आले तसे कोरेचे कोरेच ते जगांतून बाहेर पडले. यांहूनहि शेवटल्या कोटींचे लोक म्हणजे नास्तिक, ते मुळीं ईश्वरालाच गुंडाळून ठेवतात![1] हें एक प्रकरण झालें.

१. "The various modes of worship which prevailed in the Roman world were all considered by the people as equally true, by the philosopher as equally false, and by the magistrate as equally useful." --Gibbon.

"Sapping a solemn creed with solemn sneer,
The lord of irony, that master spell."

--Byron.

(पुढें चालू).

दुसरें राज्यप्रकरण. यावरहि वरच्यासारखेंच मतवैचित्र्य आहे. कोणी टोरी ह्मणजे राजपक्षाचे आहेत; त्यांचें मत असें आहे कीं, राजा हा ईश्वरांश, ईश्वरानेंच मनुष्यांवर त्यास नेमून ठेविलें आहे, यास्तव त्याचा आज्ञाभंग करणें पाप होय. दुसरे जे वरच्यांचे प्रतिपक्षी आहेत त्यांस व्हिग ह्मणजे लोकपक्षाचे असें ह्मणतात. यांच्या मतें राजा हा केवळ प्रजेनें नेमलेला अधिकारी आहे; यास्तव प्रजा धनी व राजा तिचा चाकर. तिसरे आहेत ते प्राचीन रोमन लोकांप्रमाणें 'राजा' या नांवाचाहि तिटकारा करून लोकसत्ताक राज्य चांगलें असें प्रतिपादन करतात. चवथे तर वरच्या नास्तिकांप्रमाणें सगळें राज्यतंत्र गुंडाळून टाकून सार्वस्विक संप्रदाय असावा ह्मणून भांडतात. सार्वस्विक संप्रदाय ह्मणजे साऱ्या राष्ट्रानें आपआपल्या परीनें उद्योग करून मधमाशांप्रमाणें सार्वजनिक कोठार करावें, आणि त्यांतून ज्यास जें पाहिजे तें त्यानें आपल्या विनियोगार्थ न्यावें. या प्रकारास इंग्रेजींत 'कम्युनिजम' ह्मणतात.[१] असो; तर युरोपांत हल्लीं वरील दोन विषयांच्या संबंधानें इतक्या तऱ्हा आहेत. यांपैकीं जॉनसन यानें पहिल्या दोन उचलल्या होत्या; ह्मणजे तो पक्का ख्रिस्ती व पक्का टोरी असा होता. त्याचीं आईबापें मोठीं सात्विक होतीं; व बाप तर इंग्लंडच्या धर्माचा पुरा अनुयायी असून स्टुअर्ट घराण्याचा मोठा कैवारी होता. तींच मतें लहानपणीं साम्युअलच्या मनांत पक्केपणीं बिंबून जाऊन वयाच्या मानानें उत्तरोत्तर बलावत गेलीं. इंग्लंडच्या धर्माचा तो इतका अभिमानी झाला कीं, बॉसवेलबरोबर तो स्कॉटलंडास जेव्हां गेला तेव्हां तेथील देवळांत त्यानें पाऊलहि ठेवलें नाहीं; त्याप्रमाणेंच ह्यूम एवढा इतिहासकार व त्याच्या परिचयाविषयीं उत्सुक, पण त्यानें त्याचें कधीं मुखावलोकन केलें नाहीं. राज्यप्रकरणींहि त्याचा हेका वरच्यासारखाच होता. त्यांत एवढा मात्र फरक झाला कीं, 'मुद्राराक्षसां'तील अमात्य राक्षसाप्रमाणें त्याची राजभक्ति स्थलांतर पावली. पूर्वी स्टुअर्ट घराण्याचा पक्ष घेऊन हानोवरच्या घराण्यास जसा तो शिव्या देत असे, त्याप्रमाणेंच पुढें हें दुसरें राजकुल जसें दीर्घकाळ प्रतिष्ठापित झालें तशी त्यावरहि त्याची भक्ति बसली. असें होण्यास तिसऱ्या जॉर्ज राजाचें गादीवर येणें, व त्यांतून त्यानें जॉनसन यास वर्षासन करून देऊन एके प्रसंगीं तर स्वतः होऊन त्यानें

"I am one of the very few examples, in this country, of one who has not thrown off religious belief, but never had it: I grew up in a negative state with regard to it. I looked upon the modern exactly as I did upon the ancient religion, as something which in no way concerned me." —*Mill's Autobiography.*

१. मुंबईचे प्रख्यात ब्रह्मचारी केलासवासी विष्णुबोवा यांनीं 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध' ह्मणून एक लहानसा ग्रंथ केला होता, त्यांत वरील प्रकारचींच मतें प्रणीत केलीं होतीं हें कित्येकांस माहीत असेलच.

त्यास मुलाकत दिली, हें कारण होय हें उघडच आहे. मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, तिसऱ्या जॉर्ज राजाच्या वेळीं पुष्कळ दंगाधोपा चालला होता; तर या वेळीं जॉनसननें राजकीय पक्षास आपल्या लेखणीनें बरीच मदत केली. या राजकारणी लेखांविषयीं मागें यथास्थलीं लिहिलेंच आहे.

येथवर खुद्द चरित्राचा भाग संपूर्ण झाला. आतां आरंभीं संकल्पांत सुचविल्याप्रमाणें एक सदर मात्र शिल्लक राहिलें आहे, तें पुढील अंकांत घेऊं.

भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम्।[1]

रघुवंश.

अंक ४०–(१) पूर्वचरित्रापासून बोध. (२) सतत उद्योग. (३) गृहाचार. (४) धर्म.

१. गेल्या पांच अंकांत प्रस्तुत महापंडिताचें चरित्रकथन व त्याचें सामान्यतः स्वभाववर्णन इतकें सर्व आटपलें. आतां यापुढें मागील अंकाच्या शेवटीं सुचविल्याप्रमाणें पूर्वकथित चरित्रापासून वाचकांनीं कोणकोणता बोध ग्रहण करायाचा हें लिहावयाचें. प्रकृत चरित्राच्या उपोद्घातांत त्यापासून होणारे फायदे जे सांगितले आहेत ते आमच्या वाचकांपैकीं विशेष बहुश्रुत व मार्मिक जे असतील त्यांस झाले असतील यांत संशय नाहीं; ह्मणजे जॉनसनचा एकंदर जीवनवृत्तांत जो दिला तो वाचतांना त्या त्या स्थलीं जो जो उपदेश त्यांच्या मनावर ठसायाचा व जे जे विचार त्यांच्या मनांत उत्पन्न व्हावयाचे ते ते त्यांस स्थलविशेषीं सुचले असतील. पण आमच्या एकंदर वाचकांची स्थिति तितपत होण्यास अद्याप पुष्कळच काळ लोटला पाहिजे. वरील दोन्ही गुण जे बहुश्रुतपणा व मार्मिकता त्यांचा त्यांचे ठायीं नुकता कोठें उदय होऊं लागला आहे. यास्तव वरील चरित्रापासून उपलभ्य जो उपदेश तो तात्पर्यादाखल फोड करून सांगणें अवश्य आहे. शिवाय जॉनसनसारख्या दूरद्वीपस्थ ग्रंथकाराचें एवढें सविस्तर चरित्र एतद्देशीयांस कळून काय करायाचें आहे असें कित्येकांस वाटून त्यांस कदाचित् त्याचा कंटाळाहि आला असेल; व विषयांची सामग्री खुंटल्यामुळें आह्मी कांहीं तरी मजकूर वाचकांवर लादून देत आहों असाहि कोणास अंदेशा येऊन चुकला असेल; यास्तव येथपर्यंत झालेल्या कथानकापासून किती महत्त्वाच्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत त्या उघड करून दाखविणें जरूर झाहे. तसें केलें असतां चरित्रलेखनाकरितां प्रस्तुत विषयाचीच कां निवड झाली हेंहि कळून येईल.

२. प्रस्तुत चरित्राच्या साग्र अवलोकनापासून पहिली मोठी गोष्ट ही लक्षांत येते कीं, जॉनसन हा नुसता पुस्तकवाल्याचा मुलगा असून पुढें जो एवढ्या अप्रतिम योग्यतेस चढला तें त्याच्या विशाळ बुद्धीचें तर फळ आहेच, पण बुद्धीपेक्षां निश्चयाचें

---

१. "अशा पुरुषांचा जन्म लोकाभ्युदयार्थ होत असतो।"

बळ वरील उन्नतीस विशेष कारण झालें असें ह्मटलें पाहिजे. हें बळ ज्यास अनुकूल नाहीं तो केवढाहि अचाट बुद्धीचा असला तरी तीं बुद्धि त्यास कांहीं कामास पडायाची नाहीं; वाऱ्यावांचून अग्नि जसा निर्बळ त्याप्रमाणेंच मोठी जाज्वल बुद्धिहि दृढ निश्चयावांचून केवळ पंगु होय. जें काम हातीं धरलें तें शेवटास न्यावयाचेंच अशा अटीनें जो त्यास प्रवृत्त होईल, त्याच्याच हातून तें सिद्धीस जाईल, व अशाच निश्चयाचा मनुष्य विख्यातीस चढेल. जॉनसननेंच कोठेंसें ह्मटलें आहे कीं, मोठमोठीं कामें जीं उठतात तीं केवळ बुद्धिसामर्थ्यावर उठत नसतात, तर सतत उद्योग व निर्धार यांच्या बळावर उठतात. त्याचींच गोष्ट पहा बरें, कीं इंग्लिशसारख्या परिपक्वतेस येऊन पोंचलेल्या भाषेचा कोश पहिल्याप्रथम आणि पुनः एकट्यानें करायाचा ह्मणजे केवढें सहासाचें व केवढ्या अचाट श्रमाचें काम ! सदरहू पुस्तक साद्यंत वाचायाचें किंवा लिहून काढायाचें एवढेंच काम कोणाच्या माथीं मारलें समजा, तर त्यास आपल्या डोक्यावर केवढा बोजा ठेवलासा वाटेल बरें ! त्याची छाती अगदीं दडपून जाऊन हें कोठून लवांड गळ्यांत पडलें असें त्यास वाटेल यांत संशय नाहीं. मग जी अवाढव्य इमारत नुसती डोळ्यांनीं पहाणें किंवा आयता मालमसाला असतां पुनः रचणें हें एवढें दुर्धर काम वाटतें, ती स्वतः खाणींतून दगड काढून झाडें तोडून चुना कमावून पायापासून उभी करणें ह्मणजे तर केवढा पर्वतप्राय उद्योग आहे ! पण तोहि प्रस्तुत प्रचंड पंडितानें सहज लीलेनें[1] शेवटास नेला; व मध्यें अनेक प्रकारचीं विघ्नें व संकटें आलीं तरी तीं जुमानलीं नाहींत. हें तर काय, पण जॉनसनचें बुद्धिवैभव एवढें अपार

१. वरील शब्दांचा सार्थकता पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल.—

"Dr. Adams found him one day busy at his Dictionary, when the following dialogue ensued—*Adams.* "This is a great work, sir. How are you to get all the etymologies?" *Johnson.* "Why, sir, here is a shelf with Junius, and Skinner, and others; and there is a Welsh gentleman who has published a collection of Welsh proverbs, who will help me with the Welsh." *Adams.* "But sir, how can you do this in three years ?" *Johnson.* "Sir, I have no doubt that I can do it in three years." *Adams.* "But the French Academy, which consists of forty member, took forty years to compile their Dictionary." *Johnson.* "Sir, thus it is. This is the proportion. Let me see; forty times forty is sixteen hundred. As three to sixteen hundred, so is the proportion of an Englishman to a Frenchman." With so much ease and pleasantry could he talk of that prodigious labour which he had undertaken to execute." —Boswell's *Life.*

होतें व तो एकदां अंग मोडून बसला ह्मणजे काम सपासप उडविण्याची त्याची अशी विलक्षण हातोटी होती कीं, ज्या कोशरचनेच्या कामाखालीं कोणी सामान्य मनुष्य चिरडून जाऊन डोकें वर उलण्याचेंहि त्यास सामर्थ्य रहातें ना, त्याच्याच ऐन गर्दीत त्यानें एक काव्य रचलें, एक नाटक संपूर्ण केलें, व त्याच्या ग्रंथांपैकीं उत्तम मानिलेला जो 'रांबलर' त्याचे दोनशें आठ अंक लिहिले! बरें इतकेंहि करून स्वारी पुनः थकली काय? नाहीं. थकून करते काय? कोश संपून वर्गणीदारांच्या हातीं तो समग्र जाऊन पडला व साऱ्या राष्ट्राच्या अभिमानास व हर्षास कारण झाला; पण कोशकारांची अवस्था काय? 'इंग्लिश भाषारूप समुद्रा'चें जरी त्यांनीं समंततः पर्यटन केलें, तरी पर्यटन करणारा जसा निघालेल्या जागीं येऊन पुनः लागतो, त्याप्रमाणें ते नेमकेच पूर्वस्थितीशीं येऊन पुनः भिडले; ह्मणजे पुनः बाबूके भाई दरवेशी ही अवस्था कांहीं चुकली नाहीं! एवढा इकडचा डोंगर इकडे केला, पण पुनः हातातोंडाशीं गांठ आहे ती आहेच. वरील प्रचंड उद्योग संपतांच पूर्ववत् अल्पस्वल्प उद्योग करून दोन प्रहरची वेळ टाळावी हा त्याचा क्रम लागलाच सुरू झाला. असो; तर अशा विपत्तींतहि सदरहू ग्रंथकारानें इकडे मोठमोठाले ग्रंथ रचले, व आपलें सर्व आयुष्य विद्यासंपादनांत व विद्याप्रसार करण्यांत खर्चलें, हें मोठें विलक्षण नव्हे काय? तर प्रस्तुत चरित्रापासून सर्व लोकांनीं व विशेषतः आमच्या नवीन विद्वानांनीं सतत उद्योग करण्याविषयीं उपदेश घ्यावा. हें नवीन मंडळीस विशेषेंकरून सांगण्याचें प्रयोजन असें आहे कीं, जॉनसननें आपल्या देशबंधूंची जी सेवा केली, ती करण्याचें सामर्थ्य व तिचा बोजा सारा त्यांच्याच डोक्यावर आहे. आणि सामान्यतः पहातां ही देशकल्याणाच्या कामाची धुरंधरता त्यांच्याकडे आहे, व ती वहिवाटण्यास वरील गुणाची तर अत्यंत आवश्यकता आहे, यास्तव त्यांनींच त्याच्या संपादनार्थ विशेषतः झटलें पाहिजे. आजपर्यंत त्यांचा क्रम जो चालत आला आहे, कीं सरकारच्या मेहेरबानीनें व देशाच्या खर्चानें जी विद्या त्यांस दिली जाते तिचें वास्तविक चीज करण्याचें कधीं स्वप्नांतहि न येऊन गप्पाटप्पा, ख्यालीखुशाली वगैरेंतच बहुधा कालक्रमणा करायाची; ज्या गोष्टी आपल्या हातून होण्यासारख्या आहेत त्याविषयीं काडीइतकाहि प्रयत्न न करतां, नवे धर्म स्थापणें, जुने अनादिसिद्ध चालत आलेले प्रचार मोडून टाकून कोणीं कधीं न ऐकिलेले असे नवे बळेंच सुरू करणें, अशासारख्या रिकाम्या उठाठेवी करीत बसायाचें; सुधारणा करण्याच्या मिषानें परकी लोकांचे निंद्य आचार प्रचारांत आणूं पहायाचें; व ज्यांस सज्ञान करण्याकरितां सरकारानें त्यांस रानटी स्थितींतून काढून सुशिक्षित केलें, त्यांस स्वतः तर ज्ञानाचा लेशहि पोंचविण्याची कधीं तजवीज न करितां उलटा त्यांचा उपहास मात्र करून फुकाची फुशारकी मिरवायाची व आपले हात आज गगनाला लागलेले आहेत, तेच आपण कांहीं काळापूर्वी काय

होतों याचें बिलकूल स्मरण ठेवायाचें नाहीं;—हा सर्व प्रकार अगदीं बदलून गेला पाहिजे. इंग्रेजांसारख्या परम ज्ञानसंपन्न राष्ट्राशीं सुदैवेंकरून एतद्देशीयांचा जो योग झाला आहे त्याचें जर साफल्य व्हावयाचें असेल, व स्वातंत्र्यनाशरूप जी या देशाची महाहानि झाली आहे तिची जर भरपाई व्हावयाची असेल, तर लोकसुधारणेचे खांब ह्मणविणारांनीं सध्यांपेक्षां फार निराळ्या तऱ्हेनें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. हल्लीं जर त्यांस पोकळ घमंडी वाटते, कीं युनिवर्सिटींतून आपण पार पडलों कीं ज्ञानाची अत्यंत सीमा आपण गांठली, ती त्यांनीं अगोदर दवडली पाहिजे. विद्यालयांतील सर्व संस्कार होऊन बाहेर पडलेला मनुष्य हा खरोखर पहातां पांखवीख फुटून घरट्याबाहेर पडलेल्या पांखराच्या बच्चासारखा होय. ह्मणजे त्यास त्याचीं आईबापें ज्याप्रमाणें पोसून उडायाजोग्या स्थितीपर्यंत आणून पोंचवितात, त्याप्रमाणेंच आमचे विद्यालयीन पंडितहि तीन चार वर्षांच्या शिक्षणाच्या योगानें सामान्यतः कोणत्याहि विषयांत स्वतःच्या परिश्रमानें प्रवेश होई इतक्या प्रगल्भतेला येऊन पोंचलेले असतात, इतकेंच काय तें. मग ही ज्यांची स्थिति त्यांनीं ज्ञानसमुद्राचें पैल तीर गांठलें, कीं ते अलीकडच्याच तीरावर आहेत हें कोणासहि समजेल. पांख फुटलेल्या पक्ष्यास आकाशक्रमण जसें पुढें करावयाचें असतें, त्याप्रमाणें विद्यालयाच्या बंधांतून जो सुटला तो विद्यासमुद्रावर सफर करण्यास नव्या नाविकाप्रमाणें तुकता तयार झालेला असतो. तर ही वास्तविक स्थिति मनांत आणून आमच्या होतकरू लोकांनीं अल्प विद्येंत संतोष न मानतां व वृथा गर्वानें फुगून न जातां जॉनसनची ज्ञानप्राप्तीविषयीं जशी पराकाष्ठेची उत्कंठा होती व तो स्वतः मोठमोठ्या ग्रंथकारांस वंद्य असतांहि शेवटपर्यंत त्याचें अध्ययन जसें सुटलें नाहीं, तसाच त्यांनीं क्रम ठेवला पाहिजे.[1] त्याप्रमाणेंच परीक्षांच्या तडा-

१. **जॉनसन** यास पुस्तकें वाचण्याचा भारी नाद असे. तो स्वभावतः आळशी असल्यामुळें कोणतेंहि पुस्तक तडीस नेऊन पोंचवीत नसे; पण अर्धें मुर्धें वाचल्यानेंहि त्याच्या लक्षांत ग्रंथांतील एकंदर मतलब येई. अशा रीतीनें त्यानें जितके ग्रंथ वाचले होते तितके त्या काळीं थोडक्यांनींच वाचले असतील. असें असतांहि आपला अभ्यास व्हावा तसा होत नाहीं हें त्याच्या मनास किती जाचत असे हें त्याच्या रोजनिशीवरून दिसून येतें. या रोजनिशा व त्याचे इतर कागदपत्र चट सारें छापून काढलें आहे. यांतले कांहीं चुटके पुढें देतों. ते वाचले असतां कशास कांहीं ठिकाण नसतांहि जे आपणास कृतकृत्य मानीत असतील व मूर्खपणांत काळ घालवीत असतील त्यांस आपलें क्षुद्रत्व भासल्यावांचून रहाणार नाहीं !—

I resolve,

To read good books; to study theology.

To treasure in my mind passages for recollection.

To rise early; not later than six, if I can; I hope sooner, but as soon as I can.

(पुढें चालू).

क्यांतून सुटून आपला चरितार्थ व्हावयाला लागला ह्मणजे आपण कृतकृत्य झालों, व इतःपर कोणतीहि कर्तव्यता उरली नाहीं, हीहि कोती समजूत वरील मंडळीनें सोडून दिली पाहिजे. वर विद्येच्या संबंधानें जसें सांगितलें कीं, जें तीर त्यांस पलीकडचें

To keep a journal both of employment and expenses.
To take care of my health, by such means as I have designed.
To set down at night some plan for the morrow.

Resolved,
To apply to study.
To reclaim imagination.
To rise early.
To study religion.
To go to church.
To drink less strong liquors.
To keep a journal.
To put books in order.

I hope,
To rise at eight.
To be temperate in food.
To waste less time.
To regulate my sleep as to length and choice of hours.
To read a certain portion every week.

I have read five books of Homer, and hope to end the sixth to-night.

I this day read a great part of Pascal's life.
I tried in this summer to learn Dutch, but was interrupted by inflammation in my eye.

Almighty and merciful God, I again appear in thy presence the wretched misspender of another year, which Thy mercy has allowed me.....This year has passed with so little improvement, that I doubt whether I have not rather impaired than increased my learning.....I have now begun the sixtieth year of my life. How the last year has past, I am unwilling to terrify myself with thinking.....When I look back upon resolution of improvement and amendment, which have year after year been made and broken, either by negligence, forgetfulness, vicious idleness, casual interruption, or morbid infirmity; when I find that so much of my life has stolen unprofitably away, and that I can descry by retrospection scarcely a few single days properly and vigorously employed; why do I yet try to resolve again? I try because reformation is necessary, and despair is criminal. I try in humble hope of the help of God.

वाटतें तें वस्तुतः पहातां अलीकडचें आहे; त्याप्रमाणेंच जेथें कर्तव्यतेची त्यांच्या बुद्धीनें समाप्ति झाली तेथेंच खरोखरी पाहिलें असतां तिचा नुसता आरंभ आहे असें त्यांनीं समजावें. उघडच आहे कीं शिपायास कवाइतींत तयार करून त्यास जाम्या-निम्यानिशीं बाहेर पाठवून दिला, ह्मणजे त्याच्या कामाची सुरवात झाली ह्मणायाची का अखेर झाली ह्मणून समजायाची ? कवाइतीची अखेर झाली खरी, पण ती होऊन पुरा शिपाई तयार होतांच खऱ्या कामाची सुरवात झाली असें समजायाचें. तर याप्रमाणें विद्यालयांतील सर्व अध्ययन पुरें होऊन ज्यांचा शेवटला सोहळा झाला, व इलाखाधिपतींचा गुरुमंत्र ज्यांच्या कानीं पडला, त्यांनीं लगेच दुसऱ्या दिवसापासून आपल्या साऱ्या बुकांस एकदम रजा देऊन टाकावी, व शिकंदर बादशाहा ज्याप्रमाणें सारें जग जिंकून बाबिलोन शहरीं स्वस्थ येऊन पडला, व जे जे मनास वाटले ते ते चार करून आपल्या परम देदीप्यिमान कीर्तीस डाग लावून घेऊं लागला, त्याप्रमाणेंच आमच्या नव्या मंडळीपैकीं बहुतेकांचा प्रकार आढळून यावा ही केवढी दिलगिरीची गोष्ट आहे ! जॉनसनसारख्यांचा कित्ता घेऊन वरील मंडळीनें थोडा बहुत जरी आजपर्यंत उद्योग केला असता तरी त्यांच्या विद्वत्तेचें किती चीज झालें असतें व लोकांस किती उपयोग घडता ! युनिवर्सिटी स्थापन होऊन आज वीस वर्षें झालीं, व त्यापूर्वीहि कित्येक वर्षांपासून इकडे इंग्रेजी विद्येचा प्रचार सुरू झाला होता; मग इतक्या वीस तीस वर्षांत लोकसुधारणेला किती साह्य झालें असतें ! तरुण जनांस वाचण्यालायक अशीं नाना प्रकारचीं मनोरंजक पुस्तकें, बहुश्रुत लोकांच्या उपयोगीं पडण्यासारखे तन्हेतऱ्हेच्या माहितीचे चमत्कारिक ग्रंथ; विद्यार्थ्यांस इष्ट असे देशोदेशींचे संक्षिप्त इतिहास; निरनिराळ्या शास्त्रांवर सुबोध ग्रंथ; त्याप्रमाणेंच या देशांतील जुनी कविता व जुना इतिहास यांचा संग्रह,—कीं जो होण्याची सोय दिवसेंदिवस कमी होत चालली आहे; तसेंच साऱ्या भारतवर्षीयांच्या किंबहुना साऱ्या जगाच्या प्रीतीचें व पूज्यबुद्धीचें स्थान झालेली जी प्राचीन गीर्वाण भाषा, तींत काय काय ज्ञानभांडार आहे, तिच्या खालोखाल मानलेली जी फारशी भाषा तींत काय मौज आहे, याविषयीं शोध; हिंदुस्थानी, गुजराथी, वगैरे एतद्देशीय भाषांचा मराठीशीं कितपत संबंध आहे, व्याकरणरीत्या सर्वांचा कसा कसा मेळ आहे इत्यादि विचार;—या या प्रकारें उद्योग करण्याचें आमच्या पुढारी मंडळीनें जर मनावर घेतलें असतें तर आजला लोकांची किती निराळी स्थिति असती ! यासारखेंच देशी शेतीकडे व देशी व्यापाराकडे जर कोणीं लक्ष दिलें असतें; व आपल्या इंग्रेजी ज्ञानाचा लाभ आपल्या देशबंधूंस त्यांच्या भाषेच्या द्वारें करून दिला असता, व व्यावहारिक कृत्यांच्या संबंधानेंहि त्यांस उपयुक्त माहिती करून दिली असती, तर त्यांस व सर्वांस केवढें भूषण झालें असतें ! आतां एक मात्र खरें, कीं वरील क्षुल्लक कृत्यांकडे आमच्या पंडित मंडळीची बहादरी

सगळी खर्चून जाती, ह्मणजे मुंबईस प्रार्थनासमाजमंदिर उठतेंना, पुण्यास हत्तीची बडी वरात मिरवितां आली नसती, व टळटळीत अवसेच्या शुभमुहूर्तावर मंगलकार्यहि न गाजतें ![1]

प्रस्तुत ग्रंथकारानें इतकें अध्ययन केलें, व इतका उद्योग केला यावरून आमच्या देशांतिल बुद्धिमान् लोकांनींहि सामान्यतः एक मोठी गोष्ट शिकण्यासारखी आहे. ती ही कीं, मनुष्याची बुद्धि जात्या कितीहि प्रखर असली तरी अभ्यासावांचून व उद्योगावांचून तिचें कांहीं तेज पडायाचें नाहीं. पहा कीं, एखादी जमीन उत्तम लागवडींची जरी असली, तरी तिची मालमशागत जर नीट केली नाहीं, तर तिचें स्वरूप पाहिजे तसें वठायाचें नाहीं. मोठा उत्तम जातीचा जरी आंबा घेतला तरी तो रुजून त्याचें झाड होऊन तें पूर्ण दशेस आल्याविना त्याचा गुण प्रगट व्हावयाचा नाहीं. मोठा हपूसचा आंबा आहे ह्मणून लहानसा रोपडा असतांहि त्याचीं पानें चाखलीं तर गोड

१. जी एकदां गतभर्तृका झाली तिला पुनः संसारसुखाची गोडी लावून देण्याचा जो उद्योग आमच्या देशहितेच्छूनीं सदय अंतःकरणेंकरून उपस्थित केला आहे, त्यावर कोणत्याहि तऱ्हेचा आक्षेप केलेला त्या मंडळीस बहुधा खपणार नाहीं. पण आपला व पुष्कळ लोकांचा अभिप्राय कळविणें हें ज्या अर्थी पुस्तकर्त्याचें कर्तव्य होय–मग तो तो अभिप्राय सुधारणेच्या पक्षास अनुकूल किंवा प्रतिकूल असो !–त्या अर्थी वर सांगितलेला अमावास्येचा जो विवाह झाला तो चमत्कारिकच असें ह्मटल्यावांचून रहावत नाहीं. पुनर्विवाह हा पूर्णपणें शास्त्रसंमत असून पुरातन काळीं चालू होता, व तोच मार्ग केवळ रूढि नसल्यामुळें आजपर्यंत बंद पडला होता, तो आह्मीं पुनः सुरू करणार असें जर त्याचे पक्षकर ह्मणतात, व जगद्गुरूंस अध्यक्षस्थानीं बसवून त्यांजकडून त्याबद्दल शास्त्रार्थ मिळण्याबद्दल जर त्यांनीं एवढी खटपट केली; तर आज पांच सात वर्षें लोटलीं नाहींत तोंच सारें शास्त्र एकीकडे गुंडाळून ठेवून सूर्यचंद्राच्या दृष्टीआड व पुरतें वेदाक्षरहि न उमटूं देतां लुटुपुटीच्या खेळाप्रमाणें सारा विधि एका चार घटकेंत आटपून टाकला यांत त्यांचा काय मतलब असेल तो असो ! सुमारें दोन तीन वर्षांपूर्वी येथील एक नामांकित विद्वान् बंगाल हिंडून माघारीं आले होते. व पुढें आपल्या प्रवासाची हकीकत त्यांनीं समेत जेव्हां निवेदन केली, तेव्हां तिकडील एका ब्राह्मणाविषयीं त्यांनीं सांगितलें कीं, त्यानें ब्राह्मविधीनें एका शूद्रीशीं पुनर्विवाह केला; व असें केल्यानें एकींत तीन निरनिराळ्या सुधारणा त्यानें केल्या. त्या अशा कीं, एक तर पुनर्विवाह; दुसरा जातिभेदभंग; आणि तिसरा, विवाहाचा अपूर्व प्रकार; ह्मणजे पूर्वीचें मंत्रातंत्राचें सारें बंड मोडून टाकून नवी सुधारलेली पद्धत सुरू करणें. मग अशा प्रकारचींच कांहीं दुहेरी तिहेरी सुधारणा करण्याचा तर वऱ्हाड्यांचा बेत नसेल ना ! असें असेल तर आह्मी त्यांस अशी सूचना करतों कीं, पुनः जेव्हां एखादी अशी शिकार सांपडेल तेव्हां आणखीहि एक दोन नव्या सुधारणा त्यांनीं अमलांत आणाव्या. त्या या कीं, विवाहभोजनास ब्राह्मणांस जें निमंत्रण करतात त्याऐवजीं पुढल्या समारंभास सत्यशोधक मंडळी ऊर्फ जोतिबा फुल्यांची शिष्यशाखा यांस आमंत्रणें द्यावीं, व याज्ञिक चालविण्यास कोणी रेणातीरवासी गौरवर्ण आचार्य शर्मण्य देशाहून मागवावा ! !

लागतील काय ? अथवा वाफेचें उदाहरण घ्या. हिच्या अद्भुत शक्तीचें या काळांत कोणासहि वर्णन द्यावयाला पाहिजे असें नाहीं. पण तिचें सामर्थ्य प्रगट होण्यास तिची तशी योजना झाली तर उपयोग. ती न झाली तर जी हजारों खंडींचें ओझें वायुवेगेंकरून एका देशांतून दुसऱ्या देशांत नेऊन टाकते, पर्वतप्राय लाटांस व वाऱ्याच्या सोसाट्यांस न जुमानतां मोठमोठ्या सागरांवरून अग्निनौकांस लोटीत नेते, व हजारों चाकांस एकसमयावच्छेदेंकरून गति देऊन अवघ्या राष्ट्राचें विणकाम एखाद्या महाराक्षसीप्रमाणें एकटी पतकरते, तीच एरवीं सैपाक घरांत चूलीवरील भांड्याचें झांकण नुसती थडथडावीत बसेल इतकेंच ! तर मूळची बुद्धि कितीहि उत्कृष्ट असली, तरी तिचें तेज पडण्यास उद्योगाची अपेक्षा आहे. ही गोष्ट आमचे लोक अलीकडे विसरत चालले आहेत. कोणाच्या ठायीं कोणताहि गुण असो; त्याची अंमळ प्रशंसा झाली कीं पुरे, तेथें गर्व जडलाच. गर्व जडला कीं, उद्योगाचें मान कमी झालेंच. असें होतां होतां लवकरच अशी स्थिति येते कीं, इसापनीतींतील ससा जसा अंमळ दूर धांवून लागलाच वृक्षछायेंत शीतल जागीं गाढ निद्रिस्त झाला, त्याप्रमाणेंच आरंभीं मोठे चलाख दिसणारे विद्यार्थी लवकरच प्रशंसेनें विघडून जाऊन अगदीं कुचकामाचे होऊन जातात, किंवा युनिवर्सिटीच्या परीक्षांपर्यंत त्यांची मजल पोंचलीच, तर नानाप्रकारचीं ढंगें व व्यसनें त्यांस जडून त्यांच्या योगानें देशास भूषण यावयाचें तें तर एकीकडे राहून उलटा कलंक मात्र लागतो. बरें, एवढी वाहवा जिकडे तिकडे होऊन त्यांच्या पदरीं विद्या तरी कितीशी पडते म्हटलें तर ती अर्थात् थोडीच; कारण विद्यापर्वताची चढण अगोदर कठिण, मग त्यांत पायथ्यापासूनच 'ग' महाराज पाटुंगळीस चिकटल्यावर मोठा खंबीर चढणारा असला तरी त्याची किती मजल होणार ! तर प्रस्तुत ग्रंथकाराच्या चरित्रावरून आमच्या वाचकांनीं 'ग' रूप रोगावर महामात्रा, घ्यावी. त्यांनीं असें ध्यानांत आणावें कीं, जॉनसनची एवढी लोकोत्तर बुद्धि होती तरी त्याचा उद्योग राहिला नाहीं. आपण बुद्धिमान् आहों तेव्हां जडबुद्धीच्या सामान्य लोकांप्रमाणें आपणास सतत अध्ययनाची काय गरज आहे, इतरांस पुस्तकांपासून व शिक्षकांपासून जें ज्ञान प्राप्त होणार तें आपल्या ठायीं जिवंत झऱ्याप्रमाणें आपोआपच प्रादुर्भूत होईल, या मूर्खत्वाच्या भ्रमांत तो कधींहि पडला नाहीं. तर ज्ञानप्राप्तीचा जो एकच मार्ग,—कोणता ? तर अध्ययन, (आतां हा कोणास बुद्धिमत्त्वास्तव सुगम होतो, कोणास स्वाभाविक जाड्यास्तव दुर्गम असतो, इतकाच काय तो भेद)—तोच प्रस्तुत महापंडितानें शेवटपर्यंत क्रमिला. हें एक झालें. दुसरी गोष्ट अशी कीं, बुद्धिमत्तेचा उपयोगहि इकडे कांहीं निराळाच पहाण्यांत येतो. या गुणाबद्दल ज्याची ख्याति व्हावयाला लागते त्याला वाटूं लागतें कीं, मी कांहीं इतरासारखा नाहीं, तेव्हां माझें वर्तन अर्थातच जगानिराळें असलें पाहिजे. ही समजूत एकदां डोक्यांत शिरली म्हणजे तिचे

परिणाम कोठवर जाऊन थडकतील याचा नेम नाहीं. विक्षिप्त आचार, कुत्सित मतें, अद्वातद्वा भाषण इत्यादि विशाल बुद्धीचे तरंग जितके प्रगट होतील तितके थोडे! त्याप्रमाणेंच आपणाखेरीज कोणालाहि मानायाचें नाहीं, कोणाची प्रसिद्धि होऊं लागली असतां त्यास विरोध करायाचा, जेथें तेथें जेव्हां तेव्हां आत्मप्रतिष्ठा गात बसायाचें, हाहि प्रकार नजरेस येतो. सारांश, ज्याप्रमाणें रूपवत्त्वाचा अभिमान स्त्रियांस कधीं कधीं कुमार्गावर घालवितो व संपत्तीचा गर्व सामान्यतः शीलभ्रंशास कारण होतो, त्याप्रमाणेंच बुद्धिमत्त्व हेंहि वर सांगितल्याप्रमाणें चित्तास विकार करतें. पण जॉनसनच्या ठायीं बुद्धिवैभव एवढें अपूर्व वसत असतां त्याच्या योगानें वरील दुष्ट विकार कोणतेहि उत्पन्न झाले नाहींत. त्याची उलटी अशी समजूत असे कीं, ईश्वरानें ज्या अर्थीं आपल्या ठायीं बुद्धिविशेष ठेवला आहे त्या अर्थीं त्याचा उपयोग पूर्णपणें करून परोपकाराकडे त्याचा जितका व्यय होईल तितका अवश्य केला पाहिजे; तो न केला तर परमेश्वराचा मी दोषी होईन.[1] त्याप्रमाणेंच इतरांचा अवमान करणें, त्यांची प्रसिद्धि झालेली न खपणें, हेंहि त्यास बिलकूल माहीत नव्हतें. उलटें त्याचें असें मात्र असे कीं, आपल्याकडून होईल तितकें साह्य करून दुसऱ्यांस प्रसिद्धीचा मार्ग सुगम करून द्यावयाचा. गोल्डस्मिथ कवीस त्याचा आश्रय न मिळता तर कदाचित् शेवटपर्यंतहि त्याची विशेष ख्याति न होती.

३. मागील चरित्रावरून दुसरी शिकण्यासारखी गोष्ट झटली झणजे जॉनसनचा गृहाचार होय. गृहाचार झणजे घरांतील वागणूक ही पुष्कळ वेळां मोठमोठ्या लोकांची सुद्धां बाह्याचरणाहून झणजे जगांत जी त्यांची वर्तणूक दिसते तिजहून अत्यंत भिन्न असते. जे बाहेर बोलायाला चालायाला मोठे गोड, दिसायाला मोठे सभ्य, व सकुदर्शनीं लोकहितार्थ झटणारे अशा प्रकारचे वाटत असतात, तेच कधीं कधीं उंबरठ्याच्या आंत पाऊल ठेवतांच कपाळास आठ्या पडणारे, नानाप्रकारच्या दुराचारांत निःशंक रमणारे, व पहिल्या प्रतीचे आपमतलबी असे असतात. हा चमत्कारिक विरोध जगांत अनेकशः आढळत असतो, यास्तव प्रसिद्ध पुरुषांच्या लौकिक चरित्रांच्या शेवटीं त्यांच्या गृहचरिताचा नेहमीं वृत्तांत दिलेला असतो. हा मागील चरित्रांत दाखल झाला आहेच; व त्यावरून जॉनसनची घरगुती वागणूक झणजे आईबापाशीं, बायकोशीं, चाकराशीं वगैरे त्याचें वर्तन कोणात्या तऱ्हेचें होतें हें वाचकांस कळलेंच आहे. आतां एतद्दे-

१. जॉनसनची वरील समजूत त्यानें एके ठिकाणीं दाखल केली आहे—

"Of him to whom much is given much shall be required."

या वाक्याप्रमाणेंच जॉनसननें आपला कार्यभागहि आटपला. तो झणत असे कीं, मीं आपल्या वांट्याचें लिहून चुकलों आहे (I have written my share). राजाची व त्याची मुलाखत होऊन जो भाषणप्रसंग झाला त्यांतहि वरच्यासारखाच उद्गार निघाला आहे.

शीय लोकांनीं वरील वर्तनापासून काय बोध ग्रहण करायाचा तो सांगतों. प्रथमतः चाकर या सदरावर कांहीं विशेष लिहिण्यासारखें नाहीं. कां कीं, सेवकपरिवार बाळगण्याची ऐपत आमच्या लोकांत थोड्यांसच आहे, व ज्यांस आहे त्यांचें त्यांशीं वर्तनहि दूषणास्पद असतें असें नाहीं. इतर प्रकारच्या बऱ्याच सुधारणा जरी आमच्या घरांतून शिरल्या आहेत, तरी चाकरांस धरून धोपटण्याची व त्यांस बूट मारण्याची तऱ्हा अद्याप कोठें दृष्टीस पडूं लागली नाहीं. यास्तव दुसऱ्या दोन संबंधाचें मात्र येथें लिहितों. जॉनसनचें आपल्या बायकोवर केवढें प्रेम होतें हें यापूर्वी सांगितलेंच आहे; तथापि तिचा शह आपणावर बसूं न देण्याविषयीं तो जपत असे, याविषयींहि एक आख्यायिका मागें दिली आहे. तिजकडे आमच्या नवीन मंडळीनें अंमळ विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. कां कीं, इंग्रेजांचे आचार झटले झणजे ते सर्वथा निर्दोष समजून ते सुधारणेदाखल इकडे चालू करण्याचा कांहीं दिवसांपूर्वी जो सपाटा असे तो आतां जरी बराच मोडत चालला आहे, व कुलांगनांचें परम भूषण झणून मानलेली वेडी लज्जा टाकून देऊन नवऱ्याच्या हातांत हात घालून चालणाऱ्या सुधारलेल्या स्त्रियांचें मानहि अलीकडे जरी कमीच होत चाललें आहे; तरी सामान्यतः पहातां कांहींसा स्त्रैणत्वाकडेच लोकांचा कल दृष्टीस पडतो. हा प्रस्तुत पंडिताच्या वर्तनाचा कित्ता घेऊन त्यांनीं मोडला पाहिजे. आतां हें खरें कीं, बायकोस आपणावांचून दुसरी गतिच नाहीं, आपण पाहिजे तसा तिजवर अंमल चालवला असतां चालणार आहे हें लक्षांत आणून तिला सतत जाच करणें हें परम अधमाचें कृत्य आहे; व रथचक्रन्यायानें स्त्रीचा अधिकार संसारकृत्यांत पुरुषाच्या बरोबर आहे यास्तव तोहि तिला देणें हें रास्त आहे; परंतु 'अबला यत्र प्रबला' असा प्रकार घरांत असून पुरुषानें निर्माल्य होऊन बसणें, किंवा वेडे लाड करून बायकोस वडील माणसांहून शिरजोर करून ठेवणें हीं दोन्ही कृत्यें अत्यंत लज्जास्पद होत. यास्तव स्त्रीचा बंदा होऊन न रहातां तिजशीं प्रेमभावानें वागण्याचें उदाहरण प्रस्तुत चरित्रापासून घेण्यासारखें आहे. याप्रमाणेंच जॉनसननें पहिला संबंध तुटला असतां शेवटपर्यंत दुसरा जोडण्याची बिलकुल इच्छा केली नाहीं व यावज्जन्मांत दहा बारा वर्षें संसारसुखाचा अनुभव जो त्यास घडला, तितक्यांतच त्यानें संतोष मानला, हा प्रेमातिशय व मनोनिग्रहहि अत्यंत विचारार्ह होय. आमच्या जुन्या लोकांस स्त्रीचे हक्क मुळींच न समजून नवी बायको करणें व नवा जोडा विकत घेणें या दोन्ही गोष्टी सरासरी सारख्याच वाटतात, व त्यामुळें चार चार पांच पांच पर्यंतहि बायका करण्याचा प्रघात आजपर्यंत चालत आला आहे हें सर्वांस माहीत आहेच; त्याविषयीं आह्मांस बोलणें नको. पण हें नवल नव्हे काय, कीं मोठे विद्वान् व कनवाळू झणविणारांनीं ज्या स्त्रीवर आपण नुकतेच अगदीं मरमरून जात होतों व जीस आपलें अप्रतिम प्रेम परोपरीनें शतशः बोलून दाखविलें तिचीच

अत्यल्प काळांत अगदीं आठवण बुजून जाऊन द्वितीय संबंधाविषयीं त्यांनीं जसें काय धादावून जावें, व आपल्याच स्वार्थावर केवळ नजर देऊन जीं अर्भकें त्यांस अपत्यांसारखीं शोभतील व ज्यांचे मनोधर्म त्यांच्याहून अर्थातच वयःपरत्वेंकरून अत्यंत भिन्न असणार त्यांस विवाहरूप पाशांत गोंवून टाकून आपल्या नियतकालिक सुखाकरितां त्यांच्या संसाराचें मातेरें करून टाकावें ? हें तर काय, पण वेळेनुसार लोककल्याणाची पाठीवरील गोणीहि लोक हां हां म्हणत असतां बेलाशक झुगारून देऊन एकदांचें चटकर चतुर्भुज होऊन आईपुढें जाऊन उभें रहावें, हा तरी काय थोडा चमत्कार आहे !

यापुढचा उपदेश आईबापांशीं वागण्याच्या संबंधानें. हाहि प्रस्तुत चरित्रापासून बराच घेण्यासारखा आहे. तो असा कीं, जॉनसन हा आपला चरितार्थ चालवून द्रव्यसंपादन जरी करूं लागला, व त्याची कीर्ति तर साऱ्या विद्वन्मंडळांत जरी गाजूं लागली, तरी आपल्या वृद्ध मातेची लवमात्रहि उपेक्षा न करतां पूर्वीप्रमाणेंच त्याची तिचे ठायीं अतिशयित भक्ति राहिली. ही त्याची भक्ति अशीच शेवटपर्यंत होती, व शेवटपर्यंत तिच्या नांवानें तो प्रार्थना करीत असे, हें मागें सांगितलेंच आहे.[1] आतां वरील गुण आमच्या नवीन मंडळींत कितपत आढळतो हें जर पाहिलें तर एखाद्या आणीबाणीच्या विवाहादि प्रसंगीं जरी तो पूर्ण उदयास येतो, तरी सामान्यतः पहातां त्याचें तेज मलिनच दृष्टीस पडतें. कित्येक ठिकाणीं तर यासंबंधानें पहातां एका महाराष्ट्र कवीचें वर्णन सर्वथा प्रयत्यास येतें.[2] आतां या वर्तणुकीचें मुख्य

१. Prayers and meditations (प्रार्थना आणि मनन) या नांवाचा एक भाग **जॉनसन**च्या ग्रंथांस जोडलेला आढळतो, त्यांत पुढच्यासारखे उल्लेख सांपडतात—

"I went to church; after sermon, I recommended Tetty (बायकोचें लाडकें नांव) in a prayer by herself; and my father, mother and brother in another."

हा मरणोत्तर प्रार्थना करण्याचा प्रकार खिस्ती लोकांस मान्य नाहीं; कारण जिवंत असतां जें पापपुण्य झालें असेल त्याप्रमाणें त्या त्या मनुष्यास अक्षय्य स्वर्गवास किंवा अक्षय्य नरकवास भोगावा लागणार असें त्यांचें मत आहे. यास्तव मेल्यानंतर प्रार्थना करणें हें मेल्यानंतर औषधोपचार करण्यासारखेंच केवळ व्यर्थ होय असें ते समजतात. असें असतां **जॉनसन**चा वरील प्रघात शेवटपर्यंत चालू होता. आपल्या बायकोचा मरणदिवस तर तो उपोषणांत घालवी हें मागें सांगितलेंच आहे. असो; वरील सर्व प्रकार यत्किंचित् ध्यानांत आणला असतां हिंदु लोकांचे श्राद्धादि आचार निखालस वेडगळपणाचेच असें थोड्यांसच वाटेल !

२. **नामदेवा**चा अभंग आहे—

कलियुगाचे मुळें झालें धर्माचें वाटोळें ।
पलंगीं बैसवूनि राणी माते हातीं आणवी पाणी ।

(पुढें चालू).

बीज काय हें जर पाहिलें, तर पाश्चात्य विद्येच्या योगानें उत्पन्न झालेला मूर्खपणाचा गर्व हें तें होय यांत संशय नाहीं. या विद्येचें फळ आजपर्यंत काय दृष्टीस पडत असे तें सर्वांस माहीत आहेच. तींत यत्किंचित्हि प्रवेश होतांक्षणींच आपली पूर्वजपरंपरा मूर्खत्वाचें केवळ आगर होती या महातत्त्वाची तात्कालिक स्फूर्ति सर्वांच्या मनांत होत असे. मग असें असल्यावर वरील परंपरेंतलीं शेवटलीं जीं मातापितरें तीं तरी वरील कोटींतून कोठून सुटणार? खरोखरच, जर ज्ञान हें थोरपणास कारण आहे, तर ग्रहणसमयीं राहूचा जप करीत बसणारा, कलकत्ता ही इंग्रेजांची विलायत ह्मणून समजणारा, व बेरीज वजाबाकीच्या पलीकडे ज्याचें ज्ञान साऱ्या जन्मांत गेलें नाहीं, असा महामूर्ख बाप कोणीकडे; व सारें आकाश ज्यानें धुंडाळून काढलें आहे, साऱ्या पृथ्वीचा नकाशा ज्यास मुखोद्गत येत आहे, व शून्यलब्धीपर्यंत मजल मारून जो केवळ गणिताब्धि होऊन राहिला आहे, असा दिग्विजयी लेक कोणीकडे? ह्याप्रमाणेंच अलीकडील महान् महान् युरोपियन राष्ट्रांनीं शोधून काढलेल्या नव्या देवाचें शुद्ध सुधारलेल्या रीतीनें नेत्रमीलनपूर्वक ध्यान करून एकदांच आठा दिवसांचें जो अघमर्षण करून टाकतो अशा पुत्रानें आपल्या वेड्या आईस दररोज देवधूपारतीची कटकट करतांना व धोंड्याच्या दगडाच्या पायां पडतांना जर पाहिलें तर त्याच्या ठायीं तिजविषयीं अवज्ञा कशी बरें उत्पन्न होणार नाहीं? खरें आहे; इंग्रेजी पुस्तकें वाचून जो जाडा विद्वान् झाला व मिशनरींच्या प्रसादानें ज्याच्या अंतःकरणांत सद्धर्मप्रकाश फांकला त्यास आपल्या मूर्ख व मूर्तिपूजक आईबापांची लाज कां बरें वाटणार नाहीं!

४. आतां वरील सदराच्या संबंधानेंच धर्म या विषयावर कांहीं विचार मनांत येण्यासारखे आहेत, ते येथें दाखल करून सदरहू अंक आटपतों. मागें सांगण्यांत आलेंच आहे कीं, जॉनसन हा भाविक ख्रिस्ती होता. लहानपणीं त्याच्या आईबापांनीं जीं धर्मसंबंधीं मतें त्याच्या मनांत भरवून दिलीं होतीं तींच त्यानें शेवटपर्यंत ठेवलीं, व त्यांच्याच तर्फेनें तो नेहमीं भांडत असे. कॉलेजमध्यें असतांना त्याच्या मनांत बरीच चलबिचल होऊन ख्रिस्ती धर्माची चेष्टा करणें व त्याच्या विरुद्ध प्रतिपादन करणें यांत सुद्धां त्याला मौज वाटायाला लागली होती; पण पुढें कांहीं काळानें

'स्त्रिये पाटावाची चोळी माता अखंड चिंध्या गाळी।
ऐसा कलियुगाचा महिमा ह्मणे विष्णुदास नामा॥

ही तर चवदाव्या शतकांतली गोष्ट. पण एकोणिसाव्या शतकांत व 'सुधारलेल्या इंग्रेजी राज्यांत' वरील अभंगावरहि कडी होणार हें वरील कवीच्या ध्यानीं मनींहि नसेल! आपल्या अगाध ज्ञानवैभवास शोभत नाहींत ह्मणून प्रत्यक्ष आईबापांस टाकून दिलेले व श्राद्धास ब्राह्मण जितके ——— असतील तितके घालावे ह्मणून मातोश्रीशीं विनोद केलेले सत्पुत्र इंग्रेजी विद्येस व आर्यजननीस केवढे भूषणास्पद होत हें सांगायाला नको!

त्याचें त्यासच तें वाईट वाटायाला लागून तो पक्का भाविक बनला. आतां एवढ्या उल्लेखांवरूनच किती गोष्टी सिद्ध होतात पहा ! एक तर ख्रिस्ती धर्माचें गौरव त्याच्या अनुयायांच्या तोंडून जें ऐकूं येतें कीं, तो ईश्वरप्रणीत असल्यामुळें तो स्वीकारल्याबरोबर सर्व संशय छिन्न होऊन मनास अप्रतिम शांतिसुखाचा अनुभव होऊं लागतो हें बिलकूल खरें नाहीं. खरें असतें, तर जॉनसन हा जन्मतःच सत्यधर्माचा असून व पवित्र सत्याचा त्यास लहानपणापासून सारखा बोध चालला असतां व तें तो आचरीत असतां कॉलेजचें वारें लागतांच त्यास स्वधर्माची टवाळी करण्याची कां इच्छा व्हावी ?[1] यावर कोणी सद्धर्माभिमानी प्रतिपक्षी कदाचित् ह्मणतील कीं, त्या वेळेस त्याची बुद्धि परिपक्व झाली नव्हती ह्मणून वरील उपहासास तो प्रवृत्त झाला; तर तसेंहि केवळ निवळ ह्मणतां येत नाहीं. कां कीं पुढें जरी नास्तिकपणा अगदीं सोडून देऊन जॉनसननें शेवटपर्यंत अत्यंत भाविकपणाची वृत्ति धारण केली; तरी हें केवळ भर्त्याच्या बळानें त्यानें केलें, स्वतः सर्वथा छिन्नसंशय होऊन कोणी वाद करायाला उभा राहील त्याशीं सामना घालण्यास तो तयार झाला असें कधींहि झालें नाहीं.[2]

---

१. मेकालेसाहेबांनीं एका निबंधांत मोठें संतोषपूर्वक लिहिलें आहे—

"In this way, undoubtedly, the progress of science may indirectly serve the cause of religious truth. The Hindu mythology, for example, is bound up with a most absurd geography. Every young Brahmin, therefore, who learns geography in our colleges, learns to smile at the Hindu mythology."

Ranke's *History of the Popes*.

वरील वाक्यें वाचून मनुष्यस्वभावाचा चमत्कार कोणास वाटणार नाहीं? काय मौज आहे पहा, कीं पदार्थविज्ञानांतील प्रत्येक शोध पवित्र शास्त्रास पदोपदीं खोडून टाकीत असतां आमच्या साहेबांस आपल्या जवळचें उदाहरण देतां आलें नाहीं; हिंदुधर्माकडे बोट दाखविणें भाग पडलें ! विद्येच्या तेजापुढें खोटे धर्म लोपून जातात हें जर खरें आहे, तर त्याच तेजानें ख्रिस्ती धर्माचें मंडन न होतां विद्यालयीन लोकांची प्रवृत्ति त्याचीहि विटंबना करण्याकडेच होते, हें मोठें नवल नव्हे काय ?

२. याप्रमाणेंच एका अलीकडील ग्रंथकाराचा अभिप्राय आहे—

"If his political opinions were strong, his religious ones were stronger still; and after wavering, even disbelieving, at one time, and for some years "caring for none of these things," he became one of the most sincerely believing, and truly pious Christians that ever professed the faith of the Gospel. That he had very minutely, or very learnedly, examined the various

(पुढें चालू).

हें त्याच्या 'चरित्रा'वरून तर जागोजाग दिसतेंच आहे; व शिवाय मिल्टन, ह्यूम, गिबन. यांनीं इंग्लंडांत व व्हॉल्टेर, रॉसो, वगैरे मंडळीनें फ्रान्स देशांत ख्रिस्ती धर्मावर सारखा तडाका चालवला असतां प्रस्तुत महापंडित नुसते मूग गिळून जागच्या जागीं बसले यावरून काय मनांत येतें बरें? ज्यानें इंग्रेजी भाषेचें परिज्ञान सर्वांस व्हावें ह्मणून कित्येक वर्षेपर्यंत सतत परिश्रम केले, त्यांस बहुश्रुत करण्याकरितां दोन निबंधावलि लिहिल्या, व आपल्या देशच्या कवींच्या कीर्तीस उज्वलित केलें, त्यानें स्वधर्माच्या रक्षणार्थ कांहींच खटपट करूं नये काय? इंग्रेजी भाषेंतील एखाद्या शब्दाची व्याख्या बरोबर न समजली, किंवा एखाद्या प्रसिद्ध काव्याचें गुणदोषज्ञान यथास्थित झालें नाहीं, ह्मणजे जी हानि होणार ती आत्म्याच्या हानीपेक्षां मोठी आहे काय? तेव्हां स्वभावतःच दुर्बळ अशा पक्षाच्या समर्थनाविषयीं त्यानें व्यर्थ यातायात केली नाहीं असें झटलें पाहिजे. असो; दुसरी गोष्ट वरील उल्लेखावरून अशी ध्यानांत आणावयाची कीं, जॉनसन हा ख्रिस्ती धर्माचें अनुसरण जो करीत होता तें केवळ पूर्वसंस्कारामुळें व हट्टामुळें, बुद्धिपुरःसर ह्मणून नव्हे; तेव्हां मिशनरी साहेबांचें स्वधर्माच्या तर्फेचें मोठें प्रमाण जें, कीं पहा एवढा तत्त्वज्ञ बेकन, एवढा गणिती व एवढा शोधक न्यूटन, एवढा कवि मिल्टन, एवढा ग्रंथकार जॉनसन, पण हे सर्व ख्रिस्तचरणीं सदा लीन असत; मग एवढ्या बड्या मंडळींनीं 'अंतःकरणपूर्वक पाळलेला' जो धर्म त्याच्याकडे येथील तरुण विद्वानांनीं दुर्लक्ष करावें काय? व त्याची टवाळी करावी काय?–हें प्रमाण अर्थात्च लटपटून जातें. ज्याच्या बुद्धीस यत्किंचित्हि प्रखरत्व आहे त्याच्या सहज लक्षांत येईल कीं, वरील सर्व मंडळी इतर कोणत्याहि देशांत उत्पन्न झाली असती तरी तेथलाहि धर्म ती वरच्यासारखाच 'अंतःकरणपूर्वक पाळती'!

आतां वरील उल्लेखापासून एतद्देशीयांनीं विशेषतः कोणता बोध ग्रहण करण्या-

---

points of controversy connected with this most important subject cannot be affirmed, nor even that he had with adequate patience, and with undisturbed calmness, scrutinized the foundations of his own general belief. His extreme anxiety to believe; his nervous dread of finding any cause for doubt; his constitutional want of some prospect on which to fix his hopes; his excessive alarm at the appearance of any cloud arising over that prospect, prevented him from possessing his soul in the perfect peace and unruffled serenity necessary for him who would rise to the height of this great argument, nay indisposed him altogether to enter upon the discussion."

Lord Brougham—*Johnson.*

सारखा आहे तो सांगतों. एक तर अर्थात् हा कीं शुभवर्तमानासारख्या लटपटींत शास्त्रावर भरंवसा ठेवूनहि प्रस्तुत पंडितास जर पारमार्थिक लाभ झाले,–ह्मणजे दया, शांति वगैरे सद्गुण त्याचे ठायीं नांदून दुराचारापासून त्याची निवृत्ति झाली,–तर वरील पुस्तकाहून फार मोठ्या योग्यतेचे आमच्या लोकांत जे धर्मग्रंथ सर्वप्रसिद्ध आहेत त्यांचा आश्रय केल्यानें तर किती अधिक फळ होईल! तर या दुसऱ्या ग्रंथांवर जे पूर्ण भाव ठेवून चालत असतील त्यांस नांव ठेवणें हें बरोबर नाहीं; कां कीं, त्यांचा त्यांवर जर पूर्ण विश्वास आहे, व हा विश्वास बैबलासारख्या ग्रंथावर ठेवल्यानेंहि पूर्वोक्त फळ जर प्राप्त होत आहे, व त्यामुळेंच तो विश्वास निंद्य होत नाहीं, तर आमच्या देशांत जे मोठमोठे मुमुक्षु होऊन गेले व त्यांनीं आध्यात्मिक ज्ञानावर जे सर्वमान्य ग्रंथ करून ठेवले त्यांचें अनुकरण केलें असतां तें मात्र निंदास्पद कां व्हावें? अगदीं तान्ह्या मुलाच्या डोक्यावर पाद्री साहेबांनीं आपल्या पवित्र हातानें पाण्याचे चार थेंब टाकले ह्मणजे त्याचा नरकवास चुकून तें मोक्षास जाण्यास योग्य होतें हें मत जर अत्यंत समंजस होय, तर गंगेसारख्या महानदींत मज्जन केल्यानें पापक्षालन होतें हें मत कशानें वरें वेडगळ झालें? येशूनें वादळ शांत करून तो समुद्रावरून चालत गेला, व सरते शेवटीं थडगें फोडून वर येऊन लोकांदेखत आकाशांत आपल्या बापाकडे गेला, हा जर पवित्र इतिहास, व त्यावर शंका काढणें हें अघोर पाप; तर सेतुबंधाची कथा किंवा तुकारामबोवांचें स्वर्गारोहण हें तरी कशावरून खोटें? पवित्रशास्त्रांत खोटा भूगोल, खोटी जगदुत्पत्ति, खोटें पदार्थविज्ञान, वेडगळ मतें, अप्रयोजक व बीभत्स कथा हें सर्व साहित्य भरपूर असूनहि तें जर ईश्वरप्रणीतच आहे, तर पृथ्वींतील इतर सारे धर्मग्रंथ तरी मनुष्यकृतच होत यास तरी काय प्रमाण?–तर याप्रमाणें आमच्या विचाऱ्या निराश्रित धर्मावर जे जे कोट्या करायास सरसावतात त्यांनीं जर शांत व निःपक्षपात बुद्धीनें विचार केला, तर त्यांस खचित आढळून येईल कीं, जे जे आक्षेप त्यांस येथील लोकांवर व त्यांच्या धर्मावर आणतां येतील तेच आक्षेप, किंबहुना त्यांहूनहि अधिक, परद्वीपस्थ लोकांवर व त्यांच्या धर्मावर सहज घेतां येणार आहेत; यास्तव असल्या वादग्रस्त विषयावर उगाच हुजत घेत बसणें व एकमेकांच्या रिकाम्या कुटाळक्या करण्यांत कालक्षेप करणें यांत कांहीं जीव नाहीं. हें करण्यापेक्षां जो धर्म ज्यास जन्मतः प्राप्त झाला आहे, त्यासच अनुसरून त्यांतच सदाचरणाचा व परमार्थाचा जो मार्ग त्यास सांपडेल तो त्यानें स्वीकारला असतां कलहाचें तोंड मिटेल, अमूल्य कालाचा अपव्यय होणार नाहीं, व खरी धार्मिकताहि जगांत वाढेल असें आह्मांस वाटतें.[1]

---

१. जॉनसनच्या संभाषणांत एके ठिकाणीं वरच्यासारखाच रोख आला आहे. त्याच्या

(पुढें चालू).

महाजनो येन गतः स पंथाः ।[१]

महाभारत.

अंक ४१–(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) इंग्रेजी राष्ट्राचे गुण **जॉनसनच्या** ठायीं प्रतिबिंबित होण्याचें कारण. (३) निश्चय. (४) अभिमान. (५) सदयत्व. (६) धैर्य. (७) स्वकीयांविषयीं व स्वदेशाविषयीं प्रेम. (८) दोषांचा उल्लेख. (९) तुटकपणा. (१०) ग्रह.

१. प्रस्तुत चरित्राच्या आरंभीं जो थोडा उपोद्घात केला आहे त्यांत असें सांगितलें होतें कीं, इंग्रेज लोकांचा स्वभाव व त्यांचे आचारविचार यांविषयीं त्यापासून एतद्देशीयांस माहिती होऊन, शिवाय लोकस्थितीच्या सादृश्यामुळेंहि इकडील लोकांस

ओळखीच्या एका बाईनें इंग्लंडचा धर्म सोडून 'क्वेकर्स' ह्मणून एक पंथ आहे तो स्वीकारला, ती हकीकत तिची एक मैत्रीण त्यास सांगत असतां तो अतिशय संतापला, व त्या धर्मांतर केलेल्या बाईवर त्यानें पुढील वर्षाव केला—

Johnson (frowning very angrily)— "Madam, she is an odious wench. She could not have any proper conviction that it was her duty to change her religion, which is the most important of all subjects, and should be studied with all care, and with all the helps we can get. She knew no more of the church which she left and that which she embraced, than she did of the difference between the Copernican and Ptolemaick systems. We ought not, without very strong conviction indeed, to desert the religion in which we have been educated. That is the religion given you, the religion in which it may be said Providence has placed you. If you live conscientiously in that religion, you may be safe. But error is dangerous indeed, if you err when you choose a religion for yourself." *Mrs. Knowles*—"Must we then go by implicit faith?" *Johnson*—"Why, madam, the greatest part of our knowledge is implicit faith; and as to religion, have we heard all that a disciple of Confucius, all that a Mahometan, can say for himself?—" He then rose again into passion, and attacked the young proselyte in the severest terms of reproach, so that both the ladies seemed to be much shocked.

—Boswell's *Life*.

वरील वाक्यांचें मनन करण्यास आम्ही आमचीं खिस्ती भावंडें 'ज्ञानोदय' 'सत्यदीपिका' आणि या देशाच्या पारलौकिक हितार्थ झटणारे जे मिशनरी लोक त्यांस फार फार शिफारस करतों!

१. "थोर पुरुष ज्या मार्गानें गेले तोच हिताचा मार्ग!"

स्वहिताच्या बऱ्याच गोष्टी कळतील. आतां वरील दोन्ही प्रकारची माहिती काय काय होण्यासारखी आहे ती सांगतों.

२. सदरील उपोद्धातांत असें लिहिलें होतें कीं, जॉनसन यास त्याच्या राष्ट्राचा प्रतिनिधिभूत मानला असतां चालणार आहे; ह्मणजे सामान्यतः इंग्रेज लोकांचा स्वभाव जो आढळतो तो त्याचे ठायीं दिसत असे. अशा व्यक्ति प्रत्येक राष्ट्रांत असतातच; कां कीं मनुष्यास जन्मतः स्थलविशेषाचे संस्कार सहजच लागतात, आणि त्यांतून स्वदेशप्रीति बळकट असली व अन्यदेशीय संस्कार कधींच लागले नसले ह्मणजे मूळ प्रकृति जशीची तशींच कायम रहाते. जॉनसनचा प्रकार असाच होता. इंग्लंडचा धर्म, इंग्लंडची राज्यव्यवस्था, इंग्रेजी रिवाज, इंग्रेजी विद्या वगैरे सर्व कांहीं अत्युत्तम असा त्याचा मूळपासून जो एकदां ग्रह होऊन गेला होता तो शेवटपर्यंत हालला नाहीं. त्यांतून लंडन शहरची तर त्यास अशी आवड असे कीं, तें सोडून इंग्लंडांतल्या इंग्लंडांतहि देशावर फिरावयाला जाणें सुद्धां त्यास आवडत नसे. आपल्या देशांतून बाहेर असा दोनदां मात्र तो पडला; एकदां स्कॉटलंडास बॉसवेलबरोबर गेला तें, आणि दुसऱ्यानें पारिस शहरास थ्रेलच्या बरोबर गेला तें. यांत पहिली मुशाफरी त्याच्या स्वदेशांतीलच ह्मणावयाची; दुसरी मात्र खरोखरी बाहेरची, पण तिचा जॉनसननें सांगण्यासारखा कांहीं उपयोग करून घेतला नाहीं. 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा' या ह्मणीप्रमाणेंच सरासरी त्यानें प्रवास केला. आपला यजमान व यजमानीण जिकडे जिकडे गेलीं, व पारिस शहरांतील पहाण्यासारखीं स्थलें जीं जीं त्यांनीं पाहिलीं, तें मात्र सर्व यानें पाहिलें. त्याच्यासारख्या विद्वानानें व शोधकानें अशा प्रसंगीं जें औत्सुक्य प्रगट करावयाचें व जी जिज्ञासा त्यास वाटायाची, तसा प्रकार त्याच्या त्या वेळच्या रोजनिशींत बिलकूल दृष्टीस पडत नाहीं. हें तर काय, पण जॉनसन तेथील लोकांशीं पुरता बोलला सुद्धां नाहीं. त्याला फ्रेंच भाषा जरी समजत होती, तरी ती बोलण्याचा सराव नसल्यामुळें एतद्देशीय लोकांस तेवढी फुशारकी वाटेल व तेवढाच वचपा ते आपणावर भिरवतील, या भयास्तव वरील प्रसंगच त्यानें मुळीं टाळले. असो; मग अशा व्यक्तीचे ठायीं स्वदेशजन्य सर्व संस्कार पूर्णपणें कां प्रतिबिंबित होणार नाहींत ?

३. आतां वरील गुण कोणकोणते ते सांगतों. एक तर निश्चय. निश्चय ह्मणजे जें एकदां करीन ह्मटलें तें केल्याखेरीज कधीं सोडायाचें नाहीं. हा गुण प्रस्तुत चरित्रावरून व मागल्या अंकांत सतत उद्योगाविषयीं जो मजकूर लिहिला आहे त्यावरून, प्रस्तुत ग्रंथकाराचे ठायीं किती पूर्ण होता हें तेव्हांच लक्षांत येणारें आहे. त्यांतून जॉनसनचा स्वभाव मूळचा आळशी व त्यांत मज्जारोगाची पीडा, शिवाय दारिद्र्य तर इतकें कीं जेमतेम करून एक एक दिवस पार पाडायाचा; पण इतकें सर्व असतां असल्या विपत्तींतहि ज्यानें पंचवीस वर्षें काढलीं, व कोणापुढेंहि दैन्य न दाखवतां

किंवा कोणाची तावेदारी न पतकरतां केवळ स्वकष्टानें इतकीं वर्षें आपलें व आपल्या माणसांचें पोषण केलें, त्याची शर्थ कोणास वाटणार नाहीं ! पंचवीस वर्षें एकसारखी खळ न पडतां लेखणी चालवणें,—मग लिहिण्यास मन लागो न लागो, प्रकृति बरोबर असो नसो, गृहसंबंधीं अडचणी असोत, दुःखें असोत,[1] कांहींहि असलें तरी लेखणीची गति थांबतां उपयोगीं नाहीं, आणि पुनः वर्तमानपत्राच्या सारख्या क्षणिक महत्त्वाच्या विषयावर लिहावयाचें नसून अवघ्या शब्दसमूहाचें परिगणन करून भाषेची एकंदर व्यवस्था करायाची, निबंधरचना करायाची, सर्वमान्य कवींच्या गुणदोषांचें विवेचन करायाचें,—ह्मणजे केवढें दुर्घट आहे हें सांगायास नको ! तर या गुणाचें वास्तव्य इंग्रेजी राष्ट्रांत कितपत असेल याची कल्पना सदरील चरित्रावरून वाचकांनीं करावी. वस्तुतः पहातां आमच्या देशांत वरील लोकांचें प्रभुत्व होऊन प्रस्तुत चरित्र एतद्देशीय भाषेंत लिहिण्याचा योग आला हेंच वरील गुणाचें थोडें प्रमाण आहे असें नाहीं. हा गुण त्यांचे ठायीं नसता तर आजपर्यंत शेंकडों विकट प्रसंग जे त्यांच्यावर येऊन गुदरले तितक्यांतून पार पडून येथील आधिपत्य त्यांच्याकडे जातेंचना ! याप्रमाणेंच आटलांटिक महासागरांत दूर एका कोपऱ्यांत पडून राहिलेलें जें बेट होतें,—कीं जें दोन हजार वर्षांपूर्वी तर कोणास माहीतहि नव्हतें, व हजार वर्षांपूर्वी ज्यास जगांत कांहींच मानमान्यता नव्हती, तें आज जें वैभवाच्या शिखरास चढलें आहे व सारें जगहि त्याच्या उलाढालीला पुरेसें न होऊन विद्या, कला, कौशल्य यांचें तें केवळ माहेरघर होऊन राहिलेलें आहे, हा तरी वरील अमोलिक गुणाचाच प्रभाव होय !

४. दुसरा गुण अभिमान. अभिमान ह्मणजे दुसऱ्याकडून झालेली अवज्ञा तिळमात्रहि न खपून स्वतःच्या पराक्रमावरच सर्वथा अवलंबन करण्याविषयींची मनाची साहजिक वृत्ति. हा गुण वरच्याचाच अनुषंगी आहे, व वरच्याप्रमाणेंच उन्नति होण्यास अत्यंत अवश्यक होय. जॉनसनच्या अंगीं हा कितपत वसत होता व तो कोणकोणत्या प्रसंगीं पूर्णपणें प्रगट झाला, हें मागें सांगितलेंच आहे. त्यास आपले ऐन उमेदीचे

---

१. 'रांबलर' चालवीत असतां जॉनसनची स्थिति कशी होई ही त्याच पुस्तकाच्या शेवटच्या अंकांतील एका उल्लेखावरून दिसून येते—

"He that condemns himself to compose on stated days will often bring to his task an attention dissipated, a memory embarrassed, an imagination overwhelmed, a mind distracted with anxieties, a body languishing with disease; he will labour on a barren topic, till it is too late to change it; or in the ardour of invention diffuse his thoughts into wild exuberance, which the pressing hour of publication cannot suffer judgment to examine or reduce."

दिवस दारिद्र्यांत व कष्टांत जे काढावे लागले त्याचें तरी कारण वरील मनोवृत्तिच होय. तो घरांतून बाहेर पडल्यावर प्रथमतः ज्या शालाध्यक्षांच्या हाताखालीं कांहीं दिवस राहिला होता, तेथेंच जर कुलंगी कुत्र्याप्रमाणें नेहमीं पुढें पुढें नाचून तो आपल्या धन्याची सतत मनधरणी करता किंवा पुढें सेक्रेटरी ऑफ स्टेट साहेबांचा वशिला लागल्यावर त्यांच्या अनुसधानानें जर रहाता तर मध्यान्हकाळची भ्रांत मुळीं नाहींशी होऊन उलटा ऐषआरामांतहि तो रहाता; पण जे जाल्या तेजस्वी असतात त्यांस मोठ्या धनिकाची किंवा मोठ्या प्रभूचीहि तावेदारी पतकरत नसते. कुत्र्यानें आपल्या सुखाचें वर्णन केलें असतां शेवटीं त्याच्या गळ्याभोंवतालचा करकोचा पाहून लांडगा जसा दचकला, व मागल्या पायीं तडक चालता झाला; त्याप्रमाणेंच परदास्यावर वृथापुष्ट होऊन पडण्यापेक्षां आपलें स्वातंत्र्य राहून जाडीभरडीच मिळते आहे तर तिजवरहि महात्मे पुरुष संतुष्ट रहातात.[1] तर जॉनसनची याप्रमाणेंच गोष्ट होती. तो पराकाष्ठेचा निस्पृह असल्यामुळें व जात्या धीट असल्यामुळें थोरथोरांची मनधरणी करणें त्याच्या हातून होत नसे. हें तर काय, पण प्रसंग पडल्यास कोणी केवढाहि मोठा असला तरी त्याची शोभा करतांना तो मागें पुढें पहात नसे. शिवाय दुसरा चमत्कार असा कीं, दुसऱ्याकडे हात पसरण्याचा जसा त्यास कंटाळा, त्याप्रमाणेंच दुसऱ्यास स्वतः आश्रय देण्याविषयीं त्याची पराकाष्ठेची उत्कंठा असे. तो स्वकष्टावर मोठ्या पंचाइतीनें निर्वाह करीत असतां आपल्या इष्टमित्रांचा समाचार घेण्याविषयीं नेहमीं तत्पर असे, व पुढें पुढें तर कित्येक निराश्रित मनुष्यांस त्यानें आपल्या घरीं बाळगिलें असून त्यांची साऱ्या प्रकारची वर्दळहि तो मोठ्या सहनशीलपणानें सोशी. असो; तर प्रस्तुत ग्रंथकारास व त्याच्या राष्ट्रास साधारण असणारा हा दुसरा गुण होय. इंग्रेज लोकांस स्वतःविषयीं किती अभिमान आहे व स्वतंत्रतेस ते किती चहातात, हें येथें विशेष फोड करून सांगायाला पाहिजे असें नाहीं. इतर देशांप्रमाणेंच त्यांच्यामध्यें हरएक प्रकरणीं परस्परांत मतभेद असतां व निरंतर राज्यप्रकरणांत वगैरे निकरानें कलह चालले असतां, संकटसमयीं सर्वांनीं एक होणें व साऱ्या पृथ्वीभर उलाढाल चालली असतां स्वदेशाचें वारें न विसरणें, या दोन गोष्टींवरूनहि यांच्या स्वाभिमानाचें स्वरूप कोणाच्याहि लक्षांत येणारें आहे. शिवाय परराज्याची गोष्ट तर दूरच, पण स्वराजाचाहि जुलूम त्यांस सहन न होऊन त्यांनीं एकाचा शिरच्छेद केला व एकास पळवून लावला, व राजाचे अधिकार आणतां आणतां त्यांनीं अगदीं संपुष्टांत आणून ठेवले आहेत आणि

१. वरील गोष्ट केवळ इंग्लंडासच लागू आहे असें नाहीं. भर्तृहरीच्या 'शतकां'तून व इतर कित्येक कवींच्या ग्रंथांतून राजसेवेचा सुद्धां किती निषेध केला आहे हें आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस माहीत असेलच–'पंचतंत्रां'त व 'हितोपदेशां'त तर एके ठिकाणीं दोघां कोल्ह्यांचा जो संवाद चालला आहे तो इंग्लंडांतल्या 'व्हिग' आणि 'टोरी'च्या वादासारखाच होय!

अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्याच्या खालोखाल स्वातंत्र्याचा झेंडा त्यांच्याच देशांत मिरवत असून थोरापासून तों लहानापर्यंत सर्वांस हवें तसें बोलण्याचालण्याची पूर्ण मोकळीक आहे, हें जगद्विश्रुतच आहे.

५. तिसरा गुण सदयत्व. या गुणाच्या संबंधानेंहि जॉनसनविषयीं अनेक उल्लेख यापूर्वी केले आहेत. तो बाह्यतः जरी उग्र व उद्दाम दिसे, तरी त्याचें अंतःकरण अत्यंत दयार्द्र असे. 'परदुःखेन दुःखिता विरलाः' असें जें ह्मटलें आहे त्या कोटींतच तो येतो. कोणीहि मनुष्य असला आणि त्यानें दुःखाक्रोश केला तर तो त्यास बिलकूल सहन न होऊन तो यथाशक्ति त्याच्या संकटाचें निवारण करी. जे निराश्रित व दुबळे त्यांस त्याचें घर धर्मशाळेसारखें असे, असें त्याच्या एका मित्रानें ह्मटलें आहे. तो स्वतः थेलच्या घरीं निरंतरच्या पाहुण्यासारखा रहात असतां त्याच्या घरांत कोणती मंडळी भरली असे व त्याच्या पेनशनावर कोणाचा सतत निर्वाह चालला असे, हें यापूर्वी अनेक वेळां सांगितलेंच आहे. स्वतः इतका आळशी कीं बारा बारा, दोन दोन वाजे तोंपर्यंत आंथरुणांतून हालायाचा नाहीं, पण छापखानेवाल्यानें सांगितलें पुरे, कीं जर आज मजकूर आला नाहीं, तर ठसे जुळणाराची आजची मिळकत बुडून त्यास उपास काढावा लागेल, कीं स्वारी लागलीच उठून कामाला लागे. त्यांचें नांव मोठें व त्यामुळें पुष्कळ मोठमोठ्या लोकांशीं त्याचा परिचय जडला असे, यास्तव आपल्या मित्रांस किंवा त्यांच्या तर्फेनें इतर मनुष्यांस तो शेंकडों वेळां शिफारसपत्रें देई; यांपैकीं पुष्कळ बासवेलच्या 'चरित्रां'त आढळतात. असो; तर हाहि गुण त्याच्या राष्ट्राचे ठायीं नांदणाऱ्यांपैकींच होय. हें ह्मणणें आमच्या विपन्न देशबंधूंस कदाचित् व्याजोक्तीचें वाटेल, किंवा येथील राजकर्त्यांची खुशामत करण्याकरतां लिहिलें आहे असें वाटेल; पण तसें बिलकूल नाहीं. सदरील राष्ट्राची आमच्या देशांत जी वर्तणूक दृष्टीस पडते, तीस वरील गुणाचें नांव सर्वथा लावतां येणार नाहीं हें खरें; पण तिचीं कारणें पाहूं गेलें असतां निराळींच सांपडतील. तीं सर्वांस सहज समजण्यासारखीं असल्यामुळें व येथें त्यांचें कारण नसल्यामुळें प्रस्तुत स्थळीं देत नाहीं. इतकेंच सांगणें बस आहे कीं, वरील लोकांचें आचरण त्यांच्या मूळ जागीं जर पाहिलें तर त्यांच्या एकंदर राज्यरीतीवरून, त्यांचीं शेंकडों धर्मार्थ कृत्यें जीं झपाट्यानें निरंतर चालू आहेत त्यांवरून, गुलामांच्या मुक्तयर्थ त्यांनीं कोट्यावधि रुपये खर्चले, व हावर्ड, क्लार्कसन, फासेट यांच्यासारखे उदार पुरुष त्यांच्या देशांत निरंतर निपजत आहेत यावरून, वरील उल्लेखाची सार्थकता निःपक्षपात मनुष्यांच्या नजरेस आल्यावांचून रहाणार नाहीं.

६. चवथा गुण धैर्य. धैर्य हें दोन प्रकारचें आहे; एक मानसिक व दुसरें शारीरिक. मानसिक धैर्य ह्मणजे जो एकदां संकल्प केला तो कितीहि प्रत्यवाय आले तरी तडीस नेऊन पांचवणें, जें आपल्या मनास प्रमाणसिद्ध सत्य वाटलें तें बेधडक बोलून

दाखवणें, लोकमताचें अंधपरंपरान्यायानें अनुसरण न करतां केवळ प्रांजलपणानें व स्वतंत्रबुद्धीनें तत्त्वशोध करण्याचा यत्न करणें, इत्यादि होय. हें जॉनसनच्या अंगीं कितपत होतें, हें यापूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. आतां दुसरें जें शारीरिक धैर्य, ह्मणजे आंगधिटाईनें कोणावर चालून जाणें, प्रसंगीं न गडबडणें, हें प्रस्तुत ग्रंथकाराचे ठायीं होतें कीं नाहीं, याविषयीं त्याच्या 'चरित्रां'त दाखले आहेत. त्यांवरून पहातां हाहि गुण त्याच्या अंगीं पूर्ण होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तो लष्करी खात्यांत कधींहि शिरला नाहीं,–एकदां मात्र लंडनच्या शिबंदींत कांहीं दिवस राहून निशाण मारण्याचा वगैरे त्यानें थोडा अभ्यास केला होता,—तरी खऱ्या शिपायाचे गुण जे धैर्य व प्रसंगावधान ते त्याच्या अंगीं पुरतेपणीं होते. तो अंगानें चांगला धट्टाकट्टा असून जोरदार असल्यामुळें मारामारीपर्यंत येऊन बेतली असतांहि मागें घेत नसे, याविषयीं मागें एक दोन उदाहरणें दिलींच आहेत. त्यांशिवाय बासवेलच्या ग्रंथांत आणखी पुढील उल्लेख आहेत. एके समयीं मध्यरात्र उलटून जाऊन जॉनसन आपल्या नित्यक्रमाप्रमाणें जागत बसला असतां एकदम त्याच्या दारावर कोणीं मोठ्यानें ठोठावलें. तें ऐकतांच शेकोटी[1] डवचण्याचा दांडा हातांत होता, तोच घेऊन स्वारीनें दार उघडलें. पहातो तों दार ठोठावणारे चोर नसून कॉलेजांतले दोघे स्नेही होते. मग त्यांच्या बरोबरच बाहेर पडून हिंड हिंड हिंडून व पुष्कळ हूडपणा करून प्रहर दिवसास बोवा बिन्हाडीं आले. याप्रमाणेंच बॉसवेलबरोबर स्कॉटलंडावर जी मुशाफरी केली, तींत अनेक वेळां समुद्रावर वादळ सुटून होडी डबघईस आली होती, व इंग्लंडांत तर दोघांचींहि गच्छंती झाल्याचें वर्तमान सुद्धां पत्रांतून जाहीर झालें होतें; पण असल्या प्रसंगींहि जॉनसन बिलकूल डगमगला नाहीं. बॉसवेलनें भय प्रदर्शित केलें असतां त्यास तो उलटा रागें मात्र भरे. त्याच्या मित्रमंडळांत बोक्लार्क ह्मणून एक खानदानीचा गृहस्थ होता. तो आपल्या शेतवाडीच्या बंगल्यांत जाऊन राही, तेव्हां जॉनसन त्याच्या घरीं आतिथ्य अनुभवण्यास कधींमधीं जाई. अशा वेळचें आपल्या मित्राचें आचरण बोक्लार्क मंडळींत सांगे, तें हें कीं, त्याच्या दाराशीं भले जंगी कुत्रे पाळलेले असत; असे कीं, पटाईत चोरांसहि त्यांची वचक वाटावी. पण जॉनसन त्यांस बिलकूल भीजत नसे. एकदां तर दोघांची झोंबी लागली असतां, तो त्यांच्या अंगांवर जलदीनें धांवत गेला; आणि दोघांच्या डोक्यांवर दोन ठुस्से लगवून त्यानें त्यांस पळवून लाविलें. शेवटल्या क्लेशदायक दुखण्यांतहि प्रस्तुत ग्रंथकारानें वरील धैर्यवृत्ति प्रगट केली. पोटांतलें पाणी काढण्याकरितां त्यानें अनेक

१. इंग्लंडांत अतिशयित थंडी असल्यामुळें शेकोटी बहुधा बाराहि महिने पेटलेली असते, व यास्तव तिजकरतां एक निराळी जागाच केलेली असते, हें वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच.

वेळां शस्त्रप्रयोग करून घेतले. तशा वेळीं खुद्द डॉक्टरहि भीत; पण तो स्वतः बिलकूल कचरला नाहीं. तसाच त्याचा शेवटहि अगदीं स्वस्थपणानें झाला. असो; तर हा गुणहि जॉनसनच्या राष्ट्राचे ठायीं आढळणारा आहे. हा वर सांगितलेल्या दोन्ही प्रकारांनीं इंग्रेज लोकांचे ठायीं कितपत वसत आहे याविषयीं त्यांचाच इतिहास काय पण साऱ्या जगाचा इतिहासहि स्पष्टपणें सांगत आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

७. स्वकीयांविषयीं व स्वदेशाविषयीं प्रेम. ही वृत्तिहि जॉनसनचे ठायीं बळकट असून त्याच्या देशबंधूंचे ठायीं तशीच आढळणारी आहे. स्वकीयांविषयीं प्रेम ह्मणजे आईबाप वगैरे वडील माणसांवर भक्ति, इष्टमित्रांविषयीं स्नेह वगैरे होय; व स्वदेशप्रीति ह्मणजे आपल्या राजाच्या ठायीं निष्ठा, धर्माविषयीं पूज्यबुद्धि, व सामान्यतः सर्व गोष्टींविषयीं योग्य अभिमान असणें हें होय. वरील निरनिराळ्या वृत्ति जॉनसनचे ठिकाणीं कसकशा होत्या हें यापूर्वी अनेक वेळां सांगितलेंच आहे; आतां त्याच त्याच्या राष्ट्राच्या ठायीं आहेत कीं नाहीं याविषयीं मात्र लिहावयाचें. प्रथमतः स्वकीयांकडे ओढा हा प्रस्तुत राष्ट्रांत कितपत असतो, याविषयीं दुसरें मोठें प्रमाण नको;-'home', 'hearth' इत्यादि शब्दांत किती प्रेम सांठवलें आहे, व इंग्रेजी कवितेंत वगैरे त्यांविषयींचें उल्लेख किती सहृदयत्वाचे असतात, यावरूनच वरील गोष्टीचा निकाल होणार आहे. तसेंच कोणत्याहि प्रख्यात मनुष्याचें चरित्र वाचलें असतां त्यांत बहुधा वरील प्रकारचा मजकूर सांपडेलच सांपडेल. कोणास आपल्या बापाची लाज वाटून त्यानें त्यास भिक्षा मागावयास लाविलें आहे, किंवा आईशीं पशुवत् विनोद केला आहे, असें तर कोठेंहि सांपडणार नाहीं. त्याप्रमाणेंच इंग्रेज हे स्वभावतःच साहसी व उद्योगी असल्यामुळें त्यांचा पुष्कळ दिवसांपासून साऱ्या पृथ्वीवर व्याप चालू आहे. कोणी चीनांत आहेत, कोणी इराणांत आहेत, कोणी तुर्कस्थानांत आहेत; पण असाहि प्रकार कोठें वाचण्यांत किंवा ऐकण्यांत येत नाहीं, कीं कोणी बहादर चीनांत गेल्याबरोबर चौलकर्म करवून सर्वभक्षक बनले, किंवा रूमशामच्या राज्यांत इमाम बनून घरीं आल्याबरोबर आईपुढें गुडघे टेकून 'अल्ला बिसमिल्ला अबदुल रहिमान' हा कुराणोक्त मंत्र पढायाला लागले! पण आमच्या येथली बडद्या बडद्या विद्वानांची स्थिति कशी आहे पहा! युनिवर्सिटीचे सोळा संस्कार पूर्ण झाल्याबरोबर जामानिमा करून आईवापांनीं एकदांचें समुद्रांत जहाज लोटावें, व सगळ्या लोकांसहि मोठी आशा लागावी कीं, आजपर्यंत आमचे महामूर्ख पूर्वज अटक नदी धरून बसले, पण आतां बरीक ठीक झालें, आतां हिंदुस्थानाची सुधारणा झाल्याखेरीज खास रहात नाहीं,-याप्रमाणें सर्वतोमुख आशीर्वाद अनुभवीत आर्यजननीच्या वीरांनीं आपल्या भूमीचा तीर सोडावा. पुढें कांहीं थोडा काळ जाईपर्यंत आमच्या बहादरांसहि वाटावें कीं, आपणावर सर्वांची एवढी जी भिस्त आहे त्याप्रमाणें आपणास कांहीं केलें पाहिजे खरें. पण हे विचार सरासरी

तांबड्या समुद्रापर्यंत ! तोंवर आईबापांचे ठिकाणीं प्रेम, लोणच्या पापडाविषयीं तिखट-मीठ लावलेलीं पत्रें, व ज्या समुद्रांत आकाशांतील प्रभूनें मिसरी लोकांच्या राजास सहकुटुंब सहपरिवार बुडविलें व आपल्या लाडक्या लेकरांस तेवढी खाशी कोरडी वाट दिली, त्याच्या पवित्रोदकानें नेत्रस्पर्श करून भगवद्गीतेचें पठन,–हे सर्व प्रकार एशिया खंडास सीमाभूत जो वरील पवित्र सागर त्याचें उल्लंघन होईपर्यंत. पण त्यांतून पार पडून सुधारलेल्या युरोपखंडाचें एकदां वारें लागलें, व तिकडील रागरंग, मजलशीचे प्रकार, व डंकन रोडच्या सवाईचीं वेश्यामंदिरें यांत स्वाऱ्या एकदां भडकल्या, ह्मणजे मग हिंदुस्थान कसला व विद्याभ्यास तरी कसचा ! असें करतां करतां वर्ष सहा महिन्यांत विलायती संस्कारांचें आमच्या पंडित मंडळीवर असें जबरदस्त पूट बसून जातें कीं, मूळचें सर्व बदलून जाऊन ते पक्के इंग्रेज बनतात ! खरेंच, जर येथल्या येथेंच इंग्रेजांच्या नुस्त्या भाषेच्याच अल्पमात्र ज्ञानानें आमच्या पंडितांस स्वभाषा येई-नाशी होते, आपले आचार सर्व वेडगळ वाटूं लागतात; व पूर्वीचे सर्व लोक सरस-कट महामूर्ख भासूं लागतात; तर युरोपांत जाऊन वरील लोकांचें ऐश्वर्य पाहिल्यावर व त्यांच्या देशांतल्या अनेक मौजा जातीनें अनुभविल्यावर तर काय स्थिति होऊन जाईल बरें ! उघडच आहे कीं, जो येथून आगबोटीवर पाय ठेवण्यापूर्वी नुसता यःक-श्चित् हिंदु होता, तो कांहीं काळानें इंग्रेजी शिंप्यांच्या हातची विजार, इंग्रेजी दुका-नांतून घेतलेली टोपी, इंग्रेजी हवेनें वाढलेली मजेदार दाढी, अशा सुधारलेल्या जिनसा घेऊन माघारा आला, व 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा' या न्यायानें ज्याच्या बरो-बरचा लोणचेपापडवाला ब्राह्मणहि खासा बुटलेर बनून आला, त्यानें परत आल्यावर आपल्या आईबापांस ओळखलें व आपल्या इष्टमित्रांस क्षेमकुशल पुसलें, तर त्याची थोरवी ती मग काय राहिली ? एवढी महायात्रा केल्यानें जें पुण्य संग्रहीं पडलें, त्याचा वरच्यासारख्या हलक्या लोकांशीं व्यवहार केल्यानें खाडदिशीं क्षय होऊन जाणार नाहीं काय ? असो; तेव्हां एकंदरींत मोठी जेमतेम करून इकडून जी कांहीं मंडळी विलायतेस पाठविण्यांत आली, त्यांच्या वर्तनांत व तिकडून इकडे व चोहोंकडे जॉनसनचे देशबंधु जे आज शेंकडों वर्षें संचार करीत आहेत त्यांच्या वर्तनांत, जमीन अस्मानची तफावत नजरेस येते असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

हा एक प्रकार झाला; दुसरा स्वदेशविषयक प्रीतीचा. हिचें स्वरूप वर जें सांगितलें आहे, त्यावरूनहि लक्षांत येईलच. शिवाय हरएक गोष्टीच्या संबंधानें इंग्रेज

---

१. वरील पवित्रशास्त्रोक्त कथेवर रचलेली एक नक्कल १३ व्या अंकांत दिलेली आहे, ती आमच्या कित्येक वाचकांस आठवत असेलच. असल्या नकला इंग्रेजी पुस्तकांतून येऊं लागल्या यावरून खिस्ती वाचकांची आस्तिक्यबुद्धि कितपत आहे याची कल्पना बरीच होणारी आहे !

लोकांस आपल्या देशाचा अभिमान जो वाटतो: व कोणत्याहि तऱ्हेचें दूषण त्यांस बिलकूल न खपून तें ऐकतांच त्यांची तळव्याची आग मस्तकाला जाऊन पोंचते; हेंहि त्यांच्या स्वदेशभक्तीचेंच दर्शक होय. आतां ही भक्ति कधीं कधीं अत्युत्कट होऊन दुराग्रहापर्यंत जाऊन पोंचते, व त्यामुळें ती प्रशंसेस पात्र न होतां उलटी गर्हणीयहि होते हें खरें आहे; पण कांहींहि असलें तरी आमच्या नवीन मंडळींत जी पूर्ण परमहंसता दृष्टीस पडते, कीं आपल्या देशाविषयीं कोणीं कांहींहि झटलें तरी पूर्ण समाधानवृत्ति प्रगट करायाची, किंबहुना स्वतः जितकीं अप्रयोजक दूषणें त्यावर ठेवायाला सांपडतील तितकीं अवश्य ठेवायाचीं, यापेक्षां वरील हेकटपणाहि शंभर वांटयानें बरा. आतां या कलमाच्या आरंभीं इंग्रेज लोकांच्या राजनिष्ठेविषयीं व धर्मनिष्ठेविषयीं जें लिहिलें आहे त्यावर मात्र अंमळ स्पष्टीकरण केलें पाहिजे. वरील उल्लेख कित्येकांस कदाचित् विलक्षण वाटेल. कां कीं, यापूर्वी अनेक वेळां ख्रिस्ती धर्माविषयीं आह्मीं लिहिलें आहे कीं, त्याचें माहात्म्य दिवसेंदिवस अगदीं कमी होत चाललें आहे, व इंग्लंडांतील राजकीय अंमलाविषयीं तर नुकतेंच वर लिहिण्यांत आलें आहे कीं, तो आतां अगदीं बेताबाताचा असून खरी सत्ता राजाच्या हातांत कांहींच उरली नाहीं. मग या दोन्ही गोष्टी जर खऱ्या आहेत, तर इंग्लिश राष्ट्रांत राजनिष्ठा व धर्मनिष्ठा आहेत हें कसें असा सहजच आक्षेप निघणार आहे. तर याचें उत्तर असें आहे कीं, वरील दोन्ही उल्लेख एकंदर राष्ट्राच्या संबंधाचे आहेत; ह्मणजे धर्मावर अश्रद्धा व लोकस्वतंत्रतेविषयीं प्रीति या दोन्ही वृत्ति सुशिक्षित लोकांचे ठायीं जरी आढळतात तरी अशा लोकांखेरीज बाकीचा जो एकंदर लोकसमुदाय त्याचे ठिकाणीं स्वदेशच्या राजाच्या ठायीं प्रीति व स्वधर्मावर भाव हे पहिल्याप्रमाणेंच कायम आहेत ते आहेत. आतां विद्येचा फैलाव दिवसेंदिवस होत चालल्यानें सर्वांस आपापले हक्क व धर्मांतील तथ्य हीं अधिकाधिक कळूं लागलीं आहेत खरीं, तरी शुक्लद्वितीयेस जसें चंद्राचें बिंब अंशतः मात्र प्रकाशित असून बाकीचा पुष्कळ भाग अंधकारग्रस्त असतो, त्याप्रमाणेंच प्रस्तुत राष्ट्राची स्थिति आहे. यापुढें त्याची स्थिति उत्तरोत्तर सुधारत जाऊन कालेंकरून कदाचित् पौर्णिमेचा चकचकाट होईल, पण सध्यांची अवस्था पाहिली तर सज्ञान व अज्ञान लोकांचें प्रमाण सरासरी वर सांगितल्याइतकेंच आहे.

८. येथवर जॉनसन व त्याचे देशबंधु यांस साधारण असणाऱ्या गुणांचा निर्देश केला. आतां गुणांप्रमाणेंच दोषांचाहि उल्लेख केला पाहिजे. व्यक्तिभूत मनुष्याचे ठायीं गुणदोष जसे साहचर्यानें नेहमीं आढळतातच, किंबहुना गुणांच्या अनुषंगानें दोष व दोषांच्या अनुषंगानें गुण रहावे असाहि नियम या मनुष्यलोकाचे ठायीं आढळतो, त्याप्रमाणेंच राष्ट्रासहि हा नियम लागू पडेल हें उघडच आहे. यास्तव यापुढें इंग्रेज लोकांचे ठायीं असणाऱ्या दोषांचें जें निरूपण करायाचें तें विषयानुरोधानें सहज प्राप्त

झालें आहे, हें सर्वांच्या लक्षांत येईलच. हें येथें विशेषेंकरून सांगण्याचें कारण इतकेंच कीं, वरच्यासारखा प्रसंग विषयानुरोधास्तव आजपर्यंत जेथें जेथें आला आहे तेथें तेथें आमच्या कित्येक सत्यनिष्ठ व ज्ञाननिष्ठ बंधूंचा असा समज होत आला आहे कीं, येथील राज्यकर्त्यांची निंदा करण्याची आह्मांस अतिशय प्रीति असल्यामुळें आह्मी तसें करण्यास प्रवृत्त झालों आहों. अशा समंजस लोकांची कानउघाडी यापूर्वीच नुकती पुष्कळपणें केलेली आहे; यास्तव पुनः येथें इतकेंच सांगणें बस आहे कीं, आमचे लेख कोणाच्याहि तरफदारीनें लिहिलेले नसतात, काळ्यास काळा न्याय व गोऱ्यास गोरा न्याय ही व्यवस्था आमच्या घरची नाहीं. कोणत्याहि पक्षाच्या संबंधानें आमच्या बुद्धीस जें खरें वाटेल तें लिहिण्याचा आमचा मूळ संकल्प आहे. तो पाद्री साहेबांच्या पुढें गोंडा घोळायाचा, अधिकाऱ्यांचें अर्जव करायाचें, असा मुळींच नसल्यामुळें प्रस्तुत पुस्तकांतील मजकूर 'ज्ञानोदया'च्या ज्ञानमय लेखाहून व 'दीपिके'च्या सत्यरूप ज्योतीहून पुष्कळ वेळां अत्यंत भिन्न असतो यांत नवल तें कोणतें ? तेव्हां पुढें जें दोषनिरूपण करायाचें आहे तें वरील गुणनिरूपणाप्रमाणेंच केवळ प्रांजलपणानें केलेलें आहे असें समजावें.

९. पूर्वी सांगितलेंच आहे कीं, निश्चय व अभिमान हे गुण प्रस्तुत ग्रंथकाराच्या ठायीं असून त्याच्या राष्ट्रांतहि ते तसेच आढळतात. या गुणांचे अनुषंगी दोष ह्मटले ह्मणजे तुसडेपणा व तुटकपणा हे होत. निःस्पृहपणानें वागण्याची व कोणाचीहि गरज न बाळगतां स्वतःच्या हिंमतीवर नेहमीं रहाण्याची ज्यास संवय लागून गेली असते त्याची प्रकृति सहजच तापट बनते. कोणाचेंहि मिंधें रहाण्याची त्यास गरज न पडल्यामुळें तो अर्थात् कोणाशींहि आर्जवानें रहात नाहीं, व त्यामुळें एकलकोंडेपणा व तिरसटपणा हे गुण त्यास जडतात. जॉनसनविषयीं यासंबंधाचे उल्लेख पूर्वी अनेकशः केलेच आहेत, कीं कोणी पदवीनें केवढाहि थोर असला किंवा त्याचा कितीहि परिचित असला तरी वेळ आली असतां त्याचा तामसपणा पूर्णपणें प्रगट होत असे; व एरवीं तो स्वभावानें पराकाष्ठेचा सज्जन असतांहि या त्याच्या प्रकृतीस्तवच लोक त्याजपासून दूर रहात. इंग्रेज लोकांचाहि एकंदरींत पहातां हाच स्वभाव आहे. त्यांचा देश साऱ्या युरोपापासून विलग असल्यामुळें बेपर्वाईपणा व तुटकपणा हे गुण त्यांच्या ठायीं जसे आढळतात तसे बहुधा कोणत्याहि युरोपस्थ राष्ट्रांत आढळणार नाहींत. आतां हें खरें कीं, या वृत्तींच्या योगानेंहि त्या देशाचें कांहीं अंशीं कल्याण झालें आहे; तरी कांहीं असलें तरी त्या दोषरूप होत यांत संशय नाहीं.[१]

१. वर सांगितलेलें दूषण कित्येक राजनिष्ठ मंडळीस कदाचित स्वकपोलकल्पित वाटेल, यास्तव त्यांच्या प्रत्ययार्थ तिकडचींच कांहीं प्रमाणें दाखल केलीं पाहिजेत. गोल्डस्मिथनें (पुढें चालू).

१०. पण वरच्याहूनहि एक मोठा दोष पूर्वोक्त गुणांपासून उत्पन्न होणारा आहे; तो तसाच जॉनसन यास व एकंदर इंग्रेज लोकांस साधारणभूत आहे. हा कोणता, तर दुराग्रह होय. बॉसवेलचें 'चरित्र' समग्र वाचलें असतां जॉनसनसारख्या थोर व पोक्त बुद्धीच्या मनुष्यासहि हरएक विषयासंबंधीं किती विलक्षण ग्रह जडलेले असत ते सर्व स्पष्ट दिसतात, व त्यांचा वाचकांस अतिशयित आचंबा वाटल्यावांचून रहात नाहीं.

'मुशाफर' या नांवाच्या काव्यांत आपण पाहिलेलीं युरोपांतील राज्यें मुख्यमुख्य वर्णिलीं आहेत, त्यांत स्वदेशाविषयीं त्यानें लिहिलें आहे—

"That Liberty, which Britons prize too high,
Keeps man from man, and breaks the social tie.
The self-dependent lordlings stand alone
All claims that bind and sweeten life unknown."

आपल्या देशबंधूंचें वर्तन एका ओळींत त्यानें वर्णिलें आहे—

"Pride in their port, defiance in their eye !"

पण दूर कशाला ? खुद्द जॉनसनचाच अभिप्राय पहा—

"Though a stern trueborn *Englishman*, and fully prejudiced against all other nations, he had discernment enough to see, and candour enough to censure, the cold reserve too common among Englishmen towards strangers; "Sir" said he, "two men of any other nation who are shown into a room together, at a house where they are both visitors, will find some conversation. But two Englishmen will probably go each to a different window, and remain in obstinate silence. Sir, we as yet do not enough understand the common rights of humanity."

—Boswell's *Life*.

?. "The characteristic peculiarity of his intellect was the union of great powers with low prejudices. If we judged of him by the best parts of his mind, we should place him almost as high as he was placed by the idolatry of Boswell; if by the worst parts of his mind, we should place him even below Boswell himself. Where he was not under the influence of some strange scruple, or some domineering passion which prevented him from boldly and fairly investigating a subject, he was a wary and acute reasoner, a little too much inclined to scepticism, and a little too fond of paradox. No man was less likely to be imposed upon by fallacies in argument, or by exaggerated statements

(पुढें चालू).

या ग्रहांपैकींच आपल्या देशाची सर्व प्रकारें स्तुति व परदेशांची बहुधा सर्व गोष्टींच्या संबंधानें निंदा करण्याची जी त्याची प्रवृत्ति वरील ग्रंथांत भरपूर दृष्टीस पडते ती होय. एशियाखंडांतील दूर व अप्रसिद्ध राष्ट्रांची गोष्ट तर दूरच, पण फ्रान्स, स्कॉटलंडासारखे जवळचे देश, व ग्रीक, रोमन यांसारखीं साऱ्या अर्वाचीन सुधारणेस मूलस्तंभभूत व जगत्प्रसिद्ध राष्ट्रें हींहि प्रस्तुत महापंडिताच्या तडाक्यांतून सुटलीं नाहींत. सर्वांवर पाळीपाळीनें त्याच्या वाक्शस्त्राचा तीव्र प्रहार झालेला आहेच. ग्रीक व रोमन लोकांविषयीं जॉनसननें एकदां असें मत प्रदर्शित केलें कीं, ते सामान्यतः पहातां रानटीच असावे; कां तर त्यांच्यांत छापखाने नसल्यामुळें ज्ञानप्रसार होण्याचें साधन त्यांस मुळींच अनुकूल नव्हतें. स्कॉच व फ्रेंच यांजविषयींहि तो नेहमीं अत्यंत तिरस्कार प्रगट करीत असे. तो ह्मणे, या लोकांसारखे गलिच्छ लोक कोणतेहि नसतील! या भयंकर आरोपाचें कारण एवढेंच झालें कीं, तो पारिस शहरांत होता तेव्हां एका फ्रेंच चाकरास भुईवर थुंकून ती थुंकी बुटानें पुसून टाकतांना त्यानें पाहिलें; व तसेंच एडिनबरो शहरांत तो खाणावळींत उतरला असतां त्यानें साखर मागितली, ती एका चाकरानें हातांत आणून त्याच्यापुढें केली. या पाजीपणाच्या कृत्याचा जॉनसनला त्या वेळेस इतका राग आला होता कीं, त्यास उचलून खिडकींतून खालीं झुगारून द्यावा अशें त्यास वाटलें!![1] फिनिशियन लोक प्राचीन काळीं मोठे नामांकित नाविक होते; व जेव्हां होकायंत्राची माहिती नव्हती, व समुद्रांचे नकाशे वगैरे बिलकूल साधन नव्हतें, अशा काळींहि सगळ्या भूमध्यससमुद्रभर ते हिंडत व ब्रिटनसारख्या दूरदूरच्या बेटांशींहि त्यांचा व्यव-

of fact. But if, while he was beating down sophisms and exposing false testimony, some childish prejudices, such as would excite laughter in a well-managed nursery, came across him he was smitten as if by enchantment. His mind dwindled away under the spell from gigantic elevation to dwarfish littleness. Those who had lately been admiring its amplitude and force were now as much astonished at its strange narrowness and feebleness as the fisherman in the Arabian tale, when he saw the Genie, whose stature had overshadowed the whole sea coast, and whose might seemed equal to a contest with armies, contract himself to the dimensions of his small prison, and lie there the helpless slave of the charm of Solomon !''

—Macaulay.

१. वरील गोष्ट वाचून वाचकांस सहज तर्क होईल कीं, साखरेचा स्पर्शहि जॉनसनसारख्यास जर इतका अमंगळ वाटला, तर कढीचा भुर्का तर किती अपवित्र ठरेल कोण जाणे! खरोखर, हिंदूंच्या रानटीपणाचें प्रमाण दुसरें कोणतेंच पहायाला नको!!

हार चालत असे. यावरून तर त्यांच्या नाविकज्ञानाचें व धाडसाचें अतिशयित आश्चर्य वाटतें ! पण अशा लोकांचीहि प्रशंसा जॉनसनच्या ज्ञानमय कर्णरंध्रांत दुःसह होई. एके प्रसंगीं त्यांच्या नाविकविद्येची कोणी वाखाणणी करीत असतां त्याचा उद्गार निघाला, "काय हो ! यांची ती काय मोठी तारीफ करतां कुत्रीं नाहीं का पोहत" ! ! चिनी लोक रानटी का सुधारलेले याविषयीं एके प्रसंगीं गुरुशिष्याचें खलबत चाललें असतां बॉसवेल या विचाऱ्या प्राच्य राष्ट्राची कड घेऊन ह्मणाला—"चिनी लोक ज्ञानसंपन्न आहेत." गुरूनें लागलीच त्याच्या डोळ्यांत अंजन घालून त्याचा दृग्भ्रम दूर केला—"खरें बोवा, भांडीं करण्याची विद्या त्यांस अवगत आहे खरी !" दुसऱ्या एका प्रसंगीं हिंदुस्थानांतील प्रसिद्ध सेनापति सर ऐर कूट, ज्यानें नुकताच हैदरअल्लीचा पराभव करून मद्रास इलाखा बचाविला होता, त्याच्या घरीं भोजनाचे वेळीं आरब लोकांची गोष्ट निघाली. कूटसाहेब नुकताच आरबस्थानांतून आला होता, यास्तव वाटेनें तद्देशीयांची स्थिति जी त्याच्या दृष्टीस पडली होती तिची तारीफ करून त्यांचें प्राच्यदेशप्रसिद्ध जें इमान व शौर्य त्यांचें तो वर्णन करीत होता हें अर्थातच आमच्या पाश्चात्य पंडिताशिरोमणींस न खपून त्यांनीं आपल्या आवडत्या देशबंधूचा शह विचाऱ्या आरबांवर बिनदिकत ठेवून दिला ![1] पण हेंहि सर्व जुन्या जगाविषयीं झालें. नव्या जगांत इंग्रेज

१. "We went to Sir Eyre Coote's, at the governor's house and found him a most gentlemanlike man. His lady is a very agreeable woman, with an uncommonly mild and sweet tone of voice. There was a pretty large company : Mr. Ferne, Major Brewse, and several officers. Sir Eyre had come from the East Indies by land, through the deserts of Arabia. He told us the Arabs could live five days without victuals, and subsist for three weeks on nothing else but the blood of their camels, who could lose so much of it as would suffice for that time, without being exhausted. He highly praised the virtue of the Arabs; their fidelity, if they undertook to conduct any person; and said they would sacrifice their lives rather than let him be robbed. Dr. Johnson, who is always for maintaining the superiority of civilized over uncivilized men, said, "Why, I can see no superior virtue in this. A serjeant and twelve men, who are my guard, will die rather than that I shall be robbed." Colonel Pennington of the 37th regiment, took up the argument with a good deal of spirit and ingenuity. *Pennington.* "But the soldiers

(पुढें चालू).

लोकांनींच वसवलेलें एक मोठें राज्य आहे हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. हें राज्य जॉनसनच्या वेळेपर्यंत इंग्लंडच्या ताब्यांत होतें; पण त्याच्या हयातीच्या शेवटीं शेवटीं या वसाहतवाल्यांची व इंग्रेजांची करांच्या बाबतींत कुरबुर होऊन होतां होतां युद्धप्रसंगावर येऊन बेतली. तरी वसाहतवाले न डगमगतां त्यांनीं मोठ्या शर्थेनें आपला बचाव करून इंग्लंडचा पराभव केला. ही गोष्ट जॉनसनच्या मरणाच्या आदल्या वर्षी घडून तेव्हांपासून युनेटेड स्टेटस (संयुक्त संस्थानें) या नांवाचें अमेरिकेंत नवेंच राज्य स्थापित झालें. स्वातंत्र्य व भरभराट या दोहोंच्या संबंधानें पहातां यासारखें राज्य आज साऱ्या भूमंडळावर नाहीं अशी त्याची सर्वत्र कीर्ति आहे; व वॉशिंगटन, फ्रांकलिन यांसारखे जगन्मान्य पुरुष प्रस्तुत ग्रंथकाराच्या वेळेसहि स्वदेशास भूषित करीत होते. पण कांहीं नाहीं; एक राजनिष्ठेचें तत्त्व जॉनसनच्या हृदयांत पूर्ण बिंबून गेलें असल्यामुळें न्याय्य पक्षाविषयीं अभिमान, गुणिजनाविषयीं पूज्यबुद्धि वगैरे सर्व वृत्ति त्याचे ठायीं एका क्षणांत लीन होऊन गेल्या. त्यानें आपल्या लेखणीचेंहि सामर्थ्य वरील राज्यक्रांतीच्या प्रसंगीं अन्यायाच्या तर्फेनेंच प्रगट केलें हें मागें सांगितलेंच आहे. असो; तर या अमेरिकन लोकांविषयींहि जॉनसनच्या ठिकाणीं जबरदस्त दुराग्रह नांदत असे. इंग्लंडचें वर्चस्व चोहोंकडे गाजत असतां यांनीं मात्र त्याचें नाक खालीं केलें, हें त्यास बिलकूल न खपून तो त्यांच्यावर नेहमीं दांत ओंठ खात असे. 'त्यांस जाळून पोळून टाकिलें पाहिजे,' 'एका मृत्यूच्या शिक्षेखेरीज बाकी कोणतीहि सजा जी आह्मी त्यांस देऊं तिजबद्दल त्यांनीं आमचे उपकार मोजले पाहिजेत' अशा तऱ्हेचीं भयंकर व क्रूरतेचीं वाक्यें त्याच्या तोंडून वरील लोकांविषयीं नेहमीं ऐकूं येत. 'अमेरिकन' हें नुस्तें नांव काढल्याबरोबर तो रागानें खवळून जाऊन वेडा होई. एके प्रसंगीं त्यानें असें बोलून दाखविलें कीं, 'साऱ्या जगास मी मित्रासमान लेखतों, एका अमेरिकनास मात्र नाहीं.' असो; तेव्हां वरील सर्व उदाहरणांवरून आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, जॉनसनच्या मतें प्रशंसनीय तेवढे सर्व गुण त्याच्या राष्ट्राचे ठायीं असून सारें अज्ञान, मूर्खत्व, दुष्टत्व काय तें इतर राष्ट्रांत पाहून घ्यावें!

---

are compelled to this, by fear of punishment." *Johnson.* "Well, Sir, the Arabs are compelled by the fear of infamy." *Pennington.* "The soldiers have the same fear of infamy, and the fear of punishment besides; so have less virtue; because they act voluntarily." Lady Coote observed very well, that it ought to be known if there was not among the Arabs some punishment for not being faithful on such occasions."

—*Tour to the Hebrides.*

आतां वर जो विशेषतः एका व्यक्तीविषयीं उल्लेख केला तो सामान्यतः सर्व राष्ट्राचे ठिकाणींहि कोणत्या प्रकारें आढळतो तें सांगणें अवश्य होय, व पूर्वक्रमास अनुसरून ह्मटलें ह्मणजे तसें केलेंहि पाहिजे. पण प्रस्तुत स्थळीं तसें करणें इष्ट दिसत नाहीं. कां कीं, एक तर या पूर्वी अनेक स्थळीं प्रकृत विषयावर उल्लेख केलेलेच आहेत. यास्तव ते येथें पुनरुक्त होणारे आहेत. पण याहून मोठें सबळ कारण ह्मटलें ह्मणजे हें होय कीं, तसें केल्यानें आमच्या विद्यालयसंपादित ज्ञानाचा अपव्यय होणारा आहे. आमच्या मूढ देशबंधूंस सन्मार्ग दाखविण्याची ज्यांनीं परम दीक्षा धारण केली आहे अशा कित्येक ज्ञानमूर्तींचा असा अभिप्राय अनेक वेळां प्रगट झालेला आहे कीं, सरकारानें श्रमाचा व अर्थाचा एवढा व्यय करून ज्ञानांजनशलाकेनें एतद्देशीयांची दृष्टि स्वच्छ जी केली ती एवढ्याकरितां कीं, त्यांनीं आपले दोन्ही डोळे साफ उघडून न पहातां एक नेहमीं मिटून ठेवला पाहिजे. हा मिटायाचा डोळा दोषदर्शनाचा होय. याचा उपयोग पाहिजे तर आपल्या स्वदेशांतील हरएक प्रकरणीं छिद्रें बाहेर काढून तीं 'ज्ञान' व 'सत्य' या नांवांनीं साऱ्या जगास प्रकट करण्यांत खुशाल करावा; तसें करण्यांत पुण्यसंग्रह आहे, व देशाचें अपरिमित कल्याण आहे. पण हीच दुर्बीण युरोपाकडे व विशेषेंकरून त्यांतील एका बेटाकडे लावण्याचा मात्र आह्मांला बिलकूल अकत्यार नाहीं. तिकडे दृष्टि फेंकायाची असेल तर दुर्बीण उलटी करून थोरलें भिंग पुढें सरसावलें पाहिजे. तसें केलें असतां सहजचं तिकडे मेघमंडळास भेदून गेलेले पर्वत, समुद्रप्राय अफाट नद्या, नाना धान्यसमुदायांनीं सतत आच्छादित असणारा भूपृष्ठभाग, इत्यादि वैभव दृष्टिगोचर होणार आहे ! असो; तर आमच्या सन्मान्य सद्धर्मी बंधूंच्या वरील उपदेशास मान देऊन आमच्या देशावर राज्य करणाऱ्या राष्ट्राच्या संबंधानें वर जें लिहिणें जरूर होतें तें येथें लिहीत नाहीं. आह्मांस मेहेरबानीनें दिलेल्या विद्याधनाचें खरें चीज जर जॉनसनच्या देशबंधूंचा स्तव केल्यानेंच होणार आहे, तर तसेंच कां होईना ? माजी बादशाही अमलांत जसें 'हाजी जीहां' या शब्दांचें माहात्म्य असे, व रूमच्या बादशाहांपुढें जसा देवतांप्रमाणें धूपहि जळत असे, तशीच जर या वर्षापासून सुरू झालेल्या सुधारलेल्या बादशाहीचीहि स्थिति असेल, तर आपलें तरी काय जातें 'दीपिका' ओंवाळायाला व 'उदयोऽस्तु' ह्मणायाला ! उगाच विनाकारण लांबलचक मजकूर लिहून 'हत्ती' महाराजांस आपला शुंडादंड उचलण्याचा प्रसंग आणा, किंवा त्यांचा पुच्छावलंब करणाऱ्या आमच्या देशबंधूंस व त्यांच्या धर्मबंधूंस राजनिष्ठेनिमित्त दौतींत लेखणी बुडवायास लावा, यांत मौज ती कोणती !

असो; येथवर आरंभीं सांगितलेलें जें प्रस्तुत ग्रंथकाराचें व त्याच्या राष्ट्राचें सादृश्य त्याचें निरूपण केलें. यापुढचा राहिलेला भाग आतां सरतेशेवटच्या अंकांत येईल.

कीं तोडिला तरु फुटे अणखीं भरानें
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें ॥ नीतिशतक.

अंक ४३-(१) प्रकृत अंकाचा विषय. (२) लोकस्थितीचें द्विविध सादृश्य. (३) जॉनसनच्या वेळीं लोकभाषेची व विद्येची स्थिति. (४) महाराष्ट्र भाषा; कोश व व्याकरण. (५) निबंधादि रचनापद्धति. (६) या सादृश्यावरून घ्यावयाचा बोध. (७) दुसरें राज्यपद्धतीचें सादृश्य.

१. मूळ उपोद्घातांत सांगितल्यापैकीं एक सदर मात्र आतां उलगडायाचें राहिलें आहे; बाकी मूळ संकल्पाप्रमाणें सारें विवरण झालें. हें सदर लोकस्थितीचें सादृश्य होय. जॉनसनच्या वेळेस इंग्लंडांतली स्थिति जी होती ती सांप्रतच्या या देशांतील स्थितीला बऱ्याच अंशीं मिळते; यास्तव दोहोंचें विवरण करून परस्पर तुलना केली असतां एतद्देशीयांस बरीच माहिती होऊन कांहीं उपयोगाच्या गोष्टीहि कळणार आहेत.

२. हें सादृश्य दोन प्रकारचें आहे; एक विद्येच्यासंबंधाचें व दुसरें लोकस्थितीच्या संबंधाचें. पहिलें सादृश्य असें कीं, जॉनसनच्या वेळीं इंग्रेजी भाषेची स्थिति हल्लींच्या महाराष्ट्र भाषेप्रमाणेंच कित्येक अंशीं असून वाचकांच्या अंगींहि इकडच्या इतकीच अभिज्ञता व रसिकता होती. लोकस्थिति पाहिली, तर इकडूनहि सरकार व प्रजा यांची अधिकाराच्यासंबंधानें परस्पर स्पर्धा लागली असल्यामुळें हल्लींचा येथील प्रकार तिकडे पुष्कळ दृष्टीस पडत होता. असो; तर आतां दोहोंचें अनुक्रमानें निरूपण करतों.

३. जॉनसनचें मागील चरित्र समग्र वाचून आधुनिक महाराष्ट्र भाषेचें व तत्कालीन इंग्रेजी भाषेचें बरेंच सादृश्य शोधक वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलें असेल. अलीकडे दहा वीस वर्षांत इकडे ज्याप्रमाणें देशभाषेची सुधारणा करण्याकडे विद्वानांचें लक्ष लागलें आहे, त्याप्रमाणेंच तिकडेहि जॉनसनच्या वेळेच्या सुमारास इंग्रेजी भाषेस परिपक्वता आणण्याविषयीं विद्वज्जनांचे परिश्रम चालू झाले होते. प्रथमतः जॉनसनच्या 'कोशा'विषयीं विचार केला असतां ध्यानांत येईल कीं, त्याच्या वेळेपर्यंत भाषेचें नियमनहि झालें नव्हतें. ज्याला जसें वाटेल तसें तो लिहीत असे. लेखनपद्धति, उच्चार, व शब्दप्रयोग याविषयीं तादृश निर्बंध नव्हता.[१] याप्रमाणेंच निबंध, कादंबरी व चरित्र

---

१. जॉनसननें इंग्रेजी भाषेचें सुकाणू हातीं धरून तिचें नियमन करण्यापूर्वी तींत काय काय घोंटाळा होता तो त्याच्या कोशाच्या प्रस्तावनेवरून तर कळणारच आहे; पण पुढील उताऱ्यावरूनहि त्याचें स्वरूप वाचकांस थोडक्यांत कळेल. हा उतारा 'रांबलर'च्या शेवटच्या अंकांतील होय. ही निबंधावलि वरील कोश चालत असतांच सुरू होऊन शेवटास गेली हें वाचकांस कळलेंच आहे—

"Whatever shall be the final sentence of mankind, I have at least endeavoured to deserve their kindness. I have laboured to

(पुढें चालू).

यांचा प्रघातहि प्रस्तुत पंडिताच्या वेळेपासूनच विशेष पडला. 'स्पेक्टेटर' व 'रांबलर' यांची लोकमान्यता पाहून त्यांच्या धाटणीवर अनेक ग्रंथकारांनीं निबंधावलि रचल्या. या जरी बहुतेक स्वकरच लयास गेल्या, तरी प्रस्तुत शतकाच्या आरंभीं निबंधरचनेचा त्रैमासिक पुस्तकांच्या रूपानें जो नवा प्रकार सुरू झाला त्यास त्या कारणीभूत झाल्या हें मागें एके निबंधांत सांगितलेंच आहे. कादंबऱ्यांचा प्रघातहि जॉनसनच्या वेळेस सुरू होऊन रिचर्डसन, फील्डिंग, स्मॉलेट वगैरे नामांकित कादंबरीकार उदयास आले. जॉनसन व गोल्डस्मिथ यांनींहि एक एक कादंबरी रचली ती सर्वप्रसिद्धच आहे. हाहि प्रकार वरील निबंधाप्रमाणेंच या शतकांत वृद्धिंगत होऊन स्कॉट, डिकन्स, लिटन यांच्यासारखे जगत्प्रसिद्ध कादंबरीकार निपजले, व आपल्या देशभाषेस आपल्या अमोलिक ग्रंथांनीं त्यांनीं भूषित केलें. तिसरा चरित्ररचनेचा प्रकार; हा तर जॉनसननेंच चांगल्या उत्कर्षास आणला हें त्याच्या 'कविचरित्रा'विषयीं निरूपण करितांना सांगितलेंच आहे. याप्रमाणेंच इंग्रेजी भाषेंत इतिहासग्रंथांचीहि प्रवृत्ति वरील काळापासूनच पहून ह्यूम, रॉबर्टसन, गिबन वगैरे ग्रंथकार प्रसिद्धीस आले हेंहि यापूर्वी एका निबंधांत सविस्तर सांगण्यांत आलेंच आहे.

४. आतां इकडे महाराष्ट्रभाषेची स्थिति पहा. या भाषेची पूर्वीची स्थिति कशी होती, व अलीकडे पंचवीस तीस वर्षांत तीस कोणकोणते संस्कार घडले, याविषयीं यापूर्वी अनेक वेळां प्रसंगवशात उल्लेख केलेलेच आहेत. यास्तव प्रकृत स्थलीं दोन गोष्टींच्या संबंधानें मात्र लिहितों ह्मणजे पुरे. भाषेचें नियमन होण्यास दोन मोठीं साधनें लागतात; एक कोश व दुसरें व्याकरण. कोशाच्या योगानें तींतिल शब्दसमुदाय निश्चित होऊन तिचा लेखनप्रकार, वर्णोच्चार व व्युत्पत्ति हीं ठरून जातात. तसेंच व्याकरणानें तिचे नियम ठरून जाऊन शुद्धाशुद्धतेविषयीं निर्बंध होतो. हीं दोन्ही साधनें मराठीस अनुकूल आहेत हें सर्वांस माहीत आहेच. कोश झटले ह्मणजे शास्त्री

---

refine our language to grammatical purity, and to clear it from colloquial barbarisms, licentious idioms, and irregular combinations. Something, perhaps, I have added to the elegance of its construction, and something to the harmony of its cadence. When common words were less pleasing to the ear, or less distinct in their signification, I have familiarised the terms of philosophy, by applying them to popular ideas, but have rarely admitted any word not authorised by former writers; for I believe that whoever knows the English tongue in its present extent, will be able to express his thoughts without further help from other nations."

मंडळीनें केलेला मराठी कोश, आणि मोलस्वर्थ व क्यांडी यांनीं रचलेले मराठी व इंग्रेजी कोश, हे होत; व व्याकरण तर रा० व० दादोबा पांडुरंग यांचें सर्वप्रसिद्धच आहे. आतां पहिला मराठी कोश सध्यां मुळींच प्रसिद्ध नसून कोठें आहे तो जुन्या पुस्तकालयांतून वगैरे लोळत पडलेला आढळतो, व त्याचा संक्षेप[1] कांहीं वर्षांपूर्वी छापला गेला त्याचीहि अवस्था मूळ कोशाप्रमाणेंच आहे; तसेच दुसरा व तिसरा कोश हे इंग्रेजी भाषत असल्यामुळें ती भाषा ज्यांस चांगली समजते त्यांसच त्यांचा उपयोग, व शिवाय त्यांची किंमत भारी असल्यामुळें त्यांचा सार्वजनिक प्रचार होणेंहि दुरापास्त; त्याप्रमाणेंच दादोक्त व्याकरणाच्या योगानें भाषेस जरी पुष्कळ साहाय्य झालें तरी त्यांत न्यूनतेचे अनेक प्रकार आहेत, हें सर्व खरें; तरी भाषाप्रसाधनाचीं वरील जीं दोन मुख्य साधनें तीं आमच्या भाषेचीं सिद्ध होऊन चुकलीं आहेत ही गोष्ट संतोषाची होय यांत संशय नाहीं. वरील उद्योग मागेंच होऊन गेल्यामुळें आजला भाषा इतक्या स्थितीस येऊन पोंचली ही एक नफ्याची गोष्ट झाली; व त्यांतून कोशांविषयीं पाहिलें तर ते सरकारच्याच आश्रयानें रचले जाऊन पुनः इतक्या आस्थेनें जे तयार झाले, ते लोकाश्रयानें तर होण्याचा मुळींच संभव नव्हता. तेव्हां महाराष्ट्र भाषेवर सरकारची ही एक मोठी मेहेरबानीच झालीशी समजली पाहिजे. विशेषतः मोलस्वर्थचा कोश तर मराठी भाषेचें उत्तम ज्ञान होण्यास फारच उपयोगी आहे, व कांहीं अंशीं जॉनसनच्या कोशाचीहि उपमा त्यास साजेल[2] असो; तर कोश व व्याकरण यांची सध्यां इतपत स्थिति आहे.

आतां वरील दोन साधनांच्या योगानें भाषेची अभिवृद्धि जर व्हावयाची असेल तर त्यांचा सार्वत्रिक प्रचार झाला पाहिजे हें तर उघडच आहे; हा प्रचार वर सांगितलेल्या व्याकरणाचा झालेलाच आहे, कोशाचा मात्र झालेला नाहीं. यास्तव जॉनस-

---

१. मागील अंकाच्या आरंभीं सांगितलेला जो मराठी कोश तोच वरील संक्षेप होय. माजी डायरेक्टर मेहेरबान ग्रांट साहेब यांच्या हुकुमावरून रा. गोडबोले यांनीं तो तयार केला होता; पण तो छापून प्रसिद्ध होण्यापूर्वी ग्रांट साहेबांची कारकीर्द संपल्यामुळें वरील कोश जागच्या जागींच राहिला! तो आतां सरकारी डिपोंत पडला आहे. ही माहिती कोशकर्त्यांकडून आह्मांस मिळाली आहे.

२. मोलस्वर्थच्या कोशास वरील उपमा जी दिली आहे, ती यावरून कीं त्यांत नाना प्रकारची माहिती जेथें तेथें सांपडते. आपल्या लोकांत सध्यां प्रचारांत असणाऱ्या व कालगत्या लोपून गेलेल्या सर्व चमत्कारिक ह्मणींचा संग्रह त्यांत केलेला आहे. त्याप्रमाणेंच शेंकडों जुने व प्रौढ शब्द व भाषणपद्धति हीं त्यांत आहेत. याखेरीज, 'अष्टविवाह', 'अठरा कारखाने', 'नवरत्नें', 'चौदा विद्या', चौसष्ट कळा', 'राग', इत्यादि शब्द पाहिले असतां सदरील ग्रंथ केवढ्या श्रमानें व किती आस्थेनें तयार केला आहे, हें पूर्णपणें लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

नच्या कोशाप्रमाणें वरील कोशाचें जर रूपांतर झालें, ह्मणजे महाराष्ट्र शब्दांची महाराष्ट्र भाषेनेंच व्याख्या होऊन तो सर्वजनगम्य जर झाला, तर भाषा ठरीव होण्यास व घेडगुजरी प्रकार मोडून तिची सुधारणा होण्यास तो कारणीभूत होईल. तर भाषेचा उत्कर्ष व देशाचें हित हीं व्हावींशीं ज्यांस वाटत असतील त्यांनीं वरील साधन लोकांस अनुकूल करून देण्याविषयीं झटलें पाहिजे. पूर्वोक्त दोन कोशांवरून पाहिलें असतां वर सांगितला तसा कोश तयार होणेंहि मोठें कठिण आहे असें नाहीं. कारण शब्दांचें संग्रहण व त्यांचें व्याख्यान हे दोन्ही मुख्य भाग अगोदरचे सिद्धच आहेत. एक नवा जोडण्यासारखा भाग झटला ह्मणजे अवतरणांचा मात्र होय. जॉनसनच्या कोशांत जशीं भरपूर अवतरणें आहेत तशीं महाराष्ट्र भाषेंतील जुन्या व सर्वमान्य ग्रंथांतून वरींच देतां येणार आहेत. आतां एवढें खरें कीं, जॉनसनच्या वेळेपर्यंत गद्यरचना व पद्यरचना करणारे शतावधि मोठमोठे ग्रंथकार होऊन गेले होते, तशी आमची मराठीची निदान अद्याप तरी स्थिति झालेली नाहीं. यास्तव त्यास आपल्या कोशांत जसें वैचित्र्य आणतां आलें तसें इकडे आणतां येणार नाहीं. तरी सध्यां पूर्वीच्याच पद्यात्मक ग्रंथांतून मुख्यतः अवतरणें दिलीं असतां कांहीं काळानें पुढें गद्यग्रंथांतूनहि तीं देऊन कोशास क्रमाक्रमानें पूर्णता आणतां येईल हें उघड आहे.

मराठी व्याकरणाविषयीं पाहिलें, तर त्याचा आज वीस पंचवीस वर्षें चांगला प्रचार पडून तें बहुधा ठरीव झाल्यासारखेंच झालें आहे. तरी अद्याप मराठीच्या मूलभाषा ज्या संस्कृत, प्राकृत, फारसी वगैरे त्यांच्याकडे एतद्देशीय पंडितांचें हवें तसें लक्ष न लागल्यामुळें त्यांच्या धोरणानें वरील विषयाचा व्हावा तसा विचार अजून झाला नाहीं. तो झाला असतां व्याकरणविषय सध्यां आहे त्याहून अधिक सुगम व चित्तवेधकहि होईल असें आह्मांस खचित वाटतें.

५. आतां वर सांगितलेले गद्यप्रकार ह्मणजे निबंध, कादंबरी, चरित्र व इतिहास हे आपल्या भाषेंत कसे सुरू झाले आहेत व त्यांची मजल कोठपर्यंत पोंचली आहे याविषयीं यापूर्वी एक दोन अंकांत बरेंच निरूपण केलें आहे. त्याहून अधिक विवरण झटलें ह्मणजे निराळ्याच ठिकाणीं केलें पाहिजे. यास्तव येथें सामान्यतः इतकेंच सांगतों कीं, ज्या अर्थीं इंग्रेजी भाषेंतील नमुन्यांवर वरील पद्धति सुरू झाल्या आहेत त्या अर्थीं त्या सुधारण्यास मूळ नमुन्यांची उत्कृष्ट माहिती करून घेणें व त्यांवर निरंतर विचार करणें हें अवश्य होय. उत्कृष्ट चित्रकर्म किंवा मूर्तिकर्म साध्य करून घ्यावयाचें असल्यास ज्याप्रमाणें मूळ अस्सल प्रती नेहमीं पुढें धरून कलम किंवा विंधणें हें चालवावें लागतें, त्याप्रमाणेंच वरील रचनाविशेषांचीहि गोष्ट आहे. ही गोष्ट इतकी उघड असतांहि ती आमच्या लोकांस अद्याप चांगलीशी समजत नाहीं. याविषयींचा प्रत्यय पहाणें असल्यास अलीकडे वरचेवर निघणाऱ्या ज्या कादंबऱ्या त्यांवरून पहावा. या

कादंबऱ्यांतील बहुतेक तर अगदीं सामान्य प्रतीच्या ह्मणजे थोडें बहुत शिक्षण ज्यांस प्राप्त झालें आहे न आहे अशा लोकांच्या हातूनच रचल्या जातात हें सर्वांस माहीत आहेच. अशा लोकांस इंग्रेजींतील विख्यात कादंबरीकारांचीं नांवेंहि माहीत असण्याचा संभव नाहीं हें उघड आहे. पण हें असो; ज्यास जें साधन अनुकूल नाहीं त्याचा त्यानें उपयोग करून न घेतल्याबद्दल त्यास नांव ठेवणें रास्त नाहीं. पण जे चांगले सुशिक्षित ह्मणविणारे त्यांजकडूनहि वरील साधनाचा उपयोग झालेला तितपतच पहाण्यांत येतो. असो; तर वरील पद्धति व इतर कोणतीहि गोष्ट उत्तम स्थितीस यावी असें जर मनांत असेल, तर ज्यांचें अनुकरण करावयाचें त्यावर निरंतर ध्यान ठेवून सतत परिश्रम चालले पाहिजेत हें एतद्देशीयांनीं पक्कें मनांत बागविलें पाहिजे.

६. वर जें सादृश्य सुमारें शंभर वर्षांपूर्वीच्या इंग्रेजी भाषेंत व हल्लींच्या मराठी भाषेंत दाखविलें त्यावरून एक मोठी गोष्ट वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. ती ही कीं, इंग्रेज ग्रंथकारांच्या परिश्रमांनीं ती भाषा जर आज इतक्या नांवारूपास आली, तर आमच्या लोकांनीं जर तसाच उद्योग केला, तर तितकें किंवा निदान त्याच्या खालोखाल तरी त्यांच्या श्रमांस यश कां येणार नाहीं? जॉनसनच्या वेळीं 'रांबलर'सारख्या पत्राच्या जर पांचशेंच प्रती कायत्या निघत असत, व काव्यें, नाटकें, कोश वगैरे रचूनहि मोठमोठ्या ग्रंथकारांस सुद्धां उदरनिर्वाहाची पंचाईत पडे, तर यावरून तिकडे त्या वेळीं लोकांची अभिरुचि कितपत होती हें स्पष्ट दिसत नाहीं काय? आमच्या देशांत सार्वजनिक शिक्षणाचा नुकता कोठें प्रघात सुरू झाला आहे, व त्यांतून संपत्तीच्या मानानें पहातां तर आमच्या बिचाऱ्या देशास आंग्लभूमीची पूर्वीहि कधीं सर आली नाहीं, मग सध्यांच्या दुबळ्या स्थितींत तर कशाला गोष्ट बोलायाला पाहिजे? पण

---

१. मेकॉले साहेबांनीं बटाटे फाकणाऱ्या ऐरिश लोकांहून किंवहुना पोर्च्युगीज लोकांहूनहि हिंदु लोकांस कंगाल करून दाखविले आहेत हें आमच्या वाचकांस यापूर्वी एक दोनदां कळविलेंच आहे. मग जागोजाग हिंदु राजे व जहागीरदार असतांहि जेव्हां वरची स्थिति, तेव्हां आतां तर आमच्या देशावर अठरा विश्वे दारिद्र्याची पुरी कळा आली असेल यांत काय काय नवल? वरील साहेबांचे त्यांच्यासारखेच एक जाडे बंधु हिंदुस्थानाविषयीं ह्मणतात कीं, एवढा अफाट देश जिंकल्याची दगदग केल्यासारखी त्यापासून इंग्लंडास कांहीं व प्राप्ति होत नाहीं, उलटें पैशाचें नुकसान मात्र त्यास आहे—

"If India affords a surplus revenue which can be sent to England, thus far is India beneficial to England. If the revenue of India is not equal to the expense of governing India, then is India a burden and drain to England."

—Mill's *British India*.

(पुढें चालू).

इतकें असतांहि आज जर येथील लोकांत वाचनाचा इतका प्रचार दृष्टीस पडतो, तर पुढल्या काळाविषयीं कोणाच्या मनांत उमेद येणार नाहीं ? हें एक झालें. दुसरी गोष्ट वरील साद्यावरून व पूर्वीच्या एकंदर चरित्रावरून एतद्देशीय ग्रंथकारांनींहि घेण्यासारखी आहे कीं, ग्रंथरचनेच्या श्रमाचें साफल्य किती दीर्घ काळानें होत असतें तें त्यांनीं लक्षांत आणावें. पहा कीं, जॉनसनसारखा अलौकिक बुद्धीचा मनुष्य,—कीं ज्याचा पाठशाळेंतील घडा म्हणून रचलेला काव्याचा चुटका त्या वेळचा अद्वितीय कवि पोप यानें वाचून वाहवा केली, ज्याचीं स्वकपोलकल्पित पार्लमेंटांतलीं भाषणें वाचून एका पंडितानें तर त्यास प्रत्यक्ष डिमॉस्थेनीसच्याहि वर जागा दिली, व कोशाचें

वरील विलक्षण वाक्यावर ग्रंथप्रकाशक बिस्सन साहेब यांनीं चांगली समर्पक टीका केली आहे ती आमच्या वाचकांपैकीं ज्यांस तशी अनुकूलता असेल त्यांनीं अवश्य वाचावी.

१. हा प्रसंग जॉनसनच्या एका चरित्रकारानें सविस्तर कथन केला आहे. तो येणेंप्रमाणें–

"That Johnson was the author of the debates during that period was not generally known; but the secret transpired several years afterwards, and was avowed by himself on the following occasion; Mr. Wedderburne, Dr. Johnson, Dr. Francis, the present writer, and others, dined with the late Mr. Foote. An important debate towards the end of Sir Robert Walpole's administration being mentioned Dr. Francis observed, "That Mr. Pitt's speech on that occasion was the best he had ever read." He added, "That he had employed eight years of his life in the study of Demosthenes, and finished a translation of that celebrated orator, with all the decorations of style and language within the reach of his capacity; but he had met with nothing equal to the speech above-mentioned." Many of the company remembered the debate; and some passages were cited, with the approbation and applause of all present. During the ardour of conversation Johnson remained silent. As soon as the warmth of praise subsided, he opened with these words; "That speech I wrote in a garret in Exeter-street." The company was struck with astonishment. After staring at each other in silent amaze, Dr. Francis asked, "How that speech could be written by him?" "Sir," said Johnson, "I wrote it in Exeter-street. I never had been in the gallery of the House of Commons but once.

(पुढें चालू).

प्रचंड काम उरकल्यावर तर जो आपल्या देशभाषेचा जणों काय अधिपतिच होऊन बसला त्यास नित्य निर्वाहाचीहि पंचाईत असावी काय? पण हेंहि एक असो; आपल्या लोकांच्या समजुतीप्रमाणें कोणाकोणास द्रव्यदृष्टि नसते, व दुसऱ्या समजुतीप्रमाणें 'नादत्तमुपतिष्ठति' ('पूर्वजन्मीं न दिलेलें लाभत नाहीं') असें समजून जरी एकवार त्याच्या दारिद्र्याची उपपत्ति केली, तरी हें चमत्कारिक नव्हे काय, कीं त्याच्या प्रचंड विद्वत्तेनुरूप त्याची कोरडी मानमान्यताहि होऊं नये? ही शेवटीं शेवटीं बरीच होऊं लागली, तरी जशी व्हावी तशी कधींहि झाली नाहीं. एकच उदाहरण पहा; आपला यजमान व यजमानीण यांजबरोबर जॉनसन हा आपल्या वयाच्या सासष्टाव्या वर्षीं पारिस शहरास गेला ह्मणून पूर्वी सांगितलेंच आहे. आतां त्याजसारखा अलौकिक पंडित कोठेंहि गेला असतां 'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते' या न्यायानें पहातां त्याचा वरील ठिकाणीं किती मान व्हावा! पुढें कांहीं वर्षांनीं बेंजामिन फ्रांकलिन तेथेंच आला असतां त्याचा आबालवृद्धांकडून केवढा गौरव झाला! चंद्रदर्शनाच्या दिवशीं साऱ्या लोकांची दृष्टि जशी सकौतुक व उत्कंठापूर्वक आकाशाकडे लागलेली असते, किंवा धूमकेतु उगवला असतां सारें जग जसें त्याच्याकडे सचमत्कार पहातें, त्याप्रमाणेंच मोठमोठ्या अमीर उमरावांपासून तों साधारण गरीबगुरीबांपर्यंत सर्वांनीं त्याचा जयजयकार केला. असाच प्रकार त्याच्याहि पुढें कितीका वर्षांनीं सर वॉल्टर स्कॉट हा हवा पालटण्याकरितां इटाली देशास निघाला असतां जेथें तेथें घडून आला. मग यावरून पहातां वरील दोघांहूनहि कित्येक अंशीं ज्याची योग्यता मोठी त्याचा वरील ठिकाणीं बिलकूल मानमरातब न होतां तो केवळ साधारण मनुष्याप्रमाणें गेला तसा माघारीं आला ही मोठी आचंबा करण्यासारखी गोष्ट नव्हे काय?[1]

Cave had interest with the door-keepers. He, and the persons employed under him, gained admittance; they brought away the subject of discussion, the names of the speakers, the side they took, and the order in which they rose, together with notes of the arguments advanced in the course of the debates. The whole was afterwards communicated to me, and I composed the speeches in the form which they now have in the parliamentary debates." To this discovery Dr. Francis made answer: "Then, Sir, you have exceeded Demosthenes himself; for to say that you have exceeded Francis's Demosthenes would be saying nothing."

—*Murphy's Life of Johnson.*

१. जॉनसनची त्याच्या मंडळांत जरी पराकाष्ठेची चहा होती, व सर्व जग त्यास गुरू-

(पुढें चालू).

तर वरील गोष्टींपासून एतद्देशीय ग्रंथकर्त्यांनीं दोन प्रकारचा बोध घ्यावा. एक द्रव्याच्यासंबंधानें. त्यांनीं असें मनांत आणावें कीं, जॉनसनसारख्यास गेल्या शतकांतील इंग्लंडासारख्या देशांत जर इतकी विपत्ति सतत काढावी लागली व तितकी काढावी लागली असतांहि त्यानें एकदां धरलेला मार्ग अस्खलितपणें तसाच सतत चालविला, तर आमच्या धनहीन व ज्ञानहीन देशांत ग्रंथरचनेपासून फलनिष्पत्ति कितपत होण्याचा संभव आहे हें जाणून मुख्यतः देशहितबुद्धीनेंच आपलें काम आपण बजाविलें पाहिजे. भाषारूप उपवनास आपल्या ज्ञानोदकाचें सेचन निदान आरंभीं तरी त्यांनीं केवळ निरपेक्ष बुद्धीनेंच केलें पाहिजे. कालेंकरून त्यांच्या श्रमांचा परिपाक कीर्तिरूप सुमनांनीं व अर्थरूप फलांनीं प्रगट होईलच होईल; पण त्या अदृष्ट लाभावर नजर न देतां पहिल्यानें केवळ आपलें कर्तव्यच ह्मणून त्यांनीं हातांत लेखणी धरली पाहिजे. दुसरी गोष्ट कीर्ति अथवा लोकमान्यता. हीहि जॉनसनसारख्यास सुद्धां किती दीर्घ काळानें प्राप्त झाली, हें वर सांगितलेंच आहे. खडकाळ डोंगराची चढण जशी मोठी कठिण असते तसाच लोकप्रसिद्धीचा मार्गहि परम विषम होय. तो क्रमण्यास मनुष्यानें एकदां कंबर बांधली ह्मणजे मग कितीहि अडथळे आले तरी त्यानें धैर्य सोडतां कामास नाहीं. हा उपदेश, जॉनसन प्रथमतः लंडन शहरास आपलें नशीब काढण्यास जो आला तेव्हांपासून तों शेवटपर्यंत त्याचा

प्रमाणें मान देत, तरी बाहेर त्याचें जाणें येणें व परिचय फार बेतावाताचाच होता. याविषयीं 'जॉनसनच्या चरित्रा'चा अलीकडील प्रकाशक क्रोकर यानें हिंदुस्थानचे माजी गवर्नर जनरल वेलेस्ली साहेब यांचा दाखला येणेंप्रमाणें दिला आहे--

"His polite acquaintance did not extend much beyond the circle of Mr. Thrale, Sir Joshua Reynolds, and the members of the Club. There is no record that the editor recollects, of his having dined at the table of any peer in London except Lord Lucan: he seems scarcely to have known an *English* bishop, except Dr. Shipley and Dr. Porteus, whom every one knew; and except by a few occasional visits at the *basbleux* assemblies of Mr. Montagu and Mr. Vessey, we do not trace him in anything like *fashionable* society. This seems strange to us; for happily, in our day a literary man of much less than Johnson's eminence would be courted into the highest and most brilliant ranks of society. Lord Wellesley recollects, with regret, the little notice compared with his posthumous reputation, which the *fashionable* world seemed to take of Johnson. He was known as a great writer; but his social and conversational powers were not so generally appreciated."

आयुष्यक्रम पूर्वी जो सांगण्यांत आला आहे, त्यावरून चांगला ठसण्यासारखा आहे. इतक्या काळांत त्याजवर दुःख व अडचणी हीं तर पुष्कळ आलींच; पण कीर्तीचे विघातक जे दूषक त्यांचाहि शेवटपर्यंत त्याजवर कडाका उडत होता. पण इसापनीतींतील 'बैल व मुरकूट' या गोष्टीप्रमाणेंच त्याचें वर्तन नेहमीं दृष्टीस पडे. मुरकूट बोवास बलीवर्दानें जसें उत्तर दिलें कीं, "बाबारे तूं माझ्या शिंगावर बसलास केव्हां हेंहि मला समजलें नाहीं, व आपली स्वारी केव्हां उठून जाईल हेंहि कळणार नाहीं." त्याप्रमाणें जॉनसन पक्का धिम्मा असे. सूर्यबिंबावरून ढग जसे येतात जातात व अखेरीस आपोआप वितळूनहि जातात, त्याप्रमाणेंच वरील पंडिताच्या ग्रंथावर दूषकांचे आक्षेप शतशः झाले व कालगत्या लोपूनहि गेले![1] तर एतद्देशीय ग्रंथकारांनींहि दूषकाचे आक्षेप घे-

---

१. जॉनसननें आपल्या आक्षेपकांच्या संबंधानें धरलेली जी निर्वाण औदासीन्याची वृत्ति तिजविषयीं मेकॉलेनें लिहिलें आहे—

"Of his assailants Johnson took no notice whatever. He had early resolved never to be drawn into controversy; and he adhered to his resolution with a steadfastness which is the more extraordinary, because he was both intellectually and morally, of the stuff of which controversialists are made. In conversation, he was a singularly eager, acute, and pertinacious disputant. When at a loss for good reasons, he had recourse to sophistry; and when heated by altercation, he made unsparing use of sarcasm and invective. But when he took his pen in his hand, his whole character seemed to be changed. A hundred bad writers misrepresented him and reviled him; but not one of the hundred could boast of having been thought by him worthy of a reputation or even of a retort. The Kenricks, Campbells, Mac Nicols, and Hendersons did their best to annoy him in the hope, that he would give them importance by answering them. But the reader will, in vain, search his works for any allusion to Kenrick or Campbell, to Mac Nicol or Henderson. He had learned, both from his own observation and from literary history, in which he was deeply read, that the place of books in the public estimation is fixed, not by what is written about them, but by what is written in them; and that an author whose works are likely to live is very unwise if he stoops to wrangle with detractors whose works are certain to die. He always maintained that fame was a shuttle-

(पुढें चालू).

ण्यास वरच्याप्रमाणेंच तयार व्हावें. जो कोणी कोणत्याहि संबंधानें जगांत वर डोकें काढूं जाईल त्याजवर आक्षेपांचा भडिमार व्हावयाचाच हें त्यांनीं ध्यानांत आणावें. जन हें त्रिविध आहे, यास्तव एकच वस्तु तिघांस तीन प्रकारांनीं भासेल यांत नवल कसचें? तर हें जाणून सुज्ञ जे आहेत ते वृथा दूषकांच्या तोंडीं लागत नसतात. जर कोणाचा खरा आक्षेप असेल तर तेवढा मात्र स्वीकारून वरकड कोल्हेकुईकडे ते बिलकूल लक्ष देत नाहींत. मोरोपंताची आर्या पुष्कळांस माहीत असेलच—

हंसें मुक्ता नेली मग केला कलकलाट काकांनीं ।

हा प्रकार कोणास कीर्तीचा लाभ होतांच मत्सरी जे खल त्यांच्याकडून नेहमीं व्हावयाचाच. तर ज्यास आपली योग्यता यथार्थ भासत असेल त्यानें वरील कर्णकटु काकरवाची अगदीं पर्वा न करितां उलटें असें समजावें कीं, हा गोंगाटच आपल्या यशाचा दर्शक असून त्यास अत्यंत अनुकूलहि आहे![1]

या कलमाचा निकाल करण्यापूर्वी आणखी एक मोठा महत्त्वाचा उपदेश ग्रंथ-

---

cock which could be kept up only by beaten back, as well as beaten forward, and which would soon fall if there were only one battle-door. No saying was oftener in his mouth than that fine apophthegm of Bentley, that no man was ever written down but by himself."

१. दूषक व आक्षेपक हे जरी आपल्याकडून ग्रंथकाराची दुर्दशा करून टाकण्याविषयीं यत्न करीत असतात, तरी त्यांचे प्रयत्न वस्तुतः पहातां त्याची प्रसिद्धि वाढविण्यास मात्र कारण होतात, हें प्रमेय पुष्कळांस कळत नाहीं. जॉनसननें जागजागीं त्याचा उल्लेख केलेला आढळतो—

"Abuse is often of service; there is nothing so dangerous to an author as silence. His name, like a shuttle-cock, must be beaten backwards and forwards; or it falls to the ground."

"Never let criticisms operate on your mind; it is very rarely that an author is hurt by his critics. The blaze of reputation cannot be blown out; but it often dies in the socket. A very few names may be considered as perpetual lamps shine unconsumed."

"Dr. Johnson was famous for disregarding public abuse. When the people criticised and answered his pamphlets, papers, &c. he would say; 'Why now, these fellows are only advertising my book; it is surely better a man should be abused than forgotten.'"

Mrs. Piozzi's *Anecdotes*.

रचनेच्या संबंधानें एतद्देशीयांनीं घेण्यासारखा आहे, तो सांगितला पाहिजे. तो हा. पूर्वी जॉनसनच्या सर्व ग्रंथांचा क्रमाक्रमानें जो निर्देश केला आहे त्यावरून शोधक वाचकांच्या लक्षांत कदाचित् एक मोठी गोष्ट येऊन चुकली असेल कीं, 'इंग्रेजी भाषेचा कोश', 'शेक्सपीयरची आवृत्ति'. 'रांबलर', 'कविचरित्र' वगैरे जे ग्रंथ तयार झाले त्यांच्या वृत्तांतांत कोठें 'सरकाराचा उदार आश्रय' किंवा 'दक्षिणाप्रेज कमिटीकडून बक्षीस'असा कांहीं प्रकार दृष्टीस पडत नाहीं. कोशासारखीं प्रचंड कामेंहि जीं उठलीं तीं फक्त लोकाश्रयावर ! तर देशभाषांचा उत्कर्ष व्हावा अशी ज्यांची मनःपूर्वक इच्छा असेल त्यांनीं वरील गोष्टीचें चांगलें मनन करणें अवश्य होय.

७. आतां दुसरें सादृश्य जें लोकस्थितीच्यासंबंधानें त्याविषयीं विवेचन करूं. जॉनसननें सध्यांचें जें इंग्लंडांतील राजघराणें त्याच्या पहिल्या तीन कारकीर्दी चांगल्या पाहिल्या. यांपैकीं पहिल्या दोहोंविषयीं त्याचें काय मत होतें तें यापूर्वी प्रसंगवशात् सांगण्यांत आलेंच आहे कीं, त्या त्यास बिलकूल पसंत नसून पहिल्या व दुसऱ्या जॉर्ज राजास तो बोलण्याच्या ओघांत बेलाशक शिव्या देत असे. त्यापुढें तिसऱ्याच्या कारकीर्दीपासून त्याच्या मनांत जो फेर झाला, आणि वर्षासन व राजदर्शन यांच्या योगानें त्याची वृत्ति जी दृढ होऊन बसली, तिचाहि पूर्वी उल्लेख केलाच आहे. हें मतांतर ज्या काळीं झालें तो काळ मोठा विलक्षण आणीबाणीचा होता. राजा पराकाष्ठेचा दुराग्रही व अपक्व बुद्धीचा, प्रधानमंडळ त्याच्याच तंत्रानें चालणारें व राजकारणांत अचतुर, आणि एकंदर प्रजा तर आपले योग्य अधिकार ओळखून त्यांत केसभरहि मागें घ्यावयाचें नाहीं अशा निकरास येऊन पडलेली, अशी भयंकर स्थिति त्या वेळची होती. अशांत अमेरिकेंतील वसाहतवाल्यांचा व इंग्लंडचा तंटा जुंपला. वसाहतवाल्यांचें म्हणणें इतकेंच होतें कीं, ज्यापक्षीं आम्ही इंग्लंडची प्रजा म्हणून आमच्यावर करांचा बोजा तुम्ही लादतां त्यापक्षीं तिकडील लोकांप्रमाणें आमच्याकडून कांहीं सभासदहि पार्लमेंटांत घेत चला. हें त्यांचें म्हणणें वाजवी होतें हें कोणासहि सहज कळणारें आहे; व थोरला पिट, बर्क वगैरे शहाण्या मुत्सद्द्यांचाहि सल्ला अमेरिकन लोकांशीं तडजोड पाडून तंटा मिटवून

१. इंग्रेज लोकांचे ठायीं जे कित्येक लोकोत्तर गुण आहेत त्यांत मुख्य म्हटला तर वर सांगितलेलें जें स्वावलंबन तेंच होय यांत संशय नाहीं. त्यांच्या देशांत ज्या ज्या मोठ्या गोष्टी झालेल्या आहेत त्या केवळ त्यांच्या स्वतंत्र श्रमांचें फळ होत. येथील लोकांस प्रत्येक गोष्टीकरितां सरकारच्या तोंडाकडे पहाण्याची जी संवय लागली आहे व कोणतीहि गोष्ट सरकार मनावर घेईल तरच ती सिद्धीस जाईल, ही जी त्यांची बळकट समजूत होऊन गेली आहे ती त्यांच्या पंगुपणाचें एक मोठें कारण होय. या रीतीनें पाहिलें असतां सरकारचा व रयतेचा पूर्वीचा लाडीकपणा जात जाऊन दिवसेंदिवस दूरभाव जो होत चालला आहे तोहि कांहींसा हितावहच होय. दूर टाकून दिल्यानें तरी आमचे डोळे उघडून आपलें कर्तृत्व गाजविण्याची आह्मांस अवश्यकता पडो म्हणजे झालें !

टाकण्याविषयींचाच होता. पण त्यांचें ऐकतो कोण? पार्लमेंटांत त्यांनीं वल्गना कर कर केल्या व शेवटीं उगीच बसले. इकडे युद्धाची कडेकोट तयारी होऊन इंग्रेजी फौज आपल्या वसाहतींवर चालून जाण्यास निघाली. वसाहतवाले तरी त्याच आंग्लभूमींचे पट्टे! त्यांनीं लढाईचा घाट पहातांच कंबर बांधली, व इंग्लंडची सत्ता मुळींच झुगारून देऊन 'अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्य' या नांवानें आपला स्वातंत्र्याचा झेंडा उभारला. पुढें वॉशिंगटनानें कोणत्या चातुर्यानें व हिमतीनें लढाई शेवटास नेली, व स्वतः स्थापलेल्या नव्या संस्थानाचा पहिला अधिपति होऊन तें उच्चपद कालेंकरून सोडून दिलें, व साऱ्या जगाची वाहवा मिळविली, हें सर्वत्र विश्रुत आहेच. असो तर या लढाईच्यासंबंधानें वर सांगितलेला जो राज्यांतील बखेडा तो फारच माजला. युद्धांत इंग्लंडची धुळधाणी उडून एवढें राज्यचें राज्य हातचें गेलें यामुळें राजा व प्रधानमंडळ यांची अतिशयित नाचक्की झाली, व लोकपक्षास तेज आलें.[1] त्यांतून विल्कीज, जूनियस यांच्यासारखे लोकपक्षाचे कैवारी यांनीं तर आपल्या लेखांनीं लोकांस आपले हक्क पुरतेपणीं भासवून देऊन आपल्या प्रतिपक्ष्यांवर सारखा धडाका चालविला होता. जॉनसनसारख्यांनींहि राजपक्षाचें मंडन करण्याचा व वरील लेखाचें खंडन करण्याचा प्रयत्न चालविला होता; पण एकंदरींत पहातां हा दुसरा पक्ष किती दुर्बळ होता याचें प्रमाण पहाण्यास फार लांब जाणें नको. जॉनसनचेच वरील प्रकरणीं लेख पाहिले असतां त्यांतील कोटिक्रम किती पोकळ आहे, व त्याच्या स्वाभाविक सत्यनिष्ठेवर राजनिष्ठेचा व दुराग्रहाचा पगडा बसून तो कसा भरकटला आहे हें तेव्हांच लक्षांत येईल!

आतां वरील स्थितीचें सादृश्य इकडे आमच्या देशांतहि कसें दृष्टीस पडूं लागलें आहे हें सर्वांस माहीत आहेच. पाश्चात्य विद्येचा संस्कार इकडील लोकांस घडून तो नमुना जसा इकडे उतरत चालला आहे, त्याप्रमाणेंच त्याच्याबरोबर वर्तमानपत्रांचा फैलाव, लौकिक प्रकरणांची चर्चा, सार्वजनिक सभा, वगैरे प्रकारहि सहजच सुरू झाले आहेत. वरील विद्येचें अध्ययन इकडे सर्वत्र चालू झालें आहे, व आज वीस वर्षें तर युनिवर्सिटींतल्या मोठमोठ्या परीक्षांतून पसार झालेली मंडळी चोहोंकडे पसरली आहे, तेव्हां या कारणापासून वरील कार्य उद्भवावें हें सहजच आहे. गारगोटींवर आपण होऊन जर चकमक झाडली, आणि तींतून झाडण्यासरसा बाहेर विस्तव पडला, तर त्याबद्दल कोणास आश्चर्य वाटेल काय? पण नवल पहा काय कीं, ज्यांनीं एतद्देशीयांस अज्ञानसागरांत मग्न झालेले पाहून त्यांस सदय अंतःकरणेंकरून वर काढिलें, आणि

१. वरील कालीं इंग्लंडाची स्थिति कशी होती याविषयींची हकीकत बकल नामक अलीकडील नामांकित ग्रंथकारानें आपल्या इतिहासाच्या पहिल्या भागाच्या शेवटीं सातव्या प्रकरणांत उत्कृष्ट दिलेली आहे. ती वाचीत असतां एतद्देशीय वाचकांस इकडील सादृश्य बरेंच लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

ज्ञानाच्या व सुधारणेच्या मार्गास लावून दिलें, त्यांसच त्यांनीं तो मार्ग क्रमण्यास आरंभ केला असतां ती गोष्ट आतां खपेनाशी झाली आहे. 'बांबे ग्याझिट'सारख्या पत्रांचे पुरस्कर्ते व त्यांत लिहिणारे हे नेटिवांस अलीकडे कसे पाण्यांत पाहूं लागले आहेत, व त्यांनीं कोणत्याहि संबंधें कोठें डोकें वर काढलेलें दिसल्याबरोबर आपली कलमबहादरी ते कोणत्या प्रकारें गाजवीत असतात, हें सर्वांस माहीत होत चाललेंच आहे. एल्फिनस्टन, मालकम, मनरो वगैरे राजकार्यधुरंधरांनीं येथील प्रभुत्व कोणत्या तऱ्हेनें संपादन केलें, व आपल्या राष्ट्राचा बोज जेणेंकरून राहील तशा रीतीनें एतद्देशीय लोकांशीं वर्तन ठेवून त्यांच्या ठायीं आपल्या परकी अंमलाविषयींहि कोणत्या वृत्ति त्यांनीं उत्पन्न केल्या, त्याप्रमाणेंच बेंटिक, मेकॉले वगैरेंचे हिंदुस्थानाच्या राज्याविषयीं कोणकोणते स्तुत्य हेतु होते, हें सर्व अलीकडील बाच्छाही मंडळीच्या कधीं स्वप्नांतहि येत नसेल![1] हिंदुस्थान ह्मणजे आपल्या तरवारबहादर पूर्वजांनीं एक चैनीची जागा आप-

१. मेकॉलेनें पार्लमेंटांत जीं अनेक भाषणें निरनिराळ्या प्रसंगीं केलीं तीं एकत्र छापलेलीं आहेत. त्यांत एक 'हिंदुस्थानची राज्यव्यवस्था' या विषयावर आहे. त्यांतील पुढील उतारे वाचले असतां त्या वेळेंत व सांप्रत काळांत किती फेर पडला आहे तो दिसून येईल—

"Do I call the government of India a perfect government? Very far from it. No nation can be perfectly well governed till it is competent to govern itself. I compare the Indian government with other governments of the same class, with despotisms, with military despotisms, with foreign military despotisms. I compare it with the government of the Roman provinces; with the government of the Spanish colonies; and I am proud of my country and age. It is a source of constant amazement to me that it is so good as I find it to be.

"There is one part of the bill on which I feel myself irrestibly impelled to say a few words. I allude to that wise, that benevolent, that noble clause, which enacts that no native of our Indian empire shall, by reason of his colour, his descent or his religion, be incapable of holding office. At the risk of being called by that nickname which is regarded as the most approbrious of all nicknames by men of selfish hearts and contracted minds, at the risk of being called a philosopher, I must say that, to the last day of my life, I shall be proud of having been one of those who assisted in the framing of the bill which contains that clause. We are told that the time can never come when the na-

(पुढें चालू).

णास करून ठेविली आहे, तेथें मनास मानेल तशी चंगळ करावी व सरकारच्या जांवईपणाची चार दिवसांची सत्ता यथेच्छ चालवून घ्यावी, यापलीकडे कधीं काळीं बहुतेकांच्या मनांतहि बिलकूल कल्पना येत नसेल. असो; या विषयावर पूर्ण विवेचन करून या देशाची राज्यरीति सुधारण्यास काय काय गोष्टी अवश्य आहेत, सध्यांचा जो प्रकार चालू आहे त्यापासून राज्यकर्त्यांचें व प्रजेचें असें उभयपक्षींहि कोणतें अहित होत आहे, वगैरे दर्शविण्याचा यत्न केल्यास फारच विस्तार होणार आहे; व चालू विषयाचें व मासिक पुस्तकांच्या मर्यादेचें अतिक्रमण होणार आहे; यास्तव वरील दिग्दर्शन केलें एवढेंच बस आहे. वरील विषय वस्तुतः वर्तमानपत्रांचा असून त्यांतून त्याची चर्चा निरंतर चालू असतेच. तर सरतेशेवटीं वरील सादृश्यावरून आमच्या देशबंधूंनीं हा बोध घ्यावा कीं, इंग्लंडांतील लोकांनीं सतत प्रयत्न करून आपले हक्क जसे वरचेवर सरकारचे कानावर घातले, त्याप्रमाणें स्वदेशाच्या उन्नत्यर्थ त्यांनींहि कंबर बांधावी. तसें केलें असतां अल्पदृष्टि व स्वार्थपरायण जे 'एलिफास'चे बंधु ते आपल्या स्वभावास अनुसरून कोल्हेकुई करतीलच; पण तीस या देशाच्या कैवाऱ्यांनीं अगदीं

---

tive of India can be admitted to high civil and military office. We are told that this is the condition on which we hold our power. We are told that we are bound to confer on our subjects every benefit—which they are capable of enjoying?—no;—which it is in our power to confer on them?—no;—but which we can confer on them without hazard to the perpetuity of our own dominion. Against that proposition I solemnly protest as inconsistent alike with sound policy and sound morality."

"Are we to keep the people of India ignorant in order that we may keep them submissive? Or do we think that we can give them knowledge without awakening ambition? Or do we mean to awaken ambition and to provide it with no legitimate vent? Who will answer any of these questions in the affirmative? Yet one of them must be answered in the affirmative, by every person who maintains that we ought permanently to exclude the natives from high office. I have no fears. The path of duty is plain before us; and it is also the path of wisdom, of national prosperity, of national honour."

"We are free, we are civilized to little purpose, if we grudge to any portion of the human race an equal measure of freedom and civilization."

भिऊं नये. वीस वर्षांपूर्वी साऱ्या जगासमोर जो जाहीरनामा प्रसिद्ध झाला तो जर नुसता दप्तरच्या दप्तरांत रहायाचा नसेल, यंदां आमच्या दयावंत राणी सरकारानें एवढ्या समारंभानें जो 'चक्रवर्तिनी' पदाचा स्वीकार केला तो केवळ आत्मगौरवार्थ जर नसेल, युवराजासारखी खाशी मंडळी या देशांतील जयजयकार घेऊन माघारी जाते याचें जर कांहीं सार्थक होणें असेल, युनिवर्सिटीच्या वार्षिक उत्सवाच्या प्रसंगीं चक्रवर्तिनीच्या प्रतिनिधींकडून आह्मांस जें आश्वासन मिळत गेलें आहे, कीं इंग्रेज सरकारचा हेतु या देशाचें कल्याण करावें व लोकांस सुजाण करून त्यांची सत्ता त्यांच्या हातीं परत द्यावी, तें त्यांचें वचन जर केवळ उपचारार्थ नसेल; तर पाश्चात्य विद्येचा परिपाक आमच्या ठायीं इतके लवकर इतका दृष्टीस पडूं लागला आहे, या गोष्टीचा आमच्या राज्यकर्त्यांस आनंद व अभिमानच वाटला पाहिजे. बापाचें ओझें डोईचें खांद्यावर येण्याचा जर पुत्रानें प्रसंग आणला, किंवा शिष्य गुरूच्या योग्यतेस येण्याचा जर सुमार दिसूं लागला, तर दोघांसहि त्या गोष्टीचा खेद वाटावा, का आपल्या श्रमाची कृतार्थता वाटावी ? तर या न्यायानें पाहिलें असतां आमच्या देशांत वर्तमानपत्रें, सार्वजनिक सभा इत्यादि रूपांनीं जो उद्योग चालू झाला आहे त्याचें सर्वांनीं अभिनंदनच करणें योग्य आहे. पण असा प्रकार इकडे येणाऱ्या अलीकडील आंग्लभौमांचे ठायीं प्रायः न दिसून उलटा त्यांचा सापत्नभाव मात्र प्रगट होत असतो. पण त्याची फारशी पर्वा न करतां आमच्या देशहितेच्छूंनीं हें लक्षांत ठेवावें कीं, ज्या देशांत जॉनसन, बर्क यांच्यासारखी मंडळी निपजली, व जेथें आजहि ब्राइट, फॉसेट, यांच्यासारखे माहात्मे पुरुष नांदत आहेत, तेथपर्यंत इकडील गाऱ्हाणीं पोंचलीं असतां केवळ अरण्यरुदित केल्याप्रमाणें होईल असें नाहीं, तर कालेंकरून तरी त्यांच्या श्रमांस यश येईलच येईल !

याप्रमाणें या शेवटच्या अंकाचा विषय समाप्त झाला. गेल्या सप्तंबरच्या अंकांत आरंभीं उपक्षेप केल्याप्रमाणें प्रस्तुत चरित्राचे सर्व भाग येथें संपूर्ण झाले. दोन वर्षांपूर्वी बॉसवेलकृत 'चरित्र' समग्र वाचलें असतां आह्मांस सुचलें कीं, जॉनसनचें चरित्र एतद्देशीय वाचकांस समग्र कथन केलें असतां पुष्कळ तऱ्हेचा फायदा होण्यासारखा आहे. तो कोणकोणता हें यापूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. आतां हा आमचा मूळ संकल्प कितपत सिद्धीस गेला असेल हें आमच्यानें सांगवत नाहीं. तरी आह्मीं केलेल्या दिग्दर्शनावरून आमच्या वाचकांपैकीं जे कोणी इंग्रेजी जाणणारे असतील त्यांस वर सांगितलेला इंग्रेजी ग्रंथ वाचण्याची जर इच्छा होईल, व केवळ मराठी जाणणारांस चरित्रनायकाचें व त्याच्या राष्ट्राचें बरेंच स्वरूप ध्यानांत येऊन महत्त्व प्राप्त होण्यास कोणकोणते अमोलिक गुण अंगीं असावे लागतात हें जर स्पष्टपणीं दिसून येईल, तर एवढें सविस्तर चरित्र लिहिल्याच्या श्रमांचें पुष्कळ साफल्य झालें असें आह्मी समजूं.

मोरोपंताची कविता.

जसे होती देव प्रमुदित शचीनायकवनीं
तसे साराज्ञाते बुधजन मयूरेशकवनीं ।
मंत्ररामायण.

अंक ४५—(१) प्रस्तुत निबंधाचें स्वरूप. (२) त्यांत येणारे विषय. (३) विवेचनाच्या विस्तारावद्दल वगैरे वाचकांस सूचना. (४) प्रस्तुत विषयाचे भाग. (५) **मोरोपंता**वर आक्षेप. (६) त्याच्या तर्फेचीं मतें.

१. प्रस्तुत अंकाचा विषय अगदीं नवा असून आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस तो मोठा चित्तवेधक होईल असें वाटतें. अशासारखे विषय आह्मीं अद्याप कसे हातीं धरले नाहींत यावद्दल पुष्कळांस आजपर्यंत नवल वाटलें असेल; कां कीं आमचें पुस्तक महाराष्ट्रभाषेच्या अभिवृद्धयर्थ जर निघालें आहे, तर त्या अभिवृद्धीचे मुख्य साधक जे महाराष्ट्रकवि त्यांच्या संबंधानें कधींच विवेचन होऊं नये हें विचित्र आहे. हें जाणून कित्येकांनीं आह्मांस यासंबंधानें सूचनाहि केल्या आहेत. पण प्रकृत विषय आजपर्यंत तसाच ठेवण्याचीं अनेक कारणें झालीं. एक तर हें कीं, मराठी कविता हा विषय कांहीं लहान नाहीं. ज्ञानेश्वरी, एकनाथकृत रामायण, मुक्तेश्वराचीं चार पर्वें, तुकाराम, नामदेव, इत्यादिकांचे हजारों हजार अभंग, मोरोपंताचे भारत, भागवत, रामायण इत्यादिविषयक ग्रंथ,[1] एवढेच मोठमोठाले ग्रंथ घेतले तरी ते समग्र व मननपूर्वक वाचणें ह्मणजे थोड्या श्रमाचें व काळाचें काम आहे असें नाहीं. त्यांतून 'ज्ञानेश्वरी'सारखे ग्रंथ तर भाषेच्यासंबंधानें व अर्थाच्यासंबंधानेंहि दुर्बोध; कां कीं त्यांतील शब्द व रचना ही अर्धी मराठी व अर्धी प्राकृत आहे, व विषयहि अध्यात्म किंवा वेदांत असल्यामुळें आकलन होण्यास कठिणच. शिवाय महाराष्ट्र कवितेचा संपूर्ण संग्रहहि अद्याप झाला आहे असें नाहीं. 'सर्वसंग्रह' पुस्तक सहा सात वर्षेंच काय तें चालून त्यांत जो काय थोडा बहुत महाराष्ट्र कवितेचा जीर्णोद्धार झाला तो झाला. त्याचा आयुर्दाय संपून आज दहा वर्षें होत आलीं; व इतक्या काळांत

---

१. मराठी कवितेचा एकंदर विस्तार पाहिला तर लहान आहे असें नाहीं. एकट्या मोरोपंताच्या आर्या तीन लक्ष आहेत असें ह्मणतात. तुकाराम, नामदेव, ज्ञानदेव, इत्यादिकांचे अभंगहि तसेच किती आहेत याचा ठिकाण नाहीं ! याविषयीं कांहीं प्रसिद्ध अभंग येणेंप्रमाणें आहेत—

चार कोटी एक लक्षाच्या शेवटीं ।
चवतीस सहस्र सांगितले ॥
सांगुनी इतुके तुका कथिता झाला ।
चवदा अभंगां या सोडूं नका ।

शेंकडों गोष्टींचें 'उत्तेजन' व 'वर्धन' झालें,–तालीमबाजांचे आखाडे ओस पडले होते ते पुनः गजबजून राहिले, लोकांचे ठायीं सद्धर्माचा अभाव होऊं लागला होता, तो दोन रुपये रोजीचा महाग धर्मगुरु मुंबापुरीहून मागवून आणून त्याच्या करवीं देशोन्नतीस मुख्यस्तंभभूत जी धर्मोन्नति ती करविली, कलाकौशल्य अस्तंगत होऊं पहात होतें त्यास शिवणकलेपासून पुनः ओनामा ह्मणायाला लाविला,–तशीच गेल्या दशकांत लोककल्याणकर्ती मंडळीहि आर्यजननीचें बिरीद दंडाला बांधून जिकडे पहावें तिकडे कंबरा बांधून उठली, व पटापट देशहिताच्या कामाला लागली; पण इतक्या लोककल्याणेच्छूंतून एक दोनहि आमच्या विचाऱ्या महाराष्ट्र कवींच्या वांट्यास आले नाहींत. रा. माधव चंद्रोबा, 'सर्वसंग्रहा'चे मालक, यांनीं सरकारचा आश्रय तुटला असतां आपल्या देशबंधूंची जी काकळूत केली ती केवळ अरण्यरुदिताप्रमाणें निष्फळ झाली! याहि गोष्टीस कांहीं काळ लोटला असतां आमच्या मराठी कवींस दुसरी एक महापर्वणी आली होती. माजी गव्हर्नर नेक नामदार सर बार्टल फ्रीयर हे विलायतेस जाऊं लागले, तेव्हां तुकारामाचा जीर्णोद्धार करण्याचें त्यांनीं मनांत आणून माजी डायरेक्टर मेहेरबान ग्रांट साहेब यांच्याकडे तें काम सोंपवून दिलें. ग्रांट साहेबांचीहि भक्ति वरील कवीवर होतीच; तेव्हां त्यांनीं वरील काम मोठ्या उत्साहानें पतकरून आपल्या शिष्यमंडळीपैकीं कांहींजणांची तिकडे योजना केली. एवढी धुरंधर मंडळी ज्या कामांत पडली व २४००० रुपयांची रक्कम ज्याकरतां निराळी काढून ठेवली तें कसें हं हं ह्मणतां उठलें असेल हें सांगायाला नकोच! 'राजा बोले आणि दळ हाले' या ह्मणीप्रमाणें वरील प्रसंगीं मोठमोठे चमत्कार घडण्यांत आले. ज्यांच्या हातांस मराठी पुस्तकाचा विटाळ कधीं सोसायाचा नाहीं, व मराठी कवींचें तर ज्यांनीं कधीं मुखावलोकनहि करावयाचें नाहीं, असे बडे बडे किताबधारी तुकारामापुढें लीन होऊन कोणीं त्याचें चरित्र लिहिलें, कोणीं अभंगांचें सूचीपत्र तयार केलें, कोणीं ग्रंथप्रकाशन व टिप्पण हें काम पतकरलें; तसेंच कोणी साहेबांचे आज्ञेवरून मूर्तिपूजाजन्य पातकाचीं आगरें जीं आळंदी, देहू वगैरे स्थानें त्यांच्या दर्शनास जाऊन संतमंडळीचा आश्रय केला, व अभंगांचीं बाडें जमा केलीं. असें होतां होतां कांहीं काळानें वरील संकल्प सिद्ध होऊन जो बिचारा शूद्रकवि आपल्या लंगोटे बहादर व घोंगडीवाल्या भक्तमंडळींतच काय तो रमायाचा, किंवा फार झालें तर हरदासांच्या कथाप्रसंगीं सत्कार पावायाचा, त्यास एकाएकीं आरबी गोष्टींतील अबू हसनासारखें मोठें ऐश्वर्य प्राप्त झालें! इंदुप्रकाश मुद्रणयंत्रालयांतील मुक्ताफळें आंगभर उधळलेलीं, महावस्त्रांत शरीर लपेटलेलें, व युनिव्हर्सिटीचे शानदार झगे घातलेले तरुण विद्वान डोक्यावर मोचेंलें उडवताहेत व चवऱ्या ढाळताहेत अशा थाटानें तुकाराममहाराज फारा दिवसांनीं आपल्या अभिधानाची सार्थता पावून विराजमान झाले. महाराष्ट्र देशाच्या पहिल्या अधिपतीनें पाठ-

विलेलें ऐश्वर्य परत लावून वरील कवीनें जी आपली हानि करून घेतली होती, तिची भरपाई दोन शतकांनंतर त्याच देशाच्या परद्वीपस्थ प्रभूनें करण्याचें मनांत आणिलें कीं काय कोण जाणे! असो; झाली ती गोष्ट बरीच झाली. पण एकट्या तुकोबाचींच वरील संभावना झालेली पाहून कोणाहि समंजस मनुष्यास असें वाटणारें आहे कीं, दाराबाहेर जर शेंपन्नास आगांतूक आरोळ्या देत आहेत तर त्यांपैकीं एकासच आंत घेऊन त्यास राजोपचार करून पंचपक्वान्नी भोजन घालणें यापेक्षां सरसकट मुक्तद्वार करून साऱ्या मंडळींस सारभाताचा साधा बेत करणें बरें नव्हे काय?[1] तर एवढ्या उघड गोष्टीविषयींहि सूचना करण्याचें श्रेय वरील पंडितमंडळीनें घेतलें नाहीं, हें त्यांस मोठें भूषणास्पद झालें असें नाही. असो; तर महाराष्ट्र कवितेचा अद्याप संपूर्ण संग्रह झाला नाहीं, व जितका झाला आहे तितक्याचें अवलोकनहि श्रमाचें व काळाचें काम होय हें प्रस्तुत विषय तसांच राहूं देण्याचें एक कारण होय. दुसरें कारण असें कीं, महाराष्ट्र कवीविषयींच्या निरूपणांत संस्कृत कवींच्याहून एक विशेष भाग येण्यासारखा असतो; तो कवींविषयींचा वृत्तांत किंवा निदान दंतकथा हा होय. हा भाग प्राचीन जे संस्कृत कवि त्यांच्या संबंधानें येण्याचा बहुधा संभवच नसल्यामुळें त्यांच्या ग्रंथांचेंच विवेचन करण्यास हरकत नसते. पण मराठी कवींविषयीं तसें करतां येत नाहीं. कोणत्याहि कवीविषयीं सविस्तर निरूपण करावयाचें झटलें झणजे वाचकांची अपेक्षा प्रथमतः कवींच्या वृत्तांताविषयीं सहजच होण्यासारखी असते. या अपेक्षेप्रमाणें बहुतेक मराठी कवींचा वृत्तांत त्यांच्या त्यांच्या जागीं थोडा बहुत तरी मिळण्याचा अद्याप संभव आहे. पण हें काम चौकस व युक्तिवान मनुष्यांचें असल्यामुळें केव्हां सिद्ध होईल हें सांगवत नाहीं. तेव्हां या कारणावरून हा प्रस्तुत विषय तूर्त तहकूब ठेवण्यांत आला. तिसरें कारण असें कीं, महाराष्ट्र कवि, महाराष्ट्र देशाचा इतिहास, अशासारखे विषय अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळें इतर सामान्य विषयांप्रमाणें त्यांचें निरूपण सरसकट रीतीनें

१. वरील उपमा कित्येक वाचकांस कदाचित् फार अप्रशस्त वाटेल; पण वास्तविक स्थिति पाहिली तर आमच्या देशाच्या हरएक प्रकरणीं वरील सादृश्यच लागू पडेल. इंग्लंडांतील अगदीं सामान्य कवींचेहि ग्रंथ छापून निघाले आहेत, पण आमच्या देशांतील मोठमोठ्यांसहि कोणी विचारीना. इंग्लंडांत अगदीं साधारण घडणाऱ्या गोष्टींचीहि हकीकत लिहिली जाऊन सामान्य प्रसिद्धीच्या मनुष्यांचेंहि चरित्र सर्वांस विश्रुत होतें; येथली स्थिति पाहिली तर आपल्या पूर्वजांनीं केलेल्या दिग्विजयादि पराक्रमांविषयींहि कोणास जिज्ञासा होत नाहीं, व मोठी दिगंत कीर्ति मिळवलेल्या महापुरुषांचीं पुरतीं नांवेंहि कोणास विचारल्यास सांगतां येणार नाहींत. याप्रमाणेंच जुन्या काळची प्रत्येक विद्या व प्रत्येक कला निराश्रित होत्साती दिवसेंदिवस समूळ लय पावत आहे, व आमचे विद्वान् व सुधारणेच्छु देशबंधु खुशाल बिनधोर सर्व स्थिति पहात आहेत हें कोणाहि मनुष्यास चोहोंकडे दृष्टि फेंकली असतां कळणार आहे!

करतां उपयोगी नाहीं. तें हातीं घेणारानें त्यांचें मनन दीर्घकाळ करून व त्यांजवर पुष्कळ शोध करून यथावकाश विचारपूर्वक त्यांजवर ग्रंथरचना केली पाहिजे. यास्तव मासिक पुस्तकांतून असले विषय संगतवार सायंत असे कधींहि येत नसतात; आलेच तर प्रस्तुत निबंधाप्रमाणें खंडशःच यावयाचे. तर याप्रमाणें अनेक कारणांस्तव महाराष्ट्र कवितेचा विषय आजपर्यंत लिहावयास न घेऊन सध्यां जो घेतला आहे तो तरी 'मोरोपंत' अशा रूपानें न घेऊन 'मोरोपंताची कविता' असा घेतला आहे याचें कारण उघडच आहे कीं, पहिलें सदर घातलें असतें तर कवीचा वृत्तांत व त्याच्या सर्व ग्रंथांचें गुणदोषविवेचन हें करणें भाग पडतें; पण वृत्तांत अजून जसा जमावा तसा जमला नाहीं, व ग्रंथहि सर्व अद्याप छापून निघाले नाहींत. तेव्हां पहिलें सदर टाकून दुसरेंच प्रकृत निबंधास घालावें लागलें.

२. आतां वर सांगितल्याप्रमाणें विषयसंकोच केला असतां प्रकृत निबंधांत निरूपण करण्यासारखें काय राहिलें असें कोणास कदाचित् वाटेल; पण वरील सदरांतहि थोडा विषय येणार आहे असें नाहीं. मोरोपंताच्या कवितेविषयीं लोकांत पुष्कळ मतभेद आहे; कोणाच्या मतें त्याच्या सारखा कवि आजपर्यंत महाराष्ट्रांत किंबहुना हिंदुस्थानांतहि, झाला नाहीं; कोणाच्या मतें त्याची योग्यता चित्रकवित्वाच्या संबंधानेंच विशेषतः मानायाची; व कोणाच्या मतें तर तो मुळींच कवि नसून उगीच भाराभर गावाळ लिहून ठेवण्यांत त्यानें मूर्खपणानें आपलें आयुष्य घालविलें. तर एवढा जेथें वाद आहे, व तोहि पुनः आमच्या अशिक्षित जुन्या लोकांत नव्हे तर विद्यासंपन्न म्हणविणाऱ्या मोठमोठ्या नामांकित मंडळीमध्यें, तेथें निःपक्षपातपणें यथावत गुणदोषविवेचन होण्यास पुष्कळ अवकाश आहे हें उघड आहे.

वरील विवेचनावरून आणखीहि कांहीं गोष्टींविषयीं निर्णय झाल्यासारखा होईल. एक तर एकंदर महाराष्ट्र कवितेविषयीं. या विषयावर पाश्चात्य ग्रंथकारांचीं मतें अद्याप म्हणण्यासारखीं प्रगट झालीं नाहींत; तरी जेथें संस्कृत कवितेचीहि डाळ शिजत नाहीं तेथें मराठी कवितेची गोष्ट बोलायासच नको![1] आमची नवीन विद्वान् मंडळी तर

१. संस्कृत कवितेविषयीं मेकॉले साहेबांचें मत काय होतें हें नुकतेंच एके ठिकाणीं (अंक ४२ टीप) दाखल केलेलें आहे. मिल साहेबांचें मत पहायाचें असल्यास तेंहि त्यांच्या इतिहासांत स्पष्ट लिहिलेलें सांपडेल (पुस्तक २ भाग ९). हे दोघे रसिकशिरोमणि लोकांतरास गेल्यापासून त्यांची गादी चालविणारा कोणी अद्याप निघाला नाहीं व कदाचित् यापुढेंहि निघणार नाहीं. कारण कीं, एक तर दिवसेंदिवस इकडील भाषांचा प्रसार तिकडे अधिकाधिक होत चालला आहे, व ज्या विषयाची माहिती आपणास सरासरी शून्यच त्यावर निःशंकपणें अभिप्राय ठोकून देण्याचें साहसहि अलीकडील काळांत कमीच ह्मटलें पाहिजे! तरी अद्याप संस्कृत कवींची प्रसिद्धि काय ती संस्कृतज्ञांच्या मंडळींतच आढळते. तिच्या पलीकडे सामान्य

(पुढें चालू).

सर्वतोपरी आपल्या परद्वीपस्थ गुरुंच्या सूत्रानेंच चालणारी, तेव्हां त्यांचे विचारहि सदरील विषयावर त्यांच्यासारखेच असून जुन्या शास्त्री लोकांप्रमाणेंच प्राकृत कवितेब्रिषयीं त्यांचा सामान्यतः तिरस्कारच आढळतो. तर विद्वानांच्या तिरस्कारास पात्र जी वरील कविता तिचें स्वरूप पुढील विवेचनांत बरेंच प्रगट होणार आहे; मोरोपंताची योग्यता मराठी कवींत मोठी धरली असल्यामुळें त्याच्या गुणावगुणांवरून एकंदर कवीविषयीं सामान्यतः निर्णय होणार आहे कीं, वरील रसज्ञ मंडळीची त्यांजवर जी अवकृपा झाली आहे ती कितपत यथार्थ आहे. दुसरी गोष्ट पुढील विवेचनावरून ही स्पष्ट होणार आहे कीं, ज्यांचीं मतें सर्व लोक सत्य व यथार्थ ह्मणून समजत असतात ते कितीसा उहापोह करून कोणत्याहि विषयावर आपला अभिप्राय निश्चित करीत असतात. हें मान एकदां सर्वांस कळलें ह्मणजे अनेक प्रकारचे त्याचे भ्रम जाणार आहेत.

३. वरील दोन कलमांत प्रकृत विषयाच्या संबंधानें वाचकांस जें उपोद्घातरूपानें कळवायाचें होतें तें कळविलें. आतां मुख्य लेखास आरंभ करण्यापूर्वी एका गोष्टीविषयीं मात्र वाचकांस कांहीं सूचना करणें अवश्य वाटतें. ती ही कीं, हा जो नवा विषय आह्मीं हातीं धरला आहे तो किती लांबेल याचा आह्मांस सध्यां कांहीं अजमास करवत नाहीं. तर आमचें आख्यान फार लांबून वाचक मंडळीपैकीं जर कोणास डुकल्या यायला लागल्या तर त्यांनीं खुशाल मधून उठून जाऊन अंगाई करावी. तसें केल्याबद्दल व्याख्यात्यास यत्किंचितहि राग येणार नाहीं; चालू कथानक आटपून दुसऱ्यास आरंभ झाला ह्मणजे तो त्यांस उठण्याबद्दल पुनः सूचना करील. ही अपूर्व सूचना श्रोतृवृंदास करण्याचें याच खेपेस आह्मीं मनांत आणल्याचें कारण काय हें थोडा तर्क केला असतां कळणार आहे. यापूर्वी जेव्हां जेव्हां निबंधाचा विषय कमजास्त लांबत गेला तेव्हां तेव्हां कित्येकांस तो कंटाळवाणा वाटून त्यांचे उद्गार निघाले आहेत, कीं 'हें वक्तृत्व आतां कोठवर लांबणार?' 'इंग्रेजी भाषा संपणार तरी केव्हां?' 'जॉनसनचें भारूड आतां पुरें झालें!' आमच्या 'ज्ञानोदय' नामक वृद्धबंधूंस पवित्रशास्त्र व त्यावरच्या छपन्न टीका वाचायाचा त्रास येत नसेल, पण जॉनसनचा निबंध इंग्रेज लोकांच्या संबंधानें एवढा स्तुतिपर असतांहि त्याचा त्यांस कंटाळा येऊन तो त्यांस 'महाभारत'च वाटला. तर या पूर्वीच्या अनुभवावरून या प्रसंगीं वरील सूचना अगोदरच

बहुश्रुत लोकांपर्यंत ती अजून पोंचली नाहीं. त्यांचा तिजविषयीं सामान्यतः तिरस्कारच आढळतो. मग कालिदास, भवभूति वगैरे मंडळीचा जेथें इतका बोज तेथें बिचाऱ्या वामन, मोरोपंताला कोण पुसतो! या बिचाऱ्या प्राकृत कवींचा एवढा भाग्योदय कधीं काळीं होईल तो होवो. सध्यां नाहीं ह्मणायाला आमचे साळेभोळे तुकोबा मात्र युरोपांतील कांहीं लायब्ररींतून जाऊन बसले आहेत. युरोपखंडाची सुधारलेली हवा याच महाराष्ट्र कवीस लागण्याचा कोणता योग आला हें वर सांगण्यांत आलेंच आहे.

करून ठेवणें जरूर दिसलें. आतां हें खरें कीं, आह्मीं आरंभलेली स्वदेशसेवा जे मनोभावेंकरून मानून घेत असतील व आमच्या खऱ्याखोट्या विचारांचें जे स्वस्थपणानें व प्रांजलपणानें मनन करीत असतील त्यांच्या तोंडून सहसा वरील उक्ति निघत नसतील, याविषयीं आह्मांस खात्री आहे, व यास्तवच वरील आक्षेपांची आह्मी फारशी मातब्बरीहि मानीत नाहीं. ज्यांनीं पुस्तकाची परीक्षा ह्मटली ह्मणजे त्यांच्या बांधणीवरून वगैरे करावयाची किंवा तें महिन्याच्या महिन्याला निघतें, किंवा त्यांतील मजकूर ठरीव राजनिष्ठेस अनुसरून आहे का तीस विरुद्ध आहे, अस्सल सुधारणेचीं ह्मणून नाणावलेलीं जीं मतें त्यांचेंच त्यांत मंडन आहे कीं खंडन आहे, चहापात्र तोंडास लावून तें मात्क्यान मेजावर ठेवीपर्यंत पुरेसा चुटकेदार त्यांत निबंध आहे का कपाळ उठेसें लांबलचक चऱ्हाट वळलें आहे, एवढेंच काय तें पाहून पुस्तकाचा चांगलेपणा किंवा वाईटपणा जे ठरवीत असतात, अशाच लोकांचे प्रायः वरील आक्षेप होत. अशा मंडळीस आमचें उत्तर एवढेंच आहे कीं, मासिक पुस्तक हें कांहीं वर्तमानपत्र किंवा 'पंच' आहे असें नाहीं. त्यांतील विषय विशेष महत्त्वाचे असावे लागतात, व त्या मानानें त्यांचें निरूपणहि तसेंच यथास्थित व पूर्ण व्हावें लागतें. विषय ज्या तऱ्हेचा असेल त्या मानानें त्यावरील विवरण अर्थात् अधिक उणें होणारच. त्यांतून असेंहि आजपर्यंत कोणी राज्यकर्त्यानें किंवा शास्त्रकारानें कायदा कानू केलेला आठवत नाहीं कीं, अमुक अमुक विषयास अमुक अमुकच पृष्ठें लागावीं; ती शास्त्रोक्त मर्यादा उल्लंघिली कीं, लोण बारगळलें! ज्याला ज्या विषयावर जेवढे विचार सुचतील तेवढे दाखल करण्यास तो मुखत्यार आहे, व वाचकांच्या रुचिविशेषपरत्वें ते पसंत होतील किंवा नापसंत होतील, हें उघड आहे. असो हें एक झालें. दुसरी गोष्टहि प्रकृत स्थलीं अगोदर सुचवून ठेवण्यासारखी ही वाटते कीं, प्रस्तुत विवेचनांत 'आमचे नवीन विद्वान् लोक' 'त्यांनीं उपस्थित केलेले सुधारणेचे मार्ग', 'वीररसप्रधान काव्य', व 'ख्रिस्ती धर्म' यांचा संबंध कोठेंच येणार नाहीं असेंहि बहुशः होणार नाहीं. या चौकड्यापैकीं पहिल्याचा व तिसऱ्याचा तर चालू निबंधाशीं अत्यंत निकट संबंध आहे हें उघडच आहे; कां कीं, नवीन विद्वानांचीं प्रस्तुत कवीविषयीं काय मतें आहेत तीं सांगून त्यांचें यथातथ्य परीक्षण आह्मांस करावेंच लागेल, व 'वीररसप्रधान काव्या'चा जन्म किमर्थ आहे हेंहि बहुधा सर्वांस विश्रुत असेलच. आतां दुसऱ्याच्या व चवथ्याच्या संबंधानें तरी कोठें लिहिणें येईल कीं नाहीं याचें सध्यां कांहीं सांगवत नाहीं; तरी तें आलेलें पाहून ज्यास विषाद होईल त्यानें 'वेदार्थयत्ना'सारख्या विद्वद्वर्यमान्य पुस्तकाचे अंक चाळले असतां किंवा वृद्ध 'ज्ञानोबां'चा बहुधा कोणताहि अंक उलटून पाहिला असतां त्याचें दुःख व आश्चर्य बरेंच कमी होईल असें आह्मी त्यास आश्वासन देतों.

४. आतां यापुढें मुख्य विषयास लागायाचें. हा विषय कोणता याचा निर्देश वर केलाच आहे, कीं मोरोपंताचा वृत्तांत किंवा त्याच्या काव्यांचें समग्र परीक्षण हें त्यांत यावयाचें नसून फक्त त्याच्या कवित्वाविषयीं विचार करायाचा. ह्मणजे 'कवि' ही संज्ञा त्यास लागेल कीं नाहीं, लागेल तर त्याचे ठायीं कोणकोणते कवित्वगुण दृष्टीस पडतात, त्याच्या काव्यांतले गुणदोष कोणते वगैरे संबंधानेंच मुख्यतः विवेचन करायाचें आहे. हें विवेचन पुढील क्रमानें करूं. प्रथमतः सदरील विषयावर उभय पक्षांचीं जीं मतें आहेत, ह्मणजे प्रस्तुत कवीची वाहवा करणारे व त्याच्या कवितेस नाक मुरडणारे यांचें काय काय ह्मणणें आहे तें वाचकांस कळवून नंतर त्या मतांच्या यथातथ्याविषयीं विचार करूं आणि शेवटीं प्रस्तुत कवीच्या संबंधानें आमच्या काय समजुती झाल्या आहेत त्या दाखल करून विषय समाप्त करूं.

५. आतां प्रथमतः मोरोपंताचे जे दूषक आहेत त्यांचे आक्षेप काय काय आहेत ते पाहूं. यांचा उल्लेख अगोदर करण्याचें कारण असें आहे कीं, हल्लींच्या मन्वंतरांत वरील आक्षेपकांचाच विशेष भरणा आहे. पूर्वीचें मन्वंतर फिरून अमुक अमुक मतें अडाणी वेडगळ लोकांचीं व अमुक अमुक सुधारलेल्या विद्वान मंडळींचीं अशी जेव्हांपासून आमच्या लोकांत दुफळी पडली, तेव्हांपासून प्रस्तुत कवीची अवहेलना करणें हें समंजसतेचें व रसिकतेचें एक मोठें लक्षण बनून राहिलें आहे. आपल्या जन्मभूमीची हरएक प्रकरणीं टवाळी करणें हें जसें आजपर्यंत शहाणपणाचें चिन्ह मानलें जात असे, व हा उपहास जो जितका जितका अधिक करील तितकी तितकी त्याची विद्वत्ता विशेष समजत असत, त्याप्रमाणेंच मोरोपंताच्या कवितेवर जितकी जितकी अधिक कोटी लढवावी तितकी तितकी त्या लढवणाराची चातुर्याबद्दल व रसिकत्वाबद्दल तारीफ व्हावयाची! हा प्रकार अद्यापहि तसाच आहे. मोरोपंताला वाग्देवीच्या न्यायासनापुढें पिंजऱ्यांत जर चौकशीकरितां उभा केला, व नवीन विद्वन्मंडळांतले पंच त्याचा इनसाफ करण्यास नेमले, तर बहुधा इसापनीतींतील पंचाइतींत मेंढ्यास जो न्याय मिळाला, किंवा शंभर वर्षांपूर्वी इंग्रेजी जुरीनें नंदकुमाराच्या तर्फेनें जो आपला अभिप्राय दिला, त्यासारखीच आमच्या विचाऱ्या महाराष्ट्र कवीचीहि अवस्था व्हावयाची! त्याची व एका तुकारामाखेरीज बाकीच्या साऱ्या कवींची जी आजपर्यंत उपेक्षा झाली ती वरील मतांचेंच फळ होय. 'सर्वसंग्रहा'चा एवढा सात वर्षें चाललेला उद्योग जो एकाएकीं डुबला त्याचें तरी कारण वरचेंच ह्मटलें पाहिजे; कारण जर प्राकृत कवितेची योग्यता विद्वानांस व तद्द्वारा इतर लोकांस यत्किंचित्हि भासती, तर सरकारचा आश्रय तुटल्यावरहि वरील पुस्तक चालण्यास मोठीशी अडचण पडती असें वाटत नाहीं. तर एवढा ज्या मतांचा प्रभाव त्यांच्या यथार्थत्वाचा विचार करणें अत्यंत अवश्यक होय.

आतां वरील मतांचा क्रमानें निर्देश करतों. मोरोपंताच्या संबंधानें व तसेंच

सामान्यतः एकंदर महाराष्ट्र कवींच्या संबंधानें एक पहिलें मोठें मत ह्मटलें ह्मणजे हें आहे कीं, त्यांस स्वतंत्र योग्यता नाहीं. त्यांचे काव्यग्रंथ संस्कृतांतील 'रामायणभारता'दि ग्रंथांचीं किंवा त्यांतील प्रकरणांचीं केवळ भाषांतरें होत. यास्तव त्यांनीं जो कांहीं रसाचा अंश साधला असेल तो वस्तुतः पहातां त्यांचा आहे असें नाहीं. चंद्राचा प्रकाश जसा त्याचा स्वतःचा नसून केवळ सूर्यापासून प्राप्त झालेला, त्याच्या अंगचा असा त्यांतला एकहि किरण नाहीं; त्याप्रमाणेंच मुक्तेश्वर, मोरोपंत वगैरेंच्या ग्रंथांत कितींहि शोभा असली तरी ती खरोखरी पहातां व्यासवाल्मीकांचीच होय! तेव्हां या मताप्रमाणें वरील प्रसिद्ध कवि हा अश्वादि वाहनांप्रमाणें केवळ अर्थवाहक होय असें झालें. या पहिल्या आक्षेपानें कवित्वाचें मोठें अंग जें स्वतउद्भूत स्फूर्ति तें मोरोपंताचें व एकंदर महाराष्ट्रकवींचें नाहींसें होऊन ते दुसऱ्या प्रतीचे कवि असें ठरलें. दुसरें मत तर वरच्याहूनहि भयंकर आहे. तें आमच्या एका बंधूच्या शब्दांनींच येथें दाखल करतों–

"महाराष्ट्र व संस्कृत या दोन्ही भाषा मोरोपंताला करतळामळ होत्या व प्रास वगैरे साधण्यास त्यास यत्किंचितहि श्रम लागत नसे. तथापि त्याला रसज्ञ देखील ह्मणवत नाहीं. कांहीं तरी लिहावें, मात्रा आणि यमक साधलें ह्मणजे झालें. किंबहुना मात्रा, यमक, आणि अपरिचित शब्द यांतच काय तो रस असें त्याला वाटत असे." आणखी कांहीं पुढें वरील लिहिणारानेंच असें ह्मटलें आहे—"एखाद्या देशांत मोठमोठे ग्रंथकार झाले असून मग जर दुर्दैववशात् त्या देशांतील लोकांची बुद्धि मंद होईल, तर ते लोक मग अर्थापेक्षां शब्दांवर लक्ष फार देत असतात. जसा एखादा मनुष्य अगोदर श्रीमान असून नंतर गरीबीस येतो, आणि ती गरीबी छपविण्याकरितां बाहेर सगळे डामडौल पूर्वीच्यापेक्षां चांगले राखतो, तसेंच मोरोपंतांचें लक्ष इतर अलंकारांपेक्षां यमकादिकांवर विशेष होतें. यांत सगळा अपराध त्याचाच नव्हे; त्याच्या वेळींच्या विद्वज्जनांची रुचि कांहीं विलक्षणच होती. गूढ व दुर्बोध शब्द ज्याच्या लेखनांत येतात त्यालाच काय तो विद्वान ह्मणायाचें; इतरांस मूर्ख नाहीं तर प्राकृत ह्मणत असत."[१]

१. 'विविधज्ञानविस्तार' पुस्तक १ अंक ५,७. यांत **मोरोपंता**विषयीं आणखी जो बराच मजकूर लिहिला आहे तो वाचला ह्मणजे असें वाटतें कीं, ७ व्या अंकाच्या शेवटीं 'पुढें चालेल' ह्मणून जें वचन दिलेलें आहे तें सदरील लिहिणारानें पुरें केलें नाहीं ही फार चांगली गोष्ट झाली. नाहीं तर आमच्या विचाऱ्या कवीवर आणखी काय काय घोरपडी आल्या असत्या न कळे! या टीकाकर्त्याचे एक दोन आक्षेप येथें सांगतों, त्यांवरून त्याचें मन प्रस्तुत कवीवर केवढें रुष्ट झालेलें होतें हें कळून येईल. **मोरोपंता**नें एके आर्येंत कृष्णास 'शिनळ ह्मटलें यावरून ईश्वराला तो फारच थोडा मान देत असे. आपला पोशिंदा जो बाबूजी नाईक त्यावर या कवीनें तीन चार [प्रस्तुत लिहिणाराच्या मतें] अगदीं साधारण आर्या केवळ टाकभाड्याप्रमाणें रचल्या, यावरून 'मोरोपंताच्या हृदयांत कृतज्ञता देखील फारच थोडी होती,' कोण विलक्षण कल्पना या!!

या आक्षेपांनीं तर कवित्वाचें सर्वस्वभूत जें रसिकत्व त्यावरहि धाड पडली. यांनीं प्रस्तुत कवीच्या वाग्वधूचें शरीरलावण्यहि नाहींसें होऊन गुंजांचीं वगैरे भूषणें धारण करणाऱ्या वनचरस्त्रीचें तीस साम्य येतें. याखेरीज इतर जे आक्षेप विद्वान मंडळीच्या तोंडून ऐकूं येतात व कधीं कधीं लेखांत दृष्टीस पडतात त्यांचा सारांश वरील वाक्यांत आला आहे. हे आक्षेप असे– एक अपरिचित शब्दांचा. हा आक्षेप पुष्कळांच्या तोंडून ऐकूं येतो. ते ह्मणतात, "काय हो? कसला कवि हा! येथून तेथून संस्कृत शब्द ह्मणजे काय! कोणाला समजूं नये अशी कविता करण्यांत यास काय थोरवी वाटली असेल ती असो. 'अन्या धन्या कन्या'—काय ही कविता?" हाच आक्षेप कोणी शास्त्रीय परिभाषेनें बोलून दाखवतात. संस्कृतांत द्राक्षापाक, नारिकेलपाक असे काव्यरचनेचे प्रकार आहेत. यांपैकीं मोरोपंताच्या काव्याची दुसऱ्या वर्गात गणना होते. ती अशाकरतां कीं, त्याचें काव्य असोल्या नारळासारखें कठिण असून तें उकलायास मोठा प्रयास पडतो. ही आपल्या देशबंधूंची दुःखकारक स्थिति पाहून कांहीं अर्वाचीन पंडितांनीं द्राक्षापाकात्मक कविता रचली आहे. वामन, मोरोपंत यांनीं संस्कृत शब्दांची आपल्या कवितेंत रगाडी जी करून दिली आहे, तिच्या उलट प्रकार या सदय कवींनीं केलेला आढळतो. पूर्वीच्या मूर्ख कवींनीं मोठमोठे संस्कृत शब्द योजून कवितावधूस उंची रेशमी व लोकरी वस्त्रें लेवविलीं, तें न साहून आमच्या अर्वाचीन कविवरांनीं 'तट्टू', 'खट्टू', 'चकाके', 'ठोका', 'बडवा', 'ठुस्सा' वगैरे अगदीं साधे व जोरदार शब्द योजून तिला लकतऱ्यांनीं विभूषित केली आहे, व कोठें कोठें 'लांबनाक्या', 'देशकैवारधारी' वगैरे मोठीं शोभादायक ठिगळेंहि जोडलीं आहेत; असो, 'भिन्नरुचिर्हि लोकः' किंवा 'निरंकुशाः कवयः' यांतून कोणत्या तरी वचनाचा आश्रय करून स्वस्थ बसावें, दुसरा उपाय नाहीं! दुसरा आक्षेप यमक, प्रास वगैरेच्या संबंधानें. मोरोपंताचा वरील शब्दालंकाराकडे मोठा भर जो जेथें तेथें दृष्टीस पडतो तो त्यास मोठा बाधक झाला आहे. कवितेच्या अंतरंगावर जें धोरण ठेवावयाचें तें टाकून यमकादि केवळ बाह्यांगावरच जो अगदीं चूर होऊन गेला तो कवि कसला, व यावद्दलच त्याची प्रशंसा करणारे जे जुने लोक ते कसले रसिक, अशी नवीन विद्वान मंडळीची आज पुष्कळ दिवस समजूत होऊन राहिली आहे. त्यांतून 'अष्टोत्तरशत रामायणें' रचून तर आपल्या शतमूर्खत्वाचा, अप्रयोजकपणाचा, व अरसिकत्वाचा मोठा बाव्हटाच त्यानें आपल्या हातानें रोंवून ठेवला असें ह्मणायास हरकत नाहीं! तिसऱ्या एका रसकवर्गाची कल्पना अशी धांवते कीं, अलीकडे आमच्या देशांत बुद्धीचा सामान्यतः ऱ्हासच झाला आहे, आणि त्यांतून सरस्वतीचा पूर्वी भोजविक्रमादिकांच्या वेळीं एकदां जो वीणानाद होऊन गेला तो गेला. त्यावर आज हजार दोन हजार वर्षे तिनें आपलें वाद्य जें गवसणींत गुंडाळून ठेवलें आहे तें हल्लींच्या सुधारलेल्या इंग्रेजी राज्यांत ती

सोडण्याचें मनांत आणील तर न जाणों! बाकी निव्वळ मूर्खत्वाचा जो हा मध्यंतरीं काळ गेला त्यांत साधारण समजूतहि लोकांस दुर्लभ, मग कवित्वाची गोष्ट तर दूरच! तेव्हां अर्थातच मोरोपंतासारख्या रसानभिज्ञ कवींनीं पोकळ शब्दालंकारांनीं कवितेस भूषित केली व लोकांचीहि रसज्ञता तितपतच असल्यामुळें तसल्या थाटमाटालाच भूलून जाऊन त्यांनीं त्यांस कवित्वाच्या उच्चपदावर नेऊन बसविलें!

आतां वरील मतांच्या उलट ह्मणजे प्रस्तुत कवीच्या तर्फेचे जे कित्येक अभिप्राय आहेत ते दाखल करतों. जुन्या लोकांत मोरोपंताची चहा कितपत असे व अद्याप आहे हें सर्वांस माहीत आहेच. त्यास निवर्तून अद्याप संपूर्ण शतकहि लोटलें नाहीं, तरी त्याची कीर्ति साऱ्या देशभर केव्हांच पूर्वीच्या अतिविख्यात कवींप्रमाणें चोहोंकडे पसरून राहिली आहे. त्याच्या जिवंतपणींहि स्वतःची ख्याति सर्वतोमुख झालेली त्यानें ऐकिली असेल. कीर्तनांचा प्रघात त्याच्या काळीं चोहोंकडे अतिशय फैलावला असल्यामुळें त्याच्या कवित्वाचा प्रसार पूर्वीच्या कवींहूनहि त्वरित झाला असेल. हा प्रघात अद्याप सुरूच आहे. तेव्हां कीर्तनकार मंडळींतच मुख्यतः प्रस्तुत कवीची प्रशंसा विशेष आढळते हें उघड आहे. श्रोत्यांच्या रंजनास यमकप्रासप्रचुर असें पंतांचें कवन उत्कृष्ट साधन असल्यामुळें त्याजवर ज्यांची वृत्ति त्या हरदासांच्या तोंडून त्याजविषयीं अत्यंत प्रशंसापर उद्गार कां न निघावे? तेच सामान्यतः इतर जनांच्याहि तोंडून कानीं पडतात. ते असे. मोरोपंतासारखा कवि त्याच्यापूर्वी कोणी झाला नाहीं, व पुढेंहि होणार नाहीं. त्याची कविता इतकी गहन आहे कीं, ज्यानें संस्कृताचें चांगलें अध्ययन केलें आहे त्यासच ती लागेल; सामान्य मराठी जाणणारास तर ती मुळींच कळावयाची नाहीं. मोरोपंताची विद्वत्ता मोठी असून संस्कृत भाषेचे छप्पन्न कोश जसे काय त्याच्यापुढें हात जोडून उभे होते व सरस्वतीचा त्यास वरप्रसाद होता; यामुळें जागोजागीं त्यानें असे चमत्कार केले आहेत कीं, एकेका आर्येचे दहा दहा अर्थ करतां येतात! सारांश, मोरोपंत हा केवळ अद्वितीय कवि होय व त्याचें काव्य ज्यास कळेल तो अद्वितीय पंडित होय!

---

१. वरील मतें नवीन विद्वानांच्या तोंडून पुष्कळांनीं ऐकलीं असतीलच. तीं त्यांच्या लिहिण्यांतहि प्रसंगवशात दृष्टीस पडतात. एका महापंडितांनीं वामन मोरोपंत, इत्यादि कवींस एका दावणींत गोंवून त्यांच्यावर "degenerate Sanscrito-Marathi Poets"(धड संस्कृतना मराठी असे भिकार मराठी कवि) असा सरसकट एक कोरडा उडवला आहे. दुसऱ्या एकानें मोरोपंताची योग्यता बरीच वर्णिली आहे, पण चित्रकाव्यरूप रचनेंत त्यानें आपल्या बुद्धीचा अपव्यय केला असें त्यानें झटलें आहे. मुंबई युनिवर्सिटीतहि एकदां असा प्रश्न घातला होता–"मोरोपंताची कवित्वाच्या संबंधानें जी सर्वत्र ख्याति आहे तिचीं कारणें तुह्मांस काय वाटतात तीं सांगा." या प्रश्नास उत्तर कोणत्या प्रकारचें अपेक्षित होतें त्याच्या रोखावरून सहज ध्यानांत येणार आहे.

अगारे कांतारे कुचकलशहारे मृगदृशां
मणेस्तुल्यं मूल्यं सहजसुभगस्य द्युतिमतः ॥[1]

अंक ४६. (१) विषयाचा उपक्षेप. (२) पहिला आक्षेप—मराठी कविता केवळ भाषांतररूप होय. (३) भाषांतररूप ग्रंथांचीं उदाहरणें. (४) वरील वादाविषयींचीं अवांतर प्रमाणें. (५) प्रत्यक्ष प्रमाण. (६) दुसरा आक्षेप—अपरिचित शब्द.

१. मागील अंकांत मोरोपंताच्या कवितेविषयीं अनुकूल व प्रतिकूल मतें कसकशीं आहेत तीं दाखल केलीं. आतां त्यांवर अनुक्रमानें आह्मी आपले अभिप्राय वाचकांस सादर करतों.

२. मोरोपंताविषयीं व एकंदर मराठी कवींविषयीं विद्वन्मंडळाचा पहिला मोठा आक्षेप हा आहे कीं, त्यांची कविता स्वतंत्र रचलेली नव्हे, तर केवळ भाषांतररूप होय. आतां निवळ भाषांतर असल्यानें ही काव्याची शोभा व कवीची योग्यता कितपत कमी होते हा एक स्वतंत्रच विचार आहे. त्याविषयीं पूर्वी एका अंकांत आह्मीं विस्तारेंकरून निरूपण केलेंच आहे. तें पाहिलें असतां महाराष्ट्रकवींचा अधिक्षेप करण्यास कितपत कारण आहे हें लक्षांत येईल.[2] पण वरील आक्षेप हा मुळींच कितपत खरा आहे याचा अगोदर पुरतेपणीं विचार केला पाहिजे.

३. 'भाषांतर' या शब्दाचा अर्थ काय हें कोणासहि सांगावयास नको. कोणत्याहि पदार्थाचें प्रतिबिंब आरशांत, स्थिर उदकप्रवाहांत, वगैरे पडलें असतां मूळ पदार्थाची सावयव प्रतिमा जशी स्थलांतरीं दृष्टिगोचर होते, त्याप्रमाणें एका भाषेंतील अर्थ दुसरींत यथास्थित व्यक्त झाला असतां त्याचें भाषांतर झालें असें ह्मणतात. अशीं भाषांतरें आपल्या भाषेंत व दरएक भाषेंत अनेक आहेत. जगद्विख्यात कवि होमर व व्हर्जिल यांचीं भाषांतरें इंग्रेजींत अनुक्रमेंकरून पोप व ड्रायडन यांनीं केलीं आहेत. वरच्यांच्या जोडीस बसविण्यासारखा जो आमचा 'कविकुलगुरु' त्याच्या अप्रतिम नाटकाचें भाषांतर सर विल्यम जोन्स यानें केलें आहे. आमच्या भाषेंत वामनपंडितानें भर्तृहरीचीं 'शतकें', जगन्नाथरायाची 'गंगालहरी', तशीच 'भगवद्गीता' यांचीं भाषांतरें रचिलीं आहेत; व मोरोपंतानें 'सप्तशती' व 'गीता' यांवर प्राकृत टीका केल्या आहेत. अलीकडे दहा वीस वर्षांत तशींच संस्कृत नाटकाचीं व 'मेघदूता'दि काव्यांचीं भाषांतरें होऊन गेलीं आहेत. तर हीं सर्व पद्यात्मक भाषांतराचीं उदाहरणें होत. आतां अशाच तऱ्हेचे वामन, मोरोपंत, मुक्तेश्वर इत्यादिकांचे ग्रंथ आहेत कीं काय हें पाहूं.

---

१. "जें रत्न आहे तें घरीं असलें, रानांत पडलें असलें, किंवा तरुणींच्या स्तनहारांत गुंफलें असलें तरी त्याची योग्यता सारखीच; कां कीं तें स्वभावतःच तेजस्वी व सुंदर असतें!"

२. प्रकृत पुस्तकाच्या १२ व्या अंकांत वरील निरूपण केलें आहे. तेथेंच आरंभी वरील विषयावरही कांहीं विचार दाखल केले आहेत.

४. वरील गोष्टीविषयीं निर्णय प्रत्यक्ष प्रमाणावरून ह्मणजे मूळ रामायण, महाभारत व भागवत यांशीं वरील कवींचे ग्रंथ ताडून पाहिले असतां तर होणार आहेच; पण एरवींहि सामान्य अनुमानावरून तिजविषयीं बराच निकाल होण्यासारखा आहे. तो येणेंप्रमाणें. एक तर ग्रंथविस्तारावरून रामायणाची ग्रंथसंख्या २४००० व भागवताची १८००० आहे, आणि महाभारत तर लक्ष ग्रंथ ह्मणून प्रसिद्धच आहे. मग यावरूनहि उघड दिसणार आहे कीं, सदरील मराठी ग्रंथांस या प्रचंड ग्रंथांचीं भाषांतरे ह्मणणें अगदींच शोभणार नाहीं. मोरोपंताच्या 'भारता'वरील आर्या पुरत्या वीस हजारहि नाहींत, 'मंत्रभागवत' तर सरासरी साडे तीन हजार आहे व 'मंत्ररामायण' तर हजार सुद्धां असेल नसेल! मुक्तेश्वराच्या 'रामायण' व 'भागवत' यांवर ओंव्या असल्याचें आह्मांस अद्याप माहीत नाहीं; व 'भारता'वर ज्या आहेत त्याहि पहिल्या चार पर्वांवरच्याच प्रसिद्ध असून त्यांतलींहि तीनच छापून निघालीं आहेत.[1] ओंवी

१. मुक्तेश्वराच्या 'भारता'विषयीं असा लोकप्रवाद आहे कीं, त्यानें मूळ समग्र ग्रंथ रचिला असतां त्यांतील चार पर्वें मात्र सध्यां उरलीं आहेत; बाकीचीं सर्व कोणीं द्वेषानें बुडविलीं असें ह्मणतात. मुक्तेश्वर 'नवनीतां'तील शकावरून पहातां शिवाजी महाराजांच्या वेळीं असावा. मग त्याचे समकालीन जे रामदास, तुकाराम व वामनपंडित यांचे ग्रंथ या काळापर्यंत चालत आले असतां याचेच कां बुडावे, हें कळत नाहीं. कवि एकदां प्रसिद्ध झाला,—ह्मणजे त्याच्या ग्रंथांची चहा होऊन त्यांच्या अनेक प्रति झाल्या व हरदासाच्या वगैरे तोंडीं त्याची कविता बसली,—ह्मणजे त्यानें काव्य बुडविणें हें एका राजाखेरीज दुसऱ्या कोणासहि शक्य नाहीं हें उघड आहे. कोणी केवढाहि पटाईत खळ असला तरी त्यास फार ह्मटलें ह्मणजे रविकुकुटन्यायानें आपल्या जवळची प्रत किंवा असेंहि करतां आपल्या इष्टमित्रांच्या प्रती नष्ट करून टाकतां येतील! बरें, एवढा खलद्वेष संपादण्यासारखें प्रस्तुत कवीच्या ग्रंथांत तर कांहीं दिसत नाहीं; कां कीं अर्वाचीन रामजोशासारखे त्यानें कोणावर कडाके उडाविलेलेहि आढळत नाहींत. आचरणांत कांहीं वावगें असेल ह्मणावें तर तो मुळीं प्रसिद्ध साधु एकनाथ यांचा नातू व शिष्य; तेव्हां त्या 'शांतिजलधी'च्या निदान एखाद्या लहरीचा तरी असल्या सत्पात्राचे ठायीं समावेश झाला असेल हें उघड आहे! दुसरा असा चमत्कार आहे कीं, जो खळराहू भारतपर्वांच्या ग्रासीं एकदां प्रवृत्त झाला, त्यानें पहिल्या चार कला तरी चावायाच्या कशा ठेवल्या! तेवढ्यांपुरतींच त्याच्या मनांत कींव उत्पन्न झाली काय? एकंदरींत ही दंतकथा आह्मांस मुळींच निराधार वाटते. कदाचित असें झालें असेल कीं कवीच्या हातून चारच पर्वें पार पडून तो निवर्तला असेल; किंवा कदाचित् आरंभींच कांहीं अनिष्टापात होऊन विराटोत्तर पर्वांचा लय झाला असेल. तर आमच्या वाचकांनीं या टीपेवरून हा बोध घ्यावा कीं, असले लोकप्रवाद असले तरी कविवित्ताच्या शोधाविषयींची त्यांची प्रवृत्ति कुंठित होऊं नये. चिरनष्ट मानलेल्या वस्तूंपैकीं प्रसंगवशात् कोठें काय उदयास येईल याचा नेम नाहीं!

वरील चार पर्वांपैकीं आदिपर्व, सभापर्व, व विराटपर्व, हीं तीन भाजी 'सर्वसंग्रहां'त

(पुढें चालू).

छंद हा बहुधा संस्कृतांतील अनुष्टुपावरूनच प्राकृत कवींनीं नवा सुरू केला असावा, तेव्हां मूळ संस्कृत वृत्तांतील अर्थ मराठींत उतरण्यास हा छंद चांगला सोयीवार पड-ण्यासारखा आहे हें उघड आहे. तरी असें असतांहि मुक्तेश्वराचीं पर्वें ग्रंथसंख्येंत मूळ पर्वांहून कमीच आहेत. तीं खरोखरी पहातां मूळच्याहून वाढावीं; कां तर संस्कृतांत समास व संधि यांच्या योगानें पुष्कळ अर्थाचा थोड्या शब्दांत समावेश होतो, व तसें मराठींत नसल्यामुळें भाषांतर करतांना मूळच्याहून मोठें वृत्त धरावें लागतें, किंवा मूळच्या एकांतील अर्थ मराठींत दोहोंत आणावा लागतो. असो; तर ग्रंथविस्ताराचें हें एक प्रमाण झालें. दुसरें प्रमाण कविताविषयावरून. बहुतेक महाराष्ट्र कवींची कविता जर पाहिली, तर तिचे विषय स्वतंत्र ह्मणजे संस्कृतांतून न घेतलेले असे आहेत हें तेव्हांच लक्षांत येईल. उदाहरणार्थ वामन, आनंदतनय व रघुनाथपंडित घ्या. यांनीं निरनिराळ्या विषयांवर जीं व्याख्यानें रचिलीं आहेत त्यांस केवळ कथानकाखेरीज दुसरा कोणताहि मूळ संस्कृतांतला आधार नाहीं. त्यांतील विचार, कल्पना, अलंकार वगैरे सर्व त्या कवींचे स्वतःचे होत. तिसरें प्रमाण यमकादि शब्दालंकार. हे महाराष्ट्र कवितेंत वामनानें प्रथमतः आणले व त्यावरून त्यास 'यमक्या वामन' असें नांव प्राप्त झालें होतें. मोरोपंतानें तर हें यमकांचें प्रकरण कोठपर्यंत वाढविलें हे सर्वप्रसिद्धच आहे. आनंदतनय, रघुनाथपंडित यांनींहि आपल्या कवितेस प्रासानुप्रासांनीं जागोजाग अत्यंत शोभा आणली आहे हें सर्वांस माहीत आहेच. तर यांवरूनहि वरील आक्षेपाचें वरेंच निरसन होतें; कां कीं, जें निवळ भाषांतर आहे, त्यांतून संस्कृतासारख्या अत्यंत अभियुक्त भाषेंतून मराठीसारख्या भाषेंत, त्यांत भाषांतरकारांस लांब लांब यमकें व प्रासांवर प्रास ही गर्दी कधींहि साधतां येणार नाहीं हें कोणासहि सकृद्दर्शनीं सुद्धां स्पष्ट दिसणार आहे.

छापून निघालीं आहेत. मधल्या 'वनपर्वा'विषयीं या पुस्तकांत सुमारें दोन वर्षांपूर्वी एका रत्नागिरीकरानें जाहिरात दिली होती; पण लोकाश्रय पाहिजे तसा किंवा मुळींच न मिळाल्यामुळें ते काम तसेंच राहिलें असावें. तें वरील कवीचें भाग्य आतां पुनः उदयास येऊं पहात आहे हें मागील अंकाच्या शेवटच्या बड्या जाहिरातीवरून सर्वांस कळलेंच आहे.

१. मोरोपंतास यमकांची व प्रासांची एवढी आवड असतां एका ग्रंथांत त्यानें संस्कृत व इंग्रेजी भाषांप्रमाणें यमकविरहित छंदाची योजना केली आहे. हा ग्रंथ 'भगवद्गीते'चें भाषांतर होय. पुढील आर्या पहा—

धर्मक्षेत्रीं कुरुच्या क्षेत्रीं जे युद्धकामुक मिळाले ।
माझे आणि पांडव ते प्रवर्तले संजया कसें सांग ॥ १ ॥
रचलें पांडववळ तें दुर्योधन देखुनी तया काळीं ।
तो राजा वचन असें द्रोणाच्या जवळि येउनी बोले ॥ २ ॥

(पुढें चालू).

पण ही केवळ चार पांच मराठी कवींची व त्यांच्याहि ग्रंथांचीच काय ती गोष्ट झाली. त्यांस सोडून बाकीच्यांविषयीं विचार केला ह्मणजे तर वरील मतास कांहींच थारा रहात नाहीं. पहा कीं, मुकुंदराजानें 'विवेकसिंधु' व 'परमामृत' हे ग्रंथ केले आहेत; ज्ञानेश्वरानें 'अमृतानुभव' केला आहे; एकनाथकृत 'स्वात्मसुख' आहे; व वामनानें 'निगमसार' व 'श्रुतिकल्पलता' हीं रचिलीं आहेत. या वेदांतविषयक ग्रंथांस भाषांतरें कोण ह्मणेल? तसेंच तुकारामप्रभृति अभंगकारांनीं आपले भक्तिपर, वैराग्यपर, स्वानुभवपर वगैरे हरएक प्रसंगीचे उद्गार आपल्या प्रासादिक वाणीनें जगास विश्रुत केले आहेत त्यांवरहि भाषांतरत्वाचा आरोप करणारा कोण बहादर सांपडेल तो सांपडो! हीच गोष्ट अमृतरायाचे कटाव, रामजोशाच्या लावण्या, महिपतीचीं अनेक संतचरित्रें, व 'मनाचे श्लोक', 'केलावली', 'सन्माणिमाला', 'संशयरत्नमाला' इत्यादि शेंकडों स्फुट प्रकरणांसहि लागणारी आहे.

५. वरील अवांतर प्रमाणांवरूनहि प्रस्तुत वादाचा बराच निकाल होणार आहे. आतां वर सांगितलेलें प्रत्यक्ष प्रमाण वाचकांस सादर करतों. 'महाभारता'च्या आदिपर्वाच्या शेवटीं शेवटीं 'सुंदोपसुंदोपाख्यान' ह्मणून एक कथानक आहे तें व मुक्तेश्वर आणि मोरोपंत यांचीं प्राकृत आख्यानें अशीं तिन्ही पुढें देतों—

" दृष्ट्वा च विश्वकर्माणं व्यादिदेश पितामहः ।
सृज्यतां प्रार्थनीयैका प्रमदेति महातपाः ॥ १ ॥
पितामहं नमस्कृत्य तद्वाक्यमभिनन्द्य च ।
निर्ममे योषितं दिव्यां चिन्तयित्वा पुनः पुनः ॥ २ ॥

वरील आर्या मूळ ग्रंथाशीं किती मिळून आहेत हें पुढील श्लोकांवरून लक्षांत येईल—

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः । मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥
दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा । आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥

जो कवि आपणास 'आर्यापति' ह्मणवीत असे, व शब्दालंकार रचण्यांत ज्याचा हातखंडा असे, त्यानें वरील ग्रंथांत आपलें सर्व भाषावैभव दूर गुंडाळून ठेवून केवळ सेवकाप्रमाणें त्यानें अर्थवाहनाचेंच काम कां पतकरलें हें पुढील प्रस्तावनेवरून व्यक्त होईल—

त्यांचे पाय नमुनि मी दीन अतिज्ञानहीन परि भावें ।
गावें गीतार्थातें ह्मणवुनि टीका करावया धावें ॥
मी तों अगाधगीता-सुधानदीमाजि घालितोंचि उडी ।
नरजन्म पर्व दुर्लभ जाणुनि द्यावी कशी न येथ बुडी ॥
आर्याबुधिपरतीरा पावाया मी प्रवर्तलों नीट ।
पोंहाया न कळे परि अमृतांबुधि ह्मणुनि मज्जनीं धीट ॥
पुरुषाचा धर्म भ्रम ह्मणउनि कांहीं पडेल येथ उणें ।
पूर्ण करावें शोधुनि भगवत्प्रीत्यर्थ सज्जनें निपुणें ॥

त्रिषु लोकेषु यत्किंचिद्भूतं स्थावरजंगमम् ।
समानयद्दर्शनीयं तत्तदत्र स विश्ववित् ॥ ३ ॥
कोटिशश्चैव रत्नानि तस्या गात्रे न्यवेशयत् ।
तां रत्नसंघातमयीमसृजद्देवरूपिणीम् ॥ ४ ॥
सा प्रयत्नेन महता निर्मिता विश्वकर्मणा ।
त्रिषु लोकेषु नारीणां रूपेणाऽप्रतिमाऽभवत् ॥ ५ ॥
न तस्याः सूक्ष्ममप्यस्ति यद्गात्रे रूपसंपदा ।
नियुक्ता यत्र वा दृष्टिर्न सज्जति निरीक्षताम् ॥ ६ ॥
सा विग्रहवतीव श्रीः कामरूपा वपुष्मती ।
जहार सर्वभूतानां चक्षूंषि च मनांसि च ॥ ७ ॥
तिलं तिलं समानीय रत्नानां यद्विनिर्मिता ।
तिलोत्तमेति तत्तस्या नाम चक्रे पितामहः ॥ ८ ॥
ब्रह्माणं सा नमस्कृत्य प्रांजलिर्वाक्यमब्रवीत् ।
किं कार्यं मयि भूतेश येनास्म्यद्येह निर्मिता ॥ ९ ॥
॥ पितामह उवाच ॥ गच्छ सुंदोपसुंदाभ्यामसुराभ्यां तिलोत्तमे ॥
प्रार्थनीयेन रूपेण कुरु भद्रे प्रलोभनम् ॥ १० ॥
त्वत्कृते दर्शनादेव रूपसंपत्कृतेन वै ।
विरोधः स्याद्यथा ताभ्यामन्योऽन्येन तथा कुरु ॥ ११ ॥
॥ नारद उवाच ॥ सा तथेति प्रतिज्ञाय नमस्कृत्य पितामहम् ।
चकार मंडलं तत्र विबुधानां प्रदक्षिणम् ॥ १२ ॥
प्राङ्मुखो भगवानास्ते दक्षिणेन महेश्वरः ।
देवांश्चैवोत्तरेणासन् सर्वतस्त्वृषयोऽभवन् ॥ १३ ॥
कुर्वत्या तं तया तत्र मंडलं तत्प्रदक्षिणम् ।
इंद्रः स्थाणुश्च भगवान्धैर्येण प्रत्यवस्थितौ ॥ १४ ॥
द्रष्टुकामस्य चात्यर्थं गतया पार्श्वतस्तया ।
अन्यदंचितपद्माक्षं दक्षिणं निःसृतं मुखम् ॥ १५ ॥
पृष्ठतः परिवर्त्तन्त्या पश्चिमं निःसृतं मुखम् ।
गतायाश्चोत्तरं पार्श्वमुत्तरं निःसृतं मुखम् ॥ १६ ॥
महेन्द्रस्यापि नेत्राणां पृष्ठतः पार्श्वतोऽग्रतः ।
रक्तान्तानां विशालानां सहस्रं सर्वतोऽभवत् ॥ १७ ॥
एवं चतुर्मुखः स्थाणुर्महादेवोऽभवत्पुरा ।
तथा सहस्रनेत्रश्च बभूव बलसूदनः ॥ १८ ॥

तथा देवनिकायानां महर्षीणां च सर्वशः ।
मुखानि चाभ्यवर्त्तन्त येन याता तिलोत्तमा ॥ १९ ॥
तस्या गात्रे निपतिता दृष्टिस्तेषां महात्मनाम् ।
सर्वेषामेव भूयिष्ठमृते देवं पितामहम् ॥ २० ॥
गच्छन्त्या तु तया सर्वे देवाश्च परमर्षयः ।
कृतमित्येव तत्कार्य्यं मेनिरे रूपसंपदा ॥ २१ ॥
तिलोत्तमायां तस्यां तु गतायां लोकभावनः ।
सर्वान् विसर्जयामास देवानृषिगणांश्च तान् ॥ २२ ॥

इत्यादिपर्वणि राज्यलाभपर्वणि तिलोत्तमाप्रस्थापने
एकादशाधिकद्विशततोऽध्यायः

॥ नारद उवाच ॥ जित्वा तु पृथिवीं दैत्यौ निःसपत्नौ गतव्यथौ ।
कृत्वा त्रैलोक्यमव्यग्रं कृतकृत्यौ बभूवतुः ॥ १ ॥
देवगंधर्वयक्षाणां नागपार्थिवरक्षसां ।
आदाय सर्वरत्नानि परां तुष्टिमुपागतौ ॥ २ ॥
यदा न प्रतिषेद्धारस्तयोः सन्तीह केचन ।
निरुद्योगौ तदा भूत्वा विजह्रातेऽमराविव ॥ ३ ॥
स्त्रीभिर्माल्यैश्च गन्धैश्च भक्ष्यभोज्यैः सुपुष्कलैः ।
पानैश्च विविधैर्हृद्यैः परां प्रीतिमवापतुः ॥ ४ ॥
अन्तःपुरवनोद्याने पर्वतेषु वनेषु च ।
यथोचितेषु देशेषु विजह्रातेऽमराविव ॥ ५ ॥
ततः कदाचिद्विन्ध्यस्य प्रस्थे समशिलातले ।
पुष्पिताग्रेषु शालेषु विहारमभिजग्मतुः ॥ ६ ॥
दिव्येषु सर्वकामेषु समानीतेषु तावुभौ ।
वरासनेषु संहृष्टौ सहस्त्रीभिर्निषेदतुः ॥ ७ ॥
ततो वादित्रनृत्याभ्यामुपातिष्ठन्त तौ स्त्रियः ।
गीतैश्च स्तुतिसंयुक्तैः प्रीत्या समुपजग्मिरे ॥ ८ ॥
ततस्तिलोत्तमा तत्र वने पुष्पाणि चिन्वती ।
वेशं साक्षिप्तमाधाय रक्तेनैकेन वाससा ॥ ९ ॥
नदीतीरेषु जातान्सा कर्णिकारान् प्रचिन्वती ।
शनैर्जगाम तं देशं यत्रास्तां तौ महासुरौ ॥ १० ॥
तौ तु पीत्वा वरं पानं मदरक्तान्तलोचनौ ।
दृष्ट्वैव तां वरारोहां व्यथितौ संबभूवतुः ॥ ११ ॥

तावुत्थायासनं हित्वा जग्मतुर्यत्र सा स्थिता ।
उभौ च कामसंमत्तावुभौ प्रार्थयतश्च ताम् ॥ १२ ॥
दक्षिणे तां करे सुभ्रूं सुंदो जग्राह पाणिना ।
उपसुंदोऽपि जग्राह वामे पाणौ तिलोत्तमाम् ॥ १३ ॥
वरप्रदानमत्तौ तावौरसेन बलेन च ।
धनरत्नमदाभ्यां च सुरापानमदेन च ॥ १४ ॥
सर्वैरेतैर्मदैर्मत्तावन्योऽन्यं भ्रुकुटीकृतौ ।
मदकामसमाविष्टौ परस्परमथोचतुः ॥ १५ ॥
मम भार्या तव गुरुरिति सुंदोऽप्यभाषत ।
मम भार्या तव वधूरुपसुंदोऽभ्यभाषत ॥ १६ ॥
नैषा तव ममैषेति ततस्तौ मन्युराविशत् ।
तस्या रूपेण संमत्तौ विगतस्नेहसौहृदौ ॥ १७ ॥
तस्या हेतोर्गदे भीमे संगृहीतावुभौ तदा ।
प्रगृह्य च गदे भीमे तस्यां तौ काममोहितौ ॥ १८ ॥
अहं पूर्वमहं पूर्वमित्यन्योऽन्यं निजघ्नतुः ।
तौ गदाऽभिहतौ भीमौ पेततुर्धरणीतले ॥ १९ ॥
रुधिरेणावसिक्तांगौ द्वाविवार्कौ नभश्च्युतौ ।
ततस्ता विद्रुता नार्यः स च दैत्यगणस्तथा ॥ २० ॥"

तपस्वी ऋषेश्वर ब्रह्मयाप्रती येऊनि क्लेशांतें सांगती ।
तेणें विचारूनियां चित्तीं विश्वकर्मा निरोपीं ॥ १ ॥
रत्नें घालोनि अवयवीं दिव्यांगना निर्मी बरवी ।
जींतें देखतां वैरभावीं नाश होय असुरांतें ॥ २ ॥
अवश्य ह्मणोनी विश्वकर्मा तीहीं लोकींच्या ललामा ।
एकवटोनि दिव्य प्रतिमा तिलोत्तमा निर्मिली ॥ ३ ॥
तिळतिळ जडोनि रत्नकण सजीव घडिलें प्रमदारत्न ।
ह्मणोनि तिलोत्तमा हें अभिधान ब्रह्मा ठेवी तियेतें ॥ ४ ॥
सकुमार सुंदर सुलक्षणी चातुर्य–प्रकाशाची खाणी ।
जींतें अवलोकितां नयनीं चोज आलें अद्भुत ॥ ५ ॥
उभी ठाके जया सवा तिकडे मुखें निघती देवा ।
सहस्रनयन झाला मघवा चतुरानन विरंची ॥ ६ ॥
तिनें होतांचि मागें पुढें अभी दुतोंडा दोहींकडे ।

अवलोकनाचेनि पाडें स्कंद झाला षण्मुख ॥ ७ ॥
तीसि बोधोनि वर्मकळा विरिंची पाठवी विंध्याचळा ।
जेथें असुरगणाचा पाळा परमानंदें क्रीडत ॥ ८ ॥
नृत्यांगनांचीं नर्तनें किन्नरांचीं मधुर गायनें ।
डोल देती आसव–पानें अंकासनीं अंगना ॥ ९ ॥
तेचि वनीं विलोल–नेत्रा तिलोत्तमा शशांकवक्त्रा ।
रक्तवर्ण–एकवस्त्रा वेढोनि वेंची पुष्पांतें ॥ १० ॥
तीसीं अवलोकितां नयनीं काम–व्याधें विंधिलें बाणीं ।
देह–स्मरणातें विसरूनि भोग भूलीं भूलले ॥ ११ ॥
आलिंगनालागीं उतावळे दोघे धावूनि पातले जवळे ।
परस्परें लाऊनि डोळे करसंकेतें वारिती ॥ १२ ॥
दक्षिणकरीं धरिली सुंदें वामहस्तीं उपसुंदें ।
दोघे कामाच्या उन्मादें रमावया झोंबती ॥ १३ ॥
सुंद ह्मणेरे ज्येष्ठपत्नी तुवां मानावी मातृस्थानीं ।
येरू ह्मणे कन्या भगिनी स्नुषा तुझी मम भार्या ॥ १४ ॥
दोघे चढले अति विषादा वश झाले निष्ठुर क्रोधा ।
पडताळूनि प्रचंड गदा युद्धकंदना मिसळले ॥ १५ ॥
घे घे ह्मणोनि घालिती घावो लक्षूनि भेदिती वर्म ठावो ।
लोपला सुहृद–पणाचा भावो घेवूं पहाती प्राणांतें ॥ १६ ॥
सुंदें ताडितां हृदयकमळीं उपसुंद हाणी कर्ण–मूळीं ।
मूर्छना दाटोनि भूमंडळीं दोघे प्राणा मुकले ॥ १७ ॥
होतां प्रमदेचें दर्शन व्यर्थ दोघे पावले मरण ।
जेवीं करिणींलागीं करीण युद्ध करितां काननीं ॥ १८ ॥
स्त्रिया जाणि असुरमेळा भयें पातला पाताळा ।
ब्रह्मा आदि सुरां सकळां परमानंद ते काळीं ॥ १९ ॥

त्रस्त–तर–सुर–प्रार्थित–विधि–वचनें चतुर विश्वकर्मा तें ।
व्यसन हराया द्याया निज कौशल्यें सुरांसि शर्मातें ॥ १ ॥
लोक–त्रय–स्था तिळ तिळ उत्तम लावण्य मेळउनि यत्नें ।
स्त्रीरत्न रची जाणों अवयव ते न खचिलींच तीं रत्नें ॥ २ ॥
नामें तिलोत्तमा ती लावण्य तिचें नृपा अपाराचि तें ।
जेणें वेधावेंचि क्षण तरि जें मन महातपा रचितें ॥ ३ ॥

तीस ह्मणे द्रुहिण अये देवि त्रैलोक्य-सुंदरी पुनीते।
वारीं ताप जगा जे दिधले सुंदोपसुंदरिपुंनीं ते ॥ ४ ॥
ती भुलले सुर हरिहर पाहुनी लोकैकसुंदरा ज्याला।
ब्रह्म-नियोगें दावी तें मोहक वदन सुंद राजाला ॥ ५ ॥
विंध्य-वनीं ललना-जन परिवृत ते दैत्यराज पीत-सुर।
स्वर्गाधिपत्य साधुनि होते स्व-बळें करुनि भीतसुर ॥ ६ ॥
पुष्पावचयव्याजें जैसी चपळा घनीं वनीं चपळ।
फिरतां तिला पहाती स्थिर पाहुनि बैसती न नीच पळ ॥ ७ ॥
अक्लोकितांचि चित्तें तद्रूपीं जेविं सुंद रमला हो।
उपसुंदहि ह्मणे हें प्राप्त स्त्रीरत्न सुंदर मला हो ॥ ८ ॥
धांवुनि धरिति कर तिचे सोडुनि सुंदोपसुंद रीतीतें।
दोघांसहि कटाक्षें अनुमोदी कृत्य सुंदरी ती तें ॥ ९ ॥
सुंद ह्मणे म्यां वरिली सर परता धरुनि हात तो डावा।
गुरुदारघर्षणोद्यत जो तो लागेल हात तोडावा ॥ १० ॥
उपसुंद ह्मणे माझी न करावी धर्महानि करकरुनी।
कां धरिला मृदुकर सर हरहर मरसील हा निकर करुनी ॥ ११ ॥
सुंद जसा उपसुंदहि दे दैत्यातें जसें गगन गाळी।
ज्यासि अमर्ष रुचे तो अंध विवेकासि कां मग न गाळी ॥ १२ ॥
सुंदीं जैसा काम क्रोध उठे तदनुजीं तसाचि तदा।
बिंब प्रतिबिंबचि तें घे ज्येष्ठ कनिष्ठहि तशीच गदा ॥ १३ ॥
सुंदाची उपसुदीं उपसुंदाची गदा पडे सुंदीं।
तन्मरणमुद्युद्धासें गणपतिच्या कळ चुकेल कां तुंदीं ॥ १४ ॥

वरील तिन्ही आख्यानें परस्पर ताडून पाहिलीं असतां सदरील मतास कितपत बळकटी येते हें वाचकांस कळून येईलच. तिन्ही आख्यानांची पद्यसंख्याच नुसती पहिली तर त्याचें प्रमाण सरासरी १, $\frac{3}{4}$, $\frac{3}{4}$ इतकें पडेल. आंतील अर्थ पाहिला तरी मुक्तेश्वराच्या ओंव्यांतहि पुष्कळ फेर केलेला आढळेल, आणि मोरोपंताच्या आर्यांत तर मूळच्या कथासूत्राखेरीज थोडेंच सादृश्य सांपडेल.

वरील सादृश्य तरी 'भारतां'तील एक विवक्षित कथानक घेतलें ह्मणून इतकें आढळलें. एकंदर इतिहासाच्या संबंधानें जर वरील तिन्ही ग्रंथ परस्परांशीं ताडून पाहिले तर तें याहूनहि थोडें आढळेल. तेव्हां एकंदरींत 'भारत', 'रामायण' वगैरे ग्रंथांचा सरासरी आधार घेऊन वरील दोघां महाराष्ट्र कवींनीं स्वतंत्रपणेंच काव्यरचना केली आहे असें ह्मणायास हरकत नाहीं. वामनादि कवींचीं स्फुट आख्यानें तर

बहुधा 'रघुकिराता'दि काव्यांप्रमाणेंच स्वतंत्र होत!

६. याप्रमाणें एका आक्षेपाविषयीं विचार झाला. दुसरा आक्षेप 'अपरीचित शब्दां'चा. हा आक्षेप बहुधा अशा लोकांच्या तोंडून ऐकूं येतो कीं, ज्यांनीं स्वभाषेचें कधींहि ह्मणण्यासारखें अध्ययन केलें नसून इंग्रेजीच्या ज्ञानावरच जे आपणास थोर व विद्वान ह्मणून लेखीत असतात. यांपैकीं कित्येक बहादर असे आहेत कीं, त्यांस मोरोपंताची सामान्य आर्या किंवा वामनाचा सामान्य श्लोकहि लागण्याची पंचाईत! अशांची रसिकता काय ती, कोणा कवीला 'बुळबुळीत' ह्मण, कोणाला 'कुचकट' ह्मण, कोणाला 'खुळा' ह्मण, असा चारगटपणा करण्यानेंच बहुधा प्रगट होत असते. केवळ उपहास केल्यानें कोणत्याहि गोष्टीची माहिती होत नसते, उपहास करणें तर उपहास्य वस्तूचें अगोदर कांहीं ज्ञान तरी आपणास असलें पाहिजे, नाहीं तर आकाशावर थुंकल्याप्रमाणें आपलीच शोभा होत असते, एवढी साधी गोष्टहि वरील महारसिकांस कळत नाहीं! अपरिचित शब्दांचा प्रयोग करण्याबद्दल जो आपण कवीस दोष ठेवावा, त्याच्या अगोदर ते शब्द कोणाला अपरिचित याचा कांहींच विचार होऊं नये काय? 'अपरिचित शब्द' ह्मणून कविता वाईट एवढाच महासिद्धांत गृहीत केला असतां मराठी वाचकानें कानडी किंवा हिंदुस्थानी कवींस कां नांव ठेवूं नये? किंबहुना फारसी भाषेंतील, फ्रेंच भाषेंतील, ग्रीक भाषेंतील कविता सरसकट नादान अशीहि भरारी कां मारूं नये? मोरोपंताची कविता 'अपरिचित शब्द'मय आहे हें जर खरें मानलें, तर आज पाऊणशें ऐशीं वर्षें सर्वांच्या मुखीं जो त्याच्या नांवाचा जयजयकार ऐकूं आला आहे तो कसा आला असता! ज्याची कविता कोणास कळण्यासारखीच मुळीं नाहीं त्याची सामान्य लोकांतहि चहा होईल काय? तेव्हां प्रस्तुत कवीच्या काव्यांतील शब्द सर्वांसच 'अपरिचित' आहेत असें मनांत येत नाहीं. आतां हें खरें, कीं जे महाविद्वान थोड्या थोडक्या काळांत येथल्या येथेंच जन्मभाषाहि विसरून गेलेले आढळतात, त्यांच्या दृष्टीनें पाहिलें असतां कोणत्याहि मराठी कवीचे, आणि त्यांतून मोरोपंताचे तर, शब्द भारीच 'अपरिचित'! पण अशांच्या अभिप्रायावरून जर महाराष्ट्र कवींवर आक्षेप काढायाचे, तर पाद्री साहेबांचे व बाटे लोकांचे आमच्या देशाच्या हरएक प्रकरणीं जे मोलवान विचार सहस्रशः प्रगट झालेले आढळतात, तेहि शिरसावंद्य कां करूं नयेत? कोणतीहि भाषा पाहिली तरी तिचे आंतल्या आंत अनेक प्रकार असतात,—मोठमोठ्या पंडितांच्या भाषेपासून तों अगदीं अडाणी लोकांच्या भाषेपर्यंत! मग अशा भाषाभेदांत एकाचे शब्द दुसऱ्यास सहजच 'अपरिचित' वाटणार आहेत. मोरोपंत, वामन यांच्या सारख्यांची भाषा सामान्य अडाणी शूद्रांत तर काय पण सामान्य प्रतीच्या लोकांसहि पुष्कळ ठिकाणीं 'अपरिचित' वाटणारी आहे, व त्याप्रमाणेंच अडाणी कुणब्यांच्या लावण्या व पवाडे हेहि कांहीं अंशीं पंडितांस 'अपरिचित' वाटतील. पण अशा परस्पर 'अपरि-

चया'नें दोहोंपैकीं कोणाचीहि वास्तविक योग्यता कमी होते कीं काय, हें कोणाहि समंजस मनुष्यांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. आतां येथें कोणी असें विचारील, कीं सर्वांस समजण्यासारखी कविता करायाची टाकून मोरोपंतानें एवढे मोठे मोठे संस्कृत शब्द, लांब लांब समास वगैरे योजून तीस एवढें दुर्बोधत्व कां आणलें, तर त्यावर प्रस्तुत कवीच्या तर्फेनें उत्तर देणें मोठें कठिण आहे असें नाहीं. रुचिपरत्वें-करून जगांत हरएक प्रकरणीं कृतिभेद आढळतो हें सर्वप्रसिद्धच आहे. दोघेहि कोट्याधीश असतात; पण एकास साधाच पोषाक पसंत पडतो, व एकास भपकेदार आवडतो. दोघीहि रूपानें चटकचांदण्या असतील; पण एकीस माणिकमोत्यांनीं आपणांस लेवविण्याची हौस असेल, दुसरी—

कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषाविरहिता
विराजे सिंदूरें धवल वसनें भूपवनिता ।

अशा प्रकारची असेल. अशीच ग्रंथकर्त्यांचीहि गोष्ट. कालिदासाची वाणी शुद्ध, साधी व रसाळ अशी त्याच्या साऱ्या ग्रंथांतून आढळते. भवभूति त्याच्याहून कमी होता असें नाहीं. पण त्याच्या नाटकांतील भाषा झटली झणजे प्रौढ, उद्दाम, व साहित्योक्त गौडी रीतीस अनुसरणारी अशी आहे. हाच फरक इंग्रेजी भाषेंत आडिसन व जॉनसन यांच्या ग्रंथांत आढळतो. शेक्सपीयर व मिल्टन यांची जोडी कांहीं अंशीं वर सांगितलेल्या दोघा कविवरांच्या सारखीच होय, व दोघांच्या मधली तफावतहि तशीच आहे. पहिल्याचें कवित्व 'वाचमर्थोऽनुधावति' या वचनाप्रमाणें केवळ स्वतःप्रेरित असल्याप्रमाणें भासतें; व त्यामुळें कधीं व्याकरण चुकलें, कधीं अलंकार चुकला, कधीं अर्थाची असंगति झाली, असे प्रमाद त्याच्या कवितेंत जागोजाग आढळतात. दुसऱ्याचा प्रकार अगदीं वेगळा. तो स्वकालीन पंडितांत अग्रगण्य असल्यामुळें त्याच्या ग्रंथांत वरील दोष नाहींत इतकेंच नव्हे, तर त्याच्या रचनेंत प्रगल्भता व अलंकारादिकांचा थाटमाट हा जागोजाग दृष्टीस पडतो. यास्तवच त्याची कविता पंडितांस जितकी प्रिय आहे तितकी सामान्य अडाणी लोकांस नाहीं. ग्रीक व रोमन ग्रंथकारांवर अनुसंधान ठेवून लिहिण्याचा त्याचा पुष्कळ प्रघात असल्यामुळें वरील भाषांचें मार्मिक ज्ञान त्याचें काव्य यथास्थित समजण्यास पुष्कळ अंशीं अवश्य आहे, व यास्तवच मोठमोठ्या पंडितांनीं त्याच्या काव्यांवर टीका लिहिलेल्या आहेत. असो; तर मग जें रुचिवैचित्र्य इतर भाषांतील कवितेंत आढळतें तेंच आमच्या महाराष्ट्र भाषेंतहि कां आढळूं नये? कोणी कवि शुद्ध, सरळ व सुबोध शब्दांनीं पुण्यपत्तनाचें वर्णन करतो—

"पुणें गांव आहे. नदीकांठ आहे.
तेथें जाळिती लोक. तें पात्र वाहे."

कोणी पुढील विकट तऱ्हा काव्यांत आणतो—

"अनलसमीहित साधी राया वारा महीवरा कामा ।
अनलस मीहि तसा धीरा यावा रामही वराका मा ॥".

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञाम्
जानंतु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ॥*

मालतीमाधव.

अंक ४७– (१) सदरील अंकाचा विषय. (२) यमक व प्रास. (३) संस्कृत कवींचा प्रघात. (४) इंग्रेजी कवींचा. (५) वरील आक्षेपाचा ग्राह्य अंश. (६) तो मोरोपंतावर कितपत लागू पडतो याविषयीं विचार. (७) तत्कालीन पंडितांची अभिरुचि प्रस्तुत कवीस कितपत बाधक झाली याविषयीं विवरण.

१. मागील अंकांत मोरोपंताच्या कवितेवरील दोन आक्षेपांचें निरसन केलें. आतां पुढल्याविषयीं विचार करूं.

२. प्रस्तुत कवीच्या पदरचनेच्या संबंधानें आधुनिक पंडित मंडळीचा त्याजवर मोठा आक्षेप ह्मटला ह्मणजे यमक व प्रास यांच्या संबंधानें आहे. या दोहोंचें प्राचुर्य त्याच्या काव्यांत जें आढळतें तें त्याच्या अरसिकत्वाचें दर्शक होय, व जे वाचक किंवा श्रोते वरील शब्दालंकारांस चहातात तेहि अरसिक वर्गांतच येतात. असें आज बहुत वर्षें मत चालत आलें आहे; या मताविषयींचे कांहीं उल्लेख आरंभींच्या अंकांत दिलेलेच आहेत; त्याशिवाय अलीकडील महाराष्ट्र कविता पाहिली तर तींतहि वरील मतांचा प्रभाव दृष्टीस पडतो. तो अर्थात हा कीं, तींत यमकादि शब्दालंकारांच्या परित्यागाविषयीं वाग्देवीस जणों काय कडकडीत व्रत धरविलें आहे असें वाटतें. असो; तर हें जें एवढें पंडितमान्य मत आहे याच्या यथार्थत्वाविषयीं सविस्तर विवरण करणें अवश्य होय.

३. कोणत्याहि प्रचाराच्या युक्तायुक्ततेचा जो विचार करावयाचा तो दोन गोष्टींवरून होत असतो; एक तत्त्वदृष्ट्या, व दुसरा थोर मानलेल्या लोकांच्या आचारावरून. युक्तीच्या दृष्टीनें एखादी गोष्ट बरोबर दिसत असते हें एक; किंवा सर्वमान्य लोक तीस अनुसरतात हें दुसरें. आतां यमक व प्रास काव्यांत असणें हें वाईट का चांगलें याविषयीं वस्तुतः जर विचार केला, तर हें कोणासहि स्पष्ट दिसणारें आहे कीं, ज्या अर्थीं ते शब्दालंकार होत, त्या अर्थीं ते कवितेस शोभविणारे आहेतच आहेत. सोन्यारुप्याचे दागिने अंगावर घालणें हें चांगलें का वाईट याविषयीं निर्णय ठरविण्यास जशी पंडितांची सभा मिळवून भवति न भवति करण्याची गरज नाहीं, त्याप्रमाणेंच कर्णाचें

---

*"जे कोणी आमची अवहेलना करतात त्यांनीं असें समजावें कीं, आमचा हा यत्न त्यांजकरितां नव्हे!"

रंजन करणारे जे वर्णसाम्याचे प्रकार ते कवीनें योजावे कीं नाहीं, याविषयीं फार वाटाघाट करणें नलगे. काव्यांत रसाचें प्राधान्य मानूनहि कवि ज्याप्रमाणें छंदोबद्ध शब्दरचनेचें साहित्य रसपुष्टयर्थ अवश्य घेतात, त्याप्रमाणेंच यमक व प्रास हेहि मनास आल्हाद करणारे असल्यामुळें त्यांचा प्रयोग सत्कवींनींहि केलेला आढळतो यांत नवल काय? तेव्हां प्रस्तुत शब्दालंकारांत वस्तुतः दूषणीय कांहीं आहे असें नाहीं. आतां दुसरी गोष्ट जें सत्कवींच्या प्रयोगाचें प्रमाण तेंहि प्रकृत वादास प्रतिकूल आहे असें नाहीं. संस्कृतांत पूर्वीपासून यमकाचा मुळींच प्रघात नाहीं, तेव्हां त्याच्या संबंधाचें त्या भाषेंत प्रमाण सांपडणार नाहीं हें उघडच आहे. पण अनुप्रासाविषयीं पाहिलें तर अगदीं मोठमोठ्या कवीश्वरांपासून तों अर्वाचीन सामान्य कवीपर्यंतहि त्याचें प्राबल्य आढळतें. कालिदासाचे ठायीं वाग्देवीचें सर्वस्व आढळतें. व त्याच्या काव्यांत संस्कृत कवितेची जितकी पूर्ण दशा दिसते, तितकी अन्यत्र कोठेंहि दिसत नाहीं; पण असें असूनहि अनुप्रासाविषयीं त्याची मोठी करडी नजर दिसते असें नाहीं, उलटी वरील शब्दालंकाराविषयीं त्याची आवडहि जागोजाग दिसते.[1] संस्कृताचें अध्ययन केलेल्यांस 'रघुवंशा'च्या नवव्या सर्गांत कोणता प्रकार बहुधा साऱ्या सर्गभर आढळतो तो सांगायाला नकोच. त्यांत दर एक श्लोकाच्या शेवटल्या चरणांत तीन तीन अक्षरांची अनुवृत्ति होई अशी रचना केली आहे. ही तर 'कवींच्या कुलगुरूं'चीच प्रत्यक्ष गोष्ट झाली. भवभूति कालिदासाच्या बराच मागून झाला असावा, तरी त्याचें स्थान वाग्देवीच्या सिंहासनासमोर कालिदासाच्या पलींकडचेंच आहे, ही प्रसिद्धि पहिल्या पासून चालत आलेली आहे, पण त्याच्या कवितेंत पाहूं जावें तों शब्दालंकाराविषयीं याचीहि पराङ्मुखता दृष्टीस पडत नाहीं, इतकेंच नव्हे तर उलटी बरीच हौस सुद्धां दृष्टीस पडते.[2] यांच्या पुढला प्रचार तर सांगायालाच नको. भारवि, माघ, बाण, सुबंधु, श्रीहर्ष, जयदेव इत्यादिकांच्या काव्यांत शब्दालंकारांविषयीं उदासीनता कितपत दृष्टीस पडते हें या कवींच्या ग्रंथांतलें एखादें पृष्ठ उलटून पाहिलें असतांहि कळणार आहे.

---

१. उदाहरणार्थ पुढील श्लोक पहा—

ततो मृगेंद्रस्य मृगेंद्रगामी वधाय वध्यस्य शरं शरण्यः।
जाताभिषंगो नृपतिर्निषंगात् उद्धर्तुमैच्छत् प्रसभोद्धृतारिः॥
रघुवंश—२.

२. पुढील उदाहरण पहा—

असारं संसारं परिमुषितरत्नं त्रिभुवनं
निरालोकं लोकं मरणशरणं बांधवजनम्।
अदर्पं कंदर्पं जननयननिर्माणमफलं
जगज्जीर्णारण्यं कथमसि विधातुं व्यवसितः॥
मालतीमाधव—५.

हें तर काय पण पहिल्या दोघांनीं आपापल्या महाकाव्यांच्या अनुक्रमेंकरून १५ व्या व १९ व्या सर्गांत चित्रकवित्वाचे जे चक्रबंध, गोमुद्रिकाबंध वगैरे प्रकार, त्यांची रचना करूनहि आपली हौस फेडून घेतली आहे. दुसऱ्या दोहोंची श्लेषप्रियता तर पंडितप्रसिद्धच आहे. 'नैषध' काव्य तर अनेकार्थसंभवाविषयीं केवळ कामधेनुच होय ही प्रसिद्धि सार्वलौकिक आहे. आतां या मध्यमकालीन कवींपासून अलीकडे जों जों येऊं लागावें तों तों वरील शब्दालंकारांचें प्राबल्य तर कितपत दृष्टीस पडूं लागतें हें सांगावयासच नको. 'विश्वगुणादर्श', 'लक्ष्मीसहस्र', 'भारतचंपू', 'नलचंपू' इत्यादि ग्रंथांवरून कवितेच्या बाह्यालंकारांवर अर्वाचीन कवींचे परिश्रम केवढे दृढ होत आले आहेत हें कोणासहि सकृद्दर्शनीं सुद्धां कळणार आहे. असें होतां होतां अगदीं अलीकडे किंबहुना आधुनिक काळचा प्रघात जसा आढळतो कीं, सामान्य भाषणांत किंवा लिहिण्यांतहि शब्दचमत्कारावांचून व्हावयाचें नाहीं. सरस्वतीचा ओघ निघाला कीं तो जलयंत्रोद्गारांप्रमाणें चित्रविचित्रतेनेंच प्रगट झाला पाहिजे![1]

---

१. हा वाग्वैचित्र्याचा प्रकार शास्त्री मंडळीच्या लेखांतून व भाषणांतूनहि नेहमीं दृष्टीस पडतो हें पुष्कळांस माहीत असेलच. याचें एक उत्कृष्ट उदाहरण गुर्जरदेशीय प्रसिद्ध पंडित गट्टुलालजी यांचा सुमारें चार वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेला एक लेख होय. डेक्कन कॉलेजच्या मंडळीनें ७३ साली जो 'मृच्छकटिक' नाटकाचा प्रयोग केला त्यावेळीं पंडित मजकूर पुण्यांत असल्यामुळें इतर शास्त्रिसमुदायाबरोबर त्यांसहि प्रयोगप्रेक्षणार्थ निमंत्रण झालें होतें. खरोखरी झटलें असतां 'प्रेक्षणार्थ' हा शब्द पंडितजींच्या संबंधानें पहातां अनर्थक होय; कां कीं हे दोन्ही डोळ्यांनीं आंधळे आहेत. ही महापत्ति त्यांस पूर्ववयांतच प्राप्त झाली असें समजतें. तरी असें असतांहि त्यांची विद्वत्ता एवढी मोठी आहे कीं, त्यांच्या तोडीचे पंडित या काळांत अवघ्या भारतवर्षांत थोडेच असतीलं. पण यांच्या संबंधानें सांगण्यासारखी सर्वांत अत्यंत आश्चर्यांची गोष्ट झटली झणजे यांचें शीघ्रकवित्व होय. वरील प्रयोगाच्या समयीं विद्यालयांतील पुष्कळ मंडळी एके दिवशीं त्यांच्या घरीं गेली होती; तेव्हां समस्यापूरणादि अनेक चित्रकवित्वाचे प्रकार पाहून सर्वांस मोठें कौतुक व आश्चर्य वाटलें. बोलतां बोलतां हव्या त्या वृत्तांत पद्य जुळणें, हव्या त्या विषयावर श्लेषादि चमत्कारयुक्त वर्णन करणें, हवे ते तीन चरण दिले असतां चवथा अर्थसंगतीची हानि न होतां जुळून देणें, इत्यादि अनेक प्रकार एका चार घटकेंत प्रत्यक्ष पाहिल्यावरून आमची खात्री झाली कीं, कालिदासादिकांच्या 'भोजप्रबंधा'दि ग्रंथांत आढळणाऱ्या व आख्यान-परंपरेनें चालत आलेल्या ज्या गोष्टी सर्वप्रसिद्ध आहेत, त्यांस असंभाव्य मानण्याची बिलकूल गरज नाहीं. असो; याच प्रसंगीं वरील नाटकप्रयोगावर त्यांनीं आपला अभिप्राय संस्कृतांत लिहून दिला; तो सदरील वर्षाच्या जून महिन्याच्या आरंभींच्या 'ज्ञानप्रकाशा'त छापला होता. तो पाहिला असतां जुन्या पंडितांची श्लेषादिप्रियता पूर्ण लक्षांत येईल.

प्रस्तुतसारख्या पंडितांविषयीं मनांत विचार येतांच त्यावरोबर अनेक वृत्तिहि तत्क्ष-

(पुढें चालू).

४. इंग्रेजी कवितेंत पाहिलें तरी वरचाच प्रकार आढळेल. तींत अत्युत्तम मानलेले जे शेक्सपीयर व मिल्टन यांचे ग्रंथ त्यांत सुद्धां शब्दालंकारास मान नाहीं असें नाहीं. आतां त्या भाषेंत संस्कृताप्रमाणें किंवा संस्कृतांतून मराठींत अंशतः आलेल्याप्रमाणें संधि व समास हे नाहींत व त्यामुळें यमक व अनुप्रास या दोहोंचीहि घटना करण्यास तींत वरील दोहों भाषांप्रमाणें सोय नाहीं हें उघड आहे. तरी वरील शब्दालंकारांची जितपत योजना होण्यासारखी आहे तितपत त्यांचा तींत प्रचार आढळतो. ड्रायडन व पोप यांचा तर यमकबद्ध छंदाविषयीं व अनुप्रासाविषयीं केवढा कटाक्ष होता तो त्यांच्या काव्यांवरून दृष्टीस पडतोच. तो आमच्या वाचकांपैकीं जे इंग्रेजी कविता वाचलेले असतील त्या सर्वांस माहीत असेलच. हीच गोष्ट इतर पुष्कळ कवींसहि लागू आहे. इतर भाषांतील मोठमोठ्या कवींचाहि प्रघात आमच्या वरील ह्मणण्यासच लागू पडेल अशी आह्मांस खात्री वाटते.

णींच उद्भवतात. एक तर विषादयुक्त खेद, कीं आमच्या प्राचीन राष्ट्राचें विद्यावैभव अस्तंगत होण्याचा हा समय येऊन ठेपला आहे. सूर्यास्तसमयीं शेवटचे शेवटचे किरण जसे उंच वृक्षांच्या शेंड्यांवर, पर्वतांच्या शिखरांवर, वगैरे क्षणमात्र विश्राम पावून अंमळशानें समूळ लयास जातात, त्याप्रमाणें आमच्या प्राचीन विद्या सध्यां उगाच कोठें कोठें निसटता आधार धरून राहिल्या आहेत. आणखी थोड्याच काळानें प्राचीन इराण, मिसर वगैरे देशांतील विद्याप्रमाणें त्यांचा चिरंतन अस्त होण्याचा सुमार दिसतो. याप्रमाणें चित्तास खिन्नता प्राप्त झाली असतां आमच्या सरकारची अनास्था व विद्वन्मंडळींचें विचित्र वर्तन पाहून आश्चर्य व उद्वेग हीं उत्पन्न होतात. सरकारची उपेक्षाबुद्धि तर अलीकडे हरएक प्रकरणीं दिसण्यांत येतेच, तेव्हां एकाच संबंधानें तिजबद्दल गाऱ्हाणें गाणें जरूर आहे असें नाहीं. पण आमच्या नूतन पंडितांची बरीक तारीफ करावी तितकी थोडी. यांपैकीं बहुतेक तर केवळ अर्थसाधनाच्या खटपटींत चूर असतात, तेव्हां विद्येविषयीं व्यासंग पुढें चालविणारे अगोदर विरळाच. त्यांतून प्राचीन विद्येकडे यदाकदाचित् कोणाची लहर फिरलीच तर ती इंग्रेजी तऱ्हेनें फिरायाची! ह्मणजे शास्त्रांचें अध्ययन करायाचें तें त्यांचें यथार्थ ज्ञान होण्याकरतां नव्हे, तर 'पंडित' हें उपपद मिळावें, शालजोडी पांघरून वेदशास्त्रांची परीक्षा घेण्याची योग्यता यावी, पुढ मागें प्रोफेसरी पटकावण्यास रस्ता खुला असावा, दहा दहा पानें युरोपीयभट्टादिकांनीं संक्रांतीच्या तिळादाखल दिलेलीं गोड गोड आशीर्वचनें सर्वांस फुशारकीनें दाखवितां यावीं, एवढ्याच हेतूनें विचाऱ्या कणादजैमिन्यादिकांचा परिचय करायाचा व त्यांच्यावर लेखणी भरकटावयाची! असो, भाग्य त्यांचें; 'भवितव्यता बलवती' ह्मणून त्यांनीं स्वस्थ बसावें, दुसरा उपाय नाहीं! तरी सरतेशेवटीं आमच्या नवीन मंडळीस वरील महापंडिताच्या संबंधानें येथें पुढील सूचना केल्यावांचून रहावत नाहीं, कीं अजूनहि त्यांनीं प्राचीन शास्त्रकारांच्या कीर्तीचें रक्षण करण्याचा उद्योग केला असतां बराच होण्यासारखा आहे. पण तो करण्यास अर्थातच मूर्खत्वाचा अभिमान अगोदर सोडून देऊन अद्याप कोठें कोठें अवशिष्ट राहिलेल्या महापंडितांची यथावकाश वर्षानुवर्ष परिचर्या पतकरली पाहिजे!

तर वरील दोन्ही प्रमाणांवरून पहातां वरील शब्दालंकारांत कांहीं अंगभूत दोष आहेत किंवा त्यांविषयीं आवड असणें हें अरसिकतेचेंच निश्चित दर्शक होय असें नाहीं, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. जो प्रकार मोठमोठ्या सर्वमान्य कवींच्या काव्यांत आढळतो, व जो वस्तुतः दोषरूप मानणें शोभतच नाहीं, तो आमच्या महाराष्ट्र कवीचे ठायीं आढळल्यानेंच केवल दूषणीय होतो हें ह्मणणें अर्थातच अत्यंत अयुक्त होय.

५. आतां एवढें मात्र खरें आहे कीं, प्रस्तुत आक्षेप मोरोपंताच्या संबंधानें पहातां जरी दुर्बळ होय, तरी सामान्यतः त्यांतील कांहीं अंश ग्राह्य आहे. तो येणेंप्रमाणें. शब्दालंकार हे अर्थालंकारांहून अर्थात कमी योग्यतेचे आहेत; कां कीं पहिले केवळ कर्णास आल्हाद देणारे होत, पण दुसऱ्यांच्या ठायीं मनास चमत्कृत करण्याची शक्ति असते. तेव्हां सहृदय जो वाचक किंवा श्रोता त्याचें पहिल्यानें जितकें रंजन होईल त्याहून दुसऱ्यानें अधिक होणार आहे, व हा दुसरा आल्हाद पहिल्याहून अधिक वेळ टिकणाराहि असतो हें सहृदयानुभवसिद्ध आहे. तर प्रकृत आक्षेपाचा ग्राह्य असा हा एक अंश होय. दुसरा असा कीं, सर्व राष्ट्रांत प्रायः आद्य कवींच्या ग्रंथांत शब्दालंकारापेक्षां अर्थालंकारावर विशेष भर असतो; व उत्तरोत्तर कवितेच्या ऱ्हासकाळीं दुसऱ्यापेक्षां पहिल्याचें प्राबल्य विशेष आढळण्यांत येतें. असें होण्याचें कारण काय हें मागें प्रसंगवशात सांगितलेलेंच आहे.[1]

६. पण या दोहोंसंबंधांनीं तरी प्रस्तुत आक्षेप मोरोपंतावर लागू पडतो काय? मुळींच नाहीं. शब्दालंकाराची योग्यता स्वतंत्रतः अर्थालंकाराहून कमी खरी; पण यावरून त्यास मुळींच योग्यता नाहीं असें होत नाहीं. स्त्रीच्या सौन्दर्याचा विचार कर्तव्य असतां मार्मिक जन शरीरलावण्यास सोन्यारुप्याच्या दागिन्याहून जास्त लेखतील हें निर्विवाद आहे, किंबहुना रुचिपरत्वेंकरून रोम शहरांतील जगद्विख्यात पुतळींच्याप्रमाणें शुद्ध मनोहर लावण्यासच चहाणारे गोवर्धन कवीसारखे रसिकवर्यहि आढळतील;[2] पण यावरून सोनें व रुपें हीं मातींच्या मोलाचीं असें कोण ह्मणणार आहे? त्यांच्या दागिन्यांची शोभा कृत्रिम, यास्तव स्वभावसिद्ध लावण्यापुढें त्यांचें रमणीयत्व पृथकत्वेंकरून पहातां जरी विशेष मानतां येणार नाहीं, तरी जेथें दोहोंचा समागम होतो तेथें

---

१. निबंधमाला अंक ४ पहा.

२. व्हेनिस ह्मणून ग्रीक व रोमन लोकांची शृंगारदेवता होती. हिची एक जगत्प्रसिद्ध प्रतिमा रोम शहरीं आहे. हिच्या चबुत्र्यावर वरील रसिकवराची पुढील आर्या खोदून लिहिली असतां समसमांचा योग होणारा आहे.

रतरीतिवीतवसना प्रियेव शुद्धापि वाङ्मुदे सरसा ।
अलसा सालंकृतिरपि न रोचते शालभंजीव ॥

नेत्रास विशेष आल्हाद झाल्यावांचून रहाणार नाहीं, हें उघड आहे. तेव्हां याच न्यायानें पाहिलें असतां, यमक व प्रास यांची स्वतःसिद्ध योग्यता जरी कितीहि मानली तरी जेथें मूळचा अर्थ सुंदर असून त्यास शब्दालंकारांचेंहि साहित्य असतें तेथें तो त्याच्यामुळें विशेष खुलेल हें उघडच आहे. हें तर काय, पण जेथें वर सांगितल्याप्रमाणें सुंदर अर्थाचा व अनुप्रास यमकांचा यथास्थित योग झालेला असतो तेथें

प्रमादालोचनन्यस्तं मलीमसमिवांजनम् ॥[1]

या न्यायानें वरील शब्दालंकारांसहि कांहीं अपूर्व शोभा प्राप्त होते. अथवा कालिदासानें 'कुमारसंभवां'त जसें झटलें आहे कीं,

अन्योन्यशोभाजननाद्वभूव
साधारणो भूषणभूष्यभावः ॥[2]

त्याप्रमाणें अर्थास अलंकारानें शोभा आली कीं अलंकारास अर्थानें आली याचाहि वरील ठिकाणीं निर्णय करवत नाहीं. अशीं स्थलें वामन व रघुनाथ पंडित यांच्या काव्यांत अनेक आहेत, व मोरोपंताच्या कवितेंत तर तीं पुष्कळच सांपडतील.

आतां वरील आक्षेपाचें दुसरें जें अंग, कीं शब्दालंकारांची रचना हें 'लोकांची बुद्धि मंद झाल्या'चें प्रमाण होय, याविषयीं विचार करावयाचा. 'विविधज्ञानविस्तारां'तला मूळ लेख निबंधारंभीं दिलाच आहे; त्यावरून प्रस्तुत आक्षेपाचें पूर्ण स्वरूप वाचकांस कळेलच. या लेखांतील मतें जरी अलीकडील काळांत सर्वांस अभिमत असणारीं आहेत, व सकृद्दर्शनीं बहुतेकांस यथार्थहि वाटतील, तरी अंमळ शोधक बुद्धीनें विचार केला असतां त्यांची असत्यता लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. एक तर सदरील लिहिणारानें लोकांच्या बुद्धिमांद्याविषयीं जें लिहिलें आहे तें मोरोपंताच्याच काळास अनुलक्षून लिहिलें आहे, कीं एकंदर सगळा अर्वाचीन काळ ध्यावयाचा हें त्यावरून स्पष्ट होत नाहीं. वाक्यांवरूनच मुसता अर्थ घेतला, तर एकंदर अलीकडील काळावर लिहिणाराचा कटाक्ष आहे असें वाटतें. पण पुढें जों पहावें, तों मोरोपंतावरच टीकाकर्त्याचा मुख्य रोंख आहे हें दृष्टीस पडतें. आतां कोणत्याहि अर्थानें घेतलें तरी वरील बुद्धिमांद्याचा आक्षेप लागू पडत नाहीं. एकंदर अर्वाचीन काळ घेतला, तर सर्वच मराठी कवि येथून तेथून नादान असें ह्मणणें पदरांत येऊन त्यांच्यापैकीं कित्येकांची अलीकडील विद्वानांनींहि जी प्रशंसा केली आहे ती मूर्खपणाची ठरणार, व ज्या राष्ट्रांत त्यांची आज शतकांचीं शतकें चहा होत आहे तेहि अप्रयोजकपणाच्या पायरीला

१. "जसें काजळ हें मूळचें मलिन असतां तरुण स्त्रियांच्या डोळ्यांत पडल्यानें त्यास शोभा येते!"

२. "परस्परांची परस्परास शोभा प्राप्त झाल्यामुळें भूषणत्व व भूष्यत्व हे धर्म दोहोंस साधारण झाले!"

पोंचणार! आणि त्यांतून जेथें सारी कविमालिकाच महामूर्ख ठरली, तेथें तिजपैकीं एकालाच प्रमुखत्वेंकरून पुढें करण्यांत मोठेंसें हशील नाहीं, व तसें करणें हें वाजवीहि होत नाहीं. आणि वस्तुतः पाहिलें असतां प्राचीन संस्कृत कवितेची व अर्वाचीन महाराष्ट्र कवितेची जो सामान्यतः तुलना करील त्यास अलीकडील लोकांची बुद्धि मंदावली आहे असाच निश्चितपणें सिद्धांत करतां येईल असें आह्मांस वाटत नाहीं. रघुनाथ पंडिताचें 'नलोपाख्यान' व मोरोपंताची 'केकावलि' हे ग्रंथ कोणत्याहि संस्कृत काव्याशीं तोलले असतां त्यांस हलके ठरवणारा रसिक विरळाच सांपडेल असें वाटतें. बरें, दुसऱ्या तऱ्हेनें जर घेतलें, कीं बुद्धिमांद्याविषयींचा उल्लेख मोरोपंताशीं समकाल असणाऱ्या लोकांविषयींच समजावयाचा, तर हें ह्मणणें तर वरच्याहूनहि अयुक्तिक होय. कां कीं, पूर्वी ह्मणजे ज्ञानदेवाच्या वेळेस किंवा श्रीधराच्या वेळेस महाराष्ट्र कविता उत्तम स्थितींत असून पुढें अमुक अमुक काळापासून तीस उतरती कळा लागली व अमुक काळीं तर ती अगदीं टेकीला आली असें मत आजपर्यंत आह्मीं कोणाच्याहि लेखांत पाहिलें नाहीं किंवा तोंडचेंहि ऐकलें नाहीं. वरील उत्कर्षापकर्ष हे संस्कृत कवितेंत व इंग्रेजी कवितेंत स्पष्ट आढळतात. पण मराठींत तसा प्रकार बिलकूल आढळत नाहीं. तींतील कवि सामान्यतः कवित्वगुणांत सर्व एकसारखेच आहेत. महाराष्ट्रकवितेंतच हा विशेष कां आढळतो याचीं कारणें पाहूं गेलें असतां बरींच सांपडतील; पण तीं येथें विस्तारेंकरून देतां येत नाहींत. थोडक्यांत येथें इतकेंच सांगतों कीं, छापण्याची युक्ति निघाल्यापासून इंग्लंड वगैरे देशांत ग्रंथकर्तृत्व हें अर्थप्राप्तीचें जसें साधन झालें, तसा प्रकार इकडे नसल्यामुळें ज्यास स्वाभाविक कवित्वस्फूर्ति तोच इकडे कवि होत गेला. पैशाच्या लालचीनें आजपर्यंत इंग्लंडांत जसे शेंकडों कवि होऊन गेले, व अद्यापहि कोणास सामान्यतः वृत्तरचना करण्याचें कसब अंमळ साधलेंसें झालें कीं तो कवि बनून त्याचे ग्रंथ छापून निघूं लागतात, तसा प्रकार इकडे अर्थातच अशक्य होता. तसेंच संस्कृत कविता जशी राजाच्या आश्रयानें व पंडितजनांच्या मान्यतेनें उदयास आली, तसाहि प्रकार महाराष्ट्र कवितेंत मुळींच आढळत नाहीं. अगदीं जुन्या मराठी कवींपासून तों अगदीं अलीकडच्यापर्यंत कोणासहि सरकारी दरबार माहीत नव्हतें, व पंडितांमध्येंहि कदाचित् एका दोघांखेरीज बाकीच्यांस मुळींच मान नव्हता. हें तर काय, पण बहुतेक मराठी कवि केवळ परमार्थपरायण व विरक्त होते, हें सर्वप्रसिद्धच आहे. तर याप्रमाणें दोहों तऱ्हांनीं वरील बुद्धिमांद्यविषयक उल्लेख अयथार्थ होय हें लक्षांत येईल.

७. आतां टीकाविषयक पूर्वोक्त लेखांत प्रस्तुत संबंधाचा दोष सगळा मोरोपंतावरच न घालतां तत्कालीन पंडितमंडळावरहि तो बराच लोटून दिला आहे. त्या काळीं 'विद्वज्जनांची अभिरुचिच तशी विलक्षण' असल्यामुळें प्रस्तुत महाराष्ट्र कवीसहि तेंच वळण लागलें असा प्रस्तुत आक्षेपकाचा अभिप्राय आहे. आतां या ह्मणण्यांतहि कितीसा

तथ्यांश आहे याविषयीं जर शोधपूर्वक विचार केला, तर वरील उल्लेखाप्रमाणें हाहि जसजसा विचार करावा तसतसा फिक्का पडूं लागेल. अर्वाचीन पंडितांची सामान्यतः कोणत्या तऱ्हेची काव्यरुचि आढळते याविषयीं आह्मीं पूर्वी अनेक वेळां लिहिलेंच आहे;[1] तेव्हां येथें त्याविषयीं आणखी कांहीं लिहिण्याची गरज नाहीं. वरील प्रसंगोपात्त अभिप्रायांवरून आमचें मत यासंबंधें वरील आक्षेपकाच्याहून निराळें नाहीं हें वाचकांच्या लक्षांत असेलच. तेव्हां मोरोपंताची जी शब्दालंकारांविषयीं व 'दुर्बोध' शब्दांविषयीं आवड ती तत्कालीन विद्वज्जनांपासून त्यास कितपत लागली असेल याविषयीं काय ती वाटाघाट करायाची.

अर्वाचीन गीर्वाण पांडित्याचा महाराष्ट्र कवितेशीं कितपत संबंध होता व त्याच्या योगानें तीस कितपत वळण लागलें असेल, याविषयीं ज्या कोणी वरील कवितेचें अंमळ शोधपूर्वक पर्यालोचन केलें असेल त्याचीहि तेव्हांच खात्री होण्यासारखी आहे. एक तर महाराष्ट्र कवींपैकीं कितीकांच्या अंगीं विद्वत्ता वसत होती, याविषयीं पूर्वी अनेक वेळां आह्मीं प्रसंगवशात उल्लेख केलेलेच आहेत.[2] त्यांवरून सहज दिसून येईल कीं, नुसत्या व्याकरणाचीहि ज्यांस पुरती ओळख नव्हती त्यांची गणना विद्वज्जनांत कोठून होणार? महाराष्ट्र कवींचें व पंडितजनांचें कितपत सख्य असे याविषयीं त्यांच्या चरित्रांत व ग्रंथांतहि प्रसंगवशात लेख आढळतात. तुकाराम व नामदेव यांच्या ज्या कथा ऐकण्यांत व वाचण्यांत येतात त्यांवरून ही गोष्ट स्पष्ट दिसते कीं, त्यांस ब्राह्मणांकडून व विशेषतः पंडितांकडून पुष्कळ छळ व अवज्ञा सोसावी लागली. त्यांच्या ग्रंथांतहि वरील संबंधाचे अनेक उल्लेख आढळतात.[3] ज्ञानदेव, एकनाथ व रामदास हे जरी ब्राह्मण होते व पुढें लवकरच ते स्वदेशीयांस एवढे पूज्य होऊन बसले, तरी स्वतःच्या हयातींत त्यांचीहि स्थिति पुष्कळ अंशीं वरच्यासारखीच असावी. अगदीं शेवटले जे मोरोपंत व रामजोशी यांच्यापर्यंतहि वरील परंपरा चालत आलेली दृष्टीस

१. अंक ३ व ३५ पहा. २. अंक ३ व १० पहा.

२. नामदेव भोळेभावानें व नम्रतापूर्वक ह्मणतो—

पंडित ब्राह्मण पुसतील अर्थ।
त्यास मी अनाथ काय बोलों ॥ इ०

तुकाराम वरीलच अभिप्राय वदतो, पण निराळ्या बाण्यानें—

बरा कुणबी केलों। नाहीं तरी दंभेंचि असतों मेलों ॥ १ ॥
भलें केलें देवराया। नाचे तुका लागे पायां ॥ २ ॥
विद्या असती कांहीं। तरी पडतों अपायीं ॥ ३ ॥
सेवा चुकतों संतांची। नागवण हे फुकाची ॥ ४ ॥
गर्व होता ताठा। जातों यमपंथें वाटा ॥ ५ ॥
तुका ह्मणे थोरपणें। नरक होती अभिमानें ॥ ६ ॥

पडते. फार काय, पण हल्लींच्या काळीं जरी शास्त्रविद्या प्रायः अस्तंगतच झाली आहे, तरी तिचें जें क्वचित् वास्तव्य दिसतें त्यावरून पूर्वीच्या काळाचें सहज अनुमान करतां येतें. सध्यांहि जर पंडित ह्मणून मोडणाऱ्या लोकांच्या ठायीं महाराष्ट्र भाषेची, तींतील कवितेची, व हरदासांची वगैरे अवज्ञा दृष्टीस पडते, तर पूर्वीचे जे भाष्यांत अध्ययन केलेले व प्रतिगदाधर बनलेले सभाधुरंधर महापंडित त्यांच्यापुढें बिचाऱ्या प्राकृत कवींचा तो काय पाड असणार? कालिदासादिकांसहि 'रंडागीतानि काव्यानि' ह्मणून ज्यांनीं धुडकावून द्यावें, त्यांच्या पुढें आमचे अज्ञान शूद्रकवि व अपंडित ब्राह्मणकवि यांनीं किती शेखी मिरवावी!

पण संस्कृत व महाराष्ट्र कवितेचें जो एकंदर स्वरूप लक्षांत आणील, व दोहोंची परस्पर तुलना करील, त्यास तर वरील उल्लेख किती यथार्थ होय, हें तेव्हांच कळणारें आहे. ही तुलना ह्मणजे एक मोठा स्वतंत्र विषयच होय, व त्याच्या निरूपणांत अनेक अवांतर गोष्टींचा विचार करावा लागेल. तरी वरील निरूपणाचा एकंदर रोंख थोड्क्यांत सांगतां येण्यासारखा आहे; तो हा कीं, संस्कृत कवितेचा झोंक सामान्यतः पहातां सगळा ऐहिक विषयांकडे आहे, व मराठी कवितेचा परमार्थाकडे आहे. युरोपांतील संस्कृत भाषा ज्या ग्रीक व ल्याटिन त्यांत किंवा अर्वाचीन इंग्रेजी वगैरे भाषांत जें कवितेचें स्वरूप दृष्टीस पडतें त्याच रूपानें कालिदासादिकांचे ठायीं या देशांत वाग्देवी अवतीर्ण झाली. ह्मणजे ऐहिक व्यवहारांत नानाविध प्रसंगीं ज्या वृत्ति मनांत उम्या रहातात त्यांचेंच वर्णन वरील कवितेंत आढळतें. तेव्हां ती अर्थातच सामान्यतः शृंगारवीरादि नवरसात्मक व बाह्यसृष्टिवर्णनपर अशी आहे. पण मराठी कवितेचा रोंख अगदीं उलटा. संस्कृत कवींच्या प्रमाणें वाचकांचें किंवा श्रोत्यांचें रंजन करणें एवढाच महाराष्ट्र कवींचा उद्देश नव्हता; तर लोकांचीं मनें प्रवृत्तिमार्गाकडून निघून निवृत्तिमार्गाकडे लागावीं, हेंच त्यांचें मुख्य धोरण होतें. त्यांच्या काव्यांत नवरसांचें वास्तव्य नाहीं असें नाहीं, पण ते सर्व भक्ति व वैराग्य यांच्या अंगभूत आहेत. संस्कृतांत ज्याप्रमाणें कोणी कामी नवमेघाच्या दर्शनानें सोत्कंठ होत्साता त्याजपाशीं आपलें सर्व हितगुज वदतो किंवा राजकन्येचें धर्षण केल्याबद्दल कोणास वधशूलाकडे चालविलें असतां आपल्या हृदयंगमेच्या लीलांचें स्मरणपूर्वक प्रेमभरानें तो वर्णन करतो, किंवा इंग्रेजींत कोणी रंगेल्यानें आपल्या प्रियकरणीच्या केसांचा झुबका चोरून कातरला असतां त्यावरून प्रेमकलह माजून तो कलहच काव्यास विषय होतो, किंवा कोणा कवीच्या दौतींतील शाई सूर्य पिऊन गेला असतां कविरायाची तार सूर्याशींच बोलायाची लागते,– तसा प्रकार मराठी कवितेचा नाहीं. स्फुट विषयांवर पद्यरचना केलेली अगोदर तींत थोडीच सांपडेल, आणि जी कांहीं सांपडेल तिचें धोरण एकंदर कवितेसारखेंच बहुधा आढळेल. सारांश, संस्कृत व मराठी कवितेंत इतकेंच अंतर आहे कीं, पहिलीमध्यें

नवरसांचें जसें प्रसंगोपात्त मिश्रण सामान्यतः आढळतें, त्याप्रमाणेंच शांत व भक्ति या रसांचेंहि क्वचित् आढळतें; त्यांच्याकडे प्राधान्य मुळींच नाहीं. पण मराठी कवितेंत पहावें तों वरील रसच मुख्य असून इतरांचें मिश्रण असलेंच तर अप्रधानत्वेंकरून असतें. तिचे मुख्य विषय ह्मटले ह्मणजे वैराग्य व अध्यात्म हे होत, तेव्हां यांस अनुसरूनच अर्थात तींतील रससंपत्ति होय.

तर वरील विरोधावरून हें सहजच लक्षांत येईल कीं, जर संस्कृत कवितेचें व महाराष्ट्र कवितेचें स्वरूप हीं परस्परांहून इतकीं भिन्न आहेत; तर एकीचें वळण दुसरीस लागलें हें ह्मणणें मुळींच शोभत नाहीं. याखेरीज दुसरी हीहि गोष्ट शोधक व मार्मिक जनांच्या ध्यानांत येण्यासारखी आहे कीं, इटालियन, फ्रेंच, इंग्रेजी वगैरे अर्वाचीन भाषांतली कविता ही जशी प्राचीन ग्रीक व ल्याटिन कवितेच्या धोरणावर चालू झाली, तसा प्रकार महाराष्ट्र कवितेचा बिलकूल दिसत नाहीं. अगदीं अव्वलपासून तों अखेरपर्यंत कोणत्याहि मराठी कवीस 'रघुकिराता'दि पंडितमान्य काव्यांची बिलकूल ओळख होतीशी सुद्धां दिसत नाहीं. नामदेव, तुकाराम यांची गोष्ट तर बोलायालाच नको, पण पंडितमंडळींत बरेच मोडण्यासारखे जे वामन, मोरोपंत, रामजोशी वगैरे त्यांच्या ग्रंथांतहि कालिदासादिकांचा मागमूसहि नजरेस येत नाहीं. संस्कृत कवितेच्या धर्तीवर जुनें मराठी काव्य ह्मटलें ह्मणजे रघुनाथपंडितांचें 'नलोपाख्यान'च एक होय. त्याची रचना श्रीहर्षाच्या 'नैषधा'च्या नमुन्यावर केली आहे असें कवीनेंच सरतेशेवटीं सांगितलें आहे[1]. पण याखेरीज बाकीच्या कोणत्याहि महाराष्ट्र काव्यांत जुन्या कवींची पद्धति कोणत्याहि संबंधानें बिलकूल दृष्टीस पडत नाहीं. प्रस्तुत कवीचेंच उदाहरण पहा. गेल्या शतकांत पेशव्यांच्या अमलांत प्राचीन पांडित्याचें जें सर्वत्र पुनरुज्जीवन झालें त्याच्या ऐन भरांत तो हयात होता, तेव्हां कमलांनीं चोहोंकडे फुलून गेलेल्या सरोवरांत विहार करणाऱ्या भ्रमरास परागांच्या छटा जशा सहज लागून जातात त्याप्रमाणें केवळ प्रसंगोपात्त संसर्गानेंहि आमच्या प्राकृत कवींवर पांडित्याची छाया पडण्याचा वस्तुतः पुष्कळ संभव होता. ह्मणजे प्राचीन संस्कृत कवींचे उपमाचातुर्य, पदलालित्य,

१. पुढील श्लोक परस्परांशीं ताडून पाहिले असतां वरील उल्लेखाचा प्रत्यय येईल—

कोणी वणिग्जन विकी तुलितां तराजे । कस्तूरिका तिजसवें अलिनी विराजे ।
दोन्ही समान निरखी विकणार देतो । घेणार तो न समजोनि उगाच घेतो ॥
(समेमणपदैर्यदापणे तुलयन् सौरभलोभनिश्चलम् ।
पणिता न जना रवैरवै–रपि कूजंतमलिं मलीमसम् ॥)
उडत होते खग वायसादि जाणा । तयां भासला हंस तो ससाणा ।
नभा मानूनी निकषपाषाणा । स्वर्णरेखा तें तेज मनीं आणा ॥
(तनुदीधितिधारया रया–द्वतया लोकविलोकनामसौ ।
छदहेम कषन्निवालसत् कषपाषाणनिभे नभस्तले ॥)

उदात्तता वगैरे गुण, किंवा अलीकडच्यांचे पदार्थक्लिष्टत्वादि कृत्रिम प्रकार हे त्यास सहज लागावे. पण त्याच्या काव्यांत पाहूं गेलें असतां वरील दोन्ही प्रकारांपैकीं कांहींच नजरेस येत नाहीं. त्याची तऱ्हा मुळींच वेगळी. ती इतर मराठी कवींचे ठायीं जशी आढळते तशीच त्याच्याहि कवितेंत आढळते. तिचें मूळ वर ज्याविषयीं उहापोह केला आहे त्याहून फार निराळें आहे. तें कोणतें याविषयीं पुढें प्रसंगोपात्त विवेचन करायाचें आहे त्यावरून कळून येईल.

ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेह बिंदुही फार।
सारज्ञ असूयोज्झित त्यांला माझा असो नमस्कार॥
--मंत्ररामायण.

अंक ५२–मोरोपंताची कविता—

१. प्रस्तुत विषयावरील गेल्या तीन अंकांत मोरोपंतावर येणाऱ्या कित्येक आक्षेपांविषयीं विचार केला. आतां बाकीच्यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं.

२. प्रस्तुत कवीविषयीं अलीकडील पंडितांची एक मोठी समजूत अशी होऊन गेली आहे कीं, त्याची कविता ह्मणजे पराकाष्ठेची कृत्रिम. जो पाहिजे तो प्रकार तींत पाहून घ्यावा. जसें स्वैरिणीचें पाऊल उजू ह्मणून चुकूनहि पडायाचेंच नाहीं, त्याप्रमाणेंच या कवीच्या वाग्देवतेचीहि पद्धति होय. श्लेष, कोट्या, कूटें, शब्दचित्र, लांब व विकट समास यांतच कवित्वाचें सर्वस्व आहे असें समजून वरील गौडबंगाल रचण्यांत त्यानें आपला काळ घालवला. या सिद्धांताच्या प्रत्यापनार्थ एका एतद्देशीय व एका पाश्चात्य पंडिताचे उल्लेख येथें घेतों. त्यांपैकीं पहिला हा—

"With authors who mean only one thing, and whose sole object is to give an expression to that meaning without casting any side-glances, there is no difficulty. But in works of art of our national poetry, like the one under consideration, it may be counted upon as a rule that the author did intend to be variously understood. This capacity of being diversely rendered is deemed to be a great merit, and authors take very considerable pains to succeed in this line."

"जे ग्रंथकार (कवि) एकमार्गी असतात, ह्मणजे मनांत एकच अर्थ धरून तो सरळ रीतीनें व्यक्त करायाचा इतकेंच ज्यांस माहीत, जे इकडे तिकडे कधींहि वांकडी नजर करायाचे नाहींत, त्यांच्याविषयीं मुळींच पंचाईत नसते. पण आमच्या देशांतील कवींचीं प्रस्तुतच्या सारखीं ('केकावली'सारखीं) जीं कृत्रिम काव्यें आहेत तीं वाचतांना हें आपलें नेहमीं लक्षांत ठेवावें कीं, कवीचा उद्देश केवळ एकच अर्थ आपल्या काव्यांतून निष्पन्न व्हावा असा नसायचाच, तर त्यांतून अनेक अर्थ निघावे अशाच बुद्धीनें

ती रचलेली! हा अनेकार्थसंभव ह्मणजे कवितेचा मोठा गुण मानला असून एतद्देशीय कवींनीं तो साधण्याकरितां मोठी खटपट केलेली आढळते."

दुसरा उल्लेख येणेंप्रमाणें—

"Moropant has undoubtedly great command of the Marathi language, which he sometimes prostitutes by indulging in such poetical conceits as acrostics, and by writing without the use of the labial letters, introducing the conjunction परंतु(but)into every line, and by commencing each line of this verse by the last word of the preceding line."

"महाराष्ट्र भाषा ही मोरोपंतांची केवळ अंकित होऊन राहिली होती हें खरें आहे; पण तिचा त्यानें कोठें कोठें अपव्यय केलेला आढळतो. तो असा कीं, कोठें नियमित अक्षरें साधलेलीं, कोठें निरोष्ठ रचना केलेली, कोठें प्रत्येक पद्यांत 'परंतु' घालून दिलेलें, कोठें पूर्वपद्यांतींचा वर्ण पुढील पद्याच्या आरंभीं योजलेला,—इत्यादि प्रकार त्याच्या कवितेंत आढळतात."

वरच्या दोहोंपैकीं पहिला उतारा 'एज्युकेशनल रेकर्ड' नामक इंग्रेजी शालापत्रकांतील होय. हा सन १८६७ सालाच्या नोवेंबर महिन्याच्या अंकांतून घेतला आहे. या सुमारास रा. ब. महादेव गोविंद रानडे हे आर्विटंग मराठी ट्रान्सलेटर असल्यामुळें कै. परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्या 'केकादर्श'वर त्यांनीं सरकारी नात्यानें आपला अभिप्राय प्रगट केला. तो कवितामर्मज्ञांच्या अवलोकनांत यावा ह्मणून त्या वेळचे डायरेक्टर मे. ग्रांट साहेब यांनीं वरील पत्रकाच्या कर्त्याकडे पाठविल्यावरून त्यानें तो सदरील अंकीं आपल्या वाचकांस सादर केला. तर वरील वाक्यांत सामान्यतः महाराष्ट्र कवींविषयीं व त्यांतून विशेषेंकरून मोरोपंताविषयीं जें मत दाखल केलें आहे तें वरील नामांकित विद्वानाचें होय. दुसरा उतारा माजी डा. विल्सन, इकडील प्रख्यात मिशनरी, यांच्या लेखांतला होय. मोलस्वर्थकृत कोशाच्या आरंभीं साहेबमजकुरांनीं मराठी भाषेवर व तींतील ग्रंथांवर लिहिलेला एक निबंध आहे, त्यांत प्रस्तुत महाराष्ट्र कवीच्या संबंधानें वरील मजकूर आला आहे. असो; आतां वरील दोन्ही मतांच्या यथार्थत्वाविषयीं विचार करूं.

पहिलें मत रा. ब. रानडे यांचें. रावबहादुरांचा महाराष्ट्र कवितेवर कितपत व्यासंग आहे हें आह्मांस चांगलेंसें माहीत नाहीं; तरी निदान शोधकपणा व मार्मिकपणा हे गुण त्यांच्या अंगीं पूर्ण असून, त्यांचा अभिप्राय, लिहिण्यांत किंबहुना बोलण्यांतहि कधीं लेचापेचा बाहेर पडायाचा नाहीं, तर तो नेहमीं यथान्याय व पोक्त असाच असायाचा, याविषयीं पहिल्यापासून प्रसिद्धि आहे. तेव्हां या ख्यातीवरून पहातां वर त्यांनीं एकंदर महाराष्ट्र कवींविषयीं व मोरोपंताविषयीं जो एवढा निक्षून अभिप्राय

दिला आहे त्याचा आह्मांस अत्यंत विस्मय होतो. त्यांच्यासारख्या बड्या विद्वानाच्या लेखावर आक्षेप घेणें हें कांहीं अंशीं मोठें साहसच होय; पण स्वपक्षाची चांगली बळकटी पाहूनच या साहसास आह्मी प्रवृत्त होत आहों. आतां इतकेंहि करून आमची कोटी जर त्यांच्यावर लागू झाली नाहीं व आमचाच पक्ष खोटा ठरला, तर आह्मी आपले आक्षेप माघारी घेऊं.

प्रस्तुत आक्षेप दोन प्रकारचा आहे. एक एतद्देशीय कवींच्या संबंधानें व एक मोरोपंताच्या संबंधानें. आतां पहिल्याविषयीं विचार करतां 'एतद्देशीय' या शब्दानें आमचे महाराष्ट्र कविच जर घेतले तर त्यांजवर तर वरील 'कटाक्षप्रेक्षणा'चा आक्षेप बहुधा मुळींच लागू पडत नाहीं. ज्ञानोबा, तुकोबा, एकनाथ, नामदेव, महीपति, श्रीधर, यांची तर बिचाऱ्यांची गोष्टच नको. यांच्या वाग्वधूंचा नेत्रकटाक्ष ह्मटला ह्मणजे अरुंधती लोपामुद्रादि महा सत्यांच्या कटाक्षाप्रमाणें दुर्लभ! 'ब्रह्मानंदीं लागली टाळी' अशी अवस्था होऊन ज्यांस देहभानहि पुरतें नसायाचें, त्यांस वरील चाळे करण्यास कोठून फावणार! गरुडपक्षी जसा अस्मानीं राहून सूर्यावर एक टक लावतो, त्याप्रमाणें परब्रह्मरूपावर ज्यांचें लक्ष निश्चळ होऊन राहिलेलें व केवळ अंतःप्रेरणेनें ज्यांचे वनपक्ष्यांप्रमाणें सुस्वर निघणारे त्यांच्या वाणींत श्लेषास कोठून जागा मिळणार! तेव्हां या साऱ्या भावड्या मंडळीस तर नाशाबितीवरून रावबहादूर एकदम खुले करून देतीलच. आतां रहातांपैकीं मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत, रघुनाथपंडित व रामजोशी ही जराशी चवचाल मंडळी राहिली. यांस संस्कृताचें विशेष वारें लागून त्यांतील कांहीं चमत्कार त्यांनीं आपल्या काव्यांत उतरून देऊन महाराष्ट्र कवितेस विशेष प्रगल्भता आणली. तेव्हां वरील आरोप यांच्यावर ठरण्याचा अधिक संभव आहे. पण यांच्याहि ग्रंथांत पाहूं जातां यांस धरायास फारसें सांपडत नाहीं. पहिल्या दोघांनीं श्लेषप्रयोग केलेला तर आमच्या आठवणींत एकहि नाहीं; तिसऱ्याविषयीं पुढील कलमांत पृथक विचार करायाचाच आहे; आणि शेवटल्या दोघांविषयीं पाहिलें तर पहिल्याच्या 'नलोपाख्यानां'त आठ दहा ठिकाणीं श्लेषरचना आहे, व जोशीबोवांच्या लावण्यांपैकीं एक छेकापन्हुति मात्र श्लिष्ट आहे.[1] हा महाराष्ट्र कवींचा प्रकार झाला.

१. रामजोशाचा 'छंदोमंजरी' ह्मणून एक छंदःशास्त्राविषयक ग्रंथ आहे. यांत त्या त्या वृत्तांचें नांव शेवटीं श्लेषानें आणून त्याच वृत्तांत पद्याची रचना कालिदासाच्या 'श्रुतबोधा' प्रमाणें केली आहे. तसेंच वामनानें भर्तृहरीच्या शतकांचें भाषांतर केलें आहे, त्यांतहि कचित् श्लेष आलेले आहेत. पण या दोहोंनीं वरील उल्लेखास बाध येणार नाहीं हें उघडच आहे. 'छेकापन्हुति' ह्मणजे काय हें साहित्यशास्त्रज्ञांस सांगावयास नकोच. वरील लावणी किती बहारीची आहे, हें ती वाचली असतां मार्मिकांस कळणारच आहे; शिवाय तिच्या चित्तमोहकत्वाचें दुसरेंहि आह्मांपाशीं एक चमत्कारिक प्रमाण आहे. अकरा वर्षांपूर्वीं पुण्यांत

(पुढें चालू).

'एतद्देशीय' या शब्दानें संस्कृत कवि जर घेतले, तर गीर्वाणवाणीचें लावण्य अपार असल्यामुळें आणि शब्दप्राचुर्यास्तव व समासरचनेस्तव श्लेषघटनेची तींत अतिशयित सुलभता असल्यामुळें मधुर कटाक्षांची तींत वृष्टि आहे हें खरें; पण तींतील जो ग्रंथ हातीं घ्यावा त्याच्या पृष्ठोपृष्ठीं वरील सडा सांपडेल असें नाहीं. वरील शिडकाव ज्यांत मुळींच नजेरस येणार नाहीं, किंवा आलाच तर कोठें एखादा दुसरा शिंतोडा, बाकी सर्व पृष्ठें धुतल्या मोत्यांसारखीं स्वच्छ, अशीं काव्यें संस्कृतांत पुष्कळ आहेत. हें संस्कृतज्ञांस सांगायाला नकोच. त्याप्रमाणेंच वरील प्रकाराचें प्राबल्य जसजसें अलीकडे येऊं लागावें तसतसें विशेष आढळतें हेंहि अनेक वेळां पूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. तेव्हां वादविषयक शब्दाचा वरील अर्थ घेऊनहि निर्वाह लागणार नाहीं. आतां प्रस्तुत आक्षेपकास दोन्ही अर्थ विवक्षित असून आमच्या देशांतल्या एकंदर कवितेचें स्वरूप जर वरील इंग्रेजी वाक्यांत सांगितलें असेल, तर इकडूनहि कोणती अडचण येणार आहे ती उघडच आहे. जो आक्षेप एकंदर संस्कृत कवितेवर अंशतः मात्र लागू पडतो, व मराठी कवितेवर तर बहुधा मुळींच लागू पडत नाहीं, तो दोघींचें एकीकरण केल्यानें विशेष दृढ होईल असें नाहीं. हें स्पष्टच आहे. शिवाय संस्कृत भाषेवरून जरी मराठी भाषा निघाली, तरी संस्कृत कवितेंत व महाराष्ट्र कवितेंत किती अंतर आहे हें नुकतेंच एका निबंधांत आह्मीं दाखविलेंच आहे.[1] राजाच्या मंदिरांत व ऋषीच्या आश्रमांत जितका भेद, किंवा उपवनांत व वनांत जितका भेद, तितकाच वरील दोन्ही कवितांमध्यें आहे. तेव्हां दोहोंविषयीं साधारणतः कोणतेंहि विधान करणें उचित नव्हे.

आतां मोरोपंतास स्वतः वरील आक्षेप कितपत लागू पडतो हें पहायाचें. याविषयीं पुढें पुरतेपणीं विवेचन करायाचेंच आहे. सध्यां एवढें सांगतों ह्मणजे बस आहे कीं, आमच्या देशाच्या संबंधानें मोठमोठ्या विद्वानांचे ठायींहि जे कित्येक भ्रम आज वर्षानवर्षें नांदताहेत त्यांपैकींच हाहि एक होय. उदाहरणार्थ प्रस्तुत ग्रंथ 'केकावलि' हाच पहा. यावर अभिप्राय देण्यापूर्वी दादोबांची 'यशोदापांडुरंगी' टीका, तिजवर 'ज्ञानप्रसारकां'त व 'इंदुप्रकाशां'त आलेली चर्चा, व अभिप्राय देण्याकरतां हातीं घेतलेला 'केकादर्श', हीं सर्व पुस्तकें रावबहादुरांनीं अगोदर वाचलीं असें त्यांनीं सदरील 'रिपोर्टा'च्या आरंभीं कळविलें आहे. पण याप्रमाणें चारदां प्रस्तुत काव्याचें पर्यालो-

---

नातूंच्या एका घराला रात्रीं आग लागली होती, त्याच वेळेस जवळच पन्हळकर गोसावी यांचें कीर्तन चालू असून त्यांनीं वरील छेकापन्हुति त्या समयास काढली होती. बोवांची ह्मणण्याची रीत जोशीबोवांच्या अस्सल धाटणीची मोठी चटकदार असल्यामुळें मंडळी इतकी गर्क होऊन गेली होती कीं, सगळें कीर्तन आटपून विडा खिरापत होऊन खुशालपणें लोक जों बाहेर पडतात तों आगीचा डोंब त्यांच्या दृष्टीस पडला!!

१. अंक ४७ पहा.

चन झालें असतां त्याविषयीं त्यांचा अभिप्राय वर दाखल केल्याप्रमाणें पडला. तो हा कीं, हें काव्य कृत्रिम होय, यास्तव आमच्या कवीनें आपल्या राष्ट्राच्या अभिरुचीस अनुसरून जेथें जेथें दुहेरी अर्थ आणण्याची तजवीज केली असेल तेथें तेथें दोन्ही अर्थ जे सांगायाचे ते 'केकादर्श'कारानें सांगितले नाहींत. या दुटप्पी अर्थाविषयीं रावबहादुरांचा फार आग्रह दिसतो. असा अर्थ 'केकावली'त अवश्य असलाच पाहिजे, याविषयीं त्यांची पक्की खात्री असून रा० परशुरामपंत यांनीं तो दिला नाहीं हा त्यांच्या ग्रंथाविरुद्ध त्यांचा काय तो मोठा मुद्दा आहे. या महादोषास्तव 'केकादर्शा'ची योग्यता फार कमी झाली असल्यामुळें तो पुढील आवृत्तींत काढून टाकण्याविषयींहि शेवटीं ग्रंथकर्त्यास शिफारस केली आहे.

आतां या अर्थबाहुल्याच्या संबंधानें प्रथमतः ही गोष्ट वाचकांस कळविणें जरूर आहे कीं, 'केकावली'त मोरोपंताविषयींच्या सामान्य प्रसिद्धीप्रमाणें अनेक अर्थ जर खरोखरच निघण्यासारखे असते, तर रा० परशुरामपंत हे ते दिल्याविना रहाते असें आह्मांस वाटत नाहीं. या पंडिताचा सारा व्यासंग काय तो महाराष्ट्र कवितेवर होता हें सर्वांस माहीत आहेच. मराठी कविता वाचणें, लिहिणें, ऐकणें, शोधणें, छापविणें यांतच त्यांचा बहुतेक काळ गेला असल्यामुळें प्रस्तुत विषय हा केवळ त्यांचाच होऊन जसा काय राहिला होता. त्यांतून परशुरामपंत तात्या हे जर जुन्याच हरदासांसारखे केवळ असून अर्वाचीन पद्धतीविषयीं अनभिज्ञ असते, ह्मणजे एखाद्या ग्रंथाची आवृत्ति काढणें आहे तर तींत काय काय असणें अवश्य आहे हें जर त्यांस माहीत नसतें, तर एक निराळी गोष्ट होती. पण या कसबांत तर ते पहिल्यापासून वाकबगार; संस्कृत नाटकांचीं भाषांतरें, 'नवनीत', वगैरे अनेक ग्रंथ त्यांनीं स्वतः तयार केले असून शिवाय जेथून नवे ग्रंथ पसार व्हावयाचे तेथली सर्व घडामोड नेहमीं त्यांच्या नजरेखालीं; मग इतकें असून 'केकावली'सारख्या शतशः वाचलेल्या ग्रंथावर व्याख्या तांना त्यांच्या हातून वर सांगितल्यासारखी मोठी चूक होईल काय. डुरंग यांच्या आवृत्तीच्या पुढें ज्या दोन हेंहि लक्षांत आणलें पाहिजे कीं, वरील गृहस्थ हे अलीकडील पांच्या आवृत्तींत पुष्कळ होते तरी कालमानाप्रमाणें त्यांच्या मनावरचा संस्कार जुन्या पद्धानें आमच्या कवीच्या पंतांच्या काव्यांत अर्थांतराचा संभव जर लेशमात्रहि असता तर महाराष्ट्र टीकेचा अपूर्व आनंदानें व धन्यतेनें प्रगट केला असता. आमची अलीकडील म हितचिंतकांनीं त्यांचे त्यामुळें, व त्यांच्या नव्या अभिरुचीस अनुसरून केलेल्या महाकाव्येय आहे. आमच्या तीन अर्थ तर कोठचे, पण कोठें कोठें एका अर्थासहि पंचाईत अ 'अपूर्व दाहो' आदृष्टि अर्थांतरावर न पोंचली तर हें संभवनीय आहे; पण वरील पंडित हांपासून आमचें अभिरुचीच्या व्याख्याकाराचे ठायीं वरील श्लेषानभिज्ञत्व किंवा श्लेषा लें. तेव्हांपासून संभवत नाहीं. मल्लीनाथासारख्यांनीं 'नैषधा'वर टीका केली आणि या केकेच्या उत्त-

श्लेष त्यांनीं उलगडला नाहीं, किंवा 'राघवपांडवीय' काव्यावर टीका लिहून एक राम यणपर अर्थ मात्र टीकाकारानें लावला व दुसरा भारतपर अर्थ द्यावयास तो मुळीं विसरला, हें जितकें संभवदुक्तिक, तितकेंच प्रस्तुत महाराष्ट्र टीकाकाराचें प्रस्तुत महाराष्ट्र कवीच्या संबंधाचें विस्मरण होय. त्यांतून रावबहादुरांनीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ 'केकावलीं'तील कांहीं स्थळांचा नुसता निर्देश जरी केला असता, कीं या या ठिकाणीं दोन अर्थ स्पष्ट असतां रा० गोडबोले यांनीं ते दिले नाहींत, तर टीकाकारावरील आरोपाची शाबिती झाली असती. पण हें ज्यापक्षीं त्यांनीं केलें नाहीं, त्यापक्षीं आपल्या वृद्ध पंडिताची योग्यता नीटशी मनांत न आणतां केवळ वरिष्ठपणाच्या नात्यावर जाऊन त्यांनीं कांहीं तरी अभिप्राय झोंकून दिला असें ह्मणणें भाग आहे !

ही टीकेची गोष्ट झाली. आतां मूळ काव्याविषयीं जर विचार केला तर त्यावर तरी 'कृत्रिम'त्वाचा आरोप त्यांनीं कोणत्या आधारावरून केला आहे, हेंहि बरोबर समजत नाहीं. मॉनियर विल्यम्स वगैरे कांहीं अर्वाचीन संस्कृतज्ञ पंडितांनीं कालिदासादिकांच्या कवितेसहि Artificial Poems (कृत्रिम काव्यें) या सदराखालीं ओढलें आहे, तशाच. कांहीं रीतीनें 'केकावली'चेंहि कृत्रिमत्व रावबहादुरांनीं स्थापित केलें असेल, तर आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. कां कीं, छंदोभंगाचा, व व्याकरणभंगाचा अभाव, सुंदर रचना, अलंकारांची ठाकठिकीनें योजना, हीं सर्व जर 'कृत्रिम'त्वाचीं अंगें ठरतील तर पृथ्वीवरील सर्व भाषांतील हजारों जगन्मान्य होऊन राहिलेलीं सारीं मोठमोठीं काव्येंहि याच वर्गांत येणार. मग या वर्गांतच आमच्या कवीच्या 'केकावली'ला कोनाकोपऱ्यांतहि जरी थोडीशी जागा मिळाली तरी कांहीं हरकत नाहीं. शब्दरचनेवरून जर प्रस्तुत काव्यांस वरील विशेषण मिळालें असेल ह्मणावें, पंतांनीं याच काव्यांत कांहीं विशेष शब्दचमत्कार केले आहेत असें नाहीं. त्यांच्या वरवर ज्यानें अवलोकन केलें असेल त्यास सुद्धां सहज कळून येणार ...यांत प्रस्तुत कवीच्या वाग्वधूचें स्वरूप जें प्रगट झालें आहे, तें,

...दृष्टी स्मितरुचिरमुखी भ्रूयुगीं नृत्य नर्म
...लांगी अभिनव मिरवे घर्मरोमांच वर्म ।
...पून उलटें एखाद्या व्रतस्थ राजस्त्रियेप्रमाणें,
...न्यंगस्नाना कनकमणिभूषाविरहिता
...जे सिंदूरें धवलवसनें भूपवनिता ।

...स तर प्रस्तुत काव्यांत प्रायः मुळींच नसून यमकेंहि चार चार ...चीं ह्मणजे शिकस्त ! असें असतां रावबहादुरांनीं 'केकावली'वर जें आहे त्याच्या शेवटच्या वाक्यांत प्रस्तुत काव्याचें गुणसर्वस्व ह्मणून जें येणेंप्रमाणें दाखल केलें आहे—

वर्षानव...
हाच पहा. ...यावर ...
'ज्ञानप्रसारकां'त व 'इंदुप्र...
लेला 'केकादर्श', हीं सर्व...
'रिपोर्टा'च्या आरंभीं कळ...

नातूंच्या एका घराला रात्रीं...
कीर्तन चालू असून त्यांनीं...
ण्याची रीत जोशीबोवां...
गर्क होऊन गेली होती...
जों बाहेर पडतात तों...

१. अंक ४७ पह...

As a work of art there is not another equal to it in the language.

"चित्रकाव्याच्या दृष्टीनें पहातां प्रस्तुत काव्याच्या तोडीचें महाराष्ट्र भाषेंत दुसरें कोणतेंहि सांपडणार नाहीं." या अभिप्रायावरून पहातां असें ह्मणणें भाग येतें कीं, आमच्या नेटिव ट्रान्सलेटरांनीं 'बृहद्दशम' व 'अष्टोत्तरशत रामायणें,' यांची वार्ताहि ऐकली नसावी. फार तर काय पण 'नवनीतां'तलें एखादें आख्यान जरी त्यांनीं उलटलें असतें तरी वरील वाक्य एवढें 'धडाकून' लिहितांना त्यांस पंचाईतच पडती![1]

आतां अर्थदृष्ट्या 'केकावली'चें कृत्रिमत्व कितपत सिद्ध होतें तें पाहूं. प्रस्तुत काव्य आज बारा तेरा वर्षें[2] आमच्या अवलोकनांत असून त्याजवर आमची कितीएक वेळां आवृत्ति झालेली असेल. पण 'एज्युकेशनल रेकार्डां'तील वरील लेख वाचीतोंपर्यंत या काव्यांत अर्थाच्या लटपटीबद्दल आमच्या महाराष्ट्र कवीनें कांहीं खटपट केलेली आहे ही गोष्ट कधीं आमच्या ध्यानींमनींहि वागली नाहीं. आमची समजूत अशी होती कीं हा प्रबंध एकसंधी आहे; यांत कोठेंहि सांधा किंवा चीर ह्मणून बिलकूल मिळायाचीच नाहीं. पण वरील अभिप्राय जेव्हां आह्मीं पाहिला व तो कोठून

---

१. याच समयीं (सन १८६७) पुस्तकें नोंदण्याचा एक नवा आक्ट होऊन जुन्या सर्व पुस्तकांचा सरकारानें संग्रह करविला. यांपैकीं साऱ्या मराठी ग्रंथांवर रावबहादुरांनीं जो रिपोर्ट केला तो सदरील नोंदणीपटाच्या आरंभीं छापलेला आहे. त्यांत मोरोपंताच्या अष्टोत्तरशत रामायणांवर जो अभिप्राय प्रगट झाला आहे, तो वरील वाक्याशीं फारसा जमण्यासारखा दिसत नाहीं. तो येणेंप्रमाणें आहे—

(मोरोपंतानें तऱ्हेतऱ्हेचीं जीं अनेक रामायणें रचलीं आहेत तीं सर्व मिळून एक चमत्कारिक चीजच होय!)

"His (Moropant's) Ramayans, with their fantastic principles of arrangement, are a curiosity in literature."

२. 'केकावलि' हा ग्रंथ सन १८६५ या सालीं रा० ब० दादोबा पांडुरंग यांच्या आवृत्तीवरूनच पहिल्यानें सुप्रसिद्ध झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्याच्या पुढें ज्या दोन तीन आवृत्ति निघाल्या त्या वरलीच्यामुळेंच निघाल्या. रावबहादुरांच्या आवृत्तींत पुष्कळ विलक्षण प्रमाद आहेत हें खरें; तरी त्यांच्यासारख्या प्रख्यात विद्वानानें आमच्या कवीच्या अत्यंत रमणीय कृतीचा पुरस्कार करून 'यशोदा पांडुरंगी'सारख्या महाराष्ट्र टीकेचा अपूर्व प्रकार प्रथम सुरू केला याबद्दल सर्व रसिकांनीं व महाराष्ट्र भाषेच्या हितचिंतकांनीं त्यांचे आभार मानणें अवश्य होय. वरील टीकेचें नांव आह्मांस तर अत्यंत प्रिय आहे. आमच्या वाचकांस येथें [illegible] हरशी हरकत दिसत नाहीं, कीं मयूर कवीचा 'अपूर्व टाहो' आ-

सर्वतोभद्र, हे किंवा असील टीकाग्रंथच कारण झाला; आणि तेव्हांपासून आमचें शतांपैकीं सुमारें पाऊणशें [illegible] तें उत्तरोत्तर तेथें दृढतरच होत गेलें. तेव्हांपासून निराळ्या छंदांत रचिलीं आहेत [illegible] ऐकिले त्यांनीं आह्मांस १०१ व्या केकेच्या उत्त-

निघाला आहे हें मनांत आणिलें, तेव्हां आमची बुद्धि कुंठित झाली. 'हितोपदेशां'-तील तीन धूर्तांच्या गोष्टींतील बिचाऱ्या याज्ञिकाप्रमाणें प्रत्यक्ष दर्शनाचें प्रमाणहि आह्मांस आभासवत भासूं लागलें. प्रस्तुत पुस्तकाच्या तेराव्या अंकांत छापलेल्या आमच्या एका मित्राच्या पत्रावरून जसें आह्मांस व आमच्या वाचकांस अकस्मात कळलें, कीं मोरोपंतानें आपल्या भारतपर्वांच्या आरंभीं एक एक अक्षर मुद्दाम योजून एक भगवत्पर वाक्य साधलें आहे, त्याप्रमाणेंच 'केकावली'तहि आजपर्यंत कोणास कळून न आलेल्या कांहीं हिकमती त्यानें कशावरून करून ठेवल्या नसतील असेंहि क्षणमात्र आह्मांस वाटलें. शेवटीं हा संदेह दूर करण्याकरितां सदरील काव्यग्रंथ आह्मीं पुनः एकवार बारकाईनें निरखून निरखून पाहिला. गूढ अर्थसंचयाच्या भ्रमानें कोणी जन्मी सगळी घरांतली जमीन ठोकठोकून वारंवार पहावी, कीं कोठें तरी पोकळ आवाज होऊन हाडा हातास लागेल, त्याप्रमाणें प्रकृत काव्यांतील पद ना पद आह्मीं छेडून पाहिलें, पण आह्मांस तर अद्याप रावबहादुरांच्या लिहिण्याचा प्रत्यय आला नाहीं. मग हा काय चमत्कार असेल तो असो!

वरील संदिग्ध अवस्था आमची जोंपर्यंत राहील तोंपर्यंत आह्मांस असा निर्वाह करणें भाग आहे कीं, आमच्या देशाच्या प्रकरणीं मागील मंडळीचे जे कायमचे ग्रह होऊन राहिलेले आहेत त्यांपैकींच हाहि एक होय. यापेक्षां दुसरीं तोड आह्मांस सुचत नाहीं.

येथवर पहिल्या आक्षेपाविषयीं विचार झाला. आतां दुसरा आक्षेप डा. विल्सन साहेब यांचा. या पाश्चात्य पंडिताची माहिती आमच्या कांहीं वाचकांस कदाचित् असेल; पण सर्वांच्या करितां त्यांचें थोडें वृत्त येथें सांगणें जरूर आहे. आमच्या देशाच्या निरनिराळ्या भागांत श्वार्त्स, डफ, केरी वगैरे मोठमोठे मिशनरी जसे येऊन राहिले होते, व या देशास त्यांनीं आपणास वाहून घेऊन प्रभु येशूच्या शुभवर्तमानाचा प्रसार करण्यांत आपले जन्मचे जन्म घालविले, त्याप्रमाणेंच डा. विल्सन यांनींहि मुंबई इलाखा पतकरून इकडील लोकांस सद्धर्माचें ज्ञान व्हावें एतदर्थ आपलें बहुतेक आयुष्य खर्चलें. या देशांत प्रसिद्ध कोशकार क्यांडी व इतिहासकार मेडोज टेलर यांच्याप्रमाणें मिशनरी मजकुरांनीं चाळीस वर्षें घालविलीं; व त्यांचें देहावसानहि येथेंच झालें. इतक्या काळांत त्यांचा एतद्देशीय लोकांशीं अत्यंत परिचय होऊन येथील भाषा, रीतरिवाज, वगैरेहि

---

१. रावबहादुरांचा अर्थद्वैताविषयीं एवढा पक्का ग्रह कर[illegible]नसून यमकेंहि चार चा[illegible] आह्मांस तर्कहि होत नाहीं. कदाचित् पहिल्या केकेचा दुसऱ्या[illegible] रावबहादुरांनीं 'केकावली'वर जें दादोबांनीं केला आहे, एवढ्यावरच त्यांनीं वरील कल्[illegible]स्तुत काव्याचें गुणसर्वस्व ह्मणून जें पण हा अर्थहि किती सुध्या रीतीनें सगळ्या पद्यावर [illegible] कळणार आहे.

त्यांस चांगलीं माहीत झालीं होतीं हें सांगावयास नकोच. शिवाय अनेक लौकिक प्रकरणीं त्यांचा लोकांस पुष्कळ उपयोग होत असून विद्याप्रसाराच्या कामींहि त्यांनीं फार मदत केली हेंहि सर्वसंमत आहे. तर अशा प्रकारची बडी असामी आमचे दुसरे आक्षेपक होते. तेव्हां त्यांच्या लेखाला किती महत्त्व येणारें आहे, व तो चुकीचा असल्यास खोडून टाकणें किती अवश्य होय हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच.

डा. विल्सन साहेबांस दीर्घकाळ वास्तव्यामुळें आमच्या भाषेचें ज्ञान चांगलें झालें असेल असें आह्मांस वाटतें; पण आमच्या ग्रंथांचें ज्ञान त्यांस कितपत होतें याविषयीं कांहीं निश्चयात्मक सांगवत नाहीं. पाश्चात्यजनांच्या व विशेषतः मिशनरींच्या बाण्याप्रमाणें त्यांची गति सर्वत्र होतींच,—कां कीं, हिंदु शास्त्राचें, पारशी शास्त्राचें व मुसलमानी शास्त्राचें त्यांनीं खंडन केलेलें आढळतें; व 'जाति' या मिशनरीप्रिय विषयावर त्यांचा एक मोठा ग्रंथ अलीकडे त्यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झालेला आहे. शिवाय युनिवर्सिटींतलीहि अशी मौज ऐकण्यांत येते कीं, आरबी, हिब्रू, चिनी वगैरे भाषांत कोणी उमेदवार हजर झाला असतां कोणी परीक्षक न मिळे तर विल्सन साहेबांनीं आपला त्याचा पतकर घ्यावा! आतां असलें चतुरस्रत्व संपादन केलें असतां त्यापासून दोष कोणता उत्पन्न होतो हें कोणासहि सांगावयास नकोच. तो पुढील विवेचनावरून वाचकांच्या चांगला लक्षांत येईलच.

साहेब मजकुरांचा आमच्या कवीवर असा आक्षेप आहे कीं, त्यानें शब्दचित्र रचण्यांत व यंत्रें बांधण्यांत आपल्या भाषाप्रभुत्वाचा अपव्यय केला. आतां हा आरोप त्याच्यावर लागू होण्यापूर्वी दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. एक वरील प्रकार मोरोपंतानें केले आहेत कीं नाहींत; दुसरें, ते केले असतां बुद्धीचा अपव्यय होतो कीं काय?

वरच्यांपैकीं पहिल्या प्रश्नाचा निकाल आमचे बहुतेक वाचक करतीलच. कां कीं, 'नवनीता' वरूनहि 'निरोष्ठ रामायण' 'दाम रामायण', व 'परंतु रामायण' हीं पुष्कळांनीं पाहिलीं तरी असतीलच. शिवाय माजी 'सर्वसंग्रहा'वरून 'मंत्ररामायण' 'नामांक रामायण', 'मंत्रमय रामायण' हेहि प्रकार कित्येकांस अवगत असतीलच. तर आमच्या महाराष्ट्र कवीनें वरील कृत्रिम रचना केली आहे एवढा मुद्दा खरा आहे; व केवळ शब्दशः पहातां डॉक्टरसाहेबांचा आक्षेप यथार्थ होय.

वरील कृत्रिमताहि कितपत दोषरूप होय याचा विचार केला असतां प्रथ-

ते ह्मणण्यासारखे कृ[illegible] अक्षरें साधून रचलेल्या प्रबंधास वरील नांव आहे. मोरोपंतांनीं सर्वतोभद्र, हे किंवा अस[illegible] ह्मटलें आहे—

शतांपैकीं सुमारें पाऊणशें रा[illegible] **रामायण यासि नाम मंत्रमय।**
निराळ्या छंदांत रचिलीं आहेत [illegible] **कवि रचिल असें न यंत्रमय॥**

निघाला आहे हें मनांत आणिलें, तेव्हां आमची बुद्धि कुंठित झाली. 'हितोपदेशां'-तील तीन धूर्तांच्या गोष्टींतील बिचाऱ्या याज्ञिकाप्रमाणें प्रत्यक्ष दर्शनाचें प्रमाणहि आह्मांस आभासवत भासूं लागलें. प्रस्तुत पुस्तकाच्या तेराव्या अंकांत छापलेल्या आमच्या एका मित्राच्या पत्रावरून जसें आह्मांस व आमच्या वाचकांस अकस्मात कळलें, कीं मोरोपंतानें आपल्या भारतपर्वांच्या आरंभीं एक एक अक्षर मुद्दाम योजून एक भगवत्पर वाक्य साधलें आहे, त्याप्रमाणेंच 'केकावलीं'तहि आजपर्यंत कोणास कळून न आलेल्या कांहीं हिकमती त्यानें कशावरून करून ठेवल्या नसतील असेंहि क्षणमात्र आह्मांस वाटलें. शेवटीं हा संदेह दूर करण्याकरितां सदरील काव्यग्रंथ आह्मीं पुनः एकवार बारकाईनें निरखून निरखून पाहिला. गूढ अर्थसंचयाच्या भ्रमानें कोणी जशी सगळी घरांतली जमीन ठोकठोकून वारंवार पहावी, कीं कोठें तरी पोकळ आवाज होऊन हांडा हातास लागेल, त्याप्रमाणें प्रकृत काव्यांतील पद ना पद आह्मीं छडून पाहिलें, पण आह्मांस तर अद्याप रावबहादुरांच्या लिहिण्याचा प्रत्यय आला नाहीं. मग हा काय चमत्कार असेल तो असो![1]

वरील संदिग्ध अवस्था आमची जोंपर्यंत राहील तोंपर्यंत आह्मांस असा निर्वाह करणें भाग आहे कीं, आमच्या देशाच्या प्रकरणीं मागील मंडळीचे जे कायमचे ग्रह होऊन राहिलेले आहेत त्यांपैकींच हाहि एक होय. यापेक्षां दुसरीं तोड आह्मांस सुचत नाहीं.

येथवर पहिल्या आक्षेपाविषयीं विचार झाला. आतां दुसरा आक्षेप डा. विल्सन साहेब यांचा. या पाश्चात्य पंडिताची माहिती आमच्या कांहीं वाचकांस कदाचित् असेल; पण सर्वांच्या करितां त्यांचें थोडें वृत्त येथें सांगणें जरूर आहे. आमच्या देशाच्या निरनिराळ्या भागांत श्वार्त्स, डफ, केरी वगैरे मोठमोठे मिशनरी जसे येऊन राहिले होते, व या देशास त्यांनीं आपणास वाहून घेऊन प्रभु येशूच्या शुभवर्तमानाचा प्रसार करण्यांत आपले जन्मचे जन्म घालविले. त्याप्रमाणेंच डा. विल्सन यांनींहि मुंबई इलाखा पतकरून इकडील लोकांस सद्धर्माचें ज्ञान व्हावें एतदर्थ आपलें बहुतेक आयुष्य खर्चलें. या देशांत प्रसिद्ध कोशकार क्यांडी व इतिहासकार मेडोज टेलर यांच्याप्रमाणें मिशनरी मजकुरांनीं चाळीस वर्षें घालविलीं; व त्यांचें देहावसानहि येथेंच झालें. इतक्या काळांत त्यांचा एतद्देशीय लोकांशीं अत्यंत परिचय होऊन येथील भाषा, रीतरिवाज, वगैरेहि

---

१. रावबहादुरांचा अर्थद्वैताविषयीं एवढा पक्का ग्रह कश[illegible] नसून यमकेंहि चार चार [illegible] आह्मांस तर्कहि होत नाहीं. कदाचित् पहिल्या केकेचा दुसर[illegible] रावबहादुरांनीं 'केकावली'वर जें दादोबांनीं केला आहे, एवढ्यावरच त्यांनीं वरील कल[illegible] प्रस्तुत काव्याचें गुणसर्वस्व ह्मणून जें पण हा अर्थहि किती सुध्या रीतीनें सगळ्या पद्यावर [illegible] कळणार आहे.

त्यांस चांगलीं माहीत झालीं होतीं हें सांगावयास नकोच. शिवाय अनेक लौकिक प्रकरणीं त्यांचा लोकांस पुष्कळ उपयोग होत असून विद्याप्रसाराच्या कामींहि त्यांनीं फार मदत केली हेंहि सर्वसंमत आहे. तर अशा प्रकारचीं बडी असामी आमचे दुसरे आक्षेपक होते. तेव्हां त्यांच्या लेखाला किती महत्त्व येणारें आहे, व तो चुकींचा असल्यास खोडून टाकणें किती अवश्य होय हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच.

डा. विल्सन साहेबांस दीर्घकाळ वास्तव्यामुळें आमच्या भाषेचें ज्ञान चांगलें झालें असेल असें आह्मांस वाटतें; पण आमच्या ग्रंथांचें ज्ञान त्यांस कितपत होतें याविषयीं कांहीं निश्चयात्मक सांगवत नाहीं. पाश्चात्यजनांच्या व विशेषतः मिशनरींच्या याण्याप्रमाणें त्यांची गति सर्वत्र होतींच,—कां कीं, हिंदु शास्त्राचें, पारशी शास्त्राचें व मुसलमानी शास्त्राचें त्यांनीं खंडन केलेलें आढळतें; व 'जाति' या मिशनरीप्रिय विषयावर त्यांचा एक मोठा ग्रंथ अलीकडे त्यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झालेला आहे. शिवाय युनिवर्सिटींतलीहि अशी मौज ऐकण्यांत येते कीं, आरबी, हिब्रू, चिनी वगैरे भाषांत कोणी उमेदवार हजर झाला असतां कोणी परीक्षक न मिळे तर विल्सन साहेबांनीं आपला त्याचा पतकर घ्यावा! आतां असलें चतुरस्त्व संपादन केलें असतां त्यापासून दोष कोणता उत्पन्न होतो हें कोणासहि सांगावयास नकोच. तो पुढील विवेचनावरून वाचकांच्या चांगला लक्षांत येईलच.

साहेब मजकुरांचा आमच्या कवीवर असा आक्षेप आहे कीं, त्यानें शब्दचित्र रचण्यांत व यंत्रें बांधण्यांत आपल्या भाषाप्रभुत्वाचा अपव्यय केला. आतां हा आरोप त्याच्यावर लागू होण्यापूर्वी दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. एक वरील प्रकार मोरोपंतानें केले आहेत कीं नाहींत; दुसरें, ते केले असतां बुद्धीचा अपव्यय होतो कीं काय?

वरच्यांपैकीं पहिल्या प्रश्नाचा निकाल आमचे बहुतेक वाचक करतीलच. कां कीं, 'नवनीता' वरूनहि 'निरोष्ठ रामायण' 'दाम रामायण', व 'परंतु रामायण' हीं पुष्कळांनीं पाहिलीं तरी असतीलच. शिवाय माजीं 'सर्वसंग्रहा'वरून 'मंत्ररामायण' 'नामांक रामायण', 'मंत्रमय रामायण' हेहि प्रकार कित्येकांस अवगत असतीलच. तर आमच्या महाराष्ट्र कवीनें वरील कृत्रिम रचना केली आहे एवढा मुद्दा खरा आहे; व केवळ शब्दशः पहातां डॉक्टरसाहेबांचा आक्षेप यथार्थ होय.

वरील कृत्रिमताहि कितपत दोषरूप होय याचा विचार केला असतां प्रथ-

---

ते ह्मणण्यासारखे कृत्रि[illegible]क्षरें साधून रचलेल्या प्रबंधास वरील नांव आहे. मोरोपंतांनीं सर्वतोभद्र, हे किंवा असले[illegible] ह्मटलें आहे—

शतांपैकीं सुमारें पाऊणशें रा[illegible] **रामायण यासि नाम मंत्रमय।**
निराळ्या छंदांत रचिलीं आहेत [illegible]**वि रचिल असें न यंत्रमय॥**

मतः एवढें कबूल करणें भाग आहे कीं, संस्कृत साहित्यांत चित्रकाव्याची गणना शेवटली आहे, व सामान्यतः कोणत्याहि भाषेंत पाहिलें असतां तसाच प्रकार आढळेल. यमक व अनुप्रास हे शब्दालंकाराहि रसदृष्ट्या जर गौण होत, तर अक्षरबंध तर त्या दृष्टीनें फारच हलके ठरतील यांत संशय नाहीं. कां कीं, शब्दालंकार हे अर्थसौरस्यास जितके प्रतिबंधक होत, त्यापेक्षां यंत्रें हीं तर फारच असून त्याच्या योगानें अर्थ जसा काय जखडून टाकलेला असतो. तेव्हां सामान्यतः पाहिलें असतां एवढें खरें आहे कीं, रसैकपर जे कवि व वाचक असतील त्यांची वरील शब्दचित्राविषयीं तादृश भक्ति असणार नाहीं. सर्व भाषांतील अति प्राचीन जे सर्वमान्य कवि त्यांचीं काव्यें पाहिलीं असतां वरील गोष्टीची प्रचीती येईल, व मोठमोठ्या रसिकांचाहि तसाच कटाक्ष आढळेल. आमच्या देशांतील वाल्मीकि व व्यास यांच्या काव्यांत तर काय, पण कालिदास व भवभूति यांच्या किंवा जगन्नाथराय, गोवर्धनाचार्य यांच्या ग्रंथांतहि वरील प्रकार कोठेंहि आढळणार नाहीं; व रसिकांस तो कितपत संमत होय याचें प्रमाणहि मागील दोन महदाख्यायिकांवरून मिळणार आहे.[२] तेव्हां कृत्रिम रचनेच्या विरुद्ध एवढा आक्षेप मात्र काय तो आणतां येणार आहे. पण दुसऱ्या पक्षीं जर पाहिलें तर असें आढळून येईल कीं, प्रस्तुत कृत्रिम पदरचनाहि मोठमोठ्या सर्वमान्य कवींच्या कृतींतूनहि दृष्टीस पडते. 'किरातार्जुनीय' व 'शिशुपालवध' यांची पंचकाव्यांत गणना आहे हें सर्वप्रसिद्धच आहे. शिवाय 'भारवेरर्थगौरवम्' व 'माघे संति त्रयो गुणाः' हीं वचनेंहि सर्वविश्रुत आहेत. पण असें असतां भारवीनें व माघानें आपआपल्या महाकाव्यांत एक एक सगळा सर्ग वरील तऱ्हेचा घातलेला आहे, हें यापूर्वी प्रसंगोपात्त अनेक वेळां वाचकांस कळविलेंच आहे. 'विदग्धमुखमंडन' ह्मणून एक असेंच कूटात्मक प्रसिद्ध काव्य संस्कृतांत आहे. तेव्हां या उदाहरणांवरून पहातां आमच्या महाराष्ट्र कवीच्या तर्फेनें एवढें सहज ह्मणतां येईल कीं, त्यानें वर सांगितलेल्या कांहीं तऱ्हा जरी कोठें कोठें केलेल्या असल्या तरी त्यांबद्दल तो विशेष दोषास पात्र होतो असें नाहीं. निदान त्यांवरून त्याच्या अरसिकतेचें मोठेंसें प्रमाण धरतां येत नाहीं.

मोरोपंताच्या कृत्रिम रचनेच्या तर्फेनें केवळ सामान्यतः वरील आधार दाख-

---

१. काव्याचे तीन प्रकार साहित्यशास्त्रांत सांगितले आहेत; एक ध्वनिकाव्य, दुसरें गुणीभूत व्यंग्य आणि तिसरें चित्र. या तिहींची गणना उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी आहे. 'ध्वनि' किंवा 'व्यंग्य' ह्मणजे शब्दार्थांहून भिन्न असा मार्मिक अभिप्राय [illegible] असतो तें उत्तम काव्य, तादृश प्रधान नसतो तें मध्यम, व मुळींच [illegible] नसून यमकेंहि चार काव्याचे दोन प्रकार आहेत. एक अर्थचित्र व शब्दचित्र. पहिल्या रावबहादुरांनीं 'केकावली'व ला असतो व दुसऱ्यांत केवळ पदरचनेचा. [illegible] प्रस्तुत काव्याचें गुणसर्वस्व ह्मण

२. अंक ९ व अंक ४१ पहा.

विण्यांत आला. वस्तुतः पहातां त्याच्या अष्टोत्तरशत रामायणांस वरील तरफदारीचीहि गरज नाहीं. कां कीं, वरील रामायणेंहि आमच्या कवीच्या वाग्देवतेची केवळ स्वतंत्र लीला आहे. होमरच्या महाकाव्यांतील वीर युद्ध आटपल्यानंतर जसे रंगयुद्धांत परस्पर झगडले व नाना तऱ्हेच्या कसरती करून त्यांनीं कर्षणूक करून घेतली, किंवा चिताऱ्यानें मुख्य चित्र तयार झाल्यानंतर जशी भोंवताली नक्षी व बेलबुट्टी काढण्यांत आपली करामत खर्चावी त्याप्रमाणेंच आमच्या कवीनें 'भारता'दि मोठमोठ्या ग्रंथांनीं आपल्या जन्मभाषेस अलंकृत करून शेवटीं आपल्या उपास्य देवतेच्या प्रीत्यर्थ आपल्या सरस्वतीचा ओघ जलयंत्रोद्गारांप्रमाणें चित्रविचित्रतेनें प्रगट केला आहे. यास्तव राजमंदिराच्या भोंवतालीं कारंज्यांची शोभा केली असल्यास कारागीरास नांव ठेवणें जसें शोभणार नाहीं, व जलतुषारांचें वैचित्र्य पाहून तटस्थ रहाणाराच्या अंगींहि विशेष अरसिकता मानण्याची गरज नाहीं, त्याप्रमाणेंच प्रसंगवशात् कृत्रिमतेचा प्रकार केल्यानें व चाहिल्यानें कवि व रसिकहि दोषास पात्र होतो असें आह्मांस वाटत नाहीं. सागराचा अफाट विस्तार, नद्यांचे उंच प्रदेशावरून दृष्टिगोचर होणारे सर्पवत् ओघ, नायगारा नदीचा 'रसातलास विदारणारा तटप्रपात', हिमालयाच्या ज्येष्ठ कन्येनें आपल्या 'प्रियपात्र रत्नाकरा'स जेथें सहस्र भुज प्रगट करून सरभसालिंगन केलें आहे तेथला विचित्र व भव्य देखावा, यांच्या अंगीं कवीचें व रसिकाचें मन तल्लीन करून टाकण्याची शक्ति खरी, व वाग्देवतेचीं मुख्य विहारस्थानें हीं होत हेंहि खरें. पण सागरावर दूर दूर नजर पोंचवून डोळे दुखूं लागले असतां, व नायगारेच्या धबधब्यांच्या प्रलयगर्जनेनें कर्णविवरें बधिर झालीं असतां, जलयंत्रावर नाचणाऱ्या तुषारांची व त्यांवर मारणाऱ्या इंद्रधनुष्यांच्या लकेरींची शोभा पहाणें व सुखस्पर्श तुषारवृष्टींचा अनुभव घेणें हें त्याच देवीस केवळ तुच्छ वाटेल असें आमचें मन घेत नाहीं !

तर डॉ. विल्सन साहेबांनीं आमच्या कवीवर वरील आक्षेप दाखल करून त्याच्या कीर्तीची हानि करण्याचा यत्न करण्यापूर्वी वरील कांहीं विचार मनांत आणायाचे होते. शिवाय त्यांच्या लेखावरून तिऱ्हाईत वाचणारास असें वाटण्याचा संभव आहे कीं, आमच्या कवीनें आपल्या ग्रंथांत लहर लागेल तेथें वरील कृत्रिम प्रकार आणून आपलें भाषाप्रभुत्व गाजविलें आहे; तर यासंबंधानेंहि त्यांनीं वाचकांस कळविणें जरूर होतें कीं, मोरोपंतानें शब्दचित्राचे प्रकार जे केले आहेत ते भारवि व माघ यांच्या प्रमाणें आपल्या मोठमोठ्या ग्रंथांच्या मध्येंच न करतां अगदीं निराळे केले आहेत, शिवाय ते ह्मणण्यासारखे कृत्रिमहि नाहींत. खड्गबंध, गोमूत्रिकाबंध, मुरजबंध, समुद्रसमक, सर्वतोभद्र, हे किंवा असले दुसरे प्रकार त्याच्या रामायणांत मुळींच नाहींत. अष्टोत्तरशतांपैकीं सुमारें पाऊणशें रामायणें छापून निघालीं आहेत; यांतील बहुतेक तर निरनिराळ्या छंदांत रचिलीं आहेत एवढेंच काय तें त्याचें वैचित्र्य; कित्येकांत 'उमा',

'काशी', 'शिव', अशीं नांवें व कोठें कोठें ऋषींचीं नांवें, तीर्थांचीं नांवें वगैरें साधलीं आहेत. तेव्हां एकंदर रामायणसमूहांत अमळ करामतीचीं झटलीं झणजे 'परंतुरामायण', 'दामरामायण', 'लघ्वक्षररामायण', 'ओंवीरामायण', 'मंत्ररामायण' व 'निरोष्ठ-रामायण' एवढींच काय तीं होत. पण हीं साधण्यासहि आमच्या कवीचे श्रम झटले झणजे हत्तीस आपल्या शुंडादंडावर पुष्पमाला खेळविण्याचे जितके श्रम तितकेच बहुधा होत!

असो; येथवर मोरोपंताच्या कवितेवर एका एतद्देशीय व एका पाश्चात्य पंडितानें काढलेल्या आक्षेपांचा विचार झाला. पुढील खेपेस वरील दोन पंडितांच्याच प्रस्तुत-विषयक लेखावर आणखी कांहीं विचार करायाचा आहे.

अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन् ।
प्राप्नुयात् बुद्ध्यवज्ञानमपमानं च शाश्वतम् ॥[२]

अंक ५४–(१) विषयोपक्रम. (२) 'केकावली'विषयीं रावबहादुरांचा अभिप्राय. (३) त्यावर टीका.

१. मागील खेपेस दोघां पंडितांचे आमच्या कवीवरील आक्षेप दाखल करून त्यांवर आह्मीं आपलें मत वाचकांस कळविलें. आतां त्याच पंडितांनीं मोरोपंताविषयीं आणखी जो मजकूर लिहिला आहे त्यांत कितपत तथ्य आहे याविषयीं विचार करूं.

---

१. वरच्या सहांपैकीं तीन रामायणांचें स्वरूप 'नवनीतां'तल्या वेंच्यांवरून वाचकांस म कळेलच. यास्तव बाकीच्या तिहींचें मात्र येथें सांगतों. 'लघ्वक्षररामायण' सारें एकमात्रक आहे. उदाहरण—

दशमुख-वध-मति विधि-सुर-नुत-पद जगदधिप अजित वरद हरि ।
परम करुण झणवुनि दशरथ-नरवर-तनुज-मनुज-पण हि धरि ॥ १ ॥

'ओंवी रामायणां'त आर्या व ओवी हीं दोन्ही छंदें साधलीं आहेत; उदाहरण—

वंदुनि सरस्वतीला ध्याती कुलदेवतेस कवि सर्व ।
गाती निजपूर्वजगुरु-मूर्ती हरि गुरु तथैव कवि शर्व ॥ ३ ॥
(वंदुनि सरस्वतीला ध्याती । कुलदेवतेस कवि सर्व गाती ।
निजपूर्वजगुरुमूर्ती । हरि गुरु तथैव कवि शर्व ॥)

('मंत्रमय रामायणा'चें उदाहरण)—

श्रीमान् राजशिरोमणि दशरथ जो निजयशें वरा माहिंत ।
द्विजसेवक यज्ञनिरत जनभयहर्ता धरा निकामहित ॥ १ ॥

वरील आर्येंत संपूर्ण त्रयोदशाक्षरी मंत्र श्रीकारापासून मकारापर्यंत साधला आहे हें लक्षांत येईलच.

२. "अप्रासंगिक असें जें वचन तें प्रत्यक्ष बृहस्पति जरी बोलला, तरी त्याच्या योगानें तो अवश्य व निरंतर अपमानास प्राप्त होईल!"

२. रा. ब. रानडे यांनीं आपल्या रिपोर्टाच्या अखेरीस 'केकावली' विषयीं आपला एकंदर अभिप्राय येणेप्रमाणें दाखल केला आहे—

"A few words upon the subject-matter of the poem itself before I conclude this rather long Report. It is, as I have said, a hymn addressed to the Deity, and belongs to the devotional class of poetry. The devotional breathings are, however, of a sort which can be understood and relished in this country alone. There is no awe about the Deity, nothing of terror surrounding his glory, no humiliation of spirit on the devotee's part, no dazzling of sight at the awful vision. The relations between the worshipper and the worshipped are exceptionally free; every now and then there is a side-thrust and a push at the Deity which can be understood, if not relished, in a country where both the prevailing philosophy and theology place man almost on an equality with God, and advocate either his present unity with or his future absorption in God. This kind of philosophy is destructive of all real devotion. The poem, however, partakes of this fault in common with many other works existing in the language, which possess the same characteristics as the Gopi Gita, Ganga Lahari, Mahimna Stotra, Gita Govind, and many others of the like description. The highest and most impassioned outbursts of devotion in our poetry all partake of this character. Those attributes of the Deity which have a prominent bearing on the devotional aspect of human faith, his all forgiving temper, his zeal to serve those who seek his help and place their faith in him, bountifulness and extreme condescension, all these are celebrated as they deserve in successive stanzas of this hymn. There are five passages in the way of episodes in praise of Dhruva, Vyas and Narad, and the other Puranic saints and heroes. The all paramount importance of the sacred story of God's exploits; performed in the course of his various incarnations, is described in a succession of fourteen beautiful stanzas at the end. And the hymn closes with a recital of what the author sums up as the highest boon he craves at the hands of the Almighty. As a work of art there is not another equal to it in the language. As a devotional hymn it does not strike harsh to the orthodax reader, but it is disqualified for any

higher acceptance by the fault above pointed out."

("हा रिपोर्ट बराच लांब झाला; आतां प्रस्तुत काव्याच्या ('केकावली'च्या) विषयावर चार शब्द लिहून लेखणी आटपतों. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, हें काव्य ईश्वराचें स्तोत्र आहे, व याची गणना भक्तिपर ग्रंथांत होणारी आहे. या स्तोत्रांत जो ईश्वरविषयक भक्तीच्या उद्गारांचा प्रकार आढळतो तो एतद्देशवासी लोकांखेरीज इतर कोणास समजावयाचा नाहीं व रुचावयाचाहि नाहीं. ईश्वराविषयीं भक्ताच्या मनांत ज्या वृत्ति स्वभावतः उत्पन्न व्हाव्या—ह्मणजे त्यांचें ऐश्वर्य पाहून भयचकित होणें, आपली क्षुद्रता मनांत येऊन अत्यंत नम्र होणें, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष जाऊन आश्चर्यानें थक्क होऊन जाणें, आपल्या पापमग्नतेमुळें धाक वाटणें,—त्या या काव्यांत बिलकूल दृष्टीस पडत नाहींत. उलटा भज्य आणि भजक यांजमधील संबंध यांत अत्यंत निकटतेचा आढळतो. जागोजाग ईश्वराशीं अतिप्रसंग केलेला व त्याच्यावर कोटी लढवलेली, हा प्रकार प्रस्तुत काव्यांत आहे. यास्तव या देशांतील तत्त्वज्ञानाचें व ईश्वरज्ञानाचें स्वरूप जे जाणीत असतील,—ह्मणजे मनुष्य व देव हे समसमान असून ते एकरूपच होत किंवा पुढें तरी त्यांचा अभेद होणारा आहे,—हें ज्यांस माहीत असेल त्यांसच प्रस्तुत काव्यांतील भाषणप्रकार अगोदर कळेल; मग तो आवडणें न आवडणें ही तर स्वतंत्र गोष्ट आहे! वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग हा खऱ्या ईश्वरभक्तीचा केवळ विध्वंसक होय. आतां हें खरें आहे कीं, वर सांगितलेला दोष प्रस्तुत काव्यांतच्च आढळतो असें नाहीं; 'गोपीगीत', गंगालहरी, 'महिम्नस्तोत्र,' इत्यादि काव्यांत वरीलच प्रकार आहे. आणि सामान्यतः पहातां आमच्या देशांतील कवितेंत भक्तीचे अत्यंत प्रेमळ उद्गार जे जे आढळतात त्या सर्वांत हीच तऱ्हा नजेरस येते. मनुष्यास भक्तीविषयीं प्रेरणा करविणारे जे ईश्वराचे अनेक गुण,— ह्मणजे त्यांचें अत्यंत क्षमाशीलत्व, शरण आलेल्या भाविकांच्या साहाय्यार्थ धांवण्याविषयींची त्याची आतुरता, सर्वांवर कृपादृष्टि, आणि दयोदारता,—हे सर्व या काव्यांतील अनेक पद्यांत यथास्थितपणें वर्णिले आहेत. ध्रुव, व्यास, नारद, वगैरे पुराणप्रसिद्ध पुरुषांचा स्तव कथानुषंगानें मधें मधें आणला आहे. तसेंच देवानें निरनिराळ्या अवतारीं जीं चरित्रें केलीं त्यांच्या कथेचें माहात्म्य शेवटच्या चवदा पद्यांत सुंदर रीतीनें वर्णिलें आहे. आणि सरते शेवटीं कवीच्या समजुतीनें परमेश्वरापाशीं मागायाचें जें अत्युत्कृष्ट वरदान त्याविषयीं प्रार्थना करून या काव्याचा उपसंहार केला आहे. काव्यरचनेच्या करामतीपुरताच विचार केला, तर याच्या तोडीचें काव्य महाराष्ट्रभाषेंत दुसरें नाहीं. भक्तिपर स्तोत्र या दृष्टीनें पाहिलें तर जुन्या धर्मांतील मतें ज्यांस मान्य आहेत अशा वाचकांस त्यांत कांहीं गैर दिसत नाहीं; पण त्यांच्याहून वरच्या पायरीचे जे असतील,—ह्मणजे ज्यांस ईश्वराविषयीं यथार्थ ज्ञान झालें असेल,—त्यांस पूर्वोक्त दोषास्तव तें मान्य होण्याजोगें नाहीं").

३. वरील लेख अनेक रीतींनीं पहातां चांगला मनन करण्यासारखा आहे. आमच्या देशांत पाश्चात्य विद्येचा रिघाव होऊन, तिचा एतद्देशीय लोकांच्या मनावर दृढ संस्कार व्हावयाला लागून, जुनी अडाणी समजूत व नवी सुधारलेली समजूत ही दुफळी जेव्हांपासून व्हावयाला लागली तेव्हांच्या पहिल्या भट्टींत जी मंडळी तयार झाली तिच्या मनाची स्थिति वरील उताऱ्यांत स्पष्ट रेखल्यासारखी दिसत आहे. ती अशी– वरील मंडळीनें इंग्रजी विद्येच्या प्रकाशानें शोधून काढलेलें महातत्त्व एक हें होय कीं, आमच्या देशांत नांवाजण्यासारखें ह्मणून फारकरून कांहींच झालें नाहीं. आमची विद्या घ्या, कलाकौशल्य घ्या, रीतरिवाज घ्या, राजकारण घ्या, शिपाईगिरी घ्या,–चोहोंकडे आमच्या मूर्खपणाचा जसा काय ध्वजच उभारला आहे! त्यांतून आमच्या धर्माची गोष्ट तर मुळींच काढूं नका. असला अप्रयोजक व पाजीपणाचा धर्म तर कधीं कोठेंहि झाला नसेल!! या महातत्त्वाअन्वयेंच रावबहादुरांनीं सदरील रिपोर्टांत आमच्या विद्येच्या कवीवर व त्याच्या टीकाकारावरहि साहेबी पेनाची फडेंशाई उडविली आहे. रावबहादुरांची इंग्रेजी विद्येंतील निपुणता सर्वश्रुतच आहे; तेव्हां तिजप्रमाणें वरील इंग्रेजी लेख मोठ्या सफाईनें लिहिलेला आहे यांत संशय नाहीं. आणि ज्यांनीं ज्यांनीं 'एजुकेशनल रेकार्ड' पत्रांत सदरील रिपोर्ट वाचला असेल त्यांनीं या सफाईवरूनच परीक्षा करून रावबहादुरांच्या मतास बहुधा मान डोलविली असेल. दुसऱ्या एका रावबहादुरानें 'केकावली'तील कांहीं चरणांचा अर्थ फिरविला एवढ्याबद्दल त्या बिचाऱ्यावर वर्तमानपत्रांतून, मासिकपुस्तकांतून जसा काय गहजब उडाला. पण सगळ्या काव्यावर ज्यांनीं इंग्रेजी पेन फिरविलें त्यांच्या अभिप्रायाबद्दल कोणीं कोठें ब्रूं कां चूं सुद्धां केलें नाहीं. ट्रान्स्लेटर साहेबांच्या खुर्चीला पोपमहाराजांच्या खुर्चीप्रमाणें प्रमादराहित्याचा[1] ताईत बांधलेला आहे कीं काय न कळे! किंवा युनिवर्सिटीच्या किताबांतहि कांहीं वीरमंत्र आहे कीं काय कोण जाणे! एकंदरींत या प्रकरणीं माघकवीचाच अभिप्राय लागू पडण्यासारखा आहे—

तुल्येऽपराधे स्वर्भानुर्भानुमंतं चिरेण यत् ।
हिमांशुमाशु ग्रसते तन्म्रदिम्नः स्फुटं फलम्[2] ॥

---

१. रोमच्या पोपाचा एक परंपरागत चाललेला महान् अधिकार प्रमादराहित्य (infallibility) हा होय; ह्मणजे जो सेंटपीटरच्या खुर्चीवर बसेल त्याच्या तोंडांतून असत्य ह्मणून निघायाचेंच नाहीं असा भाविक क्याथलिक लोकांचा सिद्धांत आहे. सेंट पीटर हा ख्रिस्ताच्या प्रेषितपरिवारापैकीं असून रोम येथील गादी थेट त्याच्यापासून आजपर्यंत चालत आली आहे असाहि समज आहे.

२. "चंद्र आणि सूर्य यांचा सारखा अपराध असतां राहु हा चंद्रास वारंवार ग्रासतो व सूर्यास एखादे वेळेस ग्रासतो, हें फळ पहिल्याच्या मृदुत्वाचें व दुसऱ्याच्या तीव्रत्वाचें होय,

असो; आतां रावबहादुरांच्या वरील टीकेवर आह्मी आपली टीका आमच्या वाचकांस सादर करतों.

प्रस्तुत काव्याच्या ह्मणजे 'केकावली'च्या संबंधानें रावबहादुरांचा आमच्या महाराष्ट्र कवीवर असा टपका आहे कीं, त्यानें सर्व विश्वाचा नायक जो परमेश्वर त्याच्या पुढें जें अगदीं भयभीत होऊन जावयाचें व आपल्या अपरिमित क्षुद्रत्वास्तव वर मान करण्याचेंहि धैर्य न होऊन त्यानें पुरतें ब्रहि जें काढूं नये, तें सर्व गुंडाळून ठेवून 'इसापनीतीं'तील कोल्ह्याच्या तिसऱ्या आचरणास अनुसरून त्यानें परमात्म्याशीं खुशाल हवी तितकी सलगी किंबहुना हास्यविनोदहि केला आहे. या अतिप्रसंगाच्या प्रकारास्तव सदरील काव्य सुधारलेल्या समाजाच्या लोकांस पसंत होण्याजोगें नाहीं असा रावबहादुराचा सिद्धांत आहे. आतां आमच्या अडाणी कवीनें आपल्या वेडगळ लडिवाळपणानें अलीकडील बड्या बड्या विद्वानांची आपणावर इतराजी होण्याचा प्रसंग आणला हें त्याचें कमनशीब तर खरेंच; पण आह्मांस असें वाटतें कीं, आमच्या रावबहादुरांनीं वरील निकाल कागदावर नमूद करण्यापूर्वी आमच्या बिचाऱ्या कवीच्या संबंधानें कांहीं गोष्टी ध्यानांत आणल्या असत्या तर बरें होतें. एक तर ही कीं, कैदीस संशयाचा फायदा देण्याची जशी त्यांनी वहिवाट आहे त्याप्रमाणें प्रस्तुत कवीस मागील काळाचा फायदा द्यावयाचा होता. ह्मणजे ज्यापक्षीं तो मागील काळीं जन्मास आला त्या अर्थी अर्वाचीन काळचें सुधारलेलें ईश्वरज्ञान त्याच्या स्तोत्रांत न आल्याबद्दल त्यास कांहीं गय करायाची होती. मिलटन कवीनें आपल्या महाकाव्यांत पृथ्वीस स्थिर केली आहे व सूर्यास फिरावयास लावलें आहे, शेक्सपीयर बोवांनीं तर बोहेमिया देशाच्या किनाऱ्यावर जहाज उतरविलें आहे, आमच्या कविकुलगुरूंनीं मेघास स्त्रियांच्या 'केशसंस्कारधूपांनीं' पुष्ट होण्याची तजवीज सांगितली आहे, महाभारतवाल्यानें कुरूंच्या तृतीय सेनानीकडून 'सप्तद्वीपा' पृथ्वी रथचक्रासह वर उचलविली आहे, ड्रायडननें आपला फलज्योतिषावरील विश्वास आपल्या ग्रंथांत प्रगट केला आहे, गोल्डस्मिथनें आपल्या जन्मभूमीवरील काव्यांत अर्थशास्त्रदृष्ट्या जे अपसिद्धांत होते त्यांचें प्रणयन केलें आहे; त्याप्रमाणेंच कोलंबस बाहामा बेटांस हिंदुस्थानाचा भाग समजला, सीजराच्या वेळेपर्यंत ब्रिटनची गणना कल्पित बेटांत होत होती, ग्रीक व रोमन लोकांच्या वेळेस हिंदुस्थान हा पृथ्वीची सीमा होऊन राहिला होता, चारशें वर्षांपूर्वी आटलांटिक महासागराच्या पलीकडे कांहीं नाहीं असें सर्व समजत असत, आरिस्टॉटल हा एवढा पंडितशिरोमणि असतां पदार्थविज्ञानाचे त्याचे सिद्धांत कित्येक अगदीं वेडगळ आहेत—इत्यादि अनेक ठिकाणीं अर्वाचीन पंडित आपली तीव्रता कमी करून मागल्या अडाणी काळांत होऊन गेलेल्या मंडळींची जशी कींव करतात तशी कांहीं मेहेरबानी रावबहादुरांनीं पंतांवर करणें रास्त होतें. प्रस्तुत कवीनें प्रार्थनासमाजांत जर आपलें नांव नोंदलें असतें व

मोठमोठ्या पंडितांच्या उपासनांच्या वेळेस हजर असून ईश्वरस्वरूपाचें मार्मिक ज्ञान जर संपादन केलें असतें, किंवा दयानंदजींची तेहतीस कोटी देवांवरची मोहीम पाहिल्यानें मूर्तिपूजाजन्य पातकांचें क्षालन होऊन सद्धर्मोन्नति जर त्याच्या अंगीं संचरती, तर त्याच्या हातून हल्लींच्या 'केकावली'च्या तोडीचें काव्य उतरतें कीं नाहीं याची शंकाच वाटते; पण जें उतरलें असतें त्यांत मराठी ट्रान्सलेटरांस नापसंत होण्याजोगें कांहीं आलें नसतें, यांत संशय नाहीं. 'रत्नमाला,' 'प्रार्थनासंगीत' या महाकाव्यांत खऱ्या देवाविषयीं खरा भक्तिरस जसा प्रगट झाला आहे तसाच 'केकावली'तहि संचरून आमच्या सुधारलेल्या भाविक जनांच्या पवित्र नेत्रांतून प्रेमाश्रूंचा प्रवाह चालविण्यास वरील केकारव कदाचित् कारणभूत झाला असता; तरी असल्या पवित्र व सुधारलेल्या काव्यांत कवित्वरस कितपत उतरता याचा मात्र आह्मांस संशय वाटतो! असो; पण ज्या अर्थीं आमच्या विचाऱ्या कवीचा ग्रंथ पेशवाईच्या अमदानींतच आटपला, व पुढील सुधारलेल्या राज्याचा व धर्माचा आमच्या गाढांधकारमय देशांत उदय होऊं लागण्याच्या पूर्वीच त्याचा अस्त झाला, त्या अर्थीं वादविषयक काव्यांत ईश्वरभक्तीचा प्रकार परिपक्व बुद्धीच्या लोकांस मान्य होई अशा प्रकारें वठला नाहीं, याबद्दल आमच्या हीनभाग्य कवीवर ठपका ठेवणें बरोबर नाहीं. ही एक गोष्ट झाली. दुसरी अशी कीं, 'केकावली'त मयूरानें ईश्वराची करुणा भाकून जरी टाहो फोडला आहे, तरी त्याच्या ईश्वरांत व रावबहादुरांच्या ईश्वरांत अतिशयितच अंतर आहे. आमच्या कवीचा देव साकार, मनुष्यदेहधारी, 'गदारिदरनंदकांबुजां'नीं विराजमान, भक्तांच्या साह्यार्थ गरुडावर स्वारी करून धांवणारा, विदुराच्या कण्या, शबरीचीं बोरें, सुदाम्याचे पोहे, हे खाणारा, एका अवतारीं कडकडीत एकपत्नीव्रत आचरणारा आणि पुढल्यांत गोकुळवृंदावनांत—

श्लिष्यति कामपि चुंबति कामपि कामपि रमयति रामाम् ।
पश्यति सस्मितचारु परामपरामनुगच्छति वामाम् ॥ १ ॥[1]

अशा प्रकारचा धुमाकूळ करून देणारा, क्षणांत 'प्रियाकुचतटीं' व क्षणांत 'नृपमखांत' 'पत्रावळी' काढणारा, भृगूनें उरावर लात हाणली असतां तिचें चिन्ह भूषणत्वेंकरून वागविणारा, अशा प्रकारचा होय. आमच्या टीकाकर्त्याचा अलीकडील देव ह्मटला ह्मणजे त्याला रंग नाहीं, रूप नाहीं, तो कधीं अवतरलेला नव्हे, कधीं कोणाच्या दृष्टीस पडलेला नाहीं, कोणाशीं बोललेला नाहीं, डोळे मिटले ह्मणजे दिसायाचा, वेणारवानें जागृत व्हावयाचा, अशा प्रकारचा आहे. त्याचीं चरित्रें ह्मटलीं

१. वरील अष्टपदी जयदेवकवीच्या सर्वप्रसिद्ध 'गीतगोविंदां'तील होय. तिचा अर्थहि सुगमच आहे-

"कोणास आलिंगन देतो, कोणाचें चुंबन करतो, कोण्या स्त्रियेस रमवितो, एकीकडे सस्मित अवलोकन करतो, व दुसरीच्या मागून चालतो!"

ह्मणजे त्यानें आमच्या देशांत सद्धर्मोन्नतीसाठीं शाक्यमुनीस उत्पन्न करून त्याचा धर्म चोहोंकडे पसरविला व शेवटीं ब्राह्मणांकरवीं त्याच धर्माचें उन्मूलन करविलें, इस्राएल लोकांत प्रभु येशूस उत्पन्न करून त्याच लोकांकडून त्याचे हाल हाल करून त्यास मारविलें, महंमदास आरबस्थानांत पाठवून त्याच्या चेल्यांकडून ख्रिस्ती धर्म मलिन करविला व आमच्या देशांतल्या मूर्ति फोडविल्या, पुढें युरोपांत महंमदाचें मातेरें करवून इकडेहि शिवाजीच्या हस्तें पुनः मूर्तींचें स्थापन करविलें, अलीकडे राममोहनराय व दयानंद सरस्वती यांच्या हृदयांत सद्धर्मप्रकाश फांकवून आर्यांच्या उन्नतीस आरंभ होतो न होतो तों एकाचें श्वेतद्वीपांतच देहावसान झालें व दुसऱ्यावर एकाएकीं गहजब गुदरून त्या वावटळींत देशसुधारणेचें जहाज कोणीकडच्या कोणीकडे हेलकावे खात भडकलें! असो; तर कवीची ईश्वराच्या विषयींची समजूत व टीकाकर्त्याची त्याजविषयींची समजूत या परस्पर इतक्या भिन्न आहेत; मग इतका स्पष्ट विरोध असतां 'केकावली'तील वर्णन आमच्या रावबहादुरांच्या मनांत भरेसें उतरलें नाहीं यांत नवल कसचें? व यांत आमच्या विचाऱ्या जुन्या कवीचा दोष तरी कसचा? इंग्रजी चिताऱ्यानें जर स्त्रीपुरुषांच्या जोडप्याचें चित्र काढलें तर मडम साहेबाच्या पायांत बूट, डोक्यावर टोपी, अंगांत झगा वगैरे सर्व जामानिमा इंग्रेजी तऱ्हेचा, नवऱ्यानें हलकीशी नाजुक छत्री डोक्यावर धरलेली असून स्वतः स्वारी ऊन खाते आहे, मुखकमलांतून जो जो शब्द खालीं पडेल तो तो झेलण्यास जसा काय तो तत्पर होऊन राहिला आहे,—अशा तऱ्हेचें तें उठेल हें उघडच आहे; तोच आमचा हिंदु चितारी असला कीं, बायकोला लाजतां लाजतां पुरेसें होतें आहे, नवरा यथास्थित जामानिमा करून चालत असतां बायको अनवाणी व छत्रीशिवाय अशी त्याजपासून दूर चालली आहे, पेहेराव इकडच्याप्रमाणेंच अर्थात् असून इकडच्या चालीप्रमाणेंच हातापायांत वगैरे भूषणें आहेत,—वगैरे सर्व प्रकार असायाचाच! मग असें एखादें जुन्या कारागीरानें काढलेलें चित्र पाहून जर इंग्रेजी रसिकता पावलेले एखादे मर्मज्ञ ह्मणूं लागले, कीं "हें कायहो! स्त्रियांचे पाय उघडे दाखविणें हें किती अप्रशस्त आहे? वक्षःप्रदेश उघडा दाखविला तर तो चालेल, कांकीं सुधारलेल्या देशांत मोठमोठ्या समारंभांत तशा वेषानें स्त्रिया वावरतात; तसेंच कपाळीं कुंकूं लावलें आहे, हें तरी किती अमंगळ आहे! जे रानटी लोक असतात त्यांस आपलें शरीर रंगवावेंसें वाटतें, खरें सुधारलेलें माणूस आहे त्याच्या कपाळीं कधीं कांहीं दृष्टीस पडायाचें नाहीं; त्याप्रमाणेंच नाक व कान टोंचून शरीरास इजा करून तेथें भूषणें घालणें, हातावर तोंडावर गोंदणें हें तरी किती अभद्र आहे! पण या सर्वांत बायकोचें लाजणें हें तर फार विचित्र आहे; येथें तर चिताऱ्यानें आपल्या अडाणीपणाची शिकस्त केली आहे! बायका जर अशा

१. सुबंधु कवीवरील निबंध, पृष्ठ ३७ पहा.

लाजूं लागल्या तर मग त्यांची व त्यांच्या द्वारें देशाची सुधारणा होणार कशी ? मिल्ल सारख्यांनीं स्त्रीजातीचा कैवार घेऊन त्यांस पार्लमेंटांत बसविण्याची खटपट करावी; आणि आमच्या खुळ्या देशांत तर बायकांस नवऱ्याच्या समोर उभें रहाण्याचाहि धीर नसावा ही केवढी शोचनीय गोष्ट आहे बरें !" अशा प्रकारची टीका वरच्यासारख्या तजबीरीखालीं कोणीं लिहून ठेवली तर ती कितीशी समंजस ह्मणून आपण समजूं ! तर याप्रमाणेंच आमच्या कवीच्या हृदयांत ईश्वराचें स्वरूप ज्या रीतीचें लहानपणापासून ठसलें होतें त्या रीतीची त्याची तजबीर त्याच्या काव्यांत उठली हें उघडच आहे. प्रस्तुत टीकाकारास आवडे अशा प्रकारच्या चित्राची त्याजपासून अपेक्षा करणें हें त्यास इंग्रेजी येत नसल्यावद्दल त्यास नांव ठेवण्यासारखेंच समंजस होय.

आतां वरील आक्षेपच वस्तुतः कितपत यथार्थ होय याविषयीं जर विचार केला, तर इकडूनहि प्रस्तुत काव्याच्या तर्फेनें कांहीं बोलतां येणार नाहीं असें नाहीं. रावबहादुरांनीं आपल्या टीकेंत ईश्वराच्या संबंधाचें वर्णन जसें असावें ह्मणून सांगितलें आहे तसें 'केकावली'त मुळींच नाहीं असें कोणालाहि ह्मणवणार नाहीं. आपण ईश्वरें स्वरूपच आहों असें जर आमच्या कवीस वाटतें, व त्याच्या ठायीं नम्रभाव व स्वतःच्या पापमलिनतेविषयीं खेद, या वृत्ति जर मुळींच नसत्या, तर वादविषयक काव्याचा प्रादुर्भावच मुळीं होताना ! 'कृतांतकटका'ची पांढरी सफेत पताका फडकूं लागली असतां त्यानें प्रस्तुत ग्रंथ जो रचला, तो दक्षिणाप्रैज कमिटी किंवा मराठी-ग्रंथ-उत्तेजक मंडळी यांच्या बक्षीसाच्या लालचीवर अथवा पेशव्यांनीं देऊं केलेल्या इनामास भुलून रचला असें नाहीं; तर केवळ अंतःप्रेरणेस वश होऊनच तो लिहिला हें सर्वांस माहीतच आहे. हें या काव्याच्या सर्वसंमत उत्कृष्टत्वावरूनच सिद्ध होतें. आतां यांत सलगीचा जो प्रकार आहे तो रावबहादुरांस बिलकूल पसंत पडत नाहीं; कां कीं परमेश्वर केवढा थोर व मनुष्य हा त्याच्यापुढें किती पराकाष्ठेचा क्षुद्र ! हा अभिप्राय एका पक्षीं पहातां खरा आहे हें कोणीहि कबूल करील. पण दुसरी एक गोष्ट रावबहादुरांच्या कशी लक्षांत आली नाहीं, किंवा त्यांनीं कशी आणली नाहीं, याचा अंमळ चमत्कार वाटतो. मनुष्य हा ईश्वरापुढें अत्यंत क्षुद्र हें खरें; पण तसेंच हेंहि खरें आहे कीं, त्याचा उत्पन्नकर्ता व जनकहि तोच. तेव्हां आमच्या कवीनें देवापुढें कितीहि 'लुब्रे'पणा केला असला, तरी त्याचा अपराध ह्मटला ह्मणजे बापापाशीं मुलानें अल्लडपणा केल्याप्रमाणेंच होय. हा पुत्रजनकभाव कवीनेंहि कित्येक पद्यांत सुरस रीतीनें वर्णिला आहे. त्यांतून हिंदु धर्म हा प्रार्थनासमाजाच्या धर्माप्रमाणें अभावरूप व मनोमय नसून त्यांतील देव डोळ्यानें दिसणारा, त्याचीं चरित्रें लिहून ठेवलेलीं, त्यांचा गजर नेहमीं कानावर येणारा, असा प्रकार असल्यामुळें कवीच्या वाणींस स्फूर्ति होण्यास, किंबहुना तिचें चापल्य प्रगट होण्यास, त्याची अनुकूलता किती अधिक आहे हेंहि सर्वांच्या सहज लक्षांत

येण्यासारखें आहे. प्रार्थनासमाजीय भक्तानें ईश्वराचे गुण गाणें झटलें झणजे विशप हूकर यांनीं आपल्या सर्वप्रसिद्ध ग्रंथांच्या आरंभीं झटलें आहे तशीच अवस्था—

"Our safest eloquence concerning Him is our silence."

"आमचें ईश्वराविषयीं यथार्थ वक्तृत्व झटलें झणजे मौन हें होय." अशा ठिकाणीं वाग्देवीचा रिघाव करणें हें वाताकर्षक यंत्रानें निर्वायु केलेल्या स्थलीं घंटानाद करूं पहाण्यासारखेंच होय!

येथवर मोरोपंताच्या तर्फेनें जे जे आह्मीं विचार सुचविले ते राववहादुरांच्या प्रतिकूल टीकेपासून होणाऱ्या भ्रमाचें बरेंच निवारण करतील असें वाटतें; तरी वरील सर्व निरूपण हें वरील टीकेच्या शाखाविस्ताराचेंच केवळ खंडन झालें. पूर्वोक्त लेखावर केवळ 'मूले कुठारः' असा एक विचार अद्याप राहिलाच आहे. हा झणजे आह्मीं राववहादुरांसारख्यांस सुचवावा असें नाहीं; पण त्यांच्या व बहुतेक जुन्या मंडळीच्या लेखांत [illegible] भाषणांत असा प्रकार आढळतो कीं आमच्या देशाची गोष्ट आली झणजे अगदीं कर[illegible]ळ्यापुढें असणाऱ्या गोष्टींकडेहि त्यांनें [illegible] त्या साक्षी व जो पुरावा पाश्चात्यांच्या जरी स्वापमावांगा [illegible] होतं. त्या प्रकरणांत पुरून उरेसा होतो तोच आमच्या प्राच्यदेशीय प्रकरणांत कोता पडूं लागतो, किंबहुना त्याचें स्वरूप उलटें सुद्धां भासायाला लागतें. पाश्चात्यानें ताडावर चढणाऱ्या ताडीवाल्यास गोळी घालून ठार केला तरी बिचारा ताडीवाला मनुष्यजातीच्या खापरपंजोबाच्या झणजे वानराच्या स्वरूपास मिळतो व साहेब दोषमुक्त होतात, किंबहुना यांच्या अग्नियंत्रशौंडत्वाची तारीफहि व्हावयाला वेळेनुसार चुकायाची नाहीं; तेंच इकडे कोणी खऱ्याखुऱ्या वानरावर चाप झाडला कीं वानराचा मनुष्य होऊन त्याच्या मानेला तात बसते! तेव्हां असा प्रकार आढळत असल्यावरून प्रस्तुत टीकाकर्त्यासारख्या पंडितांसहि अगदीं सामान्य सिद्धांताचीहि कधीं कधीं आठवण देणें जरूर पडतें. प्रकृत प्रकरणीं लागू पडणारा सिद्धांतहि तसाच कांहीं मोठासा गूढ आहे असें नाहीं. तो हा होय कीं, काव्यांची परीक्षा जी करायाची ती रसिकजन त्यांतील सिद्धांतांच्या खेरखोटेपणावर तादृश करीत नसतात, केवळ अपसिद्धांताचें ज्यांत प्रतिपादन केलें आहे, ज्यांत सत्याचा लवलेशहि नाहीं, असें काव्य केवळ अमोलिक असूं

१. आमचे अर्वाचीन सामाजिक हे कोणतेंहि धर्मपुस्तक ईश्वरदत्त झणून मानीत नाहींत हें सर्वप्रसिद्धच आहे. त्यांचें झणणें असें आहे कीं सृष्टींत जेवढें ईश्वराचें स्वरूप प्रगट झालें आहे तेवढ्यावरून त्याचे सर्व गुण व्यक्त होतात, व भजकांस एवढें साधन बस आहे. या त्यांच्या मतास कितपत आधार आहे हें आमच्या मतें माजी जॉन स्टुअर्ट मिल याच्या धर्मविषयक 'निबंधत्रया'वरून बरेंच दिसून येईल. मिल हा कोणत्याच धर्माचा नसून त्यानें केवळ मनुष्यबुद्धीनें वरील विषयावर जे विचार शोधक मनुष्याचा मनांत येण्यासारखे आहेत तेच सदरील ग्रंथांत दाखल केले आहेत. पण असें असतां वरील ग्रंथांतील ईश्वरज्ञान व सामाजिकांचें ईश्वरज्ञान यांचा परस्पर थोडाच जम बसेल!

शकेल; आणि ज्यांत सात गाळण्यांतून काढलेलें निवळ सत्य ओतप्रोत भरलेलें आहे असलेंहि काव्य कोणी कवडीला सुद्धां विचारूं नये अशा वसुलाचें असेल. युक्लिडच्या प्रमेयांवर कोणी छंदोबद्ध रचना केली तर तींत कितीसा रस उतरेल? प्रत्यक्ष भर्तृहरीनें व्याकरणावर कारिका रचल्या आहेत; पण त्यांतील रसाचें माधुर्य कोणत्या प्रकारचें आहे हें पहाण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यानें संस्कृत भाषेच्या दुसऱ्या पुस्तकांत दाखल केलेल्या पांच सहा कारिकांचा आस्वाद घ्यावा. तो घेतला असतां सत्यंदेवतेचा केवढाहि भक्त असला तरी तो लवकरच पुरे ह्मटल्याविना रहाणार नाहीं! तीच मोठ-मोठ्या काव्यांची व नाटकांची गोष्ट पहा; त्यांतील बहुधा सर्वांचीं कथानकें केवळ कल्पित असतात, व जगांत कधीं दृष्टीस न पडणाऱ्या गोष्टीहि त्यांत वर्णिलेल्या आढळतात. पण इतकें असूनहि कवित्वरसानें वरील ग्रंथ जसे काय उचंबळत असतात! याचें कारण उघडच आहे कीं, असत्यता ही मनोरंजकतेस स्वभावतः मुळींच विरुद्ध नसून उलटी तीस पुष्कळ अंशीं अनुकूलहि आहे. तर आमच्या कवीचीं धर्मविषयक मतें रावबहादुरांच्या मतांहून कितीहि भिन्न असलीं, किंवा वादविषयक काव्यांत त्यानें ईश्वराचें वर्णन कोणत्याहि पद्धतीनें केलें असलें, तरी कवित्वदृष्ट्या हे सर्व विचार केवळ बाह्य होत हें रावबहादुरांनीं लक्षांत आणायाचें होतें. प्रार्थनासमाजांत माजी भास्कर दामोदर पाळंदे यांचीं 'रत्नमाला' चालते, व तींतील पद्यें रावबहादुरप्रभृति विद्वान भक्तजन दर आठा दिवशीं तालसुरावर गातात, तेव्हां तींतील ईश्वरवर्णन किती चोख असेल हें उघडच दिसतें; पण असें आहे ह्मणून वरील 'माले'स आमचे टीकाकार 'केकावली'वर 'प्याराडैज लॉस्ट'वर, व 'इलियड'वर नेऊन बसवितील काय? आमच्या पंतांस किंवा होमरसाहेबांस दी. दी. च्या परीक्षेस बसवून ईश्वरज्ञान या विषयावर एक पेपर दिला असता तर दोघांसहि बेताबाताचेच मार्क मिळून 'नापास' हा टिळा दोघांसहि लागता यांत संशय नाहीं. कांकीं, अलीकडील सुधारलेल्या काळांतला व विशेषतः एकोणिसाव्या शतकांतील देव ह्मटला ह्मणजे तो दुर्बिणींतून व सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दिसायाचा, पृथ्वीच्या पोटांतील थरांत व वृक्षपर्णावरील रेषांत प्रगट व्हावयाचा, असा आहे. पण बिचाऱ्या होमरच्या वेळेस तर त्याच्या साऱ्या देशभर व एका देवप्रिय लोकांखेरीज बाकीच्या साऱ्या जगभर अज्ञानजन्य व मूर्तिपूजाजन्य अंधकारच चोहोंकडे पसरला होता. त्यांतून कविमहाराजांस एक सोडून सात दुर्बिणी आणल्या असल्या तरी एकीचाहि उपयोग न होता. ईश्वरज्ञानाचा दुसरा मार्ग ह्मटला ह्मणजे पवित्र शास्त्र व कुराण हे ग्रंथ होत. यांपैकीं पहिल्याचा कांहीं भाग कदाचित् होमरच्या वेळेस असेल नसेल! दुसऱ्या कवीस मात्र दुसरा ग्रंथ सहज प्राप्त होण्याजोगा होता; पण त्यास त्याचे तेहेतीस कोटी देव सोडतील तेव्हां पैगंबर साहेबांच्या देवाकडे जाण्याची त्यास बुद्धि होणार! त्यांतून 'पंधरा आणे निव्वळ बाष्कळ-

पणानें भरलेल्या' ग्रंथांवर त्याचें उपजीवन असल्यामुळें व अरसिकत्वास्तव त्यांतील भाकड कथांचीच त्यास गोडी लागल्यावर मग ईश्वराविषयीं चोख माहिती करून घेण्याचें त्यास कोठून सुचणार! अठरा पुराणांनीं ज्यास ग्रासलें त्यास बिचारें एकटें कुराण काय करतें! बाकी आमची पक्की खातरी आहे कीं, अकबर बादशहाच्या रंगेल पंडितरायांनीं जसा यवनीशीं समागम करून इहलोकींच्या सुखसर्वस्वाचा अंगीकार केला, त्याप्रमाणें आमचे महाराष्ट्र कवि जर—

'श्रीराम याच नामीं न ह्मणूनि अल्ला खुदा नवी रमला'।

या आर्येचा विपर्यास करून एखाद्या सुंदर मशिदींत इमाम होऊन बसते, व आपलें पूर्वपातक समग्र झाडून एक खरा अल्ला ओळखून रहाते, तर 'केकावली'त त्यांनीं ज्या चुका केल्या आहेत त्या ते न करते, व सुधारलेल्या विद्वान् वाचकांनींहि नाक मुरडूं नये असें काव्य त्यांच्या हातून निपजलें असतें. पण त्याविषयीं आतां खेद करून काय उपयोग आहे? भाषेंतील आद्यकाव्याचें विवेचन करतांना जसा कोणीहि वाचक कधीं हा विचार करीत बसत नाहीं, कीं जुपिटर हा खरा देव होता कीं नाहीं, एक ग्रीक वीर मार्स देवाशीं व व्हीनस देवीशीं लढला आहे असा प्रकार कवीनें घालणें हें बरोबर आहे कीं नाहीं, मार्स व व्हीनस यांचा व्यभिचारसंबंध, व्हीनसनें काव्याच्या नायिकेस तिच्या जाराकडे नेऊन पोंचविणें, जुपिटर एवढा देवाधिदेव असतां जूनो देवीनें त्याला जादूनें भारून रतिनिद्रापर करून फसविणें, वगैरे प्रकारांवरून होमरच्या देवविषयक कल्पना किती अप्रशस्त होत्या–हे सर्व विचार रसिक वाचकांच्या जसे कधींहि मनांत येत नाहींत; किंवा 'प्याराडैज लॉस्ट' वाचतांना जसा कोणीहि वाचक शेजारीं मिल्लसाहेबांचे 'धर्मावर तीन निबंध' किंवा टॉमस पेन याचा नास्तिकवाद ठेवीत नाहीं, व मूसा पैगंबरानें 'बैबल'च्या आरंभीं केलेल्या सृष्टयुत्पत्तीचें वर्णन खरें कीं अर्वाचीन ज्योतिषसिद्धांत व भूगर्भशास्त्र हीं खरीं, आडम हा मनुष्यजातीचा पूर्वज खरा कीं डार्विनसाहेबांच्या मताप्रमाणें वानर हा खरा, हे सर्व विचारहि जसा तो खुशाल खिशांत घालून ठेवितो, व काव्यरसभरांत निःशंक वाहवतो; तशीच आमच्या महाराष्ट्र कवींच्या अत्युत्तम कृतींचीहि गोष्ट आहे. जो खरा रसिक आहे तो रावबहादुरांनीं काढलेल्या आक्षेपांचा कधीं विचारहि करणार नाहीं व ते त्याच्या मुळींच मनांतहि यावयाचे नाहींत. कोहिनूर हिरा पहावयास सांपडला असतां जसा कोणीहि असा विचार करणार नाहीं कीं, हा कोळशाचा भाऊ आहे. हा मूर्तिपूजकांच्या देशांत सांपडला असून जगन्नाथाच्या मूर्तीवर होता, तस्मात् हा कवडीचा माल आहे; फिडियस नामक ग्रीक कारागीरानें केलेला जुपिटराचा पुतळा पाहिला असतां हा खोटा देव आहे, तेव्हां सुधारलेल्या समाजाच्या मनुष्यास संतोष करण्याचें यांत सामर्थ्य नाहीं असें जसा कोणी सामान्य मनुष्यहि ह्मणणार नाहीं; व्हीनसची उघडी पुतळी पाहिली

असतां 'स्त्रियश्चरितं' या श्लोकावर जसा कोणी पांडित्य करीत बसणार नाहीं, व कोणी करूं लागल्यास त्यास त्या देवीच्या अवकृपेंतल्या मंडळींत निवडण्यास फारशी अडचण नको; किंवा एखाद्या स्त्रीच्या रूपाची जी परीक्षा करावयाची ती तिच्या धर्मावरून करणें, अथवा स्वराची करावयाची ती तिच्या रूपावरून करूं पहाणें, हें जसें अत्यंत असमंजस; त्याप्रमाणेंच 'केकावलि' हें पुस्तक ट्रान्स्लेटरांच्या टेबलावर असतां व त्यांच्या पेनाच्या खुपाट्यांत सांपडलें असतां त्याच्या गुणदोषांचें मान करण्यास काव्यविवेचनाचा जो कांटा काढावयाचा तो न काढतां रावबहादुरांनीं त्याच्या ऐवजीं आपल्या प्रार्थनासमाजांतली धर्माधर्मविवेचनाची पवित्र तुला काढून आमच्या विचाऱ्या नेटिव कवीच्या पदरांत त्यांनीं धर्मविषयक अज्ञानाचें व दांडगेपणाचें बेलाशक माप झोंकून दिलें, याचा आह्मांस अत्यंत विस्मय होतो!

प्रस्तुत काव्याविषयीं आपलें मत प्रगट करतांना रावबहादुरांनीं आणखी असाहि एक मोठा विचार मनांत आणणें अवश्य होतें कीं, मूर्तिपूजेच्या धर्मापेक्षां अमूर्त देवाची उपासना ही कितीहि उत्कृष्ट असली, तरी पहिल्या धर्मांतील काव्याची परीक्षा कर्तव्य असतां हा दुसरा उंच प्रतीचा धर्म विशेष उपयोगी पडणारा आहे असें नाहीं. पाद्री साहेबांच्या पवित्र धर्मोपदेशानें व 'पवित्र शास्त्रां'तील तत्त्वज्ञानानें सद्धर्माचीं तत्त्वें आमच्या अर्वाचीन विद्वानांचे ठायीं बिंबलीं असतील खरीं; तरी ज्याप्रमाणें परिसाशीं संघटन होऊन लोखंड सोनें बनलें खरें, पण लोहचुंबकाची व त्याची संगत तुटली व त्यामुळें लोहचुंबकाचें सामर्थ्य ओळखण्याची त्याची लायकीहि पण गेली, तशीच वरील पंडितांची स्थिति आहे. ख्रिस्ती धर्म, मुसलमानी धर्म, ब्राह्मांचा धर्म, प्रार्थनासमाज, या सर्वांतील देवाकडे जितकें सन्निध जावें व तन्मय व्हावें, तितका इकडचा संबंध तुटला, व महाराष्ट्र कवींच्या कृतींवर अभिप्राय देण्याचा तितका अधिकारहि कमी झाला.[१] पोरपणाचा अनुभव जसा तरुणपणीं नाहीं, तरुणपणाचा वार्धक्यांत नाहीं,

---

१. दादोबांनीं 'यशोदापांडुरंगी'च्या प्रस्तावनेंत असाच अभिप्राय दर्शविला आहे—

"ज्या देशांत व ज्या लोकांत रसभरित ह्मणून प्रसिद्ध काव्यें असतात, त्यांच्या गुणांचें यथायोग्य परीक्षण करण्यास, आणि त्यांची रुचि घेण्यास, त्याच देशाचे डोळे आणि जीभ असली पाहिजे. इतर लोकांच्यांनीं तसें यथान्याय परीक्षण होणें केवळ अशक्य असें माझें ह्मणणें नाहीं. कदाचित ते विशालबुद्धीचें परीक्षण असल्यास योग्य परीक्षा करूं शकतील. परंतु त्यांच्या रुचीनें जो तद्देशीय सुज्ञांस आनंद होईल, त्याच मानाचा आनंद अन्यदेशीय विद्वानांस होणार नाहीं. याचीं कारणें बहुत आणि सूक्ष्म आहेत. ज्या लोकांत वंशपरंपरेनें ज्यांचा सहवास असतो, त्यांचा पूर्वापर व्यवहार, रीति, भाती, विद्या, ज्ञान, आचार, या सर्व गोष्टींच्या संघट्टनानें त्यांचीं मनें तशींच रंगलेलीं असतात. ह्मणून त्यांच्या काव्यानें जे हर्ष शोकादि विकार त्यांच्या मनांवर होतील, तसे विकार अशा संघट्टनाच्या अभावामुळें ज्यांचीं

(पुढें चालू).

वीराचें बाहुस्फुरण भित्र्यास नाहीं, कामिजनांचा रोमांचानुभव क्लीबांस नाहीं, तसेंच मूर्तिपूजकांच्या काव्यांतील प्रेम इतर धर्मांच्या लोकांस कळायाचें नाहीं, व त्यांच्या काव्यांतील रसानुभव मूर्तिपूजकांस घेतां येणार नाहीं. यास्तव ज्यानें त्यानें आपला जितका अधिकार आहे तितकाच सांभाळून त्याचें अतिक्रमण न करणें हें फार बरें. आमच्या राववहादुरांस व त्यांच्या सद्धर्मानुसारी समाजबंधूंस आमच्या मूर्तिपूजक कवींचें काव्य पसंत न झालें ह्मणून तें वाईट ठरलें असें मुळींच होत नाहीं. जोंपर्यंत हजारों महाराष्ट्रजनांच्या हृदयास आमच्या सरस्वतीप्रिय मयूराचा टाहो भेदून जात आहे, जोंपर्यंत त्याचा सारा पिसारा उभारलेला पाहून त्याच्या अप्रतिम वैचित्र्यानें जनसमूह चकित होऊन रहात आहे, जोंपर्यंत मेघदर्शनजनित हर्षभरांत तो नृत्य करीत असतां वाग्देवीच्या नूपुरांचा मंजुल रव रसिकजनांस त्यांच्या कर्णांची धन्यता वाटवीत आहे, तोंपर्यंत कितीहि रेवरेंडसाहेबांचे, मुल्लासाहेबांचे किंवा राववहादुरांचे अभिप्राय त्यास प्रतिकूल पडले तरी त्यास तिळमात्रहि धाक बाळगायाला नको. एका कवीनें ह्मटलें आहे—

उदितवति द्विजराजे कस्य न हृदयं मुदं परां धत्ते ।
संकुचसि कमल यदयं हर हर वामो विधिर्भवतः ॥

"चंद्राचा उदय झाला असतां कोणाचें हृदय आनंदभरानें व्याप्त होत नाहीं? पण अशा वेळींहि जेव्हां तुझा संकोच होतो, तेव्हां, हे कमला तुझें दुर्दैव बलवत्तर ह्मटलें पाहिजे!" याप्रमाणेंच आमच्या द्विजराजाच्या वाणीचा रसानुभव घडण्यास ज्यांस समाज आडवा येतो ते एकेश्वरभक्तहि अत्यंत अनुकंपनीय मात्र होत!

सुचिंत्य चोक्तं सुविचार्य यत्कृतं । सुदीर्घकालेऽपि न याति विक्रियाम् ।[1]

अंक ५५–(१) मागील विषय पुढें चालू. (२) द्वैत व अद्वैत मतें. (३) त्यांच्या सत्यासत्यत्वाविषयीं विचार. (४) अद्वैत मत हें 'खऱ्या' भक्तीचें कितपत विध्वंसक होय याविषयीं विवेचन.

१. मागील अंकांत रा. ब. रानडे यांच्या 'केकावली'विषयक लेखावर आह्मीं आपले विचार वाचकांस सादर केले. आतां त्यांतील एका वाक्यावर मात्र चर्चा करणें राहिली आहे, तेवढी करून दुसरे आक्षेपक जे डॉ. विल्सन साहेब त्यांचा आमच्या कवीविषयींचा लेख कसा काय आहे तो पाहूं.

२. वरील वाक्य हें होय—"वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग हा खऱ्या ईश्वरभ-

---

मनें तशीं रंगलीं नसतात, त्यांजवर होणार नाहींत. अशा विचारानें पाहिलें असतां हें पुढील स्तोत्र, प्रौढ आणि रसिक काव्यांत गणिलें पाहिजे."

१. "चांगला विचार करून जें बोलावें व करावें तें दीर्घकालानेंहि विकार पावत नाहीं. ,

क्तीचा केवळ विध्वंसक होय." आमच्या देशांत द्वैत व अद्वैत या दोन मतांचा प्रचार प्राचीन काळापासून आहे हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. द्वैत मत ह्मणजे जीवात्मा व परमात्मा हे भिन्न होत हें होय; अद्वैत ह्मणजे ते अभिन्न ह्मणजे एकरूपच होत हें होय. पहिल्या मताचे प्रतिपादक असें ह्मणतात कीं, जीव हा अल्पज्ञ, अल्पसामर्थ्य, विकारवश असा असतां सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, व निर्विकार जो परमात्मा त्याशीं त्याचें ऐक्य कसें संभवेल? यास्तव त्यांची सदोदित भेदस्थितिच रहाणार, व दोहोंमधला सेव्यसेवकभाव हाहि नित्य होय. जीवात्म्यास मुक्ति तीनच. सलोकता, समीपता, आणि सरूपता; सायुज्य मुक्ति त्यास कदापि होणार नाहीं. अद्वैतवाद्यांचें ह्मणणें असें कीं, एका परमात्म्यावांचून अवघ्या विश्वांत दुसरा पदार्थच नाहीं, अवघें चराचर हा त्याचाच आविर्भाव असून सर्व जीव हे त्याचेच अंश होत.[१] ज्याप्रमाणें लाटा, बुडबुडे व गारा हे तिन्ही विकार एका उदकाचेच होत, व तिघांसहि पूर्वस्वरूपास मिळण्याची योग्यता आहे, त्याप्रमाणेंच सर्व जीवमात्र एका परब्रह्माचेच अंशभूत असून त्यांचा पृथग्भाव सरला असतां ते परमात्मस्वरूपास सहजच मिळणारे आहेत. हा पृथग्भाव अहंवृत्तीच्या ह्मणजे मीपणाच्या योगानें झालेला आहे. ह्मणजे वस्तुतः परमात्म्याशीं तादाम्य असतां जीवानें 'मी निराळा' अशी भावना बळकट धरल्यानेंच काय तो भिन्नभाव आलेला आहे. ज्या वेळेस त्यास स्वस्वरूपाचा बोध होईल त्या वेळेस गार विरून जसें पाणी होतें, त्याप्रमाणेंच अहंवृत्ति ही नष्ट होऊन जीवात्मा परमात्म्याशीं अभेद पावेल. तसेंच चोहोंकडे अफाट पसरलेलें जें हें चराचर विश्व तेंहि परमात्म्याच्या केवळ इच्छामात्रेंच उत्पन्न झालेलें असून जसा कोळी आपणच आपल्या शरीरापासून केलेल्या विस्तारास आवरूं शकतो, त्याप्रमाणेंच साऱ्या जगाचा आपल्या ठायीं लय करण्याचेंहि परमेश्वरास सामर्थ्य आहे!

वरील वाद आज शेंकडों वर्षें या देशांत चालू आहे. शैव व वैष्णव या मतभेदाचें बीज वरील वादच होय; पहिले अद्वैतवादी व दुसरे द्वैतवादी होत. माध्व व रामानुज हे द्वैतमती आहेत; आणि शंकराचार्याचे अनुयायी सर्व अद्वैतमताचा अभिमान बाळगतात. आमच्या महाराष्ट्र देशांत पाहिलें तर अद्वैताचाच सर्वत्र प्रचार आहे. महाराष्ट्र कवींपैकीं एकहि द्वैतवादी नाहीं. हिंदुस्थानाच्या बाहेरील राष्ट्रांत पहातां प्रायः द्वैतमताचाच प्रसार आहे; तरी मुसलमान लोकांत 'सूफी' ह्मणून एक पंथ आहे त्याची

---

१. मुकुंदराजानें ह्मटलें आहे—

तुझिये इच्छेचा विस्तार विस्तारिलें हें चराचर।
जीव अंशें अपार स्फुरसी तूं॥
प्रतिबिंबीं आभासक जैसा का तरणी सर्वत्र एक।
तैसा सर्व जीवासीं प्रकाशक परमात्मा तोचि॥

मतें व ग्रीक लोकांतला मोठा तत्त्वज्ञ जो प्लेटो त्याचे तत्त्वविचार हे अद्वैतालाच पुष्कळ अंशीं अनुसरून आहेत. तसेंच सुमारें दोनशें वर्षांपूर्वी इंग्लंडांत होऊन गेलेला प्रख्यात तत्त्ववेत्ता बर्कले याच्या उपपत्तिहि वेदांतालाच अनुकूल आहेत.

३. वर एवढा विस्तार करण्याचें प्रयोजन हें कीं, 'वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग' ह्मणजे कोणता तो वाचकांच्या चांगला लक्षांत यावा. तेव्हां यावरून वाचकांस कळून आलेंच असेल कीं, राववहादुरांचा रोख अद्वैतमतावर आहे. हें मत ईश्वरभक्तीचें विध्वंसक होय असा त्यावर आक्षेप होय.

रा. ब. रानडे हे प्रार्थनासमाजाचे एक अध्वर्यु आहेत हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. या समाजास ख्रिस्ती धर्मांतील तत्त्वें किती संमत आहेत, किंबहुना समाजाच्या उत्पत्तीचा या धर्माशीं कितपत संबंध आहे, हेंहि पुष्कळांस बहुधा सांगायाला नकोच. तेव्हां 'पृथ्वीवरील अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचा जो धर्म' त्यास परमसंमत जें द्वैतमत तें प्रस्तुत आक्षेपकांच्या मनांत कितपत बिंबलें असेल, व त्यामुळें तद्विरुद्ध मत त्यांस कितपत मान्य होण्याजोगें असेल, याचीहि कोणास सहज कल्पना होईल. आतां आमच्या महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांतून ओतप्रोत भरलेलें जें अद्वैतमत त्याच्या तर्फेनें राववहादूरप्रभृति आक्षेपकांस आमचें एक तर हें सांगणें आहे कीं, अनेक पवित्र व सत्य धर्मांस तें कितीहि असंमत असलें, व मिशनरी साहेबांनीं त्याजवर कितीहि नाकें मुरडलीं तरी जोंपर्यंत जीवात्म्याचें स्वरूप अमुक व परमात्म्याचें अमुक असें कोणाच्याहि प्रत्ययास आलें नाहीं तोंवर अद्वैत मत हें असत्यच असें कोणासहि ह्मणण्यास अधिकार नाहीं. ज्या दिवशीं रसायनज्ञांचीं यंत्रें आध्यात्मिक विषयांवर चालू होतील, व पंचमहाभूतांचें जसें अलीकडे पृथक्करण झालें आहे, तसें चैतन्याचें व जगच्चालक शक्तीचेंहि होईल, त्या दिवशीं द्वैताद्वैतप्रकरणाचा चोख निकाल होणार आहे. पण हें जोंपर्यंत होणार नाहीं, तोंपर्यंत अमुक खरें व अमुक खोटें असें आग्रहानें पाहिजे तर ह्मणावें, पण 'युक्ती'स धरून कोणासहि ह्मणतां येणार नाहीं. त्यांतून ज्या मताचे प्रतिपादक शंकराचार्यांसारखे शेकडों महान् महान् तत्त्वज्ञ होऊन गेले व ज्याची छाया द्वीपांतरींहि कोठें कोठें दृष्टीस पडते, त्याविषयीं निश्चयात्मक विरुद्ध उल्लेख करणें हें कांहीं अंशीं साहसात्मकच होय.

४. पण हें केवळ प्रस्तुत आक्षेपाच्या सामान्य स्वरूपाविषयीं झालें. साक्षात् त्याविषयींचा विचार तर याहूनहि जड जाण्यासारखा आहे. राववहादुरांच्या ह्मणण्याप्रमाणें पाहिलें असतां अद्वैत मत आणि खरी भक्ति यांचा परस्पर अत्यंत विरोध आहे; ह्मणजे ज्यानें अद्वैत मत अंगीकारिलें त्याच्या हृदयांत भक्तीनें ठाव सोडलाच ह्मणायाचें! खरेंच, जो एवढा 'निपट धृष्ट' बनला कीं आपण व ईश्वर एकच असें मानायाला लागला, त्याच्या ठायीं भक्ति कशी वास करील? जो दांडगा भक्त,

आधीं होता संतसंग तुका झाला पांडुरंग ।
असें म्हणायाला चुकत नाहीं,
त्याचें भजन राहीना मूळ स्वभाव जाईना ॥

हें संभवेल तरी कसें? तेव्हां 'विवेकसिंधु'कारापासून तों 'केकावली'कारापर्यंत 'पायलीचे पंधरा व अधोलीचे सोळा झालेले सर्व महाराष्ट्र कवि,' तसेंच आळंदी, पंढरपूर, काशी वगैरे ठिकाणीं आजपर्यंत यात्रेस गेलेले कोट्यावधि लोक, जगद्गुरु आचार्यांसारखे सर्व अद्वैतवादी, हे चट सारे अभक्तिमान् झाले! निदान यांच्यांत 'खऱ्या' भक्तीचा तरी लवलेशहि मिळायाचा नाहीं! या 'खऱ्या' भक्तीचें स्वरूप काय असावें याविषयीं आह्मीं पुष्कळ विचार करून पाहिला, पण अद्याप आह्मांस उमज पडत नाहीं. तुकाराम, नामदेव वगैरे मंडळी 'खरे भक्त' नव्हेत. 'केकावली'सारख्या काव्यांत 'खरी भक्ति' नाहीं, तर मग ही भक्तीची चीज आहे तरी कोठें? असें तर नसेल ना, कीं वासिस्मोदकाचें सेवन, त्वगग्राचें लवन, यज्ञसूत्राचें छेदन, अपूपसेवन, हीं महासाधनें जवळ केल्याव्यतिरिक्त 'खऱ्या भक्ती'चा बोध होणेंच नाहीं! अशी कांहीं गुरुकिल्ली असेल तर मग आह्मांस कबूल आहे, कीं आमचे सारे महाराष्ट्र कवि 'खऱ्या भक्ती'चें स्वरूप न जाणतांच निजधामास गेले, व तें आमच्या सारख्यांसहि समजण्याची बहुधा गोष्टच नको!

वरील वाक्य हें इंग्लंडांतल्या एखाद्या त्रैमासिकांत किंवा मिशनरींच्या एखाद्या पत्रांत आलें असतें, तर फारसा चमत्कार वाटण्यास कारण नव्हतें. कारण विलायतेंत मोठमोठ्या ग्रंथकारांसहि इकडच्या अगदीं साधारण गोष्टींचेंहि ज्ञान कितपत असतें, व त्यांतून मिशनरी साहेबांच्या मनांत तर आमच्या देशाविषयीं किती पवित्र कल्पना सदोदित घोळत असतात, हें सर्वांस महशूरच आहे. तेव्हां अशांनीं आमच्या देशांतल्या अद्वैतमताची बातमी ऐकली म्हणजे त्यांस सहजच त्याची तेव्हांच उपपत्ति करतां येणार आहे, कीं हा ख्रिस्तशत्रूचा प्रताप होय! त्याचा साऱ्या मनुष्यमात्रावर संमोहनास्त्र टाकण्याचा पहिल्यापासून उद्योग सतत चालूच आहे, आणि त्यांतून आमच्या हिंदुस्थानावर तर त्याची जी कृपा आहे ती कांहीं अतोनात! तेव्हां पूर्वी त्यानें आपण स्वतः जसा देवाशीं घट्टाईनें साम्ना केला व आपणास स्वपरिवारासह अक्षय नरकाग्नींत पाडून घेतलें, त्याप्रमाणेंच बिचाऱ्या हतभाग्य हिंदूंच्या मनांत आपण व देव हे एकच आहों अशा अत्यंत धृष्टतेच्या व पातकाच्या कल्पना तो भरवून देत असेल यांत नवल कसचें? याप्रमाणें तेव्हांच उपपत्ति करून एखाद्या पाश्चात्य पंडितानें जर असा सिद्धांत ठोकून दिला असता, कीं असलें दांडगाईचें मत ज्यांचे डायीं बिंबलें त्यांच्या ठायीं ईश्वरभक्तीचें नांव कशाला पाहिजे, तर तें शोभूनच गेलें असतें. कांकीं, दूरस्थ मनुष्यास कोणत्याहि गोष्टीचा एकदेशच प्रायः समजत असतो; तेव्हां त्याजपाशीं तर्कशास्त्र कड-

कडीत असलें ह्मणजे मग तो काय उपपत्ति करूं शकणार नाहीं? हव्या तितक्या करील. पण तसलें पांडित्य खुद्द तद्देशीयांनींहि करणें हें अत्यंत असमंजस होय. इकडील मनुष्यानें कोणीं ऐकिलें, कीं विलायतेंत व्हिग पक्षाचे लोक आहेत ते राजाला व प्रजेला समसमान लेखतात, या पक्षाच्या लोकांनीं एका राजावरच राजद्रोह शाबीत करून त्याचें डोकें तोडलें, व त्याच्या पुत्रास पुढें कांहीं वर्षांनीं देशोधडीस लावलें, जूनियस ह्मणून एक बहादर होता त्यानें तर खुद्द राजाला प्रजेच्या तर्फेनें पाहिजे तसें चापून पत्र लिहून वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें,—या सर्व गोष्टी ऐकून इकडे जर कोणीं असा तर्क केला कीं, इंग्रज लोक हे आपल्या राजाला केराबरोबर मानतात, तर त्यास फारसें नांव ठेवतां येणार नाहीं; कांकीं वरील गोष्टी अगदीं विलक्षण असून त्यांवरून दूरस्थ मनुष्यानें वरील अनुमान काढणें हें सहजच आहे. पण तिकडची स्थिति ज्यास नेहमीं डोळ्यांपुढें दिसते आहे त्यानेंहि वरीलच अभिप्राय प्रगट केल्यास चालेल काय? तर याप्रमाणेंच अद्वैतमताचें पुरतें स्वरूप लक्षांत न आणतां, व त्यास अनुसरणाऱ्या लोकांचा आचार पहातां आपल्या उपपत्तीस ताळा मिळतो कीं नाहीं याचाहि फारसा विचार न करतां केवळ आग्रहपूर्वक एखादा उल्लेख साऱ्या राष्ट्राच्यासंबंधानें करणें हें केवढें साहस होय! अद्वैतवाद्यांनीं केवळ उपपत्तीच्या द्वारें जीवात्म्याचें व परमात्म्याचें ऐक्य मानलें ह्मणून व्यवहारदृष्ट्या कोणता भेद झाला? रसायनवेत्त्यांनीं हिऱ्याचें आणि कोळशाचें ऐक्य स्थापित केलें ह्मणून जवाहिऱ्यांचीं दुकानें बसलीं काय? किंवा हिऱ्यांचे दागिने अंगावर घालतांना कोणास आपलें आंग काळें होईल असा धाक वाटला काय? कोणी पदार्थविज्ञान शिकून तयार झाला, आणि हें तत्त्व त्याच्या मनांत पक्कें बिंबलें, कीं पदार्थ निराधार असले ह्मणजे पडतात हें अगदीं खोटें आहे; तर असला मनुष्य आपल्या घराच्या आड्यावर चढून किंवा एखाद्या कड्यावर जाऊन तेथून खालीं उडी मारील हें संभवतें काय? त्याला जर कांहीं अक्कल ह्मणून असेल तर त्यास सहज कळेल कीं, न्यूटनचा सिद्धांत कितीहि खरा असला, तरी वरच्यासारखी उडी मला मारतां कामा नये. जोंपर्यंत मी या पृथ्वीवर आहें व तिजपासून कोट्यावधि कोस दूर अंतरालांत जाऊन रहाण्याचें मजमध्यें सामर्थ्य आलें नाहीं, तोंपर्यंत माझ्या अंगीं पतनोन्मुखता असली काय, किंवा पृथ्वीच्या अंगीं आकर्षणशक्ति असली काय, मला दोन्ही सारखींच आहेत. आरिस्टॉटलचें मत खरें असलें किंवा न्यूटनचें खरें असलें, तरी माझी तंगडी मोडायाची ती मोडेलच! हीच गोष्ट द्वैत व अद्वैत या मतांसहि लागू आहे. कोणतेंहि मत घेतलें तरी देव व मनुष्य यांचा पूज्यपूज्यकभाव सुटत नाहीं. द्वैतवाद्याच्या मतें वरील भाव तर सिद्धच आहे; अद्वैतवाद्याच्या मतें तरी द्वैत घालविण्याचा उपाय ईश्वरभजनच होय! अद्वैतवादी असें ह्मणणारा तर कोणी अद्याप निपजला नाहीं, कीं मीं सर्व सृष्टि निर्माण केली, सारीं महा-

भूतें माझ्या सत्तेनें आपापलें काम बजावीत आहेत, मी सर्वशक्तिमान व सर्वज्ञाता आहें! एवढे अद्वैतवादधुरीण शंकराचार्य, पण त्यांनींहि आपल्या शिष्यवर्गाकरतां ईश्वरोपासनानिमित्त अनेक स्तोत्रें करून ठेविलीं आहेत. उघडच आहे कीं, सोनें ह्मणून कोणापुढें जर अशोधित धातूचें एक ढेकूळ आणून टाकलें, तर त्यानें लागलीच सोनारास बोलावयास जाऊं नये; अगोदर भट्टी तयार करून रसायनक्रियांच्या तजविजीस लागावें, मग जशी भट्टी उतरेल तसें सोनें बनेल. आमच्या शूद्रकवीनें ह्मटलें आहे—

ब्रह्मज्ञान नव्हे लेंकराच्या गोष्टी । तेथें व्हावा पोटीं अनुताप ॥
दगडाहुनि जीव करावा कठीण । अंतरींचा शीण तेव्हां जाय ॥
मेल्या मनुष्याची न धरती आस । तैसा हो उदास संसारासीं ॥
तुका ह्मणे येथें करारांचें काम । मग आहे राम जवळींच ॥

तसाच पुढील जनभाषेंत रूढ झालेला अभंग—

चणे खावे लोखंडाचे । मग ब्रह्मपदीं नाचे ॥

तेव्हां केवढाहि निःसीम अद्वैतवादी असला तरी त्यास भक्ति सुटत नाहीं; द्वैताचें मालिन्य झडून अद्वैत सिद्ध होण्यास वरीलच काय तो उपाय होय. व्यवहारांत पहातां हाच प्रकार आढळतो. वैष्णवांपेक्षां शैवांत कर्मकांडाचा प्रचार कमी आहे अशें नाहीं; तसेंच आमच्या महाराष्ट्र देशांतील कवींनीं अद्वैतावर किंतीहि कटाक्ष ठेवला तरी त्यांनीं भक्तीचा निषेध कोठेंहि केला नाहीं. उलटें जेथें तेथें तिचें माहात्म्यच वर्णिलेलें आढळतें. मग इतकें सर्व असून 'हें तत्त्वज्ञान भक्तीचें केवळ विध्वंसक होय' या वाक्याचा अर्थ काय समजावयाचा? उपपत्तिदृष्ट्या वरील विध्वंसकता सिद्ध होत नाहीं, आणि व्यवहार तर वरील वाक्याच्या अगदीं उलट नजरेस येतो, मग उक्त वाक्याची प्रतीति घ्यावयाची तरी कोठें?

आतां प्रस्तुत आक्षेपकांचा असा आशय असला तर न जाणों, कीं खऱ्या एकेश्वरास सोडून सतराशें साठ देवांस जें भजणें ती भक्ति कसची? अलीकडील एकोणिसाव्या शतकांतल्या देवाची सुधारलेल्या रीतीनें उपासना न करतां माजी नेटिव देवांस जुन्या खुळ्या रीतीनें भजणें काय कामाचें? असा कांहीं रावबहादुरांचा अभिप्राय असल्यास मग कांहीं बोलणें उरलें नाहीं. जर आमच्या अद्वैतवाद्यांस खरा देव मुळीं सांपडलाच नाहीं, तर मग ते खरी भक्ति करतात तरी कसची? मृगजळच जर मुळीं खोटें, तर मग त्यांत स्नान केल्याची प्रतिष्ठा ती काय वर्णायाची आहे? या आक्षेपांवर एवढें मात्र ह्मणतां येईल, कीं ईश्वराचें स्वरूप सर्व जग जें सामान्यतः समजतें, त्यावरून पहातां, कोणी कशाहि रीतीनें त्याचा स्तव केला तरी तो त्यास मान्य व्हावा असें वाटतें. ऐहिक प्रभूंकडे कोणास अर्ज करायाचा असला, तर तो जसा

अमुक तऱ्हेनेंच गेला पाहिजे, त्यावर मायना अमुक तऱ्हेचाच असला पाहिजे, अशा शेंकडों भानगडी असतात, व तसें कांहीं नसलें ह्मणजे अजेदारावर अर्धचंद्रप्रयोग होण्याचें भय असतें, तसा कांहीं प्रकार या थोरल्या दरबारांत बिलकूल नाहीं असा एकंदर जगाचा अभिप्राय दिसतो. आतां हें खरें, कीं जुना करार, नवा करार, कुराण, जेंदावेस्ता, वेद या सर्वांचें आपल्या परिपक्व बुद्धीनें घाटण करून आमचे नूतन सामाजिक जसें आपल्या एकेश्वरास भक्तीचें मसालेदार खाद्य देतील, तसलें आमच्या जुन्या भक्तमंडळीकडून कोठून मिळणार? त्यांस धड ना व्युत्पत्ति, ना शास्त्रज्ञान, ना व्याकरण; जसे अर्धबोबडे दोन शब्द वेडेवांकडे त्यांस सुचतील तसे त्यांनीं बोलायाचे! तरी पण 'भक्ती'चा अर्थ आह्मांस जो कळतो त्यावरून पहातां तिचा अंश आमच्या भावड्या भक्तमंडळींत जितका सांपडेल, तितका मोठमोठ्या सुधारलेल्या समाजांतून आढळेल कीं नाहीं, याचा अ.ह्मांस संशयच आहे. पूर्वी सोमनाथ, मथुरा वगैरे ठिकाणीं कुराणवाल्यांनीं जशी खऱ्या देवाप्रीत्यर्थ धुमाळी केली, तसें एखादें वावटळ पुढें कधीं काळीं पुनः सुटलें ह्मणा; तर अशा प्रसंगीं विश्वेश्वर, महाकालेश्वर, जगन्नाथ, विठोबा वगैरे देवांच्या संरक्षणार्थ जितकी मंडळी गोळा होईल, तितकी प्रार्थनासमाजमंदिराच्या किंवा दयानंदस्वामी, जोतिबा फुले यांच्या पुतळ्यांच्या बचावाकरितां जमेल काय? आमच्या जुन्या वेडगळ धर्मानें सुलतान महंमद, अवरंगजेब, टिपू सुलतान असल्या जाडी इसमांचा छळ सोसला, व पोप साहेबांच्या शिष्यांनींहि शक्त्यनुसार त्याचा बराच उच्छेद मांडला असतां त्यांतूनहि तो पार पडला; तसला उगीच थोडासा प्रयोग आमच्या 'खऱ्या भक्तिमान्' अर्वाचीन मंडळीवर होण्याचें जर चिन्ह दिसूं लागलें, तर ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधकसमाज, यांच्या दप्तरांतील पटांवर कितीशीं नांवें उरतील बरें? उद्यां जर 'इसापनीती'तील वायू-सूर्यांच्या भांडणाप्रमाणें विठोबाचा व एकेश्वराचा वाद जुंपून कोणावर आपल्या भक्तांचें अधिक प्रेम आहे हें त्यांनीं पहाण्याचें मनांत आणलें आणि पंढरपुरच्या देवळाच्या गाभाऱ्यांत व प्रार्थनामंदिराच्या सभास्थानीं असा नाद घुमला कीं पुढील सालच्या अमुक दोन दिवसभर आमच्या भक्तांनीं कडकडीत उपास करावा, तर पारण्याचा तिसरा दिवस उजाडेपर्यंत कोणत्या देवाच्या भक्तांचा धीर निघेल? आह्मांस खचीत वाटतें कीं, तिसऱ्या दिवशीं देवापुढें हजर होण्याचे वेळेस कोणी भक्तजन तरी त्यास असें सांगणारे भेटतील कीं, 'असल्या विलक्षण अटी आह्मी कधीं सोसणार नाहीं; त्यांतून आह्मी समाजांतील उपासक असलों ह्मणून इतकी घस आह्मी आपल्या अंगाला लावून घेतलीच पाहिजे असें कांहीं ठरत नाहीं!' सारांश, आमच्या नवीन भक्तांस ईश्वराविषयीं कदाचित् अधिक यथार्थ ज्ञान झालें असेल, त्यांनीं दुर्बिणींतून व सूक्ष्मदर्शकांतून त्याच्या चातुर्याची व सामर्थ्याची अधिक पारख केली असेल, सेंटपॉलच्या

देवालयांतील व्यासपीठावर नेऊन उभे केले असतां ते मोठें रसभरित 'सर्मन' देतील, दी. दी. च्या परीक्षेंत शेंकडा नव्वद मार्क झोडतील, हें सर्व त्यांच्या ठिकाणीं संभवेल; पण 'खरी भक्ति' ही जर शब्दार्थज्ञानापलीकडे कांहीं असेल, तिचा संबंध मानसिक वृत्तींपेक्षां हृदयवृत्तींशी जर विशेष असेल, ती केवळ भाषणानें जर सिद्ध होत नसेल तर तिचें वास्तव्य घेरेदार मंडळींत व बूटस्टॉकिंगवाल्या खाशा विद्वानांत फार करून थोडेंच दृष्टीस पडेल—

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥

असल्या अटीचे बाणेदार शिपाई जर पहायाचे असले तर तुकोबा, ग्यानोबा यांच्या कंपूंतच ते आढळणार!

आतां 'खऱ्या भक्ती'चें एक मात्र स्वरूप सांगण्यासारखें राहिलें आहे. तेवढें सांगून प्रस्तुत प्रकरण आटपतों. मागील अंकांवरून वाचकांस कळलेंच आहे कीं, 'केकावली'त मोरोपंतानें ईश्वरांत व आपणांत किती अंतर आहे तें न ओळखून त्याशीं सलगी केली आहे. ही सलगी अद्वैतमताचा परिणाम होय व 'खऱ्या भक्तीस' विरुद्ध होय, असा रावबहादुरांचा रोंख दिसतो. आतां या आक्षेपाच्यासंबंधानें पूर्वी एक गोष्ट तर वाचकांस कळविलीच आहे कीं, ईश्वरामध्यें व मनुष्यामध्यें कितीहि अंतर असलें तरी तें अंतर सार्वभौम राजामध्यें व त्याच्या मुलामध्यें जसें असतें तसें होय. भर दरबारांत बाप आपल्या अमीरउमरावांबरोबर बसला असतां मुलानें बापाकडे दुडदुडां धांवत जाऊन अंकारोहण केलें, किंवा कांहीं लडिवाळपणाचें भाषण केलें, तरी त्या सलगीबद्दल मुलाचें पारिपत्य होण्याचें जसें भय नको; त्याप्रमाणेंच आमच्या देशांतील कवींनीं ईश्वराचा गुणानुवाद करतांना प्रसंगानुसार जरी कांहीं अतिप्रसंग केला असला, तरी त्यांवर ह्मणजे मोठा दोष येतो असें आह्मांस वाटत नाहीं. त्यांतून 'केकावलि' काव्य पूर्वीच्या एकंदर पद्धतीवर व तशा लोकांकरतांच रचिलें असल्यामुळें त्यांत अर्वाचीन भक्तजनांस अतिप्रसंग वाटण्यासारखा जरी प्रकार मधें मधें असला, तरी काव्याची रसहानि होत नाहीं, हेंहि मागें सांगण्यांत आलेंच आहे. आतां ही सलगी अद्वैतमतापासून झालेली आहे. हें जें ह्मणणें आहे त्यावर एक तर अशी अडचण येणार आहे कीं, आमच्या देशांत वैष्णवांचीं काव्यें पाहिलीं असतां तीं तरी प्रकृत दूषणापासून मुक्त आहेत असें नाहीं. त्यांतहि वादविषयक काव्यांतला प्रकार किंबहुना त्याहूनहि अधिकच आढळेल. उदाहरणार्थ वेंकटाध्वरीचें 'लक्ष्मीसहस्र' घ्या. या काव्याची पंडित लोकांत पुष्कळ ख्याति आहे. यांतील भक्त्युद्गारांविषयीं अशी आख्यायिका आहे कीं, 'चंडिकाशतक' रचल्यानें बाणभट्टास जसे पुनः पाय आले व 'गंगालहरी'च्या श्रवणानें सुप्रसन्न होऊन भागीरथीनें जगन्नाथरायास यवनीसहवर्तमान प्रत्यक्ष पावन करून घेतलें, त्याप्रमाणें 'लक्ष्मीसहस्रा'नें वरील द्रविड कवीस पुनः डोळे आले!

ही आख्यायिका प्रस्तुत काव्य वैष्णवांस किती प्रिय आहे हें दर्शविते. दुसरा वैष्णवप्रिय ग्रंथ पाहिजे असल्यास 'गीतगोविंद' आहे. यांतील अष्टपद्या कर्नाटकांत आबालवृद्धांस येत असतात व स्त्रियासुद्धां गातात. आतां या दोन्ही ग्रंथांत उपास्य देवतेविषयींचा कवीचा भाव पाहिला असतां तो रावबहादुरांस आवडण्यासारखा आहे असें नाहीं. तो प्रार्थनासमाजांतील उपासनेसारखा मोठा मर्यादेचा व नम्रपणाचा नसून प्रस्तुत 'केकावली'तल्यासारखाच अत्यंत सलगीचा आहे. फार तर काय, पण पहिल्या काव्यांतील शृंगारस्तबक व दुसऱ्यांतील बहुतेक भाग यांतील वर्णनास 'सलगी' हा शब्द तरी मोठ्या मुरवतीनेंच लावायाचा! असो; तर या दोन उदाहरणांवरून अद्वैतावर जें प्रस्तुत दूषणाचें जनकत्व घातलें आहे तें बरोबर नाहीं असें स्पष्ट दिसून येईल.

आमच्या कवीच्या तर्फेचा दुसरा पुरावा 'पृथ्वीवरील अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचें जें पवित्र धर्मपुस्तक' त्यावरूनहि घेण्यासारखा आहे. वेदांतशास्त्राचा व 'बैबला'चा किती विरोध आहे हें सांगावयास नकोच. पहिल्याचा सिद्धांत जो कीं सर्व जीव व एकंदर विश्व हें परब्रह्माचाच आविर्भाव होय, त्याच्या अगदीं विरुद्ध बैबलांतील लेख आहेत. 'पवित्रशास्त्रा'च्या पहिल्या दोन अध्यायांत एकंदर सृष्टि व मनुष्यजाती यांची उत्पत्ति वर्णिली आहे; तिजवरून वरील विरोध स्पष्ट लक्षांत येण्यासारखा आहे.[1] तेव्हां सदरील ख्रिस्ती शास्त्र हें पूर्ण द्वैतमय आहे हें उघडच आहे. पण असें असतां रावबहादुरांनीं खऱ्या भक्तीचीं लक्षणें ह्मणून सांगितलेल्या ज्या हृदयवृत्ति—ह्मणजे भयचकितता, अत्यंत नम्रीभाव इत्यादि त्या वरील पवित्र ग्रंथांत सर्वत्र दृष्टीस पडतातच असें नाहीं. पहिला मनुष्य जो आदम त्यापासून तों त्याची पुढील संतति जे देवाचे आवडते लोक यहुदी त्यांच्या वृत्तांतापर्यंत पहातां देव हा मनुष्याचा संवगडी होय किंवा पुढारी होय अशी कल्पना 'पवित्र शास्त्रा'वरून होते. देव हा संध्याकाळच्या थंडगार वेळीं आपण नवीन केलेल्या बागेंत हवा खावयास येत असे तेव्हां आदम व त्याची स्त्री इव्ह या उभयतांचा समाचार घेई,[2] त्यांचा मुलगा हाबेल यानें कोवळीं व पुष्ट कोकरें देवास अर्पण करावीं तीं

---

१. "प्रारंभीं देवानें आकाश आणि पृथ्वी हीं उत्पन्न केलीं." (उत्पत्ति–अध्याय १-ओंवी १.)
"तेव्हां परमेश्वर देवानें भूमितील मातीचा माणूस घडिला, आणि त्याच्या नाकपुड्यांमध्यें जिवाचा श्वास फुंकिला, मग माणूस श्वासवान् जीव झाला." (उत्पत्ति–अ० २–ओं० ७).

२. "नंतर दिवसांतील वाऱ्याच्या वेळेस परमेश्वर देव बागांत चालत असतां त्याचा शब्द त्यांनीं ऐकिला; तेव्हां आदाम व त्याची बायको हीं परमेश्वर देवाच्या दृष्टीपासून बागांगील झाडांच्यामध्यें लपालीं. तेव्हां परमेश्वर देव आदामाला हाक मारून त्याला बोलला, तूं कोठें आहेस! तेव्हां तो बोलला कीं, म्यां बागामध्यें तुझा शब्द ऐकिला आणि मी नागवा यास्तव भ्यालों व लपालों. ....." (उत्पत्ति–अध्याय ३ रा.)

त्यानें प्रीतीनें घ्यावीं, नोहास त्यानें नौकेची कल्पना सांगून त्यास एकट्यास जलप्रलयांतून वांचविलें, मोझ्यास सीना पर्वतावर त्यानें दहा आज्ञा सांगितल्या, मिसरी लोकांच्या दास्यांतून सोडवून यहुदी लोकांस स्वदेशास आणतांना त्यानें तांबडा समुद्र दुभंग केला, आणि कधीं 'जळत्या झुडपां'त दिसून, कधीं 'ढगांचा खांब' व कधीं 'अग्नीचा खांब' होऊन तो त्यांस मार्गदर्शक झाला,—या सर्व वृत्तांतावरून पहातां रावबहादुरांच्या देवाची प्रतीति होत नाहीं. आकाशांतून क्षणोक्षणीं आपल्या आवडत्या लोकांच्या साह्यार्थ खालीं उतरणारा, व त्यांशीं अतिपरिचिताप्रमाणें बोलणारा देव झटला ह्मणजे आमच्या अर्जुनाचे घोडे खाजवणारा, विदुराच्या गृहीं जेवणारा, बेदरचें पोतें भरणारा जो आमचा हिंदु देव त्यासारखाच 'जुन्या करारां'तला देव झाला. ख्रिस्ती लोकांस विशेष संमत जो 'नवा करार' त्यांत पहातांहि देवाचा सुलतानी थाट फारसा दृष्टीस पडत नाहीं. त्यांत तर मुळीं देव जो भूलोकावर अवतरला तो रूमशामसारख्या बादशाहाच्या पोटीं येऊन मोठ्या समारंभानें प्रगट झाला असें मुळींच नसून एका गरीब कुमारीचे पोटीं आला व गवताच्या गव्हाणींत जन्मास आला. पुढें तरी ईश्वराचें किंवा ईश्वरपुत्राचें त्यानें वैभव चोहोंकडे मिरविलें ह्मणावें तर तेंहि नाहीं. तीस वर्षांपर्यंत विशेष प्रसिद्धीस न येतांच येशूनें दिवस घालविले; नंतर शेवटल्या तीन चार वर्षांत लोकांस स्वर्गमार्गाचा उपदेश करून व त्यांच्यापासून छळ पावून शेवटीं त्यानें मनुष्यजातीकरितां देहांत प्रायश्चित्त भोगलें! या शेवटल्या वर्षांत येशूचा व त्याच्या शिष्यांचा परस्पर संबंध जो शुभवार्तिकांच्या लेखांवरून दिसून येतो तो वरील 'भयचकिते'चा व अत्यंत 'नम्रीभावा'चा मुळींच नसून सॉक्रेटीस व त्याचें शिष्यमंडळ यांच्यासारखाच केवळ दिसतो.[1] तेव्हां एकंदरींत सांगायाचें काय कीं, जर 'पवित्र शास्त्रां'तहि देवाविषयींच्या समजुती वर सांगितल्याप्रमाणें दृष्टीस पडतात, तर आमच्या अपवित्र नेटिव शास्त्रांतून व नेटिव काव्यांतून त्या तशाच आढळल्यास नवल कसचें!

५. आतां दुसरे आक्षेपक डॉ. विल्सन यांचा लेख वाचकांस सादर करतों. हे साहेब कोण व पुढील लेख कशांतला हें मागें सांगितलेंच आहे.

"If the reign of Shivaji, the Maratha, was honoured by the appearance of the greatest Marathi poet from the common orders of the people, the reign of the first Brahman Peshwah,—who was established in his administration in the year 1717—

१. सॉक्रेटीस व ख्रिस्त यांच्या चरित्रांत पुष्कळ साम्य आढळतें. दोघांचा जन्म हलक्या कुळांत होऊन दोघांनींहि आपलें आयुष्य लोकांत सन्मार्गाची प्रवृत्ति करण्याकडे खर्चिलें. दोघांचाहि शिष्यपरिवार त्यांचे ठायीं अत्यंत भक्ति धारण करणारा असा होता. दोघांनीं लोकांचा छळ सोसून दोघांचा शेवट देहांतशासनानेंच झाला. सॉक्रेटीस यास Forerunner of Christ (ख्रिस्ताचा जासद) असें जें ह्मणतात तें वरील चरित्रसादृश्यावरूनच होय.

was honoured by the appearance of the greatest Marathi poet from the priestly order. This was Mayur Pandit, or Moropant, of Baramati in the Deccan. He belonged to a tribe of Brahmans, the Karhadi, having no great pre-eminence in the Maharashtra, but he has become the great favourite of all the Brahmans since his day.[1] He is the lord of the Arya .metre, in which he copiously writes, with power and ease, drawing his ideas from the Ramayana, Mahabharata and Bhagwata, so often mentioned as the sources of Marathi excitement, and but seldom improved upon either in thought or feeling. He has undoubtedly great command of the Marathi language, which he sometimes prostitutes by indulging in such poetical conceits as acrostics, and by writing without the use of the labial letters, introducing the conjunction परंतु (but) into every line, and by commencing each line of his verse by the l st word of the preceding line. Though a follower of Vishnu, he wrote with respect for the other deities, for whom, such as Shiva. the acute and intelligent Konkani or Chitpawan Brahmans, in full power at Poona, had a special regard. The rise of the Peshwas indeed, was the signal for the Marathi bards,—who had nothing like the heavenborn light and fire of the Hebrew prophets,—altering their tune. Moropant is said to have lived to the age of sixty, and to have died about a hundred years ago. One of his books held in most estimation is the Mayur Kekawali, the Trumpeting of the Peacock, so called from his own name. It is devoted principally to the extolment of Krishna."

("शिवाजीच्या राज्यांत ज्याप्रमाणें शूद्र लोकांत उत्पन्न झालेल्या महाराष्ट्र कवींमध्यें अत्यंत विख्यात जो तुकाराम तो निपजला, त्याप्रमाणें पहिल्या पेशव्याच्या कारकीर्दीत, कीं जिचा आरंभ इ. स. १७१७ त झाला तींत ब्राह्मणज्ञातींतला अत्यंत विख्यात कवि जो मोरोपंत तो जन्मास आला. या कवीचें वास्तव्य बारामती मुक्कामीं होतें. तो कऱ्हाडा होता. या ब्राह्मणज्ञातीचें महाराष्ट्रांत मोठेंसें वजन नाहीं; तरी प्रस्तुत कवि निवर्तल्यापासून तो सर्व ब्राह्मणांस अत्यंत प्रिय झाला आहे.[2] यास आर्या-

१. "Parashuram pant Godbole says of him (Navanit, P. 165). प्राकृत कवितांमध्यें मोरोपंताच्या कवितेसारखी कविता नाहीं. So much for the conquest of prejudice by the talent of the poet!"

२. "प० शुरामपंत गोडबोले यांनीं (नवनीत–पृष्ठ १६५) वरील कवीविषयीं असें लि-

(पुढें चालू).

पति ह्मणतात. या छंदांत त्यानें पुष्कळ कविता केली आहे; ती चटकदार असून अगदीं सहज केल्यासारखी दिसते. रामायण, महाभारत, आणि भागवत, हे ग्रंथ महाराष्ट्रवासी जनांस अत्यंत आल्हादप्रद होत हें सुप्रसिद्धच आहे; याच ग्रंथांतील विचार घेऊन प्रस्तुत कवीनें ते मराठींत उतरून दिले आहेत. तरी या ग्रंथांपेक्षां अधिक प्रौढ विचार किंवा विशेष सरस वर्णन हीं त्याच्या काव्यांत फारकरून आढळत नाहींत. महाराष्ट्रभाषाहि प्रस्तुत कवीची केवळ अंकित होऊन राहिली होती हें खरें आहे पण तिचा त्यानें कोठें कोठें अपव्यय केलेला आढळतो; तो असा कीं कोठें नियमित अक्षरें साधलेलीं, कोठें निरोष्ठ रचना केलेली, कोठें प्रत्येक पद्यांत 'परंतु' घालून दिलेलें, कोठें पूर्वपद्यांतींचा वर्ण पुढील पद्याच्या आरंभीं योजलेला,–इत्यादि प्रकार त्याच्या कवितेंत आढळतात. तो जरी विष्णूचा भक्त होता तरी इतर देवतांविषयींहि त्यानें आपली पूज्यत्वबुद्धि प्रगट केली आहे; या देवांतीलच एक जो शिव त्याविषयीं पुण्यास भरभराट पावलेले जे चाणाक्ष व कुशाग्रबुद्धि चित्पावन ब्राह्मण (पेशवे) त्यांची विशेष भक्ति होती. महाराष्ट्र कवींचे ठायीं यहुदी भविष्यवाद्याच्याप्रमाणें ईश्वरप्रेरित ज्ञान व स्फूर्ति हीं बिलकूल नव्हतीं, तेव्हां पेशव्यांचा अभ्युदय होतांच त्यांनीं त्यांच्या आवडत्या देवांकडे आपल्या भक्तीचा ओघ वळविला यांत कांहीं आश्चर्य नाहीं ! मोरोपंत हा साठ वर्षांचा होऊन वारला व या गोष्टीस आज (सन १८५७) सुमारें शंभर वर्षें होऊन गेलीं आहेत असें ह्मणतात. त्याचा अत्यंत मान्य असा ग्रंथ ह्मटला ह्मणजे 'केकावली' हा होय. या शब्दाचा अर्थ 'मोराचा टाहो' असा आहे, व हें नांव कवीच्या नांवावरूनच दिलें आहे. या ग्रंथांत मुख्यतः कृष्णाचें माहात्म्य वर्णिलें आहे.")

कनकभूषणसंग्रहणोचितो यदि मणिस्त्रपुणि प्रणिधीयते ।
न स विराजति न चापि हि शोभते भवति योजयितुर्वचनीयता ॥[1]

अंक ५६.–(१) विषयोपन्यास. (२) अर्वाचीन पांडित्याचा प्रकार. ३) मिशनरींची स्थिति. (४) विल्सन साहेबांच्या लेखावर दूषणें. (५) प्रस्तुत कवीविषयीं आणखी कांहीं मतें.

१. मागील अंकांत डॉ० विल्सन साहेबांचा प्रस्तुत कवीविषयींचा लेख वाचकांस सादर केला. आतां त्यांतील तथ्यातथ्याचा विचार करूं.

२. वरील विचार करण्यापूर्वी युरोपियन व विशेषतः मिशनरी लोकांच्या संबं-

---

हिलें आहे–'प्राकृत कवितांमध्यें मोरोपंताच्या कवितेसारखी कविता नाहीं.' या वाक्यावरून स्पष्ट दिसतें कीं, प्रस्तुत कवीच्या जातीवरून उत्पन्न होणारा जो ग्रह तो त्याच्या काव्यचातुर्याच्या योगानें अलीकडे नाहींसा झाला आहे."

१. "सोन्याच्या दागिन्यांत घालण्याम योग्य असें जें रत्न तें जर शिशाच्या कोंदणांत बसविलें, तर तें रत्न रडतें असें नाहीं, व तेथें शोभा पावतें असेंहि नाहीं, तर योजकाच्या चातुर्याची मात्र चर्चा होते !"

धानें कांहीं गोष्टी वाचकांस कळविणें जरूर आहे; त्या लक्षांत आणल्या असतां प्रस्तुत लेखाचें स्वरूप वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. आमच्या देशांत पाश्चात्यांचें प्रभुत्व झाल्यापासून एक मोठा चमत्कार दृष्टीस पडूं लागला आहे कीं, ज्ञानसंपादन हें पूर्वी जें महत्प्रयासाचें काम असे, तें अलीकडे एकाएकीं अत्यंत सुगम झालें आहे! अलीकडे यंत्रविद्या उत्कृष्ट दशेस येऊन पूर्वीचे महिन्यामहिन्यांचे प्रवास हल्ला जसे एकेका दिवसांत सहज उरकतात, त्याप्रमाणेंच विद्यादेवीच्या मुलखांतहि अशा कांहीं यांत्रिक योजना सुरू झाल्या आहेत कीं काय नकळे! पूर्वी शास्त्राध्ययनास झटलें ह्मणजे तपांचीं तपें लागत असत; ह्मणजे बारा बारा चोवीस चोवीस वर्षें घालवावीं तेव्हां दोन चार शास्त्रांत गति होत असे! हल्लींचा प्रकार पाहिला तर चार वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें या सर्वांचें ज्ञान होण्यास पराकाष्ठा चार पांच वर्षें! हें तर काय, पण एशिया खंडांतील सारी विद्या सुद्धां एका मनुष्यास तादृश प्रयास न पडतां पटकावतां येते! युरोपांतील स्थिति पाहिली तर तेथील विद्या अद्याप इकडच्या सारख्या सुगम झाल्या आहेतसें दिसत नाहीं. तेथील विद्यालयांतून जुन्या ग्रीक व रोमन विद्यांचा जरी अभ्यास सतत चालू आहे, व इकडे संस्कृताचें जसें होत चाललें आहे, त्याप्रमाणें तिकडे सामान्यतः पहातां ग्रीक व ल्याटिन या भाषांचें ज्ञान जरी पुष्कळांच्या ठायीं आढळतें, तरी वरील दोन विद्यांत महापंडित ह्मणून आजपर्यंत गाजलेले फारच थोडे निघतील! नुसत्या इंग्लंडांत पाहिलें तर असलीं विद्वद्रत्नें आजपर्यंत फार तर चारपांचच झालीं असतील! उघडच आहे; इकडे पेशवाईत शास्त्रविद्येस इतकें उत्तेजन होतें, पण सगळ्या कारकीर्दींत साऱ्या देशभर गाजलेले भट्टाचार्य किती निपजले असतील? पण हल्लींच्या मन्वंतरांत ती स्थिति अगदीं बदलून गेली आहे. एकोणिसाव्या शतकांत पंडित बनवण्याची कृति फारच सुलभ झाली आहे. सरासरी व्युत्पत्ति पैदा करावी, युरोपियन लोकांनीं रचलेल्या पांचपन्नास ग्रंथांतून सटरफटर गोळा करावें, जुने एक दोन पंडित जवळ करावे कीं आटपलें! मग व्याख्यान देण्याचा प्रसंग येवो, ग्रंथरचना करण्याचें अगत्य पडो, कांहींहि असो; वरील सामग्री जवळ असली ह्मणजे मग कसलीहि पंचाईत नाहीं! सारांश, अर्वाचीन पांडित्य हें सरासरी गौडबंगाल झालें आहे. पण इतकें असून तें सामान्य लोकांस उमगण्याचा मार्ग राहिला नाहीं. कांकीं, अलीकडील लोकांस स्वतः तर त्यांत मुळींच गम्य नाहीं, तेव्हां 'सर्वान् पुच्छवतो हयानिति वदंत्यत्राधिकारे स्थिताः' अशी त्यांची स्थिति झाली आहे. ज्या थोड्या लोकांस ह्मणजे जुन्या पंडितांस वरील लटपट कळण्याचा संभव ते तर अगोदर दिवसेंदिवस नाहींसेच होत चालले आहेत. जे कोणी थोडे कोठें कोठें आढळतील त्यांस अगोदर इकडची वार्ताहि कळण्याचा संभव नाहीं; त्यांतून कोणास कळलींच तर त्या बिचाऱ्यांचें अलीकडील 'जुक्ती'पुढें काय चालणार? "शास्त्रीबोवा, पृथ्वीवर समुद्र किती आहेत?"

ह्मणून प्रश्न केल्यावरोवर शास्त्रीबोवांच्या ज्ञानाची तेव्हांच परीक्षा होणार! तर याप्रमाणें आमच्या प्राचीन विद्यांत निष्णात ह्मणविणाऱ्या मंडळींची स्थिति आहे.

३. डॉ० विल्सनसारख्या मिशनरींची तर वरच्याहूनहि अधिक पायरी. त्यांनीं इंग्लंडचें व हिंदुस्थानचें मोठेंच काम पतकरलें असल्यामुळें पाश्चात्य व प्राच्य विद्या त्यांस केवळ करतलामलकवत् असल्या पाहिजेत! इकडील एखाद्या शिष्यानें तिकडची कोणतीहि गोष्ट विचारली तरी ती त्यांस सांगतां आली पाहिजे; व तिकडच्या कोणी पंडितानें किंवा मंडळीनें इकडची कोणत्याहि तऱ्हेची माहिती पुसली तरी तीहि त्यांस माहीत नसतां उपयोगी नाहीं. तेव्हां दोन्ही खंडांच्या संबंधाचें हरएक प्रकारचें ज्ञान असावें तेव्हां शुभवर्तमानाच्या प्रेषिताचा जम चांगला बसणार आहे हें उघड आहे.

पण वरील सर्वज्ञताहि शुभवर्तमानाच्या कृत्यास कितीहि आवश्यक असली तरी ती साध्य कशी व्हावी? 'अनंतपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः' ही जी इहलोकची स्थिति आहे ती कशी बदलेल? कोणी केवढ्याहि अचाट बुद्धीचा असला तरी विद्यांची सीमा कोणाच्यानें गांठवणार आहे? त्याप्रमाणेंच आयुष्याची स्वल्पता व विघ्नांचें बाहुल्य यांच्यापुढें तरी कोणाचें काय चालणार आहे? तेव्हां यावरून पहातां कोणीहि मनुष्यानें फार मोठी हांव बांधतां उपयोगीं नाहीं हें उघड आहे. ती बांधली असतां बदामाच्या गोष्टींत जशी पोराची अवस्था झाली तशी व्हावयाची! त्यांतून कोणी तितक्यांतूनहि अनेक विद्यांचें प्रभुत्व संपादन करण्याची खटपट चालविलीच तर ज्याप्रमाणें धातूचा पत्रा जितका ठोकठोकून लांब करावा तितका लांब होत जातो खरा पण तितकें जाडीचें मान कमी कमी होत जातें. त्याप्रमाणें जितक्या अधिक विद्यांचा हव्यास धरावा तितकी प्रत्येक विषयांतील गति कमी होते; तेव्हां इकडून तिकडून क्षेत्रफळ सारखेंच! नाहीं ह्मणायाला इतकी मात्र तफावत होते कीं, थोडेच विषय घेऊन त्यांवरच जो व्यासंग चालवतो त्याचे ते पक्के होतात आणि वरील हव्यासी मनुष्याचें ज्ञानविषयबाहुल्यास्तव चोहोंकडे गुडघाभरच पाणी अशा तऱ्हेचें होतें व त्यामुळें अनेक प्रमादांस मात्र तो पात्र होतो.

असो; आतां वरील सिद्धांताच्या प्रत्ययार्थ डॉक्टर मजकुरांच्या लेखांतील सत्यासत्यतेचें विवेचन करूं. हें विवेचन त्यांच्या शिष्यवर्गास वगैरे कदाचित् आवडणार नाहीं, व एवढ्या सर्वमान्य पंडिताच्या लेखावर दूषणें दिल्याबद्दल आह्मांवर कादचित् धृष्टतेचाहि आरोप येईल. पण जोंपर्यंत आमच्या दूषणाची अयथार्थता आह्मांस कोणीं दाखवणार नाहीं तोंपर्यंत वरील आरोप आह्मी खुशाल पतकरूं.

४. पहिल्या वाक्यांत पहिल्या पेशव्याच्या अधिकाराचा सन १७१७ ह्मणून दिला आहे तो चुकीचा आहे हें आमच्या सर्व वाचकांच्या ध्यानांत येईलच; कांकीं बाळाजी विश्वनाथ यास सन १७१४ त पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं हें सुप्रसिद्ध आहे.

आमच्या कवीचा जन्मशकहि वरील वर्ष नसून सन १७२८ त तो जन्मला. शूद्र-कवीचा उदय शिवाजीच्या कारकीर्दीत झाला ही गोष्टहि खरी नाहीं. कांकीं, प्रस्तुत पंडितानें दिलेला सन जरी घेतला,[1] तरी शिवाजीच्या कारकीर्दीला पुष्कळच अवकाश रहातो. त्याचा राज्याभिषेक तर १६७४ त झाला; व नुसता तो आपणास राजा म्हणवूं लागला ही गोष्टहि १६६४ त झाली. सन १६४९ त झटलें म्हणजे त्याचा नुसता उदय होऊं लागला होता. त्या वेळेस त्याची सत्ता धोंड्या वाघ किंवा उमाजी रामोशी यांच्या बेताचीच सरासरी होती! हें केवळ शकांच्या संबंधानें झालें. आतां सदरील वाक्यांतील अभिप्रायाविषयीं जर विचार केला तर तो अशा तऱ्हेचा दिसतो कीं राज्यक्रांति झाली कीं मोठे कवि निपजायाचेच! हा सिद्धांत कांहीं अंशीं खरा आहे व सर्व देशांच्या इतिहासावरून त्यास बराच आधार मिळतो. तरी ज्याप्रमाणें बीजारोपण झालें न झालें तों फलोत्पत्ति संभवत नाहीं, त्याप्रमाणेंच राज्यक्रांतीची वेळ व कवीच्या जन्माची वेळ हीहि एककालिक संभवत नाहीं. त्यांतून आमच्या महा-राष्ट्र कवींची गोष्ट तर इतर देशांतील कवींच्याहून अगदींच निराळी. त्यांचें धोरण केवळ परमार्थाचें असल्यामुळें ऐहिक राज्यांच्या घडामोडींनीं यांच्या स्फूर्तीस साह्य व्हावें असा मुळींच प्रकार दिसत नाहीं. आमचे कवि भर यवनी अमलांत व भर मराठी कारकीर्दीत जन्मलेले आहेत; तरी एका स्थितीमुळें त्यांच्या वाणीस तेज चढलें आहे किंवा दुसरीच्यामुळें तें उतरलें आहे असें बिलकूल नजरेस येत नाहीं. आह्मांस खास वाटतें कीं, तुकाराम हा जन्मला त्याच्यापूर्वी शें दोनशें वर्षें जरी जन्मता, तरी त्याची अभंगवाणी झाली आहे तशीच प्रगट होती. त्याप्रमाणेंच ज्ञानदेव व मोरोपंत हे कालांतरीं जरी जन्मास येते तरी त्यांची कविता आहे तशीच उदयास येती. एवढें मात्र झालें असतें कीं, 'जाणिजे', 'सागरू', इत्यादि रूपें व 'पढियंते', 'चेववीं', 'साचोकारें' इत्यादि शब्द ज्ञानदेवाच्या कवितेंत येते ना; व मोरोपंताची कविता आहे तशी संस्कृत शब्दांनीं व प्रयोगांनीं गजबजून न जाती, आणि 'काचस्मृतिरपि तापसि

---

१. हा सन १६४९ असा दिला आहे. तेव्हां तुकारामाच्या शेवटल्या वर्षीं शिवाजी राजा एकवीस वर्षांचा होता असें होतें.–तुकारामाच्या जन्ममरणाच्या शकांच्या संबंधानें मोठा घेंटाळा दिसून येतो. 'नवनीतां'त माजी भास्कर दामोदर पाळंदे यांनीं जो वृत्तांत दिला आहे त्यांत वरील दोन शक १५१० व १५५१ (फाल्गुन वद्य १२) असे दिले आहेत. गाथ्यांत तेच शक १५३० व १५७१ (फा० वद्य २) असे आढळतात. हे दोन्ही शक शिवाजीच्या संबंधानें मुळींच जुळत नाहींत. पहिला शक मानिला असतां तुका-रामाच्या अंतसमयीं शिवाजी एक वर्षाचा होता असें होतें; दुसरा मानला तरी एकवीस वर्षांचा होता असें निघतें. कोणीकडून पाहिलें तरी 'गाथ्यां'तील शिवाजीकडे पाठविलेल्या अभंगांचा जम बसत नाहीं.

मैवं प्रलपात्र भूभुजःसदसि' किंवा 'पकडो लियो हकालो वे विसवामितर भाग जावेगा' हा चमत्कारहि तींत दृष्टीस न पडता!

कऱ्हाडे ब्राह्मणांविषयीं विल्सन साहेब जें ह्मणतात, कीं, त्यांस 'महाराष्ट्र देशांत मोठीशी मान्यता नाहीं' हेंहि आह्मांस कसें तें नीट समजत नाहीं. अन्नोदकादिक व्यवहार किंवा स्नेहसंबंध हे प्रकार कऱ्हाड्यांशीं होत नाहींत असें तर मुळींच नाहीं; किंवा ते कोणत्याहि प्रकारें हीन होत असेंहि कोणी समजत नाहीं. त्यांजवर पूर्वीपासून एक मोठा अपवाद आहे खरा; पण त्याच्या योगानें त्यांची मान्यता कमी झाली आहे असें कोठेंहि आढळत नाहीं.[1] 'क'कारांची कावेबाजपणाबद्दल ख्याति असल्यावरून किंवा देशस्थांचीं धींमेपणाबद्दल प्रसिद्धि असल्यावरून त्यांच्या लोकमान्यतेंत जसा कमीपणा येत नाहीं त्याप्रमाणेंच वरील ज्ञातीचीहि गोष्ट होय. त्यांतून ज्या सालीं साहेब मजकुरांचा वरील लेख प्रगट झाला त्या सालीं एका कऱ्हाड्या बाईचें नांव साऱ्या देशभर गर्जत होतें, त्यावरूनहि विल्सन साहेबांसारख्या शोधक पंडिताचा वरील भ्रम कसा निघाला नाहीं याचें आह्मांस आश्चर्य वाटतें! मोरोपंताची प्रसिद्धि त्याच्या मरणोत्तर झाली, व ज्ञातिजन्य ग्रह मोडण्यास पुष्कळ काळ लोटावा लागला, हे दोन्ही उल्लेखहि अत्यंत विस्मयास्पद होत! आमच्या कवीविषयीं साहेब मजकुरांनीं जर उगीच कोणापाशीं थोडीशी विचारपूस केली असती, तरी त्यांस तेव्हांच कोणींहि सांगितलें असतें कीं, मोरोपंताची कीर्ति त्याच्या हयातींतहि चोहोंकडे पसरली होती, त्याच्या नूतन कवितेस श्रोतेमंडळीची मान डोलल्यावांचून बहुतकरून एकहि दिवस जात नसेल, पेशव्यांचे आप्त जे बारामतीकर जोशी त्यांच्यापाशीं प्रस्तुत कवीचें वास्तव्य होतें, आणि सोलापूरकर जोशीबोवा तर त्याच्या आर्याबधूस इतके लुब्ध होऊन पडले कीं त्यांचे नाचेपोर सुटून ते ततःपर परमार्थपरायण झाले! पण इतकें सर्व असतां माजी परशुरामपंत तात्यांनीं पंतांची तारीफ केलेली पाहून साहेबांस आश्चर्य

---

१. 'Indian caste' (हिंदुस्थानांतील जातिभेद) या नांवाचा जो ग्रंथ वरील साहेबाच्या मरणोत्तर प्रसिद्ध झाला त्यांत त्यांनीं वरील ब्राह्मणांविषयीं फार निराळ्या तऱ्हेचा मजकूर लिहिलेला आढळतो—

"They (The Karhadas) appear in every way as respectable as their neighbours. The great Marathi poet Moropant belonged to their caste. To them, too, belonged one of the most learned natives who has yet appeared in Western India, the late distinguished Bala Gangadhar Shastri Jambhekar, Professor in the Elphinstone Institution. What is generally said of the intelligence of the Konkanasthas is applicable to the Karhadas, with whom they are generally on friendly terms."

वाटलें, आणि त्यांचा सिद्धांत झाला कीं, ज्यापेक्षां कोंकणस्थ पंडिताच्या लेखांत या कन्हाड्या कवीची प्रशंसा केलेली आढळते, त्यापेक्षां कवीनें आपल्या देशबंधूंचा जाति-भेदजन्य दुराग्रह मोडून टाकला यांत संशय नाहीं! हा तर्क किती समंजस आहे बरें! पोप कवीच्या 'इलियड'ची प्रख्याति पाहून किंवा गोल्डस्मिथच्या काव्यांची तारीफ ऐकून जर कोणी एतद्देशीय पंडितानें असेच तर्क बांधले,–कीं ज्या अर्थीं क्याथलिक धर्माच्या कवीचें काव्य एवढें सर्वमान्य झालें आहे त्या अर्थी पोपची शहामत खरी, कीं त्याच्या पदलालित्यानें धर्मभेदजन्य दुराग्रहाचेंहि खंडन केलें. त्याप्रमाणेंच गोल्ड-स्मिथ कवीची धन्य, कीं तो ऐर्लंडदेशचा असतां आज इंग्लंडांतील लहानथोरांस त्याचे ग्रंथ परमप्रिय झाले आहेत! त्याप्रमाणेंच स्कॉट यास सर्व कादंबरीकारांत अग्रगण्य लेखतात, बर्क यास साऱ्या वक्त्यांत श्रेष्ठ मानतात, वेलिंगटन यास साऱ्या इंग्लिश सेनापतींत पहिली पायरी देतात, इत्यादि शेंकडों गोष्टींवरूनहि वरच्यासारखीं अनुमानें शतशः होणारीं आहेत! पण हीं किती यथार्थ होत हें पहाण्यास विलायतेस जाव-यास नको, येथें इंग्रजी शिकलेले विद्यार्थीहि त्यांत तथ्य कितपत आहे तें सांगूं शकतील. उघडच आहे कीं, कोणाच्या कवित्वाची पारख कोणी त्याच्या धर्मावरून किंवा जाती-वरून करतात काय? मिशनरी लोकांनीं पहिल्यापासून आमच्या देशांतील जातिभे-दाचा बोभाटा ऐकला आहे, व जातिभेद हा पराकाष्ठेचा अनर्थावह होय हें त्यांच्या मनानें एकदां घेतलें आहे. तेव्हां तो नाहीं तेथें आडवा येणारच! कोणी कसाहि कारागीर असो, कोणाच्या अंगीं कांहींहि गुण असो, त्याच्या जातभाईखेरीज त्याच्या कारागिरीची वाहवा किंवा त्याच्या गुणाची चहा ह्मणून व्हावयाची नाहीं! विल्सन साहेबांनीं एवढा ज तिभेदजन्य दुराग्रह आमच्या देशाच्या कोणत्या भागांत पाहिला असेल तो असो! आमच्या वाचकांपैकीं थोड्यांच्याच आढळांत तो कोठें आला असेल तर असेल!

पुढें आमच्या कवीवर साहेबांचा असा आक्षेप आहे कीं, 'रामायण', 'महाभा-रत' आणि 'भागवत' या ग्रंथांच्या आधारें त्यानें कविता केली आहे, पण सदरील ग्रंथांपेक्षां अधिक सरस वर्णन किंवा त्यांहून प्रौढ अर्थरचना हीं त्याच्या काव्यांत फार-करून कोठेंहि आढळत नाहींत. वरील वाक्यावर अनेक प्रत्याक्षेप येणारे आहेत. एक तर प्रथमतः अशी शंका उद्भवते कीं, साहेबमजकुरांनीं वरील तिन्ही ग्रंथ व आ-मच्या प्राकृत कवींचीं काव्यें हीं सर्व एवढ्या बारकाव्यानें वाचलीं असतील काय? 'महाभारत' एक लक्ष, 'रामायण' चोवीस हजार, आणि 'भागवत' अठरा हजार एवढाच ग्रंथसमूह पाहिला तरी सरासरी दीड लक्षाची भरती झाली. हीं सर्व संख्या एका पारड्यांत, आणि दुसऱ्यांत आमच्या कवीच्या तीन लक्ष आर्या! मग एवढीं जड पारडीं उचललीं असतां कांटा केसभरहि इकडे कीं इकडे कलत नाहीं असें

साहेबांच्या नजरेस आलें काय? हें एक झालें. दुसरें असें कीं, जरी घटकाभर असें कबूल केलें, कीं वरील दोन्ही पारडीं अगदीं तंतोतंत भरलीं, तरी यामुळें आमच्या कवीकडे कांहीं मोठें गौणत्व येतें असें आह्मांस वाटत नाहीं. मिशनरी साहेबांस इकडील ग्रंथ सरासरी सारेच अप्रयोजक, तेव्हां आमच्या आदिकवींच्या सारखी किंवा इतिहासकाराच्या बरोबरीची ग्रंथरचना करणें ह्मणजे त्यांच्या दृष्टीनें कांहीं मोठें दुष्कर कृत्य आहे असें नाहीं हें उघडच आहे; पण आह्मां नेटिवांच्या दृष्टीनें वरील साम्य ह्मणजे मोठीच पदवी होय.[1] साहेब मजकुरांस शेक्सपीयरच्या तोडीचें नाटक लिहिणें, किंवा होमरच्या तोडीचें काव्य रचणें हें जितपत सुसाध्य वाटणार आहे तितपतच वाल्मीकिव्यासप्रभृति कवींनीं साधलेला रस आपल्या काव्यांत उतरणें हें इकडील कवींसाहि वाटणारें आहे. तर हें ध्यानांत आणून विल्सन साहेबांनीं मूळ 'रामायणा'दि ग्रंथांवर आमच्या कवीच्या हातून तान झाली नाहीं या अपराधाबद्दल त्याची कांहीं गय करायाची होती. असो; पण वस्तुतः पाहिलें असतां साहेबांचा आक्षेप तर मुळींच लागू पडत नाहीं. तो कसा हें आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. गेल्या ४६ व्या अंकांत व १२ व्या अंकाच्या आरंभीं जें विवरण केलें आहे त्यावरून सहज लक्षांत येणारें आहे कीं, महाराष्ट्र कवींनीं व्यासादिकांचें आयतें भांडार लुटलें आहे, त्यांत त्यांच्या पदरचें ह्मणून कांहीं नाहीं, हें अलीकडील सर्वसंमत मत केवळ अज्ञानमूलक होय. 'रघुवंशा'दि महाकाव्यांस 'स्वतंत्र ग्रंथ' ह्मणतांना जसें फारसें चांचरायाला नको, त्याप्रमाणेंच तुकारामाची अभंगवाणी किंवा मोरोपंताची आर्यावाणी या प्रायः स्वतःसिद्धच होत असें ह्मणतांनाहि फारशी कांकूं करणें नलगे!

यापुढील वाक्यावर गेल्या ५२ व्या अंकांत चर्चा केलीच आहे. तेव्हां येथें त्याविषयीं आणखी कांहीं लिहिण्याची गरज नाहीं.

पुढील दोन वाक्यांत साहेबांचा असा मतलब दिसतो कीं, मोरोपंत हा मूळचा

---

१. गोवर्धनासारख्यांनीं वरील ग्रंथांविषयीं आपली पूज्यत्वबुद्धि येणेंप्रमाणें प्रगट केलेली आढळतें--

विहितघनालंकरणं विचित्रवर्णावलीमयस्फुरणम् ।
शक्रायुधमिव वक्रं वल्मीकभुवं कविं नौमि ॥
व्यासगिरां निर्यासं सारं विश्वस्य भारतं वंदे ।
भूषणतयैव संज्ञा यदंकितां भारती वहति ॥
श्रीरामायणभारतबृहत्कथानां कवीन् नमस्कुर्मः ।
त्रिस्रोता इव सरसा सरस्वती स्फुरति यैर्भिन्ना ॥
अतिदीर्घजीविदोषाद् व्यासेन यशोऽपहारितं हंत ।
कैर्नोच्येत गुणाढ्यः स एव जन्मांतरापन्नः ॥

विष्णुभक्त असतां पेशव्यांची शिवोपासना पाहून शिवाविषयीं आपली भक्ति प्रगट करूं लागला. इतर महाराष्ट्र कवींच्या पदरींहि वरील मतलबी भक्ति साहेबांनीं बेलाशक घालून दिली आहे. ज्या मिशनरी साहेबांची अशी ख्याति होती व ती स्वमुखानेंहि ते सांगत असत कीं आमच्या देशांतील राजापासून रंकापर्यंत त्यांचें दळणवळण असे व सकाळीं बडोद्याच्या सयाजी महाराजांबरोबर भाषण केलें तर संध्याकाळीं नांगर हाकणाऱ्या कुणब्याशीं त्यांचें बोलणें होत असे, त्यांच्या लेखांत आमच्या कवींविषयीं असल्या विलक्षण गैरसमजुती दृष्टीस पडाव्या हें खरोखर मोठें आश्चर्यकारक होय! हिंदुस्थानाच्या किनाऱ्यावर पाय ठेवण्याच्यापूर्वी विलायतेंतहि विल्सन साहेबांच्या कानावर हा मजकूर आला नसेल काय, कीं हिंदु लोक हे ब्रह्मा, विष्णु आणि शिव यांस मुख्य दैवतें मानतात? त्याप्रमाणेंच हिंदूंचे देव किती अपरंपार आहेत व ते त्या सर्वांस भजतात, हेंहि त्यांच्या कानीं कधीं आलें नाहीं काय? जर मोरोपंताची सर्व देवांविषयीं ऐक्यभावना असून तो सर्वांस सारखेच पूज्य मानीत असे, व प्रत्येक क्षेत्राच्या देवतेवर, प्रत्येक तीर्थावर, प्रत्येक साधूवर त्यानें स्तुतिपर आर्या केल्या आहेत, तर शिवासारख्या प्रधान देवतांस आमचा कवि आपल्या ग्रंथांत मानतो, हें सांगण्यांत एवढा कोणता अर्थ असेल तो असो. महाराष्ट्रांत बीस वर्षें वास्तव्य असतां, व 'हिंदुधर्माचा कृत्रिम कोट' फोडण्याची स्तुत्य मनीषा निरंतर मनांत बागवून त्याविषयीं पुरती माहिती मिळविण्याविषयीं साहेबांची इतकीं वर्षें सारखी खटपट चालली असतां, त्यांस सर्वप्रसिद्ध गोष्टींचीहि माहिती व्हावयाची कशी राहिली हें आह्मांस कळत नाहीं! आमच्या देशांत महाएकादशी जशी सर्व आबालवृद्ध करतात त्याप्रमाणेंच शिवरात्रीचेंहि व्रत पाळतात, आपल्या पंचायतनांत शालिग्रामशिलेच्या शेजारींच शिवाचा बाणहि दृष्टीस पडतो, ज्या कवीनें 'हरिविजय' केला त्यानेंच 'शिवलीलामृत'हि केलें, तसेंच विष्णूचीं, शिवाचीं, देवीचीं, गणपतीचीं वगैरे देवालयें आमच्या देशांत अगदीं शेजारीं शेजारीं असून त्यांच्या संबंधानें कोठें लोकांच्या मारामाऱ्या झालेल्या, खून पडलेले, किंवा नुसती शिवीगाळहि झालेली कधींहि ऐकण्यांत येत नाहीं, या सर्व गोष्टी विल्सन साहेबांसारख्या विद्वान् व शोधक पंडितास ठाऊक नसाव्या याचा आह्मांस फारच आचंबा वाटतो! पेशव्यांचें जरी शिव हें दैवत असलें, तरी इतर देवतांविषयीं त्यांचा विरोध असल्याविषयीं आमच्या मिशनरी साहेबांस कोठें प्रमाण मिळालें होतें काय? त्याप्रमाणेंच त्यांनीं प्रस्तुत कवीवर व इतरांवरहि उपासनांतर केल्याचा किंवा निदान आपल्या लेखांत तरी आपल्या उपास्य देवतेव्यतिरिक्त अन्य देवतांविषयीं वरकांती भक्ति प्रगट केल्याचा जो आरोप बेलाशक केला आहे, तें तरी केवढें साहस होय! आमच्या वारामतीकर कवीचा आणि पेशव्यांचा तर बिलकूल संबंध नव्हता. त्याचीं सारीं काव्यें धुंडलीं तरी त्यांत पेशव्यांपैकीं एकाचेंहि

नांव सुद्धां सांपडायाचें नाहीं; मग त्यांचें स्तवन तर कोठलें?[1] त्यानें सारा जन्म ज्या यजमानांच्या समागमें घालविला त्यांविषयीं सुद्धां त्यानें उल्लेख केलेले त्याच्या साऱ्या कवितेंत कोठें आठ दहा ठिकाणीं आढळले तर नशीब! मग इतकी ज्याची निस्पृहता त्यावर केवळ राजप्रीतिसंपादनार्थ मतांतर केल्याचा आरोप करणें हें केवढें धारिष्ट ह्मणावें! इतर महाराष्ट्रकवींवर साहेबांनीं हाच आरोप जो मोघमपणें केला आहे तो तरी अशाच प्रकारचा होय. अगोदर पेशव्यांच्या अमदानींत कवि झाले तरी किती?—अमृतराय, मोरोपंत, रघुनाथपंडित आणि रामजोशी. मग यांपैकीं स्वदेवतात्याग करून पेशव्यांची खुषामत करायाला कोण तयार झाले असतील ते असोत! लोकांत तर वरील चौकडींतून एकाविषयींहि अशा प्रकारचा कांहीं एक बोभाटा नाहीं. मग असें झालें असेल तर नकळे, कीं एखाद्या क्याथलिक पाद्रीनें वरील कवीच्या मरणकाळीं गुप्तपणें त्यांच्या जवळ जाऊन त्यांची शेवटली जबानी घेतली असेल; व ती आपल्या धर्मबंधूंस कळण्याकरतां इंग्रजींत कोठें प्रसिद्ध केली असेल! अशी कांहीं कल्पना केल्याखेरीज वरील कवींच्या लबाडीची बातमी मिशनरी मजकुरांस कशी कळली असावी हें कांहीं उमगत नाहीं. आतां आमच्या साहेबांस यहूदी कवींची जर तारीफ करणें होती, व त्यांनीं 'जिवंत देवा'चे जे एकदां पाय धरिले ते धरलेच, त्यांच्या पवित्र भूमीचें प्रभुत्व अनेक राष्ट्रांकडे गेलें असतां त्यांची दिव्य स्फूर्ति यशोहवावांचून अन्य देवांकडे वळलीच नाहीं, इत्यादि प्रकारें जर वरील देवप्रिय लोकांची स्तुति करणें त्यांस अवश्य वाटलेंच होतें तर ती त्यांनीं खुशाल करायाची होती! पण त्यांच्या स्तवनार्थ आमच्या बिचाऱ्या महाराष्ट्र कवींवर स्वकपोलकल्पित दूषणें देण्याची काय गरज होती? त्यांतून साहेबांनीं हेंहि मनांत आणायाचें होतें कीं, हिंदु लोकांची भक्ति जर इतकी कोंवळी असती कीं पाहिजे तिकडे तिनें सहज वळावें, तर मिशनरी खातें आमच्या देशांत येण्याचीच मुळीं गरज उरतीना! भाकरीच्या तुकड्याबरोबर कुतरें नाचवावें तसें नाचतें अशीच जर येथील लोकांची स्थिति असती तर आमचा देश केव्हांच सारा इसाममय बनून जाता. त्याप्रमाणेंच साहेबांच्या भाकीताप्रमाणें आजपर्यंत कोणी तरी ख्रिस्ती तुकाराम किंवा वामन आमच्या देशांत निपजता. पण अद्याप तर तीं चिन्हें कोठेंहि बिलकूल दृष्टीस पडत नाहींत![2]

---

१. **मोरोपंत**विषयीं बराच सविस्तर वृत्तांत 'काव्येतिहाससंग्रहा'च्या येत्या अंकांत येणार आहे. त्यांतील कांहीं आख्यायिकांवरून आमच्या कविसिद्दावर मिशनरी साहेबांनीं ग्रामसिंहवृत्तीचा जो आरोप केला आहे त्याची यथार्थता चांगली लक्षांत येईल.

२. विलसन साहेबांनीं महाराष्ट्र कवींचा वृत्तांत संपवून शेवटीं पुढील पवित्र आशा प्रगट केली आहे—

(पुढें चालू).

पुढील वाक्यांत साहेबांच्या हातून दोन प्रमाद घडले आहेत. मोरोपंताचें मरणकालीं वय ६० वर्षांचें होतें असें झटलें आहे; तें खरोखरी ६५ वर्षांचें होतें. त्याप्रमाणेंच त्यास निवर्तून सुमारें शंभर वर्षे झालीं असें झटलें आहे तेंहि बरोबर नाहीं; १८५७ सालीं वरील गोष्टीस अवघीं ६३ वर्षें झालीं होतीं. साहेबांनीं 'नवनीत' उलटून पाहिलें असतें किंवा त्यांच्या एतद्देशीय सेवकांपैकीं कोणापाशीं उणीच चौकशी केली असती, तरी वरील खरी माहिती मिळण्याचा त्यांस संभव होता. पण ते स्वतःच मुळीं सर्वांस गुरुस्थानीं व जातीनें सर्वज्ञ; त्यांतून त्यांच्या वज्रलेखावर कोणाची लेखणी चालणार! तेव्हां त्यांस वरील खटपट करण्याची जरूरी [illegible] हेंहि नीटच होय.

शेवटील वाक्यांत विल्सन साहेब सांगतात कीं, 'केकावली'त मुख्यतः कृष्णाचा महिमा वर्णिला आहे. या वाक्याचा अर्थहि आमच्या ध्यानांत चांगलासा उतरत नाहीं. आह्मांस खास वाटतें कीं, ज्यानें 'केकावली' समग्र वाचली आहे, व तीं ज्यास साद्यंत समजली आहे, त्याच्या हातून प्रस्तुत काव्यावर साहेबांच्या सारखा शेरा सहसा पडणार नाहीं. या काव्यांतील मुख्य विषय कृष्ण किंवा इतर कोणीहि देव नसून कवीचा स्वोद्धार हाच होय. कोणी कवीनें लिहिलें आहे—

तनू भववनीं त्रितापदवपावकें कावली ॥
ह्मणूनि करुणस्वरें करि मयूर केकावली ॥

तर संसारांतील तापत्रयानें पीडित होत्साल्या मयूरानें 'दयामृतघना'च्या वृष्टीविषयीं अत्यंत सोत्कंठ होऊन टाहो फोडला, व 'इसापनीती'तल्या लाडक्या पक्ष्यानें आपल्या धनिणीपाशीं जसें गाऱ्हाणें गाइलें आहे त्याप्रमाणेंच प्रस्तुत काव्यांतहि पहिल्यापासून शेवटपर्यंत

तसाचि उरलों कसा पतित मी नसें काय कीं ।
दयामृतघना अहो हरि वळा मयूराकडे ।
रडे शिशु तयासि घे कळवळोनि माता कडे ॥

असाच मयूराचा केकारव आढळतो. प्रसंगवशात् त्यानें मधें मधें बऱ्याच भराऱ्याहि मारल्या आहेत. तेव्हां एकंदरींत पहातां प्रस्तुत काव्यांत कोणत्याहि देवतेचें विशेष वर्णन आहे असें नाहीं व त्यास 'स्तोत्र' हा शब्दहि यथास्थितपणें लागणारा नाहीं. असें असून विल्सन साहेबांनीं वर जो शेरा मारला तो सरासरी अनमानधवक्यानें मारला ह्मणावा, किंवा पहिली तेवढी केका कर्णी कानावर आल्यावरून तिजवरून

"The Mahrathas declare that the spirit of poetry has left their country. It may soon appear that in this opinion they are mistaken, even though it may not be expected that Hinduism with its grotesque and impure gods and heroes, will again inspire the bards of the country."

स्थालीपुलकन्यायेंकरून त्यांनीं साऱ्या काव्याचें स्वरूप लक्षांत आणलें असावें असें आह्मांस वाटतें.[1]

याप्रमाणें वरील दोघां पंडितांचे प्रस्तुत कवीविषयींचे अभिप्राय दाखल करून त्यांवर आह्मीं आपले विचार प्रगट केले. आतां प्रस्तुत अंक आटपण्यापूर्वी विद्वद्वृंदांत मोरोपंताच्या संबंधानें सामान्यतः आणखी ज्या कित्येक समजुती आढळतात त्यांचाहि उल्लेख करतों. एक तर सर्वसाधारण मत हें कीं, मोरोपंत हा मुळीं कविच नव्हे, तर केवळ पद्यांची जुळवाजुळव करणारा होय. त्याच्या वेळचे लोक अज्ञान व अरसिक, त्यामुळें त्याची कविता त्या काळीं खपली गेली, किंबहुना सर्वमान्यहि झाली; हल्लींच्या सुधारलेल्या काळांत तिची योग्यता कोणासहि कांहीं वाटणार नाहीं. कित्येकांचें ह्मणणें असें पडतें कीं, मोरोपंत हा महाराष्ट्र कवींतला पोप होय. या इंग्रेजी कवीची त्याच्या हयातींत जशी अतिशयित प्रख्याति झाली, व सर्व त्यास कविमुकुटमणि ह्मणून समजत असत, पण चालू शतकांत त्याच्या कवितेचें बंड मोडून तो अगदीं नादान ठरला आहे, तीच गत मोरोपंताची! कोणी ह्मणतात, वामन हा महाराष्ट्र कवितेंतला ड्रायडन व मोरोपंत हा पोप होय; खरें कवित्व पाहिलें तर तें पहिल्यांत जसें आढळतें तसें दुसऱ्यांत आढळत नाहीं. दुसऱ्याचें काव्य ह्मटलें ह्मणजे सारें यमकमय, शब्द-चमत्काराच्या पलीकडे त्यांत कांहीं नाहीं. याप्रमाणें ज्याच्या जसें मनास येईल त्या-प्रमाणें तो बेलाशक आमच्या कवीविषयीं हवा तसा अभिप्राय ठोकून देतो!

वरील मतांविषयीं आह्मी तूर्त विचार करीत नाहीं. प्रस्तुत कवीविषयीं आमच्या काय समजुती झाल्या आहेत त्या ज्या वेळेस दाखल करूं त्या वेळेस वरील अभिप्रायांतील

---

१. साहेब मजकुरांनीं इतर महाराष्ट्र कवींविषयीं जें निरूपण केलें आहे त्यांतहि वर दाखविल्यासारखा अप्रमाण उल्लेखांचा प्रकार बराच आढळतो. त्यांचीं उदाहरणें येथें दाखल करितों. ते नामदेवास ज्ञानोबाच्या अगोदर ढकलतात; यास त्यांस काय प्रमाण मिळालें असेल तें असो! रामदासाचा अंतकाळ सन १६६० त ह्मणून दिला आहे, पण या कवीनें 'शिवबा'च्या मरणोत्तर त्याच्या पुत्रास जें पत्र लिहिलें आहे त्यावरून पहातां वरील काळ फार चुकीचा ठरतो. तुकारामाच्या कवितेस 'अभंगनाटक' (नाटाचे?) अशी संज्ञा आहे; अमृतरायानें पद या छंदांत कविता रचिली आहे, तिचा विषय अध्यात्म असल्यामुळें ती कोणास फारशी आवडत नाहीं; रामजोशी हा पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत होता, व त्यानें 'लावण्या ह्मणजे शृंगारपर कविता' केली आहे; अनंतफंदी हा शेवटल्या पेशव्याची व त्याचा शूर सरदार बापू गोखला यांची खुशमत करणारा होता; कल्याणमल्लानें महाराष्ट्र भाषेंत 'अनंगरंग' ह्मणून एक चावट ग्रंथ केला आहे;—इत्यादि विलक्षण उल्लेख मोलस्वर्थकृत कोशाच्या प्रस्तावनेंत आढळतात. बिचाऱ्या तुकारामावर तर साहेबांनीं जें तर्कट रचलें आहे तें कांहीं पुसूंच नये! एकंदरींत बड्या नांवावर किती चुका व किती अप्रमाण लेख खपले जातात याचा प्रत्यय सदरील प्रस्तावनेवरून चांगला येणारा आहे!

तथ्यातथ्याविषयींहि सहज विवेचन करावें लागेलच.

परकृत अपमान जसा त्वत्कृत बहुमान हा तसा मातें ॥
--अश्वमेधपर्व.

अंक ५७--(१) विषयोपन्यास. (२) मोरोपंताच्या तर्फेची मंडळी. (३) त्याच्या कवितेंतील मोठा विशेष. (४) हा त्याच्या कीर्तीच्या प्रसारास कारण. (५) यावरून त्याचें महाकवित्व कितपत ठरतें याविषयीं विचार. (६) मोरोपंताच्या कवितेचें गहनत्व व दुर्बोधत्व. (७) वरील मताची यथार्थता.

१. येथवर प्रस्तुत कवीवर येणाऱ्या आक्षेपांविषयीं विवेचन झालें. आतां त्याच्या तर्फेची जी मंडळी आहे तिच्या तोंडून त्याचा गुणानुवाद जो ऐकूं येतो तो कितपत यथार्थ होय याविषयीं विचार करावयाचा.

२. मोरोपंताच्या तर्फेची मंडळी कोण हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. जुनें विद्वन्मंडल व नवें विद्वन्मंडल हीं दोन्ही प्रस्तुत कवीच्या प्रतिपाक्षिवर्गांतच प्रायः येतात. पहिल्यांच्या दृष्टीनें प्राकृत हें जितकें हलकें तितकेंच दुसऱ्याच्या दृष्टीनें व्हर्नाक्युलर (एतद्देशीय भाषा) हें होय; व 'नैषध'कार आणि 'चंपू'कार सोडून मोरोपंताकडे मेहेरनजर करण्यास पहिल्यांस जितके प्रयास, तितकेच दुसऱ्यांस शेक्सपीयर किंवा पोप सोडून महाराष्ट्र कवितेवर येण्यास! या दोहोंशिवाय बाकी राहिलेला सारा जनसमूह प्रस्तुत कवीच्या तर्फेचाच ह्मणायास हरकत नाहीं. त्यांतून त्याचे चाहते व सेवक ह्मटले ह्मणजे हरदास हे होत. यांनींच आमच्या 'कवीश्वराच्या मनः-पयोनिधिसुते'चा आविर्भाव होतांच मोठ्या उत्साहभरानें तिचें अभिनंदन केलें, आणि लवकरच साऱ्या महाराष्ट्रीय जनांच्या हृदयांत तीस अढळ पदीं बसवून टाकिलें. तर याच मंडळीच्या तोंडून प्रस्तुत कवीविषयीं जे उद्गार ऐकूं येतात त्यांतील तथ्यातथ्याविषयीं विवेचन केलें पाहिजे.

३. मोरोपंताची कविता वाचतांना सकृद्दर्शनींहि कळून येणारा तिचा एक मोठा विशेष ह्मटला ह्मणजे लांब लांब यमकें हा होय. हा यमकांचा प्रकार प्रथमतः वामनानें सुरू केला. त्याच्यापूर्वी महाराष्ट्रकविता ही केवळ ओंवी व अभंग या छंदांतच असल्यामुळें यमकांच्या रचनेस अर्थातच अवकाश नव्हता; आणि त्यांतून वरील कवींपैकीं कोणीहि पंडित नसल्यामुळें वरील साध्या छंदांतहि यमकरचना करण्याचा कोणीं यत्न केलेला दृष्टीस पडत नाहीं. पण पुढें वामनानें जेव्हां गणवृत्तें महाराष्ट्रकवितेंत आणलीं, तेव्हां तीं यमकरचनेस विशेष अनुकूल असल्यामुळें तो यत्न त्यानें केला.[२] नंतर मोरोपंतानें

---

१. अनुष्टुप छंदांतहि शब्दालंकार साधलेले पहाणें असल्यास 'किरातार्जुनीय', 'शिशुपालवध', 'नैषध' वगैरे काव्यांत ते दृष्टीस पडतील. महाराष्ट्र भाषेंतील प्रकार पहाणें असल्यास मोरोपंताच्या 'अनुष्टुप रामायणां'त तो दृष्टीस पडेल.

२. मोरोपंतानें 'वामनपंडितस्तुतीं'त ह्मटलें आहे—

(पुढें चालू).

तर वरील शब्दालंकार साधण्यास फार सोयीचें जें आर्यावृत्त[1] तें उचलून त्यांत प्रकृत शब्दचमत्काराची अगदीं कमाल करून सोडली. तीन तीन चार चार अक्षरांचे यमक तर सामान्यतः सर्व आर्यांत असून कोठें कोठें तर सहा सहा आठ आठ अक्षरेंहि यमकबद्ध आढळतात. कांहीं कांहीं ठिकाणीं तर दुसरा व चवथा चरण बहुधा एकाच अक्षरांनीं बांधलेला आढळतो. याप्रमाणें यमकरचनेचा प्रकार प्रस्तुत कवीच्या काव्यांत सर्वसाधारण असून शिवाय जागोजाग अनुप्रासाचाहि चमत्कार त्यानें केलेला आहे.[2]

४. आतां हा जो मोरोपंताच्या कवितेंत आढळणारा विशेष वर सांगितला तो त्याची प्रसिद्धि प्रथमतः त्वरित होण्यास कारणभूत होऊन पुढें त्याची कीर्ति स्थिरावल्यावरहि तीस मुख्यतः आधारभूत होऊन बसला. अजून पाहिलें तरी प्रस्तुत कवीची जी चहा आढळते ती पुष्कळ अंशीं वरील विशेषावरूनच होय. इंग्लंडांत पोपची प्रख्याति त्याच्या अपूर्व पदलालित्यावरून जशी झाली, व वीस वर्षांच्या वयांतच वरील कवि तत्कालीन कवींत अग्रगण्यत्व पावून पूर्वीच्या महाकवींशीं टक्कर मारूं लागला;[3]

अन्यत्र नसे कवनीं यावे रस सर्व हा नियम कांहीं ।
केली भाषाकवि जे त्यांची तीं गर्वहानि यमकांहीं ॥

१. प्रस्तुत कवीची आर्यावृत्तविषयक प्रीति सर्वप्रसिद्धच आहे—

आर्या आर्यांसि रुचे ईच्या ठायीं असे जशी गोडी ॥
आहे इतरां छंदीं गोडी परि यापरीस ती थोडी ॥

२. असें सांगतात कीं, बारामतींत मोरोपंताची वसावयाची जी खोली असे तींत चोहोंकडे भिंतींवरून यमकबद्ध अक्षरें लिहून ठेविलीं होतीं. ह्मणजे कवीस रिकाम्या वेळीं एखादा यमक सुचला कीं तो त्यानें भिंतीवर लिहून ठेवावा. पुढें काव्यरचनेच्या वेळीं जे जे यमक त्या त्या प्रसंगाला उपयोगीं पडतील ते ते त्यानें घ्यावे. हा प्रकार प्रस्तुत कवीच्या काव्यांत जें अपूर्व यमकचातुर्य आढळतें (कीं जें पाहून घटकर्पर कवीस खापराचा घडा घेऊन पाणीच वहावें लागतें!) ह्यावरून पहातां केवळ संभाव्य दिसतो. 'अगा राया' आणि 'अगारा या', 'हानिकर' आणि 'हा निकर' इत्यादि शेकडों ठरीव यमकांवरूनहि वरील गोष्टीस बळकटी येते.

३. वरील वयांत त्यानें Essay on Criticism ('काव्यविवेचनावर निबंध') हें लहानसें काव्य रचिलें. आडिसनचा 'स्पेक्टेटर' याच वेळेस चालू होता, त्यांत वरील काव्याची फार तारीफ केलेली आढळते. (स्पे० अंक २५३) जॉनसनचा अभिप्राय येणेप्रमाणें आहे.

"One of his greatest, though of his earliest works, is the "Essay on Criticism," which, if he had written nothing else, would have placed him among the first critics and the first poets, as it exhibits every mode of excellence that can embellish or dignify didactic composition,—selection of matter, novelty of arrangement, justness of precept, splendour of illustration, and

(पुढें चालू).

किंवहुना त्यांच्याहूनहि एकंदर लोकांस अधिक प्रिय झाला, त्याप्रमाणेंच आमच्या महाराष्ट्र कवींचेंहि झालें असावें. वारामतींतून त्याच्या आर्या जेव्हां प्रथमतः बाहेर पडूं लागल्या असतील, तेव्हां महाराष्ट्रकवितावधूचा हा नवीन थाटमाट पाहून तत्कालीन जन मोठे चकित होऊन राहिले असतील! 'उदिते तु सहस्रांशौ न खद्योतो न चंद्रमाः', किंवा 'उदिते नैषधे काव्ये क्व माघः क्व च भारविः'[1] अशाच प्रकारचा त्यांस अनुभव घडला असेल! आपल्या धर्मपित्याच्या आश्रमांत तपस्विकन्येप्रमाणें वाढलेली जी शकुंतला तिनें पूर्वस्थितींतील वल्कलें टाकून देऊन महिषीपदोचित राजवेष धारण केला असतां तिच्या स्वरूपांत जसें विलक्षण अंतर दिसलें असेल, त्याप्रमाणेंच जी कविता पूर्वी ओंवी व अभंग या छंदांत असून प्रायः अलंकारविरहितच होती तिला

झणत्कार जीच्या पदीं नूपुरांचा
रुणत्कार जीच्या करीं कंकणांचा ।

असें स्वरूप एकदम प्राप्त झालेलें पाहून सारा जनसमूह अत्यंत विस्मित होऊन गेला असेल! गीर्वाणवाणीच्या सुवर्णसूत्रांनीं जागोजाग विणून काढलेलें व अनुप्रासानें स्थलविशेषीं विचित्रित केलेलें असें उज्ज्वल वस्त्र परिधान केलेली वरील अभिनव कविता जनमनःप्रांगणीं जेव्हां नटीप्रमाणें अवतीर्ण झाली असेल, तेव्हां तिचा अलंकारांचा थाटमाट पाहून व चरणांत रुणझुणणाऱ्या यमकरूप पैंजणांचा कर्णमनोहर नाद ऐकून जोशीबोवांसारखी मंडळी तल्लीन होऊन गेली यांत काय आश्चर्य?

तर प्रस्तुत कवीची लवकरच जी चोहोंकडे प्रसिद्ध झाली, व पूर्वीच्या महाराष्ट्र कवींत तो तेव्हांच सामील झाला, किंबहुना त्या सर्वांस त्यानें लोपवून टाकलें, हें सर्व वरील रचनाविशेषाचें फल होय जगांतील रीत पहातां सामान्यतः अशीच आढळते कीं, अंतरंगाकडे दृष्टि फार थोड्यांची; 'बाह्यरंगप्रसंगेन के के नानेन वंचिताः' हाच प्रकार प्रायः आढळणारा! निदान सकृद्दर्शनीं तरी बाह्यरंगाला जशी मंडळी भुलते व त्याच्या योगानें छाप बसून जाते, तसें अंतर्गत गुणाच्या योगानें होत नाहीं. तेथपर्यंत दृष्टि जी पोंचायाची ती प्रथमतः तर फारकरून कोणाची पोंचत नाहींच; पोंचलीच तर जे अत्यंत मार्मिक असतील त्यांचीच पोंचते. बाकी एकंदर लोकांची रीत ह्मटली

---

propriety of digression. I know not whether it be pleasing to consider that he produced this poem at twenty, and never afterwards excelled it; he that delights himself with observing that such powers may be soon attained, cannot but grieve to think that life was ever at a stand."

१. 'सूर्य उगवला असतां काजव्याचा उजेड रद्द होतो व चंद्राचाहि फिका पडतो.' 'नैषधकाव्य निर्माण झालें असतां माघकवि कोणीकडे व भारवि कोणीकडे?'

ह्मणजे जें वरकांती दृष्टीस पडेल त्यास भुलावें, किंवा फार झालें तर प्रमुख ह्मणून जे निवडले असतील त्यांचें अनुसरण करावें. आतां हें खरें आहे कीं, एका इंग्रजींतील ह्मणीप्रमाणें[1] केवळ बाह्य चाकाचक्क्याचा फार दिवस टिकाव निघत नाहीं; आंत कांहीं तत्त्व असल्याखेरीज नुसता बाहेरचा डामडौल फार दिवस निभत नाहीं. कालेंकरून खरें नाणें कोणतें व खोटें कोणतें हें उघडकीस येतेंच. पण हा तत्त्वनिर्णय निरनिराळ्या प्रकरणांत कमीजास्त अवकाशानें होतो, व तो होणें हेंहि कांहीं कांहीं प्रकरणीं अवघड असतें. साक्षात् प्रत्ययावह जीं शास्त्रें आहेत त्यांतील प्रकरणांचा व व्यवहारांतील गोष्टींचा जसा खरेखोटेपणा तेव्हांच निवडतां येतो, त्याप्रमाणें केवळ मानसगोचर ज्या वस्तु त्यांचा निवडतां येत नाहीं. खरा वैद्य किंवा खोटा वैद्य, खरा ज्योतिषी किंवा खोटा ज्योतिषी, खरा शिपाई किंवा खोटा शिपाई ही परीक्षा जशी औषधक्रियेवरून, ग्रहणादि वर्तविण्यावरून, व मर्दुमकीच्या प्रसंगावरून तेव्हांच करतां येण्यासारखी असते, तशी कवित्वाची किंवा तत्त्वज्ञतेची गोष्ट नाहीं. यामुळें पोप कवि आहे कीं नाहीं याविषयींचा वाद आजपर्यंत चालला आहे, व मानसशास्त्रांतील अनेक प्रमेयें अद्याप जशींचीं तशींच संदिग्धावस्थेंत आहेत!

तेव्हां मोरोपंताची प्रख्याति लवकरच जी सार्वत्रिक झाली ती त्याच्या कवितेच्या बाह्य स्वरूपावरून झाली. याच्या उज्ज्वलत्वानें लोकांचे डोळे इतके दिपून गेले कीं, अंतर्गत स्वरूपाची परीक्षा करणें दुर्घट झालें. किंबहुना ती करण्याचें त्यांस अगत्यहि वाटलें नाहीं. मोरोपंतासारखा कवि मागें झाला नाहीं व पुढेंहि होणार नाहीं, इत्यादि प्रकारांनीं त्याची वाहवा सर्वांच्या तोंडीं जी झाली ती वरील कारणांवरूनच होय. अजून तरी प्रस्तुत कवीची एकंदरींत जी चहा आहे व त्याची प्रसंगविशेषीं जी तारीफ ऐकूं येते तिचें बहुधा दुसरें कांहीं कारण नाहीं. हरदासांच्या तोंडून बहुधा सर्वांनीं असे उद्गार ऐकिले असतील कीं, 'वाः! काय पंतांचें चातुर्य! असा कवि दुसरा नाहींच!' पण या उद्गाराचें मूळ पाहूं जातां चमत्कारिक प्रास किंवा यमक यांच्याहून निराळें फारकरून आढळणार नाहीं. इतर लोकांतहि प्रायः अशीच समजूत दृष्टीस पडते, कीं ज्याची भाषेवर एवढी सत्ता कीं अमुक अमुक अक्षरें चरणाच्या शेवटीं आणायाचींच तर तीं सहज आणायाचीं, तन्हेतन्हेचे प्रास मधें साधायाचे, रामायणें रचिलीं आहेत तर राजाधिराजांचें जसें ऐश्वर्य दृष्टीस पडतें कीं चंदनाचा महाल तर जिकडे तिकडे चंदनच, बिलोरी महाल तर येथून तेथून बिलोरच, संगमवरी दगड तर चोहोंकडे तोच, त्याप्रमाणें लघ्वक्षर रामायण ह्मटलें कीं सारी एकमात्रक अक्षरांचीच गर्दी,

---

१. वरील ह्मण येणेंप्रमाणें—

'An empty sack cannot long stand upright' (रिकामें पोतें किती वेळ ताठ उभें रहाणार?)

निरोष्ठ रामायण झटलें कीं तें खुशाल विडा खाऊन वाचावें, दामरामायणांत पहावें तों आर्याधीचे शेवटले वर्ण व पुढच्याचे आद्य वर्ण शेवटपर्यंत सारखे गुंफलेले,—याप्रमाणें हव्या त्या तऱ्हेवर ज्या नाट्याचार्यानें वाग्देवीस नर्तकीप्रमाणें नाचवावी, त्यांचें काव्यचातुर्य काय वर्णावें?

५. आतां वरील रचनाचातुर्य हें कवित्वाचा मोठा भाग होय असें समजून त्यावरून प्रस्तुत कवीची महाकवींत गणना करणें हें किती समंजस आहे याचा विचार करूं. गेल्या सत्तेचाळीसाव्या अंकांत शब्दालंकारांच्या योजनेच्या संबंधानें जें विवेचन केलें आहे त्यावरून व इतर ठिकाणींहि प्रसंगवशात् जे उल्लेख केले आहेत त्यांवरून आमच्या वाचकांस कळलेंच असेल कीं शब्दालंकारांची योग्यता अर्थालंकारांहून फार कमी आहे. शब्दालंकार हे वस्तुतः दोषमय नाहींत, व मोठमोठ्या सर्वमान्य कवींनींहि त्यांचा प्रयोग केलेला आढळतो. हें खरें, तरी वस्तुतः पहातां त्यांच्या घटनेस कवित्वाचें अंग मानितां येईल असें नाहीं. केवळ यमक प्रास जुळणाराची आणि कवीची स्पर्धा झटली झणजे 'घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः'[1] अशासारखीच होय. केवळ छंदाची रचना व यमक प्रास यांची जुळणी हीं दोन्ही सामान्यतः पहातां व्यवहारोपयोगी शिल्पकर्माप्रमाणेंच श्रमसाध्य होत. सुतारकाम, शिवणकाम वगैरे ज्याप्रमाणें केवल सामान्य बुद्धीच्या मनुष्यासहि श्रमसाध्य होय, व त्या कामांत त्याची जसजशी अधिक मेहनत होईल तसतशी त्याची वाकबगारीहि वाढेल, त्याप्रमाणेंच पद्यरचनेचीहि गोष्ट आहे. हें कोणास सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण अंमळ विचार केला असतां वरील उल्लेख अयथार्थ वाटणार नाहीं. पहा कीं शाळेंतील मुलांस इतर विषय जसे शिकवितां येतात,—झणजे चांगलें वळणशुद्ध अक्षर, हिशेबठिशेब ठेवणें वगैरे, त्याप्रमाणेंच पद्यरचना करणें हेंहि त्यांस मोठेंसें कठिण जातें असें नाहीं. (एखादा विषय दिला असतां त्यावर गद्यरचना करणें जसें त्यांस सुलभ असतें त्याप्रमाणेंच छंदोबद्ध रचना ही थोड्या परिश्रमाअंतीं त्यांस सुसाध्य असते.) त्यांतून कविता रचण्याचा व वाचण्याचा ज्यास पुष्कळ नाद असतो त्यास तर यमक प्रास साधण्यासहि मोठेसे आयास पडत नाहींत. आमच्या देशांत वाचणारांची संख्या थोडी आणि त्यांतून ग्रंथ विकत घेऊन वाचणारे तर फारच थोडे, त्यामुळें कविता करण्याचा धंदा ज्यारीनें चालत नाहीं; पण तेंच विलायतेंत पाहिलें तर दरवर्षास शेंकडों नवीं काव्यें प्रसिद्ध होत असतात व त्यांच्या शेकडों हजार प्रती उडत असतात! याविषयीं प्रमाण पाहिजे असल्यास जॉनसनचें 'कविचरित्र' किंवा पोपचें 'डनसिअड' हें पहावें. पहिला

---

१. "घट निर्माण करणारा कुंभार आणि त्रिभुवनास निर्माण करणारा ब्रह्मदेव यांची झटापट."

ग्रंथ जॉनसननें लंडन शहरांतील पुस्तकवाल्याच्या विनंतीस मान देऊन रचला.[1] व पुस्तकवाल्यांनीं जे कवि निवडून काढले ते त्यानें हातीं घेतले. ही निवडानिवड पुस्तकवाल्यांनीं अर्थातच दुकानांतील विक्रीच्या मानावर केलेली होती; ह्मणजे ज्या कवींचे ग्रंथ चांगले विकले व त्यांस चांगली किफायत झाली तेच त्यांनीं पुढें केले; मग त्यांची वास्तविक योग्यता कांहींहि असो![2] वरील गोष्टीस हल्लीं बरोबर एक शतक लोटून गेलें आहे. पण इतक्यांत काय चमत्कार झाला आहे पहा, पारसीकांचा राजा झर्सीज यानें उंच मनोऱ्यावर चढून तेथून आपलें अफाट सैन्य पाहिलें असतां त्यास जसा आमच्या अर्जुनाप्रमाणें अत्यंत विषाद झाला आणि वाटलें कीं, अरेरे! एवढ्या अवाढव्य समुदायांतून शंभर वर्षांअंतीं एकहि जगणार नाहींना! त्याप्रमाणेंच जॉनसननें ज्या मंडळीचीं चरित्रें लिहिलीं त्यांची अवस्था झाली आहे! एवढ्या पंडिताच्या हातून त्यांचीं चरित्रें लिहिलीं गेलीं यास्तव त्यांचें नांव बुडण्याचें आतां तादृश भय नाहीं एवढें खरें; पण एरवीं पाहिलें असतां वरच्यांतली निम्मेशिम्मे मंडळी इतक्यांतच गळून गेली आहे. कोठले 'किंग' आणि 'ड्यूक'? खरे राजे व खरे ड्यूक आजपर्यंत जसे शेंकडों धुळीस मिळून गेले त्याप्रमाणेंच वरील नामधारी 'किंग' व ड्यूक' हे केवळ नामशेष होऊन बसले आहेत! पोपच्या 'डनसिअड' काव्यांतील मंडळीची तर याहूनहि दुर्दशा! 'डन्स' शब्दाचा अर्थ 'शंख' असा आहे, व वरील काव्यांत सारे शंखमणि ओंवले आहेत ह्मणून वरील नांव त्यास दिलें आहे. पोप हा लवकरच कवित्वसिंहासनावर आरूढ झाला असतां त्या वेळचे शेंकडों छोटेखानी कवि रविबुकन्यायानें त्याचा मत्सर करूं लागले व अनेक तऱ्हांनीं त्यास त्रास देऊं लागले. शेवटीं त्यानें साऱ्या मंडळीस एका दावणींत घालून तिजवर आपला विनोदप्रतोद चालू केला. हा प्रतोद वरील काव्य होय.[3] असो; तर वरील उदाहरणांवरून हें लक्षांत आणा-

१. अंक ३७ पहा.

२. वरील चरित्रलेखनाचें काम जॉनसननें केवळ सांगकाम्याप्रमाणें केलें. इंग्रेजी कवींत अग्रगण्य जे शेक्सपीयर, चॉसर, स्पेनसर हे सदरील कवितंत मुळींच नाहींत, व त्या वेळच्या कित्येक प्रसिद्ध कवींसहि असाच फांटा दिला आहे. वर सांगितलेली खोगीरभरती मात्र हवी तितकी आहे. यासंबंधानें बॉसवेलचा व जॉनसनचा सवाल जबाब झालेला आहे—

"I was somewhat disappointed in finding that the edition of the 'English poets', for which he was to write prefaces and lives, was not an undertaking directed by him, but that he was to furnish a preface and life to any poet the booksellers pleased. I asked him if he would do this to any dunce's work, if they should ask him. Johnson. "Yes, Sir; and say he was a dunce!"

३. वरील ग्रंथ सन १७२८ त प्रसिद्ध झाला. पोपनें कुकविसत्र आरंभल्याची वार्ता

(पुढें चालू).

याचें कीं (पद्यरचना ही श्रमसाध्य होय) व इतर श्रमसाध्य कलांप्रमाणें हींतहि परिश्रमानुरूप वरीच निपुणता साधतां येते.

आतां एवढें खरें आहे कीं, यमकप्रासादि चमत्कार जरी श्रमसाध्य असले तरी मोरोपंतानें ते जितक्या तऱ्हेचे केले आहेत तितके करणें व तितक्या सहज रीतीनें करणें हीं दोन्ही कृत्यें प्रायः दुर्घटच होत. सरस्वतीचा व्यास प्रसाद असेल, ह्मणजे सारी भाषा ज्याच्यापुढें जशी काय हात जोडून उभी असेल, त्यासच वरील गोष्ट साध्य होय. तरी हें भाषाप्रभुत्व बुद्धिमत्त्वाचें जितकें दर्शक होय तितकें कवित्वाचें नाहीं हें वाचकांनीं लक्षांत आणलें पाहिजे. प्रस्तुत पुस्तकाच्या तिसऱ्या व चवथ्या अंकांत व इतरत्रहि प्रसंगोपात्त वरील दोहों गुणांच्या भिन्नत्वाविषयीं विवेचन केलें आहे; त्यावरून सहज समजण्यासारखें आहे कीं शब्दचमत्कारघटनेचें चातुर्य आणि सहृदयत्व यांचा परस्पर कांहीं संबंध नाहीं. दोहोंचें सामानाधिकरण्य क्वचित् संभवेल,—जसें प्रस्तुत कवीचेठायीं; पण त्यांचा नित्य संबंध ह्मणून बिलकूल नाहीं. ज्याप्रमाणें जो उत्कृष्ट कसरती तो मोठा बळकट असला पाहिजे असा नेम नाहीं, किंवा जो मोठा पहिलवान त्यास दोरीवरून चालतां आलें पाहिजे असेंहि नाहीं; त्याप्रमाणेंच जो बुद्धिसामर्थ्यानें यंत्रें, कूटें, निरनिराळे बंध वगैरे रचील त्यास सरस काव्य करतां येईलच, किंवा सरस कवि त्यास वरील यंत्रादि प्रकार अवश्य साधतीलच असा कांहीं नियम नाहीं. तेव्हां मोरोपंताच्या कवितेंत यमकप्रासादिकांचे जे चमत्कार आहेत त्यांवरून त्याची गणना महाकवींत करणें हें असमंजस होय. तेवढ्यांवरून जर एवढ्या पायरीवर त्यास चढवावें तर मग 'रामकृष्णविलोमकाव्य,' 'नलोदय,' 'राघवपांडवीय' इत्यादि प्रबंधांत कवित्वाचें सर्वस्व उतरलें आहे असें ह्मणणें भाग येईल!

६. तर याप्रमाणें प्रस्तुत कवीविषयीं यमकादि प्रकरणांवरून झालेली जी समजूत तिजविषयीं विचार झाला. आतां मोरोपंताची कविता झटली ह्मणजे मोठी गहन, जो संस्कृतज्ञ पंडित असेल त्यासच ती लागेल, इत्यादि जे प्रवाद सामान्यतः ऐकूं येतात त्यांतील तथ्यातथ्याचा विचार करूं.

वरील समजुती कशावरून उत्पन्न झाल्या हें मागील निरूपणावरून वाचकांच्या लक्षांत येईलच. मोरोपंताची प्रख्याति मागें सांगितल्याप्रमाणें जेव्हां चोहोंकडे झाली

अगोदर चोहोंकडे पसरलेलीच होती; यास्तव सदरील काव्य विकावयाला काढावयाच्या वेळेस सारी 'शंख' मंडळी पुस्तकवाल्याच्या दुकानाशीं जमली, आणि त्यास पुस्तकें बाहेर काढूं देईनात! ही मौज पोपच्या 'चरित्रां'त काढलेल्या एका चित्रावरून दिसून येते.—पोपचें चरित्र अद्यापहि इंग्लंडांत चालून आहे. मेकॉले साहेबांनीं एकास कुकवित्वाबद्दल कसें खरमरीत वक्षीस दिलें आहे तें कित्येक वाचकांस माहीत असेलच. हे कविवर्य रॉबर्ट मॉन्टगॉमेरी होत. (मेकॉलेचा निबंध, एप्रिल १८३० पहा.)

असेल तेव्हां त्याचें संस्कृत पद्धतीचें काव्य पाहून लोकांच्या मनांत वरच्यासारख्या कल्पना भरल्या असतील याची कल्पना करणें मोठें कठिण आहे असें नाहीं. नैषधकार, चंपूकार यांच्या बरोबर हरदासांच्या कीर्तनांत या नव्या आर्याकाराचें काव्य जेव्हां निघूं लागलें असेल, तेव्हां वरील कवींविषयींच्या सर्व समजुती या नव्या कवीसहि जडल्या असतील हें सहजच आहे. त्यांतून मोरोपंताची कविता 'प्राकृतसंस्कृतमिश्रित' असल्यामुळें व अशिक्षित लोकांस तात्काळ कळण्याजोगी नसल्यामुळें वरील अनेक भ्रम माजण्यास विशेषच कारण झालें हें उघड आहे.

७. आतां वरील समज कितपत खरे आहेत याविषयीं विचार करूं. प्रथमतः कवींविषयींच पाहिलें तर तो श्रीहर्ष, जगन्नाथराय, अप्पय्या दीक्षित यांसारखा पंडित होता असें मुळींच नाहीं, तो केवळ पुराणिक होता. पुराण सांगतां येण्यास कितपत काव्यव्युत्पत्ति लागते हें बहुधा पुष्कळांस माहीत असेलच. आदिकवीच्या 'मधुर कूजितां'त आणि भारवीच्या 'नारिकेलफलतुल्य वचनां'त सुबोधतेच्या दृष्टीनें पहातां किती अंतर आहे हें बहुधा कोणासहि सांगावयास नको. तेव्हां आमच्या कवीचा अत्यंत परिचय ज्या ग्रंथांशीं ते वरील आद्यकाव्यांच्या तोडीचे अत्यंत सुबोध ग्रंथ होत. ते सोडून त्यानें तज्जातीय इतर ग्रंथांकडे नुसतें अवलोकनहि केलेसें दिसत नाहीं. आजपर्यंत जेवढा ह्मणून प्रस्तुत कवीच्या ग्रंथांचा भाग आमच्या पहाण्यांत आला तेवढ्यांत असें एकहि स्थल आह्मांस आठवत नाहीं कीं, ज्यावरून संस्कृतांतील पंचमहाकाव्यांशीं किंवा नाटकांशीं मोरोपंताचा परिचय होता असें अनुमान करतां येईल! कालिदासादिकांचे अर्वाचीन काव्यग्रंथ जरी सफई बुडून जाते तरी प्रस्तुत महाराष्ट्रकवीचे ग्रंथ सध्यां जसे निपजले त्यापेक्षां निराळ्या तऱ्हेचे निपजतेना असें आह्मांस खास वाटतें. तर जी काव्यव्युत्पत्ति पांडित्याचा केवळ निकृष्ट भाग, किंबहुना मुळींच भागहि नव्हे, ती आमच्या कवीची वर सांगितलेल्या तऱ्हेची ह्मणजे पौराणिक पद्धतीचीच केवळ होती. हें सांगितल्यावर मग पांडित्याचा शिरोभाग जीं न्यायमीमांसादि शास्त्रें त्यांत तर त्याची कितपत गति असावी हें सांगायाला नकोच! तेव्हां एकंदरींत

१. मोरोपंताची एक आर्या प्रसिद्धच आहे—

नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती ।
वैकुंठपेठ मोठी नांवावरि हीनदीन खटपटती ॥

या आर्येवरून प्रस्तुत कवीस वरील शास्त्रांची कितपत अभिज्ञता असावी याचें कांहीं अनुमान करण्यास जागा आहे. शिवाय त्याच्या खुद्द ग्रंथांतहि प्रस्तुत प्रकरणीं निर्णायक होण्यासारखीं कांहीं स्थलें आहेत. उदाहरणार्थ—

ऐसें ह्मणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी ह्मणे अयि ते ।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते ।--आदिपर्व २९.

(पुढें चालू).

प्रस्तुत कवि हा महापंडित होता ही जी सामान्यतः त्याच्या प्राकृतसंस्कृतमिश्रित काव्यावरून लोकांची समजूत झालेली आहे ती अगदीं खोटी आहे. महाराष्ट्र कवींत पंडित असा एक वामन मात्र होता; बाकीच्यांस वरील संज्ञा लावणें हें अप्रशस्त होय.

मोरोपंताच्याच ग्रंथांवरून पहातां तो आपणास पंडित समजत असे किंवा त्या पदावर चढण्याविषयीं त्याची हांव होती असाहि प्रकार बिलकूल नजरेस येत नाहीं. तो आपली पदवी ओळखून तींत संतुष्ट होता असें दिसतें. आपलें कवित्व कोणत्या तोलाचें आहे हें पक्केपणीं जाणून तो त्याविषयीं योग्य अभिमान बाळगीत असे, व दूषकांच्या आक्षेपांची पर्वा करीत नसे, हें त्याच्या कांहीं उल्लेखांवरून दिसतें खरें, तरी जगन्नाथरायाप्रमाणें 'पंडितराज', 'पंडितपति', पंडितराजराजितिलक' इत्यादि विशेषणें त्यानें आपणास घेतलेलीं कोठेंहि आढळत नाहींत. फार तर काय, पण रामजोशांप्रमाणें 'कविराय' किंवा जयदेवाप्रमाणें 'कविराजराज' अशा उपपदांचाहि त्यानें प्रयोग केलेला नसून स्वतःविषयींचा उल्लेख केवळ 'मयूर', 'मोर', 'मयूरेश' अशा साध्या पदांनींच त्यानें केलेला आढळतो. शिवाय पांडित्य मिरविण्याचा दुसरा जो प्रकार असतो, ह्मणजे शास्त्रीय प्रकरणांस अनुलक्षून काव्यांत उल्लेख करायाचे, किंवा अर्थबाहुल्याचा चमत्कार करायाचा, तोहि प्रकृत कवीच्या कृतींत कोठेंहि दृष्टीस पडत नाहीं. हें तर काय, पण आपल्या अंगीं पंडितत्व वसत नसल्यामुळें आपलें काव्य पंडितांच्या दोषदृष्टीस पात्र होईल हा धाकहि आमच्या कवीनें वागविलेला कोठें कोठें नजरेस येतो!

तीस ह्मणे द्रुहिण अये देवि त्रैलोक्यसुंदरि पुनीते।
वारीं ताप जगा जे दिधले सुंदोपसुंदरिपुनीं ते॥
—कित्ता ३६.

आमचा कवि जर वैयाकरण असता तर 'अनुष्ठितुं' व 'पुनीते' अशीं रूपें तो न लिहिता हें उघडच आहे. इतर महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांतून व्याकरणशुद्धतेचा प्रकार कितपतसा दृष्टीस पडतो हें प्रस्तुत पुस्तकाच्या १० व्या अंकाच्या शेवटीं एका टीपेंत कांहीं उदाहरणें दाखल केलीं आहेत त्यांवरून लक्षांत येईल.

१. कथांसि उपमा दिली सुरभिची दिसे नीट ती
परंतु बहुमंद मी ह्मणुनि सच्छ्रुती वीटती।
कथा निरुपमा तयांप्रति पशूपमा शुद्धतें
नव्हेचि न विचारिलें बुधजनांशिं म्यां उद्धतें॥
'केकावली.'

असेंहि उपदेशिती गुरु रहस्य मंदा रुचे
निजस्तव जसा तसा अगुण घे न वंदारुचे।
ह्मणोनि निगमस्तुता भलतसें तुला वानितों
परंतु हृदयीं महाजनभयासि मी मानितों॥ कित्ता.

८. हें एक झालें. आतां यांच्याच अनुषंगानें रहाणारा दुसरा भ्रम जो कीं मोरोपंताचें काव्य जो संस्कृतज्ञ असेल त्यासच कळेल, किंबहुना स्थलविशेषीं मोठ-मोठ्या पंडितांसहि तें समजण्याची मुष्कील पडते,–यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं.

या भ्रमाचा निरास करण्यापूर्वी अर्वाचीन काळीं लोकांच्या मनास बळकट जडून राहिलेल्या एका मिथ्या कल्पनेचा ऱ्हास केला पाहिजे. ही कल्पना अशी कीं, काव्य जितकें जितकें दुर्बोध तितकें तितकें तें चांगलें. आपण कविता केली आणि ती वाचणारास किंवा ऐकणारास चटदिशीं कळली ह्मणजे मग आपली करामत व आपलें चातुर्य तें काय? खरें काव्य ह्मटलें ह्मणजे तें, कीं ज्यांतील पद्यें येथून तेथवर सबंध वाचलीं असतां बोध ह्मणून बिलकूल होऊं नये. पोरींच्या उखाण्यांतला 'काय तुझ्या मनांत, सांग माझ्या कानांत' हा जसा प्रकार, किंवा विडलकवीच्या कोड्यांतला 'षण्मासचा वायद्या'चा प्रकार, तशी जेव्हां बहार असेल तेव्हां तें काव्य!' ही समजूत अत्यंत असमंजसपणाची व अरसिकतेची आहे. काव्याचा उद्देश जर मनोरंजन आहे, व रस हा त्याचें केवळ तत्त्व होय, तर वरील दुर्बोधता हा काव्यांचा गुण नसून उलटा दोषच होय; कांकीं, जेथें अर्थज्ञानच दुर्लभ तेथें मनोरंजन कसलें व रसोत्पत्तीचा संभव तरी कसचा? शिवाय अर्थगांभीर्य व उत्तानार्थत्व हे गुण स्वभावतः परस्परविरोधी नव्हेत हें तत्त्व वरील अरसिक मंडळीस कळत नसतें. उत्कृष्ट पाणी जसें स्वच्छ असतें आणि खोलहि पण असूं शकतें, त्याप्रमाणें ज्या काव्याचीं पदें प्रसादयुक्त ह्मणजे अत्यंत व्यक्त आहेत त्यांत अर्थहि पण मोठा सखोल असूं शकेल! हें मर्म न समजून वरच्यासारखे लोक साध्या कवितेस भिकार समजतात, व मोठमोठे संस्कृत शब्द आणि लांब लांब समास योजून रचलेल्या काव्यास प्रौढ व गहनार्थक मानतात. केवळ सुबोधत्वावरून व दुर्बोधत्वावरून वरील कल्पना बांधणें हें केवळ स्वच्छपणावरून किंवा गढूळपणावरून पाण्याच्या खोलीचें अनुमान करण्यासारखें असमंजस होय. दोन हातच खोल आहे पण आंतील गोटे बिलकूल दिसत नाहींत अशा गढूळ डबक्यास भारी खोल मानून ज्यांतील रत्नसंचय वरून लख्ख दिसतो आहे अशा सागरास वरील स्वच्छतेवरूनच केवळ उथळ मानला असतां तें किती समंजस होईल!

१ सर्व देशांतील महाकवींच्या पद्धतीप्रमाणें **कालिदासा**चें काव्य प्रसादगुणविशिष्टच आहे; तरी 'नलोदय' या नांवाचें एक अत्यंत क्लिष्ट काव्य त्याच्या नांवानें प्रसिद्ध आहे. याचें कर्तृत्व अलीकडील मंडळी दुसऱ्या एका **कालिदासा**कडे देतात. जुन्या मंडळींत वरील काव्याच्या अप्रसन्नतेची अशी उपपत्ति करतात कीं, तें आमच्या कविमुकुटमणीनें लोकांच्या सांगीवरून लिहिलें. आपलें उत्तानार्थक काव्य हवें त्यास समजतें, तर असें नसून जें गहन अर्थाचें काव्य नुसत्या पंडितांसच लागेल असें रचावें असें लोकांनीं सांगितल्यावरून **कालिदासा**नें 'नलोदय' रचलें अशी एक गोष्ट ऐकण्यांत आहे. **मोरोपंता**च्या 'बृहद्दशमा'विषयींहि अशीच आख्यायिका आहे. या दोहोंत संभाव्यता कितपत आहे हें सांगायास नकोच!

असो; आतां प्रस्तुत महाराष्ट्र कवींचे ग्रंथ वरील दोहोंपैकीं कोणत्या प्रकारांत येतात तें पाहूं. सदरहू प्रकरणीं आजपर्यंत कोणत्या समजुती लोकांच्या मनांत दृढ होऊन बसलेल्या आहेत हें या पूर्वीच्या विवेचनावरून वाचकांस कळलेंच आहे. त्या या कीं, मोरोपंतांचें काव्य ह्मणजे दुर्बोध; जसा असोल्या नारळ असतो, कीं त्यास फोडायास कुऱ्हाडच आणली पाहिजे, तशी प्रस्तुत कवींची कविता; साहित्यांत सांगितलेल्या नारिकेलपाकाचें उत्कृष्ट उदाहरण ती होय. खरी कविता ह्मटली ह्मणजे द्राक्षापाक या तऱ्हेची असावी; कीं द्राक्षांत जसा अंतर्गत रस बाहेर लखलखीत दिसत असतो, व द्राक्ष तोंडांत घालण्याचा अवकाश,–कीं तें विरघळून गेलेंच, त्याप्रमाणें कवितेच्या अंगीं सुबोधपणा असावा! पण मोरोपंतांचें तर याच्या अगदीं विरुद्ध. हा प्रस्तुत कवींच्या प्रतिपक्ष्यांचा त्यावर भडिमार. त्याच्या तर्फेच्या मंडळीची प्रशंसा पाहिली तरी ती याच मुद्द्यावर. पंतांचें काव्य ह्मणजे काय हो! किती गहन, मोठमोठ्या पंडितांसहि तें उकलण्याची पंचाईत, एकेका आर्येंत दहा दहा अर्थ!! एकूण दोहों पक्षांचें भांडण तर खरें पण मुद्द्याची गोष्ट एक,—कीं मोरोपंताची कविता दुर्बोध. या दुर्बोधत्वामुळें कितीएक जणांची अशी प्रसिद्धी झालेली आहे, कीं मोरोपंताची कविता लावणें झालें तर त्यांनींच लावावी. अशा मंडळीस 'आर्यापंडित' ही लौकिक संज्ञा आहे.

आतां ही जी मोरोपंताच्या कवितेच्या संबंधानें हाकाहाक आहे ती पुष्कळ अंशीं निवळ व्यर्थ आहे हें कोणासहि सकृद्दर्शनीं सुद्धां दिसणार आहे. पहा कीं, मोरोपंतांची कविता मराठी पांचव्या व सहाव्या यत्तेच्या पोरांसहि चांगली समजते. कीर्तनसमयीं हरदास मोरोपंतांच्या आर्या ह्मणतात; पण या आर्या निघाल्या कीं श्रोतेमंडळी डुकल्या घ्यावयाला लागली किंवा उठून जावयाला लागली असेंहि कोठें आढळत नाहीं. हरदास तरी जातीनें मोठे विद्वान् व महापंडित असतात असें नाहीं.

---

१ **दादोबांनीं मोरोपंताची श्रीहर्षाशीं** जी तुलना केली आहे तिजवरून वरीलच भ्रम उत्पन्न होणारा आहे. शिवाय त्यांच्या इंग्रजी व मराठी प्रस्तावनेंत जो उल्लेख आहे तो येणेंप्रमाणें—

"Experience has perfectly satisfied me that even among Sanscrit scholars in this country, few can pretend to the full and easy comprehension of this little poem without mental efforts of no ordinary kind."

"त्यांत आणखी पंतांच्या काव्यांत निष्णात ह्मणून वाखाणलेल्या पुरुषांमध्येंहि बहुतेकांस 'केकावलि' हा ग्रंथ साचंत लागत नाहीं, असाहि बोभाटा माझ्या ऐकण्यांत होताच; या सर्व कारणांवरून मोरोपंतांच्या ग्रंथावर टीका करण्यास हाच लहानसा ग्रंथ म्यां निवडून काढला."

महाराष्ट्रकवितेचें ज्ञान व तिची चांगली उपस्थिति, आणि सामान्य प्रकारची व्युत्पत्ति एवढी सामग्री असली ह्मणजे त्यांचें काम चांगलें चालतें. मग अशांसहि जी कविता स्वतः समजायास व श्रोतृजनांस समजावयास मोठीशी कठिण जाते असें नाहीं तिच्या दुर्बोधतेची प्रसिद्धि किती पोकळ ह्मणावी! असें तर आजपर्यंत कोणाच्या पहाण्यांत आलें नसेल, कीं आज अमुक अमुक आख्यान लावायाचें तर त्यावरील आर्यांची कोणा महापंडितापाशीं जेव्हां संता घेऊन फोड करून घ्यावी तेव्हां मग हरदासानें कीर्तनाला उभें रहावें! शिवाय, हेंहि पुष्कळांस माहीत असेल कीं छापण्याचा प्रचार इकडे सुरू झाल्याच्यापूर्वी प्रस्तुत कवीचे ग्रंथ इतर महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांप्रमाणें लोक हस्तलिखित प्रती करून संग्रहास ठेवीत, व पुष्कळांचा प्रस्तुत कवीच्या आर्यांविषयीं छंद असल्याविषयींहि लौकिक असे. तर या सर्व प्रकारांवरून प्रस्तुत प्रकरणाचा काय निकाल होतो तो वाचकांनींच पहावा!

कवीविषयींच पाहिलें तर त्याच्या ग्रंथांतहि आपलें काव्य मोठें गहन आहे व तें उकलणें हें पंडितांशिवाय इतर कोणाच्यानेंहि होणार नाहीं अशा प्रकारची कोठेंहि प्रौढी झोकलेली आढळत नाहीं. स्वतःविषयींचे जे त्याचे कोठें कोठें उल्लेख आहेत त्यांत आपल्या कृतीच्या सरसत्वाविषयींच त्यानें लिहिलेलें आढळतें.[1] उलटा एके ठिकाणीं ('मंत्ररामायणा'च्या प्रस्तावनेंत) असा मात्र उल्लेख आढळतो—

कोठें दुरान्वित पद कोठें चुकली असेल यतिमात्र।
अतिमात्र दोष ऐसे न वदोत कवी समस्तगुणपात्र॥

जो कवि दूरान्वयाच्या योगानें वाचकांस काव्य समजतांना अडचण पडूं नये

---

१ उदाहरणार्थ पुढील आर्या पहा—

हें भीष्मपर्व पावो साधुश्रुतिशष्कुलीनभा सावें।
श्रीव्यासकृत मयुरेश्वर-विलस्थित वेगळें न भासावें॥
रसिक कवि परम सज्जन भगवद्भक्त प्रसन्न होतील।
न गमले यापरिस हित तो जो वदनांत अमृत ओतील॥
भारत.

जैमिनीकृताश्वमेध-स्थित कुशलवचरित वर्णिलें आहे।
बा हे रीति पहावी मग तों वाटे सुधानदी वाहे॥
नामरसायन.

पद्माकांतपदींच कृष्णविजयग्रंथांबुजन्मांजळी
भावें वंदुनि अर्पिला हरिजनामध्यें किती जे अळी।
ते याचा रस सेवितीलचि शिरीं वाहेल सन्मंडळी
हा स्वस्वामिपदप्रसाद खळ तो भीतील जैसा कळी॥
बृहद्दशम.

याविषयीं एवढा संकोच बाळगीत होता तो आपलें काव्य होईल तितकें दुर्बोध करण्याविषयीं झटेल कीं काय याचें अनुमान कोणासहि सहज होणार आहे!

आतां एवढें मात्र खरें आहे कीं, मोरोपंताचें कवित्व केवळ द्राक्षापाकाच्याच वर्गांत येणार नाहीं. साऱ्या महाराष्ट्र कवींत त्याचें काव्य समजण्यास अंमळ श्रम लागतील खरें. तरी जो बहुश्रुत आहे ह्मणजे ज्यास संस्कृत शब्द बरेच माहीत असून समासांची मोडणी समजली आहे, आणि प्रस्तुत कवीची पद्धति ज्यास थोडीशी ठाऊक झाली आहे, त्यास ह्मणजे दरएक आर्येशीं अर्थबोध होण्याकरतां थबकून रहावें लागेल असें मुळींच नाहीं. बहुतेक आर्या त्यास वाचतां वाचतां सहज उलगडतील. क्वचित् ठिकाणीं मात्र, कीं जेथें यमकामुळें, प्रासामुळें वगैरे वाक्याची रचना अंमळ अव्यवस्थित झाली असेल, तेथें थोडासा विचार करावा लागेल; तरी ज्याप्रमाणें सूर्याच्या आड आलेला ढग त्याच्या बिंबावरून निघाला असतां अंधार जाऊन एकदम चक्क होतें, किंवा धुराचा भपकारा वर निघून जाऊन अग्नीची ज्वाला प्रगट होते, त्याप्रमाणें वरील ठिकाणीं एकदम अर्थव्यक्ति झाली असतां मनास चमत्कार व आल्हाद होतो! तसेंच कांहीं थोड्या ठिकाणीं अर्थ खरोखरच दुर्बोधहि असेल. 'नवनीतांत'हि अशीं कांहीं स्थलें आहेत; तीं आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांच्या लक्षांत असतीलच. पण हा दुर्बोधपणा वाचकांस मुद्दाम घोळांत पाडण्याकरितां कवीनें आणलेला असतो किंवा यमकादिरचनेमुळें झालेला असतो असें ह्मणवत नाहीं. कांकीं, असला प्रकार बहुतेक कवींच्या ग्रंथांत, आणि त्यांतून ज्यांनीं ग्रंथरचना पुष्कळ केली त्यांच्यांत तर आढळायाचाच. प्रस्तुत कवीविषयीं असें ऐकण्यांत आहे, कीं तो एका बैठकीस शंभर शंभर दीडशें दीडशें आर्या रचीत असे, व त्याच्या हातच्या पंढरपूरच्या प्रती ज्यांनीं पाहिल्या आहेत ते सांगतात कीं त्यांत एकहि अक्षर कोठें खोडलेलें आढळत नाहीं. यावरून स्पष्ट दिसतें कीं, कित्येक इंग्रेजी कवींचा जसा प्रघात असे, कीं आपली कृति जितकी उत्कृष्ट व जितकी निर्दोष करवतां येईल तितकी झाली व शेकडों वेळां तिजवरून नजर व लेखणी फिरली ह्मणजे मग ती बाहेर काढायाची, तसा प्रकार मोरोपंताचा नसावा. तर शेक्सपीयर, ड्रायडन इत्यादि कवींप्रमाणें जें एकदां पहिल्या तडाक्यास लिहून टाकलें तें टाकलें, त्यांत पुनः फारकरून फेरफार व्हावयाचा नाहीं, ही त्याची तऱ्हा असावी. तर या कारणामुळें प्रस्तुत कवीच्या ग्रंथांत कोठें कोठें दुर्बोध स्थलें राहिलीं असावीं असें वाटतें.[1] याखेरीज अपपाठ हेहि स्थलविशेषीं

१. रचनाचापल्याच्या योगानें होणाऱ्या दुर्बोधत्वाचें एक चमत्कारिक उदाहरण स्काटच्या 'लेडी आफ दि लेक' नामक काव्यांत आहे. याच्या पहिल्या सर्गांत एके ठिकाणीं नवश्रीच्या वर्णनांत पुढील दोन ओळी आढळतात—

(पुढें चालू).

अर्थभ्रम होण्यास कारणभूत होत असतील; कांकीं, इंग्लंडांत जसें आहे, व हल्लीं इकडेहि चालू झालें आहे, कीं छापखान्याच्या सोयीमुळें ग्रंथकारानेंच खुद्द तयार केलेली प्रत वाचकांस मिळते,–तसा प्रकार अर्थातच जुन्या महाराष्ट्र कवींस लागू नाहीं. तेव्हां लेखकपरंपरेच्या योगानें झालेल्या प्रमादांचें प्रायश्चित्त बिचाऱ्या कवींस भोगणें येतें!

गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः।[1]

अंक ५८.–(१) विषयोपक्षेप. (२) लोकांची गतानुगतिकत्वाविषयीं प्रवृत्ति. (३) मोरोपंताच्या काव्याचें अनेकार्थत्व. (४) प्रस्तुत कवीचें पांडित्य. (५) श्रीहर्षाची व त्याची तुलना. (६) त्याच्या कवितेंतील अनेकार्थात्मक स्थळें. (७) ५३ व्या अंकांतील आर्येविषयीं विचार.

१. गेल्या अंकांत मोरोपंताच्या संबंधानें जे कित्येक विलक्षण समज लोकांत आहेत त्यांविषयीं बहुतेक विचार झाला. आतां त्यांतील एक मात्र कलम राहिलें आहे. हें कलम कोणतें तर प्रस्तुत कवीचें श्लेषप्रियत्व, ह्मणजे त्याच्या आर्यांचे दहा अर्थ होतात, हें होय.

Fox-glove and night-shade, side by side,
Emblems of punishment an l pride.

या ओळी कवीस स्वतःच्या स्वतःस कळेनात याविषयीं एके ठिकाणीं पुढील चमत्कारिक लेख आढळतो—

"Soon after the publication of the *Lady of the Lake*, anb whilst his fame was at its highest, Scott received a visit from an old and valued friend. Their conversation naturally turned on the successful poem, and the friend, delighted with the work as a whole, still decl red that some lines were quite unintelligible to him. Picking up a copy of the book, he opened it at this passage, and pointed it out to Scott, saying, 'There, I have puzzled over those tuo verses for hours, and I can't see your meaning. "Well" replied the poet, with his broad smile and accent, "it would have been a strange thing if you had seen my meaning, for I could never see it myself." This anecdote is related on the authority of the son of Scott's friendly critic."

वरील गोष्टीचा प्रत्यय 'मंत्रमय भागवता'वरून आह्मांस आला. याची एक जुनी प्रत आह्मांस मिळाली होती. ती व पंढरपुरची प्रत यांत अनेक ठिकाणीं विलक्षण तऱ्हेचे फेर आढळले. वरील अस्सल प्रतीखेरीज पुष्कळ ठिकाणचा अर्थ कांहीं कळला नसता! वरील रामायण हें हल्लीं 'काव्येतिहाससंग्रहां'त छापत आहे.

१. " जग हें गतानुगतिक आहे, ह्मणजे जिकडे एक गेला तिकडे दुसऱ्यांनीं डोळे मिटून जावयाचें, परमार्थ ह्मणजे वास्तविक गोष्ट काय आहे तिच्याविषयीं कोणी शोध करीत नाहीं."

२. लोकांची सामान्यतः प्रवृत्ति अशी आढळते कीं, जो समज एकदां होऊन बसला तो 'पीछेसी आई' या न्यायानें केवळ अंधपरंपरेनें पुढें चालवायाचा. एकंदर राष्ट्राच्या मानानें कोणत्याहि देशांत पहातां विद्वज्जनांची संख्या थोडीच असल्यामुळें, आणि त्यांतून रायचंदाच्या टीपेवर निर्वाह न करतां आपणाजवळ आपला खाजगी कांटा बाळगून सत्यासत्य तोलणारी मंडळी तर वरच्याहूनहि फारच थोडी असल्यामुळें वरचा गतानुगतिकत्वाचा प्रकार सर्वत्र आढळण्यांत येतो. आमच्या देशांत वेदांविषयीं काय समजूत आहे ती कोणासहि सांगावयास नकोच;—कीं त्यांचा अर्थ केवळ अगम्य आहे. जसा नीलनदीच्या उगमांचा शोध अद्याप लागला नाहीं, व तो लागण्याचा उद्योगहि 'नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ' या वचनाप्रमाणें निषिद्ध होय; त्याप्रमाणेंच अनादि जी श्रुति तिचा अभिप्राय परम दुरापास्त असून त्याविषयीं परिश्रम करणेंहि व्यर्थ व साहसात्मकच होय! पण हा समज कितपत खरा आहे याविषयीं अलीकडे कोणासहि संशय उरण्यास जागा राहिली नाहीं. आमचे रेणानदीकांठचे पाश्चात्य आर्यबंधु तर रूपावळी झाली कीं प्रथमतः 'अग्निमीळे'वर धडाका उडवतात! आणि एकंदरींत पहातां ऋग्वेदाचा अर्थ कोणासहि होत नाहीं हें ह्मणणें 'रामायण' किंवा 'राजा शिवाजी' हीं काव्यें कोणासहि कळत नाहींत असें ह्मणण्याप्रमाणेंच अत्यंत असमंजस होय. पण लोकांच्या मनाचा असा एक चमत्कारिक स्वभाव आहे,—तो येथेंच नव्हे, तर चोहोंकडेहि असाच आढळतो—कीं जें दृश्य व परिचित त्यापेक्षां जें अदृश्य व अपरिचित त्यास अधिक मान![1] तेव्हां या स्वभावास अनुसरूनच जो वेद एवढा परमपूज्य त्याचा अर्थ एवढा उत्तान[2] असेल हें लोकांच्या मनाच्यानें घेव-

---

१. वरील प्रमेयाचें पुढील दोन सुभाषितांत दृष्टांतासहित निरूपण केलें आहे—

अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति।
मलये भिल्लपुरंध्री चंदनतरुकाष्ठमिंधनं कुरुते॥

अतिपरिचय खोटा मान राहात नाहीं।
प्रगट दिसत भानु तो जगीं तुच्छ पाहीं
लघु शशि द्वितियेचा वंदिती सर्व भावें
ह्मणवुनि सखया रे दूर देशीं रहावें॥

२. वेदाचा अर्थ सुगम आहे, व युरोपियन लोक प्रथमतःच ऋग्वेद हातीं धरतात, या दोन्ही गोष्टी पुष्कळ वाचकांस कदाचित् विलक्षण वाटतील; पण वेदाचें दुर्बोधत्व त्यास कशांमुळ प्राप्त झालें आहे हें समजलें असतां वरील विस्मय नाहींसा होईल. 'ज्ञानेश्वरी'च्या दुर्बोधतेचें जें कारण तेंच वेदाच्या दुर्बोधतेचें होय. 'ज्ञानेश्वरी'ची भाषा जुनाट असल्यामुळें अर्वाचीन महाराष्ट्र भाषा जाणणारांस वरील ग्रंथ जसा अवघड लागतो, त्याप्रमाणेंच पंचमहाकाव्यांशींच ज्याचा परिचय त्यास ऋग्वेदाची भाषाहि अत्यंत अपरिचित वाटते. हल्लीं-

(पुढें चालू).

वत नाहीं. असो; दुसरें उदाहरण मूर्तिपूजेचें घ्या. हा मार्ग वेदविहित आहे किंवा नाहीं, खऱ्या 'जिवंत' देवास मूर्तिपूजेची चीड येते किंवा नाहीं, वगैरे विचार एकीकडे ठेवले असतां केवळ इतिहासज्ञानावरून कोणासहि कळणार आहे कीं, मांजरांस व सुसरींस भजणाऱ्या लोकांनीं पर्वतप्राय मनोरे बांधले, ज्युपिटराच्या एका भक्तानें साऱ्या पृथ्वीवर आपलीं गरुडांकित निशाणें फडफडाविलीं व दुसऱ्यांनीं सर्व विद्यांचें व कलांचें सार्वभौमत्व संपादन केलें, मारया देवींच्या भजकांतच अत्युत्कृष्ट मूर्तिकार, चित्रकार व मंदिरकार जन्मले आहेत, खुद्द आमच्या देशांतच पाहिलें असतां गाईच्या भजकांनीं साऱ्या आर्यभूमीचें आधिपत्य संपादन केलेलें आहे, व तुळशींच्या पायां पडणाऱ्या बायांनींहि वेळोवेळां राज्याचें सुकाणूं हातीं धरलेलें आहे, किंबहुना रणमंडळांत गर्जनाहि केली आहे! तसेंच एकंदरींत पहातां आजपर्यंत जेवढीं राष्ट्रें उदयास आलीं त्यांतील बहुतेक मूर्तिपूजकच होतीं, व आज जगांत जी सुधारणा दृष्टीस पडते आहे तीहि फारकरून वरील लोकांपासूनच आलेली आहे. पण हें सर्व सर्वांच्या एवढें डोळ्यांसमोर ढळढळीत असतां पाद्रींचें व्याख्यान किंवा सामाजिकांची 'जुक्ती' ऐकली असतां त्यांत मतलब काय आढळतो,–कीं मूर्तिपूजेसारखा घोर पापमार्ग दुसरा कोणता नाहीं; जेथें मूर्तिपूजा आहे तेथें विद्या नाहीं, कला नाहीं, नीति नाहीं, शौर्य नाहीं, दया नाहीं,–कांहीं नाहीं! चोरी, चाहाडी, शिंदळकी, मारामाऱ्या, खून, रक्तपात, या अनर्थपरंपरेची मात्र रगाडी! मूर्तिपूजा असली कीं तेथें सुखाचें वारें सुद्धां लागायाचें नाहीं, व विद्येची वार्ताहि ऐकूं यावयाची नाहीं! या सर्व उद्गारांचें मूळ पाहूं जातां यहुदी, ख्रिस्ती व मुसलमानी धर्मांत उपदेशिलेला जो मूर्तींचा द्वेष तो आज हजारों वर्षें अनेक राष्ट्रांच्या मनांत बिंबून जाऊन 'बाबावाक्यं प्रमाणम्' या न्यायानें पितृपुत्रपरंपरेनें पुढें चालत गेला हें होय. आमच्या देशांतहि मिशनरींनीं मूर्तिपूजेच्या नांवानें शतशः आरोळ्या मारल्या असल्यामुळें तेंच तुणतुणें पुढें ब्रह्मोनीं, सामाजि-

---

च्या इंग्रेजी भाषेंत व चॉसर कवीच्या भाषेंत तसाच फरक आढळतो. शिवाय 'सप्तसिंधू'च्या तीरीं यज्ञयाग करणाऱ्या प्राचीन आर्यांच्या काळांत व हल्लींच्या मनूत जमीनअस्मानचें अंतर असल्यामुळें पूर्वीच्या पद्धति आतां बिलकूल कळेनाशा झाल्या आहेत हेंहि वरील दुर्बोधतेचें एक दुसरें मोठें कारण होय. तरी ज्या अर्थी पारशी लोकांच्या प्रमाणें आमचे जुने ग्रंथ नाहींसे झाले नाहींत, व प्राचीन आर्यांचे वंशज आह्मी या देशांतल्या देशांत अद्याप असून पूर्वीची परंपराहि अद्याप केवळ विच्छिन्न झालेली नाहीं, त्या अर्थी 'जेंदावेस्ता' ग्रंथाप्रमाणें आमच्या वेदांस निवळ दुर्बोधत्व आलें नाहीं! त्यांची रचना साधी असल्यामुळें व विषयहि सुगम असल्यामुळें आणि त्यांतून भाष्यादि साधनें अनुकूल असल्यामुळें, अर्थाची फोड होण्यास मोठेसे प्रयास आहेत असें नाहीं.

कांनीं, दयानंदभक्तांनीं व शेवटीं सत्यशोधकांनींहि चालविलेलें आढळतें![1]

३. तर प्रस्तुत कवीच्या काव्याच्या अनेकार्थत्वाविषयीं आज सुमारें शंभर वर्षें लोकांत जी बोलवा आहे ती वरील कलमांतील दोन सिद्धांतांप्रमाणें निवळ बाजारगप्प आहे. तिला आधार ह्मणून बिलकूल नाहीं. मोरोपंताचे ग्रंथ उगीच चाळून जो पाहील त्यास सुद्धां कळून येईल कीं वरील गोष्टीस शेंडा ना बुडखा! आतां इतके दिवस चालत आलेल्या प्रवादाविषयीं व रावबहादुरांसारख्यांच्या अभिप्रायाविषयीं एवढें निःक्षून जें आह्मी मत प्रगट करतों तें कशावरून हें सांगणें अवश्य आहे.

४. एक तर ही गोष्ट प्रथमतः लक्षांत आणली पाहिजे कीं मोरोपंत हा पंडित

---

१. परवां जो आगीचा भयंकर कहर उसळला त्याच्या संबंधानें एक पत्रिका या शहरांत दुसरे दिवशीं वांटली गेली. ती आमच्या वाचकांपैकीं फारच थोड्यांच्या पहाण्यांत आली असेल यास्तव तिचें पूर्वार्ध येथें उतरून घेतों—

"सूचना–ता० १३ व १४ मे १८७९ दिवशीं पुणें शहरांत जो अग्निप्रलय झाला आणि तेणेकरून जी लोकांस भयंकर स्थिति प्राप्त झाली, त्यावरून आमच्या मनांत अशी कल्पना उत्पन्न झाली कीं, आज ४० वर्षांपासून ह्या पुणें शहरांतल्या लोकांस तारक जो प्रभु येशूख्रिस्त याजकडे फिरण्याविषयीं बहुत बोध व सूचना मिळत असतांना लोक येशूख्रिस्ताचा धिःकार करून आपल्याच गर्वानें फुगून पापामध्यें राहिले आहेत. ह्मणून त्यांजवर देवाचा भयंकर क्रोध पेटलेला आहे, आणि त्याच क्रोधाग्नीनें सदरहू दिवशीं आपल्यापुढें होणाऱ्या शिक्षेचा थोडासा मासला दाखविला. तर पृथ्वीवर रहाणाऱ्यांच्या दुष्टपणाचें शासन करायाला परमेश्वर आपले स्थानांतून निघाला आहे. त्यानें सूप आपले हातांत घेतलें आहे. आणि तो आपलें खळें निर्मळ करील. गहूं कोठारांत सांठवील, आणि भूस न विझणाऱ्या अग्नींत जाळून टाकील. जसा रात्रीं चोर येतो तसा प्रभूचा दिवस येईल, आणि कुशल व सर्व सलामत आहे असें जेव्हां मनुष्यें ह्मणतील तेव्हां जशी प्रसूतीची वेदना स्त्रीला लागते तसा त्यांचा अकस्मात् नाश होईल. आणि ते निभावणार नाहींत."

नुकता जो साऱ्या दक्षिण हिंदुस्थानभर भयंकर दुष्काळ पडला होता त्याच्या संबंधानेंहि वरच्यासारखेच विलक्षण लेख ख्रिस्ती वर्तमानपत्रांतून येत असत, हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस आठवत असेलच. बंगाल्यांतले प्रख्यात मिशनरी डॉक्टर डफ यांचा 'हिंदुस्थानांतील बंड' या नांवाचा पत्ररूप ग्रंथ आह्मीं नुकताच वाचला, त्यांत तरी वरीलच चमत्कार आढळला. सदरील ग्रंथांतील एक मोठें प्रमेय हें होय कीं, वरील सालीं एवढा बंडावा व एवढा रक्तपात झाला याचें कारण काय!–काडतूस प्रकरण, राजेरजवाड्यांची दगाबाजी, रशियन लोकांनीं केलेली चिथावणी, वगैरे केंप्रभृति इतिहासकारांनीं वर्णिलेलीं कारणें नव्हत, तर ईश्वराचा माजी कंपनी सरकारवर कोप! तो कशाकरतां?–तर हिंदुधर्माचें उन्मूलन करण्यांत त्यांच्याकडून जी कसर होत गेली तिजवरून!! बकलच्या इतिहासाच्या तिसऱ्या भागाच्या शेवटीं सन १८५३ सालच्या महामारीबद्दल इंग्रेजी प्रधानमंडळीचा व स्कॉटलंड येथील धर्माध्यक्षांचा जो चमत्कारिक पत्रव्यवहार झाला तो दाखल केला आहे; तोहि प्रस्तुत प्रकरणीं समजूत पडण्याकरतां वाचकांनीं वाचण्यासारखा आहे.

नव्हता. त्याची विद्वत्ता कोणत्या तऱ्हेची होती याविषयीं गेल्या अंकांत कांहीं निरूपण केलेंच आहे. त्याच्या वेळीं मराठी बादशाहीचा कळस झाला असल्यामुळें एतद्देशीय जुन्या विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तिचा प्रचार हल्लीं जसा इंग्रजी विद्येचा झाला आहे तसा सर्वत्र झाला होता खरा, तरी प्रस्तुत कवि तिजविषयीं केवळ उदासीन होता. पौराणिक व्युत्पत्तीच्या पलीकडे त्यानें कधीं हांव बांधिली नाहीं. तो शास्त्रांच्या अध्ययनास लागता तर त्यांत पारंगत होऊन भट्टाचार्य पदवीला पोंचता यांत संशय नाहीं, पण त्याच्या मनाची प्रवृत्तिच निराळी पडली. तुकारामास दिल्लीपद देऊं केलें असतें तर तें त्यास जितपत पसंत पडलें असतें, किंवा रामदासांच्या पायांवर त्यांच्या दिग्विजयी शिष्यानें आपल्या कमाईची नवी बादशाही वाहिली असतां तिजविषयीं त्यांनीं जितपत लोभ प्रगट केला, तितपतच आमच्या कवीसहि कणाद, पाणिनि, जैमिनि इत्यादि शास्त्रकारांच्या वाङ्मयाचें सार्वभौमत्व संपादन करण्याची हौस होती. तेव्हां 'घटपटादि खटपटीं'त न पडतां प्रस्तुत कवीनें परमार्थसाधनास जेवढा व्युत्पत्तीचा भाग अवश्य तेवढाच संपादन केला. बहुतेक महाराष्ट्र कवींची पांडितता कितपत होती याविषयीं पूर्वी अनेक वेळां लिहिलेंच आहे, व त्यांपैकीं 'पंडित' हें उपपद कोणत्या कवीस मात्र यथार्थत्वानें लागू पडतें हेंहि गेल्या अंकांत सांगितलेंच आहे. या पंडित कवीसहि पुढें स्वपांडित्याचाच पश्चात्ताप होऊन तें ओझें भगवद्भक्तीच्या पायीं उतरून ठेवावें लागलें; व बाकीच्यांचा तर पांडित्यावर केवढा कटाक्ष होता हें त्यांच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून दिसून येतें.[1] मग असलें पांडित्य जोडून आपल्या मुख्य उद्देशास बळेंच

---

१. तुकारामाचा एक अभंग पूर्वी दिलेला आहे. तो येथें दाखल करतों—

बरा कुणबी केलों । नाहीं तरि दंभेंचि असतों मेलों ॥
भलें केलें देवराया । नाचे तुका लागे पायां ॥
विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ॥
सेवा चुकतों संतांची । नागवण हे फुकाची ॥
गर्व होता ताठा । जातों यमपथें नाटा ॥
तुका ह्मणे थोरपणें । नरक होती अभिमानें ॥

रामदासानें ह्मटलें आहे—

नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी
जडे गर्व ताठा अभिमान पोटीं ।

रंगनाथाचें एक पद आहे—

श्रुतिपारायण शास्त्र सुभाषित उत्तम पंडित झाला रे ।
योगकळा सकळा अनुलक्षित वायु समग्रहि प्याला रे ॥
भूतभविष्य गमे समयीं यमनियमहि वश्य तयाला रे ।

(पुढें चालू).

व्याघात करून घेण्याचा उद्योग मोरोपंतानें केला नाहीं हें सहजच आहे. वरील उद्देश त्याचा दोन प्रकारचा होता. एक तर 'दयामृतघना'ची प्रसादवृष्टि आपणावर होण्याची आपल्या अंगीं पात्रता यावी, आणि दुसरा हा कीं, आपल्या देशबंधूंसहि वरील लाभ होण्यास साधनीभूत असा नूतन कवित्वप्रकार दाखवावा. या दोहोंखेरीज त्याचा आणखी कोणताहि हेतु नव्हता हें त्याच्या सर्व ग्रंथांवरून स्पष्ट दिसतें.

भुललारे भुललारे प्राणी भुलला या आभासा रे ।
आत्मकळा नकळे भ्रमला नर व्यर्थ पराक्रम गेला रे ॥ ध्रु० ॥

पंतांनींहि 'अकराव्या स्कंधां'त ह्मटलें आहे—

गलिताहंकृति जाणे बंधा मोक्षासि अनुभवीं चढला
तो पंडित इतर नव्हे जरि पुष्कळ सर्व शास्त्रही पढला ॥

१. 'विविधज्ञानविस्तारा'च्या पहिल्या वर्षाच्या पांचव्या अंकांत पुढील विलक्षण मजकूर आढळतो—

"मोरोपंत वैराग्यामुळें जर कारकुनीचा धंदा टाकून कविता करायाला लागला असता, तर त्यानें एकनाथ, ज्ञानेश्वर प्रभृति साधूंप्रमाणें भक्तिमार्ग धरिला असता व एकनाथ, ज्ञानेश्वर, रामदास यांप्रमाणें केवळ पारमार्थिक विषयांवर ग्रंथ केले असते; किंवा वामनासारिखें तरी कांहीं ग्रंथ इतर विषयांवर व कांहीं नुस्ते पारमार्थिक विषयांवर केले असते. परंतु त्या प्रकारचें कांहींच नाहीं. त्यानें जी कविता केली ती सर्व स्वतःचे कीर्तीसाठीं केली, परमेश्वराचें गुणवर्णन करण्याकरितां रचली नाहीं. सूक्ष्म पाहिलें असतां असें वाटतें कीं, मोरोपंत ईश्वराला फारच थोडा मान देत असे."

वरील 'सूक्ष्मदृष्टि' आक्षेपकाची नजर पुढील पद्यांवर गेली असती तर 'स्वतःचे कीर्तीसाठीं कविता केल्या'चा भयंकर आरोप तो आमच्या विचाऱ्या कवीवर बहुधा न घालता!—

हरि ज्यांचा कैवारी त्या पांडुसुतांसि वंदितों भावें ॥
वाटे चरित्र त्याचें कांहीं आपण तरावया गावें ॥
'आदिपर्व.'

ज्यांच्या गानें व्हावें प्रेमाश्रु-क्षपित-चंदन मयूरें ॥
आर्या समर्पिल्या हरि-चरणां श्रीरामनंदन मयूरें ।
'स्वर्गारोहण पर्व.'

सुयश न जयांत हरिचें चित्रहि गुणभवन कवन तें अशुचि ।
त्यांत सुमति नर न रमति पळहि बहु मानिती तया पशुचि ॥
'भागवत.'

पुन्हा न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो ॥
'केकावलि.'

ज्या कवीनें भगवद्यशोवर्णनपर ग्रंथांतहि मंत्ररचना केली, एक रामायण पुरेसें न वाटून अष्टोत्तरशत रामायणें रचण्याचा विलक्षण खटाटोप केला, व केवळ लोकहितपर बुद्धीनें रामायणभारतादि ग्रंथांचें सार प्राकृत वाणींनें सर्वांस समर्पण केलें, त्याच्याचविषयीं वरील उल्लेख करणें हें केवढें धाष्टर्य होय, केवढें अज्ञान होय, किंवा केवढा दुराग्रह होय!!

५. आतां प्रस्तुत कवीच्या ग्रंथांचें ज्यांनीं उगीच वरवर अवलोकन केलें आहे त्यांची अशी समजूत होणें सहज आहे, कीं ज्या कवीनें संस्कृत शब्दांची भरपूर योजना, समासांची रचना, आणि यमक व प्रास यांचा थाटमाट हें सर्व आपल्या कवितेंत आणून तीस संस्कृत कवितेचें साम्य आणिलें त्यास ही स्फूर्ति पंचकाव्यांवरून व विशेषेंकरून 'नैषधा'वरून, तसेंच 'लक्ष्मीसहस्र', 'वासवदत्ता', 'कादंबरी' वगैरे ग्रंथांवरून झाली असावी. रा० व० दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या व्याकरणाच्या प्रस्तावनेंत व 'यशोदा पांडुरंगी'च्या प्रस्तावनेंत मोरोपंताची श्रीहर्षाशीं जी तुलना केली आहे ती वरील समजुतीवरूनच होय. पण वस्तुतः पहातां वरील साम्य अत्यंत भ्रामक होय. तें इतक्यापुरतें मात्र खरें धरतां येईल, कीं संस्कृत भाषेचें अत्यंत उज्ज्वल स्वरूप जसें 'नैषधां'त दृष्टीस पडतें तसें मराठीचें मोरोपंताच्या काव्यांत आढळतें. 'नैषधां'त जशी अनुप्रासाची गर्दी आढळते व रचनेची कृत्रिमता नजरेस येते त्याप्रमाणेंच आमच्या महाराष्ट्रकवीच्या कवितेंतहि अनुप्रास व यमक हीं दोन्ही भरपूर असून पदरचनाहि प्रायः केवळ सुगम नसते. पण एवढ्याखेरीज बाकी कोणत्याहि प्रकारचें सादृश्य वरील दोघां कवींत किंवा त्यांच्या कवितेंत बहुधा आढळणार नाहीं. श्रीहर्ष केवढा पंडित होता हें त्याच्या महाकाव्याच्या शेवटीं त्यानें स्वरचित नानाशास्त्राविषयक ग्रंथांचे जे उल्लेख केले आहेत त्यांवरून स्पष्ट दिसतें; आमच्या महाराष्ट्र कवीच्या पांडित्याविषयीं मागें लिहिलेंच आहे. श्रीहर्षाच्या काव्यांत पदलालित्य उत्कृष्ट प्रकारचें आढळतें; आमच्या मराठी कवींपैकीं तर एकानेंहि वरील गुण साधण्याविषयीं विशेष परिश्रम केलेले दिसत नाहींत. 'नैषधां'त तेराव्या सर्गांत पांच नलांचें वर्णन करतांना कवीनें श्लेषाची कमाल करून सोडली आहे.—एक अर्थ नलाकडे, एक इंद्राकडे; पुनः एक नलाकडे दुसरा अग्नीकडे, याप्रमाणें नलाचें व चार लोकपालांचें एकेकाच श्लोकांत वर्णन केलें आहे; पुनः उलट घेऊन एकेका लोकपालाचें व नलाचें श्लेषेंकरून वर्णन केलें आहे; आणि शेवटीं एका श्लोकांत तर नलाचें व चारी दिक्पालांचें वर्णन केलें आहे![1] आमच्या प्राकृत मयूरकवीच्या नलोपाख्यानांत पाहिलें तर वरच्यासारखी कांहीं एक गडबड नसून मूळ भारतकाराचाच त्यानें साधा कित्ता वळविला आहे. श्लेषाच्या संबंधानें पाहिलें तर साऱ्या उपाख्यानांत एका आर्येंत मात्र एक लहानसा श्लेष केलेला आढळतो.[2] बाकी जो कवितापदेश वरील संस्कृत कवीच्या

---

१. रघुनाथ पंडितानें 'नैषधा'चें अनुकरण करून शारदेकडून चारी लोकपालांचें व नलाचें सश्लेष वर्णन करविलें आहे हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. 'नलोपाख्यानां'तील २२७-२३१ श्लोक पहा.

१. वरील आर्या ही होय—

(पुढें चालू).

वाग्देवीनें पदलालित्यपूर्वक नृत्य करून सारा अलक्तकांतित करून सोडला, व रसिकका-मिजनांच्या हृदयाचा भेद करणाऱ्या कटाक्षशरांनां मदनाचें पंचशरत्व सार्थ करून कालि-दासानें वर्णिल्याप्रमाणें

श्यामीचकार वनमाकुलदृष्टिपातै–
र्वांतेरितोत्पलदलप्रकरैरिवार्द्रैः ॥[1]

अशी स्थिति तिनें ज्याला आणली, त्याच प्रदेशावरून पंतांची वाग्वधू कुलस्त्रीप्रमाणें दृष्टिचांचल्य मुळीं प्रगट न करतां केवळ मर्यादशीलपणानें नीट गेली आहे! तेव्हां एकंदरींत पहातां प्रस्तुत महाराष्ट्र कवीची वरील संस्कृत कवीशीं तुलना करणें हें यथार्थ नव्हे.

दुर्बोधतेच्या संबंधानें तर प्रकृत कविद्वयाची तुलना वरच्याहूनहि असमंजस होय; कां कीं दोघांवरहि वरील आक्षेप ह्मणण्यासारखा लागू पडत नाहीं. जो सामान्य व्युत्पन्न आहे त्यास 'नैषधा'चे श्लोक अगदींच कळणार नाहींत असें नाहीं, व ज्याचा महाराष्ट्र कवितेशीं बराच परिचय झाला असेल त्यास मोरोपंताच्या आर्या मुळीं लाग-णार नाहींत असेंहि नाहीं.[2] एवढें मात्र ह्मणतां येईल खरें, कीं एका पक्षीं कालि-

---

अनुपम अनुरूप अनघ जरि वरिला त्वां नृपात्मजे न नल ।
होइल केवळ तापद कीं जो नर नल न होय तो अनल ॥

१. दशरथ राजाच्या मृगयेचें वर्णन––

तत्प्रार्थितं जवनवाजिगतेन राज्ञा
तूणीमुखोद्धृतशरेण विशीर्णपंक्ति ।
श्यामीचकार वनमाकुलदृष्टिपातै–
र्वांतेरितोत्पलदलप्रकरैरिवार्द्रैः ॥

" चपल घोड्यावर बसलेला आणि भात्यांतून ज्यानें वर बाण ओढलेला आहे असा तो राजा त्या कळपाच्या मागें लागला असतां सारीं हरणें विसकटून त्यांनीं तो वनप्रदेश आपल्या भयचंचल दृष्टिपातांनीं काळा सावळा करून टाकला;–जणों काय वाऱ्यानें उडालेल्या अशा जलार्द्र नील–कमलपत्रांनींच!"

२. दादोबांनीं 'यशोदा पांडुरंगी'च्या प्रस्तावनेंत पुढील अभिप्राय प्रगट केला आहे––

"कालिदास, भवभूति, माघ, आणि श्रीहर्ष, यांचीं अनुक्रमें रघुवंशकिरातादि जीं प्रसिद्ध महाकाव्यें आहेत, त्यांमध्यें शब्दांच्या काठिण्यावरून आणि अर्थान्वयाच्या गूढत्वा-वरून श्रीहर्षाचें जें शेवटलें नैषधकाव्य, त्याचें दुर्बोधत्व बहुधा लोकानुभूत आहे; तसेंच ज्यांस संस्कृत भाषा अवगत नाहीं, अशा प्राकृत जनांस मोरोपंताच्या काव्यांत संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ असल्यानें, साहजिक त्या शब्दांच्या अपरिचयामुळें, आणि प्राकृत जनांस अप्रसिद्ध असे संस्कृत शब्द, आणि निवळ प्राकृत व ग्राम्य शब्द, यांचें मिश्रण असल्यानें संस्कृतभाषाभिज्ञ अशा पंडितांसहि त्यांची निवड करून अर्थयोजना करण्यांत अवघड प्रसंग

(पुढें चालू).

दासाच्या किंवा बाणभट्टाच्या कवितेंतील प्रसाद जसा प्रायः आढळणार नाहीं, त्याप्रमाणेंच दुसऱ्या पक्षीं वामन किंवा मुक्तेश्वर यांच्यासारखें सुगमत्वहि बहुधा सांपडायाचें नाहीं. तसेंच एका पक्षीं पंचनली प्रकरणांतून पार पडण्यास जसें टीकाकाराचें थोडें बहुत तरी साहाय्य घ्यावें लागेल, त्याप्रमाणेंच 'बृहद्दशमा'ची फोड करतांनाहि केवळ प्राकृत वाचकास संस्कृतज्ञाची मदत घेतल्याशिवाय फारकरून चालणार नाहीं. तरी ज्याप्रमाणें 'किरातार्जुनीया'च्या व 'शिशुपालवधा'च्या एकेका सर्गावरून साऱ्या काव्यावर दुर्बोधतेचा दोष आणणें बरोबर होणार नाहीं, त्याप्रमाणेंच वरच्यासारख्या प्रसंगोपात्त दुर्गम स्थलांवरून वरील दोघां कवींचे ग्रंथ डोंगराळ प्रदेशांप्रमाणें मोठे अडचणीचे आहेत असें ह्मणणेंहि उचित नव्हे !

तेव्हां प्रस्तुत कवीच्या काव्यांत भरपूर श्लेष आहेत हा जो लोकप्रवाद आजपर्यंत चालत आला आहे तो खरा असण्याचा कितपत संभव आहे हें वरील निरूपणावरून लक्षांत येईल. आतां प्रत्यक्ष प्रमाणावरून काय सिद्ध होतें तें पाहूं.

६. आमच्या वाचकांस माहीत असेलच, कीं यापूर्वी अनेक वेळां प्रस्तुत विषयाच्या संबंधानें उल्लेख करून मोरोपंताच्या आर्यांच्या अनेकार्थत्वाचें प्रत्यक्ष उदाहरण दाखविण्याविषयीं आह्मीं सूचना केल्या आहेत. पण गेल्या ५३ व्या अंकांतील एका पत्राखेरीज आजपर्यंत कोणाकडूनहि वरील संबंधाचा कांहीं एक मजकूर आलेला नाहीं. तेव्हां यावरून निदान आज तरी इतकें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं, कीं ज्या अर्थीं आजपर्यंत निदान दोन अर्थांची तरी एकहि आर्या कोणाकडून दाखविण्यांत आली नाहीं, त्या अर्थीं पंतांच्या आर्यांचे दहा दहा अर्थ होतात ही लोकवार्ता पृथ्वीवर

असण्याच्या दृढ संभवामुळें, तसेंच समयविशेषीं शब्दांचा दूरान्वय असल्यानें अर्थज्ञानाच्या दुःसाध्यामुळें, मोरोपंतांचें काव्यहि दुर्बोध आणि कठिण ह्मणून बहुधा सर्व जनांस अनुभूत आहे."

वरील अभिप्रायांपैकीं दुसऱ्याविषयीं येथें कांहीं लिहावयास नकोच. पहिल्याचें यथार्थत्व पुढील उताऱ्यावरून कळून येईल–

With the structure or frame of the poem our delight is nearly unqualified. The language is highly elaborate, bearing the mirror's polish. It never becomes common-place, and bears throughout a sustained tone of sprightliness and elevation. Although we find a continual play upon words for many verses together, yet, not only is the sense not lost in a mere jingle of syllables, but the general effect is often much enhanced by the harmonious contrast of open and concealed meanings."

Dr. Roer.

सिंहाचें एकच जोडपें आहे, वेरुळचीं लेणीं हीं पांडवकृत्यें होत, अग्निपुराणांत आगगाडी आहे, शतपथ ब्राह्मणांत तारायंत्र आहे, या गप्पांपैकींच एक गप्प होय!

आतां आह्मी आपल्या तर्फेचें जें प्रत्यक्ष प्रमाण दाखविणार तें दोन प्रकारचें आहे. एक 'नवनीता'च्या दोन भागांवरून व मोरोपंताचा अत्यंत मान्य ग्रंथ जो 'केकावलि' त्यावरून. आणि दुसरा प्रकार वर सांगितलेल्या पत्रांत दाखल केलेल्या आर्येचें बहुलार्थत्व कितपत यथार्थ होय हें दर्शविण्यांत येईल हा होय.

तेव्हां प्रथमतः 'नवनीता'चे दोन भाग घ्या पहिला भाग तर प्रसिद्धच आहे; दुसरा कदाचित् सर्वांस माहीत नसेल, यास्तव त्याविषयीं इतकें सांगणें अवश्य दिसतें कीं, तो कै० परशुरामपंत तात्या यांनींच केलेला आहे.[1] हा भाग पहिल्याच्या सरासरी तिसरा हिस्सा असेल नसेल, तरी एकंदरींनें पहातां यांतील वेंचे पहिल्यांतल्यापेक्षां सरस आहेत. आतां हे जे दोन भाग आहेत यांत साऱ्या महाराष्ट्र कवींचें स्वरूप बऱ्याच अंशीं प्रतिबिंबित झालें असेल असें ह्मणण्यास हरकत नाहीं; कांकीं साऱ्या महाराष्ट्रकवितेचें आलोडन करून जें सार निघालें तें वरील ग्रंथकर्त्यानें दोनदां रसिकजनांस अर्पण केलेलें आहे. त्यांतून मोरोपंताच्या काव्यावर तर रा० गोडबोले यांची विशेषच भक्ति असल्यामुळें तदनुरूप त्यावर त्यांचा विशेष व्यासंग झाला असेल हें उघडच आहे.[2] मोरोपंतास निवर्तून अद्याप फार काळ लोटला नसल्यामुळें व त्यानें ग्रंथहि पुष्कळ लिहून ठेवला असल्यामुळें त्याच्या इतका भरणा फारकरून दुसऱ्या कोणत्याहि महाराष्ट्र कवीचा दिसत नाहीं. या दोन कारणांस्तव 'नवनीता'च्या दोन्ही भागांत वरील कवींतील वेंचे चांगले भरपूर आलेले आहेत. यास्तव त्याच्या कवित्वाचें स्वरूप सदरील दोन ग्रंथांत जसें प्रगट झालें आहे तसें इतर कोणत्याहि महाराष्ट्र कवींचें झालें नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तर प्रस्तुत वादांत बऱ्याच अंशीं निर्णय होण्यास वरील दोन ग्रंथांतील वेंचे उपयोगीं पडतील हें उघडच आहे.

---

१. वरील दुसऱ्या भागाच्या शेवटीं असें पद्य आहे--

जरि याचा जन आदर करितिल घेतील हा पहायास।
तरि उत्तेजन होइल मज तिसरा भाग तो करायास॥

ही आशा कितपत सफळ झाली हें सांगायाला नकोच. तिसऱ्याची गोष्ट तर दूरच, पण दुसरा भागहि करण्याची विशेष जरूर नव्हती असें सदरील ग्रंथकारास बहुधा लवकरच वाटलें असावें!

२. परशुरामपंत तात्यांच्या पद्यमय ग्रंथांवरून तर वरील भक्ति व्यक्त होतेच; कां कीं त्यांतील धाटणी प्रस्तुत कवीपासूनच उचललेली आहे. शिवाय असेंहि ऐकण्यांत असे कीं, रात्रींतून दिवसांतून जो वेळ रिकामा सांपडे तो बहुधा मोरोपंतांचें काव्य वाचण्यांतच वरील पंडितांचा जात असे.

'नवनीत' भाग पहिला यांत श्लेषात्मक ह्मणून जीं स्थलें आह्मांस आढळलीं तीं येणेंप्रमाणें—

तूं 'मलिन' 'कुटिल' 'नीरस' 'जड'हि 'पुनर्भव'पणें हि कचसा च।
'धरिला शिरीं'हि न स्व-प्रकृतिगुण त्यजिसि नाम 'कच' साच ॥
'कचोपाख्यान.'

बृहदश्व 'द्विजराज' श्रीधर्माच्या समीप आला जो।
ताप उरींचि न दे जो त्यासि विधु न कां ह्मणोनि हा लाजो ॥
'नलोपाख्यान.'

अनुपम अनुरूप अनघ जरि वरिला त्वां नृपात्मजे न नल।
होइल केवळ तापद कीं जो नर नल न होय तो 'अनल' ॥
'कैकेयी-'

लेशहि शरदमल न भा धवली अमृतांशुचीहि शरदमलनभा।
'अंबर' सितरुचि रजनी-विलासिनी धरि भ-मौक्तिकें रुचिर जनीं ॥
'रासारंभींच्या आर्या.'

हा सीते हा लक्ष्मण ऐसें मरतां ह्मणोनि मोठ्यानें।
'अमृत' प्रदीं करावें अहिनें केलें तसेंचि खोट्यानें ॥
'भारती रामायण.'

मोहृत 'भुजग' मोहा केंवि तुह्मी मजसम स्तनग हो तें।
तुमचेंहि सुकृत सरलें कां सांगा मज समस्तनग हो तें ॥
'कित्ता.'

हा सीते मज देतो त्वन्मुखजितचंद्र ताप हा सीते।
हा सीते करितो 'द्विज-राज' हि ह्मणवूनि ताप हा सीते ॥
'कित्ता.'

वरील आर्यापैकीं पहिलींत मात्र भरपूर श्लेष असून बाकींच्यांत ज्या शब्दांभोंवतीं अवतरणचिन्ह केलें आहे तेवढे मात्र श्लिष्ट आहेत.

'नवनीत' भाग दुसरा यांतील वेंच्यांत कोठेंहि बिलकूल श्लेष नाहीं.

'केकावली'त ह्मणण्यासारखा श्लेष पुढील केकेंतील एका शब्दावर मात्र आहे—

तुझ्या गुणकथा महासुरभि त्यांत हीं रासभी
शिरे विषयवासना जशि शुका अहीरास भी।
तशी न इतरास भी इस 'सदंड' हीं हाकिती
तथापि बहु लाथळी मग अदंड मी हा किती ॥

बाकी लहानसान श्लेष पुढील कांहीं स्थलीं आहेत—

गमो मधुर हें विष स्तवन सेवितां माजवी
करी मलिन सद्यशोमुख हलाहला लाजवी ।
हरापरिस तूं बरा प्रभुवरा सदा जो पिशी
असा रस समर्पिला 'अमृत' आपुलें ओपिशी ॥
ह्मणोनि कवितासुता तुज समर्पितों साजरी
नसे बहु तशी गुणी कनकपीतवासा जरी ।
तरी न इतरा वरी हरि करीं इला किंकरी
मयूर हि निजात्मजाग्रह[1] विमुक्त जैसा करी ॥
तिला हि बरवी ह्मणा उचित होय तोषाकरें
असेल सजली यथारुचि तयीं स्वयोषा करें ।
जशी पदरजें शिला परि असे न हे शापिली
धवें 'हरिमनोहराकृति' सती अघें व्यापिली ॥
कथासुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती
शिशूंस जरठांस ही निरखितां 'रसें' दाटती ।
दुहोत भलते सदा तरि न लेश ही आटती
स्ववत्स 'मल' भक्षिती परि न सर्वथा बाटती ॥
तुझ्यासमचि हें गुणें अणु उणें नसे नाम हा
दिसे अधिक ही तसा गुण तुला असेना महा ।
सदैव भलत्यास ही सुलभ आणखी गायका
'छळी' न न 'अधोगति' क्षण हि दे जगन्नायका ॥
वरि प्रकट शांतिला धरि परंतु मीना बकी
गिळी तशि तुला टपे सुकृतबुद्धिहीना बकी ।
जिणें गरळ पाजिलें 'अमृत' पाजिलें तीस तां
खळासि न दिसो भलेपण खरे भल्या दीसतां ॥
सुरासुरनरोरगां भुलवुनी कथा न त्यजी
न भेद करि पंक्तिचा 'अमृत' पाजिती सत्य जी ।
तिणें जरि सुधारस स्वरतमानसां पाजिला

---

१. 'निजात्मजेचा आग्रह' 'निजात्मजारूप ग्रह' अशीं दोन प्रकारचीं पदें वरील समासांत पडण्यासारखीं आहेत. 'किरातार्जुनीय' सर्ग १ यांतील पुढील श्लोकांत अशा प्रकारचा पदच्छेद आहे—

अवंध्यकोपस्य विहंतुरापदां भवंति वश्याः स्वयमेव देहिनः ।
अमर्षशून्येन जनस्य जंतुना न जातहार्देन न विद्विषा—'दरः'

वधी अमृत घोटितां द्रव न येचि बापा जिला ॥

तर वर सांगितलेल्या तीन ग्रंथांत श्लेषप्रयोगाचीं उदाहरणें वर दाखल केल्या-इतकींच काय तीं आहेत. यांखेरीज इतरत्र जीं आमच्या वाचण्यांत आलीं तीं येणेंप्रमाणें—

नमुनि जरत्कारि ह्मणे नसतां अपराध टाकितां दासी ।
'द्विजराज' तुह्मी या अप-राधें कैं द्याल हर्ष चांदासी ॥
'आदिपर्व.'

करुनि प्रदक्षिणा धनु उचलोनि ख्याति तो करी मोठी ।
चापाच्याचि न केवळ नरवीरांच्या हि वांकवी 'कोटी' ॥
'कित्ता.'

झाली झाला केवळ 'कृष्णा' पोपूनि अंधकारा ती ।
जाणों सुयशोऽर्थ तमो–गुण धाडी तेथ अंधकाराती ॥
'विराटपर्व.'

भीमें पाठविला शर दुसरा हि सुषेण–जीवनाचमना ।
कर्ण तयास हि खंडी ये 'मार्गण'–जुल–विघात हाच मना ॥
'कर्णपर्व.'

जरि 'शुचिमूर्ति' 'सुवृत्ता' मान्या 'श्रवणोचितें गुणें' मुक्ता ॥
विद्धा जडाहि ते हे अगुणा ही तीस करि उणें मुक्ता ॥
'सन्मणिमाला.'

वर जीं उदाहरणें दाखविलीं त्यांवरून मोरोपंताची दहा दहा अर्थांविषयींची जी सार्वत्रिक प्रसिद्धि, व मोठ्या पंडितांचींहि त्याच्या काव्याच्या संबंधानें चिरकाळ दृढ होऊन बसलेलीं मतें, हीं दोन्ही कितपत यथार्थ होत याविषयीं आमच्या वाचकांची

१. रावबहादूर रानडे यांचें 'केकावली'च्या अनेकार्थत्वाविषयीं एवढें दृढ मत ज्यावरून झालें त्या स्थलांचें स्वरूप पुढील दोन उतार्‍यांवरून बरेंच लक्षांत येईल—

(केका १)—गदारिदरनंदकांबुजधरा—गदा — अहंकृतिजन्यप्रपंचमिथ्याज्ञानसद्बुद्धीत जागृत करणारी जी भगवच्चिच्छक्ति तिचें उपलक्षण. अरि — चक्र — सत्‌ज्ञानरूप जो अंतःप्रकाश त्याचें उपलक्षण. दर — शंख — नादमूलक जो प्रणव — ओंकार त्यांचें प्रतिरूपक नंदक — विष्णूचें खड्ग — अज्ञानरूप अथवा संशयरूप जी हृदयग्रंथी तिचें छेदक जें आत्मज्ञान त्याचें प्रतिरूपक. अंबुज — कमल — संसारदुःखें करून पीडित जो जन त्याच्या म्लान आणि आकुंचित अंतःकरणाचे भगवद्भक्तिजन्यप्रेमानंदानें जें विकाशन त्याचें निदर्शन; या सर्व चिन्हांतें धारण करणारा, अर्थात् या सर्व उपलक्षणांनीं उपलक्षित परब्रह्मरूप जो भगवान् त्याचें संबोधन;—असा सच्चिदानंदरूप जो तूं त्या.

(पुढें चालू).

खात्री होईलच. त्यांस दिसून येईलच, कीं साऱ्या आर्येभर श्लेष असा काय तो वर दोनच आर्यांत आहे. पहिली 'कचोपाख्यानां'तील व शेवटली 'सन्मणिमालें'तील! बाकी साऱ्या पद्यांतून एखादें पद क्लिष्ट आहे, व तोहि श्लेष अप्रसिद्ध किंवा बळें ओढून ताणून आणलेला अशांपैकीं मुळींच नसून अगदीं परिचयांतला असा आहे.

७. आतां शेवटलें व्यतिरेकप्रमाण ५३ व्या अंकांतील आर्येचें. ही आर्या पुढील होय—

कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे ।
तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे ॥

ही आर्या कोणत्या प्रसंगाची आहे व हिचा अर्थ काय हें मराठी शाळांतील शेवटल्या यत्तेंतील पोरेंहि सांगतील. पण प्रकृत अर्थ एवढा उत्तान असतां अरसिक व छांदिष्ट मंडळीनें या बिचाऱ्या आर्येचा जो धुडगुस मांडला आहे व हिजवर जे कांहीं आपल्या पांडित्याचे तारे तोडले आहेत तें कांहीं पुसूं नये! आमच्या मयूरकवीच्या एवढ्या एका पराशींच अर्वाचीन प्राकृत पंडित एवढें कां बागडतात हें कांहीं समजत नाहीं! या एका आर्येंत मीं काय ती वहार सांठवून ठेविली आहे, व सोरटी सोमनाथाची पिंडी सुलतान महमदानें फोडली असतां अपरिमित अर्थसंचय जसा खळदिशीं बाहेर पडला त्याप्रमाणें सरस्वतीची ऐन जिनगी काय ती या एका पद्यांत लिकवून ठेवली आहे असा एखादा गुप्त लेख तर पंतांनीं कोणा भक्तापाशीं ठेवला नाहींना! काय असेल ते असो! आह्मांस तर याच एकट्या आर्येची अशी दुर्दशा कां व्हावी हें कांहीं कळत नाहीं. एक कारण मात्र दिसतें, कीं भोजनादि प्रसंगीं प्रस्तुत कवीच्या ज्या आर्या ह्मणण्यांत येतात त्यांतील ही एक असल्यामुळें हिजकडे कल्पक मंडळीचें विशेष लक्ष लागलें व हिच्या कांहीं पदांशीं कल्पनेचा विहार होण्याजोगा असल्यामुळें हिजविषयीं परंपरेनें प्रसिद्धि पडत गेली.

(केका ४३)—"हरिमदापहें — हरि — सूर्य — अर्थात् सूर्यासारखे उग्रप्रतापी जे रावणकंस सारिखे अथवा हरि — सिंह — अर्थात् सिंहासारिखे पराक्रमी जे हिरण्यकशिपुबलिदुर्योधनादिकांसारखे भूपाल अथवा, हरि — शुक — पोपट — अर्थात् क्रियाहीन असतां केवळ पोपटासारिखे वाचाल मात्र असे जे वाग्पंडित अथवा हरि — अग्नि — अर्थात् अग्नीसारिखे दुसऱ्याच्या अंतःकरणास पोळणारे जे दुष्ट जन — अथवा सर्व गोकुलाचा नाश करणारा जो दावाग्नि तो या सर्वांचा मद — गर्व त्याचा, नाश करणारा जो तूं त्या त्वां; अथवा हरि — यम — कृतांतरूप जो काल त्याचा, मीं सर्व भुवनत्रयाचा संहार करणारा ह्मणून जो मद ह्म० गर्व; अथवा हरि — इंद्र — हा एकदां अतिवृष्टि पाडून सर्व गोकुलाचा नाश करण्यास उद्युक्त झाला होता तेव्हां त्वां आपल्या आंगठीनें गोवर्धन उचलून त्याच्या छत्राखालीं सर्व व्रजवासी प्राण्यांचें रक्षण करून तेणेंकरून त्या इंद्राच्या मदाचा त्वां नाश केला अशी जगप्रसिद्ध तुझी कीर्ति आहे अशा—

रा० लोंडे हे पनवेलकर बोवांच्या वाक्प्रवाहासरसे एकदम वहावत जाऊन अगदीं भांबावून गेले ही कांहीं अंशीं आश्चर्याचींच गोष्ट! तसेंच बोवांच्या हातचलाखीनें केवळ चकित होऊन जाऊन 'केकावली'विषयींहि आपला भ्रम असाच नसेलना, तर काय भानगड असेल ती आपली आपण पाहून घ्या, याप्रमाणें सदरील पत्रकारानें दोहों कानांवर हात ठेवले आहेत. या गोष्टीचींहि आह्मांस मोठी मौज वाटते! एकंदरींत 'गतानुगतिक'त्वाचा प्रकार लोकांत किती प्रबळ आहे, व धडधडीत उघड दिसणाऱ्या गोष्टीविषयींहि लोकमताच्या विरुद्ध अभिप्राय प्रगट करण्याचें साहस किती थोडें आढळतें, ही गोष्ट सदरील पत्रावरून स्पष्ट दिसते. असो; आतां वरील आर्येविषयीं विचार करूं.

आमच्या पनवेलकर मित्रानें जो अर्थ सांगितला आहे त्याहिपेक्षां आणखी दोन तीन निरानिराळे अर्थ आह्मीं हरदासांच्याच तोंडून ऐकिलेले आहेत. ते असे—

(१) "अर्जुनास कोणीं सुभद्रेविषयीं बातमी सांगितली, कीं 'कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य' ह्मणजे उपवर झाली आहे; तें ऐकून तो विषादपूर्वक ह्मणतो, 'तें खरें, पण ती सुभद्रा 'जाहली' ह्मणजे मोठी 'जलाल' आहे ह्मणून ऐकतों; शिवाय हलधर तीतें स्वमतें धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे."

(२) "अर्जुन ह्मणतो, 'कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य.' त्यावर त्यास कोणी त्याचा मित्र सांगतो, असें आहे तर तूं 'जा हरी (रलयोरभेदः) आहे,' ह्मणजे तूं गेलास तर कृष्ण तुझी शिफारस करील. अर्जुन उत्तर देतो 'पण, 'तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे,' तेव्हां धाकट्या भावाची शिफारस कशी लागू पडणार?"

(३) "अहो 'हलधर!' कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे, तीते स्वमतें धृतराष्ट्रसुतासि द्या,' परंतु 'वया पाहे,' कांहीं वयाकडे पहा!"

तेव्हां एकंदरींत वादविषयक आर्येवर पांच अर्थ तर बसले! 'नैषध'काराचें आणि आमच्या महाराष्ट्र कवीचें साम्य तर अगदीं तंतोतंत जुळलें! आतां दुसरी एक आर्या पहा—

आर्या आर्यांसि रुचे ईच्या ठायीं असे जशी गोडी ।
आहे इतरां छंदीं गोडी परि यापरीस ती थोडी ॥

हिचाहि साधा सरळ अर्थ आबालवृद्धांस श्रुत आहे. पण त्यांत कांहीं बहार नाहीं. खुबीदार अर्थ पुढेंच आहे—"स्त्री ही जे श्रेष्ठ आहेत त्यांस आवडते; स्त्रीच्या सुखासारखें दुसरें सुख नाहीं; इतर छंदांत बहार नाहींशी नाहीं, पण हिची सर त्यांस येणार नाहीं." एकंदरींत कवीचा हृद्गतार्थ असा कीं, "बाबानों, तुह्मांस खरी चैन भोगायाची असेल तर इतर फंदांत पडूं नका; शांभवी देवी, बाटलाबाई, वगैरे सर्व या शोकापुढें तुच्छ!"

अनेक अर्थांविषयीं प्रसिद्ध अशा तूर्त आह्मीं दोनच आर्या ऐकिल्या आहेत व वर जितके अर्थ सांगितले तेवढेच वरील आर्यांतून निष्पन्न होतात अशी आजच्या घटकेला आमची समजूत आहे. हें येथें लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, न जाणों कदाजित् उद्यां एखादा नवा पंडित निघून तो वरच्यासारख्या आणखी आर्या व त्यांतील आणखी अर्थ शोधून काढील![1] असो; आतां वरील पांडित्यप्रकारावर आमच्या मनांत कांहीं आक्षेप उद्भवतात ते येथें प्रगट करून हें श्लेषप्रकरण आटपतों.

(१ ला अर्थ)—पंतानीं प्रश्नोत्तरें आर्येंत ग्रथित केल्याचा हा नवाच मासला आहे. याचें दुसरें उदाहरण आह्मांस तर अद्याप कोठेंहि आढळलें नाहीं 'कृष्णा' हें संबोधन असतां 'अनुजा' शब्दाशीं त्याचा संधि केलेला पंतास कसा खपला! 'धृतराष्ट्र' ह्मणजे 'पंडु' हा अर्थ पनवेलीस नवा निर्माण झाला असल्यास नकळे; पण साऱ्या भारतवर्षांतले लोक तर वरील अर्थ ऐकून आमच्या पत्रकाराप्रमाणें भांबावून जातील यांत संशय नाहीं! 'धृत आहे राष्ट्र ज्यानें' असा यौगिक अर्थ घेऊन प्रस्तुत शब्द जर बिचाऱ्या पंडूवर बळेंच लागू करावयाचा असेल तर मग आमचे सध्यांचे प्रतिनिधि नेकनामदार लॉर्ड लिटन साहेब यांनींहि जपूनच असलें पाहिजे; कां कीं उद्यां कोणी नवा टीकाकार उत्पन्न होऊन त्यानें नेकनामदारांची 'हलधरा'शीं सोयरीक बनवून दिली तर करतां काय? त्यांतून वरील आप्तसंबंध जडण्यास पूर्वीचा मुळींच आधार नाहीं असेंहि नाहीं. प्रख्यात 'विलासतरंगिणी'कार यांनीं आपला नायक सूर्यकुलोत्पन्न कमलनाभ यास आंग्लो—मुसलमीन क्षत्रिय महंमद जॉनसन याची कन्या दिल्यांची पूर्वीची परंपरा वरील शरीरसंबंधास अनुकूलच होय!

(शालापत्रक—१८७४ जानेवारी पहा)

(२ रा अर्थ)—यावर विशेष आक्षेप घेण्यासारखा नाहीं. एकंदर अर्थाचा अप्रयोजकपणा स्पष्टच आहे.

(३ रा अर्थ)—कित्ता.

(४था अर्थ)—'कांहीं वयाकडे पहा' याचा अर्थ काय? अर्जुन मात्र ऐन पंचविशीच्या भरांतला आणि दुर्योधन ऐशीं वर्षांचा थेरडा असा तर कांहीं प्रकार नव्हता; मग 'वया'कडे काय पहावयाचें? आह्मांस खास वाटतें कीं अशी अर्जुनाची तरफदारी करणाराच्या डोकींत 'हलधर' बोवा नांगर घालायास चुकतेना! आणि सदरील अर्थकार नांगराला योग्यहि खरेच!

याप्रमाणेंच दुसऱ्या आर्येंतील दुसरा आषकपर अर्थहि केवळ अप्रयोजक होय, तो अर्थ जर खरा मानावा, तर 'उभाभ्यामुतते नमः' व 'प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात्'

१. वरील वाक्य लिहून गेल्यास फार दिवस निघून गेले नाहींत तोंच एक पत्र येऊन धडकलें. तें पुढील अंकांत वाचकांस सांपडेल.

इत्यादि श्रुतीचे दुसरे अर्थ व 'हस्तादेनचेरस्तेये' या पाणिनीय सूत्राचें अर्थांतर हीं सर्व खरीं मानलीं पाहिजेत!

असो; एकंदरींत पहातां प्रस्तुत कवीचीं अर्थबाहुल्याच्या संबंधाची प्रसिद्धि केवळ अज्ञानानें व अंधपरंपरेनें झालेली आहे. त्यांतून 'जहाली आहे', 'जा हुली आहे.' 'जा हरी आहे' वगैरे पदच्छेद करणें ह्मणजे तर निव्वळ पोरखेळ आहे! आकाशांतील ढगांकडे पाहून हत्तीचा उंट झाला, उंटाचें गाढव झालें, गाढवाचा राक्षस झाला वगैरे रूपांतरें बघत बसणें यांत जितपत अर्थ आहे तितपतच वरील शब्दक्रीडेंत होय! किंबहुना वरील आकाशप्रेक्षणहि एक्या अर्थीं बरें; कां कीं तें कर्मणुकीच्या सदरांत तरी ओढतां येईल. पण सत्कवींच्या कृति छिन्नभिन्न करून त्यांत मौज वाटणें यास मनुष्यभक्षक रानटी लोकांचा जो प्रेतांशीं विनोद चालतो[1] त्याचीच उपमा साजेल! आणि त्यांतून वरील पोरखेळावरून कवीचा अभिप्राय तसाच होता ह्मणून त्यावर बालिशत्व आणूं पहाणें, आणि या बालिशत्वावरून त्याची महाकवींत गणना करणें ह्मणजे तर अरसिकत्वाचा व असमंजसपणाचा कडेलोटच होय!!।

सच्चेतः कैरवांतें विकच करि जगत्ताप संपूर्ण टाळी
अज्ञानध्वांत सारें हरि रसिकचकोरांसि अत्यंत पाळी।
नाना वस्तु प्रकाशी कविहृदयपयोराशिसंतोषहेतू
काव्येंदु स्वप्रभेनें खलविरहिजनीं होतसे धूमकेतू॥
'मंत्ररामायण'.

अंक ५९.-(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) **मोरोपंत** हा कवि आहे कीं नाहीं हा वाद. (३) याचें मूळ. (४) चार आक्षेपात्मक उतारे व त्यांविषयीं विचार.

१. येथवर मूळ संकल्पाप्रमाणें प्रस्तुत विवेचनाचे दोन भाग झाले. एक प्रस्तुत कवीवर येणाऱ्या आक्षेपांवर विवरण; आणि दुसरें, त्याजविषयींच्या प्रशंसापर उद्गारांविषयीं विचार. आतां राहिलेला तिसरा भाग झटला ह्मणजे प्रस्तुत विषयाच्यासंबंधानें आमच्या ज्या समजुती झाल्या आहेत त्या होत. त्या यापुढें दाखल करतों.

२. मोरोपंताच्या संबंधानें पहिला मोठा वाद झटला ह्मणजे हा होय कीं, त्याला 'कवि' ही संज्ञा देतां येईल कीं नाहीं. हा वाद अर्थातच नव्या विद्वन्मंडळांत उत्पन्न झालेला आहे; जुन्यांस या वादाचा अर्थहि फारकरून कळायाचा नाहीं. नव्या

---

१. पृथ्वीच्या पाठीवर मनुष्यभक्षक लोकांची वस्ती अद्याप आहे. 'राबिनसन क्रुसो' नामक अति विख्यात इंग्रेज कादबरीचें मराठींत भाषांतर झालें आहे. त्यावरून वरील प्रकाराचें स्वरूप आमच्या मराठी वाचकांच्याहि लक्षांत येणारें आहे. पासिफिक महासागरांतील बेटांकडचा बोभाटाहि कधींमधीं वर्तमानपत्रद्वारें कानावर येतोच,—कीं नुकतेच अमुक अमुक मिशनरी सागरस्थ लोकांनीं गट्ट करून टाकले!

लोकांत तरी मोरोपंत हा कवि आहे कीं नाहीं ही चर्चा कशावरून निघाली याचा जर विचार केला, तर ती प्रख्यात इंग्रजी कवि ड्रायडन व पोप यांच्यावरून निघाली आहे हें उघडच आहे. अर्वाचीन मंडळीची ही एक चमत्कारिक प्रवृत्ति सर्वांच्या सहज लक्षांत येण्यासारखी आहे, कीं युरोपांतल्या व इकडल्या गोष्टींत सकृद्दर्शनीं साम्य आढळून आलें कीं लागलींच देशकालभेदाकडे बिलकूल लक्ष न पुरवतां, व वरील साम्य वस्तुतः बरोबर आहे कीं नाहीं याचाहि फारसा विचार न करतां तिकडच्या सारखी कृति इकडे उठवून द्यावयाची! युरोपाच्या इतिहासांत आढळलें, कीं मार्टिन लूथर हा[1] पोपवर उठून त्यानें धर्मक्रांति केली; कीं लागलीच इकडे शंकराचार्यांवर हत्यार धरून मंडळी सरसावलीच! पण साऱ्या युरोपाला दरारा घालणारा, आणि जॉन राजास पदच्युत करून खुद्द नेपोलियनावर बहिष्कार घालणारा पोप कोणीकडे, आणि आमचे भिक्षावृत्ति गरीब बिचारे जगद्गुरु कोणीकडे हा कांहीं विचार नाहीं! 'स्कोलास्टिसिजम्' ह्मणून एक पांडित्यप्रकार युरोपांत कांहीं शतकांपूर्वी मोठा जारी चालू होता, त्यापासून लॉर्ड बेकननें लोकांचीं मनें परावृत्त केलीं; हें ऐकल्याबरोबर आमच्या नवीन मंडळींस येथील शास्त्रविद्येचें व वरील प्रकारांचें पूर्ण साम्य दिसून येऊन न्यायमीमांसादि शास्त्रांचें शुष्कत्व तेव्हांच कळून येतें![2] मूर्तिपूजेच्या संबंधानें अलीकडील विद्वत्समूहांत व विशेषतः नवीन सामाजिकांचे ठायीं कशा समजुती आढळतात याविषयीं गेल्या अंकांच्या आरंभीं थोडासा उल्लेख केलाच आहे. असो; तर प्रस्तुत वादाचें जें बीज,—कीं मोरोपंत हा कवि नव्हे,—हें ड्रायडन व पोप यांचें साम्य आमच्या महाराष्ट्र कवींशीं बळेंच घालून दिल्याचें फळ होय.

३. ड्रायडन हा मिल्टनशीं समकालीन होता. त्यानें अठ्ठावीस नाटकें रचलीं व अनेक लहान मोठीं काव्यें लिहिलीं. ल्याटिन भाषेंतील महाकाव्य जें 'ईनियड' त्याचें यानें इंग्रजींत भाषांतर केलें. याच्या कवितेंतील मोठा विशेष ह्मटला ह्मणजे पदलालित्य हा गुण होय. पूर्वीचे शेक्सपीयरप्रभृति महाकवि व त्यांशीं समकालीन असणारे मिल्टन वगैरे यांची काव्यशक्ति त्याच्याहून फार मोठी खरी; पण वरील गुण इंग्रजी कवितेंत

---

१. रोमन क्याथलिक लोकांचा रोम शहरांत रहाणारा धर्माध्यक्ष पोप याचा व वरील कवींचा कांहीं संबंध नाहीं हें आमच्या मराठी वाचकांस सांगणें जरूर आहे. इतकें मात्र होतें कीं, वरील कवि क्याथलिक धर्माचा होता.

२. वरील उल्लेख सकृद्दर्शनीं अतिशयोक्तिरूप वाटण्यासारखा आहे. पण त्याजविषयींची खात्री करून घेणें असल्यास 'लोकहितवादिकृत निबंधसंग्रह' पहावा किंवा रा. ब. देशमुख व रानडे यांचीं व्याख्यानें ऐकावीं. त्याप्रमाणेंच मेकॉलेचा 'लॉर्ड बेकन' हा निबंध वाचला असतां जुन्या ग्रीक व रोमन लोकांच्या तत्त्ववेत्त्यांची साहेब बहादुरांनीं कशी टर उडवून दिली आहे तें समजेल!

जो विशेषेंकरून दृष्टीस पडला तो प्रथमतः याच्या काव्यांत.[1] याच्यापुढें वरीलच काव्यपद्धति पोप यानें चालू केली. ड्रायडनविषयीं पोपची पराकाष्ठेची पूज्यबुद्धि होती. पूर्वी होऊन गेलेल्या साऱ्या कवींमध्यें त्यानें वरील स्वकालीन कवीस पसंत करून त्याची पद्धति पुढें चालू करण्यांत व ती पूर्णदशेस आणून पोंचविण्यांत आपल्या आयुष्याचा व्यय केला. या परिश्रमांचें फळ 'इलियड'चें भाषांतर व दुसरे पुष्कळ नानाविषयात्मक काव्यग्रंथ यांच्या रूपानें प्रादुर्भूत झालें. पोपचा मोठा कवित्वगुण तरी पदलालित्य हाच होय. या गुणांत त्यानें इतकी कमाल करून टाकली आहे कीं, आतां त्याहून कोणी वरचढ होऊं पाहील तर तें प्रायः केवळ असाध्य होय.[2] पोपचें माहात्म्य त्याच्या काळांत इतकें होतें कीं, त्याच्यापूर्वी ड्रायडनची जशी सर्वतोमुख ख्याति

---

१ ड्रायडननें इंग्रेजी भाषेवर कोणकोणते उपकार करून ठेवले हें जॉनसन पुढील उताऱ्यांत सांगतो—

"Of Dryden's works it was said by Pope, "that he could select better specimens of every mode of poetry than any other English writer could supply." Perhaps no nation ever produced a writer that enriched his language with such a variety of models. To him we owe the improvement, perhaps the completion, of our metre, the refinement of our language, and much of the correctness of our sentiments. By him we were taught *sapercet fari*, to think naturally and express forcibly. Though Davis has reasoned in rhyme before him, it may be perhaps maintained that he was the first who joined argument with poetry. He showed us the true bounds of a translator's liberty. What was said of Rome, adorned by Augustus, may be applied by an easy metaphor to English poetry embellished by Dryden, *lateritiam invenit marmoream reliquit*. He found it brick and left it marble."

२. "It is remarked by Watts, there is scarcely a happy combination of words, or a pharse poetically elegant in the English language, which Pope has not inserted into his version of Homer. New sentiments and new images others may produce but to attempt any further improvement of versification will be dangerous. Art and diligence have now done their best, and what shall be added will be the effort of tedious toil and needless curiosity."

—Johnson.

झाली होती, व पुढें जॉनसनचें जसें अतोनात प्रस्थ माजलें; त्याप्रमाणें लोकांची त्याजविषयींची समजूत 'न भूतो न भविष्यति' अशाच प्रकारची बहुतेक झाली होती. या वेळचे सर्व मोठमोठे ग्रंथकारहि त्याच्या आर्जवानें होते. काव्यकलेच्या संबंधानें पहातां तर ती पोपनेंच पूर्ण उदयास आणली अशी सर्वत्र प्रसिद्धि होऊन त्याचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति तेव्हांपासून जी पडली ती अद्यापहि दृष्टीस पडते. जॉनसननें जीं दोन लहानशीं काव्यें रचलीं तीं वरील प्रवृत्तीचेंच उदाहरण होत.[1] वरील ग्रंथकारास साऱ्या इंग्रजी कवींत वरील दोघांचेंच काव्य फार आवडत असे; त्याच्या 'कविचरित्रां'त त्यांजविषयींचा वृत्तांत फार सविस्तर दिलेला असून दोघांची त्यानें फार चमत्कारिक तुलना केलेली आहे.[2]

प्रस्तुत शतकास आरंभ झाल्यापासून इंग्लंडांत अनेक विषयांवर मतांतरें सुरू झालीं. प्रकृत विषयाच्यासंबंधानें तसेंच होऊन नवीन उपस्थित झालेल्या 'एडिनबर्ग

---

१. अंक ३४ पहा.

२. वरील तुलना पोपच्या चरित्राच्या शेवटीं शेवटीं आहे. ती फारच लांब आहे यास्तव शेवटला उपसंहार मात्र येथें उतरून घेतों.

"Of genius, that which constitutes a poet; that quality without which judgment is cold, and knowledge is inert; that collects, combines, amplifies, and animates; the superiority must, with some hesitation, be allowed to Dryden. It is not to be inferred, that of this poetical vigour Pope had only a little because Dryden had more; for every other writer since Milton must give place to Pope; and even of Dryden it must be said, that, if he has brighter paragraphs, he has not better poems. Dryden's performances were always hasty, excited by some external occasion, or extorted by domestic necessity; he composed without consideration, and published without correction. What his mind could supply at a call, or gather in one excursion, was all that he sought, and all that he gave. The dilatory caution of Pope enabled him to condense his sentiments, to multiply his images, and to accumulate all that study might produce or chance might supply. If the flights of Dryden, therefore, are higher, Pope continues longer on the wing. If of Dryden's fire the blare is brighter, of Pope's the heat is more regular and constant. Dryden often surpasses expectation, and Pope never falls below it. Dryden is read with frequent astonishment, and Pope with prepetual delight."

रिव्ह्यू' वगैरे त्रैमासिकांतून वरील कवीविषयीं विरुद्ध मजकूर येऊं लागला जॉनसनसारख्या रसिकांनीं ज्या कवींची एवढी तारीफ केली होती, व ज्यांस कवित्वसिंहासनावर आरूढ करवून सर्वांच्या अभिवंदनास त्यांस पात्र करून ठेविलें होतें, त्यांस कॅलिप्रभृति अर्वाचीन निबंधकारांनीं पदच्युत करून 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या न्यायानें जॉनसनप्रभृति मोर्चेलवाल्यांसहि त्यांच्याबरोबरच खालीं ओढलें. तेव्हां अलीकडे सर्वानुमतें एकंदर असें ठरलें आहे कीं पोपप्रभृति कवि नादान व जॉनसनप्रभृति टीकाकारहि नादान! कवित्वाचें तत्त्व दोघांसहि माहीत नसून केवळ टुमदार रचना व नोकझोक या बाह्यगुणांवरूनच ते कवितेची पारख करीत! या नवीन मतांचा विशेष प्रसार व दृढीकरण हें वर्डस्वर्थ नामक अर्वाचीन विख्यात कवीनें केलें. त्यानें आपल्या काव्यांत पूर्वीच्या वेळोवेळीं लिहिलेल्या प्रस्तावना एकत्र करून ज्या जोडल्या आहेत त्यांत अठराव्या शतकांतील कवींस व रसिकांस खऱ्या कवित्वाचें स्वरूप कितपत समजत होतें तें दाखविलें आहे. शिवाय प्रस्तुत विषयाच्यासंबंधानें नुसतीं मतेंच प्रगट न करतां आमच्या 'रसगंगाधर'कार पंडितरायांनीं ज्याप्रमाणें स्वकृत व्याख्यांचें पूरण स्वरचित उदाहरणांनीं केलें आहे, त्याप्रमाणें आपल्या स्वतःच्या नवीन कवितेच्या रूपानें वरील कवीनें आपल्या मताचें समर्थन केलें आहे.

आतां वरील गोष्टींचें सादृश्य आमच्या मराठी कवितेकडे कसें लागतें तें पहा. ड्रायडनविषयीं मिल्टननें एकदां अशी उक्ति प्रगट केली कीं, 'तो काय नुसता यमक्या आहे, कवि कसचा!' पोपविषयींहि पुष्कळांनीं अशाच प्रकारचा अभिप्राय दर्शाविला आहे. या दोन गोष्टींवरून मोरोपंताविषयीं नवीन मंडळींचें मत ठाम ठरून गेलेंच,—कीं हा कवि कसचा? हा बोलून चालून यमक्या; प्रास जुळावे, यमक साधावे, या गोष्टींकडे ज्याचें सदासर्वदा लक्ष लागून राहिलेलें, व त्यांतच ज्याची काय ती प्रतिष्ठा त्याचें कवित्व तें काय असणार? जॉनसननें वर सांगितल्याप्रमाणें ड्रायडनची व पोपची तुलना करून ड्रायडन यास पोपहून वरची पायरी दिली आहे. हें पहातां इकडे वामन व मोरोपंत यांच्याविषयीं मत उत्पन्न झालेंच,—कीं कवि झटला तर वामनच, मोरोपंताचा नुसता थाटमाटच पाहून घ्यावा! पुढें मूषकमंडूक न्यायानें ड्रायडन व पोप या दोघांसहि उचलून भरारी मारणारा जसा वर्डस्वर्थ इंग्लंडांत निपजला, त्याप्रमाणेंच इकडे आमच्या देशांतहि वामनास वामनत्व देणारा व मयूराचा पिच्छभार उतरवणारा एक महाकवि निपजून त्यानें सारा महाराष्ट्र देश दणाणून दिला आहे! सारांश, आमच्या माजी पडलेल्या जगद्गुरूंच्या ह्मणण्याप्रमाणें इंग्रजी व मराठी कवितांचें साम्य एकंदरींत 'ठीकसें ठीक' जुळून बसतें!

तर याप्रमाणें मोरोपंताच्या मुळीं कवित्वावरच जी अलीकडे धाड येऊन पडली आहे, तिचें कारण वर सांगितलेला ड्रायडन व पोप यांच्यासंबंधानें उत्पन्न झालेला

वाद होय. तिकडचें अनुकरण करून इकडेहि तिकडच्या सारखी कांहीं तरी गडबड उडवून द्यावयाची ही जी अधुनिक प्रवृत्ति तिचेंच केवळ फळ वरील वाद होय. बाकी ज्या पंडितांच्या तोंडून वरील कलमांत दाखल केलेले अनेक सिद्धांत ऐकूं येतात, त्यांनीं ह्मणजे पोपचीं किंवा ड्रायडनचीं शेंदोनशें तरी पानें वाचलेलीं असतात किंवा आमच्या इकडच्या महाराष्ट्र कवींच्या वाङ्मयाशीं ते विशेष परिचित असतात असा मुळींच अर्थ नाहीं. एखाद्या मिशनरीस 'वेदा'विषयीं व्याख्यान देण्याची हुक्की आल्यास त्यास जितपत संहितेचें पारायण करावें लागतें,[1] 'षड्दर्शना'विषयीं अभिमान प्रगट करतांना 'ज्ञानोदया'सारख्या पत्रांच्या प्रकाशकांस जितपत कणादजैमिन्यादि अपवित्र शास्त्रकारांची ओळख करून घ्यावी लागते,[2] मेकॉलेप्रभृति बहादरांस प्राच्य देशांतील कोणत्याहि कोनाकोपऱ्याविषयीं लिहावयाचें असल्यास त्यांस जितपत परिश्रम करणें अवश्य होतें,[3] किंवा आमच्या अर्वाचीन महापंडितांस जेंदावेस्ता आणि वेद, वेद

---

१. वरील वेदव्याख्यानाचा एक मासला परवां येथें दृष्टीस पडला. अहमदनगरचे मिशनरी रे० टेलर साहेब यांनीं नुकतें येथील पाद्रीशाळेंत वरील विषयावर एक व्याख्यान दिलें. मिशनरीमजकुरांस मराठी भाषेचें ज्ञान बऱ्यापैकीं आहे असें त्यांच्या भाषणावरून दिसून आलें; पण याखेरीज सदरील व्याख्यानांत दुसरा कोणताहि गुण दृष्टीस पडला नाहीं. मुख्य विषयाचें विवेचन ह्मटलें तर कांहीं इकडच्या तिकडच्या दहावीस ऋचा व श्लोक गोळा करून टिपून आणले होते, व वेदांत किती विरोध आहेत हें दाखविण्याकरितां ते सर्वांस वाचून दाखविले, इतकेंच काय तें. अलीकडे शिक्षणाचा फैलाव पुष्कळ झाल्यामुळें पहिल्यासारखें 'पल्लवाग्राहि पांडित्य' हल्लीं पुण्यासारख्या ठिकाणीं तरी चालणार नाहीं हें रेवरेंड साहेबांच्या सारख्यांसहि कसें कळत नाहीं कोण जाणे! तरी सदरील व्याख्यानाच्या शेवटीं एका तरुण सभासदाकडून व्याख्यानकारासजें एक बरेंच खरमरीत उत्तर मिळालें त्यावरून त्यास कळलेंच असेल कीं आपलें पवित्रशास्त्रीय बीज येथें फारसें रुजलें नाहीं व रुजण्यासारखेंहि नाहीं!

२. अंक ४१ पहा.

३. वरील ग्रंथकारानें एके प्रसंगीं आमच्या राममोहनरायाविषयीं असें ह्मटलें—

"Is it not notorious that the profundity of one age is the shallowness of the next; that the profundity of one nation is the shallowness of a neighbouring nation? Rammohun Roy passed, among Hindoes, for a man of profound Western learnning; but a very superficial member of this institute,

'Literature of Britain.'

या ठिकाणीं विद्वत्तेच्या खोलाचें व उथळपणाचें जें माप घेतलें आहे त्या मापानें आमच्या पाश्चात्त्य पंडितांचें इकडील विषयांचें ज्ञान कितीसें भरेल? ह्मसमाजाच्या आद्यस्था पकास इंग्लिश भाषेचें व इंग्रजी विद्यांचें जितपत ज्ञान होतें तितपत संस्कृताचें ज्ञान व शास्त्रांची

(पुढें चालू).

आणि कुराण, कुराण आणि पवित्रशास्त्र, पवित्रशास्त्र आणि धम्मपद, धम्मपद आणि गुलामगिरी यांची झांगड घालून देतांना जितपत पंचाईत पडते, तितपतच वरील कवित्वांची तुला धारण करणाऱ्या रसिक मंडळीस! यास्तव या केवळ स्वकपोलक, लिप्त साम्याच्यासंबंधानें येथ कांहीं लिहिणें अवश्य आहे असें वाटत नाहीं. त्यांतून वरील तुलनेचा एक पक्ष आमच्या मराठी वाचकांस अगदींच अपरिचित पडल्यामुळें आह्मीं जरी वरील खटपट केली तरी व्यर्थ खटाटोप मात्र होणार!

यास्तव ड्रायडन आणि वामन, पोप आणि मोरोपंत, वर्ड्स्वर्थ आणि 'वीररस-प्रधान काव्या'चे कर्ते, या युग्मत्रयांत परस्पर कितपत साम्य आहे याविषयींचें विवेचन तूर्त एकीकडे ठेवूं. प्रस्तुत वादाचा निर्णय होण्यास सध्यां एवढेंच बस आहे कीं, मोरोपंत हा कवि नव्हे असें जे प्रतिपादन करतात त्यांच्या आक्षेपांचें निरसन करून आमच्या स्वतःच्या मतांचीं कारणें पुढें वाचकांस सादर करतों.

४. मोरोपंत हा कवि नव्हे या प्रमेयावर सविस्तर उपपादन ज्यांत केलें आहे असा ग्रंथ अद्याप मुळींच झाला नाहीं. मराठी कविता वाचणारे आपल्या लोक

माहिती किती प्रोफेसरांच्या ठायीं आढळेल? आणि त्यांतून ज्या पंडितवर्यांनीं प्राच्य व पाश्चात्त्य विद्यांच्या योग्यतेवर बेधडक मिनिट झोकून दिलें त्यांच्या ज्ञानाची गंभीरता तर कोठवर वर्णावी!! (अंक ३० पहा.)

१. वरील श्रेणीपैकीं पहिल्या विषयावर एक बेंड व्याख्यान आह्मांस कांहीं दिवसांपूर्वी बापुरस्थ आर्यसमाजांत ऐकायास सांपडलें. व्याख्यान कोणत्या तऱ्हेचें होईल याची कल्पना आह्मांस पूर्वी झालीच होती. पण मुंबईकरांस व विशेषतः दयानंदजींच्या जुक्तिवाल्यांस तें कितपत रुचतें हें पहाण्याची आमची इच्छा होती. पाहिलें तों सर्व यथास्थित चाललें होतें! व्याख्यात्यांनीं हिंदुस्थानावरून पार्सदेशावर, पार्सदेशावरून रूमशामच्या मुलखावर रूमशामावरून शार्मण्यदेशावर याप्रमाणें उड्डाणावर उड्डाण चालवून शेवटीं स्वारी ऐलेंडावर जाऊन थांबली, व या सर्व देशांतून आर्यधर्म चालू होता असें आपल्या गुरुबंधूंस व परम भाविक श्रोत्यांस त्यांनीं कळविलें! इंग्रजी बहुमानार्थक संबोधन 'सर' याचीहि त्यांनीं नवीच उत्पत्ति आपल्या प्रिय समाजबंधूंस सादर केली. ती ही कीं, वरील शब्द 'आर्य' शब्दाचा अपभ्रंश होय!! या अजब चिजा ऐकून आह्मी तर अगदीं थक्क होऊन गेलों, पण आमच्या मुंबईकर आर्यबंधूंच्या चेहेऱ्यावर आश्चर्याचें वगैरे कांहीं एक चिन्ह नजरेस आलें नाहीं. जें जें आलें तें तें त्यांनीं खुशाल कान पमरून बहुमानपूर्वक ऐकून घेतलें. ठीकच आहे, ज्या महाभाविकांस 'आदम' आदिमः), 'पूजारी' (पूजेचा अरी) या व्युत्पत्ति महागुरूंच्या मुखावाटें निघाल्या असतां चांगल्या ग्राह्य झाल्या, त्यांच्या माजी अध्यक्षांनीं विलायतेंत छापलेल्या गीताभाष्याच्या उपोद्घातांत 'कौवरव' (कौरव) शब्द 'कैवार' शब्दापासून निघालेला आहे म्हणून प्रतिपादन केलें आहे, तीं मंडळी 'सर' शब्दाच्या मूळपीठिकेला कशाला नाक मुरडील! आम्हांस खास वाटतें कीं, 'आर्याः' याचें इंग्रेजी रूपांतर Sirrah असें करून जरी याख्या-त्यांनीं आपल्या प्रिय बंधूंस सादर केलें असतें तरी तें चाललें नसतें असें नाहीं!

किती आहेत याचा विचार केला असतां वरील गोष्टीचें आश्चर्य वाटणार नाहीं; आणि त्यांतून प्रस्तुत महाराष्ट्रकवीचें काव्य वाचून वरील निर्णय करणारा मनुष्य तर थोडाच आढळेल असें वाटतें! ज्यास शोध न करितां मतें भराभर झोकून देण्याची भारी हौस, जे केवळ दुसऱ्याच्या अभिप्रायाचा अनुवाद करणारे, किंवा ज्यांचा एखाद्या गोष्टीविषयीं एखादा ग्रह एकदां होऊन बसला ह्मणजे बसला; अशा मंडळीच्या पायीं आजपर्यंत आमच्या विचाऱ्या देशाची विटंबना झालेली आहे. असो; तर वरील सविस्तर ग्रंथाच्या अभावीं प्रस्तुत विषयावर कोठें कोठें जे दोन चार उल्लेख आमच्य आढळण्यांत आले आहेत त्यांचें येथें अवतरण करून त्यांविषयीं विवेचन करतों.

'विविधज्ञानविस्तारा'च्या पहिल्या वर्षाच्या पांचव्या व सातव्या अंकांत 'मोरोपंत' या सदराखालीं कांहीं मजकूर लिहिलेला आहे, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. त्यांतील पुढील तीन उतारे घेतों—

" नलाख्यानांत कोठें एक आर्या आहे. ती अशी—

राधाप्राप्त्यर्थ जसा
तो स्वकरगतामला यशा शिनळ ॥
सोडी दमयंत्यर्थ
क्षिप्रचि अतिदुर्लभा तशाशि नळ ॥

यमक जोडण्यासाठीं ज्यानें भगवंताला 'शिनळ' असें विशेषण दिलें, त्याची भक्ति केवढी होती ती सहज ध्यानांत येईल. श्रीमद्भागवतांत दुष्टांनीं जी परमेश्वराची निंदा केली आहे त्या श्लोकांचा टीकाकारानें प्रथम वास्तविक अर्थ सांगून, नंतर टीकेच्या योगानें भगवंताची निंदा आपल्याहि तोंडातून झाली म्हणून दोषशमनार्थ पुनः त्याच श्लोकांचा अर्थ ओढून ताणून स्तुतिपर केला आहे. मोरोपंताला हें ठाऊक असून त्याला तें अभद्र भाषण करण्यास अगदीं संकोच वाटला नाहीं, किंबहुना लज्जा देखील वाटली नसावी.

येथें श्रीकृष्णाला शिनळ म्हणून, त्यानें राधेसाठीं आपलें निर्मल यश घालविलें असें कवि म्हणतो. असें जर आहे तर त्याचे गुण कां गावे? श्रीमद्भागवतांत कृष्णाची आणि गोपीची क्रीडा शुकाचार्यानें वर्णिली आहे. परंतु शुकाचार्य एवढा साधु आणि ऊर्ध्वरेता असून त्यानें ती क्रीडा कधीं दूषिली नाहीं; परंतु त्या कृत्याला भगवंताचीं यशें असें म्हटलें आहे. मोरोपंताला तीं कृत्यें वाईट वाटत होतीं असेंहि कोठें आढळत नाहीं. दुसरें, जर, श्रीकृष्ण जार, तर त्याची उपमा नळाला साजत नाहीं. कारण नळानें हंसाला पाठविलें तें जार कर्माच्या हेतूनें नव्हे. "

"विराटपर्वांत अर्जुन उत्तरास सांगतो—

न्यावा चमूवरि तुवां
रथ तरुणीप्रति जसा स्मरें तरुण ॥

वीररसांत शृंगाररस मिसळल्यानें काव्यास कशी गोडी येत असते ती एक मोरोपंताचे भक्तच केवळ जाणत असतात; इतरांस अतर्क्य. अशाच एका प्रतीचें उदाहरण देऊन होरेशियस नामें रोमी कवि ह्मणतो—

Resum teneatis, amici? 'मित्रहो, हें पाहून तुह्मी हंसल्याशिवाय रहाल काय?"

"मोरोपंतानें रामायणांत कोठें एक उत्प्रेक्षा केली आहे ती अशी—

सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली जशी वृकें एणी ।
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी ॥

रामचंद्रानें शिलासेतु बांधला, तो कवि ह्मणतो सेतु नव्हे, तर काय? आपली कन्या जानकी रावणानें नेली या कारणानें पृथ्वीनें त्या रावणाची लंकारूप जी स्त्री तिची वेणी धरून ओढिली आहे.

काय हा अलंकार! रावणानें जर दुसऱ्याची बायको आणली, तर त्याच्या स्त्रियेला तें बरें वाटेल काय? सहसा वाटणार नाहीं. तर मग तिची उगीच कां वेणी धरून ओढावी?

रा. ब. भास्कर दामोदर यांनीं नवनीताचे प्रस्तावनेंत या उत्प्रेक्षेची फारच प्रशंसा केली आहे. त्यांला तिजमध्यें काय जो चमत्कार वाटला असेल तो वाटो. आमचें मत तर अगदीं भिन्न."

'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रहां'त एके ठिकाणीं असा लेख आहे—

"वाक्याचा किंवा त्यांतील शब्दांचा अर्थ दोहोंकडे लागत असला ह्मणजे श्लेषनामक अलंकार होतो. जसें—

तूं मलिन कुटिल नीरस
जडहि पुनर्भवपणें हि कच साच ॥
धरिला शिरींहि न स्व—
प्रकृतिगुण त्याजिसि नाम कच साच

मोरोपंत. कचोपाख्यान.

या स्थलीं कचनामक ब्राह्मणास जीं विशेषणें दिलीं आहेत, ती केंसासहि लागतात. साधारण कवि या अलंकाराचा हवा तेथें प्रयोग करून आपल्या काव्यांस दुर्बोधता आणितात, व त्यांच्या ग्रंथांत एका शब्दाचे दोन अर्थ होत असतात. एवढ्यानेंच त्यांस व कितीएक अरसिकांस ते ग्रंथ मोठे चांगले वाटतात; पण सहृदय पुरुष तसले लेख पसंत करीत नाहींत. हें आमचेंच मत आहे असें वाचणाऱ्यांनीं समजूं

नये; तर मोठमोठ्या सुज्ञ ग्रंथकारांचेंहि मत असेंच आहे."

आतां अनुक्रमेंकरून वरील चारी स्थलांविषयीं विचार करूं.

(१) प्रस्तुत आर्या वनपर्वांतर्गत नलोपाख्यानांतील आहे. तिचा अर्थ उघडच आहे, कीं, नलराजाच्या हातीं हंस सांपडला असतां तो त्यास सोडून देता झाला; कसा? तर जसें कृष्णानें राधेशीं रमण्याची इच्छा धरून आपल्या हातचें निर्मल यश घालविलें. या आर्येंत नलाचें आणि कृष्णाचें, दमयंतीचें आणि राधेंचे, हंसाचें आणि यशाचें, असें तीन प्रकारचें साम्य कवीनें वर्णिलें आहे, व उपमालंकार केला आहे. वरील तीन साम्यांत चित्तास चमत्कार देणारें साम्य झटलें झणजे हंस आणि यश यांचें होय, व उपमेचा मुख्य भाग हाच होय. कृष्ण आणि राधा यांच्या जागीं आणखी कोणाची योजना केली असती तरी चालली असती; कारण त्यांचें नल आणि दमयंती यांशीं जें सादृश्य वर्णिलें आहे तें केवळ गौण आहे. मुद्याची गोष्ट काय ती अमूर्त[1] जें यश त्याशीं संस्कृत कवीच्या संकेतास[2] अनुसरून मूर्त जो परम शुभ्र हंस त्याची तुलना दोहोंशीं 'सोडणें' या क्रियेचा चमत्कारिक रीतीनें अन्वय करून दिला आहे ही होय. ही तुलना यथार्थ असली झणजे कवीचें काम झालें; व जो खरा रसिक आहे त्याचें लक्ष तिच्या पलीकडे तिळमात्रहि जाणार नाहीं. आमच्या टीकाकर्त्यानें कृष्णास 'शिनळ' हें विशेषण लावणें बरोबर आहे कीं नाहीं, शुक्राचार्याचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय व मोरोपंताचा कसा होता, हंसाला जो दमयंतीकडे पाठविला तो जारकर्माच्या हेतूनें नव्हे, अतएव श्रीकृष्णाची उपमा नळाला साजत

१. उपमा झणजे दोन वस्तूंचें चमत्कारिक सादृश्य असल्यामुळें सजीव व निर्जीव, मूर्त व अमूर्त, अशांचें सादृश्य विशेष चमत्कारास्पद होय हें उघडच आहे. प्रस्तुत शतकाच्या आरंभीं विलायतेंत त्रैमासिकांची जी नवीन तऱ्हा निघाली तींतील पहिलें जें 'एडिनबर्ग रिव्ह्यू' (अंक २८ पहा) त्याचा मुख्य स्थापक व प्रकाशक जो विख्यात टीकाकार जेफरी त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे—

"It has always been our opinion that the very essence of poetry—apart from the pathos, the wit, or the briliant descriptions which may be embodied in it, may exist equally in prose—consists in the fine perception and vivid expression of that subtle and mysterious analogy which exists between the physical and the moral world, which makes outward things and qualities the natural types and emblems of inward gift and emotions."

२. संस्कृत कवींचे संकेत अनेक आहेत. ते येणेंप्रमाणें—कीर्ति व हास्य यांचें शुभ्रत्व; तरुण स्त्रियांच्या मद्यगंडूषांनीं बकुलवृक्षाचें फुलणें; हत्तींच्या गंडस्थळांत मोतीं; चकोरांचें चंद्रीकरणसेवन; चक्रवाक पक्ष्यांचा सूर्यास्ताबरोबर वियोग व सूर्योदयाबरोबर संगम, इ० इ०

नाहीं--वगैरे जें पांडित्य केलें आहे तें निवळ अरण्यरोदन आहे. त्याचा वरील आर्येतील उपमेशीं बिलकूल संबंध नाहीं. मोरोपंताच्या धर्मसंबंधी मतांविषयीं जर विचार कर्तव्य असता, तर प्रस्तुत लिहिणाराचा वरील सर्व ऊहापोह यथायोग्य होता; पण जोंपर्यंत कवित्वाच्या संबंधाचेंच विवेचन आहे तोंपर्यंत वरील धर्ममीमांसा केवळ अप्रस्तुत होय !

(२) विराटपर्वांत उत्तरगोग्रहण प्रसंगींची पुढील आर्या आहे—

बैस रथीं तूं माझा सारथि हो तरणिचा जसा अरुण ।
घ्यावा चमूवरि तुवां रथ तरुणीप्रति जसा स्मरें तरुण ॥

या आर्येंत वीररसांत शृंगाररसाची भेसळ झाली आहे ती आमच्या आक्षेपकांस खपत नाहीं. वरील रससंकराच्या योगानें त्याच्या ठायीं हास्यरसाची उत्पत्ति होऊन तो जो वाहवत गेला आहे तो टैबर नदींत जाऊन पडला आहे ! आह्मी रोमकभाषानभिज्ञ असल्यामुळें होरेशियस बोवांचें काय रससूत्र आहे व वरील हास्यरसोद्गार त्यांनीं कोणत्या संबंधानें प्रगट केला हें आह्मांस माहीत नाहीं. तरी गीर्वाणभाषेच्या आयुधागारांतील पुढील कालिदासीय अस्त्र आमच्या बिचाऱ्या प्राकृत कवीचा बचाव करील असें वाटतें.—

राममन्मथशरेण ताडिता
दुःसहेन हृदये निशाचरी ।
गंधवद्रुधिरचंदनोक्षिता
जीवितेशवसतिं जगाम सा ॥

हें पद्य 'रघुवंशा'च्या अकराव्या सर्गांतलें आहे. प्रसंग ताटकावधाचा असून वरील पद्यांत ताटकेवर श्लेषेंकरून अभिसारिकेचें रूपक केलें हें उघडच आहे.

आतां शृंगारांत वीराचें मिश्रण असल्याचा प्रकार पहा—

शांते मन्मथसंगरे रणभृतां सत्कारमातन्वती
वासोऽदाज्जघनस्य पीनकुचयोर्हारं श्रुतेः कुंडलम् ।
बिंबोष्ठस्य च वीटिकां स्मितमुखी पाण्योरणत्कंकणं
पश्चाल्लंबिनि केशपाशनिचये युक्तो हि बंधक्रमः ॥

---

१. "(ताटकापक्षीं) रामाच्या दुःसह शरानें हृदयाचे ठायीं विद्ध झालेली ती राक्षसी दुर्गंधयुक्त रक्तानें न्हालेली होत्साती यमसदनास गेली. "

"(अभिसारिकापक्षीं) मदनाच्या दुःसह शरानें विद्धहृदय होत्साती ती अभिसारिका सुगंधयुक्त रक्तचंदनाचा लेप केलेली अशी प्राणेशाच्या संकेतस्थानीं गेली."

२. अंक ४१ पहा.

वरील दोन उदाहरणांवरून वाचकांस कळून येईलच, कीं शृंगार आणि वीर यांचा परस्पर केवळ विरोध आहे असें नाहीं. एवढें मात्र खरें आहे कीं, कोणी वीर रणावेशानें भरून गेला असतां त्याच्या तोंडून शृंगारोक्ति वदविणें, किंवा कोणी अनंग-रंगमग्न झाला असतां त्यानें वीरश्रीचें भाषण करणें, हें शोभणार नाहीं; पण उपमेकरतां शृंगारांत वीररस आला किंवा वीरांत शृंगार आला तर तो हास्यास्पद होतो असें नाहीं. लौकिक भाषेंतहि 'रतियुद्ध' आणि 'रणनवरा' या शब्दांवरून वरीलच प्रमाण मिळतें.[1]

त्यांतून ज्या प्रसंगविशेषीं वरील शृंगारोपमा योजली आहे तेथें तर ती विशेष शोभते असें आह्मांस वाटतें. ज्या महावीरानें पंजरस्थ सिंहाप्रमाणें बारा वर्षें वनवास काढला, व तेराव्या वर्षीं तर ज्यास क्लीबवेश धारण करून स्ववीर्याचा निन्हव करणें भाग पडलें, आणि भावी समरप्रसंगाची ज्यास नुसती वार्ता कळल्याबरोबर—

उठल्या उत्साहाच्या त्या शांतश्रीमदुदधिवरि लहरी ।

अशी ज्याची अवस्था झाली, त्यास चिरकांक्षित जें शत्रुसेनेचें दर्शन तें घडलें असतां केवढा हर्ष होणारा आहे व रणतुंबळ करण्याविषयीं केवढें प्रबळ बाहुस्फुरण होणार आहे! वरील बाहुस्फुरणास आमच्या मतें एकच अत्यंत समर्पक दृष्टांत होय![2]

(३) आमच्या आक्षेपकास लंकादेवीची वेणी धरून ओढल्याबद्दल तिची फार कींव आली आहे. या कींववरून त्याची सदयता प्रगट होते, प्रण सहृदयता होत

---

१. गीर्वाणकविमुकुटमणीच्या ग्रंथांतहि पुढील उपमा आढळतात—

स निर्विश्य यथाकामं तटेष्वालीनचंदनौ ।
स्तनाविव दिशस्तस्याः शैलौ मलयदर्दुरौ ।
असह्यविक्रमः सह्यं दूरान्मुक्तमुदन्वता ।
नितंबमिव मेदिन्याः स्रस्तांशुकमलंघयत् ॥

रघुवंश. ४

२. प्रख्यात इंग्रेजी कवि स्कॉट याच्या अत्युत्कृष्ट काव्यांत पुढील उल्लेख आढळतो. हा तर वादविषयक आर्येबरोबर अर्थसादृश्याच्या सदराखालीं देण्यासारखा आहे—

"Twice have I sought clan-Alpine's glen,
In peace; but when I came agen,
I come with banner, brand and bow,
As leader seeks his mortal foe.
For love-lorn swain, in lady's bower,
Never panted for the appointed hour,
As I, until before me stand,
This rebel Chieftain and his band."

Lady of the Lake.—V.

नाहीं. पहिल्या आक्षेपांत कृष्णभक्ति अस्थानीं प्रकट होऊन ती जशी प्रस्तुत रसिकाच्या यथार्थ दर्शनास विघातक झाली त्याप्रमाणेंच येथें वरील हृदयवृत्ति झाली आहे. लंका ही रावणाची स्त्री यास्तव तिजविषयीं सीतेची माता जी भूदेवी तिची अत्यंत द्वेषबुद्धि होणें हें स्त्रीस्वभावास अनुसरूनच आहे, व आपल्या कन्येचा ज्या दुष्टानें विनाकारण छळ आरंभला आहे त्याच्यावर कसा तरी प्रतीकार घडो अशी इच्छा तीस होणें हेंहि सहजच आहे. द्वेषाचें व प्रेमाचें मनुष्यापासून मनुष्याकडे किंबहुना पदार्थांकडेहि कसें संक्रमण होत असतें हें मनुष्यस्वभावाकडे ज्यानें अंमळ लक्ष पुरविलें असेल त्याच्या सहज लक्षांत येणारें आहे. आमचे कविकुलगुरु यक्षाच्या मुखें मेघास सांगतात—

भर्तुः कंठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः । १

"बा मेघा! तुजकडे शिवगण मोठ्या प्रेमानें बघत राहतील. कां? तर तुझा वर्ण त्याच्या स्वामीच्या कंठासारखा आहे ह्मणून!" तर हृदयवृत्तीच्या संक्रमणाचा इतका प्रभाव आहे. आतां हें खरें आहे कीं, रावणानें आपली मुलगी चोरून नेली तर त्याच्या बायकोकडे काय अपराध आहे, तिला तर घरांत सवत आल्यानें वाईटच वाटणार आहे, वगैरे गोष्टींचा विचार आमच्या आर्यभूमीनें करणें जरूर होतें. पण हा तीस कसा झाला नाहीं कोण जाणे! असो. स्वतः क्षमा खरी, पण या प्रसंगीं तींच आमच्या रसिकाच्या क्षमेस पात्र आहे! आमच्या कवीच्या हातून तरी वरील चूक कशी घडली हेंहि चांगलेंसें कळत नाहीं; पण पुढील शतकांत सगळेंच पारडें फिरून जाऊन नवे प्रभु, नवी विद्या, नवे महाकवि, नवे रसिक, अशी गर्दीच गर्दी होऊन जाणार आहे, व उपमा, उत्प्रेक्षा वगैरे जोखण्याचे विलायती कांटे या देशांत येऊन थडकणार आहेत हें तरी त्या विचाऱ्याच्या कोठून लक्षांत यावें ?

वरील उत्प्रेक्षेची प्रशंसा केल्याबद्दल कै० भास्कर दामोदर पाळंदे यांजवरहि प्रस्तुत टीकाकर्त्याचा शेवटचा फटकारा गेला आहे. पण माजी रावबहादुरांसारख्या खऱ्या रसिकास चमत्कार वाटण्याजोगें वरील उत्प्रेक्षेंत कांहींच नाहीं असें आह्मांस

---

१ भर्तुः कंठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः
पुण्यं यायास्त्रिभुवनगुरोर्धाम चंडीश्वरस्य ।
धूतोद्यानं कुवलयरजोगंधिभिर्गंधवत्या-
स्तोयक्रीडाविरतयुवतिस्नानतिक्तैर्मरुद्भिः ॥
—'मेघदूत'

(महाकाल जो त्रिभुवनपति त्या वंदाया मग जावें
प्रभुकंठाची प्रभा मानुनी गण तुज बघतिल भावें
तया स्थलींचीं बालोद्यानें हलवी मारुत मंद
विलसित पद्मां डोलवूनि जो हरी तयाचा गंध ॥)
—'पद्यरत्नावली.'

वाटत नाहीं. एक तर केशाकर्षणाचा प्रकार स्त्रियांच्या कृतौस अनुसरून असल्यामुळें स्वभावोक्तिरूप होय; आणि शिवाय सेतूचें आणि वेणीचें सादृश्य कृष्णत्वास्तव, दैर्घ्यास्तव, आणि संवीतत्वास्तव अत्यंत समर्पक व हृदयंगम होय!

याप्रमाणें 'विविधज्ञानविस्तारां'तील आक्षेपांचें निरसन झालें. यावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच कीं, जे आक्षेप कित्येक पंडितंमन्य प्रस्तुत कवीवर आपल्या विद्वत्तेच्या घमंडींत झोकून देतात त्यांविषयीं यथार्थ बुद्धीनें विचार केला असतां ते प्रायः असंच नाहींसे होणार आहेत. त्यांतून कवींचे विचार तर्कशास्त्राच्या तराजूंत जोखूं पहाणें हें तर अरसिकतेचें केवळ शिखर होय!

असो; आतां शेवटला जो 'अनेकविद्यामूलतत्वां'तील उतारा त्याविषयीं विचार करावयाचा. हा हातीं घ्यावयाचें आह्मांस मोठें भय वाटतें. यापूर्वी आह्मी आमच्या प्रस्तुत राज्यकर्त्यांविषयीं, इंग्रजी ग्रंथकारांविषयीं, विलायती धर्माविषयीं वगैरे जें जें लिहिलें त्या सर्वांवरून राजद्रोहाचा व सद्धर्मद्रोहाचा जबरदस्त चार्ज आह्मांवर आला, व वरील महापातकांची निष्कृति आह्मी अद्याप करीतच आहों. तेव्हां यावरून पहातां वरील पुस्तकांतील लेखाविरुद्ध अभिप्राय प्रगट केल्यानें तर केवढा भयंकर गुन्हा होणार आहे याची कल्पनाहि करवत नाहीं! जर इंग्रज लोकांस न रुचण्यासारखें कांहींहि लिहिल्यानें राजनिष्ठेचा लगेच चुराडा होऊन जातो; आणि तो कां, तर ते आमच्या देशाचें राज्यसूत्र हातांत वागवून आमचें रक्षण करताहेत व त्यांच्या कृपेनें आह्मांस ज्ञानप्राप्ति झाली आहे ह्मणून; तर मग मुळीं जन्मलाभच जेथपासून त्या ठिकाणीं विरोध प्रगट करणें हें तर केवढें धाष्टर्य व केवढा अधमपणा होय! आपले राज्यकर्ते जें जें करतील त्यास नेहमीं मान डोलवीत जायची ही जर राजनिष्ठा, इंग्रेज ग्रंथकारांच्या पेनांतून जें जें निष्पन्न होईल तें तें शिरसावंद्य करायचें ही जर सत्यनिष्ठा, पाद्रीसाहेब जें जें सांगतील त्यास 'आमेन्' (तथास्तु) या एक्या पदानेंच उत्तर करायचें ही जर धर्मनिष्ठा, तर मग 'बाबावाक्यं प्रमाणम्' हेंच पितृभक्तीचें परमस्वरूप होय! या कडकडीत व्रताची दीक्षा घेऊन तें आजन्म अबाधित पाळण्याचा ज्यांचा कृतसंकल्प असेल व त्यांत ज्यांस धन्यता वाटत असेल त्यांस तीं सुखेनैव वाटो. आमच्या मनाची नैसर्गिक प्रवृत्ति तर अगदीं निराळ्या प्रकारची आहे; व आह्मीं आजपर्यंत जेवढें वाचलें व ऐकलें त्यावरून वरील प्रवृत्तीचें दोषरूपत्वहि अद्याप आमच्या लक्षांत आलें नाहीं. शिवाय हेंहि सांगणें या प्रसंगीं अप्रस्तुत होणार नाहीं, कीं ज्या महापंडिताचा पितृनामानें निर्देश करण्याचा अधिकार जगदीशाच्या कृपेनें आमच्याकडे आहे, ज्याचें पूर्ववय गदाधरादिकांच्या समागमें जाऊन उत्तरवय मिल्प्रभृति पाश्चात्य तत्वज्ञांच्या संगतीनें गेलें, रविकरगतकमलन्यायानें ज्याच्या विकासप्रद सान्निध्याचा अमूल्य लाभ आजपर्यंत इतका काळ आह्मांस लाभला, आणि ज्याचें स्वभाषाभिवृद्धीचें व्रत

आज पांच वर्षें यथाशक्ति चालवून देशोन्नतीच्या धुराकर्माचा अंगीकारहि ज्याच्या पद्धतीस अनुसरून आह्मांस अवश्य करणें आहे,—त्या विख्यात पुरुषाचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय पडता याची आह्मांस पूर्ण खात्री आहे. तर आतां एवढी प्रस्तावना करून व परमपूज्य श्रीमत्पितृपदीं प्रणाम करून पूर्वोक्त अवतरणाविषयीं आमचे विचार वाचकांस सादर करतों.

सदरील उतार्‍यांतील मुख्य गोष्ट 'हवा तेथें प्रयोग' ही होय. ह्मणजे मोरोपंतानें ज्या प्रसंगीं वरील आर्येंत श्लेषाची योजना केली आहे तो प्रसंग श्लेषरचनेस उचित नव्हे हा त्यावर आक्षेप होय. आतां वरील श्लेष अप्रासंगिक कां याचा जर विचार केला तर एवढेंच कारण दिसतें कीं, देवयानीचें बोलणें रोषाचें आहे, यास्तव चित्तवृत्ति कलुष झाली असतां श्लेषाची स्फूर्ति कोठून होणार ? मिरवणुकीच्या वेळची घोड्याची ऐटदार चाल जशी रणांगणावर अप्रासंगिक होईल, त्याप्रमाणेंच क्रोधाच्या, शोकाच्या वगैरे भाषणांत श्लेष तर काय, पण सामान्यतः कोणताहि अलंकार शोभणार नाहीं ! पण असें असतां सर्वमान्य महाकवींच्या ग्रंथांतून पाहिलें असतांहि शोकाच्या, क्रोधाच्या वगैरे आवेशांत केलेलीं भाषणेंहि केवळ अलंकारविरहित असतात असें नाहीं. काव्याचा मुख्य हेतु मनोरंजन असल्यामुळें अलंकाराचा थोडाबहुत प्रयोग वरील प्रसंगींहि केलेला आढळतो. उदाहरणार्थ पुढील श्लोक पहा—

स्वप्नांतरेऽपि खलु भामिनि पत्युरन्यं
या दृष्टवत्यसि न कंचन साभिलाषम् ।
सा संप्रति प्रचलितासि गुणैर्विहीनं
प्राप्तुं कथं कथय हंत परं पुमांसम् ॥
निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा
सालंकृतिः श्रवणकोमलवर्णराजिः ।
सा मामकीनकवितेव मनोभिरामा
रामा कदापि हृदयान्मम नापयाति ॥ १

---

१ न पाही स्वप्नींही पतिविण कधीं जी नर दुजा
स्पृहायुक्तें चित्तें जितकमलनालोत्तमभुजा ।
सुशीला तूं ऐशी पर पुरुष जो निर्गुण तया
कशी पाहूं जाशी हरिणिनयने सत्वरतया ॥
गुणांनीं जी पूर्णा अणुसम नसे दोषहि जिला
अलंकारीं साजे रस वसतसे जींत पहिला ।
मृदू जीचे वर्ण श्रवणसुख देती परिसतां
वसे ती पद्माक्षी मम हृदयिं जेवी सुकविता ॥

—'पद्यरत्नावली'.

वरील पद्यें जगन्नाथकृत 'भामिनीविलासा'च्या 'करुण' नामक तृतीय विलासांतील आहेत. पहिल्या पद्यांत 'गुण' आणि 'पर पुमान्' हे शब्द श्लिष्ट आहेत; व दुसऱ्याचा तर सगळाच अर्थ श्लेषमय आहे.

तेव्हां वादविषयक आर्येंत श्लेषाच्या प्रयोगाबद्दल जर आमच्या कवीवर दूषण आलेंच, तर तें वरील महारसिकावर व महाकवीवरहि तितक्याच मानानें येणार आहे !

शिवाय हेंहि लक्षांत आणलें पाहिजे कीं, निर्भर्त्सनेच्या भाषणांत नामाच्या यथार्थत्वाविषयींचा किंवा अयथार्थत्वाविषयींचा उल्लेख येणें हें अगदीं साहजिक आहे. कोणी गोरा मनुष्य असतां त्यास उद्देशून रागानें बोलतांना 'तूं बाहेर जितका गोरा आहेस तितका आंतून काळा आहेस,' किंवा तो वर्णानें काळा असल्यास 'तूं आंत बाहेर सारखाच काळा आहेस' अशी बोलण्याची प्रवृत्ति लोकव्यवहारांतसुद्धां आढळते. मग काव्यांत तर हा प्रकार आढळेलंच आढळेल. 'गीतगोविंदां'त विप्रलब्धा नायिका नायकास रोषपूर्वक ह्मणते—

बहिरिव मलिनतरं तव कृष्ण मनोऽपि भविष्यति नूनं ।
कथमथ वंचयसे जनमनुगतमसमशरज्वरदूनम् ॥

"हे कृष्णा ! तूं बाहेरून जसा अत्यंत मलिन (काळा) आहेस त्याप्रमाणेंच तुझें मनहि आहे असें वाटतें; एरवीं मदनसंतापानें पीडिलेल्या अशा स्वानुरक्त जनाचें वंचन तुझ्या हातून कसें होईल ?"

कृष्णास व बलरामास धनुर्यागप्रेक्षणार्थ बोलवायास कंसाकडून अक्रूर आला असतां गोपी भग्नमनोरथ होत्साल्या अक्रूरास शिव्या देतात—

यमदूतशतक्रूरहि स्वमुखें अक्रूर ह्मणविलो मेला ।
आला गांव वधाया परि बाई हा न लेश कोमेला ॥

तेव्हां वरील प्रमाणांवरून पहातां वादविषयक आर्येंतील श्लेषावर अप्रासंगिकत्वाचा जो दोषारोप केला आहे तो दूर होईल असें वाटतें.

वरच्याखेरीज इतर जीं दूषणें प्रस्तुत कवीवर वरील लेखांत सामान्यतः दिलेलीं आहेत त्यांविषयीं यापूर्वी विचार झालेलाच आहे. श्लेषाचा प्रयोग आमच्या कवीस कितीसा प्रिय होता व तो त्याच्या कवितेंत कितीसा आढळतो, तसेंच जीं थोडींबहुत अशीं स्थलें आहेत त्यांस श्लेषरचनेच्या योगानें दुर्बोधत्व कितीसें आलें आहे, याविषयीं येथें कांहीं निराळें लिहिणें नकोच. वरील सर्व गोष्टींचा विचार झाला असतां

प्रस्तुत महाराष्ट्रकवीची 'साधारण कवि' या पदांनीं जी अवगणना केली आहे तीहि सहजच निराधार होणार आहे.

उत्तरें.

हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा ॥ [२]

—'रघुवंश.'

अंक ६२.—(१) चालू अंकाचा विषय. (२) रा. ओक यांच्या पत्रास उत्तर. (३) रा. कानेटकर यांच्या आक्षेपांचें परीक्षण.

१. या अंकांत दोन पत्रांचीं उत्तरें घालायचीं आहेत. एक पत्र गेल्या अंकांत बहुतेक आलेंच आहे, त्याचा राहिलेला भाग या अंकांत येईल. याखेरीज दुसरेंहि एक महत्वाचें पत्र आह्मांकडे आलें आहे. तेंहि या अंकांत दाखल होऊन त्याचें उत्तरहि यथानुक्रम याच अंकांत दृष्टीस पडेल.

दोनहि पत्रांतील विषय चालू विषय जो 'मोरोपंताची कविता' त्याच्याच संबंधाचा आहे, यास्तव या अंकांत त्याचाच समावेश केला आहे. कोणत्याहि विषयाची पूर्णपणें चर्चा झाली असतां तो चांगला व्यक्त होतो व त्याची पुरती शहानिशा होते हें उघडच आहे; यास्तव वरील पत्रें व त्यांचीं उत्तरें हीं प्रस्तुत विवेचनाचींच अंगें समजून त्यांकडे वाचक चांगलें लक्ष देतील अशी आह्मांस उमेद आहे.

तर आतां यथानुक्रम वरील दोन पत्रांचा विचार करूं.

---

१ आमच्या वडिलांचा प्रस्तुत महाराष्ट्रकवीवर शेवटपर्यंत मोठा कटाक्ष असे. सुमारें पंधरा वर्षांपूर्वी आह्मी शाळेंतील पाठाच्या आर्या त्यांजपाशीं वाचीत होतों, तेव्हांपासून तें परवां 'नवनीता'च्या नवीन आवृत्तीच्या वेळीं कांहीं मंडळी त्यांजकडे कांहीं दुर्बोध आर्या घेऊन आली होती तोंपर्यंत त्यांचा रोंख प्रस्तुत कवीवर सारखा होता. इतर विषयांवर त्यांच्या मतांची चलबिचल झालेली आमच्या लक्षांत आहे; पण प्रकृत विषयावर मात्र त्यांचा अभिप्राय जो एकदां ठाम बनून गेला होता तो होता! जुन्या व नव्या पंडितांचें बिचाऱ्या मयूरकविविषयींचें अप्रेम त्यांच्या ठायीं एकवटलेलें होतें. **मोरोपंत** मुळीं कविच नव्हे, तर पुराणांतील अर्थ घेऊन तो शुद्ध प्राकृत भाषेंत त्यानें आर्यारूपानें ग्रथित केला एवढींच काय ती त्याची करामत, हें त्यांचें ठरीव मत होतें. महाराष्ट्रकवींत 'कवि' ही संज्ञा एका **मुक्तेश्वराला** मात्र बरोबर रीतीनें लागेल असें ते नेहमीं ह्मणत असत. सन १८६६ सालच्या ट्रेनिंग कॉलेजांतील परीक्षेत पुढील प्रश्न आढळतो—

" (३ प्र०)—मुक्तेश्वर व मोरोपंत या दोघांनींहि शकुंतलाख्यान लिहिलें आहे, त्यांत तुह्मांस विशेष चांगलें कोणतें वाटतें तें सांगून त्याचीं कारणें लिहा."

शालापत्रक—जुलै १८६३.

२ "सोनें शुद्ध निघतें कीं काळसर पडतें याची परीक्षा अग्नीवरून तेव्हांच होते!"

२. पहिलें पत्र नागपुरकर ओक यांचें आहे' या पत्रकाराचा आमच्याशीं पूर्वी एक दोन वेळां वादप्रसंग झालेला आहे. रा. ओक हे मोठे शोधक व उद्योगी आहेत आमच्या पुस्तकांत त्यांचीं एरवींहि कांहीं पत्रें आलेलीं आहेत. आमच्या पुस्तकांत जो जो मजकूर प्रसिद्ध होत जातो त्यावर प्रस्तुत पत्रकारासारख्यांची निरंतर चर्चा होत असावी अशी आमची पहिल्या अंकापासून इच्छा आहे हें वाचकांस माहीत आहेच, व कोणत्याहि प्रतिपक्ष्यास आह्मी आजपर्यंत विमुख झालों नाहीं हेंहि वरील मंडळीस सांगावयास नकोच. तर सध्यां चालू असणाऱ्या विषयावर आजपर्यंत जें चोहोंकडे सामसूम होतें तो प्रकार मोडून या खेपेस दोन प्रतिपक्ष्यांस उत्तरें देण्याचा प्रसंग आलेला आहे या गोष्टीचा आह्मांस मोठा संतोष वाटतो. त्यांतून आमच्या नागपुरकर मित्राच्या कृशानुसदृश आक्षेपांचें निरसन करणें तर विशेषच उत्साहप्रद होय!

रा. ओक यांचे आक्षेप आमच्या दोन लेखांच्या संबंधानें आहेत. ते लेख येणेंप्रमाणें—

(अंक ५७)–"मोरोपंताची कविता वाचतांना सकृद्दर्शनींहि कळून येणारा तिचा एक मोठा विशेष ह्मटला ह्मणजे लांबलांब यमकें हा होय. हा यमकांचा प्रकार प्रथमतः वामनानें सुरू केला. त्याच्या पूर्वी महाराष्ट्रकविता ही केवळ ओवी व अभंग या छंदांतच असल्यामुळें यमकांच्या रचनेस अर्थातच अवकाश नव्हता; आणि त्यांतून वरील कवींपैकीं कोणी पंडित नसल्यामुळें वरील साध्या छंदांतहि यमकरचना करण्याचा कोणीं यत्न केलेला दृष्टीस पडत नाहीं. पण पुढें वामनानें जेव्हां गणवृत्तें महाराष्ट्रकवितेंत आणिलीं, तेव्हां तीं यमकरचनेस विशेष अनुकूल असल्यामुळें तो यत्न त्यानें केला."

(अंक ४७)—"अगदीं अव्वलपासून तो अखेरपर्यंत कोणत्याहि मराठी कवीस 'रघुकिराता'दि पंडितमान्य काव्यांची बिलकुल ओळख होतीशी सुद्धां दिसत नाहीं. नामदेव, तुकाराम यांची गोष्ट तर बोलायालाच नको. पण पंडितमंडळींत बरेच मोडण्यासारखे जे वामन, मोरोपंत, रामजोशी वगैरे त्यांच्या ग्रंथांतहि कालिदासादिकांचा मागमूसहि नजरेस येत नाहीं. संस्कृत कवितेच्या धर्तीवर जुनें मराठी काव्य ह्मटलें ह्मणजे रघुनाथ पंडितांचें 'नलोपाख्यान'च एक होय. त्याची रचना श्रीहर्षाच्या 'नैषधा-' च्या नमुन्यावर केली आहे असें कवीनेंच सरतेशेवटीं सांगितलें आहे. पण याखेरीज बाकीच्या कोणत्याहि महाराष्ट्र-काव्यांत जुन्या संस्कृत कवींची पद्धति कोणत्याहि संबंधानें बिलकुल दृष्टीस पडत नाहीं."

आतां या दोन लेखांत आलेल्या कित्येक गोष्टींवर आमच्या प्रतिपक्ष्यानें जे जे आक्षेप काढले आहेत त्यांवर आमचें काय काय ह्मणणें आहे तें वाचकांस सादर करतों.

रा. ओक यांचा पहिला आक्षेप असा आहे कीं, 'हा यमकांचा प्रकार प्रथमतः वामनानें सुरू केला' हें ह्मणणें बरोबर नाहीं. कां कीं, रामदास, मुक्तेश्वर, आणि

विठ्ठल वगैरे कवींच्या ग्रंथांतून वरील प्रकार आढळण्यांत येतो, व हे कवि वामनाच्याच वेळेस होते; मग वामनानेंच वरील प्रकार सुरू केला हें कशावरून ? या आक्षेपावर आमचें उत्तर एवढेंच आहे कीं, आमच्या आक्षेपकानें वरील वाक्यावर एवढें पांडित्य करण्यापूर्वी जर त्याचा पूर्वापर संबंध पाहिला असता तर बरें झालें असतें. हा 'प्रकार' ह्मणजे केवळ यमकरचना असा अर्थ नव्हे, तर लांब लांब यमकें जुळण्याचा प्रघात असा अर्थ होय. नुसता यमकाचाच प्रकार पाहिला तर रामदास, मुक्तेश्वर हेच कवि कशाला पाहिजेत, तो प्रकार अगदीं आदिकवि मुकुंदराज किंवा ज्ञानेश्वर यांच्यापासूनहि महाराष्ट्र-कवितेंत चालू झाला आहे. इंग्रजींत जशी यमकरहित छंदोरचना (blank verse) आढळते, व संस्कृतांत तर तिचाच प्रचार दृष्टीस पडतो, तसें मराठींत एका ठिकाणीं खेरीजकरून कोठेंहि आढळत नाहीं, हें बहुधा कोणासहि सांगावयास नको.[1] मग यमकाचा महाराष्ट्र-कवितेंत एवढा सर्वतोमुख प्रचार असतां आमच्या बिचाऱ्या शूद्रकवीला व बीडवासी चित्रकूटकार कवीला एवढी तसदी देण्याची पंचाईत आमच्या नागपुरकर मित्रानें कशाला केली हें आह्मांस समजत नाहीं. अगदीं 'विवेकसिंधू'पासून व 'ज्ञानेश्वरी'पासून तों थेट ब्राह्मणांच्या कसबा'पर्यंत व 'एका साहेबानें केलेल्या कविते'पर्यंत ज्या यमकाची जबरदस्त व्याप्ति पसरून राहिली आहे त्याला हुडकून काढण्यास रा. ओक हे विठ्ठलकवीकडे कशाला घुसले कोण जाणे ? असो; तर वामनपंडिताला जो आह्मीं मान दिला तो नुसत्या यमकरचनेच्या संबंधानें नव्हे, तर पांच पांच सहा सहा अक्षरांचीं यमकें कवितेंत घालण्याची पद्धति त्याच्या काव्यांत प्रथमतः दृष्टीस पडूं लागली याबद्दल तो होय.

आतां वामनपंडित अगोदर श्लोकरचना करूं लागला, कीं रामदास, विठ्ठल वगैरे मंडळीनें प्रथमतः अक्षरगणवृत्तें उचललीं, या विषयावर जें आमच्या आक्षेपकानें एवढें विवेचन केलें आहे, त्याचा प्रस्तुत प्रकरणास फारसा उपयोग आहे असें आह्मांस वाटत नाहीं. मुक्तेश्वर, विठ्ठल वगैरे कवींचें कवित्व सामान्यतः पाहतां कोणत्याहि योग्यतेचें असलें, तरी श्लोकरचनेच्या कामांत त्यांस वामनाची सर येणार नाहीं हें कोणीहि सांगेल. फार लांब जावयाला नको. प्रस्तुत पत्रकारानेंच विठ्ठलाच्या ग्रंथांतले जे थोडेसे उतारे दाखल केले आहेत त्यांवरून पाहतांहि रचनेच्या संबंधानें दोघां कवींत किती अंतर आहे, तें सहज दिसून येईल. तेव्हां असें जरी कबूल केलें कीं, वामनाची कविता वरील साऱ्या कवींच्या मागून प्रगट झाली, तरी दीर्घ यमकांचा प्रकार त्याच्या ग्रंथां-

---

१. संस्कृतांत सर्वत्र यमकरहित छंदोरचनेचाच प्रकार दृष्टीस पडतो. 'घटकर्परा'दि कांहीं थोड्या काव्यांत मात्र मुद्दाम यमकरचना केलेली आढळते, मराठींत वरच्याच्या उलट प्रकार असून **मोरोपंत**कृत 'गीता'यांत मात्र यमकांचा अभाव आढळतो.

वरून प्रवृत्त झाला असें ह्मणण्यास मोठीशी हरकत दिसत नाहीं.[1] शिवाय नवीन पद्धतीचा प्रवृत्ति पडणें ही गोष्ट प्रवर्तकाच्या प्रसिद्धीवर अवलंबून असते हेहि कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. मग वामनाच्या श्लोकांच्या इतकींच विठ्ठलकवीच्या दोन 'स्वयंवरां'ची किंवा मुक्तेश्वराच्या 'कौतूहल नाटक रामायणा'ची आजपर्यंत प्रसिद्धि असेल किंवा हल्लीं आहे असें आमच्या आक्षेपकांच्यानें ह्मणवेल काय? आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस तर वरील दोघां कवींच्या गणवृत्तात्मक ग्रंथांची नुकतीच माहिती झाली असेल असें ह्मणण्यास हरकत नाहीं. रा. ओक यांचा तरी वरील ग्रंथांशीं कितीसा जुना परिचय असेल कोण जाणे!

रा. ओक आह्मांस सांगतात कीं, "कोणत्याहि छंदांत यमकरचना साधणें हें त्या छंदावर फारसें नाहीं, तर कवीच्या चातुर्यावर ही गोष्ट अवलंबून असते. चांगला कल्पक कवि असला तर तो हव्या त्या छंदांत यमकांची रेलचेल उडवून देईल." आमच्या आक्षेपकानें आमचा मूळचा लेख जर अधिक लक्षपूर्वक वाचला असता तर वरील महातत्त्व प्रगट करण्याचें व त्यावर एवढा विस्तार करण्याचें त्यास प्रयोजन दिसलें नसतें. यमकाला काय, तें एकाक्षरी वृत्तांतहि येणार नाहीं काय? पण ज्या-अर्थीं त्याची योजना शोभेकरतां आहे, त्याअर्थीं तें कोणत्या ठिकाणीं विशेष शोभेल याचा कांहीं विचार नको काय? मोठमोठाल्या वृत्तांत जसें पांच सहा अक्षरांचें यमक शोभेल तसें तें लहानशा छंदांत शोभणार नाहीं हें उघडच आहे. सात आठ अक्षरांचा छंद, आणि त्यांत पांच सहा अक्षरांवर यमक, हा प्रकार ह्मटला ह्मणजे मध्यें वीतभर काय ती जमीन आणि दोहोंकडे हात हातभर रेशमी कांठ अशा बाजीरावी धोतरजोड्याप्रमाणें किंवा 'मिया मूठभर आणि दाढी हातभर' यासारखाच होय. तर ओंवी व अभंग हे छंद यमकरचनेस विशेष अनुकूल नसल्याविषयीं जें आह्मीं लिहिलें आहे त्याचें वरील कारण होय; व त्यामुळेंच वामनास गणवृत्तांचा प्रयोग करतांना दीर्घ यमकांची योजना करण्यास अवकाश सांपडून यमकरचनेच्या विशेषास्तव त्याची महाराष्ट्र-कवींत प्रसिद्धि झाली असावी हें थोडासा विचार केला असतां कोणाच्याहि लक्षांत येणारें आहे

मोरोपंतानें वामनाविषयीं जें ह्मटलें आहे, कीं त्यानें महाराष्ट्र कवींची आपल्या

---

१. या यमकप्रकरणीं **दादोबां**चा लेख येणेंप्रमाणें आहे--

"त्यांत आणखी रसान्वित यमकें साधण्याची तर हातोटी या कवीप्रमाणें कोणत्याहि इतर महाराष्ट्र-कवींची आढळत नाहीं. अशीं रसान्वित यमकें साधूनहि इतका विशाल ग्रंथ रचणारा महाराष्ट्र भाषेंत हा एकच कवि. मला वाटतें अशीं यमकें साधण्याचा कित्ता **मोरोपंतां**नें वामनपंडिताकडून घेतला असावा."

(यशोदा पांडुरंगी-प्रस्तावना.)

यमकांनीं गर्वहानि केली, त्यावर आमच्या पत्रकारानें जें तर्कशास्त्र लढविलें आहे तें पाहून आह्मांस आचंबा वाटतो. बिचाऱ्या पंतांच्या मनांतहि एवढा खोल अर्थ वरील आर्या लिहितांना आला असेल, किंवा असा अर्थ काढणारा पुढें आपणास कोणी भेटेल अशी कल्पनाहि त्यांच्या मनांत आली असेल, असें आह्मांस वाटत नाहीं. आह्मांस तर वादविषयक आर्यार्धाचा एवढाच अर्थ भासतो कीं, त्यांत आमच्या कवीनें आपल्या वडील बंधूची त्याच्या काव्यांत आढळणारा जो विशेष त्याच्यासंबंधानें प्रशंसा केली आहे. हा विशेष मोरोपंतास स्वतः अत्यंत संमत असल्यामुळें, व तो वामनाच्या काव्यावरूनच त्यानें प्रायः उचलला असल्यामुळें, आपल्या गुरूचें ऋणच त्यानें जणूं काय वरील प्रशंसेच्या रूपानें फेडलें असें मानण्यास हरकत नाहीं. कोणा एखाद्याच्या ठायीं एखादा गुणविशेष असून त्यावरून जर त्याच्या श्रेष्ठत्वाचें वर्णन केलें, तर तो गुणविशेष तद्व्यतिरिक्त इतरांचे ठायीं अवश्य मानायासच पाहिजे असें आह्मांस वाटत नाहीं.

याप्रमाणें यमकाच्या प्रवृत्तीच्या संबंधानें आह्मीं वामनास कां प्रथम स्थान दिलें याविषयीं विचार झाला. आतां गणवृत्तांच्या संबंधानेंहि वरील कवीस आह्मीं तोच मान दिला आहे, तर याविषयींहि आमचा अभिप्राय कळविणें अवश्य आहे.

गणवृत्तें हीं प्रथमतः वामनानें महाराष्ट्र-कवितेंत आणलीं व त्याच्यापूर्वी प्रस्तुत कविता ही अभंग व ओंवी या छंदांतच होती असा आमचा उल्लेख आहे. यावर रा. ओक यांचे आक्षेप येणेंप्रमाणें आहेत. जोंपर्यंत वामनाचा जन्मकाळ समजला नाहीं तोंपर्यंत गणवृत्तांचा प्रवर्तक तोच हें ह्मणणें बरोबर नाहीं. कां कीं, रामदास, विठ्ठल व मुक्तेश्वर या तिघांनीं गणवृत्तात्मक कविता केली आहे, व हे सर्व वामनाशीं समकालीन होते; मग यांच्यापैकीं कोणीं प्रथमतः गणवृत्तांची योजना कशावरून केली नसेल? वामनानेंच ती केली यास आधार काय? दुसरें असें कीं, वामनाच्या पूर्वी तरी गणवृत्तांचा प्रचार नव्हता यास तरी प्रमाण काय? हे दोन्ही आक्षेप एका रीतीनें पाहतां खरे आहेत. गणवृत्तात्मक रचना वामनानेंच प्रथमतः केली, किंवा त्याच्यापूर्वीहि कोणीं इंद्रवज्रा, मालिनी, शिखरिणी इत्यादि छंदांत काव्यरचना केली होती, तसेंच विठ्ठल, रामदास व मुक्तेश्वर यांनीं कोणकोणत्या वेळीं ग्रंथरचना करण्यास आरंभ केला; या सर्व गोष्टींची माहिती आमच्या आक्षेपकास जशी अद्याप लागली नाहीं तशीच आह्मांसहि ती अजून मिळाली नाहीं, हें आह्मांस कबूल करणें भाग आहे. वरील गोष्टींविषयीं चांगलीशी माहिती नसल्यामुळें आमच्या उल्लेखावर वस्तुतः पाहतां अनिश्चितता येणार आहे हेंहि उघड आहे. पण सामान्यतः व्यवहारदृष्ट्या पाहिलें असतां आमचा उल्लेख यथार्थ मानण्यास हरकत दिसत नाहीं. ज्या अर्थीं वामनाच्या काळापूर्वीची जेवढी कविता आज प्रसिद्ध आहे तेवढी सर्व अभंग व ओंवी या दोन छंदांतच

आहे, व वामनाशीं समकालीन असणारे जे विल्हणप्रभृति कवि त्या सर्वांत वामनाचीच श्लोकरचनेच्या संबंधानें अधिक प्रख्याति असून आजपर्यंत गणवृत्तांची जी प्रसिद्धि झाली तीहि मुख्यतः त्याच्याच ग्रंथांवरून झालेली आहे, त्या अर्थी सामान्यतः पाहतां आमचा वरील उल्लेख वादास्पद होत नाहीं. पूर्वी अनेक वैयाकरण झाले असतां जर पाणिनीस व्याकरणशास्त्रप्रणेता ह्मणतात, ग्रीनलंड द्वीपकल्पापर्यंत डेन्स लोक जाऊन पोंचले असतां अमेरिका शोधून काढल्याचा मान जर कोलंबसाकडेच आह, इकडे आर्यभट्ट व ग्रीस देशांत पायथागोरस यांस गुरुत्वाकर्षणधर्माची माहिती असतां जर न्यूटनची वरील प्रमेयाबद्दल प्रसिद्धि आहे, तर याप्रमाणेंच जरी वामनाच्या पूर्वी गणवृत्तांचा प्रयोग करणारे कोणी असले तरी 'सुश्लोक वामनाचा' या सार्वलौकिक प्रसिद्धीस अनुसरून गणवृत्तांचे प्रवर्तकत्व वरील कवीकडे दिल्यानें मोठासा असंमजसपणाचा दोष अंगीं येतो असें आह्मांस वाटत नाहीं. आर्या व लावणी या छंदांचाहि पूर्वी कोणीं प्रयोग केला असेल, किंवा नसला तरी आमचे नागपुरकर आक्षेपक ह्मणणारच कीं कोणीं केला नसेल कशावरून?—तरी असें असतां वरील छंदांची प्रवृत्ति पंतांनीं व जोशीबोवानीं केली असें ह्मटल्याबांचून कोणी राहील काय? एके ठिकाणीं कालिदासानें ह्मटलें आहे—

नक्षत्रतारा ग्रहसंकुलाऽपि
ज्योतिष्मती चंद्रमसैव रात्रिः ॥

"नक्षत्रें, तारे आणि ग्रह हे जरी आकाशांत असले तरी रात्रीस चंद्राच्या योगानेंच 'ज्योतिष्मती' (प्रकाशयुक्त) हें नांव प्राप्त होतें." तर हा न्याय रा० ओक यांनीं अंमळसा ध्यानांत आणला असता तर बरें झालें जसतें !

येथवर आक्षेपास्पद लेखांपैकीं एकाच्या संबंधानें विचार झाला. आतां दुसऱ्या लेखाच्या संबंधानें आमचा अभिप्राय वाचकांस कळवितों.

आमचा मूळचा अभिप्राय असा आहे कीं, अगदीं पहिल्यापासून तों शेवटपर्यंत साऱ्या महाराष्ट्रकवितेचें स्वरूप जर लक्षांत आणलें तर तें कालिदासादिकांच्या कवितेच्या स्वरूपाहून अत्यंत भिन्नतेचें आहे असें दृष्टीस पडेल. हा भिन्नभाव कोणत्या प्रकारचा आहे याविषयीं ४७ व्या अंकांत बरेंच दिग्दर्शन केलें आहे. याच निरूपणांत आमचा असा उल्लेख आला आहे कीं, एक 'नलोपाख्याना'खेरीज कोणतेंहि महाराष्ट्रभाषेंतील काव्य संस्कृत कवींच्या पद्धतीवर लिहिलेलें आढळत नाहीं; व मराठी कवींपैकीं रघुनाथ पंडिताखेरीज इतरास कोणासहि कालिदासादि संस्कृत कवींशीं परिचय होतासाहि दिसत नाहीं. रा० ओक यांनीं दहा बारा पृष्ठांभर जें एवढें अकांडतांडव केलें आहे त्याला आधार पाहिला तर एवढाच!—कीं कालिदासादिकांच्या ग्रंथांची महाराष्ट्र कवींस बिलकूल ओळख नव्हती असें तुह्मी ह्मणतां

पण हा पहा आह्मांस विठ्ठलकवीच्या 'सीतास्वयंवरां'त कसा दाखला मिळाला आहे तो! विठ्ठलकवीनें 'हनूमन्नाटक' व कालिदासाचा 'रघुवंश' हीं दोन्ही वाचलीं होतीं हें अगदीं स्पष्ट आहे!! आमच्या नागपुरकर आक्षेपकाच्या नेहमींच्या वादरीती-प्रमाणें पहातां येथेंहि आह्मी हरलों ह्मणून गपचीप बसणें भाग आहे. तरी वरच्या-प्रमाणेंच पुनः एकवार आमच्या प्रतिपक्ष्यास हलवून अंमळ जागें करणें जरूर आहे तें इतक्याच संबंधानें कीं आमचा उल्लेख त्यानें अगोदर पुरतेपणीं ध्यानांत आणायचा होता, आणि मग पाहिजे तेवढी भरारी मारायाची होती! महाराष्ट्र कवींपैकीं कोणींहि 'रघुवंशा'दि काव्यें वाचलींच नव्हतीं असा आमचा मुळींच उल्लेख नाहीं; आमचा उल्लेख केवळ काव्यपद्धतीच्या संबंधानें आहे. संस्कृत कवितेची व महाराष्ट्र कवितेची पद्धति अगदीं भिन्न आहे, व तिजवरून पाहतां कालिदासादिकांची मराठी कवींस बिलकूल ओळख सुद्धां नव्हती असें वाटण्यासारखें आहे, एवढाच आमचा अभिप्राय आहे.[1] वामन, मोरोपंत वगैरे मंडळीचा संस्कृत कवींपैकीं कितीकांशीं व कितीसा परिचय होता हें आतां समजणें अशक्यच आहे, पण एवढें खरें आहे कीं, त्यांच्या ग्रंथांत पाहूं जातां वरील परिचयाचें फारच थोडें प्रमाण सांपडेल. आणि यावरूनच तो परिचय जरी कांहींकांचा यथाकथंचित् असलाच, तरी तो ह्मणण्यासारखा दृढ नव्हता असें ह्मण-ण्यास हरकत दिसत नाहीं.

आमच्या प्रतिपक्ष्यानें 'कांहीं श्रीहनुमंतनाटककथा कांहीं रघुवंशिंची' एवढ्या एका पराला धरूनच जें एवढें प्रचंड उड्डाण केलें आहे त्यापेक्षां दहा वीस वामनी श्लोक किंवा पांचपंचवीस मोरोपंती आर्या, अथवा विठ्ठलकवीचीं दहापांच 'चित्रकूटें' घेऊन त्यांशीं समानार्थक अशीं जर पंचमहाकाव्यांतील कांहीं स्थलें दाखविलीं असतीं तर आह्मीं आपला लेख संतोषानें माघारी घेतला असता; व तेणेंकरून आमच्या 'वाचण्याची सीमा' किती आकुंचित आहे व रा० ओक यांची किती विस्तृत आहे हेंहि दिसून आलें असतें. पण हें ज्या अर्थीं त्यांनीं केलें नाहीं त्या अर्थीं आमचा मुद्दा पहिला आहे तसाच आहे असें ह्मणणें भाग पडतें. विठ्ठलकवीनें वरील दोन ग्रंथांचा केवळ प्रसंगोपात निर्देश केल्यानें कांहींएक ठरत नाहीं.

आतां चालू मुद्द्याच्या संबंधानें एका गोष्टीविषयीं मात्र लिहिणें राहिलें. तें एवढेंच कीं, आह्मीं एकंदर महाराष्ट्र कवितेच्या संबंधानें जें एवढें विधान केलें आहे तें कोणत्या आधारावरून? आह्मीं यत्रयावत महाराष्ट्रकवित्व अवलोकनांत आणून वरील सिद्धांत केला कीं कसें? या आक्षेपावर आमचें असें उत्तर आहे कीं, प्रत्येक सिद्धांत

---

१. सदरील पत्रांत रा० ओक यांचा जसा आमच्या लेखाविषयीं गैरसमज झाला आहे तसाच पूर्वी आमच्या दुसऱ्या एका आक्षेपकाचाहि झाला होता. अंक ३५ पहा.

स्थापित करतांना तदाकलित सर्व व्यक्तींविषयीं पृथक् पृथक् शोध करणें नेहमीं अवश्य असतें असें नाहीं. 'कावळ्यांचा रंग काळा असतो' किंवा 'एशिया खंडांत लोकसत्तात्मक राज्यांची पद्धति कोठें आढळत नाहीं,' असें सामान्यतः ह्मटलें ह्मणजे सारे कावळे एके ठिकाणीं बोलवायला पाहिजेत किंवा साऱ्या एशिया खंडभर हिंडलें पाहिजे असें नाहीं. जेवढे कावळे आजपर्यंत दृष्टीस पडले तेवढें सर्व जर काळेच होते, व जेवढ्या एशियांतील राज्यांची आपणांस माहिती आहे तेवढ्यांतून राजसत्तेखेरीज दुसरा प्रकार जर चालूच नव्हता, तर वरील दोन सिद्धांतांचें विधान करणारास मोठीशी धास्ती बाळगायाला नको. तर याचप्रमाणें आमचें महाराष्ट्र कवितेंत जेवढें अवलोकन आहे तेवढ्यावरून पाहतां वरील सिद्धांत यथार्थ वाटून त्याचा आह्मीं उल्लेख केला. ज्यांचें अवलोकन आमच्याहून विस्तृत असेल त्यांनीं आमच्या सिद्धांताचा असत्यपणा दाखवावा, ह्मणजे अर्थात्च आह्मांस त्याचा त्याग करणें भाग आहे. पण हें जोंपर्यंत होणार नाहीं, तोंपर्यंत आमचा मूळ उल्लेखच कायम समजला पाहिजे. अशा प्रकरणीं पुराव्याचा बोजा विरुद्धपक्षावर रहातो हें उघडच आहे.

याप्रमाणें आमच्या नागपुरवासी आक्षेपकाच्या लांबलचक पत्रांत जेवढे मुद्दे आहेत तेवढ्यांच्या संबंधानें आह्मीं आपलें मत कळविलें. आतां याखेरीज त्यांत जो पुष्कळ पाल्हाळवार व फाजीलपणाचा मजकूर आहे त्याच्या संबंधानें कांहीं विशेष न लिहितां त्यांतील एका मोठ्या मुद्द्याविषयीं मात्र थोडेंसें लिहून हें उत्तर आटपतों.

प्रस्तुत पत्रकाराचा सदरील लेख लिहिण्यांतला मोठा उद्देश आह्मांस हा वाटतो कीं, आह्मीं जसे आजपर्यंत बड्याबड्या मंडळीवर प्रहार केले आहेत, व त्यांच्या अनेक मतांवर निर्भीडपणें चर्चा करून त्यांचा शुष्कपणा दाखविला आहे, तसाच प्रकार आमच्याशीं करून महन्निंदारूप महापातकाची आमच्याकडून निष्कृति करवावी. आमच्या आक्षेपकवर्गास आमचें पुस्तक हें कांहीं अंशीं

अयमश्वः पताकेयमथवा वीरघोषणा ।[1]

यासारखें भासत आहेसें दिसतें. प्रस्तुत पत्रकारानें एके ठिकाणीं. नेपोलियनचा संबंध आणला आहे, त्यांतीलहि हाच आशय आहे हें उघड आहे. आतां ही जी आमच्याविषयींची समजूत ती आमचे ख्रिस्ती बंधु 'ज्ञानोदय' किंवा पुरे राजभक्त 'एलिफास' अशांच्या ठायीं आढळली तर नवल नाहीं; कां कीं आमच्याकडे मेहेरनजर त्यांची

---

१ अयमश्वः पताकेयमथवा वीरघोषणा ।
सप्तलोकैकवीरस्य दशकंठकुलद्विषः ॥
'उत्तररामचरित'

(सप्तलोकांतील एक वीर असा जो दशकंठकुलांतक (राम) त्याचा हा अश्व व ही पताका आहे, अथवा मूर्तिमती वीरघोषणाच आहे !)

कधींकाळीं वर्षा सहा महिन्यांनीं झाली तर होणार; आणि सद्धर्माचीं व राजनिष्ठेचीं पवित्र व शुद्ध तत्त्वें त्यांच्या जशा काय हाडांला खिळून राहिलेलीं! पण आमच्या देशबंधूंचेहि वरच्याचसारखे समज होऊन बसले असावे हें खरोखर आश्चर्य आहे! रा० ओक यांनीं आमच्या अंतःकरणांत प्रवेश करून पुढील हृद्गते किती मौजेचीं बाहेर काढलीं आहेत पहा!—

"आपल्या लेखाकडे कोणी पहात नाहीं, कोणीं पाहिलें तर वाचण्याच्या भरीस कोणी पडत नाहीं. कोणीं वाचलें तर त्यांत खरें काय आहे खोटें काय आहे हें पाहून त्यांतील दोष तुह्मांस कळविण्याचें कोणीच मनावर घेत नाहीं, अशी ज्या वेळेस अनास्था तुमच्या नजरेस येऊं लागली, तेव्हां तुह्मांसहि सहज वाटलें असावें कीं आपण तरी शोध करण्याची उरस्फोड कशास करावी? द्यावें कांहीं तरी खेचून आणि अंक भरून काढावा; आपण तरी मागें पुढें पहा आणि ग्रंथ उलथे पालथे घाला कशासाठीं?"

ही आमच्या हृद्गतांची मीमांसा झाली. आतां आमच्या झोटिंग बादशाहीपासून देशाचें कोणतें भयंकर नुकसान होत आहे, यावर ओक महाराजांचा अभिप्राय कसा काय आहे तो पहा!—

"ज्यांनीं लोकांस मार्ग दाखवून कांहीं प्रकारविशेषानें ज्ञानामृत पाजण्याचा जिमा घेतला आहे, तेच जर अरेरावपणाचें प्राबल्य माजवितील, आणि निवळ हुक्की-खातर अद्वातद्वा लेख प्रसिद्ध करतील तर इतर जनांनीं कोणाकडे पाहून धीर धरावा? मुख्य नाविकानेंच जर डुलकी देत देत सुकाणूं फिरविलें, आणि जहाज वहावत वहावत जाऊन खडकावर आदळण्याची वेळ ठेपली, तर इतर नाविकांची आणि वरील लहान-थोर मंडळींची काय त्रेधा उडणार आहे?"

वरच्यासारख्या लेखांवर काय उत्तर द्यावें? आमच्या पुस्तकाच्या संबंधाची ज्यास थोडीबहुत माहिती असेल, व ग्रंथरचना ह्मणजे काय याविषयीं जो क्षणभर समंजसपणानें विचार करील त्यास सुद्धां वरील दोन लेख किती विलक्षण आहेत हें कळून येईल. आमच्या पुस्तकाचे वाचक किती आहेत, तें कितपत लक्ष लावून लोक वाचतात, त्यांतील सत्यासत्याचें कोणी विवेचन करतात कीं नाहीं, आमचे अभिप्राय नमूद करण्यापूर्वी आह्मांस कांहीं शोध करावा लागतो कीं नाहीं, कांहीं पुस्तकें चाळावीं लागतात कीं खसूचित्व प्रगट करून तब्बेत लागेल तशी लेखणी चालविण्याबद्दल वादे-वीच्या दरबारचा आह्मांस एखादा चांद मिळाला आहे, वगैरे गोष्टींविषयीं लिहूं गेल्यास पुष्कळ लिहितां येईल. त्याप्रमाणें अरेरावपणा माजविण्याचा व खडकावर जहाज नेऊन हपटवण्याचा चार्ज आह्मांवर कितपतसा लागू होईल याविषयींह थोडें लिहितां येईल असें नाहीं. पण स्वतःच्या संबंधानें सविस्तर लिहिणें हें स्वदोषनिवारणाच्या प्रसंगींहि

विशेष प्रशस्त होईल असें आह्मांस वाटत नाहीं यास्तव आह्मी आपल्या तरफदारीनें आमच्या प्रतिपक्षिवर्गास एवढेंच कळवितों कीं, आह्मी आपल्या दरबारीं अद्याहत्तरच्या नवव्याप्रमाणें अद्याप एकहि आक्ट प्रसार केला नाहीं. आमचें तारू सहा वर्षांपूर्वी जेव्हां बंदर सोडून बाहेर पडलें तेव्हांच त्याच्या निशाणावर आमचा लेख फडकला आहे, कीं आमचें मत स्वीकारण्याविषयीं आमचा कोणास आग्रह नाहीं, व कोणी आमची चूक आह्मांस दाखविल्यास ता आह्मी मोठ्या संतोषानें पदरांत घेऊं. याच प्रतिज्ञेची आह्मीं पुढेंहि अनेकवार पुनरुक्ति केली आहे रा० ओक यांनीं तर आपल्या सदरील पत्रांतच शंभर वेळां आमच्या प्रांजल बुद्धीचा महिमा गाइला आहे. मग तेव आह्मी 'अरेरावपणाचें प्राबल्य माजवतों' ह्मणून त्याच तोंडानें आह्मांवर भडिमार करतात यास काय ह्मणावें ? आह्मी हवा तसा अद्वातद्वा लेख प्रसिद्ध केला ह्मणून यांच्या हातची लेखणी कोणीं हिसकावून घेतली आहे ? सदरील पत्रासारखा अद्वातद्वा व फाजील मजकूरहि आह्मीं आपल्या पुस्तकांत खुशाल येऊं दिला हें अरेरावपणाचेंच लक्षण काय ? पण रागाच्या किंवा हेकटपणाच्या आवेशांत बुद्धीची समता राहती तर मग काय न होतें ! वरील वृत्तांच्या योगानें आमच्या पत्रकाराची बुद्धि इतकी कलुषित झाली आहे कीं अगदीं उघड दिसण्यासारख्या गोष्टीहि त्यास दिसल्या नाहींत. टीका करण्यास हातीं घेतलेल्या दोन लेखांचा अर्थ ध्यानांत घेतांना तो कसा चुकला आहे हें मागें दाखविलेंच आहे. त्यांतून वरच्या दोन अवतरणांपैकीं दुसऱ्यावरून पाहतां तर त्याची मति अगदींच घसरली आहे असें ह्मणावें लागतें. आमच्या पत्रकाराचा सरासरी असा मतलब दिसतो कीं, आपल्या लिहिण्यांत प्रमादाला लवलेश स्थळ नाहीं अशी जेव्हां कोणाची खात्री होईल तेव्हां त्यानें हातांत लेखणी धरावी, दरम्यान धरूं नये. कोणतेंहि विधान करायाचें ह्मटलें ह्मणजे साऱ्या जगभर हिंडून जेव्हां त्याची शाहानिशा करून घ्यावी तेव्हां मग लेखणीचा टांक कागदाला लावावा. या समजुतीवरून आमच्या आक्षेपकास मनुष्याच्या बुद्धीचें आकुंचितत्व, प्रमादपरत्व इत्यादि धर्म कबूल नाहींत असें वाटतें. त्यानें नाविकाचा दाखला घेतला आहे. तर तोचघेऊन आह्मी त्यास असें विचारतों कीं, समुद्रयान करण्याचा जर त्यास प्रसंग आला तर कपतानाकडून नौकेबद्दल अभयलेख घेतल्यावांचून तो तिजवर पाऊल ठेवणार नाहीं काय ? व वरील अभयलेख देणारे कपतान तरी त्यास किती भेटतील ? तसेंच वरील लेख मागणाराविषयीं मुख्य नाविकाच्या मनांत कल्पना तरी काय होईल ? तर हीच गोष्ट ग्रंथकारासहि लागू आहे. मोठा कपतान् कुक् घेतला किंवा कोलंबस घेतला तरी त्याच्याहि स्वाधीन जसे वारे नाहींत, समुद्रांतील खडक नाहींत, किंवा इतर होण्यासारखे शेंकडों अपायहि नाहींत, त्याप्रमाणेंच कोणी केवढाहि ग्रंथकार असला तरी प्रमादराहित्य हा गुण त्यास कधींहि लाभावयाचा नाहीं. हें तर काय, पण वरील

गुण आपल्या ठायीं असावा अशी हांव बांधणारा मनुष्य 'रासेलस'मधील पंचमहाभूतांवर अंमल चालविणाऱ्या ज्योतिष्याच्या इतपतच शहाणा ह्मणायाला पाहिजे. असो; तर या सर्व गोष्टी आमच्या आक्षेपकानें लक्षांत आणायाच्या होत्या. त्या इतक्या उघड असतां त्याच्या ध्यानांत आल्या नाहींत याचा खरोखर आह्मांस आचंबा वाटतो. तर त्यास सरशेवटीं एवढेंच सांगतों ह्मणजे बस आहे कीं, जसा मोठा शूरहि पराभव पावल्यानें नामर्द ठरत नाहीं, त्याप्रमाणेंच वेळेनसार लेखणी घसरली तरी तिजबद्दल कोणत्याहि ग्रंथकारास मोठीशी शरम वाटायाला पाहिजे असें नाहीं. जगांत आजपर्यंत ज्ञानाचा व सत्याचा प्रसार कोणत्या तऱ्हेनें झाला हें पाहिलें असतां कोणालाहि कळून येणारें आहे कीं, ज्यास जें मत वाटेल तें त्यानें प्रगट करावें हीच वरील प्रसाराची रीति आहे. सत्याचा आविर्भाव एकदम होत नसतो, तो क्रमाक्रमानेंच व्हावयाचा. यास्तव निवळ सत्य हातीं लागेल तेव्हांच मी तें प्रगट करीन असें ह्मणून कांहींच होणार नाहीं. ज्याला जितपत शोध लागेल तितपत त्यानें लोकांस प्रसिद्ध करावा, त्याविषयीं लोकांनीं निरंतर चर्चा चालू ठेवावी, आणि मग कालेंकरून जें निष्पन्न होईल तें सत्य, हीच आजपर्यंतची सत्यशोधनाची पद्धति आहे. तर हींच आह्मींहि आजपर्यंत चालविली आहे. हींतहि ज्यांस अरेरावपणा दिसेल त्यांची धन्य ह्मटली पाहिजे. तर याप्रमाणें आह्मीं अनुसरलेल्या पद्धतीविषयीं रा० ओक यांस पुनः एकवार जागें करून कलम खालीं ठेवतों.

---

३. आतां आमचे दुसरे आक्षेपक रा० कानेटकर यांच्या कोटिक्रमाविषयीं विचार करूं.

५७ व्या अंकांत आह्मी मोरोपंताच्यासंबंधानें असा उल्लेख केला आहे कीं, तो पंडित नव्हता, तर केवळ पुराणिक होता. हा उल्लेख प्रस्तुत पत्रकारास साहसात्मक व चमत्कारिक दिसतो. ज्याची कवित्वाच्या संबंधानें एवढी सर्वतोमुख ख्याति आज शंभर वर्षें गाजते आहे तो 'आर्यापति' केवळ पुराणिक होता, ही गोष्ट आमच्या आक्षेपकास जशी वाटली तशीच पंतांच्या बहुतेक भक्तांस अप्रिय वाटेल यांत संशय नाहीं. शेक्सपीयर अविद्वान् होता हें जसें त्याच्या कित्येक भक्तांस खपत नाहीं[1]

---

१. "They who accuse him of wanting learning give him the gretest commendation. He was naturally learned. He needed not the spectacles of book to read nature. He looked inward, and found her there."

—*Dryden.*

व मिल्टननें शाळा घातली होती ही गोष्ट जशी त्याच्या चाहत्यांस लाजिरवाणी वाटते,[1] तसाच प्रकार प्रस्तुत महाराष्ट्र कवीच्यासंबंधानें होणार आहे. पण या गोष्टीस उपाय नाहीं. जी खरी गोष्ट आहे ती मनाला गोड न वाटे ह्मणून दडवून ठेवणें बरोबर नाहीं. शिवाय कानेटकरप्रभृति मंडळींनीं हाहि विचार करायाला पाहिजे कीं अंगीं पांडित्य नसल्यानें कवींस कमीपणा तो कोणता? कवित्वाचा व विद्वत्त्वाचा वस्तुतः विशेष संबंध मुळींच नाहीं; कांहीं अंशीं तर वरील दोन्ही गुण परस्परविरुद्धहि आहेत. या प्रमेयावर आह्मीं यापूर्वी अनेक वेळां प्रतिपादन केलें आहे.[2] मग ज्या विद्वत्त्वाचा कवित्वगुणाशीं अशा प्रकारचा संबंध तें आमच्या कवीच्या ठायीं बळेंच स्थापित करण्यापासून फायदा कोणता? शिवाय पौराणिकत्वाच्या योगानें त्यास हीनत्व तें काय येणार? कविरायांची डफावर थाप पडत नव्हती काय? आंग्लभौमकविमुकुटमणि घोडेवाल्याचें काम करीत नव्हता काय? स्काटलंडच्या कविश्रेष्ठाचा कृषिव्यापार चालत असतां वाग्देवी हलारूढ होत नव्हती काय? मग त्याच देवीच्या हातून पंतांच्या व्यासपीठाची अवधीरणा होण्यास कोणतें कारण आहे तें आह्मांस समजत नाहीं! असो; आतां प्रस्तुत आक्षेपकाचें ह्मणणें काय आहे तें पाहूं.

रा० कानेटकर यांचें आपल्या तर्फेचें पहिलें प्रमाण हें आहे कीं, मोरोपंताच्या काव्यांत महाराष्ट्र भाषेचें अत्यंत उज्वल स्वरूप दृष्टीस पडतें; चित्रविचित्र संस्कृत शब्द, सबंध संस्कृत वाक्यें, कठिण व अप्रसिद्ध संस्कृत शब्द, हे सर्व त्याच्या ग्रंथांत आढळतात; शिवाय 'मुक्तमाला'दि संस्कृत काव्यें त्यानें रचिलीं असून क्वचित् स्थलीं त्याची कृति इतकी दुर्बोध असते कीं ती कोणास उकलतहि नाहीं. मग असें असून केवळ पौराणिकव्युत्पत्ति त्याचे ठायीं होती असें आह्मीं ह्मणतों हें कसें? यावर आमचें असें उत्तर आहे कीं, वरील सर्व गोष्टी सिद्ध होण्यास पौराणिक व्युत्पत्तीपेक्षां अधिक सामग्रीची आह्मांस गरज दिसत नाहीं. ज्यानें 'रामायण,' 'महाभारत' इत्यादि ग्रंथांचें

---

१. This is the period of his life from which all his biograhers seem inclined to shrink. They are unwilling that Milton should be degraded to a school-master; but, since it cannot be denied that he taught boys, one finds out that his motive was only zeal for the propagation of learning and virtue; and all tell what they do not know to be true. only to excuse an act which no wise man will consider as in itself disgraceful. His father was alive; his allowance was not ample; and he supplied its deficiencies by an honest and useful employment.

—*Johnson's Life of Milton.*

२. अंक ३ व ४ पहा.

अनेकशः पारायण केलें आहे त्यास वरील सर्व गोष्टी सुसाध्य आहेत असें आह्मांस वाटतें. त्यांतून आमच्या कवीची आमदानी कोणत्या वेळीं होती हें ध्यानांत आणलें असतां व त्याच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेचा विचार केला असतां त्याच्या कवितेचें स्वरूप जितपत उज्वल दृष्टीस पडतें तितपत सिद्ध होण्यास साक्षात् शास्त्राध्ययनाची कितीशी अवश्यकता होती हें सहज दिसणारें आहे.

रा० कानेटकर यांचा दुसरा मुद्दा असा आहे कीं, मोरोपंताची विद्वत्ता किती होती याचें अनुमान त्याच्या ग्रंथांवरून कसें बांधतां येईल ? त्याच्या ग्रंथांत वरील ज्ञान प्रगट होण्यास जर अवकाशच नव्हता, तर मग त्यांत तें दृष्टीस न पडल्यावरून त्याचा अभावच कसा निखालसपणें मानावा ? हा मुद्दा नमूद करतांना प्रस्तुत आक्षेपकानें आमच्या मागल्या दोन आक्षेपकांप्रमाणेंच चूक केली आहे. आमचा मूळचा उल्लेख एवढाच आहे कीं, पंचमहाकाव्यांशीं किंवा नाटकांशीं मोरोपंताचा परिचय होता असें ज्यावरून अनुमान करतां येईल असें स्थळ त्याच्या ग्रंथांत आढळत नाहीं. याचा अर्थ अंमळ लक्षपूर्वक वाक्य वाचलें असतां कोणाच्याहि लक्षांत येणार आहे. त्यांत प्रस्तुत महाराष्ट्र कवीचा पंचमहाकाव्यांशीं परिचय होता कीं नव्हता याविषयीं साक्षात् विधान कांहींच केलेलें नाहीं. जसें एखाद्या मनुष्याविषयीं ह्मणावें, कीं पोषाखावरून हा श्रीमंत असाव्याचा दिसत नाहीं, त्याप्रमाणेंच वरील विधान होय. त्यांतील मुद्दा एवढाच आहे कीं जर मोरोपंताच्या ग्रंथांवरून पूर्वोक्त काव्यांशीं त्याचा परिचय होता असें कोणी ह्मणूं लागेल तर त्यास तसें ह्मणतां येणार नाहीं. यापलीकडे वरील वाक्यांतून अर्थनिष्पत्ति होत नाहीं. प्रस्तुत कवि पंडित नव्हता हा जो आमचा उल्लेख आहे त्याचे आधार निराळे आहेत.

प्रस्तुत आक्षेपकांचें तिसरें ह्मणणें असें आहे कीं, केवळ 'अनुष्ठितुं' व 'पुनीते' या दोन रूपांवरून प्रस्तुत कवीच्या व्याकरणज्ञानाची परीक्षा करतां येत नाहीं ही कोटी आह्मांस सयुक्तिक वाटत नाहीं. आह्मांस खास वाटतें कीं, ज्यानें व्याकरणाचें अध्ययन केलें आहे त्याच्या हातून वरच्यासारख्या चुका कधींहि होणार नाहींत वामन पंडिताच्या एका चरणाचे पत्रकारानें उदाहरण दिलें आहे, पण त्यावरून वरील कवीच्या शैथिल्याखेरीज दुसरी कोणतीहि गोष्ट ठरत नाहीं. रचनेच्या संबंधानें वरील प्रमाद कवीनें बुद्धया केले असतील हें ह्मणणेंहि ठीक नाहीं; कां कीं, आमच्या कवीची व्याकरणशुद्धतेबद्दल अतिशयित ख्याति आहे. मग याच ठिकाणीं त्यानें मुद्दाम चिखलांत पाय बुडविला असेल हें मुळींच संभवत नाहीं. याप्रमाणेंच लेखकप्रमादाची कल्पनिहि बसण्यासारखी नाहीं हें उघड आहे; कां कीं, तसें असतें तर खरा पाठ बसविण्यास फारशी पंचाईत पडतींना. आतां एक मात्र सदरील पत्रकाराची कल्पना वास्तविक आहे खरी; कीं 'मुक्तामाला'दि ग्रंथांत शेंकडों चुका आढळण्याचा संभव होता, पण हे ग्रंथ

निवळ संस्कृत असल्यामुळें कवीनें त्यांच्या रचनेकडे विशेष लक्ष पुरविलें असेल असें ह्मटल्यास साजणार आहे.

रा० कानेटकर यांचा प्रस्तुत कवीच्या तर्फेनें चौथा मुद्दा असा आहे कीं, कालिदासानेंहि 'रघुवंशा'च्या आरंभीं आपली अत्यंत नम्रता प्रगट केली आहे; मग याच अर्थानें मोरोपंताच्या दोन केकाहि घ्याव्या. हें केकांचें प्रमाण आह्मां मोठेसें प्रबळ ह्मणून दाखल केलें आहे असें नाहीं; तें केवळ पूर्वीच्यांस पुष्टीकरणरूप होय. ग्रंथांच्या आरंभीं वगैरे वाचक मंडळीची क्षमा मागण्याची जशी सर्वत्र शिष्टजनरीति आढळते तसा कांहीं प्रकार पूर्वोक्त श्लोकांत मानण्यास हरकत नाहीं हें खरें; तरी एकंदर धोरणावरून पाहतां पूर्वोक्त केका केवळ उपचारार्थक आहेत असें आह्मांस वाटत नाहीं.

आतां प्रस्तुत पत्रकारानें शेवटीं एकंदर महाराष्ट्र कवींच्या संबंधानें जो आपला उद्गार प्रगट केला आहे त्याचा विचार करून हें उत्तर आटपतों. हा उद्गार कृतज्ञताबुद्धीनें परिप्लुत आहे खरा; पण त्यावरून आमच्या आक्षेपकानें कवित्वाच्या स्वरूपाविषयीं चांगलासा विचार केला नाहीं, व 'विद्वत्त्व' या शब्दाचा अर्थहि तो फार संकुचित घेतो, हें व्यक्त होतें. वर टीपेंत सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत मालेच्या तिसऱ्या व चवथ्या अंकांत वरील विषयाच्या संबंधानें ऊहापोह केला आहे; तो ध्यानांत आणला असतां महाराष्ट्र कवींवर अविद्वत्त्व स्थापल्यानें केवळ साहसोक्तीचा दोष येतो असें नाहीं हें आमच्या आक्षेपकास कळून येईल. 'रसाळ व प्रासादिक उक्तीं'स विद्वत्तेची काय गरज आहे ? तुकारामप्रभृति शूद्रकवींचे ठायीं व महीपत्यादि ब्राह्मण कवींचे ठायीं कितपत विद्वत्ता होती ती त्यांच्या एकंदर स्थितीवरून व ग्रंथांवरूनहि स्पष्ट दिसण्यासारखी आहे. मग ज्या गुणाची ते स्वतःहि पर्वा करीत नसत त्याची त्यांवर बळेंच स्थापना करूं पहाणें हा कृतज्ञतेचा कोण प्रकार !

किं कवेस्तस्य काव्येन किं कांडेन धनुष्मतः ।
परस्य हृदये लग्नं न घूर्णयति यच्छिरः ॥ [1]

अंक ६३ (१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) **मोरोपंतास** कवि ही संज्ञा लागेल कीं नाहीं याविषयीं विचार. (३) प्रस्तुत कवीचे कवित्वगुण. (४) त्याच्या कवितेंतील गुण. (५) दोष. (६) उपसंहार.

१. येथवर प्रस्तुत विषयाच्या संबंधानें लोकांत अनुकूल व प्रतिकूल मतें काय काय आहेत त्याविषयीं विवेचन झालें. आतां आमचीं मतें काय काय ठरलीं आहेत तीं दाखल करतों.

---

१. "तें कवीचें काव्य काय कामाचें, व तो तिरंदाजाचा तीर काय कामाचा, कीं जो हृदयाशीं येऊन धडकलीं असतां मुरकुंडी वळत नाहीं !"

२. प्रथमतः अगदीं मुख्य मुद्दा जो कवित्वाचा,—ह्मणजे मोरोपंतास 'कवि' ही संज्ञा यथार्थरीत्या लावतां येईल कीं नाहीं,—याच्या संबंधानें विचार करावयाचा. या मुद्द्यावर आमचें ठरीव मत काय आहे हें फारकरून सांगायाला नकोच. इतर अनेक विषयांवर आमचा व इतर मंडळीचा जसा मतभेद आहे त्याप्रमाणेंच यावरहि आहे, व आमचें मत पूर्णपणें वाचकांस कळावें यास्तव गेल्या १० अंकांत त्यावर सविस्तर विवरण केलें आहे. त्यावरून पहातां आमचा अभिप्राय सर्वांच्या सहज लक्षांत येण्यासारखाच आहे. तो हा कीं 'कवि' ही संज्ञा प्रस्तुत कवीस पूर्णपणें लागेल.

वरील निर्णय आह्मीं कशावरून केला असें जर प्रस्तुत कवीचे प्रतिपक्षी आह्मांस विचारतील तर त्यांस निश्चयात्मक उत्तर देणें कठिण पडेल. कविता हा विषय हृदयगम्य आहे, बुद्धिगम्य नव्हे; ह्मणजे कविता ह्मणावी कोणती व न ह्मणावी कोणती याचा निर्णय सहृदय मनुष्यास करतां येईल, केवळ जो बुद्धिमान् आहे, तो करूं शकणार नाहीं. ज्याप्रमाणें आंधळ्या मनुष्यास एखाद्या पदार्थाची केवळ स्पर्शज्ञानावरून काय होईल तेवढीच कल्पना होईल, रंगाची कल्पना तर त्यास स्वप्नींहि व्हावयाची नाहीं; किंवा उत्कृष्ट रूपवतीविषयींहि क्लीबाची भावना ह्मणजे काय ती मानुषीत्वधर्मेंकरून होईल; बाकी कामिजनास जो अनुभव घडतो, कीं—

---

१. पोप यास कवि ह्मणावा कीं नाहीं हा वाद जॉन्सन्च्या वेळेपासून चालत आला आहे. त्यास उद्देशून वरील पंडितानें जें लिहिलें आहे तें न प्रस्तुत प्रसंगींहि लागू पडणारें आहे. हा लेख वरील कवीच्या चरित्राच्या शेवटीं आहे—

"After all this, it is surely superfluous to answer the question that has once been asked, whether Pope was a poet? Otherwise than by asking, in return, If Pope be not a poet, where is poetry to be found? To circumscribe poetry by a definition will only show the narrowness of the definer, though a definition which shall exclude Pope will not easily be made. Let us look round upon the present time, and back upon the past; let us inquire to whom the voice of mankind has decreed the wreath of poetry; let their productions be examined, and their claims stated and the pretensions of Pope will be no more disputed. Had he given the world only his version, the name of poet must have been allowed him; if the writer of the "Iliad" were to class his successors, he would assign a very high place to his translator, without requiring any other evidence of genius,"

स्पृशंत्यास्तारुण्यं किमिव न हि रम्यं मृगदृशः । [१]

"यौवनांत आलेल्या सुंदर स्त्रीचें मनोहर नाहीं असें काय आहे?"— या गोष्टीची त्यास कल्पनाहि करतां येणार नाहीं, त्याप्रमाणेंच सत्कवींच्या कृतींचा साक्षात्कार नेत्रद्वारा अथवा कर्णद्वारा झाला असतां थरारून जाणें, गहिंवरून जाणें, देहभान विसरणें, साश्रु होणें, हीं सर्व लक्षणें जो सहृदय त्याचेच ठायीं दृष्टीस पडतील; एरवीं कोणी केवढाहि पंडित असला तरी वरील गुणाव्यतिरिक्त त्यास अत्युत्कृष्ट काव्याचेंहि रमणीयत्व बिलकून कळून येणार नाहीं. तसेंच काव्यांतील रस हा केवळ स्वानुभवगम्य असल्यामुळें तो दुसऱ्याच्या आटोक्यांत आणून देणें हेंहि दुर्घटच आहे. प्रस्तुत विषय तर्कशास्त्रास अगोचर असल्यामुळें अमुक काव्य रसभरित आहे व अमुक नीरस आहे हें सिद्ध करून दाखविणें केवळ अशक्य होय. यास्तव मोरोपंत हा खरा कवि होय असें आह्मी कां समजतों याचीं कारणें आमच्यानें देववत नाहींत. वरील विधानाची सिद्धता आह्मी केवळ पुढील रीतीनें करतों.

पहिली गोष्ट तर ही कीं, आज शंभर वर्षें मोरोपंताची जी ख्याति चालत आली आहे ती त्याच्या अंगीं खरे कवित्वगुण नसते तर कधीं चालत आली नसती. कोणत्याहि कवीच्या योग्यतेचें ठोकळ प्रमाण त्याची लौकिक प्रसिद्धि व या प्रसिद्धीचा काळ हीं धरावयास हरकत नाहीं. आजपर्यंत जगांत जेवढे कवि होऊन गेले त्या सर्वांस वरील प्रमाण पूर्णपणें लागू पडतें. ज्याची जेवढी योग्यता तेवढ्याच मानानें त्याची लोकांत प्रसिद्धि व त्याच्या कीर्तीचा स्थाईकपणा. तर हेंच प्रमाण प्रस्तुत कवीवर लागू केलें असतां चालणार आहे. आतां हें खरें आहे, कीं अलीकडील विद्वान् मंडळीनें त्याच्या प्रसिद्धीचें एक मोठें कारण काढून ठेवलेंच आहे. तें कोणतें तर त्याची यमकरचना! पण केवळ यमकरचनेवरून कोणाचा कविवर्गांत रिघाव होईल हें संभवत नाहीं. तसें असतें तर संस्कृतांतील 'रामकृष्णविलोमकाव्य' इत्यादि कृत्रिम

---

१. वरील चरण भर्तृहरीच्या 'शृंगारशतका'तील एका श्लोकांतील आहे. तो श्लोक हा—

स्मितं किंचिद्वक्त्रे सरलतरलो दृष्टिविभवः
परिस्पंदो वा वामविरलविलासोक्तिपरसः।
गतीनामारंभः किसलयितलीलापरिकरः
स्पृशंत्यास्तारुण्यं किमिव न हि रम्यं मृगदृशः॥

याचें वामनकृत भाषांतर येणेंप्रमाणें आहे—

डोळे विशाल अणि चंचल मंद हास
चातुर्ययुक्त वचनीं मिरवे विलास।
शोभा हरी चरण कोमल पल्लवांची
कीं चांगलीच तरुणत्व दशा स्त्रियांची॥

प्रबंधांची पंचमहाकाव्यांहून जास्ती प्रसिद्धी होती. अर्थाला बिलकूल धक्का न लागतां लांबलांब यमकें सहज साधणें हा प्रकार जेव्हां प्रस्तुत कवींच्या काव्यांत प्रथमतः दृष्टीस पडूं लागला असेल तेव्हां श्रोत्यांचीं व वाचकांचीं मनें तेव्हांच तल्लीन होऊन गेलीं असतील हें खरें; पण यमकें मात्र भपकेदार असून आंत कांहीं अर्थ नाहीं असा जर वरील काव्यांतील प्रकार असता तर त्याची एवढी प्रसिद्धि कधीं न होती, व पूर्वीच्या महाराष्ट्र कवींत मोरोपंताची जी एकदम गणना झाली, व उत्तरोत्तर तर तो वरील मंडळींत शेवटला असतां अग्रगण्य होऊन बसला हेंहि कधीं घडतेंना. तर प्रस्तुत वादाचा निर्णय करण्यास वरील सामान्य प्रमाण बरेंच उपयोगी पडेल.

वरच्याहून सबळ कारण अर्थात्च प्रस्तुत कवीच्या कृतींतच जें सांपडतें तें होय. आह्मांस खास वाटतें कीं, ज्यास लवमात्र ह्मणून सहृदयता आहे तो प्रस्तुत कवीच्या ग्रंथांचें उगीच वरचेवर अवलोकन करूनहि प्रकृत वादाच्या संबंधानें फार वेळ द्वैधांत रहाणार नाहीं. ज्याप्रमाणें लोहचुंबकाची परीक्षा करावयाची असल्यास त्याचें व लोहाचें सान्निध्य झालें कीं बस आहे, मग लोहाला मागें ओढलें तरी तें जाऊन चुंबकास चिकटणारच; त्याप्रमाणेंच ज्यास सत्काव्याचें मर्म समजतें आहे व ज्यावर सत्कवींचीं वचनें मोघ होत नाहींत, तो आमच्या महाराष्ट्र कवीचा सरस्वतीनिष्यंद सेवितांच लुब्ध होऊन जाईल यांत बिलकूल संशय नाहीं. तसेच ज्यास प्राकृत कवित वाचून वरच्यापैकीं कांहींच अनुभव येणार नाहीं त्यानें आपले ठायीं अरसिकता मानली अथवा आपल्या मनावर दुराग्रहाचा पगडा जबरदस्त आहे असें मानलें तर मोठीशी चूक होणार नाहीं असें आह्मी खात्रीनें सांगतों.

३. असो; आतां ज्या कवित्वगुणांवर आह्मी इतके लुब्ध होऊन गेलों आहों- व ज्यांच्या योगानें आमचें प्रेम प्रस्तुत कवीवर इतका काळपावेतों स्थिर होऊन बसलें आहे, ते गुण कोणतें तें सांगतों. कवितेचीं अंगें दोन; एक पदरचना, व दुसरें अर्थरचना. उत्कृष्ट कवींच्या पदरचनेचे गुण ह्मटले ह्मणजे शब्दांचा साधेपणा व अन्वा याचा सरळपणा हे होत. व अर्थरचनेचे गुण प्रसाद व गांभीर्य हे होत. या चार गुणांपैकीं दुसरा व चवथा हे प्रस्तुत कवीच्या कृतींत दृष्टीस पडतात कीं नाहींत याविषयीं कोणी अभिज्ञ व रसिक शंका घेईलसें वाटत नाहीं. पहिल्या व तिसऱ्याविषयीं मात्र तसें केवळ विधान करवत नाहीं. आमच्या कवीस भवभूत्यादिकांप्रमाणें प्रौढ रचनेची अत्यंत आवड असल्यामुळें त्यानें आपल्या प्राकृत काव्यांतहि मोठमोठ्या संस्कृत शब्दांस व लांब लांब समासांस स्थल देऊन जॉनसननें ज्या प्रकारचें स्वरूप इंग्रेजी भाषेस दिलें तसें यानें मराठीस दिलें, या त्याच्या रचनाविशेषास्तव केवळ प्राकृतज्ञास त्याच्या काव्यांत पुष्कळ ठिकाणीं प्रसन्नत्व दिसणार नाहीं हें खरें, तरी व्युत्पत्तीचा ज्यास अंमळ संस्कार लागला आहे त्याची कुरकूर प्रस्तुत कवीच्या ग्रंथांच्या संबंधानें फारशी

येईल असें वाटत नाहीं. त्याप्रमाणें पदरचना व अर्थरचना या दोन्ही प्रकारांवरून पहातां आह्मी मोरोपंताची महाकवींत गणना करतों.

महाकवीच्या ठायीं दुसरें मोठें लक्षण हें आढळतें कीं, संपूर्ण रसवर्ग जसा काय त्यांच्या स्वाधीन असतो. चिताऱ्याच्या पाशीं सारे रंग जसे सदैव सिद्ध असतात; पाकाचार्यापुढें षड्रस जसे हात जोडून उभे असतात, त्याचप्रमाणें कवीचीहि गोष्ट होय, सारी भाषा ही जशी काय त्याची अंकित होऊन गेलेली असते, यास्तव तो अशी कांहीं चमत्कारिक शब्दांची सांगड घालून देतो कीं, वर्णनविषयक पदार्थ जसा काय डोळ्यांसमोर उभा रहातो, व वर्ण्य मनोवृत्तीशीं वाचकाच्या चित्ताचें तादात्म्य होऊन जातें! मोरोपंताच्या कवितेंत वरील रसाविर्भावाचीं शेकडों उदाहरणें आहेत. तीं आमच्या वाचकांपैकीं बऱ्याच मंडळीस निर्दिष्ट करायास पाहिजेत असें वाटत नाहीं- शिवाय या पुस्तकांतच अनेक उतारे आजपर्यंत दाखलहि केले आहेत. तरी प्रस्तुत विवेचनाच्या परिपूर्त्यर्थ कांहीं उत्कृष्ट स्थलांचा येथें विशेषतः निर्देश करणें प्राप्त आहे.

प्रस्तुत कवीची शृंगारवर्णनाची हातोटी कोणत्या तऱ्हेची आहे हें ज्यास पहाव. याचें असेल त्यानें 'आदिपर्वा'तील शर्मिष्ठा व ययाति आणि शकुंतला व दुष्यंत यांचे प्रसंग पहावे; 'वनपर्वा'तील उर्वशीकृत अर्जुनविलोभन व 'विराटपर्वा'तील कीचककृत द्रौपदीप्रमाथ हीं दोन प्रकरणेंहि वरील रसाचींच उदाहरणें होत. विप्रलंभ शृंगाराचा प्रकार पहाणें असल्यास 'मंत्ररामायणां'त रामास पंपेच्या दर्शनानें उत्पन्न झालेल्या सोत्कंठ अवस्थेचें वर्णन केलें आहे तें पहावें, किंवा भारतांतर्गत रामोपाख्यानांत वरील प्रसंगाचेंच पुनः वर्णन आहे तें पहावें. वीररसाचा मासला पहावयाचा असेल त्यानें 'वनपर्वा'तील किरातार्जुनीय युद्ध, 'विराटपर्वा'तील अर्जुनप्रकटन 'भीष्मपर्वा'तील भार्गवभीष्मयुद्ध इत्यादि कथानकें पहावीं. सारें 'रामायण' व 'महाभारत' हीं काव्येंच मुळीं 'इलियड'प्रमाणें वीररसानें परिप्लुत असल्यामुळें तो रस त्यांत हव्या तितक्या स्थलीं सांपडणार आहे हें उघडच आहे, यास्तव प्रस्तुत रसाच्या संबंधानें स्थलनिर्देशन हेंच वस्तुतः पहातां अप्रस्तुत होय. अद्भुत रसहि वीररसप्रधान काव्यांच्या अनुषंगानेंच रहाणारा आहे यास्तव त्याचीं उदाहरणेंहि विशेषतः सांगायाला नकोत. करुणरसाची परीक्षा कर्तव्य असतां ती पुढील उदाहरणांवरून चांगली होण्यासारखी आहे;—वनपर्वात नल दमयंतीला निजल्या जागीं अरण्यांत सोडून जात आहे तो प्रसंग; यक्षाच्या शापेंकरून चारी भाऊ मरण पावले असतां धर्मराजाचा शोक, 'स्त्रीपर्वा'त समरांगणावर कुरुस्त्रियांनीं केलेला विलाप; व 'मंत्ररामायणां'त रामलक्ष्मणांस इंद्रजितानें मूर्छित केलें असतां सीतेस त्यांचीं निश्चेष्ट शरीरें पाहून झालेलें दुःख; 'गदापर्वा'त भयानक रस पूर्ण आहे. रौद्राचें उत्कृष्ट उदाहरण 'कर्णपर्वा'तर्गत दुःशासनवधप्रकरण होय.

याखेरीज मोरोपंताच्या कवितेंत जागोजाग मनोरम पद्यें, वर्णनें, भाषणें वगैरे महाकवींच्या कृतींतून आढळणारे सर्व प्रकार भरपूर आहेत. त्यांचा निर्देश करणें केवळ अशक्य होय. यास्तव सरतेशेवटीं एवढेंच सांगून बस करतों कीं, ज्या कोणास प्रस्तुत कवीच्या कवित्वगुणांची थोडक्यांत परीक्षा कर्तव्य असेल त्यानें 'केकावली' काव्य पहावें. तें हातीं घेतलें असतां कालिदासाचें गुणसर्वस्व जसें 'मेघदूतां'त आढळणारें आहे जगन्नाथाच्या वाणीचें रससर्वस्व जशी 'गंगालहरी' प्रगट करते, त्याप्रमाणेंच वरील केकारवहि प्रस्तुत कवीच्या गुणांविषयीं निर्णायक होईल.

वरील विवेचनावरून मोरोपंत हा कवि आहे कीं नाहीं या मुख्य मुद्द्याचा व कविवर्गांत त्याची पायरी कितीशी उंच येईल या गोष्टीचाहि निकाल होण्यासारखा आहे. आतां प्रस्तुत विषयाच्या एका भागावर मात्र लिहून हा दोन वर्षें चाललेला निबंध आटपतों.

४. हा अवशिष्ट भाग प्रस्तुत कवीच्या गुणदोषांचें विवेचन हा होय. टीकाकर्त्याचें काम म्हटलें म्हणजे कोणत्याहि विषयाचें जें स्वरूप त्याच्या लक्षांत येईल तें त्यानें निःपक्षपात बुद्धीनें वाचकांस सादर करावें हें होय. तर हें कर्तव्य मनांत आणून आजपर्यंत मोरोपंताच्या कवितेशीं आमचा जेवढा परिचय घडला तेवढ्यावरून आमच्या मनांत तिचें स्वरूप जें आलें तें येथें प्रगट करतों. हें स्वरूप अर्थात्च गुणदोषात्मक होय. तर आतां दोहोंचा क्रमानें निर्देश करतों.

मोरोपंताच्या कवितेंत आढळणारा पहिला मोठा गुण म्हटला म्हणजे हा होय कीं, त्यानें भाषेच्या शुद्धतेकडे अत्यंत लक्ष दिलेलें आढळतें. हें लक्ष पूर्वीच्या कोणत्याहि महाराष्ट्र कवीचे ठायीं दिसून येत नाहीं. सरासरी अर्थाचा बोध झाला म्हणजे झालें. मग व्याकरण किती कां चुकेना. असें पूर्वीच्या कवींचें एकंदर धोरण दिसतें. पण या चरम महाराष्ट्रकवीनें आपल्या साऱ्या पूर्वजांचा कलंक झाडून टाकून आपल्या देशभाषेस पुरें प्रायश्चित्त दिलेलें आढळतें. ह्रस्वाचें दीर्घ, दीर्घाचें ह्रस्व हा प्रकार कोठें आढळत नाहीं एवढेंच नव्हे; तर अनुस्वार, प्रयोग इत्यादिकांकडेहि त्यानें लक्ष पुरविलेलें आढळतें.[1] सारांश, प्रस्तुत कवीनें महाराष्ट्र कवितेस व्याकरणशुद्धतेचें पुरतें वळण लावून या गुणास्तव तिचें स्वरूप विशेष उज्ज्वल केलें आहे.

---

१. उदाहरणार्थ पुढील पद्यें पहा—

असुर म्हणति विधनें प्रबल करायासि देव या नीचें।
मन मोहिलें गुरूचें गुरुचित्ताहूनि देवयानीचें॥
आदिपर्व.

जेणें ताप दिला तो हा कामी तापसा हतांस दया।
उठवि तुझी किति मारूं हाका मी ताप साहतां सदया॥
(पुढें चालू.) कित्ता.

मोरोपंताच्या कवितेचा विशेष गुण तिची प्रौढ रचना होय. प्राकृत भाषेच्या अंगीं संस्कृत भाषेचा डौल आणण्याविषयीं प्रस्तुत कवीस पराकाष्ठेची हौस होती असें त्याच्या एकंदर काव्यपद्धतीवरून स्पष्ट दिसून येतें. संस्कृत शब्दांचा चोंहोकडे भरणा, लांब लांब संस्कृत समास, संस्कृत पद्धतीवर केलेले प्राकृत भाषेचे प्रयोग,[1] कोठें कोठें संस्कृत सबंधवा सबंध वाक्यें, हे सर्व प्रकार प्रस्तुत कवीच्या कृतींतून आढळतात. आतां या गुणाच्या योगानें प्राकृत कविता केवळ प्राकृत वाचकांस बरीच दुर्बोध झाली आहे खरी, तरी अंमळ वरल्या प्रतीच्या वाचकांस वरील गुणास्तव ती अत्यंत प्रिय झालेली आहे.

प्रकृत कवितेचें तिसरें मोठें अंग यमकप्रासमय रचना होय. या रचनेच्या संबंधानें यापूर्वी कांहीं ठिकाणीं लिहिण्यांत आलेंच आहे, त्यावरून ती दोषमय आहे कीं काय याविषयीं वाचकांची संशयनिवृत्ति झालीच असेल. यास्तव येथें इतकें सांगतों ह्मणजे बस आहे, कीं वरील शब्दालंकार साधण्यास प्रस्तुत कवीनें पुष्कळ परिश्रम केले आहेत; व व्याकरण बिघडूं न देतां किंवा अर्थाची हानि न करतां लांब लांब यमकें साधण्याची व श्लोकांची साखळीची सांखळी जुळविण्याची जी या कवीची अपूर्व करामत दृष्टीस पडते ती समयविशेषीं अर्थ खुलविण्यास किंवा निदान नुसता मनास चमत्कार वाटविण्यास फार उपयोगीं पडते. तिजवरून कवीच्या भाषाप्रभुत्वाविषयीं मोठें प्रमाण मिळतें हेंहि येथें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

मोरोपंताच्या कवितेच्या बाह्यरचनेच्या संबंधानें कोणते गुण सर्वांच्या लक्षांत येण्यासारखे आहेत ते वर सांगितले. आतां अर्थरचनेच्या संबंधानें विचार करूं. अर्थदृष्ट्याहि प्रस्तुत कवीचें काव्य प्रौढ व रसभरित आढळतें. सर्व महाकवींच्या ग्रंथां-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

ह्मणा मज उताविळा गुणचि घेतला घाबरें
असो मन असेंचि बा भजकवाहिमेघा बरें ।
दिमे क्षणिक सर्व ही भरंवसा घडीचा कसें
धरील मन आंधनें बहु परिश्रमे चाकसें ॥

केकावलि.

सुखें हरि वश्य तुझी कुशलधाम नामावली
क्षणांत पुरवील जी सकल कामना मावली ।
कृपा करिशि तूं जगत्त्रयनिवास दासांवरी
तशी प्रकट हे निज श्रितजना सदा सांवरी ॥

कित्ता.

प्रयोगांचीं कांहीं चमत्कारिक उदाहरणें पहाणें असल्यास (अंक १०) पृष्ठ १३० पहा.

१. वरील प्रयोगांचीं उदाहरणें (अंक १०) पृष्ठ १३१ यांत सांपडतील.

तून जशी सुंदर व प्रौढ अर्थाची सुंदर व प्रौढ भाषेंत रचना केलेली आढळते त्याप्रमाणेंच मोरोपंताच्या कवितेंतहि सहृदय वाचकांस केवळ तल्लीन करून टाकणारीं व हजारों वेळां वाचलीं तरी पुरेशीं न होणारीं अशीं सहस्रावधि स्थलें सांपडतात. ज्या त्या पात्रास व समयास उचित व विवक्षित रसानें पूर्ण भरलेलीं अशीं भाषणें व वर्णनें त्याच्या ग्रंथांत जागोजाग आहेत आतां हें खरें आहे कीं वरील सरसता जेथें तेथें आढळते असें नाहीं; पण हा प्रकार साऱ्याच कवींच्या व ग्रंथकारांच्या ठायीं आढळणारा आहे. येथून तेथून सारें सारखेंच उच्चठ असें काव्य किंवा असा ग्रंथ प्रायः थोडाच सांपडेल. त्यांतून ग्रंथाचा जेवढा विस्तार अधिक तेवढा वरील सार्वत्रिक सरसत्वाचा संभव कमी. जॉनसननें एके ठिकाणीं म्हटलें आहे, कीं हिरा म्हटला म्हणजे अर्थातच कोंदण त्याच्याहून कमी योग्यतेचें असलें पाहिजे. तर याच न्यायावरून पाहतां कोणत्याहि ग्रंथाचे सरस भाग म्हटले म्हणजे त्यांहून इतर भाग अर्थातच निरस असले पाहिजेत.

हें प्रस्तुत कवीच्या कवितेचें सामान्य स्वरूप झालें. याहून सदरील कवितेविषयीं विशेषतः लिहिण्यासारखें दुसरें कांहीं नाहीं. संस्कृत कवींत किंवा इंग्रजी कवींत पुष्कळांचे कवित्वविशेष जसे सांगण्याजोगे असतात तसा प्रकार महाराष्ट्र कवींत प्रायः दिसून येत नाहीं. संस्कृतांत ज्याप्रमाणें—

उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् ।
दंडिनः पदलालित्यं माघे संति त्रयो गुणाः ॥

अशी निवड करतां येते, किंवा पाश्चात्य कवींत—

"The first in loftiness of thought surpassed,
The second in majesty, in both the last."[२]

असे कवित्वविशेष जसे एका प्रसिद्ध कवीनें काढले आहेत, तसा प्रकार महाराष्ट्र कवींत होण्यास म्हणण्यासारखी जागा नाहीं. एक मात्र गाढ अंमळ लक्षांत ठेवण्यासारखी आहे खरी, कीं मोरोपंताच्या कवितेंत पूर्वीच्या सर्व कवींपेक्षां ठाकठिकी विशेष आढळते. म्हणजे दरबारांत वगैरे वागलेल्या मनुष्याचा जसा बोलण्याचालण्यांत, उठण्याबसण्यांत वगैरे बेतबात आढळतो, त्याप्रमाणेंच प्रस्तुत कवीच्या ठायींहि वाक्यरचना सरळ, शब्दरचना शुद्ध, वर्णन करायाचें झालें तर तें पाल्हाळवार न करतां

---

१ "उपमा अशी कालिदासानेंच करावी; अर्थगौरव असें भारवीचेंच; पदलालित्य म्हणजे शब्दांची डौलदार रचना ही दंडीसच साधली; पण माघकवीचे ठायीं मात्र हे तिन्ही गुण आढळतात."

२. "पहिल्याचा कवित्वविशेष उदात्तत्व हा होता; व दुसऱ्याचा पदलालित्य हा होय; आणि तिसऱ्याचे ठायीं वरील दोन्ही गुणांचें यौगपत्य आढळतें."

मुद्देशीर व थोडक्यांत, इत्यादि प्रकार आढळतात. संक्षिप्त रीतीनें मुद्देसूद मजकूर लिहिण्याची पद्धत प्रस्तुत कवीच्या ग्रंथावरून बरीच लागण्यासारखी आहे.

५. आतां मोरोपंताच्या कवितेंत दोष कोणकोणते आढळतात याविषयीं विचार करायाचा. हें निरूपण करण्याच्या अगोदर एक मोठी गोष्ट लक्षांत आणण्यासारखी आहे, तिजविषयीं येथें थोडें लिहितों ही गोष्ट मोरोपंताच्या कवितेचें, किंबहुना एकंदर महाराष्ट्र कवितेचें, स्वरूप ही होय.

या विषयावर थोडें दिग्दर्शन आह्मीं पूर्वी एक वेळ केलेंच आहे.[1] सामान्यतः पहातां मोरोपंताच्या सारखें संस्कृतशब्दप्रचुर व थाटामाटाचें काव्य पाहून कोणाचाहि असा समज होण स्वाभाविक आह, कीं ही काव्यसरणी संस्कृतावरून उचललेली आहे. सदरील निबंधांत प्रस्तुत कवीच्या संबंधाच लोकांच अनेक ग्रह ज यापूर्वी दाखल केलेले आहेत,—कीं मोरोपंत हा महापंडित होता, त्याच्या काव्याचे दहा दहा अर्थ होतात, —वगैरे ते सर्व वरील समजुतीवरूनच उत्पन्न झालले आहत हें उघड आहे. पण वस्तुतः पहातां वरील समज अगदीं चुकीचा आहे. पूर्वनिर्दिष्ट निबंधांत आह्मीं दाखविलेंच आह कीं, संस्कृत कवितेचें स्वरूप व प्राकृत कवितेचें स्वरूप हीं दोन्ही अत्यंत विसदृश होत. वामन, मारोपंत इत्यादि कवींपासून जो वाक्प्रवाह निघाला त्यास कालिदास-भवभूत्यादिकांची वाणी ही मुळींच कारण नाहीं. तसें असतें तर महाराष्ट्र कविता आहे त्याहून फार निराळ्या तऱ्हची असती. उदाहरणार्थ, मोरोपंतांचेंच काव्य घ्या. मोरोपंताचा जर पंचकाव्यांवर व नाटकादिकांवर सतत परिश्रम असता तर त्यांतील सर्व विशेष त्याच्या कवितेंत दृष्टीस पडल्यावांचून राहतेना. हे विशेष कोणते ते पुढें लक्षांत येतीलच. यांचा वरील कवीच्या ग्रंथांत जो अभाव दृष्टीस पडतो त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, वरील संस्कृत कवींचें वळण आमच्या महाराष्ट्र कवीस लागेल असावें हें मुळींच संभवत नाहीं. आतां मारोपंतादि कवींच्या मनावर संस्कार कोणाचा घडला व त्यांस कवित्वस्फूर्ति कोठून प्राप्त झाली या गोष्टीचा जर विचार केला तर अंमळ शोधाअंतीं असें कळून यईल कीं, वरील कवींचे गुरु झटले झणजे व्यास, वाल्मीकि वगैर मंडळी हात. याच्याच साध्या व प्रासादिक वाणीचा कित्ता आमच्या महाराष्ट्र कवींनीं वळविला.[2] यास्तव सहजच त्यांच्या कवींत जी सरस्वती प्रगट

---

१. अंक ४७ पहा

२. "वरील गोष्टींचें एक मोठें प्रमाण हें आहे कीं. जो ज्याचें अनुकरण करतो त्याच्या विषयींचा उल्लेख त्याच्या ग्रंथांत आढळतो. अर्वाचीन संस्कृत कवींच्या ग्रंथांतून (उदाहरणार्थ, 'प्रसन्नराघव,' 'विश्वगुणादर्श,' 'आर्या सप्तशती' इ०) पूर्वीच्या संस्कृत कवींस,—झणजे कालिदास-भवभूत्यादिकांस—उद्देशून केलेले उल्लेख आढळतात व कांहीं कांहीं नामनेंहि आढळतात. महाराष्ट्र कवींत पहावें तों कालिदासादि मंडळींचें नांवाहि आढळत नाहीं. त्याचे उल्लेख

(पुढें चालू.)

झाली आहे ती कालिदासप्रभृति मंडळीच्याहून निराळी आहे. उत्कृष्ट शिल्पकारानें आपलें सर्व कौशल्य खर्च करून शाणोल्लेखादि संस्कारांच्या योगानें ज्यावें सर्व तेज प्रगट करावेंसें आहे व नंतर मोठ्या नक्षीच्या कोंदणांत बसवून दिल्यानें तर जो विशेषच खुलतो आहे अशा हिऱ्यांत व वरील संस्कार व उच्चार ज्यास झाल नाहींत अशा नूतन खनिज रत्नांत जितकें अंतर तितकेंच संस्कृत व महाराष्ट्र कवितेंत होय. जयदेवानें पहिलीचें वर्णन येणेंप्रमाणें केलें आहे—

यस्याश्चोरश्चिकुरनिकरः कर्णपूरो मयूरो
भासो हासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः ।
हर्षो हर्षो हृदयवसतेः पंचबाणस्तु बाणः
केषां नैषा कथय कविताकामिनी कौतुकाय ॥ [1]

'प्रसन्नराघव.'

हें वर्णन संस्कृत कवितेस पूर्ण लागू आहे पण महाराष्ट्र कवितेस तें लागू पडणार नाहीं. महाराष्ट्र कविताकामिनीचे ठायीं तिच्या बडील बहिणीचा थाटमाट, नोकझोक, चापचोपी हे गुण बहुधा नाहींच झटले तरी चालेल. पहिलीचें ऐश्वर्य काय वर्णावें ? तिच्या प्रसाधनकर्मावर केवढ्या बड्या बड्या मंडळीची नेमणूक ! प्रत्यक्ष 'मुनित्रय' तीस निर्मल व उज्वल पटांनीं प्रावृत करण्यास व 'अंजनशलाके'नें तिच कटाक्ष अमोघतर करण्यास व्यापृत झालेलें; 'रंभादि देवांगनां'स ज्यानें इंद्राच्या कचरींत नाचण्याकरतां सजवाव्या त्या भरताचार्यांकडून तीस नाट्यविषयक शिक्षा मिळालेली; मम्मटादि अलंकारिकांच्या हातून तीस भूषणविधि होणारा ! मग असलें अपार ऐश्वर्य अनुकूल असल्यावर आमच्या गर्वाण कवीचेच अंगीं जी जगन्मोहकता आली आहे ती कां न यावी ? आतां दुसऱ्या बहिणीस वरील संस्कारांची कितीशी अनुकूलता आहे हें पाहिलें तर यासंबंधाची माहिती कोणासहि द्यावयास पाहिजे असें नाहीं. पहिलीचा पुरस्कार करण्यास व तिचें लालनपालन करण्यास जसे विक्रमभोजप्रभृति अनंत राजे झाल तशी

(मागील पृष्ठावरून पुढे चालू.)

व नमनोद्यत व्यासवाल्मीकींस व पूर्वकालीन महाराष्ट्र कवींसच उद्देशून केलेलीं आढळतात. **रघुनाथ पंडितानें** मात्र मरणशय्येवरीं 'नैषधा विषयीं' उल्लेख केलेला आढळतो. पण यापूर्वी अनेक वेळां सांगण्यांत आलेंच आहे कीं, पंचकाव्यकारांच्या धर्तीवर रचना केलेला हा एकच महाराष्ट्र कवि होय.

१. "ज्या कवितावधूचा चोर हा चिकुरनिकर (केशपाश, मयूर हा कर्णपूर (कर्णभूषण), भास हा हास (हास्य), कविकुलाचा गुरु म्हणजे कविश्रेष्ठ जो कालिदास तो जिचा विलास, हर्ष हा हर्ष (चित्ताचा उल्हास), आणि बाण हा जिच्या हृदयात संचार करणारा साक्षात् पंचबाण (मदन) होय, ती कोणाच्या मनास कौतुक करीत नाहीं ?"

तर अगोदर दुसरीस मुळींच सोय नव्हती. ती वाढली झटली तर ज्ञानोबांच्या मठांत, तुकोबांच्या दुकानांत, रायजींच्या 'गंगातीरच्या झोंपडींत, किंवा दासांच्या सज्जनगडावर! शेवटीं तर बिचारीस 'वाणी वाणो बभूवेति' या वचनास अनुसरून माघुकजनाच्या रंजनार्थ डफावरहि पदावक्षेप करावा लागला! सारांश, वरील दोहनी कवितांची स्थितिरीति अत्यंत भिन्न होय. कालिदासादिकांची जी अर्वाचीन कविता ती महाराष्ट्र कवितेची जन्मित्री मुळींच नव्हे, तर तिच्याहून प्राचीन जी वाल्मीकिव्यास इत्यादि आद्यकवींची वाणी तिच्यापासून हिचा उगम आहे.

वरील गोष्ट ध्यानांत ठेविली असतां मोरोपंतांच्या कवितेंत जे दोष आढळतात त्यांची उत्पत्ति सहज होणार आहे. या दोषांपैकीं कांहीं भावरूप आहेत व कांहीं अभावरूप आहेत. ज्यानें संस्कृत कवितेचें किंवा इंग्रेजी कवितेचें स्वरूप पाहिलें असेल त्यास प्रस्तुत कवीचे ठायीं पदलालित्य, माधुर्य, प्रसाद इत्यादि गुण असावे तसे नाहींत हें सहज वाटणार आहे. संस्कृतांत श्रीहर्षानें व इंग्रजींत पोपनें भाषा कमविण्यांत जी मेहेनत घेतली व त्या कामांत त्यांस जें यश आलें, तसा प्रकार प्रस्तुत कवीचे ठायीं, किंबहुना कोणत्याहि महाराष्ट्र कवीचे ठायीं, त्यास आढळून येणार नाहीं. आमच्या महाराष्ट्र कवींनीं सामान्यतः पहातां अर्थव्यंजनाच्या पलीकडे थोडेंच लक्ष दिलेलें आढळेल. आपल्या मनातील अर्थ शब्दांनीं व्यक्त झाला ह्मणजे झालें, मग शब्दांच्या ठाकठिकीकडे किंवा सौंदर्यीकडे विशेष लक्ष पुरवावयाचें नाहीं, असा त्यांचा सामान्य प्रवात आढळतो; व त्यांचा ग्रंथरचना करण्यातला उद्देश केवळ भक्ति, ज्ञान, वैराग्य यांपकींच असल्यानुळें भाषा कमविण्याचा जो अप्रधान उद्योग त्याची त्यांनीं उपेक्षा केली यांत मोठेंसें नवलहि नाहीं. प्रस्तुत कवीवर लागू होण्यासारखा वरील भाषासंबंधीं पहिला दोष होय. दुसरा अर्थरचनेच्या संबंधानें या प्रकरणांत आमच्या एकंदर महाराष्ट्र कवींचे ठायीं, व पुष्कळ अंशीं या चरम कवीचे ठायींहि, न्यून काढण्यास जागा आहे. संस्कृत कवींचा प्रयत्न जसा वाचकास पदोपदीं चमत्कृत करण्याचा आढळतो तसा या अर्वाचीन कवीच्या ग्रंथांतून आढळत नाहीं. आतां वरील हेतु साधण्यास संस्कृत कवींस जीं साधनें आहेत, तीं सर्व प्राकृत कवींस नाहींत हें उघड आहे;[२] तरी एवढें खरें आहे कीं, जर आमचे महाराष्ट्र कवि साहित्यशास्त्रज्ञ असते तर सध्यां आहे त्याहून मराठी कवितेंत पुष्कळ बहार दृष्टीस पडती; ह्मणजे संस्कृत

---

१. अंक १३ पहा.

२. वरील साधनांपैकीं एक मोठें साधन श्लेषयोजना हें होय. श्लेषप्रकरणीं प्रस्तुत कवीची कीर्ति किती आहे व ती किती निराधार आहे, याविषयीं पूर्वी पुष्कळ विवेचन झालेलेंच आहे. प्रकृत स्थलीं एवढेंच सांगतों कीं, ज्या काळीं संस्कृत विद्येचें सामान्यतः पुनरुज्जीवन

(पुढें चालू.)

कवितेंत[1] जशीं हृदयंगम वर्णनें, अलंकारिक भाषणप्रकार वगैरे आढळतात तसे प्रकार मराठी कवितेंतहि आले असते.

तर संस्कृत व इंग्रजी कवितेशीं परिचित असलेल्या वाचकास पुष्कळ ठिकाणीं मोरोपंताचें काव्य मनोरम वाटणार नाहीं. वाचकाचें चित्त वेधून टाकण्याचे वर जे शब्दरचनेच व अर्थरचनेचे उपाय सांगितले त्यांविषयीं इतर महाराष्ट्र कवींप्रमाणें त्यानेंहि विशेष प्रयत्न केला नसल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं प्रस्तुत कवीच्या ग्रंथांत नीरसता भासेल. एवढें खरें आहे कीं, प्रस्तुत कवीस महाराष्ट्र भाषा ही केवळ करतलामलकवत् असल्यामुळें त्याच्या शब्दरचनेच्या सफाईनें व यमकप्रासांच्या योजनेनें वाचकांस वरील ठिकाणींहि बरीच कर्मणूक होते, पण अशा स्थलीं विशेष उपयोगीं पडण्यासारखे जे पूर्वोक्त प्रकार त्यांची अनुकूलता प्रकृत काव्यास असती तर याहून बरें झालें असतें यांत संशय नाहीं.

आतां प्रस्तुत कवींच्या कृतींत आढळणाऱ्या एका मोठ्या दोषाचें निरूपण करून हें विवरण व एकंदर निबंध समाप्त करतों. हा दोष अश्लीलत्व होय. अश्लीलत्व ह्मणजे चावटपणा नव्हे; हा दोष मोरोपंताच्या काव्यांत मुळींच आढळत नाहीं.[2] अश्लीलत्व ह्मणजे प्रौढ काव्यांत न खपण्यासारख्या ग्राम्य शब्दांचे प्रयोग व केवळ व्यावहारिक दाखले हे होत. सत्कवींची शब्दपद्धति व अर्थपद्धति लक्षपूर्वक पाहिली असतां ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे, दोहोंमध्यें ग्राम्यतेचा लेशहि त्यांस खपत नसतो; नुसती वाक्यरचनाहि कवितेंत व्यावहारिक भाषेहून निराळी असावी लागते. आणि त्यांतून शब्द व दृष्टांत हे तर प्राकृत व्यवहारांतले व ग्राम्यभाषेंतले मुळींच उपयोगीं नाहींत. काव्याचा उद्देश मनोरंजन असल्यामुळें, व जे विषय नेहमींच्या व्यवहारांतले व अत्यंत परिचित त्यांच्यापासून वरील उद्देश साध्य होत नसल्यामुळें, त्यांचे वाचक शब्द व त्यांचे दृष्टांत हे मनास आल्हाद देत नाहींत; उलटें असें मुद्धां होतें कीं, एखादें पद्य सुंदर साधलें असून त्यांत मोठा प्रौढ अर्थ संगृहीत केलेला असतो, पण वरच्या प्रकारच्या एका शब्दानें किंवा दाखल्यानें दुधांत मिठाचा खडा टाकल्याप्रमाणें होऊन जातें! हा आक्षेप

होऊन त्या भाषेतील काव्यपद्धतीची चोहोंकडे वाहवा होती, व कवितेनप्रसंगीं वीर 'चंपूकरा' दिकांच्या श्लेषवैचित्र्यावर पंडितजनांची वारंवार मान डोलत असेल व वाहवा उडत असेल, त्या काळींहि आमच्या कवीनें वरील अलंकाराचा थाटमाट आपल्या प्राकृत कवितेंत आणण्याचा प्रयत्न केला नाहीं हें त्याच्या समंजसतेचें व रसिकतेचें मोठें प्रमाण आह्मी समजतों.

१. 'संस्कृत कविता' या शब्दांनीं कालिदासभवभूत्यादिकांची कविता ध्यावयाची हें संदर्भावरून स्पष्टच आहे. एरवीं वेद, पुराणें, इतिहास हीं सर्व वरील संज्ञत येणारींच आहेत, पण तीं ध्यावयाचीं नाहींत.

२. 'विविधज्ञानविस्तार' अंक ७ पहा.

सर्व वाचकांस बहुधा नवीनच वाटणार आहे, यास्तव त्याच्या स्पष्टीकरणार्थ कांहीं उदाहरणें देतों.

तूं जेंवि देवकीला भेटसि तैसेंचि भेट आतेला ।
आह्मांहुनि तूंच अधिक घृत सोडुनि केण करिल आतेला ॥
उद्योगपर्व ६.

धृतराष्ट्रासि रुचेल सांग अत्युग्र नीति तो काणक ।
वणिक ग्राहकहस्तीं देतो विषसर्पिशर्कराकाणक ॥
आदिपर्व २६.

प्रभुला बिभीषण ह्मणे पावेल जय न रे वणि कदापि ।
निजकपटज्ञा पाणी जोडी भोळ्या नरा वणिक दापी ॥
वनपर्व १२.

आह्मां व्यसनार्तांची धर्मस्थिति हेचि बा जपावी गा ।
त्वां मोडावें न इला स्वस्वास्थ्यसुखार्थ बा जपावे गा ॥
सभापर्व ५.

यदुनाथातें गोष्टीं पाहे जैसा चकोर सोमासीं ।
त्याच्या प्रभुमूर्तिरतद्दृगुपमेसि सितारता गमो मासीं ॥
मंत्रभागवत.

उत्तर ह्मणे नको गे पायां पडतों बृहन्नडे सोड ।
जोड दिली दुखवु नको केवल पितृकरतलस्थ हा फोड ॥
विराटपर्व ३.

गेला स्वर्गासि अमित सुकृतें सोडोनि राय तें नाकीं ।
होय सुदुःसह शक्रा जैसें बाळासि रायतें नाकीं ॥
आदिपर्व १०.

पहिल्या आर्येंत 'आ' हा शब्द व तेलातुपाचा दृष्टांत हे दोन्ही ग्राम्य होत. दुसऱ्या व तिसऱ्या आर्येंतील प्रसंगास वाण्याच्या दुकानाचे दाखले अगदीं अप्रयोजक दिसतात. चौथींत 'बाज' शब्द घातला आहे; तो मुळींच शोभत नाहीं; सेतूंची वगैरे उपमा अधिक सरस होती. पांचवींत पहिली चंद्रचकोरांची उपमा चांगली आहे व ती कविसंप्रदायसंमतहि आहे; पण उत्तरार्धांतील साखरेची व माशीची उपमा ही ग्राम्यत्वास्तव अप्रशस्त होय. शिवाय तिची आवश्यकता नसल्यामुळें ती पौनरुक्त्यदोषासहि पात्र आहे. सहाव्या आर्येंतील उपमा तर केवळ अश्लील होय. सामान्यतः व्यवहारांत तशा प्रकारची भाषणपद्धति आहे खरी, पण ती कवितेंत शोभा पावणार

नाहीं. शेवटल्या आर्यंतील रायत्याचा दृष्टांत वाचून तर थोडेच वाचक हांसल्यावांचून रहातील. इंद्र कोणीकडे आणि रायतें तें काय!!

६. असो; याप्रमाणें दोन अडीच वर्षांपूर्वी जो विषय आह्मीं हातीं धरिला त्याची आज समाप्ति झाली. आतां या पंताख्यानाच्या शेवटीं त्याची थोडी फलश्रुति सांगितली असतां अप्रासंगिक होणार नाहीं असें समजून चार शब्द लिहितों. वरील आख्यानावरून पहिली मोठी गोष्ट ही ध्यावयाची कीं, जो कोणी लिहूं लागेल त्यास आमची महाराष्ट्र कविता हा विषयहि योग्यतेच्या मानानें किंवा वैचित्र्याच्या मानानें लहान आहे असें भासणार नाहीं. इंग्रेजी व संस्कृत कवितेचा जसा विस्तार मोठा आहे, तसाच हिचाहि असून हिजवर हवें तेवढें विवेचन होण्यास जागा आहे. केवळ एका पंडितंमन्य पाद्री साहेबांनीं एका पृष्ठा दोन पृष्ठांत वासलात लावून टाकावी यापेक्षां तिची योग्यता फार अधिक आहे. तर आमच्या नवीन विद्वानांनीं आजपर्यंत धरलेली स्वभाषविषयींची व तींतील कवितेविषयींची लाज सोडून देऊन व कवितेच्या नव्या शाखा स्थापण्याची वेडगळ हाव तूर्त एकीकडे ठेवून जर जुन्या कवितेचें चांगलें अध्ययन केलें व तिच्या गुणदोषांचें विवेचन केलें तर फार उपयोग होण्यासारखा आहे. एक तर इंग्रेजी भाषेच्या योगानें होणारें जें स्वभाषादूषण तें बंद होईल; दुसरें स्वदेशीय कवितेची त्यांस योग्यता कळून येईल; आणि तिसरें हें कीं, स्वदेशाविषयींच्या अनेक तऱ्हेच्या समजुतीहि बऱ्याच पालटतील. तर मागील निबंध वांचून ही एक गोष्ट लक्षांत येण्यासारखी आहे. दुसरी गोष्ट ही कीं, केवळ परंपरेनें चालत आलेल्या समजुतींत व वस्तुस्थितींत किती अंतर असतें. मोठमोठ्या विद्वानांचीं मतें सुद्धां पुष्कळ वेळां वरील परंपरेनें ग्रहण केलेलीं आढळतात तर त्यांविषयीं अधिक विचार केला असतां त्यांचें स्वरूप किती पालटतें हेंहि प्रकृत निबंधावरून कळून येणार आहे. याखेरीज जे कोणी पंतांचे भक्त असतील त्यांस व साधारणतः तिन्हाईत वाचणारासहि प्रस्तुत विवेचन बरेंच इष्ट वाटणार आहे असें ह्मणण्यासहि हरकत दिसत नाहीं. असो; आतां सरते शेवटीं आमच्या पूर्वीच्या भाकिताप्रमाणें जर कोणी मंडळी आख्यानाच्या मध्यें झोंपीं गेली असतील त्यांस उठून बसण्याविषयीं इशारत करून कलम खालीं ठेवतों.

---

१. वर सांगितलेला दोष शेक्सपीयरच्या नाटकांतहि कोठें कोठें आढळतो. त्याच्या योगानें रसभंग कसा होतो याविषयीं जॉन्सनच्या 'रांबलर'च्या १६८ व्या अंकांत विवेचन केलेलें आहे. तें आमच्या आंग्लभौमभाषाभिज्ञ वाचकांस वाचण्याविषयीं आह्मी शिफारस करतों.

निबंधमाला—वर्ष ४ थें.



अंक ४८—सामान्य आक्षेप—ज्ञानोदय—दीनबंधु—निबंधमाला.

दिनयामिन्यौ सायं प्रातः शिशिरवसंतौ पुनरायातः ।[1]

मोहमुद्गर.

सालमजकूरचा हा अखेरचा अंक आहे. याहि वर्षांत मागल्याप्रमाणें आमच्या प्रतिपक्ष्यांनीं आमच्या पुस्तकाविषयीं बरीच चर्चा केली, यास्तव त्यांच्या आक्षेपांवर आमचें काय ह्मणणें आहे तें त्यांस व इतर वाचकांस कळलें पाहिजे. तेव्हां सालाबादप्रमाणें सदरील अंकांत वरीलच मजकूर येईल.

हा आमचा प्रतिवार्षिक स्नानविधि पाहून आमचे कित्येक वाचक कदाचित् ह्मणतील कीं, एवढ्या उठाठेवींचून काय अडलें आहे ! अगोदर वाद उकरून काढा, आणि मग त्यावर चर्चा प्रतिचर्चा करीत बसा यांत शहाणपण तें कोणतें ? यापेक्षां कोणाशीं तंटाबखेडा न करतां सर्वांशीं गुण्यागोविंदानें रहावें हें बरें नव्हे काय ? भाषा सुधारण्याचें व लोकांत ज्ञानप्रसार करण्याचें काम जरी हातीं घेतलें, तरी तें सिद्धीस नेण्यास 'याची गचांडी धर, त्याची गचांडी धर' याप्रमाणें वारंवार अर्धचंद्रप्रयोग करण्याचें कांहीं विशेष कारण दिसत नाहीं. दुसऱ्याचा मर्मभेद होई व त्यास संताप येई अशा रीतीनें लेखणी चालविणें हें खऱ्या विद्वत्तेचें लक्षण नव्हे. तर खरा विद्वान् व उत्तम ग्रंथकार तो होय, कीं ज्याचे लेख चंदनाप्रमाणें सर्वांच्या हृदयास शीतळवितात व आनंद देतात, व जो कोणाच्याहि वाटेस न जातां व कोणासहि तिळमात्र सुद्धां न दुखवतां लौकिक दुर्मतांचें खंडन करतो व आपल्या देशबंधूंस सत्याचा व ज्ञानाचा लाभ करून देतो !

वरील सदुपदेश आजपर्यंत आह्मांस अनेकांनीं केला, व ८, २४, ४४ वगैरे अंक तर वरील व्याख्यानें आह्मांस मिळण्यास विशेषच कारण झाले. एका विदर्भदेशीय बंधूनें आपल्या पत्रांत 'मेकॉलेचा नवीन अवतार' या सदराखालीं एके प्रसंगीं आह्मांस उद्देशून शांतिपाठ वाचावयास आरंभ केला होता; पण तो एका लेखांतच आटपला. त्याचा उपक्रम व उपसंहार हे एकदांच झाले; मग काय झालें असेल तें असो ! तसेंच दुसरे एके प्रसंगीं एका पुण्यग्रामस्थ बंधूनें आमच्या कडक लेखणीवर टीका करून ग्रंथकर्तृत्वाचें परम तत्त्व आह्मांस असें सांगून दिलें होतें कीं, कोणास बिलकूल ढका न लावतां जें लिहिणें तें लिहावें ही तऱ्हा शिकणें असल्यास 'स्पेक्टे-

१. "दिवस व रात्र, सकाळ व संध्याकाळ, शिशिर व वसंत, हीं युग्में एकामागून एक निरंतर चालत आहेत ।"

टराचें' अध्ययन करावें व तिची थोरवी लक्षांत येण्यास मेकॉलेचा आडिसनवरील निबंध वाचावा !

आतां आमच्या प्रतिपक्ष्यांपैकीं बहुतेकांकडून वरच्यासारखे आक्षेप जे वरचेवर वाचण्यांत व ऐकण्यांत येतात त्यांवर उत्तर दर वर्षीच्या अखेरीस बहुधा आमच्याकडून देण्यांत आलेंच आहे. तेंच एकदां सरतेशेवटचें ह्मणून येथेंहि दाखल करतों. आमच्या पूर्वजांच्या वचनांपैकीं एक वचन ख्रिस्ती मंडळीचें मोठें आवडतें झालें आहे. तें हें कीं, 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' ! तर हेंच वचन आमच्या साऱ्या प्रतिपक्ष्यांच्या अंगावर आह्मी टाकून देतों. त्यावरून त्यांनीं असें समजावें कीं, कोणत्याहि विषयाचें वास्तव स्वरूप त्याची चांगली चर्चा झाल्याखेरीज कधींहि प्रगट होत नाहीं; आमच्या कविश्रेष्ठानें ह्मटलें आहे—

हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा ।

"अग्नीचे ठायीं सुवर्णाची परीक्षा होते,—कीं तें शुद्ध आहे कीं काळसर आहे." तर याच न्यायानें जें खरेंखरेंच बावनकशी आहे त्या सोन्यास अत्यंत तीव्र अग्नीचाहि जसा धाक बाळगायाला नको, त्याप्रमाणेंच जें खरें आहे त्यास कालत्रयींहि कशाचें भय नाहीं ! युक्लिडचे सिद्धांत आज दोन हजार वर्षांवर साऱ्या पृथ्वीभर नांदताहेत. पण इतक्या काळांत त्यांवें खंडन किंवा उपहास करणारा कोणी निर्माण झाला नाहीं. पण तीच टॉलेमीच्या ज्योतिष सिद्धांताची दुर्दशा पहा ! आपल्या ग्रहमालेच्या अधिपतीचें तेज आज अपरिमित वर्षे भुवनोदरांत फांकून राहिलें आहे,—त्यास वृद्धि नाहीं, क्षय नाहीं, अस्त नाहीं, ग्रहण नाहीं ! पण तीच खद्योतविद्युदादि अल्पतेजांची किंबहुना चंद्रादिकांचीहि स्थिति पहा ! कोणी कसलाहि वातरट असला, तरी वाघोबाच्या जबड्यापुढें उभें राहून विदूषकी प्रकार करण्याची कोणाची छाती होईल काय ? पण तीच गदैभाचार्यांची मूर्ति पुढें उभी असूं द्या; मग त्यांनीं प्रत्यक्ष सिंहाचें कातडें आपल्या उंच कानांवरूनहि जरी अगदीं गुरगुटून घेतलें असलें, तरी त्यांच्या शाब्दप्रमाणावरून त्यांच्या अंतर्गत रूपाची तेव्हांच मीमांसा करून कोणी पोरहि आचार्य बोवांच्या पाठीवर खुणेची थाप मारील व बिनधोकपणें वर ह्या करील ! तर खऱ्या महत्त्वाचें व खोट्याचें इतकें अंतर आहे. जें मूळचें खरें आहे तें मुहूर्तमात्र जरी कदाचित् लोपलें तरी कालांतरानें प्रगट होणारच; त्यास खंडनापासून अपाय नाहीं हें तर काय, पण खचीं केलेल्या झाडाप्रमाणें किंवा जाळलेल्या जमनी प्रमाणें वरील विपत्तिच त्याच्या अत्यंत उत्कर्षास कारण होते. मग हें जर खरें आहे, तर आमच्या प्रतिपक्ष्यांनीं वेड्यासारखी हाकाटी करावी हा केवढा चमत्कार आहे ! या हाकाटीनें ते आपला दुर्बळपणा मात्र लोकांस जाहीर करतात असें होत नाहीं काय ? आक्षेपावर यथार्थ उत्तर ह्मटलें ह्मणजे त्यांचें खंडन होय;

त्याबद्दल हाकाटी करणें किंवा कुरकूर करणें हें उत्तर नव्हे. खरा मर्द जसा कोणत्याहि प्रसंगीं डगमगत नाहीं व घायांनीं विव्हळ होऊन आक्रोश करीत बसत नाहीं, त्याप्रमाणेंच आपला पक्ष खरा आहे अशी खात्री होऊन जो पुढें सरसावला तोहि प्रतिपक्ष्यांच्या वाग्बाणांची क्षिति न बाळगतां उलटा अधिकाधिक हर्ष व उत्साह मात्र पावतो!

आतां आमच्या आक्षेपकांचें दुसरें ह्मणणें आहे कीं, आडिसननें कोणास बिलकूल ढक्का न लावतां लोकसुधारणा केली कीं नाहीं? हें ह्मणणें आह्मांवर कितपत लागू पडेल याचा विचार केला असतां पुष्कळच आहे. मुळीं अगोदर आडिसनची उपमा आह्मी घेऊं इच्छीत नाहीं. आमच्या कित्येक देशबंधूंस आपल्या विशाल बुद्धीची स्वतःची स्वतःला पक्की खात्री वाटून कोणी आपणास मिलटन ह्मणवून घेतो, कोणी डिमॉस्थेनीसच्या, कोणी लूथरच्या पदवीला पोहोंचलेले आहेत, अशा प्रकारची मनोमय साक्ष आमचें मन आह्मांला कांहींच देत नाहीं. ज्या विख्यात ग्रंथकाराचें महत्त्व पोप, जॉनसन, मेकॉले अशा सारख्यांनींहि भक्तिपुरःसर वर्णिलें आहे त्याची बरोबरी करूं जाणें यापरतें धाडस कोणतें? एवढेंच मात्र साम्य धरण्यास हरकत नाहीं, कीं स्वभाषेच्या अभ्युदयाची इच्छा मनांत धरून वरील ग्रंथकारानें तदर्थ जसा यत्न केला, तशींच आमचीहि मनीषा असून आमचे यथाशक्ति प्रयत्न त्याच उद्देशानें सतत चालू आहेत. यापलीकडे कोणत्याहि प्रकारचें सादृश्य आपणावर ओढून घेण्याचें धाष्टर्य आमच्यानें करवत नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, आडिसनच्या निबंधांचा अमुक अमुक प्रकार आहे ह्मणून तोच मार्ग सर्वांनीं अनुसरला पाहिजे किंवा तो अनुसरणें सर्वांस शक्य आहे हें कसें ह्मणवेल? ज्या त्या काळाच्या स्थितिविशेषावर व त्यांतून ज्याच्या त्याच्या प्रकृतीवर कोणाच्याहि लिहिण्याचें मान असतें. वरील ग्रंथकाराची प्रकृति जर जॉनसनच्या सारखी असती किंवा तो कालांतरीं निपजला असता, तर त्याच्या लेखणीचा मऊपणा जाऊन तींत कडकपणा आला असता हें उघडच आहे. शिवाय ज्या काळीं इंग्लिश लोकांनीं एका राजाचें पारिपत्य करून दुसऱ्यास देशांतून पळवून लाविलें व आपलें स्वातंत्र्य पूर्णपणें स्थापून कोणत्याहि तऱ्हेचा जुलूम आपणावर होऊंच नये अशी तजवीज करून टाकली होती, ज्या काळीं त्यांचें आधिपत्य भूमीवर व समुद्रावरहि स्थापित होऊन साऱ्या युरोपावर त्यांचा दरारा झाला, व हल्लीं जें त्या राष्ट्राचें वर्चस्व हरएक प्रकारें साऱ्या जगावर गाजत आहे त्यास जेव्हां सुरुवात झाली होती, तो काळ कोणीकडे; आणि सध्यां आमच्या देशाची जी स्थिति दृष्टीस पडते,—ह्मणजे जी नुकतीच सुवर्णभूमि ह्मणून साऱ्या जगभर गाजत होती तीच आतां दारिद्र्याचें वसतिस्थान होऊन दुर्भिक्षादि उत्पात तींत आपलें निरंतरचें बिऱ्हाड ठेवूं पहात आहेत, जी सर्व प्रकारच्या वैभवानें मंडित भूमि हातो

तिचें आतां तें सारें वैभव नष्ट होऊन तिला आपल्या गत वैभवाची जणूं काय पूर्ण विस्मृतिच पडत चालली आहे व हल्लींचीच स्थिति आपली स्वाभाविक स्थिति असें तिला भासत आहे,—ही स्थिति कोणीकडे? वरच्या भरभराटीच्या काळांत आडिसननें आपल्या देशबंधूंच्या व विशेषतः देशभगिनींच्या मनोरंजनार्थ अनेक नाजुक विषयांवर आपलें नाजुक कलम चालविलें, व प्रसंगोपात विशेष महत्त्वाच्या विषयांवर लिहितांनाहि आपली लेखणी कोणास न बोचे अशी तजवीज ठेविली. पण ती गोष्ट त्याची त्यास व त्या काळास शोभून गेली. इकडे तो प्रकार कसा चालेल? हल्लींच्या दुर्धर देशस्थितींत व आणीबाणीच्या प्रसंगीं शेंकडों अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर अवश्य विचार कर्तव्य असतां, वरील ग्रंथकाराच्या पद्धतीस अनुसरून जर इकडील पत्रकार कांचोळीवर, चंद्रकळेवर, गालावरील हनवटीवरील गोंदण्यावर, तुऱ्याच्या टिकेवर वगैरे टीका करूं लागले व नवऱ्या बायकांचे प्रीतिकलह, पोषाकाच्या पेहेरावाच्या तऱ्हा इत्यादि विषयांवर विवेचन करूं लागले, तर तें किती शोभेल बरें? वरील प्रकार झटला झणजे एका मराठी कांदबरींत एक वृद्ध राजा शत्रूंच्या पुढें पळत असतां आपल्या जिवलगेस आंब्यावर लटकणाऱ्या कयऱ्या दाखवून पानचट, अप्रयोजक व अप्रासंगिक शृंगार करीत आहे त्याप्रमाणें, किंवा आमच्या वीररसप्रधानकाव्यकारांचा नायक बहादर आपल्या 'गोड राणी'स बगलेंत मारून रानोमाळ पळत सुटला असतां तितक्या संधींतहि तीस एक वनस्पतिशास्त्रावर व्याख्यान देत आहे त्याप्रमाणें, होणार आहे. तर जे आमचे आक्षेप 'स्पेक्टेटर'च्या अध्ययनाची व अनुकरणाची आह्मांस सूचना देतात त्यांनीं वरील गोष्टींचें अंमळ मनन करावें.

तिसरी गोष्ट मेकॉलेची तारीफ. मेकॉलेनें प्रकृत विषयाच्या संबंधानें आडिसनची प्रशंसा केली आहे हें खरें आहे, व ती यथार्थ होय हेंहि खरें आहे. पण मेकॉलेच्या निबंधांचेंच जो कोणी एखादें पृष्ठ वाचील त्यास सुद्धां कळून येईल कीं, वरील साहेबांनीं आपल्या गुरूचाच कित्ता केवळ वळविला आहे असें नाहीं. आपली लेखणी ते किती नम्रपणानें चालवीत, व तिचें कूंसहि कोणास बोचूं नये, याविषयीं ते किती जपत असत, याविषयींचीं भरपूर प्रमाणें त्यांच्या निबंधांत, त्यांच्या इतिहासांत, व त्यांच्या भाषणांत लागतील तितकीं आहेत. यांपैकीं बॉसवेलवेंच एक उदाहरण घेतलें, तर कडक लिहिण्याचा त्यांस किती त्रास असे, व दुसऱ्याची टवाळी करणें हें त्यांस किती नको असे, याविषयीं कोणाचीहि पुरती खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं.[1] पण इतकी लांबची गोष्ट कशाला पाहिजे? मेकॉले बोवांच्या सभ्यपणाबद्दल व कनवाळूपणाबद्दल आमचा कोणीहि बंगाली बंधु पूर्ण साक्ष देईल. 'वॉरन् हेस्टिंग्सु'च्या

१. प्रस्तुत पुस्तकाचा ३७ अंक पहा.

निबंधांत नंदकुमार यास पुढें करून बंगाली बाबूंवर वरील इंग्रजी पंडितानें कशी कोमळ पुष्पवृष्टि केली आहे, ती इकडेहि सर्व इंग्रेजी जाणणारांस माहीत आहेच. असो; तर स्वतः हातघाईच्या वेळेस आपला हात आटोपण्याचें सामर्थ्य ज्यास नसे, व फावेल त्या रीतीनें पाहिजे त्यावर प्रहार करावयास जो चुकला नाहीं, त्यानें आडिसनच्या कोमळ लेखणीचा महिमा कितीहि गाइला तरी काय फळ आहे ?

पण यावर आमच्या आक्षेपकांचें पुनः असें ह्मणणें पडेल कीं, मेकाले जरी स्वतः आपल्या उपदेशाप्रमाणें चालला नाहीं, तरी तो उपदेश स्वतः खोटा झाला काय ? ही कोटी वस्तुतः खरी आहे; कां कीं, मनुष्याच्या स्वाभाविक दौर्बल्यास्तव त्याचें आचरण स्वतःच्या उपदेशास नेहमीं अनुसरून असतेंच असें नाहीं. यास्तव उपदेष्ट्याचें प्रत्यक्ष आचरण कसें आहे हा विचार पुष्कळ वेळां निराळा ठेवून उपदेशाचीच स्वतंत्रपणें योग्यता कितपत आहे याचा विचार करून त्याचें ग्रहण करावें लागतें. पण असें करतांना विवक्षित उपदेश अगोदर कितपत यथार्थ आहे याचा निर्णय झाला पाहिजे. तो होऊन उपदेश सर्वथा ग्राह्य होय असें ठरलें असतां त्याचें अनुसरण उचित होय.

आतां दुसऱ्यांच्या मतांचें खंडन करणें हें वस्तुतः किती दूषणीय होय याचा जर विचार केला, तर हें कोणासहि कळून येईल कीं, तें सामान्यतः पहातां दूषणीय नाहीं एवढेंच नव्हे, तर सर्व प्रकारें उलटें हितावहच होय. ज्याप्रमाणें हवा किंवा पाणी हें कोंडून जागच्या जागीं राहिलें असतां तें दूषित होऊन अपायकारक होतें, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या मनाची स्थिति होय. हवा व पाणी यांस अटकाव नसून तीं मोकळीं खेळत राहिलीं असतां जशीं शुद्ध असतात, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या बुद्धीसहि निष्प्रतिबंधता असल्यानें तिची तीव्रता अबाधित रहाते. हें महातत्त्व ओळखूनच इंग्लंडांतल्या व अमेरिकेंतल्या राज्यतंत्रधुरंधरांनीं बोलण्याची व लिहिण्याची स्वतंत्रता एकंदर लोकांस देऊन टाकलेली आहे; व असें केल्यानें कोणत्याहि प्रकारचा अपाय आजपर्यंत झाला नाहीं एवढेंच नव्हे, तर वरील राज्यांस मुख्य बळकटी वरील स्वातंत्र्यानेंच आली आहे असें ह्मटलें असतां चालेल.[१] आतां यावर कोणी कदाचित् अशी शंका

---

१. वरील महत्त्वाच्या विषयावर मिलप्रभृति महान् महान् पंडितांनीं जगन्मान्य ग्रंथ करून ठेविले आहेत, तेव्हां त्याविषयीं येथें कांहीं विशेष लिहिणें नकोच. कदाचित् कोणाचा असा जर आक्षेप निघेल, कीं वरील स्वातंत्र्य हें परम न्याय्य आहे तर हिंदुस्थान सरकारानें तें अलीकडे काढून कां घेतलें ? तर यावर आमचें उत्तर हें आहे कीं, चालू सालच्या ९ व्या आक्टावरून प्रस्तुत विषयाच्या विरुद्ध कोणतेंहि अनुमान बांधतां येत नाहीं. सदरील आक्टावरून एवढें मात्र सिद्ध होईल, कीं सुप्रीम कौन्सिलच्या मतें हल्लींच्या स्थितींत स्वातंत्र्य हें

(पुढें चालू.)

काढतील कीं, अशी स्वातंत्र्याची दवंडी चोहोंकडे पिटल्यानें सारी बजबजपुरी माजणार नाहीं काय? कोणास कोणी विचारीनासा होईल, व हवा तो हवें त्याविषयीं पाहिजे तसें लिहील. ही शंका निवळ अडाणीपणाची आहे. एक तर असें आहे कीं, विद्यामंदिरांत लहान व थोर ही लौकिक गणना मुळींच लागू पडत नाहीं. युक्लिडनें एका राजास जसें उत्तर केलें, कीं भूमितींत प्रवेश होण्यास राजमार्ग नाहीं,[1] तशींच गोष्ट विद्यामंदिराच्या आंतल्या प्रदेशांतील होय. या पवित्र मंदिरास येण्यास राजांचा एक मार्ग व रंकाचा एक मार्ग हा भेद जसा बिलकूल नाहीं, सर्वांस रस्ता एकच; त्याप्रमाणेंच मार्ग क्रमून आंत प्रवेश करतांच पूर्वीचे व्यावहारिक संबंधहि सर्व गढून जातात. नव्या राज्यांत गेलें असतां तेथील कायदे जसे मानले पाहिजेत, त्याप्रमाणेंच विद्यादेवीच्या राज्यांत पाऊल ठेवल्याबरोबर पूर्वीचें तंत्र सारें विसरलें पाहिजे. तेथें रशियाचा बादशाहा सारखा व अगदीं कंगाल मनुष्यहि सारखा. तेव्हां ही स्थिति लक्षांत आणली असतां महाजनांच्या अपमानाबद्दलची वरील शंका व्यर्थ होय हें उघड आहे. आतां बजबजपुरी माजण्याबद्दल जें ह्मणणें आहे त्यांत कितपत अर्थ आहे याविषयींहि थोडासा विचार केला असतां खात्री होणार आहे. बाजारांत क्रयविक्रयाची मोकळीक असल्यानें, ह्मणजे ज्यास जो पाहिजे तो माल त्यास विकावयास आणतां आल्यानें व ज्यास जो पाहिजे तो पटेल त्या किंमतीस घेतां आल्यानें, असा प्रकार आजपर्यंत कधीं घडण्यांत आला आहे काय कीं, हिरा गारेच्या किंमतीनें गेला व गार हिऱ्याच्या किंमतीनें गेली? तर मग हीच गोष्ट ग्रंथांसहि लागू पडणार आहे. बाजारांत ज्याप्रमाणें हजारों जिन्नस आले तरी तितक्यांचीहि किंमत चोख रीतीनें होऊन जाते; त्याप्रमाणेंच लोकांतहि सामान्यतः इतकी अभिरुचि नेहमीं आढळते, कीं कोणत्याहि ग्रंथाची सरासरी परीक्षा तेव्हांच होते. त्यांतून विद्येचा प्रसार जसजसा सार्वलौकिक होत जाईल तसतसें वरील परीक्षण विशेष सुलभतेनें होत जाईल हें उघडच आहे. तेव्हां एकंदरींत पहातां वरील स्वातंत्र्यापासून लोकांचें हितच आहे. जो चांगला ग्रंथ आहे त्यास खंडनाचें अगोदर भय नाहीं; त्यांतून खंडन करण्याचा कोणीं यत्न केलाच तर मोठ्या दाट धुक्यानेंहि सूर्याचें तेज जसें लोपून जात नाहीं, तर लवकरच प्रखरतर प्रकाशानें तें विरून जाऊन सूर्य विशेष देदीप्यमान मात्र दिसतो, त्याप्रमाणेंच

लोकांस हितावह होणार नाहीं. पण ज्याप्रमाणें तापकऱ्यास दुरधादि पदार्थ अपथ्यत्वास्तव वर्ज्य असल्यावरून त्यांचे स्वभावसिद्ध धर्म नाहींसे होत नाहींत, त्याप्रमाणेंच आमच्या देशाच्या आधुनिक स्थितीवरूनहि वरच्यासारखें अनुमान करणें अप्रयोजक होय!

१. प्रख्यात भूमितिशास्त्रप्रवर्तक युक्लिड यास एकदां कोणी राजानें प्रश्न केला कीं, तुमच्या शास्त्राच्या उपपत्ति सुगम रीतीनें शिकण्याचा कांहीं मार्ग आहे कीं नाहीं? या प्रसंगीं युक्लिडनें वरील उत्तर दिलें.

ह्या ग्रंथासहि प्रतिखंडनासरशी आधिकाधिक शोभा मात्र येते, व पैल पाडलेल्या हिऱ्या प्रमाणें त्याचें अंतःस्वरूप विशेष व्यक्त होतें. आतां दुसऱ्यापक्षीं ग्रंथ वाईट असला म्हणजे अयुक्तिक मतांचें त्यांत प्रतिपादन केलें असलें किंवा चित्तरंजनाचा प्रकार त्यांत बिलकूल नाहीं. यथाकथंचित् ग्रंथकाराच्या बड्या नांवानें किंवा तत्पक्षीय लोकांच्या नसला तर असल्या ग्रंथाची योग्यताहि प्रगट होण्यास फार उशीर लागतो असें जयजयकारानें वगैरे एखाद्या ग्रंथाची योग्यता वाढली, किंवा मुळींच नसून ती अज्ञान किंवा भोळ्या लोकांस भासूं लागली, तरी कालेंकरून त्याचें वास्तव स्वरूप लोकांच्या दृष्टीसमोर येईलच येईल. तेव्हां दोहींकडून वरील स्वातंत्र्यापासून नफाच आहे. इंग्लंडांतल्या ओक झाडाविषयीं जसें सांगतात कीं, त्यास उलथून टाकण्याविषयीं वाऱ्याचा जितका जितका अधिक प्रयत्न तितकीं तितकीं त्याचीं मूळें मात्र भुईंत खोल खोल जातात, तशीच गोष्ट सत्यसिद्धांतांची होय. त्यांचें तेज सूर्यतेजाप्रमाणें नित्य होय, वास्तव तें मलिन होण्याची शंकाहि नको. पण असत्य सिद्धांत हे खोट्या मोत्याप्रमाणें होत. अमार्मिकांस त्यांचें पाणी दुरून मोठें शानदार दिसेल, वेळेनसार 'नेपालेश्वर-भाललग्नचिखला'च्या न्यायानें त्यांस मूढ जनांच्या दृष्टीनें मोठें गौरवहि प्राप्त होईल; पण त्यांस कोणाचा अंमळ ढक्का लागला कीं पुरे, त्यांचें तेज मावळलें! तर असलीं मोतीं जर मोतीचौकांत येऊन खऱ्या मोत्यांच्या बरोबरीनें विकूं लागलीं, तर त्यांचें भंजन करणारा कोणी निघाल्यास त्यांत लोकांचें हित आहे कीं अहित आहे?

वरील विवेचनावरून वाचकांस सहज ध्यानांत येईल कीं, दुसऱ्याच्या लेखावर टीका करणें हें सभ्यपणास व सुजनतेस उचित नव्हे, व वरील मोकळीक सर्वांस दिल्यानें मोठा हाहाकार उडून जाणार आहे, या दोन्ही केवळ कोत्या समजुती होत. सदरील मोकळीकेपासून कोणत्याहि तऱ्हेनें अनिष्ट होण्याचा संभव नसून उलटें तिजपासून लोकांचें अतिशयित हित आहे. तर मेकॉलेच्या वरील उपदेशाचा असा अर्थ जर कोणी समजत असतील तर तो अगदीं चुकीचा आहे असें त्यांनीं समजावें. त्याचा मुख्य ग्राह्य अंश वस्तुतः एवढाच आहे कीं, वादामध्यें एकमेकाच्या उखाळ्या पाखाळ्या काढणें, अप्रस्तुत विषयाचा उपन्यास करून कोणाच्या गृहच्छिद्राचा ग्राम्य शब्दांनीं उल्लेख करणें रस्त्यांतल्या भांडणाप्रमाणें केवळ मोठ्यानें ओरडून आपला जय झालासा मानणें, इत्यादि प्रकार सभ्यत्वास व सुज्ञत्वास विरुद्ध होत. हे मात्र सर्वमान्य लोकांच्या वादविवादांत दृष्टीस पडत नाहींत. एरवीं प्रतिपक्ष्याच्या सिद्धांतांचें यथेच्छ खंडन करणें प्रसंगवशात उपहासाचाहि प्रयोग करणें. वगैरे प्रकार किती युक्त आहेत हें मोठमोठ्या सर्वमान्य ग्रंथकारांच्या पद्धतीवरून पाहिजे त्यास स्पष्ट दिसणार आहे.

तर वरच्यासारखे आक्षेप काढून जे आह्मांस सभ्यपणाचा व कनवाळूपणाचा उपदेश करतात त्यांस पुनः सरतेशेवटीं आह्मी आपला अभिप्राय एकंदरीनें कळवितों

कीं सर्व मनुष्यांस आपापलें मत लोकांस स्पष्टपणें कळविण्याचा पूर्ण अधिकार आहे, व या अधिकारांतच आपल्या प्रतिपक्ष्यावर कोटिक्रम करण्याची मोकळीकहि येते. हा कोटिक्रम शुद्ध न्यायपद्धतीप्रमाणें 'पर्वतो वह्निमान्'—'धूमत्वात्' असा केवळ प्रतिज्ञाहेतुघटितच असावा, त्यांत विनोदादिकांचें मिश्रण झालें असतां तो तेव्हांच दूषित होतो, किंवा तीव्रतेनें त्याचा वेग मंद होतो, हें आह्मांस अद्याप कोठेंहि आढळण्यांत आलें नाहीं. उलटा प्रकार मात्र असा पुष्कळ ठिकाणीं आढळला आहे कीं, मोठे वावदूक ह्मणून ज्यांची जगभर ख्याति आहे व वादप्रवीण होऊं पहाणारे ज्यांच्या ग्रंथांचें अध्ययन करतात, ते विनोदकलेंत पूर्ण असून वाद खेळण्याचीं शस्त्रास्त्रेंहि ते आपणांपाशीं नेहमीं लखलखीत ठेवीत असत. उपडच आहे कीं, समरांगणांत गांठ पडली असतां कोणत्याहि सैन्याकडून दुसऱ्याविषयीं असें गाऱ्हाणें केलेलें कधीं ऐकण्यांत येतें काय, कीं हें काय बोवा, तुह्मी आमच्यावर केवढ्यानें घाव करतां ! असली प्राणघेणी लढाई कोठें बोलली आहे काय ? तिची खरी पद्धत ह्मटली ह्मणजे अशी कीं तींत दोन्ही पक्षांकडील एकहि शिपाई जाया होऊं नये ! तसेंच शिध्या रीतीनें झुंझायाचें टाकून ही कवाईत व हे कपटप्रयोग तुह्मी करतां, छापे घालतां, हें तरी तुमच्या माणुसकीला शोभतें काय ? वरच्यापारखें धर्मव्याख्यान कांहीं काळापूर्वी तुर्कांनीं रशियनांस किंवा रशियनांनीं तुर्कांस दिलें असतें तर जितकें अप्रयोजक झालें असतें, तितकेंच आमच्या प्रतिपक्ष्यांचे वरील उपदेशपर आक्षेपहि होत. तर हें नीट ध्यानांत धरून आमच्या प्रतिपक्षिवर्गानें त्याप्रमाणें आपली वागणूक ठेवावी. आमच्या लेखणीपासून त्यांस उपद्रव पोंचूं नये अशी जर त्यांची इच्छा असेल, तर आपल्या लेखण्या अगोदर पुसून साफ करून त्यांनीं दप्तरांत अडकवून टाकाव्या व जिव्हेचें संयमन करण्यासहि अंमळ शिकावें. आजपर्यंत जसा भोळसरपणाचा व भाविकपणाचा काळ होता तसा यापुढें रहाणें असंभाव्य होय. किताबवाल्यांनीं व मोठमोठ्या हुद्देदारांनीं कांहींहि कोटिक्रम लढविला तरी तो आजपर्यंत झेलला जात असे. लोकांस वाटे कीं, इंग्रजी विद्या पढून जे मोठमोठ्या अधिकारांवर आधिरूढ झाले, त्यांचीं मतें अर्थातच अत्यंत समंजसपणाचीं असलीं पाहिजेत, त्यांत चुकीचा ह्मणून लेशहि मिळावयाचा नाहीं. त्याप्रमाणेंच जे आमच्या राज्यकर्त्यांचे शिष्य बनले त्यांच्या अंगीं त्यांच्या गुरूंचे सर्व गुणहि सहजच उतरले असतील; ह्मणजे ज्या बहाद्दरांनीं इंग्रजी पाटलून, इंग्रजी बूट, इंग्रजी वासकूट, इंग्रजी गळपट्टा वगैरे सुधारणेची सामुग्री आपलीशी करून टाकली, त्यांच्याच अंगीं आंतली सामुग्री जी इंग्रजी व्यासंग, इंग्रजी देशाभिमान, इंग्रजी प्रामाणिकपणा, इंग्रजी साहस वगैरे गुणहि असतील;—असाहि लोकांचा समज असे. पण अलीकडच्या दहावीस वर्षांत झालेल्या उलाढालींवरून वरील भ्रम बरेच उडून गेले आहेत. त्यांवरून अलीकडे सर्वांस स्पष्ट दिसून आलें आहे कीं, सम-

जसत्वाचा व व्यासंगादि गुणांचा युनिव्हर्सिटीच्या पदव्यांशीं किंवा रावसाहेब, राव-बहादूर या किताबांशीं नित्यसंबंध आहे असें नाहीं. सामान्यतः पहातां वरील गुणांचा मनुष्याच्या उंचीशीं किंवा बळकटपणाशीं जितपत संबंध तितपतच बी. ए., एम्. ए. किंवा रा०सा०,रा०व०, या अक्षरांशीं आहे. तर या स्थित्यंतराच्या मानानें अलीकडे लोकांच्या मनांत जीं चलबिचल झाली आहे ती आमच्या प्रतिपक्षिवर्गानें लक्षांत आणावी. आजपर्यंत जीं मतें त्यांच्या बुद्धीनें सत्य व समंजस ह्मणून गृहीत केलीं होतीं तीं आतां पुष्कळ लोकांस अन्यथा भासूं लागलीं आहेत. हें फळ अलीकडे झालेला अधिक विद्याप्रसार व विशेष अनुभव यांचें होय हीं उत्तरोत्तर जसजशीं वाढत जातात तसतसें लोकांत मतांतर होत जातें हा लोकस्थितीचा नियमच होय. तेव्हां यास विरोध करूं जाणें ह्मणजे इंग्लंडचा एक राजा समुद्राच्या कांठावर बसून भरतीच्या लाटांवर आपलें क्षुद्र प्रभुत्व चालवूं पहात होता त्यासारखें अत्यंत असमंजस होय. सदरहू राजश्रींनां समुद्र ऐकत नाहींसें पाहून आपलें राजासन जसें मुकाट्यानें मागें घेतलें तसाच प्रकार आजपर्यंत सुखानें प्रभुत्व भोगलेल्या धुरंधरांनींहि समयविशेषीं करणें अवश्य होय. आजपर्यंत आपली कारकीर्द जशी गाजत होती तशी आतांहि कां गाजूं नये असें त्यांच्या मनांत येत असेल; व ज्या बंडवाल्यांनीं त्यांचा अंमल उठविण्याचा प्रयत्न चालविला आहे त्यांच्यावर त्यांचा मोठा रागहि होत असेल; पण नुसत्या रागानें व खेदानें काय होणार ? जें पूर्वापार चालत आलें तेंच पुढें चालवायचें व स्वतःच्या विचारशक्तीचा ह्मणून कधीं उपयोग करायाचा नाहीं, हेंच जर आमच्या देशाची उन्नति न होतां तो निकृष्ट दशेस येऊन पोचण्याचें जबरदस्त कारण होय, तर दहावीस वर्षांमागच्या लोकांचींच मतें तेवढीं अनन्यभावेंकरून शिरसावंद्य मानावीं हें कोठलें ? पाण्याचा एकदा बांधारा फोडला ह्मणजे अमुकच ठिकाणापर्यंत त्यानें जाऊन थांबावें असा त्यास हुकूम करतां येईल काय ? त्याच्या स्वभावसिद्ध नियमास अनुसरून तें जिकडे वाहील तिकडे वाहील ! आणि असेंच तें निष्प्रतिबंधतेनें वाहिलें तरच अनादिसिद्ध जो सत्यरूप समुद्र त्याशीं सरतेशेवटीं त्याचा संगम होण्याचा संभव! सारांश आमच्या प्रतिपक्ष्यांस जर लोककल्याणाची खरी अपेक्षा असेल व सत्यमय ज्ञानाचा प्रसार व्हावा हेंहि त्यांच्या मनांत वागत असेल, तर आत्मप्रतिष्ठा व आढ्यता हीं त्यांनीं अगोदर मुळींं सोडून दिलीं पाहिजेत. इसापनीतींतील सरड्याची गोष्ट नेहमीं ध्यानांत वागवून त्यांनीं असें समजलें पाहिजे कीं, आपल्या मतांविषयीं आपल्याला जसा अभिमान वाटत असतो व त्यांच्या सत्यत्वाविषयीं खात्री होऊन चुकलेली असते, तशीच दुसऱ्याचीहि पण असते. यास्तव आमचें मत तेवढें खरें माना हा दुसऱ्यास आग्रह करणें हें मूर्खपण होय. मतांच्या सत्यासत्यत्वाची परीक्षा करण्याचा जो विवेचनरूप कस ईश्वरकृपेनें मनुष्यमात्रास अनुकूल आहे तो वादसमयीं दोहों पक्षांनीं

आणून मधें ठेवला पाहिजे, व त्याचा यथार्थ उपयोग करून जो निर्णय होईल तो प्रांजलपणें स्वीकारला पाहिजे. जें खरें उंची सोनें आहे त्यावर उक्त प्रयोग कितीहि तीव्र केला तरी त्यास भय नाहीं एवढेंच नव्हे, तर तितका त्याचा उत्कर्ष मात्र होणार हें उघडच आहे !

याप्रमाणें आमच्या पुस्तकावर कडकपणाच्या संबंधानें जो कित्येकांचा आक्षेप सामान्यतः आढळतो, त्यावर आह्मीं आपला अभिप्राय एकवार सविस्तर देऊन आतां गेल्या वर्षांत झालेल्या चर्चेवर आमचे विचार दाखल करतों.

ज्ञानोदय—या आमच्या वयोवृद्ध बंधूची व आमची गांठ पडल्यास आज बराच काळ लोटून गेला. आमच्या पहिल्या मुलाखतीची आठवण आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस असेलच. प्रस्तुत पुस्तकाच्या आठव्या अंकांत आमची पारलौकिक चिंता वाहणारे व आमच्या कल्याणार्थ हजारों कोसांवरून येथें येऊन शुभवर्तमानाच्या प्रसारार्थ हजारों रुपये दरमहा खर्चणारे जे ख्रिस्ताचे प्रेषित त्यांच्याविषयीं व त्यांच्या एकंदर उद्योगाविषयीं आमचे विचार जेव्हां प्रथमच प्रगट झाले, तेव्हां त्यांच्या एकदम लक्षांत येऊन चुकलें कीं, वीस वर्षांपूर्वी जी 'लहरी' आपण मोठ्या प्रयत्नानें आटवून टाकली होती तीच पुनः दुसऱ्या रूपानें प्रगट होऊन आपल्या उद्योगास पूर्ववत् व्याघात होत जाणार. ही धास्ती वरील मंडळीस पहिल्यानें पडली खरी; पण तीसहि उमेद वाटली असावी कीं, या लहानग्या पुस्तकास चिरडून टाकण्यास किती उशीर ? हें फार तर लोकाश्रयाच्या जोरावर आपणांशीं भांडणार, पण असल्या दुर्बळ आश्रयावर टेकलेल्यांचा आपण कितीकांचा आजपर्यंत समाचार घेतला आहे ! आपणावर एवढी 'विचारलहरी' उठली होती; पण आह्मी मनावर घेतांच तिच्या उगमाशीं बांधारा घालून टाकून तिचा प्रवाह तेव्हांच बंद करून टाकला, व तिचे तरंग जागच्या जागीं मुरून जात अशी तजवीज केली. 'लहरी' आटून गेल्यावर फारा दिवसांनीं 'दंभहारक' जन्मास आलें व आपला शिवरा स्वभाव प्रभूच्या सेवकांवर प्रगट करूं लागलें पण त्याचीहि खोड जिरून शेवटीं रर करतां तेंहि आमच्या प्रतापानें खपून गेलें. तर त्यांतलेंच हें तिसरें ! हें तरी आपल्या समोर किती दिवस टिकणार ? याप्रमाणें विचार करून आमच्या वृद्ध बंधूनें आपलें व आपल्या शिष्यवर्गाचें आश्वासन केलें असावें. पण गेल्या तीन वर्षांत वरील संकल्पाप्रमाणें कांहींच घडून आलें नाहीं. मधून मधून अनेक वेळां आमच्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध बंधूस आह्मीं बऱ्याच इशारतीहि दिल्या; पण कांहीं नाहीं ! आपल्या थोर वयास शोभणारी जी गंभीर वृत्ति त्यांनीं एकदां धारण केली ती ते कांहीं केल्या सोडीनात ! शेवटीं आमच्या अत्याग्रहास मान देऊन त्यांनीं गेल्या जुलई व आगस्ट महिन्यांत पुनः आमची भेट घेतली.

या भेटीच्या समयीं आमच्या बंधूस प्रथमदर्शनींच दिसून आलें कीं, मधें जरी

इतका काळ निघून गेला तरी आमच्या स्वरूपांत बालाग्रहि अंतर पडलें नाहीं. या गोष्टींचें आमच्या वडील बंधूस आश्चर्य वाटत असेल व कदाचित् खेदहि होत असेल; पण आह्मांस तर तिचा केवळ अभिमानच वाटतो. आरंभीं जी प्रतिज्ञा केली तिचेंच अनुसरण करीत असून आह्मीं अद्याप मार्गभ्रष्ट झालों नाहीं याविषयींची आमच्या बंधूची साक्ष आह्मांस आनंद देते. आतां आह्मांत मुळींच फरक न झालेला जसा त्याच्या लक्षांत आला तसें त्याच्या संबंधानें मात्र आह्मांस वाटत नाहीं. आमच्या विषयीं सदरील पत्रकर्त्याची आरंभीं जी समजूत होती ती कालेंकरून बरीच पालटली आहे असें दिसतें. तीन वर्षांपूर्वीच्या त्याच्या लेखांत जी वृत्ति स्पष्ट दिसते तिजपेक्षां सध्यांच्यांत ती फार निराळी दृष्टीस पडते. पहिल्या लेखांत जसें 'औधत्य व उच्छृंखळपण' भरपूर होतें तसें या दुसऱ्यांत नसून सभ्यपणाची रीत या दुसऱ्या खेपेस आमच्या वृद्ध बंधूनें बरीच प्रगट केली आहे. याप्रमाणेंच उत्तरोत्तर आमच्या ख्रिस्ती बंधूंची वृत्ति सुधरत जाऊन इतर धर्मांच्या लोकांविषयीं सभ्यपणानें लिहिण्याची जर त्यांस आवश्यकता दिसूं लागेल, तर आमच्या असद्धर्मी पुस्तकाचीहि सद्धर्मी लोकांवर कांहीं छाप पडूं लागली असें आह्मांस अभिमानपूर्वक व संतोषपूर्वक ह्मणतां येईल.

आतां आमच्या बंधूच्या आक्षेपांविषयीं विचार करूं. या आक्षेपांस कारण प्रस्तुत पुस्तकाचा चाळिसावा अंक होय. जॉनसनच्या चरित्राच्या पहिल्या पांच अंकांत त्याचें चरित्र खुद्द संपवून बरील अंकांत त्याच्या चरित्रापासून एतद्देशीयांनीं घेण्यासारखा बोध कोणता तो सविस्तर सांगितला आहे. या बोधाचें शेवटलें कलम धर्म हें होय. या कलमावर लिहितांना ख्रिस्ती व हिंदु धर्माविषयीं जे कांहीं उल्लेख केलेले आहेत ते अर्थात्च आमच्या बंधूस असंमत होऊन आमचें ख्रिस्ती धर्माविषयीं अज्ञान व येथील धर्माविषयीं वृथाभिमान हीं दर्शविण्याचा त्यानें यत्न केला आहे. या मुख्य विवेचनाबरोबर कांहीं अवांतर गोष्टींविषयींहि त्यानें चर्चा केली आहे.

आमच्या प्रतिपक्ष्याचे आक्षेप एकंदरीत पहातां पुष्कळच आहेत. त्या सर्वांविषयीं विचार करण्यास येथें जागा नाहीं व त्याची तादृश आवश्यकताहि नाहीं. वास्तव मुख्य मुख्य जे आहेत त्यांचा मात्र निर्देश करून त्यांवर आमचे अभिप्राय वाचकांस कळवितों.

'ज्ञानोदय' बोवांचा पहिला मोठा आक्षेप आमच्या भाषेच्या संबंधानें आहे. आह्मीं दुसऱ्यांस अपशब्दांबद्दल व अप्रयोगांबद्दल नांवें ठेवीत असून स्वतः हवी तशी भाषा दवडतों, व 'महाराष्ट्र भाषेचे शंकराचार्य' होऊं पहात आहों, असा आह्मांवर आरोप करून त्याच्या सिद्धयर्थ आमच्या बंधूनें कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. आतां

यावर आमचें ह्मणणें एक तर हें आहे कीं, शब्दांची व प्रयोगांची शुद्धाशुद्धता जी ठरवायाची ती 'ज्ञानोदय' वे वांच्या मर्जीवरून किंवा कोशकारांच्या वगैरे आधारावरून ? [1] दुसरें असें कीं आमच्या ख्रिस्ती बंधूस केवळ स्वमनःकल्पित दूषणें दुसऱ्यावर ठेवून द्यावयाची एकंदरींत भारी हौस ! 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या वचनाचा एवढा महिमा गात असतां त्यांची तत्त्वविचाराविषयीं एवढी आस्था दृष्टीस पडते कीं, आमच्यासारख्या पुस्तकाचा अंक त्यांस जेव्हां कोणी नेऊन दाखवावा तेव्हां ते तीं वाचतात; एरवी त्यांची पवित्र दृष्टि सैतानप्रेरित मजकुराकडे कोठून जावयाला ? ती जर मेहरबानीनें कधींमधीं आमच्या गरीब पुस्तकाकडे वळती,तर त्यांस तेव्हांच दिसून आलें असतें कीं,आमची पद्धत त्यांस वाटते तिजहून फार निराळी आहे. आमचा कोणावरहि कोणत्या प्रकारचा जोरा नाहीं, व भाषेच्या किंवा विचारांच्या संबंधानें ख्रिस्ताचे प्रतिनिधि पोपमहाराज यांजप्रमाणें आह्मीं अद्याप शिक्का मोर्तबहि कधीं अमलांत आणलें नाहीं. वरील दोहों संबंधांनीं हव्या त्यावर टीका करण्याचा अधिकार आह्मी स्वतः जसा चालवितों त्याप्रमाणेंच इतरांनाहि तो आमच्यावर चालविला असतां आह्मी संतापत नाहीं एवढेंच नव्हे, तर दोषाविष्करणार्थ आक्षेपकांची वारंवार प्रार्थना करून खुद्द आमच्या पत्रांतहि प्रतिपक्ष्यांच्या आक्षेपांस स्थळ मिळत गेलें आहे. तर वरच्यासारखे निराधार उल्लेख करण्यापूर्वी आमचे बंधु आपल्या प्रतिपक्ष्यांचें स्वरूप अगोदर नीट लक्षांत आणण्याचा जर प्रयत्न करतील तर बरें, अशी आह्मी त्यांस एक सामान्यतः सूचना करून ठेवतों. तिसरी गोष्ट अशी कीं, मराठी भाषेविषयीं नाक मुरडणें व तिची चवढव सांगणें या भानगडींत आमच्या ख्रिस्ती बंधूंनीं फारकरून पडूंच नये. ख्रिस्ती शास्त्रांतील प्रमेयांविषयीं त्यांनीं पांडित्य केलें, किंवा एखाद्या सर्वसाधारण विषयावर चर्चा केली, तर ती त्यांस शोभणार आहे; पण महाराष्ट्र भाषेचे प्रयोग ठरविण्याच्या ओंड पाण्यांत त्यांनीं शिरणें ह्मणजे पुष्कळ अंशीं 'हितोपदेशां'तील 'अव्यापारेषु व्यापार' करूं जाणाऱ्या वानरासारखीच अवस्था होय. पूर्वीचे भोळे दिवस आतां राहिले नाहींत; विद्याप्रसारजन्य जें यथार्थ ज्ञान त्याच्या योगानें इतर शेकडों गोष्टींच्या संबंधाचे भ्रम आजला जसे उडून गेले आहेत, त्याप्रमाणेंच पाद्री साहेबांस

---

१ उदाहरणार्थ 'आजला' हा शब्द घ्या. आमच्या बंधूच्या मतें हा आमच्या शंकराचार्यांं किल्ल्याच्या शब्दांपैकीं होय असें दिसतें.पण मे ल्स्वर्थ्चा कोश उलटला असतां त्यांत पुढील व्याख्यान सांपडेल—"आजला—By to-day Ex. "मी मुंज झाल्यापासून पढतों तर आजला पंडित झालों असतों."

शास्त्री मंडळीनें सन १८२९ सालीं जो 'महाराष्ट्र भाषेचा कोश' प्रसिद्ध केला त्यांतहि वरील प्रयोग व वरीलच उदाहरण दिलेलें आहे. तेव्हां आतां प्रामाण्य कोणाचें मानावें ?

(पुढें चालू)

किंवा त्यांच्या छात्रशाखेस एतद्देशीय भाषांचें ज्ञान कितपत असतें हेंहि सर्वांस केव्हांच पक्कें समजून गेलें आहे. तर जोंपर्यंत पुणें, सातारा वगैरे जुन्या मराठी शहरांवा महाराष्ट्रांत मागमूस राहील, व विद्यादेवी ब्राह्मणांवर रुष्ट होऊन तांबट, कासार, माळी वगैरेंच्या घरोघर पाणी भरूं लागली असें होणार नाहीं, तोंवर शरणपुरीच्या पंडितांनीं किंवा सोलापूर बाजारांतील महाराष्ट्रभाषाभिज्ञांनीं 'अळी मिळी गूप चिळी'चेंच व्रत पतकरावें हें आह्मांस बरें दिसतें ! 'ज्ञानोदया'ची लेखणी आज सुमारें चाळीस वर्षें जरी चालली आहे, व ख्रिस्ताच्या एतद्देशीय भक्तमंडळापैकीं कोणाच्या हातून कोशरचनेचीं वगैरे कामें जरी पार पडलीं असलीं, तरी महाराष्ट्र भाषेचे प्रयोग शुद्ध कानीं पडण्याचा संभव वरील शहरांच्या रस्त्यांतहि जितका आहे तितका आमच्या ख्रिस्ती मंडळीच्या मोठमोठ्या सभांतहि नाहीं. ही गोष्ट वस्तुतः पहातां अगदीं उघड आहे, व आमच्या जरठ बंधूंस आमच्यासारख्या पूर्ववयस्कानें ती सांगावी असें नाहीं. पण काय करावें ? आमच्या बंधूच्या दिव्य दृष्टीस सामान्य जनास स्पष्ट दिसणाऱ्या गोष्टीहि अनेक वेळां बिलकुल दिसत नाहींत. तेव्हां वडीलपणावें नातें अशा प्रसंगीं अंमळ एकीकडे ठेवून द्यावें लागतें ! [१]

एकीकडे पहावें तर आमच्या पुण्यग्रामस्थ जुन्या शास्त्रीसमूहाचीं व त्यांच्या बरोबर मोलस्वर्थ साहेबांची मूर्खांत गणना करावी लागणार, किंवा दुसऱ्या पक्षीं आमचे ज्ञाननिधि परमपूज्य बंधु, ज्यांनीं आज चाळीस वर्षें महाराष्ट्र भाषेचीं सूत्रें हातात बागविलीं, त्यांची ज्ञानदृष्टि अद्याप ज्यांच्यापर्यंत पोंचली नाहीं असे कांहीं चुकार शब्द कोठें कोठें कोनाकोपऱ्यांत दडून बसलेले आहेत असें तरी मानलें पाहिजे ! तर या दोहोंमध्यें वाचकास काय वाटेल तो त्यांनीं निर्णय करावा !

१ आमच्या वडील बंधूचा आमच्या भाषेवर मोठाच कटाक्ष आहे असें दिसतें. नुकत्या ७ फेब्रवारीच्या अंकांत पुढील मजकूर आढळतो—

"निबंधमाला—या मासिकपुस्तकाविषयीं एक विद्वान् संस्कृतज्ञ एतद्देशीय गृहस्थ असें लिहितात कीं, निबंधमालेची भाषा कांहीं मात्र लेबाईक नाहीं. तिच्या भाषेची कोणी निःपक्षपातानें परीक्षा करूं लागल्यास तींत शोभिवंत व देखणाऊ शब्दांचा थाट मात्र दिसून येतो. पण त्या शब्दांत चांगला व विचारशील अर्थ कधीं नसतो. अशा भाषेच्या शैलीपासून दूर राहणें बरें"—म्हणे अशी भाषा लिहावयास कोणी शिकूं नये.

हे विद्वान् संस्कृतज्ञ कोण असतील ते असोत ! त्याप्रमाणेंच संस्कृतज्ञत्वाबद्दल सर्टिफिकिट देण्याचा अधिकार आमच्या ख्रिस्ती बंधूंनीं केव्हां घेतला, व 'विचारशील अर्था'चे मोक्के आणि 'भाषेच्या शैलीपासून दूर राहणारे' वरील टीकाकार यांस मराठी भाषेचे चौख कोणीं नेमले, हेंहि आह्मांस कळत नाहीं ! एकंदरींत वरील प्रकार पाहून 'परस्परं प्रशंसंति अहो रूपमहो ध्वनिः' या सुभाषिताची आह्मांस आठवण होते वरील वचनाचा अर्थ आमच्या गर्विष्ठ पंडितांस व त्यांच्या शिफारसकर्त्यांस तर सांगायाला नकोच, पण आमच्या वाचकांपैकीं कोणास त्याविषयीं जिज्ञासा झाल्यास त्यांनीं अंक ४१ (सुभाषित) पहावा.

याप्रमाणें आमच्या पुस्तकाच्या बाह्यांगाविषयीं ह्मणजे त्याच्या भाषासरणी-विषयीं स्वतःच्या तर्फेनें जें लिहिणें योग्य वाटलें तें लिहिलें. 'ज्ञानोदया'च्या टीकेपैकीं भाषेच्या संबंधाचा हा एक आरंभींचा लहानसा मुद्दा आहे. पुढें जे पुष्कळ आक्षेप आमच्या बंधूंनीं काढिले आहेत ते त्यांच्या धर्माच्या संबंधाचे आहेत. ह्मणजे जानसनचीं धर्मविषयक जीं मतें होतीं त्यांच्या संबंधानें आह्मीं आपले अभिप्राय जे प्रगट केले होते त्यांचें खंडन करून ख्रिस्ती धर्मावरचे आमचे आक्षेप उडाविण्याचा त्यांनीं यत्न केला आहे. या सर्व टीकेवर आह्मीं आपले विचार संपूर्ण दाखल केले होते, व सर्व मुद्द्यांवर आमच्या बंधूंच्या इच्छेनुरूप चांगला तपशीलवार मजकूर लिहिला होता. आमच्या बंधूस अवघ्या पवित्र शास्त्रांत खोटा भूगोल, खोटें पदार्थज्ञान, अप्रयोजक व बीभत्स कथा वगैरे प्रकार कोठेंच आढळले नाहींत; यास्तव प्रत्यक्ष प्रमाणानें ते दाखविण्याविषयीं आमच्या बंधूंनीं आह्मांस सूचना केली होती. तीस अनुसरून आह्मीं मराठी पवित्र शास्त्रांतून अध्यायवार, ओंवीवार उतारे उतरून घेतले होते. पण इतकें होऊन ऐन वेळेस तें सर्व व्यर्थ झालें. चालू सालचा नववा आक्ट एकाएकीं आदळल्यानें सर्व हिंदुस्थान हदरून गेलें, हजारों लेखण्या एकाएकीं भयस्तब्ध झाल्यासारख्या होऊन एका क्षणांत बोथटून गेल्या! तेव्हां अर्थातच निरुपायास्तव आमचें सर्व उत्तर जसेंचें तसें एकीकडे ठेवून द्यावें लागलें. ठशांवरून एक फर्मा उतरला असतां व दुसरा अर्धामुर्धा जुळला असतां सर्व काम सदरील आक्टामुळें रद्द झालें. असो; झाली ती गोष्ट बरीच झाली. तिजविषयीं आतां बोलून कांहीं फळ नाहीं. पण आह्मांस एवढ्याच गोष्टीचा खेद वाटतो कीं, आमच्या वृद्ध ख्रिस्ती बंधूनें एवढ्या आग्रहानें व एवढ्या खात्रीनें जीं प्रमाणें आह्मांस दाखल करण्याविषयीं सांगितलें होतें तीं आह्मीं एवढ्या श्रमानें गोळा करून त्यांस अर्पण करायास आणलीं असतां तीं शेवटीं काहून न काहून सारखींच झालीं! आतां निदानींची गोष्ट एवढीच आमच्या बंधूंस कळवितों कीं, शुभवर्तमानांत वरील प्रकार आहेत कीं नाहीं य विषयीं खात्री करून घ्यावयाची असल्यास त्यांनीं आह्मांस तसें कळवावें. ह्मणजे सदरीलप्रमाणें पुनः एकवार काहून तीं आमच्या प्रिय व सन्मान्य बंधूंस खाजगी रीतीनें पाठवून देऊं. मग तीं त्यांनीं आपल्या पत्रांतून प्रसिद्ध केल्यास त्यांस कोणत्याहि तऱ्हेचा आडकाठी नाहीं. तसें केलें असतां त्यांच्या सर्व बंधूंस व इतरांसहि तीं कळविल्यासारखीं होतील. शिवाय त्यांच्या खंडनाचा कांहीं मजकूर त्यांस लिहिणें असेल तर तोहि त्यांनीं लिहावा. तेणेंकरून लक्षावधि संशयित लोकाची संदेहनिवृत्ति होईल.

याप्रमाणें गेल्या सालांतील एका प्रतिपक्ष्याची वाट लागली. आतां याप्रमाणेंच दुसऱ्याच्या आक्षेपांवरहि आक्टाचा तडाका संभाळून जितकें लिहावयास सांपडेल तितकें लिहून सदरील अंक आटपतों.

दीनबंधु—हें एक लहानसें वर्तमानपत्र 'सुबोधपत्रिका' 'आर्यपत्रिका' वगैरेंच्या प्रमाणें आपल्या समाजाच्या तर्फेनें निघालेलें आहे. हा समाज गेल्या ४४ च्या अंकांत सांगितलेला सत्यशोधक पंथ होय. या पंथाची एकंदर हकीगत वरील अंकावरून आमच्या सर्व वाचकांस थोडी बहुत कळलीच आहे. तेव्हां तिजवरून वरील पत्राची परीक्षा कोणास सहज करतां येईल. असल्या पत्रांत आलेल्या आक्षेपांवर उत्तर देणें झटलें झणजे अक्षरजननीस व्यर्थ शिणवणे होय. तरी ज्या अर्थी वरील अंकांत आमच्या शूद्रबंधूंच्या भ्रमनिरसनार्थ 'गुलामगिरी'सारख्या अत्यंत अप्रयोजक ग्रंथांतील मतांचेंहि आह्मीं विवेचन केलें, त्या अर्थी त्याचसंबंधानें आणखीहि कांहीं विचार येथें दाखल करणें आह्मांस आवश्यक दिसतें, जोतीबासारख्यांनी ब्राह्मणांच्या व शूद्रांच्या परस्पर संबंधाविषयीं ज्या कल्पना कित्येकांच्या मनांत भरवून दिल्या आहेत त्या जर खऱ्या असत्या, व आमच्या मनांत वागत्या, तर वरील महाग्रंथाची आह्मीं चर्चाच केली नसती. आह्मांस पक्कें माहीत आहे, कीं अप्रयोजक व गाबाळ ग्रंथ हे चिरकाल रहाण्याचा बिलकूल संभव नाहीं; व त्यांत कोणा व्यक्तिविषयीं, जातीविषयीं किंवा राष्ट्रविषयीं कितीहि निंदापर व कडक मजकूर लिहिला असला तरी इमापनीतींतील किरडूं व कानस यांच्या गोष्टाप्रमाणें बिचारें मूर्ख किरडूं मात्र भग्नदंत होण्याचा संभव ! पण हें सर्व जाणीत असतां 'गुलामगिरी'चें एवढ सविस्तर निरूपण करण्याचें मुख्य कारण हेंच कीं, आमचे बिचारे शूद्रबंधु अद्याप केवळ अज्ञान व भोळे असल्यामुळें 'झुकानेवाला चाहिये' या न्यायानें कोणामहि त्यांच्या मनांत हव्या त्या मूर्ख कल्पना भरवून देतां येणार आहेत. तर ही त्यांची प्रतारणा न व्हावी व त्यांच्या उत्कर्षाचा खरा मार्ग त्यांच्या ध्यानांत आणून द्यावा हें वरील विवेचनाचें मुख्य बीज होतें. याशिवाय दुसरे जे वरील लेखाचे उद्देश, कीं विक्षिप्तपणाचे अनेक हास्यास्पद प्रकार वाचकांस कळून त्यांस घटकाभर कर्मणूक करावी; लोकप्रसिद्धि, सरकारी अधिकाऱ्यांची मेहरबानी, व सर्वमान्य पुस्तकांतून उल्लेख हीं सर्व पैदा होण्यास किती थोडद्या विद्वत्तेनें व योग्यतेनें प्रसंगविशेषीं काम होतें हा प्रकार कांहीं लक्षांत यावा; व भर्तृहरीच्या व पोपकवीच्या सर्वप्रसिद्ध वचनांची उत्कृष्ट प्रचीती यावी; हे उद्देश केवळ गौण

---

१. हीं वचनें ११ व्या अंकांत आलींच आहेत—

ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्माऽपि च तं नरं न रंजयति ॥
भर्तृहरि.

(न जाणे न नेणे अशा पामराला
बुझावूं शकेना विधाता तयाला ॥)
वामन.

A little learning is a dangerous thing.
Pope.

होते. तर वरील मुख्य उद्देशासच अनुसरून आमच्या दीन शूद्रबंधूनें आपल्या आचार्यांच्या तर्फेनें जो कांहीं मजकूर आह्मांस कळविला आहे त्यावर कांहीं विवेचन करणें अवश्य होय.

'दीनबंधू'नें आपल्या वेड्या बागडद्या भाषेनें जे आमच्या लेखावर कांहीं आक्षेप काढले आहेत त्यांपैकीं मुख्य तीन चार आहेत. ते येणेंप्रमाणें--

"मालाकार यांनीं आजपर्यंत आपल्या पुस्तकांत अनेक विषय प्रसिद्ध केले. पण त्यांचा झोंक चरचरीत लिहिण्याकडे असतो कीं जेणेंकरून दुसऱ्याचा पाणउतारा व्हावा अशी त्यांची ऐट असते. जेव्हां त्यांची हुकी तारीफ करण्याकडे लागते तेव्हां ते त्या कलावर लिहितात."

"मि० फुले यांनीं आपले बुकांत पुराणें व स्मृत्या यांबद्दल पुष्कळ चांगलें विवेचन केलें आहे. त्यांची भाषा जरी कडक दिसते, व पूज्य मानलल पुराण आणि त्यांतील नामधारी देव यांविषयीं त्यांनीं अति निर्भर्त्सना केली आहे, तरी त्यांचा हेतु अज्ञानाचे आवरणापासून लोक मुक्त व्हावे एवढाच आहे.....दुसरें त्यांनीं चित्पावनांचे उत्पत्तीविषयीं लिहिलें आहे. तेव्हां आपले ज्ञातिसमुदायास दोष दिलल त्यांस (मालाकारांस) सहन झाले नसतील.....असो; या विद्वान मालाकारांनीं यापेक्षां असें करणें अवश्य होतें कीं, फुले यांनीं जें जें लिहिलें आहे तें तें स्मृतिपुराण यांचे प्रमाणांनीं असत्य असें व्यक्त करून दाखविलें असतें तर त्यांची तारीफ करतां आली असती."

"ईश्वरकृपेनें या देशावर इंग्रजी राज्य झालें ह्मणूनच आज पुढारी ज्ञातीशिवाय इतरांस कांहीं तरी ज्ञान प्राप्त होऊन आपले हक्क कळूं लागले आहेत. मालाकार आपले ज्ञातीच्या स्वभावाप्रमाणें दीर्घदर्शी व गुप्त द्वेषी मतलबीहि आहेत. इतर ज्ञातींचा सुधारणा त्यांस अगदीं आवडत नाहीं."

"आतां मालाकार यांनीं धूर्तानीं नाडलेले, दरिद्रानें पीडलेले, आणि अज्ञानांत गडलेले अशा गाई बापड्या गरीब शूद्रांवर हत्यार धरणें झटलें ह्मणजे फारच विपरीत समजलें पाहिजें."

आतां यांपैकीं पहिल्या आक्षेपाविषयीं तर आह्मीं प्रस्तुत अंकाच्या आरंभीं बराच विचार केला आहे; तेव्हां त्याच्या संबंधानें आमच्या दीनबंधूस कांहीं विशेष सांगावयाला नकोच. राव जातीसारख्य महान् पंडितांच्या अंतेवासिजनास आमचे निबंध पसंत पडत नाहींत या गोष्टीचा आह्मांस मोठासा आचंबा वाटत नाहीं, व ताद्दश खेदहि होत नाहीं. ज्या दृष्टीस 'गुलामगिरी' हा ग्रंथ पर्वतप्राय पांडित्याचा वाटला त्याच दृष्टीस आमचे लेखहि मोठे प्रचंड वाटले तर बरींक आह्मांस खेद होण्यास कारण खरें! पण तसें न होऊन 'दीनबंधु' सारख्यांस आमचे लेख तद्विपरीत वाटतात

हेंच त्यांस लहानसान सर्टिफिकिट आहे असें नाहीं. मिल्टननें एके ठिकाणीं झटलें आहे—

'Of whom to be dispraised. is no small praise'

"ज्यांच्या निंदेस पात्र होणें हीच लहानसान तारीफ नव्हे." तर या न्यायानें पाहिलें असतां आमच्या शूद्र बंधूचा एक एक शब्द आह्मांस पुष्पप्रक्षेपाप्रमाणें तोषप्रदच होय!

दुसरें ह्मणणें असें कीं, जोतीबांनीं श्रुतिस्मृतींतून जीं एकेक वज्रप्राय प्रमाणें काढून आपला परम भाविक शिष्यमणि धोंडीबा याच्या द्वारें आपल्या साऱ्या शिष्य मंडळास प्रणीत केलीं त्यांचें श्रुतिस्मृतींतल्या प्रमाणांनीं आह्मीं खंडन करायाला पाहिजे होतें, तसली बिलकूल खटपट न करतां आह्मीं केवळ थापट्यावारीच एवढ्या गुरुशिष्यांस जे जागच्या जागीं बसविले तें नीट नव्हे! आमच्या वाचकांस या आक्षेपावरून आठवेलच, कीं पंडित दयानंदजींच्या छात्रमंडळानेंहि आह्मांस पूर्वी हाच दोष दिला होता. एकंदर गाऱ्हाणें हें कीं, श्रुतिस्मृतींतल्या प्रमाणांचें खंडन श्रुतिस्मृतींतल्या प्रमाणांनीं केलें पाहिजे! आतां या संबंधानें आमच्या परमहंसशिष्यांच्या ह्मणण्यांत कांहीं तरी अर्थ होता; कां कीं पंडितजींचें वेदमूर्तित्व व शास्त्रपारंगतत्व हें जरी बेताबातांचेंच आहे, तरी जोतीबांच्या मानानें तुलना करूं जातां स्वामी केवळ अपरसूर्यच होत असे झटलें पाहिजे! द्विजत्वास्तव व विद्वान् लोकांच्या परिचयास्तव त्यांजपाशीं कांहीं फुटकळ ऋचा व शास्त्रवचनें यांचा संग्रह झालेला आहे, व त्यांचा अर्थहि समजण्याची त्यांस शक्ति आहे; यास्तव त्यांनीं अमुक अमुक वेदांत किंवा शास्त्रग्रंथांत अमुक अमुक आहे असें झटलें असतां केवळ हास्यास्पदतेचा प्रकार होण्यासारखा नाहीं. पण आमच्या शूद्र धर्मस्थापकांची तर कशी मौज आहे! त्यांस पुरतें व्याकरणाचें व शुद्ध लिहिण्याचेंहि ज्ञान नाहीं. आमच्या वाचकांस आठवतच असेल कीं,'गुलामगिरी'ची इमारत पूर्ण तयार झाल्यावर तींतील व्याकरणसंबंधी खाचाखोचा भरून टाकून साफ गिलावा करण्याविषयीं त्यांनीं आपल्या लेखास आज्ञा केली. आमचे प्रतिपक्षी 'दीनबंधु' यांचीहि व्याकरणाविषयीं आपल्या गुरूसारखीच निष्ठा आहे.[1] तर अशा स्थितींत आह्मीं आपल्या शूद्रबंधूंस अशी सूचना करतों कीं, श्रुतिस्मृतींचा ऊहापोह

---

१ वरील आज्ञेचा उल्लेख (अंक ४४ पृष्ठें ५०३–४) यांत आहे. 'दीनबंधू'नें तर विचाऱ्यानें या सालाच्या आरंभींच्या अंकांत प्रांजलपणानें कबूल केलें आहे—

"**माफी करतील**—अजपर्यंत आमचे पत्रांत व्याकर्णाच्या संबंधानें घडून आलेल्या चुकांविषयीं आमचे वाचक माफी करतील अशी आशा आहे. यांतून अव्वलपासून वाचीत आलेल्या वर्तमानपत्राच्या वाचकांस सांगणें नको.

वरील प्रायश्चित्तविधि कितपत निर्दोष आहे हें व्याकरणवेत्त्यांस कळून येईलच!

करण्याची हौस त्यांनीं तूर्त एकीकडे ठेवावी; अगोदर लेखनशुद्धीच्या सूत्रांची संथा घ्यावी किंवा दादोकृत महाभाष्यांत पारंगत व्हावें; आणि यांतून पार पडून कर्ता कर्म क्रियापदांची थोडीबहुत ओळख पटली ह्मणजे मग गीर्वाण भाषेविषयीं व मनुवासिष्ठादिकांविषयीं सावकाश विचार करतां येईल!

तिसऱ्या कलमांत आमच्या बंधूंनीं आमच्या ज्ञातीवर नेहमीं करावयाचे आक्षेप केले आहेत, कीं आह्मीं त्यांस कधीं वर डोकें काढूं दिलें नाहीं, त्यांच्यांत सुधारणा झालेली आह्मांस कधीं देखूं सकत नाहीं व इंग्रजांचें राज्य झालें ह्मणूनच त्यांचा आज भाग्योदय झाला आहे! आतां या आक्षेपांवर पूर्ण विवरण करून ब्राह्मणांची व शूद्रांची स्थिति वस्तुतः कशी होती व सध्यां कशी आहे तें यथास्थितपणें दाखविण्यास व हल्लींच्या राज्यांत त्यांचे स्थित्यंतर कसें झालें आहे हें दर्शविण्यास पुष्कळच स्थळ पाहिजे. सदरील विषयावर चांगला स्वतंत्र ग्रंथच होण्यासारखा आहे. तेव्हां तूर्त प्रसंगानुसार कांहीं विचार आमच्या शूद्र बंधूंस सादर करून पुढें चालतों.

आमच्या देशाची अत्यंत प्राचीन काळीं स्थिति कशी होती, पुढें जे अनेक लोकव्यवस्था करणारे निपजले त्यांनीं तींत काय काय फेरफार केले, जातिभेदाचें अपूर्व प्रकरण केव्हांपासून उपस्थित झालें व कसें झालें, चारी वर्णांचा परस्पर संबंध आरंभीं कसा होता व पुढें कसकसा होत गेला, वगैरे गोष्टींविषयीं प्रस्तुत काळीं आमच्या लोकांत उगीच कोठें चर्चा होऊं लागली आहे. वरील प्रश्नांचीं यथास्थित व समर्पक उत्तरें अद्याप कोणासहि देतां येणार नाहींत. आमच्या जुन्या ग्रंथांची माहिती जेव्हां विद्वान् लोक दृढ परिश्रम करून मिळवितील तेव्हां वरील गोष्टींचा उलगडा कांहींसा होऊं लागेल. आतां हें खरें आहे कीं, हल्लींहि मोठमोठ्या युरोपीय पंडितांपासून तों जातीबांपर्यंत अनकांचे अनेक तर्क वरील विषयाच्या संबंधानें बाहेर पडले आहेत; पण ते सर्व बहुतेक अज्ञानाचें व असमंजसपणाचे होत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. युरोपियन लोकांचें काय आहे कीं त्यांस अगोदर इकडची माहिती तुटपुंजीची, आणि तसल्या माहितीवर मग त्यांचें तर्कट चालायाचें! त्यांतून जातिभेदासारखा प्रकार त्यांच्या सुधारलेल्या मुलखांत मुळींच नाहीं; तेव्हां असल्या अपूर्व विषयावर त्यांचे विलक्षण तरंग उठलले आपण एरवी जसे पहातों तसेच यावरहि दृष्टीस पडतात. आमच्या जोतीबाच्या सारख्या बहादरांची तर गोष्ट बोलावयासच नको. त्यांनीं बोलावयाला किंवा लिहावयाला आरंभ केला ह्मणजे मग अर्थसंगतीची गरज नाहीं, युक्तीचें नांव घ्यावयाला नको, व सभ्यतादि गुणांची तर ओळखहि मिळायाची नाहीं! तर असल्यांनीं प्रस्तुतसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर जीं मतें प्रगट केलीं असतील तीं प्रमाण घेऊन चालणें हें फार असमंजस होय. त्यांतून पूर्वीच्या

काळाच्या वृत्तांताचा प्रस्तुत काळाशी मोठासा संबंध आहे असेंहि नाहीं. सर्वांस माहीतच आहे कीं, हजारों वर्षांपूर्वी या देशांत मन्वादिकांनीं ज्या व्यवस्था केल्या त्यांपैकीं सध्यांपर्यंत चालू असणाऱ्या फारच थोड्या सांपडतील. मधले दोन वर्ण तर अगोदर बहुधा नष्टच झ ल्यासारखे होऊन राहिलेल्या दोहोंचेहि आचार मूळ व्यवस्थेप्रमाणें कितपत राहिले आहेत हें कोणालाहि सांगायला पाहिजे असें नाहीं. मग अशी जेथें स्थिति आहे तेथें त्रेतायुगांतल्या गोष्टी काढून विनाकारण बखेडा माजवावा हें कोणाहि सुज्ञ पुरुषास मान्य होणार नाहीं. 'गुलामगिरी'च्या जनकानें ब्राह्मणा सारखे दुष्ट व लबाड लोक पृथ्वीच्या पाठीवर मिळावयाचे नाहींत, व त्यांनीं सर्व सत्ता आपणांकडे ओढून घेऊन मूळच्या रहिवाशांस गुलाम करून टाकले, वगैरे पुष्कळ निवळ बडबड केली आहे पण त्यानें अंमळ डोळे उघडून जर जगाच्या अनादिसिद्ध व्यवहाराकडे पाहिलें असतें, व अमेरिकेंतल्या, आफ्रिकेंतल्या वगैरे मूळ रहिवाश्यांची स्थिति क्षणभर मनांत आणली असती, तर आपलें भाग्य केवढें व ब्राह्मण हे खरोखर 'भूदेव' होत अशी त्यांची खात्री झाली असती ! शिवाय 'गुलामगिरी'तला इराणी इतिहास जर अक्षरशः खरा मानला, तर तेणेंकरून तर ब्राह्मणांचें विलक्षण गौरवच होतें ! कां कीं, इराणांतून येऊन एवढा हिंदुस्थान ज्यांनीं काबीज केला त्यांनींच जर पुढें राज्याधिकार क्षत्रियांस देऊन व वाणिज्य वैश्यांस देऊन स्वतः अरण्यवास पतकरला, तर मग त्यांच्याहून थोर व परोपकारी दुसरे कोण ? अमेरिकेंतल्या गुलामांस स्वतंत्र करण्याचा नुसता विचार असतां जर भयंकर लढाई उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं, व खुद्द आमचें उदार सरकारहि इतकीं वर्षे आह्मांस वेळोवेळीं देऊन लहानसहान अधिकार आह्मांस देतांनाहि मागें पुढें करीत असतें, तर मग ज्यांनीं स्वतः कमावलेलें राज्य आपल्या अंकित दासांस परत देऊन आपण कंदमूलांचे अधिकारी झाले, त्या ब्राह्मणांची थोरवी कोठवर वर्णावी !! पण ही मागली गोष्ट राहूं द्या. गेल्या शतकांत झालेल्या गोष्टी तर सर्वांच्या दृष्टीसमोर आहेत कीं नाहींत ? मग त्यांवर वस्तुतः काय तर्क निघतात बरें ? दुराग्रहाचा चीक डोळ्यांत घालून बळेंच जो आंधळा बनला नसेल त्यानें पेशव्यांचा इतिहास ध्यानांत आणला असतां व शिंदे होळकरांच्या मूळपीठिकेकडे किंचित् लक्ष पुरविलें असतां 'दीनबंधू'च्या वरील अवतरणांतील आक्षेपांची योग्यता त्यास कळल्यावांचून रहाणार नाहीं. पण असें असतां आमचे शूद्र प्रतिपक्षी चित्पावनांच्या उत्पत्तीविषयीं वाटाघाट करून सह्याद्रिखंड जोतीबाखंड असल्या महाग्रंथांचें निर्मथन करून महापांडित्याचा आव घालतात, आणि अमुक ब्राह्मण वरच्या पायरीचे, अमुक खालच्या पायरीचे, या रिकाम्या उलाढाली करीत बसतात. मशकानें घार मोठी कीं गिधाड मोठें ही चर्चा मोठ्या पर्वताच्या शिखराग्रावर आरूढ होऊन कंठशोष होईपर्यंत केली तरी त्यास

कांहीं लाभ आहे काय ? इसापनीतींतल्या वेड्या बेडकीप्रमाणें मात्र त्यास महत्वाकांक्षेचें फळ फार झालें तर मिळेल ! तर हा मूर्ख व्यापार सोडून देऊन आमच्या शूद्र प्रतिपक्ष्यांनीं नेहमीं लक्षांत ठेवावें कीं, चित्पावन हे चितेपासून जीवंत झालेले असोत किंवा इराणांतून आलेले असोत, त्यांचे नैसर्गिक गुण जे यापूर्वी प्रगट झाले व अद्यापहि होत आहेत ते छप्पन्न 'गुलामगिऱ्यां'नीं व शंभर 'जातिभेदसारां'नींहि लवमात्रहि कमी होणारे नव्हेत. चित्पावनांनीं गेल्या शतकांत सारा हिंदुस्थान दणाणून देऊन आपल्या क्षत्रकुलांतक क्षेत्रपतीप्रमाणें दिग्विजय केला, व अद्यापहि त्यांचें बुद्धिवैभव जसेंचें तसेंच जागृत आहे, या गोष्टी सर्वजनविश्रुत आहेत. त्या ज्यास सहन होत नसतील त्यांनीं पाहिजे तर दिवाभीतांप्रमाणें गिरिकंदरांत आपलें तोंड लपवून रहावें; वरील पक्ष्याच्या पंखांनीं दिनमणि जसा झांकला जाणार नाहीं, त्याचप्रमाणें जोतीप्रभृतींनीं कितीहि कोल्हेकुई केली तरी ती सर्व व्यर्थच होय ! तर एकंदरींत आह्मी आपल्या कनिष्ठ शूद्र बंधूस असें निश्चयानें कळवितों कीं, जोती साहेबांनीं आपल्या महाग्रंथांत आमच्या ज्ञातीस दोष लावले यामुळें आह्मांस राग आला असावा असें जें त्यास वाटतें तें अगदीं चुकीचें आहे. मोहोरीचा दाणा जसा या पारड्यांत टाकला कीं त्या पारड्यांत टाकला तरी त्याच्या वजनानें तराजूचा कांटा केंसभरहि ढळत नाहीं, त्याप्रमाणेंच मि० जोतीसारख्या महापंडिताच्या स्तुतींतहि अर्थ तितकाच व निंदेंतहि तितकाच ! तेव्हां आमचे ज्ञातिबांधव दोहोंचीहि सारखीच पर्वा करतात हें त्यानें खास समजावें. त्याप्रमाणेंच आमची ज्ञाति गुप्तद्वेषी मतलबी आहे वगैरे ज्या कल्पना आमच्या गरीब बिचाऱ्या बंधूनें आपल्या महागुरूच्या उपदेशावरून एकदर डोक्यांत भरून घेतल्या आहेत त्याहि बहुतेक अंशीं निराधार होत हेंहि त्यास शोधाअंतीं व विचाराअंतीं कळणार आहे.

आतां चवथा आक्षेप. तो असा कीं, गरीब बापड्या शूद्रांवर हत्यार धरण्यांत आह्मांस काय पुरुषार्थ वाटला नकळे ! हा आक्षेपहि अगदीं भ्रममूलक होय. मि० फुले यांच्या मतांवर टीका केली किंवा 'गुलामगिरी'चा उपहास केला, ह्मणजे शूद्र मंडळीवर आह्मीं हत्यार धरलेंसें जर होतें; तर दयानंदजींच्या संबंधानें मजकूर लिहिल्यानें साऱ्या ब्रह्मवृंदांस आह्मीं दुखविलें असेंहि पण ह्मणायाला पाहिजे; परंतु या दोन्हीहि गोष्टी खोट्या आहेत हें कोणालाहि सांगायाला पाहिजे असें नाहीं. लक्षावधि ब्राह्मण देवपूजेच्या संभळ्या झुगारून देऊन नित्य प्रातःकाळीं हवाशुद्धयर्थ होमहवन करूं लागले आहेत, शेंकडों ब्राह्मणराजांनीं आर्यसमाजाच्या पटांत आपलीं नांवें घालून दिलीं आहेत, व पंढरपूर, जगन्नाथ इत्यादि क्षेत्रांकडे आतां कोणीं ढुंकूनहि पहात नाहीं हा प्रकार अद्याप जसा कोठेंहि आढळूं लागला नाहीं; त्याप्रमाणेंच शिंदे, होळकर, पवार वगैरे शूद्र अधिपति हे बडे बडे सत्यशोधक बनले आहेत, आळंदी, देहू, जेजुरी वगैरे

ओस पडून तुकारामप्रभृति संतमंडळींचें माहात्म्य पार नाहींसें झालें आहे, असलेहि प्रकार कोठेंहि दृष्टीस पडत नाहींत.तर हें क्षणभर ध्यानांत आणलें असतां आमच्या वंधूस तेव्हांच कळेल कीं, मि० जोती व 'गरीब बापडे' शूद्र यांचा कांहीं संबंध नाहीं. जोतीबांचें मत असें करतां पांच पन्नास शूद्रांस कदाचित् पसंत असेल नसेल; तर एवढ्यांत साऱ्या शूद्र प्रजेचा त्यांनीं अंतर्भाव करूं पहाणें हें समंजस नव्हे.

याप्रमाणें आमच्या शूद्रबंधूच्या आक्षेपांविषयीं विचार झाला. आतां सरतेशेवटीं आमच्या समाजाधिपतींस व त्यांच्या शिष्यवृंदास कांहीं सूचना करून त्यांचा शेवटचा निरोप घेतों. मि० फुले यांस सूचना अशी कीं, जर त्यांस आपल्या ज्ञातिबंधूंची सुधारणा कर्तव्य असेल तर ती 'गुलामगिरी'सारखे ग्रंथ तयार केल्यानें व जे आपणांहून सर्व प्रकारें श्रेष्ठ त्यांस नुसत्या शिव्या दिल्यानें ती होणार आहे असें मुळींच नाहीं. ब्राह्मण कितीहि लबाड असले व कितीहि दुष्ट असले, तरी एक गोष्ट निर्विवाद आहे;—कीं ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या कंबरेला आहेत. त्यांच्या साह्याशिवाय इतर ज्ञातीस ज्ञानाचा लाभ होण्याचा बहुधा मुळींच मार्ग नाहीं. पाद्रीसाहेब हजारों रुपये खर्च करून बळीच्या राज्यांतून किंवा चंद्रलोकावरून इकडे येवोत, व शूद्रांस विद्या पढविण्याविषयीं पाहिजे तितकी खटपट करोत, पण भटांनीं कामांत पडल्यावांचून तें बिलकूल सिद्धीस जावयाचें नाहीं. तर अशी जेथें स्थिति आहे तेथें रिकामें डोकें फोडीत बसण्यांत कार्य हांशील आहे ? आपलें कार्य जर साधून घ्यावयाचें असेल तर त्या कार्यसाधकाशीं सलोख्यानें वागावें यांत शहाणपणा आहे कीं त्याशीं नेहमीं हुमरीतुमरी करावी हा शहाणपणाचा मार्ग आहे ? आपलें काम फत्ते झाल्यावर मग पाहिजे तर त्याच्या बोकांडी बसून कृतज्ञतापाशांतून आपणांस मोकळे करून घ्यावें; पण तोंपर्यंत त्याचें मनोधारण करणें किंवा निदान त्यावर पुष्पवृष्टि न करणें हेंच न्याय्य होय. दुसरी गोष्ट अशी कीं, अलीकडच्या इंग्रेजी विद्येच्या प्रसारानें पूर्वीचे समज पुष्कळ पालटून गेल्यानें आधुनिक विद्वन्मंडळांत शूद्राविषयीं पूर्वीप्रमाणें ग्रह राहिले नाहींत हें तर काय, पण कांहीं दिवसांपूर्वी शूद्रांचे आचार मिरविण्यांतहि पुष्कळांस प्रतिष्ठा वाटूं लागली होती. भोजनादि कांहीं व्यवहारांखेरीज ब्राह्मणशूद्रत्वाचा संबंध अलीकडील मंडळींत तादृश ओळखीत नाहींत, व दिवसेंदिवस असलाच प्रकार वृद्धिंगत होत जाईल असा देशस्थितीच्या मानावरून सुमार दिसतो. मग अशी स्थिति जेथें आयतीच येऊं लागली आहे, तेथें मनःकल्पित दुःखांबद्दल बळेंच आक्रोश करून व मत्स्य कच्छ, इराणांतून आले वगैरे निष्फळ गप्पा खऱ्या मानून विनाकारण बखेडा माजविणें हा किती मूर्खपणा आहे ? तर आमच्या शूद्र देशहितेच्छूनें वरील गोष्टींकडे कांहीं लक्ष पुरवून आपल्या ज्ञातीच्या सुधारणेचा जर समंजसपणानें उद्योग केला तर त्यांत त्याचें, त्याच्या ज्ञातीचें व एकंदर

देशाचेंहि कल्याण होणार आहे. याप्रमाणेंच जोतीबांच्या शिष्यवर्गासहि आमचें असें सांगणें आहे कीं, 'गुलामगिरी'सारख्या ग्रंथावरून ब्राह्मणांविषयीं जे दुष्ट ग्रह कांहींकांच्या मनांत बिंबले असतील ते त्यांनीं सोडून द्यावे. त्यांनीं अंमळ डोळे उघडून वास्तविक स्थिति कशी आहे ती जर पाहिली, तर ब्राह्मणांच्या मनांत त्यांच्याविषयीं अत्यंत वैर जळत आहे व त्यांचें जेवढें वाईट होईल तेवढें करण्याविषयीं ते निरंतर तत्पर असतात वगैरे कल्पना किती कुत्सित आहेत, हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं; आतां हें खरें आहे कीं, ब्राह्मण ह्मणजे सर्वच अत्यंत सुजन आहेत व त्यांत दोष ह्मणून सांपडायाचाच नाहीं किंवा शूद्रांचे दुःखाक्रोश सर्व व्यर्थ असून त्यांच्या स्थितींत सुधारणा करण्याची बिलकूल गरज नाहीं, असें आमचें मुळीं ह्मणणें नाहीं. आमच्या ज्ञातीचे जे कांहीं वास्तविक दोष असतील ते सर्व आह्मांस कबूल आहेत; त्यांवर पांघरूण घालण्याची किंवा ते नाहींत असें ह्मणण्याची आमची बिलकूल इच्छा नाहीं. त्याप्रमाणेंच आमच्या शूद्र देशबंधूंवर जातिभेदाच्या संबंधानें वगैरे जीं दुःखें खरोखर येत असतील, तीं हलकीं करणें किंवा होतील तितकीं नाहींशीं करणें हें प्रत्येक देशहितेच्छूचें कर्तव्य होय हेंहि आह्मांस मान्य आहे; व आमची पक्की खात्री आहे कीं या कामास आमच्या ज्ञातिबांधवांची विमुखता दृष्टीस पडणार नाहीं इतकेंच नव्हे, तर पुष्कळ मोठ्या उत्साहानें त्यास साह्यहि करतील. तर असे कांहीं सुविचार मनांत आणून आमचे सत्यसमाजवाले देशबंधु त्याप्रमाणें जर चालतील, व या आर्यभूमीचा आजपर्यंत साऱ्या जातींनीं जसा अभिमान बाळगिला तसाच पुढेंहि बाळगून आपसाआपसांत वितुष्ट वाढूं न देण्याविषयीं जर तजवीज ठेवतील, तर अजूनहि आमची स्थिति सुधरेल व हल्लींच्या राज्यापासून होणारे जे विद्यादिक अमूल्य लाभ ते सर्वांस होऊन सर्वांचें कल्याण होईल यांत संशय नाहीं.

निबंधमाला—वर्ष ४ थें.—येथें आमच्या चवथ्या वर्षाचा कारभार आटपला. आतां सालाबादप्रमाणें वर्षाची साधारण हकीकत लिहून अंक पुरा करतों.

या वर्षांत अनेक विघ्नें आलीं असतां त्या सर्वांतून आमचें पुस्तक निभावून तें अद्याप चालत आहे याबद्दल प्रथमतः जगन्नियंत्याचे उपकार आठवून आमच्या आश्रयदात्यांचेहि आभार मानणें अवश्य होय. या विघ्नांचा उल्लेख पुढें होईलच. अगोदर गेल्या सालांत झालेल्या उलाढालींच्या संबंधानें दर वर्षाच्या वहिवाटीप्रमाणें कांहीं लिहितों.

आमच्या देशाच्या बाहेर गेल्या सालांत कोणती जबरदस्त उलाढाल झाली ती साऱ्या जगास मह्शूर आहेच. ह्मशामच्या कितीका काळापासून गाजलेल्या बाद-

शाहीवर येतां येतां अखेरचा प्रसंग गतवर्षी येऊन रशियाचा फार दिवसांचा मनोरथ पूर्णपणें सिद्धीस गेला. गुदस्तांहि तुर्क लोकांवर लढाईचा प्रसंग होताच; आणि त्यांतून पार पडून ते विसावा घेतात न घेतात तों मोठा घनघोर संग्राम त्यांच्या पुढें वाढून ठेवल्यासारखा आला. पण धन्य त्यांची छाती! एवढें काहूर त्यांच्या भोंवताली जमून आलें असतां व ऐन संकटसमयीं त्यांस त्राता किंवा साह्यकर्ता कोणी मिळेना हें तर काय, पण ज्याची त्याची बुद्धि उलटी अशी कीं ही खट एकदां युरोपांतून निघाली असतां बरी!—पण इतकें सर्व असतांहि बिलकूल न डरतां ते रशियाशीं सामना करायाला उभे राहिले. ज्या संस्थानास सारें युरोप उपहासानें 'दुखणाईत मनुष्य' ह्मणत असे त्यानें डोक्यास लपेटलेला रुमाल झुगारून देऊन जेव्हां का शिरस्त्राणाचें धारण केलें व फारा दिवसांनीं मैदानाची हवा पाहिली, तेव्हां साऱ्या जगाची तेव्हांच खात्री झाली कीं चारशें वर्षांपूर्वी तुर्क लोकांच्या अंगीं जो कस होता तो अद्याप जसाचा तसा आहे! केवढें प्रचंड व प्रबळ रशियाचें संस्थान, कीं ज्यानें साठ वर्षांपूर्वी सारें युरोप जिंकलेल्या नेपोलियनास रसातळास मिळविलें, व वीस वर्षांपूर्वी इंग्लंड व फ्रान्स यांसहि सहसा दाद दिली नाहीं! तेव्हां त्यानें फार दिवस भक्ष्य न मिळालेल्या भुकेल्या अस्वलाप्रमाणें गुरगुरून व चवताळून जेव्हां गरीब बिचाऱ्या 'दुखणेकऱ्या'वर चाल केली, तेव्हां सर्वांस खास वाटलें कीं आतां याची धडगत नाहीं; हा दांडगा अस्वल यास एका क्षणांत फाडून टाकतो! पण लवकरच सर्वांस तोंडांत बोट घालून चकित व स्तब्ध होऊन रहाण्याची पाळी आली व सर्वांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें! दुखणेकऱ्यानें दरवेशाचें कसब पुरें दाखवून क्रूर व उन्मत्त अस्वलास असा सडकून मार दिला कीं, युरोपांत व एशियेंत दोहों ठिकाणींहि त्यास चें चें करीत माघारी पळावें लागलें! प्लेवनाच्या वाघानें तर त्याशीं पांच महिने झुंजून त्याचीं अशीं बळकट हाडें मोडलीं कीं, आजन्मपर्यंत तीं तो न विसरें!! असो; एकंदरींत गेलें साल जरी तुर्कस्थानास पराकाष्ठेचें जड गेलें तरी त्यांनीं साऱ्या एशियाचें तोंड उजळ केलें व आपलें नांव जगांत चिरकाळ ठेविलें यांत संशय नाहीं!

आमच्या देशांत गेल्या सालच्या अगदीं आरंभीं घडलेली गोष्ट 'केशर इ हिंद' हा किताब आपल्या महाराणी साहेबांनीं घेतला ही होय. या उपपदधारणानें त्यांची राज्यसत्ता ह्मणजे दृढतर झाली असें जरी ह्मणतां येत नाहीं,—(कां कीं त्यांच्याविषयीं येथील प्रजेच्या मनांत अतिशय प्रीति व पूज्यबुद्धि पहिल्यापासूनच वसत असल्यामुळें त्यांची राज्यसत्ता प्रकृत उपपद धारण करण्यापूर्वीच शिखरास जाऊन पोंचली होती)—तरी भरतखंडवासी सर्व प्रजा एका स्वामिनीची अंकित होय, ही कल्पना विशेष दृढतर झाली यांत संशय नाहीं. तिच्या योगानें या अफाट देशांतील नाना वर्णांचे व नाना धर्मांचे लोक आपआपसांतले भिन्नभाव सोडून देऊन सर्वसाधारण बंधुत्वाचें नातें ओळ-

खून एकमेकांशीं सलोख्यानें जर वागूं लागतील तर हा एक मोठाच लाभ झालासा ह्मणतां येईल. हा परस्पर स्नेह आमच्या देशाची उत्तरोत्तर जी स्थिति होत चालली आहे तिजकडे क्षणभर लक्ष पुरविलें असतां किती अवश्यक होय हे सहज कळणारें आहे. आमच्या देशाचें सर्व प्रकारचे दारिद्र्य तर साऱ्या जगास विश्रुतच आहे; त्यांतून अलीकडे तर दुष्काळ व महामारी हे भयंकर उत्पात येथें निरंतरचें बिऱ्हाड करूं पहात आहेतसें दिसतें. गेल्या सालांत या दोहोंचा व त्यांतून पहिल्याचा अंमल मुंबई व मद्रास इलाख्यांत जारीनें चालून त्याची अवई साऱ्या जगभर गेली हें सर्वांस ठाऊकच आहे. त्यांतून एवढें बरें झाल का, शेवटीं हस्त नक्षत्रानें आमच्या बिचाऱ्या देशास एन अखरच्या गटकळीच्या वेळीं तरता हात दिला, नाहीं तर बहुधा प्रलयकालच येऊन ठेपला होता! साऱ्या पावसाळ्याभर डोळे वटारून पर्जन्यानें शेवटीं साऱ्या देशावर अविच्छिन्न कृपा केली त्यामुळें, 'हस्तानें साऱ्यांचीं तोंडें हस्तीं केलीं' असा प्रवाद सर्वतोमुख झाला. असो; वरील कहरांचें वर्णन करावें तितकें थोडें आहे. लक्षावधि लोकांचा अन्नावांचून व पाण्यावांचून प्राणनाश व्हावा, टापूचे टापू ओस पडावे, गुरेंढोरें जीं देशाचे जीवनास व संपत्तीस मूलभूत त्यांचा निःपात होऊन जावा, या गोष्टींची केवळ कल्पना मनांत आणली असतांहि अंगावर थरथरून कांटा उभा रहातो; मग त्या प्रत्यक्ष डोळ्यांनीं ज्यांनीं पाहिल्या असतील त्यांची अवस्था तर काय झाली असेल! ती ध्यानांत आणून प्रत्येक देशहितेच्छूचें कर्तव्य एवढेच होय, कीं जेणेंकरून आपआपसांतले तंटे मोडून साऱ्यांचा एक विचार होईल व आपल्या अंगचे अनेक दोष जाऊन त्या जागीं राष्ट्राभ्युदयास कारण जे अनेक सद्गुण ते येतील, असें आचरण ठेवावें.

आतां आमच्या पुस्तकाच्या संबंधानें पहातां या खेपेस कांहीं विशेष लिहिण्यासारखें आहे असें नाहीं. आमच्या कृत्यास पूर्वीपासून आमच्या देशबंधूंचा जसा आश्रय आहे तसाच तो नेहमींप्रमाणें गेल्या सालांतहि क्रमाक्रमानें वाढला. आमच्या पुस्तकाच्या अनियमितपणाबद्दल जरी पहिल्यापासून थोडा बहुत बोभाट आहेच आहे, व अलीकडे तर वरील तक्रारीचें कलम फारच वाढलें आहे, तरी आमच्या वर्गणीदारांनीं अत्यंत क्षमाशीलवृत्ति प्रगट करून पुष्कळांनीं त्याबद्दल कधीं चकारशब्दहि काढला नाहीं. या गोष्टींबद्दल आह्मी त्यांचे फार आभार मानतों; व त्यांच्या मनोदयानुरूप आमच्याकडून कृति होत नाहीं याबद्दल जरी कांहीं विषाद वाटतो, तरी त्याबरोबर आह्मांस उमेदहि पण येते. ती अर्थातच अशी कीं, आह्मांवर आमच्या आश्रयदात्यांचा गैरभरंवसा नाहीं हें वरील गोष्टीवरून व्यक्त होतें. आतां अलीकडे आमची नेहमींची पद्धतहि सुटून आमचें पुस्तक चालू आहे कीं बंद पडलें असा अंदेशा वाटण्याची जी तूर्त स्थिति आली आहे तिचीं कारणें आमच्या साऱ्या वाचकांस माहीत आहेतच. हीं

कारणें एकामागून एक इतकीं लागोपाठ व इतकीं अवचित आलीं, व इतकीं उत्साह-भंजक होतीं, कीं आमच्या पुस्तकाचा पाया आहे त्याहून जर अंमळ लेचापेचा असता व आमच्या वाचकांची व आमची या कृत्याविषयीं जर कमींशी हौस असती, तर हा त्र अंक अखेरचा करून एकंदर कारभार आटपण्याचींच पाळी आली होती ! पहिलें कारण स्थलांतर. हें होण्याचें कारण तूर्त सांगतां येत नाहीं; पण आमच्या वाचकांपैकीं जे अंमळ कल्पक असतील त्यांच्या तें तेव्हांच ध्यानांत येण्यासारखें आहे. याच्या योगानें आमचें पुस्तक चालण मोठें दुरापास्त होईल असें आह्मांस प्रथम वाटत होतें; पण पुढें पहातां केवळ तसा प्रकार आडळून आला नाहीं. नव्या ठिकाणीं पूर्वस्थला-इतक्या जरी सोई नव्हत्या व एकंदर कामाच्या संबंधानें जरी कित्येक नव्या अडचणी उत्पन्न झाल्या, तरी पुस्तक चालण्यास ह्मणण्यासारखी हरकत नव्हती. पण हें सर्व नीट होऊन पुनः सारी व्यवस्था नीट बसते न बसते तों चालू सालचा नववा आक्ट एकदम पसार होऊन बाहेर पडला. हा आक्ट प्रस्तुतच्या देशस्थितीस कितपत अनुकूल आहे, व सामान्यतः पहातां तो प्रजेस कितपत हितावह होण्याचा संभव असतो, वगैरे गोष्टीविषयीं येथें विचार कर्तव्य नाहीं. साऱ्या लहान मोठ्या इंग्रजी व एतद्देशीय वर्तमान पत्रांतून व विलायतेंतल्या जगभर फैलावणाऱ्या मोठमोठ्या पत्रांतूनहि त्याविषयीं चर्चा झालीच आहे या आक्टानें कोणत्याहि जातीच्या अगर धर्माच्या लोकांस चिरड येईल असा मजकूर किंवा सरकारच्या राज्यपद्धतीच्या संबंधानें विरुद्ध विचार हीं दोन्ही मना केलीं आहेत. तेव्हां अर्थातच 'ज्ञानोदय' प्रभृति बंधूंचा व सर्व सामाजिकांचा आह्मांस शेवटचा निरोपच घेणें आलें; व मेकॉले प्रभृति देशदूषकांचा जो आह्मी प्रसंगवशात् शक्त्यनुसार समाचार घेत होतों तोहि आतां बेताबातानींच घ्यावा लागेल . या बंधनांचा जेव्हां आह्मीं विचार केला, व जुळलेला अंक बहुतेक सारा रद्द करून तो नव्या रुळीस लागू पडे असा पुनः नव्यानें लिहिला पाहिजे हें जेव्हां मनांत आणलें, तेव्हां कांहीं वेळ आमचा असा कल झाला कीं हें काम अजीच बंद करावें हें बरें. पावलो पावलीं अंग चुकविण्याची कसरत करीत मार्गक्रमण करण्यापेक्षां मुळींच मुक्काम करणें काय वाईट ? आमच्या भाषेच्या हितार्थ व देशाच्या कैवारानें चार वर्षें पर्यंत जेवढे आमचे परिश्रम झाले तेवढे बस झाले. याप्रमाणें कांहा दिवसपर्यंत आमची बुद्धि होऊन नाउमेद झाली. पण पुनः असें वाटूं लागलें कीं इतके दिवस चांगल्या प्रकारें चालू झालेला उद्योग टाकून देणें हें नीट नव्हे. आक्टाचा अंमल जेथपर्यंत पोंचूं शकत नाहीं असे पुष्कळ विषय आहेत; तर तेच हातीं धरून पूर्ववत क्रम चालवावा. त्याप्रमाणें चालू अंकाचें काम आह्मीं पुनः हातीं घेतलें. यांतच गुंतलों असतां अकालिक वज्रपातासारखा कोणता भयंकर प्रसंग एकाएकीं येऊन गुदरला तो सर्वांस विश्रुत झालाच आहे. याविषयीं लिहिण्यास आमची लेखणी चालत नाहीं

आतां सरतेशेवटीं आमच्या वाचकांस एवढेंच सांगणें आहे कीं, हल्लीं आमचें पुस्तक जरी सहा महिने मागें पडलें आहे तरी हा खळगा भरून टाकण्याचेंहि आह्मांस केवळ दुरापास्त वाटत नाहीं. भविष्यकाळाच्या संबंधानें कोणतेंहि विधान करणें मानवांस शोभत नाहीं; पण सामान्यतः आपल्या उमेदीच्या मानानें व कार्याच्या मानानें तसें करण्यास मनुष्य धजावतें व तें बरोबरहि आहे. तर आजपर्यंत उरकलेल्या कामावरून पहातां वरील कार्य केवळ दुर्घट होय असें आमचें मन घेत नाहीं. कालें-करून एवढी तूटहि भरून येईल अशी आह्मांस उमेद आहे. हिजप्रमाणें पुढें जर कांहींच झालें नाहीं व आमच्या वाचकांची कुरकूर जशीच्या तशीच राहिली, तर मग एक मार्ग सिद्धच आहे. घड्याळ फार मागें पडूं लागलेसें दिसलें तर तें पुनः बरोबर करण्यास जशी बिलकूल पंचाईत नसते,—कांटा फिरवून पुनः बारांवर आणून ठेवला ह्मणजे झालें,—त्याप्रमाणेंच आह्मीं आपल्या पुस्तकाकडून मंडूकप्लुति करविली ह्मणजे झालें! या मार्गाचें अवलंबन आह्मांसच पहिल्यानें करावें लागणार आहे असें नाहीं. एतद्देशीय मासिक पुस्तकांचा व चोपडींकडच्यांचा असा प्रकार अनेक वेळां झालेला आढळतो. पण ही प्लुति न करण्याचीं अनेक कारणें आहेत. एक तर आमचें पुस्तक मागसलें तें मजकुराच्या तुटीमुळें किंवा वर्गणीच्या तुटीमुळें मागसलें आहे असें नाहीं. केवळ अपरिहार्य कारणांनीं तशी गोष्ट झाली आहे. तर हा खंड जसा केवळ आगंतुक कारणानीं पडला आहे तसा क्रमाक्रमानें तो पूर्णहि होण्याच संभव आहे. दुसरें असें कीं, नियमितपणा सर्वथा इष्ट तर खराच, पण तो जर तादृश साध्य नाहीं तर त्याच्या अभावानें मासिक पुस्तकांतील विषयांची रसहानि होते असें आह्मांस वाटत नाहीं. विलायतेंतील त्रैमासिकांप्रमाणें चालू घडामोडींत जर आह्मीं आपली लेखणी शिरकविली असती, तर मग आमच्यावर टपका बरोबर आला असता, कीं फ्रेंच व प्रशियनांचें युद्ध बडोदे प्रकरणाच्या वेळीं व बडोद प्रकरण रूमशा-मच्या लढाईचे वेळीं आह्मीं आणलें! पण तसा प्रकार इकडे कोणता आहे? जोतीबांच्या 'गुलामगिरी'चें विवेचन आगष्ट महिन्यांत यावयाचें तें नोवेंबरांत आलें किंवा मोरो-पंताच्या कवित्वाचा विचार अमुक अमुक महिन्यांत व्हावयाचा ता अमुक अमुक माहे-न्यांत झाला ह्मणून काय बिघडलें? एका ऋतूंतलीं फळें दुसऱ्या ऋतूंत सपक लाग-तात किंबहुना अपायकारक होतात, तसा कांहीं प्रकार मासिक पुस्तकांतील विषयांच असतो काय? तर हा मुख्य मुद्दा आमच्या वाचकांनीं नेहमीं ध्यानांत ठेवावा. तिसरें व्यवहारदृष्ट्या जर पाहिलें, तर इकडूनहि आमचें दोषविमोचन बरेंच होण्यासारखें आहे. अगोदर आमच्या पुस्तकाची वर्गणी अगदीं थोडी आहे. ती जर जबरी असती तर उशीराच्या संबंधानें आह्मीं विशेष दोषास पात्र झालों असतों. त्यांतून या थोड्या वसूलाबद्दलहि आमची बिलकूल सक्ती नाहीं. अंक मागसले असून आगाऊ पैसा

देण्याबद्दल जर आह्मांकडून तगादा होता, किंवा मोठमोठ्या ढोबळ्या अक्षरांनीं वर्गणीदारांस वसूलाबद्दल अनेक वेळां सूचना दिल्या असत्या, तर आमच्यावर सदरील मंडळीचा शब्द रहाण्यास जागा होती. तेव्हां ज्या अर्थीं आमच्या पुरस्कर्त्यांवर आह्मीं कोणत्याहि तऱ्हेचा भार घालीत नाहीं, त्या अर्थीं त्यांनींहि उशीराची बाब फारशी मनांत आणूं नये. आतां हें तर खरेंच आहे कीं, अशी उशीराबद्दलची हकाटी असणें हें सद्यःप्रसूत अर्भकाच्या प्राथमिक रुदिताप्रमाणें अत्यंत शुभावहच होय. कां कीं, कित्येक बड्या बड्या पुस्तकांचीहि अशी स्थिति आढळते; कीं त्यांचे अंक टपालांतून जे यावे ते जसेच्या तसे मेजावर पडावे, व तेथें त्यांस वाचनाचा सोहळ्या तर दूरच पण नुसता चाकूचा संस्कारहि पुरता होऊं नये, व लवकरच तेथून पुस्तकालयांत त्यांचें शेवटचें स्थलांतर व्हावें! तर या मानानें पहातां वरील प्रकार केवढा श्रेयस्कर आहे!

याप्रमाणें हल्लींच्या स्थितीच्या संबंधानें जें कळविणें होतें तें वाचकांस कळविलें. याखेरीज प्रस्तुत पुस्तकाच्या अनियमितपणाबद्दलचीं जीं कारणें आहेत तीं मागील वर्षाच्या उपसंहारांत विस्तारेंकरून सांगितलींच आहेत. तींहि आमचे वाचक लक्षांत आणतीलच.

आतां सरतेशेवटीं एका गोष्टीविषयीं मात्र लिहून आटपतों. गेल्या ३९ व्या अंकांत मोरोपंतकृत 'शिवार्या' छापण्यास आरंभ केला होता; पण पुढें त्या मुळींच आल्या नाहींत. याचें कारण असें झालें कीं, आमच्या दोघां रत्नागिरीकर मित्रांनीं पुढें लवकरच 'काव्येतिहाससंग्रह' नामक सध्यां चालू असणारें मासिक पुस्तक काढण्याचा विचार आह्मांस कळविला. त्यावरून पंतांचा वरील ग्रंथ त्यांजकडे सोपविण्याचा आह्मीं निश्चय केला. तो त्यांच्या पुस्तकांत लवकरच समग्र प्रसिद्ध होणार आहे.

यद्यस्य नास्ति रुचिरं तस्मिंस्तस्यास्पृहा मनोज्ञेऽपि।
रमणीयेऽपि सुधांशौ न मनःकामः सरोजिन्याः॥

नीतिशतक.

अंक ७१—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) रा० कानेटकर यांच्या दुसऱ्या पत्राचें उत्तर.

१. हा चालू सालांतला शेवटला अंक होय. यास्तव सालाबादप्रमाणें सर्वांची खात्री दाखवून हिशेबाचा निकाल केला पाहिजे. हा निकाल यापुढें सरते शेवटीं ठेवण्याचा आह्मीं बेत केला आहे. यापूर्वी केव्हां केव्हां चालू विषय तहकूब ठेवून

१. "जें ज्याला सुंदर वाटत नाहीं तें कितीहि रमणीय असलें तरी त्याविषयीं तो पराङ्मुख असतो. पहा कीं, चंद्र एवढा रम्य असतांहि त्याजवर कमलिनी प्रसन्न होत नाहीं!"

मधेंच प्रतिपक्ष्यांच्या कोटिक्रमाचा विचार आह्मी करीत होतों; पण त्यामुळें आमच्या वाचकांचा मनोभंग होतो, व विषयसरणीसहि खंड पडतो यास्तव ही खातेबाकी शेवटींच काढावी हें बरें असें आह्मांस वाटतें.

२. चालू सालचे आमचे प्रतिपक्षी झटले झणजे रा० कानेटकर, रा० ओक, व उमराबतीकर 'शोधक' हे होत. रा० कानेटकर यांच्या एका पत्रास ६२ व्या अंकांत आह्मीं उत्तर दिलेंच आहे. त्याच झणजे 'मोरोपंताची कविता' या विषयाच्या संबंधानें त्यांनीं पुढें दुसरें एक पत्र पाठविलें. तें ६४ व्या अंकांत छापलेलें आहे. तर आतां प्रथमतः या पत्रांतील आक्षेपांचा विचार करूं.

प्रस्तुत वाद हा ५९ व्या अंकांत आह्मीं 'अनेकविद्यामूलतत्त्वां'तील एका लेखावर जी चर्चा केली आहे तिजवरून उपस्थित झालेला आहे. वरील अंकांत जो उतारा आह्मीं काढला आहे, तो त्या प्रसंगाला जेवढा उपयोगीं होता तेवढाच काढलेला आहे. यास्तव त्याचा पूर्ण अर्थ मनांत येण्याकरितां समग्र लेखाचें येथें प्रथमतः अवतरण करतों—

"वाक्याचा किंवा त्यांतील शब्दाचा अर्थ दोहोंकडे लागत असला; झणजे श्लेष नामक अलंकार होतो. जसें;

तूं मलिन कुटिल नीरस जडहि पुनर्भवपणें हि कच साच;
धरिला शिरींहि न स्व प्रकृति गुण त्यजिसि नाम कच साच.
मोरोपंत. कचोपाख्यान.

या स्थळीं कचनामक ब्राह्मणास जीं विशेषणें दिलीं आहेत, तीं केंसासहि लागतात. साधारण काव या अलंकाराचा हवा तेथें प्रयोग करून आपल्या काव्यांस दुर्बोधता आणितात, व त्यांच्या ग्रंथांत एका शब्दाचे दोन अर्थ होत असतात, एवढ्यानेंच त्यांस व कितीएक अरसिकांस ते ग्रंथ मोठे चांगले वाटतात; पण सहृदय पुरुष तसले लेख पसंत करीत नाहींत; हें आमचेंच मत आहे, असें वाचणाऱ्यांनीं समजूं नये; तर मोठमोठ्या सुज्ञ ग्रंथकारांचेंहि मत असेंच आहे. आतां यावरून श्लेष कोठेंच उपयोगीं पडत नाहीं असें समजूं नये. योग्य स्थलीं त्याची योजना केली असतां त्यापासून मोठा चमत्कार होतो. आपण या अर्थ दोघांस दोन प्रकारें दाखवावयाचा आहे तर त्या स्थलीं श्लेषापासून मोठा चमत्कार होता जसें नलाख्यानांत पंचनली प्रकरणीं

---

१. वरच्यावेरीज इतर काहीं लेखाहि यदा कदा पत्रांतून प्रसिद्ध झाले; एक 'शिवाजी'त व दुसरा 'नेटिवओपिनियन'मध्यें. पण या दोन्ही लेखांत कांहीच दांडील नसल्यामुळें त्यांस उत्तर देण्याची आह्मी मुळींच पंचाईत करीत नाहीं. आह्मांस लिहिण्याची व वाचकांस वाचण्याची मात्र विनाकारण तसदी पडणार. त्यांतून 'शिवाजी'तला कोटिक्रम तर कितीकांच्या वाचण्यांत आला असेल हेंहि अगोदर सांगवत नाहीं!

रघुनाथ कवीनें सरस्वतीच्या भाषणांत श्लेषाची योजना केली आहे, तेथें तो फारच शोभा देतो. तेथें दुसऱ्या अलंकारापासून श्लेषाचें कार्य न होतें. साधारण बोलतांना सश्लेष प्रसंगाचित भाषण केल्यास त्यापासून मोठा चमत्कार होतो. जसें कोणी एका गृहस्थाकडे दुसरा गृहस्थ सहज आला असतां पहिला गृहस्थ चाकरास ह्मणाला. अरे. या गृहस्थास बसावयास पाट आण. त्यावर दुसऱ्या गृहस्थानें. नको, पाट कशास पाहिजे, भुईसपाटच आहे, असें सश्लेष उत्तर केलें. या असल्या श्लेषापासून मौज वाटते."

वरील लेख सगळा वाचला असतां त्यांतील अभिप्राय कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखा आहे. तो 'कितीएक वेळां' वाचूनहि आमच्या प्रतिपक्ष्याच्या 'कधींहि' मनांत आला नाहीं या गोष्टीचें आह्मांस नवल वाटतें. 'या लिहिण्याचा कटाक्ष संस्कृतांतील जीं श्लेषात्मक काव्यें आहेत त्यांवर असावा असें स्पष्ट दिसतें.'—असें रा. कानेटकर यांचें ह्मणणें आहे. पण हें केवळ निराधार होय. एकंदर निबंधाचें स्वरूप जर ते ध्यानांत आणतील, व जागोजागचे उल्लेख पहातील, तर त्यांस स्पष्ट दिसून येईल कीं, 'वाक्यांतले अलंकार' या धड्यांत संस्कृत कवितेचा ग्रंथकारानें कोठेंहि संबंध आणलेला नाहीं. 'अनकविद्यामूलतत्त्व' हा ग्रंथ इंग्रेजींतील 'कोर्स आफ रीडिंग' नामक ग्रंथावरूनच प्रायः रचलेला आहे; व त्या ग्रंथांत 'फिगर्स् आफ स्पीच' ह्मणून इंग्रेजी भाषेंतील अलंकारांवर एक धडा आहे तेव्हां त्याच नमुन्यावर मराठी कवींतलीं उदाहरणें घेऊन वरील मराठी धडा रचलेला आहे हें उघड आहे. अलंकारशास्त्राचा विषय संस्कृतांत असल्यामुळें उपमा, रूपक, श्लेष वगैरे जुनीं नांवें आयतींच मराठींत घेतलीं आहेत, व त्यांपैकीं कित्येकांचा संस्कृतावरून सामान्यतः अर्थोदरवा प्रचारहि आहे. संस्कृतांत ज्यांस नांवें नाहींत, व इंग्रजींत आहेत, असे दोन तीन नवेहि अलंकार सामील केले आहेत; जसें, विरुद्धगुणन्यास (Antethesis) चेतनगुणोक्ति (Personification) इत्यादि. कोठें कोठें संस्कृत अलंकारांस मराठी कवितेंत उदाहरण न सांपडल्यामुळें ग्रंथकारास स्वतःचीं गद्यमय उदाहरणेंहि घालावीं लागलीं आहेत; व परशुरामपंत गोडबोले यांच्या भाषांतरांतलीं उदाहरणें घेतलीं आहेत. तेव्हां वरील सर्व गोष्टींवरून विचार करतां हें उघड दिसणारें आहे कीं, प्रस्तुत पाठ हा केवळ मराठी भाषेच्या संबंधानेंच रचलेला आहे; त्यांत संस्कृत काव्याविषयीं उल्लेख करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. यास्तव वादविषयक लेखांत श्लेषालंकाराच्या प्रासंगिकत्वाविषयां जें विवरण केलें आहे तें सर्व मोरोपंतासच लागू आहे हें उघड आहे.

आतां 'साधारण कवि' हे शब्द मोरोपंतासच उद्देशून लिहिले आहेत कीं नाहींत याविषयीं विचार करावयावा. आमच्या आक्षेपकाच्या मनें वरील निंदाद्योतक शब्द संस्कृत कवींकडे लावायाचे. ही कल्पना स्वतंत्ररीत्या विचार करतां सयुक्तिक आहे

खरी; कां कीं, संस्कृतांत श्लेषाचें बंड फार आहे; व विशेषतः अर्वाचीन कवींनीं तर पाहिजे तेथें श्लेषाची योजना केलेली आढळते. श्लेष ह्मणजे सरस्वतीचें सर्वस्व होय ही कल्पना बहुतेक अर्वाचीन संस्कृत काव्यावरून होणारी आहे.[1] पण ही कल्पना एरवीं कितीहि ठीक असली तरी प्रकृत लेखाला ती मुळींच जुळण्यासारखी नाहीं. एक तर सदरील निबंधांत केठेंहि संस्कृत कवींविषयीं किंवा काव्याविषयीं मुळींच उल्लेख केलेला नाहीं यास्तव तो येथेंच तेवढा केला असेल हें ह्मणणें शोभत नाहीं. शिवाय दुसरें असें कीं, एकंदर संदर्भावरून पहातां श्लेषाच्या संबंधाने लिहिलेला सर्व मजकूर वर दाखल केलेल्या उदाहरणावरूनच ग्रंथकाराच्या मनांत आलेला असावा ही कल्पना करणें अगदीं सयुक्तिक आहे. या प्रकरणीं कोणास संशय असेल तर तो प्रस्तुत निबंधांतील दुसऱ्या एका लेखावरून निघण्यासारखा आहे. हा लेखहि वरच्यासारखाच प्रसंगोपात्त आहे—

"दोन तीन अक्षरें सन्निध असून, ज्या क्रमानें संनिद्ध असतील त्याच क्रमानें त्यांची आवृत्ति असली ह्मणजे यमक होतें. जसें;

कड्यावरुनिया उड्या प्रथम टाकुनी त्या गड्या
गडे पशुप भेटती, तटतटा भुजा आंगड्या
फुगोनि तनु फाटती; मणगटों कडीं दाटती;
सुखें बहुत वाटती; विरहसिंधुतें आटती.

वामन.

या स्थलीं पहिल्या चरणांतील शेवटच्या दोन अक्षरांची आवृत्ति दुसऱ्या चरणाच्या अंतीं, व तिसऱ्याच्या शेवटच्या अक्षरांची आवृत्ति चवथ्या चरणाच्या अंतीं आहे; यास्तव येथें यमकालंकार खाहें. या अलंकाराचीं व मागच्या अलंकाराचीं वामन पंडित, मोरोपंत वगैरे सर्व महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांत हजारों उदाहरणें सांपडतील. या अलंकारापासून चमत्कार वाटण्यास वाक्याचा अर्थ समजावा लागत नाहीं, नुसत्या ऐकण्यानेंच आनंद होतो, यास्तव अज्ञान लोकांत यांची फारच चहा असते, विद्वान् व रसिकजन यांत यांचें तादृश माहात्म्य नसतें. ते यांस गौण मानितात; तथापि अर्थ दुर्बोध न होतां सरस राहून जर शब्दालंकार काव्यांत आले, तर त्यांहीकरून त्यास विशेष रमणीयता येते, यांत संशय नाहीं."

वरील मजकूर मराठी कवींस अनुलक्षून लिहिला आहे कीं संस्कृत कवींच्या संबंधानें लिहिला आहे याविषयीं कोणाच्या मनांत शंका येईल काय? आतां हें खरें

---

१. उदाहरणार्थ सुबंधु कवीची पुढील प्रतिज्ञा पहा—

सरस्वतीदत्तपरप्रसादः चक्रे सुबंधुः सुजनैकबंधुः ।
प्रत्यक्षश्लेषमयप्रबंध– विन्यासवैदग्ध्यनिधानबंधनम् ॥

आहे कीं, वस्तुतःच विचार केला तर तो संस्कृत कवितेलाहि लागण्यासारखा आहे. पण संस्कृत कवितेस लागेल तितपत इंग्रेजी व फारशी कवितेलाहि लागणार आहे हें उघड आहे. तथापि ग्रंथकर्त्याचा रोख केवळ मराठी कवितेकडेच आहे. किंवा निदान मुख्यतः तरी आहे, असें झटलें असतां 'बळेंच ओढून ताणून अर्थ केला'—सें होईल असें वाटत नाहीं.

वरील कोटिक्रम हा केवळ अंतःप्रमाणावरून झाला, झणजे ग्रंथांतल्या ग्रंथांतच जें प्रमाण सांपडलें त्यावरच केवळ निर्वाह करून केला. पण बाह्यप्रमाण जें आमच्यापाशा आहे तें तर वरच्याहूनहि अत्यंत सबळ आहे. 'साधारण कवि' हा प्रयोग केवळ मोरोपंतासच उद्देशून केलेला आहे याविषयीं आह्मीं तर कधीच संशयांत पडलों नाहीं, व ज्यांचा आमच्या वडिलांशीं बरेच दिवस सहवास घडला असेल तेहि कधीं पडणार नाहींत. प्रस्तुत मराठी कवींचें नांव कधीं त्यांच्यापाशीं निघालें, आणि बिचाऱ्या कवीला कांहीं तडाखे बसले नाहींत, असें आह्मांस तर कधींहि आठवत नाहीं. 'आर्या करणारा', 'पुराणिक', 'भाषांतर करणारा', 'अप्रयोजक कवि' या व अशा सारख्याच पदांनीं नेहमीं मोरोपंताच्या संबंधानें निंदापर अभिप्राय प्रगट होत असत. आमचा प्रस्तुत कवीशीं जो परिचय झाला; तो वरील गुरुमुखानेंच झाला. पण तो केवळ अर्थज्ञानाच्याच संबंधानें, त्या वेळेस हायस्कुलांतून 'नवनीत' चाले, तेव्हां त्यांतील कवितेचा अर्थ आह्मांस समजून घ्यावा लागे; पण या अर्थविवरणाच्या वेळीं, या आर्येची शब्दरचना चांगली आहे, किंवा हें वर्णन चांगलें आहे, वगैरे कोणत्याहि तऱ्हेची प्रशंसा आह्मीं कधींहि ऐकली नाहीं. हें तर काय, पण बहुधा दरएक प्रसंगीं प्रस्तुत कवीची उपहास्यता मात्र होत असे. नाहीं झणायाला, प्रस्तुत कवीच्या वांट्याला एवढी मात्र स्तुति येत असे, कीं त्याच्या कवितेंत अशुद्धतेचा प्रकार कोठेंहि आढळत नाहीं; व जो त्याची कविता समजून घेईल त्याच्यापाशीं संस्कृत शब्दांचा पुष्कळ भरणा होईल. या दोन गोष्टींखेरीज मोरोपंताच्या काव्यांत कांहीं वाखाणण्यासारखें आहे असें आमच्या वडीलांस कधींहि वाटलें नाहीं. त्यांतून रसाविषयीं तर बोलूंच नका. कवित्वाचें परम तत्त्व जो रस तो प्रस्तुत कवीचे ठायीं त्यांस कधींच आढळला नाहीं. एखाद्या कारागीरानें ठाकठिकीनें केलेल्या मातीच्या चित्रांत व खऱ्या बोलत्या चालत्या माणसांत जितकें अंतर तितकेंच मोरोपंताच्या कवित्वांत व खऱ्या कवित्वांत होय हें त्यांचें ठरीव मत असे. कैलासवासी गोडबोले यांची जशी एकंदर मराठा कवितेवर भक्ति असून मोरोपंताविषयीं तर अतिशयितच असे, किंवा भास्कर दामोदर यांनीं आपले उद्गार 'नवनीतां'तल्या निबंधांत जसे प्रगट केले आहेत तसा कांहीं एक प्रकार प्रस्तुत ग्रंथकाराचा नसे. मराठी कवींपैकीं मुक्तेश्वरास मात्र ते मान देत, व रघुनाथपंडिताच्या 'नलोपाख्याना'चा पूर्वार्ध तेवढा त्यांस पसंत असे; तसेंच रामजोशाच्या कवनांतहि

कवित्वस्फूर्ति कांहीं आहे असें ह्मणतांनाहि आह्मीं त्यांस ऐकलें आहे. बाकी अलीकडे ग्रांट साहेबांच्या कारकीर्दीपासून तुकारामाचा जो जयजयकार होऊं लागला आहे तो किंवा इतर कोणत्याहि कवींची तारीफ ते कधींहि करीत नसत. आणि सामान्यतः पहातां महाराष्ट्र कवींविषयीं त्यांचा काय अभिप्राय होता तो आमच्या प्रतिपक्ष्यानें केलेल्या अवतरणावरूनच (शालापत्रक जुलई १८६४) स्पष्ट दिसत आहे !

आतां रा. कानेटकर यांनीं आपल्या तर्फेचा पुरावा ह्मणून जीं कित्येक अवतरणें दाखल केलीं आहेत त्यांच्या योगानें त्यांच्या पक्षास कितीशी बळकटी येणारी आहे हें बहुधा कोणासहि सांगायाला नको. 'वामन, मोरोपंत वगैरे महाराष्ट्र कवि' एवढ्याच शब्दांवरून कवित्वाच्या संबंधाचा निकाल झाला काय? वरील शब्द केवळ लोकप्रवृत्तीस अनुसरूनच योजलेले आहेत हें उघड आहे; त्यांचा वास्तविक अर्थ एवढाच आहे कीं, "वामन, मोरोपंत वगैरे ग्रंथकार, ज्यांस आजपर्यंत लोक 'कवि' ह्मणत आले आहेत." यापेक्षां जास्त अर्थ वरील शब्दांत नाहीं. एवढाच अर्थ न धरला, तर 'कुकवि', 'bad poet' वगैरे शब्दांवरूनहि कवित्व सिद्ध होऊं लागेल. एका उतार्‍यांतील ('एवढाल्या कवीं'चीं) या शब्दप्रयोगावर आमच्या प्रतिपक्ष्यानें कटाक्ष ठेवला आहे; पण वरील अवतरणचिन्हित शब्दांवरूनहि कवित्वाचें प्रमाण मिळतें असें नाहीं. 'एवढाले कवि' या शब्दांचा अर्थ 'असले सर्व प्रसिद्ध कवि' इतकाच ध्यावयाचा हें उघड आहे. वरील उल्लेख केवळ उच्चारपद्धति व लेखनपद्धति यांच्या संबंधानेंच केलेला आहे, कवित्वगुणाच्या संबंधानें नव्हे, हें आमच्या आक्षेपकानें कसें ध्यानांत आणलें नाहीं कोण जाणे !

रा. कानेटकर यांनीं आपल्या पक्षाच्या समर्थनार्थ एक शाब्द प्रमाणहि आणलें आहे. तें ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांचें होय. मोरोपंत हा कवि नव्हे असा जर आमच्या वडिलांचा सिद्धांत असता तर तो त्यांनीं आपल्या शिष्यवर्गाच्या मनांत बिंबवून दिला असता, पण त्यांनीं असें कधींहि केलें नसून आर्या सांगण्याच्या त्याच्या हातोटीची प्रशंसा मात्र आह्मीं ऐकली आहे, असें ते ह्मणतात. आमच्या प्रतिपक्षाचा वरील उल्लेख कितपत यथार्थ होय हें आमच्यानें सांगवत नाहीं. आह्मीं स्वतः जें प्रमेय शेंकडों वेळां ऐकिलें आहे तें नेहमीं तसा प्रसंग असतां ट्रेनिंगच्या मंडळीस कधींच श्रुत झालें नसेल याविषयीं आमचें मन घेत नाहीं. मग वरील प्रमेय वरील मंडळीस दुर्ग्राह्य होय असें वाटल्यावरून त्यावर कधीं विवरण होत नसल्यास न कळे ! मोरोपंत कवि कां नव्हे, कालिदास किंवा शेक्सपीयर यांच्यासंबंधानें मात्र वरील संज्ञा अन्वर्थक कां, हें मनांत भरण्यास, किंबहुना नुसतें लक्षांत येण्यासहि, इंग्रजी किंवा संस्कृत भाषेचें ज्ञान अवश्यक होय. यास्तव त्यांच्या अभावीं वरील खोल पाण्यांत विद्यार्थ्यांस न शिरविणें हेंच बरें अशा समजुतीनें वरील प्रकार कदाचित

घडत असेल. आतां मोरोपंताच्या आर्या सांगण्याची त्यांची धाटणी अनुपम असे हा जो लौकिक आमच्या पत्रकाराने वरील कालेजांतील विद्यार्थ्यांच्या तोंडून ऐकला आहे तो प्रस्तुत वादास मोठासा उपयोगी आहे असें नाहीं. कोणाचीं कोणा ग्रंथकाराविषयीं कांहींहि मतें असलीं तरी त्याच्या ग्रंथांचा अर्थ सुबोध रीतीनें सांगतांना कोणती अडचण पडणार आहे? एखाद्यास 'राजा शिवाजी' हें काव्य अगदीं भिकार वाटलें, ह्मणून त्यास तें विद्यार्थ्यांस समजून देण्यास मोठीशी अडचण पडणारी आहे असें नाहीं.

याप्रमाणें प्रस्तुत वादांतील मुख्य गोष्ट जी प्रकृत वाक्यार्थाची मीमांसा ती झाली. वरील प्रमाणांवरून आमच्या सर्व वाचकांच्या सहज ध्यानांत येईल कीं, 'अनेकविद्यामूलतत्त्वां'तील वादविषयक लेख हा केवळ मोरोपंतासच लागू आहे. आतां वरील निर्णयावरून उत्पन्न होणारा जो दुसरा गौण वाद आहे त्याच्या संबंधानेंहि कांहीं लिहिलें पाहिजे.

हा दुसरा वाद असा कीं, आमचे वडील 'मराठी भाषेचे उत्कृष्ट अभिज्ञ व अत्यंत मार्मिक' असतां प्रस्तुत कवीविषयीं त्यांच्या मनांत एवढी अढी सदोदित कशी राहिली? ज्या मयूरकवीचा 'अपूर्व टाहो'[1] ऐकून आज शंभर वर्षे आबालवृद्ध महाराष्ट्रीय जन मान डोलवीत राहिले आहेत, ज्याच्या कवितारूप 'मदनमंजरी'नें सोलापुरस्थ फक्कड 'कविराया'च्या गळ्यांत माळ घालून त्याच्या हातचा डफ खालीं ठेविला, ज्याच्या वाणीनें परशुरामपंत गोडबोले, भास्कर दामोदर, शंकर पांडुरंग पंडित[2] अशा मंड-

---

१. 'यशोदा पांडुरंगी' या ग्रंथाच्या शेवटीं पुढील आर्या सांपडते. ती कोणीं रचिली असेल ती असो!—

ऐकुनि विश्व सुखावे ज्या केकांचा अपूर्व तो टाहो।
त्याला ईशकृपेनें आयुष्याचा कधीं न तोटा हो॥

२. वरील रसिक व मार्मिक गृहस्थाचें प्रस्तुत कवीविषयीं काय मत असे तें आमच्या आक्षेपकानेंच ६४ व्या अंकांत पत्रद्वारें सादर केलें आहे. बी ए. च्या परीक्षेंत एके प्रसंगीं त्यांचा पुढील प्रश्नहि पाहिलेला आह्मांस आठवतो—

"What was the spirited rejoinder of Bhishma to his preceptor?"

[भीष्मानें आपल्या गुरूला जें बाण्याचें उत्तर दिलें तें कोणतें?]

वरील उत्तर उद्योगपर्व अध्याय १३ यांत आहे. त्याचें स्वरूप पुढील एका आर्येवरूनच लक्षांत येण्यासारखें आहे—

वधिले क्षत्रिय तेव्हां नव्हता हा भीष्म शांतवन समज।
देवाप्ति मागते ते झाले मरणीं करूनि नवस मज॥

वीररसाचे वरच्यासारखे तडाखे जे सदरील कवीच्या ग्रंथांतून जागोजाग आढळतात त्यांवरून पुढील आर्येची सार्थकता भासते—

नायक वीरकवींचा ऐसा होईल काय अन्य कवी॥

ळीस चटका लाविला, व एका रावबहादुरांच्या रूक्ष बुद्धीसहि क्षणभर तन्मय केलें,[१] त्याच्याविषयीं एके ठिकाणींच अत्यंत तिरस्कार व पराङ्मुखता कां दृष्टीस पडावी बरें? त्यांतून विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं, कित्येकांची बुद्धि कितीहि प्रखर असली तरी ती रूक्षत्वास्तव काव्यास्वदनाविषयीं असमर्थ असते,[२] तसाहि प्रकार प्रस्तुत प्रकरणीं लागू होता असें नाहीं. 'पद्यरत्नावलि' ज्यांनीं वाचली असेल, व विशेषतः शेवटला 'विलाप' वाचला असेल त्यांच्या मनाची खात्री असेलच कीं, तें भाषांतर अत्यंत रसावांचून होण्याजोगें नाहीं. पण काय चमत्कार आहे कीं, कालिदास, भवभूति, बाण,

---

१. रा० व० महादेव गोविंद रानडे यांचें महाराष्ट्र कवितेविषयीं विशेष प्रेम असल्याचें कोठें दिसून येत नाहीं. 'केकावलि' हें काव्य तरी प्रसंगविशेषानेंच त्यांस वाचावें लागलेंसें दिसतें. असें असतां त्यांच्या रिपोर्टांत पुढील वाक्य आढळतें—

"The all paramount importance of the sacred story of God's exploits, performed in the course of his various incarnations is described in a succession of fourteen beautiful stanzas at the end."

[तसेंच देवानें निरनिराळ्या अवतारीं जीं चरित्रें केलीं त्यांच्या कथेचें माहात्म्य शेवटीं शेवटीं ज्या चवदा पद्यांत वर्णिलें आहे तीं हृदयंगम आहेत.]

वरील पद्यसमूहांत कवीची प्रतिभा अत्यंत उज्वलता पावली आहे हें कोणासहि सकृद्वाचनीं सुद्धां लक्षांत येणारें आहे!

२. मोठमोठ्या पंडितांचे ठायीं काव्यपराङ्मुखत्व कधीं कधीं दृष्टीस पडतें याविषयीं एका प्रसिद्ध ग्रंथकाराचा येणेंप्रमाणें लेख आहे—

"Men of taste are sometimes disgusted in turning over the works of the anti-poetical, by meeting with gross railleries and false judgments concerning poetry and poets. Locke has expressed a marked contempt of poets; but we see what ideas he formed of poetry by his warm panegyric of one of Blackmore's epics! and besides he was himself a most unhappy poet! Selden, a scholar of profound erudition, has given us *his* opinion concerning poets. 'It is ridiculous for a *lord* to print verses; he may make them to please himself. If a man in a private chamber twirls band-strings, or plays with a rush to please himself, it is well enough; but if he should go into Fleet-street, and sit upon a stall and twirl a band-string, or play with a rush, then all the boys in the street would laugh at him.'—As if 'the sublime and the beautiful' are to be compared to the twirling of

(पुढें चालू.)

बिल्हण, जगन्नाथराय[1] वगैरे गीर्वाण कवींविषयीं ज्या रसिकाची परम भक्ति असे त्याची महाराष्ट्र कवितेविषयीं सामान्यतः पहातां उदासीनवाचीच बुद्धि दृष्टीस पडे. "कालिदास, भवभूतीसारखे तर नकोच,—परंतु यत्किंचित् गोष्टींत तरी यांची बरोबरी ज्यांस करितां येईल, असे सुद्धां कवि मराठींत अद्यापि झाले नाहींत"—या अभिप्रायावर कितीका रसज्ञांची मंजूरी पडेल ती पडो!

तेव्हां प्रस्तुत प्रकरणीं जो अभिप्राय आह्मीं ५९ व्या अंकांतील टीपेंत दाखल केला आहे तोच आह्मांस खरा वाटतो. आमचे वडीलांची बुद्धिमत्ता सर्वोत्कृष्ट होती, व 'अभिज्ञ'त्व, 'मार्मिक'त्व, 'चातुर्य', 'चाणाक्ष'पणा या सर्व गुणांनीं जरी ते विशिष्ट होते, तरी सूर्याचें तेजोनिधित्व व कलंकित्व यांचें सामानाधिकरण्य जसें संभवत नाहींसें नाहीं, त्याप्रमाणेंच वरील सर्व गुणांचें व आह्मीं आक्षिप्त केलेल्या दोषाचें साहचर्यहि केवळ असंभाव्यच मानायाला पाहिजे असें नाहीं. मनुष्यस्वभावाचें ज्यानें बरेंच अवलोकन केलें असेल त्याच्या ही गोष्ट तेव्हांच लक्षांत येण्यासारखी आहे कीं, अगदीं निर्दोष अशी बुद्धि थोडी, प्रायः नाहींच झटलें असतां चालेल. कोणाचे ठायीं एखादी मानसिक शक्ति प्रबळ दृष्टीस पडली, तर तितक्याच मानानें दुसरीचें दुर्बलत्व आढळतें, आणि त्यांतून बुद्धीची समता ह्मणजे निःपक्षपातपणा हा गुण तर बहुधा फारच दुर्लभ.

---

a band-string, or playing with a rush !— A poet, related to an illustrious family, and who did not write unpoetically, entertained a far different notion concerning poets—So pursuaded was he that to be a true poet required an elevated mind, that was a maxim with him, that no writer could be an excellent poet who was not descended from a noble family. This opinion is as absurd as that of Selden's:—but when one part will not grant enough, the other always assumes too much. The great Pascal, whose extraordinary genius was discovered in the sciences, knew little of the nature of poetical beauty. He said 'poetry has no settled object.' This was the decision of a geometrician, not of a poet. "Why should he speak of what he did not understand?" asked the lively Voltaire. Poetry is not an object which comes under the cognizance of philosophy or wit."

—*Curiosities of Literature.*

१. संस्कृत कवींपैकीं वरील मंडळीवर आमच्या वडिलांची विशेष भक्ति असे. बाणभट्टाच्या कादंबरींत मात्र श्लेषाचा प्रयोग उत्तम रीतीचा आहे असें ते ह्मणत असत. जगन्नाथरायाचेंहि काव्य त्यांस अत्यंत मान्य असे.

मनाच्या ताजव्याची दांडी निरंतर समांतर असलेली फारच विरळा आढळते. व ती तशी ठेवण्याबद्दल खबरदारी घेणारी मंडळीहि थोडीच ! आपण तराजू उचलून गिऱ्हाइकाच्या पदरांत माल टाकतों आहों, तर दोन्ही पारड्यांची स्थिति काय आहे या गोष्टीकडे लक्ष देणारे वाग्देवीच्या मुलखांतील वणिक फार थोडे; आणि त्यांतून विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं, गिऱ्हाइकेंहि बहुधा अशी शहाणीं कीं, दांडी कितीहि झुकली तरी त्या बिचाऱ्यांस त्या गोष्टीची बिलकूल पर्वा नाहीं. पदर पसरण्याचें व दाम देण्याचें तेवढे बेट्यांचें काम ! मेकॉले साहेबांनीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वी कलकत्ता मुक्कामीं एक भला जंगी धट लावून एके पारड्यांत आरबी, फारसी व संस्कृत ग्रंथांचे गठ्ठे दुसऱ्या पारड्यांत इंग्रेजी ग्रंथांचे असे घालून लाट साहेब सर विल्यम बेंटींक यांच्या पदरांत कसें चोख माप घातलें, हें यापूर्वी अनेक वेळां आह्मीं सांगितलेंच आहे. वरील तुला करण्यापूर्वी वरील दोघां साहेब बहादुरांनीं धटाचा पासंग तरी पाहिला होता काय ? तो कितपत बरोबर होता हें आतांच्या काळचें एखादें पोरहि सांगेल. मेकॉले साहेबांनीं वरील तुलनेच्या समयीं एका पारड्यांत आपलें इंग्रेजी विद्येचें भारी ज्ञान घातलें असेल खरें; पण दुसऱ्या पारड्यांत बिचाऱ्यास कितीसें वजन पडलें असेल तें असो ! अशाच प्रकारची दुसरी मोठी गम्मत पाहिजे असल्यास तीं आमच्या दक्षिण प्रैज कमिटीची होय. आज तीस वर्षेपर्यंत ही कमिटीहि सरस्वतीच्या मुलखांत पिकणाऱ्या जिनसांचें माप लोकांच्या पदरांत टाकीत आहे. पण मौज काय आहे कीं, तुलाध्यक्ष कोण ? तर मेजर क्यांडी किंवा क्यापटन जेकब ! ह्मणजे ज्या बिचाऱ्यांचें मत एका किंवा अर्ध्या ओळीवर फार करून कधींहि लांबायाचें नाहीं, किंवा कधीं लांबलेंच तर तें आपल्या ठरीव व्याकरणनियमांचा किंवा ठरीव राजनिष्ठेचा वगैरे भंग झालासा आढळल्यासच काय तें. असली बहादर मंडळी नवीन ग्रंथांचा सोक्षमोक्ष काय तो करणार ! असो; तर पक्षपाताचा अभाव हा गुण जगांत वर सांगितलेल्या तऱ्हेनें सामान्यतः आढळतो. त्याचें महत्व फारच थोड्यांच्या लक्षांत येतें, व त्याच्या संपादनार्थ मोठेसे परिश्रम केलेलेहि प्रायः आढळत नाहींत.

त्यांतून गेल्या मन्वंतराचा असा महिमा होता कीं कोणत्याहि विषयावर कसेंहि मत द्यावयाचें झालें, तरी मत देणारास कोणाचा धाक बाळगायाला पाहिजे होता असें नाहीं. अलीकडे विद्येचा प्रसार अधिकाधिक होत चालल्यानें लोकांत शोधकबुद्धि दिवसेंदिवस वाढत चालली आहे. केवळ माना डोलविण्याचे दिवस हळू हळू जात चालले आहेत, तेव्हां वादविषयक लेख लिहितांना व मोरोपंतांविषयींची आपली अवज्ञा प्रगट करतांना प्रस्तुत ग्रंथकारास मोठेसें जड पडलें असावें असें नाहीं. शिवाय नमूद केलेला अभिप्राय अजूनपर्यंतहि विद्वान व मार्मिक ह्मणविणाऱ्या मंडळींतून गेला आहे असें नाहीं; मग त्या बेळेस तर तो किती दृढ असेल हें सांगावयास नकोच.

आतां मोरोपंताच्या काव्यांत श्लेषाचा प्रकार कितीसा आहे व जो क्वचित् आहे त्याच्या योगानें त्याच्या कवितेस कितीसें दुर्बोधत्व आलें आहे, वगैरे गोष्टींचा आमच्या आक्षेपकानें उल्लेख केला आहे; पण त्या सर्व गोष्टी वादविषयक लेख लिहिते समयीं आमच्या वडीलांनीं ध्यानांत आणल्याच असतीलसें आमच्यानें सांगवत नाहीं. एक तर त्यांचीं सर्व विषयांवरील मतें प्रायः मागील मन्वंतरासच अनुसरून होतीं, तेव्हां मोरोपंताची अवहेलना हें त्यांत कलम आलेंच. शिवाय आमचे पत्रकार दुर्बोधत्वाचें जें प्रमाण घेतात तेंहि त्यांस मान्य नव्हतें. जितकी सोप्या शब्दांत कविता असेल तितकी चांगली असें त्यांचें ठरीव मत होतें. या दुर्बोधत्वावर त्यांचा इतका कटाक्ष असे कीं, अलीकडील श्लेषप्रधान काव्यपद्धति त्यांस बिलकूल आवडत नसे. 'भारतचंपू' 'लक्ष्मी-सहस्र' वगैरे ग्रंथांचा ते नेहमीं अधिक्षेप करीत असत. तसेंच ज्यांनीं 'पद्यरत्नावली' पाहिली असेल त्यांच्या सहज लक्षांत येण्यासारखी एक ही मोठी गोष्ट त्या ग्रंथांत आहे कीं, जेव्हां निरुपायास्तव संस्कृत शब्दांचा व समासांचा वरील काव्यांत भरणा करावा लागला, तेव्हां दर एक पानाखालीं भरगच्च टीपा व शिवाय शेवटीं एक निराळा कोश अशी सामग्री सदरील ग्रंथांस जोडावी लागली. तर ही गोष्ट ध्यानांत आणली असतां आमच्या आक्षेपकांस कळून येईलच कीं, जो श्लेष त्यांच्या बुद्धीनें अत्यंत सुबोध होय तो प्रस्तुत ग्रथकारासहि तसाच वाटत होता असें नाहीं. तेव्हां या रीतीनें पहातां वादविषयक आर्येवर सदरील ग्रंथांत जो दोष दिला आहे तो ठीकच आहे.

आतां मोरोपंतानें फारच थोड्या जागीं श्लेषाची योजना केली आहे व श्लेष-प्रयोग ह्मणजे कवित्वचातुर्याची सीमा हें जें अर्वाचीनकाळीं मत निघालें आहे तें प्रस्तुत महाराष्ट्र कवीस अभिमत होतेंसें कोठेंहि दिसत नाहीं, या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. पण त्या कोणाला ? ज्यानें प्रस्तुत विषयावर प्रांजलपणें शोध केला असेल त्याला आमच्या वडीलांचें सामान्यतः सर्व महाराष्ट्र कवींविषयीं व विशेषेंकरून मोरोपंता-विषयीं काय मत होतें तें वर सांगण्यांत आलेंच आहे. शिवाय आह्मांला जातीनें माहीत आहे कीं, त्यांनीं आपण होऊन बुद्धिपुरःसर मोरोपंतांचें काव्य कधींहि वाचलें नाहीं;—मोरोपंतांचेंसें काय, पण कोणत्याहि मराठी कवीचें वाचलें नाहीं. मुक्तेश्वरास जरी ते कवित्वाच्या संबंधानें मान देत, तरी 'नवनीता'च्या बाहेर त्यांचा वरील कवीशीं परिचय होता असें फारसें दिसत नाहीं. ही गोष्ट त्यांच्या लेखांतील जागोजागच्या अवतरणांवरून सुद्धां ध्यानांत येईल. त्यांचें पांडित्य लोकविश्रुतच आहे; तेव्हां त्यास अनुसरूनच त्यांचीं सर्व मतें होतीं. ह्मणजे पूर्वीची बडी शास्त्रीमंडळी घेतली तर त्यांच्या ठायीं पुराणिक, हरदास वगैरे मंडळीविषयीं व प्राकृत भाषेविषयीं जी अवहेलनाबुद्धि दृष्टीस पडते, तीच प्रस्तुत ग्रंथकाराचे ठायींहि आढळत असे.

आमच्या अलीकडील बडद्या विद्वानास जसें मराठी वर्तमानपत्र किंवा पुस्तक हातांत घेणें ह्मणजे अंमळ अप्रशस्तच, किंवा एखाद्या ठिकाणीं कीर्तन चाललें असलें तर तें ऐकणेंहि विद्वत्तेस बट्टा आणणारेंच, त्याप्रमाणेंच जुन्या पंडितांचाहि सामान्यतः प्रकार होता. तेव्हां या रीतीनें पहातां आमच्या वडीलांची महाराष्ट्र वींविषयींची बुद्धि व त्यांची तरफदारी करणाऱ्या प्रस्तुत पत्रकारांचा बुद्धि या दोहोंत अतिशयित अंतर होतें हें उघड आहे. जे महाराष्ट्र कवि आमच्या आक्षेपकास सर्वथा वंद्य होत ते वरील महापंडितास आपणांहून खालच्या पायरीचे वाटत असतील हें उघड आहे. मग अशांच्या कृति कोण वाचीत बसतो ? संस्कृत काव्यें सादर बुद्धीनें वाचतांना व विशेषतः पंडितरायांच्या 'गंगालहरी'त वाहवतांना प्रस्तुत रसिकास आह्मीं शेंकडों वेळां पाहिलेलें व ऐकलेलें आह्मांस आठवतें; पण 'ज्ञानेश्वरी' किंवा 'केकावले', किंबहुना मुक्तेश्वरकृत 'भारतपर्वें', यांत रममाण होतांना आह्मीं त्यांस कधींच पाहिलें नाहीं. हें तर काय, पण वादविषयक कवितेच्या संबंधानें त्यांनीं कित्येक वेळां आमचा निषेधहि केलेला आहे !

तेव्हां प्रस्तुत कवीविषयीं आमच्या वडीलांचा जो अभिप्राय होता तो प्रांजल बुद्धीचा किंवा शोधपूर्वक स्वीकारलेला होता असें नाहीं हें उघड आहे. जॉनसनच्या ग्रंथांत व भाषणांत बिचाऱ्या ग्रे कवीविषयीं जशी सदोदित अवहेलना आढळते,[१] किंवा संस्कृत विद्येचें नांव निघालें कीं, मेकॉले साहेबांच्या कपाळाला तिडीक गेलीच,[२] तसाच

१. वरील ग्रंथकारानें सदरील कवीचें जें चरित्र लिहिलें आहे तें साऱ्या 'कविचरित्रां'त भिकार ह्मणून निवडलें आहे. ज्याच्या अनुपम कृति नवाशिक्यापासून तों थोर थोर पंडितापर्यंत आज शेंदीडशें वर्षें सर्वांस आल्हादप्रद झाल्या आहेत त्यांवर जॉनसनचे अभिप्राय पुढील मासल्याचे आहेत—

"The second stanza, exhibiting Mar's car and Jove's eagle, is unworthy of further notice. Criticism disdains to chase a school-boy to his common-places." *Life of Gray.*

२. मेकॉले साहेबांचें पांडित्यसर्वस्व पुढील वाक्यांत प्रकट होत आहे—

"I believe that the present system tends, not to accelerate the progress of truth, but to delay the natural death of expiring errors. I conceive that at present we have no right to the respectable name of a Board of Public Instruction. We are a board for wasting public money; for printing books which are of less value than the paper on which they are printed was while it was blank; for giving artificial encouragement to absurd history, absurd metaphysics, absurd physics, absurd theology.—"

—*Minute on Education.*

प्रकार प्रस्तुत कवीचा व प्रस्तुत रसिकाचा होता. पहिल्याचें कवित्व सामान्यांतलें आहे असें नाहीं, व दुसऱ्याची रसज्ञताहि साधारण होती असें नाहीं; पण एका कवीनें म्हटलें आहे—

भ्रमन् वनांते नवमंजरीषु
न षट्पदो गंधफलीमजिघ्रत् ।
सा किं न रम्या स च किं न रंता
बलीयसी केवलमीश्वरेच्छा ॥

"भ्रमर हा वनांत विकास पावलेल्या नूतन मंजरींचा सर्वांचा स्वाद घेत असतां एका चंपककलिकेचा मात्र अनादर करता झाला; आतां वस्तुतः पहातां ती म्हणजे रमणीय नाहीं, असें नाहीं व तो भोक्ता नाहीं असेंहि नाहीं; केवळ ईश्वरेच्छा प्रबळ इतकीच गोष्ट !"–सारांश, प्रस्तुत प्रकरणीं वरील समाधानच पतकरिलें पाहिजे; दुसरा उपाय नाहीं.

यापुढें रा० ओक व उमरावतीकर 'शोधक' यांच्या पत्रांस उत्तरें द्यावयाचीं. पण तसें करण्यास आमचें मन घेत नाहीं. कां कीं, एक तर रा० ओक यांचें लांबट पत्र व उमरावतीकरांचें पत्र यांवर आह्मीं आणखी चर्चा चालविली असतां तींत फारसें हांशील असणार नाहीं. आमचें म्हणणें काय आहे, व आमच्या प्रतिपक्ष्यांचा अभिप्राय काय आहे, हें वाचकांस यापूर्वी सविस्तर कळलेंच आहे. यास्तव आतां सदरील प्रकरणीं त्यांनींच तिऱ्हाईतपणें पंचाईत तोडावी म्हणजे झालें. कोणत्याहि विषयाचा ऊहापोह होऊन लोकांस त्यांचें स्वरूप स्पष्टपणें कळावें हाच आमचा मुख्य उद्देश आहे. वरील निर्णय आमच्या तर्फेचा झाला असतां आह्मांस आनंद होणार आहे हें तर उघडच आहे, व तसा होण्याविषयीं आह्मीं पहिल्यापासून खबरदारी ठेवतों हेंहि सहजच आहे, तरी अमकाच निर्णय झाला पाहिजे याविषयीं आमचा बिलकूल आग्रह नाहीं.

रा० ओक यांचीं इतर जीं कांहीं पत्रें आहेत त्यांवर आमच्या कांहीं मित्रांनीं परस्पर उत्तरें दिलींच आहेत. यास्तव त्यांवरहि येथें पुनः चर्चा करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

---

१. आमच्या आक्षेपकांनीं आपल्या पत्राच्या शेवटीं जो एक उल्लेख केला आहे, तो गैरसमजानें केला आहे. अंक ५९ तील लेख जर ते पुनः वाचून पहातील तर 'प्रस्तुत प्रकरणीं' या शब्दांचा संबंध 'मोरोपंतांची कविता' या विषयाकडे नाहीं, हें त्यांच्या लक्षांत येईल असें आह्मांस वाटतें.

निबंधमाला—येथें आमच्या पुस्तकाच्या सहाव्या वर्षाची समाप्ति झाली. यास्तव आजपर्यंतच्या क्रमाप्रमाणें येथें सदरील पुस्तकाच्या संबंधानें व कांहीं अवांतर गोष्टींच्या संबंधानें कांहीं लिहिण्यासारखें आहे तें लिहून एकंदर वर्षाचा कार-भार आटपतों.

प्रथमतः प्रस्तुत पुस्तकाच्या संबंधानें. या संबंधानें पहिल्यापासून जी एक हाका-हाक आहे ती अद्याप मिटली नाहीं. ही अर्थात्च अनियमितपणाबद्दल होय. हिच्या संबंधानें आह्मीं यापूर्वी अनेक वेळां लिहिलेंच आहे, यास्तव पुनः तेंच तेंच वाच-कांस कळविण्यांत कांहीं हाशील नाहीं. आमच्या पुस्तकाचे विशेष काय काय आहेत ते ध्यानांत आणले असतां कोणाच्याहि सामान्यतः लक्षांत येईल कीं, तें अगदीं तारखेच्या तारखेला निघणें ह्मणजे दुरापास्तच होय. या विशेषाचें आह्मीं आजपावेतों कोठेंहि सविस्तर निरूपण केलें नाहीं; पण ज्या अर्थीं आमच्या वाचकांची व प्रतिपक्ष्यांची एका अनियमितपणाच्या दोषाबद्दल आह्मांस वारंवार टोंचणी सोसावी लागते, त्या अर्थीं वरील विशेषांचा या खेपेस स्पष्टपणें उल्लेख करणें अवश्य वाटतें. पुढील निरूपण कोणा कोणाच्या मतें आत्मश्लाघेच्या व परनिंदेच्या सदरांत सामील होईल, पण त्यास आमचा इलाज नाहीं. आह्मांवर दोषारोप करण्याची जी मुभा आह्मीं सर्वांस दिली आहे तीच आह्मांच्या स्वतःच्या तरफद रीकरितां आह्मीं स्वतः घेतली असतां आमच्यावर कोणी हि न्यायी मनुष्य टपका ठेवणार नाहीं. तर आतां वरील विशेषांचा निर्देश करितों.

आमच्या पुस्तकाचा पहिला मोठा विशेष हा आहे कीं त्यांतील सारा मजकूर आह्मांस स्वतःचा नवा बनवावा लागतो. 'वेदार्थयत्न' 'षड्दर्शनचिंतनिका,' माजी झालेला 'कौमुदीमहोत्सव' हीं जशीं व्याख्यात्मक मासिक पुस्तकें आहेत; 'नाट्यकथा-र्णव' हें जसें प्रायः भाषांतररूप आहे; 'काव्येतिहाससंग्रह' हें तर केवळ प्रकाशनरूपच आहे, तसा प्रकार 'निबंधमाले'चा नाहीं. वर सांगितला हा मासिक पुस्तकांचा एक वर्ग झाला. आतां दुसरा पहा; या दुसऱ्यांत सध्यां चालू असणारें 'विविधज्ञानविस्तार' व यापूर्वी बुडालेलीं 'ज्ञानप्रसारक,' 'ज्ञानसंग्रह' वगैरे यांचा अंतर्भाव होतो. या पुस्त-कांतून जरी विषयबाहुल्य आढळतें, तरी त्यांत आमच्या पुस्तकांत वर सांगितलेला मोठा विशेष कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखा आहेच. तो अर्थात हा कीं वरील पुस्त-कांतील बरींच प्रकरणें भाषांतरद्वारा उपलब्ध झालेलीं होत. तर आमच्या पुस्तकाच्या तर्फेनें वरील विशेष अंमळ ध्यानांत आणला असतां आमचें घड्याळ अगदीं तोफेबरोबर कधींच चाललें नाहीं याचें आश्चर्य वाटण्यास कोणासहि जागा रहाणार नाहीं.

त्यांतून वरील पुस्तकांपैकीं कांहीं कांहीं काळपर्यंत मुद्दाम बंद पडून पुनः चालू करावीं लागलीं अशीं आहेत, व बहुतेकांस तीन तीन चार चार किंवा अधिक महिन्यांचाहि गोता वेळोवेळीं बसलेला आहे, व अजूनहि बसतच आहे, हेंहि शोध केला असतां

कोणासहि समजणार आहे.[1] तशीच हीहि एक लहानशी गोष्ट आमच्या आक्षेपकांनां मेहेरबानी करून जरा ध्यानांत आणण्यासारखी आहे, कीं आमचा आजपर्यंतचा हा सारा उद्योग केवळ एकट्याचा आहे !

आमच्या पुस्तकाचा दुसरा मोठा विशेष हा होय कीं, त्यांत लौकिक विषयांवर कधींहि विवरण असत नाहीं. जगांत घडणाऱ्या घडामोडींविषयीं किंवा सामान्यतः आढळणाऱ्या लोकस्थितीविषयीं निबंधरचना करणें झाल्यास तें काम सुलभतेचें आहे हें उघड आहे. कां कीं झालेल्या गोष्टींची हकीकत लिहिणें किंवा लोकांत साधारणतः ज्या विषयावर सहस्रश ऊहापोह झालेला ऐकण्यांत किंवा वाचण्यांत येतो त्यावर निरूपण करणें हें काम मोठ्याशा श्रमाचें आहे असें नाहीं. पण आमच्या पुस्तकांतील विषय व त्यांच्या निरूपणाचा प्रकार हीं दोन्ही वेगळीं. आमचे विषय प्रायः सर्व ग्रांथिक असून त्यांचें निरूपणहि ग्रंथकारांच्या पद्धतीस अनुसरूनच केलेलें असतें. ह्मणजे कोणताहि विषय घेतला तरी त्याचें प्रथमतः स्वरूपवर्णन, नंतर त्याचे विभाग, मग एकेकावर क्रमशः निरूपण, शेवटीं उपसंहार, असा प्रकार असतो. शिवाय जागोजाग विषयाच्या विशदीकरणार्थ भरपूर टीपाहि असतात. तेव्हां ही पद्धति अंमळ लक्षांत घेतली असतां इकडूनहि अमची तरफदारी थोडी होणारी आहे असें नाहीं. जे अशी अपेक्षा करितात, कीं वर्तमानपत्र जसें सकाळचें असलें तर सकाळीं, संध्याकाळचें असलें तर संध्याकाळीं, असें अगदीं ज्या वेळेच्या त्या वेळेवर निघत असतें, त्याप्रमाणेंच मासिक पुस्तकानेंहि पाहिली तारीख चुकूं देतां कामा नये. त्या बिचाऱ्यांस मासिक पुस्तकांची योग्यता व स्वरूप हीं दोन्ही कळत नाहींत असें ह्मटलें पाहिजे. 'निबंधमाला' व 'विविधज्ञानविस्तार' हीं मासिक पुस्तकें आणि 'प्रेक्षक' व 'विनोद' हीं वर्तमानपत्रें जो सारख्याच दराने लेखील तो अंधेर नगरीचें राज्य करण्यासच योग्य ह्मटला पाहिजे ! बिचारीं 'प्रेक्षकें' इतक्यांतच किती बरें 'साखरावगुंठित' होऊन बसलीं असतील ! त्याप्रमाणेंच 'इनोदा'चेहि किती गट्टे आताराच्या कामीं पडून आपल्या प्रकाशकाची कीर्ति जगांत उधळतील हें कोण सांगेल ? वर्तमानपत्रांचा आयुर्दाय ह्मटला ह्मणजे सरासरी तो दिवस, किंवा पराकाष्ठा ह्मटली ह्मणजे तो आठवडा; खुद्द 'टाइम्स'हि बाळंतिणीच्या खोलीच्या खिडकीला डकवलेला किंवा हिंगाजिच्याशीं सामील झालेला कोणीं पाहिला नसेल ? तर ज्या वर्तमानपत्रांचें असें क्षणिक आयुष्य तीं कोणीकडे, आणि कधीं काळीं 'स्वकपोलकल्पित' शब्दाची योजना केली तिच्याबद्दल आज पृष्ठांचीं पृष्ठें वाद माजावा इतकी ज्यांतील लेखांचो लिहिणारावर जोखीम

१. 'वेदार्थयत्ना'चा परवा डिसेंबरचा अंक निघाला, 'षडदर्शनचिंतानके'चा जानेवारीचा निघाला, 'नाट्यकथार्णवा'चा अश्विनमासचा निघाला, 'विविधज्ञानविस्तारा'चा अद्याप नोवेंबरचा निघायाचा आहे.

रहाते, तीं मासिक पुस्तकें कोणीकडे ? याप्रमाणेंच भाषाशुद्धतीचा वगैरेहि विचार करण्यासारखा आहे. मासिक पुस्तकांतून लेख प्रसिद्ध करावयाचा तर तो लवकरच गबाळांत दाखल होण्यासारखा नसल्यानें त्यांत शब्दांची मांडणी, वाक्यांची जुळणी, विषयाची ठाकठिकी, वगैरे गोष्टींकडे किती लक्ष पुरविणें अवश्य असतें हेंहि कोणाहि समंजस मनुष्याच्या लक्षांत तेव्हांच येऊन चुकणारें आहे. सारांश, प्रस्तुत प्रसंगाच्या संबंधानें 'इसापनीती'तील 'कोल्ही व सिंहीण' ही मार्मिक गोष्ट आमच्या वाचकांनीं लक्षांत आणावी.

आतां आमच्या आक्षेपकांपैकीं कोणी कदाचित म्हणतील कीं वरील मजकूर सर्व खरा आहे, पण विलायतेंतील मासिक पुस्तकें व त्रैमासिक पुस्तकें वेळच्या वेळेवर निघतात कीं नाहींत ! मग त्याप्रमाणेंच एतद्देशीय पुस्तककारांनींहि का व्यवस्था ठेवूं नये ? या प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत आहे. तें हेंच कीं, आमचें हिंदुस्थान विलायत बनण्यास अद्याप बराच अवकाश आहे. तर तोंपर्यंत दम खाऊन मग वरील चुणचुणीत आक्षेप काढणारांनीं काढावे. जी इंग्रेजी भाषा आज कित्येक शतकें महत्प्रावधि महान् महान् ग्रंथकारांनीं परिश्रम करून आशियांत कमावून ठाकला आहे व जींत आतां हवा ता विचार, हवी ती कल्पना, हव्या तितक्या तऱ्हेनें अनायासें व्यक्त करितां येते, त्या भाषेची गोष्ट कोणीकडे; आणि जी भाषा आजपर्यंत अडाणी लोकांची म्हणून जुन्या व नव्या पंडितांच्या अवहेलनेस पात्र झाली होती व जी ग्रंथकारांच्या उपयोगीं पडूं लागून कांहीं वीस पंचवीस वर्षें झालीं न झालीं ती कोणीकडे ! त्यांतून अलीकडील विद्वज्जनांचा स्वभाषेवर भक्ति किती आहे म्हणाल, तर हींत मोठमोठे विचार व्यक्त करण्याचें मुळींच सामर्थ्य नाहीं, व हीं गांवढळ लोकांच्याच उपयोगी, हेंच तिच्याविषयीं नुकतें नुकतें बहुमत ठरल्यासारखेंच होतें ! तेव्हां नुसत्या भाषेच्याच संबंधानें विचार केला तर सध्याच्या इंग्रेजी व मराठी भाषेंत तफावत म्हटली म्हणजे आगगाडीच्या लोखंडी सडकेंत व डोंगराळ प्रदेशांतील चेवाड वाटेंत जितकी आढळेल तितकी होय. ग्रंथरचनेचें बाह्य स्वरूप जी भाषा तिची ही नुसती गोष्ट झाली. आतां अंतःस्वरूप जे विचार त्याच्या संबंधानें पाहिलें असतां इकडूनहि इंग्लंड व हिंदुस्थान यांत थोडा फरक आहे असें नाहीं. तिकडे अगोदर पूर्वीचा जमलेला ग्रंथसंग्रह किती आहे याचा कोणीं कधीं विचार केला आहे काय ? तसें इकडे अद्याप काय आहे ? नुसतीं ग्रंथरचनेचीं साधनेंच तिकडे किती आहेत बरें ! किती का प्रकारचे कोश, कितीका तऱ्हेचीं माहितीचीं पुस्तकें, पुस्तकालयें किती, सभा किती, पुस्तकांची किंमत किती स्वल्प ! वरील सर्व गोष्टींचें इकडे आजच्या घटकेला तर सर्व प्रकारें वैगुण्यच आहे. पण इतकें तरी दूर कशाला ? नुसत्या छापखान्यांचीच व्यवस्था तिकडची व इकडची पहा म्हणजे झालें ! आमच्या इकडे प्रिंटरपासून तों बाइंडरपावेतों किती विद्वान मंडळी

असते, आपापल्या कामांत त्यांची दक्षता किती वाखाणण्यासारखी असते, याविषयीं छापखान्याचा थोडाबहुत ह्मणून ज्यास अनुभव असेल तो सुद्धां खासें सर्टिफिकिट देईल ! ग्रंथकारानें विणून तयार केलेलें कांरें सणंग कंपाजिटर, करेक्टर, प्रिंटर, इतक्या खाशा मंडळीच्या हातांखालून जाऊन शेवटची स्वच्छ परीटघडी निपजेपर्यंत किती हापटाधोपट करावी लागते, व किती साबण खराब करावा लागतो, याची कल्पना तरी आयता कपडा अंगावर घेणारास होते काय ? तर आमच्या वाचकांपैकीं ज्या ज्या मंडळीस आमच्या पुस्तकाच्या अनियमितपणामुळें उद्वेग प्राप्त होत असेल त्यांनीं वरील कांहीं गोष्टी मनांत आणाव्या, व मुद्रणाकांत तयार होणारा पदार्थ पात्रावर आला असतां तो चटकावून टाकण्यास जितका वेळ लागतो, त्यापेक्षां आंत सिद्ध होण्यास पुष्कळच वेळ लागत असतो या प्रत्यहींच्या अनुभवाकडे अंमळ लक्ष पुरवावें. त्यांतून वरील खाद्य चांगलें पक्कें तयार होऊन खासें खुसखुशीत उतरावें, अशी जर भोक्त्यांची इच्छा असेल तर त्यांनीं तीन आण्याच्या खाणावळींतल्या भोजनभाऊंप्रमाणें घर डोक्यावर घेण्याचा उद्योग करूं नये. त्यांनीं पाहिजे तर एवढा शोध ठेवावा, कीं आपले सूपकार हे चुलीवर अक्षता टाकून महानसांत सुखेंकरून शयन करताहेत, का वसंतसेनेच्या वाडयांतील पांचव्या चौकांत बुभुक्षु विदूषकाच्या नजरेस जो प्रकार पडला तसा चालू आहे ? तसें केलें असतां पहिला प्रकार आढळण्यांत येईल असें नाहीं. जो अग्नि एकदां सिद्ध झाला तो अद्याप जशाचा तसाच चालू आहे, त्यास अगदीं खळ नाहीं, त्याच्या पोषणार्थ लांकडांचे भारे वरचेवर येऊन पडताहेत, मसाल्याचीं पाळीं गच्च भरलीं आहेत, वरचेवर फोडणीचा चरचरीत प्रयोग होतोच आहे, हींच हालहवाल वरील प्रेक्षकाच्या दृष्टीस पडेल अशी आमची खात्री आहे. आतां कित्येक सूपशास्त्रज्ञांनीं आह्मांस कित्येक वेळां अशी इशारत केलेली आहे खरी, कीं तुमच्याकडून नेहमीं जो उशीर होतो त्यापेक्षां तुह्मीं एकदम खंडी व अर्धीखंडी लांकडें चुलाण्यांत कोंबून एकदम धडाड जाळ करून मागला वचपा एका सपाट्यासरसा काढून टाकाना ? गेल्या वर्षीं मंडूकप्लुति करून तुह्मीं जें लघुत्व पतकरलेंत, त्यापेक्षां चिंचवडी धबडगा करून एक दोन भले खासे बत्ते उतरून लोकांची कूरकूर मिटवावीत कीं नाहींत ? वरील वक्रोक्ति आमच्या हिताच्या हात्या खऱ्या, पण आह्मीं त्यांच्याकडे कां दुर्लक्ष केलें याचें कारण कोणाहि मर्मज्ञाच्या तेव्हांच लक्षांत येण्यासारखें आहे. तें हें कीं, अग्निमहाराज हे पाकनिष्पादक खरे, पण त्यांच्या तरी तब्येतीनेंच घेतलें पाहिजे. कोणी त्यांच्यावर जबरदस्ती करूं ह्मणेल, किंवा त्रैराशिकाच्या मापानें त्यांच्यापासून काम घेईन ह्मणेल, तर बिलकूल चालायाचें नाहीं. ब्रह्मदेवानें पदार्थमात्राच्या संबंधानें जे नियम एकदां लावून दिले आहेत ते त्यांसहि अलंघ्य होत ! तर पदार्थ विशेष सिद्ध व्हावयास जो काळ अपेक्षित आहे त्याचा संक्षेप

करूं पहाणें, हें अत्यंत असमंजसपणाचें लक्षण होय. त्यांतून भोक्त्या मंडळीस आपल्या शरीरप्रकृतीची जर काळजी असेल तर अंमळ उशिरि झाल्यापासून जी पीडा होणार आहे तिजपेक्षां अपक्व अन्न विशेष जाचणारें आहे, हेंहि त्यांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. सारांश, मासिक पुस्तकाचें काम लोकांत यथार्थ ज्ञानाचा प्रसार करण्याचें व भाषाभिवृद्धि करण्याचें होय; तर या मुख्य उद्देशाकडे जो नजर देईल व आपलें कर्तव्य चोख रीतीनें बजावूं पाहील त्यानें सांगकाम्याप्रमाणें बाराची तोफ धडकल्याबरोबर हातांतली पाटी खालीं टाकून द्यावी, व 'दिवस बुडाला आणि मजूर उडाला' या म्हणीप्रमाणें अलगरजीपणा दाखवावा हें आह्मांस तर अत्यंत लज्जास्पद वाटतें. काम चोख होऊन तें वेळच्या वेळेवरहि होईल तर फारच उत्तम हें तर उघडच आहे; पण तें आपल्या मनाजोगतें न होतां नुसतें घडघाळाच्या ठोक्याबरोबर मात्र होतें आहे तर तें कांहीं उपयोगाचें नाहीं, व तो कारागीरहि कुचकामाचा, अशी आमची तर समजूत आहे !

तर याप्रमाणें प्रस्तुत पुस्तकाच्या अनियमितपणाच्या संबंधानें जें आमच्या वाचकांस कळविणें उचित होय तें कळविलें. वरील उल्लेख यापूर्वीहि कित्येक वेळां केलेलाच होता, पण इतका स्पष्टपणें कधींहि केला नव्हता, तो प्रस्तुत समयीं तसा प्रसंग प्राप्त झाल्यामुळें एकदां सरते शेवटचा ह्मणून केला आहे. तर आमचे आक्षेपक तो ध्यानांत धरतील, व यासंबंधानें पुनः लिहिण्याची आह्मांस तसदी देणार नाहींत व आपणहि घेणार नाहींत अशा आशा आहे.

तेव्हां प्रस्तुत प्रकरणीं आमचा एकंदर अभिप्राय असा आहे कीं, आमच्याकडून होईल तितकी जलदी आह्मी करीतच असतों, व पुस्तकाच्या नियमितपणापासून वाचकांस आणि विशेषतः पुस्तककारांस किती फायदा होण्यासारखा असतो हेंहि आह्मी पूर्णपणें समजतों; पण नियमितपणा साधून जर विषयनिरूपण यथास्थितपणें होत नाहीं, किंवा एखादी टीप एखादें पुस्तक वेळेवर न मिळाल्यामुळें लिहावयाची रहात आहे; तर आमच्या आक्षेपकांनीं कितीहि हाकाटी केली तरी तिजकडे आमचें बिलकूल लक्ष जाणार नाहीं. जे नियमितपणाचे एवढे चाहते असतील, कीं पहिली तारीख उजाडली न उजाडली कीं नवा अंक बाहेर पाडावा, आणि असें होईल तरच तें मासिक पुस्तक, त्यांचें समाधान आमच्याकडून होण्याचा विशेष संभव नाहीं; व हें आह्मांस पहिल्यापासूनच माहीत असून त्याविषयीं पहिल्याच अंकाच्या बेष्टनावर आह्मीं सुचवूनहि ठेवलें होतें. आतां हें खरें आहे कीं, आमच्या पुस्तकाची सन १८७८ सालापासून तर फारच अव्यवस्था झाली; पण तिजबद्दल आह्मांवर रास्तपणें कितपतसा दोष येईल हें कोणीहि सांगूं शकेल. खरोखर पहातां त्या सालीं व पुढें हें पुस्तक मुळीं बंदच पडावें अशी त्या वेळची स्थिति होती. पण तसल्या कचाट्यांतूनहि आह्मी पार

पडून सदरील पुस्तकास पुनः पहिल्याप्रमाणें सुरळीत रस्ता लागला हीच अगोदर भाग्याची गोष्ट ह्मणायाची ! अलीकडे विद्याखातें दिवसेंदिवस किती शहाणें होत चाललें आहे. त्यांत शहाण्या लोकांची कितपत बूज रहात आहे, प्रतिवर्षी काय काय नवे नवे आक्ट पसार होत आहेत, वगैरे गोष्टींचा जो क्षणभर विचार करील त्यास आमची त्या वेळची स्थिति लक्षांत आणण्यास फारसे आयास पडणार नाहींत. येथील छापखान्यांची व्यवस्था किती उत्तम प्रकारची असते याविषयींहि आह्मीं वर उल्लेख केलाच आहे; मग छापखाना एकीकडे, लिहिणारा एकीकडे, व्यवस्थापक एकीकडे, अशी त्रिस्थली झाल्यावर तर काम किती चोख उठणार आहे हेंहि सांगायाला नकोच ! पण सुदैवानें हल्लीं मागील व्यवस्थेचीं कारणें सर्व नाहींशीं झालीं आहेत. आमचें इतःपर स्थानांतर करण्याचें सामर्थ्य कोणामध्येंहि राहिलें नाहीं; आह्मांस या पुढें हेडमास्तरांची रिमार्क, इनस्पेक्टर साहेबांचा रिपोर्ट, किंवा मेहेरबान डायरेक्टर साहेबांची ऑर्डर यांपैकीं कशाचाहि तिळमात्र सुद्धां धाक बाळगण्याचें कारण उरलें

---

१. डायरेक्टर साहेब बहादुरानीं नुकताच गुजराथेंत एक वक्तृकुल कोणता सोडून दिला आहे तो आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस श्रुत झाला असेलच. तो हा कीं, कोणी मास्तर खाजगी रीतीनें कोणास शिकविण्याचें पतकरील तर विद्याखात्याच्या कामास पडणार नाहीं. मास्तरांनीं आपलें तन मन धन आपल्या सरकारी शाळेंत अर्पण केलें पाहिजे, दुसऱ्या यजमानाची मजुरी त्यांनीं पतकरतां कामा नये. वरच्याप्रमाणें 'अव्यभिचारिणी भक्ति' ज्या मेहरबानांनीं आज्ञापत्रद्वारें प्रतिपादन केली त्यांच्या कर्णपथावर पुढील गर्जना अद्याप आलीच नसेल काय ?

"But during the time, this was not the only work I had to do. I was engaged, for five hours a day, in administering a large school consisting of more than 500 young men. The administration of a large High School, and this in a town like Poona, is not an easy task. Again, I had already undertaken editing and annotating on the systems of Indian philosophy in my "Studies in Indian Philosophy," a monthly periodical. This engaged me from day to day at least for three hours. When these circumstances are examined, the reader will realize the difficulties of my position."

—*M. M. Kuntè's Vicissitudes.*

पण स्क्रिप्ट साहेबांचें एक सर्वप्रसिद्ध सुभाषित आहे; तेंच यथें समाधानार्थ घेतलें पाहिजे—

"कायदे—कायदे हीं कोळ्यांचीं जाळीं होत, त्यांत माशांप्रमाणें साधे भोळे जे कोणी असतात, ते मात्र बिचारे गुंततात. पण गांधील माशांप्रमाणें जे अस्सल पटाईत असतात, ते त्यांतून तेव्हांच निसटून जातात !" (मधुमक्षिका—पृष्ठ १७).

नाहीं. एलिफास साहेबांनीं[1] आतां कितीहि टकरा मारण्याचा आव घातला तरी त्यांची मस्ती जिरवण्यास आह्मांपाशीं अलीकडे पुष्कळ साधन झालं आहे. त्यांस 'केसरी'चें दर्शन करविलें किंवा 'मराठ्या'चा भाला अंमळसा चमकावला ह्मणजे काम झालें! पूर्वी शाळाखात्याच्या काबाडकष्टाखालीं व पंजाबी कानूखालीं आमचें ग्रंथवाचन हवें तसें होत नसे; दरवर्षीं पांचपांचशें रुपयांचीं बुकें आणून कपाटांची व कसरीची धन करावयाची, पण वरील गंजींतली एखादी कार्डाहि कोणीं चावली कीं पुरे, तो लागलींच निमकहराम ठरायाचा, या वेडगळ काचांतून आह्मी सुटलों. आतां इंग्रेज ग्रंथकार, संस्कृत ग्रंथकार, व मराठी ग्रंथकार आहेत आणि आह्मी आहों! तिसरा कांटा ह्मणून आतां कोणताहि उरला नाहीं. याप्रमाणेंच आजपर्यंत आह्मांस भाड्याचा रथ आणून युद्धप्रसंग करण्याची जी पाळी येत असे, तीहि स्थिति जाऊन आतां आमचा स्वतःचा खासा रथ पूर्णपणें सज्ज होत आहे; व आजपर्यंत मार्गाची जी विषमता असे तीहि आतां बहुतेक वर सांगितल्याप्रमाणें नाहींशी झाल्यासारखीच आहे. तेव्हां यापुढील मार्गक्रमण सुखाचें होईल असा अजमास दिसत आहे. या उपर काय होईल तें पहावें!

वर जें आह्मीं आपल्या वाचकांस आश्वासन दिलें आहे त्याच्या दृढीकरणार्थ कांहीं भ्रमाचा निरास करणेंहि येथें अवश्य वाटतें. हे भ्रम दोन तीन प्रकारचे आहेत. एक हा कीं, आमच्या लेखणीनें आजपर्यंत साठ सत्तर मजली मारल्या, तेव्हां साठ-सत्तरीच्या उमरींत जसें मनुष्य थकतें, त्याप्रमाणेंच आमच्या घड्याळाचाहि कांटा आतां रेंगाळायाला लागला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ही कल्पना वस्तुस्थितीशीं कितपत जमते आहे याविषयीं बहुधा आमच्या कोणच्याहि समंजस वाचकास कांहीं सांगावयास नको. नुसत्या दूरच्या दुरून ज्यांनीं कांहीं तरी कल्पना लढवाव्या त्यांचा हा वेडगळ तर्क दिसतो. अवघी सृष्टि व लोकव्यवहार ही किती अपरंपार विषयांनीं भरलेलीं आहेत, इंग्रेजींत ज्ञानाचें केवढें थोरलें कोठार आहे, संस्कृतांतील व महाराष्ट्र भाषेंतील सामग्री तरी केवढी आहे, या सर्व गोष्टी जो मनांत आणील त्यास वरील कल्पना किती कोती व मूर्खपणाची आहे हें तेव्हांच कळून येणारें आहे. आमची एकट्याचीच काय, पण आमच्याप्रमाणें सहस्रशः लेखण्या जरी आणखी चालू झाल्या तरी शतकांचीं शतकें विषय खल्लास व्हावयाला नकोत. असा अनंतपार सागर वर सांगितल्याप्रमाणें भरून राहिलेला आहे! या भूमंडळाला वेढून राहिलेला जो रत्नाकर

१. 'एलिफास' या सहीचें एक अप्रयोजक पत्र बॉम्बे ग्याझिटच्या ता० ३ आक्टोबर १८७३ च्या अंकांत आलें होतें. वरील शब्दाचा अर्थ 'हत्ती' असा आहे. या आक्षेपकाचा कोटिक्रम किती दुर्बल होता हें पहाणें असल्यास अंक ३६ पहावा. त्यांत त्याचें खंडन केलेलें आहे.

त्यांतून आज हजारों वर्षें रत्नें काढण्याचा सपाटा चालू असतांहि त्यांचें रत्नाकरत्व जसें अद्याप अविच्छिन्नच आहे, किंवा इंद्राचे असंख्य हत्ती जरी प्रतिवर्षी त्यास शोषून साऱ्या जगाचा संताप जलासारानें दूर करतात तरी त्याच्या जलाधित्वास जसा ढका नाहीं, त्याप्रमाणेंच आमच्या पूर्वजांचीं भांडारें आह्मीं कितीहि लुटलीं, व इंग्रेजांचा अर्थसंचय आटवून इकडील टांकसाळा कितीहि सुरू केल्या, तरी वरील निधींचा कधीं तळ दिसूं लागण्याची पाळी येणार आहे ही कालत्रयींहि गोष्ट काढायाला नको! त्यांतून महाराष्ट्र भाषा ही जींस कधीं नांगर शिवला नाहीं, अशा नूतन भूमिकेप्रमाणें आहे. हिची नुकती कोठें मशागत व्हावयाला लागली असून, पूर्वोक्त दोन महानद्यांच्या संबंधानेंहि कोठें नुकती अंतर्वेदी बनत चाललीं आहे. मग वरील महानद्यांच्या पाटावर आह्मीं उगीच एक लहानसा वाफा तयार करून त्यांतील फुलांची माळ आपल्या देशबंधूंस प्रतिमासीं अर्पण करीत असतां इतक्यांतच जेव्हां वरील जमीन सत्व सांडील कीं काय याविषयीं मंडळी साशंक व्हावयाला लागली तेव्हां तिची किती धन्य ह्मणावी!

आमच्या पुस्तकाच्या संबंधानें पुष्कळांचे ठायीं. दुसरा असा भ्रम दिसतो कीं आह्मी बहुधा महिनाभर सुस्त पडून उगीच कोठें चार दिवस लेखणीला श्रम देतों व एक अंक भरून टाकतों. वाग्देवीची आह्मांवर जर एवढी बहाल मर्जी असती तर मग आणखी काय पाहिजे होतें? आमच्या देशांतील लोकांस अद्याप ग्रंथकर्तृत्वाचीं मर्में चांगलींशीं कळूं लागलीं नाहींत असें ह्मटलें पाहिजे. वाग्देवीची उपासना किती बिकट आहे, ती सन्मुख येऊन उभी ठाके तोंपर्यंत किती आढेवेढे घ्यावे लागतात, आपल्या मनाजोगती ती सजणें हें अनेक प्रसंगीं किती दुरापास्त असतें, इत्यादि रहस्यांचें ज्ञान स्वानुभवाविना प्रायः अगम्यच होय.[१] तेव्हां प्रस्तुत भ्रमाच्या निरासार्थ इतकेंच सांगतों कीं, ज्या आलस्याचा आमचे आक्षेपक आमच्या ठायीं खुशाल संभावना करतात त्यास खरोखरच पहातां किती थोडा थारा मिळण्यास अवकाश आहे, हें वस्तुस्थितीवरून कोणाच्याहि लक्षांत येईल. एक अंक आटपून

---

१. प्रख्यात कवि कौपर यानें काव्यरचनापरिश्रमाविषयीं येणेंप्रमाणें लिहिलें आहे—

"There is a pleasure in poetic pains
Which only poets know. The shifts and turns,
The expedients and inventions multiform,
To which the mind resorts, in chase of terms,
Though apt, yet coy, and difficult to win—
To arrest the fleeting images that fill
The mirror of the mind, and hold them fast,

(पुढें चालू)

टाकल्यावर आह्मांस पंधरावीस दिवस झोंप घ्यावयाला सांपडते अशा भ्रमांत जे असतील त्यांस खरी हकीकत कळविली तर केवढें आश्चर्य वाटेल ! ही खरी हकीकत अशी आहे कीं, एक टप्पा संपला कीं लागलीच दुसऱ्या टप्याला आह्मांला घोडीं जोडावीं लागतात, आणि याप्रमाणें आज सहा सात वर्षें क्रम चालला असतांहि कालाची मजल आमच्यापुढेंच आहे. नाहीं ह्मणायाला कांहीं अपरिहार्य कारणांनीं काय व्यत्यय येतो तेवढा येतो; बाकी गेल्या दशकांत कागदाला टांक लागल्या- व्यतिरिक्त आमचे फारच थोडे दिवस गेले असतील !

आमच्या आक्षेपकांचा अलीकडे तिसरा असाहि मुद्दा निघत चालला आहे कीं, तुह्मीं इतकीं कामें सोसासोसानें अंगावर घेतां, मग हीं इतकीं निभणार तरी कशीं ? 'निबंधमाला' आहे, 'काव्येतिहाससंग्रह' आहे, 'चित्रशाला' आहे, 'किताब-खाना' आहे, 'न्यू इंग्लिश स्कूल' आहे, 'केसरी' आहे, 'मराठा' आहे, 'छापखाना' आहे,—हें आहे तरी काय ? इतकीं कामें कोठें बोललीं आहेत ? आमचे प्राच्य आर्य ह्मणजे कसले नाजूक; उगीच तास दोन तास शिकविलें किंवा एक दोन पत्रें खरडलीं न खरडलीं, कीं त्यांनीं हाय हाय हुश्श हुश्श करीत लागलींच पडावें ! मग एखादें दुसरें काम च जड होऊन त्याखालीं बेजार होऊन जावें असा इकडचा देशाचार असतां तो आह्मी मोडूं पहातों हें आह्मांस किती अनुचित आहे बरें ! या आक्षेपावर काय उत्तर द्यावें, हे खरोखरच आह्मांस सुचत नाहीं. बहुकार्यव्यापृतत्व हा जर

And force them sit, till he has pencill'd off
A faithful likeness of the forms he views :
Then to dispose his copies with such art,
That each may find its most propitious light,
And shine by situation, hardly less
Then by the labour and the skill it cost;—
Are occupations of the poet's mind !"

—*The Task.*

१. वर 'दशक' ह्मटलें आहे त्यांतील तात्पर्य असें आहे कीं, माजी 'शालापत्रक' शेवटलीं चार वर्षें आह्मीं चालविलें. प्रस्तुत स्वतंत्र पुस्तक काढण्याची कल्पनाहि यरील सरकारी पुस्तकावरूनच आमचे मनांत प्रथमतः आलीं. 'कविता' या सदराखालीं 'शालापत्रकां'त जो मजकूर आह्मीं लिहिला होता; त्यापैकींच 'कालिदास', 'भवभूति', 'बाणभट्ट', 'सुबंधु' व 'दंडी', हें निबंधपंचक आह्मीं पुढें निराळें छापून प्रसिद्ध केलें. शेवटीं महाराष्ट्र कवितेवर लिहिण्याचा आह्मीं उपक्रम केला होता, पण ते आमच्या मेहरबान डायरेक्टर साहेबांच्या आणि माजी ट्रान्स्लेटर व डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांच्या पसंतीस न पड-ल्यावरून सदरील निबंध तसाच टाकून द्यावा लागला. पुढें लवकरच मे० चाटफील्ड साहे-बांच्या आज्ञापत्रावरून विचाऱ्या 'शालापत्रका'ची इतिश्री झाली !

आमच्या देशबंधूंस एवढा अक्षम्य अपराध वाटत असला, तर मग आह्मीं आपल्या देशाची मोठीच अगळीक केली यांत संशय नाहीं. वरील महादोषाबद्दल प्रायश्चित्त करण्याचा आह्मांस एकच मार्ग दिसतो तो हा कीं, तज्जन्य पातक अधिकाधिक जोडीत जावें, ह्मणजे पूर्वी सांचलेल्याचा ऱ्हास होत गेला तर कोण जाणे ! इतउत्तर याप्रमाणेंच प्रायश्चित्तविधि करण्याचा आमचा संकल्प आहे.

असो; येथवर दर वर्षाच्या वहिवाटीप्रमाणें सदरहू पुस्तकाच्या संबंधानें आमच्या आश्रयदात्यांस कांहीं गोष्टी कळविण्यासारख्या होत्या त्या कळविल्या. आतां आमच्या स्वतःच्या संबंधाच्या इतर कांहीं गोष्टींविषयीं थोडेसें लिहून आटपतें घेतों.

गेल्या सालीं, ह्मणजे ६० व्या अंकाच्या सरतेशेवटीं, आह्मीं आपली व वियाखात्याची जी फारकत करून घेतली, तिजविषयीं आमच्या देशबंधूंस कळवून पुढें आह्मी कोणता मार्ग पतकरणार याविषयींहि सूचना करून ठेवली होती. तर आतां वरील स्थित्यंतराचा जातीचा अनुभवहि त्यांस थोडाबहुत कळविणें अवश्य वाटतें. आमची पूर्वजभूमि जें परशुरामक्षेत्र तिकडे आमच्या मेहेरबान डायरेक्टर साहेबांनीं मेहेरबानीनें आमची रवनगी केली असतां मात्क्यान् आह्मी आपल्या पुण्यजनमंडळींत येऊन जे दाखल झालों, व रौप्यशतकाचा प्रतिमासीं जो वरील अधिकाऱ्यांच्या कृपेनें आह्मांस लाभ होत असे त्यास आह्मीं आपणास वेडपणानें अंतरविलें असतां गेल्या सालीं आमचा योगक्षेम कसा काय चालला, राजसेवा सोडून लोकसेवा पतकरल्याचा आह्मांस कधीं अनुताप झाला कीं काय, वगैरे गोष्टींविषयीं आमच्या वाचकमंडळींपैकीं कित्येकांस तरी जिज्ञासा वाटण्याचा संभव आहे. तर वरील मनोवृत्तीच्या तृप्त्यर्थ कांहीं मजकूर लिहिणें जरूर आहे. शिवाय सरकारी अधिकारी दरसालीं आपल्या कामाची वरिष्ठांस जशी सुनावणी करतात, त्याप्रमाणेंच आर्यभूमीच्या परमवंद्य चरणीं आह्मीं आपली दरवर्षीची सेवा प्रेमपुरःसर अर्पण केली असतां इकडूनहि आह्मांस कांहीं गैर दिसत नाहीं. तर सन १८८० सालीं आह्मीं आपल्या आर्यबंधूंची काय काय कामागरी बजावली तिचा खर्डा पुढें सादर करतों—

न्यू इंग्लिश स्कूल—गेल्या वर्षीं जें आह्मीं लिहिलें होतें, कीं आह्मी व आमचे कांहीं विद्यालयबंधु असे मिळून एक इंग्रेजी शाळा काढणार आहों. ती वरील होय. हींत हल्लीं सुमारें चारशें विद्यार्थीआहेत. अभ्यास अगदीं पहिल्या बुकापासून तों म्याट्रिकुलेशन पावेतों चालतो. सदरील परीक्षेत गेल्या खेपेस बारांतून आठ उमेदवार आमच्या शाळेतून पसार झाले, व एकास जगन्नाथ शंकरशेटची पहिली स्कॉलरशिप मिळाली. वरील दोन गोष्टींवरून सदरील 'स्कूल'ची स्थिति बरीच लक्षांत येण्यासारखी आहे. आमच्या लोकांच्या ज्या कित्येक वेडगळ कल्पना आहेत, कीं सर-

कारचा नेट असल्याखेरीज नेटिव लोकांच्या हातून ह्मणजे कोणतेंहि काम उठणें नाहीं, खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांस युनिव्हर्सिटी पास करीत नाहीं, सरकारी मदतीवांचून नुसत्या लोकाश्रयावर शाळा चालणें केवळ अशक्य होय, डायरेक्टर साहेबांचें नियमन, इन्स्पेक्टर साहेबांची तपासणी, वगैरे सूत्रांखेरीज शालारूप शकट चालणें ह्मणजे अगदीं दुरापास्त,—या सर्व भ्रमांचा निरास 'न्यू इंग्लिश स्कूल'च्या एका वर्षाच्या कारकीर्दीवरूनहि पुरतेपणीं होण्यासारखा आहे. आमच्या शिक्षकमंडळांत एक एल्. एल्. बी, दोन एम्. ए, व एक बी. ए. असे चार उपपदधारी आहेत, ही एक विशेषतः ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे !

आर्यभूषण—गेल्या वर्षीच्या उपसंहारांत सांगितलेला जो छापखाना तो हा होय. यांत पूर्वोक्त विद्यालयांनि मंडळीच भागीदार असून त्यांच्या परिश्रमांवर हेंहि अवाढव्य काम सुरू झालें आहे. आजपर्यंत इतर सर्व व्यापारांप्रमाणें छापखान्याचा उद्योगहि अविद्वान् व अडाणी लोकच प्रायः करीत आले आहेत. यामुळें अज्ञानध्वंसनाविषयां केवळ वज्रच असें जें मुद्रणयंत्र त्याचा प्रभाव व्हावा तितका अद्याप प्रगट झाला नाहीं. तो झाला असतां आज उघड्या माथ्यांनीं जे आपलें उन्नतत्व निर्भयपणें खुशाल मिरवीत आहेत अशा बिचाऱ्या कितीक मैनाकांस समुद्राच्या तळीं जाऊन दडून बसावें लागेल !

मराठा व केसरी—हीं दोन वर्तमानपत्रेंहि वरील मंडळीच्या श्रमांचेंच फळ होत. पहिलें पत्र निवळ इंग्रजी असून तें 'ज्ञानप्रकाशाच्या' एवढें निघतें व दुसरें निवळ मराठी असून तें 'सुबोधपत्रिके'च्या एवढें निघतें. पहिलें वाचलें असतां बहुतेक मोठमोठीं इंग्रेजी वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वाचल्याचें श्रेय येण्यासारखें आहे, व त्यामुळें दूरदूरच्या गांवीं सरकारी कामामुळें ज्यांस रहाणें पडतें व जगांत काय चाललें आहे हें समजण्याचा ज्यांस चांगलासा मार्ग नसतो त्यांस तें विशेष उपयोगाचें आहे. दुसऱ्याचा उपयोग विशेषतः सामान्य लोकांस, ह्मणजे ज्यांस इंग्रेजांचा संपर्क नाहीं, किंवा जे खेडेगांवांतून रहाणारे, त्यांस होण्यासारखा आहे. त्याविषयींची जाहिरात ६६ व्या अंकाच्या मलपृष्ठावर आलीच आहे, तेव्हां त्याच्या संबंधानें जास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

काव्येतिहाससंग्रह—हें पुस्तक आमच्या बहुतेक वाचकांस ऐकून तरी माहीत असेलच. हेंहि आमच्या दोन विद्यालयबंधूंच्या साह्यानें आह्मीं १८७८ सालापासून सुरू केलें. त्यांपैकीं एकाकडे ऐतिहासिक भागाचें ह्मणजे बखरींचें प्रकाशन आहे, दुसऱ्याकडे मद्राराष्ट्र कवितेचें आहे, व तिसऱ्याचें आमच्याकडे आहे. या तिसऱ्या भागाच्या संबंधानें आह्मीं आपलें नांव प्रकाशकांत घालणार होतों; पण नुसत्या 'निबंधमाले'वरूनच अधिकारी मंडळीचा आमच्याबर घुस्सा होता; मग 'माला'

कर्तृत्वांत 'संग्रहे'कर्तृत्वाचीहि आणखी भर पडली असती तर 'पौरजानपदशिक्षणाधिष्ठात्या' महाराजांची तब्येत आमच्यावर किती जात रहाती कोण जाणे ? आमचें वरील पुस्तकांत अंग आहे, हें साहेब बहादुरांस पुढें चारमुखें श्रवण झालेंच असेल; कां कीं, आपल्या नियुक्त मेषपातृत्वाखेरीज कोणी कांहीं करतो कीं काय याविषयीं साहेबांचें परम जागरूकत्व आहे. 'रासेलस्'मधल्या आनंदगुहेंत जो एकदां शिरला त्यास जसें सारें गणगोत तेव्हांपासून अंतरलेंच,त्याप्रमाणेंच मेहेरबानांच्या मेंढवाड्यांत शिरून ज्यानें डिपार्टमेंटाला एकदां आपला देह वाहिला त्यानें मग दुसरी तिसरी भानगड कांहीं करतां उपयोग नाहीं. कायद्याचा अभ्यास करणें, वर्तमानपत्रास मजकूर पाठविणें, मासिक पुस्तक चालविणें, लोकसमाजास जाणें, हे सारे निवळ बदमाषीचे प्रकार ! वरील घोर अपराधांच्या संबंधानें साहेबांस कोणाच्या संबंधानें बातमी मिळाली पुरे, कीं लागलींच काळें पाणी ! !

चित्रशाळा—आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच कीं, 'काव्येतिहासा'च्या तिसऱ्या अंकांत नाना 'फडणवीसाची लहानशी रंगीत तजबीर घातली होती तो चित्रशाळेचा आरंभ होय. तेव्हांपासून सुधारणा होतां होतां हल्लीं रामपंचायतन, शिवपंचायतन येथपर्यंत मजल येऊन ठेपली आहे. या तजबिरीचें काम कोणत्या तऱ्हेचें झालें आहे हें आह्मीं स्वतः सांगण्याची आज गरजच उरली नाहीं.हजारों प्रती उडून दूरदूरच्या गांवांहूनहि त्यांजविषयीं प्रतिदिवशीं मागण्या येत आहेत. असो; या उद्योगाच्या संबंधानें आमच्या वाचकांस विशेषेंकरून एवढीच एक गोष्ट कळवायाची आहे कीं, आमच्या इतिहासप्रसिद्ध पुरुषांच्या मूर्ति चिरकाळ रहाव्या एवढ्याकरितां मुळीं हा कारखाना आह्मीं काढला, व हल्लीं वरील तजबीरी जेवढ्या पैदा झाल्या तेवढ्यांचा आह्मीं संग्रहहि करून ठेवला आहे; तर आमच्या शोधक मित्रांनीं आणखी कांहीं शोध लागल्यास आह्मांस वरदी द्यावी. वरील ऐतिहासिक मंडळी अवकाशानुसार हातीं घेण्याचा आमचा इरादा आहे.

किताबखाना—या नांवाचें येथें बुधवार पेठेंत आमचें दुकान आहे. यांत चित्रशाळेंत तयार झालेलीं चित्रें, व इंग्रेजी, मराठी आणि संस्कृत या तिन्ही भाषांतील पुस्तकें विक्रीस ठेविलेलीं आहेत. सदरील पुस्तकांची यादी यापूर्वी एकदां एका अंकाबरोबर आमच्या वर्गणीदारांकडे आलेली होतीच. आतां लवकरच पूर्वापेक्षां मोठी व सविस्तर याद आह्मी तयार करणार आहों. तिच्या आरंभीं सदरील दुकान स्थापण्याचा उद्देश वगैरे सर्व आमच्या देशबंधूंस आह्मी सविस्तर कळविणार आहोंच, यास्तव येथें कांहीं जास्त लिहीत नाहीं.

तर याप्रमाणें ही उद्योगपरंपरा आह्मीं उपस्थित केली आहे. हिचें वरच्या इतकें दिग्दर्शनच तूर्तच्या प्रसंगीं पुरे आहे; तिचा जसजसा विस्तार होईल तसतशी तिज-

विषयींची हकीकत आमच्या देशबंधूंस कळत जाईलच. आतां वास्तव सरतेशेवटीं एका गोष्टीविषयीं मात्र थोडासा उल्लेख करून वाचक मंडळीची रजा घेतों. ही गोष्ट एवढीच कीं, आह्मीं हा जो नवा पसारा घातला आहे, यापासून तूर्त जरी मोठासा फायदा दिसणार नाहीं, तरी आजहि वरील बहुतेक उद्योग फलोन्मुख झाले आहेत, व लवकरच हे आमच्या पूर्वस्थितीचें आह्मांस स्मरणहि होऊं देणार नाहींत, अशी आह्मांस पुरती उमेद आहे. निदान सध्यांची इतकी तरी स्थिति आहे, कीं आह्मीं मेहेरबानांच्या पायांस अंतरलों या गोष्टीचा आह्मांस अनुताप होण्यास यत्किंचिताहि कारण उरलें नाहीं. राजसेवारूप खडतर जमीनीला स्वातंत्र्यदाहाचा संस्कार लावून व स्वतःस हीनत्व आणणाऱ्या नानाविध श्रमांनीं तिची प्रसन्नता संपादण्याचा खटाटोप करूनहि जें पळतें पीक आमच्या पदरीं कधींहि पडलें नाहीं, तेंच आतां स्वातंत्र्याचा अपहृत, न होतां व पहिल्यासारखी हमालीची दगदगहि न पडतां हंगामाच्या वेळीं खारखी आमच्या घरीं आपल्या पायांनीं चालून येत आहे. तर परम लाभप्रद व ज्ञ. जो अशी जी ही आर्यभूमीची सेवा तिजकडे दिवसेंदिवस तिच्या बाळगोपाळांची मनःक्षाज होत जावो अशी 'सत्यसंकल्पदात्या' प्रभूप्रतीं उत्कंठापूर्वक प्रार्थना करून याच' भरतवाक्यानंतर जवनिकेंत अंतर्धान पावतों !

लोकहितवादी.

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदांधः समभवं
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ।[१]

नीतिशतक.

अंक ६४ – (१) विषयोपन्यास. (२) लोकहितवादी. (३) त्यांच्या ग्रंथांचें सामान्य स्वरूप. (४) त्यांतील भतें. (५) ग्रंथरचनेचा उद्देश.

१. वरील नांवावर प्रसिद्ध झालेले पांचसात ग्रंथ आमच्याकडे आल्याला बरेच दिवस होऊन गेले. त्यावर अभिप्राय यापूर्वीच द्यावयाचा, पण अनेक कारणांस्तव तसें करतां आलें नाहीं. एक तर मोरोपंताच्या कवितेवर आमचा निबंध चाललाच होता, यास्तव तो मधेंच टाकून दुसरा घेतां येईना. दुसरें, सदरील विषयहि लहानांतला नव्हे; लोकहितवादींचे अनेक लेख समग्र वाचणें ह्मणजे सुद्धां जबरदस्तच काम, मग त्यावर यथास्थित विवेचन करण्यास तर किती वेळ व किती श्रम पाहिजेत! यास्तव पंतांची अगोदर बोळवण करून कीर्तिमंदिरांत त्यांचा यथोचित सन्निवेश झाल्यावर मग रावबहादुरांची भेट सावकाश व निर्वेध घ्यावी असा संकल्प केला.

---

१. "जेव्हां मी अल्पज्ञ होतों तेव्हां हत्तीसारखा मदांध होतों, आणि मी सर्वज्ञ आहें असा माझ्या मनाला गर्व झाला होता !"

तिसरें कारणहि आतां परिस्फुट करण्यास हरकत नाहीं, कीं जोंपर्यंत आमच्या पायांत राजसेवची रुपेरी बिडी होती तोंपर्यंत रावबहादुरांच्या ग्रंथगहनांत अनिरुद्ध संचार करण्यास व त्यावर यथास्थित कुठारप्रयोग करण्यास बरीच अडचण होती. यास्तव ती तुटून निरंकुशत्वाचा अंगीकार केल्यावरच वरील कार्यास हात घालावा हें बरें दिसलें.

२. लोकहितवादी हे स्वदेशहितार्थ उद्योग करूं लागल्यास आज सुमारें चाळीस वर्षें होत आलीं. इतक्या काळांत देशस्थिति सुधारण्याच्या निमित्तानें ज्या ज्या उलाढाली झाल्या त्या सर्वांत हे आपल्या नामाभिधानाप्रमाणें प्रमुखत्वानें वागत आले आहेत; व अद्यापहि त्यांचें उतार वय झालें असतां व राजसेवेचा भार त्यांच्या डोईवरून उतरला असतां त्यांचा लोककल्याणनिमित्तक उद्योग अव्याहत चालू आहे. जुन्या रीतीप्रमाणें झटलें ह्मणजे अशा वयांत रावबहादुरांनीं एखादें क्षेत्र पाहून तेथें 'हरि हरि' ह्मणत कालक्षेप करावयाचा. व आमच्या अर्वाचीन मंडळींच्या पद्धतीप्रमाणें पाहिलें तर चहा, काफी, लायब्ररी, समाज, इतक्यांत कायतें सदोदित गुरफटलेलें असायाचें; पण त्यांचा क्रम फार वेगळ्या तऱ्हेचा आहे. दहा गेले पांच राहिले आतां आपलें काय उरलें आहे, स्वस्थ कोठें तरी बसून राहिलेलं चार दिवस सुखा समाधानानें काढावे, संतत झाली, संपत झाली, संसार आटपला, आतां आजवर कष्ट करून जोडलेलें भोगावें, आतां कोठें जा दगदग करायाला,—इत्यादि जे नाउमेदीचे व सुस्तपणाचे उद्गार चाळीशीच्या सुमारासहि आमच्या देशांतील मंडळींचे सामान्यतः निघूं लागतात, त्यांतलें बिलकूल वारें ऐन साठीच्या अमलांतहि प्रस्तुत ग्रंथकाराचे ठिकाणीं आढळत नाहीं. देशहितार्थ उलाढाल करण्याविषयीं हव्यास, ग्रंथरचना, सभापांडित्य वगैरे विषयीं हौस हीं सर्व नव्या दमाच्या तरुण बांडांतहि आढळणार नाहींत अशीं या वयातीत पुरुषाचे ठायीं आज घटकेला तरतरीत आहेत. सारांश, लोककल्याणाच्या निमित्त सतत दीर्घकाळ परिश्रम करणें व या कामाविषयीं सदोदित उत्साह बाळगणें, या गोष्टीच्या संबंधानें सर्वांनीं व विशेषतः आमच्या अलीकडील कमकुवत मंडळीनें रावबहादुरांचा कित्ता घेणें अत्यंत उचित होय.

आतां हें खरें आहे कीं, वरील आस्थापूर्वक उद्योगाशीं व उत्साहाशीं इतर अनेक गुणांचें साहचर्य जसें असायाला पाहिजे तसें प्रस्तुत व्यक्तीचे ठायीं आढळत नाहीं. खरा लोककल्याणेच्छु व देशाभिमानी पुरुष झटला ह्मणजे त्याचे ठायीं पराकाष्ठेची निस्पृहता वागत असली पाहिजे, तो वचनाचा धड असला पाहिजे, व कसलींहि संकटें आलीं, किंबहुना जीवितसंशयाचा जरी प्रसंग येऊन ठेपला, तरी त्यानें डगमगतां उपयोगीं नाहीं. या थोरल्या कसोटीला लावले असतां आमच्या देशांतले थोडेच देशहितेच्छु तींतून पार पडतील, व सदरहूप्रमाणेंच प्रस्तुत लोकहितवादींचीहि स्थिति आहे. त्यांचे ठायीं या देशाचें कल्याण व्हावें ही इच्छा जरी पूर्णपणें वागत

आहे, व आजपर्यंत अनेक कार्यांत त्यांनीं शक्त्यनुसार आपला वांटा जरी बराच उचलला, तरी अनेक प्रसंगीं मागील पिढीच्या मंडळीस जें अपयश आलें त्याचे हेहि अंशभाक् झाले हें लोकविश्रुतच आहे. याशिवाय वरील अपयशाहूनहि लांछनप्रद व लोकहितवादी या नांवाला न साजणारें असें आचरण त्यांच्या हातून अनेक प्रसंगीं घडलें आहे हेंहि सर्वप्रसिद्धच आहे. या आचरणाची वाच्यता येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. कां कीं, लोकहितवादींच्या लौकिक वर्तनावर आम्हांस चर्चा करणें नाहीं, ग्रंथकर्तृत्वाच्या नात्यानेंच आम्ही त्यांजविषयीं मुख्यतः लिहिणार आहों. तरी लोकहितवादींचें पूर्ण स्वरूप लक्षांत येण्यास वरील दिग्दर्शन अवश्य होय. यास्तव तें करून आतां मुख्य विषयास लागतों.

३. लोकहितवादींनीं गेल्या चाळीस वर्षांत हजारों ठिकाणीं भाषणें केलीं आहेत, व शेंकडों लेख वर्तमानपत्रांत लिहिले आहेत. ग्रंथ हें नांव सर्वथा शोभण्यासारखी स्वतंत्र, ठाकठिकीची, सविस्तर रचना त्यांच्या हातून अद्याप झालेली नाहीं.[1] जो मजकूर जसा बोलावा तसाच तो लिहून छापायाला पाठवावा हाच त्यांचा क्रम आजपर्यंत चालत आला आहे. असे फुटकळ लेख एकत्र करून ते त्यांनीं 'निबंधसंग्रह' या नांवानें छापून प्रसिद्ध केले आहेत, व ठाणें, मुंबई वगैरे ठिकाणीं दिलेलीं व्याख्यानेंहि कांहीं छापविलीं आहेत. पंचवीस तीस वर्षांपूर्वीहि सुबोध व साधी निबंधरचनेची पद्धत लोकांस हितावह होती हें खरें; कारण एकंदर लोकसमुदायांत त्या वेळेस विद्येचा प्रसार नुकता कोठें होऊं लागला होता. सरकारानें लोकशिक्षणाकडे चांगलें लक्ष देऊन लोकांत लिहिण्यावाचण्याचा प्रघात सुरू केला होता, व त्यामुळें ज्ञानाची अभिरुचि त्यांचे ठायीं उत्पन्न होऊं लागली होती. अशा समयास 'निबंधसंग्रहां'तल्यासारखे लेख लोकांच्या नुकत्या जागृत झालेल्या विचारशक्तीस चांगलें खाद्य होतें. पण वरील निबंध सध्यांच्या स्थितीला झटले ह्मणजे ज्वानींत आलेल्या मनुष्यास जसें बोंडलीं भरभरून दुध पाजावें त्यासारखेच एकंदरीनें होत. ज्या वयांत भरभक्कम पेलेच पेले उठायाचे किंबहुना शक्त्यनुसार चरव्याच्या चरव्या तोंडाला लागायच्या, त्या काळाला हे छुटपुटीच्या खेळांतल्यासारखे छोटे छोटे लेख काय उपयोगी ? ज्यास अर्वाचीन विद्येचा बराच संस्कार झाला आहे, तो जर प्रस्तुत ग्रंथकाराच्या बड्या नांवास भुलून त्यानें निर्माण केलेल्या ग्रंथरूप महासागराचा[2]

---

१. लोकहितवादींनीं अलीकडे कांहीं मोठाले ग्रंथ केले आहेत खरे; पण तेहि प्रायः भाषांतररूपच असून ग्रंथकर्त्याचाच त्यांतील भाग झटला ह्मणजे एका अंगचीं भली मोठी प्रस्तावना व दुसऱ्या अंगचीं लांबचलांब परिशिष्टें हा होय. तेव्हां एकंदरींत पहातां वरील आक्षेप अजूनहि लागू पडणाराच आहे.

२. 'निबंधसंग्रहा'च्या आरंभीं ग्रंथप्रकाशकानें 'सूचना' या सदराखालीं पुढील मजकूर घातला आहे—

(पुढें चालू.)

प्रथमांश जो 'निबंधसंग्रह' या नांवानें प्रसिद्ध झाला आहे त्याचें अवगाहन करूं लागेल, तर त्यास या महासमुद्राचा उथळपणा पाहून आश्चर्य व खेद हीं वाटल्यावांचून रहाणार नाहींत. चारुदत्ताच्या बड्या घरांत मोठ्या प्रयासानें प्रवेश करून बिचारा शर्विलक जसा निराश होत्साता माघारा जाण्यास निघाला, त्यासारखीच बहुधा बऱ्याच वाचकांची नाउमेद रावबहादुरांच्या लेखसमुदायाच्या योगानें होणारी आहे. आतां एवढें खरें आहे, कीं वरील समूहांतहि माहितीच्या गोष्टी जागोजाग बऱ्याच सांपडतील, कांहीं ठिकाणीं मार्मिकपणाचें लिहिणें आढळेल, आणि शुद्ध मराठी भाषा व सुबोध भाषापद्धति यांचाहि लाभ होईल. पण एवढ्या सागरांत डुंबल्याचें चीज एकंदरींत पहातां फारच थोडें होईल यांत संशय नाहीं. ग्रंथाची योग्यता सामान्यतः पहातां दोन प्रकारांनीं धरली जाते. एक त्यांत नवा मजकूर तरी असावा, किंवा जुनाच असला तर नव्या तऱ्हेनें तरी तो लिहिलेला असावा. पण 'निबंधसंग्रहा'दि ग्रंथांत दोन्ही प्रकार आढळत नाहींत. त्यांत दाखल केलेले अभिप्राय तीस चाळीस [illegible]पूर्वी काय नवे वाटले असतील ते असोत, पण हल्लींच्या काळांत तर ते आबादहा [illegible]श्रुत असल्यामुळें केवळ चर्वित-चर्वणरूप झाले आहेत. शिवाय ते कांहीं नवल चार दिनें सांगितले आहेत ह्मणावें तर तसेंहि नाहीं. दयानंदजींच्या व्याख्यानांत ज[illegible] आतां आज[illegible]ट्या सतरा वेळां ऐकण्यांत येतात, किंवा पाद्रींच्या ग्रंथांतून, भाषणांत—इत्यादि जे ना[illegible]प्रोकळ पांडित्य शंभर वेळां आढळतें, त्याचप्रमाणें रावबहादुरांच्या[illegible]शांतील मंडळीचे साम[illegible]न एकाच प्रकारचा घोष सदोदित आढळतो. ब्राह्मण लबाड[illegible]या अमलांतहि प्रस्तुत ग्रंथक[illegible]देश बुडविला, पंडितांनीं साता समुद्रांविषयीं शोध [illegible]ण्याविषयीं हव्यास, ग्रंथरच[illegible] मेंढरें. संस्कृत विद्या येथून तेथून अप्रयोजक व [illegible]वेडगांच्या तरुण बांडांतहि आढळण[illegible]कवडीचीहि योग्यता नाहीं, धर्माची स्थिति फार खराब झाली अतरीत आहेत. सा[illegible]तयार केला पाहिजे, जुने शास्त्रीलोक व भट्टें हीं सर्व मेलीं पाहिजेत, त्यांस छदाम [illegible]उचलून देणें ह्मणजे निव्वळ पाजीपणा, एतद्देशीय राजेरजवाडे सर्व पशु, भटभिक्षुक [illegible]यब्ररींत येऊन ज्ञानसंपादन करीत नाहींत, ग्रंथांस उत्तेजन देत नाहींत, पुनर्विवाह सु[illegible] झाला पाहिजे, विला-यतेची महायात्रा करून आलेल्यास सर्वांनीं अग्रासन [illegible]लें पाहिजे, कर्मकांडाच्या

"या विद्वान ग्रंथकाराचे परोपरीच्या विषयांवरील शो[illegible]ध व विचार पाहून कोणासहि नवल वाटल्यावांचून रहाणार नाहीं. अलीकडे नेटिव [illegible] विद्वान बहुत असतील व यांहूनहि अधिक विद्वान असतील, पण त्यांनीं असे अनेक वि[illegible]षयावर स्वीय विचाराचे लेख लिहिलेले कोठें आढळत नाहींत; आणि या परोपकारी व लो[illegible]कहितवादी गृहस्थानें जाति, धर्म, शास्त्र, आचार, राज्य, लोकव्यवहार इत्यादि विषयां[illegible]वर निर्भीडपणानें रास्त विचार दर्शवून एक महासागराएवढा लेखांचा सांठा करून [illegible]ठविला आहे व तो सर्व प्रसिद्धीस येण्यास हा प्रथमचा शुभशकुन आहे ह्मणून हा ग्रंथ सर्वांचे आदरास अगत्य पात्र होईल असा भरंवसा आहे."

खटपटींत बिलकूल अर्थ नाहीं. सर्व गुणांचें परम निधान ह्मणजे काय ते इंग्रज लोक, इ० इ०—हें सर्व भारूड लोकहितवादींच्या ध्यानीं मनीं आज चाळीस वर्षें वागतें आहे; व ग्रंथ असो, निबंध असो, भाषण असो, कोणताहि विषय असो, वरील तत्त्वाचा त्यांत प्रवेश झाल्याखेरीज व्हावयाचेंच नाहीं! सारांश, ज्याप्रमाणें रासेलस हा आपल्या जुन्या गुरूच्या तत्त्वज्ञानास कंटाळून ह्मणाला कीं, याचा उपसर्ग माझ्या-मागें अद्याप काय ह्मणून? यानें जें मला शिकविलें तें लहानपणीं मला आवडलें खरें, पण तें त्या वेळेस नवें होतें ह्मणून; पण आतां त्याच ज्ञानापासून मनास आनंद वाटणें ह्मणजे तें जेव्हां मात्र्याचा विसरून जावें तेव्हां!—अशीच प्रायः अर्वाचीन बाचकांची लोकहितवादींच्या मतांविषयीं समजूत आहे, व ती अयथार्थ आहे असेहि बहुधा थोड्यांसच वाटेल.

४. आतां लोकहितवादींनीं आजपर्यंत आपल्या लेखांतून जीं शतावधि मतें प्रगट केलीं आहेत त्यां सर्वांवर यथास्थित विवरण करणें ह्मणजे 'निबंधसंग्रहा'-सारखाच अवाढव्य ग्रंथ होणार. यास्तव तें तर विस्तारभयास्तव करतां येत नाहींच. शिवाय कित्येक मतांवर आज चर्चा करण्याचीहि जरूर राहिली नाहीं, कारण त्यांचा शुष्कपणा कालगत्या ठरला जाऊन आजला त्यांच्या संबंधानें कोणीहि भ्रमांत पडणार नाहीं. इंग्रजी विद्येचा नुकताच संस्कार झाल्यानें अवतरणभूत भर्तृहरिवचनाप्रमाणें किंवा पोपच्या सर्वप्रसिद्ध सुभाषिताप्रमाणें पाश्चात्य विद्यारूप वारुणीच्या पहिल्या झुरक्याबरोबर आमची विद्वान् मंडळी झिंगली जाऊन त्या अमलांत स्वदेशाविषयीं, स्वधर्माविषयीं, आपल्या रीतीभातीविषयीं वगैरे जें भयंकर पांडित्य त्यांच्या तोंडावाटे उचंबळत असे, त्यास अलीकडे पुष्कळच उतार पडला आहे. उतूं जाऊं लागणारें दूध जसें जलतुषारानें उपशम पावतें त्याप्रमाणें सुविचार व अनुभव यांच्या झटक्या-सरशी वरील पांडित्याच्या कहरानें पुष्कळच उलट खाल्ली आहे. ही कलनी कळा दिसूं लागण्यापूर्वी आमची मंडळी किती बहकली होती याचा मासला पहाणें असल्यास प्रस्तुत ग्रंथकाराचे पहिले पहिले लेख, तसेंच 'पुण्याचें वर्णन', 'बाशीराम कोतवाल', जोतीबाकृत 'गुलामगिरी' वगैरे ग्रंथ पहावे. या ग्रंथांतून मोठमोठ्या बलवत्तर ह्मणून ज्या कोट्या दाखल केल्या आहेत त्यांच्यानें आतां एखादें पोरहि फसणार नाहीं. असो; तर याप्रमाणें रावबहादुरांच्या जुन्या लेखांतील कित्येक मतां-विषयीं येथें मुळींच विचार करावयाला नको. यास्तव हल्लींच्या काळींहि जीं लोकांस भ्रमांत पाडण्यासारखीं आहेत त्यांविषयींच मुख्यतः विवेचन करूं.

'निबंधसंग्रहां'त एक विषय धरून त्यावर जें काय लिहावयाचें तें एके ठिकाणीं लिहिलेलें आहे असें नाहीं तर अनेक विषयांचा ऊहापोह अनेक ठिकाणीं केला आहे. सदरील लेख हे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेले असल्यामुळें ज्या प्रसंगास जें मनांत

आलें तें त्या वेळेस लिहून दिलें आहे. अशी अव्यवस्था असल्यामुळें ज्यास लोकहितवादींचीं एखाद्या विवक्षित विषयावर समग्र मतें हवीं असतील त्यास तीं एका सदराखालीं आढळतील असें नाहीं; तर 'त्रिस्थलीं यात्रा' या ह्मणीप्रमाणें कांहीं भाग एका निबंधांत व कांहीं भाग विषयांतररूपानें दुसऱ्या निबंधांत असा प्रकार आढळेल. अशा प्रकारच्या व्यवस्थेमुळें पुढील विवेचनांत रावबहादुरांच्या लेखांचा निर्देश करतां येणें शक्य नाहीं. यास्तव वरील अवाढव्य रचनेवरून जीं त्यांचीं मतें आमच्या लक्षांत आलीं त्यांवर सामान्यतःच विवेचन करणें प्राप्त आहे.

१. प्रस्तुत ग्रंथकारानें 'लोकहितवादी' हें नांव धारण करून निबंधरचना करण्याचा एवढा उद्योग कां पतकरला याचें कारण उघडच आहे. आमच्या सरकारानें कांहीं अंशीं औदार्याच्या बुद्धीनें व कांहीं अंशीं आपमतलबानें इकडील लोकांस सज्ञान करण्याचा जेव्हां उद्योग सुरू केला, तेव्हां उपदेशाच्या अंतीं अर्जुनास जसें झालें, कीं

अथास्य तत्त्वेषु कृतेऽवभासे
समुन्मिमीलेव चिराय चक्षुः ॥

"तत्त्वांचा बोध होऊन त्यांचा प्रकाश त्याच्या अंतर्यामीं पडला असतां फार दिवसांनीं जशी दृष्टि यावी तसें त्यास होऊन गेलें," तसा प्रकार आमच्या इकडील मंडळीचा झाला. आमच्या पूर्वजांच्या ध्यानीं मनींहि नव्हत्या अशा शेंकडों गोष्टी त्यांस कळूं लागून इंग्रजी विद्येचा अपरंपार सागर त्यांस दृष्टिगोचर झाला. या सागरांत जे अभिनिविष्ट होऊन त्याचें अवगाहन करूं लागतील ते परम धन्य होत यांत कांहीं संशय नाहीं, व आमच्या देशाची जुलमी अंमलदारांच्या पायीं कितीहि हानि झाली तरी ती वरील सागराच्या बळावर कालेंकरून तरी भरून येईल असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. या भावी फलाचे सूचक अंकुर सध्यांहि दृष्टीस पडूं लागले आहेत.[१]

---

१. इंग्रजी विद्येच्या प्रभावाचें वर्णन मेकॉलेनें आपल्या एका भाषणांत येणेंप्रमाणें केलें आहे–

"And thus I am brought back to the point from which I started. I have been requested to invite you to fill your glasses to the Literature of Britain; to that literature, the brightest, the purest, the most durable of all the glories of our counrty; to that literature, so rich in precious truth and precious fiction; to that literature which boasts of the prince of all poets; and of the prince of all philosophers; to that literature which has exercised an influence wider than that of our commerce, and mightier than that of our arms; to that literature which has taught France the principles of liberty, and has furnished Germany with models of art; to that literature which forms a tie

(पुढें चालू.)

असो; पण वरील मंडळीचें काय झालें, कीं वरील सागराच्या दर्शनानें त्याच्या अवगाहनाविषयीं उत्कट इच्छा व उत्कंठा जी त्यांचे ठायीं उत्पन्न व्हावयाची ती न होऊन बहुतेकजण कांठच्या चिखलांत व रेंदाळांत मात्र अडकून राहिले. वरील जलाशयांतील रत्नांचा लाभ अर्थातच गाढ अवगाहन करणारांस मात्र व्हावयाचा; तो वरील कांठच्या पोहणारांस कोठून होणार ? यास्तव त्यांचे ठायीं अनेक दुर्मतांचें व दुराग्रहांचें जाल मात्र सांठलें. आपला देश ह्मणजे कवडीच्या मोलाचा, शौर्याची व सदाचरणाची आपले इकडे कधीं वार्ताहि नाहीं; हिंदुधर्मासारखा अप्रयोजक व अनर्थकारक धर्म आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर कोणताहि झाला नसेल, आमच्या चाली ह्मणजे सरासरी रानटीपणाच्याच, खरी विद्या काय ती इंग्रजींत, पूर्वीचे साडे तीन शहाणे एकीकडे व अलीकडचें पहिलें बूक शिकणारें पोर एकीकडे,—इत्यादि शेंकडों मतें वरील कर्दमपानाच्या दुष्ट संस्कारानें आमच्या अर्वाचीन पंडित मंडळीस चिकटून राहिलीं. ह्मटलें आहे—

अगाधजलसंचारी नो गर्वं याति रोहितः ।
अंगुष्ठोदकमात्रेण शफरी फर्फरायते ।।

"देवमासा हा समुद्राचा नेहमीं ठाव घेणारा, पण त्यास त्याबद्दल गर्व होत नाहीं; पण आंगठा बुडेल न बुडेल अशा लहानग्या डबक्यांत राहून बेडकी डौलानें शब्द करते !" तर रावबहादुरांनीं आपली लेखणी चालविण्यास जी सुरवात केली ती वरील समयास होय; ह्मणजे नूतनलब्ध पाश्चात्य विद्येच्या अंजनशलाकेनें जेव्हां त्यांची दृष्टि साफ झाली व पूर्वीचें अज्ञानपटल एकदम दूर झालें, तेव्हां आपणास ज्या नव्या गोष्टी समजल्या व जीं नवीं मतें आपले ठायीं बिंबलीं त्यांचा लाभ आपल्या देशबांधवांस करून द्यावा अशा हेतूनें त्यांनीं लोकहितवादित्वाची दीक्षा स्वयमेव धारण करून लोकाज्ञानाध्वंसनाचें परम साधन जी लेखणी तिचा अंगीकार केला. प्रस्तुत ग्रंथकारानें आपला उद्देश एके ठिकाणीं स्पष्टपणें लिहिला आहे, यास्तव त्याचा येथें उतारा घेतों—

---

closer than the tie of consanguinity between us and the commonwealths of the valley of the Mississippi; to that literature before the light of which impious and cruel superstitions are fast taking flight on the banks of the Ganges; to that literature which will, in future ages, instruct and delight the unborn millions who will have turned the Australasian and Caffrarian deserts into cities and gardens. To the Literature of Britain, then ! And wherever British literature spreads, may it be attended by British virtue and by British freedom !"

आलें तें त्या वेळेस लिहून दिलें आहे. अशी अव्यवस्था असल्यामुळें ज्यास लोकहितवादींचीं एखाद्या विवक्षित विषयावर समग्र मतें हवीं असतील त्यास तीं एका सदराखालीं आढळतील असें नाहीं; तर 'त्रिस्थलीं यात्रा' या ह्मणीप्रमाणें कांहीं भाग एका निबंधांत व कांहीं भाग विषयांतररूपानें दुसऱ्या निबंधांत असा प्रकार आढळेल. अशा प्रकारच्या व्यवस्थेमुळें पुढील विवेचनांत रावबहादुरांच्या लेखांचा निर्देश करतां येणें शक्य नाहीं. यास्तव वरील अवाढव्य रचनेवरून जीं त्यांचीं मतें आमच्या लक्षांत आलीं त्यांवर सामान्यतःच विवेचन करणें प्राप्त आहे.

१. प्रस्तुत ग्रंथकारानें 'लोकहितवादी' हें नांव धारण करून निबंधरचना करण्याचा एवढा उद्योग कां पतकरला याचें कारण उघडच आहे. आमच्या सरकारानें कांहीं अंशीं औदार्याच्या बुद्धीनें व कांहीं अंशीं आपमतलबानें इकडील लोकांस सज्ञान करण्याचा जेव्हां उद्योग सुरू केला, तेव्हां उपदेशाच्या अंतीं अर्जुनास जसें झालें, कीं

अथास्य तत्त्वेषु कृतेऽवभासे
समुन्मिमीलेव चिराय चक्षुः ॥

"तत्त्वांचा बोध होऊन त्यांचा प्रकाश त्याच्या अंतर्यामीं पडला असतां फार दिवसांनीं जशी दृष्टि यावी तसें त्यास होऊन गेलें," तसा प्रकार आमच्या इकडील मंडळीचा झाला. आमच्या पूर्वजांच्या ध्यानीं मनींहि नव्हत्या अशा शेंकडों गोष्टी त्यांस कळूं लागून इंग्रजी विद्येचा अपरंपार सागर त्यांस दृष्टिगोचर झाला. या सागरांत जे अभिनिविष्ट होऊन त्याचें अवगाहन करूं लागतील ते परम धन्य होत यांत कांहीं संशय नाहीं, व आमच्या देशाची जुलमी अंमलदारांच्या पायीं कितीहि हानि झाली तरी ती वरील सागराच्या बळावर कालेंकरून तरी भरून येईल असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. या भावी फलाचे सूचक अंकुर सध्यांहि दृष्टीस पडूं लागले आहेत.[१]

---

१. इंग्रेजी विद्येच्या प्रभावाचें वर्णन **मेकॉलेनें** आपल्या एका भाषणांत येणेंप्रमाणें केलें आहे–

"And thus I am brought back to the point from which I started. I have been requested to invite you to fill your glasses to the Literature of Britain; to that literature, the brightest, the purest, the most durable of all the glories of our counrty; to that literature, so rich in precious truth and precious fiction; to that literature which boasts of the prince of all poets; and of the prince of all philosophers; to that literature which has exercised an influence wider than that of our commerce, and mightier than that of our arms; to that literature which has taught France the principles of liberty, and has furnished Germany with models of art; to that literature which forms a tie

(पुढें चालू.)

असो; पण वरील मंडळीचें काय झालें, कीं वरील सागराच्या दर्शनानें त्याच्या अवगाहनाविषयीं उत्कट इच्छा व उत्कंठा जी त्यांचे ठायीं उत्पन्न व्हावयाची ती न होऊन बहुतेकजण कांठच्या चिखलांत व रेंदाळांत मात्र अडकून राहिले. वरील जलाशयांतील रत्नांचा लाभ अर्थातच गाढ अवगाहन करणारांस मात्र व्हावयाचा; तो वरील कांठच्या पोहणारांस कोठून होणार ? यास्तव त्यांचे ठायीं अनेक दुर्मतांचें व दुराग्रहांचें जाल मात्र सांठलें. आपला देश ह्मणजे कवडीच्या मोलाचा, शौर्याची व सदाचरणाची आपले इकडे कधीं वार्ताहि नाहीं; हिंदुधर्मासारखा अप्रयोजक व अनर्थकारक धर्म आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर कोणताहि झाला नसेल, आमच्या चाली ह्मणजे सरासरी रानटीपणाच्याच, खरी विद्या काय ती इंग्रजींत, पूर्वीचे साडे तीन शहाणे एकीकडे व अलीकडचें पहिलें वूक शिकणारें पोर एकीकडे,—इत्यादि शेंकडों मतें वरील कर्दमपानाच्या दुष्ट संस्कारानें आमच्या अर्वाचीन पंडित मंडळीस चिकटून राहिलीं. ह्मटलें आहे—

अगाधजलसंचारी नो गर्वं याति रोहितः ।
अंगुष्ठोदकमात्रेण शफरी फर्फरायते ।।

"देवमासा हा समुद्राचा नेहमीं ठाव घेणारा, पण त्यास त्याबद्दल गर्व होत नाहीं; पण आंगठा बुडेल न बुडेल अशा लहानग्या डबक्यांत राहून बेडकी डौलानें शब्द करते !" तर रावबहादुरांनीं आपली लेखणी चालविण्यास जी सुरवात केली ती वरील समयास होय; ह्मणजे नूतनलब्ध पाश्चात्य विद्येच्या अंजनशलाकेनें जेव्हां त्यांची दृष्टि साफ झाली व पूर्वीचें अज्ञानपटल एकदम दूर झालें, तेव्हां आपणास ज्या नव्या गोष्टी समजल्या व जीं नवीं मतें आपले ठायीं बिंबलीं त्यांचा लाभ आपल्या देशबांधवांस करून द्यावा अशा हेतूनें त्यांनीं लोकहितवादित्वाची दीक्षा स्वयमेव धारण करून लोकाज्ञानाध्वंसनाचें परम साधन जी लेखणी तिचा अंगीकार केला. प्रस्तुत ग्रंथकारानें आपला उद्देश एके ठिकाणीं स्पष्टपणें लिहिला आहे, यास्तव त्याचा येथें उतारा घेतों—

---

closer than the tie of consanguinity between us and the commonwealths of the valley of the Mississippi; to that literature before the light of which impious and cruel superstitions are fast taking flight on the banks of the Ganges; to that literature which will, in future ages, instruct and delight the unborn millions who will have turned the Australasian and Caffrarian deserts into cities and gardens. To the Literature of Britain, then ! And wherever British literature spreads, may it be attended by British virtue and by British freedom !"

"पत्र नंबर १००."

शत पत्रांचा इत्यर्थ.

'विनंती विशेष. मी आपले श्रम या पत्रांत संपूर्ण करणार. यास्तव या लिखित पत्रशतकाविषयीं कांहीं सुचवितों. आज दोन वर्षे मी लोकांस त्यांची स्थितिरीति कशी आहे ती अगदीं भीड न धरितां उघड करून सुचविली. त्यांत एखादें अक्षर अधिक उणें, शुद्ध अशुद्ध, कोणास वाटलें तर त्याणीं क्षमा करावी. माझे जिवाची पक्की खात्री आहे कीं, जो कोणी या पत्रांचें अवलोकन करील आणि विचार करून पाहील त्यास प्रत्येक शब्द खरा आहे असें वाटेल. लोकहितवादीनें कोणाची मजुरी पत्करली नाहीं. कशाची अपेक्षा, आशा किंवा इच्छा धरली नाहीं. कोणाचे सांगण्यावरून व शिकविल्यावरून कृत्रिम वर्णन केलें नाहीं. लाभावर किंवा द्रव्यावर नजर देऊन कीर्ति व्हावी या हेतूनें लिहिलें नाहीं. इतके श्रम जे केले ते फक्त लोकांस त्यांची वास्तविक स्थिति कशी आहे ती कळावी, त्याणीं सुधरावें, त्यांस इहलोकीं सुखवृद्धि व्हावी, परलोकाचें साधन घडावें, व आपले बहुत काळापासून दृढ ग्रह झाले आहेत त्यापैकीं कांहीं अविचारानें व कांहीं मूर्खपणानें जडलेले आहेत ते कमी व्हावे किंवा नाहींसे व्हावे इतक्याच हेतूनें मीं यथामतीनें व स्वइच्छेनें वेतनावांचून श्रम केले आहेत. व जितकें लिहिलें आहे तें अक्षरशः खरें खरें निवडून विचार करून काळजीनें लिहिलें आहे. हें सर्व लोकांस नजर आहे. हें लिखितशतक कोणी बालबोध अथवा मोडी छापून मुलांस लिखितासारखें वाचण्यास दिलें तर बहुत नफा होईल. यास्तव या ग्रंथावर लोकहितवादी आपली सत्ता ठेवीत नाहीं. पाहिजे त्याणीं तीं पत्रें छापून प्रगट करावीं. कितीएक प्राचीन काळचे लोकांस कितीएक लोकहितवादीचीं मतें विपरीत व हिंदुधर्मास विरुद्ध भासतील, परंतु तो त्यांचा मिथ्या भास आहे; कारण कीं, त्यांत हिंदु धर्मास कांहीं विपरीत नाहीं. फक्त मूर्खपणास मात्र विपरीत आहे. याविषयीं विचार केला तर खात्री होईल."

"माझें मागणें सर्व लोकांस आहे कीं, मीं जें लिहिलें आहे याचा विचार करून पहा. तुमच्या चांगल्यावांचून त्या लिहिण्याचा हेतु नाहीं. तुमचें कल्याण व्हावें ह्मणून मी झटतों व तुमच्या चुक्या वगैरे उघड करून दाखविण्यांत राग रोष येईल हें मीं मनांत आणलें नाहीं. कारण कीं, माझी उत्कंठा तुमच्या सुधारण्याकडे आहे. माझें अंतःकरण सर्व तिकडे आहे. यास्तव मीं जें लिहिलें आहे त्याचा तुह्मी विचार करावा. कारण कीं, ज्याणें तुमची सेवा एकनिष्ठेनें व निष्कपटपणानें केली त्याजवर तुमची इतराजी नसावी. किंबहुना तो काय बोलतो हें तरी मनन करावें. अस्तु. तुमची आमची गांठ आज दोन वर्षे सतत होती याचा मला मोठा आनंद सर्वकाळ वाटेल. सर्वांनीं कृपालोभ असो द्यावा हे विनंति."

प्रस्तुत विषयाच्या विवेचनास वरील उपोद्घात बस आहे, असें आह्मांस वाटतें. त्यावरून प्रस्तुत ग्रंथकाराविषयीं कोणास कदाचित् माहिती नसल्यास ती थोडी बहुत होऊन त्याच्या ग्रंथरचनेचा उद्देश व तिचें सामान्य स्वरूप हीं दोन्ही कळून येतील. आतां एवढेंच सांगून पुरें करतों कीं, लोकहितवादींचा उद्देश जसा लोकांत यथाशक्ति ज्ञानप्रसार करण्याविषयींचा होता व अद्याप आहे, तशीच आमचीहि गोष्ट आहे. शिवाय हें ज्ञान भासरूप किंवा मिथ्या नसतां तें यथार्थ व सत्य असावें असाच आमचाहि संकल्प आहे. जाणूनबुजून खोटें मत प्रसिद्ध केल्याचें किंवा त्याचा अभिमान धरल्याचें आमचें आह्मांस तरी माहीत नाहीं, व कोणी तसा आरोप केलेला आमच्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत आला असतां त्याचें यथामति आमच्याकडून निरसन होत जाऊन प्रसंगोपात्त प्रतिपक्ष्याची कोटीहि आह्मीं घेतलेली आहे. आतां दोघांच्या नजरेस जी गोष्ट आपापल्या तऱ्हेनें खरी वाटते तींत भेद कां पडावा असें कोणास कदाचित् वाटेल. पण हा मतभेद मनुष्यस्वभावासच लागला आहे असें समजावें. लोकांत जसें रुचिवैचित्र्य आढळतें तसेंच मतवैचित्र्य हेंहि दृष्टीस पडावयाचेंच. फार तर काय, पण आपापल्या ठिकाणींहि समजुतींचा फेर किती होत असतो ! तर याप्रमाणेंच पहातां लोकहितवादींच्या व आमच्या काळांतील अंतर, त्या वेळची विद्यापद्धति, या वेळची विद्यापद्धति, तेव्हांची देशस्थिति, आजची देशस्थिति, इत्यादि गोष्टी क्षणभर ध्यानांत आणल्या असतां, ज्या गोष्टी रावबहादुरांस व तत्कालीन लोकांस युक्तिइच्या सिद्धांतासारख्या वाटत होत्या, त्या आतां आह्मांस फार निराळ्या तऱ्हेनें भासूं लागल्या आहेत यांत कांहीं आश्चर्य नाहीं; दर एक पिढींत शेंकडों विषयांवर याप्रमाणें मतांतर होत जाणें हा सृष्टिक्रमच आहे, व हें मतांतर कोणत्याहि प्रकारें अनिष्ट नसून लोकांच्या विवेचनशक्तीचा प्रवाह अप्रतिबद्ध होत्साता चालू आहे. याचें हें अत्यंत अभिनंदनीय निदर्शन होय ! असो; तर रावबहादुरांनीं आमच्या कडे आपले ग्रंथ परीक्षणार्थ पाठविले, याबद्दल त्यांचे आभार मानून व एक दोन वेळां आमचा अभिप्राय प्रगट करण्याविषयीं त्यांनीं आह्मांस सूचनाहि केल्या त्यांवरून प्रदर्शित होणाऱ्या त्यांच्या प्रांजल बुद्धीची तारीफ करून हा नमस्कृतिरूप अंक संपवितों.

कस्यात्यंतं सुखमुपनतं दुःखमेकांततो वा
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ।[1]
'मेघदूत'.

---

१. "सदोदित सुखी किंवा सदोदित दुःखी असा कोण आहे ? चाकाच्या धांवेप्रमाणें मनुष्याची स्थिति ही वरचेवर वर खालीं होतच असते !"

अंक ६'५—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) देशाची निकृष्ट स्थिति. (३) अशा स्थितीचीं दोन स्वरूपें. (४) त्यांपैकीं दुसरें आपल्या देशास लाग. (५) वरील स्थिति प्राप्त होण्याचीं कारणें.

१. मागील अंकांत लोकहितवादींच्या ग्रंथांचें सामान्य स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे तें सांगितलें. आतां त्यांत अनेक विषयांवर जीं मतें त्यांनीं प्रगट केलीं आहेत त्यांविषयीं विचार करावयाचा. हीं मतें व्यवस्थेवार दाखल केलीं नसल्यामुळें अर्थातच त्यांचा निर्देश करतां येत नाहीं. तरी तीं त्यांच्या बहुतेक ग्रंथांतून आढळत असल्यामुळें व सामान्यतः सर्वांस माहीत असणाऱ्यांपैकींच असल्यामुळें त्यांचा निर्देश करणेंहि तादृश आवश्यक नाहीं. यास्तव त्यांच्या यथार्थत्वाविषयीं येथें सामान्यतः विवेचन करतों.

२. लोकहितवादीप्रभृति जे आमच्या देशाचे आक्षेपक आहेत त्यांच्या लेखांतून व भाषणांतून आढळणारा पहिला मोठा मुद्दा पाहिला तर हा आढळेल कीं, आह्मीं आपलें प्राचीन वैभव आपल्या मूर्खपणानें घालवून आतां व्यर्थ हाका मारीत बसलों आहों. व इतकी निकृष्ट स्थिति प्राप्त होऊन साऱ्या जगांत केवल नादान ठरलों असतां व परकी लोकांच्या लाथा खात असतां निलाजऱ्यांसारखे अद्याप सुस्त होऊन पडलों आहों. मेकॉलेप्रभृति स्वदेशमहिमा गाणारे ग्रंथकार, सद्धर्माच्या आवेशानें बरळणारे मिशनरी व बाटेमंडळ, उसनी धर्मस्फूर्ति आणून नव्या धर्माच्या खटपटीस लागलेली ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधक समाज यांतील भक्तमंडळी, 'घाशीराम कोतवाल'कारप्रभृति चार दिवस घाशीरामी चालवून घेतलेले अर्वाच्य पंडित, या साऱ्या मंडळींचीं आमच्या देशाच्या संबंधाची एक मोठी समजूत ही आहे कीं, आमचा देश केवळ आसन्नमरण झाला आहे, आमच्यांत कोणत्याच प्रकारचा कांहींच वकूब ह्मणून राहिला नाहीं, ही परम शोचनीय स्थिति आह्मीं आपल्या मूर्खपणाच्या योगानें आपणांस आणली, आणि हींतून निघण्याचे उपाय ह्मटले ह्मणजे वरील तत्त्वज्ञमंडळी आमच्यावर मेहेरबानी करून आह्मांवर आपआपल्यापासच्या मात्रांचे-प्रयोग काय करील तेवढेच काय ते! या प्रयोगांखेरीज सध्यां आमची बिलकूल धडगत नाहीं. आमचे रावबहादुर तर आज चाळीस वर्षें आमच्या कानीं कपाळीं ओरडताहेत कीं, तुमची ऋषींच्या कारकीर्दीत मात्र बरी स्थिति होती, तेव्हांपासून आज दोन हजार वर्षें तुह्मी सारखे खालीं जात आहां. भर्तृहरीनें जसें ह्मटलें आहे कीं,

अधोधोः गंगेयं पदमुपगता स्तोकमधुना
विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः।

"गंगा ही शंकराच्या मस्तकापासून जी भ्रष्ट झाली ती जातां जातां शेवटीं

अगदीं भूमितलापर्यंत जाऊन पोंचली; तर याप्रमाणेंच ज्यांचा विवेक सुटला त्यांची शेंकडों प्रकारांनीं विटंबना होते."—त्याप्रमाणेंच दोन हजार वर्षांपूर्वीचे इंद्रवरुणादि देव, गवालंभ, नियोग वगैरे आचार, गुरुगृहीं बारा बारा चोवीस चोवीस वर्षें वास, इत्यादि गोष्टी चट साऱ्या सुटून जाऊन पुराणांचा शिमगा जेव्हांपासून सुरू झाला व भटांच्या घृतकुल्या व मधुकुल्या देशांत प्रवृत्त झाल्या, तेव्हांपासून वरील कुल्यांच्या प्रचंड प्रवाहाच्या वाटे येथील संपत्ति, येथील पराक्रम, येथील विद्या, येथील कौशल्य, चट सारें पार वाहून गेलें! भटांच्या पायीं या देशाची गेल्या दोन हजार वर्षांत अशी दशा होऊन गेली कीं, आह्मांस हवें त्यानें खुशाल तुडवावें, आमचें भरलें घर लुटावें, आह्मांस गुलाम करावें, तरी आपल्या नीच अवस्थेबद्दल आह्मांस कांहीं वाटूं नये. असें होतां होतां शेवटीं आमच्या डोळ्यांत दारिद्र्यांजन घालून आह्मांस शुद्धीवर आणण्याकरितां आकाशांतील प्रभूनें दयाळु होऊन साऱ्या पृथ्वींतले शहाणे लोक आह्मांवर अंमल करण्याकरितां पाठविले ह्मणून बरें झालें; नाहीं पेक्षां आमची आजला काय अवस्था होऊन जातीं कोण जाणे!

आतां सर्वांनीं गृहीत धरलेला हा जो पहिला मोठा मुद्दा हा कितपत खरा आहे, याविषयीं प्रथमतः विचार केला पाहिजे. हा विचार दोन प्रकारांनीं करायाचा. एक आमच्या देशाची खरोखरच अत्यंत निकृष्टतेची स्थिति आहे कीं काय? आणि दुसरें, तीं तशी असल्यास तीस आमचें मौख्य कितपत कारणभूत आहे.

३. आतां वरील दोन प्रश्नांपैकीं पहिल्याचें उत्तर तर सर्वांपाशीं सिद्धच आहे, कीं हा देश अगदीं खराबीला येऊन पोंचला आहे. लोकांस अठरा विश्वे दारिद्र्यानें गांठलें असून खाण्याची सुद्धां दिवसेंदिवस भ्रांत होऊं लागली आहे; कोणत्या व्यापारांत ह्मणून तेजी राहिली नाहीं; घरीं दारीं विलायत भरली आहे. सरकारी देण्यानें तर लोकांस अगदीं टेकीला आणून वरचेवर नव्या बाबी निघतच आहेत; लोकांतला वकूब पाहिला तर कोणाच्या अंगीं हिंमत नाहीं, जो तो आपल्यापुरतें पहाणारा, दुसऱ्याचें पागोटें माझ्या हातीं कसें येईल, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे चुगली करून दुसऱ्यास पेंचांत कसा आणीन, पुढें पुढें शेंपूट हलवून व बुटाचे पवित्र प्रहार सोसून खुशामत कशी करीन, या विचारांत बहुतेक मंडळी मग्न; शिपाईगिरी लोकांत किती राहिली आहे ह्मणाल तर शस्त्रास्त्रांचीं चित्रें पुस्तकांतून पहावीं व त्यांचे प्रयोग इतिहासांत वाचावे: नुसत्या शरीरसामर्थ्याकडे पहावें, तर दर पिढींला आंत आंत पाय येत असून लवकरच हरबऱ्याच्या झाडाला शिडी लावण्याची पाळी येते कीं काय कोण जाणे असें वाटतें! जुन्या विद्या, जुन्या कला, या तर नाहींशा होत चालल्या आहेत; त्यांच्या जागीं नव्या येत चालल्या आहेत ह्मणावें तर तेंहि नाहीं. याखेरीज दुष्काळ, महामारी वगैरे हळू हळू येथें निरंतरचें बिऱ्हाड करूं पहात आहेत असेंहि दिसतें!

एकंदरींत हल्लींच्या काळाला या देशाची स्थिति मोठी भयंकर झाली आहे यांत बिलकूल संशय नाहीं.

तेव्हां वरील रीतीनें पहातां आमच्या देशाच्या आक्षेपकांचें ह्मणणें सर्वथैव खरें आहे हें कोणीहि कबूल करील. पण निकृष्ट स्थितीचीं दोन स्वरूपें असतात; एक शाश्वत अथवा नित्य व दुसरें आगंतुक अथवा नैमित्तिक. जसा झाडाच्या मूळाला अपाय झाला किंवा मनुष्यास क्षयाची भावना झाली ह्मणजे त्यांची वाढ खुंटून तीं दुसऱ्या पंथाला लागलीं असें समजायाचें, त्याप्रमाणेंच फार दिवस परकी अमलांत राहिल्यानें किंवा त्याची स्वतःची व्यवस्था सुटल्यानें जें अगदीं निःसत्व होऊन गेलें त्या राष्ट्राची स्थिति होय. अशा अवस्थेस शाश्वत निकृष्टावस्था ह्मणतां येईल. अशा स्थितींत राष्ट्र फार दिवस रहाणें ह्मणजे मुष्कीलच हें सांगणें नको. दुसरी आगंतुक अथवा नैमित्तिक निकृष्टावस्था ह्मणजे कांहीं अपूर्व अनर्थापात होऊन त्यांच्या योगानें जेव्हां राष्ट्र क्षीण होऊन जातें, पण त्याच्या अंगचा जोम कायम असल्यामुळें कालेंकरून त्याची स्थिति पुनः सुधारते किंवा पहिल्याहून त्याची अधिक भरभराटहि होते. या दोन्ही स्थितींचीं उदाहरणें इतिहासांत अनेक आहेत. मिसर, इराण, वगैरे देशांचें वैभव नष्ट झाल्यास आज हजारों वर्षे होऊन गेलीं, व आजला तर त्यांचा फारसा मागमूसहि उरला नाहीं ह्मटलें असतां चालेल. ग्रीस देश हा प्राचीनकाळीं अत्यंत उत्कर्षाच्या स्थितीस येऊन पोंचला असतां आणि सर्व विद्या व सर्व कला जशा काय तेथें अवतीर्ण होऊन राहिल्या असतां, हल्लीं त्या देशाची स्थिति पाहिली तर पन्नास वर्षांपूर्वी तर तो मुसलमानांच्याच ताब्यांत होता, आणि हल्लीं जरी स्वतंत्र स्थितींत आहे तरी पूर्वीच्या वैभवाची आज तेथें छायाहि दृष्टिगोचर होत नाहीं. यूरोपच्या संस्थानांतील अत्यंत निकृष्ट स्थितींतलें संस्थान ग्रीस हें होय. यासारखीच पुष्कळ अंशीं इटाली देशाचीहि स्थिति होय. जे लोक पूर्वी साऱ्या जगास आजिक्य होऊन राहिले होते, व ग्रीक लोकांची विद्या ज्यांनीं संपादन करून वृद्धिंगत केली होती, त्या लोकांची आज प्रसिद्धी ह्मटली ह्मणजे भिजास, छानछूक, नीतिभ्रष्टता या गुणांनींच फारकरून आहे. शेजारच्या राष्ट्रांनीं त्यास यापूर्वी अनेक वेळां पादाक्रांत करून टाकलें आहे, व हल्लीं एकंदर युरोपियन राष्ट्रांत सदरील देशाची गणना सामान्य प्रतींतच आहे. तेव्हां मिसर, इराण, ग्रीस, रोम, हीं उदाहरणें वर सांगितलेल्या पहिल्या स्थितीचीं होत. दुसऱ्या स्थितीचीं उदाहरणें ह्मटलीं ह्मणजे केनीच्या लढाईनंतर रोमची जी अवस्था झाली, पानपतच्या दारुण संग्रामानंतर ब्राह्मण बादशाहीचा जो अपकर्ष झाला, किंवा शिवाजीच्या मरणोत्तर त्याच्या विजवट्या लेकानें जें लवकरच चोहोंकडे वाटोळें करून टाकलें, हीं सर्व होत. या सर्व महाप्रसंगीं वरील राष्ट्रांची स्थिति खग्रास झालेल्या चंद्राप्रमाणें झाली होती. पूर्णग्रस्त चंद्र जसा सर्वथा निष्प्रभ होत्साता दीन दिसूं लागतो, किंवा सूर्य तर पूर्णग्रा-

ससमयीं आकाशांतून अगदीं नाहींसा झाल्यासारखा होतो, त्याप्रमाणेंच केनीच्या लढाईनंतर कांहीं दिवस रोमची सत्ता त्या शहराच्या तटापर्यंतच काय ती होती; पानपतच्या रणमखांत जी पूर्णाहुति पडली, तिच्या योगानें खुद्द पेशव्याची तर कंबरच खचून तो मरणाच्या दारीं बसला; व एकंदर राज्यावरहि अत्यंत ग्लानि आली. आणि तिसऱ्या उदाहरणांत तर मराठ्यांची राजधानी व राजकुल त्यांच्या चिरंतन वैऱ्याच्या कबजांत सांपडून संपूर्ण राज्यवृक्ष उपळून पडण्यासारखाच झाला होता ! तरी असल्या भयंकर विपत्तींतहि वरील तीन संस्थानें डगमगलीं नाहींत; कारण त्यांचा बाह्यतः जरी अगदीं विध्वंस झाला, तरी त्यांचा आंतला जोम जशाचा तसा कायम होता. यास्तव—

कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें ।

या न्यायानें त्यांचें लवकरच पुनरुज्जीवन झालें. हें तर काय, पण जसें खचीं केलेलें झाड पुनः विलक्षण जोरानें फोफावतें, त्याप्रमाणेंच वरील संस्थानांनीं पुनः आपला प्रभाव असा प्रगट केला कीं, त्यांच्यापुढें त्यांचे शत्रु अगदीं जेरीला आले. रोमन लोकांनीं केनीच्या लढाईचा बदला झामाच्या लढाईंत घेतला; थोरल्या माधवरावानें हिंदुस्थान पुनः सर करून यवनांचें पुनः शासन केलें, निजामाची खोड मोडून हैदरास तर वेळोवेळ चीत केलें, शिवाय नागपूरकर, कोल्हापूरकर वगैरेंचा बंदोबस्त करून घरचें काकांचें प्रचंड बंड मोडलें तें निराळेंच ! त्याप्रमाणेंच मराठे सरदारांपैकीं दोघां पट्ट्यांनीं अवरंगजेबाचा कसा पाठपुरावा केला, व शेवटीं त्यास जेमतेम करीत अहंमदनगरांत कसें नेऊन घातलें, हेहि सर्व इतिहासज्ञांस विदित आहेच तर हीं तीन उदाहरणें दुसऱ्या प्रकारच्या निकृष्ट स्थितीचीं होत.

४. आतां सध्यां हिंदुस्थानची जी निकृष्ट स्थिति आहे, ती वरच्यांपैकीं कोणती आहे याचा विचार करणें अवश्य आहे. या विषयावर एकंदरींत पहातां कोणाचाहि मतभेद नाहींच ह्मटलें असतां चालेल. राजा राममोहनरायापासून तों जोतीबापर्यंत व एडनवासी दरवडेखोरापासून तों परवां निवर्तलेल्या जोशीबोवांपर्यंत आज शेंकडों लोकांचे जे अनेक प्रकारांनीं उद्योग चालू झाले व पुढें चालू आहेत त्या सर्वांवरून अर्थात् हेंच अनुमान निघतें कीं, ही आर्यभूमि आज अनेक कारणांनीं जरी विपन्न स्थितीस येऊन पोंचली आहे तरी प्रयत्नांतीं तिचा उत्कर्ष होण्याचा अद्याप संभव आहे. आमचे राज्यकर्तेहि आह्मांस कढूं लागल्यापासून आह्मांस हेंच सांगत आले आहेत कीं, "बाबांनो, तुमचा हा विस्तीर्ण देश आकाशांतील प्रभूच्या सत्तेनें आमच्या हातीं जो आला आहे तो उगीच नव्हे. आह्मांस देवानें तुमचे पालक नेमले आहेत. तर तुमची अज्ञानदशा सरून तुह्मी आपला कारभार स्वतः पाहूं लागण्याजोगे हुशार

झालां ह्मणजे मग आमचे काम कांहीं उरलें नाहीं. आह्मी कृतकृत्य होत्साते तुह्मांस दिल्लीपदावर आरूढ करून आपल्या श्वेतद्वीपास पुनः परत जाणार !" या नाटकी आश्वासनांत कितीहि तथ्य असो; तरी निदान एवढें खरें आहे कीं, आजपर्यंत आमच्या राज्यकर्त्यांनीं आह्मांस अज्ञानदशेतून काढण्यास पुष्कळ प्रयत्न केले, व अद्यापहि ते प्रयत्न चालूच आहेत; तसेंच वरील प्रयत्नांस यशहि पुष्कळ आलें यांत संशय नाहीं. ही जी पाश्चात्यांच्या प्रयत्नांची येथें सफलता झाली हिजविषयींच नुसता विचार केला असतां आमच्या राष्ट्राची अंतर्गत स्थिति कशी आहे हें कोणाच्याहि लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. जसा एखादा नदीप्रवाह लव्हाळ्यांनीं चहूंकडे आच्छादून टाकला असल्यामुळें दृष्टिगोचर होत नसतो व तो आटून गेला कीं काय असा भास होतो, किंवा एखादा जबरदस्त घाव लागल्यानें चांगला सशक्त मनुष्यहि जसा कांहीं वेळ निश्चेष्ट होऊन पडतो, तशी वस्तुतः पहातां आज आमच्या देशाची स्थिति झाली आहे. पूर्वी कधींहि पडली नव्हती अशी परकी अंमलाची जबरदस्त मगरमिठी त्यावर एकाएकीं येऊन पडल्यामुळें त्याची हालचाल अगदीं बंद झाल्यासारखी बाह्यतः दिसते खरी, व इतक्या दिवसांची निश्चेष्टतेनें त्याच्यावर पुष्कळ ग्लानि आली आहे हेंहि खरें; तरी एकंदरींत पहातां आंतल्या शरीरप्रकृतीस कांहीं धक्का पोंचला आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

वरील मत पुष्कळांस विलक्षण वाटण्यासारखें आहे, व आजपर्यंत आमच्या देशाच्या संबंधानें जे जे ह्मणून विचार बाहेर पडले आहेत त्या सर्वांस तें विरुद्धच आहे ह्मटलें असतां चालेल. आमचा धर्म बिघडला आहे, आमचीं नीतिं सुटली आहे, आमचे मूळचे चांगले आचार जाऊन वेडगळ रीतिभाति आह्मांस लागल्या आहेत, इत्यादि विषयांचें प्रतिपादन कोणीं ऐकिलें नाहीं ? लोकहितवादींच्या ग्रंथांतून तर प्रायः याच तत्त्वांचें विवेचन आढळतें. मग हीं सर्व मतें एकीकडे ठेवून या आमच्या देशाच्या प्रकृतीचें मान यथास्थित आहे, व त्याच्या रक्तशुद्धीबद्दल विशेष आयास करण्याची जरूर नाहीं, हें मत किती धाष्टर्याचें वाटणारें आहे हें सांगणें नको ! यास्तव त्यावर सविस्तर विवेचन करणें जरूर आहे.

एखाद्या मनुष्याची शरीरप्रकृति दुरुस्त किंवा नादुरुस्त आहे याची परीक्षा जशी त्याच्या नाडीवरून वगैरे करतां येते, त्याप्रमाणें देशाची स्थिति ठाम करण्याचें असुकच एक साधन आहे असें जरी नाहीं, तरी सामान्यतः कित्येक गोष्टींवरून वरील निर्णय होण्यासारखा असतो. या गोष्टी शिपाईगिरी, बुद्धिमत्ता, कलाकौशल्य इत्यादि होत. आतां हे गुण आमच्या देशांत अद्यापि कायम आहेत हें ह्मणणें पुष्कळांस केवळ हटवादीपणाचें वाटेल, पण जो वस्तुतः शोध करील त्यास वरील उल्लेख केवळ तसा वाटणार नाहीं. हल्लीं आमचा देश येथून तेथून सारा परद्वीपस्थ लोकांच्या ताब्यांत

आला असून त्यांत जीं अनेक शूर राष्ट्रें आजपर्यंत स्वातंत्र्यानें वागत होतीं तीं आजला सर्व परतंत्र होऊन गेलीं आहेत. त्यांतील सध्यां एकासहि स्वसत्तेनें अमुक गोष्ट करीन ह्मटलें तर सामर्थ्य उरलें नाहीं, वगैरे जे प्रकार येथें सर्वांस दृष्टीस पडतात त्यांवरून सामान्यतः कोणासहि असें वाटण्याचा संभव आहे कीं, हिंदुस्थानांतील वीस कोट प्रजा ही केवळ नामर्द झालेली आहे, हींत कांहीं जीव उरला नाहीं. आमच्यांत तर कित्येक असे बहादर गणिती आहेत कीं वरील एकंदर लोकसंख्येचा व या देशांत असणाऱ्या युरोपियन फौजेचा मेळ घालून देऊन दहा हजार काळे लोकांबरोबर एक गोरा शिपाई असें ते बेलाशक कोष्टक घालून देतात ! लोकहितवादीप्रभृति देशकार्यधुरंधरांची समजूत तरी वरच्याहून भिन्न आहे असें नाहीं. आतां अंमळ विचार केला असतां वरील अभिप्राय कितपत यथार्थ ठरता तो पाहूं.

जगाच्या कोणच्याहि भागाचा इतिहास ज्यानें मननपूर्वक वाचला असेल त्याच्या एक गोष्ट सहज लक्षांत येणारी आहे कीं, दोन सैन्यांचें युद्ध झालें असतां त्यांत जय अपजय जो होत असतो त्यावरून सैनिकांच्या शरीरसामर्थ्याचा व मर्दुमकीचा नेहमीं सुमार लागण्यासारखा असतो असें नाहीं. जयापजयांत यदृच्छेचा जो भाग असतो तो जरी काढून टाकला, तरी अवशिष्ट भागांत मुख्य अंश ह्मणजे सेनानायकाचें युद्धकौशल्य हाच होय. काष्ठयुद्धांत ह्मणजे बुद्धबळांच्या डावांत सरशी होणें हें जसें खेळणाराच्या पटाईतपणावर नेहमीं असतें, तसाच पुष्कळ अंशीं प्रकार खरोखरच्या युद्धांतील होय. त्यांतून अलीकडे तर दारूचा उपयोग लढाईत होऊं लागल्यापासून वरील काष्ठयुद्धाचें साम्य युद्धास अधिकाधिकच येत चाललें आहे. पूर्वी लढाई जिंकण्यास अंगच्या जोराचें जसें काम पडत असे, तसें आतां फारकरून नाहींच ह्मटलें असतां चालेल. दूरच्या दूर राहून सेनानायक सांगेल त्या वेळेस गोळ्यांचा भडिमार करावयाचा व तो हुकूम फिरवील त्याप्रमाणें भरभर रणभूमीवर हालचाल करावयाची एवढेंच अलीकडे शिपायांचें काम झाल्यामुळें सेना हें केवळ एक चालतें बोलतें यंत्रच बनून राहिलें आहे. त्याला स्वतःची ह्मणून प्रेरणा मुळींच नसून वरून जी इशारत येईल ती अमलांत आणावी एवढीच त्याची कामागिरी. हें स्थित्यंतर युद्धकलेंत अलीकडे झाल्यामुळें काय चमत्कार झाला आहे कीं. मोठा उंचापुरा जवान सारखाच व वाऱ्यानें उडून जाण्यासारखें एखादें किंवकट पोरहि सारखेंच ! सैनापत्याच्या कामांताहि वरच्यासारखाच फरक झालेला आहे. पूर्वीप्रमाणें आतां सेनापति मोठा धिप्पाड पुरुष व सर्व शस्त्रास्त्रांत कुशल असा असला पाहिजे असें नाहीं. त्याचें कसब त्यास माहीत असलें ह्मणजे बस होतें; त्याच्या अंगच्या सामर्थ्याचा त्याच्या युद्धकौशल्याशीं कांहीं संबंध नाहीं. एवढा नेपोलियन बादशाहा, कीं जो दहा बारा वर्षांत गोलंदाजीपासून बादशाहीपर्यंत चढला, व प्रत्यक्ष त्याचे शत्रु ज्याच्याविषयीं

असें ह्मणत असत, कीं तो एकटा सैन्यांत असणें व अर्ध्या लाख फौजेची कुमक मिळणें बरोबर असे,—ती स्वारी स्वतः कशी होती ह्मणाल तर वामनमूर्ति, व लढाईंत ह्मटलें तर सरासरी पेशव्यांच्या मूळ पुरुषाच्या तोडीचे ! ![1]

वर सांगितलेली गोष्ट अंमळ ध्यानांत धरली असतां आमच्या देशाच्या प्राच्य व पाश्चात्य आक्षेपकांनीं एतद्देशीय लोकांच्या शिपाईगिरीच्या संबंधानें केलल्या पांडित्याचा प्रायः विध्वंस होऊन जाणारा आहे. तिजवरून एखादें पोर सुद्धां सांगूं शकेल कीं, एखाद्यानें उंच डोंगरावर जाऊन उभें राहून मी साऱ्या पृथ्वींतील माणसांहून उंच आहे असें ह्मणणें, किंवा आगगाडींत बसलेल्या मनुष्यानें पायीं धांवणाऱ्या मनुष्याहून मी अधिक वेगवान् ह्मणून फुशारकी मारणें, हीं कृत्यें जितकीं समंजस आहेत; तितकाच समंजसपणा नेपोलियनच्या शिपायानें किंवा येथील पलटणींतील गाऱ्या मनुष्यानें आपल्या वीरश्रीची बढाई मारण्यांत आहे. शिवाय ही दुसरी गोष्टहि कोणाच्या सुद्धां लक्षांत येईल, कीं दहा हजार नेटिव लोकांस जर एक युरोपियन भारी, तर मग गेल्या शंभर वर्षांत कित्येक वेळां इंग्रज लोकांचे जे पराभव झालेले आहेत व कत्तली उडाल्या आहेत तो सर्व प्रकार खोटा ह्मटला पाहिजे !

तेव्हां एकंदरींत वरील मत, कीं एतद्देशीयांवर परकी लोकांचें वर्चस्व झालें आहे यास्तव ते पराक्रमहीन होत, हें अगदीं असमंजस होय. याशिवाय प्रत्यक्ष प्रमाण पाहिजे असल्यास या देशांतील काळी फौज हें एक आहेच. शिवाय हेंहि कोणास सांगावयास नको च, कीं पूर्वीपासून शिपाईगिरीविषयीं प्रख्यात असे जे रजपूत पुरभय्ये वगैरे लोक यांच्या अंगचें पाणी हल्लींच्या चिरकालिक स्वस्थतेनेंहि कमी झालें आहे असें नाहीं; इतकेंच कीं तें प्रगट होण्यास हल्लीं बिलकूल जागाच नाहीं ![2]

---

१. मेकॉलेनें एके ठिकाणीं पुढील उल्लेख केला आहे—

"Bonaparte loved to describe the astonishment with which the Mamelukes looked at his diminutive figure. Mourad Bey, distinguished above all his fellows by his bodily strength and by the skill with which he managed his horse and his sabre, could not believe that a man who was scarcely five feet high and rode like a butcher, was the first soldier in Europe !

—*Life and works of Addison.*

२. 'राजा कालस्य कारणम्' या संस्कृत ह्मणीप्रमाणें जें राष्ट्र कांहीं कालापूर्वी साऱ्या जगास भारी झालेलें असतें तेंच पुढें किती नादान होऊन जातें याची पुढील उताऱ्यावरून प्रतीति येईल—

"The character of the Swedes has differed greatly in differ-

(पुढें चालू.)

हें वर सांगितल्यांपैकीं एका गुणाविषयीं झालें. आतां दुसरा गुण बुद्धिमत्त्व. या गुणाविषयीं आमच्या देशाची पहिल्यापासून प्रख्याति आहे. युरोपांतील अत्यंत प्राचीन

---

ent ages; nor is it very uniform. At present their peasants seem to be a heavy plodding race of men, strong and hardy, but without any other ambition than that of subsisting themselves and their families as well as they can. It seems difficult to conceive that the modern Swedes are descendants of those, who, under Gustavus Adolphus and Charles XII carried terror in their names through distant countries, and shook the foundations of the greatest empires. The intrigues of their senators drew them to take part in the Seven Years' War against Prussia; yet their behaviour was spiritless, and their courage contemptible."

—*Geographical Grammar.*

"Who that has lived here (Berlin) will deny that the Prussians are energetic, patriotic, and teeming with youthful vigour; that they are not corrupted by sensual pleasures, but are manly, have earnest convictions, do not think it beneath them to reverence sincerely what is noble and lofty? What a melancholy contrast does France offer in all this? Having sneered at everything, she has lost the faculty of respecting anything. Virtue, family life, patriotism, honour, religion, are represented to a frivolous generation as fitting subjects of ridicule. The theatres have become schools of shamelessness and obscenity. Drop by drop poison is instilled into the very core of an ignorant and enervated society, which has neither the insight nor the energy left to amend its institutions, nor—which would be the most necessary step to take—become better informed or more moral. One after the other the fine qualities of the nation are dying out. Where is the generosity, the loyalty, the charm of our *esprit*, and our former elevation of soul? If this goes on, the time will come when this noble race of France will be known only by its faults. And France has no idea that while she is sinking, more earnest nations are stealing a march upon her, are distancing her on the road to progress, and are preparing for her a secondary position in the world.

—*Character.*

राष्ट्रें जेव्हां उदयालाहि आलीं नव्हतीं, तेव्हांपासून या आर्यभूमींतील लोकांच्या बुद्धीचा जो विकास झालेला आहे तो हल्लींच्या अपकर्षाच्या स्थितींतहि लयास गेला आहे. असें ह्मणवत नाहीं. पंचनददेशांत जेव्हां आर्यांची प्रथमतः वसाहत झाली, तेव्हां जी त्यांच्या बुद्धीची प्रखरता होती, ती आज हजारों वर्षें लोटून गेलीं असतां अद्याप जशीची तशीच कायम आहे असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. वरील गोष्टींचें प्रमाण पहाण्यास फार लांब जावयास नको इंग्रेजी विद्येचें अध्ययन आमच्या लोकांनीं किती जलद केलें, व जो विषय हातीं घेतला त्यांत तेºकिती लवकर पारंगत होतात, हें कोणासहि सांगायाला पाहिजे असें नाहीं. युनिव्हर्सिटीच्या परीक्षा सुरू झाल्यास नुकतीं कोठें वीस वर्षें झालीं न झालीं तों इतक्यांत किताबवाले पैशापासरी होऊन बसले; अकरा वर्षांपूर्वी सिविल सर्विसच्या परीक्षेस जाण्याची सरकारानें इकडील मंडळीस सोय करून दिली, तों पहिल्याच खेपेला असा प्रकार नजरेस आला कीं हें लचांड कोठून केलें असें सरकारास होऊन त्यास पुढच्याच वर्षीं हात आखडावा लागला ! तेव्हां कोणत्याहि विषयाचें ग्रहण करण्याची जी शक्ति आमचे लोकांचे ठायीं आढळते तिजवरून त्यांच्या बुद्धिमत्त्वाचें मान कोणाच्याहि लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं.

वरील गुणाचाच विकास आमच्या देशांतील कलाकौशल्यांत दृष्टीस पडतो. हें अंगहि प्राचीन काळापासून या देशास अनुकूळ असून इतर देशांतून अपरिमित संपत्तीचा लोट इकडे येण्यास तें कारणभूत झालें हें इतिहासज्ञांस विदित आहेच. त्याप्रमाणेंच इकडील नमुने नेऊन युरोपियन लोकांनीं आपल्या देशांत कारखाने सुरू केले, व त्याच्या योगानें इकडील उद्योग बसला, वगैरे गोष्टीहि अलीकडे सर्वांस माहीत झालेल्याच आहेत. तरी इतकें असतांहि येथील कारागिरी अद्यापि कोणत्या तऱ्हेची आहे याचा मासला एतद्देशीय व परदेशीय प्रदर्शनांतून दृष्टीस पडतो. इकडील कला जसे पाश्चात्य शिकले त्याप्रमाणेंच तिकडील कलांचा अभ्यास करून त्यांचा इकडे प्रचार करणें ही गोष्ट अद्याप लोकांच्या मनांत भरलेली नाहीं; पण ती जेव्हां भरेल तेव्हां इकडील कारागीर तिकडच्यांशीं टक्कर मारायाला लवकरच तयार होतील यांत बिलकूल संशय नाहीं.

तेव्हां एकंदरींत पहातां आमच्या बुद्धीचा असा पक्का निश्चय आहे कीं, आमचे पूर्वीचे सर्व गुण आमच्या ठिकाणीं अद्याप कायम आहेत. इतकेंच कीं, भस्माच्छादित अग्नीप्रमाणें किंवा गंजलेल्या तरवारीप्रमाणें त्यांची हल्लीं स्थिति झाली आहे. त्यांस प्रगट होण्यास हल्लींच्या मन्वंतरांत जर कोठें अवकाश असता तर ते कधीं असे अगोचर रहाते ना. आतां हें खरें आहे कीं, आमच्या राज्यकर्त्यांकडून आह्मांस वेळोवेळ मोठीं गोड गोड आश्वासनें मिळत गेलीं आहेत, कीं आमच्या हिताखेरीज त्यांचा

येथें राज्य करण्यांत दुसरा बिलकूल उद्देश नाहीं. आह्मांस उच्च स्थितीस आणून पोंच. विलें ह्मणजे त्यांचें येथें दुसरें काम कांहीं उरलें नाहीं. धर्माची, जातीची वगैरे तफावत बिलकूल मनांत न आणतां आह्मांस मोठमोठ्या जागा खुशाल दिल्या जातील, इ० इ० वरील उदारोक्ति पार्लमेंटांतील भाषणांतून, जाहीरनाम्यांतून, दरबारांतील नाटकी बोलण्यांतून वगैरे सहस्रशः प्रगट झालेल्या आहेत. पण हा सर्व प्रकार बहुतेक वाग्डंबराचाच आजपर्यंत ठरलेला आहे. पण पुढें कधीं काळीं आमचें बादशाही सरकार आपल्या वचनांतील कांहीं अक्षरें तरी मोकळीं करण्याचें जेव्हां मनांत आणील, किंवा आमच्या लोकांची हक्कांची सुस्ती झडून त्यांस कंबर बांधून देशहितार्थ उद्योग करण्याचें अगत्य भासूं लागेल, तेव्हां वर सांगितलेल्या गुणांची त्यांस प्रतीति घडेल.

येथवर वरील दोन प्रश्नांपैकीं एकाचा उलगडा झाला;—कीं आमच्या देशाची अवस्था निकृष्टतेची आहे कीं कसें, व तशी असल्यास ती कोणत्या प्रकारची आहे? आतां दुसऱ्या प्रश्नाचा विचार करावयाचा. तो हा कीं, आह्मी निकृष्ट स्थितीस पोंचलों यास आमचें मौर्ख्य कितपत कारणभूत आहे.

५. या दुसऱ्या प्रश्नाचाहि उलगडा मागील प्रश्नाप्रमाणेंच वस्तुतः पहातां तेव्हांच होण्यासारखा आहे. कोणतीहि हानि होण्यास मूर्खत्व हेंच कारण होय हें उघड आहे. जर मनुष्य सर्वज्ञ असेल व सदोदित जागरूक राहील तर त्याची कोणतीहि हानि होण्याचा संभव नाहीं. वरील दोन गुण जितक्या प्रमाणानें कोणामध्यें अधिक असतात तितक्या मानानें तो निर्भय व सुरक्षित असतो हें अनुभवसिद्धच आहे. तर अशा अर्थानें जर पाहिलें तर व्यक्तिमात्राची किंवा एकंदर राष्ट्राची निकृष्ट स्थिति ही ज्याच्या त्याच्या मूर्खतेचेंच फळ होय यांत संशय नाहीं. आमचे बाजीराव साहेब जर शहाणे व दूरदृष्टि असते तर या प्रांताची आजला अशी स्थिति कां होती? भाऊसाहेब जर पानपतास आपलाच आग्रह धरून न बसते तर पुढें ओढवलेलें महा अरिष्ट कां प्राप्त होतें? नेपोलियन जर गर्वानें चढून न जातां अंमळ अक्कल खर्च करता, तर त्याचे पांच लाख सैन्य रशियांत गारद कां होतें? व स्वतः चोरट्यासारखा एकटा माघारी पळून कां येता? माजी कंपनी सरकारच्या फौजेचा तरी असाच अफगाणिस्थानांत जो मागें नाश झाला तोहि सुविचाराअंतीं टळला नसता काय? तेव्हां एकंदरींत जेथें तेथें मूर्खत्वजन्य अविचार हाच फळाला येतो हें उघडच आहे. आपल्या भाषेंतच ह्मण आहे कीं, 'आधीं अक्कल जाते आणि मग भांडवल जातें'. भारवीचाहि असाच दहा हजार रुपये किंमतीचा एक श्लोक सर्वप्रसिद्ध आहे—

सहसा विदधीत न क्रिया-
मविवेकः परमापदां पदम्।
गुणते हि विमृश्यकारिणं

गुणलुब्धाः स्वयमेव संपदः,[1]

तेव्हां वरच्याप्रमाणें सामान्यतः विचार करतां आमचीं आज जी पडती कळा आहे तीस आमचें मौख्यर्य कारणभूत आहे हें निर्विवाद आहे.

पण हा केवळ तात्त्विकरीत्या विचार झाला. हा व्यवहाराला कांहीं उपयोगी नाहीं. सर्वज्ञता व निरंतर जागरूकता हे मानुष धर्म जर मुळींच नव्हेत, तर मग त्यांच्या संबंधानें विवेचन करून फळ काय? वरील गुणांनीं जो विशिष्ट असेल तो सदोदित उच्चस्थितींत राहील हें ह्मणणें व ज्यास पंख असतील त्यास भुईवर पडण्याचें भय नाहीं हें ह्मणणें, हीं दोन्ही सारखींच होत. यास्तव वरील मुद्द्याचा व्यवहारदृष्ट्या विचार करणें जरूर आहे.

हा विचार ह्मटला ह्मणजे असा आहे कीं, सामान्यतः जगाची रहाटी जी दृष्टीस पडते तिजकडे लक्ष दिलें पाहिजे; व साधारणपणें इतर राष्ट्रांविषयीं जी आपणांस माहिती आहे तिजवरून पहातां हिंदुस्थानांतील लोकांस त्यांच्या विपन्न स्थितींबद्दल कितपत नांव ठेवणें रास्त आहे हें पाहिलें पाहिजे. वरील विचार करून जर असें ठरलें, कीं इतर राष्ट्रांचे ठायीं जें सामर्थ्य व जी अक्कल बहुंधा आढळते तितकें सामर्थ्य व तितकी अक्कल सुद्धां आमच्या देशाच्या वांट्याला आलीं नाहींत तर मग आमच्या माथीं येणारा दोषारोप अवश्य पतकरला पाहिजे.

आमच्या या आर्यभूमीच्या संबंधानें जो कोणी विचार करूं लागेल त्यानें प्रथमतः ही एक मोठी गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, हा देश मोठा अवाढव्य आहे. हिंदुस्थानाचा विस्तार रशिया देश काढून टाकला असतां बाकीच्या युरोपखंडाएवढा आहे हें सर्वांस माहीत असेलच. तर हिंदुस्थान ह्मणजे युरोपांतील एकुणीस राष्ट्रें असें समजलें पाहिजे. या एकुणीस राष्ट्रांत जसे शेंकडों धर्मपंथ आहेत, शेंकडों तऱ्हेचे आचारविचार आहेत, शेंकडों भाषाभेद आहेत, तशीच स्थिति हिंदुस्थानांतील आहे. हिंदुस्थान हें जरी या देशाचें नांव आहे, तरी यांतच एकीकडे फिरंगाण ह्मणजे फिरंग्याचा मुलूख आहे, एकीकडे हपसाण ह्मणजे हपशाचा मुलूख आहे, एकीकडे रोहिलखंड ह्मणजे रोहिल्यांचा मुलूख आहे, एकीकडे गोंडवन ह्मणजे अगदीं रानटी स्थितींतले गोंड लोक यांचा टापू आहे, गुजराथेचा भाग मुसलमानांनीं हाकून दिलेल्या पारशांनीं व्यापला आहे, पंजाब शिखांनीं धरला आहे, याप्रमाणें स्थिति आहे. आचारविचार व रीतिभाती यांच्या संबंधानेंहि या देशांत वरच्यासारखेंच वैचित्र्य आहे. साप जरी चावला तरी त्यास युक्तीनें चिमट्यांत धरून दूर रानांत नेऊन सोडणारे जैनधर्मी श्रावक

१. "कोणतीहि गोष्ट उतावळीनें करूं नये, कां कीं, अविवेक हा आपत्तींचें मुख्य मूळ आहे. जो कोणतीहि गोष्ट सुविचारानें करतो, त्याच्या गुणास भुलून संपत्ति त्यास स्वयमेव वरतात !" या श्लोकाविषयीं एका सावकाराची सर्वप्रसिद्ध गोष्ट आहे.

लोक येथें आहेत, व लग्नाचीं लग्नें बसवणारे फांसेपारधी अथवा ठगहि आहेत;[1] पन्नास पन्नास शंभर शंभर बायका करणारे असे कुलीन ब्राह्मण एकीकडे आहेत, दुसरीकडे पतिवाहुल्यानें रहाणाऱ्या कुर्ग लोकांच्या स्त्रिया आहेत; एकीकडे कन्याघातार्ची प्रवृत्ति आहे, दुसरीकडे स्त्रीराज्यार्ची अलौकिक तऱ्हा आहे; ज्यांनीं बापजन्मीं कधीं शस्त्रस्पर्श केला नाहीं अशी एकीकडे गुजराथी व बंगाली मंडळी आहे, व तरवारीशीं सदोदित काम ठेवणारे व शस्त्रपूत मरणाविषयीं हौस बाळगणारे असे दुसरीकडे रजपूत व पुरभय्ये आहेत; एकीकडे मराठमोळ्याचा गोषा आहे, आणि दुसरीकडे स्कॉटलंडच्या कांहीं भागांत आढळणाऱ्या प्रथम निवेदनाचा प्रकार चालू आहे![2] आतां वरील प्रकारावरून पहातां या देशांतील लोकांचें सामान्यतः वर्णन करणें ह्मणजे वस्तुतः दुरापास्त असावें. कारण जेथें एवढें वैचित्र्य आढळतें तेथें कोणता गुण जमेस धरावा आणि कोणता नये धरूं? सरडा जर घटकेंत तांबडा आहे, घटकेंत हिरवा आहे, घटकेंत पांढराहि आहे, तर त्याचा अमुकच रंग ह्मणून कोणता सांगावा? अर्थात् कोणताच सांगणें बरोबर नाहीं. पण ही गोष्ट एवढी उघड असतांहि पुष्कळ इंग्रज ग्रंथकारांस दिसली नाहींशी वाटते. त्यामुळें त्यांच्या ग्रंथांत पुष्कळ विलक्षण विरोध आढळतात. एके ठिकाणीं वाचावें, कीं हिंदु लोकांसारखे दुर्बळ व गरीब लोक कोठें नाहींत; दुसरीकडे उलटून पहावें तों सत्तावन सालचा भयंकर वृत्तांत दृष्टीस पडतो. एकीकडे पहावें तों असा उल्लेख आढळतो कीं, हिंदु लोकांत स्वातंत्र्याचें वारें कसें तें माहीतच नाहीं, इतर राष्ट्रांनीं मानेवर ठेवलेलें जोकड मोठ्या आनंदानें वागवावें हाच त्यांस जन्माभ्यास. दुसरीकडे पहावें तों गॉल लोकांचा सेनानायक जसा शुक्र झालेल्या रोम शहरांत शिरला तसाच इकडे अल्लाउद्दिन चितूर शहरांत शिरत आहे, प्रतापगडावर नारसिंहावताराचा नमुना उतरला आहे, श्रीवर्धनकर कुळकरण्याचा पणतू शहाजहानच्या तक्तावर बसला आहे, वसई मुक्कामीं फिरंग्याचीं व वडगांव मुक्कामीं इंग्रजांचीं तारंबळ उडाली आहे, कोणी कन्हाडी बाई मर्दानी पोषाक करून शत्रूच्या तोफखान्यावर भरधांव घोडा टाकीत आहे, इत्यादि प्रकार आढळतात. कोणी इंग्रज बहादूर आह्मांस सांगतात कीं, हिंदु लोकांस राज्य कसें चालवावें हें मुळींच कळत नाहीं; दुसरीकडे पहावें तों गोवळकोंड्याचा कारभार हांकणारा मादण्णा, अकबरबादशहाचे दिवाणजी बिरबल, हैद-

१. ठग लोक कोण हें सर्वांस माहीत असेलच. यांनीं कधीं कधीं एखादें लग्नचें लग्न गांठून साऱ्या मंडळीस एकेकानें गळफांस लावावा, असें ऐकण्यांत आहे. हिंदुस्थानचे इतिहासकार मेडोज टेलर यांचा 'ठगाची जबानी' या नांवाचा ग्रंथ प्रसिद्धच आहे.

२. स्काटलंडच्या पश्चिमेकडील कांहीं भागांत पूर्वी असा प्रघात होता कीं, कुळानें लग्न केलें असतां पाहिल्या समागमाचा अनुभव त्याच्या यजमानानें ह्मणजे जमीनदारानें घ्यावा. हा प्रकार इकडे गुजराथेंत चालू आहे हें सर्वप्रसिद्धच आहे.

राच्या राज्याचीं सूत्रें चालविणारा पूर्णय्या! मेकॉले साहेब 'वारन हेस्टिंगज'च्या निबंधांत लिहितात कीं, हिंदुस्थानासारखा भिकारडा देश साऱ्या पृथ्वींत कोणताहि नाहीं; तेंच 'लॉर्ड क्लाइव'च्या निबंधाकडे उलटावें, कीं हिंदुस्थान ह्मणजे कुबेरनगरी! तेव्हां एकंदरींत काय कीं, आमचा देश अफाट पडल्यामुळें साऱ्या युरोपाच्या स्थितीच्या संबंधानें एखादा सामान्य सिद्धांत बसविणें हें जसें असमंजस होईल तसेंच तें येथेंहि होणारें आहे.

आतां वरील विस्ताराविषयींच नुसता विचार केला तर ही गोष्ट कोणाच्याहि ध्यानांत येण्यासारखीच आहे, कीं हा विस्तारच या देशास लहानसहान रीतीनें बाधक आहे असें नाहीं. रोमन बादशाहीच्या इतिहासाची ज्यांस माहिती असेल त्यांस पुढील गोष्ट अवगतच असेल कीं, पहिला बादशहा आगस्टस यानें आपल्या वंशजांस असा उपदेश लिहून ठेवला होता कीं, सध्यां ज्या राज्याच्या सीमा आहेत त्या बेताच्या आहेत, या वाढविण्याच्या भानगडींत कोणीं पडूं नये, पडल्यास राज्यास अपाय घडेल. या उपदेशाप्रमाणेंच पुढें चाललें होतें; व कित्येक प्रसंगीं तर राज्यांतले प्रांतहि वरील बादशहानीं आपोआप सोडून दिले. पुढें ज्यांस 'युनैटेड्स्टेट्स' [संयुक्त संस्थानें] ह्मणूं लागले त्या अमेरिकेंतील प्रांतांविषयींहि कित्येक इंग्रज ग्रंथकार असें ह्मणतात कीं, ते इंग्रजी राज्यांतून वेगळे झाले या योगानें इंग्लडचें हित झालें. अफगाणिस्थानचा कबजा पतकरण्याविषयीं आमचें सरकार नाखुष आहे याचें कारण तरी तेंच. झसर्जि राजानें ग्रीस देशावर आणलेल्या वीस लाख फौजेचा व मोठ्या आरमाराचा चुराडा झाला, व नऊ वेळा युरोपांत धर्मयुद्धाबद्दल उचल होऊन ती सर्व वायां गेली यांतील बीज तरी एवढेंच, कीं अवाढव्य कारखाना असला कीं तेथें बेबंदाई सुरू झालीच! तर हिंदुस्थानाच्या विस्तारावरून जो कित्येक कोटिक्रम रचतात, कीं इंग्लड तें काय एवढेंसें बेट व हिंदुस्थान केवढा अफाट देश, तरी एवढ्याशा मुलखांतील लोकांनीं एवढें विस्तीर्ण राज्य घेतलें, तेव्हां येथील लोकांत कांहीं शौर्य नाहीं,—या कोटींत फारसा अर्थ आहे असें नाहीं. एकट्या तुर्क लोकांनीं लक्षावधि युरोपियन वीरांचा पराभव केला; यःकश्चित् अफगाणिस्थान, पण तें आमच्या केसरिहिंदच्या रथींस महारथींस अजिंक्य होऊन बसलें आहे; एवढेंसें एका कोपऱ्यांतील बेट, पण सारें युरोप जिंकणाऱ्या नेपोलियनच्या हातून तें घेणें झालें नाहीं, इत्यादि गोष्टींवरून जें अनुमान काढायाचें तेंच आमच्या देशाच्या संबंधानेंहि निघणारें आहे. तें हें कीं, अतिविस्तार हा राज्यास अपायकारक आहे; आटपशीर राज्यांत जी बळकटी असते ती मोठ्यांत असत नाहीं. आमच्या हिंदुस्थानांत पहा; छपन्न देश, छपन्न भाषा, शेंकडों जाती, शेंकडों धर्म, शेंकडों आचार! मग इतक्याचा एकोपा व्हावा कसा? आजपर्यंत तर साऱ्या देशावर एक सत्ता ही कधीं नव्हती. नांवाला जरी एक मुख्य अधिपति असला

तरी मोंगलाईत व पेशवाईत जो प्रकार दृष्टीस पडत होता तसाच असायाचा. निजाम उल्मुलुख दिल्लीच्या बादशहापासून दक्षिण देशची सुभेदारी घेऊन जे बाहेर पडले ते पडले; शिंदे होळकर जे उत्तरेस जाऊन बसले ते बसले! सध्यां तरी आमच्या सरकारास एवढ्या अवाढव्य राज्याचा बंदोबस्त जो करतां येतो आहे, तो छापखान्ने, आगगाड्या, तारायंत्रें इत्यादि अपूर्व साधनें त्यांस आयत्या वेळेस प्राप्त झालीं ह्मणूनच! सारें भरतखंड जर लोहशृंखलेनें बद्ध झालें नसतें, व तारायंत्रद्वारा सर्व राज्यसूत्रें जर श्वेतद्वीपनिवासी सभेस चार हजार कोसांवरून धरतां आलीं नसतीं, तर हल्लींप्रमाणें सर्व राज्यतंत्र सुयंत्र चालण्यास किती पंचाईत पडती हें कोणासहि सांगावयास नको!

तर आमच्या देशांतील लोकांत एकी नाहीं, त्यांनीं धर्माच्या, जातीच्या वगैरे अनेक कारणांनीं आपआपसांत हजारों तंटे उत्पन्न केले आहेत, इत्यादि प्रकारें जी आमची अर्वाचीन मंडळी हकाटी करते, व त्याबद्दल आपल्या देशावर आक्षेप ठेवते, तें अगदीं बरोबर नाहीं. इंग्लंडसारख्या चिमुकुल्या व शहाण्या ह्मणविणाऱ्या देशांत जर धर्माच्या संबंधानें शेंकडों मतभेद आहेत, व लक्षावधि मनुष्यांचे धर्मप्रकरणीं बळी पडले आहेत; लौकिक प्रकरणांत तर राजवधापर्यंत बारी येऊन परवांच्या[1] सारखी मारामारी व माभळभटी तर तेथें जर हरहमेश चालू आहे, तर हिंदुस्थानसारख्या प्रचंड देशांत आज सहस्रावधि वर्षांच्या ज्या फळ्या व जे तट पडून राहिले आहेत ते कांहींच नाहींत असें झटलें पाहिजे. युरोपखंडाच्या सर्व देशांनीं निरंतर एकवट राहून परस्पर गुण्यागोविंदानें रहावें ही इच्छा करणारास व तसें नसल्याबद्दल सर्वांस सरसकट बेवकूबीच्या सदरांत ओढणारास आपण किती शहाणा ह्मणूं! तसेंच तेथील शेकडों धर्मांचा खल करून एक सोज्वळ धर्म बनवूं पहाणाऱ्या जबरदस्त रसायनज्ञास तरी आपण कोणत्या कांटांत ढकलून देऊं? पण इतकें तरी लांब कशाला? आमच्या देशावर नाहीं तो आक्षेप आणून आपलें सुज्ञत्व मिरविणाऱ्या मंडळीकडेच जर नजर दिली, व आह्मांस शहाणें करण्याच्या निमित्त ज्या शेंकडों तऱ्हेच्या त्यांनीं खटपटी केल्या त्यांत तरी एकीचा महिमा कितपत दृष्टिगोचर होत आहे हें जर पाहिलें, तर आमच्या मतें प्रस्तुत विषयाचा तेव्हांच निकाल पडणार आहे. गेल्या पंचवीस वर्षांत आमच्या देशांत किती सभा झाल्या, किती मंडळ्या निघाल्या, किती समाज झाले, याचा पत्ता तरी आहे काय? तसेंच दर एक मंडळीची स्थिति कशी काय असते याचा जर वस्तुतः शोध केला, तर साडेतीन सभासदांत किती मतभेद, किती कुरबुरी, किती वैमनस्यें,

---

१. परवां लिबरल पक्षाची जी सरशी झाली, त्यावेळेस माजी गवर्नर टेंपल साहेब व 'बांबे ग्याझेट'चे माजी एडिटर स्याकलिन साहेब यांचा त्यांच्या देशबंधूंनीं कसा खरपूस समाचार घेतला हें सर्वांस महशूरच आहे!

किती लटपटी, याचा तरी कोणास थांग लागेल? मग शहाण्यासुरत्या बड्या बड्या विद्वान् मंडळींत जर ही व्यवस्था, तर मूर्खांच्या खाणींत निपजलेल्या मागील अज्ञान लोकांचा पाड तो काय? सारांश, मतभेद हा मनुष्यस्वभावासच खिळला आहे असें समजावें, व जें जों मनुष्यें सज्ञान होत जातात तों तों त्याचा ऱ्हास न होतां तो उलटा वाढत मात्र जातो; तसेंच जितका जितका देश विस्तीर्ण तितका तितका तो आवराया-सहि कठिण. तर या दोन गोष्टी मनांत आणल्या असतां आमच्या देशाची सध्यां जी स्थिति आहे तिजविषयीं विशेष आश्चर्य कोणासहि वाटणार नाहीं.

सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामंतचक्रं च तत्
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चंद्राविंबाननाः।
उन्मत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बंदिनस्ताः कथाः
सर्वं यस्य वशादगात्स्मतिपथं कालाय तस्मै नमः॥[१]

'वैराग्यशतक.'

अंक ६६– (१) आपल्या देशाचें प्राचीनत्व. (२) त्याची सांप्रतची स्थिति व त्यासंबंधीं पाश्चात्य व तदनुयायी ग्रंथकारांचें मत. (३) लोकहितवादींचें मत व त्यांचें निरसन.

१. आमच्या देशाच्या निकृष्ट स्थितीच्या संबंधानें जो विचार करील त्यानें मनांत आणण्यासारखी दुसरी मोठी गोष्ट ही आहे कीं, तो अत्यंत प्राचीन होय. जगाच्य इतिहासांतला असा कोणताहि काळ नाहीं, कीं ज्या वेळेस हिंदु लोक नव्हते. हल्लींचीं युरोपियन राष्ट्रें हीं रोमच्या बादशाहीखालीं असणाऱ्या प्रांतांतील लोकांची संतति होय; रोमन लोकांनीं ग्रीक लोकांपासून विद्याप्राप्ति करून घेतली; ग्रीक लोकांनीं मिसर-देशाच्या लोकांपासून ज्ञान संपादन केलें;– ते मिसरी लोक कदाचित् आमच्या प्राचीन ऋषींचे समकालीन असतील;[२] तर आमची परंपरा इतकी प्राचीन आहे.

---

१. "गेला तो नृप ते प्रधान अवघे ते पंडितांची सभा
गेली ते नगरी तशा शशिमुखी ज्या तप्तहेमप्रभा।
गेला तो नृपपुत्र त्या शुभकथा ज्यां देखिलें सर्व जें
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें कालासि त्या वंदिजे॥"

वामन.

२ "Ere yet the Pyramids looked down upon the valley of the Nile—when Greece and Italy, those cradles of modern civilization housed only the tenants of the wilderness, India was the seat of wealth and grandeur. A busy population had covered the land with marks of its industry; rich crops of the most

(पुढें चालू)

यवनांच्या[1] वीरांनीं ट्रॉय शहराला वेढा दिला होता, त्या सुमाराला इकडे शतयोजन समुद्रावर सेतु पडून लंकेवर अयोध्येच्या राजाचा मारा चालला होता; तिकडे ऑगस्टस बादशहा रोमकपत्तनीं सार्वभौमपदावर अधिष्ठित होऊन व्हर्जिलप्रभृति कविवरांच्या वाग्प्रसांत तल्लीन होऊन जात होता, तोंच इकडे शकांचें निर्दालन करून विक्रमादित्य राजा उज्जयिनीस विराजमान होत्साता 'कविकुलगुरू'च्या सरस्वतीनिष्यंदांत वाहवत होता; तिकडे येशू ख्रिस्ताचे प्रेषित आपल्या धर्माच्या प्रसारार्थ झटत होते, तेव्हांच इकडे बुद्धाचे अनुयायी चीन, तिबेट वगैरे देशांत व लंका सुमात्रा वगैरे बेटांत आपल्या गुरूच्या मतांची स्थापना करीत होते; तिकडे इंग्रेज लोक आपल्या राजावर उठून आपल्या स्वातंत्र्याचा पाया घालीत होते, तोंच इकडे एका प्रचंड वीराच्या हस्तें बहुत काळापूर्वी नष्ट झालेल्या एतद्देशीय वैभवाचें पुनरुज्जीवन होत होतें. सारांश, हा हिंदुस्थान देश कालआजचा आहे असें नाहीं; तर त्यानें मिसरी, इराणी, ग्रीक, रोम इत्यादि अनेक राष्ट्रांचे अभ्युदय व लय पाहिले आहेत, व अर्वाचीन राष्ट्रांशींहि टक्कर देऊन तो अद्याप कायम राहिला आहे.

२. वरील उघड गोष्टीकडे जो क्षणभर लक्ष पुरवील त्याच्या सुद्धां ध्यानांत सहज येणारें आहे कीं, जर हा देश इतका प्राचीन आहे तर आज तो कितीहि निकृष्ट

---

coveted productions of Nature annually rewarded the toil of the husbandman; skilful artizans converted the rude produce of the soil into fabrics of unrivalled delicacy and beauty; architects and sculptors joined in contributing works, the solidity of which has not in some instances been overcome by the revolution of thousands of years. The princes and nobles of India, unlike the wandering chieftains of the neighbouring countries, already dwelt in splendid palaces, and clothed in the gorgeous products of its looms, and glittering with gold and gems, indulged a corresponding luxury in every act and habit of their lives. Poets were not wanting to celebrate the exploits of their ancestors, nor philosophers to trade the mazes of metaphysical inquiry, and weave the net of ingenious speculation, with as much subtlety, and perhaps with not less success than has attended the researches of subsequent inquirers."

—*Thornton's History of India.*

१. यवन म्हणजे ग्रीक लोक हा शब्द Ionian या शब्दाचा अपभ्रंश होय असें कित्येकांचें मत आहे. 'महाभारतां'त यवनांचा उल्लेख अनेकशः आढळतो.अलीकडे 'यवन' शब्दाचा प्रयोग केवळ मुसलमानांच्या संबंधानेंच होतो.

स्थितीला पोंचला असला तरी त्यांत आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट मुळींच नाहीं, व तशा स्थितीबद्दल त्यास नांव ठेवणेंहि बरोबर होणार नाहीं. एकंदर जगाची रहाटी आपण नित्य काय पहातों? उत्पत्ति, स्थिति, लय हें अवस्थात्रय पदार्थमात्रास लागू नाहीं काय? बाल्य, यौवन, मृत्यु, या अवस्थांस व्यक्तिभूत मनुष्य जसा पात्र आहे, तसेंच एकंदर राष्ट्रहि पात्र नाहीं काय? 'जमका अजब तडाखा' कोणाला सुटला आहे? जीं राष्ट्रें आज लक्ष्मीच्या मदानें धुंद होऊन पडलीं आहेत व वीर्योत्साहानें स्फुरण पावत आहेत तींच बिचारीं आणखी शेंदोनशें वर्षांनीं कोणत्या कोनाकोपऱ्यांत जाऊन पडतील याचा कांहीं नेम आहे काय? मिसर देशाच्या मनोऱ्यांची कथा सांगायाला आज कोण उरला आहे? सारें जग धुंडलें तरी जुना ग्रीक पंडित किंवा रोमन शिपाई कोठें तरी आढळणार आहे काय? एकंदर इतिहासाकडे नजर दिली असतां असें आढळतें कीं, कोणतेंहि राष्ट्र भरभराटीस येऊं लागलें असतां ती त्याची उत्कर्षाची स्थिति पराकाष्ठा शेंदोनशें वर्षें टिकते. नेपोलियन, बारावा चार्लस राजा, तैमूरलंग वगैरेंच्या उल्कापातासारख्या होऊन गेलेल्या कारकीर्दी तर राहोतच; कां कीं, तुफानाच्या सोसाट्यांत भर वेगानें चालणाऱ्या जहाजाप्रमाणें किंवा भडकलेल्या रेल्वे एंजिनाप्रमाणें त्यांच्या प्रतापाची स्थिति होय; तो कितीहि उज्वल झाला तरी त्यांत स्थैर्याचा अंश प्रायः नाहींच ह्मटलें तरी चालेल. पण व्यवस्थितपणें चालालेल्या संस्थानांचा जरी विचार केला, तरी सामान्यतः असें आढळतें कीं, एका पराक्रमी पुरुषानें राष्ट्रास उन्नतीच्या दशेस आणावें तों दुसरा असा निपजतो कीं, त्यानें नवें मिळविलेलें व पूर्वीचें अशीं दोन्ही घालवून टाकावीं. कोणी राज्यकर्ते असे निघतात, कीं ज्यांनीं आपल्या बाहुबलानें व बुद्धिबलानें पायाशुद्ध नवी इमारत खाशी उठवून द्यावी; दुसरे बहादर असे उत्पन्न होतात, कीं ज्यांच्या हातून पूर्वार्जिताची वृद्धि होणें तर एकीकडेच राहिलें, पण जें आहे तें राखण्याचाहि त्यांच्या ठिकाणीं वकूब नसतो. मग ही जर चोहोंकडे आढळणारी स्थिति आहे, तर आमचें हजारों वर्षांमागचें वैभव आज दृष्टीस पडत नाहीं ह्मणून इंग्रेज ग्रंथकारांनीं आह्मांस दूषण द्यावें हा केवढा मूर्खपणा आहे, व 'लोकहितवादी'सारख्या स्वदेशभक्त व सत्प्रिय ह्मणविणारांनीं तेंच तुणतुणें निरंतर आमच्या कानाशीं वाजवावें, व आपणांस मूर्खांतले मूर्ख व पाजींतले पाजी ह्मणवून घ्यावें हें किती लज्जास्पद होय! 'लोकहितवादी'चा जर हा सिद्धांत ठरला आहे, कीं प्राचीन ऋषींच्या कारकीर्दीत आमची काय सुधारणा झाली होती ती होती, तेव्हांपासून पुराणांनीं व भटांनीं जी या देशाची नासाडी करून टाकली ती सांगतां पुरवत नाहीं;–तर आज तीन हजार वर्षें लोटून गेलीं असतांहि तींच पूर्वीची स्थिति आज येथें दृष्टीस पडावी ही अपेक्षा करणें ह्मणजे केवढा वेडगळपणा आहे? ज्या आमच्या रावबहादुरांस या देशांत आज कोठेंहि वसिष्ठवामदेव

आढळत नाहींत किंवा रामअर्जुन आढळत नाहींत म्हणून खेद होतो, तेच जर आज अथेन्स शहरीं गेले व प्लेटोच्या पाठशाळेचा शोध करूं लागले तर ती त्यांस कोठें आढळेल? रोम शहरीं जाऊन साऱ्या जगभर पडकलेल्या सीझरच्या गरुडांकित निशाणांचा जर ते तपास करूं लागले तर तीं त्यांस कोठें सांपडतील? अथवा असें समजा कीं, इ० स० ४८८० सालीं अमृतसंजीवनीच्या योगानें कोणीं त्यांस उठविलें, व त्यांनीं इंग्लंडास सफर केली, तर पार्लमेंटांतील वक्तृत्वाच्या श्रवणाचा अथवा केसरिहिंदच्या कोहिनूरच्या दर्शनाचा त्यांस लाभ होण्याचा कितीसा संभव आहे? या मुलखांत तरी वरील सालीं कोरेगांवचा जयस्तंभ व मुंबापुरींतली राजभक्तिप्रदर्शक ् साहेबांची अश्वारूढ प्रतिमा हीं दोन्ही दृष्टीस पडतीलच हें कोणाच्यानें सांगवेल? ोल्या तीन हजार वर्षांत आमची स्थिति कितीहि पालटली असली, व रावबहादुर मंडळी जो मूर्खपणाचा शिक्का आमच्या कपाळावर ठोकूं पहातात तो हि खरा असला, तरी त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ऐशीं वर्षांच्या म्हाताऱ्यास ाठ वर्षांचें पोर नांव ठेवूं लागलें, कीं माझ्या अंगांत पहा कशी चपळाई आहे, जरठाचे अंगीं कांहीं नाहीं; माझें तोंड पहा कसें सुकुमार आहे, व शरीर जिरवाणें आहे; नाहीं तर याचे पहा अंबाडीसारखे केंस, अंगावर किती ं, शरीरास किती कंप! अशा मासल्याचें लडिवाळपणाचें पांडित्य करणाऱ्या ाजश्रीच्या नाजूक गालावर जर कोणीं दोन बोटें उठविलीं, व कर्णोत्पाटनपूर्वक ांचीं अशी कानउघाडी केली कीं, "बाबारे, तुझ्यासारखीं शंभर पोरें या म्हाताऱ्यानें आजपर्यंत खेळविलीं आहेत, तुझे आजोबा जेव्हां तुझ्याएवढे होते तेव्हां ते याच्या मांडीवर लोळत होते, तुझ्या पंजीची भरज्वानी यांनीं पाहिली आहे,"— तर असें करणें अयोग्य होईल काय? तर असाच प्रकार आमच्या देशाच्या तर्फेनें मेकॉलेप्रभृति टारगे ग्रंथकार व त्यांचे एतद्देशीय अनुयायी यांच्या संबंधानेंहि करणें अवश्य होय. तो यापूर्वी अनेक वेळां करण्यांत आलाच आहे; यास्तव पुनः चर्वितचर्वण नको!

तर आमच्या देशाचा अवाढव्य विस्तार व त्याचें अत्यंत प्राचीनत्व या दोन गोष्टींचाच विचार केला असतां कोणासहि कळून येईल कीं, त्यास सध्यां जी स्थिति प्राप्त झाली आहे तिची उपपत्ति करण्यास केवळ आमच्या नैसर्गिक मूर्खत्वाकडेच गेलें पाहिजे असें नाहीं. मोठमोठीं शहाणीं सुतीं राष्ट्रें यापूर्वी मोठ्या उत्कर्षाला चढून कालेकरून पार लयाला गेलीं आहेत, व या घटकेपर्यंतहि मोठ्या अढल शहाण्या राष्ट्रांचीहि वेळोवेळ अक्कल गुंग होऊन फटफजिती उडालेली आहे. मोठ्या थाटानें एखादें अवडंबरचावें आणि लवकरच सगळें ऑफस होऊन जावें अशा प्रकारचीं उदाहरणें ज्ञानाच्य वशिखरास जाऊन पोंचलेल्या अर्वाचीन राष्ट्रांच्या इतिहासांतूनहि आढळत

स्थितीला पोंचला असला तरी त्यांत आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट मुळींच नाहीं, व तशा स्थितीबद्दल त्यास नांव ठेवणेंहि बरोबर होणार नाहीं. एकंदर जगाची रहाटी आपण नित्य काय पहातों? उत्पत्ति, स्थिति, लय हें अवस्थात्रय पदार्थमात्रास लागू नाहीं काय? बाल्य, यौवन, मृत्यु, या अवस्थांस व्यक्तिभूत मनुष्य जसा पात्र आहे, तसेंच एकंदर राष्ट्रहि पात्र नाहीं काय? 'जमका अजब तडाखा' कोणाला सुटला आहे? जीं राष्ट्रें आज लक्ष्मीच्या मदानें धुंद होऊन पडलीं आहेत व वीर्योत्साहानें स्फुरण पावत आहेत तींच बिचारीं आणखी शेंदोनशें वर्षांनीं कोणत्या कोनाकोपऱ्यांत जाऊन पडतील याचा कांहीं नेम आहे काय? मिसर देशाच्या मनोऱ्यांची कथा सांगायाला आज कोण उरला आहे? सारें जग धुंडलें तरी जुना ग्रीक पंडित किंवा रोमन शिपाई कोठें तरी आढळणार आहे काय? एकंदर इतिहासाकडे नजर दिली असतां असें आढळतें कीं, कोणतेंहि राष्ट्र भरभराटीस येऊं लागलें असतां ती त्याची उत्कर्षांची स्थिति पराकाष्ठा शेंदोनशें वर्षे टिकते. नेपोलियन, बारावा चार्लस राजा, तैमूरलंग वगैरेंच्या उल्कापातासारख्या होऊन गेलेल्या कारकीर्दी तर राहोतच; कां कीं, तुफानाच्या सोसाट्यांत भर वेगानें चालणाऱ्या जहाजाप्रमाणें किंवा भडकलेल्या रेल्वे एंजिनाप्रमाणें त्यांच्या प्रतापाची स्थिति होय; तो कितीहि उज्वल झाला तरी त्यांत स्थैर्याचा अंश प्रायः नाहींच झटलें तरी चालेल. पण व्यवस्थितपणें चालिलेल्या संस्थानांचा जरी विचार केला, तरी सामान्यतः असें आढळतें कीं, एका पराक्रमी पुरुषानें राष्ट्रास उन्नतीच्या दशेस आणावें तों दुसरा असा निपजतो कीं, त्यानें नवें मिळविलेलें व पूर्वीचें अशीं दोन्ही घालवून टाकावीं. कोणी राज्यकर्ते असे निघतात, कीं ज्यांनीं आपल्या बाहुबलानें व बुद्धिबलानें पायाशुद्ध नवी इमारत खाशी उठवून द्यावी; दुसरे बहादर असे उत्पन्न होतात, कीं ज्यांच्या हातून पूर्वार्जिताची वृद्धि होणें तर एकीकडेच राहिलें, पण जें आहे तें राखण्याचाहि त्यांच्या ठिकाणीं वकूब नसतो. मग ही जर चोहोंकडे आढळणारी स्थिति आहे, तर आमचें हजारों वर्षांमागचें वैभव आज दृष्टीस पडत नाहीं म्हणून इंग्रेज ग्रंथकारांनीं आह्मांस दूषण द्यावें हा केवढा मूर्खपणा आहे, व 'लोकहितवादी'सारख्या स्वदेशभक्त व सत्प्रिय म्हणविणारांनीं तेंच तुणतुणें निरंतर आमच्या कानाशीं वाजवावें, व आपणांस मूर्खांतले मूर्ख व पाजींतले पाजी म्हणवून घ्यावें हें किती लज्जास्पद होय! 'लोकहितवादी'चा जर हा सिद्धांत ठरला आहे, कीं प्राचीन ऋषींच्या कारकीर्दीत आमची काय सुधारणा झाली होती ती होती, तेव्हांपासून पुराणांनीं व भटांनीं जी या देशाची नासाडी करून टाकली ती सांगतां पुरवत नाहीं;–तर आज तीन हजार वर्षे लोटून गेलीं असतांहि तींच पूर्वीची स्थिति आज येथें दृष्टीस पडावी ही अपेक्षा करणें म्हणजे केवढा वेडगळपणा आहे? ज्या आमच्या रावबहादुरांस या देशांत आज कोठेंहि वसिष्ठवामदेव

आढळत नाहींत किंवा रामअर्जुन आढळत नाहींत ह्मणून खेद होतो, तेंच जर आज अथेन्स शहरीं गेले व प्लेटोच्या पाठशाळेचा शोध करूं लागले तर ती त्यांस कोठें आढळेल? रोम शहरीं जाऊन साऱ्या जगभर फडकलेल्या सीझरच्या गरुडांकित निशाणांचा जर ते तपास करूं लागले तर तीं त्यांस कोठें सांपडतील? अथवा असें समजा कीं, इ० स० ४८८० सालीं अमृतसंजीवनीच्या योगानें कोणीं त्यांस उठविलें, व त्यांनीं इंग्लंडास सफर केली, तर पार्लमेंटांतील वक्तृत्वाच्या श्रवणाचा अथवा केसरिहिंदच्या कोहिनूरच्या दर्शनाचा त्यांस लाभ होण्याचा कितीसा संभव आहे? या मुलखांत तरी वरील सालीं कोरेगांवचा जयस्तंभ व मुंबापुरींतली राजभक्तिप्रदर्शक टेंपल साहेबांची अश्वारूढ प्रतिमा हीं दोन्ही दृष्टीस पडतीलच हें कोणाच्यानें सांगवेल? तर गेल्या तीन हजार वर्षांत आमची स्थिति कितीहि पालटली असली, व रावबहादुरप्रभृति मंडळी जो मूर्खपणाचा शिक्का आमच्या कपाळावर ठोकूं पहातात तो कितीहि खरा असला, तरी त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ऐशीं वर्षांच्या ह्माताऱ्यास जर आठ वर्षांचें पोर नांव ठेवूं लागलें, कीं माझ्या अंगांत पहा कशी चपळाई आहे, ती या जरठाचे अंगीं कांहीं नाहीं; माझें तोंड पहा कसें सुकुमार आहे, व शरीर कसें गोजिरवाणें आहे; नाहीं तर याचे पहा अंबाडीसारखे केंस, अंगावर किती सुरकुत्या, शरीरास किती कंप! अशा मासल्याचें लडिवाळपणाचें पांडित्य करणाऱ्या टारग्या राजश्रींच्या नाजूक गालावर जर कोणीं दोन बोटें उठविलीं, व कर्णोत्पाटनपूर्वक त्यांची अशी कानउघाडी केली कीं, "बाबारे, तुझ्यासारखीं शंभर पोरें या ह्माताऱ्यानें आजपर्यंत खेळविलीं आहेत, तुझे आजोबा जेव्हां तुझ्याएवढे होते तेव्हां ते याच्या मांडीवर लोळत होते, तुझ्या पंजीची भरज्वानी यांनीं पाहिली आहे,"— तर असें करणें अयोग्य होईल काय? तर असाच प्रकार आमच्या देशाच्या तर्फेनें मेकॉलेप्रभृति टारगे ग्रंथकार व त्यांचे एतद्देशीय अनुयायी यांच्या संबंधानेंहि करणें अवश्य होय. तो यापूर्वी अनेक वेळां करण्यांत आलाच आहे; यास्तव पुनः चर्वितचर्वण नको!

तर आमच्या देशाचा अवाढव्य विस्तार व त्याचें अत्यंत प्राचीनत्व या दोन गोष्टींचाच विचार केला असतां कोणासहि कळून येईल कीं, त्यास सध्यां जी स्थिति प्राप्त झाली आहे तिची उपपत्ति करण्यास केवळ आमच्या नैसर्गिक मूर्खत्वाकडेच गेलें पाहिजे असें नाहीं. मोठमोठीं शहाणीं सुतीं राष्ट्रें यापूर्वी मोठ्या उत्कर्षाला चढून कालेकरून पार लयाला गेलीं आहेत, व या घटकेपर्यंतहि मोठ्या अढल शहाण्या राष्ट्रांचींहि वेळोवेळ अक्कल गुंग होऊन फटफजिती उडालेली आहे. मोठ्या थाटानें एखादें अवडंबर रचावें आणि लवकरच सगळें ओंफस होऊन जावें अशा प्रकारचीं उदाहरणें ज्ञानाच्या शिखरास जाऊन पोंचलेल्या अर्वाचीन राष्ट्रांच्या इतिहासांतूनहि आढळत

नाहींतसें नाहीं. मग साऱ्या पृथ्वीतील राष्ट्रांस ज्या गोष्टी लागू, व जें अल्पदृष्टित्व मनुष्यधर्मासच खिळलेलें, त्या सर्वांबद्दल एकट्या हिंदुस्थानावरच मूर्खत्वाचा आरोप करणें हें केवढें अज्ञान होय! आमच्या रावबहादुरांसारख्या मंडळींनीं आजपर्यंत देशोदेशींचे इतिहास वाचून व आपल्या हयातींत घडलेल्या हकीकती पाहून व ऐकून राष्ट्रांच्या उत्कर्षापकर्षाच्या संबंधानें काय सिद्धांत ठरवले असतील ते असोत; पण आमच्या अल्पमात्र ज्ञानावरून व अनुभवावरून आमच्या बुद्धीस असें वाटतें कीं, जशी व्यक्तिभूत मनुष्याची स्थिति, किंवा समुद्रावर चालणाऱ्या तारवाची स्थिति, तशीच राष्ट्रांची किंवा राज्याची होय. व्यक्तिभूत मनुष्यास जसे शेंकडों अपाय घडण्याचा नेहमीं संभव असतो, व मी अमुक वर्षें जगेन अशाविषयीं त्यानें चंग बांधणें हा जसा त्याचा मूर्खपणा होईल; किंवा मोठें प्रचंड तारूं असलें तरी त्याच्या तांडेलानें आपणांस सर्वथा निर्भय मानणें हें जसें असमंजस होईल; त्याप्रमाणेंच वैभवाच्या शिखरास चढलेल्या राष्ट्रानें किंवा मोठ्या अवाढव्य वाढलेल्या राज्यानें आपल्या टळत्वाचा अभिमान वहाणें हाहि वेडगळपणाच होय. नौकेचें नियमन हें नाविकाच्या सर्व स्वाधीन असतांहि वातावरणांतल्या फेरफारावर जशी त्याची बिलकूल सत्ता चालत नाहीं, व इतर धोकेहि वेळेनुसार कोणते प्राप्त होतील याचा त्यास जसा नेम लागत नाहीं, त्याप्रमाणेंच राजकारणाचीहि गोष्ट होय. कोणती मसलत कोणत्या वेळेस अंगावर येईल, व कोणता शत्रु कोठें उत्पन्न होईल, याचा काय नेम आहे? आमचे सूर्यवंशी व सोमवंशी प्राचीन हिंदु राजे कोणीकडे, आणि तार्तार देशांत भटकणारे मोंगल कोणीकडे? दिल्लीपदावर आरूढ झालेले बादशहा कोणीकडे, आणि पुनवडी मुक्कामीं ठेवून दिलेला नावडत्या बायकोचा नावडता लेक कोणीकडे, व अळूची शाक आणि ताकभात झोडणारे श्रीवर्धनवाले भट कोणीकडे? भगवा झेंडा व जरीपटका कोणीकडे आणि कुर्पाणी बाईचें 'हडेल हप' कोणीकडे? लार्ड मेयो साहेब विलायतेहून निघाले असतील तेव्हां पोर्ट ब्लेरवासी कैद्याच्या हातून आपलें देहावसान होईल हें त्यांच्या किंवा कोणाच्या स्वप्नीं तरी आलें असेल काय? फ्रान्सच्या बादशहाचें चिरंजीव, आणि त्यांस झुलू लोकांच्या एका टोळीनें सोडग्यांखालीं हाणून पाडावें! काडतूस तें काय बोटभर, आणि त्याचा प्रभाव पाहिला तर रक्ताच्या नद्या!! तेव्हां एकंदरींत काय, कीं कालाची गति अत्यंत विचित्र आहे; यास्तव तीं न जाणतां हल्ल्या तशा वल्गना करणें हें अप्रयोजकपणाचें लक्षण होय. त्यांतूनहि पाश्चात्य ग्रंथकारांनीं वरील गर्वोक्ति प्रगट केल्या तर त्यांत मोठेसें नवल नाहीं; कांकीं स्वदेशाच्या संबंधानें कोणी खोटाहि अभिमान वाहिला असतां तो तादृश दूषणार्ह होणार नाहीं. पण आमच्या देशांतल्याच पंडितांनीं आपला एकंदर इतिहास गुंडाळून ठेवून, आपली स्वतःची कुळकथा विसरून जाऊन, व डोळ्यांसमक्ष घडलेल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून,

आपल्या जन्मभूमीच्या संबंधानें सदोदित कृशानूचें व्रत धारण करावें; व आह्मी मूर्ख, आह्मी नाम्र्द, आह्मी कोडगे, अशी सतत हातांत जपमाळ घ्यावी, या बहादुरीस काय ह्मणावें हें बरीक आह्मांस समजत नाहीं ! !

३. येथवर आमच्या देशाच्या संबंधानें पाश्चात्य ग्रंथकारांनीं जें सामान्यतः पांडित्य केलेलें आढळतें, व त्यांचे लेख शिरसावंद्य करणारी व इंग्रज ह्मणजे परब्रह्म मानणारी जी मंडळी यापूर्वी होऊन गेली त्यांच्या ठायीं या देशाच्या संबंधानें ज्या समजुती बहुधा दृष्टीस पडतात, त्यांविषयीं चर्चा झाली. आतां वरील समजुतींत व 'लोकहितवादी'च्या मतांत जरी प्रायः अंतर नाहींच; तरी एका मोठ्या गोष्टीच्या संबंधानें दोहोंत एक मोठाच फरक आहे. तो हा कीं, रावबहादुरांच्या मतें आमची निकृष्ट स्थिति आज तीन हजार वर्षें कायम आहे, एवढा सगळा काळ आमचा झोपेंतच गेला ! हीं तीन हजार वर्षें केव्हांपासून धरायाचीं याचा निश्चय प्रस्तुत ग्रंथकारांनीं कोठेंहि केलेला आह्मांस आठवत नाहीं, तरी एकंदरींत पहातां 'ऋषींची कारकीर्द' असे शब्द त्यांच्या लेखांत व भाषणांत अनेक वेळां आढळतात त्यांवरून पहातां वरील ऋषिमंडळ जेव्हांपासून अस्तंगत झालें तेव्हांपासून या हतभाग्य देशाच्या अज्ञाननिद्रेस आरंभ झाला असें समजायाचें असें वाटतें. वरील ऋषींपैकीं शेवटला ऋषि निजधामास गेला तेव्हांपासून अकलेची व आमची जी फारकत झाली ती आमच्या मागल्या पिढीपर्यंत ! वाग्देवीच्या वीणेचा झणत्कार वाल्मीकीच्या आश्रमांत जो गुप्त झाला तो तीन हजार वर्षांनीं करवीरपत्तनीं मात्क्यान् प्रगट झाला. धर्मसंस्थापना करणारे प्राचीन मुनि जे एकाएकीं कोणीकडे गडप झाले ते वरील दीर्घकाळानंतर पुनः आर्यसमाजस्थापकाच्या रूपानें एकवट होऊन अवतीर्ण झाले. प्राचीन सोमरस पिणारी जुनी ऋषिपरंपरा जी मागें पार नाहींशी झाली ती आज एकोणिसाव्या शतकांत अर्वाचीन सोमरसाचे चषक धारण करून देशाच्या भाग्यानें पुनः उदयास आली ! बाकी एवढीं तीस शतकें जीं मधल्यामध्यें गेलीं तीं निव्वळ व्यर्थ गेलीं. त्यांत आह्मीं कांहीं लाभ करून घेतला नाहीं, कांहीं नवीन युक्त्या काढल्या नाहींत, —कांहीं केलें नाहीं ! एवढें मात्र केलें, कीं आठ हात लांकूड आणि नऊ हात धलपी अशा मासल्याचीं 'पंधरा आणे बाष्कळपणानें भरलेलीं' अकटोविकटो पुराणें रचून ठेविलीं; धर्माचें अतोनात बंड माजवून शेंकडों व्यर्थ खटपटी उत्पन्न केल्या; भटांची घोकंपट्टी व शास्त्रार्थांचे शुष्क वाद हे उभे केले; भिक्षुकीचा संप्रदाय हरएक प्रकारें चालू करून आळसाची वृद्धि केली; आणि सारा देश ह्मणजे एक मेंढवाडा करून सोडला ! विक्रम, भोज वगैरे कांहीं पराक्रमी राजे मध्यंतरीं होऊन गेले, पण त्या बेट्यांनीं काव्यनाटकांदिकांस उत्तेजन देऊन शेवटल्या बाजीरावानें जशी चोहोंकडे बदफैली वाढविली तसा मात्र प्रकार करून ठेवला ! तसेंच अलीकडे शिवाजी,

बाजीराव, नाना फडनवीस वगैरे कांहीं पुरुष निर्माण होऊन त्यांनीं 'एरंडोऽपि द्रुमायते' या न्यायानें या मेंढवाड्यावर आपला अंमल कांहीं वेळ गाजविला, व या वड्यांच्या इस्पितळांत आपल्या शहाणपणाचा टेंभा चार दिवस मिरवून घेतला; पण एकंदरींत पहातां कांहीं जीव नाहीं. हल्लीं एखाद्या सहावी यत्ता उत्तरलेल्या पोरांत जी अक्कल सांपडेल तीहि विचाऱ्यांच्या वांट्याला आली नव्हती !!

आतां हें जें आमच्या रावबहादुरांचें मत इतके दिवस दृढ होऊन बसलेलें आहे, कीं प्राचीन ऋषींच्या कारकीर्दींत काय ती हिंदुस्थानांत सुधारणा होती, व तेव्हांपासून सारखा या देशाचा ऱ्हासकाळ लागला आहे,—हें त्यांनीं कोठून पैदा केलें असेल व त्याजबद्दल त्यांच्यापाशीं काय प्रमाणें असतील हें आह्मांस समजत नाहीं. अगोदर ऋषींचा काळ कोणता या गोष्टीचा पक्का निश्चय नाहीं हें वर सांगण्यांत आलेंच आहे; व शिवाय वरील काळाची एवढी माहिती तरी कोणाला आहे हेंहि नीट समजत नाहीं तसेंच सुधारणा ह्मणजे तरी काय या मुद्द्याचाहि स्पष्टपणें निकाल झाला पाहिजे. हल्लीं जें सुधारणेचें मान मानलें जात आहे तें ऋषींच्या कारकीर्दीस लागू पडेल असें 'लोकहितवादीं'स वाटतें काय ? वाटत नसेल तर मग गेलीं तीन हजार वर्षें तरी गैरसुधारणेचीं कशावरून ह्मणायाचीं ? अर्वाचीन सुधारणेचीं मोठमोठीं तत्त्वें जीं मांस-भक्षण, सुरापान, सब-गोलंकार, इत्यादिकास वेदांत आधार मिळतो यावरून तर प्राचीन ऋषींस हल्लींच्या इंग्रज, फ्रेंच वगैरे लोकांच्या पायरीला नेऊन मिळवायाचे नसतील ना ! असें असेल तर मग ठीक आहे. एरवीं वैदिक काळास सुधारलेला व पौराणिक काळास गैरसुधारलेला ह्मणण्यास काय प्रमाण आहे हें आह्मांस कळत नाहीं. इंद्रवरुणादिकांची उपासना केली कीं सुधारणेचें शिखर झालें, तेंच शिवविष्णूंच्या प्रतिमांकडे वळलें कीं सुधारणादेवतेचा क्षोभ झाला अशी कांहीं भानगड तर नसेलना ! असें असेल तर 'लोकहितवादीं'नीं सुधारणुकेची एक कलमवारी करून ठेवली असती तर बरें झालें असतें; ह्मणजे तिजवरून वरील वादाचा तेव्हांच निकाल पाडतां आला असता. वैदिक काळांत कवायत शिकलेलीं पलटणें, कोर्ट-मार्शलें, पार्लमेंट सभा, आर्यसमाज, पुस्तकालयें, वगैरे सुधारणेस अवश्य लागणाऱ्या जिनसा असल्याविषयीं रावबहादुरांपाशीं कांहीं दाखला नाहींना ? तसेंच वरील काळांत कोणी नेपोलियन होऊन गेला, कोणी फिडियस होऊन गेला, अशाविषयींहि आमच्या कानावर अद्याप वार्ता आली नाहीं; मग आमच्या प्रतिपक्ष्यांच्या जवळ किंवा त्यांचे गुरुवर्य श्रीमत्परमहंस यांच्या जवळ, कांहीं जबरदस्त पुरावा असल्यास न कळे ! एकंदरींत रावबहादुरांचें वरील मत आह्मांस केवळ निराधार वाटतें. दयानंदजींच्या व्याख्यानांतून अर्वाचीन व प्राचीन काळांच्या संबंधानें जी वेडगळ बडबड आढळते, व वेदांत आगगाड्या आहेत, तारायंत्रें आहेत, विमानें आहेत, वगैरे निरर्गल प्रलाप

आढळतात, त्यांचीच कांहीं छाया त्यांच्या शिष्यमंडळीवरहि पडली आहे कीं काय कोण जाणे!!

आमच्या प्राचीन पूर्वजांविषयीं आमची पूज्यबुद्धि 'लोकहितवादीं'च्याहून कमी आहे असें नाहीं. ते परम तपोनिष्ठ व परमज्ञानी होते याविषयीं आमची खात्री आहे. त्यांनीं आपल्या बुद्धिप्रभावेंकरून तत्कालीन राष्ट्रांतहि आपणास धन्य ह्मणवून घेतलें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. पण ते शहाणे होते ह्मणून पुढील मंडळी मूर्ख निघाली, व ती मूर्खपरंपरा राववहादुरांच्या आदल्या पिढीपर्यंत अविच्छिन्नत्वेंकरून चालत आली, व पुण्यांत इंग्रजी अंमल होऊन माजी बुधवारच्या वाड्यांत इंग्रजी शाळेची स्थापना झाली तेव्हां काय ती अक्कल पुनः या देशांत आली हें जें महत्त्व 'लोकहितवादी' आपल्या ग्रंथांवरून लोकांच्या मनांत ठसवूं पहात आहेत, हें बरोबर आह्मांस बिलकूल कबूल नाहीं. आमच्या राववहादुरांनीं आपल्या स्वतःच्या बुद्धिमत्तेचें मान कितीसें ठरविलें आहे हें आह्मांस चांगलेंसें माहीत नाहीं; तरी आमची पक्की खात्री आहे कीं, जो काळ अत्यंत अज्ञानाचा गेला ह्मणून ते आजपर्यंत डांगोरा पिटीत आहेत त्याच काळांत त्यांच्याहून शतपट बुद्धिमान असे शेकडों हजारों लोक होऊन गेले आहेत. त्यांनीं जीं कृत्यें करून ठेविलीं आहेत त्यांजबद्दल सारें जग मान डोलवीत आहे, व ज्या काळीं राववहादुरप्रभृति अर्वाचीन ऋषींचीं नांवें सुद्धां मागें उरणार नाहींत, व त्यांचे परमगुरु जे इंग्रज लोक त्यांचें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत मात्र राहील, त्या काळीं सुद्धां त्यांचा लौकिक हल्लींप्रमाणेंच गाजत राहील. ही मंडळी कोण हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं; कां कीं, गेल्या तीन हजार वर्षांत या देशांत मोठमोठे कवि, मोठमोठे शास्त्रकार, मोठमोठे राज्यस्थापक, मोठमोठे मुत्सद्दी वगैरे मंडळी कोण कोण होऊन गेली याविषयीं थोडीबहुत तरी माहिती नाहीं असा मायेचा पूत कोणीहि सांपडेल असें आह्मांस वाटत नाहीं.

तेव्हां एकंदरींत पहातां अर्वाचीन काळांत एतद्देशीय लोकांच्या बुद्धीचा ऱ्हास झाला हा जो महासिद्धांत 'लोकहितवादीं'नीं ठरवून ठेवला आहे तो आह्मांस केवळ चुकीचा वाटतो. आमचे राववहादुर व त्यांच्या बरोबरीची मंडळी यांनीं ज्या वेळेस इंग्रेजी विद्येच्या अध्ययनास आरंभ केला तेव्हांची स्थिति अशी होती कीं, इंग्रजांचें या देशांत नुकतेंच सार्वभौमत्व होऊन युरोपांतहि त्यांचा तसाच दरारा होता. शिवाय हल्लींच्या बादशाही अंमलांत जे विलक्षण प्रकार चोहोंकडे दृष्टीस पडत आहेत,—ह्मणजे नवे नवे आक्ट, नवे कर, दरवर्षीं दुष्काळाचें भय, चोरांचे घाले आले तर उलटा प्रजेस दंड, इत्यादि—हेंहि त्या वेळेस कांहींच नसून उलटी चोहोंकडे आबादानी, स्वस्थता, संतोषवृत्ति हीच दृष्टीस पडत असे. त्यांतून पाश्चात्य यांत्रिक विद्येचा प्रभाव जेव्हांपासून इकडे दृष्टीस पडूं लागला, तेव्हांपासून तर आमच्या परद्वीपीय राज्यकर्त्यां-

विषयीं लोकांच्या अशा समजुती होऊन बसल्या कीं, हे कोणी अमानुष सृष्टींतले प्राणी आहेत; पंचमहाभूतांवरहि ज्यांचा अंमल चालूं लागला, त्यांची सत्ता माणसांवर चालेल यांत नवल काय? तर याप्रमाणें वीसपंचवीस वर्षांमागली येथील स्थिति असल्यामुळें नवीन इंग्रेजी शिकूं लागणारांच्या मनावर कोणत्या तऱ्हेचे संस्कार होत असत याची कल्पना सहज करतां येते. हल्लींहि इंग्रेजी विद्येपासून कोणतीं फळें सामान्यतः दृष्टीस पडतात हें जर लक्षांत आणिलें, तर पूर्वीच्या ऐन अमदानींत हेच विकार किती दृढ होण्याचा संभव होता हें सहज ध्यानांत येईल. कोणत्याहि गोष्टीची खरी योग्यता समजून येण्यास बराच काळ लोटावा लागत असतो हा सामान्य नियम आहे; त्याप्रमाणेंच इंग्रेज लोकांच्या विद्येचें, राज्याचें, सुधारणुकीचें वगैरे यथार्थ स्वरूप कांहीं काळापूर्वी समजणें अशक्य होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आमच्या रावबहादुरांसारखी परम राजनिष्ठ मंडळीहि आतां इंग्रेजी राज्याचे पहिल्यासारखे पोवाडे गाईल असें आह्मांस वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच दहा वीस वर्षांपूर्वी विद्वान् व सुधारलेले म्हणविणाऱ्या लोकांचीं जीं मतें ठरलेलीं असत, कीं इंग्रेजी राज्य म्हणजे नीतीचें आगर, इंग्रेजांचा धर्म, आचारविचार वगैरे सर्व उत्कृष्ट, काय ज्ञान तें इंग्रेजी भाषेंत, इंग्रेजांचें हरएक गोष्टींत अनुकरण करण्यास बिलकूल हरकत नाहीं, कां कीं, साऱ्या जगांत शहाणे म्हणून निवडलेले लोक जें करतात तें वाईट कसें असेल?—इत्यादि परंपराहि प्रस्तुत काळीं विच्छिन्न झाल्यासारखीच आहे. अलीकडे इंग्रेजी भाषेचा फैलावा या देशांत पुष्कळच झाल्यामुळें आमच्या राज्यकर्त्यांच्या शेंकडों गोष्टी ज्या आह्मांस पूर्वी नुसत्या ऐकूनहि माहीत नव्हत्या त्या आतां चांगल्या स्पष्ट दिसूं लागल्या आहेत. या दृढतर परिचयाच्या योगानें काय झालें, कीं आमचे पूर्वीचे पुष्कळ भ्रम उडून गेले; व आह्मी आपणांस व दुसऱ्यांस अधिक यथार्थ बुद्धीनें लेखूं लागलों. तसेंच आजपर्यंत आह्मांस आपल्या स्वतःविषयीं बिलकूल माहिती नव्हती असें म्हटल्यासहि सत्याचा अपलाप केलासें होईल असें नाहीं. आपण कोण, आपली स्थिति काय आहे, आपला पूर्वीचा वृत्तांत काय, आपल्या धर्माचें व आचारविचारांचें यथातथ्य स्वरूप काय, आपल्या हजारों वर्षांच्या ग्रंथसंग्रहांत काय काय लिहिलें आहे, इत्यादि गोष्टींविषयीं जिज्ञासाहि पूर्वी कोणास वाटत नसे. पाश्चात्य ग्रंथकारांनीं इकडील स्थितिरीतीचें तुटपुंजीचें ज्ञान मिळवून त्यावर जें स्वकपोलकल्पित तर्कट रचावें, किंवा पाश्चात्य व प्राच्य ख्रिस्तभक्तांनीं पवित्र शास्त्राच्या भूषणार्थ जी लेखद्वारा व भाषणद्वारा बडबड करावी, ती सर्व वेदवाक्याप्रमाणें गृहीत करून चालायाचें, व त्यावर काय त्या उड्या मारायाच्या, अशी पंधरावीस वर्षांमागील येथील विद्वत्समूहाची स्थिति होती. वरील समूहाच्या स्वप्नींहि कधीं अशा कल्पना येत नसत, कीं ज्या मेकालेच्या अभिप्रायांचें प्रामाण्य त्याचे देशबंधु तिकडील प्रकरणांतहि बेताबातानेंच स्वीकारतात, त्यांचींच वचनें इकडे मात्र वेद-

वाणीप्रमाणें मानणें हा केवढा मूर्खपणा आहे ? जे मिशनरी बहादर एकाच पेनाच्या तडाक्यासरसें हिंदु धर्माचें, मुसलमानी धर्माचें, व पारशी धर्माचेंहि खंडन करून टाकीत, व युनिवर्सिटीच्या परीक्षांत ज्यांच्याकडे एशिया खंडांतील साऱ्या भाषांच्या बद्दल जशी काय एकदां सुपारीच देऊन टाकली असे, त्या परमपूज्य डॉक्टर विल्सन साहेबांस त्यांच्या शिष्यवर्गानें पोपसाहेबांच्या प्रमादरहित आसनावर नेऊन बसवावें हा तरी केवढा शहाणपणा आहे ! माजी 'सत्यदीपिके'च्या कर्त्यांनीं बिचाऱ्या शास्त्री-वैदिकांस आपल्या घरीं बोलावून आणून त्यांस आपल्या नूतनलब्ध पवित्रशास्त्राच्या तेजानें दिपवून टाकून आपल्या मूर्तिपूजक जनित्यास पुत्रलीला दाखवून स्वतःची धन्यता वाटावी, व नंतर वरील कुंठित झालेल्या मंडळीस दक्षणा देऊन वाटेस लावावें, हा तरी केवढा चमत्कार आहे ![1] पवित्रशास्त्राच्या पवित्र ओंव्यांत एवढा अजब गुण आहे काय कीं जसें सैतानानें येशूस एका उंच डोंगराच्या शिखरावर नेऊन सारीं पृथ्वींतील राज्यें दाखविलीं (!), त्याप्रमाणेंच आदमाच्या व नोहाच्या पवित्र कथा वाचल्या-बरोबर वाग्देवीचा सारा मुलूख एकदम नजरेच्या आटोक्यांत येतो !! असो; तर राव-बहादूरप्रभृति जुन्या मंडळींच्या लेखांतून जीं विलक्षण मतें आढळतात त्यांचें मूळ पाहिलें तर हें होय कीं, त्यांच्या वेळीं स्वतःविषयीं अज्ञान व दुसऱ्याविषयीं अयथार्थ ज्ञान हे दोन्ही प्रकार लोकांमध्यें होते. त्यामुळें चोहोंकडे एक मोठें ठोकळ मत जारीनें चालू झालें होतें, कीं या देशांत पूर्वीचें ह्मणून जेवढें आहे तेवढें सर्व वेडगळ, व नवें जें जें दृष्टीस पडूं लागलें आहे तें तें सर्व शहाणपणाचें. व्यासकृत अठरा पुराणांचें सार जसें पुढील वचनांत काढिलें आहे, कीं—

परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ।

"परोपकार हेंच पुण्य व दुसऱ्यास पीडा करणें हेंच पाप" त्याप्रमाणेंच मागील मन्वंतरांतल्या तत्त्वज्ञानाचे दोन जबरदस्त सिद्धांत झटले ह्मणजे हे होत कीं, हिंदु ह्मणजे मूर्खांतले मूर्ख; व अकलेचे वांटेकरी झटले ह्मणजे इंग्रेज लोक, मिशनरी, बाटे-मंडळी व इंग्रेजीचा संस्कार झालेले नवीन विद्वान् !

वरील स्थिति लक्षांत आणली असतां, प्रस्तुत ग्रंथकारानें जेथें तेथें इंग्रेजांचें माहात्म्य कां वर्णिलें आहे, अ नवीन विद्वत्तेची तेवढी शिफारस करून त्याखेरीज सर्व ज्ञान वायफळ असें कां दाखविलें आहे, व गेल्या शंभर पिढ्यांत या देशांत शहाणा मनुष्य ह्मणून कोणी निपजलाच नाहीं हें जें इतिहासविरुद्ध, अनुभवविरुद्ध, व वस्तु-स्थितिविरुद्ध मत त्याचें त्यानें सर्वत्र प्रणयन कां केलें आहे, हें सहज समजण्याजोगें आहे. वरील मतें या काळापर्यंत रावबहादुरांचीं जशींच्या तशींच कायम राहिलीं, ही

१. अंक ३६ पृष्ठ ६४४ पहा.

गोष्ट बरीच आश्चर्य करण्यासारखी आहे. इतका दृढपणा त्यांच्या सध्यांच्या सहाध्यायी मंडळींतहि आढळत नाहीं. मग या दृढतेची उपपत्ति

अंगीकृतं सुकृतिनः परिपालयंति ।

"महात्मे पुरुष एकदां ज्याचा अंगीकार केला त्याला कधीं अंतर देत नाहींत" या सर्वप्रसिद्ध वचनावरून करावयाची; किंवा ज्या माउलीच्या प्रसादानें त्यांस आजपर्यंत 'भाकरी मिळत गेली,'[1] व ते आज इतक्या योग्यतेस चढले, त्या राजनिष्ठेला वरील मतपरंपरा अत्यंत अनुकूल पडली ह्मणून तिची त्यांस दुस्त्यज्यता वाटते, किंवा त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें आमच्या देशाची बुद्धिदेवता जशी गेल्या शंभर पिढ्या झोंपी गेली होती तसाच थोडासा चुटका गेल्या पिढीभर 'लोकहितवादीं'च्या बुद्धीनेंहि घेतला; काय असेल तें असो! वरच्यापैकीं कोणतीहि उपपत्ति स्वीकारली तरी कठिणच, पहिलीनें त्यांच्या समबुद्धीवर धाड पडते, दुसरीनें सत्यदेवतेचा क्षोभ होतो, आणि तिसरीनें त्यांच्या बुद्धीची जागरूकता नष्ट होते!

स्वजातीयविघाताय माहात्म्यं दृश्यते नृणाम् ।
श्येनो विहंगमानेव हिनस्ति न भुजंगमान् ॥[2]

'दृष्टांतशतक.'

अंक ६७—(१) विषयोपक्षेप—ब्राह्मण. (२) प्रस्तुत लेखापासून होणारा गैरसमज. (३) ब्राह्मण मुत्सद्दी. (४) 'निबंधसंग्रहां' तील उतारा. (५) इंग्रेजी ग्रंथकारांचे अभिप्राय.

१. गेल्या अंकांत 'लोकहितवादीं'च्या ग्रंथांतील एका मोठ्या मुद्द्याच्या संबंधानें विचार झाला; ह्मणजे एकंदर देशाविषयीं जीं त्यांचीं मतें आहेत त्यांवर चर्चा झाली आतां या देशाची बुडवणूक ज्यांच्या पायीं झाली असा प्रस्तुत ग्रंथकाराचा ग्रह आहे त्या लोकांविषयीं, ह्मणजे 'लोकहितवादीं'चे सजातीय जे ब्राह्मण त्यांच्याविषयीं विचार करूं. हा विचार तीन प्रकारांनीं करायाचा. एक, वरील लोक मुत्सद्दी होते या नात्यानें. दुसरें, तेच काय ते या देशांतील पंडित यासंबंधानें. आणि तिसरें, ते धर्माध्यक्ष ह्मणून. प्रस्तुत ग्रंथकारानें या तीन मुद्द्यांवरून आस्थे. ब्रह्मबंबूंवर कोरडा उडवला आहे; यास्तव तिहीं संबंधांनीं प्रकृत विषयाचा विचार करणें अवश्य होय.

२. सदरील विषयास लागण्यापूर्वी एका गोष्टीच्या संबंधानें येथें उल्लेख करणें

---

१. रावबहादुरांनीं दोन अडीच वर्षांपूर्वी ठाण्यास एके प्रसंगीं काय भाषण केलें तें आमच्या वाचकांपैकीं बऱ्याच मंडळींस आठवत असेलच.

२. "मनुष्यांचा पराक्रम प्रायः स्वजातीयांचा घात करण्यांतच दृष्टीस पडतो. पहा कीं ससाणा हा सर्पांस न मारतां पक्ष्यांवरच झडप घालतो!"

अवश्य वाटतें. ती गोष्ट ही होय कीं, आह्मी जातीनें ब्राह्मण पडलों. तेव्हां आपल्या सजातीयांच्या कैवारानें आह्मी काय लिहिणें तें लिहूं, असा आमच्या वाचकांचा समज होण्याचा संभव आहे. विशेषतः ब्राह्मणेतर वाचकांचा आणि त्यांतून परधर्मी व परधर्मांत शिरलेल्या मंडळीचा तर वरील समज होईलच होईल. जगाची सामान्यतः प्रवृत्ति ह्मटली ह्मणजे आपणावरून सर्व पहायाचें ही असल्यामुळें ज्या पवित्र मंडळीनें अफगाणिस्थानांत आमच्या शिपायांस जय येवो ह्मणून आकाशांतील बापापाशीं गळ घेतली, व खुनी जॉर्ज नेर्न्स[1] याच्या तर्फेनें प्रभु येशूपाशीं भीड खर्चली, त्यांस वरील निःपक्षपातता केवळ दुर्घट वाटणार आहे हें खरें. पण या गोष्टीस आमचा उपाय नाहीं. आह्मी आपल्या तर्फे आमच्या साऱ्या वाचकांस प्रांजलपणें एवढेंच कळवितों कीं, आमच्या राष्ट्राचा, जातीचा, धर्माचा वगैरे आह्मी जरी पूर्ण अभिमान बाळगतों, व त्यांवर जो वृथा दूषण देईल त्याचें पारिपत्य केल्याखेरीज जरी आह्मी कधीं सोडणार नाहीं, तरी यथार्थ दूषणाचा कैवार आह्मी कधीं घेणार नाहीं. सदोषत्व हें इहलोकीं कोणासच सुटलें नाहीं, यास्तव त्याचा आमच्या देशाकडे जेवढा रास्त वांटा येईल तेवढा कोणाहि निःपक्षपात मनुष्यास पतकरलाच पाहिजे. तो न पतकरणें ह्मणजे हटवादीपणा होईल. पण आमच्या देशाची अलीकडे अशी कांहीं चमत्कारिक स्थिति झाली आहे कीं, त्यास कोणी धनी ना गोसावी ! हवें त्यानें त्याच्याविषयीं काय पाहिजे ती बडबड करावी. जो जो जितकी अधिक अधिक बडबड करील तितका तितका तो जाडा पंडित व जाडा देशसुधारणा करणारा ! इतर देशांविषयीं कोणास कांहीं लिहिणें झाल्यास कांहीं तरी शोध करून लेखणी अंमळ जपून चालवावी लागते, पण आमचा हिंदुस्थान ह्मटला ह्मणजे पार्लमेंटच्या सभासदांनीं, इंग्रेज ग्रंथकारांनीं, मिशनरींनीं, एतद्देशीय ख्रिस्तभक्तांनीं, समाजवाल्या मंडळींनीं, चटोर पुस्तककारांनीं, त्याच्याविषयीं काय पाहिजे तें बोलावें व लिहावें. कांहीं शोध करायाला नको, कांहीं माहिती मिळवायाला नको, कांहीं धाक बाळगायाला नको—जें लिहावें तें सप्रमाण व जें बोलावें तें सत्यच ! बरें,

---

१. वरील नांवाच्या एका खलाशानें कल[illegible] आश्रय पोलिसच्या शिपायाचा जीव घेतल्यावरून त्यास फांशीं दिलें, हें कांहीं महिन्यापूर्वीचें वर्तमान आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांच्या वाचण्यांत आलेंच असेल. बिचाऱ्या नेर्न्सचें पुढें त्याच्या धर्मबंधूंनीं व धर्मभगिनींनीं कसें और्ध्वदेहिक केलें तें मात्र सर्वांच्या समजण्यांत आलें नसेल. नेर्न्स हा गतप्राण झाल्यावर त्याचें प्रेत वरील मंडळीनें मागून घेऊन त्याचा मोठ्या समारंभानें अंत्य संस्कार केला. पाद्री मंडळीनें त्याच्याबद्दल प्रभुपाशीं मोठ्या भक्तीनें प्रार्थना केली, व आपला बंधु आकाशांतील प्रभूच्या प्रेमळ मिठीचा अनुभव घेत आहे (Safe in the arms of Jesus) असें गीत गाइलें. तसेंच कित्येक मडमांनींहि वरील महापुरुषाच्या शवास पुष्पगुच्छांनीं अलंकृत करून मोठा सोहळा केला ! वाः ! धन्य नेर्न्स साहेबांचें सौजन्य ! धन्य त्यांच्या भगिनींची बंधुप्रीति ! ! आणि धन्य पाद्री व त्यांचा प्रभु ! ! !

आमच्या येथल्या मंडळीला वरच्या बोलण्यापैकीं व लिहिण्यापैकीं कांहीं टेंकेल ह्मणावें तर त्याची वार्ताहि नको ! तुह्मी त्यांस किती पाहिजे तितक्या शिव्या द्या, व नाहीं नाहीं तीं नांवें ठेवा; तीं सर्व त्यांस कबूल ? वरील पुष्पवृष्टि जितकी जितकी अधिक होईल तितका तितका त्यांस विशेष संतोष ! ती न होईल तर मात्र त्यांस चैन पडावयाचें नाहीं. या देशाविषयीं कोणीं चार ओळी मजकूर लिहिला, आणि त्यांत हिंदूंचें मूर्खत्व, भीरुत्व वगैरे सिद्ध केलेलें नसलें तर वरील तत्त्वज्ञ मंडळी नाक मुरडल्याखेरीज कधीं राहायाची नाहीं. सारांश, आमच्या देशांत अशी बहादर व निगरगट्ट मंडळी झाली आहे कीं, इतर देशांतील मनुष्यांस जशी आपली कोणी नालस्ती केलेली खपत नाहीं, तशी येथें स्वदेशाची प्रशंसा बिलकूल खपत नाहीं; व इतरांस जितपत आत्मस्तुति प्रिय तितपत इकडे आत्मनिंदा प्रिय !

तर अशा स्थितींत लोकांस आपणाविषयीं यथार्थ ज्ञान करून देणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे. जे दुराग्रही व हटवादी असतील त्यांस वरील यथार्थ ज्ञानहि विपरीत रीतीनें भासेल यांत संशय नाहीं; पण समंजस लोकांकडेच दृष्टि देऊन वरील प्रयत्न करणें उचित होय. तर आमच्या सजातीयांच्या संबंधानें आह्मीं जें यापुढें लिहिणार आहों, तें केवळ तिन्हाईतपणानें व निःपक्षपात बुद्धीनें लिहिणार आहों. त्यांत कोणास अन्यथा दिसल्यास प्रत्याक्षेप करण्याची आह्मीं सर्वांस मोकळीक दिलेलीच आहे.

३. तेव्हां आतां प्रथमतः मुत्सद्दीपणाच्या संबंधानें ब्राह्मणांविषयीं विचार करावयाचा. गेल्या शतकांत पूर्वी कधींहि न आलेलें ऐश्वर्य ब्राह्मणांस एकाएकीं प्राप्त झालें होतें; राजे ब्राह्मण, सरदार ब्राह्मण, दिवाण ब्राह्मण, वकील ब्राह्मण,—अशी कांहीं विलक्षण गर्दी एकदम होऊन गेली होती ! ज्या लोकांची प्राचीन वृत्ति ह्मटली ह्मणजे तपस्वीपणाची, व अर्लीकडील वृत्ति पराकाष्ठा झाली तर कारकुनीपणाची, त्यांनीं गेल्या शतकांत प्राचीन आश्रमींचे दर्भ व अर्वाचीन आश्रमींची लेखणी हीं दोन्ही टाकून देऊन एकदम क्षात्रधर्माची नवीन दीक्षा धारण केली; व कोणी राजवेत्राचा अंगीकार केला, कोणी खड्गाचा [illegible] स्वीकारला, असें अपूर्व वृत्यंतर त्यांचे ठायीं एकदम दृष्टीस पडलें. परशुरामक्षेत्रांतल्या मंडळीनें आपल्या क्षेत्रपतीची दिग्विजयाची दीक्षा चोहोंकडे गाजविली. भारती युद्धापासून ब्राह्मणांचें नांव समरांगणांत जें लोपून गेलें होतें तें हजारों वर्षांनीं पुनः उदयास आलें; व ज्या महाक्षेत्रावर अर्जुनाचा वानरांकित ध्वज फडकला होता, त्यावरच युगांतरीं भाऊसाहेबांचा जरीपटका झळकला ! सारांश, ज्याप्रमाणें स्पेनच्या राजानें पंधराव्या शतकाच्या अखेरीस साऱ्या देशावरचा यवनी अंमल उठवून फारा दिवसांनीं मूळच्या राज्यसत्तेची व धर्माची पुनः स्थापना केली, त्याप्रमाणेंच पुढें दोन तीन शतकांनीं इकडेहि महाराष्ट्र वीरांच्या हस्तें तोच प्रकार घडण्यांत आला.

वरच्यासारख्या हकीकती कोणी तिऱ्हाइतानेंहि ऐकल्या असतां त्याच्या मनांत आवेशाचें स्फुरण होण्यासारखें आहे; कां कीं, ज्याच्या अंगीं पौरुष आहे त्यास प्रत्यक्ष शत्रूचा आपणास बाधक होणारा पराक्रमहि अभिनंदनीय होत असतो, मग तिऱ्हाइताचा होईल यांत नवल काय? त्यांतून गेल्या दोन शतकांत आमच्या देशबंधूंनीं आपला प्रताप असा गाजविला कीं, एवढा अफाट हा हिंदुस्थान, पण एका शतकाच्या अवधींत तो सर्व त्यांच्या डिंडिमाच्या नादानें दुमदुमून गेला! शिवाय हीहि लक्षांत आणण्यासारखी दुसरी मोठी गोष्ट आहे कीं, मराठ्यांचा इतिहास हा इंग्लिश, फ्रेंच, किंवा स्पानियर्ड लोकांच्या इतिहासासारखा नाहीं,—ह्मणजे इंग्लिशांनीं जशी येथें सत्ता बळकावली, नेपोलियननें जसा सारा युरोप विनाकारण तुडवून टाकला, किंवा स्पेनच्या ख्रिस्ती वीरांनीं अमेरिकेंत घुसून तेथें देशचे देश उध्वस्त करून टाकून जसा आपल्या देशास व साऱ्या मनुष्यजातीस अक्षय्य कलंक लावला,—तसाहि वरील इतिहासाचा प्रकार नाहीं. दुसऱ्यास बुचाडण्याच्या बुद्धीनें जें युद्ध आरंभिलेलें असतें त्यांत वीरश्रीचा उत्कर्ष कितीहि दृष्टीस पडला तरी सुविचारी व न्यायी मनुष्यास तो तादृश प्रशस्त होत नाहीं; कां कीं, वरच्यासारखें युद्ध ह्मणजे दिवसा ढवळ्या घातलेल्या दरवड्याचेंच भावंड होय. यास्तव सीजर, नेपोलियनसारख्या सरदारांनीं कितीहि अद्भुत पराक्रम केलेले असले, किंवा हेस्टिंग्स डलहौसीसारख्यांनीं दुसऱ्याचें पागोटें घेण्यांत कितीहि शिताफी दाखविली असली, तरी प्रांजल इतिहासकारास त्यांच्या हकीकती लिहिण्यास कदापि संतोष वाटणार नाहीं. इतिहासदेवतेचीं परमप्रिय स्थानें ह्मटलीं ह्मणजे थर्मापिलीचा पहाड, सिंहगड, साराटोगा, केनीचें रणांगण, ब्यानॉकबर्नचा माळ, प्लेवनाचा मोर्चा हींच होत!

तर वरील अनेक कारणांस्तव महाराष्ट्र देशाचा इतीहास व ब्राह्मणांचीं शिपाईगिरी व राज्यकारण हीं परकी वाचणारांसहि प्रिय होण्यासारखीं आहेत. मग एतद्देशीय वाचकांस तर त्यांपासून केवढा उत्साह प्राप्त होण्यासारखा आहे हें सांगणें नकोच. पण या सर्व गोष्टी आमच्या रावबहादुरप्रभृति मंडळीस काय होत! त्यांनीं इंग्रेजी भाषेच्या सव्वीस मातृकांचा परिचय झाल्या दिवसापासूनच बहुधा दोन महासिद्धांत बळकट धरून ठेवले आहेत कीं, अकलेंत पहिला नंबर ह्मटला ह्मणजे आपले विद्यादाते व अन्नदाते जे इंग्रेज लोक त्यांचा; व दुसरा नंबर त्यांचे प्रिय छात्र व दासानुदास जे आपण त्यांचा; व पहिल्या मंडळीस स्वर्ग एक बोट उणा, व दुसरीस दोन बोटें! वर दाखल केल्याप्रमाणें अकलेची वांटणी होऊन गेल्यावर मग बाकीच्या मंडळींची वार्ता कशाला पाहिजे आणि त्यांतून आमच्या देशांत गेल्या तीन हजार वर्षांत जी अविच्छिन्न मूर्खपरंपरा होऊन गेली त्यांपैकीं कोणी वरील अकलेस हक्क सांगणें ह्मणजे तर एखाद्या अतिशूद्रानें मोठमोठ्या वेदशास्त्रसंपन्न महाब्राह्मणांच्या पंक्तीच्या

लाभाची आशा करणें यासारखेंच वेडगळ होय. इंग्लिशभाषारूप महानसांत रांधला जाणारा जो अतिमोलाचा अकलरूप पदार्थ त्याचे पहिले भोक्ते झटले झणजे मेकॉले, मॉरिस, विल्सनप्रभृति पाश्चात्य ऋषिवर्य हे होत; त्यांस समर्पण होऊन राहिलेलें जें पवित्र उच्छिष्ट तें पुढें 'लोकहितवादी', 'घाशीरामा'चे जनक, 'सत्यदीपिका'धारी यांनीं पुरोडाश झणून मोठ्या भक्तीनें सेवन करायाचें; मग या दोन पवित्र पंक्तींतून निभावून येऊन वरील प्रभुभोजनापैकीं एखादा शलगवाचा तुकडा किंवा सोमरसाचा एखादा थेंबहि आमच्या ब्राह्मण वीरांच्या किंवा मुत्सद्द्यांच्या विचाऱ्यांच्या वांट्याला कोठून येणार ! असो; आतां आमच्या रावबहादुरांचे स्वज्ञातीविषयीं जे अमोल उल्लेख जागोजाग आहेत, कीं ब्राह्मण हे राज्यबुडवे, त्यांस राज्य चालविण्याची अकल नाहीं, लढाई करण्याचें शहाणपण नाहीं, इ० इ०. त्याविषयीं येथें सविस्तर लिहिण्याची मुळींच जरूर नाहीं. अज्ञानाचें किंवा दुराग्रहाचें पटल जो आपल्या डोळ्यांवरून अंमळ दूर सारील त्याच्या सुद्धां प्रस्तुत प्रकरणीं खरें कांय तें लक्षांत येण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं. यास्तव 'निबंधसंग्रहा'पैकीं एका मात्र लेखाचें येथें अवतरण करून प्रस्तुत प्रकरण आटपतों.

"नंबर ४१."

"नानाफडणविसाचें शहाणपण."

"**विनंति विशेष**—सांप्रत मराठे लोकांत अशी झण आहे कीं, नानाफडणिसासारखा कोणी शहाणा नाहीं परंतु मला वाटतें कीं, आतां इंग्रज लोकांमध्यें सहस्रशः नानापेक्षां शहाणे आहेत. नानाफडणिसाचें शहाणपण वर्णन करण्याजोगें सर्वोत्कृष्ट नव्हतें. त्या लोकांमध्यें त्याची कीर्ति होण्याचें कारण इतकेंच कीं, मूर्खांचे समेंत थोडासा कोणी शहाणा असला झणजे त्याची ख्याति होते, आणि गांवढा जोशी गांवढ्यांत पंडित असतो; कारण कीं, त्या गांवचे लोक जितके ज्ञानी असतात त्यांहून त्यास विद्वान्पणा अधिक असतो. वास्तविक पाहिलें तर नानाफडणीस कांहीं विद्वान् नव्हता व त्यास दूरदृष्टि नव्हती. जन्मापासून त्यानें कारभार केला याजमुळें त्याची बुद्धि बरीच होती, व मराठे दरबारचा बंदोबस्त त्याला चांगला करितां येत होता; परंतु मेंढ्यास मेंढ्या वळतां आल्या झणून तो कांहीं घोडेस्वार होत नाहीं. इंग्रजलोकांतील कारभारी यांची बुद्धि विशाळ, मसलत खोल, अनेक देशींचे वृत्तांत त्यांस माहीत, व त्यांचें आपसांत एक मत असे. नानाफडणिसाचे ठायीं हें नव्हतें. तो जुन्या चालीचा ब्राह्मण, त्याची माहिती कमी, व आपसांत दुष्टपणा फार होता. पहा बरें, नानाफड-

णिसाचे हातीं सर्व राज्यकारभार होता. परंतु त्यानें कांहीं राज्यांत अधिकाऱ्यांची रचना व पदव्या हें ठरविलें नाहीं. इंग्रजांत एक मेला ह्मणजे दुसरा तयार असतो. हा क्रम मराठी राज्यांत नव्हता. कायदे कांहीं नव्हते. बरें, त्यांचे समीप इंग्रज होते त्यांचा शोध तरी त्यानें कांहीं करावा, तेंहि कांहीं नाहीं, इंग्रजांनीं मात्र सर्व लोकांच्या डोक्यावरचे केस मोजून ठेविले, परंतु मराठे लोकांस इंग्रजांविषयीं कांहीं माहीत नाहीं. त्यांचा देश व नांवगांव कांहींएक ठाऊक नाहीं. नानाचे वेळचे पत्रांत कोठें इंग्रजांस जलचर, कोठें कलकत्तेकर असें ह्मटलें आहे. याजवरून त्याचें ज्ञान समजतें. टिपूशीं लढाई केली तेव्हां लार्डकार्नवालीस तेथें गेले होते. व त्याजबरोबर परशुरामभाऊ वगैरे सरदार पेशव्यांकडून गेले होते. पण त्यांपैकीं एकजणासहि ते कोण होते हें ठाऊक नाहीं व कोठून आले हें माहीत नव्हतें. इंग्रजांचा वकील पुण्यांत होता त्याची मात्र त्यांस ओळख होती. परंतु त्यांचा शेंडाबुंधा किंवा हिंदुस्थानांत इंग्रज कोठें आहेत व फरासीस कोठें आहेत व फिरंगी कोठें आहेत, याचा कांहीं शोध लागत नाहीं. नानाफडणिसाची बातमी फार होती असें ह्मणतात. परंतु ही बातमी फुसक्या गोष्टीची होती. शिकांचें व नेपाळचें वगैरे संस्थान दूरवर होतें, त्यांचा त्यास ठिकाण नव्हता व राज्यांत टपाल वगैरे नव्हतें. नानाची बातमी इतकीच होती कीं, आपले ओळखीचे लोकांतील कोण कोठें गेला, कोण काय जेवला, ही मात्र बातमी तो चित्त देऊन काढीत असे; एवढ्यावरून मूर्ख लोकांस असें वाटे कीं, आह्मीं काल अमुक करीत होतों तें नानास ठाऊक कसें झालें? परंतु या बातमींचा उपयोग काय? बातमी ह्मणजे संपूर्ण जगांत कोणतीं राष्ट्रें आहेत, कोणते मुलूख मोठे आहेत, हें समजावें. तळेगांवास इंग्रज लोक आले होते तेव्हां मराठे लोकांनीं एकावर हजार जाऊन त्यांचा पराभव केला. या गोष्टीचें मराठे लोक मोठें वर्णन करितात. परंतु असली गोष्ट कांहीं मोठी नव्हे व त्यांत कांहीं शहाणपण नाहीं. घोडें मनुष्यास मारील यांत काय आश्चर्य आहे? परंतु त्यामुळें घोडा शहाणा व मनुष्य वेडा असें ह्मणूं नये. ती गोष्ट एखादे वेळीं झाली ह्मणून वारंवार होणार नाहीं. नेहमीं मनुष्य घोड्यावर बसतात; तद्वत् इंग्रजांचा पराभव मराठे लोकांनीं केला, पण त्याजमुळें इंग्रज नाहींसे झाले नाहींत. आणि इंग्रज लोक शहाणे. ते इकडे आल्यावर त्यांनीं या लोकांच्या सर्व माहितगाऱ्या काढिल्या आणि मग त्यांस जिंकण्यास उशीर लागला नाहीं. अशी मराठ्यांनीं इंग्रजांची माहितगारी कां काढिली नाहीं? नानाफडणिसास ही गोष्ट करण्यास अनुकूल होतें, परंतु त्यास हें कांहीं ठाऊकच नाहीं. त्याच्या समजुती अशा होत्या कीं, पृथ्वी काय ती एवढीच व सर्व जग तें इतकेंच आहे. याशिवाय कोठें कांहीं नाहीं. इंग्रज हे कोणत्या बेटांतून आले आणि प्रथम दहा वीस जण, नंतर शेदोनशें असें इतके दूर येऊन एवढें राज्य जमविलें. ही कृति विश्वकर्म्यासारखी नव्हे काय? परभाषा, परमुलूख, परजात, परधर्म, तत्रापि

वरिष्ठता पादले हें केवढें शहाणपण बरें? इंग्रज कोण हें वर्तमान ठाऊक नाहीं, हा केवढा मूर्खपणा आहे! आपले लोक पेशवाईत मूर्ख होते यांत संशय नाहीं. त्यांस कांहींच कळत नव्हतें. बरें आणखी नानाफडणीस यास कांहीं आपले देशाचा अभिमान नव्हता व शौर्यहि नव्हतें. तो स्वभावानें कुत्सित होता व हलक्या मनाचा होता. सर्व देशाचें कल्याण करण्याचें त्याचें मनांत क्षणभर देखील येत नव्हतें. परंतु त्याचीं आंतून बहुत सरदारांशीं वांकडीं मात्र होतीं. त्यानें सर्वांस एक कायदा लावून देऊन सर्वांस एकत्र जमविण्याचा प्रयत्न कधींच केला नाहीं. आपले घरापर्यंत व आपले राज्यापर्यंत मात्र नजर ठेविली. लोकांच्या सुधारणेचा प्रयत्न केला नाहीं. श्रीकाशीक्षेत्रास जाणें तरी बरोबर दोनशें लोक लागत. तेव्हां मनुष्यें माघारीं येत होतीं. नाहीं तर भिल्ल, रामोशी, पेंढारी वगैरे चोरटे लोक लुटीत होते. त्यांचा बंदोबस्त त्याच्यानें झाला नाहीं. काशीहि आपलेकडे इंग्रजांकडून घेवविली नाहीं. व त्यास आपले राज्याबाहेर कोण अम्मल करितो याची खबर बिलकूल नव्हती. या लोकांचें कोणतेंहि कल्याण त्याचें हातून झालें नाहीं. मग त्यास कोणत्या प्रकारानें लोक शहाणा झणतात हें कांहीं कळत नाहीं. नीति, सुधारणा किंवा विद्येची वृद्धि त्यानें केली नाहीं; व कलाकौशल्यें हीं वाढविलीं नाहींत. नशीबानें राज्य चाललें, नाहीं तर अशा लोकांच्या हातांत राज्य क्षणभर देखील असूं नये; परंतु काळाच्या योगानें इंग्रज त्या वेळेस इकडे फारसे आले नव्हते. याजमुळें हें राज्य चाललें, नाहीं तर असे लुटारू, अडाणी लोकांचें बेकायदा राज्य निभूं नये. परंतु ईश्वरसत्तेनें तें झालें. तात्पर्य नाना फडणिसाविषयीं जो अभिप्राय लोकांचा आहे तो खोटा आहे. आतां जर नानाफडणीस असता तर त्याजला लोक वेडा झणूं लागते आणि तो पळूनहि जाता यांत संशय नाहीं." लो० हि०.

वरील लेखावर चर्चा करण्यापूर्वी त्याच्या जोडीला कांहीं इंग्रेजी लेख सामील करितों. त्यांचेंहि वाचकांनीं मनन करावें—

"The first of the events alluded to in point of time and importance was the death of Nana Furnuwees. His health had long been in a declining state; but he continued to transact business, almost to the last, with his accustomed order and punctuality. He died on the 13th March. "And with him," says Colonel Palmer, "has departed all the wisdom and moderation of the Mahratta government." Nana Furnuwees was certainly a great statesman. His principal defects originated in the want of personal courage, and in an ambition not always restrained by principle. In the latter unhappy years of his life, on the testimony of English as well as Mahratta authority, he is entitled to the high praise of having acted with the feelings

and sincerity of a patriot. He honorably advised Bajee Rao to such measures as he believed advantageous, unmindful of any consequences. He was decidedly averse to the admission of a body of foreign troops in the manner proposed by the Marquis Wellesley, if the energies of the government could possibly be restored without their aid. He respected the English, admired their sincerity and the vigour of their government; but as political enemies, no one regarded them with more jealousy and alarm. The life of Nana may be said to have been entirely public; and its events have been so fully recorded as well as the motives for his conduct, that it is unnecessary to enlarge on his character. In private life he was a man of strict veracity, humane, frugal and charitable. His whole time was regulated with the strictest order, and the business personally transacted by him almost exceeds credibility."

("मागील भागाच्या शेवटीं निर्दिष्ट केलेल्या वृत्तांतांपेक्षां कालमानानें व महत्त्वाच्या मानानें पहिली मोठी घडलेली गोष्ट ह्मटली ह्मणजे नानाफडणवीस याचा मृत्यु ही होय. नानाच्या प्रकृतीस बरेच दिवस चैन नव्हतें, तरी शेवटपर्यंत त्यानें नेहमींच्या ठाकठिकीनें व टापटिपीनें कारभार चालविला. मार्च महिन्याच्या १३ व्या तारखेस त्याचा काळ झाला. त्याच्या बरोबरच मराठी राज्यांतील सारें शहाणपण व सर्व व्यवस्थितपणा निघून गेला, असें कर्नल पामर यानें लिहिलें आहे. नाना फडणवीस हा खरोखर मोठा मुत्सद्दी होऊन गेला. त्याचे मुख्य अवगुण ह्मटले ह्मणजे एवढेच होते कीं, तो जातीनें शूर नव्हता व त्याची महत्त्वाकांक्षा कांहींशी अनावर होती. त्याचीं शेवटलीं चार पांच वर्षें जीं विपत्तींत गेलीं त्यांत त्यानें स्वदेशभक्ति पूर्णपणें प्रगट केली; याविषयीं त्याच्या देशबंधूंचें व त्यावेळच्या इंग्रेजांचें ऐकमत्य आहे. बाजीराव गादीवर आल्यावर त्यानें त्यास निरपेक्ष बुद्धीनें आपला उत्तम सल्ला देण्यांत कधीं कसर केली नाहीं. मार्क्विस वेलेस्लीनें सांगितल्याप्रमाणें इंग्रेजी पलटणें चाकरीस ठेवण्याची मसलत त्यास बिलकूल पसंत नव्हती. जोंपर्यंत होईल तोंपर्यंत राज्यांतल्या राज्यांतच बंदोबस्त करावा हें उत्तम अस त्याचें मत होतें. तो इंग्रेजांस चाहत असे, त्यांची नेकी व राज्य चालविण्याची शहामत यांची तो तारीफ करी; पण राज्यकाणाच्या संबंधानें ते नेहमीं त्याच्या डोळ्यांत खुपत असत. नानाचें सर्व आयुष्य राज्य कारभारांतच गेलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या कारभारांत घडलेल्या सर्व गोष्टींची

तपशीलवार हकीकत पूर्वी दाखल झालेलीच आहे, व नानाचे कोणकोणत्या कार्यांत काय काय हेतु होते तेहि प्रदर्शित केलेलेच आहेत; यास्तव त्याच्या स्वभावाचें वर्णन येथें अधिक करण्याची जरूर नाहीं. खाजगी रीतीनें पाहतां नाना फडणवीस हा वचनाचा धड, दयाशील, मितव्ययी व धर्मात्मा असा होता. त्याचा सारा वेळ बांधलेला असे; व तेणेंकरून त्याच्या हातून इतकें काम उरके कीं, तें कोणास सांगितल्यास खरें सुद्धां वाटणार नाहीं !")

"The fortunes of Nana Furnuwees were now, in the general opinion, and perhaps in his own, desperate; but on being forced to abandon half-measures, into which he was misled by a timid disposition, the vigour of his judgment, the fertility of his expedients, the extent of his influence, and the combination of instruments which he called into action, surprised all India, and from his European contemporaries, procured for him the name of "the Mahratta Machiavel."

या वेळेस सर्वांस असें वाटून गेलें होतें कीं, आतां नानाची धडगत नाहीं; कदाचित् त्याचा त्यासहि त्यावेळेस भरंवसा वाटत नसेल, पण पहिल्यापहिल्यानें भित्रेपणामुळें आरंभलेलें धरसोडीचें वर्तन सोडून देऊन जेव्हां त्यानें आपलें बुद्धिसर्वस्व प्रगट केलें, तेव्हां, त्याची दूरवर पोंच, युक्तिप्रयुक्ति रचण्याचें चातुर्य, त्याचा चोहोंकडे असलेला दबदबा, व आपणावर उठलेल्या शत्रूंस मोडण्यास त्यानें जीं कारस्थानें उभीं केलीं तीं,– या सर्वांकडे पाहून सारें हिंदुस्थान तोंडांत बोट घालून राहिलें, व त्या वेळचे इंग्रेज लोक "मराठ्यांतला म्याकिवेल [१]" असें ह्मणूं लागले.

वरील दोन उतारे ग्रांट डफच्या सर्वप्रसिद्ध इतिहासांतले आहेत. पुढील उतारा 'एशियाटिक आन्युअल रेजिस्टर' या वार्षिक पुस्तकांतील आहे—

"Contemporary with Poorneah, and in no ways inferior to him, was Nana Furnevese, who for a quarter of a century administered the territory of the Peshwa, during the minority of Bajee Rao. To attempt a character of this great statesman, would be to detail a history of Mahratta politics for the last twenty-five years, during which he discharged the duties of Minister with abilities unequalled. During the long and important period of his administration, by the force

१. म्याकिवेल नामें करून एक विख्यात इटालियन प्रधान सोळाव्या शतकाच्या आरंभीं उदयास आला, याला 'इटालींतला चाणक्य' ह्मटलें असतां शोभणार आहे.

and energy of his single mind he held together his vast empire—composed of members whose interests were as opposite as the most anomalous elements—and by the versatility of his genius, the wisdom and firmness, and modification of his government, he excited this mass of incongruities to one mutual and common effort. With that wise and forseeing policy—which strong in its own resources, equally reject the extremes of confidence and despair, he supplied from the fertility of unexhausted genius an expedient for every possible event."

(पूर्णयाच्याच वेळचा व त्याच्यासारखा बुद्धिमान् प्रधान नानाफडणीस हा होता; यानें बाजीरावाच्या[1] अज्ञानदशेंत पेशव्यांचें राज्य पंचवीस वर्षें चालविलें. या नामांकित मुत्सद्द्याचें वर्णन करणें ह्मणजे गेल्या पंचवीस वर्षांत मराठ्यांच्या राज्यांत ज्या उलाढाली झाल्या त्यांची हकीगत देणें होय; वरील काळांत त्यानें विलक्षण चातुर्यानें प्रधानगिरीचें काम बजावलें. इतकीं वर्षें पावेतों त्यानें आपल्या एकट्या बुद्धीनें पेशवाईसारख्या प्रचंड राज्याचें नियमन केलें. त्या राज्यांत किती निरानिराळीं संस्थानें व त्यांच्यांत परस्पर किती बखेडे ! पण इतक्यांसहि त्यानें एक तंत्रानें वागविलें; अशी त्याची राज्य वहिवाटण्याची कांहीं चमत्कारिक हातोटी होती ! त्याचें शहाणपण व दूरदृष्टि हीं अशा प्रकारचीं होतीं कीं, कोणतेंहि कार्य करायाचें तर तें उतावळीनें न करतां किंवा त्याच्याविषयीं निराश होऊन न बसतां तें धिमेपणानें व धोरणाधोरणानें करायाचें. यामुळें कोणत्या वेळेस कसाहि प्रसंग गुदरला तरी तो डगमगत नसे.)

प्रस्तुत विषय एकंदर ब्राह्मणांच्या मुत्सद्दीपणाचा आहे, यास्तव वरील पुस्तकांतूनच पुढीलहि उतारा वाचकांस सादर करतों--

"Every trait" said the British Resident of that day "in the character of Poorneah marks him as an extraordinary man. * * * To a mind of singular vigour, he added an extensive acquaintance with the resources of the country and an intimate knowledge of characters. The revenue of Mysore has been raised to its present amount by the superior management of Poorneah; by the attention to the repair of tanks and watercourses: and the construction of roads and bridges;

१. वरील उल्लेखांत थोडीशी चूक आहे. बाजीरावाच्या जागीं सवाईमाधवरावाचें नांव पाहिजे होतें.

by the encouragement which he has given to strangers to resort to and settle in Mysore; and his general endeavours to improve the agriculture of the country, and the situation of the people under the government."

("त्या वेळचा इंग्रेजांचा रेसिडंट वरील प्रधानाविषयीं असें ह्मणतो कीं, पूर्णया यांच्या अंगचे सर्व गुण मोठे विलक्षण होते. त्याची बुद्धि अत्यंत तीव्र असून त्यास आपल्या देशाच्या संबंधानें सर्व प्रकारची उत्तम माहिती होती; शिवाय कोण कसा आहे, कोण कसा आहे हें ज्ञानहि त्यास सर्वोत्कृष्ट होतें. पूर्णयानें म्हैसूर प्रांताची जी उत्कृष्ट व्यवस्था ठेविली होती तिच्या योगानें त्याचें उत्पन्न आज इतकें वाढलें आहे. ही व्यवस्था अशी कीं, त्यानें तळ्यांची व नाल्यांची चांगली दुरुस्ती ठेविली, रस्ते व पूल बांधले, नवीन वसाहत करण्यास येणारांस चांगलें उत्तेजन दिलें, शेतकीची सुधारणा केली, आणि एकंदर रयतेस सुखी केलें.").

ऐश्वर्यादनपेतमीश्वरमयं लोकोऽर्थतः सेवते
तं गच्छंत्यनु ये विपत्तिषु पुनस्ते तत्प्रतिष्ठाशया ।
भर्तुर्ये प्रलयेऽपि पूर्वसुकृतासंगेन निःसंगया
भक्त्या कार्यधुरं वहंति कृतिनस्ते दुर्लभास्त्वादृशाः ॥[1]

'मुद्राराक्षस'.

अंक ६८—(१) दोन्ही अभिप्रायांची तुलना. (२) 'लोकहितवादी'च्या अभिप्रायाचें खंडन. (३) प्रस्तुत विषयावर आमचें मत.

१. मागील अंकांत जे उतारे दिले आहेत त्यांतील मराठी उतारा एका पारड्यांत घातला व इंग्रजी उतारे दुसऱ्या पारड्यांत घातले तर तराजूचा कांटा कोणत्या बाजूला कलेल बरें ? आमच्या रावबहादुरांनीं बिचाऱ्या नानास दिलेल्या सर्टिफिकिटांत व इंग्रेजांनीं दिलेल्या सर्टिफिकिटांत हें केवढें जमीनअस्मानचें अंतर ! 'लोकहितवादी' महाराज तर त्यांस शहाणपणाच्या उच्चपदावरून लाथेनें खालीं झुगारून देणार, आणि इकडे पहावें तों इंग्रेज ग्रंथकार तर त्यास महामंत्रिमंडळांत नेऊन बसवणार; मग नानाची मधल्यामध्यें बिचाऱ्याची वाट काय ? प्राचीन काळच्या त्रिशंकूसारखी किंवा गेल्या शतकांतल्या द्रविड

---

१ "जो प्रभु ऐश्वर्ययुक्त आहे त्याची लोक स्वार्थास्तव सेवा करीत असतात; त्याच्या विपत्तिकाळींहि जे त्यास अनुसरतात ते तरी त्याची पुनः स्थापना होईल, या आशेवर त्याला भजतात; पण आपल्या स्वामीचा सर्वथा नाश होऊन गेला असतांहि केवल पूर्वीचा लागा बांधा स्मरून जे केवळ निरपेक्ष बुद्धीनें त्याच्या कार्यार्थ देह झिजवितात ते तुझ्यासारखे धन्य पुरुष या लोकीं दुर्लभ होत ! "

ब्राह्मणासारखीच पुनः पंचाईत येऊन पडली ! बरें, वरील दोन सर्टिफिकिटांची एकवाक्यता करूं ह्मटलें तर कोणत्याहि बाजूनें ती होण्याचा संभव नाहीं. एक सर्टिफिकिट ह्मणतें, कीं नाना मूर्ख, अल्पदृष्टि, व आपस्वार्थी होता, त्यानें सर्वांस एका जुटीनें वागविण्याचा कधींच यत्न केला नाहीं. तेंच दुसऱ्या सर्टिफिकिटांत पहावें, तों नाना ह्मणजे अटोकाट शहाणा, दूरदृष्टि, लोककल्याणकर्ता, व सर्वांवर आपली छाप ठेवून सर्वांस एका धोरणानें वर्तविणारा, असा आढळतो. मग या ठिकाणीं तोड तरी काय काढावी ? वरील दोन अभिप्रायांपैकीं कोणता तरी एक अभिप्राय खोटा ठरला पाहिजे, हें उघड आहे. पण खोटा ह्मणावा कोणता ? आमच्या रावबहादुरांचें सर्टिफिकिट एकदम रद्द करून टाकावें तर तें कठिणच; कां कीं, आज तीन हजार वर्षांत निपजलेल्या एकंदर लोकांस सरसकट महामूर्ख ठरवून त्या सर्वांचें शहाणपण हिरावून घेऊन जे आज चाळीस वर्षें महाज्ञानी ह्मणून नाणवलेले आहेत त्यांचा अभिप्राय यच्चयावत् खोटा कसा ह्मणावा ? त्यांतलें एखादें अक्षर कदाचित् अन्यथा पडेल, किंवा फार झालें तर एखादें वाक्य नजरचुकीनें भलतें पडलेंसें ह्मटलें तर असो, पण सहस्रशः मनन केलेल्या विषयावरचा त्यांचा एवढा सविस्तर नमूद केलेला सारांश सगळाचा सगळा निखालस चुकला असें ह्मणणें ह्मणजे केवढें धारिष्ट होणारें आहे ! त्यांतून एतद्देशीय इतिहासाच्या संबंधानें तर रावबहादुरांचा हातखंडा आहे हें सर्वप्रसिद्धच आहे; त्यांस जुनी माहिती मिळविण्याचा पहिल्यापासून जितका हव्यास आहे तितका कोणासहि नाहीं ह्मटलें असतां चालेल. मग इतकें असून त्यांनीं एवढ्या डौलानें दिलेलें स्वदस्तुरचें सर्टिफिकिट कवडीच्या मोलाचें ह्मणून बेलाशक झुगारून दिलें असतां शोभेल काय ? कधीं शोभणार नाहीं.

आतां दुसऱ्या पक्षाविषयीं विचार केला असतां तिकडूनहि लहानसान पंचाईत आहे असें नाहीं. रावबहादुरांनीं अविचारानें कांहीं तरी अभिप्राय ठोकून दिला असें जर न ह्मटलें, तर नानास वरच्यासारखीं अघळपघळ सर्टिफिकिटें देणारे तरी अकलेचे खंदक होते असें ह्मणणें भाग आहे. जो खरा कवडीचा माल ह्मणून आह्मीं येथल्या येथें सर्वानुमतें ठरवतों त्यालाच जेव्हां पाश्चात्य रत्नपारखे अमोलिक ठरवतात, तेव्हां ते गाजरपारखे नव्हेत ? अर्थात् ते तसेच होत. पण हा सिद्धांत स्वीकारणें ह्मणजे 'लोकहितवादी'च्या तत्वज्ञानाच्या संबंधानें 'मूलच्छेदी पांडित्यप्रकर्षः' असाच प्रकार होणार ! ज्यांच्या शहाणपणाचा प्रकाश अज्ञानांध हिंदूंच्या नेत्रांस विषयीभूत करण्याकरतां मुळीं आमच्या रावबहादुरांचा आज तीन तपें सारखा खटाटोप, त्यांच्याच डोक्यावर महामूर्खत्वाचा बोजा नेमका जाऊन आदळला तर मग काय राहिलें ? छे, छे ! हें तर त्यांच्या बुद्धीस सर्वथा विरुद्धच होय. एक वेळ आपणाकडे मूर्खत्व घेऊन आपल्या प्रभूकडे शहाणपणा द्यावा हा सेवकधर्म ह्मणतां येईल; पण आपल्या राज्यकर्त्यांकडे

गाजरपारखेपणा देऊन आपण मात्र पहिल्या प्रतीचे परीक्षक होणें हा केवढा निमकहरामीपणा होणार आहे ! !

तेव्हां एकंदरींत पहातां एकीकडे आड आणि 'एकीकडे विहीर' अशाच प्रकारची ही पंचाईत आहे. राववहादुर, नाना व साहेब या त्रयीपैकीं मूर्खत्वाचा बोजा कोणीं तरी पतकरला पाहिजे; त्यावांचून गत्यंतर नाहीं. वरील त्रिवर्गापैकीं पुढील दोन असामी तर गतच झालेले आहेत; तेव्हां त्यांच्या तरफदारीचा खटला उरकलाच. आतां राहिले--साहिले राववहादुर; तर ते किंवा त्यांचे कैवारी यांपैकीं कोणी जर वरील पंचाईत तोडतील तरच वरील वैध नाहींसें होणार आहे. एरवीं मार्गच उरला नाहीं !

वर जो आह्मीं हेतु प्रदर्शित केला आहे तो केव्हां सिद्ध होईल, किंबहुना मुळींच होईल कीं नाहीं, याविषयीं तूर्त कांहीं सांगतां येत नाहीं. यास्तव सध्यां राववहादुरांच्या पूर्वोक्त लेखावर आह्मी आपला अभिप्राय आमच्या वाचकांस सादर करतों.[1]

२. 'लोकहितवादीं'चा वादविषयक लेख हा अनेक प्रकारांनीं मोठा विचार करण्यासारखा अ ाचा पहिला मोठा उपयोग हा आहे कीं, त्यावरून पाश्चात्य विद्येपासून आम ा नवीन मंडळीच्या मनावर कोणते दुष्ट संस्कार झाले ते त्यांत स्पष्ट दिसत आहेत. पंचवीस वर्षे ब्राह्मण बादशाहीचा कारभार हाकलेला जुनापुराणा दिवाण नानाफडनवीस कोणीकडे, आणि आंग्लभौम भाषेचें केवळ मुखावलोकन होऊन नुकती ज्यांची लेखणी फुरफुरूं लागली असे आमचे कोंवळे राववहादुर कोणीकडे ?[1] पण कांहीं नाहीं; लहानग्या जॉर्ज वॉशिंगटनानें आपणास वक्षीस आलेल्या लहानशा कुऱ्हाडीचा प्रयोग जसा आपल्या बापाच्या बागेंतील बिचाऱ्या झाडांवर करण्याचा लगे हात सपाट चालविला, त्याप्रमाणेंच प्रस्तुत तरुण पंडितानेंहि विद्याप्रविष्ट होतांच लोकहितवादीची दीक्षा धारण करून 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या म्हणीप्रमाणें जुने मुत्सद्दी, जुने पंडित, जुना धर्म, जुन्या चाली यांवर आपल्या नूतनलब्ध शस्त्रास्त्रांचा भडिमार चालू केला. महामूर्खत्वाची एक भली जाडी सनद काढून ती त्यानें परमप्रीतीनें आपल्या पितृपितामहप्रपितामहादि शंभर पूर्वजांस एका सपाट्यासरशीं देऊन टाकली. ही अपूर्व पुष्पवृष्टि लोकांतरवासी देशमुखमंडळीस कितपत मानवली असेल कोण जाणे ! बरें, आतां हा जो सिद्धांत, कीं शहाणे काय ते आह्मी, आणि इंग्रेजीचा ज्यांस पवित्र संस्कार घडला नाहीं ती सर्व मंडळी मूर्ख, हा कशावरून खरा समजायाचा ? राववहादुरांनीं त्याची सिद्धता कोठेंच केली नसून तो जेथें तेथें प्रत्यक्ष प्रमाणाप्रमाणें गृहीत धरलेलाच आढळतो. उदाहरणार्थ प्रस्तुत लेखच पहा. त्यांत वरील सिद्धांताचें जागोजाग विधान मात्र केलेलें आहे. "आपले लोक पेशवाईत मूर्ख होते यांत संशय नाहीं. त्यास कांहींच

१. वादविषयक लेख राववहादुरांनीं सन १८४८ त लिहिलेला आहे.

कळत नव्हतें;''—''आतां जर नाना फडणवीस असता तर त्याजला लोक वेडा ह्मणूं लागते, आणि तो पळूनहि जाता यांत संशय नाहीं;''—''मूर्खांचे समेंत थोडासा कोणी शहाणा असला ह्मणजे त्याची ख्याति होते''—इ० इ०. तर आतां अगोदर या महासिद्धांताची सत्यता कितपत आहे ती पाहूं.

इंग्रेजी भाषेचा गेल्या वीस पंचवीस वर्षांत इकडे प्रसार झाल्यापासून वरील तत्त्व सामान्यतः सर्वांचे ठायीं व विशेषतः नवीन विद्वानांचे ठायीं बिंबलेलें आढळतें. जुना इंग्रेजी न शिकलेला तेवढा मूर्ख व इंग्रेजी पैदा केलेला तेवढा शहाणा अशी एक साधारणपणें समजूत पडून गेलेली आहे. ही समजूत वस्तुतः पहातां अगदीं वेडगळपणाची होय. इंग्रेजी विद्वत्ता ह्मणजे एवढी काय अपूर्व चीज आहे याचा कोणीं कधीं विचार केला आहे काय? इंग्रेजी विद्वत्ता ह्मणजे इंग्रेजी भाषेचें ज्ञान याच्या पलीकडे काय आहे? मग केवळ भाषेचें ज्ञान झाल्यानें, ह्मणजे दहा पांच हजार शब्दांचें अर्थज्ञान झाल्यानें व सामान्यतः कोणत्याहि इंग्रेजी ग्रंथांतील अभिप्राय समजण्याची शक्ति आल्यानें, एवढें शहाणपण तें कोणतें आलें? इंग्रेजी भाषेच्या वर्णांत किंवा शब्दांत असा कांहीं विजातीय प्रभाव आहे काय, कीं पहिले जिव्हाग्रावर वसले व दुसरे मनांत सांठवले ह्मणजे बुद्धीस आपली तीव्रता आलीच? आतां कोणी ह्मणतील कीं, इंग्रेजींत हजारों मोठमोठे ग्रंथ लिहिलेले आहेत, त्या भाषेंत पदार्थविज्ञानावर व सामान्यतः सर्व व्यवहारावर महान् महान् पंडितांनीं आपापले अत्यंत प्रौढ विचार प्रगट केलेले आहेत; तेव्हां त्यांच्या परिशीलनानें अर्थातच बुद्धीस परिपक्वता येणार आहे. खरें आहे; पण एवढ्या पल्ल्यावर आजपर्यंत कितीशी मंडळी पोंचलेली आढळेल? आज आमच्या देशांत जेवढ्यांस इंग्रेजी भाषा येत आहे त्यांपैकीं शेंकडा कितीजण बेकनचें किंवा मिल्लचें बुद्धिपुरःसर अध्ययन करणारे सांपडतील? शिवाय केवळ ग्रंथज्ञान व व्यवहारज्ञान यांत किती तफावत असते हेंहि कोणाला सांगायाला पाहिजे असें नाहीं. साऱ्या जगाचा इतिहास ज्यास मुखोद्गत येत आहे त्याच्या हातीं एखाद्या लहानशा संस्थानाचा कारभार दिला तर त्याच्यानें तो वहिवाटला जाईल काय? सारा भूगोल ज्यास करतलामलकवत् आहे त्यास एखाद्या रानांत नेऊन सोडला किंवा त्याच्या हातीं जहाजाचें सुकाणूं दिलें तर काय मौज होईल बरें? तेव्हां ग्रंथपठन व व्यवहारचातुर्य हीं केवळ भिन्न होत हें उघड आहे.

आमच्या रावबहादुरांनीं नाना फडणविसावर मोठा टपका हा आणला आहे कीं, तो 'कांहीं विद्वान् नव्हता,' या आक्षेपावरून आह्मांस गेल्या वर्षींच्या अशाच एका जबरदस्त आक्षेपाची आठवण होते. तो मोरोपंतास ईश्वरविषयक ज्ञान यथार्थ नव्हतें अशाविषयींचा होय. वरील आक्षेपाच्या निरसनार्थ आह्मीं आमच्या महाराष्ट्र कवीच्या तर्फेनें जे विचार प्रगट केले आहेत तेच प्रायः प्रस्तुत प्रसंगीं वरील महाराष्ट्रीय

मंत्र्याच्या तरफदारीसहि उपयोगी पडण्यासारखे आहेत.[1] नाना फडणवीस विद्वान् नव्हता ह्मणजे काय ? रावबहादुरांच्या मनांत त्यानें अगोदर सहाव्या यत्तेचा दाखला मिळवून किंवा चान्सेलर साहेबांच्या हातचें चर्मपत्र घेऊन मग फडणिशीवर रुजू व्हावयाचें होतें असें तर नाहींना ? तसें असल्यास आह्मी रावबहादुरांस असें विचारतों कीं, मराठी राज्याची मूळ स्थापना करणारे जे शिवाजी महाराज त्यांनीं कितीशीं सर्टिफिकिटें पैदा केलीं होतीं ? त्यांस नुसतें पांढऱ्यावर काळेंहि करतां येत नव्हतें. दुसरें उदाहरण हैदरअल्लीचें घ्या. यानेंहि आपल्या मनगटाच्या जोरावर राज्य कमावून त्याचा कारभार उत्तम रीतीनें चालविला होता. याचा दाखला इंग्रेजी इतिहासांतूनहि सांपडतो. पण यांचीहि विद्वत्ता किती होती ह्मणाल तर बेरीज वजाबाकीचीहि भ्रांत ! तिसरें उदाहरण पाहिजे असल्यास शिखांचा राजा रणजितसिंग यांचेंहि आहे. पण हीं असलीं उदाहरणें आमच्या महा विद्वान् 'लोकहितवादीं'स काय उपयोगीं ? "मेंढक्यास मेंढ्या बळतां आल्या ह्मणून तो कांहीं घोडेस्वार होत नाहीं;"—"मूर्खांच्या सभेंत थोडासा कोणी शहाणा असला ह्मणजे त्याची ख्याति होते." खरें आहे. आह्मी सारे बिचारे मेषराशीवरच जन्मलेलों, तेव्हां आह्मांवर तावा चालविण्यास एवढी अक्कल ती कशाला पाहिजे ? बरें तर, सिंहराशीवर जन्मलेल्या राष्ट्रांचीं उदाहरणें घेऊं. रावबहादुरांस मुसलमानांचा इतिहास अवगत आहेच, व मुसलमानांची गणना ते मेंढ्यांत करतील असेंहि वाटत नाहीं; मग त्यांच्या थोरल्या पैगंबर महाराजांचा वृत्तांत जर मनांत आणला तर तेहि प्लेटोच्या किंवा आरिस्टॉटलच्या पाठशाळेंत शिकून तरतरीत विद्वान् बनले होते असें दिसत नाहीं.[2] पण महंमदालाहि कदाचित् आमचे पाश्चात्यैकपक्षपाती प्रतिपक्षी चांगलासा कबूल करणार नाहींत. त्यांचा असा आक्षेप निघेल कीं, महंमद झाला तरी तो एशियाटिक पडला; व एशियाटिक ह्मटला ह्मणजे युरोपाच्या मानानें नामर्दच ? बरें तर महंमदालाहि एका बाजूला गुंडाळून ठेवूं. रॉबर्ट क्लैव व वॉरन हेस्टिंग्स हे तर युरोपचे अस्सल पट्टे कीं नाहीं ? मग यांच्याविषयीं तरी काय ? या जोडीस हिंदुस्थानची हवा जी पहावी लागली ती अलीकडच्या 'सी. एस्. आय्.'वाल्या तीनशें रुपये तनखा

---

१. अंक ५४ पहा.

२. "With these powers of eloquence, Mahomed was an illiterate barbarian : his youth had never been instructed in the arts of reading or writing; the common ignorance exempted him from shame or reproach, but he was reduced to a narrow circle of existence, and deprived of those faithful mirrors, which reflect to our mind the minds of sages and heroes."

—*Gibbon.*

सुरू झालेल्या खाशा मंडळीसारखी नाहीं. रॉबर्ट यास निव्वळ ठोंब्या व उडाणटप्पू ह्मणून त्याच्या आईबापांनीं दूरदेशीं पाठवून दिला, व वॉरनची रवानगी होण्याचें तरी बहुतेक तसेंच कारण! आमच्या रावबहादुरांनीं या आर्यभूमीच्या उन्नत्यर्थ आपल्या एका राजविद्याभूषित चिरंजीवांस भगवद्गीता व लोणचें पापड बरोबर देऊन जसें मोठ्या-समारंभानें अग्निनौकेवर आरूढ केलें, व "हा दिवस हिंदुस्थानच्या, व विशेषतः मुंबई इलाख्याच्या, इतिहासांत गणण्यासारखा झाला" ह्मणून आपले चित्ताचे ठायीं अत्यंत धन्यता मानली, अशा प्रकारचा कांहींच सोहळा वरील दोघां पोरांच्या संबंधानें झाला नाहीं. 'खायाला काळ आणि धरणीला भार' या ह्मणीप्रमाणेंच केवळ नादान ह्मणून त्यांस पंधरा सोळा वर्षांच्या उमरींत त्यांच्या आप्तजनांनीं आपल्या दृष्टीवेगळे केले. त्यांची विद्या झटली ह्मणजे काय ट फ थोडेंसें येत असेल तें, व पराकाष्ठा कांहीं जमाखर्चाची माहिती!

तेव्हां एकंदरींत पहातां प्रस्तुत ग्रंथकाराचा जो मुख्य सिद्धांत, कीं राज्याचा बंदोबस्त ठेवतां येण्यास मूळ विद्वत्ता पाहिजे, त्यास कोठेंच थारा रहात नाहीं. तो राव-बहादुरांच्या अनेक सिद्धांताप्रमाणें केवळ स्वकपोलकल्पित व भ्रममूलक दिसतो!

रावबहादुर प्रस्तुत मुत्सद्द्यांविषयीं आणखी असें ह्मणतात कीं, "त्याला मराठे दरबारचा बंदोबस्त चांगला करतां येत होता." मग नानानें काय करावयाचें होतें तर? फ्रान्स देशांत जाऊन सोळाव्या लुईच्या राज्यकारभारांत पडावयाचें होतें काय? किंवा तिसऱ्या जॉर्ज राजाच्या इंग्रेजी अकलेच्या मुत्सद्द्यांनीं अमेरिकेंत जी आपली फटफजीती करून घेतली तिचा वांटा घेण्याकरितां विलायतेस जाऊन बसावयाचें होतें? 'लोकहि-तवादी'वर जर कोणीं असा टपका आणला कीं तुह्मीं भिकारड्या मराठी भाषेंत मोठी सुरस ग्रंथरचना करतां खरी, पण फ्रेंच भाषेंत किंवा चिनी भाषेंत कोठें तुह्मीं ग्रंथ लिहिले आहेत? तर ते वरील आक्षेपकास काय उत्तर देतील बरें?

"नाना फडणिसाचें शहाणपण वर्णन करण्याजोगें सर्वोत्कृष्ट नव्हतें" असाहि रावबहादुरांचा बिचाऱ्या नानावर एक लहानसा फटकारा आहे. हें वचनहि आमच्या हृदयांत चांगलेंसें उतरत नाहीं. 'वर्णन करण्याजोगें' व 'सर्वोत्कृष्ट' शहाणपण कोणतें समजावयाचें याचा रावबहादुरांनीं मेहेरबानी करून खुलासा केला असता तर बरें झालें असतें. अक्कल जोखण्याचा एखादा अजब कांटा तर 'लोकहितवादीं'नीं विलायतेहून आणला नाहीं ना? एरवीं "आतां इंग्रेज लोकांमध्यें सहस्रशः नानापेक्षां शहाणे आहेत" हें त्यांस कसें उमगलें बरें? विलायती मुत्सद्द्याची ते अशी तारीफ करतात कीं, 'त्यांची बुद्धि विशाल, मसलत खोल, अनेक देशींचे वृत्तांत त्यांस माहीत, व त्यांचें एकमत असे.' इतकी सर्व सामुग्री असतांहि अमेरिका हातची गेली, हिंदुस्थान जाण्याच्या बेतांत आलें होतें, आफगाणिस्थानांतून दोनदां पाय काढावा लागला, हां हां ह्मणतां

तुर्कस्थानास रशियानें गिळिलें; एकदम भलीभक्कम दहा कोट रुपयांची चूक लागली, लाखों मनुष्यें अन्नान्न करून मरतातच आहेत, इत्यादि भयंकर अनर्थपात कसे बरें होतात ! लॉर्ड नॉर्थ, लर्ड डलहौसी, लॉर्ड, ऑकलंड, लॉर्ड लिटन, लॉर्ड बीकन्स्फील्ड, सर जॉन स्ट्राची, सर विल्यम टेंपल, असलीं जबरदस्त धेंडें राज्यकारभार हाकीत असतां गाडी खड्यांत कां जाऊन पडावी !

नाना फडणवीसास भुगोल येत नव्हता हाहि त्यावर एक जबरदस्त चार्ज आहे. 'तो जुन्या चालीचा ब्राह्मण, त्याची माहिती कमी,'—'त्याचे समीप इंग्रेज होते, त्यांचा शोध तरी त्यानें कांहीं करावा, तेंहि कांहीं नाहीं;' —''नानाचे वेळचे पत्रांत कोठें इंग्रेजांस जलचर, कोठें कलकत्तेकर असें ह्मटलें आहे, याजवरून त्याचें ज्ञान समजतें;'—'शिखांचें व नेपाळचें वगैरे संस्थान दूरवर होतें, त्याचा त्यास ठिकाण नव्हता;' —'त्याच्या समजुती अशा होत्या कीं पृथ्वी काय ती एवढीच व सर्व जग इतकेंच आहे'—'त्यास आपले राज्याचे बाहेर कोण अंमल करतो याची खबर बिलकूल नव्हती;'—या सर्व उल्लेखांवरून वरील चार्ज शाबीत करायाचा. आतां एवढें कोणासहि कबूल करायाला पाहिजे कीं, हल्लीं जसें एखादें पोरहि चारी खंडांचा भूगोल खडाखड ह्मणून दाखवील तशी माहिती बिचाऱ्या नानाला मुळींच नव्हती. त्याची माहीती ह्मणजे पराकाष्ठा साऱ्या हिंदुस्थानची; व इराणी, दुराणी, फराशिस, वलंदाजी, आंग्रेज, फिरंगी,[1] वगैरे बाहेरील राष्ट्रांची त्यास काय थोडी बहुत ऐकून माहिती असेल तेवढीच पण एवढी माहिती त्या वेळच्या मुत्सद्द्याला बस होती असें आह्मांस वाटतें. राघोबा दादासारख्या प्रचंड वीराशीं 'मनसुबीच्या तलवारी'नें लढतांना गिबनच्या बड्या इतिहासाचा कांहीं उपयोग झाला असता असें आमच्या रावबहादुरांस वाटतें काय? 'इंग्रेजांस खडे चारून' माघारी चुरमुरे खात लाविलें, त्या वेळेस युरोपखंडांतील भुशिरांचें ज्ञान त्यास कितपत कामास येतें कोण जाणे? खर्ड्यास 'मोंगलास गोगलगाय' केली त्या वेळेस रावबहादुरांच्या पैगंबरचारित्राचें पठण कितीसें श्रेयस्कर होण्याचा संभव होता! तेव्हां एकंदरींत वरील चार्जांतहि आह्मांस कांहीं अर्थ दिसत नाहीं. पेशवाईचा कारभार वहिवाटण्यास रसायनशास्त्राचा किंवा भूगर्भशास्त्राच्या ज्ञानाचा जितपत उपयोग झाला असता तितपतच बहुधा युरोपखंडाच्या इतिहासाचा व भूगोलाचाहि झाला असता!

---

१. 'वलंदाजी' हा शब्द हॉलंडर्स (Hollanders) या शब्दावरून झाला असावासा दिसतो. 'आंग्रेज' हा शब्द 'आंग्लेज' (Anglaise) या फ्रेंच उच्चारावरून इकडे आला असावा. 'फिरंगी' हा 'फ्रांक' (Frank) या शब्दाचा अपभ्रंश होय. फिरंग्यांची व मुसलमानांची ओळख युरोपखंडापासून आहे. 'फ्रेंच' हा शब्द व खड्गविशेषवाची 'फिरंग' शब्द हे वरील शब्दावरूनच निघालेले आहेत हें उघड आहे.

वर जें स्वदेशसंबंधाचें अज्ञान राववहादुरांनीं नानाच्या गळ्यांत बेलाशक अडकवून दिलें आहे, त्याबद्दलहि त्यांजपाशीं कितपतसा पुरावा असेल हें आह्मांस समजत नाहीं. नानास आपल्या राज्याच्या बाहेरील बिलकुल माहीती नव्हती ह्मणजे काय? 'आपलें राज्य' ह्मणजे कोणतें? खुद्द पेशव्यांच्या अमलाखालीं जो मुलूख होता त्याच्या बाहेर त्यास खबर नव्हती असें जर राववहादुरांचें ह्मणणें असेल, तर तें निवळ खोटें आहे हें कोणीहि सांगूं शकेल. नानास महादजी शिंदा काय करतो आहे, टिप्पूची काय मसलत आहे, निजामाची काय गडबड आहे, हें बिलकुल माहीत नसे काय? वरील माहितीशिवायच त्यानें पंचवीस वर्षें कारभार हाकला काय? महादजी, हैदर, टिप्पू, निजाम, इंग्रेज, राघोबादादा, सखारामबापू, परशुरामभाऊ, बाळोबा तात्या, इत्यादि शतशः शत्रूंस नाना जो एकटा पुरून उरला तो 'कोण काय जेवला' असल्या शिळोत्याच्या वातम्या काढूनच काय? राववहादुरांचा जन्म कारभाऱ्यांच्या घराण्यांतला आहे, व बडोद्यासारख्या संस्थानांतील कारस्थानांतहि ते थोडे बहुत पडलेले असून जास्त पडण्याची त्यांची इच्छा होती, तेव्हां त्यांस काय अनुभव असेल तो असो; पण आह्मांस तर केवळ अनुमानावरून असें वाटतें कीं, जो एकटा वरच्यासारख्या कचाट्यांत पंचवीस वर्षें राहिला व पाटीलबोवासारख्याच्याहि अकला ज्याच्यापुढें रद्द झाल्या तो केवळ 'जुन्या चालीचा ब्राह्मण' शाल्योदन झोडणारा भटभाईच केवळ नसेल! शिखांच्या व नेपाळच्या संस्थानांचा नानास ठिकाण नव्हता असेंहि 'लोकहितवादी' निश्चितपणें विधान करतात; पण हेंहि आह्मांस अत्यंत असंभवनीय दिसतें. वरील संस्थानांचा मराठ्यांशीं बिलकुल संबंध नव्हता हें खरें; पण त्यांविषयींची साधारण माहिती इकडे कोणाहि सामान्य मनुष्यास सुद्धां त्या वेळेस असावी असें हल्लींच्या स्थितीवरून वाटतें. ज्यास इंग्रेजीचा गंध नाहीं अशा जुन्या साधारण बहुश्रुत मनुष्यास नानकशाही पंथ व नेपाळची कस्तुरी याविषयीं माहिती नाहीं असें हल्लीं सुद्धां आढळत नाहीं. यशवंतराव होळकर शिखांच्या मुलखांत शेवटीं निघून गेला होता, व नागपुरचा आप्पासाहेब तर तिकडेच जाऊन दडून बसला होता, हें इतिहासज्ञांस विदित आहेच. मग नाना फडनवीसासारख्या भुत्सद्द्यास वरील संस्थानांचा ठिकाणहि नव्हता हें ह्मणणें कितपत धाष्टर्याचें आहे याचा वाचकांनींच विचार करावा! इंग्रेजांस 'जलचर'[1]

---

१. नानाच्या पत्रांतून इंग्रेजांस जर खरोखरीच 'जलचर' ह्मटलेलें असेल, तर वरील शब्दाचा अर्थ 'समुद्रवासी' येवढ्यांत रहाणारे इतकाच समजायाचा हें उघड आहे. ताम्रमुख, टापकर, टोपीवाले हे शब्द जसे अद्याप इंग्रेजांस निंदेनें लावतात; किंवा टिप्पू सुलतान त्यांस जमें वाणगट ह्मणत असे किंवा नेपोलियन 'Nation of Shopkeepers' (घेलाशेट) ह्मणत असे त्यासारखाच वरील शब्द केवळ निंदाद्योतक होय. त्यावरून नाना फडणवीसाच्या भूगोलज्ञानाचा तर्क करणें केवळ असमंजस होय.

व 'कलकत्तेकर, ह्मटलेलें आढळतें एवढ्यावरून 'लोकहितवादीं' चा तर्क धांवतो कीं, हिंदुस्थान ह्मणजेच पृथ्वी अशी नानाची समज होती. आमचे रावबहादुर जर कर्सनदास मुळजींचा 'इंग्लंडचा प्रवास' वाचतील तर त्यांस एक मोठी गोष्ट आढळून येईल कीं, राघोबादादाकडून दोघे वकील विलायतेस गेले होते, व त्यांनीं तिकडून बर्कच्या हातचें पत्र इकडे आणून हजर केलें होतें[1] मग हें जर खरें आहे, तर कलकत्ता हीच इंग्रजांची विलायत, हिंदुस्थान देश हींच काय ती पृथ्वी, या कल्पना नानाच्या डोक्यांत जरी कदाचित् मूळच्या असल्या तरी सहज निघाव्या असें वाटतें, मग रावबहादुरांच्या ह्मणण्याप्रमाणें नाना फडनवीस हा बेटा अगदींच टोणपा असल्यास नकळे!!

एथवर नाना फडनवीसाच्या शहाणपणाची मीमांसा झाली. आतां टीकाविषयक लेखांत वरील मुत्सद्द्याविषयीं 'लोकहितवादीं'नीं त्याच्या संबंधानें आपले इतर अभिप्राय जे नमूद केले आहेत त्यांविषयीं विचार करूं.

'नानास दूरदृष्टी नव्हती'—या सूत्रावर 'लोकहितवादीं'चेंच भाष्य असतें तर बरें झालें असतें, ह्मणजे त्याची चांगली फोड तरी झाली असती. आह्मांस वरील वाक्याचें तात्पर्य एवढेंच दिसतें कीं, नानाच्या पश्चात् लवकरच पेशवाई बुडाली, तेव्हां हा परिणाम नानानें पूर्वी नीट कारभार केला नाहीं याचा होय; असाच जर रावबहादुरांचा अभिप्राय असेल तर तो अगदीं चुकीचा आहे असें ह्मटलें पाहिजे. ज्यानें नानाची कारकीर्द सगळी वाचली असेल, व तिजवर यत्किंचितहि विचार केला असेल त्याच्या सहज लक्षांत येणारें आहे कीं, थोरल्या माधवरावाच्या मागें व नारायणरावाच्या मृत्यूनंतर जी सारी बजबज झाली ती नानानें ह्मणून सांवरली, व सवाई माधवरावानें उडी घेतली त्या वेळेस पेशवाईची भरभराट पुनः पूर्वीप्रमाणें दिसूं लागण्याचाहि रंग आला होता.[2] तेव्हां नानाचा कारभार हा पेशव्यांच्या राज्यास बिल-

१. वरील पत्र ग्रंथाच्या ३७ व्या पृष्ठांत दाखल केलें आहे. सदरील ग्रंथाचा उपोद्घात वाचला असतां त्यांस इतर मजकूरहि बराच मिळणारा आहे कीं ज्यावरून रावबहादुरांच्या प्रस्तुतविषयक पांडित्यास बराच धक्का पोंचेल!

२. "Nana Furnawees was now at the summit of prosperity; without the intervention of a foreign power he had obtained every object of his ambition. Doulut Rao Sindia was favourably disposed towards him and his ministers and officers were more intent on forwarding their own particular views in the Government of their young master, than in schemes for controlling the Poona court. Tookajee Holkar had become imbecile, both in mind and body, and his officers were subservient to Nana,

कूल बाधक झाला नसून उलटा तो अत्यंत हितावह मात्र झाला हें उघड आहे. एखाद्यास मोठें बिकट दुखणें लागलें असतां त्यांतून त्यास एखाद्या चतुर वैद्यानें जसें पार पाडावें व पुनः आरोग्य द्यावें, तसाच वरील प्रकार घडला. आतां पुढें जो पेशवाईचा शेवट झाला त्याबद्दल नानास दोष ठेवणें ह्मणजे शिकंदराच्या मागें झालेल्या झोटिंग बाच्छाईबद्दल शिकंदरास मूर्ख ह्मणणें, महादजीच्या मागें, रणजितसिंगाच्या मागें, ऑलिव्हर क्रॉमवेलच्या मागें, लवकरच जें वाटोळें झालें त्याबद्दल वरील महापुरुषांस अल्पदृष्टि ह्मणणें यासारखेंच सर्वथा अप्रयोजक होय.

"नाना फडणीस यास कांहीं आपले देशाचा अभिमान नव्हता व शौर्यहि नव्हतें. तो स्वभावानें कुत्सित होता, व हलके मनाचा होता. सर्व देशाचें कल्याण करण्याचें त्याचे मनांत क्षणभर देखील येत नव्हतें परंतु त्याचीं आंतून बहुत सरदारांशीं वांकडीं मात्र होतीं. इ० इ०"--वरील आक्षेपांपैकीं नानाच्या अंगीं शौर्य नव्हतें एवढी मात्र गोष्ट बरोबर आहे; बाकी सर्व राववहादुरांच्या अज्ञानाचा किंवा दुराग्रहाचा मात्र विकास आहे. "नानास आपल्या देशाचा अभिमान नव्हता"--राघोबादादासारख्या प्रबल वीराशीं व आनंदीबाईसारख्या राक्षशिणीशीं नानानें जें चिरंतन वैर संपादिलें तें कशाकरितां बरें ? बाजीरावासारख्या अधमाधमाचीहि त्यानें शेवटीं सेवा जी पतकरली ती कशासाठीं ? यांखेरीज नानाच्या स्वदेशप्रीतीचीं आणखी कोणतीं उदाहरणें पाहिजेत ? त्यांतून आमच्या राववहादुरांनीं दुसऱ्यास देशाभिमानाच्या संबंधानें नांव ठेवावें या गोष्टीची तर आह्मांस मोठीच मौज वाटते ! असो; 'तो स्वभावानें कुत्सित होता व हलके मनाचा होता'--'कुत्सित स्वभाव' व 'हलकें मन' या शब्दांचा राववहादुर काय अर्थ समजत असतील तो असोत; आह्मांस तर प्रस्तुत मुत्सद्द्याच्या संबंधानें वरील शब्दांचा कांहींच बोध होत नाहीं. नानाची कदर मोठी होती, तो मितभाषी असे व कधीं हंसत नसे, शिवाय त्यानें आपणावर कोणाची मात्रा कधीं चालूं दिली नाहीं, या गुणांस तर 'लोकहितवादी' कुत्सितपणा ह्मणत नसतील ना ? तसेंच

Rughoojee Bhonslay was completely secured in interests, and the Brahmin jagheerdars were of his party. The Peishwa's government had thus every prospect of regaining the tone and vigour it had possessed under the great MahdooRao; but Nana's fondness of power, and his anxiety to preserve it, brought on a catastrophe which speedily undermined his authority, overturned the labours of his life, and terminated his days in trouble and in misery.

—*Grant Duff.*

त्यानें वेलस्ली साहेबांनीं केलेल्या हितोपदेशास मान डोलवली नाहीं हा तर त्याच्या मनाचा हलकेपणा नसेल ना ! काय असेल तें असो ! 'सर्व देशाचें कल्याण करण्याचें त्याच्या मनांत क्षणभर देखील येत नव्हतें.'—खरेंच, त्यानें भटांची व शास्त्र्यांची दक्षिणा कोठें बुडविली ! क्यापटन कौपरसारख्या लोककल्याणकर्त्या पुरुषाची एकनिष्ठपणें सेवा कधीं केली ? आपल्या पुत्रपौत्रांची आपल्या राजकर्त्यांकडून पाठ कोठें थोपटून घेतली ! कौंसलांत जागा पटकावून होस हो मिळवून देण्याचा स्तुत्य क्रम कधीं पत्करला ? 'निबंधसंग्रहा'सारखीं लोकमौर्ख्यनिरसनार्थ पुस्तकें छापून कधीं प्रसिद्ध केलीं ? 'त्यांचीं आंतून बहुत सरदारांशीं वांकडीं मात्र होतीं'—वाः—केवढा जबरदस्त हा नानाचा गुन्हा ! सर्वांशीं सरळपणें व मित्रभावानें वागण्याचें सोडून त्यानें मनांत तिढाभाव धरला आं! महादजी शिंद्यासारखा सिधा व प्रेमळ मनुष्य पेशव्यांच्या गादीशीं एवढा इमानानें वागत असतां त्यास नानानें पुण्यास येतांच क्षेमालिंगन देऊं नये काय ? अरेरे ! त्या वेळेस एखादें ख्रिस्ती मिशन पुण्यास येऊन उतरलें असतें, अगर एखादा प्रार्थनासमाज किंवा आर्यसमाज तरी स्थापला गेला असता, तर किती बरें झालें असतें! !

आतां 'लोकहितवादीं'च्या निबंधांतील एका कलमाविषयीं मात्र लिहिणें आहे. तें कलम लोकसुधारणा होय. नानानें आपल्या राज्यांत हल्लींप्रमाणें 'अधिकाऱ्यांची रचना व पद्ध्या' हें ठरविलें नाहीं, कायदे कानू केले नाहींत, टपाल ठेवलें नाहीं, काशी इंग्रेजांकडून आपल्या ताब्यांत घेतली नाहीं, भिल्लांचा व पेंढाऱ्यांचा बंदोबस्त केला नाहीं, विद्याखातें काढलें नाहीं, कलाकौशल्य वाढविलें नाहीं.' वगैरे गोष्टींवरून आमचे शहाण्यांतले शहाणे व लोककल्याणार्थ देह झिजवणारे रावबहादूर पुढील महासिद्धांताचें निबंधन करतात.—कीं "नानाचे हातून लोकांचें कोणतेंहि कल्याण झालें नाहीं. मग त्यास कोणत्या प्रकारानें लोक शहाणा ह्मणतात हें कांहीं कळत नाहीं." वाः! एकूण नानाचें सारें शहाणपण व साऱ्या जन्माची दगदग टपालावांचून व पीनलकोडावांचून व्यर्थ गेली ना! पण कां नये जाऊं? एका कोर्ट मार्शलाविना सारें पानपतचें युद्ध जसें फुकट गेलें, तशीच आगगाडीवांचून व तारायंत्रावांचून सारी पेशवाई बेवकूफ कां ठरूं नये ! ![1]

आतां 'लोकहितवादीं'चा शेवटचा गोड उपसंहार तेवढा ऐका, ह्मणजे पुरे करूं. "नशीबानें राज्य चाललें, नाहीं तर अशा लोकांच्या हातांत राज्य क्षणभर देखील असूं नये; परंतु काळाच्या योगानें इंग्रेज त्या वेळेस इकडे फारसे आले नव्हते. याजमुळें

---

१ 'विविधज्ञानविस्तार' पु० १० अं० ५, ६, ७ यांत 'लोकहितवादी'च्या 'पाणिपतची लढाई' या पुस्तकावर अभिप्राय आहे तो वाचकांनीं पहावा.

हें राज्य चाललें, नाहीं तर असें लुटारू अडाणी लोकांचें बेकायदा राज्य निभूं नये. परंतु ईश्वरसत्तेनें तें झालें."—आमेन्!

याप्रमाणें नाना फडनविसाचें शहाणपण बाहेर काढतांना आमच्या राववहादुरांनीं आपलें जें प्रगट केलें आहे त्यावर आह्मीं आपला अभिप्राय वाचकांस सादर केला. आतां हा अंक आटपण्यापूर्वी प्रस्तुत प्रकरणीं आमचे काय विचार आहेत ते वाचकांस कळवितों.

३. राज्य चालविणें ही व्यवहारांतल्या इतर कलांसारखीच एक कला आहे. दर्यावर्दीस जशी जहाजाची व समुद्राची माहिती पाहिजे, किंवा वैद्यास जशी शरीराची व औषधांची माहिती पाहिजे, त्याप्रमाणेंच मुत्सद्द्यासहि आपल्या स्वतःच्या राज्याची व्यवस्था कशी आहे, व ज्यांचा त्याशीं संबंध त्यांची कशी आहे, याविषयींची माहिती असणें जरूर आहे. आतां या नियमाप्रमाणें पहातां नानाफडनवीसासारखे जे आमचे जुने मुत्सद्दी होऊन गेले त्यांस आपल्या कामांतली वाकबगारी कितपत होती याचा जर विचार केला, तर वरील दुहेरी ज्ञान त्यांस कमी होतें असें नाहीं हें कोणाच्याहि लक्षांत येईल. आतां आमचे 'लोकहितवादी' किंवा त्यांच्या मतांचे अभिमानी कोणी असल्यास ते आह्मांस विचारतील कीं, नानास इंग्रेजांच्या देशाची काय माहिती होती? हल्लींच्या विद्वानास जशी इंग्रेजी भाषा फडाफड बोलतां येते, इंग्रेजांचा रीतरिवाज, इंग्रेजी विद्या, इंग्रेजी शास्त्रें, इंग्रेजांचे शोध, या सर्वांविषयीं जशी त्यांस माहिती आहे तशी नाना फडनविसास कोठें होती? खरें आहे; वरील सर्व माहिती त्यास मुळींच नव्हती ह्मटलें असतांहि चालेल. पण आह्मी असा प्रतिप्रश्न करतों कीं, वेलेस्ली साहेब किंवा जनरल स्मिथ यांस आमच्या इकडील कितपत माहिती असेल? वेलेस्ली साहेब मोक्षमूलरांप्रमाणें गीर्वाण भाषेंत पारंगत होते काय? जनरल स्मिथ साहेबापुढें मोरोपंताची आर्या टाकली असती तर ती त्यांस कितपत उलगडली असती? पण इतकें दूर कशाला? हल्लीं जी आमची राजपरंपरा आहे, ह्मणजे कलेक्टरापासून तों तहत पार्लमेंटाच्या सभासदांपर्यंत, त्यापैकीं असे किती लाल सांपडतील, कीं ज्यांस इकडची सर्व माहिती यच्चयावत् पुसून घ्यावी? इकडे वर्षांचीं वर्षें राहिलेल्या विलायती कामगारांस इकडची अगदीं सामान्य माहिती सुद्धां नसते हें कोणास माहीत नाहीं? मग असें जर आहे, तर एतद्देशीय जुन्या मुत्सद्द्यांवरच एवढा भडिमार कां? आप्पासाहेबानें वसई घेतली व फिरंग्यांची ठाणीं कोंकणांतून उठवलीं तीं पोर्च्युगाल देशाच्या भूगोलाचें ज्ञान संपादन करून काय? हैदरअलीं इंग्रेजांस ठोकीत ठोकीत खुद्द मद्रासेवर जाऊन आदळत असे तो इंग्रेजी भाषेच्या जोरावर काय? तेव्हां वरील सर्व उदाहरणांवरून ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे कीं, ज्याला जेवढी माहिती पाहिजे तेवढी त्याला असली ह्मणजे बस आहे. सेनापतीला शत्रूच्या सैन्याची व मुलखाची माहिती

असली ह्मणजे बस आहे. मुत्सद्द्याला तशीच शत्रूच्या राज्यव्यवस्थेची माहिती असली ह्मणजे बस आहे. ही माहिती नानाला होती कीं नाहीं याविषयीं मराठ्यांच्या इतिहासकारांचेंच खुद्द वर दाखल केलेलें सर्टिफिकिट आहे.[1]

---

१. वर जो आह्मीं विचाऱ्या नानाच्या संबंधानें तरफदारी केली आहे ती बहुधा बस होईलच. पण ती न होऊन जर भूगोलज्ञानावांचून व इतिहासज्ञानाशिवाय नानाची मुत्सद्देगिरी सारी पाण्यांतच जात असली, तर त्यास आमच्या रावबहादुरांनीं मागील काळाचा तरी थोडा बहुत फायदा देण्याविषयीं आह्मीं शिफारस करतों अशाच पक्का प्रकरणीं मेकाले साहेबांचा अभिप्राय काय आहे तो पहा—

"This gentleman can never want matter for pride, if he finds it so easily. He may boast of an indisputable superiority to all the greatest men of all past ages. He can read and write: Homer probably did not know a letter. He has been taught that the earth goes round the sun: Archimedes held that the sun went round the earth. He is aware that there is a place called New Holland: Columbus and Gama went to their graves in ignorance of the fact. He had heard of the Georgium Sidus: Newton was ignorant of the existence of such a planet. He is acquainted with the use of gunpowder: Hannibal and Cæsar won their victories with sword and spear. We submit, however, that this is not the way in which men are to be estimated. We submit that a wooden spoon of our day would not be justified in calling Gallileo and Napier blockheads, because they never heard of the differential calculus. We submit that Caxton's press in Westminister Abbey, rude as it is, ought to be looked at with just as much respect as the best constructed machinery that ever, in our time, impressed the clearest type on finest paper. Sydenham's first discovery was that the cool regimen succeeded best in cases of small-pox. By this discovery he saved the lives of hundreds of thousands; and we venerate his memory for it, though he never heard of inoculation. Lady Mary Montague brought inoculation into use; and we respect her for it, though she never heard of vaccination. Jenner introduced vaccination; we admire him for it, and we shall continue to admire him for it, although some still safer and more agreeable preservative should be discovered. It is thus that we ought to judge of the events and the men of other times,

सरतेशेवटीं हीहि एक गोष्ट आमच्या वाचकांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, नाना फडणविसासारख्या मुत्सद्द्याविषयीं जर निखालसपणें अभिप्राय प्रगट करायाचा, तर तो ज्यांनीं राज्याचें सुकाणूं कधीं स्वप्नींहि हातीं धरलें नाहीं त्यांनीं देणें शोभतें ? कीं जे राज्यकारस्थानांत व राज्यकारभारांत जातीनें पडलेले त्यांनीं देणें शोभतें ? ज्या आमच्या राववहादुरांच्या व्यवस्थेखालीं 'ग्रंथोत्तेजक मंडळी'च्या सारखें लहानसान काम निभेना त्यांनीं साऱ्या देशाच्या उलाढाली करून हा मूर्ख होता, याला अक्कल नव्हती, ही मीमांसा करणें व त्यांच्या संबंधानें भराभर शिक्कमोर्तबानिशीं सर्टिफिकिटें प्रसिद्ध करणें हें किती विलक्षण आहे ? ज्यांस पुनर्विवाहासारख्या जबरदस्त कामांत पडण्याची व लोकांत प्रसिद्धि करून घेण्याची मात्र हौस, पण अंमळ कचाट्यांत सांपडले कीं ज्यांस घटकाभरहि धीर निघायाचा नाहीं; त्यांनीं 'पानपतच्या मोहऱ्या'स तो 'जवानमर्द शिपाई होता असें नाहीं' या प्रमाणें सर्टिफिकिट देणें हा केवढा चमत्कार आहे ? ज्यांनीं पुरती बंदूकहि कधीं हातांत धरली नसेल त्यांनीं मोठ्या कमांडर इन-चीफच्या थाटानें पानपतच्या लढाईवर टीका करावी हें हास्यास्पद नव्हे काय ? पण हास्यास्पद कसलें ? आंग्लभौमभाषा माउलीचा वरप्रसादच हा, कीं तींत प्रविष्टमात्र होतांच सर्व जग तुच्छ दिसायला लागायाचें, व 'सर्वज्ञोऽस्मि' ही स्फूर्ति व्हावयाला लागायाची ! !

They were behind us. It could not be otherwise. But the question with respect to them is, not where they were, but which way they were going. Were their faces set in the right or in the wrong direction ? Were they in the front or in the rear of their generation ? Did they exert themselves to help onward the great movement of the human race, or to stop it ? This is not charity, but simple justice and common sense. It is the fundamental law of the world in which we live that truth shall grow, first the blade, then the car, after that the full corn in the car. A person who complains of the men of 1681 for not having been men of 1835 might just as well complain of a projectile for describing a parabola, or of quicksilver for being heavier than water".

—*Sir James Mackintosh.*

वेदव्यासः स नवदश यो वेद वेदाक्षराणि
श्लोकं त्वेकं परिपठति यः स स्वयं जीव एव । [१]

'विश्वगुणादर्श'.

अंक ६९ – (१) 'लोकहितवादी'चा जुन्या पंडितांविषयीं अभिप्राय (२) तो वाचून सकृद्दर्शनीं मनांत येणारे विचार(३)शास्त्रविषयेंवर 'लोकहितवादी'चा आक्षेप—त्याचें निरसन.

१. मागील अंकांत रावबहादुरांचीं आमच्या जुन्या मुत्सद्द्यांच्या संबंधानें काय मतें आहेत तीं दाखल करून त्यांवर चर्चा केली. आतां एतद्देशीय जुन्या पंडितांविषयीं व प्राचीन विद्येविषयीं त्यांचे काय अभिप्राय आहेत ते पाहूं.

वरील अभिप्राय 'लोकहितवादी'नीं आपल्या ग्रंथांतून जागोजाग प्रगट केले आहेत, व भाषणद्वाराहि शेंकडों वेळां लोकांच्या कानांवर घातले आहेत. त्यांचा समुच्चय पुढील लेखांत बराच दृष्टीस पडतो; यास्तव त्याचें येथें समग्र अवतरण करतों—

"सांप्रतचें पंडितांचे ज्ञान."

"सांप्रत काळचे पंडितांचें ज्ञान असें असतें कीं त्याचा जिवास, शरिरास, प्रपंचास कांहींच उपयोग पडत नाहीं. केवळ वादविवादच करण्यास व लोकांस तमाशा दाखविण्यास मात्र उपयोगी आहे. यास्तव मला हे पंडित बहुरूपी, सोंगाडी, व चित्रकथी यांहून बरे दिसत नाहींत. बारापंधरा वर्षेपर्यंत व्याकरण किंवा न्याय यांचें अध्ययन करितात, ह्मणजे त्यांस पंडितपणा प्राप्त होतो. परंतु त्यांची विद्या अशी असते कीं, एकानें ह्मणावें, या शब्दाचे अंतीं "च" असावा; दुसऱ्यानें ह्मणावें "च" असावा. याजविषयीं वाद शेंकडों प्रमाणें दाखवून सर्व दिवसभर करतात. शेवटीं निश्चय एकाचाहि होत नाहीं. तसेच न्यायकई[२] हेहि भांडतात. एक ह्मणतो ईश्वर आणि जीव एक आहे; दुसरा ह्मणतो, दोन्ही विभक्त आहेत. तिसरा ह्मणतो ईश्वर गुणी आहे. चवथा ह्मणतो निराकार आहे. याप्रमाणें रिकामा वाद चालविण्यांत जन्म घालवितात. आणि त्यांस त्या वादांतील सत्य काय आहे हें समजण्याची इच्छ नसते. परंतु परस्परापेक्षां श्रेष्ठ कोण होतो हें पाहण्याकरितां भांडतात. आणि मग त्या वादांत सत्यानेंच भाषण करतात असें नाहीं, मनास येईल तशी कल्पना, कपट, युक्ती, मूर्खपणा, इत्यादि योजून सरासरी फार बोललेसें करतात. त्यांस कोणी ह्मणतात असे

---

१. "ज्याला वेदाचीं नऊ दहा अक्षरें येतात तो वेदव्यास होय, व ज्याला एक श्लोक संबंध पाठ येतो तो प्रत्यक्ष बृहस्पति होय !"

२. वरील शब्द मूळच्याप्रमाणेंच ठेवला आहे. कदाचित तो लेखकप्रमादहि असेल; तरी रावबहादुरांच्या संस्कृत ज्ञानावरून पहातां वरील उपपत्तिच केवळ करावयाला पाहिजे असें नाहीं, असें आह्मांस वाटतें.

निर्फळ वाद घालण्याच्या ज्या ज्या विद्या हे शास्त्री शिकतात त्यापासून इहलोकीं व परलोकीं हित नाहीं. आपले जिवाचेंही कल्याण नाहीं, व दुसऱ्याचे जिवाचेंही नाहीं. एक व्याकरण ह्मणावयास वाराचवदा वर्षें लागतात त्याचें कारण हेंच आहे कीं, त्या प्रकरणीं वाद करण्यास शिकतात; ग्रंथ पाठ करतात; व प्रतिष्ठेकरितां वाद करितात. हे सर्व शास्त्री, पंडित या प्रकाराचे आहेत. त्यांस व्यवहारीक ज्ञान नाहीं. त्यांस मोडीचें लिहितां देखील येत नाहीं, व कोणतेंही काम करावयाचे हे उपयोगी नाहींत. बरें इतकें असून यांची वर्तणूक पाहिली तर फारच वाईट. सामान्यतः हे गोंधळी, भाट यांप्रमाणें व्याजस्तुति करून गृहस्थास भुलवून पैका काढणारे लोक आहेत. प्रातःकाळीं उठले ह्मणजे यांचा उद्योग हाच आहे कीं गृहस्थांचे घरीं जाऊन यांची स्तुति करावी; त्यामध्यें त्यांचें जसें वर्णन पाहिजे तसें करून दोन पैसे निघाले ह्मणजे त्यांचें कार्य झालें. पैशाकरितां महापातकी असला तरी त्यास शुद्ध ह्मणतील, महान् नीच असला तरी त्यास सन्मान देतील. पापानें द्रव्य मिळविलें तरी त्यास दिलें ह्मणजे तो सद्व्यय झाला अशी समजूत करून आणखी तसेंच मिळीव ह्मणून सांगतील. याचे उदाहरणास फार लांब जावयास नको. बाजीराव पेशव्यानें पुण्यांत ब्राह्मणांचे मनोरथाप्रमाणें दानें केलीं; व बहुत शास्त्री, पंडित जवळ बाळगिले. परंतु त्यांनीं त्यास सत्कर्मास किंवा आपले राज्यरक्षणास किंवा नीतीनें चालण्यास समजूत दिली नाहीं. जें त्याणें केलें त्याजविषयीं त्याची स्तुतिच करीत गेले, व महाराज सर्वत्र विजयी होतील असे आशीर्वाद देत गेले. आपण ब्राह्मण प्रभु, आपलें तेज सर्वांहून अधिक, आपलेकडून एक शिपाई गेला तर सर्वांचा पराजय होईल, याप्रमाणें बोलून त्यांजकडून राज्यकारभार सोडून देववून त्यास पंडिताचे आर्जव करणारा असा मूर्ख केला व शेवटीं आपण आणि तो असे दोघेही भीक मागत गेले. यास्तव हे पंडित जरी पुष्कळ पढलेले असले तरी ते मूर्ख समजावे. कारण कीं, लोकहितकारक ज्ञान त्यांस नाहीं. त्यांचें ज्ञान भाटांचे व तमासगिरांचे बोलण्याप्रमाणें आहे. त्यापासून मोक्ष व्हावयाचा नाहीं व इहलोकीं सुखोत्पत्तिही व्हावयाची नाहीं. सारांश हल्लींचे पंडित हे महामूर्ख असे मी ह्मणतों. नानाप्रकारचे अर्थ फिरवितात. नानाप्रकारचे असत्य सिद्धांत करितात. आणि क्षणांत भक्तीचा मार्ग, क्षणांत नरकांत जाण्याचा मार्ग दाखवितात. त्यांस मुख्य ज्या गोष्टी त्यांचें ज्ञान नसतें. मनुष्य जन्मला कशाकरितां! त्याचें सार्थक काय! व आपलें कर्तव्य काय! याचा विचार त्यांचे मनांत क्षणभरही वसत नाहीं. द्रव्याचा व मानाचा लोभ धरून हे असतात. यांचा आश्रय जो कोणी करील त्यास वेड लागेल यांत संशय नाहीं. व त्यांची बुद्धि स्थिर नाहीं. अमूक सत्य व अमूक असत्य हेंही त्यांस भासत नाहीं. सत्याचा असत्याचा भाव यांस समजत नाहीं. धर्माचा अधर्माचा भेद यांस ठाऊक नाहीं. जो पाहिजे तो

शास्त्रार्थ काढून देतील, जें पाहिजे तें प्रायश्चित्त देतील. फक्त पैसा मिळाला ह्मणजे झालें. अशा पंडितांचा संग्रह करून कोणास काय फायदा होणार आहे ? राजास होणार नाहीं व प्रजेसही होणार नाहीं; व ज्या प्रजेचे पुढारी असलेले लोक विनाकारण आपल्यास विद्वान् ह्मणवितात त्या प्रजेचा सर्वस्वी नाशच होईल. याप्रमाणें हिंदुलोकांची व्यवस्था झाली आहे. या लोकांस शास्त्रीपंडितांखेरीज जेव्हां दुसरे कोणी पुढारी मिळतील तेव्हां लोकांमध्यें व्यवस्था चांगली होईल. व शास्त्रीपंडित पुष्कळ असावे अशी जे इच्छा धरितात ते महामूर्ख समजावे. या लोकांपासून या देशाचें किमपि हित होणार नाहीं. अधिक मूर्खपणा मात्र वाढेल व भ्रांति वृद्धिंगत होईल; आणि ती ज्याचे मनांत शिरेल त्याचा प्राण गेल्यावांचून निघणार नाहीं. यास्तव हे शास्त्रीपंडित अगदीं निरुपयोगी आहेत हा सिद्धांत होतो; ही विद्या कांहीं उपयोगी नाहीं. जर असें नसेल तर मला कोणी उत्तर द्यावें कीं, व्याकरणाचें पंधरा वर्षें अध्ययन केलें, त्यापासून अमुक उपयोग होतो असें मला दाखवून द्यावें ह्मणजे मी वास्तविक ह्मणेन; परंतु मीं शोध केला आहे त्यावरून मला तर वाटतें कीं मनुष्यास लांकडें तोडावयाचें कसब शिकविलें तर बरें, परंतु हें व्याकरण नको. यांत कांहींच अर्थ नाहीं. केवळ मूर्ख होण्याची विद्या आहे; आणि इतकेंही असून ज्याचा त्यास असा गर्व असतो कीं, मी केवढा विद्वान्, माझ्यासारखा विद्वान् त्रैलोक्यांत नाहीं. पाहिला तर तो सर्वांहून मूर्ख असतो. याप्रमाणेंच न्याय, मीमांसा, अलंकार या शास्त्रांची व्यवस्था आहे. केवळ असत्य सिद्धांतांचें प्रतिपादन करून विलक्षण कुतर्क करून भलतेच अविचार लोकांत स्थापन करितात; आणि वास्तविक पाहिलें तर ब्राह्मणांमध्यें चार रोजगार आहेत. सराफ, भट, पंडित, हरदास, या सर्वांपेक्षां पंडित हे महामूर्ख होत. सराफ, भट, हरदास हे बरे हे यत्किंचित पढलेले असतात. याजमुळें हे दुराग्रही नसतात व यांस अभिमान नसतो; सांगितली गोष्ट ऐकतात. व यांचें लक्ष व्यवहारिक मार्गावर फार असतें. याजकरितां कांहीं सुधारण्याचा रस्ता यांत आहे; परंतु हे विनिज (?) आहेत ह्मणून पंडित यांची समजूत फार दृढ होती कीं, आमचें मत खरें आहे; व इतर सर्व मूर्ख आहेत, याजकरितां यांचा दुराग्रह फार होतो तो हे सोडीत नाहींत; अतिशय आग्रह धरितात. याजमुळें हे लोक अगदींच उपयोगीं नाहींत. हिंदुलोक यांचें महान् दुर्भाग्य ह्मणून हे पंडित व शास्त्री या लोकांचे पुढारी झाले, व यांस लोक समजतात कीं, हे धर्मरक्षक आहेत, परंतु हे अधर्मवृद्धि करणारे होत; व हे सोनार, परभु, ब्राह्मण वगैरे यांचा यत्किंचित् निमित्तानें व नाद लावून दोहोंकडून पैसा खाणार व खोटीं मतें आणि नानाप्रकारचीं खोटीं कर्में प्रसिद्ध करून भोळ्या लोकांस ठकविणार, यास्तव त्यांस आवडतही नाहीं कीं आपलीं शास्त्रें बहुत लोकांस ठाऊक व्हावीं. कारण तेणेंकरून आपली उघडीक होते, व दगाबाजी व लबाड्या बाहेर पडतात हें त्यास फार

भय आहे, जोंपर्यंत आछादित आहे तोंपर्यंत यांच्या प्रतिष्ठेचें आयुष्य आहे; मग किरकोळ लोक यांस पुसतील कीं, तुझी आह्मांस सांगतां परंतु ही सर्व लबाडी आहे. तुझी लबाडीवरच पोट भरतात, तस्मात् आह्मी तुमचा त्याग करितों. अशी अवस्था होईल त्यांत संशय नाहीं. हा मूर्खपणा बहुत काळपर्यंत निभला. कारण कीं गौप्य होतें. आजपर्यंत महाप्रयत्नानें झांकून झांकून चालविलें परंतु आतां चालणार नाहीं. अडाणी लोकांकडे एखादी पंचाईत न्या, तर ते लागलाच न्याय सांगतील. बरें तीच पंचाईत चार पंडितांकडे न्या, ह्मणजे ते अतोनात वाद करतील, आणि नानाप्रकारच्या मसलती काढून असत्य प्रतिपादन करतील, अशी त्यांची अवस्था आहे. त्यांचीं मनें बिघडून जातात आणि भ्रांति उत्पन्न होऊन त्यांस विवेचन करतां येत नाहीं. खोट्यास स्थापन करण्याकरितां प्रमाणें दाखवितील, आणि त्याचा पक्ष धरून भांडत बसतील. याचा अनुभव कोणीही विचार करून त्यांची वर्तणूक पाहिली तर लक्षांत येईल. जेथें बहुत पंडित तेथें मूर्खपणा वाढून भ्रष्टाचार होतो; अधर्मप्रवृत्ति होते, व इतर लोकांवर दया करणें हें त्यांजपासून घडत नाहीं. त्यांची समजूत अशी आहे कीं, सर्वांनीं दुःख भोगिलें तर चिंता नाहीं, परंतु आह्मी मात्र सुखी असावें. तदनुसार उदाहरण पहा. शास्त्री यांचे मतानें ज्या ज्या गृहस्थांनीं अन्नछत्रें घातलीं तेथें शूद्र गेला तर त्यास अन्न मिळत नाहीं. आणि ब्राह्मण श्रीमंत झाला तरी जेवावयास बोलावितात; असा चमत्कार आहे. अस्तु, सर्व लोकांस ज्ञानप्राप्ति होईल तेव्हां हे सर्व पंडितांचे गुण बाहेर पडतील.''

लो० हि०

२. वरील लेखावर चर्चा करण्यापूर्वी तो वाचून सामान्यतः कोणाच्याहि मनांत एक मोठा विचार येण्यासारखा आहे, तो येथें दाखल केला पाहिजे. हा विचार हाच कीं, आमच्या रावबहादुरांनीं वरील निबंधांत जुन्या पंडितांस 'महामूर्ख' हा जो ठळठळीत किताब दिला, व न्याय, व्याकरण, मीमांसा, अलंकार या सर्व शास्त्रांचें मर्म रहस्य काढून तें आपल्या प्रिय वाचकांस समर्पण केलें, तें करण्यापूर्वी त्यांनीं एवढी जबर शास्त्रव्युत्पत्ति कोणत्या पाठशाळेंत पैदा केली बरें ? वरील गोष्टींचा बोभाटा अद्याप तर आमच्या कानांवर आला नाहीं; मग प्रत्यक्ष वाग्देवीनें त्यांस समग्र वाङ्मयाचा ठेवा आयताच गुपचुप आणून दिला, किंवा त्यांचे महागुरु दयानंदजी यांनीं त्यांजवर एकाएकीं कांहीं वरप्रसाद केला, कीं काय नकळे ! आमच्या अल्पबुद्धीस तर असें वाटतें कीं, एखाद्या विषयावर जर ठाम अभिप्राय ठोकून द्यावयाचा, तर त्याची तरी माहिती करून घेणें अवश्य आहे; केवळ रावबहादुरांवर जाऊन किंवा भाविक श्रोते मान डोलवितात एवढ्यावरच जाऊन झोटिंगपाच्छाई करणें हें फार अश्लाघ्य कृत्य होय. जो सत्याची यत्किंचित् तरी पर्वा करतो, व कागदाला टांक लावणें ह्मणजे केवढें जबाबदारीचें काम आहे हें ज्याचे ठायीं तिळमात्रहि वागतें

आणि सत्यज्ञानाचाच प्रसार लोकहितावह होय, याविषयीं ज्यांची पक्की खात्री आहे, तो आमच्या रावबहादुरांप्रमाणें आपल्या लेखणीचें व जिव्हाग्राचें चापल्य कधींहि प्रगट करणार नाहीं. एखादी गोष्ट कागदावर नमूद करण्यापूर्वी व ती छापून काढण्यापूर्वी तिजविषयीं अनेक वेळां शोध केल्याखेरीज तो कधीं रहावयाचा नाहीं. आतां एवढें खरें आहे कीं, ज्या काळीं वरच्यासारखे शतशः अभिप्राय रावबहादुरांनीं बेलाशक झोंकून दिले त्या काळाचा महिमाच असा होता कीं, लेखणीला त्या वेळेस कोठें आडकाठीच नव्हती. ज्याला ज्या विषयांत ओ का ठो मुद्धां कळूं नये, त्यावर त्यानें खुशाल व्याख्यान द्यावें व ग्रंथरचना करावी. विल्सन साहेबांनीं एका लेखणीच्या टाकांत हिंदु, मुसलमानी व पारशी या तिन्ही धर्मांचा फडशा पाडून निःक्षत्री पृथ्वी करावी, जोतीबांनीं धोंडीबाबरोबर मनुविषयीं व भागवताविषयीं वादविवाद करावा,[1] एका कासारज्ञातीय महापंडितानें संपूर्ण शास्त्र्यांचा पराभव करून 'पवित्र शास्त्रा'चें माहात्म्य स्थापित करावें,[2] मोरोबांनीं आपलें अगाध ज्ञान एका कादंबरींत ओतून गवर्नर साहेबांच्या चरणीं चषकसमर्पण करावें, 'एका साहेबानें' महाराष्ट्र भाषेंत विलायती कवितेचा अपूर्व मासला उतरून देऊन दुसऱ्या महारसिक साहेबानें तो चुटका क्रमिक पुस्तकांत सामील करावा,— अशी कांहीं त्या वेळेस चमत्कारिक पर्वणी येऊन गेली! पण तो पर्वकाळ आतां संपला व रावसाहेबांचा अंमल बहुतेक आटपून चंद्राचा चंद्रिकेशीं पुनः पूर्ववत् पूर्ण योग होण्याचा समय आला आहे. मेकाले साहेबांनीं संस्कृताचें किंवा फारसीचें एक अक्षरहि माहीत नसतां चाळीस वर्षांपूर्वी प्राच्य व पाश्चात्य विद्येची जशी बेलाशक तुलना करून दोहोंतलें तारतम्य काढलें;[3] किंवा मिल्लनें आमच्या रावबहादुरांच्या सारखाच

---

१. अंक ४४ पहा.

२. अंक ३६ पहा.

३. "I have no knowledge of either Sanskrit or Arabic. But I have done what I could do from a correct estimate of their value. I have read translations of the most celebrated Arabic and Sanskrit works. I have conversed both here and at home with men distinguished by their proficiency in the eastern tongues. I am quite ready to take the oriental learning at the valuation of the Orientalists themselves. I have never found one among them who could deny that a single shelf of good European library was worth the whole native literature of India and Arabia. The intrinsic superirority of the Western literature is indeed, fully admitted by those members of the Committee who support the

निरर्गल प्रलाप करून जुनी हिंदुविद्या कवडीच्या मोलाची ठरवून हिंदूंस रानटी लोकांत काढलें, तसली बडबड या काळीं जर कोणी करूं ह्मणेल तर त्यास कोणी बाहेर तोंडहि काढूं देणार नाहीं. शाळेंतलीं पोरें सुद्धां वरच्यासारख्या प्रचंड पंडितास सांगतील कीं, "साहेब महाराज, आपली एरवीं केवढीहि विद्वत्ता असली तरी या विषयावर लेखणी चालविण्यास आपणांस बिलकूल अकत्यार नाहीं. आपणांस इकडील लोकांवर, इकडील विद्येवर, इकडील कलांवर वगैरे यथेच्छ पांडित्य करून आपली शेखी मिरविण्याची हौस असेल खरी; पण जोंपर्यंत आपण इकडील भाषांचें ज्ञान करून घेण्याची खटपट केली नाहींत, इकडील ग्रंथांवर परिश्रम केले नाहींत, इकडील लोकव्यवहार पाहिला नाहींत, तोंपर्यंत आपण आपलें पेन दौतींतच बुडवून ठेवावें हें बरें. त्यांतच आपला बोज आहे." नाहीं तर "युरोपांतील पुस्तकांची एक फळी एकीकडे आणि हिंदुस्थानांतील व आरबस्थानांतील सगळी विद्या एकीकडे;" "हिंदुस्थानांतील लेणीं कदाचित् भुईतून वर निघालीं असतील किंवा ढगांतून खालीं कोसळलीं असतील;" असले जाडे जाडे सिद्धांत बाहेर पडायाचे[1] !

तेव्हां एकंदरींत पहातां ही गोष्ट उघड आहे कीं, प्रस्तुत ग्रंथकार हे आपणास कितीहि विद्वान् समजत असले, किंवा केवढ्याहि मोठ्या सरकारी अधिकारावर चढले असले, तरी एतद्देशीय प्राचीन विद्येविषयीं त्यांनीं कोणत्याहि तऱ्हेचा अभिप्राय देणें हें केवळ धाष्टर्य होय. येथील गटारयंत्रावरील एखाद्या भटजींनीं भांग्या मारुतीचें वर-

---

oriental plan of education. It will hardly be disputed. I suppose, that the department of literature in which the Eastern writers stand highest is poetry. And I certainly never met with any Orientalist who ventured to maintain that the Arabic and Sankrit poetry could be compared to that of the great European nation."

—*Minute on Education.*

१. "This labourious description of the architecture of the Hindus affords some curious specimens of the inveteracy of the author's prejudices. In his zeal to undervalue the cavern-temples of the Hindus he even insinuates that they are not artificial. "It is difficult to say, how much of the wonderful in these excavations, may be the work of nature." He seemed inclined, with Bryant, to think that it was not impossible that the pyramids had dropped from the clouds, or sprung out of the soil." (!)

—Mill's *British India (Wilson's Note).*

प्रदान घेऊन इंग्रेजी विद्येविषयीं व्याख्यानें देण्याचा सपाटा चालवून रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, दर्शनानुशासन यांवर जर गदी उडविली, तर तें जितपत हास्यास्पद होईल तितपतच रावबहादुरांचें प्रस्तुत प्रकरणीं वरील पांडित्य होय.

आतां आमचे प्रतिपक्षी, किंवा त्यांच्या तर्फेची कोणी मंडळी असल्यास ती, कदाचित् असा कोटिक्रम रचतील कीं, यथील जुन्या विद्येविषयीं स्वतः जरी कोणास माहिती नसली तरी ऐकीव गोष्टींवरून किंवा साधारण अनुमानानें तिजविषयीं अभिप्राय दिल्यास काय हरकत आहे? सर्वच गोष्टी आपण जातींनिं माहीत करून घेऊन मग त्यांवर मत द्यावें असा नियम कसा चालेल? कोणाचेंहि ज्ञान झालें तरी त्याचा कांहीं अंश साक्षात् प्राप्त झालेला व कांहीं परंपरेनें मिळालेला असें असायाचेंच. खरें आहे, पण हा प्रकार तरी 'लोकहितवादीं'च्या ग्रंथांतून आढळतो काय? आह्मांस कबूल आहे, कीं त्यांनीं स्वतः जरी 'रामः रामौ' 'घटः पटः' न केलें तरी कांहीं चिंता नाहीं; पण हें तरी अवश्य आहे कीं नाहीं, कीं ज्यांस वरील विद्या अवगत आहे त्यांच्यापासून त्यांनीं प्रस्तुत प्रकरणीं कांहीं तरी माहिती करून घ्यावी! अथवा महामूर्ख शास्त्र्यांकडून ज्ञानप्राप्ति करून घेण्यांत मानहानि वाटत होती, तर निदान इंग्रेजी ग्रंथकार तर कोठें गेले नव्हते! सर विल्यम जोन्स, कोलब्रुक, विल्सन, मोक्षमुल्लर वगैरे मंडळी तर आमच्या रावबहादुरांस पसंत होण्यासारखी होती कीं नाहीं? आमची पक्की खात्री आहे कीं, वरील पाश्चात्य पंडितांच्या ग्रंथांपैकीं एखादें पान जरी त्यांनीं कधीं वाचलें असतें, तरी तेवढ्यावरूनहि आपले संस्कृत विद्येविषयींचे अभिप्राय किती अज्ञानावे व किती दांडगाईचे आहेत हें त्यांस कळून आलें असतें. पण ही 'घटपटादि खटपट' करण्याची आमच्या 'लोकहितवादीं'स काय जरूर? आपलें ज्ञानाचें कोठार अमक्या अमक्या ठिकाणीं रितें आहे असें जेव्हां त्यांस भासेल, तेव्हां तो रिता ठाव भरून काढण्याची पंचाईत कीं नाहीं! स्वतः ज्या त्या विषयाची खडानखडा माहिती बिनचूक असल्यावर मग दुसऱ्याच्या तोंडाकडे बघायची काय जरूर? डॉन क्विक्झोटची स्वारी पुरती भालेराईची दीक्षाहि[1] न घेतां जशी जगांतील अन्यायांस दंड करण्यास आपल्या शामकर्ण वारूवर आरूढ होऊन बाहेर पडली, त्याप्रमाणेंच इंग्रेजी विद्येचा संस्कार झाला न झाला तों लोककल्याणास ज्यांनीं आपणांस वाहून घेतलें, व लोकांस शहाणे करण्याकरितां हातांत लेखणी धरली, ते कसली बिचाऱ्या कोलब्रूकची किंवा मोक्षमुल्लरची गरज बाळगताहेत?

---

१. 'नाईट' होण्याच्यापूर्वी मोठा विधि असे. तो करण्यास वरील स्पानिश सरदार विसरला होता. पांच वर्षांपूर्वी बडोद्याच्या प्रकरणांत सरकारची कामगिरी इमानें इतबारें

(पुढें चालू)

असो; आतां प्राचीन पांडित्यावर वर जें अर्वाचीन पांडित्य प्रगट झालें आहे त्यांत वस्तुतः कितपत तथ्य आहे तें पाहूं.

३. वादविषयक लेखाचा दोन प्रकारांनीं विचार करण्यासारखा आहे. एक, प्राचीन पांडित्यावरील आक्षेप; व दुसरें, तें पांडित्य संपादन केलेल्या मंडळींवर ह्मणजे पंडितांवर आक्षेप. आतां प्रथमतः पहिल्या मुद्द्याविषयीं विचार करूं.

एतद्देशीय शास्त्रविद्येवर 'लोकहितवादीं'चा मोठा आक्षेप हा आहे कीं, तिचा 'जिवास, शरिरास, प्रपंचास कांहींच उपयोग पडत नाहीं;' तस्मात् 'लांकडें तोडायाचें कसब शिकविलें तर बरें, परंतु हें व्याकरण नको.' वाः! केवढें अमोलिक तत्त्व हें आमच्या रावबहादुरांनीं शोधून काढून आपल्या महामूर्ख देशबंधूंस अर्पण केलें! भट्टोजी दीक्षितानें आपल्या ठिकाणीं आपली मोठी धन्यता मानली असेल कीं, एवढा व्याकरणोदधि, पण त्या सगळ्याचें मंथन करून मीं 'सिद्धांतकौमुदी' बाहेर काढली; पण त्या बिचाऱ्यालाहि वरील प्रचंड सिद्धांताची प्रतीति कधीं घडली नसेल! वरील कौमुदीस आपल्या देशांतल्या देशांतच राहू उत्पन्न होतील हें त्याच्या स्वप्नींहि आलें असेल काय? एकूण पाणिनि, पतंजलि, नागोजीभट्ट वगैरे मंडळींनीं आज हजारों वर्षें ज्या विषयावर व्यासंग केला तो सारा तमाशा ह्मणून आज उमगला आं! पण हा काय बरें चमत्कार आहे, कीं ज्यांच्या ज्ञानांजनानें 'लोकहितवादीं'ची दृष्टि साफ होऊन त्यांस वरील महातत्त्व ओळखतां आलें तेहि बेटे वरील तमासगिरांतच नाचूं उडूं लागले आहेत! बोधलिंगाचार्य 'शार्मण्यदेशे रेणाख्य नदीतीरे बोण्णनाम्नि नगरे' असा संकल्प करून मुनित्रयाच्या पुरश्चरणास लागले हें नवल नव्हे काय? दुसऱ्यानें उक्षतरण नगरीं अधिष्ठान करून 'गोल्डस्टकर्स पाणिनि' ह्मणून एक मोठा थोरला 'चित्रपट' तयार केला याला तरी काय ह्मणावें? त्याप्रमाणेंच आमच्या देशांतहि भट्ट कीलहॉर्न पतंजलीच्या नादीं लागून त्याला सजवताहेत, दुसऱ्या एका पंडितानीं 'लेक्चर्स ऑन पाणिनि' ह्मणून कांहीं सोंगें उभीं केलीं, हें तरी काय? आमच्या रावबहादुरांनीं तीस वर्षांपूर्वी मोठी बहादुरी करून जें 'पुरंदरचें बंड'[1] मोडून टाकलें होतें तेंच पुन्हा इतक्यांत कसें बरें उठलें? कणाद, जैमिनी, यास्क पिंगल, भरत वगैरे शेंकडों बंडवाले जे त्यांनीं

बजाविल्याबद्दल मुंबईच्या प्रख्यात सौटर साहेबांस खुद्द युवराजांनीं 'नाईट' बनविलें ही गोष्ट आमच्या वाचकांस आठवत असेलच. वरील विधि झालेल्या पुरुषांस 'सर' ही किताबत मिळत असते तेव्हां कित्येक हिंदुहि 'नाईट' झाले आहेत हें सांगावयास नकोच.

१. "कांहीं दिवसांनीं हें जुने लोक गेले ह्मणजे पंडित उताणे पडतील. परंतु या गोष्टीस दहावीस वर्षें आणखी पाहिजेत. ह्मणजे आह्मीच या पंडितांचा तमाशा पाहूं तथापि प्रथम पाठशाळेचा विध्वंस झाला पाहिजे, ह्मणजे एक पुरंदरचें बंड मोडलें. हे विनंति.

'पंडितांची योग्यता' (पृष्ठ ४९५).

उधळून लावले होते त्या सर्वांनीं द्वीपाचीं द्वीपें उडून जाऊन दूरदूर देशीं आपले झेंडे नेऊन लावले आहेत, व साऱ्या युरोपभर व अमेरिकाभर त्यांचा दंगा दिवसेंदिवस जास्त वाढतोच आहे, हें भयंकर वर्तमान आमच्या नेटिव सौटर साहेबांस अद्याप कोणीं विदित केलें नाहीं काय? काय असेल तें असो. कदाचित् व्याख्यानांच्या तडाक्यांत त्यांस अलीकडील वर्तमान ऐकण्यास अवकाश सांपडला नसेल. भूगोलांत तीन प्रकारचीं सरोवरें सांगितलीं आहेत. कांहींस नद्या मिळतात, पण त्यांतून निघत नाहींत; कांहींस मिळत नाहींत, पण त्यांतून निघतात मात्र; आणि कांहींस मिळतात, व त्यांतून निघतातहि. प्रस्तुत ग्रंथकाराचा प्रकार या तिहींपैकीं दुसऱ्यासारखा असावा असा सुमार दिसतो!

'लोकहितवादी' हे आपणांस विद्वानांत लेखीत असतील याविषयीं संशयच नाहीं; कां कीं 'विद्वान् कोणास ह्मणावें?' वगैरे अनेक निबंधांतील प्रमेयांवरून व 'मूर्ख' 'टोणपे' 'पशु' इत्यादि विशेषणांच्या जागोजागच्या वृष्टीवरून वरील गोष्ट उघडच दिसते. पण आह्मांस खास वाटतें कीं, जर विद्यादेवी साक्षात् प्रगट झाली व तिनें दरबार भरविला, तर आमच्या रावबहादुरांस त्यांत वरील प्रतीच्या मानकऱ्याची जागा मिळणें मुष्कील पडेल. ज्या विद्येचा 'जिवास, शरिरास, प्रपंचास कांहींच उपयोग पडत नाहीं' ती काय कामाची, एवढीच ज्यांची तिच्याविषयींची भावना तो कसला तिचा भक्त? तो खरोखरच लांकडें तोडण्याच्या व तीं वहाण्याच्याच उपयोगी? असला भारवाही व मजूरदार वाग्देवीच्या नंदनवनांत काय कामाचा? 'आरवी गोष्टी'तील यक्षानें लावण्य वतीच्या पलंगावर चढूं पहाणाऱ्या कुबड्याची जशी अश्वशालेंत योजना केली, शृंगारवंचन झाल्याबद्दल त्याच्याकडे जेवणाचें ताट पाठवून दिलें, तितपतच योग्यता वरील विद्योपासकाची होय. ज्याची एवढी मंदबुद्धि व क्षुद्र दृष्टि, कीं विद्येच्या योगानें शरीरास समाधान झालें तर ती विद्या, तो कसचा विद्वान्! त्या हतभाग्यास तिचें स्वरूप मुळींच बुद्धिगोचर झालें नाहीं, व तिच्यापासून होणाऱ्या आनंदाचा लवलेशहि मिळाला नाहीं, असें ह्मटलें पाहिजे. 'इसापनीती'तील कोंबड्यानें जसा सिद्धांत केला, कीं हें रत्न कुच कामाचें, याची कवडीचीहि योग्यता मी समजत नाहीं, यांच्यापेक्षां एक जोंधळ्याचा दाणा हजार वांट्यांनीं बरा, तशाच प्रकारचा वरील उदरंभरि पंडितांचा सिद्धांत होय. सारांश, विद्येचें सर्वोत्कृष्ट फल ह्मटलें ह्मणजे उदरपोषण किंवा इंद्रियजन्य सुख होय असें मानणारा मनुष्य अत्यंत जडबुद्धि समजला पाहिजे. त्यास उपमा ह्मटली तर रत्नाविषयीं पाषाणबुद्धि धरणारा वरील कुक्कुट, पशुमात्राविषयीं केवळ मांसबुद्धि बाळगणारा शौनिक किंवा युवतिमात्राविषयीं केवळ मानुषीबुद्धि बाळगणारा क्लीब, यांचीच यथार्थ होय. कोहिनूर हिरा व गार हीं जशीं कोंबड्याच्या दृष्टीनें सारखीं, शिकंदर बादशहाचा नामांकित घोडा[1] व भोंडक्याचीं तट्टेंहि जशीं खाटिकास सारखीं, षंढास

१. बुसेफेलस नामेंकरून शिकंदर बादशहाचा मोठा उमदा घोडा होता हा त्याच्या

जसें मनुष्याच व स्त्रीचें आलिंगन सारखें, त्याप्रमाणेंच सरस्वतीच्या अवकृपेंतल्या मंडळीस लांकूउतोड्या व वैयाकरण सारखा !

'लोकहितवादी'चा व्यवहारोपयुक्ततेचा सिद्धांत अंगीकारला तर आज विद्यादेवीचे किती मुलूख ओसाड पडणार आहेत ? मोठमोठ्या दुर्बिणीवर आरूढ होऊन अंतराळांतील दूरदूरच्या प्रदेशांत डोकावून येणारे ज्योतिषी, पृथ्वीच्या पोटांत शिरून कोसकोस खोल जाणारे भूगर्भवेत्ते, नीलनदीचा उगम हुडकून काढणारे, ध्रुवप्रदेशांतील गोठलेल्या समुद्रांत जाणारे, आफ्रिकेच्या मध्यभागांत बुसणारे, मुंग्यांच्या व मधमाशांच्या प्रजासत्तात्मक राज्याविषयीं शोध करणारे, हजारों वर्षांपूर्वीचे सांगाडे गोळा करून ब्रह्मदेवाच्या अव्वल कारकीर्दीतील प्रजेची स्थिति कशी होती याचा तलास लावणारे वगैरे शेंकडों वेड्या पीरांची काय अवस्था होईल ? त्यांतून हीहि लहान चमत्काराची गोष्ट नव्हे, कीं आमच्या रावबहादुरांच्या मताप्रमाणें शहाण्यांतले शहाणें जें इंग्रज सरकार तेंहि वरील खुळास सर्वथा अनुकूलच आहे. लाखों रुपयांचा खर्च ठेवून वरील खुळें विलायत सरकारनें उराशीं बाळगिलीं आहेत; व एथेंहि वरील प्रकार दृष्टीस पडत नाहींसा नाहीं. तशीच दुसरी हीहि मोठी गोष्ट लक्षांत आणण्यासारखी आहे कीं, जगाच्या आरंभापासून प्रस्तुत ग्रंथकाराच्या महातत्त्वाचीच जर प्रवृत्ति असती, तर आजला चोहोंकडे काय स्थिति दृष्टीस पडली असती बरें ! जगानें वेडे ठरविलेल्या मंडळींनें विद्यादेवतेची केवळ निरपेक्ष व निष्काम बुद्धीनें जर हजारों वर्षे उपासना चालविली नसती, तर आजपर्यंत जगांत कितीसें ज्ञान साठलें असतें ! सरकारानें आपला खर्च देऊन श्वेतद्वीपींची महायात्रा करविण्याचा कपिलाषष्ठीचा योग आणला असतां आपलें जन्मभर केलेलें पांडित्य चटदिशीं गुंडाळून ठेऊन रावबहादुरांनीं मुकाट्यानें माघारी पाय घेतला या कृतींत आणि वर्षानवर्षे मनांत सांठविलेला संकल्प सिद्ध होण्याचा समय आला असतां तीन डाकलग जहाजांनिशीं कोलंबसानें पृथ्वीसीमाभूत मानलेल्या महासागरावर धाड घातली या कृतींत किती जमीन अस्मानची तफावत ! तर विद्येचा खरा भक्त झटला झणजे तिजपासून आपणास कांहीं लाभ होईल कीं नाहीं, ही कल्पनाहि त्याच्या मनांत येत नसते; केवळ ज्ञानजन्य जें सुख त्याचीच तो पर्वा करीत

बापाकडे प्रथमतः आणला. तेव्हां तो असा उच्छृंखळ होता कीं त्याच्यावर चढण्याची कोणाची छाती होईना. शेवटीं शिकंदरानें त्याच्यावर स्वारी केली. त्याच्या साऱ्या युद्धांत हा घोडाच त्यास उपयोगीं पडला. त्याच्यावर चढण्याकरितां शिकंदरानें रिकिबींत पाय ठेवला कीं सैनिकांनीं शत्रूवर चाल करावयाची, असा नेहमींचा संकेत असे. शेवटीं पंजाबांतल्या लढाईत वरील घोडा जायबंदी होऊन मरून पडला. ते समयीं शिकंदरानें त्याचा प्रेतसमारंभ करून त्या ठिकाणीं त्याच्या नांवानें एक शहर वसविलें.

१. 'विविधज्ञानविस्तार' पु० ११, अंक १०, पृष्ठें २३५—६ पहा.

असतो. प्रणयी पुरुषाचें मन प्रेमविषयक स्त्रीवर लुब्ध होऊन पडलेलें असतें तें जसें तिच्या वस्त्राभरणाविषयीं किंवा तिजकडून घडणाऱ्या सेवे विषयीं निरपेक्ष असून केवळ तिच्या समागमाविषयींच आतुर असतें तशींच खऱ्या वि विलासी पुरुषांची होय![1]

बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते
पिपासितैः काव्यरसो न पीयते ।[2]

अंक ७०—(१) 'लोकहितवादी'चा शास्त्रविद्येवर दुसरा आक्षेप—त्याचें निरसन (२) संस्कृत विद्येची उपयुक्तता. (३) तिची व अर्वाचीन पाश्चात्य विद्येची तुलना. (४) उपसंहार.

१. 'लोकहितवादी' ह्मणतात कीं, "ही विद्या कांहीं उपयोगी नाहीं. जर असें नसेल तर मला कोणीं उत्तर द्यावें, कीं व्याकरणाचें पंधरा वर्षे अध्ययन केलें त्यापासून अमुक उपयोग होतो, असें मला दाखवून द्यावें. ह्मणजे मी वास्तविक ह्मणेन." आह्मी रावबहादुरांस असें परत विचारतों कीं, जर संस्कृत व्याकरण निरुपयोगी, तर

---

१. "What is the *use* of logic ?—I answer that knowledge itself is a use, and that all legitimate inquiry rewards itself with its own pleasures. The appetite for finding out laws from facts, causes from effects, necessary truth from fleeting occurrences of the day, puts in its claim to gratification, which is as legitimate, if less imperious, as that of the animal nature for food and sleep. The studies which enwrapt the soul of Joseph Scaliger during the massacre of Saint Bartholomews, must have been a source of pleasure pure and high, from which they had a right to draw. If the question, what "fruit" does it bring?—which the Baconian philosophy puts so often—be understood, as it certainly ought not, to refer only to the *material* wants & comforts of humanity, it is a base, sordid, and stupid question against which every better mind indignantly protests. Science was never brought to its present height by hopes of wealth, plenty, and comfort alone, but chiefly by those *mirabiles amores* with which she can inspire her followers. He who loves to see the processes of his mind reduced to their laws and causes, to him are logical studies a pleasure—to him they bring fruit."

२. "ज्यास भूक लागली आहे त्याचें व्याकरणानें पोट भरत नाहीं; कोणास तहान लागली असतां काव्यरस उपयोगीं पडत नाहीं."

मराठी व इंग्रेजीहि तसेंच असलें पाहिजे. मग तीं शिकविण्याविषयीं आमचें सरकार इतका अट्टाहास कां करितें? इंग्रेजी भाषेचीं आजपर्यंत छप्पन जणांनीं छप्पन व्याकरणें केलीं आहेत, व अजूनहि तीं होत असून पुढेंहि होतील यांत संशय नाहीं. आमच्या सरकारचे आमच्या देशावर जे मोठाले उपकार झाले आहेत त्यांतलाच एक हा होय, कीं आमच्या भाषा आजपर्यंत ज्या सैरावैरा धांवत होत्या त्यांचें त्यांच्या आश्रयाच्या योगानें नियमन होऊन त्या व्याकरणाच्या आळ्यांत आल्या. मग जे परिश्रम मराठी व इंग्रेजी भाषांच्या संबंधानें स्तुत्य, तेच संस्कृत भाषा आली कीं निंद्य झाले काय? आतां यावर आमच्या प्रतिपक्ष्यांचें कदाचित् ह्मणणें पडेल कीं, व्याकरण शिकण्यास हरकत नाहीं, पण नुसत्या एका विषयाचा व्यासंग पंधरा वर्षें करीत बसणें, आणि त्यांत व्याकरणासारख्या रुक्ष विषयाचा यांत काय अर्थ आहे? इंग्रेजी किंवा मराठी व्याकरण जसें भाषाज्ञानास साह्यभूत ह्मणून शिकतात, त्याप्रमाणेंच संस्कृत व्याकरणहि तितक्या वेतांचें शिकावें. उगीच पोकळ शब्दवाद वाढविण्यांत काय तात्पर्य? या कोटिक्रमांत पुष्कळच गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. एक मोठी गोष्ट तर ही कीं, सदरील विषय असुकपर्यंतच शिकावा व असुकपर्यंत शिकूं नये ही मर्यादा करण्यांत काय अर्थ आहे? ज्यास जितकें अपेक्षित असेल किंवा जेथपर्यंत त्याचा बुद्धिप्रवेश होईल तेथपर्यंत तो शिकेल. कोणास समग्र विषयाची माहिती करून घ्यावयाची असली तर त्यास आडकाठी करणारे रावबहादुर कोण? नुसत्या अर्वाचीन इंग्रेजी भाषेचें व्याकरण शिकूनच न रहातां जे आंग्लोसाक्सन वगैरे भाषा शिकतात व शब्दव्युत्पत्तीचा थांग लावीत लावीत अगदीं मूळाशीं जाऊन थडकतात किंवा तितक्यानेंहि तृप्त न होतां इंग्रेजी शब्दांचीं दुसऱ्या छप्पन भाषांशीं जे नातीं जुळवीत बसतात, त्यांस आमचे नवीन कौंसलदार एकदम वेड्यांच्या इस्पितळांत नेऊन टाकतील काय? येथील कॉलेजांतील माजी संस्कृत गुरु डॉक्टर हौ किंवा सध्यांचे उक्षतरणवासी मोक्षमुल्लर यांस जर 'लोकहितवादी' विचारूं लागले कीं, "काय हो, इतकीं वर्षांचीं वर्षें तुह्मी नुसते शब्द कुटीत बसतां, व या भाषेंत अमकें रूप होतें, या भाषेंत अमकें चालू आहे, भाषेची उत्पत्ति अमक्या अमक्या तऱ्हेनें झाली असावी, तींत कालगत्या असे असे फेरफार होत जातात, वगैरे पांडित्य करण्यांत तुह्मी कालक्षेप करतां, हें काय खूळ तुह्मीं माजवलें आहे? तुमच्यापेक्षां रोंटीवाल्याचा उद्योग मी फार चाहतों."—तर वरील शामण्यदेशीय पंडितांकडून त्यांस काय उत्तर मिळेल बरें! दुसरें असें कीं, व्याकरणविषय आमच्या रावबहादुरांस जरी रुक्षत्वास्तव अप्रिय असला तरी तेवढ्यावरून तो सर्वांस नापसंत झालाच पाहिजे असें आहे काय? व्याकरण, गणित, न्याय (तर्कशास्त्र), धर्मशास्त्र (कायदे), वगैरे विषय पुष्कळांस रुचिपरत्वेंकरून कंटाळवाणे वाटतात, ह्मणून तेवढ्यावरूनच ते त्याज्य झाले? आपणास जें आवडेल तेंच इतरांस आवडलें पाहिजे

असा आग्रह धरणें हें किती असमंजस होय!' आतां बारा बारा पंधरा पंधरा वर्षें एकच विषय धरून बसणें हें चांगलें कीं वाईट याचा जर विचार केला, तर इकडूनहि आमचे जुने शास्त्री केवळ मूर्खच ठरतील असें आह्मांस वाटत नाहीं. एकच कां विषय

१. मनुष्यांच्या बुद्धीबुद्धींत फरक असतो; कोणाची रुक्ष असते व कोणाची सरस असते. व्याकरणगणितादि विषय रुक्ष बुद्धीच्या मनुष्यांस प्रिय होतात, व काव्येतिहासादि इतरांस आवडतात. संस्कृतांत रुक्षत्वाच्या संबंधानें व्याकरणाची व न्यायाची ज्यांत निंदा केली आहे असे अनेक श्लोक आहेत. उदाहरणार्थ पुढील घ्या—

पठंतु कतिचिद्बठात्खफछठैति वर्णांच्छठान्
घटः पट इतीतरे पटु रटंतु वाक्पाटवात ।
वयं बकुलमंजरीगलदनल्पमाध्वीझरी-
धुरीणगणरीतिभिर्भणतिभिः प्रमोदामहे ॥

मेकाले साहेबांस गणिताचा पराकाष्ठेचा कंटाळा असे. त्यांच्या 'चरित्रां'त पुढील गमतीचें पत्र आढळलें—

"My dear mother,—King, I am absolutely certain, would take no more pupils on any account. And, even if he has numerous applicants with prior claims, he has already six, who occupy him six hours in the day, and he is likewise lecturer to the college. It would, however, be very easy to obtain an excellent tutor. Lefevre and Malkin are men of first--rate mathematical abilities, and both of our college. I can scarcely bear to writs on Mathematics or Mathematicians. Oh for words to express my abomination of that science, if a name sacred to the useful and emblishing arts may to applied to the perception and recognition of certain properties in numbers and figures! Oh that I had to learn astrology, or demonology, or school divinity! Oh that I were to pore over Thomas Aquinas, and to adjust the relation of Entity with the two Predicaments, so that I were exempted from this miserable study! "Discipline" of the mind Say rather starvation, confinement, torture, annihilation! But it must be. I feel myself becoming a personification of Algebra a living trigonometrical canon, a walking table of Logarithms. All my perceptions of elegance and beauty gone, or at least going. By the end of the term my brain will be "as dry as a remainder biscuit after a voyage." Oh to change Cam for Isis! But such is my destiny; and since it is so, be the pursuit contemptible, below contempt, or disgusting beyond abhor-

होईना पण तो पुरतेपणीं येणें हें चांगलें; कीं अनेक विषय अर्धेमुर्धे येणें हें चांगलें; याविषयीं विचार केला असतां कोणाच्याहि लक्षांत येईल कीं सर्वांनीं गुडघाभर पाण्यांत पोहण्यापेक्षां एकेका विद्येंत एकेकजण पारंगत असणें हें फार चांगलें. सर्व विद्या देशांत सामग्र्यानें जागृत रहाण्यास वरीलच साधन उत्कृष्ट होय हें उघड आहे. अर्थशास्त्रांत श्रमविभागाचा जो सिद्धांत आहे तोच इकडे व सर्वत्र लागू पडण्यासारखा आहे. त्यांतून परमेश्वराच्या कृपेनें आमच्या देशांत धारणाशक्तीचा असा दुष्काळहि नाहीं, कीं एकेक शास्त्रच झेपतां झेपतां पुरेसें होऊन इतरांकडे अवलोकन होणेंहि दुरापास्त व्हावें. चार चार शास्त्रांचें किंबहुना सहांचेंहि आकलन केलेल्या बुद्धि या देशांत निपजलेल्या आहेत. तसेंच हेंहि आमच्या बहुश्रुत ह्मणविणाऱ्या 'लोकहितवादीं'स माहीत असायला पाहिजे होतें, कीं केवळ व्युत्पत्तीपुरतें व्याकरणज्ञान होण्यास पंधरा वर्षें अध्ययन करण्याची जरूर आहे असें नाहीं. इंग्रेजी व्याकरण शिकण्यास

---

rence, I shall aim at no second place. But three years ! I cannot endure the thought. I cannot bear to contemplate what I must have to undergo. Farewell then Homer and Sophocles and Cicero.

Farewell happy fields.

Where joy for ever reigns; Hail ! horrors, hail,
Infernal world !

How does it proceed ? Milton's descriptions have been driven out of my head by such elegant expressions as the following—

$$\text{Cos } x = 1 - \frac{x^2}{1.2} + \frac{x^4}{1.2.3.4.} - \frac{x^6}{1.2.3.4.5.6.}$$

$$\text{Tan } \overline{a + b} = \frac{\text{Tan } a + \text{Tan } b}{1 - \text{Tan } a + \text{Tan } b}.$$

My classics must be Woodhouse, and my amusements summing an infinite series. Farewell, and tell Selina and Jane to be thankful that it is not a necessary part of female education to get a headache daily without acquiring one practical truth or beautiful image in return. Again, and with affectionate love to my Father, farewell wishes your most miserable and mathematical son.

T. B. MACAULAY.

—*Life & Letters*.—pp. 90-1.

जसें भाषाशास्त्राचें अध्ययन अवश्य आहे असें नाहीं, तसेंच संस्कृत भाषेच्या व्याकरणाचें ज्ञान होण्यासहि भाषाव्यांतच उडी घातली पाहिजे असें नाहीं![1]

२. प्रस्तुत लेखांत आमच्या रावबहादुरांनीं एकंदर शास्त्रवियेवर जो भडिमार केला आहे त्याचें सार पुढील वाक्यांत आहे–"ही विद्या कांहीं उपयोगी नाहीं." हें लहानसें वाक्य नमूद करतांना प्रस्तुत ग्रंथकारानें कितीसा विचार केला असेल बरें! 'उपयोगी' ह्मणजे काय? उपयोगित्वाची काय व्याख्या करावयाची? 'जिवास, शरिरास, प्रपंचास' जें अवश्य लागेल तें उपयोगी हा जर सिद्धांत स्वीकारला, तर साऱ्या जगांत दोन विद्या मोठ्या उपयोगाच्या दिसतात. एक नांगऱ्याची, व दुसरी रोटीवाल्याची. अन्नावांचून जीव जगत नाहीं यास्तव धान्य जमीनींतून उत्पन्न केलें पाहिजे, व कच्चें धान्य मनुष्यास पचत नाहीं ह्मणून त्यास अग्निसंस्कार करून तें भक्षणीय केलें पाहिजे. याव्यतिरिक्त इतर ज्या हजारों विद्या व कला सर्व सुधारलेल्या देशांतून चालू आहेत त्या सर्व निरुपयोगीच ह्मटल्या पाहिजेत. उदाहरणार्थ बागाईत व गायनकला घ्या. 'लोकहितवादीं'च्या शिष्यास मोठ्या नंदनवनांत नेलें तरी तो भोंवतालचा सर्व देखावा पाहून ह्मणणार, "काय हो, काय हा धनाचा अपव्यय? हीं शेंकडों तऱ्हेचीं तुह्मीं फुलझाडें लावलीं आहेत त्यांच्यापासून उपयोग तो कोणता? या संगमरवरी दगडांच्या वाटा तुह्मीं केल्या आहेत व चंदनाचे मंडप उभे केले आहेत हा तुमचा कोण मूर्खपणा! या बागेचा धनी महामूर्ख आहे असें मी समजतों. या फुलांपासून, फळांपासून, व कुंजांपासून अमुक अमुक उपयोग आहे असें मला कोणी दाखवून द्यावें ह्मणजे मी खरें ह्मणेन. माझी येथें सत्ता असती, तर मी तर या साऱ्या बगीच्यावर गाढवाचा नांगर फिरविला असता, व एक खासा भटारखाना येथें उठवून दिला असता!" गायनकलेच्या संबंधानेंहि वरील राजश्रींच्या तोंडून वरच्यासारखेंच गांडिय निघायाचें. मोठ्या तानसेनाच्या आवाजदारीपेक्षां जात्याचा घर्घर शब्द त्यांच्या कानास अधिक गोड लागेल; कां कीं, पहिला स्वर केवळ निष्फळ असून दुसरा मात्र चपातीच्या रूपानें फलद्रूप होणार आहे. तर 'जीव, शरीर व प्रपंच' यांचा जर अगदीं मूळचा अर्थ घेतला, तर चपातीवाल्याची पायरी तानसेनाच्या वरचीं होणार हें उघड आहे. 'जीव' व 'शरीर' शब्दांत जर इंद्रियगणाचाहि अंतर्भाव केला तर बरीक बगीचा व गायन हीं केवळ निरुपयोगी ठरणार नाहींत; कां तर, पहिल्यानें चक्षुरिंद्रि-

---

१. संस्कृत व्याकरणाच्या अध्ययनास फार काळ कां लागतो याबद्दल 'लोकहितवादीं'नीं येणेंप्रमाणें अपला अभिप्राय प्रगट केला आहे—

"एक व्याकरण ह्मणावयास बारा चवदा वर्षे लागतात. त्याचें कारण हेंच आहे कीं, त्या प्रकरणीं वाद करण्यास शिकतात; ग्रंथ पाठ करतात; व प्रतिष्ठेकरितां वाद करितात!" आमचे रावबहादुर किती काळांत भाष्यान्त व्याकरण ह्मणण्याचा मक्ता घेतील?

याची व दुसऱ्याच्या योगानें श्रोत्रेंद्रियांची तृप्ति आहे. पण ही मीमांसा एकदां सुरू झाली ह्मणजे ती कोठपर्यंत जाऊन थडकेल याचा नियम नाहीं. शरीरनिर्वाहापासून इंद्रियतृप्तीपर्यंत एकदां मजल येऊन पोंचली, कीं लागलीच पुढें 'उपयोगी' या विशेषणाच्या अर्थांत शिवडमरूंतून प्रगट झालेलीं चवदा सूत्रें, 'अवच्छेदकावच्छिन्ना'ची गदी, 'घटपटाची लटपट', व एकंदर 'पुरंदरचें बंड' हीं येऊन घुसलींच समजायाचीं ! कारण मनुष्य हा चिदंश व जडांश या दोहोंचा संयोग होय; चिदंश ह्मणजे मन व जडांश ह्मणजे शरीर. मग एका अंशाला जेणेंकरून सुख होतें तो पदार्थ जर उपयोगी समजावयाचा, तर निदान तितक्याच मानानें दुसरा अंश जें मन त्यास आनंद देणाऱ्या वस्तुहि उपयोगीच, मानल्या पाहिजेत हें उघड आहे.[1] चपातीनें भूक निवते ह्मणून ती जर उपयोगी, व गाण्यानें कर्णेंद्रियाचें समाधान होतें ह्मणून तेंहि जर उपयोगी तर बिचारें पाणिनीयच कशानें निरुपयोगी झालें? पाणिनीयाचें अध्ययन करणारास त्यापासूनहि आल्हाद होतो. आमच्या रावबहादुरांसारख्या महापंडितांस "अंतीं 'च' असला काय, आणि 'चा' असला काय" त्याची कांहींच क्षिति नाहीं हें उघड आहे; पण त्यांच्या अभिप्रायावरून जर मुनित्रयाची किंमत करावयाची, तर एखाद्या नांगऱ्याच्या हातून तानसेनाला सर्टिफिकिट पोंचविलें पाहिजे !

३. वरील महासिद्धांताचें प्रणयन करण्यापूर्वी 'लोकहितवादीं'नीं दुसरीहि एक मोठी गोष्ट लक्षांत आणायाची होती ती ही कीं, व्याकरण, न्याय, मीमांसा, अलंकार यांचा 'जिवास, शरिरास व प्रपंचा'स जितपत उपयोग नाहीं, तितपतच हल्लीं मराठी

---

१. केवळ प्रपंचनिर्वाहाच्या सुखाहून विद्याजन्य मानसिक सुखाची थोरवी किती आहे हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल—

"Such are the charms to barren states assign'd:
Their wants but few, their wishes all confined;
Yet let them only share the praises due,
If few their wants their pleasures are but few;
For every want that stimulates the breast,
Becomes a source of pleasure when redrest.
Whence from such lands each pleasing science flies,
That first excites desire, and then supplies;
Unknown to them, when sensual pleasures cloy,
To fill the languid pause with finer joy;
Unknown those powers that raise the soul to flame,
Catch every nerve, and vibrate through the frame."

—*The Traveller (The Swiss).*

शाळांतून, हायस्कूलांतून, व कालेजांतून जे विषय, पांचपांचशें हजार हजार रुपयांचे मास्तर व प्रोफेसर शिकवतात, त्यांचाहि नाहीं. वरील सर्व विषय जसे संस्कृतांत आहेत, तसेच इंग्रेजींत व एकंदर युरोपांतील साऱ्या नव्या जुन्या भाषांतूनहि आहेतच आहेत. 'न्याया'च्या जागीं 'लॉजिक' झटलें, 'अलंकारा'च्या ऐवजीं 'ह्रेटरिक' शब्दाचा प्रयोग झाला, कीं वरील विद्यांचा अनुपयुक्ततेचा दोष चटदिशीं उडून त्या लागलींच उपयुक्त बनल्या काय! रावबहादुरांच्या चिरंजीवापैकीं कोणी वैयाकरण, नैयायिक किंवा मीमांसक बनला असत' तर त्या गोष्टीची त्यांस अत्यंत लज्जा वाटली असती हें उघड आहे; वरीस कल पहातांच बहुधा त्यांनीं फ्रेडरिक दि ग्रेट याच्या तीर्थरूपांचें अनुकरण केलें असतें.[1] पण इंग्रेजी व्याकरण, इंग्रेजी न्याय, इंग्रेजी अलंकार शिकून 'ग्राजुएट' पदाला पोंचणें हें बरीक अत्यंत भूषणास्पद होय नव्हे? शालजोडी व गौन यांमध्यें वस्तुतः इतकें अंतर आहे काय? आह्मांस तर दोहोंत एवढा मोठा फेर कोणता आहे तो समजत नाहीं. पंधरा वर्षें अध्ययन केलेला जुना पंडित बाजारांत उभा केला असतां तो जितक्या किंमतीला जाईल त्याहून बारा वर्षें डोळेफोड करून एम्. ए. बनलेला अर्वाचीन विद्वान् अधिक मोलानें विकेल असें 'लोकहितवादीं'स वाटतें काय? वरील गोष्ट हल्लींच्या काळीं तर सर्वांच्या चांगली प्रत्ययालाहि येत चालली आहे हें सुप्रसिद्धच आहे. भूगोलचे भूगोल तोंडपाठ करा, साऱ्या इतिहासांतल्या कर्मकटकटीची संथा घ्या, व्याकरण घोटघोटून त्याच्या आवृत्ति करा, शून्यलब्धीपर्यंत माराकूट करून मजल मारा; आणि शेवटीं फळ पाहिलें तर काय,—शून्यलब्धीच! रावबहादुर मोठ्या डौलानें हा प्रश्न प्राचीन पंडितांपुढें टाकतात, कीं पंधरा वर्षें व्याकरण झटल्यापासून अमुक अमुक उपयोग आहे असें मला कोणीं सांगावें; आह्मीहि त्यांस प्रतिपृच्छा करतों कीं,

---

१. "The Latin was positively interdicted. "My son," His Majesty wrote, "shall not learn Latin; and more than that, I will not suffer any body even to mention such a thing to me.' One of the preceptors ventured to read the Golden Bull in the original with the Prince Royal. Frederic William entered the room, and broke out in his usual kingly style.—

"Rascal, what are you at there?"

"Please your Majesty," answered the preceptor, "I was explaining the Golden Bull to his Royal Highness."

"I'll Golden Bull you, you rascal!" roared the Majesty of Prussia. Up went the King's cane; away ran the terrified instructor; and Frederic's classical studies ended for ever."

—*Macaulay's Essays.*

चारीखंडाचा भूगोल वगैरे घडघड ह्मणतां आल्यापासून तरी काय फायदा आहे? साऱ्या पृथ्वींतील नव्या तोंडांत बसल्या, तरी त्यांतील एकहि तहानेच्या वेळीं उपयोगीं पडेल काय? शिकंदर बादशाहाचा किंवा नेपोलियनचा पराक्रम वर्णिला तर दोघांच्यापासूनहि एका छदामाची तरी प्राप्ति होणारी आहे काय? अवघ्या देशांतील उत्पन्नाच्या यादी मुखोद्गत झाल्या, ह्मणून अजराजाच्या खजिन्यांत चौदा कोटी मोहोरांची रास जशी रात्रीच्या रात्रीं अचानक येऊन पडली, तसें आमच्या कोठारांत होईल काय? माजी गव्हर्नर साहेबांनीं मोठें दयाळू होऊन बी. ए. ची परीक्षा झालेल्या नवीन विद्वानांची मामलेदार कचेरींत योजना केली; तेथें त्यांस वर्षानवर्षे घोकलेल्या विषयांपैकीं एकाचा तरी उपयोग होतो काय? कधीं जन्मांत बोरूच्या पेराचा संस्कार नाहीं, व लेखणी कशी करावी हें माहीत नाहीं; मग शंकुच्छेदाचा एखादा सिद्धांत तर तेथें लावायाचा नसेलना? तेव्हां एकंदरींत पहातां शास्त्रविद्येच्या अनुपयुक्ततेच्या संबंधानें जें 'लोकहितवादीं'नीं प्रतिपादन केलें आहे, तेंच सारें अर्वाचीन शिक्षणपद्धतीसहि तंतोतंत लागणारें आहे. मग एकीच्याच नांवानें तेवढी सदोदित हाकाटी करींत बसावी हा केवढा अन्याय आहे?

मेकॉले साहेबांनीं इ० स० १८३४ सालीं प्राच्यदेशीय विद्येची पाश्चात्य विद्येशीं तुलना करून पहिली केवळ निरर्थक ह्मणून जो साहेबी पेनाच्या सफाईत शेरा झोंकून दिला, त्यांत त्यांनीं मोठी जबरदस्त ह्मणून ही कोटी सरकारच्या नजरेस आणली कीं, संस्कृत किंवा फारशी ग्रंथ पढून त्यांपासून पढणारासहि कांहीं उपयोग पुढें घडत नाहीं, व लोकांचाहि कांहीं फायदा होत नाहीं. ही कोटी किती शुष्क आहे हें वरील विवेचनावरून सहज लक्षांत येईल. हल्लींच्या सरकारानें जसें विद्याखातें उत्पन्न करून त्यांत इंग्रेजी भाषेच्या द्वारें लोकशिक्षणाचीं पद्धति सुरू केली आहे, त्याप्रमाणेंच संस्कृताच्या व फारशीच्या द्वारेंहि लोकांस ज्ञानप्राप्तीचें साधन करून देतां आलें नसतें काय? हल्लीं जसे इंग्रजी प्रोफेसर, गणिताचे प्रोफेसर, तर्कशास्त्राचे प्रोफेसर यांच्या नेमणूका झाल्या आहेत, त्याप्रमाणेंच व्याकरणन्यायादिशास्त्रांचें अध्यापन करण्यास पंडित व मुनशी यांची योजना करण्यास कांहीं मोठी पंचाईत पडती असें कांहीं नाहीं. आतां एवढी गोष्ट अवश्य कबूल केली पाहिजे, कीं अलीकडे पदार्थविज्ञानाच्या संबंधानें पुष्कळ अधिक शोध झाला आहे, व इतिहासाचें अंग संस्कृत विद्येस मुळींच कमी आहे; पण शेक्सपीयरच्या जागीं कालिदास, टॉडहंटरच्या जागीं भास्कराचार्य, मिल्लच्या जागीं गदाधरभट्ट, मिल्टनच्या जागीं फर्दोशी असा कांहीं मोबदला होता, तर कांहींच उपयोग न होता हें ह्मणणें निवळ दांडगाईचें आहे! त्यांतून वरील लॉर्ड साहेबांची फर्डेशाई चालली असतां त्यांच्या हातचें कलम हिसकावून घेऊन त्यांस कोणीं असें कसें विचारिलें नाहीं कोण जाणे?—कीं, "पंडित महाराज, आपण संस्कृत, फारसी, आरबी भाषेंतील

ग्रंथांचें हार्द पुरतेपणीं काढून आपली तारतम्यशक्ति पूर्णपणें प्रगट केलीत खरी, व वरील भाषांतील ग्रंथ कवडीच्या मोलाचेहि नाहींत, त्यांतील पदार्थविज्ञान, ज्योतिष, भूगोल, वैद्यक वगैरे सर्व चुकलेलें आहे, हें आपलें पांडित्य सर्व खरें आहे; पण आपण आह्मांस एवढें सांगा पाहूं, कीं पाश्चात्यांच्या सुधारणेस मूलस्तंभभूत जे ग्रीक व ल्याटिन भाषेंतील ग्रंथ त्यांत कितपतसा भूगोल आहे, कितपतसें ज्योतिष आहे, कितपतसें पदार्थविज्ञान आहे ? न्यूटनचे ज्योतिषांतील व दर्शनानुशासनांतील सिद्धांत, फ्रांकलिनचे विद्युत्प्रयोग, छापखाना, होकायंत्र, आगगाडी, तारायंत्र, प्रकाशालेख्य, वगैरे सर्व जर सुधारणेचीं आवश्यक अंगें होत, तर जुने ग्रीक व रोमन यांस रानटी लोकांतच सामील केलें पाहिजे. मग हा काय बरें चमत्कार आहे, कीं वरील लेकांचे ग्रंथ अद्याप विलायतेंतील व सर्व युरोपांतील विद्यालयांतून शिकविण्याचा तडाका चालूच आहे ! कांहीं शतकांपूर्वी पाश्चात्य राष्ट्रें अज्ञान व रानटी होतीं तेव्हां प्लेटो, आरिस्टॉटल, लिव्ही, सिसरो वगैरे मंडळीचें माहात्म्य होतें तें ठीकच होतें; पण आज एकोणिसाव्या शतकांत सुधारणुकेच्या प्रकाश साऱ्या युरोपखंडांत आणि त्यांतून श्वेतद्वीपांत एवढा कोंदला असतां अजूनहि वरील रानटी ग्रंथकारांची पहिल्यासारखीच चहा रहावी हें केवढें आश्चर्य आहे !" त्यांतून खुद्द साहेबांसच ग्रीक व रोमन ग्रंथकारांनीं किती वेडावून टाकिलें असें हें कोणास सांगितलें तर खरें तरी वाटेल ? त्यांच्या भाच्यानें जें त्यांचें चरित्र लिहिलें आहे तें वाचलें असतां होमर, प्लेटो, थुसिडिडीज इत्यादिकांच्या कृतींचीं पारायणें त्यांनीं कितीदां केलीं याचा ठिकाण लागत नाहीं ![1] मग नाहीं

---

१. ग्रीक लोकांच्या विद्येविषयीं वरील ग्रंथकारांचें किती विलक्षण प्रेम होतें हें त्यानेंच स्वतः एके ठिकाणीं बोलून दाखविलें आहे—

"Of the indifference which Mr. Mitford shows on this subject I will not speak; for I cannot speak with fairness. It is a subject on which I love to forget the accuracy of a judge, in the veneration of a worshipper and the gratitude of a child. If we consider merely the subtlety of disquisition, the force of imagination, the perfect energy and elegance of expression which characterise the great works of Athenian genius, we must pronounce them intrinsically most valuable; but what shall we say when we reflect that from hence have sprung directly or indirectly, all the noblest creations of the human intellect; that from hence were the vast accomplishments and the brilliant fancy of Cicero; the withering fire of Juvenal; the plastic imagination of Dante; the humour of Cervantes;

नाहींत ते वेडगळ आक्षेप प्राच्य ग्रंथांवरच आणून इकडील विद्या तेवढ्या सफाई बुडविल्याचें श्रेय जें साहेब बहादुरांनीं घेतलें, व नेटिव बहादुरांच्या अप्रयोजक लेखांस आपला अज्ञानमूलक व दुराग्रहप्रचुर लेख कारणीभूत केला, ही प्राच्य राष्ट्रांची त्यांनीं केवढी थोर आगळीक केली बरें ! साऱ्या पाश्चात्य राष्ट्रांतून जर ग्रीक व ल्याटिन विद्यांच्या अध्ययनाचीं विद्यालयें आहेत व शाळाहि आहेत[1], व त्यांच्या प्रीत्यर्थ लाखों रुपयांचा खर्च प्रतिवर्षीं चालू आहे, तर येथील एक पाठशाळा तेवढी आमच्या

---

the comprehension of Bacon; the wit of Butler; the supreme and universal excellence of Shakspeare? All the triumphs of truth and genius over prejudice and power, in every country and in every age, have been the triumphs of Athens. Wherever a few great minds have made a stand against violence and fraud, in the cause of liberty and reason there has been her spirit in the midst of them; inspiring, encouraging, consoling;—by the lonely lamp of Erasmus; by the restless bed of Pascal; in the tribune of Mirabeau; in the cell of Galileo; on the scaffold of Sidney. But who shall estimate her influence on private happiness? Who shall say how many thousands have been made wiser, happier and better, by those pursuits in which she has taught mankind to engage: to how many the studies which took their rise from her have been wealth in poverty,—liberty in bondage,—health in sickness,—society in solitude? Her power is indeed manifested at the bar, in the senate, in the field of battle, in the schools of philosophy. But these are not her glory. Wherever literature consoles sorrow, or assuages pain,—wherever it brings gladness to eyes which fail with wakefulness and tears, and ache for the dark house and the long sleep,—there is exhibited, in its noblest form, the immortal influence of Athens."

—*Mitford's History of Greece.*

१. युरोपखंडांत आज जो एवढा विद्येचा उत्कर्ष झाला आहे त्यास कारण ग्रीक व ल्याटिन भाषेतील ग्रंथ होत. इ० स० १४५३ सालीं तुर्क लोकांनीं कस्तुंतुनिया शहर हस्तगत करून रूमशामची गादी घेतली तेव्हां हजारों जुने पंडित आपले ग्रंथ खांदाडीस मारून दूरदूर देशीं पळाले. पुढें त्यांच्या अध्यापनामुळें वरील प्राचीन विद्येचा संस्कार साऱ्या युरोपखंडास घडला. तेव्हांपासून हळू हळू इंग्लिश, फ्रेंच, इटालियन वगैरे अर्वाचीन भाषा सुधारत चालल्या, व त्यांत ग्रंथसंग्रहहि होऊं लागला. सोळाव्या शतकांत जी धर्मक्रांति झाली तीस कारण वरील विद्याप्रसारच होय.

सरकारास जड व्हावी हा केवढा चमत्कार आहे ? वेदांची आवृत्ति इंग्लंडांत निघावी, व पाणिनीचा जीर्णोद्धार जर्मनींत व्हावा, आणि आमच्या इकडच्या महापंडितांनीं पाठशाळा मोडल्याचें श्रेय घेऊन हें 'एक पुरंदरचें बंड मोडले' ह्मणून नाचूं लागावें हें या आर्यभूमीच्या पुत्रांस केवढें भूषण होय[1] ! !

४. शास्त्रविद्या कांहीं उपयोगाची नाहीं हा निर्णय 'लोकहितवादीं'नीं कदाचित् आपल्या मंडळीची स्थिति व शास्त्रीमंडळीची स्थिति यांची परस्पर तुलना करूनहि केला असेल. त्यांस वाटत असेल कीं सुधारलेली इंग्रजी विद्या शिकल्याचें फळ पहा, आणि वेडगळ शास्त्रांवें मूर्खपणानें अध्ययन केल्याचें तरी फळ पहा ! पंडितांनीं शास्त्रांची कुटाकूट करून दहा दहा वीस वीस वर्षें घालवावीं, आणि शेवटीं फळ काय, तर शालजोडी खांद्यावर टाकून सभेला जावें, आणि हातावर पावली पडली तर मोठें भाग्य मानावें ! तीच आमच्या नवीन इंग्रेजी विद्वानांची बडेजाव पहा, राजविद्याभूषित झाले कीं, खुद्द गवर्नर साहेबांच्या हातून त्यांच्या स्वदस्तुरचें चर्मपत्र मिळायाचें, चोहोंकडे विद्वत्तेचा जयजयकार व्हावयाचा, तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत नांव पडायाचें आणि कोणी मामलेदार, कोणी डेप्युटी कलेक्टर, कोणी हेडमास्तर, कोणी सदरअमीन. अशा अधिकारांवर आरूढ होऊन घरींदारीं पैशाचा पाऊस पडायाचा ! मेकाले साहेबांच्या पूर्वनिर्दिष्ट लेखांत असाच कोटिक्रम केलेला आहे. आतां यांत कितपत अर्थ आहे हें कोणी सामान्य अकलेचा मनुष्य सुद्धां सांगूं शकेल. आमच्या सरकारच्या मनांत पाश्चात्य विद्येस हे ईल तेवढें उत्तेजन द्यावयाचें होतें ह्मणूनच वरील प्रकार आजपर्यंत दृष्टीस पडला हें उघड आहे. बडोद्याचे राजे माजी खंडेराव गायकवाड यांनीं मनांत आणलें असतें, कीं आपल्या राज्यांत जो जो कामगार नेमायाचा तो उत्तम कुस्तीगीर असला तरच नेमायाचा तर चाललें नसतें काय ? युनिव्हर्सिटीच्या परीक्षा चालतात तसाच वर्षांतून एकदां तालीमबाजांचा मोठा आखाडा पाडला असता ह्मणजे झालें असतें.

---

१. युरोपीय पंडितांची संस्कृत विद्येवर जी भक्ति आहे तिचा शतांशहि इकडे आढळत नाहीं. उदाहरणार्थ पुढील उद्गार पहा—

"So much in answer to objections which have repeatedly been made against Indian Logic. I should like to see the Brahmans themselves take up the gauntlet and defend their Logic against the attacks of European critics.....Indian philosophy therefore should not be attacked at random. Thales or Empedocles can be criticised in the schools with impunity, but Kanâda and Goutama may still find champions in India, if not in Europe."

—*Max Muller.*

आतां एवढें खरें आहे, कीं सेनाखासखेल साहेबांनीं वरील पद्धति सुरू केली असती तर सर्वांनीं हाकाटी केली असती, व मराठी दरबारच्या मूर्खपणाचा ज्यानें त्यानें यथेच्छ उपहास केला असता; आणि त्यांतून प्रस्तुत ग्रंथकारानें तर असली अमोलिक संधि कधींच फुकट दवडली नसती. हल्लीं ते आपल्या ग्रंथांतून जागोजाग जशी मल्हारराव महाराजांची कीर्ति गाऊन आपल्या राजनिष्ठेस वारंवार उज्वल करतात, त्याप्रमाणेंच खंडेराव महाराजांवरहि त्यांनीं यथेच्छ भंडार उधळला असता! पण वस्तुतः पहातां आमची तर मनोदेवता अशी वाहते कीं, कान धरून मल्लखांबावर उडी मारशील तर तुला मामलत देऊं किंवा अमुक अमुक पकड करशील तर तुला सरसुभा करूं, या म्हणण्यांत जितपत शहाणपण आहे, तितपतच ग्रहणांच्या उपपत्ति शिकून ये तेव्हां तुला बारानिशीवर घालूं, किंवा शंकुच्छेद सगळा करून ये तेव्हां तुला अव्वल कारकून करूं, या ठरावांतहि आहे! पण हें बोलून उपयोग काय? 'लोकहितवादीं'च्या तत्त्वज्ञानाचे दोन महासिद्धांत कोणते ते मागें सांगण्यांत आलेच आहेत. तेव्हां त्यांस अनुसरून म्हटलें म्हणजे वरील प्रकार ठीकच आहेत.

विशेषतः सर्वविदां समाजे विभूषणं मौनमपंडितानाम् ॥[1]

'नीतिशतक.'

अंक ७१—(१) विषयोपन्यास. (२) जुन्या पंडितांवर आक्षेप—वितंडवाद. (३) व्यवहारशून्यत्व. (४) इतर दूषणें.

१. मागील अंकांत 'लोकहितवादीं'चे या देशांतील प्राचीन विद्येवर काय काय अभिप्राय आहेत ते दाखल करून त्यांवर चर्चा केली. आतां वादविषयक लेखांत जुन्या पंडितांच्या संबंधानें त्यांनीं जे अनेक उल्लेख केले आहेत त्यांच्या संबंधानें विचार करूं.

२. प्रस्तुत ग्रंथकाराचा जुन्या शास्त्रीमंडळीवर पहिला आक्षेप हा आहे कीं, ते वितंडवादी असतात. त्यांस सत्याची बिलकूल पर्वा नसते, तर कोणत्या तरी युक्तीनें प्रतिपक्ष्याचा पराजय करून आपण प्रतिष्ठा मिळवावी एवढाच त्यांचा हेतु असतो. या आक्षेपाच्या संबंधानें आह्मी रावबहादुरांस असें विचारतों कीं, सर्वच शास्त्री असे हटवादी त्यांस आढळले काय? तसेंच, शास्त्राध्ययन व हटवादित्व या दोहोंत नित्य कार्यकारणभाव आहे असेंहि त्यांच्यानें सिद्ध करून देववेल काय? शिवाय तिसरी

१. "विशेषेंकरून सर्वशास्त्रनिपुण पंडितांच्या समाजांत अपंडितास परम भूषण म्हटलें म्हणजे मौन हेंच होय!"

गोष्ट ही कीं वरील वितंडवादाचा प्रकार शास्त्रीमंडळीखेरीज इतर ठिकाणीं त्यांच्या कोठेंच नजरेस आला नाहीं काय ? आरोपींवर वरील चार्ज शाबीत होण्यास वरील तिन्ही प्रश्नांचा उलगडा झाला पाहिजे; तो आमचे रावबहादुर कोणत्या तऱ्हेनें करतील हें आज कांहींच सांगवत नाहीं. यास्तव त्यांच्या संबंधानें आमचें काय ह्मणणें आहे तें वाचकांस कळवितों.

वर जो दुराग्रहाचा प्रकार 'लोकहितवादीं'नीं विचाऱ्या शास्त्रीमंडळीच्याच तेवढा माथीं मारून टाकला आहे तो वस्तुतः पहातां जेथें जेथें विद्वत्तेचा प्रकार आहे तेथें तेथें आढळायाचाच. मनुष्यांत प्रायः अहंबुद्धीचें अतिशयित प्राधान्य असल्यामुळें अगदीं अडाणी लोकांत सुद्धां हटवादीपणाचा प्रकार आढळत नाहींसें नाहीं. आमच्या रावबहादुरांनीं 'इसापनीतीं'तील सरड्याची गोष्ट जर कधीं वाचली असेल, व तिचें तात्पर्य काय आहे हें लक्षांत आणलें असेल, तर 'महामूर्ख' शास्त्र्यांच्या ठायीं वरील प्रकार आढळतो याविषयीं त्यांस आश्चर्य वाटण्यास कांहीं कारण उरणार नाहीं. अमुक अमुक गोष्ट अशी आहे आणि अमुक अमुक गोष्ट अशी नाहीं, एवढ्यावरूनच वादास प्रवृत्त झाल्याचा किंबहुना मारामारीवर आल्याचा, प्रकार प्रस्तुत ग्रंथकाराच्या कधीं नजरेस आला नसेल काय ? मग मनुष्यस्वभावासच जो गुण खिळलेला तो कोंहीं मनुष्यांत आढळतो एवढ्यावरून त्यांसच त्या दोषाचे भागीदार करणें हीं किती अन्यायाची गोष्ट आहे ! जुने पंडित तर 'महामूर्ख'च, त्यांची गोष्ट राहूं द्या; पण रावबहादुरांच्या नव्या पद्धतीचे कोरे करकरीत दोन चार विद्वान् घेतले समजा, तर त्यांचीं सर्वांचीं मतें तरी सारीं एकसारखीं असें आढळेल काय ? तसेंच, आपल्या विद्वत्तेच्याच सदोदित घमेंडींत असावें, याला काय समजतें, त्याला काय येतें, अशा वल्गना कराव्या, समेत नेहमीं आपली शेखी मिरविण्याचा यत्न करावा, इत्यादि प्रकार 'लोकहितवादीं'स जसे शास्त्रिमंडळींत आढळले असतील तसेंच अलीकडील मंडळींत आढळले नसतील काय ? जॉनसन वाद करतांना कधीं हार घेत नसे, आपला पक्ष खोटा आहे असें जरी त्यास माहीत असलें तरी तो खरा करून दाखविण्यास तो झटत असे, ही गोष्ट रावबहादुरांच्या कानावर कधीं आली नाहीं काय ? विलायतेंतील मासिक त्रैमासिक पुस्तकांची व वर्तमानपत्रांची नेहमीं झडपट चालत असते हेंहि त्यांनीं कधीं पाहिलें नाहीं काय ? तर विद्येचा जेथें ह्मणून प्रचार आहे, तेथें वितंडवाद, लब्धप्रतिष्ठा वगैरे प्रकार कोणाकोणामध्यें आढळायाचेच. ह्मटलें आहे—

विद्या विवादाय धनं मदाय । शक्तिः परेषां परिपीडनाय
खलस्य साधोर्विपरीतमेतत् । ज्ञानाय दानाय च रक्षणाय ।।[1]

१. " विद्या आली कीं वादास प्रवृत्त व्हावयाचें, धनप्राप्ति झाली कीं मदोन्मत्त व्हाव-

तर विद्या प्राप्त झाली असतां ज्याशीं त्याशीं वाद करण्याची हौस, आपलें पांडित्य लोकांपुढें मिरविण्याची सदोदित इच्छा, 'मी केवढा विद्वान् माझ्यासारखा विद्वान् त्रैलोक्यांत नाहीं' असा गर्व, यच्चयावत् सृष्टि मूर्खांनीं भरलेली दिसणें, हे प्रकार स्वभावपरत्वें व बुद्धिपरत्वें पुष्कळांमध्यें आढळायाचेच. वरील गोष्टीचा प्रत्यय पहाण्यास आमच्या रावबहादुरांस इतकें दूर कशाकरितां जावें लागलें कोण जाणें ! पण सुबंधूनें 'वासवदत्ते'च्या प्रस्तावनेंत ह्मटलें आहे—

गुणिनामपि निजरूपप्रतिपत्तिः परत एव संभवति ।
स्वमहिमदर्शनमक्ष्णोर्मुकुरतले जायते यस्मात् ॥[1]

पण हे पुरंदरचे रामोशी आह्मी आनरेबल साहेबापुढें अ णून काय वेड्यासारखे उभे करतों ! !

'लोकहितवादी' शास्त्रविद्येचा उपहास करून ह्मणतात—"त्यांची विद्या अशी असते कीं, एकानें ह्मणावें, या शब्दचे अंतीं 'च' असावा; दुसऱ्यानें ह्मणावें, 'चा' असावा. याविषयीं वाद शेंकडों प्रमाणें दाखवून सर्व दिवसभर करतात. शेवटीं निश्चय एकाचाहि होत नाहीं. तसेंच नैयायिक हेहि भांडतात. एक ह्मणतो, ईश्वर आणि जीव एक आहे, दुसरा ह्मणतो, दोन्ही विभक्त आहेत. तिसरा ह्मणतो, ईश्वर गुणी आहे, चवथा ह्मणतो, निराकार आहे. याप्रमाणें रिकामा वाद चालविण्यांत जन्म घालवितात आणि त्यांस या वादांतील सत्य काय आहे हें समजण्याची इच्छा नसते." वरील वाक्यांत आमच्या रावबहादुरांनीं आपलें शास्त्रज्ञान दाखविण्याचा यत्न केला आहे हें शास्त्रज्ञान 'ज्ञानोदया'सारख्या पत्रांत किंवा माजी 'सत्यदीपिके'सारख्या मासिक पुस्तकांत आलें असतें, तर शोभलें असतें; पण प्रस्तुत ग्रंथकारासारख्या बहुश्रुत व विद्वान् ह्मणविणाऱ्या गृहस्थानें असा निरर्गल प्रलाप करावा हें खरोखर अत्यंत खेदास्पद होय. एकूण च मध्यें आणि चा मध्यें कांहीं अंतर नाहीं ना ? हें अंतर नाहीं तर सर्व वैयाकरण महामूर्खच समजले पाहिजेत. प्रस्तुत ग्रंथकाराचा निर्देश कर्तव्य असतां 'तो,' 'ती,' किंवा 'तें,' या तिहींपैकीं कोणत्याहि अक्षराचा उच्चार केला असतां आमच्या रावबहादुरांस चालेलना ! एकूण बिचाऱ्या दादोबानें आपल्या थोरल्या व्याकरणाच्या आरंभीं व्याकरणशास्त्राच्या उपयुक्ततेच्या संबंधानें एवढें पांडित्य जें केलें आहे ते सारें फुकटच ! तसेंच हेंहि आह्मीं आज नवेंच ऐकलें कीं पाणिनि पतं-

---

याचें, शरीरिसामर्थ्याचा उपयोग दुसऱ्यास पीडा देण्यामध्यें करावयाचा; हीं लक्षणें दुष्टाचीं होत. सज्जनाचा प्रकार वेगळा. तो विद्येपासून ज्ञान जोडतो, धनाचा विनियोग दानाकडे करतो आणि शक्तीचा उपयोग दुसऱ्याचा बचाव करण्याकडे करतो."

१. "गुणिजनांसहि आपल्या गुणाचें ज्ञान दुसऱ्यापासूनच व्हावयाचें; पहा कीं, डोळ्यांस आपलें स्वरूप समजायाला आरसाच पाहिजे ! "

जलि वगैरे मंडळीनें जें एवढें भारूड करून ठेविलें आहे त्यांत निश्चयात्मकता ह्मणून कांहीं नाहीं. भाग्य बिचाऱ्या शास्त्रकारांचें ! त्यांनीं संस्कृत भाषा सारी धुंडाळून काढून तिचा पक्का छडा काढला, तरी शेवटीं खापर फुटायाचें तें फुटलेंच ! इतर शास्त्रांचेंहि मंथन करून लोकहितवादींनीं केवढा जाडा सिद्धांत काढला आहे पहा ! "याप्रमाणेंच न्याय, मीमांसा, अलंकार या शास्त्रांची व्यवस्था आहे. केवळ असत्य सिद्धांतांचें प्रतिपादन करून विलक्षण कुतर्क करून भलतेच अविचार लोकांत स्थापन करतात !"[२]

---

१. आमच्या राववहादुरांसारख्या राजनिष्ठ मंडळीस अलिफ्टनं साहेबांचें प्रमाण किती ग्राह्य होणारें आहे हें सांगावयाला नकोच. यास्तव त्याच्या सर्वप्रसिद्ध इतिहासांतला एक लहानसा उतारा 'पुरंदरच्या बंडाच्या' तर्फेनें येथें दाखल करतों—

"Panini, the earliest extant writer on its Grammar, is so ancient as to be mixed up with the fatuous ages. His works and those of his successors have established a system of grammar, the most complete that ever was employed in arranging the elements of human speech.

—*History of India*—Book III, Chap. 5.

२. संस्कृत विद्येचा फलितार्थ ह्मणून वर जो आमच्या प्राच्य महापंडितांनीं काढला आहे त्याचा मेळ पुढील पाश्चात्य पंडितांच्या उल्लेखाशीं कितीसा बसतो हें आमच्या वाचकांनीं लक्षांत आणावें. मिल्ल साहेबांनीं आपलें पांडित्य समग्र केल्यावर त्यावर विल्सन साहेब आपला अभिप्राय दाखल करतात—

"This question of the civilization of the Hindus, although discussed with disproportionate prolixity, irrelevancy of illustration, and tediousness of recitation, both in these concluding remarks, and in a variety of previous notes and observations, can scarcely be considered as satisfactorily determined. It may be admitted, that the Hindus were not a civilized people according to Mr. Mill's standard; but what that standard is, he has not fully defined. Civilization is used by him, however, as a relative term, and in this sense, we may readily grant that the Hindus never attained the advance made by modern Europe. It is not just to institute such a comparison; for, to say nothing of the advantages we possess in a pure system of religious belief, we cannot leave out of consideration the agency of time. The Hindus, by the character of their institutions, and by the depressing influence of foreign subjugation, are apparently

वरील लेख रावबहादुरांनीं जर अक्कलहुशारीनें लिहिला असेल, तर आह्मी त्यांस अशी सूचना करतों कीं, कणाद, जैमिनि, गदाधरभट्ट, मम्मटभट्ट, इत्यादि मूर्खपरंपरेनें आजपर्यंत या देशांतील वेड्याबागड्या लोकांस खूळ लावून अलीकडे तर तिनें आपलें वेड पाश्चात्यांच्या ठायींहि पिकविण्याचा सपाटा चालविला आहे; तर त्यांनीं प्रतिपादन केलेल्या 'असत्य सिद्धांतांचे' व 'विलक्षण कुतर्कां'चें बंड मोडल्याचें श्रय जर रावबहादुर घेतील, तर त्यांची कीर्ति बेकन किंवा जॉनसन यांच्याप्रमाणें भूमंडळावर अजरामर राहणारी होईल'.!

---

what they were at least three centuries before the Christian era. Two thousand years have done nothing for them, everything for us. We must, therefore, in fairness, compare them with their contemporaries, with the people of antiquity; and we shall then have reason to believe, that they occupied a very foremost station amongst the nations. They had a religion less disgraced by idolatrous worship, than most of those which prevailed in early times. They had a government, which, although despotic, was equally restricted by law, by institutions, and religion: they had a code of laws, in many respects wise and rational, and adapted to a great variety of relations which could not have existed, except in an advanced condition of social organization. They had a copious and cultivated language, and an extensive and diversified literature; They had made great progress in the mathematical sciences; they speculated profoundly on the mysteries of man and nature, and they had acquired remarkable proficiency in many of the ornamental and useful arts of life. Whatever defects may be justly imputed to their religion, their government, their laws, their literature, their sciences, their arts, as contrasted with the same proofs of civilization in modern Europe, it will not be disputed by any impartial and candid critic, that as far as we have the means of instituting a comparison, the Hindus were in all these respects quite as civilized as the most civilized nation of ancient world, and in as early times as any of which records or traditions remain.—W.

१. युरोपामध्यें प्लेटो, आरिस्टॉटल वगैरे मंडळींनीं जो शेकडों वर्षांपासून तत्त्वज्ञानाचा प्रघात पाडला होता तो शेवटीं **बेकननें** फिरविला. याजविषयीं इंग्रजींत **मेकॉलेच्या 'लार्ड**

"मनुष्य जन्मला कशाकरतां ? त्याचें सार्थक काय ? व आपलें कर्तव्य काय ? याचा विचार त्यांचे मनांत क्षणभरहि वसत नाहीं."—"ज्या ज्या विद्या हे शास्त्री शिकतात त्यांपासून इहलोकीं व परलोकीं हित नाहीं."—"धर्माचा अधर्माचा भेद यांस ठाऊक नाहीं."—इत्यादि आरोपहि 'लोकहितवादीं'नीं जुन्या पंडितांवर आणले आहेत. हे सर्व यथार्थ आहेत असें जरी घटकाभर कबूल केलें, तरी हें उघड आहे कीं, वरील गोष्टींविषयीं आमच्या जुन्या पंडितांचे ठायीं जितपत ज्ञान आढळेल तितपतच बहुधा नवीन विद्वज्जनांतहि आढळेल ! 'मनुष्य जन्माला कशाकरतां ?—हा प्रश्न दोघांहि पंडितांपुढें टाकला तरी फळ सारखेंच होणार आहे असें आह्मांस वाटतें. धर्म काय आणि अधर्म काय ? या दोहों प्रश्नांचीं उत्तरेंहि आमचे रावबहादुर देतील काय ? त्यांच्या वरील वाक्यांवरून असा घाट दिसतो कीं, वरील सर्व गोष्टींचा उलगडा त्यांनीं आपणाशीं करून ठेवला आहे, पण हा काय असेल हें निश्चयानें कांहीं सांगवत नाहीं. आमच्या जुन्या मंडळीस ज्यांची वार्ता सुद्धां नव्हती व हल्लीं नाहीं असे कांहीं नवीन शोध तर प्रकृत प्रकरणीं 'लोकहितवादीं'नीं करून ठेवले नसतील ना ! असें असेल तर साऱ्या जगाच्या तर्फेनें आह्मी त्यांस अशी विनंति करतों, कीं ते त्यांनीं सर्वांस सादर केले असतां हजारों मोठमोठे तत्त्ववेत्ते जे विचार करून थकले, व 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां'[1] असें ह्मणून त्यांनीं हात टेकले, त्या सर्वांचा आज एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं तरी खाडदिशीं निकाल होऊन जाणारा आहे ! सिनियां पर्वतावर प्रगट होऊन ईश्वरानें जसें मोश्याच्या स्वाधीन आज्ञादशक केलें त्याप्रमाणेंच आमच्या राव-बहादुरांवर तर कांहीं अनुग्रह झाला नाहीं ना ! अथवा आमची ब्रह्मीमंडळी जशी आठआठ दिवस गिरिकंदरांत जाऊन बसते व पवित्र आत्म्याचा आणि त्यांचा संवाद होऊन नवीं पारमार्थिक तत्त्वें उदयास येतात,[2] तसाहि कांहीं प्रकार आर्यसमाजाचे

बेकन' या निबंधांत तर सविस्तर उपपादन आहेच; व मराठींतहि रा० काणे यांनीं केलेल्या वरील नांवाच्याच ग्रंथांत याचें कांहीं दिग्दर्शन सांपडेल. जॉनसननेंहि 'मेटाफिजिकल पोएटस्' ह्मणून एक कोटिबाज कविपरंपरा इंग्लंडांत निघाली होती तिचें बंड 'कौले' या प्रसिद्ध निबंधांत मोडून टाकलें आहे.

१. वरील चरण हा 'महाभारतां'तील प्रसिद्ध यक्षप्रश्नांपैकीं आहे. सगळा श्लोक येणेंप्रमाणें—

श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्नाः । नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम् ।
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां । महाजनो येन गतः स पंथाः॥

२. बंगाल्यांतील ब्राह्मसमाजांत अलीकडे एक नवीनच ट्रूम निघाली आहे. बाबू केशवचंद्र सेन, प्रतापचंद्र मजुमदार वगैरे मंडळीस नव्या देवाच्या नांवानें डोळे मिटण्याचा व आपल्या देशबंधूंच्या मूर्तिपूजाजन्य पातकाचें आपल्या वक्तृत्वरसानें परिक्षालन करण्याचा कंटाळा आला, कीं एके दिवशीं उठून ते मुकाट्यानें कोठें तरी गिरिकंदरांत जाऊन बसतात,

धुरंधर जे प्रस्तुत ग्रंथकार त्यांचा झाला नसेल ना! काय असेल तें असो. बरें आमच्या जुन्या पंडितांच्या स्वप्नींहि वरील विचार आले नाहींत असें समजा; पण नवीन मंडळींत तरी या संबंधानें कोणता फरक आहे? आपण कशाकरतां जन्मलों, आपल्या जन्माचें सार्थक काय? इत्यादि गहन विचारांत गढलेली नवीन मंडळी आमच्या राव-बहादुरांस आजपर्यंत कितीशी आढळली असेल? पण इतकें लांब कशाला? खुद्द आमच्या रावबहादुरांनींच जर आपला आजपर्यंतचा वृत्तांत सर्व प्रसिद्ध केला तर त्यांत स्वजन्माच्या सार्थकाचा प्रकार कितीसा आढळेल कोण जाणे!

५. 'लोकहितवादीं'नीं व्यवहारदृष्ट्याहि जुन्या पंडितांवर कांहीं आक्षेप केले आहेत. ते असे. "त्यांस व्यवहारिक ज्ञान नाहीं. त्यांस मोडीचें लिहितां देखील येत नाहीं व कोणतेंहि काम करावयाचे हे उपयोगीं नाहींत." या महान् आक्षेपाचें निरसन करूं पहाण्यासहि आह्मांस संकोच वाटतो. कां कीं, तो स्वभावतःच इतका दुर्बल आहे कीं त्याचा उल्लेख करणें हेंच त्याचें निरसन होय. मोडी लिहितां न आल्यानें जर पाणिनीयाचें अध्ययन व्यर्थ होणार व बारानिशीवाल्याची योग्यता पंडितांवर

व तेथें पवित्र आत्म्याची व त्यांची मनोमय भेट होते. मग आठा पंधरा दिवसांनीं वरील प्रेषित मंडळी पुनः बाहेर पडली, कीं कांहीं तरी अमोलिक तत्त्व प्रगट होतें. कुचबिहारच्या राजाला आपली कन्या समर्पण करावी कीं नाहीं हा प्रश्न मनांत धरून केशवचंद्र सेनाची स्वारी एकोणिसाव्या शतकांतील सुधारलेल्या देवाकडे कौल मागण्याकरितां जेव्हां गेली, तेव्हां चटदिशीं महंमदाप्रमाणें किंवा येशूखिस्ताप्रमाणें देवसाक्षात्कार होऊन त्यांस आज्ञा झाली कीं "कांहीं फिकीर नाहीं, तुझी कन्या जरी मूर्तिपूजकाच्या पदरीं पडणार तरी या-वेळेपुरती डोळेझांक करून माझें चिरंतन जें मूर्तिपूजावैर तें मी घटकाभर विसरून जाईन. भक्ताचा योगक्षेम यथास्थित चालण्याकरितां आपली प्रतिज्ञा गुंडाळून ठेवण्यास मला कांहीं मोठीशी पंचाईत नाहीं!" बाबू मजकुरांनीं कुचबिहारवाल्यांशीं सोयरीक केल्यापासून त्यांच्या शिष्यपरिवाराची मात्र त्यांच्यावरची भक्ति अगदीं उडाली. त्यांनीं त्यांस अध्यक्ष-स्थानापासून पदच्युत केलें, व किती एक वेळां ब्राह्ममंदिरांत मारामारीपर्यंतहि मजल येऊन पोंचली! तेहतीस कोटी देवांवर स्वारी करून त्यांस जे धर्मवीर जिंकणार त्यांच्या गोटांत इतक्यांतच कां फंदफितूर व्हावा! आमच्या इकडेहि वरच्यासारख्या गमती कांहीं कमी आहेत असें नाहीं. दयानंदजींचे शिष्य पासिफिक महासागर ओलांडून मुंबापुरींत येऊन दाखल होतांच त्यांनीं आपल्या पूर्वीच्या अध्यक्षांची काय शोभा केली ती पुष्कळांस माहीत असेलच. त्याचप्रमाणें येथील प्रार्थनामंदिरांताहि एका प्रमुख वीरानें आपली व समाजाची एकदम फारकत करून टाकून आजपर्यंत मीं येथें व इतर ठिकाणीं जें जें पांडित्य केलें तें 'सब झूट' ह्मणून सर्वांस लखलखीत सांगून दिलें ही मौजहि ऐकण्यासारखीच आहे! अशी झूर्या करणारी मंडळी वर्षानुवर्ष तोंडांत बागविलेला दोरा एकदम आयत्या वेळेस निःशंकपणें बाहेर काढूं लागली, ह्मणजे मग देशोन्नति व धर्मोन्नति खाशी होणार!!

होणार तर घिसाडी, सुतार, सोनार, चांभार वगैरे किती धंद्याची मंडळी आपापला असाच हक्क सांगावयास तयार होईल याचा विचार रावबहादुरांनीं केला काय? मोडी लिहितां न आल्यानें जर प्राचीन पंडित कुचकामाचे ठरले तर सामता किंवा आरी धरतां येत नसल्यानें आमचे अर्वाचीन पंडितहि कवडीचा माल ह्मणून ठरणार नाहींत काय? मग अलीकडील एम. ए. च्या पेक्षां पिंज्या चांभाराची योग्यता जास्त ही जबरदस्त कोटी 'लोकहितवादी'च्या गळ्यांत येऊं पहाणारी आहे. ही जर ते मेकॉले साहेबाप्रमाणें मान्य करीत असले,[1] तर मग बरीक आमचें कांहीं बोलणें नाहीं!

"पंडितांस व्यवहारिक ज्ञान नाहीं, व ते कोणतेंहि काम करावयाचे उपयोगी नाहींत."—हाहि पाणिनीच्या व कणादाच्या शिष्यशाखेवर मोठाच कुठारप्रहार आहे. 'लोकहितवादी'च्या आज तीस चाळीस वर्षे प्रणीत केलेल्या तत्त्वज्ञानांतील वरील वचन हें केवळ महाकाव्य होय असें झटलें असतां चालेल. त्यावर अनेक ठिकाणीं त्यांनीं विवरण केलेलें आढळतें. "संस्कृताचा इतकाच उपयोग आहे कीं लोकांमध्यें भ्रांति उत्पन्न व्हावी, व जों जों मनुष्य त्यांत प्रवीण होतो तों तों अज्ञानसमुद्रांत खोलखोल जात असतो;"—"मुळीं एकदां संस्कृताच्या झऱ्याचें पाणी जो प्याला त्याची भ्रांति जावयास नव्वद वर्षे शिकविलें तरी उपयोग नाहीं हें निश्चित आहे"—"संस्कृतांत चांगली विद्या नाहीं व उपयुक्त ज्ञान नाहीं हें सर्व विद्वानांनीं ठरविलें आहे,"—इ० इ० वरील महासिद्धांत पाहून आह्मांस पुढें लेखणी चालविण्याची मोठी दहशत वाटते. कोण जाणे कीं आजपर्यंत अनेक विषयांवर आमचीं मतें जीं रावबहादुरांच्याहून अगदीं विपरीत होऊन बसलीं आहेत, व मोठमोठ्या विद्वानांनीं निर्विवाद ह्मणून मानलेले सिद्धांतहि आह्मांस पुष्कळ जे वादग्रस्त वाटूं लागले आहेत, हा सर्व प्रभाव 'संस्कृताच्या झऱ्याचें पाणी' चाखल्याचा तर नसेल ना! वरील पाण्याचाच जर वेड्याचा असा गुण असला कीं त्याच्या योगानें डोकें आपलें गढूळ होऊन जावेंच, तर आजपर्यंत जें आह्मीं कालिदासादिकांच्या सरस्वतीचें असोशीनें प्राशन केलें, व तोच प्रवाह प्राकृत भाषेच्या रूपानेंहि मयूरप्रभृति मंडळीच्या वाणीच्या द्वारें आह्मीं सेवन केला, तो

---

१. "We shall next be told," exclaims, Seneca, "that the first shoemaker was a philosopher." For our own part, if we are forced to make our choice between the first shoemaker and the auther of the three books on Anger, we pronounce for the shoemaker. It may be worse to be angry than to be wet. But shoes have kept millions from being wet; and we doubt whether Seneca ever kept any body from being angry."

—*Lord Bacon.*

आह्मांस बाधला असेल यांत संशय नाहीं! असें असेल तर आमचे रावबहादुरप्रभृति पंडित मोठे सावध खरे, कीं असल्या दुष्ट उदकाच्या ते वाऱ्यालाहि कधीं उभे न रहातां आजपर्यंत त्याचा अनुभव जो त्यांनीं घेतला तो पंचतंत्रांतील (काय करावें! आह्मांस दाखला सुद्धां संस्कृतांतल्या भ्रांतिमय ग्रंथांखेरीज सुचतच नाहीं!) शहाण्या वानराप्रमाणेंच केवळ घेतला. त्या गुलामानें जसें ब्रह्मराक्षसाच्या तळ्यांतील पाणी झाडावरून नलिकायंत्राचा प्रयोग करून मोठ्या शिताफीनें शोषून घेतलें व आपली तहान भागविली त्याप्रमाणेंच 'लोकहितवादी' जोतीबा वगैरे अर्वाचीन महापंडितांनीं व्यास, कालिदास, पाणिनि इत्यादिकांशीं जातीनें गांठ न घेतां मेकॉले झाले, विल्सन बोवा झाले, अशा अशा महासमर्थ गुरुमुखांपासूनच संस्कृत विद्येची माहिती करून घेतली. तरीच त्यांचें डोकें आमच्याप्रमाणें बिघडून न जातां आजपर्यंत अगदीं साफ राहिलें! असो; आतां होऊन गेलेल्या गोष्टीस काय उपाय आहे? आमच्या वेड्या सरकारनें पाठशाळेंतील 'पुरंदरचें' बंड मोडून त्यासच पुनः युनिवर्सिटींत जो थारा दिला तसें जर केलें नसतें तर वरील खूळ आमच्या डोक्यांत कां शिरतें? तरी एवढी एक गोष्ट बरीच समाधान मानण्यासारखी आहे, कीं आमच्या अलीकडील मंडळीपैकीं पुष्कळांवर जरी वरील दुष्ट संस्कार घडला असेल, तरी आमच्या रावबहादुरांच्या अमदानींतली बहुतेक मंडळी तरी त्यापासून अगदीं अलिप्त राहिली आहे. तेव्हां वरील लहरींत जरी आह्मी किती बहकलों तरी आह्मांस सांवरण्यास, किंबहुना वरील दुर्विकाराचें निरसनहि करण्यास वरील सावध राहिलेली मंडळी चांगली उपयोगीं पडण्यासारखी आहे!

गीर्वाणाच्या अध्ययनानें मनुष्य व्यवहारशून्य व कुचकामाचा कां होऊन जावा याविषयीं आह्मांस तर कांहींच तर्क होत नाहीं. पाणिनीला हातीं घेतला कीं माणसाला खूळ लागतें, आणि दादोबाला घेतला तर लागत नाहीं; भास्कराचार्यानें बीजगणित व रेखागणित शिकविलें कीं विद्यार्थी वेड्याच्या इस्पितळास योग्य होतो, आणि कोलंजो किंवा टॉडहंटर यांचें अंतेवासित्व पतकरलें कीं कांहीं विकार होत नाहीं; 'गदाधरी' झटली कीं बहकला, तेंच मिल्हचें अध्ययन केलें कीं बुद्धि साफ; शंकराचार्यांच्या मुखें-करून वेदान्तश्रवण झालें कीं मनुष्य बिघडला, तीच बर्कलेच्या तोंडानें जगाची मिथ्या-त्वोपपत्ति ऐकली कीं डोकें शाबूत; वाग्भट हातीं घेतला कीं मूर्खत्वाचा छाप बसलाच, इंग्रेजी वैद्यक शिकलें कीं झाला फर्डा शहाणा; शेक्स्पीयरला हातांत वागविणें हा शहा-णपणा, तोच बेटा कालिदास आला कीं तोच वाचक बेवकूब ठरला.—हें काय गौड-बंगाल असेल तें असो! आमच्या रावबहादुरांनीं आपल्या बृहत्संहितेंत 'संस्कृत विद्या,' 'पंडितांची योग्यता', 'पंडितांचें ज्ञान', 'पुराणांतील माहिती' अशा शेंकडों सदराखालीं आपणाकडून शास्त्री, पंडित, पुराणें, सप्तसमुद्र, मेरुपर्वत, सप्तपदार्थ, इत्यादिकांचा पार

धुव्वा उडवून देऊन चोहोंकडे शेणसडा करून दिला आहे. तो इतका कीं, प्राच्य विद्येचे परम शत्रु जे मेकाले साहेब त्यांस जर कोणीं विलायतेंत वरील संहिता नेऊन दाखविली असती तर 'जीतेराव !' 'भलेबहादूर ?' असा आपला पट्टशिष्याविषयीं धन्यवाद त्यांच्या तोंडून निघाला असता ! एथें तरी राव जोती, बाबा पदमजी वगैरे वीर जे अस्तन्या मारून शास्त्र्यांवर व भटांवर तुटून पडले तो प्रभाव आमच्या रावबहादुरांच्याच लेखणीचा असावा असें आह्मांस वाटतें; कां कीं, विद्वानमंडळींत व देशसुधारणा करणाऱ्यांत अग्रगण्य मानलेल्या नवीन पंडितांच्या तोंडून जेव्हां वरील वाग्रत्नें निघत तेव्हां अर्थात्च त्यांचें महत्त्व सर्वांनीं मानणें अवश्य होतें. त्यांतून बिचाऱ्या आरोपीच्या तर्फेनें तर बिलकूल पुरावा घेण्यास मार्ग नव्हता. जुने शास्त्रकार तर मेलेलेच, केवळ कीर्तिरूप देहानेंच त्यांचें आज हजारों वर्षें एथें वास्तव्य झालेलें. त्यांच्या यशाचे रक्षक जे शास्त्री व पंडित ते आपापल्या नित्यव्यवसायांत निमग्न; त्यांच्यापर्यंत आमच्या रावबहादुरांचें अकटोविकट पांडित्य अगोदर जातें आहे कशाला ? त्यांतून गेलेंच, तर नवीन फाकड्या विद्वानापुढें त्यांचें काय चालणार ? बारा वर्षें घोकंपट्टी करून एक नुसतें व्याकरण पैदा करणारी मंदबुद्धि मंडळी कोणीकडे आणि पुरती रूपावळीहि न येतां साही शास्त्रांचा, अठरा पुराणांचा, चार वेदांचा एका सपाट्यासारखा निकाल लावून पार मोकळे होऊन जाणारे पाश्चात्य व प्राच्य पंडित कोणीकडे ! आरोपींच्या तर्फे एकीकडून मात्र भरभक्कम पुरावा मिळण्यासारखा होता खरा, पण तो एथपर्यंत येऊन पोंचतो कसचा ! रेणानदीच्या काठीं, उक्षतरण नगरीं वगैरे आपल्या प्राचीन ऋषींचे अंतेवासी थोडे होते असें नाहीं; त्याप्रमाणेंच विल्सनसाहेब(रेवरेंडबोवा नव्हेत !), कोलब्रूक साहेब, हौ साहेब वगैरेंच्या हातचीं शेकडों सर्टिफिकिटेंहि एथल्या एथें उपयोगीं पडण्यासारखीं होतीं. पण ही कुमक 'पुरंदरच्या बंडा'ला येऊन पोंचावी कशी ? नवीन विद्वान् मंडळींनीं जेव्हां वरील खटपट करावी तेव्हां; पण ती मंडळी तर आपल्या नूतनसंपादित इंग्रेजी विद्येच्या घमेंडींत ! पहिलें बुक झालें, 'सेरीज ऑफ लेसन्स' झालें, किंवा 'कोर्स ऑफ रीडिंग' झालें कीं जो तो आपणास 'न भूतो न भविष्यति' अशा तऱ्हेचा पंडित समजणार. सरासरी स्टेशनमास्तरचें किंवा सिग्नलरचें काम चालविण्यापुरतें बुटणेरी

---

१. मेकॉले, मिशनरी, 'लोकहितवादी' वगैरे मंडळी जशी पाणिनि, कणाद, कालिदास इत्यादिकांचे वैरी होत त्याप्रमाणेंच होमर, प्लेटो, सिसरो वगैरे ग्रंथकारांसहि तीन चार शतकांपूर्वी युरोपांत राहू उत्पन्न झाले होते. त्यांच्या मनांत वरील असद्धर्मी ग्रंथकारांचें प्राबल्य युरोपांत पुनः होऊं नये असें होतें. पण वरील खंडाचें किंबहुना साऱ्या पृथ्वीचें भाग्य सबळ तेव्हां वरील अरसिक शिरोमणींचें कांहीं न चालून ग्रीक व रोमन लोकांचा बुद्धिप्रभाव पुनः सर्व देशांत प्रगट झाला. वरील मंडळींस त्यांचें प्रतिपक्षी उपहासानें 'ट्रोजन' ह्मणत असत! ट्रोजन (ट्राय शहरचे लोक) हे ग्रीक लोकांचे शत्रु होते हें सर्वप्रसिद्धच आहे.

इंग्रेजी कां येईना, तेवढ्याच्याच बळावर तो आपल्या शंभर पूर्वजांस मूर्खांत निवडून काढणार, आपल्या आईबापांस भूगोलावर व इतिहासावर व्याख्यानें देऊन त्याचें अज्ञान त्यांच्या पदरीं घालणार, 'हीं भटें मेलीं पाहिजेत' 'हें पुरंदरचें बंड मोडलें पाहिजे ह्मणजे आह्मीच या पंडितांचा तमाशा पाहूं' या सुधारणेच्या महत्तत्त्वांचा निरंतर जप करणार, मग तो कशाला शास्त्र्यांची व पंडितांची तरफ उचलील? असो; तर अशी आजपर्यंतची स्थिति असल्यामुळें 'लोकहितवादी' प्रभृति मंडळीनें या देशांतील जुन्या विद्येविषयीं काय पाहिजेत ते सिद्धांत करून ठेवले पण हल्लीं जो ज्ञानाचा प्रकाश दिवसेंदिवस चोंहोंकडे फांकत आहे त्यांत ते पुष्कळ फिक्के पडत चालले आहेत हें पाहून आह्मांस फार वाईट वाटतें!

'लोकहितवादीं'नीं आमच्या जुन्या पंडितांस केवळ व्यवहारशून्य ठरवितांना थोडकासा हाहि विचार करून पहावयाचा होता कीं, इंग्रेजी विद्येंत निपुण झाल्यानें तरी कितीसें व्यवहारचातुर्य येत असतें? मोडी लिहिण्याच्या संबंधानें तर बहुधा येथें लिहावयास नकोच; कां कीं विद्यालयीन शस्त्रास्त्रांनीं मंडित होऊन तीन तीन चार चार लढाया मारून आलेल्या माहावीरांची मामलेदार कचेरींत काय फजिती उडते हें आज कोणाला सांगायाला पाहिजे असें नाहीं. जन्मभर गदायुद्धाचा अभ्यास केलेल्या भीमाच्या हातीं जसा विराटाच्या घरीं पळा व झारा आला, किंवा 'किरातरूपी प्रभू'शीं झगडलेल्या भारती महारथ्याच्या हातांत शंखवलयें येऊन पडलीं; त्याप्रमाणेंच मिल्ल, बेकन ग्रोट एके खिशांत व विद्यारण्य, कालिदास मम्मटभट दुसऱ्यामध्यें असे घालून आमचे अर्वाचीन पंडित जेव्हां आपल्या नवीन अधिकारावर रुजू होतात, व विशी पंचविशींच्या अमलांत पुनः पुस्तीवर बसून श्री-श्री-श्री- व ग-ग-ग करण्याचा प्रसंग येतो, तेव्हां बिचारी 'श्री' तर सरस्वतीच्या मत्सरानें निघून गेलीच. पण 'ग'चाहि तिजबरोबरच मधल्यामध्यें परिहार झाला हें मनांत येऊन आमच्या खाशा मंडळीला किती संतोष होत असेल बरें! ही एका मोडी लिहिण्याची गोष्ट झाली. याखेरीज इतर जीं बेंकडों व्यवहाराचीं मोठमोठीं अंगें आहेत त्यांत तरी इंग्रेजी शिकल्यानें मनुष्य पुरा वाकबगार बनतो असा आमचे रावबहादुर अभिप्राय देतील काय? प्रस्तुत ग्रंथकारास सादर करण्यास एक खासें अलीकडचें उदाहरण आमच्यापाशीं आहे. गेल्या दशकांत देशी व्यापाराच्या संबंधानें पुष्कळ भवति न भवति व गडबड होऊन मुंबई व पुणें या दोन ठिकाणीं स्वदेशीय मालाच्या खपास उत्तेजन देण्याकरितां दोन खाशा मंडळ्या स्थापन झाल्या. त्यांनीं दहादहा वीसवीस हजारांचें भांडवल उभारून विलायतेबरोबर टक्कर मारण्यास आरंभ केला. या दोन्ही उद्योगांत जुन्या महामूर्ख मंडळीपैकीं कोणीहि असेलसें वाटत नाहीं; सारी मंडळी केवळ अर्वाचीन संस्काराची,—ह्मणजे साऱ्या जगांत काय उलाढाल चालली

आहे, कोणत्या देशचा काय वृत्तांत, कोणती सामुद्रधुनी कोठें हें ज्यांस बिनचूक माहीत अशा प्रकारची. पण इतका लल्ख भूगोल वागत असतां व साऱ्या जगाचा इतिहास करतलामलकवत् स्पष्ट दिसत असतां वरील व्यवहारनिष्णात मंडळींच्या हातून दोन्ही दुकानांचें काम किती उत्कृष्ट वहिवाटलें गेलें ह्मणाल तर बोलण्याची मुळींच सोय नाहीं! आह्मांस पक्कें माहीत आहे कीं, इतकें भांडवल एखाद्या कुळंब्याभाळ्याच्या स्वाधीन केलें असतें, तर तो सुद्धां पुष्कळपट अधिक किफायत करून दाखविता. पण इतकें तरी दूर कशाला? आमच्या रावबहादुरांच्याच खुद्द आधिपत्याखालीं असणाऱ्या ग्रंथे तेजक मंडळीची तर काय दशा होऊन गेली आहे, हें आज कोणाला नव्यानें सांगायाला पाहिजे असें नाहीं. तेव्हां एकंदरींत पहातां हाहि व्यवहारशून्यत्वाचा कोटिक्रम मागच्याप्रमाणेंच ढांसळणारा आहे हें उघड आहे.

६. आतां यांखेरीज इतर जे अनेक आक्षेप प्रस्तुत ग्रंथकारानें अद्वातद्वा रीतीनें जुन्या पंडितांवर ठेवून दिले आहेत त्यांविषयीं वरच्याप्रमाणें सविस्तर लिहूं गेलें असतां फारच पाल्हाळ होणार आहे, यास्तव त्यांच्या संबंधानें येथें कांहीं लिहीत नाहीं. शास्त्री हांजी हांजी करणारे असतात; ते धर्मसंरक्षक नसून उलटे अधर्मवृद्धि करणारे आहेत, ते अन्नछत्रांत शूद्रांस जेवूं देत नाहींत, त्यांनीं बाजीरावाला हरबऱ्याच्या झाडावर चढवावें, व तसें केल्यानें 'शेवटीं दोघेहि भीक मागत गेले' वगैरे असंबद्ध प्रलाप प्रस्तुत निबंधांत पुष्कळच आहेत. त्यांचा प्रकृत विषयाशीं फारच थोडा संबंध असून शिवाय त्यांत यथार्थत्वहि तितपतच आहे. आमच्या रावबहादुरांचें ज्ञाननेत्र जर विकाररहित असतें तर त्यांस फार निराळ्या तऱ्हेचीं दर्शनें झालीं असतीं. असो; आतां सांप्रत लेखांतील एका वाक्यावर मात्र कांहीं विचार प्रगट करून हें प्रकरण आटपतों.

वरील वाक्य हें होय—"लोकांस शास्त्रीपंडितांखेरीज जेव्हां दुसरे कोणी पुढारी मिळतील, तेव्हां या लोकांमध्यें व्यवस्था चांगली होईल." या वाक्याचा रोंख काय आहे हें बहुधा कोणासहि सांगावयास नको. जुनी मंडळी पार नाहींशी होऊन जाऊन आपण जेव्हां पुढें सरसावूं तेव्हां साऱ्या देशभर सुधारणाच सुधारणा करून सोडूं अशी 'लोकहितवादीं'स मोठी उमेद वाटत होती, हें वरील उल्लेखावरून स्पष्ट दिसतें. अशी उमेद बाळगणें हें कांहीं गैर नव्हे; उलटें तें भूषणास्पदच होय. पण खेद करण्यासारखी गोष्ट एवढीच कीं, गेल्या वीस तीस वर्षांत रावबहादुरप्रभृति मंडळींनीं ज्या कित्येक उलाढाली केल्या त्यांपासून 'चांगली व्यवस्था' होणें तर दूरच राहिलें, पण अधिक बखेडा मात्र झाला. पूर्वीचे शेंकडों मतभेद होते ते मोडण्याच्या उद्देशानें त्यांनीं नवे मात्र उत्पन्न केले; पूर्वीच्या अधर्मप्रवृत्ति नाहींशा करण्याच्या मिषानें अपायकारक नवीन प्रवृत्ति मात्र पाडल्या; संस्कृत भाषा नाहींशी करून प्राकृत होती ती मात्र धड राहूं दिली नाहीं; विधवांच्या साह्यार्थ कंबर बांधून त्यांस सधवा तर केल्या पण 'इदं

च नास्ति परं च न लभ्यते' अशा कचाट्यांत मात्र त्यांस नेऊन घातलें; स्वदेशीय व्यापार तर सुधारला नाहीं, पण रिकामी हाकाटी केल्याच्या योगानें विलायती व्यापाऱ्यांचे बंध मात्र मोकळे केले; लोकांची सत्ता तर कांहीं वाढली नाहीं, पण एतद्देशीय संस्थानें मात्र सरकारच्या घशाखालीं उतरविलीं; असा एकंदरींत पहातां 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' एवढा मात्र देशास लाभ झाला. इंग्रेज सरकारची निरंतर तुतारी वाजतां वाजतां आजला अशी स्थिति येऊन पोंचली आहे कीं, हा हिंदुस्थान आह्मांला नको, याच्या पायीं आह्मांला भुर्दंड मात्र भरावा लागतो व वारंवार संकटें प्राप्त होतात, असें आमचे राज्यकर्तेच ह्मणायाला लागले आहेत! तुह्मी मूर्ख, तुह्मी पांजी, अशी आज तीस वर्षें सतत पुष्पवृष्टि करून लोकांचा तेजोभंग केल्यानें ते असे निःसत्व होऊन गेले आहेत कीं, आमच्या हातून कांहीं होणें नाहीं, आह्मी जन्माचे रडेच, या कल्पना त्यांनीं उराशीं बाळगल्या आहेत; सरकारच मेहेरबानी करून जर आमचें कांहीं बरें करील तर होईल, एरव्हीं आह्मीं लयाच्या पंथाला लागलोंच आहों, हें महत्तत्त्व सर्वांनीं गृहीत केल्यासारखें दिसत आहे. नाहीं ह्मणायाला यथेच्छ मुखपांडित्य तेवढें करावें पण क्रियाद्वारा त्यापैकीं एकहि गोष्ट घडली नाहीं तरी चिंता नाहीं एवढा मात्र उपदेश 'लोकहितवादी' प्रभृतींच्या आचरणावरून पुष्कळांनीं उचललेला दिसतो. आपल्या महामूर्ख पूर्वजांनीं अटकेची अटक इतके दिवस घालून ठेविली, नाहीं तर आह्मी केव्हांच सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलों असतों हाहि विचार आमच्या रावबहादुरांच्या मनांत वर्षानवर्षें घोळत होता; शेवटीं सुमारें बारा वर्षांपूर्वी त्यांनीं आपल्या एका राजविद्याभूषित चिरंजीवांकडून समुद्रयान करवून हजारों रुपये वरील महायात्रेच्या निमित्त उधळले. पण त्या सर्वांचा बिचाऱ्यांचा विनियोग काय काय झाला असेल याची कल्पना आमचे वाचक सहज करतीलच. आमच्या रावबहादुरांनीं आपल्याकडून हिंदुधर्मसंरक्षणार्थ वरचेवर पापडांची पार्सलें श्वेतद्वीपास रवाना केलीं खरीं; पण पापडांचा कोट ऐन विलायती सुधारणेच्या तडाक्यासमोर कितीसा टिकणार! वरील महाप्रस्थानसमयीं पत्रोपत्रीं केवढा जयघोष झाला व देशसुधारणेच्या संबंधानें केवढाले मंगलाशीर्वाद झाले आणि त्यांतून 'लोकहितवादी'स तर केवढी धन्यता वाटली, हें त्या वेळचीं वर्तमानपत्रें काढलीं असतां समजणार आहे. पण याहि प्रचंड उद्योगास शेवटीं काय फळ आलें तें सर्वांस महशूर आहेच. खुद्द 'लोकहितवादी'च आतां व्याख्यानांत सांगूं लागले आहेत कीं, इकडील तरुण मंडळी तिकडे पाठविण्यांत कांहीं हशील नाहीं! तेव्हां एकंदरींत पहातां जुन्या महामूर्ख शास्त्र्यांचें धुरंधरत्व नाहींसें होऊन तें नव्या महाविद्वान् इंग्रेजी पंडितांकडे आलें असतांहि तीस चाळीस वर्षांच्या कारभारांत एकंदर काय झालें तर आमचे शूद्र कवि ह्मणतात—

बोलणें फोल झालें। डोलणें वायां गेलें॥

प्रातः क्षालितलोचनाः करतले चंचत्पवित्रांकुरा-
स्तत्तत्स्थाननिवेशितोर्ध्वतिलकाश्चैलांतबद्धाक्षताः ।
को जातश्च मृतोऽथवा मृततिथिः कस्यालये वर्तते
चेत्थं हर्षशतैर्युताः प्रतिदिनं धावंत्यहो भिक्षुकाः ॥[1]

अंक ७३—(१) विषयोपक्षेप. (२) हिंदुधर्म. (३) निबंधसंग्रहां'तील उतारा. (४) भटांच्या अर्थशून्य अध्ययनाच्या संबंधानें विचार.

१. येथपर्यंत ब्राह्मणांच्या संबंधानें दोन प्रकरणांविषयीं विवेचन झालें; एक, ते मुत्सद्दी या संबंधानें. व दुसरें, ते पंडित या संबंधानें आतां तिसऱ्या प्रकरणास लागूं. हें तिसरें प्रकरण ब्राह्मणांचें धर्माधिक्कृतत्व हें होय. तर या संबंधानें प्रस्तुत ग्रंथकारानें जीं मतें प्रगट केलीं आहेत त्यांत कितीशी यथार्थता आहे याविषयीं आतां विचार करावयाचा.

२. हिंदुधर्म हा जगांतील सर्व धर्मांहून प्राचीन होय असें ह्मटलें असतां चालेल; निदान याच्याहून प्राचीन असा तरी कोणताहि धर्म नाहीं हें खास आहे. या धर्माचा सर्व अधिकार पहिल्यापासून ब्राह्मणांकडे चालत आला आहे. सर्व देशांत धर्माचे रक्षक ह्मणून जसे कोणी नियुक्त असतात त्याप्रमाणेंच या देशांतील सर्व धर्माधिकार वरील प्रमुख ज्ञातीकडेच अगदीं पूर्वापार चालत आले आहेत. सर्व राज्याधिकार जसा क्षत्रियांकडे, सारें वाणिज्य जसें वैश्यांकडे, त्याप्रमाणेंच धर्मप्रकरण ह्मणून जेवढें तेवढें सर्व पहिल्यापासून ब्राह्मणांच्याकडे सोंपवून दिलेलें आढळतें. अंत कालगत्या या मूळच्या स्थितींत पुष्कळच फेरफार होऊन गेले आहेत हें खरें आहे; वेदांच्या काळीं काय स्थिति असेल ती पुराणांत आढळत नाहीं, व पुराणांतून आढळते तिला व आजच्या स्थितीलाहि पुष्कळ ठिकाणीं जमीन अस्मानची तफावत ! तथापि ब्राह्मणांचें प्रमुखत्व व पूज्यत्व हें अजून चाललें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

हें ब्राह्मणांचें वर्चस्व फार प्राचीन काळापासून जगाच्या सामान्य प्रवृत्तिप्रमाणें सर्वांस मोठें दुःसह होऊन राहिलेलें आहे. विश्वामित्राची वसिष्ठाशीं सदोदित स्पर्धा असे, नाहीं नाहीं ते कष्ट करून त्यानें ब्राह्मणत्व संपादन केलें, व आपल्या सत्त्वशील प्रतिस्पर्ध्याचा त्यानें नाहीं नाहीं तो छल केला; परशुरामाचें तर अवघ्या क्षत्रियकुलाशीं दारुण वैर पेटून राहिलेलें होतें, व त्या वैराग्नीचा उपशम फार भयंकर रीतीनें झाला;

---

१. "सकाळच्या पहरीं धोंडभट्टी करून पवित्र पळस हातांत घेतलेले, व वस्त्राच्या एका गांठीला तेंळि बांधून दुसरींत अक्षता घेतलेले, असे भिक्षुक आज कोण जन्मला, कोण मेला, कोणाच्या घरीं आज श्राद्ध आहे, वगैरे विचक्षणा करीत दररोज मोठ्या गर्दानें इकडून तिकडे धांवत असतात !"

बुद्ध तरी जात्या क्षत्रियच, तेव्हां त्याच्या मतांचा प्रथमतः जो प्रसार झाला असेल तो प्रायः ब्राह्मणेतर मंडळींतच झाला असेल; पुढें जेव्हां त्याचा पंथ बळावत चालला तेव्हां बौद्धांची व ब्राह्मणांची कित्येक शतकें झटापट चालली होती; शेवटीं श्रीमच्छंकराचार्यांनीं वाग्युद्धांत आपल्या प्रतिपक्ष्यांचा पराभव करून सारें भरतखंड निर्बौद्ध करून टाकून पुनः वेदमार्ग स्थापित केला.[1] ही येथवर प्राचीन काळची हकीकत झाली. यापुढें तर फारच चमत्कारिक स्थिति झाली. ब्राह्मणांचे बौद्धांशीं व जैनांशीं जों वाद संपताहेत न संपताहेत, तों द्वीपांतरींचे निराळेच वादी त्यांशीं वाक्कलह करण्यास उभे ठाकले 'ला इला इलील्ला महमद रसूलिल्ला' (ईश्वर एकच आहे आणि त्याचा प्रेषित महंमद आहे) या महामंत्राची जपमाळ घेतलेले व 'अल्लाहो अकबर' (परमेश्वरकी जय !) असा जयघोष करीत ज्यांनीं थोड्याच कालांत अनेक देश व्यापून टाकले असे अरबी वीर वायव्य दिशेकडून वावटळीप्रमाणें या देशांत घुसले. यांची व आमची भवति न भवति होऊन तोडजोड जों पडते न पडते,[2] तों त्यांच्याहि पलीकडच्या मंडळीच्या या देशावर धाडीवर धाडी येऊन पडल्या. त्यांत पहिल्या प्रथम जो येशूचा कळप आला त्यानें तर काय चोंहोंकडे धुमाळीच उडवून दिली; ब्राह्मणांच्या महाबीरांचें जें समुद्रार्जित क्षेत्र तें त्यांनीं 'फिरंगाण' करून सोडलें ! शेवटीं वरीलच पण सुधारलेल्या धर्माची जी संभावित मंडळी पुढें आली तिनें सेंट झेवियरच्या[3] शिष्यमंडळीप्रमाणें एतद्देशीय

---

१. बाणभट्टावरील निबंध पृष्ठें ६–७ पहा.

२. हिंदुधर्म व मुसलमानी धर्म यांचा अनेक रीतींनीं मिलाफ होत चालला ही गोष्ट मोठी ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. हिंदु मुसलमानांत अर्धेमुर्धे शिरून शीक बनले; मुसलमान हिंदूंत शिरून कबीरपंथी व शेखमहंमदी बनले. आमचें योगशास्त्र मुसलमानांत शिरून सुफी नांवाचे त्यांच्यांत अवलिया बनले. त्यांचें रमल आमच्या शकुनशास्त्रांत सामील होऊन बसलें. शेकडों हिंदु देवस्थानांचे मुसलमानांकडून खर्च चालले आहेत, व त्याप्रमाणेंच शेकडों तक्कयांचा इतमाम हिंदु राजेरजवाड्यांकडून चालला आहे. ख्रिस्ती धर्माची वरच्याप्रमाणें आमच्याशीं अद्याप लगट जमली नाहीं. ब्रह्मसमाज, आर्यसमाज, सत्यशोधकसमाज, यांचा वरील ईश्वरप्रोक्त धर्माशीं बराच बिंबप्रतिबिंबभाव आढळतो खरा; तरी वरील रोपडें हें या आर्यभूमींत अजून मुळींच रुजलें नसल्यामुळें त्यांचा एतद्देशीय धर्मांत अंतर्भाव करतां येत नाहीं.

३. सेंट झेवियर नामेंकरून एक मोठा विख्यात क्याथलिक मिशनरी सोळाव्या शतकांत हिंदुस्थानांत आला होता. त्यानें पोर्च्युगीज लोकांच्या मुलखांत कित्येक वर्षें उपदेशकाचें काम केलें, व हजारों लोकांस बापतिस्मा देऊन भावी नरकयातनेंतून मुक्त केलें. वरील शतकांत फिरंगी लोकांनीं कोंकणपट्टींत काय कहर उसडून दिला तो सर्वांस विदित आहेच. वरील ख्रिस्ती साधूचें प्रेत गोवें मुक्कामीं पुरलेलें आहे; व दर बीस वर्षांनीं तें भाविक क्याथलिक मंडळीच्या दर्शनार्थ बाहेर काढीत असतात. तीन चार वर्षांपूर्वी नुकता वरील दर्शनविधि होऊन गेला हें पुष्कळांस आठवत असेलच.

अधर्मी लोकांस पावांनीं पावन करण्याची दीक्षा तर उचलली नाहीं, पण त्यांच्या तरणोपायाकरितां निराळ्या तजविजी काढल्या. प्रत्यक्ष दंडाचाच अवलंब न करतां त्यांचीं गरीब भावंडें जीं साम, दान, व भेद त्यांचा त्यांनीं आश्रय केला. हा प्रकार अद्याप चालूच आहे.

याप्रमाणें ब्राह्मणांचें वर्चस्व सहन न होऊन त्यांस विरोध करणारी प्रतिपक्षी मंडळी आजपर्यंत इतकी निर्माण झाली. इतक्यांसहि दाद न देतां आजपर्यंत ब्राह्मण हे या देशांत प्रमुखवे प्रमुख राहिलेच आहेत. स्वदेशीय व परदेशीय शत्रूंवर अद्याप त्यांचीच छाप पडून राहिलेली आहे. एवढा बुद्धाचा धर्म कीं अवघ्या मानव जातीच्या एका अर्धावर ज्याचा आज अंमल आहे, तो या भरतखंडावर प्रथम पसर पसर पसरला, पण शेवटीं नद्यांच्या वर्षाकालीन पुराप्रमाणें पार सारा ओसरून गेला. एवढा आरबस्थानच्या पैगंबर साहेबांचा धर्म, कीं ज्यानें एका अर्ध्या शतकांत एकीकडे फ्रान्स व स्पेन आणि दुसरीकडे इराण व हिंदुस्थान पाहिलें, पण या देशांत कित्येक शतकें बादशाही अंमलानें चालूनहि त्याच्यापासून हिंदुधर्मास पाहिलें तर काडीइतकाहि धक्का पोंचला नाहीं; अवरंगजेबासारखे, टिप्पूसारखे एक एक मी मी ह्मणणारे करडे इमाम होऊन गेले, पण त्या सर्वांचें बारसें व बारावा हीं दोन्ही वैदिक धर्माच्या लोकांनीं पाहिलीं ! पिता, पुत्र, व पवित्र आत्मा या त्रिकूटानेंहि आजपर्यंत येथें जंग जंग पछाडले, पण कांहींएक झालें नाहीं; व इतःपर तर पाद्रीसाहेबांचा उद्योग दिवसेंदिवस अरण्यरुदितवतच होऊं पहात आहे. खुद्द खासा स्वारी किंवा त्यांचे कोणी हस्तक येशूच्या मेंढवाड्यांत शिरण्याविषयीं लोंकांची मनोदेवता प्रसन्न करण्यास एखाद्या चवाट्यावर उभे राहिले असतां गोमयस्नानेंकरून शुद्ध झाल्याविना बाहेर पडले तर भाग्याचे अशी आजच स्थिति दृष्टीस पडत आहे.

३. तर ज्या कोटावर आमच्या रावबहादुरांनीं आपल्या 'शतपत्रां'चा भडिमार चालू केला तो अशा तऱ्हेचा भक्कम आहे. आतां 'लोकहितवादीं'च्या सरबत्तीचा थोडासा मासला वाचकांनीं पहावा—

"नंबर ६१."

भटांनीं लावून दिलेलें वेड.

"विनंती विशेष. हिंदु लोक हल्लीं आहेत त्यापेक्षां चांगले होण्यास त्यांनीं बहुतेक आपलीं मूर्ख मतें सोडलीं पाहिजेत. प्रथम हीं मूर्ख मतें उत्पन्न कशीं झालीं ह्मणाल तर त्याचें कारण लिहितों. प्राचीनकाळीं हिंदु लोकांनीं विद्या बहुत केल्या. पुढें असें झालें कीं ब्राह्मण लोकांनीं नवीन विद्या अधिक अधिक शोधावयाच्या सोडून ते काव्यें करूं लागले, आणि वेद पाठ करूं लागले. अर्थ सोडून दिला आणि धर्मशास्त्रांत असें आहे कीं, आपला कुलाचार रक्षावा त्याप्रमाणें जें मागें बापानें केलें तेंच मुलानें

करावें अशी समजूत पडली. आणि जों जों हे मूर्ख होत चालले तों तों मागले लोक त्यांस देवासारखे दिसूं लागले. निरक्षर भट ह्मणूं लागले कीं व्यास अवतारी होता. व ज्यांनीं गणिताचे ग्रंथ केले ते देव होते असें ह्मणून मागले ग्रंथ मात्र वाचावे, पुढें कांहीं करूं नये, असें झालें. तेव्हां अज्ञान फार वाढलें. व त्यास साधन मुख्य पुराणें आणि महात्में लिहावयाचीं हाच कांहीं दिवसपर्यंत पंडितांचा रोजगार होता. तेव्हां त्यांनीं मनास येईल तें लिहिलें. कोणीं कावेरीमहात्म, कोणीं करवीरमहात्म, कोणीं शालिवाहनचरित्रें, कोणीं नाशिकमहात्म, कोणीं अग्निपुराण, कोणीं गणपतिपुराण अशीं लिहिलीं. प्रत्येकांत त्यांचा हेतु इतकाच होता कीं एकाद्या देवाचें किंवा एकाद्या नदीचें वर्णन करून ईश्वर त्यांत आणून ठेवून ब्राह्मणांस पैसा मिळण्याचा तजवीज पाहावी. तशींच व्रत महात्में, कोणी ह्मणाला सोमवारीं उपवास करावा. कोणी ह्मणाला मंगळवारीं. कोणीं शनवारीं दरएकाची कथा व त्याची देवता आणि त्याचप्रमाणें अमक्यानें केलें, आणि त्याचें अमुक कार्य झालें, व तसें जो करील त्याचें तसेंच होईल ह्मणून लिहिलें. पण हें सर्व कवीचें लाघव, आणि ब्राह्मणांचें कार्य करावयाची तजवीज आहे असें उघड दिसतें व याचा खोटेपणा उघड दिसतो. व वर्षांत तीनशेंसाठ दिवस व त्यांहून अधिक व्रतें आहेत. तसेंच दरएक पुराणांत दरएक देवाचें वर्णन, त्याचें नांव, अमके दैत्य त्यानें मारले, तो ईश्वर, त्यास भजावें, इतरांस भजलें तर नरकाचें साधन, याप्रमाणें लागलाच शेरा, असें दरएकांत आहे. दरएकांत सृष्टीची उत्पत्ति, देवाचें चरित्र व भविष्यें याप्रमाणें सर्व तयारी केली आहे. तेव्हां कोणते देवास भजावें, कोणतीं व्रतें करावीं, किंवा तीनशेंसाठहि दिवस व्रतें करावीं ? धर्मशास्त्र पाहिलें तर तो पर्याय कांहीं वेगळाच आहे. वेद पाहिले तर त्यांत कांहीं वेगळेंच आहे. वेदांत अवतार आणि नानाप्रकारच्या देवता आणि व्रतें हें कांहीं नाहीं. फक्त होमाशीं कारण आहे. याचा मेध, त्याचा मेध हें सर्व त्यांत आहे. तेव्हां वेदशास्त्र व पुराणें यांचा धर्म पाहिला तर अगदीं वेगवेगळा दिसतो. पुराणांत नित्यकर्म पाहिलें तर सगळा एक दिवस करावयास पुरणार नाहीं इतके धर्म त्यांत आहेत. पण त्यांत कांहीं नीति आहे असेंहि नाहीं. कासोटा असा घालावा, गंध असें लावावें, शौच्यास अमुक कोस जावें, तोंड असें धुवावें, हेंच फार आहे. याप्रमाणें नेम करणारांस काय वाटलें असेल तें त्यांचें त्यांसच ठाऊक ! बरें असो. याचा आजपर्यंत कोणीच विचार केला नाहीं. आलीकडे भट वगैरे झाले यांनीं कांहीं ग्रंथ केले आहेत. पण ते त्यांहून अधिक. गोपिनाथ भटजींनीं अमुक भट्टी केली, गणेश भटांनीं अमुक भट्टी केली, अशा शेंकडो भट्ट्या केल्या आहेत; परंतु त्यांत आहे काय ? संस्कृताचा अर्थ फार लोकांस कळत नाहीं. परंतु जर त्याचा अर्थ कळावया जोगा असता तर मला वाटतें कीं लोक मागेंच ते ग्रंथ समुद्रांत नेऊन टाकते. परंतु ते भ्रमांत आहेत.

बरें, भरली मूठ सव्वा लक्षाची आहे तेंच बरें. श्राद्ध करावयाची कल्पना लिहावयास पन्नास पत्रें लागलीं आहेत. तसेंच हरएक संस्काराच्या रीति फार मूर्खपणाच्या आहेत. लग्नाच्या, उष्टवणाच्या, देवपूजेच्या पद्धती, आणि कोणतें कर्म असें नाहीं कीं त्या-विषयीं ग्रंथ नाहीं. शौच्यविधीवर देखील एक ग्रंथ आहे. त्यांत मनुष्यानें शौच्य कसा करावा हेंच लिहिलें आहे. वास्तविक पहा बरें याचा कांहीं तरी उपयोग आहे काय ? कशाला भट या संस्काराच्या कंठाळभर पोथ्या बाळगतात ! यांत काय आहे ? याचा काय उपयोग ? लोकांचें सुख व ज्ञान वाढावयाची त्यांत एक देखील गोष्ट नाहीं, मूर्खपणा वाढावयाच्या गोष्टी आहेत. त्या ग्रंथांनीं वेड लावलें एवढें मात्र झालें. अज्ञानास अजरामर करण्याकरितां या पोथ्या लिहिल्या आहेत असें मला वाटतें, व त्यांची फजिती होऊं नये ह्मणून त्या गुप्त ठेवितात. कोणी सोडूं नये, व कोणी भल-त्यानेंच वाचूं नये ह्मणतात यावें कारण हेंच. जर त्यांत खरें ज्ञान असतें तर कोणीहि वाचलें तर चिंता काय ? ग्रंथ लिहिणारांची खात्री होती कीं, हें गुप्त ठेविलें तर याचें महात्म्य राहील. हे भूसाचे लाडू आहेत हें त्यांस माहीत होतें. याप्रमाणें हे भट वेडे झाले आहेत. मनुष्य कांहीं उद्योग करील तर त्यास या भटांचे संगतीनें वेळ सांपडा-वयाचा नाहीं. हल्लीं कर्नाटकांतील एक सरदार याजकडे पाहिलें ह्मणजे समजतें कीं त्याचा वेळ हातपाय धुण्यांत जातो. दिवसांतून दोनशें वेळ पाय धुतो. पांचशें वेळ चूळ भरतो. यास हें काय वेड ? तसेंच बाजिरावाकडे पहा. हा पुरुष मराठ्याचे राज्यास बुडविण्यास कारण झाला. असें कां झालें याविषयीं विचार केला तर इतकेंच दिसतें कीं त्यास जन्मापासून नानाफडणिसानें कोपरगांवीं भटांचे शाळेंत ठेविला होता, ह्मणून मोठेपणीं केवळ भटच निपजला. याचे राजकीय गुणांचे अंकूर जळून गेले. याप्रमाणें पूर्वीचे पेशवे भटांचे शाळेंत नव्हते. कोणी असें ह्मणतात कीं, राज्यास अयोग्य व्हावा ह्मणून नानाफडणीसानें त्यास बुध्या भट केला. परंतु तोच राज्यावर आला हेंच देशाचें प्रारब्ध. अस्तु. त्यास वेड लागलें. त्यानें राज्य केव्हां करावें, कारभार केव्हां करावा, आणि हें नित्य कर्म केव्हां करावें हें जाणलें नाहीं, आणि या कर्माचा फायदा काय ? जोंपर्यंत निर्मळ वाटे तोंपर्यंत कोणीहि हात धुतोच आहे. त्यास अमुक वेळ हात धू ह्मणून सांगायास कशास पाहिजे ? परंतु इतक्या मूर्खपणाच्या गोष्टीस ब्राह्मण मात्र मान देतात. आणि कोणी उपास, कोणी जप, कोणी अनुष्ठान असे सगळा दिवसभर करितात. ज्याजवळ पैसा आहे त्यास भट घेरतात आणि हा उपदेश करतात. आणि पुराणिक बावास घेरतात व वेड लावतात कोणी सांगतो आवळीचे झाडाखालीं जावें, पूजा करावी. कापसाच्या वाती जाळाव्या. त्याप्रमाणें अज्ञान बायका करितात. हें वेड त्यांस भट लावतात. हें सर्व त्यांनीं सोडून दिल्याखेरीज यांची बरी गत मला दिसत नाहीं. मग ईश्वराची इच्छा. हे विनंती. "लो० हि०"

वरील लेख हा केवळ मासल्याकरतां दाखल केला आहे. त्यांत 'लोकहितवादीं' चे भटांविरुद्ध जे जे आक्षेप आहेत ते सर्व आले आहेत असें नाहीं. इतर पत्रांतून 'मूर्ख', 'टोणपे', 'पशु', 'भडवे', वगैरे अतिशय नाजूक शब्दांची जी पुष्पवृष्टि रावबहादुरांनीं ठिकाणोठिकाणीं केलेली आढळते तिची झांक सदरील पत्रांत झणण्यासारखी नाहीं. असो; तर या भटविषयक लेखाचा वाक्यशः किंवा शब्दशः विचार न करतां एकंदर 'शतपत्रांत'त त्यांच्या ज्या अनेक कोट्या आढळतात त्या कितपत युक्तीस धरून आहेत हें पाहूं झणजे झालें.

४. भट 'टोणपे' होत हा आरोप त्यांच्यावर शाबीत करण्याचें पहिलें एक मोठें कारण हें होय कीं, ते अर्थावांचून ग्रंथांचें पठन करितात. हा जबरदस्त चार्ज बिचाऱ्या भटांवर आज इकडे इंग्रेजी सुरु झाल्यापासून जो तो फाकडा विद्वान् बेलाशक झोकून देत आहे. "काय हो, हे बेटे बैल, एका अक्षराचाहि अर्थ समजून घेण्याची खटपट न करतां जन्मभर घोकंपट्टी करीत बसतात; बारा बारा वर्षें चोवीस चोवीस वर्षें दररोज उठून काय केलें, तर भाराभर ग्रंथ येथून तेथून घोकून त्यांचा पिट्टा पाडला, एवढीच काय ती त्यांची फुशारकी! आणि आमचे लोक तरी कसले महामूर्ख, कीं या आळशी पोपटपंची करणाऱ्या भटांस उपाशी मारायाचें टाकून त्यांच्या सभा करतात, त्यांस दक्षिणा देतात, त्यांचे आशीर्वाद घेतात;–तेव्हां एकंदरींत आमच्या लोकांच्या बेवकुबीची कांहीं शिकस्त आहे!" याप्रमाणें आजपर्यंत लक्ष वेळां आमच्या देशांतील नव्या इंग्रेजी पंडितांचे उद्गार बाहेर पडले असतील! आमच्या 'लोकहितवादीं'नींच वरील कोटिक्रम लेखद्वारा व भाषणद्वारा आजपर्यंत कितीदां लढवला असेल कोण जाणे? आतां हा कितपत सयुक्तिक आहे याविषयीं जर कोणी अंमळ विचार करील, तर तो किती शुष्क आहे, व बिचारे भट प्रस्तुत प्रकरणीं किती निरपराध आहेत हें कोणाच्याहि लक्षांत येईल. आमच्या देशांतील भट आज पिढ्यानपिढ्या जे वेदाची घोकणी करीत आले आहेत हा त्यांचाच अपराध काय? उद्यां जर आमच्या सरकारची व रशियाच्या बादशहाची चकमक उडून दुसऱ्या पक्षाचा जय झाला, आणि रशियन लोकांची सत्ता येथें सर्वत्र स्थापित होऊन घरीं दारीं रशियन भाषा चालू झाली, तर आजपर्यंत आंग्लभौम भाषेंत पारंगत झालेल्या आमच्या अर्वाचीन महापंडितांची काय दुर्दशा घडेल बरें! मग अशा वेळीं जर झारसाहेबांनीं चोहोंकडे दवंडी पिटली, कीं ज्याला आमची भाषा अवगत असेल त्यालाच आम्ही चाकरीस ठेवूं. इंग्रेजीची घोकंपट्टी करून तींत ज्यांनीं आपल्या आयुष्याचा अपव्यय केला त्यांस आम्ही आपल्या दाराशीं उभें सुद्धां राहूं देणार नाहीं, ते उपाशी मेले तरी बेहेत्तर आहे,—तर आमचे 'लोकहितवादी' प्रभृति इंग्रेजी विद्वान् किती हाकाटी करतील बरें! मग हीच गोष्ट जुनीं बिचारीं जीं 'भटें' त्यांसहि बरोबर लागू पडत नाहीं काय? हल्लीं जसा इंग्रेजी भाषेच्या

ज्ञानानें चोहोंकडे निर्वाह होण्याचें साधन झालें आहे, तसाच प्रकार पेशवाईंत वेदविद्येचा नव्हता काय? मग आमचे रावबहादुर इंग्रेजी झाल्यावर जन्मले, व रामभट बिन शामभट हा इंग्रेजीच्या पूर्वी जन्मला, एवढ्याचवरून एक शहाणे व दुसरा टोणपा हा निर्णय करणें म्हणजे केवढा शहाणपणा आहे बरें!

भट हे वेदांचा अर्थ समजून घेण्याची खटपट करीत नाहींत, व वरील गोष्ट त्यांच्या कधीं स्वप्नींहि येत नाहीं, याबद्दल त्यांस दोष ठेवणें हें तरी किती वेडेपणाचें काम आहे? वेदांचें पठण मुळीं लोककशाकरितां करतात याचा आमचे अर्वाचीन पंडित अगोदर विचार करतात काय? आमचे एतद्देशीय भट ज्या हेतूनें संहिता हातीं धरतात, व रेणातीस्थ भट्ट ज्या उद्देशानें ऋग्वेदाचें अध्ययन करतात, ते परस्पर अगदीं भिन्न होत हें कोणींहि अंमळ विचार केला असतां त्यास सहज कळून येण्यासारखें आहे. येथें रामभटजी आपल्या बट्ट्या शेंडीला हिसके मार मारून 'शिरिखा पुरुखा' म्हणून जे दररोज आटाट करीत असतात ते भट्टमोक्षमूलरच्यापुढें चरचरीत परीक्षा देऊन पी. एच्. डी. हें वर्णत्रय त्यांस पटकावतां यावें म्हणून नव्हे. त्यांचा उद्देश वरच्याहून अगदींच भिन्न असतो. तो अर्थात् हाच कीं, वेदाध्ययन हा ब्राह्मणांचा मुख्य धर्म आहे, छंदोमयी सरस्वतीचा पवित्र संस्कार द्विजांच्या जिव्हेस घडणें अवश्य होय, संहितेचें पठन केलें असतां त्यांत आपणास निःश्रेयसप्राप्ति असून आपल्या पूर्वजांच्या उद्धाराचाहि तोच मार्ग आहे, वृत्रासुराचा बाप एक स्वर चुकला तों त्यासरसें भलतेंचें भलतेंच होऊन गेलें,[1] इत्यादि कल्पना या देशांत आज हजारों वर्षें लोकांच्या मनांत ज्या दृढतर होऊन बसलेल्या आहेत त्यांचें वरील अध्ययन हें फळ होय. मग असें जर आहे, तर वैदिकांस तुह्मी अर्थज्ञान कां करून घेत नाहीं हें म्हणणें म्हणजे याज्ञिकांस तुह्मी शारीरिक शास्त्राचा अभ्यास कां करीत नाहीं, किंवा यात्रेकरूंस तुह्मी भूगोलविद्या कां पढत नाहीं हें म्हणण्यासारखेंच केवळ अप्रयोजक होय हें उघड आहे. यज्ञाचा उद्देश जसा शारीरिक शिकविणें हा नाहीं, व यात्रांचा उद्देश नद्यांचे उगम धुंडणें किंवा पर्वतांच्या उंच्या काढणें हा नाहीं, त्याप्रमाणें आज हजारों वर्षें वेदपठनाची जी प्रवृत्ति पडली आहे तिचें तात्पर्य अर्थज्ञान हें नसून वेदराशींचें रक्षण हेंच मुख्यतः होय.

---

१. वेदांत वृत्रासुराचें व इंद्राचें युद्ध वर्णिलेलें आहे. वृत्र हा रावणाप्रमाणें ऋषिपुत्र होता. याच्या बापाची अशी कथा आहे कीं, त्यानें पुत्रेष्टि करून मला इंद्रशत्रु असा त्रहावा म्हणून देवांपाशीं प्रार्थना केली, व त्याप्रमाणें त्याची मनःकामना सिद्ध झाली. पण दुर्भाग्यवशात् झालें काय, कीं वरील प्रार्थनेंत त्यानें 'इंद्रशत्रु' या सामासिक शब्दाच्या उत्तर पदावर जो स्वर द्यावयाचा तो न देतां पूर्वपदावर दिला; तेणेंकरून षष्ठीतत्पुरुषाच्या जागीं बहुव्रीहीचा प्रयोग होऊन 'इंद्र आहे शत्रु [नाशक] ज्याचा' असा त्यास पुत्र झाला!!— तेव्हां वेदांत स्वरांचें माहात्म्य इतकें आहे!

आतां वेदांतल्या वेदांतच 'ब्राह्मणेन षडंगो वेदो निष्कारणोऽध्येयो ज्ञेयश्च' (ब्राह्मणानें निरिच्छतेनें षडंगांसहित वेदाचें अध्ययन करावें व त्याचा अर्थ समजून घ्यावा) अशीं वचनें आढळतात खरीं; पण वरच्याप्रमाणें श्रुतीच्या कितीहि आज्ञा असल्या, तरी प्रस्तुत काळाच्या संबंधानें त्याजविषयीं विचार केला पाहिजे हें उघड आहे. ज्या काळीं वेदवाणीचा साक्षात् प्रचार होता, किंवा निदान संस्कृत भाषेची तरी पुष्कळ प्रवृत्ति होती, त्या काळीं सांगोपांग वेदाचें अध्ययन व त्याचें ज्ञान हीं दोन्ही किती सुलभ होतीं हें कोणासहि सांगायाला नको[1]. पण हल्लीं ख्रिस्तीशकाच्या एकोणिसाव्या शतकांत त्या प्राचीन स्थितीपैकीं कितीशी कायम राहिली आहे? पूर्वीसारखा अरण्यवासी जटावल्कलधारी यजनयाजननियुक्त ऋषि आतां कोठें राहिला आहे? पैगंबर महंमद व येशूख्रिस्त हीं नांवें तरी वसिष्ठविश्वामित्रांच्या कर्णपथावरून कधीं गेलीं होतीं काय? आपले वंशज शिपाई बनून पंचनद देशापर्यंत आपले झेंडे उडवीत नेतील, व कोणी अग्निनौकेवर आरोहण करून श्वेतद्वीपाची यात्रा करतील हें आमच्या सप्तर्षींच्या कधीं स्वप्नीं तरी आलें असेल काय? मग जेथें वरच्याप्रमाणें हजारों वर्षांत सगळीच उलटापालट होऊन गेली, तेथें मूळच्या स्थितींतल्या प्रवृत्ति कशा चालू रहाव्या? जो वेद प्राचीन होतां होतां अलीकडे आह्मांस इतका दुरावला आहे हीं, त्याचा अर्थच होत नाहीं, तो करूं जाणें ह्मणजे पातक होय, अशा आमच्या समजुती होऊन बसल्या, तो अगोदर समग्र मुखोद्गत करणें ह्मणजेच केवढें अरिष्ट काम आहे? मग त्याचें सार्थ पठन करणें हें तर किती दुर्घट होणार!! तर आमच्या रावबहादुरप्रभृति अर्वाच्य पंडितांनीं आज इतकीं वर्षें विचाऱ्या भटांवर जो सारखा भडिमार चालवला आहे, तो सुरू करण्यापूर्वी वरच्यासारख्या कांहीं गोष्टी थोड्याशा मनांत आणल्या असत्या तर बरें होतें असें आह्मांस वाटतें.

भटांच्या प्रतिपक्ष्यांनीं दुसरी हीहि एक गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे कीं, वरील भारवाहकांनीं जर 'षडंग वेदा'चें ओझें आज हजारों वर्षें आपल्या जिव्हाग्रीं वागविलें नसतें, तर आजला तोच 'षडंग वेद', कीं जो आमच्या धर्माचें मूळ आहे,

---

१. 'शिक्षे'त पाठकांच्या गुणावगुणांविषयीं पुढील वचनें आढळतात—

गीती शीघ्री शिरःकंपी तथा लिखितपाठकः।
अनर्थज्ञोऽल्पकंठश्च षडेते पाठकाधमाः॥
माधुर्यमक्षरव्यक्तिः पदच्छेदस्तु सुस्वरः।
धैर्यं लयसमर्थं च षडेते पाठका गुणाः॥

याप्रमाणेंच 'निरुक्ता'तहि—

स्थाणुरयं भारहारः किलाभूदधीत्य वेदं न विजानाति योऽर्थम्।
योऽर्थज्ञ इत्सकलं भद्रमश्नुते नाकमेति ज्ञानविधूतपाप्मा॥

तो कोणीकडे गेला असता बरें? ज्या मूळापासून क्रमाक्रमानें आर्यांच्या सुधारणेचा वृक्ष पुढें बळावत गेला तेंच जर अगोदर विच्छिन्न होतें तर आमच्या राष्ट्राची काय स्थिति होऊन जाती कोण जाणे? आह्मांस तर असें वाटतें कीं, बौद्ध, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे लोकांच्या तडाक्यांतून आह्मी अद्याप जे वांचलों आहों, व वरील धर्मापासून आह्मांस बिलकूल धक्का जो पोंचला नाहीं, हा सर्व प्रभाव वरील जबरदस्त कोटाचा आहे. मग या कोटावर आज हजारों वर्षें पहारा करून ज्या संस्थांनीं तो आजमित्तीपर्यंत एक दगडहि ढासळूं न देतां जसाचा तसा कायम राखला त्यांस 'टोणपे' ही बक्षीशी देणें हें आमच्या रावबहादुरप्रभृति महापंडितांसच शोभतें असें ह्मटलें पाहिजे! ज्या कोणाचें डोकें मिशनरींच्या बडबडीनें फिरून गेलें नसेल, व ज्यास आपल्या पूर्वजांचा अभिमान लवमात्रहि वाटत असेल, त्याच्या मनाची स्थिति वेदघोष कानीं पडला असतां फार निराळ्या तऱ्हेची होईल असें आह्मांस वाटतें; व प्रस्तुत ग्रंथकारांस 'भटें' हीं जशीं अत्यंत तिरस्कारास पात्र होऊन केवळ केरकचरा वाटलीं आहेत त्यापेक्षां त्यांजविषयीं त्याची बुद्धिहि बहुधा पुष्कळ निराळ्या तऱ्हेची होईल?[१]

---

१. आमच्या लोककल्याणकर्त्या रावबहादुरांनीं आर्यक्षेत्रीं ज्या वेळेस भटमत्राच्या स्वाहाकारास आरंभ केला होता, त्याच वेळेस इंग्लंडांत एका शार्मण्य भट्टाचार्यानें कोणत्या अनुष्ठानास सुरवात केली होती हें मनांत आणलें असतां लज्जा व खेद या वृत्तींनीं अंतःकरण परिप्लुत होतें! 'लोकहितवादी'नीं इकडे जों शंखासुराचें मत चालू केलें होतें, तों श्वेतद्वीपांत मोक्षमूलर यांनीं मत्स्यावताराची दीक्षा घेऊन जे ग्रंथ आह्मांस इकडे कल्पटासमान वाटत होते, किंबहुना अद्यापहि वाटतात, त्यांचा तिकडे जीर्णोद्धार करून 'निगमभूपतीचा नगारा' ते येणेप्रमाणें पिटीत होते—

The Veda has a two-fold interest: it belongs to the history of the world and to the history of India. In the history of the world the Veda fills a gap which no literary work in any other language could fill. It carries us back to times of which we have no records anywhere, and gives us the very words of a generation of men, of whom otherwise we could form but the vaguest estimate by means of conjectures and inferences. As long as man continues to take an interest in the history of his race, and as long as we collect in libraries and museums the relics of former ages, the first place in that long row of books which contains the records of the Aryan branch of mankind, will belong for ever to the *Rig-veda*.

—*Ancient Sanskrit Literature.*

प्रस्तुत विषयाच्या संबंधानें आणखी असाहि एक विचार सहज मनांत येण्यासारखा आहे कीं, जेव्हां कोणत्याहि राष्ट्राचा जम बसून त्याची सर्व प्रकारची व्यवस्था लागते, तेव्हां चोहोंकडे श्रमविभाग ह्मणून जो अर्थशास्त्रांत सांगितला आहे तो सुरू होतो. कोणत्याहि देशांत पाहिलें असतां गृहस्थ व भिक्षुक हे दोन वर्ग अगदीं निरनिराळे झालेले आढळतात; पहिल्याकडे सारा ऐहिक व्यवहार सोंपविलेला असतो, व दुसऱ्याकडे साऱ्या पारमार्थिक प्रकरणाचा ह्मणजे धर्मखात्याचा हवाला दिलेला असतो. वरील श्रम-विभाग एकदां ठरून गेला ह्मणजे मग त्याच्या मर्यादा अगदीं नियमित होऊन जातात. तर याप्रमाणें पहातां आमच्या देशांतील भटांकडे अखिल वेदराशींचें पठनद्वारा रक्षण, यज्ञयागादिक अनुष्ठानें, नित्यनैमित्तिक विधि लोकांकडून करविणें, हीं कामें आज हजारों वर्षें सोंपवून दिलेलीं आहेत. मग हा सोंपवून दिलेला कार्यभाग जर त्यांनीं आजपर्यंत चांगल्या रीतीनें संभाळलेला आहे तर त्याव्यतिरिक्त इतर गोष्टींचें ज्ञान त्यांस नाहीं ह्मणून त्यांच्यावर प्रहार करणें हा केवढा अन्याय होय? येथील सरकारी तिजोरीवर संगीनीची बंदूक खांद्यावर टाकून पहारा करणाऱ्या एखाद्या हैलंडर बाळाला जर आमच्यापैकीं एखादे फांकडे विद्वान् ह्मणूं लागले कीं, "कायरे, तूं नुसता घाण्याच्या बैलासारखा आपली रेखलेली मर्यादा न सोडतां नुसता इकडून तिकडे हिंडतोस; व तुझें कसब ह्मटलें तर काय, संगीनीनें भोंसकायाचें किंवा बंदुकीचा चाप दाबून कोणावर गोळी घालायाची, एवढेंच; तुला या खजिन्यांत किती पैसा आहे, त्याची कशी काय व्यवस्था करतात, वगैरे कांहीं माहीत आहे काय? सराफाचा कांटा, कारकुनाची लेखणी हीं तुझ्या हातांत देऊन कांहीं फळ आहे? तूं बेड्या नुसता टोणगा, तुझ्या बळाचा दुसऱ्यांनीं उपयोग करून घ्यावा तेवढाच; तुझा तुला कांहीं नाहीं!"—इत्यादि पांडित्य जर एखादे कागदी जवान वरील श्वेतद्वीपस्थापुढें करायाला लागले, तर त्यानें काय उत्तर करावें बरें? त्यानें वरील कोटिक्रमास एका शब्दानेंहि उत्तर न करतां जात जातां वरील राजश्रींच्या कानशिलावर बंदुकीचा दस्ता चांगला पाडून दिला तर त्याला देवाच्या घरचा बोल आहे काय? तर वरच्यासारखेंच जबरदस्त उत्तर आजपर्यंत जो टारगी मंडळी भटांस 'बैल' ह्मणणारी निघाली आहे त्यांसहि खरोखर पहातां पाहिजे. पण हें व्हावें कसें? बिचारे बुधवारी पंचा लावणारे व भांग्या मारुतीच्या आश्रयानें रहाणारे आमचे भिक्षुक कोणीकडे; आणि बूट स्टॉकिंग चढवलेले आधुनिक रावसाहेब, रावबहादुर, नामदार ही राजदरबारी मंडळी कोणीकडे? आमची तिसऱ्या बुकांतील ह्मण सर्वांच्या तोंडीं आहेच, कीं "कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी!" तेव्हां अशा स्थितींत आजपर्यंत आमच्या देशांतील सर्व वेदमूर्ति 'लोकहित-वादी' प्रभृति अर्वाचीन पंडितमंडळीच्या हातून होणारी पुष्पवृष्टि सतत सेवींत मुकाट्यानें राहिले यांत कांहीं आश्चर्य नाहीं!

याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते । [१]

अंक ७४–(१) भटांवर दुसरा आक्षेप. (२) भट आळशी. (३) पोशे. (४) दानधर्माच्या संबंधानें आक्षेप. (५) पाश्चात्य राष्ट्रांत भटांचें माहात्म्य.

१. भटांवर 'लोकहितवादी'प्रभृति मंडळीचा दुसरा एक जबरदस्त चार्ज असा आहे कीं, हे निवळ पोशे होत; इतरांनीं श्रम करून जोडावें आणि या आळशी भटांनीं पाटांवर चोहोंचा आंकडा ठोकून देऊन यथास्थितपणें हात मारून घ्यावा एवढेंच यांचें काम ! ही जबरदस्त कोटीहि आज तीस चाळीस वर्षें बिचाऱ्या भिक्षुकांवर अप्रतिहत चालू झाली आहे. भटांनीं खाण्याखालीं सारा देश फस्त करून टाकला, जिल्ब्यांच्या व साखरभाताच्या ताटांनीं पेशवाई ठार बुडविली, भिक्षुकांनीं सारा देश व्यापून चोहोंकडे आळसाची वृद्धि केली, गरीबांस नाडून हे त्यांचें डोकें कधीं वर होऊं देत नाहींत, व यामुळें दुष्काळांत लोक अन्नान्न करून मरतात, आंधळे, पांगळे वगैरे अनाथ लोकांस दानधर्म करावयाचा टाकून आमचे मूर्ख लोक रिकामटवळ्या भटांचीं मात्र सर्व प्रकारें भर करतात, कारखाने, विद्यालयें, ग्रंथकारांस उत्तेजन वगैरे गोष्टी सुरू करायाच्या सोडून देऊन आमचे लोक कोठें सहस्रभोजनें घालतील, देवळें बांधतील, सदावर्तें सुरू करतील, याप्रमाणें आह्मी अलीकडे अगदीं गाढव होत चाललों आहों,– इत्यादि पांडित्यप्रकार आज चाळीस वर्षें जो जो आपणास शहाण्या व सुधारलेल्या लोकांत लेखीत आला, त्याच्या तोंडावाटे हरहंमेश बाहेर पडला आहे. त्यांतून आमच्या देशाच्या हात धुऊन पाठीस लागलेलें जें मिशनरी व बाटेमंडळ त्यांनीं तर 'आळशी व पोशे' भटांचा जो कांहीं पाठपुरावा केला आहे तो कांहीं पुसूं नये.'Priesthood' '(भटभाई)' 'Priestcraft' (भटांचा कावा), 'Priest-ridden land' (भटांनीं ग्रासून टाकलेला देश), Sleek & pampered priests' (पराभ्रपुष्ट व सुखावलेलीं भटें),––इत्यादि शब्दपरंपरेची पाश्चात्य भटमंडळीच्या भाषणांतून व लेखांतून अगदीं रेलचेल उडालेली नेहमीं आढळते. पण कां नये उडूं ? सारा देश मेंढवाडा करून सोडला असतांहि आमच्या परमोदार व दयाळू सरकारच्या डोळ्यांत जर आमच्या राजेराजवाड्यांचे चार शेंदाड शिपाई सलतात, हिंदुस्थानची संपत्ति आज शंभर वर्षें सारखी लुबाडित असतांहि म्यांचेस्टरवाल्यांची जर अजूनहि इच्छा तृप्त होईना, तर आमच्या घरीं क्षणास बसणारीं भटें व नदीवर क्रिया चालवणारे कारटे यांच्या पदरीं पडणारा प्रतिग्रह पाहून वेदशास्त्रसंपन्न ख्रिस्तलोकवासी डॉक्टर विल्सन साहेब अशा सारख्यांचा आत्मा कां बरें तळतळूं नये !

---

१. "एका याचकाच्या दृष्टीस दुसरा याचक पडला पुरे कीं लागलीच दोघे एकमेकांवर कुत्र्याप्रमाणें गुरगुरायाला लागतात !"

असो; तर आतां वरील जबरदस्त कोटिक्रमांत खरेपणा कितपतसा आहे या गोष्टीच्या विचारास लागूं.

२. 'भट आळशी आहेत' हे शब्द आह्मी आज कितीक वर्षें ऐकत आलों आहों; पण आह्मांस तर वरील शब्दांचा उमज अद्याप चांगलासा पडत नाहीं हें आह्मांस प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. भट,—आणि आळशी ! ही विशेष्य-विशेषणांची संगति कोण कशी जुळवील तो जुळवो ! भटांच्या संबंधानें 'उपद्व्यापी,' 'लटपटे' वगैरे निंदाव्यंजक विशेषणांचा प्रयोग केला असतां त्यांचा अर्थ मनांत भरण्यास मोठीशी पंचाईत पडणार नाहीं; पण 'आळसा'चें विधान त्यांच्याशीं कसें कराव-यांचें कोण जाणे ? जुन्या चालीचा जर भट घेतला तर त्याची दिनचर्या ह्मटली ह्मणजे दररोज तीन चार वाजतां पहांटेस उठावयाचें, सूर्योदयापूर्वी आपले नित्यविधि सर्व आटपायाचे, मग साऱ्या दिवसभर आपला भिक्षुकीचा रोजगार पहावयाचा,—अमक्याच्या घरीं अमुक अनुष्ठान आहे, अमकी अमुक व्रतवैकल्यें करते आहे, गोमाजी वसंतपूजा करताहेत, सोमाजीच्या घरीं मंत्रजागर आहे, इ० इ० इ०— मग या साऱ्या उलाढाली करून राहिलेल्या वेळांत वैदिक ग्रंथांची स्वतः आवृत्ति करायाची, विद्यार्थी पढवायाचे, ग्रंथ लिहावयाचे, मोठमोठ्या इष्टींपासून तों बारक्यासारक्या-पर्यंत साऱ्यांची समजूत करून घ्यावयाची, वगैरे;—मग इतक्या खटाटोपींत ज्यांचा जन्म जावयाचा ते पुनः 'आळशी'च ! या महाराष्ट्र देशांत नवे प्रभु झाल्यापासून आमच्या जन्मभाषेंतील शब्दांनीं अगदीं ताळच टाकून दिला असल्यास नकळे ! एरवीं वरील शब्दांचा भटांच्या संबंधानें एवढा विपरीत अर्थ कसा व्हावा हें आह्मांस कळत नाहीं.

आतां आमचे प्रतिपक्षी कदाचित् ह्मणतील कीं, केवळ अक्षरशः जरी वरील विशेषण भटमंडळास लागू न पडलें तरी मंडूकवत् निरंतर निरर्थक आक्रोश करीत बसणारी व बेडग्यासारखे कांहीं तरी चाळे करण्यांत जन्म घालवणारी जी महामूर्ख मंडळी तीस 'आळशी' ह्मणण्यास काय फिकीर आहे ? 'उद्योग' ह्मणजे 'सदुद्योग' असा अर्थ घ्यावयाचा हें उघड आहे, मग निरर्थक उद्योग करणारास 'उद्योगी' कोण ह्मणेल ?— कोटी खरी आहे, पण तींत इतकाच विचार अगोदर करायाचा कीं, आमच्या रावबहादुरांसारख्यांनीं वेदविद्या व ब्राह्मणधर्मांतील सर्व अनुष्ठानें निरर्थक ठरविलीं ह्मणजे तीं तशीं लागलींच झालीं कीं काय याचा मात्र अंमळ विचार करणें जरूर आहे. 'लोकहितवादी'नीं नाना फडनविसास बेवकूब ठरवला, व न्यायमीमांसादि शास्त्रांत निष्णात असणाऱ्या साऱ्या मंडळीस एका तडाक्यासरसे महामूर्खांत निवडून काढले, या जबरदस्त कोट्या त्यांच्या कितपतशा अंगावर आल्या हें मागें वाचकांस कळलेंच आहे; मग आरोपी नंबर तीन जीं भटें तीं तरी आमच्या नामदारांच्या पिंज-

ज्यांतून सुटणार नाहींत हा कोणीं भरंवसा धरावा? मामील दोन प्रकरणीं जर रावबदुरांचा फैसला अगदीं रद्द करून टाकून आरोपींची क्षमा मागून त्यांची संभावनापूर्वक बोळवणी करावी लागली, तरी हल्लीं कोर्टासमोर असणाऱ्या वेदमूर्तीच्या विरुद्ध तरी भरपूर पुरावा असेल यावद्दल कोणीं खातरजमा करावी! तर चारी वेद व सहा वेदांगें हीं सर्व निवळ केरकचरा होत, मोक्षमूलरप्रभृति पाश्चात्य वैदिक हे 'शहाण्याचे सुडके आणि गाढवाचे चुलते' होत, आमचे नेहमींचे स्नानसंध्यादिक सर्व विधि निवळ पोरखेळ असून ते ज्यांनीं आह्मांस आज हजारों वर्षें लावून दिले ते वरील 'चुलत्या'चेच सख्खे बंधु होत, इत्यादि अनेक सिद्धांतांवर आमचे नामदारसाहेब आपलीं मिनिटें जगजाहीर करीत तोंपर्यंत बिचाऱ्या आरोपींस गटारयंत्राचा रस्ता खुला करून दिला असतां त्यांत कांहीं गैरशिस्त प्रकार होणार आहे असें आह्मांस वाटत नाहीं!

अलीकडे इकडे अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें लोकांस कांहीं समजूं लागल्यांपासून 'आळशी' या शब्दाची एक नवी मीमांसा निघाली आहे. 'आळशी' कोणास ह्मणावें? —तर ज्यावा श्रम अनुत्पादक होय, त्यास. मनुष्याच्या निर्वाहाला उपयोगी ज्या वस्तु—ह्मणजे अन्नवस्त्रगृहादि—त्या ज्यांच्या हातून निर्माण होतात त्या लोकांचे श्रम उत्पादक होत; बाकी इतर धंद्याचे सर्व लोक ही कोटी अनुत्पादक श्रमवाल्यांची.[1] तेव्हां

१. 'उत्पादक' [productive] व 'अनुत्पादक' [unproductive] श्रम ह्मणजे काय याची कांहीं कल्पना आमच्या वाचकांस वरील प्रसंगोपात्त विवेचनावरून होईलच; पण प्रस्तुत विषयावर पूर्ण विवेचन ज्यास पाहिजे असेल त्यानें आमच्या वडिलांचा 'अर्थशास्त्रपरिभाषा' हा ग्रंथ पहावा. सदरील ग्रंथाच्या तिसऱ्या भागांत वरील विषयाचें निरूपण केलेलें आहे. वरील हवाला देणें हा पुष्कळ अंशीं थट्टेचाच प्रकार होणार आहे हें आह्मी समजतों; पण जर कोणी जुन्या पुस्तकाचे संग्राहक असले तर त्यास वरील माहितीचा उपयोग घडण्याचा कदाचित् संभव आहे! येथें प्रसंगवशात् आमच्या शहाण्या विद्याखात्यास व मोडकळीस आलेल्या ग्रंथोत्तेजक मंडळीस एक सूचना करावीशी वाटते. ती एवढीच कीं, रा० सा० सीताराम विश्वनाथ पटवर्धन बी० ए० कृत 'उजळणीचें पुस्तक' किंवा 'सार्थ आश्वलायनसूत्र' अशासारख्या विचित्र पुस्तकांचा जो पुरस्कार त्यांनीं आरंभला आहे, त्यापेक्षां यापूर्वी अनेक चांगले चांगले ग्रंथ होऊन गेले असून ते जे राम ह्मणण्याच्या बेतांत आले आहेत त्यांजवर थोडासा संजीविनीचा प्रयोग झाला असतां देशाचें फार कल्याण होणार आहे. मेहेरबान चाटफील्ड साहेब यांस 'उजळणीचें पुस्तक' हा मोठा अमोलिक ग्रंथ वाटत असेल तर त्यांनीं तो रचणाऱ्या विद्वन्मणींची खाजगी रीतीनें पाहिजे असल्यास हवी तेवढी संभावना करावी; पण देशाचा पैसा ह्मणून जो त्यांच्या हवालीं विश्वासानें केलेला असतो त्याची अशी झोटिंगपाच्छाई करण्यास त्यांस अधिकार आहे असें आह्मांस वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच नामदार देशमुख साहेब यांनींहि 'आश्वलायन सूत्रा'वर ग्रंथोत्तेजक मंडळीच्या पसंतीची छाप बेलाशक ठोकून देण्यापूर्वी वाचक मंडळींच्या अभिरुचीविषयीं कांहीं तरी कींव मनांत बाळगावी हें आह्मांस रास्त दिसतें. आठ वर्षांच्या पोरीला ऐशीं वर्षांचा कोंवळा वर पाहून दिला असतां

या अनुत्पादक कोटींतले अगदीं अग्रगण्य झटले झणजे आमचे भिक्षुक होत. मग ते 'आळशी' कसे नव्हेत ?—ठीक आहे; हीहि कोटी दयानंदजींच्या परिभाषेप्रमाणें 'ठीकसे ठीक' जुळते ! आतां तींत 'जुक्ती' कितपतशी दृष्टीस पडते तेवढी मात्र पाहूं.

आतां प्रथमतः ही गोष्ट तर कोणासहि कबूल करणें भाग आहे, कीं 'उत्पादक' या शब्दाचा मुख्यार्थच जर घेतला, तर आमचा दशग्रंथी भिक्षुक निवळ अनुत्पादक कोटींतलाच खरा. कां कीं, मोठा घनान्त वेद झटला झणजे कांहीं गिरणींतल्या सारखे कापडाचे गठ्ठे तयार होऊन पडत नाहींत, किंवा भटारखान्यांतल्याप्रमाणें खाद्यसमृद्धि निष्पन्न होत नाहीं. उलटे वरील श्रम हे कंठशोषफलक मात्र होत. तेव्हां या रीतीनें पहातां भटांवर 'आळशी'पणाचा छाप ठळठळीत बसतो खरा ! पण ही मीमांसा होतां होतां केवढी व्यापक होणारी आहे याचा मात्र आमच्या प्रतिपक्ष्यांनीं विचार केला पाहिजे. एकदां का भट हे वरील विशेषणाच्या टप्यांत आले, झणजे मग आमचे नामदारसाहेब, त्यांचे धर्मगुरु दयानंदजी, त्यांचे नेकनामदार खाविंद गवर्नर साहेब व सारें कौंसल, हिंदुस्थानांतील दोन लाख फौज, सारे छोटे बडे आफिसर वगैरे किती मंडळी एका दावणींत गोंविली जाणार आहे याचा कांहीं सुमार नाहीं ! नाहीं झणायाला वरील कोटींतून शेतकरी, कोष्टी, खाटिक, पाणके, पण्यस्त्रिया, वगैरे कांहीं निवडक मंडळी मात्र काय सुटेल तेवढी सुटेल. बाकी झाडून सारी मंडळी 'आळशी व पोशे' मंडळींत सामील होणार. मग हें जर आमच्या रावबहादुरांस पतकरत असलें, तर आमच्याकडून कांहीं एक हरकत नाहीं. आज चाळीस वर्षें देशोन्नतीच्या कामाला कायावाचामनेंकरून झटलेले 'लोकहितवादी', व दररोज सकाळीं दुधाची चरवी रिचवून धर्मोन्नत्यर्थ अस्खलित वाक्प्रवाह चालवणारे दयानंद स्वामी वगैरे खाशी मंडळी जर आमच्या भटांस सोबतीला मिळाली तर मग आणखी काय पाहिजे ?

तेव्हां वरच्यांपैकीं कोणत्याहि तऱ्हेनें पहातां भटांवर 'आळशी'पणाचा आरोप यथास्थितपणें स्थापित होत नाहीं. आतां वरील मंडळी ही देशाच्या बुडणुकीस कितपत कारणीभूत होय याच्याविषयीं विचार करूं.

३. कोणाहि व्यक्तीवर किंवा वर्गावर वरील आरोप लागू पडण्यास मुख्यतः ही गोष्ट सिद्ध झाली पाहिजे कीं, विवक्षित व्यक्ति किंवा वर्ग यांच्याकडून कोणतीहि कामगिरी होत नसून कुटुंबावर किंवा राष्ट्रावर त्यांच्या पोषणाचा व्यर्थ बोजा मात्र

तिला जितपत आनंद होण्याचा संभव आहे, तितपतच आमच्या देशांतील कोंवळ्या वाचकांच्या हातीं रावबहादुरांनीं सजवलेल्या आश्वलायन बोवांची दाढी लागली असतां होणार आहे हें उघड आहे ! तर सदरील मंडळीच्या अधिपतींनीं आपली जरठ अभिरुचि एकीकडे ठेवून वर्गणीदारांच्या पैशाच्या मोबदला अंमळसा कोंवळा माल त्यांस पोंचता होण्याची तजवीज केली असतां बरें असें आह्मांस वाटतें !

पडतो. 'पोशे'पणाचें हेंच लक्षण होय हें उघड आहे. आतां आमच्या देशांत जो भिक्षुकवर्ग आहे त्याच्याविषयीं जर विचार केला, तर कोणाच्यानें असें सिद्ध करून देववेल काय, कीं, ते मुळींच काम करीत नाहींत, किंवा निदान अगदीं थोडें काम करून देशांतील संपत्तीचा वांटा मात्र ते मोठा उपटतात? वरील दोन्ही विधानें भटांच्या संबंधानें करणें झटलें झागजे अंमळ जडच जाईल असें वाटतें. पहिलें विधान तर किती शुष्क आहे याविषयीं नुकतें वर लिहिण्यांत आलेंच आहे, यास्तव त्याजवर आणखी लिहिण्याची जरूर नाहीं. तर आतां दुसरें विधान कितपत यथार्थ होणार आहे तेवढें पाहूं झणजे झालें.

आमच्या देशांतील भट्टांकडे आज अनादिसिद्ध कोणती कामगिरी चालत आली आहे, व ती ते आजपर्यंत कोणत्या रीतीनें बजावीत आहेत याविषयीं यापूर्वी आह्मीं उल्लेख केलेलेच आहेत. ते लक्षांत आणले असतां, व भिक्षुकांस सामान्यतः प्राप्ति कितपत होत असते याचा विचार केला असतां, रावबहादुरप्रभृति मंडळींचें आज इतकीं वर्षें जें त्यांच्यावर पांडित्य चालू आहे त्यांत कितपत यथार्थता आहे हें कोणाहि समंजस व न्यायी मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. मोठा उत्कृष्ट वैदिक घेतला, तर तो आपल्या विद्येंत पुरा होण्यास त्यास किती काळ लागत असेल, व किती श्रम पडत असतील, या लहानशा गोष्टीचा आमच्या नामदार साहेबांनीं कधीं विचार केला आहे काय? जर केला असेल, तर वरील श्रम एका पारड्यांत घातले आणि सभेची दक्षिणा, स्वधाकाराची प्राप्ति, निरानिराळ्या याज्ञिकांतली किफायत, अनेक व्रतांत निष्पन्न होणारे अवूपराशि, इत्यादि अनेक कलमें दुसऱ्या पारड्यांत दाखल केलीं, तर कोणत्या बाजूला दांडी झुकेल बरें? फार दूर कशाला, आह्मी 'लोकहितवादी'सच खुद्द असें विचारण्याची परवानगी घेतों कीं त्यांनीं ए. बी. सी. ला आरंभ केल्यापासून आजपर्यंत जो अभ्यास केला व आजतागाईत त्यांस जो द्रव्यलाभ झाला यांचें परस्पर प्रमाण घातलें असतां तें कितीका वैदिकांच्या संबंधानें लागू पडेल? प्रस्तुत ग्रंथकर्त्यास इंग्रेजी भाषेचें व इंग्रेजी स्मृतींचें अध्ययन करण्यास जो अटाट करावा लागला असेल त्यापेक्षां भटांस कमी श्रम पडतात असें कोणाच्यानें झणवेल काय? मग आजपर्यंत असा कोणता दशग्रंथी भिक्षुक आढळला आहे, कीं ज्याचा इतमाम आमच्या ऑनरेबल साहेबांच्या शतांशाला तरी उतरेल? आमच्या रावबहादुरांनीं ब्राह्मणांच्या 'भिक्षेच्या सनदे'ची जागोजाग टवाळी केली आहे, व त्यांच्या 'शंकर और पूरी'वाल्या सद्गुरूंनीं शेंकडों वेळां 'सब टक्का बनानेकी बात है'[1] झणून एतद्देशीय भिक्षुकवर्गाचा

१. दयानंदजींच्या व्याख्यानांत पुढील गंमतीचा श्लोक आढळतो—

"ब्रह्मोवाच— टका धर्मष्टका कर्म टका हि परमं पदम्।
यस्य गृहे टका नास्ति हाटकाटकटक्यते [?] ॥"

उपहास केलेला आहे, त्याप्रमाणेंच पाद्री व बाटे मंडळीहि भटांची टर उडवून 'आकाशांतील बापास' संतुष्ट करण्याची संधी कधीं फुकट जाऊं देत नाहीं; पण चारगटपणा सोडून देऊन खऱ्या निःपक्षपात बुद्धीनें जो प्रस्तुत प्रकरणाचा विचार करील, तो खरे 'पोशे' कोण याचा चोख निकाल तेव्हांच करील याविषयीं आह्मांस बिलकूल संदेह वाटत नाहीं.

पण या ठिकाणीं आमच्या प्रतिपक्ष्यांचा असा कोटिक्रम निघण्याचा संभव आहे कीं जरी वेदपठनाचे श्रम व 'कनिंघमकृत सटीक पुराव्याचा आक्त' किंवा 'पोलिसचिंतामणि' वगैरे ग्रंथ झोडण्याचे श्रम हे परस्पर तुल्य होत असें घटका भर कबूल केलें, तरी पहिल्यांत व दुसऱ्यांत व्यवहारदृष्ट्या किती फरक आहे हें लक्षांत आणायाला नको काय ? नुसत्या श्रमाचाच विचार करून काय फळ आहे ? श्रमावरोवर त्याच्या उपयुक्ततेचाहि पण विचार करणें जरूर आहे. रस्तोरस्तीं पुष्कळ वेडे रात्रंदिवस फिरत असतात, ह्मणून त्यांची व 'पोलिसचिंतामणि' खिशांत घालून गस्त करणाऱ्या पोलिसांची बरोबरी करतां येईल काय ? पोलिसास सरकार पगार देतें ह्मणून वरील फिरत्या वेड्यांसहि दिला असतां चालेल काय ?—ठीक आहे. येथवर वरील कोटी आह्मांस ग्राह्य करणें भाग आहे पण तींत एकदोन मोठ्या गोष्टींच्या संबंधानें अगोदर थोडासा विचार होणें जरूर आहे. एक गोष्ट तर ही कीं, आमचा वेदराशि व कनिंघम यांची जी वर सांगड घालून दिली आहे ती सर्व प्रकारें बरोबर नाहीं. कनिंघम आपल्या अध्येत्यास या लोकीं फळणारा आहे, ह्मणजे वरील 'आक्त' पाठ केला असतां त्याचा ताबडतोब उपयोग होण्यासारखा असून तो उपयोग दृष्टहि आहे. वेदराशीची तशी गोष्ट नाहीं. त्याच्या पठनाचें फळ येथें कोर्टांत किंवा बाजारांत दृष्टीस पडणारें आहे असें नाहीं. तें आहे अदृष्ट, ह्मणजे परलोकीं मात्र तें गोचर होणार ![1] मग असें जर आहे, तर वरील दोन ग्रंथांची उपयुक्ततेच्या संबंधानें परस्पर तुलना होणार कशी ? दुसरी गोष्ट अशी कीं, अलीकडे सोशियलिस्ट व निहिलिस्ट या मंडळ्यांनीं ईश्वर, येशू ख्रिस्त, बैबल वगैरे सब झूट ह्मणून सारेंच जसें एका सपाट्यासरसें झुगारून दिलें आहे, तसाच प्रकार जरी आमच्या रावबहादुरप्रभृति अर्वाचीन ऋषींनीं साऱ्या प्राचीन ग्रंथांच्या व आचारविचारांच्या संबंधानें केला असें समजलें, तरी जोंपर्यंत वरील शून्याकार आमच्या देशांत साक्षात् झाला नाहीं, तोंपर्यंत भटांचें

वरील स्मृतिवचन आमच्या परमहंसांनीं कोठून चोंचींत धरून आणलें असेल तें असो ! आह्मांस तर असा संशय येतो कीं, हें त्यांच्याच स्वतःच्या 'गडबडाध्यायां'तील नसेल ना ! !

१. वेदपठनाचें साफल्य पुढच्यासारख्या वचनांवरून व्यक्त होतें—

कुक्षौ तिष्ठति यस्याग्रं वेदाभ्यासेन जीर्यते ।
कुलं तारयते तेषां दश पूर्वान् दशापरान् ॥

वेदपठन व गर्दभांचें गांधर्व हीं दोन्ही सारखीं होत असें ह्मणण्यास कोणासहि अधिकार नाहीं. जोंपर्यंत आमच्या नामदार साहेबांनीं कुस्तुंतुनिया शहरचा स्थापक कान्स्टंटाइन बादशाहा याच्याप्रमाणें सद्धर्मप्रतिपादनार्थ एखादा पवित्र आक्ट सरकारी कौंसलांतून पसार करून साऱ्या देशभर फडकवून दिला नाहीं, आणि शंखासुर व सुलतान महंमद या दोघांचा अवतार घेऊन दशग्रंथांचें व तेहेतीस कोटी देवांचें कांडात काढलें नाहीं, तोंपर्यंत त्यांनीं आपलीं खाजगी मतें आपलीं आपल्यापाशींच गुंडाळून ठेवावीं हें बरें. सदरील मतें जेव्हां लोक स्मृतींच्या जागीं मानूं लागतील तेंव्हां अर्थातच भटांच्या वेदपठनास कोणी विचारणार नाहीं, व वरील कामगिरीबद्दल देशांतील पैसा त्यांजकडे गेला असतां अन्याय होईल. पण वरील मन्वंतर पूर्णपणें अमलांत येईपर्यंत आजपर्यंत चालत आलेल्या प्रवृत्तीप्रमाणेंच सर्व गोष्टींचा विचार करणें जरूर आहे.

तेव्हां ब्राह्मणांचा तिसरा वर्ग जो भटांचा त्यांच्या तर्फेनें एकंदरींत आह्मी असें ह्मणतों कीं, त्यांच्यावर आजपर्यंत अर्वाचीन विद्वन्मंडळानें जो आळसाचा व पोशेपणाचा आरोप विनदिक्कत ठेऊन दिलेला आहे तो अगदीं शुष्क आहे. वरील दोन्ही विशेषणें त्यांजवर बिलकूल लागू होत नाहींत. तीं त्यांजवर उगीच जर ठोकून द्यावयाचीं असतील तर तीं त्यांच्या प्रतिपक्ष्यांस मात्र विशेष यथार्थत्वानें लागू होणार आहेत. घनान्त वेद ह्मटला असूनहि जर भट आळशीचा आळशीच रहाणार, तर मग आमच्या युनिव्हर्सिटींतला एम.ए.हि कां आळशी होणार नाहीं ? समग्र वेदवाणी वश झाली असतांहि एतद्देशीय भिक्षुकांची 'भिक्षेची सनद' जर आमच्या फाकड्या विद्वानांच्या डोळ्यांत खुपते, तर आमच्या चिरंजीवांस असिस्टंट कलेक्टर करा, आह्मांला एखाद्या बड्या नेटिव संस्थानांत कारभारी करा, हे हक्क सांगणें तरी किती अप्रयोजक होणार आहे बरें ? वरील भिक्षुकी 'सनदे'वर आमचे कितीसे वेदमूर्ति आजपर्यंत गब्बर होऊन बसले आहेत ? 'सब टक्का बनानेकी बात' ह्मणून देशहितार्थ हळहळणारे जे दयानंदजी ते कधीं असा विचार करतात काय, कीं संध्याकाळच्या शिळोप्याच्या वेळीं चार घटका बडबड केल्यानें जर दररोज दोन रुपये लंबे करण्यास हक्क पोंचतो, तर दहा दहा बारा बारा वर्षांच्या घोकंपट्टीस क्षणाचें आमंत्रण व पावलीभर दक्षिणा ह्मणजे मोठी लयलूट झाली नव्हे ! पण अशासारख्या कोट्या किती उघड असल्या तरी त्या वरील जगद्गुरूंच्या 'जुक्ती'स सर्वथा अगम्यच होत. निःसार जल तेवढें टाकून देऊन तन्मिश्रित दुग्धाचा स्निग्ध अंश तेवढा ग्रहण न केला, तर मग 'परमहंस'त्व तें काय ! !

'लोकहितवादीं'नीं आजपर्यंत आमच्या लोकांचा मूर्खपणा जो अनेक प्रकारें वर्णिला आहे त्यांत शेंकडों वेळां असा कोटिक्रम आणला आहे कीं, आमच्या जुन्या लोकांस

पैशाचा व्यय कसा करावा हें बिलकूल कळत नाहीं, व त्यामुळें आज आमचा देश इतक्या खराबीस येऊन पोंचला आहे. शहाणपणाचा व्यय म्हटला म्हणजे कारखाने काढावे, दवाखाने घालावे, शाळा स्थापाव्या, पुस्तकालयें सुरू करावीं, नवीन ग्रंथकारांस उत्तेजन द्यावें, पण आमचे जुने टोणपे वरच्यापैकीं एकाहि गोष्टीकडे एक छदामहि खर्चणार नाहींत, तर करतील काय? जिकडून तिकडून ब्राह्मणाची भर करतील. सहस्रभोजनें, देवालयें, यात्रा, सदावर्तें इत्यादि अनेक मूर्खपणाच्या वाटांनीं पैसे उधळून टाकतील! आतां हा जो जुन्या गृहस्थ व भिक्षुक मंडळीवर नामदार साहेबांचा भडिमार सतत उडत असतो, तो वस्तुतः पहातां एका अंशीं खरा आहे हें कोणासहि कबूल करणें भाग आहे. आमच्या लोकांत दातृत्वाविषयींच्या कल्पना फार विलक्षण आहेत, आणि पात्रापात्रत्वाचा विचार व मितव्यय या दोन्ही गोष्टींत त्यांची समजूत जशी असावी तशी नाहीं. पण ज्या प्रवृत्ति आज हजारों वर्षें सारख्या चालू आहेत त्या रावबहादुरप्रभृति मंडळीस आज आवडेनाशा झाल्या, म्हणून लागलीच लोकांनीं एका क्षणांत सोडून द्याव्या ना! मोठमोठ्या सुधारलेल्या राष्ट्रांतहि लोकांचा एकेक ग्रह नाहींसा व्हायला किती काळ लोटत असतो हें रावबहादुरांस माहीत नाहीं काय? गुलामांचा व्यापार या विषयावर इंग्लंडांत किती वर्षें चर्चा चालली होती बरें? आणि त्यांतून अजूनहि वरील राक्षसी व्यापार म्हणजे वाईटच अशाविषयीं तरी सर्वांची खात्री होऊन चुकली आहे काय? अमेरिकेतलें परवांचें भयंकर युद्ध कोणास आठवत नाहीं? तर सहस्रभोजनांत शेंकडों रुपये एकदम फना करून टाकण्याचें सोडून तेच रुपये ग्रंथोत्तेजक मंडळीला देणगीच्या रूपानें दिले असतां त्यांत किती अधिक श्रेय आहे ही कल्पना आमच्या जुन्या मंडळीच्या डोक्यांत एकदम न शिरली तर त्यांत नवल कसचें? व याबद्दल भटांच्या नांवानें खडे फोडण्यांत काय हाशील आहे? त्यांतून आमच्या नव्या मंडळीनें तरी जुन्या खोडांस सुधारलेल्या समजुतींच्या संबंधानें जर कांहीं उदाहरणें घालून दाखविलीं असतीं तर इकडून तरी बोलायास कांहीं जागा झाली असती. पण असा तरी प्रकार आजपर्यंत कोणता दृष्टीस पडला आहे? नाहीं म्हणायाला एवढें मात्र झालें आहे कीं, सहस्रभोजनांत जो पैसा खर्ची पडायाचा तो विलायती कलालांच्या उत्तेजनार्थ गेला आहे; देवालयांत जो भुरून जावयाचा तो प्रार्थनामंदिरांत किंवा दयानंदजींच्या घीशक्करेंत चूर झाला आहे; आणि विष्णुपदांत जो ठार बुडून जावयाचा तो लंडनांतल्या हॉटेलांत म्लेंच्छरमणींच्या सवें अनंगोत्सव भोगण्यांत खल्लास झाला आहे!

येथवर एतद्देशीय भिक्षुकवर्गाच्या तर्फेनें आम्हीं केलेली तरफदारी ही केवळ येथल्या येथेंच जी स्थिति आढळते तिच्याच संबंधानें केली. आतां आपला देश सोडून जर आपण अंमळ बाहेर नजर केली, तर इकडून प्रस्तुत प्रकरणीं कितपत पुरावा

मिळण्यासारखा आहे व तो कोणत्या तऱ्हेचा आहे याविषयीं थोडासा विचार करूं.

४. कोणत्याहि देशांतली स्थिति आपण लक्षांत आणली किंवा कोणत्याहि धर्मांतील मतांचा विचार केला तर आपणास असें आढळेल कीं, दातृत्वाचें माहात्म्य कोणत्याहि राष्ट्रांत वर्णिलेलें नाहीं किंवा त्याविषयीं कोणत्याहि धर्मांत आज्ञा नाहींत असें नाहीं. अगदीं अज्ञान राष्ट्रांत सुद्धां अतिथीचा सत्कार,[1] विपन्नावर दया करणें, धर्मनिष्ठ लोकांच्या द्वारें ईश्वराराधन, वगैरे प्रकार चालू असल्याविषयीं आढळतें. मनुष्य स्वभावतः स्वार्थैकपर असल्यामुळें त्याची बुद्धि आपलें जें आहे तें आपल्यापाशीं ठेवावें, किंबहुना संधी सांपडल्यास दुसऱ्याचेंहि लुबाडावें, अशा प्रकारची असते. ही बुद्धि अत्यंत निंद्य व अनर्थकारक होय हें उघडच आहे. तेव्हां सर्व धर्मप्रवर्तकांनीं आपापल्या राष्ट्रांतून वरील कुत्सित मनोवृत्तीचा जितका संकोच होईल व तद्विरुद्ध जी औदार्यबुद्धि तिचा जितका विकास होईल तितका होण्याची तजवीज केलेली आढळते. आमच्या देशांत प्रतिग्रहाचे मालक जसे भट हे होत, त्याप्रमाणेंच मुसलमानांत फकीर आहेत, व ख्रिस्ती धर्मांत पाद्री आहेत. त्यांतून सदरील अंकावरील अवतरणास अनुसरून जे मिशनरी मंडळ आमच्या भटांवर नेहमीं प्रहार करीत असतें, त्याचा स्वतःचा चरितार्थ कसा चालत असतो याबद्दल तें कधींच क्षणभरहि विचार करीत नाहीं हा थोडा चमत्कार आहे असें नाहीं. पण इसापनीतींतील 'पक्षपाती न्यायाधीशा'प्रमाणें आपल्या पदरांत माप घ्यावयाचें तें एका पारड्यानें व दुसऱ्याच्या पदरांत घालायाचें तें दुसऱ्या पारड्यानें ही सामान्यतः जगांतली रीत आहेच; मग येशूच्या मेंढवाड्यांतलीं लाडकीं कोंकरें तरी वरील नियमास अपवाद कां आणतील?

५. त्यांतून इंग्रेज लोकांचे एकनिष्ठ भक्त जे आमचे रावबहादुर त्यांनीं खुद्द इंग्लंडांतच भिक्षुकीचा प्रकार कोणत्या तऱ्हेचा आढळतो याविषयीं कधीं लवमात्रहि विचार केला नाहीं हें मोठें आश्चर्य आहे. वरील विचार जर ते करते तर त्यांची लेखणी येथील भटांवर इतकी चरचरीत चालती ना! कां कीं, साऱ्या सुधारणेंत पूर्ण झटलें ह्मणजे युरोपखंड, आणि त्यांत सुधारणेचा ऐन अस्सल गाभा झटला ह्मणजे इंग्लंड देश; पण या गाभ्याच्या आंत जों डोकावून पहावें तों कांहीं चमत्कारिकच स्थिति आढळते. नामदार साहेबांच्या तत्त्वज्ञानाचा महासिद्धांत जो भटांच्या संबंधानें अदत्तपणा व

---

१. अतिथीच्या सत्काराविषयीं आमच्या धर्मांत कशा आज्ञा आहेत हें बहुधा एथें सांगायाला नकोच. त्रैश्वदेवानंतर चवाठ्यावर घटकाभर उभें राहून आगंतुक (एकाएकीं येणाऱ्या) अथितीची मार्गप्रतीक्षा करावी आणि नंतर अन्नग्रहण करावें हा गार्हस्थ्याचा धर्म होय हें सर्वप्रसिद्धच आहे. अगदीं अडाणी राष्ट्रांतील पद्धति पहाणें असल्यास प्रसिद्ध काव्य 'लेडी ऑफ दि लेक' याचा पांचवा सर्ग पहावा. स्कॉटलंडच्या वेषधारी राजास त्याच्या शत्रूकडून कोणत्या तऱ्हेचा पाहुणचार मिळाला तो त्यावरून लक्षांत येईल.

भटांचा द्वेष या दोहोंपैकीं एकहि गोष्ट वरील ठिकाणीं निदर्शनास येत नाहीं. एखादा 'लोकहितवादीं'चा शिष्य 'निबंधसंग्रह' खाकोटीस मारून महापुण्यभूमि जें श्वेतद्वीपक्षेत्र तेथें जर गेला, तर तेथल्या तीरावर पाऊल ठेवल्याबरोबर त्याच्या चित्ताला मोठा संतोष होईल कीं, "आतां बरीक परान्नास सोकवलेलीं जीं द्राड भटें त्यांच्यापासून मी अगदीं मुक्त झालों, ज्या अत्यंत धन्य देशास आज माझे पाय लागले तेथील लोक असे बहादर आहेत कीं, ते भटांच्या काव्याला कधीं भुलणारे नव्हेत; ज्यांनीं खुद्द आपल्या राजांचाहि मुलाजा ठेवला नाहीं ते दुबळ्या भटभिक्षुकांस मीठ घालतील कीं काय? ही गोष्ट कधींहि घडायाची नाहीं!" याप्रमाणें मोठी उमेद बाळगून वरील महापंडित इंग्लिस्तानांत प्रवेश करील; पण त्यास लवकरच आढळेल कीं, दुर्वासाच्या मागें लागलेल्या सुदर्शनाप्रमाणें भटांचा पाठपुरावा हा आपला जेथें तेथें आहेच! 'आगींतून निघालें आणि फुपाट्यांत पडलें' या म्हणीचा अनुभव वरील भटत्रस्त गृहस्थास येईल; अथवा खरें म्हटलें तर फुपाट्यांतून निघून भर आगींत जाऊन पडलों असेंहि त्यास वाटेल! विलायतेच्या संबंधानें वरील म्हण उलटी लागू करण्याचें कारण पुष्कळांस माहीत असेलच कीं, भिक्षुकमंडळीचा उपद्रव इंग्लंडास मुळींच नाहीं, किंवा धर्मभोळ्या हिंदुस्थानाहून कमी आहे, असा प्रकार अगदीं नाहीं. तर उलटें असें मात्र आहे कीं, तिकडे जें भटांचें बंड आहे त्याच्या पासंगालाहि इकडचें पुरायाचें नाहीं. तिकडच्या अगदीं कनिष्ठ प्रतीच्या भटास जी प्राप्ति असते ती इकडे मोठ्या पट्टीच्या भिक्षुकासहि होत नाहीं. पहा कीं, इकडे साऱ्या दिवसभर उपद्व्याप करून वर्षाच्या काठीं शेदोनशें रुपये मिळाले म्हणजे डोक्यावरून पाणी गेलें अशीं इकडचीं बिचारीं 'भटें' कोणीकडे; आणि दशमांशभुक्[1] विलायती गोरे भट कोणीकडे! तसेंच दररोज प्रहरभर कंठशोष करावा तेव्हां शेर दोनशेर तांदुळांचे धनी होणारे आमचे पुराणिक कोणीकडे आणि लॉर्ड होऊन वरच्या पार्लमेंटांत बसणारे विलायतेंतील सरदारी भिक्षुक कोणीकडे! आमच्या साध्याभोळ्या देशास पाश्चात्य तत्त्वज्ञानी 'priestridden'(भटांनीं खोगीर ठेवलेला)असें पुष्कळ वेळां विशेषण जोडतात; पण आह्मांस खास

---

१. आमच्या प्राचीन धर्मशास्त्राप्रमाणें राजा हा षष्ठांशभुक् होय म्हणजे त्यानें जमीनीच्या उत्पन्नाचा सहावा भाग घ्यावा. विलायतेंतील पाद्री आपल्या खात्याकडे काळीच्या वसुलाचा दहावा हिस्सा ओढतात. यास इंग्रेजींत 'टैथ्' (tithe) म्हणतात. सदरील प्रकरणासंबंधी कांहीं माहिती थोडक्यांत हवी असल्यास ती मराठी क्रमिक पुस्तकांत 'इंग्लंडवर्णन, प्रकरण आठवें, धर्म व धर्मखातें' या घड्यावरून मिळण्यासारखी आहे. त्यांतील पुढील मजकूर प्रस्तुत विषयास विशेष उपयोगाचा आहे—

"धर्माध्यक्षांच्या निर्वाहासाठीं भूमीच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा योजिला आहे, आणि बहुतकरून प्रत्येक विभागांत देवळाजवळ रहाण्यास घर व कांहीं जमीन धर्माध्यक्षास मिळते."

वाटतें कीं, विलायती भट आमच्या नेटिव भटांस हजार वांड्यांनीं बरें ह्मणवितील. इकडे हिंदुस्थानांत कोणीं आजपर्यंत धर्माचें एक स्वतंत्र खातेंच ह्मणून कधीं ऐकलें आहे काय? पण आमच्या राज्यकर्त्यांच्या सुधारणाप्रमुख देशांत आज अनादिसिद्ध कालापासून 'चर्च' (धर्मखातें) आणि 'स्टेट' (राज्यखातें) हीं दोन्ही खातीं अगदीं बरोबरीनें चाललीं आहेत. गृहस्थांमध्यें जशा छोट्या अधिकारांपासून तों अमीर-उमरावींच्या पदव्यांपर्यंत क्रमाक्रमानें पायऱ्या आहेत, त्याप्रमाणेंच भटभिक्षुकांतहि छोटेखानी उपदेशकापासून तों बिशप, आर्चबिशप यांच्यापर्यंत सारखी अधिकारपरंपरा आहे. मुलकी व लष्करी खात्यांत जसे प्रतिवर्षी लोक परीक्षा देऊन शिरतात, त्याप्रमाणेंच धर्मविषयांत परीक्षा देऊन दरवर्षी नवीन मंडळी धर्मखात्यांत शिरते. आतां या धर्मखात्याच्या मंडळीस देशाची एवढी कामगिरी तरी काय बजवावी लागते ह्मणाल, तर नूतन अर्भकांचें उपनयन, वधूवरांचें ग्रंथिबंधन आणि प्रेतांचें भूमौकरण! ज्यास बाप्तिस्मा ह्मणतात तो विधि झाल्यानें मनुष्य येशूच्या कळपांत येतो व भावी नरकाग्नीचा उपशम पाद्रीकृत पवित्र प्रोक्षणानें होतो, यास्तव मूल जन्मल्यावर थोड्याच दिवसांनीं वरील उपनयनविधि व्हावा लागतो तो करणें; वधू व वर यांनीं देवळांत पाद्रीकडे जाऊन तेथें आणा शपथा कराव्या लागतात व लग्न नोंदून ठेवावें लागतें तो प्रकार; आणि शेवटल्या सार्वजनिक पुनरुत्थानापर्यंत मेलेल्या ख्रिस्ती मनुष्यास लांकडाच्या पेटींत पडून रहावें लागतें, तर हा भूमौकरणसंस्कार,—हीं तीन पाद्रींचीं मुख्य कामें होत. याखेरीज आपापल्या टापूंतलें लिहिणें ठेवणें, शाळांवर देखरेख ठेवणें, व दर आठा दिवसांनीं देवळांत उपासना चालवून एक धर्मव्याख्यान देणें, वगैरे कांहीं अल्पस्वल्प कामेंहि त्यांच्याकडे असतात. आतां या सर्व कामांकरतां एक स्वतंत्र अगडबंब खातें ठेवणें हें किती जरूरीचें आहे, व असें खातें ज्या लोकांनीं आज शेंकडों वर्षें चालविलें आहे त्या लोकांनीं इतर राष्ट्रांच्या धर्मभोळेपणाविषयीं निरंतर वाटाघाट करीत असावी हें किती शहाणपणाचें काम आहे, याचा आमच्या वाचकांनींच विचार करावा!

सदरहू प्रकरणाच्या संबंधानें लिहूं गेलें असतां आणखी पुष्कळ विस्तार होण्याजोगा आहे, पण त्याची विशेष अवश्यकता नाहीं, यास्तव पुढील दिग्दर्शन मात्र

---

१. इंग्लंडचे राज्यखात्याच्या संबंधानें जसे इकडच्या तालुक्यासारखे बावन्न परगणे केले आहेत, तसे धर्मखात्याच्या संबंधानेंहि पुष्कळ विभाग केलेले आहेत. या विभागांस 'प्यारिश' ह्मणतात. दरएक प्यारिशमध्यें जन्ममरण व विवाह यांचा नोंदणीपट ठेवलेला असतो. त्याप्रमाणेंच लोकांच्या उपासनेकरितां देऊळ, शिक्षणाकरितां गांवठी शाळा व जे अगदीं विपन्न होतील त्यांच्या निर्वाहाकरतां 'वर्कहौस' (कारखाना) यादि सोयी वरील विभागांत असतात.

करितों. आमच्या राज्यकर्त्यांनीं भटांच्या पायीं केवळ आपला स्वतःचाच देश नागवून ठेवला आहे असें नाहीं, तर आपल्या पाद्रींचें गवाळें त्यांनीं इतर देशांवरहि 'तुका ह्मणे माझें आहे संतांवरी ओझें' या न्यायास अनुसरून खुशाल ठेवून दिलें आहे. बिचारा ऐर्लंड देश, कीं ज्यानें आजपर्यंत आत्ममुक्त्यर्थ शेंकडों वेळां व्यर्थ प्रयत्न केले आणि या घटकेपर्यंत ज्याची सारखी आबळा चालली आहे त्यावर इंग्लिश सरकारानें तीनशांहून अधिक वर्षें आपल्या सुधारलेल्या[1] भटमंडळींचा उदरनिर्वाह खुशाल चालविला होता. ऐरिश लोक रोमन क्याथलिक, त्यांस सरकारी बिशप आर्चबिशपप्रभृति सद्धर्मोपदेशकांची बिलकुल जरूर नाहीं, तरी वरील अगडबंब धर्मखात्याचा बोजा त्यांच्यावर बिनादिक्कत ठेवून दिलेला होता! दुसरें उदाहरण आमच्या देशावें. येथें अद्याप एवढी मेहेरबानी झाली आहे, कीं 'ऐरिश चर्च'प्रमाणें येथें एक 'इंडियन चर्च' स्थापिन केलें नाहीं; ह्मणजे इतर शेंकडों संबंधानें गोऱ्या मंडळीस जसें येथें यथेच्छ चरायला सांपडतें त्याप्रमाणेंच तिकडची भिक्षुक मंडळीची झुंडहि इकडे सोडून देतां येती. तरी येथेंहि आर्चबिशप, बिशप, चापलन वगैरें शेकडों मंडळींचा तनखा चालू आहेच; नाहींसा नाहीं. कित्येक चापलनांस तर मुळीं कामहि नाहीं तरी त्यांचा पुख्खा आपला चालू आहेच!

वरील सरकारी धर्मखात्याखेरीज खाजगी धर्मखातींहि विलायतेस थोडीं आहेत असें नाहीं. आमच्या अज्ञानांधकारमग्न देशाच्या धर्मोन्नत्यर्थच किती मिशनें चालू आहेत. पहा हीं इतकीं विलायती भटांचीं अन्नसत्रेंच ह्मणायाचीं! येशूच्या प्रेषितांनीं वरील लक्षावधि रुपयांचे गळच या आर्यजनसमुद्रांत टाकून दिलेले आहेत, पण त्यांच्या प्रबळ आमिषास भुलूनहि कधींकाळीं एखाद्या महापर्वणीस लेले किंवा काणे यांच्यासारखा अंमळ जाडगेला असा मासा त्यांस गावतो! बाकी दर वर्षींच्या रिपोर्टांची खोगीरभरती व्हावयाला पुष्कळ महा-अरि किंवा मातंग ही मंडळीच मारून मुटकून सामील करावी लागते!

असो; तेव्हां एकंदरींत पहातां वरील विवेचनावरून कोणाहि निःपक्षपात बुद्धीच्या मनुष्याची खात्री होईल, कीं, 'लोकहितवादी'प्रभृतींनीं भटांच्या नांवानें जी हाकाटी आज कित्येक वर्षें उठविलेली आहे, कीं ते देशास केवळ भारभूत होत, ती अगदीं असंमजस होय. ज्या काळीं भटांचा साऱ्या देशांतून निःपात होईल, व धर्माची मनुष्यजातींत मुळींच जरूर रहाणार नाहीं, त्या काळीं आह्मीहि आपल्या भिक्षुकमंडळीस एकदम शेवटची सुपारी देऊन रजा देऊं; पण मोठमोठ्या शहाण्या

---

१. ऐर्लंडच्या संबंधानें ही मोठी चमत्कारिक व ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, तें अद्याप आपला मूळचा क्याथालिक धर्म राखून राहिलेलें आहे.

ह्मणवणाऱ्या देशांतून आजमितीपर्यंत जर भटांचें खूळ आहेच आहे, तर आह्मींच काय ते साऱ्या जगांत महामूर्ख व धर्मभोळे ह्मणून जे चोहींकडे टिमकी पिटतात, त्यांच्या शहाणपणाची, शोधाची, व निःपक्षपात बुद्धीची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडी असें आह्मांस वाटतें !

कवणाला न प्रिय तें गुणमणिमय केलिमंदिर श्रुतिचें ।
'आदिपर्व'.

अंक ७५—(१) ब्राह्मणांचें प्रस्थ. (२) हा मत्सरभाव उत्पन्न होण्याचीं कारणें. (३) ब्राह्मणांची व इतर राष्ट्रांची तुलना. (४) वस्तुस्थिति. (५) हलींच्या उच्च जातीच्या वर्तनांत व ब्राह्मणांच्या वर्तनांत अंतर. (६) शेवटले दोन मुद्दे.

१. 'लोकहितवादी' चा भिक्षुकवर्गावर, किंबहुना एकंदर ब्राह्मणज्ञातीवर हाहि एक मोठा रोख आहे कीं, त्यांचें प्रस्थ या देशांत प्राचीन काळापासून फार माजलेलें आहे. मनुष्यजाति ही वस्तुतः सारखी असून तींत जन्मतःच लहान थोर कोणी नाहीं असें असतां ब्राह्मणांनीं इतर वर्णांच्या लोकांस फसवून आपलें स्तोम इतकें माजवून ठेविलें आहे कीं, आज हजारों वर्षें लोटून गेलीं असतांहि 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः,' 'सागरे सर्वतीर्थानि पदे विप्रस्य दक्षिणे' वगैरे बंडाळी या घटकेपर्यंत कायम आहे ! आतां हें ढोंग इतकीं सहस्रावधि वर्षें निभलें कसें याविषयीं कोणाच्या मनांत शंका येईल, तर तिच्या समाधानार्थ रावबहादुरांनीं अशी एक अपूर्व कोटि काढली आहे कीं, या आपमतलबी ब्राह्मणांनीं अशी सारी विद्या अगदीं गूढ ठेविली, तेणेंकरून तींत काय आहे कोण जाणे या भ्रमांतच सारे इतर लोक गढून राहिले; व त्या मुळें 'झांकली मूठ सव्वा लाखाची' या ह्मणीप्रमाणें ब्राह्मणांचा व त्यांच्या विद्येचा भोपळा आजपावेतों न फुटतां तसाच राहिला ! पण आतां सरतेशेवटीं आकाशांतील प्रभूस ब्राह्मणेतर वर्णांची कींव येऊन त्यानें या भरतखंडाचें राज्य आपल्या लाडक्या लोकांस बहाल केल्यामुळें त्यांच्या प्रसादानें 'लोकहितवादी', 'गुलामगिरी'कार, 'सत्यदीपिका'धारी असे आज नवे ब्रह्मनिष्ठ उदयास येऊन त्यांनीं हें कितीका काळाचें ब्राह्मणांचें बंड मोडून तें 'पुरंदरच्या बंडा'च्या भेटीला पाठविण्याचा स्तुत्य उद्योग सुरू केला आहे !

२. आतां ब्राह्मणांच्या महत्त्वाच्या संबंधानें हा जो प्रस्तुत ग्रंथकारास मत्सरभाव उत्पन्न झाला आहे, किंवा निदान जो त्याच्या ग्रंथांतून व भाषणांतून नेहमीं व्यक्त होतो, तो ज्याचा त्यास निःपक्षपाततेच्या रूपानें मोठा भूषणप्रद वाटून तत्समानकालीन लोकांसहि नवीन विद्वत्तेचें परमसार ह्मणून वाटला असेल यांत संशय नाहीं; पण आह्मांस तर तो बऱ्याच अंशीं निराळ्या रूपानें भासतो हें आह्मांस प्रांजल

पणें कबूल करणें भाग आहे. निःपक्षपातपणाचें स्वरूप आह्मीं एवढेंच समजतों कीं—

शत्रोरपि गुणा वाच्या दोषा वाच्या गुरोरपि ।

"शत्रूचेहि गुण असले तरी ते बोलून दाखवावे, व प्रत्यक्ष आपल्या गुरूचे दोष असले तरी तेहि पण उघड बोलावे !" पण आमच्या नामदार साहेबांच्या व तद्वर्गीय लोकांच्या ठिकाणीं वरील पक्षपाताभाव कांहीं चमत्कारिक तऱ्हेचा नजरेस येतो. त्यांस वरील श्लोकार्धांत 'अपि' [हि] या शब्दाचें स्वारस्य मुळींच भासत नाहींसें वाटतें. त्यांचें वचन कांहीं निराळ्याच प्रकारचें; तें हें—

शत्रोर्गुणा एव वाच्या दोषा एव गुरोरपि !

"शत्रूचे गुण असतील तेवढेच काढावे, व गुरूचे जेवढे ह्मणून दोष आढळतील तेवढे काढावे" हा प्रकार गेल्या वीस पंचवीस वर्षांत झालेल्या पुष्कळ ग्रंथांतून आढळणारा आहे, हें सर्वांस महशूर आहेच.

आह्मांस ही गोष्ट कबूल आहे कीं, आपल्या देशांतली एखादी गोष्ट असली ह्मणजे तेवढ्यावरून तिची तारीफ करावी, किंवा तिचा वास्तविक दोष असेल तो छपवण्याचा प्रयत्न करावा, हे दोन्ही प्रकार अश्लाघ्य होत; जो आपणास न्यायी व निःपक्षपात ह्मणवितो त्यास वरील दोन्ही गोष्टी खपायाच्या नाहींत हें उघड आहे. पण आपले जेवढे ह्मणून दोष असतील तेवढे बाहेर काढून जगजाहीर करणें, आपणांवर बळेंच खोटे दोषारोप करून घेणें, किंबहुना आपल्या गुणांवरहि दोषत्व स्थापित करणें, आणि या सर्व कृत्यांबद्दल बिलकुल संकोच न मानतां उलटी आपली आपण मोठी फुशारकी मारणें, व हें मोठें लोकहिताचें कार्य आहे ह्मणून समजणें, हे सर्व निःपक्षपातत्वाचे कोणत्या मुलखांतले प्रकार असतील ते असोत ! आह्मांस तर वरील गोष्टींचा बिलकूल उमज पडत नाहीं. वरील पक्षपाताभावास आह्मी तर अज्ञानातिशय, मेंदु बिघडल्याचा प्रकार, किंवा अतिनिंद्य मनोधारणाचा प्रकार, अशीं नांवें देतों. ज्या बेट्या परद्वीपस्थ लोकांस इकडची उगीच उडत उडत माहिती सुद्धां पुरती मिळत नाहीं, व स्वाभिमानास अगर धर्माभिमानास पेटून जे निरर्गल प्रलाप करतात, त्यांची एक गोष्ट असो; किंवा जे येथल्या येथें मोट हाकायाची सोडून किंवा भांडीं ठोकायाचीं सोडून बारा पिढ्यांत न घडलेल्या साक्षरत्वसंस्कारांस पात्र झाल्यानें पोप कवीनें वर्णिल्याप्रमाणें ज्यांच्या ठायीं विद्यारूप वारुणीच्या पहिल्या झुरक्याचा पूर्ण अंमल नजरेस पडतो, त्यांचीहि गोष्ट एक वेळ राहूं द्या; पण वाग्देवीचें माहेरघर ह्मणून आज सहस्रावधि वर्षे नाणवलेल्या अत्युच्च वर्णांत जन्म झाला असून व बुद्धीस परम वैशद्य आणणारी जी पाश्चात्य विद्या तिचाहि पुष्कळ संस्कार घडला असून ज्यांस आपल्या देशांत निंद्यतेचाच प्रकार जिकडे तिकडे दृष्टीस पडतो, जें जें पहावें तें तें

मूर्ख, वेडगळ, कुत्सित अशाच रूपानें ज्यांच्या मनांत भरतें, व अखिल दोषमय अशा या भारतवर्षांत आह्मीं कोठचे हतभाग्य जन्मास आलों, ही समजूत ज्यांनीं स्वतः निरंतर उराशीं बाळगून ती आपल्या देशबंधूंच्या गळ्यांत घालण्याचांहि ज्यांचा चाळीस वर्षें अस्खलित प्रयत्न चालू आहे, त्यांची शहामत केवढी ह्मणावी! 'इसापनीतीं'तील खेचरास आपल्या अवलादीविषयीं खोटा अभिमान वाटत होता, कीं मी मोठ्या उमद्या घोड्याचा बच्चा आहें, तर मीहि वेळ पडल्यास आपल्या अंगचा पराक्रम धन्यास दाखवीन,—हा प्रकारहि आह्मांस तितका अप्रशस्त वाटत नाहीं; पण प्रत्यक्ष उच्चैःश्रव्यापर्यंत जरी आपली परंपरा लागत असली, व उत्कृष्ट शालिहोत्रज्ञांनीं जरी आपल्या अश्ववाविषयीं अनेक सर्टिफिकिटें दिलीं, व आपली धमक आपली आपल्याला जरी दिसत असली, तरी तें सर्व एकीकडे ठेवून निरपेक्ष बुद्धीनें जन्मभर अंगमेहनत करणारे जे कुंभकर्णाचे बंधु परम वैराग्यशील व पूर्णसमाधानी श्रीमत्सदानंदस्वामी[1] हेच आमचे महापूर्वज ह्मणून सतत हटाग्रह घेऊन बसणें या सत्यनिष्ठेस काय ह्मणावें हें बरीक आह्मांस समजत नाहीं! एका अंशीं खोटा अभिमानहि श्लाघ्य ह्मणतां येईल; कां कीं, त्यावरून थोर पदवीस चढण्याची उत्कट इच्छा तरी प्रगट होते. पण आपली वास्तविक योग्यताहि लोपविण्याचा प्रयत्न करून मुद्दाम कान लांब करून गाढवांच्या पंक्तीला बसणें यांत कोणास काय पुरुषार्थ वाटत असेल तो असो!

तेव्हां आह्मी आपल्या ज्ञातिबांधवांविषयीं ज्या भावना मनांत बाळगतों त्या 'लोकहितवादीं'च्या पेक्षां फार निराळ्या आहेत. प्रस्तुत विषयाच्या संबंधानें आमचाहि केवळ निःपक्षपात बुद्धीनेंच लिहिण्याचा संकल्प आहे; पण ही निःपक्षपातता बरील मासल्याची मात्र नाहीं. 'लोकहितवादीं'चा प्रयत्न जसा जेथें तेथें आपल्या देशबंधूंवर नक्षा करून व आपल्या ज्ञातिबांधवांवर प्रहार करून आपलें ज्ञानविशिष्टत्व मिरविण्याचा असतो, तसा आमचा बिलकूल नाहीं. गरीब बिचारीं जीं जुनीं 'भटें' किंवा जुन्या चालीचे गृहस्थ यांच्यावर आह्मीं आपल्या इंग्रेजी ज्ञानाची मोठी फुशारकी मारली ह्मणजे त्यांत आमचा पुरुषार्थ तो काय झाला! आह्मांला पहा भूगोलाचें कसें ज्ञान आहे कीं, आफ्रिका खंड, अमेरिका खंड, अटलांटिक महासागर पासिफिक महासागर, असें आह्मी ह्मणतों; नाहीं तर तुह्मी कोठलें जंबुद्वीप, क्रौंचद्वीप, दह्याचा समुद्र, मधाचा समुद्र वगैरे काहून इतके दिवस त्यांत गचकळ्या खात बसलां होतां; कसले तुह्मी गाढव लोक; इत्यादि वल्गना आजपर्यंत सहस्रावधि एतद्देशीय पंडितांनीं करून आपल्या बुद्धिमत्तेचें श्रेष्ठत्व मिरविलेलें आहे; पण आह्मांस तर हा

१. वरील स्वामी कोण हें आमच्या पुणेकर वाचकांस बहुधा सांगायाला नकोच. इतरांस संशय पडल्यास त्यांनीं अंक २३ व २४ हे पहावे.

निवळ पोरकटपणा वाटतो! त्यांतून 'लोकहितवादी'प्रभृतींनीं कुक, म्याजेलन यांच्याप्रमाणें जर एखादी मोठी सफर तरी केली असती, किंवा पासिफिक महासागर माहीत असल्याचें कांहीं चीज करून दाखविलें असतें, तर वरील घमेंडींत कांहीं अर्थ तरी होता; पण तसें कांहींच नसल्यानें दुग्धसमुद्राच्या जागीं भूमध्यसमुद्र आल्यानें एवढा कोणता फरक झाला तो आह्मांस समजत नाहीं! दुसऱ्याच्या उसन्या ज्ञानावर आपणच मधल्यामध्यें फुगून जावें हें कोणाहि समंजस मनुष्यास पसंत पडणार नाहीं. असो; तर या देशांत जीं ब्राह्मणांची व भटांची स्थिति आढळते तिजविषयीं पुढें जें आह्मी लिहिणार तें परद्वीपस्थांचें ज्ञाननेत्र उसनें घेऊन त्यावरून लिहिणार असें नाहीं. तर एकंदर जगाविषयीं विचार केला असतां कोणाहि मनुष्याच्या ज्या तिऱ्हाईतपणानें समजुती होण्यासारख्या आहेत त्या येथें दाखल करूं.

३. अलीकडे भाषाशास्त्रांतील प्रमेयांवरून व कांहीं अवांतर प्रमाणांवरून पाश्चात्य पंडितांनीं असा सिद्धांत ठरविला आहे कीं, हें भरतखंड मूळचें आमचें नव्हे; तर कॉकेजस पर्वताच्या आसपास जीं आर्यराष्ट्रें रहात असत त्यांपैकीं पुढें कित्येक पूर्वेकडे गेलीं व कित्येक पश्चिमेकडे गेलीं, त्यांपैकीं प्राच्य आर्य ह्मटले ह्मणजे आह्मी व पारसीक हे आहों. पारसीकांनीं इराणाचा वाट धरली, व आह्मी पंचनद (पंजाब) देशांतून या हिंदुस्थानांत शिरलों. ही उपपत्ति जर स्वीकारली, तर आह्मीं मुसलमान, फिरंगी, इंग्रेज, यांच्यासारखेच परस्थ आहों असें झालें. आतां या ठिकाणीं एवढाच विचार कर्तव्य आहे कीं, आह्मी आपापसांत व आमच्या अंकित लोकांशीं कोणच्या तऱ्हेनें वागलों?

वैदिक काळांतल्या स्थितीविषयीं अलीकडे असा सिद्धांत ठरला आहे कीं, त्यांत जातिभेदाचा प्रकार मुळींच नव्हता.[१] तेव्हां या काळांत ब्राह्मणांचें बंड मुळींच नव्हतें हें उघड आहे, यास्तव या आद्य युगाविषयीं तर विचार करायाला नकोच. पुढलें पौराणिक युग; या दुष्ट काळांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी वर्णव्यवस्था होऊन या आर्यभूमींत अवदशेनें प्रवेश केला. आतां या युगांत तरी हे चारी वर्ण एकदम कसे बांधले गेले हा एक दुर्घटच विचार आहे; पण ते कसेहि झाले असले तरी हें उघड आहे कीं जे जे ज्या ज्या वर्णाला योग्य त्यांत त्यांत त्यांचा अंतर्भाव झाला असेल, ह्मणजे जे ज्ञानी व तपोनिष्ठ ह्मणून निवडले गेले असतील त्यांवर ब्राह्मणत्वाचा शिक्का बसला असेल, ज्यांच्यांत क्षात्र तेज चमकत असेल ते दुसऱ्या वर्गांत सामील झाले असतील, ज्यांचा वाणिज्याकडे व नौकागमनाकडे कल ते वैश्य बनले असतील, आणि वरील तिन्ही गाळण्यांतून निसटलेलीं जीं गाळींव रत्नें तीं व कदाचित् मूळचे रहिवाशी

१. पुरुषसूक्तांतील चातुर्वर्ण्योपपादक ऋचा सर्वप्रसिद्धच आहे. पण वरील सूक्त हें प्रक्षिप्त होय असें अर्वाचीन पंडितांचें ह्मणणें पडतें. मग खरा प्रकार काय असेल तो असो!

अनाडी लोक यांचा चौथा वर्ण झाला असेल. हें वर्गीकरण होतांच ब्राह्मणांनीं आपला आश्रम पतकरला असेल, क्षत्रियांनीं राजवेत्राचा स्वीकार केला असेल. वैश्यांनीं नौकेचा सुकर्ण धरला असेल व शूद्रांनीं बळीराजाच्या मानेवर जोखड ठेवून खांद्यावर आसूड टाकून कृषिकर्मास सुरवात केली असेल! ही आपापसांतली व्यवस्था झाली. आतां या आमच्या आर्यांनीं आपण जिंकलेल्या लोकांस कसें वागविलें हें जर पाहिलें तर शूद्रांस किंवा भिल्लप्रभृति लोकांस त्यांनीं शिकारी कुत्र्यांकडून फाडविलें किंवा त्यांचा समूळ निःपात करून टाकला अशाविषयीं तर कोठें दाखला मिळत नाहीं. एवढे शूद्रांचे कैवारी रा० जोतीराव, व एवढी त्यांची बृहत्संहिता 'गुलामगिरी'; पण आकाशांतील बापाच्या पवित्र लेंकरांनीं जेथें तेथें जो कंठस्नानाचा पवित्र विधि आचरलेला आढळतो तसा कांहीं प्रकार 'उद्धट व दांडग्या'[1] भटांनीं कोठेंच केलेला नजरेस येत नाहीं!!

तर वरील दोन्ही प्रकार पहातां ब्राह्मणांस दूषण ठेवण्यास जागा रहात नाहीं हें कोणाहि विचारी मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. पहिल्यानें उच्चनीचभाव मुळींच नसतां ब्राह्मणांची जर त्यांच्या गुणांवरून ज्ञाति बांधली असेल, तर त्यांनीं आपलें प्रस्थ माजवलें असें ह्मणण्यास जागा कोठें राहिली? 'आपलें' या शब्दाचा प्रयोगच मुळीं प्रस्तुत स्थलीं केवळ व्यर्थ होय! हें एक झालें. दुसरें असें कीं, हे जे लबाड ब्राह्मण आपण होऊन उंच पायरीवर बसले त्यांनीं आपल्या श्रेष्ठत्वाचा उपयोग काय करून घेतला ह्मणाल तर वनवास व तपश्चर्या! कंदमुळें खावीं, पर्णकुटींत रहावें, विषयत्याग करावा, पंचाग्निसाधनादि खडतर तपें आचरावीं, वेदाध्ययन व शास्त्रविचार यांत मग्न असावें, हीं खुळें त्यांनीं माजवलीं![2] नाहीं तर आमच्या पवित्र धर्मांतली तरी मौज पहा. विलायतेंतले बिशप व आर्चबिशप किंवा

---

१. (पृष्ठ ४२२ अंक ३१ पहा.)

२. आमच्या पूर्वजांविषयीं ग्रीक व रोमन लोकांच्या ग्रंथांतून पुष्कळ उल्लेख सांपडतात. ब्राह्मणांची तपश्चर्या, स्त्रियांचा अग्निप्रवेश, इत्यादि अपूर्व प्रकार पाहून व ऐकून वरील लोकांस किती विस्मय वाटत असे तें त्यांच्या ग्रंथांवरून व्यक्त होतें. शिकंदर बादशहानें हिंदुस्थानावर स्वारी केली त्या वेळचीं चमत्कारिक हकीकत मोक्षमुलर साहेबांनीं येणेंप्रमाणें दिली आहे—

"No people certainly made a more favourable impression upon the Greeks than the Indians. And when we read the account of their moral and intellectual condition at the time of Alexander, we are obliged to admit that if some of their good qualities are no longer to be met with among the Indians of later times, this is owing, not entirely to an original defect of character, but to that continual system of oppression exercised

रोमनगरींतले ख्रिस्ताचे प्रतिनिधि यांचा थाट काय?—रहायाला टोलेजंग राजवाडे, जेवायाला चांगलें चमचमीत, प्यायाला अर्वाचीन सोमरस, इ० इ०! तीन शतकांपूर्वी तर पोप साहेबांची काय बडेजाव असे, केवढें ऐश्वर्य असे, व काय विलास असत ते तर सांगायाला नकोच! तिसरी गोष्ट अशी कीं, आपले आज्ञांकित जे लोक त्यांवर ब्राह्मणांचा सोटाहि इतर देवप्रिय लोकांप्रमाणें फिरल्याचें कोठें आढळत नाहीं. महंमदाचे अनुयायी आमच्या देशांत व इतर अनेक देशांत शिरले, आणि त्यांनीं केलें काय? धरा, मारा, झोडा, लुटा, सुंता करा, हें एकंदर चरित्र! प्रभु येशूचे पवित्र लोक या आर्यभूमींत शिरले व अमेरिकेंत प्रविष्ट झाले. केलें काय?—सारी अमेरिका आपल्या प्रभूच्या नांवें व पोपसाहेबांच्या हुकुमाअन्वयें[1] ओस करून टाकली, व मूळचे बिचारे

---

upon them by foreign conquerors, to whose physical power they submitted, while they could not help despising their masters as barbarians. Of the demoralising influence of a foreign occupation we have an instance in the time of Alexander, in the story of Kalanas (Kalyana), who yielded to the flattering offers of the European conqueror, and left his sacred home to follow his royal master as a piece of curiosity. But Megasthenes was afterwards informed that the behaviour of Kalanas was strongly disapproved of by his friends, as ambitious and servile; while Mandanis was praised for his manly answer to Alexander's messengers, not only by his countrymen, but by Alexander himself. It was not long before Kalanas repented his unworthy ambition, for he burnt himself soon after a Pasargada, in the same manner as the only other Brahman who reached Europe in ancient times, burned himself at Athens, to the astonishment of the Greeks, who erected a tomb to him, with the inscription, "Here lies the Indian Sarman Cheya (Sarman Acharya?), from Barygaza, who sought immorality after the old custom of the Indians.

—*Ancient Sanskrit Literature.*

१. कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावल्यावर स्पेनच्या लोकांनीं मेक्सिको व पेरू, या समृद्ध देशांवर लवकरच गर्दी करून सोडली, व तेथें मूळच्या लोकांचीं जीं मोठालीं राज्यें होतीं तीं मोडून टाकलीं. ही भूमि बळकावण्याबद्दल स्पेनच्या राजास पोप महाराजाकडून आज्ञापत्र मिळालें होतें. पोप हे ख्रिस्ती धर्माचे मुख्य आचार्य असल्यामुळें ज्या त्या महत्कृत्याला त्यांची आज्ञा घ्यावी लागत असे. वरील देशच्याच राजानें जेव्हां आपलें 'आर्जिक्य आरमार' इंग्लंडावर पाठविलें, तेव्हां त्यावरहि वरील आचार्यांच्या हातच्या आशीर्वादाक्षता

इंडियन लोक हे सूर्यादि देवतांचे उपासक होते, यास्तव त्यांचा पार झप्पा उडवून देऊन सारी भूमि पवित्र करून सोडली! आमच्या देशांत तरी प्रथमतः याचकवृत्तीनें येऊन वरील लोकांनीं फावलें तोंपर्यंत पुष्कळ पुंडाई केली, पण पुढें तिजबद्दल त्यांस वरेंच खरपूस प्रायश्चित्त मिळालें. आफ्रिकाखंडांतील नीग्रो लोकांवर तर ख्रिस्तभक्तांची केवढी कृपा होत असे हें साऱ्या जगास महशूर आहेच. तर या सर्व प्रकारांपैकीं एकहि प्रकार आमच्या वसिष्ठविश्वामित्रादि पूर्वजांच्या आचरणांत दृष्टीस पडला नाहीं ही लहानसान गोष्ट नव्हे!

४. तर ब्राह्मण लबाड, ब्राह्मण मतलबी, ब्राह्मण लोभी वगैरे आरोपापासून आमचे पूर्वज वरील कोटिक्रमावरून बहुधा मुक्त होतील जसें वाटतें. आतां त्यांनीं सर्वांचें पायां पडून घेतलें, आपण भूदेव अशी आपणांकडे थोरवी घेतली, आपल्या चरणतीर्थाचे ठायीं पावनत्व स्थापित केलें, अध्यापन, याजन व प्रतिग्रह हे हक्क आपणांकडेच ठेवले, ब्राह्मणानें कोणताहि अपराध केला तरी त्यास मृत्यूच्या शिक्षेची माफी असें ठरविलें, इत्यादि अनेक कलमांची याद आमचे प्रतिपक्षी आमच्यापुढें टाकतील. वरील कलमें खरीं आहेत, हें कोणासहि कबूल करणें भाग आहे. पण वरील गोष्टींबद्दल ब्राह्मणांवर व भटांवर कडाका उडविण्यापूर्वी आमचे प्रतिपक्षी जरासा शांतपणें जर विचार करतील, किंवा एकंदर राष्ट्रांत आढळणाऱ्या स्थितीकडे अंमळ लक्ष पुरवतील, तर त्यांचे प्रलाप पुष्कळ कमी होतील असें आह्मांस खास वाटते. ब्राह्मणांचे ठिकाणीं इतर वर्णांहून जर विद्वत्त्व, पावित्र्य वगैरे गुण अधिक आहेत, व सर्व पूज्यतेचें अधिष्ठान जो धर्म त्याचा अधिकार जर त्यांच्याकडे आहे, तर त्यांच्याकडे विशेष पूज्यत्व असायला कोणता प्रत्यवाय आहे? अज्ञानी मनुष्यानें ज्ञानवंतास श्रेष्ठ मानणें हा अन्याय आहे काय? धर्माचरणांत कालक्षेप करणाऱ्या पवित्र पुरुषास इतरांनीं मान दिला असतां त्यांत गैर काय आहे? त्यांतून आमच्या अर्वाचीन पंडितांस कधीं असें आढळलें आहे काय, कीं शिंदा उठला आणि साऱ्या पाणक्यांच्या पायां पडत सुटला. किंवा दाभाड्याचें व पेशव्याचें युद्ध लागलें तेव्हां मला ब्रह्महत्या घडेल अशी दाभाड्यास मोठी धास्ती पडली! कांहीं नाहीं; धर्मांतील मतें निराळीं व व्यवहार निराळा. जगांत प्राधान्य झटलें तर व्यवहाराचें आहे; या व्यवहारावर धर्मसंबंधीं मतांचें पुष्कळ कार्य घडतें खरें, तरी एकंदरींत पहातां व्यवहारच धर्माला आपणाकडे ओढीत असतो. यास उदाहरण ब्राह्मणांचेंच पहा. ब्राह्मणांचा मुख्य धर्म झटला झणजे अग्नीची उपासना व वेदाध्ययन. या दोहोंतलें हल्लीं कितीसें शिलक उरलें आहे बरें? पाणिनि, यास्क वगैरे मंडळीच्या वेळीं हजारों पशूंचीं आहुति पडून इंद्रवरुणादि देव तृप्त होत

पडल्या होत्या. पण दैवयोग विचित्र; कीं त्या अक्षता व आरमार या दोघांनींहि शार्मण्यसागराच्या तळीं बरोबर ठाव घेतला!!

असत; तेंच पुढें कालिदास, भवभूति, यांच्या वेळीं पहावें तों त्यांच्या काव्यांत इंद्र-वरूण कोणीकडे लोपून जाऊन दुसऱ्याच देवांचें प्राधान्य आढळतें; त्यांतूनहि अलीकडे यावें तों आमचे नामदेव, तुकाराम हे एका तिसऱ्याच देवापुढें प्रेमभरांत नाचताहेत असें आढळतें. आमच्या जोशीबोवांनीं एका लावणींत याज्ञिकांवर भडिमार उठवून यज्ञकर्माचा जो विचका करून दाखविला आहे तो त्यांच्या गोत्रपतीला कितपतसा रुचला असता बरें ? किंवा रामेश्वरभट्ट हा सर्वांगाचा दाह झाला असतां स्वकृत शूद्र-गुरूच्या पायां पडतांना जर आमच्या मुख्य स्मृतिकारानें पाहिला असता तर त्याची काय वृत्ति झाली असती ! त्यांतून अलीकडे म्लेंछसार्वभौमत्वापासून आमच्या आचार-विचारांत जे पुष्कळच बदल झाले आहेत ते तर प्राचीन स्थितीस किती प्रकारें विरुद्ध आहेत, हें सांगायला नकोच ! तेव्हां एकंदरींत पहातां धर्मपुस्तकांत लिहून ठेवलेल्या गोष्टी व प्रत्यक्ष घडणारा व्यवहार या दोहोंत पुष्कळच अंतर असतें, व वरील झटा-पटींत कोणता पक्ष बहुधा प्रबल होत असतो, हें कोणच्याहि सहज लक्षांत येणारें आहे. मग असें असतां वस्तुतः घडणारा प्रकार काय आहे, इकडे बिलकुल लक्ष न पुरवतां केवळ ग्रांथिक वचनांचा आधार घेऊन त्यांवरून वेडगळ कुतर्क करीत बसावयाचें व यथेच्छ जल्पना करायाची हा केवढा शहाणपणाचा मार्ग आहे बरें ![1]

---

१. केवळ ग्रांथिक वचनांचाच जर विचार केला तर हिंदुधर्मांतील वचनें जितकीं व्यवहाराला विरोध करणारीं आढळतील तितकीं अन्यधर्मांत आढळणार नाहींत असें नाहीं. पहा कीं ख्रिस्ती धर्मांत आदितवारीं काम करणें हें घोर पातक मानलें आहे; पण त्या वचनामुळें 'वॉटरलू'ची प्रचंड लढाई राहिली काय ? ख्रिस्तानें आपल्या शिष्यांस आज्ञा केली आहे कीं बाबांनो, मच्या एका थोबाडींत कोणीं दिली तर त्याच्यापुढें दुसरा गाल करीत जा. पण याच सच्छिष्यांची कृति साऱ्या जगभर काय आहे ती पहा ! ज्या प्रभूनें सूळावर चढतांना आपल्या शत्रूंच्याबद्दल प्रार्थना केली तो कोणीकडे, आणि साऱ्या जगाला ज्यांचा सुळसुळाट पुरून उरला आहे अशीं आकाशांतील बापाचीं गरीब कोंकरें कोणीकडे ! योहान्नाचें शुभवर्तमान अध्याय १४ ओवी १२ हींत प्रभु येशूचें आपल्या अनुयायिवर्गास असें भरपूर आश्वासन आहे—"मीं तुह्मांस सांगतों, मी जीं कामें करितों तीं मजवर विश्वास ठेवणाराहि करील, आणि त्यांपेक्षां मोठींहि करील, कारण कीं, मी बापाकडे जातों." या वचनावरून स्पष्ट आहे कीं येशूनें निजधामाला जातांना आपल्या कामाचा हवाला ख्रिस्ती लोकांस देऊन टाकला आहे, मग आह्मी जर आमचे बंधु 'ज्ञानोदय'कर्ते यांस ह्मणूं लागलों कीं, काय हो तुह्मी आज चाळीस वर्षें ख्रिस्ती धर्माची दीक्षा धारण करून बसलां आहां, मग वरील पवित्र शास्त्रोक्तीस अनुसरून आपण आह्मांस थोडेबहुत चमत्कार करून दाखवाल काय ? येशू समुद्रावरून चालत गेला; तुह्मी एका खेपेला आगबोटीची गरज न ठेवतां मुंबईच्या समुद्रावर जो पाय ठेवा ते थेट लंडनच्या धक्क्यापर्यंत तडक चालत जा ! वाटेनें वादळें वगैरे लागतील ह्मणाल, तर तें साधनहि तुमच्यापाशीं आहेच. कांकीं, ये नें हुं ह्मटल्याबरोबर वादळ शांत झालें, त्याप्रमाणें तुह्मीहि आपला अंमल गाजवा ह्मणजे झालें ! ख्रिस्त महाराजांनीं पांच

५. त्यांतून आमच्या नामदार साहेबांसारख्या अर्वाचीन तत्त्वज्ञान्यांस ज्यांच्यापासून प्रकाश प्राप्त झाला असे जे इंग्रेज ग्रंथकार व विशेषतः मिशनरी लोक ते दुसऱ्यांच्या संबंधानें एवढें प्रचंड पांडित्य जे प्रगट करतात ते स्वतः त्यांतला एखादा शिंतोडा तरी आपल्या अंगावर कधीं घेऊन पहातात काय? तो जर ते घेतील तर किती चमत्कारिक गोष्टी बाहेर पडतील बरें? ब्राह्मणांचें इतर वर्णांशीं जें वर्तन दृष्टीस पडतें त्याची आणि आमच्या पाश्चात्य प्रभुजनांची एतद्देशीय लोकांशीं जी वागणूक नजरेस येते तिची अशी परस्पर जर तुलना केली तर काय निष्पन्न होईल? ब्राह्मण हे परम दुर्जन व इंग्रेज लोक अत्यंत सज्जन असें ठरेल काय? आमच्या देशांतील मोठा वेदशास्त्रसंपन्न पवित्र ब्राह्मण भागीरथीचें स्नान करून धौतवस्त्रांनिशीं रस्त्यानें चालत असून समोरून जर अंत्यज आला तर फार झालें तर तो त्यास दूर व्हावयाला सांगेल, किंवा आपणावर सावली न पाडण्याविषयीं सांगेल; पण झाडचे तुटून आलेल्या कित्येक गौरकाय अंमलदारांचा आपलें महत्त्व गाजवण्याचा काय प्रकार असतो तो पुष्कळांस माहीत असेलच. साहेब बहादुरांस देखल्याबरोबर साऱ्या काळ्या रयतेनें त्यास सलाम केला पाहिजे. नाहीं तर खाडदिशीं चाबूक! आमच्या एका विद्वान् रावबहादुरांचें अपवित्र दर्शन एका पाश्चात्य स्त्रियेस दुःसह होऊन आगगाडीच्या डब्यांतून त्यांचें बलात्कारेंकरून निष्कासन केलें ही गोष्ट सर्वांस श्रुत आहेच. फार दूर कशाला, बादशाही अंमल सुरू झाल्या पासून बूटमाहात्म्य किती वाढलें आहे हें सर्वांस माहीत नाहीं काय? हायस्कुलांतून सुद्धां बादशाही कदर; कीं खबरदार साहेबांपुढें नेटिव जोडे घालून उभे रहाल तर; या नव्या बादशाही दैवतांपुढें गरीब जीं नेटिवें त्यांनीं अनवाणी पायांनिशीं पुढें उभें राहून आपण किती दीनवाणी झालों आहों, हें पूर्णपणें दाखविलें पाहिजे. असें तीं न करतील तर त्यांस राजद्रोही म्हणून समजण्यांत येईल?

पाव व दोन मासे एवढ्या सामग्रीवर पांच हजार माणसें जेवूं घातलीं; मग ज्ञानोदय कचेरींत गेल्या दुष्काळांत अशीं सहस्रभोजनें कां बरें झालीं नाहींत! लाखों माणसांनीं अन्न अन्न करून प्राण सोडला हें तुमच्यानें खुशालपणें कसें बरें पाहवलें? आपल्या नेहमींच्या पुरण्यांतून पांच पाव व दोन मासेहि कोणाच्यानें वगळले नाहींत काय!"— या सर्व प्रश्नांस आमचे सद्धर्मी बंधु काय उत्तर देतील बरें! तेव्हां एकंदरींत ही गोष्ट उघड आहे, कीं कोणत्याहि राष्ट्राच्या धर्मावरून त्याचा व्यवहार पहाणें किंवा व्यवहारावरून धर्माची परीक्षा करणें या दोन्ही गोष्टी पुष्कळ अंशीं असमंजसपणाच्या होत.

१. सन १८७७ च्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर जो बादशाही अंमल आमच्या देशांत सुरू झाला तो विद्याखात्यासारख्या धर्मखात्यांत तरी विशेष सक्तीनें सुरू होणार नाहीं असें वाटलें होतें. कां कीं, एक तर विद्यार्थी पढवावयाच्या जागा म्हणजे कांहीं सरकारी दरबारें नव्हेत; तेव्हां 'खडी ताजीम', 'नजर रख्खो', वगैरे प्रकार तेथें पुष्कळ अंशीं हास्यास्पदच होत. देवळांत धर्मोपदेशक यावयाचा आहे; तर तुताऱ्या वाजताहेत ब्यांडबाजा झडतो आहे,

आह्मींच कांहीं दिवसांपूर्वी माजी बादशाहीच्या रीतरिवाजांस हंसत होतों, व दिल्लीच्या दरबारीं किंवा हैदराबादच्या कचेरींत ज्ञानवंतांत अग्रगण्य जी पाश्चात्य मंडळी तीस सात दरवाज्यांच्या आंत बूट काढावा लागे, व हुजुरांत उभे रहायाचें तें बंदिवानाप्रमाणें हात बांधून उभें रहावें लागे, इत्यादि प्रकार नुकतेच आह्मांस हास्यास्पद वाटत असत; पण तें वाटणें निवळ मूर्खपणाचें होतें असें आतां आह्मांस कळतें! कुरनिसा, मुजरे, कदम, मुलाजा, खामोष, वगैरे सोंगें मागील काळांतल्या अर्धवट रानटी बादशाहीला लागू होतीं असा आमचा व प्रायः सर्वांचा समज होता![1] पण माजी बीकन्सफील्ड साहेब यांनीं आपलें जातिस्मरत्व प्रगट करून आमच्या महाराणी साहेबांस केसर-इ-हिंद ही फारसी किताबत घेऊन दुष्काळाच्या ऐन भरांत कण्हत पडलेल्या आमच्या हिंदुस्थानास तर 'जनरल ऑफ दि एंपायर'पासून तों 'रावबहादुर'पर्यंत बेगडी किताबांनीं जेव्हां अगदीं मढवून काढलें तेव्हां आमच्या डोळ्यांत एकदम अंजन पडलें, व आह्मांस साफ दिसूं लागलें कीं आमच्या पाश्चात्य प्रभूंनीं येथें साठ वर्षें जी बादशाही भोगली ती अगदीं आळणीपणानें भोगली! प्रजेकडून तिच्या धन्यांचा मानमरातब जर नाटकी थाटामाटानें यथास्थितपणें उठला नाहीं, तर मग सार्वभौमत्व तें काय!

अशा थाटानें त्यानें प्रवेश करून व्यासपीठावर चढावें हें जितपत शोभेल, तितपतच वरील प्रकार शोभणारे आहेत. शिवाय, ज्या विद्यार्थ्यांच्या कडून दररोज इंग्लंडच्या इतिहासाची संथा घेववावयाची त्यांसच मोगलाई कुरनिसा करण्याचीहि लहानपणापासून संवय लावावयाची ही तऱ्हाहि आह्मांस फार विलक्षण दिसते! इंग्रेजी विद्येचा प्रभाव स्वाभिमान, थोर बुद्धि, अशा रूपानें दृष्टीस पडावा असा जर तिच्या पुरस्कर्त्यांचा उद्देश असेल, तर त्याची व वरील मोगलाई बंदेशाईची कशी सांगड जुळणार कोण जाणे! आमच्या सरकारास सर्व इंग्रेजी विद्यार्थी बादशाही अमलास पुरतेपणीं योग्य व्हावे असें जर वाटत असेल, तर इंग्लंडच्या इतिहासाच्या ऐवजीं मोगलाईचा किंवा तुर्कस्थानचा इतिहास योजला असतां ठीक पडेल; कां कीं मग ह्यांपडन, वॉरिंगटन वगैरे दुर्वृत्त मनुष्यांचीं नांवें विद्यार्थ्यांच्या कानावर पडण्याचा संभव रहाणार नाहीं; व जो जो नवा आक्ट पसार होत जाईल त्याला 'आमेन' ह्मणण्यास सर्व शिकतील! शिवाय सध्यांचे विद्याविनयसंपन्न डायरेक्टर साहेब यांच्या बंगल्याच्या पायऱ्यांखालीं ग्राज्वेट मंडळीची जी वरंवार योग्य संभावना होत असते तिजपासूनहि कोणास खेद वाटण्याचें विशेष कारण रहाणार नाहीं!!

१. माजी गवर्नर जनरल लॉर्ड बेंटिंक यांचा कलकत्त्यास जो पुतळा आहे, त्याच्या खालीं मेकॉले साहेबांनीं रचून दिलेला लेख खोदला आहे; त्यांत पुढील चमत्कारिक वाक्य आहे—"Who infused into Oriental despotism the spirit of British Freedom;" (ज्यानें प्राच्यदेशीय साम्राज्यांत इंग्लंडाच्या स्वातंत्र्याची मूर्ति ओतली!). बिचारे बेंटिंक व मेकॉले! चाळीस वर्षांनंतर त्यांच्या जागीं बीकन्सफील्ड व डिझ्रेली या बादशाही मूर्ति अवतीर्ण होऊन 'ब्रिटिश स्वातंत्र्य', 'छापण्याची मोकळीक', 'जातिभेदभाव' वगैरेंची किती धुळधाण होऊन जाणार आहे हें त्यांच्या स्वप्नींहि आलें असेल काय?

६. आतां वरच्यांपैकीं एक दोन मुद्द्यांविषयीं मात्र लिहून हें एकंदर ब्राह्मण-प्रकरण आटपतों. एक हा कीं, मनूनें ब्राह्मणांस देहान्तशासनाची जी माफी दिली आहे ती होय. ही माफी पाहून आमचे पाश्चात्य बंधु व विशेषतः ख्रिस्ताचे प्रेषित हे फार हळहळतात; कां कीं, एकाच ज्ञातीस तेवढें कायद्यांतून वेगळें करणें हा केवढा घोर पक्षपात आहे?[1] कां कीं, सर्व मनुष्यें ह्मणजे आकाशांतील बापाचीं लेकरें होत, आणि कायद्याच्या दृष्टीनेंहि सारीं मनुष्यें सारखींच; मग वरील भिन्नभाव हा किती अन्यायाचा

---

१. कंपनीची नवी सनद होते वेळीं १८३३ सालीं मेकॉलेनें जें पार्लमेंटांत भाषण केलें त्यांत पुढील उद्गार निघाले होते—

"The danger is that the new-comers, belonging to the ruling nation, resembling in colour, in language, in manners, those who hold supreme military and political power, and differing in all these respects from the great mass of the population, may consider themselves as a superior class, and may trample on the indigenous race.....Unless, therefore, we leave the natives exposed to the tyranny and insolence of every profligate adventurer who may visit the East, we must place the European under the same power which legislates for the Hindoo. No man loves political freedom more than I. But a privilege enjoyed by a few individuals, in the midst of a vast population who do not enjoy it, ought not to be called freedom. It is tyranny. In the West Indies I have not the least doubt that the existence of the Trial by Jury and of Legislative Assemblies has tended to make the condition of the slaves worse than it would otherwise have been. Or, to go to India itself for an instance, though I fully believe that a mild penal code is better than a severe penal code, the worst of all systems was surely that of having a mild code for the Brahmins, who sprang from the head of the creator, while there was a severe code for the Sudras, who sprang from his feet. India has suffered enough already from the distinction of castes, and from the deeply-rooted prejudices which that distinction has engendered. God forbid that we should inflict on her the course of a new caste, that we should send her a new breed of Brahmins, authorised to treat all the native population as Parias!"

आहे बरें? खरें आहे; आमच्या पाश्चात्य तत्त्वज्ञांनीं हें मोठें अमोलिक तत्त्व शोधून काढलें खरें; पण लिहिण्यास खेद ह्मणून एवढाच वाटतो कीं, तें फारकरून त्यांच्या बुकांतल्या बुकांतच काय तें आढळतें. त्यांचा उपयोग ह्मटला ह्मणजे प्राय: इतकाच, कीं आह्मी पहा किती न्यायी आहों, हें आह्मांस, पररा्ट्रांस, आणि यापुढें होणाऱ्या राष्ट्रांस समजावें! बाकी एकाच अपराधाबद्दल काळा व गोरा हे दोघे सोबतीनें यमराजाच्या नगरास दाखल झाले असा प्रकार फारच क्वचित् आढळतो. काळ्या मनुष्याच्या प्राणाची किंमत फारकरून अल्पस्वल्प दंड, कैद, स्थलांतर, इतक्याच रूपानें घेतली जाते. ही गोष्ट तर आबालवृद्धांस श्रुत आहेच. शिवाय युरोपियन अपराध्याची चौकशी करायाची झाली तर न्यायाधीश युरोपियन असला पाहिजे, पंच गोरे पाहिजेत, वगैरे नि:पक्षपातपणाचीं आणखी कलमें आहेत तीं निराळींच. तर या सर्व गोष्टींचा विचार केला असतां आमच्या जुन्या स्मृतिकारांत व अर्वाचीन कोडकर्त्यांत फरक कोणता होतो तो आह्मांस चांगलासा समजत नाहीं. अन्याय जर करायाचाच, तर तो सर्वांस सांगून उघडपणें केलेला एक वेळ इतका वाईट वाटणार नाहीं. पण आव मात्र सगळा बाहेरून निवळ सोवळेपणाचा आणि समदृष्टीचा, आणि कृति अगदीं भिन्न, हें मात्र कोणाच्या न्यायानुवर्ती मनास भावत असेल तें असो!'

७. दुसरा मुद्दा हा कीं, ब्राह्मणांनीं आपली विद्या लपवून ठेवली, व तसें केल्यानें त्यांचा आजपर्यंत बोज राहिला. या दोन्ही गोष्टी प्रस्तुत ग्रंथकाराच्या दृढतर दुराग्रहाच्या मात्र दर्शक होत. वेदांमुद्धां सर्व विद्या शिकण्याचा अधिकार सर्व द्विजांस ह्मणजे पहिल्या तिन्ही वर्णांस आहे हें 'लोकहितवादी'नीं कसें लक्षांत आणलें नाहीं कोण जाणे? चवथा जो मंदबुद्धि शूद्रवर्ण त्यासहि पुढें पुराणद्वारा सर्व ज्ञान करून घेण्यास खुला मार्ग झाला हीहि गोष्ट सर्व प्रसिद्धच आहे. पण हे सर्व कोण विचार पहातो? आपण ब्राह्मण असतां आपल्या ज्ञातीवर बेधडक भडिमार करतों हा धीट-

१. वरील लेखाच्या संबंधानें मलिका माआझमा महाराणी साहेबांनीं १८५८ सालीं प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यांतील कांहीं कलमें लक्षांत आणण्यासारखीं आहेत. तीं येणेप्रमाणें–

"धर्मसंबंधी विचाराच्या, किंवा आचरणाच्या सबबीनें कोणाची तरफदारी होऊं नये, व कोणास इजा होऊं नये; व कोणास दु:ख होऊं नये; तसेंच कायद्यांचा आश्रय सर्वांस समान रीतीनें व नि:पक्षपातानें लोकांची जात किंवा धर्म मनांत न आणतां द्यावा.

"ईश्वरकृपेनें जेव्हां हिंदुस्थानांत स्वस्थता होईल तेव्हां त्या देशांतील व्यापारधंद्यांस उत्तेजन द्यावें, लोककल्याणाच्या कृत्यांची वृद्धि करावी, व आमच्या सर्व रयतेचें हित होईल अशा रीतीनें राज्यकारभार चालवावा, अशी आमची मनापासून इच्छा आहे. आमच्या रयतेची आबादानी तेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष तींच आमच्या राज्याची मजबुती, व त्यांची कृतज्ञता तेंच आह्मांस उत्तम फळ असें आह्मी समजतों."

वरच्यापैकीं आज तेवीस वर्षांत किती अक्षरें खरीं झालीं आहेत बरें!!

पणा मिरवायाला मग कसा सांपडेल? व खालच्या पायरीच्या लोकांबद्दल एवढी कळकळ दाखविली असतां नव्या विद्वत्तेचें चीज केल्याबद्दल जो सरकारापर्यंत गवगवा होणार व खिस्ती वर्तमानपत्रांतून वगैरे जो निःपक्षपाताबद्दल जयजयकार व्हावयाचा तोहि एरवीं कसा व्हावा? त्यांतून प्रस्तुत ग्रंथकर्त्याचें जर पहिल्यापासून हें ठरीव मत आहे, कीं ब्राह्मणांची सर्व विद्या ह्मणजे येथून तेथून मुळीं अप्रयोजकच, तर ती इतर वर्णांच्या लोकांस शिकवून तरी फायदा कोणता होणार होता व सध्यां होणार आहे? सगळे संस्कृत ग्रंथ ह्मणजे जर 'भूसके लड्डू' तर ब्राह्मणांनींच तेवढें त्यांचें हजारों वर्षें चर्वितचर्वण केलें हें बरें नव्हे काय? 'संस्कृताच्या झऱ्याचें पाणी' जर इतकें दुष्ट आहे कीं, त्याचा विकार 'निबंधसंग्रहा'चें 'नव्वद वर्षें' अध्ययन केल्यानेंहि मोडला जाणारा नव्हे, तर क्षत्रिय, वैश्य व शूद्र या मंडळीस ब्राह्मणांनीं त्या झऱ्याजवळ येऊंच दिलें नाहीं हें वाईट केलें, का चांगलें? पण हा विरोध तरी 'लोकहितवादीं'च्या कोठून लक्षांत यावयाला? त्यांस एकंदर एक गोष्ट माहीत, कीं, जिकडून आपल्या देशबांधवांचा पाडाव होईल तिकडून करावयाचा. मग खरें खोटें, समंजस असमंजस, सुसंगत विसंगत, जसे ह्मणून आक्षेप आढळतील तसे ते आपल्या ब्रह्मबंधूंच्या डोक्यावर आदळून द्यावयाचे. हें देशोन्नतीचें परमश्लाघ्य कृत्य करीत असतांना आमच्या भावी नामदार साहेबांनीं ही मोठी गोष्ट ध्यानांत आणली नाहीं, कीं आपल्या लेखांची योग्यता सदोदित सारखी रहावी असें जर मनांत असेल, तर सत्यदेवतेची होईल तेवढी जागरूक उपासना करणें अवश्य आहे. ती तशी न करतां जर प्रमत्ततेनें तिचा वारंवार उपमर्द केला, तर त्याचें भयंकर प्रायश्चित्त कधींना कधीं तरी भोगणें पडेल.

८. असो; एथवर ब्राह्मणांच्या संबंधानें तीन प्रकारांनीं विवेचन झालें. यांत 'ब्राह्मण' हें सदर जरी विषयाच्या अनुगमाकरितां धरलें आहे, तरी वरील तीन प्रकरणांत एतद्देशीय इतिहास, एतद्देशीय शास्त्रविद्या, व एतद्देशीय धर्म या तीन प्रकरणांवर आह्मीं आपले विचार नमूद केले आहेत, हें मार्मिक वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. तेव्हां एकंदरीनें पहातां 'लोकहितवादीं'नीं आपल्या देशाच्या संबंधानें जीं अनेक मतें प्रगट केलीं आहेत त्यांतील बहुतेकांच्या संबंधानें आह्मीं आपले विचार वाचकांस कळविले. हे सर्वांस प्रगट करणें आमच्या मनांत फार दिवस होतें, यास्तव तसा प्रसंग आणल्याबद्दल आह्मांस रावबहादुरांचे उपकार मानणें भाग आहे. आमच्या वाचकांसहि वरील विषय महत्त्वाचे वाटतील याविषयीं आह्मांस संदेह नाहीं; यास्तव तेहि प्रस्तुत ग्रंथकाराचे आभारी होतील असें आह्मांस वाटतें. सदरील विषयांवर पुष्कळांचे निवळ प्रलाप मात्र ऐकूं येतात; पण त्यांवरील आपलीं मतें कागदावर दाखल केलीं अशीं प्रस्तुत ग्रंथकारानेंच. आतां त्यांवर त्यांचे एका तऱ्हेचे अभिप्राय पडले अ हेत, व आमचे एका तऱ्हेचे पडले आहेत, ही गोष्ट निराळी; तथापि आपलीं

मतें स्पष्टपणें प्रसिद्ध केल्याचें श्रेय रावबहादुरांस अवश्य दिलें पाहिजे. नसते आडून गोळ्या मारणारे शेंदाड शिपाई पुष्कळ असतात; पण समरांगणावर निशाण फडकावून युद्धास तयार झालेला वीर थोड्का! तर ज्याप्रमाणें 'लोकहितवादीं'नीं तीस वर्षांपूर्वी आपल्या देशबंधूंस आपलें 'शतपत्र' अर्पण करतांना ग्रंथकारांच्या नेहमींच्या चालीप्रमाणें त्यांची प्रार्थना केली,[1] त्याप्रमाणेंच आह्मीहि वरील ग्रंथकाराचा निरोप घेण्याच्या तयारीस लागून हें 'शतपत्र नव्हे' शतपत्राची पाकळी त्यांस प्रांजलभावानें अर्पण करतों!

•

प्रौढं विक्रांतमासीद्वन इव भवता शूरशून्ये रणेऽस्मिन्।[2]

वेणीसंहार.

अंक ७६—(१) उपसंहार. (२) मागील विवेचनाचें तीव्रत्व. (३) त्यांतील हेतु. (४) इतर येणारे आक्षेप. (५) 'निबंधसंग्रहां'तला उतारा.

१. या अंकांत प्रस्तुत ग्रंथकाराचा आह्मी निरोप घेणार. एथवर आमच्या देशाच्या व विशेषतः ज्ञातीच्या संबंधानें जें त्यांनीं आज चाळीस वर्षें विचार प्रगट केले, त्यांच्या संबंधानें जें आह्मांस वाटलें तें त्यांस व सर्वांस आह्मीं सादर केलें. आतां हा विषय सोडतांना बऱ्याच गोष्टींच्या संबंधानें जें कांहीं लिहिण्यासारखें आहे तें येथें नमूद करून नंतर पुढील मार्गास लागूं.

२. आजवर एक सबंध वर्षभर जें आह्मीं 'लोकहितवादीं'च्या मताच्या संबंधानें विवेचन केलें तें पाहून प्रायः कोणाच्याहि मनांत एक मोठी गोष्ट ही येण्यासारखी आहे कीं, आह्मीं त्यांच्याविषयीं फार कडक रीतीनें लिहिलें. हा कडकपणा पुष्कळांस आवडत नाहीं हें आह्मांस माहीत आहे; पण हें त्यांचें मृदुत्व आह्मांस बिलकूल पसंत नाहीं. अस्थानीं मृदुत्व हें गुणांत मोडत नाहीं हें तर काय, पण तें उलटें अत्यंत तीव्रत्वाहूनहि अतिशयित अनर्थकारक होय अशी आमची पक्की खात्री आहे. बागेंत वाढणाऱ्या रानगवताचा किंवा काचकुयरीचा मुलाजा करण्यांत कांहीं हांशील आहे काय? कोणास जर रोग झाला तर वेळेनसार तीव्र शस्त्रक्रियाहि करणें यास कोणी आततायित्व ह्मणेल काय? तर हाच न्याय प्रस्तुत प्रकरणींहि वाचकांनीं लागू करावा. मासिक पुस्तकें हीं कुलस्त्रिया व कुलपुरुष यांनीं पलंगावर लोळत पडून वाचण्याचे दिवस आतां गेले. वर्तमानपत्रांनींहि अमुक अमुक रावसाहेब इकडून आले, आणि तमुक तमुक रावबहादुर तिकडे गेले, व अमक्या अमक्या गांवीं एक दोन तोंडाचें

१. अंक ६४ पहा.

२. "या शूरशून्य रणमंडळावर आपण खूप तरवार गाजवून घेतली!"

पारडूं निपजलें, असल्या जाड्या बातम्या लोकांस देण्याचें सोडून आपणाकडे येणाऱ्या वर्गणीचें कांहीं अधिक चीज करून दाखविण्याची उमेद बाळगणें दिवसेंदिवस जरूर आहे. कां कीं, मासिक पुस्तक किंवा वर्तमानपत्र वाचणें म्हणजे चहाकाफी पिण्यासारखीच एक नवी निघालेली ढूम आहे, असें मानणें या काळाच्या संबंधानें पहातां रास्त नव्हे. सध्यां आमची व एकंदर जगाची जी स्थिति आहे ती अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, साऱ्या राष्ट्रांची जणों काय शर्यत लागली आहे. या बड्या शर्यतींत जो तो आपलें घोडें पुढें दामटायाला पहात आहे. नुकतीं नुकतीं आमच्या देखत दोन घोडीं पुढें होतीं तीं मागें पडलीं, व दुसरीं दोन पुढें सरसावलीं; वैं एक उमदा घोडा तर मधल्यामधेंच खचला![1] तर असली कडाकडीची शर्यत सध्यां जर जारीनें चालू आहे तर तिच्या ऐन गर्दींत जर आह्मी चहापाण्याचे झुरके एखाद्या खुशालचंदाप्रमाणें घेत बसलों तर आह्मी किती शहाणे ह्मणावयाचे! त्यांतून सध्यां आह्मी तर इतके दुबळे झालों आहों कीं, आह्मांला वरील शर्यतींत भिडायाला स्वतःचा घोडाहि पण नाहीं. त्याच्या ऐवजीं काठीचा घोडा करून आपल्याच कुल्यावर शिपड्या मारून घेण्याची आह्मांस पाळी आहे! तर वरील स्थिति लक्षांत आणून आमच्या पत्रकर्त्यांनीं व पुस्तककारांनीं आपल्या देशास आलेल्या दैन्याचा परिहार करण्याचे उपाय योजले पाहिजेत. या उपायांतला सर्वांत मोठा उपाय ह्मटला ह्मणजे देशस्थितीच्या वास्तविक स्वरूपाचें निरूपण हा होय. रोगाची यथार्थ परीक्षा हा चिकित्सेचा जसा मूळ पाया होय, व तीच जर झाली नाहीं तर मोठ्या धन्वंतऱ्याचेहि उपचार जसे केवळ व्यर्थ होत, किंबहुना उलटे अनर्थकारक होत; त्याप्रमाणेंच आमचें हें एवढें पुरातन अवाढव्य राष्ट्र आज जें इतक्या निकृष्ट स्थितीला येऊन पोंचलें आहे तें कशामुळें हें समजलें ह्मणजे अगोदर एक मोठें काम झालें. पण हें होण्यास हल्लींचा बादशाही तोंडपुजेपणा उपयोगी नाहीं. जें काय असेल तें खडखडीत सांगण्याचे हे दिवस आहेत. अगदीं गळ्यापर्यंत येऊन ठेपल्यावरहि जर 'खावंद,' 'खुदावंत,' 'जी हां' हेच प्रकार रोग्यास रुचूं लागले, तर मग खुदाची मुलाखत होण्याची वेळ जवळच आली असें समजावें!

३. तर 'लोकहितवादीं'च्या मतांवर आह्मीं जी इतकी चरचरीत टीका केली, ती एवढ्याकरतां कीं त्यांच्या या देशाच्या संबंधानें ज्या समजुती आज चाळीस वर्षें होऊन बसल्या आहेत, व ज्यांचा आज इतके दिवस लेखनद्वारा व वाग्द्वारा ते प्रसार करीत आहेत, त्या अगदीं चुकीच्या व अनर्थकारक आहेत; त्यांच्यापासून आजतागाईत देखील थोडा अनर्थ झाला आहे असें नाहीं. मनांतील विचार सर्व क्रियांचें मूळ होत; मग तेच जर बिघडलेले असले तर हातून घडणारा उद्योग तरी

१. वरील उल्लेख इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, व टर्की यांच्या संबंधानें अनुक्रमेंकरून केलेला आहे हें इतिहासज्ञांस सांगावयास नकोच!

कोठून धड होणार ? लहानपणापासून पोरांस जर दोन महातत्त्वें शिकवून ठेविलीं, कीं तुमच्या वाडवडिलांनीं आजपर्यंत जें जें ह्मणून करून ठेवलें आहे तें तें सारें निवळ गाढवपणाचें आहे, देवबापानें हल्लीं जे धनी आपणांला पाठवून दिले आहेत ते साऱ्या दुनियेंतले शहाणे आहेत, यास्तव आपल्या आचारविचारांचा जितका तिटकारा करावा तितका थोडा, व इंग्रेजांचें जितकें अनुकरण करावें तितकें श्रेयस्कर; तर मग तेच अंकुर वळावून पुढें जो विचित्र शाखाविस्तार दृष्टीस पडतो तो कां नये पहूं ? कोणी बापाची ओळख विसरतात, कोणास बापाची लाज वाटूं लागते, कोणी आईशीं विनोद करतात, कोणी सोमरसाचें सेवन करून गटारोदकानें अवभृथस्नान करतात, इ० इ० शतशः प्रकारानीं आमच्या अर्वाच्य पंडितांची बुद्धि जी आज फांकलेली दृष्टीस पडते, ती कशामुळें बरें ! तीस वरील दोन महासिद्धांत हेच कारणीभूत नव्हेत काय ? 'आपले लोक पेशवाईत अगदीं मूर्ख होते यांत संशय नाहीं' हें महातत्त्व ज्यांच्या हृदयांत एकदां बाणलें त्यांच्या ठायीं स्वदेशाचा इतिहास वाचण्याविषयीं कितीशीं उत्कंठा उत्पन्न होईल बरें ? असे लोक 'बापू गोखल्याचें चरित्र,' 'पानपतची लढाई', 'महादजी शिंद्याचें चरित्र,' 'ऐतिहासिक गोष्टी,' हीं पुस्तकें मोठ्या प्रेमानें वाचतील काय ? त्यांस अर्थातच असें वाटणार आहे कीं, या बेवकूब लोकांचीं चरित्रें वाचल्यापासून काय फायदा होणार आहे ? त्यापेक्षां क्लैव साहेबांचें चरित्र, किंवा हॉवलाक साहेबांचें चरित्र, अथवा 'युनैटेड स्टेट्स'चा इतिहास वाचलेला बरा नव्हे काय ? गेल्या तीन हजार वर्षांत आमच्या देशांत शहाणा ह्मणून कोणी निपजलाच नाहीं हें जर खरें आहे, तर या तीस शतकांचा इतिहास ह्मणजे मूर्खत्वाचाच इतिहास नव्हे काय ? तर आमच्या देशांत स्वतःविषयींचें जें लज्जास्पद अज्ञान आढळतें, व स्वदेशाच्या इतिहासाविषयीं अरुचि व अनास्था जी चोहोंकडे दृष्टीस पडते, हीं सर्व फळें 'लोकहितवादी'प्रभृति अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांच्या पांडित्यांचींच होत हें उघड आहे. युरोपांत व अमेरिकेंत इतिहासप्रसिद्ध थोरथोर पुरुषांचीं नांवें निघालीं असतां लोकांचीं अंतःकरणें थरारून जातात. मद्यप्राशनाच्या वेळीं त्यांच्या नांवानें जयजयकार होतो.[1] त्यांच्या

---

१. युरोपांत मद्यप्राशनाला जेव्हां मंडळी बसते तेव्हां 'टोस्ट' देत असतात. 'टोस्ट' ह्मणजे अमक्याच्या नांवानें दारू पिणें. हा 'टोस्ट' पुरुष, स्त्रिया किंवा एखादी गोष्ट यांच्या-संबंधानें असतो. तेव्हां एखादा मोठा मनुष्य मंडळींत असला, किंवा एखाद्यानें कांहीं मोठा पराक्रम केला तर त्याच्या नांवानें सारी मंडळी तोंडाला ग्लास लावते. एके प्रसंगीं मेकॉलेनें Literature of Britaian (ब्रिटन देशांतला ग्रंथसंग्रह) हा विषय काढून तत्प्रीत्यर्थ मद्यप्राशन केलें. हा प्रसंग एडिनबर्ग येथें १८४६ सालीं घडला. त्यावेळीं मेकॉलेनें येणेप्रमाणें उपक्रम केला—

"The Directors of our Institution have requested me to

नांवानें शतवार्षिक उत्सव होतात,[1] त्यांच्या संबंधाच्या सामान्य वस्तु सुद्धां लोक मोठ्या प्रेमानें जतन करून ठेवतात.[2] त्यांचीं चरित्रें कितीक वेळां लिहिलीं जातात, शिवाय त्यांचे पुतळे, तजबिरा वगैरे तयार होतात; आणि तोच इकडचा प्रकार पहा! कोण आपासाहेब आणि कोण दादासाहेब; होते कधींकाळचे कोणी; सारेच लोक एकंदर मूर्ख होते, त्यांत 'एरंडोऽपि द्रुमायते' या न्यायानें यांनीं चार दिवस दुढ्ढाचार्यपणा मिरविला, इतकेंच काय तें! हल्लींच्या शहाणपणाला हें जुनें अर्धें बोबडें शहाणपण तोलेल कीं काय? छे, गोष्टहि बोलायला नको! 'आतां जर नाना फडनवीस असता तर त्यास पळून जावें लागतें' हा नामदार साहेबांनीं सिद्धान्त करूनच ठेवला आहे!– हें इतिहासप्रकरण झालें. याप्रमाणेंच इतर प्रकरणांविषयींहि 'लोकहितवादीं'चे अभिप्राय किती समंजस आहेत, हें यापूर्वी दर्शविण्यांत आलेंच आहे. कालिदासादि कवींची ख्याति साऱ्या भूगोलावर पसरून युरोपांतील व अमेरिकेंतील मोठमोठे पंडित त्यांच्या कृति पाहून तन्मय होतात; इकडे आमच्या रावबहादुरांनीं पहिल्यापासून एक मत

---

propose to you as a toast the Literature of Britain. They could not have assigned to me a more agreeable duty. The chief object of this Institution is, I conceive, to impart knowledge through the medium of our own language....."

या भाषणाचा उपसंहार पूर्वी एके प्रसंगीं आलाच आहे. (अंक ६४).

१. हल्लीं अमेरिकेंत 'संयुक्त संस्थानांचा' शंभरावा वाढदिवस मोठ्या थाटानें गाजविण्याची तयारी चालू आहे. नुकतेंच एक मोठें पुस्तक अमेरिकेंत प्रसिद्ध झालें आहे; त्याचें नांव Our First Century (आमचें पहिलें शतक) हें आहे. सन १८५७ सालींहि क्वेंजयंती करण्याचा घाट इंग्लंडांत कांहीं मंडळीनें घातला होता; पण त्याला कोणी विशेष झटेनात. हिंदुस्थान ह्मणजे रानवट मुलूख; तेव्हां तो जितल्यांत एवढी प्रतिष्ठा कशाची, व शतवार्षिक उत्सव तरी कशाचा, अशा बुद्धीनें वरील समारंभाची हेळसांड चालली होती, पण प्रभूस करणें!—तेव्हां वरील जयंती एकाएकीं अशा कडाक्यानें गाजली कीं तिच्या नादानें सारें भूमंडळ दुमदुमून राहिलें!!

२. युरोपांतील पदार्थसंग्रहालयांतून अशा अनेक चिजा जतन करून ठेवतात. उदाहरणार्थ आमच्या महाराष्ट्रसिंहाचीं शत्रूच्या हृदयास विदारण करणारीं वाघनखें 'ब्रिटिश म्युझियम'मध्यें ठेविलीं आहेत. अशा इकडच्या चिजा तिकडे शेंकडों नेऊन ठेवलेल्या आहेत. एका अर्थी या गोष्टींचें आह्मांस विलकुल दुःख वाटत नाहीं, आमच्यांत इकडे असली दिवटी मंडळी निघालेली आहे कीं, आपल्यापासचा एखादा जिन्नस कुजूं देतील, किंवा वाण्याच्या दुकानीं त्याची वासलात करतील, पण कोणाला ह्मणून दाखवगार नाहींत! दोन तीन वर्षांपूर्वी येथील मोडक्या बाजारांत श्रीं० सवाई माधवराव व यशोदाबाई यांच्या जुन्या तसविरा विकायाला मांडल्या होत्या. त्यांस कोणी गिऱ्हाईक विचारीना; त्यांच्या चौकटी चांगल्या नक्षीच्या होत्या, यास्तव त्या काढून देण्याविषयीं मात्र कित्येक बोलत. हल्लीं त्या तसविरा आमच्या चित्रशाळेंत आहेत!!

बळकट धरून ठेवलें आहे कीं वरील कवि हे देशाच्या अपकर्षास कारणभूत होत. त्यांनीं लोकांत शृंगारोद्दीपन करून हिंदी लोकांस हतवीर्य करून टाकलें.[1] मोरोपंतांवर एके ठिकाणीं प्रस्तुत ग्रंथकारानें असा आक्षेप आणला आहे कीं तो भर पेशवाईत हयात असतां त्यानें पेशव्यांवर एखादें वीररसप्रधान काव्य करावयाचें टाकून जुन्या पौराणिक कथाच तो कुटीत बसला ! कोण विलक्षण कल्पना या ! लोकांचे पुढारी ह्मणविणाऱ्या महाजनांचे असे बुद्धितरंग प्रकट होऊं लागले ह्मणजे मग राष्ट्रांत किती सुधारणा होत जाणार व किती यथार्थ ज्ञान प्रसृत होणार हें सांगायला नकोच !

तर आजपर्यंत आमच्या लोकांत स्वतःविषयीं पराकाष्ठेचें अज्ञान राहून कोणत्याच लौकिक कृत्याविषयीं त्यांच्या ठिकाणीं उत्साह दृष्टीस पडत नाहीं; आमच्या देशबंधूंनीं गेल्या व चालू शतकांत एवढाले पराक्रम केले असतां व तद्वर्णनपर जुने वृत्तान्त असतां त्यांचा संग्रह करून ठेवण्याविषयीं कोणासहि आजपर्यंत इच्छा झाली नाहीं व अद्यापहि होत नाहीं. आमच्या जुन्या विद्या व कला ऱ्हास पावत जाऊन सांप्रत तर बहुधा क्षयाच्याच पंथाला पोंचल्या आहेत, आमच्या राष्ट्रांतील जुने सद्गुण एक एक नाहींसे होत जाऊन त्यांच्या जागीं परवशताजन्य दुर्गुण आह्मांस जडत

---

१. रावबहादुरांचें सरस्वतीचें सारसर्वस्व जें काव्य त्याविषयीं पहिल्यापासून अत्यंत अप्रेम दिसतें. हीं त्यांच्या अंरसिकपणाची मोठी निशाणी ह्मणून आह्मी समजतों. अवघ्या प्राचीन व अर्वाचीन सुधारलेल्या राष्ट्रांतून कवींची लोकप्रियता कितपत आढळते हीं गोष्ट त्यांनीं कधींहि मनांत आणली नाहीं असें दिसतें. साक्रेटीस व युरिपेडीस, सिसरो व व्हर्जिल बेकन व शेक्सपीयर, मिल्ह व टेनिसन्, इत्यादि जोडयांविषयीं जर ते क्षणभर विचार करतील, तर वाग्देवीचीं मृदु व कठोर हीं दोन्ही रूपें तिला साहचर्यानें सहज प्रगट करतां येतात हें त्यांस कळून येईल. तसेंच कवींचा वाक्प्रवाह हा देशास हानिप्रद नसून उलटा नदीप्रवाहाप्रमाणें अत्यंत भूषणप्रद व संतोषप्रद होय हेंहि वरील उदाहरणांवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. असें असतां 'लोकहितवादी'चे पुढील विलक्षण उल्लेख पहा ! !—

"हिंदु लोक हल्लीं आहेत त्यापेक्षां चांगले होण्यास त्यांनीं बहुतेक आपलीं मूर्ख मतें सोडलीं पाहिजेत. प्रथम हीं मूर्ख मतें उत्पन्न झालीं कशीं ह्मणाल तर त्याचें कारण लिहितों. प्राचीन काळीं हिंदु लोकांनीं नवीन विद्या बहुत केल्या. पुढें असें झालें कीं ब्राह्मण लोकांनीं नवीन विद्या अधिक शोधावयाच्या सोडून ते काव्यें करूं लागले."

'निबंधसंग्रह'—नंबर ६१.

"भागवतासारखे शृंगारिक ग्रंथ, नवरस, अष्टनायकांचें वर्णन आणि गीतगोविंदासारखीं काव्यें, हीं लोकांस प्रिय होत चाललीं ! चंपू व काव्यांचा काल ह्मणजे जसा बाजीरावाचे वेळेस होनाजी बाळाचा काल आला आणि मराठी भाषेंत निरुपयोगी काव्यांचा भरणा झाला, तसाच होय.

'स्वाध्याय'—पृष्ठ ९१.

तसेंच 'आश्वलायन गृह्यसूत्र'—प्रस्तावना पृष्ठें ६६—६७ पहा.

चालले आहेत, अतिनिंद्य परकी आचारांची आह्मांस लाज न वाटतां ते मोठ्या प्रतिष्ठेनें आह्मी हळू हळू अंगीकारीत चाललों आहों,—इत्यादि सर्व परिणाम आजपर्यंत माजलेलें जें तत्त्वज्ञान त्याजपासूनच साक्षात् उद्भवलेले आहेत असें आह्मी समजतों. मग वरील सर्व प्रकार जर अत्यंत अनिष्ट आहेत तर त्यांच्या मूळावर कुऱ्हाड घालून त्यांचा उच्छेद करण्याचा प्रयत्न करणें हें कृत्य अश्लाघ्यतेचें आहे काय ? हिंदुधर्म हा अत्यंत अनर्थकारक होय ह्मणून त्यावर मिशनरी, बाटे, व समाजवाले यांनीं धोपाट्यावर धोपाटे घालावे यांत जर कोणास कांहीं गैर दिसत नाहीं; आमच्या जुन्या समजुती अगदीं वेडगळपणाच्या आहेत ह्मणून 'लोकाहितवादी'प्रभृतींनीं चाळीस वर्षे सतत पांडित्य करावें हाहि प्रकार जर रास्त आहे, तर आमच्या बुद्धीनें आह्मांस जीं मतें अत्यंत असमंजस व अनर्थावह वाटतात तीं नाहींशीं करून टाकून लोकांच्या समजुती बरोबर करण्याचा आह्मींहि कां उद्योग करूं नये ?

४. आतां आमच्या कित्येक कोमल व सभ्य देशबंधूंचा आह्मांवर असा आक्षेप येईल कीं, तुह्मांस कोणाचीं मतें अग्राह्य वाटलीं तर तीं खोटीं ह्मणून तुह्मी सिद्ध करा, त्याविषयीं तुह्मांस पूर्ण अधिकार आहे; पण वरील निरसन जें करावयाचें तें सौम्य व सुकुमार शब्दांनीं करावयाचें टाकून तुह्मी आपल्या प्रतिपक्ष्यावर तीव्र शब्दप्रयोग करतां हें काय ? या आक्षेपावर यापूर्वी आह्मीं अनेक वेळां उत्तर दिलेलेंच आहे, यास्तव प्रस्तुत प्रसंगीं इतकें सांगतों ह्मणजे बस आहे, कीं नामदार साहेबांच्या लेखणीच्या चरचरीतपणाशीं आमच्या कलमाचा तिखटपणा जो कोणी लावून पाहील त्यास आह्मांस नांव ठेवण्यास मोठीशी जागा राहील असें आह्मांस वाटत नाहीं. शिवाय तीव्र व सौम्य लेखांविषयीं आमचें तर असें मत आहे कीं, वरील प्रयोग प्रतिपक्ष्याचा लेख ज्या मानाचा असेल त्याप्रमाणें करणें वाजवी आहे. जो सभ्य वादी आहे त्यावर जर प्रतिपक्षी तुटून पडेल व तीक्ष्ण वाक्प्रहार करील तर तें शोभणार नाहीं; पण जो मुळींच कोणाची मुरवत न धरतां तुह्मी 'पशु' आहां येथून पांडित्यास आरंभ करील त्याचा अंमळ खरपूससा समाचार घेतला असतां कोणी दोषी होईल असें आह्मांस वाटत नाहीं. इंग्लंड एवढें सुधारणेंत व सभ्यतेंत अग्रगण्य होऊन बसलें आहे, पण उद्यां जर कोणी तेथें भरसभेंत विल्यम पिट्ट यास टोणपा ह्मणूं लागला, किंवा बेकनची महामूर्खांत गणना करूं लागला, अगर शेक्सपीयरला नांवें ठेवूं लागला, तर कोणी मुकाट्यानें ऐकून घेईल काय ? आह्मांस खास वाटतें कीं वरच्यासारख्या महापंडितास परवां टेंपल व म्याकलीन यांची जशी विलायतेस पूजा झाली त्याप्रमाणेंच जाडें बक्षिस मिळाल्यावांचून कधीं रहाणार नाहीं. आतां हें खरें आहे कीं, आमच्या इकडे मंडळी अशी खमंग होऊन बसली आहे कीं, त्यांस किंवा त्यांच्या पूर्वजांस तुह्मी कांहीं ह्मणा, त्यांस ह्मणून कोणत्याहि गोष्टींचा राग नाहीं. कशाला असेल ? प्रत्यक्ष स्वतःची कितीहि

वेळां मानहानि झाली तरी जे निरंतर खाविंदचरणारविंदीं लोळणारे, त्या बापड्यांचें नाना फडनवीसास कोणीं गाढव झटलें म्हणून काय गेलें? नाना फडनवीस कोण हें अगोदर पुरतें माहीत असेल तर मग त्याच्याविषयीं राग किंवा लोभ!

तर 'लोकहितवादीं'च्या लेखांवर गेल्या वर्षभर जी आम्हीं शिस्त धरली त्यांत गैरशिस्तपणाचा प्रकार बिलकूल नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. आतां ते वयानें एवढे पोक्त झालेले आहेत, व आजपर्यंत मोठमोठे सरकारी हुद्दे वहिवाटून हल्लीं खुद्द गवर्नर साहेबांच्या खुर्चीशीं खुर्ची लावून बसण्यापर्यंत त्यांचा बडेजाव वाढला आहे, तसेंच लोककल्याणाच्या कामींहि त्यांनीं आजपर्यंत पुष्कळ मेहनत केली असून हल्लींहि ती खळली नाहीं; या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; पण यांपैकीं एकहि प्रस्तुत प्रकरणास बिलकुल लागू नाहीं. वाग्देवीच्या मुलखांतला कायदा असा आहे कीं, त्यांत पाऊल ठेवतांच सर्वांचीं वयें सारखीं होऊन जातात, साऱ्यांचे हुद्दे एक होतात, व उच्चनीचभावाला तेथें कोणताच थारा रहात नाहीं. हौद्यांत उडी टाकल्याबरोबर दोघे मल्ल जसे समवयस्क होतात, समरांगणावर मोठे रूमशामचे बादशहा सारखे व सात रुपयांचा हडेलहप शिपाई जसा सारखा, किंवा रतिनायक हा जसा ज्ञातिभेदास न ओळखतां 'पंडितराजराजितिलका'सारख्या महाब्राह्मणासहि 'यवनी नवनीतकोमलांगी' हा घ्यास लावायाला चुकत नाहीं, त्याप्रमाणेंच सरस्वतीच्या साम्राज्यांतील हालहवाल आहे! रोमन लोकांत अशी चाल असे कीं, फौजेवर ज्याची हुकमत चालते आहे, व जो लढाया मारून विजयी होऊन आला आहे, अशा सरदारासहि पुनः जर 'कॉनसल' हा हुद्दा पाहिजे असेल, तर त्यानें इतर उमेदवारांप्रमाणें साधा पांढरा पोषाक करून लोकसमाजांत येऊन हजर व्हावें, आणि मग त्याच्याकडे जर बहुमत पडलें तर तो हुद्दा त्यास मिळावयाचा; दरम्यान नाहीं. तर विद्वत्समाजांतीलहि हीच व्यवस्था आहे. तेथें रावबहादुरीला कोणी विचारीत नाहीं; व नामदारीचीहि कोणी किंमत समजत नाहीं; आपला ग्रंथ आणून लोकांपुढें टाकावा, मग त्यांतील मजकुराच्या योग्यतेवरून त्याचा काय दर लागेल तो लागेल! ग्रंथकारावरून कोणी ग्रंथाची परीक्षा करीत नाहींत, तर ग्रंथावरून ग्रंथकाराची करीत असतात!

आतां कित्येक कदाचित् असेंहि म्हणतील कीं, जर 'लोकहितवादीं'नीं आपण होऊन तुम्हांकडे आपले ग्रंथ पाठविले होते तर त्यांवर इतका कडाका उडवणें हें सुजनतेस उचित नव्हे. असें जर कोणाचें मत असेल, तर त्यास सुजनता म्हणजे काय, व ग्रंथावर टीका म्हणजे काय, या दोहोंचाहि चांगलासा उमज पडलेला नाहीं असें म्हणणें भाग आहे. रावबहादुरांनीं जेव्हां आपल्या कृति आमच्याकडे पाठविल्या, तेव्हां त्या तिळगुळादाखल पाठविल्या असतील असें आमचें मन घेत नाहीं. आमचीं मतें त्यांच्या मतांच्या किती विरुद्ध आहेत हें जरी कदाचित् त्यांस पुरतेपणीं माहीत नसेल, तरी

केवळ गुणदोषविवेचनाच्या बुद्धीनेंच वरील नजर त्यांनीं आह्मांस केली याविषयीं आह्मांस बिलकूल संशय नाहीं. त्यांचा आमच्या पुस्तकास पुष्कळ दिवसांपासून आश्रय आहे, व आमचे लेख जरी त्यांनीं कदाचित् सगळेच वाचले नसतील तरी आमची विवेचनपद्धति लक्षांत येण्यापुरतें तरी त्यांनीं त्यांचें प्रसंगोपात अवलोकन केलें असेल याविषयीं आमची खात्री आहे. तेव्हां वर्तमानपत्रांतून वगैरे गुळमुळीत अभिप्राय जसे प्रगट होत असतात त्यासारखाच प्रस्तुत पुस्तकांतहि दृष्टीस पडेल अशा आशेनें वरील ग्रंथसमर्पण झालेलें नाहीं हें उघड आहे. तर ज्याप्रमाणें आपण बाजारांत गेलों असतां आपला दुकानदाराशीं स्नेह आहे हें तेथें काहून उपयोग नाहीं, किंवा न्यायसभेंत अगर रणभूमीवर प्रेमालिंगनाची अपेक्षा करणें हें अत्यंत असमंजस होय, त्याप्रमाणेंच पुस्तककारांकडे आपण ग्रंथाची भेट पाठविली असतां आपणास आवडेल असाच अभिप्राय मिळेल अशी अपेक्षा करणें हेंहि वेडेपणाचेंच काम आहे. प्रस्तुत विषयाचें आह्मीं पूर्वीच एका अंकांत सविस्तर विवेचन केलें आहे; यास्तव तें कोणास पहावयाचें असल्यास पहावें, ह्मणजे प्रस्तुत प्रकरणीं चांगली समजूत पडेल असें वाटतें.[1]

५. असो; आतां सरतेशेवटीं 'लोकहितवादीं'च्या 'निबंधसंग्रहा'तला एक दुसरा उतारा वाचकांस सादर करतों त्यावरून प्रस्तुत ग्रंथकाराच्या गुणांचें वर्णन जें आह्मीं आरंभींच्या उपोद्घातांत केलें आहे त्याची प्रतीति वाचकांस आल्यावांचून रहाणार नाहीं.

"फड व पेशवाईतील माहिती."

"मराठी राज्यांत फड ह्मणून एक मोठी कचेरी होती. ती पुण्यांत पेशव्यांचे शनवारचे वाड्यांत बसत होती. त्या कचेरीचे मुख्य अधिकारी बहुत वर्षेपर्यंत बाळाजी जनार्दन भानू ऊर्फ नाना हे होते. ह्मणून त्यांस नाना फडनवीस असें नांव पडलें. या पुरुषास ज्याप्रमाणें काम करण्याची शक्ति होती त्याप्रमाणें मराठी राज्यांत दुसरे कोणासहि नव्हती. सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत एक क्षण व्यर्थ न जाऊं देतां सर्व काल ते सरकारी काम करीत. त्यांत हिशेब किती लिहित, जावसाली पत्रें व बातमीचीं पत्रें किती लिहित, खलबतें आणि मसलती किती करीत, त्याचा सुमार नव्हता; व इतकें काम होण्याकरितां त्यांची वेळेची व्यवस्था फार चांगली असे. बडबड किंवा वायफळ अगर पोकळ गोष्ट ते कधीं बोलले नाहींत, व त्यांनीं कधीं ऐकिली नाहीं; घ त्यांचे घरांत फार मंडळी नसे, व स्वारीचा डौल नसे, एकांताची त्यांस फार प्रीति होती, कामावांचून त्यांचे घरीं कोणी जात नव्हतें व कामावांचून कोणाची भेट होत नव्हती. त्यांचे हाताखालीं फडावर ७०० कारकून होते व तेथें जाबसाली, राजकीय, हिशेबी व चिटणिशी लिहिणें पुष्कळ असे. मराठी राज्याची रचना अशा होती कीं,

१. अंक १५ पहा.

सरकारची आप्तमंडळी व पदरची मंडळीहि सरकारांत खासगत वाड्यांत रहात असे. शिवाय सरकारसंबंधाचीं माणसें दोन प्रकारचीं, मुत्सद्दी व सरदार. प्रत्येक सरदाराजवळ मुत्सद्दी होते, त्यांचीं नांवें, फडणीस, पोतनीस, मुजुमदार, दिवाण, हसबनीस, दप्तरदार वगैरे. याप्रमाणें लोक प्रत्येक सुभ्याचे निसबतीस असत. व त्यांस दरकदार असें ह्मणतात. सातारचे हुजुरचे दरकदार यांनां पुण्याचे दरकदार नेमावे, व पुण्याचे दरकदार यांनीं प्रांतांत व महालांत दरकदार नेमावे असा दस्तुर होता. सरदारांत पटवर्धन, रास्ते, पवार, धुळप, आंग्रे, विंचुरकर वगैरे सरंजामी सरदार असत. शिवाय पागे, पथकी, किल्लेदार, शिलेदार वगैरे सरदार होते. प्रत्येकास गांव व कुरणें तोडून दिलीं होतीं. दरएक सरदाराकडे दरकदार असत त्यांनीं जमाखर्ची व जाबसाली लिहिणें लिहावें; आणि अधिक उणें हुजुरास कळवावें. पुण्यापासून ५० कोशाचे आंत मोठाले गवताचे व पाण्याचे गांव पाहून त्याठिकाणीं पागा असत. भिंवरथडी, इंद्रायणीतीर, गंगथडी इत्यादि ठिकाणीं घोडा व स्वार राहिल्यानें खर्च थोडा पुरे, व स्वारास आणि जनावरांस आराम असे. काम लागेल तेव्हां बोलावून नेत. तसेंच जेथें किल्ले आहेत तेथें त्यांवर गडकरी लोक शेतसनदी शिपाई ठेवीत. शिवाय सबनीस, हवालदार, सरनोबत, किल्लेदार वगैरे अंमलदार असत. त्याचप्रमाणें पागांत व पथकांत डंके, निशाणें, बिनी, व ढाल याप्रमाणें नेमणूक असे. मोठे सरदारास नौबती, चौघडे असत. व आणखी बक्षी, हजीरनीस, तबीब, जिनसीवाल यांची नेमणूक असे. होळकर हे मावळ्याचे सुभेदार. त्याचप्रमाणें गुजराथचे सरसुभे, वसई व साष्टी हे कोंकणचे सरसुभे, कर्नाटकचे सरसुभे असे विभाग होते. दर सुभ्याखालीं कित्येक मामलती व कमाविशी व किल्ले असत. सुभा हा लष्करी अंमलदार, तो स्वार, तोफा वगैरे बाळगून महालांत स्वस्थता राखी. त्याचे दरकदार व जमीनदार मिळून मुलकी काम करीत. दरकदाराची बदली अगर बरतर्फी सुभ्याकडून होत नव्हती. हुजूराहून होत होती. पेशवे हे सातारचे मुख्य प्रधान; ह्मणून राज्यकारभार करीत. यास्तव दर पिढीस सातान्यास जाऊन वस्त्रें घेत, व पुण्यास फडणीस, मुजुमदार होते ते साताऱ्याहून नेमलेले असत, व पुण्याचे दरकदारांनीं हरएक सुभ्याजवळ व सरदाराजवळ दरकदार नेमावें. या जागा बहुतकरून वंशपरंपरा होत्या, व त्यांस उत्पन्नाकरितां महालचे जमाबंदीवर शेकडे बांधून दिले होते तेंच वेतन. याप्रमाणें असल्यामुळें या जागा मोठ्या प्राप्तीच्या असत. व याजमुळें नानाफडनीसाकडे फडणिशीच्या जागा भरण्याचें काम असे. जितके फडणीस तितके सर्व नानाकडून नेमले जात. मोठे घराण्यांत एक सरदार असे. त्याचा भाऊ विंचुरकराकडील फडणीस असे. तिसरा गुजराथेंत दरकदार असे. चौथा किल्ल्याचा सबनीस असे. याप्रमाणें एकएकाच्या घरांत दहा दहा रोजगार असत. रास्ते, पटवर्धन वगैरे जीं मोठालीं घराणीं, त्यांत तर कोणीच रिकामा नसे. नानाचें वेतन दहा हजार रुपये दरसाल

होतें, परंतु कारकुनी, दरक मिळून दहा लाख रुपये मिळत. या नेमणुका सरकारमहशूर होत्या, सबब लांच नव्हते. शिंद्यासारखे सरदार आपले मुलखाचे हिशेब पेशव्यास देत व फडणिसाची मखलाशी त्याजवर होण्याचे अगत्य असे, तेव्हां त्यांचे जमाबंदीवर हुजूरचे दरकदाराची प्राप्ती पन्नास हजार, सत्तर हजार येई. त्यांतील कांहीं फडणीस घेत. कांहीं मुजुमदार घेत. याप्रमाणें वांटणी होत असे. पेशव्यांच्या स्वाऱ्या, मोहिमा व मुलुखगिऱ्या दरसाल होत. त्यांतून कांहीं खुद्द व कांहीं सरदार मार्फत होत; तेव्हां त्या वेळेस जे शिपाई प्रसिद्धीस येत त्यांस सरदाऱ्या मिळत. पानशे, पटवर्धन वगैरे नामांकित सरदार यांचे घरचे दहा दहा वीस वीस पुरुष सरकारकामावर मेले होते, याजमुळें त्यांवर सरकारची फार कृपा असे. याखेरीज विदेशी लोक चाकरीस असत; त्यांजवरील आरबांचे सरदार, शिद्दी सरदार, पठाणाचे सरदार, गार्दी सरदार, गोमांतकी फिरंगी सरदार, वगैरे हे निराळेच असत. नानाफडणिसाचे कारकीर्दीस हे सरदार पागा, किल्ले, अठरा कारखाने, इत्यादि फार तयारींत असत. एक वेळ बाजिरावानें असें मनांत आणिलें कीं, पानशे यांचा सरंजाम जप्त करावा; तेव्हां गणपतरावभाऊंनीं श्रीमंतांस मेजवानी केली, आणि आंचवाव्यास जाण्याचे वाटेवर १८ विधवांचीं पानें मांडलीं. पुढें जेव्हां श्रीमंत आंचवाव्यास जाऊं लागले तेव्हां गणपतरावभाऊंनीं विनंति केली कीं, या स्त्रिया पहाव्या; या इतक्यांचे भ्रतार सरकारची दौलत राखण्याकरितां मेले आहेत ! असें असतां सरकारांतून जप्तीचा विचार झाला हें काय ? तेव्हां बाजीरावास आश्चर्य वाटून त्यानें अभय दिलें.

तसेंच पूर्वी दादासाहेब राक्षसभुवनचे लढाईस गेले होते; तेव्हां तळेगांवीं जाऊन ढमढेरे याजकडून कोण लढाईस येणार म्हणून त्यांनीं विचारलें. तेव्हां ढमढेरे यांचे कुळांत एक बाई व एक १५ वर्षांचा मुलगा मात्र राहिला होता. तेव्हां त्या बाईनें दादासाहेबांस सांगितलें कीं आमचा कोणी पुरुष तुमचेबरोबर नसल्यास आमचे कुळाचें नांव जाईल, याजकरितां एवढा मुलगा आहे हा बरोबर अगत्य न्यावा. जर त्यास वडिलांची शरम असेल तर तो कांहीं सरकारांत काम करून भूषणास येईल. तेव्हां तो मुलगाहि हौसेनें लष्करावरोबर गेला. आणि राक्षसभुवनावर दादासाहेबांचे समक्ष ठार झाला. पुढें स्वारी परत आली तेव्हां दादासाहेब त्या बाईकडे भेटीस गेले आणि त्यांनीं तिला सांगितलें कीं मुलगा तर मेलाच, परंतु आतां मी तुमचा मुलगा आहें असें समजून समाधान माना. आणखी एक वेळ असें झालें कीं झुंझारराव घोरपडे व बाजी घोरपडे यांचा मलवडी व बुध या परगण्याचे देशमुखीविषयीं वाद लागला आणि थोरले माधवरावसाहेब यांजकडे उभयतां आले; त्या प्रसंगीं रामशास्त्री यांनीं दोन चार वेळ गोष्ट काढिली परंतु श्रीमंतांनीं कांहीं उत्तर दिलें नाहीं, म्हणून तो वाद तसाच राहिला. पुढें धारवाड घेण्याकरितां स्वारी निघाली, तेव्हां वादी प्रतिवादी यांस

भाऊबंदसुद्धां बोलविले, आणि लढाईंत किल्ल्यावर शिड्या लावून हल्ला करावयाचें ठरलें तेव्हां उभयतां पक्षकारांस श्रीमंतांनीं सांगितलें कीं, आतां बुरजावर जो निशाण चढवील तो देशमुख खरा, असें ऐकतांच उभय पक्षांनींहि मोठ्या निकरानें युद्ध केलें. त्यांत बाजीचे पन्नास पुरुष ठार मेले. झुंझारराव यांनीं किल्ला सर केला; तेव्हां निर्विवाद होऊन देशमुखीच्या सनदा झाल्या. याचप्रमाणें मोतीतलावाचे लढाईंत पटवर्धनांचे १७ पुरुष एकदम मेले. त्याचें कारण असें झालें कीं, त्रिंबकरावमामा पेठे हैदर नायकावर गेले. इतक्यांत गोविंद-हरि वारले. तेव्हां मामांनीं पुण्यास पत्र लिहिलें कीं, गोविंदपंत वारले, मागें पोरेंबाळें उरलीं आहेत, तेव्हां त्यांच्या हातून काम कसें होईल? हें वर्तमान गोविंद हरीचे चौघा मुलांस व पांच भावांस कळलें; तेव्हां त्यांनीं मामास सांगितलें कीं, उद्यांची लढाई आह्मांकडे द्यावी, आणि आपण उगाच पहात असावें. आणि त्याप्रमाणें त्या दिवशीं सर्व पटवर्धन मंडळीनें विडे उचलले कीं, आज नांव जातें याजकरितां मामांची खात्री केली पाहिजे. मग संध्याकाळचें सुमारास हैदर नायकाचा पराभव होऊन पटवर्धन मंडळी बहुत पडली आणि राहिली ती विजयी होऊन मामाकडे आली आणि त्यांस नमस्कार केले. तेव्हां त्यांनीं हा वृत्तांत पाहून लागलीच पुण्यास लिहून सरंजामाच्या सनदा आणून दिल्या. पण चमत्कार असा झाला कीं, मामांचे पहिले दिवसाचें पत्र व हें अशीं दोन श्रीमंतांचे हातीं एकदम आलीं; तेव्हां तीं वाचून श्रीमंताचे डोळ्यांतून अश्रु पडले. अशी सरदारांची तपासणी लढाईवर होत होती, आणि मुत्सद्दी यांची तपासणी फडावर होत होती. कोणी शिलेदार उमेदवार असला ह्मणजे तो आरंभीं फडावर राही. तेथें त्याची हुशारी, शहाणपणा, विश्वास व सरकारचे ठायीं एकनिष्ठपणा यांची पारख झाली ह्मणजे तो अर्थात्च नानापर्यंत महशूर होई. नंतर त्यास दरकदारी मिळे. त्यास रवाना करते वेळेस माहितगारीचा अजमास ह्मणून एक कागद असे, तो व तैनात जाबता व मशाल, अबदागीर, पालखी यांतून जशी ज्याची योग्यता असेल तसें सामान त्यास देऊन त्याचे स्वाधीन चिटणिशीकडील पत्रें श्रीमंतांचे शिक्क्यासुद्धां देऊन रवाना करीत. प्रत्येक सरदार व सुभा याजकडील वकील हुजूर पुण्यास नेहमीं रहात, व ते सरकाराशीं कामकाज पडेल तें करीत. याप्रमाणें शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन या सर्वांचे वकील पुण्यांत असत. सरकारची आज्ञा जी होणें ती वकिलाचे मार्फत होई आणि वकील आपले धन्यास लिहित. शिवाय वकीलाजवळ जासूद, सांडणीस्वार, हरकारे वगैरे कागद पोंचविण्यास असत. खेरीज वातमीचीं पत्रें येत जात. व सावकारी डाकाहि शिवाय होत्या. तसेंच परदरबारीं श्रीमंतांचे वकील होते. दिल्लीस नाशिककर हिंगणे, हैदर नाईकाकडे सातारकर जोशी, निजामाकडे बारामतीकर काळे व पिंगळे व नागपुरास वांईकर वैद्य असे होते. हीं कामें मोठ्या पदवीचीं होतीं. शिवाय सरकारांत

पारसनवीस, इंग्रजीनवीस मेहेंदळे होते. याप्रमाणें जे काय मराठी राज्यांत मोठे नामांकित मुत्सद्दी झाले, त्यांचा उगम फडावर झाला आहे. मोठा नामांकित हुद्दा मिळणें तो फडावर मिळे. उमेदवारास आपली योग्यता दाखविण्यास स्थल तेंच होतें. त्यांचे गुणाची परीक्षा तेथें होई. जाबसाली पत्रें, हिशेबी कागद, तहनामे, झडत्या, तरजुमे एकबेरीज दुबेरजी लिहिण्याच्या तऱ्हा, उत्तम वळणाचीं अक्षरें, चिटाणिशी वळण, जनोबाभट्टी, बिवलकरी हीं तेथेंच निर्माण झालीं. (भट व बिवलकर हे फडावरचे कारकून होते.) रोजकिर्दी, दफाती, अठरा कारखान्यांचे हिशेब, शिवाय आरमार इत्यादींचा विचार फडावर होई. वांकनीस, खासगीवाले, हे खासगीकडील कारभारी, पण त्यांसहि फडावर हिशेब द्यावा लागे. मोठमोठे सावकार यांजकडे महालाचा निश्या, रसदा भरणें वगैरे काम असे; याजमुळें त्यांची सरकारांत मोठी वजनदारी असे. दरकदारास किताब नव्हते. त्यांचे दरकाचीं नांवें फडणीस, मुजुमदार अशीं होतीं; तींच चालत. सरदार लोकांस किताब बहुत होते. विश्वासराव हा किताब सुपेकर पवारास होता. झुंझारराव, सरजेराव, घोरपडे, नामजाद हा किताब खानवेलकर व माणकर यांनीं कोंकण प्रांत सर केला त्यांस आहे. शिवाय रणनवरे, फांकडे, सरखेल, तरवारबहादुर इत्यादि शेंकडों किताब होते. व त्या किताबांचे लवाजिमे होते. आतां सरदारांपैकीं बहुत प्रसिद्ध आहेत. तसेंच मुत्सद्द्यांपैकीं, रामशास्त्री न्यायाधीश, नारो बाबजी नगरचे सरसुभे, नारो अपाजी पुण्याचे सुभेदार, विसाजीपंत लेले वसईचे सुभेदार, रामाजी महादेव साष्टीचे सुभेदार, इत्यादिकांची कीर्ति अद्याप चालत आहे. अहिल्याबाईनें स्वत: ४० वर्षे राज्य केलें व तिच्या शब्दास श्रीमंत पेशवे, शिंदे, भोंसले, सर्व मानीत; व भिल्ल, कोळी, देखील तिला आई समजत. याजवरून त्या काळीं लोक अगदीं वाईट होते अशी कितीएकांची समजूत आहे ती अशुद्ध आहे असें समजावें. पेशवाईचे अखेरीस मात्र बाजिरावाचा अंमल झाला त्यांत वीस वर्षेपर्यंत सतत दंगे, बंडें, काळ, अवर्षणें पडून मुलूख उजाड झाला, व गांवचे गांव बेचिराक झाले. वीस वर्षेपर्यंत सरकार नाहींसें झालें. दफतर, फड वगैरे सर्व कचेऱ्या बंद पडल्या. आणि भट व बायका यांचा गोंधळ माजला. ही गोष्ट खेरीज; परंतु या दुष्टत्वाचे पूर्वी मराठी राज्य फार अबादान होतें; व दक्षिणेंत द्रव्य फार होतें. अस्तु. देशांत प्रसिद्धपणा पावण्याचीं स्थलें असलीं पाहिजेत. विलायतेंत पार्लमेंट आहे तें तसेंच स्थल आहे. सांप्रत या देशीं असें स्थल नाहीं ही एक मोठी कमताई आहे. आतां कोणी ह्मणतील कीं फडाप्रमाणें हल्लींचीं कोडतें आहेत त्यांत वकिली करून प्रसिद्ध व्हावें. वैद्यशाळा आहेत त्यांत विद्या करून डाक्टर व्हावें. इंजिनियर शाळा आहेत त्यांत शिकून सर्वेयर व्हावें. व व्यापार वाढला आहे त्यांत द्रव्य मिळवून प्रसिद्ध व्हावें. कायदेकौंसल आहे त्यांत भाषणें करून प्रसिद्ध व्हावें, तसेंच धारे कमी

झाल्यामुळें व महागाईमुळें कुळास मिराशी जहागिरीप्रमाणें झाल्या आहेत; त्यांत त्यांनीं स्वस्थ असावें. त्यास हें सर्व खरें आहे. यास आह्मी वाईट ह्मणत नाहीं, व हीं सर्व ठिकाणें फार योग्य आहेत परंतु त्यांत समावेश व प्रतिष्ठा फार होते असें आह्मांस वाटत नाहीं. याजकरितां मोठी प्रतिष्ठा वाढेल व बहुतांचा गुण दिसून येईल असें साधन कांहीं तरी अवश्य पाहिजे. त्याशिवाय उमेदवारांची तृप्ति होत नाहीं. लक्षावधि लोक आहेत हे हल्लीं मुकाट्यानें उगीच चोरासारखे बसले आहेत, यांनीं कोठें व कोणत्या कामांत प्रसिद्ध व्हावें?"

वरील उतारा वाचून कोणास खेद वाटणार नाहीं कीं, प्रस्तुत ग्रंथकारानें शास्त्रें व पुराणें याविषयीं विवेचन करण्याच्या भानगडींत न पडतां आपल्या देशबंधूंस आपल्या बहुश्रुतपणाचा फायदा करून देण्याचें जर मनावर घेतलें असतें तर किती बरें होतें! तर या गोष्टीविषयीं आमच्या देशबंधूंच्या तर्फेनें नामदार साहेबांस विनंति करून त्यांची रजा घेतों.

आमच्या देशाची स्थिति.

यानंतर अंक ७७ पासून ८४ पर्यंत 'आमच्या देशाची स्थिति' या विषयावर निबंध होता. परंतु हा निबंध शास्त्रीबुवांनीं लिहिल्यानंतर सुमारें तीस वर्षांनीं, तारीख २१ एप्रिल १९१० च्या मुंबईच्या सरकारी ग्याझेटांत त्याच सालीं दोन महिने अगोदर पास झालेल्या प्रेस आक्टाअन्वयें मुंबईसरकारनें मना करून सरकारजमा ठराविला. ह्मणून तो येथें छापला नाहीं; व आमची ही आवृत्ति येथेंच समाप्त झाली.



या ग्रंथाची सूची.

अनंतफंदी. ३१६
अपभ्रष्टशब्दचंद्रिका. ४९२,५०३
अपशकुन. २२०
अमृतराय. ३१४
अमोलिक वैद्यक चातुर्य. ५१६
अवतरण. १४३
आडिसन. ५५.६,५५९
आमच्या देशाचा इतिहास. ८५
आमच्या देशाची स्थिति. १०९५
आमच्या देशाच्या इतिहासाविषयीं इंग्रजांना गोडी. ९९
आरब लोकांचा इतिहास. ५९८
आर्यभूषण. ९५५
इंग्रजसरकारनें केलेलें आमचें हित. २०९
इंग्रजांचा भाषाभिमान. ११४
इंग्रजी इतिहास. ५६५
इंग्रजी गद्य ग्रंथ. ५५४
इंग्रजी भाषा. ५५.०
इंग्रजी भाषेचा कोश. ६७२
इंग्रजी भाषेचें अनुकरण. १५६
इंग्लंडचा इतिहास. ५.६६
इंग्लंडांतील वक्तृत्व. २८३
इतिहास. ६१
इतिहासाचा उपयोग. ६६
इतिहासाची प्रवृत्ति. १५८
इंदुप्रकाश. ६२३
इराणचा इतिहास. ६०१
उत्कृष्ट भाषांतर. २००
एडिंबरो रिव्ह्यू. ५५९
एलिफास. ६२९
कविता. २६
कवितेचें भाषांतर. १९०
कवित्व तर्कशास्त्राशीं विरुद्ध. ३६
कवींचे गुण. ४१
कादंबरी व नाटक. १६०
काव्यविवेचन. २५
काव्येतिहाससंग्रह. ४७७,९५५
काळा व गोरा. १०८१
किताबखाना. ९५६
कीर्तन. ३०८
कीर्तनाचा उपयोग. ३१६
केकावली. ८०१
केशवचंद्र सेन. ३३८
केसरी. ९.५५
कौमुदीमहोत्साह. ४३४
गद्यपद्यावली. ४४०
गर्व. २५१
गर्व दोषरूप. २५४
गर्व निर्दोष. २६०
गिबन. ५७३
ग्यारिक. ६६१
ग्रंथांवर टीका. ३७९
ग्रहगति आणि संसारकृत्यें यांचा संबंध. २३९

ग्रांट डफ. ६१०
ग्रीसचा इतिहास. ५७१
ग्रीस देशांतील वक्तृत्व. २७७
घाशीराम कोतवाल. ९७
चित्रकला. २९०
चित्रशाळा. ९५६
जमाखर्चाची पद्धति. ४७४
जानसन. ५५६,६५१
जानसन क्लब. ६८४
जानसनचा दुराग्रह. ७४१
जानसनचा स्वभाव. ७०४
जानसनचें कविचरित्र. ६९७
जानसनच्या चरित्रापासून बोध. ७१५
जुने पंडित. १०१४,१०३५
जुनियसचीं पत्रें. ६९६
जेसूईट. ६५८
जेम्स मिल्ल. ६१४
जोतीबा फुले. ४५८
ज्ञानेश्वरीपरिभाषा. ४९९
ज्ञानोदय. ९१५
ज्योतिष. २३३
ज्योतिषाची योग्यता व उपयोग. २४७
टीका करणाराचे गुण. ३८६
टेंपेस्ट नाटक. ४००
डिमास्थेनिस. २७८,३५०
तारा नाटक. ५२५
तुकाराम. ३१३
तुकाराम बोवांचे अभंगांतील निवडक वेंचे. ५१५
दक्षिणा प्रैज कमिटी. ३३०
दयानंदसरस्वती. ३३९,३७७,६१८
दयानंदसरस्वतीचें वक्तृत्व. ३४५
दिवटया बाजीरावाचें वक्तृत्व. ३०३
दीनबंधु. ९२०
नाटयकला. २९४
नाना फडणविसांचें शहाणपण. ९९४
निबंधमालेचा उद्देश. १३
निबंधसंग्रह. ९५९,१०५०,१०९०
न्यू इंग्लिश स्कूल. ९५४
पिट. ३५१
पुण्याचें वर्णन. ९७
पेशवाईतील माहिती. १०९०
पंढपुरच्या बडव्यांची व उत्पातांची दांडगाई व अनाचार. ३३७
प्रतापचंद्र बाबू. ३३८
प्रभू येशूच्या पवित्र लोकांचें कृत्य. १०७५
प्राच्य राष्ट्रांचा इतिहास. ५७८,५९७
प्रासादिक कविता. ३१
प्रेस आक्ट. ९३०
प्रेस आक्टाची वेसण. ५२५
प्रौढ भाषा. १५२
फाक्स. ३५१
फुल्लर साहेबांचा खटला. ६४६
बर्क. २८६,३५०
बाजीरावाचें वक्तृत्व. ३०१
बासवेल. ६८५
बूटमाहात्म्य. १०७८
बेकन. ३५३,५५५
ब्राह्मण. ९९०
ब्राह्मणांचें प्रस्थ. १०७०
भटांचें अध्ययन. १०५०,१०५८
भटांचें माहात्म्य. १०६६
भारतवर्षीय प्राचीन व ऐतिहासिक कोश. ४४३

भाषादूषण. १०८
भाषादूषणाचीं उदाहरणें. ११८
भाषादूषणाचीं कारणें. १०९
भाषादूषणाचे प्रकार. ११२
भाषापद्धति. १३५
भाषापद्धतीचें उत्तम स्वरूप. १३७
भाषापद्धतींची भिन्नता. १४६
भाषांतर. १८३
भाषांतरकाराचे गुण. १८६
भाषांतराचे प्रकार. १८७
भाषेचा प्रचार. १२४
भुर्तेखेतें. २१०
मराठा. ९५५
मराठी भाषा–सांप्रतची स्थिति. १
———सांप्रतचा ऱ्हास व कारणें. २
———उत्कर्षाचे खरे उपाय. ६
मराठी भाषेचा कोश व व्याकरण. ७४१
मराठी भाषेची पूर्वीची स्थिति. १३५
मराठी भाषेची सध्यांची स्थिति. १३६
मराठी भाषेंतील ग्रंथसंग्रह. १७७
मराठी वर्तमानपत्रें. १४,१६
महादेवशास्त्री कोल्हटकर. ३३६
महाराष्ट्र देशांतील वक्तृत्व. २९८
माणकेश्वर. ३१६
मासिक पुस्तकें. ९,१६
मिजास. ५६
मेकाले. ५६१
मोरोपंत. ७५८
मोरोपंत कवि आहे कीं नाहीं ८६३,८९३
मोरोपंतावर आक्षेप. ७६४
रसायनशास्त्र. ४२६
राजस्थानचा इतिहास. ६११
रामजोशीबुवा. ३१४
रासेलस. ६८१
रिकामपण. ५७
रोमचा इतिहास. ५७२
रोममधील वक्तृत्व. २८०
लेखनशुद्धि. १२२
लोककल्याणाच्या वल्गना. ३३७
लोकभ्रम. २१०
लोकहितवादी. ९५७
लोकहितवादीच्या ग्रंथांचें सामान्य स्वरूप. ९५९
वक्तृत्व. २७३
वक्तृत्व आणि लोकसत्तात्मक राज्य. २७६
वक्तृत्वाचा उपयोग. ३५४
वक्तृत्वाचे विभाग. २७४
वक्तृत्वाच्या अभिवृद्धीचें कारण. २९०
वक्तृत्वाच्या उत्कर्षाचीं साधनें. ३३३
वक्तृत्वोत्तेजक सभा. ३२४
वक्त्याचे गुण. ३४९
वर्णशुद्धि. १२६
वर्तमानपत्रांचें वाचन. १७९
वर्तमानपत्रें. ८
वाक्यशुद्धि. १२९
वाचन. १७१
वाचनाचा आणि विद्वत्तेचा मेळ. १८०
वाचनाचा प्रघात. १७९
वाचनापासून लाभ. १७२
विद्यार्थीबुद्धिवर्धिनी. ४७३
विद्वत्व आणि कवित्व. २५
विनोदात्मक लेख. १६१
विलसनसाहेब. ८१२, ८२३
विष्णु परशुराम रानडे. ३३६

वेदांचा काळ.	४११
वेदार्थयत्न.	४०६
व्याकरण.	१२३
शकुन.	२२०
शकुनावर विद्वानांचा विश्वास.	२३१
शकावली.	५१८
शब्दशुद्धि.	१२७
शिवाजीचें वक्तृत्व.	३००
शुद्ध भाषा.	१३७
श्रीहर्ष.	८५३
षड्रिपु.	२५२
संस्कृत विद्येची उपयुक्तता.	१०२८
सत्यदीपिका.	६३५
सत्यशोधक समाज.	४५७
सरळ व सोपी भाषा.	१४७
साधी भाषा.	१३८
सिसरो.	२८१,३५०
सुबोध भाषा.	१३९
सृष्टिवर्णन.	१६२
संपत्ति अनिष्टाचें मूळ.	५०
संपत्ति आणि धर्म.	५९
संपत्तीचा उपभोग.	४९
संपत्तीचा राष्ट्रांस उपयोग.	५३
संपत्तीपासून लाभ.	५२
स्वाभिमान.	२६९
हिंदुधर्म.	१०४८
हिंदु लोकांचा इतिहास.	६०६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १३९९
संग्रह शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0001399



मुक्तामाला.

हें मोरोपंतांचें **संस्कृत काव्य** निबंधमालेंत कै० **विष्णुशास्त्री** यांनीं **सार्थ** छापून सिद्ध केलें होतें, तेंच साधारण वाचणारांनाहि चांगलें समजावें म्हणून ह्या नव्या आवृत्तींत श्लोकांचा अन्वय, **कठिण शब्द** व **भावार्थ** हे प्रत्येक श्लोकाखालीं दिले आहेत. किंमत ०४.

पद्यरत्नावली.

कै० **कृष्णशास्त्री चिपळूणकर** यांची **कवित्वशक्ति सर्वमान्य** होती. यांनीं वेळोवेळीं पुष्कळ कविता केल्या; परंतु त्यांतले त्यांत त्यांनीं **कालिदासाचें मेघदूत काव्य** मराठी साकीछंदांत उरलेलें फारच **अप्रतिम** आहे. वरील पुस्तकांत शास्त्रीबोवांच्या सर्व निवडक कविता दिल्या असून त्यांपैकीं कांहीं कांहीं तर फारच **बहारीच्या** आहेत. प्रत्येक कवितेंतील **कठिण शब्दांचे** अर्थ त्यांचे खालीं दिलेले असून शेवटीं **कठिण शब्दांचा कोशहि** जोडलेला आहे. किंमत ०८.

साक्रेटिस.

ह्या महात्म्याचें चरित्रहि कै० **थोरले चिपळूणकर यांनींच** लिहिलेलें असून त्याची ही ११ **वी आवृत्ति** आहे. यावरून तें किती लोकप्रिय आहे हें कळून येईल. किंमत ०४.

अनेकविद्या-मूलतत्त्व-संग्रह.

हें पुस्तक कै० **कृष्णशास्त्री चिपळूणकर** यांनीं तयार केलें असून यांत **शास्त्रीबोवांनीं** जे **शास्त्रीय विषय** पाश्चात्त्य देशांत **पूर्णतेस** गेलेले आहेत, **ते निवडून** मराठींत इतके **सुलभ** व **चटकदार** रीतीनें लिहिले आहेत कीं, साधारण मनुष्यासहि ते कळण्यास अडचण पडत नाहीं. **यंत्रशास्त्र, रसायनशास्त्र, दर्शनानुशासनशास्त्र, ज्योतिष, प्राणिधर्मविषयकशास्त्र; शारीरशास्त्र,** वगैरेसारखे विषय **बिकट** असून **शास्त्रीबोवांनीं** आपल्या **भाषाकौशल्यानें फारच सुलभ** करून सोडले आहेत. शिवाय वरील विषय स्पष्ट कळावे म्हणून प्रत्येक **विषयासंबंधीं आकृति** पुस्तकाचे शेवटीं जोडल्या आहेत. **पुस्तकाची नवीन आवृत्ति** कै० प्रि. **महादेव शिवराम गोळे** यांनीं तपासून दुरुस्त केली आहे. पुस्तकाचीं पानें आकृतींसह **डेमी अष्टपत्री ग्लेज व जाड** कागदाचीं ४०० वर असून **बाइंडिंग मजबूत** आहे. किं. १॥ रु. ट. ह. ०२,

वाङ्मय-विषयक निबंध.

हे **निबंध** कै० **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांनीं वेळोवेळीं निबंधमालेंत लिहिले आहेत. शास्त्रीबोवांची **भाषा** किती **शुद्ध**, किती **जोरदार** व किती **चटकदार** असते, व मुलांना शाळांतून वाचनाला त्यांचे **निबंध** किती उपयुक्त व **प्रगल्भविचारभरित** आहेत, हें आतां नव्यानें सांगण्याची जरुरी नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत विद्यार्थ्यांस वाचनास योग्य असेच सात **निबंध** छापलेले आहेत. **१ भाषादूषण २ लेखनशुद्धि, ३ भाषापद्धति, ४ वाचन, ५ भाषांतर, ६ विद्वत्व** व **कवित्व** आणि **७ ग्रंथांवर टीका** हे निबंध विद्यार्थ्यांना वाचण्यास गैर आहेत असें कोण म्हणेल ? किंमत ०१२.

विनोद व महदाख्यायिका.

कै० **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांच्या निबंधमालेच्या अंकाच्या शेवटीं **विनोद, महदाख्यायिका** म्हणून एक सदर असे, ही गोष्ट वाचकांस माहीत आहेच. त्यांत **विनोदपर चुटके, महदाख्यायिका** म्हणजे थोर लोकांच्या गोष्टी येत असत; त्या सर्व **एकत्र** करून या पुस्तकांत छापून प्रसिद्ध केल्या आहेत. यांतील बहुतेक त्या तऱ्हेच्या इंग्रजी पुस्तकांतून घेतल्या असून कांहीं **कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांनीं वृद्ध **गृहस्थांच्या तोंडून** किंवा **हरदासांच्या तोंडून** ऐकलेल्या जशाच्या तशाच यांत घातल्या आहेत; तेव्हां या गोष्टींच्या चांगुलपणाबद्दल येथें निराळें लिहिण्याचें कारण नाहीं. किं. ०९.

सुभाषित.

वेळोवेळीं **कै० विष्णुशास्त्री** यांच्या **निबंधमालेंत प्रसिद्ध** झालेलीं **हीं सुभाषितें मूळ संस्कृत** श्लोकांसाहित **प्राकृत अर्थासह** वरील पुस्तकरूपानें निराळीं छापून काढलीं आहेत; हा ६१३ **सुभाषितांचा समुच्चय** मराठी सुवाच्य असून किं. ०१२ आहे.

रासेलस.

ह्या इंग्रजी ग्रंथाचें **मराठी भाषांतर** कै० **कृष्णशास्त्री** यांनीं १८७६ मध्यें केलें व तें इतकें अप्रतिम वठलें कीं, ह्या भाषांतराबद्दल त्यांची त्या वेळीं **अत्यंत वाहवा** झाली. आजपर्यंत याच्या चार आवृत्त्या खपून आतां **नवीन पांचवी काढली** आहे. तेव्हां पुस्तकाचे **चांगुलपणाबद्दल** निराळी **साक्ष** पटविण्याचें कारण नाहीं. किं० ०८.

पत्ता—**चित्रशाळा प्रेस**, पुणें सिटी, पेठ सदाशिव.